COMPILED

मु. रा. जयकर पारितोषिक ग्रंथ

मराठी व्युत्पत्तिकोश

[ऐतिहासिक व तौलनिक]

पुस्तक सं० १५/२
आगत नं० २८६८८
दिनांक ....
गुरुकुल पुस्तकालय कांगड़ी.

कृष्णाजी पांडुरंग कुलकर्णी, एम्. ए., बी. टी.

मराठीचे प्राध्यापक, एल्फिन्स्टन् कॉलेज, मुंबई १

केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ–सदन २, मुंबई २

मूल्य बावीस रुपये

सर्वाधिकार सुरक्षित

प्रथमावृत्ति : १९४६

प्रकाशक–केशव भिकाजी ढवळे, श्रीसमर्थ-सदन, गिरगांव, मुंबई
मुद्रक–जयराम दिपाजी देसाई, राष्ट्रवैभव प्रेस, गिरगांव, मुंबई

MARATHI
ETYMOLOGICAL DICTIONARY

[HISTORICAL & COMPARATIVE]

K. P. KULKARNI, M.A., B.T.
Professor of Marathi,
Elphinstone College, Bombay

KESHAV BHIKAJI DHAWALE, BOMBAY 2

Rs. 22/-

माझी पत्नी

सौ. सत्यभामा

माझी कन्या

सौ. कमळा (बनूताई)

ह्या मायलेकींच्या प्रेमळ स्मृतीस—

अनुक्रमणिका

पृष्ठे

आधारभूत ग्रंथांची यादी ९-१०

संक्षेपचिन्हें व त्यांचा विस्तार १११-२

प्रस्तावना—"शब्द: उद्गम व विकास" १७-१२०

कोश १-७८०

आधारभूत ग्रंथांची यादी

1. Bagchi P. C. : *Pre-Aryan and Pre-Dravidian in India (articles by S. Levi, J. Przyluski and J. Bloch translated).*
2. Ballard P. B. : *Thought and Language, 1934.*
3. Baly. : *Eur-Aryan Roots, Vol. I.*
4. Beames John : *A Comparative Grammar of the Modern Aryan Languages in India 1872-79.*
5. Bhandarkar R. G. : *Wilson Philological Lectures, 1914.*
6. Block Jules : *La Formation de la Langue Marathi (1920),–Marathi Translation by Dr. V. G. Paranjpe, 1941.*
7. Brugmann : *Comparative Grammar of Indo-Germanic Languages.*
8. Chatterji S. K. : *The Origin and Development of Bengali Language, 1926.*
9. Chakravarti P. C. : *The Linguistic Speculations of the Aryans, 1933.*
10. Eisenson Jon : *The Psychology of Speech, 1938.*
11. Fowler F. N. : *Modern English Usage, 1934.*
12. Goldberg I. : *The Wonder of Words, 1938.*
13. Gould and Richardson : *Tibetan Wordbook, 1944.*
14. Graff W. L. : *Language and Languages, 1932.*
15. Grierson G. A. :
    1. *Linguistic Survey of India, Voll. VI-VIII, 1903–28.*
    2. *Dictionary of Kashmiri Language.*
16. Jespersen Otto :
    1. *Language, Origin, Growth & Nature.*
    2. *Philosophy of Grammar.*
17. Katre S. M. :
    1. *Comparative Glossory of Konkani.*
    2. *Pk. Langs. & their Contribution to Indian Culture.*
    3. *Historical Linguistics in Indo-Aryan, 1944.*
18. Kittel, Rev. : *Kannad-English Dicttonnry, 1894.*
19. Molesworth J. T. : *Marathi-English Dictionary, 1857.*
20. Ogden C. K. & I. A. Richards : *Meaning of Meaning.*
21. Paget Richard, Sir : *Human Speech.*
22. Partridge Eric : *World of Words.*
23. Rajwade V. K. : *Words in Rigveda.*
24. Richardson : *Persian-Arabic-English Dictionary, 1938.*
25. Saksena Baburam : *The Evolution of Awadhi, 1936.*
26. Sayce A. H. : *Introduction to the Scicnce of Language.*
27. Skeat W. W. :
    (1) *Etymological English Dictionary.*
    (2) *Science of Etymology Vol. I, II.*
28. Turner R. L. : *Comparative Etymological Dictionary of the Nepali Language, 1931.*
29. Urban W. M. : *Language & Reality, 1939.*
30. Varma Siddheshwar : *Phonetic Observations of Indian Grammarians, 1929.*

31. VOSSLER KARL : *Spirit of Language in Civilizalion, 1932.*

32. WALDE ALOIE, J. POKORNI : *Vergleichendes Worter-buch der Indo-germanischen Sprachen, 1932.*

33. WILSON R. A. : *The Miraculous Birth of Language.*

34. YULE & BURNELL : *Hobson—Jobson, 1903.*

१ **अभ्यंकर, वासुदेवशास्त्री, महामहोपाध्याय :** व्याकरणमहाभाष्याचें मराठी भाषान्तर. १९३८

२ **करंदीकर, म. अ. :** मराटी शब्दसंग्रहमीमांसा (अप्रकाशित)

३ **कुलकर्णी, कृ. पां. :** मराठी भाषा-उद्गम व विकास, १९३३
राजवाडे धातुकोश, १९३८

४ **तुळपुळे, शं गो. :** यादवकालीन मराठी भाषेचा अभ्यास, १९४२

५ **दाते, य. रा.; कर्वे चिं. ग. :** महाराष्ट्र शब्दकोश भाग १-७. १९३२—

६ **नरेंद्रकविकृत** रुक्मिणीस्वयंवर : (वि. भि. कोलते संपादित)

७ **पाइअसद्दो महाण्णवो,** (कलकत्ता)

८ **प्राकृतप्रकाश :** (कॉवेल–संपादित)

९ **पटवर्धन, मा. त्र्यं. :** फार्सी-मराठी कोश

१० **वि. प. पंडितशास्त्री :** संस्कृत धातुकोश १८६२

११ **मराठी भाषेची पूर्वपीठिका :** (नागपूर प्रत)

१२ **रघुनाथपंडित :** नलदमयन्तीस्वयंवराख्यान (प्रियोळकर–संपादित)

१३ **राजवाडे, वै. का. :** निरुक्ताचें भाषान्तर

१४ **स्टीफन्स फादर :** खिस्तपुराण

१५ **हेमचंद्र :** १ देशीनाममाला. २ प्राकृत व्याकरण (वैद्य–संपादित).

१६ **ज्ञानेश्वरी :** (राजवाडे,–माडगांवकर–संपादित)

ग्रंथांत वापरलेले संक्षेप

अकाम. अर्वाचीन (कालीन) मराठी.
अक्रि. अकर्मक क्रियापद.
अप. अपभ्रंश.
अभाआ. (NIA) अर्वाचीन भारतीय आर्यभाषा.
अमा. अर्धमागधी.
अमृ. अमृतानुभव.
अर. अरबी.
अव. अनेकवचन.
अशोक. अशोकाचे शिलालेख.
आ. आसामी.
उक्रि. (क्रि). उभयविध क्रियापद.
उगी. उद्धवगीता (कोलते).
उह. उषाहरण (राजवाडे).
ऋपू. ऋद्धिपुरवर्णन (देशपांडे).
एव. एकवचन.
ऐटि. पारसनीस–ऐतिहासिक टिपणें.
ऐस्फुले. पारसनीस–ऐतिहासिक स्फुट लेख.
ओ (उ). ओरिया, उरिया भाषा.
कर्मणि. कर्मणिरूप.
का. काश्मिरी.
कान. कानडी.
कु. कुमाउनी.
क्रिवि. क्रियाविशेषण.
खरे. खरे–ऐतिहासिक पत्रव्यवहार (खंडानुक्रमें)
गरा. गद्यराज हयग्रीवाचार्य (नेने)
गा. गाथा.
गु. गुजराती.
ग्रा. ग्रामीण मराठी.
चसू. चक्रधरसिद्धान्तसूत्रें (नेने–भवाळकर)
चित्र. चित्रगुप्तबखर.
णिच् प्रयोजकरूप.
त. सार. चांगावाटेश्वराचा तत्त्वसार (दिवेकर).
ता. तामिळी.
ता. प. ताडून पहा.
तु. तुर्की.
तुगा. तुकाराम–गाथा.
ते. तेलुगु.
दृ. पा. दृष्टान्तपाठ (नेने–भवाळकर).
ध. उ. महदंबेचे धवळे, उत्तरार्ध (देशपांडे).
ध. पू. महदंबेचे धवळे, पूर्वार्ध (देशपांडे).
ना. नाम.
नाधा. नामधातु.
नपुं. नपुंसकलिंग.
निष्ठा भूतकालवाचक कृदन्त.
ने. नेपाळी.
पपा. पश्चिम पहाडी भाषा.
पा. पाली.
पु. पुश्तु.
पुं. पुल्लिंग.
पेकाम. पेशवेकालीन मराठी (१७००-१८१८ इ. स.)
पेद. पेशवे दप्तर (निवडक कागद–खंडानुक्रमें).
पै. पैशाची पैशाची प्राकृत भाषा.
पं. तं. पंचतंत्र (भावे).
प्रा. प्राकृत.
प्रां. प्रांतिक मराठी
प्राभाआ (OIA) प्राचीन भारतीय आर्यभाषा.
फा. फारसी.
बकाम. बहामनी कालीन मराठी (१३५०–१६३० इ. स.).
बं. बंगाली.
भाइसंमं. भारत इतिहास संशोधक मंडळ इतिवृत्तें (वर्षानुक्रमें).
म. महाराष्ट्री प्राकृत भाषा.
मप्र. मराठी प्रत्यय.
मभाआ (MIA) मध्ययुगीन भारतीय आर्यभाषा.
मु. मुक्तेश्वर (पर्वानुक्रमें).
मो. मोरोपंत (आर्याभारताचा पर्वानुक्रमें उल्लेख)
याकाम. यादवकालीन मराठी (इ. स. ११००–१३५०)
रा. (राज.) राजवाडे— (मराठ्यांच्या इतिहासाचीं साधनें–खंडानुक्रमें).
रादा. रामदास दासबोध.

राम· रामदासी मनाचे श्लोक.

राज्ञा· राजवाडे ज्ञानेश्वरी.

लीच. लीलाचरित्र (नेने).

वह. वच्छहरण (पंगु).

वाड. वाड-संपादित पेशवेदप्तरांतील कागदपत्र (नामवारीनें).

वि. विशेषण.

विवे. विवेकसिंधु.

वैसं. वैदिक संस्कृत.

शिकाम· शिवकालीन मराठी (१६००-१७०० इ. स.).

शिकामप· शिवकालीन पत्रव्यवहार.

शिले. शिलालेख (वर्षासह).

शिशु. शिशुपालवध (भावे).

शौ. शारसैनी (प्राकृत भाषा).

सभा. सभासदबखर.

सक्रि. सकर्मक क्रियापद.

सर्व. सर्वनाम.

सा· साधित शब्द.

सं. संस्कृत.

सिं. सिंधी.

स्त्री· स्त्रीलिंग.

हिं. हिंदी.

ज्ञा. ज्ञानेश्वरी (माडगांवकर).

संस्कृत धातूच्या पुढील अंक गणाचा आहे.

√ धातुदर्शक चिन्ह.

< कोणत्या शब्दापासून सिद्धि होते ह्याचें दर्शक.

> पाठीमागील शब्दापासून सिद्धि झाली ह्याचें दर्शक.

As.	Anglo-Saxon
Av.	Avestan
Corn.	Cornish
D.	Doric
E. Eng.	English
Got.	Gothic
Gr.	Greek
H.G.	High German.
IE.	Indo-European
Ir.	Irish
Kent.	Kentish
Lat.	Latin
L.G.	Low German
Lith.	Lithunian
O.E.	Old English
O.P.	Old Persian
Russ.	Russian
Teu.	Teutonic
Urs. Aryan.	Pre-Vedic

शुद्धिपत्र—वृद्धिपत्र

पृ.	ओळ (पहिला अंक स्तंभाचा)	अशुद्ध	शुद्ध
२७	२–१७	—	किंवा कार
४०	१-१२	ध्वनिप्रतिकता प्रतिकें	ध्वनिप्रतीकता प्रतीकें
५५	२–१६	मिमांसा मिमांसक	मीमांसा मीमांसक
६३	फूटनोट	Beams	Beames
९४	२–९	म्वणून	म्हणून
९५	१–७	संखेच्या	संख्येच्या
कोश ४१	२-३४		फा. आलक = आश्रय हा शब्द अधिक वाचा.
९५	१–६	उडववूँ	उडाववूँ
१४४	२–१३	efigy	effigy
१४७	१–७	कर्पदिका	कर्पर्दिका
३३२	२–२६	मि, लो	म, लों
३७४	१–२४	स्ब	स्व
३९८	१–४	दृषत्	दृषद्
	१–२४	दग्थ	दग्ध
४०८	२–१९	र्पु	पुं
४३५	२–४	ऊष्ण	उष्ण
४३८	२–१९	नभ्	नभस्
४७८	१–२१	परिणाम	परिमाण
४८१	१–२९		फा.
६४५	२–३२	वधुः	वधूः
६४८	१–२	Divotee	Devotee

एवम् हि श्रूयते–बृहस्पतिरिन्द्राय दिव्यम् वर्षसहस्रम् प्रतिपदोक्तानां शब्दानां शब्दपारायणं प्रोवाच नान्तं जगाम । महाभाष्य.

शब्दस्य परिणामोऽयम् इत्याम्नायविदो विदुः । वाक्यपदीय १-१२१

ॐ भूयानसि महानसि

प्रस्तावना

शब्द : उद्गम आणि विकास

१ व्युत्पत्तिकोशाची कल्पना : आज मी मराठी भाषेंतील शब्दांचा ऐतिहासिक व तौलनिक व्युत्पत्तिकोश वाचकांच्या पुढें ठेवीत आहें. गेलीं सात आठ वर्षें ज्या विषयाचा सतत निदिध्यास केला तो विषय माझ्या मताप्रमाणें व मूळ योजिलेल्या कल्पनेप्रमाणें पूर्ण होऊन आज महाराष्ट्रांतील विद्वान् व भाषाभिमानी लोकांच्या पुढें ठेवतांना मला आनंद होत आहे व एक प्रकारचें कृतकृत्यतेचें समाधान वाटत आहे. तरी पण ज्या विषयाच्या प्रत्यक्ष अभ्यासांत गेलीं कांहीं वर्षें मोठ्या आनंदांत गेलीं, कित्येक उद्वेगाच्या प्रसंगीं ज्या विषयाच्या अध्ययनानें व चिंतनानें क्षणिक आपत्तींचा मला विसर पडला व मनोद्वेग नाहींसा झाला, तो विषय हातावेगळा दूर करतांना कृतकृत्यतेच्या समाधानाबरोबरच चिरपरिचिताच्या वियोगापासून होणारी मनाची अस्वस्थताहि मनाला खिन्न करते आहे. ह्या कार्यांत विघ्नेंहि पुष्कळ आलीं. अडथळेहि अपेक्षेच्या बाहेर आले. ते केवळ स्नेह्यांनीं मला केलेल्या साहाय्यामुळेंच नाहींसे झाले. ग्रंथ पुरा झाला. त्याचें हस्तलिखितहि तयार झालें. छापण्यास सुरुवात केली. आणि लगेच महायुद्धाच्या परिस्थितीमुळें उत्पन्न होणाऱ्या अडचणी एकामागून एक येऊं लागल्या. आज टाईप आहे तर कंपॉझिटर नाहीं; उद्यां कंपॉझिटर आहे तर यंत्र दुरुस्त नाहीं; परवां कागद आहे तर फर्मा काढणारा यंत्रावरील माणूस नाहीं, अशी स्थिति हमेश होत असे. पुढें पुढें तर आम्ही सर्व कंटाळलों. कंपॉझिटर कंटाळले, छापखानेवाले कंटाळले, प्रत्यक्ष मीहि कंटाळलों. ह्या सर्व कामाला विटून जाण्यापर्यंत आम्हा सर्वांची अवस्था झाली. अशा आपत्तींमधून मार्ग काढला व काम पुरें झालें. म्हणूनच आज समाधान वाटत आहे.

हें मराठी व्युत्पत्तिकोशाचें काम मजकडे इ. स. १९३८ मध्यें आलें. त्यावर्षीं मुंबई येथें २३ व्या महाराष्ट्र साहित्य संमेलनाची बैठक झाली. संमेलनाचे स्वागताध्यक्ष मुंबईमधील प्रमुख व प्रसिद्ध नागरिक नेक नामदार न्यायमूर्ति **मुकुंदराव जयकर** हे होते. संमेलनाध्यक्ष **विनायकरावजी सावरकर** हे होते. त्या संमेलनप्रसंगीं मराठी भाषेसंबंधींच्या कांहीं चिरस्थायी व भरीव अशा प्रयत्नास उत्तेजन म्हणून श्रीमंत मुकुंदरावजी जयकर ह्यांनीं तितकेंच भरीव असें एक हजार रुपयांचें पारितोषिक जाहीर केलें व त्या संबंधींची योजना तयार करण्यास संमेलनचालकांस विनंती केली. लगेंच श्री. दत्तो अप्पाजी ऊर्फ दाजीसाहेब तुळजापूरकर ह्यांच्या पुरस्कारानें एक योजना सिद्ध करून श्री. मुकुंदरावजींच्या पुढें व तत्परत्वें संमेलनाच्या पुढें संमतीसाठीं मांडली. तीच ही मराठीच्या व्युत्पत्तिकोशाची योजना होय. ही योजना श्री. मुकुंदरावजींना व संमेलनांतील सर्व प्रतिनिधींना संमत होऊन जाहीर अधिवेशनांत हा व्युत्पत्तिकोश तयार करण्याचें काम सर्वानुमतें मजवर सोंपविण्यांत आलें. त्यानंतर प्राथमिक विचारांत व तयारींत कांहीं महिने गेले. श्री. जयकर हेहि मध्यवर्ती न्यायमंदिराचे न्यायमूर्ति म्हणून मोठ्या मानाच्या व जबाबदारीच्या कामांत मग्न होते तरी मराठीच्या ह्या कामाच्या संबंधीं त्यांची आस्था कमी नव्हती. त्यांनींच त्याचा आग्रह धरून त्याच्या प्राथमिक खर्चाची तरतूदहि केली. काम सुरू झालें. दीड दोन वर्षें सतत अव्याहत रीतीनें चाललेंहि. निम्में सिम्में तयारहि झालें. परंतु पुढें माझ्या अनारोग्यामुळें कांहीं महिने हें बंद ठेवावें लागलें. सुदैवानें मला शरीरस्वास्थ्य मिळाल्याबरोबर मी हें काम पुरें केलें व तसें इ. स. १९४२ च्या शेवटीं श्री. मुकुंदरावजी जयकर ह्यांना कळविलें. श्री. मुकुंदरावजींच्या मनाचा थोरपणा इतका कीं कोशाचें काम पुरें झाल्याचें त्यांच्या कानावर आल्याबरोबर त्यांनीं ताबडतोब क्षणाचाहि विलंब न करतां व कोशाचें हस्तलिखित पाहण्याचाहि आग्रह न धरतां परितोषिकाची रक्कम माझ्या हवालीं केली. इतका विश्वास त्यांनीं माझ्यावर टाकला. त्यांच्या विश्वासास पात्र होण्याची पराकाष्ठा ह्या प्रयत्नांत मीं केली. ती कितपत साध्य झाली हें पाहण्याचें काम अर्थात् आमच्या वाचकांचें व

श्री. जयकर यांचें आहे. मीं माझ्याकडून प्रयत्नांत कसूर होऊं दिली नाहीं इतकेंच प्रामाणिकपणानें फार झालें तर मी म्हणेन.

ह्या प्रकारचाच दुसरा एक प्रयत्न ह्याच्या पूर्वी मीं केला. धुळें येथील राजवाडे संशोधन मंदीर ह्या संस्थेच्या वतीनें धातुकोश हा १९३७ सालीं मी पुरा केला. राजवाडे ह्यांनीं मराठींतील जवळ जवळ तीस हजार धातूंच्या व्युत्पत्तीचा कच्चा खर्डा तयार केला; परंतु तो सर्व पुनः तपासून पारखून छापण्याच्या पूर्वींच दुर्दैवानें त्यांचा अंत झाला. त्या कामावर मी साधारणपणें दहा वर्षें खपून तो ग्रंथ आटोपशीर स्वरूपांत राजवाड्यांच्या निर्वचनसिद्धांतांना व विचारप्रणालींना कोठेंहि बाध येऊं न देतां तयार करून छापला. त्याला सविस्तर अशी एक प्रस्तावनाहि जोडली. त्या ग्रंथाच्या सिद्धतेंत मला तितकेंसें स्वातंत्र्य लाभलें नाहीं. खुद्द राजवाडे ह्यांच्या भाषाशास्त्रीय विचारसरणीनें व रा. सं. मंडळाच्या धोरणानें मी किंचित् कां होईना पण बांधला गेलों होतों. तरी पण तें काम मूळ आंखलेल्या योजनेप्रमाणें पार पडलें. अशा रीतीनें गेलीं वीसएक वर्षें ह्या नाहीं त्या स्वरूपानें हें मराठी शब्दांच्या निर्वचनाचें काम करण्याची संधि मला मिळत गेली, व तिचा फायदा मी आपल्या शरीराच्या व बुद्धीच्या मर्यादित शक्तीप्रमाणें करून घेऊन आज ह्या ग्रंथाच्या रूपानें मी माझा प्रयत्न भाषिक अभ्यासकांच्या पुढें ठेवीत आहें.

२ ह्या कोशाचें ऐतिहासिक स्वरूप : राजवाडे ह्यांचा मराठी धातुकोश हा मींच संपादिला. परंतु तो कोश आणि हा प्रस्तुतचा मराठी व्युत्पत्तिकोश ह्या दोहोंत फार फरक आहे. दोन्हीहि व्युत्पत्तिकोशच. परंतु एकाची म्हणजे राजवाडे ह्यांच्या कोशाची व्याप्ति फक्त मराठी धातूंपुरतीच मर्यादित आहे, तर दुसऱ्याची म्हणजे माझ्या कोशाची व्याप्ति अधिक विस्तृत अशी आहे. त्यांत अधिक मराठी शब्दांचा समावेश आहे. संस्कृत, फारसी, कानडी व इतर भाषांतील मराठींत आलेले व तत्सम व तद्भव ह्या दोन्ही स्वरूपांत आढळणारे असे दोन्ही प्रकारचे शब्द मीं ह्या कोशांत विचारांत घेतले आहेत. व ते विचारांत घेतांना त्यांचीं ऐतिहासिक व तौलनिक अशा दोन्ही दृष्टींनीं पाहाणी केली आहे. मराठी शब्दाचें संस्कृत मूळ, त्याच्या पुढील पाली, प्राकृत, देशी प्राकृत, अपभ्रंश ह्या भाषांतील त्या मूळ संस्कृत प्रतीकाचीं रूपें देणें हें त्याचें ऐतिहासिक स्वरूप होय. खुद्द मराठी शब्दाच्या पुनः यादवकाल, बहामनीकाल, शिवकाल, पेशवेकाल, अव्वल इंग्रजीकाल ह्या सर्व कालांतील रूपांचाहि ऐतिहासिक स्वरूपांत अंतर्भाव होतो. ह्या सर्व रूपांवरून कोशाचें ऐतिहासिक स्वरूप स्पष्ट होईल. ह्या सर्व स्वरूपांबाबत कालाचा संबंध येतो. वैदिक कालापासून तों थेट आजपर्यंत एखाद्या मराठी शब्दाचें स्वरूप कोणकोणत्या अवस्थांमधून आलें, त्या शब्दानें वैदिक कालापासून आजपर्यंत कोणकोणत्या स्वरूपांत प्रवास केला, प्रवासांत कोणकोणत्या ठिकाणीं मुक्काम केले हें ऐतिहासिक स्वरूपांवरून विशद होईल. हा त्यांच्या मुळाच्या स्वरूपाचा, उच्चाराचा, घटकावयवांचा, व अर्थांचा इतिहास आहे. आर्य शब्दांचा पांच सात हजार वर्षांचा, शिमी (फारसी–अरबी–तुर्की) शब्दांचा गेल्या सहाशें वर्षांचा, द्राविडी, कानडी, तेलगू शब्दांचा दीडहजार वर्षांचा, पाश्चात्य आर्यशब्दांचा गेल्या चारशें वर्षांचा हा इतिहास आहे. हें त्याचें ऐतिहासिक स्वरूप झालें.

३ तौलनिक स्वरूप : मराठी शब्दांच्या ऐतिहासिक स्वरूपाबरोबर त्यांचें इतर समकालीन भाषांतील शब्दांशीं संबद्ध असलेलें तौलनिक स्वरूपहि ह्या कोशांत दिलें आहे. पाश्चात्य देशांतील मुख्य मुख्य आर्योद्भव भाषांतील प्रतीकें मराठी तत्सम रूपांबरोबर दिलीं आहेत. ग्रीक, लॅटिन, लिथ्यूनियन, स्लाव्ह, गॉथिक, जर्मन, अँग्लोसॅक्सन इत्यादि भाषांतील स्वरूपें संस्कृत रूपांबरोबर दिलीं आहेत. जेथें त्याच शब्दाचीं अशीं रूपें उपलब्ध होऊं शकलीं नाहींत तेथें त्या शब्दांतील धातूपासून निघालेले व त्याशीं संबद्ध असलेले इतर शब्द दिले आहेत. हेतु हा कीं त्या शब्दांतील मुख्य वर्ण त्या त्या भाषेंत कोणकोणत्या अवस्थेंत सांपडतात, त्याची वर्णप्रक्रिया त्या त्या आर्य–युरोपीय भाषांत कशी झाली आहे ही गोष्ट तेव्हांच विशद व्हावी. तत्सम शब्दांच्या बाबतींत हीं जशीं आर्य-युरोपीय भाषांतील त्या शब्दांचीं किंवा त्याशीं अगदीं जवळचीं संलग्न असलेल्या शब्दांचीं रूपें दिलीं आहेत, तशींच कांहीं तत्सम व बऱ्याच तद्भव शब्दांच्या बाबतींत हिंदुस्थानांतील आर्यभारतीय भाषांतील त्याच शब्दांचीं रूपें दिलीं आहेत. पौर्वात्य सर्व आर्यभाषांतील रूपें संस्कृत रूपांजवळ दिलीं आहेत. ह्यांत झेंद अवेस्ता मधील रूपहि दिलें आहे. हिंदुस्थानांतील भाषांपैकीं बहुतेक सर्व आर्यभारतीय भाषा–काश्मिरी, ल्हांडा,

पंजाबी, हिंदी, बंगाली, आसामी, उरीया, सिंधी, गुजराती, नेपाळी, इत्यादि सर्व भाषांतील रूपें दिलीं आहेत. द्राविडी शब्दांच्या बाबतींत मुख्यतः कानडी व शक्य तेथें तामील, तेलगू, मल्याळी व तुळू ह्या भाषांतील त्या शब्दांचीं रूपें दिलीं आहेत. फारसींतून आलेल्या शब्दांच्या बाबतींत फारसी व अरबी ह्या भाषांतील रूपें दिलीं आहेत. इंग्रजी वगैरे पाश्चात्य शब्दांच्या बाबतींत लॅटिन, ग्रीक वगैरे भाषांतील शब्दांचीं रूपें दिलीं आहेत. एक मराठी शब्द घेतला आणि पाहिला म्हणजे त्याबरोबर पाश्चात्य व पौर्वात्य बहुतेक सर्व आर्योद्भव भाषांतील रूपें त्या शब्दाजवळ दिलेलीं आढळतात. एकाच शब्दाचीं पाश्चात्य व पौर्वात्य आर्योद्भव भाषांतील रूपें अशीं जवळ जवळ ठेविलेलीं पाहिलीं म्हणजे वर्णप्रक्रियेच्या दृष्टीनें त्यांची तुलना करणें सुलभ होतें. त्यांचें तौलनिक स्वरूप तेंव्हांच स्पष्ट होतें. ऐतिहासिक स्वरूपांवरून ज्याप्रमाणें एखादा मराठी शब्द निरनिराळ्या कालखंडांत कसा वावरला हें सिद्ध होतें तसें तौलनिक स्वरूपांवरून तोच आर्य मराठी शब्द निरनिराळ्या क्षेत्रखंडांत कसा वावरतो हें सिद्ध होतें. ऐतिहासिक व्युत्पादनानें त्या शब्दानें निरनिराळ्या कालांत केलेल्या प्रवासाचा आलेख काढतां येतो. तर तौलनिक व्युत्पादनानें त्या शब्दानें निरनिराळ्या देशांत केलेल्या प्रवासाचा आलेख काढतां येतो.

ऐतिहासिक व्युत्पादन व तौलनिक व्युत्पादन हे शास्त्रीय व्युत्पादनाचे दोन डोळे आहेत. खरी शास्त्रीय व्युत्पत्ति ह्या दोन डोळ्यांच्या साहाय्यानें स्पष्ट प्रतीत होते व निश्चितहि ठरते. आडव्या व उभ्या धाग्यांनीं तंतुपटाची वीण भक्कम होते. ताणा व बाणा हे दोन धागे पट भरभक्कम करतात. ऐतिहासिक स्वरूप हा त्या व्युत्पत्तिपटाचा ताणा आहे तर तौलनिक स्वरूप हा त्याच व्युत्पत्तिपटाचा बाणा आहे. ह्या दोन ताणाबाण्यांनीं व्युत्पत्तिरूप तंतुपटाला बळकटी येते. ह्या दोन बंधांनीं व्युत्पत्ति बांधली जाते. हे बंध जितके बळकट व निश्चित तितकी ती व्युत्पत्ति बळकट व निश्चित. अक्षांश व रेखांश ह्यांनीं जशी भूगोलावरील कोणत्याहि स्थानाची जागा निश्चित ठरवितां येतें तशी ऐतिहासिक व तौलनिक रूपनिर्देशांवरून भाषेंतील कोणत्याहि शब्दाची व्युत्पत्ति निश्चित करतां येते. त्या शब्दाच्या रूपनिर्देशांबरोबर त्याचा अर्थनिर्देश केला तर त्याचें व्युत्पादन संपूर्ण झालें असें म्हणतां येईल. त्याच्या जोडीला त्या त्या काळच्या व त्या त्या स्थानच्या वाङ्मयांतील उतारे जर आधारासाठीं दिले तर पुनः त्या शब्दाचें व्युत्पादन सांग व संपूर्ण झालें असें म्हणतां येईल. अशा सांग व संपूर्ण व्युत्पादनाबद्दल कांहीं संशयच राहात नाहीं. त्यांत अनुमानाला किंवा भ्रमसात् तर्काला कांहीं जागाच नसते. कल्पनेला अवसरच मिळत नाहीं. कल्पनेला वाव मिळाली कीं हटात् व्युत्पत्ति होते. कल्पनेवर आधारलेली व्युत्पत्ति पुष्कळ वेळां चमत्कार करून दाखविते. कित्येक वेळां आश्चर्यांनें थक्क करते. कांहीं वेळां ती खरीहि वाटते. सकृद्दर्शनीं ती नाकारण्याचें धैर्य होत नाहीं. परंतु ऐतिहासिक व तौलनिक प्रमाणांच्या अभावीं ती काल्पनिक व्युत्पत्ति फोल व हास्यास्पद ठरते. ही काल्पनिक व्युत्पत्ति निराळी व वर निर्दिष्ट केलेली ऐतिहासिक तौलनिक व्युत्पत्ति निराळी.

४ नवें कोश-शास्त्र : एकंदर कोशरचनेच्या विचारसरणीमध्यें अलीकडे बराच बदल झाला आहे. व्युत्पत्तिशास्त्राच्या विचारसरणींत व मांडणींत बदल झाले कीं कोशशास्त्रांत त्यांचें प्रतिबिंब उमटल्याखेरीज राहात नाहीं. वैदिक निघंटु ग्रंथ, यास्काचार्यांचा निरुक्त ग्रंथ, विश्व, हैम, अमर, देशीनाममाला, पाइअलच्छी वगैरे ग्रंथांतील कोशरचनेवरून त्या त्या कालीं कोशशास्त्रांत झालेले फरक दृष्टोत्पत्तीस येतात. एकार्थ, समानार्थ, नानार्थ, एकावयवी, द्व्यवयवी, अन्त्याक्षर वगैरे निरनिराळ्या तत्वांवर संस्कृत प्राकृत मधील बहुतेक शब्दकोश आधारलेले आहेत. मराठी सारख्या अर्वाचीन भारतीय भाषांचे कोश मात्र आधुनिक पाश्चात्य पद्धतीवर आधारून रचिले आहेत. भाषिक संशोधनाची जसजशी प्रगति होत आहे तसतसे पाश्चात्य कोशपद्धतींतहि बदल होत आहेत. व त्याप्रमाणें आपल्या इकडील अर्वाचीन भारतीय भाषांच्या कोशरचनेंतहि बदल होत आहेत. मोल्स्वर्थचा मराठी कोश, किटेलचा कानडी कोश, डॉ. ग्रिअर्सनचा काश्मिरी भाषेचा कोश, ब्लोकूच्या मराठी संबंधीं लिहिलेल्या ग्रंथांतील शब्दसूचि, प्रो. टर्नरचा नेपाळी भाषेचा कोश इत्यादि आधुनिक कोश हे तर ह्या शास्त्रांत आदर्शच आहेत. परंतु ह्यांमध्येंहि पहिल्या मोल्स्वर्थच्या कोशांत आणि प्रो. टर्नरच्या नेपाळी कोशांत रचनेच्या दृष्टीनें फार अंतर आहे व ह्या अंतरावरूनच दोन्ही कोशांच्या मध्यंतरच्या काळांत कोशशास्त्राच्या विचारसरणींत किती नवी भर पडली आहे, हें स्पष्ट होण्यासारखें आहे. पाश्चात्य देशांत तर ऑक्सफर्ड

नवा इंग्रजी कोश, पोकोर्नि, वाल्दे वगैरेंचे कोश हे नव्या कोश-शास्त्रावर आधारलेले कोश होत. असे प्रयत्न जेव्हां केव्हां आपल्या इकडील वर्तमान बोलींचे होतील तो सुदिनच समजला जाईल.

नव्या कोश-शास्त्राची उभारणी चांगल्या भक्कम सिद्धांतावर झाली आहे. 'शब्द घ्यावयाचा, त्याचीं वेगवेगळया काळांत वापरलेलीं रूपें द्यावयाचीं, त्याचीं उदाहरणें द्यावयाचीं, त्यांचे निरनिराळे अर्थ द्यावयाचे, अर्थांत व रूपांत झालेले बदल देऊन त्यांचीं कारणें सांगावयाचीं, त्याचें मूळ द्यावयाचें, त्याच्यापासून झालेले साधित शब्द द्यावयाचे, इतर भाषांतील त्याचीं रूपें द्यावयाचीं, त्या भाषांत जर त्या शब्दाच्या अर्थानें व रूपानें निराळेंच वळण घेतलें असेल तर तें स्पष्ट करून त्याचें कारण सांगायचें, व शेवटीं त्या शब्दाच्या अर्थाचा व रूपांचा कालाच्या दृष्टीनें क्रम सांगायचा, इतक्या गोष्टी ह्या नव्या कोशशास्त्रांत येतात'.* आपण एखादा मराठी शब्द घेतला तर त्याचें संस्कृत मूळ, पाली, प्राकृत, अपभ्रंश भाषांतील त्याचीं रूप व अर्थ, त्याचीं यादवकाल, बहामनीकाल, शिवकाल, पेशवेकाल, आंग्लकाल व अर्वाचीनकाल ह्या सर्व कालांतील रूपें व त्यांचा अर्थ व शक्य तेथें त्याचीं उदाहरणें, त्या मूळ मराठी शब्दाचे निरनिराळे अर्थ, त्याचे साधित शब्द, त्याचे वाक्यांत येणारे संबंध, त्याचे प्रत्यय वगैरे त्या शब्दाच्या सर्व बाबी आपणास दिल्या पाहिजेत. ह्याशिवाय मराठीच्या ज्या इतर आर्यभाषाभगिनी आहेत त्यांमधील त्या शब्दाचीं रूपेंहि दिलीं पाहिजेत. इतकें सर्व केलें तरच त्या शब्दाची व्युत्पत्ति पूर्ण झाली असें म्हणतां येईल. त्या शब्दांची हीच व्युत्पत्ति ऐतिहासिक व तौलनिक आहे असें म्हणतां येईल.

५ नवें व्युत्पत्तिशास्त्र : मराठी भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्तीबद्दल ही नवीन दिशा अलीकडे दिसूं लागली आहे. संस्कृत भाषेंतील शब्दांसंबंधींचा प्रयत्न रोथ–बोटलिंग ह्यांच्या वैदिक कोशापासून जो सुरू झाला तो आजपर्यंत चाललाच आहे. मॅक्समुल्लर, मेय्ये, ब्रुग्मान, बेली, पोकोर्नि, वाल्दे ह्या सर्व पाश्चात्य व्युत्पत्तिसूरींचे प्रयत्न उल्लेखनीयच आहेत. प्राचीन इण्डो आर्यन (OIA) मधील प्रयत्नांनीं मध्य इण्डो आर्यन मधील (MIA) प्रयत्नांना चालना दिली व तोच प्रवाह अर्वाचीन नवीन इण्डो आर्यन (NIA) भाषांपर्यंत येऊन पोहोंचला. ह्या तिन्ही कालांतील भाषांसंबंधीं झालेल्या संशोधनाचा एकमेकांवर प्रकाश पडून ऐतिहासिक व तौलनिक व्युत्पादनाचें एक नियमबद्ध शास्त्रच निर्माण झालें. त्यांत वर्णप्रक्रिया, अर्थप्रक्रिया व प्रयोगप्रक्रिया ह्या तिन्ही उपांगशास्त्रांतील नियमांनीं बळकटी आली. हिंदुस्थानांतील प्रचलित भाषांसंबंधीं असे शास्त्रशुद्ध प्रयत्न सुरू झाले. बीम्स, भांडारकर ह्यांनीं सर्व हिंदुस्थानांतील औत्तरीय आर्यभाषांचें स्वरूप विशद केलें. हर्न्ले ह्यांनीं हिंदी भाषा विशद केली. डॉ. ग्रिअर्सननीं काश्मिरी भाषांतील शब्दसंपत्ति सोपस्कारानें मांडिली. ज्यूल्स ब्लोकनीं मराठी भाषेची व शब्दसमूहाची आमूलाग्र विचिकित्सा केली. सुनीतिकुमार चतर्जी ह्यांनीं बंगाली भाषेचा उद्गम व विकास सांगितला. डॉ. टर्नरनीं नेपाळी भाषेचा कोश सिद्ध केला. बाबूराम सक्सेना ह्यांनीं अवधी भाषेची उत्क्रांति दाखविली. हे सर्व ग्रंथ त्या त्या भाषेची व तत्परत्वें तिच्यांतील शब्दांची वर्ण–प्रत्यय–प्रयोग प्रक्रियांच्या दृष्टीनें केलेले विचिकित्साप्रयत्नच होत. केवळ मराठी भाषेसंबंधींचे मराठी भाषेंत लिहिलेले प्रयत्न म्हणजे दादोबा पांडुरंग, गोडबोले, गुंजीकर, जोशी, दामले, इत्यादि मंडळींचीं व्याकरणें, वि. का. राजवाडे ह्यांचें भाषाशास्त्रीय लिखाण, मोल्स्वर्थ व शब्दकोशमंडळ ह्यांचे कोश इत्यादि ग्रंथ होत. प्रस्तुत कोश तयार करतांना मीं ह्या सर्व ग्रंथांचा उपयोग केला आहे. ह्या उपरिनिर्दिष्ट ग्रंथांशिवाय आणखीहि कित्येक ग्रंथांचा मला उपयोग करावा लागला आहे. ह्या सर्वांचें ऋण मी मोठ्या विनम्र भावानें कबूल करतों. मूळ स्फूर्ति ज्यूल्स् ब्लोक् ह्यांच्या ग्रंथापासूनच मिळाली. त्यांच्या शब्दसूचीचाच आदर्श मी पुढें ठेविला व तो आत्मसात् केला. त्या मूळ स्फूर्तीला आणखी पुष्टि डॉ. टर्नर ह्यांच्या नेपाळी कोशानें दिली. तो कोशहि मीं आदर्श म्हणूनच पुढें ठेविला. वाल्दे, पोकोर्नी, ब्रुगमान्, बीम्स, भांडारकर, ब्लोक, टर्नर ह्यांच्या ग्रंथांत आढळून येणारी पद्धत स्वीकारून ती अधिक विस्तृत अशा स्वरूपांत मराठी भाषेंतील शब्दांना लावण्याचा प्रयत्न मीं ह्या माझ्या कोशांत केला आहे. पद्धतीच्या चांगुलपणाचें श्रेय अर्थात् त्या उपरिनिर्दिष्ट महनीय व्युत्पत्तिसूरींचें होय.

---

* **Dr. S. M. Katre:** *Historical Linguistics in Indo-Aryan,* p. 155.

१ मं/२ २८६८८

६ इण्डोयुरोपियन धातु : ह्या कोशांत शब्दाच्या मराठी रूपांबरोबर ज्या ज्या निरनिराळ्या कालखंडांतील व निरनिराळ्या भाषांतील रूपें दिलीं आहेत त्यांचा निर्देश वर केला आहे. त्या भाषांतील इण्डोयुरोपियन आद्य भाषेच्या निर्देशांकडे विशेष लक्ष देणें अवश्य आहे. इतर भाषांप्रमाणें ही इण्डोयुरोपियन भाषा प्रत्यक्ष बोलण्यांत किंवा लिहिण्यांत नव्हती. ही एक मानीव भाषा आहे. ही एका अर्थानें काल्पनिक–कल्पनेनें बसविलेली–अशी आहे. सर्व पाश्चात्य भाषांतील शब्दांचीं बीजें संशोधून काढलीं खरीं; परंतु ह्या शब्दबीजांचीं तरी बीजें कोणतीं व कसलीं असलीं पाहिजेत ह्या विषयीं जिज्ञासा उत्पन्न झाली. त्यांविषयीं संशोधन सुरू झालें. सर्व पाश्चात्य भाषांतील शब्दबीजें एकत्र घेऊन त्यांचें तौलनिक संशोधन करून मूळ इण्डोयुरोपियन शब्दबीजें कल्पनेनें ठरविलीं. म्हणूनच ह्या मूळ आद्य इण्डोयुरोपियन भाषेला संशोधकांनीं मानीव, काल्पनिक भाषा (Hypothetical language) असें म्हटलें आहे. ह्या कोशांत कांहीं कांहीं तत्सम शब्दांच्या बाबतींत मूळ संस्कृत रूपाच्यापूर्वी ह्या मूळ इंण्डोयुरोपियन भाषेंतील शब्दबीज दिलें आहे. ह्या रूपांचा काल अर्थात् संस्कृत भाषेंतील रूपांच्या कालापेक्षां प्राचीन असल्यामुळेंच तीं अगोदर प्रथम दिलीं आहेत.

मराठी कोशांत ह्या इण्डोयुरोपियन भाषेंतील रूपांचा उपयोग काय असा एखादे वेळेस प्रश्न निघेल. “मराठी कोशांत ह्यांना स्थान नसावें. संस्कृत रूपाच्या मागें जाण्याचें मराठी कोशकाराला कांहीं कारण नाहीं. संस्कृतच्या मागें जाणें म्हणजे एक प्रकारचा हटात् केलेला पाण्डित्यप्रकर्षच आहे.” ही पारंपरिक विचारसरणी आहे व हिला उत्तरहि स्पष्टच आहे. व्युत्पादन किंवा निर्वचन हें सत्यशोधन आहे. सत्य हें अमुक एका मर्यादेपर्यंतच शोधावें असें थोडेंच आहे? जेथपर्यंत मानवी बुद्धीची गति धांवेल तेथपर्यंत सत्यशोधन व तत्त्वशोधन हें होणारच. संस्कृतपर्यंत तरी मराठी शब्दांचें मूळ आपण शोधतोंच ना ? “संस्कृत भाषा हीच आद्य भाषा, हीच गीर्वाण–देवांची–भाषा आहे व हिच्या अगोदर दुसरी भाषा असणेंच शक्य नाहीं,” ही विचारसरणी जोंपर्यंत होती तोंपर्यंत संस्कृतभाषेंतील शब्दबीजें देणें हें योग्य होतें. परंतु संस्कृतभाषेच्या पूर्वी सुद्धां आर्य मानवपुंजांची भाषा असली पाहिजे हें मानणें उत्क्रांतिशास्त्राला धरून आहे. ही जी कोणती भाषा वेदपूर्वकालीं आर्य लोकांच्या बोलण्यांत होती तीच ही इंडोयुरोपियन भाषा मानिली गेली आहे. ह्या भाषेंतील बीजें प्रस्तुत कोशांत (IE) ह्या निर्देशानें दाखविलीं आहेत व तीं बेली, पोकोर्नि व वाल्दे ह्यांच्या सर्वमान्य कोशांवरून घेतलीं आहेत. हीं सर्व शब्दबीजें आहेत हें विसरून चालणार नाहीं. पोकोर्नि, वाल्दे ह्यांच्याप्रमाणें आपल्या इकडे वि. का. राजवाडे ह्यांनींहि, वेदपूर्वकालीन आर्य भाषेसंबंधीं संशोधन ‘संस्कृतभाषेचा उलगडा,’ ‘गुण व वृद्धि’ वगैरे निबंधांत केलें आहे. राजारामशास्त्री भागवत ह्यांनींहि आपल्या वि. फा. लेक्चर्समध्यें ह्या दिशेनें थोडासा प्रयत्न केला आहे. ह्या संशोधनांत कल्पनाशक्तीचा भाग बराच असला तरी हें संशोधन विद्वन्मान्य समजलें गेलें आहे.

७ व्युत्पत्तीचें स्वरूप : व्युत्पत्तीसंबंधीं नेहमीं चेष्टेनें म्हटलें जातें कीं ‘व्युत्पत्तीमध्यें व्यंजनेंच तेवढीं फक्त जमेला धरलीं जातात; स्वर तर अजीबाद जमेला धरले जात नाहींत, (‘In etymology vowels count for nothing and consonants for very little’). हें वचन व्हॉल्टेर यांचें आहे. वरवर पाहाणाऱ्याची व्युत्पत्तिसंबंधीं अशी समजूत होते ही गोष्ट खरी आहे. पूर्वीच्या काळांतील कांहीं विद्वानांचे व्युत्पत्तिविषयक प्रयत्न पाहिले म्हणजे तशी थोडीशी वस्तुस्थिति दिसते हीहि गोष्ट खरी. व्युत्पत्तीचा मोह मोठा जबरा आहे. कल्पनाशक्तीला अमूप मोकाट सोडण्याचा मोह व्युत्पत्तीच्या बाबत आवरतां आवरत नाहीं. अठराव्या शतकापर्यंत व्युत्पत्तिबाबत कांहीं निश्चित स्वरूपाचें असें ‘शास्त्र’ न ठरल्यामुळें ही अवस्था तेथपर्यंत आढळून येते. जेव्हांपासून व्युत्पत्तिशास्त्र म्हणून कांहीं निश्चित झालें तेव्हांपासून मात्र ही परिस्थिति पालटली. तो व्हॉल्टेरचा सिद्धांतहि मागें पडला. स्वर व व्यंजनें हीं दोन्हीं व्युत्पादनांत जमेंत धरण्यांत आणि तींहि प्रामुख्यानें जमेंत धरण्यांत येऊं लागलीं. शब्दाच्या व्युत्पादनांतील हे मुख्य घटकच होत. त्या दोहींपैकीं कोणा एकाला बाजूस सारून कसें चालेल? बाजूस सारून ती व्युत्पत्ति तरी शास्त्रास धरून होणार कशी ? शब्दाचे हे दोन्ही घटक आणि त्याचा अर्थ हे तीन तर त्या शब्दाच्या व्युत्पादनाचे तीन आधार होत. “सध्यांचें व्युत्पादन ही पूर्वीची कल्पनाशक्तीची क्रीडा राहिली

पुस्तकालय
[illegible]

नाहीं. तो आतां केवळ कल्पनेचा विलास राहिला नाहीं. तो केवळ चमत्काराचा सुखमय खेळ नव्हे. व्युत्पादन हें एक शास्त्र आहे. आणि इतर शास्त्रांप्रमाणें ह्याहि शास्त्रांत प्रयत्नसातत्याला फलश्रुति मिळतेच. ”†

प्रयत्नाला फळ मिळतेंच असें म्हटलें खरें, पण कांहीं वेळेला व्युत्पत्तीच्या पुढें चांगल्या चांगल्या व्युत्पादकांनाहि हात टेकावे लागतात. कितीहि प्रयत्न केला तरी एखाद्या शब्दाची व्युत्पत्ति लागत नाही. त्या शब्दाचें मूळ कांहीं हातास लागत नाहीं. मराठीमध्यें असे पुष्कळ शब्द आहेत कीं त्यांची व्युत्पत्ति बरोबर लागत नाहीं, व लागली तरी पटत नाहीं. अशी अशी व्युत्पत्ति **असावी** असें म्हणावें लागतें. प्रस्तुत कोशांतहि जेथें व्युत्पत्ति नीट लागली नाहीं तेथें मीं प्रांजलपणानें तसें कबूल केलें आहे. सर्व ज्ञानाचा मक्ता एकट्याजवळ कसा असणार? अशीं जीं दुर्गम स्थळें लागलीं तीं कोशांत प्रश्नचिह्नानें किंवा इतर रीतीनें निर्दिष्ट केलींच आहेत. कोणीहि पुढें समानधर्मा येईल आणि ह्या दुर्गम स्थळांचा थांग लावील. व्युत्पत्ति निश्चित अशी कांहीं ठिकाणीं आढळते तर ती संभवनीय अशी कांहीं ठिकाणीं आढळते. इतर कांहीं ठिकाणीं ती शक्य असते. अशक्यता, असंभवनीयता, शक्यता, संभवनीयता, निश्चितता ह्या व्युत्पत्तिशास्त्रांतील पायऱ्या आहेत. व्युत्पत्तीला जसजसा आधार कमी अधिक मिळेल तसतशी वरील अवस्थांपैकीं एखादी अवस्था त्या व्युत्पत्तिबाबत आढळते. व्युत्पत्तीला आधार म्हटले म्हणजे वर्णांच्या उच्चारांतील साम्यभेद, अर्थांतील साम्यभेद व त्याप्रमाणें त्यांचा प्रत्यक्ष वापर हे होत. उच्चारसाम्यभेद व अर्थसाम्यभेद ह्यांच्या आधारावर एखादी व्युत्पत्ति अशक्य किंवा शक्य, असंभवनीय किंवा निश्चित आहे हें सांगतां येतें. एक प्रसिद्ध व्युत्पत्तिशास्त्रज्ञ (Alois Walde) म्हणतो कीं “ प्रत्येक शब्द मुळांत स्पष्ट असतो. त्याचा अर्थ उघड असतो. धात्वर्थच त्याचा खरा स्पष्ट उघड अर्थ असतो. परंतु ही त्याची अर्थासंबंधीं असलेली पारदर्शकता कालाच्या ओघांत नाहींशी होते. तिच्यावर पुटेंच्या पुटें सांचतात. उच्चारांत व अर्थांत होणाऱ्या फरकांची हीं पुटें बनलेलीं असतात. कधीं कधीं तर मूळचा शब्द पार नाहींसा होतो. त्याचा मोठ्या प्रयत्नानें शोध लावावा लागतो. त्याच्या अवशेषाचा तलास करावा लागतो. कधीं तो लागतो तर कधीं तो लागत नाहीं. कधीं मधील धागे अनुमानानें जोडावे लागतात. इतकें करूनहि सिद्धांत बांधणें कठीण होतें. व जरी सिद्धांत बांधले तरी ते बरोबर असतीलच अशी खात्री देतां येत नाहीं. ” §

व्युत्पत्तीचा उपयोग : व्युत्पत्तीचा उपयोग काय? हें शास्त्र खरें परंतु ह्याचा व्यवहारांत किंवा ज्ञानसंचयांत किंवा संस्कृतिसंपादनांत उपयोग काय आहे असें कोणीहि विचारील. ह्याचें प्रयोजन कळल्याखेरीज कोणी मंद सुद्धां ह्या शास्त्राच्या अध्ययनास प्रवृत्त होणार नाहीं. ह्या शास्त्राचा व्यवहारांत तर उपयोग आहेच. व्यवहार हा भाषेवर अवलंबून आहे. म्हणजे भाषेंत वापरल्या जाणाऱ्या शब्दांच्या अर्थावर व परस्पर संबंधावर आहे हें उघड आहे. शब्दाचा अर्थ व परस्पर संबंध जितका चांगला समजेल तितका व्यवहार चांगला होईल. शब्दांचे घटक, त्यांचा उच्चार, त्यांचा व्यस्त व समस्त असा अर्थ, त्यांचा इतर शब्दांशीं असलेला संबंध, तो संबंध दाखविणारा शब्द व त्याचा अर्थ, थोडक्यांत म्हणजे वाक्यांतील शब्दांचा व्यस्त व समस्त उच्चार आणि त्यांचा व्यस्त व समस्त अर्थ ह्या बाबींचा उलघडा व्युत्पत्तिशास्त्रानें होतो. हा त्याचा व्यावहारिक उपयोग आहे. “ भाषा नुसती बोलण्यानें व्यवहार होतो हें खरें आहे. भाषा बोलण्याला व्युत्पत्तिज्ञानाची आवश्यकता आहेच असें नाही. निरक्षर माणसांना कोठें व्युत्पत्तीचें ज्ञान असतें? पण त्यांचा व्यवहार होतोच ना? ” अशी एक विचारसरणी आहे. परंतु हिला उत्तर उघड आहे. व्यवहार हा व्युत्पत्तिज्ञानाशिवाय होऊं शकला तरी तो व्यवहार चांगला, अप्रमादी, सजाणिवी होऊं नये असें थोडेंच आहे? तसा तो झाला तर चांगलेंच. तितकें त्याचें फल अधिकच. “ एकः शब्दः सम्यग् ज्ञातः सम्यक् प्रयुक्तः स्वर्गेलोके कामधुग् भवति ” अशी शब्दाच्या योग्य ज्ञानाची व उपयोगाची फलश्रुति पूर्वीच्या आचार्यांनीं सांगितली आहे.

ज्ञानप्राप्ति हा व्युत्पत्तिशास्त्राचा दुसरा उपयोग आहे. शब्दाचें घटक, त्या घटकांचा योग्य उच्चार, त्यांची योग्य जुळणी, त्यांचा अर्थ इत्यादि सर्व बाबींचा विचार व्युत्पत्ति-

---

† Otto Jespersen: *Language*, p. 305.

§ Karl Vossler: *Spirit of Language in Civilization*, p. 230.

शास्त्रांत येतो. ह्यानें वर्णांचा योग्य उच्चार, त्यांचीं उच्चारस्थानें, त्यांचें उच्चारांतील साम्यभेद, उच्चारांचे प्रकार हे उच्चारशास्त्राचे विषय व्युत्पत्तीमध्यें येतात. शब्दांचे उच्चार व अर्थ ह्या दोन्हींचा विचार व्युत्पत्तिशास्त्राला करावाच लागतो. तेव्हां दोन्हींचें ज्ञानानें बोलणाऱ्याच्या ज्ञानांत भर पडणारच. तेव्हढ्यानें त्याची व्युत्पन्नता वाढणारच. "शब्दाचा खरा अर्थ ठरविणें" हाच व्युत्पत्ति-शास्त्राचा प्रधान हेतु असल्याचें प्रसिद्ध व्युत्पत्तिशास्त्रज्ञ वाल्दे सांगतो. ('To determine the true signification of a word,'–Walde, *Lat. et. Worterb.* XI). आपल्या इकडील व्युत्पत्तिशास्त्रज्ञांचा हाच सिद्धांत आहे. अर्थ समजण्या-साठीं शब्दांचा उपयोग आहे. "तो अर्थ मी स्पष्ट करीत आहें. म्हणून मी शब्द वापरतों" असें पतंजलि आपल्या महाभाष्यांत म्हणतो–"अर्थगत्यर्थः शब्दप्रयोगः। अर्थं स प्रत्याययिष्यामीति शब्दः प्रयुज्यते (वार्तिक १५ पा. सू. ३-१-७). तन्त्रवार्त्तिककाराचें मत तर स्पष्टच आहे. "सर्वो हि शब्दोऽर्थप्रत्ययनार्थं प्रयुज्यते" (त. वा. मीमांसासूत्र १-३-८). शब्दाच्या अर्थाचें निर्वचन हें एक स्वतंत्र विद्यास्थान असल्याचें दुर्ग सांगतो (तस्मात् स्वतंत्रमेवेदं विद्यास्थानमर्थनिर्वचनम्). शब्दाच्या व्युत्पत्तीनें शब्दाचा अर्थ कळतो.

शब्दांच्या व्युत्पत्तीचें ज्ञान झाल्यानें त्याचें योग्य उच्चारण व योग्य अर्थप्रतीति होते हें त्या शब्दापुरतें जरी खरें असलें तरी त्याशिवाय त्या शब्दाच्या अर्थानें आपल्या इतर ज्ञानांतहि पुष्कळ भर पडते. प्राचीनकालच्या समाजाचा इतिहास आपणास शब्दांच्या व्युत्पत्तीवरून काढतां येतो. त्याकालीं एखाद्या समाजाच्या चालीरीति, धर्मसमजुती, त्याचे खाण्याचे जिन्नस, पांघरावयाचीं प्रावरणें, ल्यावयाचे अलंकार, त्याचे पाळीव पशुपक्षी, त्याचे करमणुकीचे खेळ, त्याचे उदीम व्यवहार, त्याचे दुसऱ्या परकी संस्कृतीच्या (लोकांशीं) झालेले हर्षामर्श ह्या सर्व गोष्टी कशा होत्या हें आपणांस त्या समाजाच्या भाषेंतील शब्दांच्या व्युत्पत्तीवरून जाणतां येतात. समाजाचें स्वरूप त्याच्या भाषेंत उमटलेलें असतें व तें आपणांस शब्दांच्या व्युत्पत्तीच्या साह्यानें अजमावितां येतें. एखाद्या राष्ट्राचा इतिहास समजण्यास तत्कालीन ऐतिहासिक लेख हे पहिले पुरावे होत. ऐतिहासिक लेख जेथें संपतात तेथें पुरावा शिलालेख, नाणीं व ताम्रपट हे होत. आणि जेथें शिलालेख नाणीं, ताम्रपट संपतात, जेथें त्यांची गति खुंटते तेथें पुरावा हुडकावयाचा झाला तर त्या राष्ट्रांतील भाषेंतील शब्द हेच होत. एखाद्या राष्ट्राचा इतिहास लिहावयाचा जर झाला तर त्याला अस्सल साधनें म्हटलीं म्हणजे तेथील भाषेंतील शब्द होत. हीं साधनें सर्व साधनांत प्राचीनतम साधनें होत. प्राचीन आर्य सोम काढीत व पीत, यज्ञ करीत, त्यांच्या गृहांतील मुख्य पुरुष सर्वांचें रक्षण करी, मुख्य स्त्री वस्तीस्थानाचें मोजमाप घेई, मुलगी गाईंची धार काढी, भाऊ पोषण करीत, बहिणी वांटे करीत वगैरे वगैरे त्यांच्या गृहव्यवस्थेची माहिती त्यांच्या सोम, यज्ञ, पिता, माता, दुहिता, भ्राता, भगिनी वगैरे शब्दांवरून कळते. कोणताहि जुना शब्द घेतला व त्याची व्युत्पत्ति पाहिली तर असें प्राचीन इतिहासज्ञान होतें.

व्युत्पत्तिशास्त्र व काव्य ह्या दोहाचा संबंध फार जवळचा व दाट आहे. शब्दांचा इतिहास–तो रूपाचा असो वा अर्थाचा असो–सांगणें म्हणजे वाङ्मयाचा इतिहास सांगणें होय. व्युत्पत्ति व काव्य किंवा साहित्य ह्या बहिणी बहिणी होत. व्युत्पत्तीच्या साह्यानें आपण शब्दांचीं जुनीं प्राचीन रूपें ठरवितों. त्यांचा माग काढीत मधील रूपें धुंडाळत मूळच्या रूपापर्यंत व अर्थापर्यंत मागें जातों. आपण हें करतों म्हणजे तरी काय करतों ? वाङ्मयाच्या इतिहासाचा माग काढीत आपण मागें वाङ्मयाच्या मुळाशीं नाहीं का जात ? हें करतांना आपणांस धाग्याधाग्यानें जावें लागतें. कधीं पूर्ण आधार आपणांस मिळत नाहीं, इथला एक धागा, तिथला दुसरा धागा अशी जोड आपणास करावी लागते. व असें केल्यानें एखादे वेळेस त्याला कंथेचें रूप येण्याचा संभव असतो. शंभर टक्के आपलें बरोबरच येईल असें नाहीं. ह्या प्रक्रियेंत अनुमानाचा भाग थोडा फार असतोच. म्हणून क्वचित् प्रसंगीं व्युत्पत्तिप्रमादहि होणें शक्य आहे. व्युत्पत्तिशास्त्रज्ञानें हें विसरतां कामा नये कीं भाषेचा स्वभाव मुळांत काव्यमय आहे. साहित्य शास्त्रज्ञानेंहि पण हें विसरतां कामा नये कीं काव्याचा किंवा साहित्याचा स्वभाव मुळांत भाषामय–शब्दमय आहे. काव्याचा किंवा साहित्याचा विचार निरनिराळ्या दृष्टीनें करतात. त्यांत राष्ट्र, समाज, मानव, मानस वगैरे सर्व शास्त्रांचा समावेश होतो. ह्या सर्वांचा साहित्यद्वारां व्युत्पत्तिशास्त्राशीं संबध येतो. म्हणूनच ह्या शास्त्राची व्याप्ति मोठी आहे. $ शब्दाच्या अर्थज्ञानानें

$ **Karl Vossler**–*The Spirit of Language in Civilization*–p. 230–.

ज्ञानप्राप्ति होते. तेव्हां व्युत्पत्तिशास्त्राचा दुसरा उपयोग म्हणजे ज्ञानप्राप्ति.

व्युत्पत्तिशास्त्राचा सर्वांत अधिक उपयोग म्हटला म्हणजे संस्कृतिज्ञान हा होय. व्यवहार व ज्ञानप्राप्ति ह्या दोन्ही उपयोगांपेक्षां हा श्रेष्ठ आहे. शब्दाच्या व्युत्पत्तीनें शब्दाच्या निरनिराळ्या अर्थांवर प्रकाश पडतो. शब्दाचे निरनिराळे अर्थ कळल्यानें अर्थांत बदल कसे झाले, कोणत्या काळांत झाले व ते होण्यास कारणें काय झालीं ह्या बाबी निश्चित करतां येतात. शब्द हे भाषेचे घटक असल्यामुळें व भाषा ही समाजाचा आरसा असल्यामुळें सामाजिक व्यवहाराचें प्रतिबिंब शब्दांत उमटलें जातें. सामाजिक जीवन जाणण्याचा एक अचूक मार्ग म्हटला म्हणजे त्या समाजाच्या भाषेचें व्युत्पत्तिज्ञान असणें हा होय. फार प्राचीन समाजाच्या व त्याच्या फार प्राचीन भाषेच्या बाबतींत तर हें विशेषच प्रत्ययास येतें. संस्कृत भाषेसंबंधीं झालेल्या व्युत्पत्तिज्ञानानें वेदपूर्वकालीन, वैदिक, महाभारतीय वगैरे कालांतील आर्यसमाजाचा जीवनेतिहास स्पष्ट रीतीनें मांडतां आला आहे. व्युत्पत्तिशास्त्राच्या जोरावर पांच दहा हजार वर्षांपूर्वींचें आर्यांचें सामाजिक जीवन आपण जाणूं शकतों, सामाजिक संस्कृति आपण अजमावूं शकतों. संस्कृतिज्ञान हाच व्युत्पत्तिशास्त्राचा प्रधान उपयोग होय.

व्युत्पत्तिशास्त्रानें संस्कृतीचें ज्ञान होतें व संस्कृति अंगीं बाणते असा दुहेरी त्याचा उपयोग आहे. समाजाच्या प्राचीन संस्कृतीचें ज्ञान व्युत्पत्तिशास्त्रानें होतें. हें त्याचें विषयनिष्ठ मूल्य झालें. एका विषयाचें ज्ञान झालें. त्या व्यक्तीला हें व्युत्पत्तिविषयाचें ज्ञान झालें. तिच्या अंगीं ज्ञानानें एक प्रकारची संस्कृति बाणते. ज्याला व्युत्पत्तिज्ञान आहे तो मनुष्य विद्वान् समजला जातो, संस्कृतिसंपन्न समजला जातो. त्याची चार चौघांत मानमान्यता होते. गांवढळ मनुष्यापेक्षां निराळा तो समजला जातो. हा गुण जरी पोषाखी समजला गेला असला तरी तो सांस्कृतिक गुण (Cultural virtue) आहे ह्यांत शंका नाहीं. व्युत्पत्तिशास्त्राचें हें व्यक्तिनिष्ठ मूल्य आहे.

९ व्युत्पत्तिशास्त्रावर आक्षेप : व्युत्पत्तिशास्त्राचें हें व्यक्तिनिष्ठ मूल्य असल्यामुळें ह्याच्याबरोबर कांहीं विद्वानांच्या मतें ह्यांत एक दोष उतरला आहे. व्युत्पत्तिरक्षणासाठीं भाषेंतील कांहीं शब्दांच्या बाबतींत अनुच्चारित वर्ण लिहावे लागतात. उपयुक्ततेच्या दृष्टीनें ह्या अनुच्चारित वर्णांना मूल्य नाहीं; व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीनें व तत्परत्वें संस्कृतिप्रदर्शनाच्या दृष्टीनें त्यांना मूल्य आहे. उपयुक्ततेच्या दृष्टीनें शून्य मूल्य असलेले वर्ण लिहिण्याची आवश्यकता काय असा साहजीक कोणीहि प्रश्न विचारील. फ्रेंच भाषेंत असे अनुच्चारित वर्ण पुष्कळ शब्दांच्या बाबतींत लिहावे लागतात. इंग्रजींतहि तीच अवस्था आहे. Laugh, neigh, neighbour, walk, plough, borrow, through, lieutenent, colonel, psychology, feign, pseudo, इत्यादि शब्दांत कांहीं वर्ण अनुच्चारित आहेत; परंतु ते लिहावे लागतात. आणि ते केवळ संस्कृतीच्या दृष्टीनें किंवा व्युत्पत्तीच्या दृष्टीनें लिहावे लागतात. मराठी वगैरे आधुनिक भारतीय बोलींत सुद्धा असे अनुच्चारित वर्ण आपणास लिहावे लागतात. मराठींतील अनुच्चारित अनुस्वार हा वर्ण ह्याच प्रकारचा आहे. गुजराती भाषेंतील कोमल अनुस्वार किंवा अनुनासिक अनुच्चारित असला तरी लिहिण्यांत तो दाखवावा लागतो. वर्णमाला जोंपर्यंत ध्वनिशास्त्राबरहुकूम नसते तोंपर्यंत हे असे अनुच्चारित वर्ण लिहिण्यांत येणारच. ह्या अनुच्चारित वर्णांचा उपयोग कांहीं असला तर तो व्युत्पत्तिशास्त्राच्या दृष्टीनेंच आहे. उपयुक्ततावादी विद्वान् ह्याला लेखनांतील मोठी अडगळ समजतात. मोठमोठ्या लेखकांना ही एक लेखनांतील मोठी आपत्तिच वाटते. ह्या मुळेंच जॉर्ज बर्नार्ड शॉ ह्या नाटककारानें ह्याला लेखनांतील भयंकर अत्याचार असें म्हटलें आहे. ह्यानें लेखकाच्या वेळेचा व श्रमाचा किती अपव्यय होतो, ह्याचें त्यानें भडक चित्र रंगविलें आहे. हा अत्याचार थांबविण्याचा उपायहि त्यानें सुचविला. अनुपयुक्त व्याकरण व अनुच्चारित वर्ण लेखन ह्या दोहोंना फाटा दिला पाहिजे असा तो उपाय होय. केवळ व्युत्पत्तीसाठीं अनुच्चारित वर्ण लिहिणें व वैयाकरणींच्या समाधानासाठीं अनुपयुक्त व्याकरण पाळणें हा सामान्य लेखकांवर केवळ जुलूम आहे. व्युत्पत्तिशास्त्रज्ञानें कोशांतून त्या शब्दांची व्युत्पत्ति पाहावी, वैयाकरणीनें व्याकरणग्रंथ पाहावे. त्यांच्या समाधानासाठीं इतरे लेखकजनांस विनाकारण त्रास कां अशी ही विचारसरणी आहे. ‡

ह्या विचारसरणींत सत्य आहे. उच्चारणाला अनुसरणारी वर्णमाला पाहिजे ही गोष्ट खरी आहे. ही असलीच

---

‡ George Bernard Shaw : Preface to "*The Mireculous Birth of Language*" by R. A. Wilson.

वर्णमाला शुद्ध शास्त्रीय स्वरूपाची असते. अनुच्चारित वर्ण लेखनांत वापरणें हें जरी शास्त्र, इतिहास व रूढी ह्यांना धरून असलें तरी सामान्य लोकांच्या दृष्टीनें त्यांची उपयुक्तता नाहीं ही गोष्ट मान्य केली पाहिजे. त्यांचा जर लेखनांत अडथळा होत असला तर तो दूर केला पाहिजे. परंतु अनुच्चारित वर्ण लेखनांत न लिहिणाऱ्या मंडळींनीं मात्र त्यांचें लेखन भाषिक संस्कृतीच्या दृष्टीनें किंचित् का होईना जर हीन ठरल्याचा कोणी व्युत्पत्तिविशारदानें आरोप केला तर तो स्वीकारण्याची तयारी दाखविली पाहिजे.

१० आपल्याकडील व्युत्पत्तिपरंपरा: व्युत्पत्ति म्हणजे काय, अलीकडच्या काळांत तें शास्त्र कसें बनलें आहे, व्युत्पत्तिज्ञानाचा उपयोग काय ह्या गोष्टी येथवर आपण पाहिल्या. आपल्याकडे व्युत्पत्तिशास्त्राची परंपरा फार प्राचीन आहे. वैदिक काळापर्यंत ती परंपरा मागें जाते. प्रत्येक ब्राह्मण व आरण्यक ग्रंथांत निर्वचनाचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. तशींच पुढील सौत्र व औपनिषदीय वाङ्मयांतहि त्याचीं उदाहरणें कांहीं कमी आहेत असें नाहीं. यज्ञयागादिकांचीं सत्रें चालू असतांना होमासंबंधीं सर्व ऋत्विक्कर्म समाप्त झाल्यानंतर सर्व ऋत्विक् शद्बांचीं निर्वचनें शोधून काढण्यांत आपल्या बुद्धीची कसरत करतांना पाहिलें म्हणजे आश्चर्य वाटतें. 'अर्क' शद्बाचें निर्वचन काय तर "अर्चते वै मे कमभूदिति तदेव अर्कस्य अर्कत्वम्"; आङ्गिरस शद्बाचें निर्वचन काय तर "अङ्गानाम् हि रसः, प्राणो वा अङ्गानाम् रसः तस्मात्." बृहस्पतीची व्युत्पत्ति अशी– "वाग्वै बृहती तस्या एषः पतिस्तस्मादु बृहस्पति". सामन्‌ची व्युत्पत्ति अशी– "सामन् वाग्वै सामैष सा चामश्चेति तत्साम्नः सामत्वम्."§ 'विद्युत्'ची व्युत्पत्ति "विदानात् विद्यत्येनं पाप्मनः' अशी व 'क्षत्र'ची व्युत्पत्ति "क्षत्रं प्राणोहि वै क्षत्रं – त्रायते हैनं प्राणः, क्षणितोः" अशी बृहदारण्यकोपनिषदांत दिली आहे. इन्द्र शद्बाची व्युत्पत्ति "इन्द्रः तम् इदंद्रंसन्तम् इन्द्र इत्याचक्षते" अशी ऐतरेयोपनिषदांत दिली आहे. निर्वचनाचीं असलीं आणखी उदाहरणें पुष्कळ आढळतात. ही झाली वैदिक कालाची गोष्ट. ह्याच्या पुढच्या काळांत निरुक्तशास्त्र चांगलेंच जोपासलें गेलें. त्याला पद्धतशीर शास्त्राची पदवी प्राप्त करून देण्यांत आली. आचार्य यास्क ह्याला आद्य निरुक्तकार म्हणून आपण मान देतों. ह्यानें निरुक्तीस शास्त्रीय वळण लाविलें. संस्कृतनिरुक्तीच्या बाबत पाणिनि, पतंजलि, कात्यायन व प्राकृतनिरुक्ताच्या बाबत चंड, वररुचि, कच्चायन, हेमचंद्र ही नांवें उल्लेखनीय होत. वेदभाष्यकार सायणाचार्य व निरुक्तभाष्यकार दुर्गाचार्य ह्यांचेंहि व्युत्पत्तिविषयक प्रयत्न त्यांच्या भाष्यांत पुष्कळ आढळतात. आपल्या इकडील निर्वचनशास्त्राचीं मुळें इतकीं प्राचीन असलीं तरी एकंदर निर्वचनशास्त्राचें स्वरूप पारंपरिक होतें. तें प्राधान्यानें "आख्यातजानि सर्वाणि नामानि" ह्या सिद्धांतावर आधारलेलें होतें. ह्या निर्वचनसिद्धांताच्या प्रतिपादनांत पूर्वपक्ष उत्तरपक्ष कितीहि असले तरी मुख्य आधार तोच होता. एकदां हा सिद्धांत मुख्य ठरल्यानंतर आपल्या बुद्धीचें सर्व वैभव शब्दाचें मूळ धातुबीज शोधून काढण्यांतच दाखविण्याचा मोह प्राचीन नैरुक्तिकांना झाला असल्यास नवल नाहीं. शिवाय संस्कृत भाषा ही गीर्वाण भाषा आहे अशी धार्मिक समजूत असल्यामुळें तिच्या जीवनांत कांहीं कालखंड आहेत, किंवा तिच्यांत विशेष रूपांतर, अपभ्रंश होणें शक्य आहे, किंवा तिच्या भोंवतीं कांहीं इतर भाषा असणें शक्य आहे वगैरे गोष्टी त्यांच्या विचारांत फारशा येत नसत. ह्यामुळें प्राचीन पारंपरिक व्युत्पादनांत ऐतिहासिक व तौलनिक दृष्टि येत नसे. उलट बऱ्याच वेळां हटात् निर्वचन होई, किंवा कधीं कधीं हास्यकारक लोकव्युत्पत्ति किंवा जानपदव्युत्पत्ति (folk-etymology) दिली जाई. एका संस्कृत शब्दांच्या बाबत मात्र त्यांचें एकंदर व्युत्पादन बरेंच मौलिक असे. शब्दांच्या वर्णप्रक्रियेचे व अर्थप्रक्रियेचे उत्सर्ग त्यांनीं बांधले. त्या उत्सर्गांच्या अपवादांचीहि नोंद केली व अशा रीतीनें व्युत्पादनाचें शास्त्र सिद्ध केलें.

११ व्युत्पत्तिशास्त्रांतील उत्सर्ग: पाश्चात्य व्युत्पत्तिशास्त्रांतील वर्णप्रक्रियेचे उत्सर्ग बांधण्याची जी पद्धत मान्य झालेली आहे तीच पद्धत आपल्या इकडील व्युत्पत्तिशास्त्रांत होती. साधारणपणें त्या पद्धतीचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहे. एकाच प्रकारच्या वर्णप्रक्रियेचीं पुष्कळ उदाहरणें सांपडलीं म्हणजे त्यांवरून उत्सर्ग तयार होतो. थोड्या थोड्या उदाहरणांनीं वर्णप्रक्रियेचा उत्सर्ग मांडणें हें अत्यंत धोक्याचें आहे. पुष्कळ उदाहरणें शोधून काढिलीं पाहिजेत. तीं तपासलीं पाहिजेत. त्या सर्वांमधून कोणती प्रक्रिया अनुस्यूत रीतीनें वाहात जात आहे हें पाहिलें पाहिजे.

---

§ बृहदारण्यकः १ –३ –८, २०, २२.

त्या प्रक्रियेला कांहीं उदाहरणांनीं बाधा येते कीं काय, येत असल्यास तिचें स्वरूप काय आहे, प्रक्रिया जी होते ती सापेक्ष आहे कां निरपेक्ष आहे, सापेक्ष असेल तर तिला अपेक्षा कशाची आहे, निरपेक्ष असेल तर ही कोणत्या परिस्थितींत निरपेक्ष आहे, एखाद्या भाषेंत जर एखादा उत्सर्ग ठरला तर तोच उत्सर्ग आणखी त्याच वंशांतील कोणकोणत्या भाषांत पाळला गेलेला आहे व तसा तो पाळला गेला असेल तर कोणत्या काळांत पाळला गेला, वर्णांच्या उच्चारांत काय काय भिन्न फरक पडले, अमुक एक फरक कोणत्या काळांत पडला इत्यादि इत्यादि प्रश्न व्युत्पत्तिशास्त्रांत उद्भवतात व त्यांचीं उत्तरें द्यावीं लागतात. अशा प्रकारच्या चौफेर तपासणीनें एखादी वर्णप्रक्रिया तावून सुलाखून निघाली म्हणजे ती वर्णप्रक्रिया वर्ण–उत्सर्गाच्या पदवीला पोहोंचते; एरव्हीं नाहीं. तशी जर ती तावून सुलाखून उतरली नाहीं तर ती केवळ वर्णप्रक्रियाच राहील. अशा रीतीनें वर्णप्रक्रियेचा उत्सर्ग (phonetic law) तयार होतो. व्युत्पत्तिशास्त्रांत कांहीं उत्सर्ग सर्वमान्य स्वरूपाचे असतात. त्यांची प्रक्रिया सर्व भाषांत आढळून येते. कांहीं इतर उत्सर्ग विशिष्ट भाषांतच किंवा भाषावंशांतच लागूं होतात. असे व्युत्पत्तीचे उत्सर्ग पुढें दिले आहेत. त्यांवरून शब्दनिर्वचन कसें करावें, त्याची शास्त्रीय पद्धति कोणती ह्या गोष्टी स्पष्ट होतील.

उत्सर्ग १ : “एखाद्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल प्रयत्न करण्यापूर्वी त्या शब्दाचें जुन्यांत जुनें पहिलें रूप व त्याचा उपयोग, हीं कशीं होतीं हें प्रथम शोधून काढावें. त्याच्या रूपांचा व कालाचा क्रम लावावा.”

उदाहरणार्थ, ‘म्हणून’ हा शब्द घेतला तर त्याची व्युत्पत्ति शोधण्यापूर्वी त्याचीं निरनिराळ्या काळांतील वाङ्मयांत आढळणारीं रूपें शोधून मांडावीत. त्यांचा अर्थ मांडावा. त्या अर्थांत कांहीं बदल झाला आहे कीं काय हें पाहावें. म्हणून’ हें सध्यांचें रूप, त्याच्या मागचें रूप ‘म्हणूनि’, त्याच्याहि मागचीं रूपें ‘म्हणोन, म्हणोनि, म्हणौनि, म्हणौनिया,–आ’ अशीं अनुक्रमें आङ्ग्लकाल, पेशवेकाल, शिवकाल व यादवकाल ह्या कालांत आढळतात. हीं सर्व ल्यबन्त अव्ययें असून त्याच्या अर्थांत फरक फारसा झालेला नाहीं. परिणामबोधक अव्ययेंच सर्व आहेत. त्याच्याहि पूर्वीचें प्राकृतमधील रूप ‘भण्णूण’ असें आढळतें. संस्कृतमधील त्यांचें रूप ‘भणित्वा’ असें आहे. वैदिकालांत तें रूप ‘भणी’ असें असून त्यांतील धातु ‘भण्’ हा आहे. ह्याचा मूळ अर्थ ‘बोलून, बोलल्यावर’ असा होता. पुढें मराठींत त्याला परिणामबोधक अव्ययाचा अर्थ प्राप्त झाला. ‘म्हणजे’ हा शब्द तसाच आहे. ‘त्याचें’ ह्या शब्दाचीं रूपें अशींच मांडून दाखवितां येतील. “तस्य > तस्स > तह > तहा > तहाचें > तेआचें > तेयाचें > तयाचें > त्याचें” अशीं हीं क्रमानें त्याचीं रूपें होत. ह्यांचा कालहि निश्चित करतां येण्यासारखा आहे. ‘गवसणें’ हा आणखी एक शब्द घेऊं. ह्याचा अर्थ ‘सांपडणें, हुडकणें’ असा आहे. गवेस < गवेष अशीं त्याचीं जुनीं रूपें आहेत. वेदांत ‘गवेष्’ हें रूप आढळतें व त्याचा तेथें ‘गाई हुडकणें’ असा अर्थ आहे. वेदकालीं आर्य लोक पशुचारणजीवी असल्यामुळें ‘गोधन’ हेंच त्यांचें मुख्य धन होतें. हें त्यांचें धन पणी दस्यु वगैरे त्यांचे शत्रु हरून नेत. तेव्हां ‘तें धन आमचें आम्हांस हुडकून दे’ – **‘गवेषय अस्मान्’** अशी प्रार्थना आर्य लोक आपल्या पूषन् देवतेची करीत असत. असा ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीचा थोडक्यांत इतिहास आहे. “ओझा, झा, वझे, उपाध्ये, पाध्ये” वगैरे हीं ब्राह्मणांचीं आडनांवें म्हणून रूढ आहेत. परंतु त्यांचीं रूपें ‘उवज्झाय, उअज्झाअ, उअज्झा’ अशीं आढळतात. आणि ह्या रूपांचें मूळ ‘उपाध्याय’ ह्या शब्दांत आहे. ह्या शब्दाच्या रूपांत व अर्थांत अशा दोन्हींतहि फरक पडला आहे. ह्याची व्युत्पत्ति उप+आ+ध्यै ह्या धातूपासून आहे. असा ह्या शब्दाचा थोडक्यांत इतिहास आहे. ह्याचीं वाङ्मयांतील उदाहरणें दिलीं म्हणजे तें व्युत्पादन पूर्ण ऐतिहासिक झालें. त्याला पुनः इतर भाषांतील रूपांचा आधार दिला म्हणजे तें तौलनिक व्युत्पादन झालें असें म्हणतां येईल.

उत्सर्ग २ : “शब्दाची व्युत्पत्ति शोधतांना इतिहास व भूगोल हे दोन्हीहि पहा. भिन्न भिन्न संस्कृतीच्या लोकांचा परस्परसंबंध आला म्हणजेच एका भाषेंतून दुसऱ्या भाषेंत शब्द ऋण म्हणून घेतले जातात.”

उदाहरणार्थ, मराठींत जे फारसी, अरबी वगैरे शब्द आले ते महमदी संस्कृतीच्या लोकांशीं पंधराव्या शतकापासून मराठी भाषकांचा निकट संबंध आल्यामुळें आले. कांहीं पोर्तुगीज, इंग्रजी वगैरे पाश्चात्य भाषांतून शब्द आले ते त्या

लोकांशीं मराठी भाषकांचा संबंध आल्यामुळेंच आले. तीच गोष्ट द्राविडी शब्दांची होय. अशा रीतीनें इतिहासावरून आपणास शब्दांच्या ऋणाचीं कारणमिमांसा करतां येते. इतिहासाप्रमाणें भूगोलाचाहि उपयोग व्युत्पत्तीच्या कामीं होतो. ‘ बटाटा ’ शब्द पोर्तुगीज शब्दावरून आला. पोटॅटो हा कंद त्या लोकांनीं आपल्या बरोबर आणिला. ‘ प ’ वर्णाचा कर्कश उच्चार नरमावून ‘ ब ’ होणें अगदीं साहजीक आहे. ‘ तमाखू ’ शब्दहि तसाच आहे. त्याचीहि उपपत्ति वरीलप्रमाणें आहे. अशा रीतीनें भूगोलाचा उपयोग व्युत्पत्तीच्या कामीं झाल्याचें दिसून येईल.

उत्सर्ग ३ : “व्युत्पत्ति पाहतांना मूळ आर्य आणि आर्योद्भव ज्या भाषा आहेत त्यांच्यामधील वर्णप्रक्रियेचे नियम ध्यानांत घ्या. व्यंजनें आणि स्वर ह्यांमध्यें होणारे फरक हे विशेष बारकाईनें पाहिले पाहिजेत”.

जगामध्यें ज्या निरनिराळ्या भाषा रूढ आहेत त्यांचें वर्गीकरण केलें आहे. त्यांचे निरनिराळे वंश ठरविले आहेत. हें वर्गीकरण ज्या तत्वांवर आधारलें आहे त्यांपैकीं त्या भिन्न भाषांत आढळणारी भिन्न वर्णप्रक्रिया हें एक तत्व आहे. आर्य भाषांत एक विशिष्ट प्रकारची वर्णप्रक्रिया आढळून येते. कंठ्य वर्णांचे तालव्य वर्ण होणें, तालव्याचे दन्त्य वर्ण होणें, कठोर वर्णांचे मृदु वर्ण होणें, आगम, आदर्श वगैरे सर्व व्यंजनप्रक्रियेच्या बाबी होत. गुण, वृद्धि संप्रसारण, संधि वगैरे स्वरप्रक्रियेच्या बाबी होत. वर्णप्रक्रियेच्या सर्व बाबी तपासून त्या कालाच्या अनुक्रमानें जर लाविल्या तर अमुक एका काळांत अमुक एका वर्णांत अमुक एक फरक झाला व तो अमुक एका कारणानें झाला असें सांगतां येतें. उदाहरणार्थ, फार प्राचीनकालीं मूळ आर्य भाषेंत मूर्धन्य उच्चार नव्हते, आणि उत्तर कालीं ज्या अर्थीं ते असल्याचें प्रत्ययास येतें त्या अर्थीं ते कोणत्या तरी इतर भाषेच्या संसर्गानें आले. ते द्राविडी भाषांतून आले असे विद्वानांचें मत आहे. तसेंच मूळ संस्कृत भाषेंत तालव्य उच्चार आहेत, परंतु दन्त्यतालव्य उच्चार नाहींत. प्राकृत भाषांच्या अमदानींत हे नवे उच्चार आर्य भाषेंत आले. कांहीं विद्वानांचे म्हणणें असें कीं हे उच्चार ग्रीक लोकांच्या संसर्गामुळें आले. कांहीं उलट असें म्हणतात कीं हे द्राविडी लोकांच्या सहवासामुळें आले. कांहीं दुसऱ्या विद्वानांना तर ह्या उच्चारांत मंगोली भाषांचा परिणाम आहेसा वाटतो. इतकें मात्र निश्चित कीं हे उच्चार मूळ आर्य भाषेंत नव्हते. हे केव्हां आले हेंहि सांगतां येण्यासारखें आहे. असेंच आणखी एक उदाहरण आहे. ‘ अ ’ ह्या स्वराचे निभृत व उत्तान किंवा संवृत व विवृत असे जे दोन उच्चार आढळून येतात त्याचें कारण फारशी भाषकांशीं आलेला संबंध हें होय. सध्यांच्या इंग्रजी भाषेंतील उच्चाराचें वळण मराठी भाषेंत क्वचित् येत असल्याचें दृष्टोत्पत्तीस येते. अशा रीतीनें जे निरनिराळे उच्चार येतात त्यांच्या उपपत्ति आपणास काळाच्या दृष्टीनें सांगतां येतात.

उत्सर्ग ४ : “ दोन शब्दांपैकीं प्राचीन कोणता व अर्वाचीन कोणता हें ओळखण्याचीं कांहीं गमकें सामान्य रीतीनें ठरलेलीं आहेत. दोन शब्दांपैकीं जो शब्द कमी वर्णांचा असेल तो प्राचीन किंवा तो शब्द मूळचा असें मानतात. ”

‘ प्रत्युपकारक ’ हा शब्द घेतला तर ‘ उपकारक ’ हा शब्द ‘ प्रत्युपकारक ’ पेक्षां प्राचीन, ‘ कारक ’ हा शब्द ‘ उपकारक ’ पेक्षां प्राचीन, ‘ कर ’ हा ‘ कारक ’ पेक्षां प्राचीन, ‘ कृ ’ हा ‘ कर ’ पेक्षां प्राचीन आणि त्याच्याहि पेक्षां सर्वांत प्राचीन म्हटला म्हणजे ‘क्’ किंवा ‘ ऋ ’ किंवा ‘ अ. ’ अशा रीतीनें दोन शब्दांची तुलना केली असतां प्राचीन, प्राचीनतर, प्राचीनतम अशीं त्याचीं रूपें आपणांस ठरवितां येतात. तुलना करावयास घ्यावयाचीं रूपें हीं एकाच शब्दाचीं असतील किंवा दोन भिन्न भिन्न शब्दांचीं असतील. ह्या सिद्धान्ताची उभारणी आर्य भाषांच्या एका सर्वमान्य सिद्धान्तावर झाली आहे, आणि तो सिद्धान्त म्हणजे यास्काच्या निरुक्तांत वर्णिलेला “ आख्यातजानि सर्वाणि नामानि–सर्व नामांचीं – सर्व शब्दांची उत्पत्ति धातूंच्या पासून होते”, हा होय.

जुन्यांतलीं जुनीं शब्दाचीं रूपें हुडकण्याच्या ह्या उत्सर्गाला कांहीं मर्यादा आहेत. हा उत्सर्ग सर्व ठिकाणीं लागूं पडतो असें नाहीं. ‘ उपाध्याय, ’ ‘ ओझा ’ किंवा ‘ झा ’ हीं जीं उदाहरणें वर दिलीं आहेत, त्यांमध्यें ह्या सिद्धान्ताच्या मर्यादा दिसून येतात. “ उपाध्याय> उवज्झाय> उअज्झाय> उअज्झाअ> ओझा> झा ” असा क्रम जो दिसतो तो एकापेक्षां दुसरा उत्तरकालांत घडून आलेला आहे. जसजसा काळ अधिक गेला तसतसे त्या शब्दाचे वर्ण झडून त्याला ह्रस्व, ह्रस्वतर, ह्रस्वतम अशीं रूपें प्राप्त झालीं. ‘ ध्यै ’ ह्या एकाक्षरी धातूपासून जसा उपाध्याय हा चतुरक्षरी शब्द उत्तरकालांत सिद्ध झाला, तसाच ‘ उपाध्याय ’ ह्या चतुरक्षरी शब्दापासून

'ज्ञा' हा एकाक्षरी शब्द उत्तरकालांतच सिद्ध झाला. म्हणजे एकाच शब्दाबाबत दोन्ही प्रकारच्या उलट सुलट प्रक्रिया–ह्रस्वाचें दीर्घ होणें आणि दीर्घाचें ह्रस्व होणें–ह्या झालेल्या दिसतात. म्हणूनच ह्या सिद्धांताला मर्यादा आहेत असें आम्हीं म्हटलें आहे. 'आख्यातजानि सर्वाणि नामानि" ह्या भाषिक तत्त्वाची सिद्धता दाखविण्यासाठीं ह्या सिद्धांताची मांडणी आहे. ह्या उत्सर्गाला अगदीं संलग्न असा हा पुढील उत्सर्ग आहे.

उत्सर्ग ५ : "वर्णांच्या कमीजास्त संख्येवरून ज्याप्रमाणें आपणास शब्दाचें प्राचीन रूप ठरवितां आलें त्याप्रमाणें शब्दाच्या वर्णांच्या कमीजास्त उच्चारावरूनहि आपणास त्याचें प्राचीन रूप ठरवितां येतें."

शब्दांतील मुख्य स्वराच्या उच्चारावरून अमुक एक रूप प्राचीन व अमुक एक अर्वाचीन असें सांगतां येतें. ह्या सिद्धांताचें उत्तम उदाहरण आपणास स्वरांच्या उच्चारांत, त्याचप्रमाणें वेदाच्या उदात्त, अनुदात्त, स्वरित ह्या स्वरांच्या उच्चारांत, त्याचप्रमाणें आर्य भाषेच्या आघातांत आढळून येतें. 'पौत्र' ह्यांतील मुख्य स्वर 'औ' हा स्वर 'पुत्र' ह्यांतील 'उ' ह्या स्वरापेक्षां अर्वाचीन होय. 'उ' हा स्वर 'पत्' ह्यांतील 'अ' ह्या स्वरापेक्षां अर्वाचीन होय. ह्या 'अ' स्वराच्या उच्चारामध्येंहि कालाच्या दृष्टीनें सूक्ष्म दृष्टीच्या अभ्यासकांनीं अ, इ, उ, (नितराम् ह्रस्व) अशा तीन अवस्था मानिल्या आहेत.

उत्सर्ग ६ : "अनियमित धातु (irregular roots) हे भाषेंतील अगदीं प्रथमचे सर्व धातूंच्या अगोदरचे धातु होत. ह्या धातूंपासून नंतर साधित धातु व त्यापासून नंतर साधित शब्द तयार होतात."

सर्व शब्दांच्या मुळाशीं धातु व सर्व धातूंच्या मुळाशीं हे अनियमित धातु अशी ह्या सिद्धान्ताच्या मुळाशीं विचारसरणी आहे. धातु दोन प्रकारचे : एक क्रियाधातु व दुसरे सार्वनामिक धातु. नामाच्या, विशेषणाच्या, क्रियाविशेषणाच्या अगोदरचे क्रियाधातु व सर्वनामाच्या अगोदरचे सार्वनामिकधातु असें मानिलें आहे. क्रियाधातूंत नियमित आणि अनियमित असे दोन प्रकार आहेत. 'ब्रू' धातूचें 'ब्रवीषि' रूप होणें हें नियमित आहे, परंतु त्याचें 'आत्थ' रूप होणें हें मात्र अनियमित आहे. 'ब्रवीति' हें रूप नियमित परंतु 'आह' हें रूप होणें अनियमित. 'गमामि !' हें रूप नियमित परंतु 'गच्छामि' हें रूप अनियमित. ह्यांतील अनियमित रूपें हीं नियमित रूपांपेक्षां प्राचीन आहेत, ही विचारसरणी ह्या सिद्धान्ताच्या मुळाशीं आहे. ह्या रूपांना आपण अनियमित असें म्हटलें खरें पण तसें म्हणून कांहीं समाधान होत नाहीं. ही खरी भाषाशास्त्रीय उपपत्तिहि पण नव्हे. 'अनियमित' म्हणून निरवानिरव करणें म्हणजे एक प्रकारचें भाषाशास्त्रीय सूक्ष्मतेचें दौर्बल्य दाखविण्यासारखें आहे. 'आत्थ, आह, आहथुः, आहुः, घ्नन्ति, गच्छ, यच्छ' इत्यादि जीं रूपें अमुक अमुक एका असंबद्ध अशा धातूंचीं अनियमित रूपें म्हणून समजलीं गेलीं आहेत तीं अनियमित रूपें नसून प्राचीनकाळीं प्रचलित असलेल्या धातूंचीं नियमानें सिद्ध झालेलीं रूपें आहेत. व्युत्पत्ति लावतां आली नाहीं म्हणून त्यांना अनियमित म्हणणें हें योग्य होणार नाहीं. संस्कृत व प्राकृत भाषांत पुष्कळ शब्दांचीं वैकल्पिक रूपें कांहीं आढळतात. त्यांचेंहि स्पष्टीकरण हेंच समजावें.

उत्सर्ग ७ : "एखाद्या शब्दाची व्युत्पत्ति काढतांना तो सर्वच्या सर्व शब्द विचारांत घ्यावा."

त्याचा एखादा अवशेष किंवा भाग घेऊन त्याचीच फक्त व्युत्पत्ति देण्यानें त्या सर्व शब्दाची व्युत्पत्ति मिळत नाहीं. सर्व शब्दच्या शब्द व्युत्पादावा. त्याचा अंशच फक्त व्युत्पादूं नये. अशा रीतीनें व्युत्पत्ति देतानां जर एखाद्या अंगाच्या व्युत्पत्तीबद्दल संशय आला किंवा त्या व्युत्पादनानें वर्णप्रक्रियेच्या एखाद्या उत्सर्गाचा भंग झालेला आढळला तर त्याबद्दल मन साशंक होऊन पुनः त्याची व्युत्पत्ति काढावयास हवी. नुसत्या प्रत्ययाची किंवा उपसर्गाची व्युत्पत्ति देऊन सर्व शब्दाची व्युत्पत्ति दिल्याचें समाधान मानूं नये.

उत्सर्ग ८ : "दोन निरनिराळ्या असंबद्ध अशा भाषांतील दोन शब्दांचीं रूपें बाह्यतः किती जरी तंतोतंत सारखीं दिसलीं तरी त्यांची व्युत्पत्ति एकच नसते. हा एक प्रकारचा व्युत्पत्तिभ्रम आहे. असल्या साम्याचा कधींहि मनावर परिणाम होऊन देऊं नये.§"

आर्यभाषा व फारसी भाषा ह्या दोहोंत पुष्कळ शब्दांचीं बाह्य स्वरूपें सारखीं दिसतात. त्याचप्रमाणें कांहीं शब्द इंग्रजीत व मराठींत उच्चारांत सारखे दिसतात. इंग्रजी शब्द aggréssor आणि मराठी तत्सम अग्रेसर ह्या दोन शब्दांत उच्चारसाम्य आहे. ह्या उच्चारसाम्याला भुलून जर दोहोंची व्युत्पत्ति एकच सांगितली तर ती शास्त्रशुद्ध ठरणार नाहीं. 'अग्रेसर' मध्यें 'सृ' हा धातु

---

§ Skeat: Science of Etymology, ch 2, pp.14–.

आहे तर aggressor ह्या शब्दांत gradio हा धातु आहे. तसेंच ‘ अब्रू ’ हा फारसी शब्द व ‘ ब्रू ’ हा संस्कृत धातु किंवा ettiquette हा इंग्रजी शब्द आणि इतिकृत्वा हा संस्कृत शब्द ह्या उच्चारसम शब्दांची व्युत्पत्ति एकच मानणें अगदीं अशास्त्रीय होय.

व्युत्पत्तिशास्त्रातील हे आठ मुख्य उत्सर्ग वर दिले. हे सामान्य स्वरूपाचे आहेत. बाकीचे लहानसहान उत्सर्ग ह्या आठांच्यामध्यें अंतर्भूत होतात. अशी जरी परिस्थिति असली तरी कांहीं दुय्यम उत्सर्गांचा पृथक् निर्देश करणें जरूर आहे. हे वरील आठ उत्सर्ग सामान्य भाषाशास्त्राच्या अत्यंत स्थूल दृष्टीनें दिले आहेत. ते सर्व आर्य भाषांना लागतात. ह्या शिवाय त्या त्या भाषेच्या स्वभावाप्रमाणें त्या भाषेपुरते मर्यादित असें स्वतंत्र उत्सर्ग आहेत. इंग्रजी, फ्रेंच, जर्मन, लिथ्यूनियन, ग्रीक, लॅटिन, पुराणफारसी, झेंदअवेस्ता, संस्कृत, प्राकृत, मराठी, हिंदी, बंगाली, गुजराती वगैरे भाषांतील व्युत्पत्तीचे उत्सर्ग सांगतां येण्यासारखे आहेत. यास्काचार्यांनीं संस्कृत भाषेतील व्युत्पत्तीचे उत्सर्ग दिले आहेत.* ते आपल्या मराठी भाषेबाबत फार उपयुक्त असल्यामुळें ते ह्या विवेचनांत उल्लेखनीय आहेत.

उत्सर्ग ९ : “ तत् येषु पदेषु स्वरसंस्कारौ समर्थौ प्रादेशिकेन गुणेन अन्वितौ स्याताम् तथा तानि निर्ब्रूयात्.”

स्वरसंस्कार व अर्थ ह्यांचे तदर्थवाचक जे धातु, त्यांच्यापासून होणारीं जीं नामरूपें त्यांच्याशीं मेळ आहे. त्यांची व्युत्पत्ति तशी करावी. उदाः–गति, मति, कर्ता, कारक इत्यादि शब्दांची व्युत्पत्ति त्यांचा धातु आणि त्यांचा स्वरसंस्कार अर्थ ह्यांच्यांत मेळ असल्यामुळें त्या प्रमाणें दिली पाहिजे. परंतु अक्षिन् वगैरे शब्दांत तसा मेळ दिसत नाहीं. अक्षिन् शब्द आणि चक्ष् हा धातु ह्यांत मेळ नाहीं. अशा वेळेस अर्थाकडे पाहून तपासून नंतर व्युत्पत्ति द्यावी. हेंच खालील शब्दांत सांगितलें आहे.

उत्सर्ग १० : “ अथ अनन्विते अर्थे, अप्रादेशिके विकारे अर्थनित्यः परीक्षेत् ”. ह्या उत्सर्गांत यास्काचार्यांनीं अर्थविकास शास्त्राचें महत्त्व सांगितलें आहे.

उत्सर्ग ११ : केनचित् वृत्तिसामान्येन (परीक्षेत).

वृत्ति म्हणजे धातुरूप. असें कोणतें तरी धातुरूप घेऊन त्यामध्यें व ज्याची व्युत्पत्ति द्यावयाची त्यामध्यें साम्य असलें म्हणजे झालें. उदाः–अद्रि (= पर्वत, वज्र) ह्यांत अद् – अदने हा धातु दिसतो; परंतु खाणें आणि वज्र, किंवा पर्वत ह्याचा कांहीं संबंध दिसत नाहीं. वज्राची क्रिया आघात करून फोडणें ही आहे. ह्या अर्थाचा दॄ हा धातु आहे. ह्याचें रूप दृणाति असें होतें. उपसर्ग ‘ आ ’ लावल्यानें आदृणाति असें रूप होईल. ह्या रूपांतील शेंवटचा ‘ णाति ’ हा भाग गळून पडला. व्युत्पत्तीच्या बाबतींत कल्पनाशक्तीला कशी वाव द्यावी लागते ह्याचें एक उत्तम उदाहरण म्हणून यास्कांचा हा उत्सर्ग देण्यासारखा आहे.

उत्सर्ग १२ : “ अविद्यमाने सामान्ये अपि अक्षरवर्णसामान्यात् निर्ब्रूयात्. ”

वर सांगितलेलें अर्थसामान्य जर नसेल तर अक्षराचें, किंवा एखाद्या वर्णांचें साम्य लक्षांत घेऊन शब्दाची व्युत्पत्ति करावी. असें करतांना शब्दाच्या रूपाकडे म्हणजे तो शब्द काय आहे, तो कसा बनला आहे वगैरेंकडे लक्ष देऊं नये (न संस्कारम् आद्रियेत). अमुक एक शब्द अमक्या धातूपासून निघाला असें पुष्कळ वेळां दिसतें. परंतु त्या धातूचा अर्थ व शब्दाचा रूढ अर्थ ह्या दोहोंत मेळ नसेल तर संस्कार म्हणजे शब्दरूप लक्षांत घेण्याचें कारण नाहीं. कारण धातूपासून निघालेल्या नामरूपांविषयीं पुष्कळदां मनांत घोटाळा उत्पन्न होतो. धातूपासून नामरूप बनवीत असतांना विलक्षण बदल घडून येतात. ‡ (ह्या उत्सर्गाला ‘ अग्नि ’ ह्या शब्दाचें उदाहरण दिलें आहे. तो अ, ग्, नि असा विभागून प्रत्येक विभागाची व्युत्पत्ति देण्याचा प्रयत्न केला आहे).

१२ वर्णप्रक्रियेचे प्रकार : असे हे व्युतत्तिशास्त्राचे बारा उत्सर्ग किंवा सिद्धान्त दिले आहेत. शब्दव्युत्पत्तीसंबंधीं इतका सामान्य स्वरूपाचा उपन्यास केल्यानंतर वर्णप्रक्रियेचे ठोकळ असे प्रकार सांगणें अवश्य आहे. वर्णप्रक्रियेचे मुख्य असे बारा प्रकार पुढील प्रमाणें आहेत.

१ ‘आदिलोपः’ उदाः–अस् सारख्या धातूच्या प्रथमच्या ‘ अ ’ चा निवृत्तिस्थानाच्या वेळीं लोप होतो. उदाः–स्तः, सन्ति.

२ ‘ अन्तलोपः ’ उदा :–गत्वा, गतम् ह्या उदाहरणांत अन्त्य ‘ म् ’ चा लोप होतो.

३ ‘उपधालोपः’ उदाः–‘ जग्मतुः, जग्मुः’ ह्या उदाहरणांत उपान्त्य ‘ अ ’ चा लोप होतो.

४ ‘ वर्णलोपः ’ उदाः–‘ याचामि ’ मधील ‘ चा ’ चा लोप होऊन ‘ यामि ’ असें रूप बनलें.

५ ‘ द्विवर्णलोपः ’ उदाः–तिस्रः’ त् (‘इस्र’ ह्याचा लोप)

---

* यास्क : निरुक्त–अध्याय २, खंड १.

‡ वै. का राजवाडे : निरुक्ताचें भाषांतर, पृष्ठ ५७५०.

६ ‘आदिविपर्ययः’ उदाः–घन (हन्), सिंह (हिंस्), ज्योतिः (द्योतिः)

७ ‘आद्यन्तविपर्ययः’ उदा :– स्तोका (श्चुत्), रज्जु (सृज्), सिकता (कस्–विकसने).

८ ‘अन्तव्यापत्ति :’ उदा :– ओघ (वह्), नाध (नह्), वधू (वह्), मेघ (मिह्), गाध (गाह्), मधु (मद्).

९ ‘वर्णोपजनः’ उदा :–आस्यत् (अस् – क्षेपणे), द्वार (वार्), भरुजा (भ्रस्ज् – दहने).

१० तत्र सिद्धायाम् (प्रकृतौ) अनुपपद्यमानायाम् इतरया उपपादयेत्.

जेव्हां एखाद्या शब्दांत मूळ धातु लागूं पडत नसेल, म्हणजे त्या शब्दाची उपपत्ति मूळ धातूपासून होत नसेल तर दुसऱ्या प्रकृतीनें त्या शब्दाची उपपत्ति करावी.

११ अथ तद्धितसमासेषु एकपर्वसुच अनेकपर्वसुच पूर्वम् पूर्वम् अपरम् अपरम् प्रविभज्य निर्ब्रूयात्.

जेव्हां तद्धित व सामासिक शब्दांची व्युत्पत्ति द्यावयाची असेल तेव्हां त्यांतील प्रत्येक अवयव पृथक् करून त्याची व्युत्पत्ति द्यावी.

१२ न एकपदानि निब्रूयात्.

एकपदांची म्हणजे ज्यांचा संदर्भ माहित नाहीं अशांची व्युत्पत्ति करूं नये.

ज्या सामान्य उत्सर्गावर शब्दनिरुक्ति साधारणपणें आधारलेली आहे ते बारा सामान्य उत्सर्ग व आपल्या इकडील संस्कृत भाषांच्या वर्णप्रक्रियेसंबंधीं यास्काचार्यांनीं दिलेले बारा प्रकार हे येथवर सांगितले. हेच उत्सर्ग व प्रकार प्राकृत भाषा व अर्वाचीन भारतीय बोली ह्यांतील शब्दांच्या व्युत्पत्तीबाबत सामान्य रीतीनें अवलंबिले जातात. ह्यांत ऐतिहासिक व तौलनिक पद्धतीची भर मात्र नवीन आहे. ह्या दोन्ही पद्धतींचें स्वरूप मागें विशद केलें आहे. ह्या सर्व उत्सर्गांच्या व प्रकारांच्या साह्यानें कोणत्याहि शब्दाचें निर्वचन करणें हेंच कार्य कोशकाराला करावें लागतें.

व्युत्पत्तीची पद्धति आपण निश्चित केली. तिचें स्वरूप पौर्वात्य व पाश्चात्य अशा दोन्ही निरुक्तशास्त्रांच्या विचारसरणींनीं मुक्रर केलें. आतां भाषेंतील शब्दांची ह्या पद्धतीनें विचिकित्सा करावयाची आहे. परंतु त्या पूर्वीं शब्दाचें स्वरूप आपणास निश्चित केलें पाहिजे. शब्द कसा निर्माण होतो, मानवी शब्द इतर पशुपक्ष्यांच्या शब्दापासून भिन्न कसा व केव्हां होतो, वर्णसमन्वयानें शब्द कसा सिद्ध होतो, वर्णांना कांहीं अर्थ आहे कीं नाहीं, शब्दाला अर्थ कसा प्राप्त होतो, अर्थाच्या निरनिराळ्या शक्ति कोणत्या, शब्दांचा व्यस्त व समस्त अर्थ इतक्या बाबी शब्दविचिकित्सेंत अन्तर्भूत होतात. ह्या शब्दविचिकित्सेंतून निष्पन्न होणाऱ्या सिद्धांतांच्या साह्यानें नंतर मराठी भाषेंतील शब्दांची विचिकित्सा करणें शक्य होईल.

१३ शब्दाची उत्पत्तिः शब्द ह्यांत मूळ धातु शब्द् असा असून त्याचा अर्थ ध्वनि निर्माण करणें असा आहे. किंवा त्यांत शप्–आक्रोशे हा धातु असून ‘शाशपिभ्यांददनौ’ (उणा. ४-९७) इति दन्, पकारस्य बकारः अशी त्याची साधनिका आहे. शब्द हा ध्वन्यात्मक व वर्णात्मक अशा दोन प्रकारचा असून तो कानांनीं ऐकतां येण्यासारखा आहे. तो आकाशाचा गुण आहे. हें त्याचें तात्त्विक स्वरूप झालें. त्याच्या व्यावहारिक स्वरूपांत हें त्याचें तात्त्विक स्वरूप येऊन पुनः त्यापासून होणारी अर्थप्रतीति हा गुण येतो. अशा दोन्ही दृष्टींनीं शब्दाकडे पाहणें जरूर आहे. तो ध्वनींच्या साहाय्यानें सिद्ध झाल्यानंतर त्यांच्यांत अर्थप्रतीति उतरते. तो अर्थाचें वाहन बनतो. परंतु येथें असा एक प्रश्न उद्भवणें शक्य आहे. आणि तो हा कीं ध्वनि निर्माण होण्यापूर्वीं मानव प्राणी आपल्या मनांतील भाव कोणत्या मार्गानें प्रगट करीत असे. भाषानिर्मितीच्या पूर्वीं किंवा ध्वनि उत्पन्न होण्याच्या पूर्वीं त्याच्याजवळ असें कोणतें साधन होतें कीं ज्याच्या द्वारां तो आपल्या मनांतील भावार्थ प्रगट करून स्वतःला व इतरांना व्यवहाराला प्रवृत्त करीत असे. उत्क्रान्तिवादी असें सांगतील कीं मानवाला ध्वनि निर्माण करण्याची शक्ति कांहीं एकदम प्राप्त झाली नाहीं. ज्याप्रमाणें ध्वनीपासून शब्द व शब्दांपासून भाषा उत्क्रांत झाली त्याप्रमाणें मूळ ध्वनि सुद्धां अगोदरच्या कोणत्या तरी अर्थवाहक साधनापासून उत्क्रान्त झाला असावा. एखाद्या अमीबापासून किंवा प्रोटोप्लाझमच्या कणापासून जर पूर्ण असा मनुष्यदेह निर्माण झाला तर त्याचा आवाजहि अशा कांहीं तरी सूक्ष्म पदार्थापासून निर्माण झाला असला पाहिजे. आवाज निर्माण करण्याचें सामर्थ्य आल्यानंतर शब्द व भाषा निर्माण करण्याचें सामर्थ्य

मनुष्य प्राण्याला प्राप्त झालें. परंतु आवाजाच्या सामर्थ्याचें ज्ञान होण्यापूर्वी किंवा आवाजानें अर्थवाहक शब्द तयार करण्याचें ज्ञान होण्यापूर्वी मानव प्राणी आपले विचार व विकार कोणत्या विशिष्ट प्रकारें प्रगट करीत असला पाहिजे ? मनांत विचार व विकार तर खूप सांठले आहेत, त्यांची मनस्वी खळबळ आंत माजली आहे, ते बाहेर प्रगट केले पाहिजेत, त्याशिवाय गत्यंतर नाहीं, आणि त्याबरोबर ते प्रगट करण्याचें साधन तर उपलब्ध नाहीं. अशा परिस्थितींत त्या मानवानें काय केलें असलें पाहिजे ? कोणत्या भिन्न मार्गाचा अवलंब करून त्यानें आंतील मानसिक आंदोलनांना बाहेर वाचा फोडून दिली व प्रगट केले ?

१४ अंगविक्षेपाची भाषा : त्या परिस्थितींत त्यानें कांहीं हावभाव केले असले पाहिजेत. कांहीं हाताच्या खुणा, कांहीं अंगविक्षेप, नेत्रविक्षेप, मुद्राविक्षेप, केले असले पाहिजेत. ह्या विक्षेपांच्या साह्यानेंच त्यानें आपल्या मनांतील भाव दुसऱ्यास प्रगट केले असले पाहिजेत. शब्दांच्या भाषेच्या पूर्वींची मानवांची भाषा ही अंगविक्षेपांची असली पाहिजे. आतां ही अंगविक्षेपांची भाषा तो आद्य मानव कसा वापरीत असावा हें पाहूं.

आपण आपली मान उभी अगर आडवी हलवून होकार दर्शवितों; मानेला आडवे झटके देऊन 'नको, नाहीं, नकार' दर्शवितों; डोळे मिचकावून 'गप्प रहा, बोलूं नको,' किंवा 'आपण ह्या खुळचटाला सहज फसवूं' हा भाव दाखवितों. डोळे वटारून रागाचा आविर्भाव करतों. 'खबरदार, चूप बैस' हा भाव दर्शविण्यास डोळे वठारून उजव्या हाताची तर्जनी उभी धरतों. "अस्सा मारीन, सूड उगवीन" हा भाव आपण ओंठ चावून दाखवितों.ओंठ पुढें करून किंवा तोंडाचें बोळकें करून थोडीशी हवा बाहेर फेंकून 'फूस, निरर्थक' हा भाव दाखवितों. 'काय करावें बरें ? वेळ तर बाकां आली, काय उपाय योजावा ? अशा विवंचनेचा भाव किंवा काळजी आपण डोकें खालीं वांकवून तर्जनी कपाळावर उभी दाबून दाखवितों. ह्या झाल्या कांहीं सामान्य भावना व कल्पना. सर्वनामाच्या कल्पना आपण कशा दाखवितों तें पहा. 'मी, हूं. अहम्, I' ही कल्पना स्पष्ट करण्याच्या वेळीं आपण आपला हात पोटाकडे वळवून हाताचा अंगठा आपल्या पोटाच्या दिशेनें पुढें करतों. 'तुम्, तूं, त्वम्, you' ही कल्पना स्पष्ट करतांना ज्या माणसाबद्दल बोलावयाचें त्याच्याकडे बोट करतों. 'वह तो, सः, he' वगैरे तृतीय पुरुषाची कल्पना उजव्या खांद्यावरच्या बाजूनें अंगठा दाखवून स्पष्ट करतों. 'लहान, मोठें' ह्यासंबंधाच्या कल्पना आपण कशा दाखवितों हें सर्वांच्या परिचयाचें आहे. तसेंच 'पुरुष, स्त्री, मूल, येथें, तेथें, कोठें,' इत्यादि कल्पना दाखविण्याच्या हाताच्या निरनिराळ्या खुणा आहेत. ऐकण्याची क्रिया किंवा चव घेण्याची क्रिया दाखवितांना आपण कानाला किंवा जिव्हेला अंगठ्यानें स्पर्श करतों. बोलण्याची क्रिया ओंठ हलवून दाखवितों. एखाद्याचा निर्देश करावयाच्या वेळेस ओंठ हलवून आपण त्या विशिष्ट मनुष्याकडे बोट दाखवितों. ह्याचप्रमाणें घर , खोली, बाग, भाकर, खाद्य, पाणी वगैरेच्या कल्पनादर्शक कांहीं विशिष्ट अशा खुणा आहेत. ज्यांना भाषा बोलतां येत नाहीं किंवा निरनिराळ्या अर्थांचे दर्शक असे निरनिराळे शब्द बोलतां येत नाहींत किंवा ते शब्द उच्चारण्यासाठीं आवाजांत निरनिराळे बदल करतां येत नाहींत असे लोक, उदाहरणार्थ लहान अर्भकें व मुके लोक ह्या किंवा असल्याच हावभावांच्या भाषेचा अवलंब करतात. ध्वनीमधील अर्थवाहनाचें सामर्थ्य प्रतीत होण्याच्या पूर्वीच्या अवस्थेंत आद्य मानव हावभावभाषेचा, अंगविक्षेपभाषेचा उपयोग करीत होता. आपले हात, हाताचीं बोटें, डोळे वगैरे अवयवांच्या साह्यानें तो बोलत होता. मुखयंत्राच्या साह्यानें नाहीं. आद्य मानव हातानें व डोळ्यानें बोलत होता; तोंडानें नाहीं. जसजशी त्याची प्रगति होत गेली तसतसा त्याला हातांचा उपयोग बोलण्याशिवाय इतरत्र करण्याची जरूरी भासूं लागली. जसजसे हात इतर कामांत-विशेषतः मृगया, कृषि व इतर कलांत गुंतू जाऊं लागले तसतशी मनांतील भाव व्यक्त करण्याकडे इतर कोणत्या तरी इंद्रियाची योजना मनुष्यानें केली. हें जें दुसरें इंद्रिय त्याला उपयुक्त आढळलें तें मुख होय §. अशा रीतीनें हात गेले व तोंड आलें.

हावभावांच्या भाषेचें परिणत स्वरूपः ह्या हावभावांच्या भाषेचा अवशेष अद्यापहि मोठ्या चांगल्या कलेच्या स्वरूपांत आपणास आढळून येतो. हावभावांची भाषा आजहि आपल्या परिचयाची आहे. प्रत्यक्ष ध्वनींपेक्षां किंवा ध्वनींच्या भाषेपेक्षां हावभावांची

---

§ Sir Richard Paget : *Human Speech*, p 132.

भाषा आजहि अधिक समजली जाते. कारण प्रत्यक्ष भाषेपेक्षां अधिक अर्थ हावभावांमार्फत व्यक्त केला जातो, असा आपला आजचा अनुभव आहे. सर्वांच्या सर्व अन्तःकरण मुद्रेच्या मार्फत दाखविलें जातें. हृदयाचें प्रतिबिंब मुद्रेवर उमटतें. मुद्रा किंवा चेहरा हा एक आरसा आहे. ह्या मुद्रेपेक्षांहि महत्त्वाचे डोळे आहेत. सगळ्या विश्वांतील प्रेम, सगळ्या विश्वांतील शृंगार डोळ्यांत सांठविलेला आहे व तो डोळ्यांमार्फत दाखविला जातो. डोळ्यांच्या मार्फत कित्येक अन्तःकरणें जोडलीं व तोडलीं जातात. डोळ्यांच्या भाषेपुढें ही तोंडाची किंवा शब्दांची भाषा अगदीं रद्द आहे. प्रेमाची उत्कटता, आतुरता, उत्कंठा इत्यादि सर्व भावना डोळे बोलतात. डोळे शृंगार बोलतात; तोंड रुक्ष व्यवहार बोलतें. डोळे विकार बोलतात; तोंड विचार बोलतें. राग व अनुराग, लाभ व लोभ, नम्रता व उद्धतता असे परस्परविरुद्ध विकार डोळे काय किंवा मुद्रा काय ह्यांच्या द्वारां प्रगट केले जातात.

१५ अभिनयकला : ह्या हावभावांच्या भाषेला आपण ‘**अभिनय**’ असें म्हणतों. अभिनय म्हणजे एक प्रकारची भाषा आहे. तें एक प्रकारचें दुसऱ्याशीं बोलणें आहे. अभिनयानें आपण आपले विचार व विकार दुसऱ्यास सांगतों. शब्दभाषा व अभिनयभाषा ह्या दोहोंत फरक इतकाच कीं एकींत आपण ध्वनींचा उच्चार करतों तर दुसरींत अवयवांची हालचाल करतों. पुष्कळ वेळां असें होतें कीं आपल्या मनांत आपणास काय वाटतें तें शब्दानें बोलून व्यक्त करतां येत नाहीं. मनांतील एखादा विचार आपणास भाषेच्या द्वारां पूर्ण तंतोतंत असा व्यक्त करून दाखवितां येत नाहीं. विचाराची ही गोष्ट तर विकाराची गोष्ट त्याहूनहि कठीण आहे. आपल्या मनांतील भावना, विकार, त्यांची गुंतागुंत अगदीं हुबेहुब रीतीनें भाषेच्या द्वारां दुसऱ्यांस सांगणें तर सुतराम् अशक्य आहे. आम्हीं आपल्या भावना भाषेच्या द्वारां प्रगट करतों असें म्हणणें फुकट आहे. प्रेमाचा किंवा दुःखाचा आवेग कितीसा आपणांस शब्दांनीं सांगतां येईल ? भक्तीच्या समाधींतील सौख्य बरोबर शब्दांनीं सांगणारा कोण आहे ? आईचें आपल्या मुलांसंबंधींचें वात्सल्य भाषेनें सांगतां येणें शक्य आहे कां ? राग, लोभ, प्रेम, शृंगार, कृतज्ञता, तुच्छता, जुगुप्सा, लज्जा इत्यादि विकारांना शब्दांच्या मापानें मोजतां येईल का ? ह्या भावना किंवा हे विकार भाषेचे क्वचितच विषय होत. हे आपणास मनांत **वाटतात.** हे आपण आंत अनुभवतों. ह्यांचीं दृश्य चिन्हें किंवा गमकें मात्र आपल्या चेहऱ्यावर उमटतात; ह्या आंतील विकारांचा आपल्या शरीराच्या अवयवांवर परिणाम होतो, व त्यांमध्यें हालचाल निर्माण होते. अवयवांतील ह्या हालचाली सर्वांच्या ओळखीच्या झाल्या आहेत. व त्याच ‘अभिनया’च्या विषय होतात. ह्यामुळें ‘अभिनय’ ही एक कला ठरली. भाषेंत जें सामर्थ्य नाहीं तें अभिनयांत आहे. वाङ्मयकाराला जे मनोविकार भाषेंत पूर्णत्वानें व्यक्त करतां येत नाहींत ते अभिनयकार आपल्या अभिनयकलेनें बरोबर व्यक्त करूं शकतो. अभिनयाची भाषा ही अशा महत्त्वाची आहे. ही सौंदर्यनिर्मितीची एक कला आहे. हिचें मूळ हावभावांत आहे.

मानवाच्या आद्य हावभावभाषेचीं स्थूल व परिणत अशीं दोन्हीं स्वरूपें वर सांगितलीं. शब्दाच्या भाषेच्या पूर्वींची ही अवस्था होती. आपल्या विचारविकारांचें प्रकटीकरण व निवेदन ह्या दोहोंचें साधन हावभाव हे होते. येथपर्यंत ठीक आहे. सर रिचर्ड पॅगेट ह्यांची ही हावभावांच्या भाषेची उपपत्ति येथपर्यंत संमत होण्यास कांहींच हरकत नाहीं. परंतु ह्याच्याहि पुढें ते जातात. त्यांचें म्हणणें थोडक्यांत असें आहे. मुद्रेच्या, हातांच्या व बोटांच्या हालचाली बरोबर अगदीं त्या सारख्या हालचाली तोंडांत होऊं लागल्या; व त्या जिभेच्या साह्यानें होऊं लागल्या. बाहेर जे हात ते तोंडांत जीभ. जीभ तोंडांत बाहेरच्या हातांप्रमाणें अगदीं बरोबर हावभाव किंवा हालचाल करूं लागली. जिभेच्या त्या हालचालीप्रमाणें निरनिराळे शब्द किंवा ध्वनीचे प्रकार सुरू झाले. ह्याला कांहीं भाषांतील शब्दांचीं उदाहरणें पाहिलीं म्हणजे बाहेरच्या हातांच्या हालचाली जीभ आंत तोंडांत कशी करते व त्या विशिष्ट हालचालींचा द्योतक असा अर्थ त्या ध्वनींना कसा प्राप्त झाला आहे हें स्पष्ट होईल. त्याला त्यांनीं संस्कृत धातु उदाहरणें म्हणून घेतलीं आहेत. “ अघ्, अंघ् ” हे धातु उच्चारतांना जीभ मध्यें येऊन श्वासनलिकेचा संकोच होतो. गुदमरतांना जसा गळा दाटतो तशी बरोबर क्रिया होते. ह्यावरून ‘ अघ् व अंघ् ’ ह्या धातूंना ‘ गुदमरणें, गळा दाटणें ’ असा अर्थ प्राप्त झाला. ‘अद्, चम्, जेम्’ वगैरे धातु उच्चारतांना जिभेचा टाळूला किंवा ओंठाला स्पर्श होऊन खातांना जसा मचमच आवाज होतो व जी हालचाल होते तशी बरोबर तोंडांत जिभेची होते. त्यावरून त्या धातूंना ‘ खाणें, जेवणें

असा अर्थ प्राप्त झाला. ‘ अन्, श्वस्, जीव् ’ वगैरे धातु उच्चारतांना नाकांतून हवा आंत घेतांना व बाहेर सोडतांना जसा आवाज होतो तसा आवाज तोंडांत होतो व त्यांना तसा अर्थहि ‘ श्वासोच्छास करणें ’ हा प्राप्त झाला आहे. ‘आप्, ’ हा धातु उच्चारतांना दोन्ही ओंठ एकमेकावर आदळतात व ‘ पकडणें, ताब्यांत घेणें ह्या दोन क्रियांची दर्शक अशी क्रिया तोंडांत घडून येते. त्यावरून त्या धातूला ‘ पकडणें, घेणें, मिळविणें, ताब्यांत घेणें ’ हे अर्थ प्राप्त झाले आहेत. ‘ कृ, गर्, गृह्, तंक्, दा, स्फुट्, वगैरे धातु हे असल्याच प्रकारचे आहेत. अशीं आणखी किती तरी उदाहरणें पॅगेट ह्यांनीं दिलीं आहेत‡. इंग्रजी व इतर भाषांतहि अशीं उदाहरणें सांपडतात. cut, stop, top, clank, bang, dim, fit, hiss, pooh, ah वगैरे किती तरी उदाहरणें वरील विधानास पोषक आहेत, असें त्यांचें म्हणणें आहे.: त्यांनीं आपल्या उपपत्तीस पुरावा म्हणून आणखी जुन्या जपानी भाषेंतील शब्दांचींहि उदाहरणें दिलीं आहेत. मराठींतहि असल्या प्रकारचीं उदाहरणें सांपडण्यासारखीं आहेत. ‘फोडणें, तोडणें, खोकणें, सरणें, सोसणें, कुरतुडणें, मुळूमुळूं, सुरुसुरू, झिमझिम, टपटप, सरसर, छी :, थू, ओहो वगैरे सर्व ध्वनिशब्द ह्याच प्रकारचे आहेत असें म्हणतां येईल.

१६ हावभाव भाषेचें वैगुण्य : अशीं जरी ध्वनिशब्दांचीं उदाहरणें आढळलीं तरी व जरी बाह्य इंद्रियांच्या चलनवलनाचा प्रतिध्वनि त्या शब्दांच्या अर्थांत उमटलेला दिसत असला तरी ते शब्द उच्चारतांना आंतील जिव्हेची हालचाल बाहेरील हात वगैरे इंद्रियांच्या सारखी होते असें म्हणणें म्हणजे हावभावांच्या भाषेचें सामर्थ्य वाजवीपेक्षां अधिक आहे असें म्हणण्यासारखें आहे. हावभावांची भाषा ही शब्दांच्या किंवा ध्वनींच्या भाषेच्या पूर्वींची अवस्था आहे येथपर्यंतचा सिद्धांत मानणें हें शास्त्रीय होईल.परंतु बाहेरचीं हात वगैरे इंद्रियें जशी हालचाल करतात तशी बरोबर हालचाल तोंडांत जीभ करते हें मानणें अशास्त्रीय होईल. तशी हालचाल होते हें खरें मानलें तर एका विशिष्ट हावभावाच्या अर्थाचा दर्शक शब्दाचा उच्चार सर्व भाषांत एकच झाला पाहिजे. रीचर्ड पॅगेटनीं दिलेलीं उदाहरणेंच ह्या सिद्धान्ताच्या विरुद्ध जातील. ‘अघ्, अंघ्’ हे धातु उच्चारतांना गळा दाटतो म्हणून त्यांना “ गुदमरणें, गळा दाटणें ” असा अर्थ प्राप्त झाला तर त्या अर्थाच्या शब्दांत ‘ अघ्, अंघ् ’ ह्या धातूंचे उच्चार आलेच पाहिजेत. तसें असल्याचें तर आढळून येत नाहीं. तसें झालें तर सर्व भाषांतील निदान ध्वनिशब्द तरी सारख्याच उच्चाराचे असले पाहिजेत असें ठरेल. तशी तर वस्तुस्थिति नाहीं. पुनः त्यानें भाषेंत कृत्रिमता येईल ही गोष्ट निराळीच. शिवाय एकाच अर्थाचे पुष्कळ शब्द घेतले तर त्या सर्वांचे उच्चार सारखेच झाले पाहिजेत असें मानावें लागेल. ‘ ताडणें ’ हा शब्द उच्चारतांना मारण्याच्या क्रियेंत हात जसा दुसऱ्या वस्तूवर आदळतो तशी जीभ तोंडातल्या अवयवांवर आदळते असें मानलें तर मारणें, चोपणें, दण्डणें, कांडणें, कुटणें, break, beat, strike, slap, ताडनम्, दण्डनम्, कुट्ट वगैरे शब्द उच्चारतांना जीभ तशीच आदळत असली पाहिजे. ती तशी आदळली तर तेच ध्वनि उमटले पाहिजेत. म्हणजे सर्वांचे एकसारखेच उच्चार झाले पाहिजेत. तसें तर प्रत्यक्षांत आढळून येत नाहीं. प्रत्येक भाषेंतील शब्द तर निरनिराळ्या उच्चाराचे आहेत. एकाच वंशाच्या भाषांतील एकार्थ शब्द निरनिराळ्या उच्चाराचे जर आढळतात तर भिन्न वंशाच्या भाषांतील एकार्थ शब्द भिन्न उच्चाराचे आढळल्यास नवल नाहीं. तेव्हां एका विशिष्ट मर्यादेच्या पुढें सर रिचर्ड पॅगेटचा हा हावभावभाषेचा सिद्धांत मान्य करवत नाहीं. तो प्रत्यक्ष वस्तुस्थितीच्या व शास्त्राच्या विरुद्ध जातो. त्या उपपत्तींतील इतकाच भाग फार झालें तर खरा मानतां येईल. हावभाव भाषा (gesture language) ही मानवांची आद्य भाषा होय. ध्वनिभाषा ही नंतर उत्पन्न झाली. हावभाव हें मानवी विचारप्रदर्शनाचें पहिलें माध्यम. ध्वनि हें माध्यम नंतरचें. ध्वनि हें तरी माध्यम मानवानें कां पत्करलें ? त्यांत तसे गुण आढळले म्हणून पत्करलें. कोणते ते गुण ? त्यांतील पहिला गुण हा. उजेड असो वा अंधार असो; दोन्ही वेळां सारखाच प्रतीत होण्याचा गुण ध्वनींत आहे. दिवसां, रात्रीं, संध्यासमयीं, केव्हांहि ध्वनि सारखाच ऐकला जातो. त्याचा दुसरा गुण हा. ध्वनि उत्पन्न झाल्याबरोबर लगेंच तो समुद्राच्या लाटांप्रमाणें चहूं बाजूस पसरतो. कसल्याहि अडथळ्यास तो जुमानीत नाहीं. कांहींहि त्याला अडवूं शकत

---

‡ Sir Richard Paget : *Human speech*, pp. 140-141.

नाहीं. ह्या दोन गुणांमुळें ध्वनि हें माध्यम मानवाला विचारप्रकटीकरणासाठीं फार सोयीस्कर असें सांपडलें व त्याच माध्यमाचा विकास मानवी भाषेंत झाला. हावभावांत हे दोन्हीहि गुण नव्हते. त्यामुळें अर्थातच हावभावभाषा मागें पडली व ध्वनिभाषा पुढें आली.

१७ मानवेतर प्राण्यांची भाषा : आवाज उत्पन्न करण्याचें सामर्थ्य ईश्वरानें सर्व प्राण्यांना दिलें. मानव प्राणी ज्याप्रमाणें निरनिराळे ध्वनि निर्माण करून आपल्या मनांतील भाव प्रकट करतो त्याप्रमाणें इतर सर्व जरी नाहींत तरी कांहीं प्राणी ध्वनि निर्माण करून आपले भाव मर्यादित रीतीनें कां होईना पण प्रकट करतात. मानवेतर प्राण्यांचा एकच आरटन सूर आहे. पक्ष्यांचाहि एक आरटन सूर आहे. जरी हा सूर एक असला तरी त्यामध्यें कांहीं थोड्या भिन्न भिन्न परिस्थितींत कांहीं थोडे भिन्न प्रकार त्यांना उत्पन्न करतां येतात. त्या भिन्न प्रकारांवरून त्यांच्या स्थूल भावना समजून येतात. एखाद्या पक्ष्याचें साधें स्वाभाविक ओरडणें निराळें व संकट आलें असतांना ओरडणें निराळें. उन्मादावस्थेंतील सूर निराळा व पलायनाच्या वेळचा सूर निराळा. शत्रूशीं भांडण्याच्या वेळचें ओरडणें निराळें व लहान अर्भकांच्या तोंडांत भक्ष्य भरवितांना ओरडणें निराळें. असे पक्ष्यांच्या एका आरटन सुराचे भिन्न तेरा प्रकार असल्याचें सांगतात$. पाण्यांतल्या माशांचाहि एक ध्वनि आहे. तो ऐकूं येतोच असें नाहीं. त्याला हातांत धरला कीं कांहींसा कर्कश ध्वनि तो उत्पन्न करतो. मासा पाण्यांत असतांना जर त्याचा ध्वनि उत्पन्न झाला तर त्याच्या लगतच्या पाण्यावर त्याच्या लाटा उत्पन्न होत असून त्यांच्या द्वारां त्याच्या मनांतील भाव इतर माशांना कळत असला पाहिजे. मुंगी वगैरे कीटकांनाहि एखादा ध्वनि असावा आणि तो वाट शोधतांना, वाटेंत थबकतांना, हुंगतांना, वळसे घेतांना, मध्येंच डोकें उंचावतांना, त्या मुंग्या उत्पन्न करीत असाव्यात असें कीटकशास्त्रज्ञ सांगतात. कीटकांपेक्षां उत्क्रांत झालेले प्राणी कुत्रे, हरीण, ससा, मांजर, हत्ती, गाय, घोडा, गाय, ससाणा, पिंगळा, पाल, पोपट, माकड ह्यांच्या आरटन सुरांतील भिन्न प्रकार उघड ऐकूं येतात. हे प्राणी इतर प्राण्यांपेक्षां अधिक माणसाळले असल्यामुळें किंवा उत्क्रांतीमध्यें अधिक पुढारलेले असल्यामुळें ध्वनीचे भिन्न प्रकार उत्पन्न करणें, त्या भिन्न ध्वनींशीं भिन्न अर्थ निगडित करणें व भोंवतालच्या मानवांच्या भाषेंतील ध्वनींचा अर्थ समजणें ह्या गोष्टी त्यांना शक्य होतात. शब्दाची व्याख्या 'व्यवहाराला प्रवृत्त करणारा ध्वनि' अशी जर केली तर ह्या वरील प्राण्यांचे ध्वनि हे शब्द होत, त्यांची एक विशिष्ट भाषा आहे असें मानावें लागतें. त्यांतल्या त्यांत माकडें हीं तर अधिक पुढारलेलीं आहेत. त्यांच्या भाषिक सामर्थ्याची बौद्धिक पातळी इतर प्राण्यांच्यापेक्षां उच्च आहे. त्यांना नऊ भिन्न ध्वनि काढतां येतात. हे त्यांच्या भाषेंतील नऊ भिन्न शब्दच. त्यांचे अर्थहि निरनिराळे आहेत. त्याप्रमाणें त्यांची व्यवहारप्रवृत्तिहि भिन्न भिन्न होते. तज्ज्ञांचें म्हणणें असें कीं "माकडाचा स्वाभाविक ध्वनि खि, क्खि, खी यी (ch-ye) असा असून त्याचा अर्थ आपल्या अस्तित्वाची जाणीव, आनंद, सुख वगैरे भावदर्शक आहे. 'क-इ-इ' असा माकडानें ध्वनि उच्चारला तर त्याला दुसऱ्याचें लक्ष आपल्याकडे वेधावयाचें आहे असा भावार्थ असतो. भय, धोका, संकट हें दाखवावयाचें असेल तर तें उच्च कर्कश तारस्वर उत्पन्न करतें. तो कांहींसा इ-क्-ग्-क् (e-c-g-k) अशा सारखा होतो, किंवा कधीं 'ङ-कू-उ-व-(n-qu-u-w) अशा सारखा होतो. माकडानें व्ह-उ-उ-व (wh-oo-w) असा ध्वनि काढला म्हणजे ओळखावें कीं त्याला कांहीं तरी खाण्यापिण्याचा पदार्थ पाहिजे आहे किंवा त्याच्यावर उपकार झाला आहे, किंवा त्याला कोणी तरी कुरवाळलें आहे. कोणत्याहि चांगल्या कृत्याला त्याची प्रतिक्रिया ह्या ध्वनीनें होते.§"

मानवेतर प्राण्यांच्या ध्वनींना कांहीं अर्थ असावेत असें वाटतें. त्यांच्या ध्वनींसारखे ध्वनि जर एखाद्या कुशल मनुष्यानें काढले तर त्यांचा परिणाम त्या प्राण्यांवर झाल्याविना राहात नाहीं. एखाद्यानें कावळ्याचा ध्वनि काढला कीं लगेंच कावळे चहूंबाजूंनीं ओरडत त्या माणसाच्या भोंवतीं गोळा होतात. कुत्र्यासारखा बरोबर कोणी भुंकला कीं लगेंच त्या परिसरांतील बहुतेक कुत्रीं एकदम ओरडून एकच गिल्ला करतात, असा नेहमींचा अनुभव आहे.

१८ त्यांच्या भाषेच्या मर्यादा : हा तात्विक विचार झाला. मानवेतर कांहीं प्राणी ध्वनि उत्पन्न करूं शकतात. त्यांतील कांहीं त्यांचे कांहीं भिन्न प्रकार काढतात. त्या

$ A. L. Turnbull : *Bird-Music*, ch. I.

§ R. L. Garner : *The Speech of Monkeys*, P. 8.

ध्वनिप्रकारांना कांहीं स्थूल अर्थ असतो. ह्या इतक्या बाबतींत मानवांशीं त्यांचें साम्य आहे. ह्या दृष्टीनें केवळ स्थूल तात्त्विक दृष्टीनें त्यांच्या ध्वनिसमूहांना किंवा त्यांच्या भाषेला 'भाषा' म्हणतां येईल. परंतु मानव व इतर प्राणी ह्यांचें साम्य येथवरच आहे; ह्याच्यापुढें नाहीं. मानवेतर प्राण्यांचें हें सामर्थ्य अत्यंत मर्यादित आहे. त्यांच्या ध्वनींची संख्या अत्यंत मर्यादित आहे. ते ध्वनि एकसुरी आरटन स्वरूपाचेच असतात. त्यांना सुटे स्वतंत्र असे ध्वनिखंड उत्पन्न करतां येत नाहींत. संयुक्त ध्वनि किंवा ध्वनिसमूह निर्माण करतां येत नाहींत. त्यांना आपल्या ध्वनींना अत्यंत स्थूल असाच फक्त अर्थ देतां येतो. अर्थाचे भिन्न प्रकार त्यांना करतां येत नाहींत. त्याच्या भिन्न भिन्न सूक्ष्म छटा उत्पन्न करण्याची गोष्ट तर दूरच. अशा रीतीनें मानवेतर प्राण्यांचें सामर्थ्य अत्यंत मर्यादित आहे. मानव व मानवेतर प्राणी ह्या दोघांचें हें ईश्वरदत्त सामर्थ्य सारखें असलें तरी मानवानें तें आपल्या बुद्धीनें इतकें वाढविलें आहे कीं तें सामर्थ्य सारखें असून नसल्यासारखें वाटतें. मानवांची भाषा निराळी व पशुपक्ष्यांची निराळी इतकें मानूनसुद्धां पुरें पडत नाहीं, तर पशुपक्ष्यांची भाषा ही भाषाच नव्हे असें मानावें लागतें. इतका फरक दोहोंच्या भाषांत आहे. मानवानें आपल्या ध्वनींची संख्या वाढविली. त्या ध्वनींना उच्चारमात्रांचा निश्चित आकार दिला. सुटे स्वतंत्र, संयुक्त, समस्त व व्यस्त, स्पृष्ट व इषत्स्पृष्ट इतक्या भिन्न प्रकारांनीं ते उत्पन्न करण्याचें सामर्थ्य पैदा केलें. त्यांत पुनः कंठ्य, औरस्य, तालव्य, मूर्धन्य, ओष्ठ्य, स्वर, व्यंजनें, अर्धस्वर, ऊष्मे, महाप्राण इतके प्रकार त्यानें केले. ह्या सर्व ध्वनिप्रकारांवर व ध्वनिसमूहांवर त्यानें भिन्न भिन्न, स्थूल व सूक्ष्म अर्थाचा अध्यारोप केला. ध्वनीची संख्या, ध्वनीचे आकार व ध्वनीचा अर्थ ह्या तिन्ही बाबत मानवानें आपल्या बुद्धीच्या सामर्थ्यानें इतकी वाढ केली कीं त्याची भाषा निराळी व इतर प्राण्यांची निराळी, अशी स्थिति झाली आहे. ह्या दोहोंत केवळ प्रमाणाचाच भेद नाहीं तर प्रकाराचा भेद आहे.

१९ मानवी मुक्तमनः मानवानें ही जी वाढ केली ती आपल्या बुद्धिसामर्थ्यानें केली खरी, परंतु ती करणें त्याला कसें शक्य झालें ह्याचें स्पष्टीकरण करणें जरूर आहे. ह्यासाठीं मानव व मानवतेर प्राणी ह्यांची आणखी थोडी तुलना केली पाहिजे.

पशुपक्ष्यादिकांनीं जर एखादी निसर्गांतील वस्तु पाहिली तर ती त्यांना स्थूल इंद्रियानें दिसतें व तीं त्यांना त्या विशिष्ट वेळेपुरतीच व त्या विशिष्ट काळापुरतीच फक्त दिसते. त्या वस्तूची 'कल्पना' त्यांना करतां येत नाहीं. त्यांचें मन (किंवा बुद्धि) त्या विशिष्ट कालानें व स्थलानें बांधलेलें असतें. तसें मनुष्याचें नाहीं. त्याचें मन (किंवा बुद्धि) त्या विशिष्ट स्थलाच्या व कालाच्या पलीकडे जातें. त्याला स्थलकालाचीं बंधनें नसतात. मानवी मन ह्या दृष्टीनें मुक्त असतें. मानसशास्त्रवेत्ते मनाच्या ह्या अवस्थेला "मुक्तमन" -"Free Mind"–असें म्हणतात. मानवी मन मुक्त, स्वतंत्र असल्यामुळेंच त्याला कोणत्याहि कालांत व कोणत्याहि स्थलांत संचार करतां येतो. म्हणूनच त्याला ईश्वरनिर्मित कोणतीहि वस्तु प्रत्यक्ष इंद्रियप्रतीत करतां येते, इतकेंच नाहीं तर ती वस्तु प्रत्यक्ष समोर नसली तरी तिची त्याला 'कल्पना' करतां येते. म्हणूनच **ईश्वरनिर्मित व प्रत्यक्ष इंद्रियप्रतीत** अशी सृष्टि जशी एक आहे तशीच **मानवनिर्मित व बुद्धिप्रतीत** अशी दुसरी एक स्वतंत्र सृष्टि आहे. प्रत्यक्ष सृष्टीप्रमाणें कल्पनाधिष्ठित सृष्टि निर्माण करण्यांत त्यानें आपल्यास निर्माण करणाऱ्या ईश्वराची बरोबरी केली आहे.

मानवी मुक्तमनानें स्थल व काल ह्या दोन तत्त्वांवर ताबा मिळविला. हीं दोन्हीं तत्त्वें अनादि व अनंत असलीं तरी त्यांना आपल्या कह्यांत त्यानें आणिलें. कोणत्याहि स्थलाचा व कालाचा भाग तो आपल्या मनश्चक्षूपुढें चित्रित करूं शकतो. त्याच्या आयुष्यांत होणारी व त्याच्या जन्मापूर्वीं झालेली सर्व कालांतील व सर्व स्थलांतील वैश्विक घटना तो मुक्तमनाच्या साह्यानें कल्पनेच्या जोरावर स्वतः अनुभवूं शकतो, इतकेंच नव्हे तर ती पुनः प्रकट करूं शकतो. प्रकट करण्याचें त्याचें मुख्य साधन अर्थात् त्याची भाषा होय; त्या भाषेंतील शब्द होत; त्या शब्दांचें वर्ण होत; त्यांचा अर्थ होय! भाषा काय, किंवा शब्द काय, हीं त्या प्रकटीकरणाचीं चिन्हें होत. त्यांचा उपयोग केवळ खुणा म्हणूनच आहे. भाषेंतील शब्दांना आकार आहे. त्यांना ध्वनि आहे. शब्दांच्या आकारांच्या योगानें स्थल (space) ह्या तत्त्वाचें प्रकटीकरण होतें*. शब्दाच्या

---

* R. A. Wilson : *Miraculous Birth of Language*; p. 158.

ध्वनींच्या योगानें काल (Time) ह्या तत्त्वाचें प्रकटीकरण होतें. अशा रीतीनें स्थल व काल ह्या दोन तत्त्वांवर त्यानें ताबा मिळविला आहे. ह्याच्या जोरावर त्यांनें आपल्या निसर्गदत्त ध्वनीला आकार दिला, त्यांत विविध प्रकार केले व त्यांच्यावर भिन्न अर्थ लादले. मानवध्वनि **साकार, सप्रकार व सार्थ** झाला व मानव भाषा सिद्ध झाली. इतर प्राण्यांचा ध्वनि मानवध्वनि इतका विस्तृत प्रमाणावर साकार, सप्रकार व सार्थ नसल्यामुळें त्यांच्या भाषेपासून मानव भाषा भिन्न झाली इतकेंच नव्हे तर अगदीं भिन्नस्वरूपाची झाली.

२० ध्वनि साकार कसे झाले ?: मानवध्वनि हे साकार, सप्रकार व सार्थ झाले खरे, पण ते कसे झाले हें पाहणें ही ह्याच्या पुढची गोष्ट आहे. आपण जेव्हां ध्वनि उच्चारतों तेव्हां आंतील हवा आपण फुफ्फुसांत दाबतों व ती श्वासनलिकेच्या द्वारां बाहेर फेकतों. हवा बाहेर फेकतांना आपल्या मुखांत असणाऱ्या निरनिराळ्या जीभ, दांत, ओंठ, तालु इत्यादि इंद्रियांचे अडथळे मध्यें आड येतात. अशा अडथळ्यांमधून आंतील हवा बाहेर पडते व तिच्यांत निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात. ही निर्लेप हवा तोंडांतल्या नादपेटिकेंतून आल्यामुळें तिला नाद प्राप्त होतो. पुढें कंठ, तालु, दन्त, ओष्ठ ह्या इंद्रियांचा स्पर्श झाल्यामुळें त्या नादांत तसे निरनिराळे प्रकार उत्पन्न होतात. आंतील हवा तोंडाच्या द्वारां बाहेर फेकण्याची क्रिया शबर स्वामींनीं चांगली वर्णन केली आहे. "आंतील हवा प्रथम नाभीपासून निघते. ती हृदयाजवळ आली म्हणजे वाढते. कंठांत आली म्हणजे तिचे निरनिराळे प्रकार होतात. नंतर ती तालूवर आदळते व परतते. नंतर तोंडामध्यें भिन्न अवयवांशीं स्पर्श झाल्यामुळें निरनिराळे ध्वनि उत्पन्न करते"§. ह्या उच्चाराच्या क्रियेला प्रयत्न असें म्हणतात. हा प्रयत्न बाह्य व आंतर अशा दोन प्रकारचा आहे. ह्या दोहींचे पुनः निरनिराळे प्रकार आहेत. "ककारापासून मकारापर्यंत स्पर्शनामक पंचवीस वर्णांच्या उच्चारांचा स्पृष्ट नांवाचा आभ्यन्तर प्रयत्न होय. अन्तस्थ नांवाच्या य्, र्, ल्, व् याचा ईषत्स्पृष्ट होय. ऊष्म नामक श्, ष्, स् ह्या वर्णांचा इषत्विवृत प्रयत्न आहे. स्वरोच्चार हा विवृत नामक आभ्यन्तर प्रयत्न होय"§. बाह्य प्रयत्नांचे विवार, संवार, श्वास, नाद, घोष, अघोष, अल्पप्राण, महाप्राण हे प्रकार आहेत. त्यामध्यें प्रत्येक वर्गांतील प्रथम आणि द्वितीय वर्ण यांचे विवार, श्वास, अघोष हे प्रयत्न आहेत. पहिल्या वर्णांचा अल्पप्राण व दुसऱ्या वर्णांचा महाप्राण प्रयत्न आहे. तसेंच त्या वर्गांतील तिसऱ्या व चौथ्या वर्णांचा संवार, नाद, घोष असा प्रयत्न असून तिसऱ्याच्या अल्पप्राण, चौथ्याचा महाप्राण प्रयत्न आहे. पांचवावर्णाचा तिसऱ्या वर्णासारखाच प्रयत्न असून त्यांत आनुनासिक्य हा एक अधिक गुण आहे"‡. प्रत्येक वर्गांतील वर्णांचें हे प्रकार झाले. वर्णांचें त्यांच्या उच्चारस्थानांवरून झालेले पांच वर्ग–कंठ्य, तालव्य, मूर्धन्य, दन्त, ओष्ठ्य–हे आहेतच. ह्यांचेंहि पुनः आणखी कांहीं सूक्ष्म प्रकार कांहीं भाषांत पडतात. परंतु ते त्या त्या भाषेचें स्वतंत्र उच्चार म्हणतां येतील.

ध्वनीचे निरनिराळे आकार व प्रकार आपण येथवर पाहिले. आतां त्यांना अर्थ कसा प्राप्त झाला हें आपण पाहूं. शब्दांना अर्थ कसा प्राप्त झाला हा ह्याच्या पुढचा प्रश्न आहे. प्रथम ध्वनीला स्वतंत्र अर्थ असतो कीं नाहीं हाच मुळीं वादाचा विषय आहे. आपल्याकडील पौर्वात्य व तसेंच पाश्चात्य शास्त्रकारांनीं ह्याबाबत पुष्कळ पूर्वपक्ष उत्तरपक्ष केले आहेत. व्याकरणमहाभाष्यांत पाणिनीच्या २–५ ह्या सूत्राच्या अनुषंगानें ह्यासंबंधीं विवेचन केलें आहे. 'अर्थवन्तो वर्णा धातुप्रातिपदिकप्रत्ययनिपातानामनेकवर्णानामर्थदर्शनात्' ह्या वार्तिकानें त्या विवेचनास आरंभ केला आहे. 'वर्ण अर्थवान् आहेत; कारण कांहीं ठिकाणीं धातु, प्रातिपदिक, प्रत्यय व निपात हे एकाक्षरी असूनहि त्यांना अर्थ आहेसा दिसतो. 'इ' सारखे धातु, अ (आभ्याम्) सारखें प्रातिपदिक, 'सु, अ' सारखें प्रत्यय, 'अ' सारखे निपात, हे सर्व वर्ण अर्थवान् आहेत. शिवाय वर्णांची उलटापालट केली असतां अर्थांमध्यें फेरफार होतो ("वर्णव्यत्यये चार्थान्तरगमनात्"–१०). उदाहरणार्थ, 'कूप, सूप, यूप,' ह्या तीन शब्दांतील 'क' काराचा अर्थ विहीर, 'स' काराचा अर्थ वरण व 'य' काराचा अर्थ खांब असा आहे. त्याप्रमाणें एखादा वर्ण कमी झाला असतां पूर्वींचा अर्थ राहात नाहीं (वर्णानुपलब्धौ चानर्थगतेः– ११); उदाहरणार्थ 'वृक्ष' ह्यांतील 'व्' वर्ण जर कमी केला तर 'ऋक्ष' शब्द राहतो व 'वृक्ष' चा अर्थ 'ऋक्ष' मध्यें येत नाहीं. आणखी एक प्रमाण आहे. वर्णसमूहाला

---

§ शबरभाष्य : मिमांसासूत्र, १-३-२५.

‡ म.म. वा. अभ्यंकर : व्याकरण–माहाभाष्य–भाषान्तर, पृष्ठ.१६७, १६०.

ज्या अर्थी अर्थ आहे त्या अर्थी वर्णाला सुद्धां अर्थ आहे (संघातार्थवत्त्वाच्च-१२). हा पूर्वपक्ष झाला. ह्याचा उत्तरपक्ष म्हणून असें म्हणतां येईल कीं वर्णाला अर्थ नाहीं; कारण प्रत्येक वर्णाला स्वतंत्र अर्थ असलेला दिसत नाहीं. एकेक वर्ण उच्चारल्याबरोबर त्याचा स्वतंत्र निराळा असा अर्थ मनांत कधींहि येत नाहीं[1]. 'वृक्ष' शब्द उच्चारल्याबरोबर झाड असा अर्थ आपणापुढें येतो, परंतु त्यांतील 'व्' हा वर्ण उच्चारल्यानें त्या अर्थाचा कांहीं थोडा अंश व 'ऋक्ष' असें उच्चारल्यानें बाकीचा राहिलेला अर्थ आपणापुढें उभा राहतो व नंतर 'झाड' हा समस्त अर्थ प्रतीत होतो असें कधीं होत नाहीं. 'वृक्ष' ह्या समस्त वर्णसमूहाचा 'झाड' हा समस्त अर्थ आहे. 'इ, ऋ, जी' इत्यादि एकाक्षरी वर्णांना स्वतंत्र अर्थ असला तरी त्यानें वर्णाला अर्थ आहे हें सिद्ध होत नाहीं. असे ह्या वादाचे पूर्वपक्ष उत्तरपक्ष आहेत.

२१ अनुकरणात्मक शब्द : शब्दांना जसा अर्थ आहे तसा वर्णांना अर्थ नाहीं. शब्द एका पुढें एक ठेविल्यानें, त्यांना अन्वित केल्यानें, जो अर्थ निष्पन्न होतो व त्या अर्थाप्रमाणें जसें आपण व्यवहारास प्रवृत्त होतों तसें वर्णांच्या बाबतींत होत नाहीं. शब्द हे वस्तूंच्या खुणा किंवा प्रतीकें आहेत. शब्द उच्चारल्याबरोबर त्या त्या वस्तूची कल्पना आपणासमोर येते. ध्वनींच्या उच्चारानें आपणासमोर वस्तुची कल्पना जर उभी राहूं शकली तर तितक्या पुरतें त्या ध्वनींना अर्थ आहे असें म्हणावें लागेल. अनुकरणात्मक ध्वनींच्या बाबत किंवा भावनात्मक ध्वनींबाबत फार झालें तर तशी त्या वस्तूची कल्पना उभी राहूं शकते असें म्हणतां येईल. 'शब्दाचा उचार हा त्याच्या अर्थाचा प्रतिध्वनि असतो,' ह्या सिद्धांताच्या मुळाशीं ध्वनीला अर्थ असतो ही विचारसरणी आहे. तीच विचारसरणी ध्वनिशब्द, अनुकरणात्मशब्द, प्रतिध्वनिशब्द, ह्यांच्याहि मुळाशीं आहे. कांहीं कांहीं प्राण्यांना त्यांच्या आवाजावरून नांवें पडलीं आहेत. त्यावरून त्या ध्वनींना अर्थ प्राप्त झाला आहे. चिमणी हें नांव चिंव चिंव आवाजावरून, काक, काग, कावळा हीं नांवें त्या प्राण्याच्या आवाजावरून, टिट्टिभी, टिटवी हीं नांवें त्यांच्या टॅंव, टॅंव आवाजावरून, मयूर, मोर हीं नांवें त्यांच्या मॅंव मॅंव आवाजावरून, पडलीं आहेत. कुत्र्याला 'भों भों' किंवा गाईला 'हम्मा' हें नांव त्यांच्या विशिष्ट आवाजावरूनच पडलें आहे. ध्वनीला अशा रीतीनें अर्थ प्राप्त होतो. शब्दांच्या केवळ उच्चारावरूनच त्यांच्या अर्थाची कल्पना येणारे असे पुष्कळ शब्द मराठी भाषेंत आहेत. सरसर, धपधप, धुगधुग, फटफट, भकभक, फाटकन्, ताडकन्. काटकन्, सूंसूं, भिरकन्, गडगडाट, खळखळाट, झिमझिम, रिपरिप, गुंगूं करणें, गोंगावणें, घोरणें, ढोसणें, टर्रा फाडणें, गुरगुरणें, चुकचुकणें, कुचकुचणें, हंबरणें, भोंकणें, डरकणें, डुरकणें इत्यादि कितीतरी ध्वनिशब्द मराठींत आहेत ह्यांमध्यें ध्वनींना अर्थ प्राप्त झाला आहे असें मानावें लागतें.

२२ ध्वनींचा अर्थ : प्रतिध्वनिशब्दांत व अनुकरणात्मक शब्दांत त्या त्या ध्वनींचाच प्रतिध्वनि किंवा त्यांचें अनुकरण असल्यामुळें त्या ध्वनींना अर्थ प्राप्त झाल्यास नवल नाहीं. परंतु कधीं कधीं ध्वनींच्या उच्चनीचत्वामुळें, ऱ्हस्वदीर्घत्वामुळें, आरोहावरोहामुळें, मार्दवकार्कश्यामुळें, त्या त्या ध्वनींना किंवा ध्वनिसमूहांना निरनिराळे स्थूल अर्थ प्राप्त होतात. ऱ्हस्व ध्वनि त्वरा दाखवितो तर दीर्घ ध्वनि मंदाई, संथपणा दाखवितो. कोमल, मृदु, मंद भावना ऱ्हस्व व मृदु ध्वनींनीं तर कर्कश, जड, संथ भावना दीर्घ व कठोर ध्वनींनीं प्रकट केल्या जातात हा तर आपला नेहमींचा अनुभव आहे. ह्याला धरूनच काव्यशास्त्रकारांनीं शब्दयोजनेसंबंधीं तसे शास्त्रांत निर्बंध घातले आहेत. ध्वनीमध्यें अर्थप्रकटन सामर्थ्य असल्याचें आढळून आल्याशिवाय असे निर्बंध घातले गेले नसते. कधीं कधीं कांहीं वर्णांना विशिष्ट अर्थ प्राप्त होतो. कंठ्य व ओष्ठ्य वर्ण ह्या ध्वनींना प्रेम, माया, वात्सल्य आदर पूज्यत्व वगैरे कोमल भावनादर्शक असे अर्थ प्राप्त झाले आहेत. लहान मुलें भाषाशिक्षणाच्या आद्य अवस्थेंत कंठ्य व ओष्ठ्य वर्णच प्रथम उच्चारूं शकतात. पितृ, पिता, बाप, बाबा, बापू, बाबा, आबा, अबू, आपा; मातृ, माता, माई, माय, आई, बाई, मा, मामा, मम्म इत्यादि शब्दांत ओष्ठ्य व कंठ्य ध्वनींचें प्राधान्य आढळतें तें वर उल्लेखिलेल्या भावना त्यांच्यांत निविष्ट असल्यामुळें आहे. 'श्, ष्, स् ह्या ऊष्मध्वनींत भय, त्वरा, नापसंती, तिरस्कार, तिट्कारा वगैरे भाव प्रकट करण्याचें सामर्थ्य आहे. म्, न्, र्, ल् ह्या ध्वनींत कुरकुर, तक्रार, गुरगुर, वगैरे भाव प्रकट करण्याचें सामर्थ्य आहे. दन्त्य व मूर्धन्य ध्वनींत आघात, तोटा, सोटा, तटाखा, सपाटा, ताडन, दण्ड

---

[1] म. म. वा. अभ्यंकर: व्याकरण-महाभाष्य-भाषांतर, पृ. ७५.

वगैरे शब्दांनीं प्रतीत होणारे कांहीं कर्कश भावार्थ प्रकट करण्याचें सामर्थ्य प्राप्त झालें आहे.

२३ संस्कृत ध्वनींचे अर्थ: भाषेंतील कांहीं ध्वनींना अर्थ कसा प्राप्त झाला आहे हें वर सांगितलें. आतां संस्कृत ही विशिष्ट भाषा घेऊन तिच्यांतील ध्वनिशब्दांचें पृथक्करण करून संस्कृत ध्वनींना कांहीं विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे कीं नाहीं हें पाहूं. संस्कृतमध्यें 'अ' ह्या स्वराला अभाव, नकार, आधिक्य असा अर्थ आहे; 'आ' ह्या स्वराला ईषत्. पर्यंत, आसमंतात्, आधिक्य इत्यादि अर्थ आहेत. 'इ' मध्यें कोमलता, गमन, मार्दव, स्त्रीत्व इत्यादि अर्थ आहेत. 'उ' मध्यें ओरडणें, हांक मारणें, शब्द करणें, जाहीर करणें, असे अर्थ आहेत, तर 'ऋ' मध्यें जाणें, हलणें, पेरणें हे अर्थ आहेत. हे कांहीं स्वरध्वनींचे अर्थ झाले. संस्कृतमधील कांहीं व्यंजनध्वनींनाहि असेच अर्थ प्राप्त झालेले दिसतात. 'क्' ध्वनीला शब्द करणें, जाणें, करणें हे अर्थ तर 'ख्' ध्वनीला खणणें, खाणें, खोदणें खेळणें, हे अर्थ आहेत. 'ग्' ध्वनीचे गाणें, शब्द करणें, घेणें बांधणें, रचणें, गिळणें, जाणें, पाळणें, लपविणें इत्यादि अर्थ असलेले आढळतात तर 'घ्' ध्वनीचे घासणें, चोळणें, घट्ट करणें, शब्द करणें इत्यादि अर्थ असलेले आढळतात. 'ङ्' चे अर्थ गुञ्जणें, गुञ्ज गुञ्ज, गोंगावणें असे अर्थ आहेत तर 'च्' चे अर्थ चयन, संचय, चौर्य, चर्वण, चाटणें, हलणें असे आहेत. 'छ्' ध्वनीला लपविणें, आच्छादिणें, छाटणें असे अर्थ आहेत तर 'ज्' ध्वनीला जन्मणें, जल्पणें, जिंकणें असे अर्थ आहेत. 'झ्' चे अर्थ शब्द, पतन, गोंधळ हे आहेत. 'ट्' मध्यें आदळ आपट, भटक, फाडणें, तोडणें हे अर्थ आहेत तर 'ठ्' चे मार, ठोक, गमन हे अर्थ आहेत. 'ड्' मध्यें उडण्याचा अर्थ निविष्ट आहे. तोच 'द्' ध्वनीमध्येंहि आहे. 'त्' मध्यें चिरणें, समर्थ असणें, तरून जाणें हे अर्थ आहेत. 'द्' मध्यें देणें, दाबणें, उडणें, जळणें हे अर्थ तर 'ध्' मध्यें ठेवणें, विचार करणें हे अर्थ आहेत, तर 'न्' मध्यें नेणें, वाहणें, स्तवणें, हलणें, हे अर्थ आहेत. 'प्' मध्यें पिळणें, पाळणें, लठ्ठ होणें, स्वच्छ करणें हे अर्थ तर 'भ्' मध्यें प्रकाशणें, भिणें, असणें, होणें, भरणें हे अर्थ आहेत. 'म्' मध्यें मोजणें, ओरडणें, देणें, घेणें, ठरविणें, नाश करणें, मरणें हे अर्थ आहेत. 'य्' मध्यें जोडणें, जाणें ह्या क्रिया निविष्ट आहेत. 'ल्' मध्यें धरणें, चिकटणें, तोडणें ह्या क्रिया व्यक्त करण्याचें सामर्थ्य आहे तर 'व्' मध्यें वाहाणें, विणणें, मागणें, उपभोगणें, वेधणें, आच्छादणें ह्या क्रिया व्यक्त करण्याचें सामर्थ्य आहे. 'श्' मध्यें स्तवणें, समर्थणें, मारणें, तीक्ष्ण होणें, पडणें, गोळा होणें, सैल होणें इत्यादि, अर्थ आहेत, 'स्' मध्यें बांधणें, दाबणें, रस काढणें, उत्पन्न करणें, सरणें इत्यादि अर्थ आहेत. 'ह्' ध्वनि त्याग, गमन, न्हेषण, हवन, हरण इत्यादि अर्थ सुचवितो तर 'क्ष्' ध्वनि राहणें, वस्ती करणें, झरणें, गळणें, नाश करणें इत्यादि अर्थ सुचवितो. 'ज्ञ' मध्यें मानसिक क्रिया व्यक्त करण्याचें सामर्थ्य निविष्ट झालें आहे, संस्कृत भाषेंतील उच्चारध्वनींना कोणकोणते अर्थ प्राधान्यानें प्राप्त झाले ह्याची वर्णवार मांडणी ध्वनिशब्दांचें–विशेषतः धातूंचें पृथक्करण करून येथवर केली आहे.

२४ आपृक्तधातु: ह्याच तत्त्वाला अनुसरून पाणिनीनें शब्दांचें पृथक्करण करून त्यांचें बीज धातु आहे असें ठरविलें. ह्या धातूंचें बीजपृथक्करण करून आपृक्त धातु म्हणून ठरविले व त्या त्या आपृक्त धातूचें अथवा बीजाचे अर्थहि त्यानें दिले. भाषेचा सर्व पसारा ह्या बीजापासून किंवा ध्वनीपासून झाला. पाणिनीनें मानलेलीं आपृक्त बीजें व्, र्, न्, भ्, ध्, ज्, ग्, द्, क्, प्, स्,' हीं बारा होत. ह्यांशिवाय 'भ्र्, क्ष्, स्त् स्त्र्' हीं पाणिनीनें दिलेलीं संयुक्तबीजें होत. ह्या सर्वांचें त्यानें पुढील प्रमाणें अर्थ दिले आहेत 'म्' ह्याचा अर्थ चंद्र, मनुष्य असा आहे. त्यापासून मयह्, मायह्, मह्, मस्, मास्, मन् वनुस्, मानव, म्ना, मानणें, माहा, मा, मो, Mind, man, gayma हे शब्द बनले आहेत, 'भ्' ह्याचा अर्थ प्रकाश असा असून भय्य, भायस्, भा, भास, भास्वत् भास्कर, प्रभा, पाहिजे, पहाट हे शब्द त्या पासून बनले आहेत. 'ध्' म्हणजे गृह व त्यापासून झालेले शब्द धयम्, धय, ध्याइमन् हे आहेत. 'द्' म्हणजे देव, प्रकाश व त्यापासून सिद्ध झालेले शब्द दय्य, दय वय्, दिव् देव, देवी, Daeve (अवे.), Deus (लॅ.), Theo (ग्री.), द्योत, ज्योत इत्यादि होत. इतर आपृक्त बीजांचा अर्थ व त्यापासून निघालेले सर्व भाषांतील शब्द देतां येतील. हीं आपृक्त बीजें म्हणजे मूलभूत आद्य ध्वनि होत. ह्यावरून इतकें निष्पन्न होतें कीं भाषेंत कांहीं मूलभूत ध्वनि असतात व त्यांना ध्वनि-

प्रतीकतेमुळें (sound symbolism) कांहीं अर्थ प्राप्त झालेले असतात.

२५ इंग्रजी ध्वनींचे अर्थ : ध्वनींना अर्थ आहे ह्याला आणखी आधार इंग्रजी भाषेंतून मिळतो. इंग्रजीमध्यें निन्दा, तिट्कारा, नावड, वीट वगैरे विकार U ह्या स्वरानें दाखविले जातात. पुढील शब्द पहा. Bull, bungle, blunder, muddle, clumsy, mud, slush, mug, numb, skull, dumb, humbug, humdrum, dumber इ. तसेंच त्या भाषेंत S आणि T ह्या ध्वनींत स्थायित्व, चिरंतनत्व, सामर्थ्य, रचना वगैरे अर्थ प्रकट करण्याचें सामर्थ्य आहे. B आणि L ह्या दोन ध्वनींत वाजविणें, उडविणें, सुरुंगानें नाहींसें करणें ह्या अर्थांची कल्पना आहे. G आणि R ह्यांच्या संयुक्त ध्वनींत कुरकुरणें, धुसफुसणें, तक्रार, गाऱ्हाणें वगैरेंची कल्पना आहे. K ह्या ध्वनींत फुटणें,तुटणें,कुटणें, मोडणें ह्या क्रियांची कल्पना आहे. P ह्या ध्वनींत मारणें दाबणें, लावणें ह्यांची कल्पना आहे. अशा रीतीनें इंग्रजी भाषेंतील कांहीं शद्बांच्या पृथक्करणावरूत तिच्यांतील कांहीं वर्णांना स्थूल अर्थ प्राप्त झाल्याचें आढळून येतें.

२६ मराठी ध्वनींचे अर्थः मराठी भाषेंतील कांहीं शद्बांचें पृथक्करण केलें तर तिच्यांतहि कांहीं वर्णांना स्थूल अर्थ प्राप्त झाल्याचें आढळून येतें. उदाहरणार्थ, 'ग्' ह्या मराठी वर्णाला मधुरत्व, रुचित्व, वर्तुलत्व, समूह, चैतन्य, वाणी, गमन, गिळणें, गोपनीयत्व असे अर्थ असल्याचें दिसतें. 'च्' कारा दि शब्द पाहिले तर भ्रमण, गीत, अदन प्रकाश, सौंदर्य, संचय इतके 'च्' चे अर्थ असावेत असें वाटतें. 'झ्' ह्या वर्णाचे तेज, आवाज, भांडण, आच्छादन, त्वरा, तिरस्कार हे अर्थ आहेत. ध्वनि दंश, चलितत्व, दहन, क्रीडा, शरीरावयव हे अर्थ 'ड्' ह्या वर्णाचे अहेत. 'ढ्' मध्यें वैपुल्य, चलितत्व, उच्चत्व हे अर्थ असावेत. 'त्' ह्या वर्णाचे त्वरा, हिंसा, त्रास, विभागणें, रक्षण, वजन इत्यादि अर्थ असल्याचें दिसतें. 'त्' हा वर्ण पुनः सार्वनामिक बीज म्हणून वापरांत अहेच. 'थ्' मध्यें स्थैर्य, स्थान, विस्तृतत्व, संघात, अल्पत्व, तिरस्कार हे अर्थ आहेत. देणें, दुष्टत्व ह्या कल्पना 'द्' वर्णामध्यें असाव्यात. 'न्' मध्यें सजीवत्व, पाणी, द्रवत्व, हिंसा, आवाज, वाहन, नकार इत्यादि अर्थांच्या कल्पना असाव्यात. 'श्' ह्या वर्णांत खालीं पडणें, निजणें, मर्यादा, अंत, स्वच्छत्व इत्यादि अर्थ आहेत असें दिसतें.

केवळ उदाहरणें म्हणून मराठींतील दहा वर्णांचे स्थूल अर्थ वर मांडून दाखविले. ह्या वर्णांचे आणखीहि कांहीं अर्थ असणार नाहींत असें नाहीं. बाकीच्या वर्णांचेहि अर्थ अशा रीतीनें मांडून दाखवितां येतील. 'उपसर्गानें शब्दाचा अर्थ बदलतो' ह्या सिद्धान्ताच्या मुळाशीं हेंच तत्त्व असावेंसें वाटतें. विशेषतः एकाक्षरी उपसर्गांच्याबाबत हेंच तत्व अधिक उपोद्बलित होतें. 'नि, वि, सु, (अ) पि' ह्या उपसर्गांनीं मूळ शब्दाच्या अर्थांत विकृति कां उत्पन्न व्हावी ? त्या त्या उपसर्गाच्या घटकवर्णांत कांहींतरी अर्थ निविष्ट झाला असल्याशिवाय विकृतिसामर्थ्य त्याला कसें प्राप्त झालें असणार ? हा अर्थ तरी त्या त्या उपसर्गाला कोठून आला ? पूर्वीच्या कोणत्या तरी पूर्ण शब्दांचे अवयव झडून जे अवशेष राहिले ते हे उपसर्ग होत. तेव्हां पूर्वीच्या पूर्ण शब्दांचा अर्थ ह्या ह्या अवशिष्ट अवयवांत एकत्र झाला तोच ह्या ह्या उपसर्गांचा अर्थ ठरला. त्यामुळेंच उपसर्ग लागल्याबरोबर शब्दाच्या अर्थांत विकृति उत्पन्न होते. ही विचारसरणी व्युत्क्रमानें अनुसरिली कीं ध्वनींना अर्थ प्राप्त होतो ह्या म्हणण्याला पुष्टि मिळते.

२७ भावनात्मक शब्द : ज्याप्रमाणें भाषेंतील अनुकरणात्मक शब्दांच्या अर्थांचें पृथक्करण केल्यानें त्यांतील ध्वनींना अर्थ असावा असें वाटतें त्याचप्रमाणें भाषेंतील भावनात्मक किंवा उद्गारात्मक शब्दांच्या अर्थांचें पृथक्करण केल्यानें त्यांतील ध्वनींना किंवा वर्णांना अर्थ असावा असें वाटतें. मानवाच्या मनांत कांहीं भावना उत्पन्न झाली म्हणजे लगेंच त्या भावनेला अनुरूप अशीं कांहीं चिन्हें शरीरावर दृग्गोचर होतात. प्रेमाच्या विकारांत घाम सुटणें, घसा कोरडा होणें, भीतीच्या किंवा रागाच्या विकारांत हातांपायांत कंप उत्पन्न होणें, रोमांच उभे राहणें, नाडी किंवा हृदय ह्यांचे ठोके भराभर पडणें वगैरे कांहीं लक्षणें उत्पन्न होतात. हा शरीरधर्मच आहे. त्या त्या भिन्न भावांचा किंवा विकारांचा शरीरांतील निरनिराळ्या ग्रंथींवर तात्काल परिणाम होऊन त्या त्या ग्रंथींतून किंवा पिंडांतून कांहीं विशिष्ट रस उत्पन्न होऊन तो शरीरांतील सर्व रक्तांत मिसळतो. तो सर्व शरीरांत भिनला कीं वर सांगितलेलीं लक्षणें दृग्गोचर होतात. अशा तऱ्हेची वैद्यक दृष्ट्या उपपत्ति ह्या प्रक्रियेची सांगितली जाते. हीं जीं घाम, कंप, शोष, रोमांच, द्रुतरुधिराभिसरण इत्यादि चिन्हें किंवा लक्षणें सांगितलीं

तशींच त्या त्या भिन्न विकाराला अगर भावनेला अनुरूप असा एखादा ध्वनि मुखाच्या वाटें आपोआप बाहेर पडतो. दमणूक, थकवा वगैरे झाला कीं तद्दर्शक 'हुश् हुश्' हा ध्वनि, आनंद झाला कीं 'हा! ह्य, ह्यॅ' सारखा हास्यध्वनि, आश्चर्य वाटलें कीं 'ब, ब, बा, ब्रा, हो हो, अहो' अशा सारखा ध्वनि, तिरस्कार, जुगुप्सा, किळस वाटली कीं 'शी, शी, च् च्, छी, छी' वगैरे सारखा ध्वनि उत्पन्न होतो. हे सर्व ध्वनि त्या त्या विकाराचे दर्शक असल्यामुळें त्यांना त्या विकाराचा अथवा भावनेचा अर्थ प्राप्त होतों.* भावनात्मक शब्द हे ह्या दृष्टीनें ध्वनिशब्द होत.

२८ ध्वनिप्रतिकताः ध्वनीला अर्थ कसा प्राप्त होतो हें वर सांगितलें. ध्वनीच्या अर्थासंबंधींचें हें विवेचन ध्वनिशब्दांनाच व तेंहि अत्यंत मर्यादित स्वरूपांत लागूं आहे असें आम्हीं ठिकठिकाणीं स्पष्ट म्हटलेंच आहे. ह्या ध्वनिशब्दांचे अनुकरणात्मक शब्द (imitation words), प्रतिध्वनि शब्द (echo words) भावनात्मक शब्द हे प्रकार होत. एखाद्या पदार्थाच्या प्रत्यक्ष ध्वनीवरून, किंवा एखाद्या प्राण्याच्या प्रत्यक्ष आवाजावरून किंवा एखाद्या भावनेच्या प्रत्यक्ष उद्गारावरून तद्दर्शक शब्द त्या ध्वनीपासून सिद्ध होणें हें साहजीक आहे. प्रत्यक्ष ध्वनिशब्दाखेरीज इतर क्षेत्रांतहि कधीं कधीं शब्दनिर्मितीच्याबाबत ध्वनि कारणीभूत होत असला पाहिजे. ध्वनिशब्दांत तो उत्तान रीतीनें कारणीभूत होत असला तर इतर क्षेत्रांत तो प्रच्छन्न रीतीनें कारणीभूत होत असावा. किलकिलणें हा शब्द उत्तान रीत्या ध्वनिशब्द आहे. तर '(डोळे) किलकिले' हा शब्द प्रछन्न रीत्या ध्वनिशब्द आहे. किर्रर् (आवाज)' हा उत्तान ध्वनिशब्द आहे तर 'किर्रर् (झाडी)' हा प्रछन्न ध्वनि आहे. खेकटें, खुरपें, खूर, खुमखुमी, खेंकडा, कांकडी, खिसणें, खो खो, खोट' इत्यादि शब्दांत ध्वनिशब्दत्व आहे तें प्रछन्न आहे. 'खेंकसणें, खोकणें, खरखरणें, खुडगुडणें, गडगडणें, भडभडणें, सरसरणें वगैरे शब्दांतील ध्वनिशब्दत्व उत्तान आहे. ध्वनिशब्दाचें उत्तान स्वरूप जाऊन त्या ऐवजीं प्रच्छन्न स्वरूप त्याला ध्वनिप्रतीकतेमुळें (sound symbolism) येतें. प्रत्यक्ष ध्वनीपासून क्रियाध्वनि, किंवा भावनाध्वनि निर्माण होतात. व तसें त्यांचे दर्शक शब्द तयार होतात. 'फ्यस् किंवा फिस्' हे प्रत्यक्ष ध्वनि व त्याचे द्योतक 'फ्यस् व फिस्' हे शब्द आहेत. परंतु फिसणें, फिसकणें, फिसकटणें, फिसकरणें, फिसकारणें वगैरे त्या मुळध्वनीचे क्रियाध्वनि आहेत. तसेच फिसक, फिसकट, फुसक, फुसका, फिसकार, फुसकार, फिसकणी, फिसकारणी, फुसकणी, फिसकावणी वगैरे त्याचे भावध्वनि आहेत. 'फुसफुस, धुसफुस, पादरफूस' वगैरे त्याचे संयुक्त ध्वनि आहेत. हे शब्द त्या त्या क्रियाध्वनीचे किंवा भावध्वनीचे द्योतक आहेत. एका ध्वनीपासून निरनिराळ्या क्षेत्रांतील निरनिराळे शब्द ध्वनिप्रतीकतेमुळें तयार होतात. 'चमक, झळक, लखकन्, लखलखाट वगैरे' प्रकाशासंबंधींचे शब्द, 'अफाट, पसारा, फापट, ढिगारा, बुंधा, फांद्या, वगैरे वृक्षासंबंधींचे शब्द, 'मंदमंद, झुळझुळ, झिमझिम वगैरे जलासंबंधीं शब्द, सोसाटा, झंझावत, झोत, गोंगाट, झांबड वगैरे तुफानी वाऱ्यासंबंधीं शब्द ह्या सर्वांत ध्वनिप्रतीकताच दिसून येते. निसर्गांतील त्या त्या पदार्थांच्या होणाऱ्या ध्वनींची मानवी मनांत होणारी ही प्रतिक्रिया आहे व हे शब्द त्या प्रतिक्रियेचीं प्रतिकें आहेत. हे सर्व शब्द ध्वनिप्रतीकतेचे परिणाम होत. अशीं आणखी पुष्कळ उदाहरणें काढून दाखवितां येतील.

२९ ध्वनींच्या अर्थाच्या मर्यादाः ध्वनीला किंवा ध्वनिप्रतीकतेला अर्थ आहे हा सिद्धान्त अत्यंत मर्यादित स्वरूपाचा आहे. केवळ कांहीं ध्वनिशब्दांपुरतीच त्याची मर्यादा आहे. इतर शब्दांच्या बाबतींत नाहीं. ज्या शब्दांत बौद्धिक किंवा वैचारिक अंश (intellectual content) अधिक आहे त्या शब्दांच्या बाबतींत तर ही विचासरणी अगदींच लागूं पडत नाहीं. ह्याच सिद्धांन्त जर इतर शब्दांच्या बाबतींत खरा मानला तर त्या शब्दांना व तत्परत्वें त्या भाषेला कृत्रिमपणाचें स्वरूप प्राप्त होईल. भाषेंतील शब्दघटना व त्या शब्दांची अर्थघटना ही अमुक एका रीतीनें करूं म्हटलें तरी ती तशी होत नाहीं. आपल्या स्वभावाप्रमाणें ती भाषेंत होत असते. अमुक एक शब्द अमुक ध्वनींचाच कां बनला व त्याला अमुकच एक अर्थ कां आला हें सांगतां येत नाहीं. ठराविक ध्वनींच्या प्रमाणें जर शब्द बनले व त्यांना त्या त्या ध्वनीच्या ठराविक अर्थाप्रमाणें समुचित असे जर अर्थ प्राप्त झाले

---

* **Jon Eisenson :** *The Psychology of Speech*, chap 2 (वरून).

तर भाषेचें स्वातंत्र्य तें काय राहिलें ? तिचें स्वाभाविकत्व तें काय राहिलें ? भाषेच्या स्वतःच्या म्हणून कांहीं लहरी असतात, –स्वतःचें म्हणून स्वभावविशेष असतात. ह्या स्वभावविशेषांप्रमाणें त्या त्या भाषेंतील शब्दघटना व अर्थघटना सिद्ध होतात. एखाद्या शब्दांत कांहीं विशिष्ट ध्वनि असले तर त्या शब्दांचा अमुक एक विशिष्ट अर्थ बनला पाहिजे हें म्हणणें केवळ ध्वनिशब्दांच्या बाबतींत थोडेसें टिकलें तरी इतर शब्दांच्या बाबतींत पुष्कळ टिकणार नाहीं. अशाच शब्दांचा भरणा भाषेंत विशेष असतो. तेव्हां ध्वनींच्या अर्थासंबंधीं विचारसरणीचें स्वरूप अत्यंत मर्यादित आहे हें विसरून चालतां येणार नाहीं.

शिवाय आणखीहि एक गोष्ट आहे कीं जिच्यांमुळें ही विचारसरणी मर्यादित स्परूपांत घेणें जरूर पडतें. समजा, आपण कांहीं ध्वनि ठरविले. त्यांचे अर्थहि कांहीं आपण ठरविले, परंतु तेच ध्वनि त्या भाषेच्या सर्व हयातींत कायम त्याच स्वरूपांत थोडेच राहतात ! ते मूळ ध्वनि अविकृत असे राहणें सुतराम् अशक्य आहे. कालाच्या ओघांत ते ध्वनि बदलणार; त्या ध्वनींचें उच्चारण बदलणार; त्या ध्वनींचा क्रम बदलणार; त्या ध्वनींचा अर्थ हि बदलणारच. त्यांच्यांत असे बदल होणें हें त्यांच्या व भाषेच्या जिवंतपणाचें लक्षण आहे. वैदिक भाषेंत कांहीं ध्वनींना जो विशिष्ट अर्थ प्राप्त झाला तोच त्यांचा अर्थ प्राकृत भाषांत कायम राहीलच असें नाहीं. तसा कायम राहील तर ती भाषा मृतच समजावी लागेल. तोच अर्थ पुनः अर्वाचीन भारतीय बोलींत तसा कायम राहील असें तर सुतराम् शक्य नाहीं. तसा राहिला तर अर्वाचीन बोली ह्या मृतच समजाव्या लागतील. भाषेंत अपभ्रंश म्हणा, अगर विकृति म्हणा, अगर परिणति म्हणा, कांहीं होतच नाहीं असें मानावें लागेल. व ही भूमिका शुद्ध अशास्त्रीय ठरेल. तेव्हां ध्वनींच्या अर्थासंबंधीं विचारसरणीचें स्वरूप अत्यंत मर्यादित आहे व तें केवळ ध्वनिशब्दांपुरतेंच,–त्यांतहि पुनः अविकृत किंवा इषद्विकृत ध्वनिशब्दांपुरतेंच मर्यादित आहे असें मानिलें पाहिजे.

२० शब्दांना अर्थ कसा प्राप्त होतो ? संकेत : ध्वनीच्या अर्थाच्या विवेचनानंतर शब्दाच्या अर्थाचें विवेचन ओघानेंच प्राप्त होतें. अनुकरणात्मक व भावनात्मक शब्दांच्या अर्थाचें पृथक्करण करून आपण ध्वनींचा अर्थ निश्चित करण्याचा प्रयत्न केला. शब्द हा एक किंवा अनेक ध्वनि मिळून बनलेला असतो. त्यामुळें त्यांत एक किंवा अनेक उच्चार असतात. शब्दाचें उच्चारण हें त्याचें बाह्य स्वरूप व त्याचा अर्थ हें त्याचें आंतर स्वरूप आहे. उच्चारणाचा संबंध मुखांतील इंद्रियांशीं येतो. अर्थाचा संबंध मनाशीं किंवा बुद्धीशीं येतो. म्हणून शब्दाचा अर्थ हा मानसशास्त्राचा विषय ठरतो. शब्दाचें उच्चारण जसें डोळयांना प्रत्यक्ष दिसतें व कानांना प्रत्यक्ष ऐकूं येतें तशी शब्दाच्या अर्थासंबंधीं आंतर मनांत होणारी क्रिया आपल्या इंद्रियाला प्रत्यक्ष दिसत नाहीं. शब्दाला अर्थ प्राप्त होण्याची क्रिया इतकी प्राचीन असते कीं तिचें आद्य कारणहि सांगतां येत नाहीं. ह्यामुळें शब्दाच्या अर्थाची उपपत्ति सांगणें ही बाब फार कठीण होऊन बसते. तशी ती कठीण असल्यामुळें तिचें कर्तृकत्व ईश्वराकडे दिलें जातें. कोणी म्हणतात हा ईश्वरी इच्छेचा परिणाम आहे. ईश्वराला "आपण पुष्कळ व्हावें–स ऐच्छत बहु स्याम्" असें वाटलें. तो पुष्कळ झाला आणि विश्वांतील निरनिराळ्या वस्तूंच्या रूपांनीं प्रगटला. नंतर त्यानें आपल्या मनाला येईल तसें त्या सर्व वस्तूंचें नामकरण केलें. अशा रीतीनें भाषेंतील प्रत्येक शब्दांत त्या त्या वस्तूचा अर्थ निविष्ट झाला. त्या शब्दाचा एक प्रकारचा संकेतच ठरला कीं ह्या शब्दानें अमुक एक वस्तु ओळखावी. 'अस्मात् पदात् अयम् अर्थः बोद्धव्यः इति ईश्वरेच्छा' अशी व्याख्या त्या संकेताची ठरून गेली. ह्यांतील 'ईश्वरेच्छा' हाच शब्द मान्य होण्यासारखा नाहीं. सध्यांच्या शास्त्रीय युगांत भाषेच्या बाबत ईश्वरकर्तृकत्व मान्य होणार नाहीं. अमुक एका पदाचा अमुक एक अर्थ समजावा असें मनुष्य ठरवितो; ईश्वर हा सृष्टींतील यच्चयावत् चराचर वस्तु जरी उत्पन्न करीत असला तरी त्या सर्वांचें नामकरण तो करीत नाहीं. वस्तूंची निर्मिति जरी ईश्वरकर्तृक असली तरी तिचें नामकरण मानवकर्तृक किंवा मानवसमाजकर्तृक आहे. हें नामकरण मानवानें सभा भरवून केलें नाहीं किंवा एखादा कायदा करून केलें नाहीं; तर तें त्याच्या हातून आपाततः व प्रसंगांच्या जरूरीप्रमाणें झालें व त्याला समाजांतील इतरांची संमति मिळाली. अशा तऱ्हेनें मानवानें संकेत निर्माण केले. त्या संकेताच्या खुणा म्हणून शब्द रूढ झाले. शब्द हीं प्रतीकें आहेत. ह्या केवळ खुणा आहेत. ह्यांच्या पाठीमागें संकेत उभा असतो. संकेत हा शब्दाचा मुख्य

आधार आहे. तो त्याचा पृष्ठवंश आहे. संकेत जोंपर्यंत शाबूत, तोंपर्यंत शब्द शाबूत असतो. त्यांत जर कांहीं विकृति झाली तर शब्दांत विकृति झाल्याखेरीज राहात नाहीं. संकेत नष्ट झाला कीं तद्दर्शक शब्दहि मरतो. मनुष्याचें शरीरस्वास्थ्य हें त्याच्या शरीरांतील पृष्ठवंशाच्या स्वास्थ्यावर जसें अवलंबून असतें, त्यांत कांहीं बिघाड झाला कीं पक्षघात होऊन जसें शरीर लुळें पांगळें होतें, तसेंच ह्या संकेतांचें आहे. संकेत हे कांहीं काळ रूढ असतात. कांहीं फेरबदल त्यांत होतात. नंतर ते जुने होऊन कांहीं काळानें नाहींसे होतात. तसेच तद्दर्शक शब्द कांहीं काळ रूढ असतात, कांहीं बदलतात, नंतर जुने होऊन मरण पावतात. संकेत नवे निर्माण झाले कीं तद्दर्शक नवे शब्द निर्माण झालेच पाहिजेत. भाषेंतील शब्दांच्या अर्थांत जे फेरबदल होतात ते संकेतांतील फेरबदलामुळें होतात. भाषेंतील शब्दांची येरझार ही संकेतामुळें होते.

३१ वस्तु व तिची कल्पना : शब्द व संकेत किंवा संकेतामुळें त्याला प्राप्त होणारा अर्थ ह्या दोहोंत अति निकटचें साहचर्य असतें. एक आहे तर दुसरा आहे, एक नाहीं तर दुसरा नाहीं, इतका अविनाभाव ह्या दोहोंत आहे. वेदान्तांतील प्रकृतिपुरुषांचें जें ऐक्य किंवा शिवपार्वतीचें जें ऐक्य तें वाक् आणि अर्थ ह्या दोहोंचें मानिलें गेलें आहे. अभेदाचें हें एक आदर्श उदाहरण आहे. शब्दाच्या मागें जो संकेत उभा असतो तो कधीं प्रत्यक्ष वस्तूसंबंधीं असतो तर कधीं त्या वस्तूच्या कल्पनेसंबंधीं असतो. दोन पाय, दोन हात, डोकें, नाकडोळे इत्यादि अवयवाचा बोलका प्राणी दिसला कीं त्याला ‘मनुष्य’ म्हणावयाचें; न बोलका, आडव्या आकाराचा, चार पायाचा प्राणी दिसला कीं त्याला ‘पशु (जनावर)’ म्हणावयाचें; अशा ज्या आपण खूणगांठी बांधतों ते त्या त्या शब्दांचे संकेत होत. माझ्या पुढें ‘मनुष्य’ ही सृष्ट वस्तु आहे. त्याला ‘मनुष्य’ असा शब्द मी ठरल्याप्रमाणें वापरीन. समजा, माझ्यापुढें प्रत्यक्ष ‘मनुष्य’ नाहीं; तरी पण कल्पनेनें मी तो माझ्यासमोर आणीन व त्या कल्पनेनें उभा केलेल्या मनुष्यालाहि मी ‘मनुष्य’ म्हणेन. ‘मनुष्य’ हा शब्द जो मी वापरला तो प्रत्यक्ष समोर मनुष्य असतांनाहि वापरला व माझ्या कल्पनेंतील मनुष्यासंबंधींहि वापरला. प्रत्येक सृष्ट वस्तूची अशी कल्पनेनें निर्माण केलेली एक आकृति मानवी मनांत असते. वस्तु आणि तिची काल्पनिक प्रतिकृति अशा दोन गोष्टी प्रत्येक सृष्ट वस्तूच्याबाबत असतात. ह्या दोन्हींची खूण म्हणजे तद्दर्शक शब्द होय.

३२ शब्द व अर्थ ह्यांचा क्रम : शब्द व त्याचा अर्थ ह्या दोहोंपैकीं शब्द अगोदर आणि अर्थ नंतर असा क्रम ऐकणाऱ्याच्या दृष्टीनें समजला जातो. परंतु बोलणाऱ्याच्या दृष्टीनें पाहिलें तर हा क्रम उलट असल्याचें आपणास आढळून येईल. सृष्टीच्या उत्पत्तीच्या क्रमाच्या दृष्टीनें पाहिलें तर वस्तु अगोदर, नंतर तिची काल्पनिक प्रतिकृति आणि त्यानंतर तद्दर्शक शब्द असा स्वाभाविक क्रम लागतो. वस्तु प्रथम निर्माण झाल्या व त्यांचें नामकरण नंतर झालें. म्हणजे अर्थ अगोदर आणि शब्द नंतर असा उलट क्रम असल्याचें प्रत्ययास येतें. आपल्या नेहमींच्या भाषिक व्यवहारांत शब्द अगोदर आणि त्याचा अर्थ नंतर असा क्रम असतो. ह्या क्रमाच्या अगदीं विरुद्ध असा सृष्टींतील क्रम आहे. एखाद्या शब्दाला अर्थ कसा प्राप्त झाला असें म्हणण्याच्या ऐवजीं एखाद्या वस्तूचा अन्वर्थक किंवा समर्पक द्योतक असा शब्द कसा निर्माण झाला हें म्हणणें अधिक सयुक्तिक आहे.

३३ अर्थ हा वस्तुनिष्ठ कां व्यक्तिनिष्ठ ? शब्दाला संकेतानें अर्थ प्राप्त झालेला असो किंवा अर्थाची किंवा वस्तूची समर्पक खूण म्हणून शब्द प्राप्त झालेला असो; शब्दानें दाखविलेल्या अर्थामध्यें दोन अंश असतात. एक त्यांत बौद्धिक अंश असतो व दुसरा त्यांत भावनिक अंश असतो. शब्दानें जो अर्थ दाखविला जातो किंवा जी वस्तू दाखविली जाते, त्या वस्तूचा आपल्याशीं दोन तऱ्हेनें संबंध येतो. त्या वस्तूचें आपणास ज्ञान होतें ही एक गोष्ट आणि त्या वस्तूशीं आपल्या कांहीं भावना निगडित झालेल्या असतात ही दुसरी गोष्ट. ह्या दोन्ही गोष्टींत उपयुक्ततेचा संबंध असतोच. त्या वस्तूचा उपयोग करून घेण्याच्या आपल्या वृत्तीवर तिचें ज्ञान करून घेण्याची क्रिया अवलंबून राहणार. तसेंच त्या वस्तूचा आपणास जो उपयोग होईल त्याच्यावर त्या वस्तूसंबंधीं आपल्या भावना बनणार. वस्तूसंबंधीं मानवी मनांत उत्पन्न होणाऱ्या ज्ञानाच्या व भावनांच्या मुळाशीं त्या वस्तूची मानवी व्यवहारांतील उपयुक्तता असणार हें उघड आहे. हीच उपयुक्तता अर्थात् त्या वस्तूसंबंधीं आपण जो शब्द वापरणार त्याच्याहि मुळाशीं असणार हेंहि पण उघड आहे. तेव्हां शब्दाचा अर्थ

बऱ्याच अंशानें उपयुक्ततेवर अवलंबून असतो. कोणत्याहि वस्तूचा उपयोग हा त्या वस्तूवर व उपयोग करून घेणाऱ्यावर अवलंबून असतो. म्हणजे वस्तूची उपयुक्तता ही वस्तुनिष्ठ असते व व्यक्तिनिष्ठहि असते. हें सर्व स्पष्ट रीतीनें मांडावयाचें म्हटलें तर पुढीलप्रमाणें मांडतां येईल. शब्द म्हणंजे वस्तूची खूण. त्याचा अर्थ म्हणजे ती वस्तू. हा अर्थ उपयुक्ततेवर आधारलेला असतो. ही उपयुक्तता वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असते. म्हणजेच शब्द हा वस्तुनिष्ठ असून अर्थ हा वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असा दोन्ही प्रकारचा असतो. सौंदर्यासंबंधीं ज्याप्रमाणें म्हटलें जातें कीं तें वस्तुनिष्ठ असून मानसगम्य आहे, त्याप्रमाणें शब्दाचा अर्थ वस्तुनिष्ठ असून मानसगम्य आहे. त्यांत वस्तु आणि व्यक्ति ह्या दोहोंचा संबंध येतो. शब्द हें वस्तूचें नांव असल्यामुळें त्यांत वस्तूचा संबंध येणारच. त्या वस्तूला जें नांव दिलें जातें तें देतांना नांव देणारी व्यक्ति आपली कांहीं तरी विशिष्ट भावना त्यामध्यें आणणारच. ह्या दृष्टीनें त्यांत व्यक्तीचा संबंध येतो. किंवा अंतीम दृष्टीनें असेंहि म्हणतां येईल कीं बोलणारी किंवा ऐकणारी व्यक्ति ही वस्तूमध्यें अन्तर्भूत होऊं शकेल. ती व्यक्ति सुद्धां एक प्रकारची वस्तुच नाहीं कां ? वस्तुमध्यें व्यक्ति समाविष्ट झाल्यानंतर व्यक्तिनिष्ठता ही वस्तुनिष्ठमध्यें समाविष्ट होईल. म्हणूनच आम्ही म्हणतों कीं शब्दाचा अर्थ हा विषयनिष्ठ असून मानसगम्य आहे.

शब्दाला अर्थ संकेतानें प्राप्त होतो. ह्या संकेतासंबंधीं मात्र कांहीं नियम नाहीं. संकेत हा स्वतंत्र आहे. तो मनाला वाटेल त्या रीतीनें देण्यांत येतो. त्याला कोणत्याहि नियमाचें बंधन नाहीं. 'मनःपूतमसमाचरेत्' अशा प्रकारचें संकेतांचें सामर्थ्य आहे. तो कसा येतो व केव्हां येतो व कां येतो हें सांगतां येत नाहीं. कांहीं वेळेला ध्वनीच्या अर्थावरून संकेत निर्माण होतो असें म्हणतात. परंतु हें म्हणणें सर्व शब्दांच्या संकेतांबाबत टिकणारें नाहीं. फार झालें तर अनुकरणात्मक व भावनात्मक शब्दांच्या संकेतांबाबत थोडेसें म्हणतां येईल असें आपण मागें पाहिलें. धात्वर्थावरून किंवा उपमीतीवरून संकेत निर्माण होतात असेंहि म्हटलें जातें. परंतु हेंहि म्हणणें सर्व शब्दांच्या संकेतांबाबत टिकणारें नाहीं. भाषेंतील सर्वच शब्द धातूपासून किंवा उपमीतीच्या आश्रयानें सिद्ध झालेले नसतात. कांहीं शब्द अगदीं स्वतंत्र रीतीनें सिद्ध होतात. त्यांचा धातूशीं किंवा उपमीतीशीं कसलाहि संबंध नसतो. मन मानेल तसे संकेत निर्माण होतात व त्या संकेताप्रमाणें त्यांचें दर्शक शब्द सिद्ध होतात. त्याची कारणमिमांसा करतां येत नाहीं म्हणूनच त्यासंबंधीं "अस्मात् पदात् अयम् अर्थः बोद्धव्यः इति ईश्वरेच्छा" असें म्हणावें लागतें.

संकेत कसाहि ठरो. परंतु तो एकदां ठरला म्हणजे तो सर्वमान्य व्हावा लागतो. बोलणाऱ्याचा जो संकेत तोच ऐकणाऱ्याचाहि असावा लागतो. दोघांनीं जर भिन्न संकेत मानिले तर एकाचें बोलणें दुसऱ्यास समजणार नाहीं. भाषेच्या उपयोगाच्या दृष्टीनें बोलणारा मनुष्य हा भाषेचा एक घटक व ऐकणारा मनुष्य हा भाषेचा दुसरा घटक होय. ह्या दोन घटकांचा मेळ बसला म्हणजे भाषेचा उपयोग बरोबर झाला असें समजतात. बोलणाऱ्यानें आपल्या मनांत योजलेला भावार्थ शब्दांच्या साह्यानें ऐकणाऱ्यास बरोबर तसा समजला कीं भाषेचें काम झालें. दोघांचा भावार्थ एकच झाला पाहिजे. दोघांच्या संकेतांचें ऐक्य साधलें पाहिजे. बोलणाऱ्याची प्रत्यक्ष बोलण्याच्या पूर्वीची वृत्ति आणि ऐकणाऱ्याची ऐकल्यानंतरची वृत्ति एक झाल्या पाहिजेत. ह्या दोन्ही वृत्ति एक करण्याची जबाबदारी बोलणाऱ्याची व ऐकणाऱ्याची सारखीच असते. बोलणाऱ्या व्यक्तीनें आपला भावार्थ नीट समजावा म्हणून नीट समर्पक शब्दयोजना करणें, ते नीट उच्चारणें, त्यांचा योग्य नियमबद्ध प्रयोग करणें ह्यांसंबंधीं काळजी वाहावी लागते. ऐकणाऱ्या व्यक्तीनेंहि भानावर राहून नीट लक्ष देऊन ते शब्दसमूह ऐकणें, त्यांचा रूढीमान्य अर्थ समजणें ह्यांविषयीं दक्षता बाळगावी लागते. दोघांनीं अशी काळजी वाहिली तरच दोघांच्या वृत्ति एक होतील. अशा वृत्ति एक झाल्या तरच भाषेचा खरा उपयोग झाला असें म्हणतां येईल. ही गोष्ट खालील आकृतीनें अधिक स्पष्ट होईल.

आकृति १ ली



बोलणाऱ्या व्यक्तीबाबत बोलण्याच्या क्रियेच्या एका टोंकाला त्याची वृत्ति असते व दुसऱ्या टोंकाला त्या

वृत्तीच्या प्रकटनासाठीं वापरलेले शब्द असतात. हे शब्द त्या वृत्तीचीं चिन्हें असतात. कारण त्या चिन्हांमुळेंच त्याची वृत्ति किंवा भावार्थ ओळखितां येतो. त्या क्रियेच्या अगदीं उलट अशी क्रिया ऐकणाऱ्याच्या बाबतींत होते. शब्दचिन्हें हीं प्रथम एका टोंकाला असूनं दुसऱ्या टोंकाला ऐकणाऱ्याची वृत्ति असते. ती त्याची वृत्ति ऐकलेल्या शब्दचिन्हांप्रमाणें बनते. वक्त्याच्या–बाबत भावार्थ अगोदर, वृत्ति अगोदर व शब्दोच्चार नंतर हा क्रम असतो, तर श्रोत्याच्याबाबत शब्दश्रवण अगोदर व नंतर भावार्थ, नंतर वृत्ति असा उलट क्रम असतो. आपल्या नेहमींच्या भाषिक व्यवहारांत हाच क्रम असतो. हा साध्या सरळ रेषेनें आपल्याला दाखवितां आला. हा सरळ रोकडा व्यवहार आहे. ह्यांत आडवळणें नाहींत. प्रवास सरळ व तडक आहे. रोजची व्यवहाराची भाषा, भावनाप्रधान भाषा, आपलें नेहेमींचें बोलणेंसवरणें ह्याबाबत हा क्रम असाच सरळ रेषात्मक असतो व तो इतका तात्काल फल देतो कीं आपण बोलावयाचा अवकाश कीं आपला भावार्थ लगेंच त्याक्षणीं ऐकणाऱ्याला समजतो. मात्र दोघेहि–बोलणारा व ऐकणारा हे शुद्धीवर असावयास पाहिजेत. त्यांचे संकेत एकच असले पाहिजेत.

३४ वस्तु–कल्पना–प्रतीक : भाषिक व्यवहाराचें यश शब्दचिन्हांच्या, भावार्थांच्या किंवा संकेतांच्या ऐक्यावर अवलंबून असतें हें ठरलें. आतां त्याच्याहि मागें जाऊन भावार्थ व शब्दचिन्ह ह्या दोहोंचा मेळ कसा बसतो हें पाहूं. शब्दाला अर्थ प्राप्त होतांना (किंवा वस्तूला समर्पक शब्दचिन्ह प्राप्त होतांना) काय क्रिया होते हें पाहूं. ‘ शब्द ’ हें एक चिन्ह आहे; तें एक प्रतीक आहे. आणि तें प्रतीक एका वस्तूसंबंधींच्या ‘ कल्पनेचें ’ आहे. शब्दार्थाच्या बाबत त्या तीन बाबींचा संबंध येतो. पहिली बाब वस्तु , दुसरी बाब त्या वस्तूची कल्पना आणि तिसरी बाब त्या कल्पनेचें दर्शक चिन्ह किंवा प्रतीक. वस्तु, कल्पना, प्रतीक ह्या तीन बाबींच्या परस्परसंबंधानेंच अमुक एका शब्दाला अमुक एक अर्थ प्राप्त होतो. ह्या तीन बाबींचा हा संबंध त्रिकोणाच्या आकृतीनें दाखवितात. त्रिकोणाच्या एका टोंकास संबंधी वस्तु, शिरोबिंदूजवळ त्या वस्तूची कल्पना व त्रिकोणाच्या दुसऱ्या टोंकास तिचें प्रतीक किंवा शब्दचिन्ह अशी त्याची मांडणी आहे. ह्या तिहींचा संबंध खालील आकृतीनें अधिक स्पष्ट होईल.

आकृति २ §



शब्दाच्या अर्थाचा असा हा त्रिकोण आहे. एका टोंकास बोलणाऱ्याच्या मनांतील योजलेली वस्तु, वरच्या टोंकाला त्या वस्तूसंबंधीं मनांत बनलेली कल्पना आणि तिसऱ्या टोंकाला तिचें दर्शक शब्दचिन्ह असें दाखवून प्रत्यक्ष क्रिया कशी होते ती बाणांनीं दाखविली आहे. आपण वस्तु प्रथम पाहतों, नंतर तिची कल्पनामूर्ति आपण आपल्या मनांत तयार करतों व नंतर तिचें दर्शक चिन्ह म्हणजे शब्द ठरवितों. अशी ही क्रिया आहे. भाषिक व्यवहार किंवा शब्दाची अर्थनिश्चिति अशी त्रिकोणात्मक असते.

प्रवासास सुरुवात बोलणाऱ्याच्या भावार्थापासून किंवा योजिलेल्या वस्तूपासून म्हणजे ‘ अ ’ ह्या बिंदूपासून होते. तेथून निघाल्यानंतर लगेंच मुक्काम त्यासंबंधीं मनांत बनलेल्या कल्पनेवर म्हणजे ‘ क ’ ह्या बिंदूवर होतो. तेथून मुक्काम त्या कल्पनेच्या दर्शक शब्दचिन्हावर म्हणजे शब्दावर ‘ ब ’ ह्या बिंदूजवळ होतो. वस्तु-कल्पना–तद्दर्शक शब्द अशीं हीं तीन त्या भाषिक व्यवहाराच्या प्रवासांतील मुक्कामाचीं स्थळें आहेत. मला ‘ मनुष्य ’ संबंधीं बोलावयाचें आहे. मी ‘मनुष्य’ पुढें पाहतों. त्याची कल्पनामूर्ति बनवितों. कल्पना तयार झाली कीं तिचें दर्शक म्हणून उच्चारचिन्ह मी वापरतों. अशा रीतीनें तद्दर्शक शब्द मी उच्चारतों. ‘मनुष्य’ हा दृश्य तरी आहे. परंतु ‘ब्रह्म’ ह्या अदृश्य व अगम्य वस्तूसंबंधीं जरी बोलावयाचें झालें तरी हीच क्रिया होते. असल्या अदृश्य

---

§ C.K. Ogden and I. A. Richards: *The Meaning of Meaning*, *ch*, I *p*. 11(ह्या ग्रंथांतून आकृति)

वस्तूची आपण आपल्या कल्पनेप्रमाणें 'कल्पनामूर्ति' बनवितों. आणि त्या कल्पनामूर्तींचीं दर्शक शब्दचिन्हें वापरून आपण आपला भावार्थ प्रगट करतों.

बोलणाऱ्याच्या भाषिक व्यवहाराच्या क्रियेच्या अगदीं उलट अशी क्रिया ऐकणाऱ्याच्या भाषिक व्यवहारांत होते हें मागें स्पष्ट केलेंच आहे. श्रोता हा शब्दचिन्हें प्रथम ऐकतो. तीं ऐकल्यानंतर तत्संबंधीं कल्पना त्याच्या मनांत येते. आणि नंतर ती कल्पना ज्या वस्तूची असेल ती वस्तु ऐकणाऱ्याच्या मनश्चक्षूपुढें उभी राहाते; प्रवासाचा क्रम शब्द-कल्पना-वस्तु असा श्रोत्याच्या बाबत असतो. वक्त्याचा क्रम अर्थात् त्याच्या उलट वस्तु-कल्पना-शब्द असा असतो.

३५ हेतुमत् अथवा प्रेरणिक भाषा : आणखीहि ह्या प्रक्रियेच्या मागें थोडें जाऊं. बोलतांना पुष्कळ वेळां असें होतें कीं ज्या वस्तूबद्दल आपणास बोलावयाचें आहे ती वस्तु आपल्या समोर प्रत्यक्ष असतेच असें नाहीं. बहुतेक वेळां ती नसतेच. अशा वेळीं त्या वस्तूची 'कल्पना' (concept or idea) च आपल्या मनश्चक्षूपुढें असते. ती त्या वस्तूची कल्पना तरी आपल्या मनांत कां यावी ? तर त्या वस्तूबद्दल बोलण्याचा आपला हेतु असतो म्हणून. म्हणजे ह्या सर्व प्रक्रियेच्या मुळाशीं 'मनांतील हेतु' असतो. ही प्रक्रिया खालील आकृतींत दाखविली आहे.

आकृति ३ ‡



कांहींतरी वस्तूबद्दल बोलण्याचा 'हेतु' आपल्या मनांत येतो. तो वरील आकृतींत 'ड' बिंदूजवळ दाखविला आहे. हेतु उत्पन्न झाल्याबरोबर त्या वस्तूची कल्पना मनांत जागृत होते. ती 'क' बिंदूजवळ दाखविली आहे. वस्तूची कल्पना आल्याबरोबर तिचा दर्शक शब्द व तिचें मूळ ती प्रत्यक्ष वस्तु ह्या दोन गोष्टी समोर येतात. त्यांचीं स्थळें अनुक्रमें 'ब' व 'अ' ह्या बिंदूजवळ दाखविलीं आहेत. आपणास मनुष्यासंबंधीं बोलावयाचें झालें तर बोलण्याचा हेतु 'ड' येथें उत्पन्न होऊन त्याचा प्रवास 'क' पर्यंत झाला कीं मनुष्याची काल्पनिक मूर्ति मनाच्यासमोर उभी राहील. ती तशी उभी राहिली कीं तद्दर्शक प्रत्यक्ष वस्तु-मनुष्य—ही 'अ' बिंदूजवळ व तद्दर्शक म-नु-ष्य असा शब्द 'ब' बिंदूजवळ मनश्चक्षूसमोर उभे राहतील. ह्या प्रक्रियेंत आपल्या जाणिवेचा होणारा प्रवास बाणांच्या टोकांनीं दाखविला आहे.

आपण जी व्यावहारिक भाषा वापरतों त्या भाषेंतील शब्दाच्या अर्थाबाबत प्रक्रिया ही अशी होते. व्यावहारिक भाषा ही बहुतेक प्रेरणिक किंवा हेतुमूलक (promotive) असते. आपण कांहींहि बोललों तरी त्याच्या मुळाशीं कांहीं तरी हेतु हा असणारच. हेतुमूलक भाषेंतील शब्दाच्या अर्थाची प्राप्ति ह्या प्रक्रियेनें होते. हेतुमत् भाषा समजण्यास जरा वेळ लागतो. एखादे वेळेस बोलतांना वक्त्याचे एकापेक्षां अधिक हेतु असतील. ह्या अनेक हेतूंपैकीं एखादाच हेतु श्रोत्याला समजेल. बाकीच्या हेतूंची कल्पना त्याला तात्काल येणार नाहीं. ती येण्यास वेळ लागेल. एक हेतु समजल्यानंतर दुसरा, दुसरा समजल्या नंतर तिसरा, असे ते हेतु एकामागून एक त्याला समजतील. अलंकारिक किंवा गुंतागुंतीच्या भाषेंत बोलणाऱ्याचें मनांत एकापेक्षां अधिक हेतु असतात. बोलण्यांत एकापेक्षां अधिक हेतु असले तर वरील तिसऱ्या आकृतींत 'ड' पासून 'क' बिंदूपर्यंत जाणाऱ्या रेषा अधिक होतील. जितके हेतु असतील तितक्या 'डक' रेषा होतील हें उघड आहे. बोलणाऱ्याच्या मनांत हे हेतु जरी स्पष्ट असले तरी ऐकणाऱ्याला ते समजण्यास वेळ लागेल. कायद्याची, न्यायनिवाड्याची, वादविवादाची, पूर्वपक्ष-उत्तर पक्षाची ह्या सर्व भाषा हेतुमत् स्वरूपाच्या असतात. त्यामुळें त्यांना फाटे फार फुटतात. हे फाटे कसे फुटतात हें खालील आकृतींत दाखविलें आहे.

---

† W. L. Graff: *Language and Languages*, pp. 83,91.

आकृति ४



शब्दाला अर्थ प्राप्त होतांना जी क्रिया होते तिचें स्पष्टीकरण वरील चार आकृतींच्या साह्यानें करून दाखविलें. शब्दाच्या अर्थप्रतीतीच्या प्रक्रियेंतील चार भिन्न अवस्था ह्या चार आकृतींनीं दाखविल्या आहेत. अर्थप्रतीतीची स्थूल अवस्था पहिल्या आकृतींत, तिच्यामागील सूक्ष्म अवस्था दुसऱ्या आकृतींत, तिच्याहि मागील सूक्ष्मतर दोन अवस्था तिसऱ्या व चौथ्या आकृतींत दाखविल्या आहेत. ह्या चार आकृतींपैकीं पहिली व दुसरी ह्या दोनच आकृति महत्त्वाच्या आहेत. शेवटच्या दोन ह्या त्या दुसऱ्या आकृतीच्या पुरवण्या होत. तिचें अधिक स्पष्टीकरण तिसऱ्या व चौथ्या आकृतींत दाखविलें आहे.

२६ त्रिकोणास पाया नाहीं : ह्या आकृतीसंबंधीं एक गोष्ट उल्लेखनीय आहे. ती कधींहि विसरतां कामा नये. किंबहुना तिचेंच महत्त्व विशेष आहे. पहिल्या आकृतींत ती दिसून येत नाहीं परंतु बाकीच्या तिहींत ती स्पष्ट दिसून येते. ती गोष्ट म्हटली म्हणजे अर्थप्रतीतीच्या ह्या त्रिकोणाला पाया नाहीं. त्रिकोणाचे तीन बिंदु व दोन बाजू इतक्याच गोष्टी आहेत. तीन बिंदु दोन रेषांनीं जोडले आहेत. 'अ, ब, क' हे त्रिकोणाचे तीन बिंदु व 'अक' व 'बक' ह्या दोन रेषा इतकेंच साहित्य आहे. तिसरी रेषा 'अब' ही नाहीं. ह्याचा अर्थ उघड आहे; शब्दाला अर्थ प्राप्त होण्याच्या क्रियेंत त्रिकोणाची ही तिसरी बाजू अस्तित्वांत नसते. तिचा कांहींच संबंध ह्या अर्थप्रक्रियेंत नाहीं. वस्तु व वस्तूची कल्पना ह्या दोन्ही परस्परसंबद्ध आहेत आणि तो संबंध 'अक' ह्या रेषेनें दाखविला आहे. वस्तूची कल्पना व तिचें दर्शक चिन्ह जो शब्द ह्या दोन्हीहि गोष्टी परस्परसंबद्ध आहेत. व तो संबंध तो 'कब' ह्या रेषेनें दाखविला आहे. वस्तु, वस्तूची कल्पना व तिची खूण म्हणजे शब्द ह्या तिन्ही गोष्टी अनुक्रमें 'अ, क, ब' ह्या तीन बिंदूंनीं दाखविल्या. वस्तु व वस्तुदर्शक शब्द ह्या दोहोंचा मात्र साम्यसंबंध कांहीं नाहीं. वस्तु निराळी व शब्द निराळा. त्यांचा परस्पर साम्यसंबंध कांहीं नाहीं. 'मनुष्य' ही वस्तु दोन हातांची, दोन पायांची, एक डोक्याची असते. तिचें खरें चिन्ह, तिची खरी खूण म्हटली म्हणजे तिचें चित्र ही होय. तसेंच 'खुर्ची' ही वस्तु चार पायांची, पाठ असलेली, बसावयाची चौकट असलेली, लाकडाची बनविलेली असते. तिचें खरें चिन्ह म्हणजे चित्र हें होय. तसें चित्र काढलें तर मूळ वस्तु 'मनुष्य' किंवा 'खुर्ची' व तिचें याथातथ्याचें चित्र ह्यांचा परस्परसंबंध स्पष्ट आहे. परंतु वस्तुदर्शक शब्द म्हणजे तिचें याथातथ्याचें चित्र नव्हे. आपण तिचा दर्शक शब्द वापरतों; तिचें चित्र काढीत नाहीं. आपण 'म-नु-ष्य' असा शब्द वापरतों. आपण 'खु-र्ची' अशी वर्णात्मक खूण वापरतों. इंग्रज लोक 'm-a-n' अशी किंवा 'c-h-a-i-r' अशी खूण वापरतील. इतर भाषांत निरनिराळ्या खुणा वापरतील. एकाच वस्तूच्या दर्शक खुणा ज्याअर्थी निरनिराळ्या देशांत व निरनिराळ्या काळांत तयार होतात, त्याअर्थी त्या खुणांचा आणि त्या प्रत्यक्ष वस्तूंचा परस्परसंबंध कांहीं नाहीं हें स्पष्ट होतें. ह्या खुणांच्या ऐवजीं जर त्या वस्तूचें प्रत्यक्ष चित्र काढलें असतें तर तें सर्व देशांत व सर्व कालांत एकच राहिलें असतें. तें असें स्थलाप्रमाणें व कालाप्रमाणें बदललें नसतें. शब्द ही खूण बदलते, ह्याचें कारण ह्या खुणेचा संबंध वस्तूच्या कल्पनेशीं आहे; प्रत्यक्ष वस्तूशीं नाहीं हें होय. वस्तू व तद्दर्शक शब्द ह्या दोहोंचा संबंध नाहीं म्हणून वरील त्रिकोणांत 'अ ब' ही रेषा जोडली नाहीं, म्हणूनच ह्या त्रिकोणाला पाया नाहीं. वस्तु व तद्दर्शक शब्द ह्यांचा प्रत्यक्ष साम्य संबंध नाहीं. वस्तुकल्पना व शब्द ह्या दोहोंचा संबंध आहे.

२७ अर्थनिश्चितीचे घटक : शब्दाला अर्थ प्राप्त होतांना जी प्रक्रिया होते ती आकृतींच्या साह्यानें येथवर विशद केली. परंतु शब्दाला अर्थ प्राप्त झाला असें केव्हां म्हणतां येईल ? "जी वस्तु किंवा जो प्रसंग प्रत्यक्ष पाहिल्यानें जो परिणाम पाहणाऱ्यावर होतो तोच परिणाम

या वस्तूचा किंवा त्या प्रसंगाचा दर्शक शब्द ऐकल्यानंतर लगेंच झाला तर त्या शब्दाला तो विशिष्ट अर्थ प्राप्त झाला असें म्हणतां येईल. प्रत्यक्ष वस्तूचें किंवा प्रसंगाचें परिणाम करण्याचें सामर्थ्य तद्दर्शक शब्दांत आलें कीं त्याला अर्थ प्राप्त झाला. हें जें सामर्थ्य किंवा शक्ति तोच त्याचा अर्थ. प्रत्यक्ष वस्तूचा अगर घटनेचा परिणाम निश्चित करणारे जे घटक तेच तद्दर्शक शब्दाचा अर्थ निश्चित करणारे घटक होत§." हे जितके निश्चित असतील तितका शब्दाचा अर्थ अधिक निश्चित होईल. हे जर निश्चित नसले तर बोलणाऱ्याला आपल्या मनांतील अभिप्राय दुसऱ्यास नीट सांगतां येणार नाहीं व ऐकणाऱ्याला तो नीट समजणार नाहीं. वक्त्याचा हेतु व श्रोत्याची समजूत ह्यांत अंतर पडेल. बोलणारा बोलेल एक आणि ऐकणारा ऐकेल भलतेंच. शब्दाच्या अर्थाचे घटक निश्चित असले तर वक्त्याची बोलण्याच्या पूर्वीची वृत्ति व श्रोत्याची ऐकल्यानंतरची वृत्ति ह्या दोन्ही वृत्ति एक होतील. वक्ताश्रोत्यांचें वृत्त्यैक साधण्यासाठीं हे घटक निश्चित असावयास पाहिजेत. त्यांपैकीं पहिली गोष्ट म्हणजे वस्तु आणि वस्तूची कल्पना ह्या दोहोंत 'अभिन्नत्व' पाहिजे. २ वस्तूची कल्पना व तद्दर्शक शब्द ह्या दोहोंत तंतोतंत 'व्याप्ति' पाहिजे. ३ वक्त्याची व श्रोत्याची भाषा एकच पाहिजे. ४ वक्ता व श्रोता ह्यांच्या ज्ञानाचें, संस्कृतीचें व आकलनशक्तीचें अधिष्ठान सारख्या दर्जाचें पाहिजे. **अर्थनिश्चितीचे हे चार घटक आहेत.** हे सर्व शाबूत असावे लागतात. ह्यांपैकीं जर एखादा निश्चित नसला तर श्रोतावक्त्यांच्या समजुतींचा घोंटाळा होईल. ह्या घटकांच्या जोडीला इतर कांहीं दुय्यम घटक आहेत. परंतु त्यांचा संबंध वाक्यार्थाशीं आहे. शब्दार्थाशीं तितकासा नाहीं. शब्दाचा वाक्यांतील इतर शब्दांशीं असणारा संबंध हाहि घटक समजतात. सान्निध्य, आकांक्षा व योग्यता हेहि अर्थप्रतीतीचे घटक समजले जातात. परंतु त्यांचा संबंध विशेषतः अन्वित शब्दांच्या अर्थाशीं म्हणजे वाक्याच्या अर्थाशीं येतो; सुट्या एकट्या शब्दाच्या अर्थाशीं येत नाहीं.

३८ शब्दाच्या अर्थांतील अंश-बौद्धिक अंश : अशा रीतीनें शब्दाचा अर्थ प्रतीत होतांना त्यांत **बौद्धिक व भावनिक अंश** उतरतात. ह्या दोन अंशांचा मिळून शब्दाचा अर्थ बनलेला असतो. हे दोन त्या अर्थाचे अवयव होत. शब्द वापरला किंवा ऐकला कीं आपणास त्या त्या वस्तूचें ज्ञान होतें. खुर्ची, बांक, पुस्तक, लेखणी, घर, दार, खिडकी, गांव, शहर, जग, विश्व, सूर्य, प्रकाश, जल, वायु वगैरे शब्द उच्चारल्याबरोबर आपणास त्या त्या वस्तूचें ज्ञान होतें. हा जो ज्ञान करून देण्याचा त्या शब्दाच्या अर्थांतील भाग त्याला बौद्धिक अंश (intellectual content) असें म्हणतात. प्रत्येक शब्दानें कांहीं तरी ज्ञान होतें, म्हणून प्रत्येक शब्दांत बौद्धिक अंश हा असतोच. वस्तुनामें, पदार्थनामें, जातिनामें, - थोडक्यांत म्हणजे सर्व सामान्यनामें ह्यांच्या द्योतक शब्दांच्या अर्थांत बौद्धिक अंशाचा भाग अधिक असतो. विश्वामधील सर्व ज्ञात वस्तुजात व त्यांचे दर्शक शब्द ह्या दोहोंचा संबंध बुद्धि लावते. हा संबंध मागें सांगितल्याप्रमाणें त्रिकोणबद्ध (वस्तु–संकेत–दर्शक शब्द) असल्यामुळें बुद्धीचा विषय आहे. तो संबंध ओळखणें ही बौद्धिक क्रिया आहे. म्हणून ह्या शब्दाच्या अर्थांत बौद्धिक अंशच प्रामुख्यानें असतो.

शब्दाच्या अर्थांतील बौद्धिक अंशाच्या दृष्टीनें आपल्या इकडील शब्दशास्त्रकारांनीं केलेलें विवेचन चिन्त्य आहे. शब्द हा नित्य आहे कां अनित्य आहे, त्यानें व्यक्ति दाखविली जाते कां जाति दाखविली जाते; वगैरे कांहीं प्रश्न आपल्या इकडील प्राचीन विद्वानांनीं विवेचिले आहेत. "वैयाकरणांच्या मतानें शब्द नित्य आहे, आणि अर्थ हा त्या नित्य शब्दालाच आहे. त्या नित्य शब्दालाच 'स्फोट' असें म्हणतात. त्या स्फोटाची उत्पत्तिहि होत नाहीं व व त्याचा नाशहि होत नाहीं. मनुष्य बोलूं लागला म्हणजे फक्त त्यावेळीं त्या बोलण्यानें म्हणजे ध्वनीनें तो स्फोटरूपी नित्य शब्द प्रकाशित होतो आणि श्रोत्याच्या मनामध्यें आपला अर्थ आणून देतो" §. शब्दाचे पुनः त्यांनीं दोन प्रकार केले आहेत एक वैदिक शब्द व दुसरे लौकिक शब्द. लौकिक शब्दांचा आपल्या व्यवहारांत संबंध येतो. गाय, घोडा, पुरूष, हत्ती, हरीण, ब्राह्मण, इत्यादि लौकिक शब्द होत. ;हा लौकिक शब्द जाति दाखवितो का व्यक्ति दाखवितो ह्या प्रश्नाचा निर्णय प्राचीन शास्त्रकारांनीं दोन्ही मतांचा समन्वय करून दिला आहे. पाणिनीचा आधार पाहिला तर दोन्हीं मतांना पोषक अशीं

---

§ J. Eisenson: *The Psychology of Speech*, pp. 75-78.

§ म.म. वा. अभ्यंकरः व्याकरणमहाभाष्यभाषांतर, १.२, १२, १३.

त्याचीं सूत्रें आढळतात. 'पदाचा अर्थ जाति आहे' ह्या मताला पोषक हें पुढील सूत्र आहे. " जात्याख्यायामेकस्मिन् बहुवचनमन्यतरस्याम् (१-२-५८) " पदाचा अर्थ व्यक्ति आहे ' ह्या मताला पोषक सूत्र हें आहे-" सरूपाणामेकशेष एकविभक्तौ (१-२-६४) ". तेव्हां एकंदरींत ' जातीनें युक्त व्यक्ति ', किंवा 'व्यक्तीनें युक्त जाति'असे दोन्ही अर्थ वैयाकरणांना मान्य होते. शब्दाचा अर्थ व्यक्ति आहे असें जरी मानलें तरी पुनः ती व्यक्ति कसली हा प्रश्न राहतोच. उदाहरणार्थ गाय हा शब्द घ्या. हा प्राणीवाचक शब्द आहे. गाय प्राणी म्हणजे शब्द नव्हे. तें द्रव्य आहे. गाय जी विशिष्ट हालचाल करील तीहि पण शब्द नव्हे. ती क्रिया होय. गायीवरील रंग म्हणजेहि शब्द नव्हे. तो गुण होय. त्यां गायींत जें सामान्य स्वरूप आढळतें तेंहि पण शब्द नव्हे. ती आकृति होय. ' गाय ' ह्या शब्दानें द्रव्यक्रियागुणविशिष्ट अशी व्यक्ति गाय समजली जाते. शब्दाची व्याख्या पुढील सूत्रांत केली आहे. " प्रतीतपदार्थको लोके ध्वनिः शब्द इत्युच्यते "— ज्याच्यापासून व्यावहारांत पदार्थाचें ज्ञान होतें असा जो ध्वनि तो शब्द. ह्या व्याख्येंत व्यवहारांतील उपयुक्ततेलाच महत्त्व दिलें आहे. हेंच व्यावहारिक उपयुक्ततेचें महत्त्व पाश्चात्य विचारसरणींतहि अभिप्रेत आहे.

शब्दाच्या अर्थाची व्यवहारांतील ही उपयुक्तता निश्चित करण्यास कांहीं इतर गोष्टी कारणीभूत होतात. एकापेक्षां जास्त अर्थ असलेल्या शब्दाच्या बाबतींत तर ह्या गोष्टींवर भिस्त ठेवून त्या शब्दाचा विशिष्ट अर्थ निश्चित केला जातो. संदर्भानें आपण अर्थ निश्चित करतों हें खरें. संदर्भ हें सामान्य कारण आहे व तें सर्व ठिकाणीं उपयोगीहि पडतें. परंतु त्याशिवाय इतर विशेष कारणें हि अर्थनिश्चितीस उपयोगी पडतात. त्या शब्दाचा इतर शब्दांशीं संयोग, वियोग, साहचर्य, विरोध, उद्देश, प्रकरण, त्या शब्दाचें विशिष्ट चिन्ह, सान्निध्य, अर्थयोग्यता, सामर्थ्य, औचित्य, देश, काल, लिंग, वचन, स्वर, अभिनय हीं सर्व अर्थनिर्णायक विशेष कारणें होत (का. प्र. उ २, का १४). हरि शब्दाचे विष्णु व इंद्र असे दोन अर्थ आहेत, त्यांपैकीं आपणास कोणता एक पाहिजे हें 'शङ्खचक्रधर' ह्या शब्दाच्या संयोगानें अगर वियोगानें ठरवितां येईल. 'राम' ह्याचा 'दाशरथी राम' हा अर्थ अभिप्रेत असेल तर 'रामलक्ष्मण' हें साहचर्य व 'परशुराम' हा अर्थ अभिप्रेत असेल तर 'रामार्जुन' हें शब्दसाहचर्य उपयोगी ठरतें. चित्रभानु हा शब्द दिवसास अनुलक्षुन असल्यास 'सूर्य' व रात्रीशीं संबद्ध असल्यास 'अग्नि' असे त्याचे अर्थ होतात. येथें 'काल' ही बाब अर्थनिर्णायक ठरली. 'तीर' शब्द पुंल्लिंगी असेल तर 'बाण' व नपुंसकलिंगी असेल तर 'नदीतट' असा अर्थ होईल. येथें लिङ्ग हें अर्थनिर्णायक ठरलें.

३९ शब्दांतील भावनिक अंश : शब्दाच्या अर्थांतील ह्या बौद्धिक अंशाबरोबर भावनिक अंश (emotive content) असतो. शब्दानें जसें ज्ञान होतें तशा त्यानें भावनाहि निर्माण होतात. विचार उत्पन्न करण्याचें सामर्थ्य जसें शब्दांत आहे तसें विकार उत्पन्न करण्याचेंहि सामर्थ्य आहे. ज्ञान जसें शब्दाशीं निगडित होऊन बसतें तशा भावनाहि शब्दांशीं निगडित होऊन बसतात. शब्दाच्या अर्थांत जसें ज्ञान समाविष्ट झालेलें असतें तशा त्यांत भावनाहि समाविष्ट झालेल्या असतात. कधीं कधीं शब्दाच्या अर्थांवर भावनांचे थरचे थर सांचलेले असतात. भाषेंतील उद्गारवाचक शब्द, विशेषनामें, व्यक्तिनामें वगैरे ह्या दृष्टीनें उल्लेखनीय आहेत. उद्गारवाचक शब्दांत तर भावनिक अंशच असतो. त्यांत बौद्धिक अंश नसतोच असें म्हटलें तर चालेल. हर्षाची भावना ' अहा, अहाहा, ओहो, वाः, वाहवा ' ह्या शब्दांत आहे. शोकाची अगर दुःखाची भावना ' अगई, अयाई, अँ, उँ, अरेरे, अगग, हाय, हायहाय, हरहर, रामराम, शिवशिव देवारे ' ह्या शब्दांत निविष्ट झाली आहे. आश्चर्याची भावना ' अबब, ओहो, बबब, आहा, बापरे ' ह्या शब्दांत असलेली दिसते. तिरस्काराची भावना ' हट्, छे, छत्, छी, छीछी, भलतेंच, फुस्, फें, उंः, इत्यादि उद्गारशब्दांत आढळते. उद्वेग, विरक्ति, धिक्कार ह्या भावना समाविष्ट झालेले शब्द ' ' धिक्, इश्श, थुत्, थूः, हिडीस, धूत्, अहाहा' हे होत. हे सर्व शब्द त्या त्या भावनेचे उद्गार असल्यामुळें ह्यांत भावनिक अंश प्रधान आहे. व्यक्तिनामें किंवा विशेषनामें ह्यांतहि भावनिक अंश विशेष असतो. ' शिवाजी ' ह्या शब्दांत भावनिक अंश किती आहे हें महाराष्ट्रीयांस सांगावयाला नको. मराठ्याचें शौर्य, वीर्य, अभिमान, स्वत्व, पराक्रम, यश, वगैरे उत्कर्षाच्या सर्व भावना त्या शब्दांत एकवटल्या आहेत. राम, कृष्ण, भीष्म, कर्ण, हरिश्चंद्र, तारामती, अहल्या, सीता, इत्यादि पौराणिक व्यक्तिवाचक शब्द भावनिक अंशानें ओतप्रोत भरलेले आहेत. सध्यांसुद्धां व्यक्तींचीं नामें ठेवतांना आपण कोणत्या तरी भावनेनें

प्रेरित झालेलों असतों. त्यामुळें त्यांत भावनिक अंश मुख्य असतो. गुणवाचक विशेषणें, भाववाचक नामें, कांहीं क्रियाविशेषणअव्ययें इत्यादि शब्द भावनिक अंशानें पूर्ण असतात. सर्वनामांत तर भावनिक अंशच विशेष आढळतो. प्रथम पुरुषवाचक सर्वनामांत अहंता, प्रौढी, अभिमान ह्या भावना असतात, तर द्वितीय पुरुषवाचक सर्वनामांत आदर, तुच्छता, अभिमान, प्रेम, द्वेष ह्या भावना असतात, तर तृतीय पुरुषवाचक सर्वनामांत ताटस्थ्य, बेपर्वा, औदासिन्य, अनौत्सुक्य ह्या भावना असतात, भावनिक अंश शब्दाच्या अर्थांतच फक्त असतो असें नाहीं तर तो प्रत्ययाच्या अर्थांतहि असतो. पौरुष, शौर्य, राकटपणा वगैरे शब्दांनीं प्रतीत होणाऱ्या भावना पुंलिंगी प्रत्ययाच्या मुळाशीं आहेत, तर सौंदर्य, नाजुकपणा, शृंगार, अनुकंपा, प्रेम, लडिवाळपणा इत्यादि शब्दांनीं प्रतीत होणाऱ्या भावना स्त्रीलिंगी प्रत्ययाच्या मुळाशीं आहेत, तर क्षुद्रत्व, लडिवाळपणा अवहेलना, अनादर इत्यादि शब्दांनीं प्रतीत होणाऱ्या भावना नपुंसकलिंगी प्रत्ययाच्या मुळाशीं आहेत. वचनाच्या प्रत्ययाबाबत एकवचनी प्रत्ययाच्या मुळाशीं क्षुद्रत्व, अल्पत्व, आदर, अवहेलना, अहंकार, महत्त्व ह्या भावना व अनेकवचनी प्रत्ययाच्या मुळाशीं बहुत्व, आदर, बहुमान, प्राचुर्य, अचाटपणा, बेफामपणा इत्यादि शब्दांनीं प्रतीत होणाऱ्या भावना असतात. क्रियापदाच्या आज्ञार्थ, विध्यर्थ ह्या अर्थांच्या प्रत्ययांत तर भावनिक अंशच मुख्यतः असतो. इच्छा, आशीर्वाद, प्रार्थना इत्यादि भावना आज्ञार्थी व विध्यर्थी रूपांनीं दर्शविल्या जातात. क्रियापदाच्या स्वार्थी रूपांत बौद्धिक अंश विशेष असतो. कारण तें एक साधें सरळ विधान असतें. काळांपैकीं वर्तमानकाळाच्या प्रत्ययांत बौद्धिक अंश असतो तर भूत व भविष्य काळांच्या प्रत्ययांत भावनिक अंश अधिक असतो. अव्ययांपैकीं शब्दयोगी अव्ययें, उभयान्वयी अव्ययें ह्यांत बौद्धिक अंश असतो, भावनिक अंश तितकासा नसतो.

४० धार्मिक शब्द-भावनिक अंश : ईश्वर, देव, धर्म, वगैरे संबंधींच्या विषयांत वापरांत येणाऱ्या शब्दांत असणारा भावनिक अंश अधिक उत्तान रीतीनें दृष्टोत्पत्तीस येतो. धर्मासंबंधीं अथवा ईश्वरासंबंधीं वापरांत असणाऱ्या शब्दांभोंवतीं पावित्र्य, मांगल्य, पुण्य इत्यादि भावनांचें वलय असतें. हिंदु तत्त्वज्ञानांतील ‘ॐ’ ह्या अक्षरांत भावनिक अंशाचा प्रकर्ष झाला आहे. ‘ॐ’ मध्यें हिंदूची सर्व संस्कृति एकवटली आहे. आर्यांचा धर्म, तत्त्वज्ञान, कर्मकाण्ड, नीति, इतिहास, परंपरा, रूढी किंबहुना आर्यत्व म्हणून जें जें कांहीं आहे तें सर्व ह्या एका शब्दांत निविष्ट झालें आहे. सर्व आर्य संस्कृतीचें पवित्र प्रतीक म्हणजे ‘ॐ’ अक्षर किंवा प्रणव हा होय. ह्या प्रणवाक्षराचा सारखा अव्याहत जप करून आजवर कित्येकांनीं मोक्ष साधला, कित्येकांनीं निर्वाण मिळविलें. तपश्चर्या, योगमार्ग, कर्मकाण्ड, संघशरणशक्ति, नैष्कर्म्य, संन्यास, भक्ति वगैरे मार्गांनीं प्राप्त होणाऱ्या सायुज्यतेच्या ह्या साधनांत किंवा माध्यमांत भावनांचा प्रकर्ष किती झाला असला पाहिजे !

धार्मिक शब्दांचीं ही एक बाजू झाली. धर्माच्या दुसऱ्या बाजूचा विचार करतां त्याबाबत वापरांत असणाऱ्या शब्दांतहि भावनिक अंश असलेला आढळतो. मंत्र तंत्र, जादु टोणा, जारण, मारण, अभिचारण, वशीकरण वगैरे मंत्रविद्येंतील शब्दांत भावनिक अंशाचा अतिरेक झालेला असतो. त्या भावना जरी दुष्ट असल्या तरी त्या त्या शब्दांना भारून टाकतात. त्या शब्दांच्या उपयोगानें फल येणें न येणें हें त्यांतील भावनिक अंशावर अवलंबून असतें. मंत्रशब्दांतील भावनिक अंश सुरक्षित, फलदायी व प्रभावी राहावा म्हणून त्यासंबंधीं विशेष दक्षता घेतात.

४१ परिस्थितीमुळें आलेला भावनिक अंश: कधीं कधीं शब्दांच्या घटनेवरूनहि त्याच्या अर्थामध्यें बौद्धिक किंवा भावनिक अंश उतरतो. शब्दांत जर मृदु वर्ण असतील, त्यांचा ह्रस्व उच्चार होत असेल, त्यांची श्रुति जर कोमल असेल तर त्याच्या अर्थांत एखादी विशिष्ट भावना अंतर्भूत झालेली असते. ह्याच्या उलट एखाद्या शब्दांत कठोर, कर्कश वर्ण असतील, त्यांचा उच्चार व त्यांची श्रुति जर कर्कश असतील तर त्यांत कठोर भावना अंतर्भूत झालेली असते. कधीं शब्दाच्या भोंवतीं असलेलें परिस्थितीचें वलय किंवा त्याचा संदर्भ त्या शब्दांत भावनिक अंश आणून सोडतो. ‘हातरुमाल’ म्हणजें ‘तोंड पुसावयाचें फडकें’ हा त्यांतील बौद्धिक अंश होय. कापडवाल्याच्या दुकानांतील सर्व लहान चौकोनी फडकीं हीं हातरुमालच.त्या प्रत्येकांत बौद्धिक अंश आहे. परंतु त्यांतील एक हातरुमाल मी विकत घेतला.त्यांत आतां माझी स्वामित्वाची,पसंतीची

भावना निविष्ट झाली. समजा, तो हातरुमाल मला कोणी त्यावर नक्षी काढून भेट म्हणून दिला कीं त्यांत प्रेमाची भावना निविष्ट झाली. असाच एक हातरुमाल शेक्सपीयरच्या एका नाटकांतील ऑथेल्लो ह्या पात्राच्या मनांत भावनांचा हलकल्लोळ उठवून देतो. जव्हेऱ्याच्या दुकानांतील दर्शनी पेट्यांत सर्व अंगठ्याच असतात. त्या प्रत्येकींत बौद्धिक अंश असतो.त्यांतील एक विकत घेतली कीं तिच्यांत स्वामित्वाची भावना आली.ती प्रेयसीला दिली कीं तिच्यांत प्रेमाची भावना आली.ती हरवली कीं मनाला हुरहुर लागते. तिच्यांत दुःखाची भावना आली. विवाहांत दिलेली ती अंगठी हरवली असेल तर विवाहमांगल्याच्या भावनेला धक्का बसतो. कालिदासाच्या शाकुंतलात एका अंगठीनें किती गोंधळ करून सोडला आहे! अंगठी वस्तु व शब्द एकच. जव्हेऱ्यासहि अंगठीच, दुश्यन्तासहि अंगठीच, शकुन्तलेसहि अंगठीच, मासे धरणाऱ्या कोळ्यासहि अंगठीच, व दरबारांतील मंत्र्यांनाहि अंगठीच. पण प्रत्येकानें वापरलेल्या 'अंगठी' ह्या शब्दांत किती निरनिरळ्या भावना उतरल्या? अशा रीतीनें कांहीं कांहीं शब्दांत त्या त्या परिस्थितीमुळें किंवा त्या त्या संदर्भामुळें बौद्धिक अंशाबरोबर भावनिक अंश उतरतो.

४२ भावनिक शब्द : शब्दाच्या अर्थांत असलेल्या मूळच्या बौद्धिक अंशाला निरनिराळ्या कारणांनीं भावनिक अंश येऊन मिळण्याची क्रिया भाषेच्या व्यवहारांत सारखी चाललेली असते. शब्दाच्या अर्थामध्यें असे बौद्धिक व भावनिक अंशांचे थरच्या थर सांचत जातात. ह्या अंशांचें प्रमाण जस जसें वाढत जातें तसतसें त्या भाषेचें अर्थप्रकटनाचें सामर्थ्य वाढत जातें. बौद्धिक अंशाचें प्रमाण अधिक असलेले शब्द वेदान्त, गणित, ज्योतिष, भूगोल वगैरे भौतिक शास्त्रें, व औद्योगिक शास्त्रें ह्यांच्या स्पष्टीकरणासाठीं उपयोगी पडतात. भावनिक अंशाचें प्रमाण अधिक असलेले शब्द काव्य, कादंबरी, नाटकें वगैरे कल्पनाप्रधान, भावनाप्रधान विषयांच्या स्पष्टीकरण करण्यासाठीं उपयोगी पडतात. कांहीं कांहीं शब्दांत तर नुसता बौद्धिक अंश तर कांहीं शब्दांत नुसता भावनिक अंशच कायमचा उतरतो. 'स्त्री' आणि 'ललना' हे दोन्ही एकाच वस्तूचे दर्शक शब्द आहेत. तसेच 'वृक्ष' व 'तरु' हे एकाच वस्तूचे दर्शक शब्द आहेत. 'विलसति' व 'तिष्ठति' हे एकाच क्रियेचे दर्शक शब्द आहेत. तसेच ठिकाण-स्थल,' 'पाणि-जल, नीर,' 'बाग-उद्यान,' 'झोपडी-उटज,' 'कमळ-कमल, सरोज, सरसिज, पंकज' इत्यादि शब्दांच्या जोड्या एकाच त्या त्या वस्तूच्या दर्शक आहेत. परंतु भावनिक संदर्भाच्या नेहेमींच्या वापरामुळें त्या त्या जोडींतील दुसऱ्या शब्दांत भावनिक अंश पूर्णपणें उतरला आहे. हे असलेच भावनिक अंशाचे शब्द भावनाप्रधान वाङ्मयाचें माध्यम बनतात. भाषेंतील असले भावनिक अंशानें थबथबलेले शब्द हुडकून काढून वापरणें व त्यांचें वाङ्मय तयार करणें हेंच कार्य भावनाप्रधान लेखक करतो. प्रतिभा प्रतिभा म्हणून दैवी शक्ति म्हणून म्हणतात ती हीच होय. कवि, नाटककार, कादंबरीकार, लघुकथाकार वगैरे सर्व ललित लेखकांची हीच शक्ति मुख्य होय. हे ललित कलावन्त लेखक भाषा, प्रयोग, शब्द, ध्वनि ह्या सर्वांतील नादमय व भावनिक अंश बरोबर ओळखून त्यानें थबथबलेले शब्द निवडून आपल्या वाङ्मयांत वापरतात. त्यांच्या वाङ्मयांत भावनिक अंशाचा समुच्चय उतरतो व तें वाङ्मय भावनात्मक होतें.

४३ आकृतींचें स्पष्टीकरण : भाषेंतील शब्दाच्या अर्थांतील बौद्धिक व भावनिक अंश ह्या संबंधींचें विवेचन वर केलें. अर्थांतील ह्या दोन्ही अंशांची उपपत्ति वर दिलेल्या आकृतींच्या साह्यानें सांगतां येण्यासारखी आहे. वरील चारी आकृतींचा अभिप्राय एकच आहे. मात्र पहिलीपेक्षां दुसरींत अधिक व दुसरीपेक्षां तिसरींत त्याच प्रक्रियेचें अधिक स्पष्टीकरण आहे इतकेंच. बोलणारा व ऐकणारा ह्या दोघांमध्यें होणाऱ्या भाषिक देवघेवीचे हे आलेख आहेत. ह्या चारी आकृतींचा मुळचा अभिप्राय एकच आहे असें म्हटलें तरी भाषेच्या भावनिक, बौद्धिक व हेतुमत् ह्या तीन स्वरूपांत त्या चारीपैकीं एखादीच आकृति विशेष लागूं पडते. उदाहरणार्थ भावनिक भाषेच्या बाबत होणारी शब्दार्थाची प्रक्रिया पहिल्या आकृतींत दाखविल्याप्रमाणें सरळ रेषात्मक मार्गानें होते. बौद्धिक भाषेच्या बाबत तीच शब्दार्थाची प्रक्रिया दुसऱ्या आकृतींत दाखविल्याप्रमाणें त्रिकोणात्मक मार्गानें होते. हेतुमत् भाषेच्या बाबत तीच शब्दार्थाची प्रक्रिया तिसऱ्या आकृतींत दाखविलेल्या मार्गानें होते. भावनिक भाषेंत प्राचुर्यानें येणारे रागाचे, लोभाचे, प्रेमाचे उद्गार तेव्हांच ससजतात. शिवी किंवा अपशब्द वगैरे तर तात्काळ अंतःकरणाला घरे पाडतात. श्रोता व वक्ता ह्यांच्या वृत्तींचें ऐक्य भाव-

निक भाषेच्याबाबत तात्कालिक होतें. हें वृत्यैक्य होतें इतकेंच नव्हे तर हृदयैक्यहि होतें. भावनिक शब्द उच्चारण्याचा अवकाश कीं पडलीच समजूत. वक्त्याचें उच्चारण व श्रोत्यांचें आकलन ह्यांमध्यें वेळ जात नाहीं, किंवा कांहीं अडथळा उत्पन्न होत नाहीं. प्रेमाची, अधिक्षेपाची, गौरवाची भाषा समजण्यास आपणास वेळ लागतो का ? तशी गोष्ट बौद्धिक भाषेची नाहीं. एखादें प्रमेय सांगावयाचें आहे किंवा एखादें तत्त्वप्रतिपादन करावयाचें आहे; तर त्यावेळेस शब्दोच्चारण झाल्यानंतर त्याच्या मागील संकेत काय आहेत, ते स्पष्ट, असंदिग्ध आहेत की नाहींत, त्या शब्दांनीं आपल्या मनांतील भावार्थ नीट व्यक्त झाला आहे कीं नाहीं,असल्या प्रश्नांचे अडथळे मध्यें येतात व त्यामुळें समजुतीच्या क्रिया त्रिकोणात्मक होतात. हेतुमत् किंवा प्रेरणिक (promotive) भाषेच्या बाबतहि असेच व्याघात मध्यें आल्यामुळें समजूत पडण्याची क्रिया त्रिकोणात्मक होते.

४४ शब्दाच्या शक्तिः शब्दाच्या अर्थांतील ह्या दोन बौद्धिक व भावनिक अंशांमुळें शब्दाला विशिष्ट शक्ति प्राप्त होतात. ह्या शक्ति तीन आहेत असें आलंकारिक सांगतात. अभिधा, लक्षणा व व्यंजना ह्या त्या तीन शक्ति होत. अभिधा शक्तीनें निष्पन्न होणारा अर्थ हा वाच्यार्थ होय. लक्षणा शक्तीच्या द्वारां निष्पन्न होणारा अर्थ लाक्षणिक व व्यजंना शक्तीच्या द्वारां निष्पन्न होणारा अर्थ व्यंग्यार्थ होय. वाच्यार्थ हा उत्तान अर्थ होय. हा उघड उघड सरळ रीतीनें समजतो. वाच्यार्थ हा बऱ्याच वेळां धात्वर्थावर आधारलेला असतो. व्यवहारामध्यें हाच अर्थ रूढ असतो. त्या दृष्टीनें ह्याला त्या शब्दाचा रूढार्थ, व्यावहारिक अर्थ असेंहि म्हणतां येईल. ज्या वेळेस शब्दाचा हा उत्तान, सरळ, रूढ, व्यावहारिक अर्थ आपणास सोडावा लागतो व त्याच्या जवळचा संलग्न असा दुसरा अर्थ स्वीकारावा लागतो, व असें केल्यानेंच अर्थप्रतीति होते, त्यावेळेस आपण त्या शब्दांतील लक्षणा शक्तीचा आश्रय करतों. लाक्षणिक अर्थ हा वाच्यार्थाहून भिन्न परंतु त्याशीं संलग्न असा असतो. लक्षणा ही शक्ति अभिघा शक्तीवर अवलंबून असते. अभिधा शक्तीची ती पुरवणी किंवा विस्तार आहे. अभिधा शक्तीचें वैगुण्य किंवा कमतरता लक्षणाशक्ति भरून काढते. एखाद्या शब्दाच्या अर्थप्रतीतीस अभिधाशक्ति जर अपुरी पडूं लागली तर तो तिचा अपुरेपणा लक्षणाशक्ति दूर करते. अभिधा काय किंवा लक्षणा काय, दोन्हीं शक्तींचा आश्रय शब्दच. दोन्हींची उभारणी शब्दावरच. ह्या दोन्ही शक्ति अगदीं भिन्न आहेत असें आलंकारिकांचें म्हणणें आहे. ह्या दोन्ही शक्ति एकच आहेत असें शब्दार्थकारांचें म्हणणें आहे. ‘ नदीवरील वस्ती ’ ह्या प्रयोगाचा अर्थ “ नदीच्या प्रत्यक्ष पाण्यावर असलेली वस्ती ” असा अर्थ अभिधाशक्तीनें होतो. हा अर्थ प्रत्यक्ष व्यवहाराला अशक्य असल्यामुळें तो सोडून “ नदीच्या पाण्याजवळ आसपास असलेली वस्ती ” असा व्यवहाराला शक्य व सोयीचा अर्थ लक्षणाशक्तीनें होतो. ज्याअर्थीं एक अर्थ वाच्यार्थ-सोडून दुसऱ्या लक्ष्यार्थाचा स्वीकार करावा लागला त्याअर्थीं हे अर्थ दोन भिन्न आहेत व त्यांच्या शक्तिहि दोन्ही भिन्न आहेत. ही झाली आलंकारिकांची विचारसरणी. ह्याच्या उलट शब्दार्थकारांचें म्हणणें असें कीं “नदीवरील वस्ती ” ह्या प्रयोगांतील लाक्षणिक अर्थ म्हणून जो सांगितला तो त्याचा वाच्यार्थच होय. ह्या प्रयोगाचे दोन वाच्यार्थ आहेत. ‘प्रत्यक्ष पाण्यावर असलेली वस्ती’ हा एक अर्थ.व ‘ पाण्याजवळ आसपास असलेली वस्ती ’ हा दुसरा अर्थ. अभिधाशक्तीच्या द्वारां एखाद्या शब्दाला एकापेक्षां अधिक वाच्यार्थ प्राप्त होतात. तसेंच येथें ते प्राप्त झाले. “ अमुक एक मनुष्य कर्ण आहे, किंवा भीष्म आहे, किंवा बृहस्पति आहे किंवा गाढव आहे ” इत्यादि प्रयोगांत त्या त्या शब्दांचे मूळ वाच्यार्थ सोडून लाक्षणिकार्थ घ्यावे लागतात असें आलंकारिकांप्रमाणें न म्हणतां त्या त्या शब्दाचा तो तो नवा दुसरा वाच्यार्थच होय असें शब्दार्थकारांच्या मताप्रमाणें म्हणतां येईल व तें अधिक सयुक्तिक दिसेल.

जी गोष्ट लक्षणेची व लाक्षणिक अर्थाची तीच गोष्ट व्यंजना ह्या तिसऱ्या शक्तीची व व्यंग्यार्थाची.लक्षणा ही जशी अभिधाशक्तीवर आधारलेली शक्ति आहे, तशी व्यंजनाशक्ति हीहि त्याच अभिधा शक्तीवर आधारलेली आहे. लक्षणा ही जशी अभिधेची पुरवणी आहे, तशी व्यंजनाहि अभिधेची पुरवणी आहे. ह्या दोन्ही शब्दशक्ति मूळ अभिधाशक्तीचे विस्तार होत. मूळ अभिधेचींच हीं विस्तृतस्वरूपें असल्यामुळें खुद्द आलंकारिकांमध्यें अभिधावादींचें एक मत रूढ आहे.

शब्दशक्तींचा हा विचार आलंकारिक व शब्दार्थकार अशा दोन मतप्रणालींच्या दृष्टीनें येथवर केला. तात्त्विक दृष्टीनें ह्या शब्दशक्तींची आणखीहि किंचित् सूक्ष्म तपा.

सणी करणें जरूर आहे. शब्दाची शक्ति एक मानां अगर तीन माना. हा फारसा महत्त्वाचा प्रश्न नाहीं. तीन भिन्न शक्ति मानल्या काय, अगर एक मानून तिचीं दोन विस्तृत स्वरूपें मानलीं काय, दोन्हीमध्यें शब्दाच्या अर्थाच्या दृष्टीनें भिन्न क्रिया होतात. एक शक्ति आहे असें म्हणणें अथवा तीन शक्ति आहेत असें म्हणणें हा शब्दच्छल आहे. शब्दाचे निरनिराळे अर्थ निष्पन्न होण्याच्या क्रियेंत भिन्न भिन्न मानसिक क्रिया होतात ही गोष्ट सुतराम् स्पष्ट आहे, व ती मान्य केल्याशिवाय गत्यंतर नाहीं· "हा आंबा आहे, आमच्या बेबीचा पाप्पा आंबा आहे," ह्या दोन प्रयोगांपैकीं पहिला प्रयोग वाच्यार्थाचा व दुसरा प्रयोग लक्ष्यार्थाचा आहे. पहिलें साधें फलवाची विधान आहे. दुसरें अभिरुचिवाची व वात्सल्यवाची विधान आहे. पहिलें कोरडें विधान आहे. दुसरें भावनेनें ओलें झालेलें विधान आहे. पहिल्यांत भावना नाहीं. दुसऱ्यांत ती आहे. दुसऱ्यांत तरी ती भावना कशी आली ? आंब्याचा उत्तान अर्थ सोडून त्याची 'गोडी, अभिरुचि' आंब्यापासून विलग करून आमच्या वात्सल्याच्या भावनेच्या जोरावर आम्ही ती पाप्पावर आरोपित केली व पाप्पामधील आमची वात्सल्यभावना दुसऱ्या प्रयोगांतील 'आंबा' ह्या शब्दांत ओतली. म्हणजे पहिल्या प्रयोगांतील 'आंबा' हा शब्द जो भावनाशून्य होता तो दुसऱ्या प्रयोगांत आम्हीं भावनापूर्ण केला, त्यांत आम्हीं आमचा भावनिक अंश (emotional content) ओतला. वाच्यार्थाचा ज्या ज्या वेळीं लक्ष्यार्थ करावा लागतो त्या त्या वेळीं बोलणारा मनुष्य आपला भावनिक **अंश** वाच्यार्थांत ओतत असतो. तेव्हां शब्दाला लक्षणाशक्ति जी प्राप्त होते किंवा त्याचा लाक्षणिक अर्थ जो निर्माण होतो ती बोलणाऱ्याच्या भावनिक अंशामुळें होय. लक्षणा व लक्ष्यार्थ ह्यांत भावनिक अंश आहे असें मानल्याखेरीज गत्यंतर नाहीं. लक्षणा स्वतंत्र शक्ति माना अगर अभिधेची पुरवणी माना. शब्दाच्या अर्थांत जो बदल होतो तो ह्या भावनिक अंशाच्या मिश्रणानें होतो हें उघड आहे.

ह्याचा अर्थ असा नव्हे कीं शब्दाच्या वाच्यार्थामध्यें अगदींच भावनिक अंश (emotional content) नसतो, आणि लक्ष्यार्थामध्येंच फक्त असतो. वाच्यार्थांतहि कांहीं कांहीं वेळेस परिस्थितीप्रमाणें भावनिक अंश असतो. हें वरचेंच वाच्यार्थाचें उदाहरण पहा. "हा आंबा आहे," हें साधें वाच्यार्थाचें विधान आहे. ह्यांत भावनिक अंश नाहीं. परंतु ह्यांत थोडासा जर का बदल केला, त्यांत एखादा शब्द अधिक घातला कीं त्यांत भावनिक अंश उतरेल. "हा आमच्या बेबीचा आंबा आहे, किंवा हा आमच्या आजोबांनीं कलम केलेल्या झाडांचा आंबा आहे किंवा हा आमच्या सासुरवाडीचा आंबा आहे," असें जर त्या मूळच्या कोरड्या विधानांत अधिक भर घालून बदल केले तर त्या त्या बदलापुरता कां होईना पण त्यांत भावनिक अंश उतरल्याशिवाय राहणार नाहीं. हे सर्व वाच्यार्थच होत. वाच्यार्थ असूनहि त्यांत भावनिक अंश उतरला आहे. वाच्यार्थांतहि भावनिक अंश असतो, मात्र तो लक्ष्यार्थाइतका नसतो इतकेंच.

लक्ष्यार्थाची जी गोष्ट तीच व्यंग्यार्थाची होय. लक्ष्यार्थामध्यें बोलणारा आपली वैयक्तिक भावना ओततो. शब्दाचा लक्ष्यार्थ म्हणजे त्या शब्दाचा वाच्यार्थ, अधिक बोलणाऱ्याची व्यक्तिनिष्ठ भावना असें थोडक्यांत समीकरण आहे. वाच्यार्थ हा बहुतेक वस्तुनिष्ठ (objective) असतो. लक्ष्यार्थ हा थोडा का होईना पण व्यक्तिनिष्ठ (subjective) असतो. अभिधाशक्ति ही शब्दाशीं संलग्न असते, व्यक्तीशीं संलग्न तितकीशी नसते. लक्षणाशक्ति हीहि शब्दाशीं संलग्न असते व तशी असून पुनः व्यक्तीशीं संलग्न असते. व्यंजनाशक्ति ही ह्याच्या पुढील एक पायरी आहे. व्यंजनाशक्तिहि शब्दाशीं संलग्न असते व तशी असून पुनः ती बोलणाऱ्या व ऐकणाऱ्या व्यक्तीशीं संलग्न असते. लक्षणेपेक्षां देखील व्यंजनाशक्ति व्यक्तीशीं अधिक संलग्न असते. लक्षणेपेक्षां व्यंजना शक्ति अधिक व्यक्तिनिष्ठ (subjective) असते. शब्दाच्या व्यंग्यार्थामध्यें मूळ शब्दाचा वाच्यार्थ कुठेंच्या कुठें लोपून जातो. व्यंग्यार्थामध्यें श्रोतावक्त्यांची भोंवतालची परिस्थिति, त्यांची मानसिक अवस्था, संदर्भ, वक्त्याचा आवाज, हेल, सूर, चर्या, काकु वगैरे गोष्टीचा संबंध येतो. इतके घटक एकत्र येऊन व्यंग्यार्थ सिद्ध होतो. इतक्या घटकांच्यामुळें प्राप्त झालेला एकत्रित अर्थ त्या शब्दाच्या मूळ वाच्यार्थापासून दुरावला गेल्यास नवल नाहीं. इतकीं भिन्न व्यवधानें मध्यें आल्यानंतर तो दुरावणारच. एखाद्या शब्दाचा व्यंग्यार्थ हा त्याच्या वाच्यार्थापासून दुरावतोच परंतु त्याचा एक व्यंग्यार्थ त्याच्या दुसऱ्या

व्यंग्यार्थापासून दुरावतो. “ सूर्य अस्तास गेला, ” असें मी म्हटल्याबरोबर ह्या वाक्याचा माझा व्यंग्यार्थ माझ्या वाच्यार्थाहून भिन्न होईलच परंतु माझा व्यंग्यार्थ, इतर जे कोणी तें वाक्य ऐकतील त्यांच्या व्यंग्यार्थाहून, भिन्न होईल. ऐकणाऱ्यांपैकींहि प्रत्येकाचा व्यंग्यार्थ पुनः दुसऱ्याच्या व्यंग्यार्थाहून भिन्न होईल. एकाच वाक्याचे अगर एकाच शब्दसमूहाचे असे निरनिराळे व्यंग्यार्थ कां उत्पन्न व्हावेत ? ह्याचें कारण उघड आहे. जो तो ऐकणारा किंवा बोलणारा मनुष्य त्या वाक्यांत किंवा शब्दसमूहांत आपली व्यक्तिनिष्ठ भावना ओतूं शकतो. व्यक्तिनिष्ठत्व (subjectivity) प्रत्येकाचें किंचित् का होईना भिन्न असल्यामुळें प्रत्येकाचा व्यंग्यार्थ भिन्न होऊं शकेल. प्रत्येकाचें व्यक्तिनिष्ठत्व हें त्याच्या भावनांनीं शबल असल्यामुळें व्यंग्यार्थांत भावनिक अंश (emotional content) विशेष असतो असें आमचें प्रतिपादन आहे.

शब्दाच्या ह्या तीन प्रमुख शक्तींखेरीज आणखी कांहीं शक्ति आहेत. पण त्या दुय्यम आहेत. त्यांचा अन्तर्भाव वरील तीन शक्तींत होतो. तात्पर्यार्थाची एक शक्ति मानतात. तात्पर्यार्थांत वैयक्तिक दृष्टि असतेच. तो तिचा एक उद्रेक आहे. तात्पर्यार्थ म्हणजे व्यक्तीनें आपल्या मताप्रमाणें वाक्यांतील सर्व शब्दांचा मिळून लाविलेला अर्थ होय. हा त्या त्या व्यक्तीनें आपापल्या मनोवृत्तीप्रमाणें लाविलेला संहितार्थ किंवा समुचितार्थ होय. तात्पर्यार्थ हा वस्तुनिष्ठ व व्यक्तिनिष्ठ असा दोन्ही स्वरूपाचा असतो. ज्या प्रमाणांत तात्पर्यार्थ व्यक्तिनिष्ठ असेल त्या प्रमाणांत त्यांत भावनिक अंश असेल हें उघड आहे.

४५ संदर्भार्थ : शब्दाला त्याच्या अर्थाच्याबाबत कांहीं शक्ति असतात व शक्तीप्रमाणें त्याला एक विशिष्ट अर्थ प्राप्त होतो, त्या अर्थांचें स्वरूप भिन्न असतें, ही भिन्नता त्यांतील भावनिक अंशामुळें उत्पन्न होते वगैरे गोष्टी आपण येथवर पाहिल्या. शब्दाचा वाच्यार्थ हा मूळ मुख्य अर्थ असून इतर अर्थ त्याचे आनुषंगिक होत. हे इतर निरनिराळ्या घटकांवर अवलंबून असतात. वाच्यार्थ हाहि बऱ्याच वेळां इतर आनुषंगिक गोष्टींवर अवलंबून असतो. शब्दाच्या अर्थांत द्योतकत्व व वाचकत्व ह्या गोष्टी महत्वाच्या आहेत. कोशामध्यें शब्दाचे जे निरनिराळे अर्थ दिलेले असतात, ते सर्व त्या शब्दाचे वाचक अर्थ होत. ह्या सर्वांना कोशार्थ असेंहि म्हणतां येईल. हे अर्थ कधीं एक तर कधीं अनेक असतात. हे अर्थ कधीं धातु किंवा मूळ एखादा शब्द ह्या पासून निष्पन्न झालेले असतात. कधीं ते रूढीनें मान्य केलेले असतात. हे अर्थ त्या पदार्थांच्या व्याख्या असतात. पदार्थ किंवा वस्तु व त्याचा अर्थ ह्या दोहोंत समीकरण असतें. वस्तु म्हणजे अर्थ आणि अर्थ म्हणजे वस्तु असा अविनाभाव त्या दोहोंत असतो. वर्णात्मक शब्द हें त्याचें चिन्ह असतें. वस्तु, अर्थ, चिन्ह असे हे तीन घटक ह्या प्रक्रियेंत मुख्य असतात. वस्तूबद्दलची मानवानें ठरविलेली व्यावहारिक उपयुक्तता ही तिच्या अर्थांत दाखविली जाते. किंबहुना ही उपयुक्तता म्हणजेच त्या वस्तुचा—त्या वस्तुदर्शक शब्दाचा अर्थ होय. हा वस्तुनिष्ठच (objective) असणार हें उघड आहे. शब्दाचा अर्थ व्यक्तिनिष्ठ (subjective) नसून वस्तुनिष्ठच असतो असें जें म्हणतात त्याचें कारण हें होय. सर्व वाचक अर्थ वस्तुनिष्ठच असणार. येथें असा एक प्रश्न उद्भवेल कीं वस्तु जर एक आहे आणि तिचा अर्थ जर वस्तुनिष्ठ आहे तर हा वस्तुनिष्ठ अर्थ एकच असला पाहिजे. प्रत्येक वस्तूला एकच अर्थ असायला पाहिजे, अनेक अर्थ असतां कामा नये. कोशांत पाहावें तर अनेक अर्थ दिलेले असतात. मग ते कां ? ह्याचें कारण वर सांगितलेली मानवानें ठरविलेली व्यावहारिक उपयुक्तता ही होय. ही उपयुक्तता मानव जी ठरवितो ती वस्तूकडे निरनिराळ्या दृष्टीनें बघून ठरवितो. ह्या निरनिराळ्या दृष्टींमुळें निरनिराळे वाचक अर्थ उत्पन्न होतात. ह्या निरनिराळ्या दृष्टींपुरती व्यक्तिनिष्ठता त्यांत येतें, तेवढ्या पुरता शब्दार्थ व्यक्तिनिष्ठ (subjective) होय. किंवा ह्याबाबत दुसरेंहि एकमत आहे. शब्दांचे जितके अर्थ तितके ते स्वतंत्र शब्द होत. जल, हात, धार ह्या तीन अर्थांचे पाणी शब्द तीन स्वतंत्र आहेत. कोशांत दिलेल्या शब्दाच्या निरनिराळ्या वाचक अर्थांपैकीं एकच अर्थ संदर्भार्थ असतो. हा अर्थ संदर्भावरून ठरत असतो. वस्तुवाचक शब्द कोणत्या संदर्भांत वापरला गेला आहे, कोणत्या विशिष्ट परिस्थितींत वापरला गेला आहे, कोणत्या इतर शब्दांच्या साहचर्यांत वापरला गेला आहे, ह्यावर त्या शब्दाचा जो अर्थ ठरतो तो संदर्भार्थ होय. ‘अग्नि’ शब्दाचे कोशांत पुष्कळ अर्थ आहेत. पाणी शब्दाचे पुष्कळ आहेत. परंतु त्यांतला कोणता अर्थ बोलणारास अभिप्रेत आहे हें संदर्भावरून कळणें शक्य आहे. बाकीचे पुष्कळ अर्थ असले तरी ते निरुपयोगी

आहेत. बोलणाऱ्याचा संदर्भ ज्या अर्थी एकच असतो त्या अर्थी शब्दाचा द्योतक अर्थ एकच असला पाहिजे. कोशांत दिलेले शब्दाचे निरनिराळे अर्थ हे कोरडे असतात. त्यांना संदर्भ नसतो. संदर्भांत अंतर्भूत असलेल्या बोलणाऱ्या व्यक्तींच्या भावनांचें किंवा विचारांचें त्यांच्याभोंवतीं वलय नसतें. द्योतक अर्थाच्या भोंवतीं बोलणाऱ्या व्यक्तींच्या भावनांचें किंवा विचारांचें वलय असतें. ह्यालाच आपण वाक्यमिमांसेच्या दृष्टीनें संदर्भ असें म्हणतों. हें वलय असतें म्हणूनच द्योतक अर्थांत व्यक्तिनिष्ठता अधिक असते, म्हणूनच त्यांत भावनिक अंश अधिक असतो.

शब्दाच्या अभिधा शक्तीनें प्राप्त होणाऱ्या त्याच्या वाच्यार्थाची द्योतक व वाचक अशी फोड करून त्यांत भावनिक अंश (emotional content) कितपत आहे हें आपण येथवर पाहिलें, लक्षणा, व्यंजना व इतर शब्दशक्तींमुळें प्राप्त होणाऱ्या शब्दाच्या अर्थांतील भावनिक अंशाचा विचार आपण मागें केलाच आहे.

४६ अलंकारांतील भावनिक अंश : आतांपर्यंत शब्दाच्या अर्थाची निरनिराळ्या दृष्टींनीं आपण चिकित्सा केली. व त्यावरून त्याचे पुढील प्रकार निश्चित केले. प्रथम शब्दाचा वाच्यार्थ. वाच्यार्थाचे दोन प्रकारः द्योतक आणि वाचक. ह्यांच्याशीं संलग्न असलेले संदर्भार्थ व तात्पर्यार्थ. वाच्यार्थाहून निराळा परंतु त्याशीं संलग्न असा लक्ष्यार्थ, बोलणाऱ्या ऐकणाऱ्यांच्या वृत्तिभेदांमुळें बदलणारा व्यंग्यार्थ, सूचकार्थ किंवा ध्वन्यर्थ, असे इतके भिन्न प्रकार झाले. शब्दाच्या अर्थांतील बौद्धिक व भावनिक हे दोन अंश सर्व अर्थांच्या मुळाशीं आहेत. त्यांत पुनः हेतुमत् भाषेचा एक निराळा प्रकार आपण स्पष्ट केला. शब्दाच्या अर्थाचे हे सर्व प्रकार त्यांतील भावनिक अंशाप्रमाणें क्रमवार लावणें शक्य आहे. वाक्यार्थांपैकीं वाचक अर्थांत भावनिक अंश सर्वांत कमी व व्यंग्यार्थांत भावनिक अंश सर्वांत अधिक अशा ह्या दोन टोंकाच्या दोन मर्यादा ठरतात व बाकीचे सर्व अर्थ ह्या दोहोंमध्यें बसण्यासारखे आहेत. व्यंग्यार्थापेक्षां कमी भावनिक अंश लक्ष्यार्थामध्यें असला तरी हे दोन्ही अर्थ भावनिक अंशाचे आहेत. त्यामुळें व्यंग्यार्थ आणि लक्ष्यार्थ असलेल्या शब्दांची भाषा भावनिक असणार हें उघड आहे. उपमा, रूपक, उत्प्रेक्षा अनन्वय, काव्यलिंग, प्रतिवस्तूपमा वगैरे अर्थालंकार हे शब्दाच्या लक्ष्यार्थावर अवलंबून असतात. अलंकाराच्या मुळाशीं वक्रोक्ति माना, साम्योक्ति माना, अगर अतिशयोक्ति माना, ह्या प्रत्येकींत लक्ष्यार्थावर आपणास विसंबावें लागतेंच. अलंकारांची उभारणी लक्ष्यार्थावर व व्यंग्यार्थावर केलेली असते. तेव्हां ओघानेंच हें म्हणणें भाग पडतें कीं सर्व आलंकारिक बोलणें हें भावनिक बोलणेंच आहे. सर्व आलंकारिक भाषा ही भावनिक भाषाच (emotive language) होय. शब्दालंकारांत वर्णांच्या ध्वनींतील भावनामयता असते,– उच्चारांतील भावनिक अंश असतो. अर्थालंकारांत शब्दाच्या अर्थामधील भावनामयता असते–अर्थांतील भावनिक अंश असतो. वाक्यालंकारांत संदर्भार्थामधील किंवा तात्पर्यामधील भावनिक अंश असतो.

४७ शब्दक्रम व भावनिक अंशः शब्दाच्या अर्थांत जसा भावनिक अंश असतो तसा शब्दांच्या क्रमांत भावनिक अंश असतो. बोलतांना आपण शब्दांचा जो क्रम साधतों, ज्या क्रमानें शब्द उच्चारतों त्यावर आपल्या मनांतील भाव प्रकट होणें न होणें हें अवलंबून असतें. वाक्यांतील शब्दांचा क्रम हा व्याकरणाच्या नियमांनीं जरी ठरला असला तरी आपल्या इच्छेप्रमाणें, भावनांच्या आवेगांप्रमाणें, मानसिक अवस्थांप्रमाणें त्या शब्दांचा क्रम पुढें मागें होतो. बोलतांना शब्दांवर जो जोर किंवा आघात पडतो व त्याप्रमाणें त्या शब्दाचा वाक्यांतील क्रम जो आपोआप सहज बदलतो तो आपल्या भावनांच्या आवेगावर अवलंबून असतो. संभाषणसंवादांत तर शब्दांचा क्रम नेहमीं बदलतो. संभाषणसंवाद चालला असतांना आपल्या भावनांत, वृत्तींत, परिस्थितींत जसजसे फरक होत जातात तसतसे त्यांचें प्रतिबिंब आपल्या भाषेवर पडतें. तें कधीं शब्दाच्या निवडीच्या रूपानें तर कधीं संख्येच्या रूपानें तर कधीं शब्दाच्या क्रमाच्या रूपानें पडलेलें दिसून येतें. शब्दाच्या निरनिराळ्या प्रकारांत व त्याच्या निरनिराळ्या अर्थांत जसा भावनिक अंश असल्याचें आपण पाहिलें तसें शब्दाची निवड व संख्या व क्रम ह्यांमध्यें हि भावनिक अंश असतो. आपल्या मनांतील भावार्थ प्रकट करण्यासाठीं लागणाऱ्या शब्दांपैकीं आपण अमुक विशिष्टच शब्द निवडतों, त्यांची अमुक एक संख्या मुक्रर करतों, व ते अमुक एका क्रमानें उच्चारतों. हें सर्व त्या आपल्या क्षणिक भावनेवर अवलंबून असतें. रोजच्या व्यवहारांतील संभाषणांत, संवादांत अथवा बोलण्याच्या भाषेंत शब्दांचा क्रम आपल्या त्या

त्या वेळच्या भावनेवर अवलंबून असतो. तितक्यापुरता शब्दांच्या त्या क्रमांत भावनिक अंश आहे.

४८ वाक्यार्थ : आतांपर्यंत आपण सुट्या, स्वतंत्र शब्दाच्या अर्थाचें पृथक्करण करून त्यांतील बौद्धिक व भावनिक अंश ठरविले. एकस्त्या सुट्या शब्दाच्या अर्थामध्यें किती प्रकार उद्भवतात तेहि सांगितले. सुट्या शब्दाच्या अर्थानंतर वाक्याच्या अर्थाचा विचार येतो. वाक्यामध्यें सुटे वापरले गेलेले शब्द कोणत्या तरी संबंधानें अन्वित असतात. भाषिक व्यवहाराच्या दृष्टीनें वाक्य हाच भाषेचा प्रधान घटक होय, शब्द नव्हे. वाक्यानें जसें आपण व्यवहाराला प्रवृत्त होतों तसें प्रवृत्त करण्याचें सामर्थ्य शब्दांत नसतें. वाक्यांमध्यें आपण निरनिराळे शब्द निरनिराळ्या संबंधांनीं जोडत असल्यामुळें शब्दांचे साहजिकच दोन प्रकार पडतात. एक प्रकार जोडावयाचे शब्दांचा व दुसरा जोडणाऱ्या शब्दांचा. वाक्यांतील मुख्य शब्द हे जोडावयाचे शब्द होत. नाम व क्रियापद हे मुख्य शब्द होत. हे मुख्य शब्द प्रत्ययांनीं व अव्ययांनीं जोडले जातात. प्रत्यय व अव्ययें हे जोडणारे शब्द होत. ह्या दोन प्रकारांखेरीज वाक्यांतील शब्दांचा आणखी एक प्रकार पडतो. हा दुय्यम शब्दांचा प्रकार होय. कर्ता, क्रियापद व कर्म हे अव्वल दर्जाचे, विशेषण, क्रियाविशेषण हे दुय्यम दर्जाचे व शब्दयोगी अव्ययें, उभयान्वयी अव्ययें, प्रत्यय हे तिसऱ्या दर्जाचे असे तीन प्रकारचे शब्द वाक्यांत असतात. ह्यापैकीं पहिल्या दोन प्रकारच्या शब्दांना स्वतंत्र अर्थ असतो. तिसऱ्या प्रकारच्या शब्दांना तितका स्वतंत्र अर्थ नसतो. उपसर्ग, शब्दयोगी अव्ययें व प्रत्यय हे सर्व एके काळच्या जुन्या सार्थ शब्दांचे अवशेष होत. त्यांना जरी कांहीं अर्थ असला तरी वाक्यांतील शब्द परस्परांशीं जोडण्याचें मुख्य कार्यच फक्त त्यांच्याकडे असतें. अर्थाच्या दृष्टीनें वाक्यांतील महत्त्वाच्या शब्दांचा स्वतंत्र अर्थ घेऊन तो एकत्रित केला म्हणजे वाक्याचा अर्थ सिद्ध होतो.

शब्दाला एकट्याला अर्थ आहे कां अन्वित शब्दांनां अर्थ आहे ह्यासंबंधीं पतंजलीनें केलेलें विवेचन येथें उल्लेखनीय आहे. प्रातिपदिक संज्ञा कोणास करावयाची ह्या संबंधाचें विवेचन करतांना प्रातिपदिक संज्ञेचें एक सूत्र मुख्य मानून त्याच्या अनुषंगानें वर्णाचा अर्थ, शब्दाचा अर्थ, शब्दसमूहाचा अर्थ ह्यासंबंधीं निर्णय भाष्यकारांनीं दिले आहेत. “अर्थवत् अधातुः अप्रत्ययः प्रातिपदिकम् (१-२-४५)” हें त्याचें मुख्य सूत्र असून त्यावरील पुढील दोन वार्त्तिकें आहेत. “अर्थवत्यनेकपदप्रसंगः” हें पहिलें आणि “समुदायोनर्थक इतिचेत् अवयवार्थवत्त्वात्समुदायार्थवत्त्वं यथा लोके” हें दुसरें, अशीं दोन वार्त्तिकें आहेत. ह्या विवेचनांत प्रातिपदिक होण्याच्या तीन अटी दिल्या आहेत[‡]. त्यांत अर्थवत्त्व ही एक अट आहे. वाक्य (म्हणजेच शब्दसमूह) हें अर्थवान् आहे. त्यामुळें तें प्रातिपदिक होऊं शकेल. ही अडचण उत्पन्न होईल. ह्या अडचणीचा परिहार पुढें केला आहे. आपल्या दृष्टीनें फक्त ह्या विवेचनांतील वाक्याला अर्थ असतो इतकाच भाग महत्त्वाचा आहे. प्रत्येक पदाला अर्थ असल्यामुळें त्यांच्या समुदायालाहि अर्थ आहे असें म्हणावेंच लागतें. अवयव जर अर्थवान् असतील तर तेथें त्यांचा समुदायहि अर्थवान् होत असतो. वाक्याला अर्थ असतो इतकाच ह्या वादाचा निष्कर्ष आहे.

असाच एक वाद मिमांसाशास्त्रांत केलेला आढळतो. संबंध वाक्य पूर्ण धरून त्याचा अर्थ करणारा मिमांसकांचा एक पक्ष होता, तर वाक्यांतील निरनिराळ्या घटकांचा अर्थ करून त्या समुचित अर्थावरून वाक्याचा अर्थ करणारा दुसरा एक पक्ष होता. पहिल्या पक्षास गुरु मिमांसक किंवा अन्विताभिधानवादी असें म्हणत. व दुसऱ्या पक्षास भट्ट मिमांसक किंवा अभिहितान्वयवादी असें म्हणत. दोन्ही पक्षांचें ध्येय वेदांचा अर्थ लावणें हें एकच होतें. मतभेद जो होता तो वेदांचा अर्थ लावण्याच्या पद्धतीसंबंधीं होता. वाक्यार्थ हा दोन्ही पक्षांना मान्य होता.

४९ शब्दार्थ व वाक्यार्थ-साम्यभेद : शब्द हा अनेकार्थी असणें शक्य आहे. एकच प्रतीक एकाच वेळीं निरनिराळ्या संदर्भांत निरनिराळे संकेत दाखवूं शकतें. सर्वच संकेत सारख्याच स्पष्टतेनें लागू पडतात असें नाहीं. त्यांतील एखादा दुसराच आपणास अभिप्रेत असतो व बाकीचे किंचित् दूर असतात. जरूरी पडली तरच ते पुढें सरसावतात. द्व्यर्थी शब्दाच्या किंवा एखाद्या कोटी केलेल्या शब्दाच्या अर्थासंबंधीं आपली वृत्ति कशी द्विधा होते हें आपणा सर्वांच्या परिचयाचें आहे. वाक्याचा अर्थ मात्र एकच एक आणि तोहि विशिष्ट असाच असतो. वाक्याचा संकेत ठाम व निश्चित असतो. त्याचे जर दोन संकेत पुढें आले तर त्या दोहोंप्रमाणें दोन व्यवहार

[‡] म. म. वा. अभ्यंकर, व्याकरणमहाभाष्यभाषांतर, पृ. ५२७.

होतील व त्यानें घोटाळा होईल हें उघड आहे. द्व्यर्थी किंवा अनेकार्थी वाक्यें नसतात असें नाहीं. परंतु व्यवहाराच्या ठाम प्रवृत्तीसाठीं आपण त्या भिन्न अर्थांपैकीं आपणास अभिप्रेत तोच अर्थ स्वीकारितों, व त्याप्रमाणें व्यवहाराला प्रवृत्त होतों. वाक्य उच्चारतांना आपणास विशिष्ट असा संदर्भ निवडावा लागतो. त्या संदर्भाविषयींच फक्त बोलावयाचें असतें. त्यासाठीं वाक्यांत योजावयाचे जे निरनिराळे शब्द असतात त्यांचेहि विशिष्टच अर्थ फक्त आपण निवडतों. आपला बोलावयाचा जो अर्थ तो आपण प्रथम मनांत ठरवितों. त्याला अन्वर्थक असे शब्द नंतर आपण ठरवितों. ते शब्द नंतर जोडतों. अशा रीतीनें आपलें वाक्य तयार होतें. शब्दार्थ व वाक्यार्थ ह्या दोहोंत आणखी एक भेद आहे. शब्द व त्याचा अर्थ हे परस्परसंबंधानें बांधलेले असे दोन घटक आहेत. त्या शब्दांत व्यवहाराला प्रवृत्त करण्याचें सामर्थ्य नसतें. उलट वाक्य हें व्यवहाराला प्रवृत्त करतें. त्यांत कांहींतरी एक विचार अनुस्यूत असतो. त्यांत कांहींतरी एक भावना अनुस्यूत असते. कांहीं तरी संदर्भ दुसऱ्यास सांगावयाचा असतो, व त्याला व्यवहाराला प्रवृत्त करावयाचें असतें. व्यवहारप्रवृत्ति हें भाषेचें प्रधान ध्येय असल्यामुळें वाक्य हाच त्या भाषेचा प्रधान घटक ठरतो$.

वाक्य हें आपणास व्यवहारास प्रवृत्त करतें. मग तें वाक्य एक शब्दाचें असो वा अनेक शब्दांचें असो. कधीं कधीं वाक्य हें एक शब्दांचें असतें. त्या एका शब्दांत कांहीं अध्याहृत शब्दाचा अन्वित अर्थ सामावलेला असतो. जा, ये, पी, खा, कर, धांव, मार, टाक, वगैरे आज्ञार्थी रूपांत संपूर्ण वाक्याचा अर्थ सामावलेला असल्यामुळें हे शब्द म्हणजे वाक्येंच होत. उद्गारवाचक अव्ययें हीं पूर्ण वाक्येंच आहेत असें समजलें जातें. " अहाहा, अबब, अरेरे ओहो, रामाशिवा गोविंदा " इत्यादि निरनिराळ्या भावनांचीं दर्शक जीं अव्ययें आहेत त्यांत वाक्यार्थ आहे. उद्गारवाचक अव्ययें ही भाषेंतील अगदीं प्रथमचीं वाक्यें होत असें म्हणतात. त्यांत एखाद्या भावनेचा पूर्ण आविष्कार झालेला असतो व तो तसा ऐकणाऱ्याला समजल्यामुळें तो तसा व्यवहारास प्रवृत्त होतो. उद्गारवाचक अव्ययाप्रमाणें आणखी कांहीं वेळेस आपण सुटे शब्द एकटे वापरतो. तेथें ते शब्द वाक्येंच असतात. व वाक्याप्रमाणें व्यवहारास प्रवृत्त करतात. लहान मुलांचे उच्चारलेले शब्द म्हणजे अर्थपूर्ण व भावनापूर्ण वाक्येंच असतात. " आई " असा शब्द त्यानें जरी उच्चारला तरी त्यांत 'मला घे, मला सांभाळ, मला कांहीं खायला दे, मला होणारा हा त्रास नाहींसा कर, मला बरें वाटेल असें कांहीं तरी कर," अशी कांहीं तरी त्या मुलाची इच्छा असणार हें उघड आहे. त्या मुलानें कुत्र्यासंबंधीं एखादा बालशब्द उच्चारिला तर त्यांतहि "मला ह्या प्राण्यापासून कांहीं इजा होईल, मला ह्याची भीति वाटते, हें जवळ असलेलें मला आवडत नाहीं" अशासारखी कांहीं भावना असते. इच्छा, अपेक्षा, द्वेष, त्वेष, धिक्कार, नकार, प्रेम, लाडिकपणा वगैरे मुलांच्या मनांतील अनेक वृत्ति, विकार, भावना त्या मुलांकडून त्याच्या बोबड्या, तोतऱ्या, एकट्या दुकट्या, शब्दांत व्यक्त केल्या जातात. तेव्हां हे जे मुलांच्या भाषेंतील सुटे एकटे शब्द अन्वित नसले तरी वाक्येंच होत असें मानणें भाग आहे. कारण हे शब्द व्यवहारास प्रवृत्त करतात. मुलाला उद्देशून आपण त्याच्या भोंवतालची मंडळी जी भाषा बोलतों तीहि पण पुष्कळ वेळां अशी एक एकट्या शब्दाची असते. त्या शब्दांत "असें कर, असें करूं नकोस, हें बरें नव्हे, ह्यानें तुला इजा होईल, ह्यांत तुझें हित नाहीं", अशा विधिनिषेधस्वरूपाचा कांहीं तरी आपला बोलण्याचा अभिप्राय असतो. हा अभिप्राय सांगतांना जरी आपण एखाद्या वेळेस एकटाच शब्द वापरला तरी ऐकणाऱ्या त्या मुलास आपला अभिप्राय पूर्ण कळून त्याप्रमाणें तें मूल व्यवहारास प्रवृत्त होतें. तेव्हां हे सुटे शब्द एकटे दुकटे असले तरी व अन्वित नसले तरी वाक्येंच समजलीं पाहिजेत. ह्यांतील इतर संबंधी शब्द व त्यांचें परस्पर अन्वितत्व ह्या गोष्टी अध्याहृत समजल्या पाहिजेत.

अनेक शब्दांच्या अन्वयानें सिद्ध झालेल्या वाक्यासंबंधीं व त्याच्या अर्थासंबंधी कांहीं प्रश्नच राहात नाहीं. वाक्यांतील शब्द निरनिराळ्या संबंधांनीं जोडलेले असतात. आकांक्षा, योग्यता, व सन्निधि हे त्यांपैकीं मुख्य संबंध होत. वाक्यांत जे शब्द वापरावयाचे ते एकालगत दुसरा असे त्वरेनें उच्चारावे लागतात. त्यांपैकीं प्रत्येकाची जरूरी दुसऱ्यास लागते. व प्रत्येकाचा अर्थ दुसऱ्याच्या अर्थाला योग्य असावा लागतो. वाक्यार्थ हा घटक–शब्दांच्या समुचित अर्थावर अवलंबून असतो. तो सर्व घटक–शब्दांच्या सहकार्यावर

$ **W. L. Graff** : *Language and Languages*, P. 114.

अवलंबून असतो. त्या सर्व शब्दांचें अर्थसाहचर्य (किंवा "अर्थसंसर्ग") मिळेल तरच वाक्याचें अर्थैकत्व प्राप्त होईल.

वाक्यार्थ हा व्यवहाराला उपयोगी असल्यामुळें तो नेहमीं वापरांत असतो. वाक्यांत वापरलेल्या शब्दांचे कोशांत जरी अनेक अर्थ असले तरी संदर्भाकडे पाहून योग्य तोच त्याचा अर्थ आपण स्विकारतों. बाकीच्या इतर अर्थांचा आपण स्वीकार करीत नाहीं. अनेकार्थांपैकीं जो अर्थ आपण स्वीकारतों तो 'चलनी अर्थ' होय. हे जे शब्द आपण चलनी नाण्यांप्रमाणें व्यवहारसिद्धीसाठीं वापरतों, ते त्यांतील 'चलनी अर्थांच्या' जोरावर वापरतों. ह्या दृष्टीनें वाक्यार्थ हा गतिमान् असतो. वाक्यांत शब्द वापरला म्हणजे त्या शब्दाच्या अर्थाला एक प्रकारची गति प्राप्त होते. वाक्यांतील शब्दांचा अर्थ हाहि गतिमान् असतो. शब्द जोंपर्यंत कोशांत आहे तोंपर्यंत त्या शब्दाच्या अर्थाला कांहीं गति नसते. कोशांतील शब्दांचे अर्थ हे स्थितिमान् असतात;–ते अचल असतात. कोशांतील शब्द वाक्यांत वापरला गेला कीं त्याला गति प्राप्त होते. जितका जास्त वेळां तो वापरला जाईल तितकी जास्त गति त्याला प्राप्त होईल. तो शब्द अधिक चलनी होईल. हें जें जास्त गतिमत्त्व त्याला प्राप्त होतें, त्याचा त्याच्यावर परिणाम झाल्याशिवाय राहात नाहीं. शब्दाच्या बाह्य व आंतर् स्वरूपांवर त्याचा परिणाम होतो. शब्दाचें व अर्थांचें हें गतिमत्त्व हा त्याचा जिवंतपणा आहे. हेंच त्याचें खरें तेज व खरें सामर्थ्य होय. कोशांतील सर्वच शब्दांना हें गतिमत्त्व लाभत नाहीं. त्याचप्रमाणें एखाद्या शब्दाच्या सर्वच अर्थांनाहि हें गतिमत्त्व लाभत नाहीं. आतां हें गतिमत्त्व कशानें लाभतें, तें कोण कोणत्या गोष्टीवर अवलंबून असतें, ह्याचा विचार शब्दाची स्वरप्रक्रिया व अर्थप्रक्रिया ह्या दोहींच्या अनुषंगानें करतां येण्यासारखा आहे. सध्यां शब्दार्थ व वाक्यार्थ ह्यांच्या संबंधांत ओघानें त्याचा निर्देश केला इतकेंच.

५० भारतीय आर्यभाषांचें महत्त्वः ध्वनिभाषा व ध्वनिपूर्वभाषा, शब्द व त्याचा अर्थ, वाक्य व त्याचा अर्थ, अर्थ व त्याचे प्रकार, त्याचे बौद्धिक व भावनिक अंश इत्यादि मुद्द्यांचा ऊहापोह येथवर आपण केला. ह्या ऊहापोहांत आपली दृष्टि सर्व सामान्य होती. सर्व सामान्य मानवी भाषा व तिचे शब्द व अर्थ घटक ह्या गोष्टी आपणासमोर होत्या. आतां आपण आपल्या लगतच्या गोष्टींकडे येऊं. आपली मराठी भाषा, तिच्याशीं संबद्ध असलेल्या अर्वाचीन भारतीय आर्य भाषा व ह्यांचे शब्द व अर्थ हे घटक ह्यांचा विचार करूं. भारतीय आर्य भाषा हा एक भाषासंघ किंवा भाषावंश आहे. हा अत्यंत प्राचीन पण अत्यंत अद्यावत् आहे. हा अत्यंत पुरातन पण अत्यंत सुधारलेला आहे. हा अत्यंत दीर्घायुषी पण सृजनक्षम आहे. हा अत्यंत संपन्न पण अत्यंत नम्र असा जगाच्या पाठीवरील एक अद्वितीय भाषासंघ आहे. ह्या भाषासंघाचा कालदृष्ट्या विस्तार कांहींतरी दहा हजार वर्षांच्या मागें जाईल. स्थलदृष्ट्या विस्तार सर्व ज्ञात जग व्यापून उरण्याइतका आहे. ह्या भाषकांनीं जग कित्येक वेळां पादाक्रांत केलें व कित्येक राज्यें साम्राज्यें स्थापिलीं. पॅसिफिक महासागराच्या तळापासून हिमालयाच्या गौरीशंकरापर्यंतचें क्षेत्र ह्या भाषकांनीं तपासलें. त्यांनीं सूर्यावरचे डाग शोधले. त्यांनीं मंगळावरील जीवात्म्याशीं संभाषण करण्यापर्यंत मजल नेली. द्रव्यच्छेदन करकरून अणूच्या सामर्थ्याचा तलास लाविला. भौतिक, दैविक, आत्मिक शास्त्रें व कला ह्यांमध्यें प्रयत्न पराकोटीस नेला आहे. ह्या अशा आर्य मानवपुंजाच्या असामान्य प्रयत्नांचा गदारोळ आर्यभाषांत प्रतिबिंबित झाला आहे. त्यामुळें ह्या भाषासंघांत विलक्षण सामर्थ्य प्राप्त झालें आहे. ह्या भाषासंघाला आर्यभारतीय, आर्ययुरोपियन, आर्यशार्मण्य अशीं नांवें त्या त्या विशिष्ट अभिनिवेशामुळें दिलीं गेलीं. हा भाषासंघ खरा म्हटला म्हणजे आर्यभाषासंघ होय. हिंदुस्थानांतील भाषांच्या दृष्टीनें त्यांना "भारतीय आर्य भाषा" असें जर म्हटलें तर योग्य दिसेल.

५१ त्या भाषांचे कालखंडः भारतीय आर्यभाषा ह्या फार प्राचीन भाषा होत. ह्या भाषांतील अत्यंत प्राचीन साधनें म्हटलीं म्हणजे वैदिक वाङ्मय हें होय व अत्यंत अर्वाचीन साधनें म्हटलीं म्हणजे अर्वाचीन भारतीय आर्य बोली ह्या होत. वैदिक भाषेपासून ते अर्वाचीन भारतीय आर्य बोलींपर्यंतच्या भाषिक परिणतीच्या कालाचे निरनिराळे कालखंड पडतात. त्या त्या कालखंडांत भाषिक विकासांची ती ती अवस्था प्रतीत होते. ह्या कालाचे स्थूल असे तीन कालखंड मानिले आहेत. ह्या तीन कालखंडांत प्रतीत होणाऱ्या भाषा तीन भिन्न स्वरूपांच्या दिसतात. हीं तीन स्वरूपें एकाच भाषेच्या

परिणतींतील तीन स्पष्ट भिन्न अशा अवस्था होत. ह्यानां नांवेंहि पण स्थूल अशींच दिलीं आहेत. प्राचीन भारतीय आर्य भाषा, मध्ययुगीन भारतीय आर्य भाषा व अर्वाचीन भारतीय भाषा हीं तीं नांवें होत; व हीं पाश्चात्य विद्वानांनीं दिलेल्या Old-Indo-Aryan, Mid-Indo-Aryan, New-Indo-Aryan ह्या नांवांना अनुरूप अशीं आहेत. वैदिक वाङ्मयाचा परिष्कार करणारी संस्कृत व इतर तत्समकालीन भाषा ह्या पहिल्या 'प्राभाआ' वर्गांत, पाली, प्राकृत, अपभ्रंश ह्या भाषा दुसऱ्या 'मभाआ' ह्या वर्गांत, व सध्यांच्या रूढ असलेल्या आर्य बोली ह्या तिसऱ्या 'अभाआ' ह्या वर्गांत पडतात. आपली सध्यांची मराठी भाषा ही 'अभाआ' ह्या वर्गांतील आहे. मराठी व इतर बोली ह्यांचा निर्देश 'अभाआ' बोली असाच योग्य होईल.

५२ आर्यभाषांचें मूलधन : 'प्राभाआ,' 'मभाआ,' 'अभाआ,' ह्या तीन भिन्न व स्वतंत्र अवस्था जरी असल्या तरी त्यांतून वाहाणारा आर्यभाषा सरस्वतीचा स्रोत एकच आहे. त्याच्यावर वर्णप्रक्रियेचीं व अर्थप्रक्रियेचीं आवरणें खूप पडलीं आहेत. ह्यांनीं तिचें स्वरूप पार बदलून गेलें आहे. हीं आवरणें बाजूस सारलीं कीं तिचें मूलधन दृग्गोचर होतें. स्वरव्यंजनांचें उच्चारण, प्रकृतिप्रत्ययांचे अनुबंध, कर्तृक्रियापदांचे प्रयोग, शब्दसंपत्तीचे विनियोग, शब्दार्थांचा संबंध ह्या गोष्टी म्हणजे भाषेचें 'मूलधन' होय. आर्यभाषेच्या कोणत्याहि अवस्थेंत हें मूलधन आढळतें, स्वरव्यंजनाचे उच्चार शब्दसंपत्ति व शब्दार्थांचा संबंध ह्या बाबी कोशाच्या दृष्टीनें महत्त्वाच्या होत. ह्यांपैकीं स्वरव्यंजनाचें उच्चारण हें मूलधनाचें एक अंग मराठी भाषेंत कोणत्या स्वरूपांत आढळतें हें पाहूं.

त्यांचे उच्चार-स्वर, व्यंजनें : संस्कृतमधील स्वरव्यंजनें मराठीनें प्राकृत, अपभ्रंश ह्या भाषांच्या मार्फत घेतलीं. त्यांपैकीं दीर्घ ॠ, ऌ, ॡ हे स्वर, ङ्, ञ् हीं व्यंजनें ह्यांचा फारसा वापर मराठींत नसल्यामुळें तीं कमी होतात. परंतु संस्कृतमधील वर्णांशिवाय इतर अधिक वर्णांचा स्वीकार मराठीला करावा लागला आहे. हे अधिक वर्ण दुसऱ्या भाषांच्या संबंधामुळें आलेले असोत किंवा पूर्वींच्या वर्णांचें उच्चारांतरांमुळें आलेले असोत. दन्ततालव्य व्यंजनें, अ, ए, ओ ह्या स्वरांचे ऱ्हस्व उच्चार, वगैरे कांहीं गोष्टी मराठीमध्यें नवीन आलेल्या आहेत. मराठींत आलेले स्वर व्यंजनाचे उच्चार हे अगदीं नवे आहेत कां जुन्या संस्कृत उच्चारांचीं भिन्न स्वरूपें आहेत हें ठरविणें झाल्यास संस्कृतमध्यें हे उच्चार कसे होते, त्यांचें उच्चारमापन कोणत्या प्रकारचें होतें हें पाहाणें जरूर आहे.

५३ स्वरव्यंजनोच्चाराचें स्वातंत्र्य : संस्कृतमध्यें उच्चाराचे दोन प्रकार आहेत. ते स्वर व व्यंजन हे होत. ह्या दोन प्रकारांचे पुनः पोटभेद पुष्कळ आहेत. शब्दाचे जे निरनिराळे अवयव (syllable) असतात ते त्या शब्दांतील स्वरव्यंजनांवर अवलंबून असतात. ह्या अवयवांना संस्कृत शिक्षाकार 'अक्षर' असें म्हणतात. 'अक्षर' शब्दाचा अर्थ "न क्षरन्तीत्यक्षराणि, क्षरणम् अन्यांगतया चलनम्" (तै. प्राति. वैदिकाभरण १-२) असा केला आहे. अक्षर हें स्वतंत्र राहतें; दुसऱ्याला आनुषंगिक म्हणून वावरत नाहीं, हा अक्षराचा खरा अर्थ आहे. ह्या अर्थानें जर पाहिलें तर 'स्वर'च तेवढा अक्षर होऊं शकेल, व्यंजन होऊं शकणार नाहीं. कारण स्वर हा स्वतंत्र रीतीनें वावरतो, व्यंजन तसें स्वतंत्र वावरूं शकत नाहीं, तें स्वराच्या आश्रयानेंच वावरतें, अशीं साधारणपणें समजूत आहे. परंतु उच्चारशास्त्राच्या सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर हें म्हणणें टिकणार नाहीं. व्यंजनांना सुद्धां स्वतंत्र अस्तित्व आहे. स्वराच्या आश्रयानेंच त्यांचा उच्चार होऊं शकतो, इतरत्र नाहीं, हें म्हणणें सशास्त्रहि नव्हे व अनुभवालाहि पटत नाहीं. जपानी, इंग्रजी, जर्मन ह्या भाषांत व्यंजनें स्वरांच्या आश्रयाशिवाय वावरतात, उच्चारिलीं जाऊं शकतात. आपल्या इकडील भाषांत ती स्थिति आढळते. व्यंजनांना त्यांचें स्वतःचें असें औच्चारिक स्वातंत्र्य आहे, त्यांना स्वरांच्या इतकें जरी नसलें तरी अक्षरत्व आहे. तेव्हां स्वरांना ज्याप्रमाणें एखाद्या शब्दाचा अवयव होण्याचें सामर्थ्य असतें त्याप्रमाणें व्यंजनांनाहि त्याचे अवयव होण्याचें सामर्थ्य असतें. दोन्हीमध्यें कांहीं फरकच असला तर उच्चाराच्या प्रमाणाचा आहे. व्यंजनाच्या बाबतींत उच्चाराचें प्रमाण स्वराच्या औच्चारिक प्रमाणापेक्षां कमी असतें. त्यांच्यामध्यें फरक जो दिसतो तो अक्षराच्या औच्चारिक प्रमाणांतील भेदामुळें दिसतो.

स्वराच्या काय किंवा व्यंजनाच्या काय उच्चारांत तीन गोष्टी मुख्य असतात, त्या उच्चाराचे हे तीन घटक होत. ध्वनि (sonority), उच्चाराची लांबी (length), उच्चाराला लागणारा हवेचा किंवा उच्छ्वासाचा जोर

(breath-force) हे त्याचे घटक होत. व्यंजनामध्यें स्वरापेक्षां हे तीन घटक कमी प्रमाणानें असतात. हें त्याचें प्रमाण जर वाढविलें तर स्वर आणि व्यंजनें ह्यांमध्यें औच्चारिक दृष्ट्या भेद राहणार नाहीं.

स्वर आणि व्यंजन ह्यांच्या व्याख्या आपल्याकडील वैयाकरणांनीं दिलेल्या पाहिल्या म्हणजेहि व्यंजनाच्या औच्चारिक स्वातंत्र्याची अंधुक कां होईना पण त्यांना कल्पना होती असें दिसतें. 'स्वर' हा सम्राट् आहे व 'व्यंजनें' हीं मांडलीक राजे आहेत असें त्यांचें वर्णन केलें आहे (तै. प्राति. २१-१ वैदिकाभरण). 'स्वर' ह्या शब्दाचा धात्वर्थ "स्वयम् राजते-स्वतः प्रकाशतो" असा पाणिनीनें केला आहे. (पा. १-२-२९). त्यासंबंधीं पतंजलि पुढीलप्रमाणें लिहितो—"स्वयम् राजन्ते स्वरा अन्वग् भवति व्यंजनमिति". व्यंजन शब्दाचा धात्वर्थ पुढीलप्रमाणें दिला आहे. "परेण स्वरेण व्यज्यते इति व्यंजनम्" (तै. प्राति. १-६) §. संस्कृतवैयाकरणाच्या स्वर-व्यंजनासंबंधींच्या विचारसरणींत अशा रीतीनें त्यांच्या औच्चारिक स्वातंत्र्याविषयीं सूक्ष्मता आहे. स्वरांत तर औच्चारिक स्वातंत्र्य आहेच. परंतु व्यंजनेंहि स्वराच्या अधीन फारशीं नाहींत. दोघांच्या औच्चारिक स्वातंत्र्यांत प्रमाणाचा फरक आहे. औच्चारिक घटक म्हणून दोहोंचें अस्तित्व, स्वातंत्र्य व महत्त्व आहे. स्वरांचें तें अधिक प्रमाणांत असेल इतकेंच.

५४ त्यांचें उच्चारमापन : उच्चाराच्या दृष्टीनें कमी अधिक असेना का, पण स्वर व व्यंजन ह्या दोहोंचें औच्चारिक अस्तित्व व स्वातंत्र्य आपण मान्य केलें. आतां हें औच्चारिक अस्तित्व आहे किती, त्यांच्या उच्चारांना वेळ लागतो किती हा पुढचा प्रश्न आहे. उच्चारमापनांतील सर्वांत लहान परिमाण किंवा माप म्हणजे अणु. हा 'अणु' अदृश्य आहे. हा इंद्रियाचा विषय नाहीं. इंद्रियाला अगम्य आहे. सूर्यकिरणांच्या कवडाशामधून जे कण प्रकाशित होतात त्यांपैकीं एका कणाइतका तो असतो. हेंहि त्याचें स्थूल वर्णन आहे (सूर्यरश्मिप्रतीकाशा कणिका यत्र दृश्यते—लोमशीशिक्षा). ह्याच्यापेक्षां मोठें परिमाण म्हणजे परमाणु. हा दोन अणूंचा मिळून झाला आहे. हा मात्र दृश्य किंवा श्राव्य म्हणजे इंद्रियगम्य आहे. परमाणूपेक्षां मोठें परिमाण म्हणजे **मात्रा** हें होय. अंगुलिस्फोटनाला जितका काळ लागतो तितका काळ म्हणजे मात्रा अशी त्याची व्याख्या व्यास आपल्या शिक्षेंत करतो (व्या. शि. २२-३). निमेषकाला मात्रा (नारदशिक्षा), किंवा विद्युदुन्मेषकाला अशाहि इतर व्याख्या आहेत. चाषस्तु वदते मात्राम् असें मात्रेसंबंधीं ऋक्प्रातिशाख्यांत म्हटलें आहे. एकमात्रा ह्या परिमाणानंतरचें परिमाण द्विमात्रा हें होय. दीर्घस्वराचें उच्चारण द्विमात्रा असतें. त्याच्या पुढचें परिमाण त्रिमात्रा हें होय व हें प्लुत उच्चाराचें परिमाण होय. द्विमात्रा व त्रिमात्रा हीं दोन्हीं परिमाणें अनुक्रमें कावळा व मोर ह्या पक्षांच्या आवाजाइतकीं आहेत (ऋ. प्राति १३-२०). अणु, परमाणु, मात्रा हीं तीन उच्चारपरिमाणें होत. ह्यांची जशी कालमर्यादा दिली आहे तशींच ह्यांचीं उच्चारस्थानेंहि दिलीं आहेत. एक अणु म्हणजे मंडल असें म्हणून त्याचें स्थान हृदय ठरविलें आहे. द्विराणव (दोन अणु) ह्यांचें स्थान कंठ, त्रिराणव (तीन अणु) ह्यांचें स्थान जिव्हाग्र व मात्रेचें स्थान विसृत असें म्हटलें आहे (चारायणीय शिक्षा). एका मात्रेमध्यें चार अणु असतात. त्यांचीं हीं चार उच्चारस्थानें. हें सर्व वर्णन अर्थात् प्रतीकात्मक आहे असें मानलें पाहिजे. कारण इतकी सूक्ष्मता प्रत्यक्ष व्यवहारांत बुद्धीला आकलन होणें कठीण आहे.

प्रत्यक्ष व्यवहारांतील उच्चाराचे प्रकार ऱ्हस्व व दीर्घ हे दोनच होत. ह्यांत पुनः उच्चाराची एखादी मात्रा कमी अधीक करून चार प्रकार करतात. ऱ्हस्व, क्षिप्र, दीर्घ व प्लुत असे जे चार प्रकार होतात ते दीर्घ उच्चाराची एक मात्रा कमी केली कीं क्षिप्र व अधिक केली कीं प्लुत हे प्रकार होतात ह्यावर अवलंबून आहे. प्लुत उच्चारांत आणखी एक मात्रा मिळविली कीं वृद्ध उच्चार होतो.

ऱ्हस्व दीर्घ हे उच्चार सर्वांच्या परिचयाचे आहेत. एखाद्याला हाक मारतांना शेवटीं अन्त्य अक्षराचा जो उच्चार आपण लांबवितों तो प्लुत उच्चार होय. उदा. गोविंदाऽऽऽ,रामाऽऽऽऽऽ, हरीऽऽ–ऱ्याऽऽऽऽऽ. 'हरी' चें 'हऱ्याऽऽ' होणें हा वृद्ध उच्चार होय. नेहमीं हा अन्त्य उच्चारच आपण लांबवितों असें नाहीं. कधीं मधील उच्चारहि लांबविला जातो. पंजाबी भाषेंत 'सीऽऽऽ तारामा' अशी हांक मारतात. तर ल्हांडी भाषेंत

---

§ Siddheshwar Varma : *Critical Studies, P. O. I. Gr.* pp. 56,57.

'सीताराऽऽऽमा अशी हांक मारतात. आपण मराठींत 'सीतारामांऽऽऽ' अशी हाक मारतों. ही एक प्रांतविशिष्ट उच्चाराची लकब आहे इतकेंच.

ही झाली स्वरांच्या उच्चारांची कालमर्यादा. ह्यानंतर व्यंजनांच्या कालमर्यादेचा विचार येतो. स्वराचा उच्चार हा व्यंजनाच्या उच्चारापेक्षां किंचित् का होईना पण अधिक लांबविला जातो. स्वराचें उच्चारण जरा अधिक ओढलें गेल्यामुळें लांबतेंच. ऱ्हस्व स्वराच्या उच्चारणाला जर एका मात्रेचा काल लागला तर व्यंजनाच्या उच्चारणाला त्यापेक्षां कमी वेळ लागणार; म्हणजे अर्ध्या मात्रेइतका काल लागणार. व्यंजनाच्या ह्या उच्चारणांत अर्थात्‌च त्याचें उच्चारण पुढील लगतच्या दुसऱ्या व्यंजनाच्या उच्चारणांत मिसळून जाण्याचा काल विचारांत घेतला नाहीं. तो काल जर विचारांत घेतला तर अर्ध्या मात्रेहूनहि थोडा कमी काल त्या व्यंजनाच्या उच्चारणाला लागेल. परंतु हें त्याचें उच्चारण आनुषंगिक आहे. त्या मूळ व्यंजनाचें स्वतःचें नव्हे. कांहीं शिक्षाकार व्यंजनाच्या उच्चारणांस पाव मात्रेइतकीच कालमर्यादा लागते असें म्हणतात (सर्वसंमत शिक्षा). स्वरासह व्यंजन उच्चारण्यास अर्धमात्रा वेळ लागतो. व्यंजनाच्या उच्चारणाची जी कालमर्यादा ह्या शिक्षाकारांनीं निश्चित केली ती उच्चारणाच्या वेळेकडे बघून निश्चित केली नाहीं, तर व्यंजनोच्चार ऐकण्यास वेळ किती लागतो ह्याकडे बघून निश्चित केली आहे. सामान्य कोणत्याहि व्यंजनाची ही गोष्ट झाली. ह्या शिवाय कांहीं विशिष्ट व्यंजनांच्या उच्चारास वेळ किती लागतो ह्याचाहि विचार शिक्षाकारांनीं केला आहे. ऊष्म व्यंजनाच्या उच्चारास वेळ अधिक दीर्घ स्वराइतका लागतो (पाणिनिशिक्षा). ऱ्हस्व स्वरानंतरच्या अनुनासिक व्यंजनाच्या उच्चारास दीर्घ स्वराइतका वेळ लागतो (आपिशलिशिक्षा). अनुस्वाराचें उच्चारण ऱ्हस्व असतें. ऱ्हस्व स्वरानंतरचा अनुस्वार किंचित दीर्घ तर दीर्घ स्वरानंतरचा अनुस्वार किंचित् ऱ्हस्व उच्चारला जातो.

हें पृथक् व्यंजनाच्या उच्चारासंबंधीं झालें. दोन स्वर किंवा दोन व्यंजनें जवळ जवळ आलीं आहेत तर त्या दोहोंच्या उच्चारांमध्यें थांबावयाचें किती हा एक प्रश्न आहे. हा काळ सामान्य रीतीनें पाव मात्रेइतका मानला आहे (ऋप्रा. २-१). दोन दीर्घ स्वरांमधील विराम अर्थात् दोन ऱ्हस्व स्वरांमधील विरामापेक्षां अधिक लागणार. दोन नुसतीं व्यंजनें लगोलग उच्चारायचीं असलीं तर त्यांमध्यें थांबण्याची जरूरीच उरणार नाहीं. दोन किंवा अधिक व्यंजनांच्याच फक्त उच्चारांत विराम असणें शक्यच नाहीं (व्यास शिक्षा).

उच्चाराच्या ज्या ह्या कालमर्यादा सांगितल्या गेल्या आहेत त्या अर्थात् सामान्य कोणत्याहि एका व्यक्तीच्या उच्चारणाला लागू आहेत. प्रत्येक व्यक्तीचें उच्चारण भिन्न असतें. कोणी जलद तर कोणी सावकाश तर कोणी फार जलद नाहीं व सावकाशहि नाहीं अशा रीतीनें बोलतो. उच्चारणाचा वेग कसाहि असला तरी ह्या कालमर्यादेमुळें जवळजवळच्या वर्णोच्चारणाच्या एकसूत्रतेंत त्यानें व्याघात कांहीं उत्पन्न होत नाहीं. त्यांच्या अनुस्यूतत्वाला (continuity) त्यानें बाधा येत नाहीं. ही एक गोष्ट झाली—कीं बोलण्याची गति उच्चारणसातत्याला बाधा करित नाहीं. दुसरी गोष्ट वर्णोच्चारास लागणारा वेळ त्या वर्णाची जात बदलूं शकत नाहीं ही होय. हा जरा वादाचा मुद्दा आहे. अ, इ, उ हे ऱ्हस्व आहेत. हे जर लांबवून दीर्घ केले तर आ, ई, ऊ असे होतील म्हणजे त्यांच्या उच्चारणांत फरक पडला. आतां प्रश्न हा कीं अ हा जर कंठ्य तर आ हा कांहीं दुसऱ्या प्रकारचा आहे कीं काय. तसेंच इ हा जर तालव्य व उ हा जर ओष्ठ्य तर ई व ऊ हे निराळ्या प्रकाराचे समजायचें कीं काय? ह्या संबंधीं प्रातिशाख्यें व पाणिनिपतंजलि ह्यांच्या मतांमध्यें फरक आहे. वर्णाची उच्चारणकालमर्यादा व वर्णाची जात ह्या दोन्ही बाबी स्वतंत्र आहेत असें पतंजलीचें म्हणणें आहे (१-४-१०९)‡.

५५ मराठींतील स्वर: मराठी भाषेच्या बाबत स्वरव्यंजनादि वर्णांच्या उच्चारणास लागणारा वेळ व संस्कृतमधील किंवा प्राकृतमधील वर्णोच्चारणाला लागणाऱ्या वेळाइतकाच असणार हें उघड आहे. ह्या दोहोंत फारसा फरक पडणार नाहीं. मराठींतील वर्ण संस्कृतमधून प्राकृत–अपभ्रंश ह्या भाषांच्या द्वारां आले आहेत. हे वर्ण मराठींत येतांना त्यांच्यामध्यें कांहीं फेरबदल काल, स्थल, भोंवतालच्या व परकीय भाषांचा परिणाम ह्या कारणांमुळें झाले आहेत. वर्णांपैकीं स्वरांत 'अ, इ, उ,' हे तीन मुख्य आहेत. ह्यांचेंच दीर्घ स्वरूप म्हणजे 'आ, ई, ऊ,' हे स्वर होत. 'अ' स्वराच्या उच्चारांत कांहीं सूक्ष्म छटा आढळून

---

‡ *Ibid*, pp 178,182—

येतात. त्यांत तीन छटा महत्त्वाच्या आहेत. ‘ गवत ’ हा साधा शब्द घेतला तर त्यांतील तीन अक्षरांत तीन ‘अ’ आहेत, परंतु त्यांचें उच्चाराचें परिमाण सारखें नाहीं. पहिला ‘ग’ मधील ‘अ’ ‘व’ मधील ‘अ’ पेक्षां कमी उच्चाराचा आहे. ह्याच्यापेक्षां कमी उच्चारपरिमाण शेंवटच्या ‘त’ मधील ‘अ’ चें आहे. ह्या शेवटच्या ‘अ’ चें परिमाण इतकें कमी आहे कीं तें नसल्यासारखेंच भासतें व शेंवटचा ‘त’ हा ‘त्’ असा व्यंजनवत् उच्चारिला जातो. ‘त’ चें उच्चारण पावमात्रा, ‘ग’ चें अर्ध मात्रा, ‘व’ चें एक मात्रा असें प्रत्येकाचें उच्चाराचें मान आहे. मधील ‘व’ चें मान आम्ही एक मात्रा आहे असें म्हणतों. त्याला ग्रामीण बोलींतील उच्चाराचा आधार आहे. खेडेगांवांतील ग्रामीण बोलींत ‘गवत’ हा शब्द ‘गवा॑त’ असा उच्चारलेला आढळतो. तरट, करट, कवठ, कपट, भडक, सडक, कडक, कमळ, सरमड, गडबड, चटक, तिखट, सरक वगैरे शब्दांचे उच्चार अनुक्रमें करा॑ट, कवा॑ठ, कपा॑ट, भडा॑क, सडा॑क, कडा॑क, कमा॑ळ, सरमा॑ड, गडबा॑ड; चटा॑क, तिखा॑ट, सरा॑क असे होतात. ह्यावरून मधील ‘अ’ ज्या अर्थीं दीर्घ केलेला आढळतो त्याअर्थीं त्याचा उच्चार एक मात्रा परिमाणाचा समजला गेला असला पाहिजे. उच्चारांत अर्धी मात्रा अधिक येण्याचें कारण कदाचित् त्या शब्दावरील आघात किंवा परकीय भाषेंतील उच्चार हीं कारणें असावींत. अन्त्य ‘अ’ ह्या स्वराचा जसा हा एक उच्चार विशेष आहे तसाच आद्य ‘अ’ ह्या स्वराचाहि एक उच्चारविशेष आहे. अन्त्य ‘अ’ हा जसा ओझरता उच्चारिला जाऊन निभृत होतो तसा आद्य ‘अ’ हा जोरानें उच्चारिला जाऊन दीर्घ होतो. आद्य ‘अ’ हा बऱ्याच वेळां ‘आ’ सारखा उच्चारिला जातो. त्यांतहि आणखी जोर पडला कीं ‘हा’ असा क्वचित् उचारिला गेलेला ऐकूं येतो. अक्रोड, अक, अगा, अघटित, अटळ, अडका, अनर्थ, अमर, अमल, अमसूल, अरकस, अरगज, अरड, अलग, अलाहिदा, अलें, अवखळे, अवघड, अवस, इत्यादि किती तरी शब्द असे आढळतात कीं त्यांमधील आद्य ‘अ’ हा ‘आ’ सारखा उचारण्याकडे बोलणाऱ्याचा कल असतो. कांहीं कांहीं पोटभाषांत–कोंकणी मराठींत तो स्पष्ट ‘आ’च उच्चारिला जातो. ‘अ’ च्या ह्या उचारसंभ्रमामुळें कोशकाराला कित्येक ‘अ’ आदिशब्द ‘आ’मध्यें किंवा ‘ह’कारामध्यें द्यावे लागतात. ‘अ’च्या थोड्याशा लांबट उच्चारानें जसा दीर्घ ‘आ’ हा उच्चार निष्पन्न होतो तसा त्यांत आणखी थोडासा जोर दिला तर त्या उच्चारांत महाप्राण ‘ह’चा उच्चार मिसळतो. अशा रीतीनें मूळच्या ‘अ’ चें प्रथम ‘आ’ व नंतर ‘हा’ असें उच्चारान्तर होतें.

‘इ’ हा तालव्य स्वर आहे व ‘उ’ हा ओष्ठ्य स्वर आहे. ह्यांच्या उच्चाराबाबत फारसा फरक झालेला नाहीं. पहिल्या संस्कृतमधील अवस्थेपासून तों आजच्या मराठींतील अवस्थेपर्यंतच्या सर्व अवस्थांत हे दोन्ही स्वर थोडेफार अविकृतच राहिले आहेत. कधीं कधीं ‘इ’ चा ‘यि’ व ‘उ’ चा ‘वु’ असा उच्चार करतात. ‘ऋ ॠ, ऌ ॡ,’ हे स्वर संस्कृतमधून मराठींत उतरले आहेत असें तात्त्विक दृष्ट्या म्हणावयाचें मात्र परंतु मराठींत ते फारसे प्रत्यक्ष वापरीत नाहींत. ह्या चारीपैकीं फक्त पहिला ह्रस्व ‘ऋ’ च फक्त आढळतो. बाकीचे तीन स्वर नाममात्र आहेत. ह्या नंतरचे ‘ए, ओ’ ह्या दोन स्वरांच्या उच्चारणाच्या कालाबाबत मराठीमध्यें फरक झालेला दिसतो. आणि ‘ए’ आणि ‘ओ’ ह्याचें ह्रस्व आणि दीर्घ असे दोन प्रकार आहेत. ‘माणसें, फुलें, फळें, गेलें, केलें,’ ह्या शब्दांमधील अन्त्य ‘ए’ हा उच्चार दीर्घ आहे. परंतु माणसं, फुलं, फळं, गेलं, केलं’ ह्या शब्दांतील अन्त्य ए ऱ्हस्व आहे. तो ऱ्हस्व आहे म्हणूनच त्याचें रूपान्तर ‘अ’ मध्यें झालें आहे. ‘क्षेत्र’ ह्या शब्दामधील आद्य ‘ए’ उच्चार हा सरळ ‘ए’ असा दीर्घ आहे. परंतु ‘खेत’ शब्दाच्या ग्रामीण उच्चारांत ‘ए’ ह्रस्व असून तो शब्द ख्य॑त असा उच्चारिला जातो. ‘बेत, खेळवा, बेसन’ ह्या शब्दांचे उच्चार ब्य॑त, ख्य॑ळवा, ब्यसा॑न’ असे होतात. ‘ए’ ह्या स्वरांतील तालव्यत्व ग्रामीण मराठींत ‘य’च्या रूपानें दाखविलें जातें. तसाच ‘ओ’ ह्या स्वराचा उच्चार परिचयाचा आहे. ‘ओ’ चा उच्चार ऱ्हस्व झाला कीं त्याचा ‘व’ होण्याकडे प्रवृत्ति होते. ‘ओठ, ओढा, ओझें, ओढणें, ओंचा, ओला, ओकणें, औषध’ इत्यादि शब्दांचे उच्चार उघड उघड ‘वठ, वढा, वझें, वढणें, वचा, वला, वकणें, वखद असे ग्रामीण मराठींत होतात. मूळ ‘ओ’ मधील दीर्घत्व नाहींसें होऊन ‘अ’ च्या उच्चाराइतकें त्यांत लघुत्व येतें. बाकीचा अवशिष्ट ‘उ’ चा उच्चार ओष्ठ्यत्वांत राहिला आहे. ह्या शब्दांच्या रूपांत ओष्ठ्यत्व जें उतरलें आहे

त्याचें कारण हें आहे. सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर 'ए' आणि 'ओ' ह्या दोन्ही स्वरांच्या ऱ्हस्वउच्चारांत उच्चार-परिमाण एका द्व्यणूनें कां होईना पण कमी झालें आहे. कारण त्याचें स्वरत्व जाऊन व्यंजनत्व आलें आहे. स्वरांपेक्षा व्यंजनास उच्चारकाल कमी लागतो हा नियम आहे. ह्या प्रकार कानडी भाषेच्या संपर्काचा परिणाम आहे. ऐ आणि औ ह्या स्वरांच्या उच्चारांबाबत मराठींत विशेष फरक पडलेला दिसत नाहीं. कांहीं थोडासा फरक पडला असला तर त्याच्या दोन घटक स्वरांच्या संनिहित उच्चाराबाबत पडला आहे असें म्हणतां येईल. ऐ हा अ+इ किंवा आ+इ असा व औ हा अ+उ किंवा आ+उ असा उच्चारिला जातो. परंतु हा फरक विशेष ध्यानांत येण्यसारखा नाहीं.

५६ मराठींतील व्यंजनें : मराठीमधील स्वरांनंतर व्यंजनांचा विचार येतो. स्पर्श व्यंजनांचे पांच वर्ग आहेत व ते उच्चारस्थानांप्रमाणें ठरले आहेत. कंठ्य व्यंजनांच्या उच्चारांत औरस्य उच्चार कधीं कधीं आलेला दिसतो. फारसी भाषेंतील कंठ्य व्यंजनाच्या उच्चारांत औरस्य उच्चार अधिक आहे. त्याचा परिणाम कदाचित् मराठी कंठय उच्चारावर झाला असण्याचा संभव आहे. परंतु तो लक्षांत येण्यासारखा नाहीं. कंठय उच्चारापैकीं अनुनासिक 'ङ' हा उच्चार मराठींत राहिला नाहीं. हा उच्चार तत्सम शब्दांतच फक्त आढळतो. संस्कृत मध्यें हा उच्चार आहे. प्राकृत भाषांच्या अमदानींत कांहीं काळ हा उच्चार अस्तित्वांत असावा. मराठींत मात्र ह्याचा अवशेष राहिला नाहीं.

उच्चारान्तराच्या दृष्टीनें तालव्य व्यंजनें हींच महत्त्वाचीं आहेत. त्यांच्या उच्चारणांत बराच बदल झाला आहे.

'च' वर्गांतील व्यंजनांचे मराठींत दोन प्रकारचे उच्चार होतात. एक शुद्ध तालव्य व दुसरा दन्ततालव्य. ह्या दोहोंपैकीं तालव्य हा उच्चार संस्कृतमधून मराठींत आला व तो तत्सम शब्दांत आढळतो. दुसरा जो दन्ततालव्य उच्चार तो मात्र संस्कृतमध्यें आढळत नाहीं. प्रातिशाख्यें, शिक्षा, व्याकरणग्रंथ ह्यांपैकीं कोणत्याहि ग्रंथांमध्यें ह्या दन्ततालव्य उच्चारांचा उल्लेख नाहीं. प्राकृत-व्याकरणांमध्यें चवर्गांतील व्यंजनांचा एक निराळा उच्चार नमूद केलेला आढळतो. तालव्य उच्चाराचा तो एक स्वतंत्र भेद आहे ह्यांत शंका नाहीं. तो दन्ततालव्य आहे कां नाहीं ह्याबद्दल मात्र शंका आहे. कारण 'च्' 'ज्' ह्या दोन व्यंजनांच्या उच्चार आणि 'य्' ह्याचा उच्चार अशा दोन उच्चारांचा संबंध त्यांत येतो. 'य्' अर्धस्वर असून त्याचा उच्चार तालव्य आहे. ह्या दोन्ही उच्चारांचा उल्लेख ज्या सूत्रांत आला आहे ती सूत्रेंच खालीं मांडून दाखवितों.

(१) चवर्गस्य स्पष्टता तथोच्चारणः। प्रा. प्रकाश ११-५.

(२) चजयोरुपरि यः स्यात्। य्चिरम्, य्चिय। प्रा. स. १२-२१.

(३) श्चिण्टो य्चिश इत्येके। य्चिशदि। प्रा. स. १३-३.

(४) चजयोरुपरि यो भवेत्। य्चलइ, य्जिलइ, । प्रा. स. १८-२.

(५) चवर्गस्योपरिष्टाद्यः य्छले। प्रा. स. २०-४.

ह्या वर दिलेल्या पांच सूत्रांवरून इतकें सिद्ध होतें कीं चवर्गीय व्यंजनांचे दोन उच्चार होते : एक स्पष्ट **च्, छ्, ज, झ्,** असा व दुसरा अस्पष्ट **य्च, य्छ्, य्ज्, य्झ्,** असा. हा दुसरा उच्चार दन्ततालव्य उच्चारासारखा असल्यास न कळे. आम्हांस ह्याबाबत शंका आहे.

दन्ततालव्य उच्चाराचा थांग प्राकृत भाषांत जर लागत नाहीं तर तो इतरत्र शोधला पाहिजे. तो उच्चार इ. स. ३२२ मध्यें होता, असें इतिहासावरून ठरतें. चंद्रगुप्त, चंदन, उज्जयिनी, पंचाल, चष्टन, जमुना हे तालव्यप्रधान उच्चाराचे शब्द आहेत. परंतु हे शब्द पूर्वीच्या तत्कालीन लेखामध्यें लिहिलेले वाचले म्हणजे असें स्पष्ट आढळून येतें कीं ह्या शब्दांचे उच्चार तालव्यप्रधान नव्हते. वरील शब्द अनुक्रमें पुढीलप्रमाणें लिहिलेले आढळतात. Sandrokuptos (चंद्रगुप्त), Tzandanan (चंदन), Ozena (उज्जयिनी), Passloi (पंचाल), Tiastanes (चष्टन), Diamonna (जमुना) हीं त्यांचीं रुपें होत. अर्थात् हीं रुपें परक्यांच्या-चिनी प्रवाश्यांच्या उच्चाराचीं असावींत. ह्या सर्व उच्चारांत मूळ तालव्याच्या ऐवजीं कांहीं दन्त्य उच्चाराची भेसळ झालेली दिसते. ह्यावरून एक अनुमान निघतें तें हें कीं ख्रिस्ती शकाच्या तिसऱ्या चौथ्या शकाच्या सुमारास चिनी प्रवासी ह्यांच्या उच्चाराचा परिणाम आर्योद्भव भाषांवर झाला असावा व त्याचा अवशेष हा दन्त-तालव्य उच्चारांत उतरला असावा. ह्या नवीन उच्चाराचें

उच्चारण प्राकृत व्याकरणकारांना बरोबर आकलन न झाल्यामुळें त्याचें दर्शक प्रतीकहि ठरविण्यास त्यांना अडचण पडली असावी. ही जी अडचण त्यांना भासली तीच वरील पांच सूत्रांमध्यें प्रतीत होते. ह्या नवीन उच्चाराचें प्रतीक त्यानीं **त्च्, त्छ्, त्ज्, त्झ्**, असें ठरविलें. परंतु हा एक तर्क आहे हें येथें अगोदर सांगितलें पाहिजे. ह्या दन्ततालव्य उच्चाराच्या मूळासंबंधीं निरनिराळीं मतें विद्वानांमध्यें आहेत. कोणी ते द्रविड उच्चाराचा अवशेष म्हणतात, तर कोणी ते मंगोली भाषेंतील उच्चाराचे परिणाम म्हणतात,§ तर तिसरे कोणी ते प्राकृत भाषांतील उच्चाराचे अवशेष आहेत असें म्हणतात. ह्या उच्चाराबाबत आणखी संशोधनानें जर कांहीं अधिक प्रकाश पडेल तरच निश्चित मत देतां येणें शक्य होईल. तोंपर्यंत अनुमानावरच भिस्त ठेविणें प्राप्त आहे.

मराठी मूर्धन्यवर्णः मराठींतील मूर्धन्य व्यंजनांच्या उच्चारांत फरक झाला आहे. परंतु तालव्य दंततालव्याइतका हा फरक स्पष्ट व भिन्न स्वरूपाचा नाहीं. उच्चार मूर्धन्यच; परंतु एक किंचित नरमावलेला व दुसरा किंचित कठोर असे दोन प्रकार मूर्धन्य व्यंजनांचे आहेत. ही व्यंजनें शब्दाच्या आरंभीं आलीं असतां त्यांचा उच्चार शुद्ध होतो. परंतु शब्दाच्या मध्यें अगर शेवटीं आलीं तर तीं उच्चारतांना जीभ जितकी टाळयावर-मूर्ध्यावर-दाबावयास पाहिजे तितकी न दाबतां मध्येंच किंचित् पसरावी लागते. ह्यामुळें त्यांचा उच्चार नरमावून होतो. ‘डाग, भडभड किंवा भडाभड’ ह्या शब्दांतील ‘ड’ चा उच्चार एक नाहीं. ‘डाग’ मधील ‘ड’ अधिक स्पष्ट, अधिक कठोर व दुसऱ्या दोन्हीं शब्दांतील ‘ड’ चा उच्चार मृदु आहे. ‘डफ, डाग, टांका, ठोका, ढोण्या’ ह्या शब्दांतील आद्य मूर्धन्य वर्णांचे उच्चार स्पष्ट आहेत. ‘पाड, खाडी, कडे, खडा, पटपट, खटपट’ इत्यादि शब्दांतील मध्य व अन्त्य मूर्धन्य वर्णांचे उच्चार तितके स्पष्ट नाहींत; किंचित् नरमावलेले आहेत. मूर्धन्य वर्णांच्या उच्चारांतील हा फरक मराठी व्याकरणकारांना मान्य आहे.

मूर्धन्य वर्णांनंतरच्या दन्त्य, ओष्ठ्य ह्या वर्गांच्या वर्णांच्या उच्चारांत फरक झालेला नाहीं. अर्धस्वरांच्या उच्चारांतहि फरक नाहीं. ऊष्म वर्णांपैकीं ‘स्’ च्या उच्चारकडे विशेष प्रवृत्ति आहे. ‘श्’ आणि ‘ष्’ ह्यांच्या उच्चारांतील सूक्ष्म भेदाकडे विशेष लक्ष दिलें जात नाहीं. मूर्धन्य ऊष्म हा उच्चार तत्सम शब्दांतच फक्त आणि तोहि साक्षेपी लोकांच्या उच्चारांतच राहिला आहे. तालव्य श् आणि दंन्त्य स् हे दोन उच्चार मराठींत कायम राहिले आहेत. ह्, ळ्, क्ष्, ज्ञ्, ह्या व्यंजनांच्या उच्चारांच्या बाबतींतहि कांहीं फरक झाला नाहीं. मराठी भाषेंतील वर्णांच्या उच्चारांचें पृथक्त्व थोडक्यांत हे वरील स्वरूपाचें आहे.

५७ अर्वाचीन भारतीय भाषा-स्वरोच्चार :

मराठी भाषेंतील उच्चारविशेषांचा निंर्देश वर केला. मराठी भाषा ही जशी संस्कृत–प्राकृत ह्या भाषांच्या परंपरेंतील आहे तशाच इतर औत्तरीय अर्वाचीन बोली ह्याहि त्याच परंपरेंतील आहेत. मराठीनें ज्याप्रमाणें कांहीं मूळ संस्कृत उच्चारविशेष उचलले तसेच ह्या इतर भाषांनींहि उचलले. त्या मूळ उच्चारांत कांहीं फेरबदल जसे मराठीच्या बाबत झालेले आपण पाहिले तसे फेरबदल इतर आधुनिक भाषांच्या बाबत झालेले आपणास पाहिले पाहिजेत. ‘अ’ हा स्वरोचार मराठींत साधा, विवृत व संवृत अशीं तीन भिन्न स्वरूपें धारण करतो. बंगाली व इतर पूर्वेकडील भाषांत ‘अ’ हा उच्चार ‘ओ’ असा करण्याकडे प्रवृत्ति असल्याचें दिसून येतें. गण, अनल, कदा, मण्डल, वड इत्यादि शब्द बंगाली भाषेंत गॉण्, ऑनॉल्, कॉदा, मॉण्डॉल्, वॉड अशा रीतीनें उचारिले जातात. ‘अ’ पेक्षां अधिक व ‘ओ’ पेक्षां कमी विवृतत्व बंगालीमधील ‘अ’ च्या उच्चारांत असल्याचें दिसून येईल. मराठींत आलेला ‘अ’ चा कोमल किंवा निभृत उच्चार सर्व भाषांत आढळतो. बंगालीमध्यें कांहीं रूपांत अन्त्य ‘अ’ पूर्ण उच्चारिला जातो. ‘चल, करील करीत’ हीं रूपें बंगालींत ‘चॉलॉ कॉरिलॉ, कॉरितॉ’ अशीं उच्चारिलीं जातात. ‘अ’ ह्या स्वराच्या उच्चारांत निभृतत्व हें मराठी वगैरे भाषांत आलें तर त्याचें विवृतत्व (ऑ) बंगाली भाषेंत आलें. उरिया भाषेंत बंगाली भाषेपेक्षां ती प्रवृत्ति कमी आहे. §

सिंधी भाषेचा आणखी एक विशेष आहे. आद्य ‘अ’चा ‘इ’ होतो. किहाणी (सं. कथानिका, म. कहाणी), पजिरणु (प्रज्वल-पाजळणें), खिण (क्षण), खिमा (क्षमा), पिञ्जिरो (पञ्जर), लिलाट (ललाट), किवाड (कपाट-कवाड), विंगा (वक्र वांक), मिशी (श्मश्रु). §

---

§ N. B. Divatia : *W. P. L. 4.*

§ J. Beams : *Comp. Gr. M. A. Languages.* P. 67

दुसराहि एक विशेष अन्त्य स्वराबद्दल आहे. मूळ अन्त्य आ, इ, ई, उ, ऊ, ह्या स्वराबद्दल सर्व अभाआ भाषांत ‘ अ ’ येतो. सिंधी भाषेंत त्याच्या ऐवजीं ‘ उ ’ येतो. हा ‘ उ ’ कदाचित् अपभ्रंश भाषेंतील ‘ उ ’ चा किंवा प्राकृतमधील ‘ ओ ’ चा अवशेष असावा. ‘ हात, कान, दांत, धीट, वड ’ ह्या शब्दांचीं सिंधी भाषेंतील रूपें ‘ हथु, कनु, डंदु, डीढु, वडु ” अशीं आहेत.

‘ ऋ ’ हा उच्चार मराठी व उरिया ह्या भाषांत इतर भाषांच्या मानानें फार आढळतो ह्या दोन भाषांत मूळचें संस्कृत वळण कायम ठेवण्याची प्रवृत्ति अधिक आहे. मराठीमध्यें देखील विशेषतः ग्रामीण व कांहीं प्रातिक बोलींत ‘ ऋ ’ ह्याचे ‘रु, रू, री’ असे उच्चार केले जातात. रुषि (ऋषि), रीण (ऋण), रुख, रूख (वृक्ष) अशीं रूपें आढळतात. गुजराती भाषेंतहि ‘ ऋ ’ चा ‘ रु ’ असा उच्चार करतात. ‘ ऐ ’ व ‘ औ ’ ह्या दोन उच्चारांबाबतहि बंगाली व इतर भाषांत फरक पडला आहे. व तो तसा पडणें साहजिक आहे. कारण ‘ अ ’ च्या उच्चारांत पडलेल्या फरकाचा परिणाम ‘ ऐ, औ ’ ह्या उच्चारावर झालाच पाहिजे. ‘ ऐ ’ आणि ‘ औ ’ हे उच्चार बंगालींत ‘ ऑइ, ऑउ ’ असे होतील. ‘ ए ’ हा उच्चार बंगालींत ऱ्हस्व उच्चारिला जातो. ‘ एक ’ हा शब्द ‘ ऑक् किंवा यॅाक् ’ असा उच्चारतात. ग्रामीण मराठींतील ‘ यक्, योक् ’ असे त्याचे उच्चार ताडून पाहण्यासारखे आहेत. हिंदी पंजाबीमध्यें ‘ ऐ, औ ’ उच्चारण्याची प्रवृत्ति आहे; मराठींत नाहीं. मराठींतील धवळा, नवशिका, लोणी, लवणें, कवडी, सवत हे शब्द हिंदी व पंजाबीमध्यें ‘ धौला, नौसिख, नौनी, नौना, कौठी, सौत ’ अशीं रूपें धारण करतात.

५८ अभाआ. व्यंजनोच्चार : व्यंजनोचारांच्या बाबतींत विशेष उल्लेखनीय म्हणजे तालव्य उचार होत. मराठी मध्यें ह्या उचारानें तालव्य व दन्ततालव्य असे दोन प्रकार आढळतात. त्यांची उपपत्ति मागें दिलीच आहे. हिंदीमध्यें तालव्यत्व बरेंच राहिलें आहे. बंगालीमध्यें अरबी व फारसी शब्दांतील तालव्य उच्चारांत दन्ततालव्यत्व आलेलें आहे. व त्याचा परिणाम इतर संस्कृत शब्दाच्या उचारावर होत चालला आहे. पंजाबी भाषेंत कधीं कधीं त्यांतील मूळ स्पर्शाचा उच्चार पार नाहींसा होऊन तालव्य स्वराचा उच्चारच बाकी राहतो. ‘ मझ ’ हा म्हैस अर्थी शब्द पंजाबी भाषेंत ‘ मेय्ह ’ असा कांहीं तरी उचारिला जातो. तालव्य उचारांतील हा भेद कांहीं भाषांत त्या त्या वर्णाखालीं एक टिंब देऊन दाखविण्याचा प्रघात आहे. ‘ ज ’ व ‘ झ ’ ह्या दोन तालव्य वर्णांच्या उचारांतील फरक विशेष जाणवतो.

मूर्धन्य उचारांच्या बाबतींतहि अर्वाचीन भारतीय भाषांत बराच भेद पडलेला आढळतो. ‘ ड ’ आणि ‘ ढ ’ ह्या दोन वर्णांच्या उचारांतील फरक विशेष लक्ष्य आहे. मराठीमध्यें मृदु व कठोर असे दोन प्रकार असले तरी ते दोन्ही मूर्धन्यच आहेत. शब्दाच्या आरंभीं किंवा जोड अक्षरांतील ‘ ड ’ व ‘ ढ ’ हेहि मूर्धन्यच उच्चारिले जातात. इतर ठिकाणीं मात्र त्यांचा उच्चार ‘ र, ऱ्ह ’ सारखा होतो. हिंदीमध्यें हे उच्चारविशेष आढळतात. ते तसेच पुढें बंगाली व उरिया भाषेंतहि आढळतात. ‘ बड ’ हा शब्द ‘ बरं ’ गाडी हा ‘ गारी ’, ‘ खेंकडा ’ हा शब्द हिं. केंकरा, बं. ओ. कांकरा, गुढी हा शब्द हिं. गुरिया असे ह्या शब्दांचे भिन्न उच्चार होतात. पंजाबीमध्यें हे उच्चार मूर्धन्यच राहिले आहेत. सिंधी भाषेंत ह्या वर्णांचा एक निराळाच उच्चार रूढ आहे. हिंदीप्रमाणें त्या भाषेंत ‘ ड ’ आणि ‘ र ’ असे दोन्हीं उच्चार रूढ आहेत. परंतु त्या शिवाय सिंधींत ‘ ड्र ’ असा एक निराळाच उच्चार आहे. ‘ चंद्र ’ ह्या शब्दाचा उच्चार ‘ चंड्रु ’ असा आहे. ‘ ट ’ चाहि उच्चार ‘ ट्र ’ असा आहे. ‘ पुत्र ’ हा शब्द ‘ पुट्रु ’ असा उच्चारिला जातो. संस्कृतमधील दन्त्यांचें सिंधी, पंजाबी व हिंदी ह्या भाषांत मूर्धन्यीकरण होतें. सिंधी भाषेंत हा प्रकार विशेष आढळतो. टंठो (तुष्टः), टेटो (तीर्यक्), ठूंठो (स्थग+ट), डया (दया), डसणु (दर्शनम्), डह (दशन), डिठो (दृष्ट) इत्यादि. हिंदी-पंजाबीमधील रूपें जवळ जवळ जवळ अशींच आहेत. दन्त्य व ओष्ठ्य वर्णांच्या उच्चाराबाबत विशेष उल्लेखनीय असे फरक नाहींत. अन्तस्थ उच्चारांपकीं ‘ य ’ आणि ‘ व ’ ह्या दोन उच्चारांतील फरक सारखेच आहेत. पंजाबी आणि हिंदी ह्या भाषांत ‘ य ’ चा बहुतेक ठिकाणीं ‘ ज ’ होतो. बंगाली आणि उरिया ह्या भाषांत ‘ य ’ चा ‘ ज ’ करतात, परंतु ‘ य ’ असाच लिहितात. ‘ यांजन ’ हा शब्द म. गु. सिं. ह्या भाषांत यांजन, पं. हिं. मध्यें जांजन व बं. उ. मध्यें ‘ जोजन ’ असा उच्चारून ‘ योजन ’ किंवा ‘ यांजन ’ असा लिहितात. ‘ व ’ हा गु. म. सिं. ह्या भाषांत ‘ व ’ असाच उच्चारिला जातो. पंजाबींत कधीं ‘ व ’ कधीं ‘ ब ’ उच्चारिला जातो.

हिंदी, बंगाली, उरिया ह्या भाषांत ‘व’ चा उच्चार ‘ब’ असा करतात. हिंदीमधील उच्चार थोडा कां होईना पण सैल आहे. परंतु बंगाली व उरिया मध्यें ‘ब’ हा उच्चार कटाक्षानें करतात. ‘र’ ह्या वर्णाच्या उच्चारांत कांहीं फरक नाहीं. ‘ल’ ह्या वर्णाच्या उच्चारांत पुनः बंगाली व उरिया ह्या भाषांत फरक दिसून येतो. कधीं ‘ल’ तर कधीं ‘न’ असे त्याचे दोन उच्चार होतात. त्या भाषांत लिहितात ‘ल’ आणि उच्चारतात ‘न’, असा इतका घोटाळा ह्या दोन वर्णांबाबत आढळून येतात.

अन्तःस्थ उच्चारांनंतर ऊष्म वर्णांच्या उच्चाराचा विचार येतो. पंजाबी भाषेनें ऊष्म उच्चारांपैकीं ‘श’ आणि ‘ष’ हे दोन्ही नाहींसे करून एकच ‘स’ हा उच्चार कायम ठेविला आहे. सिंधी भाषेंत जवळ जवळ तोच प्रकार आहे. ‘ष’ हा उच्चार तर नाहींसाच झाला आहे. ‘श’ हा उच्चार कांहीं ठिकाणीं, विशेषतः व्यापाऱ्यांच्या लेखनांत आढळतो. पण तेथेंहि त्याचा उच्चार मात्र ‘स’ असा होतो. पूर्व हिंदी भाषेंतहि हीच पद्धत अवलंबिली जाते. ह्या सर्व भाषांत ‘ष’ हा उच्चार नाहींसाच झाला आहे. हें अक्षरहि ‘ख’ चा उच्चार दाखविण्यासाठीं वापरतात. ‘श’ हें अक्षर ‘स’ हा उच्चार दाखविण्यासाठीं वापरतात व त्याचा उच्चार ‘स’ असाच करतात, बंगाली भाषेंत तिन्ही ऊष्म्यांचा उच्चार ‘श’ असा करतात. ‘सकल’ हा शब्द शॉकॉल असा, ‘षष्ठ’ हा शब्द शॉश्ठ असा उच्चारतात. उरिया भाषेंत हीच पद्धत आढळते. गुजराती भाषेंत ‘श’ च्या ऐवजीं ‘स’ उच्चारण्याकडे विशेष कल आहे. ग्रामीण भाषा व सुरतकडील प्रांतिक भाषा ह्यात तर ऊष्मत्व नाहींसें करून त्याच्या ऐवजीं ‘ह’ उच्चारण्याची प्रवृत्ति आढळून येतें. पंजाबीमध्येंहि हीच प्रवृत्ति आहे. तत्सम शब्द अगदीं मूळ संस्कृतप्रमाणें उच्चारतांना ह्या सर्व भाषिकांमध्यें घोटाळा उडून जातो व पुनः मूळ उच्चार साधत नाहीं तो नाहींच.

अनुनासिक वर्णांच्या उच्चारामध्यें पडलेले फरक उल्लेख करण्यासारखे आहेत. ‘ङ’ आणि ‘ञ’ हे दोन उच्चार गुजरातीमध्यें नाहींत. हिंदी भाषेंतहि हे उच्चार नाहींत. त्यामुळें ही अक्षरेंहि त्या भाषांत आढळत नाहींत. सिंधी भाषेंत मात्र कंठ्य व तालव्य अनुनासिक हे दोन्ही उच्चार आहेत. सिङु (शिंग), अङणु (अंगण), अङरु (अंगार) ह्या शब्दांतील कंठ्य अनुनासिक स्पष्टच आहे. तसाच कञा (कन्या), धाञु (धान्य), वञणु (वञ्चनम्) ह्या शब्दांतील अनुनासिक उच्चार तितकासा स्पष्ट तालव्य नाहीं, त्या वर्गांतील तो अनुनासिक अन्तःस्थ उच्चारासारखा आहे.§ ‘ण’ ह्या अनुनासिकांच्या उच्चारांत फारसा फरक नाहीं. त्याचा आणि ‘न’ चा घोटाळा उडतो. पण दोन्ही उच्चार स्पष्ट निराळे असे बहुतेक भाषांत उच्चारले जातात. पंजाब व संयुक्त प्रांत ह्या दोन प्रांतांत फारशी उर्दू भाषांच्या विशेष संपर्कामुळें ‘ण’ हा उच्चार नरमावून गेला आहे. कधीं कधीं तर नुसता एकटा ‘न’ हाच सर्व अनुनासिकांचें कार्य करतो. सिंधी भाषेंत ‘ण’ हा उच्चार विशेष स्पष्ट आहे. तो ‘ऋ’ ‘ण’ असा कांहींसा उच्चारिला जातो.

५९ संयुक्तवर्णोच्चार : संयुक्तवर्णांच्या उच्चाराबाबत अर्वाचीन भारतीय भाषांचा कांहीं स्वभावविशेष दिसून येतात. संस्कृत भाषेपेक्षां अर्वाचीन भारतीय भाषांत संयुक्त वर्णांचें प्राचुर्य व प्रकार अधिक आहेत. संस्कृतमध्यें संधीच्या नियमाप्रमाणें कांहीं विशिष्ट संयुक्तवर्णच आढळून येतात. संयुक्त वर्णांतील दोन्ही वर्णांच्या उच्चारांचा मेळ येण्यासाठीं एक वर्ण दुसऱ्या वर्णाच्या स्वभावधर्माप्रमाणें बदलला जातो. कठोर वर्णांचें मृदुवर्ण होणें, ‘स’ चा ‘त’ होणें ‘न्’ अनुस्वार व विसर्ग होणें, वगैरे जे बदल होतात ते सापेक्ष आहेत. अर्वाचीन बोलींत संयुक्त व्यंजनाबाबत संस्कृतपेक्षां अधिक स्वातंत्र्य आहे. त्यांत पुनः मध्य व अन्त्य ‘अ’ हा स्वर निभृत झाल्यामुळें तर पुष्कळ वर्णांचें विचित्र असे संयोग अर्वाचीन बोलींत आढळून येतात. गेल्तों (गेलों+होतों), सर्कार, दर्बार, लग्ता (लगता), बीज्का (बीजका), भिज्का, बुज्रा (बुजरा), अशीं संयुक्तवर्णाचीं विचित्र उदाहरणें नेहेमीं पुष्कळ आढळतात. ह्या सर्व भाषा बोली असल्यामुळें असलीं उदाहरणें पदोपदीं आढळलीं व अधिक प्राचुर्यानें आढळलीं तर तें स्वाभाविकच आहे. ही प्रवृत्ति सर्व अर्वाचीन भाषांत आढळते.

हा त्यांचा विशेष स्वभाव झाला व तोहि तद्भव संयुक्त वर्णांच्या पुरताच सांगितला. तत्सम संयुक्त वर्णांच्या उच्चाराबाबत होणारे फरकहि त्या त्या अर्वाचीन

---

§ J. Beames : *Comp. Gr. M. A. Languages*, p. 78.

भाषेंत कांहीं कमी नाहींत. 'स्मरण' हा शब्द बंगालीमध्यें 'श्मॉरॉन' असा, 'लक्ष्मी' शब्द 'लॉख्खी', 'पद्म' शब्द 'पॉद्द' असा उच्चारिला जातो. 'कृष्णा' व 'विष्णु' हे शब्द बंगाली व उरिया ह्या भाषांत उच्चारतांना 'ण'च्या ऐवजीं 'ट' हा वर्ण मध्यें येतो. बंगालीमध्यें पुनः शेवटीं अनुस्वार येतो. 'कृष्णा' व 'विष्णु' हे शब्द बंगालीमध्यें अनुक्रमें 'कृष्टं' आणि 'बिष्टुं' आणि उरियामध्यें 'कृष्टो, बिष्टो' असे उच्चारिले जातात. वैष्णव शब्दाचे तर 'बॉश्नॉब, बॉइश्टनॉब, बस्ताब, बस्ताम्' इतके भिन्न उच्चार आहेत. सिंधी भाषेंत 'ग, ज, ड, ब,' हे वर्ण इतर भाषांहून अगदी निराळ्या उच्चारांनीं वावरतात. त्यांचे उच्चार 'ग्ग, ज्ज, ड्ड, ब्ब' असे द्वित्त आहेत.

सर्व अर्वाचीन भारतीय भाषांत शब्दोच्चाराच्या बाबत आघाताचें तत्त्व अमलांत आहे. शब्दोच्चारामध्यें फरक आघातामुळें होतात. शब्दांतील उपान्त्य वर्ण जोरानें उच्चारिला जातो. त्याचा परिणाम त्यांतील स्वर दीर्घ होण्यांत होतो आणि उपान्त्य स्वर दीर्घ झाला कीं अन्त्य स्वराचा लोप होतो. 'रथ, गत, मदन, कब,' हे शब्द मराठींत 'रऽथ, गऽत, मदऽन, कऽब' असे उच्चारिले जातात. 'तीळ, गूळ, गूण, वीष, जात' ह्या शब्दांच्या उच्चारांतहि फरक झाला आहे. हा प्रकार मराठी, हिंदी, गुजराती ह्या भाषांत आढळून येतो. सिंधीमध्यें मात्र मूळ संस्कृतमधील उच्चार कायम ठेवण्याकडे प्रवृत्ति आहे. संस्कृतमधील 'आ, इ, ई, उ' हे इतर भाषांत 'अ' कारान्त होतात. सिंधीमध्यें मूळ उच्चार कायम ठेवण्याकडे प्रवृत्ति आहे. 'रासि, जाति, रीति' हे शब्द सिंधीमध्यें 'राहि, जाति, रीति' असे उच्चारिले जातात.

'अभाआ' भाषांचे आणखी पुष्कळ स्वभावविशेष उल्लेख करण्यासारखे आहेत. ते आम्हीं ठिकठिकाणीं कोशांत निर्देशिले आहेतच. परंतु त्यांतील बरेच तपशिलांसंबंधीं आहेत. असें कांहीं स्वभावविशेष जरी आपण निर्देशिले तरी त्यांना अपवाद म्हणून कांहीं उदाहरणें आढळतील, नाहीं असें नाहीं. कारण ह्या सर्व अर्वाचीन भारतीय आर्य भाषा सध्यां प्रत्यक्ष बोलींच्या स्वरूपांत आहेत. त्या रोजच्या व्यवहारांत प्रत्यक्ष बोलल्या जातात. परस्पर दळणवळणामुळें त्यांच्यावर इतर सन्निवर्ती भाषिकांच्या उच्चारांचा परिणाम होत आहे. अशा परिस्थितींत भाषेच्या जिवंतपणामुळें उच्चारांच्याबाबत जर कांहीं क्वचित् परस्परविरोधी उदाहरणें आढळलीं तर नवल नाहीं.

६० 'अभाआ'चे स्वभावविशेष : अर्वाचीन भारतीय भाषांपैकीं प्रत्येकींतील कांहीं निश्चित असे स्वभावविशेष वर दिले. परंतु सर्व अभाआ भाषांना सामान्य असे कांहीं विशेष संस्कृतप्राकृत भाषांच्या द्वारां प्राप्त झाले असलेच पाहिजेत. भाषांच्या उत्क्रांतीच्या किंवा परिणतीच्या अवस्थेंत हें होणें अटळ आहे. तत्सम शब्द संस्कृतमधून प्राकृतमध्यें येतांना प्राकृत भाषांच्यां स्वभावानुसार स्वरप्रक्रियेचे फरक त्यांत होऊन ते प्राकृतमध्यें तद्भव स्वरूपानें कांहीं काळ वावरले. प्राकृत अपभ्रंश भाषांच्या नंतरची भाषिक उत्क्रांतीची अवस्था म्हणजे अर्वाचीन भारतीय आर्य बोली होत. ह्या बोलींत ते शब्द येतांना त्यांच्या रूपांत आणखी कांहीं प्रक्रिया त्या त्या अभाआ. भाषांच्या स्वभावानुसार झाल्या. प्रत्येक अभाआ. बोलीच्या कांहीं विशिष्ट अशा स्वर प्रक्रियेच्यां लकबी वर सांगितल्या. आतां येथें सर्व अभाआ. बोलींना सामान्य अशा कांहीं लकबी आहेत त्यांचा निर्देश करतों. त्या लकबी ह्या*:–

(१) शब्दाच्या अन्त्य स्वराचा लोप स्थूल मानानें प्राकृत भाषांमध्यें होतो. हीच लकब अभाआ. मध्यें उतरली आहे. ह्याला कांहीं अपवाद आढळतात. ह्या अपवादात्मक उदाहरणांत अन्त्य स्वराचा कांहीं अवशेष राहिलेला आढळतो.

(२) उपान्त्य स्वराच्या उच्चारमात्रा कायम राखणें ही त्या शब्दांची दुसरी लकब आहे.

(३) उपउपान्त्य स्वराचा लोप; मात्र तो आद्य नसला पाहिजे. प्रथम ह्या उपउपान्त्य स्वराचा '**अ**' होतो व नंतर पुढील उच्चारांत तो मिसळून जातो,–चालू रूढ उच्चारांत विरून जातो.

(४) प्राकृत भाषांत ज्याप्रमाणें आद्य स्वर कायम राहतो तसाच तो अभाआ. मध्यें हि कायम राहतो.

(५) संयुक्त व्यंजनाचें एकेरी व्यंजन होणें ही प्रक्रिया पंजाबी भाषेखेरीज सर्व अभाआ. भाषांत होते. व ती होतांना मूळ संयुक्त व्यंजनाच्या उच्चारमात्रा कायम राखण्यासाठीं आद्य अवयवांतील स्वर दीर्घ होतो. ह्याला

---

* Dr. S. M. Katre : *Pr. Langs. their contri. to Indian Culture*, p. 75.

अपवाद फक्त सिंधी हीच तेवढी भाषा. तिच्यांत मूळ प्राभाआ. भाषेंतील स्वर कायम राहतो.

(६) स्वरप्रक्रियेंतील ह्या लकबीखेरीज प्रत्यय प्रक्रियेच्याहि कांहीं लकबी अभाआ बोलींत उतरल्या आहेत. विभक्तीचे प्रत्यय वापरून शब्दांचे परस्परसंबंध दाखविण्याच्या ऐवजीं विभक्तिप्रतिरूपक अव्ययें वापरून ते संबंध दाखविण्याची लकबहि अभाआ. मध्यें फार रूढ होत आहे. अपभ्रंश भाषांच्या अवस्थेंतच पुष्कळ विभक्तिरूपें नाहींशीं झालीं आहेत. सामान्यरूपाची उत्क्रांति त्याच काळांत पूर्ण झाली.

६१ मराठींतील वर्णप्रक्रिया : मराठीभाषेंतील विशिष्ट उच्चार मागें सांगितले. तसेच मराठी भाषेच्या इतर भगिनी भाषांतील उच्चारांतील कांहीं विशिष्ट लक्षणेंहि सांगितलीं. ह्या सर्व भाषा अर्वाचीन भारतीय भाषा असल्यामुळें ह्यांचा प्रत्यक्ष उद्गम मध्यकालीन भारतीय आर्य भाषांपासून झाला. पाली, प्राकृत, अपभ्रंश ह्या भाषा मभाआ ह्या वर्गांतील होत. ह्या मभाआ भाषा प्राचीन भारतीय आर्य भाषांपासून निघाल्या. वैदिक वगैरे भाषा ह्या प्राभाआ वर्गांतील होत. प्राभाआ मधून अभाआ पर्यंत शब्दांचा कांहीं प्रवास झाला आहे. ह्या एवढ्या दीर्घ कालाच्या प्रवासांत ह्या शब्दाचा उच्चारांत पुष्कळ फरकहि झाले. उच्चारांत झालेल्या फरकांचा परामर्ष आपणांस मराठीभाषेच्या दृष्टीनें घेणें जरूर आहे. प्रस्तुत कोशांत त्या त्या शब्दाच्या खालीं ते ते फरक निर्दिष्ट केलें आहेतच. त्या सर्वांचीं एकत्रित सूत्रबद्ध मांडणीच फक्त येथें करीत आहें. ह्या मांडणीनें मराठी भाषेचीं उच्चारलक्षणें अधिक स्पष्ट होतील. संस्कृत प्राकृत शब्द मराठींत येतांना कोणकोणते संस्कार घेऊन आले आहेत हें पाहाणें इतकेंच काम आहे. प्रथम आपण मराठींतील स्वरोच्चार घेऊन त्याचा उद्गम शोधण्याचा प्रयत्न करूं.

६२ स्वरोच्चार : स्वरोच्चारांपैकीं पहिला स्वर ‘अ’ हा आद्य व मध्य अवस्थेंतील देऊन तो ज्या संस्कृत वर्णपासून आला आहे ते दिले आहेत; व पुढें उदाहरणें दिलीं आहेत.

मराठी **अ** १ सं. प्रा. ‘अ’ ह्या स्वरापासून–अघास (अध्याश), अवाढव्य (अववृध्), अवगणें (अवगम्), अत्रकणें (अत्रक्).

२ सं. ‘ऋ’; प्रा. ‘अ’ पासून–कस (कृष्), आकडी (आकृष्टि).

३ सं. ‘आ’; प्रा. ‘अ’ पासून–गढ (गाढ्), असड (आसाद).

४ सं. ‘इ’; प्रा. ‘अ’ पासून–चाड (चांदि).

५ सं. उ; प्रा ‘अ’ पासून–आकल (आकुल), आघळ (आघूर्ण).

६ सं. ओ; प्रा. ‘अ’ पासून, कावळा (काकोल), काजवा (खद्योत).

७ सं. प्रा. ‘ए’ पासून–अकरा (एकादश).

फारसी भाषेंतील आद्य व मध्य ‘अ’ पासून व ‘इ’ पासूनहि ‘अ’ येतो. अनामत (अनामत), अफगाण (अफगान्), अफवा (अफवाह्), अत्तर (इत्र), अफराताफर (इफरात्), अनीना (इनान्).

कानडी—अढगु (अडगिसु), अडगल (अड्ड), अडकित्ता (अडके, कोइत्तसु), अड्डा (अट्ट).

इंग्रजी— अ, ॲ ह्या स्वरापासून मराठी ‘अ’ येतो. अपील, अडमिनिंस्ट्रेटर.

मराठी **‘आ’** १ सं. अ. आ; प्रा. आ पासून-आख (अक्षिन्), गांव (ग्राम), कापडी (कार्पटिक);

२ सं. आ; प्रा. अ. आक (अंकु), आग (अग्नि);

३ सं. ऋ; प्रा अ–माख (मृष्, मृज्), आहार (आहृ);

४ फा. आ–आउंदा (आयंदा), आखर (आखीर);

५ कान. अ, आ–आठाळ (अड्डुल), आडी (आड्ड), आढी (अडि, अडकु);

मराठी **इ** १ सं. इ; प्रा. इ.–चिंब (स्तिमित), इंगित (इंग), इडा (इडा);

२ सं. उ. प्रा. उ–उकिडवा (उत्कुट्टुक);

३ सं. ऋ; प्रा. इ. किणव (कृपा); जावइ (जामातृ), इट (ऋष्टि);

४ सं. ए. ऐ; प्रा. इ. शिराक (स्रेक), कुचिले (कुचैल);

५ सं. यि, वि. आवाई (आख्यायिका), इवल (विह्वल्), इख (विष);

६ फा. इ, इअ.–इजार (इझार), इतराज (इअतराज), इतबार (इअतबार), इतमाम (इहतमाम);

७ कान. इ–इडली (इड्डरिया);

मराठी **ई** १ सं इ; प्रा. इ–ई–जीक (जीव), पीठ (पिष्ट), पीळ (पीड);

२ सं. ॠ; प्रा. ई–दीठ (दृष्टी), सिरी (श्री);

३ सं व्य, य; प्रा. वी–विभिचारु (व्यभिचार) अतीतु (अत्यंत);

४ सं ए; प्रा. ए–अवीट (अवेष);

५ फा. ई–ईद (ईद);

६ कान. ई–ईड (ईळे);

ह्याशिवाय संस्कृत–प्राकृतमधील हि, भि, धि ह्या वर्णांपासून मराठी **ई** निष्पन्न होतो.

मराठी **उ**१ सं. प्रा. उ–उड (उड्डी), उचक (उत्स्कु);

२ सं. प्रा. अ, आ–हुळहुळ (व्हल् व्हल्); उखाणा (आहनस्या), उगारणें (अवगोरणम्).

३ सं. ऋ; प्रा. अ–उजु (ऋजु), कुरतुड (कृत्तृद्);

४ सं. प्रा. ओ. उ–रामु(रामो), विष्णु (विष्णो);

५ सं. प्रा. इ. बुंद (बिंदु); दुपार (द्विप्रहर). उंदीर (उन्दुर, इंदुर);

६ फा. उ–उजूर (उझ्र), उरुबरू (रू ब रू), उर्दू (उर्दू),

७ कान. उ–उखळ (उरलुकल्लु, वर कल्ल), उचट (उच्चु), उडीद, उडवा (उड्डी), उंड (उंडे), उप्पिट (उप्पुइट्ट), उडीद (उद्द).

ह्याशिवाय मराठी. ‘ उ ’ हा सं. प्रा. उ, अउ, हु, भु, इत्यादि वर्णांपासून सिद्ध होतो.

मराठी **उ** १ सं. प्रा. उ, ऊ–बीजू (विद्युत्), तांतु (तंतु), ऊब (ऊष्मन्);

२ सं. ऊ, ऋ; प्रा. ऊ.–भाऊ (भ्रातृ), पाऊस (प्रावृष्), ऊ (यूका);

३ सं. इ; प्रा. ऊ–ऊंस (इक्षु, उच्छु), ऊन (त्वीनम्, त्वानम्);

४ फा. उ–ऊर्फ (उर्फ);

ह्याशिवाय मराठी **ऊ** हा आद्य ‘ ओ ’ चा संक्षेप म्हणून व हु, भु, वु इत्यादि ऱ्हस्व व दीर्घ वर्णांपासून सिद्ध होतो. ‘ उ ’ च्या ऱ्हस्व व दीर्घ उच्चारांमध्यें तितकासा फरक केला जात नाहीं. उंट–ऊंट, उठ–ऊठ, उणखुण–ऊणखूण, उत–ऊत, उद–ऊद, उन्ह–ऊन ह्या दोहोंत फारसा फरक नाहीं.

मराठींत **ऋ, ॠ** हे दोन उच्चार रूढ नाहींत. त्यांचें मूळ शोधण्याची आवश्यकता नाहीं.

मराठी **ए** १ सं. प्रा. ए–शेत (क्षेत्र), देऊळ (देवकुल), एक (एक);

२ सं. अय, प्रा. ए–अतिशे (अतिशय);

३ सं. ऋ; प्रा. इ–केविल (कृपण), घेणें (गृण्ह्);

४ सं. अ, य; प्रा. ज–वळें (वलय), शेज (शय्या), येथें (अत्र);

५ सं. इ, ई; प्रा. ए–खेळ (क्रीड्), येथें (इत्थम्), एरु (इतर);

६ फा. इ, ए–एहसान (इहसान), एलची (ईल्ची), एलगार (एल्–इलगार);

७ कान. आ–ए–एडका (एड, आड्डु), ऐशेल (अळशीतेल); एलची (यालक्की), एळकोट (एलुकोट); हा मराठी उच्चार संस्कृत ‘ अक, अग, अज्ञ, अत, अद ’ इत्यादि वर्णांच्या संक्षेपानें प्राकृतमध्यें ‘ अ अ ’ होऊन त्यापासून येतो. याकाम, शिकाम, पेकाम व स्त्री भाषांमध्यें ‘ य ’ बद्दल ‘ ए ’ येतो. उदा व्यवहार, व्येथा.

मराठी ‘ **ऐ** ’ उच्चार संस्कृत प्राकृत ए, ऐ, आइ, आई व सघोष ऐ युक्त व्यंजनें ह्या वर्णांपासून आद्य, मध्य, व अन्त्य अवस्थांत सिद्ध होतो. तसाच फा. ऐ व आ पासून सिद्ध होतो. उदा–ऐन (ऐन्), ऐब (आयब्), ऐपत (आफियत), ऐवज (इवझ्; पेकाम–यैवज, यैवर्जी), ऐष (एष);

मराठी ‘ **ओ** ’ हा उच्चार १ सं. प्रा. ओ.–सोळा (षोडष), ओठ (ओष्ठ);

२ सं. औ; प्रा. ओ–मोती (मौक्तिक), जोड (यौट्);

३ सं अप, अव, उप; प्रा. उव–वोप (अर्पय), ओवरी (अपवरक), सोनें (सुवर्ण);

४ सं. अ, उ; प्रा. अ–ओझा (उपाध्याय), चोंच (चंचू), ओंचा (उत्संग);

५ सं. व–ओहमाय (वधूमातृ), ओहर (वधूवर);

६ कान. ओ-ओक (ओक्कारिसु), ओंड (ऑड्डु), ओली (ओली, ओल);

याकाम. मध्यें व अर्वाचीन ग्रामीणं व स्त्रीभाषांत ‘ ओ ’ चें रूप ‘ वो ’ असें आढळतें. वोळख, वोळग, वोपणें, वोरप, वोक अशीं शब्दांचीं रूपें आढळतात. सं. प्रा. अउ, अऊ, वो, यो, अप, अब्र, उअ, उव इत्यादि वर्णांपासून मराठी आद्य, मध्य व अन्त्य ‘ओ’ सिद्ध होतो.

मराठी ‘ **औ** ’ हा उच्चार सं. प्रा. ‘ औ, ओ, अव, अव, अप, उत् ’ पासून निष्पन्न होतो.

मराठी **औ** १ सं. प्रा. ओ औ–औषध (ओषघ), औदासिन्य, औद्योगिक, औरस्य;

२ सं. प्रा. अ–आउ औत (आयुध, आयुत), औक्षण (आयुष्मान्), औट (अर्धचतुर्थ);

३ फा. अर. औ–औकात (औकात्), औरत (औरत्),

४ इं. आउ–औंस.

मराठींतील स्पर्शव्यंजनांची प्रक्रिया पुढें क्रमानें मांडली आहे.

६३ व्यंजनप्रक्रिया-कंठ्य : मराठींतील कंठ्यवर्ण आद्य असतांना संस्कृत व प्राकृत कंठ्य वर्णांपासून निष्पन्न होतात. मध्य असतांना मात्र इतर वर्णांपासून निष्पन्न होतात. त्यांत संस्कृत संयुक्त वर्ण आहेत. फारसी भाषेंतील औरस्य कंठ्य वर्ण मराठींत येतांना त्यांचें औरस्यत्व नाहींसें होतें. ते शुद्ध कंठ्य होतात. इंग्रजी कंठ्य वर्ण मराठींत येतांना त्यांच्यांत कांहीं फरक होत नाहीं. द्राविडी कंठ्यवर्णांतहि कांहीं विशेष फरक होत नाहीं.

मराठी आद्य, मध्य व अन्त्य **क** हा सं. प्रा. क, ख, ग, च, ष, ह इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.

आद्य **क** १ सं. प्रा. क्–करणें (कृ–कर), काम (कर्मन्, कम्म), किडा (कीटक, कीडअ), केळें (कदलिकम, कअलिअम्);

२. सं. क्र क्क–केणें (क्रीणकम्, क्रयण), कोस (क्रोस), कोल्हा (क्रोष्टृ), कढ (क्वथ्), कढई (कटाह, क्वथिका), किलेश (क्लेश).

३ सं. प्रा. ख–काजवा (खद्योत);

मध्य **क** १ सं. क–सांकडें (संकट);

२ क्क–चिकण (चिक्कण), शिंक (छिक्का, सिंघ्), हकार (हक्कार);

३ क्य–सकणें (शक्), परकें (पारक्यम्);

४ क्र–चाक (चक्रम्), ताक (तक्रम्), वांक (वक्र);

५ ट्क–सक (षट्क);

६ त्क–उकर (उत्कर), उकड (उत्क्वथ्), उकल (उत्कल);

७ र्क–कंकर (कर्कर), माकड (मर्कट), साकर (शर्करा);

८ सं. ग, घ, ष, क्ष, ह–ठक (स्थग), शिंक (शिंघा), झक (झष);

९ कान. क. कच (कचु), कटाव (कद), कडबु

१० फा. क–कचेरी, कज्जा, कजाख;

आद्य **ख** १ सं. ख–खजूर (खर्जूर), खणणें (खननम्), खल (खल);

२ स्क–खांदा (स्कंध), खांब (स्कंभ्);

३ स्ख–खळणें (स्खलनम्);

४ क–खिला (कीलक), खुजा (कुब्ज);

५ फा. ख–खंजीर (खंजर), खबर, खजाना;

क–खमीस (कमीस, पोर्तु. कमीस),

६ कान, क–खंड (कडे), खचणें (कच्चु).

७ सं. क्ष–खर (क्षर), खवण (क्षपणक), खार (क्षार), खीर (क्षीर),

मध्य **ख** सं. ख, ख्य, ष, ष्क, क्ष, क्ष्ण, क्ष्म इत्यादि संस्कृत वर्णांपासून येतो. ख किंवा ख–अन्वित संयुक्त वर्णांपासून तो येणें हें साहजिक आहे. त्याशिवाय इतर जे वर्ण आहेत त्यामध्यें ष, क्ष हे वर्ण आहेत. ‘ ष ’ वर्णाचा ख नेहेमीं फार प्राचीन काळापासून होतो. क्ष मध्यें कच्या जोडीला ष हा वर्ण आहेच. तेव्हां क्ष्>क्+ष्>क्+ख्>ख् ह्या मार्गानें ‘ क्ष ’ची परिणति ख होते.

१ सं. ष–वीख (वीष);

१ सं. ख–सांखळी (शृंखलिका);

३ सं ख्य–वाखाणणें (व्याख्यान), लेख (लेख्य);

४ सं. ष्क–पोखर (पुष्कर), विखर (विष्कर);

५ सं क्ष–आंख (अक्ष), काख (कक्ष), चोख (चोक्ष), पेखणें (प्रेक्षणम्), रूख (वृक्ष);

६ सं. क्ष्ण–तीख (तीक्ष्ण);

७ सं क्ष्म–पाकळी (पक्ष्मन्);

आद्य **ग** १ सं. ग प्रा. ग; गणणें (गणनम्), गधडा, गाढव (गर्धभ), गंध (गंध), गवळी (गोपालक) गहिरा (गभीर),

२ सं. ग्र; प्रा. ग्य–गणणें, गांठ (ग्रंथि), गांव (ग्राम)

३ कान. ग. गवसणें (गवसविणें)

मध्य **ग**–अंगठा (अंगुष्ठ), पांग (ळा) (पङ्गुल), जग (जगत्),

२ सं. ग्य. ग्र. द्ग.–जोगा (योग्य), आगळा, (अग्रल), मोगरा (मुद्गर),

३ क : काग–डा (काक), बगळा (बक), मुगूट (मुकुट); ह्यावरून दिसून येईल कीं, मराठी मध्य ग संस्कृत ‘ ग ’ अन्वित संयुक्तवर्णांपासून निष्पन्न होतो.

ह्या संस्कृत संयुक्तवर्णाचा प्राकृतमध्यें **क** असा वर्ण होऊन त्यापासून मराठी ग सिद्ध होतो. संस्कृत क चा प्राकृत मध्यें ग नेहेमींच होतो. तोच मराठींत उतरला आहे.

आद्य **घ** १ सं, ग; प्रा. घ :-घर (गृह), घड (घट्), घडा (घट), घण (घन) घाम (घर्म), घाय,-व (घात),

कान., ग.-घ्रणा (गाण);

फा. घ-घम् (घम्)

मध्य **घ** १ सं. घ्र, घ; प्रा. घ्य-वाघ (व्याघ्र),

रेख, रेघ (रेखा),

मराठींतील आद्य 'घ' कधीं कधीं आद्य महाप्राण उच्चारामुळेंहि येतो. ही लकब फार प्राचीन आर्ययुरोपीय भाषांच्या काळीं सुद्धां होती. उदा. घेणें (गृह), घर (गृह),

वरील उदाहरणांवरून असें दिसून येईल कीं, मराठी कंठ्य व्यंजनें आद्य असोत किंवा मध्य असोत; तीं संयुक्त वर्णांपासून आलीं तर त्या संयुक्त वर्णांत कंठ्य उच्चारच प्रधान असल्यामुळें इतर वर्णांचा लोप होऊन प्रधान कंठ्य वर्णच कायम राहतो.

६४ तालव्यः मराठींतील तालव्य वर्ण संस्कृतमधील तालव्यवर्णापासून आले आहेत. इ, ए हे दोन्ही स्वर तालव्य असल्यामुळें ह्या स्वरांच्या मागें पुढें आलेल्या तालव्य वर्णांचा उच्चार शुद्ध तालव्य होतो. अ, उ, ओ ह्या स्वरांसंबंधीं मात्र तशी गोष्ट नाहीं. ह्या तालव्य उच्चाराबरोबर मराठींत दन्ततालव्य म्हणून दुसरा उच्चार आला आहे व तो ह्याच तालव्य वर्णांनीं दाखविला जातो. इ, ए हें दोन स्वर तालव्य असल्यामुळें त्याच्या पुढें मागें लगत आलेल्या तालव्य वर्णांचा उच्चार शुद्ध तालव्य असा होतो. अ, उ, ओ ह्या स्वराच्या पुढें मागें लगत आलेल्या तालव्य वर्णांचा उच्चार कधीं तालव्य तर कधीं दन्त्यतालव्य होतो. शब्दाच्या मध्यें आलेला तालव्य दोन्ही प्रकारचा होतो. उदाः चोंच, चोंच्यींत किंवा चोंच्येत, त्याचें (च्यें). साधारणपणें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं मराठींत तद्भव शब्दाच्या बाबतींत तालव्य उच्चारणच बहुशः आढळतें. तत्सम शब्दांतहि तितकेंच आढळतें. तत्सम शब्द अगदीं संस्कृत सारखे उच्चारले तर गोष्ट निराळी. दन्ततालव्य छ उच्चार मराठींत फारसा आढळत नाहीं. छ हा मराठींत च्छ असा लिहिला जातोच. तो संस्कृतचा परिणाम आहे.

आद्य **च** १ सं. **च**, च्च; प्रा. च. चक्वा (चक्रवाक), चित्ता (चित्रक), चवणें (च्यवनम्).

२ ह्याशिवाय सं. य, श, ष, च पासून-चुक (युच्छ);

मध्य **च** १ सं च : चंचल (चञ्चल), चोंच (चञ्चु) पांच (पञ्च), संचरणें (संचरण),

२ सं. च्च, च्य : उंच (उच्च), उचाट (उच्चाट), रुच (रुच्य),

३ त्य : साच (सत्य), नाच (नृत्य), येथचा (अत्रत्य);

४ र्च : आंच (अर्चिस्), कुंचा (कूर्च);

५ (नि) श्च : निचर, निचळ, निचिंत;

६ फा. च,-चादर (चादर), चाबूक, चुबा;

७ कान. च.-चिनका (चिण्ण), चिल्लीपिल्ली, चुलता;

आद्य **छ** १ सं. च, ष, श, छ : छेदणें (च्छिद्), छपन्न (षट्पंचाषत्), छकडा (शकट);

मध्य **छ** १ छ, छ, च्छ्व-उछ्वास (उत्श्वास), उछेद (उच्छेद);

३ त्स : उछाव (उत्सव);

३ फा. श, च,-छान (शान्), छाप (चापिदन्),

आद्य **ज** सं. **ज**,-जण (जन), जळ (जल), जाई (जाति), जाग (जागृ), जांग (जंघा), जाणणें (जाना-ज्ञा), जुना (जीर्ण);

२ ज्य : जेठ (ज्येष्ठ), जोशी (ज्योतिषिक);

३ ज्ञ, ज्व : जर (ज्वर), जाळ (ज्वाला), ज्ञान (जाण);

४ य : जमणें (यम्), जाणें (यानम्), जुई (यूथिका);

५ द्य : जोत (द्योत), जोतिबा (द्यौष्पिता);

मध्य **ज** १ सं. गांजा (गञ्जा), पाजर (पञ्जर), विजणा (व्यजन);

२ ज्ज : काजळ (कज्जल), लाज (लज्जा);

३ ज्ञ : पैज (प्रतिज्ञा);

४ ज्व : उजळ (उज्ज्वल);

५ ज्य, र्ज, य्य, र्य, ब्ज : वणजार (वाणिज्य); खाज (खर्जु), मॉंजर (मार्जार), आजा (आर्य), काज (कार्य), भाज (भार्या), शेज (शय्या), खुजा (कुब्ज);

६ द्य : आज (अद्य), उजविणें (उद्यापन), खिजणें (खिद्य), वीज (विद्युत्);

७ फा. झ, ग : जेर (झेर्), जुमान (गुमान), जिल्हा (झील), जिरे (झिरिह्), जास्त (झाइद्), जाहीर (झाहिर);

आद्य **झ** सं. ध्य, ध्व, क्ष, ज; प्रा. झ पासून—झक (झष्) सं. झगडा (संगर्त), झवणें (यंभ्, धव),

मध्य **झ** सं. ह्य, ध्य, क्ष; प्रा. ज्झ पासून–

कान. फा. ज. झड (जड), झनान, झगा (जुब्बा),

६५ **मूर्धन्य उच्चार :** आर्यभाषेंतील मूर्धन्य उच्चार दुसऱ्या कोणत्या तरी द्राविडीसारख्या भाषेंतून आले आहेत असें भाषाशास्त्रज्ञ समजतात. संस्कृतमध्यें मूर्धन्यीकरण ही प्रक्रिया सापेक्ष आहे. दन्त्य उच्चाराचें कांहीं विशिष्ट परिस्थितींत मूर्धन्यीकरण होतें. मूर्धन्यीकरण हें मूर्धन्य ऊष्मवर्णाच्या संयोगानें होतें. हा एक प्रकार होय. दुसरा प्रकार 'र'च्या किंवा 'ऋ'च्या संयोगानें दन्त्याचें मूर्धन्यीकरण होतें.

आद्य **ट** १ सं. प्रा. ट पासून. टक (टंक), टीप (टिप्), टोळ (टोलो);

२ सं. त; प्रा. ट–टाळी (तालिका), टाळू (तालु), टिळा (तिलक);

मध्य **ट** १ सं ट; प्रा. ट–कांटा (कंटक), घांट (घंटा),

२ सं. ट्ट ड्ड; प्रा. ट–कुटीण (कुट्टिनी);

३ कान. ट्ट, पोट (पोट्ट), होट (हाट्ट);

मध्य **ठ** १ सं. स्त, स्थ, र्थ–ठक–ग (स्थग), ठाण, ठाव (स्थान), ठी (स्त्री), ठुली (स्थूल), ठोंब (स्तंभ), साठी (सार्थें);

आद्य **ड** १ सं. प्रा. ड–डिंभ (डिम्भ), डाल (डल्ल), डोंगर (डुंगर), डोइ (डोओ);

२ सं. द; प्रा. ड–डाह (दाह), डुल, डोल (दोल), डावा (दक्षिण), डसणें (दंश), डोण (द्रोणी);

मध्य **ड :** १ सं. प्रा. ड–अंड, कड, कुंड, खांड, गंड, दंड, पिंढी, खोड;

२ सं. ट; प्रा. ड–आघाडा (आधाट), कवाड कपाट);

३ सं. ड्ड, र्द; प्रां. ड–उडी (उड्डी), वाड (वड्ड).

आद्य **ढ** १ सं. !; प्रा. ढ–ढांकण (ढंकणी), ढिला (ढिल्ल), ढेक (ढिक्क), ढेकूण (ढंकुणो);

मध्य **ढ** १ सं. र्ध; प्रा, ड्ढ : मुंढी (मूर्धन्), वाढ (वृध्), गाढव (गर्धभ);

मराठीमध्यें 'ण' आदि शब्द नाहीं. '**न**' च्या ठिकाणीं 'ण' चा उच्चार ग्रामिण अशिष्ट भाषेंत आढळतो. 'नारायण' शब्द 'णारायण' असा विचित्र रीतीनें उच्चारिलेला दैवज्ञ, यजुर्वेदी, घांटी भाषांत आढळतो. मध्य 'ण' चे शब्द कांहीं थोडे आहेत. कांहीं ग्रामनामांत विकल्पानें 'नेर' व 'णेर' अशीं दोन्ही रूपें आढळतात. उदा–अमळणेर,–नेर, पिंपळणेर, –नेर, बडणेर,–नेर. हा शब्द सं. नगर किंवा नीवर ह्या शब्दापासून आला असावा. मध्य 'ण' सं. प्रा. न, ण, र्न, ष्ण इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.

६६ **दन्त्य उच्चार :** ह्या उच्चारांच्या बाबत मराठीमध्यें फारसे फरक झाले नाहींत. दन्त्य वर्णानें संयुक्त असा वर्ण आरंभीं असेल तर त्याचा दन्त्य वर्ण होतो.

आद्य **त** १ सं, प्रा. त, त्र : तड (तरी), तण (तृण), ताव (ताप), तीनं (त्रीणि), तुट (त्रुट्), तोड (त्रोट्);

मध्य **त** १ सं. प्रा. त : आंत (अंतः), भितर (अभ्यंतर), सांवत (सामन्त);

२ सं. प्रा. त्त, क्त, प्त, त्न, त्र : उताणा (उत्तान), पांत (पंक्ति), सतरा (सप्तदश), सत्तर (सप्तति), सवत (सपत्नी), गोत (गोत्र), पूत (पुत्र), रात (रात्र);

आद्य **थ** १ सं. स्त, त्स, स्थ : थान (स्तन), थवा (स्तबक), थोडा (स्तोक), थेंब (स्तिम्), थाळी (स्थाली), थेर (स्थविर);

मध्य **थ** १ सं. र्थ, स्त, स्थ, न्थ च; प्रा. त्थ पासून –चौथ (चतुर्थ), थित (स्थित), पालथा (पर्यस्त), पोथी (पुस्तक), तेथें (तत्र), जेथें (यत्र), येथें (अत्र).

२ कान. त. थेर (तेर).

मराठी आद्य, मध्य, अन्त्य 'थ' हा सं. प्रा. थ, स्त, त, छ, स्छ, टठ, स, ह, ह्या वर्णांपासून निष्पन्न होतो.

आद्य **द** १ सं. द, द्र; प्रा. द, द्द पासून –दांत (दन्त) दहीं (दधिन्), द्रोण (द्रोणि);

२ सं. द्व. ध्व; प्रा. द्द पासून–दोन (द्वौ), दणदण (ध्वन् ध्वन्);

३ फा. द – दफ्तर (दफात);

मध्य **द** १ सं. द. पासून–मंद (मन्द), कुरुंद (कुरविन्द);

२ सं. द्द, द्ध, द्र, र्द; प्रा. द्द पासून–कुदाळ (कुद्दाल), साद (शब्द), मूद (मुद्रिका), हळद (हरिद्रा),कुदणें (कूर्दन), वादळ (वर्दूलिका), नीद (निद्रा);

आद्य **घ** १ सं. प्रा. ध पासून–धण (धन), धरणें (धरणम्),

१ फा. कान. द.–धड्ड (दड्ड), धमामा (दमामा), धाबळी (दप्प);

मध्य **ध** १ सं. द्ध, ग्ध, ब्ध, ध्र, ध, न्थ, ग्ध; प्रा. ध्ध पासून – अंधार (अंधःकार), उधर (उद्धृ), दूध (दुग्ध), लाध (लब्ध), गीध (गृध्र), यूध (युद्ध),

आद्य **न** १ सं. न, न्य, स्न. ज्ञ; प्रा. न, ण पासून– नई (नदी), नाथी (नास्ति), नातें (ज्ञातीयम्), नहाण (स्नान)

२ फा. न–नखुदा (नाखुदा), नफर, नफा, नमाज, नमूद, नरम;

३ कान. न–निगर (निगरिसु), नातें (निट्ठ).

मध्य **न** १ सं. ण्य, र्ण, ण्व; प्रा. ण्ण पासून–रान (अरण्य), कान (कर्ण);

२ सं. क्ष्ण, ष्ण, क्ष, स्न; प्रा. ण्ह – लहान (श्लक्ष्ण), कान्हा (कृष्ण), पान्हा (प्रस्नव);

३ सं. न्न, न्य, ज्ञ, म्न; प्रा. न्न, ण्ण – ऊन (उष्ण), मान (मन्या), विनंति (विज्ञप्ति);

ह्याशिवाय सामान्य रीतीनें आद्य, मध्य, अन्त्य ‘ न सं. प्रा. न, ण, ड, ञ, म, द, ल, इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो. न, ण विपर्यय ह्या सदरांत ‘ न ’ ह्या वर्णांच्या प्रक्रियेचा विचार केला आहे तो पाहावा.

६७ ओष्ठ्य उच्चारः ह्या वर्गांतील वर्णांची प्रक्रिया पुढील प्रमाणें आहे.

आद्य **प** १ सं. प, प्ल; प्रा. प्प पासून–पड (णें) (पतन), पाव (पाद), पूत(पूत्र), पोथी (पुस्तक), पहिला (प्रथम), पाखल (प्रक्षाल), पाझरणें (प्रक्षर), पी (प्लीहा);

२ फा, कान. प-पडदा (पर्दा),पडतोरा (पडित्तौरे);

मध्य **प** १ सं.प प्य, त्म, र्प, ल्प; प्रा. प्प पासून– चापा (चंपक), पिंपळ (पिप्पल), रूपें (रूप्य), ऊपज (उत्पद्य), उपड (उत्पत्), आपण (आत्मन्), कापड (कर्पट), कापूर (कर्पूर), कापूस (कार्पास) शिंपी (शिल्पिन्);

आद्य **फ** १ सं. फ, स्फ, स्फ, प, स्फ्य; प्रा. पासून– फास (पाश), फळ (फल), फाग (फल्गु), फांदणें (स्पदन), फावडा (स्फ्यीति),

१ फा. फ –फक्त, फजीत, फकीर, फक्ते, फत्तेमार (पाईतमार);

मध्य **फ** सं, ष्प, त्फ, ल्फ; प्रा. प्फ पासून– वाफ (बाष्फ), उफणणें (उत्फण), उफळ (उत्फुल्ल), गोफ (गुल्फ), आफळणें (आस्फलन).

आद्य **ब** १ सं. प्रा. ब, ब्र, द्र, व–बगळा (बक), बुझणें (बुध्य–)–बेल (बिल्व), बामण (ब्राह्मण);

२ सं उप; प्रा. उव; बैसणें (उपविश);

३ फा. कान. बखर, बखळ, बकाणा (बौकण);

मध्य **ब** १ सं. म्ब, म्ल, म्र; प्रा.म्ब, उंबर (उदुम्बर), कांबळा (कम्बल), आंब (अम्ल), (तांब ताम्र);

फा. ब : बद, बदाम, बदमाश, बतेला, बन्दूक.

कान. ब : बुचका (बागसी), बुरगुंडा (बुरगे), बुदला (बुद्दणार);

आद्य **भ**, सं. भ, भ्र, ब, म्ह, प्रा. भ पासून–भात (भक्त), भें (भय), भट्टा (भ्रष्ट), भंवई (भ्रूमई), भाणवस (महानस);

२ कान. ब–भकाट (बक्क), भणंग (बणगु), भल्या (प्रभात);

मध्य **भ** सं. र्भ, भ्र, भ्य, ह्व; प्रा. ब्भ पासून–भोंक (बोक्क), गाभ (गर्भ), दाभ (दर्भन्), लाभ (लभ्य), भितर (अभ्यंतर), जीभ (जिव्हा);

आद्य **म** १ सं. म, म्र, म्ल; स्म; प्रा. म : मन (मनस्), मेंड (म्रेड);

२ फा. म – मखमल, मक्ता, मखलाशी, मगज, (मग्ज);

३ कान. म : मात (मातु), मागें (मग्गल);

मध्य **म** १ सं. न्म, म्य, र्म, ल्म; प्रा. म्म : आम्ही (अस्मे);

२ स. ष्म, श्म, स्म, क्ष्म; प्रा. म्ह.–गीम (ग्रीष्म), मसण (स्मशान), धामा (धार्मिक), काम (कर्मन्), माखणें (म्रक्षणम्), बामण (ब्राह्मण).

६९ अन्तःस्थ : आद्य **य** १ सं. ए, अ, इ, य; प्रा. ए : पासून येणें (आया), येर (इतर).

२ कान. य, ए : यल्लमा, यळकोट (एळकोट), फा. आ, यार (आयर).

मध्य **य** १ सं. क्, ग्, ज्, त्, द् ह्यांचा लोप झाल्यानंतर द्विस्वरसंधि टाळण्यासाठीं मध्यें 'य' येतो.

मण्यार (मणियार), पंड्या (पंडित), प्यार (प्रियकर);

२ फा. आ. अ-आयना, कायदा, फायदा.

आद्य **र** १ सं. प्रा. र पासून-रंग (रङ्ग), रडणें (रटणम्), रती (रक्तिक);

सं. वृ, ऋ; प्रा. र पासून-रुख (वृक्ष), रीण (ऋण);

१ फा. र.-रईस, रक्कम, रक्तखाना, रकाना;

२ कान. र. रकटें (रट्ड);

मध्य **र** १ सं. र; प्रा. र पासून- अंतर (अंतर), उकर (उत्कर), उतर (उत् + तृ), उंबर (उदुम्बर), ओवरी (अपवरका);

२ सं. र्ह-जर, तर (यर्हि, तर्हि), गाऱ्हाणें (गर्ह्);

३ सं. द-अकरा, बारा, तेरा, सत्रा इत्यादि शब्दांतील 'र' हा सं. द (दश मधील) पासून आला.

४ सं. र्य.-वीर (वीर्य), धीर (धैर्य), पारोसा (पर्युषित), मेर (मर्यादा);

आद्य **ल** १ सं. ल-लसण (लशुन), लहु (लघु), लोहार (लोहकार);

२ सं. न; प्रा. न-लिंब (निंब), लोणी (नवनीत);

३ सं. ड; प्रा. ड-लेकरूं (डेक्क);

४ फा. ल-लंगर (लङ्गर), लगाम (लिगाम), लबे;

५ कान. ल-लुकण, लेक (लेक), लोळी (लूली);

मध्य **ळ** १ सं. ल; प्रा. ल्ल-संलग्न, अस्वल (अच्छभल्ल), गाल (गल्ल);

२ सं. द्र, र्य; प्रा. ल्ल-साल (छल्ल), चेला, चिल्ल,

३ सं. ल्य; प्रा. ल्ल-बेल (बिल्व);

आद्य **व** १ सं. य, व्य, व्र; प्रा. व-वटणें (वृत्), वड (वट), वण (व्रण), वाखाण (व्याख्यान);

२ सं. उप; प्रा. उव-वहाणा (उपानह्), वठाण (उपस्थान);

३ सं. ओ, औ; प्रा. ओ-वोखद (औषध);

४ फा. व.-वकर, वकल (वक्ल), वतन;

५ कान. ओ-वडार (ओड्डु), वाघ्या (वग्गे);

मध्य **व** १ सं. प, म; प्रा. व पासून-करवत (करपत्र), कुवा (कूप), कींव (कृपा), नांव (नामन्), गांव (ग्रामम्);

२ सं. व, र्व, व्य, म्-सव (सव्य), शिवणें (सीव्य); चावणें (चर्व्), डव (दर्वी);

७० ऊष्मवर्णोच्चार : संस्कृतमधील तीन ऊष्म उच्चार प्राकृतमध्यें येतांना त्यांची गल्लत होऊन त्यांपैकीं एकच राहिला. श, ष, स ह्या तिन्हीबद्दल एका प्राकृत मध्यें 'श' व दुसऱ्या प्राकृतमध्यें 'स' असे राहिले. मराठींत व इतर अभाआ.भाषांपैकीं कांहींत 'श' व कांहीं भाषांत 'स' आला. मराठींत एकच मूर्धन्य राहिला. भोंवतालच्या परिस्थितीप्रमाणें त्याचा 'श' व मूर्धन्य 'ष' उच्चार होतो.

- आद्य '**श**' १ सं. श, स्य, र्श; प्रा. स;

२ फा. श, स;-शकल, शब्बून, शंखजिरा (संगजिराहत्), शरम, शरबत, शर्थ (शर्त्), शेतखाना (सीहहत्खाना);

३ कान. श, स-शिकेकाई (शिगे), शेंदणें (सेदु).

मध्य **श** १ सं. क्ष, त्स; प्रा. च्छ;

२ सं. स्य, श; प्रा. स;

सामान्यतः सं. प्रा. श, ष, स्, क, छ, च्छ, त्य, स्य, त्स्-इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.

आद्य **स** १ सं. श, ष, स; प्रा. स पासून-सांवळा (श्यामल), सल (शल), सीस (शीर्ष), सकणें (शक), सहा (षष्), सांड (षंड), सक (षट्क).

२ फा. स-सकलात, सक्का, संगीन, सजा;

३ कान. छ-सजुगरा (छज्जे);

मध्य **स** १ सं. ष्य-दिसणें (दृश्य), वेसवा (वेश्या);

२ सं. ष्य, श्र.-पूस (पुष्य), आसरा (आश्रय).

मराठी आद्य, मध्य, अन्त्य **स** हा सं. प्रा. निरनिराळ्या वर्णांपासून निष्पन्न होतो. श, ष, स, र्श श्र, श्य, ष्य, स्य, स्र, स्ल, श्व, र्ष, क्ष, च्छ, स इतक्या वर्णांपासून मराठींत आला आहे. ज्याअर्थी इतके वर्ण त्या उच्चाराच्या मुळाशीं असलेले दिसतात त्याअर्थी ऊष्मवर्णांचा उच्चार प्राकृत भाषांत निश्चित नव्हता व तीच प्रवृत्ति मराठींत आली असें सिद्ध होतें.

७१ महाप्राणोच्चार : दोन स्वरांच्यामध्यें असलेल्या जुन्या घोष महाप्राणांची विकृति झाल्यामुळें संस्कृतमध्यें 'ह' आला आहे. प्राकृत भाषांत दोन स्वरांमध्यें आलेल्या

महाप्राणव्यंजनांचें स्पर्शत्व नष्ट झालें आहे. ही विकृति वैदिक कालांतहि चालू होती.

मराठी आद्य **ह** १ सं. ह पासून – हणणें (हन्), हरण (हरिण);

२ सं. अ–हाण (अन्य), हंडी (भांड);

३ फा. ह–हंगाम, हकीगत, हक (हक़्);

४ कान. ह–हरळ (हरळु), हेंगाड (हेंगसु);

मध्य **ह** १ सं. श, स; प्रा. ह पासून,

२ सं. ख, घ, थ, फ, भ; प्रा. ह पासून–लिहणें (लिख), मेहुण (मिथुन), नाहो (नाथो), मेहुडा (मेघ), दहीं (दधिन्), गहिरा (गभीर), बहिरा (बधिर);

आद्य **ळ**–संस्कृत व मराठी मध्यें आद्य ‘ळ’ उच्चार नाहीं.

मध्य ‘**ळ**’ १ सं. ल; प्रा. ल पासून–अभिळास (अभिलाष), राऊळ (राजकुल), फळक (फलक);

२ सं. ट, ड, ल्य, र; प्रा. ल, ड, ल्ल, र पासून–होळी (होला), हेळ (हेड् , हेट्);

आद्य व मध्य **क्ष** सं. प्रा. क्ष् (क्+ष्) पासून सिद्ध होतो. क्षत्रिय, क्षपणक, क्षण, क्षिप्र-हे सर्व तत्सम शब्दच आहेत.

आद्य, मध्य **ज्ञ** हा सं. प्रा. ज्ञ् (ज् + ञ्) ह्यांच्या संयोगानें सिद्ध होतो.

७२ शब्दान्तर्गत वर्णप्रक्रिया : येथवर मराठी शब्दांतील वर्णांच्या उच्चाराबाबत होणारे फरक सांगितले. ते सांगतांना त्या त्या वर्णांचीं आद्य व मध्य (व अन्त्य) हीं तीन स्थानें आपण विचारांत घेतलीं. आतां शब्दांतर्गत स्थितींत वर्णांत होणाऱ्या फरकांचा विचार करूं. हे शब्दान्तर्गत फरक प्रामुख्यानें सापेक्ष फरक होत. संधि व वर्णसान्निध्य ही त्या फरकाचीं कारणें असतात. विश्लेष, व्यत्यास, अक्षरागम, अक्षरलोप, असवर्णापत्ति, समानवर्णपरिहार, गुण, वृद्धि, संप्रसारण, आघातामुळें झालेले फरक वगैरे ह्या प्रकारांत येतात. ह्या उच्चारप्रक्रिया मराठी भाषेच्या स्वभावविशेषाप्रमाणें होतात. परकी भाषांतील शब्द मराठींत येतांना मराठीच्या स्वभावविशेषाचा ठस्सा त्यांच्यावर बसून ते येतात. ह्यालाच त्या परकी शब्दांचें मराठीकरण असें म्हणतात.

ह्यांतील कांहीं प्रकारांचीं उदाहरणें मागें निरनिराळ्या सदराखालीं आलींच आहेत. येथें फक्त त्या त्या भिन्न विकृतिविशेषाचा निर्देश करतों, आणि जरूर तेथें उदाहरणें देतों.

१ सान्निध्यपरिणाम : व्यंजनें निकट आलीं असतां त्यांचा एकमेकावर परिणाम होतो.

१ मूर्धन्य आणि दन्त्य वर्णांचा संयोग झाला म्हणजे मूर्धन्य उच्चार जरा नरमतो. उदा. तट्तट्णें, वाटतो.

२ सारखेच वर्ण समोरासमोर आले म्हणजे वर्णांच्या घोषत्वावर परिणाम होतो. पुढच्या वर्णासारखा मागचा वर्ण होतो. उदा.—अधिकारी>आतकारी, अध्+पाव> आतपाव. अध्+शेर>अच्छेर; मध्यें+चा=मध+चा= मच्चा. धुकधुक>धुगधुग>,रोडगा>रोडगा.

३. कधीं कधीं दुसराच वर्ण तेथें येऊन उच्चारभेद होतो. उदा.—पंच+तीस=पसतीस, पंच=सष्ट (षष्टि)= पांसष्ट

४ कांहीं शब्दांत पुढील अक्षरांतील अवयवांचे परिणाम मागच्या अक्षराच्या उच्चारावर होऊन बदल होतो. मिरी (मरीच), वेल (वल्ली), ऐंशी (अशीति).

५ अक्षरसंयोगाचा एक परिणाम ‘ न ’ आणि ‘ र ’ जवळ आले असतां मध्यें ‘ द ’ येणें हा होय. हें एक वर्णागमाचें उदाहरणहि होऊं शकेल. उदा–वानर,–वान्दर, पंधरा (सं. पंचदशन्, प्रा. पण्णरह).

२ समानवर्णपरिहार (अक्षरव्यापत्ति) : दोन भिन्न अवयव संलग्न असून सरूपत्वामुळें एक दुसऱ्यावर आरूढ होतो त्यावेळीं हा फरक घडून येतो. उदा. एक+काम=एकामी, अव+विकणें=अवकणें, केकेत+ताड= केकताड, गुरें–राखी=गुराखी, नव+वर=नवरा, रिक्क (रिक्त)+काम=रिकामा, नाक+काटणी=नाकाटणी, जन्य+निवास=जानविसा, दीप+आवलि=दिवाळी, धुव+वणी=धुवण=धूण.

३ वर्णविपर्यय : उच्चारप्रक्रियेंतील हा एक चमत्कार आहे. शब्दांतील एका वर्णाचा उच्चार दुसऱ्या वर्णाच्या जागीं आला म्हणजे वर्णविपर्यय किंवा वर्णव्यत्यास होतो.ही प्रक्रिया उच्चाराच्या नियमानुसार होते. शब्दाच्या उच्चारांत एक प्रकारची गति असते; तोल असतो. हा तोल बिघडला कीं उच्चार बिघडतो. ‘ काळे राळे गोरे राळे ’ असे कठीण वर्णोच्चाराचे शब्द न थांबतां जलद उच्चारावयास सांगितले असतां तसे घाईनें उच्चारिले म्हणजे उच्चाराची फार मौज उडते. सर्व ‘ ळ ’ तरी, किंवा सर्व ‘ र ’ तरी, किंवा ते दोन्ही जाऊन त्यांच्या ऐवजीं ‘ य ’ असे उच्चारिले

जातात. असा उच्चारांत बिघाड कां होतो ? ह्याचें उत्तर म्हणजे उच्चाराचा तोल सुटतो व उच्चाराची घसरगुंडी सुरू होते. हा तोल तरी कां सुटतो ? त्या प्रयोगांत ळ, र, ळ, र, र, ळ अशा ह्या मूर्धन्य वर्णांची कर्कश व कठीण उच्चारांची परंपरा सारखी एकापुढें एक लागल्यामुळें उच्चाराचा तोल सुटला आणि उच्चाराची घसरगुंडी लागली.

उच्चारांतील हा तोल सर्वांच्या भाषेंत सुटलेला आढळतो. मुलांच्या व थोरांच्याहि उच्चारांत अशी घसरगुंडी होते. उदाहरणार्थ ‘कवडसा’ हा शब्द ‘कडवसा’ असा उच्चारतात. येथें ‘व’ आणि ‘ड’ ह्यांचा व्यत्यास झाला. ‘नुकसान’ हा शब्द ‘नुसकान’ किंवा लुसकान (ग्रामीण) असा उच्चारतात. येथेंहि वर्णविपर्यय झाला. ‘मशहूर’ पासून ‘महशूर’ ‘कुपल्’ पासून कुलुप, फाटक > फाकट,अगोदर > अदुगर,दोडका > दोकडा, तोकडा > तोडका हीं वर्णव्यत्यासाचीं उदाहरणें होत.

कधीं कधीं दोन उच्चारांपैकीं सोपा उच्चार अगोदर उच्चारण्याची प्रवृत्ति असते. वाराणशी–बानारशी–बनारस, लघु > लहु > हलूं; नवनीत > नअनीअ > नोनींअ > नोनी > लोणी; चिकटणें > चिटकणें; असे विपर्यय होतात. डोकसें–डोसकें, तिलक–टिकला, पडला–पल्डा, वराडला–वराल्डा, हीं ग्रामीण भाषेंतील व्यत्यासाचीं उदाहरणें होत. कांहीं उदाहरणांत ‘ह’कार हा आपली जागा बदलतो. उदा. लघु–लहु–हलूं; एकार्ध–एकाद्ध–एखादा; दुह्–धू (धार काढणें), तृष्णा–तण्हा–तहान; स्ना–न्हा–नहा–न्हा,–नहाण; उपानह–वाहणओ–वहाणा–अशीं रूपें निष्पन्न होतात. ह्या प्रत्येक जोडींतील उच्चारांत ‘ह’ उच्चाराचें स्थान पुढें मागें सरकलें आहे.

उच्चारांतील हा चमत्कार मराठी भाषेच्या आरंभापासून असलेला दिसतो. मराठीच्या पूर्वींच्या प्राकृत भाषांतहि असले वर्णविपर्यय होत होते असें कांहीं शब्दांवरून दिसून येतें. अशा उदाहरणांचा निर्देश हेमचंद्रानें आपल्या व्याकरणांत केला आहे. त्यानें दिलेल्या सूत्रांवरून ह्या उच्चारचमत्कारावर अधिक प्रकाक्ष पडेल.

वर्णविपर्ययाचीं हेमचंद्रानें नऊ सूत्रें दिलीं आहेत. करेणु वाराणस्योरणोर्व्यत्ययः (८-२१-११६), आलाने लनोः’ (-११७), ‘अचलपुरे चलोः’ (-११८), ‘महाराष्ट्रे हरोः’(-११९), ‘ह्रदेहंदोः (-१२०), ‘हरिताले रलोर्नवा’ (-१२१), ‘लघुके लहोः (-१२२) ‘ललाटे लडोः (-१२३), ‘ह्य ह्यो’ (-१२४) हीं तीं नऊ सूत्रें होत. ह्या सूत्रांत उदाहरणें देऊन कोणत्या दोन वर्णांचा विपर्यय झाला आहे ह्याचाहि निर्देश केला आहे. १ करेणु, २ वाराणसी, ३ आलान, ४ अचलपूर, ५ महाराष्ट्र, ६ ह्रद, ७ हरिताल, ८ लघुक, ९ ललाट, १० ह्यः हे हेमचंद्राचे दहा शब्द आहेत. ह्या दहा शब्दांत ज्या वर्णांचा विपर्यय झाला आहे त्यांच्या जोड्या मांडतोंः–

र–ण; ल–न; च–ल; ह–र; ह–द; र–ल; ल-ह; ल–ड; ह–य हे वर्ण बदलले आहेत. ह्यांत कांहीं वर्ण पुनः पुनः आल्यानें त्यांची संख्या अधिक झाली आहे. खरें पाहिलें तर र, ण, ल, न, च, ह, य, इतक्याच वर्णांचा विपर्यय वरील हेमचंद्राच्या उदाहरणांत झाला आहे. ह्यांत उच्चारविपर्यय स्वतंत्र रीतीनें झाला नाहीं. अमुक एक वर्ण अमुक एका वर्णाच्या संगतींत आला आहे म्हणूनच विपर्यय झाला. ही विपर्ययाची प्रक्रिया सापेक्ष स्वरूपाची आहे. त्यास दुसऱ्या एखाद्या योग्य वर्णाच्या सान्निध्याची किंवा साहचर्याची अपेक्षा असते. वरील वर्णांच्या जोड्यांतील वर्ण हे साहचर्यानें आले म्हणूनच त्यांचा विपर्यय झाला. रण, लन, चल, हर, हद, रल, लह, हय हीं वरील शब्दांतील वर्णसाहचर्यें होत. हे जे साहचर्यानें दोन दोन वर्ण एकाच शब्दांत जवळ जवळ आले व स्थानान्तर पावले ते वर्ण सूक्ष्म दृष्टीनें पाहिले तर उच्चाराच्या बाबतींत एकाच प्रकारचे आहेत असें आढळतें. तसेंच प्रत्येक जोडींतील दोन्ही वर्णांच्या उच्चारांचीं स्थानें एकच किंवा परस्पर जवळचीं आहेत असें दिसतें. ‘ण’ चें नरमावलेलें रूप म्हणजे न् आणि ल्. हे दन्त्यवर्ण असून उच्चारस्थान एकच आहे “रलयोः अभेदः; डलयोः अभेदः; नणयोः अभेदः” अशा प्रकारचे अभेद दाखविणारे कांहीं परंपरामान्य असे उत्सर्ग त्यांचें उच्चारसाम्य व उच्चारस्थानैक्य दाखवितात. त्यावरून असें दिसून येईल कीं व्यत्ययाची प्रक्रिया ज्यांवर घडते असे कांहीं विशिष्टच वर्ण आहेत. ही प्रक्रिया सर्व भाषांत होते. वैदिक भाषेंतहि होत होती, ह्याचें गमक म्हणजे ‘रज्जु, स्तोका, सिकता’ हीं उदाहरणें होत. इंग्रजींत वर्णविपर्ययाचीं उदाहरणें Through-Jhurb, Grass-Gaers, Horse-Hross. Bird-Bridd, Wasp-Waeps अशीं कांहीं आढळतात.

ह्या विवेचनावरून पुढील फलादेश निष्पन्न होतोः–

१ वर्णविपर्यय होणारे कांहीं विशिष्टच वर्ण आहेत. उदा-' र, ल ', ' न-ण, ' ' ड, ल, ' ' ळ-ड ' ' र-ण, ' ' स-क '.

२ ह्या वर्णांच्या उच्चारस्थानात विशिष्ट संबंध आहे. ज्यांचा उच्चार जवळ जवळ सन्निकृष्ट आहे त्या वर्णांचाच विपर्यय होतो.

३ विशिष्ट वर्णांचा विपर्यय कांहीं जातिक कारणांनीं होतो.*

७३ मराठींतील 'ण' 'न' उच्चार : मराठींतील हे दोन उच्चार विशेष चिन्त्य आहेत. महाराष्ट्रांतील कांहीं ठिकाणीं व कांहीं विशिष्ट जातींत ' ण ' बद्दल ' न ' व ' न ' बद्दल ' ण ' असे उच्चारांतील पालट होतात. महाराष्ट्रांतील सर्व प्रांतांतील कुणबी लोकांच्या बोलण्यांत हा बदल होतो. त्यांतहि सातारा जिल्ह्यांतील दक्षिण व पूर्व भागांत हा उच्चार विशेष आढळतो. कोंकण व देश ह्या ठिकाणच्या दैवज्ञांच्यामध्यें साधारणपणें चाळीस टक्के प्रमाणांत हा उच्चार आहे. नगर, सातारा, सोलापूर, खानदेश ह्या प्रांतात वसाहत करून राहिलेल्या शुक्लयजुर्वेदीय ब्राह्मणांच्यामध्यें स्त्री-पुरुष ह्या दोघांतहि अजमासें चाळीस टक्के प्रमाणांत हा उच्चार आहे. खेडेगांवांतील देशस्थ ब्राह्मणांपैकीं अजमासें पंचवीस किंवा तीस टक्के देशस्थांत हा उच्चार आहे. कोकणस्थ चित्पावन ब्राह्मणांमध्यें ही लकब आढळून येत नाहीं. सुशिक्षित मराठ्यांच्या मध्येंहि नाहीं. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं ' न ' च्या ठिकाणीं ' ण ' येण्याचा उच्चारविशेष हा महाराष्ट्रांत सर्व ठिकाणीं आहे. जवळजवळ सर्व लोकांत आहे. कधीं कधीं कमी शिक्षण म्हणून किंवा कमी संस्कृति म्हणून हा उच्चार त्या त्या लोकांच्या बोलण्यांत येतो. तेव्हां हा उच्चार स्थाननिघ्न नाहीं, ज्ञातिनिघ्न नाहीं व संस्कृतिनिघ्नहि पण तितकासा नाहीं.

बरें, ह्या उच्चाराच्या बाबत कांहीं नियम घालतां येईल असें पहावें तर तेंहि अशक्य आहे. ' सोनार ' हा शब्द ' षोणार ' असा कांहीं लोक उच्चारतात. तसेंच ' राजमान्य ' हा ' राजमाण्य ' असा होतो. ' अरण्य ' व ' पुण्य ' हे शब्द ' अरन्य ' व ' पुन्य ' असे उच्चारलेले आढळतात, आरंभींचा ' न ' हा ' ण ' होतो असें म्हणावें व त्याला ' णारायन ' व ' णमण ' हीं उदाहरणें द्यावीं तर ' निर्वाणी ' ह्या शब्दांत तो तसाच ' न ' राहिला आहे. ' ठिकान ' ह्या शब्दांत अन्त्य ' ण ' चा ' न ' होतो असें म्हणावें तर ' नमन, इमान, विमान ' ह्या शब्दांत अन्त्य ' न ' चा ' ण ' होऊन ते ' नमण, इमाण, विमाण ' असे उच्चारलेले आढळतात. ' पानी, लोनी, वानी, वाचनार, घेनार, देनार, ' हे शब्द तर नेहमींच्या परिचयाचे आहेत. ' राजकन्या ' ही ' राजकण्या ' होती तर ' पुण्य ' हें ' पुन्य ' होतें. तृतीयेचा प्रत्यय ' नें ' हा ' णें ' होतो. ' रामाणें, कारणाणें, प्रेमाणें ' ह्या शब्दांत ' ण ' कारान्त उच्चार होतो. ह्यावरून हें स्पष्ट आहे कीं ' ण ' ' न ' बद्दल ' न ' ' ण ' उच्चार येणें ह्याविषयीं निश्चित नियम बांधतां येत नाहीं. ग्रामीण भाषेंतील उच्चारांतील एक लकब म्हणूनच तिचा निर्देश करणें जरूर आहे.

१ ह्या उच्चारविशेषाचें प्राचीनत्व : ही लकब फार जुनी आहे. संस्कृत, प्राकृत ह्या भाषांच्या काळांत ही लकब लोकांच्या बोलण्यांत होती. पाणिनीनें ह्या प्रक्रियेचा निर्देश ' रषाभ्यां नोणः समानपदे ' (८-४-२३५) ह्या सूत्रांत केला. वार्त्तिककारानें " ऋ वर्णान्नस्यणत्वंवाच्यम् " ह्या वार्त्तिकांत ' ऋ ' ह्या स्वराचा निर्देश त्यांच्याबरोबर केला आहे. उच्चारस्थानाच्या दृष्टीनें जर पाहिलें तर ही प्रक्रिया होणें अपरिहार्य आहे. ' ऋ, ष, र ' ह्या वर्णांचें उच्चारस्थान मूर्धन् आहे. ह्या वर्णांच्या सान्निध्यांत जर ' न ' हा दन्त्य वर्ण उच्चारला तर मूर्ध्यापासून दन्त्यापर्यंत प्रवास जिभेला लगबगीनें करणें कष्टाचें होतें. व जीभ मूर्ध्याच्याजवळ घोंटाळतें आणि दन्त्य ' न ' हा मूर्धन्य ' ण ' असा उच्चारिला जातो. पाणिनीच्या ' णोपदेश ' धातूंच्या मुळाशीं हीच प्रक्रिया आहे. ह्याचा अर्थ इतकाच कीं हा ' ण-न ' व्युत्क्रम फार जुना आहे.

प्राकृत भाषांतहि ही लकब रूढ होती. ' न ' चा ' ण ' होणें हा माहाराष्ट्री भाषेचा विशेष हेमचंद्रानें ' नोणः ' (८-१-२२८) ह्या सूत्रांत निर्देशिला आहे. ' र, ष, ऋ ' ह्या वर्णांचें सान्निध्यहि प्राकृत भाषांनीं मानलें नाहीं. केव्हांही व कुठेहि ' न ' चा ' ण ' करणें हा माहाराष्ट्रीचा स्वभावच बनला. ह्याच्या उलट ' ण ' चा ' न ' करणें हा स्वभाव पैशाची ह्या प्राकृत भाषेनें उचलला. पैशाची भाषेचा हा स्वभाव हेमचंद्रानें 'णोनः'

---

* कृ. पां. कुलकर्णी, म. सा. पत्रिका, व. १२, अं. ७, पृ. १६२-६.

(८-४-३०६) ह्या सूत्रांत निर्देशिला आहे. माहाराष्ट्रीमध्यें ‘ण’ हा उच्चार ‘ण, न, ज्ञ, ल, म्न, त, र’ इतक्या सात निरनिराळ्या वर्णांपासून सिद्ध होतो. वर्ण, प्रत्यय व धातुपाठ ह्या तिन्हींमधील प्रक्रिया ‘ण’ प्रधान आहे. त्यावरून माहाराष्ट्री भाषेला ण-प्रधान प्राकृत भाषा असें म्हणतां येईल. तसेंच पैशाची भाषेंतील प्रक्रियेवरून तिला ‘न-प्रधान’ प्राकृत भाषा म्हणतां येईल. तेव्हां मराठी भाषेंत हा ‘ण-न’ चा होणारा व्युत्क्रम तिच्या जन्माच्या अगोदरपासून आहे. संस्कृत प्राकृत भाषांमधून तो मराठींत उतरला. माहाराष्ट्री व इतर प्राकृत बोलणारे समाज दक्षिणेंत महाराष्ट्रांत येतांना त्यांनीं ‘नो णः’ ची लकब मराठींत आणून सोडली. तसेंच पैशाची भाषा बोलणारा समाज दक्षिणेंत महाराष्ट्रांत स्थायी होतांना त्यांनीं आपली ‘णोनः’ ची उच्चाराची लकब मराठींत आणून सोडली.

आतां आधुनिक मराठींत आढळून येणाऱ्या ह्या ‘ण-न’ च्या व्युत्क्रमासंबंधीं कांहीं नियम निष्पन्न होतात किंवा नाहीं हें पाहूं. ह्यासाठीं कांहीं उदाहरणें तपासणें जरूर आहे. आद्य, मध्य, अन्त्य ‘ण’ काराचीं उदाहरणें प्रथम मांडतों.

१ आद्य ‘**ण**’ काराचे कांहीं परकी शब्द आहेत. मूळचे मराठी णादि शब्द नाहींत. उदा. णकशा, णोकर, णाहक, णिखालस, णाकबूल, णिखाल, णौबद, णजर, णजीक हे उच्चार ग्रामीण भाषेंतील आहेत. ‘ण’ हा जो ‘न’ च्या ऐवजीं येतो तो त्या त्या शब्दावरील आघातामुळें येतो.

२ मध्य ‘**ण**’–उदा. गणीमी, गणगट, मणगट, गर्णाळ, गांजणूक, मेहणत, जुणेर, झुणका, फणका, आणोळखी, दाणादाण, टाणाटोणा, अणोळखी, कणवाळू, घणघोर, घणवट,–तणाव, देणगी, टणचाई, फडणीस, जाणवर. हीं उदाहरणेंसुद्धां ग्रामीण भाषेंतील आहेत. शिष्ट भाषेंत ‘न’ मिश्र उच्चार आढळेल. ह्या व्युत्क्रमाचें कारणहि त्या त्या शब्दांतील ‘ण’ वरील आघात हें होय.

३ अन्त्य ‘**ण**’–उदा. वंगण, वखाळणी, कण्या, कोण, बटण, चाळण, गाळण, राण, गुण्हा, चपणा, चिमणी, चटणी, खूण, मकाण, फकिराणा, नजराणा, दाणा, तवाणा, कमाण, जाहिराणा, कुराण, दिवाणा, हैराण, सुकाणू, वैराण.

ह्या शब्दांच्या उच्चारांत आघात इतरत्र असला तरी शब्दाचा अन्त्य ठसकेदार रीतीनें उच्चारण्याच्या भरांत ‘न चा उच्चार ‘ण’ असा झाला. अशीं उदाहरणें आणखी पुष्कळ देतां येतील. ह्या विवेचनावरून पुढील नियम तयार होतीलः–१ आरंभीं असलेल्या आघातामुळें आद्य ‘न’ चा ‘ण’ होतो. २ मध्य ‘न’ वर आघात असेल तर त्या ‘न’ चा ‘ण’ होतो. ३ शब्दामध्यें उपान्त्य ‘आ’ असेल किंवा एखादा दीर्घ स्वर असेल तर ‘न’ चा ‘ण’ होतो.

‘न’ ‘ण’ ह्यांच्या व्युत्क्रमासंबंधीं हें विवेचन झालें. आतां ‘ण-न’ ह्याच्या व्युत्क्रमांचीं उदाहरणें व त्यावरून बनणारे नियम देतों.

१ आद्य ‘**न**’—नदी, नख्त, नक्षत्र, नख, नट, नगर, नम्र, नाडी, नाद, नार, नाव, न्हावी, निदान, निदिध्यास, नेवेद्य, नौका, नियम, निरोप, इ.

२ मध्य ‘**न**’—गनित, गनपती, मनगट, कनीक, गांजनूक, बामनीन, गुनानुवाद, कारखानीस, जमेनीस, पोतनीस हे सर्व ग्रामीण शब्द आहेत.

३ अन्त्य ‘**न**’–गुडदानी, गुजरान, रान, गान, गान्हान, मेव्हना, गुमान, गोनी, घोन, टिपान, छान, छबिना, जिवानु, मसान, किस्ना, इस्नु, म्हसन्या, इ.

ह्या तीन सदरांतील उदाहरणें तपासलीं म्हणजे असें दिसून येईल कीं :—

१ शब्दावरील आघात जसजसा मागें खेंचला जातो तसतशी ‘न’ हा वर्ण उच्चारण्याकडे प्रवृत्ति अधिकाधिक दिसून येते. तोच आघात जसजसा पुढें खेंचला जाईल तसतसा ‘न’ चा उच्चार अधिक जोरांत होऊन त्यांत ‘णत्व’ येऊं लागतें.

२ ‘ण’ च्या उच्चाराच्या बाबतींत ज्याप्रमाणें तालव्य किंवा ‘र, ष, ऋ,’ ह्या वर्णांच्या सान्निध्याची अपेक्षा असते, त्याप्रमाणें ‘न’ च्या निष्पत्तीस दन्त्य वर्णांच्या सान्निध्याची अपेक्षा असते.

३ स्वराच्या बाबतींत ‘उ, ओ, किंवा दीर्घ अ व ओ ह्या स्वरांचें सान्निध्य लाभलें तर ‘न’ कार उच्चारण्याकडे रोख असतो §.

---

§ कृ. पां. कुलकर्णी : म. सा. पत्रिका, व. ८, पृ. ५०४–५१४.

७४ अभाआ उच्चारविशेष-संख्याविशेषणें:- मराठींतील स्वरप्रक्रिया किंचित् विस्तारानें आतांपर्यंत विशद केली. स्वर व व्यंजनें ह्यांच्या आद्य व मध्य अवस्थांत होणारे बदल एका मराठी भाषेंतीलच फक्त मांडून दाखविले. असेच बदल मराठीसारख्या इतर अभाआ. भाषांत होतात. त्यांतील कांहीं बदल मराठीसारखे तर कांहीं त्यांहून भिन्न असून प्रस्तुत कोशामध्यें त्या त्या शब्दाखालीं ते दिले आहेत. त्यावरून सर्व भाषांत आढळणारी वर्णप्रक्रिया स्पष्ट होईल. परंतु सर्व अभाआ. भाषांतील वर्णप्रक्रियेचें थोडें आंतील सूक्ष्म दर्शन होण्याच्या दृष्टीनें फक्त एक पासून दहा संख्या दाखविणारे शब्द व कांहीं पुरुषवाचक सर्वनामें हे शब्द विस्तारानें मांडून दाखवितों. त्यांवरून सर्व अभाआ भाषांतील औच्चारिक परस्परसंबंध अधिक प्रतीत होतील. उच्चाराच्या दृष्टीनें त्यांचें वर्गीकरण करतां येणें शक्य आहे कीं नाहीं हेंहि कळेल. त्याचप्रमाणें अभाआ भाषांच्या प्रदेशांत समानोच्चारदर्शक रेषा (Isogloss) काढून सारख्या उच्चाराचा प्रदेश शक्य तर आपणास दाखवितां येईल. प्रथम संख्यावाचक शब्दांचीं रूपें मांडतों.

१ एक : ‘एक’ हा संख्यावाचक शब्द निरनिराळ्या अआभा. मध्यें निरनिराळ्या रूपांत उतरला आहे. त्यांत ‘**ए**’ आणि ‘**क**’ असे दोन वर्ण आहेत. पैकीं पहिला ‘**ए**’ हा वर्ण सं. पा. प्रा. गु. मै. बं. ओ. सिंह, व मराठी ह्या भाषांत ‘**ए**’ च राहिला आहे. हिंदीमध्यें त्याचा ‘**य**’ सिंधीमध्यें **हि** किंवा **इ**, पंजाबीमध्यें ‘**इ**’, पश्चिम पंजाबीमध्यें ‘**इ**’ व **हि,** काश्मिरीमध्यें ‘**अ**’ अशीं रूपें झालीं आहेत. मूळच्या ‘**ए**’ मध्यें कंठय (अ) व तालव्य (इ) ह्या दोन उच्चार मिसळलेले असल्यामुळें त्याचीं इतकीं रूपें झालीं. रूपांत प्रक्रिया होण्यास सुरुवात पाली प्राकृतांच्या काळानंतर झाली. कंठय व तालव्य हे दोन मिळाल्यामुळें कांहीं ठिकाणीं कंठय ‘**अ**’, ‘**इ**’ हे उच्चार आले व इतर कांहीं ठिकाणीं **इ, य, हि, ये,** हे उच्चार आले. साधारणपणें असें म्हणावयास हरकत नाहीं कीं पंजाबी, पश्चिमपंजाबी, काश्मिरी ह्या भाषांत पूर्ण व सिंधी, हिंदी ह्या भाषांत अपूर्ण असें उच्चारांतर झालें आहे. म. गु. मै. बं. ओ व किंचित् हिंदी ह्या भाषांत आद्य ‘**ए**’ कायम राहिला आहे. ह्यावरून असें स्थूल अनुमान निघतें कीं उत्तरेकडील भाषांत आद्य ‘**ए**’ बदलला व पूर्व व दक्षिण ह्या दिशांकडील भाषांत तो बदलला नाहीं. ग्रामीण व फार्शी भाषांत अनुक्रमें ‘**योक**’ आणि ‘**यक**’ अशीं रूपें होतात. दुसरा वर्ण ‘**क**’ हा सं. म. गु. मै. बं. ओ. हि. ह्या भाषांत ‘**क**’ च राहतो. इतर पा. प्रा. पं. व पपं ह्या भाषांत द्वित्त ‘**क्क**’ होतो. सिं. मध्यें त्याचा ‘**कु**’ होतो. ह्यावरून असें दिसतें कीं ज्या भाषांत आद्य दीर्घत्व राहिलें त्या भाषांत ‘**क**’ हा ‘**क**’ च राहिला. ज्या भाषांत आद्य ह्रस्वत्व आलें तेथें उच्चारमात्रांची संख्या त्या शब्दांतील कायम राहण्याकरतां ‘**क**’ चें रूपांतर द्वित्त ‘**क्क**’ मध्यें झालें. ह्या दुसऱ्या वर्णाच्या फरकाबाबतहि असें म्हणतां येईल कीं पूर्व, पश्चिम, दक्षिण ह्या दिशांकडील अर्वाचीन भारतीय आर्य बोलींत ‘**क**’ व उत्तर व वायव्य दिशांकडील बोलींत द्वित्त ‘**क्क**’ असे त्याचे फरक झाले.

‘एक’ ह्या एकट्या शब्दांत झालेले फरक व त्या फरकांची निरनिराळ्या अभाआमध्यें विभागणी ह्याचें स्वरूप सांगितलें. आंता संयुक्त शब्दांत त्याची अवस्था काय होते हें पाहूं.

‘एक’ शब्दानें बनलेले मराठी सामासिक शब्द पुढीलप्रमाणें आहेत:—अकरा, एकवीस, एकतीस, एक्केचाळीस, एक्कावन्न, एकसष्ट, एक्काहत्तर, एक्याएंशी, एक्क्याण्णव. ह्यांशिवाय एकोन-ण, एकूण, हे शब्द प्रथम येऊन बनलेले एकोणीस, एकोणतीस, वगैरे नऊ शब्द आहेत. शिवाय एकी, एकोत्रा, एकेरी, एकूण, एकुणात, वगैरे शब्द आहेत. ह्या शब्दाच्या घटनेंत विशेष लक्ष्य अशी प्रक्रिया कांहीं नाहीं. प्रक्रिया साधी व सरळ आहे. एक चीं रूपें एक, एक्क, एक्का, एक्क्या अशीं होतात. एक चें एक्क होणें हें केवळ आघातामुळें आहे. वरील एकेरी शब्दाच्या बाबतींत अभाआ. भाषांचे जे वर्ग पडले तेच वर्ग ह्या सामासिक शब्दांच्या बाबतींत पडतात. वरील सामासिक शब्दांपैकीं **एकोण** किंवा **एकूण** ह्या शब्दाची वर्णप्रक्रिया तेवढी चिन्त्य आहे. एकूण-एकोणचें प्राकृत रूप **औण** हें होतें व त्यापासून गु. **ओगण**; सिं. **उणि**; पं. **उन्न**; पपं. **उन्व**; हिं. **उन**; जु. हिं. **अगुन, गुन**; मै. **उन**; सिंह. **एकुन्**; का. **कुनवु.** अशीं रूपें उतरलीं आहेत. ह्या रूपांतील प्रक्रियेचा क्रम-एकोन > एकोण > एकूण > औण > अगुन > गुन > ओंगन > उन्न > उण > उन असा लागेल. एकोण

किंवा एकूण हें जुनें रूप मराठी व सिंहली ह्या दोन भाषांतच राहिलें आहे. संख्याविशेषणाच्या बाबतींत बऱ्याच वेळां मराठी आणि सिंहली ह्या भाषांत प्रक्रिया एकच होते त्याचें हें एक उदाहरण आहे. आणखी कांहीं उदाहरणें पुढच्या विवेचनांत येतील.

ह्या संख्याविशेषणाच्या रूपांत होणाऱ्या प्रक्रियांवरून अभाआ. भाषांचे स्थूल मानानें दोन वर्ग पडतातः-एक वर्ग पं. हिं. बं. आ. ओ. बि. ह्या भाषांचा व दुसरा वर्ग सिं. गु. म. सिंह. ह्या भाषांचा. ह्या दुसऱ्या वर्गांतही पुनः मराठी व सिंहली ह्या भाषाच तेवढ्या एक स्वतंत्रच प्रक्रिया अनुसरतांना आढळतात.

२ दोन १ सं. द्वे; पा. द्वे, दुवि; प्रा; दुवे; अप. दुइ; का. दोयी; पंप. दूई; आ. बं. उ. बि. दुई; सिं.दे.

२ सं. द्वे, द्वौ; प्रा. बे; अप. बी; गु. बे; सिं. दे.

३ सं. द्वौ; प्रा. दी; पंप, दो; पं. हिं. दो; का. दोयी.

४ सं. द्वा; पा. द्वा; प्रा. दोण्णी; म. दोन.

दोन ह्या संख्याविशेषणी शब्दाचीं हीं इतकीं रूपें होतात. अभाआ. भाषांतील निरनिराळया रूपांवरून हें स्पष्ट आहे कीं मूळ संस्कृत रूप चार निरनिराळया प्रकारांनीं विकृत झालें. मूळ संस्कृत शब्द तीन भिन्न रूपांत आढळतोः–द्वा, द्वे, द्वौ. प्राकृतमधील रूपांच्या मुळाशींहीं तीन भिन्न रूपें आहेत. अभाआ भाषांनीं ही तीन अंगें उचलिलीं. ह्या तीन अंगांपैकीं कोणत्या तरी एका अंगावरून त्या त्या भाषेंत रूप तयार झालें. कोणतें अंग कोणत्या अर्वाचीन भाषेनें स्वीकारलें हें वरील चार पंक्तींत मांडलेल्या रूपांवरून स्पष्ट होईल. वरील चार पंक्तींतील रूपांपैकीं तीन रूपें महत्त्वाचीं आहे. एकांत '**द**' उच्चार दुसऱ्यांत '**ब**' उच्चार व तिसऱ्यांत अन्त्य '**न**' उच्चार हे विशेष निर्णायक आहेत. '**ब**' उच्चार गुजराती भाषेंतच फक्त व अन्त्य '**न**' उच्चार फक्त मराठी भाषेंतच उतरला आहे. बाकीच्या भाषांत आद्य '**दो**' किंवा '**दु**' किंवा '**दे**' हे उच्चार व अन्त्य '**यी**' किंवा '**ई**' हे उच्चार उतरले आहेत. तेव्हां तीन भिन्न अंगांवरून भाषांचेहि तीन भिन्न गट पडतात. एका गटांत पपं, आ बं. ओ. बि. व किंचित् सिं. ह्या भाषा, दुसऱ्या गटांत गु. व किंचित् सिं. ह्या भाषा, व तिसऱ्या गटांत एकटी मराठी ही भाषा असे तीन गट होतात. आणखी एक पपं, हिं. का. ह्या भाषांचा गट पडतोसा दिसला तरी तो पहिल्या गटांत अंतर्भूत होण्यासारखा आहे. '**द, ब, न,** हे उच्चार प्राकृत अपभ्रंश भाषाच्या काळांतच (म्हणजे साधारणपणें इ. स. १ पासून ५०० पर्यंत) सुरू झाले असले पाहिजेत.

हें एकऱ्या दोन किंवा बे ह्या शब्दाबद्दल झालें. समासान्तर्गत येणाऱ्या त्याच्या रूपाचा विचारहि आपणास केला पाहिजे. बारा, बावीस, बत्तीस, बेचाळीस, बावन्न, बासष्ट, बहात्तर, ब्याऐंशी, ब्याण्णव इत्यादि सामासिक शब्दांत व बीज शब्दांत **ब** हें अंग उतरलें. दुवोदरशें (१०२), दुहोत्रा, दुप्पट, ह्यामध्यें 'द' हें अंग राहिलें. मराठी आणि इतर अभाआ. भाषा ह्या बाबत सारख्याच आहेत. 'दोन' ह्या अर्थाच्या एकेरी शब्दांत 'द' किंवा 'ब' हा उच्चार व सामासिक शब्दांत 'ब' हा एकच उच्चार अशी अवस्था आढळून येते.

ह्या सर्व विवेचनावरून हें स्पष्ट दिसून येतें कीं उत्तरेकडील सर्व अभाआ. भाषांचा एक वर्ग, गुजराती भाषेचा दुसरा वर्ग व मराठी भाषेचा तिसरा वर्ग असे तीन वर्ग पडतात. उत्तरेकडील सर्व भाषांत एकच उच्चारप्रक्रिया राहिली व दक्षिणेकडील दोन भाषांत दोन उच्चारप्रक्रिया उतरल्या असा साधारणपणें निष्कर्ष निघतो. ह्या उच्चारभेदाचेंहि विशिष्ट असें भौगोलिक क्षेत्र आपणांस ठरवितां येईल. उत्तरेकडील क्षेत्रांत एक विशिष्ट उच्चारप्रक्रिया 'द' अन्वित व दक्षिणेंकडील क्षेत्रांत 'ब' अन्वित किंवा 'न' अन्वित असे दोन भाग पडतात. एक, आठ व चार ह्या शब्दांच्या बाबतींत उच्चारभेदाप्रमाणें जसा क्षेत्रभेद ठरवितां आला तसा दोन ह्या शब्दाच्या बाबतहि ठरवितां आला.

ह्या स्वरप्रक्रियेचीं आणखी उदाहरणें आढळतात. '**द्वार**' ह्या शब्दाचीं प्रा. दार आणि बार अशीं दोन रूपें होतात. उत्तरेकडील भाषांत बार हें रूप रूढ आहे. मराठीमध्यें 'दार' हें रूप रूढ आहे. बारी, बारणूं, बारी (खिंड, भोंक), बारें (भोंक, दार) हीं रूपें मराठीतहि रूढ आहेत. परंतु हीं हिंदी सारख्या औत्तरीय भाषेंतून आलीं असावींत. 'द्वादश' पासून मराठींत बारा, बारस, बारसें असे शब्द उतरले. ह्यावरून मराठींतहि ही प्रक्रिया आढळते. सं. प्रा. '**द्व**' पासून कांहीं भाषांत 'द' व कांहीं भाषांत 'ब' असे वर्ण येण्याचें कारण म्हटलें म्हणजे त्या त्या भाषेच्या प्रांतात रूढ असलेल्या

प्राकृत भाषांतील उच्चारप्रक्रियेचा अवशेष हें होय. ‘द्व’ ह्या संयुक्त वर्णांतील जो वर्ण जोरांत उच्चारिला गेला त्या प्रमाणें तें रूप परिणत झालें. द्वार असा उच्चार केला कीं त्याचा परिणत शब्द दार असा उच्चार झाला, व्वॉर असा उच्चार केला कीं त्याचा परिणत शब्द बार असा झाला. ‘व्’ पासून ‘ब्’ होणें ही प्रक्रिया नेहमींचीच आहे. तिच्यांत ‘द्’ चा हातभार कांहीं नसावा.

३ तीन : १ सं. त्रि (त्रय, त्रीणि); पा. तीणि; प्रा. तिण्णि; बं. तीन; ओ. तिनि; हिं. तीन; पं. तिन्न; गु. त्रण; ने. तिन; म. तीन.

२ सं. त्रि (त्रय); प. पद्दा. त्रे; सिं. त्रे; पुस्तु. त्रे; दार्दिक. तीर;

‘तीन’ ह्या संख्यावाचक शब्दाच्या रूपांच्या बाबतींत अभाआ. भाषांचे दोन गट पडतात. एका गटाच्या भाषांतील शब्द सं. त्रीणि ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहेत व दुसऱ्या गटांतील शब्द सं. त्रि किंवा त्रय ह्या रूपांशीं संबद्ध आहेत. मराठी शब्द तीन असा असल्यामुळें ती भाषा पहिल्या गटांत पडते. पहिल्या गटांतील भाषांचें भौगोलिक क्षेत्र विस्तृत आहे. त्यांत फक्त अगदीं उत्तरेकडील म्हणजे पंजाबच्या पलीकडील प्रांत तेवढा येत नाहीं. पश्चिमेकडील सिंध प्रांतहि त्यांत येत नाहीं. मध्यदेश, पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या सर्व दिशांकडील प्रदेशांत ‘त्रीणि’ पासून उत्पन्न झालेलीं रूपेंच रूढ आहेत. त्रीणि हें रूप अनेक वचनी नपुंसकलिंगी असावेंसें वाटतें. पाली व प्राकृतनीं तेंच रूप उचललें. त्याचाच परिणत अंश ‘तीन, तिनि, तिन्न’ वगैरे रूपांत इतर अर्वाचीन भाषांत उतरला.

४ चार : ह्या शब्दाचा आद्य वर्ण **चा** व द्वितीय वर्ण **र** आहे. मूळ शब्द चतुर् असा आहे. प्राकृतमध्यें चत्तार, चत्तारी, चत्तारो व अप. मध्यें चारि असे शब्द होतात. ह्यांतील **चत्तारी** व **चारि** हीं रूपें कांहीं अर्वाचीन बोलींत उतरलीं. कांहीं भाषांत **चत्तार** हें रूप उतरलें. हिं. पं. गु. म. भाषांत चार हें रूप चत्तारपासून रूढ झालें. बं. ओ. बि. ह्या पूर्वेकडील व सिंधी ह्या पश्चिमेकडील भाषांत **चारि** हें रूप चत्तारी (चत्वारि) पासून उतरलें. हीं भिन्न रूपें उतरण्याचें कारण अर्थात् त्या त्या प्रांतांत असलेल्या भिन्न प्राकृतमधील भिन्न रूपें हें होय.

ह्या शब्दाच्या फरकाचें क्षेत्र हिं. पं. गु. म. भाषांचा उत्तरदक्षिण असा लांबट टापू हें होय. ह्याच्या पूर्वेस व पश्चिमेस ‘चारि’ ह्या फरकाचें क्षेत्र आहे. ‘एक व आठ’ ह्या शब्दांत होणाऱ्या फरकांचें जें क्षेत्र आपण ठरविलें त्याच्यापेक्षां ‘चार’ ह्यांतील फरकांचें क्षेत्र निराळें आहे. गुजराती व मराठी ह्या दोनच भाषा दोन्ही क्षेत्रांत येतात. सिंधी ही भाषा अजीबाद निराळी पडते.

चार (सं. चतुर्) ह्या शब्दाचे सामासिक शब्द चौदा, चो,-चौवीस, चौतीस, चवेचाळीस-चव्वेताळीस, चोपन्न, चौसष्ट, चौऱ्याहत्तर, चौऱ्यांशी, चौऱ्याण्णव असे होतात. ह्या प्रत्येकांत आरंभीं **चो** किंवा **चौ** हा वर्ण आहे. तो **चतुर्** ह्यापासून आहे. **चवेचाळीस** मधील चवे, चव्वे, हीं ‘चौ’ चीं रूपें आहेत. हाच फरक इतर अभाआ. भाषांत आढळतो. वरील सामासिक शब्दांपैकीं **चाळीस** हा शब्द विशेष लक्ष्य आहे, त्याचीं चाळीस व ताळीस अशीं दोन रूपें होतात व तीं प्राकृत भाषांच्या कालांतच सुरू झालीं. त्यांपैकीं चाळी(ली)स हें रूप प्रा. अप. बं. हिं. ह्या भाषांत आढळतें. पा. पं. ल्हां. गु. ह्या भाषांत तालीस हें रूप आढळतें. मराठींत चाळीस व ताळीस अशीं दोन्हीं रूपें आढळतात. सिंहली भाषेंत सतलिह, सालिस अशीं रूपें आहेत. सिंहली रूपें चाळीस व ताळीस ह्या दोहोंमधील अवस्था दाखवितात. चाळीस मधील आद्य तालव्य उच्चारांतील तालव्यत्व कमी होऊन त्यांत दन्त्यतालव्यत्व हळुहळूं येऊं लागून पं. ल्हां. गु. म. मध्यें तें तालव्यत्व पूर्ण दन्त्यतालव्यत्व झालें. मधली अवस्था सिंहलीमध्यें राहिली. ह्यावरून असें वाटतें कीं पालीमधील उच्चार पुरा दन्त्यतालव्य नसावा, त्याकडे तो झुकूं लागला असावा. तालव्याचें दन्त्यतालव्यांत रूपांतर हें इतकें प्राचीन आहे काय ?

ह्या शब्दांतील दुसरा महत्त्वाचा वर्ण ‘र्’ हा होय. तो पालीमध्यें र् व ल् (ळ्) ह्या दोन्ही रूपांत होता. पुढें प्राकृत काळांत तो ल् झाला. अभाआ. भाषांपैकीं ओ. म. सिंह. मध्यें ‘ळ्’ व बं, हिं. सिं. गु. मध्यें ‘ल्’ असा उतरला. ‘ळ्’ व ‘त्’ हे दोन्ही उच्चार पाली, ओ, सिंह. म. अशा मार्गानें आले.

५ पांच: सं. पञ्चन्; पा. प्रा. पञ्च; का. पांच; पं; पंञ्ज; हिं. पाँच; बं. पाँच; आ. पाँस; ओ. पाम्च; सिं. पञ्ज; गु. पॉच; म. पांच.

पांच ह्या संख्या विशेषणी अर्थाच्या शब्दाचीं निरनिराळया अभाआ. भाषांतील रूपें वर दिलीं आहेत. ह्या सर्व रूपांवरून असें दिसतें कीं स्वरप्रक्रिया अगदीं सरळ आहे. प्राकृतभाषांच्या काळापर्यंत मूळ संस्कृत रूपांत कांहीं बदल झालाच नाहीं. अभाआच्या काळांत शब्दांतील तालव्य अनुनासिक कोमल झाल्यामुळें त्याचा उच्चारओझरता झाला, व त्याचा परिणाम म्हणजे आद्य '**प**' वर्ण हा '**पा**' झाला. ह्या फरकानें मूळ शब्दांतील उच्चारमात्रांची संख्या कायम राहिली. पुढें पुढें कोमल अनुनासिकहि उच्चारांतून नाहींसा झाला (काश्मिरी व मराठी रूपें पहा). **पञ्चन्** पासून **पाँच, पांच** होणें ही अगोदरची प्रक्रिया होय; **पञ्ज, पॉस** होणें ही नंतरची प्रक्रिया होय. **च** ह्या तालव्य कठोर वर्णाचें रूपांतर 'ज' ह्या तालव्य मुदु उच्चारांत होणें व 'च' ह्या दन्त्यतालव्य वर्णाचें 'स' ह्या दन्त्य ऊष्म्यांत रूपांतर होणें ह्या प्रक्रिया नंतरच्या ठरतात. ह्या उच्चारप्रक्रियांप्रमाणें भाषांचें पौर्वापर्य जर लावावयाचें म्हटलें तर अभाआ. भाषांचे दोन गट पडतील: एक 'च' अन्वित गट व दुसरा 'ज' अन्वित किंवा 'स' अन्वित गट. पहिल्या गटांत काश्मिरी, हिंदी, बंगाली, आसामी, गुजराती, मराठी ह्या भाषा येतील. दुसऱ्या गटांत पंजाबी, सिंधी, ल्हांडी ह्या भाषा येतील.

आतां ह्याचे सामासिक शब्द पाहूं. पंधरा, पंचवीस, पसतीस, पंचेचाळीस, पंचावन्न, पासष्ट, पंचाहत्तर, पंचाऐंशी, पंचाण्णव हे त्याचे सामासिक शब्द होत. ह्या नऊ सामासिक शब्दांपैकीं सहा शब्दांत **पंच** हा मूळ शब्दच आला आहे. दोन शब्दांत **पस** व **पास** अशीं त्याचीं रूपें झालीं. म्हणजे मूळ **पञ्च** मधील '**च**' चें तालव्य स्वरूप हळुहळूं कमी होऊन त्याच्या ऐवजीं दन्त्यतालव्यत्व येण्यास सुरुवात झाली होती. मराठी **पांच** ह्या शब्दाच्या द्वितीय वर्णाचा '**च**' चा उच्चारहि दन्त्यतालव्यच आहे. तालव्य उच्चार कमी होऊन त्याच्या जागीं दन्त्यत्व येण्याचा काल साधारपणें खि. उ. १००० हा ठरेल.

'पांच' ह्या शब्दाच्या रूपांवरून आपण त्यांतील दन्त्य उच्चाराचा काळ ठरविला खरा. परंतु पंधरा, पन्नास, पंचवीस वगैरे शब्दांचीं पाली व प्राकृत मधील रूपें तपासलीं म्हणजे हा काळ पाली प्राकृतच्या काळापर्यंत मागें जातो. **पंधरा** शब्दाचीं पाली व प्राकृत रूपें पन्नरस, पण्णरस, पण्णदह, पण्णरह अशीं आहेत. त्यांतील **पन्न** व **पण्ण** हीं रूपें **पञ्च** चीं आहेत. '**ञ्च**' चें **न्न, ण्ण** असें रूपांतर होण्यास त्या उच्चारांत दन्त्य उच्चार असला पाहिजे. तेव्हां पाली भाषेच्या काळांत **पञ्च** मधील **च** च्या उच्चारांतील तालव्यत्व नाहींसें होऊन त्याजागीं दन्त्यत्व येत होतें. ह्या विधानास पञ्चाशत्, पञ्चविंशति वगैरे शब्दांचीं पाली व प्राकृत रूपें पुष्टि देतात.

'**पन्नास**' हा मराठी शब्द तर फारच विचित्र आहे. हा शब्द मूळ **पञ्चाशत्** ह्या संस्कृत शब्दाचा संबंधी आहे. त्याचीं पा. प्रा. रूपें पन्नास, पण्णास, पण्णसा, पण्णासम् अशीं होतात. ह्या रूपांचा अवशेष अभाआ. पैकीं फक्त मराठी व सिंहली भाषांतच फक्त राहिला. सिंहली भाषेंतील शब्द '**पणस**' असा आहे व मराठी **पन्नास** असा आहे. इतर अभाआ. भाषांतील शब्दांत **न** नाहीं; **च** हा वर्ण आहे.

६ सहा: सं. षट्; पाप्रा. छ; अप. चह; पं. छे; हिं, छ, छे; ने. सिं. गु. छ; ल्हां. छे, छीं; सिंह. स, सय, ह, हय; म. सहा.

निरनिराळया अभाआ. भाषांतील **सहा** चीं रूपें हीं होत. ह्यांवरून भाषांचे दोन वर्ग पडतात: एक 'छ' वर्ग व दुसरा 'स' वर्ग. पैकीं पहिल्या वर्गांत अभाआ. पैकीं मराठी व सिंहली शिवाय करून सर्व भाषा येतात. दुसऱ्या वर्गांत मराठी व सिंहली ह्या आहेत. मूळ षट् मधील आद्य 'ष' च्या उच्चारांत मूर्धन्य व ऊष्मत्व असे दोन प्रकार आहेत. पैकीं मूर्धन्यत्वा-ऐवजीं तालव्यत्व आल्यामुळें अभाआ. भाषांत त्याचें रूपांतर '**छ**' झालें. त्यांचें ऊष्मत्व मराठी व सिंहलीमध्यें राहिलें. ह्या उच्चारभेदांवरून औत्तरीय सर्व भाषांचा एक वर्ग व सिंह. म. चा दक्षिणेकडील भाषांचा दुसरा वर्ग असे दोन स्पष्ट भिन्न वर्ग पडतात.

सामासिक शब्द सोळा, सव्वीस, छत्तीस, सेहचाळीस, छपन्न, सहासष्ट, षा-शाहत्तर, षा-शाऐंशी, षा-शाण्णव, साठ असे आहेत. ह्या शब्दांत 'छ' असलेल्यांचा एक वर्ग व 'ष, श' असलेल्यांचा दुसरा वर्ग,

असे दोन वर्ग पडतात. मूळ शब्दांतील मूर्धन्य, तालव्य ह्या दोन्ही उच्चारांच्या अवशेषाची जाणीव मराठींत राहिली.

७ सात : सं. सप्तन्; पा. प्रा. सत्त; का. सथ; कु. सात; आ. त्सात; बं. सात्; ओ. सात्; बिं. हिं. सात्. पं. स्हां. सत्त्; सिं. सत; गु. सात; म. सात. ह्या रूपांची प्रक्रिया सरळच दिसते. 'प्त' चें द्वित्त नाहींसें झाल्यामुळें त्याची भरपायी आद्य वर्ण स दीर्घ होण्यानें किंवा दुसरा वर्ण द्वित्त–'त्त' होण्यानें झाली. आघात प्रथम असल्यामुळें कांहीं भाषांत शेवटचा 'त' अर्धोच्चारित झाला. अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर का. पं. ल्हां. सिं. ह्या भाषांचा एक वर्ग व कु. आ, बं. ओ. बिं. हिं. गु. म. ह्या भाषांचा दुसरा वर्ग असे दोन वर्ग पडतात. म्हणजे उत्तर–पश्चिमेकडील भाषांचें क्षेत्र व दक्षिण–पूर्वेकडील भाषांचें क्षेत्र अशीं दोन क्षेत्रें पडतात.

सामासिक शब्द पुढीलप्रमाणें आहेतः **सतरा, सत्तावीस, सद,–डतीस, सत्तेचाळीस, सत्तावन्न, सदु–डसष्ट (सतसष्ट), सत्याहत्तर, सत्यारेंशीं, सत्याण्णव** व **सत्तर,** ह्या सर्व शब्दांत पहिला अवयव **सत,–द,–ड** किंवा **सत्त** असा असल्यामुळें एकच प्रकारची प्रक्रिया झाली आहे. इतर अभाआ. भाषांतील सामासिक शब्दांत **सतरा** शब्दाच्या बाबतींत **सत** व **सत्र, सत्तावीस** शब्दाच्या बाबतींत **सत** व **सात, सदतीस**च्या बाबतींत **सत,–द,–ड** व **सइ,** सत्तेचाळीसच्या बाबतींत **सत, सात** व **सइ, सत्तावन्न**च्या बाबतींत **सत** व **सात, सदसष्ट**च्या बाबतींत **सत** व **सात सत्याहत्तर**च्या बाबतींत **सत** व **सता, सत्यारेंशी, सत्याण्णव**च्या बाबतींत **सत** व **सात** अशीं प्रथम अवयवाचीं अंगें तयार होतात. ह्यांत सत, सत्र, सात, सइ हीं चारच आहेत. पैकीं सत व सात हींच बहुतेक सामासिक शब्दांत येतात. **सइ** हें अंग फक्त सदतीस व सत्तेचाळीसच्या बाबत ब. पं. हिं, ओ. बं. ह्या भाषांतच फक्त येतात. आघात, वर्णलोप व त्यांमुळें उच्चारमात्रांची संख्या कायम ठेवण्याची प्रवृत्ति इत्यादि कारणांमुळें मूळ सत शब्दाचीं हीं इतकीं निरनिराळीं अंगें झालीं. **सइ** हें जें अंग कांहीं भाषांत वापरलें जातें त्यावरून अभाआ. भाषांचे दोन वर्ग पडण्यासारखे आहेत. एक **सइ** रूप वापरणाऱ्या भाषांचा वर्ग व दुसरा **सत, सात** रूपें वापरणाऱ्या भाषांचा वर्ग. पहिल्या वर्गांत पं. हिं. ओ. बं. ह्या भाषा येतात. दुसऱ्यांत का. आ, गु. सिं. म. ह्या भाषा येतात.

८ आठ : सं **अष्टन्**; प्रा. **अट्ठ, अढ**; गु. हिं. मै. ओ. **आठ**; बं. **आट**; सिं. **अठ**; पं. **अठ्ठ**; का. **ओठ.**

'**आठ**' ह्या शब्दाच्या वरील रूपांवरून असें दिसून येईल कीं आद्य सं. 'अ' गु. सिं. मै. ओ. व म. ह्या भाषांत '**आ**' होतो; प्रा. हिं. पं. ह्या भाषांत '**अ**' होतो व का. भाषेंत 'ओ' होतो. ज्या भाषांत 'आ' होतो तेथें दुसरा वर्ण '**ष्ट**' हा द्वित्त 'ठ्ठ' न राहतां 'ठ' किंवा 'ट' असा साधा एकेरी वर्ण राहतो. जेथें द्वित्त वर्ण राहतो तेथें अर्थातच 'अ' कायम राहतो. ह्याचें कारण मूळ शब्दांतील उच्चारमात्रा कोणीकडून तरी तितक्यांच राहिल्या पाहिजेत. पूर्वेकडील सर्व भाषा व पश्चिम–दक्षिणेकडील गु. म. ह्या भाषांत 'आ' राहिला आहे. उत्तरेकडील सिं. पं. का. ह्या भाषांत अ (किंवा ओ) आणि द्वित्त वर्ण राहिला आहे. काश्मिरींतील '**ओ**' हा ऱ्हस्वोच्चारित असला पाहिजे. 'एक' ह्या शब्दांतील फरकांचें जें एक विशिष्ट भौगोलिक क्षेत्र ठरलें तेंच क्षेत्र '**आठ**' ह्या शब्दांतील फरकांचें ठरलें आहे. एका विशिष्ट भौगोलिक क्षेत्रांतच हे फरक झाले आहेत.

सामासिक शब्दांत 'आठ' हा शब्द निरनिराळीं रूपें धारण करतो. **अठ्ठावीस, अठ्ठेतालीस, अठ्ठावन्न, अठ्ठ्याहत्तर, अठ्ठयारेंशी, अठ्ठयाण्णव** ह्या शब्दांत **अठ्ठा,** अठरा शब्दांत **अठ** व अडतीस, अडसष्ट ह्यांत **अड** अशीं रूपें होतात. अठ, अठ्ठ, अठ्ठय, अड (ड) अशीं तीन चार रूपें होतात. त्यांत पुनः '**अ**' आणि '**ठ्ठ**' ह्यां उच्चारांत फरक पडतो. कांहीं भाषांत 'आ' व कांहींत ठ्ठ, ठ्ठया, ठ्ठे, ड, ड, अशीं रूपें होतात. ह्या फरकांचेंहि क्षेत्र वरीलप्रमाणेंच आहे. हे सर्व एका विशिष्ट भौगोलिक टापूत एका विशिष्ट नियमानें होतात.

९ नऊ : सं. नवन्; पा. णव; प्रा. नवन, णव; का. नव्, नउ; पं. नउं; सिं. नउं; बं. नय; गु. हिं. मै. नउ; म. नऊ.

ह्या रूपांच्या प्रक्रियेंत फारसा फरक नाहीं. आद्य '**न**' वर्ण सर्व अभाआ. भाषांत कायमच राहिला. पालीप्राकृत रूपांत मात्र तो '**ण**' असा आढळतो. अन्त्य न्'च्या लोपाची भरपायी 'ण' होण्यांत झाली आहे. अभाआ. भाषांतें त्याचा पुनः '**न**' झाला आहे कां तो मूळच

संस्कृत '**न**' उतरला कां प्राकृतमधील **नवन** ह्या रूपांतील '**न**' तसाच पुढें कायम राहिला हें सांगणें कठीण आहे. कांहीं ग्रामीण बोलींतील '**णउ**' ह्या रूपांत '**ण**' आहे.

दुसरा वर्ण '**व**' हा पा. प्रा. का. ह्या भाषांत कायम राहिला आहे. का. पं. सि. गु. हिं. मै. म. ह्या सर्व भाषांत त्याचा '**उ** (अथवा **ऊ**) झाला आहे. दोन्हीहि ओष्ठ्य उच्चार असल्यामुळें **व** किंवा **अव** चें **ऊ** किंवा **ऊ** होणें साहजिक आहे. बंगाली '**नय**' हें रूप सर्वांच्या नंतरचें असावें व तें **नवन्>नव>नउ>नअ>नय** अशा मार्गानें आलें असावें.

सामासिक शब्दांत '**एकोन,-ण**' हा शब्द येतो. एकोणीस, एकोणतीस,–चाळीस,–पन्नास,–साठ,–सत्तर,–ऐंशी असे शब्द आहेत. फक्त **नव्याण्णव** हा शब्द निराळा आहे. त्यांतच फक्त **नवन्** शब्द उतरला आहे. '**नव्वद**' शब्दांतहि **नवन्** शब्द राहिला आहे. सर्व अभाआ. भाषांत ह्या शब्दासंबंधीं प्रक्रिया एकसारखीच असल्यामुळें त्यांचे उच्चारभेदावरून क्षेत्रभेद पडत नाहींत. बंगाली **नय** ह्या शब्दावरून तेवढें बंगालीचें क्षेत्र अलग पडतें.

१० दहा : सं. दशन्; पा. दस, दह; का. दह; पं. दहा, सिं. डह; ल्हां. दाह; आ. दह; कु. दस; बं. दस्; ओ. दस; बिं. हिं. दस्; गु. दस; म. दहा.

अशीं **दहा** चीं रूपें अभाआ. मध्यें रूढ आहेत. ह्या सर्व रूपांत दोन अंगें दिसतात. एक **दह** सारखें 'ह'–अन्त. व दुसरें 'दस्' सारखें 'स'–अन्त. **हान्त** रूप पा. का. पं. सिं. ल्हां. आ. म. ह्या भाषांत आहे. **सान्त** रूप कु. बं. ओ. बि. हिं. गु. ह्या भाषांत आहे. म्हणजे पूर्वेकडील सर्व भाषा व पश्चिमेकडील गुजराती ह्या भाषांचा एक वर्ग व उत्तर दक्षिणेकडील भाषा व मराठी ह्या भाषांचा दुसरा वर्ग असे दोन वर्ग पडतात. म्हणजे 'दहा' सारख्या 'हान्त' उच्चाराच्या क्षेत्राचा पट्टा काश्मिर-पंजाब-सिंध-महाराष्ट्र प्रांतांना घेरतो. सान्त उच्चाराच्या क्षेत्राच्या पट्ट्यांत पश्चिमपूर्व सर्व आडवा प्रांत येतो. पूर्वेकडील आसाम तेवढा 'हान्त' उच्चाराच्या क्षेत्रांत येतो.

दहा ह्या शब्दाचे संबंधी असलेले शब्द स्वतंत्रच आहेत. वीस, तीस, चाळीस, पन्नास, साठ, सत्तर, ऐंशी, नव्वद हे मराठी शब्द व त्यांच्या मुळाशीं असलेले संस्कृत–प्राकृत शब्द ह्यांचा दहा किंवा दशन्, किंवा दस, दह, ह्या शब्दाशीं कांहीं संबंध दिसत नाहीं. विंशति, त्रिंशत्, चत्वारिंशत्, पञ्चाशत्, षष्टि सप्तति, अशीति, नवति वगैरे शब्दांत दशन् चा संबंध कोठेंच दिसत नाहीं. विं, त्रिं, चत्वा, पञ्च, हे पहिले अवयव निराळे काढले तर 'श' हा दुसरा अवशिष्ट अवयव **शत** शब्दाशींच अधिक संबद्ध दिसतो, तसेच शेवटच्या चार शब्दांतील षष्, सप्त, अश्, नव हे अवयव निराळे काढले तर अवशिष्ट अवयव **ती** हा राहतो. **शत** व **ती** ह्या दोन्ही अवयवांचा संबंध दशन् ह्या शब्दाशीं कांहीं दिसत नाहीं. ह्या परिस्थितींत मूळचे संस्कृत शब्द स्वतंत्रच मानले पाहिजेत. ते सामासिक शब्द नव्हत. त्यांच्या पहिल्या अवयवाचा अर्थ मात्र दोन, तीन, चार, पांच, सहा, सात, आठ, नऊ असा अनुक्रमें आहे. किंबहुना ते त्या अर्थाचे शब्दच आहेत. पहिल्या एका अवयवाचा जर हा अर्थ आहे तर दुसऱ्या अवयवाचा अर्थ **दहा** असाच असला पाहिजे. वीस म्हणजे दोन दहा, तीस म्हणजे तीन दहा, तसे नव्वद नऊ दहा असा अर्थ असावा. तसेंच विंशति म्हणजे दोन दश, त्रिंशत् म्हणजे तीन दश असे संस्कृत शब्दाचे अर्थ असावेत. शति, शत्, ती हे द्वितीय अवयवी शब्द **दहा** ह्या अर्थी आहेत कीं काय?

दहाचे संबंधी जे दुसरे सामासिक शब्द आहेत त्यांची घटना स्पष्ट आहे. अकरा, बारा, तेरा, चौदा, पंधरा, सोळा, सतरा, अठरा व त्यांचे मूळ संस्कृत शब्द एकादश, द्वादश, त्रयोदश, चतुर्दश, पञ्चदश, षोडश, सप्तदश, अष्टादश हे उघडउघड सामासिक शब्द आहेत.

११ मी : सं. अहम्; माहाराष्ट्री. अहम्मि, अम्मि, म्मि; प्रा. मइ, मे; अप. हं, ह हुं, हऊं, आमी; हिं. मैं, मे; ओ. मुं; गु. हूं; का. सिं. गु. कों. मार. व्रज. हं, हॉंव; बं. मूइ; म. मी.

'मी' ह्या प्र. पु. सर्वनामाचीं अभाआ. मधील रूपें वर दिलीं आहेत. 'मी' रूपाचें मूळ शोधून काढणें फार कठीण आहे. संस्कृतमध्यें अहम् हें रूप आहे. प्राकृतमध्यें मइ, मे, अहम्मि, म्मि, अम्मि अशीं पुष्कळ रूपें आहेत. अभाआ. मधील प्र. पु. सर्वनामाचें रूप संस्कृत–प्राकृत प्रथमेच्या किंवा इतर कोणत्या तरी तृतीयासारख्या विभक्तीच्या रूपापासून आलें आहे अशीं

त्यासंबंधीं दोन मतें आहेत. ' **अस्** ' धातूच्या **अस्मि** ह्या रूपाचा अवशेष त्यांत असावा असेंहि एक मत आहे (पिशेल ४१७). अभाआ मधील रूपांतरून असें दिसतें कीं कांहीं भाषांतील रूपांच्या मुळाशीं अहम् व इतर कांहीं भाषांतील रूपांच्या मुळाशीं प्रा. अहम्मि, अम्मि, म्मि ह्यांपैकीं एखादें रूप आहे. ह्यावरून अभाआ. भाषांचे दोन वर्ग पडतात : एक ' ह ' वर्ण ज्याच्यांत प्राधान्यानें आहे अशा भाषांचा व दुसरा ' म ' वर्ण ज्यांच्या रूपांत प्राधान्यानें आहेअशा भाषांचा. पहिल्या वर्गांत का., सिं., गु., मार., व्रज ह्या भाषा येतात. दुसऱ्या वर्गांत पं. राज. हिं. ओ. बं. म. ह्या भाषा आहेत. आम्हीं ह्या वर्गांना अनुक्रमें **हूं** वर्ग व **मी** वर्ग असे संबोधतों. काश्मीरपासून गुजरातपर्यंतचा पश्चिमेकडील उत्तर–दक्षिण टापू हें एका वर्गाचें भौगोलिक क्षेत्र ठरतें. व पंजाबपासून पूर्वेकडे बंगालपर्यंत व दक्षिणेकडे महाराष्ट्रापर्यंतचा टापू हें दुसऱ्या वर्गाचें भौगोलिक क्षेत्र ठरतें मधील राज., मार., व्रज व दक्षिण कोंकणी ह्या भाषांतील रूपें पुनः अडचण उत्पन्न करतात. ह्या भाषांतील रूपें त्या प्रांतांतील इतर रूपांपेक्षां निराळीं कशीं बनलीं हा एक प्रश्नच आहे. मराठींत '**मी**', तर तिच्या पोटभाषेंत दक्षिण कोंकणींत **हाँव** कसें आलें? तसेंच हिंदींत ' मैं ', तर व्रज भाषेंत ' हूं ' कसें? गुज. मध्यें ' हूं ', तर मारवाडींत व राजस्तानींत **म** प्रधान रूप कसें? ह्याची उपपत्ति सांगणें कठीण आहे. भौगोलिक क्षेत्रविभागणीची रेषा पंजाबपासून उत्तर–दक्षिण जाते.

ह्या सर्वनामाचीं आम्ही, मला, मी, माझें, मज, आपण, आपलें, आमचें अशीं इतर विभक्त्यंत रूपें आहेत, पैकीं **आम्ही** हें वैदिक **अस्मे** पासून आलें. मह्य पासून मज, माझें, मा (मला) हीं रूपें आलीं (पिशेल ४१८). किंवा अहम्>मह पासून मा, मह, हीं रूपें आलीं (ब्लोक २०८). आत्मन् पासून आपण हें रूप निघालें. परंतु भौगोलिक क्षेत्र निश्चित करण्यास ह्या रूपांचा फारसा उपयोग होत नाहीं. ' **मी** ' ह्याचींच फक्त रूपें विशेष उपयोगी असल्यामुळें विचारांत घेतलीं आहेत.

११ तूं: वैसं. युष्मे; सं. त्वम्; प्रा. तुमं, तुम्हे; का. चह, तोह; पं. तूं, तुसीन; हिं. तूं, तुम्; बं. तूं; लमा. तु, तुमेन्; सिंह. तो, तोपि; म. तूं.

' तू ' चीं अभाआ. मधील रूपें वर दिलीं आहेत. त्या सर्वांच्या मुळाशीं सं. त्वम् हें रूप आहे. वैसं. युष्मे हें रूप कोणत्याहि रूपाच्या मुळाशीं असावेंसें वाटत नाहीं. प्राकृत रूपें तुमं, तुम्हे हीं मधील अवस्था स्पष्ट दाखवितात. ह्या अभाआ. रूपांवरून त्या त्या भाषांचे वर्ग पडत नाहींत. त्यामुळें त्यांचें भौगोलिक क्षेत्रहि ठरविण्याची जरूरी पडत नाहीं. ह्या रूपांच्या बाबत सर्व भाषांचा एकच वर्ग पडतो व एकच क्षेत्र ठरतें. पं. हिं. बं. गु. म. वगैरे उत्तर–दक्षिण–पूर्वे कडील सर्व भाषांत ' **तूं** ' हें रूपच रूढ आहे. काश्मिरी व सिंहली मध्यें ' तो ' असें ओकारान्त रूप आहे. का. चह; पं. तुसीन; सिंह. तोपि हीं रूपें वैकल्पिक आहेत. आसन्नवर्ती कोणत्या तरी भाषेच्या संपर्कानें हीं आलीं असावींत.

ह्या सर्वनामाचीं तुम्हीं, तुम्हांस, तुला, तुझें, तुमचें अशीं इतर विभक्त्यंत रूपें आहेत त्यांचाहि क्षेत्र ठरविण्यास फारसा उपयोग नाहीं.

सर्व अभाआ. भाषांत जवळ जवळ एकच असें रूप प्रचारांत कां यावें? इतर शब्दांच्या रूपांत जसे फरक झाले तसे ' तूं ' च्या रूपांत लक्ष्य असा फरक कां पडूं नये? ह्याचें कारण बहुधा हें असावें कीं त्यांत अवयव कमी आहेत. **त्वम्**, **तुम्** व ' **तूं** ' अशा याच्या तीन अवस्था आहेत. अवयव कमी आहेत ही एक गोष्ट, ' त ' हा कठोर वर्ण आहे ही दुसरी गोष्ट व बोलण्याच्या व्यवहारांत ज्याच्याशीं बोलावयाचें त्याला अनुलक्षून असलेला शब्द विशेष आघातानें व स्पष्टतेनें उच्चारण्याची जरूरी ही तिसरी गोष्ट–ह्या तीन गोष्टींमुळें ' **त्वम्** ' संबधींच्या अभाआ. भाषांतील इतर रूपांत फरक पडला नसावा.

ह्या सर्वनामाचें ' तुम्ही ' हें रूप विशेष चिन्त्य आहे. ह्याचीं रूपें पुढीलप्रमाणें आहेत. वैसं. युष्मे, त्वस्मै; सं. त्वम्; पाप्रा. तुम्हे, तुम्हो; पं. तुसीं; ल्हां तुसी; ने. तिमि; हिं. तुम्; बं. तुमी; ओ. तुंभि; गु. तमे; सिंह. तोपी; म. तुम्ही.

ह्या सर्व रूपांचें मूळ वैसं. युष्मे हें नसून त्वस्मै हें व त्याच्याशीं संलग्न असलेलीं तुम्हे, तुम्हो हीं रूपें असावींत. हिं. ने. बं. ओ. गु. म. भाषांतील रूपें ह्या रूपांशीं संबद्ध अशींच दिसतात. निराळेपणा फक्त पं. ल्हां. व सिंह. रूपांत दिसतो. पहिल्या दोन पं. ल्हां. भाषांतील ' तुसीं ' ह्या रूपांत ' **स** ' आलेला आहे व सिंहली ' तोपी ' ह्या रूपांत ' **प** ' आलेला आहे. ह्याचें कारण

कांहीं तरी स्थानिक असलें पाहिजे. ह्या शब्दाचीं रूपें अभाआ. भाषांच्या औच्चारिक वर्गीकरणास फारशी उपयोगी पडणारीं नाहींत.

ह्या सर्व मांडणीवरून पुढील गोष्टी निष्पन्न होतात.

१ एक मधील पहिला ‘ए’ हा वर्ण उत्तरेकडील भाषांत बदलला. पूर्व व दक्षिण ह्या दिशांकडील भाषांत बदलला नाहीं. त्यांतील दुसरा वर्ण ‘क’ उत्तर व वायव्य दिशांकडील भाषांत ‘क्क’ असा व पूर्व, पश्चिम व दक्षिण दिशांकडील भाषांत ‘क’ असा झाला. सामासिक शब्दांत ‘एक’ चीं तीन रूपें आढळतात. १ एकोण, एकूण, २ ओगण, ३ उन्न. पैकीं पहिलें रूप मराठी–सिंहलीमध्येंच आढळतें. त्याच्याच जवळचें ओगण हें रूप सिंधी, गुजरातीमध्यें आढळतें. बाकीच्या पं. हिं. बं. बि. आ. ओ. ह्या भाषांत उन्न असें रूप आढळतें. सर्व भाषांचे दोन वर्ग पडतात. एक वर्ग पं. हिं. बं. आ. ओ. बि. ह्या भाषांचा व दुसरा वर्ग सिं. गु. म. सिंह. ह्या भाषांचा.

२ ‘दोन’ ह्या शब्दाच्या बाबतींत ‘द’ अन्वित ‘ब’ अन्वित ‘न’ अन्वित अशीं तीन अंगें झाल्यामुळें तें तें अंग रूढ असलेल्या भाषांचे तीन वर्ग पडतात. ‘द’ अन्वित अंग पपं, आ. बं. ओ. बि. सिं. म्हणजे उत्तरेकडील भाषांत रूढ आहे. ‘ब’ अन्वित अंग गु. सिं. मध्यें आढळते. मराठीमध्येंच फक्त ‘द’ अन्वित अंग रूढ आहे.

३ ‘तीन’ ह्या शब्दाच्या बाबतींत अभाआ. भाषांचे दोन वर्ग पडतात. एका वर्गांत वायव्य दिशांकडील भाषा व दुसऱ्या वर्गांत मध्यदेश, पूर्व, पश्चिम व दक्षिण दिशांकडील भाषा येतात, पहिल्या वर्गांतील प. प. सिं. पुश्तु, दार्दिक ह्या भाषांत ‘त्र’ अन्वित अंग रूढ आहे.

४ ‘चार’ ह्या शब्दाच्या बाबतींत भाषांचे दोन वर्ग पडतात. एक वर्ग पूर्व पश्चिम दिशांकडील भाषांचा व दुसरा वर्ग मध्य व दक्षिण दिशांकडील भाषांचा. ह्या शब्दाचें ‘चाळीस’ हें रूप बं. हिं. मध्यें रूढ आहे. व ‘ताळीस’ हें रूप पं. ल्हां. गु. ह्या भाषांत रूढ आहे. मराठी ही एकच भाषा आहे कीं जिच्यांत ‘चाळीस व ताळीस’ हीं दोन्हीं रूपें आढळतात.

५ ‘पांच’ ह्या शब्दाचीं ‘च’ अन्वित व ‘ज’ अन्वित अशीं दोन अंगें होतात. पहिलें ‘च’ अन्वित अंग हें वायव्य, पूर्व, पश्चिम, दक्षिण ह्या दिशांकडील म्हणजे का. हिं. बं. आ. गु. म. ह्या भाषांत रूढ आहे. ‘ज’ अन्वित रूप पं. सिं. ल्हां. ह्या उत्तरेकडील भाषांत रूढ आहे. ‘पचास’ हें रूप मराठी वगळून सर्व भाषांत रूढ आहे. मराठी व सिंहली ह्या दोन भाषांतच फक्त ‘पन्नास’ हें रूप रूढ आहे.

६ ‘सहा’ ह्या शब्दाचीं दोन अंगें-एक ‘छ’ अन्वित व दुसरें ‘स’ अन्वित रूढ आहे व त्याप्रमाणें भाषांचे दोन वर्ग पडतात. ‘स’ अन्वित रूप फक्त मराठी व सिंहली ह्या दोन भाषांत आढळतें. बाकीच्या उत्तर, पूर्व, पश्चिम, दक्षिण ह्या दिशांकडील भाषांत ‘छ’ अन्वित अंग रूढ आहे.

७ ‘सात’ ह्या शब्दाच्या बाबतींत उत्तरपश्चिमेकडील भाषांचा (का. पं. ल्हां. सिं.) एक वर्ग आणि दक्षिण पूर्वेकडील भाषांचा (कु. आ. बं. ओ. बि. हिं. गु. म.) दुसरा वर्ग पडतो. ‘सत व सात’ हीं रूपें का. आ. गु. सिं. म. ह्या भाषांत आढळतात. ‘सई’ हें रूप पं. हिं. ओ. बं. ह्या भाषांत आढळतें.

८ ‘आठ’ ह्या शब्दाच्याबाबत उत्तरेकडील सर्व भाषांचा एक वर्ग व दुसरा वर्ग पूर्व, पश्चिम व दक्षिण ह्या दिशांकडील भाषांचा असे दोन वर्ग पडतात.

९ ‘नऊ’ शब्दाच्या बाबतींत सर्व भाषांत एकच प्रक्रिया आहे. त्यांत क्षेत्रभेद कांहीं नाहीं.

१० ‘दहा’ शब्दाचीं दोन अंगें आहेत. एक ‘सान्त’ व दुसरें ‘हान्त’. पैकीं पहिलें ‘सान्त’ हें पूर्वपश्चिमेकडील भाषांत रूढ आहे. व ‘हान्त’ हें रूप उत्तर व दक्षिणेकडील मराठी भाषेंत रूढ आहे.

११ सर्वनामाच्या रूपांपैकीं ‘मी’ ह्या सर्वनामाचीं रूपें भाषांच्या औच्चारिक वर्गीकरणास उपयोगी पडतात. त्याचीं दोन अंगें आहेत ‘ह’ अन्वित अंग व दुसरें ‘म’ अन्वित अंग. पैकीं पहिल्या वर्गांत का. सिं. गु. मार. व्रज ह्या भाषा येतात. दुसऱ्या वर्गांत पं. राज. हिं. ओ. बं. म. ह्या भाषा येतात. ह्या शब्दाच्या रूपांप्रमाणें भाषांचे दोन वर्ग–एक काश्मीरपासून गुजरातपर्यंतचा पश्चिमेकडील उत्तरदक्षिण टापू व दुसरा पंजाबपासून पूर्वेकडे बंगालपर्यंत व दक्षिणेकडे महाराष्ट्रापर्यंतचा टापू अशीं दोन भिन्न क्षेत्रें पडलीं तरी मधील

एका विशिष्ट टापूंत भिन्न रूपें कशीं रूढ झालीं असा प्रश्न राहतोच.

संख्याविशेषणें व सर्वनामें ह्या शब्दांचे उच्चार हे मुळाशीं धरून भाषांचें औच्चारिक वर्गीकरण करण्याचा प्रयत्न येथवर केला. हें वर्गीकरण निश्चित करण्यासाठीं आणखी उदाहरणें तपासावीं लागतील. हें वर्गीकरण तितकेसें निश्चित जरी नसलें तरी मार्गदर्शक खास होईल असें वाटतें.

तात्पुरते निष्कर्ष पुढीलप्रमाणें निघतीलः–

१ मराठी ही कधीं स्वतंत्र वर्गांत मोडते.

२ कधीं ती बं. आ. त्रि. ओ ह्या भाषांच्या म्हणजे पूर्व–दक्षिण भाषांच्या वर्गांत पडते.

३ कधीं ती पश्चिमेकडील सिंधी, गुजराती ह्या भाषांच्या वर्गांत पडते.

४ कधीं मराठी व सिंहली ह्या दोन भाषांचाच एक वर्ग पडतो.

सिंधी–गुजराती भाषांच्या बरोबर पश्चिम–दक्षिण भाषांच्या वर्गांत मराठी अधिक बसते कां बंगाली-ओरिया ह्या भाषांच्या बरोबर पूर्व–दक्षिण भाषांच्या वर्गांत अधिक बसते कां सिंहली–मराठीचा एक दक्षिण भाषांचा स्वतंत्र वर्गच मानावा लागतो हा एक प्रश्न आहे. त्यांतल्या त्यांत ओरिया, सिंहली व मराठी ह्या भाषांत औच्चारिक साम्य अधिक आहे.

७५ अभाआ. वर्णप्रक्रिया : ह्या वरील निष्कर्षांना अनुसरून आपणांस अभाआ. भाषांच्या बाबतींत समानोच्चारदर्शक रेषा (Isogloss) काढून तो तो विशिष्ट उच्चारभिन्न असा प्रदेश दाखवितां येईल. समानोच्चारदर्शक रेषांचें उत्तम गमक म्हणजे उच्चार होय. एखादा भाषाविशेष किंवा प्रत्ययविशेष पुढें करून त्याच्या अनुरोधानें भाषांचे वर्ग ठरविणें किंवा त्या त्या भाषा बोलणाऱ्यांचें वसाहतीचा किंवा आगमनाचा क्रम ठरविणें ह्यापेक्षां उच्चारविशेषांच्या आधारावर ठरविणें हें केव्हांहि अधिक शास्त्रीय होईल. डॉ. हर्न्ले व डॉ. ग्रियर्सनच्या आंतर प्राकृत व बाह्य प्राकृत ह्या वर्गीकरणास प्रत्ययांच्या स्वरप्रक्रियेंतील उच्चारविशेषांचा आधार मिळाला असता तर तें वर्गीकरण अधिक सबल झालें असतें.

अभाआ. भाषांच्या औच्चारिक वर्गीकरणास उपयोगी असे पुढील वर्ण आहेत. **व-ब, न-ल, ल-ळ, र-ड, र-ल, न–ण, क्ष–ख, छ–स** असे सोळा वर्ण व त्यांच्या जोड्या उपयोगी पडतील. **व** आणि **ब** ह्या दोन वर्णांसंबंधीं असें म्हणतां येईल कीं **ब** हा उच्चार आवश्यक रीतीनें कु. बं. आ. त्रि. ओ. ह्या पूर्वेकडील भाषांत उच्चारिला जातो. ल्हां. पं. हिं. ह्या भाषांत हा उच्चार वैकल्पिक असा म्हणजे कधीं **व** तर कधीं **ब** उच्चारिला जातो. सिं. गु. म. ह्या पश्चिम व दक्षिणेकडील भाषांत '**व**' असा उच्चारिला जातो. **व–ब** मधील उच्चारभेद हा अभाआ. भाषांच्या जन्माच्या अगोदरपासून रूढ असावा. मूळ शब्द **व**–आदि आहे कां **ब**–आदि आहे हें ठरविण्यास मराठी व गुजराती भाषांतील रूढ शब्दच उपयोगी पडतील.

'**न**'चा '**ल**' होणें हा सर्व अभाआ. भाषांचा विशेष आहे. बं उ. मध्यें **ल** आणि **न** चा नेहमीं संभ्रम होतो. **ल** आणि **ळ** ह्या दोन वर्णांबाबत सर्व अभाआ. भाषांत घोटाळा आहे. उ. बं. गु. ह्या भाषांत 'ळ' पुष्कळ वेळां येतो. पंजाबीमध्यें कमी वेळां येतो. इतर भाषांत फारसा येत नाहीं. मराठीमध्यें 'ळ' येतो. पेकाम. मध्यें तो **ऱ्ल** असा लिहिला जात असल्यांचें तत्कालीन मोडी पत्रव्यवहारावरून दिसतें. त्याचा उच्चार मूर्धन्य आहे. त्याच्या मुळाशीं दन्त्य 'ल' हा उच्चार आहे. ज्या अर्थीं पेकाम. मध्यें **ऱ्ल** असा लिहिलेला आढळतो त्या अर्थीं मूर्धन्यत्व हे दन्त्य उच्चाराची परिणति असावी. **ल–ळ** ह्या वर्णद्वयाच्या अगोदरच्या **र–ड** व **र–ल** ह्या दोन जोड्या होत. ह्यांपैकीं प्राकृत भाषांत **ड>र–ल–र>ल** असे फरक होतात. हिंदी भाषेंत फक्त **ल** च्या जागीं **र** व **र** च्या जागीं **ल** उच्चारतात व लिहितात. ह्या दोन वर्णांबद्दल निश्चिति नाहीं. इतर अभाआ. भाषांत संख्यावाचक विशेषणांत **द>ड>र, द>ल** (मराठीमध्यें **ळ**) असे फरक होतात.

न–ण ह्या जोडीसंबंधीं हिंदी बेफिकीर आहे. तेथें **ण** च्या ऐवजीं **न** वापरतात. बंगाली–उरियामध्यें उच्चार व लेखन बरोबर आहे. गुजरातीमध्यें **न** बद्दल '**ण**' विनाकारण वापरलेला आढळतो. म. गु. सिं. हिं. इतक्या भाषांत **न** चा **ण** होतो. आद्य **न** मात्र बदलत नाहीं.

क्ष ह्या वर्णाचा बऱ्याच वेळां छ होतो. नंतर मराठीच्या स्वभावाप्रमाणें **छ** चा **स** होतो (ऊंस, रीस, सुरी, शेत). दन्त्यतालव्य उच्चार

करण्याकडे मराठीमध्यें प्रवृत्ति आहे. त्या प्रवृत्तीप्रमाणें 'छ' चा 'स' होतो. **क्ष** ह्या वर्णांत **क**, **ष** हे दोन वर्ण असल्यामुळें **ष** चा कांहीं भाषांत **छ**, कांहींत **ख**, व कांहींत **स** असे तीन भिन्न फरक होतात. मराठीमध्यें **ष** चा **छ** व **छ** चा **स** होतो. बंगालीमध्यें **स** चा **छ** होतो.

य–ज ह्या जोडीपैकीं हिं. पं. बं. उ. ह्या भाषांत **ज** राहतो व म. गु. सिं. ह्या भाषांत **य** राहातो. मराठींत '**य**' हा उच्चार व वर्ण हे दोन्ही कायम आहेत. **ध्य** चा **झ**, **ह्य** चा **झ** हे बदल सर्व भाषांत होतात. आसामी भाषेंत **स** चा उच्चार **त्स** असा होतो (त्सोनारी, त्सोळा, त्सोनें, त्सोधणें, त्सुंड). सिंहली भाषेंत **स** चा **ह** होतो (होण्ड)*.

७६ मराठी शब्दसंग्रहघटक : मराठींतील शब्दघटनेंत आढळणाऱ्या वर्णप्रक्रियेचें स्वरूप अगोदर विशद करून अभाआ. भाषांच्या वर्णप्रक्रियेंत तिचें स्थान सांगितलें. उच्चारणांत बदल होण्याची प्रक्रिया अर्थात् तद्भव शब्दांच्या बाबतींत होते हें उघड आहे. वर्णप्रक्रियेचे फरक त्यांच्या मध्यें होतात म्हणूनच त्यांना तद्भव म्हणतात. वर्णक्रियेची विकृति झालेले शब्द तद्भव व विकृति न झालेले शब्द तत्सम होत. शब्दांची तत्सम व तद्भव अशी विभागणी ही संस्कृतच्या दृष्टीनें आहे हें विसरतां कामा नये. तत्सम म्हणजे संस्कृतसम व तद्भव म्हणजे संस्कृतभव असा त्याचा अर्थ आहे. संस्कृत ही मूळ भाषा; तिच्यापासून प्राकृतभाषा उद्‌भूत झाल्या व प्राकृत भाषांपासून अभाआ. भाषा उद्‌भूत झाल्या ही विचारसरणी शब्दांच्या तत्सम-तद्भव ह्या विभागणीच्या मुळाशीं आहे. ह्या अर्थानें हे दोन शब्द अभाआ. मध्यें वापरले जातात. खरें पाहिलें असतां तत्सम व तद्भव हे शब्द कोणत्याहि भाषेंतून मराठींत आलेल्या शब्दांसंबंधीं वापरले तर त्यांत कांहीं चूक होणार नाहीं. फारसी भाषेंतून कांहीं शब्द मराठींत आले व ते अविकृत स्वरुपांत आले तर त्यांना फारसी तत्सम म्हणण्यांत चूक ती कसली ? तसेच फारसींतील विकृत शब्दांना तद्भव म्हणण्यांत चूक कसली ? द्राविडी, पोर्तुगीज, इंग्रजी ह्या भाषांतून आलेल्या शब्दांसंबंधीं हीच विचारसरणी सयुक्तिक होईल. रूढी मात्र ते शब्द संस्कृत शब्दांसंबंधीं वापरण्याची आहे.

तत्सम, तद्भव : मराठींतील शब्दसंग्रह हा मुख्यतः तीन घटकांचा मिळून बनला आहे. हे तीन घटक म्हणजे तत्सम, तद्भव व देश्य असे आहेत. व ते संस्कृत भाषा ही मराठी भाषेची मूळ भाषा आहे असें समजून मानिले आहेत. अर्थात् तत्सम शब्द म्हणजे मूळ संस्कृत भाषेंतील शब्द होत. संस्कृत ही जरी मूळ भाषा समजली तरी संस्कृत आणि मराठी ह्या आद्य व अन्त्य भाषिक अवस्थांमध्यें प्राकृत भाषा ह्यांचे थर होते. तेव्हां संस्कृतमधून मराठीमध्यें शब्द येतांना त्यांच्यावर ह्या मधील थरांवर असलेल्या प्राकृत भाषांचे संस्कार होत असत. कांहीं इतर शब्द प्राकृतभाषांच्या संस्कारांशिवाय मराठींत आले. अशा रीतीनें शब्दसंग्रहांत दोन मुख्य प्रकार झाले. संस्काराशिवाय जे शब्द आले ते तत्सम होत. ज्यांच्यावर प्राकृत भाषांचे संस्कार झाले ते तद्भव शब्द होत. मराठी शब्दसंग्रहांतील हे दोन मुख्य घटक होत. ह्याशिवाय एक तिसरा जो एक घटक आहे तो **देश्य** किंवा देशज शब्दांचा होय. देश्य, देशी किंवा देशज शब्द म्हणजे ह्या देशांतील शब्द. आर्य लोकांची वसाहत हिंदुस्थानांत होण्यापूर्वीं तेथें ह्या देशांतील मूळचे 'एतद्देशी' लोक राहत असलेच पाहिजेत. त्यांची कांहीं तरी भाषा असलीच पाहिजे. ती त्यांची भाषा अर्थातच संस्कृत प्राकृत वगैरे आर्य भाषांच्या पेक्षां वेगळी असलीच पाहिजे. ह्या भाषांना देशी भाषा व त्यांतील शब्दांना देश्य शब्द अशी संज्ञा आहे. तत्सम, तद्भव व देश्य किंवा देशज असे तीन मुख्य घटक मराठी शब्दसंग्रहांत आहेत. ही तीन नांवें शब्दांच्या बाह्य स्वरूपावरून पडलीं आहेत. तत्सम शब्द अविकृत स्वरूपाचे, तद्भव हे विकृत स्वरूपाचे व देश्य शब्द हे मूळचे. ह्यांत त्या शब्दांच्या अर्थासंबंधाचा विचार नाहीं.

ह्या तीन घटकांपैकीं तत्सम व तद्भव ह्या दोन प्रकारांचा विचार संस्कृत, प्राकृत व अर्वाकालीन बोली ह्या भाषांच्या व्याकरणकारांनीं सविस्तर केला आहे. यास्क पाणिनि, पतंजलि हें संस्कृत व्याकरणकार तत्सम शब्दांचें विवेचन करतात. चंड वररुचि, कात्यायन, हेमचंद्र, धनपाल, मार्कंडेय, लक्ष्मीधर हे तद्भव शब्दांची विचिकित्सा करतात. त्यांच्या घटनेसंबंधीं कित्येक उत्सर्ग त्यांनीं

---

* (1) J. Beames : *Comp. Gr. M. A. Langs. ch. 3*, (2) R. G. Bhandarkar : *W. P. L. 4* (ह्या ग्रंथांवरून)

बांधले आहेत. त्यांच्या विचिकित्सेंत तत्सम–तद्भव शब्दांइतका देशज शब्दांचा शास्त्रीय विचार केला नाहीं. तीच गोष्ट मराठी व्याकरणकारांची. देश्य शब्द कोठून आले, त्यांची घटना कशी झाली, त्यांच्या घटनेचे कांहीं उत्सर्ग बांधणें शक्य आहे कां नाहीं इत्यादि प्रश्नांचीं उत्तरें त्यांनींहि दिलीं नाहींत.

‘ देशी ’ ह्या शब्दाच्या अर्थाबद्दल प्राचीन विद्वानांत एकमत नाहीं. ‘ देशी ’ म्हणजे ‘ ह्या देशांतील ’ हें जरी खरें असलें तरी ‘ ह्या देशांतील ’ ह्या शब्दप्रयोगाच्या अर्थांतहि बरेच श्लेष निघण्याचा संभव आहे. आर्यभाषा ह्या देशांत सुरू होण्याच्या पूर्वीं येथें जी भाषा प्रचलित होती त्या भाषेंतील जे शब्द ते देशी शब्द होत. आर्य किंवा आर्योद्भव भाषांच्या पूर्वींच्या भाषा म्हणजे द्राविडीच भाषा असें निश्चित रीतीनें समजत नसावेत. ‘ देशी ’ ह्या शब्दाचा अर्थ स्पष्ट नसल्यामुळें हेमचंद्रानें आपल्या देशीनाममालेंत त्याची स्पष्ट व्याख्याच दिली आहे. तो म्हणतो :–

“ जे लक्खणे ण सिद्धा ण पसिद्धा सक्कयाहि हाणेसु
ण य गउणलक्खण सत्ति संभवा ते इह णिबद्धा
देस विसेस पसिद्धिइ भण्णमाणा अणन्तया हुन्ति ।
तम्हा अणहि पाइ अपयट्ट भासा विसेसओ देसी ।। ३,४.

प्रकृतिप्रत्ययादि विभाग काढून ज्या शब्दांची व्युत्पत्ति संस्कृतमध्यें दिली गेली नाहीं ते, ज्यांची व्युत्पत्ति प्रकृतिप्रत्यय असे विभाग पाडून जरी करितां आली तरी संस्कृत कोशांत जी दिली गेली नाहीं असे शब्द, संस्कृतमधून प्राकृतमध्यें येतांना ज्या शब्दांच्या अर्थामध्यें फरक झाला असे शब्द, व प्राकृत अपभ्रंश भाषांत फार दिवसांपासून वापरांत असलेले शब्द—असे इतके प्रकार हेमचंद्रानें ‘ देशी ’ ह्या सदरांत घातले आहेत. देशी शब्दाची ही हेमचंद्राची व्याख्या अतिव्याप्त आहे हें उघड आहे. म्हणून त्याच्या विवेचनांत व्युत्पत्तिप्रमादाची उदाहरणें पुष्कळ आढळतात.

७७ देशीची उपपत्ति : देश्य किंवा देशज शब्दासंबंधीं उपपत्ति बांधणें शक्य आहे. देश्य शब्द म्हणून जे मानिले गेले आहेत तें सर्वच्या सर्व एकाच कोणत्या तरी भाषेंतून संस्कृत प्राकृत किंवा इतर आर्य भाषेंत व तद्द्वारां मराठींत आले असें नाहीं. कालाच्या ओघांत ज्या ज्या एतद्देशीय लोकांशीं आर्यांचा संबंध आला त्यांच्या भाषांतून आले असावेत. असे एतद्देशीय लोक म्हणजे द्राविडी लोक. द्राविडी भाषांचा आणि आर्य भाषांचा संबंध आल्यानंतर साहजीक शब्दांची देवाणघेवाण झाली असली पाहिजे. द्राविडी शब्दबीजें संस्कृत, प्राकृत मध्यें येऊन त्यांचा बरेच दिवस वापर झाल्यानें त्यांच्या मूळ द्राविड स्वरूपाचा विसर पडून ‘ देशज ’ ह्या सामान्य स्वरूपाच्या वर्गांत त्यांचा समावेश झाला असण्याचा संभव आहे. अशा रीतीनें देश किंवा देशज मानिल्या गेलेल्या शब्दप्रकाराचा द्राविडी शब्द हा एक घटक झाला. द्राविडी लोकांच्या सारखाच कोल, गोंड, भिल्ल, संताळी, कातकरी, कातोडे, नाग वगैरे वन्य जातीय लोकांचा आर्य लोकांशीं संबंध आल्यामुळें त्यांच्या भाषांतील जे शब्द आर्य भाषांत आले त्यांचाहि समावेश **देशज** शब्दांत होऊन त्यांचाहि एक दुसरा घटक बनला. तसेच आणखी कांहीं मध्य आशिया, चीन, तिबेट, पूर्वेकडील जावा, सुमात्रा, मलाया इत्यादि देशांतील लोकांचाहि आर्य लोकांशीं संबंध आला असला पाहिजे. त्यांच्या बाबतहि शब्दांची देवाणघेवाण झाली असली पाहिजे. कांहीं आर्य संस्कृत शब्द त्यांच्या भाषेंत गेले असले पाहिजेत. तसेच त्यांचेहि शब्द संस्कृत प्राकृत भाषांत व तद्द्वारां सध्यांच्या भारतीय आर्यबोलींत उतरले असले पाहिजेत. देशज म्हणून मानिलेल्या शब्दप्रकारांत ह्यांचाहि समावेश झाला असला पाहिजे. देशज शब्दांचा हा आणखी एक घटक होय. ह्या शब्दांसंबंधीं संशोधन ज्या संशोधकांनीं केलें त्यांच्यापैकीं क्रॉफुर्ड, श्मीड वगैरे आद्य संशोधकांनीं ह्या अतिपूर्व देशांतून आलेल्या शब्दांना **आस्ट्रो एशियाटिक** किंवा **ऑस्ट्रिक** असें नांव दिलें आहे. तेंच नांव नंतरच्या प्रबोधचंद्र बागची व सुनीतिकुमार चतर्जी ह्या संशोधकांनीं स्वीकारिलें आहे. ह्या दोघांनीं प्राकृत व बंगाली भाषांत उतरलेल्या ऑस्ट्रिक शब्दांसंबंधीं संशोधन करून त्यांच्या याद्या तयार केल्या आहेत. ब्लोक वगैरे संशोधक ह्या सर्व शब्दांना **आर्यपूर्व** किंवा **द्राविडपूर्व** भाषांतील शब्द अशा सामान्य स्वरूपाच्या संज्ञेनें ओळखतात. पूर्वींच्या प्राकृत व्याकरणकारांचीं देश्य किंवा देश्यज ही संज्ञा जशी सामान्य स्वरूपाची आहे तशीच आर्यपूर्व किंवा द्राविडपूर्व ही संज्ञा सामान्य स्वरूपाची आहे.

ह्यावरून असें साधारणपणें म्हणावयास हरकत नाहीं कीं प्राकृत व्याकरणकारांनीं देश्य, किंवा देशज म्हणून

जी एक शब्दप्रकार मानिला त्यांत द्राविड, ऑस्ट्रिक व कांहीं प्राचीन एतद्देशीय वन्य जातींच्या भाषांतील शब्द इत्यादि शब्दांचा समावेश झाला. ते सर्व घटक मिळून देशी शब्दसंग्रह तयार झाला.

ह्या देशी शब्दसंग्रहांत आणखी एका प्रकाराच्या शब्दांचा समावेश झाला असण्याचा संभव आहे. हेमचंद्र वगैरे प्राकृत व्याकरणकारांनीं ज्या वेळीं देशी शब्दांचा संग्रह एकत्र करून आपल्या ‘ देशीनाममाला ’ सारख्या ग्रंथांत गोंवला त्यावेळीं परकी शब्दांबरोबर कांहीं प्राचीन आर्य शब्दहि–कीं ज्यांच्या आर्यत्वाची स्मृति प्राचीनत्वामुळें पार नाहींशी झाली, ज्यांचा संबंध आर्य शब्दांशीं व्युत्पादनाच्या कोणत्याहि प्रक्रियेनें जोडणें त्यांना सुद्धां अशक्य झालें–असे आर्य शब्दहि समाविष्ट केले गेले असावेत. हेमचंद्राच्या देशी नाममालेंतील कांहीं शब्दांचे आर्यत्व संशोधकांनीं व्युत्पादनाच्या आधुनिक प्रक्रियांनीं सिद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. देशी शब्दसंग्रहांतील हा आणखी घटक होय.

७८ शब्दसंग्रहाचे घटक : अशा रीतीनें मराठीच्या शब्दसंग्रहाचे पुढील घटक ठरतात.

(१) तत्सम–(संस्कृत भाषेंतून प्रत्यक्ष असे अविकृत स्थितींत आलेले).

(२) तद्भव–(संस्कृत भाषेंतून अप्रत्यक्ष–म्हणजे प्राकृतद्वारां विकृत होऊन आलेले).

(३) द्राविड–(मूळ ह्या देशांत आर्यपूर्वकाळांत राहणाऱ्या लोकांच्या द्राविडी–कानडी, तामील, तेलगू, मल्याळी, तुळू वगैरे भाषांतून आलेले).

(४) देशज, देश्य–(ह्या देशांतील आर्यपूर्वकाळांत राहणाऱ्या एतद्देशीय वन्य जातीच्या–भिल्ल, नाग, कातकरी, कोंड, गोंड लोकांच्या भाषांतून आलेले).

(५) ऑस्ट्रिक किंवा ऑस्ट्रोएशियाटिक (जावा, सुमात्रा, मलाया वगैरे देशांतील लोकांच्या भाषांतून आलेले).

(६) शिमी (यहूदीमधून व महमदी धर्मांच्या सेमिटिक लोकांच्या अरबी, फारसी, तुर्की भाषांतून आलेले).

(७) पश्चिमात्य युरोपीय (पंधराव्या शतकापासून पोर्च्युगीज, फ्रेंच, डच, इंग्लिश वगैरे लोकांच्या संबंधांमुळें त्यांच्या भाषांतील आलेले शब्द).

(८) अन्य भारतीय आर्योंद्भव बोलींतील (मराठी भाषेच्या भोंवतालीं ज्या भारतीय आर्योंद्भव बोली–नागपूरजबलपुराकडे हिंदी, सुरतखानदेश पलीकडील गुजराती, ओढिया प्रांतापलीकडील उरिया इत्यादि आसन्न–परिसरवर्ती भाषांतील शब्द).

मराठी भाषेंतील शब्दसंग्रहांतील हे आठ भिन्न घटक सांगितल्यानंतर ह्या प्रत्येक घटकाचें स्वरूप, शब्दसंग्रहांतील त्यांचें प्रमाण, ज्या कालखंडांत ते शब्द आले त्या कालखंडाचा थोडासा इतिहास, कोणकोणत्या क्षेत्रांत त्यांचा विशेष प्रवाह आला त्या क्षेत्रांचा निर्देश वगैरे तत्संबंधीं बाबींचें स्पष्टीकरण करणें ओघानेंच प्राप्त होतें.

तत्सम शब्द : ह्या घटकांतील पहिला घटक तत्सम शब्दांचा होय. तत्सम शब्दांत दोन प्रकार पडतात. एक प्रकार म्हटला म्हणजे प्राचीन तत्सम शब्दांचा. प्राचीन काळीं प्राकृतमधील कांहीं संस्कार न घेतां मराठींत आलेल्या शब्दांचा. दुसरा प्रकार म्हटला म्हणजे उत्तरकालीं प्राकृत भाषांचें वर्चस्व कमी होऊन अर्वाचीन बोली सुरू झाल्यानंतर कालपरत्वें व कारणपरत्वें जे संस्कृत शब्द मराठींत आले त्या शब्दांचा. पहिल्या प्रकारांत वेद, ब्रह्म, ॐकार, प्रणव, इंद्र, पूषन् , यज्ञ, उपनिषदें, माया, उपाध्याय, आचार्य, विद्यार्थी, आश्रम, वर्ण इत्यादिसारखे शब्द येतात. हे शब्द जसेच्या तसे मराठींत तिच्या जन्मापासून आले आहेत. दुसऱ्या प्रकारांत म्हणजे अर्वाचीन कालांत आलेले ‘ उपस्थित, दिनांक, समाजवाद, समता, स्वातंत्र्य, मतदान, विधिमंडळ, अष्टप्रधान, पंतप्रधान, न्यायाधीश, राजव्यवहार, अग्निप्रवेश, सहगमन, स्वप्न, बालक, शिक्षण, शरीर, प्रार्थना, नदी, आश्चर्य, इत्यादि शब्द समाविष्ट करतां येण्यासारखे आहेत. पूर्वी जे तत्सम शब्द आले ते वेदान्त, धर्म, नीति, महाकाव्यें, वैद्यकादि भौतिक शास्त्रें, वेदान्तादि तत्त्वशास्त्रें, ज्योतिषादि दैवशास्त्रें, ह्यांसंबंधीं विशेष आले. सध्यां जे तत्सम येतात किंवा उत्तरकालीं जे आले तेहि पण असेच कारणपरत्वें, त्या त्या जरूरीप्रमाणें आले व येताहेत. भाषेंत प्रौढपणा किंवा अभिजातपणा आणण्यासाठीं तत्सम शब्द वापरण्याकडे प्रवृत्ति होणें साहजिक आहे. हें एक प्रकारचें भाषेचें व भाषेंतील शब्दांचें संस्कृतीकरण आहे.

७९ संस्कृतचा पुनरुद्धार : असें मराठीमध्यें तिच्या जन्मापासून शब्दांचें संस्कृतीकरण आजवर तीन चार वेळां झालें. यादवकालांत हेमाद्रिपंडिताच्या पुरस्कारानें संस्कृत विद्येचें पुनरुज्जीवन झालें. त्यावेळीं व्यवहारांतील कित्येक शाखांतील संस्कृतसम (तत्सम) शब्दांचा भरणा झाला. हा काल म्हटला म्हणजे तेरावें शतकाच्या सुमाराचा काल होय. पुढें शिवकालांत फारसी–अरबी शब्दांचा वापर अतिरेकानें होत असल्याचें आढळून आल्यानें, घरीं, दारीं, अन्तःपुरीं, राजमंडळांत जिकडे तिकडे परकी शब्द आढळल्यानें व त्यांचा वापर स्वराज्याच्या व स्वातंत्र्याच्या भावनेस विघातक असल्यानें शिवाजी छत्रपतींनीं राजाज्ञेनें परकी-शब्दांबद्दल तत्सम शब्द रूढ करण्याचा प्रयत्न केला व रघुनाथपंडित ह्या विद्वानांस राजव्यवहारकोश तयार करण्यास सांगितलें. राजव्यवहारांत तरी संस्कृत शब्द त्यांनीं सुरू केले. संस्कृतीकरणाचा हा दुसरा प्रयत्न. तिसरा प्रयत्न अव्वल इंग्रजींत एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धांत शास्त्री मंडळींनीं केला. ह्या मंडळींत मराठी भाषेचे शिवाजी असे आपणास म्हणवून घेणारे विष्णु शास्त्री चिपळूणकर हे अग्रगण्य होत. सांस्कृतिक उत्थापन ह्या काळांत झालें व त्याचाच एक भाग म्हणजे तत्सम शब्दांचा मराठींत प्रवेश हा होय. अलीकडच्या अर्वाचीन काळांत असाच एक प्रयत्न सावरकर–पटवर्धन यांनीं केला. शिवकालांतील प्रयत्नाचा रोंख फार्सी शब्दांवर होता तर आजच्या प्रयत्नाचा फारसी, उर्दु वगैरे शब्दांच्याबरोबर आंग्ल शब्दांवरहि रोंख आहे. परकीय शब्दाच्या ऐवजीं स्वकीय तत्सम शब्द रूढ करणें ही एक दृष्टि त्याच्या मुळाशीं तर आहेच. परंतु तिच्याबरोबर जे जे नवे शास्त्रशोध होत आहेत, जीं जीं नवीं ज्ञानाचीं व व्यवहाराचीं दालनें उघडलीं जात आहेत, त्यांतील नव्या कल्पनांचे दर्शक शब्द तत्सम स्वरूपाचेच निर्माण होत आहेत. पारिभाषिक शब्दांची निर्मिति हा तत्सम शब्दांसंबंधीं अगदीं अलीकडील असा प्रयत्न होय. हेमाद्रिपंडिताच्या पुरस्कारानें झालेला प्रयत्न हा पहिला, शिवाजीच्या पुरस्कारानें झालेला प्रयत्न हा दुसरा, चिपळूणकरांच्या पुरस्कारानें झालेला प्रयत्न हा तिसरा, सावरकरांच्या पुरस्कारानें झालेला प्रयत्न हा चौथा, व पारिभाषिक शब्दनिर्मितीचा प्रयत्न हा पांचवा असे हे तत्सम शब्दांचया पुनरुज्जीवनाचे पांच प्रयत्न होत.

८० संस्कृतीकरण : मराठी भाषेच्या हयातींतील हे संस्कृतीकरणाचे प्रयत्न होत. परंतु ह्याच्या पूर्वी संस्कृत भाषेच्या हयातींत शब्दांचें संस्कृतीकरण करण्याचे प्रयत्न पुष्कळ वेळां झाले. त्यांत परकीय शब्दांचें संस्कृतीकरण झालें इतकेंच नव्हे तर स्वकीय शब्दांचेंहि झालें. प्राकृत-भाषांच्या अमदानींत संस्कृत शब्दांचीं रूपें बदलत असत. वर्णप्रकियेचे फरक त्यांत नेहेमीं होत असत. अशा बदललेल्या शब्दांचें संस्कृतीकरण केल्याचीं उदाहरणें पुष्कळ आढळतात. परकीय शब्दांचें संस्कृतीकरण झाल्याचीं उदाहरणें वैदिक वाङ्मयांत पुष्कळ आहेत. ऋग्वेदामध्यें जर्फरी, तुर्फरी, बृबु, बुसथ, ताबुव इत्यादि परकीय शब्द संस्कृतमध्यें आत्मसात् करून घेतलेले असे आहेत. ज्योतिषशास्त्रांतील व अथर्ववेदांतील कांहीं शब्द परकीय आहेत. ‘होरा, द्रेष्काण, नेम, तामरस, पिक, तक्म’ हे शब्द जरी वैदिक वाङ्मयांत वापरले असले तरी ते मूळचे म्लेच्छ असल्याची ग्वाही जैमिनीनें दिली आहे. ह्या शिवाय ‘कर्मार, कितव, कला, काल, कुट कुणास, गण, कुंड, नाना, नीहार, नीळ, हिममेघ, बिल, बीज, मयूर, रात्री, रूप, सायम्, वल्गु, हे वेदांतील शब्द परकी असून संस्कृतीकरण केलेले असेच आहेत. ब्राह्मण ग्रंथांतहि ‘अटवि, आलक, आडंबर, कम्बल, कुलाल, खड्ग, तंडुल, तिल, पण, मटची, मर्कट, वलक्ष (पांढरा), वल्ली, व्रीहि, शव’ हे शब्द परकी असून संस्कृतमध्यें आत्मसात् केलेले आहेत. संस्कृतीकरणाचा हा पहिला प्रयत्न होय. हे शब्द पहिल्या थरावरील शब्द होत. संस्कृतीकरणाचें तत्त्व सर्वमान्य होतें. त्याची तात्त्विक भूमिका जैमिनीनें न्यायमालेच्या पहिल्या अध्यायाच्या पहिल्या अधिकरणांत मांडली आहे. परकी शब्दांना संस्कृत शब्दांचें स्वरूप देणें म्हणजेच केवळ संस्कृतीकरण नसून त्या परकी शब्दांचें संस्कृतमध्यें स्थान, उपयोग ठरविणें ही बाबहि संस्कृतीकरणांत येतें असें जैमिनीचें मत आहे. परकीय शब्दांचा संस्कृतमध्यें अन्तर्भाव करतांना त्याचें संस्कृतीकरण करीत असत. स्वकीय शब्दांचेंहि संस्कृतीकरण करीत असत. मूळ शब्द संस्कृत. त्याचें प्रथम वर्णप्रक्रियेच्या नियमांनीं प्राकृतीकरण होई. नंतर ह्या प्राकृत शब्दांचें पुनः संस्कृतीकरण करीत असत. ह्या नव्या संस्कृत शब्दाचा पुनः प्राकृत शब्द सिद्ध होई. ‘गोपेंद्र

ह्या संस्कृत शब्द. त्याचें अपभ्रष्ट रूप ' गोविंद ' व हें रूप संस्कृत म्हणून समजलें गेलें. असलेच आणखी पुढील शब्द पहा. विक्षिप्ति>विच्छित्ति; भद्रम्>भद्द>भदन्त; मारिस>मारिष; मृत्स्न>मसीन>मसृण; गुप्स>गुच्छ>गुत्स; वृक्ष>रुक्ख>रुक्ष; अधस्तात्>हेट्ठ>हेष्ट. ह्या जोड्यांतील पहिला शब्द संस्कृत, नंतरचा प्राकृत, त्याच्या नंतरचा पुनः संस्कृत अशीं हीं रूपें आहेत.

८१ व्यत्यस्त संस्कृतीकरण : ह्या प्रक्रियेला व्यत्यस्त संस्कृतीकरण असें म्हणतां येईल. ही प्रक्रिया उदाहरणांनीं पाहणें हें फार मनोरंजक व बोधप्रदहि आहे. मराठींतील "आखाडा=कुस्त्याचें मैदान" हा शब्द घ्या. गु. आखाडा; हिं. आखारा; ने. आखारा अशीं रूपें आहेत. ह्या रूपांचा संबंध प्रो. टर्नरनें पा. अक्खवाटो ह्या शब्दाशीं जोडला आहे. त्याच्या नियमाप्रमाणें त्यांचा संबंध सं. अक्षवाट ह्या शब्दाशीं लागतो. परंतु हा शब्द कोशामध्येंच आढळतो. म्हणून त्याचा संबंध पाली वाङ्मयांत आढळणाऱ्या अक्खवाटो ह्या शब्दाशीं जोडला गेला. आतां प्रश्न हा कीं पा. अक्खवाटो हा शब्द सं. अक्षवाट पासून आला, कीं उलट सं. अक्षवाट शब्द अक्खवाटपासून तयार झाला. अक्षपाट म्हणून त्याच अर्थी आणखी एक संस्कृत शब्द आहे. हा शब्द पाली शब्दाचें संस्कृतीकरण आहे असें टर्नर म्हणतो. अक्खवाट हा पाली शब्द सर्व अभाआ. मधील शब्दांचा मूळ शब्द होय. 'अक्खवाट' ची एक सरळ परिणति ' आखाडा ' ही व दुसरी व्यत्यस्त परिणति ' अक्षवाट किंवा अक्षपाट ' ही. अशींच आणखी कांहीं उदाहरणें देतां येतील. ' गादी=उंच आसन; पं. गाद्दी, हिं. गादी; ह्या शब्दाचें मूळ प्रा. गद्द किंवा गर्द हें आहे. ह्या शब्दाचा सं. गर्त ह्या शब्दाशीं संबंध असूं शकेल. ' गाडी, गाजर, गाय, घर ' ह्या शब्दांचा संबंध ' गड्डी गृंजन, गौ. गृह ' ह्या संस्कृत शब्दांशीं असूं शकेल.* आम्हाला जे असले शब्द आढळले त्यांचा निर्देश आम्ही ' उत्तरकालीन संस्कृतीकरण ' म्हणून केला आहे.

संस्कृतीकरणाची ही भाषिक प्रक्रिया फार जुनी असल्याबद्दलचा पुरावा पाणिनीच्या धातुपाठावरून मिळतो. पाणिनीच्या धातुपाठांत दोन हजार धातु अजमासें दिले आहेत. त्यांपैकीं खरे अस्सल संस्कृत धातु नऊशें आहेत. बाकीचे हजार बाराशें धातु हे कृत्रिम किंवा उत्तरकालीन आहेत आणि ते कांहीं पाणिनीनंतर, कांहीं कात्यायनानंतर व कांहीं पतंजलीनंतर संस्कृतमध्यें समाविष्ट झाले असावेत. भट्ट मीमांसक तर ह्या संबंधीं उघड उघड म्हणतात—"सूत्रवार्त्तिकभाष्येषु दृश्यते चापशब्दनम्". तेव्हां अशा परिस्थितींत उत्तरकालीन संस्कृतीकरण झालें असल्याबद्दल शंका राहात नाहीं.

८२ तत्सम शब्द अविकृत राहण्याचीं कारणें : येथें अशी एक शंका येण्याचा संभव आहे कीं पहिल्या मूळच्या थरांवरील तत्सम शब्दांत रूपाचा अथवा अर्थाचा फरक ह्या पुढील काळांत कसा झाला नाहीं. ह्या जर बोली आहेत तर हे आदिम तत्सम शब्द अविकृत कसे राहिले? ह्या शंकेचें समाधान पुढील स्पष्टीकरणानें होईल. एक तर असलेच आद्य तत्सम शब्द अविकृत राहिले कीं जे अल्पावयवी होते. राजा, देव, दर्शन, नृप, मंदिर, मेघ, पृथ्वी, प्रकाश, आकाश, चंद्र, सूर्य, तारा, तारका, शिखर, इत्यादि शब्दांत अवयव दोन-तीनच आहेत. हे शब्द बऱ्याच बाबतींत अविकृत राहिले. कांहीं बाबतींत ह्या शब्दांतहि विकृति झाली. नाहीं असें नाहीं. परंतु बदललेल्या विकृत शब्दांचा उपयोग अर्थाची च्छटा दाखविण्याकडे झाला. देखणें, मेहूडें, प्रथिमी, परकाश, चंदर, सूरज, वगैरे फरक कांहीं झाले. पण त्यांनीं अर्थच्छटा किंवा बोलणाऱ्याचें सांस्कृतिक वैगुण्य दाखविलें गेलें. तत्सम शब्द अविकृत राहण्याचें एक कारण म्हणजे त्यांचें अल्पावयवत्व.

२ आद्य थरांवरील तत्सम शब्दांमध्यें विकृति न होण्याचें दुसरें कारण म्हटलें म्हणजे त्यांच्यावरील आघात हें होय. मराठी भाषेंत आघात आहे कीं नाहीं ही बाब जरी मतभेदाची असली तरी वैदिक संस्कृत भाषेंतून जे शब्द अर्वाचीन बोलींत उतरले त्यांच्या मूळ वैदिककालीन स्वरूपांत आघात होता. त्या आघातासह ते शब्द वैदिक कालांत किंवा पुढच्या प्राकृत भाषांच्या किंवा अपभ्रंश भाषांच्या कालांत उच्चारिले जात असले पाहिजेत. त्याच परंपरेनें अर्वाकालीन बोलींतहि तो त्यांचा

---

* Dr. S. M. Katre : *Pr. langs. their contri. to Indian Culture*, P. 76.

आघात जर त्यांच्या स्वरूपाच्या विकृतीच्या आड आला असेल तर त्यांत आश्चर्य नाहीं. त्यांतहि पुनः अन्त्य आघाताचे दोन किंवा तीन अवयवांचे तत्सम शब्द अविकृतच राहणार हें उघड आहे. तेव्हां तत्सम शब्दांत फरक होऊं शकले नाहींत त्यांचें कारण म्हणजे त्यांच्यावरील आघात हें होय.

३ विकृति न होण्याचें आणखी एक कारण आहे. कांहीं तत्सम शब्दांचा उपयोग ठराविक क्षेत्रांतच होई. त्यांच्यांत फरक झालेले शब्द इतर क्षेत्रांत वापरले जात. धर्म, नीति, सभ्य व शिष्ट व्यवहार, पवित्र व श्रद्धायुक्त वातावरण इत्यादि क्षेत्रांत तत्सम शब्दच आणि तेहि अत्यंत शुद्ध अशा स्वरूपांत वापरले जात. देवालयांत, धर्मविधींत, पवित्र कार्यक्रमांत शुद्ध तत्सम शब्दच वापरले जात. बाहेर सामान्य व्यवहारांत ‘देखणें, दिसणें, पाहाणें’ असे विकृत शब्द वापरांत असले तरी प्रत्यक्ष देवालयांत देवासंबंधीं ‘दर्शन करणें, दर्शन घेणें’ असेच तत्समशब्दांकित प्रयोगच वापरांत असत. तसेच ब्राह्मण, पूजा, अर्चा, निर्माल्य, उपचार, दीप, पत्र, पुष्प, नैवेद्य, गन्ध, अभिषेक, मंत्र, घंटा, कलश, शंख, मूर्ति, पंचायतन, आसन, तीर्थ, प्रसाद, असे किती तरी तत्सम शब्द घरांतील एका देवघरासारख्या मर्यादित क्षेत्रांत वापरांत असत. कथा, कीर्तन, आख्यान, पूर्वरंग, उत्तररंग, नमन, भजन, इत्यादि शब्द कीर्तनाच्या क्षेत्रांत, तिथी, श्राद्ध, होम–हवन, पिण्ड, तर्पण, क्षण, पितृ, पितामह, प्रपितामह, भोजन, बली, वैश्वदेव, आहुति, वगैरे धर्मकार्यांत वापरले जाणारे किती तरी शब्द तत्समच असत व ते वर्षानुवर्षें अविकृतच राहात. तत्सम शब्दांतील विकृति थांबविण्याचें हें तिसरें कारण होय.

८३ तत्सम शब्दांचें प्रमाण : तत्सम शब्दांतील विकृति स्थगित करणारीं कारणें वर सांगितलीं. त्यानंतर तत्सम शब्द कोणकोणत्या अर्वाचीन बोलींत अविकृत राहिले व ते किती प्रमाणांत अविकृत राहिले हा त्यांच्या पुढील प्रश्न होय. तत्सम शब्दांचा वापर दोन गोष्टींवर अवलंबून असतो. एक म्हणजे प्राचीन संस्कृतीचा अभिमान व दुसरी गोष्ट म्हणजे परकी संस्कृतीचें आक्रमण. त्यापैकीं पहिली गोष्ट सर्व सामान्य आहे. आर्योद्भव बोलींवर झालेल्या परकीयांच्या आक्रमणाबाबत मात्र स्थलदृष्ट्या व कालदृष्ट्या फरक असल्यामुळें ह्याचा परिणाम प्रत्येक अर्वाचीन आर्योद्भव बोलींवर कमी अधिक झालेला आढळतो. महमदीयांचें आक्रमण सिंधी, काश्मिरी, पुष्तु, पंजाबी ह्या भाषांच्या प्रांतांवर अगोदर झालें व तें फार वेळ टिकलें. ह्यांच्यानंतर हिंदी व गुजराती ह्या भाषांचे प्रांत त्यांच्या आक्रमणाखालीं आले. व शेवटीं मराठी, बंगाली व ओरिया ह्या भाषांचे प्रांत आले. आक्रमणाबाबत जो ह्या प्रांतांचा क्रम लागतो तोच क्रम अरबी फारसी वगैरे शिमी भाषांचा आर्योद्भव बोलींवर झालेल्या परिणामाबाबत लागतो. अर्थात् तोच क्रम तत्सम शब्दांच्या वापराबाबत लागणार, त्या त्या प्रांतांच्या बोलींतील तत्सम शब्दांचें प्रमाण किंवा त्यांची टक्केवारी याच क्रमानें कमी अधिक ठरणार हें उघड आहे. सिंधी, काश्मिरी, पुष्तु, पंजाबी, गुजराती, हिंदी, मराठी, बंगाली व उरिया असा ह्या भाषांचा तत्सम शब्दांच्या प्रमाणाबाबत क्रम लागतो[*]. सिंधी भाषेंत तत्सम शब्दांचें प्रमाण सर्वांत कमी व बंगाली व ओरिया ह्या भाषांत सर्वांत अधिक आढळतें. सिंधी भाषा हें एक टोंक तर उरिया भाषा हें दुसरें टोंक. सिंध प्रांतांत महमदीयांचा संबंध सर्वांच्या अगोदर आला, तर ओढिया प्रांतांत सर्वांच्या शेवटीं आला. मराठी भाषेचें स्थान मध्यावर आहे.

फारसी अरबी वगैरे भाषांच्या आक्रमणाबरोबर आपणांस पोर्च्युगीज, इंग्रज वगैरे पाश्चात्य परकी भाषांच्या आक्रमणाचाहि निर्देश केला पाहिजे. ह्या भाषांच्या आक्रमणाबाबत तीच विचारसरणी लागूं पडेल.

तत्सम शब्दांचें प्रमाण एखाद्या भाषेंत अधिक आढळून आलें तर त्यावरून त्या भाषेचें शुद्धत्व, शुचित्व, प्रौढत्व हें जरी दिसून आलें तरी त्याबरोबर त्या भाषेचें विचाराच्या प्रकटीकरणाबाबत शब्दांचें दैन्यहि दिसून येतें असें जें एक मत प्रचलित आहे [§], तें मात्र मान्य करण्यासारखें नाहीं. सिंधी भाषेंत हें प्रमाण कमी आहे म्हणून तिच्यांत विचारप्रकटीकरणाचें सामर्थ्य बंगालीपेक्षां अधिक आहे असें समजावें लागेल आणि तशी तर वस्तुस्थिति नाहीं. तत्सम शब्दांचें कमी

---

[*] J. Beames : *Comp. Gr. I. A. Langs. P. 40.*

[§] *Ibid; P. 35.*

प्रमाण हेंच जर विचारप्रकटीकरणाच्या सामर्थ्याचें गमक मानिलें तर सिंधी, पंजाबी, पुष्तु ह्या भाषा सर्व आधुनिक आर्योद्भव बोलींपेक्षां पुढारलेल्या भाषा आहेत असें मानावें लागेल. पण तशा त्या आहेत कां? नाहींत. तेव्हां हें गमकहि असमर्थनीय आहे.

मराठी भाषेंतील तत्सम शब्दांचें प्रमाण हें निरनिराळ्या कालखंडांत निरनिराळ्या कारणांनीं बदललें आढळतें. मराठीच्या जन्माच्या वेळीं म्हणजे यादवकालांत मराठींत तत्सम शब्दांचें प्रमाण शेंकडा तेवीस होतें. तद्भव शब्दांचें शेंकडा बहात्तर व इतर शब्द शेंकडा पांच असें प्रमाण होतें. हेंच प्रमाण पुढील बहामनी कालांत बदललेलें दिसतें. कालखंडाप्रमाणें हें प्रमाण जसें बदलतें तसेंच लेखकाप्रमाणेंहि बदलतें. एका यादवकालांतीलच जर चार ग्रंथ घेतले तर त्यांत प्रत्येकांत तत्सम–तद्भव शब्दांचें प्रमाण निरनिराळें आढळेल. ज्ञानेश्वरींत तत्सम साडेबावीस, तद्भव चौसष्ट व इतर साडेतीन असें शेंकडा प्रमाण पडतें. तेंच दृष्टान्तपाठ व पूजावसर ह्या महानुभावी ग्रंथांत अनुक्रमें तत्सम बारा व एकतीस, तद्भव शहाऐंशी व त्रेसष्ट व इतर दोन व सहा हें प्रमाण पडतें. पाटणच्या शिलालेखांत हेंच प्रमाण तत्सम पंचवीस, तद्भव एकाहत्तर व इतर चार असें आहे*. बहामनीकालांतील एकनाथ स्वामीच्या अर्जदास्तसारख्या किंवा भारूडासारख्या जानपद वाङ्मयांत हें प्रमाण आणखी बदललेलें आढळतें.

सध्यांच्या अर्वाचीन मराठीच्या शब्दसंग्रहांतील हें प्रमाण तत्सम ४६·०५, तद्भव ४९·२३, परकीय फारसी २·९६, इंग्रजी व इतर युरोपीय १·७६ असें पडतें. निरनिराळ्या कालखंडांत तत्सम शब्दांचें प्रमाण बदलण्याचें कारण म्हणजे भाषेंतील संस्कृतीकरणाची प्रवृत्ति हें किंवा सांस्कृतिक पुनरुत्थापनाची (Revival of learning) प्रवृत्ति हें होय.

रूपतद्भव शब्द : संस्कृतीकरणाचे प्रयत्न कितीहि जरी झाले तरी तद्भव शब्दांचें प्रमाण हें अधिक राहणारच. मराठी भाषा ही रोजची बोली असल्यामुळें वर्णप्रक्रिया, अर्थप्रक्रिया वगैरेंसंबंधीं फरक हे तिच्यांत होणारच. किंबहुना असे फरक होणें हें तिच्या जिवंतपणाचें लक्षणच आहे. संस्कृततसम शब्दाच्या रूपांत कांहीं थोडासा फरक झाला कीं तो तद्भव होतो. भिंत, पसाय, विंचू, दार, घर, पोथी, खांब, माणूस इत्यादि शब्द तद्भव होत. त्यांचे तत्सम शब्द अनुक्रमें भित्ति, प्रसाद, वृश्चिक, द्वार, गृह, पुस्तिका, स्खंभ, मनुष्य हे होत. तत्सम व तद्भव हे प्रकार शब्दाच्या रूपाकडे पाहून केले आहेत. तत्सम शब्दांच्या रूपांत विकृति जी झाली ती पाली–प्राकृत–अपभ्रंश ह्या भाषांच्या काळांत झाली. आर्य भाषेचा प्रवाह वैदिक संस्कृतपासून तो अभाआ. बोलींपर्यंत वाहात आला आहे. आर्य भाषेच्या ह्या प्रदीर्घ जीवनांत शब्दांच्या उच्चारांत जे विलक्षण बदल झाले त्यामुळें आर्य भाषेचें स्वरूपहि बदलत गेलें.

८४ अर्थतद्भव : शब्दाच्या बाह्य स्वरूपांत म्हणजे उच्चारांत जसे फरक झाले तसे त्याच्या आंतर स्वरूपांत म्हणजे अर्थांत फरक झाले. भाषेचें स्वरूप बदलण्याचें हेंहि एक कारण आहे. कधीं शब्दाच्या बाह्य स्वरूपांत फरक न होतां केवळ अन्तःस्वरूपांत म्हणजे अर्थांत फरक पडत असे. बाह्यस्वरूपांत फरक पडला म्हणजे आपण त्या शब्दाला **तद्भव** म्हणतों. परंतु बाह्य स्वरूपांत फरक न पडतां त्याच्या अर्थांतच फक्त फरक पडलेला आहे अशा शब्दालाहि आपण **तत्सम**च म्हणतों. आमच्या मतें हें बरोबर नाहीं. ह्या प्रकारच्या शब्दाला निराळें नांव असणें जरूर आहे. ह्या प्रकाराला आम्हीं **अर्थतद्भव** असें म्हणतों. रूपतद्भव शब्दांचा विचार वर आलाच आहे. कांहीं शब्द असे आहेत कीं त्यांचें बाह्य स्वरूप पाहिलें तर तें संस्कृत रूपासारखेंच असतें. त्यांत वर्णप्रक्रियेची कांहीं विकृति झालेली नसते. म्हणजे ते तत्समच असतात. त्यांच्या अर्थांत मात्र फरक झालेला असतो त्या शब्दाच्या संस्कृतमधील अर्थाहून भिन्न असा अर्थ मराठींत रूढ असतो. रूपाच्या दृष्टीनें हे शब्द तत्सम खरे परंतु अर्थाच्या दृष्टीनें हे तद्भव होत. 'समारंभ' हा शब्द रूपतत्सम आहे. त्या दृष्टीनें त्याचा अर्थ "चांगला आरंभ" असा आहे. मराठीमध्यें त्याचा रूढ अर्थ 'उत्सव, विधि, सोहळा, आनंदोत्सव' असा झाला आहे. 'पंडित' म्हणजे बुद्धिवान् मनुष्य. परंतु मराठीमध्यें त्याचा अर्थ 'विद्वान्, पढीक' असा आहे. तीच गोष्ट

---

* डॉ. शं. गो. तुळपुळे. यादवकालीन मराठीचा अभ्यास. पृ. ४६–५०.

'पाण्डित्य' ह्या शब्दाची. आग्रह, अलंकार, उपसर्ग, उदय, उपकरण, कर्म, गवाक्ष, ग्राहक, गायित्री, प्रारब्ध, यजमान, संचित इत्यादि किती तरी असे शब्द आहेत कीं त्यांचें बाह्यस्वरूप तत्सम व अन्तःस्वरूप (अर्थदृष्ट्या) तद्भव आहे. प्रस्तुत कोशांत अर्थतद्भव शब्दांचीं उदाहरणें आम्हीं ठिकठिकाणीं दिलीं आहेत. अर्थामध्यें झालेली विकृतिच फक्त आम्हीं विचारांत घेतली आहे.

शब्दाचें तत्समत्व व तद्भवत्व त्याच्या रूपाच्या व अर्थाच्या अशा दोन्ही दृष्टींनीं ठरविलें पाहिजे. आजपर्यंत तें एका रूपाच्या दृष्टीनेंच ठरविलें जात असे. अर्थाचा विचार करून तें ठरविणें जरूर आहे. संस्कृत शब्द मूळच्या स्वरूपांत व मूळच्या अर्थानें रूढ असलेले हे खरे अस्सल शंभर टक्के तत्सम शब्द होत. हे शब्द रूपतत्सम व अर्थतत्सम होत. हा प्रकार पहिला. रूप मात्र तत्सम परंतु अर्थ बराच बदलला आहे अशा शब्दांचा दुसरा प्रकार होय. ह्याला रूपतत्सम व अर्थतद्भव असें म्हणतां येईल. तिसरा प्रकार रूपतद्भव व अर्थतत्सम शब्दांचा व चौथा प्रकार रूपतद्भव व अर्थतद्भव अशा शब्दांचा होईल. हे प्रकार उदाहरणांसह खालीं मांडून दाखवितों.

१ रूपतत्सम–अर्थतत्सम : उदा–अवतरण, याग, पूजन.

२ रूपतत्सम–अर्थतद्भव : उदा–अवतार, प्रचार, आग्रह, प्रारब्ध, यजमान.

३ रूपतद्भव–अर्थतत्सम : उदा–उतरणें, भिंत, विंचू, सवत.

४ रूपतद्भव–अर्थतद्भव : उदा–(परीक्षा) उतरणें, लवणें.

मराठी भाषेंतील शब्दसंग्रहाचे हे चार प्रकार होत. हे प्रकार आपण शब्दांच्या रूप व अर्थ ह्यांत झालेल्या फरकांवरून ठरविले.

कालाच्या दृष्टीनें पुनः ह्यांत प्रकार पडण्यासारखे आहेत. प्राचीन तत्सम व अर्वाचीन तत्सम व प्राचीन तद्भव व अर्वाचीन तद्भव असे तत्समाचे दोन व तद्भवाचे दोन मिळून चार प्रकार पडले आहेत, प्राकृत भाषांमध्यें अविकृत राहिलेले शब्द हे प्राचीन तत्सम होत व विकृत झालेले शब्द प्राचीन तद्भव होत. अर्वाचीन बोली तयार झाल्यानंतर निरनिराळ्या कारणांनीं व निरनिराळ्या वेळां जे संस्कृत शब्द आले ते अर्वाचीन तत्सम होत. 'प्रार्थना, अग्निप्रवेश, आश्चर्य, स्वप्न, बालक, शरीर, नदी, प्रिय, प्रथम, ज्वर, दिवारात्रौ, शृंग, स्थान, इत्यादि शब्द अर्वाचीन तत्सम होत. त्यांचा प्रवेश अलीकडे झाला. ह्या शब्दांत विकृति झाली कीं तें तद्भव होतील. करम (कर्म), धरम (धर्म), खतरी (क्षत्रिय), काज (कार्य) इत्यादि शब्द अर्वाचीन तद्भव होत. ह्या शिवाय अर्धतत्सम म्हणून एक प्रकार कल्पून त्याचे पुनः प्राचीन व अर्वाचीन असे दोन पोटभेद मानिले आहेत. आदर्शिका>आदर्सिका>आदर्सिआं>आरसी; सर्षप>सरिसप सरिसव>सर्सों; पद्म>पदुम>पऊम>पऊवा; रत्न>रतन>रदण>रयण>रअअण. हीं त्यांचीं दोन दोन उदाहरणें होत. हे शब्द तद्भवच आहेत असें म्हणावयास हरकत नाहीं.

८५ मराठींतील शब्दसंख्या : मराठीचा शब्दसंग्रह अशा रीतीनें तत्सम, तद्भव, देशी, परकीय (फारसी, अरबी, युरोपीय) इत्यादि शब्दप्रकारांचा मिळून बनला आहे. ह्या शब्दसंग्रहांतील संख्या मोल्स्वर्थच्या कोशांत साठ हजार आहे. वा. गो. आपटे ह्यांची परिगणना पंचाहत्तर हजार आहे. महाराष्ट्रशब्दकोशकारांची परिगणना एक लाखावर म्हणजे एक लक्ष, बारा हजार, एकशें एकोणतीस इतकी आहे. त्यांत परकी शब्द (फारसी, अरबी, तुर्की) एकोणतीसशें आहेत. पंधराशें पन्नास शब्द युरोपियन भाषांतील इंग्रजीमधून आलेले असे आहेत. मूळ इंग्रजी शब्द पांचशें साठ आहेत. मराठीमधील धातूंची संख्या तीस हजार आहे असे राजवाडे ह्यांनीं एकदां लिहून ठेविलें. परंतु ती संख्या अतिरिक्त आहे. अगदीं कितीहि उदार परिगणना केली तरी मराठींतील धातूंची संख्या आठ हजारांच्या सुमारास होईल असें आम्हांस वाटतें.

शब्दसंख्येच्या दृष्टीनें पाहिलें तर मराठी भाषा फार संपन्न आहे. ती वाङ्मयानें संपन्न आहे. तिनें एकेकाळीं स्वराज्य केलें. दुसऱ्या एकेकाळीं तिनें साम्राज्य केलें. सर्व हिंदुस्थानांत एकेकाळीं फिरून ती स्वत्वं गाजवून आली. आत्मिक, दैविक, भौतिक अशा सर्व शास्त्रांत तिनें विचारप्रकटन केलें. कृषि, राज्यव्यवहार, युद्ध, उद्यम, धर्म, नीति, तत्त्वज्ञान, साहित्य वगैरे सर्व विषयांत तिच·

अप्रतिहत संचार होता. ह्या सर्व शास्त्रांतील कल्पनांच्या द्योतक अशा संज्ञा व शब्द मराठी भाषेंत वापरांत असलेच पाहिजेत. मराठी काय किंवा अभाआ. पैकीं कोणतीहि बोली काय, तिचा शब्दसंग्रह संपन्न होण्यास त्यांच्या मातृस्थानीं असलेल्या संस्कृत, प्राकृत ह्या भाषा कारणीभूत होत हें उघड आहे. त्यांत पुनः संपन्नतेच्या दृष्टीनें, भाषकांच्या संख्येच्या दृष्टीनें, विचारप्रकटीकरणाच्या सामर्थ्याच्या दृष्टीनें सर्व अभाआ. भाषांत मराठी भाषा बरीच अग्रेसर–दुसरी किंवा तिसरी–आहे. मराठी बोलणाऱ्या लोकांचा इतर भाषा बोलणाऱ्या लोकांशीं संबंध अगदीं पहिल्यापासून आल्यामुळें इतर भाषांतील शब्द मराठींत अपरंपार आले. दोन भिन्न भाषांचे, दोन भिन्न संस्कृतीचे समाज एकत्र आले म्हणजे ही भाषिक देवघेव होणारच. त्यांचे शब्द मराठींत आले. त्याप्रमाणें मराठी शब्द त्यांच्या भाषांत गेले असलेच पाहिजेत.

मराठी भाषेचा जन्म साधारणपणें खिस्तोत्तर ७०० च्या सुमारास झाला असें मानलें तर त्या काळापासून आतांपर्यंत कानडी, तामील वगैरे द्राविडी भाषा, फारसी, अरबी, तुर्की वगैरे शिमी भाषा, पोर्तुगीज, फ्रेंच, इंग्रजी वगैरे युरोपीय आर्य भाषा इतक्यांशीं मराठीचा संबंध आला. मूळ तिचें अधिष्ठान संस्कृत-प्राकृत ह्या भाषा असल्यामुळें मराठीशब्दसंग्रह प्रामुख्यानें व प्राधान्यानें संस्कृत-प्राकृतच असणार हें उघड आहे. त्याचा विचार आपण तत्सम–तद्भव ह्या शब्दप्रकारांच्या संबंधांत केला. हे शब्द तर मराठीचे मूळ वारसा हक्काचे होत. मराठी ज्या निरनिराळ्या संस्कृत–प्राकृत भाषांच्या अवशेषांतून उद्भूत झाली त्या भाषांतील शब्दांच्या देवाणघेवाणीचा परिणाम तिच्यावर झाला. तो परिणाम तसाच पुढें चालू राहणार हें उघड आहे. मराठीच्या जन्माच्या पूर्वीं संस्कृत, प्राकृत, अपभ्रंश ह्या भाषांचा परकी भाषांशीं संबंध आलाच असला पाहिजे. त्यांच्यांतील कांहीं परकी शब्द संस्कृत-प्राकृतमध्यें आलेले असले पाहिजेत व ते शब्द मराठींत उतरले असले पाहिजेत. जरी ते संस्कृत-प्राकृतच्या द्वारां मराठींत आले असले तरी ते परकीय होत. त्यांच्या मुळाचा तपास आपणास लावला पाहिजे. केवळ संस्कृत-प्राकृतमधून आले असें म्हणून भागणार नाहीं.

८६ अनार्य म्लेच्छ शब्द : आर्य लोक हिंदुस्थानांत स्थायी होण्याच्यापूर्वीं तेथें कांहीं मूळचे एतद्देशीय वन्य लोकांची वस्ती असली पाहिजे. आर्यांच्या रेट्यामुळें ते लोक पूर्वेकडे लोटले गेले. त्यांच्यापैकीं कांहीं बंगाल आसामच्या डोंगरखोऱ्यांत, कोणी राजमहेंद्रीच्या किंवा मणीपूरच्या आसपास डोंगरकपाऱ्यांत राहून बसले. कोणी अधिक पूर्वेकडे व दक्षिणेकडे खेंचले जाऊन अनाम, पेनांग, जावा, सुमात्रा, मलायाद्वीपकल्प, निकोबार बेट ह्या ठिकाणीं राहिले. आर्यांच्या भाषेचा ह्या एतद्देशीय लोकांच्या भाषांशीं संबंध येऊन शब्दांची देवाणघेवाण झाली असली पाहिजे. किती तरी परकी म्लेच्छ शब्द प्राचीन वैदिक संस्कृत वाङ्मयाच्या खबदाडींत किंवा सांदीकोपऱ्यांत सुरक्षित रीतीनें दबा धरून बसले व भोंवतालच्या संस्कृत वातावरणांत इतके एकरूप झाले कीं त्यांच्या परकीपणाचा ठसा पार नाहींसा झाला. ह्या म्लेच्छ शब्दांचें पूर्ण संस्कृतीकरण झालें. हे शब्द अनार्य किंवा म्लेच्छ खरे पण ते कोणत्या विशिष्ट भाषेंतील आहेत हें पाहणें जरूर आहे. अनार्य, म्लेच्छ, द्राविडी, देशी अशीं त्यांना नांवें आहेत. परंतु हा स्थूल निर्देश आहे; सूक्ष्म व चिकित्सक नव्हे. आर्यांच्या व द्राविडी लोकांच्याहि पूर्वीं हिंदुस्थानांत वसाहत केलेल्या लोकांच्या भाषांतील शब्द होत. म्हणूनच ह्या शब्दांना सिल्वा लेव्हीनें ‘आर्यपूर्व व द्राविडपूर्व’ असें उभयविध नांव दिलें. परंतु हें नामकरणहि सामान्य स्वरूपाचें झालें. ह्या वेदपूर्वकालीन भाषांचें संशोधन लोगन, कीन, फोर्बस, मुल्लर, कुह्न, लेव्ही, ब्लोक, प्रिझलुस्की, सुनीतिकुमार चतर्जी, प्रबोधचंद्र बागची व श्मिड ह्यानीं केलें. ह्या सर्व संशोधकांत श्मिड हा आद्य व मुख्य संशोधक होय. मान ख्मेर, मॉन अनाम, खासी, निकोबारी, मुण्डा व संताळीचा कांहीं भाग ह्या सर्व भाषांचा एक संघ किंवा वंश समजून त्यानें त्याला ऑस्ट्रो एशियाटिक असें नांव दिलें. ह्या भाषावंशाला मेलेनेशिया, पॉलिनेशिया, इंडोनेशिया येथील भाषा जोडल्या म्हणजे ह्या अनार्य भाषांचा “ आस्ट्रिक वंश ” तयार होतो.*

येथें एक गोष्ट सांगणें अवश्य आहे; नाहीं तर गैरसमज होण्याचा संभव आहे. ही शब्दांच्या मूळाची

---

* P. Schmidt : *Intro. Pre-A. Pre-D. P. 1* (**Article translated**).

विचिकित्सा आहे. युरोपीय संशोधकांनीं ही सर्व विचिकित्सा साधार, सनियम व सशास्त्र केली आहे. इतकें जरी आहे तरी आमची भूमिका आम्ही अधिक स्पष्ट करतों. हे परकी समजलेले अनार्य शब्द ऑस्ट्रिक भाषांतून आर्य संस्कृत भाषेनें घेतले असें आमचें म्हणणें नाहीं. ते शब्द आर्य भाषेंतूनहि अनार्य भाषांनीं घेतले असणें शक्य आहे. प्राचीन काळीं संस्कृत ज्ञानाचा पुनरुद्धार तीन कालखंडांत झाला. त्यावेळीं कदाचित् ह्या अनार्य शब्दांचें संस्कृतीकरण करून त्यांचा संस्कृत कोशांत अन्तर्भाव केला असला पाहिजे. महाभारताच्या संस्कृतीकरणाचा काल, गुप्त राजवटींचा किंवा अष्टादश पुराणलेखनाचा काल, हेमंचद्रसूरीचा काल असे हे तीन संस्कृतच्या पुनरुद्धाराचे कालखंड होत. ह्यांपैकीं कोणत्या तरी कालखंडांत त्या अनार्य शब्दांना संस्कृतमध्यें प्रवेश मिळाला असण्याचा संभव आहे. पुढील दोन्ही उपपत्ति संभवनीय आहेत. संस्कृतनें त्या भाषांतून हे शब्द घेतले; किंवा त्या भाषांनीं हे शब्द संस्कृतमधून घेतले. त्या दोन्ही भाषांतील शब्दांत आढळून येणारीं उत्तान **शब्दसाम्यें** दाखविण्याचा आमचा उद्देश आहे. मराठी भाषेच्या शब्दरत्नाकारांत आलेला हा बाहेरचा पहिला शब्दप्रवाह होय.

८७ आस्ट्रिक-मराठी शब्दसाम्यें : मराठींतील ऊंस शब्द व ऑस्ट्रिक भाषांतील sau, bos, bois, bays, bush, buns, bus, buush, abau हे शब्द ताडून पाहण्यासारखे आहेत. तसाच मराठी तांबूल, तांबोळी ह्या शब्दांचें ऑस्टिक शब्दाशीं साम्य आहे. त्या भाषांत तम्, -ताम्,+बूल, हे दोन शब्द आहेत. मलु किंवा बलु ह्याचा अर्थ वनस्पती (नागवल्लीसारखी) असा आहे. बाण ह्या मराठी शब्दाचें ऑस्ट्रिक पनः, पोनह, प्नोह, ह्या शब्दांशीं उच्चाराचें व अर्थाचें साम्य आहे. कार्पास, कापूस, कापड हे मराठी शब्द ऑस्ट्रिक कार, पास, सॉक, सोक, तोंक इत्यादि शब्दांसारखे दिसतात. बाल, वाल, कम्बल, शाल्मली सांवरी हे शब्दहि बुलु (मलायी), बोलाऊ, बुलु, पोलोक, बोलो, कोपल, साम्बल, सिम्बल ह्या शब्दांशीं संबद्ध दिसतात. केळ, कर्दळी ह्या मराठी शब्दांचा केलुइ, गेलुइ, ग्लुइ, तेलुइ, केलुइ, के-ली, गेली-लई वगैरे आस्ट्रिक शब्दांशीं संबंध दिसतो. तसेच मातंग (मा+तंग) ह्या शब्दाचें ऑस्ट्रिक तोङ्ग, तुङ्ग, ताक, दांग, ताङ्ग ह्या शब्दाशीं साम्य दिसतें. मयूर, मयूक, मोर हे शब्द आस्ट्रिक शब्दांशीं संबद्ध दिसतात. मकर, मर, अभ्रक, मेर, ब्रक, म्रा, रक् (ओरडणें) हे आस्ट्रिक शब्द होत. नांगर, लांगल, लांगूल, लिंग, लगुड, लाकूड हे मराठी शब्द आस्ट्रिक शब्दांसारखेच दिसतात. अंकाल, लिंकोर, तेंगाल, तेंगल, तंगाल, तिंगल, हे निरनिराळया पोट भाषांतील आस्ट्रिक शब्द होत. ह्यांतील कल् किंवा लक् हा धातु आहे. खासी, संताळी, मुंडारी भाषेंतील शब्द लोह्, लोकू, लोकु हे ताडून पाहाण्यासारखे आहेत*.

ऑस्ट्रिक आणि मराठी ह्या दोन भाषांतील शब्दसाम्यें आणखी कांहीं खालीं मांडून दाखवितों. कंसाबाहेरील शब्द मराठी आहेत व कंसांतील शब्द ऑस्ट्रिक आहेत. अंगार, अंगारा, इंगळ (अङ्ग, जेंग-क, जंगकट, निगक ह्), अम्मा=स्तन (आम्, आहम्, अम्, बू, बोस), आलें (मलायी-अल्य, हलिय, लिया), उंट (उंट), उंदिर (कंदूर, कोन), चुवा (चाअ, त्साअ), कचरा (चिचा, किचा, चिकक), कड (कोडु), कपाल (केबल, क्पाल, कपल), कळक (करेक,-क,-ल,-लेऊ), काळाकुट्ट (ह्यांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. त्यांपैकीं कुट्ट हा ऑस्टिकसम आहे. हेरकोट, ऐकुट, हिकुट), कुकलें (केन, केन्यू, केनॅकग), कुरूप (कुरप,-फ=कांट्यानें केलेलें घर), कुरंग (किजंग, कियंग, किदंग=हरीण), कोळी (क्लाऊ, ग्लाऊ), खाकरा (कहाक्, खाक्), खाट,-टे (काट, कट, चाट, चट=खारट), गज (गगो, गज, गाजह), गजकर्ण (गस्, गच्, गजहकुरण=कातडीचा रोग), गल (गोल, गुल=लहान खळगा, भोंक), गळा, घाट (गॉट, ग्लोह, गलो, कोलो), गाल (कपोल>कप, कपोऊ, थबाल>थोबाड), गोचीड, गवळी, (गच् गाई).

---

* आस्ट्रिक शब्दांबाबत पुढील निर्देश पहा.

(1) Przyluski : *Pre-A and Pre-D. P. 130* (Translated by P. C. Bagchi).

(2) Skeat and Blagden : *Vocabulary* (*Religion of the Vedas*). *P. 11-12.*

(३) कृ. पां. कुलकर्णी : म. सा. पत्रिका, वर्ष १७, अं. १-२.

चरू (स्राउ, स्रो, चरोइ, जरोइ), चिचुंद्री (चंदोर चंतूर, चिंदिल), चिमणी (चिअड), चिलट (ची, चइ, चोअ, सइ), चुडी (चुल्ली, चुल, कुल, चुका, चुन्), छिनाल (नोइ, हेनोंइ, नेनोइ>निजणें= मैथुन करणें), छूँ, छूँ, कूँ, कूँ (छके, चुके, छो, चो, चु, चुआ=कुत्रा), छोटा (चोट, कसूट, मचूट, चूट), जांग, जांगाड (चन्, चोंग, जोंग जुंग, जंगग), जांब (जंबु), ज्वारी, जोंधळा (जव, जगुंग, जागोंग, जाली), टंपलणें (तेम्पाल, टंपाल), टांग, ढांग, ढेंग, (केतेंग, रेंगुह>ढेंग, जेंकु<जंघा), टाळकें (कल्का, तलके), डावा (डा-वाल), डाहाळी (डेहे, डनन), डुक्कर (डेगह, डेगाह), तंबाखू (तेंबाकी, तोंबाको, तेंवकड, तोबाको, तो=वनस्पती), तोंड (तेनुद, लुद, थ्यो), नांगर (तेंगल, तेंगाल), नारळ (नियोर कोंलइ).

पलिता (पालोष), पाकोळी (पुक, पोक, पलिक, पलग), (मलायी शब्द-पुकी-पुकि=स्त्रीयोनि), बाहु (बहु; बहुक, बहुक, बाहो), बीज (बिजि बिजेक,-ह) बेडूक (बुअक, तबेक, ठबेक), मनुष्य (मेनिक, मेनिक, मोन, मेइन, नोइ, मेन्दी), मशक, माशी, मच्छर (मुस, मोइ, सुओइ), मिशी (मिसेइ, बिसई), रामफळ (रांबइ, रंबुतन), लवंग (चंगेक, त्केंग, हिअ (चिनी= सुंगधी नख), लिंबूर (निंबूर), (लंवाँग), लुच्चा (लुत्, लुइच, लुएच, लुओच), वांगें (तिआंग, तिंग; बोहतिंग), वाटी (बेटिस-गुडघ्याचा सांधा), वारा (बेरुअ, बेरुअह).

शेवट (स ऍ, सेन, शेन), शेळो (ह्मेस, श्येस, हेस्स, बेबेक, बेब), सकाळ (सिआकाल, काल,-यकाल), सपाट (चेपेट, पेमाप), सबंद (स-बेन्दा, सबेन्द), साल (चेलॉक, शेंबलाक, सेलुपट, स्लुप्ट>सालपट), सुणें (चिओक, चु, चु ओ, च्छो, छो, छिया), हुडकणें (कह, यहोको, हिक, घ्, हिंळके).

द्राविडपूर्व शब्दऋण : ऑस्ट्रिक-मराठी शब्दसाम्यें येथवर दाखविलीं. ही शब्दांची देवघेव फार प्राचीन कालीं झाली. आस्ट्रिक भाषांनीं आर्यभाषांपासून हे शब्द घेतले किंवा ऑस्ट्रिक भाषांपासून आर्य भाषांनीं घेतले हीं दोन्हीं अनुमानें शक्य आहेत. ह्या ऋणांचा काळ द्राविडपूर्व (किंवा आर्यपूर्व) आहे असें विद्वान् समजतात. असल्याच प्रकारचें द्राविडपूर्व शब्द-ऋण पुढील शब्द आहेत. हे आर्य आहेत कां अनार्य आहेत हें सांगणें कठीण आहे. प्राचीन संस्कृत ग्रंथांत त्यांची व्युत्पत्ति दिली आहे. फावडें (सं. स्फ्यै=वृद्धौ)= माती खणून पसरण्याचें हत्यार, काणा (तै. संहिता-काणः), उशी (उपश्री-कौषी. उप.), खिचडी (कृसर-पंचविंशब्रा.), ताणा (तान-तै. संहिता), पडदणी (परिधान.-अ. वेद.), दशी (दशा=टोंक-श. ब्राह्मण).

पुढील शब्द अस्सल देशी मूळ मराठी म्हणून समजले गेले आहेत. त्यांचीहि सं. व्युत्पत्ति देण्याचा प्रयत्न केला आहे. उंग=जवळ, ओहडी=बायको, ओहडास=नवरा, (सं. वह्, वोढ्ढ), (ओढ्या-पाट, म्होतुराचा नवरा), किरला=खेंकडा (सं. कुलीर); डवरा=म्हातारा; डोशी, डवरी=म्हातारी; कांब (सं. कमठ); कूकडा=कोंबडा (कुक्कुट).

८८ इंडोयुरोपियन : ह्या द्राविडपूर्व व आर्यपूर्व शब्दऋणानंतर प्रत्यक्ष द्राविड किंवा आर्य ऋणाचा विचार येतो. प्रथम आपण आर्य शब्द-ऋणाचा विचार करूं. ह्यांत प्राचीन आर्य किंवा इंडोआर्यन, संस्कृत ह्या भाषांतील शब्दांचा संबंध येईल. त्यांतहि इंडोआर्यन भाषांतील शब्द-ऋण हें फार प्राचीन होय. मराठी भाषेच्या जन्माच्या पुष्कळच अगोदर-प्राकृत संस्कृतच्याहि जन्माच्या अगोदरच्या काळांत हें ऋण घेतलें गेलें. ह्याचा निर्देश आम्हीं प्रस्तुत कोशांत '*IE.*' ह्या प्रतीकानें केला आहे. ह्या ऋणाचें स्वरूप स्पष्ट समजावें म्हणून व त्यांचा प्राकृत-देशीभाषा ह्यांच्याशीं अनुस्यूत संबंध प्रतीत व्हावा म्हणून अधिक निर्देश करणें जरूर आहे. हेमचंद्राच्या धातुपाठांत असे पुष्कळ धातु आहेत कीं त्यांचे संस्कृत मूळ प्रतीक काय असावें हें सांगतां येत नाहीं. हेमचंद्रानें दिलेली व्युत्पत्ति पटत नाहीं. कोणी ते देशी धातूंपासून आले असें समजतात. तर कोणी त्यांना द्राविडी समजतात. तर कोणी त्यांचा समानार्थक संस्कृत धातूंशीं संबंध जोडतात. ह्यांची उपपत्ति लुई ग्रे ह्यानें लावण्याचा प्रयत्न केला आहे*. ह्या धातूंचा संबंध संस्कृत धातूंशीं नसून इंडोयुरोपियन वंशांतील इतर दुसऱ्या

---

* Louis Gray : *Fifteen Prakrit Indo-European Etymologies, AOS Vol. 60, No. 3 P. 361.*

शाखांतील भाषांमधील धातूंशीं आहे हें त्यानें उदाहरणांनीं सिद्ध केलें आहे.

१ अट्टग=व्यायाम, तालीम. संस्कृत मूळ–अट्टनम् व द्रा. मूळ–ओदोनो अशीं आहेत. परंतु तीं बरोबर नाहींत. त्याचा संबंध *IE*. Derto-no, Dert = set in motion ह्यांशीं आहे.

२ काढणें–प्रा. कढइ–सं. मूळ कर्ष् समजतात तें बरोबर नाहीं. कर्ध् हें मूळ असावें. त्याला आधार इंडोयुरोपियन पाश्चात्य भाषांतील शब्दांचा आहे. *IE*. Krzd, qrsd, qere, qeld हीं रूपें त्याच्या मूळाशीं असावींत.

३ चढणें-प्रा. चढाई, ह्याचें संस्कृत मूळ निश्चित नाहीं. *IE*. qelde, qele, queldhe. हीं रूपें मूळ असून त्यांना इतर पाश्चात्य भाषांतील रूपांचा आधार आहे.

४ काटणें (कट्, कुट)–हा धातु संस्कृत कुंट्, चृत्, कृत् ह्या रूपांशीं जोडला आहे. परंतु *IE*. Sqere ह्या रूपाशीं तो संबद्ध असावासा वाटतो. ह्याला इतर पाश्चात्य भाषांचा आधार आहे.

५ डोई हा मराठी शब्द व डोय, डोंगी ह्या प्राकृत शब्दांचा संबंध संस्कृत द्रोण, द्रोत, द्रौत ह्या शब्दांशीं जोडतात. परंतु तो *IE*. Dereus ह्या धातूशीं असावा.

६ मराठी ढाकणें, झाकणें–प्रा. ढक्कई ह्यांचा संस्कृत तिष्ठ् ह्या धातूशीं संबंध जोडतात. परंतु तो *IE*. Steqneti ह्या धातूशीं असावा. म्हणजे मूळ तिष्ठति नसून स्थक्नाति असलें पाहिजे.

७ म. दिसणें; प्रा. दंसई ह्याचा संबंध संस्कृत दृश् ह्यांशीं लावतात. परंतु मूळ *IE*. Derke हा धातु असावा.

८ म. दल = तुकडा; प्रा. दलइ, सं. दलयति. *IE*. Dolo ह्या धातूशीं संबद्ध आहे.

९ म. तिसरा; प्रा. तच्च, सं. तृतीय, *IE*. Tere ह्याशीं संबद्ध आहे.

१० म. बैल; प्रा. बैल्ल, सं. बदिल, बंदीलो. *IE*. Bende (बिन्दु).

११ म. रुख; प्रा. रुक्ख; सं. वृक्ष. *IE*. Leuqe ह्याचा अर्थ दीप्ति असा आहे.

१२ म. लाठी; प्रा. लठ्ठी; सं. यष्टि. *IE*. Rasti, Rakti, Rege.

१३ म. लुंगविणें; प्रा. लुक्कइ; सं. (?) *IE*. Lanqo, Luqate.

१४ म. हाट; प्रा. हट्ट; सं. हाट. हा शब्द द्राविडी आहे असें किटेल म्हणतो. परंतु तौलनिक दृष्ट्या त्याचा संबंध *IE*. erto, Gere ह्या धातूशीं आहे.

१५ म (?); प्रा. हुत्त; सं. व्हे, हूत. *IE*. Dhaue.

८९. आर्य शब्दऋण: मराठी शब्दसंग्रहांतील ऑस्ट्रिक व इंडोयुरोपियन असे दोन प्राचीन घटक सांगितले. ह्यानंतर तिसरा घटक आर्य शब्दांचा होय. आर्य भाषांतील शब्द म्हणजे प्रथम प्राचीन संस्कृत भाषेंतील शब्द होत. मराठी भाषेच्या जन्माच्या पूर्वीचें हें शब्द–ऋण होय. हें दोन स्वरूपांत आलें. एक स्वरूप तत्सम व दुसरें स्वरूप तद्भव. पैकीं पहिले तत्सम शब्द प्रत्यक्ष संस्कृतभाषेमधून घेतले. दुसरेहि संस्कृतमधूनच परंतु प्राकृत भाषांच्या मार्फत घेतले. पहिलें तत्सम स्वरूप अविकृत आहे. दुसरें तद्भव स्वरूप विकृत आहे. ह्या दोन्ही शब्दांचा विचार मागें केलाच असल्यामुळें त्यांचा पुनः निर्देश करणें जरूर नाहीं. कोशांत तर त्यांचा निर्देश प्रत्येक आर्योद्भव शब्दाच्या बाबतींत केला आहे. तद्भव शब्दांच्या बाबतींत कांहीं शब्द कांहीं विशिष्ट प्राकृत मधूनच आले आहेत. कांहीं शब्द पालीमधून, कांहीं माहाराष्ट्रीमधून, कांहीं शौरसेनी, अर्धमागधी, तर मागधी पैशाची-तर कांहीं अपभ्रंश भाषांमधून मराठींत आले आहेत. त्यांचाहि निर्देश कोशांत ठिकठिकाणीं केला आहे. प्राकृतमधून आलेल्या तद्भव रूपांपैकीं पालीमधील रूप हें त्यांतल्या त्यांत अधिक प्राचीन समजतात. ह्या प्राचीन तद्भव रूपांची कल्पना येण्यासाठीं कांहीं पाली रूपें एकत्रित करून देतों.

पाली शब्द : अडीच (अढतीय), अठरा (अट्ठरस), चौदा (चौद्दस), छत्तीस (छत्तिंश), छप्पन (छप्पञ्ञास), पंधरा (पण्णरस), पन्नास (पण्णास), बारा (बारस); जळू (जळूका), उन्दुरो, घोणस (सं. गोनस–घोणस), घोरपड (गोरफिडी), छावा (शाव–छापो), मांजर (मज्जारो), साप (सप्पो), ससा (शश–ससो), सुणें (श्वन्–सुणें), डोणी (द्रोणी-दोणी), आसूं (अस्सू), खाज (खज्जु), आप्पा, नणंद, पाहुणा, सासरा (ससुरो), सासू, सून (सुण्हा), वादळ वद्दलिका, वादलिका), न्हावी (नापित, नहापितो), वाक) (वल्क), काकडी (कर्कटिका>कक्कारि), अंबील, खीर,

खाजें, गुळ (गुळो, गुड), आपसूक (आत्मसुख, अल्पौत्सुक्य>अप्पोसुक्को), अकटोविकट (अकृत-विकृत>अकटविकट), ओलें (अल्लो), उकिडवा (उक्कटिको>उत्कटिक); खार, थोकडा, धिम्मा, पक्का, बुड्ढा, मक्ख, रिता, वांज, साच, साजूक (सद्यस्क>सज्जूक्कम्), सारखा (सरिक्खो), सुका (हिंदीमधून), गांठ, थोम, साद, ताक, तेल, लोणी, पीठ, भात, भूस, लोण, सातु, शिंगाडा (शृंगाटक–सिंघाटो), हळद, उंबरा, ओरी, ओळंब, कप्पा, कवाड, कूड, खिळा, चिखल, तांबें, ताळा, थाळी, पलंग, पेला, वेज, सहाण, सूप, शिंकें, छत्री, साडी, वाकळ, वाण, सूत, विनंती (विज्ञप्ति> विन्नत्ति) इत्यादि इत्यादि.

हे पाली भाषेंतील कांहीं शब्द झाले. असेच इतर प्राकृत भाषांतील शब्द काढून दाखवितां येतील. कोशांत ते त्या त्या ठिकाणीं दिलेच आहेत. येथें त्यांची पुनरावृत्ति करीत नाहीं.

९० द्राविडी–कानडी शब्द : ह्या प्राचीन आर्य भाषांतील शब्दांच्या ऋणानंतर प्राचीन द्राविडी भाषांतील शब्दऋणाचा विचार येतो. द्राविडी भाषांत कानडी, तामील, तेलगू, मल्याळी व तुळू ह्या भाषांचा समावेश होतो. ह्या सर्व भाषा मराठी भाषेच्या जन्माच्या अगोदर अस्तित्वांत होत्या. मराठी भाषा सध्यां ज्या प्रांतांत बोलली जाते त्या प्रांतांत मराठी भाषेच्या पूर्वीं कानडी व तेलगू ह्या भाषा प्रचलित होत्या. आंध्र काय किंवा त्यांच्यानंतरचे आंध्रभृत्य शातवाहन काय, हे दोन्हीहि राजवंश कानडी भाषेचे कट्टे कैवारी होते. कानडी भाषा एके काळीं कावेरी नदीपासून उत्तरेस गोदावरी नदीपर्यंतच्या प्रदेशांत बोलली जात होती असें अमोघवर्ष म्हणून एक कन्नड कवि म्हणतो. कुमारील भट्टानें पंच-द्राविडांत तामील, तेलगू, कानडी ह्यांबरोबर महाराष्ट्र आणि गुजरात ह्या दोहोंचाहि निर्देश केला आहे. कुमारील भट्टाचें हें परिगणन भाषिक असण्याचा संभव आहे. मराठी भाषेच्या जंन्मोच्या वेळीं–यादवकाळांत मराठीचा आणि कानडी, तेलगू ह्या द्राविडी भाषांचा अतिनिकट असा संबंध आला. त्याच्याहि पूर्वीं चालुक्य, राष्ट्रकूट व वाकाटक ह्या तीन राजवटींत कानडी भाषेचा पुरस्कार झाला. चालुक्य राजे इं. स. ६०० च्या सुमारास उदयास आले. त्यांची राजधानी विजापुराजवळ बदामी येथें होती. राष्ट्रकूटांनीं इ. स. ७५७ पासून इ. स. ९७३ पर्यंत महाराष्ट्रावर राज्य केलें. हें घराणें कानडी होतें, असें कांहीं विद्वान् म्हणतात. ह्यांची राजधानी मालखेड येथें होती. ह्यांच्यानंतर दुसरें चालुक्य घराणें उदयास आलें व त्यांनीं इ. स. ११२६ पर्यंत राज्य केलें. वाकाटक घराणें हें ब्राह्मण होतें. ह्या सर्व राजवटी मराठी भाषा जन्म पावण्याच्या सुमारास त्या प्रांतावर राज्य करीत होत्या. ह्या कानडी भाषेच्या पुरस्कारक होत्या. तेव्हां कानडी, तेलगू वगैरे भाषांचा परिणाम मराठी भाषेवर झाला असल्यास नवल नाहीं. मराठीच्या जन्मानंतरहि यादवकाळ, बहामनीकाळ व शिवकाळ ह्या तिन्ही काळांत कानडी भाषेचा परिणाम होत होता. पुष्कळ द्राविडी शब्द पूर्वींच संस्कृत–प्राकृतमध्येंच दडी मारून अगोदरच बसले होते. ते तर मराठींत आलेच. परंतु पुढें मराठीचा स्वतःचा संसार सुरू झाल्यानंतर पुष्कळ कानडी, तेलगू वगैरे शब्द मराठींत आले. शिशुपालवधाचा कर्ता भास्करभट्टापासून तों तुकारामापर्यंत कानडी शब्दांचें लोण मराठींत येतच होतें. रे. किटेलच्या कानडी कोशांतील शब्द प्रस्तुत कोशांत त्या त्या ठिकाणीं दिलेच आहेत. त्यांशिवाय आम्हांला जीं अनेक शब्दसाम्यें आढळलीं तींहि आम्हीं दिलीं आहेत. ज्ञानेश्वरींतील कानडी शब्द उल्लेखनीय आहेत. अडालु (भय), उळीग (सेवा), ओगर ('जेवण), उडव, कतकटा, कडसण, मातु, मच्छे, सावळे इत्यादि. शिशुपालवधांत पुढील कानडी शब्द आहेत. गुढी, गुंडें, उगुढें, पळें, गदरोल्लु, हडप, डम्ब, बाप, ताली, तोडका इत्यादि. पुढील कांहीं कानडी शब्द मराठी–कानडीच्या सीमाप्रांतात वापरांत आहेत. अइलिआ, आरा, ओरंबा, करळ, कें‌ड, कोलें, कोल्हे, कुणगा (वाफा), कोंगळी, गद्दी, गादा, गुढें, गुडे, गुडार, -ळ, गुरुळ, गोरंबु, तिमाणें, मस्तर, मरड, मडखळ, मस्तुती, यरकाल, हिंडीरे, हिंगारी, मुंगारी, कोळपें, नारू, मुडा, आढी, करड (तांदूळ), कानो, कारोळा, गुणी, गेणो.

पुढील कानडी शब्द उल्लेखनीय आहेत. तिमया (सं. त्रिमल), बसव (सं. वृषु), विरण्णा (सं. वीर), टंका (टंक), मुकटा (मुद्ग), पेड (पीठ), कोचाळें, कचोळें, हरळ, हेंडा (मोठें ढेकूळ), गोहटा, कोल्हार (गुहा), राड (रेंदा), चुट्टा (तंबाखूची वळी), तुंबा, दिंडा, ओटा, ओटी (उपस्थ), ओंडा, गड्डा, चिवा, बांबू, परडें, परडी (पात्रविशेष), बाठी, इजट

(गूळ खाणारें मांजर), उळ, उळी, कडस, अक्का, अण्णा, अम्मा, अधा, आके (नणंद), कोळगा.

९१ तेलगू शब्द : द्राविडी भाषांपैकीं कानडी भाषेंतील शब्दांप्रमाणें तेलगू भाषेंतील शब्दहि मराठींत आढळतात. आंध्रांच्या राजवटींत ह्यांचा महाराष्ट्राशीं संबंध आला. ऐतरेय ब्राह्मणांत आंध्रांचा उल्लेख आहे. आंध्र, पुंड्र, शबर, पुलिंद ह्या चार दस्युजाती विश्वामित्राच्या मुलांचे वंशज म्हणून उल्लेखिल्या आहेत. टॉलेमीनेंहि ह्यांचा उल्लेख केला आहे. आंध्रांचा व मराठ्यांचा संबंध इ. स. तिसऱ्या शतकापर्यंत मागें जातो. पुढील तेलगू शब्द उल्लेखनीय होत. वकट (ओंकट), लेंड (रेंड), मुंड, आर, वेद (ऐद), झक, ओदु, नाल (कान. नाल्कु), अनारसा, चावम्यॉव (चाउ = कान), बुरगुंडा, अडसण, अरवार, करडा, काचका, गजगा, कोडी, चक (वास्यास आलेली भूमी), चेक, जाड, टाळा–,ताळा (ते. टाळमु, सं. तालयंत्रम्), कुडुकमिडुक = दागिने वगैरे, बरड (ते. बरड, सं. बरटी = राळा), शिकेकाई (कान. सिगे = वनस्पति) लुकण.

९२ तामील शब्द : तामील हा शब्द पुढील मार्गानें व्युत्पादितात. द्रविड > दमिड > द्रमिल > तामील. पुढील तामील शब्द मराठींत आले आहेत. एळव, ओडप, कोंट्टा, ब्जाडी, टेंगुळ, मट्टा, भेंडी, पडतोरा, मांजरपाट (मादरपाट, मद्रपोल्लम), सार (चिंचेचें), चाटी (सं. श्रेष्ठिन्), चिल्लींपिल्लीं.

९३ अभाआ. शब्द-ऋण : कानडी, तामील, तेलगू ह्या भाषांतील शब्दांच्या ऋणानंतर कालाच्या दृष्टीनें अर्वाचीन भारतीय आर्य बोलींतील शब्दांच्या ऋणाचा विचार येतो. आर्य शब्दांच्या ऋणाचा विचार तीन भिन्न कालखंडाच्या दृष्टीनें केला पाहिजे. एक प्राचीन आर्यभाषा, मध्ययुगीन आर्यभाषा व अर्वाचीन आर्यभाषा अशा तीन कालखंडांत आर्य शब्दांचें ऋण मराठीनें घेतलें. अर्वाचीन आर्यभाषांच्या बाबत कोणता शब्द कोणत्या भाषेनें घेतला हें सांगणें कठीण आहे. हिंदी, गुजराती, बंगाली, उरिया, मराठी इत्यादि अर्वाचीन आर्योद्भव भाषा संस्कृत–प्राकृत–अपभ्रंश ह्या मार्गानें उत्पन्न झाल्या आहेत; म्हणून ह्या सर्व भाषांत संस्कृतमधील पुष्कळ शब्द तत्सम व तद्भव ह्या दोन्ही स्वरूपांत सांपडणें शक्य आहेत. संस्कृत शब्द ह्या सर्व आर्योद्भव भाषांच्या सारख्याच मालकीचे होत. तेव्हां अमुक एका भाषेंतून अमुक एक शब्द अमुक एका दुसऱ्या भाषेंत आला असें म्हणणें पुष्कळ वेळां धोक्याचें होतें. सं. ‘मातृ’ ह्या शब्दापासून तत्सम माता व तद्भव माय, मा, माई असे आले आहेत. आतां ह्यावरून कांहीं अनुमान निघेल काय–कीं मराठीनें माई किंवा माय हा शब्द हिंदीपासून किंवा पंजाबीपासून घेतला किंवा हिंदीनें ‘मा’ शब्द मराठीपासून घेतला ? हीं अनुमानें काढलीं तर तीं सयुक्तिक ठरणार नाहींत.

९४ त्यासंबंधीं नियम : ह्यासंबंधीं पुढीलसारखे कांहीं नियम बांधले तर मार्गदर्शक होतील.

१ प्रथम संस्कृत तद्भवाचें रूप ज्या सर्व भाषांत सारखें किंवा अतिसदृश होतें तो तद्भव शब्द इतर भाषांतून मराठीनें घेतला असें म्हणूं नये.

२ त्या विशिष्ट भाषेची वर्णप्रक्रिया किंवा उच्चारप्रक्रिया त्या तद्भवांत दिसल्याविना तो शब्द त्या भाषेंतून किंवा भाषांतून मराठीनें घेतला असें म्हणूं नये. उदा:—हरताळ.

३ संस्कृतमधून येणाऱ्या तद्भवास एखाद्या भाषेंत जर विशिष्ट अर्थ आला असेल व मराठींत त्या अर्थानें जर तो तद्भव रूढ असेल तर त्या भाषेंतून तो आला असें निश्चित समजावें. उदा.—मांदगी=आजार हा शब्द गुजरातीमधून मराठींत आला.

४ विशिष्ट प्रांतांतील शहराच्या किंवा विशिष्ट लोकांच्या रितिरिवाजावरून जर एखादा शब्द निर्माण होऊन रूढ झाला तर तो त्यांच्या भाषेंतील होय असें समजावें (धमणी, धमनी गाडी>दमण गांवची गाडी; ही व्युत्पत्ति संशयित आहे).

५ विशिष्ट प्रांतांत विशिष्ट शब्द रूढ असतात, तेथून ते दुसऱ्या भाषांत जातात व रूढ होतात. उदा. पक्वान्नांचे शब्द विशिष्ट रूढ आहेत. तीं पक्वान्नें महाराष्ट्रांत केलीं व त्या पर प्रांतांतील शब्द त्याबद्दल वापरले तर त्या परकी भाषेंतील तें ऋण होय हें उघड आहे. ‘उप्पीट=खारा सांजा’ हा पदार्थ कानडी आहे. उप्पु–मीठ; पीठ (सं. पिष्ट). रसगुल्ला हा शब्द बंगाली आहे. रबडी हा शब्द हा हिंदी आहे. सुतरफेणी हा गुजराती आहे. हे शब्द मराठीनें त्या त्या भाषेंतून घेतले. ह्यांचें मुळ जरी संस्कृत

आढळलें तरी ते संस्कृतमधून मराठींत आले असें समजूं नये. *

९५ अर्वाचीन युरोपियन आर्य (पोर्च्युगीज) शब्द : अर्वाचीन भारतीय बोलींनंतर कालाच्या दृष्टीनें अर्वाचीन युरोपियन आर्य शब्दांचा विचार येतो, ह्यांमध्यें पोर्च्युगीज, फ्रेंच, डच, इंग्रज, जर्मन इतक्या युरोपियन आर्य भाषांचा आपणास विचार करावा लागेल. ख्रिस्तीशकाच्या पंधराव्या शतकाच्या आरंभीं पोर्च्युगीज लोकांशीं संबंध आला.

त्यांचा व्यापार, धर्मप्रसार, लोकांचा छळ, राजवट व त्यांचा उच्छेद इत्यादि बाबींमुळें बरेच पोर्च्युगीज शब्द मराठींत आले. अद्यापिहि दक्षिण कोंकणी भाषेंत ते सारखे येत असावेत. मराठींत पुढील पोर्च्युगीज शब्द रूढ आहेत. परतकेस, पुर्तुकाल, गोवरंदोर, विजुरे, मनवर, गुराब, बतेरी, माखजन, क़ाजू, कंपू, काडतूस, काजें, चेपें, कुतनी, फालतु, फीत, घमेलें, लवाद, नाताळ, पगार, पाव, पसार, पिकाव, टिकाव, परात, पुरावा, रिफाड, खण, रैंड, सोडत, तुरंज,–ग, वार, बिजागरी, अननस, अलमारा, रत्तल, बशी, बटाटा, बिस्कूट, बंब, बुराख, चावी, कोबी, खमीस, इस्त्री, कर्नल, जुगार, लिलाव, मेज, मेस्त्री, पाद्री, पोपयी, पेरू, पिंप, साबण, तंबाखू, वरांडा, भोपळा, आचार, लोणचें, हापूस, अय्या, बादली, बारडी, बांक, बर्करा, बटेला, बटवा, बूज. (ह्यांतील कांहीं शब्द दुसऱ्या भाषेंतील असून ते पोर्च्युगीज भाषेच्या द्वारां मराठींत आले आहेत).

९६ फ्रेंच शब्द : युरोपीय भाषांपैकीं आणखी एका भाषेमधून कांहीं शब्द मराठींत आले. जसा पोर्च्युगीज, इंग्रज, डच ह्या लोकांचा संबंध महाराष्ट्रीय लोकांशीं आला तसा फ्रेंचांचाहि आला. सतराव्या शतकापासून हा संबंध सुरू झाला. तो अठराव्या शतकांत पेशव्यांच्या अमदानींत, निजामशाहीमध्यें, शिंदे वगैरे सरदारांच्या दरबारीं वाढतच गेला. एतद्देशीय राज्यकारभारांत फ्रेंच बरेच वावरूं लागले. लाली, बुसी हे तर चांगले मुत्सद्दी व सेनापति म्हणून प्रसिद्ध होते. महादजी शिंद्यांच्या दरबारीं पेरॉन्, डी बॉईन ह्यांनीं सैन्याच्या शिस्तशिक्षणाच्या बाबत चांगलें नांव मिळविलें. सैन्यांत तोफखाना, कवाईत, दारुगोळा वगैरेवर देखरेख फ्रेंचांचीच असे. इब्राईमखान गाडदी, पानशे मंडळी फ्रेंच्यांच्या तालमींत तोफखान्याचे दर्दी झाले. जरी ते लोक थोडे होते तरी एक वेळ हिंदुस्थानांत राज्य पैदा करण्याबाबत यशस्वी स्पर्धा करण्यापर्यंत त्यांची प्रतिष्ठा हिंदुस्थानांत बद्धमूल झाली. राज्यव्यवहारांत फ्रेंचांचा इतका संबंध आल्यामुळें त्यांच्या भाषेंतील कांहीं शब्द मराठींत शिरले असल्यास नवल नाहीं. जे फ्रेंच शब्द मराठी भाषेंत आत्मसात् झाले आहेत ते खालीं दिले आहेत.

मूळ पहिला शब्द त्यांच्या नांवासंबंधीं रूढ असलेला **फिरंगी** हा. फ्रेंच लोकांना इतर युरोपीय पोर्च्युगीज वगैरे लोक Franks असें म्हणत. ह्याच शब्दाचा अपभ्रंश होऊन **फिरंगी** हा शब्द तयार झाला. ह्या शब्दाच्या अर्थाची व्याप्ति पुढें पुढें वाढली. तींत अर्थाचें सामान्यीकरण झालें, व मूळ फ्रेंच लोकांचा वाचक जो शब्द होता तो सर्व युरोपीय परकी लोकांचा वाचक बनला. पुढें तर त्याला परकी, म्लेच्छ, यवन असा अर्थ आला. मूळचा विशेष स्वरूपाचा अर्थ सामान्य स्वरूपाचा झाला.

ह्याच्याच जोडीचा **फरासीस** हा शब्द. फ्रेंच लोकांना पेशव्यांच्या दरबारीं फरासीस असें म्हणत. सेंट ल्यूबीन हा फरासीसांचा वकील बारभाईमध्यें पेशव्यांच्या दरबारीं पुण्यास होता. हा शब्द मूळ फ्रेंच "Francois" ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे.

ह्याशिवाय मूळ फ्रेंच शब्दांचे अपभ्रंश म्हणून पुढील शब्द मराठींत रूढ आहेत. **आलतर** (voltair)= पहुडण्याची खुर्ची. **कडाबीन,–दीन** (Carabine) =रुंद तोंडाची आखुड बंदुक. **काडतूस** (Cartouche); **कूपन** (Coupen). **फरगत** (Fregate); **फरसबी** (French beans). **बांक** (Banc–Bench), **बलंदेज** (Hollandais), **फाणूस**=दिवा, फाणस=कंदील.

जर्मन भाषेंतील शब्द आले नाहींत. सध्यां कांहीं थोडेसे पर्वांच्या युद्धामुळें व नात्झी विचारसरणीमुळें आले आहेत. '**किंडरगार्टन**'चा प्रतिशब्द बालोद्यान हा रूढ आहे. **सोल्दाद** हा जर्मन **सोल्डाट** ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. हा सतरा व अठराव्या शतकांतील कागदपत्रांत आढळतो. हल्लीं हिटलर,–शाही, नात्झी, ब्लिट्झ् इत्यादि शब्द रूढ होत आहेत.

---

* डॉ. म. अ. करंदीकर–मराठी शब्दसंग्रहमीमांसा (अप्रकाशित).

डचांच्या भाषेंचें चिन्ह **इस्पिक, इस्पिड** ह्या असल्या शब्दांत मराठींत राहिलें आहे. हे शब्द अनुक्रमें डच भाषेंत Shcopen व Spade असे आहेत.

मेक्सिकन भाषेचे अवशेष दोन शब्दांतच आहेत. ते शब्द म्हटले म्हणजे **टॉमॅटो** व **चाकोलेट** हे होत. मंगोलियन भाषांपैकीं चिनी भाषेंतील जाकुजा, पेकोसुशांग वगैरे चहाचीं नांवें व जपानी भाषेंतील हाराकिरी, रिक्शा हे शब्द मराठींत आले आहेत.

९७ इंग्रजी शब्द : युरोपियन आर्य भाषांपैकीं ज्या भाषेचा विशेष व दीर्घकाल असा संबंध मराठी भाषेशीं आला अशी भाषा इंग्रजी ही होय. इंग्रज लोकांचा महाराष्ट्राशीं संबंध ३३६ वर्षांइतका जुना आहे. त्यांपैकीं पहिलीं दोनशें वर्षें हीं केवळ परिचयांत गेलीं. घनिष्ठ असा संबंध गेल्या दीडशें वर्षांतच आला. प्रथम व्यापारी म्हणून, नंतर युद्धसामुग्री देणारे म्हणून, नंतर मिशनरी म्हणून, नंतर राज्यकर्ते म्हणून त्यांचा संबंध आला. पहिला इंग्रज कप्तान हॉकिन्स म्हणून इ. स. १६०८ मध्यें पश्चिम किनाऱ्यावर उतरला. सर टॉमस रो नें जहांगीर बादशहापासून सुरतेजवळ वखार घालण्यासंबंधीं फर्मान आणिलें. मराठीमध्यें पहिले इंग्रजी शब्द आले ते अंग्रेज, फतोरी हे असावेत. नंतर गलबत, गुराब, माखजन, तमाखू वगैरे शब्द पोर्च्युगीच भाषेच्या द्वारां आले असावेत. त्यानंतर कांहीं इंग्रजी विशेषनामें विशेषतः इंमज मुत्सद्दी व योद्धे ह्यांचीं नांवें मराठींत आलीं असावींत. कांहीं इंग्रजी नांवांचे मराठी अपभ्रंश उल्लेख करण्यासारखे आहेत. गाजर (Goddard), इष्टूर (Stuart), तानसेन (Thomson), इंद्रसेन (Anderson), मंडूक (Maddock), इष्टिन (Hastings), मेघफरास (Macpherson), तामगिराम (Thomas Graham), इस्मिथ (Smith), मस्तान (Mostyn), अलपिनूष्टन (Elphinstone),

ह्याशिवाय जीवनाच्या प्रत्येक शाखेंत इंग्रजी शब्दांचें लोण सारखें येत आहे तें वेगळेंच. शाळा, शिक्षण, पोषाख, बाजारहाट, राजकारण, खेळकरमणुकी, औषधपाणी वगैरे प्रत्येक शाखेंत इंग्रजी शब्द हमेश येत आहेत. शिक्षण म्हटलें तर त्यांत स्कूल, मास्तर, टेबल, पेन, रूम, प्लेग्राऊंड, पीरियड, बेल, फी, इन्स्पेक्टर, रबर, निब, कंपास, अॅटलास, बोर्ड, चॉक, पेन्सिल, केन् हे शब्द आले आहेत. पोषाखांत शर्ट, कोट, बटन, पँट, ब्लाऊझ, जंपर, निकर, टाय, कॉलर, सॉक्स, बूट, शू, सोल, हील, पॉलिश इत्यादि शब्द इंग्रजींतून आले आहेत. दवाखान्यासंबंधीं पाहिलें तर डॉक्टर, बिल, फी, व्हिजिट, कॉंपॉउंडर, मिक्श्चर, डोस, पावडर, पिल्स, बँडेज, कॅप्सूल, नर्स, ड्रेसिंग, टेंपरेचर, एनिमा इत्यादि शब्द इंग्रजी आहेत. प्रवासाच्या बाबत ट्रॅम, बस, रेल, तिकिट, फलाट, इंजिन, गार्ड, पार्सल, गुड्स, रिझर्व्ह इत्यादि शब्द इंग्रजी आहेत. पोस्ट ऑफिसमध्यें गेलों तर कार्ड, पाकीट, मनी आर्डर, रजिस्टर, डिपॉझिट, लेटफी, डिलिव्हरी, क्लिअरन्स, मेल, वायर, टेलेग्राम हे शब्द इंग्रजी आहेत. वर्तमानपत्राच्या बाबत न्यूज, व्ह्यूज, पेपर, एजन्ट, डेली, विक्ली, मॅगझिन, लीडर, फीचर इत्यादि शब्द इंग्रजी आहेत. राजकारणांत तर गव्हरनरपासून प्यूनपर्यंत इंग्रजी शब्द वापरांत आहेत. पर्वांच्या लढाईनंतर इंग्रजी शब्दाचा लोंढाच मराठींत आला. बलून, एअररेड, बॉंब, टॉरपेडो, टँक, कॉन्व्हाय, रॅकेट, रेशन, क्यू, कोटा इत्यादि शब्द लढाईनें आणले. तसेच सिनेमानें पुष्कळ परकी शब्द मराठींत आणून सोडले आहेत. मानवी जीवनाचें असें एक क्षेत्र नाहीं कीं त्यांत कांहीं इंग्रजी शब्द मराठींत आले नाहींत. इतका घनिष्ठ संबंध इंग्रज व मराठे ह्यांचा आला. हे इंग्रजी शब्द तर आलेच. परंतु त्याबरोबर त्यांचे उच्चार प्रयोग व विचार हेहि मराठींत आले.

९८ शिमी भाषेंतील शब्द-ऋण : इंग्रजींतील शब्दांच्या ऋणानंतर कालाच्या दृष्टीनें मागें जाऊन आपणास शिमीवंशांतील भाषांच्या शब्द-ऋणाचा विचार केला पाहिजे. ऑस्ट्रिक, आर्य, द्राविडपूर्व, उत्तरकालीन आर्य, कानडी, तेलगू, युरोपीयन आर्य इतक्या भाषांतील शब्दांचा आपण विचार केला. आतां यहूदी, अरबी, फारसी, तुर्की वगैरे शिमी भाषांतील शब्दांचा विचार करूं. ह्यांपैकीं यहूदी भाषेचा संबंध फार जुना आहे. परंतु त्यांतील शब्द फारसे आले नाहींत. फारसी, अरबी, तुर्की भाषा बोलणाऱ्या महमदी समाजाचा महाराष्ट्रांशीं संबंध खिस्ती शकाच्या चौदाव्या शतकाच्या आरंभापासून आला. महमदीयांनीं यादवांचा उच्छेद करून दख्यनचें राज्य इ. स. १३१८ पासून आपल्या स्वाधीन करून घेऊन १३४७ पर्यंत ते दिल्लीहून चालविलें. नंतर

हुसेन गंगू बहामनीनें दिल्लीशीं असलेला आपला संबंध तोडून स्वतंत्र रीतीनें बहामनी सल्तनत् चालविली. मराठ्यांच्या कर्तबगारीला व बुद्धिमत्तेला कांहींसा वाव ह्या राजवटींत मिळाला. राज्यकर्ते म्हणून, धर्मप्रसारक म्हणून महमदीयांचा मराठ्यांशीं संबंध दाट आला. त्याचा परिणाम मराठी भाषेवर फार झाला. फारसी, अरबी शब्द मराठींत आले. प्रत्यय, उपसर्ग, अव्ययें, प्रयोग वगैरे गोष्टीहि पुष्कळ आल्या. बहामनी काळ व शिवकाळ ह्या दोन कालखंडांत फारसी भाषेनें मराठींत धुडगुस घातला. फारसी शब्दांचा लोंढा शिवाजी महाराजाला राजाज्ञेनें बंद करावा लागला. पुढें पेशवाईंत पुनः फारसी शब्द वापरांत येऊं लागले. ते श्रीधर-महीपती-मोरोपंतांच्या काव्यांनीं जरा कमी झाले. फारसी, अरबी, तुर्की वगैरे शब्दांचा निर्देश प्रस्तुत कोशांत त्या त्या ठिकाणीं केला आहे. प्रथम येथें यहूदी भाषेंतील शब्द देतों.

यहूदी लोक व त्यांचे शब्द : मराठीमध्यें थोडे हिब्रू शब्द आहेत. हे यहूदी किंवा इस्राएल लोकांच्या भाषेंतील शब्द होत. आपली मातृभाषा मराठी असल्याचें जरी महाराष्ट्रांतील यहूदी लोक सध्यां सांगत असले तरी ती त्यांची मूळ भाषा नव्हे हें उघड आहे. पारशी लोक हे जरी आपली मातृभाषा गुजराती असल्याचें सांगत असले तरी ती त्यांची मूळ भाषा नव्हे. मूळ त्यांची भाषा झेंदअवेस्ता आहे. तीच गोष्ट ह्या यहूदी लोकांची. हे लोक मूळ परकी म्हणजे जेरुसलेम–पेलेस्टाईनकडील. धर्मच्छल वगैरे कारणांमुळें त्यांना देशत्याग करावा लागला. ते हिंदुस्थानांत आले. ते प्रथम मलबारांत व मुंबईप्रांतांतील पश्चिम किनाऱ्यालगतच्या कुलाबा जिल्ह्यांतील नागांवच्या आसपास आले. त्याचा काल अजमासें इ. स. ७० पहिलें शतक असावा. त्यांच्यामधील सामान्य गरीब जनता तेलाचा धंदा करीत असे. अष्टमकर, खेडकर वगैरे सात कुटुंबें त्यांच्यामधील मुख्य समजलीं जातात. हे लोक वर्णानें निमगौर, सुधारलेले, चांगला व्यापारउदीम करणारे असे आहेत. त्यांची वाणी कित्येक परकी लोकांच्यापेक्षां बरीच शुद्ध आहे. ते मराठी भाषा चांगली बोलतात. भाषेंतील आघात, स्वर अगदीं स्वाभाविक असतो. मातृभाषा मराठी असलेला मनुष्य ज्या सफाईनें मराठी भाषा बोलतो त्याच सफाईनें हे लोकहि बोलतात. महाराष्ट्रियांचा आणि यहूदी लोकांचा संबंध गेल्या दोन हजार वर्षांचा असल्यामुळें इतकें बोलण्याचें सहजत्व व स्वाभाविकत्व येणें शक्य आहे. त्यांचा मराठी भाषेचा संबंध तर तिच्या जन्मापासून आला असें म्हणावयास हरकत नाहीं. ह्या इतक्या दीर्घ संपर्कांचा परिणाम म्हणजे मराठींत यहूदी शब्द जितके यावयास पाहिजे तितके आले नाहींत असेंच म्हणावें लागेल. सध्यां मराठींत कांहीं थोडेसे यहूदी शब्द आले. त्यांच्या दीर्घ सहवासाच्या मानानें ते कांहींच नव्हत. यहूदी शब्द खालीं दिले आहेत.

मिसर देश (इजिप्त), इस्राएल, यहूदी, अब्राहाम, साराबाई, दावीद, नोहा, रुथ, सब्थ वगैरे शब्द यहूदी होत.

९९ अरबी-फारसी शब्द : शिमी भाषांपैकीं मराठी भाषेवर विशेष परिणाम करणाऱ्या भाषा म्हणजे अरबी-फारसी ह्या होत. तुर्की भाषेचा प्रत्यक्ष असा परिणाम झाला नाहीं. यादव कालांत महमदीयांशीं संबंध येण्यास सुरुवात झाली होती. त्या कालांतील नामदेव मात्र “ तुर्की मूर्ति फोडिल्या ” अशी तक्रार करतो. त्याच्या अभंगांत कांहीं फारसी शब्द सांपडतात. ‘ व ’ हें फारसी अव्यय तो वापरतो. बहामनी कालांत हा संबंध फारच दाट झाला. खुद्द मराठराज्यांत फारसीची कारकीर्द सुरू झाली. ज्ञानेश्वरींत व महानुभावी वाङ्मयांत आढळणारें मराठी भाषेचें नितांत शुद्ध स्वरूप कलुषित होऊं लागलें. फारसी–मराठीचा संबंध जो बहामनी कालांत सुरू झाला तो पुढें पेशवाईंत सुद्धां ढिलावला नाहीं. एकनाथी वाङ्मयांतील कांहीं अर्जदास्त वगैरे नमुने तर फारसीमयच आहेत. सरकारदरबारांत फारसी भाषा सुरू झाल्यामुळें सरकारी कागदपत्र फारसींत राहूं लागले. अर्जदाराच्या फिर्यादि ‘ काजी ’ पुढें जाऊन त्यांचा फैसला किंवा ‘ इन्साफ ’ होऊं लागला. पत्र गेलें व कागद आले. गोही गेली, साक्ष आली. ‘ मोकदमाचे ’ अधिकारी झाले. वार्षिक वेतना ऐवजीं ‘ सालिना मुशाहिरा, ’ मिळण्याचा सिलसिला पडला. बापाचें नांव ‘ पिते ’ म्हणून न लिहितां ‘ बिन ’ म्हणून लिहूं लागले. ‘ भ्रतार ’ शब्द गेला. व ‘कोम’ शब्द आला. पूर्वींचे ‘ बैसणाईत ’ गेले व ‘दरबारी’ आले. तसेच सवंदळी, दांडिवस, हाडपी, बारी, चवरधर, भांडारी, वेचकरू, दिवटे, बडवे हे शब्द गेले. राईक, पाईक, मांडलीक, राऊत वगैरे हुद्दे पदव्या ऐकूं येईनाशा झाल्या व त्यांच्या ऐवजीं हवालदार, जमादार, शिलेदार ह्या पदव्या ऐकूं येऊं लागल्या.

राजकारण, बाजारहाट, व्यापारउदीम, पोषाख, खाण्याचे जिन्नस वाङ्मय, वगैरे व्यवहाराच्या प्रत्येक क्षेत्रांत फारसी शब्द आले. फारसी उच्चारहि मराठी भाषेंत आले. ‘आ’चे ‘आय, ए, अ’ होणें, ‘ईया’चें आ होणें, ‘इह’चें ‘ए’ होणें, संयुक्त अक्षराचा संयोग व वियोग, त्याच प्रमाणें क, ख वगैरे कंठ्यांचे उच्चार अशा किती तरी फारसी लकबी मराठींत आल्या आहेत. ‘आन, वान, वाला, खाजा, खोर, गर, गिरी, ची, दान, दार, नवीस, बन्द, बाज इस्तान, मन्द’ ‘असे किती तरी प्रत्यय मराठींत आले आहेत. प्रस्तुत कोशांत आम्हीं त्या त्या ठिकाणीं फारसी–अरबी ऋणाचा निर्देश केलाच आहे. येथें त्याची पुनरावृत्ति टाळतों.

मराठी भाषेचें तत्समत्व-तद्भवत्व : मराठी भाषेच्या शब्दसंग्रहांत ज्या निरनिराळ्या भाषांनीं आपला शब्दांचा करभार आणून टाकून मराठी शब्दसंग्रह संपन्न केला, त्या भाषांचा निर्देश येथवर केला. शब्दांची देवघेव ही परस्पर असते. मराठीनें त्या भाषांना आपलें शब्दाचें ऋण दिलेंच असलें पाहिजे. परभाषांतून शब्द आले म्हणजे त्यांच्यावर कांहीं विकार होतात. कांहीं तत्सम स्वरूपांत तर कांहीं तद्भव स्वरूपांत असे शब्द येतात. एक बाजूनें त्यांचें मराठीकरण होत असतें. मराठी भाषेच्या जन्माच्या वेळीं अस्सल मराठी शिक्क्याचे शब्द किती होते हें सांगणें कठीण आहे,–नव्हे तें अशक्यच आहे. पूर्वींच्या भाषेंतील बरेच शब्द जुन्या स्वरूपांनीं व अर्थांनीं वावरत असतातच. नवे शब्द हळूहळूं येत असतात. राष्ट्रांत ज्या प्रमाणांत निरनिराळ्या नव्या उद्योगांची, क्रियांची, विचारांची भर पडत जाते, त्या प्रमाणांत त्या राष्ट्राच्या भाषेच्या शब्दसंग्रहांत भर पडत जाते. नवी कल्पना आली कीं नवा शब्द आलाच. पुनः लक्षणा, व्यंजना, साहचर्य वगैरे शब्दशक्तींनीं अर्थहि वाढतो. असा बदललेल्या अर्थाचा शब्द हा एक प्रकारें नवीनच असतो. अशा रीतीनें शब्दसंग्रह वाढतो. मराठी भाषेच्या प्रथमप्रथमच्या कालांत–यादव कालांत तिच्यांत अस्सल मराठी शिक्क्याचे शब्द अधिक होते. तद्भव शब्दांची संख्या तत्सम शब्दांपेक्षां अधिक होती. एकनाथ कालांत मराठी शब्दसंग्रहांत फार बदल झाला. जुन्या शब्दांचीं स्वरूपें बदललीं, त्यांचे अर्थ बदलले. नव्या स्वरूपाचे व अर्थाचे बरेच शब्द आले. एकनाथ-दासोपंत ह्यांची शब्दसंपत्ति ज्ञानेश्वर–भास्करभटाच्या शब्दसंपत्तीपेक्षां संख्येनें अधिक आहे. उच्चारानें व अर्थानें अधिक तत्सम स्वरूपाची आहे. शिवकालांत व पेशवेकालांत ती पुनः अधिक तद्भव स्वरूपाची झाली. चिपळुणकर, टिळक वगैरेंच्या काळांत म्हणजे एकोणिसाव्या शतकाच्या शेवटच्या पंचवीस वर्षांत ती अधिक तत्सम बनूं लागली. अद्यापिहि ती अधिक तत्सम म्हणजे संस्कृतसम बनते आहे. नव्या पारिभाषिक शब्दसिद्धीनें तत्सम होण्याच्या प्रक्रियेला मदतच होत आहे. नवे शब्द जे येत आहेत ते बरेच तत्सम आहेत. यादवकालांतील मराठी भाषा हीच अस्सल मराठी होय. हा कालदृष्ट्या विचार झाला. प्रांतदृष्ट्या विचार करावयाचा झाला तर मध्यवर्ती पुणेरी भाषा अधिक तत्सम होत आहे. गोव्याकडील दक्षिणकोंकणी, खानदेशांतील अहिराणी व वऱ्हाड नागपुराकडील वऱ्हाडी ह्या अधिक तद्भव स्वरूपाच्या भाषा आहेत. ह्याचीं कारणेंहि पण उघड आहेत. पुण्याकडील भाषेंत सुसंस्कृत, सुशिक्षित लोकांचें वर्चस्व एकंदर मराठी भाषकांत अधिक आहे. तसें इतर प्रांतांत नाहीं. इतर प्रांतांतील प्रांतिकभाषा सामान्य जनतेच्या वर्चस्वाखालीं अधिक आहेत.

१०० शब्दसंग्रहांत वाढ व तिचे प्रकार : भाषेंत चार प्रकारची क्रिया सारखी चाललेली असते. जुने शब्द नाहींसे होतात. नवे शब्द येतात. जुन्या शब्दांचे उच्चार व अर्थ बदलतात. ह्या चतुर्विध क्रियेच्या योगानें भाषेंतील शब्दसंग्रह संख्येनें, स्वरूपानें व अर्थानें बदलत जातो. जुने संकेत पुसट होतात. नाहींसेहि होतात. त्याचे दर्शक शब्दहि त्यांच्याबरोबर नाहींसे होतात. नवी कल्पना आली कीं नवा संकेत निर्माण होतो, कीं त्याचा दर्शक नवा शब्दहि उत्पन्न होऊन भाषेंत रूढ होतो. दुसऱ्या भाषेशीं संबंध आला म्हणजे हीच क्रिया होऊन अधिक शब्द भाषेंत येतात. अशा रीतीनें भाषेंतील शब्दसंग्रह वाढतो. शब्दसंग्रहांत वाढ निरनिराळ्या प्रकारांनीं होते. ह्या प्रकारांपैकीं कांहीं प्रकार खालीं दिले आहेत.

१ ध्वनिअनुकरण : ध्वनीच्या अनुकरणानें नवे शब्द पुष्कळच येतात. भाषेच्या उत्पत्तीच्या मुळाशीं ‘अनुकरण’ हें एक प्रधान तत्त्व आहे. ती एक उपपत्ति

आहे. अनुकरणाचा संबंध भाषेंतील शब्दांशीं–शब्दांच्या उच्चारांशीं म्हणजे ध्वनींशीं–असल्यामुळें ह्याला ध्वनि-अनुकरण असें म्हटलें. ध्वनीच्या अनुकरणानें आपण कितीतरी शब्द नवे बनवितों. सट, फट, खट, झट, अरेरे, अबब, सरसर, सूंसूं, फसफस, भसभस, खसखस, खरखर, धो, धों, फो फो, खो खो, छूं छूं, कावकाव, पापा, मंम इत्यादि सर्व ध्वनिशब्द होत.

ध्वनिअनुकरणांचा दुसरा एक ‘ क्रियाअनुकरण ’ म्हणून प्रकार आहे. ह्यांतील अनुकरण इतकें उत्तान रीतीनें दिसत नाहीं. झिमझिम, रिपरिप, भुर्रकन्, कुजबूज, गुलगुल, धुसफूस, फिसफिस, टारकन्, मुळूमुळूं, झुळझुळ, वाहवा, शुकशुकाट, खणखणाट इत्यादि क्रियाध्वनि होत.

तिसरा एक प्रकार भावनाअनुकरणी शब्दांचा होय. ह्या प्रकारांतील शब्दांत अनुकरण प्रच्छन्न असतें. ठोंब्या, दण्ड्या, ठाणबाई, सटवाई, चिमुकलें, चिमुरडें, पिट्ठुकलें, थोट्टुक, फिड्डुक, भागूबाई, ठमाबाई, सोट्या, ठोल्या इत्यादि भावनाअनुकरणी शब्द होत. थांबणें, लांबणें, कोंबणें, झटकणें, फटकणें, खांब वगैरे शब्दांतील वर्णांच्या संयोगांत ध्वनिअनुकरण आहे.

२ भावनामय उद्गार : भाषेंतील शब्दांची वाढ जशी ध्वन्यनुकरणानें होते तशी ती भावनामय उद्गारांनींहि होते. भाषेची उत्पत्ति व वाढ ह्यांसंबंधीं भावनामय उद्गारांची एक उपपत्ति विद्वानांनीं मानिली आहे. भावनांच्या उद्रेकांमुळें जे शब्द निर्माण होतात ते मूळ स्वतःसिद्ध असे शब्द असतात. इतर शब्दांपासून ते साधित झालेले नसतात. भावना किंवा विकार पुष्कळ असल्यामुळें त्यांचे दर्शक शब्दहि पुष्कळ होतात. भावनेचा किंवा विकाराचा तोंडावाटें जो स्फोट होतो तोच त्याचा दर्शक शब्द बनतो. अरेरे, ओहोहो, शी, शी, छट्, वाह्, च्, च्, च्; राम, राम इत्यादि भावनादर्शक शब्द होत.

३ अर्थाचें सामान्यीकरण : भाषेंतील शब्दांच्या अर्थाचा विस्तार बऱ्याच वेळां होतो. त्यांच्या अर्थाचें सामान्यीकरण होतें. शब्दाच्या मूळ अर्थाची व्याप्ति वाढते. शब्दाच्या मूळ अर्थाच्या लगतचे दुसरे अर्थ त्याला प्राप्त होतात. रूपकापेक्षां ही प्रक्रिया थोडी निराळी आहे. रूपकामध्यें मूळ अर्थ लागूं पडत नाहीं, तो अपुरा, पडतो म्हणून त्याच्या लगतचा परंतु त्यापासून भिन्न अशा अर्थाची सिद्धि होते. ह्या प्रक्रियेंत मूळ अर्थापेक्षां अगदीं निराळा असा अर्थ त्या शब्दाला प्राप्त होतो. गोसावी (गो+स्वामिन्)=गाईचा धनी हा मूळ अर्थ पण हल्लीं कशाचाहि धनी असला तरी किंवा नसला तरी त्याला गोसावी म्हणतात. मृग म्हणजे हरीण परंतु सर्व प्राण्यांच्या अर्थीं हा शब्द वापरला जातो. पैसेवाला म्हणजे केवळ पैसे किंवा नाणें जवळ असलेला माणूस नव्हे तर पैसा अडका, सोनेंदागिने, घरवाडी, जमीनजुमला जवळ असणारा इतका व्यापक अर्थ त्यांत येतो. पानपत्रावळ, भाजीपाला, पितर, नरौ, दंपती इत्यादि शब्दांत अर्थाची वाढ झाली आहे. समाहारद्वंद्व म्हणून समासाचा जो प्रकार आहे त्यांत अर्थाची अशीच वाढ झालेली असते. गोठा म्हणजे फक्त गाई बांधण्याचें ठिकाण; परंतु गाई, म्हशी, बैल, घोडे जरी तेथें बांधले तरी तो गोठाच असतो. घरीं ‘ बायको ’ असते एकच, पण तिला ‘ आमची मंडळी ’ असें म्हणतात. ‘ गंगा, भागीरथी ’ हीं नांवें एका विशिष्ट नदीचीं होत; परंतु तीं आपल्या गांवाजवळच्या नदीलाहि व नदी नसेल तर ओढ्यालाहि लावतांना कधीं कधीं आपण ऐकतों. कादंबरी म्हणजे बाण कवीच्या कथानकांतील नायिकेचें नांव; परंतु आतां तें सर्व रम्य कथांना लावतात. वरात (वरयात्रा) म्हणजे नवऱ्या मुलाची मिरवणूक; परंतु तो शब्द मुंजीच्या व इतर मिरवणुकीसहि लावतात. असे विस्तृत अर्थ शब्दांना प्राप्त होणें म्हणजे सूक्ष्म दृष्टीनें पाहतां तितके निराळे शब्दप्रयोग भाषेंत येऊन शब्दसंग्रहांत भर पडण्यासारखेंच आहे.

४ अर्थाचें विशेषीकरण : ह्यालाच अर्थसंकोच म्हणतात. ह्या प्रक्रियेनेंहि शब्दसंग्रहांत भर पडते. अर्थाचें सामान्यीकरण ह्या प्रक्रियेच्या विरुद्ध अशी ही प्रक्रिया आहे. ह्यानें अर्थाची व्याप्ति कमी होते. **नेमस्त** म्हणजे नियमानें वागणारा, नेमांत वर्तन ठेवणारा व **जहाल** म्हणजे कडक, तिखट, तीक्ष्ण असे सामान्य अर्थ ह्या दोन्ही शब्दांचे आहेत; पण अर्थाचा संकोच होऊन दोन विशिष्ट राजकीय पक्षांना उद्देशून हे शब्द इ. स. १९०८ पासून अद्यापपर्यंत रूढ आहेत. निर्वाण, मोक्ष, स्वर्ग हे एकाच अर्थाचे शब्द, पण निर्वाण हें बुद्धांचें, मोक्ष हें ज्ञान्यांचें व स्वर्ग हें इतरांचें कैवल्य असा संकुचित अर्थ प्रत्येकाचा झाला. गांठोडें म्हणजे गुंडाळून ठेवलेलें बोचकें, परंतु ‘ तो गांठोडें बाळगून आहे; ’ ह्यांत गांठोडें म्हणजे पैशाचें

किंवा दागिन्याचें असा संकुचित अर्थ आहे. त्याचेजवळ ‘ सोनें ’ आहे; तो आमचा ‘ काळ ’ आहे. ह्यांत ‘ सोनें, काळ’, ह्या शब्दांचा अर्थ मर्यादित झाला आहे. घर्म, ताप, वेदना, वेणा, वेद, कुटुंब, जनावर, इंद्र, विषयसुख, गवेष ह्या शब्दांच्या अर्थांचा असाच संकोच झाला आहे.

शब्दाच्या अर्थाचा विस्तार काय, किंवा संकोच काय, ह्या मार्गांनीं शब्दाच्या अर्थांत बदल होतात. अशा बदललेल्या शब्दांना निराळे स्वतंत्र शब्द म्हणून समजले तरच तितक्या पुरती शब्दांची संख्या वाढली असें म्हणतां येईल. ह्या असल्या शब्दांबद्दल दोन परस्पर विरुद्ध मतें आहेत. कोणी ह्या शब्दांना स्वतंत्र शब्द मानतात तर इतर कोणी मानीत नाहींत. ज्याअर्थीं शब्दांचें स्वरूप एकच राहतें त्या अर्थीं ते शब्द एकच. नानार्थांचे शब्द कोणी प्रत्येक निराळया अर्थाप्रमाणें स्वतंत्र शब्द समजतात तर दुसरे कोणी एकच शब्द मानून त्याला निरनिराळे अर्थ निरंनिराळया शक्तींप्रमाणें प्राप्त झाले असें समजतात.

५ शब्दांचें जात्यंतर : शब्दांची व्याकरणांत ठरलेली जात जर बदलली तर शब्दांच्या संख्येंत वाढ होते. व्याकरणांत नाम, सर्वनाम, विशेषण, क्रियापद, अव्ययें अशा शब्दांच्या जाती आहेत. ह्यांमधील एका जातींतून एखादा शब्द दुसऱ्या जातींत गेला तर तेवढ्यापुरता तो शब्द भाषेंत नवीन आला असें होणार. **वाह्, वाह्, छी, थू** वगैरे उद्गारवाचक अव्ययें आहेत. परंतु त्यांचा नामाप्रमाणें उपयोग केला जातो. “ वाहवा केली, माझी छीथू झाली, अन्नाची वानवा आहे, अन्नाची शिसारी आली, थूः तुमच्या जिनगानीवर ” वगैरे प्रयोगांत वाहवा छी, थू, वानवा, शिसारी हीं अव्ययें नसून नामें आहेत. तेव्हां तितक्यापुरते हे स्वतंत्र शब्द आहेत. नरो वा कुंजरो वा, रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति, सुखं च मे शयनं च मे, चले जाव, करा वा मरा, नमस्ते, बाबावाक्यं प्रमाणम्, हा सूर्य, हा जयद्रथ; बाप दाखव, नाहींतर श्राद्ध कर, हीं वाक्यें आहेत; परंतु ह्यांचा नामांप्रमाणें उपयोग करतात. उत्तरणें (जबाब देणें) हें नामापासून क्रियापद बनलें आहे. नामांपासून विशेषणें व विशेषणापासून नामें झालेल्यांचीं उदाहरणें तर पुष्कळच पदोपदीं आढळतात. तसेंच नामांचीं विभक्तिप्रत्ययान्त रूपें अव्ययांप्रमाणें वापरलीं जातात. ‘ **जोरानें, जोरांत** बोलतों, **जोमांत** आला, **इतक्यांत** ही गोष्ट घडली, **थोडक्यांत** बचावलों, नाहींतर मेलोंच असतों. ’ वगैरे प्रयोगांमधील जाड ठशाचे शब्द हीं अव्ययें होत. विशेषण व क्रियाविशेषण ह्यांच्यामध्येंहि असाच बदल होतो. हें सर्व शब्दांचें जात्यंतर आहे. शब्दाला व्याकरणांत नेमून दिलेलें एक कार्य सोडून तो दुसरें कार्य करतो, आपली जात किंवा प्रकार सोडून दुसऱ्या जातींत किंवा प्रकारांत जातो. असले जात्यंतर झालेले शब्द स्वतंत्र समजले गेल्यामुळें त्यांनीं शब्दसंख्येंत वाढ केली.

६ शब्दसंक्षेप : शब्दसंग्रहाच्या वाढीचें हें एक कारण आहे. शब्दांचा प्रदीर्घ उच्चार करणें किंवा लिहिणें हें प्रयासाचें काम आहे. त्याचा संक्षेप करण्याकडे प्रवृत्ति असते. ‘ सा. न. वि. वि. ’, ‘ रा. रा. ’, ‘क. लो. वि.’ ‘ वे. शा. सं. ’ ‘ प्रो., प्रा. ’ हीं संक्षेपाचीं नेहमींच्या वापरांतील उदाहरणें होत. बिरुदें, पदव्या, अधिकारदर्शक शब्दांचे संक्षेप पुष्कळच रूढ आहेत. म. भा.भू. (महाराष्ट्रभाषाभूषण), ह भ प (हरिभक्तिपरायण), वा. वि. (वाङ्मयविशारद), तसेच बी. ए., एम्. ए., डॉ. पी एच्. डी., जी. ए., पी. ए. हे इंग्रजी संक्षेपहि रूढ आहेत. इंग्रजीच्या संपर्कानें फोटो (फोटोग्राफ), बस् (ऑम्निबस्), झू, टॅक्सी, पियानो, टी. बी., माईक, हे शब्दसंक्षेप सर्वांच्या परिचयाचे आहेत. मॅथ्स, लॅब, प्रो. चँप्, बाईक हे संक्षेप विद्यार्थ्यांच्या मध्यें रूढ आहेत. व्हीटो, कोरम, ॲफिडवीट, स्टेटस्को, क्यूरिओ हे संक्षेप सुशिक्षिताच्या बोलण्यांत येतात.

ह्याचाच एक पोटभेद आद्याक्षरी शब्द म्हणून आहे. ‘ सारेगम ’ हा शब्द चार–षड्ज, ऋषभ, गंधार, मध्यम, ह्या सूरवाचक शब्दांच्या आद्याक्षरांचा मिळून झाला आहे. तीच गोष्ट ‘ ससेमिरा ’ ह्या शब्दाची. ह्या शब्दांतील प्रत्येक अक्षर एका संस्कृत श्लोकांतील ओळीचें आद्याक्षर आहे. सौ. (सौभाग्यवती), सौ. कां. (सौभाग्यकांक्षिणी), बागंटी (बाळ गंगाधर टिळक), नाशी (नॅशनल् सोशलिस्ट), उनरा, इना (INA), भाइसंमं. (भारत इतिहास संशोधक मंडळ), मयु. (महाराष्ट्र युनिव्हर्सिटी), लोशाप, मसाप, नूमवि. इत्यादि आद्याक्षरी शब्द रूढ आहेत.

कांहीं वाक्यांचे संक्षेप स्वतंत्र शब्दप्रयोग म्हणून रूढ होऊन बसतात. ‘ नरो वा कुंजरो वा ’, ‘ करा वा मरा ’, ‘ चले जाव ’, ‘ हा सूर्य हा जयद्रथ ’, ‘ नमस्ते ’,

'रामाय स्वस्ति रावणाय स्वस्ति', 'इडा पिडा टळो', चिरंजीव, देव तुमचें कल्याण करो, नवरा मरो, नवरी मरो; शुभ बोल नाऱ्या, आलख निरंजन, जयराम जयजयराम, की जय इत्यादि प्रयोग हे दुसऱ्या दीर्घ प्रदीर्घ कथांचे अगर प्रयोगांचे संक्षेपच आहेत. परंतु हे स्वतंत्रपणानें रूढ आहेत.

७ **वर्णलोप** : शब्दांतील कांहीं वर्णांचा लोप झाल्यामुळेंहि नवा शब्द तयार होतो व तेवढ्यापुरती शब्दसंग्रहांत भर पडते. गुरें+राखी=गुराखी, जमात+दार=जमादार, दपाते+दार=दफेदार, दिण्हले–दिधलें-दिलें, घिण्णले–घेतले हीं त्याचीं उदारणें होत.

कुशब्द (कुत्सितःशब्दः), **कवोष्ण** (किंचित् उष्णम्), **कदन्न** (कुत्सितं अन्नम्) इत्यादि शब्दांत मूळ शब्दाचा एकच वर्ण '**कु**' तेवढा शिल्लक राहिला. **सवाष्ण** (सुवासिनी), **सुग्रण** (सुगृहीणी) ह्या शब्दांत तोच प्रकार झाला आहे. **दिलेलें, घेतलेलें, खाल्लेला, प्यालेला** अशीं भूतभूतकालवाचक विशेषणाचीं रूपें होतात. परंतु प्रयोगांत कधीं कधीं त्यामधील शेवटचा '**ला**' वर्ण गाळला जातो. **खाल्ला**प्यालेला (माणूस), **केली**सवरलेली (बाई), **दिलें घेतलें** (कोणीं पाहिलें) इत्यादि प्रयोगांत दुसरा वर्ण गळला आहे. न+करता (=न करणारा) हा शब्द **नकरता** किंवा नाकर्ता असा होतो (नाकर्त्यांचा वार शनिवार), **स्पष्ट** किंवा **स्वच्छ** हें जोडाक्षरी शब्द ग्रामीण भाषेंत जोडाक्षरें विभक्त करून उच्चारिले जातात. **स्पष्ट** हा शब्द **सपष्ट** किंवा **पष्ट, पस्ट,** असा उच्चारिला जातो, तसाच स्वच्छ हा शब्द सवच्छ किंवा सच्छ असा उच्चारिला जातो. 'ब्राह्मण' हा शब्द बिरामण, बरामण, बाम्हण, बामण, बामाण अशा इतक्या रीतीनें उच्चारिला जातो. हे सर्व निराळे उच्चार असून तितक्या पुरते निराळ शब्द होत. ह्या असल्या ग्रामीण उच्चारांत संयुक्त व्यंजनाचें विश्लेषण तर आहेच पण त्याबरोबर वर्णलोपहि असल्याचें प्रत्यक्ष उच्चारावरून दिसतें.

८ **द्विमुखी शब्द** : हे द्विमुखी शब्द दोन शब्दांचे मिळूनच होतात. तरी पण हे सामासिक शब्द नव्हत. सामासिक शब्दांतील प्रत्येक शब्द पूर्ण असतो. द्विमुखी शब्दांत एका शब्दाचा कांहीं अंश व दुसऱ्या शब्दाचा कांहीं अंश असे दोन्ही अंश असतात आणि त्याच्या अर्थांत दोन्ही मूळ शब्दांच्या अर्थांतील छटा असतात. हे शब्द दोन तोंडें असल्यासारखेच आहेत, किंवा पडशीला जशी सामान भरण्यासाठीं दोन तोंडें असतात तशीं ह्यांना असतात. म्हणूनच आम्ही असल्या शब्दांना द्विमुखी–दुतोंडे शब्द असें म्हणतों. संस्कृतमधील **दम्पति, जम्पति, (जाया+पति), उपेंद्रवज्रा (उपजाति व इंद्रवज्रा** ह्या दोन्ही वृत्तांचीं लक्षणें असणारें वृत्त) हीं त्याचींच उदाहरणें होत. **रूपकथा (रूपक+कथा), सन्मुख, विन्मुख (सम्मुख** ह्या शब्दाच्या धर्तीवर), **सुनीत, स्वनीत** (स्वन+गीत), इत्यादि दुतोंडेच शब्दच होत. '**ट्रॅम्वे व रेलवे**' ह्यांपैकीं पहिल्या शब्दांतील ट्रॅम व दुसऱ्या शब्दांतील रेल असे मिळून **ट्रॅमरेल** असा शब्द वापरांत आहे. **आवळेल, खोबरेल, गोडेल, एशेल, तिळेल** असल्या शब्दांत पहिला शब्द पूर्ण व दुसरा शब्द **तेल** ह्या शब्दांचा अंश **एल** असे दोन शब्द मिळाले आहेत. गुळवणी, तेलवणी, ताकवणी, फळकवणी, ह्या शब्दांतील शेवटचा अवयव **वणी** हा **पाणी** ह्या शब्दाचा अवशिष्ट अंश आहे. हे सर्व वरील वर्गांतीलच होत. इतकेंच काय? जरा अधिक सूक्ष्म दृष्टीनें पाहिलें तर उपसर्ग–प्रतिसर्ग लावून सिद्ध झालेले शब्द सुद्धां एक प्रकारें दुतोंडे शब्दच होत. उपसर्ग–प्रतिसर्ग हे एके काळीं रूढ असलेल्या संपूर्ण शब्दाचे अवशिष्ट अंशच होत. **वि** हा उपसर्ग **विगत, विशेष, विरहित** अशा कोणत्या तरी शब्दाचा अवशिष्ट अंशच आहे. तसा **सु** हा **सुष्ठु, सुगत,** वगैरेंचा, '**प्र**' हा **प्रगत, प्रकर्षेण** वगैरेंचा अवशिष्ट अंश आहेत. **पाहुणेर** हा शब्द **गडगणेर** ह्याच्या धर्तीवर झाला आहे. तोहि दुतोंडा शब्दच दिसतो.

९ **पश्चाद्घटित शब्द** : शब्दघटनेचा हा एक मानीव प्रकार आहे. साधारणपणें समजूत अशी आहे कीं अगोदर धातु असावयाचा व त्यापासून इतर नाम, विशेषण, कृदन्त, तद्धित वगैरे शब्द सिद्ध व्हावयाचे. शब्दसिद्धीचें हें एक मत आहे. "आख्यातजानि नामानि" अशा सिद्धांतानें तो पक्ष ओळखला जातो. ह्या मताला अनुसरून आख्यातांपासून इतर शब्दांची घटना मान्य करावी लागते. परंतु पुष्कळ वेळां उलटा प्रकारहि आढळतो. नाम वगैरे इतर शब्दांपासून क्रियापद सिद्ध होतें. असे जे उलटे शब्द तयार होतात त्या शब्दांनाच '**पश्चाद्घटित**

शब्द' असें आम्हीं म्हटलें आहे. **भिक्षू** पासून **भिक**, **भिक** पासून **भिकारी** व **भिकारी** पासून परत **भिकारणें** ह्यांत **भिकारणें** हा शब्द पश्चाद्घटित शब्द होय. **उचकी** पासून **उचकणें**, ढेकर पासून ढेकरणें, पुकारा पासून पुकारणें, सुख पासून सुखावणें, दुःखपासून दुखावणें, आनंदपासून आनंदणें, पस्तावापासून पस्तावणें, परतपासून परतणें, परतविणें, तावदारणें, बोकाळणें, सोकावणें, चमकणें, गुरगुरणें, गागणें, कांगावणें इत्यादि शब्द पश्चाद्घटितच होत. नामधातु म्हणून जो एक शब्दसिद्धीचा प्रकार आहे किंवा जो अकरावा गण म्हणून संस्कृत व्याकरणांत निर्देशिला आहे ते सर्व शब्द ह्याच पश्चाद्घटित शब्दांच्या सदराखालीं येतात. अमुक एक शब्द पश्चाद्घटित आहे कीं नाहीं हें समजण्यास कोणता शब्द अगोदर सिद्ध झाला व कोणता शब्द त्यापासून केव्हां साधित झाला हें समजण्याइतकें व्युत्पत्तिज्ञान जरूर आहे.

१० अपभ्रंश : अपभ्रंश हा शब्दसिद्धीचा मुख्य प्रकार आहे. ह्यानें नवीन शब्दांची भर सारखी पडत राहते. संस्कृत शब्दांचे प्राकृत शब्द होणें, प्राकृत शब्दांचे मराठी वगैरे अर्वाचीन बोलींतील शब्द बनणें, व त्यामुळें भाषेचे कालिक किंवा प्रांतिक भेद निर्माण होणें ह्या सर्व गोष्टी अपभ्रंशानें होतात. शब्द प्रथम शुद्ध स्वरूपांतच उच्चारिला जातो. परंतु पुढें बोलणाऱ्याकडून उच्चारासंबंधीं ढिलाई होऊन म्हणा किंवा ऐकणाऱ्याच्या चुकीमुळें म्हणा, तो शब्द निराळ्या स्वरूपांत उच्चारिला जातो. शुद्ध शब्दाबरोबर हा अपभ्रष्ट शब्दहि रूढ होतो इतकेंच नव्हे तर पुढें कांहीं दिवसानीं तो शुद्ध शब्दाला मारूनहि टाकतो. भाषेंतील तद्भव शब्दांची उत्पत्ति ही अशी होते. परभाषेंतील शब्द उच्चारतांना त्यांचा मूळचा अस्सलपणा राखला जात नाहीं. त्याचा उच्चार नव्या भाषेंतील उच्चारप्रक्रियेप्रमाणें होतो. द्राविडी, फारशी, इंग्रजी ह्या भाषांतील शब्द मराठींत येतांना मराठी भाषेच्या उच्चारप्रक्रियेच्या नियमानें त्यांचे फार विचित्र असे अपभ्रंश होतात. द्राविडी भाषांतील ऱ्हस्व ए व ओ, फारसी भाषेंतील कंठ्यवर्ण, इंग्रजी भाषेंतील अ, ऑ, फ्, व्ह् वगैरे उच्चार मराठींत नसल्यामुळें हे मराठींत येतांना त्यांचें मराठीकरण होतें. इंग्रजी शब्दांचें अपभ्रंश फारच विचित्र झाले आहेत. स्टेशन (Station) शब्द इस्टेशन, टेशन, ठेसण, ठेशाण, ठेचाण, इतक्या तऱ्हांनीं उच्चारिला गेलेला आढळतो. **फ्लॅट** (Flat) हा शब्द फलाट होतो. कार्ड (Card) हा शब्द कारीड, कारीट होतो. फॅक्टरी (Factory), बॅटरी (Battery), गलिव्हट (Gullivat), हे फतोरी, बातेरी, गलबत होतात. पेनशन (Pension) पेणसल, –सूल असा होतो. लँटर्न (Lantern) हा लालटेन बनतो. स्क्रू (Screw) हा इस्क्रू होतो. व्यक्ति किंवा स्थल ह्यांचीं नांवें ह्यापेक्षांहि चमत्कारिक होतात.

'अपभ्रंश' होण्याचें कारण श्रुतिप्रमाद किंवा उच्चारप्रमाद हें होय. परंतु कांहीं वेळेस इतर कांहीं शब्दप्रमाद केल्यामुळें नवे शब्द निर्माण होऊन भाषेंत रूढ होतात. हे कोणी मुद्दाम करतात तर कोणाच्या हातून न कळत होतात, तर कोणाचे अज्ञानामुळें होतात. सामासिक शब्द किंवा संधिनियमांनीं जोडलेले शब्द मुद्दाम विपरीत रीतीनें निराळे करून हास्यकारक नवा शब्द निर्माण करण्याचा प्रकार जो एक आहे तो ह्या सदरांत येईल. '**अधोऽधो** गंगेयम्' असा संस्कृत शुद्ध प्रयोग असून त्याचा उपयोग मात्र "**धो धो** वाहणारी गंगा" अशा अर्थाचा मानतात. वेदाच्या मंत्रांत इतर शब्दांच्या अनुषंगानें पुष्कळ वेळां आलेले **चमे नमे** हे शब्द तेथील मूळच्या संदर्भामधून निघून, **चमे, नमे** असे चेष्टावजा मराठींत नवे शब्द बनले आहेत. ह्याच्याहि पुढें जाऊन कृ. प्र. खाडिलकरांनीं आपल्या भाऊबंदकी ह्या नाटकांत **चमक** शास्त्री व **नमक** शास्त्री अशीं दोन विनोदि पात्रेंहि निर्माण केलीं आहेत. हे सर्व गंमतीचे प्रकार आहेत. घटकाभर गंमत होते, हसें होतें. हे जाणून बुजून केलेले प्रमाद जरी असले तरी भाषेंत नवे शब्द कांहीं थोडे कां होईना पण आलेच. व्युत्पत्तीसंबंधीं चुकीच्या कल्पना असल्यामुळें कांहीं शब्दांच्या स्वरूपांत विचित्रपणा येऊन त्या स्वरूपांतच नवे शब्द म्हणून ते भाषेंत रूढ होऊन बसतात.

११ ग्राम्य शब्दांचें नागरीकरण : ही एक भाषेंतील शब्दासंबंधीं प्रवृत्ति आहे. शब्दसिद्धीचा प्रकार ह्याला तितकासा म्हणतां येणार नाहीं. कारण शब्दसंपत्तीमध्यें ह्यानें कांहीं नवीन भर पडत नाहीं. भाषेंत शब्द असतातच. ते रोजच्या वापरांतहि असतात. फक्त ते हलक्या खालच्या थरांवरील लोकांच्या वापरांत असतात. त्यांना शिष्टमान्यता नसते. शिष्टमंडळी ह्या असल्या शब्दांना ग्राम्य, अश्लील, असभ्य असें समजतात

परंतु हेच शब्द फार दिवस फार वेळ वापरले गेले म्हणजे त्यांच्यामधील ग्राम्यत्व, अश्लीलत्व, असभ्यत्व, नाहींसे होऊन हळुहळूं त्याना शिष्टांकडून मान्यता मिळत जाते व त्यांच्या भाषेंत ते वापरले जातात. ग्राम्य म्हणून समजले गेलेले शब्द कालाच्या ओघांत नागर बनतात. हें त्यांचें नागरीकरण होय. हे शब्द जरी नागर झाले तरी अगदीं नवे शब्द असें त्यांना म्हणतां येणार नाहीं. ते भाषेंत होतेच. फक्त एका थरावरून दुसऱ्या थरावर त्यांचा वापर होतो इतकेंच त्यांच्यासंबंधीं म्हणतां येईल. बोलीमध्यें वापरांत असलेले शब्द लेखी किंवा ग्रांथिक भाषेंत वापरांत येतात. अपशब्दांच्या बाबतींत असेंच होतें. **लुच्चा, गुलाम, लेकाचा, अरेच्या** हे शब्द आतां तितके ग्राम्य वाटत नाहींत. चांगले लोक व्याख्यानांत, लेखांत प्रसंगपरत्वें वापरतांना आढळतात. “खाज, जिरली, उलटी (केली किंवा झाली), खरडपट्टी, तासडंपटी, मस्का (लावणें), लोणी (लावणें),” हे शब्द तर चांगल्या सुशिक्षितांच्या बोलण्यांत येतांना दिसतात. कॉलेजमधील मुलें “कशी जिरली! उलटी कली! काय पण मस्का लावला!” असे प्रयोग बिनधोक रीतीनें करतांना ऐकण्यांत येतात. “धर आंगठा किंवा दाखव आंगठा, घामटें काढणें, स्वारी भरणें, उरावर बसणें” हेहि प्रयोग शिष्टांच्या तोंडून आपण ऐकतों. शिक्षण सार्वत्रिक झाल्यामुळें “धश्चोट, रिकामचोट” ह्या असल्या शब्दांबद्दल कांहीं चमत्कारिक वाटेनासें झालें आहे. “डोळा मारणें, लंबे करणें, हाताळणें (-चोरणें, स्पर्श करणें, लिहिणें), लांबविणें, सोटया, लठ्ठया, रक्षा, राख (उपपत्नी), गोटा, षंढ, तृतीयप्रकृति, म्होतूर, पाट (पुनर्विवाह), इंगा दावणें, चंपी करणें, उट्टें काढणें, घिसाडघाई” इत्यादि शब्दांतील ग्राम्यत्व पार नाहींसें झालें आहे. **ससेहोलपट, लांडगेतोड, कुतरओढ, जंगजोड, मारपीट, झांबडझुंबड, हिसका, कचका, झगडा, खवखव, रवरव**, हे शब्दहि शिष्टमान्य एकेकाळीं होतेच व पुनःहि ते हळुहळूं होत आहेत.

एखादा शब्द किंवा प्रयोग ग्राम्य किंवा अश्लील केव्हां असतो आणि तो शिष्टमान्य केव्हां होतो हें नक्की सांगणें कठीण आहे. साधारणपणें असें म्हणतां येईल कीं शिष्ट, सुशिक्षित, सुसंस्कृत लोकांच्या बोलण्यांत तो शब्द किंवा प्रयोग कसलीहि नैतिक क्षितीची भावना उत्पन्न झाल्याखेरीज येऊं लागला म्हणजे तो शिष्टमान्य झाला. अमुक शब्द वापरल्याबद्दल मनाला कांहीं बोचणी लागली नाहीं म्हणजे झालें. ग्राम्य, ग्राम्य म्हणजे तरी काय? परंपरेनें शिष्ट म्हणून मानलेल्या बोलण्याच्या विरुद्ध ही एक प्रकारची बंडखोरीच होय. बोलण्यांतील हें स्वातंत्र्य होय. “अमुक एक रीतीनें बोललें म्हणजेच शिष्ट बोलणें असें तरी कां? आमचें बोलणें शिष्ट कां नाहीं? अशी प्रवृत्ति ह्याच्या मुळाशीं असते. ही प्रवृत्ति तरुणांत असते. ही प्रवृत्ति समाजांतील खालच्या थरावरील लोकांत असते. ही प्रवृत्ति समाजांतील अगदीं उच्च अशा थरांवरील लोकांमध्येंहि पण असते. ह्या लोकांत ग्राम्य, अश्लील, म्हणून समजले गेलेले शब्दप्रयोग अगोदर बरेच दिवस हमेश वापरांत असतात. वापरून वापरून त्यांतील ग्राम्यतेच्या तीक्ष्ण कडा झिजून जातात व पुढें मग ते शिष्टांच्या भाषेंत वापरांत येतात.

ग्राम्य भाषा, व्यवसाय भाषा, धंद्याच्या भाषा वगैरे हे भाषिक भेद आहेत. जसे प्रांतिक भेद तसेच हे भाषिक भेद. प्रांतिक बोलींच्या योगानें ज्याप्रमाणें मध्यवर्ती, आदर्श, शिष्टमान्य भाषा संपन्न केली जाते त्याप्रमाणें ह्या ग्राम्य बोलींच्या योगानेंहि ती संपन्न केली जाते. तेव्हां ग्राम्य अश्लील बोली केवळ तुच्छताई तर नाहींच, उलट स्वागतार्ह आहे. त्यांचा योग्य उपयोग करून घेणें हें भाषासंपन्नतेस कारणीभूत होतें.

१२ **उपशब्द** : ग्राम्य व अश्लील शब्द वापरणें हें शिष्टमान्य नाहीं. चारचौघांत, बायकामुलांच्या कुटुंबांत तर ते उच्चारवत नाहींत. त्यांत अश्लीलत्व इतकें असतें कीं ते तोंडांतून काढवत नाहींत. अशा अवदनीय शब्दांचा अर्थ निर्दिष्ट करायचा झाला तर ते अश्लील शब्द प्रत्यक्ष न उच्चारतां त्यांबद्दल त्यांचा अर्थ सूचित करणारे **उपशब्द** वापरतात. ‘रांड, रक्षा, राख’ ह्या शब्दांबद्दल अंगवस्त्र, पात्र हे शब्द वापरतात. स्त्रीयोनिवाचक अंग, मायांग, गुह्येंद्रिय हे शब्द वापरतात. मैथुन, संबंध, यंभन, संभोग, व्यवहार, आश्लेषण वगैरे शब्द स्त्रीपुरुषसंबंधाबद्दल शिष्टमान्य आहेत. तृतीय प्रकृति, द्रौपदेय, बृहन्नडा, लखनौवाला, हे शब्द षंढ, नपुंसक ह्यांबद्दल वापरतात. मातृगमनी, मात्रागमनी, बारलिंग्या, कच्छमोचक, अश्व,–गर्धभगामिनी वगैरे तर शिव्याच आहेत पण त्या शिष्ट आहेत. साधारणपणें शिष्टमान्यतेचें स्वरूप असें आहे कीं

अश्लील अर्थाला संस्कृत (किंवा इंग्रजी) भाषेंतील शब्दांचें अवगुंठण घातलें म्हणजे त्यांचें अश्लीलत्व नाहींसें होतें. ग्राम्यतापरिहाराचाच हा एक प्रकार आहे. परंतु ह्यानें नवीन शब्दांची भर पडते हें खरें आहे. नवीन शब्दांच्या निर्मितीची एक प्रवृत्ति म्हणूनच निर्देश केला आहे.

१३ व्यक्तिनाम—(किंवा विशेषनामें) घटित शब्द : व्यक्तींच्या व स्थलांच्या नांवांपासून कांहीं शब्द सिद्ध होतात व ते भाषेंत रूढ होतात. हेमाडपंत, बिरबल, सहदेवभाडळी, होरा, भास्कराचार्य, लीलावती, कबीर, गावबा, मंबाजीबुवा, सालोमालो, नाना (फडणीस), बापू (सखाराम भगवंत), तात्या (हरिपंत फडके), बाजीराव (अर्थात् दुसरे), घाशीराम, जोतिबा, धोंडिबा, मंडलीक इत्यादि मंडळींचीं विशेषनामें त्यांच्या त्या त्या गुणामुळें अगर अवगुणामुळें सामान्यनामेंच बनलीं आहेत. पैठणी, खंबायती, इरकली (लुगडीं), धनवडी, महेश्वरी, मस्कती (डाळिंब), कॅलिको (कालिकत), दमस्क (दमास्कस), मस्लिन-मलमल (मोसल), काबुली (हिंग), काश्मिरी (शाल), कनोज (अत्तरें), पोर्ट दारू (ओपोर्टो ह्या स्थलाच्या नांवावरून), चंदेरी (पागोटें), अकोळ (तंबाखू), सातारी (जर्दा), मथुरेचा (पेढा), सुरती (बर्फी), बनारसी (शालू) इत्यादि विशेषणांत स्थलनामांचा संबंध आला आहे. पेशवेकालांत होन वगैरे चलनी नाण्यांना त्या त्या टांकसाळेच्या स्थलांच्या नांवांनींच ओळखत. अर्काटी, मोंगलाई, बागलकोटी, हीं नांवें होनांचीं असत. कांहीं कांहीं वस्तूंचा व्यक्तीच्या नांवाशीं संबंध आल्यामुळें त्या वस्तु त्या त्या व्यक्तिनामानें ओळखल्या जात. गांधी (टोपी), आगरकरी (जोडा), टिळकी (अंगरखा), नरसोपंती (पगडी), गंधर्व (टोपी), नारोशंकरी (घंटा), किर्लोस्कर (नांगर), ओगले (कंदील) इत्यादि विशेषणें ज्या व्यक्तीनें ती वस्तु प्रथम वापरली किंवा निर्माण केली त्या व्यक्तीच्या नांवावरून सिद्ध झालीं आहेत. पाटलोण, सँडविच, टॉमी, जॉनी हे मराठींत रूढ झालेले इंग्रजी शब्द व्यक्तिनामांवरूनच आले आहेत. पाटलोण हा एका प्रहसनांतील पँटॅलून नांवाच्या पात्राच्या नांवावरून आला. हा मनुष्य नेहमीं सुरवारीसारखी तंग विजार घालून रंगभूमीवर येत असे. त्यावरून विजारीला त्याचें नांव मिळालें. अर्ल ऑफ सँडविचनें प्रथम सकाळच्या न्याहारींत खाण्यासाठीं जो जिन्नस सहजगत्या तयार केला त्याला सँडविच हें नांव मिळालें. **टॉमी** हें नांव रुडयर्ड किप्लिंग ह्याच्या बरॅकरूम बॅलड्स मध्यें साध्या इंग्रज शिपायाच्या योजलेल्या पात्राच्या **टॉमी** अट्किन्स ह्या नांवावरून इंग्रजींत रूढ झालें. त्यावरून इंग्रज सोल्जर हा **टॉमी** बनला. किंवा कोणी म्हणतात कीं इ. स. १८१५ मध्यें युद्धखात्यानें सैन्याची माहिती मागविण्यासाठीं एकदां एक फिरतें पत्रक पाठविलें. सैन्यांतील लोक अशिक्षित असल्यामुळें त्या पत्रकांत एक नमुन्याचा तख्ता जोडून तो कसा भरावयाचा हें सांगितलें होतें. ह्या नमुन्याच्या तख्त्यांत कोणातरी शिपायाचें नांव लिहावयाचें तें टॉमी ॲट्किन्स हें नांव लिहिलें होतें. त्यावरून **टॉमी** हा शब्द सैन्यातील इंग्रज शिपाईवाचक होऊन बसला. संस्कृतमध्यें माणवक, यज्ञदत्त, सोमदत्त, हीं नांवें जशीं कोणत्याहि शास्त्रीय विवेचनांत विद्यार्थ्यांसंबंधीं वापरतात किंवा मराठींत ज्याप्रमाणें सोमा, गोमा, गणेश पितळीदरवाजा हीं व्यक्तिनांवें जशीं वापरतात, तशींच वरील इंग्रजी नांवें रूढ झालीं आहेत. गेल्या महायुद्धामुळें आलेलीं अशींच कांहीं व्यक्तिनामें रूढ होऊं पाहतात. हिट्लर (हुकुमशहा), क्विसलिंग (स्वजनांविरूद्ध शत्रूस सामील होणारा मनुष्य), नात्सी (आग्रही लोक), मुसोलोनी, इत्यादि शब्द सर्व भाषांत येऊं पाहत आहेत. मलिकंबरी, बारभाई, शिराळशेट, दामाशाही, बाबापदमंजी, बाजीराव (पळपुटा मनुष्य), लक्ष्मीबाई (शूर स्त्री), मस्तानी (सुंदर स्त्री), आनंदीबाई (कृत्या स्त्री), भीष्म (महात्मा, सत्यवचनी), कर्ण (दाता), धर्मराज (शांत व सत्त्वस्थ मनुष्य) इत्यादि व्यक्तिनामें सामान्यनामांप्रमाणेंच मराठींत रूढ आहेत.

ही झाली ऐतिहासिक व्यक्तींची गोष्ट. ह्या सर्व व्यक्ति कोणत्याहि काळीं कां होईना पण खऱ्याखुऱ्या होऊन गेल्या व कोणत्या कां होईना पण गुणाबद्दल अथवा दोषाबद्दल त्या प्रसिद्ध होत्या. तेव्हां त्यांचीं व्यक्तिनामें सामान्य अर्थाचीं नामें म्हणून जर रूढ झालीं असलीं तर त्यांत आश्चर्य नाहीं. परंतु कांहीं कांहीं वेळेस काल्पनिक व्यक्तींचीं नांवेंहि सामान्यनामें म्हणून सामान्य अर्थानें रूढ होतात. कादंबरी, नाटक, काव्य, लघुकथा, विनोदी लेखन, इत्यादि सृजनवाङ्मयांत कल्पनेनें निर्माण केलेलीं पात्रें त्या त्या भाषेंत कायमचीं होऊन बसतात.

हरि नारायण आपट्यांच्या ‘पण लक्षांत कोण घेतो’, ह्या कादंबरींतील यमु, शंकर मामंजी; सिंहगडांतील ‘शेलारमामा’, तशींच त्यांनीं निर्माण केलेलीं इतर पात्रें प्रो. डँडी, सावळ्या, यशवंतराव; कोल्हटकरांचे पांडुतात्या, बंडुनाना; गडकऱ्यांचे गोकुळ, ठकी, बाळकराम, तळीराम, सिंधु, सुधाकर, रामलाल, वरेरकरांचे बाबाभिगवण, डॉ. पशु, विजली, केरोपंत; अत्रे ह्यांचे रावबहादूर, भाईटोळ, ताईपोळ, करुणा, विश्राम, बगाराम, घाशअण्णा; चिं. वि. जोशी ह्यांचे चिमणराव, चिऊताई, गुंड्याभाऊ; ताम्हणकरांचा गोट्या; वामनराव जोशांचे भय्यासाहेब, रागिणी, उत्तरा, सुशिला, धोंडोपंत बर्वे, इत्यादि काल्पनिक पात्रें मराठी वाङ्मयांत कायमचीं येऊन बसलीं आहेत. सामान्यनामें म्हणून सामान्य अर्थानेंच त्यांचा वापर मराठीभाषेंत होत आहे. हीं व्यक्तिनामें झालीं. हीं जरी विशेष नामें असलीं तरी सामान्य नामेंच म्हणजे सामान्य शब्द म्हणूनच भाषेंत रूढ आहेत. अशींच कांहीं विशिष्ट समाजनामेंहि त्या त्या समाजाच्या विशिष्ट गुणदोषामुळें तद्दर्शक सामान्य नामें म्हणून रूढ झालीं आहेत. ब्राह्मण (भोळसटपणा), देशस्थ (गबाळीपणा), कोंकणस्थ (कावेबाजपणा), मारवाडी (कंजूषपणा), पठाण (खरखरमुंडेपणां), रुंडुगुंड (कानडी), शांभळोभाई (गुजराती), रामोशी इत्यादि शब्द सामान्यनामांप्रमाणें कांहीं विशिष्ट गुणदोषदर्शक शब्द म्हणून भाषेंत रूढ आहेत.

नवीन सामाजिक शब्दांमध्यें आपणास आणखी एक प्रकारच्या शब्दांचा विचार केला पाहिजे. समाजामध्यें धर्मकारण, राजकारण, अर्थकारण, वाङ्मयकारण वगैरेंसंबंधीं वैचारिक आंदोलनें उत्पन्न होऊन निरनिराळे पक्षोपपक्ष निर्माण होतात. एकमेकांच्या उखाळ्यापाखाळ्या काढण्यांत त्यांचा परिणाम होतो. ह्या त्यांच्या भांडणांत पुष्कळ नवीन शब्द उत्पन्न होतात. हिंदी राजकारणांत वंगभंग, स्वदेशी, कायदेभंग, असहकार वगैरे चळवळींत मवाळ, जहाल, नेमस्त, फेर, नाफेर, सहकारी, असहकारी, आझादी, साम्यवादी, समाजवादी, जहालवादी, भाईपक्ष, नोकरशाही असे कितीतरी पक्ष–उपपक्षदर्शक शब्द रूढ झाले. तसेंच त्या आंदोलनाला अनुलक्षून इतर दुसरेहि शब्द झाले. प्रभातफेरी, केशरीया, लाठीमार, स्थानबद्धता, स्वराज्य, बहिष्कार, खुलाव्यापार, हरताळ, इत्यादि शब्द त्या सदरांतीलच होत. मानभावी, रामदासी, वारकरी, माळकरी, धारकरी, शाक्त, स्मार्त, अवधूत, भागवत, प्रार्थनासमाजिस्ट, ब्राह्मो, सत्यसमाजी इत्यादि शब्द धार्मिक आंदोलनें दाखवितात.

१४ जुन्या शब्दांचा पुनरुद्धार : भाषेमध्यें होणाऱ्या शब्दांच्या वाढीबाबत आणखी कांहीं मुद्द्यांचा विचार केला पाहिजे. हे मुद्दे म्हटले म्हणजे जुन्या व ग्रामीण शब्दांचें पुनरुज्जीवन आणि पारिभाषिक शब्द हे होत. ह्या दोन्ही प्रकारांनीं भाषेंतील शब्दांची वाढ होते. पारिभाषिक शब्द हे तर नवेच शब्द होत. त्यांच्या मागील कल्पनाहि नव्याच होत. तेव्हां पारिभाषिक शब्दांनीं भाषेंत नवी भर पडते ही गोष्ट उघड आहे. जुन्या शब्दांचा पुनरुद्धार करण्यानें जुने शब्द जे पुनः वापरांत येतात त्यांच्या योगानें भर पडते असें तितकेंसें म्हणतां येणार नाहीं. ते शब्द एकेकाळीं वापरांत होतेच. परंतु कालाच्या ओघांत त्यांच्या पाठीमागील कल्पना नाहींशा झाल्या आणि त्याबरोबर तद्दर्शक शब्दहि अस्तंगत झाले. परंतु जुन्या इतिहासकालाबद्दल वाटणारा आदर, त्या शब्दांत असलेला जोर, त्या शब्दाच्या उच्चाराविषयीं वाटणारी नवलाई, त्या शब्दांच्या वापराबरोबर बोलणाऱ्याकडून दाखविली जाणारी बहुश्रुतता, व्यासंग अशा कांहीं वृत्ति जुन्या शब्दांच्या पुनरुद्धाराच्या मुळाशीं असतात. खरें पाहिलें तर हीं घासून गेलेलीं नाणीं असतात. हीं पुनः चालू करणें कठीण आहे. तीं चालू होणेंहि फार कठीण आहे. कांहीं अपवादात्मक उदाहरणांत तीं कांहीं प्रसंगीं चालू होतील; परंतु भाषेंत सर्रहा त्यांचा वापर पुनः होणें अशक्य आहे. जुन्या काळच्या इतिहासलेखनांत, ऐतिहासिक नाटककादंबऱ्यांत, पोवाडेलावण्यांत त्यांचा उपयोग त्या त्या वाङ्मयप्रकाराला शोभाहि देईल. त्यांच्या वापरानें तें तें वाङ्मय उठावदार व वास्तवदर्शीहि होईल. परंतु रोजच्या व्यावहारिक बोलींत त्यांचा सर्रहा वापर होणें ही गोष्ट सुतरां दुर्घट आहे. त्यांच्या पृष्ठवंशाच्या ठिकाणीं असलेली कल्पनाच (Concept) नाहींशी झाली असल्यामुळें ते शब्द लुळे पांगळे होतात. असे लुळे पांगळे झालेले शब्द पुनः ताठ उभे कसे राहणार? अद्भुतरम्य वृत्तींच्या लोकांकडून केवळ नवलाई म्हणून त्यांच्यांत पुनः जीवन ओतण्याचा प्रयत्न होईल. यादवकालांतील

वाङ्मयांत आढळणारे शब्द वापरायचा मोह होणें साहजिक आहे. ढेंढें, दलवाडें, सुरवाडें, साईखेडी, अडालु (भय), उळीग (सेवा), ओगर (जेवण), उडव, कतकटा, कडसण, मातु, उभग, पडिभर, तुकविणें, राहाटी, आडाड. वेचणें, भिंगरी, भवंड, पसाय, परिमल, कोवलीक, थोकडा इत्यादि किती तरी शब्द पुनरुज्जीवित करण्याचा प्रयत्न चाललेला दिसतो. तीच बहामनीकालीन शब्दांची स्थिति आहे. शिवकालीन शब्द हे स्वातंत्र्याच्या, स्वराज्याच्या काळांतील शब्द असल्यामुळें त्यांच्याबद्दल तर विशेष प्रेम वाटणें साहजीक आहे. गनीम, घेरा. नामाकूल, पेरणी संचणी, कुसूर, अवलाद अफलाद, एकतारी, मुलेपण, पांढरीचें कामास, शिराधडाच्या गोष्टी, अडसेरी चालविणें, जोरावरी, देवाचा पाला, दुंबाला, फितवा, उगवणी, घसघस, क्रिया लावणें, दुधभात, कौल, भाऊबंदगी, कीस्त इत्यादि जोरदार व प्रभावी शब्दांचा वापर करण्याचा मोह पडणें साहजीक आहे. तसेच पेशवाईमधील अक्षतमरीष्ट, इदंन्याय, उभ्रामार्ग, उपरोधिक, उपरशब्दी, बाहेरभाव, उपरान्त, कुष्टपिष्ट, घावडाव, कुचोद्य, खामखा, कमरबंदी, छीटपीट, जंगजोड, झांबडाझांबड, ढालढकल, त्वष्ट, द्वामुषाण, त्यादारम्य, दुरंदेशी, धातुपोषण, पोटाग, पोटतिडीक, पायगोवा, फलादेश, भाईचारा, फितवाफांदडा, लागभाग, वारापाणी, शकटभेद, शशोपंज, सामानपूर, हर्षामर्ष, राणीवसा इत्यादि शब्द पुनः वापरांत आणण्याचा प्रयत्न तर बुद्धिपुरःसर चालला आहे. अव्वल इंग्रजी कालामध्यें रूढ असलेले शब्द पुनः आजच्या मराठींत कोठें कोठें वापरलेले आढळतात. निसास, चिरगुटें, भुई, पुसायास, आडोशी, संवरणें, आदरणें, मस्तक, अवधान, कुलवाडी, सुधारणूक, भरभर, अर्जी, सही, मात्क्यान हे शब्द व फिर्याद होणें, बंदीस घालणें, लोकवृत्त समजणें, बळवंत पदार्थ, प्रसिद्धींत आहे, तर्क वाटणें, लोखंड मोडावयास फार मेहनत घेतें, वळवावयाचें अगत्य नाहीं; असले कांहीं चमत्कारिक प्रयोग केवळ नावीन्य म्हणून तुरळक तुरळक वापरांत आणलेले आढळतात.

१५ ग्रामीण शब्दांचा उपयोग : हे जुन्या पुराण्या शब्दांच्या पुनरुद्धारासंबंधीं झालें. ह्याशिवाय आणखी एका शब्दप्रकाराचा उल्लेख करणें प्राप्त आहे. तो प्रकार म्हणजे प्रांतिक बोलींतील किंवा ग्रामीण बोलींतील शब्दांचा होय. हे शब्द नागर, मध्यवर्ती, आदर्श भाषेंत वापरण्याचा सहेतुक प्रयत्न कांहीं लेखकांच्याकडून केला जात आहे. विदर्भांतील कवि वऱ्हाडी बोलींतील शब्द आपल्या काव्यांत सहेतुक रीतीनें वापरतात. कोंकणांतील कातोडी, वारली ह्यांच्या बोलींतील शब्द कांहीं कादंबरीकार आपल्या कादंबरींत मुद्दाम वापरीत आहेत. तीच गोष्ट दक्षिणकोंकणमधील लेखकांची. आपल्याकडील ग्रामीण भाषेंतील शब्द वापरण्यानें नागर भाषेचें स्वाभाविक व सहज स्वरूप हेंगाडें होतें, अशी त्या लेखनावर सत्प्रवृत्तीच्या टीकाकारांकडून टीकाहि केली जाते. सूक्ष्म दृष्टीनें पाहूं गेलें असतां ह्या शब्दांच्या वापरांत वावगें असें कांहींच नाहीं. जुन्या शब्दांचे संकेत (concepts) नाहींसे झाल्यामुळें त्या मृत शब्दांचें पुनर्जीवन करणें फलदायी होणार नाहीं अशी जी तक्रार करतां येते, तशी तक्रार ह्या प्रांतिक किंवा ग्रामीण शब्दांसंबंधीं करतां येत नाहीं. हे सर्व शब्द जिवंत असतात. ते वापरण्यास आपणास कांहींच अटकाव नाहीं; उलट मध्यवर्ती आदर्श भाषा त्या शब्दांच्या वापरानें अधिक संपन्नच होईल. प्रांतिक बोलींनीं मध्यवर्ती भाषेचें पोषणच होतें. ह्या शब्दांच्या व प्रयोगांच्या वापरानें मध्यवर्ती नागर मराठी अधिक लवचिक अधिक प्रकटनक्षम होईल ह्यांत शंका नाहीं. त्या दृष्टीनें ही प्रवृत्ति समर्थनीयच ठरते.

१६ पारिभाषिक शब्द : भाषेंतील शब्दसंपत्तीची वाढ ह्या गोष्टीचा विचार करतांना पारिभाषिक शब्दांचा विचार आपणास करावा लागतो. पारिभाषिक शब्द हे कृत्रीम असतात. हे मुद्दाम तयार करावे लागतात. भाषेंत येणारे नवे शब्द आणि मुद्दाम तयार करून आणलेले हे पारिभाषिक शब्द ह्या दोहोंत अंतर आहे. पहिल्या प्रकारच्या शब्दांत दुसऱ्या प्रकारांतील शब्दांपेक्षां स्वाभाविकपणा व जिवंतपणा अधिक आहे. बोली ह्या शिक्षणाचें माध्यम ठरल्या वेळेपासून पारिभाषिक शब्दांची आवश्यकता फार वाटूं लागली आहे. पूर्वीच्या काळीं सुद्धां पारिभाषिक शब्दांची जरुरी भासत असे. वेदान्त ज्योतिष, गणित, वैद्यक वगैरे शास्त्रांत त्या त्या शास्त्रांतील कल्पनांचे द्योतक असे विशिष्ट शब्द वापरले जात. त्या विशिष्ट शब्दांचा उपयोग, त्यांचा विशिष्ट अर्थ त्या त्या विशिष्ट शास्त्रापुरताच मर्यादित असे.

असे हे विशिष्ट शब्द पारिभाषिक संज्ञा म्हणून समजले जात. मराठा समाजांत व मराठी भाषेंत प्रचारांत व प्रत्यक्ष व्यवहारांत चालू असलेलीं हीं शास्त्रें अर्थात् संस्कृतभाषेमध्यें पूर्वीं होतींच. तेव्हां ह्या शास्त्रांसंबंधीं मराठी भाषेंत ज्या पारिभाषिक संज्ञा वापरांत आल्या त्या बहुतेक संस्कृतभाषेंतीलच होत्या. संस्कृतमधील ह्या रूढ पारिभाषिक संज्ञा तर मराठीनें उचलल्याच, परंतु एखादी नवी कल्पनादर्शक संज्ञा जर जरूर वाटूं लागली तर तीहि संज्ञा संस्कृतभाषेच्या आश्रयानें व आधारानेंच तयार केली. अशा रीतीनें संस्कृतभाषा हीच पारिभाषिक संज्ञांचें उत्पत्तिस्थान होऊन बसली. संस्कृतभाषेचा स्वभाव पारिभाषिक संज्ञांच्या साधनिकेला फार उपकारी आहे. एखादा धातु किंवा शब्दबीज मूळ घेऊन त्याला पूर्वसर्ग (उपसर्ग), प्रतिसर्ग (प्रत्यय), आदेश, लोप, आगम, वगैरे उपचार करून निरनिराळ्या अर्थांच्या च्छटांचे द्योतक असे पुष्कळ शब्द सिद्ध करतां येतात. धातूपासून क्रियापद, क्रियानाम, विशेषण, भाववाचकनाम, कृदन्त, तद्धित असे सर्व प्रकारचे शब्द तयार करतां येतात.

परिभाषा तयार करण्याच्या बाबत दोन मतें आहेत. एक मत म्हणजे प्रत्येक इंग्रजी किंवा परकी भाषेंतील शब्दाला दुसरा प्रतिशब्द संस्कृतच्या किंवा मराठीच्या आधारानें सिद्ध करून परिभाषा तयार करणें हें होय. शब्दाला प्रतिशब्द आपल्या भाषेंत देण्याबद्दलचा आग्रह ह्या मतांत आहे. दुसरें मत इतकें आग्रही नाहीं. ह्यांत लवचिकपणा आहे. ह्यांचें म्हणणें असें कीं कांहीं ठिकाणीं, कांहीं विशिष्ट कल्पनांचे द्योतक शब्द परकी भाषेंतील मूळ असले तरी हरकत नाहीं. तेच परकी शब्द मराठींत घ्यावे आणि ते जसजसे वापरले जातील तसे ते अधिक रूढ होतील. कारण पुष्कळ वेळां असें होतें कीं मूळ शब्दाच्या मागें असलेली कल्पना, किंवा संकेत जशाचा तसा नव्या निर्मिलेल्या पारिभाषिक शब्दांत उतरत नाहीं. पारिभाषिक शब्द व त्याच्या मागें असलेला संकेत ह्या दोहोंमध्यें थोडें सुद्धां अंतर राहूं देतां कामा नये. शिवाय कांहीं कल्पनांचे द्योतक परकी शब्द हे आंतरराष्ट्रीय मालकीचे झालेले आहेत. असले परकी शब्द जसेच्या तसे व जशाच्या तशा अर्थानें उचलून मराठीमध्यें आणले तर त्यांत मराठी भाषेला कमीपणा कांहींच नाहीं. उलट भाषेमध्यें तितकी शब्दसंपत्ति अधिक येऊन मराठी अधिक संपन्न होईल. अशीं हीं पारिभाषिक संज्ञांसंबंधीं दोन मतें आहेत. परिभाषा तयार करतांना शब्दसिद्धीचे नियम तर अवगत असावयास पाहिजेतच; परंतु अर्थविकासशास्त्रांतील सामान्य नियम अवगत असले पाहिजेत. पारिभाषिक संज्ञा सोपी असावी. शक्य तोंवर प्रचारांतील असावी. स्वभाषेबाहेरील संज्ञा वापरणें अपरिहार्य झाल्यास संस्कृतमधील सोपा व उच्चारसुलभ शब्द घ्यावा. पारिभाषिक शब्दाचा एकच अर्थ असावा. विशेषनामावरून किंवा ऐतिहासिक संदर्भावरून साधलेले पारिभाषिक शब्द मराठींत तसेच ठेवावेत. जेथें अन्वर्थक पारिभाषिक शब्द सिद्ध होत नसेल तेथें त्याचें काम वर्णनानें करावें. पारिभाषिक शब्दसिद्धीच्या ह्या कांहीं सामान्य सूचना आहेत. पारिभाषिक संज्ञांच्याबाबत शब्दांचे तीन थर असतात. प्रत्येक शास्त्रांत त्याच शास्त्राला फक्त मर्यादित अशा कांहीं कल्पना असतात. त्या कल्पनांचे दर्शक शब्द ह्या प्राथमिक संज्ञा होत. हे पहिल्या थरावरील शब्द होत. ह्यांना आनुषंगिक जे शब्द ते दुय्यम असून दुसऱ्या थरावरील होत. ह्या दोहोंच्या स्पष्टीकरणास जे शब्द साह्य करतात ते तिसऱ्या थरावरील शब्द होत. ह्यांतील पहिल्या थरावरील शब्द हे खरे पारिभाषिक शब्द होत.

१०१ शब्दसिद्धि,-साधितशब्दांचे प्रकार : शब्दसंग्रहांत वाढ कोणकोणत्या प्रकारांनीं पडते ह्याचा विचार येथवर केला. त्यानंतर ज्या निरनिराळ्या पद्धतींनीं शब्दांची सिद्धि होते त्यांचा विचार येतो. शब्दसंग्रहाच्या वाढीच्या मुळाशीं असलेल्या तत्त्वांचा विचार व शब्दसाधनिकेच्या पद्धतींचा विचार हे दोन्ही भिन्न आहेत. निरनिराळे शब्द तयार करण्याच्या निरनिराळ्या पद्धति आहेत. कधीं एकाच शब्दांत अन्तर्गत फरक होऊन इतर साधित शब्द तयार होतात, तर कधीं एक शब्द दुसऱ्या शब्दाला जोडून साधित शब्द तयार होतात. गुण, वृद्धि, संप्रसारण वगैरे वर्णप्रक्रियेचे बदल हे त्याच शब्दांत होऊन त्यापासून प्रयोजक, कर्मणि, सन्नन्त, वृद्ध वगैरे इतर साधित रूपें तयार होतात. हे अन्तर्गत विकार होत. प्रत्यय व उपसर्ग लावून तयार झालेले शब्द, समास व अभ्यस्त शब्द हे एकापेक्षां अधिक शब्दांच्या मिळणीनें तयार होतात. प्रत्यय किंवा उपसर्ग हे एकेकाळीं स्वतंत्र शब्द म्हणून रूढ होते. त्यांचा कांहीं अंश झडून गेला म्हणूनच ते प्रत्यय किंवा उपसर्ग झाले. समास तर उघड उघड एकापेक्षां अधिक शब्दांच्या संयो-

गानेंच सिद्ध होतात. अभ्यस्त शब्द म्हणजे द्विरावृत्त झालेले शब्द होत. हे कधीं संपूर्ण द्विरावृत्त असतात तर कधीं अर्धे किंवा कांहीं अंशानें आवृत्त झालेले असतात. साधित शब्दांचे मुख्य पांच प्रकार पडतात. एक प्रकार आंतर विकार होऊन साधलेले शब्द, दुसरे उपसर्ग लावून साधलेले शब्द, तिसरे प्रत्यय लावून साधलेले शब्द, चौथे समासानें साधलेले शब्द व पांचवे द्विरावृत्ति करून साधलेले शब्द असे पांच प्रकारचे साधित शब्द आहेत.

शब्दबीज-धातु : शब्दसिद्धीच्या बाबत धातूला विशेष महत्व आहे. भाषेंतील सर्व शब्दांच्या मुळाशीं धातु असून त्यापासून सर्व शब्द सिद्ध होतात असें एक मत आहे व तें 'आख्यातजानि नामानि' ह्या सिद्धान्तांत ग्रथित केलें आहे. "भाषेंतील कांहीं थोडेच शब्द धातूपासून सिद्ध झाले असून बरेचसे इतर शब्द स्वतः सिद्धच किंवा स्वतंत्र आहेत," असें दुसेंरहि एक मत प्रचलित आहे. शब्दसिद्धीच्या मुळाशीं धातु माना किंवा न माना; धातु नाहीं असें जर मानलें तर दुसरें कांहीं तरी बीज मानावें लागेल. हीं शब्दबीजें दोन प्रकारचीं असतात. एक सार्वनामिक बीजें व दुसरीं क्रियाबीजें. पैकीं पहिल्या सार्वनामिक बीजांपासून पूर्वयोगी व परयोगी अव्ययें, उभयान्वयी अव्ययें आणि सर्व प्रत्यय इत्यादिकांची उत्पत्ति होते. दुसऱ्या क्रियाबीजांपासून नामें, विशेषणें, क्रियापदें, व क्रियाविशेषणें इत्यादिकांची उत्पत्ति होते, असें तिसरें हि एक मत प्रचलित आहे.* कांहीं शब्दांत दोन्ही प्रकारचीं बीजें सांपडतात. 'अहम्' ह्या शब्दांत 'अह' हें क्रियावाचक बीज व 'म्' हें सार्वनामिक बीज आहे. शब्दबीजांचे जे दोन प्रकार सांगितले त्यांपैकीं क्रियावाचक बीजांवरच भाषेंतील शब्दव्यवहार किंवा वाग्व्यापार बऱ्याच अंशीं अवलंबून असतात. ह्यावरून भाषेंतील बरेच शब्द क्रियावाचक बीजांपासून म्हणजे धातूंपासून सिद्ध झालेले असतात. म्हणून शब्दसिद्धीच्या बाबत धातु हे महत्वाचे ठरतात.

धातूंचें महत्त्व : धातूंचें किंवा क्रियाबीजांचें महत्त्व आणखी एका दृष्टीनें आहे. एखाद्या समाजाच्या संस्कृतीचा दर्जा अजमावण्याचें एक उत्तम साधन म्हणजे त्या समाजाच्या भाषेंतील धातु हें होय. भाषेंत जितके धातु अधिक, तितक्या त्या समाजांत क्रिया अधिक. जितक्या त्या समाजांत क्रिया अधिक, तितका त्याचा व्याप अधिक, त्याचा व्यापार अधिक, त्याचा एकंदर जीवनप्रयत्न अधिक व विविध. जितका त्या समाजाचा जीवनप्रयत्न अधिक व विविध, तितकी त्याची सुधारणा अधिक, तितकी त्याची संस्कृति अधिक. एखाद्या विशिष्ट समाजाचें सांस्कृतिक अधिष्ठान ठरविण्यास त्या समाजाच्या भाषेंतील धातु उपयोगी पडतात. भाषेंतील धातूंचा आणि मानवजातीच्या प्रगतीचा इतका घनिष्ट संबंध आहे. मानवप्रगति व शब्दसिद्धि ह्या दोहोंचाहि संबंध त्यावरून सिद्ध होतो.

१ आंतर विकार,-साधित शब्द : धातु हे भाषेंतील सिद्ध शब्द होत. त्या दृष्टीनें ते भाषेंतील प्राथमिक शब्द होत. सामान्यतः धातूंपासून इतर शब्द साधले जातात, असें जरी खरें असलें तरी धातूंपासून नामें किंवा धातु आणि तेहि प्राथमिक स्वरूपाचे साधल्याचीं कांहीं उदाहरणें आढळतात. पुढील प्राथमिक स्वरूपाचीं संस्कृत नामें धातूंपासून साधलेलीं अशींच आहेत. दृक्-दृश्, दुह्, दुघ् (कामदुघ्), (अनु) डुह्, (उपा) नह्, (भू) भृत्, (वारि) मुच्, (पंके) रुह्, (परि) षद्, द्विष्, (मधु) लिह्, हीं नामें प्राथमिक आहेत. असलींच मराठींतील उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत. "कर, डर, धर, भर, धांव, पकड, धांवपळ, आदळआपट, ऊठबस, फिरवाफिरव, चालढकल, घालमेल, मारपीट, मोडतोड, जमवाजमव, उघडझांक, हाणफेक, शिवाशीव, धरपकड—" इत्यादि प्राथमिक स्वरूपाचीं नामें प्राथमिक धातूंपासूनच सिद्ध झालीं आहेत.

कधीं कधीं गुणवृद्धीसारखा एखादा आंतर विकार होऊन धातूंपासून इतर साधित (सकर्मक, प्रयोजक) धातु तयार होतात. उदा –पडणें–पाडणें, मरणें–मारणें, तुटणें–तोडणें, सुटणें–सोडणें, भरणें–भारणें, जळणें–जाळणें, मिळणें–मेळणें, उतरणें–उतारणें, बिघड(णें).

१. वर्णागमसाधितशब्द, विकरणचिन्ह : पुढील धातूंच्या घटनेंत मूळ संस्कृत धातूंचें विकरणचिन्ह तसेंच कायम राहिलें आहे. चिणणें (चि), झिजणें (क्षी), नाचणें (नृत्य), जुझणें (युध्य), गिजणें (गृध्य), शिजणें (सिध्य), कुजणें (क्रुध्य), कुणणें (क्रुण), इत्यादि.

---

* A. H. Sayce : *Science of Language; Vol. II, ch. 6, p. 23.*

२. **ज** हा वर्णागम मध्यें येऊन मराठी कर्मणि व विध्यर्थी रूपें सिद्ध होतात. उदा : धरिजे, करिजे, बोलिजेते, म्हणिजे, धरिजो, करिजो, म्हणिपे, घेपे (प–प्रत्यय). **व, अव, आव** हे वर्ण मध्यें येऊन प्रयोजक, शक्य व इतर काहीं रूपें सिद्ध होतात. उदा–करवणें, जाववणें, वाचवणें, भरवणें, गुरकावणें, बळकावणें, सरकावणें, भिरकावणें, सोकावणें इत्यादि. कांहीं धातूंना **क, ट, र, ल, ड, स** वगैरे वर्ण लागून साधित धातु तयार होतात. १ **क**–उदाः–अटक, कचक, चरक, चमक, टपक, ठसक, थबक. २ **ट**–उदाः–खसट, घसट, झपट, थापट. ३ **र**-उदा–घसरणें. ४ **ल**–उदा–ठेचलणें, डावलणें, उचलणें, कोसळणें, झाकळणें, घुसळणें. ५ **सड**–घुसडणें. ६ **स**–उदा–कळासणें, खडसणें, खुपसणें, धुमसणें.

३ उपसर्ग-प्रतिसर्ग-अन्तःसर्ग–साधित शब्दः शब्दाला अन्तर्गत फरक होऊन त्यापासून तयार झालेले साधित शब्द मागें सांगितले. आतां शब्दांच्या जोडणीनें तयार होणाऱ्या साधित शब्दांचा विचार करूं. एका शब्दाला दुसरा शब्द जोडण्यानें हे साधित शब्द तयार होतात. सामासिक शब्द हे उघड उघड ह्या प्रकारचे शब्द होत. उपसर्ग लावून किंवा पुढें प्रत्यय लावून किंवा दुसरा एखादा वर्णागम करून तयार होणारे साधित शब्दहि ह्याच वर्गांतील होत. शब्दाच्या आरंभीं लावलेल्या शब्दाला उपसर्ग, पुढें लावलेल्या शब्दाला प्रतिसर्ग किंवा प्रत्यय व आंत मध्यें येणाऱ्या वर्णागमाला अन्तःसर्ग असें म्हणतां येईल. उपसर्ग, प्रतिसर्ग व अन्तःसर्ग हे तिन्ही एके काळीं स्वतंत्र शब्द स्वतंत्र अर्थानें म्हणून अस्तित्वांत होते. पुढें कालान्तरानें त्यांचे कांहीं अवयव झडून त्यांचा कांहीं भाग अवशेष म्हणून राहिला. हेच पुढें उपसर्ग, प्रतिसर्ग व अन्तःसर्ग म्हणून शब्दाला चिकटले गेले. ह्यांना पूर्वीचा अर्थ असल्यानें हे लावून सिद्ध झालेल्या नव्या शब्दांनाहि नवीन अर्थ प्राप्त झाला. “उपसर्गेण धात्वर्थो बलात् अन्यत्र नीयते” असा सिद्धांत त्यामुळेंच रूढ झाला. ‘ हृ ’ हा धातु घेऊन जर त्याला निरनिराळे उपसर्ग लावले तर त्याच्या मूळ ‘ नेणें ’ ह्या अर्थांत फरक होऊन निराळे अर्थ त्या शब्दांना प्राप्त होतात. आहार म्हणजे खाणें, विहार म्हणजे खेळणें, प्रहार म्हणजे मारणें, संहार म्हणजे नाश, हे शब्द तयार होतात. असे आणखी किती तरी नवे शब्द ‘ अभिहार, प्रतिहार, परिहार ’ इत्यादि उपसर्ग लावून तयार होतील. तसेच प्रत्यय लावूनहि कांहीं शब्द ‘ हर्ता, हर्त्री, हर्तुम्, हरण इत्यादि सारखे तयार होतील. ‘ चल् ’ ह्या धातूचा कुटुंबविस्तार पहा केवढा मोठा आहे ! चल, विचल, संचल, अतिचल, अभिचल, प्रतिचल, चलत, चलती, चाल, चळणें, चाळणें, चाळण, चाळणी, चल, अचल, चाळवणें, चाळवाचाळव, चाळवणी, चालणें, चालणार, चलणार, चळणार, चलत्, चलचलरे, चाळा’–इत्यादि शब्द एका चल् ह्या धातूच्या कुटुंबांतील तत्सम व तद्भव मंडळी होत. हें एक शब्द-कुटुंब झालें. असलीं कितीतरी शब्दकुटुंबें आहेत. ह्या सर्व कुटुंबांचा विस्तार म्हणजेच भाषारूपी अश्वत्थ वृक्षाचा वंशविस्तार होय. हे जे वर साधित शब्द तयार झाले ते मूळ धातूला उपसर्ग, प्रतिसर्ग किंवा अन्तःसर्ग लागूनच तयार झाले.

४ उपसर्गसाधित शब्द : उपसर्ग हे पूर्वी एकेकाळीं रूढ असलेल्या स्वतंत्र शब्दाचे अवशेष होत. ह्यांच्या सध्यांच्या रूपांत त्यांचा पूर्वीचा अर्थ उतरला असल्यामुळें उपसर्ग लागल्याबरोबर त्यांचा अर्थ मूळ शब्दाच्या अर्थांत मिसळतो व म्हणून शब्दाचा अर्थ बदलतो. “उपसर्गेण धात्वर्थो बलात् अन्यत्रे नीयते” ह्या सिद्धान्ताचें मर्म वरीलप्रमाणें आहे. उपसर्गानेंच काय, पण प्रतिसर्ग किंवा अन्तःसर्ग लागल्यानेंहि मूळ शब्दाचा अर्थ बदलतो हेंहि तितकेंच खरें आहे. कारण उपसर्ग, प्रतिसर्ग व अन्तःसर्ग हे सुद्धां एका काळीं स्वतंत्र शब्द स्वतंत्र अर्थानें भाषेंत रूढ होते. सध्यांच्या त्यांच्या रूपांत त्यांचा पूर्वीचा अर्थ उतरला आहे. उपसर्ग व त्यापासून झालेले साधित शब्द खालीं दिले आहेत.

१ ‘ **अति** ’ ह्या उपसर्गाचा अर्थ ‘ पलीकडे, वर, फार ’ असा आहे. हा उपसर्ग लावून पुढील तत्सम व तद्भव शब्द सिद्ध होतात. त्यांवरून **अति** ह्या उपसर्गामुळें अर्थाचा कसा बदल होतो हें कळेल. उदाः–अत्यंत, अतिरेक, अतिसार, अतिस्नेह, अतिव्याप्ति, अत्याचार, अचाट (अचत्थ>अत्यर्थ), अचकट, (अत्यवकत्थ) अटासणें (अत्याशंस) इ.

२ ‘ **अधि** ’ ह्या उपसर्गाचा अर्थ ‘ वर, ठायीं, श्रेष्ठ ’ असा आहे. हा उपसर्ग लावून कांहीं तत्सम व तद्भव शब्द सिद्ध होतात. उदाः—अध्यात्म, अधिदैवत,

अध्यक्ष, अधिकार, अध्ययन, अध्यापन, अधाशी, (अधि+आशी), अवघ्टणें इ.

३ **‘अनु’** ह्या उपसर्गाचा अर्थ ‘मागून, सारखें’ इत्यादि असून त्यापासून पुढीलें तत्सम शब्द तयार झाले आहेत. उदाः–अनुक्रम, अनुचर, अनुकरण, अनुभव, अनुकूल, अनुमान, अनुरूप, अनुनासिक, अनुमोदन, अनुरक्त.

४ **“अप”**=पासून, खालीं, विरुद्ध, हीन, उदाः—अपकीर्ति, अपजय, अपशब्द, अपमान, अपराध, अपशकून, अपमृत्यु, अपेक्षा, अपघात.

५ **अभि**=अभितः, आसमंतात्, पूर्वी, जवळ, पुढें. उदाः—अभिनंदन, अभिप्राय, अभिरुचि, अभिलाष, अभिषेक, अभ्यास, अभ्यागत, अभिनय, अभिनव, अभ्यासणें, आबुखणें (अभि+उख्), आसुथणें (अभ्युत्था).

५ **‘अव’**=पासून, खालीं, हीन, अभाव. मूळ **अप** असून त्याची परिणति **अव** ही झाली असावी. अवकृपा, अवगुण, अवज्ञा, अवतार, अवधान, अवस्था, अवसान, अवशेष, अवदशा, अवसर, अवकळा, अवकाश, अवघड, अवचित, उतरणें (अवतॄ),

७ **‘आ’**=पासून, पर्यंत, थोडें. उदाः–आकर्षण, आकलन, आक्रोश, आगमन, आधार, आहार, आभार, आज्ञा, आजन्म, आग्रह, आरंभ.

८ **‘उत्,–द्’**=वर, उंच, श्रेष्ठ. उदाः–उत्कर्ष, उत्तीर्ण, उत्तम, उत्तेजन, उत्पन्न, उत्पात, उत्सव, उत्साह, उत्सुक, उद्गम, उद्योग, उदय.

९ **‘उप’**=समीप, गौण. उदाः–उपकार, उपद्रव, उपपत्ति, उपभोग, उपमर्द, उपयोग, उपेक्षा, उपास.

१० **‘दुर्, दुस्’**=वाईट, दुष्ट. उदाः- दुराचरण, दुर्गुण, दुर्दशा, दुर्बोध, दुर्भाग्य, दुश्चिन्ह, दुष्कर, दुर्लभ.

११ **‘नि’**=आंत, खालीं, कमी, जास्त, हीन. उदा–निग्रह, निपात, निदर्शन, निधान, निरूपण, निबंध, निमग्न, निरस; निकोप, नितळ, निकामी, निजोरी, निपणजा, निपणतू.

१२ **निस्, निर्**=बाहेर, रहित, अतिशय. उदा.–निरंतर, निरपराध, निरर्थक, निरीक्षण, निर्णय, निर्लज्ज, निश्चय, निश्चल, निष्काळजी, निर्धास्त.

१३ **परा**=परत, उलट, फार, अतीशय. उदा.—पराकाष्ठा, पराक्रम, पराभव, पराजय.

१४ **परि**=चाटोळा, पूर्ण, व्याप्त, भोंवतालीं. उदा.–परिचय, परिछिन्न, परिणाम, परित्राण, परिपाठ, परिमित, परिवार, परिश्रम.

१५ **प्र**=अधिक पुढें, वर. उदा.–प्रकरण, प्रकृति, प्रकार, प्रख्यात, प्रचार, प्रमाण, प्रभाव, प्रपितामह.

१६ **प्रति**=उलट, फिरून, वर, एकेक. उदा.–प्रतिकूल, प्रतिकार, प्रतिक्रिया, प्रतिध्वनि, प्रतिबिंब, प्रतिष्ठा, प्रत्येक, पडछाया, पडसाद, पैज, इ.

१७ **वि**=शिवाय, विशेष, निराळा. उदा.–विचार, विनति, विस्मृति, विख्यात, विधवा, विश्वास, विनंती, विसरणें, (अ)हेव, विलगणें, विसावा.

१८ **सम्**=चांगलें, बरोबर. उदाः––संकल्प, संकोच, संगम, संक्षेप, संसार, संचय, संपादन, संरक्षण, संहार, सांज (संध्या), सांपडणें (संपद्), सांचणें, झपाटणें (संपात).

१९ **सु**: चांगलें, सोपें, अधिक. उदा–सुकृत, स्वागत, स्वल्प, सुगम, सुभाषित, सुलभ, सुजन, सुरस, सुशिक्षित, सोपें (स्वल्प), सोहाग, सुकाळ, सुगावा, **सुजाण**.*

२० **उपसर्गसाधित तद्भव शब्द** : वरील बहुतेक शब्दांतील उपसर्ग व मूळ शब्द असे निराळे काढतां येतात. परंतु कांहीं वेळेस ते दोन्ही अलग काढतां येत नाहींत. उपसर्ग अगदीं पूर्णपणें मूळ शब्दांत मिसळून जातो. उदा–ये (आ+या), आचव (आ+चम्), उठ (उत्+स्था), निरखणें (निस्+ईक्ष), भिजणें (अभि+अंज्), पुसणें (प्र+उंच्छ्), सांभाळणें (संपाल्), झपाट (संपात्), बिघडणें (विघट्), सतावणें, (संतापय), पाठविणें (प्रस्थापय), आणणें (आनी), ऐकणें (अभिकर्ण).

५ **मराठी उपसर्ग** : वर संस्कृतमधून मराठींत वापरांत आलेले सर्व उपसर्ग दिले, व त्याबरोबर त्या उपसर्गांनीं घटित झालेले तत्सम व तद्भव मराठी शब्द दिले. ह्याशिवाय मराठीचे म्हणून कांहीं स्वतंत्र उपसर्ग आहेत ते खालीं देतों.

---

* मो. के. दामले : शास्त्रीय व्याकरण, पृ. ४७३–.

१ '**अ**' हा संस्कृत व प्राकृत 'अ' पासून आलेला असून त्याचा अर्थ हि तोच अभाव, निषेध असा आहे. स्वरादि शब्दांच्या पूर्वी तो 'अन्' होतो. उदा :-- असडीक, अडाणी, अबोल, अनोळखी, अनशेपोटी. कधीं कधीं व्यंजनादि शब्दांच्या आरंभींहि अन् येतो. उदा :— अनमान, अनमोल, अनाठायीं, अनहित, अनवाणी. २ **अड** किंवा **आड** हा संस्कृत अर्ध किंवा **अन्तर्** पासून आला असून त्याचा अर्थ 'लहान, गौण, अर्धा, आंतील' असा आहे. उदा :— अडसर, आडनांव, आडकाठी, आडवेळ. ३ **अद** (सं अर्ध.= अर्धा, निम्मा). उदाः--अदपाव, अदशेर, अच्छेर, अदमुरें, अदकोस. ४ **अव** (सं. अव. = हीन, कमी) उदा :--अवजड, अवकळा, अवदशा, अवलक्षण, अवचित. ५ **दु** (सं. दुर्=दूषित, दुष्ट). उदा :-- दुकाळ, दुवेत. ६ **नि** (सं. नि, निर्=रहित, अधिक) उदा :-- निकामी, निजोरी, निकोप, निधडा, निलाजरा, निनांवी, निरस. ७ **निर्**, **निस्**. उदा :--निर्फळ, निर्धास्त, निर्धोक, निर्गाठ, निष्काळजी. ८ **पड**-- (सं. प्रति=दुसरा, गौण). उदाः-पडजीभ, पडसाद, पडच्छाया, पडचाकर, पडदासी. ९ **फट**=फार, उघड. फटफजीती, फटलंडी (फट हा स्वतंत्र शब्द आहे.). १० **भर**=पुरा, मुख्य. उदा :—भरदिवसां, भररात्रीं, भरसभेंत, भरजरी, भरजवानी.

६ **फारसी उपसर्ग** : मराठींत उपयोगांत असलेले फारसी व अरबी उपसर्ग व त्यांनीं घटित झालेले मराठी शब्द खालीं दिले आहेत. हे उपसर्ग बहामनी, शिव- व पेशवे-कालीन वाङ्मयांत विशेष वापरांत होते. १ **ऐन**=मुख्य, पूर्ण, पुष्कळ. उदाः ऐनदौलत, ऐनआमदानी, ऐनजिनसीं, ऐनकिंमत, ऐनदोनप्रहर, ऐनरंग. २ **कम**=कमी, अपुरा. उदा-कमजोर, कमकुवत, कंबक्त (कम्बख्त्), कमअक्कल, कमनशीब. ३ **गैर**, **घैर**, वांचून, विना. उदा :-गैरहजर, गैरसमज, गैरशिस्त, गैरमर्जी, गैरसावध, गैरसोय. ४ **दर**=प्रत्येक. उदा :- दररोज, दरमहा, दरकूच, दरमजल, दरसाल, दरशेंकडा. ५ **ना**=अभाव. उदाः--नाउमेद, नापसंत, नाहक, नादार, नालायक, नामर्द, नाईलाज, नाकबूल. ६ **बद**=वाईट. उदाः-बदफैली, बदलौकिक, बदकर्म, बदनाम, बदसूर. ७ **ब**= प्रमाणें. उदाः-बजिन्नस, बदस्तुर, बशर्त, रूबरू. ८ **बर**= प्रमाणें. उदाः-बरहुकुम, बरतरफ, बरदास्त. ९ **बिन**-वांचून उदा :-बिनदिक्कत, बिनधोक, बिनतोड, बिनचूक, बिनतक्रार. १० **बे**=वांचून. उदाः-बेअब्रू, बेइमान, बेदम, बेकाम, बेचिराख, बेजार, बेढब, बेधडक, बेमुरवत, बेशरम. ११ **बेला** (**बिला**)=वांचून-बिलाकसूर, बेलाशक, १२ **ला**-लाचार. १३ **सर**=मुख्य. उदाः-सरदार, सरहद्द, सरनौबत, सरसुभा, सरपंच. १४ **हर**=प्रत्येक. हररोज, हरवक्त. १५ **हम** (आम्)-हामरस्ता.

७ **संस्कृत कृदन्तें** : शब्दसिद्धीमध्यें कृदन्त व तद्धित ह्यांचा प्रामुख्यानें समावेश होतो. मराठीमध्यें संस्कृतमधील कृदन्तें व तद्धितें तत्सम व तद्भव ह्या दोन्ही स्वरूपांत रूढ आहेत. हे साधित शब्द अर्थात् संस्कृत व तद्धित प्रत्यय लागून सिद्ध झाले आहेत.

अ (सं. अ; प्रा. अ; म. अ)-चुर्-चोर, दिव्-देव, हृ-हर, धृ-धर, चर, दीप. **अक**-कारक (कृ), नायक (नी), घातक (घत्), पाचक (पच्), गायक, पाचक, बाधक, रक्षक, लेखक, योजक, क्षेपक, जनक, हिंसक, प्रेक्षक, मारक, तारक. **अन**-नंद्-नंदन, मद्-मदन, रम्-रमण, अर्द्-अर्दन, रक्षण, अवलोकन, स्पष्टीकरण, स्थान, दान, पचन, भोजन, हवन, पचन, साधन, सेवन. **अना**-प्रार्थना, वेदना, रचना, विचक्षणा, घटना, तुलना, भावना, सूचना. **अनीय**-दर्शनीय, करणीय, प्रेक्षणीय, रमणीय, आचरणीय; **आ**-इष्-इच्छा, कथ्-कथा, चिंता, जरा, पीडा, त्वरा, त्रपा, प्रशंसा, शिक्षा, जिज्ञासा. **लु**,-**आलु**-स्पृहयालु, शयालु. **इन्**-**ई**-त्यागी, दोषी, योगी, अनुयायी, क्षयी, आभारी, सहचारी, सहाध्यायी. **नु**--सहिष्णु, वर्धिष्णु, जयिष्णु, विष्णु. **उ**-भिक्षु, इच्छु. **उक**-भावुक, घातुक, कामुक, भिक्षुक. **उर**-भासुर, भंगुर, मेदुर. **ऊक**-दंदशूक, जागरूक. **त**-गत, भूत, कृत, मृत, गूढ, सिद्ध, क्षुधित, तृषित, शंकित, लीन, जीर्ण, पूर्ण, त्रात-त्राण, घ्रात, घ्राण. **ता**-(सं. **तृ**) संस्कृतमध्यें हा प्रत्यय कर्तृवाचक आहे. त्याचें प्रथमेचें ए. व. रूप **ताका**रान्त होतें. तेंच रूप मराठींत रूढ आहे. उदाः-दाता, नेता, श्रोता, वक्ता, भर्ता, भोक्ता, स्रष्टा, शास्ता. **तव्य**, **य**, **अनीय** हे संस्कृतमधील तिन्ही प्रत्यय विध्यर्थी धातुसाधिताचे आहेत. तेच मराठींत उतरले आहेत. हीं रूपें अर्थात् तत्सम आहेत. उदाः-कर्तव्य, कार्य, करणीय; श्रोतव्य, श्रव्य, श्राव्य, श्रवणीय. **ति** < सं. ति : कृति,

गति, बुद्धि, शक्ति, स्मति, नीति, युति, प्रीति, कांति. **त्र** < सं. त्र : नेत्र (नी), श्रोत्र, पात्र, शास्त्र, शस्त्र.

८ **संस्कृत तद्धितें** : संस्कृतमधील तद्धितें तशींच मराठींत रूढ आहेत.

१ मूळ संस्कृत शब्दांतील स्वराला वृद्धि विकार होऊन त्या शब्दाचें तद्धित तयार होतें. उदा:-यदु-यादव, कुशिक–कौशिक, पृथा–पार्थ, , सुभद्रा–सौभद्र.

हीं जशीं नामें सिद्ध झालीं तशीं मूळ स्वराची वृद्धि होऊन विशेषणेंहि तयार होतात. चाक्षुष (चक्षुस्), वैष्णव (विष्णु), नाक्षत्र (नक्षत्र), वैयाकरण (व्याकरण), चैत्र (चित्रा), वैशाख (विशाखा).

२ **इक** : मासिक (मास), लौकिक (लोक), ऐतिहासिक (इतिहास), नास्तिक, नाविक, कायिक, मानसिक, ऐहिक, आध्यात्मिक, इ.

३ **इय** : श्रोत्रिय, क्षत्रिय, यज्ञिय.

४ **ता, त्व, य**–इत्यादि प्रत्यय भाववाचक नामें सिद्ध करतात. उदा–गुरुता, समता, जनता, बंधुता, गुरुत्व, समत्व, पुरुषत्व, गोत्व, जाड्य, स्वास्थ्य, दार्ढ्य.

५ विशेषणें सिद्ध करण्याचे प्रत्यय पुष्कळच आहेत. त, इत, ल, इल, आलु, ईन, ईय, वत्, मत्, विन्, तन, वल, हे त्यांपैकीं कांहीं प्रत्यय होत. **त**—कृत, मत, गत; **इत**–पुष्पित, कुसुमित, फलित, पल्लवित, मुद्रित; **ल**–चांगल, वत्सल, मांसल, पांसुल; **इल**–पंकिल, जटिल, तुंदिल, तोंडाळ; **आलु**–दयाळु, मायाळु, स्पृहयालु, शयाळु; **इन्**–नवीन, शालीन, कुलीन, मलीन; **ईय**–त्वदीय, मदीय, अस्मदीय; **वत्**– (वान्) विद्यावान्, धनवान्, गुणवान्, रूपवान्, **मत्**–संपत्तिमान, धीमान्, श्रीमान्; **विन्**–मायावी, मेधावी, तेजस्वी; **वल**–कृषीवल, रजस्वला; **तन**-चिरंतन, सनातन, प्राक्तन.

९ **मराठी कृदन्तें** : धातूंना पुढील प्रत्यय लावून कृदन्तें तयार करतात. **अ**–फूट, लूट, भूल, झीज; **आ**–झगडा, वेढा, घेरा, घसरा, पुकारा पस्तावा, ठेवा, तोटा, मेळा. **आई**–खोदाई, चराई, धुलाई, शिलाई, लिखाई. **आऊ**–विकाऊ, जळाऊ, टाकाऊ, चलाऊ, लढाऊ, दिखाऊ; **आट**–भरभराट, घमघमाट, खळखळाट. **आड**–खादाड, नासाड, भ्याड. **आर**–चुकार, लुटार–रु, **आरी**–पुजारी, पिंजारी, रंगारी. **आळ**–ओंढाळ, खाजाळ. **आळू**–लाजाळू, खाजाळू, विसराळू. **ईर**–फुगीर फुटीर. **ईंव**–घडींव, घोटींव, आटींव, रेखींव, भरींव. ऊ–हसूं, रडूं, गळूं; **क**–वेचक, निवडक; तुटक, रेचक, मारक, कारक; **का**–मारका, जळका, पडका, गळका; **गा**-बाटगा, भांडगा. **ट**-कुजट, आंबट, भिजट, पुसट, पसरट, कळकट, करपट, खवट ह्याशिवाय निरनिराळीं धातुसाधितें व क्रियापदांचीं कालाचीं व अर्थांचीं रूपें साधण्याचे निरनिराळे प्रत्यय आहेत. ल, ले ले, णार, णारा, ता. ताना, ऊ, ऊन्, ऊनी; वें, वा इत्यादि त्यांपैकीं कांहीं प्रत्यय आहेत.

१० **मराठी तद्धितें**: धातूशिवाय इतर कोणत्याहि शब्दांना पुढील प्रत्यय लावून तद्धितें तयार करतात. **अ**–ह्या प्रत्ययानें धातु तयार होतात. दुण–णें, कानस–णें, फुल–णें, आंब–णें, आखुड-णें, लांब–णें, सुरकत-णें. **आ**–ताठ–ताठा, चिकट–चिकटा, गारठ–गारठा, दुजोरा. **आई**–शितळाई, धिटाई, मलाई. **आट,–टा,–ड,–डा,–** पेंचाट, खालाट, हाकाटा, मोठाड, ओसाड, रेताड-ळ, दाताड, सुताडा, पाणाडा, धुराड. **आर (कार),–आरा, आरी** –कुंभार, सोनार, भिकार, खिंडार, पिसारा, डोलारा, लिंबारा, गुबारा; सुसारी, चितारी, फुलारी. **ल, ळ, आळ, आळा, आळी, आळें**–कृताळ, फेसाळ, केसाळ, मिशाळ, रसाळ, खोड्याळ, हापाळ, किटाळ, डोंबाळा, कागाळी, बंडाळी. **ई**—लांकडी, पितळी, दगडी; चिकी, जोडी, गुंडी, चाळिशी, दलाली, नोकरी, पुढारी; **ईक**—सोयरीक, मोकळीक, वेगळीक, आपुलीक, जवळीक. **एल**––खोबरेल, उंडेल, करंजेल. **क**—धडक, थडक, पंचक; **कर**—साळकर, खेळकर, खोडकर, होळकर, निगडीकर, काशीकर; **का**—चुळका, मणका, पुंजका, सुळका; **गा**––खळगा, मुलगा, पोरगा; **गी**–– पोटगी, देणगी; **ट**—आंबट, खारट, तिखट; **टा**— चोरटा, दिवटा, एकटा, दुकटा; **टी**—थापटी, दामटी, आगटी; **डा**—गबडा, पगडा, वावडा, माबडा, कोरडा; **ता**—खालता, वरता, मागुता; **पण, पणा**—मनुष्यपण, देवपण, थोरपण; **या**—हुप्या, घुम्या, बायक्या, भांग्या; **ला**—शिंपला, मागला, पुढला, एवढाला; **ली**—ताटली, दिवली; **लें**—खाटलें, बांजलें; **वट, वटा, बडा, वला, वळा**, धुळवट, मळवट; मुखवटा, दुखवटा, आठवडा, धिंडवडा; कानवला, गव्हला; गोतवळा, तोंडवळा.

वाणा—वाला, ळ, ळा, ळी—कंटाळवाणा, केवीलवाणी, दीनवाणी, भाजीवाला, टांगावाला, घोडेवाला; प्रेमळ, रवाळ, रसाळ, मासळी, फासळी इ.

११ **फारसी कृदन्तें व तद्धितें**—संस्कृत भाषेंतील शब्दांपासून सिद्ध झालेले कृदन्त व तद्धित शब्द जसे मराठींत आले आहेत, तसे फारसी, अरबी ह्या भाषांतीलहि आले आहेत. त्यांपैकीं कांहीं खालीं देतों. **गर, गार, बान**-सौदागर, कारिगर, गुन्हेगार, रोजगार, कामगार; बागवान, सारवान, मेहेरबान. **जार, दान**-गुलजार, कलमदान, शामदान, जुगदान. **चा, इंचा**-बगीचा, गालिचा; **ई**-बेकी, खुषी, खुबी; **गिरी, शाई**-गुलामगिरी, लुच्चेगिरी, शिंदेशाही, निजामशाही; **मंद**-अकलमंद, दौलतमंद; **वार**-उमेदवार. **आना (ईना) वार**-सालिना, महिना, नजराणा, छबीना, सादिलवार, इसमवार, प्रतवार, सालवार, **गीर**-जहांगीर, अबदागीर, आलमगीर; **खोर**-दिवाळखोर, हरामखोर; **दार**-जमीनदार, जमादार, जबाबदार, **नवीस**-जमेनिविस, वाकनीस, कारखानीस; **बाज**-दारूबाज, अफूबाज, दगलबाज; **खाना**-कारखाना, तोफखाना, शेतखाना.

१२ **सामासिक शब्द** : दोन किंवा अधिक शब्दांच्या जोडणीनें समास सिद्ध होतो. ह्या जोडलेल्या शब्दांत परस्पर कांहीं तरी संबंध असतो. परंतु त्या संबंधदर्शक शब्दाचा लोप करून शब्द जवळजवळ ठेवून जोडतात. सामासिक शब्द मुख्यतः चार प्रकारचे आहेत. व ते घटकशब्दांपैकीं कोणता शब्द मुख्य आहे ह्यावरून सिद्ध झाले आहेत. पहिला शब्द प्रधान असला कीं तो प्रायः अव्ययीभाव समास होतो. दुसरा शब्द प्रधान असला तर तत्पुरूष; दोन्ही शब्द प्रधान असले तर द्वंद्व; कोणताच शब्द प्रधान नसून तिसराच शब्द प्रधान असला तर बहुव्रीहि असे चार प्रकार आहेत. ह्यांचे पोटभेद पुष्कळ आहेत. त्यांचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत.

१ **अव्ययीभाव** :—यथाशक्ति, प्रतिक्षण, दरदिवस, आमरण, यावज्जीव, देशोदेशीं, गांवोगांव.

२ **तत्पुरुष** :—ह्याचे पहिल्या शब्दाच्या विभक्तीप्रमाणें पोटभेद आहेत. पहिला शब्द विशेषण असेल तर कर्मधारय—द्विगु हे आणखी भेद पडतात. नञ्तत्पुरुष, उपपदतत्पुरुष, मध्यमपदलोपी हे आणखी प्रकार होत. ईश्वरदत्त, गजमोजणी; कृष्णार्पण, गायरान; चोरभय, जन्मखोड; देवालय, राजवाडा; वनभोजन, घरकोंबडा; युधिष्ठिर, अन्याय, काळमांजर, पंचवटी, चौफळा.

३ **द्वंद्व** : ह्याचे इतरेतर द्वंद्व, समाहार द्वंद्व, एकशेष द्वंद्व असे तीन पोटभेद आहेत. हरिहर, भीमार्जुन; भाजीपाला, पानपत्रावळ, पैसाअडका; पापपुण्य, पितर.

४ **बहुव्रीहि** : तत्पुरुष समासाप्रमाणें ह्याचेहि विभक्तीप्रमाणें पोटभेद आहेत. कृतकृत्य, दशानन, निर्धन, तपोबल; वीरपुरुष.

१३ **अभ्यस्त शब्द** : एकाच शब्दाची पुनरुक्ति झाली म्हणजे अभ्यस्त शब्द तयार होतो. समासांत सर्व शब्द भिन्न, स्वतंत्र असून कोणत्या तरी संबंधानें जोडलेले असतात. अभ्यस्त शब्दांत एकाच शब्दाची पूर्ण किंवा अंशतः पुनरुक्ति असते. अभ्यस्त शब्दांचे पुढील मुख्य प्रकार आहेत. १ पूर्णाभ्यस्त, २ अंशाभ्यस्त, ३ अनुकरणवाचक, ४ सातत्यार्थक.

१ पूर्णाभ्यस्त-घरघर, कवडीकवडी, गांवगांव, क्षणक्षण, तिळतिळ, गोडगोड, दूरदूर, जेव्हांजेव्हां, कधींकधीं इ.

२ अंशतः अभ्यस्त-ओळखदेख, लाडीगोडी, फुटकातुटका, असातसा, वेडेंवाकडें, कधींमधीं, जेथेंतेथें, दाणादुणा, अघळपघळ, अर्धामुर्धा, करणेंसवरणें, पूसतपास.

३ अनुकरणवाचक-किरकिर, कळकळ, गरगरीत, चमचमीत, चकचकणें, झणझणणें, गटगट, ढळढळ, धबधब, चकाकणें, थरारणें, भरारणें.

४ सातत्यार्थक-ताटकळणें, ताटसणें, ताठणें, ताठरणें, ताठसणें, तातावणें, कातावणें.

१४ **प्रतिध्वनिशब्द** : अभ्यस्त किंवा द्विरुक्त शब्दांत कधीं एकाच शब्दाची द्विरुक्ति करतात किंवा समानार्थ भिन्न शब्दांची द्विरुक्ति करतात. बोलतांना जोर आणण्याचा किंवा शब्दाचें व अर्थाचें महत्त्व जाणवण्याचा हा मार्ग आहे. कधीं ही द्विरुक्ति एकाच भाषेंतील समानार्थक शब्दांची करतात तर कधीं भिन्न भाषांतील शब्दांची करतात. एक शब्द संस्कृत अथवा मराठी भाषेंतील तर दुसरा शब्द कानडी किंवा फारसी भाषेंतील असा समास होतो. ही प्रवृत्ति मराठी भाषेंत अगदीं तिच्या जन्मापासून असल्याची आढळते. ह्या शब्दांना प्रतिध्वनिशब्द किंवा

भाषांतरशब्द असें सुनीति कुमार चतर्जी म्हणतात.† प्रातिशाब्दिक शब्द असें दादोबा म्हणतात. यादवकालीन भाषेंतील द्विरुक्तीचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत. घारेधाकुटा, सांदीसवडी, पाळापाणी (ह. पा. १३, ३०, ९४), गोरागोमटा, सोयरीधायरी, वोंटेंगोमटें, दाएपसाए, इळाखिळा, कोडकौतुक, मांदीमेळावा. पेशवेकालीन भाषेंतील द्विरुक्तीचीं उदाहरणें पुढीलप्रमाणें आहेत. फितवाफांदडा, झांबडझुंबड, लावणीसंचणी, मोडतोड इ. अर्वाचीन मराठींतील द्विरुक्तीचीं उदाहरणें खालीं दिलीं आहेत. चिल्लींपिल्लीं, (तेल. म.), गल्लीकुची (कान. म.), शिवीगाळ (म. फा.), नोकरचाकर, कागदपत्र, गिजगोळ, गुंडगोळ, कामकाज, चीजवस्त, बाजारहाट, किडुकमिडुक, चिरगुटपांघरूण, दिवाबत्ती, पावरोटी (पोर्तु- pao+रोटी), सीलमोहोर, खेळतमाशा, लाजशरम, धनदौलत, शेटसावकार, अन्नपाणी, जाबसाल, किडामुंगी.

कधीं कधीं दोन्ही शब्द अर्थवान् असलेच पाहिजेत असें नसून केवळ ध्वनिपूर्ततेसाठीं सारख्या उच्चाराचा दुसरा शब्द तयार करून समास करतात. उदा–अकरीटकरी, अटीपटी, उडकीदुडकी, उलटसुलट, दगडगिगड, आलखीपालखी, अडकीमडकी, धोंडाबिंडा.

१५ त्रिवारोक्ति : हीं सर्व द्विरुक्तीचीं उदाहरणें झालीं. कधीं कधीं शब्दांची त्रिवारोक्ति आणि क्वचित् त्यापेक्षांहि अधिक वेळां शब्दांची पुनरुक्ति झालेली आढळते. ही पुनरुक्ति एकाच शब्दाची असणार व ती वाक्यांत येणार हें उघड आहे. उदा-त्यानें **घर घर घर** शोधलें. **पळ पळ पळ** कसा. हें फूल **लाल लाल लाल** आहे.

राम राम राम राम व्यर्थ काय शापिलें ।
हाय हाय हाय हाय शापघातें ताडिलें ॥
पाहें पाहें पाहें पाहें कोण न्याय वर्तले ।
त्राहें त्राहें त्राहें त्राहें काय आजि पावलें । कचेश्वर.
वद वद वद रसने रामनामे रसाले ॥

१०२ आभार व प्रार्थना : " शब्द : उद्गम आणि विकास " ह्याचें स्पष्टीकरण येथवर आम्हीं केलें व तें मुख्यतः मराठी भाषेंतील शब्दांना अनुलक्षून केलें. उदाहरणें दिलीं तीं प्रस्तुत कोशांतील आहेत. कोशाचें कार्य करतांना व्युत्पत्तिशास्त्रांतील ज्या निरनिराळ्या गोष्टी, विशेषतः मराठी शब्दांच्या बाबतींत आमच्या नजरेस आल्या, त्या आम्हीं ह्या प्रास्ताविक प्रबंधांत मांडल्या आहेत. आमच्या विधानांना आम्हीं ठिकठिकाणीं आधार दिले आहेत. ते मूळ मजकुराचे केवळ निदर्शक समजावेत. कारण कांहीं वेळां प्रतिपादनाच्या पूर्ततेसाठीं निदर्शित मजकुराच्या पुढचा पाठीमागचा कांहीं अधिक मजकूर घ्यावा लागला आहे. असा जरूर तो मजकूर जर न घेतला तर एखादे वेळेस मूळ लेखकाला अन्याय होण्याचा संभव असतो. तेव्हां दिलेल्या निर्देशांकडे ह्या दृष्टीनें पाहावें. ज्या ज्या ग्रंथकारांच्या संशोधनाचा व प्रतिपादनाचा उपयोग झाला, त्या सर्वांचा प्रस्तुत लेखक अत्यंत ऋणी आहे. प्रस्तुत ग्रंथांतील चांगुलपणाचें श्रेय सर्व ह्या निरनिराळ्या शास्त्रसूरींचें आहे. त्या सर्वांचा निर्देश आम्हीं आरंभीं स्वतंत्र रीतीनें केलाच आहे. ग्रंथांत कांहीं उणेपणा राहिला असेल तर, तो मजमुळेंच राहिला असें समजावें. युद्धपरिस्थितीमुळें ग्रंथ मुद्रणावस्थेंत फार काळ राहिल्यामुळें मुद्रणाबाबत कोठें अनवधान झालें असल्यास त्याबद्दल क्षमा करावी. शेवटीं मातृभाषेंतील व्युत्पत्तिविषयक ह्या पहिल्या प्रयत्नाकडे उदार मनानें पाहण्याबद्दल मराठी भाषाभिमानी पंडितांना सप्रश्रय प्रार्थना करून हा ग्रंथ त्यांच्या हवालीं करतों.

नेक नामदार डॉ. मुकुंद रामराव जयकर यांचे आभार मानणें हें माझें कर्तव्य समजतों. त्यांच्या **प्रोत्साहनामुळेंच** हा ग्रंथ माझ्या हातून पुरा झाला. मुंबई विद्यापीठानें प्रकाशनासाठीं आर्थिक मदत केली त्याबद्दल विद्यापीठाचा मी आभारी आहें.

मार्गशीर्ष शु. ६ शके १८६८,
एल्फिन्स्टन कॉलेज, मुंबई.

कृ. पां. कुळकर्णी

---

† Dr. S. K. Chatterji : *Polyglottism in Indo Aryan*, (*Oriental Confce. report*) 1933.

न्यायमूर्ति मु. रा. जयकर-पारितोषिक ग्रंथ

ॐ भूयानसि महानसि।

मराठी व्युत्पत्तिकोश

[ऐतिहासिक व तौलनिक]

ॐ पुं. ॐकार, वैदिक संस्कृतिनिदर्शक पवित्र अक्षर; प्रणव. Sacred symbol (in Hindu and allied religions.)

सर्व वैदिक संस्कृतीचें सारसर्वस्व या अक्षरांत परंपरेनें उतरलें आहे.

[**अ + उ + म् (ँ)** ह्या वर्णांचें मिळून हें वरील अक्षर बनलें आहे. ह्या वर्णांतील प्रत्येक वर्ण अनुक्रमें विष्णु, महेश्वर, ब्रह्मा ह्या देवतादर्शक आहे. हें प्रत्येक धार्मिक मंत्राच्या व देवतेच्या नांवाच्या आरंभीं उच्चारतात.]

^{1}**अ** पुं. मराठी वर्णमालेंतील पहिला स्वर. ह्याचें उच्चारण कंठ्य असून उच्चारस्थान कंठ आहे. The first letter of Marathi alphabet.

पूर्ववैदिक भाषेंत 'अ' ह्या स्वराचीं तीन स्वरूपें होतीं. ह्या स्वरूपांचें पुढें वैदिक संस्कृत भाषेंत 'अ' असें एकच रूप झालें. पूर्ववैदिक भाषेंत 'अ, इ, उ' अशा उच्चाराचीं कांहीं तरी तीं तीन स्वरूपें असावीं. पाणिनीच्या 'हयवरट्' ह्या सूत्रावरून असें अनुमान निघणें शक्य आहे कीं, अर्धस्वरांपासून 'अ, इ, उ, ऋ' ह्या स्वरांची उत्पत्ति झाली असावी. 'ह्' ह्याचे दोन उच्चार होते; एक कंठ्य व दुसरा औरस्य. पैकीं कंठ्य हकारापासून 'अ' हा स्वर निघाला. बाकीच्या य्, व्, र् पासून 'इ, उ, ऋ' ह्या स्वरांची उत्पत्ति झाली. ह्या प्रक्रियेला '**इग् यणः संप्रसारणम्**' (कौ. १-१-४५) ह्या सूत्रानें दुजोरा मिळतो. ह्या पूर्ववैदिक 'अ' पासूनच वैदिक संस्कृत 'अ' व प्राकृत 'अ' ह्यांची उत्पत्ति झाली व हा प्राकृत 'अ' मराठीचें मूळ आहे (भाण्डा. वि. फा. व्या. १; कुल.–म. भा. उ. वि. ७०). ह्या 'अ' पासूनच अर्वाचीन मराठींतील 'अ' ची उत्पत्ति आहे. यादवकाल, बहामनीकाल, शिवकाल, पेशवेकाल, ह्या कालांत 'अ' चीं दोन स्वरूपें आढळतात. एक संवृत व दुसरें 'विवृत'. 'अ' चा उच्चार कधीं तोकडा अर्धवट असा होई तर कधीं पसरट होई. हींच रूपें सध्यांच्या अर्वाचीन मराठींतहि आढळतात. 'गवत' ह्या शब्दांतील तिन्ही अक्षरांत 'अ' हा स्वर आहे; परंतु त्या तिन्ही 'अ' चा उच्चार सारखा नाहीं. त्याचप्रमाणें गवात, वराण असाहि मध्य 'अ' चा पसरट उच्चार ग्रामीण मराठींत आढळतो. असे हे संवृत व विवृत उच्चार हे पूर्वकालीन उच्चारांचेच अवशेष राहिले आहेत. प्रातिशाख्यें वगैरे ग्रंथांत 'अ' चे जे अनेक उच्चार निर्दिष्ट केले आहेत त्यांचे हे अवशेष होत. 'अ' ह्या पसरट किंवा विवृत उच्चाराशिवाय आणखीहि किंचित् अधिक पसरट 'ॲ' असा उच्चार इंग्रजीमधून मराठींत आत्मसात् झालेल्या शब्दांत येऊं लागला आहे. (म. भा. उ. वि. स्वरप्रक्रिया पहा.) मराठी 'अ' ची निर्मिति पुढीलप्रमाणें आहे. आद्य, मध्य व अन्त्य ह्या तिन्ही अवस्था पुढें दिल्या आहेत.

सं. **अ.** पा. **अ.**	अध्याश > अधास
,, **ऋ.** प्रा. **अ.**	कृष > कस, आकृष्टि > आकडी.
,, **आ.** प्रा. **अ.**	गाह > गढ, आसाद > हसड, उपधा > ओढ.
,, **इ.** प्रा. **अ.**	चादि > चाड.
,, **उ.** प्रा. **अ.**	आकुल > आकळ, आघूर्ण > आघळ.
सं. **ओ.** प्रा. **अ.**	काकोल > कावळा, खद्योत > काजवा.

^{2}**अ.** अभाव–नकारदर्शकअव्यय. A prefix showing negation.

[सं. **अ.** ह्या अव्ययाचीं कांहीं विशिष्ट परिस्थितींत 'अ' 'अन्' अशीं रूपांतरें होतात. न आणि अ ह्या दोहोंचा अर्थ नकार आहे. व्यंजनादि शब्द असेल तर त्याच्या पूर्वी 'अ' व स्वरादि शब्द असेल तर त्याच्या पूर्वी 'अन्' असें त्याचें स्वरूप होतें. ह्याचा अर्थ 'नकार, अभाव' असा आहे. इतर भाषांतील ह्या अव्ययाचें स्वरूप पुढीलप्रमाणें आहे.

IE. En, An, Ne, N;—सं. **न, अ, अन्**; *Av*. na, a, an (संस्कृतप्रमाणें); *Gr*. Ne, a, an; *Lat*.—Ne, nei, ni; *Lit*. Ne; *Slav*. Ne; *Got*. ni; *As*. nā, nô,un; *ME*. nai; *NE*. nay. un.

सं. **अ, अन्, न**; प्रा. **अ, अन्, अण, ण**; गु. **अ, अन**. इतर सर्व अर्वाचीन भारतीय भाषांत हींच रूपें आढळतात.]

***अ-कण** वि. कणी नसलेला. Devoid of grit.

[सं. **अ+कण.**

IE. Qne, Qnu-d; सं. **कण, कण्डु, कन्द**; *Gr*. Knid, Kno, Knid, Chonis; *Lat*. Cnide, Cinis, √Knis; *Lith*. Knis; *Lett. Russ*. Gnides (ह्या शब्दांत तो धातु आहे), Kandu; *Teut*. Knis, hnit, hnut; *As*. hnutu. पुढील शब्द पहा. *Teut*. nit, nut. wal-*nut*, chest-*nut*.

सं. **कण**; प्रा. **कण, कन**; गु. **कण, कणी, कणुं**; सिं. **कणो**; पं. **कण**; प. पं. **कणी**=थेंब; हिं. **कन**; मराठी **कण, कणीस, कणीक.**]

***अकपट** वि. कपट नसलेला, निष्कपटी; उघड, सरळ स्वभावाचा, मोकळ्या मनाचा. Free from malice.

[सं. **अ+कपट.** √कप् (?) **गूहने, खनने.**

IE. qamp, qep; *Gr*. Kup, Kap; *Lat*. camp. सर्व अर्वाचीन भारतीय भाषांत 'कपट' हेंच रूप रूढ आहे.]

***अकारण** वि. कारणाशिवाय, कारण नसतांना, निष्कारण. Causeless.

[सं. **अ+कारण.** √**कृ** ८ कृतौ.

IE. Qer; सं. **कृ** (कृति, कारण, कार्य, कृत, कर्म इ.); *Av*. Ker; *Old Pers*. Karta (कृत); *Gr*. Kra, Kro; *Lit*. Cer, Cre (Cerimonia-सं. **कर्मन्**).

सं. **कृ**; प्रा. **कर्**; हिं. सिं. का. पं. **कर्, कारन्.** मराठीमध्यें अकारण, निष्कारण असे शब्द रूढ आहेत. करण, कारण, कारण=म्हणून, हे अर्थाच्या दृष्टीनें तद्भव आहेत.]

***अकिंचन** वि. दरिद्री, जवळ कांहींहि नसलेला, थोडेंसुद्धां जवळ नसलेला. Utterly poor.

[सं. **अ+किम्+चन.** (चित्, अन, अपि ह्यांपैकीं कोणताहि एक शब्द वापरतात.)

IE. Qe, Qo, Qos, Qosti; सं. **क, च** (आणि), **कश्चित्, कश्चन, किंचन**; *Av*. Ko, Kā, chi-ç, chith; *Gr*. Te, Po, Ko; *Lat*. que, quis, quid; *Slav*. Kuto; *Lith*. Kas, Ka, Katras; *Teut*. hwa, hwe; *AS*. How, Hwa, Hwi, (*Eng*. who, why &c.)

सं. **कः पुनः**; प्रा. **कउण**; गु. **कोण**; हिं. **कौन, किं, कीं** इत्यादि.]

***अकोप** पुं. क्रोधाचा अभाव, कोप नसलेला. Absence of anger, void of anger.

[सं. **अ+कोप** √ **कुप्**; ह्यासारखेच अक्रोध, अक्लेश वगैरे शब्द सिद्ध होतात व त्या त्या नामाचा अभाव दर्शवितात.

IE. Q-ep; Qup, सं. **कुप्** (कुप्यति); *Lat*. Vap, (ckap cupid.); *Gr*. Kap, chapnos; *Lit*. Kvap, qup. (Kuputi); *Got*. af-hwafjan; *MEng*.-weffe; *Eng*. whiff; *Alb*.-Kapitem.

पं. गु. हिं. सिं. **कोप. क्रोध, क्लेश** इत्यादि तत्सम शब्द रूढ आहेत. त्या त्या शब्दांखालीं पुनः हे शब्द दिले आहेत.]

***अखंड** वि. सडक, सबंद, सगळा, खंड नसलेला. Unpieced, undivided.

[सं. **अ+खंड.**

IE. qel, qeta; सं. **खण्ड**, (**काण्ड**).

सं. प्रा. **खण्ड्, खण्ड**; गु. पं. हिं. **खांड, खंड**; सिंह. **कड्** (तुकडा); गु. **खांड**; पं. का. हिं. **खंड** (साखर); सिं. **खनु**; हिं. **खणा.** हे तद्भव व तत्सम असे दोन्ही प्रकार ह्यांत आढळतात.]

***अगतिक** वि. गति कुंठित झालेला, निरुपाय अवस्थेंत सांपडलेला. Helpless.

[सं. **अ+गति+क. गति**√**गम्.**

IE. Gem, Gm, Ga; सं. **गम्**, (जिगति, गम्यते, गच्छति-गो, गति); *Av*. jam (jamçati); *Gr*. Ban, Ba; *Lat*. Boe, be, bi; *Lett*. Guju (went); *Goth*. qiman.

सं. **गम्, गति**; प्रा. **गइ.**

मराठींतील अगत्य (अगत्य=जरूर जरूर), अगत्यवादें हे शब्द गम्पासून सिद्ध होतात.]

***अगम्य** वि. न जाण्या जोगें, न समजण्याजोगें. Inaccessible, unintellegible.

[सं. **अ+गम्** (गम्य, गमनीय, गंतव्य). इतर भाषांतील शब्द 'अगतिक' खालीं पहा.

ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे तो संस्कृतमधील एका सिद्धांतानुरूप झाला आहे. संस्कृतमध्यें जेवढे 'गमनार्थक' धातु आहेत ते ज्ञानार्थक समजावेत—ये गत्यर्थाः ते ज्ञानार्थाः— असा तो सिद्धांत आहे. 'गमने' ह्यांत सतत गमनाची क्रिया आहे. ज्ञानांतहि सतत गमनाची क्रिया आहे. सरस्वती ही जशी ज्ञानाची देवता आहे तशीच ती सतत गमनाची द्योतक—नदी-देवता आहे. हीच कल्पना ह्या वरील सिद्धांताच्या मुळाशीं आहे.]

***अगाध** वि. फार खोल, थांग न लागणारा. Bottomless, unfathomable.

[सं. **अ+गाध.** √**गाध्** (गाधति), √**गाह्-गाधः**

IE. Gedh; *Gr*. bath, Buth; *Lat*. (abyssum.); *Celt*. gael, bath; *Bret*. Beuzi.

संस्कृतमधील 'गभ्' धातु ह्याच अर्थीं आहे. बुडणें, शिरणें असा त्याचा अर्थ आहे. ह्यावरून गर्भ, गाभा, गाभार, गाढा (विद्वान्), गंभीर, गहिरा, वगैरे शब्द परस्परसंबद्ध असेच ठरतात.]

अगोचर वि. इंद्रियाच्या आटोक्याबाहेरील, विशेषतः दृष्टीच्या टप्प्याबाहेरील. Imperceptible, beyond the range of senses (eyes).

[सं. **अ+गो+चर.**

संस्कृतमध्यें 'गो' शब्दाचे गाय, इंद्रिय, दृष्टि वगैरे अनेक अर्थ आहेत. इंद्रिय शब्दाच्या अर्थाचें विशेषीकरण होऊन दृष्टि असा अर्थ झाला. ह्यांत मूळ गु-गम्-गव् हें असावें. (अगतिक पहा.)

IE. Geu, Gu, Gon; सं. **गु, गव्** (गवति, जुगुवे); *Gr.* Gof, Bof; *Lat.* Bov, vov; *Lith.* Gau-ju; *Slav.* Gov.

इतर अर्वाचीन भारतीय भाषांत हाच तत्सम शब्द रूढ आहे.]

अचल. वि. स्थिर, न हलणारें. Stationary.

[*IE.* quel; *Av.* Caraiti; *Npers.* Caridan; *Gr.* pelo; *Lat.* Colo; *Aisl.* Hvel.

सं. **अ+चल्** (√ चल् गतौ.); प्रा. **चल्ल**; गु. बं. ओ. **चाल**; पं. **चल्ल्**; सिं. हिं. **चल**; का. **चल्**=पळून जाणें. ह्यापासून मराठींत आणखी तद्भव शब्द तयार झाले आहेत. चलन, चालन, चाळण, चाळवाचाळव (णिच् रुप). अकाम. **अचळ, अचळपद.**]

अचक्षु वि. दृष्टि नसलेला, आंधळा, चक्षु-नेत्रविरहित. Blind, without sight.

[सं. **अ+चक्षुस्.**

IE. Qek; सं. **चक्ष्**; *Av.* êas.]

अचिर अ. लवकर. Presently, without delay, in a short time.

[सं. **अ+चिरम्.**

IE. queie; सं. **चिरम्, चिरः**; *Av.* Saiti, Syata, Sāta; *Lat.* quies.

सर्व अर्वाचीन भारतीय भाषांत चिर, चिरकाल, चिरंतन, चिरस्थायी, वगैरे शब्दांत हा शब्द आढळतो.]

अचूक वि. अ. विनचूक, चूक नसलेलें. Unerring, without any mistake.

[मरा. **अ+चूक**; चुकणें=चूक करणें.

सं. **चुक्क्** १ व्यथने; प्रा. **चुक्कइ** (भ्रश्यति); गु. सिं. हिं. बं. **चुक्**; पं. **चुक्क.**]

अ-चेतन वि. चेतना नसलेले, निर्जीव, जड. Inanimate, lifeless.

[सं. **अ+चेतन. चेतना**√चित्, कित्, १० ज्ञाने. हीं दोन्हीं रूपें एकाच मूळ धातूचीं. चैतन्य, केतु (निशाण) चेतना, चेतन, चिकित्सा इत्यादि शब्दांत हाच धातु आहे.]

अज वि. न जन्मलेला, जन्मापासून मुक्त. Unborn.

[सं. **अ+ज.** √ जन् (जन्यते, जायते)

IE. Gen, Gn; *Av.* Ghen, Zan, (Zanaite); *Gr.* Gun; *Lat.* Gen, Gne, Gna; *Lith.* Gemu; *Slav.* Gena; *Teut.* Kun, Kyn; *As.* Cwen; *Got.* Kuni.

हिंदुस्थानांतील इतर आधुनिक भारतीय भाषांत हाच शब्द रूढ आहे.]

अजित वि. न जिंकिलेला. Unconquered.

[सं. **जी. १ जये.** (निष्ठा-जित).

IE. Gei, Gi, Gie; सं. **जी** (जयति, जय); *Av.* je (Joy·ati); *Gr.* Bi; *Lat.* Vis (Vivses); *Eng.* (Vio·lent, Vio·late:).

सिं. **जीत्**; का. **क्षेन्** (जिंकणें); मराठी **जिंकणें** हा धातु प्रा. **जिक्क**पासून. **अजितेंद्रिय**–इंद्रियांवर तावा नसलेला.]

अदूरदर्शी वि. दूरदर्शी नसलेला, दूरदृष्टि नसलेला, धोरण नसलेला. Imprudent, shortsighted.

[सं. **अ+दूर+दर्शी** (√दृश्).

IE. Deu (ā); सं. **दूर**; *Av.* Durae (-ca) Durāt; *IE.* Derk; सं. **दृश्**; *Av.* Darç; *Gr.* Derk. *Dat.* Draco; *Got.* Tarhjan.

तद्भव—प्रा. **दिस**; हिं. गु. ओ. **दिस्**; पं. **डिस्स.**]

अदृष्ट वि. न दिसलेलें, प्रारब्ध. Unseen, providence.

[सं. **अ-दृष्ट (निष्ठा-दृश्)**

IE. Derk; सं. दृश्, **दर्श्**; *Av.* darç; *Gr.* Derk; *Lat.* draco; *Got.* (ga) tarhjan; *As.* torht (**दृष्टः**).

तद्भव शब्द पुढीलप्रमाणें आहेत.

सं. दृश् (दृश्यते); प्रा. **दिसइ**; सिंह. गु. हिं. ओ. **दिस**; सिं. **डिस**; पं. **डिस्स, दिस्स**; का. **डेश** (पाहणें).

ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे. मूळ धात्वर्थ–**न पाहिलेला**; त्यावरून दृष्टिआड, दृष्टीच्या टप्याच्या बाहेर असा अर्थ आला. मागील जन्मांत झालेल्या किंवा केलेल्या गोष्टी व प्रसंग ह्या सर्व '**अदृष्ट**' च होत. त्यावरून प्रारब्ध, नशीव वगैरे अर्थ त्याला प्राप्त झाला. '**प्रारब्ध**' शब्दाचा इतिहास ह्यासारखाच आहे.]

अद्वैत न. वेदान्तांतील एक मत, जीवात्मा व परमात्मा ह्यांचें ऐक्य प्रतिपादन करणारें मत; ऐक्य (सामान्य अर्थ), दुजा भाव नसणें. Unity (between the Brahman & the individual soul).

[सं. अ+द्वैत (**द्वौ, द्वे**).

IE. Duo, Duuo; सं. द्वौ; *Av*. dva; *Gr*. duo; *Lat*. duo; *Lit*. du; *Slav*. *Got*. dva, Tvai; *As*. two, twegen.

ह्या संस्कृत शब्दाचे तद्भव शब्द होतांना कांहीं भारतीय भाषांतील शब्दांत ‘द’ शिल्लक राहतो; कांहीं इतर शब्दांत ‘ब’ वर्ण येतो. दोन, बे, बावीस इ. ह्या शब्दाच्या अर्थांतहि फरक झाला आहे. मूळ अर्थ, द्वैत=दुजाभाव. अद्वैत–दुजाभाव नसणें. परंतु ह्या अर्थाचें विशेषीकरण झालें आहे. अर्थ मर्यादित झाला. जीव व ब्रह्म ह्यांमधीलच फक्त दुजाभाव असा विशेष अर्थ होऊन बसला.]

***अधन** वि. धन नसलेला, दरिद्री. Wanting wealth, poor.

[**सं. अ+धन.** √धा. दधाति.

IE. Dhe; सं. **धा**; *Av*. Dhai; *Gr*. the; *Lat*. de; *Slav*. deti; *Lith*. Deti; *As*. don.

सं. **धन**; प्रा. **धण**; गु. पं. **धण**; सिं. **धनु**; हिं. **ढन**; का. **दन, बंधन.**

हे सर्व शब्द त्या त्या भाषेंत पुंल्लिंगी आहेत. मराठी शब्द नपुं. आहे. ह्यावरून मराठी शब्द तत्सम व इतर भाषांतील धण वगैरे शब्द तद्भव आहेत हें उघड आहे.]

***अधर्म** पुं. धर्माला सोडून वर्तन, धर्म नसणें, धर्माचा अभाव. Unrighteousness, sin, a wrong deed.

[**सं. अ+धर्म.** √धृ-धरति (धारणात् धर्मः).

IE. Dher; सं. **धृ**; *Av*. Der; *Gr*. ther, thra; *Lat*. for, fir; *Teut*. feorm; *MEng*. ferme.]

***अध्वर** पुं. यज्ञ, ज्यामध्यें केलेली हिंसा ही हिंसा समजली जात नाहीं असें धार्मिक कृत्य–म्हणजे यज्ञ. A sacrifice.

[**सं. अ+ध्वर.** √**ध्वर्-हिंसायाम्.**

IE. Dhuer, Dhur; सं. **ध्वर** (द्रुह्, द्रुघ्, वगैरे धातु ह्याच्याशीं संबद्ध आहेत); *Av*. Druz, Druj; *Old Pers*. Drauga; *New Pers*. Darogh (–Lie). *Gr*. Thru, Thrup; *Lat*. Frud, Frus.]

अध्वर्यु पुं. मुख्य–चालक, सूत्रें हालविणारा. The chief priest in a sacrifice.

[**सं. अ+ध्वर.** √ध्वर्. अध्वर पहा.

‘यु’ हा संस्कृतमधील ‘इच्छार्थी’ प्रत्यय आहे. (मृगयु, शंयु.) ‘अध्वर्यु’ ह्याचा मूळ अर्थ यज्ञ करण्याची इच्छा करणारा–त्यावरून यज्ञ करणारा–यज्ञांतील मुख्य होता–उपाध्याय–त्यावरून कोणत्याहि कार्यांतील मुख्य सूत्रचालक. असें ह्या शब्दाच्या अर्थांत सामान्यीकरण झालें आहे. संकुचित अर्थाचा विस्तृत अर्थ झाला आहे. ह्यापासून अध्वरिए असा तद्भव शब्द मराठी जुन्या काव्यांत झाला आहे.]

अनाथ वि. पोरका, आश्रयहीन, आधार नसलेला, नवरा नसलेली (स्त्री). An orphan, friendless, widow.

[**सं. अ+नाथ.** √**नाथ्**√**नाध्.**

IE. Nedh; सं. **नाथ, नाध**; *Got*, Nithan (to help); *NGer*. Gnade (help); *ON*. Nad, Nadh-hus. (place of refuge).

ह्या शब्दाचा तत्सम ‘नाथ’ व तद्भव ‘नाह’ असा सर्व भाषांत रूढ आहे. याकाम. **नाहो=नाथ** (ज्ञा).]

अनामिक, अनामक वि. नांव घेण्यास अयोग्य-अपुरें. Annonymous.

[**सं. अ+नामिक–नामक.** नामन्.

Lat. Nomen; *Av*. Nəman; *Arm*. Anw–an; *Gr*. Gnomen; *Lith*. Imu; *Slav*. Ime.

सं. **नामन्**; प्रा. **नाम**; अप. **णाऊ**; तद्भव शब्द पुढीलप्रमाणें–प्रा. **णाम**; सिं. **नामुं**; पं. **नाउं**; हिं. **नांव**; का. **नाब्**; अकाम. **नांव.**]

अनायक–की वि. स्त्री. नायक–नेता नसलेला; अव्यवस्था, निर्नायकी कारभार. Without a ruler; anarchy.

[**सं. अ+नायक.** √**नी.**

IE. Ne; सं. **नी** *Av*. Nei, Nayeiti.

सं. **नयति**; प्रा. **नअइ**; तद्भव—पं. **नेणा**; का. **नि**; पं. **नेण**, म. **नेणें.**]

अनित्य वि. नित्य नसलेलें, थोड्या दिवसांचें, क्षणैक. Not enduring always, fleeting.

[**सं. अ+नित्य. नि+त्य.**

IE. Ne; सं. **नि+त्य**; *Got*. Nithjis; *Nord*. Nidr.

ह्याचें एक तद्भवरूप ‘निच्च, >नीच’ असें आहे. इतर भाषांत तत्सम रूप ‘नित्य’ रूढ आहे.]

अनिमेष वि. अ. जागरूक. With twinkling of the eye.

[**सं. अ+निमेष. अ+निमिष**=डोळ्याच्या पापण्या लवणें (इतका वेळ).]

अनियमित वि. (वेळेचें) बंधन नसलेलें; वाटेल त्या वेळीं–वाटेल तेव्हां घडणारें. Irregular.

[**सं. अ+नि+यमित.** √**यम्** (निष्ठा).

ह्याच्या अर्थांत बदल झाला आहे. सामान्य अर्थ–कसलाहि नियम न पाळणारा असा आहे. परंतु त्याचें विशेषीकरण झालें आहे. वेळेचें बंधन न पाळणारा असा विशेष अर्थ रूढ झाला आहे.]

अनिर्वचनीय वि. न वर्णन करण्यासारखें, न सांगण्याजोगें. Indescribable, improper to be mentioned.
[सं. **अ+निस्+वचनीय. √वच्**
अनिर्वाच, अनिर्वाच्य असेहि शब्द रूढ आहेत.]

अनिवार वि. पुष्कळ; अमर्याद, बेसुमार. Excessive; uncontrollable, inavertible.
[सं. **अ+नि+वार्य. √वृ.**
न वारतां येण्याजोगें असा मूळ अर्थ—त्यावरून सुमार–मर्यादा नसलेलें असा अर्थ प्राप्त झाला.]

अपत्नीक वि. पत्नी नसलेला (पुरुष), विधुर. A widower, (a man) without a wife.
[सं. **अ+पत्नी+क. √पत्. √पा.** (?)
IE. Pet; सं. **पत्**; *Gr*. Pota (omai), Pet (omai); *Lat*. Peto.
IE. Potis, Potni (fem.); सं. **पति, पत्नी;** *Av*. Paiti Paidhni (fem.); *Gr*. Posis, Potnia; *Lat*. Potis.
मूळ संस्कृत शब्द ‘ पत् ’ पासून किंव ‘ पा ’पासून निष्पादणें ह्याबद्दल एकमत नाहीं. अर्वाचीन भारतीय भाषांत पति व पत्नी हेच तत्सम शब्द रूढ आहेत.]

अपत्य न. मूल, संतति. A child, an offspring.
[सं. **अपत्य. √पत्.** पतनात् त्रायते यत् तत्.]

अपथ्य न. अपाय करणारा खाण्याचा पदार्थ, अपायकारक पदार्थ, अहितकारक पदार्थ. Unwholesome article.
[सं. **अ+पथ्य. <पथिन्. (पथिभवम्–हितम्–पथ्यम्)**
वै. सं. **पथस्** (=पाणी), **पथिः** (=समुद्र), **पथ्य** (योग्य, सुदैव).
IE. Peth, Peath; सं. **पथिन्**; *Av*. Path, pant (Roth and Boht.); *Gr*. pat, pant; *Lat*. Pont. (Pontis, Helles–pont); *Old Slav*. Pati; *Old Pruss*. Pintis; *Teut*. Pfad; *Old Sax*. Path; *As*. Poeth; *Eng*. path (Source uncertain).
ह्या शब्दाच्या मूळ अर्थांत कसा फरक पडला आहे तो चिन्त्य आहे.]

अपर वि. (सर्व.) दुसरा. Other.
[सं. **अ + पर.**
1 *IE*. Per; सं. **पर;** *Av*. Para; *Arm*.–Heri; *Gr*. Peran.
2 *IE*. Per (beyond), Per (to cross over); सं. **पर, पर–तः पर–मः;** *Av*. Para; *New Pers*. far-say; *Gr*. Pera; *Lat*. Par; *Lith*.–Pri; *O. slav*.–Pre; *Got*. fairra; *As*. feor, fyrre; *MEng*. fer; *Eng*. far.]

अपराण्ह (न्ह) वि. अपराण्ह काळ, बारा वाजल्यानंतरची वेळ. The afternoon.
[सं. **अपर+अण्ह. < अहन्**
अहन्च्या पलीकडचा (अपर=दुसरा+अण्ह=दिवस) असा मूळचा अर्थ आहे. परंतु त्यांत बदल झाला आहे. श्राद्धाला योग्य वेळ म्हणजे अपराण्ह काळ असें समजतात.]

अपरंपार वि. अमर्याद; बेसुमार. Boundless; infinite.
[सं. **अपरम्+पार.** (दुसरा कांठ, दुसरी मर्यादा–वेला).
IE. Per, per; सं. **पृ;** *Av*. Par, frana; *Gr*. Perao; *Lat*. Porto, Plemus; *Umbr*. Portatu; *Got*. faran; *Arm*. Helus.
सं. **पार, पारे** (न); प्रा. **पार;** गु. पं. हिं. बं. **पार, पारु=मर्यादा, परि=परतीरास;** मराठी. **पार**=शेवट, परतीर, दुसरा कांठ, तीर.]

अपरमात स्त्री. टपका, बोल. Blame, taunt.
[म. **अपर+मात**=(गोष्ट) दुसरी गोष्ट. वाईट बोल. **मात < मात्रा,** (?) किंवा मात (जय, डाव).]

अपरवाद पु. टपका, बोल. Blame, taunt.
[सं. **अपर+वाद. √वद्**]

अपरवड न. रांग सोडणें, क्रम सोडणें, पद्धत सोडणें; Oddness; deviation from the usual course.
[सं. **अपरिपाठ,** (अ+परि+पाठी √पठ्) किंवा **परिवर्तिन्;** प्रा. **परिवाडी, परिवट्टी.**]

अपराजित वि. पराजय न झालेला. Unvanquished.
[सं. **अ+परा+जित. √जी (निष्ठा)**
अपर (मधील पर) आणि अजित (मधील जित) पहा. तेथें दोन्ही शब्दांची व्युत्पत्ति दिली आहे.]

अपलाण वि. खोगीर वगैरे नसलेला (घोडा). Without a saddle.
[सं. **अ+पलाण.** < (**फा. पालान्**); शिकाम. **पलाण**=खोगीर (सभा. ५१).]

अपंक्त, अपांक्त वि. पंक्तीच्या बाहेरचा; भोजनाच्या वेळीं एका पंक्तींत बसविण्यास अयोग्य. Excommunicated, unfit to dine together.
[सं. **अ+पांक्त. < पंक्ति=ओळ.**]

अपुरा वि. पुरा न पडणारा, कमी, उणा. Incomplete.
[म. **अ+पुरा.** < सं. **पूर्णः**√पृ (**निष्ठा**).
IE. Pel, Per; *Av.* Frana; *Lat.* Plenus, Porto; *Arm.* Helus, par; *Gr.* Perao; *Umbr.* Portato; *Got.* faran.
सं. **पूरति** (वौ. सं.) **पूर;** गु. **पुरो;** सिं. **पूरो;** पं. हिं. बं. ओ. **पूरा;** सिंह. **पिरि;** का. **पुर** (रु).]

अपूज्य वि. पूज्य नाहीं असा. Not worthy of respect.
[सं. **अ+पूज्य.** √**पूज् १० पूजने.**]

अपूर्ण वि. पूर्ण–पुरा नाहीं असा, कमी, उणा. Incomplete, imperfect, not full.
[सं. **अ+पूर्ण. पृ (निष्ठा).** अपुरा पहा.]

अपूर्णांक पुं. अपुरा अंक, (गणितशास्त्रांमध्यें). A fraction.
[सं. **अ+पूर्ण. (पृ.)+अंक (अङ्क् १ चिह्ने).**]

अपूर्व वि. पूर्वीं न झालेलें–पाहिलेलें, असामान्य, विचित्र, चमत्कारिक. Unprecedented.
[सं. **अ+पूर्व.**
Av. Pouru; *Ap.* Paru; *Gr.* Poleu; *Lith.* Pilus.
ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. पूर्वीं न झालेला; ह्यावरून असामान्य, विचित्र, चमत्कारिक असा अर्थ रूढ झाला.]

अप्रतिबंध पुं. प्रतिबंध–अटकाव–हरकत नसणें. Absence of hindrance.
[सं. **अ+प्रति+बंध.**
IE. Preti, Proti; सं. **प्रति;** *Gr.* Proti;
बंध√**बंध् ९ बध्नाति;** प्रा. **बध** (बंध्); गुं. **बंधावूं;** सिं. **बंध्;** हिं. **बांध;** पं. **बन्न्हणा;** बं. ओ. **बांध;** सिंह. **बंदिनवा;** आर्मे. रुमा. **बंथेल्.**]

अप्रतिम वि. उत्तम, उत्कृष्ट, ज्याचा बरोबरीचा दुसरा नाहीं असा. Unparalleled, matchless.
[सं. **अ+प्रतिमा.** < प्रति+मा√मा माने; सं. **प्रतिमा;** प्रा. मा. अ. **पढिमा.**]

अप्रत्यक्ष वि. अ. पाठीमागें, समक्ष अथवा प्रत्यक्ष नाहीं असें, समोर नाहीं असें. In absentia.
[सं. **अ+प्रत्यक्ष** (प्रति+अक्षिन्).
IE. Ok, Oks; सं. **अक्षन्, अक्षिन्,** √ इक्ष्; *Av.* Aks (evidence), Akhi (eye); *Gr.* Ok, Op; *Lat.* Oc-(Oculuss); *Lith.* Ak, (Akiss = eye); *Slav.* Ok, (Oko = eye); *Got.* Augo; *As.* eage; *MEng.* Eie, eghe; *Eng.* Eye.
सं. **अक्षिन्;** प्रा. **अक्खि;** गु. हिं. **आंख;** सिं. **अख;** पं. **अक्ख;** का. **अछ;** बं. ओ. **आंखि;** सिंह. **अक्.**
हे सर्व तद्भव आहेत. मराठीमध्यें ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे.]

अप्रमाण न. प्रमाण नसणें, प्रमाणाचा अभाव. Absence of proof or authority.
[सं. **अ+प्रमाण.** (**प्र+माण**√**मा**); सं. **मान;** प्रा. **माअइ;** गु. **मावूँ;** सिं. **माइणु;** हिं. **माना;** मरा. **माणें, मावणें.**]

अप्रमाद पुं. चुकी नसणें; प्रमादाचा अभाव; अपराध–गुन्हा नसणें. Absence of fault.
[सं. **अ+प्रमाद्.** (प्र+माद√मद्)
'मद्' ह्याचीं तद्भवरूपें 'माज' वगैरे अशीं होतात. तीं त्या त्या रूपाखालीं दिलीं आहेत. ह्याच्या अर्थामध्यें मराठींत फरक झाला आहे. अर्थ नरमावला गेला आहे.]

अप्रयोजक वि. गैरवाजवी. Useless, inappropriate.
[सं. **अ+प्रयोजक** (प्र+√युज्)
इतर अर्वाचीन भाषांत तत्समरूप 'युज्' युक्तच आहे.]

अप्रशस्त वि. वाईट, गैर. Not roomy; inelegant.
[सं. **अ+प्रशस्त** (प्र+शस्त√शस्).
प्रशस्त (म्हणजे ऐसपैस) हा शब्द ह्या शब्दाच्या विवेचनांत चिन्त्य आहे.]

अप्रसिद्ध वि. प्रसिद्ध नसलेलें, माहीत नसलेलें, ऐकिवांत नसलेलें. Unknown, obscure.
[सं. **अ+प्रसिद्ध.** (प्र+सिद्ध–निष्ठा)]

अप्रस्तुत वि. गैरवाजवी, असंबद्ध, प्रसंगाला योग्य नसलेलें. Improper, irrelevant.
[सं. **अ+प्रस्तुत.** (प्र+स्तुत√स्तु)
ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे व त्या दृष्टीनें ह्याला अर्थ–तद्भव असेंच मानिलें पाहिजे. 'स्तु'चा अर्थ स्तुति करणें असा आहे परंतु तो अर्थ ह्या शब्दांत राहिला नाहीं. त्याचा लाक्षणिक अर्थ झाला आहे. म्हणून असल्या शब्दांना अर्थतद्भव असें आम्ही म्हणतों. ह्या असल्या शब्दांच्या रूपांत प्रक्रिया नाहीं, अर्थांत प्रक्रिया आहे.]

अबद्ध वि. न बांधलेलें, न जखडलेलें, मोकळें. Unfettered, free.
[सं. **अ+बद्ध.** (निष्ठा√बंध्)]

अबाधित वि. बाधा न झालेलें, अदूषित, हरकत नसलेले. Unobstructed, unobjected to.
[सं. **अ+बाधित.** बाधा (नाधा) किंवा √बाध्.]

अबुद्ध्या अ. अजाणता, मुद्दाम नव्हे. Unintentionally.
[सं. **अबुद्ध्या** (तृ. एव.) संस्कृतमधील विभक्ति-प्रत्ययान्वित असें शब्दाचें मूळ रूप असून मराठींत त्याचा अव्ययाप्रमाणें उपयोग रूढ आहे. त्या दृष्टीनें हा शब्द तद्भव आहे. रूपांत प्रक्रिया नाहीं परंतु शब्दाच्या कार्यांत–उपयोगांत प्रक्रिया आहे.]

अभद्र वि. भद्र नसलेलें, चांगलें नसलेलें, वाईट, अश्लील, अरिष्ट, बीभत्स. Inauspicious, evil.
[सं. **अ+भद्र.**
सं. **भद्र. भल्लं** (वामनानें ‘ ग्राम्य ’ म्हणून निर्देशिला आहे.); सिं. **भलुं, भलो;** पं. हिं. **भला, भाल;** मराठी. **भला.**]

अभय न. भयाचा अभाव, संरक्षण, भयापासून बचाव. Absence of fear ; protection.
[सं. **अ+भय.** √भी. तद्भव–प्रा. **बीहइ;** देप्रा **बीहइ** (११५-८); गु. **बिहवूं, बिवूं;** आर्मे. रुमा. **बिएल्;** मराठी. **भिणें, बिहिणें, भेणें.**]

अभर, आभर पु. पूर्णता. Satedness or sateity.
[सं. **आ+भर.** √भृ. मूळ शब्द ‘ आभर ’ असून उच्चारांत पहिल्या ‘ आ ’ बद्दल ‘ अ ’ आला. हा ‘ अ ’ अभावद्योतक नाहीं.

तद्भव—प्रा. **भर;** पा. **भर;** गु. **भरवूं;** सिं. **भर;** हिं. **भरणा;** सिंह. **बर;** का. **बोर–रु;** मराठी. **भरणें** (भर=पर्यंत. दिवसभर, वर्षभर.).]

अभाव पुं. नसणें, असंभव, शंका, वहीम. Negation.
[सं. **अ+भाव.** √भू १ सत्तायाम् (भव–भाव); सं. **भूत, प्रभूत, भूरिः, भूतिः** इत्यादि शब्द ह्याच धातूपासून सिद्ध झाले आहेत. ‘ भू, अस् ’ हे धातु फार प्राचीन आहेत.]

अभावणी स्त्री. अजमास. An estimate.
[म. **अ+भावणी.** सं. **भाव+नी.** √भू. अभाव, भव शब्द पहा.]

अभुक्त वि. न भोगलेलें, न खाल्लेलें, उपाशी, न उपयोगिलेलें. Unenjoyed; unused.
[सं. **अ+भुक्त.** (निष्ठा√भुज्)]

अभूत वि. न झालेलें, न घडलेलें. Unprecedented.
[स. **अ+भूत.** (निष्ठा√भू)
IE. Bheu; *Av.* Bavaiti. अभाव पहा.]

अभेद पुं. भेद नसणें, भेदाचा अभाव, साम्य, एकरूपता. Oneness.
[सं. **अ+भेद.** √भिद् ७ अवयवे.]

अविभक्त वि. एकत्र, वाटण्या न झालेले, निरनिराळे न राहणारे, एकत्रित. Unseparated ; joint.
[सं. **अ+विभक्त.** (निष्ठा–√वि+भज्).]

अविलंब पुं. विलंबाचा अभाव, उशीर नसणें. Absence of delay.
[सं. **अ+विलंब.** (वि+√लंब्)]

अविवेक पुं. विवेक नसणें, विवेकाचा अभाव, विचाराचा अभाव. Thoughtlessness.
[सं. **अ+विवेक.** √विच्–वेवेक्ति.]

अविश्रांत वि. अ. विश्रांति न घेतां, विसाव्याशिवाय, सारखें, खंड पडूं न देतां. Indefatiguable, untiring.
[सं. **अ+विश्रान्त.** √श्रम् (निष्ठारूप)]

अविश्वास पु. विश्वास नसणें. Distrust, want of faith.
[सं. **अ+विश्वास.** (वि+√श्वस् श्वसने)
IE. Kues; सं. **श्वस्;** *Av.* Susi; *Lit.* Susinite; *Lat.* Queror, (√ques); *As.* Awees; *Eng.* Whisper; *M Eng.* Whist; *Eng.* Hist, Whistle; (for comparison)]

अविहित वि. शास्त्रामध्यें न निर्देशिलेलें, शास्त्रामध्यें न सांगितलेलें, अधर्म्य, धर्माबाहेरील, धर्मग्रंथामध्यें नसलेलें. Not enjoined.
[सं. **अ+विहित.** वि+हित (निष्ठा√धा)
ह्या शब्दाला विशिष्ट अर्थ संस्कृतमध्येंच प्राप्त झाला व तोच मराठींत आला. मूळ अर्थ–ठेविलेलें, स्थापिलेलें, त्यावरून धर्मग्रंथांत पूर्वसूरींनीं सांगितलेलें असा विशिष्ट अर्थ त्याला प्राप्त झाला. हें अर्थाचें विशेषीकरण होय.]

IE. Dhe; सं. **धा** (दधाति); *Av.* Dhai; *Gr.* The; *Lat.* De; *Old Slav.* De, Deti; *Lith.* Deti, (Iz)das; *Teut. O. H. G.* Tuon; *As.* Don; *ME.* Don; *Eng.* do; *Got.* Dedh. (Eng. Dom, Doom) etc.

असत् न. वि. खोटें, असत्य, वाईट; न असणारें, अविद्यमान. Untrue; unreal.
[सं. **अ+सत्.** (√अस्)

IE. Es (To be, live, breathe); सं. √**अस्** > **सत्, सत्य**; *Av*. Ah; *Old Pers*. Haciya = true; *Gr*. Es; *Lat*. Es; *Lith*. Es; *Slav*. Jes–Istu (true); *Goth*. Sunj–is (True); *As*. Sodh; *MEng*. Sooth. etc.

तद्भव—पा. **अच्छा**; प्रा. **अच्छ**; हिं. **अछना**; गु. **छुं**; बं. **आछि**; ओ. **अछि=मी आहें**; का. **छुस्**; ने. **छु** इत्यादि.]

असती स्त्री. वाईट स्त्री, जारिणी. An unchaste woman.

[सं. **अ+सती**. <**सत्**√**अस्**]

असदाचार वाईट आचार, वाईट वर्तणूक.

असदर्थ वाईट–खोटा अर्थ इत्यादि.

असंतोष पुं. संतोष–समाधान नसणें; आनंद नसणें; खळबळ, अस्वस्थता. Dissatisfaction.

[सं. **सम्+तोष**. √तुष्

IE. Teus; सं. **तुष्यति, तुष्ट**; *Av*. Tusni, Tusbnan; *Slav*. Tusiti; (*Polie*) *siti*.

इतर आर्यभाषांत **संतोस** असा तद्भव होतो. मराठी ग्रामीण रूपहि संतोस असेंच आहे.]

अइन वि. (ऐन ह्याचें एक विश्लिष्ट रूप) मूळचा ठरलेला, मुख्य. Original, primary.

[फा. **आयीन** = सार; अ. **ऐन**; पेकाम. **यैन** (रा. खं. ७·५३); पेकाम. व अकाम. **ऐन** (उदा० ऐन जिनसीं); (खरे. ६·२६३५).]

अइसा वि. 'असा' ह्या सर्वनामाचें एक प्राचीन काव्यांत आढळणारें रूप. Such, so.

[सं. **ईदृशः** किंवा **एतादृशः**. >**एआइसः**>**अइसा**.

ह्या शब्दाचें लेखन "**अइसा, ऐसा**" असें जुन्या वाङ्मयांत आढळतें. सध्यांचें त्याचें रूप '**असा**' हें आहे.]

अउणापाउणा वि. कमीअधिक, अर्ध्यानें किंवा पावानें कमी. A quarter or so.

[सं. **अर्धोनपादोन** > **अद्धोणपाओण** > **अद्दोणपाओण**].

अउत न. साधन, शेतीचें अवजार, नांगर, दोन बैलांना नांगरतां येईल इतकी जमीन. An implement, a plough.

[सं. १ **आयुध**>**आउत**>**अउत**, २ **आयुक्त** (ब्लोक); अकाम. **औत**.]

अक प्रत्यय. नामप्रत्यय. (उदा० थडक, धडक, देशक)

[सं. **अक**. संस्कृतमध्यें ह्या प्रत्ययानें सिद्ध होणाऱ्या शब्दांचे बरेच निरनिराळे अर्थ होतात.]

अकटी स्त्री. अग्नि, कच्चें धान्य भाजण्यासाठीं केलेला आर. A little fire.

[सं. **अग्नि+स्थि** (**ति**); अकाम. **अगटी, आगटी, अकटी**.]

अकड-अक्कड ऐट, डौल, नखरा. Pompousness.

[सं. **आकृति**=सुंदर शरीरयष्टि; किमिव मधुराणां मंडनं नाकृतीनाम् (शा); अकाम. **अक्कड-(बाज)**.]

अकबर वि. पुं. श्रेष्ठ, मोठा; तिसऱ्या प्रसिद्ध मोगल बादशहाचें नांव. Name of a Mughal Emperor.

[अर. **अक्बर** = श्रेष्ठ]

अकरताळा (आकरताळा) वि. आतताई, हट्टी, आग्रही. Violent; ungovernable.

[सं. **अकृत+लु** किंवा **अकृत्या+लु**;>प्रा. दे. **अक्कसाल**= उन्मत्त स्त्री. कान. **अक्के**–रडणें, आरडणें, अकांडतांडव करणें. कान. **अक्के आरु**=कंठ कोरडा पडेतों रडणें. **अक्कालिके** पोटांतील आंतडीं आंत ओढण्याची क्रिया. ह्या वरील शब्दाचा कानडी शब्दाशींच संबंध अधिक आहे.]

अकरमासा वि. कमी किंवा हलक्या कुळीचा, कमअस्सल, मिश्रवंशाचा. Illegitimate progeny.

[अकरामास (एकादश मास > एग्गारह माह) विलक्षण वंशोत्पत्तिसंबंधीं; व्युत्पत्ति संशयित आहे.

कान. **अक्करु** = प्रेम, प्रेमविवाहापासून झालेली प्रजा, मिश्र उत्पत्तीची प्रजा; अकरा मासे वजनाचें खोटें नाणें; त्यावरून मिश्रवंशाचा.]

अकरा वि. संख्याविशेष; दहा आणि एक. Eleven.

[सं. **एकादशन्**; पा. पै. **एकादस, एकारस**; अर्धमा. **एक्कारस**; प्रा. अप. **एग्गारह, एआरह**; गु. **अगिआर**; सिं. **इकारहं, यारहं**; पं. **गिआरां**; हिं. **इगारह, ग्यारह**; बं. ओ. **एगार**; का. **काह**; सिंह. **एकोळस, एकोळह**.

संस्कृत शब्द **एक+दशन्** असा सिद्ध झाला. मधील **अ** किंवा **आ** हा वैदिक भाषेंत येतांना आढळतो. त्याचा अर्थ 'अधिक' असा आहे. उदा० **मित्रावरुणौ, सूर्यावरुणौ** इ.]

अकराळ (**विकराळ**) वि. भेसूर, भयंकर, राक्षसी. Frightful, hideous.

[सं. **अकराल विकराल**; अकाम. **अकराळ विकाळ**.]

अकर्मक वि. ज्याला कर्म नाहीं असा (धातु). Intransitive (verb)

[सं. **अ+कर्म+क**; कर्म√कृ ८ करणें.]

IE. Qer; सं. **कृ**; *Av*. Ker; *Old Per*. Karta (=made); *Gr*. Kra,-Kro; *Lat*. Cer, Cre; *Span*. Criar (create),]

अकल्पित वि. एकदम, पूर्वी न सुचलेलें. Unexpected, unimagined, not thought of before.

[सं. **अ + क्लृप्‌ची निष्ठा.**

अर्थामध्यें फरक झाला आहे; मूळ विशेषण; अकाम. मध्यें कधीं क्रि. वि. अ. म्हणून वापरलें जातें.]

अकल्मष वि. निष्पाप, निर्मळ. Sinless.

[सं. **अ + कल्मष** = पाप, कर्दम; कर्म्म शुभकर्म स्यति नाशयति.]

अकस पुं. द्वेष, मत्सर, वैर, हेवा. Spite, malice.

[अर. **अकस्‌**; पेकाम. **अकस** (रा. १·४३), पेकाम. मध्यें हा शब्द स्त्रीलिंगी वापरीत. (रा. ११·६९). अकाम. मध्यें पुं. बनला आहे.]

अकस(णें) क्रि. आखडणें, कमी होणें. To contract, to shrink.

[सं. **आकृष्‌** १ विलेखने; >आकिस>आकस किंवा **आकुच्‌** १ गतौ.

IE. Qeuq, Qug; सं. **कुच्‌** (संकोचणें > कुच; कुक्षि); *Lith*. Kaukara; *Old Slav*. Kuku (hill); *Goth*. Hauhs; *ME*. Hogh; *NEng*. How.]

अकस्मात क्रि. वि. एकाएकीं. Suddenly.

[सं. **अ + कस्मात्‌** (पंचमीरूप ‘ किम्‌ ’ ह्या पुं. सर्वनामाचें)

IE. Qe, Qo, Qos; सं. **किम्‌**. (च) कः ; *Av*. Ko, Ka; *Gr*. Te, Po, Ko; *Lat*. Que, quis, Quid; *Slav*. Kutd; *Lith*. Kas.

अर्थामध्यें फरक झाला आहे. ज्याचा उगम, आरंभ, सांगतां येत नाहीं असा. त्यावरून एकाएकीं, एकदम प्राप्त होणारें असा. क्रि. वि. अ. म्हणून वापरांत आहे.]

अकलमंद वि. बुद्धिमान्‌, हुशार, कल्पक. Learned, wise.

[अर. **अक्ल + मन्द** (फा. प्रत्यय); पेकाम. **अकल्मन्द, अक्कल, अकल** (रा. ८।२२४); चुकीनें ह्याचा अर्थ मंदबुद्धीचा, मूर्ख असा करतात.]

अकळ(णें), आकळ(णें) सक्रि. समजणें, उमगणें. To grasp, to comprehend.

[सं. **आ + कल्‌** १ ज्ञाने. आद्य ‘ आ ’ चा अ बनला.

IE. Qel; सं. **आ+कल्‌**; *Av*. Ghar; *Gr*. Kal-, Kel-; *Lat*. Cur, Cal; *Lith*. Kelas (way).]

अकांड वि. एकदम, अवेळीं, अनपेक्षित घडणारें. Accidental, inopportune.

[सं. **अ + कांड** (उचितकाळ). **अकांडतांडव** = अयोग्य वेळीं केलेलें नृत्य—त्यावरून गोंधळ.]

अकांत, आकान्त पुं. आक्रोश, बेसुमार रड, अमर्याद शोक. Immoderate wailing.

[सं. १ **आक्रान्त** √**क्रम्‌**ची निष्ठा २ **आक्रन्द.**

IE. Qred; सं. **क्रद्‌ क्रन्द्‌**; *Gr*. Krt; *Teut*. Hrat; *Ir*. Crotal (Husk); *Eng*. Ratte.

आक्रान्त शब्दाच्या साम्याभासामुळें (Analogy) ‘ आक्रंद ’ शब्दाला सध्यांचें स्वरूप प्राप्त झालें. अकाम. **आकान्त.**]

अकारीब पुं. नात्याचे, माहितीचे लोक, माहितगार, जाणते, भुते. Acquaintances, near relatives.

[अर. **करीब**(= आप्त.); अ. व. **अकारीब**; पेकाम. **अकारीब** (रा. १५·२५).]

अकाली पुं. शिखांचा एक पंथ, नानकाचा अनुयायी. (ह्या पंथांतील अनुयायी काळा डगला घालतात.) A sect of the Sikhs.

[सं. **अ + काल,** ज्याला काल नाहीं, ज्याला मृत्यु नाहीं असा. म्हणजे अनादि व अनन्त अशा ईश्वराचा—परब्रह्माचा उपासक. जीवन्मुक्त. शिखांनीं आपल्या पंथाला हें नांव दिलें.]

अकीत स्त्री. अक्षतृतीया, वैशाख शु. तृतीया. The third day of bright Vaishakh.

[सं. **अष्ट > अक्त + दश—अठरावा दिवस.**

हा शब्द **अक्षय्य तृतीया** किंवा **अक्षत तृतीया** ह्या शब्दांपासून व्युत्पादितात. परंतु वरील व्युत्पत्ति चिन्त्य आहे. नर्मदोत्तर ठिकाणीं शुक्लपक्ष पौर्णिमेनंतर समजतात. पहिला पक्ष वद्य मानतात. त्यांचा महिना अमान्त नसून पूर्णिमान्त आहे. त्यावरून वरील व्युत्पत्ति ग्राह्य दिसते.

ह्या दिवशीं रब्बी पिकांचा खंड देऊन आपला हिशेब पुरा करण्याची चाल शेतकऱ्यांत आहे. ह्या दिवशीं नांगर वगैरे अवजारें सिद्ध करून ब्राह्मणास दक्षिणा देतात. ही एक पितृतिथि म्हणून मानिली आहे.

गु. **अखात्रीज**; हिं. **अखेतीज, अखतीज**; का. **अछिंत्रींज.**]

अकुंठित वि. कसलाहि अडथळा नसलेला. Unrestricted.

[सं. **अ + कुंठित** √कुंठ्‌ १ प्रतिघाते—निष्ठा]

अकुतोभय वि. निर्भय, धीट, ज्यास कोठूनहि भय नाहीं असा. Not threatened with fear from any quarter.
[सं. **अ + कुतः + भय;**
ह्याचीं अपभ्रष्ट रूपें **अकूतोभय, अक्रतोभय** अशीं रूढ आहेत. हें एक प्रकारचें चुकीचें संस्कृतीकरण होय.]

अकृत्रिम वि. स्वाभाविक, कृत्रिम नसलेलें, वास्तविक. Natural, unartificial.
[सं. **अ + कृत्रिम. √कृ + त्रि + मय्च**]

अकोच(णें) अक्रि. आखडणें, संकोचणें. To contract; to shrink.
[सं. **आ + कुच्** १ गतौ; **आ + कृष्** १ विलेखने **आकुस>आक्रोस>आकोच.**]

अकोळ पुं. वृक्षविशेष. A small tree or its fruit.
[सं. **अकोठ ;** मागधी. **अंकोल्लो = पिस्त्याचें झाड**]

अक्करताळा अकरताळ पहा.

अक्कल स्त्री. बुद्धि, शहाणपणा. Sense, wisdom.
[अर. **अक्कु = शहाणपणा.**]

-अक्कलकाढा पुं. वनस्पतिविशेष, (ही जिभेवर ठेवल्यानें चुरचुर करते ; शब्दोच्चारांतील दोष नाहींसा करते असें म्हणतात). A kind of herb.
[अर. **अक्कु + कऱ्हा.**]

-अक्कलबाज अकलमंद पहा.

-अक्कलमंद वि. अकलमंद पहा.

-अक्कल हुशारी सावधान चित्त. With free will.

-अकलेचा कांदा-खंदक पुं. अति शाहणा. A wiseacre.

अक्का स्त्री. वडील बहिणीसंबंधीं हा शब्द वापरतात. An elder sister.
[*IE*. akka-mother; पूवै. **अक्का ;** सं. **अक्का ;** *Gr*. Achcha; *Lat*. Acca.
हा शब्द प्रथम देशी नाममालेंत मिळतो. कानडींत अक्का-वडील बहीण अशा अर्थी शब्द आहे. मूळ द्राविड शब्द व तो आर्य भाषेंत वेदांच्या पूर्वीं आला.]

-अक्काबाई दारिद्र्य, लक्ष्मीची वडील बहीण. (लक्षणा) अक्काबाईचा फेरा. Misfortúne.
[ह्या शब्दाचें वरील स्पष्टीकरण पटत नाहीं. ' अक्काबाई ' म्हणजे लक्ष्मीची वडील बहीण व म्हणून दारिद्र्य ह्या अर्थानें समाधान होत नाहीं. लक्ष्मीच्या वडील बहिणीचा पुराणांत कोठें उल्लेख नाहीं. दारिद्र्य हा अर्थहि कोठें उल्लेखित नाहीं. तेव्हां ह्याची व्युत्पत्ति निराळी आहे.
कानडी **अक्करे = गरज, जरुरी, अवश्यकता, अभाव** ह्या शब्दाशीं संबंध आहे. हा शब्द मूळ असून त्याला ' बाई ' हा शब्द जोडून तिला लक्ष्मीची बहीण ठरविणें ही क्रिया नंतरची आहे.]

अक्रस (णें), अक्रुस (णें) अक्रि. संकोच पावणें, आकसणें. To contract, to shrink.
[सं. **अव + कृष् १ विलेखने;** अकाम. **आकस.**]

अक्रीत, आक्रीत वि. बेसुमार, प्रमाणाबाहेर (मागणें.) Extravagantly, exorbitantly.
[**अ + क्रीत,** किंवा **आ + क्रीत.** निष्ठा √क्री. व्यवहारे; किंवा **अ + कीर्त** √कृत्.]

अखजा स्त्री. वैशाख महिन्यांतील पहिली तीज. The third day of bright Vaishakh.
[सं. **१ अष्ट + दश. २ अक्षत तृतीया ;** प्रा. **अक्खय तइज्ज ;** अकाम. **अखतीज, अकीत ;** गु. **अखात्रीज ;** हिं. **अखेतिज;** का. **अखित्रद. अकीत** पहा.]

अखत्यार, अख्त्यार पुं. हक्क, अधिकार, सत्ता. Delegated authority.
[अर. **इख्तियार.**]

अखबार स्त्री. वर्तमानपत्र, जुनें फारशी बातमीपत्र. News-paper, a chronicle.
[अर. **अखबार ;** ' खबर ' शब्दाचें अनेकवचन. पेकाम. **अखबार** (रा. १०-२७३).]

-अखबारनिवीस पुं. बातमीपत्रें लिहिणारा, बातमीदार. A news-reporter, a chronicler. [**अखबार + निविस्तन्**-लिहिणें.]

अखा, अख्खा, आखा वि. सर्व, एकंदर, सगळा, न विभागलेला. Whole.
[*IE*. Qshi; सं. **क्षी. ५ क्षये ;** *Gr*. Phthi; *Eng*. (Pthisis).
सं. **अक्षतः ;** (सं.; **√क्षी. १ क्षये**) ; प्रा. **अक्खय ;** गु. **आखो, आखलो** (न बडविलेला बैल), **आखुं=समग्र ;** अकाम. **आखा, अख्खा**.]

अखाडा पुं. कुस्ती वगैरे खेळ खेळण्याची जागा. A gymnasium; a club.
[सं. **अक्षवाटकः ;** प्रा. **अक्खवाडग, अक्खाडग, अक्खाडय.**
ह्याच्याबाबत अर्थविकास किंवा अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. मूळ मृच्छकटिक नाटकांत **फाशानें खेळ खेळण्याची**

जागा अशा अर्थानें शब्द वापरला आहे. पुढें एकत्र जमण्याची जागा, तालीमखाना, अड्डा, गाड्यांचा तळ असे अर्थ त्यांत निविष्ट झाले.]

अखेर क्रिवि. ना. शेवटीं, शेवट, अन्त. An end, finally (*Adv.*).

[अर. **आखीर, अखर–कडेची जागा, अखीरनखीर–सरते शेवटीं, अखेरी–शेवट.** गंजिफाच्या डावांत शेवटीं महत्त्वाचें पान राखून ठेवून करावयाचा डाव, ह्यावरून **अखेर साधली**–डाव केला, ही म्हण रूढ झाली.]

^{१}**अगड** पुं. आड, तट, खंदक. A well, a rampart, a moat.

[सं. **आगर्त**; प्रा. **आगड**; याकाम. **अगड = खदक.** (उ. गी.)]

^{२}**अगड** न. खेळाचें आवार. A compound for play.

[कान. **अगडु = खेळ**; कान. **√अगुळ = खणणें.**

हा शब्द आर्य आणि द्राविडी असा दोन्ही प्रकारचा आहे. ‘ **अगडबंब** ’ (धिप्पाड) ह्यांतील ‘ **अगड** ’ कानडी आहे.]

अगत्य न. जरूरी, कळकळ, आग्रह. (अगत्य अगत्य यावें) Zeal; earnestness.

[सं. **अगति** = जरुरी ; हा अर्थ अगतिकत्वापासून निष्पन्न झाला. ह्या शब्दाच्या अर्थांत बराच बदल झालेला दिसतो. **अगति** = गति कुंठित झालेला; त्यावरून आवश्यक, अनिवार्य असा अर्थ. साहाय्यास धावणारा, आसरा असाहि अर्थ त्यांत आला. अगत्य < अगति + य < अ + √गम् + ति. अगतिक पहा.]

अगदीं वि. क्रिवि. १ सर्व, पूर्ण, आत्यंतिक, पराकाष्ठेचा. Altogether, wholly.

[सं. **अगति** (?)]

^{१}**अगर** अ. अथवा, जर, किंवा. Otherwise.

[फा. **अगर–जर**; पेकाम. **अगर** (पदमव १०९).]

^{२}**अगर** एक प्रकारचें सुगंधी द्रव्य देणारें झाड, चंदनाचा एक प्रकार. Aloe-wood.

[सं. **अगरू**; गु. **अगर** ; बं. **अगर** ; याकाम. **अगर, अगरु** (नरुस्व ४२०); अकाम. **अगर** (वत्ती); वैसी उठिताए विरहागी। अगरू लावितां आंगीं ॥ नरुस्व ५५०.]

अगला वि. पहिला, अगोदरचा, पुढचा, वरचा. Headmost, anterior.

[सं. **अग्र. + ल**; प्रा. **अग्गल**; अप. **अग्गलउ**; जु. गु. **आगली = पुढें**, गु. **आगलूं, आगळ** ; सिं. **आगरो** ; हिं. **आगला** ; बं. **आगलि** ; ओ. **आगलि** ; लमा. **अंग्ले = पुढें.**]

अगाउ वि. अगोदर, अधिक, जास्त. In advance.

[सं. **अग्र** ; प्रा. **अग्ग** ; हिं. **अगाव** ; सिं. **अग्याउ.**]

अगापिछा, आगापिछा पुं. पुढचा व मागचा भाग. The fore and the hinder (parts).

[सं. **अग्र** ; प्रा. **अग्ग; पश्चिम. पश्चात्. पिछा.**]

अगशी स्त्री. खिडकी. A window.

[द्रा. **अगशी = तट, ग्रामप्राकार** वगैरेचा मुख्य दरवाजा. सं. **आकाशिका.**]

अगळा–अगळ पुं. अडसर ; कोळ्याचें जाळें. A bar (for a door); web of a spider.

[सं. **अर्गला** ; प्रा. **अग्गला** ; बं. **अगड** ; पं. **अग्गळ** ; हिं. **अग्गल, आगल** ; का. **अगळी** ; गु. **अगळी, आगळो** ; सिंह. **अगुल**; अकाम. **अगळ, आगळ, आवळ.**]

अगा स्त्री. कल्पना, अंदाज. Expectation or thought regarding.

[फा. **आगाह्** = जाणीव असलेला]

अगाढ–अगाध वि. पुष्कळ, बहुत, फार खोल. Unfathomable.

[सं. **अगाध** (√गाह् १ प्रवेशे); प्रा. **अगाढ** ; याकाम. **अगाध, आगाधे** (नरुस्व. ५६,६९०); अकाम. **अगाध, अगाढ. अगाध** पहा.]

अगाशी स्त्री. गच्ची. A terrace.

[सं. **आकाशिका. अगशी** पहा.]

अगुतली स्त्री. केळीच्या पानाचा शेंडा. The extreme portion of a plantain leaf.

[सं. **अग्र + दल**, प्रा. **अग्गतल.**]

अगे, अग, गे, ग, अगो, अगा, गा अ. संबोधन किंवा उद्गारवाची अव्ययें. Familiar vocative.

[सं. **आर्य, हंगे आर्या** ; प्रा. **हंगे**; **अज्जा** > अजि > अजी > जी; प्रा. **गोह,** > मरा. > **गा अगा**; प्रा. **हगे, हगो.**]

अगोदर क्रिवि. प्रथमतः; पहिल्यांदा. At first.

[१ सं. **अग्रतर** आदौकर > आदोगार > अगोदर; वर्णव्यत्यासानें **अगोदर** हें रूप सिद्ध होतें. सिं. **अगभरो.**]

अग्नि पुं. विस्तव. Fire.

[सं. **अग्नि** (√अज्, अंज्.)

IE. Og, Ong, Ang; सं. **अंज्** (अनक्ति, अंजन, अंगार, अग्नि इ.); *Gr*. Ab (For Ag) in Abros; *Lat*. Ung, Ignis (fire); *Lith*. Ugnis; *Slav*. Ogni (fire); *OHG*. Ancho.

तद्भव—सं. **अग्नि** ; पा. **गिनि** ; प्रा. **अग्गी, अग्गि** ; गु. हिं. **आग** ; सिं. **अगि** ; का. **ओगुन** ; पं. **अग्ग** ; मै. **आगि** ; बं. **आगुन्** ; ओ. **णिअ** ; सिंह. **अग** ; मराठी **आग.**

ह्या शब्दाशीं अन्वय होऊन पुष्कळ प्रयोग मराठींत रूढ झाले आहेत.

अग्नि देणें–जाळणें, प्रेत जाळणें. **अग्निकाष्ठ भक्षण करणें**–अग्नींत उडी टाकणें, सती जाणें. **अग्निपंचक** किंवा **पंचाग्निसाधन**–पांची बाजूनें उष्णता ठेवून तपश्चर्या करणें. **अग्निमांद्य**–(अग्नि = जठराग्नि + मंद)–भूक कमी लागणें.

–अग्निरथ आगगाडी. A steam engine, railway.

–अग्निकमळ भुंवईजवळील चक्र (योगशास्त्रांत मानतात). (An imaginary) wheel in between the eyebrows.

–अग्निहोत्र एक प्रकारचा धर्मविधि–श्रौत नांवाच्या अग्नीची उपासना.

–आग, अग्यावेताळ (रागीट मनुष्य).

आग्यारी–पारशांची पवित्र अग्नीची जागा. A place of fire-worship of the Parsees.

अग्निस्तंभ पुं. अग्नि शांत करण्याचा मंत्र, दीपमाळ. A mantra or charm for extinguishing fire, a pillar for lights.

[सं. याकाम. **अग्निस्तंभ.**]

इय अग्निस्तंभाचें अक्षेर । पुसां कां सिद्धातें ॥ नरुस्व ५९३

अग्र न. शेवट, टोक, पुढचा भाग. An end, point, tip.

[सं. **अग्र**; *IE*. agro; *Av*. agra; *Lett*. agrs.]

–अग्रगामी पुढें जाणारा. One going in front.

–अग्रमान पहिला मान, श्रेष्ठत्वाचा मान, अगोदरचा मान. Honour of being the first.

–अग्रफूल वेणींतील–टोकांवर घालावयाचें सोन्याचें फूल. A flower-like ornament for hair.

–अग्रलेख वर्तमानपत्रांतील मुख्य लेख. A leader.

–अग्रवादी वादी, खटल्यांतील दोन पक्षांपैकीं पहिला वादीचा पक्ष. The complainent (in a case).

अग्रहार पुं. ब्राह्मणांस दान म्हणून दिलेला गांव किंवा गांवाचा भाग. A village or a portion of it given as a gift to Brahmins.

[सं. १ **अग्र** (= प्रथम) + हार√हृ ; २ **अग्र** (= धान्याचीं कणसें, धाटाचीं टोकें) + हार √हृ '**धान्याचा उत्तम भाग घेणें**' हा मूळ अर्थ. नंतर **त्यासंबंधीं दान** हा त्या शब्दाचा अर्थ झाला. (परा. स्मृ. २–९–११). नंतर **चांगल्या वस्तूचें दान** असा त्याचा सामान्य अर्थ झाला. नंतर **जमीन देणें** हा अर्थ सूत्रकालांत झाला. हा शब्द प्रथम बौधायन (१–५–९–८) मध्यें आढळतो. याज्ञवल्क्यानें निर्देश केला नाहीं. महाभारतांत हा शब्द आहे.

कधीं कधीं ह्यावर थोडासा कर असे, परंतु बहुतेक सरकारी सर्व सारा माफ असे. अग्राहार–असा शब्द पूर्ण इनाम ह्या अर्थी कांहीं ठिकाणीं वापरला आहे, तेलुगु **कत्तुबदी** व कानडी **जुडी, अग्रहार** असे दोन शब्द आहेत. मराठींत **जुडी** असा एक जमिनीवरील कर ह्या अर्थी शब्द आहे. इनामदारापासून घ्यावयाचा कर असा त्याचा अर्थ आहे.]

अग्या वि. पुढला, अगोदरचा. Foremost, fore.

[सं. **अग्र** ; प्रा. **अग्ग** ; गु. **अगुवो = वाटाड्या** ; हिं. **अग्वा, अग्वाना = पुढें जाणारा, आगे = पुढें** ; पं. **अग्गे** ; सिं. **अगी, अगिआं** ; बं. **आगे = पुढें, अग्यों = मागील** ; सिंह. **अग = पहिला** ; का. **ओग, ओगु = प्रतिपदा** ; रुमा. **अगोर.**]

अघ न. पाप, दोष, मळ. Sin, fault.

[*IE*. Agh(lo); सं. **अघ** (अहस√हन्, √घात्); *Av*. aga ; *Got*. agls.]

अघटित वि. विलक्षण, चमत्कारिक. Improbable, hard of occurrence.

[सं. **घट् १ चेष्टायाम्–निष्ठारूप.**

ह्या शब्दाच्या अर्थांत बदल झाला आहे. 'घटित' केलेलें, रचलेलें असा धात्वर्थ आहे. ईश्वरी नेमानेमानें सिद्ध, दैवांत लिहिलेलें असा अर्थ नंतर झाला. जें कोणत्याहि नियमानें बद्ध नाहीं तें **अघटित** म्हणजे विलक्षण, चमत्कारिक.]

अघड वि. खरबरीत, ओबडधोबड, न घडलेलें. Unhewn, unfashioned.

[सं. **अ+घट् १ चेष्टायाम्.**

हे असो मात अघडती । ज्ञा. १–२३५]

अघवें-आघवें वि. पूर्ण, सर्व, अवघें. All, the whole.

[सं. **अग्रवत्**; प्रा. **अग्घव** ; वर्णविपर्ययानें अवघें हें रूप सिद्ध होतें.]

अघळ वि. विस्तीर्ण. Spacious, roomy

[कान. **अगल** (निष्ठा), = **विस्तीर्ण, निराळा, भिन्न केलेला.** कानडी शब्द हा संस्कृत तद्भव असावा. मराठी **अघळ** आणि **पघळ** हे दोन्ही शब्द जोडीनें येतात **आगळा = निराळा, भिन्न, अधिक.** हाहि शब्द ह्याच शब्दापासून व त्याच्यापासून सिद्ध झालेला **आगळीक = गुन्हा, आधिक्य.** ह्याचेंहि मूळ **अगल** हाच आहे.]

अघळपघळ वि. ऐसपैस, लांबरुंद. Spacious, roomy.

[कान. **अगल-विस्तृत. पघळ√-प्रगल्.** किंवा **√अपगल्**

दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्नभाषांतील असे जवळजवळ ठेवण्याचा प्रकार कांहीं शब्दांच्या बाबतींत दिसून येतो.]

अघाडा पुं. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **अग्रजात, आघाट**(?); प्रा. **अग्घाड**; देप्रा. **अग्घाड** (**अग्घाडम्मि मउमउरन्दा**–२२४. १२, १४); हिं. **अघाडा**; गु. **अघेडो, आघाडो.**]

अघाडी स्त्री. पुढचा भाग, पहिला भाग. The front or fore part, vanguard.
[सं. **अग्र+स्थितिः**
' डी ' हा प्रत्यय **स्थिति** शब्दापासून निघाला असें निश्चयानें म्हणतां येणार नाहीं. हा एक प्राकृतमधील प्रत्यय मराठींत उतरला. ह्या शब्दाचा प्रतियोगी शब्द **पिछाडी** असा आहे व त्याचा अर्थ मागील बाजू. विशेषतः हे शब्द (सैन्याच्या) पुढच्या व मागच्या भागास उद्देशून वापरतात.]

अघोर वि. भीतिदायक, भयंकर ; वाईट. Formidable, terrible.
[सं. **अ+घोर.** *IE.* Ghou-ros ; सं. **घोर**; *Got.* Gours ; *Russ.* Zurit ; किंवा **घोर** = सौम्यरूपः; √घृ.
ह्यांतील पहिला ' अ ' हा अभावार्थी नसून विशेषार्थी आहे. घोर आणि अघोर ह्या दोन्ही विशेषणांचा अर्थ एकच आहे. अघोर म्हणजे अधिक भयंकर असा अर्थ आहे. घोर म्हणजे काळजी असा अर्थ घेतला तर मात्र 'अघोर' मधील 'अ' हा अभावार्थी आहे व त्याचा अर्थ निष्काळजी असा होतो. ' अघोर ' नांवाचा एक शंकरानुयायी पंथ आहे. अघोरी हें त्यापासून विशेषण सिद्ध होतें. चपळ आणि अचपळ ही एक अशाच स्वरूपाची जोडी आहे. अ=विशेष.]

१अंक पुं. १ संख्या, आंकडा, खूण. A number, figure, cypher.
[सं. **अंक् १ चिह्न करणें** ; लॅ. **अंकस्** ; ग्री. **ओग्कोस** ; गु. **अंक, आंक, आकडो** ; हिं. **अंक, आंक, आंकडा** ; सिं. **अंगु** ; का. **आँख** ; सिंह. **अंक** = खूण. मराठी. अंकगणित –संख्येचें शास्त्र, अंकलिपि–आंकड्यांचें पुस्तक.]

२अंक पु. मांडी. The thigh.

३अंक पु. नाटकांतील एक भाग. An act of a play.

अंक(णें) उक्रि. खूण करणें, मोजणें, रेघा ओढणें. To mark.
[सं. **अंक् १ चिह्ने.**]

–अंकित (निष्ठा) चिन्हित, मर्यादित, सेवक, मर्यादेमध्यें चालणारा. [पूर्वी सेवकांना–गुलामांना ओळखण्यासाठीं म्हणून कांहीं चिन्ह अंगावर करीत; त्यावरून नोकर असा अर्थ प्राप्त झाला.]

–अंकु शिष्य, सेवक. A disciple.
या बोला आन नोहे । तरी व्यासाचा अंकु न वाहे ।
ज्ञा. १८ १६५८

अंकुर पु. कोंभ, मोड. A Sprout, a shoot.
[सं. **अंकुर** √अंक्.]

अंकुर(णें) (ना. धा.) कोंभ फुटणें. To sprout, to germinate.

अंकुरित (अंकुर ना. धा. निष्ठा) कोंभ फुटलेला–वर उमटलेला असा. Sprouted.

अंकुश पुं. एक हत्यार, हत्तीला वश करण्याचें–हाकण्याचें हत्यार. A goad.
[सं. **अंकुश.** √अंक् ; किंवा अञ्च् १ गतौ. चालवयास लावण्याचें हत्यार.]

अंग न. शरीराचा भाग, शरीर, देह, गात्र. The body, a limb.
[सं. **अंग**; प्रा. **अंग** √**अञ्ज्.** ह्याचे लाक्षणिक अर्थ पुष्कळ रूढ आहेत. उदाहरणार्थ भाग, बाजू, पक्ष; त्या कामांत त्याचें अंग आहे, (भाग); गाण्यांत त्याला अंग आहे, (कौशल्य); **अंग फाडून घेणें**–संबंध तोडणें; **अंग धरणें**–बाळसें येणें; **अंग मोडून काम करणें**–फार कष्ट करणें; **अंग सावरणें**–तोल सावरणें.]

–अंगाखालची स्त्री वेश्या; राख.

–अंगाची लाही होणें आग होणें, त्रास होणें, संतापणें.

–अंगाचें कातडें काढून जोडा शिवणें कृतज्ञता दाखविणें.

–अंगाबाहेर टाकणें जबाबदारी टाकणें.

–अंगांत येणें भुताचा संचार होणें.

–अंगचुकार श्रमांत कुचराई करणारा.

–अंगमेहनत कष्ट.

–अंगरखा वस्त्र, पैरण.
[सं. **अंगरक्षक** ; प्रा. **अंगरक्खग.**]

अंगठा पुं. हाताच्या (पायाच्या) पंजावरील पहिलें जाड बोट. A thumb or a great toe.
[सं. **अंगु+स्थ, अंगुष्ठ**; प्रा. **अंगुट्ठ**; झें. **अंगुस्त**; फा. **अंगुस्त**; सिंह. **अंगुट**; रुमा. **अंगुश्त**; सिं. **अंगूठो**; पपं. **अगूठ**; हिं. **अंगूठा**; गु. **अंगूठो.**
पितरांना अंगठ्यावरून पाणी सोडून पाजतात. त्यावरून अंगठा दाखविणें, नकार देणें वगैरे प्रयोग रूढ आहेत. **अंगठ्याची आग मस्तकास जाणें**–सर्व शरीरभर राग येणें.]

अंगठी स्त्री. अंगठ्यांत घालावयाचा एक अलंकार. A ring.

[**अंगुलिस्थ-आंगुइट्ठ, आंगुट्ठी-आंगवठी.**]

अंगडें न. अंगरखें (लहान मुलाचें). A long frock or body-garment.

[मराठी. **अंग + डें, टोप + डें** ह्यांतील 'ड' हा अल्पार्थे मराठी प्रत्यय आहे. **अंगिका** = कुडतें. **अंगिन्** = अंगी. **हिं. अंगिया** = चोळी. ह्यावरून मराठी शब्द **आंगी** असा आला आहे. त्यावरून वरचा अल्पत्वदर्शक शब्द असावा.]

अंगण न. आवार, घरापुढील मोकळी जागा, चौक. A house-yard.

[सं. **अंगण** √अञ्ज्; प्रा. **अंगण**; गु. **आंगुणुं**; **आंगनियु**; सिं. **अङ्गणुं**; हिं. बं. ओ. पं. **अं (आं) गन**.]

अंगलट स्त्री. पुं. शरीराची ठेवण. A Cast, a mould (of the body).

[सं. **अंगयष्टि**; प्रा. **अंगलट्ठी** किंवा **अंगलोष्ठ.** (?)]

अंगव(णें) उक्रि. स्वीकारणें, स्वाधीन होणें, प्राप्त होणें, मिळणें. To accept.

[**सं. अंग.** (ना. धा.) णिच्–अंगय.]

१**अंगवस्त्र** न. उपरणें, उत्तरीय. An upper garment.

[सं. **अंग**√अंज् + **वस्त्र**√वस्]

२**अंगवस्त्र** न. रखेली, उपस्त्री (लक्षणा). A keep; a mistress.

[सं. **अंगना + उपस्त्री** = आंगोवस्त्री–आंगोवस्त्र. असा शब्द बनला. वस्त्र = कपडा ह्याच्याशीं कांहीं संबंध नाहीं. राज. भा. अ. १८३२]

अंगाई स्त्री. लहान मुलाला निजविणें, झोंप. The bole of a song; a lullaby.

[**अंग** + आई. (?) ध्वनिशब्द असावा. तोच पुढें गाण्याचा वाचक बनला.]

अंगार पुं. विस्तव, पेटता निखारा, इंगळ. A live coal.

[सं. **अंगार**; वेदामध्यें अग्निवाचक 'आंगिरस्.' असा शब्द आहे. त्यावरून तर हा शब्द आला नसेल ना? गु. **अंगारो. अंगिरा** पहा.]

अंगारा पुं. धूपाची राख, भस्म, विभूति. Sacred or consecrated ash.

[सं. **अग्निरक्षा.**]

अंगारक पुं. मंगळ ग्रह. The Mars.

हा तांबडा दिसतो. अग्नीसारखा ज्वलत् आहे असें म्हणतात. जुन्या पेशवेकालीन कागदपत्रांत गोवळकोटच्या सिद्दीसंबंधीं हा शब्द वापरला आहे. रंगावरून किंवा इतर कांहीं ताम्रत्वामुळें हा त्याच्यासंबंधीं वापरला असावा. कचित् ठिकाणीं आंग्रे ह्यांच्यासंबंधींहि वापरला आहे. 'आंगारक व आंग्रे' ह्यामध्यें वर्णसाम्य आहे.]

अंगारकी चतुर्थी स्त्री. मंगळवारीं येणारी वद्य चतुर्थी.

अंगिरा पु. अग्नीचें नांव. Fire-god.

[*IE*. Ang–llo–s- = दूत; सं. **अंगिरस्**; जु. फा. Angaros; *Got*. Aggilus; *Eng*. Angel.]

वेदामध्यें आंगिरस् असा शब्द आढळतो.]

अंगीकार(णें) उक्रि. स्वीकार करणें. To claim, to espouse, to allow; to admit.

[सं. **अंगी+कृ** (च्वीरूप) **अंगीकरण** (अंगिकार), **अंगीकृत** (स्वीकृत)]

अंगीलो पुं. स्पर्श. (खेळतांना मुलांचा स्पर्श एकमेकांना झाला म्हणजे हा शब्द उच्चारतात.) A touch, contact.

[सं. **अंकपलि:** किंवा **अंगपलि:>अंगवलि अंगील**; हिं. **अंकवार**; सिं. **अंगलू.**]

अंगुचें न. एक प्रकारचा मुलांचा अंगरखा, वस्त्रविशेष. (कुणब्यांत हा शब्द वापरतात.) A frock for children.

[सं. **अंगवस्त्र**; गु. **अंगुछो**; हिं. **अंगोचा**; सिं. **अगोचा**; का. **अंगोस**; अकाम. **अगोच्छा**=उपरणें, पंचा.]

अंगुल-क न. एक माप; आठ यव एकास एक जोडून झालेलें लांबीचें माप. A measure of length.

[सं. **अंगुलि**–हाताच्या बोटाच्या रुंदीचें माप.]

अंगुलें–ळें न. हातांतील आंगठी. A ring.

[सं. **अंगुलिवलयम्**]

अंगुली, अंगळी स्त्री. बोट, पांच बोटांपैकीं सर्वांत लहान शेवटचें बोट (विशेष अर्थ). A finger or toe.

[सं. **अङ्गुलि**; प्रा. **अङ्गुली**; गु. **अंगुळी** (ळी), **आंगळी, आंगली**; हिं. **अगुली, उंगली**; सिं. **अङ्गरी**; पं. **उंगली**; का. **ओंगजू**; सिंह. **अङ्गिल्ल.**]

अंगुष्ठाण–स्तान–स्थान न. बोटाला सुई टोंचूं नये म्हणून घालावयाचें लोखंडी, पितळी टोपण (शिंप्याचें). A thimble

[**सं. अंगुलि + स्थान.** (?) ; फा. **अंगुश्तदान** ; अंगुश्तरी–अंगठी ; फारशी व्युत्पत्ति अधिक ग्राह्य.]

अंगेज, अंगेजणी स्त्री. शौर्य, धाडस, उठावणी, पराक्रम. Attack, brave-contact (as in a battle).

[फा. **अंगेझ्-अंगेख्तन** = उठावणी करणें ह्या क्रियापदाचें आज्ञार्थी रूप; पेकाम. **अंगेज, अंगेजणी.** (रा. ८-१७८])

अंघोळ स्त्री. स्नान. Ablution; bathing.

[सं. **अंग** + कानडी-**होळ-धुणें**; प्रा. **अंगोहलि** = खांद्यावरून स्नान. गु. **अंघोळ**=स्नान, **अंघोळवूँ**=स्नान करणें]

अचकट विचकट वि. वाईट, घाणेरडे (अपशब्द); चावट, अभद्र. Indecent, foul, obscene.

सं. **अत्यव** + **कत्थ** (१ श्लाघायाम्) + **वि** + **कत्थ**- (अभ्यास) + **चकत्थ.** (राज).]

वरील व्युत्पत्ति राजवाडे ह्यांनीं दिली आहे. परंतु '**अचकट**' हा शब्द केवळ '**विचकट**' शब्दाचा प्रतियोगी ध्वनिशब्द दिसतो. विचकट हा मूळशब्द आणि तो **विचकणें** ह्या धातूशीं सबंद्ध आहे. त्याचें मूळ √वि+चक्, √व्यस् असें असून **अकच्** हा प्रत्यय आहे. तसेंच 'ट' हाहि प्रत्यय आहे. ह्यासारखेच **अचकबोचक** (अव्यवस्थितपणानें), **अचकाविचका** (गोंधळ), **अचडेंबचडें** (मुलाबद्दल प्रेमाचा शब्द), **अचरटपचरट** इ. शब्द आहेत. ह्यांतील पहिले शब्द हे केवळ दुसऱ्या शब्दांचे प्रतियोगी ध्वनिशब्द आहेत व म्हणून अव्युत्पाद्य होत.)

अचंबा पुं. आश्चर्य, कौतुक. Wonder; astonishment.

[सं. **अत्यद्भुतम्**; प्रा. **अच्चब्भुय**; हिं. **अचंभा**; गु. **अचंबो.**]

अचरट वि. फाजील, व्रात्य. Unrestrained, incoherent.

[सं. **आचारवत्**, **अ**+**चऱ्हाट** (श. को.)

ही व्युत्पत्ति श. को. कारांनीं दिली आहे परंतु काल्पनिक दिसते. शब्द द्राविडी आहे कीं काय अशी शंका येते.]

अचाट वि. अत्यंत, बहुत. Strange, wild.

[सं. **अत्यन्त**; प्रा. **अच्चंत**; १ सं. **अत्यर्थ**; प्रा. **अच्चत्थ**; याकाम. **अचाट** (नरुस्व ७२८)]

काइं सांधों ते दारवठे अचाट । लोकपाळां रिगतां येकवट ॥ नरुस्व ८७१.

अचानक क्रि. वि. अ. एकदम, चोरून, अनपेक्षित. Suddenly, unexpectedly.

[सं. ? हिं. **अचानक.**]

अचावचा क्रि. वि. अ. मन मानेल तसें, असंबद्ध, अद्वातद्वा. Unmeaningly; unconnectedly.

[सं. **ध्वनिशब्द.** ∠ **वाच्य** > **वचा.** √**वच्**-बोलणें. **अवाच्य.** > **अचा** (?)

अशी व्युत्पत्ति देतां येते; परंतु पहिला 'अ'चा शब्द केवळ प्रतियोगी ध्वनिशब्द दिसतो.]

अचुंवित वि. सहज, अचुक, निर्मळ. With ease.

[सं. **चुंब्** १० किंवा **शुभ्**, **हिंसायाम्**

ह्या शब्दाचा संबंध '**चुंबित, चुंबन**' ह्या संस्कृत शब्दाशीं लावण्याचा मोह केवळ ध्वनिसाम्यावरून होतो व तशी व्युत्पत्ति श. को. कारांनीं दिली आहे. परंतु त्यांनीं अर्थभेदाचें स्पष्टीकरण केलें नाहीं. **चुंबत** काम करशील, **चुंबत** माझें ऐकशील, वगैरे प्रयोगांत येणारा **चुंबत** शब्द ह्याचा **चुंबन** शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. हा धातु निराळा आहे व त्याचा अर्थहि निराळा आहे. **चुंब् १ हिंसायाम्** ह्या धातूशीं त्याचा संबंध आहे.]

अच्छा वि. अव्यय. चांगलें, बरें. Well.

[सं. **अत्यर्थम् स्वच्छम्**; देशी **अच्छए.**]

अच्छेर पुं. माप, वजन (अर्धा शेर). A measure of quantity (half a seer).

[**अर्धाशेर** > **अधशेर** > **अत्शेर** > **अच्छेर**;

सं. **अर्ध** हा शब्द प्रथम अवयव म्हणून येऊन बरेच सामासिक शब्द सिद्ध झाले आहेत. 'अर्ध' ह्याचें मराठींत 'अद्, अड, आड' अशीं रूपें होतात.]

^{1}**अज** वि. न जन्मलेला, नित्य. Unborn.

[सं. **अ** + **ज**√जन् ४ प्रभवे]

^{2}**अज** श. अव्यय. पासून. From.

[फा. **अझ्**; शिकाम. **अजरख्तखाने**; **अज्**-पासून; **रख्तखाने**=कचेरी. पेकाम. **अज** (कदीम) (वाडमा १-६५) पत्रव्यवहार जेथें लिहिला जातो तें.]

अजगर पुं. न. मोठा, स्थूल साप. A python.

[सं. **अजगर.** 'गम्' धातूचा अभ्यास होऊन त्याचा कांहीं संबंध ह्या शब्दाशीं असेल काय ?]

अजब वि. विलक्षण, चमत्कारिक, आश्चर्यकारक. Strange, wonderful.

[अर. **अजब** = आश्चर्य.]

अजबखाना पुं. पदार्थसंग्रहालय, विचित्रवस्तुसंग्रहालय. A museum.

[अर. **अजायबखाना**; फा. **अजाइब् खाना**]

अंजम-आजम वि. वरिष्ठ, श्रेष्ठ; कनिष्ठानें वरिष्ठास संबोधावयाचा मायन्याचा शब्द. Prefix showing great regard.

[अर. **अअझम्** = सर्वश्रेष्ठ.]

^{३}**अजम** पुं. निश्चय, मोठेपणा, अभिमान. Greatness; honour.

[अर. **अझ्म्**; पेकाम. **अजम** (होकै ६);]

अजमाव(णें) सक्रि. तर्क बांधणें, अनुमानणें, समजणें, पारख करणें, कसोटीस लावणें. To infer, to imagine.

[सं. **अधि+मा २ (मी १०) माने**–णिच् ; फा. **आइमा**–आज्ञार्थीरूप √**आइमूदन्**चें. फारसी व्युत्पत्ति अधिक ग्राह्य.]

अजमास पुं. परीक्षा, अंदाज, अंदाजपत्रक ; आणेवारी-पत्रक, खालच्या अधिकाऱ्यानें केलेला पिकांचा अंदाज. An estimate, a computation.

[फा. **आझमाइश** ; शिकाम. **अज्मास** (चित्र ८८); पेकाम. **अज्मास, अदमास, अम्रास**; अकाम. **अदमास.**]

अजरामर वि. म्हातारपण व मृत्यु नाहीं असा. Exempt from old age and death.

[सं. **अ+जरा+मर.** समास मोठा चमत्कारिक आहे. ह्या शब्दाचा आणि अजरामऱ्हामत ह्या फारसी शब्दाचा घोटाळा होतो. कदाचित त्या परकी शब्दाचाच हा शब्द एक परिणाम असावासा वाटतो. "अजरामरवत् प्राज्ञः विद्यामर्थंच साधयेत्" ह्या संस्कृत सुभाषितावरून शब्द रूढ झाला.]

अजरामहामत क्रि. वि. अ. कृपेनें दिलेलें–कृपादत्त बक्षीस. A reward given through kindness.

[फा. **अझ्+राह्** ; अर. **मर्हमत्** = दया, कृपा देणगी ; पेकाम. **अज्रा मऱ्हामत** (रा. ८·४७).]

अजस्र वि. अचाट, विस्तृत, भयंकर. Huge, stupendous.

[सं. **अजस्र** = शाश्वत. **(अ+जस्+र).**

ह्याच्या अर्थांत बराच बदल झालेला दिसतो. तेव्हां वरील व्युत्पत्ति निश्चित मानतां येत नाहीं. शिवाय शब्दाचें सध्यांचें रूप 'त्' विरहित आहे. पूर्वी 'अजस्त्र' असें रूप होतें काय ?]

अजा स्त्री. बकरी. A she-goat.

[*IE.* ago ; *Lith.* ozys, ozinis ; सं. **अज.** स्त्री. **अजा.**]

ह्या शब्दावरून कांहीं म्हणी रूढ आहेत. बकरा किंवा बोकड त्याचा कांहीं अपराध नसतांना बळी देतात; त्यावरून "अजापुत्रं बलिं दद्यात्" असा एक संस्कृत प्रयोग मराठींत निरपराधी मनुष्याला शिक्षा भोगावयास लावणें ह्या अर्थी रूढ आहे. 'अजा' ह्या प्राण्याला गळ्याशेजारीं दोन मांसग्रंथी स्तनासारख्या असतात; परंतु त्यांतून दूध निघत नाहीं. त्यावरून अजागलस्तन हा शब्द रूढ आहे. **अजागळ** हा शब्दहि त्यावरूनच सिद्ध होतो. निकामी मनुष्य, बावळा, अशा अर्थी रूढ आहे. ह्या अर्थाचा संबंध अजागल-स्तनाशीं आहे हें उघड आहे.]

अजार, आजार पुं. उपद्रव, रोग, त्रास, पीडा, दुखणें. Disease.

[फा. **आझार** ; पेकाम. **आजार** (रा. ८-२४) ; अकाम. **अजार, आजार.**]

अजिजी स्त्री. शरण येणें ; दीनता, आर्जव. Submission, meekness.

[अर **आजिझी; आजिझ्**–असमर्थ, दीन, **अजीजी** करणें-**अजीअजी** करणें–खुषमस्करी करणें; पेकाम. **अजीज, अजिजी** (रा.-१९-१०५) ; **अजीज** = इष्टम्. (रा.व्य २६९)].

अजीबात–द. क्रि. वि. अ. सर्वस्वीं, मुळींच, अगदीं, बिल्कुल.(not) in the least, totally.

[फा. **अझींबाद्** ; पेकाम. **अजीबाद, अजीबात** (रा. १०-१६७, १९३).]

^{१}**अजीर्ण** वि. जुनें न झालेलें, न फाटलेलें. Undecayed; unimpaired.

[सं. **अ+जीर्ण**–(निष्ठा) जॄ ९ वयोहानौ.]

^{२}**अजीर्ण** ना. अपचन. Indigestion, dyspepsia.

[सं. **अ+जीर** √जॄ ९ वयोहानौ. ज्रि १, स्रिव् ४ गतिशोषणयोः. ह्या धातूच्या अर्थांत इतका फरक कसा झाला ? जिरणें = पचणें असा एक मराठी धातु आहे. त्याचेंहि मूळ 'जॄ' हाच धातु.]

अजुरा पु. उर्क्तें वेतन, वेतन, मुशाहिरा, भाडें, पगार. हुंडी जर पटली नाहीं तर दण्ड म्हणून जो पैसा आकारितात त्याला अजुरा म्हणतात. Hire, wages.

[अ. **उज्रा**; पेकाम. **अजुरा.** (रा. ८–२१२)]

अजून, अजूनी, अजुनि क्रि. वि. अ. अद्याप, अद्यापपर्यंत. Yet, still.

[सं. **अद्यतन–पुनः**; अप. **अजूइं**; प्रा. **अज्जउण**; हिं. **अजहूं** ; (फा. **हनूझ्**–ह्यांत वर्णविपर्यय मानावा लागतो.)

जुन्या मराठींत **अजी** (>अद्य), **अजीहून अजू** अशीं रूपें वापरलेलीं आढळतात. गुजराती **हज्जु, आज,** असे प्रयोग आहेत. मराठी शब्द 'ऊन' प्रत्ययान्त किंवा पूर्वकालवाचक धातुसाधित आहे असें वाटतें. परंतु तसें नाहीं. त्यांत '**अद्य**' हें सं. अव्यय मूळ असून, न, नी हे वर्ण अपभ्रंशांतील '**इं**'चे परिणाम आहेत.]

अजुंर्दा वि. दुःखी, कष्टी, खिन्न. Sorrowful.
[फा. **अझर्दा=कष्टी ; आझर्दगी.**]

अजुर्दगी खिन्नता. Sorrow, dejection.

अजुर्दार पुं. नोकर, जासूद, निरोप्या, काशीद. A hired labourer.
[अर. **अजुरा** = मजुरी; **उज्रा** = मजुरी.]

अज्राह-हे क्रि. वि. अ. रस्त्यावरून, मार्गानें. By the wayside.
[फा. **अझ्** = पासून. **राह्** = रस्ता.]

अंचल-ळ पुं. स्त्री. वस्त्राचें टोक, दशी, अचळी ; स्तन (गुराचें). Unwoven thread at the end of a cloth ; a teat.
[सं. **अंचलम्** (√अञ्च्)—(लिङ्गभेद मराठींत झाला); अकाम. **अचल, आचल;**]

अंचव(णें) अक्रि. अंतरणें, मुकणें. To lose utterly.
[सं. **आ+च्यु** १ पतने]

अंचव(णें), आचव(णें) अक्रि. जेवणानंतर तोंड धुणें. To wash one's mouth after meal, to rinse.
[सं. **आ+चम्, आचमन;** हिं. **अंचवना, अचाना;** बं. **आँचान.**
ह्याचा मूळ धात्वर्थ पाणी चाटणें असा आहे. परंतु त्याचें सामान्यीकरण झालें आहे. कांहीं वैदिक लोक भोजनोत्तर आचमन करतात, त्याला उद्देशून हें असावें.]

अंची स्त्री. डाक, टपाल, पेणें ; मुक्काम. A halt, a pause ; Dak.
[कान. **अंचे.** टपालरस्ता; तेल. **अंचे. अंचिय** = टपाल. घोडा बदलण्याची जागा. सं. √**अञ्च्** १ गतौ]

अंजन न. डोळ्यांत घालावयाचें काजळ. Collyrium.
[सं. **अंज् ७ लेपने**]

अंजणें न. क्रि. डोळ्यांतील अंजन-अंजन घालणें.
[सं. **अंज् ७ लेपने.** याकाम. **अंजणें.**]
मधु-कर्पुरें चकोरी अंजिजे: तेहीं आसुइं कमोदुकंदु उगाळिजे ॥ नरुस्व ५४७.

अंजली स्त्री. ओंजळ, अंजलि. The cavity formed by putting the hands side by side.
[सं. **अंजलिः; अञ्ज्+अलि.**]

अंजार(णें) गोंजारणें लाडीगोडी करणें, कुरवाळणें. To smooth down in soothing or coaxing.

अंजीर, अंजिर न. एक वृक्षविशेष व त्याचें फल. A fig.
[फा. **अंजीर.**]

अॅट(णें) अक्रि. प्रवास करणें, भटकणें. To travel, to roam.
[सं. **अट्** १ अतिक्रमणे, गतौ ; प्रा. **अट** ; देप्रा. **तलअंटइ भ्रमति** (१६०-१०); गु. **अटवूँ;** पेकाम. काव्य. **अटताती.** 'अट' ह्या मूळाच्यापुढें कांहीं मराठी वर्ण येऊन त्याच्या मूळ अर्थात बदल झाला आहे. **अट(णें), अटवि,-व(णें)-णिच् रूप.** अट+क, अटकणें, अटकवणें, अटकावा, अटघाट, अटघोळ, अटणी, अटणूक, अटपळ, अटरफटर, अटवळ, अटाट, अटाटा, अटा, अट, अटीचा, (हेकेखोर). अटकळ-हा शब्द निराळा, अटाळा.]

अॅट(णें) अक्रि. अडणें, हट्ट धरून बसणें. To become firm or compact.
[सं. **अट्** १ अतिक्रमहिंसनयोः ; २ कान. अट्ट-आटविणें २ कमीकमी होणें. **आटणी, आटणावळ, अट्टपाक.**]

अट स्त्री. अडचण, अडथळा, हरकत, हेका. Impediment, obstruction, condition.

आटाआट स्त्री. श्रम, त्रास. Effort.
[सं. **आर्त** (निष्ठा √ऋ ची)]

अटक(णें) अक्रि. अडकून पडणें. To be stopped.
[सं. **अट्ट्** १ अभियोगे + अकच्]

-अटक स्त्री. बंदी, अडथळा. Obstruction.

अटकळ(णें) सक्रि. अनुमान,-तर्क-समजूत-कल्पना करणें. To guess, to calculate, to estimate.
[सं. **अर्ध+कल् १ ज्ञाने.** किंवा **अन्तर्+कल्;** हिं. **अटकल;** गु. **अठकल;** सिं. **अट्कल.**]

-अटकळ तर्क, कल्पना, समजूत. Guess.

-अटका तर्क. Guess.

अटप(णें) उक्रि. सारणें, संपविणें, सावरणें; मरणें (लक्षणा). To consume, to finish; to die.

[सं. **आ+स्तुभ् ८ संकोचे** ; अकाम. **आटपणें, अटप, अटपता, अटपविणें (णिच्)**]

-अटपाअटप आवराआवर, सावरासावर. Disposal, winding up.

अटाट(णें) अक्रि. श्रम करणें, जिवाचें रान करणें, भटकणें, फार सायास करणें. To make vehement efforts.

[सं. **अट्** १ गतौ. (अभ्यास–अटाट्)]

अटास(णें) सक्रि. इच्छा करणें, आग्रह धरणें, हेका धरणें. To desire, to express.

[सं. **अति+आ+शंस्** १ इच्छायाम् ; अध्याश्.

कदाचित् अट्टाहास ह्या नामापासून हा शब्द नामधातु म्हणून सिद्ध झाला असावा. अट्टाहास पहा.]

अटाली स्त्री. माडी, गच्ची, शेतांतील माळा. An open terrace.

[सं. **अट्ट, अट्टाल, अट्टालिका** ; प्रा. **अट्टालग**, परंतु उच्चारावरून हा द्राविडोद्भव शब्द असावासा वाटतो ; कान. **अट्ट=माळा** ; तेलु. **अट्टालकमु**-वेशीवरील मजला ; सिं. **अटहलो**; गुं. पं. **अटारी**; हिं. **अटाल** = ढीग, शिलकी सामान ; अकाम. **अटाळा, अटोला.** शेतांतील माळा.]

अटोकाट वि. शिकस्तीचा, अत्यंत. Extreme, exceeding.

[सं. **अत्युत्कट** (?) ; **अट्ट** (उच्च) + **काष्ठा** = मर्यादा ; कानडी '**अट्ट**' शब्दाशीं संबंध आहे का ? प्रा. **अट्टकट्टा.**]

अट्टण न. व्यायाम, तालीम. Exercise.

[*IE*. Derte-no, √dere ; set in motion ;

सं. **अट्टनम्** (अर्धचंद्राकृतिधनुष्य); **अट्ट** (< **अत्त** ह्या शब्दाचा सं. **ऋति=युद्ध** ह्या शब्दाशीं संबद्ध असावा.)

Av. Derti = energy ; *Slav*. Vati, Battle ; सं. प्रा. **अड्ड् = गतौ, हिंसायाम् , प्रेरणे**, (**अड्ड्** to exert धातुपाठ ३७१,३८०), **अड्डण** = Shield ; द्रा. **ओदोनो.** परंतु हा शब्द संस्कृतोद्भव आहे. द्राविडोद्भव नाहीं.]

अट्टल वि. वस्ताद, तरबेज, बेरकी. Arrant, arch, throughgoing.

[कान. **अट** खेळणारा ; **सं. हट्टचौर** (बाजारांतील चोर) ह्या शब्दापासून वरील शब्द व्युत्पादितात. परंतु ही व्युत्पत्ति दूरान्वित दिसते. कानडी व्युत्पत्तिच ग्राह्य दिसते.]

अट्टाहास पुं. आग्रह, दुराग्रह, अत्याग्रह, निकर. A vehement action.

[सं. **अट्ट(ट्ट)हास** ; प्रा. **अट्ट(ट्ट)हास** ; अप. **अट्टहास पुष्कळ हसणें** (?) ; कानडी. **अट्ट** = उच्च, फार.]

अठळी स्त्री. फणस-खारीक वगैरेची बी. The seed-stone of a certain fruit.

[सं. **अस्थिन्, अष्टि, अष्ठि, अष्टिला** ; प्रा. अप. **अट्ठि, अट्ठिलिआ** ; का. **अड** (स्त्री) ; सिंह. **ॲट** ; अकाम. **अठी, अठोळी.**]

अठरा वि. संख्याविशेष. Eighteen.

[सं. **अष्टादशन्** ; प्रा. **अट्ठदह, अट्ठारस** ; अप. **अट्ठारह** ; हिं. **अठारह** ; पं. **अठारां** ; बं. **आठार** ; ओ. **अठर** ; गु. **अढार, अडार** ; सिं. **अडहं** ; का. **अर्दह** ; सिंह. **अटळोस.**]

अठव(णें) सक्रि. स्मरणें, ध्यानांत आणणें. To come to mind, to remember.

[सं. **आस्थापय** ; प्रा. **अट्ठावअ** ; अकाम. **आठव.**]

अठवडा आठवडा पहा.

[सं. **अष्टावर्त** (?) ; प्रा. **अट्ठवाड, अट्ठाह** ; हिं. **अठवाहा, आठवारा** ; गु. **अठवडो** ; सिं. **अठिडयो.**

हिंदी आणि सिंधी, गुजराती शब्दावरून वार, दिवस ह्यांपैकीं एखादा शब्द मूळांत असावा असें वाटतें. अष्टावर्त ही व्युत्पत्ति काल्पनिक दिसते.]

अठवरपणा पुं. आठ वर्षांचें वयोमान, उपवरपणा. The eighth year.

[सं. **अष्टवर्षत्व** ; प्रा. **अट्ठवरुसुण्ण, अट्ठवरप्पण** ; याकाम. **अठवरपणा** (शि. २०८).]

तेव्हळिं सडिवा फेडिला तुळसियेसी । अठवरपणाचा ॥ नरुस्व ३७२.

अठांगळें न. गर्भाधान हा संस्कार योग्य वेळीं न झाल्यामुळें गर्भाच्या आठव्या महिन्यांत करावयाचा संस्कार. A ceremony performed in the eighth month of pregnancy.

[सं. **अष्टमांगल्य.**]

अड(णें) अक्रि. थांबणें, थांबून राहणें, अडथळा होणें. To be stopped or detained.

[सं. **अट् १ गतौ** (?) ; प्रा. **अढ** = बांधणें; कान. **अड**–विरोध होणें, अडथळा होणें. कानडी व्युत्पत्ति सयुक्तिक वाटते. कारण अर्थसाम्य आहे.

अड् १ गतौ व **अन्तर्धा** असे दोन संस्कृत धातु मूळ देतात परंतु तेहि सयुक्तिक वाटत नाहींत.

याकाम. **अडणें** = आखडणें, निष्क्रिय होणें (नरुस्व ६८०).]

अड वि. अर्धा, आंतील, दुय्यम. Half, subsidiary.

[सं. अर्ध ; प्रा. जैन. अड्ढ ; गु. आड ; सिं. आढ= साधे ; का. अड ; सिंह. अड.

ह्या शब्दाशीं समन्वित इतर शब्द येऊन कांहीं सामासिक शब्द रूढ झाले आहेत. हा शब्द **संस्कृत अर्ध, अन्तर्** ह्या आर्य शब्दापासून सिद्ध होतो. ह्याचे उच्चार अड व आड असे दोन्ही केले जातात. उदा. १ अडघोडा, अडधोतर, अडकुटतें, अडपंचा, अडपाळ. २ आडकाम, आडकाठी, आडेलतट्टू आडमार्ग, आडरान, आडवळण.]

अडदर भय, घात. Danger, accident.

अडदांड दांडगा, अडमुठा. (< अट्ट + दंड). Strong, headstrong.

अडनाट नीट, बरोबर. (< अर्ध + नाट). Straight, right.

अडनांव उपनांव. (अड्डु + नांव). Surname.

अडफाटा विघ्न, अडथळा. Obstruction.

अडबाजार आठवड्याच्या मध्येंच भरणारा बाजार. An odd Bazar-day.

अडमाप खोटें माप. (< अन्तर् + माप). A false measure.

अडमुठा अडेल. (< अर्ध + मुग्धः). Headstrong.

अडहत्यार किरकोळ हत्यार, खंजीर, कट्यार इ. (अर्ध + हातियेर). A minor weapon.

' अड ' ह्या अवयवापुढें क, ख, खळ, चण, थळ, प, मड, व, स, सट इत्यादि शब्द येऊन निरनिराळे धातु सिद्ध होतात. त्याबाबतहि **अड** हा **अन्तर** किंवा **अर्ध** किंवा कानडी **अड्डु** ह्यापासून सिद्ध झालेला असा आहे.

अडक(णें) (< अन्तर्-अर्ध + गम्). सांपडणें, गुंतणें. To get involved.

अडख(णें) (< अन्तर् + ख्या). अडणें. To be obstructed.

अडखळ(णें) (< अन्तर् + स्खल्). अडणें.

अडचण(णें) (< अन्तर् + चण् किंवा चि + नु) संकटांत सापडणें, अडचणींत सापडणें. To be caught in a fix.

अडथळ(णें) (< अर्ध,-अन्तर् + स्थल) अडथळा उत्पन्न होणें. To be hampered.

अडप(णें) (< अन्तर् + पत् १ पतने) अडपझडप-अडपदडप करणें. To press.

अडमड(णें) (< अन्तर + मठ् १ मदनिवासयोः).

अडव(णें) (< अन्तर इ-२ गतौ. मार्गांत येणें).

अडस(णें) (< अन्तर + अस् ४ प्रक्षेपे) कानडी. अडसु = कोंबणें.) दाटणें, अडसमडस करणें. To get pressed.

अडसट(णें) (< अर्ध + सट्ट् १० हिंसायाम्) दाटणें.

अडका पुं. एक प्रकारचें नाण, अर्धा रुका, जमिनीचें माप. (६५ विघे जमीन). A copper coin, a land-measure.

[सं. अर्द्ध + रुका = अर्द्धक (श. को.) (?). अर्ध = कुत्सितार्थें ; अढा = अर्धा रुका.]

अडकित्ता पुं. सुपारी फोडण्याचें हत्यार (साधन). A (betel) nut-cracker.

[का. अडके-(सुपारी) ; कोइत्तसु = कापणें ; तुळ. इडकत्ति ; तेल. अडकत्तु.]

अडकी स्त्री. एक माप, आढकाचा अर्धा भाग. A measure.

[सं. आधक, आढक ; प्रा. आढय. अष्ट < अट्ठ याशीं संबद्ध आहे काय ? दक्षिण महाराष्ट्रांत ७ पौंड ११ औंस इतकें हें वजन आहे. चार प्रस्थ किंवा खरीचा सोळावा हिस्सा इतकें तें माप आहे.]

अडखळ(णें) अक्रि. ठेचाळणें, अडणें. To stumble.

[सं. अर्धस्खल् ; प्रा. अड्डुखळ ; किंवा अन्तः स्खल्.]

अडखुळा वि. भयभीत, भेदरलेला. Terror-stricken.

[सं. अन्तः स्खलितः, अर्धस्खलितः ; याकाम. अडखुला.

जेहीं अडखुले केले असुरः धाकुटेपणीं ॥ (नरुस्व २९२).]

अडगळ स्त्री. अडथळा करणारें-निरुपयोगी सामान. Lumber.

[कान. अड्डु + गळ. (?)]

अडगु(मडगु) स्त्री. घालमेल, गोंधळ, लपवाछपवी, आवड ; प्रेम. Confusion, deceit ; a liking.

[कान. अडगिसु लपविणें, दबून बसणें. अडगु = मिळणें, आवड.]

अडगुलें मडगुलें न. मुलांना खेळविण्याच्या गाण्यांत हा शब्द वापरतात. A term used in childlore.

[कान. **आट्ट = खेळ + कुळी (प्रत्यय) कर. मातु = भाषा.**]

¹अडण स्त्री. संकट. A hindrance.

[कान. **अड्डु**—अडवें (येणें); याकाम. **अडण** (उगी); शिकाम. धावसी आडणीं । ऐकोनिया धांवा ॥ तु. गा. ८६८]

²अडण स्त्री. सुपाऱ्या कांठाची कामटी. A slip of bamboo used in making a sifting fan.

[सं. **अटनी** (धनुष्याचें वर्तुलाकार टोंक); पा. **अटनी** (पलंगाची चौकट); गु. **आडणी** (पोळपाट).]

अडणा पुं. अडसर, दारांत आडवें घातलेलें लाकूड. A door-bar.

[कान. **अड्डु, अडने = आडवें.**]

अडणी स्त्री. शंखाची बैठक, टेका, आधार. Three legged stand.

[कान. **अड्डुणिगे**=तिवई ; याकाम. **अडणी** (ज्ञा. ११-६०) अडण पहा. ' शंख ' त्याचा अर्थ लक्षणेनें निर्बुद्ध असा झाल्यामुळें **अडणीवरचा** ह्या नुसत्या प्रयोगाला तोच अर्थ लक्षणेनें प्राप्त झाला आहे.]

अडत स्त्री. मालाच्या देवघेवीच्या व्यवहारांत मिळणारा मोबदला, मध्यस्थ. Commission.

[सं. **अट्ट**—बाजारहाट ; तेलु. **अडिती** ; सं. **आदधाति, अर्ध+स्था** (?); प्रा. **आडहति** ; प्रा. **आडहइ** ; **आड्डुह** ; कु. **आढत्**; बं. **आडत्** ; हिं. पं. **आढत.**

ह्या शब्दाबद्दल दोन तर्क संभवतात. एक तर मूळ शब्द संस्कृत असून तो द्राविडी भाषांत तद्भव म्हणून वापरतात किंवा मूळ अट्ट शब्द देशी असून त्याचें संस्कृतीकरण नंतर करून संस्कृतांत समाविष्ट केला.]

अडत्या अडत करणारा. A commission agent.

अडली पुं. हाताखालचा शिपाई. An orderly.

[इं. **आर्डर्ली.** हा इंग्रजी orderly ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. पोलिस व लष्करी अंमलदारांना एक सांगकाम्या शिपाई असतो. तो त्यांच्या तैनातीसाठीं असतो.]

अडव(णें) सक्रि. मार्ग रोखणें, जाऊं न देणें, विरोध करणें. To obstruct.

[सं. **१ अर्ध+वर्त्** ; **२ अड्** (वैदिक—**अड्नोति**) **३ अन्तर्+इ—गम्** ; कान. **अड्डुसु** ; म. **अडणें ह्याचें णिच् रूप.**]

अडवा वि. तिरपा, वाकडा, ' उभा ' ह्याच्या उलट. Horizontal, transversed.

[कान. **अड्डु** ; सं. दुसरी एक व्युत्पत्ति विचारणीय आहे. **अर्ध + ऋजु > अड्डु + उजु > अड + उ > अडवा.** परंतु कानडी मूळच अधिक निश्चित वाटतें.]

अडवें लहान फडकें, पंचा, लुगडें, पडदनी. (उ० अडवें लावून घेणें) A piece of cloth (worn slovenly).

[कान. **अरवे = कापड, कपडा** ; शिकाम. **आडवे** (दावि. १३५).

अडसेरी स्त्री. माप, वजन (अडीचशेर). A measure.

[म. **अडीच+शेर > अडशेरी > अडसेरी** ; अडीसरी, अडीच पहा. (अर्धतृतीय > अद्धतिज्जअ > अड्डुतिज्ज > अड्डीज्ज > अडीच)]

अडळ पुं. नांगराच्या रुमणीची खुंटी. A part of a plough.

अडळू पुं. पाठीराखा. A supporter.

[**अड+लावणें** (?) याकाम. **अडळू** (उ. गी.) **अडलाओ, अडलाव** असा उच्चारिला जात असे.]

" तूं धर्माचा कुढावा । तरि तेयांचा अडलाओ करावा ॥ " शिशु ४९१.

अडाखा पुं. ताळा, अनुमान, तर्क, मेळ. A method of proof in accounts, an estimate, a guess.

[सं. **१ अड + अंक. १ अति + आ + ख्या.** २ प्रकथने]

अडीच वि. संख्याविशेष, दोन आणि अर्धा. Two and a half.

[सं. **अर्धतृतीय** ; मा. **अड्ढाइज्ज**; अर्धमा. **अड्ढाइज्ज** ; पं. **ढाई**; सिं. **अढाई**; हिं. **अढाई**, बं. **अडाई.**

इतर भाषांतील रूपांत अन्त्यवर्ण तालव्य येत नाहीं. प्राकृत, अर्धमागधींत समासांत घोषवर्णच येतो. लक्षांत ठेवण्यासारखी गोष्ट ही कीं संस्कृत तृतीय पासून प्राकृतमध्यें **तइअ** असें होतें आणि त्यावरून वरील सर्व रूपांची व्युत्पत्ति बरोबर लागते. शिवाय अर्धमागधी **तच्च** हें रूप आहे. त्यापासून ' **तिच्च** ' असें रूप मानून मराठी व्युत्पत्ति लावतां येईल.]

अडुळसा पु. वनस्पतिविशेष. A kind of herb.

[सं. **अट्टरुष** ; प्रा. **अट्टलुस** ; हिं. **अडळूस, अडूसा** ; गु. **अरडुशो, अडुसी** ; रु. **आधातोदा.**]

अडू. पुं. आडवें लाकूड, पिंजऱ्यांतील आडवी दांडी, अडसर. A perch in a bird-cage.

[कान. **अड्डु** आडवें.]

अडोशीपडोशी. पुं. वि. शेजारी, जवळ आसपास राहणारा. A neighbour.
[सं. **अन्तर् वेशिक + प्रातिवेशिक. प्रा. पडवेसिअ ; हिं. पडोसी, अडोसपडोस ;** गु. **अडोसीपडोसी** आंत राहणारा, जवळ राहणारा. दोन्ही शब्द परस्पराचे प्रतियोगी आहेत. ध्वनिसाम्य तर दोहोंत आहेच.]

अड्डा खेळण्याची, जमण्याची जागा, एकत्र जमण्याचें स्थळ. A shed, an assembling place.
[कान. **अट्टसुः** खेळणें, **अड्डसु** = जमणें, **अड** = खेळ.]

अढळ(णें) अक्रि. स्थिर होणें ; भेटणें, दिसणें, सांपडणें. To be permanent; to see, to meet.
[सं. **अ+धृ** ४ अवस्रंसने, **अ. + ट्वल्** १ चलने ; प्रा. **ढल** = पडणें.]

अढाव पु. आडहत्यार बाळगणारा शिपाई. (सध्या मराठ्यांमध्यें हें एक उपनांव आहे.) One possessing minor weapons.
[म. **अढा = काठी. + उ** (मराठी प्रत्यय); बकाम. **आढाव** (रुस्व ६,५१)

अढावेढा पुं. अनमान, नापसंती. Evasive reasoning.
[कान. **अट्ट–हट्ट ; सं. वेष्ट.** >वेढ ; अकाम. आढेवेढे (अनेकवचनी प्रयोग)]

१अढी स्त्री. रास, ढीग. A heap.
[कान. **अडसु–कु**=ढीग करणें]

२अढी स्त्री. तेढ, दोरीचा वेढा, सुरकुती, (मनांतील अढी, कपाळावरील अढी.) A tangle, a wrinkle.
[कान. **अड्डु** = आडवें]

अढें न. घराच्या दोन पाख्यांमधील लाकूड, आडवा वासा. A ridge pole.
[कान. **अड, अड्डु.**]

अण् नकारार्थी शब्द. (शब्दाच्या आरंभीं येतो.) A negative prefix.
[सं. **अ, अन् ;** प्रा. **अण** (व्यंजनापूर्वी येणारा) गु. **अण् ;** सिं. **अण् ;** पं. **अण्** (अण्जान) ; हिं. **अन्जान** =अज्ञानी ; हिं. **अन्देखा ;** का. **अन्पर** (सं. **अपठित** = न पढलेला,) मराठी. **अणवाणी,** (**अन् + उपानह् अनवहाणी**), अनमोल, अनाठायीं.]

अणाडी पुं. शत्रु, वैरी ; जार. An enemy ; a lover.
[सं. (?); देप्रा. **अणाड** = जार, उपपति.]

अणखी–आणीक–आणखी वि. अधिक, जास्त. More.
[सं. **अन्यत् + क ;** प्रा. **आणिक्क ;** आणीख अणीकसा–विलक्षण, असाधारण. < अन्यत्क + स < सदृश.]

अणी स्त्री. टोकाची खिळी, चाकांतील कुणी. A pointed nail.
[सं. **अणि** (?) ; कान. **अणि, अने** = जोडणें = खिळा ; ता. **अणि** = खीळ.]

–अणकुची, अणकुचीदार. A point, a tip, pointed. (< अणि (?), अंकुश (?))

–अणिया अणीदार. Pointed.

–अणियाळें टोकाचें हत्यार. A pointed weapon.

अणीवाणी स्त्री. ऐन प्रसंग, निकडीची वेळ. A violent commotion of mind.
[म. **अणी + वाणी. < वाणी** (?). ध्वनिशब्द आहेत कीं काय ?]

अणु पुं. अगदीं सूक्ष्म भाग, कण. An atom.
[सं. **अणु ;**

–अणुआर बारीक चुरा. Bits, fragments.

–अणुमात्र अत्यंत थोडें, लहान. Exceedingly small.

–अणुरेणु बारीक कण. A minute particle.

–अणुवाद वेदान्तांतील एक वाद किंवा मत. अणूपासून उत्पत्ति मानणारें मत. The doctrine about an atom being the origin of Universe.

अण्णा आण्णा पुं. एक टोपण नांव, आदरार्थी संबोधनाचा शब्द. A term of respect for an elderly male.
[सं. **आत्मन्** (?) ; प्रा. **अण्ण ;** कान. **अण**–मोठा भाऊ ; तेलगु. **अन्ना** = वडील भाऊ. मोठ्या भावाला उद्देशून हा शब्द वापरतात.]

अण्णु वि. स्थूल, मोठा. Bulky.
[सं. **अन् + अणु ;** याकाम. **अण्णु.**]
अस्थूलु मी अण्णू। जें काहिं ते मीं ॥ ज्ञा. १८–११९१.

अण्ड न. वृषण, जननेंद्रियाजवळील ग्रंथी, शुक्रग्रंथी. A testicle.

[सं. **अण्डम्** ; प्रा. **अंड** ; गु. **अंड** ; हिं. पं. का. **आंड**; सिं. **आनो** ; बं. ओ. **आंडा.**

मराठी अण्डें आणि अण्ड असे दोन शब्द आहेत. दोन्ही नपूं. आहेत. ही शुक्रग्रंथी असल्यामुळें पुरुषत्वाचें चिन्ह समजतात. **मांड्या** ठोकणें (बलदर्शक) हें एक प्रकारचें शुक्रग्रंथिप्रदर्शनच आहे. मांडी म्हणजे त्याच्या निकटवर्ती अवयव होय.

अण्डील बैल. अण्डांत गडी असणें, अण्डें देणें, अण्डें गळणें, अण्डांत गडी घेणें वगैरे खेळांतील प्रयोग आहेत.

ह्यावरून पुष्कळ लाक्षणिक प्रयोग रूढ झाले आहेत.

अंडाखालीं खाजविणें–खुशामत करणें. –स लोणी लावणें. **अंड म्हणतां उंबर कळेना**–मूर्ख, अडाणी असणें. **अंडमळणी, अंडपंचा, अंडांतील गडी, अंडीं पिल्लीं**–गुप्त गोष्टी. **अडील अंडीर**–वीर्यवान्.]

अंडोर पुं. मुलगा. A boy.

[सं. **अंडज** ; प्रा. **अंडाउय, अंडाउर** ; ‘ **र** ’ हा संस्कृतमधून आला. (सं. **अंडीर** = वीर्यवान.) खानदेशी. **अंडोर, अंडेर**–मुलगी.]

अतताई–आतताई–यी वि. त्रागा करणारा, अविचारी, अत्याग्रही. A desperado.

[सं. **आततायिन्.**]

अतार आतार पुं. सुगंधी अत्तरें विकणारा, नाडापुडी विकणारा, गन्धी. A perfumer.

[अर. **इत्र** ; फा. **अत्तार–री** ; अकाम. **अतार, आतार.**]

अति उपसर्ग. फार, पुष्कळ. Too much.

[*IE.* Ati At, Et = पुढें, अधिक ; सं. **अति.** (√अत्); *Lat.* at, et ; *Av.* aiti ; *Arm.* ati ; *Idg.* √eti ; पा. प्रा. **अति,** *NIA.* **अति.**

–अतिइच्छा अधिक इच्छा. Great greediness.

–अतिक्रम-णें मर्यादा उल्लंघन करणें, मर्यादेच्या पलीकडे जाणें. To transgress.

–अतिचौकस फार चौकस. Over-inquisitive.

–अतितृष्णा फार इच्छा. An excessive desire.

–अतिमनुष्य अतिमानव, मानवांच्या वरील कोटींतील. A super-man.

–अतिरथी महारथी मोठे योद्धे. Great warriors.

–अतिरिक्त फार, अमर्याद. (< **अति + रिक्त** (निष्ठा) √**रिच्**). Beyond limits.

–अतिरेक अतिशय. Excess.

–अतिविष औषधिविशेष. A medicinal herb.

–अतिशय पुष्कळ, बाहुल्य. (√**अति + शी अतिशयित, अतिशयोक्ति** अलंकारविशेष). Excess.

–अतिशहाणा फार शहाणा. Overwise.

–अतिसार रोगविशेष. Dysentery.

–अतिसोस अतिशय इच्छा. An excessive thirst.

–अतींद्रिय इंद्रियास आकलन न होणारा. Not within the grasp of the senses.

–अतीत गेलेला, झालेला. (√**अति + इत – निष्ठा इ.**) Gone, parted.

–अतूट अभंग, घट्ट, समृद्ध, अखंड. (**अ + त्रुट्**) Whole, complete.

–अत्यंत अतिशय, फाजील. (**अति अंत**–शेवट मर्यादा) Extreme, excessive.

–अत्यंताभाव पूर्ण अभाव. (**अति + अन्त + अभाव**) Non-existence.

–अत्यय शेवट, नाश. (**अति + इ २–गतौ**) Ruin, end.

–अत्यर्थ पुष्कळ. (**अति + अर्थ < ऋच्छति एनम्**) Extreme.

–अत्यवस्था मरणोन्मुख अवस्था. (**अति + अवस्था –अव + स्था**). The last stage.

–अत्याचार बलात्कार. (**अति + आचार < आ + चर्**) A great harassing.

–अत्याग्रह फार आग्रह. Extreme pressure.

–अत्यादर फार आदर. Great respect.

अतीत (अभ्यागत) पुं. पाहुणा. A stranger, a guest.

[सं. **अतिथि** (ह्याचा अपभ्रष्ट संक्षेप.) अतति सातत्येन गच्छति. किंवा अ+तिथि = ज्याच्या येण्याची नक्की तिथि सांगतां येत नाहीं असा, एकदम येणारा.]

अतोनात वि. पुष्कळ, बहुत, अतिशय. Excessive.

[सं. **अतः + नास्ति.** (?)]

अतौत,-ता-तें श. अ. आंत, मध्यें. Inside, into.
[सं. **अन्तस्+अन्तः, आंत+आंत** ; याकाम. **अंतोतें** ; अकाम. **आंत.** तेथें कृष्णजळा अतौत ॥ निगा ४५.]

अत्तर न. सुवासिक अर्क (फुलांचा). Attar.
[अर. **इत्र = सुगंध.**
नूरजहाननें प्रथम गुलाब अत्तर शोधून काढलें असें म्हणतात. तिचें जहांगीरशीं लग्न झाल्याच्या सुमुहूर्तापासून तिनें आपल्या वाड्यांत एक लहानशी कुल्या करून ठेविली. तिच्यांत रोज गुलाबाचीं फुलें टाकीत. सकाळीं तवंग आला कीं त्याला फार घमघमाट सुटे. मग तो गोळा करीत. नूरजहान तेंच अत्तर वापरी. त्याला इत्र-इ-जहांगिरी म्हणत. (इत्र+दान्) अत्तरदाणी-अत्तराचे दिवे जाळणें (लक्षणा-उथळपट्टी).]

अत्ता पुं. वडीलधाऱ्या स्त्रियांसंबंधीं आदरार्थी संबोधन. A term of respect used of elderly women.
[*IE.* atta (father, mother); *Gr.* Atta; *Lat.* atta ; *Got.* att (father). *Alb.* at.
मराठींतील ‘ आत्या ’ (वडिलांची बहीण) ह्या शब्दाशीं वरील शब्दाचा संबंध आहे.]

अत्यंत(णें) अक्रि. शेवट होणें, मरणें. To die.
[सं. **अति+अन्त** (ना. धा.) ; याकाम. **अत्यंतणें**]
एथ भूतें जियें अत्यंतलीं । तियें मीचि होऊनी ठेलीं । आणि वर्ततें आथि जालीं । तें हीं मीं चि. ॥ ज्ञा. ७·१५७.

अथ आरंभदर्शक अव्यय, येथून पुढें, नंतर. A term used at commencement, hence forth.
[सं. **अथ;** ह्याचा प्रतियोगी शब्द **इति**-अन्तदर्शक अव्यय.]

-अथवा-अगर, किंवा (सं. **अथ+वा**). Gr.

अथर्व पुं. चौथा वेद. The fourth Veda.
[*IE.* āt; *Av.* athravā <ātars; *Arm.* airem; *Lat.* Atella Ariue.
[सं. **अथर्वन्. झें. अथ्रार.**

-अथर्वा पुं. होता. यज्ञामध्यें अथर्ववेदांतील मंत्र म्हणणारा. A priest of the fourth Veda.

-अथर्वण पुं. अथर्ववेदी ब्राह्मण, अथर्ववेद मानणारा ब्राह्मण. An 'Atharva Brahmin.

अथांग वि. थांग लागत नाहीं असा. Unfathomable.
[सं. **अथ+अंग.** अंक√अंच् १ गतौ]

अथांव वि. ठाव न लागणारा. Unfathomable.
[सं. **अ+स्थापय्** ; याकाम. **अथाव** (ज्ञा ८-६५); वकाम. **अथाव** (ए. भा. ५-२९८); अकाम. **अ+ठाव.**

अथिला वि. असलेला, समर्थ, योग्य. That which is existent, able, proper.
[सं. **अस्ति √अस्** ; प्रा. **अत्थि+ल** ; जुन्या काव्यांत हें रूप येतें.]

अद वि. अर्धा. A half.
[सं. **अर्ध** ; प्रा. **अद्ध** ; पं. **अद** ; हिं. **अद, आद, आधा** ; गु. **अद-अध.**]

-अदपाव अर्धापाव, अर्धा पावशेर. An eighth of a seer.

-अदशेर अच्छेर (< अर्धा+शेर.) Half a seer.

-अदमण अर्धामण. Half a maund.

अदट वि. अतुलपराक्रमी. Very brave.
[कान. **अदटु=सामर्थ्यवान** ; याकाम. **अदट** ; (उ. गी.); हा शब्द **अ(=अति)+दृढ** ; प्रा. **दळ** ह्या शब्दापासून व्युत्पादिणें शक्य आहे. व त्याचा अर्थ दृढ निश्चल असा झाला आहे.]

अदबी स्त्री. मान, आदर, नम्रता, विनय, प्रतिष्ठा. Respect, regard.
[अर. **अदब्-आदर,** मान राखणें ; शिकाम. **अदब राखणें**-चालविणें. (सभासद ३७, चित्रगुप्त ५७.)]

-अदबशीर मान राखणारा. Respectful.

अदमुरें न. पूर्ण न गोठलेलें दूध, अर्धें मुरलेलें दहीं, न विरजलेलें दहीं. Half-coagulated curds.
[मराठी. **अद+मुर(णें)**; सं. **अर्ध+√मूर्च्छ्** १ संस्त्याने; याकाम. **अधमुरें** (=अर्धवट मुरलेलें-विरजलेलें).]
जैसे दुध होय अधमुरी । तैसें संपुष्टाचा उदरीं ॥ नरुस्व ५५५

अदला बदल स्त्री. परस्पर देवघेव, फेरफार, ह्याचें त्याला व त्याचें ह्याला असा प्रकार. Exchange, interchange.
[सं. **अति+रा २ दाने+व्यति+रा** (राज. धा)
परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. बदल् हा अरबी शब्द आहे. व त्याचा अर्थ ‘ ऐवजीं ’ असा आहे. त्याची द्विरुक्ति होऊन अदलाबदल असा झाला असावा.]

अदळ(णें) उक्रि. आपटणें, अधाशीपणानें खाणें. To strike, to fling, to eat voraciously.

[सं. **आ + दल्** किंवा **द. अद् + ल** (स्वार्थे) भाअ १८३४ राज.)

आदळ आपट-आपटाआपट. (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द.) **अदळ**-झीज हे शब्द वरील शब्दापासून सिद्ध आहेत.]

अदखणा वि. कुरूप, देखणा नसलेला. Ugly, deformed.

[सं. **अदर्शनीयः ; प्रा. अदक्खण** ; शिकाम. **आदखणा** (दा. २-३-२८).]

अदा लाभ, नफा, फेड, आदा पहा. Profit, repaying.

[अर. **आइदा. अदा** = फेड ; पेकाम. **अदा** (दिमरा. १–२१४) ; अकाम. **आदा.**]

अदालत स्त्री. न्यायसभा, न्यायमंदिर. A court of law.

[अर. **अदूल्–न्याय करणें** ; हिं. **अदालत >अदालत्**– न्याय करण्याची जागा.

मुसलमानी अमदानींत चार न्यायसभा असत. १ निजामत अदालत, २ दिवाणी अदालत, ३ फौजदारी अदालत, ४ अदालत उल् काजी. ह्यांच्याकडे अनुक्रमें सेशन्स, मुलकी दिवाणी, पोलीस व धार्मिक खटले असत. ह्या सर्वांपेक्षां अधिक अशी सदर अदालत म्हणून न्यायसभा असे.]

अदावत स्त्री. वैर, गाऱ्हाणें, खोटा आरोप. Enmity, a false accusation.

[अर. **अदावत = वैर.**]

अदुभणी स्त्री. दोहली न जाणारी. A dry cattle.

[सं. **दुह् = दोहने ; दुभ्** हें रूप प्राचीन असलें पाहिजे. त्यापासून दुभतें, दुभणी दुभती हे शब्द आले. याकाम. **अदुभणी, अदुहन.**]

चांदिणेयाचा पाण्हावनी । चंद्रकान्त दुभती अदुभणीं ॥ नरुस्व ५६९.

अद्भुत वि. अपूर्व, आश्चर्यकारक. Strange, marvellous.

[सं. **अद्भूतम्√भू**–निष्ठारूप. उणादि (४–६–८९) ; **अद्** १ आश्चर्ये].

अध वि. अर्धा शब्दाचा संक्षेप. A half.

[सं. **अर्द्ध शब्दाचा संक्षेप ; प्रा. अद्ध.** ह्या शब्दाचे दोन संक्षेप मराठींत रूढ आहेत एक **अध, अद** व दुसरा **अड, आड.** हे दोन्ही सामासिक शब्दाच्या आरंभीं येतात. अद पहा.]

अधपलिप(णें) क्रि. अर्धे पोळणें. To be half-scorched.

[सं. **अर्ध + प्र + लिप्** ६ दाहे उपदेहे ; याकाम. मध्येंच हा धातु वापरलेला आढळतो.]

अधला वि. पहिला, प्रथमचा, अगोदरचा. The first.

[सं. **आदि, आद्य, आदिम** ; प्रा. **ल, इल्ल प्रत्यय.**]

–अधला मधला मध्येंच उत्पन्न होणारा, मधील. Of the places or parts about the middle.

–अधलंड मधलंड मध्यें घुटमळणारा, लुडबुडणारा. Of neither side.

–अधींमधीं कोठेंतरी, मध्यें कोठेंतरी. About the middle.

–अध्यांत मध्यांत एखाद्या गोष्टींत संबंध येणें. (आदि+मध्यें) Getting involved in.

–अधीलपण पहिलेपणा, श्रेष्ठत्व. (आदिलपण), Priority.

अधः अव्यय. खालीं. Beneath.

[*IE*. **अंधः, नूधः, अ–धः** ; सं. **अ-धः, अध-रः, अध-मः** ; *Av*. अधर ; *Lat*. Inferus ; *Teu*. und, undan ; *Got*. undar ; *OHG*. untair, undar ; *As*. under. *S*. odh, adh.]

–अधःपतन–अधःपात खालीं पडणें, नाश. Falling down. (< **अधः + पत् १ पतने**)

–अधःस्तळ खालीं–खालचा तळ, खालची जागा. The place down below.

–अधांतर मध्यें. (< **अधः + अन्तर.**) In the mid-space.

–अरधैंते–खालचावरती (सं. **अधः + वरैंते–वरती ; अधः + उपरि** ; प्रा. **उवरि**). Up-side down.

–अधम नीच, हलकट (**अधः + म. < तम**) Low, mean.

–अधर खालचा, खालचा ओंठ. (**अधः+र. < तर**) Lower, the lower lip.

–अधोगत खालच्या नीच अवस्थेस गेलेला. Gone down.

–अधोगमन खालीं जाणें, अवनति, कमीपणा होणें. (अधः गमन < गम्.) Obscurity, disgrace.

-अधोगामी खालीं, वाईट मार्गानें जाणारा. Going astray.

-अधोद्वार खालचें द्वार-उपस्थ. The anus.

-अधोमुख-अधोवदन खालीं तोंड केलेला. With face downwards.

अधि उप. अधिक, वर, ह्या अर्थी. A prefix meaning over, above.

अधष्ठ(णें) सक्रि. अवलंब करणें. To depend upon.
[सं. **अधि+स्था १**]

अधाशी वि. फार खाणारा. Voracious.
[सं. **१ आ + धे** (= पिणें) + **अश्**, **२ अधि + आशी** √अश् ९ अदने.]

-अधिकरण स्थान, ठिकाण, भूमिका. Location, place. (**अधि + करण <कृ**)

-अधिकार सत्ता (**अधि + कृ.** अधिक करणें, जास्त करणें म्हणजे प्रभुत्व गाजविणें.) Power, authority.
[अद्कार असा एक शब्द त्याच अर्थी आहे तो फा. आहे.]

-अधिराज श्रेष्ठ राजा. An emperor. (**अधि + राजन्**)

-अधिवास राहणें, वस्तीचें स्थान. An abode. (**अधि + वस्**)

-अधिरोहण चढून बसणें. To ascend. (**अधि + रुह्**)

-अधिवेशन सभेची बैठक. A session. (**अधि + विश्**)

-अधिष्ठित बसलेला, स्थापलेला. Placed. (**अधि+स्था**)

-अधिक्षेप तिटकारा, निंदा. Abuse. (**अधि + क्षिप्**)

-अधीत शिकलेला. Learned. (**अधि + इ**)

-अध्यग्नि अग्नीसमोर दिलेलें, अग्निसंबंधी. In presence of fire. (**अधि + अग्नि**)

-अध्ययन अभ्यास, पठण. A study. (**अधि + इ**)

-अध्यवसाय दीर्घ प्रयत्न. Perseverance. (**अधि + अव + सो ४**)

-अध्यस्त अध्यास केलेला. Ascribed, believed. (**अधि + अस्त**)

-अध्यक्ष मुख्य नियंता. President. (**अधि + अक्षिन्**)

-अध्यात्म आत्म्यासंबंधीं (वेदान्तांतील मत). Spiritualism. (**अधि + आत्मन्**)

-अध्याय खंड, परिच्छेद (**अधि + इ**). A chapter.

^{१}**अधिक** वि. पुष्कळ जास्त. More, greater.
[सं. **अधिक.**]

^{२}**अधिक** ना. अधिक येणारा महिना. An intercalary month of the Lunar year.

-अधिकाई विपुलता. Plenty.

-अधिकाधिक जास्त. More & more.

-अधिकोत्तर विशेष. Something special.
[अधिक आणि उत्तर हे दोन्ही शब्द जास्त अर्थाचे.]

अधीन वि. ताब्यांतील, वश. Subject to, dependent on.
[सं. **अधीन, इनं प्रभुमधिगतः.**]

अदू, अधू वि. व्यंग असलेला, दुखावलेला किंवा लुला अवयव. Defective, deformed, an injured limb.
[सं. **अर्ध** (?) व्युत्पत्ति पटत नाहीं.]

^{१}**अधेला** पुं. एक नाणें, पैशाचा अर्धा. (खानदेशांत पैसा म्हणजे दुंडा पैसा; तेव्हां तेथें अधेला म्हणजे पुण्याकडील एक पैसा) A coin.
[सं. **अर्ध+ल** ; हिं. **अधेला.**
' ल ' हा प्रत्यय स्वार्थे लागतो. अर्धल असाहि शब्द रूढ आहे. त्याचा अर्थ अर्ध्या वाट्यावर जमीन करणारा शेतकरी-वांटेकरी]

^{२}**अधेला** पुं. वाणी ह्या नांवाचा कीटकविशेष.

अधेली स्त्री. अर्धा रुपया, चांदीचें नाणें. Half a Rupee.
[म. **अधेला**, स्त्री. **अधेली = अधोली.** सागर व दक्षिण महाराष्ट्रांत दोन शेर कैलीमाप. गढवाल भाषेंत **अधेली** म्हणून जमीन मोजण्याचें एक मापन आहे.]

अन नकार, अभावदर्शक शब्द. Prefix of negation.
[अन हा **अन्य** अथवा **आणि, आणखी** ह्यांचा संक्षेप म्हणून अर्वाचीन मराठींत रूढ आहे.
सं. **अन्य** ; *E.Slav.* onu; *Lit.* ans, antras; *Teut. Got.* anthar; *E. H. Ger.* an-dher.]

-अनंग अंगरहित मदन. God of Love, Cupid. (अन् + अंग)

-अनघड न घडलेला. Unformed. (अन् + घड)

-अनंत अन्त नसलेला; नागराज. Having no end; King of Snakes. [(अन् + अन्त)

नागाचें एक नांव, नागराज. त्याच्या आदरार्थ एक व्रत सांगितलें आहे. त्यास अनन्त व्रत म्हणतात. त्याचा अपभ्रष्ट उच्चार '**अनन्तृत**' असा आहे. नागाचें प्रतीक म्हणून जो रेशमी गोफ असतो त्याला नागाचा आकार दिल्यामुळें त्याला '**अनंत**' म्हणतात. दुसरा धाकटा गोफ असतो त्याला नागाची पत्नी समजतात. त्याला **अनन्ती** म्हणतात.]

-अनमान मानाचा अभाव. Disregard. (अन्यः मानः)

-अनमार्ग वाईट मार्ग, दुसरा मार्ग. A crooked way. (अन्यः मार्गः)

-अनमोल बिनमोल, किंमतीशिवाय. Worthless, invaluable. (अन्यत् मूल्यम्)

-अनराहाटी गैर वागणूक. Misbehaviour.

-अनसरसा-अनसारखा नेहमींच्या प्रकाराशिवाय भिन्न. Unusual.

-अनाठायीं अयोग्य ठिकाणीं. In a wrong place. (सप्तमींत रूढ; अन्य + स्थान; प्रा. अण्ण-ट्ठाण.)

-अनान निरनिराळा, वेगवेगळा. Different. (अन्य + अन्य).

-अनीकसा—भिन्न (अन्यत्क सदृश) Different.

-अनत्याचारी सात्त्विक, अत्याचाराशिवाय. Non-violent. (अन् + अति + आ + चर्)

-अनधिकार अधिकार नसलेला. Destitute of title. (अन् + अधि + कृ)

-अनधिगत माहीत नसलेला, पठण न केलेला. Without any study (अन् + अधि + गम्)

-अनधीत न वाचलेला. Who has not read. (अन् + अधि + इ)

-अनध्याय सुट्टी, पाठ न घ्यावयाचा दिवस. Suspension of study. (अन् + अधि + आ + इ)

--अनन्य तोच, एकरूप. Identical. (अन्+अन्य)

-अनन्वय विसंगतपणा. Incongruity. (अन् + अनु + इ, अय्)

-अनपाय अपाय न करणारा. Unharmful. (अन् + अप + इ)

-अनपेक्षित एकदम, अकल्पित. Unexpected (अन् + अप + ईक्ष्)

-अनबुज अडाणी, न समजणारा. Ignorant. [अन् + अबुज < बुध्य. प्रा. बुज्झ. हा शब्द चुकीनें वापरलेला आढळतो.]

-अनभिज्ञ अजाण, परिचित नसलेला. Unknowing. (अन् + अभि + ज्ञा)

-अनभ्यस्त सराव नसलेला. Unaccustomed. (अन् + अभि + अस्त)

-अनर्गल-ळ स्वैर, बंधनाशिवाय. Unhampered. (अन् + अर्गल)

-अनर्थ संकट, अर्थाशिवाय. A calamity. (अन् + अर्थ)

-अनवकाश अवकाश-जागा-वेळ नसलेला. Crowded. [अन् + अव + काश्]

-अनवधान लक्ष नसणें. Inattention. (अन् + अव + धा)

-अनवसर अवसर-वेळ-फुरसत नसलेला Without leisure. (अन् + अवसर)

-अनवस्था अव्यवस्था. Disorder. (अन् + अवस्था < अव + स्था)

-अनवाणी पायांत कांहीं पादत्राण नसलेला. उघड्या पायांनीं चालणारा. Barefooted, without shoes. [अन् + उपानह-प्रा. उवानह-वहाणा-वाण.]

-अनसूट वि. उष्टा न केलेला, न उपभोगलेला. Untasted. (अन् + उच्छिष्ट < उत् + शिष्)

-अनागत वि. न आलेला म्हणजे पुढें येणारा, भावी. That is to come. (अन् + आगत-निष्ठा-गम्)

-अनात्मा जडस्वरूप. Soul-less. (अन् + आत्मन्)

-अनाद्यनंत आदि, अंत नसलेलें (परब्रह्म). That which has neither beginning nor end. (अन् + आदि + अन् + अन्त)

-अनायास श्रमांशिवाय. Without an effort. (अन्+ आ + यास < यस्).

-अनारब्ध न आरंभिलेलें. Not begun. (अन् + आ + रब्ध–निष्टा 'रभ्'ची)

-अनार्य आर्य नसलेले. Non-Aryan. (अन् + आर्य < ऋ १ गतौ)

-अनावड आवड नसलेली. Dislike. (मरा. अन् + आवड. < आ + वृत्)

-अनावरण आवरण–झांकण काढणें. Opening, unveiling. (अन् + आ + वृ)

-अनावृत उघडलेलें, उघडें केलेलें. Opened, unveiled. (अन् + आ + वृ)

-अनावृष्टि पाऊस नसलेली स्थिति. Drought. (अन् + आ + वृष्)

-अनास्था हेळसांड. Indifference. (अन् + आस्था < आ + स्था)

-अनाहत योगशास्त्रांतील षट्चक्रांपैकीं एक चक्र. A yogic term.

-अनिच्छा इच्छा नसणें. Absence of desire. (अन् + इच्छा < इष्)

-अनिष्ट नापसंत, इष्ट नसलेलें. Undesirable, unpleasant. (अन् + इष्ट < इष्)

-अनीश्वरवाद ईश्वर नाहीं असें मत. Atheism. [अन् + ईश्वर + वाद]

-अनुघड झाकण, आच्छादन. A cover, a veil. (मरा. अन् + उघड < सं. उत् + घट्; प्रा. उघट)

-अनुच्चारित न उच्चारलेला. Silent, unprounced. (अन् + उच्चार < उत् + चर्)

-अनुच्छिष्ट उष्टें नसलेलें. Untasted. (अन् + उच्छिष्ट)

-अनुत्पन्न उत्पन्न न झालेलें. Not created. (अन् + उत्पन्न. निष्टा–उत् + पद् ४)

-अनुपकारी उपकार न जाणणारा. Ungrateful. (अन् + उप + कृ-णिच्)

-अनुपत उत्पन्नाचा अभाव. Absense of income. (अन् + उपद् < उत् + पद् ४; प्रा. उप्पद)

-अनुपम उपमा नसलेला. Incomparable. (अन् + उप + मा)

-अनुपस्थित गैरहजर असलेला. Absent. (अन् + उप + स्थित)

-अनुपेग निरुपयोगी. Useless. (अन् + उप + युज् ७)

-अनूप उपमा नसलेला, निरुपम. Incomparable. (अन + उपमा-संक्षेप)

-अनृण कर्ज नसलेला–फेडलेला. Free from debt. (अन् + ऋण)

-अनेक-अनेग पुष्कळ, एकापेक्षां अधिक. Many, not one. (अन् + एक)

-अनोळख ओळख नसलेला. Unacquainted. (म. अन् + ओळख < अव + लक्ष्)

-अनौरस औरस नसलेला. Illegitimate. (अन् + औरस < उरस्)

अनतोख(णें) सक्रि. संतोषणें. To be contented.
[सं. अनु + तुष् ४, ६, < तुष्टौ णिच्; याकाम. अनतोख.]

जिम्न भरलेयां उणें। तें पाणी ढळों चि नेणे। तेवि अनतोखोनि जाणे। सामोरे यां। ज्ञा. १६·१५७.

अनंद न. घासून स्वच्छ करण्याचें साधन. A cleanser.
[याकाम. अनंद. (उ. गी.)]

अननस पुं. फलविशेष. A pine apple.
[हा शब्द ब्राझील भाषेंतील आहे. पेरू भाषेंतील नव्हे. **गुरानी** भाषेंत नाव **नांव 'नाना'**, Nana, nanas असें असून त्याच्या फळाचें नांव '**अनाना**' असें आहे. लाप्लाटी भाषेंत झाड व फळ ह्या दोहोंना '**अनाना**' पुं. असेंच म्हणतात. पेरू भाषेंत त्या फळाला '**अचुपल्ल**' असें म्हणतात. ब्राझील भाषेंतील शब्द ज्या वेळीं स्पॅनिश भाषेंत गेला तेव्हां तो '**अननस**' झाला. पोर्तुगीज भाषेंत ananas, Ananaz असा आहे. मराठींत जो शब्द आला तो पोर्तु. भाषेंतून इ. स. १६१० ते १६६५ च्या दरम्यान आला असावा.]

अनल-ळ पुं. अग्नि. Fire.
[सं. अनल.

IE. an ; सं. अन् २ श्वसने. > अनल, अनिल, अन, आन, आननम्. *Av.* antya (parantya); *Lat.* (animus, anal.)

अनवा वि. उत्तम तऱ्हेचा, विशेष प्रकारचा. Precious, new.
[अर. अन्वा = तऱ्हा, प्रकार]

अनशे(पोटी) वि. कांहीं न खाल्लेलें. With empty stomach.

[सं. **अनशित** (निष्ठा √ **अश्** ९ भोगे) ; प्रा. **अणसिय.**]

अनशुद्द, अनसूद स्त्री. भातावर तूप घेणें. Ghee served with rice.

[सं. **अन्नशुद्धि ;** हिं. **अन ;** सिं. **अन** (धान्य) ; का. **अन** (खाणें) ; सिंह. **अन्** (अन्न).]

अनागोंदी वि. अव्यवस्थित–पोकळ (कारभार.) Disorderly business.

[कान. **अन = हत्ती. गोंदी = गल्ली.**

अनागोंदी हें एक कर्नाटकांतील गांवाचें नांव. तें पूर्वी विजयनगरच्या हिंदु साम्राज्याच्या राजधानीचें शहर होतें. तेथील राजाचा जमाखर्च–जो सणादिवशीं पूजा करावयाचा तो–भरमसाट अशा कल्पित रकमांचा केलेला असे. जमाखर्चांचे आंकडे बरेच फुगविलेले असत. त्यावरून पोकळ जमाखर्चाला–कारभाराला–हा शब्द रूढ झाला. असे पोकळ जमाखर्च पूर्वीं पुष्कळ दरबारांत करीत असत. पेशवे दप्तरांतहि असे पोकळ जमाखर्चांचे कागद सांपडले आहेत.]

अनाजीपंताचा धारा जमिनीचा कर घेण्याचा एक विशिष्ट प्रकार–जो शिवाजीच्या अनाजी दत्तो ह्या सचिवानें सुरू केला तो. A term used in land revenue.

[निरानिराळ्या काळांत जमिनीची पाहणी करून तिचा मगदूर पाहून आकार ठरवीत असत. एकदा अकबराच्या कारकीर्दींत जी पाहणी झाली ती ऐनी अकबरींत निर्दिष्ट आहे. दुसरी शहाजहानच्या कारकीर्दींत झाली. तिसरी मलिकंबरनें केली. ती मलिकंबरी तरमबंदी म्हणून प्रसिद्ध आहे. पुढें दादाजी कोंडदेवानें केली. नंतर–बाळाजी विश्वनाथ–रामचंद्रबाबा शेणवी–नाना फडणीस–एल्फिन्स्टन्–अशी नांवें ह्याबाबत प्रसिद्ध आहेत.]

अनामत वि. विश्वासानें ठेविलेली रक्कम, आगाऊ खर्चासाठीं दिलेली रक्कम. A deposit, not brought to regular account.

[अर. **अमानत**–(वर्णविपर्यय) **अनामत.**]

अनियाळपण न. तीक्ष्णता, तिखटपणा. Sharpness.

[सं. **अणु ;** कान. **अणी,** = खिळा. **अणकुचीदार.** याकाम. **अनियाळपण** (उ. गी ३६५, शि. ७१०)]

पांतां दिठीचें अनियाळपण : कमळदळें होति साधारण ॥
नरुस्व ९२.

अनीना पुं. लगाम. The reins.

[सं. **अन्** २ श्वसने (?) ; अर. **इनान्**=लगाम. हीच व्युत्पत्ति ग्राह्य आहे. **अनीन कण्ठरज्जुः** रा. व्य. श्लो. १५४ पैकाम. **अनिना** (पाव ४५)]

अनु उपसर्ग. पश्चात्, मागें, पाठीमागून ह्या अर्थाचा उपसर्ग. A prefix meaning after, similar.

[सं. **अनु.** *Av.* Anu; *Ap.* Anuv.]

–अनुकंपा दया. Compassion, pity. (**अनु + कंप्.** एक दुःखानें कांपू लागला म्हणजे त्याच्या दुःखानें व्यथित होऊन दुसऱ्याची कंप होण्याची क्रिया.)

–अनुकरण दुसऱ्यासारखें वागणें–करणें. Imitation.

–अनुकूल-ळ आपल्या बाजूचा, फायदेशीर (प्रतियोगी शब्द–प्रतिकूल). Favourable. (**अनु + कूल**)

–अनुक्त न उच्चारिलेला, धर्मांत न लिहिलेला. Not spoken. (**अन् + उक्त** √वच्)

–अनुक्रम–अनुक्रमणिका एकामागून दुसरें अशी रांग, विषयांची–धड्यांची यादी. Order, succession, contents. (**अनु + क्रम**)

–अनुगमन एखाद्याच्या मागें जाणें; सती जाणें Following, self-immolation of a widow. (**अनु + गमन**)

–अनुग्रह उपकार, दया. Favour, kindness. (**अनु + ग्रह**)

–अनुचर सेवक, मागें जाणारा. A servant, a follower. (**अनु + चर**)

–अनुताप पश्चात्ताप. Repentance. (**अनु + तप–अकच्**)

–अनुनय विनंती, आराधना. Courting, cajoling. (**अनु + नी**)

–अनुनासिक नाकांतून उच्चारला जाणारा. A nasal. (**अनु + नासिक**)

–अनुपान औषधाबरोबर पाळावयाचें पथ्य. A liquid vehicle (in medicine). (**अनु + पान**)

–अनुप्रास एकच वर्ण किंवा वर्णसमुच्चय पुनः पुनः येऊन होणारा शब्दालंकार. Alliteration. (**अनु + प्र + आ + अस् ४**)

–अनुबंध बंधन, व्याकरणांतील एक खूण. A fetter, a root, an affix. (**अनु + बंध्**)

-अनुभव प्रचीति, मिळविलेलें ज्ञान. Experience. (अनु + भू)

-अनुभाव योग्यता, आविर्भाव. Dignity. (अनु + भू)

-अनुमत, अनुमति संमत, संमति. Approval. (अनु + मत √मन्–निष्ठा)

-अनुमान तर्क. Inference. (अनु + मा ३)

-अनुमोदन संमति, दुजोरा. Consent. (अनु + मुद्)

-अनुयायी नोकर, मागून येणारा. A follower, a servant. (अनु + या)

-अनुरक्त प्रेम बसलें आहे असा. Passionate, attached.
(अनु + रंज-निष्ठा) **अनुरक्ति, अनुराग** (प्रेम)

-अनुरूप योग्य, रूपाला योग्य. Suitable, fit. (अनु + रूप)

-अनुरोध रोख, मत, कल. Inclination. (अनु + रुध् ७)

-अनुलोम उच्चवर्णीयाचा अनुक्रमानें नीचवर्णीयांशीं संबंध. Marriage between a higher caste male with a lower caste female. (अनु + लोमन्)

-अनुवर्ती संबंध धरून असणारा. That supports or constitutes. (अनु + वृत्)

-अनुवृत्ति सेवा, अनुकरण, तेंच तेंच पुनः बोलणें. Service, repetition.

-अनुशासन कायदा, बंधन, आज्ञा. The law. (अनु + शास्)

-अनुषंग आश्रय, संसर्ग. Association. (अनु + संग < सञ्ज्)

-अनुष्टुभ् एक प्रकारचें वृत्त. A poetic metre. (अनु + स्तुभ्)

-अनुष्ठ(णें) धर्माप्रमाणें करणें, आचरणें, (अनुष्ठान–अनुष्ठाता, अनुष्ठित). To perform one's duties. (अनु + स्था)

-अनुसंधान लक्ष, अवधान, संबंध. Attention, aim. (अनु + सं + धा)

-अनुस्यूत गोवलेलें, नियमबद्ध, सूत्रबद्ध. Regulated. (अनु + स्यूत < निष्ठा √सिव्)

-अनुस्वार नाकांतून होणारा उच्चार. A nasal. (विशेषतः श् ष् स् ह ह्या वर्णाच्या पूर्वींचा नासिक्य उच्चार.) [अनु + स्वार < स्वर् = उच्चारानंतरचा]

-अनुक्षण प्रत्येक क्षण. Every instant. (अनु + क्षण.)

-अनुज्ञा परवानगी, संमति. Leave, consent. (अनु + ज्ञा ९)

-अन्वय संबंध, संयोग. Connection. (अनु + अय < इ. २ गतौ.)

-अन्वर्थक योग्य, यथार्थ, सार्थ. Apt.

-अन्वेषण शोधन, तपास. A search, investigation.

अनुघाड न. बंदी, (कान) ठळी. Dinning (into ears).

[सं. उत् + घट्; प्रा. उग्घड; याकाम. **अनुघाड**; अन् + उघडणें.]

जंत्राचिये श्रुति–सवें आसुडें : गीतें कानासि अनुघड पडे.–
नरुस्व ५३०.

अनुराग पुं. प्रेम, आवड. Attachment, love.

[सं. अनु + राग √रज्, रञ्ज्; याकाम. **अनुराग** (नरुस्व ५७५)]

अनुलेपन न. उटी, उटणें. An ointment, unguent.

[सं. अनु + लेपन √लिप् ६ लेपने; याकाम. **अनुलेपन** (नरुस्व ४४ उगी. १५९)]

अनुवाद(णें) सक्रि. सांगणें. To repeat.

[सं. अनुवाद (ना. धा.) √अनु + वद्; याकाम. **अनुवादणें** (ज्ञा. १०·३५)]

अनुसर(णें) सक्रि. मागें जाणें, नकल करणें, दुसऱ्याच्या सांगण्याप्रमाणें करणें, शरण येणें. To follow, to imitate, to go after.

[सं. अनु + सृ १ गतौ; याकाम. **अनुसरला** = शरण आलेला.

तो अनुसरलेयातें नुपेक्षीं भक्तवत्सलु : हा मुनिचा बोलु कां जाला विफलु ॥ नरुस्व ६४०.

अनेक वि. पुष्कळ, एकाहून अधिक. Many more than one.

[सं. अन् + एक; याकाम. **अनेग, अणेग, अन्यग** काम. **अनेक.**]

अनेगा भावांचें भांडार. नरुस्व ५०. तोडरीं बाहुलीं काढती अनेगे ॥ नरुस्व १७१. गौडिया अन्येग विधां । नरुस्व २९०.

अंत पुं. शेवट, परिणाम, मृत्यु, मरण. End, result, death.

[*IE*. anti; anta; सं. **अन्त, अन्ति, अन्तमस्**; *Got*. and, und; *Lat*. ante; *Gr*. anti; *Lit*. ant. anta.]

-अन्तक पुं. यम. God of Death.

[सं. **अन्त + क**; याकाम. **अन्तक**। नरुस्व ३१०.]

-अन्तेवासी गुरूजवळ राहणारा विद्यार्थी. Disciple. (**अन्ते + वस्**)

-अन्त्य शेवटचा. Last, final.

-अन्त्यज शेवटच्या थरामध्यें जन्मलेला-अस्पृश्य. Untouchable.

-अन्त्येष्टि शेवटचें धार्मिक कृत्य, और्ध्वदेहिक. Obsequies. (**अन्त्य + इष्टि < यज्**)

अंतडी-डें स्त्री. न. प्राण्याच्या पोटांतील अवयव. Intestines.

[सं. **अंत्र**; (**अति बंधने**); प्रा. **अंतर, अत्त + ड**; (सं. **कृत्ति**. प्रा. **कित्ती + ड. कातडें**) गु. हिं. **अंतर = आंतडीं, मध्यभाग**; सिं. **अंदरु**; प. पं. **आंदरां = आंतडीं**; रुमा. **अंद्रे = आत.**]

अंतर् आंतील. Inside.

[सं. **अंतर**; *Lat*. Inter; *Got*. under; *Av*. anctare. हा शब्द फार प्राचीन आहे.]

-अंतरंग (**अंतर् + अंग**) मन, अंतःकरण, आंतील भाग. Mind.

-अन्तरात्मा जीवात्मा. The soul.

-अंतःकरण-अंतःकला आंतील इंद्रिय, मन. Mind, the inner sense.

-अंतर खूण अंतरींची खूण, गुपित गोष्ट. A secret.

-अंतर्गृह माजघर, आंतील घराचा भाग, आंतील खोली. An ante-chamber.

-अन्तर्दृष्टि मनश्चक्षु, आंतील दृष्टि. Insight.

-अन्तर्माळ आंतडीं, आंतील आंतड्याच्या माळा. Intestines.

-अन्तराय अडथळा. Hindrance. (**अंतर् + आय** < इ २ गतौ)]

-अंतराळ न. अंतरिक्ष, वातावरण. Atmosphere. (**अंतर् + आलय**)

-अंतरिक्ष-रीक्ष न. आकाश, पृथ्वी व स्वर्ग ह्यामधील पोकळी. The mid-space, the sky.

[सं. **अन्तर्** मध्ये ऋक्षाणि नक्षत्राणि यस्य.]

-अन्तर्गत आंतील, आंत समाविष्ट झालेला. Included amongst, internal.

-अन्तर्ग्रह आंतील ग्रह, पृथ्वीच्या कक्षेच्या आंत फिरणारे ग्रह. A planet moving within the orbit of the earth.

-अन्तर्दशा आंतील खरी स्थिति. The internal state.

-अन्तर्धान एकदम नाहींसें होणें. Sudden disappearance. (**अन्तर् + धा ३ स्थापने**)

-अन्तर्निष्ठा समाधि. Abstract meditation. (**अन्तर् + नि + स्था**)

-अन्तर्भाव आंतील भाव. Mind, inward purpose.

-अन्तर्भूत समाविष्ट. Comprehended under. (**अन्तर + √भू-निष्ठा**)

-अन्तर्भेद आंतली बातमी. Internal or domestic secret. (**अन्तर् + भेद √ भिद् ७ भेदने**)

-अन्तर्मुख आत्मनिष्ठ, आंत वळलेली. Abstracted from sensuous objects.

-अन्तर्याम जीव, मन, अन्तःकरण. The inner soul, heart.

-अन्तर्वर्ती आंत असलेला. Lying within.

-अन्तर्वेदी दोन नद्यांमधील-विशेषतः गंगा व यमुना ह्या नद्यांमधील प्रदेश. (वेदी=यज्ञभूमि, हा प्रदेश ब्रह्मदेवाची यज्ञभूमि म्हणून होता.) The doab.

-अन्तर्ज्ञान दिव्यज्ञान, दिव्यदृष्टि. Intuition.

-अन्तस्थ आंतून पैसे देण्याची पद्धत, पैसे. Money etc. given secretly to bribe. (**अन्तः + स्थ**)

अंतर न. स्थल किंवा काळ ह्यासंबंधीं अवकाश, फरक, भेद, मध्य. Space, difference.

[सं. **अंतर √ऋ १ गतौ**; गु. हिं. **अंतर = मध्यभाग.**]

अंतर(णें) अंतर देणें, दूर करणें; वगळणें, To part company; to exclude.

[**अंतर (ना. धा.)**]

अंतुरी स्त्री. स्त्री, बायको. A wife.

[सं. **आन्तःपुरिकी** ; प्रा. **अंतेउरिगा**, **अंतेउरिया**, **अंतेउरी** ; याकाम. **अंतौर**, **अंतौरी** ; (नरुस्व २५३, २५०) शिकाम. पेकाम. **अंतौरि**, रिया.

अस्तुरी हा शब्द निराळा व तो 'स्त्री'पासून व्युत्पाद्य असून ग्रामीण भाषेंत रूढ आहे.]

अंतःपट, अंतरपट, अंतरपाट पुं. अंतर्पाट, नवरा व नवरी यांच्यामध्यें विवाहसमयीं जें वस्त्र धरतात तें. A piece of cloth held between the bride and bride-groom in the wedding.

[सं **अन्तर् + पट**. अ. का. मराठींत. हा शब्द **अंतर्पाट**, **अंत्रपाट** अशा स्वरूपांत रूढ आहे.]

अंतःपुर न. स्त्रियांसाठीं खास जागा, जनानखाना, स्त्रिया. The inner chamber, harem.

[सं. **अंतर् + पुर**. आंतील जागा. आन्तःपुरिकी; आन्तःपुरी ; प्रा. **अंतउरी** अंतुरी पहा.]

अंत्राळ न. अंतराळ, अन्तराल पहा. Atmosphere the mid-space.

[म. **अंत्राळी**- < **अंतरालय**. (**अंतर्+आ+√ली**) 'अंत्राळीं' असा शब्द अव्यय म्हणून अधिक रूढ आहे.]

अंथर(णें) अक्रि. खालीं पसरणें, उघडपणें मांडणें (बिछाना). To spread.

अंथरूण न. बिछाना, खालीं पसरण्याचीं वस्त्रें. A bedding. [**सं. आस्तरण** ; **प्रा. अत्थरण, अत्थुरण.** अनुनासिक कसा आला ? कदाचित् संस्कृतमधून प्राकृत व प्राकृतमधून अपभ्रंश भाषेंत आल्यानंतर हा अनुनासिक उपरा म्हणून आला.]

अंदण न. दान, बक्षीस. A present, a gift.

[सं. **अन्यदान–आनंदन–अनुदान**. (?) परंतु ह्या व्युत्पत्ति काल्पनिक आहेत. शब्द परकी दिसतो. द्राविडी असावा. चिन्त्य आहे.]

अंदाज पुं. तर्क, अनुमान, अजमास, कयास. An estimate.

[फा. **अन्दाझ्=प्रमाण, तर्क. अन्दाजा.**]

अंदु, अंदुक पुं. १ सांखळदंड, बेडी. Fetters. २ सांखळी (पायांतील), स्त्रियांचें पादभूषण. An anklet.

[सं. **अंद् १–बन्धने** ; याकाम. **अंदू**. (शि. ७१६) ; शिकाम. **अंदु निगडः** (रा. व्य. १३६);] बोभातिया अंदुचिया नाहीं । अस्थानी माजविती नरुस्व ८५.

अंदेश पुं. आदेश, आज्ञा. An order.

[सं. **आदिश्**.]

अंदेश, अंदेशा पुं. स्त्री. शंका, कल्पना, संशय, विचार, काळजी. Suspicion.

[फा. **अंदेशा** ; पेकाममध्यें **दुरंदेश, दुरंदेशी** असे दूरदृष्टि ह्या अर्थी शब्द रूढ होते.]

अन्ध वि. आंधळा, दृष्टि नसलेला. Blind.

[*IE.* andhos ; सं. **अंधः** ; *Gr.* andos ; *Alb.* ende.]

-अंधुक वि. पुसट, अंधक. Dim.

-अंधःकार न. अंधेर, अंधार. Darkness. (**अंधः + कार < कृ**)

-अंधपरंपरा स्त्री. आंधळयांची माळका. Blind leading the blind.

अन्धळा वि. दृष्टिहीन. Blind.

[सं. **अंध + ल** ; प्रा. **अंधळ** ; गु. **आंधळुं**, सिं. **अंधेरो** ; पश्चि. पं. **अनून्हा** ; का. **ओन(नु)** ; हिं. **अंधा.** ह्या शब्दाचा अन्धःकार, अंधार ह्या शब्दांशीं संबंध आहे.]

-अंधळयाची काठी आधार. A prop.

-अंधळा कारभार अव्यवस्थित कारभार. Misrule.

-आंधळयांची माळका आंधळे लोकांची माळ, अडाणी माणसें. A string of blind persons.

अंधळी कोशिंबीर एक खेळ. Blind man's buff.

[आंधळी आणि कोशी हे दोन्ही एकाच अर्थाचे पण भिन्नभाषांतील शब्द. एक **आंधळी** < सं. **अंधस्**. **कोशिंबीर** < द्रा. **कुच्चा=आंधळा.** किंवा **कोसांबर**= डोळ्यांवर बांधलेलें कापड.]

अंदाधुंद स्त्री. वि. गोंधळ, गोंधळाचा, अस्ताव्यस्त. Mismanagement ; disorderly.

[सं. **अंधः धुंद्-ध.** अंधारानें व्याप्त अशी अवस्था.]

अंधार पुं. काळोख, प्रकाश नसणें. Darkness.

[सं. **अंधकार** ; पा. **अन्धकारो** ; प्रा. **अन्धआर** > **अंधार** ; बं. **आंधार** ; ओ. **अधार** ; हिं. **अंध्यारा, अंध्येरा** ; गु. **अंधारु, अंधेरू** ; सिं. **अंधारू** ; प. पं. **अन्हेरा** (अस्पष्ट अंधारयुक्त) ; मैथिली. **आन्ह, आन्हर** ; सिंह. **ॲन्दुर.**

ह्या शब्दाचा **अन्ध अन्धळा** ह्या शब्दाशीं संबंध आहे.]

अन्न न. खाण्याचा जिन्नस, धान्य पकवून तयार केलेला जिन्नस. Food.

[*IE*. ED. सं. अद् ; २ अदने. (निष्ठारूप, नामाप्रमाणें उपयोग); झें. अंध ; *Gr*. ed; *Lat*. ed; *Slav*. Jastu; *Lith*. Estu; *Got*. Itan; *old Ger*. Ez-an.

हिं. अन ; सिं. अन (धान्य); का. अन (खाणें); सिंह. अन् (अन्न).]

-अन्नकूट अन्नाचा ढीग. A heap of food. (अन्न + कूट)

-अन्नछत्र अन्नसत्र, फुकट अन्न देण्याची व्यवस्था. A place for free distribution of food. (अन्न + सत्र)

-अन्नत्याग खाणें सोडणें. Fasting. (अन्न + त्यज् + अ)

-अन्नदान अन्न देणें. Gift of food. (अन्न + दा + न)

-अन्नपचन अन्न पचणें. Digestion. (अन्न + पचन)

-अन्नपाणी अन्नपाणी. Food and water. (अन्न + पानीयम्)

-अन्नप्राशन अन्न खाणें. Taking food. (अन्न + प्र + अश्)

-अन्नमय अन्नापासून झालेलें. Transformed from food. (अन्न + मयट्-विकारे)

-अन्नरस अन्नपचन होऊन तयार होणारा शरीरांतील रस. (अन्न + रस)

-अन्नवस्त्र अन्न आणि वस्त्र, खाणें आणि पांघरणें. Maintenance. (अन्न + वस्त्र)

-अन्नशुद्धि अन्न शुद्ध करण्याचें साधन, तूप. Ghee. (अन्न + शुद्धि)

-अन्नान्नदशा दारिद्र्य. (अन्न अन्न असें सारखें मागत राहण्याची परिस्थिति.) Utter poverty.

-अन्नोदक अन्नपाणी. Food and drink. (अन्न + उदक < उत् + अन्च् १ गतौ).

अन्य सर्व. दुसरा. Other.

[*IE*. En, An, on; सं. अन्यः; प्रा. अण्ण ; *Lit*. Anlras; *Got*. Anlhar; *Ger*. Andar; *As*. Annar; *Slav*. Onu; *H. Ger*. an-dher.]

अन्यत्र क्रि. वि. अ. दुसरीकडे. Elsewhere.

[सं. अन्य + त्र.]

अन्यथा क्रि.वि.अ. दुसऱ्या प्रकारानें, दुसऱ्या मार्गानें, नाहीं तर, असें नसेल तर. Otherwise.

[सं. अन्य + था]

अन्योक्ति स्त्री. दुसऱ्याला उद्देशून बोलणें-एक भाषा-अलंकार. Allegory.

अन्योन्य वि. परस्पर. Mutual.

अप उपसर्ग. दूर, लांब, बाजूस, वियोग-अभावदर्शक. Away, further.

[*IE*. Ap Apa, Apo ; सं. अप ; *Av*. Apa. √po; *Slav*. Opaky ; Lat. Ab, Abo, √ posino ; *Teu. Got*. Af. (afar. after).

सं. अपर, अपम ; *Av*. Apam. हे शब्द ह्या वरील शब्दांशीं संबद्ध आहेत.]

-अपकर्षण खालीं जाणें-ओढणें, अवनति. To deteriorate, to pull down. (अप् + कृष्)

-अपकार इजा, दुःख, नुकसान. Injury. (अप + कृ)

-अपकीर्ति निंदा, दुर्लौकिक. Bad name. (अप + कृत्)

-अपकृत्य वाईट काम. Bad deed. (अप + कृत्य √कृ)

-अपंग व्यंग, लुळा. Deformed, maimed, [सं. अप + अंग ; प्रा. अपंग ; अपंगिणें-संभाळणें. to look after. अपंगिता (आश्रयदाता)]

-अपघात अकस्मात् येणारा वाईट प्रसंग An accident. (अप + घात √हन्)

-अपपाठ वाईट, चुकीचा पाठ. A wrong reading. (अप + पाठ √पठ्)

-अपभ्रंश वर्णांतील बदल, विकृति, अपभ्रंश नांवाची बालभाषा. Corrupted form. (अप + भ्रंश √ भ्रंश्)

-अपमान पाणउतारा, मानभंग. Humiliation, insult. (अप+मान)

-अपमृत्यु मोठें संकट, अयोग्य वेळीं व अयोग्य कारणानें येणारा मृत्यु. Untimely death. (अप + मृत्यु < मृ)

-अपयश पराजय. Defeat, failure. (अप + यशस्)

-अपराध गुन्हा, चुकी, दोष. Offence. (अप + राध्)

-अपरूप वि. १ विचित्र. Strange. (वै. सं. अपरूप = कौतुक, आश्चर्य किंवा अपूर्व) २ मौल्यवान. Valuable. (अप + ऋतु)

-अपलाप (सत्य) लपविणें, खोटें सांगणें, दडविणें. Distortion, hiding away of truth. (अप + लाप < लप् १ भाषणे)

-अपवर्ग मोक्ष. The Moksha, salvation. (अप + वर्ग)

-अपवाद नियमाच्या विरुद्ध उदाहरण. An exception. (अप + वद्)

-अपशकुन अशुभ गोष्ट. Ill omen. (अप + शकुन)

-अपव्यय उगाच खर्च, उधळेपणा. Waste. (अप + वि + इ)

-अपशब्द शिवी, वाईट शब्द. An abuse. (अप + शब्द)

अपील न. वरील अधिकाऱ्याकडे मागावयाची दाद, विनंतीअर्ज. An appeal.

[*Eng.* Appeal; *Lat.* Appellare = address; *OE*. Apeler.]

अपूट वि. न स्पर्शिलेलें, दूषित न झालेलें (अन्नासंबंधीं वापरतात). Untouched.

[सं. **अस्पृष्ट, प्रा. अपुट्ठ.**]

अपेट वि. अंडील, अंड न बडविलेला (बैल). Not castrated.

[सं. **अ+पिष्ट**, √पिष्; **प्रा. अपिट्ठ–पेट्ठ, पेट** (श. को.)]

अपोलो (बंदर) न. मुंबईतील एक ठिकाण. Apollo Bunder.

[१ हा **अपोलो** शब्द **पलव बन्दर** ह्याचा अपभ्रंश आहे. **पलवा** नांवाचा एक मासा आहे. हा Sable-fish जातीचा आहे. **पल्ल** हा शब्द १८४७ मध्यें रूढ होता. २ '**पल्लो**' हें तेथील वस्तीचें नांव दीडशें वर्षांपूर्वीं होतें. जेथें होळीची पोळी खात असत तें ठिकाण अशीहि एक व्युत्पत्ति दिली आहे.]

अपोशन न. पाणी मुखानें स्पर्शणें, आचमन घेणें. Sipping water from a concave palm.

[सं. **आपः + अशन**, √**अश् ९ अदने.**]

अप्पा पुं. नात्याच्या पुरुषमाणसासंबंधीं एक संबोधनाचा शब्द, आदरार्थी, बहुमानवाचक संबोधन. A term of address, a vocative.

[कान. **अप, अप्प = पिता;** हा शब्द सं. **आत्मन्; प्रा. अप्प, अत्त;** दे**प्रा. अप्पो = पिता,** अशा व्युत्पत्तीनें प्राकृत व्याकरणकार संस्कृतशीं जोडतात. कानडीमध्यें विशेषनामाच्या पुढें जोडतात.]

अप्रशिखा स्त्री. सांकेतिक भाषा. A codified language.

[ह्याचा अर्थ व रचना चमत्कारिक आहे. एकाचा मित्र त्यास ठार करावयास प्रवृत्त झाला असतां आपलें मृत्युवृत्त इतरांस समजावें म्हणून त्यानें अ–प्र–शि–ख या आद्याक्षरयुक्त रचलेली एक चार चरणांची कविता म्हटली. **अनेन** तव पुत्रेण । **प्रसुप्तस्य** वनांतरे । **शिखामादाय** हस्तेन । **खड्गेनोपहतः** शिरः । (श. को.)]

अप्सरा स्त्री. देवलोकांतील स्त्री, गंधर्वांची स्त्री. Heavenly woman, a nymph.

[सं. **अप्+सरा** √**सृ-१ चलने,** अप्सु याः सरन्ति ताः अप्सरसः]

अफगाण पुं. अफगाणिस्तानचा रहिवासी. An Afghan.

[१ फा. हिं. **अफगान्.** २ ह्यांत संस्कृत शब्दहि कांहीं व्युत्पत्तिकार जोडतात. '**अश्वक**' > **अस्सकनि** > **अस्सकेनि** हे शब्द अलेक्झांडरच्या घोडेस्वारासंबंधीं वापरले आहेत. ३ आर्मिनियन-**अद्यवान = पहाडी, डोंगरांत राहणारा.** '**अफगाण**' ह्या नांवाचा संबंध यहुदी राजा सोल ह्याच्या नातवाशीं जुळतो, सोलचा पुत्र जरमिया, त्याचा पुत्र **अफगाना** (सिंहाला शह, पृ. ६)]

अफरातफर स्त्री. नासधूस, अयोग्य वापर, पैसे खाणें–लांबविणें. Mis-appropriation.

[फा. **इफरात = वैपूल्य, तफरीत** = नाश करणें, **तफ्रीक–फूट-फाट;** पेकाम. **अफरातफरा, अफरातफ्रीक** (रा. १०-२०८; ७-२२३), **अफरातफर** (वाडसमा. ३-६५).]

अफलाद, अफ्वाद, अह़फाद स्त्री. मुलीचा वंश. Daughter's progeny.

[अर. **अहफाद् = नातवंडें.** ह्याच्या जोडीस दुसरा एक शब्द येतो तो–**अवलाद् = मुलाचा वंश** (उदा. **अवलाद अफलाद चालवीजे**–वंशपरंपरा–मुलाच्या व मुलीच्या बाजूनें वतन चालवणें); शिकाम. **अव्लाद अफ्वाद, औलाद अहफाद** (रा. १५-१५९, २०-१४१); पेकाम. **अवलाद अफलाद** (पेद).]

अफवा स्त्री. कंडी, खोटी बातमी, भुमका, बाजारगप्प, आवई. A rumour.

[अर. **अफवाह्** (**फ्वाह = तोंड,** ह्याचें अ. व.); पेकाम. **अफ्वाई** (वि.) (रा. ५-२९).]

अफ़सोस स्त्री. पुं. दुःख, पश्चात्ताप, शोक, हायहाय. Regret, repentence, alas!

[फा. **अफसोस**=**दुःख, शोक;** पेकाम. **अफ्सोस** (पुं.) (रा. ७–१४२).]

अफळ(णें) अक्रि. जोरानें प्रहार करणें, –मारणें. To strike forcibly, to hit.

[सं. **आ+स्फल्;** प्रा. **अप्फलिय** (आस्फलितम्); अकाम. (काव्य)–**अफळला.**]

अफाट वि. विस्तृत, मोठें. Vast.

[सं. **आ+स्फद्** ६ विशरणे (?), '**अ**' चा अर्थ **अतिशय** असा आहे का ?]

अफाव (णें) सक्रि. बोलावणें. To call, to send for.

[सं. **१ आ+स्फ्यै. २ वृद्धौ (–स्फीति);** याकाम. **अफाव.** जे रावो आफावलेयां ये चौदा भुवनांचा ॥ नरुस्व ६१]

अफीण–म स्त्री. अफू, खसखशीच्या बोंडांतील वाळवलेला मादक चीक. The opium juice.

[सं. **अहिफेन** (?) हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे; फा. हिं. **आफीण;** बं. **अफेवा;** गु. **अफे–फीं;** अर. **अफ्यून;** *Gr.* opien, opas; *Eng.* opium; अकाम. **अफीण** (वाज) मराठींत हा शब्द **हिंदी**मधून आला. मराठी. **अफू** हाच विशेष रूढ आहे.]

अफू स्त्री. एक मादक पदार्थ. Opium.

[सं. **अहिफेन**=सापाचें विष; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे व तें पटत नाहीं. अरबी लोकांनीं ग्रीक शब्द घेतला. अ. **अफ्यून्** अरबस्थानांतून शब्द चीनमध्यें गेला. चिनी **अ-फू-युंग;** अरबी **अफीन् अफेन–अफ्यून्;** हेच शब्द हिंदी, बंगाली वगैरे भाषांत आले व तेथून मराठींत उतरले. मूळ अरबी शब्दाशीं साक्षात् संबद्ध असा **अफीण** शब्दहि मराठींत '**अफीणबाज**'मध्यें राहिला.]

अबकारी पुं. दारू वगैरे मादक पदार्थांच्या विक्रीच्या खात्यासंबंधीं. Excise.

[फा. **आब्कारी**=दारू करण्याचा धंदा. हिंदी किंवा तेलगु–**अबुकारी.**

दारू किंवा मादक पदार्थ तयार करण्याबद्दलच्या करापासून होणारें उत्पन्न. हा कर कधीं कधीं घाऊक व ठोक व्यापाऱ्यावर किंवा मादक पदार्थ तयार करणाऱ्या–दारू गाळणाऱ्या ठिकाणावरहि लादतात. पूर्वीं एके काळीं हा जुगार, खाद्याचे पदार्थ विकणारीं गृहें, जादुगार वगैरेंवर लादत असत. १८३२ सालच्या पार्लमेंटच्या रिपोर्टांत हा कर मिरीं आणि सुपारी ह्या पदार्थांवरहि घेत असत असें लिहिलें आहे.]

अबदागिरी स्त्री. सूर्याचा ताप निवारण्यासाठीं छत्रीसारखें एक साधन (देव, राजा, सरदार ह्यांवर धरण्याचें). A flat umbrella with a long pole.

[फा. **अफ्ताब्**=सूर्य, **गीर √ गिरफ्तन्=पकडणें.**]

अबब उद्गा. अव्यय. आश्चर्यदर्शक अव्यय. An expression of surprise.

[कान. **अब्ब ;** ते. **अब्बब.**

परंतु हा ध्वनिवाचक शब्द दिसतो. ओष्ठ्य वर्णयुक्त शब्द–विशेषतः व्, म् युक्त असले बरेच शब्द विकारदर्शक आहेत.]

अबलक, अबलख वि. तयार, सशक्त (घोडा), पांढरे व काळे पट्टे असलेला घोडा. Pyebal, variegated (horse).

[अर. **अब्लक्-पांढरा आणि काळा.** अभ्रक पहा.]

अबा–आबा पुं. वडील माणसास आदरार्थी संबोधन. A vocative for an elderly man.

[**अबा** हा शब्द सेमेटिक व इंडोआर्यन ह्या भाषांतून आढळतो. याचीं **अब्बी, अब्बा, अत्ता** वगैरे रूपें आहेत. लहान मूल आपल्या वडिलांना या शब्दानें हांक मारतें म्हणून तो तद्वाचक शब्द बनला.

Eng. Abba = father; *Lat.* Abbas = पाप, परमेश्वर; हिं. **बाप, बाब;** अर. **अब्बास, अबु=श्रेष्ठ;** हिब्रू. **ओबा=बाप;** खाल्डियन **अबबा=बाप;** सिं. **अबो;** कान. **अब्ब=बाप.**]

अबोल वि. न बोलणारा, मुखस्तंभ. One who does not speak.

[म. **अ+बोल;** सं. **√वल्ह् १ भाषणे**]

अब्रु, अब्रू स्त्री. मान, प्रतिष्ठा, लौकिक. Prestige, name.

[फा. **आबरू; आब् (=प्रतिष्ठा, तेज)+रू (=तोंड)=तोंडावरील तेज.**]

अभंग पुं. वृत्ताचा एक प्रकार, गायनाचा प्रकार, अखंड चालणारें गाणें, कडवें. A metre.

[सं. **अ + भंग** (?); याकाम. **अभंग** (नामदेव, उ. गीता ४६३); शिकाम. **अभंग** (तुकाराम); पेकाम. **अभंग** (महिपति); अकाम. **अभंग ;** याकाममध्यें **अभंग=गायनाचा** एक प्रकार.

तीनि वर्ण दोनि धृपदांगे : च्यारि अभंग ॥ नरुस्व १८५]

अभंड न. जिन्नस तोलण्यापूर्वीं भांड्याचें वजन करतात तें. Weight of the container.

[**सं. भंड् ६ परिमाणे.**]

अंभंड वि. खोडसाळ, कुभांडी, भांडखोर, चेष्टेखोर. Mischievous, quarrelsome.

[सं. भड् १ विनोदने = थट्टा करणें.]

अभाळ, आभाळ न. आकाश, गगन, अस्मान. Sky.

[सं. अभ्र + आलय; प्रा. अब्भ; गु. आभ; इं. अब्र; फा. अब्र.]

अभार पुं. जबाबदारी. Responsibility.

[सं. आ + भार √भृ. ३ पूरणे; याकाम. **अभार** = जबाबदारी (उ. गी.), **अभार–कृतज्ञता.** (नरुस्व ५०९).

अभि उपसर्ग. सारखा, जवळ, वेगळा, विरोध इत्यादि अर्थांचा द्योतक. A prefix.

[*IE.* Ebhi, obhi, bhi ; √mbai; सं. **अभि** ; *Gatha. Av.* Aibi, aiwi ; *ap*–Abiy.]

–अभिचार मंत्र, जादुटोणा. A magic, charm.
(सं. अभि + चर्)

–अभिजात कुलीन, थोर कुळांतील, उच्च संस्कृतींतिल. Highborn, classical. (अभि + जात √जन्)

–अभिधा शब्दाची एक वृत्ति, वाच्यार्थवृत्ति. Expressive power of a word. (अभि + धा)

–अभिधान नांव. A name.

–अभिनंदन शाबासकी, वाहवा. Congratulation. (अभि + नन्द्)

–अभिनय मुद्राविशेष, हावभाव. Expression. (अभि + नी)

–अभिनव नवीन. Novel, new. (अभि + नव)

–अभिनिवेश आवेश, आसक्ति. Enthusiasm, over-attachment. (अभि + नि + विश्)

–अभिप्राय उद्देश, हेतु. An object, a motive. (अभि + प्र + √अय्, √इ)

अभिभव पराजय, हल्ला. Defeat, an attack. (अभि + भू)

–अभिमान गर्व. Pride. (अभि + मान < मन्)

–अभिमुख समोर, उद्युक्त. In front of. (अभि + मुख = अभि = अभिगतम्)

–अभियोग वाद, भांडण. Discussion, quarrel. (अभि + योग √युज् ७)

–अभिलाष इच्छा, लोभ, हांव. Desire, greed. (अभि + √लष्)

–अभिवृद्धि वाढ. Growth. (अभि + वृद्धि √वृध्)

–अभिव्यक्ति स्पष्टता, उघड करून सांगणें,–दाखविणें. Plain-speaking. [अभि + व्यक्ति √वि + अञ्ज्.]

–अभिशाप आळ, खोटा आरोप, Accusation. (अभि + शप्.)

–अभिषेक संस्कारपूर्वक स्नान, पवित्र आंघोळ. Consecrated bath. (अभि+ षेक √सिच्)

–अभिसरणें १ इकडे तिकडे धावणें. To run about. २ प्रियकराला भेटण्यास जाणें To keep tryst. (अभि + सृ.)

–अभीष्ट इच्छिलेलें. Wished for. (अभि + इष्ट √इष्.)

–अभ्यंग सतैल आणि समर्दन (स्नान.) An oilbath. (अभि + अंग)

–अभ्यंतर आंतील भाग. Inside.

–अभ्यर्थना प्रार्थना. A request. (अभि + अर्थ् १० प्रार्थनायाम्)

–अभ्यस्त निपुण, परिचित. Expert. (अभि + अस्त < अस् ४ क्षेपणे)

अभ्यास(णें) क्रि. अभ्यास करणें, वाचणें, परिशीलन करणें. To study, to read.

[सं. **अभि + आस्** ; प्रा. **अब्भस** ; जवळ बसून परिशीलन करणें.

–अभ्यास = **पुनरावृत्ति** (उदा. वर्णांचा अभ्यास, द्वित्त्व).]

अभ्युत्थान न. कोणी मोठा मनुष्य आला असतां त्याच्या स्वागतासाठीं उठणें. Getting up (in respect.) (अभि + उत् + स्थान)

अभ्युदय उत्कर्ष, उदय. Rise. (अभि + उदय < उत् + इ)

अभ्रक पुंन. पारदर्शक खनिज पदार्थ. Mica.

[सं. अवलक्ष = पांढरा, अभ्र+क (?) अभ्रासारखा रंग असलेला; फा. अब्रक = करडा, काळा व पांढरा मिश्र; हिं. **अबरक.**

घोड्यासंबंधीं **अबलक घोडा** असा शब्दप्रयोग रूढ आहे. त्यांतील **अबलक** शब्द **अब्रक** पासूनच सिद्ध असावा.]

अभ्रा पुं. आवरण, आच्छादन-तक्कया उशीवरील. Pillow-cover.
[फा. **अब्र.**]

अमका अमुक पहा.

अमदानी स्त्री. आवक, भरभराट, कारकीर्द, हंगामाचा काळ. Income, regime, season.
[फा. **आमदनी = मोसम**]

¹**अमल** पुं. काम, कार्य, हुद्दा, अधिकार, सत्ता, सरकार, हुकमत. Duty, office, authority, administration.
[अर. **अमल्**-(त्यानें काम केलें); पेकाम. **अमल** (दिमरा १-३७)]

अमलदार पुं. अधिकारी. An officer.
[मराठी राज्यांत अमलदार तीन प्रकारचे असत. **सावकार, मुलकी कर वसूल करणारे, सरसुभेदारानें नेमलेले.**]

²**अमल** पुं. कैफ, गुंगी. Intoxication.
[अर. **अमल्-कैफ, गुंगी.**]

-अमली अधिकारांतील, ताब्यांतील; कैफ आणणारा. In authority; intoxicant.

अमर वि. मृत्युरहित, नाश नसलेलें. Immortal.
[सं. **अ + मर √**मृ.]

-अमरपट्टा अमरपणाचा लेख. An authority for immortality.

-अमर्याद मर्यादाहीन. Boundless. (**अ+मर्यादा**)

-अमर्ष मर्ष-सहनशीलता नसलेला. Intolerance. (**अ + मर्ष**)

अमसूल(सोल) न. कोकमसाल.
[सं. **अम्ल + छाल.**]

अमळ वि. किंचित् थोडासा (वेळ). A little.
[वै. सं. **अम्रस्**; सं. **अम्=थोडें लवकर** (शको).]

अमात्य पुं. अष्टप्रधानमंडळांतील एक प्रधान. A minister.
[सं. **अमा = जवळ; अमा भवः = अमात्य = राजाच्या जवळ असणारा.**]

अनामत, अमानत स्त्री. ठेव, ताब्यांत दिलेला जिन्नस. A deposit.
[अर. **अमन** ह्याचा अपभ्रंश निरनिराळ्या भाषांत निरनिराळा झाला आहे. तेलगू मध्यें **अनामत** किंवा अनामतु. वर्णविपर्यय होऊन मराठींत ‘ **अनामत** ’ असाहि होतो. मराठींत अमानत, अनामत हीं दोन्ही रूपें रूढ आहेत. पेकाम. **अमानत** (रा. ७-१२६).]

अमानुष वि. मनुष्याला न शोभणारे, दैवी, राक्षसी. Inhuman.
(चांगला व वाईट असा दोन्ही प्रकारचा अर्थ आहे. परंतु चांगला अर्थ दाखविण्यासाठीं ‘अतिमानुष’ हा शब्द वापरतात.)
[सं. **अ + मानुष √मन.**]

अमान्य वि. मान्य नसलेलें. Unacceptable.

अमार्ग पुं. वाईट मार्ग. A wrong path.

अमावास्या, अमोशा, अमावस स्त्री. महिन्याची शेवटची तीथ. New-Moon day, last day of lunar month.
[सं. **अमा = जवळ. वस्= १ राहणें.**]

अमीन पुं. विश्वासूक मनुष्य, एखाद्या इस्टेटीवर नेमलेला विश्वस्त. (कधीं न्यायदानाचेंही काम करी. त्याला सदर अमीन म्हणत.) A trustee, trustworthy.
[अर. **अमन्**-विश्वास ठेवणें, **अमीन**-विश्वासूक; पेकाम. **अमीन** (ऐस्फुले ५८)]

अमीर पुं. नायक, राजा, सुलतान, आज्ञा करणारा अधिकारी, सरदार. An Emir, a ruler.
[अर. **अमीर, √अम्र् = वर्चस्व ठेवणें; अम्र=आदा.**]

उमराव पुं. सरदार, मानकरी (दरबारांतील). A sardar, a nobleman.
[अर. **अमीर** याचें अनेकवचन **उमरा.**]

अमुक वि. सर्व. कोणी एक, विवक्षित, फलाणा. Certain (person.)
[सं. **अमुक-अदस्** याचें एकरूप.]

अमुरीव वि. न मुरलेलें. Not matured.
[म. **अ + मुरणें, + इव** (विशेषण प्रत्यय); (सं. √मूर्च्छ्.); याकाम. **अमुरीव.**]
तेथें वानि ठेविलीं अरुवारें। अमुरिवां मोतियांची ॥ नरुस्व ५८२

अमू पुं. मुका. Dumb.
[**सं. अमुख**]

अमूप वि. पुष्कळ, न मोजतां येण्याजोगें, न तोलतां येण्याजोगें. Immeasurable.
[**सं. अ + मा** (प-णिच् प्रत्यय); अकाम. ग्रामीण. **मोप = पुष्कळ.**]
ह्याचीं दुसरीं रूपें कधीं कधीं ‘ **उमाप, मोप** ’ अशींहि वापरांत आढळतात.

अमृत वि. न. न मेलेला; अमरत्व देणारें पेय. Immortal; nectar.
[सं. अ + मृत (निष्ठा √मृ ६ मरणे)
(मृत्यूपासून कायमचें संरक्षण करणारें) देवलोकींचें पेय. ह्याचे लक्षणेने कांहीं अर्थ रूढ झाले आहेत.]

अमोघ वि. अचूक लागणारें (रामबाण उपाय). Unfailing.
[सं. अ + मोघ = व्यर्थ.]

अमोद पुं. सुगंध. Fragrance.
[सं. आमोद √मुद् १ मोदे; याकाम. **अमोद.**
भवर बोलती स्वयंवाचा। आमुचा घासु काढो अमोदाचा॥ नरुस्व ६११.]

अमोल वि. फार किंमत येणारा, उत्कृष्ट, कांहींच किंमत नाहीं असा. Invaluable; price-less.
[म. **अ + मोल < मूल्यम्**; प्रा. **अमोल्ल.**]

^{१}अंबट, आंबट वि. अम्ल, खट्टें. Sour.
[सं. **अम्ल, अम्लवत्**; प्रा. **अंब. आंब** (ट-प्रत्यय);]

^{२}अंबट वि. किंचित वाळलेलें, सुकलेलें. Damp.
[कान. **अंबु = वाळणें, सुकणें.**]

-अंबट ओलें, अंबट चिंबट वि. किंचित ओलें, सुकलेलें. A little damp. [**अम्ल + स्तिम् > चिंब**]

-अंबट ढाण वि. फार अंबट. Exceedingly sour.

-अंबट तोंड सुकलेला, दुर्मुखलेला चेहरा. Gloomy face.

-अंबटी, आमटी डाळीचें पातळ वरण, तिखट, मीठ, चिंचगूळ घातलेलें कालवण. A kind of curry.
[म. **अंबट,** (स्त्री.) अम्लतिक्ती]

-अंब(णें) अंबट होणें, अंग ठणकणें (लक्षणा). To become sour.
[सं. **अम्ल**; प्रा. **अंब** (ना. धा.)]

-अंबवि(णें) (**सकर्मक अंबव**) अंबट करणें. To make sour.

-अंबवण, अंबवणी, अंबोण लग्नविधींत विहिणीस देण्याचे पदार्थ; गाईगुरांना पिण्यास द्यावयाचें खरकटें. A gruel; a kind of drink for animals.
(**अम्ल + पानीयम्, अंबवण.**)

^{१}अंबर न. वस्त्र; आकाश. A cloth; sky.
[सं. **अंबर** √अब् ६ शब्दे + घञ्. अंब √रा = शब्दे.]

^{२}अंबर, अंबार न. धान्याचें कोठार, धान्यागार. A granary.
[फा. **अंबार; अंबारस्तु जलाशयः** (रा. को.)
अंबार आणि अंबारखाना हे दोन्ही शब्द फारशी भाषेंत भूमिगत जलाशय किंवा पाण्याचें कोठार ह्या अर्थीं रूढ आहेत. त्यावरून मराठीमध्यें धान्याचें कोठार हा अर्थविकास झाला.]

अंबा, आंबा पु. वृक्षविशेष व त्याचें फळ. The mango tree and its fruit.
[सं. **आम्र**; प्रा. **अंब.**]

-आंबरस आंब्याचा रस. The mango-juice. (< **आम्ररस**)

-आंबराई आंब्याच्या झाडाचें वन. A mango-grove. (**आम्र+राजि-राई.**)

-अंबाडा-आंबाडा एक विशिष्ट केशरचना, वेणीबंध. A mode of hair-dressing.
[सं. **आम्नातक**; प्रा. **अंबाडय**; (?) आंब्याच्या फळाच्या आकाराचा वेणीबंध.]

^{२}अंबा स्त्री. एक देवी. Durga.
[सं. **अंबा.**]

अंबाडी स्त्री. एक वनस्पति व तिचें बीं. A fibrous plant, its seed.
[सं. **आम्रातक**; प्रा. **आम्माडओ**; अप. **अंबाडय**; हिं. **अंबाडा**; गुं. **अमेडा.**]

अंबारी स्त्री. हत्तीवरील माणसाचा बसावयाचा हौदा, छत्री, हत्तीवरील बसण्याचें आसन. A howdah, a canopied seat upon an elephant.

-(उलटी) अंबारी स्त्री. भिक्षेची झोळी. Beggar's bag.

अंबील स्त्री. नाचण्याचें पीठ अंबवून शिजवून केलेला पातळ पदार्थ (गुरास पाजण्याचा). A sort of flummery,-dilute preparation of Nachna-flour soured and butter milk, a gruel.
[सं. **अम्ल**; प्रा. **अंबिल** (पुं.); मराठीमध्यें लिंगविपर्यय झाला. कान. तद्भव-**अंबील**; मराठी-**अंबोण**-ह्या शब्दाशीं संबद्ध आहे.]

अंबुख(णें), आंबुख(णें) उक्रि. टाकणें, फेकणें, शिंपडणें. To sprinkle, to throw.

[सं. **सम्+अभि+उक्ष् १ सेचने**; प्रा. **अब्भुक्खण.** प्रळयाग्नीचीं उजिती । आंबुखिलीं जैशी ॥ ज्ञा. ११-३४२]

–अंबुखा पुं. पाण्याचा वर्षाव, वृष्टि. A spray.
[सं. **अंबु+वर्षाव.**]

अं(आं)बुथ(णें), उक्रि. प्रदीप्त करणें, पेटवणें, ज्वाला वाढणें–जास्त होणें. To kindle a fire.
[सं. **अभि+उत्+इन्ध् १ दीप्तौ**; प्रा. **अब्भुत्थ, अब्भुत्त–प्रकाशित होणें.**]

अंबुला पुं. नवरा, पति. Husband.
[कान. **अमर**–प्रेम करणें, आलिंगन देणें. **अमरिसु, अमरिके**–योग्यता.]

–अंबुली (आंबुली) स्त्री. पत्नी, नवरी. Wife.
नंदनंदन हा आचोज अंबुला वो ॥ ज्ञा. १३–९७८.
लांब लांबै कासोटें: मिरविती आंबुलिआ पुढें ॥ शिशु. ८९१.

अंबेकरी पुं. नावाडी, भोई. A boatman; a bearer.
[कान. **अंबी=नाव; अंबिग=नावाडी**; हिं. **अंबी.**]

अंबेमोहोर पुं. तांदुळाची एक जात, आंब्याच्या मोहराइतका बारीक आणि सुवासिक. A kind of rice.
[सं. **आम्र+मोहोर (मुखर)** (?) ; गो. **अंबे म्होवर** व्युत्पत्ति चिंतनीय आहे.]

–अंबेहळद वनस्पतिविशेष. A kind of turmeric.
[सं. **आम्रहरिद्रा**; प्रा. **अंबहलद्दा**; हिं. **अंबिया हलदी.**]

अंबोळी स्त्री. धिरडें, एक प्रकारची पोळी. (तांदुळाचें व उडदाचें पीठ मिसळून अंबवून मीठमिरची घालून केलेली) A preparation of food,–flour soured and slightly parched.
[सं. **अम्ल+पुल्लिका**; कान. **अंबळी**=जोळ, तांदुळ, ताक वगैरे मिसळून केलेला पदार्थ.]

अम्मा स्त्री. आई. A mother.
(सामान्यरीत्या स्त्रियांच्या नांवाच्यापुढें आदरार्थी शब्द लावतात. उदा–सीताम्मा, मरिआम्मा.)
[सं. **अम्बा** (?); देप्रा. अम्मा; तुळूखेरीज सर्व द्राविडी भाषांत हा शब्द रूढ आहे. पाश्चात्य भाषांतहि ह्या शब्दाशीं संबद्ध असे शब्द आहेत.

Alb. ame; *Aisl.* amma; *Lat.* Amicus; amita = मावशी, आत्या; *Gr.* ammas; *Portu.* Ama.]

अम्मा पुं. स्त्रियांचें स्तन, मातेचें स्तन. Breast.
[कान. **अम्मा**=मातेचें स्तन.]

अयन पुं. मार्ग, सूर्याचा मार्ग (उत्तरायण, दक्षिणायन). Equinox.
[सं. **अय+न** √इ=गतौ, अय् (गतौ).]

अयब पुं. उणीव, कमीपणा, व्यंग, न्यून, दोष. A drawback, a flaw.
[अर. **अयब** (**ऐब**); पेकाम. **अयब** (खरे ८-४३५४).]

अयाचित वि. न मागण्याच्या वृत्तीचा, अप्रार्थित. One who does not beg, not begged.
[सं. **अ+याचित** (निष्ठा) √याच्.
धात्वर्थाप्रमाणें वरील शब्दाचा अर्थ–अप्रार्थित असा आहे, परंतु मराठीमध्यें रूढ अर्थ त्याच्या विरुद्ध असा झाला आहे.]

अयाळ स्त्री. (सिंहाच्या, घोड्याच्या) मानेवरील भाग, मानेवरील शोभिवंत केस. Mane, a horse's mane.
[फा. **अयाल्**; तुर्की. **याल**=घोड्याची मान]

अयाळ स्त्री. पत्नी (विधवेच्या नवऱ्याच्या नांवामागें वापरतात). A term for a widow.
[अर. **इयाल=कुटुंब**; फा. **अयाल=पत्नी**]

अयोगोल पुं. लोखंडाचा गोळा. An iron ball.
[*IE.* Eies, aios ; पूवै. अयस्; *Av.* ayanh = धातु, लोखंड तांबें ; *Lat.* aes, oeris ; *Got.* aig ; *Eng.* Iron.)

अय्या स्त्री. दासी, मुलें सांभाळणारी बाई. An ayah.
[हा शब्द मूळ **पोर्तुगीज** आहे व तीमधून तो सर्व हिंदी भाषांत गेला आहे.

IE. ai, Ave ; *Gr.* ai, Al; *Portu.* Aia = स्त्री. दाई, दासी; Aio (mas); *Lat.*–Aidus ; Al.*Fr.* aide– A helper.]

अय्या पुं. मद्रासी मनुष्याला म्हणतात (विशेषतः ब्राह्मणास उद्देशून). A term for a South-Indian Brahmin.
[कान. **अय्य=धनी, मालक, आजा**; सं. **आर्य**; द्रा. **अय्या.** संस्कृत शब्द द्राविड भाषांत तद्भव झाला असावा.]

अय्या अ. उद्गारवाचक शब्द. An interjective particle.
[कान. **अय्यय्ये !** हा शब्द अलीकडील पांच वर्षांत सुशिक्षित मुलींच्या तोंडीं रूढ झाला आहे.]

अर(णें), आर(णें) अक्रि. संकोचणें, वाळून कमी होणें (विटा पाण्यानें आरतात), एकदम उकलणें. To contract, to crack, to shrink.

[कान. **अर–वाळणें, सुकणें, नाहींसें होणें**; *IE.* Er, Ar; सं. **अर, ऋ**; झें. **अर**; *Lat.* Al, er, el; *Slav.* ir, or, ar; *Teut.* ar, er, ear.]

अरकस,–अरेकस न. पुं. करवत, सुतार, करवतीनें लाकूड चिरणारा. A saw, a sawyer.

[फा. **अरा = करवत**; **अराकश्** = करवत वापरणारा; का. **अर = कानस**; कान. **अरेकस**. फारसीमधूनच हा शब्द आला असावा. **अरकस** ह्याचे दोन्ही अर्थ रूढ आहेत. एक करवत व दुसरा करवत वापरणारा सुतार.]

अरज(णें) क्रि. जमणें, निभणें. To gather, to manage, to finish.

[सं. **अर्ज् १० प्रापणे**]

अरड स्त्री. कवडी एरंडीचा कुट्टा (भाजून कढविण्याची क्रिया). The operation of parching and boiling seeds.

[सं. **अ + रट्**; कान. **अरळु–भाजलेलें धान्य, अरि = दळणें, अरिसु = दळणें, दळून घेणें.**]

अरण, अरणी स्त्री. शेताच्या मर्यादेवरील ओटा; रणांगण. A mound showing boundary; battle-field.

[सं. **आ + रण**; याकाम. **अरण.**]

देखा मोडलिया अरणी ॥ उषा १६०६.

अरण्य न. वन, झाडी. A forest, a jungle.

[सं. **अरण्यम्**; **अर्य्यते मृगैः √ऋ–गतौ**]

–अरण्यपंडित मूर्ख (अरण्यामध्यें त्याची विद्वत्ता अजमावण्यास दुसरा कोणीच नसतो म्हणून). A country savant.

–अरण्यरुदन निष्फळ ओरड (अरण्यांत कोणीच ऐकावयास व दाद घेण्यास मिळत नाहीं म्हणून). Crying in wilderness.

अरता क्रि. वि. अ. इकडचा, जवळचा. On this or the near side.

[सं. **आर, आरात्. (आ + राति), अरत्र**; प्रा. **अरत्त.** ह्याचा प्रतियोगी शब्द **परता** हा वापरतात. दोन्हींमध्यें ध्वनिसाम्य आहे. **परता** शब्द सं. ‘**परत्र**’ पासून. अर ह्यामध्यें ‘**इदम्**’शीं संबद्ध सार्वनामिक बीज आहे व त्याला ‘**त्र**’ हा स्थलदर्शक क्रि. वि. अ. चा प्रत्यय लागला.]

अरत्र क्रि. वि. अ. ह्या जगांत, इकडे, येथें. Here, in this world.

[हा शब्द ‘परत्र’ ह्याचा प्रतियोगी म्हणून त्याच्या ध्वनिसाम्यावरून बनविलेला दिसतो- **अरत्र परत्र** इकडे तिकडे ह्या जगांत व परलोकीं.

सं. **अर + त्र; पर + त्र.**]

अरवट(चरवट) वि. कांहीं चव नसलेलें, ओबडधोबड, राकट; निरर्थक बडबड. Coarse, unsavory; idle talk.

[हा शब्द सं. **चर्व्**, ह्या शब्दापासून सिद्ध झालेल्या ‘चरवट’ ह्या मराठी शब्दाच्या ध्वनिसाम्यावरून सिद्ध झाला आहे. दोन्ही शब्द प्रतियोगी अनुयोगी आहेत. पहिला शब्द कानडीपासून दिसतो. कान. **अरवे=खराब झालेलें, नासलेलें, पकलेलें.**]

अरवा, अरावा पुं. तोफांचा मारा, शिव्यांचा मारा (लक्षणा). Gun-fire, a volley of abuse.

[फा. **अराबा = तोफांचा गाडा**; पेकाम. **अराबा** (रा. १९-६३).]

अरबुज(द) वि. राकट, आडदांड, रानदांडगी **(जात).** Barbarous, rude.

[फा. **अरबुज–एक जमात.** मध्यम उंचीचा मनुष्य; सं. अ + बुध्–(?); प्रा. अ + बुज्झ; (?) (श. को.) कान. **अर्बिसु–ओरडणें.** फारसी व्युत्पत्तिच सयुक्तिक वाटते. पेकाम. **अर्बुझ–ज.** “ पठाण म्हणजे अर्बुज जात ” (पेद), इराणी दुराणी जात अर्बुज (भाव ८)

अरंबळ(णें), आरंबळ(णें) अक्रि. बडबडणें, बरळणें, ओरडणें, पेंगणें. To chatter idly, to doze, to talk (as in sleep.)

[सं. **आ + रब् १ शब्दे, +ल**, (स्वार्थे); कान. **अर्बिसु–ओरडणें; गरजणें.**]

अरळ न. फूल, मऊ झालेलें (वि). A flower, soft.

[कान. **अरळु = फूल.**]

–अरवार–ळ वि. हलकें. Light, delicate.

[कान. **अरलु = फूल**; ते. **अरवरळु = काटकोळा, पातळ**; म. **हळुवार.**]

–अरळतरळ सैल, ढिलें, अनिश्चित, मोघम. Loose, slack, slovenly.

अंरळ न. आच्छादन. A cover.

[कान. **अरलु = पसरणें वाढणें**; याकाम. बकाम. **अरल** (उ. गी.)]

शय्या घालुनि एकांतीं । अरल सुमनांची निगुति ॥ एरुस्व ३-२६

अराखडा, आराखडा नकाशा, बाह्यरेखा. A rough delineation, an outline.
[सं. **आ + रेखा. √लिख्. रिष्** ; अकाम. **आराखडा.**]

अरावा पुं. तोफांचा संग्रह व मारा, तोफांसाठीं रचलेला गराडा, अरबा पहा. Artillery.
[फा. **अराबा = तोफेचा गाडा;** पेकाम. **अराबा** (रा. १९-६३)]

अराजक न. वि. बेबंदशाही Anarchy, (a country) without a king.
[सं. **अ + राजन् + क – राजा नसलेली स्थिति.**]

अराणूक स्त्री. सुख, विश्रांति, आराम. Rest, peace.
[सं. **आ + रम् + णूक** ; शिकाम. **अराणूक** (तुगा ५८२)

अरास स्त्री. दिव्यांचा लखलखाट, शोभा. Exhibition of lights.
[फा. **आराइश्** ; पेकाम. **आराइश्** (रा. १।१९०)]

अरि पुं. शत्रु. An enemy.
[सं. **अरि √अ + रा १ दाने (वैदिक) न देणारा ;** किंवा **√ऋ + इन्.**]

अरिष्ट न. संकट, अनिष्टकारक प्रसंग,–गोष्ट. A calamity, an evil, a distress.
[सं. **अरिष्ट, √रिष् १ हिंसायाम् + कर्त्तरि ' क्त '**]

अरी स्त्री. आरी, आर, चांभाराची सुई. A cobbler's awl, an iron spiker.
[सं. **आरा** ; कान. **अरे**–कापणें.]

अरुण पुं. सूर्याचा सारथी, त्यावरून सूर्यांच्या अगोदरच्या प्रकाशाला अरुणोदय म्हणतात, पहांट. The charioteer of the Sun.
[सं. **अरुण ; ऋ + उनन्.**]

अरुवार वि. हळुवार, कोमल, मृदु. Gentle, soft, delicate.
[कान. **अरळु = फूल ;** ह्यापासून विशेषण अरुवार, हळुवार ; याकाम. **अरुवार.** (ज्ञा. १८·१४२)]
चांदणे याचा अरुवारीं । सुतली ते ॥ नरुस्व ५७८.

अरे अव्यय. संबोधनार्थक अव्यय. A vocative.
[*IE*. ata; पूवै. **अलला (भवन्त)**; सं. **अरेरे, अररे**; √ऋ ; *Bulg*. olele; *Eng*. Halloo, Halloh, Hurrah. ' रे ' हें अव्यय पुरुषांसंबंधीं वापरतात. कधीं त्यानें अगदीं जवळचें नातें किंवा तिरस्कार दाखविला जातो.]

–अरेराव अहंमन्य, ज्याला त्याला अरे म्हणणारा, गुरकावणारा, A boaster.

अरौतें, आर्ति क्रि. वि. अ. अलीकडे, अरता, अरुता, अलीकडचा. Here, on this side.
[सं. **आर + तस्** , किंवा **आरात्** (√रा), **अरत्र** ; याकाम. **आरौता,** आरुता-ती-तें.]
वस्तिचा सेवटीं स्वर्गीचे दारवठे । आरौते गंधर्वांचे वसैठे ॥ नरुस्व २११.

^{१}**अर्क** पुं. सूर्य. The Sun.
[सं **अर्क–अर्चति एनम्** (निरुक्त) **√ऋच्.**]

^{२}**अर्क** पुं. कस, सार, कढवून काढलेला अंश, निष्कर्ष. The essence, spirit.
[फा. **अरक्–निष्कर्ष**]

^{३}**अर्क** पुं. रुईचें झाड, वनस्पतिविशेष. A kind of plant.
[*IE*. Arqu ; सं. **अर्क,** √ऋच्. १ पूजने; *Lat*. arcus ; *Russ*. Rakita ; *Cech*. Rokyta ; *Serb*. Rokita.]

^{४}**अर्क** पुं. वाईट मनुष्य. A scoundrel.
[कान. **अर्क** = विद्वान मनुष्य; द्रा. **अरि, अरिके = जाणणें, शोधणें, शिकणें, ज्ञान.** मराठींत ह्या शब्दाला विरुद्ध अर्थ प्राप्त झाला आहे.]

–अर्कट अत्यंत खोडसाळ, व्रात्य. Mischievous, naughty.

अर्गळ–ळा पुं. स्त्री. आडणा, अडसर, प्रतिबंध. A bar.
[सं. **अर्गला, = (अर्ज् + कलच्, कुत्वम्).**]

अर्घ्य, अर्घ्या पुं. स्वागतार्थ दिलेली गंध पुष्पादिमिश्रित उदकाची अंजली. An offering.
[सं. **अर्ह्<अर्घ्>**अर्घ्य**=योग्य, किंमत**
IE. Algah ; वै. **अर्ज्**; सं. **अर्ह्, अर्घ्**; *Av*. arejaiti ; *Gr*. alga ; *Arm*. yargem ; *Lit*. elgnos.]

अर्च(णें) उक्रि. पूजणें, भजणें. To worship, to adore.
[सं. **ऋच्, अर्च् १० पूजायाम्.**]

–अर्चन, अर्चा पूजाविधि. Worship.

अर्चि स्त्री. ज्वाला, प्रकाश. A flame.
[सं. **आर्चिस्. √अर्च्.** १० पूजायाम्]

-अर्चिरादिमार्ग ब्रह्मप्रकाशानें प्रदीप्त केलेला मार्ग, उत्तरायण, देवयान. The road to Brahmaloka.

अर्ज-अर्जी पुं. विनंती, निवेदन, अभ्यर्थना, प्रार्थना. Application, request.
[अर. **अर्झ ;** फा. हिं. **अर्झ, अर्‌झी.**]

-अर्जदार विनंती करणार. (**अर्ज + दार**) Applicant, petitioner.

-अर्जबाब विनंतीनें मिळणारी देणगी. A gift asked for.

-अर्जबेगी अर्जांची सुनावणी करणारा, अर्जदारांना मालकापुढें नेणारा. An announcer of petitioner.
[पेकाम. **अर्जबाब, अर्जबेगी** (पेद)]

अर्जुन पुं. वनस्पतिविशेष. A plant.
[*IE*. Arg; सं. **अर्जुन** (रजत्); *Av*. erezata; *Lat*. argentum; *Arm*. arcat.]

अर्थ पुं. १ शब्दाचा भाव. A meaning. २ संपत्ति. Wealth.
[*IE*. ar; *Av*. areta, arante arta; *Arm*. ard; *Lat*. Artus; सं. **ऋ १ गतौ. ऋच्छति एनम्** (निरुक्त).
‘ **अर्थ** ’ ह्या शब्दाचा “ धन, संपत्ति ” हा अर्थ प्राचीन संस्कृत म्हणजे वैदिक वाङ्मयांत आढळत नाहीं. यास्कानें हा शब्द “ इष्ट वस्तु ” ह्या अर्थीं वापरला आहे. “ आर्थपत्त्यमिच्छन् ” नि. ७-१. ‘ **संपत्ति** ’ हा अर्थ उत्तरकालीन वाङ्मयांत त्याला प्राप्त झाला. त्याचा संबंध ‘ प्रयोजन ’ ह्याशीं असल्यामुळें तो अर्थ आला. ‘ पुरुषार्थ ’ म्हणजे सर्वांत मोठें असें प्राप्तव्य असा वेदान्तांत अर्थ प्राप्त झाला.]

-अर्थवाद (वरकरणी) स्तुति. (अर्थस्य लक्षणया स्तुत्यर्थस्य निंदार्थस्य वा वादः) Innuendo.

-अर्थशास्त्र धनासंबंधीं शास्त्र. Economics.

-अर्थतः अर्थाप्रमाणें. According to meaning.

-अर्थात् म्हणजे, साहजिक, ओघानें. Of course, virtually.

-अर्थान्तरन्यास (**अर्थ + अन्तर + न्यास < नि + आस**) एक अलंकार. A figure of speech.

-अर्थी (अर्थिन्) याचक. A needy man, a beggar.

अर्ध न. वि. निम्मा. A half.
[सं. **अर्ध ; √ऋध् ;** कांहीं समासांत हा शब्द येतो. तद्भव समासांत ‘ अर्ध ’ चीं अध्, अद्, अत्, आड, अशीं रूपें होतात.]

अर्धांग (**अर्ध + अंग**) अर्धे शरीर, एक रोग, पक्षघात. Paralysis.

अर्धांगी स्त्री, बायको. Wife.

अर्धामुर्धा (मुर्धा-ध्वनिशब्द) अर्ध्याइतका. About a half.

अर्धे अर्धा भाग. Half a part.

अर्धशिशी स्त्री. अर्धें डोकें दुखणें-एक प्रकारची डोकेंदुखी. Hemicrany.
[सं. **अर्धशीर्षम् ;** प्रा. **अद्धसीसं, अर्धसीसी.**]

अर्प(णें) सक्रि. देणें, दान करणें, ओपणें. To dedicate, to present.
[सं. **अर्प् १० दाने. √ऋ-(णिच्)-गतौ**]

अर्वाक-च् वि. अलीकडचा, हल्लींचा. Modern.
[सं. **अर्व < आरात् √अंच् १ गतौ (अवरे काले देशे वा अंचति.)**]

अर्वाचीन अलीकडील. Of modern times.
[सं. **अर्वा, अर्वाक् + चीन**]

अर्वाच्य वि. बीभत्स, व्रात्य, घाणेरडें. Low, rude, vulgar.
[सं. **अ + वाच्य. < वच्**- ‘ र ’ आगम]

अलंकार(णें) उक्रि. भूषविणें, दागिने घालणें, सुशोभित करणें. To decorate, to adorn.
[सं. **अलम् + कृ ८ करणे**]

-अलंकार दागिना, भूषण. Ornament, decoration.

-अलंकारिक भूषण देणारें. Decorated.

अलख पुं. गोसाव्यांचा शब्द, आलख (**निरंजन**). A cry of the Gosavis, (A name of Brahma).
[सं. **अलक्ष्य** (?) (शको.); हिं. **अलख** (ईश्वराचें एक नांव.)]

अलग(णें) अक्रि. (**घोंसचे घोंस**) लटकणें. To hang from.
[सं. **आ + लग्**]

अलग, अलगत वि. अ. सरळ, कशास न लागतां, पृथक्, दूर. Straight, without touching, separate, without contact.

[सं. आ + लग < लग्न (निष्ठा) √लग्)]

अलगट स्वतंत्र. Separate.

अलगुज न. पांवा, बांसरी, तोंडानें वाजवावयाचें बांबूचें वाद्य. A flute, a sort af pipe.

[फा. अल्घुजह.]

¹अलंग(नौबत) स्त्री. नगारा, डंका, निशाण. A drum, the colours.

[अर. **अलम्** (निशाण) + **नौबत** (नगारा) ; पेकाम. **अलंगनौबद** (होकै २०).]

²अलंग स्त्री. कोटाची भिंत, तट. Fortification.

[फा. **अलङ्ग** ; हिं. बि. **अलंग, आलंग = ओळ, खंदक, तट** ; पेकाम. **अलङ्ग** (होकै. २०)]

अलपाक एक प्रकारचें कापड, काळें चमकदार लोकरीचें कापड A sort of cloth.

[*Eng*. Alpaca; परंतु इंग्रजी भाषेंत हा शब्द **पेरू** देशाच्या भाषेंतून आला. **पोकोचा, पोको = एक लहान केंसाळ मेंढी. 'Al' हा स्पॅनिश प्रत्यय आहे व पाका** (paka) हें त्या जनावराचें नांव आहे. Al हा प्रत्यय अरबी प्रत्ययासारखाच आहे.]

अलबत क्रि. वि. अ. खरोखर, खात्रीनें, बेशक, निश्चित, खास. Certainly, undoubtedly.

[अर. **अलबत्ताह्** ; पेकाम. **अल्बता** (रा. १७–७;)]

अलबत्या गलबत्या वि. कोणीहि, यःकश्चित, कोणीतरी. Tom, Dick and Harry, some common insignificant man.

[म. **अलबत्या** ह्याचा प्रतियोगी ध्वनिशब्द गलबत्या ; कान. **अलगु–फिरणें, भटकणें.**]

अल्बुखार पुं. एक फलविशेष. A fruit.

[फा. **आलू बोखारा < बोख = फलविशेष**. हीं फळें प्राचीनकाळीं अफगाण व्यापारी हिंदुस्थानांत आणीत असत. बुखारा (मध्यआशियांतील शहर); बुखारा असा उल्लेख हुएनत्सांगनें (इ. ६२५–६४०) केला. हा शब्द **सं. विहार ; तुर्की मोगल बुखार ;** असा व्युत्पादिला जातो.]

अलम् न. लोक, पृथ्वी. The world.

[अर. **आलम् = जग**]

–आलम्गीर जगज्जेता. Conqueror of the world.

(मोगल बादशहांपैकीं कांहींची पदवी.)

–आलम् दुनिया सर्व जग. The whole world.

[(ह्यांत दोन्ही शब्द एकाच अर्थाचे) कधीं कधीं एकाच अर्थाच्या दोन शब्दांची द्विरुक्ति करून अतिशयत्व साधतात.]

अलवण, अलवान न. तांबडें कापड. A red cloth.

[अर. **अलवन**–(< लवन = रंग.) पुष्कळ रंगाचें ; संस्कृत व्युत्पत्ति उल्लेखनीय आहे. सं. **आरक्तवर्ण** ; प्रा. **आलवष्टा** ; हिंदीमध्यें **अलवन्** किंवा **आलवन्** म्हणजे उंची लोकरी कापड असा आहे.]

¹अलात न. वल्ह्याची फळी,–पान. A blade of an oar.

[सं. **अरित्र ; (ऋच्छति अनेन)**; प्रा. **अलित्त.**]

²अलात न. कोलीत, मशाल. A torch.

[सं. **आलात** (चक्रम्) ; **अलात + स्वार्थे अण्** ; अकाम. **अलात.**]

अलाबु पुं. भोपळा, दुध्याभोपळा. A gourd, a long white gourd.

[सं. **अलाबु.**]

अलाहबाद न. ग्रामनाम, प्रयाग. Allahbad.

[हें नांव अकबर बादशहाच्या कारकीर्दींत दिलें गेलें, इंग्रजींत व फार्सींत ह्याचे निरनिराळे उच्चार झाले आहेत. इलाहेबाद.]

अलाहिदा, अलादा वि. पृथक्, निराळा, वेगळा, विभक्त, अप्रस्तुत, अधिक. Separate, distinct.

[अर. **अलाहिदा** ; पेकाम. **अलाहिदा** (रा. ५·१९९), **अलाद** (मदबा २-३४)]

अलिता, अळिता पुं. रंग (तांबडा). Red dye.

[सं. **आरक्त√रञ्ज्, अलक्तक** ; प्रा. **अलत्त ; आरक्त** आणि **आलिप्त** ह्यांचा संभ्रम होऊन हा शब्द बनला असें वाटतें. गु. **अळतो.** (पुं. = लाख); हिं. **अलता** (पुं.); का. **ओलतु (त)**; अकाम. **अलिता, अळिता, अळता.**]

अलिप्त वि. न माखलेलें, न चोपडलेलें. Unsmeared, separate, uncontaminated.

[सं. **अ + लिप्त,** (निष्ठा) **√लिप्** ६ **लेपने.**]

अलिशान वि. उच्च दर्जा असलेला. Of exalted dignity.

[अर. **आलि + शान्**]

अलिजाह–अलिजा वि. मोटा, वैभवशाली. Great, glorious.

[अर. **आलीजाह** ; अकाम. **अलिजा** (बहादूर); लक्षणेनें सुखी, बेफिकीर अशा अर्थीं वापरतात.]

अलीकडे क्रि. वि. अ. हल्लीं, सांप्रत, जवळ, ह्या बाजूला. Nowadays, at present.

[सं. **आरात्, आदिम–ल(?)**; प्रा. **आइल्ल+कट** ; देप्रा. **अलीलं निकटं भयं** (२८,१०–११); कडे हा शब्द सं. कट पासून आहे. ‘ अली ’ शब्दाची व्युत्पत्ति अस्पष्ट आहे. **अलाड, अल्याड** हे शब्द ‘ अलीकडे ’ ह्यापासून सिद्ध होतात. √‘लग्’ ह्याशीं संबंध असावा. कानडी. **अल्ली**= त्या स्थलीं ; ह्या शब्दाचा कांहीं संबंध आहे का ?]

अलुते पुं. ग्रामपंचायतींतील कारु लोक. The artisan class in the village community.

[हा एक समुच्चयवाचक शब्द आहे व कदाचित् ‘ बलुते ’ ह्या शब्दाचा ध्वनिवाचक प्रतियोगी म्हणून सुरू झाला असावा. ‘ बलुते ’ हे ग्रामपंचायतींतील कायमचे नोकर होत. त्यांच्याशिवाय जे लोक गांवाच्या उपयोगीं पडत व निरनिराळ्या प्रकारची चाकरी करीत ते ‘ अलुते ’ ह्या वर्गांत येत (Wilson). ह्यांत रांडरोटीच्या हक्काच्या विधवा, वयोवृद्ध, बलुतेदार, भिक्षेकरी, आंधळेपांगळे ह्यांचा समावेश होई. सोनार, जंगम, शिंपी, कोळी, वाजंत्री, रामोशी, तेली, तांबोळी, हे बारा अलुतेदार म्हटले जात (डफ्‌चा इतिहास). ‘ बलुते ’ ह्या शब्दांत कान. **बल=धंदा, व्यवसाय,** हा शब्द मूळ असावा. अलुते हा त्याचा प्रतियोगी शब्द **कानडी** किंवा **द्राविडी** संबद्ध असावा.]

अलें, आलें न. ओली सुंठ, कंदविशेष. Ginger.

[सं. **आर्द्रक** ; (अर्दयति कफं आद्रम्) ; प्रा. **अल्लय, अद्दअ** ; द्रा. **अल्ल** ; हिं. **अदरख** ; गु. **आंदु** ; बं. **आदा**.

संस्कृत शब्द व त्यांचें विवेचन हीं दोन्ही कृत्रिम व उत्तरकालीन दिसतात. शब्द परकी असावा.]

अलोट वि. पुष्कळ, अमर्याद. Boundless, that recedes not.

[सं. **अ+लुट् ६ गतौ** ;]

अलौकिक वि. चमत्कारिक, लोकोत्तर, असामान्य. Strange, singular, uncommon.

[सं. **अ+लौकिक < लोक+इक**, लौकिकांत न आढळणारें.]

अल्प वि. थोडें. A little.

[*IE*. Alp. वै. सं. **अल्प, अल्पक, अल्पेन, अल्पात्** ; सं. **अल्प** (**अल्+प**–श. क.)]

–अल्पकानी हलक्या कानाचा, दुसऱ्याच्या सांगण्यावर तेंव्हांच विश्वास ठेवणारा. Credulous.

–अल्पभाष थोडें बोलणारा. Taciturn.

–अल्पसमजूत मूढ, बालस्वभाव. Of feeble understanding.

--अल्पज्ञान अडाणपण, थोडें ज्ञान. Unintelligent.

–अल्पायु थोडें आयुष्य ज्याचें आहे असा. Short-lived.

अल्लड वि. खोडकर, अल्पवयी, हूड. Mischievous, naughty, inexperienced, ignorant.

[कान. **अल्ल=दांडगाई, अल्लडु**=दंगेखोर ; मल्याळी. **अले** ; हिं. **अल्हड**.]

अल्ला, अल्लाह् (मुसलमानी धर्मांत) ईश्वर, देव. Allah.

[अर. **अल्+इलाह्=देव अल्लाह्** ; हिब्रू **एलोहा**.]

अँव उपसर्ग. बाहेर, कमी, हलकें, बाजूस वगैरे अर्थद्योतक, न्यूनतादर्शक शब्द, खालीं, दूर. A prefix.

[*IE*. Au. Aue ; वै. **अव, (अवर, अवः)**; *Av*. ava, aora ; सं. **अव** ; *Lat*. Av. (Avere); *Slav*. Acho ; *Lit*. Ausis; *Got*. Auros, uncle ; *Arm*. ava, apu V apo ; *Gr*. Av.

आर्मिनीयन शब्दावरून असें वाटतें कीं मूळ ‘ अप ’ हें प्राथमिक बीज असून त्याची परिणति ‘ अव ’मध्यें झाली.]

अँव प्रत्यय. प्रयोजक (णिच्) प्रत्यय. A causal termination.

[सं. **आपय** ; प्रा. **अ, प, आव, आवे, अवि** ; अप. **आविय, अवि, इवि** ; (हेमचंद्र ३-१५०); (सं. **कारापय** ; प्रा. **कारावेइ** ; अप. **काराविअ–वी** ; मराठी. **करवी**, इत्यादि.)]

अवऽऽ (ग्रामीण) अहो, बहुमानार्थी, संबोधनार्थी. A vocative.

[सं. **आहो**; पा. **वो** ; प्रा. **अव्वो**; किंवा युष्मद्‌चे (प्रथ ब. व.) ; पालीरूप ‘ वो ’; म. **अवऽऽ** असें होतें.]

अवक(णें), अविक(णें) अक्रि. जास्त पिकणें. To overripen.

[मराठी. **अव+पिकणें. √पच्, पक्, पक्व.**]

अवकर पुं. कंटाळा, तिरस्कार. Disgust.

[सं. **अप, अव+कृ < करणे** ; याकाम. **अवकर.**]

हिंवाचा करितां उपचारू : परिचारकांचा घेत अवकरू ॥ नरुस्व ५६०.

अवकळा स्त्री. तेज नसलेली अवस्था, निःसत्त्व, हीनदशा. Paleness, decline.
[सं. अव + कला, अप + कला √कल् १ ज्ञाने; याकाम. अवकळा (उगी. २४)]
मग येरां पडे अवकळा । पाठी लागौनि जुझे रायांचा मळा ॥ नरुस्व ११८.

अवकाश पुं. अवधि, समय, वेळ, जागा. Leisure, space, interval.
[सं. अव + काश ; √काश्–प्रकाशने, काशा = मर्यादा]

अवकाळ पु. संकट, वाईट काळ–वेळ. Calamity, bad times.
[सं. अव + काल ; अप + काल ; (अप = कुत्सित)]

अवखण(णें) अक्रि. संकटांत सांपडणें. To be in difficulty.
[सं. अव + खन्]

अवखंद पुं. मोठा खड्डा. A moat.
[सं. अप + स्खंद्.]

अवखळ वि. खोडकर, उनाड, दांडगा, न ऐकणारा. Mischievous, loafer, naughty. unrestrained.
[सं. अप,–अव + स्खल् १ स्खलने]

अवग(णें) उक्रि. १ दिसणें, वाटणें, वेष धारण करणें. समजलें जाणें, सोंग घेणें. To appear, to resemble, To run wild.
[१ सं. १ अव + गम् १ ज्ञाने; अमर्याद वागणें. सं. २ अव + वष्क् १० दर्शने; (‘ व ’ लोप); याकाम. अवगणें (नरुस्व ६३).]

अवगळ(णें) सक्रि. गाळणें, टाकणें, मोडकळणें, मेंगळणें. To drop, to droop.
[सं. अव + गल्, अव + ग्लै १ हर्षक्षये.]

अवगुंठित वि. आच्छादिलेलें, झांकलेलें. Covered, veiled.
[सं: (निष्ठा) √अव + गुठ्]

–अवगुंठन झांकण, ओढणी, बुरखा. A veil.

अवगुण पुं. दुर्गुण, खोडी. A drawback, a vice, an evil quality.
[सं. अव + गुण]

अवग्र वि. एकंदर, सगळें. All in all, all or everyone.
[सं. अव्यग्र (?) श. को.]

अवग्रहण न. नाक मुरडणें, तिरस्कार. Showing disgust, disgust.
[सं. अव + ग्रह्; याकाम. अवग्रहण.]
तेणें भीमकाची कुमरी : अवग्रहण करित ॥ नरुस्व ५७०.

अवघड(णें) अक्रि. दुःख होणें, पेटके येणें, करक भरणें. To be in straits, to have cramps.
[सं. अव + छट् १ चेष्टायाम्.]

अवघड न. वि. संकट; कठिण. Calamity; difficult.

अवचट, अवचित क्रि. वि. एकदम, अकस्मात्. Unexpectedly.
[सं. अव + चित्त, किंवा आहोस्वित् (श. को.); याकाम. अवचित = अकस्मात्.]
भवंरांचें घालणें घातलें अवचितें । विरहिणींवरी ॥ नरुस्व ४७४.

अवच्छेद(णें) सक्रि. तोडणें, तुकडे पाडणें. To cut.
[सं. अव + च्छिद् ६ अवयये]

–अवच्छेद भाग, तुकडा. A piece.

–अवच्छिन्न (निष्ठा) तोडलेला. Cut into pieces.

[पेकाम. मध्यें हा शब्द निश्चित, निश्चयपूर्वक अशा अर्थी वापरलेला, उदा. अवच्छिन्न येणें होईल.]

अवजड वि. ओबडधोबड, अवाढव्य, बोजड, दांडगा. Vast, bulky.
[सं. अव + जड.]

अवटर(णें), अवटार(णें), अवठर(णें) उक्रि. आकसणें, संकोच पावणें, गुंतागुंत होणें. To contract, to be entangled, to shrink.
[सं. अव + ट्वल् १ वैक्लव्ये (रा)]

अवटाळ(णें) उक्रि. कवटाळणें, धरणें, पकडणें. To embrace, to clasp.
[कान. ओट्टु = जमविणें, एकत्र करणें; सं. अव + ट्वल् १ वैक्लव्ये]

अवटी स्त्री. (सोनाराचा) छाप. A metal stamp, a seal.
[सं. अवटी = खांच]

अवडंबर न. आविर्भाव, डौल, देखावा. Bustle and show.

[सं. **आडम्बर**; (**आङ्+दम्+वरच्**); **आडंबाते. डवि क्षेपे; आडम्बम् राति** इत्यादि. अशी जरी संस्कृत व्युत्पत्ति श. कल्प. देतो तरी शब्द द्राविडमूळ असावा असें वाटतें.]

अवडें देवडें वि. विसंगत, वाकडें तिकडें. Inconsistent, crooked, cross.

[सं. **आडवा ?** (वर्णविपर्यय) हा. कान. **अड्डु.**]

अँवढा पुं. कंठ दाटून आल्यानंतर जो मुखरस गिळला जातो तो. A choked sensation in the throat, a gulp or mouthful of spittle.

[सं. **अव+धे १ पाने**]

अवतर(णें) उक्रि. खालीं जाणें, उतरणें, उतारा देणें. To descend, to find an antidote to, to become incarnate.

[सं. **अव+तृ १ प्लवनतरणयोः**; याकाम. **अवतरण=वारें**, संचार, अंगांत येणें (ज्ञा. ११-४२)]

अवतरण खालीं येणें, उतारा. Condescension, antidote.

अवतार देवानें घेतलेला मनुष्याचा जन्म, स्वरूप. Incarnation.

अवतारी मोठ्या योग्यतेचा, पवित्र. Great, divine.

अवतीर्ण उतरलेला, मानवी स्वरूप धारण केलेला. Descended (in human form). (**निष्ठा√तृ**).

अवंत(णें), आवत(णें) सक्र. (भोजनास) बोलावणें. To invite (for meals).

[सं. **आमंत्र** १० आमंत्रणे; पा. **आमंत**; प्रा. **आमंत > आअंत > आवत. मंतिद** (निष्ठारूप). कानडीमध्यें हा शब्द तद्भव होऊन '**आउतणें**' असें रूप सिद्ध झालें आहे. सिंह. **अमतनवा–बोलावणें, वाट पहाणें, आमतुम =निमंत्रण**; गु. **नोतरवूं** (उपसर्ग दुसरा), **नोतन** =अंतिक; हिं. **नेवतना, नौतना=बोलावणें**; सिं. **नोतिरुं** =निमंत्रण.]

अवथण(णें) अक्रि. अंगावर पिण्याचें बंद झाल्यामुळें मूल रोडावणें. To become feeble after weaning, to fall away.

[सं. **अप+स्तन** (नाधा)]

अवदशा स्त्री. वाईट स्थिति, दुर्दैव, दारिद्य. Misfortune, adversity, ill-luck.

[सं. **अवदशा=वाईट दशा.**]

अविदान न. आहुती, बळी. An oblation.

[सं. **अव–दै–४ अवयवे**]

अवंदां क्रि. वि. अ. (ग्रामीण) यंदा, ह्या वर्षी. This year, during the present year.

[फा. **आयन्दा=पुढें.**]

अवध स्त्री. शेवट, शेवटची वेळ. End, termination.

[सं. **अवधि पहा.**]

अवधाणा पुं. दुखापतीमुळें येणारी सूज. A swelling due to injury.

[सं. **अवध्मानः** (?)]

अवधान न. लक्ष, भान, जागृति. Attention.

[सं. **अवधान, अव+धा+ल्युट्**]

–अवधानी लक्ष ठेवणारा. Attentive.

अवधार(णें) सक्रि. (काव्य) ध्यानीं येणें, मनांत आणणें, समजणें, ऐकणें. To grasp.

[सं. **अव+धृ १ धारणे**; याकाम. **अवधारणें** (ऐकणें) (नरुस्व ३८), **अवधारिजो** (ज्ञा).]

अवधि स्त्री. वेळ, मर्यादा, अंतर. Time, limit.

[सं. **अवधि (अव+धा+कि.)**; याकाम. **अवधि=**वेल, लता (शि. ४९४)]

अवधूत वि. धुतलेलें, धुऊन स्वच्छ केलेलें; विरक्त, विरागी (दत्तात्रेयासंबंधीं वापरतात). That is washed; an ascetic.

[सं. **अव+धू** (निष्ठा), **अवधूत**–नामाप्रमाणेंहि उपयोग होतो.]

अवनत वि. खालीं वाकलेला, नम्र, शरण. Bent low, bowed.

[सं. **अव+नम्**–(निष्ठा)–नत]

–अवनति घसरगुंडी, अपकर्ष, दुर्दशा. Going down, misfortune.

अवभृथ(स्नान) न. यज्ञकर्मांच्या समाप्तीनंतर करावयाचें स्नान; त्यावरून कोणतेंहि धार्मिक कृत्याच्या शेवटीं करावयाचें कृत्य; चांगल्या कृत्याची समाप्ति. Final ablution.

[सं. **अवभृथ; अव+भृ, अवभ्रियते अनेन.**]

अवमान(णें) सक्र. अपमान करणें, अनादर करणें. To insult.

[सं. **अव+मन् (णिच्) मान्**]

अवयव पुं. तुकडा, भाग, (त्यावरून) शरीराचा भाग, अंगाचा भाग, इंद्रिय. A piece, a limb.

[सं. **अवयव** √**इ** २ गतौ किंवा **अवयौति** इति, **यु** (**मिश्रणे**) + **अच्**]

अवर क्रि. वि. अ. ह्या बाजूचा; अलीकडील (वि.) लहान, कनिष्ठ. On this side; small.

[सं. **अवर; न व्रियते इति; वृ-वरणे.** ह्याचा प्रतियोगी **तवर** असा एक शब्द वापरतात. परंतु हा ध्वनिसाम्यावर बनविला आहे.]

अवरजून, अवर्जून मुद्दाम, न विसरतां, न सोडतां. Purposely, without failing.

[सं. **आ + वर्ज् १० वर्जने, वशीकरणे**]

अवरठा वि. लग्नाच्या वयाच्या मर्यादेच्या बाहेर गेलेला ब्रह्मचारी. One beyond marriageable age.

[सं. **अ + वर + ठा**; (‘ ठा ’ प्रत्यय) **अ = नाहीं**; **वर–नवरा मुलगा.**]

अवरोध(णें) सक. प्रतिरोध करणें, हरकत करणें. To obstruct, to impede.

[सं. **अव + रुध् ७ विरोधने**]

–अघरोध अडकाठी, हरकत. Hindrance.

–मल-अवरोध बद्धकोष्ठ, Constipation.

अवरोह पुं. खालीं उतरणें; खालचा सूर. Descending; a lower pitch.

[**सं. अव + रुह्-१ गतौ;** आरोहअवरोह–अवरोहण= चढउतार, (विशेषतः स्वराचा–आवाजाचा.)]

अवर्षण न. पाऊस नसणें, अनावृष्टि. Drought.

[सं. **अ + वृष् १ सेचने + अन्**]

अवल, अव्वल वि. उत्तम, उच्च, पहिला. Of the first quality.

[अर. **अव्वल** = पहिला, **दूम = दुसरा**, दुय्यम; **सीम** (**= तिसरा**); परंतु ‘ दुय्यम ’च्या ध्वनि साम्यावरून तिय्यम असा शब्द तयार करतात.]

–अव्वल–अखेर (<आखिर) आरंभ आणि शेवट. Beginning and end.

अवलंब(णें) सक्रि. आधार धरून राहणें, लोंबकळणें, आश्रयणें. To depend on.

[सं. **अव + लंब्; अव + लबि**]

–अवलंब, अवलंबन आश्रय. Support.

–अवलंबित आश्रित. Dependent.

अवलक्षण न. वाईट लक्षण, अवगुण, वाईट चिन्ह, अशुभ. Ill-omen, demerit.

[सं. **अव (वाईट) + लक्षण** √**लक्ष् + अन्**]

अवलाद स्त्री. मुलाची संतति, वंश, कुळी. Son's progeny.

[अर. **औलाद** ह्याचें अनेक वचन ‘ वलद ’ असें होतें. शिकाम. पेकाम. **अव्लाद, अफ्लाद** (रा. ८-२६) ह्याच्या बरोबरीचा एक शब्द **अफलाद** म्हणून आहे. त्याचा अर्थ “ **मुलीची संतति** ” असा आहे. **अफलाद** पहा.

अर्वाचीन मराठींत ह्याच्या अर्थामध्यें फरक झाला आहे. ह्याचा शिवीसारखा उपयोग होतो. हें अर्थभ्रंशाचें उदाहरण आहे.]

अवलिया पुं. बैरागी, विरक्त साधु, विदेही, संत. An ascetic.

[अर. **वली = साधु** ह्याचें अनेकवचन. अकाम. **औलिया, अवलिया.**]

अवलीलां–ळां क्रि. वि. अ. लीलेनें, फार आयास न पडतां, सहज. Easily.

[सं. **अव + लीलया, लीला शब्दाचें तृतीयेचें रूप.** पुढें तृतीयेचें रूप जाऊन मूळ शब्दच वापरला गेला.]

अवलें न. वल्हे. An oar.

[सं. **आवल्**; प्रा. **अवल्लय**; देप्रा. **अवल्लक**]

–आवल्या, आवलेकरी वल्हेकरी. An oarman.

अवलोक(णें) सक्रि. पाहणें, बघणें. To see, to observe.

[सं. **अव + लोक्.** (‘अ’) १० दर्शने]

अवलोक, अवलोकन दृष्टि, निरीक्षण. Observation.

अवलोकित पाहिलेली, (निष्ठा). Seen, noticed.

अवशीं, अवस, स्त्री. काळोखी रात्र, पूर्वरात्र. Night, first half of the night.

[सं. **अमावास्या.** (अमासह चन्द्रार्कौ वसतः यत्र तिथौ सा); प्रा. **आओस**; गु. **अमास**; सिं. **उमासु**; हिं. **अम्मास**; याकाम. **अवस** (ज्ञा. ११.५); अकाम. **अवस, आवस, अमूस, अमोशा.**]

अवश्य,–अवश्यक क्रि. वि. अ. जरूर, खास, निश्चित. Necessarily, definitely.

[सं. **न + वश्यम्** √ **वश्**]

अवसर पुं. वेळ, अवधि, प्रसंग, योग्यकाळ. Time, period.

[सं. **अव + सर** √**सृ** १ गतौ. याकाम. **अवसर** = वेळ, प्रसंग. नरुस्व ७७]

अवसरणी आकाशवाणी. Heavenly voice.

[सं. अव+स्वर; याकाम. अवसरणी, अवस्वरणी (नरुस्व १०४)]

अवसरी संकट, हरकत, शंका, जागा. Objection.

अवसान न. शेवट, अंत, अखेर, मृत्यु; ताकत, धैर्य, हिंमत. Death; strength.

[सं. अवसान; < अव+सो ४ अवयवे. हिं. अवसान, औसान.]

अवस्था, अवस्ता (ग्राम्य उच्चार) स्त्री. दशा, स्थिति, हवाल. State, condition.

[सं. अव+स्था+(अङ्.)]

'अवस्तां' क्रि. वि. अ. एकदम, एकाएकीं, सहज. Suddenly.

[सं. अवस्तु, अवस्तात् (श. को.)]

अवहेल(णें) सक. अपमानणें, कमी–तुच्छ लेखणें.

[सं. अव+हेला (नाधा.), √ हेड्, हेल् १ अनादरे]

अवळ(णें) स. क्रि. घट्ट बांधणें, आकसणें, संकोचणें. To bind tightly.

[सं. आ+वल्; देप्रा. अविलो पशुः कठिनश्च (२४–१३); गु. अवळुं = विरोधी, उलटा; सिं. अवलो= हेकट, दुराराध्यं, विरुद्ध.]

अवळा वि. फलविशेष. A fruit.

[सं. आमलकः; प्रा. आमलग–य; हिं. आमला, आंवला; बं. आम्ला; गु. आंवळा; पं. आवला; सिं. आंविरो; का. ओम(म्)ल.]

अवळे जावळे वि. एकदम जन्मास आलेले. Twins.

[सं. जावळा–युगुल. √ युज् ७ संयोजने; कान. आवळी = जोडी. आवळे आणि जावळे हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द परंतु भिन्न भाषांतील आहेत. एक द्राविडी व दुसरा आर्योद्भव.]

अवज्ञा स्त्री. मानहानी, अनादर. Contempt, disrespect.

[सं. अव+ज्ञा.]

अवा पुं. कुंभाराची भट्टी. A potter's furnace.

[कान. आवि; कुंभाराची भट्टी. हिं. आवा; म. आवा.]

अवाई– स्त्री. बातमी, भुमका, कंडी, A rumour, a scandle.

[सं. ग्रा+ह्वे, आह्वाइका; प्रा. आवाइआ; हिं. आवाई.]

अवांक(णें) अक्रि. विचार करणें, योजणें, डगमगणें. To ponder, to hesitate.

[सं. अ+वक् १ गतौ.]

अवाका–आवांका–सामर्थ्य. Capacity.

अवाचे सवा क्रि. वि. अ. अतिशय, अपेक्षेच्या बाहेर. Excessively, immoderately.

[मूळ शब्द सवा–सव्वा < सं. सपाद; पा. सआअ; त्याच्या ध्वनिसाम्यावरून 'अवा' शब्द तयार झाला; किंवा अवा < अर्ध.]

अवाच्य वि. उच्चारण्यास अयोग्य, अभद्र, २ अनिंद्य. Unspeakable; commandable.

[सं. अ+वाच्य √वच्. २ शब्दे.

ह्या शब्दाचे दोन परस्परविरोधी असे अर्थ झाले आहेत. पहिला अगदीं धात्वर्थास धरून अर्थ रूढ आहे. दुसऱ्या अर्थांत मराठी 'अर्वाच्य' शब्दाची छटा उलट पडलीसें दिसतें.]

अवाढव्य वि. विस्तृत, फार मोठें, फार विस्ताराचें. Vast, extensive, huge.

[सं. अव+वृध्. प्रा. वड्ढ. (?)]

अवांतर वि. दुसरा, इतर, मुख्य विषयास सोडून, गौण. Secondary, the rest, minor.

[सं. अव+अन्तर.]

अवाड, अवाडू वि. न. रीघ नाहीं असें; अंगण. Tight, having no gap or space; a courtyard.

[सं. अ+वर्त्मन्; प्रा. अ+वट्ट; याकाम. अवाड, अवाडू (उ. गी.); म. अ+वाट, वाड.]

अवार न. मोठें पटांगण, आवार.. A big courtyard.

[सं. आ+वृ.]

अवाक्षर न. एक अक्षर–शब्द, चकार शब्द, वाईट उच्चारलेलें अक्षर. A blunder in reading, a single word or syllable.

[सं. अव+अक्षर; 'अव' = वाईट, कुत्सित; अवाक्षर = अपशब्द, शिवी, चुकीचा शब्द त्यावरून चकार शब्द असा अर्थ निष्पन्न झाला.]

अविक(णें) अक्रि. उतरणें, नासणें, बिघडणें. To over-ripen.

[सं. अति+पक्व (?), √पच्; म. अव+पिकणें. < अव+पक्, पच्.]

अविकळ वि. सुदृढ, दोष–व्यंगरहित, अखंड. Healthy, faultless.
[सं. अ + विकल, √वि + कल्.]

अविकार वि. विकाररहित. Unsentimental.
[सं. अ + विकार < वि + कृ]

–अविकारी न बदलणारें. Unchangeable.

–अविकृत न बदललेलें. Unchanged.

–अविचार विचाररहित. Thoughtlessness.

–अविचारी विचार करून कोणतीहि गोष्ट न करणारा. Thoughtless.

अविच्छिन्न क्रि. वि. अ. निरंतर, कायमचें. Permanently, forever.
[अ + विच्छिन्न–(निष्ठा) < छिद्]

अविट, अवीट वि. न विटणारें, न बुरसणारें, कंटाळा न आणणारें. Unfading, never wearing, unfailing.
[म. अ + विटणें.]

अविद्या स्त्री. विद्येचें नसणें–अभाव, अज्ञान, माया. Absence of learning, ignorance; illusion.
[सं. अ + विद्या, √विद २ ज्ञाने. वेदांतामध्यें ह्या शब्दाला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. विद्या म्हणजे खरें ज्ञान, ब्रह्मज्ञान, त्याच्या उलट **अविद्या** म्हणजे **माया.**]

अविंध वि. पु. मुसलमान. A Mussalman. (Lit.) unbored, unpierced.
[सं. अ + विंध < व्यध्.
ज्या लोकांत कानांना दागिन्यासाठीं भोकें पाडण्याची प्रथा नाहीं असे. ही व्युत्पत्ति निश्चित नाहीं असें वाटतें कारण अफगाणिस्थानमध्यें कान टोचण्याची प्रथा आहे. सध्यां देखील स्त्रियापुरुष आपले कान टोचून त्यांत वाळ्याभूषणें घालतात.]

अविधवा स्त्री. सौभाग्यवती, सधवा, नवरा जिवंत असलेली स्त्री. A woman whose husband is living.
[सं. अ + विधवा ; < वि + धव = नवरा
असा हा शब्द नेहमीं व्युत्पादिला जातो. हा शब्द फार जुना आहे. इतर पाश्चात्य भाषांतहि हा शब्द तसाच ‘ वि ’ ह्या उपसर्गासह आढळतो. *Lat.* Vidua ; *Eng.* Widow त्यावरून, वैदिक भाषेंत विधवा हाच शब्द मूळ असावा.]

अविंसाळ न. घरटें, खोपा. A nest.
[सं. आविस् + आलय (√ली) = घर, राहण्याचें ठिकाण; याकाम. **अविंसाळ.** (ज्ञा. ११–२५८)]
संकोचलीं कमळें, पक्षिये टाकितीं अविंसाळे ॥ नरुस्व ४७६.

अवीट वि. न विटणारा, न बिघडणारा, कंटाळा न आणणारा, गोडी देणारा. Ever fresh, ever sweet, unfailing, unfading.
[सं. अ + वीट < विष्टा]

अव्यक्त वि. अदृश्य, स्पष्ट नसलेला, झांकलेला, उघडा नसलेला. Unseen, indistinct, covered.
[सं. अ + व्यक्त, (निष्ठा) √वि + अंज्.]

अव्यग्र वि. शांत, संथ, स्थिरचित्ताचा, दुसरें व्यवधान न मानणारा. Tranquil, serene.
[सं. अ + व्यग्र, < वि + अग्र, √अज् १ गतौ.]

अव्यभिचार प. एकनिष्ठता. Unfailing loyalty, faithfulness. (अ + व्यभिचार, वि + अभिचार < चर्.)

अव्यय न. फरक बदल न होणारा. Not changing; indeclinable.
[सं. अ + व्यय < वि + अय् १ गतौ.]

अव्याप्ति स्त्री. अपूर्ण समावेशाची अशी व्याख्या. A narrow definition, inadequate extent of definition.
[सं. अ + व्याप्ति ; < वि + आप् ८ प्रापणे]

अव्याहत वि. सतत, अबाधित, अडथळा न येतां. Continuous, unobstructed.
[सं. अ + व्याहत < वि + आ + हत < हन् (निष्ठा)

अव्वा स्त्री. बाई, रक्षा. A woman, a keep.
[कान. **अव्वा = आई** ; दे प्रा. **अव्वा** ;
कानडीमध्यें ‘ **अव** ’ हें दर्शक सर्वनाम आहे. हें सार्वनामिक मूळ अनेकवचनांत पुरुष व स्त्रिया ह्यांसंबंधीं वापरतात. **अव्वे = आई ; पुरंध्री बाई, पोक्त बाई, आजी.** मराठीमध्यें ह्या शब्दाच्या अर्थामध्यें भ्रंश झाला आहे. रक्षा, राख अशा अर्थीं रूढ झाला. कदाचित् मराठ्यांनीं दक्षिणदिग्विजयानंतर बरोबर आणलेल्या स्त्रियांसंबंधीं रूढ झाला असावा.]

अव्हाट(णें) अक्रि. वाईट मार्गानें जाणें. To misbehave.
[सं. अव + वाट, अप, –अव + वर्त्मन् ; याकाम. **अव्हाट, अव्हांट** (ज्ञा).]

अव्हेर(णें) सक्रि. नको म्हणणें, न स्वीकारणें, अनादर करणें, हेळसांड करणें. To refuse, to neglect.

[सं. **आव्हे, अव + धीर्** (?); प्रा. **अवहेरि, अवहेरी;** ब्लोक या शब्दाचा संबंध **अवहेल** ह्या शब्दाशीं जोडतो. त्यापेक्षां '**अवधीर्**' हें मूळ अधिक सयुक्तिक दिसतें. हिं. **अवेर** (स्त्री).]

अंश पुं. भाग, खंड. A part, a portion.

अश् धातु. (हा संस्कृत धातु मुद्दाम दिला आहे. त्याचा पुष्कळ मराठी तत्सम व तद्भव शब्दांशीं संबंध येतो.)

[पूवै. **एक्, अक्, ओक्,** (घुसणें, तीक्ष्ण असणें); सं. **अश्** (**अश्नोति, आशु, अश्मन्, अशनि, अश्मर, अश्रु, अश्व** इत्यादि शब्दांत हा धातु दिसतो.); झें. **अश्, अक्, अष्**=शिरणें, घुसणें (**अकु, अश्मन्** (स्वर्ग), **अश्प** (अश्व), **आशुस्**; फा. **अस्वार**; हिं. **सवार,** (सिपाही).

Lat. Ash, akoha, akus; *Slav.* Ak, as'z; *Lit.* Akmeus = stone, Aket; *Teut.* Ek, egg; *Got.* Ags, egg; *Old G.* Ekka (edge); *Eng.* Acute, acumen;

ह्या अश् धातूशीं र्, ल्, म्, न्, इत्यादि वर्णांचा संबंध येऊन निरनिराळे शब्द तयार होतात. उदा. **र् = अश्रु, अश्री; म् = अश्मन्, अश्मर; न् = अशनि,** इत्यादि.]

अशर वि. दहा. Ten.
[अ. **अशर्**; पेकाम. **अशर.**]

अशरीन वि. वीस. Twenty.
[अ. **इश्रीन्.**]

अशक्त वि. कमकुवत, असमर्थ. Weak, feeble.
[सं. **अ + शक्त √शक् ५ सामर्थ्यें.**]

अशक्य वि. असंभवनीय. Impossible.

अशनि स्त्री. वीज. Lightning.
[सं. **अशनि–अश्नाति संघातं करोति. 'अश्'** पहा.]

अशिष्ट वि. वाईट, बीभत्स, असभ्य. Bad, obscene.
[सं. **अ + शिष्ट (निष्ठा) शिष् < शास्.**]

अशील पुं. खटला भांडणारा, पक्षकार; अभिजात, खासा. A client; dignified person.
[अ. **अस्ल्** (अने. व.), **असील्**; पेकाम. **असील.** (रा. ७-११२, १९१)]

अशुढाळ वि. घाणेरडें, अजागळ, अव्यवस्थित. Dirty, disorderly.
[सं. **अ + शुद्धि, √शुध् +** ल मराठी प्रत्यय.]

अशुद्ध वि. शुद्ध नसलेलें; रक्त. Impure; blood.
[सं. **अ + शुद्ध √शुध्**;]

अशुभ वि. न. वाईट, अमंगल. Inauspicious.
(**अ + शुभ**)

अशौच्य, अशौच न. शुचि-पवित्र नसलेली स्थिति; सुतक. Impurity, period of mourning.
[सं. **अ + शुचि √शुच्**; आशौच. पा. ७–३–३०]

अश्मा पुं. धोंडा, दगड. (क्रियाकर्मांतराच्या वेळचा अणकुचिदार दगड.) A stone.
[सं. **अश्मन्**; **अश्** पहा.

IE. Ek, Ak, Ok, (घुसणें, बोचणें); सं. **अश्मन्** (**अशनि, अश्मर, अश्रु**); *Av.* ash, Ak, Ash. (शिरणें, घुसणें); फा. Aswar; *Old Germ.* Ekka, edge; *Eng.* acumen, acute; *Slav.* Kamenu; *Teut.* ek, eggs; *Lot.* Akev.]

अश्राफी एक नाणें. A coin (gold).
[अर. **अश्रफी–अभिजात, उमदा,** पुष्कळ नाण्याविषयीं वापरीत. इ. स. १५५० (**दिनार, मोहुर.**)]

अश्रु पुं. डोळ्यांतील पाणी, आसूं. A tear.
[*IE.* akru; वैदिक **अश्रु, अश्र;** *Av.* acru; *Lit.* âsara; अकाय. **अंसू.**]

अश्लील वि. वाईट दिसणारें, बीभत्स, अयोग्य. Obscene, improper.
[सं. **अ + श्रीर (श्लील),** पाणिनीनें **श्रीर** असा शब्द दिला आहे. पा. ६–२–४२.]

अश्व पुं. घोडा. A horse.
[सं. **अश्वः** (√**अश्**); *Tokh.* Yuk; *Av.* Asp; *Gr.* Hippos; *Lat.* equus; *Irish.* Ech; *Gaul.* Epo; *Old Sax.* Ehe; *OldEng.* Eoh; *Got.* Aihwa; *Lith.* Aszw'a; *Per.* Asp; *Afg.* As, (aspa = mare); *Balochi*- Aps.

पशु व वनस्पति ह्यांच्या नांवाच्या शब्दावरून पूर्वींच्या वेदपूर्वकालीन आर्य समाजाच्या जीवनाची चांगली कल्पना येते. कांहीं शब्द एकच असून निरनिराळ्या आर्य भाषांत वावरतांना आढळतात. इतर शब्द कित्येक विशिष्टच भाषांत आढळतात. जनावरें व वनस्पति ह्यांचे द्योतक शब्द अनार्य भाषांतून आर्य भाषांत रूढ झाले आहेत. अशी ही शब्दांची येरझार चाललेली आढळते.

ह्या दृष्टीनें ' घोडा ' ह्या प्राण्याचे द्योतक शब्द उल्लेखनीय आहेत. ह्या प्राण्याच्या दोन विशिष्ट जाती असाव्यात असें तद्द्योतक शब्दांवरून वाटतें. एक पौर्वात्य व दुसरी पाश्चात्य. त्याच्या द्योतक शब्दांवरून कसा निष्कर्ष निघतो तो

पहा. वरील ‘ अश्व ’=घोडा ह्याचे द्योतक इतर भाषांतील शब्द व खालीं ‘ **हय** ’ ह्याचे समान व इतर शब्द दिले आहेत त्यांवरून ही गोष्ट स्पष्ट होते.

I सं. **हय** ; *Arm.* gi ; *Gr.* Tholes ; *Got.* Fula ; *Alb.* Theb ; *Iris.* Hair ; *Eng.* Foal ; II *OHGer.* Stuto ; *ONors.* Stod ; *Olb Sax.* Stads ; *OldEng.* Stod ; *Eng.* Steed ; *Lith.* Stode's ; III *IE.* Kob-moni ; *Slav. Russ.* Koni ; *Old Russ.* Komavi ; *Old Slav.* Koblya ; *Gr.* Kaballes ; *Fin.* Hevo, Hepo.]

अष्ट वि. आठ. Eight.

[*IE.* Okto, Oktou ; सं. **अष्टन्** ; *Gr.* Okto ; *Lat.* Octo ; *Lit.* asztu ; *Slav.* Osmi ; *Got.* ahtau ; *OHG.* ahts ; *As.* eahta ; *Eng.* Eight ; अकाम. **आठ.**]

-अष्टकोन आठ कोनाची आकृति. An octagon.

-अष्टगोली कांठावर व पदरावर वेलबुट्टी असलेला शेला. Decorated cloth.

-अष्टदल आठ पाकळ्यांचें. Of eight petals.

-अष्टदिग्गज आठ दिशांवर असलेले हत्ती. Elephants at 8 quarters.

-अष्टपदरी आठ पदराचा. Of eight folds.

-अष्टपुत्रा आठ मुलांना जन्म देणारी (असा आशीर्वाद.) Having eight sons. (Benediction to married woman.)

-अष्टपत्री वधूला नेसावयाचें वस्त्र. Bridal cloth.

-अष्टभाव आठ विकार. Eight sentiments.

-अष्टमातृका आठ देवता, ईश्वरी शक्ति. Heavenly deities.

-अष्टवर्ग आठ औषधींचा संग्रह. Eight herbs.

-अष्टवसु आठ वसुदेवता. Eight deities presiding over 8 quarters.

-अष्टविवाह आठ प्रकारचे विवाह-ब्राह्म वगैरे. Eight forms of marriage.

-अष्टांग शरीराचे आठ भाग. Eight parts of body.

-अष्टादश अठरा. Eighteen.

-अष्टाधिकार गांवांतील सर्व अधिकार. All authority.

-अष्टावक्र आठ ठिकाणीं वाकड्या अंगाचा. (कहोड ऋषीचा मुलगा. हा मुलगा गर्भांत असतांना बापाच्या अध्ययनांतील चुकीला हसला म्हणून त्यानें त्याला शापला). One bent at eight joints.

-अष्टावधानी अनेक अवधानांकडे एकच वेळीं लक्ष देणारा. Capable of being attentive to many things simultaneously.

-अष्टाक्षरी एक वृत्त. A metre.

-अष्टौप्रहर सारा दिवस. All day long.

अस(णें) क्रि. अस्तित्व असणें, राहणें, जिवंत असणें. To be, to exist.

[*IE.* esk ; *Lat.* escit ; *Gr.* eskon ; *Tokhar.* Sketar.

सं. **आक्षेति** ; पा. **अछति** ; खारवेल. **हाछति** ; प्रा. **अच्छइ** ; ब. **आछि** ; ओ. **अछई** ; हिं. **आछना** ; गु. **छे** ; जयपुरी. **छू** ; मेवा. **सूं** ; का. **छुस्** ; ने. **छुं** ; सिं. पं. सिंह. हा धातु नाहीं. पिशेल आणि ग्रियरसन **ऋछति** पासून हा धातु व्युत्पादितात, त्यापेक्षां वरील व्युत्पत्ति ग्राह्य आहे.]

असका वि. सर्व, सगळा, सर्व, एकदम. Whole, full, all.

[सं. **आसाग्र** ; प्रा. **असग्ग** ; > **आसका** > **असका** ; याकाम. **असिका** (ज्ञा. १७-१८७)]

देवाचें दादुलेपन सांधों केतुकें । श्रीकृष्णें काळ गीळिले असिके ॥ नरुस्व ३००.

असड(णें) उक्रि. हिसकणें, ओढणें, हिसडा देणें. To snatch, to pull or throw out.

[सं. **आ + सट्** ; प्रा. **आसट्ट** ; म. **असडा=हिसका, तिडीक, धक्का** ; परंतु ‘ **असडी** ’ हा शब्द निराळा. त्यामधील आद्य ‘ अ ’ हा ‘ आ ’चा संक्षेप नसून ‘ अ ’च आहे. **असडी,-डीक=न सडलेला.**]

अंसडी, आसडी स्त्री. माशीची विष्ठा, क्षतांतील कृमि. Feculence of flies, a fly-blow.

[सं. **आशाटिका** (?); प्रा. **असाटिका.**]

असंख्य वि. पुष्कळ, न मोजतां येण्यासारखें. Innumerable.

[सं. **अ + संख्या. √ सम् + ख्या.**]

असंग पुं. वि. संगति नसणें, संग-इच्छा नसलेला. One without company or desire.
[सं. अ + संग (= इच्छा) √सञ्ज्.]

असर पुं. शेवट, परिणाम, अंश. End, effect.
[अर. **असर् = चिन्ह**; फा **अशारिया = दशांशचिन्ह**; पेकाम. **असर = परिणाम** (रा. ५-८३).]

असल-अस्सल वि. उच्च जातीचें, पहिलें, मूळचें, मूळ. (ह्याच्या विरुद्ध शब्द नक्कल.) Original, primitive, excellent.
[अर. **असल = मूळ वंश**; पेकाम. **असेले** (नाम)– (वाडसभा ३–६६)]

असलाई अस्सलपणा. Unartificiality, primeness.

असली अस्सल. Original.

असलग वि. जवळचा, सोपें. Nearby, easy.
[सं. **आसंलग्न** ; प्रा. **आसंलग्ग**.]

असा वि. ह्या प्रकारचा, असला. Of this kind, such.
[सं. **एतादृश**, किंवा **ईदृश** ; प्रा. **एआरस**, **अइस** ; अशी (स्त्री), असें (न), असला (वि), असाच अशीं इतर रूपें होतात. ऐसा, ऐसाजे (<एतादृश).]

असाधारण वि. सामान्य नव्हे तें, विशेष प्रकारचें. Uncommon. (**अ + साधारण**)

असाधु वि. वाईट प्रवृत्तीचा, वाईट. Of evil ways. (**अ + साधु**)

असाध्य वि. मिळविण्यास कठिण, उपाय न चालणारा. Difficult to get, incurable. (**अ + साध्य √ साध्**)

असार वि. सार–सत्त्व नसलेला. Unsubstantial. (**अ + सार**)

असामी पुं. स्त्री. मनुष्य, इसम, बडें प्रस्थ, धेंड, संपन्न मनुष्य, वतनदार, अधिकार. A man, a distinguished person.
[अर. **असामी** (**अ. व.**) < **इस्म् = नांव**. < **इशाम् =** गुन्हेगार (?)
ह्याचा अर्थ पुष्कळ बदलला आहे. शेतकरी, कूळ, आश्रयी, ऋणको, गुन्हेगार इत्यादि निरनिराळ्या अर्थांतून हा शब्द फिरला आहे. **आसाम** म्हणजे **नांव**, त्यावरून जमिनीचा खातेंदार व त्यावरून सामान्यीकरण होऊन अर्थ झाला. अर. १ **अहशाम्** '**हश्म्**' चें अनेकवचन. **पुष्कळ अनुयायी असलेला**, नंतर त्याचा अर्थ **लष्कराची तुकडी बाळगणारा** २ मूळ शब्द अर. **इस्म = नांव**, **इसम** हें अनेकवचन; **इसम**, **असम** म्हणजे **व्यक्ति**, माणूस असा मूळ अर्थ आहे. शिकाम. **असामी** (सभासद); पेकाम. **असामी** (वाडबाबा २–१९१)]

असाव(णें) अक. आशा धरणें, आतुर होणें, धीर धरणें. To hope, to be eager.
[सं. **आशा** (नाधा.) > **आशाय** > **आसाव** ; किंवा **आश्वासनम्** (नाधा.)

असि पुं. तरवार, हत्यार. A sword.
[सं. **असि खड्ग** ह्या शब्दांत पूर्ववैदिक **√अश्** धातु आहे. अश् पहा. किंवा **√अस् दीप्तौ**.]

–असिधारा तरवारीची धार–पातें. Blade of a sword.

असिधाराव्रत कडक व्रत. (पतिपत्नींनीं उभयतांच्या मध्यें संगम होऊं नये म्हणून एक नागवी तरवार ठेवणें.) A difficult vow.

असिलेंपण न. असणें, हजर असण्याची क्रिया, अस्तित्व. Presence, existence.
[म. **असले + पण** < **असिले** (निष्ठा) **√अस्**. जुन्या काव्यांत हा शब्द येतो.].

असिवार पु. घोडेस्वार, राउत. A horseman, a rider.
[सं. **अश्ववार** ; '**अश्व**' पहा. किंवा (असि = तरवार + वार). याकाम. **असिवार** (शिशु. ९३२)]
तुडकानिचा वज्रादि–गहनु : असिवार–सिंधू॥ नरुस्व २२६.

असुज(णें) अक्रि. फुगवटी उतरणें, कमी होणें, सूज उतरणें. To abate, to go down, to subside.
[सं. **अव + श्वि १ गतौ; अवश्वि–फूग उतरणें** (सविकरण)]

असुड(णें) सक्रि. हिसकणें, फेकणें. To snatch, to throw.
[सं. **आ + सट्ट्**, **आ + श्वंठ्** ; म. असडणें पहा.]

असुढाळ वि. सारखे अश्रु ढाळणारा, रडवा. Of watery eyes.
[सं. **अश्रु** ; प्रा. **अंसु** ; म. **ढाळ√ध्वल् १ गतौ** ; पू. वै. **अश्** धातु पहा.]

असुदा वि. सुखी, हुषार, आनंदी, दमदार. Happy, clever, fresh, lively.
[फा. **आसूदा**.]

-असुदगी शांतता, भरभराट. Peace, prosperity.
[**आसुदा + गी**-(प्रत्यय)]

असुर पुं. दैत्य, राक्षस. A demon, an evil spirit.
[वै. सं. **असुर-असुर्यम् = सामर्थ्य, √अस् ४ क्षेपणे.** (अस्यति देवान् क्षिप्यति)

वेदांमध्यें असुर शब्द चांगल्या अर्थी वापरला आहे. पुढें आर्यांमध्यें कलह उत्पन्न झाल्यानंतर सुर-असुर असे दोन शब्द दोन्ही पक्ष परस्परांच्या देवतांबद्दल अधिक्षेपानें वापरीत. झेंद अवेस्तामध्यें असुर शब्द अहूर अशा रूपांत राहिला. 'सुर' शब्द वैदिक वाङ्मयांत आला. असुर–तुफान,–अंधार,–आर्येतर समाज–असा अर्थांत फरक झाला आहे.]

असूं पुं. न. अश्रु, डोळयांतून येणारें पाणी. A tear.
[सं. **अश्रु**; प्रा. **अस्सु**; गु. **अस, असु, अस्सु**; पं. **अम्झु**; सिं. **आश**. असुढाळ, अश् पहा.]

असोक, असोग, ओसग पुं. अशोकाचें किंवा हदग्याचें झाड. A kind of tree.
[सं. **अशोक**: प्रा. **असोअ, असोग**; हिं. **असोग, असोक**; गु. **आसो** (–पातर); याकाम. **असोक**; ने. **असोख**. (नरुस्व ४५६, ८१४)]

असोस स्त्री. इच्छा, लोभ, हव्यास, सोस. Desire, greed.
[सं. **आ + शोष √ शुष्** (?), **आश्वस्-आश्वास आशा-स** (?), ह्याचा विशेषणाप्रमाणें उपयोग याकाममध्यें आहे. **असोस** = असह्य, पुष्कळ.

म्हणे तुम्हां रोग लागले असोस । तरि जा वैद्यापासीं ॥ नरुस्व ४०४.]

अस्कर-अस्कारा पुं. लौकिक, कीर्ति. Fame, renown.
[फा. **आश्कारा-प्रसिद्धि**; पेकाम. **अस्करा** (प्रभाकर. ला. १६१)]

अस्कर(णें) अक्रि. कीर्ति मिळविणें. To secure fame.

अस्कर(णें) सक्रि. धिक्कारणें. To flout.
[सं. **अ + सत् + कृ, असत्कर**.]

अस्खलित वि. अ. न अडखळतां, एकसारखें, स्खलन-चूक न होतां. Uninterrupted, Unstumbling.
[सं. **अ + स्खल्** (निष्ठा).]

अस्त पुं. नाहींसें होणें, लोपणें, मावळणें, संपणें. Disappearance, setting.
[सं. **अस्**. (निष्ठा)]

अस्तनी स्त्री. अंगरख्याची बाही. (विशेषतः आंतील भाग) A sleeve.
[तुर्की. **आस्तीन**; फा. **आस्तीन्**; पेकाम. **अस्तनींतील अन्न**.]

अस्तन्या वर सारणें लढण्याची तयारी करणें, To be prepared to fight.

अस्तनींतील निखारा गुप्त शत्रु, गृहशत्रु, घरभेद्या. A concealed enemy, a fifth-columnist.

अस्तर न. कपड्याच्या आंत घालण्याचें-शिवण्याचें पातळ, भरड कापड. Lining (of a garment.)
[फा. **आस्तर्**.]

अस्ताव्यस्त वि. अव्यवस्थित. Disorderly, jumbled
[सं. **अस्त + वि + अस्त**. (निष्ठा) **√अस् ४ क्षेपे**.]

अस्ति नास्ति अ. न. आहे नाहीं अशी विचारपूस, होय नाहीं पहाणें. (State of) yes or no; assentingly or denyingly.

अस्तु अ. असो. May be ! Be it so.
[सं. **अस्**. धातूचीं हीं संस्कृत रूपें आहेत व तीं संस्कृतमधील अर्थानें मराठींत तशींच रूढ झालीं आहेत.]

अस्तुरी स्त्री. (ग्रामीण) बायको, स्त्री. A woman.
[सं. **स्त्री**; पा. **इत्थि, इत्थिका**; प्रा. **इत्थि, इत्थिआ**; आसामी. **तिरि**; हिं. **त्रिया**; पं. **तिर्या**; ने. **तिरिया**; अकाम. ग्रामीण. **अस्तुरी**.]

अस्थि स्त्री. न. हाड. A bone.
[सं. **अस्थिन्**; **√अस्**, **√अ + स्था** (अस्यते क्षिप्यते यत्); लॅ. **ऑस्**, **ऑसिस्**; ग्री. **ऑस्टिआन्**; स्ला. **कोस्ति**; झेंद. **अस्त**; फा. **अस्ताहं, उस्तुखपान्**; (श. को.)]

अस्थिर वि. चंचल, क्षणिक, स्थिर नसलेलें. Unsteady, momentary.
[सं. **अ + स्थिर √स्था**]

अस्पृश्य वि. स्पर्श करण्यास अयोग्य, हिंदु समाजांतील कांहीं बाहेरच्या जाती. Untouchable; a low caste among the Hindus.
[सं. **अ + स्पृश् + य**]

–अस्पृश्यता अस्पृश्यत्व,–ची स्थिति, अवस्था. Untouchability.

–अस्पृश्योद्धार अस्पृश्यांचा उद्धार. (अस्पृश्यत्व नाहींसें करण्याची चळवळ) Removal of untouchability.

अस्मादिक सर्व. आम्ही, आम्ही स्वतः. (स्वतःसंबंधीं आढ्यतेनें किंवा विनोदानें म्हणतात.) " We. "
[सं. **अस्मद् + आदि + क**=मी आदिकरून.]

अस्मान न. आकाश, आभाळ. Sky or heavens.
[फा. **आसमान** = आकाश; शिकाम. **अस्मान** (चित्रगुप्त ३३); पेकाम. **अस्मान** (खरे ६–२७६४).]

–अस्मानगिरी छत, चांदवा. A ceiling.

–अस्मान ठेंगणें होणें स्वर्ग बोटभर उरणें. To be puffed with pride.

–अस्मानी संकट, आकाशाची कुऱ्हाड. A bolt from the blue.

–अस्मानी–सुलतानी स्त्री. दैवी संकट, राजाचें संकट. Heavenly calamity, governmental harassment.

अस्वल पुं. न. प्राणिविशेष, श्वापद, एक केसाळ पशु. A bear.
[सं. **ऋक्ष** ; पा. **अच्छ** ; देप्रा. **अच्छभल्लो ऋक्षः** (१७, १६); देप्रा. **भल्लू ऋक्षः** (२१८-२); म. हिं. **भालू**; लमा. लमो = **डुक्कर**. कदाचित् **ऋक्ष–भल्ल** ह्या दोन्ही एकाच अर्थाच्या शब्दांचा मिळून मराठी अस्वल हा शब्द तयार झाला. अस्वल गुदगुल्या करून प्राण्यास मारतें त्यावरून एक वाक्प्रचार रूढ आहे. **अस्वलाच्या गुदगुल्या** ; अस्वल आणि दरवेशी ह्यावरून कांहीं वाक्प्रचार रूढ आहेत. त्याच्या नाकांतील वेसण, अस्वलाआधीं आरोळी, अस्वलाच्या रानांत केसांचा दुष्काळ इत्यादि म्हणी रूढ आहेत.]

अहम् सर्व. मी, स्वतः मी, मीपणा, (प्रथम पु. वाचक सर्वनाम) " I. "
[*IE*. Eqhom, Gho, Ghe; सं. **अहम्**; *Av*. azem. Azd; *Ap*. adam; *Arm*. es; *Lat*. ego; *Lit*. E-szi; *Gr*. ego, go'; *Got*. Ik; √eg(h)om; *Slav*. azu; *Old Germ*. I-hha. सं. **अस्मद्–अहम्** ; प्रा. **अहम्मी**.

हा शब्द अत्यंत जुना आहे. सर्व भाषांत आर्यभाषा प्राचीन, त्या भाषांत पूर्ववैदिक भाषा प्राचीन, त्यांतील सार्वनामिक बीजें प्राचीन, त्या बीजांत हें सार्वनामिक बीज प्राचीन.]

अहंकार गर्व, मीपणा. Pride.

अहंभाव मीपणाची जाणीव. Ego.

अहंकारणें गर्व होणें. To be puffed with pride.

अहंता, अहंपणा, <अहंपदार्थ गर्व, आपल्या स्वतःची निराळी जाणीव. Egoism.

अहंबुद्धि मीपणाची भावना. Idea about self.

अहमहमिका स्त्री. स्पर्धा. Rivalry, competition. [सं. **अहम् प्रथमः अहम् प्रथमः** इति स्पर्धा.]

अहद् क्रि. वि. अ. पासून. From.
[फा **अझ् + हद्** ; शिकाम. **अहद्-तहद्** (चित्र ६६१); ह्याचा प्रतियोगी शब्द **तहद्–तहत = पर्यंत** असा आहे. (फा. **ता + हद्**.)]

अहद्नामा करारनामा, वचनपत्र. A promise, an assurance; a deed.
[अर. **अहद्** + (फा.) **नामा**.]

अहवाल पुं. वृत्तान्त, हकीकत. A report.
[अर. **अहवाल्**, **हाल**. (**अ. व.**)]

अहह अ. दुःख–आश्चर्यवाचक शब्द. An exclamation.
[ध्वनिशब्द. *IE*. Egho, eghem; वै. सं. **अह, अहह, अहहा, अहे, अहा**; *Lat*. eho, ehen.]

अहा, अहाहा उद्गार. सुख, आनंद, शोक, निंदा इत्यादि भावदर्शक अव्यय. An interjection.
[**ध्वनिशब्द. सं. अहा, हा.**]

अहाच वि. क्रि. वि. अ. सामान्य, व्यर्थ, वरवर, निष्फळ. Ordinary, common; in vain.
[सं. **वृथा** (?) ; प्रा. **अहा** ; याकाम. **अहांच** (ज्ञा.) देवा समुद्र गंभीर ऐकिजें । वरु तो हि अहाच देखिजे ॥ (ज्ञानेश्वरी).]

अहाट(णें) सक्रि. दाबून घोटून बारीक करणें. To reduce to powder with pestle and:mortor, to bruise.
[सं. **आ + घट्**.]

अहाणा, अणा पुं. म्हण, उखाणा, सुभाषित. A proverb, a riddle, enigma.
[सं. आभाणक √भण् १ शब्दे; प्रा. आहाणअ; हिं. हन्ना; अकाम. अणा, उम्हाणा (ग्रामीण), उखाणा.]

अहार पुं. विस्तव, निखारा. Fire, embers.
[म. अहार-विस्तव; कान. होळकु = तेज; अकाम. अहाळणी धाप, दम, पोळणें; अहाळणें=उन्हानें तापणें, भाजणें.]

अहार(णें) अक्रि. फार जेवणानंतर सुस्ती येणें. To lie sluggishly after over-eating, to lie torpidly.
[सं. आहार√आ + हृ; प्रा. आहार; गु. बं. आहार; हिं. अहार; सिं. आहारु; मराठी. आहार (नाथा.)]

अहारोळी, आरोळी स्त्री. निखाऱ्यावर भाजलेली पोळी. कणकेची लहान दामटी (सारण आंत घातलेली). A small bread with some layer of sweet within, a cake baked on embers.
[सं. अहार (= निखारा, विस्तव.) + पोळी.]

अंहस्, अहि न. पाप; सर्प. Sin; a serpent.
[*IE.* Agh, Angh.=दाबणें; सं. अह्, अंहस् (अहि); *Av.* Az; *Lat.* Ang; *Lit.* Ank; *Slav.* Azzuku; *Tent.* Ang, Ong, eng : *Eng.* Anger.]

अहिमहि पुं. राक्षसी वृत्तीचीं माणसें (ल). Demons.
[सं. अहि आणि महि हे दोन पाताळांतील राक्षस होते. त्यांचा रामानें वध केला. अहि√आहन्ति (हन्) महि√मेह्.]

अहिराणी स्त्री. खानदेशांतील एक बोली. A dialect of Marathi.
[सं. आभीराणि = आभीर लोकांची भाषा]

अहीर अहीर लोक, गवळी लोकांची जात. A caste amongst milkmen.
[सं. आभीर.]

अहिंसा स्त्री. हिंसा वृत्तीचा अभाव. Abstinence from killing.
[सं. हिंस् २ हिंसायाम्]

अहिंस्रक, अहिंस्र वि. हिंसा न करणारा. That destroys not life.
[सं. हिंस् २ हिंसायाम्.]

अहेतु-क हेतु, उद्देशाचा अभाव. Absence of purpose.
[सं. अ + हेतु + क√धा.]

अहेर पुं. (लग्नकार्यांत किंवा दरबारांत) सत्काराची देणगी. A present, a gift.
[सं. आ + हृ. आहरण.]

अहेराऊ, अहेरी, अहीरी वि. अहेरास योग्य, अहेर म्हणून देण्यास योग्य. Fit for a gift.

अहेव स्त्री. अविधवा, सुवासिनी स्त्री, सवाष्ण, सौभाग्यवती स्त्री. A house-wife, an unwidowed woman.
[*IE.* Ui; सं. वि + धवः विधवा (स्त्री), विधवस् (वि + धा); *Zend.* Vidhava; *Gr.* eideos; *Lat.* Vidua; *Slav.* Vidova; *Russ.* Vdova; *Got.* widuwo; *Eng.* widow; सं. अ-विधवा; प्रा. अविहवा; हिं. अहिबात, अहीवात-सवाष्णपणा; म. अहेवपण, अहेवदोरा (मंगळसूत्र), अहेवमरण (सौभाग्यपणीं मरण), अहेवनवमी (गतपत्नीच्या स्मरणार्थ श्राद्धाचा दिवस-भाद्रपद वद्य नवमी).]

अहो अव्यय. संबोधनार्थक अव्यय, हांक. A vocative.
[सं. अहो.]

अहो जाहो अ. आदरदर्शक बोलणें. Respectful vocatives.

अहोदिवस सर्व दिवसभर. All day long.
[सं. अहन् = दिवस. (शब्दानुवृत्ति)]

-अहोरात्र रात्रंदिवस. Day and night.

अळ, अळई, अळी स्त्री. फळावरील आणि धान्यांतील कीड; पतंगाचें पूर्वरूप. An insect.
[सं. अलि-भुंगा, विंचू; गु. अळ(ळा) ई. (कातडीची कंडी), एल = कृमि; हिं. अळि, अळी (मोठा काळा भुंगा, विंचू); बं. अलि; सिंह. अलि (विंचू); कान. आळि=वेटोळें.]

अळ(णें) अक्रि. घट्ट होऊन बसणें, दाट होणें. To thicken, to settle down.
[कान. अळक-अर्धवट पामळ. अळण-घट्ट डाळ, हरभऱ्याचें पीठ लावून केलेली घट्ट पातळ भाजी.]

अळका, अळोका पुं. झोंपेचा भर, ध्यास, छंद, इच्छा. Desire, sleep.

[कान. अलिपु. ह. का. अळकरियु. अलपु = दमणूक थकवा. इच्छा करणें.]

-अळोकापिळोका जांभई, अंग मोडणें, झोंपेचीं चिन्हें. Yawning.

[ह. का अळक ; म. पिळोका<पीळ√पीड्]

अळंटळं-टाळं न. दिरंगाई, हेळसांड, सुस्ती. Delaying tactics.

[सं. अलम्-पुरें; टाळम् < (मराठी) टाळणें < सं. टुल्; कान. अल = विरोध.]

अळणी वि. मीठ योग्य प्रमाणांत नसलेलें, मीठ न घातलेलें. With insufficient salt.

[सं. अ + लवणम् ; प्रा. अलोण ; हिं. अलोना; बं. आलुणी; सिं. अलूण. मराठींत लोण, लोणा (क्षाराचा ओलावा) हे शब्द रूढ आहेत. त्यांच्याशीं संबंध आहे.]

अळता पुं. लोध्र वगैरेचा तांबडा रंग. A red dye.

[सं. आलक्तक.]

अळप(णें) सक्रि. घट्ट बांधणें. To tie tightly, to bind around.

[कान. अल्लु = जोडणें, जुळणें, विणणें, एकत्र बांधणें. 'प' मराठी प्रत्यय.]

अळंबें, अळंभें न. वनस्पतिविशेष, कुत्र्याची छत्री, सुईछत्री. Fungus, a mushroom.

[कान. अळिंबें ; देप्रा. आलंबं भूमिछत्रं यद् वर्षासु प्ररोहति (२८,४–५).]

अळवि(णें) उक्रि. प्रार्थना करणें, मनधरणी करणें, आलाप काढणें. To pray, to conciliate.

[सं. आ + लप् १ भाषायाम् ; याकाम. अळविणें = आलाप काढणें. राहाण मांडिलें सोगौरी : आळवीति अनंग मेचु ॥ नरुस्व ८१३]

अळशी स्त्री. जवस, धान्यविशेष. Linseed.

[सं. अतसी; गु. अलसी, इलसी ; हिं. अलसी ; सिं. एलिसी, अलिसी ; का. अलिश.]

अळसुंदा पुं. एक प्रकारचें मुगासारखें धान्य. A cereal.

[कान. अलसंदिगे, अळसंदी. एक प्रकारचें द्विदल धान्य.]

अळी, अळिका कीटक, किडा. A worm.

[कान. आळि = वेटोळें. अळ पहा.]

अळीपिळी स्त्री. वेढा, बांधणें. Turning and twisting.

-अळीपिळी गुपचिळी गप्प बसणें. To be silent.

[कान. अळी–अळम्]

अळुमाळ, अळुमाळु क्रि. वि. अ. अल्प, थोडें, किंचित्. Slightly, scantily.

[सं. अणुमात्र (?); याकाम. अळुमाळ. (ज्ञा. ६-१७५, अमृ. २-३०)]

ऐसें सांघतां भूपाळु। परि देवीचिया मना न येतीचि अळुमाळु ॥ नरुस्व २८८.

अळूं न. वनस्पतिविशेष. A kind of plant.

[सं. अळुक, आलु(न); गु. अलवी; हिं. आलू = बटाटा. हॉब्सन जॉब्सनमध्यें दिलेला शब्द ताडून पहाण्यासारखा आहे. अळवावर पाणी रहात नाहीं म्हणून अळवावरील पाणी– क्षणभंगुर, अस्थिर मोठेपणा.]

अळें न. वनस्पतीच्या मुळाशीं पाण्यासाठीं केलेला खोलगट भाग. A cavity made around a plant to receive water.

[सं. आलय ; आलवाल; पाली. आलक ; कान. आळि = वर्तुळ; गु. आलियो = भिंतींतील मोठें भोंक ; हिं. आला = आळें. सं. आलवाल हें उत्तरकालीन संस्कृतीकरण असावें. किंवा आलि हें रूप कानडींत तद्भव झालें असावें. हेंच अधिक सयुक्तिक दिसतें. ह्याला आधार पालींत व हिंदींत मराठी संबंद्ध असे शब्द आहेत.]

अळें बळें क्रि. वि. अ. मुद्दाम. Purposely.

[म. बळें. ध्वनिशब्द द्विरुक्त. कान. अळ=हलणें, जोर करणें. दोन्ही एकच अर्थाचे पण भिन्न भाषांतील शब्द].

अळोंचो मळांचो-पाळोंचो पुं. एक मुलांचा खेळ. Children's game.

[का. अळुचु–अळुगु=हालणें ; सं. पर्यंक–पालखी.]

अक्ष पुं. आंस, आंख. Axis, axle, latitude.

[सं. अक्ष.]

अक्षांश विषुववृत्ताशी समांतर असलेलें वृत्त. Latitude.

[अक्ष + अंश. पृथ्वीच्या अक्षासंबंधीं अंश. (प्रतियोगी शब्द रेखांश.)]

अक्षत स्त्री. वि. न तुटलेले तांदळाचे दाणे. Uninjured, unbroken grain of rice.

[सं. अ + क्षत् (√क्षि.) पूर्ण–न तुटलेलें असें धान्य देऊन आमंत्रण देत असत; म्हणून अक्षता टाकणें, अक्षत पडणें हे वाक्प्रचार रूढ आहेत.]

अक्षतमरिष्ट अडथळ्याशिवाय. Without any obstruction.

[सं. **अक्षतम्+अरिष्टम्** ; पेकाम. **अक्षतमरिष्ट** (पे.द.)]

अक्षतृतीया वैशाख शुद्ध तृतीया. The third day of bright Vaishakh.

[**अक्षय्यतृतीया** श्राद्धदिन. **अकीत, अखतीज पहा.**]

अक्षर न. वर्ण. ब्रह्म, कूटस्थ; लेख, नाहींसें न होणारें. A letter; imperishable, the Brahma.

[सं. **अ-क्षर**; याकाम. **अक्षेर** (वर्ण-नरुस्व ५९३)]

अक्षवण, अक्षौण न. ओवाळणें व त्याचें साहित्य. Waving a lamp around the head at a ceremony or the platter waved.

[सं. **आयुष्यमान् भव असा आशीर्वाद** ओवाळतांना देतात; त्यावरून **आयुष्य-आवुक्ष** (ग्रामीण उच्चार.)]

अक्षौणी, अक्षौहिणी स्त्री. सैन्याचा समूहविशेष. An army with its four complements. A hundred trillions.

[सं. **अक्षौहिणी=हत्ती**-२१८७०, **रथ**-२१८७०, **घोडे**-६५६१०, **पायदळ**-१०९३५०, इतकें सैन्य. याकाम. **अक्षोणी** (नरुस्व ३४७).]

अज्ञात वि. माहीत नसलेलें. Unknown.

[सं. **अज्ञात** (निष्ठा) **√ज्ञा ३** ज्ञाने]

-अज्ञान मूर्खपणा, ज्ञान नसणें. Ignorance.

-अज्ञेय जाणण्यास अशक्य. Unknowable.

-अज्ञेयवाद अज्ञेयाचा सिद्धान्त-विवेचन. Agnosticism.

आ पुं. मराठी वर्णमालेंतील दुसरा वर्ण. ह्याचें उच्चारण कंठ्य असून उच्चारस्थान कंठ आहे. ‘अ’ ह्या स्वराचें दीर्घ रूप ‘आ’ हें होय. (‘अ’ पहा). Second letter of the Marathi alphabet.

[सं. **आ.** ; प्रा. **आ.** ; **ग्राम-गांव, कार्पटिक-कापडी.** सं. **आ-अ.** प्रा. **अ.** (द्वित्ताक्षरांतील). **अंकु-आक, अग्नि-आग.** सं. **ऋ.** ; प्रा. **अ, आ** ; **मृष्**;-**ज्-माख, आहृ-आहार.** आद्येतर अक्षरांतील मराठी **‘आ’** हा **प्राकृत आ** ह्या स्वरापासून निष्पन्न होतो.]

आ उपसर्ग. अव्यय. न्यूनत्व, मर्यादा, इत्यादिदर्शक अव्यय म्हणून वापरतात. A prefix. (उदा. आजन्म, आजानु. उपसर्ग उदा. आघात, आग्रह, आचार, आकृति.)

आ पुं. तोंड, मुख, (लक्षणेनें) भीति, संशय, आश्चर्य ह्यानें थक्क झालें असतां तोंड उघडतें. ह्या उघड्या तोंडाला ‘आ’ वासणें म्हणतात. Mouth wide-opened.

आं प्रत्यय. वर्तमान कालवाचक धातुसाधित प्रत्यय-वर्तमानकृदन्त, उदा. करितां, बोलतां, चालतां. A termination.

[सं. **अत्>त** (परस्मैपद); प्रा. अप. **माण-आण**; म. **आ.** सं. **मान** (आत्मनेपद); प्रा. अप. **माण.>आण.**]

आइकणें सक्रि. ऐक पहा.

[सं. **अभिकर्ण्** ; प्रा. **अहिकण्ण**; जुनें मराठी. **अइक**; याकाम. शिकाम. पेकाम. **आइक, आयक, ऐक**; अकाम. **ऐकणें.** याकाम. (णिच्) **आइकवणें-श्रवण करणें.** (नरुस्व ११३)]

आइणी स्त्री. अभिमान, गर्व. Pride, vanity.

[सं. **अभिमानिन्** ; प्रा. **अहिआण** ; याकाम. **आइणी.**]

जे सात अखरांची गोसावीणी : रूपें पूरवी कंदर्पाची आइणि ॥
नरुस्व १९५.

आइती स्त्री. सिद्धता, रचना.

[सं. **आयत<यम्** किंवा **आ+यत् १ प्रयत्ने** (निष्ठा) किंवा **आयत्त-स्वाधीन**; याकाम. **आइती** (ज्ञा. १३-५९९).]

मागधु म्हणे “ परियेसीं वैदर्भा : आइति खेचराची ॥
नरुस्व १६९

आइतें वि. स्वतंत्र, स्वतः सिद्ध, प्रयत्न न करतां मिळालेलें. Readymade ; (got) without effort.

आई स्त्री. जननी, माता. (आदरार्थी शब्द.) Mother.

[*IE.* e ai; **अवे, अइ, आई**; *Gr.* ai, al; *Lit,* ai. सं. **आर्यें** (?), **अयि** (?), **आदि** (?) असें मूळ संस्कृत शब्द व्युत्पत्ति म्हणून देतात; परंतु त्यानें समाधान होत नाहीं. प्राकृतमध्यें ‘ आइ ’ असा शब्द आहे. हा शब्द देशी असावा. कोंकणांत ‘ **आईस** ’ असा ‘ स ’ कारान्त शब्द त्याच अर्थीं वापरांत आहे. हा ‘ **स** ’ सं. **श्री** ह्याचा अपभ्रंश असावा. याकाम. **आउस**=आई.

काई भीतरीं जाणउ आउसा । कीं सांघो सुविद्यापुढां ॥
नरुस्व ४०३]

आउत न. नांगर, शेतीचें अवजार. A plough, an implement.

[सं. **आयुक्त √युज्**-(निष्ठा). **आयुध.** अऊत पहा.]

आउंदा, औंदा ह्या वर्षी, यंदा, अउंदा पहा. This year.

[फा. **आयन्दा = येणारा, भावी.**

हा ग्रामीण उच्चार आहे. **औंदा, यंदा, आइंदा, आयन्दा** हे सर्व उच्चारांतील फरक आहेत.]

आउक्ष, औंख न. आयुष्य. Life, life-time.

[सं. **आयुष्य ; प्रा. आउख.**

स्त्रियांच्या व अशिक्षितांच्या तोंडांत हा उच्चार आहे. स्त्रिया तर नेहमीं "उदंड आउक्ष, आऊक्षवान भव" असा आशीर्वाद देतात.]

आऊ स्त्री. मराठा स्त्रीच्या नांवाला आदरार्थी प्रत्यय लावतात. (बाई ह्या अर्थी. उदा. जिजाऊ, ताराऊ.) A term of respect (for a woman.)

[कान. '**अवा**' ह्याचा संक्षेप, **अंबा > अमा > आमा > आमू > आऊ अव्वा-आऊ;** याकाम. **आउवा = माता, आई, श्रेष्ठ स्त्री. आउस-आई, माता.** (नरुस्व ४०३)

सुकु म्हणें आइकैं परिक्षिता : रुक्मिणी आउवेचें रूप पांता । नरुस्व ६८

आकडा, आंकडा पुं. अंक, संख्या, वाकडें टोंक. A number, a figure; a hook.

[सं. **अक् १ चिन्हे., अंक+डा** (मराठी प्रत्यय). **आंकडी** (स्त्री); सिं. **आकुडु.** आंकडा घालणें म्हणजे पाशांत गोंवणें असा प्रयोग उद्धवगीतेंत आहे, ह्यावरून हा शब्द व त्याचा अर्थ प्राचीन कालापासून रूढ आहे.]

^{१}**आकण** न. किंचित तुडविलेलें धान्य. Corn (a little trodden).

[सं. **आ** (किंचित्) **+ क्षुण्ण (निष्ठा √ क्षुद्).**]

^{२}**आकण** न. पायांत घालावयाचा विजयाचा तोडा. (त्यावर पराभूत शत्रूचें नांव असतें). An ornament.

[सं. **अंक् १ चिन्हे.**]

मेरू-मंडळी बहुधान्यकु । जयाचा काळु आंकणा ॥

नरुस्व २८२

आंकणा वि. ताबेदार, अंकित. Dependent. (ताब्यांतील पदार्थ दाखविण्यास त्यावर चिन्ह करीत.)

आकरस(णें), आक्रस(णें) उक्रि. घट्ट बांधणें, ओढणें, आवळणें. To bind tightly.

[सं. **आ + कृष् १ कर्षणे ; आकरस** (वर्णविश्लेष), (**२ आ + कृश्** ४ तनूकरणे) **आकर्षिणें, ओढणें** ही कल्पना घट्ट जखडून बांधणें ह्याच्या मुळाशीं आहे.]

आकर्ष(णें) उ. ओढून घेणें. To attract, to pull towards.

[सं. **आ + कृष् ;** याकाम. **आकर्षणें** (नरुस्व ६००)]

आकळ(णें) सक्रि. बांधणें. To bind. परावृत्त करणें. To disuade. समजणें, होऱ्यांत येणें. To comprehend.

[सं. **आ+कल्** १० गतौ, संख्याने च. अकळणें पहा.]

आकुळ(णें) अक्रि. अवघडणें. To strain.

[सं. **आकूलनम्, √कूल् आकलन, आकुलन, आकळ, आकुळ** (संकोच, ग्रस्त झालेला.)]

आकार(णें) उक्रि. आकारास येणें. To formulate, to get shape. बोलावणें. To call. रंगारूपास येणें. To take form. **आकारणी करणें.** To assess.

[सं. **आ + कॄ शब्दे** = बोलावणें. **आ + कृ ८ करणे** = आकार, आकृति येणें. **अंक** (नाधा.) हाच शब्द **आकारणी** (करणें) ह्याच्या मुळाशीं असावा. ह्यासंबंधीं पाणिनीनें **कारनाम्नि च प्रोचां हलादौ** (६-३-१०) असें सूत्र बांधून एक प्रान्तविशिष्ट उपयोग सांगितला आहे. '**कर**'च्या ऐवजीं '**कार**' असें होतें.]

आकाश न. आभाळ. The sky.

[सं. **आ+काश् १ प्रकाशे. आ-समन्तात् काशंते-प्रकाशंते ;** याकाम. **आकाश**=पोकळी. जयाचे रथ न मातीं आकाशीं ॥ नरुस्व २३९.

आसमंतात प्रकाश ज्या ठिकाणीं भरून राहतो तें **आकाश,** विस्तीर्णतेचें द्योतक आहे. त्यावरून **आकाशाला गवसणी घालणें, आकाशाला घेरा घालणें इ.** प्रयोग रूढ झाले. आकाश हें वरील आणि पाताळ हें खालील अशीं दोन्हीं अतिमर्यादेचीं टोकें आहेत. त्या दोहोंमध्यें सर्व वस्तुजातांचा अंतर्भाव होतो. ह्यावरून **आकाशपाताळ एक करणें-एक होणें इ.** प्रयोग रूढ आहेत.]

आकांक्ष(णें) सक्रि. इच्छा करणें, अपेक्षा करणें. To desire, to expect.

[सं. **आ + कांक्ष् १ इच्छायाम् ;**

ह्या शब्दाच्या अर्थात फरक ज्ञानेश्वरानंतरच्या कालांत पडलेला दिसतो. ज्ञानेश्वरींत **इच्छा, अपेक्षा** ह्या अर्थीं तो वापरला आहे. परंतु **तर्क, शंका, संशय** ह्या अर्थानें पुढील व अर्वाचीन मराठींत कधीं कधीं वापरतात. ह्याचें कारण '**कांक्षा**' आणि '**शंका**' ह्या दोन शब्दांमधील **ध्वनिसाम्याचा संभ्रम** (Error of Phonetic semblance) हें होय.]

आकुंच(णें) उक्रि. आखडणें, संकोचणें. To contract, to shrink.
[सं. **आ+कुच् १ संकोचणें,** आकुंचन, आकुंचित हे शब्द अकुंचन अकुंचित असेच फार वापरांत आहेत.]

आकोच(णें) हें आकुंचणें ह्याचेंच रूप आहे. (अनुनासिकलोपाची भरपाई 'ओ' करून केली आहे.)

आकृति स्त्री. आकार, रूप. A figure.
[सं. **आ+कृ** ८ करणे. **(आक्रियते इयम्)**] ह्याचा अपभ्रंश **आक्कड,** व त्यापासून विशेषण **आक्कडबाज–ऐटबाज सुंदर,** असें झालें आहे.]

आक्रंद(णें) अक्रि. ओरडणें, रडणें. To cry, to lament, to bewail.
[सं. **आ+क्रंद् १ रोदने, आव्हाने**]

–आक्रंदन न. रडणें. Weeping.

–आक्रांत मोठ्यानें रडणें. Wail.
[दोन शब्दांचा संभ्रम होऊन हा शब्द तयार झाला आहे. 'धात्वर्थ पाहूं गेलें तर आक्रमण केलेलें असा अर्थ होईल. रडण्याचा संबंध' **आक्रंदन** आणि **आकांत** ह्या दोन शब्दांचा **संभ्रम** होऊन आक्रांत असा परिणत शब्द झाला.]

आक्रम(णें) अक्रि. व्यापणें, आक्रमण करणें, ओलांडणें, उल्लंघणें. To pervade, to invade.
[सं. **आ+क्रम्** १ पादविक्षेपे ; इतर शब्द–आक्रमण, आक्रांत.]

¹आंख पुं. डोळा, पहाण्याचें इंद्रिय. An eye.
[सं. **अक्ष, अक्षिन्, √ अञ्ज् ७ लेपने;** प्रा. **अक्खि ;** गु. हिं. **आंख ;** सिं. **अख ;** पं. **अक्ख ;** का. **अछ(छि) ;** बं. ओ. **आखि ;** सिं. **अक्** =डोळा.
संस्कृतमध्यें **अक्ष** ह्याचे दोन अर्थ आहेत व त्यापासून दोन तद्भव तयार झाले. एक **आँस=कणा** व दुसरा **आँख=डोळा.** डोळा आपल्या तेजानें वस्तूला लिंपतो, तेव्हां ती वस्तु दृश्यमान होते, असा अर्थ '**अञ्ज्**' धातु धरून सिद्ध होतो. अक्षिन् म्हणजे डोळा. परंतु लक्षणेनें डोळ्याजवळील हाडाला अनुलक्षून वापरतात.]

²आंख पुं. कापडाचें माप, चार हात किंवा ९६ अंगुळें इतकें माप. A measure of length (used in measuring cloth.)
[सं. **अक्ष.** प्रा. **अक्ख**=चार हात किंवा ९६ अंगुळें ; **पेकाम. आख**=कापडावरील आंकडा.]

–आंखपट्टी कापडावरील किंमतीची पट्टी. A label (denoting price.)

–आंखबंद सबंध, पूर्ण. Whole, intact. **(आखा+बन्द १ सर्व.)**

आंख(णें) सक्रि. रेघा ओढणें–काढणें. To draw lines.
[सं. **अङ्क, √ अक् १ चिह्ने ;** प्रा. **अंक ; आखट(णें)** असेंहि एक रूप ह्याच अर्थी रूढ आहे.]

¹आखड(णें) सक्रि. आंत ओढणें. To contract, to shrink.
[सं. **आकृष्, आकृष्ट;** प्रा. **आकड्ढ**]

²आखड(णें) अक्रि. आकसणें. To shrink.
[सं. **आ+स्कन्द् ;** प्रा. **अक्खड.**]

¹आखर ना. गांवाजवळचा भाग–प्रांत, गांवाबाहेरचा भाग. An extremity of a village.
[अर. **आखीर ;** याकाम. **आखर.** (नरुस्व ३१, शि. ४५३)]

²आखर न. अक्षर, वर्ण. A letter, an alphabet, a syllable.
[सं. **अक्षर (क्षर् १ ध्वंसे);** प्रा. **अक्खर.** याकाम. **आखर.** (ज्ञा. १७-४२).]

आखळा–ळा वि. आखळा (बैल), सांड (बैल). A bull.
[सं. **अस्खलित;** प्रा. **अक्खलिय.**]

आखा वि. सर्व, पूर्ण. Whole, unbroken.
[सं. अक्षय **√ क्षी;** प्रा. **अक्खअ.** अखा पहा.]

आखाड पुं. एका महिन्याचें नांव–आषाढ. Fourth month of Hindu calendar.
[सं. **(आषाढ्या नक्षत्रेण युक्ता पूर्णिमा यस्मिन्) आषाढाः** (नक्षत्रविशेष) ; प्रा. **आखाड ;** गुं. **आषाढ, आशाढ, अखाड ;** हिं. **आसाढ ;** सिं. **आखाड्ड, सिंह. असळ.**
ह्या शब्दाचे सामासिक शब्द सिद्ध झाले आहेत. लग्न मोसमानंतरच्या आखाड महिन्यांत **आखाडपाटी** वगैरे कांहीं धार्मिक विधि सांगितले आहेत. आषाढ महिन्यांत नवोढा वधूनें श्वशुराचें तोंड पाहूं नये ह्यावरून **आखाडसासरा.**]

आखाडा पुं. तालीमखाना, अड्डा. A gymnasium, a club.
[सं. **अक्ष+वाट ;** प्रा. **अक्ख+आड ;** जुगार खेळण्याची जागा. अखाडा पहा.]

-आखाडखाना शस्त्रें ठेवण्याची जागा. An armoury.

आखुड वि. लहान, अपूर्ण, अपुरें. Short, incomplete
[सं. आ + स्खुद्.]

आखुड(णें) अक्रि. म्यानांतून काढणें. To unsheath.
[सं. **आ – खुड् – १ अवयवे √स्खुद्;** याकाम. **आखुडणें** = लहान होणें, अडखळणें (नाथा. नरुस्व ५३०).]

आखेंलेखें अ. अंकीं लेखी, स्पष्टपणें. In writing, definitely.
[सं. **अंक + लेख.** दोन्हीचा अर्थ जवळजवळ सारखा आहे. **लिहिणेंपुसणें,** लिहिपुसी–विचारपूस–ह्यासारखा प्रयोग आहे.]

१आग स्त्री. इच्छा, अभिलाष, तीव्र इच्छा. Desire.
[सं. **आकु**; प्रा. **आगु.** (पुं) लिङ्गविपर्यय.
' अग्नि 'शीं कांहीं संबंध नाहीं. आग (सं. **अग्नि** प्रा. **अग्नि**) हा शब्द निराळा]

२आग स्त्री. विस्तव, अग्नि,-चा भडका. Fire.
[सं. **अग्नि**; पा. **गिनि**; प्रा. **अगणी, अग्गी**; पं. **अगन**; बं. **आगुन**; हिं. **अगनी**; गु. **आग**; सिं. **अगि**; का. **आगुन**; आ. **णिअ**; परंतु मराठींत लिंगविपर्यय झाला आहे.]

आग, आगी पुं. अपराध. An offence.
[सं. **आगस्**; प्रा. **आग.**]

आगगाडी स्त्री. (वाफेनें) चालणारी गाडी. A railway train.
[म. **आग + गाडी.** हा आणि आगबोट हे दोन्ही शब्द स. १८५० च्या सुमारास सुरू झाले. आगगाडीस अगदीं प्रथम " **चाक्या म्हसोबा** " असें म्हणत व त्याची पूजा करीत.]

आगटी स्त्री. अग्नीची जागा. A place for fire.
[सं. **अग्निष्टिका**; पा. **अग्गिठिओ**; गु. **आगिथी**; ओ. **अंगठी**; बि. **ॲगठी.**]

आगीदुगी स्त्री. भानगड, मध्यस्थी, चोंबडेपणा, उठाठेव. Meddling, mediation.
[सं. **आगस्**; प्रा. **आग** + (मराठी प्रतियोगी) **दुगी** < **√धुक्ष्–धुक, धुगी–उष्णता, त्रास.** आगीदुगीप्रमाणें आगीभागी असेंहि म्हणतात.–धोका ह्या अर्थी.]

आगपेण स्त्री. एक प्रकारचा त्वचेचा रोग. Eczema.
[सं. **अग्नि + पीटिका.**]

आगर पुं. न. नारळ, सुपारी ह्यांचा मळा, मिठाचें क्षेत्र. Plantation of palms, a salt-pan. संग्रहस्थान. A store.
[सं. **आगर.** < सं. **आकर**; याकाम. **आगर** (नरुस्व ८५१) वरील दोन अर्थांचे शब्द निराळे असून त्यांचीं मूळेंहि निराळीं असावींत. मिठागर वगैरेंतील ' आगर ' शब्द संस्कृतोत्पन्न नसावा अशी शंका येते. **आगरी** (आगरावर उपजीविका करणारी ज्ञाति) शब्द इ. स. १३६७ च्या शिलालेखांत आहे.]

आगवेल, आगियाळे, आगएल, आगअेल न. विस्तव, आगीचा डोंब. Fire, flame.
[सं. न. **अग्नि + वलयम्**; > **अग्गिवळें, आगएल. अग्नि + आलयम्** (?). **आग–**आग्या घणस, झोटिंग, वेताळ इत्यादि.]

-आगशी अग्नीची ज्वाळा. A flame.
[सं. **अग्निशिखा.**]

आगस(णें) अक्रि. अगोदर (येणारें पीक) उगवणें. To be prematurely ripe.
[सं. **अग्र+सृ-सू, अग्रशः, प्रतियोगी** शब्द **मागास(णें). स** हा मराठी प्रत्यय मध्यें आगंतुक रीतीनें आला (?) किंवा **अग्रस्यति–आगसइ–आगस** ह्या मार्गानें आला. **आगस** (योग्य वेळेच्या पूर्वीं तयार झालेलें पीक > **अग्र + सृ-सू**) ह्याचा प्रतियोगी शब्द मागस (मागसलेलें).]

आगळा वि. अधिक, निराळा, अवर्णनीय. (अगळा पहा.) Beyond, over, superior to, excelling.
[सं. **अग्र + ल** (?); देप्रा. **अग्गला**; अप. **अग्गला**; हिं. **आगला**; जि. **अंनळे**; गुं. **आगळु, आगळ**; सिं. **अगरो**; बं. **आगली**; संस्कृत शब्द असा स्पष्ट असतांना हेमचंद्र देप्रा. म्हणून कसा देतो हें समजत नाहीं.]

आगळीक स्त्री. कुरापत, खोडी. Mischief.
[कान. **आगळिके.**]

आगापीछा आरंभ शेवट, पुढें पाठीमागें (हिंदीमधून शब्द आला). Beginning and end.

आगें क्रि. वि. अ. अगोदर, अलीकडे, पुढें. Formerly, in front.
[सं. **अग्रे**; प्रा. अप. **अग्गमित**; > **अग्गइं** > **आगें**-आगेंमागें; प्रा. **अग्गओ मग्गओ**; कान. **मगचु.**]

आग्रह पुं. दृढ मत, दृढ निश्चय, हेका, हट्ट. Resolution, vehemence, pressing demand.

[**सं. आ+ग्रह्** ९ **ग्रहणे**

जडस्वरूपी भौतिक धरण्याची क्रिया ही मानसिक–काल्पनिक स्वरूपाची ह्या शब्दांत संबद्ध आहे.]

–आग्रही हट्टी. Head-strong.

आघवें वि. पूर्ण, एकंदर, सर्व. Whole, full, all in all.

[**सं. अग्रवत्, अर्घित**(?); प्रा. **अग्घविय**. अवघें पहा.]

आघळ(णें) सक्रि. पाण्यांत खळबळणें. To turn or shake (a cloth) in water.

[१ सं. **आ+घृ** (**१ सेचने**) (वृद्धि), **आघार >** **आघाळ.** २ कान. **अगळु < अगळ** = हालविणें.]

ह्यामध्यें दोन कल्पना–हलविणें आणि धुणें–आहेत. ह्याचा प्रतियोगी शब्द **पाघळणें** असा आहे. **√स्खल्** अशी शको. व्युत्पत्ति देतो. परंतु ती अर्थाच्या दृष्टीनें ग्राह्य नाहीं. आघळपघळ–लांबरुंद (विशेषण.)]

आघाओ पुं. वाटाड्या. A guide.

[सं. **अग्रीयः**; याकाम. **आघाओ** (उगी.)]

आघाट–ण–णें पुंन. हद्द, सीमा. Boundary.

[**सं. आघाट = मर्यादा.** नागांवचा शिलालेख इ. स. १३६७.]

आघाटी स्त्री. एक तंतुवाद्य. A string instrument.

[शब्द फार जुना–वैदिक आहे. वेदामध्यें (१०-१२६-२) आघाटीचा उल्लेख आहे.]

आघाडा पुं. एक वनस्पति. A kind of plant.

[**सं. आघाट**; देप्रा. **अग्घाड अग्घाडग** (पुं), (अग्घाडम्मि मउरमउरन्दा) मउरो तथा मउरन्दो अपामार्ग (२२४,१२,१४); गु. **आघाडो, आघेडो**; हिं **अघाडा.** अघाडा पहा.]

आघात पुं. तडाखा, गुद्दा, चपेटा. A blow, a hit.

[**सं. आ+हन्. > आघात** (घात्).

पारंपारिक व्युत्पत्तीनें हन् हा धातु 'घात' ह्याचें मूळ आहे. परंतु ही व्युत्पत्ति तौलनिक दृष्ट्या पटत नाहीं. 'घात्' हाच धातु मूळ आहे व पाणिनीनें सूत्राच्या सोईसाठीं त्याला हन्शीं जोडला.]

आंगउब स्त्री. अंगांतील उष्णता, घाम. Bodily temperature, perspiration.

[**सं. अंग+ऊष्मा**; याकाम. **आंगउब** (उगी.)

आंगतुक(णें) क्रि. अंग डोलविणें. To nod (in appreciation.)

[**सं. अंग+तुक.**]

आगंतुक वि. न बोलवितां जेवावयास येणारा, अकस्मात्–अवचित येणारें. An intruder.

[**सं. आ+गंतु+क**; गन्तु हें णमुल् आहे.]

आंगमेळ पुं. शरीरसंबंध, संभोग. Union.

[**सं. अंग+मील्.** याकाम. **आंगमेळ**–संभोग (उगी.)]

आंगरखा : पुं. देहरक्षक, कपडा, कुडतें. A bodyguard, a garment, a loose long shirt.

[**सं. अंगरक्षक**; याकाम. **आंगरखा** (देहरक्षक–मानभाव वाङ्मय.)]

^{1}**आंगवण** न. सेवा, चाकरी. Service.

[**सं. अंग+वण–अंग√अंज्**]

^{2}**आंगवण** न. शौर्य, सामर्थ्य. Valour

[याकाम. **आंगवण = पराक्रम, सामर्थ्य** (ज्ञा. ७-१२)]

तेथलागु दे अनंगाची आंगवण : भावकळना ते ॥ नरुस्व ४४७

–आंगवळा पुं. सेवक, चाकर. A servant.

[याकाम. **आंगवळा–आंगवळेकारी = दासी.** (धपू७२)]

लक्षिमिये–सवें धाडिले क्षीरसागरें : आंगवळेया ॥ नरुस्व ८१

आंगव(णें) क्रि. स्वीकारणें, आटोपणें, प्राप्त होणें. To accept, to do, to be able to finish.

[**सं. अंग** (नाधा.); **अगंय > अंगव**; याकाम. **आंगव** (उगी)]

आंगसीक न. प्रसादवस्त्र. A garment (given as favour or gift.)

[**सं. अंग+सीक** (?); याकाम. **आंगसीक** (उगी.)]

आंघोळ स्त्री. स्नान. A bath.

[देप्रा. **अंगोहलि** (स्त्री.) = शीर वर्ज्य करून खांद्याखालीं स्नान. कान. **होळ = स्नान करणें.** सर्व शरीराचें स्नान. अंघोळ पहा.]

आंच स्त्री. विस्तवाची उष्णता, झळ. काळजी (लक्षणा) Heat or glow of fire. Anxiety.

[*IE*. ank. सं. **अञ्च्, अच**; Av. anku; *Lat.* ancus, ānus, ānulus; *Lit.* anus.

सं. आर्चिस्-ष् (न. पुं.); प्रा. **अच्ची**; सिंह. **असि = वीज चमकणें, गर्जणें**; सिं. गु. हिं. ब. **आच**; कान. **इचु.**

मराठींत लिङ्गभेद झाला. कानडींतील शब्द तद्भव आहे. संस्कृत धातु **√अच्, √अञ्च्** असा दिला आहे तो चिन्त्य

आहे. ‘ ऋच् ’ सारखा धातु असावा. त्याशिवाय अंचिस् शब्दांतील रेफाची उपपत्ति नीट लागत नाहीं.]

आंचक(णें) उक्रि. हिसका देणें, हिसडणें, खुडणें. To pull suddenly, to pluck, to pill.

[सं. **आ + अंच्** गतौ. **आ + स्कु ९ आप्रवणे**; म. **आंचका, आंचकी.** (झटका)]

आचमन न. हाताच्या पशांत पाणी घेऊन तें प्राशन करणें. Sipping water from the right palm.

[सं. **आ + चम्**; ह्यापासून **आंचव(णें)** हा मराठी शब्द निघाला.]

आचंबणें, अक्रि. आश्चर्य करणें. To wonder, to be struck with astonishment.

[सं. **आ + स्मि १ हसने. आस्मय् < आचमय् < आचंब.** सं. **अत्यद्भुतम्.** परंतु मराठींत **आचंबा** हा शब्द हिंदीमधून आला.]

¹आचार पुं.न. लोणच्यांचा एक प्रकार, आंबट सिक्यांत ठेवलेला पदार्थ. A kind of pickles.

[मराया. **आचार**; फारसी. **अचार** ; *Lat*. ‘Acetaria’ हा शब्द प्रथम पूर्वेकडील देशांत नंतर मलाया, फारशी व हिंदी भाषांत आणि मराठींत हिंदीमधून अठराव्या शतकांत आला. नाना फडणिसानें उत्तरहिंदमधून आचारमुरब्बे मागविल्याचा उल्लेख आहे. गोवा मराठींत पंधराव्या किंवा सोळाव्या शतकांत आला तो पोर्तुगीजमधून आला.]

²आचार पुं. धर्मविहित वागणूक. शास्त्रशुद्ध वर्तन. Religious rite.

[**आ + चर् १ चलने, गतौ. आचार्य = शिक्षक, गुरू.**]

आचारी पुं. स्वयंपाक करणारा, स्वयंपाकी. A cook.

[सं. **आ + चर् १ गतौ.** ‘ आचार्य ’ हा शब्द मूळ धरून त्याचा अर्थभ्रंश झाला असें म्हणून ह्या शब्दाची व्युत्पत्ति लावतात परंतु ती पटत नाहीं. व्युत्पत्ति दुसरी असावी.]

आचळ, आचुळ, आचूळ न. गुराचें स्तन, सड. A teat.

[सं. **अंचल.**].

आच्छाद(णें) सक्रि. झांकणें, पांघरूण घालणें. To cover.

[सं. **आ + छद् ६ छादने.**]

आज अ. चालू दिवशीं To-day.

[सं. **अद्य**; प्रा. **अज्ज अज्जु**; ओ. **आजि**; सिं. **अजु**; हिं. गुं. **अज, आजे**; बं. **आइज**; पं. **अज्ज**; का. **अजि, आज्**; ‘ **आजि** ’ हें रूप जुन्या मराठींत सांपडतें.]

आजि पुं. रण, समर, युद्ध. Battle, war.

[हा शब्द वैदिक–आजि = युद्ध पासून आहे. याकाम. **आजि.**]

आजा पुं. माता किंवा पिता ह्यांचे वडील. Grandfather.

[*IE*. Ario; वै. सं, **आर्य** (**√ऋ-गतौ**); *Av*. Airys, Airyaman. (**अर्यमन्**); *Ir*. Airem ; *Ger*. Herr ; *Eng*. Sir ; *Gr*. Helles. (Hellespont = आर्यपथ) *Old Per*. Ariya,

सं. **आर्यक**; पा. प्रा. शिला. **अय्य, अय**; प्रा. **अज्जय**; गु. **आजो** (मातामह); हिं. **आजा** (पितामह); कान. **अय्य**=शिक्षक, बाप, आजा (द्राविडी तद्भव). **आजी < आर्यिका <** अज्जिआ. परंतु **पणजा** शब्द **प्रार्य**पासून आला असें समजलें तर त्यामधील ‘**ण**’ची उपपत्ति काय ? ‘ **पणतु** ’ मधील ‘**ण**’ची उपपत्ति लागते (< प्रनप्तृ.). ‘ **आजा** आणि **पणतु** ’ ह्या दोन शब्दांच्या मूळच्या संकेतांचा संभ्रम होऊन तो शब्द बनला काय ?]

आजार पुं. रोग, आमय, पीडा, व्याधि, त्रास. Disease, illness.

[फा. **आझार्**; पेकाम. **आजार.** (रा. ८-२४)]

आजुरा पुं. उक्तें वतन. Wages.

[अ. **उज्रा.** अजुरा पहा]

आजुर्दा वि. दुःखी, कष्टी. Sad, unhappy.

[फा. **आझर्दा ; अजुर्दा** पहा.]

आजूबाजू(स) अ. आसपास, हाताशीं. Nearby.

[फा. **बाझू = हात.** ह्या शब्दाचें द्वित्त झालें. ‘ आजू ’ असा शब्द वापरांत नाहीं, बाजू शब्दाचा प्रतियोगी म्हणूनच रूढ आहे.]

आझुई क्रिविअ. अजून. So far.

[सं. **अद्यापि**; प्रा. **अज्जाइ, अज्जुइं** ; याकाम. **आझुईं** (उगी. १४७). **आझुं.** (**ज्ञा.** ९-४७७).]

आझोड(णें) सक्रि. झोडपणें, चोप देऊन पाडणें. To strike, to thrash.

[सं. **आ + झोड √संपात्–झंपाड–झोड, √आ + युद्**]

आट पुं. वळसा; हट्ट, हेका. A turn, obstinacy.

[**कान. अट्ट**; याकाम. **आट्ट** (उगी. ४६१); मराठी. अट]

¹आट(णें) अक्रि. शिजून कमी होणें; वितळणें. To thicken (by boiling), to melt.

[सं. **अट्ट् = क्वथ्** ; देप्रा. **अट्टइ** (**क्वथति**); **कान. अट्टिसु, अट्टु = शिजविणें.** मूळ कानडी शब्द असून तो

आर्योद्भव मराठींत आला. हेमचंद्र त्याला देप्रा. म्हणतो. **म. आठवल, आटवल** (तांदळाच्या कण्या, कण्हेरी), **आटवाळ, आटीव** (विशे.), **आटणी**]

^{२}**आट(णें)** अक्रि. फिरणें, अंगाची घडी करून नृत्य करणें. To revolve, to dance.
[सं. **अट्**; प्रा. **अट्ट.**]

^{३}**आट(णें)** अक्रि. कमी होणें, (कापड आटलें.) To shrink.
[सं. ? प्रा. **अट्ट.**]

^{४}**आट(णें)** त्रासणें, (जीव आटला.) To be annoyed.
[सं. **आर्त** ; प्रा. **अट्ट.**]

आट, आटवल न. स्त्री. कण्या शिजवून त्यांत पीठ मिसळून केलेला पदार्थ. A kind of dilute boiled rice.
[कान. **अट्टसु**; गु. सिं. **आटो**; हिं. बं. **आटा**; का. **ओट** (**ट्ट**); रुमा. **अरो, वन्सो** (पीठ); इं. √ **अश्** = **दळलेलें**; फा. **आर्द**; अफ. **ओर = पीठ**; आर्मी. **अलम्**. *Gr*. aleo = (दळणें) मी दळतों. ब्लोकनें **आटा** = पीठ आणि आटवल (आटवलेलें पीठ) ह्या दोन शब्दाचा उच्चारसाम्यामुळें घोटाळा केला आहे. दोन्ही शब्द निराळे.]

^{१}**आटपाट** पुं. मुलींचा एक शिवाशिवीचा खेळ. A game of girls.
[कान. **आटा = खेळ; आट + पाट.** दोन्ही ध्वनिवाचक शब्द आहेत. पाटी धरणें–वाट अडवणें वगैरे क्रिया त्याच्या मुळाशीं आहेत.]

^{२}**आटपाट** न. आटपाट नांवाचें नगर, एक काल्पनिक गांव (विशेषतः लोककथेंतील). A legendary city.
[सं. **अट्ट** = बाजार, **पाट** > **पट्टा**–वाट, पथ. बाजारपेठेचा गांव अशी कल्पना आहे. अट्–गमने, पट्–गमने. आलें गेलें गांव ही राजवाड्यांची व्युत्पत्ति काल्पनिक आहे. ग्राह्य नाहीं.]

(आट) पाडी गांव वसाहत. A village, a colony.
[कान. **पाडी–गांव, खेडें, वसाहत, पाडी व पल्ली** हे शब्द संबद्ध आहेत.]

^{१}**आटा** पुं. पीठ. Flour.
[*IE*. Ale : *Gr*. Aleo ; *Arm*. Alain; *Av*. Ash; हिं. **आहटाह** ; फा. **आर्द** ; अफ. **ओर = पीठ;** गु. सिं. **आटो**; हिं. बं. **आटा**; का. **आट-ट्टु**. मराठींत हा शब्द हिंदीमधून आला].

^{२}**आटा** स्त्री. गारा. Hail-stone.
[याकाम. **आटा** (ऋ. ४६१).]

^{३}**आटा** पुं. खेळ. Game.
[कान. **आटा**=खेळ.

इ. स. १८४१ च्या सुमारास मराठींत हा शब्द कानडी नाटक मंडळ्यांच्या संपर्कानें आला.]

आटाआट स्त्री. खटपट, धुमाकूळ. Vehement effort.
[**आट(णें)** पासून हें नाम होऊन त्याची द्विरुक्ति झाली आहे. ह्यामध्येंहि मधील ‘ आ ’चा लोप होऊन ‘ **आटाट** ’ (आटाटी) असा शब्द सिद्ध झाला आहे. **आटारा** (श्रम) आटापिटा, आटापेट (त्रास), **आटिवेठ** (दोन्ही शब्द श्रम ह्या अर्थांचेच); **आटी**–श्रम, खटपट, यातायात. (महानु–उ. गीता) **आट्टु** (विशे–कष्टपूर्ण, वेदनायुक्त. < सं. **आर्त**; प्रा. **अट्ट.**)]

आटोप(णें) क्रि. लहान करणें, आवरणें, ताब्यांत घेणें, उरकणें, संपविणें. To contract, to gather up, to take up, to dispatch, to control.
[सं. **१ आ + तुभ् १ हिंसायाम्, २ आ + स्तुभ् ५-९ रोधने.**

वरील दोन धातु ह्याच्या मुळाशीं आहेत व त्यामुळें त्याचे निरनिराळे अर्थ झाले आहेत. आटपणें असा एक धातु आहे व त्याचेहि अर्थ तेच आहेत.

आटोप–सामर्थ्य, पसारा, गर्व, उरक, संकट. खट + आटोप = खटाटोप.]

आट्यापाट्या स्त्री. (अ. व.) एक खेळ. A game.
[सं. **अष्ट + पट्टिका.** अशी संस्कृत व्युत्पत्ति काढतां आली तरी ती कृत्रिम व उत्तरकालीन दिसते. हा शब्द देशी किंवा कान. असावा **आटा=खेळ, पाटी**=रेघा. रेघांचा खेळ. हा कानडीमराठी समास आहे.]

आठ वि. संख्याविशेष, पांच आणि तीन. Eight.
[सं. **अष्टौ** ; प्रा. **अट्ठ, अढ** ; म. (समासांत) **अठ, अड्**; गु. हिं. मै. ओ. **आठ** ; बं. **आट** ; सिं. **अठ्** ; पं. **अठ्ठ** ; का. **ओठ्**. ह्याचे सामासिक पुष्कळ शब्द तयार झाले आहेत.

अठ्ठेचाळीस–ताळीस ४८ (**अट्ठचत्तालीस**); **अडतीस** ३८ (< **अट्ठतीस**); **अठ्ठ्याहतर** ७८ (< **अट्ठत्तरी**); **अठरा** १८ (< **अट्ठदस अट्ठार अट्ठारह अट्ठाराह.**); **अठ्ठावन्न** ५८ (< **अट्ठवन्न**); **अठ्ठावीस** २८ (< **अट्ठवीस.** < **अट्ठाइस.**); **अठ्ठ्याणव** (< **अट्ठाणउइ**).]

आठवडा पुं. आठ दिवसांचा गट–तितका काल, सप्ताह. A week.

[ह्याच्या व्युत्पत्तिबद्दल बराच मतभेद आहे. सं. **अष्टावर्त, अष्टवासर, अष्टवार.** (आठच्या अंतरानें पुनः येणारा दिन.) प्रा. **अट्ठवाड, अट्ठाह** ; हिं. **अठवाहा, आठवारा, अठोडिया**; सिं. **अठिड्यो**; तेल. **आठावॉढ.**

ह्या शब्दांवरून असें दिसतें कीं ह्यांत अष्ट आणि अहन् अशा दोन शब्दांचा आणि त्यांच्या अर्थाचा संबंध आहे. मूळ संस्कृत शब्द कोणता हें नक्की सांगतां येत नाहीं. प्राकृत शब्द स्पष्टच आहे. पुनः संख्या सात कां आठ ही शंका राहतेच. तोच वार सात दिवसांनंतर येतो; आठ दिवसांनंतर नाहीं. ह्याला आणखी एक गमक आहे. नेमाडी भाषेंत ‘ सात ’ ह्या संख्येला हाट म्हणतात. सुरत गुजरातीमध्यें ‘ हात ’ म्हणतात; हाट=बाजार. नेमाडींत सात दिवसांच्या मजुरीस ‘ हाटवटी ’ म्हणतात. व त्यावरून ‘ आठवडा ’ असा शब्द निघाला असावा (शको.) परंतु ह्यांतहि दूरान्वय दिसतो. ‘ अष्टावर्त ’ ही राजवाडे यांची व्युत्पत्ति काल्पनिक दिसते. प्राकृत शब्दापर्यंतची व्युत्पत्ति हीच खरी होय.]

आठवि(णें) सक्रि. स्मरणें, ध्यानांत आणणें. To recollect, to remember.

[सं. **१ आस्थापय्** ; प्रा. **आट्ठावय** ; **२ आ+ध्यै १ चिन्तायाम्–आध्याय-आठव** (राज.). पहिली व्युत्पत्ति विशेष ग्राह्य वाटते. दुसरींत वर्णप्रक्रियेच्या बऱ्याच अडचणी येतात. ध्यानांत ठेवणें, मनांत ठेवणें, स्मरणांत ठेवणें इत्यादि प्रयोगांवरून ‘ आस्थापय ’ हीच व्युत्पत्ति मानण्याकडे प्रवृत्ति होते. म. आठवण, आठवणूक (स्मरण).]

आठळी, आठी, आंठोळी स्त्री. फणसाची बी. Seed of jackfruit.

[सं. **अस्थिन्** (?); प्रा. **अंठि** (पुनं.), **अस्थिल, अष्टिल, अठळी पहा.**]

आंठी स्त्री. घडी, वळी. (कपाळावरील) आठी, संकोचलेला भाग. Wrinkle of the brow.
[सं. **अष्टिल.** (?); कान. **अट्टु=आटणें.** संकोचणें].

आंठोर(णें), आठुर(णें) अक्रि. संकोच होणें, गोठणें. To shrink.
[सं. **आ+स्तृह् ७ हिंसायाम्**].

आड पुं. घराच्या परसामधील अरुंद विहीर. A small well.

[सं. **अवट=खड्डा**(= कूप.); अप–**अड > आड**; प्रा. **अअड** ; देप्रा.–**अढो, अयडो.** (कूपः ४,२९)]

आड वि. अर्धेमुर्धे. Half.

[सं. **अर्ध** ; प्रा. **अड्ड.** १ हा शब्द प्रथम वापरून मराठी सामासिक शब्द पुष्कळ झाले आहेत. उदा—

आडमुठा (अर्धमुग्ध); **आडवळण** (अर्धवळण) **आडमार्ग** (अर्धमार्ग); **आडनांव** (अर्ध+नामन्); **आडरात** ; २ ज्याप्रमाणें ‘ **अर्ध** ’–**अड्ड.** ह्याच्या साहाय्यानें कांहीं शब्द सिद्ध होतात त्याप्रमाणें **अन्तः > अंत्त > आड** ह्यापासूनहि कांहीं सिद्ध होतात. उदा. आडवार, आडकाठी, आडथळा, आडपडदा, आडपाटा.]

आड(णें) अक्रि. पडणें, आडून गोळी मारण्यासाठीं दडून बसणें. To lie concealed, to lie in ambush.

[सं. **अन्तः+धा ३ आच्छादने;** ह्यापासून ‘ आड ’ हा शब्द सिद्ध झाला. उदा. त्याच्याआड, داराआड इ.]

आड(णें) अक्रि. हल्ला करणें. To attack.
[सं. **अड्ड् १ अभियोगे.**]

आडक(णें) अक्रि. मध्येंच राहणें, सांपडणें. To be stopped, obstructed.

[सं. **आदिह् २ उपचये. आ+टक् १ बन्धने. अर्न्तर्,–अर्ध+गम्.**]

आडकी स्त्री. एक परिमाण (४ शेराचें). A measure of quantity.

[सं. **आढक**=$\frac{3}{4}$ **द्रोण;** प्रा. **आढग** (पुंन) **आढक** पहा.]

आडकुड, आडभिंत, आडबाजू अडोशाची भिंत, पडदा. An intervening screen.
[सं. **अन्तः कुड्य.**]

आडकोढा कोपऱ्यांत. In the corner. (**अन्तः कोष्ठ.**)

आडखिळी स्त्री. अडसर. A crossbar (as of a door)
[**अन्तः+कीलक; प्रा. खिल्ल.**]

सं. **अन्तर्** किंवा **अर्ध** ‘ आड ’ वरून सिद्ध झालेले धातु पुढें दिले आहेत.

आडच(णें) अक्रि. कमी होणें, क्षय होणें. To decrease, to be reduced.

[सं. **आ+दस् ४ उपक्षये ; आदस्यते** (कर्मणि–आडच्चिजे–राज.)]

आडंप(णें) सक्रि. फसविणें. To deceive.
[सं. **आ+दभ् ५ दंभने.** (राज.)]

२आडप(णें) अक्रि. गर्विष्ठ होणें. To be boastful.
[सं. आ + दृप् ४ हर्षमोहनयोः (रा). अन्तर् + पक्–गतौ.]

आडफाक, आडफाड(णें) अक्रि. फांटे फुटणें. To draw out (of issues), to branch.
[सं. अन्तर् + स्फट्, अर्ध + पट्]

आडमुठ(णें) अक्रि. अडमुठ्यासारखें करणें. To be stupid.
[म. अडमुठा < सं. अर्धमुग्धः]

आडमोड(णें) अक्रि. मध्यें पडणें. To intervene.
[सं. अन्तर् + मुट्–संचूर्णने. (ज्ञा)]

आडल(णें) सक्रि. मान देणें. To respect.
[सं. आ + दृ ९ माने. (ज्ञा)]

आडव (णें) अक्रि. दुःखी–कष्टी होणें. To be sorry.
[सं. आ + दु ५ विपत्तौ. (ज्ञा)]

आडवस्त्र–आडवें वस्त्र न. मुख्य वस्त्र नेसण्यापूर्वीं दुसरें जें वस्त्र मध्येंच नेसतात तें. (पुरुष पंचा नेसतात व स्त्रिया पडदणी नेसतात.) A cloth worn slovenly before dressing.
[सं. अर्ध + वस्त्र किंवा अन्तः वस्त्र; कान. अडवे = वस्त्र. व्युत्पत्ति कानडीच ग्राह्य. ह्याशिवाय आडवें लावून घेणें असा स्त्रियांमध्यें एक प्रयोग आहे. स्नानाच्या वेळीं किंवा मुख्य वस्त्र नेसण्यापूर्वीं दुसरें एक वस्त्र नेसतात. त्याची नेसण सुद्धा एक विशिष्ट प्रकारची आहे. हा प्रयोग कानडी आहे. कानडी अडवे = वस्त्र हा शब्द ह्याच्या मुळाशीं आहे.]

आडसर पुं. दार बंद करण्यासाठीं योजलेला लाकडी किंवा लोखंडी दांडा. Cross–bar, door bar.
[सं. अन्तः सृ–हा शब्द कानडी तर नाहीं ना ?]

आडळ(णें) अक्रि. अडखळणें. To stumble.

आडळ पुं. विकल्प, अडथळा. Option, doubt, hindrance.
[सं. अन्तः + दल् १ भेदे.]

आडळी, आडी स्त्री. एक पक्षी. A kind of bird.
[सं. आटि, आति ; हिं. आड ; सिं. आरी = रानबदक.]

आडी स्त्री. गाण्याचा प्रकार. A kind of song.
[कान. आड्डु = गाणें.]

आडीच वि. दोन आणि अर्धा. Two and a half.
[सं. अर्धतृतीय ; प्रा. अड्ढाइज्ज ; अप. अड्ढाइजच ; मरा. अडीच. दोन पूर्ण आणि तिसरा अर्धा असा ह्याचा अर्थ आहे.]

आडोरा पुं. व्यभिचार, बलात्कार. Rape, adultery.
[देप्रा. आडोलिया–रुद्ध. देप्रा. आडाड=बलात्कार.]

अडौनि अ. बाजूस, आडवें. Aside, away.
[म. आड होओनि > आडून (दडून) ह्याचें काव्यांतील रूप आहे.]

१आढ(णें) उक्रि. आढ्यता बाळगणें. To be boastful.
[सं. आढ्य (नाधा.)]

२आढ(णें) उक्रि. आढींत घालणें,
[सं. आ + धि ६ धारणे. आढी पहा.]

आढाउ पुं. वि. शस्त्रधारी, सैनिक. A soldier, a fighter.
[सं. अड्ड् १ अभियोगे ; याकाम. आढाउ (नरुस्व ७४७)]

आढक, आडकी, अटकी पु. स्त्री. एक माप, आठ पौंड, चार शेर किंवा पायली इतकें. A measure of quantity.
[सं. आढक = $\frac{१}{४}$ द्रोण = १६ कुडव = ७ पौंड ११ औंस इतकें; प्रा. आढग ; आडकी पहा.]

आढळ(णें) उक्रि. भेटणें, दिसणें, सांपडणें. To see, to meet ; to find.
[सं. आ + ढ्वल् (?); अ + घृ. कान. आडु = गति (?)]

आढाल न. शस्त्र, हल्ला करण्याचें साधन. A weapon for attack.
[सं. अड्ड् १ अभियोगे.]

–आढालाची ढालगज, धीट. Bold.

आढाल न. डोंबाऱ्याची काठी, वेल. A bamboo pole.
[कान. अड्डु– + ल मराठी प्रत्यय]

आढाळ न. हातांत गोळे चाळण्याची क्रिया, दोरीवर तोल संभाळण्यासाठीं हातांत घेतलेला बांबू. A pole used in keeping balance on a rope.
[कान. अड्डु + ल ; (अड्डु = बांबू) ; सं. अड्ड् १ अभियोगे ; म. अडाल, आढाल = शस्त्र; याकाम. आढाळ. (उगी ६०१)

^{1}आढी, आडी, अढी स्त्री. आंबे किंवा इतर फळें पिकविण्याची उबाऱ्याची जागा. A warm place made with layers of straw for ripening fruit.

[कान. अडि = पक्क दशा.]

^{2}आढी स्त्री. रास, ढीग. A heap.

[कान. अडकु = ढीग करणें; तेलु. अड = ढीग; सं. आढ्य (?)]

^{3}आढी स्त्री. पायावर पाय ठेवून बसण्याचा प्रकार, तेढ. A sitting posture (with cross-legs.) A wrinkle, a prejudice.

[कान. अड्डु-आडवें. अडे-धीरा, टेका.]

आढें, अढें न. घराचें आढें. A ridge-pole.

[१ कान. अड्डु-बांबु. २ सं. अट्ट=वरील माडी. अढें पहा.]

^{1}आण स्त्री. शपथ, आज्ञा, हुकुम. An order, an oath, a vow.

[*IE*. Gen, Gno; सं. ज्ञा; *Av*. Zan; *Arm*. Can-; *Gr*. gno; *Lat*. Gno, Gna; *Slav*. Zna; *Lit*. Zin-oti, Zen; *Teut*. Kan, Kna; *Got*. Kannjan; *As*. Cennan, Cnawan; *Eng*. Gneow, Knawen, Know.

सं. आज्ञा √ आ + ज्ञा; पा. अञ्ञा, आणा (स्त्री); प्रा. अण्णा, आणा, अज्जा (स्त्री); दहाव्या शतकाच्या आरंभीं एका तामील शिलालेखांत '**आनै**' असें रूप आहे. तेलु. **आन**; का. हिं. **आन्**; सिं. **आण**; गु. **आण्** (=**आज्ञा, शपथ**); सिंह. **अण** (**आज्ञा**); याकाम. **आण** (=शपथ. ज्ञा. १२·१९६)].

भीमकाची आण वाउनि वट्किी : येकमेकां हांसेति रायाचिया लेकी ॥ नरुस्व ३८६.

-आणभाक स्त्री. शपथ वगैरे. A vow, a promise with an oath.

[सं. आज्ञा + भाषा.]

^{2}आण अ. आणिक. More, and, in addition.

[सं. **अन्यत्**; प्रा. **अण्ण. हन्त-हान-हानि-आणि-णि-आन-न-नि** (राज). ज्ञानेश्वरींत ' हान ' शब्द वापरला आहे.]

आण(णें) सक्रि. घेऊन येणें. To bring, to fetch.

[सं. **आ+नी**; प्रा. **आ + णी, आणणु**; हिं. **आनना**; सिं. **आणणुं**; का. **अनुन्**; रुमा. **अन्**; आणाआण=आणणें (द्वित्त). ' **आणा** ' मागें लागणें=संसाराची जबाबदारी येणें. नेआण = आणण्याची नेण्याची क्रिया; याकाम. **आणणें, आणिता** (आणणारा-नरुस्व ६४८)]

आणि, आणखी अ. समुच्चयदर्शक अव्यय. More, and.

[*IE*. An; सं. **अन्य**; *Lat*. Alter, Alius; *Lith*. antra-s; *Lat*. anpar; *Tokh*. Alyek, Aleche; गु. **आण, आन** (दुसरा), **अने**-आणि; जु. हिं. **अनि, आन**; सिंह. **अनुम्, अनिक्**; याकाम. **आनि, आणिक**. (नरुस्व ७४), **आणिक** (ज्ञा. ९-५२); अकाम. **आणि**, (ग्रामीण) **आनि, आन्, अन्**.]

आणिक वि. अधिक, ज्यास्त. More.

[सं. **अनेक**; प्रा. **अणिक्क. अणेक्क, अणेग**; परंतु हा शब्द सं. ' **अन्यत्क** '; प्रा. ' **अण्णक्क** ' पासून आहे. ह्यानें अर्थाची उपपत्ति चांगली लागते.]

आणा पुं. एक नाणें, रुपयाचा सोळावा भाग. कोणत्याहि पदार्थाचा हिस्सा दाखवितांना हा शब्द वापरतात. मध्य हिंदुस्थानांत हें एक जमिनीचें परिमाण आहे व ते सोळा रुसी किंवा सोळावा अंश इतकें आहे. गुंठ्याचा सोळावा भाग म्हणजे एक आणा असें महाराष्ट्रांत समजतात. An anna.

[सं. **अणु**,-**आणक, अकनक. आपणक < आअणअ < आणा** (राज); हिं. **आन, अनह**. हा शब्द मूळ मुसलमानी राजवटींत सुरू झाला. हें प्रत्यक्ष असें नाणें नव्हतें. हें हिशेबाचें फक्त नाणें होतें. लक्षणेनें दुसऱ्या कोणत्याहि पदार्थाच्या भागाला आणा म्हणतात.]

आणेवारी जमिनीच्या उत्पन्नाची प्रतवारी. Percentage of yield.

आणियाळें वि. तीक्ष्ण. Sharp.

[सं. **अणु, अणी**; याकाम. **आणियाळें**.]

आंत, अन्तर अ. आंतील बाजूस, पूर्वी (लक्षणा). Inside.

[*IE*. En, Eni; सं. **अन्तर**; झें. **अन्तरे** पु. फा. **अन्तर**; *Lat*. In, Iners, Intra, Inter; *Slav*. Ietro; *Got*. In; सं. **अन्तः, अन्तर्**; पा. **अन्तो**; प्रा. **अन्त, आंत**; गु. **अंतर**; हिं. **अंदर, आंतर**. आंतील, आंतला (**अन्तर् + ल**), आंतून (**आंत + हून**), आंतौततां-ती-तें-(आंतउता.)

ह्या शब्दाच्या साहाय्यानें सामासिक शब्द सिद्ध होतात. उदा. आंतउता (आंत), आंतकोनाडा, आंतचाल. आंतबट्टा, आंतपाय, आंतबाजार. आंतवार (आंतील जागा.)]

आंतडें न. पोटांतील नळी-कातडी. Intestines.

[सं. **अंत्रम्**. (अंत्रपासून आंतडें आणि कृत्तिपासून कांतडें); गु. **आंतरडु**; हिं. **आंतर**; सिं. **अंतर, अंतु**; का. **अन्द्र, अन्दर**.]

आत स्त्री. बापाची बहीण, आत्या. An aunt.

[*IE.* Atta ; सं. अत्ता, अत्तिका; *Lat.* Atta ; *Got.* Atta (father); *Norw.* Edda (पणजी); देप्रा. अत्ता चतुरर्था-माता, जननी, पिउच्छा पितृष्वसा, श्वशुरभार्या, सखी, वयस्या (२४·८); द्रा. आत्त=आई. अत्ते=सासू, आई ; कान. अत्ति=वडील बहीण. अत्तिके, अत्तिगे (वडील भावजय) ; ते. अत्त ; हिं. अत्ता.]

–आतई, आतोई पुं. आतेचा नवरा.

[सं. अत्तिका+पति.]

आत(णें), आतु(णें) उक्रि. पावणें, होणें, स्पर्शणें, शिवणें. To be attained ; to touch.

[*IE.* Ap; *Gr.* Apto; *Lat.* apiscor √ apio ; सं. आप् ८ प्रापणे ; (निष्ठा) आप्त ; प्रा. आत्त ; प्राकृत रूपापासून मराठी धातु सिद्ध झाला.]

आततायी-ई वि. हेकेखोर, साहसी (मूर्खपणाचें). A felon, a furious person.

[सं. आततायिन्]

आतष पुं. अग्नि. Fire.

[फा. आतिश्–अग्नि. आतषबाजी स्त्री. =अग्निक्रीडा, दारूकाम ; फा. आतिश्+बाझी ; पेकाम. आतश्बाजी (रा. ७–१४५)]

आतळ(णें) सक्रि. स्पर्श करणें, चोरी करणें, हात लावणें. To touch, to steal.

[सं. हस्ततल (नाधा.); प्रा. हत्तल ; अकाम. हाताळणें.]

आतां अ. सध्यां (कालदर्शक). Now.

[सं. अत्र ; पा. अत्त ; प्रा. अत्त, अत्थ ; वै. अधा ; सं. एतर्हि, अथ, आत्तः (इतोऽपित्यर्थे) > आतः > आतां (राज. भा. अह. १८३४). मराठींत पालीमधून आला असावा.

अत्र. पासून 'येथें' आणि 'आतां' असे दोन्ही एक स्थलदर्शक व दुसरा कालदर्शक शब्द उत्पन्न झाले आहेत. राजवाडे ह्यानीं ह्याची फार सूक्ष्म व्युत्पत्ति दिली आहे.]

आति स्त्री. बदक. A duck.

[*IE.* Anati, Nati ; सं. आति ; *Lat.* Anas, Antis ; *Teut.* Anut.]

आतुड(णें) अक्रि. जवळ आणणें, प्राप्त होणें, सांपडणें, स्वाधीन होणें. To be attained.

[सं. आ+तुड् १ संयोजने, सान्निध्ये ; आ+तृद् १ हिंसायाम् ; २ द्रा. आतु=धारण करणें, जवळ असणें ; याकाम. आतुडणें=सांपडणें, कळणें (नरुस्व १४१).]

आतुर वि. उत्सुक, उतावीळ. Eager.

[सं. आ+त्वर्,–आतुर.]

आंतुल वि. आंतील. Inward.

[सं. अन्तः (ल–विशेषणप्रत्यय) ; याकाम. आंतुल (ज्ञा. ११-३८८)]

–आंतुवट वि. आंतील. Inside.

[सं. अन्तर्+वर्तिन्.]

आतोळ्यो पातोळ्यो न. अंगविक्षेप. Gestures.

['आताळो गेलों, पाताळो गेलों ; तेथून आणली' अशा तऱ्हेनें गोष्ट सांगणें.]

आत्म वि. आत्म्यासंबंधीं, स्वतांचें, आपलें. One's own.

[*IE.* Etm'en ; सं. आत्मन् √ अत्, √ अन् ; *Ags.* oedm ; *as.* athum ; *Ahd.* adhmot. सं. आत्मन् ; प्रा. आत्त, अप्प. मराठींत तत्सम रूप आलें.]

ह्या शब्दाच्या साहाय्यानें मराठींत पुष्कळ तद्भव सामासिक शब्द झाले आहेत. मराठींत ते सर्व आत्मसात् झाले आहेत. उदा०

–आत्मगत आपल्याशीं, स्वगत. To one's self.

–आत्मघात स्वतःचा घात. Suicide.

–आत्मनिवेदन स्वतःसंबंधीं सांगणें. (आत्म+नि+विद्.) Self–realization, speaking of one's self.

–आत्मवत् आत्म्याप्रमाणें. Like one's own.

–आत्मलिंग जिवलग मित्र. A bosom friend.

–आत्मसाक्षात्कार परमेश्वरदर्शन. Self-realization.

–आत्मसात् आपलेसें करणें (आत्म+सात्–तदधीने). To assimilate.

–आत्मौपम्य आपल्याशीं ऐक्य. Identity with self.

–आत्मीय, आत्मिक स्वकीय. One's own.

आत्या स्त्री. बापाची बहीण, सासूबाई. A vocative (for aunt.)

[*IE.* Atta ; सं. अत्ता ; *Lat.* Atta ; *Got.* Atta (father) ; *Norw.* Edda–(पणजी) ; संस्कृत रूप उत्तरकालीन असावें. देप्रा. अत्ता (२४-८) ; कान. अत्ति=वडील बहीण, अत्ते=सासू, आई. द्रा. आत्त=आई ; आत पहा.]

आथ(णें) अक्रि. प्रसिद्ध असणें, संपन्न-भाग्यवान, असणें. To be famous, wealthy, fortunate.

[सं. आ+स्था. १ गतिनिवृत्तौ.

आथणें, आथिणें, आथि, आथी, आथिला हे सर्व शब्द ज्ञानेश्वरी, एकनाथी भागवत वगैरे जुन्या मराठी वाङ्मयांत येतात. ह्यांची व्युत्पत्ति निश्चित नाहीं. आथी हा शब्द सं. **अस्ति**–आथि आणि **आभाति**–आहाति-आथी ह्या दोन मार्गांनीं सिद्ध होण्यासारखा आहे. **√आ+स्था, √अर्थ्** ह्यापैकीं एखादा धातु मूळ असणें शक्य आहे. ‘अस्’ किंवा स्था ह्या धातूशीं अधिक संबद्ध आहे.]

आथड(णें) अक्रि. थडकणें, थांबणें, पोचणें. To stop, to reach.
[सं. **आ+स्तभ्.**]

आथी क्रि. आहे. Is.
[सं. **अस्ति**; प्रा. **अत्थि**; सिंह. **ॲति, ॲत**; याकाम. (**निष्ठारूप**) **आथिला=असलेला. आथिलेपण.** (ज्ञा. ९·३६४). आथणें पहा.]

आंथर(णें) सक्रि. पसरणें, विस्तरणें. To spread, to unroll.
[सं. **आस्तृ ५ विस्तारे**; प्रा. **अत्थर,** (मराठी शब्दांत अनुनासिक आला.) गु. **अथरवूँ, आंथर** (सतरंजी); अकाम. **अंथरणें, हंतरणें, हंथरणें.**]

–आंथर पुं. स्त्री. वेळूची चटई. A mat (of bamboo chips)

आंथरूण न. अंथरण्याचें वस्त्र. A bedding.
[सं. **अंतरीय**; प्रा. **अंतरिज्ज**; सं. **आस्तरण**; प्रा. **अत्थरण, अत्थरण**; याकाम. **आधातुरी** (आंथरूण).]

आदट(णें) अक्रि. दबणें, कमी होणें, तिंबणें. To shrink, to knead.
[म. **आ+दाट(णें)** < सं. **√आ+दभ्.**]

–आददा गर्दी. A crowd.

आदर(णें) सक्रि. मान देणें, बोलणें. To respect.
[सं. **आद्रि√दृ. वचनम् आद्रितम्; वाक्यं नाद्रियते च बान्धवजनः–भर्तृहरि** (वै. १११)
ह्या संस्कृत प्रयोगाची छाया मराठी प्रयोगावर पडली आहे.]
“ वचन हें मग आदरिते. ” न. द. १२३.
मग बोलाविला विश्वामित्र । पृच्छा आदरिली ॥ महिकावतीची बखर अ २-२४६.

आदर पुं. भाव, पूज्यभाव. Respect.
[*IE*. DER ; सं, **आ+दृ** ; *Av.* der ; *Gr*. dra ; याकाम. **आदर** (नरुस्व ६५५).]

आदळ(णें) उक्रि. आपटणें, थडकणें, कोसळणें. To strike, to crash.
[सं. **आदल् १ अवयये, आ+दृ ९ विदारणे–आदर् > आदल > आदळ.** आदळणें ह्याचा पहिला ‘आ’ जरा जोरात उच्चारिला कीं **हादळणें**–असें रूप तयार होतें व तेंहि रूढ आहे. **आदळणें** म्हणजे अधाशीपणानें खाणें असा अर्थ आहे पण तो लाक्षणिक आहे. आदळ–आपट, आदळा, आदळु (हेलकावा घाव).]

आदा पुं. येणारें उत्पन्न, आवक उत्पन्न. Income.
[अर. **आइदा**; शिकाम. **आदम्य.** (चिट. ३९.); पेकाम. **आदा** (खरे ४·१८३३); अकाम. **आदा, आदाय.**]

आदाब स्त्री. नमन, मुजरा, नजराणा, भेट. A salutation.
[अर. **अदब्=नम्रता राखणें, मर्यादा राखणें**; पेकाम. **आदाब** (ऐटि १-१२). **आदाब=भेटीचा दागिना** (रा. ५-१९१).]

आदि स्त्री. मूळ, आरंभ, उद्भव. A beginning.
[सं. **आदि.** मराठींत नामाप्रमाणें हा शब्द वापरतात.]

–आदिल पहिलें. The first. (**आदि+ल**).

–आदिपीठ मूळपीठ. The original seat.

आदेश पुं. आज्ञा, हुकुम, उपदेश. An order, an advice.
[*IE*. Dek ; सं. **दिश्** ; *Gr*. deik, dek, dak ; *Lat*. dic, dec ; *Teut*. tih, teg; *As*. tacnian ; *Eng*. Token.]

आंदुळ(णें), आंदोळ(णें) उक्रि. झोंके घेणें, हेलकावे खाणें. To swing.
[सं. **आ+दुल् १० उत्क्षेपे.**
ह्या शब्दांवरील अनुनासिकावरून ‘हिंदोला’ ह्या हिंदी शब्दाशीं संबंध अधिक असावासा वाटतो. ‘हिंदोळा’ ह्याचेच हे अपभ्रंश आहेत. हिंदोळा ह्यांत हिं. **दुल–दोल** हे धातु आहेत. **आंदोला, आंदोलिका** (झोपाळा), **आंदोलन.**]

आधण न. उकळणारें पाणी. Boiling water.
[सं. **आदहन**; प्रा. **आदाण**; कों. **आधन.** आधणणें पाण्याला उकळी फुटणें. आधण=मृत्यु ह्या अर्थी एक शब्द आहे.]

आधा वि. अर्धा, निम्मा. A half.
[सं. **अर्ध**; प्रा. **अद्ध–अद.** अध, अद्–समासांतील पहिलें पद ; याकाम. **आधा करणें=अर्धा, अर्धमेला करणें, जर्जर करणें** (नरुस्व. ६६३)]

आधातुरी स्त्री. आंथरुण. A bedding.
[सं. **अधः आस्तरण. आध+हाथरी**; याकाम. **आधातुरी. ‘हाथरी–आथरणें, हतरणें’** ह्या शब्दांचा वरील शब्द हा प्राचीन अशिष्ट उच्चार आहे.]

आधार पुं. आश्रय, ठेका. A support.
[सं. आ+धृ १ धरणे.]

आधि पुं. स्त्री. दुःख (मानसिक), चिंता. Worry, anxiety.
[सं. आधि √आ+धा ३ स्थापने.
ह्याचा प्रतियोगीं शब्द व्याधि-शारिरीक दुःख.]

आधि अ. अगोदर, पूर्वी. Before, prior to.
[सं. आदि.]

आधुक वि. आधाशी. A glutton.
[सं. अद् २ अदने+उक (मराठी प्रत्यय)]

आधुनिक वि. अलीकडचा, सांप्रतचा. Modern.
[सं. अधुना+इक.]

आन वि. अ. आणखी, दुसरें. The other.
[सं. अन्यत्; प्रा. अण्ण.
हा एक अपभ्रष्ट उच्चार आहे. अन्यत् चे आने, आण, आन असे उच्चार होतात. आनु असाहि उच्चार होतो.]

-आनौति अ. दुसरीकडे. Elsewhere.
[सं. अन्यत्र.]

आनाकानी स्त्री. कानाडोळा, दुर्लक्ष. Inattention.
[सं. अन् (नकारार्थी) + आकर्ण (नाधा.) न ऐकणें-ऐकलें न ऐकल्यासारखें करणें.]

आनान वि. सर्व. निरनिराळा. Separate.
[सं. अन्य+अन्य ; याकाम. आनान (ज्ञा. ७-२३);

-आनानी निरनिराळी. याकाम. आनानी (ज्ञा. १८-८९५)

आनारिसें वि. वेगळें, भलतेंच. Different.
[सं. अन्यादृश् ; प्रा. अण्णारिस; याकाम. आनारिसें (नरुस्व ३६).]

आनंद(णें) अक्रि. आनंद होणें, सुख होणें. To be happy.
[म. आनंद (नाधा.) <सं. आ+नन्द् १० नन्दने. आनन्द (हर्ष), आनन्दमय (विशे.), आनन्दवनभुवन रामदासांनीं हा शब्द महाराष्ट्राच्या गाभ्याला लाविला व त्याच्या वर्णनपर काव्य लिहिलें. गोदेपासून पंचगंगेपर्यंतचा भाग ह्या प्रांतांत येतो. त्यांची कर्मभूमि हाच प्रांत होय. आनंदवल्ली (भांग-आनंद देणारी वनस्पती) किंवा एक गांव.]

आप न. पाणी. Water.
[*IE.* Ap. सं. अप्; *Av.* Ab; *Lat.* Ap; *Lit.* upe (spring.)
हिं. आब = नदी-(दु)आब = नदी; फा. आप् = पाणी.]

आप आपण, आपला ह्या अर्थी समासांतील पहिलें पद. One's own.
[*IE.* etmen.
सं. आत्मन् √अत्, √अन्; प्रा. अप्प अत्त; गु. आप, आपणा; राज. आप, आपणु; पं. हिं. आप, आपन, आपस; बं. आप, आपनि; ओ. आपे, आपण; ने. आफु, आपनु; सिं. पाणु; का. पान; सिंह. अपि, ॲप (आम्ही). आपण, आपलें वगैरेचें संक्षिप्तरूप. ह्याचें मूळ ' आत्मन् ' हेंच.]

-आपाप आपोआप, सहज, विनाआयास. Easily, automatically.
[हाच शब्द ' आपापाचा माल गपापा ' ह्या प्रयोगांत आहे. त्याचा अर्थ प्रयत्नाशिवाय मिळालेला माल. आपैस-सा हा शब्द आप (स्वयम्) पासून.]

आपंग(णें) सक्रि. पोसणें, आश्रय देणें, प्रेमानें वाढविणें. To support, to bring up.
[सं. आ+प्र+अंग् १ गतौ=जवळ जाणें.]

आपंग(णें) अक्रि. विकल होणें. To be maimed.
[सं. आ+पंगु (नाधा.)-व्यङ्ग उत्पन्न होणें.]

आपज(णें) अक्रि. उपजणें, उत्पन्न होणें. To be born.
[सं. आ+पद् ४ गतौ; आपद्य-आपज्ज-आपज.]
तयाचा अन्नरस·आपजे ॥ सकुंभता आपजें ॥ (अमृ)

आपट(णें), हापट(णें) सक्रि. आदळणें. To strike.
[सं. आ+पट् १ विदारणे.
हा शब्द आपट, आफट, आंफट, हापट, हाफट इत्यादि रूपांत उच्चारिला जातो. ह्यामध्यें धातु आ+पट् किंवा आ+स्फट् १ विशरणे हा असावा. दुसराच अधिक ग्राह्य वाटतो कारण त्यानें घोषाची उपपत्ति लावतां येते.]

आपण सर्व. स्वतः; प्रथमपुरुषवाचक आदरार्थी (किंवा द्वितीय पुरुषवाचक) सर्वनाम. We; you; they.
[सं. आत्मन् ; प्रा. अप्प; अप. अप्पा; (हेमचंद्र २-५१) मराठी. आपु; सं. आत्मनः; प्रा. अप्पणो (षष्ठी); अप. अप्पणउ; म. आपण ; पं. गु. आपण ; सिं. पाण ;

मराठींत **आपु** आणि **आपण** अशीं दोन्हीं रूपें रूढ आहेत. 'आपु' हें रूप याकाम. वाङ्मयांत आढळतें. (पहा ज्ञा. ७–१३२ क्र. ३४१); अकाम. आपसुक, आपोआप. आपण मधील 'पण' हा षष्ठीचा अवशेष आहे.

ह्या सर्वनामाचे तीन अर्थ आहेत. आम्ही, तुम्ही, आम्ही तुम्ही मिळून, अशा तीन अर्थांनीं रूढ आहे. तृतीय पुरुषीहि 'आपण' वापरतात. परंतु हा उपयोग विशेषतः हिंदीच्या निकटवर्ती इंदूर–ग्वाल्हेर–प्रांतांत-आहे. तिन्ही पुरुषी दोन्ही वचनी असा विचित्र ह्याचा उपयोग आहे.]

^{३}**आपण** अ. आपणहून, स्वतः. In person.

[सं. **आत्मनः, आत्मना;** अप. **अप्पुणु > आपण;** 'आपण'चें संक्षिप्तरूप **आप** असें आहे व तें कांहीं सामासिक शब्दांच्या आरंभीं वापरतात. उदा. आपस > आपसांत, आपाप, आपोआप (सहज), आपपर, आपसुख (< आत्मसुख), आपजात, आपसांस (स्वेच्छेनें), आपआपला, आपघर, आपदंग (स्वेच्छाचार). हिंदीमध्यें हा **आप** शब्द विशेष वापरांत आहे. हिंदीमधून आलेल्या कांहीं शब्दांत आढळतो. आपखुशी, आपखुदी.]

आपत् स्त्री. संकट, आपदा, पिडा. Misfortune.

[सं. **आ + पद् ४ गतौ.** संस्कृत शब्द जुन्या फारशीमध्यें गेला. संस्कृत शब्द–**आपत्ति, आपदा, आपद्धर्म. आसई** असा एक संकट अर्थीं शब्द आहे तो ह्यापासूनच. फा. **आफत्**=संकट.]

आपद(णें) सक्रि. स्वीकारणें, घेणें. To accept.

[सं. **आ+पद् ४ आपादने.**]

आपलें वि. आपणा सर्वांचें, 'आपण'चें षष्ठीरूप. Ours.

[सं. **आत्मीय** (?); प्रा. **अपुल्ल, अप्पुल्ल** 'ल्ल'प्रत्यय प्राकृत काळांतील; गु. **आपणु.** आपुल व आपल अशीं रूपें ह्याचीं होतात व तीं समासांत येतात. 'आपुल' पासून नामें आपुलकी, आपुलीक, आपुलेपणा, व आपलपासून आपलपोट्या, आपलेआपण.]

आपा, आप्पा पुं. संबोधनवाचक शब्द, वडील माणसास किंवा मुलास उद्देशून आदरार्थी संज्ञा. A vocative.

[सं. **आत्मन्**; प्रा. **अप्प**; देप्रा. **अप्प** (पिता ४-१२); कान. **अप्पा-पिता**; तेल. **अप्पय्या**; ता. **अप्पण**; कानडी शब्द हाच देप्रा. म्हणून **हेमचंद्रानें** निर्देशिला असावा. अप्पा पहा.]

आपुथि(णें) सक्रि. गांजणें. To harass.

[सं. **आ+पुथ् १ हिंसायान्**; याकाम. **आपुथिणें(ज्ञा).**]

आपेशी वि. अपयशी. Unsuccessful.

[सं. **अप+यशस्.** हा 'अपयशस्वी' शब्दाचा अशिष्ट परंतु शिष्टमान्य असा उच्चार आहे. याकाम. **आपेस** = पराजय. (नरुस्व १९६)]

आपैता, आपैतिया,–ती, आपैते, आपेसा वि. स्वाधीन, अनुकूल. Easily available.

[सं. **आप्त** (< **आप् ५ प्रापणे**–निष्ठा.); याकाम. **आपैते** (ज्ञा.). **आपैणें** म्हणून धातु आहे तो निराळा व त्याचा अर्थ बोलावणें. त्यापासून **आपैता** असा शब्द होतो तो निराळा. त्याचा अर्थ बोलावणारा व तो सं. **अपायन < अप+इ २ गतौ** पासून.]

आपोषण, आपोष्णी अपोशन पहा.

आप्त वि. संबंधी, नातलग. A relative, kith and kin.

[सं. **आप्त** (निष्ठा < **आप् ५ प्रापणे.**) ह्या धातूपासून वरील अर्थ कसा निष्पन्न झाला हें समजत नाहीं. मूळ शब्द तत्सम आहे. धातु निराळा आहे कीं काय? आप्तवाक्य, आप्तइष्ट, आप्तमित्र, आप्तसंबंधी वगैरे समासांत येतो.]

आप्पा आपा पहा.

आफड(णें) उक्रि. शिवणें, विटाळणें. To touch. चेष्टा करणें. To cut jokes.

[सं. **आ+स्पृश्** ४ स्पर्शने. **आ+स्फुड्** १० उपहसने.]

आफत स्त्री. संकट, आपत्ति, गोंधळ, भानगड, अरिष्ट, दुष्काळ. A calamity, a trouble.

[अर. **आफत्**. सं. **आपत्ति** ह्या शब्दाशीं साम्य बांधण्याचा मोह होतो. परंतु मराठींत जो रूढ झाला तो मुसलमानांच्या परिचयामुळें झाला; तेव्हां व्युत्पत्ति अरबीच विशेष ग्राह्य.]

^{१}**आफळ(णें)** उक्रि. आदळणें, आपटणें. To strike (against).

[सं. **आ+स्फल् १० ताडने.**]

^{२}**आफळ(णें)** सक्रि. धुणें, फाडणें, जोरांत हाणणें. To wash, to tear, to strike.

[सं. **आ+प्लु १ प्लवने. २ आ+स्फल् १० ताडने.**]

आफळसाफळ न. वरकरणी दुःख. Apparent grief.

[सं. **आस्फालय् > अप्फलई < आफळ**]

^{१}**आब** पुंन. पाणी. Water.

[फा. **आब्–पाणी.** ह्याची व्युत्पत्ति अप्=पाणी अशी संस्कृत आहे. फार प्राचीनकाळीं आर्य संस्कृत शब्द जुन्या फारशींत तद्भव झाला.]

आँब पुं. स्त्री. तेज, प्रतिष्ठा, मोठेपणा, महत्त्व. Lustre, greatness, importance.
[फा आब्=तेज; पेकाम. आब (स्त्री.) (रा. १०–४४९)]

आबकारी वि. दारूचें (खातें). Excise.
[फा. **आबकारी. अबकारी** पहा.]

आबळ(णें), आबाळ(णें) अक्रि. हयगय होणें, दुर्लक्ष होणें (संवर्धनासंबंधीं). To be neglected.
[सं. **आ + बाध् १ लोडने; कान. बाळ = सुख; सिं. आबालो = मित्रहीन**]

आँबा वि. पुं. **फजीती.** Redicule.
[**कान. आबा** = साधाभोळा अडाणी मनुष्य (रीव्हचा कानडी इंग्रजी कोश.)]

आँबा पुं. **एक संबोधन, आदरार्थी** शब्द. A vocative.
[**फा. आब, आबु = वडील, पिता.** अबा पहा.]

आबाद वि. **वसलेलें, पेरलेलें,** सुखी. Settled, cultivated.
[**फा. आबाद.**
ह्याच्या विरुद्ध विराण-(मराठी–वैराण) हा शब्द आहे. दोन्ही फार्शी आहेत. लोकांची वसाहत पेरणीसंचणी करावी, असा अर्थ **आबाद करावी** ह्या प्रयोगाचा आहे. **आबादीआबाद** = समृद्धि, धनधान्याची संपन्नता. समासामध्यें ह्याचा अर्थ **शहर, नगर** असा आहे. अहमदाबाद, दौलताबाद इ. **आबादानी**= समृद्धि, सुख, संपन्नता, संपूर्णता.]

आबादी आबाद स्त्री. **सौख्य, स्वांस्थ्य.** Happiness, colony.
[**फा. आबाद.** कांहीं शहराच्या नांवांच्या पुढें हा प्रत्यय लावतात. ह्याचा अर्थ ‘ शहर, वसती, सुखी वसाहत ’ असा आहे. उ. **अहमद + आबाद, औरंगआबाद.**]

आबादानी स्त्री. **संपन्नता,** विपुलता. Plenty.
[**फा. अबादान.**]

आबुख(णें), आंबुख(णें) अक्रि. सर्वत्र जाणें. To spread over. **शिंपडणें.** To sprinkle.
[**सं. १ अभि + उख १ गतौ, प्रसरणे. २ सम् + अभि + उक्ष् १ सेचने.**]

आँवुथ(णें) अक्रि. विपरीत होणें. To turn out otherwise.
[**सं. अभि + वि + उत् स्था – अभ्युत्था.**]

आँबुथ(णें) सक्रि. **प्रदीप्त करणें.** To kindle.
[**सं. अभि + उत् + इन्ध्** १ दीप्तौ.]

आबूट, आबूठ न. मेघ, ढग. A cloud.
[**सं. अभ्र + वर्ती; याकाम. आबुट (शि. ६१६)**]
चाडेचें आबूठ चढलें । तेणें चातुर्याचें चांदिणें लोपलें ॥ नरुस्व ६३१.

आबुली स्त्री. स्त्री. Wife, a woman.
[कान. **अमर = प्रेम करणें, आलिंगन देणें. अमरिसु, अमरिके = योग्यता. आंबुला = नवरा;** याकाम. **आबुली** (नरुस्व ३७२).]
मरेति आबुलियेचेया सळा । रणीं काम–पिसें ॥ नरुस्व ११८.

आभ न. आकाश, **ढग.** Sky, a cloud.
[सं. **अभ्र;** प्रा. **अब्भ;** देप्रा. **अब्भपिसाओ राहुः** (२०-५); गु. **आभ;** हिं. **अभाल;** सिं. **अभु;** का. **अबुर्;** सिंह. **अब;** अकाम. **अभ्र, आभाळ.** (<अभ्रालय)]

आभर(णें) क्रि. नटणें, शृंगारणें. To bedeck, to decorate.
[सं. **आ + भृ ३ धारणे = आवरण घालणें.**]

आभा स्त्री. तेज, कांति. Lustre.
[सं. **आभा < आ + भा २ दीप्तौ.**]

आभाइ(णें) अक्रि. बोलणें, भाषण करणें. To speak, to address.
[सं. **आ + भाष् १ भाषणे. आभाष्–आभाख आभाक–अभाकि–आभाइ.** सं. **आ + व्हे.** (शको.)]

आभार(णें) अक्रि. आभारी **असणें.** To be thankful.
[सं. **आ + भृ ३ धारणे.** (णिच्) भार् = धारण करावयास लावणें ही मुळाशीं कल्पना आहे. ओझें, आच्छादन, पांघरूण, आवरण–धारण करावयास लावणें, त्यावरून उपकाराच्या ओझ्यानें वाकणें.]

आभार पुं. उपकाराची जाणीव. Thanks.

आभास(णें) अक्रि. भासणें. To seem.
[सं. **आ + भास् ३ प्रकाशने.**]

-आभास पुं. भास. सादृश्य. An illusion.
[ह्या शब्दाचा **चुकीचें मत, चुकीची विचारसरणी** हा अर्थ तर्क, वेदान्त शास्त्रांत आहे. सादृश्य–प्रतिबिंब पाहण्याची क्रिया ही मुळाशीं आहे. त्यानेंच भ्रम उत्पन्न होतो.]

आभीर पुं. गवळ्यांची जात, अहीरांची ज्ञात. The Abheers, a class of milkmen.
[सं. **आभीर > (तद्भव) अहीर.**]

^{१}आम वि. अर्धेकच्चें पचलेलें अथवा शिजलेलें, आमान्न, आमांश नांवाच्या रोगांत होणारा अन्नरसाचा परिणाम. Half cooked or digested.

[सं. **आम, अम्लशीं संबंध आहे.** (तद्भव) **आँव.**]

^{२}आम स्त्री. आंब्र पहा.

^{३}आम वि. सार्वजनिक, सामान्य लोकासाठीं. Public, for all people.

[अर. **आम्म = सामान्य;** अकाम. **हाम, हम.** उदा. आमरस्ता, दिवाणी इ + आम. आमदार, खासदार हे दोन शब्द १९२० च्या सुमारास मराठींत रूढ झाले. केसरींत (प्रो. फडक्यांनीं) प्रथम वापरले.]

आम(णें) अक्रि. त्रासणें, पीडणें. (जीव आमला–आंबला) To be worried.

[सं. **अम् १ पीडायाम्** ; प्रा. **अम ; अम्ल > आंब–** ह्या शब्दाशीं संबंध नाहीं.]

आमचा वि. ‘ आम्ही ’चें षष्ठीचें रूप. Ours.

[सं. **अस्मदीय;** प्रा. **अम्हच्चय, अम्हेच्चय. अस्मद्.** वै. **रूप. अस्मे. अम्हार > म्हारा > म्हाह्या** (खानदेशी)]

आमद्रफ्त, आमदरफ्त–ती स्त्री. दळणवळण, येजा. Traffic, communication.

[फा. **आमद् (=येणें) + रफ्त् (=जाणें).**]

आमंत्र(णें) उक्रि. बोलावणें (विशेषतः जेवण्यास).

[सं. **आ + मन्त्र् १० आमन्त्रणे.** (तद्भव) आवतणें, संस्कृतमध्यें ह्याचा अर्थ निरोप घेणें, असा आहे. “**आमन्त्रयस्व सहचरीम्** (कालि.) ” परंतु मराठींत अर्थ थोडासा निराळा झाला आहे. ‘ निमन्त्रण ’ ह्या अर्थीं वापरतात.]

आमिष न. मांस, भक्ष्य. A bait. लालूच, लांच. A bribe.

[सं. **आमिष (आमिष्यते भुज्यते √मिष्–श्लेषणे)** “ लालूच, लांच ” हा अर्थ मासे पकडण्याकरतां जें खाद्य गळाला लावतात त्यावरून आला आहे. गळाला कांहीं तरी प्रलोभन लावतात व त्याला लोभून मासा गळाला अडकला जातो. प्रलोभनास वश होण्याची कल्पना त्यावरून घेतली.]

आमेन उद्गा. अ. तथास्तु, ख्रिस्ती धर्मांत प्रार्थना केल्यानंतर शेवटीं ‘ शांतिरस्तु ’ ह्या अर्थीं हा शब्द वापरतात. Amen.

[हिब्रू. ग्री. लॅ. इं. **आमेन,** अर. **आमीन.**]

आंब स्त्री. आंबट पदार्थ, हरभऱ्याच्या वनस्पतीवरील आंबट पाणी, ‘ आंबा ’ शब्दाचा संक्षेप. A sour liquid.

[सं. **अम्ल, आम्र;** प्रा. **आम, अम्ब;** गु. **आंब;** हिं. **अंबत;** सिंह. **ॲम्बूल्.**

ह्या आम शब्दालाच अन्त्यागम होऊन आंब, आंबट, (अम्लिष्ट), आंबकट, आंबटढाण, आंबतें, आंबली, आमली इत्यादि शब्द तयार झाले.]

आंबा पुं. वृक्षविशेष, त्याचें फळ. A mango, mango tree.

[सं. **आम्र √अम्** ; प्रा. **अम्ब;** गु. **आंबो** (आंब्याचें झाड); हिं. **आम, अंब, आंबा;** सिं. **अबु, आमो;** पं. **आम, आंब;** का. **अंब;** बं. ओ. **आंब, आम;** सिंह. **अंब;** याकाम. **आंबा, आंब = पालवी.**]

आंबुलेपण न. नवरेपण. Husbandhood.

[कान. **अमरिके = योग्यता; अम्मु–प्रेम करणें, आलिंगन देणें. अंबुला = नवरा. आबुली = स्त्री नवरी.**]

निदेलेनि भ्रतारें । जे विये चराचरे जियेचा विसांवला बुरे ॥ आंबुलेपणहि ॥ अमृ. १–३७.

आम्ल वि. आंबट (पदार्थ–चिंच). Sour.

[*IE*. Anir, Aml ; सं. **अम्ल** ; *Lat*. Amarus ; *High Ger*. Ampfaro.]

आम्ही सर्व. आपण, प्रथमपुरुषवाचक सर्वनामाचें अनेकवचन. We.

[*IE*. Eghom, Exghe ; वै. सं. **अस्मे** ; सं. (**अहम्**) अवे. **अ–झेम. अमी;** *Lat* e-go; *Got* Ik; *H. G.* Ihha; *Lit*. Esz; *Slav*. Azu.

वै. सं. **अस्मे** ; सं. **अस्माकम्** ; प्रा. **अम्हाणम्** ; सं. **अस्मान्, अस्माभिः** ; पा. **अम्हे, अम्हेहि** ; प्रा. **अम्हे, अम्हेहिं** ; अप, **अम्हेहिं;** कु. **हम्** ; अ. **आमि** ; बं. **आमि;** ओ. **आम्भी, अम्हे** ; बि. **हमें** ; हिं. **हम्** ; पं. **असीं** ; ल. **असाँ;** सिं. **असी;** गु. **अमे** ; राजस्था. **हम्** ; ने. **हामी;** का. **असि.**]

आय पुं. नफा, फायदा, उत्पन्न. Profit. आटोका, आटोप, आकार. Form.

[सं. **आ + इ १,२ गतौ.** ह्याचा प्रतियोगी शब्द–**व्यय.** (**वि + इ**) खर्च.]

आयणी, आइणी, आयनी स्त्री. इच्छा. हेतु, मत, मन. Wish, object, view.

[सं. **आ + या. आयान.**]

आयत वि. विस्तृत. Vast.

[सं. **आ + यम्,** (निष्ठा) **आयत.**]

आयता वि. सहज प्रयत्नाशिवाय प्राप्त झालेलें. Easily obtained.

[सं. **आयत्त.** (निष्ठा √ **यम**, √दा.) **अयत्नतः**, **आयतोजी, आयतोळा** हे मराठी प्रत्यय लावून तयार झालेले शब्द आहेत. अइता पहा.]

आयना, ऐना पुं. आरसा. A mirror.

[फा. **आईना.**]

आयराणी स्त्री. हडळ, जखीण. A witch.

[वै. सं. **अरण्यानि ;** किंवा **अहिराणी. आभीराणी.**]

आयास पुं. श्रम, मेहतन, कष्ट. Labour, hard work.

[सं. **आ+यस् ४ प्रयत्ने.** प्रतियोगी शब्द–सायास, प्रयास (हेहि √**यस्** पासून)].

आयु न. आयुष्य. Life-time.

[*IE.* El-VA, Ev-A ; वै. **आयु ;** सं. **आयुस्** (**आ+** √**इ १ गतौ**); *Lat.* aevum ; *Got.* Aiws ; *Old Ger.* Aitus ; अकाम. **आयु, अयु, आयुष्य, आवुक्ष, आवुक्षण. आउक्षण** = आरती ओवाळून आयुष्य इच्छिणें.]

आयुध न. शस्त्र, हत्यार, अवजार. A weapon.

[सं. **आयुध** √ **आ+युध् ४ युद्धे.** (**तद्भव**) **आउत.**]

आर प्रत्यय. ‘ पूर्ण ’ ह्या अर्थी. A suffix.

[सं. **अगार.** उदा. **कवलार, कौलार, धवलार.**]

१आर ना. अजगर. A python.

[सं. **अजगर**; प्रा. **अअअर** (?). (प्राकृत शब्दाचा उच्चार कसा करीत कोणास ठाऊक ? शब्द अत्यंत कृत्रिम दिसतो.); याकाम. **आर** (उगी ३३५.)]

२आर न. भोंवरा, जातें, अंकुश. शेवट. A goad, a top. An end.

[सं. **आर, आरा.** √ **ऋ १ गतौ.** आर (< कार) हा मराठींत कांहीं शब्दाचा पुढें प्रत्यय म्हणून वापरतात. **आर**=सहा कान. **आरु=सहा.**]

१आर(णें) अक्रि. संकोच होणें, आकुंचित होणें. To shrink.

[सं. **आ+ऋ ३ गतौ.** (आ=ईषत्) ; २ कान. **आरु=सुकणें, २ उत्सुक होणें, शांत होणें, शमणें. अरणें पहा.**]

२आर(णें) अक्रि. खालीं जाणें, बसणें. To go down, to sit.

[**कान. आर=आंत शिरणें.**]

आरज स्त्री. वि. बढाई; पूज्य, श्रेष्ठ. A boast ; respected.

[सं. **आर्य** किंवा **आराध्य;** प्रा. **आरज्झ** = वयांत आलेली.]

आरजा स्त्री. तरुण मुलगी, ऋतुमती. A major girl.

[सं. **आ+रजस्** (विटाळ.)]

आरण, आरणी स्त्री. समरभूमि. A battlefield.

[सं. **आ+रण** √ **रा २ दाने. आ+**√**रु भाषायाम्.**]

आरण्यक न. ह्या नांवाचे संस्कृत ग्रंथ. Sacred books in Sanskrit.

[सं **अरण्य, अरण्यांत** राहून तेथील शांतमय वातावरणांत पूर्वीच्या ऋषींनीं लिहिलेले ग्रंथ. ब्राह्मणग्रंथांच्या शेवटीं गद्यमय भाषेंत हे ग्रंथ लिहिले आहेत.]

आरता-ती-त्या क्रिवि. अलीकडे. On this side.

[सं. **आरात् ; आर=सान्निध्य** (शको.)]

आरपार इकडून तिकडे. Across.

[**आर < आरात् ; पार < प्र + आर ;** सिं. आरपारी; प्रतियोगी शब्द–परता. अरतापरता=अलीकडे पलीकडे.]

आरती स्त्री. देवासमोर ओवाळण्याचा दीप. A lamp to be waved round a deity.

[सं. (कोश संस्कृत) **आर्तिक्य.** √ **ऋत् ;** सं. **आरात्रिका. आ+** √ **राध्.** (?) गु. सिं. हिं. **आरती;** का. **आलथ्.** परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. शब्द देशी किंवा द्राविडी असावा अशी शंका येते.]

आरबळ–आरंबळ(णें) अक्रि. ओरडणें, विवळणें. घाबरून जाणें. To groan, to be terrified.

[सं. **आ+रंब्+ल १ शब्दे.**]

आर (घा) बाई ना. (महानु) उंच सुरानें म्हणावयाचें ळळीत नांवाचें गाणें. A kind of song.

[सं. **आ+रु २ भाषायाम् ;** मराठी आरवणें ह्या धातूपासून असावा.]

आरमार न. लढाऊ जहाजांचा समूह. A navy.

[**पोर्तु-स्पॅनिश, अर्मांडा ;** लॅ. **आर्मेर.** हा शब्द पंधराव्या शतकांत हिंदुस्थानांत आला.]

आरंभ(णें) सक्रि. सुरवात करणें. To begin, to start.

[सं. **आ+रभ्, आरंभ;** गु. सिं. हिं. बं. **आरंभ; सिंह. अरब;** का. **आरब.**]

-आरंभ पुं. सुरुवात. A beginning.

-आरंभशूर वि. प्रथमतः शौर्य किंवा उत्साह दाखविणारा. short-couraged; having no perseverence.

आरव न. वृक्षसमूह, राई. A grove.

[सं. **आ + रुह्.** याकाम. **आरव** (ऋ. ७२)] तेणें प्रेमाचेनि पुरें आरव लोटलें : गरुवतियेचें ॥ नरुस्व ६३१.

आरव(णें) अक्रि. ओरडणें, सूर काढणें. To cry, to crow.

[सं. **आ + रु २ शब्दे.**]

आरसा पुं. दर्पण, प्रतिबिंब पाहण्याची कांच. A mirror.

[सं. **आदर्श**; प्रा. **आअरिस–आरिस्स.**

प्राचीनकाळचा आरसा कसा असे ह्याची कल्पना नाहीं. एखाद्या चकचकीत धातूच्या पत्र्याचा तुकडा आरशासारखा वापरीत असें अजंठा लेण्यांतील चित्रावरून दिसतें. बिलोरी आरसे पेशवाईच्या काळांत इंग्रज वगैरे परकीयांकडून विकत घेत. त्याच्या किंमतीहि भारी असत. संस्कृत व्युत्पत्ति ही दिली आहे, परंतु ती उत्तरकालीन संस्कृतीकरणासारखी दिसते.]

आरात(णें) अक्रि. जवळ येणें, उत्पन्न होणें. To approach, to be born.

[सं. **आरात्** (**नाधा.**), <**आ + ऋ १ गतौ.** आरातारा = रागरंग–(ध्वनिशब्द); आराटेंपाराटें=उलटेंसुलटें (ध्वनिशब्द.)]

आराध(णें) उक्रि. आराधना करणें, भक्ति–स्तुति करणें. To worship.

[सं. **आ + राध् ५ पूजायाम्. आराधन–ना, आराधणूक, आराधक, आराध्य, आराधी** हे तत्सम शब्द आहेत. आर्तिक, आरात्रिक, आरती वगैरे शब्द ह्या धातूपासूनच आहेत का ?]

आराद्या-आराध्या पुं. देवाचा पुजारी. An official attendant on a deity.

[सं. **आराध्यः** ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. दक्षिणेंत हा ब्राह्मण शिवपूजकास लावतात; परंतु तो जातिभेद मानणारा पाहिजे. लिङ्गायतांत जंगमास हा शब्द लावतात. पुढें जोक्तीणींनीं हा शब्द उचलला. त्यांच्याबरोबर जो पुरुष असतो व देवीची–यल्लम्माची पूजा करतो त्याला **आराद्या** म्हणतात. त्यावरून कंचुकी असा अर्थ झाला. त्यावरून पुढें षंढ, नपूंसक, असा अर्थ झाला.]

आरापुट्ठा पुं. ह्याचा मूळ अर्थ चाकाचीं लाकडें असा आहे, परंतु लक्षणेनें शरीराची ठेवण ह्या अर्थी वापरतात. Radial and circumferential wooden parts of a wheel; build of body.

[सं. **आरा = चाकाचें उभें लाकूड ; पुट्ठा < पृष्ठ =** परिघाचें लाकूड.]

आराम(णें) अक्रि. विश्रांति घेणें. To rest.

[सं. **आ + रम्** (परंतु मराठी धातु हा संस्कृत आराम ह्या नामापासून नामधातु आहे.) आराम = विश्रांति, लक्षणेनें आरामाचें स्थान. आरामशीर = सुखकारक.]

आरारूट न. वृक्षविशेष. ह्याच्या कांद्यापासून बलक काढतात व त्यापासून तवकीर तयार करतात. Arrowroot.

[*Eng.* Arrow-root. विषारी बाणाच्या जखमांवर औषधि म्हणून ही वनस्पति व तिचीं मुळें वापरीत असत. त्यांतील विष शोषिलें जाऊन उतार पडत असे.]

आराव पुं. शब्द, आवाज. Sound.

[सं. **आ + रु २ शब्दे.** आरव पहा.]

आरावण पुं. लग्नांतील धार्मिक विधीसाठीं लागणाऱ्या सामानाची दुरडी, अहेर इ. Articles required for a wedding ceremony.

आरिख वि. छांदस, वैदिक ऋषींनीं सांगितलेलें. Pertaining to the Vedas, ordained by the sages.

[सं. **ऋषि–आर्षम्–आरिख.**]

आरी, आरा स्त्री. चांभाराचें हत्यार. A cobbler's instrument.

[सं. **आरि** (?); कान. **अरि = तोडणें, छाटणें.**]

आरुता, आरता परता क्रिवि. अगोदर, अलीकडे. Prior to.

[सं. **आ + ऋ १ गतौ,** >**आरात्**, याकाम. **आरौता, आरुता = अलीकडे, अलीकडचा.**]

तो रावो–वांचौनि नेणिजे धरत्रीं : कैळासा आरुता ॥ नरुस्व २३६

आरुष वि. (काव्य) असमंजस, वेडेंवाकडें, बोबडें. Dull, stupid.

[सं. **ऋषि** > वि. **आर्षम् ; आरुष.**

संस्कृतमध्यें ‘ ऋषि ’ हा द्रष्टा ह्या अर्थी शब्द आहे. पुढील उत्तरकालीन संस्कृतांत आर्ष=ऋषिप्रणीत असा शब्द रूढ झाला. पाणिनीकालांत आर्ष, छांदस असे शब्द

वैदिक प्रयोगासंबंधीं वापरीत असत. वर्तमान बोलींत मात्र बराच अर्थभ्रंश ह्या शब्दांचा झाला. आर्ष, छांदिष्ट यांचा अर्थ ‘ लहरी, अर्वाच्य, असा झाला व तोच अर्थ वरील विशेषणांत आहे.]

आरूढ(णें) अक्रि. आरूढ होणें, वर चढून बसणें. To ascend, to mount.

[सं. **आ+रुह्**, (निष्ठा)-**आरुढ.** संस्कृतमध्यें चढणें, वाढणें असा अर्थ आहे. मराठींत चढून बसणें असा अर्थ उत्पन्न झाला. त्याचें कारण ‘ आरुढ ’ ह्या निष्ठेपासून नामधातु उत्पन्न झाला. **आरोहणें, आरोह** (चढ) असे ‘ आ + रुह् ’ धातूपासून उत्पन्न झालेले शब्द आहेत.]

आरोगण न. जेवण. Meal.

[सं. **आ–रुच् १ रुचौ** (?) ; **कान. आरोगण ; √आरोगिसु=खाणें;** कानडी शब्द तद्भव आहे. याकाम. **आरोगण** (ज्ञा. ४–१०७)]

आरोप(णें) उक्रि. लावणें, जमीनींत (बीं) पुरणें, पेरणें. To plant, to set, to fix.

[सं. **आरुह्–(णिच्) आरोप्.**

रुह्=वाढणें, रोप्=वाढविणें असा प्रयोजक अर्थ आहे. ह्याचाच लक्षणेनें ‘ अंगीं लावणें, चिकटविणें ’ असा अर्थ झाला. वेदान्तामध्यें ‘ रज्जु ’वर सर्पाचा आरोप करणें वगैरे सिद्धान्त वापरतात. त्यावरून आरोप शब्दाला खोटा भ्रम ‘आळ,’ असा अर्थ आला. नंतर त्याचा अर्थ गुन्हा–निरपराध्यावर आरोप–गुन्हा असा झाला. आरोपी–गुन्हेगार.]

आरोसा पारोसा पुं. वि. आंघोळ न केलेला. Unbathed.

[सं. **पर्युषित ; प्रा. परुसिअ > पारुसा.** ह्यांतील आरोसा हा प्रतियोगी शब्द आहे व तो ध्वनिसाम्यावरून तयार झाला.]

आरोळी, हारळी स्त्री. हांक, आवाज. A loud call.

[सं. **आरावलि;** √रु २ शब्दे ; प्रा. **ओरल्ली** (स्त्री.) **आ + रु २ शब्दे. आरुद्.** हेमचंद्र देशी समजतो.]

आर्जव(णें) उक्रि. आर्जव करणें, प्रार्थना करणें. To solicit, to request.

[सं. **अर्ज् १, १० प्रार्थनायाम् ;** परंतु हा धातु मराठी (तत्सम) आर्जव–ह्यापासून नामधातु म्हणून आला आहे. आणि **आर्जव** हा सं. अर्ज् धातुपासून आला. **ऋजु**= सरळ ह्या सं. विशेषणापासूनहि ‘ **आर्जव** ’ होणें अधिक शक्य आहे. फा. **अर्झु** पासून **आर्जवणें, आर्जु, अर्जमंद** हे निष्पन्न होतात.]

आर्त वि. पीडिलेला, दुःखी. Grieved, afflicted.

[सं. **√ऋत्, ऋ १ गतौ. १० पीडायाम्**, (निष्ठा) आर्त. **आर्ति**=दुःख तळमळ, त्यावरून उत्कंठा, आतुरता, इच्छा. आर्तिपासून नाम **आर्तिक**=इच्छा करणारा.

सं. **ऋत, ऋतम् ;** *IE.* ar ; *Av.* areta, Arante, arta ; *Lat.* artus ; *Arm.* rnem ; ard.]

आर्थिक वि. ‘ अर्थ ’ संबंधीं, पैशासंबंधीं. Relating to money.

[सं. √ ऋ. १ गतौ. **ऋच्छति एनम्** (ध्येय). सर्वांचें ध्येय संपत्ति; म्हणून अर्थ=पैसा, संपत्ति; वि. आर्थिक; अर्थशास्त्र, इ. **अर्थ** पहा.]

आर्द्र वि. ओलें, पाण्यानें भिजलेलें. Wet, moist.

[सं. **आर्द्र √उद् ७ क्लेदने;** *IE.* End, ud; सं. **उद् (उदन्, उदक, अनुद्र, समुद्र, उद्र);** *Gr.* ud (udor) ; *Lat.* ud, (Palus) ; *Lith.* Vandu, Undu ; *Slav.* Vod, Udra ; *Got.* Wat–o ; *As.* water.]

आर्य पुं. वि. आर्य नांवाचा प्राचीन मानववंश. ह्या वंशांत इंग्रज, जर्मन, ग्रीक, रोमन, लिथ्यूनियन, जर्मन, पारसी, हिंदु वगैरे लोक अंतर्भूत आहेत. श्रेष्ठ. The Aryans; the highest.

[*IE.* Ario ; *Av.* Airyo, Aryaman (अर्यमन्); *Old. Per.* Ariya ; *Ger.* Her ; *Eng.* sir ; *Ir.* Airem. ; *Gr.* Hellos (Pont) ;

ह्यांतील धातु **√ ऋ.=जाणें, नांगरणें** असा आहे.

IE. Re, Er ; सं. **ऋ. अर् ;** *Av.* Ar ; *Lat.* ar, re, ra ; *Slav.* Lakulis ; *Got.* Arms ; *Russ.* Ra ; *Zend. Gatha.* Rinnam, rann. Run. (**आर्य, ऋतु, ऋतम्, ऋजु हे शब्द सिद्ध झाले.**)]

आलग(णें) अक्रि. चिकटणें, लोंबकळणें. To hang from, to stick to.

[सं. **आलग्न** (निष्ठा–लज्) ; प्रा. **आलग्ग–**(नाधा.) ; **अलगणें पहा.**]

आलटापालट न. उलथेंपालथें, बदल. State of being topsy-turvy, change.

[सं. **अस् ४ क्षेपणे, अपर्यस्त+पर्यस्त** ; देप्रा. **अलट्ट-पलट्ट** (न).]

आला अक्रि. (येणें चें भू. धा. सा.) प्राप्त झाला. Arrived, came.

[सं. **आगत** (निष्ठा**√गम् १ गतौ**) ; प्रा. **आअ ;** सिंह. **आ=आलेला, हजर ;** का. **आव्, यिन(नु)=येणें;** हिं. **आया ;** पं. **आएआ,** हीं रूपें ‘ **आवना** ’ ह्यांतील धातु **√आना** ह्यापासून अगदीं भिन्न आहेत. **गु. सिं. आव ;**

लमा. **अव्** < सं. **√आप् ५ प्रापणे.** मराठीमधील भूतकाळाचें रूप सं. प्रा. निष्ठेला 'ल' हा प्रत्यय लावून तयार होतें. हा एक मराठी भाषेचा विशेष आहे.]

आला, अला वि. श्रेष्ठ, अत्युच्च. The greatest.

[अर. **अला**=श्रेष्ठ, पेकाम. **आला** (रा. ५-९); अकाम. **आला हजरत** (निजामासंबंधीं वापरतात); **हज्रत्=स्वामी.**]

आलात न. कोलीत, दिवटी. A fire-brand.

[चाकाच्याभोवतीं दिवट्या लावतात त्यास **अलातचक्र** म्हणतात. त्याचा नेहेमीं दृष्टान्त देतात. **सं. अलातम्-अंङ्गार. (√ला+क्त) अलात+अण्** (स्वार्थे.)]

आलान न. हत्तीच्या पायांतील बंध, सांखळदंड Fetters for elephants.

[द्रा. **आल** (हत्ती) + **आन=जोडलेलें-बांधलेलें. आने=हत्ती. आलान** हा शब्द संस्कृत मानून त्याची व्युत्पत्ति **आलीयते अत्र-आङ्+ली+ल्युट्** – अशी देतात. ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे.]

आलाप पुं. गाण्यांतील सूर, लकेर, बोल, रडणें. Tune, word, cry.

[**सं. आ+लप् १ शब्दे (णिच्-आलाप्).**

आलपणें=बोलणें; आलापणें=स्वर काढणें. हा त्यापासून झालेला दुसरा तद्भव धातु. आळवणें=आर्जवणें असा अर्थ निष्पन्न होतो. 'शब्दे' म्हणून जरी संस्कृतमध्यें सामान्य अर्थ दिला असला तरी प्रत्येक धातूच्या अर्थाच्या सूक्ष्म छटा तद्भव धातूपासून उघड होतात.]

आलाब(णें) अक्रि. प्रेरणें, प्रेरणा करणें, चेतवणें. To propel, to incite.

[सं. **आ+लाभ् १० प्रेरणे;** याकाम. **आलाब.**]
तैसा अहंकारु आलावला। दर्पु कामक्रोधीं रुठला। एयां दोहींचा मेला। जेयांचां ठाईं॥ ज्ञाने १६-३९४.

आलिंग(णें) सक्रि. भेटणें कवटाळणें. To embrace.

[सं. **आ+लिंग् १ गतौ** (**आङ्+लिङ्ग+ल्युट्**) =जवळ जाणें, भेटणें. **आलिंगित, आलिंगन**-तत्सम शब्द.]

आलिजा,-जाह-जाहा, आलेजा वि. उच्च. Great.

[फा. **आलिजाहा=उच्च पदवीचा. शिंद्यांची पदवी-अलिजाबहाद्दर.**]

आलिंबन न. आश्रय, आधार. A support.

[सं. **आलंबन√लंब्;** याकाम. **आलिंबन** (उगी.)]

आलें न. वनस्पती, ओली, कच्ची सुंठ. Undried ginger root.

[कान. **अल्ल**=कच्ची सुंठ; सं. **आर्द्र, आर्द्रक=ओलें, आलें;** प्रा. **अल्ल;** गु. **आदु** (न.); सिं. **अदिरक (स्त्री-आलो-ओलें);** हिं. **आदा (आला, ओलें);** का. **ओदरु (ओल);** सिंह. **अद.** 'आलें आणि ओलें' ह्या शब्दाविषयीं ब्लोक व टर्नर ह्या दोघांनीं संभ्रम केला आहे. दोन्ही शब्दांच्या उच्चारसाम्यावरून हा घोटाळा झाला आहे. दोन्ही शब्द निराळे आहेत. दोन्ही आर्योद्भव आहेत. कानडींत तद्भव झाला. कदाचित् सं. **आलु, आलुकम्** हा शब्द 'आलें' ह्याच्या मुळाशीं आहे. **आर्द्र, आर्द्रक** हीं रूपें उत्तरकालीन संस्कृतीकरण केल्यासारखीं दिसतात.

सं. **आलु, आलुकम्.** *IE.* Alo, alu; *Lat.* ālum, ālium. ह्या भारतीय मुळाशीं संबद्ध दिसतें. द्राविडी शब्द मूळ नसावा. त्या भाषांतच तद्भव झाला असावा.]

आलोक(णें) सक्रि. पाहणें. To see, to look.

[**सं. आलोच् १ दर्शने. आलोकन, आलोक.**

ह्यामध्यें दृष्टीचा बाहेरच्या पदार्थांशीं संबध येतो. आलोक= दृश्य, देखावा, रूप, आकार वगैरेमध्यें इतर पदार्थांचा संबंध येतो. आलोच, आलोचन-ह्यांमध्यें पाहणाराचा संबंध येतो.

आलोच=मनांतील विचार पाहणें ह्यांत तर फारच आंतील दृष्टीचा संबंध येतो. आलोचणें व आलोकणें ह्यांमधील हा फरक आहे.]

आलोच(णें) क्रि. पाहणें; कानांत सांगणें. To see, to whisper.

[सं. **आ+लुच्, लुक् १ दर्शने;** याकाम. **आळोचणें** (कानांत सांगणें-उगी.); अकाम. **आलोच.**]

आलोड(णें) उक्रि. हालचाल करणें, लोळणें. To move, to roll.

[सं. **आ+लुड्, लुट् १, ६, आलोडने. आलोट, आलोड, आलोढ** वगैरे धातु एकाच संस्कृत धातूपासून निष्पन्न होतात. 'आलोट'मध्यें स्वतां हलण्याची क्रिया तर आलोडमध्यें दुसऱ्यास हलविण्याची किंवा दुसऱ्याची हलण्याची क्रिया असा दोहोंत फरक आहे.]

आल्हाद(णें) उक्रि. (काव्य) संतोषणें, आनंदणें. To be delighted.

[सं. **आ+ल्हद्; म. आल्हाद** (नाथा.)

आव(णें) क्रि. पेरणें, लावणें, भात उपटून लावणें. To transplant.

[सं. **आ+वप्** १ बीजसंताने.

आंवण, आंवणी, आंवणें, आंवणू हे सानुनासिक शब्द कोंकणांत रूढ आहेत.]

पुस्तकालय

^{२}**आव(णें)** अक्रि. हात कोरडे करणें. To dry up the hands.

[सं. **आ+वै १ शोषणे**]

^{३}**आव(णें)** सक्रि. संपादन करणें To obtain.

[**सं. अव् १ अवाप्तौ**. हाच धातु सानुनासिक ‘ आंव ’ असा हि रूढ आहे.

वरील धातूपासून **आव**=डौल, प्रतिष्ठा, संपन्नता अशा अर्थाचा शब्द रूढ आहे. ज्ञानेश्वरी, ए. भागवत, मोरोपंती आर्याभारत, ह्यामध्यें वापरला आहे व तो ज्ञानेश्वरींत ज्या अर्थीं आहे त्या अर्थीं आर्योद्भव असला पाहिजे, फारशी नाहीं. नाहीं तर **आब** ह्या फारशी शब्दाशीं जोडण्याचा मोह उत्पन्न होण्यासारखा आहे. ‘ **आव=येणें** ’ असें एक हिंदी धातूच्या आज्ञार्थाचें रूप रूढ आहे. **आवजाव**-येजा. हा धातु (सं. आ+या) ह्या धातूपासून आहे.]

पेरिजे नुसदी हिंसा। तेथ **आवैल** काय अहिंसा
परि नवलु वा धिवसा। याज्ञिकाचा (ज्ञा.)

आवक वि. आलेलें. Arrived.

आव, आंव स्त्री. आमांश, शेंब. The mucus voided, affection of the bowels.

[सं. **आम-कच्चें; आमय=अपचन, रोग**; हिं. **आंव**; सिं. **आंउ** (स्त्री.); का. **ओम (मु)= कच्चें आम् (जंत)**; सिंह. **अमु (कच्चें), आमियाव=अपचन.**]

आंवक(णें), आवक(णें) अक्रि. कचरणें, साशंक होणें. To falter, to hesitate.

[सं. **अप्+गम् १** गतौ.]

आवग(णें) अक्रि. वाईट मार्गाला लागणें, बहकणें. To go astray.

[**सं. आ+वल्ग्** १ उत्पतने; हिं. **बगना**; सं. **अव+वक्क् १ गतौ** किंवा **वक्, वग्-१ वक्रगतौ**; याकाम. **आवग (=चढणें, धारण करणें), आवगणी=वेष, सोंग (नरुस्व)**; शिकाम. **आवग.** अवगे तरुवरें भूमिरसु (ज्ञाने १४-२७९). कीं मानुषणा आवगला ॥ दाव ३५२.]

आवट-आंवट(णें) उक्रि. भातासारखें उगवलेलें धान्य उपटून दुसऱ्या ठिकाणीं लावणें. To transplant.

[**सं. आ+वट्, वंट् १० विभजने** (मूळ कल्पना “ उरणें, शिल्लक राहणें ” अशी आहे. त्यावरून “ जमीन किंवा पीक आवटणें ” ही कल्पना), आवटणी=पेरणी. आवणें असाहि रूढ आहे.]

आवड(णें) सक्रि. पसंत पडणें, गोडी वाटणें. To like.

[**सं. आ+वृ** ५ वरणे, (शको.), **आ+पद्** ४ स्थितौ, प्राप्तौ (राज).

ह्यांपैकीं कोणत्याच व्युत्पत्तीनें समाधान होत नाहीं. सिंधीमध्यें “ **आउडणु** ” असा धातु आहे. गुजरातीमध्यें **आवडवूं** असा आहे परंतु त्याचा अर्थ निराळा-“ जाणणें, समजणें ” असा आहे. ज्ञानेश्वरीमध्यें “ तो मनुष्यासारिखा तरी **आवडें** (ज्ञा. ४-१००) असा प्रयोग आहे. त्यांत आवडणें=‘ दिसणें, वाटणें, भासणें ’ असा अर्थ आहे. मराठींत ‘ **आवड** ’ शब्दाबरोबर ‘ **निवड** ’ असा एक प्रतियोगी शब्द येतो. व तो सं. नि+वड्, वट् १० विभजने. ह्या धातूपासून आहे. तसा आवडणें हाहि आ+वट् १० विभजने-निराळा काढणें, ह्या धातूपासून असेल काय ?

पहिला अर्थ-**दिसणें, भासणें**; त्यानंतर त्यांत थोडी वाढ होऊन **सूक्ष्मतेनें दिसणें** म्हणजे **समजणें, जाणणें** हा अर्थ उत्पन्न झाला. व त्याच अर्थानें गुजरातींत रुढ आहे. नंतरचा अर्थ-पसंत करणें हा झाला. आणखी एक व्युत्पत्ति ग्राह्यशी वाटते. **आ+वृ** किंवा **वृत्** (निष्ठा) **आवृत** किंवा **आवृत्त**; **प्रा. आवत्त, आवट्ट** आणि मराठी धातु प्राकृत रूपापासून निष्पन्न झाला असावा. “ **आवृत-आवत्त-आवट्ट-आवड** ” अशा मार्गानें हा धातु निष्ठारूपापासून निघाला. मूळ धातूपासून नाहीं, हीच व्युत्पत्ति सशास्त्र ठरेल कारण हिला प्राकृत रूपाचा आधार आहे.]

आवत(णें) सक्रि. बोलावणें (जेवण्यास), मंत्र घालणें, आमंत्रणें. To invite for meals.

[सं. **आ+मन्त्र् १० आमंत्रणे.** (आवताण-अशिष्ट लोकांत हा शब्द निमंत्रण ह्या अर्थीं रूढ आहे.]

आवतण न. भोजनास बोलावणें. An invitation for meals.

[सं. **आमंत्रण √ मंत्र्**; कान. **अवुतण-भोजनास निमंत्रण.** कानडींत तद्भव होऊन गेला. अकाम. ग्रामीण. **आवताण.**]

आवतीं भोवतीं अ. सभोंवतीं, सभोंवार. Surrounding.

[सं. **अन्तर्वर्ती सबाह्यवर्ती=आवतीं भोंवतीं**; प्रा. **आवत्त बाहित्त.**]

आवंदा क्रिवि. ह्या वर्षीं, चालू सालीं. This year.

[फा. **आयंदा.**]

आवर(णें) उक्रि. संपवणें, आटपणें, गोळा करणें. (लक्षणेंने ह्याचे दुसरे अर्थ झाले आहेत.) To gather together, to draw in, to wind up.

[सं. **आ+वृ ५ वरणे**]

–आवरण आच्छादन. A cover. (**आव+वृ**).

आवरण न. हरितालिकेच्या अगोदरच्या दिवशींचें जेवण.

[सं. **आवरण √आ+हृ.**]

आवरीव स्त्री. मेजवानी. A feast.

[सं. **आहर √आ+हृ.**]

आवर्जि(णें) सक्रि. सोडणें, गाळणें. To omit, to drop.

[सं. **आ+वृज् १ वर्जने.** आवर्जून ह्याचा अर्थ मात्र उलट झाला आहे. आवर्जून म्हणजे मुद्दाम, अगत्यपूर्वक, न विसरतां. ह्यांतील पहिल्या स्वराबद्दल संभ्रम आहे. तो 'आ' नसून 'अ' आहे व उच्चारांत मात्र दीर्घ–विवृत झाला आहे.]

आवर्जा पुं. रोजखर्ड्यावरून तयार केलेला एक जमाखर्चाचा कागद. A document of accounts.

[फा. **अवारिज <अवर्, आबार्**=विस्कटलेलें रोजनिशी, रोजखर्डा ह्या सारखें कच्या नोंदीचें पुस्तक; पेकाम. **आवर्जे** (खरे ४-१४३३)]

आवर्तणें अक्रि. पुनः पुनः त्याच मार्गानें जाणें, पुनरावृत्ति–चक्राकार फिरणें. To repeat.

[सं. **आ+वृत् १ वर्तने. आवर्त, आवर्तन, आवृत्ति.** (पुनः पुनः येणें.)]

आवल(णें) उक्रि. आवलीं चालविणें व नावेस गति देणें. To row.

[सं. **आ+प्लव√प्लु तरणे. वल्हें, आवलें** हे दोन्ही शब्द '**प्लव**' पासून आले आहेत. **आवलें** हा '**आयुध**' पासूनहि व्युत्पादितात. परंतु तें चूक आहे. आयुध शब्दापासून आउत (=नांगर) हा शब्द तयार होतो व त्याचा अर्थ भिन्न आहे. आवलो, आवलकरी–वल्हीं हाणणारा मनुष्य; आवळणें शब्द निराळा आहे. तो आ+वल् पासून आहे.]

आँवस स्त्री. महिन्याच्या शेवटचा दिवस. New-Moon day.

[सं. **अमावास्या <अमा+वास.** (**अमा** अ. **वस् १ वस्तौ**); **आवस**–पूर्व रात्रीस सुद्धां हा शब्द लावतात. त्याचा प्रतियोगी शब्द पहाटेस असा आहे. तो कानडी 'अवसु' पासून आला.]

आंवस न. वाघानें बैलाला मारून दुसऱ्या दिवसाकरितां ठेवलेलें मांस.

[सं. **आमिष=मांस; प्रा. आमिस;** सिंह. **आम** (**आमिष**).]

आवसा पुं. डाहळ्यांची तात्पुरती झोपडी. A booth, a temporary hut.

[सं. **आवास √वस्;** पा. प्रा. **आवास;** गुं. **अवास;** हिं. **आवास;** सिंह. **अहस्, अवा** (घरें).]

आवळे जावळे न. जुळीं भावंडें. Twins.

[सं. **युगुलम् √युज्;** प्रा. **जुअल;** असा निष्पन्न होईल. परंतु आवळे शब्द कसा व्युत्पादवयाचा ? '**जावळें**' ह्याचा तो प्रतियोगी आहे. व तो ध्वनिसाम्यानें झाला. कानडी मध्यें पुढील शब्द आहेत. **जवळ=जोडी, अवळी=जोडी, प्रतिकृति.** प्रथम अवयव हा कानडींतून व दुसरा अवयव आर्योद्भव असे दोन्ही भाषांतील परंतु एकाच अर्थाचे हे शब्द आहेत.]

आँवा पुं. कुंभाराची मडकीं भाजण्याची भट्टी. A potter's furnace.

[सं. **अव् १ ज्वलने;** प्रा. **अव** (**जळणें.**)]

आँवा पुं. रोपांचा समूह. A bed of plants.

[सं. **आ+वप् १ वपने.**]

आँवा, अवा स्त्री. स्त्री. बायको (बहुमानार्थी) रखेली. A woman, a keep.

[कानडी. **अव्वा=स्त्री;** अकाम. **अवा=रखेली.**

ह्या शब्दाच्या बाबतींत मराठींत अर्थभ्रंश झाला आहे. मूळ कानडींत त्याचा अर्थ चांगला–बहुमानार्थी आहे. परंतु मराठशाहीमध्यें शहाजी, व्यंकोजी, पेशवे वगैरेंच्या अमदानींत मराठे लोक कर्नाटकांत जाऊन स्थायी झाले. सरदार-बारदार कांहीं दिवस राहून पुनः देशावर आले. येतांना त्यांच्याबरोबर कांहीं कानडी बाया आल्या. त्यांना हा शब्द वापरला गेल्यामुळें हळू हळू त्याला ठेवलेली स्त्री, रक्षा–असा अर्थ प्राप्त झाला.]

आवाई–आवई स्त्री. भुमका, कण्डी, हुल्लड, भीति, ओरड, बातमी. A rumour.

[सं. **आ + व्हे.;** (बोलणें, ओरडणें–सांगणें–(बातमी) सांगणें–बातमी अशा मार्गानें अर्थ प्राप्त झाला.) फा. **आवा;** पेकाम. **आवाई, आवई.** (खरे ७–३६१६). अवाई पहा.]

आवांक(णें), आवांकि(णें) अक्रि. धैर्य करणें, शक्ति वाढणें. To take courage, to be strong.
[सं. **आ+वक्ष् १ रोषे.** आवांका=शक्ति, सामर्थ्य. (<**आवक्षः**)]

आवांक(णें) सक्रि. बोलाविणें. To invite.
[सं. **आ+वच्** (वैदिक) आमंत्रणे]
तरी जीवीं ऐसें आवांके । म्हणे दास्यकरी न नीके ॥
(ज्ञा. १३-४०३)

आवांक(णें) क्रि. गोळा बेरीज करणें. To sum up.
[सं. **आ+वक् १ गतौ**]
जें एकवेळ आवांकुनिया । सांगावें ज्ञान (ज्ञा. १८-१३३७)

आवाज पुं. शब्द, ध्वनि. Sound, a word.
[सं. **आवाद्य √ वद्, वादय. फा. आवाझ्.** आवाजी असा स्त्रीलिंगी शब्द गायनाच्या बाबतींतच रूढ आहे. कल्पना अर्थात् मृदुपणाची, सुरेलपणाची आहे. आवाज काढणें=शब्द उत्पन्न करणें. आवाज देणें=एका आवाजाला प्रत्युत्तर म्हणून दुसरा आवाज काढणें.]

आवार नं. विस्तृत परंतु मर्यादा घातलेली जागा. कुंपण घातलेलें परसूं. A yard, a courtyard.
[सं. **आ+वृ (?)**]

आवारा पुं. नासाडी, नुकसान. Loss.
[फा. **आवारा=नासाडी; पेकाम. आवारा**(रा. १५. ३४.]

आवारु न. भोजन, मेजवानी. A feast.
[सं. **आहार (?)**; याकाम. **आवारु** (उ. गी ८२६; ज्ञा. ९.२०१)]

आवारू वि. दोन Two.
[नंदभाषा. **अवारू=दोन**; याकाम. **आवारू, अवारू** (जोडोनीया–नामदेव).]

आवाह(णें) सक्रि. बोलावणें. To call, to invite.
[सं. **आ+व्हे १ शब्दे. आवाहन, आव्हान** (बोलावणें), **आव्हान(णें).**]

आवाळू न. ओठाचा भाग, ओठ. A lip.
[द्रा. **औडु=आवुडु=खालचा ओठ**].

आवाळूं न. गळूं, गोठलेल्या रक्ताचा गोळा, फुगीर भाग. An abscess.
[सं. **अर्बुद (?)**].

आविस्, आविर् प्रकटपणादर्शक शब्द.
[सं. **आविः √ अव् उङ् शब्दे+इर=प्राकाश्यम्, प्रस्फुटत्वम्.** हा शब्द प्रथम ठेवून कांहीं तत्सम शब्द तयार झाले व ते मराठींत रूढ आहेत.

आविर्भवणें प्रगट होणें. To be manifest.
(< **आविर्+भू.** आविर्भूत, आविर्भाव आविर्भवन.)

आविष्करण प्रकट करणें. To manifest.
(**आविस्+कृ. आविष्कार, आविष्कृत**)

आविसाळें न. घरटें. A nest.
[सं. **आविस्+आलय् (?)**]

आवीस न. मांस, आमिष, लाल्लूच. Meat, a bait.
[सं. **आमिष**; याकाम. **आवीस** (उगी. २५९)]
तियें उडौनि गगनीं घेवो पाति आविसें : नक्षेत्रांची ॥ नरुस्व ७१९

आवेश(णें) अक्रि. आंत शिरणें. To enter.
[सं. **आ+विश् ६ प्रवेशने.**
आंत शिरण्याची मूळ कल्पना मानसिक क्षेत्रांतहि जाऊन एखाद्या भावनेचा आत प्रवेश ह्या अर्थीं **आवेश** शब्द रूढ झाला. उदा. क्रोधावेश, पिशाच्चावेश, भुतावेश. एखाद्या मनोभावनेचें किंवा मनोविकाराचें वर्चस्व ह्या अर्थापासूनच त्वरा, उत्कंठा हे अर्थ त्या शब्दास आले.]

आव्हान(णें) उक्रि. बोलावणें, हाक मारणें. To call, to challenge.
[सं. **आव्हान** (नाधा.) **√ आ + व्हे–व्हयने**; (**आव्हान**–(लढण्यास) बोलावणें–पाचारण)].

आशय पुं. उद्देश, हेतु, अभिप्राय. An object, a view.
[सं. **आ+शी २ शयने.** हेतु, उद्देश हे मनांत राहतात म्हणून ते आशय. हा एक प्रकारचा अर्थालंकार आहे.]

आशा स्त्री. इच्छा, आकांक्षा. A wish, an expectation.
[सं. **आशा ; आ समन्तात् अश्नुते, आप्नोति इति.** ह्याचा एक तद्भव ‘ **आस** ’ असा शब्द आहे. नामधातू– **आसव(णें)**=आशा करावयास लावणें. **आशाळ, आशाळु, आशाळभूत** < सं. **आशा+आलु**–विशे. प्रत्यय.]

आशीर्वाद पुं. चांगलें इच्छिणें. A blessing.
[सं. **आशीस्+वाद** (√ वद् १ शब्दे); याकाम. **आसी** (नरुस्व १७४); आशीर्वचन, आशीर्वादणें– आशीर्वादार्थ–क.)]

आशुरा-आशोरा पुं. मोहरमचा सण, विशेषतः नववा व दहावा दिवस. Ninth and tenth days of Muharram.

[अर. अशूरा; पेकाम. आशुरा (रा. ५-९३), आशोरा (खरे. ३४२४); अकाम. आशूरा, आशोरा, असूरा इतक्या प्रकारानें लिहिला जातो.]

आशौच न. सुतक, मृतासंबंधीं आलेलें अस्पृश्यत्व. Mourning.

[सं. आ + शौच (√शुच्.)

दुःख करणें, दुःखांत असणें असा मूळ अर्थ. परंतु आतां त्याचा अर्थ अस्पृश्यत्व असा लक्षणेनें झाला आहे.]

आश्चर्य न. चमत्कार, नवल, विस्मय. Wonder, miracle.

[सं. आश्चर्य √ चर्. (आङ्+चर्+ण्यत्+सुट् निपादनात्]

आश्रफी. स्त्री. एक प्रकारचें जुनें सोन्याचें नाणें. A gold coin.

[अर. अशर्फी, असर्फी = सुवर्णनाणें.]

आश्रम पुं. साधूच्या वस्तीचें ठिकाण, ऋषींची वस्ती. आर्यलोकांच्या जीवनांतील एक विशिष्ट अवस्था. An abode of a saint. A stage in the life of a Brahmin enjoined by the Shastras.

[सं. आ + श्रम् (श्रमणें, दमणें ह्या क्रियेवरून श्रमल्यानंतरचें विसांव्याचें स्थान असा अर्थ प्राप्त झाला.]

आश्रय(णें) उक्रि. आश्रय घेणें, मदत घेणें, अनुसरणें. To get support.

[*IE*. KRET; KRI; सं. श्री; *Av*. Shri (सुंदर) सं. आ + श्रि १ सेवायाम्; (आश्रय ह्यापासून नामधातु); आश्रय=संरक्षण, आश्रयाचें ठिकाण. आश्रयी; आश्रा, आसरा (आधार), आश्रित (पोसलेला). आसरा पहा.]

आश्वास(णें) सक्रि. धीर देणें, उत्तेजन देणें. To assure, to encourage.

[सं. आ + श्वस् २ श्वसने. आश्वास, आश्वसन, आश्वासित.]

आषक वि. अनुरक्त, प्रेम करीत असलेला प्रेमक, प्रणयी. A lover.

[फा. आशीक = प्रेमक, प्रणयी, अनुरक्त. ह्याचा प्रतियोगी शब्द माषुक-आषकमाषुक, आशुकमाशुक.]

^{1}**आस** स्त्री. इच्छा, आशा. Desire, wish.

[सं. आशा; गु. आस; हिं. सिं. आस, आसा; का. अश्; याकाम. ‘ आसावणें ’ (नरुस्व १९९). हा त्यापासून नाधा. आहे.]

^{2}**आस, आंस** पुं. गाडीचा कणा. An axle.

[सं. अक्ष; प्रा. अच्छ, अच्छि; अकाम. आसकूड-आसकड(णें); गु. आस.]

आसड(णें) सक्रि. पटकणें, पछाडणें, ओढणें, झाडणें, झटका देणें, जोरांत हिसका देणें. To snatch.

[सं. आ+ चुट्, आ + सट्; आछोटय; प्रा. अच्छोड; याकाम. आसुड(णें), आसड(णें); अकाम. असड, आसड, हसड, हसडा, आसडी (म्हशीची लाथ), आसणी= धुसळखांबाची दोरी.]

आसन न. बसण्याची वस्तु, पाट वगैरे. A seat.

[सं. आस्. (आस्यते उपविश्यते अस्मिन्)]

आसन्न वि. जवळचा. Approached.

[सं. आ + सद्. (निष्ठा) आसन्न.]

आसपास अ. भोंवतालीं, जवळपास. Round-about, nearby.

[सं. अश्र-कड, पार्श्व (< पर्शु)=बाजू; प्रा. अस्स पस्स (पास); देप्रा. आसयं निकटं (२८-१०), (प्रा. अस्स, आसयं < सं. आश्री.); गु. हिं. का. आसपास; सिं. आसिपासि; पश्चि. पं. आसेपासे; सिं. अस. (बाजू, कोपरा).]

^{1}**आसरा** पुं. आधार, मदत, आश्रय. Support, help.

[*IE*. KREI, KRI; सं. श्री (श्रित, शिव, श्री, (सौंदर्य, ऐश्वर्य), श्रेयः, श्रेष्ठ, आश्रय;) झें. श्रि (सुंदर); गु. आसरो; हिं. आसरा; सिं. आसर, आसिरो; का. आसर; पं.बि. ने. बं. ओ. आसा, आश्रा.]

^{2}**आसरा** स्त्री. जलदेवता, अप्सरा Water deity.

[सं. अप्सरस्; पा. प्रा. अच्छरा; हिं. अच्छर; सिंह. असर = देवता.]

^{1}**आसव** न. औषधींचा द्रवरस. A medicine-extract, a tincture.

[सं. आ + सु २ सवने]

^{2}**आसव** न. डोळ्यांतील पाणी, अश्रु. Tears.

[सं. अश्रु; पा. अस्सु; प्रा. असूं; गु. आंजु, आंसु; हिं. ने. आंसु; सिं. इंज; पं. अंझु; का. ओश-शु; रुमा. अख; सिंह. अस; मरा. असूँ.]

आसळग वि. वरवर आलेलें, उथळ पाण्यांत असल्यासारखें. Lying on surface.

[सं. **आ + सञ्ज् (?) लग्.** "अल्पेंचि काळें पावैन ऐसें देखे" (महानु).]

आसुड(णें) उक्रि. झटकणें, हिसका देणें, हसडणें, पाखडणें. To snatch.

[सं. **आ + चुट्** ६, १० छेदने. **आ + सट्, आछोटय; आचुट् > आसुट् > आसुड; आचुंटय् > आंसुड. आसडणें** पहा. **आसुड** असें रूप आहे. **आसुडा, आसुडपाखड.**]

आसुपाठी पुं. घोड्याच्या पाठीवर बसणारा, घोडेस्वार. A horseman.

[सं. **अश्वपृष्टोः ; > अस्सपट्ठी-आसपाठी.** पाटणच्या शिलालेखांत हा शब्द वापरला आहे.

IE. Ekuo; सं. **अश्व** √ अश् (?); *Av.* aspa·; *Gr.* appos; *Lat.* equos; *Gall.* epo; Cymr. ebol; अश्व पहा.]

आसुर पुं. दैत्य, राक्षस. A demon.

[सं. **असुर (√अस्-अस्यति देवान् क्षिपति)**

सुर आणि असुर असे दोन शब्द वैदिक वाङ्मयांत पुष्कळदां येतात. देव आणि दानव असे त्यांचे अर्थ आहेत. असुर शब्दाचा अर्थ प्रथम चांगला होता. नंतर इराणांत आर्यांच्या वसाहतींत वेबनाव झाल्यानंतर सुर असुर ह्या शब्दाच्या अर्थात वैपरीत्य निर्माण झालें. फुटून राहिलेल्या आर्यांबद्दल व देवतांबद्दल असुर शब्द वापरांत आला. व त्यांनींहि अधिक्षेपानें 'सुर' शब्द निष्कासित आर्यांना व त्यांच्या देवतांना लावला. आसुरी= आघोरी, भयंकर, हा अर्थ लक्षणेनें निराळा झाला आहे.]

आसूं न. अश्रु, डोळ्यांतील पाणी. Tears.

[सं **अश्रु ; पा. अस्सु ; प्रा (शौ). अस्सु; गु. आंज़ु, आंसु ;** हिं. ने. **आंसू ;** सिं. **इंज,** पं. **अझु ;** का. **ओश(शु);** रुमा. **अवा ;** याकाम. **आसु** (ऋ. ६२९), **आसुवें** (**नरुस्व** २४८)].

आस्ते क्रि. वि. अ. सावकाश. Slowly.

[फा. **अहिस्ता.** आस्तेकदम,=सांभाळून पाऊल (टाकणें)]

आस्था स्त्री. कळकळ, काळजी. Sincerity.

[सं. **आ + स्था.** ह्या धात्वर्थावरून वरील नामाचा अर्थ कसा निष्पन्न झाला हें समजत नाहीं. **आ + स्था=जवळ उभें राहणें, आश्रय देणें-आश्रयाचा विश्वास उत्पन्न करणें-त्याच्या संरक्षणासाठीं जवळ उभें राहणें-त्याची काळजी वाहणें-कळकळ वाटणें-अशा मार्गानेंच** त्या **अर्थाची निष्पत्ति लागते.**]

आस्थानी स्त्री. सभा A meeting.

[सं. **आ + स्थान, √ स्था ;** याकाम. **आस्थानी= सभा** (उगी).]

आस्फाल(णें) अक्रि. आदळणें, आपटणें. To strike.

[सं. **आ + स्फल् (णिच्) स्फालय**]

आस्फुर(णें) अक्रि. फुंकणें, वाजविणें, कंप पावणें. To blow, to tremble.

[सं. **आ + स्फुर्** ६ **स्फुरणे.**]

आस्वाद(णें) सक्रि. चव घेणें, चाखणें. To taste.

[सं. **आ + स्वद् > आस्वाद** (नाधा.)]

आह(णें) अक्रि. असणें. To be.

[सं. **अभावति (?);** सिं. **आंह;** जुनी हिंदी, अवधी. **अहं;** पं. राज. ब्रज. बुंदेली. **हिह.**]

आहळ(णें) सक्रि. जळणें. To burn.

[सं. **आ + हरस् (अग्निनाम-निरुक्त);** किंवा **आ + भा २ प्रकाशे;** याकाम. **आहाळ** (उगी); अकाम. **आहाळ= विस्तव, आग; आहाळणें = भाजणें.**]

आहाच क्रि. अ. वरवर, सरासरी, खोटें, व्यर्थ. Apparently, unreally.

[सं. **वृथा (?);** याकाम. **आहाच (ज्ञाने.)**]

आहाट(णें) सक्रि. ढवळणें, घोटणें. To stir, to pulverize.

[सं. **आ + घट्ट् १ चलने; आघट्ट > आघाट्टय > आहाट. आहाट-आहट** = हांक (मारणें.)]

आहणा, आहाणा पुं. म्हण, दृष्टांत, हुमाणा. An addage, a proverb.

[**वैसं. अहनस्या ;** सं. **अवख्यान ;** प्रा. **आहाण, आहण** (< आहन).]

आहार पुं. खाण्याचे जिन्नस. An eatable.

[सं. **आहृ-आहार.** याकाम. **आवारु (भोजन-उगी)** त्याच्या **हारीं (आहारीं** = ताब्यांत) जाणें पडणें, असणें.]

आहाळ (णें) सक्रि. भाजणें To burn.

[सं. **आ + हरस् (=अग्निनाम-निरुक्त). आहळणें पहा**]

ऑळ स्त्री. दोषारोप. An accusation.

[सं. **आल, अलीकम्** (न) ; प्रा. **आल** (न); अकाम. **आळ**(स्त्री)]

ऑळ पुं.स्त्री. इच्छा. A wish, a desire.

[सं. **आलय √ आ + ली ;** प्रा. **आलअ ;** सिं. **अल=घर.**

आळ स्त्री. रांग, ओळ. A row, a line.
[सं. आलि ; पा. अलि ; सिंह. ॲल=कालवा.].

आळ(णें) अक्रि. गोठणें. To freeze.
[सं. आ+लयन (√लि, ली); प्रा. अल्ल>आळ अळि=पाण्यांत किंवा द्रव पदार्थात सुरणें.]

आळगु(मळगु) वि. पुं. प्रेम, प्रेमाची गडबड, लाडिक. Love, fondling.
[कान. अळगु=प्रेम.]

आळवार पुं. दक्षिण हिंदुस्थानांतील विष्णूचे भक्त, विष्णूच्या बारा प्रसिद्ध भक्तांचें बिरुद. A divotee of Vishnu.
[कान. आळवर=नम्र, विनीत.]

आळवाळ न. आळें. A cavity round the trunk of a tree for water.
[सं. आलवाल. आळें पहा].

आळस पुं. सुस्तपणा, मंदत्व. Laziness.
[सं. आलस्य, अलस ; प्रा. आलस्स ; पै. आळस्स ; गु. आळस ; हिं. आलस ; सिं. अरिसु, अलिसु ; का. आलोछु ; याकाम. आळोसु (नरुस्व ३९४).]

-आळशी वि. मंद. Lazy.

-आळसडा वि. आळशी. Lazy.

-आळस(णें), आळसावणें (नामधातु आळसपासून) मंदावणें. To be lazy.

आळा पुं. बंधन, मर्यादा, नियमन. A fetter, a limit.
[सं. आलान (√ली)=सांखळी (शको.); ही व्युत्पत्ति तितकीशी पटत नाहीं. अन्त्य ' न 'ची काय वाट झाली ? द्रा. आने, आल (=हत्ती) + आन (=जोडलेलें, बांधलेलें). आलान पहा. कान. आळा=अवहेलना, मानखंडना (?) आळा (घालणें.)]

आळास पुं. हुंदका. A sob.
[कान. अळु=रडणें. अळुकुसु=आळा+श्वास (?) अकाम. प्रांतिक. आळास; आळिका = हट्टी. आळियाडें-आळिव-आळीव (हट्ट.).]

आळिक वि. क्षुद्र, क्षुल्लक. Mean, insignificant.
[सं. अलीक; याकाम.-आळिक (उगी.)]

आळिंबन न. प्रेम, आसक्ति. Love, attachment.
[सं. आलंबन √लंब् ; याकाम. आळिंबन (उगी.).]

आळी स्त्री. जन्तुविशेष. A worm.
[सं. हलिका, आलिका, आळीका; प्रा. एलिआ; उत्तरकालीन संस्कतीकरण आहे. अळी पहा.]

आळी स्त्री. (घराची रांग) बोळ. A lane.
[सं. आलि=रांग; प्रतोल < १ पोळ (गुजराती); < २ टोळ (इंदूर)-तोला (बंगाली); < ३ आळी (मराठी).]

आळी स्त्री. आळी मिळी गोप चिळी ह्या मुलांच्या खेळांतील वाक्यांत प्रयोग वापरतात.
[द्रा. कान. आलि=खेळांतील संवगडी.]

आळु, आळू वि. भित्रा (मनुष्य).
[द्रा. कान. आलि; तेलगु आलु = स्त्री, पत्नी.]

आळुक(णें) सक्रि. नागविणें, लुबाडणें, हपापणें. To rob.
[सं. आ + लुप् १० हिंसायाम्-आलुक-आळुक]
जिहीं आपणपै नाहिं देखिलें । तेञ्चिही इंद्रियार्थी रंजले । रंक आळुकले तुवातें सेवी ॥ (ज्ञा.)

आळुका पुं. पैसा, अडका. A pice.
[का. अळू (?); याकाम. आळुका (उगी.), आळुका, आळुकेपण, अळका, आळुमाळ. अळुमाळ पहा.]

आळू न. कन्दविशेष. A kind of root.
[सं. आलुक (आलाति इति); प्रा. आलु (पुं. नं.). २ सं. आलुकी ; प्रा. आलुई.]

आळें न. वृक्षाच्या मुळाशीं पाण्यासाठीं केलेली खांच. A cavity round the trunk of a tree for water.
[सं. आलय, आलवाल. (आसमन्तात् जलस्य लवम् आलाति); पा. आलया ; प्रा आलअ (पुं.); का. ओलु ; हिं. पं. आला (कोनाडा); सिं. आरो (घरटें); याकाम. आळें (उगी.).]

आळोच(णें) सक्रि. कानांत सांगणें. To whisper.
[सं. आलोच् १ दर्शने; याकाम. आळोच (=कानांत सांगणें-उगी.)]

-आळोंच स्त्री. कानगोष्ट.

आक्षेप(णें) उक्रि. आकर्षणें, चटक लावणें. To attract. हरकत घेणें, विरोध करणें. To obstruct, to object to.
[सं. आक्षिप् ४ क्षेपणे (आपल्याकडे फेंकणें-ओढून घेणें आपल्याकडे ओढणें-मागें खेंचणें-मागें घेणें-आढेवेढे घेणें-

शंका घेणें. अशा मार्गांनें दुसरा अर्थ निष्पन्न होतो.) **आक्षेप** (=शंका) ह्यापासून नामधातु तयार होतो.]

आज्ञा स्त्री. हुकुम, ताकीद, आदेश. An order.
[सं. **आ+ज्ञा.** (**णिच्**)–**ज्ञापय** ह्यापासून कांहीं सामा. शब्द तयार होतात. **आज्ञाकर,-कर्ता,–अंकित,–धारक,–वर्ती, –पत्र,–पक,–पालक,–पत्रिका,–भंग,-अर्थ,--सिद्ध.**]

इ पुं. मराठी वर्णमालेंतील तिसरा स्वर. Third vowel of Marathi alphabet.

ह्याचें उच्चारण तालव्य असून उच्चारस्थान तालु आहे. ह्याचें वेदपूर्व स्वरूप कदाचित् ‘य्’ असावें असें ‘हयवरट्’ ह्या पाणिनि सूत्रावरून वाटतें. अत्यन्त प्राचीन काळीं हा स्वर ‘अ’च्या उच्चाराचेंच एक स्वरूप समजला जाई. (‘अ’ पहा.) यादवकालांत व पेशवेकालांत कधीं कधीं ‘यि, वि,’ असा ह्या स्वराचा उच्चार केला जाई. अर्वाचीन मराठीमध्यें ह्याचा उच्चार ग्रामीण लोक ‘ही’ असाहि करतात.

[आद्य इ. सं. **इ**; प्रा. **इ**; **उ स्तिमित-चिंब.**
सं. **उ.** प्रा. **उ. उत्कुट्टुक–उकिडवा.**
सं. **ऋ**; प्रा. **इ**; **कृपा–किणव; जामातृ–जांवई.**
सं. **ए. ऐ**; प्रा. **इ**; **स्रेक–शिरक. कुचैल–कुचिलें.**
सं. **यि. वि. आव्हायिका–आवाई. विव्हल–इवल.**
कधीं कधीं आद्य, मध्य व अन्त्य सं. प्रा. ‘**अ, इ, ई, हि, भि, पि, धि, फि** इत्यादि वर्णांबद्दल ‘**इ**’येते.]

इ क्रि. जाणें. To go.
[*IE.* Ei; सं. **इ २ गतौ**; *Av.* aeiti ; *ap.* aitiy ; *Lat.* eiti, (ex) itium ; *Old Ir.* ethae ; *Lit.* aimi ; *Old Slav.* iti ; *Teut. Got.* ijja ; *Eng.* (it, ient, ition, itous,).

पुष्कळ मराठी तत्सम व तद्भव शब्दांत ह्या संस्कृत धातूचा संबंध येतो म्हणून तो येथें मुद्दाम दिला आहे.]

इ, ई सर्व. हा, ही, हें. This.
[सं. **इदम्**; प्रा. **ईअ**; अप. **इ, इ (इदम्, एतत् + कट = इकडे).** इ + कड (< कट) इकडे.
सर्वनामाच्या पुढें शब्द ठेवून एक सामासिक शब्द बनला. तेलु. **इक्कड, इक्कडकी = इकडे.**]

इक, ईक प्र. नामप्रत्यय. (सोयरीक, वऱ्हाडीक). A noun termination.
[सं. **इक**; अप. **इक्क**; याकाम. **इक** (पेरवणीक, वारिक)]

इख न. विष. Poison.
[सं. **विषम् >** विख, इख; याकाम. **इख, लिख**; अकाम. ग्रामीण. **इख, वीख.**]

इखलासी वि. स्नेहपूर्ण, चाहता. Friendly, affectionate.
[अर. **इख्लास–प्रेम.**]

इघ(णें) अक्रि. जाणें. To go.
[सं. **इख् १ गतौ**; याकाम. (**न + इवे; निर् + गम्**) = **नेघे.**]
विचार जेथ न रिघे । हेतु जेथ नेघे । जैं द्वैत दोषसंगें । सिंपैचिना ॥ ज्ञा ४. १४९.

[1]**इंगळ, इंगोळ** पुं. जळता निखारा, विस्तव, लाल पेटलेला कोळसा. A live coal.
[सं. **अंगार, इंगार** (हर्ष ताम्रपट); प्रा. **इंगार, इंगाल** (हे. १४७ २५४); गु. **इंगारो, अंगारो**; सिं. **अङरु**; हिं. **अंगार**; सिंह. **अंगरु**; लमा. **अंगर.**
तीक्ष्ण भाजण्याचा अर्थ ‘ **इंगळी** ’= ‘मोठा काळा विंचू ’ ह्या शब्दांत आला.]

[2]**इंगळ, इंगळी** स्त्री. काळा मोठा विंचू. A large black scorpion.
[इंगळास ओळंबे लागले. **इंगळ** म्हणजे विषारी मोठा काळा विंचू. **ओळंबे = मुंगळा** ह्या अर्थीं कोंकणांत वापरतात. प्रथम इंगळीचा दंश होऊन पुन्हा मोठा मुंगळा डसणें. अग्नीला (इंगळ) ओळंबे (गवत) लागलें असा अर्थ करितात तो बरोबर नसावा.]

इंगा पुं. कातडें मऊ करण्याचें चांभाराचें हत्यार. A cobbler’s instrument.
[सं. **इग् १ गतौ.** (इंगा म्हणून एक चांभाराचें हत्यार आहे. त्यानें तो कांतडें दाबून घोटून मऊ करतो. त्यावरून इंगा समजणें,–दाखविणें,–फिरणें असे प्रयोग रूढ आहेत. त्यांत खोड मोडणें, परिणाम जाणवणें असा अर्थ आहे.)]

इंगित न. रहस्य, खूण, उद्देश. A covered purpose, sign, object.
[सं. **इग् १ गतौ.**]

इंग्रज पुं. इंग्लंडमधील मनुष्य. An Englishman.
[*Portu* Ingrej; पेकाम. **इंग्रेज.** इंग्लिश. <Angles =इंग्लंडमध्यें फार प्राचीन काळीं राहिलेली एक जर्मन जमात.]

इच्छा स्त्री. वांछा, वासना, आशा. Desire, wish, hope.
[*IE.* Ais, Aissk. वै. **एशति, इशति, इच्छति**; सं. **इष्-इच्छ्**; *Av.* Is, Isma ; *Lat.* ais ; *Teut. Got.* Aistain ; Eis ; *Arm.* Aic, √ais-ska ; *m.Eng.* Ax, Axe (Ask).

(इच्छा-फल,-पूर्ति,–भंग,–भोजन,–मरण,–शक्ति,-स्वातंत्र्य इत्यादि सामासिक शब्दांत प्रथमावयव म्हणून हा शब्द येतो. हे शब्द तत्सम आहेत. ‘ इच्छिणें ’ हा एक नामधातु मराठींत रूढ झाला आहे.)]

इज, ज प्र. कर्मणिप्रत्यय, (जुना) विधिलिंङ् प्रत्यय. Potential or passive termination.

[सं. **य**; प्रा. **ज्ज, इज्ज**; मराठी. **इज, ज**. विधिलिंङ्मध्येंहि हा प्रत्यय आढळतो. तेथें त्याची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणें आहे. सं. **ईय, या**; प्रा. **इज्ज, ज**; मरा. **जे**. उदा. **देइजे, घेइजे, बोलिजेले, देइजो**. वर्तमान मराठींत ‘ जाणें ’ हा धातु जोडतात. पाहिलें जातें, केलें जातें इ.]

इजा स्त्री. दुखापत, पीडा, त्रास, अपाय. Injury, trouble, torment.

[अर. **ईझा**; पेकाम. **इजा** (रा. ७·११७).]

इजाफत स्त्री. देणग्या व नजराणे ह्यांच्या हिशेबाचें खातें; वतनाबरोबर मिळालेलें गांव. An account showing royal gifts; an inam village.

[अर. **इझाफा=वाढ, आधिक्य**]

इजार स्त्री. पायजमा, विजार, तुमान. Trousers.

[फा. **इझार्**]

इजारत, इजारा स्त्री. पुं. खंड, मक्ता, धारा. Rent, tax.

[अर. **इजारह, इजारत्, इजारा**; शिकाम. **इजारत** (चित्र. ९२)]

–इजारपट्टा खंडाबद्दलचा कागद–सनद.

–इजारदार मक्तेदार. (फा. **इजारा–दार्**)

इज्जत, इजत, स्त्री. अब्रू, प्रतिष्ठा, मान, थोरवी. Prestige, honour, greatness.

[अर. **इझ्झत्=प्रतिष्ठा**; पेकाम. **इज्जत** (रा. ६-२१०), **इज्जत** (खाणें, घेणें,–खाऊ, घेणा), **इज्जतपन्हा**–अब्रूदार (इझ्झत्+ पनाह्)]

इटा, विटा पुं. भाल्यासारखें एक शस्त्र. A sort of spear.

[सं. **ऋष्टिः, यष्टिः**; प्रा. **इट्ठि** (खेंचणें); सिं. **ईटी**; हिं. **ईठि**; **ईटी**; अकाम. **इटी, विटी** (विटीदांडूंतील.)]

इटी, विटी स्त्री. इटीदांडूंतील लहान तुकडा (लांकडाचा).

[**इटा** पहा.]

इडा स्त्री. शरीरांतील एक विशिष्ट नाडी. A tubular vessel.

[सं. **इडा**.]

–इडा पीडा स्त्री. सर्व त्रास, संकटें वगैरे. Pains, troubles, misfortunes.

–इडापाड पुं. आवेश. Force.

[सं. **ईर्षा**; म. **ईर, ईड**.]

–इडेपाडें अ. आवेशानें, ईर्षेनें.

इडुली–री स्त्री. अन्नविशेष, उडीद तांदूळ यांचें पीठ आंबवून सांजण्यासारखा पदार्थ करतात तो.

[देप्रा. **इड्डुरिया**; (द्राविडी शब्द आहे) कान. **इड्डुरिया=मिष्टान्न**.]

इतका सर्व. वि. एवढा, ह्या आकाराचा, ह्या परिमाणाचा. So much, so many.

[वैसं. **इयत्तक**; सं. **इयत्**; **एतावत्**; प्रा. **इत्तिअं**; (हे. २-१५६), **एत्तिअ**; अप. **इत्तिय**; गु. **एटलो**; सिं. **एतिरो**; हिं. पं. **इतना**; का. **यूत**; बं. **एत**; ओ. **एते**; सिंह. **एतकिन्**; अकाम. **इतुका** (काव्य.)]

इतबार पुं. विश्वास, इमान, श्रद्धा, पत, प्रतिष्ठा. Confidence, trust, reliance, faith.

[अर. **इअतिबार**=विश्वास; शिकाम. **इतबार** (सभा. २९); **इतबारात** (मानपान), **इतबारा** (विश्वासूक).]

इतमाम पुं. थाट, सरंजाम, व्यवस्था, लवाजमा. Pomp, retinue.

[अर. **इह्तिमाम्=व्यवस्था**.]

इतराज वि. नाखूष, रुष्ट, नाराज. Displeased, offended.

[अर. **इअतिराझ् = आक्षेप घेणारा**; शिकाम. **इतराज** (रा. १५·१०६); पेकाम. **इतराज** (रा. ३·१६७).]

इतलाख वि. स्वतंत्र, निराळा. Separate, distinct. सरकारी तिजोरींतून ठराविक (नेमणूक). A fixed payment from Government treasury.

[अर. **इत्लाक–स्वातंत्र्य**; पेकाम. **इत्लाख** (खरे ८-४३२२).]

इतल्ला पुं. स्त्री. संबंध, हित, गुंता, वार्ता, बातमी, खबर, लक्ष्य. Concern, information, warning, caution.

[अर. **इत्तिलाअ = ज्ञान, समज**; पेकाम. **इतल्ला** (पुं.) (खरे १०·५६०६).]

इति अ. ह्याप्रमाणें, अखेर, शेवट. Thus, conclusion, end.

[सं. **इण्+क्तिच्**]

-इतिश्री स्त्री. शेवट.

[सं. **इति + श्री**; पुराणांत प्रत्येक अध्यायाच्या शेवटीं **इतिश्री** असें अध्यायाचा शेवट दाखविणारें वाक्य असतें. त्यावरून **इतिश्री** म्हणजे शेवटीं येणारें वाक्य–शेवट.]

-इतिहास पुं. पूर्वींच्या हकीकतीचें वर्णन. History.

[सं. **इति + ह + आस**=अशी गोष्ट झाली.]

इथें क्रिविअ. येथें, ह्या ठिकाणीं. Here, at this place.

[सं. **अत्र**; प्रा. **इत्थ** (हे. ४३२३); अप. **इत्थ**; अकाम. **इथें, येथें**.]

इदगा पुं. इदच्या प्रार्थनेकरतां मुद्दाम केलेली जागा. A place for prayer.

[अर. फा. **इद् + गाह्=प्रार्थनेची जागा**, ईदची जागा.]

इनकार, इन्कार पुं. नापसंती, नाकबूली, निषेध. Disapproval, negation.

[अर. **इनकार्**.]

इनसान, इन्सान पुं. माणूस. A man.

[अर. **इन्सान्, मनुष्य**.]

इनसाफ, इन्साफ पुं. न्याय, निर्णय. Justice.

[अर. **इन्साफ्–न्याय**.]

इनाम न. कायमची देणगी, मोफत वतन, बक्षीस. Prize, gift, inam.

[अर. **इन् + आम्**=वरिष्ठाकडून देणगी; **इनाम + चिठ्ठी,–चौथाई,–जमीन,–दार,–पट्टी**.]

इनामत स्त्री. मेहरबानी, कृपा. Favour, grace.

[अर. **इनायत्**; इनायत होणें = बक्षीस मिळणें. इनायत करणें = बक्षीस देणें.]

इंतकाल पुं. मृत्युकाळ, अंतकाळ. Time of death.

[अर. **इंतिकाल = मृत्यु, गमन**; पेकाम. **इन्तकाल** (रा. ५.२०३)

ह्याचा आणि सं. **अन्तकाल** ह्याचा व्युत्पत्तीनें कांहीं संबंध असल्यास फार दूरचा असावा.]

इंतजाम पुं. बंदोबस्त, व्यवस्था, निकाल. Bandobast.

[अर. **इंतिझाम् = व्यवस्था**; पेकाम. **इन्तजाम** (जोरा. १२९).]

इंतजारी स्त्री. वाट पाहणें, मार्गप्रतीक्षा. Awaiting.

[अर. **इंतिझार् = अपेक्षा, प्रतीक्षा**; पेकाम. **इन्तजारी** (रा. ५·१२८)]

इंद्र पुं. देवांचा राजा. त्यावरून आकाशांतील राजा, म्हणून पावसाचा राजा, King of gods.

[सं. **इन्द् १ दीप्तौ**. इंद्राय तक्षकाय स्वाहा–जनमेजयांच्या सर्पसत्रांत तक्षक ह्यानें इंद्राचा आश्रय केला. तेव्हां जनमेजयानें तक्षकाबरोबर प्रत्यक्ष इंद्राच्या नांवाचा उच्चार करून मंत्रानें त्याची आहुति दिली. आश्रयदात्यासह आश्रितास छळणें. इंद्र+कट,–कीट,–पाप,–जाल (मंत्रविद्या–कपट–माया रचणारा); इंद्र–धनुष्य,–नीळ,–फणी;–भुवन,–लोक;–वज्रा,–वंशा (हीं दोन वृत्तें आहेत); इंद्रसभा (इंद्रसभेचें नाटक); इंद्राणी=इंद्राची पत्नी. इंद्रायण=कडुफळ.)]

इंद्रिय न. ज्ञान प्राप्त करून घेण्याचें किंवा कर्म करण्याचें साधन–शरीरावयव. An organ.

[सं. **इन्द् १ दीप्तौ** (इंद्रस्य-आत्मनोलिङ्गमनुमापकम्) इंद्रिय + दमन,–आधीन,–निग्रह,–नियमन,–गोचर,–विषय.]

इंधन न. सर्पण, जळण, लांकूड. Fire-wood.

[*IE*. AIDA; वै. सं. **इन्धे, इन्धन**; सं. **इध्**, १ ज्वलने; **एध, एधस्, इध्म, इन्धन**; *Lat*. Aid, ae; *Gr*. aido; *Teut*. *As*. ad. ask; *H.G*. eit; *Eng*. Ether, etherial. कांहीं आर्यभाषांत 'र्' युक्त तर इतर कांहीं आर्यभाषांत 'ल्' युक्त रूप उतरलें आहे.]

इन्शाल्ला ताला अ. सर्वश्रेष्ठ ईश्वराची इच्छा असेल तर. God willing.

[अर. **इन्शा अल्लाहु त आला**; शिकाम. **इन्शा अल्लहुतआला = परमेश्वर** (चित्र. ४१)].

इब्लिस वि. अरकट, खट्याळ, खोडकर, उनाड दुष्ट. Mischievous, naughty.

[फा. **इबलीस–भुताचें, राक्षसाचें नांव**.

मूळ शब्द इब्लिस हें नाम असून पुंल्लिंगी आहे. त्याचा अर्थ दैत्य, दानव, सैतान असा आहे. त्यानें अल्लाविरुद्ध बंड केलें म्हणून त्याला स्वर्गांतून हांकून दिलें अशी कथा कुराणांत सांगितली आहे. लक्षणेनें '**व्रात्य, उनाड**' असा अर्थ झाला.]

इभ्रत स्त्री. अब्रू, प्रतिष्ठा, धाक, महत्त्व, थोरवी, वचक. Prestige, greatness.

[अर. **इब्रत् = उदाहरण, अनुकरणीयत्व, महत्त्व**. लक्षणेनें त्याचा अर्थ प्रतिष्ठा असा झाला आहे. पेकाम. **इबारत** (रा. १·२९७).]

इमला पुं. इमारत, वाडा, मंदिर, बान्धकाम. A building.

[अर. इम्लाक् = मालमत्ता, स्थावर मिळकत (म्हणून लक्षणेनें) वाडा, इमारत असा अर्थ.].

इमान न. वचन, शब्द, खरेपणा. A promise, a word.

[अर. ईमान् = श्रद्धा. इमानइतबार (दोन्ही शब्दांचा अर्थ एकच), इमानक्रिया, इमानप्रमाण, इमान धरणें, इमानास जागणें.]

इमाम पुं. मुसलमानी धर्मांतील अधिकारी, नायक, धर्माध्यक्ष. Islamic priest.

[अर. इमाम; इमम्=लक्ष्यणें, अनुसरणें. प्रथम हा शब्द खलीफास लावीत. मुसलमानी धर्मांतील चार पंथांना हा शब्द वापरीत. अलीच्या वंशजांपैकीं एक.]

इमारत स्त्री. बांधकाम, मंदिर, हवेली, पायाच्या वरचें बांधकाम. A building.

[अर. इमारत्; शिकाम. इमारत (चित्र. १३३); पेकाम. इमारत=वान्धा (खरे ११·५७०६)]

इयत्ता स्त्री. एवढेपणा, इतकेपणा, शाळेंतील वर्ग. A measure, a standard.

[सं. इयत्; प्रा. इत्तिय+ता.]

इरकल न. एकप्रकारचें लुगडें. A variety of saree.

[कान. इलकल हें एका गांवाचें नांव आहे. तें गांव हुनगुड तालुक्यांत आहे व तेथें लुगडीं चांगलीं तयार होतात. तेव्हां तेथील वाणास इरकली लुगडें किंवा इरकल असें म्हणतात. पैठणी हा असाच शब्द आहे. पैठण येथें तयार झालेलें रेशमी जरीचें उंची वस्त्र.]

इरजिक,-जीक, इरजे स्त्रीन. पिकाच्या काढणीसाठीं कामास बोलविलेल्या लोकांना द्यावयाचें जेवण. A communal dinner for workers in the field.

[वैसं. इरा = अन्न(√रा = देणें) = संपत्ति. विरच् > इरज्ज–व्यवस्था करणें. कोश. ही मधील व्युत्पत्ति दूरान्वित दिसते.]

इरड स्त्री. विष्टा वगैरे खात गुरांचें सकाळचें हिंडणें.

[कान. एरु=शेण, गुरांची विष्टा, (त्यावरून) माणसांची विष्टा.]

इरलें न. पावसापासून निवारण करण्यासाठीं केलेलें झाडपाल्याचें आवरण, छत्री. A covering for rain.

[सं. वल्लरी; प्रा. विराली (हे. ४·१२१); प्रा. इल्लीर=छत्री.]

ईरसाल वि. बक्षिस किंवा नजर करण्यास योग्य असा पदार्थ, उत्तम, श्रेष्ठ हा मूळचा अर्थ. परंतु त्यांत अर्थभ्रंश होऊन त्याचा अर्थ, अर्क, ठक, वाईट असा झाला. Extremely mischievous, deceitful.

[फा. इरसाल = नजर देण्यास योग्य. उत्तम, सुगंधी; पेकाम. इर्साल (राज. १-१४७)]

ईर्साल पुं. पाठवणूक रवानगी, Dispatch.

[अर. इर्साल = दूतमंडळ, पत्रप्रेषण.]

इराकत स्त्री. लघवी, मूत्र. (अशिष्ट समाजांत हा शब्द वापरतात.) Urine.

[अर. इराकत्]

इराणी वि. इराणमधील (घोडा, गाढव) One from Iran.

[फा. ईरान–एका देशाचें नांव]

इरादा पु. विचार, हेतु, बेत. An object, a motive.

[अर. इरादत् < इरादा = इच्छा.]

इरीरी स्त्री. बैलांना हांकण्याचा शब्द. A bullock-driver's word.

[सं. इर् (णिच्) √ ऋ १ गतौ. इयर्ति–जावयास लावतो.)]

इल विशेषणप्रत्यय. An adjectival termination.

[सं. इल ; प्रा. इल्ल; याकाम. इल (आदिल, वहील, पहिल, पूर्वील, बाहिरील)]

इलाखा पुं. हक्क, परिवार, बायकामाणसें, परगणा, प्रांत, ताबा, परिवार. Right, family, presidency, province.

[अर. इलाका; शिकाम. इलाखा (सभा ४२); पेकाम. इलाखा = परिवार (मसचीथोशा २५).]

इलायची स्त्री. वेलची, वेलदोडा. Cardamom.

[सं. एला; हिं. इलायची ; बं. इलायची ; गु. एलजी ; द्रा. ते. एलाकी; ता. एलांची.

ज्या अर्थीं आर्योद्भव व द्राविडी अशा दोन्ही भाषांत हा शब्द आढळतो त्याअर्थीं हा कोणत्या तरी परभाषेंतून दोन्ही भाषांत आला असावा. इ. स. चौथ्या शतकांत जे कांहीं मसाल्याच्या जिनसांचे शब्द आले त्यांतील हा असावा. संस्कृतीकरण नंतरचें आहे.]

इलाही वि. इलाहासंबंधीं, ईश्वरी. Pertaining to Allah.

[अर. इलाह्=ईश्वर. शुक्रे इलाही = मी ईश्वराचे आभार मानतों. ह्या नांवाचा शक अकबर बादशहानें सुरू केला.]

इल्ला हें मूळचें कानडींतील नकारार्थी अव्यय आहे; परंतु तें मराठींत नामाप्रमाणें वापरतात. A negation.

[कान. इल्ला = नाहीं, नको.]

इवलें वि. छोटें, लहानसें. Small, tiny.

[*IE*. Alp; सं. अल्प (तरत्व–अल्पीयस्).]

इवाई पुं. व्याही. Bride's or bridegroom's father.

[सं. विवाही, < विवाह √ वि + वह् (णिच्). व्याही ह्याचें बोलींतील विशेषतः ग्रामीण व स्त्री बोलींतील रूप.]

इशाड न. (अशिष्ट) नांगराचा भाग–दांडा. A part of a plough.

[सं. ईषा; प्रा. इसा + दण्ड. इसकाड असाहि शब्द वापरतात. (ईषा + काष्ठ).]

इशारत, इशारा पु. स्त्री. सूचना, खूण. A warning, a signal.

[अर. इशारत्–खूण ; शिकाम. इशारती (सभा.४२)]

इश्श उ. अ. नापसंती–तुच्छतादर्शक अव्यय. A particle showing detestation.

[सं. विष् ,–षा,–विष्ठा. कान. इस–शीः घाण पाहिली कीं शीः शी असा ध्वनि आपोआप उच्चारिला जातो. त्याला अनुलक्षून हा ध्वनिशब्द आहे. राजवाडे यांची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणें आहे; पण ती दूरान्वित आहे. विस्रं (= मांसाची घाण)–ईश्शरं–इश्शरे किंवा-हिच्छ–इच्छ-इश्श–इशी. राज. भा. अ. १८३४.]

इश्क, इष्क स्त्री. प्रेम, चैन, विलास, प्रणय, शृंगार. Love, romance.

[अर. इश्क; पेकाम. इशाक (खरे ९.४८३३); इष्कबाज = चैनी, विलासी.]

इष्ट वि. इच्छिलेलें, पसंत. That which is wished or desired.

[सं. इष् (निष्ठा-इष्ट). हवे असलेले–आवडणारे लोक–म्हणून इष्टमंडळी, आप्तेष्ट. इष्टानिष्ट, इष्टापत्ति, (अनुकूल गोष्ट घडून येणें). इष्टि=इच्छिलेली गोष्ट मिळण्यासाठीं केलेला यज्ञ, हवन.]

इसंबगोल पुं. औषधिविशेष, पांढरे जिरे. हें एका झाडाचें 'बीं' आहे. A medicine.

[फा. इस्पघूल; हिं. इसब्गोल ; कान. सबगोलु ; ता. इसप्पुकोल. आर्योद्भव व द्राविडी अशा दोन्ही भाषांत आढळतो. सं. मूळ नसावें. परकी भाषेंतून आला असावा.]

इसम पुं. मनुष्य, अदमी, नांव. A man.

[अर. इस्म = नांव]

इसवी वि. ख्रिस्ती (सन.) The Christian (era).

[अर. इसा–(येशू–झीसम्. *Lat*. Jesus; *Gr*. Jesous; *Hebrew*. Yeshuca.)]

इसाळ पुं. स्त्री. न. स्पर्धा, चढाओढ. Rivalry, competition.

[सं. ईक्षा (√ ईक्ष्); पा. इक्खति; प्रा. इक्खइ. गु. इखण; २ सं. ईर्षा; पा. इस्सा + ल.]

इसाळा पुं. असूया, जोर, वीरश्री, राग, चीड, चुरस. Envy, provocation.

[सं. ईर्षा, ईर्षालु; पा. इस्सा; प्रा. ईसा; बं. हिं. पं. ला. रिस्; सिं. रीस.]

इस्टेट स्त्री. जिन्दगी; मालमत्ता. Estate.

[*Eng*. Estate; *Lat*. status, Sto = to stand; *OF*. estat; सं. स्था.]

इस्तक्‌बाल,–बील अ. पासून, आरंभ. From, beginning.

[अर. इस्तिकबाल् = भविष्यकाल, सामोरें जाणें; पेकाम. इस्तक्बाल (रा. ५.१४५)]

इस्तक्‌लाल पुं. जोर, धीर. Support, courage.

[अर. इस्तिक् लाल्; पेकाम. इस्तक्लाल (रा. ६.४४०)].

इस्तरी स्त्री. धुतलेल्या कपड्याच्या सुरकुत्या घालविण्याचें साधन. हें लोखंडाचें असून खालून चपटें असतें व त्यांत विस्तव घालतात. An ironing instrumeut.

[म. इस्तु-विस्तव + (< वैश्वदेव) आरी अशी तर व्युत्पत्ति नसेल ना ?]

इस्ताफा पुं. नोकरीचा राजीनामा, नोकरीची सोडचिठ्ठी, खुषीपत्र. Resignation.

[अर. इस्तिअफा–क्षमेची याचना; पेकाम. इस्ताफा (रा. ३-४११)]

इस्तावा पुं. सवलतीच्या साऱ्यानें केलेली जमीन, कांहीं वर्षें भरसाऱ्यापेक्षां कमी परंतु दरसाल वाढत्या

साऱ्यानें केलेली जमीन. An agreement for concessional rent.
[अर. **इस्तिवा = बरोबर, समान.**]

इस्पिक पुं. पत्त्याच्या खेळांतील एक रंग. ह्याला काळा बदाम असेंहि म्हणतात. Spade.
[इं. **स्पेड. इस्पेड्–इस्पेक (?)** (स्वरागम आरंभीं आला. **इस्पिक** त्या रंगाला म्हणतात. कधीं कधीं लक्षणेनें सर्व पत्त्यांनाहि **इस्पिक** किंवा **इस्पिट** म्हणतात.)]

इस्पितळ न. रुग्णालय. A hospital.
[*Lat.* Hospiten = a guest; *MLat.* Hospitale = a big house or palace; *OF.* Hospital; *Eng.* Hospital.]

इस्राएल् पुं. एका यहुदी संताचें नांव. ह्याचें नांव प्रथम याकोब (जेकब) असें होतें; परंतु त्यानें देवाशीं झगडून जय मिळविला तेव्हां त्याला हें नांव मिळालें. त्याचे अनुयायी, उपासक. Israel.
[हिब्रू. **सारा = लढणें, एल् = परमेश्वर**]

इस्लाम पुं. शांतता, महंमद पैगंबरानें स्थापिलेला धर्म. Islam.
[अर. **सल्म्–सुरक्षित असणें.**]

इह अ. येथें, ह्या जगांत. In this world.
[सं. **इह.** विशेषणाप्रमाणें मराठींत वापरलें आहे. इहजन्मीं, इहलोक, इहपरलोक, इहवृत्त इत्यादि कांहीं शब्द त्यापासून सिद्ध होतात.]

इहसान न. मेहेरबानी, उपकार, कृपा. Kindness, obligation, favour.
[अर. **इह् सान्** ; पेकाम. **इहसान** (खरे. १·३९).]

इळत,–द् स्त्री. हत्यार, साधन (विशेषतः शेतकीचें नांगरण्याचें.) An instrument, an implement.

इळा पुं. विळा, हत्यार. A cutting weapon.
[**विळद, विळा** < सं. **इलि** ; अर. **आलत् = हत्यार;** सं. **इलि = तरवार** ; कान. **इळगा** ; अर. **आल, आला.**]

¹ई पुं. मराठी वर्णमालेंतील चौथा स्वर. हा स्वर 'इ'चा दीर्घ उच्चार आहे. ह्याचें उच्चारण तालव्य असून उच्चारस्थान तालु आहे. ह्या स्वराचें रूप यादवकाल वगैरे पूर्वकालीं निश्चित नाहीं. कारण ऱ्हस्व व दीर्घ अशा दोन्ही रूपांत तो आढळतो. 'इ' पहा. Fourth vowel of Marathi alphabet.
[सं. **ई, इ** ; प्रा. **इ, ई** ; **जीव–जीवु, जिवु; पिष्ट–पीठ ; पीड–पीळ.**
सं. **ऋ** ; प्रा. **ई** ; **दृष्टि–दीठ.** सं. **ई.**; प्रा. **इ. श्री–सीरी.**
सं. **व्य, य** ; प्रा. **वी.** ; **व्यभिचार–वीभिचारु** (याकाम;) **अत्यंत–अतींतु.**
सं. **ए.**; प्रा. **ए.**; **अवेष अवीट.**
ह्याशिवाय आद्य, मध्य, व अन्त्य सं. व प्रा. हि, भि धि, भि, इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.]

²ई जवळ असलेला, बाळगणारा ह्या अर्थाचा प्रत्यय. उदा. धनी, रोगी. Possessive termination.
[सं. **इन्** ; प्रा. **ईण, इ.**]

ईट, वीट स्त्री. मातीचा (भाजका) चौकोनी तुकडा. A brick.
[सं. **इष्टिका, इष्टा** ; प्रा. **इट्टा** ; गु. **इंट** ; हिं. **ईंट, इंट; इटाळ–इट्टाल** < सं. इष्टकालय (?)]

ईड,–ईड (निंबु) न. फलविशेष. A fruit.
[कान. **ईळे.**]

ईद,–बकर(बकरीद) मुसलमानांचा एक सण. An Islamic festival.
[अर. **बखर, बकर** = बैल, **ईद = यज्ञ.**
महमदी धर्मांच्या पंचांगांतील बाराव्या महिन्याच्या (जिल्हेजच्या) दहाव्या दिवशीं हा सण साजरा करतात. अब्रहमनें आपल्या मुलाचें बलिदान केलें त्याच्या स्मरणार्थ हा सण आहे. ह्या मुलाचें नांव कुराणांत सांगितलें नाहीं. इस्माइल किंवा ऐझाक असें असावें. ह्या सणाला **ईद-इ-कबीर** (मोठा सण) असें म्हणतात. ह्या दिवशीं बैल, उंट, बकरी, मेंढा वगैरे बळी देतात. ह्या सारखाच दुसराच एक सण असे. त्याला **इ-अल्-कुरबान्** असें म्हणत. ह्या दोन्ही सणांत बलि देणें हें आवश्यक समजलें जात असे. बकरी असेल तर प्रत्येकानें एक व उंट किंवा बैल असेल तर दहा जणांत एक असें प्रमाण असे.]

ईनमीनतीन, ईनमीन सवा–साडे तीन सख्येनें अगदीं कमी.
[ईनमीन सवा(साडे)तीन = इ म्हणजे ही (बायको), न म्हणजे आणि, मी (स्वतः बोलणारा), न (आणि), साडे (अर्धा) = मुलगा. मी, माझी बायको आणि माझा मुलगा किंवा मुलगी–मिळून तीन माणसें. भा. अ. शके १८३२.]

ईश्वर पुं. परब्रह्म, देव, सर्वसाक्षी, विश्वाचा स्वामी सर्वनियन्ता. God.

[*IE*. Eik; सं. ईश् २ शासने; *Teut*. aigan; *As*. ahte; *Eng*. owe, own, ought.

ईश्वर–कृपा,–कर्तव्य,–भाव,–माया,–साक्षात्कार, इत्यादि सामासिक शब्द आहेत.]

ईषण–ईषणा न. स्त्री. अभिलाष, इच्छा. Desire.

[*IE*. Eis; *Av*. aes;
सं. ईष् १ इच्छायाम्, इष्णाति, इष्यते.]

ईक्ष(णें) सक्रि. पाहणें. To see.

[ईक्ष् १ दर्शने. ईक्षण (अवलोकन.)]

उ पुं. मराठी वर्णमालेंतील पांचवा स्वर. The fifth vowel of Marathi alphabet.

ह्याचें उच्चारण ओष्ठ्य असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. ह्याचें वेदपूर्व स्वरूप बहुधा ' व् ' अर्धस्वर हा असावा. (अ. पहा.) ह्याचें लेखन पूर्वींच्या मराठी वाङ्मयात ' वु ' असें कदाचित् आढळतें. याकाम. मध्यें कचित् ' उ ' व ' अ ' अशी दोन्ही रूपें दिसतात.

[सं. उ ; प्रा. उ ; उड्डु–उड, उत्स्कु–उचक.
सं. अ; प्रा. अ ; व्हलव्हल–हुळहुळ.
सं. ऋ ; प्रा. उ; ऋजु–उजु, कृततृद्–कुरतुड.
सं. प्रा. ओ; अप. उ.
सं. — प्रा. — (मूळ) औ. इउ, उ-ओ ह्या स्वराच्या संक्षेपानें.
सं. इ.; प्रा. इ; बिंदु–बुंद, द्विप्रहर–दुपार.
आद्य, मध्य व अन्त्य सं. व प्रा. उ, ऊ, अउ, अव, हु, भु इत्यादि वर्णांपासून सिद्ध होतो.]

^{2}**उं, ऊं, हं** अ. आश्चर्य–नापसंतीदर्शक अव्यय. An interjection.

[ध्वनिशब्द.]

^{3}**उं, ऊं.** स्त्री. केसांतील कृमि. A louse.

[सं. यूका.]

उक स्त्री. झळ, उकळी. Boiling, ebullition, bubbling up.

[कान. उक्कु = ऊतूं येणें ; कड येणें ; सं. उत् + क्वथ्–उक्कढ–उकड > उक अशा मार्गानेंहि साधतां येण्यासारखा आहे. द्राविडी धातु संस्कृतप्राकृतमधून घेतला असावा. याकाम. उक (उगी. ५५६)]

उकट(णें) उक्रि. टांकी देणें, टोके मारणें, जात्याला टाकी देणें. To chisel, to strike.

[सं. उत् + कट् १ गतौ, + कृत् ६ छेदने. उत्कृंतन-उत्कर्तन; हिं. उकटना = खणणें ; सिं. उकरणु, उकिरणु, उखटणु. मराठी. उचट(णें) ह्या धातूशीं संबद्ध असावा. (उकटी = टांकी केलेलें जातें.)]

उकड(णें) क्रि. शिजणें, शिजविणें, पकवणें. To boil (food.)

[सं. उत् + क्वथ् ; प्रा. उक्कढ > उकड; याकाम. उकडणें = शिजणें, गुदमरणें (नरुख ३७९). उकड (मोदक वगैरेंची), उकड पीठ,-पोळी,–हंडी. उकळ (णें)–अधण येणें हा धातु वरील संस्कृत धातूपासूनच. उकड(णें)-उकाडा-उकडा. उकाडा = रतीब ह्याची व्युत्पत्ति काय ?]

उकड, उकडा, उकिडवा, उकुडवा वि. उकडवे (बसणें), आसनाचा प्रकार, मांडी न घालतां कमर ताठ ठेवून (बैसणें). Sqat, cowering.

[सं. उत्कटुक, उत्कुटक ; उत्कटिन्–कट=कुल्ला; पा. उक्कुटिक; प्रा. उक्कुडग, उक्कुडुय, उक्कडि; सिंह. उकुल–कुल्ला.]

उकर(णें) सक्रि. खोदणें, खणणें, पोखरणें, खणून वर काढणें. To dig, to scratch, to scoop up.

[सं. उत् + कृ ६ विक्षेपे; प्रा. उक्केर, उक्कीर, उक्करिअ; देप्रा. उक्किर (हे. १·५८); अकाम. उकीर= उकरलेली माती.]

–उकरडा, उकीरडा; पुं. केर–खत टाकण्याची खांच, खताचा ढीग. A dunghill.

[सं. उत् + कृ ; प्रा. उक्केरड ; देप्रा. उक्कुरुडी– अवकरराशिः उक्कुरडो रत्नादीनाम् अपि राशिः (४६·१०); अप. उक्कुरुड ; गु. उकरडो, उकयडो.]

^{1}**उकल(णें)** उक्रि. मोकळें होणें, सैल होणें, फोडून निराळे करणें. To unravel, to disentangle.

[सं. उत् + कल् १० क्षेपे; प्रा. उक्कल-ळ, उत् + कूलय = तीरावरून वाहणें; गु. उकळवू, उकाळो–काढा, उष्णता ; हिं. उकलना. (म. उकळा–वेगळा, उकलींव = सुटलेला.)]

^{2}**उकळ(णें)** अक्रि. अधण येणें, रटरटा शिजणें. To boil, to decoct.

[सं. उत्क्वथ्–१ निष्पाके (उकळा=कढ).]

^{3}**उकळ(णें)** सक्रि. लुबाडणें, वसूल करणें. To extort, to blackmail.

[सं. उत् + कल् १० क्षेपे, उत्कलय; प्रा. उक्कळ. उकळा (पैशाचा), उकळी (=भरतें, उमाळा < उत्कलिकापासून), उकळीत, उकळेगिरी.]

उकळी स्त्री. लहर, (आनंदाची) उचंबळ. A sudden ardor, ebullition.

[सं. उत्कलिका ; प्रा. उक्कलिया; याकाम. उकळी= उचंबळ (ज्ञा. ७-७५)]

उकाव(णें) अक्रि. वर येणें, चढणें. To rise, to swell.

[सं. उत्कु (नाधा.), उत्क्रम् (?); प्रा. उक्क–उक्काव. कान. उक्कु=चढणें, हीच व्युत्पत्ति अधिक ग्राह्य ; कारण हा उपयोग वसवकृत महाबळचरित्रांत आढळतो. "वदे भट्ट नृपापुढें। उकावला चढोवढें." व. म. ६]

उक्त वि. बोललेलें. Spoken, said, uttered.

[सं. वच् (निष्ठा–उक्त).]

उक्ता वि. घाऊक, ठोकळ, मोघम, वजन न करतां. In a lump, gross.

[सं. वच् – उक्त (?) ; कान. वट्ट ; कान. ता. ते. तुळु.– ओट्ट–रास. द्राविडी व्युत्पत्ति ग्राह्य. हा शब्द 'उक्ता' असाहि आहे.]

उख स्त्री. डोकींतील उवांचें अंडें, कीटकविशेष. A louse-egg.

[सं. यूका ; देप्रा. ओक्कणी.]

उखड (णें) सक्रि. उपटणें, उन्मळून काढणें, निर्मूलन करणें. रागावणें, शेत प्रथम नांगरणें, फाडून टाकणें. To oust, to root out, to turn out.

[सं. १ उत्स्खद्, उत्कर्षति (?); प्रा. उक्खड, उक्कड्ढइ. (हे. १·१२८). २ उत्खोट्; प्रा. उक्खोड, ३ अव+स्कन्द् १ अभियोगे. ही अवस्था प्रथमची असावी. वरील भिन्न अर्थांप्रमाणें भिन्न व्युत्पत्ति आहेत. गु. उखडवूँ; हिं. उखाडना.]

उखण(णें) सक्रि. खणून काढणें, उकरणें. To dig, to break up.

[सं. उत+खन् १ अवदारणे; प्रा. उक्खण.]

उखर वि. नापीक जमीन, रेताड, खडकाळ जमीन. Barren land.

[सं. उषर ; प्रा. उखर ;]

उखरडें न. समुदाय, सैन्य, स्वार. Crowd, army, throng.

[सं. उत्कर ; प्रा. उक्कर=समूह; याकाम. उखरडें (उगी). "तें देखौनि पावलें उखरडें । यादवांचें॥ शिशु. ९६५.]

उखरवा पुं. गुंताडा. Knotted bunch.

गुणांचिये उखरवे । मार्जीं असता ॥ ज्ञा. १४-३२५.

उखळ न. धान्य सडण्यासाठीं केलेलें खोलगट पात्र, खल. A mortar.

[सं. उदूखळ ; उलूखल ; ऊर्ध्वं खं उलूखम् ; उलूखं लाति–गृह्णाति इति, उलूखम्. प्रा. उक्खल, उऊखल (उत्तरकालीन रूप); देप्रा. उक्खली पिठरम् ; कान. उरलु +कल्लु–वरकल्ल–दगडांत टाकणें. हा शब्द कृत्रिम व उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतो. प्राकृत उक्खल हा आहे. उकल्लु हा द्राविडी शब्द मूळ असावा. उखळी– (लाकडाची व भात कांडण्याची); गु. उखळ (नपुं), उखळी; हिं. उखली, उ(ऊ)खल (स्त्री); सिं. उखिरी (स्त्री.)]

–उखळ पांढरें होणें (धान्याची किंवा पैशाची) संपन्नता असणें–होणें. To be rich.

–वेंबीचें उखळ होणें स्वास्थ्याचे दिवस येणें. To be happy.

–उखळा–मुसळाशीं गांठ भांडणाऱ्या माणसांचें एकत्र येणें. Quarrelsomes coming together.

उखळ(णें) उक्रि. काढणें, मोडणें. निसटणें, निखळणें, To break up, to destroy. to loosen.

[सं. उत्+स्खल् १ संचलने; प्रा. उक्खलिय ; याकाम. उखळणें=मुळांसह उपटणें (नरुस्व २९५), (प्रतियोगी शब्द–निखळ < निक्खळ < निस्+स्खल्).]

उखा स्त्री. उषा, उषःकाल, पहाट. The dawn.

[सं. उषस् √ओषति, √उष्+क+टाप्. तद्भव : १ उखा, २ अवशीं (मध्यरात्रीं ह्या अर्थी.]

उखाणा पुं. गूढ अर्थाचें वचन, म्हण, कूट प्रश्न, कोडें. A riddle.

[वैसं. आह्नस्याः ; सं. आख्यान, अवख्यान ; प्रा. आहणा; सिं. ओखाणि ; ओखाणणुं. गु. उखाणुं= ओखाणुं, उखाणो.]

उखार(णें) अक्रि. स्वच्छ निघणें. To be clean, to wash clean.

[म. उखार (नाधा.); सं. अप+कॄ < अवकीर < उकर < उखर (?) किंवा उत् क्षार पासून.]

उखाळ न. ओकारीचें औषध. An emetic.

[सं. उत्+गॄ ९ शब्दे, उद्गारी ; प्रा. ओक्कारी, उग्गाळ >उखाळ. तरी उखाळाची मात्रा घेणें (ज्ञाने. २–२०९८); ढाळ आणि उखाळ देती (दा. ३-७-३३)]

उखाळीपाखाळी स्त्री. उणेंपुरें, वैगुण्य, वर्म. A fault, a foible, a defect.

[सं. **उत्+स्खलनम्, प्रस्खलनम्** (?); परंतु संस्कृत व्युत्पत्तीनें ह्या शब्दानें प्रतीत होणाऱ्या व्यङ्ग्य अर्थासंबंधीं समाधान होत नाहीं. ह्या शब्दांत द्वेषाची कल्पना आहे. कानडी शब्द ह्या बाबतींत चिन्त्य आहेत. कान. **उगी**=दुखणें, दुखावणें; **उगलि**,=दुखापत; **पगिल**=त्रास देणें, सोसणें. कानडींतील ह्या दोन '**उगलि पगिल**' शब्दांचा तर संबंध नसेल ना ?]

उखि-खी वि. मिथ्या, खोटा. False, counterfeit.

[सं. **वृथा, मृषम्. ?**]

आरिसा आणि मुखी । मी दिसें हें उखीं. अमृ २-६५

उखिविखी स्त्री. चर्चा, वादविवाद. Discussion.

[सं. **आक्षेप विक्षेप** (?); **मृषम्, विषय. ?**]

हे बहु उखिविखीं । ऋषीं केली नैमिषीं । ज्ञा. १३-६६

उखित पुं. आगंतुक, वाटसरू. A traveller, a sojourner.

[सं. **उषित** (निष्ठा), √ **वस्**; याकाम. **उखितें, उखिता** (ज्ञा. ९-३३१).]

उखेंडी वि. अल्प, सहज. Small, easy.
स्त्री. श्रम, कष्ट, सायास. Pains, troubles.

[सं. **उत्+खिद्** > **उत्+खेद**; प्रा. **उक्खेड**; याकाम. **उखेंडी=श्रम**(शिशु ४०९), =**अल्प**. (उगी.). ह्याचे दोन्ही अर्थ–श्रम आणि विनाआयास–असे परस्परविरोधी असे होतात. उत् हा उपसर्ग दोन्ही अर्थांनीं येणें शक्य आहे व तशा दोन्ही अर्थांनीं तो महानुभावी वाङ्मयांत वापरला आहे.]

उग(णें) अक्रि. उगा राहणें, स्तब्ध राहणें. To remain quiet, to be hushed.

[सं. **उत्+गु १ अव्यक्ते शब्दे**; ह. कान. **उगी=भिणें. उगला, उगाच, उगीचचे उगीच. उगा** (स्तब्ध); याकाम. **उगे=चूप, गप्प** (शि. १२८) कान. **उके=गप्प** (?)]

उगटि(णें) सक्रि. स्वच्छ करणें. To cleanse, to make clean.

[सं. **उत्+ग्रंथ्** > **उघट.**]

उगड, उगंड, उगंडू पुं. उद्धार, सुटका. Deliverance.

[सं. **उत्+घट्**; प्रा. **उग्घड; उत्+ग्रंथ्; +उग्वड.**]

उगण(णें) सक्रि. अंगाशीं न लावणें. Not to allow to get stuck.

[सं. **उत्+गण् १० संख्यानाम्**; प्रा. **उग्गण.**]

उगण, उगवण स्त्री. रोग बाहेर पडणें, ताऱ्याचा उदय, उगवणें. An eruption, rising.

[सं. **उद्गम् १ गतौ**; प्रा. **उग्गम, उग्गे** (चढतो); गु. **उगवूँ**=वर चढणें ; हिं. **उगना** ; सिं. **उगणु** (उगवणें).]

[१]उगव (णें) क्रि. बाहेर येणें, दिसणें, कोंब फुटणें. To sprout, to come out, to appear.

[सं. **उद्गत** ; पा. **उग्गतो** ; प्रा. **उग्गय** ; हिं. **उगना** ; सिं. **उगणु** ; गु. **उगवूँ.**]

[२]उगव(णें) उक्रि. उदय होणें. To rise.

[सं. **उत्+गम् १ गतौ** (निष्ठा–**उद्गत**); प्रा. **उग्गअ** >**उगव** (नाथा.); **उगवणें.** हा संस्कृत निष्ठेपासून धातु आहे. '**उद्गम्**' पासून नव्हे. **उगव, उगवण, उगवत** (पूर्व दिशा), **उगवान, उगवी** (समजूत).]

उगळ, उगाळ स्त्री. ओक, तोंडांतील गरळ A vomit.

[सं. **उत्+गॄ** ९ शब्दे निगरणे–**उद्गीर** ; प्रा. **उग्गिल, उग्गाल** ; बं. **उगरेण** ; हिं. **उगलना** ; का. **उगी=थुंकणें** ; **उगुळु=थुंकी. उगळ(णें)**=टाकणें, रवंथ करणें. **उगाळ(णें)** (ओकणें. उद्+गल्), **उगाळा–ळु–उगाळ** (वमन, थुंकी); कान. **उगळु=ओक, थुंकी**; सिं. **ओगार.** कानडींत तोच शब्द आहे, तो आर्यभाषेंतून घेतला आहे. हाच मूळ द्राविडी असता तर सिंधी. '**ओगार,**' असा शब्द असता ना.]

उगळण न. रवंथ करणें, थुंकणें, ओकणें. To ruminate, to spit, to vomit.

[सं. **उद्गार** √ **उत्+गॄ ९ शब्दे**; प्रा. **उग्गाल, उग्गिल** ; हिं. **उगलना**; प. पं. **उगाली=रवंथ**; सिं. **उगारणु=ओकणें. ओगारणु–रवंथ करणें. उगारणु=ओकणें.**]

[१]उगाण (णें) सक्रि. हिशेब देणें. To render account.

[सं. **उत्+गण्** (**१० संख्याने**); प्रा. **उग्गण.**]

[२]उगाण (णें) सक्रि. लुटणें, लुबाडणें. To rob.

[सं. **उद्ग्रहणम्** ; प्रा. **उग्गाहण** > **उगाण.**]

–उगाणा पुं. बयाणा, विस्तार, गणना, झाडा, हिशेब ठेवणारा कारकून, उपदेशपर भाषण. The advance, an extent, an account, an accountant, an advice.

[याकाम. **उगाणा** = समृद्धि. ऐश्वर्य (शि. ५७५), (ज्ञा. ११-७१).]

उगार(णें) सक्रि. मारण्यासाठीं वर उचलणें. To be ready to strike.

[**सं. अवगोरणम्, √अव + गुर् ६ उद्यमने ; प्रा. उग्गार.**]

उगाळ(णें), उगळ–उघाळ(णें) सक्रि. घासणें, घोटणें, वाटणें. To levigate.

[सं. उत् + घर्ष्.]

उग्र वि. भयंकर, अक्राळविक्राळ. Fierce, ferocious.

[**सं. उच्यति क्रुधा सम्बध्यते; √ उच् समवाये.**]

उघट (णें) सक्रि. प्रत्यक्ष मांडलें जाणें. To exhibit, to keep open.

[**सं. उत् + घट्; प्रा. उग्घट; याकाम. उघटे;** इयां पाटणीं जें केणें उघटे. (पाटण शिलालेख).]

–उघट पुं. उक्ता माल विकत घेऊन तो किरकोळीनें विकणारा.

[याकाम. **उघट.**

वनस्थलिचिये पेटे : भवर परिमळाचे उघटे ॥ नरुस्व ८३९]

उघड (णें) उक्रि. खुलें करणें, मोकळें करणें. To open.

[सं. **उद्घाटन √ घट्; प्रा. उग्घाटण.** (हेम. ४-३३) **हिं. उघडना; सिं. उघडणु; गु. उघडवूं. उघड, उघडझांक. उघडा, उघडीप, उघाड, उघडउघड, उघडा–** इत्यादि शब्दांचा अर्थ **स्पष्ट** असा आहे. ह्या धातूचा संबंध अर्थाच्या दृष्टीनें, संस्कृत घट् १ चेष्टायाम् ह्या धातूपेक्षां उत् + ग्रथ् १ कौटिल्ये ह्या धातूकडे अधिक पोहोचतो; तेव्हां परंपरेनें मानिल्या गेलेल्या ‘उत्+घट्’ ह्या व्युत्पत्तीपेक्षां ‘उत् + ग्रथ्’ ही व्युत्पत्ति ग्राह्य.]

उघाळ(णें) क्रि. वारंवार उच्चार करणें, चर्वितचर्वण करणें. To repeat.

[सं. **उद् ग्रथ्;** देप्रा. **ओग्गालइ** (हे. ४-४३)]

उच वि. वरच्या भागावरील, उच्च, उन्नत. Upper, higher, raised.

[सं. **उच्च;** प्रा. **उच;** अप. **उंच;** सं. **उच्च. √ उत् + अञ्च् १ गतौ (?)** किंवा **उत् + ची.** अशिष्ट भाषेंत ‘**उच**’ असा जो उच्चार आहे तो संस्कृत उच्चाराच्या अधिक जवळचा आहे. अनुनासिक जो आला तो ‘उच्च’ मधील एका ‘च्’च्या लोपाच्या भरपाईसाठीं आला. किंवा वर सांगितल्याप्रमाणें त्याच्या मुळाशीं √उत् + अञ्च् हा धातु असावा.]

उचक(णें) उक्रि. **चोरणें, चोरून** उचलणें, उपटणें, उलघडणें, समूळ वर काढणें. To steal, to uproot.

[सं. **उत् + स्कु ५ आप्रवणे ; उपस्करणम् > उचकर** (घर उचकणें); **उच्चे + क्री ९ द्रव्यविनिमये. गु. उचकवूं, उच्चक्को ; पश्चि. पं. उचक्क चोर ;** हि. **उचकना.** ब्लोक ह्यानें ह्याची व्युत्पत्ति सं. **उच्च (म. उंच)** पासून दिली आहे. ती ग्राह्य नाहीं. निरनिराळ्या अर्थाच्या धातूपासून ‘उचक’ हा धातु आला आहे. त्यामुळें त्याचे निरनिराळे अर्थ झाले आहेत. द्रव्य किंवा कर्ज ह्यासंबंधीं ‘उचक’ शब्द वापरतात तो उच्चे+क्री पासून आहे.]

उचका वि. उचकाना, तीक्ष्ण कानाचा. Of keen hearing.

[सं. **उर्ध्वकर्ण (?);** याकाम. **उचका.** (उगी ९)]

उचकी स्त्री. आचकी, उंडकी, कंठामध्यें श्वास अडकल्यामुळें निरुद्ध अशा स्थितींत बाहेर येतांना होणारा आवाज. Hiccup.

[सं. **उत् + जिहिक्क <** हिक्क् १ अव्यक्ते शब्दे. ‘हिक्क्’ला अभ्यास होऊन जिहिक्क् होतो. किंवा **उर्ध्वकी; उध्र्यञ्च्, उरस् + की ;** प्रा. **उड्ढकी ;** सिं. **हिडिको ;** हिं. **हिचकी ;** कु. **बाटुली.** किंवा हा ध्वनि–शब्द आहे. ‘**हिक्**’ असा शब्द सर्व भाषांत आढळतो. *Du.* hik; *Dan.* Hikke; *Sw.* Hicka.]

उचट(णें) सक्रि. एकदम वर करणें, चिकटलेला पदार्थ वेगळा करणें. To detach, to separate.

[सं. **उत् + चट् १ भेदने;** अप. **उच्चाडणु = सोडून जाणें;** गु. **उच्चाट = वीट;** सिं. **उचाटु** = दुःखी कष्टी ; **हिं. उचटना** = पळून जाणें, विटणें. उच्चाट होना = विटणें. अकाम. **उचाटणें**–संबंध तोडणें, वीट येणें, **उचाट = कंटाळा.** कान. **उच्चु** = सैल करणें, मोकळा करणें, सोडवणें.]

उँचंबळ(णें) अक्रि. वर कांठोकाठ येणें. To overflow.

[सं. **उत् + चंब् १ गतौ. + ल** (स्वार्थे); प्रा. **उच्चबल उचंबल.**]

उँचंबळ(णें) अक्रि. **पोटांत कालवणें.** To be uneasy.

[सं. **उत् + चंब् १ अदने + ल** (स्वार्थे) (एकच धातु परंतु अर्थ दोन व ते दोन्ही अर्थ दोन भिन्न संस्कृत मूळ धातूंशीं संलग्न आहेत. इतर रूपें–उचमळणें, उचमणें.)]

उचंडळ (णें) अक्रि. हिसळणें (प्रवाही पदार्थांविषयीं वापरतात.) To spill, to overflow.

[सं. **उच्च+आंदोलनम् (?)**]

उचल (णें) उक्रि. वर येणें, खालून वर जवळ नेणें. (लाक्षणिक अर्थ कांहीं आहेत) उठावणी करणें. To raise.

[सं. **उत्+चल् १ गतौ**; प्रा. **उचल्ल**; हिं. **उचलना**; गु. **उचलवूं**; सिं. **उछिलणुं**; याकाम. **उचलणें**=निघणें (नरुस्व ५६१)]

–उचल जोर, उत्तेजन, जागृति, चळवळ An awakening.

–उचल पांगडी-वांगडी (पांगडी = कोळ्याचें जाळें) एकदम उचलून नेणें.

–उचलाउचल उचलण्याची क्रिया (उचल+आ (आणि)+उचल)

–उचल्या भामटा A shoplifter.

^{1}**उचाट(णें)** सक्रि. वर उचलणें. To raise.

[सं. **उत्त्याजित** (√त्यज्); प्रा. **उच्चाइय, उच्चडिअ.**]

^{2}**उचाट(णें)** क्रि. कंटाळा येणें, तिरस्कार येणें. To be disgusted.

[सं. **उच्चाटनम्** √**उत्+चट्**; हिं. **उचाट.**

(उच्चाटण ह्या तत्सम शब्दाचा अर्थ निराळा व उचाटा, उचाटणें ह्या तद्भव शब्दांचा अर्थ निराळा.)]

उचापत स्त्री. उसनें घेणें, कर्ज घेणें, उठाठेव, भानगड (कर्जामुळें उत्पन्न झालेली). To borrow.

[सं. ? हिं. **उचापट.** मराठींत हिंदीमधून आला.]

उच्चार(णें) उक्रि. उच्चार करणें. To pronounce.

[सं. **उत्+चर्** (णिच्–उच्चार्) (श्वासास बाहेर जावयास लावणें–उच्चारणें. **उच्चार, उच्चार्य, उच्चारित, उच्चारणीय**–तत्सम शब्द.)].

उच्छाव, उत्सव, उत्साह पुं. आनंदाचा दिवस, समारंभ. A festival, a ceremony.

[सं. **उत्सव (उत्+सू २ हवने)**; प्रा. **उस्साह**; हिं. **उच्छाओ, उच्छाहु**; सिं. **उच्छऊ**; सिंह. **उसा**; याकाम. **उछावो**, (धपू. १८); अकाम. **उत्साव.**]

जयाचा जन्मीं मंगळाचा उच्छावो : जाला तीहीं लोकीं ॥ नरुस्व. २९१.

उच्छिष्ट वि. टाकलेलें, बाकी राहिलेलें–उरलेलें. Left over (from dishes).

[सं. **उत्+शिष्ट**, (< निष्ठा-शिष्); याकाम. **उचीष्ट** (स्मृ. स्थ. १२७).]

–उष्टें खाऊन टाकलेलें–राहिलेलें. (**उत्+शिष्ट.**)

–उष्टान, उष्टावण न. लहान मुलास प्रथम अन्न खावयास घालणें. Cooked food first offered to a child. (**उत्+शिष्ट+अन्नम्**)

उच्छृंखल वि. चंचल, उतावळा, स्वैर. Unrestrained, unbridled.

[सं. **उत्+शृंखला** (बंधन). कोणत्याहि शृंखलेपासून म्हणजे बंधनापासून मुक्त.]

उच्छेद(णें) उक्रि. मोडणें, नाश करणें, समूळ नाश करणें. To destroy, to uproot.

[सं. **उत्+छिद् ६ छेदने**].

उच्छ्वास पुं. बाहेर सोडलेला श्वास. Breathing out, the breath let out; exhaling.

[सं. **उत्+श्वास √श्वस् २ श्वसने**].

उजगारा-गरा पुं. जागरण, कंटाळा, त्रास (लक्षणा) A vigil.

[सं. **उत्+जागृ. उज्जागर; उज्जागरक**; प्रा. **उज्जगरय**; देप्रा. **उज्जगीर औन्निद्र्यम्** (४९.३); गु. **उजगरा**; हिं. **उजागर=स्पष्ट, उजगारी=प्रसिद्धी (<उत्+जागृ)**, **उजागरा**=उघडपणें, निर्भय, धीट (**<उत्+जागृ**). **उजागरी-उजागिरी, उजागीर** (निर्लज्ज) ह्या सर्वांच्या मुळाशीं जागृतीची–सावधानतेची–प्रत्यक्ष किंवा लाक्षणिक कल्पना आहे.]

^{1}**उजर(णें)** अक्रि. चकाकित करणें, स्पष्ट करणें. To brighten, to make clear, to polish.

[सं. **उत्+ज्वल् १ ज्वलने**].

^{2}**उजर (णें)** सक्रि. दुरुस्त करणें, सरळ करणें. To mend.

[सं. **ऋजु** (नाधा.); प्रा. **उज्जु+र**]

^{3}**उजर (णें)** अक्रि. हुषार होणें, सामर्थ्य येणें, ताजे तवाने होणें. To recover, to refresh.

[सं. **ऊर्जस् (=अन्न, सामर्थ्य)** (नाधा.) वर्णव्यत्यासानें 'उजरी' असें नाम तयार होतें.]

^{1}**उजव(णें)** उक्रि. रीतसर समाप्त करणें, संपविणें, हात उजवून घेणें, समाप्त–शेवट करणें. To complete, to finish.

[सं. **उत्+यम् १ उपरमे. उत्+यापन (√या-णिच्) उद्यापन-उजावन**; गु. **उजववूं.**]

उँजव(णें) लग्न करून टाकणें To dispose of (a girl as in marriage.)
[सं. उत् + यस्, उप + यम् १० परिपेवणे.]

उजवा वि. सरळ, चांगला, डाव्याच्या उलट. Simple, gentle, right.
[सं. ऋजुक ; प्रा. उजअ, (हे. ४·४१२); अप. उज्जुय > उजवा.]

उजळ(णें) सक्रि. स्वच्छ करणें, आवृत्ति करणें, प्रकाशित करणें. To brighten, to polish, to repeat.
[सं. उज्ज्वल् १ दीप्तौ; प्रा. उज्जल; हिं. उजळना; गु. उजळवूं ; सिं. उजलुणु.]

उजळणी स्त्री. संख्या. Revision, figures.
[मराठी. उजरी (काव्यांत येतो. ज्ञा. ९·३४१)]

उजळा पु. झकाकी, घासणें, प्रभा, चकाकी. Brightness, lustre, polish.
[सं. उज्ज्वलक ; पा. प्रा. उज्जलज ; का. बोझुलु ; पपहा. उजळा ; हिं. पं. उज्जल, उजला; गु. उजळूँ ; सिं. उजलु; म. उजरी = प्रभा ; याकाम. उजळ (नरुस्व ९४), उजरी (ज्ञा. ९-३४१).]

उजाड वि. वैराण, ओसाड. Deserted, desolate.
[सं. उत् + जॄ १ वयोहानौ ; हे. दे. ना. उजाड; हिं. उजाड.]

उँजू वि. चांगलें, सरळ, उजवें, नीट. Straight, just, fair, right.
[सं. ऋजु ; प्रा. उज्जु ; उज्जुअ, सिंह. उदु ; लमा. उझो = शुद्ध. उजवा (< सं. ऋजुक ; प्रा. उज्जुअ, उज्जुग), उजुकार, उजुवाट (सरळ मार्ग).]

उँजू न. नमाजाच्या पूर्वीचें हातपाय धुणें. Ablutions before Islamic prayers.
[अर. वुजूह्-चेहरे, < वझ् = चेहरा; पेकाम. उजूनमाज (रा. १-६३).]

उजूर पुं. दिरंगाई, सबब, तक्रार, आक्षेप. Excuse, delay, complaint.
[अर. उझ्र् = बहाणा, मिष; शिकाम. पेकाम. उजूर (रा. १५-१५९-१०, २२६).]

उजेड(णें), उजड(णें), उज़ाड(णें) प्रकाश देणें, उगवणें. To dawn.
[१ सं. उत् + द्योत् (णिच्) √द्युत्-प्रकाशे. २ सं. उज्ज्वल्-उद्योत् ; प्रा. उजोअ. ३ सं. उदयित; प्रा. उजइड उजेड (भा. अ. १८३२); याकाम. उजियेड (ज्ञा. ६·३२)]

उंच, उंचा वि. उंची असलेला, वर, श्रेष्ठ. (खालीं, आखूड, ह्याच्याविरुद्ध) High, up, great.
[सं. उच्च ; पा. उच्च ; प्रा. उच्च ; गु. उंचो ; सिं. ऊचो = श्रेष्ठ; पं. उच्चा ; हिं. ऊंचा. लमा. वुचो ; सिंह. उस्, उस, उह.

कांहीं भाषांत सानुनासिक व कांहीं भाषांत निरनुनासिक शब्द आहे. अनुनासिक कोठून आला ? अपभ्रंश भाषेतून आला काय ? (< उत् + अञ्च् १ गतौ (?)]

ह्या शब्दापासून खालील शब्द सिद्ध होतात.

–उंच + वट (ना. वि.), उंचेला.

–उंच + वटा उंच केलेला कट्टा. Raised platform.

–उंच सखल उंचवट खोलगट, वर, खालीं असलेला. Uneven.

–उंचावणें (नाघा.) उंच होणें. To grow tall.

उट(णें) सक्रि. (तेलानें) घासणें. To polish.
[सं. उत् + वृत् १ लेपने; याकाम. उटणें. (पूर्वी आरसे पितळेचे करीत व त्यांत प्रतिबिंब नीट दिसावें म्हणून ते तेलानें घासीत असत.)]

ह्या हो उठूनिया आरसा । आंधळेया पुढें दाखवूं बैसा ।
ना बहिरिसी हृषीकशी गाणें केऊतें । ज्ञा. ११–१५७.

उट(णें) उक्रि. लेपणें, माखणें, चोपडणें, To annoint.
[सं. उत् + वृत् १ लेपने; कान. उटणें–अंगाला लावावयाचें तेल.]

उटणें न. सुगंधी द्रव्य. An ointment, unguent.
[सं. उद्वर्तनम् ; प्रा. उट्टवण; हिं. √उवटन, उवटना; बि. अबटन; गु. उटवुं, उटणुं; सि. उवटणु, उव्बटणु; कान. उटणी ; उटी < उद्वृत्तिः

ह्याचे दोन अर्थ आहेत. एक उटणें आणि दुसरा तेज, माहात्म्य.]

उटक(णें) सक्रि. सुटणें, बंधमुक्त होणें, दूर करणें. To release, to liberate.
[सं. उत् + टक् १ बंधने.]

“ सर्वारंभा उटकलें । प्रवृत्तीचें तेथ मावलें । जलती कां कर्मफलें । तेंचि याजी ॥ ज्ञा. १४·३६३

उटक(णें) अक्रि. अडथळा होणें. To be obstructed.
[सं. उत्+स्तक् १ प्रतिघाते.]

उटंक वि. उंचवट्याची, उतरणीची. Having ups and downs.
[सं. उत्+अच् १ गतौ; प्रा. उट्ठ, उट्ठगल.]

उटाळ(णें) अक्रि. ताफा लावून उलटून देणें. To lift with a lever.
[सं. उत्+तल् १० प्रतिष्ठायाम्. उत्+स्थल (नाधा.) किंवा उत्+तालु, (=मुखांतील जिभेवरील छपर); उटाळा=लक्षणेनें उच्चारला जाणें असा ह्याचा अर्थ होतो. उच्चार स्पष्ट बाहेर पडणें म्हणजे उटाळणें. "इला कसें नाम तुझें उटाळें दयाळ. ९३]

उटाळें न. (महानु. उद्धवगीता) किल्ली. A key.
[सं. उत्+तालक; हिं. ताला.]

उट्टें न. वचपा, खोड, सूड. Revenge.
[सं. आकुट्ट; प्रा. आउट्ट (हिंसा ?); कान. उट्टी= शिवीगाळ.]

उठ(णें) अक्रि. उभें राहणें, खडें होणें. To stand.
[सं. उत्+स्था, व्युत्+स्था; प्रा. उट्ठ, उत्थ; गु. उठवूँ; पं. हिं. उथणु; का. वोथ् (उठणें, उत्पन्न होणें); बं. उठिते; रुमा. उश्ति.
'उठणें' ह्या धातूचे आणखी कांहीं अर्थ रूढ आहेत. प्रत्येक निराळा अर्थ निराळ्या अशा संस्कृत धातूशीं जोडतां येण्यासारखा आहे. त्याचीं उदाहरणें पुढें दिलीं आहेत. उठव (<उत्थाप), उठवणी (उत्थापनी), उठवण (उत्थापन), याकाम. उठावा=उत्कर्ष (नरुस्व. १०१).]

उठ(णें) अक्रि. पीडा होणें, दुखणें, (डोकें उठणें). To ache, to have pain.
[सं. उठ् १ उपघाते.]

उठ(णें) अक्रि. रचणें, तयार होणें. (इमला उठला.) To be complete.
[सं. वठ् १ ग्रथने]

उठ(णें) अक्रि. निघून–पळून जाणें. (बाई उठून गेली. माणसांतून उठला). To be cast away.
[वै.सं. सौत्रधातु. वट् स्तेये]

उठखळें न. हकालपट्टी, पराभूतता. Expelled or defeated (condition)
[सं. उत्स्था+स्खल् (द्विधातुसंयोग); याकाम. उठखळे (उ. गी. ९७)

"उठखंब," सारखा हाहि शब्द महानुभावी वाङ्मयांत वापरलेला आढळतो.

मारौनि गजरथांचीं दळें । वीराचें उठकळें केलें ॥ शिशु.१०६१]

उडकी(उंडकी) स्त्री. (प्रांतिक–कोंकण) उचकी. (श्वास वर येऊन अडकण्याची क्रिया,) Hiccup.
[सं. उर्ध्वकी; उध्रंच (√अञ्च् १ गतौ) उचकी पहा.]

उडकी हृदयांतु प्रथेसली । प्राणु सांडी वेळोवेळां ॥ ख्रिपु २·२४

उड(णें) अक्रि. वर आकाशांत फिरणें. To fly.
[*IE.* DI; DIE. सं. डी, उद्+डी. *Gr.* di; *Lat.* Discus; *Lith.* Dit.
सं. उड्डयते, उड्डीयते; प्रा. उड्डेइ, उड्डाइ; अप. उड्डाणें(तृ); गु. उडवूँ; सिं. उडामणु; उडाइणु (णिच्); पपं. उड्डु; हिं. उडना; का. वृड्; रुमा. उरि.]

उड(णें) अक्रि. उडी मारणें. To leap, to jump.
[सं. उत्+डी १ विहायसा गतौ.]

ह्या क्रियापदाचेहि लाक्षणिक प्रयोग कांहीं होतात. व तेच वाच्यार्थ असे समजले तर त्यांच्या निराळ्या व्युत्पत्ति असणें शक्य आहे. उदा०—

–दोष उडणें (<अप्+द्रा ५ कुत्सायां गतौ) To get rid of.

–पैसे उडणें (<उत्+दा १ दाने) To be without.

–म्हैस उडणें (<उत्+धे १ पाने) To become dry.

त्याच्या अपूर्ण रूपाचे कांहीं प्रयोग रूढ आहेत. उदा.

–उडत–(गेला) तुच्छतादर्शक प्रयोग. A term of contempt.

–उडतउडत, उडतपगडें सोंगट्याच्या पटांतील एक डाव.

–उडतहत्यार, उडणारें हत्यार तोफ, गोळे. A gun.

–उडदा बेगम (उर्दु+बेगम) सैन्यांतील राणी (बुद्धिबळाच्या डावांतील). The queen (in chess).

उड(णें) अक्रि. संभोग करणें, मैथुन करणें. To cohabit.
[सं. उर्द् १ क्रीडायाम्. परंतु हा शब्द द्राविडमूळ असावा. कान. उडी=मांडी, कुल्ला, ढुंगण, कमर. उडुकिसु–त्रासणें, गांजणें, त्रास देणें. ह्या कानडी शब्दांशीं संबद्ध असावा.]

उडरी न. एक पक्वान्न. A kind of food.

[कान. **इड्डली=एक पक्वान्न**; याक्राम. **उडरी** (ऋपू. ५१७).]

उडव(णें) सक्रि. फेंकणें. To throw.

[सं. **उत्+डी** (णिच्) ; देप्रा. **उड्डिअ** ; सिं. **उडाइणु**; हिं. **उडाना**; गु. **उाढववूँ**. हेमचंद्र देशी म्हणून देतो खरा. परंतु उत्+डी ह्या संस्कृत धातूशीं संबद्ध नाहीं का ? खालील व्युत्पत्ति पहा. डी-(णिच्) **उत्+डयय=उडव, उत्+डापय=उडाव**(राज), **उडणें**, (णिच्) **उडवणें, उडाणें, उडावणें, उडिवणें.**]

उडवा, हुडवा पुं. ढीग, रास, सांठा, (विशेषतः कोळशाचा, गोवऱ्यांचा, धान्याच्या धाटांचा). Heap, store.

[सं. **कूट** (?) ; प्रा. **उड** (?) ; द्रा. **हुड=रास** ; कान. **उड्डी=ढीग.** शब्द द्राविडोद्भवच आहे. अक्राम. **हुडवा** (**शेणी, गोवऱ्या ह्यांचा**).]

उडवें न. घर. A house.

[सं. **उटज** (?), प्रा. **उडय, उडज, उडव**].

उडिद पुं. धान्यविशेष, माष, काळें, (मुगासारखें) धान्य. A kind of cereal.

[सं. (?); देप्रा. **उडिद** (पुं.), **उडिदो** (माषधान्यम् ४१·५); हिं. **उडिद, उर्द, उरद्**; कान. **उद्दु**; गु. **अडद** (पुं.); सिं. **उरदु, उरिदु.**

हा शब्द आर्य नसून द्राविडी आहे. संस्कृतमध्यें ‘ माष ’ हा शब्द रूढ होता; हेमचंद्राच्या काळीं उडिद शब्द प्रचारांत होता; तेव्हां मधील कोणत्या तरी काळांत द्राविडी भाषांतून आला.]

उडिया, उरिया एका प्रांताचें (ओरिसा) व त्यांतील भाषेचें नांव. Orissa and its language (Oriya).

[सं. **ओड्-ओड्रियः, ओड्रिकः** ; प्रा. **उड्डिअ** ; हिं. **उडिसा.**]

उणा वि. Deficient, wanting.

[सं. **ऊन √वे** ; प्रा. **ऊणँ** ; गु. **उणु** ; सिं. **ऊणु** ; हिं. **ऊन, उना**; सिंह. **उन**, =**न्यून. उणें पुरें.** (कमी अधिक); **ऊणखूण** (हेतु, मनोगत (?)); **उखाण** (हलक्या-प्रतीचें), **उणावणें** (नाधा.), **उणें, उणीव, उणेंपाणें.**].

उंट पुं. प्राणिविशेष. A camel.

[सं. **उष्ट्र** ; प्रा. **उट्ट** (पुं. स्त्री); **अवेस्ता-उश्रूच** ; फा. **शुतर.** मराठींतील अनुनासिक कसा आला, अपभ्रंशामधून आला काय ? मराठींत शब्द पुंल्लिंगी राहिला. स्त्रीलिंग उंट किंवा उंटीण (सांडणी) असा होतो.]

उंड पुं. वाताचा गोळा. A cramp, abdominal pain (due to gases).

[कान. **उंडे=गोळा.** प्रा. **उडी=गोलाकार** ; ता. **उरंड्, उरूण्डै**; तेलु. **उड**; **वस्तु, पिंड** (शको.) भाकरीच्या पिठाचा उंडा (गोळा) हाहि कानडीच शब्द आहे.]

उंडगा वि. बिनकामाचा, निरुद्योगी, भटक्या. A loafer, a vagabond.

[कान. **उंडिग.**]

उंडग(णें) अक्रि. उनाडणें. To loaf.

[म. **उंडगा** (नाधा.)]

उंडर(णें), उंडार(णें) अक्रि. उनाडणें, बेफाम वागणें. To loaf.

[कान. **उंडिग.** सं. **उद्-१ क्रीडायाम्**]

उण्डा पुं. भाकरीच्या पिठाचा गोळा. A lump of flour.

[सं. ? देप्रा. **उंडी** (**पिण्ड**); कान. **उंडे=गोळा.** ता. **उरंड् उरूण्डै**; तेलु. **उंड.** हा द्राविडी शब्द आहे.]

उत्, उद् उपसर्ग, वर, बाहेर, नंतर, पलीकडे, पुढें इत्यादि अर्थद्योतक. A prefix.

[*IE.* Ud. सं. **उत्, उद्**; *Av.* Uç; *Gr.* Us; *Lat.* ut; *Teut.* ut ; *OHG.* uz; *nHG.* Aus; *As.* Ut; *Eng.* out.]

‘ उत् ’ ह्या संस्कृत उपसर्गापुढें कित्येक धातु किंवा इतर शब्द येऊन तत्सम किंवा तद्भव शब्द सिद्ध झाले आहेत.

-उद्घाट(णें) आरंभ करणें. To inaugerate.

-उद्घोष(णें) मोठ्यानें म्हणणें. To proclaim.

-उद्दाम उद्धत, अमर्याद. Uncontrollable. (**उत्+दामन्**)

-उद्दिष्ट इच्छिलेलें, हेतु. The desired thing. (**उत्+दिश्**)

-उद्देश हेतु. Object. (**उत्+दिश् ६ आदेशे**)

-उद्धत उर्मट, उद्धट (**उत्+हत √हन्**) Arrogant.

-उद्धरण वर काढणें. To uplift. (**उत्+धृ**)

-उद्बोध जाणीव. Enlightening. (**उत्+बुध् ४ ज्ञाने.**)

-उद्भिज वृक्ष वगैरे-अंकुर फुटणारें. That bursts forth. (**उत्+भिद्, उद्भिद्य**)

–उद्यत तयार. Ready. (< उत् + यत √ यम्)

–उद्यान बाग. A garden. (उत् + या + न)

–उद्यापन सांगता, पूर्णतेचा विधि. Concluding ceremony. (< उत् + या– णिच्)

–उद्युक्त तयार, उत्सुक, गुंतलेला. Engaged in. (< उत् + युज्)

–उद्योग प्रयत्न. Business. (< उत् + योग √ युज्)

–उद्वर्तन सुगंधी द्रव्यानें स्वच्छ करणें. Cleansing with perfumes. (< उत् + वृत् १ वर्तने)

–उद्विग्न उद्वेग, दुःखी. Distracted. (< उत् + विज् ७ दुःखे)

–उध्वस्त नष्ट. Distroyed. (< उत्+ध्वंस्–हिंसायाम्–निष्ठा)

–उन्नति (उद् + नति √ नम्) Progress.

उत(णें) अक्रि. वर येणें, फुगणें, फुगून वर येणें. To flow over, to boil up.

[वैसं. **उत् + तु २ गतिवृद्धिहिंसासु**, कान. **उदु** = **फुगणें** ; याकाम. **उतुं जाणें**. (नरुस्व. ५३५)

कानडी व्युत्पत्तिच ग्राह्य वाटते. ‘ **उतूं जाणें** ’ हा प्रयोग तर ‘ **उदु** ’ शीं अगदीं निकट संवद्ध आहे. त्या ‘ **उदु** ’ वरून मराठींत नामधातु सिद्ध झाला. कदाचित ‘ **उदु** ’ मध्यें सं. ‘ **ऊर्ध्वम्** ’चा दूर संबंध असावा.]

उतट(णें) अक्रि. ताणून फाटणें, दाटणें, तटतटणें, फुटणें, मर्यादेच्या बाहेर येणें. To burst.

[सं. **उत् + तट् १ उच्छ्राये**; याकाम. **उतट. उताट(णें) उताट, उताटकी उताडा. उताडा**, (‘ उतटणें ’ णिच् रूपें)] हे चोळी गेली उतटौनि ॥ शिशु २२५; कीं हे सुखाचीं तारुवें लोटलीं । आक्षै आनंदें उतटलीं दा. १-७-३१

उंतण(णें) क्रि. गवत काढणें, झांप काढणें. To mow.

[सं. **उत् + तृण** ; प्रा. **उत्तीण, उत्तण** (नाधा.)]

उंतण(णें) अक्रि. गर्वानें फुगणें. To be puffed with pride.

[सं. **उत् + तन् ८ व्याप्तौ**; प्रा. **उत्तण.**]

उताण(णें) प्रसिद्ध करणें. प्रसृत करणें. To describe, to declare.

[सं. उत् + तन् (णिच्), **उताणा, उताणापाताणा (उत्तान अपतान.)**]

उतर(णें) अक्रि. खालीं येणें, जाणें. To descend.

[सं. **अव + तॄ १, उत्तार्, उत्तर्** ; प्रा. **उत्तर** ; गु. **उतरवूँ** ; सि. **उतरणु** ; हिं. **उतरना** ; सिंह. **उतरणवा = कांठावरून वाहणें.**

उद्धवगीता ह्या महानुभावी ग्रंथांत उतरणें म्हणजे जिंकणें असा प्रयोग आहे. तो संस्कृतच्या जवळ आहे व तो सं. **उत्+तॄ** ह्या धातूपासून आहे. सध्यांच्या मराठींत खालीं येणें, कमी होणें, अपकर्ष होणें अशा अर्थीं धातु आहे तो ‘ **अव + तॄ** ’ पासून आहे. **उत् + तॄ** पासून नाहीं, कारण ह्यांत अर्थभेद होतो.]

ड, अंड, वंड, वटा, वड, वण, अ, आ, ई, ऊ इत्यादि मराठींत नामविशेषणाचे प्रत्यय आहेत. हे प्रत्यय लागून पुढीलप्रमाणें शब्द सिद्ध होतात.

उतरड, उतरंड, उतरण, उतरवटा, उतरवण, (उतर + ड मराठी प्रत्यय) Pile of pots; slope.

उतार–उतर–पेठ–वेठ An entrepot.

उतरण–उतारा, उतराई To get through. (< **उत्तीर्ण** < **उत् + तृ** (निष्ठा)

उतार उतरण्याची क्रिया. (प्रा. **उत्तरीय**).

उतारा उतरण्याचें, काढून टाकण्याचें साधन, मंत्रतंत्र. An antidote.

उतारी पत्याच्या डावांतील उतरण्याचें–खालीं टाकण्याचें पान An entry.

उतारू प्रवासी, वाहनांतून उतरणारा. A passenger, a traveller.

उतरंड स्त्री. भांड्यांचीं चढती ठेवलेली रांग. A pile of pots.

[सं. **अव +तृ** (?); देप्रा. **उत्तिरिविड, उत्तिवडा**; गु. **उतरेवड.**]

उतराण स्त्री. उत्तरेचा वारा. The north wind.

[सं. **उत्तरायण (उत्तर √ तृ, + अयन)** ; गु. **उतरांतु, उतरांदु** ; हिं. **उत्तराया, उत्तराहा** ; सिं. **उतरु (उत्तर)** ; गु. **उतरान** ; सिं. **उतिराणु** (भिन्नार्थक).]

उतव(णें) सक्रि. कढवणें. To boil.
[सं. **उत्+तप् १ तपने. उतणें पहा. उदी** ह्या कानडी शब्दाशीं संबद्ध आहे. उतणें ह्या धातूचें वरील रूप हें णिच् आहे.]

उताणा वि. वर तोंड करून पसरलेला. Having face turned upwards.
[सं. **उत्+तन् > उत्तान**; गु. **उतान**; हिं. **उत्तान, उतान, उताना.**]

उतावळा वि. शीघ्र असणारा, अधीर. Hasty.
[सं. **उत्ताप=काळजी, तळमळ**; देप्रा. **उत्तावल.** हेमचंद्र देशी म्हणतो खरा परंतु ह्याचा 'उत्तापिल' ह्या संस्कृत शब्दाशीं संबंध नाहीं कां ? **< उत्+तप् (णिच्-ताप्)**; गु. हिं. **उतावल**; सिं. **उताविली=घाई, उताविलु**; म. **उतावळी, उतावळ.**]

उतळ, उथळ वि. खोल नसलेला, पसरट, सपाट. Shallow.
[सं. **उत्+स्थल.** (सं. **उत्+तल्**; प्रा. **उत्थल्ल**); प्रा. **उत्थल्लइ** (हे. ४·१७४); देप्रा. **उत्थलिअं** गृहं; **उत्थलिअं** उन्मुखगतमित्यन्ये (४८·७); गु. **उथलवूँ, उतळुं** (उलटा होणें); हिं. **उथलना** (उलटविणें), **उथल, उत्थल** (सपाट); सिं. **उथिलणु**=उपडें होणें, कांठावरून वाहवणें; **उथल** (स्त्री)=पूर; म. **उथळ(णें)**=उसळणें, उचंबळून येणें.]

उती स्त्री. उठाव, उद्भव. Rising, swelling, inflamation.
[कान. **उदु=फुगणें**; याकाम. **उतिजणें=द्रवणें, उतूं जाणें.** (उगी.)]
विकळतां बहु सर्वांगीं। दामोदर वोतिजताय (उतिजताय) धर्गीं ॥ नरुस्व ५३५.

उतोति-ती स्त्री. खारीक. A date (fruit).
[कान. **उत्तुते. उत्तोत्ते=खारीक**]

उत्कट वि. अतिशयित, अमर्याद. Excessive.
[सं. **उत्+कट्.**]

उत्कंठ(णें) क्रि. उत्कट इच्छा होणें. To be eager.
[सं. **उत्कंठा** (नाधा.)]

उत्कर्ष(णें) क्रि. भरभराट होणें. To flourish.
[सं. **उत्कर्ष (नाधा.) √ उत्+कृष्.**]

उत्कळित न. भांडण, युद्ध. A quarrel, a fight.
[सं. **उत्+कल्, उत्+कलि.** याकाम. **उत्कळित.**
उद्यलेसें जें उत्कळित ॥ ज्ञा. १८·१७२७.

उत्कृष्ट वि. फार चांगलें, उत्तम. Excellent.
[सं. **उत्+कृष् १ कर्षणे.** (मधून निवडणें).]

उत्क्रांति स्त्री. प्रगति, वाढ Evolution.
[सं. **उत्+क्रम् १** गतौ (निष्ठा-**क्रांत**, नाम-**क्रान्ति.**)]

उत्तम वि. अतिशय सुंदर, चांगलें. The best.
[सं. **उत्तम < उत्+तम्-आधिक्यार्थी** सं. प्रत्यय.]

उत्तर न. जबाब, प्रतिभाषण, प्रतिवचन. A reply, an answer.
[सं. **उत्तर < उत्+तॄ.** परंतु ह्याचा प्रतिवचन असा अर्थ पुढीलप्रमाणें झाला. "उत्तीर्यते निस्तीर्यते प्रकृताभियोगोऽनेन."]

-उत्तरक्रिया मरणोत्तर क्रिया. Funeral rites.

-उत्तरकुरु देशविशेष. Name of a country.

-उत्तरध्रुव उत्तरेकडील ध्रुवाचा तारा. Pole star, North Pole.

उत्तरदायी वि. जबाबदार. Responsible.
[सं. **उत्तर+दा.** मराठी भाषाशुद्धीच्या चळवळींत १९२८ च्या सुमारास हा शब्द 'जबाबदार' ह्या परकी (फारसी) शब्दाचा पर्याय म्हणून रूढ झाला.]

उत्तरवेंठ स्त्री. उतारपेठ, बाजार. Entrepot.
[सं. **अव+तॄ**; याकाम. **उत्तरवेंठ** (उगी १९४, ऋ. ५१, शि. ६१६)]
मेरू उत्तरवेंठ केली जैसी : तैसे डोंगर दिसताती ॥ नरुस्व ७०१.

उत्तरी स्त्री. उत्तरक्रियेच्या वेळीं गळ्यांत अडकवायचें वस्त्र. A cloth (worn while performing the funeral rites).
[सं. **उत्तरीयम्, उत्तरस्मिन् ऊर्द्ध्वदेहभागे भवम्.** 'उत्तरीय' चा अर्थ उपरणें, अंगवस्त्र, असा पुढील काळांत झाला.]

उत्तान वि. स्पष्ट, उघड उघड. Open, unconcealed.
[सं. **उत्+तन्-उत्तान.**]

उत्तेजन, उत्तेजक, उत्तेजित (चेतना देणारे.) Stimulant.
[सं. **उत्+तिज्** (तीक्ष्ण करणें.)]

उत्थाप(णें) सक्रि. उठविणें, उभें करणें. To raise.
[सं. **उत्+स्था,** (णिच्) **उत्थापय.**]

उत्पाद(णें) सक्रि. उत्पन्न करणें. To create.
[सं. उत्+पद् (णिच्) उत्पाद.]

उत्पत्ति जन्म, संभव. Birth (उत्+पद्+ति.).

उत्पन्न निर्मित, सिद्ध. Created.
[सं. उत्+पद्, (निष्ठा) पन्न.]

उत्प्रेक्ष(णें) सक्रि. उदाहरण देणें, दाखला देणें. To illustrate.
[सं. उत्+प्र+ईक्ष् १ दर्शने.]

–उत्प्रेक्षा स्त्री. दृष्टान्त, दाखला. An illustration.

उत्फालन न. उडी. A jump.
[सं. उत्+फल् १ विशरणे.]

उत्सर्ग पुं. त्याग, नियम, विधि. Abandonment, a rule.
[सं. उत्+सृज्.]

उत्सव आनंद. A festival.
[सं. उत्+सू २ हवने.]

उत्साह पुं. उल्हास. Enthusiasm.
[सं. उत्+सह् १ सहने.]

उत्सुक वि. उत्कंठित. Eager.
[सं. उत्सुक–उत् उद्योगं–सुवति–सौति सुनोति √सु प्रसवैश्वर्ययोः]

उत्सेद(णें), उच्छेद(णें) सक्रि. नाश करणें. To destroy.
[सं. उत्+सीद् ६ हिंसायाम्.]

उथव स्त्री. भरती, पूर. High tide.
[सं. उत्+स्थापिका ; प्रा. उत्थाइ.]

उथळपथळ, उथळपातळ वि. स्त्री. वरची बाजू खालीं, खालची वर. Topsy turvy, utter disorder.
[सं. उत्स्थल, अपस्थल, पर्यस्त; देप्रा. उत्थल्लपत्थल्ला; ‘उलथापालथ’ हा शब्द वर्णव्यत्ययानें ह्यापासूनच आला काय? पर्यस्त < पल्लत्थ ; विपर्यस्त > विपल्लत्थ > उथळा, उथाळा (खांबाच्या खालचा चौकोनी दगड).]

उद् उप. वर, बाहेर, वगैरे अर्थदर्शक उपसर्ग. A prefix.
[सं. उत्, उद्; *IE*. ud ; सं. उत्, उद् (उत्तर, उत्तम, उदरम्, उदरमस् इ.); *Av*. uç (out); *Gr*. us; *Lat*. (uterus); *Got*. út; *OHG*. ùz; *AS*. ut.]

हा उपसर्ग प्रथम येऊन कांहीं तत्सम शब्द मराठींत रूढ झाले आहेत.

उन्+मनस् एक आत्मिक अवस्था. A spiritual state of mind.

उन्मीलन (< उद्+मीलन √मील्), उमलणें, उघडणें. To open.

उन्मळणें (√उद्+मूल्) उन्मूळणें, उच्छेदणें. To be uprooted.

उन्मेष-ख (√उद्+मिष् १ शब्दे.)

उदक न. पाणी. Water.
[सं. उदक √उद् उनत्ति, उन्दति, (उदन्, उद्र, समुद्र इ.) *IE*. ued ; सं. उद् ; *Av*. Vaidi ; (सं. उद्र ; *Av*. udro); *Lit*. udra; *Gr*. udar; *Alb*. uje; *Lat*. unda; *Got*. wato.

(गोव्याच्या कोंकणी भाषेंत उदक, उदन् हेच तत्सम शब्द सामान्य लोकांच्या वापरांत आहेत. ती भाषा संस्कृतच्या अधिक जवळ आहे. उदक ह्या शब्दाचे कांहीं विशिष्ट प्रयोग रूढ आहेत. उदक सोडणें = दान करणें, मालकी हक्क सोडणें. कोणालाहि दान करतांना पाणी हातावर सोडतात किंवा दानाची वस्तु पाण्यांत भिजवतात. उदकुंभ–पाणी भरलेला घट.)]

उदव(णें) उक्रि. ऊद जाळून सुगंध पसरविणें. To burn incense.
[अर. ऊद.]

–उदकाडी स्त्री. सुगंधी द्रव्याची काडी, उदबत्ती, अगरबत्ती. Incense-stick.
[म. ऊद+काडी]

–उदबत्ती [ऊद+बत्ती (वर्तिका–वात)]

उदंड वि. पुष्कळ. In plenty.
[सं. उत्+दण्ड.]

उदमी पु. व्यापारउदीम करणारा. A trader.
[सं. उद्यमिन् (√उत्+यम्), इन्नन्त]

उधार वि. उसना, पतीवर केलेला (व्यवहार). On credit.
[सं. उत्+आ+हृ (?)]

उदमेख(णें) सक्रि. स्पष्ट सांगणें, आज्ञा करणें. To clarify, to order.
[सं. उत्+मिष् १ शब्दे.]

उदमेख पुं. उद्योगीपणा, उत्सुकता. Industriousness, eagerness.
[सं. उद्+मिष्.]

उदर न. पोट, जठराशय. Stomach.
[सं. उदर; उत् + ऋणाति; उत् + दृ + अच्.]

–उदरीं (ग्रहचौकांत–मधल्या जन्मगृहांत.) शनि येणें–भाग्य उगवणें. To have good luck.

–उदरंभरी पोट भरणारा. Selfishly voracious.

उद्दाण न. मोठी चूल. A big fireplace.
[सं. देप्रा. उद्दाण.]

उदानू वि. तीन संख्या. Three.
[हिं. नंदभाषा. उदानू=तीन. याकाम. उदानु नेत्राचा–विसा खेचर अभंग].

उदार वि. थोर मन असलेला, मोठ्या मनाचा. Generous.
[सं. उदार, उत् + आ + रा = दाने; याकाम. उदार= मोठा, थोर (नरुस्व ३४२) = दाता (नरुस्व ३७४). (उदार + मत, –शिक्षण, लक्षण, पक्ष, इंग्रजी शब्द Liberal ह्याचा प्रतिशब्द म्हणून रूढ झाला. सुमारें स. १९००)]

उदावादा पुं. प्रकटत्व, जयजयकार. An ovation.
[सं. उदयवादित्व (?) श.को. याकाम. उदोवादा (ज्ञा. १५·५३२), उदोदासु = जयजयकार (नरुस्व २६४). ‘ उदयोऽस्तु ’ हा संस्कृत प्रयोग ह्याच्या मुळाशीं असावा.]
उठी कल्पांतीं उदावादा. ज्ञा. १५–५३२

उदास वि. दुःखी, कष्टी. Melancholy, dejected.
[सं. (व्युदास); उत् + आस्; प्रा. वुदास उदासणें, –उदास (नाधा.) उदासीन, उदासी, उदासीनता, वरील व्युत्पत्ति पा. स. म. नें दिली आहे. परंतु उदासीन शब्द पाहिला म्हणजे उत् + आस् ही व्युत्पत्ति ग्राह्य धरावीशी वाटते. आसीन हा शब्द, ‘आस्’ ची निष्ठा स्पष्ट आहे. सं. व्युदासमध्यें आस् धातु असला पाहिजे.]

उदीम पुं. व्यवहार. Trade.
[सं. उद्यम (उद् + यम्); हिं. उद्यम, उद्दम, उद्दिम; गु. उदीम.]

उदे(णें) अक्रि. वर येणें, उगवणें. To rise.
[सं. उत् + इ २ गतौ; *IE.* Ei; *Av.* aeiti; (दुरित. – *Av.* duzita); ap. aitiy, *Lat.* eiti; *Lat.* (exitium), ethae (Air).

उदित (निष्ठा √ उत् + इ), उदय; गु. उदे (पुं.) = उदय; हिं. उदय, उदए.]

उदेज(णें), उदज(णें), उदैज(णें) अक्रि. उगवणें. To rise.
[सं. उत् + एज् १ दीप्तौ.]

–उदयीक (उदय + इक); **उद्यां** (उदयेन)–दुसऱ्या दिवशीं. To-morrow.

–उदोउदो (उदयोऽस्तु) ‘ उदो उदो ’ असा एक आशीर्जयात्मक प्रयोग आहे.]

उद्गार(णें) अक्रि. शब्द उच्चारणें, भावनावश होऊन बोलणें. To utter.
[सं. उद्गार (नाधा.) √ उत् + गॄ ९ शब्दे.]

उद्धर(णें) सक्रि. वर काढणें. To lift up.
[सं. उत् + हृ; प्रा. उद्धर, उधरण (भेट, अहेर.), उद्धर्ता (उद्धारणारा < उत् + हर्तृ.)]

उधई स्त्री. वाळवी, एक प्रकारचा कीटक. White ant.
[सं. उध्री; सिं. उडोही; गु. उधाई.]

उधड(णें) उक्रि. (शिंगानें वस्त्रें वगैरे) फाडणें, धुडकावणें, कातडें काढणें. To rip up, to tear off, to turn out.
[सं. उत् + दॄ ९ विदारणे (+ हठ् १ बलात्कारे, + धुर्व् १ हिंसायाम्); प्रा. उद्धडन; हिं. उधडना; सिं. उधडणु; गु. उधडवूं.]

उधर(णें) अक्रि. ओकणें. To vomit.
[सं. उध्रस; ब्लोक ‘ उद्धरण ’ हा शब्द मूळ देतो. गु. उधरवूँ; हिं. उधडना (उठविलेला असणें); सिं. उधारणु (सोडविणें).]

उधव, उद्दव ऊठ, जागा हो. Awake, arise.

[सं. उत् + धू –, देप्रा. उद्धवओ, उच्चडिओ उत्क्षिप्रार्थाः (४८·२), म. धावणें, उभा (सं. ऊर्ध्व,) ह्या शब्दांशीं संबद्ध आहेत काय ?]

उधव(णें) उक्रि. उभें करणें, वर करणें, उसळणें, उचलणें, उठवणें. To lift, to awaken.
[सं. उत् + धू १ चलने; ऊर्ध्व (नाधा.); याकाम. उधवणें (ज्ञा. १·९०); णिच् रूप–उधावणें.]
मग लत्रों नेणति कैसे । आटिव लोहखांब जैसे । कां उधविलीं आकाशें । शिलाराशी ॥ ज्ञा. १६·३७७.

उधवणी, उधणी स्त्री. धुराडें. A chimney.
[सं. उत् + धूम्र.]
उधवणीचें जेवीं तोंड उगळी धुवांचे उभड ॥

उधस(णें) अक्रि. वर येणें. To throw about (dust, powders etc.).

[सं. उत्+ध्वस्. १ हिंसायाम्. (निष्ठा) उध्वस्त (नाधा.)]

उधस, ऊधस न. स्तन. The breasts.

[*IE*. Eudh, oudh, udh; सं. **ऊधस्**; *Lat.* Uber; *As*. Uder; *OHG*. Utar; *Ger*. Euter; *Eng*. Udder.]

उधळ(णें) क्रि. फेकणें, उडवणें, वर फेकणें, दाणादाण करीत पळणें. To throw away, to gallop.

[सं. १ **उद्धलयति (उद्+धूलि), २ उत्+ह्वल्** १ गतौ; हिं. **उधलना, उधलजाना.**]

उधळ, उधळपट्टी अवास्तव खर्च. Wasting.

उधळ्या उधळणारा, उधळा. A spendthrift.

उधळा पुं. मंतरलेली राख, धूळ, धुरळा. (Sacred) dust.

[सं. **उद्धूलिक**; याकाम. **उधळा** (उगी ३६२).]

उधाण-न न. समुद्राची भरती (अमावास्या, पौर्णिमेची), भर, भरभराट. High tide.

[सं. उत्+हा ३ **गतौ. (निष्ठा) उधान > उधाण., ऊर्ध्वान.**]

उधान(णें) अक्रि. तारुण्यानें मुसमुसणें. To be full of youthful vigour.

[सं. **उद्धननम्** (नाधा.)]

उनमळून(पडणें), उन्मूळून अ. मुळांसकट. (To be) uprooted.

[सं. **उन्+मूलन** (नाधा.); प्रा. **उम्मूलण.**

उन्मळणें = उन्मूलन करणें. बहुधा संस्कृत तत्सम **उन्मूलन** आणि तद्भव **उमळणें** ह्या दोहोंचा संकर होऊन वरील शब्द सिद्ध झाला आहे.]

उनाड वि. उंडगा, भटकणारा, स्वैर वृत्तीचा. A vagabond.

[सं. **उत्+नट् १ नृत्यै, नाट्**; प्रा. **उन्नाडिअ-य.** उनाड(णें), उनाडकी.]

उंदीर पुं. मूषक, चुवा, प्राणिविशेष. A mouse.

[सं. **उन्दुर**; पा. **उन्दुर**; प्रा. **उंदर, उंदुर**; गु. **उंदर**; हिं. आणि प्राच्यभाषा **इन्दूर**; सिं. **उन्दुरु**; परंतु संस्कृतीकरण उत्तरकालीन दिसतें. हा शब्द व इन्दूर हे दोन्ही शब्द ऑस्ट्रो एशियाटिक आहेत असें सु. कु. चतर्जी म्हणतात. नंतर त्यांचें संस्कृतीकरण झालें. हे दोन्ही शब्द- **उंदीर** व **उन्दूर** आर्योद्भव भाषांत रूढ आहेत.]

उन्नाव, उन्नाह पुं. वृद्धि, वाढ. Growth.

[सं. उत्+**नह्**-(णिच्) **उन्नद्ध**; याकाम. **उन्नाव, उन्नाह.**

काय प्रलयांबूचा उन्नाहो । बोधु मानी । ज्ञा. १८·४१३]

उन्ह न. सूर्याचा प्रखर प्रकाश.

[सं. **उष्ण**; प्रा. **उण्ह; उन्हून, उनून, उन्हवणी (उष्ण+पानीयम्)** उन्हातान्हा (सं. उष्ण **तृष्णा**; प्रा. **उण्हतण्हा.**)]

उन्हाळा पुं. उष्णकाल, ग्रीष्मऋतु. Summer.

[सं. **उष्णकाल**; अप. **उन्हाल** (पुं.) **उन्हाळी** (ऊन पाण्याचा झरा.)]

उप उप. खालीं, कमी, उणा, वर, कडे, प्रति जवळ वगैरे अर्थद्योतक. A prefix.

[*IE*. Upa; सं. **उप, उपर, उपरि**; *Av*. Upa, upara; *Gr*. uuo; *Lat*. Sub, sus, super, supra; *Teut. Got*. uf; *As*. uf; *OHG*. ubir; *As*. yfel, up; *OIr*. fo; *Gall*. Vo.]

हा संस्कृत उपसर्ग आहे. ह्याचे जवळ, अधिक, दुय्यम, आरंभ, शेवट, विकार, समूह इत्यादि अर्थ आहेत. ह्याचे कांहीं तत्सम शब्द मराठींत रूढ झाले आहेत. उदा.

-उपकरण साधन, दुय्यम साधन. An apparatus. (< **उप+कृ.**)

-उपकारक उपकारी. Obliging.

-उपक्रम आरंभ. Beginning. (**उप+क्रम्**)

-अपघात दुर्दैव, आघात. (**अप+घात्, हन्-घात.**) An accident.

-उपचार उपाय. Remedy. (**उप+चर् १ गतौ**)

-उपजीवी-वर जिवंत राहाणारा. Parasite. (**उप+जीव**).

-उपतिष्ठ(णें) अक्रि. हजर राहणें. To be present.

[सं. **उप+स्था.** (तिष्ठ्)]

-उपदेश बोध. Advice. (< **उप+दिश्**).

-उपद्रव त्रास. Nuisance, trouble. (< **उप+द्रु ९ हिंसायाम्**)

-उपद्रष्टा उपदेश करणारा. A sage, a seer. (< **उप+दृश्**)

-उपद्व्याप त्रास, संकट. Mischief, calamity. (**उपत्-(उत्?) व्याप**)

–उपनयन मंत्रोपदेशाचा संस्कार, जवळ नेणें. Thread ceremony. (< उप + नी उपदेशासाठीं जवळ नेणें.)

–उपनांव आडनांव. Surname. (< उप + नामन्)

उपनिषद् वेदान्तावरील पुस्तक. Upanishad. [उप = निषद्. (मंत्रोपदेशासाठीं जवळ बसून लिहिलेलें.)]

–उपन्यास प्रतिपादन, आरंभ, मांडणी. Exposition. (उप + नी + आस्)

–उपपति जार, दुसरा पति. A paramour. (< उप + पति √ पत्)

–उपपत्ति कार्यकारणभाव, स्पष्टीकरण. Demonstrated conclusion. (< उप + पत्ति √ पद्)

–उपपद गौणपद. An auxiliary word. (उप + पद-(शब्द))

–उपपुराण अंगभूत पुराण. A minor puran.

–उपभुक्त उपभोगलेले. Enjoyed, used. (उप + भुज्)

–उपमाता दाई. A wet-nurse. (उप + मातृ)

–उपरत पराङ्मुख, परावृत्त. Discontinued, turned away from. (उप + रत (निष्ठा √ रम्))

–उपरोध विरोध, त्रास, छद्मी भाषण. Sarcasm. (< उप + रुध् ७ रोधने)

–उपलब्धि प्राप्ति. Gain. (< उप + लभ्)

–उपलक्षण चिन्ह. Sign. (उप + लक्षण)

–उपवर विवाहाला योग्य (वधू). Of marriageable age (a girl).

–उपवास उपोषण. A fast. (उप + वास)

–उपवेद दुय्यम वेद. A secondary Veda.

–उपशब्द प्रतिशब्द. Synonym.

–उपशम शांति, उपशमन Mitigation. (उप + शम्)

–उपशाखा लहान शाखा. A secondary branch.

–उपश्रुति सांगोवांगी. Hearsay.

–उपसर्ग धातूच्या मागें लागणारा शब्द. A prefix.

–उपसंहार शेवट, नाश. Summing up.

–उपसागर लहान समुद्र. A bay. (< उप + सागर < सगर = एक राजा)

–उपसूचना सुचविलेला फेरफार. Amendment. (< उप + √ सूच्)

–उपस्थ जननेंद्रिय. Organ of generation. (< उप + स्था)

–उपस्थान उठणें, वर येणें. Arising. (< उप + स्था + न)

–उपस्थित हजर, उद्भवलेला. Approached, arrived. (< उप + स्थित (निष्ठा) √ स्था)

–उपहास चेष्टा, थट्टा, टर. Ridicule. (< उप + हास √ हस्)

–उपहित जवळ ठेवलेलें. Affected by, placed near. (< उप + हित (निष्ठा) √ धा ३ स्थापने)

–उपाख्यान A tale, a subsidiary story. उप + आख्यान (√ ख्या २ कथने)

–उपांग गौण अंग. A minor division. (उप + अंग √ अञ्ज्)

–उपान्त्य शेवटच्या जवळचा. Penultimate. (< उप + अन्त्य.)

–उपादान स्वीकार. Acceptance. (< उप + आ + दा)

–उपाधि, उपाध त्रास, पीडा. Trouble, predicament. (उप + आधि, + धी)

–उपाध्यक्ष अध्यक्षाचा मदतनीस. Vice-president. (उप + अधि + अक्षिन्)

–उपाध्याय भटजी. A priest. (< उप + आ + ध्यै; उप + अधि + इ.)

–उपाय इलाज. Remedy. (< उप + √ इ)

–उपार्जन मिळविणें. Earning. (< अप + अर्ज् १ प्राप्तौ)

–उपासना भक्ति, सेवा, पूजा. Worship. (< उप + आसना √ आस्)

–उपाहार फराळ. A light refreshment. (उप + आहार < आ + हृ)

उपख(णें) अक्रि. नाश पावणें, वाया जाणें. To waste.

[सं. **उप + क्षि ५ क्षये**; याकाम. **उपेख** (नरुस्व ४१).]

उपखा उणीव. Want, deficiency.

[सं. **उपेक्षा √ ईक्ष्** ; **=श्रम, =ऱ्हास, =सहवास** (**उप + क्षि**).]

उपखर्च पुं. किरकोळ खर्च. Minor expense.

[सं. **उप.**; फा. **खर्च.**; < **अर. हर्ज.** दोन भिन्न भाषांतील शब्दांचा समास.]

उपज(णें) अक्रि. उत्पन्न होणें, जन्मणें. To spring from, to be born.

[सं. **उत् + पद् ४ उत्पत्तौ**; प्रा. **उपज्ज**; प्राकृतमध्यें **सविकरण** धातु उतरला. तेथून तो तसाच मराठींत आला. गु. **उपजवूँ**; सिं. **उपजणु** (उत्पन्न होणें); हिं. **उपजना** (मोठें होणें); का. **वोपद्**; सिंह. **उपद्** (**उत्पन्न होणें**), **उपदिनवा** उत्पन्न होणें; वाढणें.]

उपट(णें) सक्रि. जोरानें मुळांसकट काढणें, एकदम वर होणें. To pluck up.

[सं. **उत् + पत् १ पतने**; **उत् + पट्**; प्रा. **उप्पट**, **उप्पड**; गु. **उपडवॅं**; सिं. **उपटणु** (**काढणें, उघडणें**); हिं. **उपटना** (कांठावरून वाहणें, पडणें, नाश पावणें. **उपट** = रेलचेल) (सं. **उत्पत्**, प्रा. **उप्पड**); उपटणी, उपटा, उपट्या.]

–उपटसूळ वि. (**उपट शूल**) विनाकारण लुब्राडणारा, एकदम मोठेपणा प्राप्त झालेला. An upstart.

उपड(णें) उक्रि. उपटणें, उपटून काढणें, उडणें, वर येणें, उद्भवणें, (झाड किंवा खिळा) पडणें. To pluck up or out; to come up.

[सं. **उत् + पत्**; प्रा. **उप्पड**; सं. **पत्** व प्रा. **पड**. ह्यांचा संकर होऊन शब्द सिद्ध झाला.]

–उपडा पालथा. Upside down. (**उपर्यस्त**)

–उपडथवी भोंवरा. A whirl-pool or whirl-wind.

^{1}**उपण(णें), उपनणें** उक्रि. विकावयास काढणें. To exhibit for sale.

[सं. **उत् + पण् १ व्यवहारे**; प्रा. **उप्पण.**]

^{2}**उपण(णें)** अक्रि. वाऱ्यावर धरणें. To winnow.

[सं. **उत् + पवन**; प्रा. **उप्पण**; गु. **उपणवूँ**; सिं. **उपणनु**; (नाधा.) **√ पू १ शुद्धौ**; **उपणा** (= कच्चा न शिजलेला. (भाताचा उपणा वाढला.)]

कणू सांडौनि उपाणिला । कोंडा जैसा ॥ ज्ञा. ९·३२९

^{3}**उपण(णें)** अक्रि. उत्पन्न होणें. To be produced.

[सं. **उत्पन्न**; प्रा. **उप्पण्ण.** (नाधा.) याकाम. **उपनणें = निर्माण होणें.** (ज्ञा. २-३२२)]

उपणें, उंपणें सक्रि. पेरणें. To sow.

[सं. **वप् १ बीजसंताने**; याकाम. **उपणें.**]

उपंढर वि. पांढरा, उघडें. White, bare.
पुं. ढोंग, दंभ. A pretext.

[सं. **उप + पंडुर.**]

उपम(णें), उपणि(णें) सक्रि. साम्य दाखविणें. उपमा देणें.

[सं. **उपमा** (नाधा.) **√ उप + मा ९ माने**; **उपमा** (**साम्य, दृष्टान्त.**), (**उपमान** = ज्याच्याशीं तुलना करावयाचें तें), **उपमेय** = ज्याची तुलना करावयाचें तें), **उपमीति** (साम्य).]

उपयोग(णें) सक्रि. वापरणें. To use.

[सं. **उपयोग** (धाना.); **√ उप + युज्.**]

उपर पु. वर्चस्व, मोठेपण, श्रेष्ठत्व. Superiority.

[सं. **उपरि**; प्रा. **उप्परि** (हे ४·३३४); झेंद. **उपैरि, उपर**; ग्रीक. **हुपर**; लॅ. **सुपर**; जर्म. **ओबर**; इं. **ओव्हर**; हिं. गु. **उपरं**; याकाम. **उपरु** (उगी. अमृ.).]

उपराउपरी तांतडीनें. In urgency. (< **उपरि-उपरि=वरवर**)

उपरणें न. पांघरावयाचें धोतर. An upper garment.

[सं. **उप + आवरणम्**; **√ आ + वृ**; " **उपाभरणम् उपाहरण** " भा. अ. १८३२; हिं. **उपरना.**]

उपरांत, उप्रांत, उपरांतिक अ. नंतर, शिवाय, आणखी. Besides, moreover.

[सं. **उपरि + अन्त**; गु. **उपरांत**; हिं. **उप्रांत**; पेकाम. **उप्रांत.**]

उपराळ(णें) अक्रि. भरून वाहणें. To run over.

[सं. **उप + अल् १ पर्याप्तौ, पूरणे.**]

उपराळा पुं. साहाय्य, मदत, मोबदला. Backing, helping, exchange. **जनावराच्या पाठी-**

वरील दोहोंकडील सारखें ओझें. Equal weight thrown over the back of a beast.

[सं. (?); हिं. **उप्राल**--ह्या शब्दापासूनच मराठी शब्द सिद्ध झाला. पेशवेकालीन कागदपत्रांत '**उपराळा = साहाय्य**' हा शब्द फार आढळतो.]

उपरि अ. वर. Over.

[सं. **उपरि. उपर पहा.**]

उपरी वि. परकी, बिगरहक्काचा, उपटसुंभ, 'श्रेष्ठत्व' अशा अर्थांपासून तर हा अर्थभ्रंश नसेल ना ? A sojourner, a foreigner.

[सं. **उपरि** (?); सिं. **ओप्पिरो**; गु. **उपरी**; हिं. **उपर**; वरील शब्द 'हुपरी' असाहि उच्चारिला जातो. ह्याची वरील व्युत्पत्ति पटत नाहीं. दुसरी कांहीं तरी असली पाहिजे. द्राविडी शब्द नसावा. कारण इतर आर्यभाषांत तो आढळतो. जुन्या वाङ्मयांत **उपरु** असा शब्द आहे.]

उपल-ळ पुं. दगड. A stone.

[सं. **उत्पल**; प्रा. **उप्पल > उपळ**; (हे २·७७).]

उपलभ(णें) सक्रि. प्राप्त होणें. To secure.

[सं. **उप + लब्ध ; प्रा. उपलब्भ, उपलद्ध** (नाथा.). याकाम. **उपलबला** (ज्ञा.)]

उपलवण-णी न. स्त्री. स्वादिष्ट, रुचकर पदार्थ (तिखटामिठाचा). A sauce.

[सं. **उप + लवण** अशी व्युत्पत्ति देण्याचा मोह होतो. परंतु ह्या व्युत्पत्तीनें समाधान होत नाहीं. कान. **उप्पु** = मीठ ; सं. **लवणम्** = मीठ ; एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील हे दोन शब्द एकत्र आणून हा सामासिक शब्द झाला.]

म्हणोनि इया वाहणी । केली म्यां उपलवणी ॥ ज्ञा. १३·५२.

उँपलव(णें) उक्रि. तोडणें, छेदणें. To cut, to chop off.

[सं. **उप + लू ९ छेदने.**]

सेवते पना बाहीरीं । न नीगतांची परी । पांती साहा सवारी । उपविली ॥ अमृ. ७०९.

उँपलव(णें) क्रि. विस्तार करणें, उगवणें, फुलणें. To bloom, to expand.

[सं. **उप + ली ४ श्लेषणे. (णिच्) लापयति**; याकाम. **उपलव.**]

साहित्याचिंए सेजें । बोलांचा रंगु उपलविजे ॥ जैसी चंद्रमयाची घडी उपलविली ॥ शिशु २४; ज्ञा. ११-२२३

उँपलव(णें) व्यक्त करणें, दिसणें, प्राप्त होणें. To manifest.

[३ सं. **उप + लभ् १ प्राप्तौ.**]

आतां आसुरी सृष्टि । तेथिची उपलउं गोठी । अवधानाची दिठी । दे पा निकी ॥ ज्ञा. १६-२७३.

उपला(णी) वि. खोगीरसाज न घातलेला घोडा. (A horse) without a saddle.

[सं. **उत् + पर्याण, पल्ययन** ; प्रा. **उप्पल्लाण** ; फा. **पलाण = घोड्याचा साज, खोगीर** ; **पलाण(न)** = आघाडीचें घोडें, घोडदळ. याकाम. **उपलाणें** (धपू ४६, शि. ५११)]

उपढव(णें) अक्रि. जागृत असणें-होणें. To be watchful.

[सं. **उत् + प्रबुध् १ बोधने** ; कान. **उप्पवडिसु = जागे होणें** ; परंतु आम्हांस वाटतें कीं ह्याचा संबंध पहुडणें = निजणें ह्या धातूशीं असावा. उपढवणें-जागें होणें. ही त्याच्याविरुद्ध क्रिया. सं. **प्रसुप्त** ; प्रा. **पहुत्त- < पहुट**]

स्वप्नीचें राज्य कां मरण । नव्हे हर्षशोकासी कारण ।
उपवढलिया जाण । जिया परी ॥ ज्ञा. १५-२९४

उपस(णें) सक्रि. बाहेर काढणें. To take out.

[सं. **उत्सृप्, उत्सर्प्, उस्सप्प** (उसप-वर्णव्यत्यास).]

उपसाह(णें) उक्रि. सोसणें, सहन करणें. To suffer.

[सं. **उप + सह् १ सहने**]

आतां म्हणे तयाचें वचन उपसाहों आम्हीं । अमृ. ७-२६९.

उपळ(णें), उपुळ(णें) अक्रि. वर उचलून येणें, पाण्याची धार वर येणें. To rush out, to gush forth.

[सं. **उत् + प्लु १ गतौ** ; प्रा. **उप्पल.** (हे. २·७७). **उपळ** (पाझर), **उपळण, उपळी, उपळवत, उपळवणी, उपळसरी.**]

उपाइ(णें) सक्रि. आरंभ करणें, उत्पादणें. To begin, to produce.

[सं. **उत् + पद् (णिच्) १० गतौ ; उत्पादय > उपाअइ** (उपाइ); **उप + इ २ गतौ ; उपायितम्, उपाइलें.**]

" तेंचि आमुचें देणें उपाइलें. ज्ञा. १०-१३२. "

उँपाड(णें) क्रि. वर काढणें, निघणें. To pull up.

[सं. **उत् + पाटय**; प्रा. **उप्पाड** ; सं. **उत् + पादय** ; प्रा. **उप्पाड** ; गु. **उपाडवूँ.**]

उँपाड(णें) सक्रि. उपडणें, मुळासह बाहेर काढणें. To root out.

[सं. १ उत्पाद, (नाधा.); **उत्+पाटय १० वेष्टने उपाडा** (१ खप, उठाव, २ उच्छेद, पराभव)]

उपास पुं. निरशन, कांहीं न खाणें. Fast.

[सं. **उपवास < उप + वस्**; हिं. **उपास**; सिंह. **उवसु**; यज्ञकर्मांच्या वेळीं खाण्यापिण्यासंबंधीं नियम पाळून व्रतस्थ राहावें लागतें, यज्ञस्थानाच्या जवळ बसावें लागतें, म्हणून उपवास हा शब्द रूढ झाला व पुढें लक्षणेनें किंवा अर्थांतर होऊन **निरशन** असा त्याचा अर्थ झाला. पारंपारिक व्युत्पत्ति '**उपास**' ह्या शब्दाची हीच. उपाशी, उपासपोट, उपासतापास (< उपवास-तपस्) ह्या शब्दानें पारंपारिक व्युत्पत्तीला आधार मिळतो. २ सं. **उप + अश् ९ भोजने**. जेवणाच्या पदार्थांऐवजीं इतर वस्तु खाणें. ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे. '**उपहार**' ह्या शब्दाच्या उपयोगानें व अर्थानें ह्या व्युत्पत्तीस आधार मिळतो.]

उपेणि, उपेणें स्त्री. न. जवळ जाण्याची क्रिया, वस्ती, **मुक्काम**. Break of journey, a halt.

[सं. **उप + इ २ गतौ**. जवळ जाणें, वस्ती,-मुक्काम अशा दोन्ही अर्थांनीं महानुभावी वाङ्मयांत हा शब्द रूढ आहे. याक्राम. **उपेणें** (उगी ७०२; ज्ञा. १८·१७४७); मराठींत **पेणें**-असा जो शब्द आहे तोहि ह्याशीं संबद्ध आहे.]

श्रीकृष्णकीर्तीचें होईल आइकवणें। म्हणौनि कालिंदिया केलें उपेणें ॥ नरुस्व ११३

उपेक्ष(णें) सक्रि. उपेक्षा करणें, दुर्लक्ष करणें. To ignore.
[सं. **उप + ईक्ष् १ दर्शने**.]

-उपोद्घात आरंभ. Preface. (< + **उत् + हन्** (घात.)

उप्पिट, उप्पिट्टु न. तिखटमीठ फोडणी देऊन केलेला सांजा. A dish prepared of wheat-flour and spices.
[कान. **उप्पु (= मीठ), + इट्टु (= पीठ)**]

उफण(णें) उक्रि. पाखडणें. To winnow.
[सं. **उत् + पवन √पू = वारा देणें**.]

उफण(णें), उफाण(णें) अक्रि. उतणें, वर येणें, एकदम वाढणें, सुजणें. To increase, to swell, to rise.

[सं. **उत् + फण् १ गतौ**; प्रा. **उप्पण** < उत्पन्न (?); गु. **उफान, उफानो**; हिं. **उफानना, उफान = कढ**]

-उफाण उफाणा ऊत, कढ. Ebullition.

उफराट(णें) अक्रि. उफराटें होणें, उलट बाजूस जाणें. To be up-side down, to proceed in the opposite direction.

[सं. **उत् + परि + अट् १ गतौ**; प्रा. **उप्पराट्ट, उफराटें** (उलट), **उफराटसुफराट** (उलटसुलट).]

उफळ(णें) अक्रि. जोरानें उधळून वर उडणें, फुटणें, उमलणें, हृदय उघडणें. To rise up, to bloom, to open.

[सं. **उत् + फल् १ गतौ**; प्रा. **उप्फल**; सं. **उत्फुल्ल**; प्रा. **उप्फल्ले**. देप्रा. **उप्फलइ कथयति** (४९·५)]

सिंह उफाळिती हुंकारें ॥ आदिपर्व अ. ३१-६७.
जो अंबरीं उफळितां खुर लागलाहे ॥ न. द. ३२

उफळ(णें) अक्रि. एकदम वर येणें. वाढ होणें. To rise suddenly, to grow.

[सं. **उत् + स्फल् ६ संचलने**; किंवा **फल् १ गतौ**. **उफाळ(णें) < उत् + स्फाल् १ गतौ**.]

उफाड(णें) अक्रि. जोरानें विकसणें, एकदम वाढणें. To form rapidly, to wax, to increase.

[सं. **उत् + स्फुट् १ विकसने किंवा स्फट् १ चलने**. **उफाडा-उफाड्याचा** (लवकर वाढणारा).]

उफाळ(णें) अक्रि. कढणें, फुगणें, चढणें. To rise up in boiling, to swell, to advance (as flame).

[सं. **उत्फलति, उत्फालय**; प्रा. **उप्फालइ** (हे. २·१७४); सिं. **उफिरजणु = वाऱ्यानें फुगणें**; म. **उफाळ = पुरून उरलेलें**, सं. **उत्फाल = उडी, दौड**.]

उब(णें) सक्रि. उष्णता देणें. To incubate.

[सं. **उष्मन्**; प्रा. **उह्म**; कान. **उब्बे = उष्णता** (कानडींत तद्भव झाला.)]

उब (उष्णता.), **उबग(णें), उबट(णें)** Warmth.

उबट (**उष्मिष्टम्**) उबदार. Warm.

[**उबव(णें), उबविणें-उबावणें. उबा** (अमृत ५६० कां गजबंजिला उबा ॥ **उबारा** (ज्ञा. ६·२२१), **उंबळ(णें) उमलें** (लाह्यासाठीं दाणे उन्ह वाफेंत ठेवतात तें.)].

उबार(णें) सक्रि. उबविणें. To incubate.
[सं. उष्मन्; कान. उब्बे.]

-उबारा आधिक्य. Excess. (कान. **उब्बर = आधिक्य.**)

-उबारा उष्णता. Heat.
[सं. उष्मतर-उब्बअर-उबार-राज. भा. अ. १८३३]

उबार पुं. स्त्रियांच्या चोळीस खाकेंत लावावयाचा तुकडा. A patch to the bodice in the armpit.
[सं. उत्+बाहु ; प्रा. उब्भाअ.]

उबाळा पुं. कढ, ऊत. Ebullition.

उबग(णें) उक्रि. उष्णता देणें, गुदमरणें, कंटाळणें. To warm, to be suffocated, to be worried.
[सं. उष्मन् (?) हा अर्थ वरील धातूमधून निष्पन्न झाला का दुसरा धातु आहे ? कानडीमध्यें उब्बे = उष्णता असा एक शब्द आहे ; परंतु तो 'उष्मन्' शब्दाचाच तद्भव शब्द दिसतो. शिवाय 'उबणें' असें मूळ असल्यामुळें 'ग' ची उपपत्ति काय ? सं. उत्+वंघ् १ कैतवे हा मूळ धातु आहे काय ?]

उंबड(णें) अक्रि. उपडें होणें, विरमणें, नाकारणें. To be topsy-turvy, to pause, to decline, to destroy.
[सं. उत्+पत् १ पतने. उबडा = उलथा.] जेणें परत्रा केलें उबडें ॥ (ज्ञा. १६-४५२)

उंबड(णें) अक्रि. उत्पन्न होणें. To arise.
[सं. उद्भूत; प्रा. उब्भूड.] कीं उबडला देखौनि सोच्यु। काळवंडैला ॥ ऋ. ४०७

उबळ स्त्री. खोकल्याची ढास. An attack of continuous and sudden coughiug.
[कान. उब्बळ < उब्बळिसु=ओकारी येणें.]

उंभ(णें) सक्रि. वर करणें. To raise.
[म. उभा < सं. उत्+बाहु; प्रा. उब्बाहु; > उभा. 'ऊर्ध्व' पासून उब्भ अशी प्रक्रिया प्राकृतमध्यें सांपडते परंतु ती ग्राह्य नाहीं. 'उब्व' रूपाच्या मुळाशीं उद्बाहु असा शब्द असावा.] किं वाढती करिती उल्हासें। उभिति गुढिया ॥ ज्ञा. ९-४०७

उंभ(णें) सक्रि. (हात) जोडणें. To fold, to unite.
[सं. उभ् ६ पूरणे.] उभूनि करतलें। पडिघाये कपोले। पायांचे सिराले। मांडू लागे ॥ ज्ञा. १४-१८४

उभड(णें) अक्रि. चांगल्या तऱ्हेनें वाढणें, उत्पन्न होणें. To grow, to rise from.
[सं. उद्भट् १ भृतौ ; प्रा. उब्भड; याकाम. उभड-डा (उभंड) = उमाळा, उसळणारा जोर, प्रवाह. (ज्ञा. १६-१३८)]
गळाले आवर्त उभड वळसे : उकलिया उलाल धारसे ॥ नरुस्व ७१८.

उभय सर्व. दोघे. Both.
[*IE* (M)bhi ; सं. उभौ ; *Av.* uwa ; *Got.* bai ; सं. अभित ; *Av.* aiwito.]

उभला पुं. उंबरठा. A threshold.
[सं. उध्वल (?) (शको.) उंबरा पहा.]
वाणसियेचें उभलें। कोण न रिगे ॥ ज्ञा. १३-७००.

उभा वि. सरळ, खडा, ताठ. Erect, standing.
[सं. ऊर्ध्वम् ; प्रा. उब्भ, उद्ध, उद्द ; गु. उभुं ; बं. उबु ; सिं. उभो ; सिंह. उडु. हेमचंद्र वोर्ध्वे ८-२.५९ ह्या सूत्रानें ही व्युत्पत्ति देतो, व प्राकृत व्याकरणकारहि देतात; परंतु ही वर्णप्रक्रियेच्या नियमांशीं विसंगत दिसते. त्याच्या मुळाशीं सं. उद्बाहु ; प्रा. उब्भाअ ; असा शब्द असावा. उब्बाहु > उभा. ह्यापासून साधित शब्द; **उभवणें** (उभे करणें), **उभवण**, **उभवणी**, **उभवट**, **उभारणी**, **उभारणें-उभारण-उभारा**, **उभाड**, **उभार** उंची, गर्व, ताठा (लक्षणा). "उभा + ड अथवा र", **उभारा-री** इच्छा, प्रवृत्ति इत्यादि शब्द सिद्ध होतात. ह्यांची व्युत्पत्ति उत् + भृ १ भरणे अशी शको-कार देतात ती विचार करण्यासारखी आहे. **उभें**-सर्व, आंखें (लक्षणेनें), **उभेउभें-उभ्यांउभ्यां** (लगबगीनें), **उभेणें** (उभें राहणें.)]

उभारा पुं. (सुवासाचें) दरवळणें, पसरणें. Fragrance.
[सं. उद्भरति; प्रा. उब्भरइ; गु. उभार = मोठें क्षेत्र आणि वजन कमी.]

उभास(णें) अक्रि. भासमान होणें, दिसणें. To illuminate, to shine, to be observed.
[सं. उत्+भास्. १ प्रकाशने.]
वाधि द्रुमासंनिध जो उभासे ॥ सा. मुद्गला. १६६.

उभळ(णें) अक्रि. नवीन जात्यांत थोडें धान्य दळणें. To grind a little corn with new grinding stone.
[सं. देप्रा. उब्भालणं शूर्पादिनोत्पवनम् (४३·१३); गु. उभेळवूँ (गहूं पाखडणें); उभेळो (सडलेले तांदूळ).]

उभि(णें) उक्रि. उभवणें, रचणें, उभें करणें, उभे राहणें. To raise, to stand.

[म. **उभा** (नाधा.); याकाम. **उभिणें** (नरुस्व ४१७), **उभौनि**=**उभें करून** (नरुस्व ७१०), **उभयांची**=**उभें असतांना** (नरुस्व ३१०).]

उमग(णें) सक्रि. समजणें, ध्यानांत येणें, बातमी बाहेर पडणें, शोधणें, हुडकून काढणें. To know, to understand, to find out.

[सं. **उन्मग्न**; प्रा. **उम्मग्ग**. √**उत्**+**मस्ज्**.]

उमच(णें) उक्रि. फसविणें, उसने फेडणें. To deceive, to return.

[सं. **उत्**+**मच् १ पूजने शाठ्ये च.**]

हारि उमचावे या । जुंवारु ये डाया । कां वैरा वापिकेया । पुतृ जचे ॥ ज्ञा. १३-५४०.

–उमज(णें) सक्रि. समजणें, पूर्णपणें ध्यानांत येणें. To understand.

[सं. **उन्मस्ज्**; प्रा. **उम्मज्ज**; दोन्ही उमग व उमज धातु एकाच अर्थाचे; परंतु एक सं. धातूच्या निष्ठेपासून व दुसरा प्रत्यक्ष धातूपासून सिद्ध होतो. दुसरा हा अधिक प्राचीन. तो अमृतानुभवांत वापरला आहे.] जयां दोघांमाजीं येखादें : विपायें उमजले होय निदें ॥ अमृ. १·१४·४

उमट(णें), **उमंट(णें)** अक्रि. बाहेर येणें, वर येणें, दिसणें, ठसा उठणें, (आवाज, ठसा) स्पष्ट होणें. To come out, to rise up, to stamp.

[सं. **उत्**+**मथ् १ विलोडने**, **उन्मृष्ट**; प्रा. **उम्मट**; गु. **उमटवूँ**, **उमडवूँ**, ‘**उन्मृष्ट**’पासून व्युत्पादणें अधिक प्रशस्य. **उमठ(णें)** हें त्याच अर्थाचें रूप आहे] जिये अनादि भूमिके नीटे । उमठे जेवी ॥ ज्ञा.

उद्मळ(णें) अक्रि. उमळणें. To feel uneasy (by internal derangement).

[सं. **उत्**+**म्लै १ हर्षक्षये.**]

उमड पुं. पाण्याचा किंवा रक्ताचा फवारा. A spray, a gush of water or blood.

उमाड स्त्री. समुद्राचें उचंबळणें. Surging of sea.

[सं. **उन्मस्ज्**, **उन्मग्न** (?); देप्रा. **उम्मण्डं हठ उद्वृत्तं च** (५२·४); गु. **उमाड**, **उमाडो** (कोलित); हिं. **उमंडना** (फुगणें, उतूं जाणें).]

उमदा वि. थोर (मनाचा–कुळाचा.) Noble, large-minded.

[फा. **उम्दा. उमैद–उमीत्**; पेकाम. **उम्दा** (रा. ८-२१२).]

–उम्दगी स्त्री. मोठेपणा, मातब्बरी. (‘गी’–भा. प्र.) Greatness, nobility.

[फा. **उम्दगी** < **उम्दा**+**गी**]

उमर स्त्री. वय, हयात, आयुष्य. Age.

[अर. **उम्र**; अकाम. **उम्बर.**]

उमराह–उमराव पुं. सरदार. A nobleman.

[अर. **अमीर**–अनेकवचन > **उमरा** > **उमराह. अमीरउमराव** (सरदारमंडळी) असा जोडीनें शब्द वापरतात. पहिला शब्द एकवचन, दुसरा त्याचेंच अनेकवचन.]

उमल(णें) अक्रि. पाकळया पसरणें, प्रकट होणें, विकासणें. To bloom, to develop.

[सं. **उत्**+**मील्**; (निष्ठा)=**उन्मीलित**; प्रा. **उम्मील्ल** (हे. ४-३५३); गु. **उमलवूँ**=विण्याच्या बेतांत असणें.]

^{1}**उमस(णें)** उक्रि. गडबडून जाणें. To be upset.

[सं. **उत्**+**मस् ४ परिमाणे.** याकाम. **उमसणें** (अमृ).]

^{2}**उमस(णें)** सक्रि. जाणणें, प्रकट करणें, सांगणें. To know, to explain, to lay open.

[सं. **उत्** (**अव**)+**मृश् ६ आमर्शने**]

जीवू जावो परि नुमसे । ठेविला ठावो ॥ ज्ञा. १३-२०२

उमळ(णें) अक्रि. धुणें, खळबळणें. To wash, to rinse.

[सं. **उत्**+**मल** (नाधा.) उमळून (पडणें); उत्+मूल (नाधा.) मुळासकट उपटून पडणें. उमळ, उमाळा, उमळशीक (उत्कंठा), उमळी (स्वतंत्र), उमाळा=मळमळ, (**उर्मि =आवेग** हा जुना शब्द उद्धवगीतेंत वापरला आहे.)]

उमाठा पुं. उंच जागा, डोंगराचें टोंक. A hillock.

[सं. **उत्**+**मस्तिष्क**; प्रा. **उम्मत्थ**, **उम्मत्थिअ**, > **उम्माथा** > **उमाठा.**]

^{1}**उमाण(णें)** उक्रि. मोजणें. To measure.

[सं. **उत्**+**मान** (नाधा.); याकाम. **उमाणणें** (अमृ. २७५ पू. १०)]

^{2}**उमाण(णें)** सक्रि. कमी लेखणें. To disregard.

[सं. **अव**+**मान**√**मन् ४ मनने**, **उमणें** (=वजन, उद्धवगीता).

उमाणा (**उह्माणा √ भण्**) ॥ आणि जेयां जें दे किरीटी । तेयातें उमाणीं तेया साठीं । मग कुबोलें कां लोटी । अवज्ञेचा. ज्ञा. १७–३०४.]

उमाप वि. अ. पुष्कळ, खूब, पुरें. In abundance.
[सं. **उत्+√मा**; प्रा. **उम्मा**. याकाम. **उपमा**; अकाम. ग्रामीण. **उमाप, उमोप**=पुष्कळ, पुरें.]
डाहाणिजा जाती उमाप । ऊर्ध्वाहि उजूं ॥ ज्ञा. १५-१४४.

उमास पुं. शिसारी, आंबणें. Nausea.
[सं. **उन्मथ्यते**; देप्रा. **उम्मच्छिअ रुचितमाकुलंच** (५७-७); गु. **उमस** (**स्त्री.**)=वीट, वेशुद्धि]

उमेठ(णें) सक्रि. एकत्र करणें, भेटणें, जमणें. To gather, to collect.
[सं. **उत्+मेथ् १ संघाते.**]
उमेठेयां देवां निचनवा । आठाइतेआं देवां वंवाळुदिवा ॥ शिशु. १५३.

उमेठा पुं. समुदाय, मेळावा. Collection, assembly.
[सं. **उत्+मेथ् १ संघाते.**]

उमेद स्त्री. खात्री, भरंवसा, आकांक्षा, तारुण्य. Hope, faith, youth.
[फा. **उमैद–उमीद्=आशा**; पेकाम. **उमेद** (खरे १-३४)]

उमेद्वार पुं. आशा-अपेक्षा बाळगणारा. A candidate.

उमोप वि. अतिशय. उमाप पहा.

उंबर पुं. वृक्षविशेष व त्याचें फल. A kind of a tree.
[वैसं. **उदुंबर**; सं. **उडुंबर**; प्रा. **उम्बर, उदमर** (हस्तलिखित); देप्रा. **उम्मरा गृहदेहली** (४०-७, ३८-८); गु. **उमरो**=उंमरा, **उमडों**=उंबराचें झाड; हिं. **ऊमरि** (**स्त्री.**)=उंबराचें झाड; बं. **डुमुर**; ओ. **डुंबर**; सिंह. **दिंबुल**. हा शब्द वैदिक भाषेंत असला तरी तेथें सुद्धां तो कोणत्या तरी तत्कालीन देशी शब्दाचें संस्कृतीकरण असा भासतो. हा शब्द ऑस्ट्रिक आहे असें त्याच्या उच्चारावरून वाटतें. घराच्या दाराखालीं मध्यें उंबराच्या लाकडाचा उंबरा करीत असें दिसतें. **उम्बरठा** (म. **उंबरा+ठा**–मराठी प्रत्यय)]

उर, ऊर न. छाती, वक्ष. The breast.
[सं. **उरस्**; **√ऋ–गतौ**; प्रा. **उर** (पुं. न.); ह्या नामापासून कांहीं नामधातु तयार झाले आहेत. **–उरप(णें) उरव(णें), उरम(णें), उरंबणें, उरी भरणें, उरस्फोड, उरफोड** (अतिशय श्रम < उरस्+स्फुट्), **उरमोडा, उरमोडी** (नदीनाम, ऊर मोडणारी). **उरशी** (उर पुढें आलेली–वयांत आलेली मुलगी); **उरःस्थल, उराउरी, उराड** (उरस्+अस्थिन्) उरोमरो.]

उर(णें) अक्रि. बाकी रहाणें, शिल्लक रहाणें. To remain.
[सं. **उर्वरित** (नाधा.); देप्रा. **उव्वरिअ**. (हे. ४-३७९); प्रा. **उव्वर**. उर्वरित हें रूप नंतरचें संस्कृतीकरण दिसतें. **उरी** (बाकी), **उरवई** (शिल्लक), **उरवणें** (बाकी ठेवणें)]
" एरि चिखलंचि **उरे** ॥ " ज्ञा. ९-५७.

उरक(णें) सक्रि. संपविणें, तडीस नेणें, आटपणें. To finish, to complete.
[सं. **उत्+रख् १ गतौ**; प्रा. **उरख–उरक–उरका** (आवर), उरकाउरक.]

उरग–उरंग–उरंगम पुं. साप, नाग, सरपटणारा. A serpent.
[सं. **उरस्+√गम्. उरसा गच्छति–सः**]

उरंग(णें) अक्रि. रंग उडणें, विटणें. To fade (as a colour).
[सं. **उत्+रंग. √रञ्ज्. उरंग–गु** (=रंग उडला आहे असा, फिकट.)]

उरगुडें–ढें न. खेड्यांतील देऊळ. A rural temple.
[कान. **उरु=गांव. <पुरस्**; **गुडि=देऊळ.**]
जेणें कैलासदुर्गा पाडिलें सत्यलोकीं ठाणें घातलें । सोनकानें उरगुढें घेतलें । वैकुंठिचें । शिशु. १६०

उरूबरू अ. समक्ष, प्रत्यक्ष. Personally, in presence.
[फा. **रू** (**=मुख**)**–ब–रू.** = तोंडासमोर, समक्ष. ह्याचेंच दुसरें '**रुबरु**' असें रूप रूढ आहे. पेकाम. **उरूबरू** (रा. ३-१२३).]

उरोळी स्त्री. छिद्रें असलेलें एक भांडें. A vessel with holes.
[कान. **उरळी**=वाटोळें भांडें; अकाम. **उरवळी, रवळी**=तांदूळ धुण्याचें भांडें.]

उर्दु न. सैन्य तळ, छावणी. A camp.
[तुर्की. **उर्दू**=सैन्य. **उर्दु**–बेगम–बादशहाच्या जनानखान्यावरील रक्षक स्त्री.]

उर्दू स्त्री. एक भाषा.
[तुर्की. **उर्दू=तातंरखानच्या सैन्याची छावणी**, त्यावरून सामान्य अर्थानें **छावणी**. हा शब्द बाबरबरोबर

हिंदुस्थानांत आला. (**उर्दु–इ–मुअल्ला** = पातशहाची छावणी.) छावणीमध्यें हिंदी, इराणी व तुर्की अशीं सैन्यें असत व ते आपआपली भाषा वापरीत. परंतु छावणींतील त्यांच्या एकत्र राहाण्यानें मिश्र अशी एक भाषा बनली. त्या भाषेस **सैन्याची भाषा = उर्दुभाषा** असें नांव पडलें. नंतर त्या भाषेस ‘ उर्दू ’ असें नांव प्राप्त झालें.]

उर्मी, ऊर्मी स्त्री. लाट, वर येणें, उमाळा, उठाव. A wave, a rising.
[सं. **ऊर्मि. √ ऋ १ गतौ.**]

उर्मट उरमट, मगरूर, माजोर. Arrogant.
[सं. **ऊर्मिमत् (?).** गुर्मी आणि उर्मि ह्या दोन्ही शब्दांत संभ्रम होऊन हा शब्द बनला.]

उल(णें) अक्रि. फुटणें, गर्भाशयाच्या बाहेर पडणें, उकलणें, दुभंगणें. To blossom forth, to come out.
[सं. **उल्ब** (नाधा.) ; देप्रा. **उल्लक,**]

उलगड(णें) सक्रि. मोकळें करणें, सोडविणें. To disentangle.
[सं. **उत् + ग्रंथ्** किंवा **घट्.**]

उलगडा, उलघडा पुं. सोडवणूक, स्पष्टीकरण, फोड. Clarification.

उलाळा, उल्लाळा, उल्हाळा पुं. उडी. Jump.
[सं. **उल्लाल √ उल्लल्** ; गु. **उलाळिओ** = उडी ; हिं. **उलहना** = जोरानें पुढें येणें.]

उलट वि. पुनरुक्त, विरुद्ध. Opposite to, reverse.
[सं. **विपर्यस्त(?), उपर्यस्त** ; प्रा. **उपल्लट्ट, उअल्लट्ट** ; देप्रा. **वल्लट्ट–उल्लुट्ट.** उलथा पालथा (**उपर्यस्त विपर्यस्त**), उलटें पालट हे शब्द संबद्ध दिसतात. हे सर्व **√अस्** (निष्ठा–**अस्त**), प्रा. **उल्लत्थ पल्लत्थ** ह्या शब्दापासून सिद्ध होतात.]

उलटा वि. सरळ नसलेला. Reverse. (देप्रा. **उल्लट.**)

उलटी स्त्री. ओकारी. Vomiting.

उलट(णें) अक्रि. कलंडणें, उलटें होणें. To lean, to change sides.
[सं. **उपर्यस्त, उल्लुठ्** (ब्लोक्); गु. **उलटुं** (उलट बाजू, उलटपक्षीं); म. **उलटी** = ओकारी ; सिं. **उलिटा, उलथा. उलिटी** = ओकणें.]

उलंड(णें) उक्रि. उलथें होणें, सांडणें. To be up-side down.
[सं. **उत् + लड् ६ उत्क्षेपणे.**]

उलथ(णें) सक्रि. (तव्या) वर पालटणें. To throw up-side down (on an iron pan).
[सं. **उपरि + अस्त √अस् ४ क्षेपणे** ; प्रा. **उवरिल्लत्थ, उअल्लत्थ. उत् + स्थल**–ह्या दुसऱ्या व्युत्पत्तींत वर्णविपर्यय मानावा लागतो. **उलथणें** (कलथा), **उलथा** (तोंड वर, पाठ खालीं अशी अवस्था, < सं. **उपर्यस्त**; प्रा. **उपल्लत्थ.**); **उलथापालथा** (सं. **पर्यस्त विपर्यस्त**; प्रा. **उओत्थल्लपत्थल्ल.**)]

उलफा पु. शिधा. Rice, flour and other articles (given in alms.)
[अर. **अलूफा उलूफा** = रोजमुरा, रोजचा शिधा; शिकाम. **उन्फे** (चित्रगुप्त.)]

उलाळ(णें) अक्रि. उड्या मारणें. To dance (out of joy.)
[सं. **उत् + लल् १ विलासे, उल्हास** किंवा **उल्लाल** पासून असावा. अकाम. **उल्हाळ, उल्हाळा.**]

उलाघाल, उलाढाल स्त्री. मोठाले बेत, घालमेल, खटाटोप, खळबळ, धडपड. Disturbance, disorder, struggle, agitation.
[सं. **उत् + घात, √ हन् (?)**; देप्रा. **उल्लेहडा लपटः** (४४·६). परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. दोन धातूंचा मिळून हा धातु असावा.]

उलिसें वि. थोडें, किंचित्. A little.
[सं. **अल्पीयस्** ; प्रा. **उल्लीस**; अकाम. ग्रामीण. **उलिसें.**]

उल्लू वि. छछोर, उनाड, स्वैर, अविचारी. Unsteady, rash, inconsiderate.
[*IE.* Ul; सं. **उलूक, उलुलि, उलूलु**; *Lat.* ulucus; uludara (ullula); *Lit.* ulula; ulbuoti; हिं. **उल्लू**; गु. **उल्लू** = मूर्ख, उपहासविषय; ही **उलूक** पासून व्युत्पत्ति ब्लोकनें दिली आहे. ती स्वाभाविक दिसत नाहीं. शिवाय उलूक हा शब्दहि ऑस्ट्रो एशियाटिक असावासा वाटतो. संस्कृत नाहीं.]

उल्हास(णें) अक्रि. आनंदणें. To be jubilant.
[सं. **उत् + लस् १ क्रीडायाम्** ; **लष् १ कान्तौ.**]

उवाइ(णें) सक्रि. (वर) प्रसन्न होणें, मित्रत्वानें वागणें. To be pleased with, to behave friendly with.
[सं. **उप् + अव् १ प्रीतौ** किंवा **उपाय** ह्यापासून (नाधा.); याकाम. ज्ञानेश्वरींत हा शब्द फार वेळां येतो. **उवाय, उवाव, उवाइ(यि)ला** वगैरे रूपांत वापरतात.]

उवेर, उवेरी स्त्री. अवशेष, बाकी राहिलेला भाग. Remnant.

[सं. **उर्वरित**; देप्रा. **उव्वरिअ अधिकमनीप्सितं निश्चित तापोऽगणितंचेति पञ्चार्थम्** (५४·३). मूळ रूप '**उव्वरिअ**' असें समजून त्यापासून **उर्वरित** असें संस्कृतीकरणानें रूप बनविलें आहे. हें मत चिन्त्य आहे.]

उलळ(णें) अक्रि. उसळणें. To rise up.

[सं. **उल्लोल, उल्ललति, उल्लोडयति.** ह्या संस्कृत धातूचें मूळ रूप √ **उत् + डी** हेंच असलें पाहिजे. पुढें ड् चा ल् झाला. आर्य भाषेच्या प्राथमिक अवस्थेंत उत् + डी हें रूप मूळ असलें पाहिजे व त्यापासून उल्लल, उल्लळ, उल्लाल, उल्लाळ हीं रूपें संस्कृततद्भव म्हणूनच रूढ झालीं. खुद्द संस्कृतमध्यें सुद्धां तद्भव शब्द बनण्याची क्रिया होत होती असें ह्या धातूच्या रूपांवरून म्हणावें लागतें. याकाम. **उलळणें** = उसळणें (नरुस्व ११४); **उलाळ** = पाण्याची उसळी (ज्ञा. ७·७५).]

उशी स्त्री. उशास घेण्याची रुभरू पिशवी. A pillow.

[सं. **उच्छीर्ष**; प्रा. **उस्सीस**; गु. **ओसीसुं**; हिं. **उसीस, ओसीस**; याकाम. **उसीसी** (दृ. पा. ५३); अकाम. **उसुशी, उशी.** ह्याशिवाय दुसरी एक व्युत्पत्ति खालीलप्रमाणें आहे. वैसं. **ओपश**; देप्रा. **उसअं उपधान-शयने मस्तकोत्तम्भनाय यन्निवेश्यते तत्** (५६·८).]

उशीत न. खातांना अथवा पितांना घशांत उलट येणारा पदार्थ. The repercussion of food during eating or drinking.

[सं. **उत्सिक्त. उत्क्षिप्त** (?).]

उशीरां अ. वेळानें. Late.

[सं. **उत्सूर्यम्**; प्रा. **उच्चूर > उस्सूरँ > उशीरां.** २ सं. **उत्सूर**; प्रा. **उस्सूर = संध्या.**]

उष्टें वि. बाकी राहिलेलें. (परंतु हा शब्द खाल्लेल्या अन्नापैकीं शिल्लक राहिलेलें ह्या अर्थींच मराठींत रूढ आहे.) Left, rejected (food).

[**सं. उच्छिष्ट, अवशिष्ट**-निष्ठा √शिष्; पा. प्रा. **उच्छिट्ठ, अवच्छिट्ठ**; का. **छोट्टु** (बाकी राहिलेलें अन्न); **उष्टावण, उष्टवळ.**]

उष्ण वि. उन्ह, गरम. Hot.

[सं. **उष्ण** √ **उष्–दाहे.** (उखादिसूत्रेण (३·२) नक्.)]

उसक(णें) सक्रि. विसकटणें, हांकून देणें. To throw helter-skelter, to drive out.

[सं. **उत् + ष्वक् १ गतौ**; प्रा. **उस्सक.**]

उसट(णें) सक्रि. खालींवर करणें, अस्ताव्यस्त करणें. To displace.

[सं. **उच्छकलनम्.** उसकटणी = घराचीं कौलें खालीं काढणें.]

उसंग पुं. मांडी. A lap.

[सं. **उत्संग** (उत्स्वजते मिलति यत्र) > **उच्छंग** > **उत्संग**; **ओच्छा** हा दुसरा तद्भव आहे.]

उसण स्त्री. पाठींतील दुःख, पीडा, इजा. Pain in the back, lumbago.

[सं. **उत्शल्य**; **उत् + शाण**; देप्रा. **उच्छुडिअ, ओसाअंत**–बाणानें विद्ध.]

उसण(णें) अक्रि. स्वप्नांत बरळणें. To rave (as in a dream).

[सं. **उत् + स्वप्न.** (नाधा.); प्रा. **उत् + सिवण**; याकाम. **उसणणें = स्वप्नांत बरळणें.**]

तैसें देवाचां गुणीं विसंवतां : मि बियाळ बोलें उसणतां ॥ नरुस्व ३७

१उसास(णें) सक्रि. भोसकणें. To stab.

[सं. **उत् + शस् ४ अवयवे, छेदने**; याकाम. **उसासणें = टोंचणें, मारणें.** (उगी. ७६, १११)]

जो देवो संसारातें उसासी: महामोहाची ली पुसी ॥ नरुस्व ३२४

२उसास(णें) अक्रि. उच्छ्वास टाकणें. To breathe.

[सं. **उच्छ्वस् २ श्वसने. उच्छ्वास**; प्रा. **उसासो**; म. **उसासा** (नाधा.)]

उसासा पुं. उच्छ्वास, मोठा श्वास. A sigh.

[सं. **उच्छ्वास √उत् + श्वस् २ श्वसने**; प्रा. **उस्सासो**; अप. **उसास**; **उसस(णें), उसास(णें)** हे नामधातु आहेत. पपं. हिं. **उसास.**]

उसंत स्त्री. विसावा. Rest, leisure.

[सं. **अप, (वि) + श्रम्**; देप्रा. **ओसाअंत.**]

उसंत(णें) व्रत करणें. To observe a vow.

[सं. **उत् + सं + तप् १ संतापे**; देप्रा. **ओसाअंत.**]

श्वासोच्छ्वासा होऊनि बहुवसें । कृच्छ्रादि व्रतें खरपुसें ।
उसंतिता राति दिवसा । नाराणुक जें । ज्ञा. १६–९१

[२ **उत् + सांत्व् १० सांत्वने**] सांत्वन करणें.

परि नुसंतिआं विवसीं । भेटी नाहीं निधीसीं । ज्ञा. १७–३०९

उसनें वि. पत सांगून आणलेला, आपला नसलेला. Borrowed, lent.

[वैसं. **वस्नम्**, = **मूल्य**; *Lat.* Venum, veneo, vendo. सं. √ **वस्.**]

उसव(णें) उक्रि. शिवलेला दोरा काढणें. To open in the seam.
[सं. **उत्+सीव् ४ तन्तुविधाने.**]

उसळ^{1}(णें) क्रि. रागावणें, प्रक्षुब्ध होणें, उडी मारून धावणें. To be angry, to spring up, to agitate.
[सं. **उत्क्षुब्ध, उच्छलति** ; प्रा. **उच्छलइ, उसलइ** ; अप. **उच्छल्ल** ; गुं. **उछाळो=उडी, हल्ला; उछलवूँ**; सिं. **उछळणु** ; पं. हिं. **उछलना=उडी मारणें.**]

उसळ^{2}(णें) अक्रि. वर जाणें. To shoot up.
[सं. **उत्+शल्**; प्रा. **उच्छल**; अकाम. **उसळी, उसाळा, उसाळ(णें).**]

उसें न. निजतांना डोक्याच्या खालीं उशीसारखें कांहीं कापडाची घडी वगैरे ठेवतात तें.
[वैसं. **ओपश** ; देप्रा. **उसअं उपधानं शयने मस्तकोत्तम्भनाय यन्निवेश्यते** (५६·८). ‘ उशी ’ हा शब्द आम्हीं **उच्छीर्ष** (प्रा. **उसीस**) ह्या सं. शब्दापासून व्युत्पादिला आहे तो पहा. गु. **ओसीसुं** ; हिं. **उसीस, ओसीस** ; याकाम. **उसीसी** ; (द्दृ. पा. ५३); अकाम. **उसुशी, उशी.**]

उळीग स्त्री. सेवा, चाकरी, काम, ओझें. Duty, task, a burden, service.
[कान. **ऊळिग=सेवा, काम**]

ऊ पुं. मराठी वर्णमालेंतील सहावा स्वर. ह्याचें उच्चारण ओष्ठ्य असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. The sixth vowel in Marathi alphabet.
[सं. **उ. ऊ**; प्रा. **उ, ऊ**;- **विद्युत्–वीजू. तंतु–तांतू.** सं. **ऊं, ऋ** ; प्रा. **ऊ** ; **भ्रातृ–भाऊ. प्रावृष्–पाऊस.** ह्याशिवाय आद्य ‘**उ**’ व ‘**ओ**’ (प्राकृत) ह्याचा संक्षेप म्हणून ‘**ऊ**’ सिद्ध होतो. दीर्घ ‘**ई**’ प्रमाणें ह्या दीर्घ ‘**ऊ**’ चें **अन्त्य** स्वरूप निश्चित नाहीं.

ह्याशिवाय **आद्य, मध्य** व **अन्त्य** ऊ हा वर्ण सं. प्रा. मधील **उ, हु, भु, वु** इत्यादि ऱ्हस्व व दीर्घ वर्णांपासून सिद्ध होतो. बरेच शब्द असे आहेत कीं ते ऱ्हस्व ‘ उ ’ नें लिहिले व उच्चारिले जातात. त्यांचा थोडासा उच्चार दीर्घ केला कीं दीर्घ ऊकाराचे शब्द मिळतात. उदा. **उंट, ऊंट; उठ, ऊठ; उणखूण–ऊणखूण, उतणें–ऊत. उद–ऊद; उन्ह–ऊन.**

· ह्याचें ऱ्हस्व स्वरूप ‘ उ ’ हें होय. (‘उ’ पहा.). अकाम. ‘ऊ’ चें **याकाम, शिकाम,** पेकाम मध्यें पूर्वस्वरूप ओ, औ असेंहि आढळतें. उ. म्हणोन म्हणौनि.]

ऊ, ऊं, हुं अ. निन्दा, आक्षेप, आश्चर्य, उद्गारवाचक अव्यय. An interjective particle expressing contempt, surprise &c.
[सं. **ध्वनिशब्द** ; देप्रा. **ऊ.**]

ऊ प्र. नामप्रत्यय, (उदा.–खाऊ, इ.). A noun termination.
[सं. **उः**; पा. **उ** (**हनु=मरण.**); मरा. **ऊ.**
कदाचित् संस्कृत णमुल् प्रत्ययापासून मराठींतील ‘ ऊ ’ प्रत्यय सिद्ध झाला असावा. वेदामध्यें त्याचा नामाप्रमाणें उपयोग केलेला आढळतो.]

ऊ, ऊं स्त्री. केसांतील कीटक, A louse.
[सं **यूका** ; पा. **ऊका** ; देप्रा. **ऊआ यूका** (५१·३); गु. **जु** ; हिं. **जूं**; सि. **जुंआ, जूं** (स्त्री); का. **झौव्**; लमा. **जुव** ; आर्मे. लमा. **झिव.**]

ऊन प्र. पूर्वकालवाचक धातुसाधित किंवा ऊनप्रत्ययान्त धातुसाधित अव्ययाचा प्रत्यय. An absolutive termination.
[वैसं. **त्वानम्, त्वीनम्** ; प्रा. **त्ताणं, तूणं, ऊण**; अप. **ऊण, एविणु, एप्पिणु**; याकाम. **ऊनि, ओनि, औनि** ; शिकाम. पेकाम. **ओन, औनि, औन** ; अकाम. **ओन, ऊनिया, औनिया** ; अर्वाचीन–**ऊन,** (काव्य) **ओनि** ; ग्रामीण मराठी–**उनशान, जाऊनशान, करूनशान इ.**]

ऊन, ऊन्ह न. (वि.) उष्णता. Heat.
[*IE.* En, Ena ; सं. **उष्ण** ; प्रा. **उण्ह**; *Av.* Un^{e}, uyamma ; *Arm.* unain ; *Lat.* vanus ; *Got.* wans ; गु. **उन्ह, उनु** ; सिंह. **उन्ह (उन्हारो)**; पपं. **उन्हाळा.**]

ऊब स्त्री. उष्णता. Warmth.
[सं. **उष्मन्** ; प्रा. **उम्ह.**
परंतु ह्या शब्दांशिवाय इतर मार्गांनींहि हा शब्द व्युत्पादिला आहे. ब्लोकला वरील संस्कृतप्राकृत मूळ संशयास्पद वाटतें.
देप्रा. **उब्बा, उब्बर, उब्बाह, उक्कोला**–चत्वारोऽपि घर्मार्था (२७–४).
गु. **उभरो** ; हिं. **उभा** (उष्णता); **ऊभ** (उन्हामुळें थकवा), **उभना** ; सिं. **उभारो, उब** (वाफ), **उबाटणु=** जाळणें, **उभारणु=**कढवणें.]

ऊर पुं. छाती. The breast.
[सं. **उरस्** (**न.**), **√ ऋ १ गतौ.** लिङ्गविपरिणमन झालें.]

ऊर्ध्व न. शेवटची घरघर. Gasping of the dying hour.
[**सं. ऊर्ध्व.**]

ऊर्फ वि. दुसऱ्या नांवाचा. Alias.
[अर. उर्फ़् = नांवाचा, प्रसिद्ध.]

ऊंस पुं. वनस्पतिविशेष, रसयुक्त धाट. A sugar-cane.
[सं. इक्षु ; प्रा. उच्छु ; जै. प्रा. इक्खु ; गु. ऊस ; हिं. ऊख, इख ; बं. आकु ; ओ. आखु ; सिंह. उक, इक् ; मालदिवी. उस ; 'गण्डेरी' पहा. (इक्षुदण्ड.) मराठींतील शब्दाच्या अनुनासिकाची उपपत्ति काय ? तो अपभ्रंशांतून आला. परंतु तो अपभ्रंशांत तरी कोठून आला ?]

ऊह पुं. तर्क, अजमास. Reasoning, inferring.
[सं. ऊह = तर्क ; √ ऊह् वितर्कें]

–ऊहापोह पुं. वाटाघाट, शहानिशा. Discussion, debate.
[सं. ऊह + अपोह (अप + ऊह √ऊह्).]

ऋ पुं. मराठी वर्णमालेंतील सातवा स्वर. The seventh vowel in Marathi alphabet.
[ह्याचें उच्चारण मूर्धन्य असून उच्चारस्थान मूर्धा आहे. ह्या वर्णानें सुरू होणारे मराठी शब्द फारसे नाहींत. आहेत ते तत्सम आहेत. संस्कृत 'ऋ' पासून मराठी ऋ (आद्य, मध्य व अन्त्य निष्पन्न होतो.]

ऋग्वेद पुं. पहिला वेद, आर्यांचा पवित्र जुना ग्रंथ. The Rigveda, the first of the four Vedas.
[सं. ऋक + वेद, √ विद् २ ज्ञाने.]

ऋण न. कर्ज. Debt.
[*IE.* Re, Er ; *Lat.* Ra ; *Got.* Rennam ; *Av.* Ar; सं. ऋण < ऋ गतौ. ऋणको, ऋणाईत, ऋणानुबंध.]

ऋतु पुं. विशिष्ट हवामानाचा कालखंड ; स्त्रियांचें मासिक रजोदर्शन. A season; menstruation.

ऋते अ. शिवाय. Without.
[सं. ऋते; *Av.* Air ; *Lat.* Ar, ra ; *Teut. HGer.* Aram ; *Lit.* Ir-ti (area); *Slav.* or-iti.]

ऋद्धि स्त्री. अष्टसिद्धींपैकीं एक सिद्धि. A deity.
[सं. ऋध्.]

ऋषि पुं. तपश्चर्या करणारा, तपस्वी. A sage.
[सं. ऋषि.]

ॠ, ऌ, ॡ पुं. मराठी वर्णमालेंतील अनुक्रमें आठवा, नववा, दहावा स्वर. The eighth, ninth and tenth vowel in Marathi alphabet.
[हे तीन वर्ण आरंभीं असलेले शब्द मराठी भाषेंत येत नाहींत. जे कांहीं थोडे शब्द आहेत ते तत्सम आहेत. 'ॠ'चें उच्चारण मूर्धन्य व उच्चारस्थान मूर्धा आहे. 'ऌ, ॡ' ह्याचें उच्चारण दन्त्य असून उच्चारस्थान दन्त आहे. संस्कृत ॠ, ऌ, ॡ ह्या वर्णांपासून मराठी ॠ, ऌ, ॡ हे वर्ण निष्पन्न होतात.]

ऍ पुं. मराठी वर्णमालेंतील अकरावा स्वर. ह्याचें उच्चारण कंठ्यतालव्य आहे व उच्चारस्थान कंठतालु आहे. Eleventh vowel in Marathi alphabet.
[सं. ए ; प्रा. ए ; क्षेत्र–शेत, देवकुल–देऊळ. सं. अय; प्रा. ए. अय; अतिशय–अतिशे (याकाम.) सं. ऋ; प्रा. इ; कृपण–केंविल, गृण्ह > विण > वेणें. वलय > वळें,

सं. अ, य; प्रा. ज. शय्या > शेज ; अक्षर > अखेर, जय > जे.

सं. ई ; प्रा. ए. क्रीड् > खेल > खेळ

सं. अक, अग, अज, अत, अद इत्यादि वर्णांच्या संक्षेपानें प्राकृतमध्यें अअ' असें स्वरूप होऊन त्यापासून मराठी 'ए' सिद्ध होतो. यादवकाल, शिवकाल, पेशवेकाल व अर्वाचीन स्त्रीभाषेंत व्येसन, व्येथा, वेवहार अशा स्वरूपांत 'य' बद्दल 'ए' आला.]

ऍ अ. आमंत्रण–संबोधन–स्मरण,–अनुकंपादर्शक अव्यय. A familiar vocative particle, eh ! hey !
[सं. ए ; प्रा. ए.]

एक वि. सर्व. संख्याविशेष, पहिला अंक, एकटा, कोणी तरी. One, single, alone, some one.
[*IE.* Equ, Aiga ; E + qa ; सं, एक ; *Lat.* Aequus. (equal), Oin, un-; *Got.* Ainas; *Lit.* Venu ; *Slav.* Inu ; *Eng.* (Unit, unite. unique).

सं. एक ; पा. एक्क ; प्रा. एक्क ; फा. यक् ; लॅ. एकुअस ; गु. मै. बं. ओ. एक ; हिं. एकं, यक ; सिं. एकु ; हिकु, हकु ; पं. इक्क ; पपं. हक्क, हिक्क ; का. अक ; रुमा. येक ; सिंह. एक्.]

'एक' हा शब्द प्रथम जोडून कांहीं मराठी सामासिक शब्द तयार झाले आहेत. कांहीं संख्यावाचक विशेषणेंहि तयार झालीं आहेत.

-एकजात वि. एकाच प्रकारचा, एकाच जातीचा. Of the same quality, single. (सं. एक + जाति √जन्)

-एकजूट स्त्री. एकत्रपणा. Combination, concert, unity. (सं. एक + जूट √ युट् १ संयोगे).

-एकटाकी. वि. एका टाकानें, एका दमानें लिहिलेलें. Letters written in one pen, continuous. (एक + टाक √ टंक्)

-एकतर्फी वि. एका बाजूचा. Relating to one side. (एक + तर्फ = बाजू).

-एकतानता स्त्री. तन्मयता, अविरत ध्यान. Close attention (एक + तान + ता).

-एकतारी स्त्री. वाद्यविशेष. A monochord, one-stringed instrument. (एक + तार; तार = तारा)

-एकत्र अ. एक ठिकाणीं, एकजूट. United. (एक + त्र)

-एकदम अ. ताबडतोब. At once. (फा. यक + दम)

-एकंदर वि. एकत्रित, एकूण. Adding together, summing up. (एकत्र; एक + अंतर; याकाम. एकंदर (५.१५); हिं. एक + अंदर.)

-एकदाणी स्त्री. मण्याचा एकपदरी हार. A kind of necklace. (फा. यक + दाणा.)

-एकदील वि. एकजीव. Unseparated, with one heart. (फा. यक + दील.)

-एकनाड स्त्री. वधूवरांच्या पत्रिकेंतील एक नाडी. The occurence of one and the same नाडी, one जन्मनक्षत्र of the proposed bride and bride-groom.

-एकनिष्ठ वि. विश्वासू, एकावर पूर्ण निष्ठा असलेला. Faithful. (एक + निष्ठा √ स्था)

-एकपुती वि. एकच पुत्र असलेलें. That has but one son. (एक + पुत्री)

-एकबेरजी स्त्री. जमाखर्चांतील पहिली नोंद. (अर्थाचें विशेषीकरण झालें आहे. विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे.) The first entry in the account book.

-एकभुक्त वि. दिवसांतून एकदांच जेवणारा. One who takes one meal daily. (एक + भुक्त √ भुज्)

-एकमानपद्धत स्त्री. एका वस्तूच्या किंमतीवरून इतर इष्ट स्थानांतील वस्तूंची किंमत काढणें, गणितशास्त्रांतील एक पद्धत. A method in arithmetic. (एक + मान + पद्धति)

-एकमुख वि. तत्पर, एकमत. Of one mouth, unanimous. (एक + मुख)

-एकमेक वि. परस्पर. Mutual, reciprocal. (प्रा. 'एक्कमेक्क'. हेम. ८-३-१)

-एकवचन न. व्याकरणांतील एक संख्यादर्शक पारिभाषिक शब्द. The singular number.

-एकवंक न. एकाकरतां. For one. (याकाम. एकवंक (ज्ञा. १३-१६).

-एकवट, एकवद वि. एकत्रित. Assembled, united.
[सं. एक + वर्तिन्; प्रा. एकवंट; याकाम. एकवड (ज्ञा. १८-६२५ ज्ञा. १५-७)]

-एकवळा पुं. एकोपा. Confideracy, combination, unity. [सं. एक + वलय √वल्); याकाम. एकवळा. (ज्ञा. ११-५)]

-एकवाक्यता स्त्री. एकमत. Oneness of opinion. (एक + वाक्य + ता, √वच्)

-एकविध वि. एक प्रकारचा. Of one type. (एक + विधा √धा)

एकवाट अ. एकदम. At once.
[सं. एक + वर्तिन्; याकाम. एकवाट (ज्ञा. ६.२२०).]

खालीं कांहीं 'एक'नें संयुक्त अशीं सामासिक संख्याविशेषणें दिलीं आहेत.

[एकवीस (सं. एकविंशति; प्रा. एकविसइ.), एकतीस (सं. एकत्रिंशत्; प्रा. एकत्तिसह्.), एकेचाळीस (सं. एक चत्वारिंशत्; प्रा. एकचत्तालिसअ.), एक्कावन्न (सं. एकपंचाशत्, प्रा. एकपन्नासीअ, एकपन्नसीअ), एकसष्ट (सं. एकषष्टि, प्रा. एकसट्टी; एकसठ्ठ.), एकाहत्तर (सं. एकसप्तति; प्रा. एकसत्तरी, एकहत्तर.), एक्यांशीं (सं. एकअशीति; प्रा. एक्काअसीअ; सिं. एकासी.), एक्याण्णव (सं. एकनवीति; प्रा. एकण्णव्वअ, एक्याण्णव.).]

एकसर अ. एकसारखा. Continuosly.

[सं. एक + सदृश ; प्रा. एकसरिअ; याकाम. एकसर, एकसरी, एकसरां, एकसरें (=एकदम; ज्ञा. ६·१५५,१३–३३०).]

एकसार वि. अनन्य. Singular, undivided.

[याकाम. एकसार (ज्ञा. ५–४).]

–एकसत्ताक वि. एकाची सत्ता असणारें. Having an authority of one. (एक + सत्ता + क ; सत्ता √अस्)

–एकंस्थान न. संख्येंतील शेवटून पहिल्या स्थानास 'एकं' असें म्हणतात. पुढील स्थानें दहम्, शतम् इत्यादि. The place of the first right hand digit of a sum.

–एकसारखा अ. सारखें, सतत. Continuously. (सं. एकसदृश; प्रा. एक्कसरग.)

–एकैक वि. एक एक असें. One by one. (सं. एकैक ; प्रा. एक्कएक्क–हेम. ८-३-१)

–एकी स्त्री. एकत्रितपणा, जूट, मित्रत्व. Unity. (फा. यकी.)

एकटा वि. एकला. Single, alone.

['टा' हा प्रत्यय 'वृत्, वृत्त, त्र' वगैरेंपैकीं एका संस्कृत शब्दाचा अवशेष असावा. सं. एकस्थ, एकार्थ, एकत्र, एकवृत्तः, एकवृत्; पा. एको; प्रा. एगट्ठ.]

एकला वि. एकटा. Single, alone.

[सं. एक, एकाकिन् ; प्रा. अक्केल्लय, एगल, एक्खल्ल (हे ८·२·१६५); हिं. एकल ; गु. एकल, एकलुं.]

एकदर अ. एकदम, गर्दीनें. Suddenly, in a mob.

[याकाम. एकदट (नरुस्व. ७४९).]

एकवट अ. एकत्रित. Coming to-gether.

[सं. एकवर्ति; प्रा. एकवट्ट; याकाम. एकवट (नरुस्व. ८५९, स्मृ. ५६), एकवडें (ज्ञा. १८–६२५).]

एकर पुं. जमीन मोजण्याचें माप. क्षेत्राचें एक विशिष्ट परिमाण ; ४८४० चौरस यार्ड इतकें क्षेत्र. मूळ अर्थ–४० पोल्स लांब व ४ पोल्स रुंद इतकें क्षेत्र (एक पोल म्हणजे साडेपांच यार्ड).

[*Eng*. Acre ; *Old Eng*. Acker ; *Lat*. Agere; *Gr*. Agros ; ह्या पाश्चात्य शब्दांत पुढील धातूचें मूळ दिसतें. *IE*. Ag (to drive); *Av*. Az (Azra = chase); सं. अज् (अज्र) ; मराठीमध्यें हा शब्द इंग्रजीमधून आला.]

एकाढ वि. एककल्ली. Obstinate, adherent to one opinion.

[सं. एक + आढ्य ; प्रा. एकाड्ढ ; याकाम. एकाढ.]

एकाहार पुं. ऐक्य. Oneness.

[सं. एक + आहार √हृ ; याकाम. एकाहार (ज्ञा. १८·२९१).]

एकी हेळा अ. एकदम, एक वचनानें. At once, with one opinion.

[सं. एक + हेला ; याकाम. एकीहेळा (ज्ञा. ४·३९).]

एकुणात स्त्री. जमाखर्चांतील शेवटची बेरीज. The total amount of an account on closing it.

ऐकूण अ. तर, मग, सारांश. Well, then, in brief, epitomising.

[सं. एक + अनु.]

ऐकूण, एकोण वि. एक उणा आहे ज्यांत. Having one less.

[ह्याचे पुष्कळ समास झाले आहेत.

एकोणतीस (सं. एकोनत्रिंशत् ; प्रा. एगूणतीस) ; एकोणचाळीस (सं. एकोनचत्वारिंशत्; प्रा. एकूणचत्तालीस); एकोणपन्नास (सं. एकोनपञ्चाशत् ; प्रा. एगूणपन्नासिअ) ; एकोणसाठ (सं. एकोनषष्टिः ; प्रा. एगूणसट्ठि) ; एकोणसत्तर (सं. एकोनसप्तति ; प्रा. एगूणसत्तरी) ; एकोणऐंशी (सं. एकोनअशीति; प्रा. एगूणासी) ; एकोण्णव्वद (सं. एकोननवति ; प्रा. एगूणणऊ इ.)]

एकूण एक वि. सर्व. All.

[सं. एक + अनु + एक]

एकूणीस, एकोणीस वि. दहा अधिक नऊ. Nineteen.

[सं. एकोनविंशति; प्रा. एकूणविंस, एकूणवीस, औणवीस; गु. ओगणीस; सिं. उणिवीह, उणीह; पं. उन्नी; प. पं. उन्वी; हिं. उनीस; जु. हिं. अगुनीस, गुनीस; मै. उनईस; बं. उनीस; सिंह. एकुन्विसि; का. कुनवुह्.]

एकेरा वि. एक पदराचा. Having one fold or thread.

एकोत्रा पुं. शेंकडा एक रुपया व्याज. Interest at one per cent.

[सं. **एक+उत्तर**; याकाम. **एकोत्तरा** (ज्ञा. ९·५४); ह्याच धर्त्तींवर दुहोत्रा, तिहोत्रा, दिडोत्रा, साहोत्रा (= पंतसचीवाच्या वतनाचा हक्क) असे शब्द सिद्ध होतात. ह्यांतील '**त्रा**' हा अवयव 'सं. **उत्तर**' ह्या शब्दाचा अपभ्रष्ट उच्चार आहे.]

एकोपा पुं. एकी. Of one mind. [सं. **एकात्मता–एकाप्पआ** > **एकोपा**. (भा. अ. १८३२.)]

एक्का पुं. एक बैल किंवा घोडा लावून ओढण्याची गाडी, वाहन. A vehicle with one bullock or horse.

[सं. **एक**; प्रा. **एक्क**; फा. **यक्का**; हिं. **एक्का**; बं. **एक्का**; गु. **एक्को**. हें वाहन फार जुनें आहे. Arrian च्या Indika ह्या ग्रंथांत निर्देशिलें आहे.]

एक्का पुं. पत्त्यांतील एक खूण असलेलें एक पान. The ace (at cards).

एखादा स. वि. एक, कोणीतरी. Some one.

[सं. **एक+अर्ध**; बं. **एक–आध**; हिं. **एक–आधा**; अकाम. **एखादा**, **एकाधा**, **एकादा**.]

एड स्त्री. नख्यांचा ठसा. An impression of nails.

[सं. **अंघ्रि** (?); प्रा. (?); गु. पं. हिं. ब. **एड**, **एडी** = **नख्या**.]

एडका पुं. मेंढा, मेष, रानटी बोकड. A ram.

[सं. **एडक**; प्रा. **एडक्क** (पुं.); द्रा. **आडु**, **एड** = **शेळी**. संस्कृत शब्दाचें रूप उत्तरकालीन संस्कृतीकरणानें सिद्ध झालेलें दिसतें. प्राकृत शब्दाच्या मुळाशीं द्राविडी **आडु** हा शब्द असावा. **एलगा**, **एलका** हीं इतर द्राविड रूपें आहेत. ह्या द्राविड शब्दांचा मूळ धातु√**अदु = खेळणें** हा असावा.]

एणें, **एणें(करून)**, **एणें(प्रमाणें)** अ. ह्यानें. By these means, according to this.

[सं. **एतेन** ; प्रा. **एणं**, **एअँ** ; गु. **एँ**; सिं. **इ**, **ही**, **हे**; पं. **इह**, **एह** ; का. **यिह्** ; हिं. **इ(ह)**, **ए(ह)**; बं. ओ. **ए**; सिंह. **ए**; '**एणें**' हें रूप तृतीयेचें एकवचन आहे. परंतु ज्या सर्वनामाचें आहे तें सर्वनाम मराठींत उपलब्ध नाहीं. प्राकृतमधून प्रत्ययासह हें रूप मराठींत उतरलेलें दिसतें.]

एतद्देशीय वि. ह्या देशांतील मूळचे रहिवासी. Natives of this country.

[सं. **एतद्+देशीय**. एतत् हें सर्वनाम कांहीं मराठी शब्दांच्या आरंभीं आढळतें.]

एतावता अ. ह्यामुळें, एकंदरींत. ('एतावत्'ची तृतीया) From that, so.

एनकेन अ. कसें तरी. In some way or other. (तृतीयेचीं रूपें < **एतत्**, **किम्**.)

एथ, **एथें** अ. ह्या ठिकाणीं, ह्या स्थळीं. Here, at this place.

[वैसं. **इत्थम् = अशा तऱ्हेनें**, **वस्तुतः** ; सं. **इह + स्थ**; प्रा. **एत्थ** ; बं. **एथा** ; पं **इत्थ** ; ओ. **एठा** ; सिं. **इति** ; सिंह. **एत** ; गोवें कों. **एठ**, **अठ** ; अहिराणी. **इठे** ; याकाम. **एठ** (शि. ७४१).

प्राकृतरूप '**एत्थ**' हें हेमचंद्रानें सं. '**अत्र**' शीं जोडलें आहे. पण त्यांत वर्णप्रक्रियेची अडचण येते. '**इत्थम्**' ह्या वैदिक रूपाच्या बाबतींत अर्थाची अडचण येते. तेव्हां मूळ संस्कृत शब्द कोणता असावा ह्याविषयीं निश्चिति नाहीं.]

एधवां अ. आतां (काव्यांत रूढ). At this time.

[सं. **एतावत्** (देशी वैय्याकरण), **ईदृश** (वेबर, पिशेल); परंतु हे दोन्ही शब्द मान्य होण्यासारखे नाहींत. "**यदा**, **कदा**, **तदा**." ह्याप्रमाणें '**एतद्दा**' असा शब्द जर सिद्ध झाला तर त्यापासून वरील शब्द सिद्ध होण्यासारखा आहे. झाला प्रा. '**एद्दह**' ह्याचाहि आधार मिळेल. **एद्दह = एधवा**, **जेद्दह = जेधवा**, **केद्दह = केधवा** (हेम. ८–२–१५७).]

एरंड पुं. वृक्षविशेष, एक प्रकारचें झाड. Castor oil plant.

[सं. **एरण्ड** ; प्रा. **एरण्डो**, **एलण्डो**, **एरांडो** ; हिं. **अरंड** ; **रंडो**, **एरंड**, **अंडी** ; बं. **भेरांडा**, **एरणकाकडी** ; द्रा. **एरण्ड** ; कान. **एरडु** (**एरळु**). मूळ शब्द द्राविडी असून त्याचें नंतर संस्कृतीकरण झालें.]

एरवी, **एरव्हीं**, **एरीं**, **एऱ्हीं** अ. किंवा, अन्य रीतीनें. Or, otherwise.

[सं. **इतरस्मिन्** ; प्रा. **इअरस्सि**, **इअरम्मि** ; याकाम. **एरवेन्ही**, **एऱ्हीं**, **एऱ्हवीं**, **एरव्हीं**.]

एरु स. दुसरा. Another.

[सं. **अपरः**, **इतरः** ; प्रा. **येर** ; याकाम. **एर**, **येर** (उगी. ६३१) = इतर.] श्रीकृष्णु परब्रह्म निरवधि : येर अवतार ते प्रतिनिधि ॥ (नरुस्व १८)

एलगार पुं. निकराचा हल्ला, चढाई, उठाव. An impetuous assault.

[फा. **येल्गार**, **एल्गार**, **इल्गार = मोहीम** ; तुर्की. **इल्घार**.]

१**एलची** पुं. वकील, परराष्ट्रमंत्री. An ambassador.

[तुर्की. **ईल्ची ;** पेकाम. इल्-एक भटकी टोळी व त्या टोळींतील एल्ची (दिमरा. २.५)]

२**एलची** स्त्री. वेलची, वेलदोडा. A cardamom.

[सं. **एला, एलीका;** द्रा. **एल, एला-यची** (सुगंधी माल); कान. **यालक्कि ;** ते. **एलकि;** गु. **एलची;** वं. **इलायच;** हिं. **इलायची.**]

एलिचपुर न. ग्रामनाम. Name of a town.

[सं. **अचलपुर ;** प्रा. **अलचपुर** (वर्णविपर्यय)]

एवढा, येवढा वि. इतका मोठा. So great, so large.

[सं. **इयत् ;** प्रा. **एवड ;** अप. **एवडु** (हेम. ८.४.४०८); सिं. **उहडो;** गु. **एवढो;** म. **एढोळ,** एवढा वेळ-(**इयती + वेला**); **एवी-तेवी** (सं. **एवम् तु एवम्**).]

एव्हां अ. आतां, ह्या वेळीं. Now, at this very time.

[सं. **इदम् + हि** (?); प्रा. **इम् + हि** (?); अप. **एवम्हि ;** गु. **हेव, एवो = असा** (एतादृशः). **एव्हां, जेव्हां, तेव्हां, केव्हां** हीं सर्व अव्ययें एकाच मार्गानें सिद्ध होतात. ह्याच्या पूर्वींचीं जुनीं मराठी रूपें अनुक्रमें "**एधवां, जेधवां, तेधवां, केधवां**" हीं होत. ह्यांचा नक्की संबंध कोणत्या संस्कृत शब्दांशीं आहे हें निश्चित रीतीनें सांगतां येत नाहीं. एधवां पहा.]

एशेल न. गोडें तेल. A kind of oil.

[म. **अळशी** (धान्यविशेष) + **तेल.** ह्याच प्रकारांनीं सिद्ध झालेले **खोबरेल, गोडेल, आवळेल, राखेल,** असे शब्द आहेत. तेलाचा प्रकार असेल तर तद्दर्शक शब्द एलाकारान्तच असतो. '.पाणी' शब्दाचा अपभ्रंश ज्याप्रमाणें **वणी** कारान्त सिद्ध होतो, त्याप्रमाणें ह्या शब्दांचा प्रकार आहे.]

एहसान न. मेहरबानी, कृपा. Obligation.

[फा. अर, **इहसान्.**]

एळकोट-यळकोट पुं. खंडोबादेवतेचा जयजयकाराचा शब्द, एकत्रित हल्ला. The word uttered by the devotees of Khandoba at the time of lifting the तळी, an all-out attack.

[कान. (**एलु = सात**) + **कोट.** त्याच्या किल्ल्याचे **सात कोट** (तट) आहेत त्यावरून खंडोबाच्या आरतीची तळी उचलतांना "**यळकोट यळकोट** उधो" असे शब्द उच्चारतात. लक्षणेनें ह्याचा अर्थ गोंधळ, अव्यवस्था असा आहे. किंवा कोट हा कोटिपासून आला असून खंडोबाच्या अमर्यादित अशा देवसैन्याला उद्देशून असावा. मल्ल दैत्याशीं जो सामना झाला त्यांत हें खंडोबाचें सैन्य होतें.]

ऐ पुं. मराठी वर्णमालेंतील बारावा स्वर. ह्याचें **उच्चारण** कंठ्यतालव्य आहे. **उच्चारस्थान कंठतालु** आहे. Twelth vowel in Marathi alphabet.

[संस्कृत **व** प्राकृत **ए, ऐ, आ + इ, आ + ई,** व सघोष 'ऐ' युक्त व्यंजनें ह्या वर्णांपासून मराठी आद्य, मध्य व अन्त्य **ऐ** सिद्ध होतो.]

ऐक(णें) सक्रि. कानानें श्रवण करणें-जाणणें, **समजून** घेणें. To hear, to listen to, to understand.

[सं. **अभिकर्ण ;** प्रा. **अहिकण्ण. अहिक्खण्ण. अभीक्ष्**-हें मूळ ब्लोक देतो तें चिन्त्य आहे. **ऐकतखेंवो =** ऐकतांक्षणीं. खेवो (क्षेपः) = आलिंगन, नैकट्य; याकाम. **ऐकतखेंवो** (ज्ञा. १०-१९७); **ऐकीव = ऐकलेलें.**]

ऐक्य न. एकी, मिलाफ, जूट, एकत्व. Oneness, unity.

[सं. **एक + य** (भाव. प्र.).]

ऐच्छिक वि. इच्छिलेलें, मर्जीनुरूप, वैकल्पिक. Wished, desired, optional.

[सं. **इच्छा + इक** (वि. प्रत्यय) **ऐच्छिक.**]

ऐट स्त्री. छानछुकी. Showiness.

[सं. **अति + स्था, अतिष्ठा ;** प्रा. **अइट्ठा ;** हिं. **ऐंठ.**]

ऐतवार, आइतवार पुं. रविवार. Sunday.

[सं. **आदित्यवार ;** प. पं. **एतवार;** सिं. **आडितवार ;** हिं. **आइतवार , इतवार ;** गु. **आतवार, इतवार.**]

ऐता, आयता वि. पलीकडचा, अगदीं तयार. Yonder, readymade.

[सं. **आयत्त ;** गु. **आंयतु** = तयार, फुकट ; हिं. **आयिता;** सिंह. **अयति, अयिति ;** याकाम. **आइती = तयारी.**]

ऐदी वि. आळशी, मंद. Idle, sluggish.

[सं. **आ + यत्** (?), **-आयत्त.** द्राविडी मूळ आहे काय ?]

ऐन वि. बहुमूल्य (जिंदगी.) Valuable property.

[अर. **ऐन् ;** पेकाम. **यैन, ऐन** (रा. ७-५३, १५-१). ह्याच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. मूळ अर्थ जिन्दगी, इस्टेट ; नंतर प्रथम वसाहतीच्या वेळीं ठरविलेला सरकारी सारा. अशा अर्थानें दक्षिणेंतील मुलकी खात्यांत हा शब्द **रूढ** आहे. दुसऱ्याहि समासांत हा शब्द आढळतो आणि त्याचा अर्थ मूळ,

प्रथमचें, प्रत्यक्ष, असा आहे. उदा- ऐन जमा, ऐन आकार, ऐन बाबत, ऐन तनखा.]

ऐपत स्त्री. सामर्थ्य, सर्व प्रकारची शारीरिक, आर्थिक वगैरे संपन्नता. Power, ability (financial and physical.)
[अर. **आफियत्.**]

ऐब पुं. चूक, खोड, व्यंग. A fault, a flaw, a defect.
[अर. **अयब, आइब्**; पेकाम. **ऐब.** (खरे ४·१५०५).]

ऐरण स्त्री. ज्यावर घण मारावयाचें तें (सोनार, लोहार यांचें) हत्यार. An anvil.
[सं. **ऐरणी (अरणि, अधरिणी)**; प्रा. **अहिरिणी**; **ऐरिणम् (इरिणे उषरभूमौभवम्)**; सिं. **अहरणी.**
लग्नविधीमध्यें ऐरणीदान म्हणून असतें. ह्या शब्दाच्या अर्थांत बराच बदल झाला असावा असें दिसतें. मूळ शब्द अरणी धरला तर त्यांत अग्नीचा संबंध आहे. त्यापासून लोखंडी हत्यार हा अर्थ कसा आला ?]

ऐल वि. इकडील, अलीकडील. On this or near side.
[सं. **आदिम**; प्रा. **आइल्ल.** प्राकृतमध्यें '**ल्ल**' हा प्रत्यय होता. ह्यापासून **एलीकडे, ऐली, ऐलाडी** हे शब्द सिद्ध होतात. ह्याचा प्रतियोगी शब्द पैली (कडे) असा आहे. याकाम. **ऐल**=अलीकडे (नरुस्व. २३०), **ऐल, ऐलाडी** (ज्ञा. ६·१९१), **ऐली** (ज्ञा. १३·८४४).]

ऐवज पुं. मालमत्ता, माल, रोख पैसा. Property, substance, wealth, money.
[फा. **इवज़्=बदला.** ह्याच्यापासून '**ऐवजीं**'=बद्दल असें अव्यय तयार होतें. जुन्या कागदपत्रांत **यैवज, यैवजीं** अशीं रूपें आढळतात.]

ऐंशी वि. संख्याविशेष. Eighty.
[सं. **अशीति (अष्टदशतः परिमाणमस्य)**; प्रा. **असीइ, असीइ**; गु. **एंशी, हेंशी**; पं. हिं. मै. **अस्सी**; सिं. **असी**; बं. **आशी**; ओ. **अशी**; सिंह. **असू, असूव**; का. **शीथ.**]

ऐश्वर्य न. वैभव, मोठेपणा. Grandeur, greatness.
[सं. ईश्वर(+य) √ ईश् २ सामर्थ्यें.]

ऐषआराम पुं. स्वस्थता, चैन, सुखोपभोग. Pleasure, ease, enjoyment.
[अर. **एश**; फा. **आराम.**]

ऐस पैस वि. अ. पुष्कळ, विस्तीर्ण. Spacious, large.
[सं. **आश्वपार्श्व** (?).]

ऐसा वि. (सार्व.) असा, असला. Such, of this kind.
[सं. **ईदृश**; प्रा. **ईदिश**; अप. **अइस**; सं. **एतादृश**; प्रा. **एआइस**; **एईअस**; सं. **एतादृक्**; प्रा. **एआरिच्छ** (?); याकाम. **ऐसा, ऐसियाही** (ज्ञा. ३·६३), **ऐसैसें** (ज्ञा. १६-१३).]

ओ पुं. मराठी वर्णमालेंतील तेरावा स्वर. Thirteenth vowel in Marathi alphabet.
[सं. **ओ**; प्रा. **ओ. षोडश-सोळा, ओष्ट-ओठ.**
सं. **औ**; प्रा. **ओ. मौक्तिक-मोत्तिअ-मोती, मोत्यें, यौट-जोड.**
सं. **अप, अव, उप**; प्रा. **उव. अर्प-वोप, अपवरक-ओवरी, सुवर्ण-सोनें.**
सं. **अ. उ**; प्रा. **अ. चंचु-चोच. उत्संग-ओसंग-ओंचा.** याकाम. शिकाम, पेकाम वगैरे प्राचीन:काळीं व अर्वाचीन **ग्रामीण** व **स्त्रीभाषांत** 'वो' असें स्वरूप आढळतें. **वोळख, वोळग, वोल, वोपणें** इ. संस्कृत व पाकृत **अउ, अऊ, वो, यो, अप, अव, उअ, उव,** इत्यादि वर्णांपासून मराठी आद्य, मध्य, व अन्त्य **ओ** सिद्ध होतो.]

ओ अ. हांक मारली असतां उत्तर 'ओ' म्हणून देतात.
[सं. **आम्.** ॐ मधील ओ हें पहिलें अक्षर त्यावरून. '**ओ**' चा **ठो**, '**ओ**' च्या नांवानें पूज्य वगैरे म्हणी रूढ आहेत.]

ओइंच(णें) सक्रि. धान्य सुपांत घालून पाखडणें. To shake (corn) in a sifting fan.
[सं. **आ, अव+विच्.**]

ओइर(णें) सक्रि. (प्रांतिक) वैरणें.
[सं. **अव+वृ.**]

ओक(णें) अक्रि. वांती होणें, वमणें, वमन होणें, बाहेर निघणें-पडणें. To vomit.
[१ कान. **ओक्करिसु, ओकारिके**=ओकणें; सं. **उत्+गॄ** ९ **शब्दे.** देप्रा. **ओक्किअं उषितम् वान्तमित्यन्ये** (६०,१६); प्रा. **ओक्किअ, उव्वक्क, उग्गिर** (भांडारकर); बं. **ओआक**; हिं. **ओकना**; सिं. **ओकणू**; गु. **ओकवूँ**; ओ **ओकवूं**; सिंह. **ओक्कारे**; ने. **वाक्नु.** कानडीमध्यें हा धातु तद्भव म्हणून सिद्ध झाला असावा. भाण्डारकरांची व्युत्पत्ति

सयुक्तिक दिसते. बाहेर टाकणें ह्यावरून लाक्षणिक अर्थानें 'गुह्य सांगणें, पैसे परत करणें' असा अर्थ झाला.]

ओक्र पुं. वमन, वांती. Vomit, the matter thrown out.

ओकारी स्त्री. वांती. Vomit.

[२ सं. उख् १ गतौ; प्रा. औग्गरी; √अवगृ किंवा कान. होक्कारि = थुंकी, उग्गरी–टाकणें, फिरविणें.]

दृस्यांचीया श्रृष्टी। ॐकीती दीठीवरी दिठी।
उठविलीया तळवटी। चीन्मात्रीची॥

अमृता. ५१२ जुनी पोथी.

ओकटें, ओखटें वि. न. वाईट गोष्ट, प्रसंग, त्रास. A trouble, a bad omen.

[सं. अवशिष्ट, उच्छिष्ट > ओशिष्ट, > ओशट; वषट् > ओषट् > वोखट्. ओशट पहा. याकाम. ओखटें (उगी. १२२).]

ओकसा वोकशीं (रडणें) अ. मोठ्या आवेगानें (रडणें). (To cry) with loud voice.

[सं. भ्रष्–शब्दे, (> भोकाड = तोंड). हा ध्वनिशब्द असावा व त्यामधील दुसऱ्या शब्दाचा तोंडाशीं संबंध असावा.]

ओकें(ओकें) वि. रिकामें, शून्य असें, उघडें नागडें. Deserted, bare.

[सं. उत् + गृ (?); कान. ओक्करिसु (?). २ सं. व्यप + स्कृष्; प्रा. वोक्कस = ऱ्हास, कमती. हीच व्युत्पत्ति अधिक ग्राह्य आहे.]

ओखट वि. ओकटें पहा.

[याकाम. ओखटें (उगी. १२२).]

ओगर(णें) सक्रि. वाढणें, जेवणांतील पदार्थ वाढणें. To serve (meal).

[सं. अवगोरणम्–जेवण; कान. ओगर = शिजवलेला भात; याकाम. ओगरण = जेवण (ज्ञा. १८·१००७)]

ओगराळें न. वरण किंवा पातळ पदार्थ वाढण्याचें पात्र. A serving ladle.

[सं. अवगोरणम्, अवगोरालयम्.]

ओघ पुं. प्रवाह, समूह, संघात (लक्षणा). Stream, current, mob, mass.

[सं. ओघ, √वह्, अववह्; प्रा. ओघ; याकाम. ओघ (ज्ञा).]

ओघळ, ओगळ, ओहळ, वघळ. पुं. ओहोळ, लहान ओढा, लहान प्रवाह. A streamlet, a rillet.

[सं. अवगल्, अपगल् (?); देप्रा. ओग्गाल,–अल्पस्रोतः (६०·१५); म. ओगळणें, ओघळणें (अव + घृ) = थेंबथेंब खालीं पडणें, गळणें, पाझरणें. गु. ओगळवूँ = विरघळणें.]

ओघळ(णें), ओगळ(णें) सक्रि. गळून पडणें, तुटून पडणें. To slip off.

[सं. अव + गल्; प्रा. ओगल.]

ओंगळ वि. अशुभ, वाईट, किळसवाणें, Shabby, dirty, disgusting.

[सं. अमंगल; अकाम (ग्राम्य) वंगळ, वंगाळ.]

ओचकार(णें) सक्रि. नखानें ओरखडणें. To scratch.

[सं. अवस् + कृ ९ हिंसायाम्.]

ओंचा पुं. नेसत्या वस्त्राचा लोंबता पुढचा घोळ, विशेषतः स्त्रियांच्या वस्त्राचा मांडीवरील पुढच्या बाजूचा घोळ. A tuck of a dhoti or sari.

[सं. उत्संग, (उत् + √सञ्ज्); प्रा. उच्छग. उच्चय (√ची) हें मूळ ब्लोक देतो तें ग्राह्य होण्यासारखें नाहीं. प्राकृतरूपाचा त्याला दुजोरा मिळत नाहीं.]

[1]ओज न. तेज, चमक, जोरदारपणा, जीव, जीवशक्ति. Life, vitality, lustre.

[सं. ओजस्, ऊर्जस्; प्रा. उज्ज = बलवान् (६२–१); देप्रा. ओज्जल्लो; उज्जल्ला = बलात्कार. गु. ओजवूँ; सिं. ओजु.]

[2]ओज पुं. उपचार, संस्कार, सांभाळ. Consecration, protection.

[कान. ओजिसु = व्यवस्थेशीर बनणें; ओचवि(णें) = काळजीनें संपविणें (नाधा.), उजविणें–लग्न करणें.]

ओझर(णें) अक्रि. गळणें, पाझरणें. To trickle, to ooze.

[सं. अवसृ. अव + क्षर् १ गलने; प्रा. अवझरइ; ओज्झर (हेम. ८-१-९८)]

–ओझर पुं. धार, पाझर, प्रवाह, धबधबा. Stream, water-fall, oozing.

ओझा पुं. एक आडनांव. A surname.

[सं. उपाध्याय (< उप + आ + ध्यै; अधि + ई); प्रा. उअज्झाय, उज्झाय; हिं. ओझा. उपाध्याय, उपाध्ये, ओझा, झा, पाध्ये, वझे इत्यादि शब्द संबद्ध आहेत.]

ओझें न. वजन, भारा, बोचकें. Weight, load, burden.

[सं. **वाह्य**, √ **वह्** ; देप्रा. **ओज्झ** ; कान. **ओज्जे.**]

ओंजळ, ओंझळ स्त्री. दोन पंजे जवळ आणून केलेला हाताचा पसा. A cavity of hands.

[सं. **अंजलि** (√ **अञ्ज्** + **अलि**); प्रा. **अजळी**; हिं. **उंजळ**; ओ. **अंजुली** ; गु. **अंजळी**. संस्कृतमध्यें हा शब्द पुंल्लिंगी आहे. मराठींत लिंगविपरिणमन झालें.]

ओटा, ओंटा पुं. दगडमातीचा कट्टा, लहानशी भिंत, ओसरी. A platform.

[कान. **ओट्टु** = एकत्र करणें **ढीग, रास.** कानडी शब्द ‘ **वृन्त** ’ किंवा ‘ **वृंद** ’ ह्याचा तद्भव आहे कीं काय ? ‘ **ओंटा** ’ शब्द पूर्वीं सानुस्वार लिहीत असत; त्यावरून ‘ वृन्त ’ (वृन्द) हाच मूळ शब्द असावा असें वाटतें.]

ओटी, ओंटी स्त्री. कांस, खालचें पोट, त्यावरून त्या भागावर असलेलें आवरण–विशेषतः स्त्रियांच्या नेसण्याचें. The lower portion of the abdomen, the lap of a dhoti or sari.

[१ कान. **उडि** = **कंबर** ; २ सं. **अवगुंठ्** (?); प्रा. **ओहट्टो** (नीवि), **उअट्टरी**–लुगड्याची गांठ.]

–ओटी भरणें–लुगड्याच्या खोळांत तांदूळ, गहूं, खोबरें, नारळ वगैरे पदार्थ भरणें. हें सौभाग्याचें चिन्ह आहे. To fill the lap of a married woman, (with flowers, rice etc).

–ओटींत घालणें–दत्तक देणें. To give into the adoption of.

ओठ, ओंठ पुं. मुखावरील जबड्याच्या खालचा व वरचा मांसल भाग. A lip.

[सं. **ओष्ठ** (उष्यते दह्यते उष्णा इति); प्रा. **ओट्ठे, उट्ट, हुट्ठ** ; अप. **ओंट्ठ**; गु. **ओठ** ; हिं. **ओंठ** ; ओ. **ओठ** ; सिंह. **ओट** ; का. **उट**; अकाम. **ओंठ, होठ.** अनुस्वार हा अपभ्रंश प्राकृतमधून आला. एक तर त्या भाषेचा वैकल्पिक सानुस्वारी उच्चार हा स्वभाव; किंवा ‘ठ’चा लोप भरून काढण्यासाठीं अनुस्वार आला असावा. ‘उंट’मध्यें हाच प्रकार प्रामुख्यानें दिसतो.]

ओठावि(णें) अक्रि. वेडावणें, ओठ बाहेर काढणें. To taunt, to mock.

ओठाळी स्त्री. घोड्याच्या ओठाला बांधावयाची दोरी (ओष्ठ + वलय). A rope to tie the lip of a horse.

ओड(णें) सक्रि. स्पष्ट काढणें, पसरणें. To exhibit, to spread.

[सं. **अव + कृष् १ विलेखने; अव + वह् १ वहने** ओडव(णें) (णिच्) = पुढें करणें, प्राप्त होणें.]

बाल बापांचा ताटीं रिगे । रिघोनि बापातेंचि जेवउं लागे । किं तो संतोषाचेनि वेगें । मुख ओडवी ॥ ज्ञा. ९·१५

ओंडवरी स्त्री. (काव्य) जादू. Magic, jugglery.

[सं. **अवडंबरी.**]

ओढ(णें) सक्रि. मागें खेंचणें, लोटणें. To pull back ; to draw, to drag, to push.

[सं. **आ + ऊढ** (**निष्ठा** √ **वह्**) > ओढ. राजवाडे ह्यांनीं ह्या धातूच्या कित्येक व्युत्पत्ति दिल्या आहेत. ह्या धातूचे जे निरनिराळे अर्थ आहेत ते वाच्यार्थ समजून प्रत्येक भिन्न अर्थाला भिन्न व्युत्पत्ति सुचविली आहे. अर्थांच्या बाबत अभिधा किंवा लक्षणा ह्या शब्दशक्तींपैकीं एकच शक्ति समजणें गैर आहे. त्या सर्व व्युत्पत्ति उल्लेखनीय व चिन्त्य आहेत. त्यापैकीं कांहीं व्युत्पत्ति खालीं देतों.]

[सं. १ **अव + कृष्**, २ **आ + ऊढ** (वाहणें), ३ **आ + व्यध् ४ ताडने** (चाबूक ओढणें), ४ **अव + धे १ धाने** (तंबाखु ओढणें). ५ **अव + ध्यै**, ६ **उप + धा ३ धारणे** (त्यानें त्याला ओढला. निंदा केली.)]

ओढगस्त–ओढघस्त वि. पैशासंबंधीं ओढाताण असलेला. Poor, one who is in want of money.

[सं. **उपधाग्रस्त.**]

ओढणी स्त्री. परकरावर पदरासारखें मुखावर ओढून घेण्याचें स्त्रियांचें वस्त्र, शाल, पदर. A cloth worn over head and shoulders by women, a cloak.

[सं. १ **अवगुंठण**, २ **आव + ऊढ**, –**ओढ** ; ३ **अवकृष्** ; प्रा. **अवअड्ढ** ; देप्रा. **ओड्ढणं उत्तरीयम्** (६२·७); सं. **अवघाटनी** ; प्रा. **ओहाढणी** ; देप्रा. **ओहाडणी, पिधानी** (६४–१६); सिं. **ओढिणी**; हिं. **ओढन**; गु. **ओढणी, ओढणुं.**

‘ अवगुंठण ’ ही व्युत्पत्ति जरी विद्वन्मान्य असली तरी वर्णप्रक्रियेला जुळत नाहीं. ‘ **अवघाटनी** ’ हा शब्द मूळ असावा.]

ओढव(णें) अक्रि. गुदरणें, जोरानें येणें. To tend impulsively, to have a forceful course.

[सं. १ वह्, (निष्ठा–ऊढ.) (नाधा.) ओढव; २ उत्+धा ३ धारणे.]

–ओढाताण स्त्री. खेंचाखेंच, गोंधळ, त्रास, तारंबळ (द्विधातुसंयोग. ओढ+ताण.) Pulling about violently, disorder, trouble.

–ओढाळ वि. भटकणारें, निर्बंध न मानणारें. Wandering, rambling.

–ओढाळी स्त्री. प्रेमाची ओढण, आकर्षण. Attraction.

–ओढी स्त्री. ओढण, चाल, संवय. Habit, tradition.

–ओढीक वि. ओढणारें, ओझें वाहणारें. A draught (beast).

ओणव(णें) अक. खालीं वाकणें, कमरेपासून वरील भाग खालीं वाकवणें. To bend, to stoop.

[सं. अवनत, √अवनम्–प्रह्वत्वे ; प्रा. ओणय, (अवनमित); प्रा. ओणविअ (नाधा.); मराठी. ओणवा, ओणवणें ; ह्या शब्दाशीं इतर भारतीय भाषांतील रूपें ताडून पहाण्यासारखीं आहेत. गु. नमवूँ; सिं. नवणु, नंवंनु ; पं निवणा ; हिं. नवना ; बि. नौना ; बं नुयाइते ; ओ. नुअइबां ; का. नमुन् ; सिंह. नवनवा.]

ओंड वि. खोल. Deep.

[कान. ओँडु=गढुळ पाणी.]

ओंडा, ओंडका पुं. लाकडाचा मोठा तुकडा, खोड. Log of wood, trunk.

[कान. ओडक=फोडलेला.]

ओत(णें) उक्रि. (पातळ पदार्थ) खालीं सोडणें–टाकणें, साच्यांत घालणें, ठसा उठवणें. To pour, to pour into a mould.

[सं. अवतत (निष्ठा √ तन्); प्रा. अवअत–ओत. (अवतर्पासून निष्पन्न होणार नाहीं. कारण ‘र’ ची वाट काय होणार ?); याकाम. ओत=प्रवाह (ज्ञा. १५·३३७); का. ओत्तु ; सिं. ओतणु ; हिं. ओतना.]

ओत न. मागावरील आडवें सूत्र. Lengthwise thread. (सं. अवतत.)

ओतप्रोत वि. पूर्ण, भरपूर ; पुष्कळ, आंत बाहेर, उभा व आडवा गुंतलेला. Full, abundant ; lengthwise and crosswise (thread).

[सं. आ+वे. प्र+आ+वे (निष्ठा); १ वैदिक–ओतु+प्रोतु ; ओतु=आडवा धागा, तंतु,=उभा धागा ; याकाम. ओतप्रोत=आडवें उभें भरलेलें (ज्ञा.). विणण्यामधील आडव्या धाग्याला ओत व उभ्या धाग्याला ‘ प्रोत ’ (किंवा तंतु) असें म्हणतात. हा शब्द फार प्राचीन आहे. वेदवेदान्तामध्यें ‘ ओतञ्च प्रोतञ्च ’ असा प्रयोग केलेला आढळतो.]

ओथंब(णें) अक्रि. रसानें थबथबणें, भरून लोंबणें. To be full of juice, to hang upon so as to bend down.

[सं. १ अव+स्तंब् १ रोधने; प्रा. उत्थंब. २ अब+स्तिम् १ क्लेदने.]

ओथिजव(णें) सक्रि. पातळ करणें. To liquidize.

[सं. अव (उत्)+स्त्यै १ संघाते]

आइकां पाणी ओथिजवावें नलगे । नवनीतीं माथुला न लगे ॥ ज्ञा. ९·२१. (चांदोरकरप्रत) ज्ञा. ९·६५

ओदर पुं. धूर, वास, घाम. Smoke, smell, sweat.

[सं. अव+दृ ; प्रा. ओदर ; याकाम. ओदरु (शि. ८३२); अकाम. दरदरून घाम आला ह्या प्रयोगांत हा शब्द राहिला आहे.]

न लवीं वो कुर्पुरु । सर्वांगीं येतुरे ओदरू ॥ शिशु ८३२.

ओनामा पुं. आरंभ, सुरुवात. Beginning.

[सं. ॐ नमः ह्याचा मराठी अपभ्रंश. ‘ ॐ नमः सिद्धम् ’ हा जैन धर्मातील मंत्र आहे व तो ते सर्व धर्मकार्यांत पठणांत आरंभीं म्हणतात. हिंदुधर्मातील ‘ श्रीगणेशाय नमः ’ ह्या मंत्रासारखा आहे. ज्याप्रमाणें ह्या मंत्रांतील श्रीगणेशा हा अवशेष राहिला तसाच त्या मंत्रांतील ‘ ओनामा ’ हा अवशेष राहिला.]

ओप(णें) उक्रि. देणें, विकणें, हवालीं करणें. To give, to sell, to entrust with.

[सं. अर्प् १० दाने; पा. ओप्पित (अर्पित); प्रा. अप्प, उप्प, ओप्प.]

ओप(णें) सक्रि. धुणें, जिल्हई देणें. To polish, to wash.

[सं. अव+पू १ पवने ; प्रा. ओपव ; देप्रा. ओप्पा–झिलाई ; –ओपा; गु. ओप–चकाकी; कान. वोप्प–सुंदर.]

ओबडधोबड वि. खरबरीत, अव्यवस्थित, बेडौल, बेढब. Clumsy, ill-formed, uneven.

[सं. **उत्कृष्ट ; प्रा. उब्भड; हिं. अबडधबड.** ध्वनिवाचक; प्रतियोगी-धोबड.]

ओम्, ॐ पुं. आर्यांच्या संस्कृतीचें दर्शक प्रतीक. The sacred letter Om.

[सं. ॐ-अ + उ + म् (ँ); प्रत्येक वर्ण एक एक देवतादर्शक आहे. **अ = विष्णु, उ = शिव, म् = ब्रह्मा. ँ = शक्ति.** प्रत्येक वैदिक मंत्राच्या आरंभांचें अक्षर. **ॐ भवति** = भिक्षावृत्ति, मधुकरी भिक्षा मागतांना '**ॐभवति भिक्षां देहि**' असा मंत्र म्हणतात. ह्यांतील '**ॐ भवति**' एवढाच अवशेष राहिला.]

-ॐ भवतिपक्ष पुं. भिक्षा मागण्याची वृत्ति. Tendency for begging.

ओंफस (होणें) अडथळ्यामुळें एकादा बेत बंद पडणें, फसणें, नाहींसें होणें, संपणें. To come to an end by interruption.

[सं. **ध्वनिशब्द; ॐ + फूत्, उत् + प्रुष् - उत्प्रुष् - ओंफस.** (राज.) परंतु अनुनासिकाची उपपत्ति काय ?]

ओबळ(णें) सक्रि. किंचित् धुणें, (तोंडावरून) हात फिरविणें. To wash slightly.

[सं. **१ अव + उत् + बाड् १ आप्लाव्ये** (राज.), **२ अवप्लावय; प्रा. ओंबालइ** (हेम. ४-४१, दे. ना. ६८-१३); गु. **अं.हाळ** = नदींतील गाळ; दुसरी व्युत्पत्ति अधिक ग्राह्य आहे. कारण तिला प्राकृत शब्दांचा आधार आहे.]

ओंबी स्त्री. गव्हाचें कणीस. : An ear of wheat.

[हेम. दे. ना. **उंबी** (स्त्रीं)-भाजलेला गव्हाचा तुरा, पक्का गहू.]

ओयरा पु. वैरा, शिधा, स्वैयंपाकघर, स्वयंपाकाकरितां निराळे काढलेले तांदूळ. The portion of rice allotted for the day's consumption ; a kitchen.

[सं. **१ अव + गॄ ९ शब्दे;** कान. **ओगर**-पळीनें वाढणें, **ओगर** = जेवण ; **२ अभ्यवहार** :(?); **अभ्यवहृत, अभ्यवहार्य** = अन्न.]

ओरकल पुं. सोन्याचा कस, दगड. A touch of gold, a touch-stone or a test stone of gold.

[कान. **ओरकल, ओरे (कस लावणें) + कल्लु (दगड).**]

ओरखड(णें) उक्रि. रेघा ओढणें, ओचकारणें. To scratch, to draw lines.

[सं. उपरि + खर्द् १ दंदशूके ; उपरि + कृष् १ विलेखने.]

ओरड(णें) अक्रि. तक्रार करणें, उच्च स्वर काढणें, रडणें. To complain, to cry out, to roar.

[सं. **अवरठ् १ परिभाषणे ;** प्रा. **अउरड**].

-ओरडाओरड स्त्री. रडण्यानें झालेला गोंधळ, मोठा आवाज करून केलेला गोंधळ. (अवरटः). A loud cry, disorder.

ओरप(णें) सक्रि. जोरानें ओढणें, आंत ओढणें, भुरका मारणें, नांगरणें. To draw in forcibly, to sip with a noise, to plough.

[सं. **अव + रफ्, रंफ् १ गतौ; ऋफ् - पीडायाम् ;** देप्रा. **ओद्दपिअं, ओरंपिअ शब्दौ नष्टे तथाक्रांते** (६७-१५); गु. **रांप** (स्त्री) = नांगर ; वेदामध्यें **रिफ्** असा धातु आहे. त्याचा अर्थ 'लेपने' असा आहे. **रपः** = आजार, अशक्तता. राजवाडे ह्यांनीं **उपरि(परि) + पा १ पाने, रफ्** (हिंसायां) अशी व्युत्पत्ति सुचविली आहे. (रा. को. ४४)]

ओरांगोटा पुं. माकडासारखा दिसणारा मनुष्य. Orang utan.

[मलाया. **ओराङ्ग ऊतान.** हें नांव बॉंटिअसनें प्रथम वापरलें. मलायी लोक माकड, वानर ह्या अर्थीं हा शब्द वापरीत नाहींत. जंगली मनुष्य, रानटी मनुष्य ह्या अर्थीं वापरतात. परंतु लक्षणेनें त्याचा अर्थ 'वानर' असा होऊन बसला आणि त्यावरून विद्रूप, कुरूप माणसाला लावला गेला.]

ओरी स्त्री. देवळांतील पडवी, खोली, सोपा, आंतील लहान खोली. An apartment in the enclosing wall of a temple, a small room.

[सं. **अपवरक-का (अप √ वृ), अवसर** (?); पा. **ओरम्, ओरतो ;** कु. **ओरी** (बाजू); बं. **ओर** (मर्यादा); हिं. पं. **ओर** (बाजू); सिं. **ओरे ;** गु. **ओरुँ** (जवळ); म. **ओवरी ;** 'अपवरक'पासून ओरी निघणें अधिक शक्य. परंतु हा कानडी तद्भव शब्द आहे. मराठी तद्भव नव्हे. संस्कृतमधून कानडींत व कानडींतून मराठींत आला. (ओरी शब्द पहा. Kittel.)]

ओल(णें) सक्रि. चिकट होणें, ओलें होणें. To be adhesive, to be wet.

[सं. **उद्र = जलचर. √ उन्द् ;** प्रा. **ओल्ले, उल्ल ;**].

म्हणौनि संवादाचा उवाओ ढले । तरि हृदयाकाश सारस्वतें ॐ ले । श्रोता दुचिता तरि वितुले । मांडला रसु ॥ ज्ञाने. ९-२८.

ओलव(णें) (णिच्). सक्रि. ओलें करणें To wet, to moisten.

ओलवण न. ओलें करण्याचा पदार्थ–साधन. Any thing to moisten.
[सं. **आर्द्र(यण)** ; प्रा. **ओल्लाण.**]

ओलवाहु वि. ओली (जमीन). (A soil) that holds moisture.

ओलसर वि. दमट. Damp. (सं. **आर्द्रसदृश** ; प्रा. **ओल्लसरिस.**)

ओलावा पुं. ओलेंपणा. Dampness, wetness.

ओलग(णें) अक्रि. पलीकडे जाणें. To cross, to go beyond.
[सं. **अव+लग् १ संगे गतौच**; प्रा. **ओलग्ग.**]
तेयांचिये वाचेपुढां भोजें । नाम नाचे माझें ।
जें जन्मशतीं ओलगिजे । एकोल यात्रेया ॥ ज्ञा. ९–२०५

ओलंड(णें), ओलांड(णें) उक्रि. उल्लंघन करणें. To cross, to pass over.
[सं. **१ उत्लङ्घ्** ; **२ ओ+लड्** (इ)–**ओलंड्** १० उत्क्षेपणे; प्रा. **ओलंड** (हेम ८-४-२६); म. **ओलांडा, ओलंडा.** परंतु ह्याला विशेष अर्थ आला आहे. एखादी गोष्ट ओलंडली असतां होणारा त्रास, रोग. एका चिंधींत बिब्बे, हळद, तांदूळ घालून ती पुरचंडी दुसऱ्यानें ओलंडली म्हणजे एकाचा रोग–केसतुड वगैरे जाऊन ओलांडणाऱ्या माणसाला तो होतो.]

ओलिसेलें न. तलम वस्त्र, नाजुक वस्त्र. A fine cloth.
[कान. **ओल्ली** = लहान पंचा–शेला.] मृणाल सुतांचे ओलिसेले । तुरां खाचेटै भणौनि वेढू सांडिले ॥ शि. ६९३.

ओली स्त्री. वस्त्राचा कांठ, पदर. Border of a cloth, end of a cloth.
[हळ्ळकन्नड. **ओळि=रेघ** ; सं. **आलि, आवलि** ; देप्रा. **ओलि** (हेम. ८-१-८३)]
" वालिपेचेचि आं ओली " शिशु १७५.

ओली(स) स्त्री. ठेव, जामीन, तारण, प्रमाण. Security, hostage.
[कान. **ओलु**=हमी, तारण, जामीन, जातमुचलका. देप्रा. **उल्ले**=कर्ज.]

ओलें वि. पाण्यानें भिजलेलें, क्लिन्न. Wet.
[सं. **आर्द्र, उद्र=जलचर, √उद्** ; प्रा. **ओल्ल, उल्ल.** (हेम. ८–१८२). ह्या शब्दापासून मराठी नामधातु ओलव(णें) असा झाला आहे. राजवाडे ह्यांनीं ह्या धातूवर पुढील टीप लिहिली आहे. **ओल, वोल, बोल्ह, ओल्ह** (उद् ७ क्लेदने, उनत्ति)–विकृत (उन्दापय = ओलाव = वोलाव) **उद्–उन्द्–उल्ल** (**न=ल**) आलें. **उन्द्–ओल्** हें रूप प्राकृत इतकें जुनें आहे, कीं **ओल** हा धातु अर्वाचीन संस्कृत म्हणून कोशांत स्थान पावला.]

ओव(णें), ओंवणें उक्रि. सुईंत सूत घालणें, शिवणें, गुंतविणें. To thread, to string.
[सं. **उप+वे, तंतुसंताने** ; प्रा. **ओविअ**; प्राकृत रूप हें निष्ठारूप आहे.]

ओवर न. दंपती, जोडपें, वधूवर. A married couple.
[सं. **वधूवर** ; प्रा. **वहुवर.**]

–ओवरजत्रा स्त्री. नवरीमुलगी–मुलगा ह्यांचें देवदर्शनास जाणें. The visit of a newly married couple to the family god.

ओवरी स्त्री. लहान खोली, देवालयाच्या भोंवतीं भिंतींत काढलेली खोली, स्वयंपाकघर. An apartment in a temple wall.
[सं: **अपवरका**; प्रा. **ओअरिया** (स्त्री). **ओवारी**= **धान्याचें कोठार**; सं. **अपवरक, उपरक**; प्रा. **उवरओ** (भाण्डारकर); गु. **ओरडो, ओरडी** (खोली); याकाम. **ओवरी** (शि. ५९६). **ओरी** पहा].

ओवस(णें) अक्रि. (स्त्रियांनीं) व्रताचें आचरण करणें. To perform some religious rite.
[सं. **उपवस्, उपवास** ; प्रा. **ओववास, ओआस; ऊआस** (हेम. ८·१·१७२–१७३) ; मराठी तद्भव. **ओवसा, वसा**=व्रत.]

ओवळा, ओंवळा वि. अमंगळ, अपवित्र, अशुद्ध, (सोंवळा ह्याच्या विरुद्ध.) Impure.
[सं. **अमंगल** ; प्रा. **ओमळिआ** ; **अवमल** (?) (ब्लोक.) ब्लोकच्या व्युत्पत्तीनें मराठी शब्दांतील अनुस्वाराची उपपत्ति नीट लागत नाहीं.]

ओवा पुं. एक प्रकारची औषधि व त्याचें बीं. A seed of the *Dill* kind, ajwaen.
[सं. **यवानी** ; (**अजमोदा**); हिं. **अजवान** ; बं. **यमानी.**]

ओवाळ(णें) क्रि. तोंडाभोंवतीं वाटोळ्या रीतीनें फिरविणें. To wave around the head.

[सं. **उत्+वल् १ संवरणे, संचरणे ; अववलय, > ओवल > ओवाळ (उद्वलन, अवज्वलन)**; याकाम. **ओवाळणें** (वेळापूर शिलालेख).]

–ओंवाळणी स्त्री. ओवाळण्याची क्रिया. त्याच्याबरोबर बक्षीस द्यावयाचा जिन्नस. (विशेषतः भाऊबीजेचा). Waving a gift given (to a sister) after waving the lamp.

ओंवी स्त्री. एक वृत्ताचा प्रकार, मराठी भाषेंतील एक वृत्त. A kind of metre.

[सं. **अर्धचतुष्पदी > अड्ढउट्ठवई > अड्डुढवई > अड्ढवई > अड्ढहवई > ढ्हवई > ढूहवई > ढूअवइ > होवई > ओवई > ओवी.**

अशा इतक्या अवस्थांमधून हा शब्द आला आहे असें प्रो. ह. दा. वेलणकर म्हणतात. (N. I. A. vol. I No. 4. p 217.) परंतु ह्या पाण्डित्यदर्शक अवस्था प्रत्यक्ष वापरांत नाहींत. काल्पनिक आहेत. ह्या शब्दाचा देप्रा. **ओविअ** ह्या शब्दाशीं संबंध आहे. “ **ओविअं** आरोपितं रुदितं चाट्ठ मुक्तं हृतंचेति पञ्चार्थम् (६६–१६). **मानसोल्लास** (श्लो. २०५२) ह्यांत ह्या शब्दाचें पुढीलप्रमाणें वर्णन आहे. “ तथा महाराष्ट्रेपुयोषिद्भिः **ओवि** गेया तु कण्डने ” ॥]

ओशट, ओशेट न. वि. तेल किंवा तुप ह्यासारख्या स्निग्ध पदार्थांनें झालेला बुळबुळीतपणा. Greasiness, oiliness, greasy.

[सं. **१ अवशिष्ट–ओशिष्ट–ओशेट–ओशट,** (भा. अ १८३२); सं. **उच्छिष्ट; २ अव+सिच् (निष्ठा)– अवसिक्त–ओसिक्त ; ३ वर्ष् १ स्नेहने–वषट्**]

ओशाळ(णें) अक्रि. लाज वाटणें, शरमणें. To be ashamed.

[सं. **अव+वश्य+ल** – ओशाळ]

–ओशाळा वि. लाजलेला. Ashamed, abashed.

–ओशाळगत, ओशाळीक स्त्री. लाज, शरम. Shame.

[ओशाळ ह्याचा अर्थ निलाजरा असाहि होतो. असे कांहीं शब्द आहेत, कीं त्यांचे परस्परविरुद्ध असे अर्थ निष्पन्न होतात. उ. निर्लज्ज, बहुमोल, बिनमोल वगैरे.]

ओषधि स्त्री. औषधि, वनस्पति. A herb, a medicinal plant.

[सं. **ओषधि (ओषं दाहं धीयते.)**]

ओष्ठ पुं. ओठ. A lip.

[सं. **ओष्ठ (उष्यते दह्यते उष्णाहारेणेति)**. ओठ पहा.]

ओस वि. शून्य, सुनें, ओसाड, पडित. Desolate, depopulated, forsaken.

[सं. **अ + उषित (√ वस्)–ओसिअ–ओस.** (राजवाडे–भा. अ. १८३४); सं. **उत्सद्** ; प्रा. **ओस्स;** याकाम. **ओस** (ज्ञा. ९·४०९).]

ओसंग-गा पुं. मांडी, ओंचा. Lap, portion of the worn-cloth on the lap.

[सं. **उत्संग, (उत्+√ संज्)** ; प्रा. **ओच्छंग ;** हिं. **उछग.** ओंचा पहा.]

ओसण(णें) अक्रि. स्वप्नांत बोलणें, बरळणें. To somniloquize.

[सं. **अव–उत्+स्वप्न** (नाधा.); ओसणवणें, ओसणावणें. हीं त्याचींच रूपें आहेत.]

ओसंड(णें) अक्रि. भरून वाहणें–सांडणें, पडणें. To overflow.

[सं. **अव+स्यन्द्. १ प्रस्रवणे ;** याकाम. **ओसंडणें** = टाकणें (ज्ञा. ३–५४)]

ओसर(णें) क्रि. कमी होणें, खालीं सरणें. To run down, to diminish.

[सं. **अपसारयति, अवसारयति ;** पा. **ओसारेति, अपसरति, अवसरति, ओसरति ;** प्रा. **ओसरइ ;** गु. **ओसरवूँ** (निघून जाणें, नाहीं म्हणणें); हिं. **उसरना, उसारना** (पळविणें, संपविणें); सिं. **अवसरु** (अवर्षण).]

ओसरी, ओसर, ओसार, उसार स्त्री. दरवाजाजवळची झांकलेली जागा, प्रकोष्ठ, ओटी, पडवी. The verandah.

[सं. **अव – अपसरिका** (?); देप्रा. **ओसरिआ अलिन्दः** (६४·१५); हिं. **उसारा=देवडी;** गु. **ओसरी.**]

ओसाड वि. निर्जन, शून्य, रिकामा. Desolate, forsaken.

[सं. **उत्सद्** ; प्रा. **ओस्साड.**]

ओसाड न. न पेरलेली जमीन. Uncultivated land. (**अव+च्छद्**)

ओहट(णें) अक्रि. कमी होणें, र्‍हास होणें, भरती उतरणें. To diminish, to run down.

[सं. **अप+घट्ट्** ; प्रा. **ओहट्ट** ; देप्रा. **ओहट्टो अपस्सृतः** (६६·१२); गु. **ओय(स्त्री)** ; (**आ+उठ् १ उपघाते**), **अप+वह्** (?)]

-ओहट-टी-टें समुद्राचें पाणी खालीं उतरणें, विराम, तहकुबी. An ebb-tide, a stop.

ओहमाय, वहमाय स्त्री. नवऱ्यामुलीची आई, सासू. Wife's or bride's mother.
[सं. **वधू+मातृ** ; प्रा. **वहु+माआ.**]

¹ओहर न. नवरानवरी, वधूवर. Newly weds.
[सं. **वधू+वर** ; प्रा. **वहुवर > ओहर.**]

²ओहर पुं. समुद्राचा फांटा. A creek.
[सं. (?); देप्रा. **वोहरम् जलस्य वहनम्**(२६६·१४).]

ओहळ(णें) अक्रि. झिरपणें, वाहणें. (नाधा.) To ooze, to trickle, to flow.

ओहोळ, वहोल पु. ओढा, वोढा, लहान प्रवाह. A streamlet.
[सं. वह्-(व)वाहलु (?) ; देप्रा. **ओआलो, वहोलो, वाहली** लघुजल प्रवाहः (२५०–५); गु. **वहेळो** ; का. **व्हळी.**]

ओळ स्त्री. रांग, पंक्ति. A line.
[सं. **आलि, वली;** देप्रा. **ओआली, ओली** (हेम. ८-१-८३); हळकन्नड **ओळि**=रांग; गु. **ओळ** (स्त्री); हिं. **वल, भल** (बाजू); सिं. **वरि** (स्त्री), **वरु** (पुं.) =बाक, वळण.]

ओळ(णें) सक्रि. एखाद्याकडे ओढला जाणें, वळणें, स्रवणें, पाझरणें. To be drawn to, to turn, to ooze.
[सं. **अव+वल्ल्, वल् १ संवरणे, संचरणे.**]

ओळकंब(णें) अक्रि. लोंबणें, लटकणें, लोंबकळणें. To hang.
[सं. **१ अवलंब्** ; प्रा. **ओलंब** ; **२ अव+उत्+कंब् १ गतौ** (रा.)]

ओळख(णें) सक्रि. जाणणें, पछाणणें, परिचय होणें. To be acquainted with, to know, to understand.
[सं. **उपलक्ष्**; प्रा. **उवलक्ख**; गु. **ओळखवूं.**]

-ओळख, ओळखदेख, ओळखपाळख स्त्री. परिचय, खूण. Acquaintance, indication mark.

ओळग स्त्री. सेवा, भक्ति, चाकरी. Service, devotion.
[सं. **अवलग्-न्न** (?); देप्रा. **ओलग्गा.**]

ओळग(णें) अक्रि. झोंके घेणें, आश्रय घेणें, चढणें. To swing.
[याकाम. **ओळग** (नरुस्व १०४).]

ओळगवि(णें) सक्रि. सेवेसाठीं अर्पण करणें, सेवा करणें. To serve.
[सं. **अवलग्** (?); प्रा. **ओलग्ग** ; याकाम. **ओळगविणें**; (उगी); कान. **ओलगिसु**=सेवा करणें.]

ओळंग(णें). ओळंघ(णें), वळंघ(णें) अक्रि. लोंबणें, खालीं लोंबणें. To hang.
[सं. **अवलग्** ; प्रा. **वलग्गइ** ; गु. **वलगवूँ** (धरून ठेवणें, मिठी मारणें, चिकटणें.), **वळगाडवूँ** (–पासून लोंबणें); हिं. **बिहंगना** (–वर चढणें.)]

ओळंब(णें), वळंब(णें) अक्रि. लटकणें. To hang.
[सं. **अवलंब्** ; प्रा. **ओलंब**; हिं. **विलंब (उशीर), विलंबना**; सिंह. **ओलंबु** (टांगलेलें), **इलंबेनवा** (जवळ येणें).]

ओळंबा पु. गवंड्याचें हत्यार. A mason's plummet.
[सं. **अवलंब**; प्रा. **ओलंब.**]

औ पुं. मराठीवर्णमालेंतील चौदावा स्वर. ह्याचा उच्चार कंठौष्ठ्य व उच्चारस्थान कंठ व ओष्ठ हे आहेत. The fourteenth vowel of Marathi alphabet.
(सं. प्रा. **औ, ओ, अव, अप, उत्** पासून निष्पन्न होतो.]

औकात पुं. गुजारा, चरितार्थ. Resources, livelihood, maintenance.
[अर. **औकात्** ; **वख्त्** चें अनेकवचन.]

औट वि. साडेतीन, तीन पूर्ण आणि चौथा अर्धा. Three and a half.
[सं. **अर्धचतुर्थ** ; प्रा. **अद्धचउट्ठ अद्धुट्ठ, अड्ढुट्ठ, अद्धचउट्ठ, अहअउट्ठ** ; याकाम. **औट.** (ज्ञा. ६-२२३).]

औटकी स्त्री. औटचा संबंध असलेली संख्या–उजळणी. A table of the multiple of $3\frac{1}{2}$.

औत पुं. शेतीचें अवजार, नांगर वगैरे. An agricultural implement, a plough.
[सं. **आयुध, किंवा आ+युत्,√यु** जोडणें.]

औत्या पु. शेतकरी, औतकरी. A peasant, a plough-boy.

औत्सुक्य न. उत्कंठा. Impatience, eagerness. (<**उत्सुक**)

-औदासिन्य न. बेफिकिरी. Indifference. (<उदासीन < उत्+आस्)

-औदुंबर पु. वृक्षविशेष. A kind of tree. (उदुंबर)

-औद्योगिक वि. उद्योगासंबंधीं. About industry. (<उद्योग <उत्+युज्)

-औपचारिक वि. वरवर, लाक्षणिक. Metaphorical. (<उपचार < उप+√चर्)

-औपरोधिक वि. गुप्त, गूढ, वर्मी लागणारा. Satirical, secret. (<उपरोध उप+√रुध्)

और वि. अन्य, दुसरा. Other, stranger. [सं. अपर, अवर ; देप्रा. ओर=सुंदर ; हिं. और.]

औरत स्त्री. स्त्री, बायको, पत्नी. A wife, a woman. [अर. औरत्.]

औरस वि. स्वतःचें, मालकीचें, निकडचें, स्वतःचा (पुत्र). One's own, a legitimate son. [सं. औरस्य (<उरसि भवः); प्रा. ओरस.]

औरसचौरस पुं. वि. समद्विभुज चौकोन, चौरस. A rectangle, length-wise and breadth-wise. [औरस (?) चतुरस्त्र.]

औषधि स्त्री. वनस्पति. A tree, a shrub.

-औषध न. रोगपरिहारक पदार्थ. A medicinal herb.

[सं. ओषधि, ओष-दाहः धीयते अत्र. ओष हा शब्द √उष् पासून.]

औषधोपचार पुं. उपचार, उपाय (रोगावर). Medical treatment.

औंस पुं. एक वजन-अडीच तोळ्याइतकें. An ounce.

[*Eng.* Ounce; *OFr.* Unce; *Lat.* Uncia = twelfth of a pound.]

औक्षण, औक्षवण न. ओवाळणें करणें. To wave around the head of a person.

[सं. आयुष्मान् (भव) असा आशीर्वाद देऊन ओवाळणें. (आयुष्य < आयुः √ इ+उसि+णिच्.)

औक्षवंत वि. फार दिवस वाचणारा. Longlived. [सं. आयुष्यवंत.]

क^{1} पुं. मराठी वर्णमालेंतील पहिलें व्यंजन. The first consonant in Marathi alphabet.

[वेदपूर्वकालापासून ह्या वर्गाच्या उच्चाराचा इतिहास पाहिला तर असें दिसून येते, कीं ह्याच्या उच्चारांत बराच फरक झाला आहे. सध्यां अर्वाचीन काळांत ह्याचा उच्चार कंठ्य आहे. ह्याचे जे वेदपूर्वकालांत उच्चार आढळतात त्यांत तालव्य व औरस्य ह्या उच्चारांचें मिश्रण असावें असें पाश्चात्य भाषांतील कंठ्य वर्णाच्या शब्दांचे उच्चार पाहिले व त्यांची तुलना केली तर दिसून येतें. संस्कृतमध्यें कंठ्यवर्णांचा अभ्यास तालव्य वर्णानें जो होतो त्याच्या मुळाशीं हीच प्रवृत्ति आहे. तालव्य उच्चाराशीं ह्याचा संबंध प्रतीत होतो. तसेंच कांहीं भाषांत 'औरस्य' उच्चाराशीं संबंध असल्याचेंहि प्रतीत होतें. प्राचीन शिमी (Semitic) भाषांतील कंठ्य उच्चारण बऱ्याच अंशीं औरस्य आहे.

सं. क ; प्रा. क ; कत्र्-कचर, कल्य-काल.

सं. क्र, क्ल. क ; प्रा. क्क. क ; क्रोश-कोस, क्लेश-किलेश. क्रथ्-कथ.

सं. ख ; प्रा. ख ; खद्योत-काजवा.

सं. ग् , घ् ; प्रा. क ; स्थग-ठक, श्रग-सरक, शिंघा-शिंक.

सं. च्. युच्छ्-चुक, सध्र्यंच-सडक.

सं. ष्. क्ष्. ह्. झष-झक, चष-चक, द्रुह-डुक, मराठी आद्य, मध्य, व अन्त्य 'क्' हा संस्कृत व प्राकृत क्, ख्, ग्, च्, ष्, ह्. इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.]

क^{2} न. सुख. Happiness. (नाक=न+अ+कम्=स्वर्ग)

का^{3} पुं. कसबा, कर्यात् ह्याचा संक्षेप. A short form of the word Kasaba.

कई वि.अ. किती, केव्हां, कोठें, कधीं वगैरे प्रश्नार्थक. (काव्यांत योजतात.) How much or how many, when, where &c.

[सं. कियत्, कस्मिन् (यावत्, तावत्); प्रा. कइआं (जइआं, तइआं; जइ, तइ; जआ, तआ; का, काव; जा, जाव; ता, ताव). " आहे इआ काले " (वर. प्रा. प्र. ६-८); प्रा. नाट्य. काव (जाव, ताव); हिं. कब, (जब, तब); मराठी. कइं, कईं, जइं, जईं, तईं, कैं जैं, तैं; याकाम, बकाम. जइं, कइं, जंव, तंव. प्रश्नार्थक व दर्शक सार्वनामिक शब्दांची सिद्धि ठरविणें किती दुरापास्त आहे हें वरील रूपप्राचुर्यावरून कळून येईल.]

कंकण न. कांकण, कंकणी, कांगणी. A bracelet, a riband tied round the wrist, a bangle.

[सं. **कङ्कण** ; प्रा. **कङ्कण** ; गु. **कंकण, कंगण** (नपुं); सिं. **कंगणु**; पं. **कंगण**; हिं. **कंकन, कंगन**; बं. ओ. **कांकन, कांगन**; का. **कांकम, कंगुन्** ; अकाम. **कंगण-णी.** हातांत बांधण्याचें सूत, वलय, कांकण. पूर्वी धार्मिक विधींत विधि समाप्त करण्याची जबाबदारी पत्करण्याचें चिन्ह म्हणून कंकण बांधीत असत. त्यावरून **हातांत कंकण बांधणें** म्हणजे जबाबदारी स्वीकारणें हा अर्थ रूढ झाला.]

कंकर पुं. लहान खडा, एक प्रकारचा खडक. Gravel, pebble.

[सं. **कर्कर** ; *IE.* Qer, Qel; सं. **कर (कर्कर, कर्कट)**; प्रा. **कक्कर** ; *Gr.* Kar ; *Lat.* Calc, cal, cer (cancer etc.) ; *Lith.* Kulnis (Heel) ; *Slav.* Klaku (Lime), Kalkis (Lime); गु. हिं. **कंकर** ; सिं. **कंकिरो** ; पपं. **कक्कर** (गोठलेलें दंव); ने. बं. आ. **कांकर.**]

कंकवा, कंगवा पुं. **कंगवा** पहा.

कंकाल-ळ पुं. अस्थिपंजर. पिशाच्च, प्रेत. A skeleton, ghost,

[सं. **कंकाल**; बकाम. **कंकाळ**; अकाम. काव्य. **कंकाळा** = दुष्ट]

नग्नभैरव वेताळ । झोटिंग पिशाच कंकाळ ॥

एभा १०·५८०.

कंकोळ पुं. एकप्रकारचा वृक्ष, त्याचें फळ, तांबूलांत घालावयाचा एक पदार्थ मिऱ्यासारखा काळा. Allspice.

[सं. **कङ्कोल**; प्रा. **कक्कोल**; हिं. **कंकोला**; बं. **कांकला.** मराठींत शब्द संस्कृतमधून आला. हें संस्कृतीकरण उत्तरकालीन असावेंसें वाटतें.]

कंकण-णी न. स्त्री. बांगडी, कांकण, कपाळावरील पागोट्याची वाटोळी व फुगीर पट्टी (कंगणीदार पागोटें). A bangle, a prominent band of turban.

[**कंकण** पहा.]

कंगवा (कंकवा) पुं. केस विंचरावयाचें फणीसारखें परंतु बहुधा एका बाजूस दाते असलेलें साधन, फणी. A comb.

[सं. **कंकत** ; प्रा. **कक्कत, कङ्कअ**; सिं. **कंगो**; हिं. **कंगुवा, कंघा**;]

कंगाल वि. गरीब, भिकारी, दरिद्री. Poor, penniless.

[सं. **कंकाल** = हाडाचा सांपळा; पाप्रा. **कंकाल**; का. **कगाल** ; बं. **कगाल** ; ओ. **कॉगाळ**; हिं. **कगाल** ; सिं. **ककालु** ; फा. **कंगालह.**]

कंगोरा पुं. नक्षीदार कांठ, वळ, कड, खांब, कोनाडा. An ornamental cordon, band.

[फा. **कंगुरा = किल्याचा कोनाडी तट.**]

^{1}**कच** स्त्री. माघार, भीति, अडचण, चेप, दाब. A strait, dilemma, fearful yielding.

[सं. **कृत्या = काम** ; प्रा. **कच्चा**; देप्रा. **कच्च तथा कोडुम्बं कायम्** (६९-१२).

संस्कृत मूळ स्वाभाविक वाटत नाहीं. हा ध्वनिशब्दच असावा हें मानणें अधिक प्रशस्त.]

^{2}**कच** स्त्री. ठोकर, पोचा, खळगा. Pressure, presss.

[कान. **कच्चा** = खांच].

कच(णें) अक्रि. खेळासाठीं तयार होणें. To prepare for play.

[सं. **कच् १ बंधने.**]

कचक(णें) उक्रि. वाईट शब्द वापरणें, रागें भरणें, To pull smartly, to scold.

[सं. **कत्थ्-कत्थक** (नाथा.) म. **कचकावणें-शब्दांनें** दहशत घालणें.]

कचकच(णें) अक्रि. बडबडणें, भांडणें. To brawl.

[सं. **कच् १ शब्दे** (द्विरुक्ति-कचकच). **ह्यापासून कचकचा** = कचकच आवाज करीत (अव्यय), **कचकचीत** = कच्चा, ओला, हिरवा; **कचकन** = एकदम घाईनें आवळण्याचा प्रकार इत्यादि शब्द सिद्ध होतात.]

कचकन, कचदिशीं (चावणें) अ. एकदम, ताडकन.

[कान. **कचु** = चावणें. **कचकन चावणें** ह्यांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील. **कन्ने** असा द्राविडी प्रत्यय आहे.]

कचकडें न. कांसवाच्या पाठीचा खवला, गव्याचें शिंग. Used to mean celluloid.

[सं. **कच्छ + कृत्ति**; प्रा. **कच्छकड**; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. व्युत्पत्ति स्पष्ट नाहीं.]

कचका पुं. सपाटा, जोराचा आघात, टोला, जोर, आवेश. A sounding stroke, smart pull.

[सं. **कच् १ बंधने (कच + अ + क).**]

कचकाव(णें) अक्रि. जोरानें बांधणें-मारणें, शिव्या देणें. To bind smartly, to abuse, to scold.

कचकावून अ. आवळून, सर्व शक्ति एकवटून. With all force.

[ह्या दोन्ही शब्दांत संस्कृत आणि कानडी ह्या दोन्ही शब्दांची भेसळ झालेली दिसते.

सं. **कच् १ बन्धने, शब्दे**; कान. **कचक्कने.**]

कचम(णें), कचंब(णें), कचमळ(णें) अक्रि. घाण करणें, गढूळणें. To stir about, to muddle.

[सं. १ **कश्मल** (नाधा.); २ **कृष्+मृद्** (द्विधातुसंयोग); प्रा. **कसमद** ; पहिली व्युत्पत्ति विशेष ग्राह्य. **कचंमा**=गढूळपणा.]

कचरट वि. ठिसूळ, ढिसूळ, लवकर तुकडा पडणारा. Brittle, weak.

[सं. **कच्चर+ट** ; (**कच्चर**=दुष्ट, कुत्सित.)]

कचरा पुं. घाण, केर, लहान लहान तुकडे, टाकाऊ पदार्थ. Rubbish, dirt, straw.

[सं. **कच्चर** ; प्रा. **कच्चवार** ; देप्रा. **कच्छरो** पङ्कः (६९-१३) ; हिं. **कच्चा**, **कचरा** (घाण); सिं. **कचिरो, किचिरो** (केर); गु. **काचर, कचरो.**]

कचरा, कचोरा पुं. एक प्रकारची सुगंधी वनस्पति. सुगंधी कंद. A fragrant plant.

[सं. **कर्चूर** ; प्रा. **कच्चूर** ; गु. **कचूरो** ; 'गव्हलाकचरा' दिवाळींत सुगंधी द्रव्य उटणें म्हणून वापरतात.]

कचाट न. स्त्री. युक्ति, धाडस, कारस्थान, संकट, अडचणीची स्थिति. A scheme, enterprise, adventure.

[सं. **कृच्छ्+पात** (?)]

कच्चा वि. हिरवा, न पिकलेला. (पक्का ह्याच्याविरुद्ध.) Unripe, unboiled, raw.

[ध्वनिशब्द-**कच**; याकाम. **काचा** (ज्ञा. १-१३४): हिं. **कच्चा काचा.** सं. **कत्थ-खोटें** (?); गणितांत 'कच्चे' असा एक शब्द रूढ आहे. त्रैराशिकांतील दुसरें पद व तिसरें पद ह्यांच्या गुणाकारास कच्चे म्हणतात. ह्याची व्युत्पत्ति स्पष्ट नाहीं.]

कचेरी स्त्री. सरकारी कामाचें ठिकाण, ऑफीस. Office, a hall of audience, a court.

[फा. **कचेरी**; सं. **कृत्यगृह** ; पा. **किच्चम** ; प्रा. **कच्च**; बं. **काचारी**; हिं. **कचरी, कचहरी**; गु. **कचेरी, कचरी** (व्यापाऱ्याची पेढी); सिंह. **कचरी**; तेलु. **कचेली.** शब्द फारशीमधून मराठींत आला. संस्कृत प्राकृत शब्द समानार्थी म्हणून पहावेत.]

कचोरा, कचौरी स्त्री. एक खाद्यविशेष (मसाला घातलेला व तळलेला). An eatable.

[सं. **क्वथ्** (?); देप्रा. **कच्चरा** ; गु. **काचरी, कचोरी** ; हिं. **कचौरी** ; का. **कच्चरी.**]

कच्च, कच्छप पुं. कासोटा, कासव. Tuck of a dhotee or a sari, a turtle.

[सं. **कच्छ, कच्छप** ; (केन जलेन छृणाति दीप्यते ; कच्छं आत्मनः मुखसंपुटं पाति.); संस्कृतमध्यें '**कच्छ**' शब्दाचे दोन अर्थ आहेत. एक **संपुट**, दुसरा **कासोटा.**]

कजाख-ग. वि. साहसी, क्रूर, दुष्ट, राक्षसी. Adventurous, fierce, ferocious.

[तुर्की. **कझाक्-लुटारू, पुंड** (?) कज्जा ह्या शब्दाशीं संबद्ध आहे का ? कज्जाख-भांडखोर (?) **कजागस्तुसाहसी** (राज. व्य.).]

कज्जा पुं. खटला, भांडण, लढाई. A suit (law), quarrel, dispute.

[अर. **कझिया**=गोष्ट, प्रतिज्ञा ; फा. **कझिया**-भांडण. एकाच अर्थाचे किंवा एकाच मुळापासून निष्पन्न झालेले **कार्य, काज, काम, कज्जा** इ. सर्व शब्द एकाच अर्थाचे व एकमूल परंतु प्रत्येक शब्दाच्या अर्थांत छटा निराळी आहे. **कज्जाग, कज्जेदलाल, कज्जेखोर**=भांडखोर.]

कंचणी, कंचनी स्त्री. नाचणारीण, नायकीण. A dancing girl.

[सं. **कंचन** (ह्या नांवाचा एक नर्तकांचा वर्ग होता.) √ **कञ्च्**-दीप्तौ, बंधने; हिं. **कंचनी.**]

कंचुक पुं. कवच, चिलखत, अंगरखा, झगा. A jacket or sleeved waistcoat (mailed).

[सं. **कंचुक.**]

१कंचुकी पुं. जनानखान्यावरील अधिकारी, द्वारपाल. A chamberlain.

[सं. **कंचुकिन्.** √**कन्च्-दीप्तौ.**]

२कंचुकी स्त्री. स्त्रियांची कांचोळी. A bodice.

[सं. **कन्चुलिका; कञ्चते हृदयाद्यङ्गान्यावृणोति.**]

कञ्जूस(ष) वि. कवडीचुंबक, अखर्चिक. A miser.

[सं **कर्ण+जुष्** (?); प्रा. **कण्णझूस** ; हिं. **कंजूर**= कानांतील मळ खाणारा. हिं. **कंजूस**, पं. **कंजूस** ; लां. **कंजूस** ; गु. **कंजूस** ; हा शब्द हिंदीमधूनच आला असावा.]

कंजर-कंजार स्त्री. दोर वळण्याचा धंदा करणारी जात. A class of rope-makers.

[देप्रा. **कंजर.** (लक्षणेनें) **कंजारीण**=केस पिंजारलेली स्त्री.]

कट पुं. कष्ट, यातना, निभाव. Pains, labour, toil.

[सं. **कष्ट, कट**; प्रा. **कट्ठ** ; गु. **काट** (विघ्न), **काटुं** (कठीण, कृपण); हिं. **कठ**; का. **करत, कठ्युन्** (नु); म. **कट, कटकट.**]

^{2}**कट** पुं. (हरभऱ्याच्या) डाळीच्या वरणाचा वरचा भाग (कटाची आमटी). Decoction of pulse.

[कान. **कट्टु**=डाळीचा, कडधान्याचा रस, (**कटवणी**= कट्टु+पानीयम्); सं. **किट्टम्**=कृष्णवर्णाचा पदार्थ, मल. परंतु कानडी व्युत्पत्तिच विशेष ग्राह्य दिसते. अर्थसाम्य त्यांत प्रतीत होतें.]

^{3}**कट** स्त्री. सोंगट्याच्या खेळांतील पटावरील एक घर. A square.

[कान. **कट्टि**=बांधणें, **कट्टे**=रचना.]

^{4}**कट(दोरा)** पुं. कमरेचा दोरा. A (silk) thread worn around the loins.

[सं. **कटिदोरकः**]

^{5}**कट** पुं. जूट, एकत्र मसलत, टोळी. A conspiracy.

[कान. **कट्टे=रचना, बांधणी.**]

^{1}**कट(णें)** अक्रि. लिप्त होणें, वेढणें, अतिशय मळणें. To be be-grimed or deeply dirtied.

[सं. **कट् १ वर्षावरणयोः**]

^{2}**कट(णें)** अक्रि. अतिशय मेहनत करणें. To toil, to strive.

[सं. **कट् १ कृच्छ्रजीवने.** किंवा **कष्ट** (नाधा.)]

^{3}**कट(णें)** अक्रि. कापलें जाणें, अवयव तुटणें. लढाईंत ठार होणें. To be cut, to be killed in fight.

[सं. **कृत् ६ छेदने** ; हिं. **कटना** ; गु. **काटवूँ** ; सिं. **काटनूँ. कटमिति** व्याज-तुटमिति.]

कटक न. सैन्य. Army.

[सं. **कटकम्. √कट् वृष्टौ गतौच** ; याकाम. **कटक= सैन्य** (ज्ञा.)]

कंटक पुं. कांटा. A thorn.

[सं. **कंटकः, √कंट्.**]

कटकट स्त्री. त्रास, संकट, भांडण, कज्जा. Teasing, wearying, persistence, wrangling.

[सं. **कष्ट**; प्रा. **कट्ट.** मराठींत लिंगबदल. **कटकट** (द्विरावृत्त); किंवा मराठींत ध्वनिशब्द म्हणून रूढ झाला असावा.]

-**कटकटा** अ. हाय हाय. An interjection of distress.

[सं. **कट** (द्विरुक्त); याकाम. **कटकटा**]

एथ अर्जुन म्हणे कटकटा ॥ ज्ञा. ११·४५२

कटकी (खण) वि. पुं. अपुरा (तीन सळी किंवा घडी). Incomplete, falling short.

[कान. **क्रटकी=कर्नाटकी खण.** हा दक्षिणी बायकांना चोळीला पुरत नाहीं. (शको.)]

^{1}**कटा** अ. हायहाय, (कटकटा पहा.) Interjection of distress.

^{2}**कटा** पु. वध, कत्तल. Death, murder, massacre.

[सं. कटाह (**कटः पापी आहन्यते यत्र**).]

संपूर्ण **कटा** जाला ॥ शिदि. २९

कटार स्त्री. लहान तरवार. (वीस ते सव्वीस इंच पातें, कमरेस लटकत ठेवितां येण्यासारखें.) A sort of dagger or poniard.

[सं. **कट्टार** ; देप्रा. **कट्टारी** (क्षुरिका ७०-७); गु. सिं. **कटार** ; कट्यार पहा. याकाम. **कटार** (ज्ञा). 'कटि' या शब्दाशीं संबंध असला पाहिजे.]

कटाव पु. व्यवस्थित बांधणी, थाट, मेळ, एक वृत्त. An imposing display, a species of metrical composition having शब्दालंकारs.

[कान. **कट्टे=रचना** ; सं. **कटिबंध** (?)]

कटाळ(णें) अक्रि. दमून जाणें, थकणें. To be tired, to be exhausted.

[सं. **कष्टालु** (नाधा.); कंटाळणें ह्याचा ग्रामीण उच्चार.]

कटाक्ष पुं. डोळ्याचा कोन, तिरवी नजर, त्यावरून लक्षणेनें राग, वैर, क्रोधदृष्टि, आग्रह, कल, प्रवृत्ति (हे अर्थ वरील अर्थाच्या लक्षणा आहेत.) A side-glance, oblique view.

[सं. **कट+अक्षिन्** ; (कटावतिशयितौ अक्षिणीयत्र, २ कटं गण्डम् अक्षति व्याप्नोति.)]

कटि स्त्री. कमर, कड. The loins, the region above the hip.

[सं. **कटि** (कट्यते वस्त्रादिना व्रियते); प्रा. कड, **कट** असे दोन अपभ्रंश होतात. उदा. **कडेवर** (कटिउपरि), **कडदोरा** (<**कटिदोरकः**) **"कर कटेवरी उभा विटेवरी."** मराठी शब्दयोगी अव्यय '**कडे**' ह्या **कटि** शब्दापासूनच.]

–कटिन्हाण न. कमरेपर्यंत स्नान. Ablution from the feet to the waist.

कटिबंद-ध पुं. पृथ्वीच्या **गोलावरील** वातावरणाचा कल्पिलेला पट्टा. A zone of the earth.

कटिबंध, कटबंध पुं. कटावाच्या वृत्तांत रचिलेलें काव्य. A species of metrical composition called कटाव.
[कान. **कट्टे**=**रचना.** (कटाव पहा.)]

कटिशूल पुं. विषयसुखाची तीव्र इच्छा (लक्षणा). A covert term for the sexual lust (in males.)

कटोरा पुं. प्याला, भांडें, मोठी वाटी. A bowl or cup.

[सं. **कटोरा** (?); देप्रा. **कट्टोरग**; हिं. **कटोरा**; सिं. **कटोरो**; गु. **कटोरी–रो**; दुसरी एक व्युत्पत्ति देतात–कय्यते दीयते स्थाप्यते भक्ष्य द्रव्यादिकमस्याम्. परंतु ह्या व्युत्पत्तींत पाण्डित्यप्रकर्ष आहे. देशी प्राकृत शब्द हांच मूळ शब्द. नंतर त्याचें संस्कृतीकरण झालें.]

कट्टर वि. एकजात, एकान्तिक, हट्टी. Head-strong, die-hard,

[**सं. प्रा.** (?); हिं. **कट्टर,** हा शब्द '**कट्टा**' ह्याचें अल्पीकरण असावें.]

कट्टा वि. बळकट, धिप्पाड, थोर, अफाट, पूर्ण, पक्का. Stout, sturdy, clever, expert.

[सं. (ध्वनिशब्द); **धट्टाकट्टा. धट्टा**<**धृष्टः कट**= अति, पुष्कळ. कटखादक=कट्टा खादाड, भा. अ. १८३४.]

कट्टा पुं. ओटा, जूट, दगडाचा ओटा. A raised place of stone or wood.

[सं. **कट्** (?); ते. **कट्ट–ओटा, बांध**; कान. **कट्टु**= **बांधणें, कट्टे**=**ओटा.** कानडी व्युत्पत्तिच अधिक ग्राह्य.]

कट्यार स्त्री. कटार पहा.

कट्यार स्त्री. नक्षीची मूठ. A decorated handle.
[सं. **कर्त्** १ कर्तने ह्यापासून किंवा कटिपासून निघाला असण्याचा संभव आहे.]

कठीण, कठिण–न वि. अवघड, दुष्कर, संकटग्रस्त, जाड, मऊ नसलेलें. Hard, solid, firm, thick.

[सं. **कठिनम्** (√**कठ्–इनन्**); प्रा. **कठिण**; सिं. **कठनु**; हिं. **कटन**; गु. **कठण-न**; पं. **कटण**; हें उत्तरकालीन संस्कृतीकरण असावें. मूळ शब्द द्राविडी. **कठ, कंट**=दगड, खडक. '**कडदू , कडु**' **कठर, कठिन कठोर** हे शब्द वरील 'कठ' शब्दाशीं संबद्ध आहेत.]

कठोर वि. निष्ठुर, जाड, कर्कश, टणक, निर्दय, तीक्ष्ण. Hard of heart, cruel, savage.

[सं. **कठोर–कठति पारुष्यमाचरति.** परंतु हें उत्तर-कालीन संस्कृतीकरण आहे. मूळ द्रा. **कठ, कंट**=**दगड, खडक.** '**कठिण**' ह्यांच्याशीं संबद्ध आहे.]

कड स्त्री. बाजू, पक्ष, कांठ, कमर. The edge, verge, border, brink.

[सं. **कटि** (?); प्रा. **कडि**; गु. **कड, केड**; सिं. **केर्** (समुद्रकांठचा धक्का). कान. तेलु. **कड**=**जागा**; कान. **कट**=शेवट; याकाम. **कड** (ज्ञा. २७·१९२). मूळ **कडेवर** घेतलें ; कड (सं.) <कटि. त्यानें माझी **कड** घेतली; कड <कट. कड (कान.) पहिला शब्द संस्कृत तद्भव व दुसरा कानडी आहे.]

कडक वि. तापट, प्रखर, टणक, तीव्र. Fierce, ardent, sharp, dry, crisp.
[सं. **कक्खट** (वर्णव्यत्यास होऊन) **कटक.**]

कडक(णें) अक्रि. वाढणें, चढणें (बाजारांतील भाव कडकणें). To increase, to wax. ताठ–चिवट होणें (भाकरी कडकणें). To become dry–crisp, to dry stiffly.
[सं. **कड्** १ कार्कश्ये]

कडकड(णें) अक्रि. आवाज होणें, एकदम तुटणें. To crash, to crack.

[सं. **कड् १० भेदने.** कडकन्, काडकन्, कडकडाट वगैरे शब्द मराठींत सिद्ध झाले आहेत. **कन्** हा प्रत्यय कानडी **कन्ने** पासून सिद्ध झाला आहे.]

कडका पुं. तुकडा, कटका. A piece (cut off).
[सं. **कट्, कड्, १० भेदने**]

कडका पुं. वृत्त, छंद, गीत, पोवाडा. A particular metre.
[हिंदी. **कडका**=**यशोगीत. कटाव** ह्या द्राविडोद्भव शब्दाशीं संबंध आहे काय ? कडाखा पहा.]

कडकडीत, कडकडून अ. अत्यंत तीव्र रीतीनें. Closely, firmly, lightly.

[सं. कड् १ मदे, वैक्लव्ये, √कड् ६ अदने. पुढील शब्द पहा. **कडकडून** चावणें, भूकेनें **कडकडणें, कडकडीत, कडकडून** भूक लागणें (√ कड् ६ अदने), **कडकडीत** सोवळें, **कडकडीत** व्रत (√कड् १० भेदने).]

–कडकणें न. नवरात्रांतील देवाच्या नैवद्याची तेलची. A stiff and dry cake fried.

कडका पुं. तीक्ष्णपणा. Sharpness. (√ **कड्** १ कार्कश्ये).

कडकी स्त्री. उष्णता, गर्मी. Heat. (√ **कड्** १ कार्कश्ये).

^{1}**कडकडून (चावणें)** अ. जोरानें (चावणें). Firmly, closely, ardently.

[कान. **कडि** = चावणें. हा शब्द ध्वनिशब्द असावासा वाटतो. पण तसा नाहीं. एकाच अर्थाचे दोन शब्द–एक द्राविडी व दुसरा आर्य असे जोडून ठेविले आहेत. **कडकडीत** थंडी, **कडकडीत** उन्ह.]

^{2}**कडकडून(भेटणें)** अ. आवळून, दृढ आलिंगन देऊन (भेटणें, मिठी मारणें). Firmly, closely, ardently.

[कान. **कदे**–दावणें, आलिंगणें, एकमेकांवर पडणें, **कदकु, कडकु** = दाबणें, पिळणें.]

कडची स्त्री. लहान कढई. Iron pan.

[सं. **कथ्, कडत्र** ; देप्रा. **कडच्छ अयोदर्वी** (७१·१०); गु. **कडछी**; सिं. **कणछू, करछू** ; हिं. **करछी** ; इतर संबद्ध भाषांत **पळी** ह्या अर्थी असाच शब्द आहे. (म. **कढणें** व **कढई** पहा.)]

कडतर पुं. जुनी फाटकी टोपली, चटई, पंखा. A fan, basket.

[सं. **कडत्र** (?); देप्रा. **कडन्तरं जीर्णशूर्पाद्युपकरणम्** (७५·१) **कडतरिअं दारितम्** (७६–१२).]

कडता पुं. चाळीस शेर वजनी एक मण जिन्नस वजन केल्यावर त्याच्यामागें द्यावयाचा वर्तांळा. (मणाच्या मागें चार शेर कमी.) Excess above the forty seer maund.

[कान. **कडत** = **छाट**.]

कडदोरा पुं. कमरेचा दोरा, करगोटा. A silk cord or silver twist worn around the loins.

[सं. **कटि + दोरकः; कटित्र > कडतर > कडदर–दोर–दोरा** (शको.) ही दुसरी व्युत्पत्ति चिन्त्य आहे.]

कडधान्य न. पावटा, वाटाणा, अळसुंदा, मूग, उडीद वगैरे. A general name for legumenous plants and legumes.

[१ सं. **काष्ठधान्यम्** ; प्रा. **कट्ठधण्ण**. २ सं. **कटधान्यम्** (कट=तृण); प्रा. **कडधण्ण**. एक अवयव प्राकृत व दुसरा संस्कृत असा संयोग झाला आहे. **कडवा, कडवळ** (चारा) वगैरे शब्दांत '**काष्ठ**' शब्दापासून निष्पन्न झालेला '**कड**' हा शब्द प्रथम अवयव म्हणून आहे. किंवा ३ कान. **कडले**=वाटाण्यासारखीं धान्यें.]

कडप न. गवताची लहान गंज. A stack of hay.

[सं. **कडम्ब** (?); देप्रा. **कडप्पो निकरः** (७३–१५); गु. **कडप**.]

कडवा पुं. कणसें कापून घेऊन राहिलेलें धाट. ज्वारीचीं धाटें. The culm or haulm of जोंधळा for fodder dried.

[१ सं. **काष्ठवृध्, कदंब**; सं. **काष्ठ + वलयम्** ; प्रा. **कड + वड्ढ, कडवाढ, कडवाड**; कान. **कडबे**; हिं. **कडबी**; सिं. **कडब** ; याकाम. **कडबाडें** (ज्ञा. १४–२४०)]

कडवू पुं. पुरणाची करंजी. A cake stuffed and rolled up.

[कान. **कडबु, कडुबु**.]

कडबोळें, कोडबुळें न. भाजणीच्या पिठाचें तळलेलें वळें. A ring made of mixed flour and fried.

[सं. **कट + वलय** (?).]

कडलग स्त्री. शिडी. A ladder.

[सं. **कटि + लग** ; याकाम. **कडलग** (उगी.)]

कडलेख वि. शिल्लक असलेलें. Remnant, residue.

[सं. (?); याकाम. **कडलेख** (उगी.)]

कडवसा पुं. थोडासा उजेड, अंधुक प्रकाश. Rays shining in at the door or a window or through the roof.

[सं. **कुदिवस (इषत् दिवसः प्रकाशः). कूट+वासः** ; **कडा** (= बाजू) + **वास** (?); **कत्–द् + उषस्** (किंचित् उषस्.) (?); याकाम. **कडवसा** (ज्ञा. ४–१७४.)]

कडवळ न. उन्हाळयांत पाणथळ जमिनींत तयार केलेला चारा. After-sproutings of जोंधळा.
[सं. **काष्ठ + वलयम्**; याकाम. **कडबार्डे** (ज्ञा. १४-२४०). कडबा पहा.]

कडवें न. पदाचा एक भाग, गाण्याचा एक भाग, तुकडा. A portion of a poem or song.
[सं. **कट** (कड); कान. **कट्टे** = रचना; '**कटाव**' शब्दांतील '**कट**'शीं संबंध आहे. **कडाका–कडाखा**= ध्रुपद.]

१कडस(णें) उक्रि. कढविणें, सुलाख घालणें, कसास लावणें. To boil and test, to test.
[सं. **क्रथ्**; प्रा. **कड**; कान. **कडसु**=कढविणें कानडीमध्यें तद्भव झाला आहे.]

२कडस(णें) अक्रि. विचार करणें. To think.
[सं. **कटाक्ष**; प्रा. **कडास.**]

३कडस(णें) अक्रि. क्षीण होणें. To emaciate.
[सं. **कृश् ४ तनूकरणे.**]

४कडस(णें) उक्रि. जोरानें बांधणें. To bind.
[सं. **कृष्**; प्रा. **कड्ढ.**]

१कडसणी स्त्री. चौकशी, विचार, वाटाघाट, मंथन (लक्षणा). Careful examination or consideration.
[सं. **कर्षणी**; प्रा. **कड्ढणी**; याकाम. **कडसणी** = मंथन, विवेचन (ज्ञा. २-१२९); कान. **कडे** = घुसळणें (?).]

ये युक्तीची कडसणी । नाहीं जयाच्या अन्तःकरणीं ॥ **ज्ञा.** २·३४२.

२कडसणी, कडोसरी स्त्री. बाजू, बरगडी. Either side of that region of the body encircled by **धोतर.**
[सं. **कटि, सणी, सरी (?)**]

कडसरी स्त्री. (गो) बांबूच्या बारीक काड्या–दोरांनीं विणून केलेलें जाळें, पाटीच्या किंवा दुरडीच्या वरचा घट्ट विणलेला भाग (शको.). A net made up of twines and bamboo sticks, the edging or extreme and closing slip of a basket.
[सं. **कृष् (?)**; प्रा. **कडसकरा**-बांबूची काठी.]

१कडा पुं. डोंगराचा तुटलेला भाग, सुळका. A cliff, a precipice.
[सं. **कट** – आवरणे; कान. **कडदु** = तुटलेला भाग. (**सं. कटक–कडअ. कडा**–भा. अ. १८३१); हिं. **कडाडा.**]

–कडेलोट पुं. कड्यावरून लोटण्याची शिक्षा. शिक्षेची परमावधि, (त्यावरून लक्षणेनें) कोणत्याहि गोष्टींतील आतिशयित्व. Precipitation from a cliff, intensest quality.

२कडा पुं. हातांतील दागिना. A bracelet.
[सं. **कटक**; प्रा. **कडग (पुंन), कडअँ; कडें, कडी** हीं इतर रूपें होत.]

कडाकोट, कडेकोट पुं. संरक्षित करणें. To secure. वि. भक्कम, सुरक्षित. Made fast and secure through locking and bolting.
[सं. **कड्–रक्षणे**; कान. **कडी + कोट**]

१कडाखा पुं. तडाखा, फटकारा, अतिशय वेग. A loud–soundnig blow or stroke.
[ध्वनिशब्द.]

२कडाखा पुं. एक वृत्त, ध्रुपद. A particular metre.
[**कटाव, कडवें** वगैरे शब्दांतील **कड, कट** ह्या मुळाशीं संबंध आहे.]

१कडाड पुं. मोडण्याचा आवाज. A rattling noise, crashing, cracking.
[सं. **कटकटा** (ध्वनिशब्द); गु. **कडकड**; सिं. **करकाट**; हिं. **कराकर**; प. पं. **करक.**]

२कडाड पुं. ज्ञाता, चाणाक्ष मनुष्य. A clever person.
[सं. **कृष्**, **कर्ष (?)**; कान. **कडे=मंथन, विवेचन** (लक्षणा); याकाम. **कडसणी**=विवेचन (ज्ञा. २·३४२), **कडाड** (ज्ञा. ११–९७).]

कडासन न. कातड्याचें आसन. A leather seat, a hide or skin used as a seat.
[सं. **कडासन**, (हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. ह्यांतील '**कड + आसन**' हे अवयव होत. पैकीं '**कड**' ह्याचा '**कृत्ति**' ह्या सं. शब्दाशीं संबंध असावा.); **गु. कडासन**]

कडियाळ–ळी–ळें न. स्त्री. सांखळी, गोल कडें, कुलुप, बंधन, माळ. A chain, bond.
[सं **कटक + वलयम्**; प्रा. **कडअ>कडय + वलअँ–वळँ**; याकाम. **कडियाळें** (ज्ञा. ९·५२९); अकाम. **कडिवळें.**]

कड स्त्री. लोखंड वगैरे धातूची सांखळी किंवा सांखळीचा एक भाग. A chain, a latch, a ring of metal.

[सं. **कटक** ; प्रा. **कडअ, कडय** ; २ सं. **कटिका** ; प्रा. **कडिआ** ; कान. **कडी** ; हिं. **कडी** ; गु. **कडी** ; सिं. पं. बं. **करी** ; अकाम. **कडीकोट-बंदोबस्त**. (कडीकोट = किल्ला.)]

कडीत स्त्री. धूळपाटी. A slate.

[कान. **कडत** = कोळशानें रंगविलेलें कापडाचें पुस्तक. यावर हिशेब लिहीत असत.]

" पृथ्वी एसनी कडीत आन मेरू एसनी खडी। " दृ. सू. २७२.

कडु-डू वि. बेचव (गोडच्या विरुद्ध), वाईट चवीचें. Bitter.

[सं. **कटु**; प्रा. **कडु**; द्राविडी. **कडि, कडुगु** ; सिंह. **कुळु**; गु. **कडवू** ; हिं. **कडुवा**; सिं. **कडो**. सं. **कटुक** (**कटुरेव कटुकः स्वार्थे कन्**); प्रा. **कडुअ**. मराठी सामासिक शब्दांत ह्यचा संक्षेप ' **कड** ' असा होतो. उदा.-**कडवट** कडू.]

कडवा वि. कडू, रानटी, निर्दय, पाषाणहृदयी. Savage, harsh, stern, severe.

[सं. **कटुकः** प्रा. **कडुअ**; हिं. **कडवा.**]

कडून अ. पासून. From.

[कान. **कड, कडे, कड**=बाजू. कडे होऊन=कडून.]

कडूसें, कडोसें कडवसा पहा.

¹कडें अ. बाजूस. Towards, in the direction of, by the side of.

[कान. **कडे**=शेवट; **कड** = बेलबुट्टी काढलेलें टोंक. याकाम. कडे (ज्ञा. १८-६६); **कडेलग** = अगदीं शेवटीं (ज्ञा. ६-५६)]

²कडें न. हातांत घालावयाचें वळें. चक्र, गोल. A ring, a circle of metal.

[सं. **कटकम्** (**कट्यते निर्गम्यते अस्मात्**); प्रा. **कडअ**;]

कडोसरी, कडोस्त्री स्त्री. कमरेस खोवण्याची वस्त्रांतील जागा. Either side of that region of the body encircled by the धोतर or लुगडें.

[सं. **कटि + वस्त्र** (?); **कटि + सणी, सरी**; **कडसणी** पहा.]

कढई स्त्री. लोखंडाचें पसरट भांडें. A frying vessel or iron pan.

[सं. **कटाहः** (कंठ उत्तापादिकं आहन्ति); प्रा. **कडाह**(पुं); हिं. **कडाहा** ; बं. **कडाई** ; ओ. **कन्हाई, कढेई, कराई** ; गु. **कडा** ; सिं. **कराहि, कणाहो**. संस्कृत 'कटाह'मध्यें 'कथ्' ह्या धातूचा संबंध असला पाहिजे किंवा कडाह ह्या प्राकृत शब्दाचें संस्कृतीकरण नंतरचें असलें पाहिजे.]

कढ(णें) अक्रि. शिजणें, उकळणें, आधण येणें. To boil, to cook, to be heated to fusion.

[सं. **क्वथ्** ; प्रा. **कढ** ; पा. **कढ्ढ** ; पं. **कढ्ढणा** ; गु. **कढवूं** ; न. **काडवूं**.

O. Czech. Crcha-line; *OS.* gihalon; *OF.* Haler; *Eng.* Hale = draw; *AS.* ge-holean = get; *Eng.* Haul.

कढणें हा धातु **क्वथ्**पासून व्युत्पादितात. परंतु इतर युरोपीय भाषांतील धातूंशीं ताडून पाहतां **कर्ष्**पासून व्युत्पादणें अधिक सयुक्तिक आहे. कांहीं विद्वानांनीं **कढणें** आणि **काढणें** ह्या दोहोंत घोटाळा केला आहे. हेमचंद्र **कढ** ह्याचा अर्थ **ओढणें** असा देतो. ह्या धातूबद्दल आणखी दोन मतें आहेत. **सं. कृष्ट, प्रा. कठ्ठ**-ह्यापासून आला असावा. परंतु '**ठ्ठ**' हा प्राकृतमध्यें '**ढ्ढ**' होत नाहीं ही एक अडचण आहे. शिवाय निष्ठारूपापासून धातु बनल्याचें विशेषसें आढळत नाहीं, असें ब्लोकचें म्हणणें आहे. **कढ्ढ**, √krz-d, √grs-d ही एक व्युत्पत्ति आहे. परंतु ह्याला अर्थभेद आड येतो. √qere=draw a furrow, √qele आणि **कढ्ढ** ह्याचा अर्थ **काढणें** असा आहे. हीं मतें मान्य होण्यासारखीं नाहींत. ह्यांत **कढ-काढ** ह्यांमधील संभ्रम आहे. **कथ्** किंवा **कर्ष्** ह्यापासूनच व्युत्पादणें हेंच योग्य.]

काढा पुं. वनस्पतींचा कषाय. The essence of medicinal herbs, decoction.

[सं. **क्वथकः** (**निक्वथकः** = **निकाढा**).]

¹कढी स्त्री. ताकास फोडणी वगैरे देऊन केलेलें उष्ण पेय. A hot drink or soup made of butter milk.

[सं. **क्वथिका** ; प्रा. **कढिआ** ; सिं. **कढही** ; कान. तद्भव. **कढ** = कढविलेलें ताक ; द्रा. **कढि.**]

²कढी (पातळ होणें) अडचणींत येणें, आजारामुळें शरीर निस्तेज होणें. To be in extreme straits, to grow pale through illness.

[सं. **काष्ठ** (?) **द्राविडी** (?)]

कण पुं. दाणा, लेश. A particle, an atom, a minute bit.

[*IE*. Qne, Qnu-d; सं. **कण, (कण्डु, कन्द);** *Gr*. (Kinid, Kno,); *Lat*. Cnide, Cinis, Knis; *Lith*. Knis; *Russ*. Gnides; *Teut*. Knis; **सं. कण; प्रा. कण, कन;** गु. **कण, कणी, कणुं;** सिं. **कणो**; पं. **कण;** पपं. **कणी = थेंब;** हिं. **कन;** मराठी. **कण, कणीस, कणीक.**]

कणकण स्त्री. तापाचा-ज्वराचा अंश. Feverish sensation.
[सं. क्रण् १ शब्दे. (ध्वनिशब्द)]

कणखर वि. कठीण, बळकट. Strong.
[कान. **कण** = बांबूची काठी.]

कणस न. बोंड, धान्याच्या ताटाचा शेंडा. An ear of corn.
[सं. **कणिश** (परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.); गु. **कणस.** कणीस पहा.]

कणंग, कणींग स्त्री. बांबूचा मोठा पेटारा (धान्य ठेवण्यासाठीं.) A corn-bin.
[कान. **कण = बांबूची काठी, कणजी, = कणगी. ग्, ज्** ह्या वर्णांचा विपर्यय नेहमीं होतो.]

कणगा पुं. कणींग, मोठी कणींग. A big corn-bin.

कणगोली, कणगुला स्त्री. पुं. लहान कणींग. A small cornbirn. (ला–अल्पार्थें प्रत्यय.)

कुणगा पुं. शेतवाडी, कुणब्याचें जीवनाचें साधन. A source of maintenance.

कणव स्त्री. कृपा, दया, माया, करुणा. Pity or compassion.
[*IE*. Qrep, Qrp; *Av*. Kərəfs; सं. **कृपा;** √**कृप् कृपेः संप्रसारणम्;** याकाम. **कणव.** (ज्ञा. १७-३३२.)]

कणा पुं. पाठीचें मुख्य आधाराचें हाड, पृष्ठवंश. (पर्वताचा कणा, मोटेचा कणा, गाडीचा कणा,) The spine or back-bone, spine axle.
[वैसं. **कर्णकः** = दांडा; कान. **कण** = काठी. **कणे** = उभा किंवा आडवा दांडा]

कणिक, कणीक स्त्री. गव्हाचें पीठ. Wheaten flour.
[**सं. कण > कणिक = सूक्ष्म कण; सिं. कणिक** (गहूं), **कणक**; कान. **कणक** = गव्हाचा मैदा. कण पहा.]

कणिका स्त्री. अति सूक्ष्म कण, अंश. A small particle.
[सं. **कणिका = बारिक वाळू**; हिं. **कणिका,** कण पहा.]

कणी स्त्री. बारीक सडी, भातांतील हिरवा कच्चा अंश. A broken bit, the portion remaining hard in grain.
[सं. **कणिका, कर्णिका**; प्रा. **कण्णिआ**; म. **कण्या**– दळलेली भरड, दाताच्या कण्या होणें (ल).]

कणीस, कणस न. सस्यशीर्षक, धान्याचें बोंड, धान्याच्या कणांचा पुंज. An ear of corn.
[सं. **कणिश; (कणः अस्य विद्यते; तं श्यति; कणाः सन्ति अस्मिन्);** प्रा. **कणिस** (न). किंवा हा देप्रा. **कणिसम्** असा शब्दहि आहे; अकण पहा.]

कणेरी, कण्हेरी स्त्री. तांदूळ वगैरे भरडून त्याच्या कण्या शिजवून केलेलें पातळ पेय. A thin diluent drink or food-water boiled with fragments of rice.
[सं. **कण, कणिका.**]

कण्या स्त्री. धान्य भरडून केलेलें एक खाद्य. An eatable of rice.

१कंठ पुं. गळा, गळयांतून निघणारा ध्वनि (लक्षणा). The throat, or the fore part of the neck.
[सं. **कंठः** (√**कंठ्**); याकाम. **कंठनाळ;** (ज्ञा. ६·२७); (लक्षणेनें) **कंठ फुटणें** (आवाज निघणें, आवाज मोठा होणें), **कंठ बसणें** (आवाज बसणें), **कंठमणी** (कंठांतील मणका, लाडका), **कंठी** (सं. **कंठिका;** प्रा. **कंठिआ**),'**कंठशोष** (कंठ कोरडा होणें–ओरडून), **कंठा** (गळ्यांतील हार–दागिना.); **कठडा** (कंठ + डा).]

२कंठ पुं. कांठ, गळा. The neck of a pitcher.
[सं. **कण्ठ;** प्रा. **कण्ठ;** गु. हिं. **कंठ;** सिं. **कंठु;** सिंह. **कट.**]

कंठ(णें) उक्रि. क्रमणें, सहन करणें, कष्टानें घालविणें. To pass, to endure, to undergo (pain).
[सं. **कठ्–कंठ् १ कृच्छ्रजीवने; कष्ट;** प्रा. **कट्ठ;** कान. **कटिसु–दुखणें, दुःख होणें.**]

कंठाळी स्त्री. पडशी. A bag having opening in the middle.

[कान. **कण्टले = पडशी.** दोन्ही बाजूंस पडणारी **पिशवी.**]

कंड, कडू स्त्री. खाज. Itching sensation.

[सं. **कण्डु, कण्डू** ; (**कण्डते शरीरं माद्यति अस्मात् उष्णशोणितत्वात्**). गु. हिं. **कण्डु.** संस्कृत शब्द नंतरचा दिसतो.]

'**कंडार(णें)** सक्रि. तोडणें, भेदणें, वाढणें. To gnaw or nibble, to get large.

[सं. **कड् १० भेदने** ; सं. **कांड** (= भाग); प्रा. **कंठ = लाठी** 'कांड' पासून मराठींत नामधातु कंडारणें असा तयार झाला. किंवा सं. **कांड + तर, कण्डारा =** महास्नायुः ; प्रा. **कंडार** = खोदणें. कांड्यासारखें मोठें वाढणें. तरी पण हा नामधातुच सिद्ध होतो.]

कंडारणें न. सोनाराची हातोडी. A hammer, a goldsmith's instrument.

[सं. **कण्ड्** ; प्रा. **कंडारेइ = खोडणें** ; संस्कृत कण्ड्पासून हा नामधातु दिसतो. खंड, खिड वगैरे शब्द ह्या शब्दाशीं संबद्ध दिसतात.]

कंडा पुं. रेशमाचा जाड दोरा, हातांत, गळयांत बांधावयाचा रेशमी दोरा. A silkstring covered over with cloth or a silver ring as an ornament for the neck or wrist.

[सं. **कंठ, कंठा, कांण्ड** (?)]

कंडी स्त्री. बाजार बातमी, गप्पा. A rumour, a bazzar gossip.

[सं. **कूट, खोटें** (?) शको.]

कंडू स्त्री. खाज, खाजविण्याची इच्छा, खुमखुम. The itch.

[सं. **कण्डू (कण्डते शरीरं माद्यति अस्मात् उष्णशोणितत्वात्)**; प्रा. **कंडू** ; सं. **कृष्** ; प्रा. **कड्ढ** ह्यांच्याशीं संबंध असावा. '**कण्डू**' हें द्वितीय संस्कृतीकरण आहे.]

कंडोरा पुं. उंसाचा करवा-तुकडा. A joint of small piece of sugar cane.

[सं. **काण्ड** ; प्रा. **कंड, काण्डतरः. गंडेरी** (उंसाचा करवा) पहा.]

कण्ड(णें) अक्रि. (आजारांत) विवळणें. To groan (as in illness). [सं. **कण् १ शब्दे** ; प्रा. **कण.** मराठींत 'ह' कार आघातामुळें अधिक आला. **कणकण** = ज्वरांश.]

कण्हेर स्त्री. वनस्पतिविशेष, फुलझाड, फुलें पांढरीं व पिवळीं असतात. A kind of plant.

[सं. **कर्णिकार** ; प्रा. **कणइर, कणवीर, कण्णिआरो** ; गु. **कणेर** (स्त्री); हिं. **कनेर** (पुं.).]

कतबा पुं. करारपत्र, जामीनकतबा. Bond, a writing furnished to the पंचायत.

[अर. **किताब्, किताबत, किब्.**]

कतल, कत्तल स्त्री. कापाकापी, हिंसा, विजन, सरसकट नाश. Slaughter or massacre.

[अर. **–कत्ल्.**]

कतलाम स्त्री. कत्तल, काटाकाटी. Slaughter.

[फा. **कत्ल्–इ–आम् = सर्वांची कतल.**]

कतार, कतारा स्त्री. रांग, ओळ. A row, rank.

[अर. **कतार, किनार्.** = शेवट, रांग, कड.]

कत्ति स्त्री. कोयता, तरवार. A sword.

[कान. **कत्ति** ; ता. **कत्ती = सुरी**; हिं. **कत्ती = सुरी** ; गु. **कती** ; सिं. **काती** ; **काती** = सोनाराचा चिमटा; लमा. कत = पटाशी. सं. **कर्तृका, कर्त्रिका (√ कर्त्र्, √ कृत् ६ छेदने)**]

कथ(णें) सक्रि. सांगणें. To tell, to narrate.

[सं. **कथ् १० वाक्यप्रबंधे**; प्रा. **कह, कध, कत्थ, कहिज्ज** (८–१–१८७); हिं. **कहना** ; गु. **कहवूँ**; सिं. **कहणु**; म. **कथणें.** प्राकृत धातूपासून हिं. गु. सिं. वगैरे भाषांतील धातु सिद्ध होतात. मराठी शब्द **कहाणी** (सं. **कथनिका**) त्यापासूनच सिद्ध होतो. मराठींतील पुढील शब्द तत्सम आहेत. **कथा** (गोष्ट, कीर्तन,); **कथानक** (गोष्ट,) **कथनीय** (सांगण्यासारखें); याकाम. **कथलियादारभ्य** (ज्ञा. १५·५७०) असे प्रयोग पेशवेकालांतहि रूढ होते.]

कथील न. एक खनिज धातु. Tin.

[सं. **कस्तीर (कस्तीर रङ्गमिति हेमचंद्रः)**; अप. **कत्थील** ; अकाम. **कथली** = कथिलाचें भांडें.]

कथला पुं. भांडण, बाचाबाची. A squabble, a wrangling.

[सं. **कत्थ्–श्लाघायाम्.** मराठींतील शब्दाच्या बाबतींत अर्थभेद झालेला दिसतो. शिकाम. पेकाम. **कथळा** = भांडण. झाला जो कथला समग्र कथिला ॥ अ. ३·२४६. कुलकर्ण्यांच्या मिराशीचा **कथळा** (शि. पत्र.)]

कद१ पुं. रेशमी सोवळें, सोवळ्याचें वस्त्र. A silk wear, a sort of silk cloth.

[सं. **कदक=वितानम्**; (?) (**कदः मेघः** इवि कायते.)]

कद२ स्त्री. किंमत, लायकी, महत्त्व, बांधणी, जाडी. Structure, stature, status, value.

[अर. **कद्द=ठेवण, बांधा.**]

कदम१ पुं. पाय, पाऊल, चालरीत, वर्तणूक. Foot-step, conduct.

[अर. **कदम्=पाऊल**]

कदम२ पुंन. एक मराठ्याचें आडनांव. A surname.

[सं. **कदंब**=एक राजघराणें.]

कदर स्त्री. भीति, दहशत, किंमत, शक्ति, ठराव, अधिकार, गुणाची परीक्षा. Fear, awe.

[अर. **कद्र=किंमत.**]

कदर(णें) अक्रि. भय घेणें, भिणें, कष्टी होणें. To be afraid of, to be dejectcd.

[१ अर. **कद्र=किंमत महत्त्व.** ह्या शब्दापासून हा नाधा. सिद्ध झाला.

२ सं. **कदर्य** (नाधा.)=निरुत्साह होणें; ह्यापासून मराठींत एक धातु आला आहे व तो ज्ञानेश्वरींत आढळतो.]

परि हें आइकोनि झनें। कदरसीं हो मनें। कायि रात्रीं चांदणें। धाकु धरिजे। ज्ञा. १६·२६५.

कदर्थ(णें) सक्रि. तुच्छ लेखणें, दुःख भोगणें, संकटांत घालणें, कष्टी करणें To think lightly, to annoy.

[सं. **कदर्थ–कुत्सितः अर्थः**; याकाम. **कदर्थ** (नाधा.)]

आतां पराजयें राजा। जैसा कदर्थिजे लाजा॥ (ज्ञा. १६–१७५)

कदर्या वि. कुत्सित अन्न खाणारा, चिक्कू. Miserly.

[सं. **कदर्यः**; याकाम. **कदर्या**=चिक्क, कद्रू (उगी.)]

कदा अ. केव्हां. When.

[सं. **कदा**; *Av.* kada; *Lit.* kada; *Lat.* quan-do.

कांहीं तत्सम ह्यापासून सिद्ध आहेत. उदा० **कदा** कोणत्या काळीं, कदानकाळीं, **कदाचित्**, **कदाश्चित** (क्वचित् अर्थी तद्भव), **कदापि** (केव्हांहि), **सदानकदा** (नेहमीं.)]

कदीम वि. जुनें, पुरातन. Ancient, old, of long standing.

[अर. **कदीम**– जुनें. ह्याविरुद्ध शब्द **जदीद=**नवें.]

कदिमी, कदिमाई स्त्री. जुनी परंपरा, जुना लौकिक. Old tradition.

[अर. **कदीमी**; पेकाम. **कदिमी, कदिमाइ** (रा. १·३३५ ८·११९)]

कधीं अ. कोणत्या दिवशीं–वेळीं, केव्हां ? When, at what time.

[वैसं. **कर्हि**; सं. **कदा**; प्रा. **कहिं**; मराठीमध्यें **कहिं, कई, कैं** अशीं रूपें विशेषतः जुन्या काळांत वापरलेलीं आढळतात.]

(काट)कन्, (फुस)कन, (झर)कन प्र. प्रत्यय रीतिदर्शक. A termination indicating manner.

[कान. **कने**; **पुसक्ने=एकदम.**]

कनक न. सोनें. Gold.

[*I.E.* Qenk; सं. **कन्-कनक, कञ्च्-कांचन**; *Gr.* kank; *Lat.* Cnicus; *As.* Huneg; सं. **कनक–√कन्** १ दीप्तौ; (द्रा. **चिनि, चिन्न**=सोनें); याकाम. **कनक** (ज्ञा. १६–१०७); ह्या धातूच्या मूल्यामुळें व पिवळेपणामुळें कांहीं शब्दप्रयोग मराठींत रूढ झाले आहेत. उदा० **कनक**चंपक (सोनचांफा), **कनक**कीट (काजवा), **कनकां**बर (पिवळें वस्त्र).]

कनकावळा पुं. कावळ्यासारखा उडणारा पतंग, दारूचा बाण. A sort of paper kite flying as a crow, a squib.

[हिं. **कन-कौवा**=पतंगाचा एक प्रकार. हिं. **कन्ना**= जेथें दोरा बांधतात तो पतंगाचा भाग. (**कन्ना+कावळा**).]

कनपट(णें), कनपटींत–कानफाडांत(देणें), सक्रि. कानशिलांत देणें. To slap on the face.

[सं. **कर्ण+पट** (नाधा.); हिं. **कनपट=आंख.** कानफाड व गालफाड ह्या शब्दांत दुसरा शब्द ‘ फाड ’ आहे. तो ‘ पट ’ ह्या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे.]

कनवट, कनोट स्त्री. कडोसरी, कणवट. The knot in the loin cloth on waist.

[कान. **कणय**=कमरेभोंवतालच्या वस्त्राची गांठ.]

कनात१ स्त्री. तुसडेपणा, खस्ता, त्रास. Cutting nature, troubles, pains.

[अर. **कनाअत**=समाधान.]

कनात२ स्त्री. तंबूच्या भोंवतालचें कापडी आवरण. A cotton-cover of a tent covering its sides.

[अर. **कनात्.**]

कनिष्ठ वि. सर्वांत लहान–धाकटा. वयानें व अधिकारानें सर्वांत कमी. Youngest, lowest.

[सं. कनीयस् ; (कनिष्ठ) (कन हा मूळ शब्द.) *IE*. Ken ; *Av*. Kainga ; *Gr*. chainos, सं. कनीन कन्या इ.]

कनुधार स्त्री. लहान धार. A small stream.

[सं. कन, कण = लहान धारा. कण पहा.]

अवो दुजी कनुधार लागती । तरी पाणिये वाति पाजळती । जलकेळी होती । निकी कीरूं । शिशु ६७५.

कनोज न. ग्रामनाम. Name of a town.

[सं. कान्यकुब्ज; प्रा. कण्णउज्ज.]

कंत(णें) अक्रि. हलणें. To move.

[सं. क्रम् (निष्ठा–क्रान्त); प्रा. कंत; (नाधा.)]

कंत्राट न. ठेका, मक्ता. Contract.

[*Lat*. Contractus; *Eng*. Contract.]

कंथा स्त्री. गोधडी, ठिगळाचें जाड वस्त्र. A patched cloth.

[*IE*. Qentho; *Gr*. Chentrhon; *Lat*. Cento; सं. कन्था ; प्रा. कंथा (स्त्री).]

कन्द पुं. कांदा, गड्डा, मूळ. A root.

[*IE*. Qed, qondo; सं. कन्द √ कन्द् ; *Got*. hausa; *Gr*. Chondoi; तद्भव–कांदा, कन्द.]

कंदन, कदन न. युद्ध, लढाई, मारामारी, कत्तल, नाश. War, destruction, slaughter.

[सं. कंद्, कद् १ वैकल्ये.]

कंदर्प पुं. मदन, कांदा. The Hindu Cupid, an onion.

[सं. १ कंदर्पः (कम् = कुत्सायाम् + दृप्.) २ कुत्सितः दर्पः कन्दर्पः (=कांदा) हें संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे. ही व्युत्पत्ति कृत्रिम आहे. कान्दा हा शब्द कन्दपासून साधलेला आहे.]

कंदी वि. एक विशेष रंगाचें, धुरकट, पिंगट रंगाचें, Brownish, dust-coloured.

[सं. कंद–मूळ. कद्रु=पिंगट (?). उदा० कंदी पागोटें, कंदी पेढे.]

कंदील पुं. फाणस, काचेच्या झाकणाचा दिवा. A lantern.

[अर. कंदील ; *Lat*. Candela, Candere = to glow; *Eng*. Candle.]

कंदुल पुं. कांचनाचें फूल. A flower of *kanchan* tree.

[सं. कंदल.]

कंदुलाचे हार तुटले । अशोकाचे झळबुकें गळले ॥ शिशु. ७१७

कंदुक पुं. चेंडू. A playball.

[सं. कंदुक. (कम्+दा); याकाम. कंदुक (ज्ञा. १७·२८०)]

कन्नड पुं. वि. कानडी देशांतील, कर्णाटकाचा. Belonging to Carnatic.

[सं. कर्णाटक; प्रा. कण्णाडअ.]

कन्या स्त्री. मुलगी, कुमारी. A zodiac sign, a daughter, a maiden, a girl.

[*IE*. Qen = being young; सं. कन–ना (कन्या, कनीयस्, कनिष्ठ.); *Av*. kainin = maiden; *Gr*. kan (kainos = new); *Lat*. cen in (recens = fresh); *O.Slav*. Pocinetu, po–koni; *Bulg*. koni = Beginning; *O.H.G*. Beginnan.].

सं. कन् दीप्तौ ; कन्यायाः कनीन् चेति निर्देशात् पाणिनिमतानुसारेण ङीष्. यास्काचार्यांनीं आपल्या निरुक्तांत कन्या शब्दाची व्युत्पत्ति दिली आहे. “ कम् इयम् नेतव्या, कमनीया, ” वगैरे दोन तीन व्युत्पत्ति दिल्या आहेत (नि. १). परंतु त्या काल्पनिक आहेत. त्यांना ऐतिहासिक प्रमाण नाहीं. धातु कन् = आरंभे हा सर्व भाषांत आढळतो.]

–कन्यादान न. कन्येचें विधियुक्त समर्पण. Giving away the daughter in marriage.

–कन्याधन कन्याशुल्क न. उलट हुंडा, कन्येबद्दलचे घ्यावयाचे पैसे. Dowry.

कन्ह(णें), कण्ह(णें) अक्रि. विवळणें, कुंथणें. To utter piteous sound of pain, to moan, to groan.

[सं. क्वण् १ शब्दे. अकाम. कन्हारी, कन्हेरी (विवळण्याची क्रिया), कन्हारणें (दुखविणें, कष्टविणें, लवकणें).]

कन्हया, कन्हैया, कान्हा पुं. कृष्णाचें नांव. Krishna, a Hindu god.

[सं. कृष्ण; प्रा. कण्ह (हे. ८-२-७५, ११०). कृष्ण (=वर्ण) हा शब्द इतर आर्य भारती भाषांत आढळतो. *IE*. Qers (Qer); *Lett*. Kirsna; *Russ*. Cerenz; *Lit*. Kervsas; *Nors*. Harr.]

कप स्त्री. दरड, नदीचा आंत गेलेला भाग. The erosive part in a bank.

[१ कान. **कप्पु**–जमिनींतील खड्डा ; तेलगु. **कुपारमु** = दगड. २ सं. **कल्प्**, **कृप्**; प्रा. कप्प; देप्रा. कप्परिअ विदारितम्; ३ अर. **खफ़र.** ह्या तीन व्युत्पत्ति होत. परंतु ह्यांतील कानडी व्युत्पत्तिच ग्राह्य वाटते. इतर साधित शब्द **कपरी, कपरा** (खबदड, दरड, विवर) असे आहेत.]

कपट न. दुष्टावा, खोटेपणा, लबाडी, हेवा. Deceit, fraud.

[**सं. कपट, √कम्प** ; (कस्य सतः ब्रह्मणः अपि पटः आच्छादकः ; कप + अटन्) ; पुढील सामासिक शब्द रूढ आहेत. त्यांत **कपट** ह्या शब्दाचा अर्थ **खोटें, लबाडीचें** असा आहे. उदा० कपटभाव, कपटयुद्ध, कपटविद्या, कपटस्तुति (खोटा भाव,-युद्ध,–विद्या,-स्तुति).]

कपडा पुं. वस्त्र, प्रावरण, अंगरखा. Cloth, a clothing.

[**सं. कर्पट ; प्रा. कप्पड ; सिं. कपिडा ;**]

कपडालत्ता पुं. कपडे वगैरे. Clothes etc.

[सं. **कर्पटः**, फा. **लत्ता = वस्त्र.** दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील, एक संस्कृत व दुसरा फारशी.]

कपा-कप्पा पुं. खण, पेटीच्या आंतील बंदिस्तभाग. A secret drawer in a cupboard.

[**सं. कल्पः** ; फा. **कुप् =** गुपित भाग; फारशी व्युत्पत्ति ग्राह्य दिसते.]

कपाट न. दार, दरवाजा, बंदिस्त पेटी, फडताळ. Door, gate, a cupboard.

[**सं.** कपाट (कं वायुं मस्तकं वा पाटयति). संस्कृतमध्यें अर्थ '**दार**' असा आहे. दार असलेलें दालन, पेटारा हा दुसरा अर्थ गेल्या शतकाच्या शेवटीं रूढ झाला. मोल्सवर्थमध्यें हा अर्थ नाहीं (१८५७). याकाम. **कपाट** = दरी, गुहा. (ज्ञा. १३-६१२)]

कपाल, कपाळ न. डोळयावरील डोक्याचा भाग. कवटीचा पुढील भाग. नशीब (ल). Forehead, luck, fate.

[*IE.* Qep = to contain, Qepel = Head ; सं. **कप्** कपाल (कं मस्तकं पालयति); *Gr.* Kap ; *Arm.* Kapem; *Lat.* Caput, Cap ; *Lith.* Kampu ; *Old Sl.* Kupu = trade ; *Got.* Kaupon -to trade.

प्रत्येक मनुष्याचें जीवितफल त्याच्या कपाळावर लिहिलेलें असतें अशी समजूत आहे. त्यावरून नशीब, दैव, प्रारब्ध असा अर्थ लक्षणेनें प्राप्त झाला. ह्या शब्दाशीं संबद्ध असे कांहीं प्रयोग मराठींत रूढ आहेत. **कपाळ** चढणें (डोकें दुखणें), **कपाळ** फुटणें (दुर्दैव ओढवणें), **कपाळाची** रेघ (नशिबांत लिहिलेलें), **कपाळाला** आठ्या घालणें (त्रासणें), **कपाळावरील** कांतडी नेणें, **कपाळावर** हात मारणें, **कपाळाशीं** कपाळ घासणें (फायद्याच्या दृष्टीनें जवळ राहणें), **कपाळकरंटा** (दुर्दैवी), **पांढऱ्या कपाळाची** (विधवा, कुंकुम नसतो म्हणून), **कपाळाचा डाग** (कलंक), **कपाळमोक्ष** (प्रेताच्या जळण्याची शेवटची क्रिया. कपाळ फुटणें, आत्यंतिक नुकसान) इत्यादि. ह्या सर्व प्रयोगांत **कपाळ** शब्दाचे वाच्यार्थ व लाक्षणिक असे दोन्ही अर्थ आहेत.]

कपि पुं. वानर, माकड, म्हातारा मनुष्य, मुरब्बी (लक्षणा). A monkey, an old man.

[**सं. कपि** ; **सं. कम्प्** , **कप्** १ चलने; **फा. कपी.**]

कपोळ पुं. गाल, कपाळ, गंडस्थळ. A cheek.

[सं. **कपोल = गाल** (कम् सुखम् पोलति इति.)]

कफ पुं. शरीरांतील श्लेष्मा, वात-पित्त-कफ ह्या त्रिदोषांपैकीं एक, बेडका, खाकरा. Phlegm, one of the three humours.

[**सं. कफ** (के शिरसि फलति); **कफ**ज्वर (कफामुळें येणारा ज्वर), **कफ**प्रकृति (कफयुक्त प्रकृति) वगैरे सामासिक शब्द तयार होतात.]

कफणी-कफनी स्त्री. सर्व अंगभर असा सैल अंगरखा, बिन बाह्याचा अंगरखा. Apron, gown.

[अर. **कफन** = मुसलमानाच्या प्रेतावरील वस्त्र. **फा. कफनी.**]

कफल्ल, कफल्लक वि. पुं. अतिशय गरीब (लक्षणा). A wretchedly poor man.

[सं. **कापालिक** (?) **कफल्ल** हें जगांतील पहिल्या चोराचें नांव. चोरांचा उपद्रव होऊं नये म्हणून निजण्याच्या पूर्वी चोरांच्या ह्या आदिदेवतेचें स्मरण करण्याची पद्धत लोकांत आहे. त्याला ब्रह्मदेवाचा वर होता कीं जो कोणी तुझें स्मरण करील त्याला चोरापासून भय नाहीं. आदिचोर कफल्लस्य ब्रह्मदत्त वरस्य च. ' कफल्ल कफल्ल काळभैरव ' असा मंत्र आहे.]

कफारत स्त्री. तंटा, बखेडा, कज्जा, आळ, अडचण, त्रास, संकट. Disorder, fracas, calamity.

[अर. **कुफ़्रात्** (= अविश्वास), कुफ ; पेकाम. **कफारत** (पाव. ९).]

कबज न. पावती, पोंच. Receipt.

[**अर. कब्ज् ; पेकाम. कबजें** (१–२९४).]

कबजा[1] पुं. ताबा, अम्मल. Possession.
[पेकाम. **कबज, कबजा** (रा. ६–६००).]

कबजा[2] पुं. जाकीट. A waistcoat.
[फा. **कबाचा.**]

कबर[1] स्त्री. मुसलमानाचें थडगें. A grave.
[अर. **कब्र्.**]

कबर[2] स्त्री. वेणी, बुचडा. Braid of hair.
[सं. **कबरी.**]

कबरा वि. रंगविशेष, चित्रविचित्र रंगाचा. A kind of colour.
[सं. **कर्बुर**; प्रा. **कब्बुर**; पं. **कबरा**; हिं. **कबरा**; गु. **काबर**; सिं. **कुबिरी**; सिंह. **कबर**=चित्ता. मराठींत हा शब्द हिंदीमधून आला.]

कबाड न. सामान, मोडकें सामान, ओझें. Load, luggage.
[याकाम. **कबाड** (ज्ञा १८·५४०); हिं. **कबाड** = मोडकें सामान (विशेषतः एका बैलावर जाण्याइतकें). जुन्या कागदपत्रांत 'कहीकबाड' असा शब्द येतो. सैन्यांतील जरुरीचें सामान, ओझें. **काबाडकष्ट** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द) =मेहनतीचें काम. **कबाडी–ड्या** = ओझें वाहणारा.]

कबाब पुं. मांसाचें पक्वान्न. An eatable of roasted meat.
[फा. **कबाब = भाजलेलें मांस**]

कबाबचिनी स्त्री. एक मसाल्याचा पदार्थ. An article of the spices.
[फा. **कुबेब–एक लतेचें फळ**; हिं. **कबाब** (चिनी लोकांनीं आणिला.); अर. **कबाबह**; फा. **चिनी.**]

कबिला स्त्री. कुटुंबांतील बायका, स्त्रिया, जनानखाना, लग्नाची बायको. Women-folk, zanana.
[अर. **कबीला.**]

कबीर पुं. एक मुसलमान साधु, रामभक्त, (पंधराव्या शतकांत होऊन गेला). Name of a Muslim saint of the 15th century.
[अर. **कबीर = मोठा.**]

कबूतर न. पक्षिविशेष, कपोत पक्षी. A pigeon.
[फा. **कबूतर.**]

कबूल वि. संमत, मान्य, पसंत. Approved, agreed to.
[अर. **कबूल्.**]

–कबुलात, कबुलायत स्त्री. करारनामा, जमीन कसण्यासंबंधीं केलेला कुळाशीं करारनामा. An agreement, an agreement of a tenant about a farm.
[पेकाम. **कबुलायत, कबुलात** (खरे ४·१४५७).]

कम वि. थोडें, कमती, उणें, अल्प. A little, deficient.
[फा. **कम्.** पुढील शब्द पहा.]

–कमअक्कल वि. कमी बुद्धीचा. Feeble, lacking wit.

–कम-अस्सल वि. हलका. Mean, of base origin.

–कम-कसर जवळ जवळ. Nearly, about. (< **कम + कसर = कमी, न्यून**)

–कम-कुवत वि. अशक्त. (< **कम् + कुवत्** = ताकत्.)

–कम-जात वि. हलक्या जातीचा. Of low caste.

–कम-जादा, कमजास्ती वि. कमी अधिक. Less or more. (< **कम + झियाद्,** –जाजती < **झियाद्.**)

–कमजोर वि. दुबळा. Weak, feeble.

–कमतरपणा पुं. कमीपणा. Deficiency.

–कमनशीब न. दुर्दैव. Misfortune. (< **कम् + नसीब्**)

कमचा–ची स्त्री. बारीक छडी, कांबीट, फोकाटी. A small stick.
[तुर्की. **कमची**; हिं. **कमची = छडी.**].

कमटा-कमठा पुं. कळकाचें धनुष्य, तिरकमटा. A bow made of bamboo.
[सं. **कमठ = बांबू**; हिं. **कमठा–धनुष्य.**]

कमंडलु–लु पुं. संन्याशाचें पात्र, भांडें, तुंबा (भोपळ्याचा). A gourd–vessel.
[सं. **कमण्डलु**; प्रा. **कमंडलु.**]

कमर, कम्बर स्त्री. ढुंगणाच्या वरचा भाग, कटि. Waist.
[*IE*. QEM. = **वाकणें, वाकडें असणें**; सं. **कम्**; *Av*. Kamara; *Gr*. Kam; *Lat*. Cam. (in camera, chamber, Cambridge, cam = winding river).

फा. **कमर्**, '**कमर**' शब्दान्वित पुढील प्रयोग मराठींत रूढ आहेत. **कमर** शब्दाचें **कंबर** असें रूप वापरांत येतें. ह्या रूपांत वर्णागम झाला आहे.]

-कमरकचका पुं. कमरेवर मारलेला ठोसा. A blow on the waist.

-कमरखोडा पुं. कमरेवरचा पेंच, डाव. A twist on the waist.

-कमरपट्टा पुं. कमरेवर घालावयाचा सोन्याचांदीचा पट्टा. A belt of gold or silver.

-कमरबंदी स्त्री. बद्धपरिकरत्वं, तयारी. Readiness, preparedness.

-कमरमोड वि. अतिशय मेहनतीचें (काम). Hard (labour).

-कमरढिला वि. कमकुवत, नेभळा, नपुंसक. Impotent, imbecile.

-कमर खचणें-बसणें धैर्य,-अवसान जाणें. To lose hope or courage.

-कमर कसणें-बांधणें सिद्ध होणें, तयार होणें. To be prepared.

-कमरेचे कांटे ढिले पडणें दमणें, अतीशय त्रास,-मेहनत पडणें. To be tired.

-कमर धरणें-भरणें कळा निघणें. To get lumbago.

कमरका-गा पुं. सैन्याची बाजू-मध्यभाग, कटिभाग, पुढें आलेला भाग. The flank or centre of an army, a projection.
[फा. **कमर्+गाह्=जागा**; पेकाम. **कमर्गा** (खरे ६-३१९३).]

कमल, कमळ न. पुष्पविशेष. A lotus.
[सं. **कमलम्**, √**कम्**; कम् जलम् अलति-अलंकरोति इति कमलम्.] कांहीं सामासिक शब्द सिद्ध आहेत. उदा०

कमलनयन, कमलाक्ष वि. कमलासारखे डोळे असलेला. Lotus-eyed one.

कमलबीज न. कमळाचें बीज. The root of a lotus.

कमलपिंडी स्त्री. नर्तनाचा प्रकार. A kind of dance.

कमळा-ला स्त्री. लक्ष्मी. Laxmi, the goddess of wealth.

कमलिनी स्त्री. कमलाचें झाड. The lotus plant.

१कमवि(णें) सक्रि. मिळविणें, प्राप्त करून घेणें. To secure, to get, to obtain.
[सं. **क्रम्** (णिच् रूप); प्रा. **कम्मवण**; देप्रा. **कम्मवइ** उपभुङ्क्ते (७८-१); हिं. **कमाना**; गु. **कमवूँ**; सिं. **कमनु**.]

२कमवि(णें) सक्रि. तयार करणें, (कातडें) कमाविणें. To tan.
[सं. **कम् १ कान्तौ**.]

कमान, कमाण स्त्री. अर्धकंस, अर्धवर्तुळ, धनुष्य. A bow, an arch.
[फा. **कमान्=धनुष्य**; पेकाम. **तिरकस-तरकस कमान**; अकाम. **कमानदार** (कमान असलेला, वांकदार.)]

कमानीर पुं. सैन्यांतील श्रेष्ठ अधिकारी (अशिष्ट उच्चार). A commander.
[*Eng.* Commander; *Lat.* Com, mandare. ह्या शब्दांत वर्णलोप-वर्णत्याग झाला आहे 'वान्दर, कम्बर' ह्यांतील वर्णागमाच्या विरुद्ध ही प्रवृत्ति आहे.]

कमाल वि. स्त्री. शेवटची, पूर्ण, पूर्णता, उच्च मर्यादा. Extreme, maximum.
[अर. **कमाल्**=पूर्ण, पूर्णता. दुसरा प्रतियोगी शब्द. **किमान**=कमींत कमी मर्यादा. (< **कम्**)]

कमावीस स्त्री. वसूल, जमिनीचा खंड, प्रांताचें उत्पन्न. The revenue receipts.
[**कमाविशी** < कमविणें.]

-कमावीसदार पुं. ज्याच्याकडे कमाविशी करण्याचा अधिकार आहे असा. The collector of the revenues of a district.

कमिटी स्त्री. मंडळ, व्यवस्थापक मंडळ, संघ. Committee.
[*Eng.* Committee; *Lat.* Com, mitto = to send.

कमी वि. उणा, कम पहा.

१कमोद न. एक तऱ्हेचें कमळ. A lotus.
[सं. **कुमुद**; हिं. **कमुद**, **कमोद** = एक तऱ्हेच्या कमळांपासून काढलेला अर्क.]

२कमोद पुं. तांदुळाचा प्रकार, उत्तम सुवासिक व गोल तांदुळ. Fragrant rice.

[सं. **कुमुद = पांढरें कमल**; गु. **कमोद** = सुवासिक तांदूळ.]

कंप पुं. कांपरें, थरथर. Shivering.
[सं. **कंप् १ भये; याकाम कंप = कांपेरा.** (ज्ञा. १८·१०५७).]

कॅंप पुं. छावणी. A camp.
[*IE.* Qep; Qemp; *Gr.* kep; *Lat.* Camp; *As.* Camp; *Eng.* Camp. **कॅंपचा** अपभ्रंश **काप.** उदा. काप दापोली.]

कंप(णें), कंफ(णें) अक्रि. कांपणें. To shiver, to shake.
[सं. **कम्प्**; गु. हिं. **कंप, कांप**; सिं. पं. **कंब**; का. **कोंप्**; सिंह. **कॅंपवूॅं.**]

कंपनी स्त्री. मंडळी, संघ, मंडळ. Company.
[*Eng.* Company; *Lat.* Com, panis = bread. मूळचा अर्थ शिपायांची तुकडी असा आहे. जुन्या कागदपत्रांत कंपणी, कुंपणी, कंपु (camp) अशा रूपांत हा शब्द आढळतो.]

कंपास पुं. समपातळी दाखविणारें यंत्र, दिक् यंत्र. A compass.
[*IE.* Pet, Spe; *Gr.* pet; *Lat.* Passus; *Eng.* Com-pass; कदाचित् संस्कृत **स्पश्, पश्य्** ह्या धातूंशीं दूरान्वित संबंध असावा. हिं. **कम्पास**, 'इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश'.]

कंपू पुं. संघ, सैन्याची तुकडी, गट, मंडळ. A camp, a corps, a company.
[*Eng.* Camp पहा. पोर्तु. Campo; हिं. **कंपू.** कंपू आणि कंपाण (compound) हे शब्द सोळाव्या (१५२३–१६१३) शतकांत मराठींत आले.]

कंपेश, कंबेश पुं. वि. कमीअधिक प्रमाण. More or less, a small difference.
[फा. **कम्** + **बेश्** = कमी जास्त.]

कंबक्ती, कंबख्ती, कमबखत स्त्री. आणीबाणीची वेळ. A crucial or a critical moment.
[फा. **कम्** + **बख्त्** = वाईट वेळ, कमी वेळ.]

कंबु पुं. शंख. A conch.
[सं. **कम्बु; कम् = जलम्; कमु + उन् वुकूचेति.**]

कंबेश, कंबेशी कंपेश पहा.

कय प्र. (मराठींतील पंचमी, चतुर्थी, द्वितीया ह्या विभक्तींचा प्रत्यय.) पासून, पेक्षां, साठीं. A termination of accusative, dative and ablative cases.
[सं. **कृते**; प्रा. **कअ, कय.** हा प्रत्यय कोंकणांतील कुणवाऊ भाषेंत व गोव्याच्या भाषेंत वापरांत आहे. उदा. मज्याकुय = मजपेक्षां, पोटाकय = पोटासाठीं.]

कया स्त्री. (कोंकणी) तेज, टवटवी. Lustre.
[सं. **कला = कळा**; अकाम. प्रांतिक. **कया**; कोंकणी व अहिराणी भाषांत मराठी 'ळ' ला 'य' हा आदेश होतो.]

कयास पुं. तर्क, अजमास. Inference.
[अर. **कियास्**; पेकाम. **कियास, कयास** (रा. ५-५२; खरे. ६-३१७२.)]

¹कर पुं. हात, किरण (लक्षणा), हत्तीची सोंड (लक्षणा) सरकारला द्यावयाची पट्टी, खंड. A hand, ray, trunk of an elephant, revenue tax.
[सं. **कर = हात**; गु. हिं. **कर**; सिंह. **कर**; सिं. **करु.**]

²कर स्त्री. शुभ दिवसाच्या पुढील दुसरा दिवस. The day following an auspicious day like Sankrant.
[सं. **करि(दिनम्).**]

कर षष्ठीचा प्रत्यय. (पुणेंकर, मुंबईकर.) A termination of genitive case.
[सं. **कः, अस्मत्कः**; प्रा. **अम्हकेर, तुम्हकेर**; हिं. **केर**; बंगालीमध्यें '**क**' चा लोप होऊन '**र**' हाच प्रत्यय राहिला आहे. उदा. आमरा, तुमरा.]

कर काळा, वाईट. Black, bad.
['**कर**' हा एक **द्राविडी** शब्द आहे व त्याचा अर्थ **काळा, कृष्ण, वाईट** असा आहे. हा कांहीं शब्दाच्या आरंभीं लावतात. उदा. **करनाटक, कर्पट.** संस्कृतमध्यें **कद, कु** हे शब्द असेच आहेत. **कदुष्ण, कापुरुष, कुशब्द, कज्जल, कम्बल, करेणु, करभ** वगैरे शब्दांत तोच शब्द आहे. '**क**' ह्या वर्णांतच वाईटाचा अर्थ आहे.]

कर(णें) सक्रि. (हातांतून) काम घडणें. To do, to make.
[*IE.* Qer; सं. **कृ**; *Av.* Ker; *Gr.* Kra, Kro; *Lat.* Cer, Cre–.]
सं. **करोति**; पा. **करोति**; प्रा. **करेइ**; बं. **गरा**; ओ. **करिबा**; हिं. **करना**; सिं. **करणूं**; गु. **करवूॅं**; ने. **गर्नु**; झेंद. **कर्**; फा. **कर्दन्**; म. **करणें.**]

करकच(णें), करकस(णें) उक्रि. आवळून बांधणें. To tie very tightly.
[सं. **क्रकच्** (नाधा.), (**क्र + कच्**), **कर्कश** (नाधा.)]

१**कर कर(णें)** अक्रि. पुनः पुनः करणें. उदा. करकरून. To do again and again.
[वैदिक सं. **करीकृ.**]

२**करकर(णें)** अक्रि. करकर आवाज करणें. To creak.
[ध्वनिशब्द. **कोरा करकरीत** ह्यांत **कोरा** हा फार्सी शब्द आहे.]

१**करकोचा** पुं. पक्षिविशेष. A crane.
[सं. **क्रौंच, क्रकच, क्रकर ; √ कुर् १ शब्दे**–(अभ्यास) **कुरकुर < कुक्कुर** किंवा द्रा. **कुट = मारणारा ; कुटकुट < कुक्कुट ;** द्रा. **कुरकुट.**]

२**करकोचा** पुं. वण (बांधण्याचा). The impression left by a tight bandage.
[सं. **क्रकच.**]

करंगळी स्त्री. हाताच्या पंज्यावरील अगदीं लहान बोट. The small finger.
[सं. **कर + अंगुलि (√ अन्ज् १ गतौ म्रक्षणे च.**]

करगोटा पुं. कटिदोरक. A string round the waist.
[सं. **कटि + ग्रंथ,–ग्रंथि** (कटिदोरक) = कमरेस बांधण्याचा दोरा ; हिं. **करगदा.**]

करंज पुं. एक झाड व त्याचें बीं, करंजी. A kind of tree and its seed.
[सं. **करंज.**]

करंजी स्त्री. एक पक्वान्न. An eatable.
[सं. **करंज**(?); कान. **करची-र्जी** (?), **करचीकाई** (?)]

करट, करवट पुं. न. एक कडू फळ. A kind of a bitter fruit.
[सं. **कर** (?); सिं. **करटु** = कच्चें कलंगडें.]

करटी स्त्री. नारळाची किंवा डोक्याची कवटी. The shell, the skull.
[सं. **करोटी;** प्रा. **करोडिअ** (कांपलेला भाग).]

करंट वि. वाईट, दुष्ट. Bad, evil, inauspicious.
[सं. **करट.** मराठींत **करट, करंट** असे दोन्ही शब्द रूढ आहेत. अनुनासिकाचा संबंध ‘करवंट’शीं असेल काय ? **कपाळकरंट, करंटलक्षण** हे शब्द त्याच शब्दापासून सामासिक बनले.]

करड स्त्री. भरड, असडी तांदूळ. Rice only once grounded.
[कान. **करड** = वाळलेला चारा, गवत. **करडु** = काळें, काळेपणा; **करी, कर** = काळें]

करडई स्त्री. वनस्पतिविशेष, एक भाजी, करडी. A kind of herb or plant.
[कान. **करडकाई.**]

करडा वि. रंगविशेष, भुरकट. कडक, कठोर. A kind of colour, stern, severe.
[तेलगु. **करडु** = कडक]

करण न. साधन, साहित्य, इंद्रिय. A means, an instrument, a sense organ.
[सं. **कृ ८ करणे.**]

करणी स्त्री. कृति, काम, कृत्य. Deed, work. गवंड्याचें हत्यार. A mason's trowel. (< **करण** = लेप.)

(कुल)करणी पुं. कुळांचें लेखन करणारा.

करणा–कर्णा पुं. पितळेची तुतारी, वाजविण्याचें वाद्य. A kind of a long pipe, a horn.
[फा. **कर्ना, कर्रनाय;** हिं. **करनाई;** सं. **कर्ण.**]

करण्डा पुं. डबा, पेटी, टोपली. A basket.
[सं. **करण्डक ;** प्रा. **करंड, करंडग ;** गु. **करंडो.**]

करंडी स्त्री. एक वाद्य. A kind of instrument, a drum.
[सं. **करडी** = वाद्य ; कान. **करडे** = पखवाज.]

करतल–ळ पुं. तळहात. Palm of hand.
[सं. **करतलम् ;** याकाम. **करतल, करतलें** = **प्रत्यक्ष** (ज्ञा. १७·३१८).]

–करताल न. एक प्रकारचें वाद्य. A kind of instrument.
[सं. **करताल ;** गु. **करताल.**]

करतां, करितां अ. साठीं, स्तव, कारणें. For, for the sake of.
[सं. **कृते (√ कृ)** किंवा **कृ** धातूपासून निघालेल्या मराठी **कर** धातूचें वर्तमानकालवाचक धातुसाधित विशेषणापासून.]

करदोडा,–दोरा, करधोटा पुं. करगोटा पहा.

करप(णें) अक्रि. फार भाजणें, भाजून काळें होणें. To scorch.
[कान. **करकु; करणु, करि** = जळणें, भाजणें. सं. **कडू १ कार्कश्ये;** प्रा. **कड्डापय, कड्डापअ;** हिं. **करपना.**]

करंबट स्त्री. आलें, मीठ, हिंग ह्यांची ठेंचून केलेली चटणी. A spiced pulp.

[सं. **करंभ = मिश्रण.**]

करम(णें) अक्रि. घालविणें, कंठणें, आनंदांत-सुखांत वेळ घालविणें. To pass time (in ease and joy.)

[सं. **क्रम्** (**क्रमय**); वर्णविश्लेषानें '**करम**' असें रूप होऊन त्याच्या अर्थांतहि भेद झाला. **करमणें = घालविणें, सुखांत वेळ घालविणें. करमणूक** = रंजन.]

करवंटी स्त्री. नारळाचें कवच. Outer cover of a cocoa-nut.

[करोटी पहा.]

करवत न. सुताराचें एक लाकूड कापण्याचें कांटेरी हत्यार. A saw.

[सं. **करपत्र**; प्रा. **करपत्त**; गु. **करवत**; हिं. ओ. **करोत**; याकाम. **करवती** (स्मृ. १९३). पुढील प्रयोग पहा. **करवती** कांठी धोतर (कांठावर करवतासारखी आकृति असलेलें); **करवतीखालीं धरणें-घालणें** (गांजणें-लाक्षणिक अर्थ.)]

करवंद न. एक रानटी फल. A kind of wild fruit.

[सं. **करमद**, **करांबुक**; प्रा. **करमंद**. हें फल आंबट आहे. तें खाल्यानें क्वचित् शहारे येतात, म्हणून गार गार **करवंदासारखे**, **करवंद(णें)** (=गार होणें,-असणें) असे प्रयोग त्यावरून रूढ झाले आहेत.]

करवल-ळ करोल पहा.

करवला पुं. नवऱ्या मुलाचा किंवा मुलीचा भाऊ. Brother of the bride or bridegroom.

[सं. **करक + वान्**; प्रा. **करअ + वल्**; **करवली** = नवऱ्या मुलाच्या अथवा मुलीच्या मागें **करक-कऱ्हा** घेऊन उभी राहणारी मुलगी.]

करवा पुं. उंसाचा तुकडा, गंडेरी. A bit of sugarcane.

[कान. **कर्बु**; **कब्बु = ऊंस.**]

करवाळ स्त्री. तलवार. A sharp sword.

[सं. **करवाल**; √कृत् ६ छेदने]

करवीं अ. मार्फत, द्वारां, कडून.

[सं. **कारकः**; प्रा. **केरओ** (**संबंधीं**); द्राविड. **केरकै**; मरा. **केरओ + इ** (तृतीया), > **करवीं** असा सिद्ध झाला. किंवा **कृ** ८ करणे-ल्यबन्तरूप **कृत्वा**, **कृत्वी** (वैदिक); प्रा. **कत्तूण**; ह्याचा **कर** = हात ह्याच्याशीं संबंध असावासा वाटतो कारण अर्थ तसा आहे. परंतु व्युत्पत्तीला हें धरून नाहीं.]

कैरळ स्त्री. छिद्र, फट. A hole, a chink.

[सं. **करल = वेळू**]

कैरळ स्त्री. काळ्या जमिनीचा एक प्रकार. Black soil.

[सं. **करक=वरड**; कान. **करल** = खारटपणा.]

करा, कऱ्हा, कऱ्हें पुं. न. मातीचें भांडें, (धार्मिक कृत्यांत एका भांड्यांत पाणी, वर आंब्याचा डहाळा, व नारळ ठेवलेला असा तांब्या). An earthen pot with mango-leaves and a cocoa-nut placed on.

[सं. **करकः** (**किरति विक्षिपति जलं अस्मात्, करोति जलमत्र वा**; √कॄ, √कृ); प्रा. **करग, करअ.**]

करामत स्त्री. कौशल्य, चमत्कार, कर्तृत्व, खुबी. Skill, ability.

[अर. **करामत्**]

करार पुं. वचन, ठराव, कबुली. Assurance, agreement.

[अर. **करार**; शिकाम. पेकाम. **करार** (सभा. ३० खरे. ११.५६६६).]

-करारमदार पुं. ठराव, बोली. An agreement.

[अर. **करार + मदार.**]

कराष्टमी स्त्री. आश्विन वद्य अष्टमी. (ह्या दिवशीं कुमारिका गंगेच्या उदकानें भरलेला करा घेऊन देवीची पूजा करतात.) Eighth day in the dark half of Ashwin month.

[सं. **करक + अष्टमी.**]

कराळ वि. भयानक, भयंकर. Terrific.

[सं. **कराल** (कराय क्षेपाय भयप्रदर्शनाय अलति पर्य्याप्नोति); प्रा. **कराल.** '**अकराळ विकराळ**' हा वरील शब्दापासून.]

करि,-करी पुं. हत्ती. An elephant.

[सं. **करिन्**; **करः** विद्यते यस्य; कर = सोंड. करेणु पहा.]

करियात-द स्त्री. तालुका, दहाबारा गांवांचा पेटा. A taluka.

[अर. **कर्यत्** = गांव.]

करी, करू प्र. 'करणारा' हा अर्थ दाखविणारा किंवा मतुप् अर्थी एक प्रत्यय. A possessive termination.

[सं.**कर**, √ **कृ**; प्रा. **केरो**, **केरउ**, **केरं**, **केरउं**; हिं. **केर** (षष्ठीचा प्रत्यय); बं. **रा**; म. **कर**, **करी**, **करू**. सं. **कः**; प्रा. **कर**, **करु**, (सं. **द्यूतकरः** प्रा. **जुदकरु**).]

करीणा-ना पुं. निवाडा, लेखी जबानी, हकीकत, वर्तमान. Judgment.

[अर. **करीना**, √**कर्दन्**; शिकाम. **करिणा** (सभा. १४) पेकाम. **करिणा** (रा. १·५२).]

करुण वि. मायाळू, दयाळू. Kind.

[सं. **करुण** (**करोति मनः आनुकूल्याय**); अकामसा. **करुणा** = दया. **करुण रस** = नवरसांपैकीं एक रस. **करुणा भाकणें** = दयेची याचना करणें.]

करें, कऱ्हें न. उंट. A camel.

[सं. **करभकम्** (√**कृ हिंसायाम्**; √**कृ विक्षेपे**); प्रा. अप. **करहअँ**; कान. **करि** = काळें. याकाम. **करें**, **कऱ्हें** (ज्ञा. १३-५५८, ११-४१४). करेणु पहा.]

करेणु स्त्री. हत्तीण. A female elephant.

[सं. **करिन्** (कर = सोंड); **करिणी** (**स्त्री**), √ **कृ** + **एनु**, सं. **करेणु** हा शब्द मोठा चिन्त्य आहे. एक अवयव संस्कृत व दुसरा द्राविडी अशांचा हा सामासिक शब्द आहे. सं. **करिन्**; ता. **यानै**; (कान. **आन**.) हे दोन अवयव आहेत. परंतु हा सर्व शब्दच द्राविडमूळ असून त्याचा संस्कृतमध्यें समावेश नंतर करण्यांत आला. द्रा. **कर** = काळा; **करी** = कोळसा. **करियमान्**, **करिमान** = काळवीट. त्याचप्रमाणें **करी** (= काळा) + **यानै**,-**एनु** = **करेणु** अशा मार्गानें तो निष्पन्न होणें शक्य आहे. (**करे** + **नाडु** > **कर्णाट-क** शब्द पहा). सं. '**करिन्**' मधील '**कर**' हें मूळसुद्धां द्राविडी असण्याचा संभव आहे. द्रा. **कर**, **करु** = काळें. तसेंच '**करभ** = हत्तीचें पिलूं, उंटाचें पिलूं' हा शब्दहि द्रा. **कर** + **भ** (आर्य) असा सिद्ध झाला असावा. **करकट**, **करट** = गंडस्थळ वगैरे शब्द द्रा. **कर**, **करि** ह्या मूळाशीं संबद्ध असावेत. चतर्जी N. I. A. Vol. II, P. 422.]

करेला पुं. लाकडाची मोठी जोडी. (तालमीसाठीं वापरतात.) A club, a wooden mace.

[हिं. **करेल**.]

करोड वि. संख्याविशेष, एक कोटी, असंख्य. A crore.

[सं. **कोटि**; प्रा. **कोडि**; हिं. **करोड**, **करोडगिरी** = जकात घेणें. हिं. **करोड** + **गिरी**. हिंदीमधून मराठीमध्यें आला.]

करोल करोळ पुं. बंदुक बाळगणारा शिपाई. A sepoy with a gun.

[तु. **कराउल**; हिं. **करोल**; कधीं कधीं विशेषण म्हणूनहि हा शब्द वापरतात. उदा. एक लाख करोल शिपाई. *Eng.* Cavalry ह्याच्याशीं संबंध आहे काय?]

कर्क पुं. खेंकडा, बारा राशींपैकीं एक रास. A crab, the Cancer in the Zodiac.

[*IE.* Qer, Qer-Qer; सं. **कर्क**. *Gr.* Karkinos; *Lat.* Cancer; *As.* Cancer; *ME.* Cancer. तद्भव-**खेंकडा** (**कर्कटकः**). संस्कृतीकरण नंतरचें.]

कर्कश वि. कठोर, रानटी, वाईट. Harsh, cruel.

[सं. **कर्क् १ हासे**. (सौत्रधातु), (**कर्कात् लोमादित्वात् शः**)]

कर्ज न. ऋण, द्रव्य उसनें घेणें-देणें. Debt.

[अर. **कर्झ्**. **कर्जखत**,-**रोखा** = पेशाच्या देण्याघेण्यासंबंधीं करारपत्र, ऋणपत्र. **कर्जदार** = ऋणकरी.]

कर्जवाम न. कर्ज वगैरे. Debt, etc.

[अर. **कर्झ्**; फा. **वाम** = कर्ज. दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द.]

कर्ण पुं. कान, श्रोत्रेंद्रिय. An ear.

[सं. **कर्णः** (कीर्यते क्षिप्यते शब्दः वायुना यत्र). **कर्णकटु** = कानाला कडू लागणारें; **कर्णपिशाच** = चमत्कारानें बातमी देणारें साधन, मंत्रसाध्य पिशाच; **कर्णमैथुन** = कानगोष्टी, कानमंत्र.]

²कर्ण पुं. व्यक्तिनाम. Name of a person.

[सं. **कर्णः** महाभारतकालीं हा एक उदार पुरुष होऊन गेला. त्यावरून लक्षणेनें उदार मनुष्यास **कर्ण** म्हणतात.]

कर्तन न. कापणें, छेदन. Cutting.

[सं. **कर्त्** १० छेदने.]

कर्तब न. चातुर्य, कौशल्य. Skill.

[हिं. **कर्तब**; **कर्तबगारी** = **कर्तृत्व**.]

कर्दनकाळ पुं. भयंकर मनुष्य, तापट, क्रूर, हिंसा करणारा, यम (शब्दशः). A cruel (person).

[सं. **कर्दनम्** + **काल**; √**कर्द् १ कुत्सितरवे**.]

कर्दम पुं. चिखल, रेंदा. Mud.

[सं. **कर्दम**; √**कर्द् १ कुत्सितरवे** (?); याकाम. कर्दम (ज्ञा.)]

कर्दळी स्त्री. वनस्पतिविशेष, केळ, एक फुलझाड. A kind of plant.

[सं. **कदली** (काय जलाय दल्यते किंवा √**कद्**); प्रा. **कदली**; याकाम. **कर्दळी** (ज्ञा.) 'र'ची उपपत्ति कशी लावावयाची? हें उत्तरकालीन संस्कृतीकरण तर नसेल ना?]

कर्नाटक एक देश. Name of a province.
[सं. **कर्णाटक**; कान. **करि = काळा**; **नाडु** = प्रांत. हें संस्कृतीकरण मूळ कानडी शब्दाचें झालेलें दिसतें. **करेणु** पहा.]

कर्म न. काम, कृत्य. An action, deed.
[सं. **कर्मन्**. √ **कृ**. ८ **करणें**; ह्याला लक्षणेनें कांहीं अर्थ आले आहेत. **कर्म** १ धार्मिक कृत्य, २ (पापपुण्यदर्शक) कर्म, दैव, ३ ज्याच्यावर क्रिया घडली तें (व्याकरण), ४ मैथुन (उ. त्यानें तिच्याशीं कर्म केलें.)]

-कर्मफळ न. कृत्याचा परिणाम. The fruit of action.

-कर्मकटकट स्त्री. संकट, जिकिरीचें काम. A term for any pestering person or business.

-कर्मकथा स्त्री. दुःखदायक हकीकत. A narration of miseries.

-कर्मकांड न. यज्ञयागादिकाचा काल,-भाग. The section of the Vedas which treats of rites.

-कर्मधर्मयोग पुं. अचानक योग, दैवानें प्राप्त होणारा योग. The union of one's fortune and one's merit.

-कर्मधारय पुं. विशेष्यविशेषणाच्या संबंधानें जोडलेला समास. A compound of adjective and substantive.

-कर्मभ्रष्ट वि. धार्मिक कृत्यें न करणारा. Neglectful of religious rites.

-कर्ममार्ग पुं. पुरुषार्थसिद्धि मिळविण्याचा विहित मार्ग. The prescribed way of performing religious acts.

-कर्मयोग पुं. प्रारब्ध, योगायोग. Fortune or fate.

-कर्मलंड वि. धर्मभ्रष्ट. Irreligious.

-कर्मविपाक पुं. पूर्वजन्मीं केलेल्या कर्माचें फल. The fruit of actions done in past lives.

-कर्मशील वि. धर्मशील. Intent upon religious rites.

-कर्मसंन्यास पुं. कर्मांचा त्याग. Renunciation of religious rites. (< **कर्म + सं + न्यास < नि + √अस्**)

-कर्माकर्म विचार पुं. चांगलें किंवा वाईट कर्म ह्यांसंबंधीं चर्चा. Consideration of things fit or unfit to be done.

-कर्मिष्ठ वि. धार्मिक कृत्यें करणारा. Intent upon religious works.

-कर्मेंद्रिय अ. काम करणारें इंद्रिय, (विशिष्ट अर्थानें) शिश्न. An organ of action or some function, (especially) the organ of generation.

कऱ्हाड न. एक गांवाचें नांव. Name of a town in Satara district.
[सं. **करहाटक**; प्रा. **करहाडय**; **करहायविसए धन्नऊरयसंनिवेसम्मि** (स. २६३). **कऱ्हाडा** = ब्राह्मणांतील एक पोटजात, कऱ्हाड ते चिपळूणपर्यंतच्या टापूंत राहणारे ब्राह्मण अशी राजवाडे व्युत्पत्ति देतात.]

कऱ्हेर न. स्त्री. पाणपोई, पाण्याचें भांडें.
[सं. **करक**; प्रा. **करअ**; याकाम. **कऱ्हेर** (नरुस्व ५०) **कऱ्हेरी = पाणी देणारा सेवक** (शि. ५०)]

कऱ्हेरी पुं. चवरी धरणारा. One who waves a *chauri*.
[सं. **करक + धारिन्**; प्रा. **करअधारी**; याकाम. बकाम. **कऱ्हेरी** = पाणी देणारी दासी.]

मीच्चि बारी मी कऱ्हेरी ॥ ए. भा. ११.५६१.
धारना पवनु । कऱ्हेरी वरणु ॥ शिशु ५०.

^{१}**कल(णें)** सक्रि. जाणणें, समजणें. To know, to understand.
[सं. **कल्** १ ज्ञाने ; प्रा. **कल**; पा.पै. **कळ**; याकाम. **कलणें** (ज्ञा. ६·१११); अकाम. **कळणें**.]

नातरी अद्भुतरसाचां कल्लोळीं । झाली चौदा भुवनांसि कडियाली । तैसें आश्चर्य हें कलीं । कैसेंनि मीं । ज्ञा. ११·३१२

^{२}**कल(णें)** अक्रि. एका बाजूस वळणें-सरणें. To incline.
[सं. **कल्** १ प्रवृत्तौ; **कलता** = एका बाजूवर कललेला.]

^{३}**कल** पुं. मनाचा ओढा, प्रवृत्ति, वळण, रोंख, झोंक. An inclination, attitude.

^{४}**कल** पुं. आवाज, कलकल.
[सं. **कल्**, **कल्ल्** १ **शब्दे**; याकाम. **कल = मंजूळ** (ज्ञा.)]

-कलकल-कलकला पुं. गोंगाट, गोंधळाचा आवाज. Confused noise.

-कलरव पुं. मंजूळ स्वर, हंसाचा आवाज. Sweet chirping sound.

[सं. कल् १ शब्दे, रु. २ शब्दे. द्विधातुसंयोग.]

-कलहंस पुं. एक पक्षी. A gander, a swan.

कलगी स्त्री. वि. एक प्रकारचा तुरा, सिरपेंचावरील तुरा. A plume of feathers, a gem-studded ornament for the turban.

[तुर्की. **कल्घी, कल्घा = शिखर.** ह्याचा आणि सं. **कलश < कळस** ह्या शब्दाचा कांहीं संबंध नाहीं. शेक्सपियरनें संबंध दाखविण्यांत चूक केली आहे. **कलश = भांडें, तांब्या.**]

कलगी^{2} स्त्री. लावणीचा एक प्रकार, वाद्याचा एक प्रकार, (विशिष्ट चिन्ह डफावर लावलेलें असतें). A *lavani* or amorous song, a kind of instrument.

[तु. **कलगी.**]

कलंक, कळंक पुं. डाग, धातूचा कीट, दोष. Verdigris.

[*IE.* Qer, Qal ; सं. **कलङ्क** ; *Gr.* Chelainos ; *Lat.* Clam.]

-कळक(णें) अक्रि. भांड्याच्या कलंकानें दूषित होणें. To be affected with verdigris.

[सं. **कलंक** (नाधा.)]

कलंकी पुं. दहावा अवतार (विष्णूचा).

[सं. **कल्की (कल्कं पापं हार्यतया अस्ति अस्य).** ह्या शब्दाचा लक्षणेनें अर्थ ‘ भांडण ’, ‘ कलह ’ आहे. तो कलह आणि कलंकी ह्यांमधील शब्दसाम्यामुळें आला असावा. ‘ कलह, कली, कल्की ’ ह्या शब्दांत वर्णसाम्य असल्यामुळें असा अर्थसंभ्रम उत्पन्न झाला आहे.]

कलंड(णें) अक्रि. (भांडें) एका बाजूवर वळणें. To incline.

[सं. **कल् + लंड्** १० उत्क्षेपणे. (द्विधातुसंयोग); **कलंडा** = बाजूवर कलणें.]

कलत्र न. स्त्री, पत्नी, लग्नाची बायको. Wife.

[सं. **कलत्र, कडत्र,** कलं त्रायते; कड्यते-शिष्यते; किंवा √कृ (गण्ड्सेचने “ गण्डेरादेश्चकः ” उणां ३-१०६) याकाम. **कलत्र** (ज्ञा. १८·७९७)]

कलथ(णें) उक्रि. उलथणें, एका बाजूवर कलणें किंवा ढकलणें. To overturn, to turn on another side.

[सं. कुथ् १ हिंसार्थः; *Lat.* Clades; अकामसा. **कल्था** = मोठें पसरट उलथणें, लोखंडाचें हत्यार; **कलथी** = लहान उलथणें.]

कलंदर^{1}, कलिंदर पुं. फकीर, दरवशांचा एक पंथ, फंदी, भटक्या, व्यसनी. A fakir.

[अर. फा. **कलंदर–एका पंथाचे फकीर. कलंदर** = योगीशः (रा. व्य. को. ११).]

कलंदर^{2} न. ऊद, प्राणिविशेष, काळमांजर. A certain wild animal.

[हिं. **कानेदर** (?)]

कलदार वि. मुखवटा असलेलें नाणें, (ब्रिटिश नाण्याला कलदार म्हणतात.) A coin having an efigy.

[अर. **कल्ह = डोकें.**]

कलप पुं. केस काळे करण्याचें औषध,-रंग, खळ. A composition used to blacken the hair, starch.

[सं. **कल्क.** शब्द फारसी आहेसा वाटतो. फा. **कलफ = चेहऱ्यावरील सुरकुती** हा शब्द मूळ असावा.]

कलबूत,-भूत,-भूद पुं. हाडांचा पिंजरा-सांगाडा. पेंढा किंवा भुसा भरून तयार केलेली जनावराचीं आकृति. A block or frame, a skeleton, a stuffed animal.

[फा. **कालबुद = आकृति.**]

कलम^{1} न. लेखणी, बोरू. A pen.

[सं. **कल्म् = बोरू, लेखणी.** अकामसा. **कलमकसाई** = लेखानें मारणारा, हिशेबनीस, **कलमदान** = लेखण्याची पेटी (फा. **कल्म + दान**). **कलम करणें** = कांपणें, (तरवारीनें) छाटणें, एका झाडावर दुसरें रोप लावणें.]

कलम^{2} न. सदर, परिच्छेद. A paragragh.

[कांहीं लाक्षणिक अर्थांचे शब्द सिद्ध झाले आहेत. (चितान्याचें) **कलम,** रजपूत **कलम,** मोगल **कलम** (चित्रकलेची रजपूत अथवा मोगल पद्धत.]

कलमबंदी स्त्री. सदरें कायम केलेली असा लेख. A writing of distinct heads.

कलमवार अ. सदरवार. Article by article, item by item.

कलमी वि. लिहिलेलें (कलमी केलेलें), कलम केलेलें (झाड, त्याचें फल). Written, grafted (tree or its fruit).

कलवड–कलोड स्त्री. कुडाची झोंपडी. A little hovel or erection for shelter, a pile of dry cow-dung lumps.

[सं. **कुटीर; म. कलोड**=आसऱ्याची जागा, गोवऱ्याचा ढीग; सं. **कल्** १ समवाये.]

कलश पुं. तांब्या, भांडें, गडवा. A water-vessel.

[*IE.* Qel, qol ; सं. **कलश;** (**कल + शु-गतौ**) *Gr.* Chulix ; *Lat.* Calix ; ह्यापासून 'कळस' हा तद्भव सिद्ध होतो. त्याचा अर्थ 'शिखर, शेवट, पराकाष्ठा' असा आहे. देवालयावर शिखराच्या टोंकास 'कलश' ठेवण्याची पद्धत आहे. **कळसपाकी** = नक्षीमध्यें कलश असलेलें.]

कलह पुं. भांडण, तंटा. A quarrel.

[सं. **कलहः** (कलं कामं हन्ति.)]

कला स्त्री. कौशल्याचें कार्य, कौशल्यबुद्धि, रचना. An art.

[सं. **कला** √ **कल्.**]

कैला स्त्री. सोळावा हिस्सा–भाग, चंद्राची कला. A phase.

[सं. **कला;** अकाम. **कळा** = तेज कांति; **अवकळा** = वाईट दशा (लक्षणा).]

कलाकंद पुं. खव्याचा पदार्थ–वर्फी. A kind of sweetmeat.

[फा. **कल्हा–इ–कंद** = मिठाई; हिं. **कलाकंद.** हा शब्द हिंदीमधून आला.]

कलागत स्त्री. भांडण, वैर, कळ, लावालावी. Sharp contention, wrangling.

[सं. **कलह + गति** (?)]

कलाटणी, कलटणी स्त्री. ढकलणें, कोलांटी उडी. Turning on another side, a somersault.

[सं. **क्रुथ् १ हिंसार्थः.**]

कलाबतु पुं. रेशीम आणि जर हे एकत्र करून केलेला दोरा–धागा. A silk-*jari* thread.

[फा. **कलाब्=सुताची गुंडी ;** हिं. **कलाबत्तून.**]

कलाल पुं. दारूचा मक्तेदार,–व्यापारी; मद्याचा व्यापारी. A destiller or vendor of spiritual liquor.

[सं. **१ कल्या;** देप्रा. **कल्ला = दारु, मद्य; कल्यापाल;** प्रा. **कल्लाल;** २ द्रा. **कळ = ताडी, कल्य** = दारु (कानडी तद्भव). ३ अर. **कल्वार**–दारु गाळणारा. संस्कृतीकरण नंतरचें. कारण **कल्ला** हा प्राकृत शब्द मूळचा. त्याचा अनुसारी संस्कृत शब्द नाहीं. तेव्हां कल्यापाल हा शब्द नंतरचा. 'ल' हा विशेषण प्रत्यय प्राकृतमधील आहे.]

कलावंत वि. कलेंत निपूण. Knowing some art.

[सं. **कलावंत;** परंतु ह्या शब्दाच्या अर्थाचें **विशेषीकरण** झालेलें आहे. अर्थ मर्यादित केला गेला. हा शब्द विशेषतः नायकीण व तिचे साजिंदे ह्यांना लावतात. ह्याचा तद्भव 'कळवात' हा रूढ आहे.]

कली–ळी पुं. एक युग (चौथें). (आरंभ ख्रि. पू. ३१०१ किंवा १३७० ; ह्याचीं वर्षें ४३२००.) The fourth age of the world. भांडण, मत्सर (लक्षणा). Strife, dissension.

[सं. **कलि,** √ **कल्;** अकामसा. **कलिपुरुष** = भांडखोर, कळ लावणारा मनुष्य. **कलियुग** = कलि नांवाचें युग. **कलि (संचरणें)** = युद्ध, भांडणाऱ्या देवतेचा अंगांत संचार होणें.]

कलिंगड न. टरबूज, एक फळ. The water-melon.

[सं. **कालिंगी.**]

कलिजा, कलेजा पुं. प्रेमविषय, हृदय. Heart.

[सं. **कालेय** (?) ; प्रा. **कालेय, कालिज्ज.** २. अर. **कल्ब** = **हृदय.** ; हिं. **कलिजा ;** मराठीमध्यें हा शब्द हिंदीमधून आला.]

कॅलिको न. उत्तम विणीचें–पोताचें कापड. A cloth of fine texture.

[*Fr.* Calicot, Calicut. येथील कापड चांगलें असल्याबद्दल मार्को पोलो, फ्रायर, टेरी इ. लेखक सांगतात. हें मलबारांतून घाटावर आणीत असत.]

कलीफा, खलीफा पुं. मुसलमानी धर्मांतील अधिकारी. The Khalif.

[अर. **खलीफ** = राजप्रतिनिधि; **खालिफ** = देवघेव करणें. परंतु ह्या शब्दाच्या बाबत अर्थभ्रंश झाला आहे. उत्तरहिंद मध्यें शिंपी, आचारी ह्यांना लावतात. दक्षिण हिंदुस्थानामध्यें ज्याप्रमाणें आचाऱ्याला मिस्त्री म्हणतात, मराठीमध्यें कुंभारास राजे म्हणतात, आचाऱ्यास बल्लवाचार्य म्हणतात, न्हाव्यास कारागीर म्हणतात, त्याप्रमाणें ह्या शब्दाच्या अर्थांत भ्रंश झाला आहे.]

कलुली, कलोली स्त्री. घोड्याचा माज, सुरसुरी, मैथुनेच्छा, मस्ती. The heat in mares, the excitement of a stallion.

[सं. **कल्लोल,** √ **कद् ;** हिं. **कलोल, किलोल** = स्वैर उड्या मारणें.]

कलुषित वि. दूषित, कलंकित. Muddied, rendered foul.

[सं. कलुष = कृष्ण, √ कृ, √ कल्; द्रा. कलकु, कलडु, कलुंबु, करे.]

कलेवर न. शरीर, निर्जीव, प्रेत. The body (of man or beast), carcass.

[सं. कलेवर (कले शुक्रे वरं श्रेष्ठं देहोत्पत्तिहेतुकत्वात् पवित्रम्; *Lat.* Cadaver).]

कल्क पुं. ठेंचा, रांधा, ओला पदार्थ वाटून शिजवून त्याचा केलेला गोळा. A slimy consistence (made by reducing the medicaments).

[सं. कल्कः (कल् १ गतौ + क दाधारार्चिकलिभ्यः उणं ३-४० इति कः).]

कल्प पुं. संख्याविशेष (चार अब्ज), युग, इच्छा, संशय, निश्चय. A day and night of Brahma, age, desire, doubt.

[सं. कल्पः √ क्लृप् किंवा कल्यते विधीयते असौ. कल्पतरु = इच्छिलेला पदार्थ प्राप्त करून देणारा वृक्ष.]

कल्प(णें), कल्पि(णें) उक्रि. विचार करणें, मानणें, जुळविणें (मनांत). To think, to imagine.

[सं. कॢप् १ विचारे; **कल्पना**=विचार, इच्छा, योजना, निश्चय; **कल्पित**=मनांत योजिलेलें, खरें नसलेलें (लक्षणा).]

कल्याण न. हित, क्षेम, कुशल, गायनांतील एक राग. Well-being, welfare, weal, a musical *rag*.

[*IE.* Qul, Qer; *Gr.* Challo; सं. कल्य, कल्याण √ कल्; (कल्ये प्रातः अण्यते शब्दते; कल्य + अण् " अकर्तरिचेति " ३-३-१९).]

कल्ला पुं. मिशांचा झुपका, तुरा. A whisker, the wattle of a cock.

[फा. कल्ल (गाल) = गालावरील केस (ल.).]

कल्ला पुं. गलबला, गिल्ला. Noise, uproar.

[सं. कल् १ शब्दे.]

कल्लोळ पुं. लाट, गोंधळ, आरडाओरड. A surge, a large wave, a noise.

[सं. कल्लोल; (कं जलं लोलं चपलं यस्मात्), √ कद् + लोल; √ कल्–आवाज करणें. प्रा. कल्लोल; याकाम. कल्लोळ (नरुस्व. ४२३); कल्लोल (ज्ञा. १५·५६८).]

कल्हई स्त्री. कथिलाचा मुलामा, भांड्याची जिल्हई, सावरासावर (लक्षणा). Tinning, the wash of tin given to culinary utensils.

[सं. कलधौत; प्रा. कलहोय (सुवर्ण, चांदी); अर. कलई = कथील; पेकाम कलइ (रा. १२·१४२).]

कल्हार न. पांढरें कमळ. The white lily.

[सं. कल्हार; याकाम. (लक्षणेनें) हृदयकमळ (उगी.), कल्हार, कळ्हार (नरुस्व. ८१४).]

कव स्त्री. वेढा, वेंग, वेंघ, मिठी, झडप. Embracing, the grasp.

[सं. क्षेम; किंवा (√ क्षिप्)–क्षेप > खेप > खेंव > कव ह्या मार्गानें हा शब्द सिद्ध झाला असावा. याकाम. खेंव (ज्ञा. १३–६१). किंवा सं. √कु; किंवा कवल = घांस ह्याचा संक्षेप ' कव ' असा झाला असावा.]

कवच न. आच्छादन, आवरण, चिलखत. Skin-cover, armour, coat of metal.

[सं. कवचम्; (कं देहं वञ्चति किंवा कु √पासून); याकाम. कवच = आच्छादन (नरुस्व. १५६).]

कवची स्त्री. (डोक्याची) कवटी, करवंटी. The fore part of the skull.

[सं. कवचम्.]

कवटल-कवटाल-ळ न. कोयड, यंत्र, डावपेंच. A crooked device to injure.

[सं. कूट, कौटल्यम् = कपट]

कवटळ(णें), कवटाळ(णें) उक्रि. भेटणें, आलिंगन देणें, मिठी मारणें, आवळणें. To clasp or embrace.

[सं. क्रम् १ पादविक्षेपे + तल् १ प्रतिष्ठायाम्; परंतु कान. कट्टाडिसु (?) हा शब्द मूळ असावा असें वाटतें.]

कवठ स्त्री. न. वृक्षविशेष, फलविशेष. Wood-apple, a kind of tree and its fruit.

[सं. कपित्थ; पा. कपिथ्थ; प्रा. कवित्थ, कविठ्ठ; सिं. कविट्ठु; हिं. कठबेल, कैथ; ओ. कईत. सं. कपिस्थ–(monkey–tree) (कपि + स्था + कः पृषोदरादित्वात् सलोपः) मूळ शब्द परकी मलाया भाषेंतील असून त्याचें संस्कृतीकरण केलें.]

कवडसा पुं. कडोसा पहा.

कवडा पुं. पक्षिविशेष. A partridge.

[सं. कपोतकः; याकाम. कवडा (उगी. ४०४).]

कँवडा पुं. मोठी कवडी. A big *cowrie*.

[सं. कपर्द; प्रा. कवड्ड ; गु. बं. कोडी; हिं. **कौरी;** सिंह. कवडिय; याकाम. कवडा (ज्ञा. १३·७९४).]

कवडी स्त्री. शंखासारख्या आकाराचें एका किड्याचें आवरण. ह्याचा उपयोग नाण्याप्रमाणें करीत. A shell, *cowrie*.

[सं. कर्पर्दिका, √पर्व् पूरणे. ''रात् लोपः'' (६·४·२१); क + पर + दा (दैप् शोधने); प्रा. कवड्ड, कवड्डिआ; ओ. कौरी ; हिं. कौरी; सिं. कोड्ड; बं. करी ; पं. कौरी. कवडीचुंबक = कवडी चुंबणारा.

ह्या नाण्यांचा उपयोग द. आशिया आणि द. आफ्रिकेंतील देशांत करीत असत. चीन देशांत पूर्वीं खंडणीवसूल कवड्यांत देत. '**शी**' राजानें खंडणी कवडींत दिली (ख्रि. पू. १४००). **त्सिन्** राजानेंहि खंडणी कवडींत दिली (ख्रि. स. ३३८). वंगमंग राजानें (ख्रि. ९२३) मध्यें हें नाणें पुन्हा सुरू केलें. हिंदुस्थानांत पूर्वीं हें नाणें सुरु असल्याचा दाखला ग्रीक ग्रंथकारांनीं दिला नाहीं ; त्रिकाण्डशेषांत ह्याचा उल्लेख आहे (२० कपर्दिका = $\frac{३}{४}$ पण).]

कवण सर्व. कोण, काय, कोणता. Who, what.

[सं. **कः पुनः** ; प्रा. **कऊण.** > **कवण** > **कोण ;** याकाम. **कव्हण** (नरुस्व. ५४), **कवण** (नरुस्व. ४२६). **कव्हण, कव्हणी, कोण** हीं रूपें काव्यांत रूढ आहेत.]

कवतिक, कवतूक न. (काव्य) कौतुक. Surprise, admiration, fondness.

[सं. **कौतुकम्,** (**कुत् + उकच्**–१·७–३१); याकाम. **कवतिक** (ज्ञा. १-९७)]

कवसकुली स्त्री. खाज उत्पन्न करणारी वनस्पति. Cowitch.

[सं. **कच्छू,** √ **कुश ;** प्रा. **कच्छु** (स्त्री); दुसरा अवयव 'कुली' हा प्राकृत 'ल' प्रत्ययापासून असावा. हिं. **कवाछ; कवचकुइरी, कवसरी, कवसली,** हे त्याच अर्थाचे शब्द होत.]

कवळ(णें) सक्रि. आवळणें, आलिंगन देणें. To embrace.

[सं. **कवल** (नाधा.); याकाम. **कवळणें** = वेटाळणें. **कव्हाळ, कवळी** २ भेट (ज्ञा. ६–२३०) (ज्ञा. १८–५३०); शिकाम. **कवळी.**]

धर्में धाऊनी धरिला हातीं । हृदयीं कवळिला परम भक्ति मुक्ते. व. १०–१०२

कवळा पुं. दोन्ही हातांचा विळखा. The grasp with two arms.

[सं. **कवल ;** प्रा. **कवल ;** पा. **कवळ ;** पै. **कवळ ;** गु. **कोळियो ;** पं. **कुली ;** हिं. **कौल ;** हिं. बं. **कुली ;** याकाम. **कवळिया** (नागांव शिलालेख).]

कवळी स्त्री. पानाचा पुडा. A bundle of betel leaves.

कवाइत स्त्री. शिस्त, ड्रिल, लष्करी चाल शकल. Military drill, manœuvres.

[अर. **कवाईद्.**]

कवाड न. दार, फाटक. A door.

[सं. **कपाटम्** (कं वायुं मस्तकं वा पाटयति.) ; प्रा. **कवाड;** हिं. **किवाड;** गु. **कमाड;** पं. **कवाड;** बं.ओ. **कबाट;** सिंह. **कवळुअ** = खिडकी; याकाम. **कवाड** = दरवाजाचें झांकण (अमृ. ७·१२३).]

कवाली स्त्री. एक फारसी वृत्त, ख्याल, गाणें. A variety of song, the *khyala*.

[अर. **कव्वाल्**]

कवि पुं. काव्य करणारा. A poet.

[*IE.* Que (दर्शने); सं. **कवि,** √**कु** १ शब्दे ; *Slav.* kolici; *Gr.* choeo; *Lat.* caveo, cav; *Serb.* cuvati; *Lith.* kavoli; *Got.* hausjan; याकाम. **कवि** = शहाणा, भाट (नरुस्व. १२४). मूळ धातूचा अर्थ 'शब्द करणें. '**कवि**' ह्याचा मूळ अर्थ **पंडित, विद्वान्** असा आहे. त्या अर्थामध्यें बदल होऊन काव्य करणारा असा विशेष अर्थ प्राप्त झाला. त्यापासून सिद्ध झालेले इतर शब्द **काव्य, कवन, कविता, कवित्व** इत्यादि रूढ आहेत.]

कव्हेरीं अ. कोठपर्यंत, किती वेळपर्यंत. How far, how long.

[म. क–प्रश्नार्थक सार्वनामिक बीज, + **वेन्हीं=वेळीं, पर्यंत**].

कशा पुं. पट्टा, चाबूक, प्रतोद, मारण्याची पट्टी, कमरपट्टा. A whip.

[सं. **कशा** (**कशति शब्दायते ताडयति वा**).]

कषाय पुं. काढा, औषधींचा अर्क, (लक्षणा) आमटी, चहा. A decoction of medicinal herbs.

[सं. **कषायः** √ **कष्,** (**कषति कण्ठम्, कष् +** आय.)]

कष्ट पुं. श्रम, त्रास, प्रयत्न, मेहनत, दुःख. Bodily exertion.

[सं. **कष् १ हिंसायाम्;** अकामसा. **कष्टणें** (दमणें), **कष्टाळू** (मेहनती), **कष्टी** (दुःखी).]

कँस(णें) सक्रि. बांधणें, घट्ट आवळणें. To bind tightly.

[वैसं. **कछ्** (वन्धने), सं. **कच्**, **कष्**; प्रा. **कस**; सिं. **कश** = लांब, अरुंद चामड्याचा पट्टा; प.पं. **कश्क** = खोगिराची दोरी ; सिंह. **कस्**–चाबूक; पं. **कस्स**; गु. सिं. हिं. **कस**; अकामसा. **कसा** = अंखरख्याचा बंद, कमरेस बांधावयाचा लांब पट्टा. **कसणी** = दोरी, **कच्छ**, **कास**, **कासोटा** हे सर्व संबद्ध शब्द आहेत.]

²कस(णें) उक्रि. परीक्षेस उतरणें, कस लावणें. To try on a touch-stone, to examine.

[सं. **कष्** १ हिंसायाम्; गु.हिं.सिंह. **कस**; सिं. **कसोटी**; याकाम. **कस** (नरुस्व. ५८९); अकाम. **कस** (सामर्थ्य, जोर), **कसोटी** (परीक्षा करण्याचा दगड).]

³कस(णें) सक्रि. जमीन मशागत करणें. To cultivate, to farm.

[सं. **कृष्** १ विलेखने.]

कसकसणें अक्रि. तापाच्या पूर्वी अंग मोडून येणें, किंचित् ताप येणें. To ache (the body or a limb).

[सं. **कषति** ; गु. **कसवूँ** = दमणें ; हिं. **कसकना** = आजारी असणें ; **कसक** = घोड्याचें लंगडणें.]

कसपट न. लहान तुकडा (गवत, लाकूड वगैरेंचा), कण, भुसा वगैरेंचा कण, तूस, क्षुद्र वस्तु (लक्षणा). A minute particle, a straw.

[सं. **कष** + **पट** ; याकाम. **कसवटी** (ज्ञा.).]

कसब न. कौशल्य, कला, उद्योग, व्यापार, चातुर्य, हिकमत. Skill, cleverness, a business, trade, a wily scheme.

[अर. **कशब्**, नंतर त्याच्या अर्थांमध्यें विशेषीकरण झालें. **कसब** = नाचण्यागाण्याचें कौशल्य, **कसबीण** = वेश्या, नाचणारी नायकीण.]

कसबा पुं. जेथें बाजार भरतो असें गांव. The chief town of a *mahal* or *bazar*-town.

[अर. **कशब** = परगण्यांतील मुख्य शहर; हिं. **कसबा**. **कसब** = कौशल्य, कारागीर असलेलें ठिकाण ह्याच्याशीं संबंध असावा.]

¹कसर स्त्री. कीटकविशेष, कपडा व कागद ह्यांस लागणारी कीड. A corroding insect, a silver-fish.

[सं. ? देप्रा. **कसर**.]

²कसर स्त्री. कमीपणा, न्यूनता, नफा, फायदा. Deficiency.

[अर. **कस्र**; फा. **कशिदन** = कमी करणें.]

कसरत स्त्री. शरीर चापल्याचे खेळ, कौशल्य, मेहनत. Practice, exercise, toiling, acrobatics.

[अर. **कस्रत्**; **कस्रतखाना** = व्यायामाचा आखाडा.)]

कसवट-टी, कसोटी स्त्री. परीक्षा, धातु पारखण्याचा दगड. A touch-stone.

[सं. **कषपट्टिका**; प्रा. **कसवट्टिआ**; सिं. **कसोटि**; याकाम. **कसवटी** (उगी. ६७१).]

¹कसा सर्व. कोणत्या प्रकारानें–कारणानें. How, for what reason.

[सं. **कीदृश**; प्रा. **किअस्स**, **किअस**.]

²कसा पुं. अंगरख्याचा बंद, पैसे ठेवण्याची लांबट पिशवी (कमरेस बांधतात). A long narrow money-bag.

[सं. **कस**, **कष्** (कसणें पहा.); फा. **कीसा** = **लांब अरुंद पिशवी** हा फारशी शब्द ह्या संबंधांत चिन्त्य आहे.]

कसाई पुं. खाटिक, जनावरें कापणारा, क्रूर (लक्षणा). A butcher.

[सं. **कशिदन्**-**कमी करणें**, **काढून घेणें** (?). **कसाईखाना** = खाटकाचें दुकान.]

कसाला पुं. पुंडावा, गोंधळ, श्रम, आयास, जुलुम, पीडा, दुःख. Oppressing, harassing.

[अर. **कसाला** = दुःख ; पेकाम. **कसाला** (रा. ६–२५१); अकामसा. **कसालत** (= पीडा, दुःख); **कसालती** मेहनती, पुंड.]

कसूर स्त्री. कुचराई, कमीपणा, चूक, न्यूनता, हयगय. Negligence.

[अर. **कुसूर्** = **दोष**, **न्यूनता** ; फा. √**कशिदन्** = **कमी करणें**.]

कसोटी स्त्री. कस लावण्याचा दगड. A touch-stone.

[**कसवट पहा.**]

कसोशी स्त्री. काळजी, सूक्ष्मता, प्रयत्नाची परमावधि. Careful examination, earnest enquiry, extreme effort.

[फा. **कोशीश्** = प्रयत्न, अभ्यास.]

कस्त स्त्री. नुकसान, तोटा, कमीपणा, न्यूनता, श्रम. Detriment, damage, loss.

[फा. **कशिदन्**=कमी करणें; हिं. **कस्त**=वाण, कमताई.]

-कस्ता वि. कमी वजनाचा, हलका. Light, dificient. कललेला, एका बाजूला वळलेला. Inclined.

[सं. **कस् १ गतौ**; कान. **कसि**=सरकणें].

कस्तान न. हलका-वाळलेला पाचोळा, इंधन. Dry and loose rubbish, old thatch-grass.

[कान. **कस** (=घाण, गदळ) + सं. **तृण**, प्रा. **तण**; **कस्तण** (कानडी-संस्कृत संयोग).]

कस्तुरी स्त्री. एक सुगंधी द्रव्य, एक प्रकारच्या मृगाच्या उन्मादावस्थेंत त्याच्या नाभींतून हें द्रव्य बाहेर पडतें. Musk.

[*IE*. Qestur; सं. **कस्तुरिका**; *Gr*. Kadlor; *Lat*. Castoreum; extracted from Ricinus Communis or Palma Chridi so called from a supposed resemblance in smell or similarity of effect to castoreum.]

कहर पुं. स्त्री. संकट, जोर, आवेश, जुलूम, विकट प्रसंग. Excess, vehemence.

[अर. **कह्‌र**=संकट; **कहरी**=(अतीशय विकट, भयंकर, प्राणहारक.)]

कहाणी स्त्री. गोष्ट, अद्भुत कथा, दुःखदायक वर्णन (लक्षणा.) A tale or story.

[सं. **कथानक, कथनिका**; प्रा. **कहाणग, कहाणिआ**; हिं. **कहानी**; सिं. **किहाणी**; संस्कृत शब्द '**कथिका**' असा आहे. त्यापासून '**कहिआ**' आणि '**णी**' हा प्राकृत प्रत्यय अशी व्युत्पत्ति बसते.]

कहाळी स्त्री. आग, उकाडा, काहिली पहा. Heat.

[सं. **क्वथ्**; प्रा. **कढ**; म. **कढ**; **काहील**=लोखंडाचें मोठें पसरट पात्र, त्यामध्यें उसाचा रस कढवून गूळ शिजवितात.]

कही स्त्री. दाणावैरण वगैरे सामुग्री मिळवून आणणारी लष्करी तुकडी, दाणावैरण. A foraging party.

-कहीकबाड न. गवत लाकूडफाटा. Foraged material.

कहीं, (जहीं, तहीं) अ. कोठें, केव्हां, कधीं (जेव्हां, तेव्हां). When, where, at what time.

[वैसं. **कर्हि**; प्रा. **कहिं**; हिं. **कहीं**; याकाम. **कहीं**, (ज्ञा. २-८); सं. '**किम्**' असें मूळ समजून त्याला प्राकृत प्रत्यय लागले आहेत. प्राकृतमधील सूत्र "**डेर्हिः**" (प्रा. प्र. ६.७) ह्याप्रमाणें कहिं, कम्मि, कमी हीं रूपें होतात. त्याच धर्तीवर जहिं, जास्सिं, जत्थ; तहिं, तास्सि, तत्थ अशीं रूपें होतात. ह्यांवरून मराठी रूपें निर्माण झालीं आहेत. मराठी जुनीं रूपें = **कधीं, जधीं, तधीं, जहीं, कहीं, तहीं, तइं, जइं** पहा.]

कैळ स्त्री. दाराची मूठ, उपाय, गुप्त साधन, युक्ति, सूत्र, मख्खी, खुबी. Any little contrivance, a trick.

[सं. **कला**; प्रा. **कला**; पै. **कळा**; गु. **कळ**; सिं. **कर**=**नाकेबंदी**, **कल** (स्त्री)=विद्या; पं. **कल**(स्त्री). **कळसूत्र** = कलाकौशल्याची दोरी, बाहुलीला गति देण्याचें गुप्त सूत्र. (सं. **कलासूत्र**.)]

कैळ स्त्री. भांडण, तंटा, कुरापत. वेदना, तिडीक. Quarreling.

[सं. **कलि**; अकाम. **कळभंड**=भांडखोर; **कळंभा** (भांडण, तंटा).]

कळ(णें) सक्रि. समजणें. To understand.

[सं. **कलनम्**, √ कल् १० संख्याने; पं. **कलना**; सिं. **किरणु**; गु. **कळवूँ**; हिं. **कलना**; याकाम. **कळणें**, कलणें. मराठी णिच् रूप-कळविणें.]

कळक(णें) अक्रि. विषार लागणें, बिघडणें, नासणें. To be affected with verdigris.

[सं. **कल्क, कलंक** (नाधा.), **कळंक**; म. **कळक, कळंक, कळकट** (**कल्क**+**ट**); कान. **कलकु**=**बिघडणें, गढूळणें**.]

कळखंड पुं. लहान भाग, तुकडा, सोळाव्या भागा इतका. A portion, a phase.

[सं. **कला** (=सोळावा हिस्सा) +**खंड**=तुकडा].

कळण न. चुरा, चुरी, भरडा. The powder and the fragments amongst split pulse.

[सं. **कला**=**अंश**. **कल् १ शब्दे**. अकामसा. **कळणाकोंडा**=भुसा, चुरा, गरीबांचें अन्न (लक्षणा) (सं. **कला**+**कोण्डा**. दोन्ही एका अर्थाचे शब्द; एक **कला** हा आर्य व दुसरा **कोंडा** द्राविडी.)]

कळप पुं. संघ, समूह, जमाव. A herd, a flock, a congregation.

[सं. कलाप; ते. कलपु = एकत्र होणें; याकाम. कलाप (ज्ञा. १८६३५); अकाम. कळप.]

कळमळ स्त्री. पोटांतील दुःख,–वेदना,–मळ, उबळ. Nausea preceding vomiting.

[सं. कलमल; प्रा. कलमल; √ क्लम् = थकणें, √ म्लै–म्लान होणें.]

कळरव पुं. मधुर आवाज. Sweet sound of gander.

[सं. कलरव √ कल्, रु २ शब्दे (पक्ष्याचा स्वर.)]

कळवंड(णें) अक्रि. भांडणें, वर्दळीवर येणें, झोंबाझोंबी करून भांडणें. To squabble, to fight in a lively and noisy manner.

[सं. कलह + हुंड (नाधा.) (?).]

कळवंतीण स्त्री. कलावंत जातींतील स्त्री, नाचणारी, गाणारी स्त्री, गुणीजन. A dancing girl.

[सं. कला + वत् + इन.]

कळवळ(णें) अक्रि. हृदयास द्रव फुटणें, कींव येणें. To yearn with tenderness.

[सं. क्लव् ४ भये; म्लै १ हर्षक्षये, क्लमथु = कळवळ, कळवळा (कींव).]

कळशी स्त्री. लहान घागर. A small metal vessel.

[सं. कलशिका; प्रा. कलसिया.]

कळस पुं. शिखर, देवालयाचें शिखराचें टोंक, The pinnacle.

[सं. कलश; *Gr.* Chulix; *Lat.* Calix; गु. कलसी; सिं. कळसी; पं. कल्स; हिं. कलस; बि. कलसा. (पूर्वीं शिखरावर कलश ठेवीत असत. तो अगदीं टोंकावर शेवटीं असे.)]

कळसपाकी वि. एक कापडाचा प्रकार. विशिष्ट प्रकारची–कलश उलटा व सुलटा अशा रीतीनें नकशी काढलेलें कापड. (Cloth) painted with particular waving figure.

कळा स्त्री. चातुर्य, किरण, तेज, मनःस्थिति, तोंडावरील तेज. Skill, ray, lustre.

[सं. कला = चंद्रप्रकाशाचा भाग, सोळावा अंश; याकाम. कळा (ज्ञा. १५·५०९); अवकळा = वाईट दशा.]

कला कुसर न. कला, कौशल्य. Art, skill.

[सं. कला; फा. कुसर. ह्या शब्दांत एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील दोन शब्द आले आहेत.]

कळावा पुं. जनावराच्या पायांस बांधावयाची दोरी. Pasture–hobbles.

[कान. कळिवु = अडंकविणें, खोडा घालणें. सं. कलाप; प्रा. कलाव; हिं. कलावा; प. कलावा = कडकडून भेटणें अशी व्युत्पत्ति ब्लोक देतो ती चिन्त्य आहे.]

कळाशी स्त्री. सुताराचें एक हत्यार. A dove-tail.

[सं. कालायस् = लोखंड. अर्थाचें विशेषीकरण झालें आहे. ‘लोखंड’ हा सामान्य अर्थ ‘लोखंडाचें हत्यार’ हा विशेष अर्थ.]

कळास स्त्री. बेमालूम जोड. A close and neat adjunction. एक नृत्याचा प्रकार. A feat in dance.

[सं. कला, कलशिका; प्रा. कलसिया = वाद्य; याकाम. कळास = वाद्य (उगी. २०४). कळास = कौशल्य (ज्ञा. १७·८).]

^{१}**कळी** स्त्री. न उमललेलें फूल, लहान खडा (लक्षणा). A bud.

[सं. कलिका; प्रा. कलिआ; गु. कलियो; सिं. पं. हिं. कली.]

^{२}**कळी** स्त्री. अंगरखा अथवा चोळीच्या बाहीचा मागचा जोड. The hinder of the two triangular pieces of a bodice.

[सं. कळाशी; < सं. कला = भाग.]

^{३}**कळी** पुं. भांडण, झगडा. Quarrel.

[सं. कलिः; प्रा. कलि. कळलाव्या, कळीचा नारद. कळ लावणें, वगैरे प्रयोगांत कळी < कलिः अशीच व्युत्पत्ति आहे. ‘कळ दाबणें’ मधील ‘कळ’ कलापासून सिद्ध होतो.]

^{१}**का** प्र. कुत्सितार्थदर्शक प्रत्यय (पोरका, चोलका). A dimunitive termination.

[सं. कः (उदा. अश्वकः); प्रा. कः.]

^{२}**का, कां** अ. अथवा, किंवा, कोणत्या कारणानें. Or, why, wherefore.

[सं. किम्.]

काई, कांई अ. कांहीं. Somewhat.

[सं. किंहि; प्रा. काइं; याकाम. काइसा (< कीदृशः), कसला.]

काइरस, कायरस पुं. काकडी, आंबा वगैरे शिजवून केलेला पातळ पदार्थ. A liquid preparation of mango or cucumber boiled and mixed with sugar.

[कान. काई (=कच्चें फळ, भाजी)+रस. (कानडी–संस्कृत संयोग.)]

काईम वि. स्थिर, निश्चित, उभा. Fixed, settled, established, firm.
[अर. काईम=उभा, स्थिर; अकाम. कायम.]

काईल, काहील स्त्री. लोखंडाचें पसरट वाटोळें पात्र. (ह्यामध्यें उसाचा रस कढवून गूळ तयार करतात.) A boiler for the juice of sugarcane.
[कान. काय=कढत करणें; ते. कागु, कायु; तुळु. काइ; ता. मल्या. काय; काहिली (=आग, दाह) पहा.]

काउ, काउळा, काऊळा, कावळा पुं. पक्षिविशेष. A crow (in nursery language).
[ध्वनिशब्द, काऊ; सं. काक; प्रा. काय; देप्रा. कायलो प्रियःकाकश्च (९१·११). काव काव असा शब्द करणारा. (√कु १ शब्दे; गु. काऊ; सिं. कां, कांउ; पं. का; का. काव; सिंह. का; हिं. कांव; याकाम. काउळ (ज्ञा).]

काउरें न. वेड, भीति, गोंधळ. Confusion, chaos, silliness.
[सं. कातर; गु. हिं. बं. कायर; याकाम. काउरे (विवे. पू. प्र. २ ओ. १६); अकाम. कावराबावरा< सं. कातर+कान. बेवरू (घाम).]

काक पुं. कावळा, काऊ. A crow.
[सं. काक; याकाम. काक.]

–काकतालीयन्याय पुं. (कावळा बसावयास व डहाळी मोडण्यास एक वेळ येणें त्याप्रमाणें) यदृच्छा. Coincidence, chance.

–काकदंतपरीक्षा स्त्री. कावळ्याचे दांत मोजणें–पारखणें, निष्फळ प्रयत्न. A fruitless labour.

–काकपद न. लेखनांतील शुद्धिदर्शक चिन्ह. The mark showing where something marked should be read.

काकड(णें) अक्रि. थंडीनें गारठणें-आकसणें. To contract or draw in through cold.
[सं. कर्करः; प्रा. कक्कर; ओ. काकर (दंव); पं. कक्कर (बर्फ); गु. कांकरू; हिं. काका. (चिवट कांतडी.)]

कांकडा, काकडा पुं. मोठी वात (दिव्याची), मशाल, तडाखा, आंकडा. A coarse wick of cloth, the lash of a leather whip.
[सं. कर्कर; प्रा. कक्कर; कान. (तद्भव) कक्कड =काकडा.]

कांकडी स्त्री. फलविशेष. A cucumber.
[सं. कर्कटिका; प्रा. कक्कडीया; हिं. पं. कक्कडी; सिं. किकिडी; बं. ओ. काकुडी; सिंह. कांकिर.]

कांकण, काकण न. मणगटांत घालावयाचें (स्त्रियांचें) भूषण, बांगडी. A bracelet.
[सं. कंकण; प्रा. कङ्कण; बं. काँकण; हिं. कङ्गन; गु. कांकण. ह्या शब्दावरून कांहीं म्हणी प्रचलित आहेत. मनगटावरील जिन्नस अगदीं उघड सहज रीतीनें दिसतो ह्यावरून "हातच्या कांकणास आरसा कशास पाहिजे?" कांकण हा स्त्रियांचा दागिना आहे त्यावरून "कांकणें भरणें–घालणें". स्त्रिया कधीं अभद्र बोलत नाहींत, कांकण फुटलें असलें तरी त्या 'वाढलें' असें म्हणतात; त्यावरून कांकणें वाढलीं ही म्हण प्रचलित आहे. "कांकणभर अधिक" ह्यांतील 'कांकण' शब्द काकिणी=वजन पासून आला; कंकणशीं त्याचा संबंध नाहीं.]

काकवी स्त्री. उंसाच्या रसाचा राब, कच्चा पातळ कढ. A juice of sugarcane boiled to some consistence, molasses.
[सं. ?; देप्रा. कक्कब; कान. काकंबी.]

काका पुं. चुलता, किंवा त्यासंबंधीं वापरण्याची हाक, A paternal uncle.
[दे. कान. कक्क=बापाचा धाकटा भाऊ; हिं. काका; सिं. काको; काका, मामा, चाचा, दादा, बाबा इत्यादि शब्द भाषेच्या आद्यावस्थेंतील होत. अर्थाचें सामान्यीकरण होऊन कोणाहि वडील पुरुषासंबंधीं हा शब्द वापरतात. (स्त्री)–काकी (चुलती).]

काकिणी स्त्री. एक वजन–वीस कवड्यांइतकें. A measure, a weight.
[सं. काकिणी, काकिणिका; प्रा. काकिणिआ.]

काकु स्त्री. एक वाङ्मयीन अलंकारविशेष, भय-क्रोध-शोकदर्शक आवाजांतील फरक. A figure of speech, change in voice in fear, anger, grief.
[सं. काकु.]

कांकू, काकू स्त्री. अळंटाळं, टाळाटाळ, कुरकुर. Hesitation, vacillating, shilli-shallying. [ध्वनिशब्द.]

काकुळत, काकूळती स्त्री. अजीजी, विनवणी, करुणा. Pitiful request, solicitation, supplication.

[कान. **कक्कलाते** = प्रेम, दया, माया; सं. **काकली** = मंजुळ, मृदु.]

काख, खाक, कांख, स्त्री. दंडाच्या आंतील भाग, बगल. The arm-pit.

[*IE.* Qoksā; *Av.* Kava; *Lat.* Coxa; सं. **कक्षा**; प्रा. **कक्ख**; हिं. **कांख**; गु. बं. ओ. **काख**; पुढील शब्द प्रयोग पहा. **काखा वर करणें** = दारिद्र्य जाहीर करणें. **काखेस मारणें** = जिन्नस घेऊन पळ काढणें. ह्याच्यापुढें '**टी**' प्रत्यय अल्पार्थें लावून **काखोटी** असा शब्द तयार होतो.]

काग पुं. कावळा. A crow.

[सं. **काक**; प्रा. **काअ**; सिं. **कांगु**; हिं. **कौवा**; हिं. पं. गु. बं. **काग.**]

कागडा पुं. उपरोधानें पारशासंबंधीं वापरतात (लक्षणा). (त्यांच्या व्यावहारिक धूर्तत्वामुळें किंवा त्यांच्यामध्यें मृतदेहाची जी व्यवस्था करतात त्यावरून). Shrewd, sharp.

[हिं. **कागडा**; गु. **कागडो**; भिल्ली. **कागडो**.]

कागद पुं. गवत, चिंधी वगैरेच्या रांध्यापासून केलेला पदार्थ. Paper.

[अर. **काघज्**; फा. **कागद**; गु. **कागळ**; ज् आणि द् ह्या वर्णांचा विपर्यय. अकामसा. **कागदावर बसणें** = लिहिण्यास आरंभ करणें. (लक्षणा); **कागदपत्र** (एकाच अर्थीं दोन शब्द एक अरबी व दुसरा आर्य. समानार्थीं उपयोग करतात.)= चिठ्याचपाट्या, पत्रव्यवहार. **कागदी**=कागदाचें बनविलेलें, नकली, तकलुपी. कागदी घोडे = कलमबहाद्दरी.]

कागाळी स्त्री. विरुद्ध तक्रार, खोटी तक्रार. Crying against, a (false) complaint.

[सं. **काकलि**; प्रा. **कागलि** (स्वरविशेष).]

कांगारू न. ऑस्ट्रेलियांतील एक जनावर. हें शेपटावर उभें राहतें. पुढील पाय फार आखूड असतात, मादीच्या पोटाला पिशवी असते, तिच्यांत ती आपलीं पिलें ठेवते. A kind of animal, the kangaroo.

[*Eng.* Kangaroo = I don't understand. ह्या शब्दाची हकीकत मोठी चमत्कारिक आहे. हा प्राणी प्रथम दिसतांच एका युरोपियननें विचारिलें कीं 'ह्यांचें नांव काय ? त्याला उत्तर '**कांगॉरू** = मला समजत नाहीं' हें मिळालें. पुढें तोच शब्द त्या प्राण्याचा वाचक ठरला.]

कांगाव-वा. कांघाव पुं. खोटी तक्रार, विनाकारण आरडाओरड. Crying against, a complaint (feigned).

[ध्वनिशब्द. **किसंगायते > किसंगाय > किअंगाव > कांगाव** = खोटा आव आणणें. परंतु ही व्युत्पत्ति कृत्रिम दिसते. **कांगावखोर** = खोटी तक्रार करणारा.]

कांग्रेस स्त्री. सभा, मंडळी, हिंदी राष्ट्रीय सभा, (अमेरिका, हिंदुस्थान वगैरे देशांतील लोकसभा.) The Congress, the people's assembly.

[*Lat.* Con-Gradier = to walk. Gressus = step. (एकत्र चालणें–बसणें–उठणें.) ह्या शब्दांतील अर्थाचें विशेषीकरण झालें आहे.]

काच[1] स्त्री. शिसा. Glass.

[सं. **काचः**; प्रा. **कच्च** (न.).]

कांच[2] स्त्री. त्रास, संकट. Difficulty, trouble.

[सं. **कृत्**, (**कृत्यमान**; प्रा. **कच्चंत**;) √**कच्** १ वंधने.]

–काचबिंदु पुं. डोळ्यांतील रोग, काचेसारखा ठिबका. Gutta serena.

–काचमिना पुं. काचेचें रोगण. Glass varnish.

–काचवटी पुं. काचेचा तुकडा. A piece of glass.

काच(णें) अक्रि. वण पडणें, बांधणें. To tie down tightly. घर्षणानें कमी होणें. To wear away.

[सं. **कच्, काच् १ बंधने. कश् १ हिंसायाम्.**]

–कांचणी स्त्री. घर्षण, जाचणी, त्रास. Teasing tormenting, anxiety.

–कांचा, कांचा पुं. कमरेस बांधावयाचा अरुंद पट्टा, लहान लंगोट. A small stripe to be tied round the waist.

–कांची स्त्री. सोन्याचा कमरपट्टा. A gold girdle. (< **काच्–बंधने.**)

कांचरी स्त्री. लहान तुकडा, फोड. A small cut or slice of a fruit.

[सं. **कातरा** (<**कृत्** ६ **कृन्तने**); प्रा. **कच्चरा**; गु. **काचरी**; सिं. **कचिरी**; म. **कचरा** पहा. याकाम. **काचरी** (ज्ञा. १३-५५६).]

कांचा[१] वि. कच्चा, हिरवा, न पिकलेला. Raw, crude.
[हिं. **काचा**; याकाम. **काचा** (ज्ञा. १·१३४); कच्चा पहा.]

कांचा[२] पुं. मागें खोंवलेला धोतराचा पुढचा भाग, कमरबंद. A waist band.
[सं. **कच्छ, कच्छटिका** ; हिं. **काछा** ; पपं. **कांछ**=चड्डी; याकाम. **काचया** (ज्ञा. १–१३४); अकाम. **काच्या.**]

कांचोळी स्त्री. चोळी, मागें गांठ द्यावयाची चोळी. A sort of sleeved breast-coat of women.
[सं. **कञ्चुलिका**; प्रा. **कंचुलिआ**; हिं. **कांचुली**; अकामसा. **काचुलिया, कांचोळीपंथ**=घटकंचुकीचा खेळ मान्य असलेला पंथ.)]

काज न. काम, उपयोग. Work, business, affair.
[सं. **कार्य**; प्रा. **कज्ज**; गु. हिं. पं. **काज**; सिं. **काजु**; पपं. **कज्ज**=विधि; याकाम. **काज** (ज्ञा. १६–२०३); अकाम. (काम)**काज**. एकाच **काम** ह्या अर्थाचे दोन शब्द.]

काजें न. गुंडी अडकविण्याचें छिद्र. A button-hole.
[पोर्तु. **कासा**; हिं. **काज**. हा शब्द शिवकालांत रूढ झाला.]

कांजवा[१] पुं. नदी ओलांडण्यासाठीं केलेला लहान तात्पुरता रस्ता. A causeway.
[फा. **काजवाह**=उंटाच्या पाठीवर बायका, मुलें, आजारी माणसें नेण्यासाठीं घातलेली एक चौकट.]

कांजवा[२] पुं. कीटकविशेष (ह्याच्या पश्चाद्भागांतून प्रकाश निघतो.). A fire-fly.
[सं. **खद्योत**; प्रा. **खज्जोअ**.]

काजळ न. काळा पदार्थ, धुराची काजळी, काळें अंजन. Lamp-black, black pigment.
[सं. **कज्जलम्**; पा.प्रा. **कज्जलम्**; बं. **काजल**; ओ. **कज्जळ**; हिं. **काजल**; सिं. **कजलु**; गु. **काजळ**; ने. **गाजल**; याकाम. **काजळी** (ज्ञा. १५–४३९); **कज्जल–कुत्सितं ज्वलनम्–अर्धवट जळलेलें द्रव्य.** हें संस्कृतीकरण नंतरचें दिसतें.]

कांजी स्त्री. भाताची पेज, कणेरी, शिजविलेलें पाणी (कोणत्याहि पदार्थाचें). Sour gruel.
[सं. **कांजिका** (उत्तरकालीन संस्कृतीकरण); तामी. **कांजी–शिजविलेले पदार्थ**; याकाम. **कांजी** (ज्ञा. १६-१२५). (कांजीवरम् मधील ' कांजी ' हा शब्द निराळा; तो ' कांची ' पासून सिद्ध झाला आहे.)]

काजू पुं. वृक्षविशेष व त्याचें फळ. Cashew-nut.
[मलायी. **कायु**; फ्रें. **अकाजु**; पोर्तु. **अकाजु**; हिं. गु. **काजें**; अकाम. **काजेल**=काजूचें तेल.]

काझी पुं. न्यायाधीश, न्याय देणारा अधिकारी (विशेषतः मुसलमानी अमदानींतील). A judge.
[अर. **काद़ी** (zwad ह्या अक्षराचा मराठी उच्चार ' झ ' असा होई.)]

कांचन न. सोनें. Gold.
[*IE.* qenəqo; सं. **कांचन**; √**कच्–दीप्तौ**; *Gr.* chnechos; *Aisl.* hunang; *Ger.* Hunagn.]

काट पुं. थर, लेप, डाग, शिरें, जळक्या धान्यापासून केलेला रंग. Layer, a decoction of burnt corn.
[सं. **क्वथ्**; प्रा. **कढ**; याकाम. **काट**=थर (ज्ञा. ११–३४५); ' **काट** ' हा शब्द सं. **क्वथ्**, **कंटक**, **कर्त** (कातणें), **काट** (मळ), **काष्ठ** (लाकूड), **कूट** (गुप्त) इत्यादि शब्दांपासून सिद्ध होतो; त्याप्रमाणें त्या त्या संस्कृत शब्दापासून सिद्ध झालेले भिन्न अर्थाचे शब्द मराठींत रूढ आहेत. **काटणें**=मळणें, राप चढणें.]

कषायाचें काट । फेडूनि कीजे धुवट ॥ भा. ए. २८३.

काट(णें) सक्रि. कापणें. To cut.
[सं. **कृत् ६ छेदने**; प्रा. **कट्ट**; हिं. **काटना**; गु. **काटवूँ**; पं. **कट्टणा**; सिं. **कटणु**; बं. **काटिना**; लिथू. **केर्ट्ठ**; ग्री. **केइरो**; स्ला. **कोर्तु**; लॅ. **कर्टस्**; हीब्रू. **कर्तैघिम्**.]

–काटकसर स्त्री. मितव्यय. Economizing.
(**काट**+**कसर**. अर. **कसर**. हिं. **काट**.)

काटकोळा वि. बारीक, पातळ, हाडकुळा. Slender, emaciated, slim.
[सं. **काष्ठ**+कान. **कोलु**=काठी. **काट** आणि **कोल** हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील. आर्य–द्राविडी संकराचें हें उदाहरण आहे.]

काटवट न. लाकडाची परात, थाळा. A big wooden plate.
[*IE.* Qetinos; सं. **काष्ठवाटिका**; *Lat.* Catinus; *Lith.* Katilas; *Slav.* Kotilu; *Eng.* Kettle.]

कांटा पुं. तीक्ष्ण टोंकाची काडी, विंचवाची नांगी. शत्रु, दुष्मन (लक्षणा). A thorn, sting of a scorpion, a pest.
[सं. **कण्टक**; प्रा. **कटंग, कटंय**; अप. **कंटउ**; ते.

काटा; द्रा. **कान्तीन्**=कांटेरी झुडपें; अकाम. **काटवण**= काटेरान (<**कंटक+वन**), **कांटाळा**=रोमांच, **काटेकुवाळ**, **काटेको**हळ. तीक्ष्ण टोंकाची काडी, तराजू, घड्याळ वगैरे जिन्नसांबावत वापरतात; त्यावरून **घड्याळाचा कांटा**, **धारवाडी कांटा**, **अंगावर कांटा** (रोमांच) हे प्रयोग रूढ आहेत. ‘**कांटा**’ त्रासदायक वस्तु असल्यामुळें **कांटा काढणें**,-**उपटणें**, **कांट्यानें कांटा काढणें** हे प्रयोग रूढ आहेत, **काट्याचा** नायटा होणें=क्षुद्र गोष्टीला मोठें स्वरूप येणें; **कांटा** मोडल्यानंतर तसाच राहूं दिला तर **नायटा** होतो. **कांटाळें**=ताजवा, वजन. (जुन्या ज्ञानेश्वरी वाङ्मयांत हा शब्द ह्या दोन्ही अर्थानें वापरला आहे..(ज्ञा. ४·१८१;१४·५१). ह्या शब्दानें अन्वित कांहीं शब्द रूढ आहेत. त्या सर्वांत ‘कांटा’ ह्याचा संबंध आहे. **कांटेकुटे**, **कांटे**कुवार (कांटे असलेली ‘कुमार’ वनस्पतीची फोड), **कांटेकोर**=कडक, बिनचूक, नेमका. (< **कांटे + कोर**=बाजू , भाग.) **कांटेतोल**=बिनचूक=बरोबर वजनाचा, **कांटेलगाम**= कांट्याचा लगाम.]

कांटेरी वि. कांट्यांनीं युक्त· Thorny.

[सं. **कन्थेरी; प्रा. कन्थेरी**; याकाम· **कांटस** (ज्ञा. १८-६१७) ‘री’ हा संस्कृत इन्नन्त आहे. संस्कृत मधून प्राकृतद्वारां मराठींत आला.]

काठ, कांठ पुं. कडा, टोंक. Border, side, edge, rim.

[सं. **कण्ठ, काष्ठा**=मर्यादा; प्रा. **कठ्ठ**; हे दोन शब्द एक सानुस्वारी व दुसरा निरनुस्वारी असे आहेत; सानुस्वारी शब्द सं. **कण्ठ** पासून व निरनुस्वारी शब्द **काष्ठा** पासून अशी व्युत्पत्ति मानणें शक्य आहे. परंतु व्युत्पत्तीमध्येंहि सामान्यीकरणाचें तत्त्व आढळून येतें. अनुस्वार नसणें किंवा असणें ही बाब तेव्हां महत्त्वाची नसते.]

काठी स्त्री. दांडकें, लकडी, छडी. A stick, a staff.

[सं. **काष्ठ** ; प्रा. **कट्ठ** ; गु.पं. **काठ** ; सिंह. **कट**= इमारतीचें लांकूड ; सिं. **काठु** ; बं. हिं. **काठ** ; का. **कूट्** ; अकाम. **काठकी, काटकी** (लहान काडी), **काटुक** (काटकीचा तुकडा). ‘काठी’ ह्या शब्दाचे संक्षेप दोन झाले आहेत: एक **काठ, काट**, व दुसरा **काड** ; व त्यावरून कांहीं सामासिक शब्द रूढ झाले आहेत. **काटकुळा, काटकोर, कडधान्य, काडवात.**

काठीनें पूर्वी जमीन वगैरे मोजत असत. तिची लांबी पांच हात व पांच मुठी असे. लक्षणेनें कांहीं अर्थ निराळे झाले आहेत. **डोलकाठी, अंगकाठी** (शरीराचा बांधा), **काठीनें पाणी शिंपणें** (दुसऱ्याकडून काम करवून घेणें); निशाणास काठी असते त्यावरून ‘**काठी शिखरास लागणें**’ (ध्येय साधणें); **कांठीवर कांबळा घेणें** (सिद्ध, तयार असणें; किंवा गोपासारखा वेष घेणें–भांडण्यास सिद्ध असणें.). ‘**काठी**’ ह्या नांवाचे एतद्देशीय लोक होते. त्याच्या वस्तीच्या प्रदेशास **काठेवाड** म्हणतात.]

काडतूस न. बंदुकीची गोळी. Cartridge.

[*Fr.* Cartouche = a roll of paper ; *Eng.* Cartridge ; *Ital.* Carta = paper. ज्या कागदांत गोळी गुंडाळलेली असे त्या कागदाचें नांव गोळीला मिळालें.]

काडी स्त्री· काड्क, गवताचा तुकडा. A blade, a bit straw.

[सं. **काष्ठिका** (?); प्रा. **कट्ठिआ, काडिआ** (?). काडी ही एक क्षुद्र वस्तु आहे. त्यावरून लक्षणेनें कांहीं शब्द रूढ आहेत. **काडीचोर** (क्षुद्र वस्तु चोरणारा); **काडीचोर** तो पाडीचोर, **काडीची** आग माडीस लागणें (क्षुद्र गोष्टीपासून मोठ्यास उपद्रव होणें); **काडीमोड** (घटस्फोट, लग्नसंबंध तोडणें. ह्यामध्यें एक सामाजिक चाल अभिप्रेत आहे. गवताची काडी चार लोकांसमक्ष मोडतात); **काडीमात्र** (काडी एवढी–थोडीसुद्धां)]

काढ(णें) सक्रि. ओढणें, सहन करणें, लावणें, दूर करणें. To draw, to push away, to endure·

[सं. **कृष् १ विलेखने; प्रा. कड्ढ**; याकाम· **काढणें** (ज्ञा. १३·८६७); बं. **काड**; सिं. **काढणु**; हिं. **काढना**; गु. **काढवूं**; अकाम. **काढणी** (< कर्षणीं) दोरी. **काढावा काढणें**=पाठलाग करणें. ते देखोनी शैल्यांचा सावळी। काढाओ काढिला ॥ शिशु. ९५६.]

काढ(णें) सक्रि. (दिवस) काढणें, कंठणें. To pass (time, days).

[सं. **कठ् १ कृच्छ्रजीवने**.]

काढणी स्त्री. हंगाम, पिकें कापण्याची वेळ. Harvest time.

[सं. **कर्तनम्, कर्षणम्** ; प्रा. **कड्ढण.**]

काढा पुं. अर्क, कषाय, वनस्पति उकळून काढेलला अर्क. A decoction of medicinal herbs·

[सं. **क्वाथ; क्वथकः**; √ **क्वथ्**.]

काणा वि. आंधळा (एक डोळ्यानें), तिरकी दृष्टि असलेला, चकणा, एकाक्ष. Blind of one eye, squint-eyed·

[सं. काण ; पा.प्रा. काण ; देप्रा. काणु ; वं. ओ. काणा; हिं. काना ; पं. ल्हां. काणाँ ; सिं. काणो ; गु. काणु ; याकाम. काणी = क्लेश (ज्ञा. १८–७६); कान. कोण=डोळा.]

कांडकुंडा पुं. (ज्ञानरूप) दगड, बाण. The stone (of knowledge), an arrow.

[कान. काण्ड + गुण्ड.]

कांड(णें) सक्रि. सडणें, घांव घालणें, तुकडे करणें. To pound, to thrash.

[सं. कड्, कंड् १ भेदने ; प्रा. कंड. अकामसा. कांडण = कांडण्याची क्रिया. कांडणावळ = कांडण्याबद्दल वेतन, मजुरी. कांडपी = कांडणारा.]

काण्डें न. भाग, उसाचा तुकडा, सोट, बाण, तीर. A joint, a piece of sugarcane, a stalk, an arrow.

[सं. खण्ड. पा. प्रा. खण्ड ; बं. खांरी : ओ. खाँडी, हिं. खॉग ; सिं. खनी ; गु. खाँडू ; याकाम. कांड (ज्ञा. १८–१०४). २ सं. काण्ड = भाग, अध्याय ; प्रा. कंड. तद्भव = कांडारे (सापाची जात); कांडारा (बांबू) कांडारणें (भाग करणें); कांडाळें (धनुष्य); खांडोळें (तुकडा); कांडाविणें, कांडोळणें (खाजविणें) इत्यादि. अडीच कांड्यावर येणें = गव्हाच्या ताटास अडीच पेरें झाल्यानंतर ओंबी फुटते त्यावरून माजांत येणें. कांडेंपेरें लावणें = अजमावून पाहणें. कांडें चिरणें = आट्यापाट्याच्या खेळांत पाटी फोडणें.

काण्ड्या पुं. बगळा, एक प्रकारचा पक्षी. A particular bird, a crane.

[सं. करण्ड; देप्रा. कंडूर (वकः).]

कात स्त्री. त्वचेचें आच्छादन, (सापाची) कात, कांतीण. The skin, the slough of a snake.

[सं. कृत्ति; प्रा. कत्ति; कांतण = कीटकविशेष. (< कृत्ति + ण- प्रत्यय), कातडें (त्वचा, चामडें.)]

कात-थ पुं. खैर झाडाचा डिंक (उकळलेला); हा कडु असतो व तांबूलांत घालतात. An astringent extract, gum.

[सं. क्वाथः √ क्वथ्-पाके.]

कातकरी पुं. एक रानटी जात, वन्य जात. A wild caste.

[कात तयार करणारी जात अशी व्युत्पत्ति श.को.कार देतात परंतु ती ग्राह्य वाटत नाहीं. काथोडी, कातकरी हे शब्द मूळ दिसतात. ' कैकाडी ' यांचा संबंध असेल काय ? ' कारस्कर ' नांवाचा एक वृक्ष पाणिनी निर्देशितो, व त्याला सुडागम म्हणतो. म्हणजे मूळचा शब्द कारकर असा असावा. त्याचा आणि कातकरी यांचा कांहीं संबंध असेल काय ? का हा द्राविडी शब्द आहे ?]

कातडें न. चामडी, शरीराचें आवरण. The skin.

[सं. कृत्ति; प्रा. कित्ति, कत्ति; गु. कातडी. मराठी शब्द ' आंतडें < अंत्रम् ह्यासारखा बनला आहे ' डें ' हा अल्पार्थें प्रत्यय]

कात(णें) सक्रि. कातरणें, काटणें, कापणें. To cut.

[सं. कर्तनम् ; प्रा. कत्तण.]

२कात(णें) क्रि. कापूस स्वच्छ करून धागा काढणें. To draw out into thread.

[सं. १ कृत् ६ अवयवे ; छेदने. पा. कन्त ; गु. काँतवूं, पं. कत्तणा ; हिं. कातना ; सिं. का. कत् ; गु. कात = सुताला पीळ द्यावयाचा लाकडाचा गोल तुकडा याकाम. कातणें = कोरणें, जुंपणें (ज्ञा. १–१३८).]

१कातर वि. भित्रा, भ्यालेला, भिणारा. Frightened.

[सं. कातरः]

२कातर स्त्री. कात्री, कात्री शब्दाचा अपभ्रष्ट उच्चार. Large scissors or shears.

[सं. कर्त् १ छेदने, कर्तरी ; प्रा. कत्तरी ; गु. कातर ; सिं. कतर ; पं कत्तर ; कत्ती ; हिं. पं. कतर्नी ; बं. कतरन्. कर्तर्या मलयवतीम् जघान (गा. सप्तशती) मधील कर्तरी म्हणजे आसनविशेष. हा शब्द निराळा.]

कातव-काताव(णें) क्रि. गांजणें, त्रासणें. To harass, to snap at.

[सं. कत् + तामनम्, तापनम् (तम् १ कांक्षायाम्) (तप् ४ पीडायाम्); सताव(णें) हा धातु वरील सारखाच आहे व त्याचें मूळ ' संताप्य ' असें आहे.]

कांति स्त्री. तेज, प्रकाश, शोभा. Brilliance, lustre.

[सं. कम्. १ इच्छायाम्, प्रकाशने.]

कांतीण स्त्री. एक प्रकारचा कीटक (पांढरें आवरणाचें घर करून राहणारा). An insect of the spider kind.

[सं. कृत्ति > कांत + ईण (म. प्रत्यय); कांतीण ; गु. कातारो (किडा).]

कात्या स्त्री. कृत्तिका. The Pleiads.

[सं. कृत्तिका ; प्रा. कत्तिअ ; सिंह. कॅती ; सिं. कतीउं ; हिं. कातिक ; पं. कत्तक (कातिक महिना).]

काथ्या पुं. नारळाच्या शेंडीची तयार केलेली दोरी. The fibrous inleguments of the cocoa-nut coir.

[सं. **कसरु, कस्तूरिक–वनस्पतिविशेष** (?). **काथ्याकूट** =(लक्षणेनें) निरर्थक विवेचन,–चर्चा,–विवाद.]

कादंबरी स्त्री. नवलकथा, कल्पित कथा, सुंदर अद्भुतरम्य गोष्ट. A novel.

[सं. **कादंबरी,** बाणभट्ट (सातवें शतक) नांवाच्या कवीनें एक नवलकथा संस्कृतांत लिहिली. त्या अद्भुतरम्य कथेंतील नायिका '**कादंबरी**' ह्या नांवाची स्त्री आहे. त्यावरून ह्या शब्दाच्या अर्थाचें सामान्यीकरण झालें. शब्दाला अर्थ कसा चमत्कारिक रीतीनें येतो त्याचें हें एक उदाहरण आहे. इ. स. १८६० च्या सुमारास हा शब्द 'नावलें' ह्या अर्थानें प्रथम वापरांत आला.]

कान पुं. ऐकण्याचें इंद्रिय. An ear.

[सं. **कर्ण**; पा.प्रा. **कण्ण** (पुं.न.); ओ. **कान**; हिं. **कान**; पं. **कन्न**; **कनु**; म.गु. **कान**; सिं. **कण.** ह्या शब्दाचे लाक्षणिक अर्थ कांहीं रूढ आहेत. उदा. **बरणीचा कान, बंदुकीचा कान, कढईचा कान.** त्याचप्रमाणें त्यासंबंधी कांहीं वाक्प्रचारहि रूढ झाले आहेत. **कान** उघडणें, **कान उघाडणी**=समजूत घालणें, भानावर आणणें; **कान** उधडणें (शिस्त लावणें), **कान झाडणें** (निषेध करणें. ज्ञा. १३·६१८). **कान किटणें** (<**किट् १ त्रासे**) एकसारखें तेंच तें ऐकणें. **कानाला** खडा लावणें, अद्दल घडणें (?). **कान** टोंचणें, सोनारानें **कान** टोंचणें (योग्य माणसानें उपदेश करणें). **कान** पाडणें=गरिबी दाखविणें, गाई वगैरे जनावरें गरिबीनें **कान** पाडून बसलेलीं आळढतात. ह्याच्या उलट **कान** टवकारणें. **कान** फुंकणें=कानांत मंत्र सांगणें; उपनयनांत गुरूनें शिष्याला मंत्रोपदेश केल्यानंतर तो उपदेश चांगला ठसावा म्हणून गुरू त्याचे कान फुंकतो. त्याचा आणखी एक अर्थ "फूस देणें, लावालावी करणें" असाहि लक्षणेनें होतो. गाढवाचे **कान** लांब असतात, त्यावरून लक्षणेनें '**कान** लांब होणें, **कान** लांबणें म्हणजे 'मूर्खपणा करणें' असा अर्थ होतो. कानांतून ऐकूं येऊं नये ह्यावरून **कानांत** बाळ्या, **कानांत** खुंट्या घालणें–मारणें, **कानावर** हात ठेवणें हे वाक्प्रचार रूढ आहेत. साधूच्या कानावर मंजिरीप्रमाणें तुलसीमंजिरी असते, त्यावरून 'सोंग करणें, सत्याचें ढोंग करणें' ह्या अर्थीं "**कानांत** तुळशी घालणें" हा प्रयोग रूढ आहे. "ह्या **कानानें** ऐकणें त्या **कानानें** सोडणें' म्हणजे गोष्ट मनांत न ठेवणें. असाहि प्रयोग रूढ आहे. सामासिक शब्द पुढीलप्रमाणें आहेत. **कानकोंडा**–ओशाळलेला, कान कोंडलेला; (**कान+कोंडणें**). **कानगोष्ट**–कानांत सांगितलेली गोष्ट, गुह्य (**कान+गोष्ट< √गोफ्तन्**). **कानठाळ**=कानाबद्दल ग्राम्य शब्द (**कान+ठाळ < स्थळ ?**). **कानपिळें**=कान पिळून जो अहेर करतात तो (**कान+पिळ<पीड्**), लग्नविधींत ही एक चाल आहे. **कानफाटा**=नाथपंथी, ह्या पंथांत कानाला भोंक पाडून किंवा फाडून त्यात लाकडाच्या बाळ्या घालतात. **कानवसा-कानोसा**= ओझरतें ऐकणें. **कानसूळ**–कानाबद्दल ग्राम्य शब्द (>**कर्णशूल**). **कानवला**=मोठी करंजी (< **कर्णवलय**).]

कानवडा वि. एका अंगावर पडणारा. Lying on one:side.

[सं. **कर्णवार्त्तिन्** (वृत्); याकाम. **कानवडा** (ज्ञा. १८·१६९४); **कानवडौनी**=एकांगानें (ज्ञा. ६-२४७); **कानवेरी**=कानापर्यंत:(ज्ञा. ९-१८२), जुना मराठी शब्द **कानडा, कानडावो** (विठ्ठल) ह्या शब्दाशीं संबद्ध आहे का?]

कानगो–काङ्गो पुं. कुलकर्णी, मुलकी अधिकारी, वसुली अधिकारी. A revenue officer, a tax collector.

[फा. **कानून्**=कायदा. **गो**=जाणणारा (उत्तर हिंदुस्थानांत हें अधिकारीनाम वापरतात); पेकाम. **कानूगो, कानुगो, कानगो** (रा. १२-१७४).]

कानडें वि. कानडी मुलखांतील, अज्ञात, वेडाविद्रा, दुर्बोध. (Anything) strange, harsh, rude, unintelligible.

[सं. **कर्नाटक, कन्नाड**; तामी. **कर–कृष्ण, काळें; नाडु-देश. करनाडु-काळा देश.** '**कर्नाटक**' हें संस्कृतीकरण. याकाम. **कानडे** (ज्ञा ९·४२); **कानवडे** (ज्ञा. १८–१६९४) नंतरचें आहे. "**कानवडें**" असें रूपहि आढळतें. अभंग वाङ्मयांत हा शब्द विठ्ठलदैवतासंबंधीं अगम्य, अतर्क्य, अचिन्त्य ह्या अर्थीं वापरला आहे. त्यावरून व्युपत्ति निराळी असावीसें वाटतें.]

कानफुल न. कानांतील एक दागिना. An ear-ring, an ear-ornament.

[सं. **कर्णोत्पल; प्रा. कण्णुप्पल. कर्णपुष्प–पासून** नव्हे.]

कानवाथर पुं. काळया पाषाणाचा पापुद्रा. A layer on a black-stone.

[सं. **कृष्णप्रस्तर.**]

कानस पुं. स्त्री. घासण्याचें खरबट हत्यार. A file, a saw.

[सं. **कर्ण् १० भेदने** (?)]

काना पुं. तोफेस दारूसाठीं केलेलें भोंक. The eye of a gun. काठ धरण्यासाठीं केलेली मूठ. The handle. अक्षराच्या पुढें द्यावयाची उभी रेघ ‘आ’ कारदर्शक. A down-right stroke.

[सं. कर्ण; प्रा. कण्ण.]

कानाडी अ. कानापर्यंत (ओढणें). Back to the ear.

[सं. कर्णनाडी; प्रा. कण्णनाडी (?)]

कानाडोळा पुं. दुर्लक्ष्य, डोळेझाक. Connivance, winking at, overlooking.

[सं. काणः + डोळा; कान. कोण = डोळा. दुर्लक्ष करतांना सहज डोळा मिचकावितात किंवा वर चढवून बारीक करतात. ‘ डोळा ’ काणा होतो त्यावरून.]

कानी स्त्री. दोरीची फेक–गांठ. The hook of the string.

[सं. कर्णकः = भांड्याचा कांठ; बं. काणा–कांठ; ओ. काणी–कापडाचें टोंक; गु. कानो. = भांड्याचा कांठ; याकाम. कानी = दावें, काढणी (ज्ञा.)]

कानू पुं. कायदा, नियम, रीत, पद्धत, हक्क. A rule, a regulation.

[अर. कानून्; *Gr*. xanon. कायदेकानू (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

कांदा पुं. गड्डा, मूळ, (सुरण, कोबी वगैरेचा) कांदा. The root.

[सं. कन्दः ; प्रा. कंद (पुं); गु. कांदो ; हिं. कांदा.]

कांदा(शहाण्याच्या) पुं. तुच्छतेचा शब्द. A deprecatory term.

[कान. कन्द = तरुण मुलगा. कधीं कधीं मोठ्या माणसालाहि मोठ्या प्रेमानें लावतात.]

कान्हा पुं. कृष्णाचें नांव. A name of Krishna.

[सं. कृष्ण; प्रा. कण्हअ; सिं. कानु; हिं. पं. कान्ह (काळा); सिंह. किणु; का. कन्नोन् (नु).]

कांप पुं. तुकडा–भाग कापलेला. A bit, slice, division.

[सं. कल्पः (व्यवस्था); पा. कप्पो ; प्रा. कप्प (चाकु); बं. काप ; हिं. कॉप ; गु. काप ; सिं. कापु.]

कांप पुं. कानांतील दागिना, कर्णभूषण. An ear-ornament.

[कान. कोप्पु = कानाच्या धरच्या बाजूस घालावयाचें भूषण.]

कांप(णें) अक्रि. हलणें, थरथरणें. To shake, to shiver.

[सं. कम्प् १ कम्पने ; प्रा. कंप ; महा. कम्प ; हिं. काँपना ; गु. कॉपवूँ.]

काप(णें) सक्रि. काटणें, छेदणें, चिरणें. To cut.

[सं. क्लृप् ; प्रा. कप्प; सं. क्लृप् छेदने; पा.प्रा. कप्प. अकाम. कापा (फणस.)]

कापड न. वस्त्र. Cloth.

[सं. कर्पण; प्रा. कप्पड; देप्रा. कंपड; सिं. कपड़ु; हिं. कपडा; गु.ब.ओ. कापड; पं. कप्पर; याकाम कापड (ज्ञा. ९·७५). हा शब्द मूळ देशी असून त्याचें संस्कृतीकरण किंवा प्राकृतीकरण उत्तरकालीन असावेसें वाटतें. कार्पास (> कापूस) + पट ह्या दोहोंचा मिळून वरील शब्द झाला असावा असें मानण्याकडे अधिक प्रवृत्ति होते.]

कापडी पुं. भीक मागणारा फिरता भिक्षेकरी. A mendicant, an itinerant beggar.

[सं. कार्पटिकः ; प्रा. कप्पडिअ ; याकाम. कापडी (ज्ञा. ६–१५३).]

कापशी–कपाशी स्त्री. कापसाचें रोपडें. The cotton-plant.

[सं. कार्पासिका ; प्रा. कप्पासिआ.]

कापूर पुं. एक सुवासिक द्रव्य. Camphor.

[अर. काफ़ूर; सं. कर्पूर; मूळ शब्द ‘जावा’ भाषेंतील आहे. ‘कापूर’ = चुना, कापूर. मलायाभाषेंत ‘ कापूर ’ असा शब्द आहे. संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे. करप्पु = दालचिनी असाहि एक शब्द आहे. सं. कर्पूर; पा.प्रा. कप्पुर; गु. सि. हि. पं. ब. ओ. कपूर; सिंह. कपुर.]

कापूस पुं. कापशीच्या फळांतील तंतु निघणारें द्रव्य. Cotton.

[सं. कार्पास, कर्पास; प्रा. कप्पास; पं. कपाह; का. कपस; गु. कापुस(न); सिंह. कपु; हिं. बं. कपास; कपाशी (कार्पासिका) = कापसाची वनस्पति.]

काफला, काफिला पुं. समूह, (गलबतें, उंट, लमाण, प्रवासी यांचा समूह–तांडा.) A body of pilgrims or travellers, a caravan.

[अर. काफिला ; पेकाम. काफला (इम. २४).]

कांफी स्त्री. बुंद, एक वनस्पती व त्याचें बीं. त्यापासून सिद्ध होणारें पेय. The coffee.

[तुर्की. अर. काह्वे = पिणें ; कह्व = दारू. *Eng.* Coffee; *Fr.* Cafè. कन्हा कफ्फ = द. अबिसीनियांतील प्रांत. ; बुन्द, बून = झाडाचें नांव.]

^{2}काफी पुं. गायनांतील एक रागविशेष. A musical mode.

काफीर, काफर पुं. अश्रद्धधान, नास्तिक, जो मुसलमानी धर्मांचा नव्हे तो. Unbeliever, hence a term of abuse.

[अर. **काफीर** (अनेकवचन **कोफ्रचें**) **नास्तिक, अश्रद्धाळू** (विशेषतः इस्लामी धर्मांत). हा शब्द अरब लोक निग्रो, पोर्तुगीज (अगदीं प्रथम) इत्यादि लोकांसंबंधीं वापरीत. पुढें दक्षिण आफ्रिकेंतील काळ्या लोकांना उद्देशून वापरीत. हिंदूकुश पर्वतावरील मुसलमानेतर लोकांना हा विशेष लावतात. काफिरीस्तान असा एक प्रांत आहे. तेथील भाषेंतील पुष्कळ शब्द आर्य आहेत. प्रथम ख्रिस्ती व नंतर हिंदु वगैरे सर्व लोकांच्या बाबत हा शब्द वापरांत आला.]

काबाड न. श्रम, कष्ट, कब्राड पहा. Troubles, pains.

[**काबाडकष्ट** (फा. **काबाड** + सं. **कष्ट** दोन्ही एकाच अर्थाचे शब्द; एक परकीय फारशी व दुसरा स्वकीय आर्य).]

काबीज वि. आत्मसात् केलेला, हस्तगत (ताब्यांत घेणें). Seized, subdued.

[अर. **काबिझ्** ; पेकाम. **काबीज** (दिमरा १·२५२); **कबजा, = ताबा.**]

काबू पुं. वि. ताबा, स्वामित्व, सत्ता, संधि, बळकट, धूर्त. Possession, opportunity, strong, cunning, wily.

[तुर्की. **काबू = सामर्थ्य** ; शिकाम. **काबू = संधि.** (चित्र. ५८); पेकाम. **काबू (मजबूत)**, खरे-१२२४.].

^{1}काम न. कार्य, कर्म, क्रिया, चळवळ, चलनवलन, धंदा. An action, a deed, a work, a business, a job.

[सं. **कर्मन्** ; पा.प्रा. **कम्म** ; बं. **काम** ; हिं. **काम्** ; पं. ल्हां. **कम्म** ; सिं. **कमु** ; गु. **काम.** ह्या शब्दानें अन्वित असे कांहीं प्रयोग रूढ झाले आहेत. **काम** काढणें-खोड मोडणें. संपविणें, संबंध आणणें हा मूळचा अर्थ. **कामीं येणें** = उपयोगीं पडणें, लढाईंत पडणें. **कामांतून जाणें** = उपयोगीं न पडणें, -नसणें. **कामकरी** = मजूर (‘ काम ’ म्हणजे हरएक काम, कोणतेंहि हलकें काम- असा अर्थविकास झाला आहे). **कामगार** = (फारशी प्रत्यय लागल्याबरोबर त्याच्या अर्थांत वाढ झाली.)—अम्मलदार, नोकरदार. **कामचलाऊ** = काम चालू करण्यास उपयोगी- तात्पुरत्या उपयोगाचा. **कामचोर** = काम करण्यांत कुचराई करणारा. **कामलाव्या** = काम मिळविणारा-लाटणारा-कसें तरी काम संपविणारा. **कामाचा जड** = काम करण्यांत- उरकण्यांत मंद.]

^{2}काम पुं. इच्छा-विषयेच्छा-संभोगेच्छा-मदन, षड्- विकारांपैकीं एक. Lust or sexual desire.
[सं. कामः √कम् ४ इच्छायाम्.]

-कामाथि(णें) अक्रि. विषयोपभोगाची इच्छा होणें (काम + मथ्-मध्यवर्णलोप). To be affected bv carnal lust.

-कामगृह न. स्त्रियांचें जननेंद्रिय. The female organ of generation.

-कामथाळोरें न. वृषण. (काम + थाळोरें < **स्थल**) The testicles.

-कामपिसा वि. मदनबाधेनें वेडा झालेला. Affected by Cupid.

-काममरण न. स्वतःच्या इच्छेला येईल तेव्हां मरणारा. Death at command.

-कामशास्त्र न. संभोगशास्त्र, कोकशास्त्र. A treatise on love.

काम(णें) सक्रि. इच्छा करणें. To desire, to wish for.

[सं. **कम्** १ **कांतौ**, ४ **इच्छायाम्**].

तैसा सर्व दोषांचा वसैठा । तम **कामौनि** सूभटा
उभारिला आंगवटा । जेया नराचा । ज्ञा. १८-७४९.

कामटी, कांबटी, कामठा स्त्री. बांबूची लहान लवचिक काठी. A lath, a split piece of *bamboo*.

[सं. **कमठः**; पा.प्रा. **कामट्ठ, कामठ** ; गु. **कामठी** ; सिं. **कावाठी**; बं. **कामठा**; कान. **कम्बि**; याकाम. **कामीठा**; (पाटण शिलालेख).]

कामत पुं. (सारस्वत ब्राह्मणांतील) एक आडनांव, घरीं केलेली शेती. A surname, a privately culivated farm.

[तेलगू-**कसतमु** ; हा मूळ सं. ‘ **कर्मन्** ’चा तेलगू तद्भव आहे.]

कामना स्त्री. इच्छा. Wish, desire.

[सं. **काम + ना**; **कामिनी** = इच्छिलेली वांच्छिलेली स्त्री, किंवा **कम् १ दीप्तौ** ह्यापासून प्रिय सुंदर **स्त्री**. त्यावरून सामान्य अर्थानें **स्त्री** असा अर्थ झाला. स्त्री ही नेहमीं व सर्वांकडूनहि वांछिली जाते म्हणून **कामिनी.**]

१कामाठी स्त्री. कार्यांची भूमि, येरजार, व्यापार. The field or extent of work, business.

[सं. **कर्म + स्थिति**; याकाम. **कामाठी** (उगी.८२२).]

२कामाठी, कामती पुं. एक जात (तेलंगण प्रांतांतील), तंबू राहुट्या वगैरेसंबंधीं कामें करणारा, शेतीवर काम करणारा. A caste.

[ते. **कमतमु** < सं. **कर्मन्** (?).]

कामी वि. उद्योगी, कामाची आवड असणारा. Busy, diligent.

[सं. १ **कर्मिन्**; प्रा. **कम्मइअ**; हिं. **कामी**; २ **काम + इ = कामी**; **निकामी** (निरुपयोगी).]

कामीठा पुं. लोहाराचें स्थान. A black-smith's place.

[सं. **कर्मस्थान > कामठाण > कामठाय > कामठा.** इतर शब्द **चहवटा, आगीठा, मांगठा, पाठोठा.**]

कांब स्त्री. बारीक, पातळ छडी, काठी, लोखंडाची किंवा बांबूची पट्टी. A lath, split piece of *bamboo.*

[सं. **कम्बा**; प्रा. **कंबा** (स्त्री), **कंबी**; कान. **कम्बि** = तार; याकाम. **कांबी** (ज्ञा. ६·४२३); अकामसा. **कामट, कांबट, कांबीट, कामटी, कमची.**]

कांबरूण न. (ग्रामीण) पांघरूण. A cover, a cloth for covering.

[सं. **अपांगावरणम्, प्रावरणम्, कंबलाभरणम्; पांघरूण** ह्या शब्दाचा वर्णविपर्यय होऊन; **कांबरूण** असा शब्द ग्रामीण भाषेंत रूढ झाला.]

कांबळें, कामळें न. पांघरण्याचें लोकरीचें ओबडधोबड वस्त्र, घोंगडी. A blanket, a rug.

[सं. **कंबल**; पा.प्रा. **कम्बल**; हिं. **कमली, कामरी**; पं. **कम्बल**; ओ.बं. **कम्बल**; गु. **कांबळो**; द्रा. **कर = काळें. करबळी. कांबळें** भिजत पडणें = काम तसेंच असिद्ध राहणें. **कांबळ्यावर** काढणें = मरणाची अवस्था येणें. (आसन्नमृत्यु मनुष्यास चांगल्या आंथरुणावरून कांबळ्यावर काढीत.)]

कांबीट स्त्री. कामटी पहा.

काम्य वि. इच्छिलेलें, आवडणारें, फल देणारें. Desired, wished for.

[सं. **कम् इच्छायाम्; कमनीयम्, काम्यम्** इ.]

काम्यकर्म, काम्यव्रत न. कांहीं तरी विशिष्ट फल देणारें असें व्रत किंवा धर्मविधि. A religious work to be done with some particular motive.

काम्हून अ. (ग्रामीण) कां म्हणून, काय म्हणून. Why, what for.

[म. **कां म्हणून** ह्याचा ग्रामीण भाषेंतील अपभ्रंश.]

काय-काया पुं.स्त्री. शरीर, देह. Body.

[सं. **' काय ' = शरीर, √चि.**]

काय, काई, काये सर्व. अ. कसला, कशाचा, प्रश्नार्थक किंवा उत्सुकता दाखविणारें अव्यय. What, which.

[सं. **किम् हि, किम् उ** (?), **कीदृक्-ग्**; प्रा. **कीअअ**, काय; हिं. **क्या**; बं. **की**; **कायसें** = कांहीं तरी (सं. < **कीदृश्**; प्रा. **कीअस्** ह्यापासून **कायसें** व **कसें** अशीं दोन रूपें होतात.). **कायुनु बायनु**-कांहीं तरी (< **किम् नु** (प्रतियोगी **बांईनु**)].

कायदा पुं. नियम, बंधन, शिरस्ता, धर्म, सरकारनें, किंवा समाजानें केलेला नियम. Law, regulation.

[अर. **काइदा**; अकामसा. **कायदेबाज** = कायदेपंडित., कायदे जाणणारा, **कायदेभंग** = सरकारी कायदे मोडण्याची क्रिया. **कायदेमंडळ** = कायदे करणारी सभा, कौन्सिल.]

कायम वि. निरंतरचें, सततचें, स्थिर. Firm, perpetual.

[अर. **काइम्**; अकाम. **कायम दायम** (निरंतरचें, दोन्ही एकाच अर्थांचे एकाच भाषेंतील शब्द-शब्दवीप्सा.)]

कायरस पुं. रायतें, कच्च्या फळांचा रस. A liquid preparation of boiled fruits, sugar etc.

[ते. **काय** = कच्चे; कान. **काई**; सं. **रस.** काइरस पहा]

कायस्थ पुं. ज्ञातिविशेष, प्रभूची ज्ञाति (कायस्थ आणि पाताणे). A caste.

[सं. **कायस्थ** (?), **कैथ** देशांतील रहिवासी. ह्या ज्ञातीचा व्यवसाय लेखनाचा आहे. बुद्धीनें तरतरीत, लेखनांत वाकब्गार अशी ही ज्ञात आहे. ह्याचा अपभ्रंश **कायथ** असा झाला आहे.]

१कार प्र. करणारा, कर्ता. An affix meaning ' Doer '.

[सं. **कृ.** ह्या शब्दाचा उपयोग प्रत्ययाप्रमाणें करून कांहीं सामासिक शब्द सिद्ध होतात. उदा. कुंभकार,

चर्मकार, वस्त्रकार, शस्त्रकार. **कारक**–करणारा. २ (व्याकरण) नामाचा क्रियेशीं संबंध.]

ँकार पुं. शब्द, आवाज, उच्चार. Sound, word, pronunciation.

[सं. **कृ. १ शब्दे.** अकार, मकार, ककार इत्यादि शब्दांत जो '**कार**' शब्द येतो त्याचा अर्थ '**शब्द**' असा आहे. " चोर चोर **करीत** उठला " ह्या प्रयोगांतील '**करीत**' ह्याचाहि अर्थ '**उच्चारीत**' असा आहे. '**कारे सत्यागदस्य**' ह्या पाणिनीसूत्रांतील '**कार**' शब्दहि असाच चिन्त्य आहे. उ. साचोकार (सत्यंकार) अगदंकार.]

कारकीर्द स्त्री. अधिकाराचा काळ, सत्तेची–अमलाची मुदत, राजवट, राजशासनाचा काल. The period of administration or sway.

[फा. **कार् + कर्द.**]

कारकून पुं. लेखक, (लिहिण्याचें) काम करणारा. A clerk, a scribe, a·writer.

[फा. **कार + कुन्** = काम करणारा, व्यापारी, उदमी. ह्या शब्दाच्या अर्थांत भ्रंश झाला आहे. प्रथम ह्याचा अर्थ " **चांगला धूर्त, हुषार माणूस** " असा होता. त्याच्यांत कमीपणा येऊन आतां नुसता **क्षुद्र लेखक** असा अर्थ झाला आहे. पेशवाईमध्यें '**कारकुनास**' मोठ्या जबाबदारीच्या कामावर पाठवीत असत. **कारकून** शिलेदार, **कारकून** सुभेदार असे प्रयोग त्या काळीं करीत. **कारकुनी** (कारकुनाचें काम), **कारकुनी** कावा (धूर्तपणा, लबाडी).]

ँकारंज, करंज पुं. एक प्रकारचा वृक्ष. A kind of tree.

[सं. **करञ्ज**; प्रा. **करंज.**]

ँकारंज न.पुं. पाण्याचे तुषार किंवा फवारा उंच उडविण्याची नळी. A jet d'eau, a playing fountain.

कारंजकर पुं. ज्ञातिनाम; बंदुक, तरवार, चाकू, सुरी वगैरे करणारा. A maker of muskets, pistols, swords, an armourer.

[सं. **क्रकचकार**; म. **कारचकर, करंचकर, कारंजकर.**]

कारखाना पुं. कोणतेंहि काम मोठ्या प्रमाणावर करण्याची जागा, खातें. Work-shop, any extensive business.

[फा. **कारखाना** = व्यवसायाचें ठिकाण; **कार** = काम, **खाना** = स्थान. पूर्वीं मराठ्याच्या राज्ययंत्रांच्या कारभारांत अठरा कारखाने–(खातीं) असत. उ. सुतरखाना, पीलखाना, जामदारखाना, थटी, पोतें. **कारखानदार** = (कारखान्याचा मालक). **कारखानीस** = कारखाननीस < फा. **कारखाना + निवीस**, (**निविश्तन्** = लिहिणें.) कारखान्यासंबंधीं लिहिण्याचें काम करणारा.]

कारट न. और्ध्वदैहिक कर्म, प्रेतवाहन किंवा त्यानंतरचें प्रेतविधि. Funeral rites.

[सं. **करट**; अकाम. **कारटा** = प्रेतविधि करणारा. ह्या शब्दाच्या अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. मूळचा अभद्र कुत्सित अर्थ जाऊन तो एक अपशब्द होऊन बसला आहे. विशेषतः खोडकर, व्रात्य मुलासंबंधीं हा शब्दवा परतात. प्रतियोगी शब्द 'पोरटा'. कारटा पोरटा.]

कारण न. मूळ, कार्य उत्पन्न करणारें निमित्त, प्रयोजन. A cause or an efficient reason, ground.

[सं. **कारणम्**; पा.प्रा. **कारण**; का. **कारन्** (पु); आ. बं. **कारन्**; ओ. **कारण**; हिं. **कारन्**; पं. **कारणं** (पु); सिं. **कारणु** (पु.); गु. **कारण**; ने. **कारन्**. मूळचा अर्थ साधन, निमित्त आहे. परंतु पुढें साधनार्थी शब्द परिणामासंबंधीं वापरण्यांत येऊ लागला. उदा. 'काम, प्रसंग.' पुढें अर्थाचें विशेषीकरण होऊन **आद्यकारण** म्हणजे **आद्यतत्त्व परब्रह्म** असा अर्थ त्याला आला. **कारणीं लावणें** = कामीं लावणें, उपयोगांत आणणें. (ह्यावरून **कारणें** = साठीं हें चतुर्थ्यन्त अव्यय निर्माण झालें).]

कारणें अ. साठीं, मुळें. For, on acccount of.

[सं. **कारणेन** (तृतीयेचें ए. व.); सिं. **कारणि**; हिं. **कारन**, गु. पं. **कारण** (हेतु); गु. **कारण के** (मुळें); का. **कारन्** (मुळें); सिंह. **करुण** (हेतु, निमित्त)]

कारंदा पुं. करवंद, एक रानटी फळ. A kind of wild fruit like ber corinda, a plant and its fruit.

[सं. **करमन्दिका**: देप्रा. **करवन्दीए असीहणही** (२८६·७·९); हिं. **करौंदा; करोंदा**; सिं. **करनोः** पांढरीं सुवासिक फुलें येणारें झाड.]

कारभार पुं. उद्योग, प्रयत्न, खटपट, जबाबदारीचें काम. Business, affair, effort, weighty business.

[फा. **कार + ओ + बार.** हा शब्द फार्सीच आहे. संस्कृत **कार्यभार** पासून व्युत्पादणें शक्य आहे. पण ती व्युत्पत्ति

निश्चित नाहीं. फार्सी 'कार' ह्या शब्दानें अन्वित असे बरेच शब्द मराठींत रूढ आहेत. कारकून, कारकीर्द, कारखाना इ.]

कारलें न. वनस्पतिविशेष, एक प्रकारची भाजी.
[सं. कर्कवल्ली (?); देप्रा. कारियल्लई, कारिल्ली, (स्त्री); कारेल्लय (न.) लता किंवा वल्लिवाचक, त्या वल्लीचें फळ कारलें. संस्कृतीकरण उत्तरकालीन.]

कारवाई स्त्री. कारस्थान, व्यवस्था, गुप्त मसलत. Skilful management, deep scheming.
[फा. कार + वाई.]

कारवान, कार्वाण पुं. घोडे वगैरे जनावरांची खरेदीविक्री करणारा, त्यांचा तांडा, काफिला. A caravan.
[तुर्की. अर. फा. कार् वान. पूर्वीचा शब्द कारबान् = उदीमव्यवहाराचा रक्षक; त्यावरून व्यापाऱ्यांचा काफिला.]

कारस्तान न. कट, गुप्त मसलत. A plot or counsel, a deeply concerted scheme.
[सं. कार्य+स्थान (?); फा. कारिस्तान्=कार्यकौशल्य; पेकाम. कारस्तान (रा. ५-१७०).]

कारळा, काऱ्हळा पुं. तिळाची एक जात. A kind of plant, the seed of it.
[कान. करि=काळा.]

कारा स्त्री. तुरुंग. A prison.
[सं. कारा, √कृ; काराग्रृह=तुरुंग.]

कारागर, कारागीर पुं. कामामध्यें निष्णात, कलावंत, कलाकुसरीचें काम करणारा, कसबी. A skilful workman, an artisan.
[फा. कार; +गर,-गीर (फा. प्रत्यय); कार्गीर = कुशल कामकरी.]

कारिसवाणा वि. केंविलवाणा. Piteous.
[सं. कृष + वर्ण, कृपण + वर्ण; याकाम. कारिसवाणा (उगी.).]

कारीगार वि. जालीम रीतीनें लागलेला, परिणामकारक. Effective in the end, effectual.
[फा. कार्गर्, पेकाम. कारीगार (हल्ला, जखम रा. १४.३५), कारेगार (खरे १.३९७).]

कारु पुं. गाणारा, भाट, गवई, स्तुतिपाठक, चारण, कारागीर, कलावंत. A singer, a musician, a bard, an artificer, an artisan.
[*IE.* Qer = आवंजणें; सं. कृ शब्दे (कारु, कार, चकर्ति); वैसं. कारु (√कृ) ह्या शब्दाच्या अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. मूळ अर्थ विस्तृत झाला आहे.]

कारोमांडेल न. प्रांतविशेष, हिंदुस्थानच्या पूर्व किनाऱ्यावरील प्रदेश. The name of the coastal province on the East of India.
[१ सं. कुरुमण्डल = कौरवांचा प्रदेश; परंतु हें काल्पनिक आहे. २ कुरुमनल = काळी वालुकामय जमीन (काल्डवेल). ३ खरमण्डलम् = उष्ण प्रांत. ४ तामीळ. चोरबंदेल = तांदळाचे बंदर (चोर>चावल). ५ चोरमण्डळ = चोर राजवटीचा प्रांत. ह्या सर्व व्युत्पत्तींमध्यें काल्पनिक भाग बराच आहे. अकराव्या शतकांतील तंजोर शिलालेखाचें आधारें शेवटची व्युत्पति खरी दिसते].

कार्तिक पुं. मासविशेष, (हिंदु पंचागांतील) एक महिना. The month *Kartika*.
[सं. कृत्तिका=एक नक्षत्र. ह्या महिन्यांत पौर्णिमेच्या दिवशीं कृत्तिका नक्षत्रांत सूर्य असतो म्हणून त्यापासून महिन्याला नांव मिळालें.]

कार्य न. काम, उद्योग, कारणाचा पाक, परिणाम. A work, busines, act, deed, effect.
[सं. कृ ८ करणे. ह्या शब्दाच्या अर्थांत बरेच उलटसुलट प्रकार झाले आहेत. सामान्यीकरण व विशेषीकरण झालें आहे. वेदान्तांत, न्यायांत ह्या शब्दाला विशेष अर्थ प्राप्त झाला आहे. कार्य = लग्नमुंज वगैरे समारंभ. **कार्यकर्ता**-हिमतीनें काम करणारा. **कार्यक्रम**-समारंभांतील कार्याचा क्रम. **कार्यकारणभाव**-कारण व परिणाम-संबंध. **कार्यसिद्धि**-कार्याचा शेवट.]

काल पुं. वेळ, समय, हंगाम. Time, season, fit time.
[सं. काल, √कल् १ गतौ.

ह्या शब्दाच्या अर्थांत पुष्कळ फरक झाला आहे. मूळ अर्थ **वेळ** समय. त्याचें विशेषीकरण होऊन **अंतकाळची वेळ= शेवटचा समय** असा अर्थ होऊन '**मृत्यु, यम, यमराज**' हा अर्थ त्याला प्राप्त झाला. नंतर **कालाची अधिष्ठात्री देवता** हा अर्थ त्यांत आला. त्या देवतेच्या सामर्थ्यानें चांगली किंवा वाईट वेळ असा अर्थ त्यांत आला. व्याकरणांत त्याला एक विशेष अर्थ आला. भूतभविष्यवर्तमान काल. ह्याचा तद्भव शब्द **काळ** असा आहे. सामान्यीकरण व विशेषीकरण असे दोन्ही प्रकार ह्या शब्दाच्या अर्थाच्या बाबत झाले आहेत. **वेळ, चांगली वेळ, वाईट वेळ**, त्याप्रमाणें त्या त्या चांगल्या किंवा वाईट काळावर येणारे **सुष्ट व दुष्ट प्रसंग, ईश्वराचा**

नेमानेम, प्रारब्ध, नशीब इत्यादि अर्थ निर्माण झाले आहेत; व हे होतांना अर्थप्रक्रिया कधीं प्रगत तर कधीं परागत-पुढें मागें अशी सरकत गेल्यासारखी दिसते. ह्या अर्थांशिवाय **काल** = गेल्या दिवशीं, येणाऱ्या दिवशीं असेहि अर्थ प्राप्त झाले आहेत. अर्थप्रक्रियेंतील झालेल्या चढउतारामुळें हा शब्द मोठा चिन्त्य झाला आहे.]

-कालकूट न. मृत्यु आणणारें संकट, त्यावरून एक प्रकारचें विष. The poison, hence a calamity.

-कालक्रमण न. काल घालविणें,-चें साधन,-त्यावरून खेळ, करमणूक. Passing of time, a game, an amusement, a play.

-कालचक्र न. कालाचा फेरा. The revolution of time.

-कालत्रय-त्र्यीं अ. कधींहि, तिन्ही काळीं (नास्ति अर्थदर्शक). Never.

-कालदशा स्त्री. वाईट दशा. Bad, ominous time.

-कालनिर्वाह पुं. दिवस कंठणें-कशी तरी गुजराण करणें. Supplying to the daily want.

-कालपुरुष पुं. यमदूत. The god of death.

-कालमान न. परिस्थिति. Measurement of time, circumstance.

-कालक्षेप पुं. काल घालविणें. Passing of time.

काल अ. गेलेल्या दिवशीं, मागच्या दिवशीं. Yesterday.

[सं. **कल्यम्, कल्ये,** √ **कल्**; पा. प्रा. **कल्लम्, कल्लिह** (**गतदिने**); का. **काल** (उद्यां); बं. **काल**; ओ. **काला**; हिं. **कल**; पं. **कल्ल**; सिं. **कल्ह**; गु. **काले** (दोन्ही अर्थांनीं.)]

कालरा पुं. महामारी, पटकी, वाखा, हागओकीचें दुखणें. Cholera.

[*Gr*. chole = bile; *Gr*. *Lat*. cholera; *OFr*. Cholere; *Eng*. Cholera.]

कालवड स्त्री. लहान वासरूं (पाडी). A young female calf, heifer.

[सं. **कल्लकटी, कल्याणी** (?); प्रा. **कल्लाणिआ**; देप्रा. **कल्लोडिआ** (स्त्री.) = वत्सतरी, (पुं.) **कल्होड**; (स्त्री.) **कल्हाडी, वड** < सं. **वत्स**.]

कालवा पुं. पाट, पाणी नेण्याचा पाट-नळ. A water course, a canal.

[कान. **कालिवे**; सं. **कुल्या** शब्दाचाच वरील कानडी शब्द तद्भव असावा. सर्वांच्या मुळाशीं वैदिक धातु √ **कल** १० गतौ, क्षेपे हा असावा. पहा-इंग्रजी Canal.]

कालवि(णें) सक्रि. मिसळणें, एकत्र करणें, ओलें करणें. To mix up with, to stir about in mingling.

[सं. **कल्** १० क्षेपे; देप्रा. **कल्लविअ**; याकाम. **कालौनि**=मिश्रण करून (नरुस्व ८४५.). संस्कृतीकरण नंतरचें असावें. '**किंचित् लवणम्**' अशीहि व्युत्पत्ति देतात परंतु ती ग्राह्य नाहीं. **कालवण**=ताक, दहीं दूध, आमटी, भाजी; **कालवाकालव**=मिश्रण, खालींवर होणें,-करणें. **काला**=मिश्रण, दहीं**काला**, गोपाल**काला**, **काला**कथला, **काला**कित्ता.]

कालाभुल-ली स्त्री. तगमग, कासावीस (पित्तप्रकोपानें झालेली). The disquietude, restlessness.

[**ध्वनिशब्द** (?); याकाम. **कालाभुला** = कासावीस (ज्ञा. १६-१४२); शिकाम. **कालाभुल** (तु. अभंग).]

मग कालाभुला हाका देते वेळे ।
होतोसि परि डोळे नुघडिसी ॥

काव स्त्री. तांबडी माती. तांबडा खडू, गरु. A kind of red earth.

[तेलु. कान. **कवि** = तांबडा.]

काव(णें) अक्रि. त्रासणें, संतापणें, गांजून जाणें, कंटाळून जाणें. To be annoyed, to be vexed.

[सं. **कु १ शब्दे** (णिच्).]

कावड स्त्री. एक काठी व तिच्या टोकांना शिंकें बांधलेलें, तराजूसारख्या एका काठीला बांधलेलीं दोन ओझीं. A bamboo lath provided with slings at each end.

[सं. **१ काम्र** < **कांव्रो**; **कमठ**; प्रा. **काव**; हिं. **कॉवर**; गु. **कावडु**. २ कान. **काऊ** = **ओझें** वाहणें; कान. ते. **कावडि**.]

कावर न. पाचर, खुंटी, खुंट्याची पाचर. A wedge, a chip driven in by the side of a peg.

[सं. **काम्र** (?).]

कावरा वि. भ्यालेला, भीतीनें किंवा रागानें चकित झालेला. Bewildered through fright or rage.

[सं. **कातर**; गु.हिं.बं. **कायर**=घिटलेला, भित्रा, आळशी, **कावरें**-वेड; याकाम. **काउरें** (ज्ञा.), **कावरुखें**-आश्चर्यकारक (ज्ञा. १५-५२), **कावराबावर**=भयभीत, घाबरलेला (कान. **कावु**=**ताप** (किंवा सं. **कातर**); कान. **बेवरू**=घाम.)]

कावल न. जुनें फुटकें भांडें. An old metal vessel.

[सं. **कोमल** (?); गु. **कावलुँ**; अकाम. **कावळा**.]

कावळा पुं. पक्षिविशेष. A crow.

[सं. **काक**+**ल** (?); देप्रा. **काउल्ल**=वक; प्रा. **काक**, **काग**, **काअ-व**. ‘ल्ल’ हा प्राकृत प्रत्यय. (काउ पहा) त्यापासून मराठी ‘ळा’ प्रत्यय सिद्ध झाला. उदा० **कावळा**, **बगळा**, **बावळा**. द्रा. **काक**, **काग**. कावळ्याला संस्कृतमध्यें निरनिराळे शब्द आहेत; परंतु द्राविडी भाषेंत एकच आहे. त्यावरून द्राविडी हा शब्द मूळ असला पाहिजे. ह्या शब्दावरून कांहीं प्रयोग रूढ झाले आहेत. **कावळा शिवणें**-और्ध्वदेहिक कृत्यांत मृताच्या पिंडाला कावळा शिवल्याखेरीज मृतांचें इच्छाविमोचन झालें असें समजत नाहींत. **कावळा शिवणें**=(स्त्री) विटाळशी होणें. **कावळ्याच्या** शापानें गाय मरत नाहीं. ह्या प्रयोगाच्या मुळाशीं रामायणांतील सीता-गाय ह्यासंबंधाची आख्यायिका आहे कीं काय ? पोटांत **कावळे** ओरडणें=फार भूक लागणें. ह्यांतील ‘ कावळे ’ हा शब्द कानडी ‘ **कवळु** ’= भूक ह्याच्याशीं संबद्ध आहे.]

कावा पुं. फेरा (घोड्यानें घेतलेला). Turning and twisting (of a horse). गुप्तठकबाजीचा हेतु. Cunning, craft.

[फा. **काव्**=खणणें (?); **कावेबाज**=धूर्त, युक्तिबाज, लबाड.]

कावीळ स्त्री. एक रोग (ह्या रोगांत अंग पिवळें होतें.). The jaundice.

[सं. **कामला**.]

काव्य न. कवीचें कार्य, कविता. The work done by a poet, poetry.

[सं. **काव्य**,√**कु** शब्दे. **कवि** पहा.]

काशा स्त्री. गवत, गवताचीं मुळें, बुडखे. The roots of the grass, grass.

[सं. १ **काश**. २ सं. **कक्ष**, **कच्छ**=गवत, कुरण; पा. **कच्छ**=गवत वाढलेली जागा; गु. **कास**=गवत उगवलेली जमीन, **काछीयो**=भाजीपाला विकणारा; हिं. **काछा**=बागवान; म. **काची**,-**छी**. **काशा** हा शब्द मराठींत अनेकवचनीं वापरतात. कास पहा.]

काशी स्त्री. क्षेत्रविशेष, वाराणशी. A celebrated place of pilgrimage, Benares.

[सं. **काशी**, √**कास्**; ह्या शब्दावरून कांहीं प्रयोग रूढ झाले आहेत. उदा० **काशी रामेश्वर**=दोन टोकांचीं दोन क्षेत्रें. **काशीकर**=काशीचा मनुष्य-भटजी, लुच्चा भटजी, काशीचा सोदा. **काशीचा कोतवाल**=कालभैरव, काशी येथें विश्वेश्वराच्या दरबारीं कोतवालाचें काम ‘ कालभैरव ’ करतो. तो पापाचा तपास लावून शिक्षा देतो. **काशीची यात्रा**=(लक्षणा) सोंगट्यांच्या खेळांतील तीनदां दहा, किंवा दोनदां दहा व एकदां पंचवीस असें दान पडणें.]

काशीद, कासद पुं. जासूद, निरोप्या, नेहमींचीं पत्रें पोंचविणारा दूत. A courier, message-runner.

[अर. **कासीद**, **काशीद**; पेकाम. **कासद** (रा. ८·२०१). पेशावाईमध्यें पत्रें पोंचविण्याचें काम **जासूद**, **काशीद** व **हरकारा** हे करीत असत. यांच्या जोड्या असत. लांबचा प्रवास दोघेदोघे करीत असत. काशीद हे बऱ्याच वेळां न्हावी जातीचे असत. हरकारे हे ब्राह्मण असत. पुष्कळ जासूद असले कीं त्यांचा ‘ **जथा** ’ म्हणत असत व त्यांच्या मुख्याला **नाईक** म्हणत.]

काष्टा पु. कास, कासोटा पहा. The tuck of a dhotee.

काष्ठ न. लाकूड, लाकडाचा तुकडा, काटकी. Wood, a piece of wood stick. **उंच लकडा** मनुष्य (ल.) (hence) a lean person.

[सं. **काष्टम्**; अकामसा. **काष्ठौषधि**-औषधोपयोगी वनस्पति; **काष्ठें भक्षण करणें**=जाळून घेणें, चितेमध्यें अग्निकाष्ठें असत त्यावरून; **काष्ठमाळा**=तुळसीच्या काष्ठाच्या मण्यांची माळ. **काष्ठयुद्ध**=बुद्धिबळाचा खेळ (ल).]

काष्ठा स्त्री. मर्यादा, वेळेचें मान (अठरा निमिषें). Limit, boundary, a measure ot time.

[सं. **काष्ठा**=मर्यादा; **पराकाष्ठा**=परम सीमा.].

कास, **काचा**, **कासोटा** स्त्री. पुं. लंगोट. The tuck of a dhotee, a small under-wear for loins.

[सं. **कच्छः**, **कक्षा**; प्रा. **कच्छ** (पुं), **कच्छा**; याकाम. **कांस घालणें**=कमर कसणें (नरुस्व ४९८). कासणें= युद्धासाठीं सिद्ध होणें (नरुस्व ३२४). मराठींत येतांना लिंगविपरिणमन झालें. ‘ **काचा** ’ हा पुं. शब्द आहे. **कच्छपट**>**कसभट**>**कसाट**>**कासोटा**; **कासोटी** (देप्रा. **कच्छटी**);

देप्रा. ‘ ट्ट ’ हा प्रत्यय आहे. तो ‘ पट, पट्ट ’ चा अवशेष आहे. तोच मराठींत उतरला. ‘ कसा ’ पहा.]

^{2}**कास** स्त्री. (गाई)च्या स्तनाची जागा, स्तन. Udder.

[सं. **कक्ष**; प्रा. **कच्छ**; २ **कक्ख** > **काख**; सिं. पं. हिं. **कच्छ** (पुं. स्त्री.); का. **कच्**; सिंह. **कॅस्**.]

^{3}**कास** स्त्री. जमीन (चांगली किंवा वाईट). Land.

[सं. **कृषि**, √ **कृष्**. ऐतिहासिक कागदपत्रांत ‘ **कास, कासबंदी, कासजमीन** ’ असे शब्द येतात. जमिनीची प्रत ठरवितांना ‘ **कास** ’ हाच शब्द वापरीत. जमिनींतील पिकें, प्रत, महसूल वगैरेसंबंधाच्या यादीला **कासबंदी** म्हणत. **कासजमीन** = प्रतवारी न लावलेली सरसकट जमीन. (एकाच अर्थाचे दोन शब्द.)]

^{4}**कास** पुं. कुरण. A grass-land.

[सं. **कक्ष, कच्छ**, = गवत, कुरण, दलदलीची जागा; पा. **कच्छ** = गवत वाढलेली जागा; गु. **कास** = गवत उगवलेली जमीन; सिंह. **कॅस** = दरवर्षी कापणी केलेली जमीन; गु. **काछीयो** = भाजीपाला विकणारा; हिं. **काछा** = बागवान. ह्या शब्दापासून मराठी शब्द **काशा** हा सिद्ध झाला आहे. **काशा** = जमिनींत वाढणारें तण.]

^{5}**कास** पुं. खोकला. Cough.

[*IE*. QES; सं. **कस्**; *Lith*. Koseti; *Slav*. Kas'iti; *Teut*. hwosta, Host (cough).]

कास(णें) क्रि. तयार होणें, एखाद्या बरोबर युद्ध करणें. To tuck and gird and prepare for an undertaking, to fight.

[सं. **काच्** १ बन्धने; संस्कृत ‘ **काच्** ’ पासून किंवा मराठी ‘ **कास** ’ पासून नामधातु तयार झाला. याकाम. **कासणें** (उगी. २५) कांस पहा.]

तो श्रीकृष्णू दानवांतें कासी : हें बोलतां सावडें ॥ (नरुस्व ३२४).

कासंडी स्त्री. एक प्रकारचें भांडें, चरवी, तपेली. A vessel.

[सं. **कांस्य** + **भाण्डम्**, (न्यूनत्वदर्शक लिङ्गविपरिणमन).]

कासरा पुं. दोर, मोठी दोरी (मोट किंवा बैल बांधण्याकरतां वापरण्याची). A rope, a string, guiding string for a bull.

[सं. **कश–कशा** = दोरी, चाबूक. **कसा** पहा.]

कासव, कांसव न. एक जलचर प्राणी. A tortoise, a turtle.

[वैसं. **कश्यप**; पेल्हवी. **कश्यप**, (अर. **कश्यप**); सं. **कच्छपः**; प्रा. **कच्छभ** (पुं.), **कच्छवो, कासवो**; हिं. **कछुआ**; सिं. **कछउं, कछूं**; बं. **काछिम**; (मराठींत लिंगभेद झाला.) **कच्छभ** > **कस्सह** > **कासअ** > **कासव** ह्या मार्गानें मराठींत आला. मराठींत क्वचित् ‘ का ’ वर अनुस्वार देतात. तो आगंतुक आहे. **कासवाची दृष्टि** = दयादृष्टि. **कासवीचें तूप**–असंभवनीय गोष्ट. **कासवाची पाठ**–कठीण पदार्थ.]

कासार पुं. भांड्यांचा किंवा बांगड्यांचा व्यापार करणारी एक जात. A brazier or worker in metal, a maker or stringer of glass bangles.

[सं. **काचकार, कांस्यकार**; हिं. **कासगर**; ने. **कस्सर**.]

कासावीस वि. घाबरा, व्याकुळ. Distressed, agonized.

[सं. **कास्** १ कुत्सायाम्, + **श्वस्** २ प्राणने (द्विधातु-संयोग). खोकल्याच्या ढासेनें श्वासोच्छ्वास करण्यास अडचण आल्यानें गुदमरलेला; त्यावरून घाबरा, व्याकुळ असा अर्थ झाला.]

कांसें न. धातुविशेष. Bell metal.

[सं. **कांस्यम्**; प्रा. **कंस** (न), **कास**; गु. **कांसु**; सिं. **कंझो**; पं. **कांसी**; हिं. **कास**; हिं. बं. ओ. **कासा**; म. **कासार** (< सं. **कास्यकार**; प्रा. **कंसआर**; भांड्यांचा व्यापार करणारा).]

कास्त पुं. (लेखक, लेखकांची) एक जात, जातिविशेष. A caste or an individual of it.

[सं. **कायस्थ**; हिं. **कायथ**; गु. **कायत्**; अकाम. **कायथ, कायस्थ, कैथ**.]

काहणी स्त्री. गोष्ट, कल्पित गोष्ट, वार्ता. A story, a fable, news.

[सं. **कथनिका**; प्रा. **कहनिआ**; याकाम. **काहणी** (ज्ञा. ६–१४२).]

काहार पु. दगड. A stone. कोळी, भोई. The Koli caste.

[सं. **कर्कर**.]

काहाळ न. स्त्री. ढोल, चर्मवाद्य, झांज. A kind of instrument.

[सं. **काहला**; याकाम. **काहाळी** (शि १०२६); **काहाळा** = झांज (ज्ञा. १–१३२).]

मधुकर वाति काहाळी चांग : कळी सुमनांचा ॥ नरुस्व. ७५०

काहिली स्त्री. आळस, दिरंगाई. Sloth, dilatoriness.

[फा. **काहिली**; < अर. **काहिल्** = **आळशी**; पेकाम. **काहिली** (मराआ. ३०)]

काहिली स्त्री. तापानें–उष्णतेनें होणारा त्रास, गुदमरणें. Restlessness in fever or through heat.
[सं. क्वथ् (?), कातर (?); प्रा. कहल=कातर, अधीर.]

कांहीं वि. थोडें, किंचित्, जें सांगतां येत नाहीं तें. A few or a little, some.
[सं. किम्+हि ; अकामसा. **कांहीं बाहीं**–अगदींच भलतें ; कांहीं एक, कांहींतरी (ज्ञा. १८·४२२). **कांहींसा**–थोडासा, कांहीं अंशानें (<किम्+ईदृश).]

काहील स्त्री. एक लोखंडाचें पात्र, (उंसाचा रस कढविण्याचें). A boiler for inspissation of the juice of sugar-cane.
[सं. कटाह ; देप्रा. कहल्ल=कर्पर, खापर, **कांहिल्लिआं** ; काईल पहा.]

काहूर न. दाट काळोख, अंधारी, कलंक, संकट, कुभांड, भ्रांति, भय. Darkness, thick gloom, heavy murk or gloom.
[फा. कहर् ; याकाम. **काहुर**=भ्रांति, भय (ज्ञा. १३–१०४१ पाठ); अकाम. **काहुरा**; सं. **कुहेली**=धुकें.]
तों चन्द्र गेला मावळोनि । काहुरा गगनीं कोंदला ।

काह्या, काह्यला, काह्यास अ. 'कशास'चीं कवितेंतील व प्रांतिक भाषेंतील रूपें. Why, for what.
[सं. किंहि; याकाम. **काह्या**=कसा, काह्याचे (ज्ञा. ६·९३)]
द्रष्टा श्रीगुरुमूर्त्ति । न रिगतां दृष्यपंथीं । तरी काह्या उपास्ति । आकळता तो ॥ ज्ञा. १८–१७०४

काळ पुं. वेळ, दिवस, वाईट प्रसंग. Time, day, bad,-inauspicious time.
[सं. कालः; पाप्रा. **काल**; बं. **काल**; '**काल**' पहा. ओ. **काळ**; हिं. **काल**; सिं. **कालु**; गु. **काळ**. **काळाच्या तोंडीं जाणें,–घालणें,–दाढेंत जाणें**=मरणें. **काळकंटक**–मोठें संकट. ('**काळ**' परम, अचाट, मृत्यु ओढवणारें. उदा. **काळझोंप, काळज्वर, काळरोग, काळरात्र. काळपुळी**–फोड (काल+स्फोटक). **काळावर** दृष्टि= नशिबावर हवाला.]

काळवखा पुं. काळोख, अंधार. Darkness.
[सं. **कालः**; देप्रा. **काल**=तमिस्र, अन्धकार ; याकाम. **काळवख** (ज्ञा. १२·४९).]
कीं काळवखेयाचा समुद्रीं माणकें: प्रथम–जातें ॥ नरुस्व. ४८४

काळवडि स्त्री. टोळधाड. A swarm of locusts.
[सं. **कालवर्त्मन्, कालवर्तिका**; याकाम. **काळवडि** (उगी.)]

काळा वि. काळया रंगाचा, पांढरा ह्याच्या उलट, कृष्ण. Black, sable.
[*IE.* Qalo; सं. **कालः**, *Gr.* Kelis; *Lat.* Calig·
१ सं. **कालः, कालकः**; पा. **काळो**; प्रा. **कालअ** (= तमिस्र, श्यामवर्ण); का. **कोलु**; बं. **काला**; ओ. **कळा**; हि. पं. **काला**; सिं. **कारो**; गु. **काळू**; म. कृष्ण पहा. २ कान. **काडु**=काळा; ते. **करूर** ; गोण्डी. **कोस्सो** ; म. **काळिमा**- (< प्रा. **कालिम**; <सं. **कालिमन्**), **काळगेला**=किंचित् काळा. (द्रा. **काळ**. द्राविडी शब्द पुढीलप्रमाणें आहेत. **कद्, कण्डु, करि, करे, कडे, कर्गु, कर्पु, कलगु, कागु, कडिगे, कड्डु** इत्यादि.)]

–काळतोंड्या वि. काळया तोंडाचा, अपेशी. Ill-starred, luckless.

–काळुंद्रा वि. फार काळा.
Exceedingly black.

–काळवंडणें अक्रि. काळें पडणें, मलीन होणें. (ज्ञा. १६-४१६) To turn livid through sickness or heat.

–काळाकभिन्न वि. अत्यंत काळा. Intensely black.
[सं. कृष्ण, **काल**+कान. **कनिप्प**=लोखंड.]

–काळासांवळा वि. कृष्ण–श्यामल. Approaching to blackness.

काळास न. कलाकुशलता. Skill.
[सं. **कला** ; याकाम. **काळास**.]

काळी स्त्री. पेरावयाची जमीन. The soil or ground considered with reference to agriculture.
[सं. **काल**. जमीन दोन प्रकारची : १ **काळी** २ **पांढरी**. पिकाची जमीन **काळी** व घरें बांधून राहण्याची जमीन **पांढरी**. गांवठाणाच्या जमिनीस **पांढरी** म्हणतात, **पंडरिगे, पांडुरंग, पंढरपूर, पंढरी** वगैरे शब्द '**पांढरी**' शब्दाशीं संबद्ध आहेत. **पांढरपेशा** हा शब्द **पांढरी** ह्या शब्दापासून सिद्ध होतो.]

काळीज न. हृदय, अन्तःकरण (मूळ अर्थ यकृत). Properly the liver but commonly understood of the heart.
[सं. **कालेय**; प्रा. **कालिज्ज**=हृदयाचें मांस. हिं. कलिजाह् ; फा. **कलिजा**=प्रेमाचा विषय.]

काळोख पुं. अंधार. Darkness.
[सं. **काल-कः**, **खलुक** ; प्रा. **कालअ**=तमिस्र. **जुना** मराठी शब्द **कालवख, कालवंख** असा आहे (ज्ञा. १२·४९).]

कांक्ष(णें) अक्रि. इच्छा करणें, अपेक्षणें. To desire, to expect.

[सं. **कांक्ष्** १ **इच्छायाम्**; याकाम. **कांक्षणें** (ज्ञा.) अकाम. **कांक्षा** = इच्छा. **कांक्षेखोर** = संशय घेणारा. मराठींत **'कांक्षा'** शब्दाला ' संशय, ' असा अर्थ प्राप्त झाला आहे. विशेषतः ' कांक्षेखोर ' ह्या शब्दांत तोच अर्थ आहे.]

किं, कीं अ. किंवा, अथवा. Or.

[सं. **किम्**.]

क्रिकरें न. लाकडास भोक पाडावयाचें सुताराचें हत्यार. A sort of chisel.

[**ध्वनिशब्द. किरकिर** आवाज उत्पन्न करणारें.]

किकीचें पान बाई कीकी मुलींचा एक खेळ. A game or play (for girls).

[**किकी** = वडील बहीण, बहीण. **पान** = आरसा. एक मुलगी दुसरीच्यापुढें उभी राहते. बहिणीच्या पुढें दुसरी बहीण उभी राहिली म्हणजे एकीचें प्रतिबिंब दुसरी असा अर्थ किंवा सं. **किकी**=नारळाचें झाड.]

किंकिणी स्त्री. लहान घंटा. A little bell.

[**ध्वनिशब्द.** सं. **किम्किम्** इति शब्दः, **किंकिणी**; गु. **किंकिणी**; हिं. **किकिनी**; पं. **किंगणो**=झूल; **किणकिण पहा.**]

किंकर पुं. नोकर, चाकर. A servant.

[सं. **किम् करोमि, किम् करोमि** इति यः पृच्छति सः.]

किंकाळ(णें) अक्रि. किंकाळी फोडणें, ओरडणें. To scream, to shriek.

[**ध्वनिशब्द.**]

किचकट वि. बारीक, सूक्ष्म व बारीक, (म्हणून) भानगडीचें, गुंतागुंतीचें, त्रासाचें. Slim, slender, minute and thin, (therefore) intricate, very difficult to be made out.

[सं. **कृच्छ्र + कट.**]

किचबिड(णें) अक्रि. अस्पष्ट–अद्वांतद्वां लिहिणें. To write in an illegible manner.

[**सं. कृष् + विकृष्, √कृष् १ विलेखने.**]

किचवट(णें) सक्रि. तोडणें, तुडवणें, मिसळणें. To prick and mangle by packing and picking.

[**सं. कृत्यते, √कृत्; प्रा. किच्चना; गु. किक्कीचावूँ.**]

किचाट,-टी,-चाट्या, किचाड पुं. कचाट, गलबला. Crowdedness, thronged state.

[सं. कृच्छ्र + कट; **२ कान. किचाट.**]

किजबीज स्त्री. किलबिल, चिंवचिंव. The chattering of birds.

[**ध्वनिशब्द.**]

किटकिट स्त्री. त्रास, किरकिर. Grumbling, grating, whinning.

[**ध्वनिशब्द, सं. किट् शब्दे.**]

किटण न. घाण, मळ (सांचलेला), कलंक, मळ (भांड्यावरील, दांतावरील). Dirt, grime, dross of iron.

[कान. **किट्ट. किटणें** (नाधा.)-मळणें, त्रासणें.]

किटाळ-किडाल-ळ न. विस्तवाची ठिणगी, संकट, त्रास, आळ, आरोप. A flake of fire. trouble, calamity.

[कान. **किडी=ठिणगी**; कान. **कोडु=वाईट गोष्ट.**]

किड(णें) अक्रि. कीड लागणें, नासणें. To become worm-eaten.

[कान. **किडु**; ता. **केडु**; ते. **केडु**; परंतु हा द्राविड तद्भव असून मूळ संस्कृत ' **कीटक** ' पासून नामधातु बनून आला असावा.]

किडा, कीड पुं. स्त्री. कीटक, क्षुद्र प्राणी, जमिनीवर सरपटणारा क्षुद्र प्राणी. A worm, an insect.

[सं. **१ कीटः, कीटकः**; पा. **कीटम्**; प्रा. **कीड, कीडअ**; अप. **कीडउ**; बं. **किरा**; हिं. पं. ल्हां. **किरा**; सिं. **कीरो**; गु. **किडो. २ कृमि-किरी > कीड.**]

किडाळ न. वि. ठिणगी, अरिष्ट. A flake of fire, a calamity. हिणकस, वाईट. Mean, low.

[सं. **किटाळ, (किट, कट,)**; याकाम. **किडाड** (**ज्ञा.** १–२३३). किटाळ पहा.]

किडुक न. लहान किडा. A small worm or insect.

[सं. **कीटक**=कीडा (अल्पार्थें–किडूक); अल्पार्थें प्रत्यय दोनदां लागला आहे. प्रथम **कीट + कः** ह्या शब्दांत व नंतर **किडा** हा शब्द सिद्ध झाल्यानंतर **' उक '** हा अल्पार्थें प्रत्यय लागला.]

किडुकमिडुक न. दागिने वगैरे. Petty trunkets.

[कान. **कुडूक** = दागिना किंवा सं. **कुटिक** = सोन्याचा दागिना. **कुडी.** कर्णभूषण; अकाम. **कुडुकमिडुक.**]

किण-किणें पुं.न. घट्टा, वण. A callosity.

[सं. किण; हिं. किन; म. **किणें**, **किनें**, **किन्हें**(न); पेकाम. **किणें** (पदललाट केलें किणें-मोरोपंत).]

किण किण स्त्री. शब्द, शब्दाचा पुनरुच्चार. Sound, repetition of sound.

[*IE*. QE-N; सं. **कण्** १ शब्दे (किंङ्किणी = घंटा. शकुनी, शकुन्त ह्यांमध्यें, √ **कण्**, **कन्**-शब्दे हाच धातु असावा.)

किताब, पुं. पदवी, बिरूद, संबोधन. A title, a form of address.

[अर. **किताब्**, **खिताब्**; शिकाम. **कितबती** (सभा. ६२); पेकाम. **खतबा** (रा. ३·३४९). अकाम. **किताबती**=लेख, **कितेब**, **हिशेबकितेब**].

किती वि. संख्या व परिमाण दाखविणारें प्रश्नार्थक-पृच्छादर्शक विशेषण, कांहीं, केवढें. How many, how much, some, some few.

[सं. **कियत्**; प्रा. **कित्तिय**, **केत्तिअ**; अकामसा. **कित्येक** = किती + एक, पुष्कळ; **किती तरी** = पुष्कळ; **कितुकें** = किती-कितुलें (काव्य).]

कित्ता पुं. वळण, तीच बाब, सदर, नमुना, सदर्हू, तक्ता, वळण. An exemplar or pattern, an item belonging to a class already mentioned.

[अर. **कित्आ** = चिठ्ठी.]

किनई, **किनी** अ. (बायकांच्या भाषेंत) 'कीं नाहीं' ह्या शब्दांचा अपभ्रंश. Is it, is it not.

किनखाप स्त्री. सोनेरी पदराचें - रेशमी कापड. A brocade, silk worked with gold and silver flowers.

[फा. हिं. **कम् खाब्**, **कम् ख़्वाब**; अर. **कमूखा**, **किमूख्व्**. Damasked silk. चिनी. **किनूख**, **किन्** = **सोनें**. फा. **कम्ख़्वाब**=थोडी झोप. ह्या कपड्यानें झोंप मोडते. ज्यानें पाहिलें नाहीं किंवा त्याच्या स्वप्नांतहि पहायला मिळावयाचें नाहीं इतकें सुंदर; परंतु ही व्युत्पत्ति कृत्रिम वाटते.]

किना, **-नें**, **-न्हें** पुं. न. वण, घट्टा. Callosity.

[**किणें पहा.**]

कितान न. ताग, गोणपाटाचें कापड, गोणपाट, बारदान. A rough cloth like gunny bag.

[अर. **कतान**, **कत्तान**.]

किनारा पुं. कांठ, बाजू, तीर. Edge, side, border.

[फा. **किनार्**; म. **किनार्-री**, = कांठ, कोर, धोतराची, लुगड्याची किनार-कांठ.

किफायत, **-ईत** स्त्री. फायदा, नफा. Advantage, profit.

[अर. **किफायत्**. **किफाइती**, **-तवार**, **-शीर** = नफ्याचा.]

किमया स्त्री. जादुगिरी, निष्कृष्ट धातूचें सोनें करण्याची विद्या-कला. Art of transforming a base metal into gold, alchemy.

[ईजिप्तचें प्राचीन नांव '**केमि**' असें होतें. **केमि** = काळें, करपलेलें (नाईल नदीच्या काळ्या चिखलामुळें काळें). ह्या देशांतील लोक धातुकाम चांगलें करीत व ते त्यांनींच सुरू केलें. म्हणून त्या कामाला इजिप्तच्या **कला-किमीच्या कला** असें म्हणत. हाच (chemia) शब्द ग्रीसमध्यें गेला, तसा अरबस्तानांत आला (**अल-किमया**). त्यावरून इंग्रजी chemistry व alchemy हे शब्द रूढ झाले.]

किंबहुना अ. फार काय सांगावें. Wherefore, much, what proof or argument is required ?

[सं. **कि + बहुना** (तृतीया ए.)=फार काय. हा संस्कृत वाक्प्रचार आहे. मराठींत त्याचा अव्ययासारखा उपयोग होतो. निर्दिष्ट गोष्टी ग्राह्य धरून त्यांपेक्षां अधिक सांगतांना पूर्वीं हें अव्यय वापरतात.]

किंमत स्त्री. मूल्य, मोल, भाव, दर, योग्यता. Price, value, rate.

[अर. **कीमत**.]

किरकिर स्त्री. कटकट, पिरपिर. Peevish, complaining, any long-continued irritating sound.

[**ध्वनिशब्द**.]

किर, **कीर** अ. खास. Certain, sure.

[सं. **किल**; प्रा. **किर**.]

किरकोळ, **किरकूळ** वि. हडकुळा, अशक्त, रोडका, बारीक. Slim, slender, spare, slight, petty.

[? **कीर** = पोपट + **कोळ** = वरटें. हा शब्द द्राविडी आहे कां ?]

किरटें (अक्षर) वि. वाकडें, सरळ नव्हे असें. Slanting, not straight.

[कान. द्रा. किरक = लेखक. द्रा. किरि, केरे, = ताडपत्रावर लोखंडाच्या काडीनें लिहिणें.]

किरण पुं. किरण. A ray.

[सं. **किरण**; हिं. **किरन्**; गु. **किरण**; सिं. **किरिणी**; पं. **किरन**, **किरण**.]

किरपाण न. शिखांचें शस्त्र, तरवार, कृपाण. A small sword, a dagger.

[सं. **कृपाण**. (√ कृप्, कृप् = आकार); *Av.* *Qerp*; सं. **कृप्**; *Av.* Kehrp. (form, body); *Gr.* Karp (kropion = sickle); *Lat.* Carp (Corpus = body); *Lith.* Kerp (Shear); *Slav.* Korpu; *Russ.* Karpu; *M.Eng.* Carpe, Hœrvest.

मराठी शब्द **खुरपें** (Sickle) ह्या शब्दांशीं ताडून पाहण्यासारखा आहे.]

किराण न. किरण, उडी. An attack, a leap, a bound.

[सं. **किल–खेळणें** (?); **किरण साधणें** = नेम धरून झडप घालणें. '**किरण**' चा ग्रामीण उच्चार.]

किराणा पुं. वाणाजिन्नस–मीठमिरची लवंग वगैरे. Grocery.

[सं. **क्री ९ व्यवहारे** (?); सिं. **किर्याणी**.]

किरिस्तांव पुं. (प्रांतिक) ख्रिस्ती, बाटलेला व त्याची भाषा. A Christian, a convert (to Christianity.)

[पोर्तु. **क्रिस्ताओ**; *Eng.* Christ. म. **ख्रिश्चन**.]

किरीट पुं. मुकुट, डोक्याचें भूषण. A crest or diadem.

[सं. **किरीट**, √कॄ.]

किर्डी स्त्री. प्रेताची तिरडी, (ग्राम्य भाषेंत, विशेषतः स्त्रियांच्या तोंडीं). A corpse, a dead body.

[सं. **कृत्ति**.]

किर्द, **कीर्द** स्त्री. जमाखर्चाची यादी–वही, रोजनिशी. An account of receipts and disbursements.

[फा. **कर्द** = **काम**. √**कर्दन्**–काम करणें; (**रोजकीर्द**–रोजचें टिपण); **कीर्द** (खतावणी) (खतावणी=खात्याप्रमाणें केलेली वही).]

किर्र् वि. दाट, कर्कश, (किर्र् झाडी). Shrill, piercing (sound), dense, close (woods).

[ध्वनिशब्द. किर्र् = रातकिड्यांचा कर्कश सूर. सं. कृ = शब्दे.]

¹किलकिल(णें) अक्रि. श्वेत-पांढरें होणें, प्रकाशणें. उदा.– पांखरें किलकिलतात, दिवस किलकिलला. To open up a little, to dawn.

[सं. किल ६ श्वैत्ये, क्रीडने (किल् ह्याची वीप्सा).]

²किलकिल(णें) सक्रि. उघडझांक करणें, मिचकावणें, उदा. डोळे किलकिलतात. To unclose a little.

[सं. **क्ष्मील् १ निमेषणे**; देप्रा. कील = स्तोक, अल्प.]

³किलकिल(णें), **कलकल(णें)** अक्रि. आवाज करणें. To chatter, to babble.

[सं. **कल्** १ शब्दे, **किल्** ६ क्रीडने. ह्या दोन्ही धातूंपासून येणें शक्य आहे. अकामसा. **कलकलाट**, **किलकिलाट** = गोंगाट, गोंधळ. **किलाण**–उडी (√ **किल्** ६ क्रीडने.)]

किलची स्त्री. लहान तुकडा, कडिपाटाच्या फळीचा तुकडा. उदा. पांचूच्या किलच्या, किलचांची तक्तपोशी. A straw, a stick, a bit of rubbish, narrow slip.

[सं. (?); देप्रा. **किलिंच**. कलिञ्ज लघु दारु (७२·१८).]

किलाफ पुं. संशय, शंका, किल्मिष, वैषम्य, काळेंबेरें. Doubt, suspicion, misgiving, filth.

[अर. **खिलाफ़**.]

किलावर पुं. पत्त्याच्या डावांतील काळया रंगाचें पान. The clubs.

[*Eng.* Club; Flower ह्या दोन शब्दांचा संभ्रम होऊन त्या दोहोंच्या मिश्रणानें हा शब्द तयार झाला असावा.]

किल्मिष न. काळेंबेरें, पाप, शंका, मळ, दोष. Foulness, filth, nastiness, doubt.

[सं. **किल्मिषम्**.]

किल्ला पुं. तटाची इमारत, गड, दुर्ग. A fort or fortress.

[अर. **कल्'अ**; **किल्ला**; फा. **कलात्**, **कलाक्** = **किल्ला**, **कल्लाह**; अर. फा. आणि हिं. **किल्'अ**, **कुल'अ**; **किल्लेदार**=किल्ल्याचा रक्षक (< **किल** + **अदार**) **किल्लेकोट**=किल्ला वगैरे (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द, एक अरबी व दुसरा संस्कृत).]

किल्ली स्त्री. कुलुप काढण्याचें साधन, चावी. A key.

[सं. **कील**, **कीलक**; पा.प्रा. **कील**; फा. **किलीद** हा शब्द वरील शब्दांबरोबर ताडून पहाण्यासारखा आहे. गु. **कीली**; हिं. **किल्ला**; सिं. **किली**; पं. **किल्ल**, **कील**; ओ. **किला**; का. **किल्**; तमा. **किलो** = मेख; म. **खिळा** पहा.]

किंवडा वि(पुं). बहिरट, बहिरा, पूर्ण ऐकूं न येणारा. Deaf, short of hearing.

[कान. **किवी** = कान; **कीवुड** = बहिरा.]

क्विण, **क्विणव** स्त्री. दया, कृपा. Compassion, mercy, kindness.

[सं. **कृपण**; प्रा. **किवण**, **किविण**; याकाम. **कणव** (ज्ञा. १३–१०४३).]

किंवदन्ति स्त्री. बाजारगप्प, अफवा. A rumour, a bazaar guff.

[सं. **किम् वदन्ति**. ‘ लोक काय बोलतात ’ ह्या अर्थी. हें संस्कृत पूर्ण वाक्य असून त्याचा नामाप्रमाणें उपयोग संस्कृतमध्यें रूढ आहे. तत्सम म्हणून मराठीनें उचलला.]

किसगणती, **खिसगणती** स्त्री. फिकीर, चाड. Regard or consideration.

[सं. **कीदृशी गणतिः**; प्रा. **किअस्सी गणती** = **कोण गणना** ह्या अर्थी हा संस्कृत प्रयोग असून मराठीमध्यें अपभ्रंश होऊन किंवा हिंदीमधून आला.]

किस(णें) सक्रि. कीस काढणें, तुकडे करणें. To grate, to scrape.

[सं. **कृश् ६ तनूकरणे** किंवा **कृष्**; **किसणी** = खोबरें बारीक करण्याचें साधन, हत्यार. **किसपट** = लहान तुकडा. **खुसपट** हा शब्द निराळा (कुश + पट पासून).]

किसमिस न. बेदाणा. (खिसमिस पहा.) Small kind raisin without pips.

[अर. **किसमिस**; अकाम. **खिसमिस**]

किसाण पुं. शेती करणारा, शेतकरी. A peasant, a plough-man, a country-man.

[सं. **कृषाण**, **कृषिवर्ण**; प्रा. **किसिवण्ण**; हिं. **किसान**; पं. **किसाण**; फा. **किसान**; अर. **किस्त** = जमिनीचा कर. फार्सी शब्दच उत्तर हिंदुस्थानांत प्रथम रूढ झाला. दोन्हींचा —संस्कृत व फार्सी—शब्दांचा संबंध असलाच तर तो फार जुना असला पाहिजे. **कृष्** ह्या धातूपासून दोन्हीहि सिद्ध झाले.]

किस्त स्त्री. शेताची मशागत. शेताचा खंड त्यावरून कर्ज, कर्जाचा हप्ता, जमीन महसूलाचा वार्षिक कर. हा हप्त्याहप्त्यानें घेत असत. प्रत्येकाला किस्त् असें म्हणत. The annual rent payable for lands.

[अर. **किस्त्**; सं. **कृप्**. पेकामसा. **किस्तबंदी** = शेतकाम. शेताची वाटणी–मशागत. **किस्ती** = १ कर्ज परत द्यावयाचा हप्ता. २ नाव (< फा. **कश्ती** = होडी.)]

किस्मत न. स्त्री. नशीब, दैव, प्रारब्ध. (किस्मतचा खेळ–फेरा.) Luck, fate, providence.

[अर. **किस्मत्**; पेकाम. **किस्मत** (ऐटी. ३७).]

किळस स्त्री. शिसारी, वैताग. Nausea, disgust, loathing.

[सं. **क्लेश**, √ **क्लिश् ४ उपतापे**, **विबाधने**; प्रा. **किलेश** > **किळस**; पा.सं. **किलास** = कुष्ठ. **किळस(णें)** (नाथा.)=किळस येणें. To loath, to nauseate.]

कीं, **की** अ. प्रश्नार्थक अव्यय, अथवा, कीं, स्वरूपबोधक-जे. Or, that (noting indication).

[सं. **किम्**; हिं. **कि**; २ फा. **के** हें अव्यय दोन अर्थ दाखवितें. एक प्रश्नार्थक ‘**कां**’ ह्या अर्थी आणि दुसरा स्वरूपबोधक ‘**जे**’ ह्या अर्थी. ह्यांपैकीं पहिलें संस्कृत ‘ किम् ’ पासून उत्पन्न झालें असून सानुस्वार आहे व दुसरें फार्सी ‘ के ’ पासून असून निरनुस्वार आहे.]

कीजे, **कीजत** क्रि. (काव्य) करावें, केलें जावें. Should be or may be done.

[सं. **कृ. ८ करणे**; **क्रियते** = कीजे, **कुर्यात्** = कीजे. कर्मणि व विध्यर्थे अशा दोन्ही संस्कृत रूपांपासून मराठींत ‘**कीजे**’ हें रूप झालें. हें जुन्या काव्यांत आढळतें. लोभ कीजे–दीजे–करिजो–कीजो–धरिजे, इत्यादि रूपें.]

कीट पुं. मळ, दोष, माती, अशुद्ध भाग. Ingrained dirt, grime.

[सं. **किट्ट**; प्रा. **किट्ट** = मल, रंगविशेष; बं. **किटकिट** = गाळ; ओ. **किटकिट**; हिं. **कीट**; सिं. **किटी**. गु. **कीटू**. **किट्ट** (काळा काळा किट्ट) ह्यामध्यें दुसरा अर्थ आला = जमलेली धातु–लोखंड. **किटण** (<प्रा. **किट्टण**; < सं. **कित्तण**; ‘ ण ’ नामप्रत्यय).]

कीडं स्त्री. किडा. A worm, an insect.

[सं. **कीट**; प्रा. **कीड**. सं. **कीटवत्**; प्रा. **कीडइल्ल**; म. **किडले**.]

कीर पुं. कोंकणांतील भंडारी जातींतील एक आडनांव. A surname.

[सं. **कीर** = पोपटाच्या जातींतील पक्षी. पक्षी राखून

जमीन शोधण्यासाठीं व त्याप्रमाणें जहाजांना दिशा दाखविण्यासाठीं त्यांना उडविण्याचें काम करणारा जहाजावरील अधिकारी.]

^{2}**कीर, कीरु** अ. निश्चयार्थक अव्यय, खास. Certainly, verily.
[सं. किल; प्रा. किर; याकाम. कीरु (ज्ञा. १·११९).]
हे कीरु न मनीं कव्हणातें : आपुलां ठाई हांसे रायातें ॥ नरुस्व १२६.

^{3}**कीर** पुं. पोपट. A parrot.
[सं. कीर; प्रा. कीर; याकाम. कीर (ज्ञा.).]

कीर्त(णें) सक्रि. स्तुति करणें, वर्णन करणें, गुण गाणें. To celebrate the praise, to laud, to extol.
[सं. कृत् १० संशब्दने.]

-कीर्तन न. ईश्वरभजन–नामोच्चार. Reciting the names of the diety. (ह्याला मर्यादित अर्थ आला आहे–कथा.)

-कीर्ति स्त्री. लौकिक, प्रसिद्धि, यश. Fame, celebrity.

कीव, कींव स्त्री. करुणा, कृपा, दया, शोक. Compassion, mercy, piteous imploring.
[सं. कृपा ; प्रा. कीवा, कींव ; *Gr*. Ekrikon; *Ger*. kreiten ; *Fr*. Crier हे युरोपीय शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत. अक्रामसा. कीवील=गरीबीचें, दीनवाणें; कोविलवाणें = दीनवाणें ; कीवकाकळूत = करुणेची याचना.]

कीळ न. शोभा, तेज, चमक. Brilliancy, lustre
[सं. किला=ज्वाला ; पा. क़िळा; याकाम. किळा, कीळ (ज्ञा. १४–१२३).]

कु संस्कृतमध्यें हा शब्द आरंभीं लावून सामासिक शब्द सिद्ध करतात. त्याचा अर्थ कुत्सित, वाईट, अपकृष्ट इ. उदा. कुशब्द, कुकर्म, कुग्राम. A particle of depreciation implying badness.
[सं. कु = कुत्सित.]

कुई स्त्री. आरडाओरड, आरोळी. (कोल्ह्याच्या शब्दाला म्हणतात.) The cry of jackals, a shrill cry of men.
[*IE*. Qe; सं. क, कक, कू, कूज् १ शब्दे; *Gr*. Kok-ku; *Lat*. Coe- *Lith*, Quaketi. ध्वनिशब्द. कोल्ह्याचा शब्द.]

कुकर पुं. कुत्रें. A dog.
[सं. कुर्कुर; पाप्रा. कुक्कुर ; बं. कुकुर ; ओ. कुकुर ; हिं. कूकर ; गु. कुकर.]

कुकरी स्त्री. सुरी, गुरख्याचें हत्यार. The *Kukari*, a dagger.
[सं. (?); हिं. कुकृरी = वांकडे केलेले सुताचे धागे.]

कुका(णें) अक्रि. ओरडणें, कोकणें. To cry, to bewail.
[सं. कू ६ शब्दे (अभ्यास), कुकार (कू + कार = शब्द).]

कुंकुम पुं. केशर, कुंकूं. Saffron, red powder.
[सं. कुंकुमम् ; याकाम. कुंकुम (ज्ञा. १५–३४९).]

कुंकूं म. तांबड्या रंगाची पूड. Red powder.
[सं. कुंकुम; गु. कुंकु, कंकु; सिंह. कुंगु; पं. कुंग्गु; का. कोंग ; हिं. कुंकुम् ; सिंह. कोकुं, कोकुम. हें मूळ केशर ; परंतु हळदीचीं कुडीं, टाकणखार, लिंबू, चुना वगैरेंमध्यें भिजवून लाल करवून त्याची पूड केली कीं तें कुंकू होतें. हें सौभाग्यवती स्त्रिया लावूं लागल्या. ह्याचेंहि कारण आपली प्रेयसी निवडल्याची खूण म्हणून तिच्या कपाळावर कुंकुमाचा तिलक लावण्याची चाल असे. पुढें तोच तिलक साभाग्याचें कायमचें चिन्ह होऊन बसला. ह्या शब्दावरून पुढील म्हणी रूढ आहेत. कुंकूं वाढणें = कुंकू संपणें ; परंतु ग्राम्यता परिहाराच्या वृत्तीनें स्त्रिया कुंकू संपलें असें कधीं म्हणत नाहींत. कुंकूं जाणें–पुसणें = वैधव्य येणें. कुंकवाचा धनी = नांवाचा नवरा.]

कुच पुं. स्त्रियांचें स्तन, थान. A woman's breast.
[*IE*. QEUQ, QUQ. = वक्रे ; सं. कुच् १ संकोचने (कुच, कुक्षि) ; *Slav*. Kuku (Hill); *Lith*. Kauker; *Teut*. Heah.]

कुचकुच स्त्री. अस्पष्ट शब्द, किंवा भाषण. A low subdued tone or sound or speech.
[सं. कुच् १ अव्यक्तशब्दे. ध्वनिशब्द ; कानाशीं कुचकुच करणें; कान. कुचु.]

कुचकुच(णें) अक्रि. कुजबुजणें. To whisper, to speak in a low tone.
[सं कुच् १ अव्यक्तशब्दे. कुचबुच—कुजबुज = हलक्या स्वराचें भाषण. Low, subdued speech.]

कुचंब(णें) अक्रि. अडचणींत सांपडणें, संकोचणें, कोमेजणें. To be caught in a fix, to be restless in pain and helplessness, to contract, to fade.

[सं. कु+शम् ४ उपशमे, कुस्म, कुस्मी, कुच्छ्रासनम्; याकाम. कुचंबणें (ज्ञा. १३-२४८.); अकामसा. कुचंबणा = आडकणें, आडकाठी, संकट.]

कुचर वि. चुकविणारा, चुकार. One who dishonestly spares to exert, evading.

[सं. कुच् १ संकोचने.]

-कुचराई स्त्री. कमी उत्साह, अळंटाळं. Fraudulent or lazy, sparing.

कुचाळ वि. निंदाखोर, थट्टेखोर. Vile, hateful, mischievous, one reviling or jeering.

[सं. कुत्साल, √कुत्स् १० अवक्षेपणे, कु-चाल ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं. अकामसा. कुचाळकी = निन्दा.]

कुचिळ न. मलीन वस्त्र. A dirty or soiled garment.

[सं. कु+चील, चीर = वस्त्र; याकाम. कुचिळें (उगी. १९२).]

कुज(णें) अक्रि. वाईट होणें, नासणें, सडणें. To rot, to putrefy.

[सं. कुथ् ४ पूतिभावे; पा. कुथ; प्रा. कुह; गु. कोहवूं. अकामसा. कुजका = कुजलेला ; कुजट = कुजकट.]

कुजंत्र, कुजांत्र न. वाईट यंत्र, प्राणघातक यंत्र, चेटूक, जादूटोणा. A magic figure, a charm.

[सं. कु+यंत्र, √यम् १ नियमने; याकाम. कुजांतर (दृ. ५४) = मंत्रतंत्र, जादुटोणे. ह्यामध्यें कांहीं आकृत्या काढून त्यांत कांहीं अक्षरें व अंक भरतात. त्या आकृतींना यंत्र म्हणतात. त्यांचा उपयोग जारणमारण–वशीकरण वगैरेंकडे करतात. ‘ य् ’चा ‘ ज् ’ होतो.]

कुंचा पुं. झुबका–केसांचा,–गवताचा. A bunch or bundle of grass, a brush or broom.

[सं. कूर्च, कुच् १ संकोचने ; प्रा. कुच्च (दाढी); बं. कुची, कुंची ; हिं. कुचा ; पं. कुच्च ; सिं. कुचा ; गु. कूचो, कुचडो ; याकाम. कुंचा = मारचेल (ज्ञा. १३–६५९); अकामसा. कुंचला–कुंचली = लहान कुंचा, कुंचल(णें)=कुंचला फिरविणें, साफ करणें.]

^{१}कुंची स्त्री. लहान मुलांचें टोपडें, रूमरू कपडा. A hooded cloak for children.

[कान. कुच्चु = गोंडा ; हिं. कुंची ; सं. कुंचिका ; प्रा. कुंचिया.]

^{२}कुंची स्त्री. किल्ली. A key.

[सं. कुञ्चिका; (उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.) गु. कुंची; हिं पं.सिं. कुंजी; का कुंञ; बं. कूञ्जी; ओ. कुञ्जी. कुची-टाळें चंद्रकरावें : उघडिती मठ शुक्तिकांचे ॥ नरुस्व ५०६.]

कुंज(णें) अक्रि. गाणं, गुं गुं करणें, शब्द करणें. To sing, to hum, to sound.

[सं. कुज् १ शब्दे. कुंजन = गुजन, गाणें.]

कुंजर पुं. हत्ती, केस. An elephant, hair.

[सं. कुंज = दन्त. ‘ कु पृथ्वीम् जरयति दन्तैः इति कुंजर ’ अशी व्युत्पत्ति देतात. ती चिन्त्य आहे. तुलु. कुजल = केस (डोक्याचे); कुंतल पहा. याकाम. कुंजर (ज्ञा. १६–३२५).]

^{१}कुंट(णें) सक्रि. मारणें, दाबणें, पूड करणें, धोपटणें, बारीक करणें. To pound, to thrash, to beat soundly.

[सं. कुट्ट् १ आघाते, कुट् ६ अवयवे ; पा. कुट्ट, कोट्ट ; प्रा. कुट्टइ; हिं. कुँटना; पं. कुट्टणा; बं. कुटा ; ओ. कुटिबा; गु. कुटवूँ; सिं. कुटणु; द्रा. कुटक, कुट्ट, कुट्टिसु = मारणें.]

^{२}कुंट(णें) सक्रि. तुडविणें, ठोकणें, चेंचणें. To pound, to thrash.

[सं. कुट् ६ कौटिल्ये, १० छेदने ; कान. कॉट्टण; तेल. कोट्टु; अकामसा. कुटण, कुट्टण कुट्टा = पीठ, चूर्ण, ठोक, मार. ‘ कुट्टा ’ ह्याचा विशेष अर्थ आहे = लाह्यांचें पीठ, तिळाची चटणी.]

कुटका पुं. तुकडा. A piece.

[सं. कुट्ट् = अवयवे; ‘ क ’ अल्पार्थें प्रत्यय; बं. कुट; हिं. कुट्टी; ओ. कुटा]

कुटकी स्त्री. वनस्पतिविशेष, कडू, विषारी औषधि. A kind of plant (poisonous).

[सं. कटुका; प्रा. कडुआ; कान. कटकी; हिं. कुटकी; गु. कडु; बं. कटूकी.]

कुटाळ वि. निंदा करणारा, टवाळी करणारा, कुचेष्टाखोर. Vile, hateful, mischievous, ever reviling.

[सं. कुट्ट् १० भर्त्सने ; अकामसा. कुटाळकी–कुटाळी–कुटाळगिरी ; कुटिल हा शब्द ताडून पहाण्यासारखा आहे.]

कुटिल, कुटीळ वि. वाकडें, दुष्ट, द्वेषी. Crooked or bent, vile, hateful.

[सं. कुट् ६ कौटिल्ये + ल (विशेषण प्रत्यय); गु. कुटिल; पं. कुटल.]

कुटी स्त्री. झोंपडी. A hut.

[सं. **कुटि** हा शब्द आस्ट्रोएशियाटिक आहे असें प्रिझुलुस्की सांगतो.]

कुटी स्त्री. निंदा, निंदेचें भाषण, दोष, हीनत्व. Reviling.

[सं. **कुट्** १० भर्त्सने; **कूट** = खोटें, याकाम. **कुटि** = दोष (अमृ. ७·१०५).]

कुटुंब न. घर, घरांतील माणसें, पत्नी. A family or household, wife.

[सं. **कुटुब**; देप्रा. **कुअण्डो**; गु. हिं. **कुटंब**, **कुटम**; पं. **कुटंब**, **कुटुम**; याकाम. **कुटुंबी**; द्रा. **कुडु** (नरुस्व७०७). हा शब्द आस्ट्रोएशियाटिक असल्याचें प्रिझुलुस्की सांगतो. ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे ह्याचें संस्कृतीकरण दोनदां झालेलें दिसतें. **कु+स्तुंब** > कुटुंब. कुटुंब शब्द पुनः संस्कृतमध्यें तत्सम म्हणून सामावला. प्रथम जमिनीची मशागत करणारा,–त्यावर निर्वाह करणारीं माणसें, स्त्री, मुलेंबाळें–पत्नी अशी अर्थाची परंपरा आहे.]

कुठें अ. कोठें पहा. Where.

[**कुठचे**, **कुठला**, **कुठें**, **कुठून**, **कुठोन** इत्यादि सर्वांत ‘ कुठ ’ हें रूप ‘ **कोठें** ’ ह्याचा संक्षेप आहे, व **कोठें** ह्याचा सं. **कुत्र**, किंवा **क्वस्थः** ह्या शब्दांशीं संबंध आहे. बं. **कोथा**; सिं. **कथी**, **किथी**; पं. **किथे**, **किथान**; ‘ **क्वस्थः** ’ ह्या शब्दाचें नपुं. प्र. द्वि. एक व. असावें असें ब्लोक म्हणतो.]

कुड–डो वि. खोटें; वाईट. False, bad, perfidious.

[सं. **कूट** ; ह्यापासून मराठींत दोन अपभ्रंश झाले आहेत : एक कुड, दुसरा खोटें, पैकीं ‘ कुड ’ हें काव्यांत विशेष वापरांत येतें.]

कुडक(णें) अक्रि. मोडणें. To break.

[कान. **कदुकु** = दाबणें, मोडणें.]

कुडकुड स्त्री. कठीण पदार्थ खातांना होणारा आवाज, कुरकुर, पिरपिर. Crackling sound, grumbling.

[सं. **कुड्** १ भक्षणे. परंतु हा ध्वनिशब्द आहे. –**कुडकुडणें** (नाधा.), **कुडकुडा,–ड्या** = कुरकुर करणारा.]

कुड, कूड पुंन. काटक्या व माती यांची भिंत. कच्ची भिंत. A wall of slight sticks or laths.

[सं. **कुड्य** = भिंत, आर्य लोकांच्या प्रथम वसाहतीच्या घराच्या भिंती कशा बांधीत याची कल्पना ह्या शब्दावरून येते. **कुडण** = कुंपण ; **कुडणें** = कुंपण घालणें.]

कुडतुड(णें) सक्रि. कुरतुडणें, अर्धेमुर्धें तोडणें. To nip off (with nails or teeth).

[सं. **कृत्** + **त्रुट्** ६ छेदने (द्विधातुसंयोग).]

कुडतें न. (ग्रामीण भाषा) सद्रा, अंगरख्याच्या आंतील पैरण. A jacket or short coat.

[फा. **कुर्ता** = सद्रा.]

कुडप(णें) सक्रि. दुमडणें, मुरडणें. To curl over, to crisp.

[सं. कुट् १ वैकल्ये + प (मराठी स्वार्थे प्रत्यय); हिं. **कुडुक** = सुताचा गुंडा,]

कुडबुड(णें) अक्रि. बडबडणें.

[सं. कुर् + ब्रू २ शब्दे. **ध्वनिशब्द**; अकामसा. कुडबुडें = वाद्य, **कुडबुड्या जोशी** = हें वाद्य वाजविणारा जोशी. एक रानटी जात.]

कुडव पुं. एक माप, दोन पायली इतकें माप. A corn-measure of two *pay̦alis*.

[सं. **कुडव**, **कुटप**. हा शब्द मूळ देशी असून त्याला संस्कृतमध्यें नंतर घेतला असावासें वाटतें.]

कुंडा, कूड वि. खोटा, वाईट, दुष्ट. False, perfidious.

[सं. **कूट** ; पा. **कूट**; प्रा. **कूड**; गु. **कुडुं** ; पं. **कुडुं** ; पं. **कुरा** ; सिंह. **कुळु**; गु. **कूड**; सिं. **कूरु** (= खोटें भाषण).]

कुंडा पुं. एक औषधि. A kind of medicinal plant. [सं. **कुटज**.]

कुडी स्त्री झोंपडी; देह, शरीर. A hut; the human body.

[सं. **कुटि** = देह, झोपडी; पा. **कुटि**, **कुटिका**; प्रा. **कुडी**; बं. **कुरिया**; ओ. **कुरिआ**; सिं. **किलि**; हिं. **कुन्ही** = घर.]

कुडी स्त्री. स्त्रियांच्या कानांतील एक दागिना. An ear-ring.

[सं. **कुटिक** = सोन्याचा दागिना. मराठी. **कुडुकमिडुक** हा शब्द ताडून पहाण्यासारखा आहे.]

कुडुबुडु(जोशी) पुं. हातांत ‘ कुडुबुडु ’ असा शब्द निघणारें वाद्य घेऊन भविष्य सांगणारा भिकारी. An instrument (and a beggar with it.).

[कान. **कुडु**, **बुडु**. **ध्वनिशब्द**. तसा ध्वनि काढणारें वाद्य.]

कुढ(णें) अक्रि. आंतल्या आंत धुमसणें, त्रासणें, खेद पावणें, मनांत रागानें जळफळणें. To fret, to grieve over inwardly.

[कान. कुडि = कढणें ; सं. क्रुद्ध > कुद्ध; क्रुष्ट ; गु. कूट ; पा. कोधो ; प्रा. कोहो ; ओ. कोहा ; गु. कोह; हिं. कोह ; अकामसा. कुधण–कुंधाण=संशयी–मत्सरी, खुनशी; कुधाणकी=मत्सर.]

कुणगा पुं. कोणास–विशेषतः वारसदार बंधूंस समजूं न देतां सांठविलेला पैसा, गुप्तधन, उपजीविकेचें साधन. A sum of money (suppressed or secretly kept by one of the sharers), a source of livelihood.

[सं. कण्डुग = माप. २० कोलग = २० हेरु = १२८ शेर.]

कुणबी पुं. शेतकरी, शेतीचा धंदा करणारा, महाराष्ट्रांतील शेती करणारा वर्ग. An individual of the agricultural class.

[सं. १ कुटुंबिन्. २ कुललंबि (कुल = दोन हलांच्या साह्यानें जेवढी जमीन नांगरली जाते तें. महाराष्ट्रांत दोन वर्ग आहेत. १ मराठा, २ कुणबी. मराठा हे शस्त्रधारी, कुणबी हे नांगरधारी.). कुणबट = (निंदार्थक) कुणबी. कुणबीण = कुणब्याची स्त्री, दासी (ह्याचा हा विशेष अर्थ आहे. ही बाजारांत विकली जात असे. हिच्यावर कर असे.]

कुंटण, कुंटीण स्त्री. वेश्या व जार ह्यांच्यामध्यें मध्यस्थी करणारी स्त्री. A go-between, a pimp, procuress.

[सं. कुट्ट् १० छेदनभर्त्सनयोः; सं. कुट्टिनी; प्रा. कुट्टिणी = दूती. कुट्टिनी हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे. बं. कुटनी; ओ. कुटणी; हिं. कुटणी; गु. कुट्टणी; अनुस्वार मराठींत कसा आला ? द्वित्त 'ट्ट'ची भरपाई अनुस्वारानें केली असावी. अकामसा. कुंटीणकी, कुंटिणखाना. कुंटिणमावशी, कुंटिणगिरी.]

कुंठ(णें) अक्रि. अडणें, थांबणें, अडथळा होणें. To be stopped or detained.

[सं. कुंठ् १ प्रतिघाते.]

कुण्ड न. पाण्याचें डबकें, सांठा, लहान हौद. A pool, a well.

[कान. कुण्ड = भोंक, छिद्र; गु. हिं. कंड; सिं. कनि; पं. कुनाल; सिंह. केडिय; परंतु हा शब्द आस्ट्रोएशियाटिक असल्याचें प्रिझुलुस्की सांगतो. नंतर त्याचें संस्कृतीकरण झालें. सं. कुण्ड; प्रा. कुण्ड; कुण्ड = अग्नि ठेवण्याचें भांडें, अग्निकुंड; देप्रा. कुंड्य = लघुभाण्डम्; कुण्डा = भांडें.]

कुण्डल न. कानांतील दागिना. An ear-ring.

[सं. कुण्डलम्; प्रा. कुंडल; गु. पं. कुंडळ; सिं. कुंढलु, कुनिरु; हिं. बं. ओ. कुंडल; सिंह. कोण्डोल्.]

कुंडलिनी स्त्री. (योगशास्त्र) शरिरांतील सहा चक्रांपैकीं मणिपूर नांवाच्या चक्राजवळ असणारी नाडी. हिचा आकार सापासारखा आहे असें समजतात. *The kundalini* (in Yoga shastra.)

[सं. कुंडलिनी.]

कुंडली–ळी स्त्री. ग्रह दाखविण्याचें कोष्टक, राशीचक्र. A figure divided into square or triangular spaces drawn to exibit the positions of planets.

[सं. कुंडलिनी.]

कुण्डा पुं. भांडें, लहान वाटोळें भांडें. A large open-mouthed jar.

[सं. कुण्ड; देप्रा. कुंड्य (लघुभाण्डम्); द्रा. कुण्ड > कुट > कुडु = (गोळा). कुण्ड पहा.]

कुंडी स्त्री. रोपटें लावण्यासाठीं मातीचें भांडें. A vessel of stone or earth, a pot for a flower-plant.

[सं. कुण्ड; पा. कुण्डिका; प्रा. कुण्ड; अकामसा. भाण्डींकुण्डीं.]

कुतनी, खुतनी स्त्री. गर्भरेशमी पट्ट्याचें कापड. A kind of cloth half silk, half cotton, and striped.

[अर. खुत्नी.]

कुत्रा पुं. प्राणीविशेष, श्वान, सारमेय. A dog.

[सं. कुर्कट, कुक्कुट. कुक्कुर. उत्तरकालीन संस्कृतीकरण(?); द्रा. कुक्, करल, कोरल, कूगु ; √कुरे – आवाज करणें ; सं. कुर्कुर (√कुर् शब्दे.); प्रा. कुत्तु, कुत्ती ; गु. कुत्रो ; हिं. कुत्ता, कुक्कुर पासून ह्याची व्युत्पत्ति नीट लागत नाहीं. दोन्ही शब्द भिन्न आहेत. ते अव्वल देशी भाषेंतील असावेत. कुत्र्याशीं संबद्ध असे वाक्प्रचार पुढीलप्रमाणें रूढ आहेत. कुत्रा हाल खाईना=फार वाईट परिस्थिति. कुत्र्याचे पाय मांजरावर व मांजराचे पाय कुत्र्यावर=वाईट चिडबीड ; नाहीं नाहीं त्या भानगडी ; कुत्र्याची मौत=कुत्र्याचें मरण. वाईट परिस्थिति येऊन मरणें ; कुत्र्याचें मूत=छत्री, चिडका मनुष्य ; कुत्र्याचें शेपूट=वाकड्या स्वभावाचा मनुष्य.]

कुथ(णें), कुंथ(णें) अक्रि. मोठ्यानें कण्हणें, त्रास होणें. To utter a forced sound, to make strenuous efforts.

[सं. कुथ् १ हिंसाक्लेशनयोः; अकामसा. कुंथाकुंथी = श्रम, खटपट.]

कुद(णें) अक्रि. उड्या मारणें, खेळणें. To leap, to spring, to jump.

[*IE*. QRD, QERD; *Lat*. Card; *Eng*. Cardinal (?); सं. कुर्द्; प्रा. कुद्द; देप्रा. कुद्दणो रसकः (८४-५); गु. कुदवूँ; सिं. कुडणु; पं. कुद्दणा; हिं. कूदना; बं. कुदन; ओ. कुदिबा.]

कुदव(णें) सक्रि. दमविणें, खेळून दमणें, खेळवणें, खोड काढणें. To exhaust, to be tired in play.

[म. कुदणें = (णिच्रूप); अकामसा. कुदक(णें), कुदल(णें) = धसपस वापरणें, मारणें.]

कुदळ स्त्री. जमीन खणण्याचें हत्यार. A hoe.

[द्रा. (तद्भव) कोडालि < कुठार (?), कुट्ट = कापणें > कट्टु, कुडु; सं. कुद्दाल, कुद्दार. (कान. गुद्दली = कुऱ्हाड, पिकाव). कु = पृथ्वी, दल् = विदारण; प्रा. कुट्टाल (पुं.); पा कुद्दालो; हिं. कुदाल; गु. कोदालो; सिं. कोडॢी; पं. कुद्दाल; बं. कोदाल; म. भांडकुदळ मधील कुदळ हा शब्द निराळा.]

कुन्हा पुं. मत्सर, दोष, तेढ, खोड, मर्म, खोंच. Grudge, spite, malice.

[अर. कुन्ह्, -कुन्हारणें = मारणें, कुन्हेबाज = खुनशी; पेकाम. कुन्हा (रा. १२-८७).]

कुप, कुंप, कुपण, कुंपण पुं.न. सभोंवतालचें कूड, बंदिस्त आवार, बांध. A hedge, a fence.

[*IE*. Qup = Convex or concave bend; सं. कूपः, √कुप्; *Av*. Kaofa (hill); *Gr*. Kubos (cube); *Lith*. Kupa; याकाम. कुंप (नरुस्व. ७८०).]

कुपथ पुं. वाईट मार्ग. A lax or devious path or course.

[सं. कु (= वाईट) + पथिन् (मार्ग). **अपथ्य** पहा. कु + पंथ = वाईट मार्ग. कु + पथ्य = वाईट अपायकारक (< पथि भवम् पथ्यम्), कुपात्र = अपात्र.]

कुपरी स्त्री. वाईट संगत. Bad company. आच्छादन. A cover.

[सं. कु = वाईट; परी = प्रकार; याकाम. कुपरि (ज्ञा).]

कुप्पी स्त्री. बाटली, कातड्याची पिशवी. A sort of bottle (of glass or leather).

[सं. कूप, कुतुपः, कूपक; प्रा. कुपय; बं. कुपी; गु. कुप्पो; सिं. कुप्पे; कान. कोप्पे = लहान भांडें. कुपींतली गोष्ट = गुपित गोष्ट. कुपित (फार्सी).]

कुफरांड, कुफराण न. आळ, आरोप, कुभांढ, लबाडी. A false accusation.

[अर. कुफ्र = स्वामिद्रोह, निमकहरामी, कुफ्फार (काफीरचें अ. व.), कफूर = नास्तिक; कुफर = स्वामिद्रोह, कुफार = लुच्चा; पेकाम. कुफ्राण (ऐस्फुले. ६५).]

कुबड न. पाठीचा बाक, पाठीवरील आवाळू. A humpback or a hump on the back.

[सं. १ कुब्जः; प्रा. कुडिल्ल; देप्रा. कुब्बडा (< कुब्र), खुज्जो; २ सं. कुभ्रः; गु. कुब्डू; सिं. कुब्रु, कुबो; पं. कोझा; हिं. ओ. कुंजा; बं. कुंजो. खुजा व कुबडा हे दोन्ही मराठी शब्द एकाच संस्कृत शब्दापासून निघाले. खुज्जा = उंचीनें लहान (स्वाभाविक); कुबडा = पोंकामुळें उंची कमी झालेला.]

कुबडा, कुबडी स्त्री. पाणगोगलगाय. A sort of water-snail.

[सं. कुभ्र = वशिंड असलेला बैल; गु. कुबडो; सिं. कुबो; पं. कुब्बा; का. कोब् (बु); हिं. कुब्बा, कुबरा. ह्या शब्दाहून अगदीं निराळे खुजा, कुब्बा वगैरे शब्द आहेत. खुबा = आवाळु, पुठ्ठा हा शब्द ह्या संबंधांत चिन्त्य आहे.]

कुबडी स्त्री. गोसावी-बैरागी-रामदासी यांची दुबेळकी असलेली काठी. A crutch, leaning staff.

[सं. कुभ्रः (?).]

कुब्जा स्त्री. कुबड निघालेली स्त्री, पोक येऊन शरीर पुष्कळ ठिकाणीं वाकडें झालेलें आहे अशी स्त्री. Humpbacked woman.

[*IE*. Qub, Qubh; सं कुब्ज; *Av*. Kaofa = hill; *Gr*. kupos; Kub; kup (Kuboo etc.); *Lat*. Cub (Cubare); gibbus; *Lith*. Kupa; *Slav*. Kupu = heap; सं. कूप; म. कुबा. इत्यादि ह्याला संबद्ध आहेत. याकाम. कुब्ब (ज्ञा. १८-९२७).]

कुबेर पुं. श्रीमंत माणूस (लक्षणा), दिक्पाल, देवांचा कोषाधिकारी A rich man, the Indian Plutus.

[सं. कुबेर, √कुम्ब् किंवा कु + वेर.]

कुभांड न. आळ, खोटा आरोप, कट, कारस्थान. A false accusation a false charge.

[सं. कु + भांड (?); फा. कुफराण (?).]

कुमक स्त्री. मदत, साह्य, पाठपुरावा, उपराळा. Assistance, succour.

[तुर्की. कुमक्.]

कुमर पुं. मुलगा, कुमार. A boy (unmarried).

[सं. कुमार; कुम् मारयति = पृथ्वीला ताडन करतो तो. लहान मुलांची ही खोड आहे. ह्याचा विशेष अर्थ राजपुत्र. दुसरा अपभ्रंश ' कुवार ' असा आहे. कुमार पहा.]

कुमाउत, कुमाईत, कुमायत वि. एक विशेष प्रकारच्या रंगाचा घोडा, त्याचें सर्व शरीर तांबूस परंतु पाय, कान, आयाळ हे काळे असतात. Bay (a horse).

[अर. कुमैत ; पेकाम. कुमैत (खरे १·३१२). इतर रूपें-कुमेत, कुमैत, कुमेद.]

कुमार पुं मुलगा, मूल, विशेष अर्थ-राजपुत्र, कार्तिकस्वामी. A boy (unmarried).

[१ कुमारयति-नन्दति यस्मिन् सति ; २ कुत्सितः मारः कन्दर्पो यस्मात् कार्तिकेयः; ३ कुमारयति क्रीडति; ४ कु=पृथ्वी, मारयति-ताडयति. ह्याचे दोन अपभ्रंश-कुमर, कुवार ' असे मराठींत रूढ आहेत. संस्कृत व्युत्पत्ति मात्र कृत्रिम दिसते.]

कुंभ पुं. घडा, मातीचें भांडें. A water jar or pitcher.

[सं. कुंभ, कु = पृथ्वी (कुं भूमिं उम्भति जलेन); गु. पं. हिं. कुंभ ; सिं. कुंभु कुंबु ; सिंह. कुंब; कुंभमेळा= कुभ राशीस गुरु येतो त्यासमयींचा योग. ह्या योगाच्या पर्वणीस प्रयागास मेळा भरतो. कुंभविवाह = घटाशीं लग्न. अनिष्ट ग्रहानें येणारें वैधव्य टाळण्यासाठीं हें लग्न करतात.]

कुंभक पुं. प्राणायामांतील वायूची एक अवस्था, आंत घेतलेला श्वास. Breath with closing the nostrils and mouth so as to suspend breathing.

[सं. कुभक (कुम्भ इव कायति प्रकाशते). स्तंभक व रेचक अशा इतर दोन त्याच्या अवस्था आहेत.]

कुंभार पुं. मातीचीं भांडीं तयार करणारा. A potter.

[सं. कुभ + कार; प्रा. कुम्भआर; कुम्भार; गु. कुंभार; सिं. कुंभरु; पं. हिं. कुम्हार; ब. कुमार; सिंह. कुंबुरु. कुम् (पृथ्वीम्) मारयति (तुडवितो) तो. ' कुमार ' ह्यांत वर्णागम होऊन ' कुंभार ' हा शब्द झाला व ' कुंभकार '. असें त्याला संस्कृत स्वरूप दिलें. परंतु ही विचारसरणी पटत नाहीं. व्युत्पत्ति कृत्रिम आहे.]

कुरकर(णें) अक्रि. कांकूं करणें, पुटपुटणें. To grumble, to murmur.

[ध्वनिशब्द, सं. कुर्, √कु ६ शब्दे (द्वित्व); देप्रा. कुरुकुरिअ; अकामसा. कुरकुर, कुरकरीत, कुरघोडी= खेळण्यांतील एक प्रकार. एका मुलानें ओणवा होऊन दुसऱ्यानें त्याच्या पाठीवर बसणें (लक्षणा).]

कुरडूं न. स्त्रियांच्या कानांतील एक मोत्याचा दागिना. An ear-ring of females.

[कान. कुरडु (?).]

कुरडूं स्त्री. एक प्रकारची वनस्पति. A kind of plant.

कुरण न. गवताची जमीन. A meadow, a ground preserved for grass..

[सं. कु + अरण्य; प्रा. कु + रण्ण; अकाम. ग्रा. कुराण.]

कुरनिसा, कुरनिसात स्त्री. नमन, नमस्कार, सलाम. Profound salutation, obeisance.

[तुर्की. कोर्निश (अनेकवचन = कोर्निशात्); पेकाम. कुर्निसी (ऐस्फुले. ७५).]

कुरवाण,-न न. उतारा, बळी, ओवाळून टाकलेला जिन्नस. An article waved round a person and thrown away.

[अर. कुर्बान्.]

कुरबूर स्त्री. बोलाचाल, अस्पष्ट पुटपुट. Fuming, chafing, muttering through anger.

[ध्वनिशब्द, √कुर ६ शब्दे, + भृ ३ भर्त्सने; अकामसा. कुरमूर = धुसफूस. (< कुर् + मूर्च्छ्).]

कुरमुरा पुं. चिरमुरा. Parched rice.

[ध्वनिशब्द आहे काय ?]

कुरवंडी स्त्री. ओवाळणी, आरती (वाईट दृष्टि नाहींशी करण्यासाठीं). The waving of lamp around an idol or person.

[सं. क्रूरदृग्वर्धनम् (?); कान. कूर = प्रेमकरणें; वंडी = वाटिका; याकाम. कुरोंडो, कुरौं (ज्ञा. ४·१०८). संस्कृत शब्द उत्तरकालीन संस्कृतीकरण दर्शवितो.]

कुरवाळ(णें) सक्रि. तोंडावरून-अंगावरून प्रेमानें-ममतेनें हात फिरविणें. To pass the hand over (the face or body of a child).

[सं. कृपालु (नाधा.); कान. कूर = प्रेम करणें.]

कुरळा वि. वाकडा केस. Curled hair.

[सं. कुरुळ, (कुरर √कु = शब्दे); देप्रा. कुरुलो (कुटील केश); कान. कुरुळू = केस, केसांचा झुबका. कानडीमधून आला हें ग्राह्य. देशी म्हणून हेमचंद्र देतो. संस्कृतीकरण हें अर्थात् नंतरचें. कुरळी = धोतराच्या शेवटीं असलेले धागे, केसांसारख्या दशा.]

कुराड, कुऱ्हाड स्त्री. लोखंडी फरशी. A hatchet, an axe.

[सं. कुठार (कोठति अनेन); प्रा. कुढार (पुं.), कुहाड; गु. कुहाडो; सिं. कुहारो; पं. कुहारो, कुल्हारा; बि. कोडार; बं. कुऱ्हाडी; ओ. कुऱ्हाडी, कुटाडी. म. कुऱ्हाड (वर्णविपर्यय).]

कुरापत स्त्री. खोडी, कुचाळी, कुचेष्टा. Redicule, a joke, a secret :foible, an error, a slip.

[अर. कर्रा (पैज) + आफत्; सं. कु+आपत्ति(?).]

कुरी स्त्री. बीं पेरण्याचें एक अवजार. A drill-plough.

[कान. कुरिगे=बैलांनीं ओढण्याचें एक पेरण्याचें यंत्र; कुर=हत्याराची तीक्ष्ण धार, पातें, टोकाचें हत्यार.]

¹कुरूप वि. व्यंग–कमीपणा असलेला. Having a deformed or ugly face.

[सं. कु + रूप (कु इषत् रूप्यम्).]

²कुरूप न. कांट्यानें केलेलें पायांतील घर. A bump or sore occasioned by a thorn.

[कान. कुरुवे = गळूं, क्षत.]

कुरूप(णें) अक्रि. चढणें, वाढणें, क्षोभणें. To aggravate, to grow, to excite.

[कान. कुरुवें; याकाम. कुरुपणें (ज्ञा. १६-३९४).]

कुऱ्हाड स्त्री. लोखंडाचें हत्यार. An axe, a hatchet.

[म. **कुराड पहा. आकाशींची कुऱ्हाड**=मोठें अचानक संकट. **कुऱ्हाडीचा घाव** खोट्याचे कपाळीं=वाईट कृत्यें करणारास शिक्षा; **कुऱ्हाडीचा दांडा** गोतास काळ=कुऱ्हाडीचा दांडा लाकडाचा असतो व आपलें गोत म्हणजे लाकूड तोडण्यास तो मदत करतो. त्यावरून स्वजनाचा शत्रु.]

कुर्रा पुं. गर्व, ताठा, अभिमान, ऐट. Airs, affectation, foppery.

[अर. **कुर्रा=पैज**; अकामसा. **कुर्रेबाज**=ऐटदार, आकडबाज, सोंगट्या खेळणारा.]

कुऱ्हें वि. वाकडें. Crooked.

[कान. कुरूवे; याकाम. कुऱ्हें (ज्ञा).]

आणि आपुली माय। कुब्ज जरी आहे। तरी जीजें तें नव्हे। स्नेह कुऱ्हें कीं ॥ ज्ञा. १८–९२७.

कुल वि. सर्व, झाडून सारें. All.

[अर. **कुल्ल्**=सर्व; अकामसा. **कुलअखत्यार**=सर्व सत्ता (**कुल्ल्अख्तियार**), **कुल्कारभार**=सर्व कारभार; **कुलबाब, कुलकानु**=सर्व कर, पट्टया, कायदे; **कुली**=सर्व, तमाम, सर्वस्वी.]

कुल न. जाति, ज्ञाति, वंश. Family, race, tribe.

[सं. कुल, √कुल् १ संहतौ.]

–कुलकंटक–कलंक वि. वंशाला कमी आणणारा. A troubler to his family.

–कुलक्रम,–धर्म पुं. कुलाचार. A religious practice descended through family.

–कुलगुरु पुं. कुलाचा आचार्य. A family priest.

–कुलज वि. कुलामध्यें उत्पन्न झालेला. Born in a family.

–कुलदैवत न. कुलाचें अधिष्ठातृ दैवत. Family diety.

–कुलपति पुं. विश्वविद्यालयाचा मुख्य आचार्य (अर्थाचें विशेषीकरण). The chancellor.

–कुलपरंपरा स्त्री. कुलाची वंशावळ. A series of generations in a family.

–कुलवधू स्त्री. कुलास भूषणभूत अशी स्त्री. (अर्थाचें विशेषीकरण). A woman of good family.

–कुलवान् वि. चांगल्या कुळांत जन्मलेला. (अर्थाचें विशेषीकरण). Born in high family.

–कुलहीन सेवा स्त्री. हलक्या कुळांतील मनुष्याची नोकरी. Service of a low-born person.

–कुळीण वि. चांगल्या कुळांतील. Born in high family.

कुलकरणी पुं. गांवांतील पाटलाचा कारकून, गांवांतील सर्व कुळांचा–शेतीच्या खात्यासंबंधीं हिशेब ठेवणारा.

[सं. **कुल + करण. कुल=जमीनीचा भाग**; दोन नांगरांनीं नांगरतां येण्याइतका. हलद्वयेन यावती भूमिः कृष्यते तावती भूमिः–मनु ७–१११. करणः=लिखनवृत्ति (श. क. १५२). कर्णिक, तलाटी वगैरे शब्द समानार्थी आहेत.]

कुलंगें वि. गिड्डा आणि केसाळ. Small and thickset (hairy).

[फा. कुलंग=एक मोठें कोंबडें. कुत्रा, व घोडा ह्यांसंबंधीं हा शब्द विशेष वापरतात.]

कुलपी, कुल्फी वि. गुप्त, बंदिस्त. Secret, hidden.

[फा. कुल्फ = गुप्त ; **कुलपी गोळा** = विषारी द्रव्याचा गोळा (तोफेचा); **कुलपी** विडा = साहित्य घातलेला विडा.]

कुलाबा पुं. भूशिर, जमिनीचा समुद्रांत शिरलेला भाग, मूठ, दांडी. A neck of land running into the sea, a handle or hook.

[अर. कुलाब्=आंकडा, पकड.]

कुलाल पुं. कुंभार. A potter.

[सं. कुलाल (**कुं पृथ्वीम् लालयति** किंवा **कुलं आलाति** (शब्दकल्प. १५४); याकाम. कुलाल (ज्ञा. १८–३११.)]

कुली पुं. मजूर, ओझेवाला, बिगारी. A coolie.

[ह्या शब्दाच्या मुळाबद्दल बराच मतभेद आहे. कांहीं विद्वान् ह्याचा संबंध ' **कोळी** ' ह्या जातीशीं जोडतात. '**कोळी**' ही एक ग्रामीण जात आहे. निकृष्ट थरांवरील आहे. खेडेगांवांत हे लोक पाणी भरणें, चुना तयार करणें, जेवणास निमंत्रण करणें वगैरे कामें करतात. कोळी हा एक बलुतेदार आहे. त्यांचा आणि ' **कोळ** ' नांवाच्या द्राविडी लोकांचा कांहीं संबंध आहे का ? *Slave* हा शब्द तुलण्यासारखा आहे. कानडी, तामीळ भाषांत **कुलि = भाडें** हा शब्द आहे. ह्यापासून वरील शब्द आला असावा असें विल्सन् म्हणतो. तुर्की आणि उसमान्ली भाषांत ' **कोल = गुलाम, पुरुष गुलाम** हा शब्द आहे.]

कुलित्थ, कुळीथ पुं. धान्यविशेष, हुलगे. A kind of corn, vetch.

[सं. कुलत्थ. कुल(?) + त्थ. पहा अश्वत्थ, कपित्थ.]

कुलुली, कुलोली स्त्री. माज, खाज, उन्माद, आरडाओरड. The heat or desire (in a mare), the excitement, the cry.

[सं. **कल्लोल (?)**. कलोली पहा.]

कुल्ला पुं. ढुंगण, टिरी. A buttock.

[सं. (?); देप्रा. **कुल्ला च्छिन्नपुच्छः** (९२·५); गु. **कुलो** ; हिं. **कूला** ; पं. **कूला** ; **कुल्यास पाय लावणें** = पळून जाणें, **कुल्ले थोपटणें**=आनंदानें नाचणें, **मातीचे कुल्ले**= उसनें, खोटें अवसान.]

कुंवर पुं. लहान मुलगा. A boy (unmarried).

[सं. **कुमार, कुमारी** (स्त्री); प्रा. **कुमार, कुमर** ; गु. **कुवर, कुवेर** ; सिं. **कुंयारो** ; पं. **कंवर, कंवार** ; पपं. **कुंवार** ; हिं. **कुंवर** ; सिं. **कुमरुवा** ; कुमार पहा.]

कुवसा, कुंवसा पुं. आश्रय. Support, shelter.

[सं. **कुक्षि**; प्रा. **कुच्छी, कुक्खी**; याकाम. **कुवसा, कुंवसा, कुवासा, कुंवासा, कुवांसा**; (ज्ञा. ६-१२५, १२-१७८, १७-१३४); शिकाम. **कुवसा**; हे सर्व शब्द ' **आश्रय** ' ह्या अर्थी आहेत. अकाम. **कूस**.]

तुका म्हणे चिंता नाहीं तुझ्या दासा । तूं त्याचा कुवसा सर्वभावें । तु. अ.

कुवा पुं. विहीर. A well.

[*IE*. QUP, QUB=उद्यमने; सं. **कुप्** ; **कूप्** (**कु ईषत् आपः यत्र (कुंभः, कूबर, कुब्ज)**; *Av*. Kaofa = टेकडी; *Per*. Kaufe ; फा. **कोह् = टेकडी**; *Lat*. Covare; लिथू. **कूप** ; स्ला. **कुम्प** = वशिंड ; गु. **कुवो**; सिं. **खुहु**; का. **खुह्** ; पं. **खूह, कुआ**; हिं. **कूआ**; ने. **कुआ**; बं. ओ. **कूआ**; याकाम. **कुवा** (ज्ञा).]

कुवाड–डें न. कोडें, कूट प्रश्न, गूढ, आश्चर्य. A riddle, a secret, a wonder.

[सं. कु + **वाद,**√**वद्** ; याकाम. **कुवाडें** (ज्ञा.४–१४३).]

–कुवाडें पवाडें न. चुगल्या. Telling tales.

[सं. **कुवाद + प्रवाद**.]

–कुवेडें न. तोडगा, टाणाटोणा. An unauthorized spell or charm.

[सं. **कुविद्या (?)**.]

कुवार वि. लग्न न झालेली (मुलगी). A girl (unmarried).

[सं. कुमार ; पा. **कुमारो** ; प्रा. **कुमार, कुमर** ; ओ. **कुऑंरी** ; हिं. **कूँवार** ; पं. **कॅवारा** ; गु. **कूंवारूं** ; अकामसा. **कुवारीण** = अविवाहित मुलगी (सं. **कुमारी**, प्रा. **कुवाँरी**); **कुवार सवाशीण** = कुमारी सुवासिनी.]

कुशल वि. सुखरूप, खुशाल, निपुण. Happy, well, that is in ease, skilful.

[सं. **१ कुश् + वृषादित्यात् कलन्** ; **२ कुं पापं शलतिः ३ कुश + ल (**√**लाति-गृह्णाति). दर्भ-गवत** तोडणारा. यज्ञ कर्मांत दर्भ तोडण्याचें एक काम असे. तें चांगल्या रीतीनें करणारा हा मूळ अर्थ. त्यावरून लक्षणेनें निपुण, तरबेज हा अर्थ आला. ही व्युत्पति मम्मटानें आपल्या काव्यप्रकाशांत (उ. २) दिली आहे. परंतु हिनें समाधान होत नाहीं. ह्यात पाण्डित्यप्रकर्षच अधिक दिसतो. खुशाल हा शब्द निराळा व तो **खुष + हाल** पासून आहे.]

कुशी स्त्री. पोट, उदर, शरीराची एक बाजू, कूस. The side of body, a rib, (hence) belly.
[सं. कुक्षि ; प्रा. कुच्छि.]

कुश्चल-ळ, कुश्चीळ वि. वाईट चालीचें, मलिन, अपवित्र. Loose, licentious, dirty, detestable.
[सं. कु. + चल्.]

कुष्ठ नं. कोड. White leprosy.
[सं. कुष्ठ, √कुश् ; कुष्णाति शरीरस्थशोणितं विकुरुते ; याकाम. **कुष्टिया** = कोडी (ज्ञा. १८–१३६).]

कुसकर(णें) सक्रि. बारीक करणें, चेंदामेंदा करणें, चेंगरणें. To squeeze, to knead, to crumble, to crush.
[सं. कुच् १ अल्पीकरणे, ६ संकोचने. **कुसकरा** = बारीक चुरा. **कुस्करी** = भांडण (ध्वनिशब्द. ‘ मस्करी ’ चा प्रतियोगी. मस्करीची होते कुंस्करी).]

कुसमुस(णें) अक्रि. त्रास होऊन निराश होणें, आंतल्या आंत जळफळणें. To sob, to murmur and mutter.
[सं. कुस् १० क्रोधे + मुह् ४ वैचित्ये; मूर्च्छ् ६ मूर्च्छने. **कुसमुस** = धुसफुस.]

कुसर स्त्री. कौशल्य, सूड, डाव. Skill, art, cleverness, vengeance, revenge.
[सं. कुशल, (?); २ फा. **कुसूर** = चुकी; याकाम. शिकाम. **कुसरी** = कौशल्य (ज्ञा. १५४२, तु. अ). ह्यावरून असें वाटतें कीं ‘ **कुसरी** = कौशल्य ’ हा शब्द फारसीउद्भव नाहीं. आर्य किंवा द्राविड असला पाहिजे. ‘ **कुशल** ’ पासून निष्पादन नीट होत नाहीं. ‘ **र** ’ ची उपपत्ति नीट लागत नाहीं. **कुसरी**=श्रेष्ठत्व, चेटकी स्त्री.]

कुसुंबा पुं. रंगविशेष. (मूळचा अर्थ–अफूच्या अर्कांचा काढा). A kind of colour.
[सं. कुसुंभ, √कुस् (कौ पृथिव्याम् सुम्भति–शोभते); गु. **कसुंभो**; सिं. **खुहुंबो**; पं. **कुसुंब, कुसुंभ, कुसुम्ह**; हिं. **कुसुंब, कुसुम**.]

कुंसळ न. गवताची बारीक काडी, टोंक. Bristle of grass. A pricking stick of grass.
[सं. कुश + ल.]

कुंसुळ स्त्री. चेटकीण. A witch, a sorceress.
[सं. कुशल = क्षेम (?); पं. हिं. **कुसल** = निरोगीपणा; गु. **कसळियुँ** = सांथ, पटकी.]

कुसूं न. घराची भिंत, दाराचें टोंक (खालचें). An enclosing wall of a house, a tenon.
[सं. १ कक्ष ; प्रा. कच्छ, कुक्षम् (?); प्रा. कुच्छँ > कुसँ > कुसूं ; २ कुस् १ संयोजने ; कान. **कुसि** = कुसूं.]

कुसूर, कुसुरी स्त्री. उणेपणा, दोष. Deficiency, a defect.
[अर. **कुसूर** = चुकी.]

कुह(णें) अक्रि. कुजणें, वाईट होणें, सडणें. To rot, to petrify.
[सं. कुथ् ४ पूतिभावे; प्रा. **कुह** = सडणें; याकाम. **कुहणें** (ज्ञा. १७-१५४), याकामसा. **कुहिलें** = नासलेलें, कुहिज(णें) = कुजणें, कंटाळणें (लक्षणा), **कुहिजक** = कुजलेलें; **कुहिदुळी** = नासकीकुजकी घाण (ज्ञा. ६-२१६).]

कुहर न. भोंक, गुहा, खांच, आगर, कोठार, धुकें. A cavern, a cave, a ditch, a hollow space, a receptacle, fog.
[सं. **कुहरम्** (कुं भूमिं हरति ; √ कुह्–विस्मायने); हिं. **कुहर, कूहा** = धुकें ; याकाम. **कुहर** = बीळ, गुहा (ज्ञा. १८·१७५२).]

कुहा स्त्री. कूप, विहीर. A well.
[सं. कूप; याकाम. **कुहा** (ज्ञा. १४·३९०). कुवा पहा.]

कुही वि. डोंगरी. Mountainous, wild.
[फा. **कोह** = पर्वत.]

कुहिरी स्त्री. वनस्पतिविशेष, खाज उत्पन्न करणारी पर्वतावरील वनस्पति. A kind of pricky plant.

कुहू स्त्री. अमावास्या. The *amavasya* day, the 30th day in a month.
[वैसं. **कुहू** = **अमावास्या**; द्वे ह वा अमावास्याः–पूर्वा सिनीवाली, उत्तरा कुहूः.]

कुळ, कूळ न. वंश, कुटुंब. Family, lineage.
[सं. **कुलम्** ; प्रा. कुल (पुंन); गु. ओ. कुळ; सिं. **कुलु**; पपं. **कुल्ल**; हिं. कुल (?). कुल पहा. **कुळकट** = कुळाची हकीकत, वंशवृक्ष–वंशवृत्त ; **कुळदीप** = कुळाला तेज प्राप्त करून देणारा ; **कुळवंत** = चांगल्या कुळांतील ; **कुळी** = वंश, गोत्र.]

कुळकणी स्त्री. चातुर्य. Skill.
[सं. कुल; याकाम. **कुळकणी** (ज्ञा. १-११३).]

कुळकर्णी पुं. कुलकर्णी पहा.

कुळथ, कुळीथ-द पुं. धान्यविशेष. A kind of corn.

[सं. कुलत्थ; प्रा. कुलत्थ (पुंस्त्री.) कुल + त्थ.]

कुळंबी पुं. शेतकरी, कुणबी. An agriculturist, a farmer.

[सं. कुटुंबिन्, कुललंबिन्, कुल = जमीन, जमीनीवर उपजीविका करणारा; अकामसा. कुणबट = कुणबी (निन्दा-व्यंजक), कुळवाडी = शेतकरी, कुणबी; (कुल + वृत्ति; देप्रा. वाडी); कुळारग = शेतसारा देणारीं कुळें, वतनदार.]

कुळव पुं. जमीन नांगरून पेरणीसाठीं तयार करण्याचें अवजार. An instrument for levelling ploughed land.

[कान. कुळ = नांगराचा फाळ; सं. कुल = दोन नांगरांनीं नांगरतां येण्याइतकी जमीन.]

कुळवाडी पुं. स्त्री. कृषिकर्म, शेतकी, शेतकरी. Farming, a farmer.

[सं. कुलवृत्ति; देप्रा. कुळवाडी; याकाम. कुळवाडी (ज्ञा. ६-४४८); शिकाम. कुळवाडी (तु. अ.).]

कुळवें, कोळवें न. धान्य मापण्याचें साधन, एक माप. A measure.

[सं. कुडव (√कुड्, कुण्डति परिमाति अनेन अस्मिन् वा); प्रा. कुडव (पुं.).]

कुक्षि,-क्षी पुं. बाजू, कूस, पोट. A side of the body, a flank, the belly.

[*IE*. QEUQ, QUQ; सं. कुक्षि, √कुश्, √कुच् १ संकोचने (इतर सिद्ध शब्द : कुच, संकोच, कुक्षि.); *Lith*. Kaukara = hill; *O.Slav*. Kuku = hill, ह्या धातूशीं संबद्ध असलेले *Eng*. Huge, high, how, hill, hug हे शब्द होत. कूस पहा.]

कूकू अ. कुत्र्यास बोलावण्याचा शब्द. A word or sound to call a dog.

[ध्वनिशब्द. सं. कु. १ शब्दे. (इतर शब्द–कूजन, कुकू, काक, कख्ख, कुक्कुट, कवि, कोकिळ).

IE. QE, QU, QU; *Gr*. kak; *Lat*. Cach, coc; *Lith*. Quaketi = to croak. *AS*. cocc; *MEng*. Cukkoo, &c.]

–कूक(णें) अक्रि. ओरडणें. To cry.

कूच, कुच न. मजल, प्रयाण, उठवण. March or decampment (of troop).

[फा. कुच्, कोच्; पेकाम. कुच (खरे ८·४३२५); अकामसा. कूच दर कूच = मजल दर मजल. कुचाचा नगारा (सैन्य निघालें म्हणजे अगोदर नगारा वाजवीत; त्यावरून इशारत मिळे.)]

कूज(णें) अक्रि. पक्ष्यासारखा आवाज करणें. To create a sound (of a bird).

[सं. कूज् १ स्वने. कूकू पहा].

जे सिद्धांचा सिंहासनीं । राज्य करिताति त्रिभुवनीं ।
जे कूजते कोकिलवर्मी । संतोषाचा । ६-४४८.

कूट (चिंचेचें) न. चिंच ठेचून केलेला भंजनवजा एक पदार्थ (मिरची, मेथ्या, मीठ, मोहरी वगैरे घालून कूट तयार करतात.). A pounded article of turmeric-pepper etc.

[सं. कुष्टा; प्रा. कुट्टा (स्त्री).]

कूट न. निंदा, लबाडी, कपट, निंदा, कोडें, गुप्तमंडळ, पर्वतशिखर. An enigma, a fraud, a falsehood, a confederacy, a peak.

[सं. कूटम्; प्रा. कूड; गु. कूड; याकाम. शिकाम. कूट = निंदा.]

कूड न. गवत, कडबा व माती मिळून बांधलेली भिंत, कुंपण. A wall of slight sticks, laths, a fence.

[सं. कुड्य, √कुड्; प्रा. कुड्ड (पुंन); रिकामा न्हावी कुडाला तुंबडी लावी.–रिकामपणीं कांहीं तरी उपद्व्याप करीत बसणें.]

कूड स्त्री. शरीर, देह. The body.

[सं. कुडि; कुडि दाहे.]

कूप पुं. विहीर (पायऱ्या नसलेली), डबरा, खड्डा. A well (with no steps), a ditch, a dug-pit.

[*IE*. QOP, QUB=उद्यमने; सं. कूप; *Av*. Kaofa = टेकडी; *Per*. Kaufe; *Lith*. Koop; *Slav*. Kump = वशिंड. याकाम. कूप (ज्ञा. १८-९९); अकामसा. कूपमंडूकन्याय,–वृत्ति = विहिरींतील बेडकासारखी मनोवृत्ति. कूपयंत्रघटिकान्याय = रहाटगाडग्याची अवस्था.]

कूर्च पुं. श्राद्धांत लागणारी दर्भाची जुडी. A bundle of sacred grass.

[सं. कूर्च=दर्भ, √ कुर्.]

कूर्म पुं. कांसव. A tortoise, a turtle.

[सं. कूर्मः (कुत्सितः ईषद्वा ऊर्मिः वेगः यस्य), याकाम. कूर्मी = कांसवी (ज्ञा. १६-१७०). कूर्मदृष्टि = कांसवाची दृष्टि, कृपादृष्टि.]

कूस¹ स्त्री. तृणविशेष. (थोडीशी) कूस (राहिली.) A grass-stick.
[सं. कुश ; प्रा. कुस (पुंन).]

कुसकट, कुसपट न. बारीक काडी. (लक्षणेनें) भांडणाचें क्षुद्र कारण, दोष. A flimsy ground for quarrel.
[सं. कुश + कट,-पट.]

कूस² स्त्री. पोट, उदर, पोटाची बाजू, गर्भ. The side of body, rib, the belly, womb.
[सं. कुक्षि; पा. कुच्ची; प्रा. कुच्छि; कुख्खी; लॅ. कोक्सा; ग्री. कुक्सोनी; सिं. कुछिरि = कुल्ला; पं. कुच्छ (स्त्री.) कोंपरा, कुच्छर = कुल्ला, ऊर; का. कोछ् = मांडी; सिंह. कुस्, किस्; रुमा. कोच = गुडघा. ह्या शब्दांबरोबर दुसरे शब्द ताडण्यासारखे आहेत. गु. कुख; सिं. कुक्ि; पं. कुक्ख, हिं. कोख. असे दोन्ही शब्द तद्भव म्हणून ब्लोक ह्यानें दिले आहेत. परंतु ह्यांत संभ्रम झालेला दिसतो. संस्कृत "कुक्षि आणि कक्षा" असे दोन शब्द आहेत. वर दिलेले पहिले शब्द हे 'कुक्षि'चे तद्भव व दुसरे पुढील हे 'कक्षा' शब्दाचे तद्भव आहेत असें दिसतें. हा घोटाळा बऱ्याच विद्वानांचा झाला आहे. आतां हें मात्र खरें कीं "कुक्षि व कक्षा" हे दोन्ही तत्सम एकाच मूळ वेदपूर्वकालीन धातूपासून सिद्ध झाले असण्याचा संभव आहे. नंतरचे तद्भव शब्द मात्र दोन भिन्न मुळापासून सिद्ध होतात. फा. कुस = योनि; म. कुसवा = गर्भाशय. कुक्षि पहा.]

कूळ¹ न. वंश, कुल, जात, घराणें. Race, family, lineage.
[सं. कुलम्; पा.प्रा. कुल; हिं. कुल; ओ. कुळ; गु. कुळ; म्हणी—कूळ उद्धरणें; कुळाला कलंक; करंटा, बुडव्या; कुळकथा,-कट;]

कूळ² न. खंडकरी. A farmer, a tenant.
[सं. कुल=जमीन.]

कुळझाडा पुं. कुळांचा तख्ता. A list of the names of farmers and their rent.

कृच्छ्र न. तप, (एक प्रकारचें) प्रायश्चित्त. A kind of religious penance.
[सं. कृच्छ्र; याकाम. कृछ्र (ज्ञा. १७-३६४).]

कृत न. कृतयुग. The first of the four ages of the world.
[सं. कृ < करणे (निष्ठा); अकामसा. कृतकर्मा (काम केलेला, हुषार); कृतकार्य, कृतार्थ (विजयी, समाधानी); कृतघ्न (केलेलें न जाणणारा); कृताकृत (अर्धवट, उदासीन.)]

कृकर पुं. एक उपप्राण, ढेंकराच्या किंवा शिंकांच्या वेळेला येतो तो. A minor breath, vital breath.
[सं. कृकरः.]

कृति स्त्री. कार्य, पद्धत, ख्याति, पराक्रम (√कृ). An act, a mode.

-कृत्य न. कार्य, परिणाम. (√कृ). Action.

-कृत्या स्त्री. उग्रदेवता. भांडखोर बाई (लक्षणा) (√कृ). A scold, a vixen.

-कृत्रिम वि. बनावट. Artificial.

-कृदंत न. धातुसाधित (√कृ). A verbal derivative.

कृपण वि. चिक्कू, गरीब, दरिद्री, पैसे खर्च न करणारा. Miserly, niggardly, poor, mean.
[सं. कृपण, √कृप् १ विलपने : *IE.* Qrep; सं. कृप, *Lat.* Crep-(Crepere = to make noise),(decrepit). संस्कृत मूळ अर्थ आणि मराठींतील रूढ अर्थ ह्यांत फार तफावत पडली आहे. हा शब्द मराठींत अर्थतद्भव झाला आहे.]

कृपा स्त्री. दया, करुणा. Tenderness, compassion, kindness.
[*IE.* Qrep, Qrp; सं. कृपा; *Gr.* Ekrikon; *Fr.* Crier; *Ger.* kreiten; *Av.* kərəfs; प्रा. कीवा; म. कीव; केविल, अकामसा. कृपाकटाक्ष = दयेची दृष्टि (कृपा+कट+अक्षिन्). °पात्र = दयेला योग्य. °निधि = कृपेचा सांठा; कृपाळू = मायाळू, दयाळू.]

कृमि पुं. किडा, जंतु, कीटक, लहान लहान किडे (अव.) Worm, germ, insect, bacillus.
[*IE.* Qer; सं. कृ; *Av.* Kerema (worm), Chaxrem (चक्र) ; *Gr.* Kor, Kul, Kir ; *Lat* Cir, Cur, Cul; *Lith.* Krivas ; *Slav.* Krivu, Kolo (wheel); *Russ.* Koless (wheel); *As.* hweo-wol (wheel). (सं. कृमि, √कृ. ह्या धातुपासून चिकुर=केंस, चक्र वगैरे शब्द सिद्ध झाले आहेत.); याकाम. कृमि (ज्ञा. १६·३०८).]

कृश वि. बारीक, हडकुळा, रोडका, लहान, पातळ, सुकलेला. Lean, meagre, slender.

[*IE.* Qork, Qrk; सं. कृश; *Av.* Keresa; *Slav.* Krs.]

कृशांग वि. रोडक्या अंगाचा, किडकिडीत. Of thin body. (कृश + अंग.)

कृशान पुं. अग्नि. Fire.

[सं. कृशानु.]

कृषि स्त्री. शेती. Farming.

[सं. कृष्; याकाम. कृषि, कृषिवल. (ज्ञा.१८–८८).]

कृष्ण पुं. वि. यादवांचा राजा, व्यक्तिनाम, विष्णूच्या दशावतारांपैकीं एक अवतार, काळा. A name of the king of Yadavas, the name of an incarnation of Vishnu, black.

[*IE.* Qers, qer; सं. कृष्ण; *Apr.* Kirsnan; *Lett.* Kirsna; *Russ.* Cerenz; *Lith.* Kersas; *Nors.* Harr; प्रा. कण्ह; सिं. कानु; हिं. पं. कान्ह (काळा); सिंह. किणु; म. कान्हा, किसन.]

कृष्णाजिन न. काळविटाचें कातडें. Skin of an antelope.

क्लृप्ति स्त्री. युक्ति, कला, कल्पना, मसलत. An ingenious mode, a device, a contrivance, an artifice.

[सं. क्लृप्ति, √क्लृप्. *Alb.* Skrep; *Lat.* Corpus; *Gr.* Craps (?).]

कें, के अ. कोठें, कोणीकडे. Where, to what place.

[सं. कुत्र; प्रा. कत्थ; अप. कहिं, कइँ, कें; याकाम. कें. (अमृ. ५·६३).]

केउता अ. वि. कोठें, केवढें, कोणता, कसला, किती, कोणीकडे. Where, how much, which.

[सं. कियत्; प्रा. केउत; याकाम. केउतें. (अमृ. ६–१५).]

जयाची वोसाइली गिळी ब्रह्मगोळकु: तिये ठाइं केउते कागवक ॥ नरुस्व ३०७.

केकत स्त्री. घायपात वनस्पति, केवडा. A kind of plant.

[सं. केतकी (वर्णविपर्यय); गु. केतक; सिं. पं. हिं. केतकी; अकामसा. केकताड = घायपाताचा समूह, कुंपणास लावण्याचें एक झाड.]

केकसा, केकसा स्त्री. कर्कशा, कजाख स्त्री, भेसूर राक्षसी. A scold, a shrew.

[सं. कैकस = राक्षस; प्रा. केकस.]

केकाण न. समुदाय, घोडा, दौड. A crowd, a horse.

घेऊनीं इंद्रियांचीं केकाणें. ज्ञा १८·४६४.

केका स्त्री. मोराचा शब्द. The cry of the peacock.

[ध्वनिशब्द. याकाम. केका (नरुस्व. ६१२). केकटणें, केकणें, केकावणें (नाधा.) = दुःखानें ओरडणें.]

केज–केजें न. मोबदला, मोबदल्याचे पदार्थ. An article given in barter.

[सं. क्रेय; प्रा. केज्ज; केजणें = धान्य देऊन मोबदल्यानें जिन्नस घेणें (नाधा.).]

केढवळ, केढोळ अ. किती वेळपर्यंत, पुष्कळ काळ. How long, for a long time.

[म. केवढा + वेळ ह्यांचा मिळून (ग्राम्य) उच्चार (पहा बीम्स २ पृष्ठ ३३३–३३४). ह्याच धर्तीवर येढोळ (येवढा + वेळ) हा शब्द सिद्ध होतो.]

केणें न. विक्रीचा जिन्नस, व्यापाराचा जिन्नस. An article of merchandise.

[सं. क्री > क्रयणम्; प्रा. किण; हिं. किनना; बं. केणा (खरेदी); का. कन्; याकाम. केणें (पाटण. शिला.)]

इयां पाटणीं जें केंणें उघटे. (पाटण शिलालेख).

कैंड करणें क्रि. नासणें, नाश करणें. To ruin, to defile.

[कान. केडिसु = नाश करणें.]

कैंड(णें) सक्रि. त्रास देणें, प्रतिबंध करणें, कोंडणें, अव्हेर करणें. To obstruct, to hinder, to revile, to reject.

केत, केतन–केतुं पुंन. केतु, ध्वज, चिन्ह, पताका. A standard, a flag, a banner.

[*IE.* Quoi, Qui; सं. कित् १ ज्ञाने; *Lat.* Cnvitus; *Lith.* Kriecue; *Gr.* Choitra (?).]

केतुका, केतुला वि. केवढा, किती. How much, how many.

[सं कियत् + क, कति; प्रा. केत्तिअ; *Lat.* Quot. ह्याचा उपयोग काव्यांत करतात. याकाम. केतुकें, केतुलें (ज्ञा. १३–३३९, ५–११७).]

केधवां, केदवा अ. केव्हां, कधीं. When.

[सं. **कदा; प्रा. केद्दह;** *Av.* Kada; *Lith.* Kada; *Lat.* Quando; याकाम. वकाम. पेकाम. केधवां (काव्य).]

म्हणे हा वैरिया मिनला दिसु : केधवां स्तवै ॥ नरुस्व. ४४५.

कैंबळ न. घराच्या छपरावरील जुनें गवत. An old thatch or the grass and the leaves of such, taken off.

[कान. **केबल (?).**]

केर पुं. धुरळा, कचरा. Rubbish, fragments, straws, leaves &c.

[कान. **किर, कीर, केर, केरिसु=पाखडणें;** अकामसा. **केरकचरा**=घाणेरडे पदार्थ. (कान. **केर;** म. **कचरा**). **केरकसपट**=केरकचरा. **केरकोंडा**=केरझाड. **केरपट्टी**= केर काढण्याबद्दल मजुरी. **केरपाणी**=घरांतील झाडलोट. **केरसुणी**=झाडणी (**केर+संवाहिनी**). **केरावारी**=केराप्रमाणें, केराबरोबर. याकाम. **केर फिटणें**=केर उडणें, नाश होणें, (ज्ञा. ११-५०९). **केर फेंडणें**=केर उडवून देणें (ज्ञा. ११-३९९.).]

केलें वि. न. केलेलें, (त्यावरून) कृत्य, कर्म. Done, an action.

[सं. **कृतम्.** प्रा. **कअ, कड, कद;** अप. **कअल;** याकाम. **केलें** (ज्ञा. १८-३९४, १८-६६४). संस्कृतमध्यें निष्ठारूपाचा नामाप्रमाणें उपयोग करीत. हीच पद्धत यादवकालापर्यंत चालू असलेली आढळते. ज्ञानेश्वरींत ‘ **केलें** ’ हा शब्द नपुं. नाम म्हणून **कृत्य, कर्म** ह्या अर्थी वापरला आहे.]

केवडा पुं. केतकीचें झाड-पान-तुरा. The screw plant.

[सं. **केतक;** पा. **केतको;** प्रा. **केअअ+डा (प्रत्यय), केअअडा, केवडा;** गु. **केवडो;** बं. **केउरा;** हिं. **केवरा, केओंडा;** पं. **केउरा;** सिं. **केरो.**]

केवढा-केव्हडा वि. किती, पुष्कळ. How much, how large, much.

[सं. **कियत्+दा, कदा;** प्रा. **केवड, केद्दह.**]

केवळ वि., अ. फक्त, शुद्ध, स्वच्छ, एकटा, निवळ. Pure, mere, alone, sole, only.

[*IE.* Qai ; *Lat.* Caelebs ; सं. **केवलम्;** प्रा. **केवल ;** याकाम. **केवल**=शुद्ध (ज्ञा. १७-२२७).]

केवा पुं. सांठा, संचय. Stock, store.

[सं. **क्री > क्रय (?).**]

केवीं अ. कसें. How.

[सं. **किम्+हि, कथम्+हि.**]

केविलवाणा वि. दीन, गरीब. Poor, mean, pitiful.

[सं. **कृपालु;** प्रा. **किवालु.** म. **वाणा** (वर्णः)]

केव्हां(जेव्हां, तेव्हां, एव्हां) अ. कोणत्या वेळीं, When.

[सं. संस्कृतमधील सार्वनामिक बीजें **किम्, यत्, तत्** अशीं घेऊन त्यांना प्राकृतमधील प्रत्यय लावून हीं अव्ययें तयार झालीं आहेत. प्रा. **काहे, जाहे, ताहे, एहे ;** प्रा. **काहे+आ** (सं. प्रत्यय)=केव्हां ; **जाहे+आ** (सं. प्रत्यय)=जेव्हां.]

केश पुं. केस, रोम, लंव. Hair.

[सं. **केशः;** प्रा. **केस;** गु. **केश;** सिं. **केसु;** पं. हिं. **केस, के;** का. **किद्द;** लमा. **केश**=रेशीम; अकामसा. **केशबंध**=वेणी. **केशवपन**=केस काढणें (**केश+वपन**). **केशाकर्षण. केशर**=एक तंतुमय सुगंधि द्रव्य. **केशरी**=केशरी रंगाचें. **केसानें गळा कापणें**= गुप्त रीतीनें नाश करणें. To ruin secretly. **केसास [illegible]क्का**=थोडा देखील उपद्रव.]

कसर, केसरी पुं. सिंह. A lion.

[सं. **केशर, केसर, केसरिन्, केशरिन्;** गु. **केसरी;** सिं. **केहरि;** पं. हि. **केहर, केहरी;** याकाम. **केसरी** (ज्ञा. १७-४२३).]

केळ स्त्री. न. वनस्पतिविशेष व तिचें फल. The plantain.

[सं. **कदली ;** पा. **कदली ;** प्रा. **कयली, कअली ;** गु. **केळ** (स्त्री.); सिं. **केल्हो ;** पं. हिं. **केला ;** बं. **कला.** हा शब्द संस्कृतमध्येंच परकीभाषेंतून आला. ह्याचें मूळ आस्ट्रोएशियाटिक आहे असें प्रिझुलुस्की म्हणतो व तें ‘ कली ’ किंवा ‘ टली ’ असें असल्याचें सुचवितों. म्हणजे **कदली** किंवा **कन्दली** ह्याच्या जोडीस **टन्दली** असेंहि रूप असलें पाहिजे. एकदां त्याचें संस्कृतीकरण झाल्यानंतर मग त्याचें प्राकृत रूप व अर्वाचीन रूप सिद्ध झालें. इत्सिंग ह्यानें ‘ **कोक** ’ शब्दास **टन्दली** असा पर्याय शब्द सुचविला आहे. **कोकपान** म्हणजे कदली पेय (मलावग्ग टीका VI, ३५,६).]

केळ वि. थोडें, क्षुद्र. Slight, little, mean.

[कान. **केळ-थोडें.** आमचे हात **केळे** खायला गेले नाहींत. **केळे** हा शब्द कानडी असून त्याचा अर्थ थोडें, क्षुद्र असा आहे. त्याचा आणि **केळें**=कदलीफल ह्याचा संबंध वर्णसाम्यामुळें जोडला जाऊन त्याच्यापुढें प्रयोगांत अन्वर्थक असा ‘ **खाणें** ’ हा शब्द आला. किंवा **कान. केळे**=खालीं, **केळगु**=खालीं ह्यापासून वरील प्रयोग रूढ झाला.]

केळवण न. स्नेहाचें भोजन, मेजवानी (लग्नमुंजीच्या अगोदर मालकाला द्यावयाचें). A feast or party given to friends and relatives on the eve of a ceremony.

[कान. **केळे = स्नेह, मित्रपरिवार, इष्टमित्र, स्त्रिया** वगैरे. याकाम. **केळवणें** (धपू. ४५). याकाम. व शिकाम. मध्यें **केळवली**, असा शब्द रूढ होता व त्याचा अर्थ **केळवण केलेली** असा होता. (ज्ञा. १३-५५२), केळवल्या व्यभिचारिणी ॥ (तु. अभंग).]

केळी स्त्री. मातीची घागर, पाणी भरण्याचें भांडें. A small vessel.

[सं. **कलशः** (?); देप्रा. **कयल** (न); कान. **केल** = मातीचें मोठें भांडें. मूळ शब्द द्राविडी असून तो देशीप्राकृत मध्यें घेतला गेला. ‘ कलश ’ चा संबंध नसावा.]

कैंक वि. कित्येक, पुष्कळ. Many a one, many.

[सं. **कति + एक, एक + एक** ; प्रा. **कइअंक** ; देप्रा. **कइयक**. प्राकृत रूप हें मूळचें. त्यानेंच मराठी शब्दांतील अनुस्वाराची उपपत्ति लागते. गु. **कैंक**; हिं. **कैएक, कएक**.]

कैकाडी पुं. एक ज्ञातिविशेष, वन्य जाती, टोपल्या-दुरड्या करणारी जात. A caste.

[सं. **केकट**. राजवाडे ह्याचा संबंध **कीकट** ह्या संस्कृत शब्दाशीं लावतात. परंतु ही जात द्राविडी भाषा बोलते व कर्नाटकी आहे. कान. **किकट** = गरीब, गरजवंत ह्या शब्दापासून वरील कैकाडी शब्द निष्पादणें अधिक प्रशस्य. मगध देशासंबंधीं ‘ कीकट ’ असा शब्द वापरल्याचा उल्लेख महाभारत, मनुस्मृति वगैरे ग्रंथांत आढळतो. हा देश यवनांनीं व्याप्त म्हणून पापभूमि समजला जात असे. ज्ञानेश्वरी अ. १७-२९४ मध्यें ह्याचा उल्लेख आला आहे. **कैकाडी** लोक आणि **कीकट** देश ह्या दोहोंचा कांहीं संबंध आहे का ? संबंध जरा दूरान्वित वाटतो.]

कैंची स्त्री. कात्री, दोन जोडांमधील पट्टी, संकट (लक्षणा). Scissors, a fix.

[तुर्की. **कैची**.]

कैद स्त्री. शिस्त, बंधन, तुरुंगवास. Discipline, restraint, imprisonment.

[अर. **कैद** ; अकामसा. **कैदी** = बंदी; **कैदखोर** = कैचींत धरणारा, शिस्तबाज. **कैदखाना** = तुरुंग.]

कैंपक्ष पुं. कैवार, पक्षपात, एकपक्ष. Partianship, partiality.

[सं. **कै(कति?) पक्ष**; याकाम. **कैपक्ष**. (ज्ञा.९१८); शिकाम. **कैपक्ष**. विरक्तें ओढावा कैंपक्ष परमार्थाचा ॥ (दा. २-८-१४). ‘कैंपक्ष’ ह्या शब्दांतील ‘कैं’ वर अनुस्वार आहे. त्याची उपपत्ति प्राकृत शब्दावरून लागेल. (पहा **कैंक** < प्रा. **कइअंक**.). ह्या शब्दाचा पुनः एक तद्भव झाला आहे. याकाम. **कैपख** (ज्ञा. १७-३५).]

कैफ पुं. धुंदी, माज. Intoxication.

[अर. **कैफ** = कसें, कोणत्या प्रकारें (मूळचा अर्थ), **धुंदी, माज** (लक्षणा).]

कैफियत स्त्री. लेखी अर्ज, जबानी. A statement, a case, matter.

[अर. **कैफीयत्** = वर्णन, हकीकत, करीणा.]

कैरा वि. तिरवा, चकणा. Squint.

[सं. **केकर**; प्रा. **केअर**; तेल. **कैकरमु** (तद्भव).]

कैरी स्त्री. हिरवा, कच्चा आंबा. An unripe mango.

[सं. **ककर** = वृक्षविशेष; प्रा. **कयर** (करीरचें फल); कान. **काई** = कच्चें फल.]

कैलास पुं. एक पर्वत, शंकराचें हिमालयांतील निवासस्थान. A mountain residence of god Shiva.

[सं. **कैलास**.]

कैलासवासी वि. कैलासावर राहणारा, (स्मार्त) मरण पावलेला. Used of a deceased man.

[ज्याच्या त्याच्या धर्माप्रमाणें मृत्यूनंतरचें स्थान निराळें असतें. **कैलास** – स्मार्त हिंदु. **वैकुंठ** – वैष्णव हिंदु. **ख्रिस्तलोक** – ख्रिश्चन. **पैगंबरलोक** – मुसलमान.]

कैली वि. मापी, ‘ वजनी ’ च्या उलट. (Prefixed to words expressing measure.)

[अर. **कैल्** = माप.]

कैवल्य न. मोक्ष, परब्रह्म, ऐक्य. Becoming one with the deity, salvation.

[सं. **केवलस्य भावः कैवल्यम्** ; **कैवल्यधाम** = स्वर्ग; याकाम. **कैवल्य** (ज्ञा· १५·१३).]

¹कैवाड न. कारस्थान, युक्ति, आळ, कुभांड, कपट, गुप्तकट. Plotting, scheming, contrivance, false charge.

[सं. **कैतव**; प्रा. **कैअव**; हिं. **कैतब**; व्रज. **कैतउ**.]

²कैवाड पुं. कैवार, पक्षाभिमान. Espousing a party.

[कान. **कैवार**.]

कैवार पुं. पक्षाभिमान. पक्षाची बाजू घेणें. Espousal of a cause, taking up sides.

[तेरु. कान. **कैवारमु, कैवारिसु** = स्तुति करणें; याकाम. **कैवार** (ज्ञा.). राजवाडे यांची व्युत्पति–**कृपाकर–कींवाकर–कींवार–किंवारस्य भावः–कैवार.** परंतु ह्यांत पाण्डित्यप्रकर्ष आहे. हा शब्द कानडी आहे.]

कोहल, कोहळ स्त्री. कोकिळ पक्षी. The black cuckoo bird.

[सं. **कोकिल** ; पा. **कोकिलो** ; प्रा. **कोइला** ; गु. **कोयल**; सिं. **कोइला**; **कु** = गाने ह्या धातूशीं संबद्ध, परंतु अगदीं मूळचा हा ध्वनिशब्दच होय.]

कोंक पुं. बाक, पोंक, कुबड. A humpback, a hump or hunch on the back.

[कान. **कोंकि–कोंकु** = बाक, वाकडेपणा.]

कोक पुं. चक्रवाक पक्षी. The *chakravak* bird.

[ध्वनिशब्द. (कवि पहा.). याकाम. **कोक** (ज्ञा.).]

–कोकशास्त्र न. 'कोक' नांवाच्या मनुष्यानें रचलेलें कामशास्त्र. A treatise on the science of sex.

कोंकण न. देशविशेष. The name of the country Westward of the Sahya mountains.

[सं. १ **कोङ्कण**; प्रा. **कोंकण** (पुं.) (स. ४१२); २ **कोणकोण** (**कोण** = डोंगर माथा); ३ **कुंकणा** = परशुरामाच्या मातोश्रीचें नांव, जमदग्नीची पत्नी. ४ **कोणकोण**= एक ग्रामनाम (गोवें प्रांतांतील साष्टीमधील). ५ **कोंग**+**कण** = मावळावयाची दिशा (कुंगु = मावळणें). ६ **कोंकु** = बाक. **कोंकणपट्टी** = कोंकण देश. सह्य व समुद्र यांमधील प्रदेश. **कोंकणस्थ** = कोंकणांतील लोक, विशेष अर्थ–महाराष्ट्री ब्राह्मणांची एक पोटजात, चित्पावन. **कोंकण्या** = कोंकणचा शेतकरी, बाळु, कामकरी.]

कोक(णें) अक्रि. ओरडणें, भुंकणें. To yell or howl.

[सं. **कु १ शब्दे,** (अभ्यास) **कोक.**]

–कोकाव(णें) – ओरडणें. To cry, to yell.
[सं. **कोकूयते.**]

कोकंब, कोकम न. अमसोलाचें झाड, तेल व साल. The mangosteen tree, its skin, juice and oil.

[**कोकंब** (?).]

कोकल(णें) अक्रि. ओरडणें, बोंबलणें. To cry, to whine.

[सं. **कुर्** ६ शब्दे (?); कान. **कुकलु** = ओरड, रड. दुसरी व्युत्पत्तिच अधिक ग्राह्य.]

कोका पुं. केळफुलाचें पान. The spike that shoots up from a plaintain tree.

[सं. **कोक.**]

कोंका पुं. पागोट्यावरील टोकदार चोंच. The pointed end of a turban.

[फा. **कूका** ; कान. **कोंकि** = बाक.]

कोकीळ, कोकिळा पुं. स्त्री. पक्षिविशेष. A kind of bird, the cuckoo.

[सं. **कोकिल**; प्रा. **कोकिल–ळ** ; इतर भाषांतील तद्भव शब्दः गु. **कोयळ**; सिं. पं. हिं. **कोइल**; ओ. **कोयळी**; सिंह. **केविल्ली**; **कोवुल्ला**; म. **कोइळ, कोईळ, कोयाळ, कोकीळ**; संस्कृत मूळ शब्दांत '√**कु**' हा धातुच आहे. द्राविडतद्भव. **कूगु, कोगिले, कुकिल्, कुवि.**]

कोको पु. एक वनस्पतिविशेष, ह्याचें तयार केलेलें एक पेय. The cocoa.

[पोर्तू. **कोको**, Cocoa. मूळ शब्द पेरु भाषेंतील आहे. पेरुभाषा. **कुका** = वनस्पतिविशेष.]

कोचकाई स्त्री. आवळयाची वडी, आवळकटी. The seasoning–young myrobolous pounded and mixed with peppers.

[कान. **कोचु** = तुकडे करणें; **काई** = फल; अकाम. **काचकी, कुचकी** = कोपरा, टोंक.]

कोजागरी स्त्री. आश्विनी पौर्णिमा. The full Moon day in Ashvin.

[सं. **को जागर्ति**–कोण जागतो. या दिवशीं रात्रीं लक्ष्मीप्रीत्यर्थ मध्यरात्रीपर्यंत द्यूत वगैरे खेळून जागून नंतर लक्ष्मी व चंद्र यांची पूजा करून दूध पितात. कोण जागत आहे असें विचारून जागणाऱ्याला लक्ष्मी संपत्ति देते अशी समजूत. श.को.]

कोट पुं. किल्ला, नगराची भिंत, तट, सैन्याचा व्यूह. A fort, a fortress, the wall of a fort.

[सं. **कोट्ट**; प्रा. **कोट्ट**; देप्रा. **कोटं नगरम्** (८७–२); गु. प. हिं. **कोट**; सिं. **कोटु**; का. **कोठ**; संस्कृत **'कोट्ट'** शब्द हा उत्तरकालीन संस्कृतीकरणानें बनलेला दिसतो. मूळ शब्द देशीच असावा.]

^{२}कोट, वि. कोटि. Ten millions.
[सं. कोटि (स्त्री.), √ कुट्; सिं. कोट; पं. **कोट** (पुष्कळ); सिंह. **केळ.** कोडी पहा.]

कोट पुं. नगर, किल्ला, नगराची भिंत, सैन्याचा व्यूह. A town, a fort, a fortification, an arrangement of army.
[सं. **कोट**; देप्रा. **कोट**(न); अकाम. **कोतवाल**=नगररक्षक; देप्रा. **कोट्टवाल** (वाल<पाल).]

कोटकल्याण न. पुष्कळ फायदा. The state of extreme profit.
[सं. कोटि; म. **कोट + कल्याण** = हित. पं. **कोट**=पुष्कळ.]

कोटगा, कोटिगा, कोडगा वि. निर्लज्ज, निलाजरा, निर्ढावलेला. Shameless, hardened, incorrigibly callous.
[कान. **कट्टि**=निर्लज्ज; **कोडग**=माकड; पेकाम. **कोटिगा** (मोरो. केका). कोडगा पहा.]

कोटि-टी वि. करोड, शंभर लाख, (शब्दालंकार) श्लेष, द्व्यर्थी शब्द, पदवी, दर्जा, प्रत, कल्पना, अवस्था. Ten millions, a word having two senses, the order, idea, rank, state, condition.
[सं. **कोटि, कूटम्**; तद्भव-**कोडी.** कोडी पहा.]

कोठा पुं. उदर, पक्काशय, सांठा करण्याची खोली, सांठा, भांडार. The stomach, a large granary, a store-room.
[सं. **कोष्ठ, कोष्ठक**; पा. **कोट्ठो**; प्रा. **कोट्ठअ**; का. **कूठ**; ओ **कोठा**; हिं. **कोठा**; पं. **कोट्ठा**; सिंह. **कोट्ठव, कोठ.**]

कोठार न. धान्याचा सांठा, धान्यागार. A granary.
[सं. **कोष्ठागार**; प्रा. **कोट्ठार**; याकाम. **कोठार**=**वखार** (ज्ञा. १६-३९५).]

कोठी स्त्री. कोठार, खोली, धान्य-सामान वगैरे ठेवावयाची पेढी. A granary, a storehouse.
[सं. **कोष्ठ**; प्रा. **कोट्ट, कोट्ठय**; सं. **कोष्ठिका**; प्रा. **कोट्ठिआ-या**; ओ. **कोठी**; हिं. **कोठी**; पं. **कोट्ठी**; गु. सिं. **कोठी.**]

कोठें अ. कोणत्या ठिकाणीं. Where.
[सं. **कुत्र**; पा. **कत्त**; प्रा. **कुत्थ**; अशी साधारणपणें व्युत्पत्ति मानिली जाते. पुढील व्युत्पत्ति पहा. **कोठें<को + ठिभम्<क्वस्थ, क्व + स्थितम्**; परंतु हा दूरान्वय दिसतो. (कुत्र > कुत्थ, > कुट्ठांहं, > कुठें, > कोठें—हा मार्ग सशास्त्र आहे).]

^{१}कोड पुं. न. रोगविशेष. (·White) leprosy, leucoderma. (कोढ पहा.)

^{२}कोड पुं. लाड, आवड, मौज. Longing, craving, hankering.
[सं. **कोडि**; देप्रा. **कुड्ढ**; सिं. **कोडु**. संस्कृतीकरण उत्तरकालीन. याकाम. **कोड** (नरुस्व. ४) ताडून पहा. कान. **कोडु** = देणें, बक्षीस देणें.]

कोडगा वि. लोचट. Shameless, callous.
[कान. **कट्टि** = निर्लज्ज, **कोडग** = माकड, वानर हुप्प्या. **कोडु** = शक्ति, सामर्थ्य. कोटगा पहा.]

कोडी वि. संख्याविशेष. Ten millions.
[सं. **कोटि**; प्रा. **कोडी**; हा शब्द आस्ट्रोएशियाटिक असल्याचें प्रिझुलुस्की सांगतो. याकाम. **कोडी** (ज्ञा. ६-१५३).]

^{१}कोडें, कोहडें, कुहेडें न. पेंच, अडचण, भानगड, जादुटोणा, कूट प्रश्न. A trouble, difficulty, strait, embarrassment.
[सं. **कूट**; देप्रा. **कूडोपाशः** (८६·३); गु. **कोयडो, कोहडो**; सिं. **कूड़** (खोटें बोलणें), **किरिको** = **सांपळा**; पं. **कूरा** (असत्य); सिंह. **कुळु** (खोटा).]

^{२}कोडें पुं. पणती. An earthen saucer-like receptacle for oil and wick.
[सं. (?); देप्रा. **कोडिअं** लघुशरावः (८७-१५); गु. **कोडियं.**]

कोढ, कोड पुं. न. महारोग, पांढरें कोड, त्वचेचा एक रोग. White leprosy.
[सं. **कुष्ठ**; पा. **कुट्ठम्**; प्रा. **कोठ, कोढ**; गु. **कोहोड, कोड**; सिं. **कोरिहो**; पं. हिं. **कोन्ह**; ने. **कोर**; बं. **कुढ**; ओ. **कुडि.**]

^{१}कोण सर्व. कोणता, प्रश्नार्थक सर्वनाम. Who, what.
[सं. **कः पुनः, कोनु**; प्रा. **कोउण**; अप. **कवुण, कवण**; याकाम. **कवण.**]

^{२}कोण, कोन पुं. कोपरा. A corner, an angle.
[सं. **कोण.** कोन पहा.]

कोंड(णें) सक्रि. वेढणें, अडकविणें, प्रतिबंधांत घालणें. To shut up, to block up.

[सं. कुड् १ प्रतिघाते; कुण्ड् १० रक्षणे परंतु हा धातु संस्कृतोद्भव नसून द्राविडी आहे. वरील व्युत्पत्ति पटत नाहीं. पुढील व्युत्पत्ति पहा. कान. **कोण्डी** = अर्धवर्तुळाकार कुंपण गुरांसाठीं केलेलें; **कोंड, कोंडी**; याकाम. **कोंड** = गांवकुसूं, कुंपण, वेळें, वर्तुळ. (ज्ञा. ३–२४२).]

कोंडलें न. वर्तुळ, वाडगें. An encircling yard.

[सं. पा. **कुण्डल**; गु. पं. हिं. **कुंडळ**; सिंह. = **कोंडोल्**; **कुनिरु** = कानांतील बाळी.]

कोंडार, कोंडी न. गुरांसाठीं गोठा. A shelter for cattle.

[कान. **कोण्ड.**]

कोंडा पुं. बारीक भुगा, भूस, चुरा. Bran, husk of corn.

[कान. **कोडे–गोंडा (?)**, **कोंडापाणी** = अन्नपाणी; **कोंडा पाऊस** = बुरबुर पावसाची.]

कोत, कोंत पुं. भाला, भाल्याचें फळ. A spear or pike, the blade of a spear.

[सं. **कुंत** = भाला ; कान. **कोंत** (परंतु कानडींत हा तद्भव आहे.); याकाम. **कोंत** (ज्ञा. १३–५३९).]

कोतल वि. राखीव, रिकामा, वाजवीपेक्षां जास्त. Reserved (for use), more than required, additional.

[तुर्की. **कोताउल्**; फा. **कोतवाल** ; हिं. **कोतल** ; पेकाम. **कोतल** (घोडा).]

कोतवाल पु. नगररक्षक. The keeper of a fort or a town.

[सं. **कोष्ठपाल(कः)**; देप्रा. **कोट्टवालः** (वाल<पाल); फा. **कोत्वाल्**.]

कोता त्रि. अपुरा, तुटका, लांडा. Deficient, scanty, shorter than needed.

[फा. **कोताह्** ; सिं. **कोताही.**]

कोताइ स्त्री. अपुरेपणा. Deficiency. (फा. **कोताहि.**)

कोथळा पुं. पोटांतील आंतडी, पोतें, थैला. The chamber of the stomach, the intestines, a large sack.

[सं. **कोष्ठ** + ल. **कुशूल**; प्रा. **कोत्थल**; बं. **कुथली**; हिं. **कोथला**; सिं. **कोथिरी.**]

कोतवाल पुं. शिपाई, पहारेवाला, फौजदारी गुन्हे तपासणारा अधिकारी, रक्षक. The chief officer of the police.

[१ फा. **कोत्वाल्** = किल्लेदार. २ सं. **कोष्ठपाल**; देप्रा. **कोट्टवाल** (**वाल** > सं. **पाल.**) ३ तुर्की. **कोताउल्**- अशा तीन व्युत्पत्ति आहेत. शब्द परकी आहे.]

कोथिंबीर स्त्री. धन्याची वनस्पति. A kind of plant.

[सं. **कुस्तुम्बरी**; प्रा. **कुत्थुंभरी**; गु. **कोथमी, कोथमीर**; हिं. **कोथमीर, कोठमीर**; म. **कोथंबरी,–बिरी–बरी, कोथमीर** इ. रूपें.]

कोन कोनाडा पुं. कोपरा, कोना. A corner, an angle.

[सं. **कोणः**; पा. **कोणो**; देप्रा. **कोण्णोगृह कोणः** (८७–२); बं. **कोणा**; हिं. **कोन**; पं. **कूण**; गु. **कोण.**]

कोनी निघणें क्रि. बाळंत होणें. To be brought to bed. (**कोन**=उदर, कुक्षी.)

कोंदण न. रत्नाचें घर, बैठक. The socket of a gem.

कोंदाटणें अक्रि. गुदमरणें, कोंडून टाकणें. To cram, to be stuffed, to be blocked up.

[सं. **कुंद्** ६ **संघाते**; याकाम. **कोंदाट** = पूर्णता (ज्ञा. ११–२५०).]

कोंद(णें) अक्रि. आंत भरणें, दाबणें, गच्च भरणें. To be stuffed, to be filled more freely.

[सं. **कुंद्** ६ **संघाते**; याकाम. **कोंदणें** (ज्ञा. १५-४७६); अकामसा. **कोंदाकोंदी** = दाटी, खेंचाखेंच.]

कोंप, कोपट, खोपट न. स्त्री. झोपडी, कुटी. A hut, a structure in a farm.

[कान. तुळू. **कोप्प** = कोपटी, खेडें; याकाम. **कोपट** (ज्ञा. १३–७८६); शिकाम. **कोपट**; अकाम. **खोपट.**]

शरीर जायाचें कोपट । याची काय खटपट ॥ तु. अभंग.

कोप पुं. राग, क्रोध. Anger.

[*IE.* qep, quep = संचलने; सं. **कुप्** (**कुप्यति**, इतर शब्दः **कपिः कपिल, कर्वूर**); *Gr.* kap ; *Lat.* Camphrer; *Lith.* kwapas;.]

कोप(णें) अक्रि. कोप करणें, रागावणें. To be angry.

[सं. **कुप्** ४ कोपने; पा. **कुप्पति**; प्रा. **कुप्पइ**; गु. सिं. पं. हिं. **कोप**; सिंह. **को**=राग. कोप पहा. मराठींत येतांना ‘ कु ’चा गुण होऊन ‘ को ’ झाला; ह्यावरून दोन अनुमानें

निवतात. एक हा '**कुप्**' धातु चौथ्या गणाचा नसावा किंवा पुढील पद मधील जोर मागील 'कु' वर येऊन संयुक्त व्यंजनाचें साधें व्यंजन होऊन बसलें.]

कोपर, कोंपर पुं. हाताचा मध्यभाग, ढोपर. The elbow.
[सं. **कूर्पर**; प्रा. **कुप्पर, कोप्पर**; गु. **कोपरियुं**; परंतु संस्कृत शब्द कृत्रिम दिसतो. कान. **कोप्पर,** परंतु हाहि कानडी तद्भव दिसतो. हा आस्ट्रोएशियाटिक असावा. कोपरा, = कोन.]

कोपरी स्त्री. नखुरडें, कोपरापर्यंत बाहीचा सदरा. Inflamation at the corner of a nail, a short shirt with half sleeves.

कोबी स्त्री. वनस्पतिविशेष. The cabbage, a kind of vegetable.
[*IE*. Cabbage; पोर्तु. **कोउवे** (Cauve); २ गोभी. एक प्रकारची औषधि].

कोम पुं. स्त्रियांच्या नांवापुढें अमक्याची पत्नी दाखविण्याकरितां योजतात. उदा. **सई कोम विठोबा.** Used only after the name of the wife or widow and before the name of the husband.
[अर. **कौम्=जात, कुटुंब.**]

कोमटी पुं. ज्ञातिविशेष, कर्नाटकांतील वैश्य जात. धार्मिक विधिनिषेध नसणारा (लक्षणा). A caste in the Karnatik.
[कान. **कोमटी, कोमती**=व्यापारी. सं. **गो** (**चक्षु**) +**मुष्टि** (?).]

कोमल, कोमळ वि. नाजूक, मऊ, गरीब, मृदु. Soft, fine, tender.
[सं. **कोमल.**]

कोमेज(णें), अक्रि. निस्सत्त्व होणें, निस्तेज होणें, द्रवणें. To fade, to wither, to droop.
[सं. **क्लम् ४ ग्लानौ**; देप्रा. **कुम्मणं** कुण्टारं, कुरुमाणं त्रयमपि म्लानार्थम् (८४–१८); सिं. **कुमैजनु**; पं **कुमावन**; अकामजा. **कोमलणें, कोमायणें, कोमावणें कोमल, कोमेज, कोंबट, कोमट** इत्यादि सर्व शब्द परस्परसंबद्ध दिसतात. ह्या सर्वांत '**कोम**' हा पहिला अवयव आहे. त्यांत **क, उ, म,** हे प्रधान वर्ण आहेत. '**क**' हा किद्‌चा संक्षेप व **उम** हा ऊष्णचा संक्षेप दिसतो. किंचित् उष्ण हें मूळ आहे.]

कोंबडा पुं. पक्षिविशेष. A kind of bird, a cock.
[सं. **कुक्कुट**; पा. **कुक्कुटो**; प्रा. **कुक्कुड**; देप्रा. **कोंभ** = डोक्यावरील तुरा; गु. **कुकडो**; सिं. **कुकुरु**; बं. ओ. **कुकुरा.** सं. **कुड्मल**; प्रा. **कुम्पल**; म. **कोंभ** (=तुरा), **कोंभ + डा**; म. **कुकडकु.**]

कोंब(णें) सक्रि. ठासणें, ठासून भरणें. To cram, to stuff, to drive in.
[सं. कुंब् १ आच्छादने (?); परंतु संस्कृत रूप कृत्रिम आहे. हा शब्द द्राविडोद्भव आहे. कान. **कोंबु**=धरणें, घेणें.]

कोंभ, कोंब पुं. झाडाचा तुरा, अंकूर, डिरी, मोड. A sprout.
[सं. **कुड्मल**; प्रा. **कुम्पल**; हिं. **कोपल**; गु. **कोंपल, कोंपलो**; **कुड्म>कोंभ, कोंभो**; याकाम. **कोंभ** (ज्ञा. १६–३२०); **कोंबडा** (**कोंभ**(=तुरा)–**डा**)=एक पक्षी.]

कोय स्त्री. आंब्याची बाठी, आठी. A mango-stone.
[कान. **काइ.**]

कोयंडा पुं. वाटोळा खिळा, कडी अडकविण्याचा फांसा, संकट (लक्षणा). A pin or bolt, the clasp, a locket, a calamity.
[कान. **कोय**=कापणें, तोडणें.]

कोयता विळा, तोडण्याचें हत्यार. A grass-sickle.
[कान. **कोय=कापणें, कोयित=विळा**; अकामसा. **कोयती**=लहान विळा.]

कोयनेल नं. एक कडू औषधि-तिचें सत्त्व (सिंकोना वनस्पति). The quinine.
[*Fr*. Quinine; *Sp*. Quina = Peruvian bark; *S. American*, Quina = bark; *Enq*. Quinine.]

कोयरी लहान चपटी डबी (कुंकूं ठेवण्याची). A small flat case.
[म. **कोय** (< कान. **काइ**).]

कोर स्त्री. बाजू, दिशा, कड, सूक्ष्म भाग, संबंध. Edge, verge, ·side, bounding line.
[सं. **कोर**=संधि (बोटाचा किंवा गुडघ्याचा सांधा); गु. पं. हिं. **कोर**; सिं. **कोलि** (कडे, जवळ); पं. **कोल.** (जवळ, मुळें); कान. **कोरू** = भाग; याकाम. **कोर** (ज्ञा. १३–८५४).]

कोर(णें) सक्रि. मळ काढणें, पोखरणें, दांत कोरणें, टोचणें, खाजवणें. To pick (the teeth etc.), to chisel off, to scratch.

[सं. **कोटय**; पा. **कोट्टे**; **कोरित**<**कोर**; कान. **कोरे**= खोदणें. *Eng.* Carve.]

कोर स्त्री. कडा, धार, किनारा, कांठ. (चंद्राची कोर, चौत कोर). The edge.

[सं. कृ ६ लवने हिंसायाम् विक्षेपे. द्रा. **ओरु=कड** ; > कान. **कोरू=भाग (चतकूर)**, **कोरणी**=खोदणी ; **क्रोरींव**=कोरलेलें.]

१कोरडा वि. वाळलेला, पाण्याचा अंश नसलेला, शुष्क. Dry, without any watery particle.

[कान. **कोरगु**=वाळणें, शुष्क होणें; अकामसा. **कोरड**= शुष्कपणा, अनार्द्रता. **कोरडणें**=वाळणें (नामधातु). **कोरडवाव, वाडी**=जिराइत जमीन, विहीरीचें पाणी न मिळणारी (<**कोरड + वावर**=जमीन, √ वृ.) –**कोरडा अधिकार**=अभिमान, आदर (औपचारिक), पोकळ डौल. –**कोरडा पाषाण**= शुष्क ठणठणीत दगड. –**कोरडें बोलणें**=भाषण. वरपांगी बोलणें.]

२कोरडा पुं. चाबूक, आसूड, मार. A whip.

[अर. **कोर=नवी दोरी. + डा** मराठी प्रत्यय *Port.* Corda = cord, rope.]

कोरडिकें, कोडकें, कुरडूक न. अडसर, रहाटाचा दोर, चाक. A wooden bar or latch, the circular revolver.

[कान. **कोरडू.**]

कोरफोड स्त्री. एक वनस्पति. Aloe tree.

[सं. **कुमारी**; प्रा. **कुँवार**; फोड = फाक (<स्फुट.).]

कोरड्यास न. (ग्रामीण) कालवण, तोंडीं लावणें, भाजी वगैरे, भाकरीबरोबर खाण्याचें भंजन. An article to be eaten with bread.

[कान. **कोर**=भाग, भाकरीचा भाग, त्याच्याबरोबर खाण्याचें **तोंडीं लावण्याचें** हा शब्द जसा मूळ क्रियादर्शक असून वस्तुदर्शक झाला, तसा '**कोर–डा-यास**' विभक्त्यन्त शब्द असून नाम झाला. '**परसाकडे**' हा शब्द असाच आहे.]

कोरा वि. शुद्ध, नवा, ताजा, न वापरलेला. Pure, fresh, new, not used.

[फा. **कोन्हा**-नवें मडकें; हिं. **कोरो, करा**=मडकें. वरील शब्दाची व्युत्पत्ति निराळीच असावी. '**नवा कोरा**' असा शब्द प्रयोग वापरतात. **नवा** आणि **कोरा** हे दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द आहेत.]

कोरान्न, कोराण्ण न. कोरडें अन्न, थोडें **अन्न**. Undressed corn, a little food.

[कान. **कोर(=भाग)+अन्न.** अन्नाचा अंश, भाग. याकाम. **कोरान्न**; **न शिजविलेलें अन्न** असा अर्थ श. को. कार माडगांवकर ज्ञानेश्वरीवरून देतात, परंतु तो बरोबर नसावा. **कोरें**=नवीन, न शिजलेलें, कच्चें अन्न अशी व्युत्पति देतात. परंतु ती समर्थनीय नाहीं.]

" काय समर्थाची कांता । कोरान्न मागें ॥ " ज्ञा. १२-८५

कोराळें न. डोंगरकठडी–कडा. A hilly tract, a precipice.

[कान. **कोरे = टोंक. (आळ–म. प्र.)**; याकाम. **कोराळें**; **कोराळ जमीन**=डोंगराळ खडकाळ जमीन.]

तरी मऊपणें बुबुळें । झगटितांहि परि नाडळे ॥
येरवीं फोडी कोराळें । पाणी जैसें । ज्ञा. १६–११७.

कोर्ट न. कचेरी, हपीस, न्यायसभा. The court.

[*OF.* Curt ; *Fr.* Cour ; Mid-L. Cortis : *Lat.* Cohortem = Cattle–yard, enclosed place; *Eng.* Court. अकाम. **कोर्ट, कोरट, कोडत.**]

कोल वि. असमर्थ, नामर्द. Powerless, helpless, impotent.

[सं. (?); देप्रा. **कुल्लो** असमर्थः.]

कोल(णें) क्रि. उडवणें, फेंकणें, लोटणें. To cast off, to throw off the *iti*.

[कान. **कोलु**=काठी (नाधा.); सं. **क्लु १ गतौ.** (क्लवनम्); सं. **कुल्या**; म. **कोली = गल.** कोली पहा.]

कोलदंडा पुं. ओढाळ गुराच्या गळयांत अथवा पायांत अडकवायचें लाकूड, संकट, आडकाठी, प्रतिबंध. A stick or bar fastened to the neck of a cattle, an obstruction.

[कान. **कोल**=काठी. ज्ञानेश्वरींत **कोल**=काठी असा शब्द आहे. याकाम. **कोलकाठी**=दांडपट्टा (ज्ञा. ११·५४८); सं. **दंड.** (कानडीसंस्कृत संकर). पूर्वीं कोलदंड्याची शिक्षा देत असत. पाय, हात, कोंपर, गुडघा ह्यांमधून लाकडाचा दांडा घालीत व माणसास उकिडवें बसावयास लावीत. **हडकुळा, काटकुळा** मधील '**कुळा**' शब्द कान. **कोल**= काठी ह्या शब्दापासून आहे.]

कोलमड(णें) अक्रि. अडखळणें, धडपडणें. To turn over on the other side, to be obstructed.

[कान. **कोला + माड=आडकाठी** ; सं. **क्लु १ गतौ + मड्** १ विघातने (द्विधातुसंयोग); परंतु द्राविडी अधिक दिसतो.]

कोलांटी स्त्री. उडी, उलटी उडी, कोलांट्या लोकांची उडी. A somersault.

[कान. **कोल = काठी + अटसु** = खेळणें. कोल्हांटी, कोलांटी नांवाची एक जात आहे. ते दोरावर खेळ करण्याचें काम करतात. ही जात रानटी आहे. तेव्हां भिल्ल, '**कोळ**' ह्यांचा तर संबंध नसेल ना ?]

कोली स्त्री. विटीदांडूच्या खेळांतील गल. The hole dug at the game of *iti-dandu*.

[सं. **कुल्या** (?); गु. **कोलो** (भिंतींतील भोंक); हिं. **कोल**; का. **कुल्** (नदी). **कोल(णें)** = (विटी दांडूनें गलींतून) फेंकणें.]

कोलीत नं. जळकें लाकूड, निखारा, मशाल, द्वेष, मत्सर (लक्षणा). A fire-brand.

[कान. **कोळिल्** < **कोला** =निखारा; सं. **क्रोधिन्** (?); प्रा **कोहिल्ल**; हिं. **कोयला**; ग्रीक. **कोहेल**; अकामसा. **कोलीत लावणें**=पेटवणें.]

कोल्हा, कोला पुं. प्राणिविशेष, वन्य जनावर. A jackal.

[सं. **क्रोष्टु**; पा. **कोट्ट**; प्रा. **कुल्ह कोल्हुअ**; देप्रा. **कोल्हुओ** शृगालः (९३-५), **कुल्हो** शृगालः (८२-१६); गु. **कोहलुं, कोलुं**; हिं. **कोल्हा, कोला**; सिंह. **कोट**. अकामसा. **कोल्ह्याचें तोंड**-शकुनाचें चिन्ह; **कोल्हेकुई-भुंक**-कोल्ह्याची ओरड. **कोल्हाकोल्हीचें लग्न**-उन्ह व पाऊस एकदम पडणें. ह्याची व्युत्पत्ति काय ?]

कोल्हार न. गुहा, कपाट. A cave, cavern.

[कान. **कोल्हार** = खिंड, विकट मार्ग; याकाम. **कोल्हौर** = मातीचें चित्र (अमृ. ७-४).]

कोल्हार पुं. कुंभार. A potter.

[सं. **कुलाल**; प्रा. **कोलाल**; **कोल्हारी** = कुंभारी; कृत्रिम; याकाम. **कोल्हेरी, कोल्हैरी = कुंभाराचा कारखाना** (ज्ञा. ९-१७३).]

कोल्हें न. भोपळयाचा आकाराचा बियाणें ठेवण्याचा मुडा. A receptacle to keep the seeds.

[कान. **कोळवी** = तेल ठेवण्याचा नळा.]

कोंवळा वि. नाजुक, तरुण. Tender, young, delicate.

[सं. **कोमल**; प्रा. **कोअँल**; गुं. **कोमळ, कुमळुं**; सिं. **कोमलुं**; हिं. **कोमल**; पं. **कूला**; का. **कुमोल्** (**लु**); लमा. **कोवूलो**; याकाम. **कोवळिका** (ज्ञा. १५-९७) = कोवळ्या.]

कोश पुं. खजिना, संग्रह, देह-अन्न-प्राण-मन-विज्ञान-आनंदमय कोश. A treasury, receptacle.

[सं. **कोश**, √ **कुश्**-संग्रहे ; अकामसा. **कोशकीटक**-कोशकिडा ; **कोशीपणें**-(नाधा.) शपथ घेणें ; **कोशाध्यक्ष**= खजिनदार.]

कोशा पुं. रेशमाचें वस्त्र, रुमाल, पटका. A silk-made cloth worn round the head.

[सं. **कौशेय** ; प्रा. **कोसेअ** ; = कुसुंभ रक्तवस्त्र.]

(आंधळी) कोशिंबीर स्त्री. एक प्रकारचा खेळ. ह्या खेळांत मुलाचे डोळे बांधून त्याला इतरांना शोधावयास सांगतात व कोणी सांपडला म्हणजे त्याच्यावर डाव होऊन त्याचे डोळे बांधतात.

[ह्यात दोन शब्द आहेत: **आंधळी, कोशिंबीर**. पैकीं **आंधळी** ह्याचा संबंध '**अन्ध**' ह्या शब्दाशीं आहे. दुसरा **कोशिंबीर** हा शब्द कान. **कोस** = आवरण, झांकण व **अंबर**= वस्त्र असा सिद्ध होतो. **कोसंबर** = वस्त्राचें आवरण (डोळे बांधतांना घालावयाचें). "कोशांची नगरींत हा खेळ खेळत व शेवटचा 'र' हा बंगाली षष्ठीचा प्रत्यय आहे वगैरे व्युत्पत्ति राजवाड्यांनीं दिली आहे ती मान्य होण्यासारखी नाहीं.]

कोशिंबीर स्त्री. फळें चिरून फोडी करून दह्यांत कालवून जो जिन्नस होतो तो. Raw fruit or vegetable crushed and mixed with curds.

[सं. **कुसंबीर, कुस्तुंबरु**; कान. कोस्तुंबरी. **आंधळी कोशिंबीर** ह्यांतील **कोशिंबीर** (= डोळ्यांवरील आच्छादन) हा शब्द निराळा.]

कोशीस स्त्री. मेहनत, प्रयत्न. Endeavour, exertion, effort.

[फा. **कोशिस्**.]

कोष्टक न. रकाना, सदर. A table, column.

[सं. **कोष्टकम्**, √ **कुश्** कोष्ठक पहा.]

कोष्टी पुं. विणकऱ्यांची एक जात (साळी कोष्टी). एक तंतु विणणारा किडा. A caste or individual of it, weaver-class, a spider.

[सं. **कोश, कोशेटी**. कोष्ठक पहा.]

कोष्ठ पुं. कोठा. The stomach.

कोष्ठक न. कोष्टक. A table, a column.

[सं. **कोष्ठः, कोष्ठक**.]

कोस, कोसळा पुं. सापाची कात. The cocoon (of silk-worm, spider or serpent)

[सं. **कोश** ; पा.प्रा. **कोसा**; बं. **कोशा**; हिं. **कोसा** ; गु. **कोस** ; सिं. **कोसु**. कोसला पहा.]

कोस पुं. अंतर मोजण्याचें मापन. A measure of distance.

[सं. **क्रोश**; प्रा. **कोस्स** ; हांक ऐकूं जाण्याइतकें अंतर (दोन मैलांइतकें); ह्याचें प्रमाण निरनिराळ्या प्रांतांत व निरनिराळ्या काळांत बदललें आहे. ऐनी अकबरींत हें प्रमाण ५००० गज इतकें होतें (एक गज = ३३ इंच). ह्यावरून दोन मैल ४ फ १८३$\frac{१}{२}$ यार्ड इतकें येतें. फाहैनच्या माहितीवरून **कोस** म्हणजे $\frac{१}{४}$ योजन (योजन = ४ मैल). **कोस**=२ मैल (बंगाल),=१$\frac{१}{४}$ मैल (दुआब), = ३ मैल (बुंदेल),=२$\frac{३}{४}$ (मद्रास),= ४ मैल (म्हैसूर).]

कोसला पुं. रेशमाचा किडा, कोश भोंवतीं आहे असा. The silk-worm, the cocoon of it.

[सं. **कोश + ल**. कोस पहा.]

कोसळ(णें) अक्रि. ढासळणें, एकदम पडणें. To crumble in or down.

[कान. **कोसरू**=आधार सुटणें. सं. **कुश्+शल्** शीघ्र गतौ, किंवा **क्षोट्** १० क्षेपे. कानडी व्युत्पत्तिच ग्राह्य.]

कोहम् पुं.‘मी कोण’ असा उच्चार (कोहम सोहम् भाव). The sound of ‘ who am I ’.

[**सं. कः अहम्.**]

कोहळा पुं. एक फल, फलविशेष. A pumpion gourd.

[**१ सं. कूष्माण्ड; प्रा. कूहण्ड,–कोहण्ड**; देप्रा. **कोहळी**; गु. **कोहलुं, कोलुं**; हिं. **कोहर** ; सिंह. **कोमडु, कोमदु**; संस्कृत शब्द निराळा व देशी शब्द निराळा. मराठी व सिंहलीशिवाय इतर भाषांत शब्द जे आले ते देशी शब्दापासून आले आहेत. सिंहली मधील शब्द मात्र संस्कृत शब्दोद्भव आहे. सिंहली भाषा ही नेहमींच इतर भाषांपेक्षां शब्दसिद्धीच्या बाबतींत संस्कृतच्या जवळ आहे. २ सं. **कुंभफल** ; प्रा. **कुभण्ड, कोहली, कोहण्ड** (कुष्माण्ड); बं. **कुमरा**; हिं. **कम्रः**, देप्रा. **कोहली, कोहालिआ**.]

कोहिनूर पुं. एका प्रसिद्ध हिऱ्याचें नांव. The Kohinoor.

[फा. **कोह्–इ–नूर** = तेजाचा पर्वत. अल्लाउद्दीन खिलजीच्या दक्षिणेच्या लुटींत प्रथम मिळाला (इ. स. १३१६). आग्रा घेतला त्या वेळीं बाबर किंवा हुमायनाला तो देणगींत मिळाला (१५२६). पुढें नादीरशहानें नेला (१७३९). नंतर तो अहमदशहाजवळ आला. तो पुढें त्याच्या नातवाजवळ शहासुजाजवळ आला. त्यानें रणजितसिंगाला दिला. इ. स. १८४९ मध्यें तो इंग्रजांकडे आला. सध्यां तो ब्रिटिश बादशहाच्या रत्नशाळेंत आहे.]

^{1}**कोळ** पुं. गहाण पडलेला माल. Article pawned.

कोहटळो स्त्री. कुजकी घाण. The refuse portion, the rotten portion.

[सं. **कोथ, √कुथ् ४ पूतिभावे**; प्रा. **कोह**=सडकी.]

^{2}**कोळ** न. तिळांची कळी, पांड. A bud of sesame flower.

[याकाम. **कोळ**; (ज्ञा. १३–५८६).]

नपुंसकें तुम्ही निर्बळें । जैसी तिळांचीं शुष्क कोळें. ॥

^{3}**कोळ** स्त्री. खाडी. The creek or inlet.

[सं. **क्रोडः**; प्रा. **कोला**; हिं. **कोला**; बं. **कोल** ; ओ. **कोळा** = मांडी, प्राण्याची–जनावराची छाती.]

कोळसा पुं. लाकूड जळून राहिलेला काळा अवशेष. The char-coal.

[वैसं. **कुल्–ज्वलने** ; सं. **कोकिलः** (विस्तव), **√कुड् १ दाहे**, **कुंडक** = स्वयंपाकघर; पा. **कोळाप** = **वठलेलें झाड** ; देप्रा. **कोउआ करीषाग्निः** (८८·७); **कोईला काष्ठांगारः** (८८·१३); **कोल्ल** (पुं.न.) जळतें लाकूड ; गु. **कोयलो, कोलसो** ; सिं. **कोइलो** ; पं. **कोला**; हिं. **कोथल, कोलसा** (कोळसा); म. **कोळपणें, करपणें, कोळंगा, कोळसा**; मराठी शब्दांतील ‘ सा ’ची उपपत्ति काय ? ‘ **कोकिल** ’ हें संस्कृतीकरण उत्तरकालीन असलें पाहिजे.]

कोळगा पुं. एक भांडें. A kind of vessel.

[कान. **कोळग** = माप, भांडें. मराठी शब्द **कोळवें** = (एक माप) ह्या शब्दापासून आला काय ?]

कोळप पुं. शेतीचें एक अवजार. An instrument for uprooting grass and weeds.

[कान. **कोळ = फाळ**, दांता; अकाम. **कोळप(णें)** = जमिनीवरून कोळप फिरविणें (गवत वगैरे काढण्यासाठीं) (नाधा.). कुळव पहा.]

कोळप(णें) सक्रि. करपणें, काळवडणें, जाळणें, राख करणें, कोळंजणें. To be scorched or tanned, to be blackened.

[सं. **कुड् १ दाहे**; देप्रा. **कोल्ल**=जळतें लाकूड. कोळसा पहा.]

^{1}**कोळंबा** पुं. तांदुळाची एक जात. A sort of rice.

[सं. **कवल** (?); प्रा. **कलम** ; देप्रा. **कलम**.]

^{2}**कोळंबा** पुं. मातीचें एक भांडें (रुंद तोंडाचें). A kind of vessel.

[पा. **कोलंब**; प्रा. **कोलंब**=भांडें; कान. **कोळवी** = पोकळ नळी; देप्रा. **कोलंबो** तथा **कोल्लरो** पीठरम्, (८७-१५) सं. **कलश** (?), √ **कल्** (?).]

कोळवें न. धान्य मोजण्याचें माप, पावशेर अर्धे, चिपटें. A measure.

[सं. **कुडव, कुलव**; प्रा. **कुडव, कुलव**; (कुळवें पहा.) कान. **कोळग** (= माप ह्या शब्दाशीं संबंध चिन्त्य आहे.) किंवा कान. **कोलु** = माप (गजासारखें).]

^{1}**कोळी** पुं. मासे धरणारी जात, पाणी वहाणारी जात. (जातिवाचक). A caste, fisherman.

[सं. **कोल**; प्रा. **कोल** (पुं).]

^{2}**कोळी** पुं. एक किडा, कीटकविशेष. Spider.

[सं. **कौल, कौलिक**; देप्रा. **कोलिओ तन्तुवागो जालकार** कृमिश्च (९३–५); गु. **कोळी**; हिं. **कोळी** (जाती); सिं. **कोरी** (विणणारा) ; कान. **कोळी** = कोंबडी (ताडून पहा.).]

^{1}**कोळें** नं. बैलाचें वशिंड. A bullock's hump.

[सं. (?); देप्रा. **कोलो कुल्लो** ग्रीवा (८७–१; ९२·५).]

^{2}**कोळें** न. भात किंवा इतर बीं ठेवण्याकरितां केलेला गवताचा पुडा. An oval-form case of grass for keeping seeds.

[सं. **कवल**; गु. **कोलियो (घांस)**; हिं. **कौली** = गांवकामगाराला द्यावयाची गव्हाची पुरचुंडी.]

कौटाळ, कवटाळ न. संकट, त्रास, जादु, चेटुक. Trouble, calamity, magic.

[सं. **कौटिल्य.**]

कौटिल्य न. कपट, वाकडेपणा, ठकबाज. Crookedness, vileness.

[सं. **कोटिल्य < कुटिल,** √ **कुट्.**]

कौतुक न. आश्चर्य, नवल, विस्मय. Wonder, marvel, any thing that excites surprise.

[सं. **कौतुकम्, कुतुक, कतूहल, कुतः .**]

^{1}**कौल** न. घराच्या छपरावर घालावयाची चपटी पन्हळ. A tile.

[सं. **कीलक-कीलअं** (?); देप्रा. **कउलम्** (गोमय पंडम्).]

^{2}**कौल** पुं. वचन, आश्वासन, अभय. Promise, assurance, protection.

[अर. **कौल** = वचन; शिकाम.पेकाम. **कौल.** (रा. १२–१३७)=**कौलास येणें**; अभय मागणें; **कौलनामा**– अभय पत्र. **कौल लावणें**=देवाकडून प्रसाद मागणें.]

^{1}**कौसल** न. सल्ला, गुप्त मसलत, कट. Counsel, council.

[दुसऱ्या बाजीराव वेळच्या जुन्या कागदपत्रांत हा शब्द येतो तो इं. Council ह्या शब्दापासून आला आहे. *Lat*. Concilium, *Eng*. Council. सं. कौशल्य. (?).]

क्रतु पुं. यज्ञ, यज्ञकर्म. A sacrifice.

[सं. **क्रतु**; ग्री. **क्रेतोस**; झेंद. **क्ष्त्रतु**; **शतक्रतु**=**इंद्र**; शंभर यज्ञ केलेला. याकाम. **क्रतु** (ज्ञा).]

क्रम पुं. मोजणें, संख्या, ओळ, रांग, मांडणी, अनुक्रम. Counting, rank, order.

[सं. **क्रमः,** √क्रम् ४ गतौ; वैदिक अध्ययनांतील एक प्रकार–**घन, क्रम, जटा**; वेदसंहितारचनेचा एक प्रकार. अर्थात विशेषीकरण झालें आहे. **क्रमप्राप्त** = ओघानें आलेलें; हा शब्द १९२० च्या सुमारास सुरू झाला. केसरीनें प्रथम सुरू केला. **क्रमिक** (पुस्तकें)=वर्गाचीं पुस्तकें–इयत्तावर.]

क्रम(णें), क्रि. (वेळ) घालविणें, आक्रमण करणें To spend time.

[सं. **क्रम,** √**क्रम् ४ गतौ**; अकामसा. **क्रमण** = गति. **क्रमोक्रम** = व्यवस्था. **क्रांत** = आक्रमिलेला, व्याप्त (ज्ञा. १५–४१२). विषुववृत्तापासून अंतर (विशेष अर्थ). **क्रांति** = प्रगमन, बदल, चळवळ. तद्भवः **करमणें** = मनरंजन होणें.]

क्रास पुं. क्रास, येशू ख्रिस्ताला ज्या खांबाला डांबला तो खांब. *The cross.*

[*Lat*. Crux; *As*. Cros; *Eng*. Cross.]

क्रिकेट पुंन. इंग्लंडचा राष्ट्रीय खेळ, चेंडूफळीचा खेळ. The game of cricket.

[*OF*. Criquet; *Eng*. Cricket. 1528 AD.]

क्रिया स्त्री. काम, कृति, कर्म. An act, action, deed.

[सं. **क्रिया < कृ < करणें** ; अर्थाचें विशेषीकरण होऊन और्ध्वदेहिक क्रिया असा विशेष अर्थ झाला. शपथ, दिव्य, प्रमाण, वगैरे संबंधीं " **क्रिया करणें** " असें म्हणतात. क्रियाभ्रष्ट–नास्तिक.]

क्रियापद न. वाक्यांतील क्रियादर्शक शब्द. The verb.

क्रियाविशेषण न. क्रियेचा गुण दाखविणारा शब्द. The adverb,

क्रीड(णें) अक्रि. खेळणें. To play.
[सं. क्रीड् १ खेलने.]

क्रूर वि. निर्दय, कठोर. Cruel, hard, harsh.
[सं. **क्रूर.**]

क्रेप न. एक कापडाचा प्रकार. The crape (cloth).
[हा प्रकार चीनमधून आला. फ्रेंच. **क्रेप, क्रेस्प;** लॅटिन. **क्रिस्पस्.**]

क्रुद्ध वि. रागावलेला. Excited, enraged.
[सं. **क्रुध्** ४. क्रोधने निष्ठा; अकामसा. **क्रोधाग्नि** = राग. **क्रोधायमान** पुं. रागावलेला.]

—क्रोध पुं. राग. Anger.
[सं. **क्रुध्** ४ क्रोधने, **क्रोध, क्रोधणें** (नाधा.)= रागावणें.]

क्लेश(णें) क्रि. त्रासणें, दुःख होणें. To afflict, to trouble, to harass.
[सं. **क्लिश् ४ उपतापे.**]

क्लिष्ट वि. कठीण, अवघड. Difficult, troublesome.
[सं. **क्लिष्ट, (निष्ठा,√क्लिश्**); अकामसा. **क्लिष्टार्थ**=कठीण दुर्बोध अर्थ.]

क्लेश पुं. त्रास. Affliction, harassment.

ख पुं. मराठी वर्णमालेंतील दुसरें व्यंजन. ह्याचें उच्चारण कंठ्य-महाप्राण असून उच्चारस्थान कंठ आहे. 'क' वर्णासंबंधींचें विवेचन ह्याला लागू आहे. The second consonant in Marathi alphabet, the hard gutteral aspirate.
[**आद्य 'ख'** सं. **ख्, क्ष्, क, ख्य, स्क.**
प्रा. **ख.** क्रीड-खेळ, स्कंध–खांदा.
सं. **क, ष.**
प्रा. **क.** कीलक–खिळा. कुब्ज-खुजा
विष-वीख पुरुष-पुरुख. क्षप-खप.
मध्य 'ख' सं. **क्ष्, ऋक्, ष्क्, स्क्, ख्य्, थ्, क्त्;**
प्रा. **क्ख;** तिक्त-तिखट. मृष-माख. इ. इ.]

ख न. आकाश, अंतरिक्षाची पोकळी. The sky, the hollow in the mid-region between the sky & the earth, the heavens.

ख न. इंद्रिय.
[सं. ख. खर्वति मनोऽस्मिन्, खन्यते, क्षुम्यते मनोऽनेनवा.]

खकाणा, खकाण पुं. उदसणारी धूळ, केर. Dust, dirt, dust (as of snuff, of powdered chillies, pepper etc).
[अर. **खाक्** = धूळ.]

खग पुं. पक्षी, आकाशांत उडणारा. A bird.
[सं. ख=आकाश+ग (√गम्). संस्कृतमध्येंच 'ख' चा अर्थ आकाश हा कसा झाला हें एक गूढच आहे. ख-ग, खे-चर, सु-ख, दुःख वगैरे शब्द 'ख' शब्दाशीं संबद्ध आहेत.]

खगोल पुं. अंतरिक्ष, आकाशांतील पोकळी, गोल, तारे वगैरे विश्व. (भूगोल व खगोल ही दोन विश्वें आहेत.). The sphere of the heavens, astronomy, the starry vault.
[सं. ख + **गोल.**]

खग्रास पुं. ग्रहणांत चंद्रसूर्याचें पूर्ण अंतर्धान. The complete obscuration of a heavenly body, complete screening.
[सं. **ख-अंतरीक्ष,+ग्रास√ग्रस्.**]

खंक वि. दीन, दरिद्री, द्रव्यहीन, सफा बुडलेला. Penniless, completely broken.
[सं. **क्षी;** हिं. **खुख = गरीब;** याकाम. **खंग = क्षीणता, न्यूनता,** (ज्ञा. १०-११०)]

खंक्या, खमखा वि. बेदरकार, जोरदार. Prompt and blunt, rude.
[ध्वनिशब्द. '**खिणक्या**' असेंहि रूप आढळतें व तें अधिक बरोबर व अधिक अर्थवाही आहे. 'खण' ह्या ध्वनीशीं संबद्ध आहे काय ?]

खंकाळ, खंकाळ वि. दुष्ट, उग्र, तिरसट, पाणीदार. Cross, surly, mettlesome, fiery.
[मराठी. **खंक + आळ** (?).]

खंग(णें) अक्रि. दुःखानें राहणें, कमी होणें, अशक्त-असमर्थ होणें. To be depressed, to be reduced and enfeebled from pain, labour etc.
[सं. **खंज् १ गतिवैक्लव्ये, क्षज् १० कृच्छ्रजीवने.** सं. **क्षयिक;** प्रा. **खइग** (?) (श.को.) ही व्युत्पत्ति सशास्त्र नाहीं. अनुस्वाराची उपपत्ति काय ? याकाम. **खंग** (ज्ञा. १०-११०); अकाम. **खंग** = **न्यूनता, कमीपणा; खंगार–ळ** = **अशक्त,** दुर्बल.]

खंगळ(णें) सक्रि. धुणें, घासणें, (कपडे अथवा भांडीं खंगाळणें). To cleanse, to rinse, to shake about in water.

[सं. घृ १० प्रस्रवणे (अभ्यास–घघृ); सं. गंगालय (?); प्रा. गघ्घाळ; का. खांकळ्ळ्; हिं. खंगालना, खंगारना; पं. खंगाळणा; गु. खंखाळवूँ.]

खच(णें) अक्रि. कमी होणें, बेहिम्मत होणें, खालीं येणें. To yield and sink down, to fail, to fall away in flesh.

[सं. स्कद् ४ गतिशोषणयोः, किंवा खच् (=अन्तर्धाने), खर्ज् ; क्षै १ क्षये, ऱ्हासे; गु. खचकावूं; हिं. खचना = घट्ट बसविणें, आंत घालणें; अकामसा. खचवणें (प्रयोजक)= खालीं करणें; दावणें.]

खचित वि. रत्नाच्या कोंदणांत बसविलेलें. Inlaid, set, studded.

[सं. खच् १ अन्तर्धाने ; देप्रा. खचिअ, खचिय; गु. खच (ठासून बसविणें); हिं. खचना.]

खचीत, खचित अ. खरोखर, निश्चितपणें, खात्रीनें. Certain, sure, fixed.

[सं. कच्चित् , किंवा खलुचित् ; प्रा. कच्चि.]

खची, खच्ची वि. कमी (करणें), निर्वृषण. Lopped or pruned, castrated.

[अर. खसी.]

खजिना, खजाना पुं. सांठा, तिजोरी, कोश, कोठार. A reservoir, treasury, treasure, receptacle.

[अर. खझीना, खजाना, खिझाना; पेकाम. खजाना, खजीनह, खज्नह् = सांठा; ह्यामध्यें एक हजार नाण्यांच्या पिशव्या असत.]

खजानची,-जी पुं. खजीनदार, निधिधारक, कोशाध्यक्ष. Public treasurer.

[तु. खझान्ची; पेकाम. खजानची (रा. ५·४२).]

खजान-पूर वि. ज्याची गंगाजळी अखंड भरलेली आहे असा. (One) with a full treasury.

[अर. खिझाना + फा. पूर = पूर्ण; पेकाम. खजानपूर (रा. १२·७०).]

खजील वि. दुःखित, शरमिंधा, लज्जित, शरमलेला, खट्टू. Ashamed, abashed, confounded.

[अर. खजल्=लाजाळू, नम्र.]

खजुरा वि. वळलेला (दोरा). (Strongly) twisted (cord).

[सं. खर्जूरकः (विंचू;); खजूरा.]

खजूर पुं. खारका तुडवून केलेला पदार्थ, खजुरी झाडाचें फळ. The fruit of date tree, dates.

[सं. खर्जूर ; पा. खज्जूरी; प्रा. खज्जूर; बं. खाजूर; ओ. खजुरी; हिं. पं. ल्हां. खजूर; सिं. खजूरी ; गु. खजुर (न); सिं. कदुरु. संस्कृत शब्द हा प्राकृत किंवा देशी शब्दाचें संस्कृतीकरण दिसतो.]

खंजीर पुं. लहान कट्यार. A sort of dirk or dagger.

[अर. खंजर; सं. खड्गजीर>खज्जीर>खंजीर (भाअ. १८३२). परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. हिच्यांत पाण्डित्यप्रकर्ष आहे.]

¹**खट** स्त्री. जमिनीचा एक प्रकार, वखरण्यांत न आलेली जमीन. A kind of soil, straw-grown, uncultivated ground.

[सं. खट = गवत, < क्षत.]

²**खट** वि. नष्ट, खट्याळ. Vile, villainous.

[सं. शठ; अकामसा. खटनट.]

खट(णें) अक्रि. आग्रह धरणें, अडणें. To stop, to hold back doggedly.

[सं. खट् १ कांक्षायाम्.]

खटका पुं. भांडण, बेबनाव, अडकण, कुत्रें. Sharp altercation, a brawl, clasp, spring-catch.

[सं. क्षत (?); हिं. खटका = संशय; पं. खटक = संशय; गु. खट्को = अडथळा.]

खटखट स्त्री. खटखट असा आवाज. A particular sound, clack, clatter.

[ध्वनिशब्द. ओ. खटखट; हिं. खटखट; सिं. खटीखटी; गु. खटखट.]

खटखट(णें) अक्रि. कटकट करणें, वाजविणें. To clack, to clatter.

[ध्वनिशब्द. सं. (खट्), √शट् १ अवसादने.]

खटपट स्त्री. त्रास, मेहनत, यातायात. Cares, pains, bother, fuss, toil, trouble.

[सं. घटपट (?). वेदान्तामध्यें ‘ ब्रह्म ’ विवेचनदृष्टान्तासाठीं घट (मृण्मय) आणि पट (तन्तुमय) ह्याचा निर्देश

नेहेमीं येतो. त्यावरून, **घटपट** = सिद्धान्तदर्शनाची आटाआटी; पुढें त्या शब्दाच्या अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. **–खटाटोप** (**खट + आटोप**, **<घट + आस्तुभ्.**)=मोठा प्रयत्न, डौल.]

खटला,–लें पुंन. वाद, भांडण, जिंदगी. A dispute, disagreement, family, retinue.

[कान. **कटले**=फिर्याद, परंपरा, पद्धत. परंतु हा शब्द द्राविड दिसत नाहीं. कानडींतच हा तद्भव झाला असला पाहिजे.]

खटाटोप पुं. डौल, अवडंबर, मोठा प्रयत्न. Mighty plan, imposing preparation.

[**म. खटाटोप < सं. घट + आटोप** (**<आस्तुभ्**).] '**फटाटोप**' हा त्याचा मूळ समजतात. परंतु हा शब्द कृत्रिम संस्कृत आहे. पुढील संस्कृत श्लोकांत तो आहे. परंतु संस्कृतीकरण मराठीचें झालें आहे.

निर्विषेणापि सर्पेण कर्तव्या महती फणा ।
विषमस्तु नवालोके **फटाटोपो** भयंकरः ॥]

खटारा पुं. बैलगाडी, धूड, अवजड वस्तु, सांगाडा, छकडा, एक्का. A cart, a bullock-cart, frame (of a house or a cart), a cart drawn by one bull.

[सं. **क्षत्ता**=सारथी, हाकणारा. **√क्षत्**; **क्षत**=मार्ग (मृच्छ. ५–१८).]

खटें, खट्टें वि. गोड नव्हे तें, खारट, आंबट वगैरे असलेलें. Saltish, sour.

[सं. **क्षार, क्षारट** (क्षत्ता); प्रा. **खार**; म. **खारट** (**<क्षारार्त**); हिं. **खट्टा** (**क्षार + इ्ट**); अकाम. **खाटी डाळ** = आंबट वरण; **खटाई** = आंबट पदार्थ, मिठाई; **खट्टू** = आंबट, दुःखी, कष्टी (मन खट्टू होणें).]

खट्याळ वि. त्रासदायक, उपद्व्यापी, द्वाड, खोडकर. Cross, surly, of evil temper, vicious.

[सं. **शठ**; **खठ + आलु** (?); कान. **केट्ट**–वाईट, **केडु** = खोडी+आळि.]

खड स्त्री. एक प्रकारचें कोंवळें गवत. Short slender grass.

[सं. **खट**; प्रा. **खड**; बं. **खर**; बि. **खर**; हिं. **खर**; गु. **खड**; का. **खोर**; सिं. **खरू**; ओ. **खरा**.]

खडक पुं. कठीण दगड, धोंडा. Hard stone, rock, rocky bed.

[सं. **क्षटक, काठ** = खडक, **क्षरक>खरक**; प्रा. **कटग**= पर्वताचा भाग, माची.]

खडकाळ वि. खडकाची (जमीन). Rocky.

[याकाम. **खडुवा** = खडक (ज्ञा. ११–५३९).]

खडक(णें) अक्रि. वाळणें. To dry and become hard and stiff.

[**सं. स्कन्द् १ शोषणे.**]

खडखड(णें) क्रि. संपणें, (आंत) कांहीं पदार्थ नसणें. To be exhausted, to be finished.

[**ध्वनिशब्द.** किंवा सं. **खड् १ मंथने.**]

खडखड स्त्री. खडखड असा आवाज. A particular sound.

खडखडाट पुं. (आवाजावरून) 'संपणें, नाहींसें होणें असा' अर्थदर्शक आवाज. Sound indicating absence.

खडखडीत वि. कोरडा, स्पष्ट, (खडखडीत उजाडणें). Clear, distinct.

खडतर वि. कठीण, त्रासदायक, राशीला लागणारा. Harsh, vexatious, worrying.

[सं. **क्षारतर**; गु. **खडतल, खडतळ**; हिं. **खरतल**; म. **खत्रड, खत्रुड**.]

खडपड(णें) अक्रि. धडपड करणें. To struggle.

[सं. **खट् १ कांक्षायाम् + पट्** (**पटु**–नाधा.).]

जैसें वांसरूं देखिलेयां दिठी ।
धेनु खडपडौनि मोहे उठी ।
मग स्तना मुखाच्चियें भेटी । काइ पान्हा धरे ॥

खडबडीत वि. ओबडधोबड. Very rough, full of asperities.

[सं. (?); हिं. **खरबर**; सिं. **खरबरी**=ओबडधोबड जमीन.]

खडस(णें) क्री. रागें भरणें, ताकीद देणें. To scold, to threaten.

[सं. **खद् १ आहनने, खड् + स** (लुङ् चा अवशेष– राजवाडे.)]

खडा पुं. रत्नविशेष. A precious stone, a jewel.

[सं **खट** (?); देप्रा. **खडुआ** (मौक्तिकानि); याकाम. **खडळ** = खडा (ज्ञा. १३·३३६).]

खडा पुं. दगडाचा तुकडा, लहान दगड. A small piece of stone.

[**सं. खंडक.**]

३खडा वि. उभा, सरळ उभा. Straight, erect, unbent.

[सं. (?); हिं. खरा, खडा; का. **खोरड**; बं. **खारा**; पं. खरा; सिं. खरो; गु. खडूं; म. **खडा, खडी** (ताजीम).]

खडाजंगी वि. अत्यंत, मोठा निकाराचा, ठाण मांडून केलेलें गैरगनिमी युद्ध. (युद्ध, लढाई याला लावतात.) A fierce (battle, quarrel).

[फा. **खाना जंगी, जंग = युद्ध**. मूळ शब्द नाम असून सध्यां मराठींत तो क्वचित् विशेषण म्हणून वापरला जातो. उदा. खडाजंगी (भांडण, युद्ध).]

खडाड(णें) अक्रि. खडाड असा आवाज होणें, संपणें, नाहींसें होणें. (A sound indicating emptiness). To be finished.

[ध्वनिशब्द. सं. क्षी (?), याकाम. खडाडता=क्षोभ.]

खडाण वि. अल्पदुधी लाथाळ (गाय), नाठाळ (जनावर), खोड्याळ. (A cow) yielding very little milk, (cow) preventing being milked.

[सं. **कठिन, खट्टन, क्षीण**. (?); देप्रा. **खड्डिओ-मत्तः**; याकाम. **खडाण** (ज्ञा. १३·२०५) खडाणे धेनूसीं दुग्ध किंचित्.]

खडावा पुं. लाकडाचा तळ असलेली वहाण किंवा पादत्राण. Wooden sandals.

[सं. **काष्ठपादुका (काष्ठ+वह्)**; पा. **कट्ठपादुका**; प्रा. **खडामुआ, खडाउआ**; हिं. **खराऊं**; ओ. **खराउ**; बं. **खरम**; का. **खराव**; कान. **कडाव**.]

खडाष्टक न. विरोधी, परस्पर न जमणारी अवस्था. (ज्योतिषांतील शब्द; सहावें आणि आठवें स्थान.) A state of discord.

[सं. **षडाष्टक**; प्रा. **खडाट्ठअ. खडाष्कट** हा शब्द टर्नरनें **खड्गाहस्तपासून** व्युत्पादिला आहे तो विचारार्ह आहे.]

खडी स्त्री. बारीक मुरुम, बारीक लहान दगडाचे तुकडे (रस्त्यावर टाकण्यासाठीं), फळ्यावर लिहिण्याकरितां किंवा भिंतीला रंग देण्याकरितां वापरावयाचा एक खनिज पदार्थ. Small pieces of stone, mettle, a kind of mineral used to colour the walls or used as chalk.

[सं. **खाटिका**; प्रा. **खडिआ**; बं. **खरी**; हिं. पं. सिं. **खरी**; गु. **खडी**; याकाम. **खडी**=माती (नरुस्व २८०); म. **खडू, खडी**. मराठींत ‘ **शाडू** ’ म्हणून एक शब्द आहे. त्यावरून असें वाटतें कीं मूळ शब्दांत ‘ **क्ष** ’ असावा.]

खडी(साखर) स्त्री. एक प्रकारची साखर (खड्या-सारखी). Sugar-candy.

[सं. **खंण्ड**; प्रा. **खंडा**=मिस्त्री, साखर ; **खडीसाखर** ह्यांतील **खडी** हा शब्द ‘ **खडा** ’ ह्यापासून आला आहे असें वाटतें व ती खड्याखारखीच दिसल्यामुळें ही उत्तान व्युत्पत्ति पटते. परंतु गुजरातीमध्यें हिला **खाण, खाण्ड** असें म्हणतात. त्यावरून ‘ **खडी** ’ हा शब्द ‘ **खण्ड** ’ ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध आहे कीं काय अशी शंका येते.]

खडीण, खडण वि. नाठाळ, खोड्याळ (जनावर). Of evil temper, vicious, michievous, head-strong.

[सं. **खट्टन, कठिन**; देप्रा. **खड्डिओ (मत्तः)**. खडाण पहा.]

खडू पुं. एक प्रकारची माती (पांढरी चुन्याची, चिक्कण). A kind of sticken earth.

[सं. **खटी, खाटीका**; म. **शाडू**. एक प्रकारची पांढरी चिक्कण माती; याकाम. **खडुगा = खडळ** (ज्ञा. ११-५३९).]

खडूळ(णें) वाईट होणें, उदसणें, माती-चिखल मिसळणें. To be turbid.

[म. **खडू** किंवा **गढूळ** (नाथा.); परंतु हा शब्द द्राविड आहे. कान. **कढूळ, कदडु** = हलवून गढूळ करणें.]

खड्ग पुं. तरवार. A sword, a dagger.

[सं. **खड्ग**. कांहीं ठिकाणीं **खड्गलता** असा शब्द आढळतो, **खड्गरूपलता-वेल**. याकाम. **खड्गलता** (ज्ञा. १५·२६६).]

खड्डा पुं. खळगा, खोल जागा. A ditch.

[सं. **स्खल्-खल; २ गर्ता-गत्ता-गट्टा**; देप्रा. **खड्डो**; का. **खोड**; बं. **खारल**; सिं. **खडा**; गु. **खाड**; पं. **खड्ड**; हिं. **खड**; कान. **कड्डु** = खळगा.]

१खण(णें) सक्रि. खोदणें, उकरणें, खोल करणें. To dig.

[सं. **खन् १ खनने**; पा. **खन**; प्रा. **खण**; हिं. **खनना**; गु. **खणवूँ**.]

२खण(णें) सक्रि. त्रास देणें. To trouble, harass.

[सं. **क्षण्, खन् १ हिंसायाम्**; याकाम. **खणुवाळा** = खडवडीत, कठीण (ज्ञा. १५·१६५).]

खणखण स्त्री. एक प्रकारचा आवाज. Rattling sound.

[सं. **खणखणाय** (ध्वनिशब्द).]

खण पुं. चोळीचें कापड (१८ तसु; २७ इंच), इमारतीचा एक लहान भाग (५–६ फुट लांब रुंद अशी जागा), पेटीचा एक लहान भाग, कप्पा. Cloth for bodice, a portion of house, a secret drawer (in a cupboard).
[सं. **क्षण** (?).]

खणतें न. जमीन खणावयाचें हत्त्यार. A spade.
[सं. **खनित्रक**; पा. **खनित्ती**; प्रा. **खणित्त**; बं. **खन्ता**; ओ. **खणता**; हिं. **खन्ती**; अकामसा. **खणती**=खणण्याची क्रिया (**खणणें + ती**–मराठी प्रत्यय).]

^{1}**खंड(णें)** क्रि. तोडणें, तुकडे करणें. To lop, to make pieces.
[*IE*. Qne; सं. **खण्ड् १०** अवयवे; प्रा. **खंड.**]

^{2}**खंड(णें)** मक्ता करणें, करार करणें. To rent, to take on rent.
[कान कुडे.]

^{1}**खंड** पुं. तुकडा, ग्रंथाचा भाग, अध्याय, अडथळा. A piece, chapter, section, obstruction.
[*IE*. Qel, Qela; सं. **खण्ड**; **काण्ड**, **अकाण्ड** पहा. ह्या शब्दाचा अर्थ ‘ तुकडा, भाग ’ असा आहे. त्यावरून **खंड पडणें**, =अडथळा होणें, विराम होणें असा अर्थ रूढ झाला.]

^{2}**खण्ड** पुं. जमिनीचा सारा, ठराव, निकाल, मक्त्याबद्दल रक्कम. Rent of the land, agreement about rent.
[कान. **कडे.** ह्यावरून **खंडगुन्हेगारी**=दण्ड, **खंडकमाविशी**, **खण्डणी** हे शब्द सिद्ध होतात.]

खणपट स्त्री. निकटपणा, सान्निध्य, पिच्छा. Closeness, proximity, pursuit.
[सं. **क्षणपट.**]

खंडी स्त्री. धान्याचें माप (२० मणांची खंडी), पुष्कळ, मोठी रास (लक्षणा). A measure (for corn), a heap.
[द्रा. **कंडि**; कान. **कंडुग.**]

खंडोबा पुं. एक देवता, महादेवाचा अवतार, स्कंधाचा अवतार. A deity.
[सं. **स्कंध** (विशेषनाम).]

^{1}**खत, खात** न. जमिनींत घालावयाचें शेणमूत. Manure.
[सं. **खत**, **खात**, √ **खन्**; बं. **खात**; ओ, **खात**; गु. **खातर**, **खात्रम्**; प्रा. **खत्तम** (भोंक). असा हा शब्द संस्कृतोत्पन्न व्युत्पादिला जातो. परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. शब्द परकी, आर्येतर असावासा वाटतो. द्राविडी **खड्डा**, **खळगा**, वगैरेंतील ‘**ख**’ शीं संबद्ध आहे. याकाम. **खातवड** = उकिरडा (ज्ञा.) < सं. **खातवटीका**; याकाम. **खतेलें**=लिप्त (ज्ञा. १६·२७).]

^{2}**खत** न. पत्र, दस्तऐवज, कर्जनामा. A document, an agreement, a deed.
[अर. **खत्**=**पत्र**; अकामसा. **खतावणी** = खातेवार नोंदीची वही.]

^{3}**खत** न. जखम, दुःख. A wound.
[सं. **क्षत**; याकाम. **खत** (ज्ञा); अकामसा. **खता** =दुःखें, किंतु; (याकाम. **खता**.–ज्ञा. ४·२०८).]

खतम् अ. शेवट, समाप्ति दाखविणारा शब्द. A word showing completion, end, ‘ finis. ’
[अर. **खतम्**=कुराणाच्या आदीपासून अंतापर्यंतच्या पठणाबद्दल पारिभाषिक शब्द. √ **खतम्** = संपविणें, शेवट, पुरें करणें. **खातम्** = मुद्रा, शिक्का. ह्यावरून मराठींत ‘ **खतम्** ’ म्हणजे संपूर्ण–शेवट–समाप्ति–नाश असा अर्थ झाला.]

खतीब पुं. मुसलमानांचें आडनांव, खुतबा म्हणणारा. A Muslim surname.
[अर. **खतीब्**; अकाम. **खुतबा.**]

खत्रड, खत्रुड वि.(न.) क्षुद्र, लहान, हलक्या किंमतीचें. Insignificant, petty, of low price.
[सं. **१ क्षुद्र**; पा.प्रा. **खुद्द**; बं. **खुद**; ओ. **खुद**; किंवा २ सं. **क्षुद्र + ट** (अल्पार्थे), अतिक्षुद्र>खत्रुट; ‘**क्षत्रिय +ट**’ अशीहि व्युत्पत्ति देतात परंतु ती योग्य नाहीं.]

खत्रा पुं. धोका, भीति, शंका, घोटाळा. Danger threat, confusisn.
[अर. **खत्रा**; पेकाम. **खत्रा** (रा. ५-१७३).]

खदखद(णें) अक्रि. खदखद आवाज करणें. To boil.
[सं. **कर्द्**, कुत्सिते शब्दे (स्कद्, स्खद्); **ध्वनिशब्द.**]

खनि स्त्री. खाण. A mine.
[सं. **खनि**, √**खन्**; अकामसा. **खनिज** = खाणीमध्यें सांपडणारें (खनि + ज, √ जन्).]

खंती, खंत स्त्री. खेद, खिन्नता, हुरहुर, क्षमा, माफी, समाधान, कंटाळा, त्रास. Dejection, forgiveness, avoidance.

[सं. √क्षम्>क्षान्ति; प्रा. खंति; क्षज् १० कृच्छ्र-जीवने (?); याकाम. खंती (ज्ञा. १८·२१८)]

खंती करिती कर्मांची । ते गांवंहे ना ॥ ज्ञा. १८·२१८

खंदक पुं. किल्ल्याच्या तटाच्या भिंतीजवळील चर. A moat.

[अर. **खंदक**; सं. **खातक** (?).]

खंदा वि. सामर्थ्यवान्, उभा, धाडसी, साहसी, ज्ञानी, शहाणा, शूर. Able, ready, adventurous, prudent, brave.

[फा. **खंदा** = हास्य; **कन्दा**, **कुन्दा**.]

खप(णें) क्रि. संपणें, विकणें, मरणें, टिकणें, श्रम करणें. मोलानें काम करणें. To fiinish, to exhaust, to die, to toil.

[सं. **क्षी**, **क्षप्** (क्षपित = नष्ट केलेला.); प्रा. **खप**; बं. **खाप**; हिं. पं. **खपत**; सिं. **खपू**; गु. **खप**; < याकाम. **खप** = 'विक्री;' हा अर्थ 'संपणें, सरणें,' ह्या अर्थावरून प्राप्त झाला.]

खपला पुं. तुकडा, सालपट. A piece, a scale.

[म. **खाप** = तुकडा; अकामसा. **खपली**, **खवला** = लहान तुकडा.]

खपा, खप्पा वि. नाखूष, रुष्ट, नाराज (खप्पा मर्जी). Displeased, disgusted with.

[अर. **खपा** = रागावलेला, गुदमरलेला; पेकाम. **खपा**, (रा. ५·१६).]

खपीप वि. लज्जित, श्रमी, लाजलेला. Abashed, put to shame.

[अर. **खफीफ**; पेकाम. **खपीप** (दिमरा. १-८५).]

खपुष्प न. आकाशाचें फूल, एक असंभाव्य वस्तु (सशाच्या शिंगासारखी). A term used to express an impossibility or a non-existent thing.

[सं. **ख** + **पुष्प**.]

खप्पड वि. रूक्ष, निःसत्त्व, सुरकुत्या पडलेला. Decayed, sunken, shriveled (features from age).

[सं. **कर्बर**, **कर्बट** (?); देप्रा. **खप्पुर**, **खप्पर**; प्रा. **कब्बड**.]

–खरपड स्त्री. भांड्याच्या तळाशीं लागलेलें करपलेलें धान्य. Burnt substance sticking to the bottom of the vessel.

[कान. **करकु** = खरपड. करपणें हा धातु द्राविडोद्भव आहे. कान. **करिकर्** = भाजलेली, करपलेली अवस्था.]

खबदाड नस्त्री. खडबडीत जागा, खळगी, भगदाड. A rude excavation or hollow.

[द्रा. (?); कान. **कब्** = **दगड**.]

खबर स्त्री. बातमी, वृत्त, समाचार. News, intelligence.

[अर. **खबर्**; अकामसा. **खबरदार** = मजबूत, धडधाकट, सावध; **खबरदारी** = काळजी, बंदोबस्त, सावधगिरी; पेकामं. **खबरदारी** (खरे २·५४३); ह्या शब्दाच्या बाबतींत अर्थभेद झाला आहे. एखाद्यासंबंधीं बातमी राखणें, –पाळतीवर असणें, –काळजी वहाणें, –सुरक्षितपणा पाहणें–अशा मार्गानें अर्थ झाला आहे.]

खबाळ(णें) सक्रि. आधाशीपणानें खाणें, उधळणें. To eat voraciously, to squander.

[अर. **किबाल** = समृद्धि, > **खबाला**.]

खबूतर न. कबूतर पहा. कपोतपक्षी. A pigeon

[फा. **कबूतर्**.]

खमकावि(णें) क्रि. रागें भरणें, दरडावणें. To scold, to menace.

[सं. **क्षमक** (नाधा.) ?]

खमक्या वि.(पुं.) जोरदार, चलाख. Smart, prompt, vehement, ardent.

[फा. **खम्** = **गांठ**.]

खमखमीत, खमंग वि. मसालेदार (पदार्थ), चवदार मसाला घातलेला. Well-spiced and seasoned.

[सं. **क्षार**–ह्या शब्दाशीं संबंध आहे का ?]

खमीस पुं. शर्ट, सद्रा. A shirt.

[*Portu.* Camisa; *Tunic.* Kamis; अर. **कमीस**.]

खंबीर वि. ठाम, मजबूत, भक्कम. Firm, strong, stable.

[फा. **खम्** = गांठ, कडी (?); **खम** = ठाण.]

^{1}खर स्त्री. लघवींतून जाणारा पांढरा पदार्थ, केर. White sediment, rubish, dirt.

[सं. **क्षार**; प्रा. **खार**; *Npers.* xār; *Gr.* Charzaros; गु. **खरवूँ**; सिं. **खरणु**; पं. **खरना**; का. **छरुन्**.]

^{2}खर वि. तीव्र, तिखट, दाट, घट्ट. Sharp, pungent.

[सं. क्षर ; प्रा. खर ; याकाम. खर, खरागणें = जळणें, भाजणें (नरुस्व ३०३).]

खरकटें न. घाण, उष्टा पदार्थ. The fragments remaining where a meal has been taken.
[सं. किर + किट्ट (?).].

¹खरखर.-रां अ. खरखर अशा आवाजानें. With rattling sound.
[ध्वनिशब्द. सं. **क्षर** > **खर**; अकामसा. **खरखरणें** = खडखड असा आवाज होणें. **खरखरीत** = खडबडीत, ओबडधोबड, **खरखरमुंडा** = एक प्रकारचा भिकारी, फकीर, कफल्लक माणुस.]

²खरखर स्त्री. डोळ्याची वेदना, पश्चात्ताप. Shooting in the eye, grieving about.
[सं. **क्षार** = डोळ्यांतील क्षार–खार; मळ.]

खरंगट(णें) सक्रि. भरडणें. To break coarsely, to bruise.
[सं. खल् + घट्ट् (द्विधातुसंयोग).]

खरचट(णें) सक्रि. घासून कातडी निघणें. To be abraded.
[सं. खर्ज् + चट्; (द्विधातुसंयोग).]

खरड(णें) सक्रि. घासणें, तासडणें, ओरखडणें. To scrape or rub off roughly, to shave roughly.
[सं. **क्षर + ट, कृष्ट,** √खर्द् १ दंदशूके; प्रा. **खरड** = लेपणें; देप्रा. **खरडिअं** रुक्षं भग्नंच (९८-१३); गु. **खर** = ओबडधोबड; अकाम. **खरड, खरडपट्टी** = तासडंपट्टी. सं. **क्षर**; देप्रा. **खरडिअ**; गु. सिं. **खरडो**; हिं. **खरा.**]

खरडा, खर्डा पुं. कच्चा मसुदा, मसुद्याचा कागद. A memorandum.
[हिं. **खर्रा, खर्डा.**]

खरतवंड न. नातवंडाचें नातवंड. Great–great–grandchild.
[सं. (?); देप्रा. **खरहिओ** (पौत्र); ‘ **वंद** ’ हा कोणत्या शब्दाचा अवशेष आहे ? कानडी ‘ **गंड** ’ ह्याचा आहे का ? **परतवंड, नातवंड** पहा.]

खरपूस वि. चांगला तयार झालेला, भाजलेला, खमंग, खुसखुसीत, चमचमीत, तीक्ष्ण, बोचणारा, प्रखर. Well roasted, fried, parched.
[सं. १ क्षर; देप्रा. **खरडिअं रुक्षं भग्नंच** (९८·१३). २ **कर्पट,**<**करप(णें)** ; याकाम. **खरपुस** (ज्ञा. १३-२९०). ‘**कर्पट**’ हा शब्द कृत्रिम दिसतो; कान. **करि**=काळा, **करिपु**= करपणें.]

खरपोडी, खरपड स्त्री. पोपडी, साल, करपलेला भात. A peeling, burnt rice.
[सं. **क्षर, पुट**; याकाम. **खरपें** = रुक्षपण, नीरस (ज्ञा. ६·४९०); कान. **करिपु.**]

खरबूज न. फलविशेष, खर्बूज पहा. A melon.
[खर्बुझा.]

खरमरा, खरमरीत वि. स्पष्ट, प्रखर, खणखणीत, तीक्ष्ण. Blunt, peremptory, biting.
[ध्वनिशब्द, **क्षर + मर**; याकाम. **खरमरा** = प्रचंड]
तेथ उन्हाळां आगी खरमरा । तेला तुपांचिया कोठारां ॥
लागला आणि वारा । सुटला जैसा ॥ ज्ञा. १६-३९५.

खरवड स्त्री. जळलेला–करपलेला भात (·किंवा) त्याचा थर. Scrapings of rice or milk adhering to the pot.
[सं. **कर्पट**; प्रा. **खरड**=लेपणें; खरपोडी पहा. **खरवड(णें)** =खरडून काढणें. द्रा. **कर; करपणें** पहा.]

खरवस पुं. जनावराचें कोवळें दूध. (हें शिजवून त्यांत साखर घालून वड्या करतात.) Biestings boiled with sugar.
[सं. **क्षार + रस** (?).]

खरसाहाण स्त्री. धार लावण्याचा दगड. Grind-stone.
[सं. **क्षारशान.**]

¹खरा वि. सरळ, सत्य, सच्चा, विश्वासू, प्रामाणिक, निष्पाप. True, genuine, right, full.
[सं. **खरः**; प्रा. पा. **खर**; बं. **खरा**; ओ. **खरा**; सि. **ख़रो**; गुं. **खरूँ**; सं. **खलु** (?).]

²खरा पुं. खडा. A piece of stone.
[**खडक, खडा** पहा. याकाम. **खरा** (ज्ञा. १४·१२८).]

¹खराटा, खरांटा पुं. बांबू, नारळी, पोफळीच्या काड्यांची केरसुणी. A broom, a stick-broom.
[सं. **क्षर + यष्टि**; प्रा. **खर + लट्ठी.**]

²खराटा पुं. फाका, अप्राप्ति. Loss, unfruifulness.
[सं. **क्षर + ट** (**अल्पार्थे प्रत्यय**); याकाम. **खराटा** (ज्ञा. ५·११२).]

खराब वि. वाईट, बिघडलेला, नापीक, उध्वस्त, दुराचरणी. Bad, uncultivable, vicious.

[अर. खराब्; पेकाम. **खराब** (खरे २-८५०); अकामसा. **खराबा** = नापीक, ओसाड जमीन (पेकाम. खराबा–रा. ६-५९१); **खराबी** = तोटा, नुकसानी, (पेकाम. खराबी–पाव ३२).]

खरारा पुं. घोडा खाजविण्याचें साधन. A curry-comb.

[सं. **क्षर**; हिं. **खरारा**; मराठींत हा शब्द हिंदीमधून आला असावा.]

खरीता, खलीता पुं. (बादशहाचें) फर्मान, आज्ञापत्र. A royal order, a silk bag in which petitions, orders or letters are enclosed.

[अर. खरीत, खलीत; रेशमी पिशवी, पत्रें घालण्याची, त्यावरून आंतील पत्रें वगैरे.]

खरीदी, खरेदी स्त्री. विकत घेणें, क्रय. Purchasing, a thing purchased.

[फा. **खरीद.**]

खरीफ वि. पावसाळयांतील पीक, कार्तिक महिन्यांतील पीक (तांदूळ, मका, वगैरे धान्यें. रब्बीच्या उलट). The Autumnal harvest.

[अर. **खरीफ्**–पावसाळा; पेकाम. **खरीफ** (रा.३·१६४) कार्तिकफल (राव्यको. ३३८).]

खरूज स्त्री. त्वचेचा रोग (ह्यांत खाज सुटते). Scabese.

[सं. **खर्ज्** १ दन्दशूके; द्रा. **कज्जी** (तद्भव शब्द); (**कच्छु, कण्डु, खर्जु, खस** = खरूज). ध्वनीवरून हा शब्द परकी असावासा वाटतो.]

खर्च(णें) उक्रि. संपणें, संपविणें, व्यय करणें, उपयोगी लावणें. To expend, to consume, to spend.

[अर. **कर्ज**; फा. खर्च; अकामसा. **खर्च** = वेंच. **खर्चवेंच** = खर्च वगैरे.]

खर्बूज न. फलविशेष. A melon.

[*IE.* QERP. = to turn, to bend; सं. चर्भ; **चर्भट** = भोपळा. *Lat.* corbis (basket); सर्बीयन. **कर्पुझ**; रशि. **अर्बुझ**; पोलीश. **कर्पुझ्**; फा. **खर्बुझा.** हाच शब्द तुर्की भाषेंत व तेथून फार्सी भाषेंत व तेथून मराठींत आला आहे.]

खल पुं. कुटण्याचें खोलगट साधन, चूर्ण करण्याचें पात्र, खल(बत्ता). A metal or stone mortar.

[सं. **खल्ल**; प्रा. **खल्ल**; ओ. गु. म. **खल**; याकाम. **खल** (नरुस्व. ५६३); **खळगा, खोल** वगैरे शब्द संबद्ध आहेत. मूळ शब्द द्राविडी असून संस्कृतीकरण नंतरचें आहे.]

खलक, खळक वि. फितुरी, कारस्थानी. Treacherous.

खलक पुं. लोक, झुंड, थवा. People, crowd.

[अर. **खल्क** = लोक; पेकाम. **खळम** (रा. ८-२२); अकामसा. (**पाव**) **खलक** = पायीं चालणारे शिपाई. **खलक-दुनिया** = लोक, सारें जग.]

खलबत, खिल्‌बत न. कारस्थान, गुप्त मसलत. Secret consultation.

[अर. **खल्‌वत्** = गुप्तता, एकांत; शिकाम. पेकाम. **खल्बत** (सभा. १२, पदमव. ७४.)]

खलाशी पुं. गलबत चालवणारा, नावाडी, नाखवा. खारवा. A sailor.

[अर. १ **खलास्** = तंबू ठोकणारा, जमीन मोजतांना सांखळी धरणारा, खलासी. २ **खलाशी** = १ सुकाणूं, २ कालव्याचा फूट बांध.]

खलास वि. संपलेलें, सरलेलें, मुक्त, समाप्त. Consumed, exhausted.

[अर. **खलास्** = मोकळें; शिकाम. पेकाम. **खलास** (रा. २०-४९).]

खलेल, खलल स्त्री. विरोध, अडथळा, हरकत, दांडगाई. Rude or violent demeanour.

[अर. **खलल**; शिकाम. **खलेल** (चित्र. ११७); पेकाम. **खलेल** (रा. ८-१८०).]

खल्वाट वि. टक्कल पडलेला. Bald.

[सं. **खल्वाट** (√खल्, √कुल्); *IE.* *Qd*; सं. **खल्**; *Lat.* Cal, Calvus = bald; *Teut.* Chal; *Ital.* Calv, Calvinus (bald.).]

खवखव(णें) क्रि. खाज सुटणें, पेटणें, चेतणें. To be inflamed or excited.

[सं. **कू १ शब्दे; क्षू १ हिंसायाम्; खर्व् १** दर्पे. (रा.).]

खवचट वि. खाजरा, नासका, कुजका, (त्यावरून) कुत्सित. Rancid, Acrimonious, bitter.

खवखव(णें) अक्रि. कफ दाटून गुदमरणें, खाजणें. To be choaked up with the throat being affected, to irritate.

[सं. क्षव (ना.), √क्षु २ शब्दे. क्षव-(द्विरुक्ति) क्षवक्षव-.]

खवडा पुं. डोक्यांतील व्रण, फोड, खरजेचा फोड. A pustule in the disease scald-head.
[सं. √ क्षम् ; प्रा. खव + ट.]

खवणा वि. पुं. नागवें, नग्न, दिगंबर जैन. Naked, a mendicant of the Jain religion.
[सं. क्षपणकः; प्रा. खवणअ; याकाम. खवणा (ज्ञा. ४·२२).]

खवंदळ(णें) क्रि. ढवळणें, हलविणें, खिजविणें, चेतविणें. To stir about, to agitate.
[सं. क्षु + दल्,-ध्वल्, (द्विधातुसंयोग.)]

खवला पुं. माशाची एक जात, ठोका, घाव, खपली. A scoop or scraper, a scale.
[सं. खवल्ल ; प्रा. खवल्ल.]

खवळ(णें) अक्रि. संतापानें लाल होणें. To work up into fury.
[सं. क्ष्वेल् १ चलने; देप्रा. खवलिअ < क्ष्वेलित=क्रुद्ध.]

^{१}खवा पुं. खुबा, खांद्याचा सांधा, खवाटा. The shoulder-joint.
[सं. स्कन्धः (?); देप्रा. खवओ (९३-१६) ; गु. खभो; पं. हिं. खवा; म. खुबा.]

^{२}खवा पुं. मावा. Milk hardened into a ball, milk conglobated by boiling.
[सं. क्षयः (?); हिं. खवा.]

खवास पुं. सरदार, उमराव, मानकरी, हुजऱ्या, सेवक. A lord, a page, a valet.
[अर. खवास्स् (अने. वचन "खास्स्" चें)=सरकार-संदेश नेणारा. ह्या शब्दाचा अर्थ परस्परविरुद्ध असा दिसतो. परंतु ते विरुद्ध अर्थहि संलग्नच आहेत.]

खवीस पुं. पिशाच्च, जबरें भूत, खुनशी मनुष्य (लक्षणा). A sprite or goblin (viewed as the spirit of a deceased Musalman), a furious fellow.
[अर. खबीस्=दुष्ट पिशाच.]

खस पुं. वाळा, सुगंधी गवत, त्यापासून होणारें अत्तर. A kind of *attar*.
[अर. खस्स् ; फा. खस्.]

खसखस स्त्री. अफूचें बीं. Poppy-seed, opium:seed.
[अर. खश्खश् , खस्खस ; का. कसकसे; सं. खस्खस (कृत्रिम संस्कृतीकरण आहे.)]

खस(णें) क्रि. पडणें, घसरणें, खालीं जाणें. To slip, to fall.
[सं. खष् १ हिंसायाम्; प्रा. खसइ ; बं. खस ; ओ. खसिबा ; हिं. खसना, गु. खसवूँ. खचणें पहा.]

खसासित वि. कठोर, कापणारें. Cutting, cruel.
[सं. खष्; याकाम. खसासित (ज्ञा. १६-२४४).]

खस्त वि. नष्ट, जमीनदोस्त, नाश झालेलें, खराब, नुकसान, तोटा. Destroyed, cut to pieces, damage.
[फा. खस्त = जखमी, रोगी ; पेकाम. खस्त=भग्न (साने पयाव. १९८).]

खस्ता स्त्री. काळजी, संकट, त्रास, श्रम. Cares, pains.
[फा. खस्त=जखमी, भग्न; खस्तह्=क्लेश, राव्यको. २३२.]

^{१}खळ स्त्री. चिकट पातळ पदार्थ (धान्यापासून तयार केलेला); घारग्याकरितां भिजविलेलें पीठ. Starch, paste, wet flour for pudding.
[सं. खलि; प्रा. खली; देप्रा. खली तिलपिण्डिका (९३-११); बं. खली; ओ. खळी; गु. खोळ (पुं.); सिं. खरु (पुं. स्त्री.); हिं. खली; पं. खली = पेंड.]

^{२}खळ वि. दुष्ट. Vile, base.
[सं. खल; प्रा. खल; गु. खळ, खल; हिं. खल.]

खळ(णें) अक्रि. पडणें, विसरणें, एकदम थांबणें, मध्येंच अडखळणें, वीर्यपात होणें (मर्यादित अर्थ). To pause, to be obstructed; to have a seminal emission.
[सं. स्खल् ; प्रा. खल; गु. खळवूँ.]

खळखळ स्त्री. गोंधळ, गडबड (मुलांचा) Botheration, bustle.
[सं. स्खल् (द्विरावृत्ति); प्रा. खलहल; गु. खळखळ; हिं. खलखल, अकाम. खळाळ = मोठ्यानें गर्जून; खळाळी-खळखळाट.]

खळखळ स्त्री. पाण्याची गति :(मंद अथवा शीघ्र), कटकट, ओढाताण (लक्षणा), दगदग, त्रास. Rippling of water, trouble, toil.
[ध्वनिशब्द; स्खल; अकामसा. खळखळाट=ओढ्याचा वाहण्याचा आवाज.]

खळखळ(णें) अक्रि. खळखळ आवाज करणें. To rattle.

[सं. स्खल् ; प्रा. खल् ; (ध्वनिशब्द).]

-खळाळ पुं. खळखळ आवाज करणारा पाण्याचा प्रवाह. A rattling stream.

[ध्वनिशब्द; सं. स्खल् ; प्रा. खल; याकाम. खळाळ (ज्ञा. ७-७८); वकाम. खळाळ (ए. भा. ७-५५२).]

खळबळ स्त्री. गोंधळ, चळवळ, ओरड. Bustle, agitation, disturbance.

[सं. स्खल् , स्फल् ; प्रा. खलभलीय; देप्रा. खलभलिय; गु. खळबळवूँ; पं. खल्हबली; बं. हिं. खलबल.]

खळबळ(णें) सक्रि. पाण्यांत घालून जोरांत हलविणें. To shake about in water (a cloth).

^{१}खळें, खळ न. धान्य मळण्याचें ठिकाण, कणसें तुडवून धान्य तयार करण्याची जागा. A treading or threshing-floor (in the field).

[सं. खलम् ; पा.प्रा. खलम् ; देप्रा. खल्ल=वृत्तिविवर; बं. खल; ओ. खळा; सिं. खरो ; गु. खळूं; याकाम. खळें (नरुस्व ६२०).]

^{२}खळें न. रणभूमि, स्मशान. A battle-field, a burning ground.

[सं. खल्ल, क्षय (?), √क्षी; याकाम. खळें=रण.]

खळगा पुं. खड्डा, खोल जागा. A pit.

[सं. खल्ल. परंतु हा शब्द द्राविडी असावासा वाटतो. खोल, खल, खळी, खोली इत्यादि शब्द एका कुटुंबांतील होत.]

खा(णें) क्रि. जेवणें, भोजन करणें, तोंडांत घालून चावून आंत घेणें. To eat.

[सं. खाद्; पा. खाद; प्रा. खाअ; बं. खाओया; ओ. खाइबा; हिं. खाना; पं. खाणा; गु. खावूँ; याकाम. खायिर=खाणारा (ज्ञा. १८-५५४). कांहीं लाक्षणिक अर्थ उत्पन्न झाले आहेत. उदा० घेणें, व्यापणें, आंत घेणें. अकामसा. खाल्लें (भूतकाळचें रूप)=खादलें. **-खावटी, खाओटी**=खाण्याचे-भोजनाचे पैसे. **-खादाड**=आधाशी (<खाद+अट्ट); **-खावट, खावाड**=आधाशी (<खाद+अट्ट) **-खाधिर**=खाणारा. (ज्ञा. १८·५५४).]

खाई स्त्री. खड्डा, खळगा, खांच. A ditch, a trench.

[सं. खात, खातिका; पा. खातो; देप्रा. खाइआ परिखा (९६-४); प्रा. खाअ, खाइआ; बं. ओ. खाइ; सिं. खाही; गु. खाई; याकाम. खाई (ज्ञा.).]

खाऊ पुं. वि. खाण्याचा जिन्नस, खादाड (समासांतीं). Sweetmeat, voracious.

[सं. खादुक, √खाद्, √स्खद् ; गु. खाउ=नाश; पं. हिं. खाऊ; का. खाओ=आधाशी.]

^{१}खाक वि. पूर्ण जळलेला, राख झालेला. Burnt to ashes, reduced to dust.

[अर. फा. खाक्=धूळ.]

^{२}खाक स्त्री. कक्षा (काख पहा). The armpit.

[*IE.* Qoksa; सं कक्षा, कक्ष ; *Av.* kasa ; *Lat.* Coxo; *Ahd.* Hahsa; म. काख (वर्णव्यत्यास).]

खाकर(णें) क्रि. खोकून बडका बाहेर टाकणें. To hawk or force up (phlegm).

[सं. खात्करोति, खाट्करोति; पा. कक्कारेति; बं. खाँकर; ओ. खाकार; हि. खाकार; पं. खागर; गु. खाँकडिवूँ; याकाम. खांकर (ज्ञा. १७-९३), खाकर=उत्पन्न होणें (ज्ञा. १५-१५९); अकामसा. खाकर-रा=बडका, श्लेष्मा; (सं. खक्खर=भिकाऱ्याची काठी).]

खाका स्त्री. गोसाव्यांमधील एक वर्ग (खाका गोसावी). A class of *gosavis.*

[अर. फा. खाक=राख. >खाकी.]

खाक्या पुं. रीत, पद्धत, बाणा. Manner, method, way, attitude.

[फा. खाका=आराखडा, खर्डा.]

खा खा स्त्री. खाण्याची अनावर इच्छा. Ardent desire to eat.

[म. खाणें. आज्ञार्थ द्वि. पु. ए. व. याकाम. खाखाणें. (ज्ञा. १-१३१). खाखाइल्या रणमोहरी (रु. ८-२१).]

खाकी वि. मळकट पिवळा रंग. Khaki colour.

[फा. खाक्=धूळ, माती; हिं. खाकी=मळखाऊ. १८५७-५८ मध्यें ह्या रंगाचे कपडे सैन्यांत देऊं लागले. तेव्हांपासून हा रंग विशेष आवडता होऊन बसला.]

खागें न. एकान्तस्थळ, संकेतस्थळ, चोराचें गुप्त निवासस्थळ. A secret meeting-place.

[सं. क्षी, क्षय (?); याकाम. खागें (नरुस्व. ४००. ली. च. ४ पृ. २४).]

जियें वैराग्य:येणें बोलें । मार्गा संसिद्ध रूप केलें ॥
किंबहुना तें आपुलें । मेळवी खागें ॥ ज्ञा. १८-९५४.

खाच(णें) अक्रि. कमी होणें, खचणें. To sink down, to ruin.

[सं. क्षि १ क्षये-(णिच्) क्षयय <खांच.]

तैसे दानपुण्य खांची । गोत्र कुटुंबा वंची
परी बायणी स्त्रियेची । उणी हो नये ॥ (ज्ञा.१३·७९३).

खांच(णें) सक्रि. संकटांत रहावयास लावणें. To force one to live in difficulty.

[सं. क्षज् १० कृच्छ्रजीवने.]

म्हणौनि ते बुद्धि रचूं । मतवाद हे खांचूं ।
सोलीव निर्वचु फलितार्थुचि ॥ (ज्ञा. १३·१०४४)

खाच, खांच स्त्री. खड्डा, खळगा. A pit, a ditch.

[म. **खचणें** ह्या धातूपासून (√क्षी=क्षये); कान. **कच्चु**=खोंचा, खळी; अकाम. **खाचखोच**= बारीकसारीक दोष (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द-एक **खाच** हा **आर्य** व **खोंच** हा द्राविडी). -**खाचर**=खळगा, खड्डा, भातजमीन;-**खाचरा-खाचरी-खांचा**=खोबण, खांच.]

खाज(णें) क्रि. कंडू उत्पन्न होणें, घशांत खवखवणें. To itch, to affect the throat or body with itching sensation.

[सं. **कास्** १ शब्दकुत्सायाम्, **खज्** १ व्यथने, सिं. **खाजी**; पं. हिं. **खाज**; रुमा. **खंझ्** ; अकामसा. **खाज**= कंडू, सुरसुरी, खुमखुमी (लक्षणा). -**खाजण**=एक प्रकारची तयार केलेली शेतजमीन (देप्रा. **खजणो** (कर्दमः); गु. **खाजण**); -**खांजणी**=मिळवणी, बेरीज, पाढ्यांचा प्रकार. -**खाजरी**= खाज उत्पन्न करणारी वनस्पति, खाजकुली. -**खाजविणें**=(प्रयोजक रूप)<**खाज**.]

खाजें न. किराणा, खारीक, खोबरें, खसखस, खडी इ. Grocery, sweets.

[सं. **खाद्य**; पा. **खज्जम्**; प्रा. **खज्जय**; ओ. **खजा**; हिं. **खाजा**; बं. **खाजा**; म. **पंचखाजें**=खारीक, खोबरें; खिसमिस, खडीसाखर, खसखस; 'ख' नें आरंभ होणारे पांच खाण्याच्या जिन्नसांचे शब्द.]

खाट, खाटला स्त्री. (चार पायांची दोरांनीं विणलेली) बाज, मांचा, चारपाई, साधा पलंग. A cot, a common bed-stead.

[सं. **खट्वा**; प्रा. **खट्टा**, **खट्वा उल्ल**; सिं. **खटोलो**, **खत**; पं. **खट**, **खाट**, **खटोली**; हिं. **खट**, **खाट**, **खटोला**; बं. **खाटूली**; गु. **खाट**, **खाटला**; हिं. **खाट्**, **खट्वा**. संस्कृतमध्यें दुसरा शब्द आढळतो. परंतु तो नंतर घेतला आहे. तामील. मल्या. **कट्टिल**=खाट. हाच शब्द पोर्तुगीज लोकांनीं उचलला.]

खाटक, खाटीक पुं. पशूंना मारणारा, मांसविक्रेता, क्रूर (लक्षणा). A butcher.

[सं. **खट्टिक** (सौनिक), **खट्टिक**; देप्रा. **खट्टिक**; प्रा. **खट्टिअ**, **खट्टिक्क**; परंतु संस्कृतीकरण नंतरचें.]

खाटी वि. आंबट, तुरट. Sharply sour.

[सं. **खट्ट**; प्रा. **खट्ट**; देप्रा. **खट्ट**; बं. **खाटा**; ओ. **खटा**; हिं. **खट्टा**; सिं. **खटो**; गु. **खाटू** ; (**खाटी डाळ**=खाटें वरण). मूळ शब्द देप्रा. असून त्याचें नंतर संस्कृतीकरण व प्राकृतीकरण झालें आहे.]

खाड, खांड न. दाढी, मिशा, दाढी. The beard and whiskers.

[सं. (?); देप्रा. **खड्डुं इमश्रु** (देशीनाममाला २-६६); याकाम. **खाडी**, **खांडी** (ज्ञा. १३-५६८), **खाड** (ली. च. १-५); बकाम. **खाड** (एरुस्व १२-१४९); शिकाम. **खाड** (पै. डी. क्रिस्टो २५); अकाम. **खाड**, **खाडू**, अरबी मध्यें **खड**=गाल असा शब्द आहे तो ताडून पहावा.]

नाभिचुंबित खाड । ली. च. १५
अर्ध खाड अर्ध मिशी । पांच पाट काढिले शिरासी
रक्तें दाटलीं खाड मिसिया जरा ॥ ए. रुस्व १२-१४९
पै. डी. क्रिस्टो २५.

खाडा पुं. खंड, खळ, खांच, खळगा. A gap, a pause, an intermission, a hole, a pit.

[सं. **स्खद्** १ स्खदने; **खड्** १अवयवे; देप्रा. **खड्डो** खानिः, **खात** किंवा **खंडं** (श.को.); गु. **खाडो**; सिं. **खड** (स्त्री.); पं. **खाड**, **खड** (स्त्री); का. **खोड्** (पुं); रुमा. **खर** (स्त्री.).]

खाडी स्त्री. समुद्राचें जमिनींत शिरलेलें पाणी. An arm of the sea, a creek.

[सं. **स्खल-खल**=खोलगट जागा; बं. **खारी**; पं. **खारी**; सिं. **खारी**; गु. **खाडी**; बं.पं.सिं. मधील '**र**' चा उच्चार ड् मिश्रित आहे. (सं. **खन्**>**खात**; किंवा **क्षार**. (श.को.).]

खाडू वि. मठ्ठ, दुष्ट, निर्मर्याद. A fool, cruel, vicious.

[कान. **कड्डु**=मठ्ठ.]

खाडु वि. मिशा काढलेला मनुष्य. Having moustaches shaved.

[**खाड**=मिशा. **खड्डुं इमश्रू** (देशीनाममाला) २-६६.]

" रक्तें दाटली खाड मिसिया जंटा "
(P. D. Christ. 25).

खाण स्त्री. खोल खळगा, खड्डा, भूविवर, दगड धातु वगैरेंचा खळगा, आगर, सांठा, योनि, जन्म, उत्पत्तिस्थान (लक्षणा). A mine, a source, a place of production.

[सं. खनिः; प्रा. खाणी; बं. खानी; पं. खाणी; सिं. खाणी; का. खाण; हिं. खानी, खान्; गु. खाण; याकाम. खाणी = उत्पत्तिस्थान (ज्ञा. १८-३५२).]

¹खांड स्त्री. ताल किंवा बांध याचा भेद, कातरा. An opening in a dam or mound.

[सं खण्ड; अकामसा. **खांडकी** = चीप, तुकडा (सं. खण्ड), **खांडकें** = उसाचा तुकडा (सं. खण्ड), **खांडवा** = लग्नांतील विड्याची झोळी (<सं. **खण्डवस्त्र**), **खांडवा** = नदीच्या पात्रांतील बसका पूल (सं. **खण्ड**).]

²खांड न. एक प्रकारचें तरवारीसारखें हत्यार. A kind of weapon (like sword).

[सं. खड्ग; याकाम. खांडें (नरुस्व. ११७), **खांडेवाहो** (नरुस्व २५४); अकामसा. **खांडेकरी** = तरवार वाळगणारा; -**खांडेनवमी** = नवरात्रांतील नवमी. ह्या दिवशीं हत्यारांची पूजा करतात. -**खांडोळें** = तुकडा (< **खण्ड**, किंवा **खांड**). खाण्ड पहा.]

अरि–रायांचा तोंडींसूनि खांडें : नेति स्त्रीरत्न । नरुस्व ११७.

खांड(णें) सक्रि. मोडणें, खंडणें, तोडणें, कुरतुडणें. To break, to cut, to gnaw.

[सं. खण्ड् १० अवयवे, भेदने; याकाम. **खांडणें** = तोडणें, खडणें (ज्ञा. १८·३५, १८०).]

³खांड स्त्री. खडीसाखर. A brown or coarse kind of sugar.

[सं. **खण्डु, खण्ड खण्ड्वम्**; पा. **खण्डो**; प्रा. **खण्डा**; बं. **खाँर**; ओ. **खडा**; हिं. **खाँर**; सिं. **खण्डु**; गुं. **खाँड**; सिंह. **कड** = तुकडा; पं. **खन्नी** (अर्धाभाग); रुमा. **खंडी** (थोडें].]

खांडा स्त्री. तरवार. A sword.

[*Lat.* Clades, gladius; *Kelt.* Clad-yo; १ सं. खड्ग, खण्डक; प्रा. खण्डइ; बं. खाँरा; ओ. खांडा; पं. खण्डा; हिं. **खाँरा**; गु. **खांडु** (खांड पहा); गु.पं.हिं.बं. **खांड**; सिं. **खनो**; का. **खड्क**; रुमा. **खंदो**; **खन्नो**. ब्लोक ह्यानें **खड्ग** आणि **खण्ड** ह्या दोन्हीच्या मिश्रणानें व्युत्पत्ति दिली आहे.]

खांडुक न. करट, दुःख. A tumor.

[१ सं. **कण्ड्** = खाजणें पासून, > कण्डू ; २ सं. **गण्ड**; दुसरी अधिक सयुक्तिक; कारण इतर आर्यभाषांतील शब्द " **सुजणें, फुगणें** " ह्या अर्थी "**गण्ड**" पासून आले आहेत. ' **गण्ड** ' शब्द **द्राविडी** असून त्याचें संस्कृतीकरण झालें.]

खातर स्त्री. खात्री, पर्वा, चिंता, गुमान. Confidence, consideration for, care.

[अर. **खातर्**; पेकाम. **खातरी** (दिमरा. २·१७६); अकामसा. -**खातरजमा** = विश्वास; -**खातरखा** = हितेच्छु; (पेकाम. **खातीरख्याह्** रा. १-५३; १०-२६५.); -**खातरतसल्ली**=खातरनशीन, **खातरनिशा**–मनाचें समाधान: -**खातरी** = खात्री, जामिनकी ; -**खातीर** = दिलासा, विश्वास; (अ. **खातीर**, पेकाम. **खातीर** दिमरा. २-४१.).]

खातें न. पुस्तक, वही, महाजन सावकाराची हिशेबाची वही. A book, an account (with an individual business).

[सं. **क्षत्रम्**; पा. **खत्तम्**; बं. **खाता**; गु. **खातू**; पं. **खात्ता**; ही टर्नरची व्युत्पत्ति पटत नाहीं. हा शब्द अर. **खत्त** = **ओळ, रेघ** किंवा **खित्ता** = **मर्यादा** ह्यापासून निष्पन्न आहे.]

खात्री स्त्री. विश्वास, निश्चय. Confidence, assurance.

[फा. **खातीर्** = हृदय, इच्छा, प्रेम. खातर पहा.]

खाद स्त्री. खाणेंपिणें, अन्न, खाण्याचा जिन्नस, खाण्याची क्रिया,–शक्ति,–पात्रता. Food.

[*IE.* Qhad; सं. **खाद्** (**स्काद्, स्कद्**); *Arm.* xacanem; *Lith.* Kandu; देप्रा. **खद्धं तथा खरिअं भुक्तम्** (९३-१६); याकाम. **खादिला**; गु. **खाध** (न) = शिधासामुग्री, **खाधं** = खाल्लेला; पं. **खाध**=अन्न, **खादा**= खाल्लेला; सिं. **खाधो** (अन्न, खाल्लेला); फा. **क्शायिदन्**. मराठींत ' **खा** ' असा एकाक्षरी :धातु आहे. तो ह्या वरील शब्दांशीं संबद्ध आहे कीं नाहीं हें सांगणें कठीण आहे. भूतकाळचीं रूपें **खादला, खाल्ला** हीं मात्र संबद्ध आहेत. अकामसा. **खादगी**=लांच, गुप्त दिलेली बक्षिसी ; **खादणें**= खाणें. (<सं. खादनम्). **खादाड, खादरा, खादडवादी**= फार खाणारा; **खादू** = खाणारा, खाण्यास सोकलेला.]

खादी स्त्री. ओबडधोबड जाडें कापड. The khaddar.

[देप्रा. **खद्द**; फा. **खारा** = जाड कापड (खारवा); " **खाँरी** "पासून व्युत्पादणें चिन्त्य आहे.]

खान पुं. मुसलमानांतील एक बिरुद. A khan.

[तुर्की. फा. **खान्**; मूळ शब्द **काघान**; त्याचा संक्षेप होऊन अर. **खान** असें रूप झालें. तुर्कांमध्यें हें राजपुरुषाचें बिरुद होतें. ह्याचा अर्थ सरदार, राजपुत्र असा असून मोगल तें वापरीत असत. परंतु आतां अफगाणिस्तान-इराणमध्यें ह्याचा अर्थ राजेश्री, साहेब असा झाला आहे. ह्या शब्दाच्या अर्थांत भ्रंश झाल्यामुळें खानखानान्, खानसाहेब, खानबहादूर असे शब्द वापरांत येऊ लागले. म. **खान्खानान्, खानदान, खानदानी**=मोठ्या घराण्यांतील, कुलीन; **खानु** (स्त्री.), **खानजाद**=दासीपुत्र.]

खाना पुं. घर, खातें, जागा, सामान. A place, a house.

[फा. **खान्**, (√ **कन्दन्**, √**खन्** = खणणें). = घर, खोली, खातें. पुष्कळ शब्दांच्या पुढें हा शब्द घालून सामासिक शब्द सिद्ध झाले आहेत. उदा० दवाखाना, छापखाना, फरासखाना, उष्ट्रखाना, पीलखाना, तोफखाना इत्यादि.]

१**खानगी** स्त्री. दासी. A female servant.

[फा. **खानगी** = दासी.]

२**खानगी** वि. खाजगत, स्वतः मालकाचें (खानगी कारभारी). Private.

खानवटा पुं. गुरांसाठीं केलेला गवताचा गोठा. A shed for cattle.

खानेसुमारी स्त्री. घरा-माणसांची, गुरांची, जिन्नसांची मोजदाद. Census.

[फा. खान् = **घर**; + **शुमारी**.]

खांदा पुं. दंडाच्या वरचा भाग. A shoulder.

[सं. **स्कन्ध**; पा.प्रा. **खन्ध**; देप्रा. **खन्धम्**; गु. **खांद**, **खांधो**; पं. **कन्हा**; हिं. **कांधा**; ओ. बं. **कांध**; सिंह. **कंद**; सिं. **कांधो** (बैलाचें वशिंड), **खांदीयो** (खांद्यावरील ओझें); मराठी समासांत हा शब्द **खांद** असा होतो. अकामसा. **खांदकर**= खांदा देणारा; **खांदेपालट**=खांदेबदलणें; **खांदकुहा**=खांद्यावरील केसांचा भोंवरा, **खांदखोड**; **खांदचोर**=खांदे चोरणारा बैल; **खांदलणें**=खांद्यावर घेणें; ह्यांशिवाय **खांदा देणें**, **खांदाडणें**, **खांदाडीस बसणें** वगैरे प्रयोग रूढ आहेत.]

खांदी स्त्री. झाडाची ढापी, फांदी. A bough, a branch.

[सं. **(वृक्ष) स्कंध>खांदा>खांदी** (स्त्री.); याकाम. **खांदी**=मोठी डहाळी, फांदी]

येकां बुढें संध्यारागाखचीं। दिया डाहाळे इंद्रनीळाची ॥
(नरुस्व. ८६४.)

खान्सामा पुं. आचारी, भोजनाची व्यवस्था करणारा, घरांतील व्यवस्थापक, बवर्जी. A cook, a butler.

[फा. **खान्सामान्** हा शब्द **खान = घर**, किंवा **खान = सरदार** ह्यापासून आला आहे. दुसऱ्या शब्दापासून आला असें म्हटलें तर अर्थभ्रंश झाला आहे. पुढील व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक आहे. फा. खवान् = ताट, वशी. फा. **खानसामान्**.]

खाप, खांप पुं. लहान तुकडा, ढलपी, तुकडा, खांड, रास. A small piece, a small splinter.

[सं. **क्लृप्** १ छेदने; प्रा. **कप्प>खप>खाप**; अकामसा. **खापटी** = लहान पातळ थापटी, पोळी. **खापणें** (नाधा. < ख़ाप < क्लृप्) = तोडणें, तासणें. **खापणी**= सरकारसारा, खण्ड. **कांपणीसांचणी**.]

१**खापर** नं. मडक्याचा तुकडा. A piece of tile or earthen pot.

[सं. **स्कर्पर, कर्पर, खर्पर**; प्रा. **खप्पर** (पुं), **कप्पर**; हिं. पं. **खप्पर**; बं. **खाबरा**; देप्रा. **खप्परो** (रुक्षः); गु. **खापडुं, खापरी**; ओ. **खपरा**; बं. **खाप्रा**; अकामसा. **खापर फुटणें** = दोष चिकटणें; **खापरपोळी** = खापरावर भाजलेली पोळी.]

२**खापर** वि. निरुपयोगी (हा अर्थ लाक्षणिक असणें शक्य आहे.). Useless (thing).

[सं. **कर्पर**; देशी. **खप्परो** (रुक्षः); अकामसा. खापऱ्या; **खापरतोंड** = दुर्दैवी, दुर्मुख.]

(खापर)पणतू पुं. नातवाचा नातू. Grandson of one's grandson.

[सं. **अपनप्तृ > पनत्तु > पणतु**; सं. **आयुष्पर** (?)> **आउखपर > खापर**; वर्णप्रक्रियेच्या दृष्टीनें ही व्युत्पत्ति योग्य दिसते परंतु हिच्यांत पाण्डित्यप्रकर्ष दिसतो.]

खामखा, खामखाह, खामखास अ. खात्रीनें, निश्चयानें. Positively, certainly.

[फा. **ख्वाहमख्वाह्** = तुझी इच्छा असो वा नसो; पेकाम. **खामखा** (रा. ८-१७५); अकाम. **खाईनखाई** = कांहीं झालें तरी, जरूर, निश्चयें.]

खामी स्त्री. तोटा, नुकसान, लाज, शरम. Loss, damage, shame.

[फा. **खामी** = **नुकसान**.]

खामोश अ. स्तब्ध, शांत, चूप, अचल. Silent, steady.

[फा. **खा-मोश्**; पेकाम. **खामोश**; (रा. १०-१८२).]

खांब पुं. जाड स्तंभ, सोट, स्थूणा. A post, a pillar.

[वैसं. **स्कंभ**; पा.प्रा. खंभ; बं. खांबा; ओ. खंब; हिं. खाम; पं. खंभा; गु. खांब; याकाम. **खांब** = अंकुर (ज्ञा. १५·१५९). 'स्तंभ' पासून व्युत्पत्ति वर्णप्रक्रियेच्या दृष्टीनें चूक आहे. 'त्' चा 'ख' होणें सुतराम् अशक्य आहे.]

१खार पुं. क्षार, खारट पदार्थ, लवण, सैंधव, हवेंतील गारवा, लोणच्याचा रस. Salt.

[सं. क्षार; पाप्रा. खार, छार; बं. खाला; ओ. खार; हिं.पं. खार ; सिं. खारु ; गु. खार ; अकामसा. **खारणें** = खारट होणें (नाधा.); **खार लागणें**=नुकसान होणें, (पदराला खार लागणें); **खाराणी**=मुतेरें, मुतानें भिजलेलें वस्त्र.]

२खार स्त्री. प्राणिविशेष. A squirrel.

[? देशी शब्द आहे का ?]

१खारवा पुं. एक प्रकारचें जाडेंभरडें कापड (तांबड्या रंगाचें). A kind of cloth.

[फा. खारा = एक प्रकारचें कापड; बं. खारुयु; ओ. खारुआ; हिं.पं. **खारवा**, खारुआ; गु. खारूँ.]

२खारवा पुं. एक नावाड्याची जात. A boat-man.

[फा. **खार्वा**.]

खारीज वि. वडतर्फ, बहिष्कृत, काढून टाकलेला. Dismissed, discharged, removed from.

[अर. **खारीज्** = बाह्य.]

१खाल अ. खालीं, 'वर'च्या विरुद्ध. Down, below.

[म. '**खालीं**' चा **अपभ्रंश**: खालीं पहा ; अकामसा. **खालवणें**, **खालावणें** = (नाधा.) नम्र होणें, खालीं करणें ; **खालवर** = खालींवर, सर्व बाजूंस ; **खालती** = खालीं ; **खालपट** = खालीं, उतरता; **खालमान्या**, **खालमुंड्या** = खालीं मान घातलेला (परंतु आंतून धूर्त).]

२खाल स्त्री. कातडी, बाहेरचें आवरण, साल, अंगाचें कातडें. Skin, hide, bark, rind.

[सं. **स्खद्,-ल्**, (**स्खदते**); सं. खल्ल; पा. खल्ल; देप्रा. **खल्ला** (चामडें, ९३-१०); बं.हिं. खाल; सिं. खल; गु. खाल; रुमा. खर् (पिशवी); याकाम. **खाल** = साल (ज्ञा. १३-२२८);=अंगाचें कातडें (ज्ञा. ११-४६५).]

अपानीं मेखा मारिती । खाल काढोनि टाकिती ॥
दा., द. ३, स. ७, ओ. ७३.

खालव(णें) अक्रि. कमी होणें, स्तुति करणें, नम्र होणें. To lessen, to praise.

[सं. **शाड्** १ श्लाघायाम्, **शार्** १० **दौर्बल्ये**, **शाल्** १ **कत्थने**; याकाम. खालय; (राज. धा.) (ज्ञा. १७-३०३).]

" कां फळले या तरूची शाखा । साहाजे भूमिसी
उतरली देखा । तैसें जीवमात्रा अशेषा ॥
खालितिले ॥ (ज्ञा. ९-२२४)

१खालसा पुं. (शीख) धर्म, मंदिर. (Shikh) religion, temple.

[अर. खाल्स, > **खालिस** = स्वच्छ, शुद्ध.]

२खालसा वि. सरकारच्या ताब्यांतील, संस्थानिक अगर इनामदार यांच्या ताब्यांतून काढून घेतलेली. (Territory) annexed.

[फा. खालिसा.]

खालीं अ. 'वर'च्या उलट, अधः, रिकामा, रिता, वृथा, वायां (लक्षणा). Beneath, under, empty.

[सं. **खल्ल** (खाडी); **प्रा. खल्ल** (छिद्र) ; बं. **खाल** ; ओ. **खाल** ; हिं. **खाल** ; गुं. **खालूँ**; याकाम. **खालां** (ज्ञा. १८-७३६); **खालारां** (ज्ञा. १८-४८१); ह्याचीं इतर रूपें **खाल**, **खालतीं**, **खालींपिली**, **खालाट**, **खालारा** अशीं थोड्याफार फरकानें झालीं आहेत. '**खाल**'चें सप्तमीचें एकवचन. **खाल**, **खल्ल**, **खळगा**, **खोपट**, **खेळ** वगैरे शब्द द्राविडमूळ व परस्परसंबद्ध आहेत.]

खालें अ. खालीं. Down, below.

[खालीं पहा.]

पांडु रथाखालें उतरत ॥ मुक्ते. आ. २६-३५
तात्काळ खालें उतरोन आला ॥ सा. रु. ह. ५-३३

खाल्ला, खाल्लेला वि. 'खाणें' ह्याचें भूतकाळचें रूप. Eaten.

[सं. खाद्, **खादित** (निष्ठा); जुनें रूप **खादिलें** ह्यापासून '**खाल्लें**' असें रूप सिद्ध झालें ; **खाल्ल्या घरचे वासे मोजणें** = कृतघ्नपणा करणें, ज्या घरांत अन्न खावयाचें त्या घराचे वासे तुळई किंमतीच्या दृष्टीनें मोजणें, वाईट चिंतणें.]

खावंद, खाविंद पुं. सरकार, राजा, मालक, यजमान. Lord, master, ruler.

[फा. **खांवंद** = प्रभू ; पेकाम. **खावन्द** (चंद्र. १-२०); **खावंदगिरी** = मालकी, धनीपणा ; पेकाम. **खावन्दगिरी** (रा. १४·४३).]

खावव(णें) सक्रि. खावयास लावणें. To feed.

[सं. **खादय**; पा. **खादाप**; ओ. **खवाइबा**; हिं. **खवाना**; गु. **खवाडवूं**; पं. **खुबाउणा**; म. **खा** चें णिच् रूप.]

खाष्ट वि. कडक, तामसी, कठीण, त्रासदायक, छळवादी. Cross, ill-tempered.

[सं. **कष्ट** (?); द्रा. (?); अर. **खिस्सत्** = दुष्टपणा; 'खास्त' पासून खाष्ट हा शब्द तयार झाला. हें त्याचें संस्कृतीकरण आहे. '**कष्ट**' पासून व्युत्पादणें म्हणजे विनाकारण संस्कृतशीं संबंध जोडणें आहे. खास्त पहा.]

खास वि. (अ.) मुद्दाम, राखून ठेविलेलें, नियुक्त, विशेष, विशिष्टजनोद्दिष्ट, खात्रीनें, खरोखर. Especial, reserved, certainly.

[अर. **खास्स्**; मोगल बादशहाच्या राजवाड्यांत दोन सभागृहें असत, **दिवान्-इ-आम्** (सार्वजनिक सभागृह) **दिवान्-इ-खास्स** (वैयक्तिक राजगृह). अकामसा. **खासगत**= खासगी, खाजगी, मालकीचे. **खासनिविस-खासनीस**= खुद्दाचा कारभारी-लेखक. **खासबारदार** = खाशा स्वारीचा शिपाई, शरीररक्षक. **खासबातमी**, **खासविद्या**, **खासदार** = घोडेवाला, पाग्या, शरीररक्षक हा मूळचा अर्थ.]

खासा, खाशा वि. मुख्य, मालक, प्रमुख (लक्ष); "औरस, सख्खा" हा मूळ अर्थ. Chief, supreme, principal.

[अर. **खास्स**, **खास**; अकामसा. **खाशानिशीं**=जातीनें ; **खासास्वारी**=मुख्य मालक, स्वतः ; **खाशी** = मुख्य मंडळी, निवडक, खाशी पंगत (<अर. **खास्सा**).]

खास्त स्त्री. खूनस, द्वेष, छळवाद. Spite, grudge, cross.

[अर. **खिस्सत्** = दुष्टावा; अकामसा. **खास्ती**-धास्ती, खंत, झुरणी ; '**खाष्ट**' पहा.]

खिंकाळ(णें) अक्रि. घोड्याचें ओरडणें, ओरडणें, मोठ्यानें हसणें (ल). To neigh, to giggle wildly.

[सं. **किंकिर** (नाधा.), ध्वनिशब्द; √कृ १ शब्दे.]

खिचडी स्त्री. डाळतांदुळाचा भात. A kind of dish, a mixture of rice and split pulse.

[सं. **कृसर** (पंचविंशब्राह्मण) = खिचडी, **खिच्चा**; देप्रा. **खिच्च**; हिं. **खिचरी**; बं. **खिचरी**; ओ. **खिचुरा**; पं. **खिचर**; सिं. **खिचु**; गु. **खिच**, **खिचडी**; याकाम. खीच (ज्ञा. ८-१४४) **खिचडा**, **खिची** (खिचडी, चिखल).]

खिज(णें) क्रि. त्रासणें, चिडणें, वाईट वाटणें. To be provoked, to be enraged, to get into passion.

[१ सं. **क्षीयते**; पा. **खिय्यति**; देप्रा. **खिज्जिअं** उपालंभ; प्रा. **खिज्जइ**; हिं. **खिजना**; सिं. **खिजनु**; गु. **खिजवूँ**; सं. **खिद्** > **खिद्य**; प्रा. **खिज्जिअ** (सविकरण). ज्यूल्स ब्लोक **खिद्यते** पासून व्युत्पादितो. हीच अधिक सयुक्तिक आहे. हिनें 'ज' ची उपपत्ति चांगली लागते. **खिजविणें** (प्रयोजक रूप).]

खिजमत स्त्री. सेवा, नोकरी, खुशामत. Service or attendance.

[अर. फा. **खिदमत** = सेवा ; हिं. **खिद्मत्** ; पेकाम. **खिजमत** (दिमरा. १.१९५). अकामसा. **खिजमतगार** = हुजऱ्या, सेवक.]

खिटी स्त्री. पाचर, ढलपी, लहान खीळ. A wedge, a chip of wood, a pin.

[सं. **खिट्** १ हिंसायाम्; परंतु वरील नाम द्राविडी असावेंसें वाटतें (?).]

खिडकी स्त्री. वातायन, वारा येण्याचें द्वार, जाळी, झरोका. A window, an air-hole.

[सं. **खटाक्किका**; प्रा. **खड्डुकी**, **खडक्किआ**, **खटक्किवा**; देप्रा. **खडक्की** (लघुद्वारम्); बं. **खिरकी**, **खरकी**; ओ. **खिरिकी**; हिं. **खिरकी**; तेलु. **किटिकी**. संस्कृतीकरण नंतरचें. मूळ शब्द देशी किंवा द्राविडी आहे. **खटक्किका**, **खडक्किका** = बाजूचा दरवाजा, मागील दरवाजा. ह्या शब्दाचा **किटकि**, **खिटकी** शब्दांशीं संबंध आहे. द्रा. **कट**, **कड**, **कद** = बाजू, कड, दार.]

खिण पुं. क्षण, अम्मळ, किंचित वेळ (बोलींतील शब्द). A moment.

[सं. **क्षण** ; प्रा. **खण** ; पं. **छिण** ; सिं. **खिण** ; हिं. **छिन** ; गु. **खण**. मूळ संस्कृत '**क्ष्**' कांहीं आर्योद्भव भाषांत '**छ्**' होतो व कांहींत '**ख्**' होतो.]

खिंड स्त्री. दोन डोंगरांमधील चिंचोळी वाट, फट, भोंक, खिंडार, भगदाड (लक्षणा). A narrow pass between hills, a cleft, a gorge.

[कान. **किंडी**; सं. **खण्ड** (?) ; अकामसा. **खिंडार** = भगदाड; गु. **खिंड**; हिं. **खिंड** (भेग, भोंक); संस्कृतमधील **खंड** आणि **खिद्** ह्या दोहोंसंबंधीं संभ्रमानें उत्पन्न झाला.]

खितप(णें) अक्रि. झुरणें, फार दिवस आजारी पडणें, झिजणें. To rot, to waste in pain.

[सं. १ कुतप (नाधा.), कुतपायते; २ क्षि + तप्. (द्विधातुसंयोग); **खितपणी** = झुरणी, झीज, दीर्घ आजार.]

खिदड(णें) अक्रि. दंगा-गोंगाट करणें. To be noisy, to gambol.
[सं. **क्रीड्** १ विहारे.]

खिदळ(णें) अक्रि. हसणें, दंगा करणें. To laugh, to giggle.
[सं. **क्रीड्**, किंवा **खुर्द्** १ क्रीडायाम्.]

खिदाड(णें), खिदडणें अक्रि. उनाडपणा करणें, दंगा करणें, चोकळणें. To loaf, To make wild and boisterous merriment.
[ध्वनिशब्द. **खिद**=हसणें ; सं. **क्रीड्** १ विहरणे.]

खितप स्त्री. फजिती, अपमान, अप्रतिष्ठा. Dishonour, shame.
[अर. **खिफ्फत्** = अपमान; पेकाम. **खिपत** (रा.५·१८).]

खिमा पुं. बारीक मांसाचे तुकडे घालून तयार केलेला पदार्थ. An article or dish prepared with small bits of meat.
[अर. **कीमा.**]

खिर(णें) अक्रि. (वीर्य किंवां मूत्र) गळणें. To flow, to pass (urine or semen).
[सं. **क्षर्** ; प्रा. **खिरइ** ; हिं. **खेरना**; याकाम. **खिरणें** (नरुस्व. ५६४).]

खिरणी स्त्री. एक तऱ्हेचें झाड. A kind of tree.
[सं.**क्षीरिणी** (चीक वाहणारें झाड); हिं. **खिरनी.**]

खिरट(णें) अक्रि. खुरटणें. To stunt.
[सं. **कृष्** + **ट** ४ तनूकरणे.]

खिरड(णें) क्रि. मागें सरणें, हटणें, हरणें, वाईट स्थिति प्राप्त होणें, इज्जत घेणें. To draw in, to withdraw, to submit, to be reduced to straits.
[सं. १ **खिद्र** (नाधा.); **क्षर** + **ट**; २ **शृध्** १० **अवमाने**; याकाम. **खिरड** (ज्ञा. १६-४२१).]

जेयाचेनी किरणाचेनि खरेपणें ।
नक्षत्राचे होती फुटाणे ।
तेजें **खिरडला** वन्हि म्हणे । समुद्रिं रिघों ॥ ज्ञा.११-२१२

खिरा पुं. वनस्पतिविशेष व तिचें फळ, लहान कांकडी. A variety of cucumber.
[अर. **खियार** = कांकडी.]

खिरापत स्त्री. प्रसाद, देणगी (ल.). Sweetmeats served out at the end of कथा etc, a donation, a gift.
[फा. **खैर** + **आफियत्** ; सं. **क्षीरपत्र.** परंतु ह्या दोन्ही व्युत्पत्ति पटत नाहींत. कदाचित् फारसी व्युत्पत्तिच बरोबर असावीशी वाटते, द्राविडी तर शब्द नसेल ना ?]

खिलत, खिलात स्त्री. समारंभानें पाठविलेली मानाची देणगी. An honourable donation sent with pomp, a role of honour.
[अर. **खिल्-अह्**=आपल्या अंगावरून काढून देणारा; **खिल अत्** ; मोगल लोकांत पांच प्रकारची खिलत असे. कांहींत तीन, कांहींत चार, पांच, सहा, सात निरनिराळे कपडे असत. हे कपडे पातशहानें स्वतः अंगावर घातलेले असत. नंतर मग ते मानाच्या देणग्या म्हणून देत.]

खिलाडू वि. खेळण्यांत तरबेज, खेळकर, उमदा, उत्साही, दोन धक्के घेणारा व दोन देणारा असा. Playful, sportive.
[सं. **खेल्** , **क्रीड्**; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे.]

खिल्लार न. समूह, तांडा (विशेषतः गाईंचा, जनावरांचा). A herd (of cows).
[सं. **क्षीर** + **आरः**; **क्षीरार** = दूध देणाऱ्या चांगल्या पुष्ट गाई. याकाम. **क्षीरार, खिल्लार** = गाईंचा समूह.]

जेथ महासिद्धीचीं भांडारें । अमृताचीं कोठारें ॥
जियें गांवीं खिल्लारें । कामधेनूंचीं ॥ ज्ञा. ९-३२१.

१**खिस(णें)** अक्रि. मागें सरणें, बाजूस सरणें, खिजणें, रुसणें. To get aside, to get back, to be angry.
[सं. **कृष्** १ विलेखने ; **खिद्** ४ **दैन्ये** ; **खिद्य**>**खिज**>**खिस.**]

२**खिस(णें)** सक्रि. बारीक तुकडे करणें (खोबरें खिसणें).
[सं. **कृष्** १ विलेखने; प्रा. **खिसइ** ; हिं. **खिस्ना, खस्ना** ; सिं. **खिसनु** ; गु. **खिसवूं, खसवूं** ; अकाम. **खिसणी**= खिसण्याचें साधन.]

खिसगिणती स्त्री. पर्वा, गुमान. Regard or consideration for.
[हिं. **किसगिनती** = कोणत्या प्रकारची ; "**का अस्य गणना**" ?]

खिसमिस न. बेदाणा. Raisin.
[फा. **किश्मिश्** ; इराण आखाताजवळ **खिशमिश** ह्या

नांवाचें एक मोठें बेट आहे. त्याला आतां **जाझिरात् अल टरील** असें म्हणतात. त्या बेटावरील हें फळ आहे.]

खिसा पुं. पडदा, खण, कांहीं ठेवण्याकरतां अंगरख्यांत लावलेली पिशवी. A pocket.
[फा. **कीसा.**]

खिसा पुं. गोष्ट, मुद्दा. A story, a narration.
[अर. **किस्सा.**]

खिसारत, खिसारा स्त्री.पुं. नुकसान, तोटा, फितुर, गुंतागुंत (ल.). Loss, ruin, hence complication.
[अर. **खिसारत** = नुकसान.]

खिस्त, किस्त पुं. हप्ता, जमिनीवरील खंड, किंवा त्याचा एक हप्ता, पैसे कर्जाऊ देण्याचा एक प्रकार, व्याज व मुद्दल ह्याचा कांहीं भाग ठराविक मुदतीनें परत करणें. An instalment.
[अर. **किस्त, किस** < **कृषि** = जमीन. अकामसा. **किस्तबंदी, खिस्तबंदी** = जमिनीची आकारबंदी. **खिस्ती** = व्याजबट्टा करणारा, गुजराती ब्राह्मणाची जात, सावकार.]

खिळ(णें) सक्रि. जोडणें, चिकटणें. To join.
[सं. **कील् १ बंधने;** अकामसा. **खिळखिळा करणें.** (सं. **खिली कृ.** (द्वि).) शक्तिहीन करणें, उध्वस्त करणें.]

खिंळ(णें) सक्रि. स्तंभित करणें, जागच्याजागीं निश्चल करणें. To nail down, to fix firmly.
[सं. **कील् १ बंधने;** याकाम. **खिळ.**]

तेहीं कोकिळां मारें देउनि तवकें : खिळिली पंचम स्वरें ॥
नरुस्व. ५८७

खिळ, खिळा स्त्री.पुं. अडकण, खुंटी, खुंट (लोखंडाचा), मोळा. A nail.
[सं. १ **खीलः, कीलः, कीलकः, किलिका;** प्रा. **खील, खीलग, खीलिया;** पा.प्रा. **खील, कील;** बं. **खील;** हिं. **खील;** गु. **खिलो;** ओ. **कीळा;** २ सं. **कीलः;** प्रा. **खिल्लेइ.**]

खीर स्त्री. दूध, तांदूळ, साखर यांचा पातळ पदार्थ. A kind of dish (food).
[सं. **क्षैरेयी,** < **क्षीरम्, क्षीरिका** = दुधाचें पक्वान्न; पा.प्रा. **खीर, खीरी;** हिं. बं. **खीर;** सिं. **खीरु;** पं. **खीरी ;** याकाम. **खीरोदक** = क्षीरोद, शुभ्र रेशमी वस्त्र ; **खिरींत सराटा** = त्रासदायक मनुष्य, विजोड कुरूप मनुष्य).

कीं मन्मथ नाथाचा गुढरू स्वेतुः कापडिला खीरोदकें ॥
नरुस्व. ४९४.

खुजट वि. ठेंगणा, खुरटलेला. Stunted, dwarfish.
[म. **खुजा** + **ट.**]

खुजा, खुज्जा वि. लहान, आंखूड, ठेंगू. Short and stunted (person).
[सं. **कुब्ज ;** प्रा. **कुज्ज, खुज्ज;** हिं. ओ. **कूजा ;** बं. **कुज्ज;** सिंह. **कुद ;** अकाम (ग्रामीण), **कोंजा, कोझा.**]

खुजा पुं. (मातीचें) भांडें (तांब्यासारखें). A kind of earthen-pot.
[फा. **कूझा.**]

खुट् स्त्री. खूण , चिह्न, (खुट् लागणें). Mark, sign.
[**ध्वनिशब्द.**]

खुट पुं. दाढीचा अर्धत्रुटीत केस. A half-cut hair.
[सं. **स्खद्** (?); देप्रा. **खड्डुं** (श्मश्रु).]

खुट(णें) अक्रि. अडणें, उपडणें, तोडणें, कमी पडणें, वाढ बंद होणें. थांबविलें जाणें. To stop, to break.
[सं. **कुंठ् १ प्रतिघाते;** प्रा. **खुट्टइ;** देप्रा. **खुट्टइ** (तृटति); गु. **खुटवूँ** (संपलें असणें, विश्वासघात करणें,); सिं. **खुटणु** (कमी करणें); पं. **खुट्टणा** (संपणें); हिं. **खुंट** (तोडणें); याकाम. **खुंटणें** (ज्ञा. १६-१८३); अकाम. **खुट, खोट** (तोटा).]

खुटखुट(णें) अक्रि. खुट्खुट् आवाज होणें. To emit the sound खुट् खुट्.
[**ध्वनिशब्द;** किंवा सं. **कुथ् ४ पूतिभावे.**]

खुड(णें) सक्रि. तोडणें, नखांनीं शेंडे तोडणें. To pluck.
[सं. **खुड्** १ खंडने ; **कुठ्** १ छेदने (सौत्रधातु); देप्रा. **खुडइ (तृटति).** हा शब्द मूळ देप्रा. असून नंतर त्याचें संस्कृतीकरण झालें आहे.]

खुडखुड(णें) अक्रि. थंडीनें कांकडणें, हुडहुडणें. To shiver from cold.
[**ध्वनिशब्द;** सं. **क्षुद् ;** अकाम. **खुडखुड** = आचका, हुडहुडी, वळवळ.]

खुडक(णें) क्रि. लंगडणें, लचकून चालणें, अडकणें, आखडणें, स्नायु संकोचणें. To cripple, to contract.
[सं. १ **खुण्डते;** देप्रा. **खुण्डय;** बं. **खुँरा;** हिं. **खोरला;** पं. **खुण्ढा, खुण्डा;** २ सं. **खुडक** = घोट्याचें हाड; प्रा. **खुडक्क** = उभे राहणें; अप. **खुडक्कइ** = पीडा करणें; सिं.हिं. **खुरक, खरक** = (मोडतांना आवाज करणें).]

खुडुक(णें) उक्रि. अडकून बसणें, (कोंबडीसारखें) बसणें. To contract through cramp.

[कान. कूडरू = बसणें; याकाम. **खुडकणें** (ज्ञा. १४-१४८); अकाम. **खुडुक** = अंडीं उबवण्याची क्रिया व वेळ. वरील धातु ह्या नामापासून झाला असावा. खुडकणें पहा.]

खुडसणी स्त्री. खुडण्याची क्रिया, छाटणी, पश्चात्ताप, दुःख, हुरहुर, चुटपुट. Plucking, repentance.

[सं. खुड् (लुङ्-स) = छेदने ; **खुडस(णें)** (नाधा.)= नखांनीं तोडणें.]

खुणखुण स्त्री. हुरहुर, कुरकुर. Vexation, regret.

[ध्वनिशब्द. किंवा क्रण् १ शब्दे.]

खुंट(णें) अक्रि. थांबणें, थांबविणें, प्रतिरोध करणें, विरोध करणें. To stop, to obstruct, to hinder.

[सं. कुठ् १ प्रतिघाते.]

खुंट, खुंटा, (खुंटी) पुं. केळीचा बुंधा, पाय, लहान दांडा, खांब, कांठ, जात्यांत घालावयाचा लाकडाचा तुकडा, आंचळांतील गांठ, चार रस्त्यांचा चौक. A stump, a peg, the handle of a handmill, a square (of roads).

[सं. कुठ् **१ प्रतिघाते; प्रा. खुण्ट**; गु. **खुँटो**; ओ. **खुण्टा**; बं. **खुण्टा**; कान. **गूट = मेख**; उच्चारावरून द्राविडीमूळ असावा. पूर्वीं रस्त्याच्या चौकांत खुंट मारीत त्यावरून चौक असा अर्थ झाला. खुंटावरील न्हावी. ह्या शब्दाचे जे अर्थ झाले आहेत त्या सर्वांत ' स्तंभ '=खांब ह्याचाच अर्थ आहे.]

खुत(णें) अक्रि. थांबणें, (रागानें) फुगून बसणें, तटस्थ होणें. To stop, to chafe.

[सं. **क्षत्** ; प्रा. **खुत**; याकाम. **खुतला** (ज्ञा. १८·६५४).]

खुतनी स्त्री. कापडाचा एक प्रकार (त्यांत कापूस आणि रेशीम ह्याचें मिश्रण असतें.). A kind of cloth.

[फा. **कुत्तान्** = तागाचें कापड.]

खुतबा, खुत्बा पुं. स्तोत्रपठण, महमदी धर्मांत नमाजानंतर महमद वगैरे पांच साधूंचीं स्तोत्रें म्हणतात तो. Repetition of a prayer.

[अर. **खुत्बाह्**.]

खुद, खुद्द वि. स्वतः, स्वतःचा, धनी स्वतः. Own, personal.

[फा. **खुद्** ; अकामसा. **खुद्खर्च** = स्वतःचा खर्च ; **खुद असामी** = स्वतःच्या नांवानें.]

खुदा पुं. ईश्वर, परमेश्वर. God (in Islam).

[फा. **खुदा** ; अकामसा. **खुदा इ खिजमतगार** = ईश्वराचा सेवक, भक्त, एका समाजसेवकसंघाचें नांव.]

खुन, खून पुं. हत्या, वध. A murder.

[फा. **खून** = रक्त; अकामसा. **खुनी**=खून करणारा; **खुन्नस**=आकस, द्वेश, दंश; **खुनशी**=दंश ठेवणारा, दावा ठेवणारा (< हिं. **खुनसी** ; सं. **क्रूहनशील** (?).]

खुंदळ(णें), खुदळ(णें) सक्रि. तुडविणें. To tread, to trample.

[*IE*. Squed; १ सं. **स्कुन्द्** ; प्रा. **खुन्द; + ल**; २ सं. **क्षोद**; प्रा. **खोअअ**; ३ सं. **क्षुभ्** ४ संचलने, **+ दल्** १ विदारणे (द्विधातुसंयोग).]

खुप(णें) क्रि. आंत शिरून त्रास देणें, आंत भोंक करणें, बोंचणें, सलणें. To prick.

[सं. **क्षुम्, क्षुप्, स्कुप्** ; प्रा. **खुप्प**; देप्रा. **खुप्पइ** = मज्जति; सिं. **खुपणु**; गु. **खूपवूँ**; याकाम. **खुपणें** (ज्ञा. १६·१२०), अकाम. **खोंपा, खोंपी, खोंपट** वगैरे शब्द ह्या धातूपासूनच निष्पन्न होतात. शब्दघटना द्राविडी आहे. तेव्हां **खुप्प** हा देशी शब्द मूळ व त्याचें संस्कृतीकरण झालें. **खुपरी** = डोळ्यांतील रोग.]

खुपस(णें) सक्रि. भोसकणें, शिरविणें, आंत घालणें, खोंचणें. To insert, to pierce.

[सं. **क्षुभ् + पृष्** हिंसायाम् (रा. धा.); **क्षुभ्+स** (लङ्).]

खुपसुरत, खुबसुरत वि. अत्यंत देखणा, सुंदर. Handsome, lovely.

[फा. **खुब्** = सुंदर, **सुरत** = रूप, आकार, मूर्ति.]

खुफिया वि. गुप्त, गूढ. Hidden, concealed.

[फा. **खुफ्या** = झांकलेलें.]

खुबल(णें) सक्रि. हलविणें, हदरणें, गचके खाणें. To toss, to dandle, to shake.

[सं. **क्षुभ्** (णिच्) **+ वल्** ; प्रा. **खोहइ, खुब्बइ**; सिं. **खोभु, छोभु** ; हिं. **छोह** (क्षोभ).]

खुबा पुं. खांदा, शरिराचा उंच भाग, पुढें आलेला भाग, टेंगूळ, पाण्यांतील प्राणी. A prominent articulation of the body, a periwinkle, a sea-snail.

[सं. कुब्र, खुब्र; देप्रा. खवओ (स्कंध) = वाशिंडाचा वैल; गु. कुबडु; सिं. कुबिरो ; पं. कुब्बा (टेंगूळ असलेला); सिं. कुब्बु; पं.हिं.बं. कुब्ब; का. कौब्(टेंगूळ).]

खुबी स्त्री. युक्ति, विशेष गुण, रहस्य. A trick, a knack.

[फा. खूब् = सुंदर ; अकाम. खुबीदार = सुंदर, नामी.]

खुमखुम, खुमखुमी स्त्री. जोर–, रग–, धमक दाखविण्याची इच्छा, खाज. Thirsting after (fight, revenge, glory), desire.

[प्रा. खम्मखम्म (पुं.) = संग्राम, मनोदुःख.]

खुमारी स्त्री. विशेष चव, लज्जत , नामीपणा, मौज, मर्म. Excellence, flavour, savour.

[अर. खुमार् = दारूचा कैफ.]

खुरची, खुर्ची, खुरशी, खुर्शी स्त्री. लाकडी उंच बैठक, आसन (चार पायांचें). A chair.

[अर. कुर्सी.]

खुरट(णें) अक्रि. वाढ खुंटणें, लंगडत चालणें. To stunt, to cripple, to limp.

[सं. खोर् १ गतिप्रतिघाते; खुरड(णें) = लंगडणें.]

खुरपें, खुर्पें न. गवत कापण्याचें हत्यार, शस्त्र. A small instrument to scrap up grass.

[सं. क्षुरप्रः; प्रा. खुरप्प; बं. ओ. हिं. पं. खुरपा ; गुं. खर्पो; याकाम. खुरपें; अकाम. खुरपणें (नाधा.)= खुरप्यानें गवत कापणें.]

मा तर्कांचें खुरपें । खांडे कोणा ॥ अमृ.· २४.

खुराक पुं. खाण्याच्या पदार्थांचा रतीब, पुष्टिदायक खाद्य. Daily diet, nutritious diet.

[फा. खुराक्]

खुराडें न. घरटें, (कबूतरें व कोंबड्यांसाठीं केलेलें) लहान घर. A pigeonry, a pigeon-hole.

[सं कुटीर; प्रा. कुडीर (?); याकाम. खूडें; (नरुस्व. ५९६).]

खुर्द वि. लहान, बुद्रुक याच्या उलट, लहान गांव. Small (town).

[पेहेलवी. खोर्दें, खुर्द; अवे. खोर्दें = लहान; फा. खुर्द, (सं. क्षुद्र ?).]

खुर्दा पुं. लहान लहान तुकडे, मोड (नाण्याची). Pieces, change (of coins), money in copper.

[फा. खुर्दा.]

खुर्निसात्, खुर्निसा, खुर्नीसा पुं. कुरनीस पहा.

खुल(णें) अक्रि. उघड होणें, उघडणें, फुलणें, उमलणें, शोभणें, साजणें. To open, to bloom, to decorate, to become.

[सं. क्षुर् १ कर्तने, खुड् १ अवयवे, कुल् १ संस्त्याने; देप्रा. खुल्ल; गु.हिं.का. खोल्; सिं. खुल् , खोल; पं. खुल्लह; अर. खलास् ह्या शब्दाशीं वरील शब्द शब्दकोशकारांनीं जोडला आहे तें तितकेंसें पटत नाहीं. खुलवि(णें), खुलावि(णें) = आनंदित करणें (मराठी णिच् रूप 'खुल' चें).]

खुला वि. रिकामा, मोकळा, रिक्त. Open, vacant.

[सं. क्षुर् , कुल् ; देप्रा. खल्ल; किंवा अर. खुलास् (?) = मोकळा, प्रशस्त.]

खुलास वि. प्रशस्त, मुक्त. Spacious.

खुलासा पुं. स्पष्टीकरण. Explanation.

[अर. खिलास्, इख्लास्.]

खुश, खूश(ष) वि. आनंदी, प्रसन्न, सुखी. Happy.

[फा. खुश्; अकामसा. खुशखबर = आनंदाची बातमी, खुशमस्करी = थट्टेबाज, हांजीहांजी करणारा (खुश् + अर. मस्खर = थट्टा.); खुशवख्त = आनंदाचा काळ, संतुष्ट; (फा. खुश्+वक्त् ; पेकाम. खुश्वक्त. रा. ८-२१४).]

खुशामत स्त्री. हांजी हांजी, स्तुति, तोंडपुजेपणा, प्रिय भाषण. Flattery, adulation, servility.

[फा. खुश् + आमद्.]

खुशाल वि. सुखरूप, आनंदी, सुखी, निरोगी. Comfortable, happy, welloff, having health.

[फा. खुश् + हाल (स्थिति); पेकाम. खुश्हाली (रा. १-५५). अकामसा. खुशालचंद = चैनी, बेफिकीर, रिकामटेकडा मनुष्य ; खुशाली = क्षेम, कुशल; खुशी = मर्जी, इच्छा, प्रसन्नता, आनंद (< खुश्).]

खुश्की, खुशकी स्त्री. जमीन, कोरडी जमीन, जमिनीवरील मार्ग, दुष्काळ. Main land, inland, a way by land, famine.

[फा. खुश्की; पेकाम. खुश्की; (रा. १०-१८१).]

खुसखुस(णें) क्रि. खुसखुस आवाज करणें. To rustle.
[सं. **कुच्** १ शब्दे, (द्विरुक्त) - कुच्कुच्; **खुसखुशित** = कुडकुडीत, खमंग भाजलेला.]

खुसप(णें) सक्रि. आंत घालणें, भोसकणें. To thrust in, to force in.
[सं. **कुष्** ९ निष्कर्षे + **स्तृभ्** १ हिंसायाम् किंवा **खुपसणें** ह्यापासून **वर्णविपर्यय** होऊन.]

खुसपट न. आंत शिरलेली काडी, गुप्त दोष, वर्म, टीका, शेरा, निमित्त (भांडणाचें) (लक्षणा). A secret foible, frailty, a slip.
[म. **खुसप,–खुपस + ट** ; सं. **कुशपत्र** (?), **कसपट; कुसपट.**]

खुळखुळ(णें) अक्रि. 'खुळ' असा आवाज होणें. To create a rattling sound.
[**ध्वनिशब्द–खुळखुळ**; अकामसा. **खुळखुळा** = वाजणारें मुलांचें खेळणें.]

खुळ, खूळ न. वेड, वेडेंपण, चळ, वेडी समजूत. Idiocy, craziness.
[सं. **क्षुल्ल, खुल्ल**; किंवा **खोल्, खोड्** १ गतिप्रतिघाते ; प्रा. **खोड**; गु. **खोडुं**; हिं. **खोरा**; सिंह. **कोर** (अर्धांग झालेला); याकाम. **खुळें** = लटकें, दुर्बळ; (ज्ञा. १८-९५७); कान. ते. **कूळ = वेडा**; अकामसा. **खुळचट, खुळसट** = खुळा; **खुळा** = वेडा, वेडसर, अपूर्ण बुद्धीचा, थोटा, अपंग.]

खूण स्त्री. चिन्ह, निशाणी, संकेत, मर्म. A token, a mark, a badge.
[सं. **क्षुण्ण, √क्षुद्** ; याकाम. **खुणावणें, खुणा, खुणीं** (नरुस्व. १७४, ३९३, ४१३); कान. **खून**; **खूणगांठ** = खुणेची वस्त्रास दिलेली गांठ, स्मरणाचें साधन. **खूण पाळणें** (ज्ञा. १८-९१४).]

खून पुं. हत्या, वध, घात, रक्तपात. Murder.
[फा. **खून्** = रक्त, खुन पहा.]

खूप, खूब वि. पुष्कळ, फार, अतिशय, भलें. Rich, abundant, copious, superb.
[फा. **खूब्**.]

खूर पुं. जनावराचा पाय, पायाची नखी, टांच, टाप. A hoof, a foot.
[सं. **खुरः, क्षुरः, √क्षु**; *Lat.* (Nova) Cula; *Gr.* chnauo; पा. प्रा. **खुर, छुर**; बं.ओ.हिं.पं.गु. **खुर**; सिं. **खुरु, कुरय**; का. **खोर** = पाय ; याकाम. **खुर (खोड)** = लाथाळ (ज्ञा. १३·६३८); सं. **क्षुर** आणि **क्षण** हे दोन्ही शब्द एका प्रक्रियेबाबत समान आहेत. त्या शब्दांतील '**क्ष**'चा कांहीं आर्यभाषांत '**ख**' होतो व इतर कांहीं भाषांत '**स** किंवा **छ**' होतो. एक कण्ठ्य व दुसरी ऊष्म्य प्रक्रिया आहे. उदा– **क्षण, सण, खिण, छिन, छुरा, सुरा, खुरा, खुरपें, खुरी, खुरा** = जोडा, वहाण ; **खुऱ्या** = नालबंदाचें हत्यार ; **खुरूप** = कांद्याचें घर.]

खेंक(णें), खेंकसणें अक्रि. रागावणें, चिडणें. To gnash, to snort, to snap at angrily.
[सं. **किखि** = वानर. वानरासारखा आवाज करणें.]

खेकटें न. लचांड, मसलत, उलाढाल, अडचण, कुलंगडें. A project, a scheme, a shift, a perplexing job.
[सं. **किखि** = वानर, **किखिट** (?) ; **संकट > षंकट > खंकट > खेंकटें** (श.को.). उच्चारावरून शब्द द्राविडी असावा.]

खेंकडा पुं. एक जलचर (क्वचित् स्थलचर) प्राणी. A crab.
[*IE.* QER, QER (कठीण); सं. **कर्** (**कर्करः = कठीण**), **कर्कटः, कर्कर** = चुना; हिं. **कंकर** = चुना; *Lat* Cal, Canere; सं. **कर्कटकः, कर्कोटकः**; प्रा. **कक्कड**; देप्रा. **खिक्खिडो** (**कृकलासः**); हिं. **केंकडा, खेंकडा**; सिंह. **कांकिरो**; बं. ओ. **कांकरा**; सिंह. **ककुलुवा**.]

खेंच(णें) सक्रि. ओढणें, ताणणें, आवळणें. To pull, to pull forcibly.
[सं. **कृष्** १ आकर्षणे; प्रा. **खंच**; बं. **खेंचा**; हिं. **खैंचना**; पं. **खैंच**; गु. **खेंचवूँ** ; का. **खंझून**; अकामसा. **खेंचाखेंच** = ओढाताण, गर्दी, रेटारेटी.]

खेट(णें) सक्रि. भिडणें, मिळणें, चिकटणें, ओलांडणें. To pass over or cross, to rub or brush against.
[सं. **किट्** १ **गतौ**; अकामसा. **खेट** = पाचर, खुंटी, दाटी; **खेटणी** = वीण, ओलांडणी, तगादा; **खेटा, खेटें** = फेरी, वारी, खेप; **खेटाखेट, खेटी** = गर्दी, दाटी.]

खेटक न. ढाल, शील्ड. A shield.
[*IE.* Qseud ; सं. **क्ष्वेड्, क्ष्वेड्, खेट्, खेटकम्**; *Av.* xsaodah ; संस्कृतमध्येंच अपभ्रंष होऊन रूपें बनलीं आहेत.]

खेडवळ वि. गांवढळ. Rustic, a peasant.
[सं. **क्षेत्रवलः, कृषीवलः**.]

खेडवळ न. खिडकी. A window.
[याकाम. **खेडकुळी** (सं. **क्षेत्रकुल्या**) = उद्यानांतील पाट (शिशु. २६.), २ खिडकी (नरुस्व २६.)]

खेडें न. लहान गांव. A hamlet or small village.
[सं. **क्षेत्रम्, खेटकम्**; प्रा. **खेड्य**; गु. **खेड, खेडुं**; पं. **खेडा**; हिं. **खेडा**.]

खेत(वाडी) न. शेत. A farm.
[सं. **क्षेत्रम्**; पा. **खेत्तम**; प्रा. **खेत्त, चेत**; का. **खीतई**; बं.बि.हिं.पं. **खेत**; पं. **खेतर**; सिं. **खेटु**; गु. **खेत, खेतर**; म. **शेत, खेती**.]

खेत न. युद्ध. A battle.
[सं. **क्षत्रम्**.]

खेत्री पुं. क्षत्रिय, शूर पुरुष. A warrior.
[सं. **क्षत्रम्, क्षत्रिय**, (√क्षत्); हिं. **खत्री, खेत्री**.]

खेद पुं. त्रास, दुःख, पीडा. Sorrow, affliction, grief.
[सं. **खिद्** ४ दुःखे, पीडायाम्.]

खेप स्त्री. वेळ, प्रसंग, वार, हेलपाटा. A turn, a journey to and from, a fruitless trip.
[१ सं. **क्षेप्यः**; ओ. **खेप** (वजन), **खेपा** (उडी); बि. **खेप** (जाळें); हिं.पं. **खेप**; गु.म. **खेप**; २ सं. **क्षेपः** = पुढें मागें हलणें; प्रा. **खेव**; बं. **खेया**; हिं. **खेवा**; गु. **खेव**; दुसरी व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक. भिन्न भिन्न अर्थाचे शब्द टर्नर एकाच संस्कृत शब्दापासून काढतो.]

खेभ(णें) अक्रि. रागावणें. To get angry.
[सं. **षिभ्, सिभ्** १ हिंसार्थः.]
एऱ्हवीं तऱ्ही अज्ञाना । जैं ज्ञानाची नाहीं खेभना
तैं तऱ्ही हे कानां । पालीकडे ॥
अमृतानुभव जुनी पो० ३९०.

खेम स्त्री. मिठी, आलिंगन. A hug, a clasp, an embrace.
[सं. **क्षेम** = आलिंगन. ह्याचें जुनें रुप '**खेव**' असें ज्ञानेश्वरींत येतें.]

खेंबडा वि. कुरूप, वाकडा तिकडा. Ugly, deformed, irregular.
[सं. **क्ष्वेड**; फा. **खमीहा** = कुबडा, वाकडा.]

खेर स्त्री. गदळ, घाण, कचरा. Refuse, rubbish.
[कान. **केडिसु** = मिसळून विघडविणें; मराठी. **केर, किर.**]

खेर, खैर पुं. एक वन्य वृक्ष, झाड. A kind of tree.
[सं. **खदिर**; प्रा. **खैर**; गु. **खेर**; पं.हिं. **खैर**; सिंह. **किहिर**.]

खेरीज वि. निराळा, अलग, वेगळा, बाहेर, वगळून; शिवाय, वांचून. Extra, additional, distinct, excluded.
[अर. फा. **खारिज**; हिं. **खारिज** (बाह्य); पेकाम. **खेरीज, खारीज** (रा. १०·१८१, २५२). हें अव्यय कधीं पूर्वीं व कधीं नंतर असें येतें. **खेरीज मुशाहिरा** = वेतनाशिवाय इतर भत्ता.]

खेंव, खेव स्त्री. भेट, मिठी, आलिंगन, घसट, चिकटणें. An embrace, a clasp, a hug.
[सं. **क्षेम, क्षेप्य**; प्रा. **खेँव, खेअँ**; याकाम. **खेव** (ज्ञा. ६·५९), **भेटतखेवो** = **भेटतांक्षणीं**. '**क्षण**' पासून हा वरील शब्द निष्पादितात, परंतु तें सयुक्तिक दिसत नाहीं.]
नातरी नीद जातखेवो ॥ पावे आपुला ठावो ॥ अमृ. १·६२

खेवणें क्रि. न. जोडणें, कोंदण, भूषण, जडाव, शोभा. To join, an ornament (studded).
[सं. **क्षेपणम्**; याकाम. **खेवण** = जडित अलंकार (ज्ञा. १·५).]
अष्टादश पुराणें । तेंचि मणिभूषणें ॥
पदपद्धति खेवणें । प्रमेयरत्नांची ॥ ज्ञा. १-५.

खेंवा वि, वल्हविणारा. Rowing, pulling with oars.
[सं. **क्षेपणिकः**, √**क्षिप्**; पा. **खेपे**; पं. हिं. **खेवना** (वल्हविणें); पं. **खेवा** (होडीवाला); हिं. **खेवा** (उतार, भाडें, नाव); बि. **खेवा**; गु. **खेवट** (**कैवर्त**); का. **खेव** = एक जहाज दुसऱ्या जहाजास ओढतांना त्याला जोडणारा दोरखंड.]

खेंस पुंन. कापसाचें किंवा रेशमाचें कापड. A certain stuff of cotton or silk.
[फा. **खिस**; का. **खेश**; बं. **खेश**; हिं. पं. **खेस**, **कास**; सिं. **खेसु**; गु. **खेस**.]

खेळ(णें) अक्रि. गंमत करणें, क्रीडा करणें, रमणें. To play, to sport, to frolic.
[१ सं. **क्ष्वेल्, खेलय**; प्रा. **खेलइ, खेड्डा**; अप. **खेळण, खेलइ**; का. **खेलून्**; बं. **खेला**; ओ. **खेळिबा**; हिं. **खेलन**; पं. **खेलणा**; गु. **खेलो** (नट); सिंह. **केळि, किड**. २ सं. **क्रीडति** किंवा **केलति** पासूनहि हा शब्द व्युत्पादितात. परंतु त्यामध्यें '**ख**' ची उपपत्ति नीट लागत नाहीं.]

खेळ पुं. गम्मत, क्रीडा, करमणूक, तमाशा, देखावा, वाईट कृत्य (ल.), नाटकाचा प्रयोग. A play, a pastime, a sport, a fun.

[सं. क्ष्वेली, केली; का. खेल; बं. खेल; ओ. खेळ; हिं. पं. खेल; सिं. खेल; गु. खेल; अकामसा. **खेळकर** = खेळाडू; **खेळकरी** = तमासगीर; **खेळणें** = खेळण्याची वस्तु; **खेळीमेळी** = घसट, सलगी.]

खैं अ. कोठें, कोठचा. Where, to which place.

[सं. कुत्र; प्रा. अप. कहीं; प्रांतिक अकाम. खैं.]

खैर पुं. वृक्षविशेष व त्याचें लाकूड. A kind of tree.

[सं. खदिर ; पा. खदिरो ; प्रा. खाइरा, खइर; सिं. खेरी; गु. खेर; ओ. खाइर; बं. खयर; अकामसा. **खैरभट**– ह्या नांवाचा मनुष्य. खैराचें झाड उपटून त्यानें हल्ला करून चोरांना पिटाळिलें अशी कथा, = शक्तिवान मल्ल.]

खैर स्त्री. कृपा, मेहरबानी, क्षेम, कुशल. Welfare, graciousness, goodness.

[अर. खैर = भले; अकामसा. **खैरखा** = हित इच्छिणारा (< खैर ख्वाह, रा. ८·६); **खैरखैरात** = दानधर्म (खैरखैरात, मदवा १-२०१); **खैरसल्ला** = क्षेम खुशाली (राज. १५-२५०); **खैरियत** = क्षेम खुशाली (< खैरीयत्); **खैराती** = क्षुद्र, भिकारी, टाकाऊ, रद्दी (खरे ४-१६०९).]

खैरात स्त्री. वांटणी, दानधर्म, त्याग. Alms, charity, distribution, giving away to the poor.

[अर. खैरात् (< ख़ैर = भले) = सत्कृत्यें.]

खो पुं. खोखोच्या खेळांतील गड्याला इषारा द्यावयाचा शब्द, नाश, तोटा, अडथळा (लक्षणा). The sound (in a play), loss, obstruction.

[सं. स्कुंभ् ९ रोधने, (स्कुभः > क्षोभः > खोह > खोअ > खो (भाइ. १८३२.), ध्वनिशब्द; कान. खो (एक खेळ); अकामसा **खो देणें** = उठवणें, हाकलणें, जावयास लावणें. **खो खो** = एक खेळ.]

खोंक स्त्री. आघातानें होणारी कपाळावरील जखम किंवा इजा, क्षत. A hole or bruise.

[सं. (?); का. खोंखोर ; हिं. खोखर (खोखला); पं. खोखरा ; सिं. खोखो ; गु. खोख. ह्या सर्व शब्दांत 'खोलगट' असा अर्थ आहे. खळगा, खोल, खोंक वगैरे शब्द एकाच शब्दापासून निष्पन्न झाले असावेत.]

खोक(णें) अक्रि. ठसकणें, ठसका येणें, ढासणें. To cough.

[*IE*. Qha, qha; *Lat*. Cachinnas; *Arm*, Kakank; *Gr*, Chazaxo; सं. क्षु २ शब्दे, कखति, कख्खति; वैदिक भाषेंत 'खोक्षो' असा अभ्यास होई. त्यावरून "खोक"; हिं. खोखला; पं. खोखरा; म. खोखला = ढास (< सं. कास (?)).]

खोंकड न. प्राणिविशेष, कोल्ह्याच्या जातीचें जनावर, म्हातारा जख्ख मनुष्य (ल). An Indian fox, an old man (fig.).

[सं. कक्खट (?); प्रा. खोड=शृगाल.]

खोकरें वि. फुटकें, मोडकें, पोकळ. Broken or cracked.

[कान. कोंकें ; याकाम. **खोकरें** (ज्ञा. ८·१५); अकाम. **खोका** ; याकाम. **खोंकरपण** = विनाशीपण (ज्ञा. १५–५००).]

अवघ्यांचा केला झाडा । रिता वाडा खोंकर ॥

खोका पुं. हुंडीपत्र (रकमेचा आंकडा न घातलेलें), देवदारी पेटी. A discharged bill or draft, a deal-wood box.

[कान. कोंके (?).]

खोःखो पुं. मोठ्यानें हसतांना किंवा खोकतांना होणारा आवाज. Sound of vehement coughing or laugh, roaring laugh.

[फा. कह्कह्, ध्वनिशब्द.]

खोगीर न. घोड्याच्या पाठीवरील बैठक, आसन, पलाण. A cushion or stuffed case used as a saddle.

[फा. खोगीर्.]

–खोगीरभरती स्त्री. निरूपयोगी वस्तु, संख्या पुरी करण्याकरितां नालायक लोकांचा केलेला भरणा. Bulky and worthless material, insignificant persons.

खोच(णें) अक्रि. भोसकणें, भोसकलें जाणें. To force into, to thrust.

[सं. कुच्, कुर्च्; प्रा. कुज्ज, खुज्ज (मज्जने); याकाम. **खोंचणें**, **खोंचरा** = भाला, बरचीसारखें शस्त्र. (ज्ञा. १६·३४५).]

खोजा पुं. मुसलमानांतील एक समाज, प्रतिष्ठित मुसलमान, जनानखान्यावरील कंचुकी

An eunuch, a Muhammadan of respectability.

[तु. **खोजाह्**; फा. **ख्वाजा**; ह्या शब्दाचे निरनिराळ्या देशांत निरनिराळे अर्थ आहेत. हिंदुस्थानांत **खोजा = नपुंसक**, इराणांत **संपन्न व्यापारी**, तुर्कस्थानांत **पवित्र कुटुंबातील माणूस**, असे निराळे अर्थ आहेत. पूर्वीं दरबारांत असले लोक असत. ते आपल्या कर्तबगारीनें लौकिक संपादीत व त्यांना मोठा प्रतिष्ठितपणा प्राप्त होई. वाईट अर्थाच्या शब्दाला ग्राम्यता-परिहारानें चांगला अर्थ प्राप्त झाला.]

खोट स्त्री. तोटा, दोष, वैगुण्य, गोळा, असत्य, खोटें, नुकसान. Loss, falsehood.

[सं. **कूट**; प्रा. **कुट्ट**, **खोट्ट**; बं. **खोटी**; हिं. **खोट**; पं. **खोट**; सिं. **खोटू**; गु. **खोट** ; याकाम. **खोट**, **खोटी**=गोळा. (ज्ञा. १६-२१६; ८-१७३); म. **खोटें**, **खोट** हे एकाच शब्दापासून निष्पन्न होतात.]

खोटा वि. असत्य, लटका, लबाड. False, faithless.

[*I E*. Qel; *Gr*. Cheleos; *Lat*. Calamities; *Lith*. Kalu ; *Lett*. Kult; सं. **कूट**; कान. **कट्ट** = वाईट (?); अकामसा. **खोटाई** = खोटेंपणा; **खोटानाटा** = खोटा, वाईट (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द.).]

खोटी स्त्री. उशीर, विलंब, अवकाश, अडथळा. Delay, obstructed or delayed state.

[सं. **कुंठ्**; प्रा.देप्रा. **खुट्ट**, याकाम. **खोटी** = गोळा (ज्ञा. १५-३३६).]

^{१}**खोड**. वि. लंगडा, अंगावरून वारा गेलेला मनुष्य. Maimed, paralytic.

[सं. **खोर**, **खोड**; देप्रा. **खोडो खञ्जः** (९८·१७.); बं. **खोरा** ; हिं. **खोरा** ; गु. **खोडूं** ; अप. **खोडि** (दोष) ; कान. **कोडु** = बुंधा.]

^{२}**खोड** स्त्री. वाईट संवय, लहर, दोष. A bad habit.

[सं. **क्रोडी** ; प्रा. **खोड** ; अप. **खोडि** (दोप); गु. **खोड**, (दोष) ; हिं. **खोरी**; अकामसा. **खोडकी**=खोड; **खोडसाळ** = खोडकर.]

^{३}**खोड** न. बुंधा, ओंडका, खोगिराची चौकट. A stalk, a stump, a trunk, the frame of a saddle.

[सं. **क्षुद्** (?), **क्षोड** = हत्ती बांधण्याची खुंटी ; कान. **कोड्डु** = **बुंधा**; देप्रा. **खोडो–सीमाकाष्ठम्** (९८–१७); **जुनें खोड** (**माणसासंबंधीं**) = म्हातारा अनुभवी मनुष्य, **व्यंगी–(पायानें खुडू**); गु. हिं. **खोड** (लाकडाचा तुकडा); हिं. **खोरा** (खोडा) ; सिं. **खोरणुं** (खुंटी).]

खोड(णें) सक्रि. खोडून काढणें, बाद करणें, रद्द करणें, डागणें, कलंकित करणें. To cancel, to erase, to expunge.

[*IE*. Kseud; *Gr*. Psudrhos; *Lith*. Siaudas; सं. **क्षुद्** ७ संपेषणे. **स्कुद्** १ आप्रवणे. **खोर्** १ प्रतिघाते; अकामसा. **खोडाखोडी** = चिताडणें.]

खोडा पुं. शिक्षा करण्याचें एक साधन, सांपळा. Stocks (for criminals).

[सं. **खोर**; **खोड** = लंगडा, (खोड पहा.); याकाम. **खोडा** = लाकडाचें अडकण (ज्ञा. १६·३१७).]

खोंड पुं. लहान बैल, वासरूं (पुं.) A young bull.

[कान. **कंदु** = वासरूं; **गॉंडे** = बैल; सं. **षंढ** = बैल (?).]

खोत पुं. शेतकरी, खंडानें शेती करणारा, परंतु पुढें त्याचा अर्थ जमिनीचा मालक असा झाला. A renter of a village.

[ह्याच्या अर्थासंबंधीं बराच घोटाळा आहे. हा शब्द बराच जुना आहे. ही पद्धत मुंबई इलाख्यांतील कोंकणपट्टींत आहे. रयतवारी पद्धतींत हिचा समावेश करतात. खोत म्हणजे एक जमीनदारच होय. तो आपल्या मालकीच्या जमिनीपैकीं तुकडे इतर कुळांना वाटून देऊन करावयास सांगतो; व त्यांच्याकडून नियमित खंड घेतो. सरकारी जमीनमहसुली अधिकारी आणि रयत यांच्यामधील हे लोक होत. ह्यांच्यामुळें ह्या अधिकाऱ्याचा जुलूम वाचत असे. हे खोत त्यांना एकदम पैसे देऊन टाकीत व कुळांकडून त्यांच्या सोयीप्रमाणें वसूल करीत (हाब्सन जाब्सन.).]

खोद(णें) क्रि. उकरणें, खोल करणें, खणणें. To dig.

[सं. **क्षुद्** ७ संपेषणे; प्रा. **खुद**; बं. **खोदा**; ओ. **खोदिबा**; हिं. **खोदना**; पं. **खोदणा**; गु. **खोदवूँ**; याकाम. **खोदें** = शोधून, धुंडाळून (नरुस्व. २३३); अकामसा. **खोदणी** = खणण्याचें हत्यार; **खोदाई** = खणण्याची मजूरी.]

खोप स्त्री. लहान झोपडी, खोपटी. A cottage or hut.

[सं **स्खुभ्** (?), **क्षुप्** (?); देप्रा. **खुंपा** (तृणादिमयं वृष्टिनिवारणम्) = गवती झोपडी; कान. **कोप्प** = लहान गांव; तुळु. **कोप्प** = झोंपडी; बोअर. **कोपी** = झोपडी; याकाम. **खोप** = पोट (ज्ञा. ९·१०३), **खोप** = लपविण्याचें घर; (नरुस्व ८६५), **खोळ** = गवसणी, वेष (नरुस्व १४०).]

^{1}**खोपा** पुं. शेतांतील गवताची झोपडी. A grass-hut in a farm.

[कान. **कोप्पे** = पिशवी ; याकाम. **खोपा** = घरटें. (उगी. ४९१.).]

^{2}**खोपा** पुं. मोठें खोपट, झोंपडी, पक्ष्याचें घरटें. A big hut, a bird's nest.

[**खोप** पहा. बं. **खोंपा** ; ओ. **खोपा**; हिं. **खोपा**, **खोंपा**; ह्या सर्वांचा अर्थ केसांचा बुचडा असा आहे. ' **खोपीं** ' म्हणजे झाडाच्या बुंध्यांत केलेलें लहान छिद्र. त्यावरून तर हा शब्द आला नसेल ना ?]

खोबण स्त्री. खोलगट भाग, कुसूचें छिद्र, भोंक. A mortise, a groove, a recess (as along a wall).

[वैसं. **क्षुभ्** = तडाखा.]

^{1}**खोबरें** न. नारळांतील मगज. Cocoa-nut-kernel.

[१ मल्याळी. **कोप्पर**; का. **खूपरा**; हिं. **खोप्रा**; पं. **खोप्पा**; सिं. **खोपो**; गु. **खोपरूं**. २ सं. **खर्पर**; प्रा. **खप्पर**; हा शब्द वरील मल्याळी शब्दाच्या मुळाशीं असावा. मराठींत मात्र हा शब्द मल्याळीमधून आला; हिंदीमधून नाहीं. ' खर्पर ' हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

^{2}**खोबरें** न. नाश, दुर्मिळता. Ruin, loss.

[कान. **खोब्बरी** = नाश. उदा० कामाचें **खोबरें** झालें.]

^{1}**खोम(णें)** अक्रि. कमी होणें, (नाम) हानि, न्यूनता. To be reduced, (noun) loss, deficiency.

[सं. **क्षुम्**; याकाम. **खोम** (ज्ञा. १४·२८५).]

^{2}**खोम(णें)** क्रि. निष्क्रिय होणें, वक्र होणें, लवणें, कमी होणें. To be inactive, to be crooked.

[सं. **स्कुभ् ९ रोधने**; अकामसा. **खोमा** = खोंचा, पोंचा, चरा ; **खोमण्या** = कडक दराऱ्याचा; **खामी** = भेग, फट (गुजरातमध्यें हा शब्द रूढ आहे.)]

खोय स्त्री. स्वभाव, खोड. Disposition or temper.

[फा. **खो**, **खु** = स्वभाव.]

खोर प्र. एक फारशी प्रत्यय (भांडखोर, चहाडखोर, दिवाळखोर, चुगलखोर, दरोडेखोर इ.). A Persian termination.

[फा. **खुर्दन्** = खाणें.]

^{1}**खोरें** न. खणण्याचें व माती फेकण्याचें साधन. A sort of hoe.

[सं. **खनित्र**, **क्षुर**; प्रा. **खुर** (?); म. **खोरणी**,**-णें** = घाण कचरा काढण्याचें हत्यार.]

^{2}**खोरें** न. दोन डोंगरांमधील खोलगट भाग, नदीच्या पात्राचा प्रदेश. A narrow valley.

[सं. **क्षुर्** > **खुर** (?), **कुहर** ; आ. **खोर** = **गुहा** ; हिं. **खोर**; ल्हां. **खोरी** = **अंगण**; गु. **खोरड**.]

खोल वि. लांबवर पोकळ, गंभीर, गहन, कठीण, दुर्बोध (ल). Deep, close, secret, reserved, an abuse (fig.).

[सं. **क्षुद्** ; **क्षुण्ण** (?); प्रा. **खोल्ल** ; ओ. **खोल** (दरी); हिं. **खोल**, **खोलर** ; पं. **खोल** ; ल्हां. **खोला** ; गु. **खोल**; अकामसा. **खोलट(णें)**, **खोलगट(णें)**, **खोलणो** = पुढें जाणें; **खोलावा** = खोली; **खोली** = खोलपणा.]

खोल(णें) क्रि. उघडणें, चालून जाणें, पुढें चालणें. To open, to go on.

[सं. **क्षुद्**, **क्षुल्** (?); प्रा. **खोल्ल** ; देप्रा. **खोल्ल** ; बं. **खोला** ; ओ. **खोलिबा** ; हिं. **खोलना** ; पं. **खोल्हणा** ; सिं. **खोलणु**; हिं. **खोल्हवूं** ; याकाम. **खोलणें** (नरुस्व. ७५७); **खोलता** = दिवट्या (ज्ञा. १३·४१८). टर्नर प्रा. **खोल्ल** पासूनच व्युत्पादितो.]

खोली स्त्री. घरांतील एक बंदिस्त भाग, अपवरक, ओरी. A room or chamber.

[सं. **क्षुद**, **क्षुल्** ; देप्रा. **कुल्ली कुटी** (९६·११); गु. **खोली**.]

खोव(णें) उक्रि. शिरकवणें, खुपसणें, रोवणें, जोरांत आंत घालणें, दवडणें. To force into, to thrust or to drive in.

[सं. **स्वव् १** बन्धने, **स्कु ९** आप्रवणे.]

खोस(णें), **खोच(णें)** सक्रि. शिरकविणें, आंत घालणें, टोंचणें, रोवणें, संकुचित होणें. To force into, to thrust, to tuck in.

[सं. **क्षुणाति**. √ **क्षु** > **क्षु** > **खुस**; का. **खसून** ; ओ. **खोसिबा** ; हिं. **खोसना**, **खोंचना**, **कोच** ; प. **खोहणा** ; सिं. **खोहाणु** ; गु. **खोसवूँ** ; याकाम. **खोचणें**, **खोचरा** (हत्यार, ज्ञा. १६-३४५); अकामसा. **खोंच** = ठोका, घाव, टोंच, खंड, खुत्री, मर्म (ल) ; **खोचरा** = भाला, बरची ; **खोंचा** = धोतराचा खोवलेला भाग ; **खोंची** = लहान खाडी (ल.).]

खोळ स्त्री. पिशवी, आवरण, झाकण, वार, आच्छादन, गुहा, बाणांचा भाता. A hooded cloak, a cover, a cave, a quiver.

[सं. **खोल** = शिरस्त्राण, **खोलि** = बाणांचा भाता; देप्रा. **खोलो** = वस्त्रैकदेश, **खोल**; बं. **खोल, खोला**; ओ. **खोळा**; हिं. **खोल**; पं. **खोळ**; गु. **खोळीयुँ**; याकाम. **खोळ** = **खळगा** (ज्ञा. ११·२५८), = मध्यभाग, गवसणी (ज्ञा. ७-१८७).]

चांदिणेयाचें सत्त्व निगालें : ते केळीचेया गाभेवनाञ्चिये खोळे ॥ नरुस्व. ५४३.

खोळंब(णें) अक्रि. उशीर लागणें, थांबणें, अवकाश-अवधि लागणें. To stop or to wait for.

[सं. **क्षणलंब्** (?), **खोल्** १ गतिप्रतिघाते.]

खौर न. डोकें भादरणें, हजामत, श्मश्रु. Shaving.

[*IE*. QES, QSE (विलेखने); सं. **क्षै** (क्षयति); **क्षुरा, क्षौर** ; प्रा. **खउर**; हिं. **छुरी (केश)**. *Lith*. Kasau ; *Slav*. Cesali ; *Russ*. Chesali ; *Lith*. Kasa ; *Slav*. Koso ; Kosnu, = Hair.]

ख्रिस्त पुं. व्यक्तिनाम, येशुख्रिस्त, ख्रिस्तोपदेशक. Jesus Christ.

[ग्री. **ख्रिस्टॉस=अभिषिक्त, अवलिप्त**; khrio=लेपणें.]

ख्याति स्त्री. नांवलौकिक, प्रसिद्धि, कीर्ति. Fame or celebrity.

[सं. **ख्याति, √ ख्या**.]

ख्याल पुं. एक प्रकारचें गाणें, पद. A sort of song. चेष्टा, विलास, विचार, कल्पना. Freaks, pranks, understanding, thought, sport, merriment.

[अर. **खियाल्** ; अकामसा. **ख्यालीखुशाली** = चांगली परिस्थिति, कुशल.]

ग पुं. मराठी वर्णमालेंतील तिसरें व्यंजन. उच्चारण कंठ्य अल्पप्राण मृदु असून उच्चारस्थान कंठ आहे. ('क' पहा.) The third consonant of the Marathi alphabet.

[सं. **ग्, ग्र्, गृ** ; प्रा. **ग, ग्ग, घ**.-(गृह-घर; गृण्ह्-घेप्प-घे.).

(मध्य. 'ग') सं. **क् द्ग् ग्र्, ग्य्, ग्र, र्ग, ङ्ग् ग्य्, ल्ग्** ; प्रा. **ग्ग**.

सं. **ङ्** ; **ङोङ्कूर्य**-गोंगाळ; **ह्-दिह**-ढीग; **ज्-भञ्ज्**-भंग.

'ग' पुं. अ. गर्व, अगे, Pride, oh.

[१ म. **गर्व** शब्दाचा पहिला वर्ण ; 'ग'ची बाधा '२ अगे, गे' ह्याचें संक्षिप्त रूप; सं. **अगे**.]

गई स्त्री. गाय. A cow.

[सं. **गो**; 'गई' हा **गाय** शब्दाचा ग्रामीण उच्चार.]

गईब वि. गहाळ, लुप्त, नाहींसा झालेला. Disappeared, missing.

[अर. **घाइब्** = अदृश्य, अव्यक्त, गुप्त; अकाम. **गैब, गायब**.]

गऊ स्त्री. गाय. A cow.

[सं. **गो (गाव, गवी)** ; पा.प्रा. **गव**; हिं. **गउ, गौ**; पं. **गौ**; सिं. **गऊँ**; गु. **गउ**; ने. **गौ**; अकाम. ग्रामीण- **गई, गाय**.]

गगन न. आकाश, पोकळी, आभाळ. The sky or heavens.

[सं. **गगन**; अकामसा. **गगनचक्र** = आकाशांत फिरणारा वारा, वावटळ; **गुगनचुंबित** = उंच, गगनास टेंकणारें; **गगनपुष्प** = असंभाव्य गोष्ट, खपुष्प; **गगनमंडल** = आकाश, पोकळी.]

गंगथड, गंगथडी स्त्री. गंगेच्या कांठावरील प्रदेश. (गोदावरी हिलाहि गंगा म्हटलें आहे.) The Ganges (or the Godavari) and the territory adjoining both the banks.

[सं. **गंगा** (**√ गम्** चें अभ्यस्त रूप.) + **तटः**]

गंगा स्त्री. भागीरथी नदीचें एक नांव, गोदावरी नदी. The river *Ganges*. The river *Goda*.

[सं. **गंगा** (**√ गम्** १ **गतौ**-(अभ्यास) सारखी जाणारी-वहाणारी). कोणत्याहि गांवास असलेल्या नदीस तेथील लोक 'गंगा' म्हणतात. अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. अकामसा. **गंगाजमना** (यमुना) **वाहणें** = दोन्ही डोळ्यांतून अश्रु वहाणें(ल.) (**वहात्या**) **गंगेंत हात धुणें** = सहजगत्या फायदा करून घेणें. **गंगेंत घोडे न्हाणें** = महत्कृत्य शेवटास जाणें. गंगा लांब पल्ल्यावर असल्यामुळें श्रम पडणें. **गंगाजमनी** = दोन भिन्न रंगांच्या कांठाचें वस्त्र. (गंगा व यमुना ह्या दोन नद्यांचें पाणी किंचित् भिन्न रंगाचें प्रयागास दिसतें त्यावरून). **गंगाजळी** = ठेव, खजिना, शिल्लक, (गंगेचें तीर्थ ठेवण्याचें भांडें-कधीं त्यांतून तीर्थ काढीत नाहींत. मरणाच्या वेळेसच फक्त त्यांतील तीर्थ आसन्नमरण मनुष्याच्या तोंडांत घालण्यासाठीं काढतात त्यावरून). **गंगापुत्र**=क्षेत्रस्थ उपाध्ये, गंगेवर उपजीविका करणारे. **गंगाभागीरथी** = विधवा स्त्री (वपन केलेली). **गंगोत्री** = गंगेचें उगमस्थान, अवतरणस्थान. **गंगोदक** = गंगेचें पाणी, पवित्र तीर्थ.]

गंगावन न. काश्मीर, नेपाळ वगैरेकडील वनगायीच्या शेपटीचे केस, केसांत घालण्यासाठीं केलेला जुडगा. Black hair of the tail of the cow in the Himalayan region.

[सं. **गंगा + अवन** (?).]

गंगाव(णें) अक्रि. आवाज करणें, गुंगुं करणें, गोंगावणें. To produce the humming sound, to say, to speak.

[सं. **हु** १ शब्दे, **हु** (अभ्यास = **जो हु य**); याकाम. **गंगाव**; अकाम. **गोंगाट > गोंगाट.**]

प्रभू तुम्ही महेशाचिया मूर्ती । आणि मी
दुबळा अर्चितसे भक्ति । म्हणोनि बोलु जऱ्ही
गंगावती । तऱ्ही स्वीकाराल ॥ ज्ञा. ९-१४

गंगाळ न. घंगाळ, पात्रविशेष. A circular metal vessel.

[सं. **गंगालय** (?); कान. **घंगाळ.**]

गचक(णें) क्रि. हिसका बसणें, हचकणें. To be jerked or jolted.

[सं. **गम्, गध्** (वैदिक), **गधक > गजक > गचक**; अकामसा. **गचकळी** = गटंगळी (ध्वनि); **गचका** = झटका, धक्का, खड्डा; **गचक्या** = खळगा. हे शब्द द्राविडोत्पन्न तर नसतील ना ? देप्रा. **गचा**=गळा ह्या शब्दाशीं संबद्ध असतील का ?]

गची स्त्री. मानेवर दिलेला जोराचा धक्का, गचांडी. A push upon the back of the neck.

[देप्रा. **गचा** = गळा ; याकाम. **गची** ; अकाम. **गचका, गचांडी, गचकणें.**]

नासापुटौ नि वारा । जो जातसे अंगुळें बारा ।
तो गची धरूनि माघारा । आंत घाली ॥ ज्ञा. ६-२३६.

गच्च, गच्ची अ. आवळून जखडून (बांधणें), बळकट, घट्ट, आवळ. Tightly, firmly, fast.

[फा. **गच्** = ठासून भरलेला चुना ; बं. हिं. **गच.**]

गच्ची स्त्री. आगाशी, चुन्याची जमीन, धाबें. A chunamed floor.

[फा. **गच्** = चुना; फा. **गची.**]

गच्ची स्त्री. गर्दी, दाटी. Crowdedness.

[म. **गच, गच्च**; फा. **गच्**–रिकामी जागा न राहील असा भरलेला चुना.]

गच्ची स्त्री. गची पहा.

गज पुं. कापड मोजण्याचें मापन, चोवीस तसू लांबीचें एक परिमाण, मोजण्याची काठी, दाण्ड्या, दाण्डकें, दारू ठासण्याची लोखंडी सळई. A measure of length, a ram-rod.

[ह्याचें प्रमाण निरनिराळ्या काळांत बदललेलें दिसतें. ऐनी अकबरी = १८ इंच, (५२$\frac{३}{८}$); इलाही गज = ३३ इंच; बिघा = ३६०० चौरसगज = $\frac{५}{८}$ एकर.

सं. **गदा.** ‘ **भीम सेनको गज** ’ हा प्रयोग हिंदीमध्यें रूढ आहे. फा. **गझ्** ; शिकाम. **गज** (चित्र. ४५).]

गज पुं. हत्ती. An elephant,

[सं. **गजः**; अकामसा. **गजकोंत** = भाला (**गज + कुंत**); **गजगति** = हत्तीसारखी सावकाश व डौलदार चालणारी; **गजघंटा** = हत्तीच्या गळ्यांतील घांट; मोठ्यानें वाजून सर्वांन सूचना देणारी, त्यावरून ओरड करणारी स्त्री (ल.); **गजवदन** = गणपती, हत्तीचें तोंड असणारा देव; **गजांतलक्ष्मी** = श्रीमंती, वैभव, हत्ती पोसण्याचें सामर्थ्य असलेली लक्ष्मी.]

गजकर्ण पुंन. एक त्वचेचा फार खाजणारा रोग. Ring worm.

[सं. **गजकर्ण.** हत्तीच्या कानाचा आणि याचा संबंध काय ?]

गजगज(णें) अक्रि. गडबड होणें, बोलणें, गोंगाट. To be lively and full of bustle.

[ध्वनिशब्द किंवा **गद्** १ **शब्दे**; अकामसा. **गजबज** = गोंगाट ; **गजगजाट** = घोशा, गडबड.]

गजगा पुं. सागरगोटा, एक वेलीचें फळ. The seed of *Sagargoti.*

[कान. **गजुगे, गजुग** = एक वनस्पति.]

गजनी स्त्री. कापडाचा एक प्रकार, अर्धवट रेशमी व पट्टे असलेलें कापड. A kind of cloth, it is half silk and half cotton and has waving stripes.

[फा. **गिझनी** ; ‘ गिझनी ’ ह्या ग्रामनामावरून तेथें तयार झालेलें.]

गजबज(णें) अक्रि. **भरलेलें असणें, भरून असणें,** गोंगाट होणें. To be lively and full of bustle.

[सं. **गद्, गज्** १ शब्दे, **बद्** १ शब्दे, भाषायाम् (द्विधातुसंयोग); याकाम. **गजबजणें** = गडबडणें (ज्ञा. १३-१८७), = दाटणें (ज्ञा. १५-२४०), **गजबज** = गडबड (ज्ञा. १८-१०२२).]

गजर पुं. मोठा आवाज, पुष्कळ प्रकारचा एकत्रित आवाज, एकत्रित नाद. A clash of musical instruments.

[सं. **गज्** १ **शब्दे**; कान. **गज** = विशिष्ट ध्वनि. **गजरु** = रागानें केलेला मोठा आवाज. परंतु कानडीमध्यें हा

संस्कृत मधून तद्भव झाला असावा. मूळ ध्वनिशब्द असावा. याकाम. **गजराउ**=ध्वनि, गजर (उगी.).]

गजरा पुं. माळ, हार, फुलांचा गुच्छ. A wreath of flowers.
[हिं. **गजरा.**]

गजल, गझल पुं. काव्यांतील एक विशिष्ट प्रकार, वृत्तविशेष, प्रेमविषयक कविता, फारसी वृत्तांत लिहिलेलें एक यमकी प्रेमगीत. A particular kind of metre and poetry in Persian.
[अर. **घझल्**=पद. (धात्वर्थ-पिंजलेला जिन्नस, √घझल्=त्यानें पिंजलें.).]

गंजिफिया, गंजीफा स्त्री. दारू, दारूची गाडी. An ammunition car.
[फा. **गंजीपा**=दारूचें कोठार.]

गंजीफा स्त्री. खेळण्याचे पत्ते, दशावतारी. A pack of playing cards.
[फा. **गंजीफा.**]

गॅझीट न. जाहीरपत्रक वर्तमानपत्र. The Gazette.
[*It.* Gazzetta-(dim. of Gazza) = a magpie or Gazzetta (=small coin) from *Lat.* Gaza; *Gr.* Gaza = a treasure.]

गंज पुं. एक प्रकारचें भांडें. A large copper vessel.

²गंज वि. पुष्कळ, समूह, सांठा. A heap.
[पेल्हवी. **गंज**=खजीना, संग्रह; अरबी. फा. **गन्ज**= संचय, रास; सिं. **गुंजु**; बं. **गंज.** मूळ शब्द **पल्हवी** भाषेंतील; तेथून तो **अरबी** भाषेंत आला व तेथून **मराठींत** असा ह्याचा प्रवास आहे.]

गंज स्त्री. गवताचा सांठा,-रास. A heap, a stack, a pile (of hay).
[सं. **गञ्ज**; प्रा. **गञ्जसाला.**]

गंज पुं. तांबरा, कीट, मळ. The rust.
[सं. **गंजन**; प्रा. **गंजण**=डाग; फा. **झंग**=कीट; अकाम. (धातु) **गंजणें.**]

गट पुं. संघ, टोळी, मंडळी, रास, ढीग. A body, a band, a gang, a lump.
[कान. **गट्टि**=गोठळा; सं. **ग्रथ्** ९ बंधने. **गठ, ग्रंथी**; हिं. **गठी** (कानडी शब्द तद्भव दिसतो.).]

गट(णें) अक्रि. मिळणें, एकत्र होणें. To unite.
[सं. **ग्रथ्** ९ बंधने.]

गट्टी स्त्री. मैत्री. Intimacy, familiarity.
[कान. **गट्टि.**]

गटपट स्त्री. गडबड, फसवाफसवी. Irrelevant and evasive speech.
[सं. **गट्**; ध्वनिशब्द.]

गटर, गटार न. मोरी, नाला, घाणीचा नाला, बातमी (लक्षणा). The *gutter* or trench, popular rumour (fig.).
[*OF.* Gouttiere = a channel, or from Goute = a drop; *Lat.* Gutta = a drop.]

गटापर्चा पुं. एका वनस्पतीचा रस. मलाया द्वीपकल्पांत हें झाड आहे. त्याचा रस आटवून केलेला रांधा, ह्याच्या कांहीं काठ्या, मुठी वगैरे वस्तु करतात. हल्लीं एक विनोदी पात्र म्हणून इंग्रजींत रूढ आहे. तें त्याच्या चमत्कारिक नांवावरून आहे. Dried milky juice.
[मलाया. **गटा**=गोंद; **पर्चा**=एक झाड.]

गट्ट(करणें) अ. एकदम गिळण्याची क्रिया, मटकावणें, गिळणें. To gulp suddenly, to appropriate fraudulently.
[ध्वनिशब्द. कान. **गट्टि**=गोळा, सामर्थ्य, काठिन्य; **गट्टकन्,-दिशीं**=एकदम (खाणें) (कान. **गट्टी+कने**); अकामसा. **गटंकळी,-गळी**=बुडी (अजाणतां, माहीत न पडतां घेतलेली).]

गठडी स्त्री. लहान गांठोडें. A small bundle.
[सं. **ग्रंथिन्**, < **ग्रथ्** ९ ग्रथने; प्रा. **गंठ**; हिं. **गठड़ी**; अकामसा. **गठीचोर-गट्टीसोड**=गांठोडें सोडून चोरी करणारा, उचल्या (एक शिवी).]

गठ्ठा पुं. मोठें गांठोडें, गोळा, गट, भांडवल, पुंजी (लक्षणा). A bale, a bundle.
[सं. **ग्रन्थः**, **गृथ्नंः**, प्रा. **गठ्ठिय** > **गठ्ठ**; हिं. **गठ्ठा**; पं. **गठ्ठा**; का. **गट्टी**=गोळा; अकाम. **गठ्ठया**=मोठा गठ्ठा. अर्थाचें विशेषीकरण झालें आहे.]

गड, गढी पुं. किल्ला, डोंगर, पहाडावरील बांधलेलें तटाचें घर. A small fort, a hill-fort.
[सं. **गडुकः** (?) **गड**; प्रा. **गड** (न)=विस्तीर्ण शीला; देप्रा. **गढो** (किल्ला, दुर्ग) (पुं. स्त्री.); हिं. **गन्ही**; बं. **गर्**; ओ. **गर**; पं. **गन्ह**; सिं. **गन्ह**; अकामसा. **गडकरी**=किल्लेदार, किल्ल्यावरील चाकरनोकर; **गडकोट**= गड, किल्ले वगैरे; **गडगा, गडगडा**=दगडाची रास (प्रा. **गड**=विस्तीर्ण शीला): **गडनिवीस, गडणीस**=गडावरील कारकून; **गडपति,-वई**=किल्लेदार.]

गड(णें) अक्रि. पुरलें जाणें, ग्रासलें जाणें. To enter and be buried in.

[सं. गड; गाढ < गाह् (निष्ठा); पा. गळ; अकाम. गळणें (< सं. गल्).]

गडगड(णें) अक्रि. मेघांचा आवाज होणें, धडधडणें, कडाडणें. To rumble, to clatter.

[१ ध्वनिशब्द; २ सं. **गद्गदः**; देप्रा. **गडअडी**, **गडयडी** (वज्रनिर्घोष); कान. **गड** = त्वरा किंवा गोंधळदर्शक शब्द; अकाम. **गडगड**, **गडगडाट** = मोठी गर्जना.]

गडगंज,-च वि. पुष्कळ, रगड (उदा० **गडगंच** संपत्ति.). Overflowing, copious.

[कान. **गड** = पुष्कळ, खात्रीचा; **गंज** = रास. मराठीमध्यें हा शब्द क्वचित् नाम **गर्दी**, **दाटी** ह्या अर्थी वापरतात.]

गडद वि. दाट, निबिड (अंधकार). Thick, gross, intense.

[कान. **गडु** (?) = दाटपणा; फा. **गर्द्** = दाट (छाया); याकाम. **गडद** = अंधकार. ज्ञानेश्वरींत ह्या शब्दाचा अर्थ **अंधकार** असा आढळतो. त्यावरून **गडद**, **अंधकार** हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील असावेत. ‘ **गडद छाया** ’ ह्यांतील **गडद** हा शब्द फा. **गर्द्** पासून आहे. ज्ञानेश्वरींतील शब्द फारशी शब्दाशीं संबद्ध नाहीं.]

जें अज्ञानाचें गडद पडे । तें हा बहुवस मनीं वाढे ॥
ज्ञा. ४–२०५.

गडद(णें) क्रि. पुरणें, झाकून ठेवणें. To hide in the earth.

[सं. **गड** = खंदक (नाधा.); हिं. **गाडना**; अकामसा. **गडदा** = खड्डा; **गडदू** = वजन, पाचर.]

गडप वि. नष्ट, अदृश्य, बेपत्ता, गुप्त. Disappeared, lost, swallowed up.

[अर. **घर्ब** = गुप्त होणें.]

गडबड स्त्री. गोंधळ, घाई, अव्यवस्था. Confusion, commotion.

[सं. **गद्**, **बद्**; देप्रा. **गडयड**, **गडअड** (=वज्रनिर्घोषः); हिं. **गरबर**; पं. **गंड्डवड्ड**; सिं. **गरबरी**; गु. **गडबड**. टर्नर ‘ **लोळणें** ’ ह्या अर्थी ‘ **गड** ’ शब्दापासून व्युत्पादितो. २ **ध्वनिवाचक** शब्द आहे. किंवा ३ सं. **गद्वद्** पासून; परंतु ही दूरान्वित व्युत्पत्ति दिसते.]

गडंगणेर नं. कार्याच्या पूर्वीचें आप्तेष्टांस भोजन, केळवण. The ceremonial meal given to the relatives before the marriage or the thread ceremony in the house.

[कान. **गड्डू** + **नीर** = पाण्याचा तांब्या व पाणी, पाहुण्यास द्यावयाची मेजवानी.]

गडी पुं. पुरुष, हस्तक, मित्र, स्नेही, सोबती. A man, a lad, a fellow.

[कान. **गट्टी**, **गंडियु** = एकत्र होणें. अर्थ मर्यादित- (विशेषीकरण) झाला आहे. मूळ अर्थ सामान्य **मनुष्य** असा असून नंतर विशिष्ट **स्नेही**, **सोबती** असा झाला आहे. **गड्या** (पुरुष), **गडे**-(सखे) असा संबोधनी उपयोग अनुक्रमें पुं. स्त्रीवाचक करतात.]

गड्डा पुं. मोटें मूळ, कांदा, सांठा. The root, bulb, mass, lump.

[सं. **कन्द**; द्रा.कान. **गड्डे**; कान. **गड्डी** = पेंढी, जुडी.]

गढ(णें) अक्रि. तल्लीन होणें. To be absorbed or engrossed by.

[सं. **गाह्**, (निष्ठा) **गाढ** (नाधा.); अकाम. **गाढ**, **गाढा**, **अगाध** पहा.]

गढा स्त्री. गढी, लहान भुईकोट किल्ला. A small fort.

[प्रा. **गढ-गड**; कान. **गुड्डु**-डोंगर.]

गढूळ वि. राड, खड्डूळ. Turbid, muddy.

[सं. **गोधुलि**, **गोधुलित** (रा. धा.), परंतु हा पाण्डित्यप्रकर्ष आहे. ‘ **गाध** ’=अंत, तळ; ह्यावरून ‘ गाळ ’ व ‘ गढूळ ’ हे शब्द आले. अकाम. **गढूळ(णें)** = रेंदाडणें (नाधा.)]

गण(णें) क्रि. मोजणें, मापणें, समजणें, मानणें (ल.). To count, to compute, to account.

[सं. **गण्**; **गृण्** (?); पा. **गण**; प्रा. **गण**; बं. **गणा**; ओ. **गणिबा**; हिं. **गिन्ना**; पं. **गिण्णा**, **गुठणा**; सिं. **गणणु**; गु. **गणवूँ**; अकामसा. **गण** = जमाव, समुदाय, संप्रदाय, तीन अक्षरांचा समुदाय (काव्य), संख्यामर्यादा; **गणगोत** = (गण आणि गोत्र), नातलग, सोयरेधायरे (ल.); **गण** = फलज्योतिषांतील एक संज्ञा (उदा० मनुष्यगण, देवगण, राक्षसगण); **गणमैत्री**=गण जुळणें; **गणती** = मोजणी, हिशेब; **गणना** = मोजणी; **गणनीय** = मोजण्याजोगें, मानण्याजोगें; **गणित** = मोजलेलें, अंकाचा हिशेब, अंकशास्त्र; **गणेश**=गणांचा ईश, गणपति.]

गण पुं. धान्याचा कण. A grain of the corn.

[सं. **कण** (?); कान. **गष्ठा** = धान्याचें शेत. अकामसा. **गणंग** = न शिजणारा धान्याचा कण. **गणगट** = मूर्ख, ठोंब्या मनुष्य (ल.).]

गण्ड पुं. मुख्य, नायक, वीर, समर्थ पुरुष. Leader, the chief man.

[सं. **गण्ड**; द्रा. **गण्ड**, **कड्डु**, **गडचु**, **गंडसु**, **गण्डु**.]

^{1}**गंड** पुं. पुरुष. A male person.

[कान. **गंड** = पुरुष, नर, सामर्थ्यवान पुरुष. **गंड** हा शब्द सामासिक शब्दांत दुसरा अवयव म्हणून येतो. उ० न्हाव**गंड**, तेल**गंड**, वाण**गंड**. **गंड** = नापित असा प्रा. देप्रा. शब्द आहे. परंतु येथें तो अर्थ अभिप्रेत नाहीं. कारण तेल**गंड**, वाण**गंड**, जोस**गंड** वगैरे रूढ शब्दांत तोच शब्द वापरला आहे.]

^{2}**गंड** पुं. गोळा, सूज, वर आलेला किंवा फुगलेला भाग, गंड (माला). A boil, a swelling.

[सं. **गण्ड**; पा. प्रा. **गण्ड**; बं. **गाँर**; पं. **गण्ण**; सिं. **गनी** (वशिंड); अकामसा. **गंडांतर** = संकट, रोग, आजार (गण्ड + अन्तर = दुसरें संकट).]

^{3}**गंड** पुं. गाल, आंख. A cheek.

[सं. **गण्ड**; प्रा. **गण्ड**; गु. हिं. बं. **गंड**; सिंह. **गड** = गाल.]

गंडेरी स्त्री. उसाचा तुकडा, करवा. A small piece of sugar-cane.

[सं. **खण्ड**, **काण्ड** ; देप्रा. **गंडली**, **गंडीरी**, **गंडीरी इक्षुखण्डम्** (दे. ना. २·२८).]

गडवा पुं. पिण्याचें लहान गोल भांडें. A metal pot of round and small type.

[सं. **गडुकः**; प्रा. **गडुअ**; बं. **गारु**; ओ. **गरु**; हिं. **गरुवा**; सिं. **गडू**; गु. **गववो**; मूळशब्द कान. **गडू**; किंवा देप्रा. असून ‘ **गडुक** ’ हें उघड उघड उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

गडा स्त्री. सीमा, मर्यादा. Limit.

[कान. **गडी** = मर्यादा, परिसर, ह्या शब्दाचा सं. **कटि** किंवा **काष्ठा** शब्दाशीं संबंध जोडणें दूरान्वित आहे. याकाम. **गडा**, **गडे** (उगी. ६७, ३५९.)]

गंडा पुं. मंत्रित दोरा, एक परिमाण (चार कवड्या = १ गंडा). An enchanted string, an aggregate of four cowries.

[सं. **खण्ड**, **काण्ड** (?) ; शब्द द्राविडी किंवा परकी असावा.]

गंडार(णें) अक्रि. उन्मादणें, माज येणें. To be excited.

[कान. **गंडा** = शक्ति, सामर्थ्यवान् पुरुष.]

गंडिया पुं. गांडू, हिजडा, षंढ. A pathic (used as a term of general abuse).

[**गांड** पहा.]

^{1}**गत** वि. गेलेला, नष्ट, मागचा. Gone, departed, past.

[सं. **गम् १ गमने** (निष्ठा–गत). ह्यापासून **गत** > **गअ** > **गअल** > **गेला**, अशा मार्गानें ‘**गेला**’ हें भूतकाळी रूप निष्पन्न होतें. अकाम. **गतकाळ**, **गतधवा**, **गतपराक्रम**, **गततेज**, **गतवर्ष**, **गतवित्त**, **गतलक्ष्मी**, **गतसत्त्व** इत्यादि सामासिक शब्द तयार होतात. ह्या सर्व ठिकाणीं **गत** = **गेलेलें**, **नष्ट**, असाच अर्थ आहे. **गतला** = गेला; **गतागत** = जाणें येणें (गत + अगत), **गतानुगतिक** = अडाणी, पुढच्याच्या मागें जाणारा.]

^{2}**गत** स्त्री. स्थिति, प्रकार, अवस्था, दशा, मार्ग, सतारीवरील गाणें. State or condition, quaver (in music).

[सं. **गति** (√**गम्**) ह्या शब्दाचा संक्षेप, अपभ्रष्ट रूप.]

गतकाळी वि. कांगावखोर, ढोंगी, सोंगाडी (स्त्री.). (A woman) roaring and bellowing upon a slight beating, feigning.

[सं. **गत + काल** = दुर्दैवी, जिचा योग्य काल गेला अशी स्त्री हा मूळ अर्थ; परंतु **कांगावखोर**, **ढोंगी** असा अर्थ त्या शब्दाला प्राप्त झाला.]

गति स्त्री. गमन, जाण्याची क्रिया–वेळ, हालचाल, स्थिति दशा, आश्रय. Motion, activity, condition, support.

[सं. **गति**, √**गम् १ गमने**. ह्याचें तद्भव रूप ‘ **गत** ’ असें होतें. ह्याचे लाक्षणिक अर्थ व ह्यासंबंधीं वाक्प्रचार रूढ आहेत. अकाम. **गति मिळणें** = मोक्ष मिळणें, सुटका होणें (गति = सुगति); **गति होणें** = प्रवेश, शिरकाव होणें; **गतिमान** = जाणारा, हलणारा, चल, अस्थिर; **गत्यंतर** = दुसरा मार्ग, दुसरा उपाय.]

गद्गद(णें) अक्रि. शिजणें, खद्खदणें, (गदगद, खद्खद असा शिजतांना आवाज होतो त्यावरून). To emit the sound of an article under ebullition.

[वैसं. **गध्** सं. **गद् १** शब्दे; (द्विरुक्ति) गद्गद; ध्वनिशब्द ; **गद्गदा हालविणें** = धरून जोरांत हलविणें.]

गद्मद(णें) अक्रि. उकडणें, घाम येणें. To feel sultry, to perspire.

[सं. **गज् १** मदने, + **मद् १** मदे; (द्विधातुसंयोग).]

गदळ स्त्री. न. केर, कचरा, मळ, घाण. Dregs, dirt, dust, rubbish.

[कान. **गदलु** = वाईट वास; सिंह. **गदाई**; गु. **गदलुं**; हिं. **गदला** = घाण. हा शब्द ब्लोकनें सं. **गृद्, गर्द्** ह्या धातूशीं जोडला आहे. परंतु कान. **गदलु** हाच मूळ समजणें हें अधिक सशास्त्र आहे. ब्लोकच्या व्युत्पत्तींत '**ळ**' ची उपपत्ति लागत नाहीं.]

^{1}गदा स्त्री. आयुधविशेष, करेलें, घाला, हल्ला, संकट (ल.). A mace, a club.

[सं. **गदा**. साधनावरून साध्याचा अर्थ लक्षणेनें झाला. गदा हें हल्याचें साधन आहे. परंतु त्याचा अर्थ हल्ला व त्यावरून सामान्य संकट असा अर्थ झाला.]

^{2}गदा स्त्री. भिकारी, भीक. A beggar, begging.

[फा. **गदा** = भिकारी.]

गदारोळ पुं. गोंधळ, गजर, ओरड, खटाटोप. A loud shout or roar.

[सं. **गद्** (१ शब्दे) + **आरोळ** (> **आरवली-आरोळी**). २ ते. **गंदरगोळयु**; कान. **गद्दल, गदरिसु**.]

तेणें केला गदारोळ ग्रंथरचनेचा । वि. सिंधु.
सांडोनि गदारोळु । मजपणें घातला आळु ॥
शि. पा. १९२.

गदेला पुं. रुंद, लांब अशी मोठी गादी. A large rectangular case stuffed.

[हिं. **गद्दी, गादी**; म. **गादी** पहा. ह्याचें पुं. रूप '**गादा व गदेला**' हे हिंदी शब्द आहेत.]

गद्गद वि. दुःखित, अश्रुमिश्र, भावनामिश्र (वाणी). Convulsive or emotional (utterance).

[सं. **गद् १ शब्दे** (द्विरावृत्ति); **गद्गद्** - अर्थाचें विशेषीकरण झालें आहे.]

गद्धा पुं. गाढव. An ass.

[सं. **गर्दभः**; प्रा. **गद्दह**; हिं. **गद्धा**; अकामसा. **गद्धेलोट, गधेलोट** = कुस्तींतील एक डाव (गद्धा+लोट).]

गद्य न. बोललेलें, पद्य नव्हे तें, छंदोरहित, साधा वाक्यसमूह. Unmetrical composition, common prose.

[सं. **गद् १ + शब्दे, य** (विधिप्रत्यय).]

गधडा पुं. गाढव. An ass.

[सं. **गर्दभः**; पा. **गद्दभ**; प्रा. **गद्दह**; सिं. **गधा**; गु. **गधाडो, गधेडो**; पं. हिं. **गधा**, गारवी भाषा. **गदा**; कलासभाषा. **गर्दाक्**; खोवरभा. **गुर्दोख**; सिं. **गदषु**.]

गनी (पोतें) न. एक प्रकारचें पोतें. A gunny bag.

[एक प्रकारचें पाटाचें कापड. ह्या कापडास **गोण-गोणी** असें म्हणत. रंफियस या युरोपियनच्या उच्चारांत त्याचें **गनिय** असें रूप झालें. सं. **गनिः** शब्द चिन्त्य आहे.]

गनीम पुं. शत्रु, वैरी, विरोधी. An enemy.

[अर. **घनीम्**; पेकाम. **गनीम** (इऐ ५-५०), **गलीम**; पेकाम. **गनिमाई** = समोरसमोर युद्ध नव्हे तें, फसवून मारणें. **गनिमी** (खरे ६-२७९६) = लबाडीचें युद्ध, सतरा व अठरा शतकांत थोडें सैन्य असल्यामुळें मराठ्यांनीं ही पद्धत अमलांत आणिली. अकामसा. **गनिमाई** = अचानक हल्ला, धावपळीची लढाई; **गनीमी** (कावा) = अचानक हल्ला करण्याची तऱ्हा.]

^{1}गंध पुं. वास. Smell or odour (good or bad.)

[सं. **गंध** ह्याचा मूळ अर्थ **वास**. विशेषीकरणानें **सुवास** किंवा **दुर्गंध** असा झाला. जें सुवास देतें तें द्रव्य असाहि त्याचा अर्थ झाला. चंदनघर्षणानें तयार केलेलें सुवासिक द्रव्य हा एक विशेष अर्थ आहे.]

^{2}गंध पुं. गंधा, दुर्गंधी. Bad odour.

[सं. **गन्ध**; देप्रा. **गंधिओ दुर्गंधः** (९९-१६); गु.पं.हिं. **गंध**; सिंह **गंद**; गु. **गंधावूँ** = घाण मारणें; हिं. **गंधा-दुर्गंधी**; रुमा. **खन्** = घाण. ह्यावरोबर **गन्दकी** = घाण हा शब्द चिन्त्य आहे. ह्याच्या मुळाशीं फा. **गन्दगी** = घाण हा शब्द आहे. गन्ध शब्दाचा मूळ अर्थ वास; त्यांत चांगला वास व वाईट वास असा भेद नंतर झाला व तो फा. **गन्दगी** ह्या शब्दाच्या संभ्रमानें झाला.]

गंधक पुं. एक खनिज द्रव्य (पिवळें). Sulphur.

[सं. **गंधक**.]

गंधर्व पुं. एक देवयोनी, गायन नर्तन करणारा. A celestial chorister.

[सं. **गंधर्व** = देवयोनिविशेष. ह्यांच्या प्रेमविवाहपद्धतीवरून '**गंधर्व**' = मोहतूर असा एक शब्द अशिष्ट भाषेंत रूढ आहे.]

गंधे पुं. अत्तराचा व्यापार करणारा. A vendor of perfumer.

[सं. **गंध, गांधिक**; पाप्रा. **गंध**; प्रा. **गांधिअ**; का. **गान्द**; बं. **गाँधी** (चावणारी माशी); ओ. **गंधाइबा**; हिं. **गांधिला**; पं. गुं. **गांधी**. टर्नर मराठी शब्द **गांधी** असा देतो. **गांधील** (माशी) हा शब्दहि गंधपासूनच आला आहे.]

गप गप, गपापा (खाणें) अ. आधाशीपणानें (खाणें). (To eat) voraciously.

[ध्वनिशब्द. कान. **कपकप्**=खातांना होणारा शब्द.]

गप, गफ, गफ्फा स्त्री. बात, गोष्ट, फुशारकी, थाप, उडत बातमी. A common report, news, an idle prate.

[फा. **गोफ्तन्**=बोलणें, **गप्**=आवई; बं. **गप्प**; ओ. **गप**; हिं. **गप्**; पं. **गप्प**; गु. **गप**; अकाम. **गप, गप्प,** (**बाजार**) **गप्प, गप्सप** (फा. **गप्शप्**=रिकामटेकड्या गप्पा); **गपाप्या**=गफ्फा मारणार, **गप्पीदास, गपाष्टक**= गफ्फा, इत्यादि शब्द रूढ आहेत.]

गफलत स्त्री. चुकी, घोंटाळा, गैरसावधपणा, हयगय. Carelessness, negligence.

[अर. **घफ्लत्.**]

गबाळ वि. अव्यवस्थित, निरूपयोगी. Untidy, slovenly.

[अर. **घैब्** > **गाईब, गायब** ; मरा. **गबाळ.**]

गब्बर स्त्री. पुं. एक सोन्याचें नाणें, त्यावरून श्रीमंत, द्रव्य जवळ असलेला. A gold coin, hence wealthy.

[सं. **गव्हर**; प्रा. **गब्भर**; २ सं. **गर्भभरः**; प्रा. **गब्भर**(?); किंवा ' **गब्रू** ' ह्या शब्दापासूनहि सिद्ध झाला असावा.]

गब्रू, गबरू पुं. हुशार, चलाख, तरुण पुरुष, लठ्ठ व ठेंगणा, श्रीमंत. A stout and comely youth.

[सं. **गर्भरूप** (?); हिं. **गब्रू**; पं. **गभ्रू, गब्रु**; सिं. **गभिरू**;=सोळा वर्षांचा तरुण. संस्कृत रूप कृत्रिम आहे.]

गभीर, गंभीर वि. प्रशांत, खोल, अगाध, विचारवंत. Deep, grave, serious.

[सं. **गभीर, √गभ्,√गध्** ; अगाध पहा.]

गम(णें) अक्रि. जाणणें, वाटणें, विचारांत येणें, आळसणें (असा गमूं नकोस.). To know, to seem, to appear, to work in a dull manner.

[१ सं. **गम् १ ज्ञाने**; प्रा. **गम**. सर्व गत्यर्थ धातु ज्ञानार्थ आहेत असा संस्कृतमध्यें सिद्धान्त आहे. २ सं. **गंब् १ आलस्ये**; अकामसा. **गम**=आशय (सं. **गम्य**); **गमक**=चिन्ह, दाखला, कारण ; **गमका**=तोरा, मिजास, नखरा ; **गम्य**=ज्ञान, माहिती (<**गम्**+**य**-जाणण्याजोगें असें जें ज्ञान).]

गम पुं. अर्थ, तात्पर्य. Drift, scope.

[अर. **घम्**=दुःख; सिं. **गमी** (ज्ञान); गु. **गम**(अर्थ); फा. **घम् खुर्दन**=अनुकंपा दाखविणें. हा अर्थ निराळा आहे. ' टर्नरनें दिलेला अर्थ फार कच्चितच आढळतो. कल, अभिप्राय, धोरण, आशय ह्या अर्थी '**गम**' शब्द रूढ आहे, परंतु तो सं. गम्य > गम् (गतौ) ज्ञाने ह्या धातूपासून आहे. **गमी**= शोक, दुःख (> फा. **घम्**=दुःख.).]

गमजा, गम्झा स्त्री. चोचले, चाळे, चेष्टा, दिमाख, तोरा, गर्व. Coquetry, prudery, airs, pseudo-modesty.

[फा. **घम्झा**=कटाक्ष, विभ्रम.]

गमत, गंमत स्त्री. मजा, चैन, आनंद, सुख, करमणूक. Any amusing occupation, interest, joy.

[सं. **गम्, गंब् १ आलस्ये**; अकामसा. (**रमत**) **गमत**= खेळत ; **गमत्या**=मनोरंजन करणारा.]

गमन न. जाणें, हलणें, जाण्याची क्रिया. Going or moving.

[सं. **गम् १ गतौ,+अन्** ; अकामसा. **गमनी**=जाणारा, संबंध असणारा (शिवीमध्यें वापरतात. उदा० **मातृगमनी, मात्रागमनी**); **गमवा**=मार्ग.]

गमव,-गमाव(णें) क्रि. सांडणें, हरवणें, फुकट घालविणें. To lose, to waste, to beguile.

[सं. १ **गम्** (णिच्) **गमय**; प्रा. **गमे, गमावइ**; हिं. **गँवाना**; पं. **गवाउँना**; गु. **गमाववूँ.** २ **गंब्** १ आलस्ये (णिच्). **गम्** म्हणजे जाणें, **गमव** म्हणजे जावविणें, जावयास लावणें, ह्यावरून घालविणें, फुकट घालविणें, हरवणें असा अर्थ प्राप्त झाला. **गमविणें** ह्याच्याविरुद्ध **गवसणें** (सांपडणें) किंवा गमणें=आळसणें (<गंब्).]

गंभीर वि. शांत, भव्य, मोठा, भयंकर. Grave, serious.

[*IE*. Gebh (to dip); सं. **गभ, गह्** (**गभीर, गंभीर**) ; *Av*. Gaf (Gafya = depth); *Gr*. Bap (Bapto = dip) ; *Lat*. Baptise ; *Teut*. Kaf.]

गय करणें क्रि. झोपीं जाणें. To lull into sleep.

[कान. **गेइ**=निजणें, झोपीं जाणें; अकाम. **गयगय करणें** (मुलांच्या झोपेबद्दल वापरतात.).]

गयफ वि. बेपत्ता. Lost, disappeared.

[अर. **घाइब्**=अदृश्य; अकाम. **गैब, गइब**=गायब.]

गया स्त्री. हिंदूंचें एक तीर्थक्षेत्र (बिहारप्रांतांत). A sacred place of the Hindus.

[सं. गया. गयावळ = गयेंतील उपाध्या.]

गयाळ, गयाळी वि. अजागळ, बावळट, गबाळ. Slovenly.

[सं. गत; प्रा. गय; हिं. गया; गु. घेला (श.को.); फा. गायब पासून आहे का ?]

गयावया स्त्री. काकुळती, करुणा, प्रार्थना. Supplication, piteous manner.

[सं. गति; प्रा. गइ; गति = शरण्य, आश्रय. किंवा ध्वनिशब्द असावा.]

°कर, °कार, °गर, °गार प्र. हे सर्व प्रत्यय आहेत. (हे सर्व कर्त्रर्थी अथवा स्वामित्वार्थी आहेत.)

[सं. कर, कार < कृ ८ करणे; प्रा. गर, गार; दुसरा एक गर असा प्रत्यय फारशी भाषेंतील आहे. उदा० सिकलगर, पंचीगर, बाजीगर.]

गर, गीर पुं. फळाच्या आंतील भाग, गाभा, मगज गर. Pulp, kernel.

[सं. गृ १ सेवने, गर्भ (?); = खाण्यासारखा भाग; सिं. गरू.]

गरक, गर्क वि. निमग्न, बुडलेलें, गुंतलेलें. Drowned, sunken.

[अर. घर्क्; पेकाम. गर्क, गरक (पाव. ४७); अकाम. गरक(णें) (नाधा.) = लवकर मुरणें, आंत शिरणें.]

गरगर(णें) अक्रि. चक्रासारखें फिरणें, भोंवतीं फिरणें. To whirl.

[सं. गरगर, √ गृ (?). गरगरां = सभोंवतीं (फिरणें), चक्रासारखें वर्तुळ गतींत (फिरणें).]

गरगट(णें) सक्रि. पिठल्यासारखा पातळ पदार्थाचा एकजीव करणें. To levigate.

[ह्या शब्दाच्या व्युत्पत्तिसंबंधीं राजवाडे यांची पुढीलप्रमाणें टीप आहे. " ग्रथचें द्वित्व जाग्रथ, जरीगृथ, इत्यादि नाना तऱ्हांनीं होई. सर्वांत प्राचीन द्वित्व ' ग्रथग्रथ ' त्याहून अर्वाचीन गरग्रथ । त्या गरग्रथ् पासून मराठी गरगटणें धातु निघाला आहे. " ह्यामध्यें पाण्डित्यप्रकर्ष आहे. परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. धातु परकी असावा किंवा ध्वनिशब्द असावा असें मानण्याकडे प्रवृत्ति होते.]

गरज(णें) अक्रि. मोठा आवाज करणें. To thunder.

[*IE*. Gerg, glg; सं गर्ज् १ शब्दे; *Av*. Gerzaiti (Complain); *Arm*. Krunk; *Gr*. Gorg; *Lat*. ging; *Old Slav*. Glagolu=sound; *Goth*. Krakon · *MidEng*. Kraken. अकाम. गर्जणें, गर्जना, गाजणें, गजर (?) इ.]

गरज स्त्री. अडचण, अभाव, उणीव, दरकार, पर्वा. Need, want, pressing necessity.

[अर. वरझ्; पुढें दिलेली व्युत्पत्ति पाण्डित्यप्रकर्षाची आहे. गृध् > गृध्य > गरज्ज > गरज = इच्छा. (भाइअ. १८३२.); अकाम. गरजी, गरजू, गरजवंत = गरज असणारा.]

गरती, गर्ती वि.(स्त्री.) पतिव्रता, कुलीन स्त्री, कुटुंबिनी स्त्री, सभ्य स्त्री, सुगृहिणी, सौभाग्यवती स्त्री. A decent and reputable woman.

[सं. गृहस्थिनी, गृहरति, गृहवती, परंतु मूळ शब्द कान. गारती, गर्ती = स्त्री हा असून त्याच्या अर्थांत वाढ झालेली आहे.]

गरदन, गर्दन स्त्री. मानगूट, लठ्ठ मान. The neck.

[पेल्हवी. गर्दन; फार्सी. = गर्दन; फार्सीकरण नंतरचें. ह्याचा सं. ग्रीवा शब्दाशीं संबंध असावा.]

गरम वि. उष्ण असलेलें, उबदार, रुष्ट, रागीट (लक्षणा). Hot, warm, angry.

[फा. गर्म; सं. घर्मन् ह्या शब्दाशीं संबद्ध आहे. झेंद. गरेम; *Thermos*, *Thermometer*; हे सर्व शब्द एकाच मूळ आर्य धातूपासून सिद्ध झाले.]

—**गरमी** स्त्री. उष्णतेचा एक रोग, उपदंश, उष्णता, काहली, आग. The syphilis, heat.

—**गरमनरम** वि. कडक आणि सौम्य (वर्तन, भाषण). Hot and soft.

गरल न. विष, जहर. Venom.

[सं. गरल, √ गॄ.]

गरवार वि. पोटीशी, गर्भार, गरवारशी. Pregnant.

[सं. गर्भार, गुरूभार; ह्या शब्दाच्या सिद्धीमध्यें गर्भ, आणि गुरु अशा दोन शब्दांचा संबंध आहे. गर्भार (गर्भ–र), गरोदर (गुरूदर) असे दोन तत्सम शब्द आहेत. सिं. गरकूरी, गरो = जड.]

गरसळी स्त्री. गळ्यांतील मण्यांचा, पोतीचा अलंकार. A necklace of glass and gold beads.

[म. गळसरी = वर्णविपर्ययानें गरसळी. सं. गल + सर ' गल्ल ' शब्द मूळ देशी, संस्कृतीकरण नंतरचें. ' ग्रीवा ' शब्दाशीं संबद्ध आहे.]

गरळ स्त्री.न. विष, लाळ (ल.), सापाच्या तोंडांतून वाहणारी विषारी लाळ, रस. The venomous foam of the mouth of serpents.

[सं. **गरल**, √**गॄ**; गु. **गरल** (नपुं.); पं. **गरल** (स्त्री); हिं. **गरल** (पुं.); ह्या सर्व भाषांत '**गरळ**' शब्दाचें लिङ्ग-विपरिणमन उल्लेखनीय आहे. तत्सम व तद्भव गरळ शब्दांचीं लिंगें भिन्न आहेत. परंतु पुंल्हिंग कसें प्राप्त झालें ?]

गरा पुं. गर, उसाचा करवा, गंडेरी. A bit or piece of sugar-cane.

[सं. **गृ** ४ सेचने; अकाम. **गर.**]

गराडा पुं. वेढा, वेष्टण, दगडाची भिंत, कुंपण. An encircling wall, a hedge, a fence.

[फा. **गिर्द, गिर्दवाद** = गिराडा, गराडा (?).]

गरिमा पुं. मोठेपणा, गुरुत्व, मान्यता, थोरवी, अष्ट सिद्धींपैकीं एक (अणिमा, लघिमा, गरिमा). Weight, gravity.

[सं. **गुरू, गरिमत्, गरिमान्, गरिष्ट.**]

गरीब वि. द्रव्य नसलेला, दरिद्री, दीन, भिकारी. Poor, mild, meak.

[अर. **घरीब्**; **गरिबाई** = दारिद्र्य; **गरीबगुरीब** घरीब् व त्याचें अनेकवचन **घुरबा**–मिळून **गरीबगुरीब** सिद्ध होतो. व त्याचा अर्थ समाहारार्थे–**गरीबलोक** असा झाला. पेकाम. **गरीबगुरबे** (रा. ६–५५३), **गरीबगुरब–गुरिब** (रा. ७-७०, वाड. २-३१).]

गरूड पुं. पक्षिविशेष, पक्ष्यांचा राजा, विष्णूचें वाहन. The bird and vehicle of Vishnu, a kind of birds.

[सं. **गरुड, गरुत्मन्** √ **गृ.**]

गरुरी, गरुरी स्त्री. गर्व, मगुरूरपणा, मग्रुरी. Pride, haughtiness, arrogance.

[अर. **घुरूर्**; पेकाम. **गरूर, गरूरी** (रा.१९-३८).]

गरोदर वि. (स्त्री.) गरवार, गर्भार. Pregnant.

[सं. **गुरू+उदर**; पा.प्रा. **गरु**; सिं. **गरकूरी. गरो**=जड.]

गर्क वि. गरक पहा.

गर्गशा पुं. बैदा, गोंधळ, आरडाओरड, त्रास, घोटाळयाचा कारभार, वांधा, निष्कारण भांडण. Disorder, noise, confusion, a fruitless squabble.

फा. **घर्घशा.** पेकाम. **गर्गशा** (रा. १५.३२).]

गर्गाचार्याचा मुहूर्त पुं. शुभमुहूर्त, चांगली शकुनाची वेळ. An auspicions time.

[सं. गर्ग नांवाचा एक ज्योतिषी होऊन गेला. त्यानें ज्योतिषशास्त्र लिहिलें. तो यादवराजांच्या दरबारीं राजज्योतिषी होता असें म्हणतात. त्याच्या गणितावरून ठरलेला मुहूर्त.]

गर्ज(णें), गरजणें अक्रि. ओरडणें, आवाज करणें. To roar, to thunder.

[सं. **गर्ज्** १ **शब्दे**; **गर्जना, गर्जन, गर्जित** = ओरड, हांक, गडगडाट.

EI. Gerg, Glg; सं. **गर्ज्** १ **शब्दे** ; *Av.* Gerzaiti (Complain); *Arm.* Krunk; *Gr.* Gorg; *Lat.* Ging; *Old. Slav.* Glagolu (Sound); *Goth.* Krakon; *Eng.* craken, Cracken; मरा. **गर्जना, गर्जित, गरजणें.**]

गर्ता स्त्री. खांच, खळगा, खड्डा. A hole, a pit.

[सं. **गर्ता, गर्त**; हिं. **गर्त, गर्दोंडा.**]

गर्द वि.स्त्री. दाट, गडद, रेलचेल, धूळ, धुरळा, वैपुल्य. Dense, thick, luxuriant, dust.

[फा. **गर्द्**; पेकाम. **गर्द** (५-१६६); अकाम. **गर्दी** = दाटी, **गर्दी** = नाश. (**भाऊ**) **गर्दी** = सैन्यांतील गोंधळ, दाटी, पळापळ. पानिपत रणक्षेत्रावर अबदाली–भाऊसाहेब यांच्या युद्धांत मराठ्याच्या सैन्यांत गोंधळ झाला व त्यांत भाऊसाहेब नाहींसे झाले त्यावरून.]

गर्बा पु. एक रासक्रीडेसारखा नाच. A kind of dance.

[गु. **गर्बा**, '**गर्भ**' ह्याच्याशीं संबद्ध आहे काय ?]

गर्भ पुं. गाभ, स्त्रीच्या पोटांतील पिंड, गोळा, आंतील भाग, द्रव्य, तत्त्व, सारांश (ल). A fœtus, an embryo.

[*IE.* Gerbh (grasp); सं. **गृभ्** (**गर्भ, सगर्भ्यः**); *Av.* Garw (womlb); *Gr.* Breth; *Lat.* Greb, gerlb (Gremium); *Lith.* Grebius (grasp); *Goth.* Kalbo:; सं. **गर्भः**; प्रा. **गब्भ**; मरा. **गाभ**; अकामसा. **गर्भगळित** = गर्भ गळण्याइतकी (फार भीति); **गर्भधारण** = गर्भ राहणें; **गर्भपतन,–पात** = गर्भ गळून पडणें; **गर्भयातना** = बाळंतपणाच्या वेदना, वेणा; **गर्भश्रीमंत** = गर्भांत असल्यापासूनची श्रीमंती असलेला; **गर्भसुती** = गर्भांत–आंतील भागांत सुताची वीण असलेला, ताणा (उभें सूत) सुताचा असलेलें वस्त्र; **गर्भधान** = गर्भासंबंधीं एक संस्कार; **गर्भार, गर्भारशी** = गरोदर स्त्री; **गर्भाशय** = गर्भ राहण्याचें उदरांतील स्थान.]

गर्व पुं. फुशारकी, अभिमान, ताठा, डौल, अहंकार, दिमाख. Pride, haughtiness, arrogance.

[सं. गर्व > गुरु; गर्व्-मदे, किंवा √गृ; **गर्विष्ठ** = अहंकारी (कदाचित् ‘ गरिष्ठ ’ याच्याशीं संबंद्ध). **गर्वोक्ति** = गर्वानें उच्चारिलेलें भाषण.]

गर्हा स्त्री. निंदा, दोष. Censure, blame, reviling.

[सं. गर्हा, √गर्ह् १ निन्दायाम्.]

–गाऱ्हाणें न. तक्रार. Complaint against, a petition.

[सं. **गर्हणम्**, गाराणें पहा.]

गल स्त्री. जमिनींतील लहान खळगा (विटीदांडूच्या खेळांतील). A hole made at marbles.

[सं. गद; सिं. गिड = भोंक; कान. **अगळु**. **गल्ली** पहा.]

गल(मुछा), गुलमुछा स्त्री. गालावरी केसांचा झुबका, कल्ला. Moustaches bunching over the cheeks.

[१ सं. **गल** + **श्मश्रु**; २ कान. **गल्ल**.]

गलका,-गा पुं. गोंगाट, गडबड. Clamour, uproar, outcry.

[सं. **गद्**, **कल्**, १ शब्दे; कान. **गलगु**=मोठ्यानें वटवट (श. को.).]

गलत स्त्री वि. चूक, चुकीचा, खोटा, रद्द. A mistake, going astray.

[१ सं. **गलित**; २ अर. **घलत्**; हिं. **गलत**; म. **गलती**; मराठीमध्यें हिंदीमधून आला. **गलतन**, **गलतान** = अस्ताव्यस्त मनुष्य; अव्यवस्थित, सैल, भोंगळ < अर. **घलत्**; सं. **गल** + **स्तन** (?).]

गलफाट(णें) अक्रि. गमाविणें, हरवणें, सांडणें, गोंधळून जाणें. To be mislaid, to be lost.

[सं. **ग्लै १ हर्षक्षये** + **पट् १ गतौ**. **गलफाटा**=घोंटाळा, धांदल, गोंधळ.]

गलबत न. एक प्रकारची नाव. A ship, a swift sailing boat of large size.

[*Dut. Eng.* Gallivat. अठराव्या शतकांतील लहान लढाऊ नावेला हा शब्द योज़ीत. ती वल्हविली जाई. तीस चाळीस वल्हीं असत. हा शब्द फार चमत्कारिक आहे. Galley ह्या पासून Gally, Galiot, Galleon, Galeass, Galleida, Galeoncino निघाले आहेत. ह्यापासूनच Jolly-boat हा शब्द उत्पन्न झाला. डनिश Jolle हा इंग्रजी शब्दाचा अपभ्रंश आहे. त्यापासून Jollyvatt हा शब्द झाला. हा सर्व प्रकार १४९५ इ. स. पर्यंत झाला. मूळ Galea = sword fish, pirate; *Portu.* Galeota = लहान नाव; फा. **गल्बत्**.]

गलबल(णें) अक्रि. गोंगाटणें, घाबरणें, भिणें. To be in wide alarm, to be in commotion.

[सं. **गद्**, **वद्** १ **शब्दे**, √**ग्लै**, √**गृ**. अकामसा. **गलबला**, **गलबलाट** = गोंगाट; **गलबल्या** = गोंगाट करणारा, अव्यवस्थित; **गलबा** = गलका, गोंगाट, जोर.]

गलिच्छ वि. घाणेरडा, घाण, मलिन. Dirty, filthy, foul.

[अर. **घलीझ्**.]

गलित वि. गळलेला, पडलेला, सुकलेला. Fallen, dropped, sunken.

[सं. गल्, (निष्ठा) गलित; अकामसा. **गलितकाय**, **गलितअंग** (रोडका), **गलितदंत** (दांत पडलेला), **गलितेंद्रिय** (म्हातारा), (**गर्भ**) **गलित–गळित** = भयभीत, इत्यादि शब्द रूढ आहेत.]

गलूल, गलोल, गलेली स्त्री. गोफण (लाकडाचें तिकाटणें असलेली). A pellet-bow.

[फा. **घलूल्**; हिं. **गुलेल**.]

गल्ला पुं. रास, ढीग, धान्याचा सांठा. Corn or grain.

[द्रा. **गल्ले**; **गोळा** = मातीचा गोळा, पुंजका; अर. **घल्ला**= धान्य.]

गल्ली स्त्री. लहान बोळ, वाट. A lane or alley.

[सं. **गद**(?); प्रा. **गड**; बं. **गली**; ओ. **गळी**; हिं. **गली**, **गल्ली**; गु. **गली**; पं. **गली**; सिं. **गली**; मराठी **गल** = भोंक (वैदुलाच्या खेळांत करावयाचें) हा शब्द **गड** पासूनच आहे कीं काय व गल्ली शब्दाशीं त्याचा संबंध आहे कीं काय ? कान. **अगळु**.]

गल्लीकुची स्त्री. आळी, बोळ, आड गल्ली. A comprehensive term for lanes.

[हिं. **गल्ली** + फा. **कुचाह**; एकाच अर्थाचे दोन शब्द.]

गव स्त्री. चिमटा, वेंघ, मिठी. The grasp, catch, pincer.

[सं. **कव** (?); **कवल**, **कवळा**; अकाम. **गव**, **गावी** (चिमट्यासारखें हत्यार).]

गवखें न. खिडकी. A window.

[सं. **गवाक्ष**; प्रा. **गवक्ख**; हिं. **गवाख**; याकाम. **गवखें** = खिडकी, मध्य (ज्ञा. ११-६१, ४२५).]

गवगव(णें) अक्रि. मोठ्यानें ओरडणें, ओरड करणें. To clamour, to cry loudly.

[वैसं. **गु १** अव्यक्ते शब्दे; अकामसा. **गवगवा** = आरडा-ओरड, तक्रार. परंतु हा शब्द परकी वाटतो. वरील शब्दाशीं जोडणें शक्य असलें तरी व्युत्पत्ति अनिश्चित. कान. **गवुजी, गवूर** (गोंगाट) हे शब्द चिन्त्य आहेत.]

गवंडी पुं. घर बांधणारा, दगडविटा ह्यांची भिंत रचणारा. A mason, a brick-layer.

[सं. **गो** = पृथ्वी. **गावी** = हत्यार ह्या शब्दाशीं संबंध आहे का ?]

गवत न. तृणविशेष. Grass.

[सं. **गौअत्त**; देप्रा. **गवत्तम्** (घास); **गवा अत्तम्** (गाईनें खाल्लेलें–खाण्याचें) ह्या निर्वचनांत पाण्डित्य दिसतें परंतु तें पटत नाहीं. निर्वचन दुसरें असावेंसें वाटतें. **गवताळ** = गवत असलेली.]

¹गवस(णें) सक्रि. सांपडणें, शोधणें, शोध करणें. To be found, to be picked up by.

[सं. **गवेषयति**; प्रा. **गवेसइ**; याकाम. **गवसणें** (नरुस्व. ५१४); शिकाम. **गवसणें**. ऋग्वेदांत ‘ **गवेषय अस्मान्** ’ असे प्रयोग ‘ पूषन् ’ देवतेसंबंधींच्या प्रार्थनेंत आढळतात. त्यावरून मूळ अर्थ **गायींचा शोध करणें, गायी सांपडून देणें** असा झाला व त्या अर्थाचें सामान्यीकरण होऊन **सांपडणें** असा अर्थ सिद्ध झाला.]

गवसलाच तसा खग भासला ॥ न. द. १००

²गवस(णें) सक्रि. आच्छादणें, आच्छादन करणें, झांकणें. To cover, to gather in, to embrace.

[कान. **गवसणिगे** = खोळ, **गवसणिसु** = झांकणें, आच्छादणें; याकाम. **गवसणें, गवसणी** (ज्ञा. ८-२२८; १०-२१६). **गवेषणे** = शोधणें ह्या शब्दाशीं वरील शब्द जोडतात व प्रथम शोध करणें पासून कृदन्तनाम होऊन त्याचा अर्थ शोधण्याचें, बांधण्याचें साधन, दोर असा अर्थ होऊन ‘ **गवसणी** ’ हा शब्द रूढ झाला व त्यापासून गवसणें हें नाम सिद्ध झालें, अशी कांहीं विद्वान् व्युत्पत्ति देतात ती मान्य होण्यासारखी नाहीं. दोन्ही शब्द भिन्न आहेत. एक संस्कृतोद्भव व दुसरा द्राविडोद्भव.]

गवळी पुं. गोप, गुरें पाळणारा, दूध विकणारा, गुराखी. A herdsman, a vendor of milk.

[सं. **गोपाल**; पा. **गोपालको**; प्रा. **गोवालअ**; बं. **गोयाल**; ओ. **गोआळ**; बि. **गवार**; हिं. **गोआल**; पं. **गवाल**; सिं. **गवारु**; गु. **गोवाळ**; ने. **गोआल**. टर्नर मराठी रूप ‘ **गोवळा** ’ असें देतो. म. **गवळण, गवळीण** = गवळ्याची स्त्री.]

गवा पुं. एक वन्य पशु, रेडा, रानटी बैल. A wild ox.

[सं. **गवय,-गो,√गु-शब्दे.**]

गवार, गवारी, गोवारी स्त्री. वनस्पतिविशेष, एक प्रकारची भाजी. A kind of vegetable.

[सं. ?; देप्रा. **गवर.**]

गँवार पुं. खेडेगांवचा, गांवढळ, घाणेरडा, मूर्ख (ल.). Rustic, clownish.

[१ सं. **ग्रामदारकः**; पा. **गामदारको** ; ओ. **गमरा**; हिं. पं. **गवार**. ह्या टर्नरच्या व्युत्पत्तिपेक्षां खालील व्युत्पत्ति सयुक्तिक आहे. २ सं. **ग्रामकरः > गामअर > गाँवअर > गँवार**; ज्ञानेश्वरींत हा शब्द ‘ **गावार** ’ असा येतो व त्याचा अर्थ मूर्ख, अजाण असा आहे.]

परी दर्पणाचेनि आधारें । एकचि करुनि दुसरें । मूख पांति गावारें ॥ राज ज्ञा. १५, २४३

गवाळें न. गांठोडें, सोवळें, बासन. The bag in which the sacred cloth is kept.

[कान. **गवसणिगे** = आच्छादन.]

गव्हर नस्त्री. गुहा, खबदाड, गुंफा, अंतरंग, हृद्गत (ल.). A cave, a den, the inmost part.

[सं. **गव्हर, √गाह्, √ गूह् ४ गूहने.**]

¹गव्हला पुं. वनस्पतिविशेष (सुगंधी), प्रियंगु, गव्हला कचरा. A particular fragrant drug.

[सं. **गंधफला**; गु. **घउला.**]

²गव्हला पुं. सपीटाची लहान वळी. A bit of wheaten flour.

[सं. **गोधूम वलयम् > गहू + वळें > गव्हलें.**]

गव्हाण स्त्री. चारा खाण्यासाठीं केलेली जागा. The rack for fodder.

[सं. **गवादनी** ; प्रा. **गवाअनी.**]

गस्त स्त्री. पहारा, खण, रौण, रखवाली, पोलिसांची रातफिरती. Round or patrol.

[फा. **गश्त.**]

गहाण न. कर्जाऊ पैसे घेण्यासाठीं ठेवलेला माल, तारण. An article pawned.

[हिं. **गहना**; अकामसा. **गहाणखत,-चिठ्ठी,-नामा** = गहाणासंबंधीं करारनामा. **गहाणदार** = गहाणावर पैसे देणारा.]

गहिना पुं. दागिना, अलंकार, भूषण. A trinket, an ornament.

[सं. गहना; प्रा. गहणय; बं. गहना; ओ. गहणा; हिं. गह्ना, गहना.]

गहिरा वि. रंगविशेष, दाट रंग, दाट, खोल, भव्य. A colour, deep and clear colour.

[सं. गभीर, सं. गंभीरः (?); पा. गाम्भीरो; प्रा. गहीर; बं. गैरा; ओ. गहिर; हिं. गहरा; पं. गहिरा (= काळसर); सिं. गहरो; गुं. घेरु; ने. गैरो; याकाम. गहिरु (ज्ञा. १-१४४). ह्या शब्दाचे दोन अर्थ रूढ आहेत. एक रंगविशेष व दुसरा भव्य, खोल. ह्यांपैकीं पहिल्या अर्थाचा शब्द 'गभीर' पासून व दुसऱ्या अर्थाचा शब्द सं. गंभीर पासून सिद्ध होतो.]

गहिंवर(णें) अक्रि. कंठ भरून येणें-दाटणें. To be overcome by some vehement emotion.

[सं. गव्हर; म. गहिंवर (उमाळा, शोक, हुंदका).]

गहन न. वि. कठीण, निबिड रान, त्यावरून संकट. Difficult, dense, a forest.

[सं. गहनम्.]

गहिंस वि. जड, वजनानें भारी. Heavy, weighty.

[सं. गरिष्ठ (?).]

गहिंसपणा पुं. मूर्खपणा, जडपणा. Silliness, dullness.

[सं. ग्रामकरः; याकाम. गहिंस = अज्ञ, अडाणी (ज्ञा. ११-९७); म. गबार, गव्हार, गहींस.]

गहूं पुं. धान्यविशेष. Wheat.

[सं. गोधूम, √ गुध् = वेष्टने; पा. गोधूमो; प्रा. गहूअँ,-गहूम्; पं. घेऊं; हिं. घेऊं, गोहूं; गु. घऊं; बं. गोम; ओ. गहम्; वी. गहूं; गव्हला पहा.]

गव्हान न. आश्रयाची जागा. A place of refuge.

[सं. गव्हर. याकाम. गव्हान (उगी.)]

गळ पुं. आंकडा (पाण्यांत टाकून जिन्नस काढतांना किंवा मासा पकडतांना वापरतात.), मासे धरण्याचा आंकडा, कडी. A fish-hook.

[सं. गलः; पा. गळो; प्रा. गल, गलअ; हिं. गल; गु. गळ; संस्कृत शब्द नंतर प्राकृत शब्दावरून तयार झाला. पूर्वींच्या वाङ्मयांत फारसा आढळत नाहीं. हा शब्द कानडी शब्दांशीं अधिक जवळचा दिसतो. द्रा. कडु = जोडणें, कान. गाळ = मासे धरण्याचा आंकडा. का कानडींत संस्कृत अथवा प्राकृतमधून आला ?]

गळ(णें) अक्रि. खचणें, स्रवणें, झरणें, खालीं पडणें, थेंब थेंब खालीं पडणें. To drop, to leak.

[सं. गल् १ अवक्षरणे; पा. प्रा. गल; हिं. गलेना; गु. गलवूँ; सिं. गरणु; पं. गरणा, गळणा; का. गलुन; सिंह. गलनवी; अकामसा. गळती = पाझरणी, ठिबकणी, अभिषेकाचें भांडें; गळतें = सांडणें, भोंक, छिद्र; गळीत = गाळलेलें-तेल वगैरे, गळिताचीं (धान्यें), तीळ, करडी वगैरे. गाळ = ठिबकून खालीं राहिलेला भाग.]

गळ(णें) अक्रि. थकून जाणें, दमणें. To fall away, to sink, to be exhausted,

[सं. ग्लै (हर्षक्षये); प्रा. गिला, गिलाअ; म. गळणें (झरणें) हा धातु निराळा; णिच् रूप-गाळणें; नाम-गाळ.)

गळंगा पुं. गवत, धाटें-यांचा कचरा, गळाठा. Fallen leaves etc. lying loosely about, hence litter.

[सं. गल्; म. गळ.]

गळंगा वि. ढिला, सैल. Loose, slack, loosely packed.

[सं. गल्.]

गळा पुं. शरीरावयव, घशाचा बाहेरचा भाग. The throat, the fore-part of the neck.

[द्रा. गार्, गरोर् (गळा); तोखा. गरेर; काफिरी. गरु; सं.प्रा.पा. गल; सिंह. गल; हिं. गल, गला; पं. गल, गला; सिं. गरू, गिरू (मानेची मागील बाजू), गलु (घसा); गु. गळुं; आस्ट्रोएशियाटिक गल्ल असा एक शब्द आहे. त्याचेंच संस्कृतीकरण व द्राविडीकरण झालें आहे. समासांत 'गळा' शब्दाचें गळ असें रूप होतें. उदा. गळगट (बांधणें) = आवळून, लपेटून; गळगंट = गंडमाला (गळ < सं. गल्ल (?)); गळचेपी = गळा दावणें, धरणें, पिच्छा आग्रह (ल.); गळपट्टा = गळ्याभोंवतीं बांधावयाचा पट्टा; गळफांस = गळ्याभोंवतीं बंधन (गल + पाश); गलश्च कंठश्च (स्नेही) = जिवलग मित्र; गळसरी = गळ्यांतील मण्याचा दागिना (गल + सर); गळसुरी = घशाची सूज. पुढील प्रयोगांत 'गळा' च शब्द कायम आहे. गळा काढणें = ओरडणें, रडणें (ल); गळा कापणें = फसविणें, नाश करणें (ल.); गळा दाटणें = गहिंवरणें; गळां पडणें = गळ्यांत पडणें; गळेपडू = गळ्यांत पडणारा; गळेलठ्ठ = लठ्ठ; गळ्यांत धोंगडें = नसती जबाबदारी.]

गळाटा, गळहाटा पुं. गोंधळ, घालमेल, पसारा, कचऱ्याचा सांटा. Disorder, derangement, large and cumbersome establishment.

[सं. **गल** (**गाल–गाळ+ट-गळाटा.**); **गळ्हाट(णें)**= आजारीपणानें कमी होणें (सं. **ग्लै+आदय** किंवा म. **गळाटा** (नाधा.)).]

गँग पुं. समूह, संघ. Band, company, group.

[*Eng.* Gang; *Goth.* Gaggan; *Eng.* Go = जाणें; *Lith.* Zengiu = I stride. सं. **जंघा** = मांडी. **जंघाल** = जलद् चालणारा.]

गा अ. संबोधनाचें अव्यय, (कोंकणी) गो. A vocative particle.

[सं. '**अगा**'चें संक्षिप्त रूप.]

गा(णें) क्रि. गाणें म्हणणें. To sing.

[सं. **गै**-**गाने**; पा. **गाय** ; प्रा. **गाअइ** ; पं. **गाऊणा**; सिं. **गाइणु** ; गु. **गावूं**; बं. **गाओया**; ओ. **गाइबा.**]

गाऊ स्त्री. अंगाई गीत. A lullaby.

[वैसं. **गातु.**]

गाकर, गाखर पुं. गव्हाची जाड पोळी, चांदकी, जाड दामटी. A mass of dough baked.

[हिं. **गाकर.**]

गाग(णें) अक्रि. मोठ्यानें ओरडणें. To bawl, to call out loudly.

[सं. **गग्घ् १** हसने; किंवा **गै १** गाने (अभ्यास) ; अकाम. **गांग(णें)** = गागणें; **गांगरडा** = ओरडाओरड, गलका.]

गांगरणें (**गांगरून**) अक्रि. गोंधळणें. To be frightened or bewildered.

[१ द्रा. **गुड्गुरु**=हसें होण्याची अवस्था ; २ सं. **काकरूक**= भित्रा; प्रा. **गग्गर** = अस्पष्ट वक्ता.]

गाज(णें) अक्रि. दुमदुमणें, प्रतिध्वनि होणें, प्रसिद्ध होणें, गरजणें, वाजणें, गर्जना होणें. To sound, to roar, to become notorious.

[सं. **गर्ज् १** शब्दे; प्रा. **गज्ज**; देप्रा. **गज्जणसद्दो मृगवारणध्वनि**; सिं. **गाज** (गर्जना) ; गु. **गाजवूं**; पं. **गज्जणा, गरजणा**; हिं. **गाजना, गरजना**; का. **गगराय** (मेघगर्जना).]

गाजर न. कंदविशेष. A carrot.

[सं. **गृंजर-नम्** ; देप्रा. **गज्जर** (पुं); बं. **गाजर** ; ओ. **गाजर** ; हिं. **गाजर्–र** ; कान. **गज्जरी** ; संस्कृतीकरण नंतरचें परंतु तें स्मृतिकालातइतकें जुनें आहे. मूळ प्राकृतवरून संस्कृत रूप तयार झालें. **गाजराची पुंगी** = क्वचित् फायदा; **गाजरपारख्या** = अकलेचा खंदक (लक्षणा), भारी किंमतीच्या वस्तूची कमी किंमत करणारा; परंतु हा अर्थ कान. **गोज्ज** = घाण-ह्याशीं संबद्ध आहे.]

गाजी, गाझी वि. धर्मरक्षक, धर्मवीर, शूर योद्धा. A hero, a warrior.

[अर. **घाझी.** ह्या शब्दाचा मूळ अर्थ धर्मरक्षक, धर्मयोद्धा, त्यावरून अर्थाचें सामान्यीकरण होऊन शूर, वीर, जयिष्णु असा सामान्य अर्थ झाला.]

गांज(णें) सक्रि. त्रास देणें, छळणें, जाचणें. To tease, to torment.

[सं. **गन्ध् १० अर्दने**, **गद** = रोग, **गंजन** = अवहेलना ; प्रा. **गजण** ; देप्रा. **गागेज्जिअं** तथा **गेज्जं** मथितम्. (१०१-१६) ; अप. **गंजिदु** (इजा) ; हिं. **गाँजना** ; गु. **गाँजवूं** ; बं. **गंजा** (उपमर्द करणें).]

गांजा पुं. वाळलेले भांगेचे तुरे. The dried hemp.

[सं. **गञ्जा, गृंजः** ; प्रा. **गंजा** ; बं. **गाँजा** ; ओ. **गंजा**; वि. हिं. पं. **गांझा, गाँजा** ; सिं. **गांजो** ; गु. **गांजे** = भांगेची फुलें. **भांग** नांवाची एक स्वतंत्र वनस्पति आहे.]

गांठ(णें) सक्रि. रचणें, मिळणें, एकत्र होणें, गांठ देणें, To connect with a knot.

[सं. **ग्रन्थ् ९ ग्रथने**; पा. **ग्रंथ**; प्रा. **गंठ**; बं. **गॉठान**; ओ. **गाथिबा**; हिं. **गाठना** ; गु. **गाठवूं**; सिं. **गाठणुं**; अकामसा. **गांठ** (<प्रा. **गंठि** <सं. **ग्रन्थि**) = बंधन, अढी, तेढ, गुंतागुंत, सांधा, भेट; **गांठण** = गुंतवणी, गांठ; **गांठोडें, गठडी** = बोचकें; **गाठाळ** =(<प्रा. **गंठिल्ल, इल्ल** हा प्राकृत इन्नन्त प्रत्यय); **गांठविणें** = एकत्र करणें, जोडणें; **गांठलें** = मुलाच्या गळ्यांतील दागिना (<**ग्रंथिल**); **गांठागांठीचा; गांठी** = साखरेच्या पदकाची माळ; **गांठीस असणें** = पैसे शिल्लक पडणें ; **गांठी देऊन ठेवणें** = बंदोबस्तांत ठेवणें.]

गांठ्याळ वि. गांठी असलेला. Full of knots, knotty.

[सं. **ग्रंथि + आल.**]

जट्याळ गांठ्याळ मिळती रासी ।
केवीं साधुत्व त्यासी मानूं आम्ही । ए. भा. ५·१४९.

गाड(णें) क्रि. पुरणें, जमिनींत घालणें. To bury.

[सं. १ गर्ता (नाधा.) किंवा **गड्** १ गोपने; प्रा. **गड्डा**; बं. **गारा**; ओ. **गार**; हिं. **गार्ना**, **गाडन्त**; गु. **गाडवूँ**, **गड्वूँ**; २ सं. **गड्** १ गोपने; देप्रा. **गड्डु**, **गड्ढ**; गाढ पहा.]

गाडदी पुं. शिपाई, युरोपिअन पद्धतीची कवाईत शिकलेले शिपाई. The guards.

[*Fr.* Garder = to keep; *OHG.* warten = to watch over; *Eng.* Guard; *Portu.* Garda.]

गाडगा,-गें पुंन. लोटकें, मडकें. An earthen pot.

[सं. **घटक**; प्रा. **घडअ**, **घडग**; '**घडग**' हा पहिला अपभ्रंश, '**घडअ**' हा नंतरचा अपभ्रंश. पहिल्यापासून '**गाडगा**' हा शब्द व दुसऱ्यापासून **घडा** हा शब्द निर्माण झाला. पहिला कोणता व नंतरचा कोणता हेंहि सांगतां येण्यासारखें आहे.]

गाडा पुं. ओझ्याची मोठी गाडी, A big cart, a common load-car.

[गाडी पहा.]

गाडी स्त्री. वाहन (बैलाचें वगैरे). A cart with a frame or box, a coach.

[१ सं. **गंत्री-का** (?); प्रा. **गंत्तिआ**, **गड्डिआ**; देप्रा. **गड्डी**; काश्मी. **गोडइ**; ओ. बं. **गारी**; बि.हिं. **गारी**; पं. **गड्ड**, **गड्डी**; सिं. **गाडो**; गु. **गाडी**; २ सं. **गर्ता** (= रथांतील बसावयाची जागा) ह्या शब्दापासून व्युत्पत्ति काढतात परंतु ती बरोबर नाहीं. देप्रा. **गड्डी गन्त्री** (९९-३) हा देशी शब्दच मूळ आहे. व तो गम् धातूशीं संबद्ध असावा. पहा हेम. दे. ना. २-८१.]

गाडौरा पुं. पाया. The foundation.

[सं. **गड्** १ जमिनींत पुरणें किंवा **गाध्** १ प्रतिष्ठा करणें; याकाम. **गाडौरा** (उगी. ज्ञा. ११-५३९)]

गाढ वि. खोल, अत्यंत, घट्ट, मजबूत. Sound, heavy, fast, tight deep.

[सं. **गाढ**, √**गाह्**; प्रा. **गाढ**; पं. हिं. **गान्हा**; सिं. **गहरु**; **गाध**; अकाम. **अगाध**, **गाढा** पहा]

गाढव न. प्राणिविशेष, गर्दभ. An ass.

[सं. **गर्दभ**; पा. **गर्दभो**; प्रा. **गद्दह**, **गड्डह** (पुं.स्त्री.); बं. **गाधा**; ओ. **गध**; बि. **गधहा**; पं. **गधा**; हिं. **गद्धा**; सिं **गडाढु**; गु. **गधो**, **गध्धो**; म **गद्धा**; **गाढवाचा नांगर** = अत्यंत नुकसान; **गाढव** = मूर्ख (लक्षणा).]

गाढा वि. गाढ, घट्ट, प्रवीण, जाडा, दृढ, जाड, ठासून भरलेला. Thick, firm, stout, proficient, adept.

[सं. **गाध**, **गाढ**, √**गाह्** = अवगाहने; पं. हिं. **गान्हा**; सिं. **गहरु**; याकाम. **गाढ**, **गाढा** (बळकट); **गाढिका** = दृढता (ज्ञा. १६·३२७; ७·९८; ६·३६४). अगाध पहा.]

गाणें न. गायन, कवन, पद, स्तुति. A song, a poem, a praise.

[*IE.* Ge; सं. **गै**, **गा** (गद्); *Av.* Gā; *Lith.* Gedmi, Gaid-us = singer; *Goth.* Qithan; *Teut.* Quoth; सं. **गै**; झें. **गाथा**; सं. **गान**; प्रा. **गाण**; सिंह. **गा**; सिं. **गाइणु**; पं. **गाउणा**; हिं. **गाना**; का. **गेवुन्**; पशैभा. **गे**; मैयाभा. **गेल** = गाणें; बं. **गाउन्** = गीत; याकाम. **गाइवें** (नरुस्व १८१), **गाणावाणा** (ज्ञा); अकाम. **गाणें** (बजावणें < वाद्य).]

गांड स्त्री. गुदद्वार, मलद्वार. The anus.

[सं. गुद (?); टर्नरनें हा शब्द सं. **गण्ड** (= गाल) ह्या शब्दाखालीं दिला आहे. अर्थभेदाचा मात्र निर्देश केला आहे. परंतु दोन्ही शब्द अविवाद भिन्न. इतर भाषांत शब्द आहेत ते 'गण्ड' ह्या शब्दापासून उत्पन्न झालेले पण भिन्न अर्थाचे आहेत. आमच्या मतें हा शब्द परकी आहे. ऑस्ट्रो एशियाटिक **गण्ड**, **गण्डकी** ह्या शब्दांबरोबर **गाण्डी** असा एक शब्द आहे. त्यापासून मराठी '**गांड**' हा शब्द तयार झाला. कान. गेण्डे–पुरुषाचें जननेंद्रिय; **गेङ्ले** = **गुद**; अकामसा. **गांड जड होणें** = गर्विष्ठ होणें, जोर असणें; **गांड फाटणें** = खोडकी निघणें, भिणें; **गांड मारणें** = गुदमैथुन करणें; खोडकी काढणें (ल.); **गांडीखालचें घोडें** = ताब्यांतील वस्तु; **गांडीस हात पोहोंचणें** = स्वतंत्रतेनें वागणें; **गांडपुशा** = हलकट, नीच; **गांडा** = खराब, बेढब (गुजराती भाषेंत **गांडा** म्हणजे खुळा, वेडा असा अर्थ आहे. व्युत्पत्ति चिन्त्य आहे.); **गांडाळ** = मोठ्या ढुंगणाची, व्यभिचारी; **गांडू**, **गांड्या** = षंढ, गांड दुसऱ्यास देणारा (हिं. सिं. गांडू).]

गांडूळ, गांडोळें न. एक प्रकारचा कृमि, मातींतील कीटक, दानवा. An earth-worm.

[सं. **गण्डोल**, **गण्डूपादः**; प्रा. **गण्डूपादो**; प्रा. **गंडुल** (पुं); देप्रा. **गोआलिआ** प्रावृषि कीटकविशेष.]

गात न. पलंगाचा सांगाडा, (टर्नर) खाट किंवा पलंग यांच्या चौकटीचें लांकूड. The frame of a cot, couch.

[सं. **गात्रम्**; पा.प्रा. **गत्तम्**; **गाअम्**; बं. हिं. **गात**; पं. **गत्ता**; गु. **गात** = शरीर.]

गातडी, गाताडी स्त्री. गव्हाण, गव्हाणीची दांडी, आडवें लाकूड (हातमागावरील, देवळाच्या मूर्तीपुढील). A frame of sticks between the cattle and the fodder.

[सं. **गवादनी (?)** ; देप्रा. **गत्ताढी तथा गाणि गवादनी** (९९·१०).]

गात्र न. गायन. A song, singing.

[सं. **गै, गातृ** (गाणारा) ; **गात्र** (गायन) ; याकाम. **गात्र** (गायन. नरुस्व १७९).]

गाथा स्त्री. कविता, आर्या, गप्पा, कथा (ल.), गुंतागुंत, गोंधळ. Composition, collection of abhang poems, idle chat, jumbled intermixture, an anthology.

[सं. **गाथा, √ग्रंथ्** ९ ग्रथने ; कांहीं व्युत्पत्तिकार ह्या दोन्ही शब्दांचा '**गै**' धातूशीं संबंध जोडतात. परंतु हे दोन्ही शब्द निराळे. एक **गाथा** (कविता) हा '**गै**' शीं संबद्ध व दुसरा **गाथा** (गुंतागुंत) '**ग्रंथ्**' ह्या धातूशीं संबद्ध.]

गाद(णें) अक्रि. गढूळणें. To become turbid.

[सं. **कर्द** (ना.); √ **गध्** १ हिंसायाम् ; हिं. **गाद**=गाळ.]

गाद(णें) अक्रि. रोगानें पछाडणें, पीडा करणें. To tease, to torment.

[सं. **गद्** १ रोगे. (णिच् कर्मणि) **गाद्** ; याकाम. **गाद**.]

> जैं अदृष्टिचेनि उपद्रवें । **गादैल** विश्वचि आघवें
> म्हणौनि पर्जन्य यष्टि करावे । नाना याग ॥
> ज्ञा. १३–२२१.

गाद(णें) क्रि. जमणें. To gather, to collect.

[सं **गद्** १ रोगे.]

गादी स्त्री. सिंहासन, मऊ आसन, कापूस भरलेला गाशा. A cushion or pad.

[सं. **गर्ता** ; प्रा. **गत, गद्द** (**गर्द**) ; बं. **गादी** ; ओ. **गाद्दी** ; सिं. **गडो** ; (सं. **गर्ता**=रथांतील आसन).]

गाध, (अ) गाध पुं. वि. शिरकाव, आंतील तळ. The penetration, the bottom.

[*IE*. Gedh (to dip) ; सं. **गाधृ (गाधति, गाहः)** *Gr*. Bath; *Lat*. abyssus (bottomless pit); *Celtic*. Bath ; *Eng*. bathos, abyss.]

गांध स्त्री. गांठ, फोड. A blind tumour or bump.

[सं. **ग्रंथि, गंधाली** ; कानडी मध्यें हा **गण्डी** असा तद्भव झाला आहे. देप्रा. **गंदीणी** (२·८३.)]

गांधर्व न. संगीत, प्रेमविवाह, पाट, मोहतूर. Song, singing, a love-marriage, a marriage by mutual consent.

[**गंधर्व** पहा.]

गांधार न. गायनांतील तिसरा स्वर, एक राग, देशविशेष (कंदाहार). The third of the seven primary notes in music, the province round the modern Kandahar.

[सं. १ **गांधार**.]

गांधील(माशी), गांधीण, गांझीण स्त्री. कीटकविशेष, वासाला भुलणारी (माशी). A gad-fly.

[सं. **गंध+ली** ; देप्रा. **गंधेली** (मधुमक्षिका); **गंधे** पहा.]

गाफील, गाफल, गाफली वि. गैरसावध, निष्काळजी बेफिकीर, मूर्ख. Unheeding, inadvertent, dull, stupid.

[अर. **घाफिल्.**]

गाबाळ न. गाठ, गबाळपणा, निरूपयोगी संग्रह. Slovenliness, a mass of old and worn articles.

[**गबाळ** पहा. **कर्पटः**=फाटलेला कपडा (रा.धा.) **गाबाळणें** (नाधा.)=गोंधळ होणें, गमावणें, भेसळ होणें.]

गाबीत पुं. आरमारावरील एक कामगार. An officer on a ship.

[अर. **घुराब्** ; **गुराब>ग्राब>गाबीत>गाबीत.**]

गाभ पुं. गर्भ. An embryo (esp. of a beast.)

[*IE*. Gerbh, Grbh; सं. √ **गृभ्, ग्रभ्** ; *Av*. Garw (womb) ; *Lat*. Greb; *Lith*. Grebiu; सं. **गर्भ** ; प्रा. **गब्भ** ; सिंह. **गब** ; सिं. **गभु** ; पं. **गब्भ** ; हिं. **गाभ** ; का. **गबिन** ; रुमा. **खबनी**=गर्भिणी. अकामसा. **गाभा**=आंतील भाग (गर्भः); **गाभण, गाभीण** (सं. **गर्भिणी**; प्रा. **गब्भिणी**)=पोटीशी असलेली (जनावरासंबंधीं उपयोग); **गाभणें**=गाभण होणें (नाधा.); **गाभाटणें, गाभुटणें**=एकदम गर्भ पडणें (< गर्भभ्रष्ट); **गाभार**=देवळाचें अंतर्गृह (गर्भागार).]

गाभूळ(णें) अक्रि. पिकण्याच्या पूर्व अवस्थेंत असणें, पाड लागणें. To be approaching to ripeness.

[सं. **गर्भ+लु** ; प्रा. **गब्भुळ>गाभूळ** ; ने. **गर्भिलो**; सं. **गर्भ+ऊढ** (नाधा.)–रा. धा.]

गाभेवन न. गाभ्यांतील पान, सूक्ष्मांकुर. A leaf or sprout in the innermost part.

[सं. **गर्भपर्ण,>गब्भपण्ण,>गब्भवन,>गाभवन;** याकाम. **गाभेवन** (ज्ञा. ९·२७५).]

गाय स्त्री. पशुविशेष, धेनु. A cow.

[सं. **गो, गावी** ; पाप्रा. **गावी** ; बं. ओ. **गाइ** ; हिं. पं. **गाइ** ; गु. **गाय** ; ने. **गाइ** ; अकामसा. **गाय** =गरीब माणुस (लक्षणा); **गाय** होणें = दीन होणें ; **गाय चिखलांत रुतणें** = संकांतट सांपडणें ; **गायकवाड** = एक आडनांव (मराठ्यांमधील) (**गाय + कवाड < कपाट ;** पेकाम. **गायकवाड**) ; **गायमुख** = गाईचें तोंड–तोंडासारखी पाणी सांडण्याची नळी ; **गायरा** = गुराखी (गौ + रक्षकः) ; **गायरान** = कुरण ; **गायरूं** = (अल्पार्थे) गाईसारखा गरीब, लहान गाय (**गो + रूपम्**).]

गायक वि. गाणारा. A singer or vocalist.

[सं. **गै १ गाने** ; **गायकी** = गाणें, गाण्याचें कौशल्य.]

गायत्री¹ स्त्री. गाय. A cow.

[‘ **गाय** ’ ह्या मराठी शब्दाला भारदस्त स्वरूप देण्यासाठीं त्याचें संस्कृतीकरण केलें.]

गायत्री² स्त्री. वेदांतील एक छंद, वृत्त, मंत्र. A sacred verse from the Vedas, a metre.

[सं. **गै १ गाने.**]

गार¹ स्त्री. खड्डा, डबरा. A hole or pit.

[१ कान. **गारी**=खड्डा; याकाम. **गारी** (स्मृतिस्थळ १७९); २ सं. **गर्ता ;** प्रा. **गड्ढा, गरआ.**]

गार² स्त्री. एक पांढरा दगड, बर्फाचा तुकडा. A flint. a hailstone.

[सं. **ग्रावन्** ; **कार** (राज.) ; देप्रा. **गार** = दगड ; याकाम. **गार** (ज्ञा.) ; अकाम. **गार, गारा, गारगोटी.**]

गार³ वि. मोठें, आदरलेलें, गौरविलें. (उदा० त्यानें त्याला **गार** केलें. तो अगदीं **गार** झाला.) Respected, honoured.

[सं. **गौरवित, गौरववत** ; प्रा. **गारविय, गारविल्ल.**]

गार⁴ वि. थंड (हिरवागार मध्यें वापरला जातो.). Cold.

[सं. **गुरु** = गार. **कार** = बर्फगारा. (शको.) ; **गौरवाय > गारवअ.** भाइअ. १८३२.]

गारठ(णें) अक्रि. थंडगार होणें, थंडीनें बधिर होणें. To be frozen or much affected with cold.

[सं. **कार** (= बर्फगारा.) + **स्थितः** परंतु हा मराठी नामधातु ‘ **गारठा** ’ पासून आला. (कारिष्ठ >) **गारठा** = थंडी, गारवा. (**सं. कार + स्थ, कारिष्ठ ?**).]

गारस(णें) अक्रि. थंड पडणें, गार होणें, गारा पडून नासणें. To become cold, to be spoiled by hail.

[सं. **कार, कारीयस्** (नाधा.).]

गारद वि. नष्ट, मृत, फस्त, ठार. Buried, sunken, lost, gone utterly.

[अर. **घरत्** = लूट ; पेकाम. **गारत, गारती, गारद** (ऐटि. ३-१७).]

गारा¹ पुं. चिखलाचा लादा, चुन्याचा लादा. A dilute mixture of earth, lime, water.

[सं. **ग्रावन्, कार** ; प्रा. **गार** = दगड. सि. **गारो** ; हिं. पं. **गारा** ; कान. **गारे** = माती–चुना–पाणी वगैरेंचा केलेला लादा.]

गारा² स्त्री. बर्फाचे दगड. Hail-stone.

[सं. **कारा** ; याकाम. **गारा** (नरुस्व ५६८).]

गाराणें, गाऱ्हाणें न. तक्रार, कागाळी, विनंती. A complaint against, petition.

[सं. **गर्गणा** ; प्रा. **गरहणा** ; पं. **गल्ह, गाल्ह** ; हिं. **गाली** ; सिं. बं. **गारि** (शब्द, अपशब्द) ; सिं. **गर्हणु** (कळविणें) ; का. **गारुन्** (माहिती मिळविणें).]

गारुडी, गारोडी पुं. मांत्रिक, सापाचें विष उतरणारा. A snake-charmer.

[सं. **गारुढ;** प्रा. **गारुड, गारुळ** ; **गरुड;** (शको.); (ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं.).]

गाल पुं. अवयवविशेष, कपोल, थोबाड. A cheek.

[सं. **गल्ल** ; प्रा. **गल्ल** ; हिं. **गाल्** ; ओ. **गाल** ; बं. **गाल;** पं. **गल्ह** ; सिं. **गलु** ; द्रा. **गल्ल** (तत्सम), **गण्ड, कण्डल;** संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे. वामनानें हा शब्द-(**गल्ल**) ग्राम्य म्हणून सांगितला आहे. मूळ शब्द देशी किंवा द्राविडी आहे. शरीरावयववाचक बरेच शब्द द्राविडी आहेत.

(**गल्ल, गण्ड**). हे शब्द ऑस्ट्रोएशियाटिक असावेत. **गाल फुगणें**=रागावणें (गालफुगी हें रागाचें चिन्ह आहे त्यावरून.); **गाल रंगविणें**=थोबाडांत मारणें (त्यामुळें गाल तांबडा होतो त्यावरून); **गालगुच्चा**=गालास घेतलेला चिमटा ; **गालफट**=गालपट (**गल्ल + स्फट**); **गालबोट**=गालावरील काजळ (दृष्ट लागूं नये म्हणून लावतात.).]

गालिचा पुं. लोकरीचें आसन, सतरंजी, नक्षीदार लोकरी अस्तरण. A small variegated carpet.

[तुर्की.फा. **कालिचा, गालिचा.**]

गाली, (शिवी) गाळ स्त्री. अपशब्द, वाईट, बीभत्स शब्द. Abuse, vituperation.

[१ सं. **गाली, गालि** ; प्रा. **गाली** ; बं. **गाल** ; ओ. **गाळी** ; हिं.पं. **गाल** , **गाली** ; सिं. **गारी** ; बं. **गारि**=शब्द, अपशब्द. २ सं. **गर्हा**>**गल्हा**>**गाल्ही**>**गाळी.**]

गाव(णें) अक्रि. सांपडणें, मिळणें, आढळणें. To find, to come by.

[सं. **गव्यति**=मार्गयति, सांपडणें, शोधणें; **ग्रह्** , **ग्रथ्** ९ उपादाने किंवा **गम्** १ गतौ (राधा.); अकामग्रामीण=**घावणें.**]

गांव, गाव न. खेडें, वस्ती, वस्तीचें ठिकाण. A village.

[सं. **ग्रामः** (=समूह); पा.प्रा. **गाम** ; अप. **गाँअ** ; बं. ओ. **गाँ** ; बि.हिं. **गाँव** ; पं. **गिराँ** ; सि. **गाउँ, गामु** ; गु. **गाम** ; ने. **गाउँ** ; अकामसा. **त्या गांवचा नसणें**=कांहीं संबंध नसणें, टाळणें (लक्षणा); **गावकंटक**=गांवांतील त्रासदायक पुंड; **गांवकरी**=आपल्या गांवांत रहाणारा; **गांवकी**=गांवचा कारभार; **गांवकुटाळ**=गांवांतील टवाळ; **गांवगन्ना**=प्रत्येक गांवास (गाव गना); **गांवगाडा**=गांवाचा कारभार व कारभारी माणसें; **गांवगुंड**=गांवांतील छळवादक पुंड, गांवात लफडीं उत्पन्न करणारा; **गांवगौर**=गांवभवानी, गांवांत भटकणारी प्रसिद्ध स्त्री. **गांवझाडा**=गांवांतील उत्पन्नाचा हिशेब व त्याचा कागद; **गांवठाण**=पांढरी, वस्तीची जागा (< ग्रामस्थान); **गांवठी**=खेडेगांवचा (अर्थसंकोच); **गांवढ्या-ढळ**=खेडेगांवांतील (ग्रामउड). **गांवढें गांव**=(निरर्थक द्विरुक्ति) खेडेगांव, कुग्राम; **गांवदरी**=गांवाच्या लगत असलेली निरुपयोगी जागा. **गांवपहाणी**=शेताची पहाणी, हिशेबाची तपासणी; **गांवमामा-मावशी**=गांवांतील मुख्य पुरुष-स्त्री; **गांवमुकादम**=पाटील; **गांवमेव्हणी**=गांवांतील सर्वांची मेव्हणी-वेश्या; **गांवरान**=गांवाच्या शिवेंतील जमीन; **गांववेस**=गांवाचा तट व तटाचा दरवाजा; **गांवशीव**=गांवाच्या मर्यादा; **गांवरस**=गांवांतील घाणेरडें पाणी (सं. **ग्रामरसः** ; याकाम. **गांवरस** (ज्ञा. १६-२५); बकाम. **गांवरस**–भा. अ. ११-८६३).]

गांवढा वि. (पुं.) खेडेगांवांत राहणारा. A villager or rustic.

[सं. **ग्राम + स्थ,-स्थान,-स्थल; गांवठण, गांवठाण, गांवथळ**=खेडेगांवांतील वसाहतीची जागा.]

गावडा पुं. खेडेगांवांतील अधिकारी. An inferior officer in a village.

[सं. **ग्रामकूट** ; देप्रा. **गामउडो--ग्रामप्रधान** (१०२-५); कान. **गौडा** (अधिकारी); **गांवढा** (खेडवळ, अडाणी).]

गावा, गावी स्त्री. सोनाराचा चिमटा, (तार ओढण्याचा). The pincers.

[म. **कव**=चिमटा.]

गाशा पुं. बैठक, बिछायत, खोगिरावरील झांकण. A small sitting cloth.

[अर. **घाशिया**; **गाशा गुंडाळणें**=आवराआवर करून निघणें, पळून जाणें (लक्षणा). **गाशा टाकणें**=अंथरूण पसरणें.]

गाहाण. गहाण, गाहण न. तारण, विश्वासासाठीं कर्ज घेऊन ठेविलेली वस्तु. An article pawned or pledged.

[सं. **ग्रहण** (?); हिं. **गहना** ; म. **गहाणखत, गाहाणदार.** गहाण पहा.]

गाहाळ वि. नष्ट, हरवलेलें. Lost, mislaid,

[सं. **गाह्** १ गोपने, **गल्** १० स्रवणे (?) ; फा. **गायब** ह्या शब्दाशीं संबद्ध आहे का ?]

गाळ(णें) सक्रि. वितळविणें, मिसळणें, वस्त्रांतून चाळणें, ढाळणें, वर्जणें. To melt, to fuse.

[सं. **गालय**, √गल् ; प्रा. **गालव** ; बं. **गलान** ; हिं. **गलाना** ; सिं. **गारणू** ; गु. **गाळवूँ**; अकामसा. **गाळण**=गाळण्याची वस्तु (**गाळण**=भीति, हा शब्द निराळा, सं. **ग्लै** पासून); **गाळणी**=चाळण्याचें साधन; **गाळ**=गदळ, घाण, मळ, गाळून राहिलेलें द्रव्य; **गाळा**=मळ, रेंदा; **गाळींव**=गाळलेलें, पक्का, बिलंदर, लुच्चा (लक्षणा).]

गाळा पुं. खोली, खण, दोन बहालांतील जागा. Space enclosed, room, apartment.

[सं. **कारा** (?) > **गारा**=लादा (?).]

गिचमिट-ड वि. खरडलेलें, अस्पष्ट, भरकटलेलें. Scrawled or scribbled.
[कान. **गीचु** = खरडणें.]

गिझगोळा वि.(पुं.) फार मऊ झालेला, अति शिजून गोळा झालेला (भात), लादा. A lump of soft rice.
[कान. **गिजटी** = सपक व चिकट चवीचा, **गिज़ी** (अतिपक्क फळें व जखम ह्यांसंबंधीं वापरतात.).]

गिडगिडिआ-या पुं. एक प्रकारचें वाद्य. An instrument.
[ध्वनिशब्द. **गिड** = किंकिणी ; कान. **गिडी** = ढोल ; याकाम. **गिडगिडिआ** (महानु. वा.).]

गिड्डा वि. टेंगू , खुजा, जाड. Short and thick.
[कान. **गिड्डु**.]

गिण सक्रि. गणणें, मोजणें. To count.
[सं. **गण्** १० गणनायाम् ; प्रा. **गिण** ; अकामसा. **गिणगिण** = गुणगुणत, गात (सं. **गानस्** , किंकिणी).]

गिण्डी स्त्री. एक प्रकारचें भांडें (तीर्थ ठेवण्याचें). A small metal vessel.
[कान. **गिण्डी** = चंबूसारखें भांडें ; मल्याळ. **किण्डि** ; तेलु. **गिंडि** ; तामीळ. **किण्णी** ; √ **किणु** = मोकळें असणें; रिक्त पडणें.]

गिधाड, गीध न. पक्षिविशेष. A vulture.
[सं. **गृध्रः** ; पा. **गिद्धो** ; प्रा. **गिद्ध** ; हिं. **गीध** ; सिं. **गिझ** ; पं. **घिद्ध, गिझ्** ; प.पं. **गिरिज्** ; का. **ग्रेद्** ; सिंह. **गिदु**.]

गिनी स्त्री. सोन्याचें एक इंग्लिश नाणें (२१ शिलिंग किंमतीचें). A gold coin.
[पोर्तु. **गिने** = आफ्रिकेंतील **गिनी** ह्या प्रदेशावरून नांव. त्या देशांत सांपडणारें सोनें ; **गिनी** देशांतील सोन्याचें हें नाणें प्रथम पाडलें.]

गिरक(णें) अक्रि. गिरकी मारणें, फिरणें, चक्कर-भोंवरा घेणें, हेलपाटा पडणें. To whirl, to turn round.
[सं. कॄ ६ विक्षेपे ; कान. **गिरी** = फिरणें. कानडी व्युत्पत्तिच अधिक ग्राह्य. अकामसा. **गिरका, गिरकी** = फेरा, खेप, प्रदक्षिणा ; **गिरगिर** फिरणें = भोंवतालीं फिरणें.]

गिरगट(णें) उक्रि. रेघोट्या ओढणें, फासणें, पिठानें भांडीं माखणें, सारवणें. To scribble, to smear, to scratch.
[सं. कॄ ६ विलेखने + **गड्** १ सेचने ; कान. **गीचु** = खरडणें, **गिरु** = ओरखडणें.]

गिरफदार,-तार वि. पकडलेला, अडकलेला, निमग्न. Arrested.
[फा. **गिरिफ्तारी** ; पेकाम. **गिरिफ्दार, गिरिसार**. (रा. १-९७, साने, पयाव. ४२८.)]

गिरव(णें), गिरवि(णें) उक्रि. मूळावरून हात फिरवून लिहिणें, वळविणें. To form letters by drawing a pen through the letters of the original copy.
[सं. कॄ ६ विलेखने; कान. **गिरु** = ओरखडणें.]

गिरस्त, °स्थ पुं. गृहस्थ. A man, a householder.
[गृहस्थ शब्दाचा अपभ्रष्ट ग्रामीण उच्चार. गृहस्थ पहा.]

गिराणी स्त्री. संकट, ओझें, दुःख, मेटाकुटी, महागाई, दुष्काळ. A difficulty, pain, famine.
[फा. **गिरानी**; पेकाम. **गिराणी**, (रा. १०-२५२).]

गिरासी पुं. गुजरातेंतील जमीनदार, एक विशिष्ट उत्तर हिंदमधील लोक. A land-holder in Gujrat, a particular people in Northern India.
[सं. **ग्रास** = घास ; **ग्रास** = कर, खंडणी. त्याचा मूळ अर्थ **खंडणी, कर** ; नंतर **ज्याला तो कर द्यावयाचा त्याला गिरासी म्हणूं लागले**. पहिल्यांदा सन्मानदर्शक, पुढें तुच्छतादर्शक असा ह्या शब्दाच्या अर्थांत चढउतार झाला आहे. पेकाम. **गिरासिये** = गिरासी.]

[1]**गिरि** पुं. पर्वत, डोंगर. A hill.
[*IE.* Geris, Goris (mountain); *Av.* Gairi; *Gr.* Bor; *Lat.* Boreas, Galea; *Lith.* Gira; *Slav.* Gora ; *Gr.* Galea. सं. **गिरि**; **गिरिजा** = पार्वती, हिमगिरीची मुलगी.]

[2]**गिरी** पुं. गोसाव्यांतील एक जात. A sect of Gosavis.
[गोसाव्यांत दोन जमाती आहेत. एक गिरी व दुसरी पुरी.]

गिरिरी स्त्री. चक्कर, भोंवळ, मूर्च्छा. A whirl, a faint.
[सं कॄ ६ विक्षेपे ; कान. **गिरी** = फिरणें, **गिर** = भोंवती गिरकी घेणें ; कानडी व्युत्पत्तिच अधिक ग्राह्य. **गिरेबाज** = (कबूतर) = उडतांना गिरकी घेणारें, (लक्षणेनें नटव्या स्त्रीसंबंधीं वापरतात); **गिरकांडा** = गिरक्या घेणारा.]

गिर्द स्त्री. अ. घेर, भोंवतालचा-जवळचा प्रदेश, परीघ, चौकी, गस्त, भोंवतीं (अव्यय). Circumference, roundabout.

[फा. गिर्द ; पेकाम. **गिर्द** (रा. १४-६४), **गिर्दनवाई**=भोंवतालचा प्रदेश–शहर कोट वगैरे (रा. १४-२०).]

गिर्दी, गिरदी स्त्री. लहान वाटोळी उशी. A small round cushion.

[फा. **गिर्दा.**]

गिऱ्हा पुं. एक जलस्थ पिशाच, ग्रहण. A water-demon, an eclipse.

[सं. **ग्रह** ; सिं. **गिरह्** (ग्रह, घास) ; पं. **गिराह** (घास); रुमा. **गेरव्**=झांकणें (ताडून पहा.).]

गिऱ्हाईक पुं. जिन्नस विकत घेणारा, ग्राहक. A purchaser, a bidder.

[सं. **ग्राहक,** √ ग्रह् ९ उपादाने.]

गिलचा पुं. पठाणांची एक जात. A particular class of Pathans.

[**घिलझाइ, खिलजी** वगैरे हीं अफगाणिस्थानांतील पठाणांच्या कांहीं विशिष्ट जातींचीं नांवें आहेत.]

गिलावा पुं. भिंतीवर चुन्याचा लेप, थर, मातीचें लिंपण. Plaster (as of a wall).

[*IE.* Gle (to be sticky); सं. (?) ; हिं. **गिल्**= माती, **गिली** (मातीचें) ; *Gr.* Gli (Glia = Glue) ; *Lat.* Gle (Gleba, = Clod of earth) ; *Lith.* Gliwe (slime) ; *Old.Slav.* Glina = Clay ; *Teut.* Cleg ; *Eng.* Clay. फा. **गिल्**= (माती) + **आवा, गिल्ला**=ओली, **गिल्आवा, गिल्लावा**=तयार माती ; देप्रा. **गिलोइया, गिलाई**=भिंतीची खपली.]

गिल्ला, गिला पुं. तक्रार, ओरड, गलका, निषेध, फिर्याद. A complaint, a representation.

[फा. **गिला** ; पेकाम. **गिला,** (खरे २-३२५).]

गिंवस(णें) – गवसणें पहा.

गिळ(णें) सक्रि. खाणें, भक्षण करणें, गळ्याच्या खालीं उतरणें. To swallow.

[*IE.* Ger (to swallow) ; सं. गृ, (**गर्, गिर्, गिल्, अज-गर, ग्रास** (घास), **गर्गर** (घसा), **गल, गल्ल.**); *Gr.* Ger ; *Lat.* Gur, Gul ; *Lith.* Gogiloto, geriu (Drinks); सं. गृ ९ गीरणे, **गिल्** ; प्रा. **गिल** ; सिं. **गिरणु** ; बं. **गिलिते** ; सिंह. **गिलिनवा** ; अकामसा. **गिळंकृत**=गिळलेलें, अपहृत ; **गिळगिळीत**=नीरस, चव नसलेलें.]

गीत न. गायिलेलें, गाणें, पद. That which is sung, a song.

[सं. गै, (निष्ठा) **गीत.** गान पहा. **गीता**=काव्य (भगवद्गीता). **गीति**=एक छंद, आर्या.]

गीद, गीध पुं. गिधाड पहा.

गीम पुं. उन्हाळा, उष्णकाळ. The hot season.

[सं. **ग्रीष्म** ; पा.प्रा. **गिम्ह** ; सिंह. **गिम्** (कढत), **गुम, ग्रिम** (उन्हाळा). **ग्रीष्म** पहा.]

^{१}**गीर** पुं. गर, मगज, गाभा. Pulp, pith, kernel.

[गर पहा.]

^{२}**गीर** प्र. (एक फार्सी प्रत्यय) –‘ करणारा ’ ह्या अर्थी. A termination implying agent.

[फा. **गर्, गीर्.** (तमासगीर).]

गीर्वाण पुं. वि. देव, संस्कृत (भाषा). God, divine.

[सं. **गिर्वण, गीर्वाण,** √ गृ ९ शब्दे.]

गुंग वि. गर्क, धुंद, जड, थक्क. Absorbed, senseless, stupid, dull.

[फा. **गुंग**=तल्लीन, निःशब्द, मूक ; अकाम, **गुंगणें**= गर्क होणें, गर्क होणें ; **गुंगी**=मूर्च्छा.]

गुंग(णें) अक्रि. गुणगुण करणें, घुमणें. To buzz, to hum a tune.

[सं. ङ्ग् १ शब्दे ; याकाम. **गोंगाव** (ज्ञा).]

गुंगुरडें, घुंघुरटें न. मच्छर, डास कीटक वगैरे. A mosquito.

[कान. **गुगड**=कीटक, मच्छर, डास. **गुंगरूं**=डांस, चिलट.]

गुग्गुळ पुं. औषधिविशेष, कांटेरी झाड, एक तऱ्हेचा धूप (औषधि-झाडाच्या चिकापासून निघणारा). A fragrant gum.

[सं. **गुग्गुल** ; पा. प्रा. **गुग्गुलम्** ; ओ. **गुगुळ** ; पं. **गुग्गुल, गुग्गल** ; सिं. **गुगुरु** ; हिं. **गूगल** ; गु. **गुगल.**]

गुच्छ पुं. फुलांचा किंवा फळांचा समूह, झुबका, घोंस, तुरा. A cluster, a bunch.

[१ सं. **गुच्छ** ; प्रा. **गुच्छ** ; २ सं. **कूर्च** ; देप्रा. **गोच्छा** मंजरी; ३ द्रा. **कोत्तु, गुत्ति, गुदि, गोंचल, गोंची**; कान. **गुच्छ, गुंज, गुल्स.**]

गुज न. गुप्त रहस्य, गुपित. A secret.

[सं. **गुह्य** ; प्रा. **गुज्झ** ; याकाम. **गुज** (ज्ञा ९-३४); अकाम. **गुजगुज**, (हित)**गुज**.]

गुंजर पुं. गुजरातेंतील लोक-व्यापारी. A native of Gujrat.

[सं. **गुर्जर** ; प्रा. **गुज्जर** ; म. **गुजर**. ह्या शब्दाच्या अर्थांत तरी फरक झाला किंवा कालाच्या ओघांत एका विशिष्ट मानवपुंजाचा जातिस्वभाव तरी बदलला असें म्हटलें पाहिजे. गुजर लोक हे पूर्वीं उत्तरेकडे राहत असत. दिल्ली, दुआब या प्रांतांत राहून चोरीपोरी करून रहात. विशेषतः गाई फार चोरत. **गुह्यक** > **गुज्झअ** (राज.) ही व्युत्पत्ति **ग्राह्य** नाहीं.]

गुंजर पुं. उदरनिर्वाह, गुजारा, चालढकल. A mere subsistence.

[फा. **गुझर्**, √**गुझस्तन्** ह्याचें आज्ञार्थी " **गुझर्** "; हिं. **गुझरना** ; अकामसा. **गुजर(णें)** (नाथा.) = कंठणें, नाहींसें होणें, मरणें, जाणें, लोटणें. **गुजराण** = कसा तरी उदरनिर्वाह; कालक्षेप, पाठवणूक; **गुजारा** = निर्वाह, पाड (< फा. **गुझारा**).]

गुजरात पुं. एक प्रांतविशेष. The province of Gujrat.

[सं. **गुर्जरत्रा** ; प्रा. **गुजरत्ता** (स्त्री) ; गुर्जरराष्ट्रापासूनहि व्युत्पादितात. गुजरात हा शब्द मराठींत दोन्ही लिंगी वापरतात.]

गुंजरी स्त्री. दुकानांचा समूह, बाजार (कोल्हापूर येथील एक भाग). A row of shops.

[फा. **घुझ्री**, **गुजरी** > **गुदरी**.]

गुंजरी पुं. गायनांतील एक राग, गुजरीतोडी. A particular *rag* in music.

[याकाम. **गुजरी** (नरुस्व. २७३).]

गुजी, गोजी स्त्री. कालवड, वासरूं (त्यावरून व्यक्तिनाम). A female calf.

[सं. **गो-**; देप्रा. **गोज्ज** = व्यंगी बैल; कान. **गुज्जो** = लहान.]

गुंज स्त्री.पुं. कट, जोर, समूह. Group, hence plot, power.

[कान. **गुंजु**; पेकाम. **गुंज** (सैन्याची गुंज मोडली.). गुच्छ पहा.]

गुंज स्त्री. एक वनस्पति व तिचें फल, गोंघणी (हें वजन म्हणून सराफ वापरतात.) A small plant bearing red berry.

[१ कान. **गुंजा**, **चिंचि**; द्रा. **गुज्ज**, **गुज्जु**, **गुंज्जु**, **गुंजु**, **चुंचुं** (सूक्ष्मत्वाची कल्पना ही मुख्य आहे.). २ सं. **गुन्द्रा**; प्रा. **गुन्दा** ; देशी. **गुण्डा** ; गु. **गुँदडो** ; हिं. **गोंद**.]

गुंजाइशी-स स्त्री. उत्पन्न, वैभव, ऐपत. Profit, wealth, high status.

[फा. **गुंजाइश्** = जागा, अवसर; शिकाम. **गुन्जाइस** (सभा. २५) ; पेकाम. **गुंजायस**, **गुंजावीस** (ऐच. ७).]

गुटकळी स्त्री. गटंगळी. The bobbing up and down (of a drowning person).

[**गटंगळी** पहा.]

गुटका पुं. घुटका, गोळी. A gulp, a small ball, a pill.

[**घुटका**, **गुटिका** पहा.]

गुटिका स्त्री. गोळी. A pill, a small ball.

[सं. **गुटिका**, √**गुट्-गुठ्** १ **अवयवे**.]

गुटी स्त्री. लहान तान्ह्या मुलास द्यावयाचें औषध. A medicine given to infants.

[कान. **गुट्टी** = मुलांना द्यावयाचें औषध.]

गुठळी स्त्री. गठळी, गांठ. A clot, a hard part (in a boil.)

[सं. **ग्रंथिल**; प्रा. **गंठिल्ल**.]

गुठा, गुठें पुंन. नांगरलेल्या जमिनीवर फिरवावयाचें अवजार, आउत. An instrument drawn over ploughed ground.

[कान. **गुंट**.]

गुडगुडी स्त्री. तंबाखू ओढण्याची लांबट चिलीम. A long smoking apparatus.

[**ध्वनिशब्द**.]

गुडघा पुं. मांडी आणि पिंडरी ह्यांमधील संधि. The knee.

[सं. **घोटक** ; सिं. **गुड** ; हा शब्द मूळ द्राविडी असून त्याचें संस्कृतीकरण नंतर झालें आहे. शिवाय घोटक आणि गुडघा ह्यांचा परस्परसंबंध तात्काळ पटत नाहीं. '**घोटक**' पासून '**घोटा**' हा मराठी शब्द सिद्ध होणें शक्य आहे.]

गुडदाणी, गुडधाणी स्त्री. गुळाची चिक्की (दाणे, चुरमुरे, डाळें, वगैरे पदार्थ घालून तयार केलेली). A sweat-meat of puffed and parched rice with raw sugar.

[सं. **गुड** + **धाना**.]

गुडदी स्त्री. दट्ट्या, बूच, झांकण. A cork, a plug, a stopple.
[कान. **गुडसु** = बंद करणें.]

गुडुप बि. दाट काळोख, अतिशय अंधार, अतिशय काळेपणा. Complete darkness.
[कान. **गुडुप, गुडपु** = लोखंडाची कांब. लोखंड काळें असतें त्यावरून काळेपणा-अंधार-काळोख]

गुडु पुं. पत्त्यांतील गुलाम. The joker (in cards).
[कान. **गुडु** = मुलगा, शिष्य, खुजा.]

गुढ(णें) सक्रि. गुंडाळणें. To roll up.
[सं. **गुड्** १० वेष्टणे; याकाम. **गुढ.**]
जी भूतीं भूतळ मांडिले । जैसें नक्षत्रीं गगन गुढलें ॥ ज्ञा. ११-२८६.

गुढर, गुढार न. कवच, खोगीर (हत्तीचें), हौदा, अंबारी, डेरा, राहुटी. A tent, a howda.
[सं. **गुड** = हत्तीचें कवच ; प्रा. **गुडा** ; कान. **गुडार** = तंबु; याकाम. **गुढार** (शि. २९०).]

गुढार न. गुह्य गोष्ट, कोडें. A riddle.
[सं. **गूढ + र** (म. प्र.), √**गूह्** १ **गूहने** ; याकाम. **गुढारणें** (ज्ञा. ११-२८६); अकामसा. **गुढार(णें)** (नाधा.) = आच्छादणें, झांकणें.]

गुढी, गुडी स्त्री. (पाडव्याच्या दिवशीं किंवा उत्सवांत) उभारावयाची काठी, ध्वज, पताका. A flag, a pole wrapped in a piece of cloth etc.
[सं. **गूर्द**; देप्रा. **गुड्डु**; गु. **गुडी**; सिं. **गुडो** (बाहुली); पं. **गुड्डा** = बाहुली; हिं. **गुरिया**; याकाम. **गुढी** (ज्ञा. ६-५२ शिशु ६०); कान. **गुडी** = निशाण, चिन्ह. टर्नर हा (**बाहुली**) अर्थीं **गुड्डा** आणि **काठी अर्थीं गुडी** एकाच देशी शब्दापासून काढतो.]

गुढें न. कोडें. A puzzle.
[सं. **कूटकम्** > **कूडअँ** > **गुढें**; परंतु टर्नरनें ‘ **गूढ** ’ पासून हा व्युत्पादिला आहे.]

गुढें न. कापणी, कडब्याची पेंढी. A sheaf.
[कान. **गुड्डे** = रास.]

गुढें न. गांवचा पळ, जमाव, परागंदा झालेला समूह किंवा कुटुंब. The inhabitants of a village in a precipitate flight.
[कान. **गुडी** = जमाव, **जूट**; याकाम. **गुढें** (नरुस्व. ७९०).]

गुण(णें) सक्रि. गुणाकार करणें, आवृत्ति करणें, पट करणें. To multiply.
[सं. **गुण्** १० आवर्तने, वृद्धौ; प्रा. **गुण**; बं. **गुणा**; ओ. **गुणिबा**; हिं. **गुजना**; गु. **गुणवूँ**; सिं. **गुण**; का. **गोन**; सिं.पं.हिं. **गुण्**; अकामसा. **गुणाकार** = गुणण्याची क्रिया; (गुण म्हणजे पट ; उ. त्रिगुण, द्विगुण).]

गुण, गुण्या पुं. दोरी, गंवड्याची दोरी. A mason's square.
[सं. **गुण** ; पा.प्रा. **गुण** ; बं. **गुणा** ; ओ. **गुणा** (पट); हिं. **गुना, गुन** ; पं. **गुणा** ; सिं. **गुणु** ; गु. **गुण.**]

गुण पुं. विशेष धर्म, पदार्थांचा धर्म, उपयोग, फायदा. A quality, attribute. दोरी. String.
[सं. **गुण**, √**गुण्** १० वृद्धौ, आमंत्रणे ; ह्या शब्दाला विशेष व सामान्य असे पुष्कळ अर्थ आहेत. सत्त्व, रजस्, तमस् ह्यांना **गुण** म्हणतात. **गुण** म्हणून न्यायशास्त्रांत तत्त्व आहे. इंग्रजी ‘ **मार्क** ’ ह्याचा प्रतिशब्द **गुण** आहे. गुण म्हणजे **पट** असा अर्थ–द्विगुण, चतुर्गुण इत्यादि शब्दांत होतो. शिवाय त्याचे प्रयोग पुढीलप्रमाणें होतात ; याकाम. **गुण, गुणिया** (ज्ञा. १८-१९); **गुणी** = मंत्र जाणणारा (ज्ञा. ११-८४) ; अकामप्र. **गुण आठविणें** = चांगल्या स्मृति असणें ; **गुण उधळणें** = दुष्ट स्वभाव बाहेर दिसणें ; **गुण दाखविणें** = खरा स्वभाव दाखविणें ; **गुण येणें** = चांगला इष्ट परिणाम होणें ; **गुणकारक** = गुण देणारें ; **गुणग्रहण** = चांगले विशेष स्वीकारणें ; **गुणत्रय** = सत्त्व, रजस्, तमस् ह्यांचा समूह ; **गुणपंचक** = शब्द, रूप, रस, गंध, स्पर्श हे ; **गुणज्ञ** = गुण जाणणारा ; **गुणाढ्य** = गुणानें श्रेष्ठ.]

गुणगुण स्त्री. बातमी, किंवदन्ती. (Suppressed) talk or rumour.
[१ ध्वनिशब्द. २ **गुंज्** १ **अव्यक्ते शब्दे** ; देप्रा. **घुणघुणिआ** (कर्णोपकर्णिका).]

गुणी वि. गुणांनीं युक्त असा. Virtuous. मांत्रिक. A charmer.
[सं. **गुणिन्**, √**गुण्** ; याकाम. **गुणी** (ज्ञा. ११-८४), **गुणिया** = मांत्रिक, गारोडी (ज्ञा. १८-१९); अकामसा. **गुणिजन, गुणीजन** = वेश्या, कलावंत ह्यांच्यासंबंधीं हा शब्द वापरतात. कारण गायन, नर्तन, वादन वगैरे कलागुणांत ते पारंगत असतात.]

गुंटा, गुंठा पुं. जमिनीचें परिमाण (१२१ चौरस यार्ड किंवा एकराचा $\frac{१}{४०}$ हिस्सा). A land measure.
[कान. **कुंटे.**]

गुंड पुं. एक मोठें भांडें, मोठी घागर, तपेलें, वाटोळा दगड. A big metal vessel, a round stone.

[कान. गुंड = वाटोळी वस्तु ; अकामसा. **गुंडगोळा** = वाटोळा (एकाच अर्थाचे दोन शब्द. एक द्राविडी व दुसरा आर्योद्भव.)]

गुंडा पुं. फुलांचा घोंस. A bunch of flowers.

[देप्रा. **गोंडी** (मञ्जरीवाचक).]

गुंडा पुं. शहाणा मनुष्य, ठक (लक्षणा). A shrewd or all-knowing fellow.

[कान. गुंड.]

गुंडा पुं. वाटोळा गोटा, मोठा दगड. A rolling or roundish stone.

[सं. गुड् आवर्तने किंवा कान. गुण्डु ; द्रा. गुल, गुलि, गुटिका, गुलिका ; अकाम. गुंडळी, गुंडाळी = (गठडी); द्रा. गुडी; अकामसा. गुंडाळा = गोळा ; गुंडाळणें = गोळा करणें (नाधा.), 'ळ' ची उपपत्ति काय ?]

गुंडी स्त्री. लहान भांडें, चरवी, कासंडी, सुताचें बटण. A small metal vessel, a cotton button.

[कान. गुंड.]

गुत(णें) अक्रि. अडकणें, एकमेकांत अडकणें. To tangle, to be embarrassed.

[सं. ग्रन्थ् (?); प्रा. गुत्थ ; देप्रा. गुत्ती बन्धनमिच्छावचनं लता शिरोमाल्यं चेति पञ्चार्था (१०६-१६); सिंह. **गोतनवा** ; पं. गुत्त ; का. गुत् ; म. गुता, गुंता ; गु. गुतो ; सिं. गुतो ; हिं. गुत्ता ; गु. गुथवूँ ; सिं. गुथणु ; पं. गुत्न्हा.]

गुत्ता पुं. पिण्याच्या दारूचें दुकान. A shop of liquor.

[फा. गुत्ता (?); हिं. गुत्ता = वायदा.]

गुद न. मलद्वार, अपानद्वार. The anus.

[सं. गुद ; याकाम. गुद (ज्ञा. ६-१९५) ; अकामसा. **गुदमस्ती** = शिरजोरपणा ; **गुदमैथुन** = विपरीतसंभोग ; **गुदव्रण** = भगेंद्र रोग.]

गुदगुली स्त्री. शरीराचा नाजूक भाग खाजविणें. (ह्यानें हसूं येतें.) Tickling.

[ध्वनिशब्द ; सं. गद् १ शब्दे (?); गदगद, गुदगुद.]

गुदमर(णें) अक्रि. श्वास कोंडणें, कोंडमारा होणें. To be under suffocation.

[सं. गुध् १ आवरणे + मृ ६ प्राणत्यागे (द्विधातुसंयोग); परंतु हा शब्द परकी आहेसा वाटतो. अकामसा. **गुदमरा** = कोंडमारा, कासाविसी.]

गुदर(णें) अक्रि. (संकट) येणें. To be in difficulty.

[१ सं. गुर्द् १ निकेतने, क्रिडायाम् ; हिं. **गुदरना** ; २ फा. गुझश्तन् (आज्ञार्थ)-**गुझर्** ; फारशी व्युत्पत्तिच ग्राह्य. ह्याच्या अर्थांत व उच्चारांतहि फरक झाला आहे. गुजरणें हेंहि त्याचें एक रूप आहे. द्, ज्, ह्या वर्णांची आलटापालट होते. हा परिणाम फार्सी भाषेचा आहे. (पहा-गुजराण फा √ गुझरान् ;) **गुदरणें** = पोहोचणें, पोहोंचविणें ; **गुदरणें** = मरणें ; कागद **गुदरला** = पाठविला ; माणूस **गुदरला** = मेला.]

गुदस्त-गुदस्ता अ. गेलेलें, मागचें (साल, वर्ष). Past or elapsed (a year or month).

[फा. गुझस्ता = गत.]

गुदाम, गोदी न.स्त्री. वखार, माल ठेवण्याची जागा, तळघर, मुलाची पुस्तकाची पिशवी. A go-down, a satchel.

[मलायी. **गदोङ्ग** ; तामिल. **किदंगु** (√ **किदु** = ठेवणें); इंग्रजींत *Go-down* असा त्याचा अपभ्रंश झाला.]

गुद्दा पुं. बुक्का, ठोसा, रद्दा. A blow with a fist.

[कान. गुद्दु = मुठीचा ठोसा ; अकामसा. **गुद्दागुद्दी** = मारामारी, बुक्काबुक्की ; **गुधडणें, गुदडणें** (नाधा.) = लाथाबुक्क्या मारणें.]

गुंत(णें) अक्रि. अडकणें, अडणें, एकमेकांत अडकणें. To get entangled, to tangle.

[सं. गुंत् , गुंथ् , ग्रथ्-प्रथने ; प्रा. गुत्थ ; देप्रा. **गुत्ती बंधनम्** (१०६-१६) ; गु. **गुथवूँ** ; सिं. **गुंधणु**- (जाळें विणणें) ; पं. **गुन्न्हा** (तिंबणें, मळणें) ; हिं. **गुंधना** (तिंबणें, मळणें, पेड घालणें), **गुथना** ; सिंह. **गोतनवा** ; याकाम. **गुंती** (= **बंधन**, ज्ञा. १५-३९४) ; अकामसा. **गुतणें, गुथणें, गुंता, गुंती, गूत,** (केसांचा गुंता), **गुत, गुंत** = गुंता, अडचण. **गुंतणूक** = अडचणीची स्थिति ; **गुंतवळ** = केसाची गुंतलेली गांठ ; **गुंता** = अटकाव, अडथळा ; **गुंताड, गुंथाडें** = गुंतलेली स्थिति ; **गुंतागुंत** = गोंधळ.]

गुन्हा पुं. दोष, अपराध, अन्याय. A crime, a fault, an offence,

[फा. गुनाह्; अकामसा. **गुन्हेगार** = अपराधी (< गुनाह् + गार); **गुन्यांव** (अशिष्ट उच्चार) = गुन्हा, अपराध.]

गुप(णें), गुंप(णें) अक्रि. भांबावणें, गोंधळणें. To be confused or perplexed.

[सं. गुप् ४ व्याकुलत्वे; याकाम. **गुप, गुंप** (ज्ञा); उदा. असा गुपूं नकोस = भांबावून जाऊं नकोस.]

कर्म म्हणिजे तें कवण। अथवा अकर्मा काय लक्षण।
ऐसें विचारितां विचक्षण। गुंपौनि ठेले॥ ज्ञा. ४-८४.

गुपचुप अ. गप्प (बसणें). Silently, stealingly.

[सं. गुंफचुप्. (द्विधातुसंयोग); ओ. **गुपचुप**; पं. **गुप्पचुप्प**; सिं. **गुपुचुपु**; ने. गु. **गुपचुप**; याकाम. गुप, **गुपितें** (नरुस्व. २१९); कान. **गुप्पने** = स्तब्ध.]

गुपट(णें) अक्रि. बोलतांना गोंधळणें, अडखळणें. To hesitate, to falter.

[सं. गुप् + पट् १ शब्दे. (द्विधातुसंयोग व मध्यलोप).]

गुप्त वि. लपविलेलें, लपलेलें, गुपित. Hidden or concealed.

[सं. गुप् (निष्ठा); **गुप्त** (स्वरभक्ति–गुपित) याकाम. **गुपितें** (नरुस्व. २१९); अकामसा. **गुप्तधन** = न दिसणारें धन, अदृश्य. **गुप्तभाग** = गुह्यभाग. **गुप्ती** = एक शस्त्र (तरवार वगैरे).]

गुंबगुब(णें) अक्रि. लठ्ठ होणें, मांस येणें. To grow or become fat or fleshy.

[सं. गुर्व् १ उद्यमने (?); कान. **गुबरु** = जाड्य.]

गुंबगुब(णें) अक्रि. गुबुगुबु आवाज करणें. To create a particular sound.

[ध्वनिशब्द. नंदीबैलवाल्याच्या वाद्याचा ध्वनि.]

गुबार, गुबारा, गुभार पुं. मळ, धूळ, पोटांत वायु धरणें, फुगणें, फुगवट. Distension of belly by accumulation of gases, dirt, dust.

[सं. गुर्व् १ उद्यमने (?); कान. **गुबरु** = जाड्य, **गुबारु** = फुगोटी; अर. ग़ुबार् = वाफ, अशुद्धता.]

गुमान स्त्री. पर्वा, खातर, संशय. Heed, regard, suspicion.

[फा. **गुमान्** = संशय, मत; शिकाम. **गुमान** (सभा. ५९); पेकाम. **गुमान** (रा. ५-५३). ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे. “ संशय व खातर ” असे दोन्ही जवळ जवळ परस्परविरोधी अर्थ त्याचे झाले आहेत. ‘ **गुमान** ’ असा एक शब्द अशिष्ट भाषेंत रूढ आहे. त्याचा अर्थ ‘ बिनतक्रार ’ असा आहे. उदा. ‘ **गुमान घे** ’. कदाचित् ‘ **गुमान** ’ च्या पूर्वींचा ‘बे’ हा गळला असावा; किंवा फा. **गुम** = गप्प, शांत ह्यापासून असावा.]

गुम्मज, गुमट, घुमट पुं. मुक्बरा, रोजा. A place for prayer.

[फा. गुम्बझ्; पेकाम. **गुम्मज, गुमट** (रा. ७-१६९).]

गुमास्ता पुं. प्रतिनिधि, कारभारी, मुनीम, मुतालीक. An agent, a deputy, a representative.

[फा. **गुमाश्ता**; पेकाम. **गुमास्ता** (मराचिस ८).]

गुंफ(णें) सक्रि. एकत्र विणणें, ओंवणें, रचणें. To string together, to interweave.

[सं. **गुम्फ्** ६ ग्रथने; प्रा. **गुंफ**; याकाम. **गुंफिणें** (ज्ञा. १८-८१२); अकामसा. **गोफ, गोप** = दोरा, रेशमी विणलेला दोरा.]

गुंफा, गुफा स्त्री. गुहा, फांद्यांची झोंपडी, पर्णकुटि. A cavern, a cave, a sylvan abode.

[सं. **गुहा** (गोपयति, √**गुफ्** = पेड घालणें. गूहयति); √**गुष्प्** = एकत्र करणें; देप्रा. **गुंफो** गुप्तिः (१०२-१३); बं. **गुफ**; हिं.पं. **गुफा**; ल्हां. **गुफा**; सिं. **गुफा**; गु. **गुफा**; का. **गोफ्**. नासिक्य फक्त मराठी भाषेंतच उतरलें आहे; इतर भाषांत नाहीं. अपभ्रंश भाषेच्या काळीं नासिक्य व निर्नासिक्य अशा दोन उच्चाराचे शब्द रूढ होते. त्यांपैकीं नासिक्य उच्चाराचे कांहीं शब्द मराठींत आले.]

गुंफिरें न. गुंताड, जाळें. A net, a tangle.

[सं. **गुफ्**, **गुष्प्** = एकत्र करणें; याकाम. **गुंफिरें** = (ज्ञा. १०-९५६).]

गुरक(णें) अक्रि. गुरगुर करणें, गरजणें. To roar, to growl.

[ध्वनिशब्द; सं. √ गृ = शब्दे; **गुर्गरायते**, (कुत्र्याचा शब्द); अकामसा. **गुरकणी** = गर्जना; **गुरकावणें** = (रूप प्रयोजक परंतु अर्थ साधा) गुरगुरणें; **गुरकावणी** = धमकावणी; **गुरगुरी** = आरडाओरड, डुरडुर.]

गुरखा पुं. नेपाळचा रहिवासी. The Gurkha.

[सं. **गोरक्षकः**; प्रा. **गोरक्खअ**. कठमण्डुपासून साठ मैल पश्चिमेस **गोर्खा** नांवाचा प्रांत आहे. त्यांत १७६८ मध्यें प्रिथीनारायणाच्या जयापूर्वीं गुर्खालोकांची वस्ती होती.]

गुरगुट(णें) सक्रि. सर्व बाजूंनीं गुंडाळून घेणें. To muffle up.

[सं. गुठ् १ आवरणे ; परंतु ह्या व्युत्पत्तीनें 'र्' ची उपपत्ति नीट लागत नाहीं. द्वित्व होऊन गुठगुठ् > गुरगुठ् अशी परिणति होणें शक्य आहे. गुट = वस्त्र ह्याचा तर संबंध नसेलना ? पहा **चिरगुट.**]

^{1}**गुरगुज** पुं. करेलें, गदा, सोटा (लोखंडी). A club, a mace.
[फा. गुर्झ.]

^{2}**गुरगुज** न. वाद्यविशेष. An instrument.
[सं. गृज् १ शब्दे.]

^{1}**गुरगुर(णें)** अक्रि. रागावून बोलणें, त्रासून बोलणें. To growl, to snarl at.
[ध्वनिशब्द. सं. गृ १ शब्दे ; देप्रा. घुघुरी ; गु. गुरवूँ, घुरकवूँ ; सिं. गुरणु ; पं. गुर्गरानणा ; हिं. गुर्राना.]

^{2}**गुरगुर(णें)** अक्रि. पोटांत आवाज होणें. To rumble (the belly).
[ध्वनिशब्द. कान. गोर्रु = पोटांत होणारा आवाज.]

गुरपट(णें), गुरफ(णें) उक्रि. (जाळ्यांत) अडकणें, गुंतवले जाणें, गमावणें (लक्षणा). To entangle, to complicate.
[सं. गुर् + पट् १ विदारणे.]

गुरव पुं. एक विशिष्ट जात. A caste.
[कान. **गोरव** = भिक्षेकरी, धनगराचा उपाध्या, शैवभिक्षु, भिक्षूच्या वेशांत शंकर. हे शंकराची किंवा ग्रामदेवतेची पूजा करतात. शिंग वाजविणें, द्रोण-पत्रावळ्या लावणें हे इतर धंदे. गांवांतील एक वतनदार बलुतेदारांपैकीं. याकाम. **गुरव** (पीरवाडी ताम्रपट).]

गुराब न. एक प्रकारचें गलबत, (लढाऊ) तारूं. A kind of ship.
[अर. **घोराब** (गलबत). अठराव्या शतकांत पोर्तुगीज इंग्रज वगैरे लोक हा शब्द वापरीत.]

^{1}**गुरु** वि. मोठा, श्रेष्ठ, अधिक, जड. Great, heavy.
[*IE.* Ger, Grr (Heavy); सं. गुरु, (गृ, गर्, गरिमा, गरीयस्, गरिष्ठ, गुर्विणी); *Av.* Gur (Gouru); *Gr.* Bar ; *Lat.* Gra (Gravis, Gravitas); *Goth.* Kaurus = heavy ; *Gael.* Gurrach (huge, stupid fellow) ; याकाम. गुरु (ज्ञा).]

^{2}**गुरु** पुं. शिक्षक, मंत्रोपदेशक, वडील. Preceptor teacher.
[सं. गुरु, विशेषण अगोदरचें व नाम नंतरचें. अकामसा. **गुरुकुल** = गुरूचा आश्रम व पाठशाला; **गुरुजन** = वडील माणसें ; **गुरुदक्षिणा** = गुरूस विद्याध्यापनाबद्दल द्यावयाची देणगी; **गुरुद्वार** = शिखांचें प्रार्थनामंदिर ; **गुरुपौर्णिमा** = आषाढी पौर्णिमा; **गुरुपरंपरा** = परात् पर गुरु, आपला गुरु, गुरूचा गुरु, त्याचा गुरु; **गरुबंधु** = एकाच गुरूचे शिष्य ; **गुरुसंप्रदाय** = एका विशिष्ट गुरूचे अनुयायी ; **गुरुत्वाकर्षण** = पदार्थांचें परस्परांना आकर्षण, पृथ्वीच्या मध्यबिंदूकडे ओढलें जाणें ; **गुरुमुखी** = शिखांच्या धर्मग्रंथाची लिपी. ग्रंथाला ग्रंथसाहेब म्हणतात. हा गुरूनें लिहिला.]

गुरुगुरु पुं. पोटांतील आवाज. The rumbling in the belly.
[कान. गोर्रु = पोटांतील शब्द.]

गुरूँ न. जनावर, (गाई, म्हशी वगैरे). One of the cattle (cow, ox etc).
[सं. **गोरूप** ; पा. **गोरूप** ; बं. **गरू** ; ओ. **गोरु** ; हिं. बि. पं. **गोरू** ; ने. **गोरु** ; लमा. गुरुव् ; याकाम. **गोरूं** (उगी).]

गुऱ्हाळ न. उंसाचा रस गाळण्याची जागा, चरक, कंटाळवाणी हकीकत (लक्षणा). A sugar-work, a tiresome narration.
[सं. **गुर + आलय, गुड + आलय** ; किंवा **गुळ्हार** ह्या शब्दाचा वर्णविपर्यय.]

गुल पुं. तांबडें पूट, फूल, आगकाडीचें तांबडें टोंक, दिव्याची काजळी. The red flower or pulp.
[फा. गुल् ; अकामसा. **गुलकन्द** = गुलाब खडीसाखरेंत मिसळलेला ; **गुलछबु** = निशिगंध, एक प्रकारचें फूल, (< फा. गुल्-शब्बू) गुल्जार (ल) ; **गुलजार** = टवटवीत, प्रफुल्ल (< फा. **गुलझार** = पुष्पवटिका) ; **गुलनार** = डाळिंबीचें फूल (< फा. **गुल् अनार**) ; **गुलमुस** = एक प्रकारचें फूल ; **गुलदस्त** = फुलांचा गुच्छ, **गुलदस्तांत** ठेविणें = लपवून ठेविणें (ल) ; **गुलहौस** = चैन (**गुल् हवस्**).]

गुलगुल वि., अ. प्रेमानें-लाडिकपणानें हळूं हळूं हलक्या आवाजांत (बोलणें). (To speak) lovingly.
[ध्वनिशब्द, सं. **गुलगुलाय** ; प्रा. **गुलगुल्** ; देप्रा. **गुललई** (चाटु करोति).]

गुलगुलित वि. गोड, प्रेमळ मधुर (आलाप). Soft, sweet and loving (speech).
[देप्रा. **गुल = चुंबन ; गुलगुलाय.**]

गुलाब पुं. एक फुलझाड, त्याचें फूल. Common rose.

[फा. गुल्=फूल. + आब=पाणी ; हिं. गुलाब ; अकामसा. **गुलाब छडी**=खडीसाखरेची कांडी ; **गुलाबदाणी**=गुलाब पाण्याचें पात्र (< फा. गुलाब्दान्); **गुलाबजाम**=फलविशेष, पक्वान्न (< गुलाब्-जामन्).]

गुलाम पुं. दासीचा पुत्र, विकत घेतलेला मनुष्य-नोकर, लबाड (लक्षणा). The son of a slave girl, a sneak fellow.

[अर. घुलाम् ; पेकाम. गुलाम (खरे ८७९); अकामसा. **गुलामगिरी**=दास्य, गुलामाचा व्यापार.]

गुलाल पुं. एक तांबडें पीठवजा द्रव्य. The red powder.

[(?) ; हिं. गुलाल.]

गुलुली, गुलेल स्त्री. एक प्रकारचा खेळ, (दोरीनें दगड मारतात.) A particular game.

[सं. गुड, गुल ; देप्रा. गोल+इल्ल ; हिं. गुलेल ; सिं. गुलेली ; २ फा. गुलूले = बंदुकीची गोळी ; अर. कऊस्+अल्=बंदुक.]

गुल्म पुं. एक रोग, वातरोग, वायगोळा, गांठ. A disease, any glandulour enlargement.

[सं. गुल्म.]

गुस्सा, घुस्सा पुं. राग, क्रोध, कोप. Anger.

[अर. घुस्सा.]

गुहा स्त्री. डोंगरांतील पोखरलेली वस्तीसाठीं तयार केलेली जागा, दरी. A cave or cavern.

[सं. गुहा ; किंवा गुंफा √ गूह् १ गूहने.]

गुह्य न. गुप्त गोष्ट, गुप्त इंद्रिय, उपस्थ, शिस्न, योनि. Secret, hidden act, an organ of generation.

[सं गुह्यम्, √ गूह् १ गूहने.]

गुळकी स्त्री. बिरडें, गुंडी. A button.

[सं. गोलक ; गोलकिका ; प्रा. गोलकोआ.]

गुळगुळीत वि. मऊ, खाचखळगे नसलेला. Smooth and glossy, even.

[सं. गुल्=गोल ; (?).]

गुळणा-णी पुं. स्त्री. पाण्याची चूळ. A mouthful of water.

[सं. गुलगुलाय् ; प्रा. गुलगुल; ध्वनिशब्द. गुडगुड> गुळगुळ ; याकाम. गुरळी = चूळ (ज्ञा. १३-४१९).]

गुळमुळ(णें) अक्रि. अस्पष्ट बोलणें. To speak lowly and inarticulately.

[सं. गॄ ९ शब्दे, + मण् १ शब्दे (द्विधातुसंयोग); अकामसा. गुळमुळीत=अर्धवट, अस्पष्ट.]

गुळवेल पुं. स्त्री. एक प्रकारचा कडू वेल, वनस्पति. A species of moon-seed.

[सं. गुडूची ; हिं. गुलोय ; बं. गुलंच ; गु. गलो ; फा. गुलाई ; अर. निलोई.]

गू पुं (मनुष्याच्या पोटांतील) मळ, उत्सर्ग, विष्ठा. Human excrement.

[सं. (·ऋर्ण) गूथ ; पा. गूथो, गूथक ; प्रा. गूह (शेण); का. गोह (खेत); बं. हिं. गू; पं. गूंह ; सिं. गूँहू ; गु. गूं. ने. गुहु.]

गूज न. गुप्त गोष्ट, हितगूज. A secret.

[सं. गुह्य ; पा. यगुहो ; प्रा. गुझ, गुज्झ , गुज्झअ ; हिं.पं. गुज्झा ; सिं. गुज्झु ; गु. गूज ; अकामसा. (हित)-गूज, गुज (गोष्टी) = रहस्य.]

गूळ पुं. उसापासून निघणारा गोड घट्ट पदार्थ. Coarse or raw sugar, jogree.

[सं. गुड, गुल ; पा. गुलो ; प्रा. गुड, गुडल ; बं. गुर ; ओ. गुर ; वि.हिं.पं. गुर् ; सिं गुरु ; गु. गोळ ; ने. गूलियो ; कोंकणी. गोड ; खान. गूय ; अकामसा. **गुळमट** ; **गुळचट**=गोड, थोडेसें गोड ; **गुळबा**=गुळाच्या पाकांत मुरवलेला आंबा ; **गुळपापडी**=एक पक्वान्न, गूळ ; **गुळवणी**=गुळाचें पाणीं; **गुऱ्हाळ**=उसाचें रसगृह, घर.]

गृध्र पुं. गिधाड. A vulture.

[*IE*. Gheldh; सं. गृध्र, √ गृभ्, √ गृध्, १ इच्छायाम् ; *Serb*. Zlzda; *Russ*, Golodz; *Lith*. Gardus. गिध, गीध पहा.]

गृह न. घर, सदन, आलय, निवासस्थान. A house.

[सं. गृहम्, √ गृह्. पुढील अन्यभाषांतील शब्द ह्या शब्दाशीं ताडून पहाण्यासारखे आहेत. *IE*. Gherdh; सं. गृह्, ग्रह्, गृध् ; *Av*. Garada; *Alb*. Gard; *Goth*. Bigairdan, Gairda; *Lith*. Garda; *Russ*. Gorod; *Bulg* Grada; *Slav*. Grad; *Cech*; hrad; अकामसा. **गृहकृत्य**=घरांतील काम ; **गृहपति**=घरांतील मालक ; **गृहकलह,-भेद**=घरांतील भांडण ; **गृहस्थ**=घर करून राहणारा कुटुंबी, गृहस्थाश्रमी, इसम, मनुष्य ; ह्याच्या अर्थांत विशेषीकरण व सामान्यीकरण झालें आहे.]

गेंगाणें न. वि. नाकांतून बोलणें, नाकांतून बोलणारें. Nasal utterance.

[सं. **ङु १** शब्दे, **ङोङ्ग्यते** (गोंगावणें); याकाम. **ङोङ्ग**, **गंगावती** (ज्ञा).]

गेज स्त्री. गौरीला वाहण्याचें कापसाचें वस्त्र. A cotton piece or lump for the goddess.

[कान. **गेज्जे**.]

गेंडा पुं. प्राणिविशेष (हत्तीसारखा). A rhinoceros.

[सं. **गण्ड, गदाङ्ग, गजेन्द्र, गण्डकः**; पा. **गण्डको** ; प्रा. **गण्डअ**; का. **गोंड** ; हिं. **गैंरॉं** ; पं. **गैंडा** ; गु. **गंडो**.]

गेंडूर न. गांडूळ. An earth-worm.

[सं. **गंडोल** ; प्रा. **गुंडुल** ; देप्रा. **गेडु** = माती.]

गेंद पुं. गोल फुगीरभाग, तुरा, झुपका, घोस, पुंजका. A tufted head.

[सं. **कन्दुक** ; पा. **गेन्डुक** ; प्रा. **गेन्दुआ** ; बं. **गेंरु** ; ओ. **गेण्डु** (खेळणें) ; हिं. **गेदँ** ; सिं. **खेनुरो** ; गु. **गेंद** ; ने. **गेंद** ; द्रा. **गेन्दु, चेण्डु, सेंडे, सेड्डु**.]

गेरू स्त्री. तांबड्या रंगाचा एक पदार्थ, काव, तांबडी माती. A red chalk.

[सं. **गैरिका** ; पा. **गेरुकम्** ; प्रा. **गेरिअ, गेरुय** ; बं. **गेरी** ; ओ. **गेरु** ; हिं. **गेरू** ; पं. **गेरी** ; सिं. **गेरू** ; गु. **गेरु** ; ने. **गेरु**.]

गेला वि. गत, गेलेला, संपलेला (जाणें ह्याचें भूतकाळाचें रूप). Gone, departed.

[सं. **गत** ; प्रा. **गअ** ; अप. **गअल** ; गु. **गओ** ; पं. **गिआ** ; मै. **गेल** ; बं. **गेलो** ; हिं. **गया** ; का. **गौव्**, **गयोव्** ; लमा. **गेलो** ; सिंह. **गिय** . (**गतल, गअल, गेल** अशा मार्गानें शब्द सिद्ध झाला. ‘ **ल** ’ हा मराठीमधील भूतकाळाचा प्रत्यय) ; हा ‘ **ल** ’ प्रत्यय मराठी, मैथिली व लमाण भाषांतच फक्त येतांना आढळतो. बाकीच्या भाषांत नाहीं. त्या भाषांतील रूप प्राकृतवरूनच घेतलेलें दिसतें. विशेषणांत ‘ **ल** ’ हा प्रत्यय येतो तो निराळा. उदा. **चांगला**.]

गेह न. घर, गृह. A house.

[सं. **गेहम्** ; पा.प्रा. **गेह** ; गु.हिं.बं. **गेह** ; सिंह. **गे**, **गेय** ; संसा. **गेहेशूर** (गेहेपंडित) = घरांत शूर.]

गैदी वि. आळसी, नेभळा, गबाळ्या. Slack, slovenly.

[फा. **घइब्** ; हिं. **गैबी** ; पेकामसा. **गैब** = **नष्ट**, बेपत्ता. (< अर. **घइब्**.]

गैर वि. अ. अयोग्य, वाईट, विना, शिवाय. Bad, improper, other than.

[अर. **घैर** = निराळा, व्यतिरिक्त; ‘ **गैर** ’ शब्दाचे तीन अर्थ आहेत : एक ‘ **वाईट** ’, दुसरा ‘ **अभाव** ’ व तिसरा अव्यय म्हणून ‘ **शिवाय** ’ असा ; अकामसा. **गैर-अदबी** = असभ्यता ; **गैरअदा** = रद्द ; **गैरअब्रू** = अप्रतिष्ठा ; **गैरअमलीकबजा** = अराजक, परस्वाधीन स्थिति ; **गैरइमानी** = बेइमानी ; **गैरकायदा** = कायद्याविरुद्ध ; **गैरकिफायत** = तोटा, नुकसान ; **गैरकौली** = परवान्याशिवाय, भलत्याच्या परवान्यानें ; **गैरखर्च** = वावगा खर्च ; **गैरमर्जी** = अवकृपा, रुष्टता ; **गैरमसलत** = वाईट मसलत, वेडगळपणाचा बेत ; **गैरमाहित** = अनोळखी ; **गैरवाजवी** = अयोग्य ; **गैरविल्हे** = भलत्याच क्रमानें ; **गैरशिस्त**– अव्यवस्थित ; **गैरसमजूत** = चुकीची समजूत ; **गैरसावध** = भानावर नसणें ; **गैरसोय** = अडचण.]

गो स्त्री. पुं. गाय, बैल, पशुविशेष (इंद्रिय, दृष्टि, वाणी वगैरे) A cow or ox.

[*IE. Gu*; सं. **गवति** (जोगुवे, गो, गव्य ; **गौतम** = मोठा बैल व व्यक्तिनाम) ; *Av.* Gau (ox, cow), Gaotem (Pr. N.) ; *Arm.* Kov (Kovu = Cow) ; *Gr.* Bovs = ox, cow ; *Lat.* Bos, Bovis; *Lett.* Guvis (Cow) ; *Slav.* Govedo; *As.* Cu ; अकामसा. **गोकर्ण** = गाईच्या कानाच्या आकाराचें भांडें. (**गोक्रण**–अपभ्रष्ट उच्चार) ; **गोकुल-ळ** = श्रीकृष्णाचें जन्मस्थान ; **गोग्रास** = गाईचा घास ; **गोचर** = इंद्रियास वश ; **गोप्रदान** = गाईचें दान ; **गोधूळ** = गाईच्या परत येण्यानें उडणारी धूळ ; **गोपद** = गाईचें पाऊल ; **गोपाल** = गाईचें पालन करणारा, गवळी ; **गोपाळकाला** = गोकुळ अष्टमीच्या शेवटीं होणारा खेळ व प्रसाद ; **गोब्राह्मण** = गाई आणि ब्राह्मण ; **गोमांस** = गाईचें मांस ; **गोमुख** = गाईचें मुख, मुखाच्या आकाराचें पाणी पडण्याचें साधन ; **गोमुखी** = गाईच्या मुखाच्या आकाराची पिशवी ; **गोरज** = गोधूळ ; **गोरस** = दूध, दहीं, ताक वगैरे ; **गोरक्षण** = गाईचा सांभाळ ; **गोरोचन** = एक विशिष्ट द्रव्य ; **गोवर** = एक प्रकारचा उष्णतेचा ताप ; **गोवरी** = शेणी, शेणाची थापटी ; **गोशाला** = गोठा ; **गोऱ्हा** = गाईचा पाडा.]

गोकर्ण न. गाईचा कान, त्या आकाराचें भांडें. A cow's ear, a small metal vessel of that shape.

[सं. **गोकर्ण**.]

गोख न. पोट, मध्यभाग, झरोका. The belly, the centre, window.

[सं. **गवाक्ष** ; प्रा. **गवक्ख** ; याकाम. **गोखा** (पुं.) .]

कैसा नव्हता प्रलयाचा वेळु। गोखा तूंचि मांडला काळु ।

ज्ञा. ११·३८४.

गोखरूं न. एक कांटेरी औषधि, सराटा. A kind of plant.
[सं. **गोक्षुर**; प्रा. **गोक्खूर** > **गोखुर** > **गोखरूं** (स्वर विपर्यय, लिङ्गभेद).]

गोगलगाय स्त्री. कीटकविशेष, सौम्य, मऊ, निरुपद्रवी प्राणी किंवा मनुष्य (लक्षणा). A snail, a term for a mild, simple man.
[सं. **गोपालिका**; देप्रा. **गोआलिका**; **गोप**, **इंद्रगोप** हे कीटकविशेष आहेत.]

गोंगाव(णें) अक्रि. गुंगुं आवाज करणें, घोंघावणें. To buzz, to sing.
[सं. **ङु १ शब्दे** (अभ्यास) ङोङूयते; याकाम. **गंगावती** (ज्ञा).]

गोचीड, गोचडी स्त्री. पशूच्या अंगाला चिकटून बसून त्याचें रक्त शोषणारा कीटक. A cattle or dog louse.
[सं. **गो**; **गो-चीकट, कीटक, √ कीट्** १ बंधने.]

गोजिरा वि. नाजूक, सुंदर, साजिरा. Handsome, beautiful.
[कान. **गुजुरु** = लहानपणा; अकामसा. **गोजिरवाणें** = मृदु, नाजुक.]

गोंजार(णें) सक्रि. प्रेमानें अंगावरून हात फिरविणें. To smooth down in soothing.
[सं. **गोदारणम्** (?), **गुंजारव** (?); **अंजारणें** (प्रतियोगी शब्द).]

गोट, गोठ पुं. स्त्रियांच्या मनगटावरील सोन्याचें वळें, सोन्याची बांगडी. Gold wristlet.

गोट पुं. सैन्याचा तळ, छावणी. A camp.
[कान. **गाट्टु** = मर्यादा, सीमा, आश्रयस्थान; सं. **गोष्ट् १ संघाते**. याकाम. **गोठ** (नरुस्व. २७८).]

गोट पुं. वस्त्राच्या शेवटीं मुरडून लावलेला कांठ; (जोड्यालाहि गोट घालतात.) The appended border.
[कान. **गोट्टु** = कोपरा, कांठ; याकाम. **गोट** = कांठ, किनारा (नरुस्व. २९९).]

गोटा पुं. फुलांचा गुच्छ. A bunch of flowers.
[सं. **ग्रंथ्**; देप्रा. **गोंठी** = मंजिरी.]

गोटा पुं. वाटोळा दगड. A roundish stone.
[सं. **गुटिका**; प्रा. **गुडिआ**; बं. **गोटा**; ओ. **गोटा**; हिं.पं. **गोट**, **गोट्टा**; सिं. **गोटु**; कान. **गोट्टु**; अकाम. **गोटी** (स्त्री).]

गोठ(णें) अक्रि. घट्ट होणें, थिजणें, आटणें. To become solid or thick by freezing or boiling.
[सं. **गोष्ट्** १ संघाते; प्रा. **गोट्ट**.]

गोठा पुं. गुरें बांधण्याचें ठिकाण. A cow-pen.
[सं. **गोष्ठ**; पा.प्रा. **गोट्ठ**; का. **गुठ**; बं. **गोठ**; ओ. **गोठ** (कळप); सिं. **गोठु** (गांव); गु. **गोठो**; ने. **गोठ्**.]

गोड वि. मधुर, मिष्ट, मंजुळ, मृदु, योग्य, चांगलें. Sweet, soft, mild, pleasing, delightful.
[सं. **गौड** (< **गुड**); प्रा. **गोड्ड**; याकाम. **गोडसें** (नरुस्व. १९); गु. **गोडी**, **गोड**; लमा. **गुद्ला** = गोड पदार्थ; गूळ पहा; अकामसा. **गोडावणें** = गोड करणें–होणें; **गोडवा** = गोड; **गोडवे** = स्तुति, प्रशंसा (< गोड्डवा); **गोडी** = गोडपणा.]

गोण, गोणतें स्त्री.न. पोतें, थैला, तरट, ओझें, संकट (लक्षणा). A large sack, gunny bag.
[सं. **गोणी** (?); देप्रा. **गोण**, **गोणी** (बैल) (?), **गोणत्त**, **गोणत्तय**; गु.बं. **गुण**; सिं. **गूणी**; हिं. **गोन**; का. **गुन**; लमा. **गोनो**; अकाम. **गोणा**, **गोण** (साखरेची), **गोणी**; कान. **गवसणी**चा अपभ्रंश (?)].

गोंड पुं. एक एतद्देशीय रानटी जात. The Gonds.
[देप्रा. **गोंड** = जंगल.]

गोंड पुं. घड. A bunch.
[देप्रा. **गोंडी** = मंजरी.]

गोंडा पुं. वाटोळा गोटा, गुच्छ, झुबका, गोळा, घोंस. A knot, knob, cluster, tuft.
[कान. **गोंडे**; देप्रा. **गोंडी** = मंजरी; अकामप्र. **गोंडा घोळणें** = खुशामत करणें, लाडीगोडी लावणें (कुत्र्याच्या शेपटी हालविण्यावरून); **गोंडा हलणें** = उत्कर्ष होणें, सतत काम चालू राहाणें (पालखीला गोंडा असतो त्यावरून).]

गोत, गोता पुं. स्त्री. हिसका, गुंता, झोंका, संकट, गोता (खाणें). A jerk, a ruinous or losing business.
[अर. **घोता**; म. **गुंता**; **गुतणें** पहा.]

गोत न. कुटुंब, वंश, पंचायत (जातींतील शिष्ट मंडळी). Relations and kindred (collectively).

[सं. **गोत्र** ; पा.प्रा. **गोत्त** ; बं. **गोता** ; हिं. **गोत** ; सिं. **गोटु** ; ने.गु. **गोत** ; याकाम. **गोत** (नरुस्व. ८०७) ; अकामसा. **गोतगंगा** = गोतपत , ज्ञातीचे न्यायाधीश ; **गोताई** = जातसभा ; **गोतमहजर** = गोताचा निवाडा ; **गोतावळा** = गोतांतील मंडळी, नात्यांतील मंडळी.]

गोत्र न. कुटुंब, वंश, ऋषिकुल, नातेवाईक. Family, race, kin.

[सं. **गोत्रम्**, <**गो** + **त्र** ; अकामप्र. **गोत्र जमणें** = कुळें जमणें (लग्नसंबंधाच्या दृष्टीनें), **गोत्रज** = गोत्रांत, कुळांत जन्मलेले.]

गोदी (गुदाम) स्त्री. वखारींतील सामान ठेवण्याची जागा. The go-down, a dock.

[मलायी. **गोदोङ्ग** ; तेल. **गिडङ्गी**, **गिड्डंगी** ; तामिल. **किडगु**, √ **किडु** = ठेवणें ; सिंव्ह. **गुदाम** ; लहान मुलाच्या पिशवीला **गुदाम** म्हणतात. थैला, बटवा-ह्यालाहि गुदाम म्हणतात.]

गोधडी स्त्री. दुलई, वाकळ, रजई. A quilt.

[सं. ? ; हिंदी. **गुद्री** = एकावर एक आंथरलेल्या चिंध्या.]

गोदावरी स्त्री. नदीनाम. The name of a river.

[सं. **गो-दावरी–गाई, स्वर्ग** किंवा **जल देणारी.** ह्या नदीचें द्राविडी नांव ‘ **दोदाय** ’ असें आहे. तेलगूमध्यें ‘ **गोदे** ’ = **मर्यादा** असा शब्द आहे. तेव्हां मूळ व्युत्पत्ति संस्कृत का द्राविडी हें निश्चित करणें कठीण दिसतें. मूळ शब्द आर्य असावा.]

गोंद,-ध पुं. डिंक, चिकट पदार्थ, झाडाचा चीक. Gum.

[हिं. **गोंद.**]

गोंद(णें) सक्रि. अवयवावर टोंचून खुणा करणें. To tattoo.

[सं. **गो** = अवयव + **दो** ४ अवखंडने, **गोदान** ; परंतु अनुस्वार कसा आला ? हा द्राविडी आहे काय ?]

गोंधळ पुं. धार्मिक विधि (देवीखंडोबासंबंधीं). A tumultuous festivity in propitiation of goddess.

[कान. **गोंधळो** = आजारी मनुष्य बरा झाल्यानंतर किंवा मुलाच्या जन्मानंतर किंवा लग्नकार्यानंतर हा धार्मिक विधि करतात. ह्या वेळीं कुलस्वामिनीस पोषाख घालतात व तिच्यापुढें नाच-गाणें-कीर्तन करतात. याकाम. **गोंदल** (नरुस्व. ८१०).]

^{२}**गोंधळ** पुं. गडबड, अव्यवस्था, घालमेल, अंदाधुंदी, धावाधाव, वाद्याचा आवाज. Disorder, derangement, confusion.

[देप्रा. **गुन्दल** ; प्रा. **गुंदल** = आनन्दध्वनि, तुमुल ध्वनि; अकामसा. **गोंधळ(णें)** = गडबडणें, घावरणें.]

गोप पुं. गाईचा रक्षक, गवळी. A herdsman, a keeper of the cattle.

[सं. **गो** + **प**, √ **पा** २ **पालने.**]

गोफ पुं. रेशमाचा विणलेला दोरा, करगोटा. A silken cord.

[सं. **गुंफ्** ; प्रा. **गुंफ.**]

गोफण स्त्री. दगड फेकण्यासाठीं दोरी. A sling.

[सं. **गुंफनम्**, √ **गुफ्** ; देप्रा. **गुंफण.**]

गोफा पुं. घोटा, खोपा (वेणीचा). The braided and bunched hair.

[सं. **गुल्फ** ; प्रा. **गुप्फ.**]

^{१}**गोम** स्त्री. कीटकविशेष, एक सरपटत जाणारा प्राणी. A centipede.

[प्रा. **गोह्मी**, **गोमी** ; हिं. **गोम** ; ने. **गोमन** ; कान. **गोमु.**]

^{२}**गोम** स्त्री. दोष. A defect, a blemish (particularly of a horse.)

[कान. **गोमु** = अश्वदोष ; घोड्याच्या पाठीवर गोमेच्या आकाराची उलट्या केसाची वळी असते; हा एक दोष समजतात. त्यावरून मराठींत हा शब्द रूढ झाला. उदा. त्याच्या बोलण्यांत गोम आहे.]

गोमती स्त्री. एका नदीचें नांव. The name of a river.

[सं. **गोमती**, **घुमती** ; हिं. **घुमना** = फिरणें.]

गुमास्ता पुं. मुनीम, दिवाणजी, पेढीवरील व्यवस्थापक. An agent, a representative.

[फा. **गुमाश्तह्** = प्रतिनिधि केलेला.]

गोमा पुं. एक व्यक्तीचें नांव, उगाच मोठेपणा दाखविणारा मनुष्य (लक्षणा). Some low fellow or other.

[गोमा गणेश पितळी दरवाजा. हैद्राबादेस एक चतुर भिकारी होता, त्याचें हें नांव. ज्याला त्याला तो मोठ्या

बढाईनें आपला सर्व पत्ता बरोबर वरीलप्रमाणें देत असे. पुष्कळ लोक फसले व अखेर हा बढाईखोर भिकारी असल्याचें उघडकीस आलें. ह्यावरून **गोमा, गोमाजी, सोमाजी, तिमाजी**, वगैरे शब्द रूढ झाले. कुडाळदेशकर आद्य गौड ब्राह्मण राजघराण्यांत '**गोमाजी**' नांवाचा एक प्रसिद्ध पुरुष होऊन गेला. परंतु त्यावरून हें नांव आलें नसावें.]

गोमटें वि. (काव्यांत) चांगलें, सुंदर, गोड. Sweet, decent, fair.
[सं. **गौर** ?]

गोमंतक पुं. प्रांतविशेष, गोवेंप्रांत. The territory known as *Goa*.
[सं. **गोम** + **अंतक** (राज); **गोमन्त** + **क**.]

गोरख पुं. व्यक्तिनाम, कानफाटे गोसावी संप्रदायाचा मूळपुरुष. The name of an individual.
[सं. **गोरक्ष, गोरख**; प्रा. **गोरक्ख**; **गोरख** हा हिंदी शब्द आहे. अकामसा. **गोरखचिंच** = एक विशिष्ट चिंच (बत्तीसशिराळें, जि. सातारा येथें आहे).]

गोंरा वि. सफेत रंगाचा, युरोपिअन (लक्षणा). White, fair.
[सं. **गौर**; पा.प्रा. **गोर**; बं.ओ.हिं.पं. **गोरा**; सिं. **गोरो**; गु. **गोरूं**; ने. **गोरो**; अकाम. **गोरा गोमटा** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द); अकामसा. **गोरटा** = गोरा (**गौर** + **ट** - प्रत्यय); **गोरापान** = गोरा (**गौर** + **पान** – अधिक्यवाचक प्रत्यय); **गोरटेला** = किंचित गोरा, गोरेला; **गोरा-मोरा** = पांढरा, घाबरलेला, फिक्कट.]

गोरा, गोऱ्हा पुं. गाईचें वासरूं, खोंड.
[वैसं. **गौ, गवय, गवल** < गौ + य, ल; प्रा. **गोण**. मराठी शब्दांतील '**र**' ची उपपत्ति **गोरूप**पासून आहे काय ? वैदिक संस्कृतमध्यें **गौर** = रेडा असा एक शब्द आहे. हा दोन भिन्न भाषांतील शब्दांचा समास तर नसेल ना ? सं. **गो** + (ऑस्ट्रीक) **उर्** (गुरेंढोरें); संताळी. मुण्डरी. **उरि** = **गुरेंढोरें** सु. कु. चतर्जी. N. I. A. vol II, p. 422.]

गोरी स्त्री. शिकारीच्या वेळचें गीत, फासेपारधी (लक्षणा). A song of the hunters, hence the hunters.
[सं. **गॄ** ९ शब्दे; याकाम. **गोरि** (उगी).]
कां गोरी याचें गायन ॥ रा. वि. २-२३.
कां गोरीच्चिया भुली । मृग व्याधा दृष्टि न घाली ॥ ज्ञा. १३-७३९.

गोरुं न. गुरूं, ढोर. The cattle.
[सं. **गोरूपम्** > **गोरुअम्** > **गोरुँ** > **गुरूँ**; **गुरूं** पहा.]

^{1}**गोल** वि. पुं. वाटोळें, गोलक, मंडळ, गोप, गुच्छ.
[*IE*. Geu; सं. **गोल**; *Gr*. Gealor; *Lat*. Vola; *Germ*. Keula; *Anord*. Kjoll; *Ahd*. Kiol.]

^{2}**गोलं(दाज)** वि. (पुं.) तोफेचा गोळा, (तोफ डागून गोळे मारणारा). The shell of a gun.
[फा. **गोल** = गोळा.]

गोलमाल पुं. गोंधळ. Confusion, chaos, disorder.
[हिं. **गोल-माल्**.]

गोलाम पुं. पुष्प, कापूर. The camphor.
[याकाम. **गोलाम** (नरुस्व. ५४२).]

गोल्हाट पुं. छातीचें पोंक, बाकदारपणा, छातीच्या पोंकांत राहणाऱ्या प्राणवायूचें ठिकाण (योगशास्त्र). The bent back.
[सं **गोल** + **हाट**; **कोल्हाट** (श. को.); याकाम. **गोल्हाट** (ज्ञा).]

गोव(णें) सक्रि. ओवणें, आंत घालणें, शिरकवणें, गुंतणें, गुंफणें. To string, to fasten or tie up.
[सं. **गुंफ्, गुप् १० भाषार्थे**; **गोपा** = गोवी, कथा, गोष्ट. गाथा; **गोवी** = कथा, गोष्ट, कहाणी; **गोवणें** म्हणजे सांगणें. गोफ्तन् हा फारसी धातु गुप् चा पर्याय आहे; **गोव-गोवा** = गुंता, अटकाव, संकट. उदा. पायगोवा.]

गोंवर पुं. लहान मुलांचा रोग, ज्वर व त्वचेवर पुरळ येणें (ऊष्णतांश). The measels.
[सं. **गोवर्ण**; कान. **गोब्बर** = खत, गोवरी; गोवरांत अंग गायीच्या रंगाप्रमाणें होतें.]

गोवरी स्त्री. शेणाची थापटी. A bit of dry cow-dung.
[सं. **गोर्वर**; **गोवर**; प्रा. **गोवर, गव्वर**; देप्रा. **गोवरं करीषम्** (१०५-१); बं. ओ. बि. हिं. पं. ने. **गोबर**; गु. **गोर्**; कान. **गोब्बर** = खत, गोवर.]

गोवंड, गोवंडी स्त्री. गायवाट. A cow-track.
[सं. **गोवृन्दम्**; देप्रा. **गोअण्टा गोचरणा** (१०५-१३); हिं. **गौण्डा, गोंडा** (गोठा); गु. **गोंद्रो. गोद्दु**.]

गोवें न. ग्रामनाम. The town Goa.
[सं. **गो**–अलबूकर्कच्या पूर्वीं त्या गांवाला "**सिन्दाबूर**" किंवा **सन्दाबूर** असें म्हणत. **गोंवा** किंवा '**कुवु**' हें त्याचें पूर्वींचें नांव होतें (Wilson–Puranas).]

गोशा, गोषा पुं. वस्त्राचा शेवट, धनुष्याचें टोक. The end of garment, an end of a bow.

[फा. **गोशा** = कोपरा, अन्त ; पेकामसा. **गोशनशीन** = एकान्तवासी ; **गोशनशीन**=गुप्तपणानें, (< गोशा + निशान.)]

गोष न. मांस, गोमांस. The cow's flesh, beef.

[फा. **गोशूत्.**]

गोषवारा पुं. सारांश, तात्पर्यार्थ, संक्षेप. The synopsis.

[फा. **गोशवारा.** मूळ अर्थ जमीनदारी पद्धतींतील खातेवही, प्रत्येक खात्यावर असणाऱ्या नोंदींचें केलेलें संक्षिप्त व एकत्रित असें टांचण, त्यावरून तात्पर्यार्थ, सारांश (लक्षणा).]

गोष्ट स्त्री. हकीकत, कथा, कृत्य, वृत्त. A story, a tale, a matter, an affair.

[सं. **गोष्ठी, गोष्ट** ; प्रा. **गोट्ठ, गोट्ठी** ; हिं. **गोष्ट, गोष्टी** ; पं. **गोह्थ्** (गोष्ट) ; गु. **गोठ.**]

गोष्पेच, गोस्पेच पुं. कानावरून बांधावयाचें वस्त्र, टापशी. A wrapper over the ears.

[फा. **गोश** = कान ; **गोश्पेच** = टापशी, पागोट्यावरील वस्त्र–अलंकार.]

गोष्माल, गोस्माल स्त्री. कान–उघडणी. Rubbing the ears of, remonstrance.

[फा. **गोश** = कान ; **मालना** = घासणें, कान पिळणें.]

गोसावी पुं. इंद्रियें (किंवा वाक्, धेनू इ.) हीं आपल्या कह्यांत ठेवणारा, विरक्त वृत्तीचा मनुष्य, मालक, धनी, बैरागी (अर्थभ्रंश). Lord, master, one who has controlled his senses.

[सं. **गोस्वामिन्** > गोस्वामी > गोसाईं > गोसावी ; हिं. **गोसाईं** ; पं. **गुसाईं** ; सिं. **गुसाँईं** ; गु. **गोसाईं.**]

गोही पुं.स्त्री. साक्ष, साक्षीदार, ग्वाही. A witness.

[फा. **गुवाही.**]

गोहो पुं. पुरुष, नवरा, मालक, यजमान, बाप्या, वस्ताद. Husband, lord, master.

[सं. **गोधः** = पति; √**गुह्** ; प्रा.देप्रा. **गोह** = योद्धा, पुरुष, मुखी ; याकाम. **गोहो, धोव, धो** (ज्ञा.)]

गोळक पुं ज्ञातिविशेष. A caste.

[सं. **गोलक** ; अकाम. **कुंडगोलक** = नवरा असलेल्या ब्राह्मण स्त्रीची अनौरस संतति. **रंडगोलक** = नवरा नसलेल्या ब्राह्मणस्त्रीची अनौरस संतति. मूल, पोर पहा.]

गोळा पुं. पिंड, रास, जथा, गोल. A ball, a heap, a group, round mass.

[सं. **गोलक** = एकत्रित करणें.]

गोळी स्त्री. गुटिका. A pill.

[सं. **गोलिका** ; प्रा. **गुलिआ** ; *IE.* Gel ; *Gr.* Galevdo ; *Lett.* Gilas ; *Russ.* Zolvi ; *Latt.* Galla ; *Alb.* Gogel ; *Lat.* Gal.]

गौ, गऊ पुं. गाय. A cow. अंतराचें प्रमाण, दोन कोस. A measure of distance.

[सं. **गव्यूत** ; प्रा. **गाउ, गाउअ** (न).]

गौड पुं. देशविशेष, लोकविशेष. A particular territory and the people therein.

[सं. **गौड** ; एकंदर ब्राह्मणाच्या दहा जाती मानिल्या आहेत. पंचगौड आणि पंचद्राविड. वंगाल देशाला गौड म्हणत. त्या देशांत मंत्रतंत्र, जादुटोणे, जारणमारण वगैरे गूढविद्या विशेष प्रचलित होत्या व आहेत. त्यावरून **गौड बंगाल** हा शब्द हिकमती मसलत, गुप्त कारस्थान ह्या अर्थी रूढ झाला. **गौड सारस्वत** = ब्राह्मणांचा वर्ग.]

गौण वि. न्यून, कमी, हीन, मुख्य नसलेलें, दुय्यम. Dificient, low, subsidiary.

[सं. **गौणम्.**]

गौर वि. गोरा, सफेत, निर्मळ. Fair, white.

[सं. **गौर.**]

गौर स्त्री. गौरी, पार्वती. The Goddess Parvati.

[सं. **गौरी.**]

गौरव पुं. मोठेपणा, वजन, गुरुत्व, मानसन्मान. Weight, influence, authority, respect.

[सं. **गौरवः** < गुरु ; अकामसा. **गौरविणें** = मानसन्मान करणें ; **गौरीहर** = शंकर देवता. लग्नविधींतील एक देवता.]

ग्यान न. ज्ञान. Knowledge.

[सं. **ज्ञान** ; हिं. **ग्यान.**]

ग्रंथ पुं. पुस्तक, पोथी, चोपडी, गुंफणी, लेखन, प्रसंग, हकीकत (लक्षणा). A book, a composition.

[सं. **ग्रथ् ९ ग्रथने** ; **ग्रंथकार-कर्ता** = ग्रंथ लिहिणारा.]

ग्रस्त, ग्रसित वि. खाल्लेलें, गिळलेलें, व्यापलेलें (लक्षणा). Swallowed, eaten.

[सं. **ग्रस् १ अदने** (निष्ठारूप).]

ग्रह पुं. कल्पना, समजूत, स्वीकार, अंगीकार, आकाशांतील तेजोगोल-मंगळ बुध, गुरु, वगैरे. Apprehension, perception, a planet.

[सं. **ग्रह, ग्रह् ९ ग्रहणे** ; अकामसा. **ग्रहदशा** = ग्रहाच्या गतीप्रमाणें चांगली वाईट अवस्था ; **ग्रहपीडा** = ग्रहामुळें त्रास ; **ग्रहमख** = ग्रह अनुकूल करण्यासाठीं होम ; **ग्रहण** = घेणें, स्वीकारणें, वेढा, व्याप्ति.]

ग्राम पुंन. खेडें, गांव, समूह, जमाव. A village.

[*IE*. Ger, Grerm ; सं. **ग्राम** ; *Slav*. Gromoda ; *Lith*. Grumiuos ; सं. **ग्रामम्** = समूह, गांव ; अकामसा. **ग्रामसिंह-केसरी** = गांवांतील कुत्रें ; **ग्रामजोशी** = गांवांतील उपाध्या ; **ग्रामणी** = पाटील ; **ग्रामण्य** = गांवकीचा तंटा ; **ग्रामदेवता** = गांवांतील देव ; **ग्रामपंचायत** = गांवांतील तंट्याचे लवाद ; **ग्राम्य** = खेडेंगांवांतील, खेडवळ.]

ग्रावा पुं. दगड. A stone.

[सं. **ग्रावन्**.]

ग्रास(णें) अक्रि. खाऊन टाकणें, व्यापणें, गिळणें. To eat, to envelop, to swallow.

[सं. **ग्रस्** = ग्रासणें.]

ग्राह पुं. मगर, नक्र. A crocodile.

[सं. **ग्रह, √ ग्रह्** ; अकामसा. **ग्राहक**=गिऱ्हाइक, घेणारा ; **ग्राहकबुद्धि** = समजून घेण्याची बुद्धि ; **ग्राह्यांश** = घेण्यासारखें तत्त्व.]

ग्रीवा स्त्री. मान, कंठ, गळा. The neck.

[सं. **ग्रीवा**.]

ग्रीष्म पुं. उन्हाळा, उष्णकाळ, एक ऋतु. The hot season.

[*IF*. Gher (warm, to heat); सं. **घर्**-(**घर्म, घृण, घृत** इ.); *Av*. Gar–ema (warm); *Arm*. Jer (jerm = warm); *Gr*. Ther (Thermos); *Lat*. For-mus; *O.Slav*. Gor-eti (to burn); *Russ*. Gornu ; *Ir*. Gris ; पा.प्रा. **गिह्म** ; सिंह. **गिम्, गुम्, ग्रिम्** ; गु. हिं. **घाम** ; बं. **घामिते** ; रुमा. **खम** (सूर्य) ; म. **घाम**.]

ग्लानि स्त्री. सुस्ती, खिन्नता, दुःख. Moroseness, sullenness.

[सं. **ग्लै**.]

ग्वाही स्त्री. साक्ष, पुरावा. Evidence, testimony.

[फा. **गुवाही**.]

घ पुं. मराठी वर्णमालेंतील चौथें व्यंजन. उच्चारण कंठ्य महाप्राण मृदु असून उच्चारस्थान कंठ आहे. ('क' पहा) Fourth consonant in Marathi, the soft gutteral aspirate alphabet.

[सं. **घ** ; प्रा. **घ** ; **घट-घड, घटिका-घडी.**

सं. **घ्र** ; प्रा. **घ्घ** ; **घ्राण-घाण, व्याघ्र-वाघ.**

(मध्य घ्) सं. **द्घ, घ्न, घ्र, र्घ** ; प्रा. **घ्घ**. (उदा. पुढें पहा.)

सं. **ख** ; **रेखा-रेघ. संख्या-सांघ.**

सं. **ग** ; **गृह-घर. गृण्ह-घेणें.** सामान्यतः आद्य, मध्य, अन्त्य मराठी 'घ्' हा संस्कृत प्राकृत, आद्य, मध्य, अन्त्य घ्, ग्, स्क्, ष्क्, द्घ्, घ्न्, घ्र्, र्घ् इत्यादि वर्णापासून निष्पन्न होतो.]

घंगाळ, घंघाळ, गंगाळ न. एक पसरट वाटोळें भांडें. A circular metal vessel with handles.

[सं. **गंगालय** (?).]

घट पुं. भांडें, घडा, विश्व, शरीर, सृष्ट वस्तु. A vessel, the universe, a body, a created thing.

[सं. **घट** ; अकामसा. **घट बसणें, घटस्थापना** = नवरात्रांत देवाची प्रतिष्ठा होणें (कुलदेवतेच्या पुढें घट ठेवतात त्यावरून); **घटपट** = (न्यायशास्त्रांत घटपट याचीं उदाहरणें नेहमीं देतात त्यावरून) वितंडवाद, निरर्थक बडबड ; **घटस्फोट** = काडीमोड, विवाहविच्छेद (त्यावेळीं मृत्युदर्शक घट फोडतात त्यावरून); **घटका, घटिका** = वेळेचें मापन, चोवीस मिनिटांइतका काळ ; **घटिका भरणें** = वेळ संपणें ; **घटित** = जुळणी, ऐक्य, मैत्री ; **घटितार्थ** = निर्णय ; **घटि-टी** = घटका, वेळ मोजण्याचें साधन ; **घटींव** = घटलेलें, बळकट, कसबी, सराईत.]

घट(णें) अक्रि. कमी होणें, हटणें, लहान होणें, आकसणें, सुदृढ बनणें, शोभणें, सजणें. To shrink, to contract, to decrease, to become fixed or confirmed.

[सं. **घृष्ट=भ्रष्ट, √घृष्, √घट् १, √घट्ट् १** चलने, चेष्टायाम् ; प्रा. **घट्टइ** (पडणें) ; बं. **घाटा** ; हिं. **घटना** ; पं. **घटना** ; सिं. **घटणू** ; गु. **घडवूँ** ; ने. **घटनु** ; अकामसा. **घट** = वजनांत येणारी तूट, नुकसान, गळती ; **घटक** = अवयव, अंशभूत, मध्यस्थ, तडजोड करणारा (< **घट + क**); **घटकावयव** = घटक असलेला ; **घटना** = घडणें, रचना.]

घटवि(णें) सक्रि. कमी करणें, लहान करणें. To shrink or contract.
[सं. घट्, (णिच्) घटय, घटव ; हिं. घटना ; पं. गटाउणा ; सिं. गटाइनु ; गु. घटाडवूँ.]

घटघट अ. एकदम पिणें किंवा खाणें, आधाशीपणानें पिणें किंवा खाणें. To drink or eat voraciously, to gulp or drink eagerly.
[ध्वनिशब्द ; पेय पितांना हा असा आवाज होतो.]

घट्ट वि. आवळलेलें, दृढ, निबिड, बळकट, घन, दाट. Strong, stout, close, thick, tight, dense.
[सं. घृष्ट, घट्ट ; प्रा. घट्ट ; अकामसा. घटमुट = दृढ, मजबूत, धडधाकट (< घट्ट + मुट < मृष्ट).]

घट्टा पुं. वण, घासण्यानें पडणारा वण. Callous skin, callosity.
[सं. घृष्ट, √ घृश्, √ घृष् ; प्रा. घट्ट ; अकामसा. घट्टाई = घट्टपणा.]

^{१}**घड(णें)** अक्रि. होणें, बनाव होणें. To become, to happen.
[सं. घटते ; पा. घटे ; प्रा. घड ; हिं.पं. घडना; सिं. घडणु ; गु. घडवूँ ; याकाम. घड, घडित्र (नरुस्व.४२०)]

^{२}**घड(णें)** सक्रि. जोडणें, तयार करणें, हातोड्यानें ठोकून तयार करणें, आकार देणें. To connect, to fashion, to draw up, to make out.
[सं. घट् ; प्रा. घड ; (सं. घटन, प्रा. घडण) ; अकामसा. घडण = घाट, रचना, डौल, आकार ; घडविणें ; घडणावळ = घडण्याची मजुरी ; घडणी = घडणें, प्रांतवार व व्यक्तिवार हिशेब, समुदाय.]

^{३}**घड(णें)** सक्रि. स्पर्श करणें, शिवणें. To touch.
[सं. घृष् (घृष्ट (निष्ठा), घट्ट) = घासणें, स्पर्शणें.]

घड पुं. समूह, फलांचा समूह. A bunch, a cluster.
[१ सं. घट ; घटा, प्रा. घडा, घड (पुं.) ; २ देप्रा. घढ (न); हिं. घरिया (माशांचें मोहोळ) ; ने. घडी ; याकाम. घड = घोस (नरुस्व. ७८७).]

घडगुप वि. दाट, निबिड (अंधकार). Thick, dense.
[सं. प्रा. घट्ट = निबिड + घूम ; कान. गुडुप ह्या शब्दाचा अवशेष (आर्यद्राविडसंकर – घट्ट + गुडुप = घडगुप.)]

घडघड(णें) अक्रि. गडगडाट होणें. To thunder.
[सं. घट् (?) ; अप. घुडुक्कइ (गर्जति) ; गु. घरकवूँ (गुरकावणें) ; सिं. घरकणु (घंटा वाजविणें) ; हिं. घरघराना (गडगडणें) ; घरकना (रागावून बोलणें) ; अकाम. घडघड (बोलणें) √ गद् (?), हा ध्वनिशब्द वाटतो.]

जैसा मेघ घडघडीत । तैसाचि कुंभकर्ण घोरत ॥

घडवंची स्त्री. उंच तिवई, स्टूल. A frame or stand, a stool.
[सं. घट + उच्च (?); हिं. घडोंचा ; कान. गडंची, गडगंची ; सिं. घडाम्जी.]

घडशी पुं. एक वाजंत्र्याची जात. A particular caste.
[घडविणारे लोक. म. घडणें ; कान. गडतर = काठिण्य, गड्डे = आवाज (?)]

घडा पुं. मातीची घागर, मातीचें भांडें. An earthen pitcher.
[सं. घटः घटकः ; पा. घटो; प्रा. घडग, घड(पुं) ; हिं.पं. घडा ; बं. घरा ; सिं. घरो ; गु. घडो ; का. गड ; लमा. खोरो ; ध्वनिशब्द सुद्धां हा होऊं शकेल. पहा घागर ; अकामसा. घडा भरणें = पापें भरून शिक्षेस पात्र होणें. (पाप करून तद्दर्शक एक खडा घड्यांत टाकावयाचा ह्या वाल्या कोळ्याच्या रीतीवरून ;) घडा फोडणें = खरें तत्त्व बाहेर सांगणें.]

घडामोड स्त्री. खटाटोप, रचणें, घडणें व मोडणें, काढणें ठेवणें, जुनेंनवें करणें, उलथापालथ. Making and destroying, buying and selling, changing.
[सं. घट् + मोट् (द्विधातुसंयोग.)]

^{१}**घडी** स्त्री. दुमडी, चुणलेली अवस्था, संच, बस्तान, रचना. A fold or double, a part doubled over.
[सं. घट् ६ रचनायाम् ; अकाम. घडी बसणें = जम बसणें. ; घडी बिघडणें = विनसणें ; घडीची पोळी = घड्या-पदर असलेली पोळी.]

^{२}**घडी** स्त्री. वेळ, घटिका. A period of 24 minutes.
[सं. घटिका ; गु. सिं. पं. हिं. बं. घडी.]

घण पुं. मोठा हातोडा (लोहारवडारांचा). A sledge-hammer.
[वैस. **घन्**=हनने ; सं. **घन** ; पा. **घनो** ; प्रा. **घणो** ; बि. हिं. **घन** ; पं. **घण** ; गु. **घण** ; ने. **घन** ; कान. **घण**= लोखंडाचा हातोडा.]

घण, घन वि. दाट, जाड, फार, अत्यंत. Thick or deep, copious.
[सं. **घन** ; पा. **घनो** ; प्रा. **घणो** ; गु. **घणूं** ; पं. **घणा** ; सिंह. **गन** ; हिं. **घना** ; बं. **घन**. ने. **घनु** ; सिं. **घणि** ; अकामसा. **घनघोर, घनदाट, घनसर** = अतिशय गर्दीचे (दोन्ही एका अर्थाचे शब्द, अतिशयत्वदर्शक) ; **घनरूप** = दाट (द्रव्य) घट्ट.]

घणवट वि. दाट, भारी (ज्ञा. २–१३०). Thick, deep, of close texture.

घणघण वि. घण अशा (घंटेच्या) ध्वनीचा, स्पष्ट, खणखणीत आवाजाचा. The ringing, clanking, twang.
[ध्वनिशब्द. **घण** = घंटाशब्द ; अकामसा. **घणघणघंटा**= नकार ; **घणघणणें** = घणघण असा आवाज होणें–करणें ; **घणघणाट** = घणघणीत (साधित शब्द) ; **घणघोष** = घणघण असा आवाज.]

घणस, घणसा पुं. सर्पविशेष. A serpent.
[सं. **घोनस** ; प्रा. **घोणस**.]

घंटा स्त्री. वाद्यविशेष, घांट. A bell.
[सं. **घंटिका**, √ **घट्** १ शब्दे.]

घन पुं. (गणित) एका संख्येनें त्याच संख्येला तीनदां गुणून येणारें फल. The cube of a number.
[सं. **घन** = दाट, आंतील भाग ; अकामसा. **घनफल** = लांबी, रुंदी व जाडी यांचा गुणाकार.]

घन पुं. मेघ, ढग. A cloud.
[सं. **घन–मेघ**, √ **हन्**, (वैसं.) **घन्** ; **घनचक्कर** = मेघांचा समुदाय, हातघाई ; **घनश्याम** = मेघाप्रमाणें काळासांवळा.]

घनघोर वि. भयंकर, गर्दीचें, तुंबळ. Thick, dense, close, heavy, hand to hand.
[सं. **घन+घोर** शब्दाची घटना किंचित् चमत्कारिक आहे. घन हें विशेषण आणि घोर हेंहि विशेषण, दोन्ही विशेषणांचें समस्त पद झालें आहे, अर्थ **आधिक्य**.]

घनपाठ पुं. वेदाचा विशिष्ट पाठ. A particular way of reciting the Vedas.
[सं. **घन** = वेदपठणाची विशिष्ट रीत (**संहिता, पद, क्रम, घन, जटा, माला** इत्यादि निरनिराळ्या पठणपद्धति आहेत.)]

घनाक्षरी स्त्री. वृत्तविशेष (१६ चरणांचा, चारपादांचा). A particular metre.
[सं. **घन + अक्षर**.]

घबाड न. आकस्मिक मोठा लाभ, एक शुभ मुहूर्त. An unexpected gust of Fortune's favours, a windfall, an auspicious period.
[**घबाड** मुहूर्तांची एक विशिष्ट गणना आहे. सूर्यनक्षत्रापासून चंद्रनक्षत्रापर्यंत नक्षत्रें मोजून त्याला तिनांनीं गुणून गुणाकारांत चालू तिथि मिळवून आलेल्या संख्येला सातांनीं भागून तीन उरल्यास त्या दिवशीं हा योग येतो. ह्या शुभ मुहूर्तावर कार्य केल्यानें फलप्राप्ति होते. त्यावरून अचानक रीतीनें प्राप्त झालेला लाभ, असा अर्थ प्राप्त झाला.]

घम स्त्री. क्षमा, गय, सहन. Forbearance, putting up with (an offence.)
[अर. **घम्** = **दुःख** (**गम खाणें–घम् खुर्दन्** ह्या फारसी प्रयोगावरून मराठींत रूढ झाला.) ; पेकाम. **गम, गमी** = शोक, दुःख (राज ७–१४२).]

घमघम पुं. अ. पुष्कळ सुवास. Diffusive fragrance.
[ध्वनिशब्द ; प्रा. **मघमघ** (वर्णव्यत्यास) घमघम ; अकामसा. **घमघमाट** = अत्यंत दरवळलेला वास–सुवास.]

घमघम(णें) अक्रि. सुगंध–वास पसरणें, फैलावणें. To smell sweetly and strongly.
[सं. (?) ; प्रा. **मघमघ** (वर्णव्यत्ययानें मराठी घमघम) ; गु. **मघमघवूँ**.]

घमेंड, घमेंडी स्त्री. डौल, ऐट, ताठा, गर्व, समृद्धि, •अतिरेक. Pomp, overbearing, abundance, profusion.
[हिं. **घमंड** = गर्व.]

घमेलें नं. लोखंडी पाटी, टोपली. A basket-like vessel made of iron.
[*Portu*. Gamelo; सं. **घर्म** = **कढई + आलय** ; प्रा. **घम्म + आलय** (श. को.) ही श. को. कारांची व्युत्पत्ति आहे. घर्म आणि घमेलें ह्यांचा संबंध हा ओढाताणीचा आहे. शास्त्रसंमत नाहीं. हा पोर्तुगीज शब्द आहे आणि तो सोळाव्या शतकांत मराठींत आला.]

घर^{१} न. रहाण्याचें वस्तीचें ठिकाण. A house, a habitation, a household.

[सं. **गृहम्**; पा.प्रा. **घरम्** (पुं. न.); बं. **घर्**; ओ. **घर**; का. **गर**; सिंह. **गर**; वि.हिं.पं. **घर्**; सिं. **घरु**; गु. **घर**; ने. **घर्**; अकामप्र. **घर** = उत्पत्तिस्थान, रोग, प्रमाण, गमक, सामर्थ्य, सदर, बायको, कुटुंब इत्यादि लाक्षणिक अर्थ रूढ आहेत. **घर करणें** = बिऱ्हाड करणें; **घरबेणा** = घराचा, संसाराचा नाश करणारा (नामदेव अभंग); **घर डोक्यावर घेणें** = गोंधळ करणें; **घर धरून बसणें** = घरांत बसणें; **घर धुऊन नेणें** = घरांतील सर्व चीजवस्त नेणें; **घर पालथें घालणें** = सर्व घरांत धुंडाळणें; **घर फोडणें, घरफोडी** = घर फोडून चोरी करणें; **घर बुडविणें** = घराचा नाश करणें; **खाल्ल्या घराचे वांसे मोजणें** = कृतघ्नपणा करणें; **घराला रामराम ठोकणें** = कायमचें सोडणें; **घरीं येणें** = मुलगी विधवा झाल्यानें माहेरीं राहण्यास येणें; **घरकज्जा** = घरभांडण; **घरकाम** = घरांतील काम–भांडीं घासणें वगैरे. **घरबशा, घरकोंबडा, घरपिसा** = घरांत नेहमीं राहणारा, घराचें वेड असणारा; **घरखर्च** = घरांतील खर्च; **गृहगोहो** (गृहगोधः) = घरांत बायकांपुढें शौर्य दाखविणारा; **घरजावई** = सासऱ्याच्या घरीं राहणारा जावई; **घरठाण** = घराच्या इमारतीची जागा; **घरदार** = घरप्रपंच, पसारा; **घरधणी–धनीन** = घराचा मालक, – मालकीण; **घरपट्टी** = घरावरील कर; **घरभर** = सर्व घरांत; **घरमेढ्या** (सं. **गृहमेधिन्**; प्रा. **मेढी**) = घरांतील मुख्य; **घराचार** = घरांतील धार्मिकविधि, प्रपंच (< **गृहाचार**); **घराणें** = वंश, कुळ. (हिं. **घराना-णें**); **घरवाडी** = घराची जागा वगैरे; **घरकुल** = लहान घर (घर + कुल–अल्पार्थें प्रत्यय); **घरगुती** = घरांतील, घरचा; **घरचा** = घरांतील, घरासंबंधीं, नवरा; **घरटें, घरटा** = पक्ष्याचें घर; **घरट, घरटी** = भात भरडण्याचें जातें, प्रत्येक घरांत (गृहम्प्रति); **घरंदाज** = गृहस्थाश्रमी, कुटुंबी (घर + अंदोझ = मिळणें); **घराऊ** = घरगुती; **घरोबा** = स्नेहपरिचय (गु. **घरोबा**).]

घर^{२} न. कांट्याचें भोंक, उंदराचें घर. A hole.

[सं. **गर्त** = खळगा, भोंक; अर. **घार** = जखम.]

घर^{३} न. सांठा, ठिकाण, छिद्र. A receptacle, rigion, hole, cavity.

[प्रा. **घरग, घरड**; बं.ओ. **घरा**; अशी व्युत्पत्ति टर्नर देतो; परंतु '**गृह**' पासून काढणें हा सरळ मार्ग आहे. हा शब्द पुंल्लिंगीहि '**घरा**' म्हणून रूढ आहे. त्याचा अर्थ जखम, व्रण, भोक असा आहे परंतु हा अर. **घार** = जखम ह्याशीं संबद्ध असावा.]

घरा पुं. जखम, व्रण. A little hole or cavity.

[अर. **घार** = जखम.]

घरांत (अ.) घर ह्या शब्दाचें सप्तमीचें एकवचनी रूप. परंतु ह्याला लाक्षणिक अर्थ प्राप्त झाला आहे. कुटुंब, स्त्री, प्रपंच, नवरा, यजमान वगैरे लक्षणेनें आलेले अर्थ परिचित आहेत. '**घरांत**' हा शब्द अव्यय समजून त्याचा वाच्यार्थ दिला आहे. उदा. घरांत बरें वाटत नाहीं=पत्नीची प्रकृति नीट नाहीं.

[सं. **गृह. गृहशब्दो भार्यायाम् वर्तते** (आश्वलायन गृह्यसूत्र, गार्ग्यनारायणीय वृत्ति १-१-११.); परंतु ह्या ठिकाणीं हा अर्थ लाक्षणिकच नाहीं कां ? गृह शब्द अनेकवचनीं वापरला म्हणजे असाच विस्तृत अर्थ होतो व त्यावरून एका प्राचीन समाजरूढीचें दिग्दर्शन होतें.]

घरंघळ(णें) अक्रि. खालीं घसरणें, सरणें. To slide or roll down or along.

[सं. घृ=**क्षरणे**, (अभ्यास) **घर्घृ, घर्घर**.]

घरघर स्त्री. मुमूर्षूंच्या हृदयाचा प्रतिष्टंभ, हृदयाची क्रिया बंद होणें, मृत्युसमयीं घशांतून घरघर असा आवाज निघणें, शेवटची अवस्था. The particular sound that comes out of the throat just before death, hence–the last stage of death, rattling or rumbling sound.

[सं. **हृद्ग्रह** (ना.); ध्वनिशब्द, √**घरघर**; कान. **घरघर** (विशिष्ट आवाज).]

घरबारी पुं. कुटुंबी गृहस्थ. A family man.

[सं. **गृहद्वार**; हिं. पं. **घरबार**; सिं. **घरबारू**; गु. **घरबार**.]

घर्षण न. घासणें. Rubbing.

[*IE*. Ghrs; सं. **घृष्**; *Lat*. Fri (Friare); *AS*. Cwirn; *ME*. Quern.]

घण(णें) अक्रि. जाणें, निघून जाणें. To leave, to abandon.

[सं. **हन्** २ गतिकर्मा (निरुक्त), **गृह** १ ग्रहणे; याकाम. **घलणें**.]

जैसा घरिं आपुला । वानिवसें वन्हि लागला ॥
तो आणिकाहीं पाजलला । जालौनि घली ॥ रा. ज्ञा. १-२५७

घवघव(णें) अक्रि. (वास) भरून जाणें, चोहोंकडे दरवळणें. To emit a strong and spreading fragrance.

[सं. **गह्** १०=निबिड असणें (द्वित्त्व); प्रा. **घमघम** (वर्णव्यत्यास), **घवँघवँ**; अकामसा. **घवघव,-वां** = गजबजून, दाट, गच्च; **घवघवी** = ठळक, स्पष्ट; **घवघवीत**= पुष्कळ, ठळक, गुबगुबीत.]

घव्य वि. तेजस्वी. Brilliant.

[सं. **गह्** ?, **घुंस्** १ दीप्तौ.]

घसर(णें) अक्रि. खालीं पडणें, गळंगणें, निसरणें, निसटणें, चाल करणें, चुकणें. To slip, to fall upon, to assail.

[सं. **घृष्+सृ**; प्रा. **घस्सर**; कु. **घसोरणो**; हिं. **घिसटना**; पं. **घसरना**; गु. **घसाळो**; अकामसा. **घसरपट्टी** = घसरा, खरड; **घसरा** = सपाटा, राग, व्यापारांतील तूट, नुकसान, कमी होणें.]

घंस स्त्री. तोटा, नुकसान, उपद्रव. Loss in trade.

[सं. **घृष्**; प्रा. **घस**; अकामसा. **घसवस** = घासाघीस, कटकट, कुरकुर; **घसण** = तूट.]

घंस पुं. झुपका. A bunch or cluster.

[म. **घोंसचा** संक्षेप.]

घसकन्-कर-दिशीं अ. एकदम, सर्व. Words formed to express promptness or smartness of action.

[ध्वनिशब्द; धान्य एकदम घेतांना असा आवाज होतो. अकामसा. **घसघशीत** = पुष्कळ, पुरेपुर, भरपूर.]

घसट(णें), घस्ट(णें) उक्रि. घासणें, ओरखडणें, घासून जाणें. To rub against (as in passing.)

[सं. **घृष्** १ संघर्षे; (निष्ठा) **घृष्ट**>(वर्णागम) **घसट** किंवा **घस्ट**; प्रा. **घस्ट**; अकामसा. **घष्टा** = घसडा; **घसट, घसण** = घरोबा, परिचय; **घसणी** = घर्षण, खर्च, नाश.]

घसवट(णें) अक्रि. झिजणें, घासलें जाणें. To rub off, to waste.

[सं. १ **घृष्** १ संङ्घर्षे+**वट्** १० विभाजने, **वृत्** १ वर्तने (द्विधातुसंयोग), २ **घर्षपट्टिका**, परंतु हा नामधातु ‘ घसट ’ (< **घृष्ट**) पासून सिद्ध झालेला दिसतो. घसाटा, < घसोटा, < घसवटा अशीं इतर नामें त्यापासून सिद्ध झालेलीं आहेत. आणि घसवटापासून हा नामधातु आहे.]

घसास(णें) अक्रि. अतिशय दिपविणें. To illuminate extremely.

[सं. **घंष्, घंस्** १ दीप्तौ. (द्वित्त्व) **घसघस्**, **घृष्** = संघर्षे ह्याचें द्वित्व.]

येर जें क्रियाजात । तें तिखेयाचें करवत
ऐसें सबाह्य घसासित । तेयाचें गा ॥ रा. ज्ञा. १६–२४२

घसा पुं. गळयाच्या आंतील भाग, गळा. The gullet, the wind-pipe, the throat.

[सं. **घस्** १ अदने; अकामप्र. **घशांत घालणें, -उतरणें** = खाणें; **घशाबाहेर पडणें** = गिळंकृत केलेली वस्तु बाहेर पडणें; **घसा फुटणें, गळा फुटणें** = वयांत येणें (वयांत आलें म्हणजे आवाज मोठा होतो); **घसा वाजणें**= घोरणें.]

घसाघसां अ. एकदम, बेसुमार, घस्घस् असा आवाज, गवत कापतांना, किंवा पदार्थ खातांना होतो त्यावरून. (Imitation of sound as that of sudden cutting etc.); lavishly spending, recklessly gulping.

[ध्वनिशब्द, **घस्घस्**; सं. **घस्** १ अदने.]

घस्त स्त्री. गस्त, पहारा, खण. Patrolling, scouting.

[फा. **गश्त्**; **गस्त** पहा.]

घस्मर वि. ओबडधोबड, जाड, खादाड, आधाशी. Coarse, thick, strong, gluttonous, devouring.

[सं. **घस्मर.**]

घळ(णें) अक्रि. धुपून जाणें (नदीची माती वगैरे); नाककानाचें छिद्र मोठें होणें. To be torn or worn into furrows.

[सं. **घृ** १० प्रस्रवणे, क्षरणे; **ग्लह** (ना.), √ **ग्लह्** ग्रहणे; अकामसा. **घळ, घळण** = गुहा, खोलगट जागा, दरी, भेग, नदीच्या प्रवाहानें झालेली खोबण; **घळघळ, घळघळां**= घटघटां, पुष्कळ (< **घळ** < **घृ** किंवा **गल्**).]

घळघळ(णें) अक्रि. सैल होणें, ढिले होणें. To become loose, slack or relaxed.

[सं. **गल्** १ स्रवणे (द्विरुक्तिः); अकामसा. **घळघळा** = पुष्कळ, विपुल; **घळघळाट** = विपुलता, समृद्धि, भरभर.]

^{१}**घाई, घाइ, घाए** स्त्री. घाय, घाव, प्रहार, ठोका, दणदणाट. A cut, wound, dint.
[सं. **घात, घाति** ; √ घन्, – √ हन् २ प्रहरणे ; प्रा. **घाई** ; अकामसा. **घाइवटा = घाव, प्रहार.**]

^{२}**घाई** स्त्री. गडबड, जलदी, त्वरा, गर्दी, तातडी. Headlong eagerness, haste, hurry, precipitancy.
[सं. **गति**, √**गम्** ; अकामसा. **घाइटा** = गडबड, धांदल.]

घांगर(णें) अक्रि. घोटाळणें. To be confounded, to be scared or frightened.
[सं. **गर्ह्** > **गागर्ह.**]

घांघवस(णें) क्रि. शोधणें. To search.
[सं. **गवेष्** १० मार्गणे ; **गम्** (यङ्लुङन्त) **गंगम, गंगस** (रा.धा.) ; ही व्युत्पत्ति व्यर्थ पाण्डित्यप्रकर्षाची आहे. अकामसा. **घांग, घांघ** = सावधानीपणा, जाणीव, दखलगिरी.]

घागर स्त्री. पाणी भरण्याचें भांडें. A vessel.
[सं. **गर्गर** ; पा. **गग्गरो** ; प्रा. **गग्गरी** ; ब. **गागरी** ; ओ. **गागरा** ; वि. **गगरा** ; हिं. **गग्रा** ; गु. **गागर** ; ने. **गाग्रो.** मूळ संस्कृत शब्द ध्वनिवाचक आहे. भांड्यांत पाणी भरतांना हा आवाज होतो. अकामसा. **पालथ्या घागरीवर पाणी** = निरर्थक कार्य. **घागरगडचा सुभा** = घागरीनें पाणी भरण्याचें काम (ल.).]

घागरी स्त्री. कडदोऱ्यावरील घंटा किंवा मणी, घुंघरी. A bell or jingling bell (as of a child's girdle).
[सं. **घर्घरी** ; प्रा. **घग्घर** ; बं. **घाघ्रा** ; ओ. **घागुरी** ; हिं. **घाघ्री** ; सिं. **घाघिरो** ; गु. **घाघरी** ; (ह्यांतील कांहीं शब्दांचा अर्थ ‘ **स्त्रियांचें वस्त्र** ’ असा आहे. त्याची व्युत्पत्ति टर्नरनें हीच दिली आहे. ती चिन्त्य आहे. **घागुरमाळ** = बैल हत्ती वगैरेंच्या गळ्यांतील घुंघुर (घुंघुरमाळ).]

घागरी-ऱ्या वि. लहंगा, वस्त्र. A female garment, a sort of petticoat.
[ध्वनिशब्द. देप्रा. **घग्घर** = स्त्रियांचें वस्त्र ; हिं **घघरा**, गु. **घाघरो** ; सिं. **घघिरो** = घागरी (पलटण).]

घागाइ(णें) अक्रि. ओरडणें. To cry.
[सं. **ड्ड** > **ङोङ्गय** > **गोंगाव** > **घांगाव** ; याकाम. **घांगाइ** (ज्ञा.) ; अकाम. **घांगावणें** = भिणें, घाबरणें.]

घांघुस(णें) क्रि. घासाघीस करणें, बारकाईनें शोधणें. To higgle-haggle, to search minutely.
[सं. **घृष्** १ संघर्षे. २ **गवेष्** १० मार्गणे (रा. धा.) परंतु ही व्युत्पत्ति दूरान्वित आहे.]

घांची पुं. ज्ञातिविशेष, तेली. A particular caste.
[सं. (?); देप्रा. **घच्चिय** ; गु. **घांची** ; देप्रा. **घाण** = तेलाचा घाणा किंवा कान. **गाण** ह्या शब्दांचा संबंध असला पाहिजे हें उघड आहे.]

घांट स्त्री. घंटा, वाद्यविशेष. A bell.
[सं. **घण्टा, घण्टिका**; पा. **घण्टा** ; प्रा. **घण्टा, घंटिया**; ओ. हिं. **घण्टा** ; पं. **घण्डा** ; सिं. **घण्डो** ; ने. **घाँडो.** का. **गट, गुरु.**]

^{१}**घाट, घाटा** पुं. चणा, हरभऱ्याच्या रोपट्याचें फळ, शिखर. A pod of gram, the top.
[सं. **ग्रंथ्** १ बंधने > **ग्रंथ**=समूह. प्रा. **घट्ट.**]

^{२}**घाट** पुं. धरण, बंधारा, धक्का, उताराची जागा, ओलांडण्याची जागा (नदीचा, डोंगराचा घाट). Wharf, stairs, landing place.
[सं. **घट्ट, घाट्ट** ; देप्रा. **घट्ट** (पुं) ; बं. **घाट, घट, घाइट** ; ओ. **घाट** ; हिं. पं. **घाट्** ; किंवा (सं. **घाटा** ह्या शब्दापासूनहि व्युत्पत्ति शक्य आहे.) अकामप्र. **घाटांत अडवणें**–अडचणीच्या जागेंत धरणें ; **घाटनाळ**=डोंगरांतील खिंड ; **घाटपांडे**=(आडनांव), घाटांतील जकात वसूल करणारा कारकून ; **घाटमाथा**=डोंगराचा माथा.]

^{३}**घाट** पुं. नदीकांठावर बांधून काढलेल्या पायऱ्या. Steps.
[सं. (?); देप्रा. **घट्ट** (पुं.) ; याकाम. **घाट.**]
जेहिं गगना लोहें बांधौनि घाट्ट : घोडे आणिले खेचरांचे ॥
नरुस्व. २६५

घाट(णें) उक्रि. योजणें, बेत करणें, पळीनें घोटणें (वरण), बनाव होणें. To bruise (with a ladle), to have a project.
[सं. **घट्** १० चलन, संघाते, **घट्टन** ; प्रा. **घट्टण**; बं. **घाँटा** = ढवळणें.]

^{४}**घाट** पुं. आकार, घडण, रचना, हेतु, योजना (लक्षणा). Form, figure, fashion, plot, project.
[सं. **घट्** १० संघाते ; गु. **घाट** ; सिं. **घाट्टु** ; अकामसा. **घाट घालणें** = बेत करणें ; **घाटण** = घट्ट वरणाचें कालवण ; **घाटणूक** = घटना, घाटाघाट–वाटाघाट.]

घांटी स्त्री. गळयाचा मणी, मणका, घसा, लहान घांट. The throat, the larynx, a small bell.

[सं. **घंटिका** ; प्रा. **घण्टिआ** ; पं. ल्हां. **घण्डी** ; गु. **घाँटी** ; अकामप्र. **घाटी फुटणें**=घसा मोठा होणें ; **घाटीखालीं उभे राहणें**–शपथ घेण्याचा एक प्रकार, दिव्य; **घाटी रोग**=जनावरांचा गळ्याचा रोग ; **घाटीकोर**=नरडी ; **घटसर्प**=गळ्याभोवतीं शिरेचा सापासारखा विळखा पडणें (रोग)].

घाड(णें) सक्रि. घडविणें, घडवणें. To frame, to shape.

[सं. **घट्** (णिच्); **घाटय** > **घाड** ; अकामसा. **घाड**=एक प्रकारचें चाक, सोनाराचा, विणकऱ्याचा, लाकडी सांचा.]

घाण(णें) अक्रि. घाण उत्पन्न होणें, वास येणें. To stink, to smell strongly.

[सं. **घ्रा** १ गन्धोपादाने ; प्रा. **घाण**, **घ्राण** (नाधा.); संस्कृतमधील नाम घ्राण ह्यापासून धातु सिद्ध झाला व त्याच्या अर्थाचें विशेषीकरण झालें. **घ्राण**=**गन्ध**; परंतु मराठींत घाण (तद्भव)=दुर्गंध–विशिष्ट प्रकारचा गंध असा मर्यादित झाला. त्यापासून घाणणें हा नाधा.]

^{१}**घाण** स्त्री. चुन्याचा घाणा, घाणी. A lime mill.

[कान. **गाण**; देप्रा. **घाण** ; अकामप्र. **घाणा भरणें**=धार्मिक मंगलविधींत धान्य कांडण्याचा विधि करणें; **घाणी**=घाण, दुर्गंध, घाणा.]

^{२}**घाण** स्त्री. वास, गंध, दुर्गंध, ओंगळ वास, केरकचरा, अव्यवस्था, दुर्दशा (लक्षणा). Stinking smell.

[**घाणणें** पहा. अकामसा. **घाणवट–घाणट**=दुर्गंधयुक्त ; **घाणेरडा, घाणेरा**=मलीन, वास मारणारा ; **घाणेरी**=एक प्रकारची वनस्पति.]

घाणा, घाणी पुं. चरक, ऊंस किंवा दुसरा पदार्थ गाळण्याचें यंत्र, रस काढण्याचें यंत्र, तेल गाळण्याचें यंत्र. The wheel-rut of a mill.

[कान. **गाण**=तेल काढण्याचें अगर ऊंस गाळण्याचें यंत्र, चक्की ; देप्रा. **घाण** (पुं.); सं. **घातनम्**, **घातनी** ; प्रा. **घायण** ; बं. **घानी** ; बि. **घानी** ; हिं. **घाना** ; पं. **घाण** ; सिं. **घाणी** ; गु. **घाण** ; ने. **घान**.]

घात(णें) सक्रि. मारणें, नुकसान करणें, घात करणें. To strike, to ruin.

[सं. **घात्** > **घातय** ; (√हन्,–√घन्); **घातिल(णें)**, निष्ठा–(घात + ल).]

अथवा निधान हें प्रगटलें । म्हणौनि खधिरांगार खोलें
भरिलें । कां साउली न पातां घातलें ॥ कुहां सिहें ॥

रा. ज्ञा. ९–१४८.

^{१}**घात** पुं. मार, वध, संहार, घाव, घिघाड, नाश, विध्वंस. Killing, striking destruction; ruin, boiling.

[सं. **घातः** √हन्, (**निष्ठा**) **घात** ; अकामसा. **घातकरी**, **घातघेणा**=घात करणारा. **घातचतुर्दशी**, **घायाळचतुर्दशी**=लढाईत मेलेल्या अज्ञात पितरांची श्राद्धतिथि, भाद्रपद वद्य चतुर्दशी ; **घातपात**=अनिष्ट प्रकार ; **घातुक**=घातक, हिंसक.]

^{२}**घात** वि. अशुभ, घात (वार). An inauspiciuos day (of the week).

[सं. **घात्य** ; प्रा. **घत्त**.]

^{३}**घात** पुं. (गणित) समान संख्यांचा गुणाकार. Amount of a multiplication, product.

[सं. **घात**=गुणाकार (लक्षणा), √हन्.]

^{४}**घात** स्त्री. शेतीच्या कामाची योग्य वेळ, मोसम, हंगाम. The proper time or period, season, period of abundance.

[सं. हन् (?) ; अकामसा. **घातीचे दिवस**=हंगामाचे दिवस ; **घातघेणा**=अवसानघातकी.]

घाप(णें), **घापत(णें)** सक्रि. घालणें, घातलें जाणें, घालवून सोडणें, घेणें. To put in, to be put in, to take.

[सं. **गृभ्** (णिच् कर्मणि); याकाम. **घापे** (अमृ. ७-१९०).]

घाबर(णें) अक्रि. भिणें, गोंधळणें, बावरणें, आकुलणें. To be scared, to be overcome with fear.

[सं. **गह्वर** ; प्रा. **गब्भर** ; देप्रा. **घब्बर** ; बं. **घाब्रान**; ओ. **घाबरा** ; हिं. **घाबर** ; पं. **घाबरा** ; सिं. **गभीरो** ; गु. **घाबरु** ; म. **घाबरा, घाबिरा, घ्राब्रा** ; सिंधी भाषेंतील शब्दावरून अशी कल्पना होते कीं ह्या सर्व शब्दांच्या मुळाशीं ‘ गभीर ’, ‘ गहिर ’ हा संस्कृत शब्द असावा. कान. **गाबु**=भीति.]

घाम पुं. उष्णतेनें अंगांतून निघणारें पाणी, स्वेद, पाझर, द्रव. Sweat, perspiration,

[*IE.* Gher; सं. **घर्म**; *Av* Garema; *Gr.* Thermos; *Lat.* For-mus; *Pruss.* Gorme; *Russ.* Gornu; पा. प्रा. **घम्म**; बं. **घाम**; ओ. **घमेरा**; हिं. **घाम**; गु. **घाम**; ने. **घाम**; अकामसा. **घामट** = ओंगळ, घामानें भरलेला; **घामाघूम** = घामानें भरलेली स्थिति (घाम + कान. **गुमि** = आधिक्य); **घामावणें** = घाम येणें; **घामोळें** = घामानें उठणाऱ्या पुळ्या, घाम पुसण्याचें फडकें (**घर्म-वलय**).]

^{1}**घाय** पुं. जखम, प्रहार, आघात, तडाखा. A wound, a cut or stroke with a weapon.

[सं. घातः √हन्-घन्; प्रा. **घाय, घाअ**; गु. **घा, घाव**; सिं. हिं. **घाऊ**; पं. बं. **घा**; याकाम. **घाय** (नरुस्व. २५४); अकाम. **घाय, घाव**; का. **गाय** = **घाव, प्रहार, आघात** हा ताडून पहाण्यासारखा आहे.]

^{2}**घाय, घाई** स्त्री. त्वरा, घाई, गडबड. Haste, hurry.

[सं. **गति** पासून किंवा **घाति** पासून. गमनक्रिया किंवा हनन(हिंसा)क्रिया ह्याच्या मुळाशीं आहे. त्यापासूनच त्वरेची कल्पना उद्भुत होते. ‘ त्वर् ’ हा धातुहि गत्यर्थच आहे. बोलण्याच्या क्रियेपासूनहि घाईची कल्पना निघणें शक्य आहे. गडबड ह्यामध्यें बोलण्याची क्रिया अभिप्रेत आहे. अकाम. **घाई**; अकामसा. **घायकटर** = मार खाणारा, कोडगा. **घायवट-वटा** = जखम; **घायबारा** = व्रण.]

घायकूत स्त्री. मोठी धांदल, गडबड, उतावळेपणा. Vehement excitement and eagerness.

[सं. **हय्** १ गतौ + **कुथ्** १ हिंसाक्लेशनयोः (**रा. धा.**) अकाम. **घायकुतेपणा** = अस्वस्थता; **घायकुत्या** = अस्वस्थ-वृत्तीचा मनुष्य. परंतु ही व्युत्पत्ति अवास्तव पाण्डित्यप्रकर्ष दाखविते. ह्यापेक्षां सं. **घाति** (**गति**) = गडबड, त्वरा ह्या शब्दापासून निष्पादणें अधिक सशास्त्र होईल.]

घायताव(णें) सं. क्रि. घाई करून ताप देणें, घाई करावयास लावणें. To urge into precipitation and confusion.

[सं. **घाति + तापनम्.**]

घायपत-घायपात स्त्री. एक वनस्पति. A kind of plant.

[सं. **१ घातपत्र** (पातें असतें त्यावरून); **२ कक्खटपत्र-खाअपात.**]

घायतळ न. (जमिनीवर पडून येणारी) **मूर्च्छा, घेरी.** Giddiness, dizziness.

[**सं. घात + तल.** प्रहारानें व्याकूळ होऊन आलेली मूर्च्छा.]

घायाळ वि. जखमी, जखमेनें बेजार. Wounded, hurt by a cut.

[**सं. घात + इल्ल; कु. घैल; बं. घाइल; ओ. घाइला;** हिं. पं. **घाइल**; गु. **घाटोल**; ने. **घायल**; अकामसा. **घायाळचतुर्दशी** = युद्धांत घायाळ झालेल्या अज्ञात वीराच्या सन्मानाचा दिवस-श्राद्धदिन, भाद्रपद वद्य चतुर्दशी.]

घार(णें) अक्रि. शिंपडणें, भिजविणें, व्यापणें, चढणें, घेरणें. To sprinkle, to make wet, to spread over, to occupy, to surround.

[सं. घृ १० प्रस्रवणे; प्रा. **घार**; याकाम. **घारणें** (ज्ञा. ३-१९६, १०-१५८.)]

घार स्त्री. पक्षिविशेष. A kite.

[सं. **गृध्र**; √ **गृभ्**, √ **ग्रह्**; देप्रा. **घारी** (दे. ना. १०७); (गिध, गीध, गिधाड पहा.)]

घारगा पुं. तांबडा भोपळा, कणीक, गूळ घालून तळून केलेली पुरी-चांदकी. A fried cake or pat of grit (of wheat).

[प्रा. देप्रा. **घारिया**; गु. **घारी**; कान. **गारिगे**; √ **घारिसु** = तळणें; सं. **घार्तिक** (भोकें पडलेलें एक खाद्य), **घार्तिकः > घारिगा > घारगा** (पंचतंत्र) हें नंतरचें संस्कृतीकरण आहे. मूळ शब्द देशी किंवा कानडी आहे.]

घारा वि. रंगविशेष, मांजराच्या डोळ्यांसारखा (रंग). A particular colour-the colour of the cat's eyes.

[**सं. गहिरः, गभीरः, गव्हरः** (?); प्रा. **गहीर**; याकाम. **गहिरुं**; पं. **गहीरा** (काळसर); हिं. **गहरा.**]

घारी स्त्री. पक्वान्नविशेष, पुरण किंवा मावा घालून तळलेली पुरी. A wheaten cake stuffed and fried.

[सं. **घार्ति(कि)का**; प्रा. देप्रा. **घारिया**; गु. **घारी** (पुरी); घारगा पहा.]

घाल(णें) सक्रि. आंत ठेवणें, स्थित करणें, टाकणें, लावणें, जडविणें, आरंभ करणें. To thrust into, to put on, to throw, to fling.

[सं. **ग्रह्, ग्लह् १० ग्रहणे** (णिच्); प्रा. **घल्ल**; अप. **घल्ल** (क्षिप्); गु. हिं. **घाल**; पं. **घल्ल**. इतर संस्कृत

धातु संबद्ध असणारे **जिघर्ति, गलति** ; प्राकृत पिंगल-पअअहि न घल्लसि (पदमपि न ददासि); याकाम. **घालणें** = टाकणें (ज्ञा. १५-५८३), = उडी टाकणें (ज्ञा. १४-१९), = पडणें (ज्ञा. १६-११८); अकाममध्यें ह्या धातूला पंधरा भिन्न अर्थ आहेत. त्यांतील बरेच लाक्षणिक आहेत. **घालून घेणें** = अंग टांकून देणें. अकामसा. **घालकाढ** = ठेवकाढ, उपसाउपस; **घालपिसा** = वेड्याचें सोंग घेणारा. **घालमेल** = घोंटाळा, गोंधळ, तगमग ; **घालवेडा** = घालपिसा, खोटा वेडेपणा आणणारा.]

^{2}**घाल(णें)** सक्रि. ओतणें. To pour in, to throw in.

[सं. **घरति, जिघर्ति** ; अप. **घल्लई** ; हिं. **घलवा** ; **घालना**; पं. **घल्लणा** ; गु. **घालवूं** ; ने. **घलवा**.]

^{3}**घालणें** सक्रि. हल्ला करणें, घाला घालणें. To attack.

[सं. **घातय (त=ड=ल)** ; याकाम. **घालणें** = हल्ला करणें (नरुस्व. २७६); अकाम. **घालणें, घाला, घालून पाडून बोलणें**=लागेल असें उपरोधिक बोलणें, मानखंडना होईल असें बोलणें. ह्या प्रयोगांतील घालून आणि पाडून ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच आहे. आधिक्य साधण्यासाठीं द्विरुक्ति केली आहे.]

घालव-घालवि(णें) सक्रि. हाकून देणें. To turn away, to cast out, to expel.

[सं. **कल्** १० क्षेपे (कालयति), **गर्ब्** **१ गतौ**. . ह्या व्युत्पत्ति अवास्तव पाण्डित्यप्रकर्ष दाखवितात परंतु 'घाल' ह्याचें वरील रूप हें णिच् आहे हें उघड आहे.]

घाव, घाय पुं. जखम, आघात, मार, नुकसान, तोटा, टोला, सपाटा. A wound, a cut or stroke with a weapon, loss.

[सं. **घात**, √**हन्** २ हिंसायाम् ; पा. **घातो** ; प्रा. **घाअ** ; बं. ओ. **घा** ; हिं. **घाव** ; पं. **घा, घाउ** ; सिं. **घाऊ** ; गु. **घा, घाव** ; अकामसा. **घावडाव** = योग्य संधि (घाव घालण्यास किंवा डाव साधण्यास योग्य संधि, परंतु 'डाव' केवळ ध्वनिशब्द आहे.)]

घाशीरामी स्त्री. कोंडमारा, जुलुमी अमंल. Suffocating crowdedness, tyrrany.

[बारभाईच्या कारभारांत नानाफडणीस मुख्य दिवाण असतांना घाशीराम हा एक उत्तरहिंदुस्थानचा मनुष्य पुण्याचा कोतवाल होता. त्या अधिकारावर असतांना त्यानें तेलंगी द्रावीड ब्राह्मणांना एक लहान कोठडींत कोंडून ठेविलें. त्यामुळें त्यांतील कांहीं ब्राह्मण मेले. ह्या जुलुमी कारभारावरून '**घाशीरामी**' हा शब्द रूढ झाला.]

घास(णें) सक्रि. चोळणें, उघाळणें, घर्षण करणें, खरडणें; वाद करणें, त्रास होणें (ल.). To rub, to scrub, to chide, to scold.

[*IE*. Ghrs; सं. **घृष्**; *Gr*. choros; *Lat*. Fri; १ सं. **घृष्** ; प्रा. **घंस, घस** ; बं. **घसा** ; ओ. **घंसिबा** ; हिं. **घसना, घिसना** ; पं. **घसणा** ; सिं. **गहणु, घशों** ; गु. **घसवूं** ; अकाम. **घासाघीस** = जिकीर ; **घासी** = कष्ट, त्रास ; २ **घर्ष** ; पा. **घंसति** ; गु. **घासवूं** ; ३ **घृष्यते** ; हिं. **घसना** ; ४ **घृष्** = कान्तौ, मोत्यें घासणें.]

घास न. गवत (घोड्यासाठीं). Grass or hay.

[सं. **घाश**, √**घस्** **१** अदने ; पा.प्रा. **घास** ; का. **गस, गास** ; बं. **घास** ; ओ. **घास** ; बि.हिं. **घास** ; पं. **घाह्** ; सिं. **गाहु** ; गु. **घास्** ; ने. **घाँस्** ; अकामसा. **घासकाटणी** = घासकापणी, गवताची कापणी ; **घासकाडी** = गवताची काडी, समुच्चयानें-कडबा वगैरे ; **घासदाणा** = सैन्याचा शिधा (येथें घास <ग्रास) ; **घास घालणें** = भरविणें, नवऱ्यामुलामुलीनें एकमेकांस प्रथम घास घालणें (अर्थसंकोच झाला आहे.).]

घां(घां)सटणें सक्रि. खरचटणें, खरवडणें, लुब्राडणें. To undergo rubbing, (hence) to sustain a loss.

[सं. **घृष्** १ संघर्षे, (निष्ठा) **घृष्ट > घासट > घसट**.]

घाळ वि. गहाळ. Forgetful, blundering, missing.

[गहाळ पहा.]

घाळ(णें) अक्रि. कोरून छिद्र मोठें करणें, मार्ग चुकणें, गहाळणें. To be enlarged in the bore, to mistake or to err, to be astray.

[सं. **गव्हर** (नाधा.), **ह्वल्** **१ चलने** ;]

घिरट, घिरिट न. मोठें जातें, भात भरडण्याचें जातें. A large hand-mill.

[सं. **घरट्ट** (ना), **घृष्टिः** (√घृष्-संघर्षे); प्रा. **घरट्ट** ;]

घिसणें अक्रि. घासणें. To rub.

[सं. **घृष्** **१** संघर्षे ; **हिंस्** ७ हिंसायाम् ; बकाम. **घिसा-घिसाडी**.]

घिसा चतुरु अपाडेंसी ॥ ग्रंथराज २-६०.

घिसाडी पुं. ज्ञातिविशेष. A particular caste.

[परंतु हा शब्द एतद्देशीय-द्राविडी असावा अशी शंका येते.]

घिस्सा पुं. कुस्तींतील एक डाव. A certain twist in wrestling.
[सं. हिंस् ७ हिंसायाम् किंवा √घृष्.]

घीं न. तूप, कढविलेलें लोणी. Clarified butter, ghee.
[सं. घृतम्; पा. घतम्; प्रा. घअ, घिअ; बं. घी; ओ. घिअ; बि. घ्यू; हिं. घी; पं. घेओ; सिं. गिह्; गु. घी; ने. घिउ; अकामसा. घींवकेणी = तुपाचा व्यापार करणारा (घी + केणें = व्यापाराचा माल).]

घीस स्त्री. नुकसान, झीज. Loss, wasting.
[सं. हिंस् किंवा घृष्.]

घीवर पुं. पक्कान्नविशेष. A kind of dish.
[सं. घृतपूर, घृतवरः; देप्रा घारतो, घेवर (घृतपूरः दे.ना.); प्रा. घेऊर, घेवर; हिं घेवर; पं. घेउर; गु. घेवर; ने. घेवर.]

घुंघटी स्त्री. डोक्यावरचा पदर, कपडा, बुरखा. A cloak or cloth worn over the head.
[सं. (अव) गुंठण; प्रा. अगुट्ठ; प्रा. घुअटो, घुनाटो; हिं. घुघट; गु. घुंघर; पं. घुघर; पं. घुङ्गट; सिं. घुंघुटु; अकामसा. घुघा = उमललेली कळी; घुघा = खोळ, पावसासाठीं आच्छादन.]

घुंग पुं. घुंघुं करणारा कीटक, भुंगा. A humming insect, a bee.
[सं. ङु शब्दे. (ङोङूयते) ध्वनिशब्द.]

घुंगरूं न. लहान घंटी, घागरी A little jingling bell.
[सिं. घिंघिरू; हिं. घुंघरू.]

घुंगुरटें न. चिलट, मच्छर, डांस. A sand-fly, a gnat, a mosquito.
[कान. गुंगुरू = माशी, मच्छर; अकाम. घुंगरूट, घुंगुरटें, घुंगरटें.]

घुंघात(णें) अक्रि. (घुबडाचा) शब्द करणें, घूकाचा आवाज करणें. To utter a sound (as that of an owl).
[सं. घु १ शब्दे. घूक = घूं घूं असा आवाज करणारा पक्षी; अकामसा. घुंगाट, घुंघाणें. = घुबडाचा शब्द.]

घुटका पुं. पाण्याचा घोट. A gulp.
[ध्वनिशब्द "गुट"; कान. गुटकु = एकदां पिणें, कान. गुट्ड = पाणी पितांना होणारा आवाज. सं. घुट् = १ परिवर्तने; प्रा. घुट्ट; हिं. घूटना; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण असावें. मूळशब्द ध्वनीवरून किंवा कान. गुटकुपासून आला असावा.]

घुटमर(णें) अक्रि. मरतेवेळीं जीव अडकणें. To flicker or quiver in the last agonies.
[सं. घुट् १ परिवर्तने + म्लै १ हर्षक्षये.]

घुटमळ(णें) अक्रि. मागें घेणें, मन द्विधा होणें, To waver, to demur, to shilly-shally.
[सं. घुट् १ परिवर्तने+म्लै–१ हर्षक्षये. गुटमळ पहा.]

घुटवळ(णें) अक्रि. मरतांना प्राण अडणें, तडफडणें, आंचके देणें, झोंबाझोंबी करणें. To be convulsed, to struggle (as in death).
[सं. घुट् १ परिवर्तने + ह्वल् १ चलने (द्विधातुसंयोग).]

घुटी स्त्री. लहान मुलांना द्यावयाचें औषध (दूध, साखर व इतर औषधें घालून), उंसाचें पेरें, कांडें. Milk spiced and sugared (given to infants), a piece of sugarcane.
[सं. गुटि, गुंटिका; हिं. घुंटी; ओ. घुट्टी; कान. गुट्टि.]

^{1}**घुंड(णें)** अक्रि. मरणप्राय इजा होणें. To be wounded extremely.
[सं. गुड् १ हिंसायाम्.]

^{2}**घुंड(णें)** अक्रि. सिद्ध-तयार होणें, To be ready.
[घट् १ रचनायाम्.]

घुडगा, गुडगा–घा पुं. पिंडरी आणि मांडी यांमधील संधि, शरीरावयव. The knee.
[१ सं. ?; देप्रा. गोड्डुक; प्रा. गोड्डु, गोड; का. गोड; बं. गोर; ओ. गोरो (पाय); हिं. गोर्, पं. गोड्डो; सिं. गोडो; म. गुडघा. मराठी शब्दाच्या मुळाशीं देशी गोड्डुक हा शब्द असावा. २ देशी. घोटकः असेंहि एक रूप आहे. परंतु त्यापासून मराठी घोटा हा शब्द सिद्ध होतो.]

घुण पुं. लाकूड पोखरणारा किडा. An insect found in timber.
[सं. घुण; अकामसा. घुणाक्षर = किड्यानें आपाततः कोरलेल्या चिन्हावरून प्रतीत होणारीं अक्षरें. अकल्पित योजना–घटना.]

घुणा पुं. सोनाराच्या साखळीचा दुवा, गांठ, बिरडें, मणी. A link, a double link. खील, दांडा. A stick or bar.

[सं. **घुणा** (?) कान. **गुणी** = चावकाची मूठ.]

घुबड न. पक्षिविशेष, घूक, घू घू असा आवाज करणारा पक्षी. An owl.

[कान. **गूबे** = घुबड ; ह्या कानडी शब्दानेंच मराठी '**ब**' ची उपपत्ति बरोबर लागते. सं. **घूक** पासून निष्पादिला तर मराठी शब्दांतील '**ब**' ची उपपत्ति नीट लागत नाहीं.]

घुम(णें) क्रि. फिरणें, वळणें, वाटोळें फिरणें. To move, to turn, to turn round.

[सं. **घूर्ण् १ गतौ** ; प्रा. **घुम्मइ** ; देप्रा. **गुम्म** = हलणें, बं. **घुमा** ; ओ. **घुमाइबा** ; सिं. **घुमणु** ; हिं. **घूमना** ; पं. **घुम्मणा** ; गु. **घुमवूँ** ; याकाम. **घुमघुम**. **घूर्ण्** (सं.) पासून प्रा. **घुम्म** हा शब्द होणें कठीण आहे. प्राकृतवरून 'घुम' असा मूळ संस्कृत धातु असावा असा तर्क होतो. संस्कृत **घूर्ण्** व प्राकृत **घुम्म** हे धातु भिन्न मानणें हाच मार्ग अधिक शास्त्रीय होय. किंवा 'ङु' ह्याशीं संबंध आहे.]

घुंम(णें) अक्रि. सारखा आवाज होणें. दुमदुमणें, रेंगाळणें, अंगांत येणें, घुंघुं करणें. To resound, to ring, to fill air, to swell, to heave.

[सं. **घूर्ण्** ; प्रा. **घुम्म घुम्मण** ; हिं. **घुमना**. (फिरणें) ; सिं. **घुमणु**.]

नातरी महामेघांचे ऊमाले । घडघडीत एके वेले
कां घुमघुमी मंदराचले । क्षीराब्धि जैसा ॥ रा.ज्ञा. ११-४७९

घुंमघुम(णें) अक्रि. घुमघुम आवाज होणें. To sound deep.

[सं. **घूर्ण** ; प्रा. **घुम्म**.]

घुमट पुं. घर, देऊळ किंवा मशीद ह्याच्या शिखराच्या वरील वाटोळा भाग, डेरा. A dome.

[फा. **गुम्बझ्** ; हिं. **गुम्मट** = मनोरा, डेरा]

घुमर(णें), घुमार(णें) अक्रि. अंगांत आलें असतां शरीर हालणें, माजानें युक्त होणें, कैफ चढणें. To be under stupor or excitement of demoniac possession.

[सं. **घूर्ण् १ भ्रमणे** ; अकामसा. **घुमारा-रे** = भुतांचा अंगांत संचार, घुमणारा आवाज, मांत्रिक, पंचाक्षरी ; **घुमिली** = धुंद, माज आलेला, कैफांत असणारा.]

घुमरी स्त्री. (काव्य) लयलूट, विपुलता, चंगळ. Great copiousness or abundance.

[*IE*. Ghos; सं. **घस्मर** (?); *Av*. Gah; *Lat*. Hostia; *Leth*. Goste.]

घुंमा पुं. भोवऱ्यावर भोवरा मारणें,–मारून पडणारा वण, त्रासिकपणा. A hole or dint struck on a top.

[कान. **गुम्मु** = मारणें.]

घुंमा, घुम्या वि. मुकस्तंभ, जड, न बोलणारा. Reserved, silent but deep, sullen.

[सं. ?; प्रा. **गुम्म** = मुग्ध ; कान. **गुंब** = संकोच.]

घुमाऊ, घुमाव पुं. शेतकरी, गांवकरी यांजपासून सरकारी आकारापेक्षां अधिक घेतलेला वसूल, मक्ता. The excess above the government cess.

[सं. **घम्ब्** १ गतौ (?); हिं. **घुमान** = बैलांची एक जोडी जितकी जमीन नांगरूं शकते तितकी जमीन.]

घुरक(णें) अक्रि. ओरडणें, आरोळी ठोकणें. To cry aloud.

[सं. **घुर्** ६ भीमार्थशब्दयोः + **क स्वार्थे** ; अकामसा. **घुरकणी** = डुरकणी ; हिं. **घुरकना**, **गुरकणें** ; **घुरका** = डुरकणारा ; ओरडणारा.]

घुरघुर(णें) अक्रि. घोरणें, वाजणें. To grumble or rumble, to snore.

[सं. **घुर्** ६ भीमार्थशब्दयोः, (**द्विरुक्त**) **घुरघुरायते**, (ध्वनिशब्द) **गुरगुर** √ **गृ** शब्दे ; प्रा. **घुरुहुरंत** ; गु. **घुरघुर**.]

घुरघूस न. फकीराच्या हातांतील हत्यार. A weapon among fakirs.

[फा. **गुर्झ** = गुरगुण.]

घुरमळ(णें) अक्रि. घुटमळणें, रेंगाळणें. To hang about, to linger at.

[सं. **घूर्ण् १**, ६ **भ्रमणे** + **मूह्** ४ वैचित्ये.]

घुरदळ(णें) अक्रि. जुगार खेळणें, इकडे तिकडे उड्या मारणें, धुडगूस घालणें. To gramble, to rumple, to tread and trample.

[सं. **खुर्द्** १ क्रीडांयाम् अकामसा. **घुरदळा** = धिंगाणा.]

घुंरें न. फेंपरें, अपस्मार. Epilepsy, (a fit of it).

[सं. **घूर्णति**, **घूरति** ; [सं. **घूर्म** ; प्रा. **घुम्म**.]

घुरें न. एक प्रकारचें घाणीचें लाकूड, वनस्पति, एक प्रकारचा तांदूळ. A kind of rice or a plant.

घुर्मी स्त्री. तंद्री, आळस, सुस्ती. Sloth, dullness.
[फा. **गुर्मी**.]

घुल(णें) अक्रि. झुलणें, गरगर फिरणें. To swing, to turn round and round.
[सं. **घूर्ण्**; **घुण्** १ भ्रमणे ; प्रा. **घुम्म, घुल, घुलाय** ; अकामसा. **घुलव(णें)** (प्रयोजक) = घुलावयास लावणें, फसवून दूर नेणें; **घुलकाव(णें)** = फूस लावून नेणें (घुणकाम्य ?); **घुलकावणी** = फुसलावणी, चाळवणें; **घुल, घुला** = एक प्रकारचा मासा, कवडी; **घुलें** = सुकट (प्रा. देप्रा. **घुल्ला**).]

घुंवळ स्त्री. घेरी, भोंवळ. A swoon.
[सं. **घूर्ण्** ; प्रा. **घुम्म(आवलि) वळ.**]

घुस(णें) अक्रि. आंत शिरणें. To rush in or push in.
[सं. **गुध्** ४ परिवेष्टने, **गुह्** १ संवरणे ; बं. **घुसावन** ; हिं. **घुसना** ; पं. **घुसणा** ; गु. **घुसवूँ** ; ने. **घुस्नु** + (**लुङ्-स्, घुक्ष्**); बं. **घुसान**; हिं. **घुसरेना** ; पं. **घुसरणा**+ (**लुङ-स्, घुक्ष्**); अकाम. **घुसड(णें)** = आंत घालणें, शिरकविणें, खुपसणें; **घुसडा** = चेंदामेंदा ; **घुसणी** = खुपसणें.]

घुसमट(णें) अक्रि. गुदमरणें, चेंगरणें, कोंडमारा होणें. To be nearly suffocated or stifled, to be choking.
[सं. **गुह्** १ संवरणे + **स** (लुङ्) = **गुक्ष्**, **घुक्ष्** + **मृध्** ६ हिंसायाम् ; अकामसा. **घुसमाड** = कोंडमारा ; **घुसमर(णें)** = गुदमरणें ; **घुसमार(णें)** = घुसमटून मारणें.]

घुसळ(णें) सक्रि. मंथन करणें. To churn, to shake violently.
[सं. **घृष्** १ संघर्षे, **घूर्ण्** + **शल्** ; प्रा. **घुसल** ; देप्रा. **घुसलइ मथ्नाति** (१०९-१३); गु. पं. हिं. **घुस** = आंत शिरणें ; याकाम. **गुसळणें** (ज्ञा.); अकामसा. **घुसळा** = घुसळून काढलेला पदार्थ, लोणी ; **घुसळींव** = घुसळलेला ; **घुसळप** = घुसळणें ; **घुसळण** = घुसळण्याचें विरजण ; **घुसळखांब** = घुसळण्याची दोरी बांधावयाचा खांब.]

घुसळखाना, घुसलखाना पुं. आंघोळीची जागा. A bath-room.
[अर. **घुस्ल्** (=स्नान) + **खाना** (घर).]

घुंस्सा पुं. राग, क्रोध. Anger, a fit of passion.
[अर. **घुस्सा** ; बं. **घुस** ; हिं. **घुसा, घुस्सा** ; सिं. **घुसो**; गु. **घुस्सो.**]

घुंस्सा पुं. टोसा, गुद्दा. A stroke, a blow, a thump.
[म. **घुसणें** ; हिं. **घुसा**.]

घुळ(णें) अक्रि. फिरणें, लोळणें, गडगडत जाणें. To roll along, to troll.
[सं. **घुण्**, **घूर्ण्** १ भ्रमणे ; प्रा. **घुम्म** ; हा शब्द सं. **घूर्ण** पासून निघाला. परंतु प्राकृत धातूचा **घूर्ण्**शीं संबंध दिसत नाहीं. तेव्हा प्राकृत अपभ्रंश होण्याच्या पूर्वीचा ' **घुळ** ' असा एक देशी अपभ्रंश असावा असा एक तर्क आहे. अकामसा. **घुळघुळ(णें)** = गुरगुरणें, घुळघुळ असा आवाज करणें ; **घुळघुळां** = खळखळां, घळघळां.]

घुळी पुं. पोळ, देवाला सोडलेला वळू. A bull dedicated to god.
[सं. (**गौ**) **गॅलि** ; कान. **गूळी**.]

घूक न. घुबड. An owl.
[ध्वनिशब्द ; सं. **घूक** ; (घू घू असा आवाज करणारा पक्षी) द्रा. **गुक्**, **गूगी**.]

घूण पुं. लाकूड धान्य वगैरे पोखरणारा किडा. Weevil.
[सं. **घूणः** ; प्रा. **घूण** ; बं. **घुन्** ; ओ. **घूण** ; हिं. **घुन्** ; पं. **घुण्** ; सिं. **घुणो.**]

घूम पुं. अर्धी फेरी, अर्धें चक्कर. A half turn, or round.
[सं. **घूर्ण्** ; प्रा. **घुम्म** ; हिं. **घूम** = फेर.]

घूर्ण वि. (डोकें) फिरलेला, धुंद, माजलेला. Rolling (as of intoxication).
[सं. **घूर्ण्** १ भ्रमणे ; अकामसा. **घूर्णन** = गरगर फिरणें ; **घूर्णित** = गरगर फिरलेलें, फिरविलेलें.]

घूस स्त्री. उंदराच्या जातीचा प्राणी. The bandicote rat.
[सं. **गृहेशयाः** (?) ही व्युत्पत्ति प्राण्डित्यप्रदर्शक आहे. मूळ शब्द देशी असावा ; हिं. **घूस** ; पेकाम. **घूस** = (मोरो.).]

घृणा स्त्री. दया, कृपा, कींव. Compassion or pitifulness.
[*IE*. Gher (warm); सं. **घृ** १ **सेचने, लेपने** ; *Lat*. Form–; *Gr*. Ther ; *Old Pruss*. Gorme (warmth); सं. **घृणा**. ह्याच्या मराठी अर्थांत थोडासा बदल झाला आहे. मूळ अर्थ **दया, कृपा**. त्याचा अतिशय झाला किंवा अतिशय कींव उत्पन्न झाली म्हणजे ' **वीट** ' येतो. कंटाळा उत्पन्न होतो. फार **केविलवाणी** स्थिति **तिरस्कारास** कारणीभूत होते.]

घृत न. तूप. Clarified butter.

[*IE*. Gherto, Ghr = to sprinkle; सं. घृ (चोपडणें), **घ्रा** (वास घेणें); *Gr*. Ghri; *Lat*. Fra-, Gra; सं. **घृतम्**; संस्कृतमध्येंहि ह्याची व्युत्पत्ति चमत्कारिक आहे. हें निष्ठारूप आहे. मूळधातु घृ – वास घेणें, शिंपडणें, घेणें, तापणें, वितळणें ह्या अर्थाचा आहे. जें शिंपडण्या-,वास घेण्या-, तापण्या-, वितळण्या-, घेण्यासारखें आहे तें **घृतम्**. ह्या शब्दाशीं **घर्म** = उष्णता हा शब्द संबद्ध असावा. **घृतम् आयुः** अशा प्रकारचा समज ह्यामुळेंच झाला. बल व सामर्थ्य देणारा हाच पदार्थ. त्याच्या अर्थाचे इतर शब्द ह्याच अर्थाचे आहेत. उदा. **आज्यम्**, **नवनीतम्** इत्यादि.]

घृतकुल्या, मधुकुल्या स्त्री. गोड पक्कान्नांची चंगळ.

[सं. **घृत** + **कुल्या** (नदी); **मधु** + **कुल्या**. **घृत** आणि **मधु** ह्यांचे पाट. तुपाची व मधाची नदी. **घृतस्य कुल्या** (माध्यंदिनाय वाजसनेयी संहिता ६-१२).]

¹**घे(णें)** सक्रि. स्वीकार करणें, लेणें, अंगीकारणें, धरणें, समजणें, मानणें, जिंकणें, आणणें, स्थापणें. To take, to receive or accept.

[*IE*. Ghrebh, Gherebh; सं. **ग्रभ्**, **ग्रह्**;:*Av*. Grab, Garw; *Lith*. Grabus; *Eng*. Grab; वैसं. **गृभायति**, **गृह्णाति**; सं. **ग्रह्**; **घिण् १ गृहणे**; प्रा. **गेण्हाति**, **गिण्ह**, **गिण्ण**, **गेण्हइ**, **घेप्पइ**; सिं. **गिन्हणु**; ओ. **घेन्**; हिं. **गहना**; सिंह. **गन्नवा**; पं. **गहा**; का. **हे**; याकाम. **घेणें**, **घेपणें**; अकाम. **घेणें**. प्राकृतमध्यें **गिण्ह्** आणि **गह्** अशीं दोन्ही रूपें आहेत. त्यांपैकीं पहिलें संस्कृत विकरणासह आलें आहे. दुसऱ्यांत विकरण नाहीं, ह्यावरून अनुमान निघतें तें हें कीं संस्कृतमधील धातु प्रथम पहिल्या गणाचा असावा.]

²**घे(णें)** सक्रि. मनांत पक्कें धरणें (आणखी लाक्षणिक अर्थ बरेच आहेत.). To take hold of, to seize.

[सं. **गह् १०**-गाहय; अकामसा. **घेघे** = नेटाचा प्रयत्न ('घेणें' ह्याचें आज्ञार्थरूप); **घेघेमार** = हातघाईचा मार (घे मार, घे मार अशा शब्दासह दिलेला मार); **घेणा** = घेणारा, **घरघेणा**, **संसारघेणा**, **जीवघेणा**; **घेव** = घेण्याजोगें (> ग्राह्यम्); **घेवणी** = घेणें (गृह् + नी); **घेवदेव** = घेणें देणें; **घेवपत**, **घेवधंदा** = व्यापार; **घेवबा** = घेणारा; **घेवादेवा** = घेवदेव; **घेवाणदेवाण** = घेणेंदेणें (घे + वाण); **घेवारी** = भाजी, धान्य वगैरे घाऊक घेऊन फुटकळ विकणारा.]

घेंघाव(णें) अक्रि. रागावणें, कडकडणें, जळफळणें. To roar and storm at.

[सं. **हन् २** हिंसागत्योः √ हन् (अभ्यास) घन्-घवन् किंवा म. **घेघे** हा अभ्यास असावा.]

घेंगाट(णें) अक्रि. दरडावून घेणें. To threat.

[म. **घेंगा** = गोंगाट, काहूर.]

घेटा पुं. मेंढा, बोकड. A goat.

[सं. (?); हिं. **घेटा** = डुकर; गु. **घेटी**, **घेटु** = बकरी. मूळ शब्द कोणता ?]

घेत(णें) सक्रि. स्वीकारणें, पतकरणें. To accept or receive.

[सं. **ग्रह् ९** स्वीकरणे; प्रा. **घत्त**; याकाम. **घेतले** (दिण्णले घेत्तले इति उल्लविरे,-अप. का. त्र.). मराठी क्रियापद चमत्कारिक आहे. '**घेणें**' हें मूळ सं. '**ग्रह्**', प्रा. **गिण्ह**' पासून; परंतु ह्या रूपामध्यें '**त**' येतो, तेव्हां हें रूप संस्कृत '**ग्रह्**'च्या (गृहीत) निष्ठेपासून निष्पन्न झालेलें दिसतें. प्राकृतमध्यें **घत्त** हें रूपसुद्धां संस्कृत निष्ठेपासूनच आहे.]

घेप(णें) सक्रि. घेणें, स्वीकार करणें. To receive or accept.

[सं. **गृभ्** (कर्मणि-गृभ्य,) (णिच् कर्मणि), **ग्राभ्य** > **घाप** > **घेप**; प्रा. **घेप्पंत**; '**प**' हा णिच् चा प्रत्यय आहे. कधीं कर्मणि प्रत्यय म्हणूनहि लागतो. याकाम. **घेपे** (ज्ञा. २-२६०).]

घेर(णें) सक्रि. वेढणें, भोवतालीं जाणें, संकटांत गोवणें, पेचांत आणणें. Te encompass, to surround, to involve in difficulties.

[सं. **घिर्** (णिच्), **ग्रह्**; बं. **घेरा**; ओ. **घेरिबा**; हिं. **घेरना**; पं. **घेरणा**; सिं. **घेरणू**; गु **घेरवूँ**; *IE*. Gwhora, Gwhere; ब्लोक ह्यानें द्राविडी शब्द '**गिरी**' ही व्युत्पत्ति दिली आहे.]

घेर, घेरा पुं. वर्तुळ, परिसर, परीघ, फेर, मंडल, शेंडीच्या भोवतींचे केस. A circumference, the skirt, the enclosing line.

[सं. **ग्रह्** (घिर्); बं. **घेर**; ओ. हिं. पं. **घेरा**; सिं. **घेरो**; गु. **घेरावो**; अकामसा. **घेरी** = चक्कर, भोवळ.]

घेला वि. मूर्ख. Stupid.

[सं. **गृहीतः** (पिशाचैः); गु. **घेलो**; अकामसा. **घेलचोद्या** = मठ्ठ; **घेलाशेट** = गुजराती माणसास म्हणतात, = उलाढाल्या मनुष्य.]

घेरिया पुं. कोंकणांतील एका किल्ल्याचें नांव. A fort in Konkan.

[सं. **गिरि** = पर्वत, **गिर्य़ः** > **घेरा** > **घेरिया.**]

घेवडा पुं. वनस्पतिविशेष. A plant and pod of it.

[सं. **गर्वा.**]

घोक(णें) सक्रि. घोषणें, पुनः उच्चारणें, पाठ म्हणणें,-करणें. To repeat frequently in order to commit to memory, to recite, to repeat, to learn by heart.

[सं. **घुष्** १० विशब्दने ; अकामसा. **घोक** = घोष, गजर ; **घोकणी** = पाठ म्हणणें ; **घोकंपट्टी** = घोकणें, पठण (घोकं + पट्ट–पट्टीचा ब्राह्मण, चांगला पठण केलेला); **घोकीक** = पाठ म्हटलेलें ; **घोक्या** = घोकणारा.]

घोकर(णें) अक्रि. घों घों करणें. To hum.

[ध्वनिशब्द, सं. **घुक्क** ; अकामसा. **घों घों** = आवाज (प्रवाहाचा) ; **घोंगणें, घोंघावणें** = घों घों आवाज करणें ; **घोंवावणें** = घोंगावणें ; **घोंवाट** = माशांची गुणगुण.]

आणि कृष्णार्जुनाचें बोलणें । घोकरि आलें श्रवणें
किं देहस्मृतीचा तेणें । वापसा केला ॥

रा. ज्ञा. ९-५२६.

घोंग न. सोंग, वेष. A cover, cloak.

[कान. **घुगी** = वेष्टण, अवगुंठण ; हिं. **घूगी** ; **घोंगी** = खोळ ; अकामसा. **घोंगट** = तोंडावरून घेतलेलें आच्छादन, खोळ ; **घोंगडी** = कांबळें, पट्टें. **घोंगडें** = कांबळें, संकट (लक्षणा).]

घोगरा, घोघरा वि. भसाड्या आवाजाचा, अस्पष्ट आवाजाचा. Rough, cracked, hoarse (voice), hoarse.

[सं. **गद्‌गद** (?), **गर्गरः, घर्घर** ; प्रा. **घग्घर, गग्गर** ; कान. **गोरगर.**]

घोट(णें) सक्रि. पिणें, गिळणें, पुनः तेंच तेंच म्हणणें (ल.). To gulp, to repeat.

[सं. **घुट्** १ परिवर्तने ; देप्रा. **घुट्टइ पिबति** (१०९-१२) ; प्रा. **घोट्ट, घोट्टय** ; अप. **घुण्टइ** ; गु. **घोट** ; पं. **घुट्ट** ; हिं. **घोट** ; हिं. **घुटकना** ; सिं. **घोटणु** ; सिं. **घुटकणु** ; अकामसा. **घोटखोर** = पाणबुड्या (**घोट + खोर** √ **खुर्दन्** (फा.) **घोटणी** = घोटणें.]

घोट(णें) सक्रि. (एकसारखें) वाटणें, मिसळून एकजीव करणें, दाबणें, बारीक करणें. To rub and stir in order to mix, to press, to pound.

[सं. **घृष्टः** (?), √ **घृष्, घट्ट** ; बं. **घोटना** ; ओ. **घोटिबा** ; हिं. **घोटना** ; पं. **घोटणा** ; **घोट्टा** ; सिं. **घोटणू.**]

घोटा पुं. एक प्रकारचें भांगेचें पेय. A drink of hemp-leaves ground in water and spices.

घोट, घुटघुट पुं पाण्याचा एकदम प्यावयाचा भाग. A gulp.

[सं. **घुटको, घुट्टुक्क** ; देप्रा. **घुट्टइ** ; हिं. **घुट्टुकना** ; पं. **घुट्टा** ; गु. **घटडो.**]

घोटळ(णें), घोटाळ(णें) अक्रि. गोंधळणें, लुडबुडणें. To be confused, to go backward and forward.

[सं. **घुट्** १ परिवर्तने ; **टल्–टूल्** १ वैक्लव्ये.]

–घोटाळा पुं. गोंधळ, भ्रमंती. Confusion, disorder.

घोटा पुं. पायाच्या चवड्याच्या वरील सांधा. The ankle–bone.

[सं. **घुट, घोटक** (भांडारकर) ; परंतु हा शब्द द्राविडी किंवा ऑस्ट्रोएशियाटिक असावा.]

घोडा पुं. प्राणिविशेष, अश्व. A horse.

[द्रा. (तद्भव) **गोळा, घोळा** ; ते. **गुरी** ; द्रा. **कुदुरे** (घोडा) ; √ **कुदि** = उडी मारणें ; **कुडुकु** ; ‘ **घोट** ’ हा आस्ट्रिक शब्दहि आहे. मूळ शब्द द्राविडी दिसतो. ‘ घोटक ’ हें त्याचें संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे. त्यापासून सिद्ध होणारीं रूपें पुढें दिलीं आहेत. सं. **घोट, घोटक** ; पा. **घोटको** ; प्रा. **घोडग, घोडअ, घोड** ; बं. **घोरा(ड)** ; ओ. **घोरा(डा)** ; बि. **घोर(ड)** ; हिं. पं. **घोरा(डा)** ; सिं. **घोरा(डा)** ; गु. **घोडो** ; ने. **घोडा** ; ह्या शब्दाचे लाक्षणिक अर्थ पुष्कळ आहेत व वाक्प्रचारहि पुष्कळ आहे. मराठ्याच्या लढाऊ वृत्तींच्या काळांत, सोळा–सतराव्या शतकांत रूढ झाले आहेत. अकामसा. **घोडा** = बंदुकीचा चाप, छत्रीचा चाप, कपडे ठेवण्याचा खांब, फळा, मृदंग ठेवण्याची चौकट, घडवंची (ह्याला घोड्याचा आधार देतात) ; **घोडी** = मादी घोडा, तंतुवाद्याच्या स्वराची कळ ; **घोडामैदान** = परीक्षेचें क्षेत्र, वेळ ; **घोडें-मारणें-चालविणें,–पुढें ढकलणें,–दामटणें** = प्रगति करणें ; **गांडीखालचें घोडें** = आधार, आश्रय ; **घोड्यानें पेंड खाणें** = अडणें, गति खुंटणें (**पेंड < पेणें** = सामान, मुकाम.) ; **घोडचूक** = मोठा दोष (कान. **गुडग** = मोठा) ; **घोड्यापुढें धावणें** =

मोतद्दारासारखी कष्टाची नोकरी करणें; **घोडकें**=लहान घोडें; **घोडकोस**=मोठा कोस-तीन मैलांचा; **घोडदवड**= घोडेस्वाराचें पळणें--धावणें; **घोडब्रह्मचारी, घोडमुंजा**= मोठ्या वयाचा मुलगा (लग्न न झालेला); **घोडमात**= बुद्धिबळांतील खेळ, घोड्यानें राजाला शह देणें.]

घोडा (घोडनवरा, घोडनवरी) वि. मोठा, वयानें व आकारानें–मोठा. A term of abuse for a full-grown boy or girl appearing as bride-groom or bride.

[कान. **गुडग**=लठ्ठ, बळकट; घोडा (अश्व) ह्या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं; **घोडगा, घोडा** (झाला)=मोठा झाला. घोडचूक, घोडकोस.]

घोडी स्त्री. मुलाला टांगण्याची शिक्षा देण्याचा एक प्रकार. A kind of punishment in a school.

[कान. **गुडि**=हात पाय बांधणें.]

घोणस पुं. पुष्कळ पायाचा प्राणी, सापाची जात, लाकडांत आढळणारा प्राणी. A kind of reptile.

[सं. **घोनस**; प्रा. **घोणस** (पुं.); द्रा. **घूण, कीण.**]

घोणा, घोन पुं. नाक, नाकांतून वाहणारा रक्तप्रवाह.

[सं. **घोणा**; प्रा. **घोणा** (स्त्री).]

घोणाट(णें) सक्रि. ओरडून हाकलणें.

[सं. **घु** १ शब्दे+**नृत्** ४ गात्रविक्षेपे (द्विधातुसंयोग.).]

घोबें न. अकल्पित लाभ. An unsought gain.

[**घबाड** पहा.]

घोर(णें) अक्रि. निजल्यानंतर आवाज होणें. To snore.

[सं. **घुर्** १ शब्दे; प्रा. **घोर**; म. **घोर**=घरघर आवाज.]

^{1}**घोर** पुं. काळजी. Anxiety, apprehension.

^{2}**घोर** वि. भयंकर. Frightful.

[*IE.* Ghou-ros; *Goth.* Gaurs; *Russ.* Zurib; सं. **घोर**; प्रा. **घोर**; अकामसा. **घोरंतर–घोरंदर**= भयंकर (घोरतर); **(अ)घोर**=भयंकर; **घोरंदार**= पराकाष्ठेचा प्रयत्न.]

घोरपड स्त्री. प्राणिविशेष, संकट, लचांड (ल.). An iguana.

[कान. **गोरी (पड)**=(लुब्ध झालेला) प्राणी, जनावर; √ **गोरिसु, गोरु**=ओढणें, गोळा करणें, लोभन, आकर्षण, संकट; अकामसा. **घोरपडे**=आडनांव, घोरपडीच्या साह्यानें गड जिंकला त्यावरून.]

घोव, घोवो पुं. नवरा, यजमान, प्रेमक. Husband, lover.

[सं. **गोवः**; प्रा. **गोह**=पुरुष, जार; देप्रा. **गामणी, गामउडो, गोहो एते चत्त्वारोपि ग्रामप्रधानार्था; गोहो भट इत्यन्ये** (१०२-५); याकाम. **घोव**; प्रांतिक मराठी. **घोव.**]

^{1}**घोष** पुं. गवळयाची वस्ती. A settlement of cowherds.

[सं. **घोष.**]

^{2}**घोष** पुं. गर्जना, मोठा आवाज. A deep continuing sound.

[सं. **घुष्**, √ **घु** १ शब्दे.]

घोस(णें) सक्रि. शोधणें, सांपडणें. To search, to come by.

[सं. **गवेष्** १० मार्गणे; **गेष्, ग्लेष्** १ अन्वेषणे.]

^{1}**घोस, घोंस** पुं. गुच्छ, झुबका. A bunch or cluster of flowers or friuts.

[सं. **गुच्छ**; प्रा. **गोच्छ**; हिं. **गुच्छा**; सिं. **छुगो**; **घोसळ**=घोंस असलेलें.]

^{2}**घोस** पुं. आवेश, जोर. Vigour.

[सं. **घोषः**]

घोसवळें, घोसाळें न. फलविशेष, भाजीचा एक प्रकार. A vegetable.

[सं. **घासवल्ली, घोसवळी**; देप्रा. **घोसाली, घोसालई** (शरदुद्भवः वल्लिभेद).]

घोसळ(णें), घोसाळणें सक्रि. चांगलें चोळणें. To rub well.

[सं. **घृष्** १ संघर्षे.]

घोळस(णें) सक्रि. थोडेंसें चोळणें. to roll a little.

[सं. **घूर्ण्** १ भ्रमणे+**स** (**लुङ्**).]

^{1}**घोळ(णें)** क्रि. वारंवार विचार करणें, वारंवार हलविणें, पाखडणें. To shake about, to ponder on, to shuffle.

[सं. **घुण्–, घोलय**; प्रा. **घोलेइ**; बं. **घुलान**; ओ. **घोरिबा**; हिं. **घोलना**; पं. **घोलणा**; सिं. **घोरणु**; गु. **घोळवूं**; ने. **घोल्नु**; **घोळ**=घेर, परिघ, हालचाल अडथळा, अडवणूक.]

घोळ(णें) सक्रि. मिसळणें. To mix up, to roll.
[सं. घूर्ण् १ भ्रमणे; प्रा. **घोलाविअ** (< सं. **घोलित**); घुल् किंवा **घोल्** हा संस्कृत धातु मूळ असावा.]

घ्राण न. नाक. The nose.
[सं. **घ्राण**,√**घ्रा.**]

ङ पुं. मराठी व्यंजनमालेंतील पांचवें व्यंजन. The fifth consonant of the Marathi alphabet, the gutteral nasal.
[सं. प्रा. **ङ्**, **म्**, **न्**, **गुं** ह्या वर्णापासून सिद्ध होतें. परंतु मराठींत ह्या वर्णानें आरंभ झालेले शब्द नाहींत. ह्याचें उच्चारण कण्ठ्य नासिक्य असून उच्चारस्थान कण्ठ आहे.]

ङोङाव (णें) अक्रि. गोंगावणें. To hum, to speak indistinctly.
[सं. ङु १ शब्दे; **ङोङ्गूयते**; याक्राम. **गोंगावणें**, **गंगावणें.**]

^{1}**च** पुं. मराठी वर्णमालेंतील सहावें व्यंजन, ह्याचें मूळ उच्चारण तालव्य अल्पप्राण कठोर असून उच्चारस्थान तालु आहे. वेदपूर्व, वैदिक व संस्कृत वगैरे आर्य भारतीय भाषांत हेंच उच्चारण मूळ आहे. मराठींत ह्याच्या उच्चारांत फरक झाला आहे. हें तालव्य उच्चारण कायम राहून दुसरा एक प्रकार-दन्त्यतालव्य स्वरूपाचें उच्चारण अर्वाचीन मराठींत रूढ आहे. हा बदल अर्थात् कोणत्या तरी परकी प्राकृत, मंगोली किंवा द्राविडी उच्चाराचा परिणाम होय. हा उच्चार मराठीच्या प्रारंभापासून आहे; कारण मूळ, तालव्य उच्चार स्पष्ट करण्यासाठीं प्राचीन लेखनांत च्य, छ्य, ज्य, झ्य अशीं प्रतीकें वापरल्याचें आढळतें. (म. भा. उ. वि. पान ३२१). The sixth consonant of the Marathi alphabet.
[सं. **च**, **त्य**, **च्च**; प्रा. **च**; **आचम-आचव**, **चृबद्-चिरड**; **त्य-चा**, **ची**, **चें** (षष्ठीचे प्रत्यय)
(**मध्य'च'**) सं. **त्य**, **श्च**, **च्य**, **र्च**; प्रा. **च्च**.
सं. **छ**, **ज**; प्रा. **च**. **छुर-चुरा**, **जोष-चोज**.
सं. **त**, **त्स**; प्रा. **च**, **च्च**; **त्सर-चर**, **चोर**, **उत्स्कु-उचक.**
सं. **य**, **श**, **ष**, **स्**. **व्यय-वेच**, **युच्छ्-चुक**, **स्पश्-चापय**, **व्युष्-बोच**. **स्यम-चिव**. **मस्क-मचक.**]

^{2}**च** अ. खात्रीदर्शक, देखील. An affix expressive of positiveness, exactness, certainty.
[*IE.* Qe; सं. **च**; *Gr.* Te; *Lat.* Que; *Av.* Ca; *OPer.* Ca; सं. **नच**=नापि, **चैव**; प्रा. **च्चिअ**, **चेअ**; याक्राम. **चि** (ज्ञाने); गु. सिं. **च**; मराठींतील **'च'** सं. 'च' पासून कधीं येतो, तर कधीं सं. **'त्य'** ह्या विशेषण प्रत्ययापासून येतो.]

चँ, चि, ची अ. पादपूरणार्थक किंवा अवधारणार्थक अव्यय. An affix of emphasis.
[हेमचंद्रकृत प्राकृत संजीविनींत (Cowell, p. 82.) '**च्चिअं**, **चेअ**,' असे अवधारणार्थी 'खरें' ह्या अर्थी शब्द दिले आहेत. उदा०. **हंच्चिअ** (**अहमेव**), **तुच्चिअं** (त्वमेव); संस्कृत नाटकांतूनहि **चिअ** शब्द आढळतो; जसें-**अहंच्चिअ** (**अहमेव**). यावरून मराठी **च**, **चि**, **ची** हे प्राकृतचे अपभ्रंश आहेत असें ठरतें.]

चइ, चाई स्त्री. केसांचा रोग (त्यानें केस नाहींसे होतात.). A disease attacking and eating away hair and wool.
[सं. **चा**,√**चृद्**, चाई पहा.]

चइ(णें) अक्रि. जागें होणें, चेवणें. To be awakened, to move, to have life.
[सं. **चित्** १ संज्ञाने; प्रा. **चेअ.**]

चइत पुं. चैत्र महिना. The month Chaitra.
[सं. **चैत्र** (चित्रानक्षत्रावरून); प्रा. **चइत्त**; अकाम. ग्रामीण. **चइत**, **चैत** (महिना).]

चउकटी वि. चौकोनी. A square.
[सं. **चतुष्कट**; प्रा. **चउकट**; याक्राम. **चउकट** (नरुस्व. ४१८); अकाम. **चौकट.**]

^{1}**चक** पुं. वजन, जरब, धाक; एकी, एकमत. Awe, reverential fear; unity, unanimity.
[१ सं. **चक्र**; प्रा. **चक्क**; फा. **शक.**]

^{2}**चक** पु. जमीन, क्षेत्र, जमिनीचा भाग, तुकडा. An estate, a farm or land assigned.
[तेल. **चक**=तुकडा; हिं. **चक**; पेकाम. अकाम. **चकनामा**=जमिनीचें कागदपत्र; **चकबंदी**=जमिनीची वसूलबंदी.]

चकई स्त्री. पक्षिविशेष, मादी, मादीचकवा. The female chakrawaka bird.
[सं. **चक्रवाकी**; प्रा. **चक्कवाई**; हिं. **चकई**; **चकवा** पहा.]

^{3}**चक(णें)** अक्रि. गोंधळणें, गोंधळून जाणें. To be confounded or bewilderd.
[सं. **चक्** १ भ्रान्तौ (सौत्रधातु).]

२चक(णें) अक्रि. खेळांतील बाजू किंवा पक्ष ठरविणें. To fix up the side in a game (by slapping hand upon hand).
[सं. **चक्र ; चक्कलनम्** = फेर.]

१चकचक(णें), चुकचुक(णें) अक्रि. पालीसारखा शब्द करणें. To create sound (as that of a lizard.)
[**चकचक** – ध्वनिशब्द.]

२चकचक(णें) अक्रि. प्रकाशणें, लकाकणें. To shine, to glitter.
[सं. **चक्** १ प्रकाशने ; अकाम. **चकचक, चकचकीत** (स्पष्ट).]

चककन् (होणें) अ. एकदम प्रकाश येणें, लखकन. To glitter suddenly.
[कान. **चक्कने** = लवकर, एकदम.]

·**चकणा** वि. तिरवा, काणा. Squint-eyed.
[सं. **चक्षुष्काणः ; चक्कआण–चक्काण–चकणा.** भाअ. १८३२]

चकती स्त्री. लहान, वाटोळा, चापट व पातळ तुकडा, खाप, फोड, चांदकी, चिट्ठी. A thing generally circular, flat and thin, a scrap of writing.
[सं. **चक्रम्** ; प्रा. **चक्कम्** + **ति** ; हिं. **चकट्टी** ; गु. **चकती** ; म. **चकली** = लहान वाटोळा तुकडा, काटेकोडबोळें.]

चकपक वि. व्यवस्थित, स्वच्छ. Neat, tidy.
[सं. **चक्क** + **पक्क. चक्क** ह्याचा द्विरुक्त शब्द **पक्क.**]

चकमक स्त्री. अग्नि पेटविण्याचें साधन, गारगोटी. A flint and steel for striking fire.
[१ सं. **चक्** = प्रकाशे, **मह्** १० प्रकशने (द्विधातुसंयोग), ध्वनिशब्द, **मक** ; तुर्की. **चक्मक्** = **गारेपासून ठिणगी पाडणारें पोलाद** ; टर्नर तुर्की शब्दापासून व्युत्पादितो ; तें चिन्त्य आहे. ‘ चकमक ’ हा शब्द महमदी संपर्कापूर्वी वापरांत होता.]

चकर(णें) अक्रि. किंचित् फिरणें, फिरविणें, चुकणें, प्रमाद–चूक करणें. To turn round a little, to err.
[सं. **चक्र–चकर** (वर्णागमानें ‘ चकर ’ रूप झालें); अकाम. **चकरमकर** = डांवपेच, युक्ति.]

चकला पु. शहराचा भाग, पेठ, मोहला, अड्डा. A division of city (or country), a stall.
[सं. **चक्र** ; प्रा. **चक्कल** ; हिं. गु. **चकला.**]

चकली स्त्री. वाटोळी भिंगरी, एक पदार्थ-पक्वान्न, कांटेकोडबोळें. A flat round piece of metal, rice-flour kneaded.
[सं. **चक्रलः** ; देप्रा. **चक्कलीअ.**]

चकवा पुं. चक्रवाक पक्षी. A kind of bird, Chakrawak bird.
[सं. **चक्रवाक** ; पा. **चक्कवाको** ; प्रा. **चक्कवाअ, चकाअ** ; गु. **चको** ; सिं. **चकुओ** ; पं. हिं. **चक्का** ; सिंह. **सक्का** ; ने. **चखेवा** ; म. **चकवी** (मादी) ; मराठीमध्यें हा शब्द हिंदीमधून आला. (पहा, Hobson–Jobson, Brahiminy duck).]

चकाटी स्त्री. गप्प, निरर्थक गोष्टी, बाता. Merry, jest or story, repartee.
[सं. **चक्राट** (**चक्र** + **अट्**), **चकाट** = लुच्चा. भा. अ. १८३२.]

–**चकाट(णें)** अक्रि. गप्पा मारणें. To tell merry stories.
[म. **चकाटी** (नाधा.) ; सं. **कथ्–चकथ** (अभ्यास.); **कत्थ् – चकत्थ.**]

चकार पुं. ‘च’ हें अक्षर, कोणतेंहि अक्षर, अवाक्षर, शब्द. The sound च, hence any vocal expression.
[सं. **च** + **कार** √ **कॄ**-शब्दे ; ‘ **कार** ’ ह्याचा अर्थ ‘ **शब्द** ’ असा आहे. **चकार** = ‘ **च** ’ हा शब्द, उच्चार. पुन्हा आणखी शब्द त्याच्यापुढें वापरतात. “ **चकार शब्द** ” (पिवळा पीतांबर, किंवा गाईचा गोठा ह्याप्रमाणें).]

१चकार, चकारी स्त्री. चवली–दोन आणे (सांकेतिक शब्द–लक्षणेनें). A cant term for two annas.
[सं. **चक्र** किंवा **चवली** मधील **पहिला वर्ण** घेऊन **कार** लावून सिद्ध केला, तसाच दुसरा शब्द **पकारी** = पावली असा आहे.]

चकारी स्त्री. गाडीच्या चाकानें पडलेली खूण, चाकोरी. A wheel-rut.
[सं. **चक्रम्–री** (?) मराठी प्रत्यय.]

चकोट वि. चोखट, उत्तम. Correct, true, the best.
[सं. **चोक्ष** = शुद्ध ; कान. **चोक्कट** ; कानडींत तद्भव झाला.]

चकोर पुं. पक्षिविशेष. A kind of bird.
[सं. **चकोर.**]

चक्क, चक्कन् वि. प्रकाशित. Bright, shining, flashing.
[सं. **चक्** १ प्रकाशने + **कने** (कानडी प्रत्यय).]

चकाक(णें) अक्रि. प्रकाशणें. To dazzle, to flash.
[सं. **चक्** १ प्रकाशने.]

चकित वि. गोंधळलेला, दिपलेला. Dazzled, confounded.
[वैसं. **चक्** १ भ्रान्तौ (सौत्रधातु), अकाम. **भयचकित** = भ्यालेला, भीतीनें थक्क.]

चक्कर[1] स्त्री. भोवळ, घेरी. A faint, giddiness.
[सं. **चक्** १ प्रकाशने + **कर.**]

चक्कर[2] न. लहान मुलाचें चाक. A ring or circle, a plaything.
[सं. **चक्र** ; प्रा. **चक्कर.**]

चक्कर[3] वि. भ्रांत, मूढ, विलक्षण, लहरी. Silly.
[सं. **चक्** १ भ्रान्तौ (सौत्रधातु), चङ्क्रम् ; **चंकम.**]

चक्का पु. दाट दहीं. Milk (or curds) coagulated firmly.
[हिं. **चक्कन** = दाट ; **चक्का** = दहीं.]

चक्काचूर पुं. बारीक भुगा, पूर्णपणें झालेली पूड, पूर्ण नाश. Shattered or shivered mass, fragments.
[म. **चक्का** = दाट ; **चूर** < चूर्ण.]

चक्की स्त्री. जातें, दळण्याचें चक्र. A hand-mill.
[सं. **चक्रम्, चक्री** ; हिं. **चक्की,**]

चक्र न. चाक, चाक (हत्यार, आयुध). A wheel, a sharp circular weapon,
[*I.E.* Quel, Quel ; सं. **चक्, क्र, चक्र** (अभ्यास) (क्रमि, चिकुर, चक्र); *Av.* Chaxem ; *Lat.* Cri-c ; *Lith.* Krivas, Kirmis ; *Slav.* Kragu ; *OSlav.* Kolo ; *Russ.* Koleso ; सं. **चक्** १ भ्रान्तौ ; अकामसा. **चक्र** = मंडल, सैन्य, समूह, राष्ट्र (लक्षणा); **चक्रदंड** = एक जोराचा प्रकार ; **चक्रनेमिक्रम** (चक्र + नेमि = परीघ + क्रम.) = चाकाचा धावेचा वरचा भाग खालीं, खालचा भाग वर जातो तो ; **चक्रपाणि** = चक्र आहे हातांत ज्याच्या (याकाम. **चक्रपाणी** नरुस्व. ८७७); **चक्रवर्ती** (चक्र = राजाचें मंडल.) त्यामधील मुख्य, किंवा ज्याच्या वरतीं चक्र = वलय आहे असा. **चक्रवाट** (चक्र+वर्तिका) = चाकोरी ; **चक्रवाढ** = राशीचें व्याज, व्याजाला व्याज आकारण्याचा प्रकार ; **चक्रवाल** = क्षितिज (पुं.); **चक्रव्यूह** = सैन्याची चक्रासारखी रचना ; **चक्राकार** (चक्र + आकार) = चाकासारखा वाटोळा आकार ; **चक्रापत्ति** = एकाचा दुसऱ्यास,-अशा रीतीनें शेवटच्यास पुनः पहिल्याचा आधार असे वाद ; **चक्री** = वेदपठणाचा कार्यक्रम सर्वांनीं मिळून म्हणण्याचा ; पागोटें चाकासारखें वाटोळें, कुंभार ; **चक्रीपुराण** = एकामागून दुसऱ्याचें पुराण-व्याख्यान.]

चक्रम् वि. इकडे तिकडे फिरणारा, भ्रमणारा, अद्वातद्वा बोलणारा, भ्रमिष्ट. Roaming or speaking at random.
[सं. **चङ्क्रम्,** √**चक्** (सौत्र धातु) १ भ्रांतौ ; प्रा. **चंकम.**]

चखोट वि. खरें, शुद्ध, निर्मळ, चोख. Clean, clear, pure, excellent.
[सं. **चोक्ष** + **ट** ; देप्रा. **चोक्खट** ; कान. **चोक्कट.**]

चंग[1] पुं. पैज, प्रतिज्ञा. Promise, declaration.
[**चङ्ग** = पचंग (?). **चंग** बांधणें = तयार होणें.]

चग[2] पुं. एक तंतुवाद्य, डफ. An instrument, a drum.
[फा. **चङ्ग** = तंतुवाद्य.]

चंग[3] वि. चपळ, चांगलें. Sharp, smart, good.
[सं. **चंग** ; प्रा. **चंग** ; सिं. **चंगो** ; अकामसा. **चांगभला** ; सिं. **चंगोभलो.**]

चंगु[4], **चिंगु** स्त्री. स्त्री व्यक्तिनाम. Name of a female.
[मराठी **चांग** < ‘ **चांगुणा** ’ ह्याचा संक्षेप, किंवा कान. **चंगु** = उडी, चापल्य.]

चंगळ वि. स्त्री. मुबलक, विपुल, विपुलता, भरभराट. Abundance, plenty.
[सं. **चंग** ; देप्रा. **चंग** + **ल.**]

चंगीभंगी पु. चैनी मनुष्य, व्यसनी. A dissipated or dissolute fellow.
[सं. **चंगी भृंगी** = शंकराचे गण, भटकणारे ; गु. **चंगी** = अफू ; **भंगी** = भांग ; अफू व भांग ह्याचे व्यसनी.]

चघळ(णें) सक्रि. चर्वण करणें, पुष्कळ वेळ चावणें. To chew slowly and long.
[सं. गॄ ६ निगरणे (अभ्यास); **चिगल** (सन्नन्त) **चिघल, चघळ**–भाअ. १८३२.]

चच(णें) अक्रि. मरणें, नाहींसें होणें. To die.
[सं. **चंच्** १ गतौ, **जस्** १, ४ हिंसायाम्, **जस्य** = चच, **शस्** २ दुर्गतौ.]

चंच(णें) सक्रि. चाचणें, अभ्यासांत परीक्षणें. To examine.
[सं. **चच्** १० अध्ययने, म. **चचविणें** (णिच्) = बोट लावणें, निकाल लावणें.]

चंच वि. धूर्त, हुशार, चौकस. Close and scrutinizing.
[सं. **चंच्** १ गतौ (उड्या मारणें); हिं. **चंग्या** = जातात. शिकाम. **चंचु** = हुशार.]

चंचर(णें) अक्रि. चाचपडणें, चंचळ होणें. To grope, to be active.
[सं. **चर्** (**अभ्यास यङ्लुङ्ग**); देप्रा. **चंचरिओ-भ्रमरः** (११३–६); गु. **चंचळ**; सिं. **चंचलु**; पं. हिं.बं. **चंचल** (अडखळणारा); सिंह. **ससल्** (अडखळणें); अकाम. **चांचरणें** = अडखळून बोलणें.]

चंचल वि. हलणारा, अस्थिर, चपल. Shaking unsteady, fickle.
[सं. **चञ्चल**; प्रा. **चंचल**; √ **चंच्** १ गतौ. **चंच्** (अभ्यास) + **ल** = अतिशय हलणें.]

चंची स्त्री. विड्याचें साहित्य ठेवण्याची कप्पे असलेली पिशवी. A bag with divisions or pockets (for keeping betel leaves, nut etc.)
[सं. **चंचा** = वेताची टोपली, विणलेली पिशवी.]

चंचु स्त्री. पक्ष्याची चोंच. A beak or bill.
[सं. **चंचु**; **चंचुप्रवेश** = चोंच शिरकवणें; **चंचुप्रवेशे मुसलप्रवेश** = कसातरी थोडा वाव करून घेणें; नंतर मुसळ शिरकविण्याइतका वाव मिळवावयाचा.]

चट पुं. दर्भाची प्रतिमा (श्राद्धामध्यें गतपूर्वजाची प्रतिमा दर्भाची करतात त्यावरून. ब्राह्मण नसला म्हणजे ही प्रतिमा करतात.). An image of दर्भ grass.
[सं. **चट**, √ **चृट्** १ अवयवे; **चट** = गवताची गांठ.]

चट स्त्री. आवड, गोडी. A taste, liking.
[सं. **चष्** १ भक्षणे, सं. **चाटु**; मराठी. **चाटणें** (श. को.).]

चट अ. एकदम, सर्व, आपोआप. Wholly, altogether.
[सं. **झट्** > **झटिति**; याकाम. **झड**.]
पांचाळ देशू लंघौनी: पातलांसे झड करौनि ॥ शिशु. २३६

चटई स्त्री. गवताची किंवा बांबूच्या काड्यांची हांतरी. Matting, a mat.
[**चट** = बांबू. **चट** = गवताची गांठ, श्राद्धाच्या वेळीं ब्राह्मणासाठीं वापरतात. ओ. **चटई**; बि. **चटई**; हिं. पं. गु. **चटाई**; **झट्** = एकत्र होणें (श. को. ही व्युत्पत्ति कृत्रिम आहे.).

चट्टी स्त्री. उतारूसाठीं गवताची झोपडी. A hut.
[हिं. = चट्टी, चाटी.]

चटक पुं. चिमणा, चिमणी. A sparrow.
[सं. **चटक**, √ **चट्** १ गतौ.]

चटक स्त्री. गोडी, आवड संवय. A taste, a liking.
[सं. **चष्** १ भक्षणे.]

चटक वि. हुशार, चलाख. Smart, sharp.
[सं. **चष्–चटक चांदणी** = हुशार, चलाख स्त्री, नखरेल तरुणी.]

चटकन्–दिन अ. एकदम. At once.
[ध्वनिशब्द, सं. **चटकृत्वा**; बं. **चट्**; ओ. **चट**; हिं. गु. **चट्**; ने. **चटक**. (**कन** - कानडी त्वरादर्शक प्रत्यय.)]

चटचटां अ. चटचट असा आवाज, लवकर, एकदम. Immediately, at once, smartly.
[ध्वनिशब्द.]

चटका पुं. भाजणें, पोळणें, दाह, हुरहुर, मनाचें दुःख (ल.). Scorching, the smart sensation following upon a burn.
[सं. **चट्** १ हिंसायाम्; हिं. **चटकना, चरकना**; पं. **चटकणा**; सिं. **चटिको** (प्रकाश).]

चटचट अ. स्त्री. भरभर, लवकर, घाई. In haste, smartly, quickly, haste. quickness.
[ध्वनिशब्द. सं. **चटचटति**; प्रा. **चडक्क**; देप्रा. **छंट** = शीघ्र; बं. **चर**; गु. **चड, चडचड**. (चटक(णें) ह्यापासूनच निष्पन्न होतो.)]

चटचट(णें) अक्रि. चटचट आवाज करणें, कमी होणें, चणचणणें. To emit the sound चटचट, to feel the scarcity.

[सं. चट् १० भेदे, किंवा ध्वनिशब्द.]

चटणी स्त्री. तिखट, मार, तिंबणें (लक्षणा). Seasoning of chopped chillies, pounding.

[सं. चट् १ हिंसायाम्, अवयवे ; (आ) चार ; ओ. चटुणी ; हिं. पं. चटणी ; सिं. चटिणी ; गु. चटणूं ; ने. चटनी ; किंवा ध्वनिशब्द आहे काय ?]

चटपट अ. स्त्री. लवकर, घाई. Quickly, haste.

[ध्वनि. चटपट; देप्रा. छंट = शीघ्र, जलद ; पं. चटपट्ट ; गु. चटपट ; सिं. चट्पटि ; हिं. चटपट.]

चटपट(णें) अक्रि. चडफडणें, सूक्ष्म वेदना होणें. To fret and grieve after, to be uneasy.

[सं. चट् १० भेदने, पट् १० भेदने, (द्विधातुसंयोग); परंतु ध्वनिशब्दच दिसतो; याकाम. चटपट (नरुस्व. ५२५).]

परि अवस्थेची न धरेचि चटपटी: गोविंदाचिए ॥

नरुस्व. ४०८

चटाव(णें) सक्रि. गोडी लागणें. To acquire a taste.

[सं. चष् १ भक्षणे ; म. चट पासून नाधा.]

चट्टा पुं. वण, व्रण, नायटा, तोटा (ल.) A sore, a scald, a loss.

[सं. चष्, चट् १ हिंसायाम् (?).]

चट्टामट्टा (करणें) पुं. सर्व खाणें, खाऊन संपविणें. Clean eating up.

[सं. चष् १ भक्षणे; देप्रा. चट्ट = भूक, चाटणें ; √ चर्व ह्या धातूशीं संबद्ध असावा. अकाम. चट सारें खाऊन टाका = सर्व खा. चट्टा = फडशा, फन्ना.]

चट्टीपट्टी स्त्री. ऐट, नखरेपणा, चापचोप, नट्टापट्टा. The business of the toilette.

[ध्वनिशब्द.]

चड, चडक स्त्री. चपराक, थापटी. A slap, a smack, a sounding stroke.

[सं. चटचटति ; देप्रा. चटक्क ; प्रा. चडचडइ ; अप. चडक्क ; गु. चड ; बं. चडचडी (मोठा आवाज) ; पं. चरकणा (मोठा आवाज करणें) ; हिं. चरचर (आवाज करणारा) ; म. चडकण, चडकणा-णी = ('क' हा कानडी प्रत्यय आहे. उदा० फटक, गटक, कडक इत्यादि.)]

चडफड(णें) अक्रि. रागावणें, त्रासणें, रागानें कांपणें, जळफळणें, तळमळणें. To fume, to chafe.

[सं. चंड् १ कोपे + स्फर् ६ स्फुरणे ; चडपडंतम् (मुद्रारा. अं. १ श्लो. १७).]

चड्डी स्त्री. लांडी, किंवा अर्धी विजार, लांग. A short underwear.

[कान. चड्डी, चणक, चण्णा = लांडी विजार.]

चढ(णें) अक्रि. वर जाणें, आरोहण करणें. To ascend, to mount, to climb.

[सं. स्कद् १ रोहणे ; प्रा. चड, छड, चढ, चडइ (ब्लोक) ; बं. चरा ; ओ. चरिबा, चढ ; पं. चन्हना ; सिं. चन्हणुं ; गु. चढवूँ ; ने. चढनु ; चढणें-ह्या धातूचीं पुढें दिलेलीं मुळें चिन्त्य आहेत ; १ सं. चह् १० परिकल्कने (परिकल्कनम् = दंभः), उदा० तो अलीकडे फार चढला ; २ शृथ् (वैदिक) = बेपर्वा होणें ; ३ स्यद् = to move on (Whitney) ; ४ सध् = to suceeed (Whitney) ; उदा० बाप मेला मुलगा चढला ; ५ स्वर्द् = १ आस्वादने ; उदा० अफू चढणें ; अकाम. चढ, चढण = डोंगराचा उंच भाग ; चढ = वाढ, उन्नति, संवर्धन, वाढावा ; चढता = चढण असलेला, वरवर जाणारा ; चढती = वाढ, प्रगति, सुधारणा, बढती ; चढती उतरती = चढउतार ; चढती भाजणी, चढती श्रेढि = कमी परिमाणाला भारी परिमाणाचें रूप देण्याची रीति (अंकगणित) ; चढवाचढव = चढविण्याची क्रिया ; चढाई = हल्ला, चाल, स्वारी ; चढावा = भेट, (हिं. चढाव = देवाला भेट) ; चढेल = गर्विष्ठ ; चढोवढी = झटापट, ईर्षेची चढाओढ.]

चढविणें(णें) सक्रि. वर जावयास लावणें. To make to ascend.

[सं. स्कंद् ; प्रा. चडावेइ ; बं. चरान ; हिं. चन्हावा ; पं. चरहाउणा ; गु. चढाववूँ.]

चण स्त्री. बांधा, आकार, ठेवण. The frame, the stature, the build or make.

[सं. चण् १ दाने (?).]

चणका पुं. वेदना, तडाखा, सपाटा, फणकारा. The smart of the sting or bite (of a scorpion).

[ध्वनिशब्द. चण् १ शब्दे.]

चणकाव(णें) अक्रि. चावणें, वेदना होणें. To bite, to shoot or smart.

[चणका (नाधा.)]

चणचण(णें) अक्रि. फार वाढणें, चुणचुणणें. To rise high.

[सं. **चण्** १ दाने.]

चणचण स्त्री. कमतरता, तूट. Scarcity, dearth, lack.

[सं. **चण्** १ हिंसायाम्.]

चणचणीत वि. मीठमिरची बरोबर घातलेला असा खमंग, हुशार, चलाख, तीव्र. Nicely seasoned, sharp, smart, intelligent.

[**चणचण** पहा.]

चणा पुं. हरभऱ्याचा वाळलेला दाणा. Gram.

[सं. **चणः**, **चणकः**; प्रा. **चणअ**; का. **चण**, **चन**; बं. **चना**; ओ. **चणा**; बि. **चणी**; हिं. **चना**; पं. **चणा**; सिं. हिं. **चणो**; ने. **चना**; गु. **चणा**.]

चंड वि. प्रखर, तीक्ष्ण, रागीट, तापट, (त्यावरून) व्यक्तिनाम, शंकराचा एक गण. Irascible, fierce, outrageous.

[सं. **चंड**; **चंडप्रचंड** = प्रखर, तीक्ष्ण, जालीम; **चंडमुंड** = शौर्य, बल, विद्या ह्या गुणांनीं युक्त असे दोन प्रबल दैत्य; **चंडवात**=सोसाट्याचा वारा; **चंडांशु**=सूर्य, तीक्ष्ण किरणांचा. (**चंड** + **अंशु** = किरण).]

चंडकाई स्त्री. एक देवता. A goddess.

[सं. **चंडी**, **चंडिका** (= देवी) + **आई**.]

चंडाल-ळ पुं.वि. नीच, निकृष्ट जातींतील, क्रूर, भयंकर, दुष्ट. One of the lowest tribe, vile, filthy, loathsome, heinous.

[सं. **चंडोळ** < **चांडाल**; **चंड**; अकामसा. **चांडाळ**, **चांडाळचौकडी** = दुष्ट माणसांची जूट; **चंडाळी** = दुष्ट कृत्य.]

चंडोल पुं. वि. एक गाणारा पक्षी, रंगेल, आनंदी, हुशार, तरत्रेज (ल.), एक अमली पदार्थ. A pyramid-crested bird, comely, a preparation of opium.

[सं. **चंडाल**, **चंडोल** (?); हिं. **चडोल**.]

चतकोर, चौतकूर पुं. चौथा भाग (भाकरीचा). A fourth (of a cake or bread).

[सं. **चतुस्**; कान. **कोर** = भाग, चौथाभाग (द्राविडी-आर्यसंकर).]

चतुर् वि. चार.

[*IE.* Qetuer; सं. **चतुर्** (**चत्वार**); *Av.* chathwar; *Gr.* Tettar; *Lat.* Quattuor; *Lith.* keturi; *Slav.* Cetyre; *Goth.* Fidwor; *OHG.* Fior; *As.* Feower; *Celt.* cethir; अकामसा. **चतुरंग** = चार अंगचें-प्रकारचें-सैन्य (घोडा, उंट, हत्ती, पायलोक); **चतुरस्त्र** = चौकोन; **चतुरानन** = चार तोंडांचा देव, ब्रह्मा; **चतुर्थाश्रम** = चौथा आश्रम, (ब्रह्मचर्य, गार्हस्थ्य, वानप्रस्थ, संन्यास-हे चार आश्रम); **चतुर्थ** = चौथा; **चतुर्दशी** = चौदावी तिथी; **चतुर्भुज** = चार हातांचा, कैदी (हातपाय मुसकी बांधतात त्यावरून), लग्नविधीनें बद्ध (नवऱ्याचे दोन हात व नवरीचे दोन); **चतुर्मास** = चार महिन्यांचा गट, (मर्यादित अर्थ) पावसाळ्याचे चार महिने; **चतुर्वर्ग** = धर्म, अर्थ, काम, मोक्ष हे चार; **चतुर्विध** = चार विधा-प्रकार-असलेला; **चतुष्क** = चौकडा, चारांचा समुदाय; **चतुष्कोण** = चौकोन; **चतुष्पथ** = चौक, चार पंथ-मार्ग मिळतात तें ठिकाण; **चतुष्पाद** = चार पायांचें जनावर; **चतुःसीमा** = चार सीमेवरील हद्द; **चतुःसूत्री** = चार सूत्रांचा समूह.]

चतुर वि. हुशार, समजंस, धोरणी. Shrewd, clever, prudent.

[सं. **चतुर**; पेकाम. **चतुर साबाजी** = हुशार, धोरणी, राजकारणी मनुष्य, निशामशाहींत चतुर शाबाजी ह्या नांवाचा एक मुत्सद्दी होता. हा जातीनें देशस्थ ब्राह्मण असून मोठा इमानी होता. ह्याचा पुढें खून झाला. म. **चतुराई**.]

चन्दन पुं. एक सुगंधी वृक्षविशेष. Sandalwood.

[*IE.* Qend, Qnd, Squend (old form); सं. **चन्दन**, √ **चन्द्**. (चंद्र, चंद्रगुप्त इ.); *Lat.* Cand; *Teut. As.* Candel; *Enq.* Candle. अकामसा. **चंदन उडविणें, काढणें** = सडकून मारणें; ठोकणें; **चंदनबटवा** = वनस्पतिविशेष, एक भाजी.]

चंदी स्त्री. घोड्याचा घास, रोजचा खर्च, खाद्य. The daily food or allowance of grass or grain (to horses etc.)

[हिं. **चंदी**.]

चंदूलाल पुं. दान धर्माबद्दल एक प्रसिद्ध मनुष्य. The name of an individnal known for charity, hence a charitable man.

[हा जातीचा खत्री असून निजामाचा दिवाण होता. त्याचा दानधर्माबद्दल लौकिक होता. त्यावरून लक्षणेनें हा शब्द फाजील दानशूर ह्या अर्थी रूढ आहे.]

चंदेरी वि. पागोटें. (चंदेरी ह्या ग्रामनामावरून). A turban made at Chander.

[देप्रा. **चंदेरी** = नगरी. चंदेर हें वेटवेच्या दक्षिणतीरावर गांव असून येथें पागोटीं तयार होतात; चंदेर येथें एक कापडाची पेठ होती.]

चंद्र पुं. चांद, चांदवा. (मुसलमानांची तारीख ही चंद्रावरून ठरवितात, प्रथम चंद्रदर्शनास पहिली तारीख असते.). The moon.

[*IE.* Qend, Squend ; सं. **चंद्र**, √ **चंद्**, √**स्यन्द्** ; *Lat.* Cand ; *Teut.As.* Candel ; *Eng.* Candle ; अकामसा. **चंद्रकोर** = चंद्राचा भाग, + कान. **कोर** = भाग ; **चंद्रकेयूर** = (स्त्रियांचें) एक शिरोभूषण (राज.) ; **चंद्रग्रहण** = चंद्राला ग्रहण ; **चंद्रचूड,-शेखर** = चंद्र आहे डोक्यावर ज्याच्या, शंकर ; **चंद्रज्योत** = चांदण्यासारखा प्रकाश देणारें दारुकाम ; **चंद्रप्रभा** = एक तयार केलेलें रसायन औषध ; **चंद्रबळ** = चंद्र अनुकूल असणें, चंद्र जन्मराशींत असणें, चंद्रबळ ओढून ताणून आणणें,–मुद्दाम आणणें = वरवर अनिच्छा दाखविणें (लक्षणा) ; **चंद्रकान्त, चंद्रमणि** = एक प्रकारचा मणि ; **चंद्रमौळी** = ज्या घराला छपर नसून वर चंद्र दिसतो, असें मोडकळीस आलेलें घर ; **चंद्रचकोरन्याय** = चकोरपक्षी चंद्रापासून गळणारे अमृताचे बिंदु पितो, त्यासाठीं वाट पहातो–तो न्याय ; **चंद्रामृत** = जीवनकला, सतरावी कला (हटयोग) ; **चंद्रिका** = चंद्राचा प्रकाश, चांदणें.]

चंद्रस, चंद्रुस पुं. एका झाडाचा चीक. A kind of white gum.

[अर. **चंद्रोस** ; *Gr.* Tsandarki (?) ; *Lat.* Sandark.]

चंद्री स्त्री. एकतानता, टक, तंद्री, उत्कंठा. Fixedness of gaze, earnest attention, absorption.

[**चंद्र-तंद्री** (?).]

चनी स्त्री. मोहर, बहर. Bloom.

[हिं. **चनी** = डाळीचा चुरा ; याकाम. **चनी**.]

चप अ. गप्प, चीप, चूप, शांतपणें. Silent, still.

[सं. **चप्** ; प्रा. **चप्प**. गु. **चप** ; हिं. **चपना**. (ध्वनिशब्द).]

चपकन्-कर-दिन प्र. एकदम. Quickly, briskly, sharply.

[ध्वनि, कान. **चप्** + **कन्**.]

चपका पु. चपराक, रपाटा, उजळा, हपका. A smart stroke or rap or pat, a process to scour or burnish.

[ध्वनिशब्द ; सं. **चप्** १० परिकल्कने ; हिं. **चपकाना**.]

चपखळ वि. स्वच्छ, स्पष्ट. Clean, clear, distinct.

[सं. **सम्** + **प्र** + **क्षल्** १० शौचकर्मणि.]

चपटा वि. पसरट, बसका, चापट. Low and flat.

[सं. **चप्** १० परिकल्कने, **चर्पटः** ; देप्रा. **चपेटा** ; कान. **चपटे** ; अकाम. **चपटी** = पसरट, चांदकी, चापट केलेली वस्तु.]

चपणा वि. डावा, डावखुरा. Left-handed.

[फा. **चप्** = डावा हात.]

चपराक स्त्री. चपाटा, सपाटा, थापटी, थप्पड. A slap or smack.

[सं. **चप्** १० परिकल्कने ; (नाधा.) **चपराक(णें)** = चपराक मारणें.]

चपराशी पुं. पट्टावाला, शिपाई. A peon, a runner, a messenger.

[हिं. **चप्रास्** = खूण, पट्टा, चिन्ह ; **चप्-ओ-रास्त** = डावा आणि उजवा.]

चपल, चपळ वि. तरल, चंचल. Active, agile, nimble.

[सं. **चपल**, √ **चप्** ; अकाम. **चपळाई** = चापल्य (इ–फार्शी प्रत्यय).]

चपल, चप्पल स्त्री. पातळ वहाण. A pair of thin sandals.

[ध्वनिशब्द, हिं. **चप्पल**.]

चपाट वि. सपाट, पसरट. Flat, levelled.

चपाटा पुं. वेग, झपाटा, सपाटा. Force, speed.

[सं. **चप्** १० परिकल्कने, **चर्पट** ; देप्रा. **चपटा** ; कान. **चपटे**.]

चपाती स्त्री. गव्हाची पातळ पोळी. A cake flattened.

[सं. **चर्पट, चर्पटी** ; प्रा. **चप्पती** ; देप्रा. **छप्पतिआ** ; बं. **चापाती** ; गु. **चपाती** ; ने. **चपाती** ; हिं. **चपाती** ; फा. **चपाती** = पातळ पोळी. ह्याच शब्दाशीं ‘ चापट ’ हा शब्द संबद्ध आहे. “ चापट पोळी ” ह्यांतील चापट आणि

पोळी हे दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत. परंतु 'चापट' ह्याचा दुसरा अर्थ-'थप्पड' हा अभिप्रेत धरून त्याला 'पोळी' शब्द जोडला.]

चपाप(णें) क्रि. घाबरणें, दचकणें. To shrink or draw in from a sudden fear, modesty etc.

[सं. **चप्** १० परिकल्कने, **चप्** १ आश्चर्यें, **चि > चायय् > चापय्**; (द्वित्व) **चपचप, चपाप.**]

चपेट स्त्री. चापट, थप्पड, तडाखा, तोटा, हल्ला, नुकसान (ल.). A pat, a slap, a blow, loss, misfortune.

[सं. **चप्** १० परिकल्कने + **ट**; (नाधा.) **चपेट(णें)**= मारणें, तडाखा देणें.]

चपेटा, (चापटा, चापटी) पुं. हाताचा आघात, थप्पड. A smart slap or blow.

[सं. **चप्** १ परिकल्कनें; देप्रा. **चपेटा**; कान. **चपटे**; **चापटी** < सं. **चप्पुटिका**; प्रा. **चप्पुडिया, चप्पुडी**= थापटी. **चपाती** पहा.]

चप्पी स्त्री. घडी, ठाकठेक, त्यावरून पूर्ण हजामत, गोटा. Kneading the limbs, hence a shave.

[सं. **चप्** १ परिकल्कने.]

चभूतरा, चबूतरा पुं. उंचवटा, कट्टा, चौथरा, बसण्याचा कट्टा. A raised mass of earth.

[सं. **चतुःस्तर > चउत्थर > चौथर, चबुत्थर**; हिं. **चबूत्राह**.]

चमक(णें) क्रि. चकाकणें, प्रकाशणें, एकदम आश्चर्य वाटणें, एकदम उसण येणें, कळ येणें (ल.). To glitter, to gleam, to start or startle.

[सं. **चमत्कृ**; प्रा. **चमक्केइ**; बं. **चकान**; ओ. **चमकिबा**; बं. हिं. **चमकना**; सिं. **चमक**; (**क्ष्माय्** १ विधूनने= चमक भरणें.) **चमक**=लकेर, प्रकाश, तकतकी; **चमकी**= एक अलंकार, नाकांतील चमकणारी टिकली, छडी.]

चमचमाट पुं. खमंग पदार्थ; खमंगपणा. Highly seasoned and piquant quality or article.

[सं. **चम्** १ अदने; **चम्** (अभ्यास किंवा द्विरुक्ति होऊन पुनः अतिशयदर्शक '**ट**' प्रत्यय लावला आहे. **चकचकाट, लखलखाट, घमघमाट** इत्यादि शब्द तसेच सिद्ध झाले आहेत.]

चमचा पुं. लहान पळी. A small ladle or spoon.

[सं. **चमस, चमस्य**; प्रा. **चमस** (पुंन.); हिं. **चमचा**; फा. **चमूचा**=पसरट व लांबट तोंडाची पळी; फारशी किंवा हिंदीमधून मराठींत आला. संस्कृतीकरण नंतरचें आहे काय किंवा तद्दर्शक वस्तु हल्लींच्या '**चमचा**' पेक्षा निराळी असावी.]

चमत्कार पुं. आश्चर्य, नवल, अचंबा. A wonder, an astonishing event.

[सं. **चमत्कार– चमत् + कार** (कॄ शब्दे); अकाम. **चमत्कारिक**=आश्चर्यकारक.]

चमेली, चंबेली स्त्री. सुवासिक फुलांची एक वनस्पति. A flower-plant and its flower.

[सं. **चंपावेल्ली**; बं. **चमेली**; हिं. **चमेली, चबेली**; पं. **चंबेली, चँबेली**; सिं. **चंबेली**; गु. **चँपेली**; ने. **चमेली.**]

चंपक पुं. चांफा, एक वृक्ष, त्याचें फूल. A flower-tree and its flower.

[सं. **चंपक**; अकाम. **चांफा, चापा.**]

चंपी स्त्री. अंग रगडणें, दाबणें, मर्दन, घडी, ठाकठेक. Shampooing.

[सं. **चप्** १० परिकल्कने; *Eng*. Shampoo.]

चंबू, जांब पुं. पाणी पिण्याचें भांडें, गळयाशीं अरुंद असलेलें भांडें. A kind of drinking vessel.

[सं. **जम्बूलक**; प्रा. **जंबूलय-अ** (पुंन.) (=मध्यभाजनमिति सातवाहनः) ही व्युत्पत्ति मान्य केली तर '**ल**' ची उपपत्ति लागत नाहीं. त्याचा लोप कसा व काय म्हणून झाला हें समजत नाहीं; म्हणून कान. **चम्बू**=तांबें, पिण्याचें वाटोळें भांडें ही व्युत्पति अधिक ग्राह्य आहेशी दिसते.]

चय, चयन पुंन. रास, पुंज, संचय. Collection.

[*IE*. Qei, Qi; सं. **चि** ५ संचये; *Av*. Cyaothna = चयन; *Gr*. Poi; *Lat*. Poema; *Bulg*. Cinja = to do; *OSlav*. Cinu; *Russ*. Cinu.]

चर(णें) उक्रि. (गवत) खाणें, हिंडणें, सारखें खाणें. To depasture, to graze, to roam, to eat.

[सं. **चरति, चर्** १ भक्षणें; पा. **चरति**; प्रा. **चरई**; बं. **चरा**; ओ. **चरिबा**; हिं. पं. **चरना**; सिं. **चरणु**; गु. **चरवूँ**; ने. **चर्नु**; **चरिंदा**=वैरण, घास, दाणाचारा (< फा. **चरइंद**) हा शब्द निराळा.]

चरक पुं. ऊस गाळावयाचा घाणा, दाबून रस अगर तेल काढण्याचें यंत्र, दळण्याचें यंत्र, चाकी. A sugar-cane mill, a mill.

[सं. चक्र (?) ; फा. चर्ख. = आकाशांतील सूर्यमंडळ, अस्मान, म्हणून कोणतेंहि चक्र. **चरका** (<फा. चर्खा) = सूत काढण्याचा रहाट. मराठीमध्यें हा शब्द गुजरातीमधून आला व त्याचा विशेष प्रचार इ. स. १९१९ च्या महात्मा गांधींच्या चळवळींत फार झाला. आतां तो शब्द आत्मसात् झाला आहे.]

चरक(णें) अक्रि. दहशत बसणें, फाटणें, टरकणें. To be torn mentally, to tear or rend.

[सं. जर्च् १ तर्जने.]

चरकट(णें) अक्रि. भरकटणें, भलतेंच बोलणें. To do or talk cursorily and carelessly.

चरका पुं. पोळणें, भाजणें, डाग (त्याचा आवाज व त्याचें दुःख). The sound or the sudden smart pain attendant upon a burn.

[कान. चुरुकु = अति उष्ण.]

चरचरणें अक्रि. भीतीमुळें घाबरणें, भांबावणें, गोंधळणें. To be confounded, to be bewildered.

[सं. जर्च् १ तर्जने ; प्रा. जच्च ; अकाम. **चच्च**, **चच**, **चरचर** अशीं तद्भवरूपें होतात.]

चरचरां, चराचर अ. कापण्याच्या ध्वनिसहित. With a sound of rending, slitting, tearing.

[ध्वनिशब्द; सं. शॄ. ९ हिंसायाम् ; अकामसा. **चरचरीत**= जाडेंभरडें, झणझणीत, तिखट; **चरा** = ओरखडा.]

^{१}चरण स्त्री. वैरण, गुरांसाठीं गवत, चरावयाचें जें तें. Pasture, grass, grazing.

[सं. **चरणम्**, √चर् ; प्रा. **चरण** (वैरण); पं. **चरना** ; गु. **चरण** (कुरण) ; ने. **चरन्** ; अकाम. **चारा**, **चारण** ; ह्यापासूनच ' **कुरण** ' हा शब्द आला आहे का ? पूर्ववैदिक भाषेंत च् आणि क् हे वर्ण संबद्ध आहेत. तालव्य व कंठ्य ह्या वर्णांत व्युत्क्रम झाल्याचीं उदाहरणें संस्कृत, ग्रीक, लॅटिन भाषांत पुष्कळ आहेत.]

^{२}चरण पुं. पाय, भाग, चौथा भाग. A foot, hence a metrical foot,a quarter or fourth part.

[*IE*. Qer ; सं. **चरण**, √**चर्** ; *Ar*. Char ; *Gr*. Kar ; *Lat*. Cur-,Car- ; *Lith*. Kelas ; अकामसा. **चरणतळ** = पायाचा तळवा ; **चरणतीर्थ**, **चरणामृत**=पायांचें तीर्थ; **चरणरज** = पायधूळ; **चरणारविंद**= चरण हेंच कमळ.]

चरपट, चर्पट, चरपटपंजरी न.स्त्री. लांब-निरर्थक भाषण-कथन, चऱ्हाट (ल.), पाल्हाळ, एका स्तोत्राचें नांव. A prolix narration, a dull, dry, long-winded story, a particular psalm.

[सं. **चर्पटम्**.]

चरफड(णें) अक्रि. रागावणें, चडफडणें, तक्रार करणें, तळमळणें, धुसफुसणें. To chafe and fume, to stamp and storm.

[सं. चृत् ६ हिंसायाम् + स्फर् ६ स्फुरणे. **चडफडणें** पहा.]

चरवट वि. खरखरीत, ओबडधोबड. Rough, prickling, coarse to touch.

[*IE*. Qerp, Qelb ; सं. **चर्ब**, **चर्बट** ; *Gr*. Korp ; *Lat* Corb ; *NPer*. Karbuza = Melon; अकामसा. **चरबट(णें)** = खरखरीत होणें.]

चरम वि. अन्त्य, शेवटचा. Last, ultimate.

[सं. **चरम** ; अकामसा. **चरमकाल** = शेवटचा क्षण ; **चरमप्रत्यय** = शेवटचा प्रत्यय, दुसरे प्रत्यय ज्यावरून होत नाहींत असा ; **चरमज्ञान** =शेवटचें ज्ञान, ब्रह्मज्ञान.]

^{१}चर वि. हलणारा, अस्थिर. Moving, going, not steady.

[सं. **चर्** १ गतौ ; **चराचर** = हलणारा-न हलणारा, सजीव-निर्जीवपरंपरा (सं. **चर** + **अचर**).]

^{२}चर पुं. खांच, खाई, खंदक. A ditch, a moat.

[सं. शॄ ९ हिंसायाम् ; अकाम. **चीर**, **चिरणें**.]

चरवी स्त्री. एक भांडें. A sort of pan or bowl.

[कान. **चरविगे** = चंबूसारखें मोठें तांब्यापितळेचें पात्र.]

चरस पुं. एक प्रकारचा मादक जिन्नस, भांग वगैरे फुलांचा मादक रस. The exudation of the flowers of hemp.

[फा. **चर्स** ; बं. ओ. हिं. **चरस्** ; पं. **चरस** ; सिं. **चरसु** ; गु. **चरस** ; ने. **चरस्**.]

चरित न. आचरण, जीवनयात्रा, कृति, पराक्रम. Behaviour, deeds, expoit, life.

[सं. चर्, चरित्र, चरित्; हिं. चरित; पं. हिं. चरितर्; सिंह. सिरित्=चालरीत; अकामसा. चरितार्थ = पोट भरणें, उदरनिर्वाह; चरित्र=चरित्र, इतिहास, कथा.]

चरिंदा पुं. चराई, चराईपैका. Food for cattle or its cost.

[फा. चरन्द्; (सं. √ चर ?); चरणें पहा. पेकाम. चरिन्दा (खरे ११-६०७३).]

चरु पुं. शिजविलेल्या तांदळाचा पिण्ड, गोळा, भात. Boiled rice or its lump.

[सं. चरु, √ चर् १ अदने ; हिं. चरुआ.]

चर्चा स्त्री. वादविवाद, स्पष्टीकरण, वर्णन, लेपन. Emulative contest, explanation, anointing.

[सं. चर्च् १ विलेपने.]

चर्च(णें) सक्रि. माखणें, फासणें, चोपडणें, वादविवाद करणें. To smear, to anoint, to discuss.

[सं. चर्च्; म. चर्चा (नाधा.); अकाम. चर्चिणें.]

चर्बी स्त्री. मेद. Fat, grease.

[फा. चर्बी.]

चर्म न. चामडें, कमाविलेलें कातडें. Skin, hide, leather.

[सं. चर्मन्; चर्मकार=चांभार; चर्म-कुंड=चामडी भिजविण्याचें कुंड; चर्मचक्षु=उघड दिसणारें चक्षुरिंद्रिय; चर्मी=कातडी (पेकाम. चर्मीसामान, खरे ११.५९१).]

चर्या स्त्री. चेहरा, आकार, रूप, तोंडवळा, पद्धत, चाल, रीत, वहिवाट. Deportment, air, look, manner, usual conduct.

[सं. चर् १ गतौ.]

चर्र् अ. भयभीत, धसक. (The sound of tearing, or of searing), or out of fear.

[ध्वनिशब्द.]

चऱ्हाट न. दोर, जाड दोरी. A long rough and coarse rope.

[*IE.* Qert, Qrt; सं. चृत्; *Lat.* Cart, Crat; हे शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत.]

चल(णें) क्रि. हलणें जाणें, निघणें. To set off,-out,-forth.

[सं. १ चलति; पा. चलति; प्रा. चलइ; बं. चला; ओ. चलिबा; हिं. चलना; पं. चलना; गु. चळवूं; अकामसा. चल=गति, चाल, हल्ला; चलती=भरभराट, चांगले दिवस, नशीव (लक्षणा); चलन, चलान= चालचलणूक, नाणें, देवघेवीचें साधन; चलणूक=वागणूक, पद्धत; चलबिचल=अस्थिर, गोंधळ, धरसोड (< चल्+ विचल्); चलाऊ=चालण्याजोगा.]

चलाख वि. हुशार, चपळ, तरतरीत. Smart, active, agile.

[फा. चालाक्, सं. चल् (?).]

¹चंव स्त्री. स्वाद, गोडी, आवड (लक्षणा). Taste, relish, liking.

[सं. चम् १ अदने; प्रा. चँअ>चंव.]

²चंव पुं. मोत्याचें (वजन), किंमतीचें मान, परिमाण. A measure in pearl-buying.

[?]

चव चोथा पुं. रस काढून घेतलेला भाग, निःसत्त्व द्रव्य. The rubbish, the dregs without any essence.

चव(णें) अक्रि. च्यवणें, निपचीत पडणें, अतिरेकाच्या संवयी लागणें, मूर्ख होणें. To fall prostrate, to become loose, to turn mad.

[सं. च्यु १ गतौ, पतने; प्रा. चव; गु. चववूँ= पुनर्जन्म घेणें; सिंह. हेनवा (पडणें).]

चवचाल वि. छछोर, छांदिष्ट, लहरी, स्वैर. Unsteady, freakish.

[चव (अतिरेकाची सवय) + चाल.]

चवक(णें) अक्रि. आश्चर्य वाटणें. To be surprised.

[सं. चमत्कृ.]

हें लोक व्यापक रूपडें । पाहातां देवाहि चवक पडे ॥
एयाचें सदमुखपण जाडें । भलतेया कडौनि ॥ रा. शा. ११-३३४

चवखल,-ळ अ. बरोबर, नीट, योग्य. Right, appropriate.

[सं. सम्+प्र+खल् १० शौचकर्मणि.]

चंवल(णें) अक्रि. चावळणें. To prattle (under the influeuce of sleep.)
[सं. श्वल् १ आशुगमने.]
जराचेनि आटोपें । रोगी भलतैसें जल्पे । चंवलित संकल्पें । जाणतैसें । रा. ज्ञा. १६-३६३.

चवडा पुं. हातापायाच्या बोटाजवळचा भाग. The middle of the foot.
[सं. चपेटा ; प्रा. चविडा.]

चवढव स्त्री. हालवाहलव, ढवळाढवळ, लुडबुड. A mess, a plight.
[ध्वनिशब्द.]

चवणा वि. मिजासी, नखरेबाज, चवदार. (One) with evil habits or tastes.
[सं. चर्व्, चम् १ अदने.]

चवरी स्त्री. (वनगाईच्या) केसांचा पंख्यासारखा जिन्नस, चामर. A chauri.
[सं. **चमरी** ; प्रा. **चमरी** ; अप. **चँअरी** ; याकाम. **चवरी** ; अकाम. **चौरी, चवरी.**]
सवें चूत-चंदन साती–धरी: पद्मिणी विजिती मृणाळांचा
चवरी ॥ नरुस्व. ७४४

चवरें न. मस्तक, शेवट, शिखर, गादी, बसावयाची जागा. The head, end, top, a padded seat.
[सं. **चूडा, चौल-ड** ; हिं. **चौरा** (चहुतरा) ; याकाम. **चवरें** (बसावयाची जागा–शिशु. ३६.)]
कीं ते परिमळाचे देव्हारे : वरि मन्मथाचें चवरें ॥
नरुस्व. ४३७.

चवळी स्त्री. एक प्रकारचें कडधान्य, अफवा. A kind of grain, a rumour, a report.
[गु. **चवळयो** = थाप, गप्प (चावळणें < चल्).]

चवाठा, चव्हाटा पुं. चार वाटा जेथें मिळतात तें ठिकाण, सार्वजनिक अड्डा, चावडी. The meeting place of four roads.
[सं. १ **चतुर्वर्त्मकम् > चउव्वट्टऊं, > चौटु** (गु.) ; याकाम. **चौहाँट, चउकट** (नरुस्व. ४१८) ; अकाम. **चावट, चहाटळ, चव्हाटा** ; २ **चतुरहट्टकम् > चउहट्टअं-यं > चउहट्टउं > चहुअट्टउं > चहूट्टअं > चहूटउ > चहटु > चौहाट.**]

चवाळें न. चारपांचांचा समूह, दोन पट्ट्यांची घोंगडी. A collection of four or five, a coarse blanket.
[सं. **चतुर् + वलयम्**]

चव्वेचाळीस चव्वेताळीस वि. चाळीस आणि चार. Forty-four.
[सं. चतुस् चत्वारिंशत् ; प्रा. **चौयालीसम्, चउत्तालीस, चउआली** ; बं. **चुयाल्लिस** ; ओ. **चौरालिस** ; हिं. **चौआलीस** ; पं. **चौताली** ; ल्हां. **चोताली** ; गु. **चौतालीस्, चुम्मालिस** ; कांहीं भाषांत 'त' राहिला व कांहीं इतर भाषांत 'च' राहिला.]

चष्मा पुं. कांच, भिंग, आरशी, ओटी, खोली (नाटकगृहांतील). Glass-spectacles, an apartment, a room between two posts.
[फा. **चश्म** = डोळा, **चश्म** = आरशी ; सं. **चक्ष्मन्.**]

चेहा स्त्री. आवड, वाहवा, शाबासकी. Liking or fondness, praise.
[सं. **चष्, जुष्, जोष** = इच्छा ? ; प्रा. **चाह** ; हिं. **चाय, चाहा** = इच्छा.]

चेहा पुं एक प्रकारची वनस्पति, तिचीं पानें–पेय. Tea.
[मूळ चिनी भाषेंतील शब्द Ch'a असा आहे, त्यावरून cha = चा हा शब्द झाला. पोर्तु. **-शा.** निरनिराळ्या प्रकारचे चहा : **पेको**-Pekoe (from Conton Pak–ho for Poh-hao = white town) ; **सुशांग** (From Canton Siu–Chung. for Siao–chung = Little sort.) ; **चहादाणी** = चहाचें भांडें (< **चादान.**).]

चहाडी, चाडी स्त्री. लावालावी, चुगली. Malicious babbling of one's misdeeds.
[कान. **चाडि** = निन्दा ; सं. **चर्ति** ; देप्रा. **चाड** = मायावी ; याकाम. **चाहाडा, चाहाडी** (शिशु. १३३) ; अकाम. **चाडी चुगली.**]

चहूं वि. चार, चहूंबाजूं–चहूंकडे. Four, four (sides), all sides.
[सं. **चतुस्** ; प्रा. **चउ** ; अप. **चहु** ; सामान्यीकरणानें चहूं = सर्व.]

चळचळ स्त्री. भीति, भीतीचा कंप, चांचल्य. Terror, trembling.

[सं. **चलति** ; पा. **चल** ; प्रा. **चल** ; बं. **चाला** ; गु. **चळघूँ**. आतिशयदर्शक द्विरुक्ति ; अकामसा. **चळण** = चलनवलन ; **चळणें** = भ्रमिष्ट होणें, घसरणें.]

चळथ स्त्री. उतरंड, एकावर एक जिन्नस ठेवून झालेला समूह. A pile or orderly heap.

[म. **चढणें** पहा. याकाम. **चळथ, चळथा.**]

तारुण्य-नगरिच्चिया सांता । कीं नवया लावण्याच्चिया चळथा ॥
नरुस्व. ८१७.

चळवळ स्त्री. हालचाल, चपलपणा. Restlessness, fidgetiness.

[सं. **चल्** + **वल्** (द्विधातुसंयोग) ; याकाम. **चळावळिश्र** (उगी. ३१०) ; अकाम. **चळवळणें** = हलणें, अस्वस्थ होणें.]

चक्षु पुं. डोळा, नेत्र. An eye.

[सं. **चक्षुस्** (न.) ; ✓ **चक्ष्** = दर्शने.]

चा पुं. (वि.) षष्ठीचा प्रत्यय-चा, ची, चें. Termination of genitine ease.

[सं. **स्य, ईय, त्य,** असे तीन संस्कृत प्रत्यय ह्याचें मूळ म्हणून देतात. कोणाच्या मतें **स्य,** तर कोणाच्या **ईय** किंवा **त्य** अशीं भिन्न मतें आहेत. रूपें पुढें दिलीं आहेत. १ सं. **स्य** ; प्रा. **स्स** ; अप. **स्स, णं, हं** ; २ सं. **ईय** ; प्रा. **इज्ज, चेय, चेअ** ; अप. **चेअ, केर** ; ३ सं. **त्य** ; प्रा. **च** ; याकाम. अकाम. **चा, जा, ला.**]

चाउटी स्त्री. निरर्थक बडबड, गप्पासप्पा. Meaningless prattling.

[सं. **चतुर्वाटिका** (?), **वाचाट** ; (वर्णविपर्ययानें) **चावट** (?) '**चव्हाटा**' पासून किंवा **चहाटळ** पासून (?) ; **चव्हाटा** पहा.]

येक म्हणे तीं सांडा गोठी ।
आधीं पाहिजे ते रोटी । मग करावी चाउटी सावकाश ।
दा. बो. ८-१०-२६

चाउरी, चाऊरी स्त्री. मंडपी, घुमट. A canopy.

[सं. **चतुर्, -कोरी, कोनी** ; देप्रा. **चउंरिया** ; **चउरी** = मंडप, **चोरी** ; याकाम. **चवरें** (वसावयाची जागा), **चाउरी** (शिशु. ६४) ; अकाम. **चहूतरा, चभूतरा चौहटा.**]

चाक न. वाटोळें चक्र. A wheel.

[*IE.* Qeqlo, Qer-qer = **चक्र** ; सं. **चक्रम्** (✓कृ-अभ्यास ; **कृमि** ; **चिकुर, चक्र, चक्रवर्तिन्** इ संबद्ध शब्द) ; *Av.* Chaxerem = चक्र ; *Lat.* Cir ; *Lith.* Crivus, Crivu ; सं. **चक्रम्** ; प्रा. पा. **चक्क** ; बं. **चाक** ; ओ. **चक** ; वि.हिं. **चाक** ; हिं. **चाका** ; पं. **चक्क** ; **चक्की** ; गु. **चाक** ; सिं. **चकु** ; ने. **चाको.** प्राकृतमध्यें हा पुंल्लिंगी आहे. मराठींत नपुं. झाला.]

चाकोरी स्त्री. चाकाची खूण. A wheel-rut.

[तु. **चाक** = चपळ तयार (श. को.) (चाक + ओरा = ओरखडा.]

चाकर पुं. नोकर, गडी, सेवक. A servant, an attendant.

[फा. **चाकर्** = नौकर ; पेकाम. **चाकरमाने, चाकरपेशा** = नोकरीचा व्यवसाय (< फा. **चाकर** + **पेशा** = धंदा).]

चाकू पुं. (लेखणी करण्याची) लहान छोटी सुरी. A penknife.

[तु. **चाकू.**]

चाक (करणें) वि. सरळ, चलाख, सुटसुटीत, नीट. Smart, tidy, trim.

[फा. **चाक् कर्दन्** ; पेकाम. **चाक** (दिमरा २-८२) ; अकाम. **चाट होणें.** उदा० मी चाट झालों = दिङ्मूढ झालों.]

चाख(णें) क्रि. चव पहाणें, जिभेनें चाटणें. To try the flavor of, to taste.

[सं. १ **चक्ष्** (✓ **चष्** १ अदने) ; प्रा. **चक्ख, चड्ड** ; बं. **चाखा, चाका** ; ओ. **चाखिबा** ; हिं. **चाखना** ; पं. **चक्खणा** ; अकाम. **चाखेणें** ; २ **चष्** = खाणें ; **जक्ष्** १ भक्षणे < **घस्, जघस्य** (अभ्यास) ; फा. '**चेशिदन्**' पासून व्युत्पत्ति दिलेली ग्राह्य नाहीं. '**चाटणें**' हा धातूहि ह्याच्याशीं संबद्ध आहे.]

चांग, चांगलें वि. सुंदर, मनोहर, रम्य. Good, nice.

[सं. **चंगः** ; देप्रा. **चङ्ग** (चारु) ; प्रा. **चंग** ; बं. **चाना** ; हिं. **चांगल** ; कान. **चांगु** = शाबास ; पं. **चंगा** ; सिं. **चंगो** ; गु. **चांगी** ; याकाम. **चांग** = चांगला, सुंदर (शिशु. ६४. उगी. ७०६). सिं. **चांगो भलो.** जोतिबाच्या जयजयकारांत मूळ रूपांत राहिला आहे. उदा० **चांगभलें.** मराठींत '**ल**' हा प्रत्यय लागून '**चांगला**' असा शब्द सिद्ध झाला.]

तया पासौनीं मानवी **चांग** : मर्त्य लोकींचे ॥ नरुस्व. २०७

चाचणी स्त्री. पारख, परीक्षा, तपासणी. Examining, testing, trying.

[सं. **चच्** १० अध्ययने.]

चांचर(णें) अक्रि. रेलणें, बहकणें, अडखळणें. To stagger or to reel.
[सं. अत्याचर् १ गतौ, (√ चर् १ गतौ,) > अच्चाचर > चाचर; कान. चचर=घाई; अकामसा. चाचर=अडखळणें ; चाचरी मुद्रा = ध्यानस्थपणा,-अवस्था ; चाचरा = बोबडा, चोचरा.]

चाचरी स्त्री. तिरपी झुकांडी. Staggering, reeling.
[म. चाचरणें पहा. याकाम. चाचरी (नरुस्व. ४५०).]

चाचरी (जाणें) अक्रि. अडखळत चालणें,-बोलणें, बोबडी वळणें, चांचरणें. To stammer, to falter.

कैसीं कुसुमरजें माजिरी । भलतेही जात चांचरी ॥
नरुस्व. ७६९

चाचप(णें) सक्रि. हातानें स्पर्श करून पहाणें. To feel with the hand.
[सं. स्पश् १० आदाने, > संस्पश् > चस्पश्, चप् १० परिकल्कने ; चचप.]

चाचपड(णें) अक्रि. अडखळणें. To grope, to speak with hesitation.
[सं. चच् १ गतौ + पत् १ गतौ (द्वि. धा. सं.).]

चाचाव(णें) सक्रि. तोडणें, चेंचणें, हळुहळू चेंचणें. To chop, to strike with gentle blows.
[सं. चर्च् १ भेदे (अभ्यास) ; कान. कच्चु = मारणें.]

चाचुवडें, (चांचुवडा) न. चोंच. A beak, a bill.
[सं चंचुपुट ; प्रा. चांचुउड ; याकाम. चांचुआडें (शिशु. ६४७).]

चांचूं न.स्त्री. हूं चूं, सावधानता. A word of hesitation, attentiveness.
[ध्वनिशब्द.]

चांच पुं. समुद्रावरील लुटारू. A pirate.
[चांच नांवाचें एक अरबीसमुद्रांतील बेट (श.को.). सं. जर्च् १ हिंसायाम् ; अकामसा. चांचेगिरी = समुद्रांतील लुटारूपणा.]

चाट(णें) सक्रि. जिभेनें खाणें. To lick.
[सं. चष्ट (निष्ठा, √चक्ष्, √चष्); देप्रा. चट्ट ; प्रा. चट्टइ ; चड्डइ ; बं. चाटा ; ओ. चाटिबा; हिं चाटना ; पं. चट्टणा ; सिं. चटणु ; गु. चाटवूँ ; ने. चाटनु.]

चाट(णें) अक्रि. चिकटणें, स्पर्श करणें, नुकसान करणें. To touch, to stick, to injure.
[सं. चच् १० हिंसायाम् उदा०-गोळी चाटून गेली.]

चाट स्त्री. नुकसान. Ruin, loss.
[सं. चट् १० हिंसायाम्.]

चाट स्त्री. गप्प, बडबड. Tedious prate.
[सं. चाटु = वाचाट.]

चाटी, चाट्या पुं. कापडाचा व्यापारी, त्यांची एक जात. A clothier.
[सं. श्रेष्टी ; तामीळ. = चेट्टी, (माल)चाटे = मालाची तपासणी करणारा. दादोबा पांडुरंगांच्या आत्मचरित्रांत मालचाटे = 'सेक्रेटरी' ह्या अर्थी वापरला (इ. स. १८८०). (चाट = खाणें किंवा कापडाचा व्यापारी); याकाम. चाटा = व्यापारी.]

तेथ वनीज वाहाति चाटे । मळयानिळा ऐसे ॥ नरुस्व. ८३९.

चाटु, चाटसी स्त्री. पळी. A wooden ladle.
[सं. चष्ट, (निष्ठा) चष् १ अदने ; प्रा. चट्टु ; देप्रा. चट्टू दारुहस्तः (१११·४) ; पं. चट्टु ; हिं. चाटी ; गु. चाडुं (पळी) तोंड ; सिं. चाडी; पं. चाटी ; सिं. सलू, सॅलिय (मातीचें भांडें).]

चाड-चाडी स्त्री. आवड, गोडी, इच्छा, लज्जा, पर्वा. Liking, fondness, desire.
[सं. चाति, चादि चाटु = गोड भाषण, √चत्, √चद् १ याचने; गु. चाड (काळजी); सिं. चाडि (इच्छा); पं. चाट (मनाचा कल) ; याकाम. चाड (= इच्छा ज्ञा. ६-६४).]

तैसा बरवा नाहीं रूपें । आन कोण्हाची चाड नाहीं स्वरूपें ॥
नरुस्व. ३३९.

चाडी, चाडें, चाढें स्त्री. न. टवळें, पणतीमधील तेल घालण्याची जागा, नरसाळें. The saucer-form vessel of a lamp-stand for oil and wicks.
[सं. चर्ति = चकति, चक्र.]

चाणक्य पुं. व्यक्तिनाम, ह्यानें चंद्रगुप्तमौर्यास सिंहासनावर बसविलें. एक निःस्पृह, राजकारणी धूर्त मनुष्य. पाताळयंत्री राजकारणी पुरुष (ल.). The name of an individual, applied appellatively to a man of parts.
[सं. चाणक्य.]

चाणाक्ष वि. हुशार, चतुर, धूर्त. Clever, shrewd.
[सं. चाणक्य (अपभ्रंश) (मो).]

चांडाळ वि. एक निकृष्ट जात, दुष्ट. A low caste, wicked (fig.).
[सं. **चण्डाल** ; प्रा. **चंडाल**.]

चात, चाती स्त्री. सूत गुंडाळण्याची सळई, सूत काढण्याची चकती, चपटा तुकडा. A flat circular piece (with a small stick) used for spinning.
[देप्रा. **चत्त** (पा. म.) ; **चत्तोतर्कुः** (१११·४).= सूत काढण्याचें साधन; परंतु ह्याच्या मुळाशीं **चकती** < सं. **चक्र+ती** असा संस्कृत तत्सम शब्द असावा. सं. **कृत्** = सूत काढणें ; **तर्कु** = चाती (वर्णव्यत्यास).]

चातक पुं. एक पक्षी (हा मेघांतून पडलेले जलबिंदुच फक्त पितो असा संकेत). A particular bird.
[सं. **चातक** (√**चत्** (वैदिक) याचने + **अकच्** ; अकामसा. **चातकन्यायें** = चातकाप्रमाणें मोठ्या उत्कंठेनें.]

चातुर्थिक पुं. न. चार दिवसांच्या अंतरानें येणारा हिंवताप. (अर्थ मर्यादित झाला विशेषीकरणानें). The fourth-day ague.
[सं. **चतुर्थ + इक** > **चतुर् + थ**.]

चातुर्य न. चतुरपणा, हुशारी. Sagacity, shrewdness.
[सं. **चातुर्य** > **चतुर**, √ **चत्**.]

चाथा पुं. सार. Essence.
[**चोथा** = गाळ.]

चांथी स्त्री. बडबड. Prattle.
[सं. **चाटु** √ **चट्** १ परिकल्कने.]

चादर स्त्री. वस्त्रविशेष, चौकोनी मोठें पांघरण्याचें वस्त्र (मुसलमानी थडग्यावर पसरण्याचें-मूळ अर्थ). A sheet or a large white cloth.
[फा. **चादर्**, **चौतर** (ऐनी अकबरी) = चार धाग्यांचें **वस्त्र** ; हिं. **चद्दर** = वस्त्र. हा शब्द हिंदीमधून १६ व्या शतकांत आला असावा. उदा. **आग्राचादर**, **रामपूरचादर**.]

चांद, चांदोबा पुं. चन्द्र. The Moon.
[सं. **चन्द्र** ; पा. प्रा. **चंद** (पुं) ; ओ. **चान्द** ; बं.हिं.गु. **चांद्** ; पं. **चंद**, **चंदर** ; सिं. **चंडु**, **चंद्रु** ; ने. **चांद्** ; याकाम. **चांद** (नरुस्व. ५३८.) **चांदोबा दाखविणें** = चंद्र पुष्कळ दिसतील,–काजवे चमकतील अशी चपराक देणें.]

चांदकी स्त्री. वाटोळी भाकर, तुकडा, वाटोळा दागिना. A small round cake or ornament.
[सं. **चन्द्र** > **चंद + क**, (**स्त्री–चांदकी**) चांदणी, देप्रा. **चंदणी** = चंद्राची पत्नी.]

चांदई स्त्री. आढ्यापर्यंत पोहोंचणारी भिंत. A gable wall.
[कान. **चंदी**.]

चांदणें न. चंद्राचा प्रकाश. Moon-light.
[सं. **चन्द्रः** > **चंद्रण** ; देप्रा. **चंदिण** (चन्द्रप्रभा); प्रा. **चंद्दण** ; बं. **चांदनी** ओ. **चान्दनी** ; हिं. **चांदनी** ; गु. **चांदरणुं** ; याकाम. **चांदिणें** (चंद्राचा प्रकाश. नरुस्व. ७६२) चंद्र पहा.]

चांदरात स्त्री. पगाराचा दिवस, मुशाहिरा वाटण्याचा दिवस. The pay-day.
[सं. **चंद्ररात्री** ; फा. हिं. **चांदरात** ; **चंद्रात्मन्–चंदरात–चांदरात** (भाअ. १८३२). पूर्वी पेशवाईंत किंवा मुसलमानी राजवटींत मुशाहिरा वाटण्याचे निरनिराळे दिवस ठरविले जात. रोजमरा, आठवडा, महिना अशा मुदती असत व त्या त्या मुदतीप्रमाणें वाटल्या जाणाऱ्या पगाराला नांव असे. महिन्याचा पगार ज्या दिवशीं चंद्र दिसे–म्हणजे द्वितीयेस वाटत, म्हणून त्याला चांदरात म्हणत. त्यावरून पुढें पगाराच्या दिवसास चांदरात असें सामान्य·रीत्या नांव पडलें.]

चांदवा पुं. छत, धर्मकार्यांत वर जें छत्र धरतात तें. A covering, a canopy.
[सं. **चंद्रकः** ; प्रा. **चन्दअ** ; बं. **चांदोया** ; ओ. **चान्दुआ** ; हिं. **चन्दवा** ; पं. **चादवा** ; सिं. **चंद्रो** ; ने. **चन्दुवा** ; याकाम. **चांदोवा** (=छत. नरुस्व ४२७).]

चांदी स्त्री. धातुविशेष, रुपें. Pure silver.
[सं. **चंद्रिका** (?), (**चन्नी**, **चान्दी**) ; बं. **चाँदी** ; हिं. पं. सिं. गु. ने. **चांदी** ; **चांदी आटणें** = खोड निघणें, रग जिरणें ; (**चन्नी** पासून निघालेला) हा चांदी शब्द निराळा].

चांद्रमान न. वि. चंद्राच्या गतीच्या परिमाणावरून मोजलेलें (प्रतियोगी शब्द **सौरमान**–सूर्याच्या गतीप्रमाणें). Lunar measurement.
[सं. **चांद्रमान** < **चंद्र + मान**, √ **चंद्**–दीप्तौ, √**मा**–माने ; **चांद्रमास** = चंद्राच्या गतीप्रमाणें होणारा महिना. (२९ दि. १४ ता. १४ मि. इतका.]

चांद्रायण न. एक प्रायश्चित्ताचा प्रकार, व्रत, पौर्णिमेस पंधरा घास, नंतर एक एक कमी करून अमावास्येस शून्य व पुन्हा वाढ असें सेवन.

An expiatory observance regulated by waxing and waning of the Moon

[सं. **चंद्र**, √ **चंद्**– प्रकाशने, **अयन** √ **इ**, √ **अय्** गतौ.]

चांप(णें) क्रि. दाबणें. To compress or press.

[सं. **चर्प (?)**, **चप्** १ सांत्वने ; प्रा. **चप्पइ, चंपई** ; बं. **चांप** ; ओ. **चापुआ** ; हिं. **चापना, चप्पा** ; गु. **चांपवूँ** ; सिं. **चपू.**]

चांप पुं. कानांतील दागिना. An ear-ring.

चाप पुं. एक प्रकारचें दाबाचें साधन. A screw press, the lock.

चांप(णें) सक्रि. रागें भरणें. To scold.

[सं. **चप्** १० परिकल्कने ; प्रा. **चप** ; देप्रा. **चंपण** ; **जी**-(णिच्) **जापय**> **चापय** ; फा. **चापिदन्**=मारणें.]

चापट, चापटी स्त्री. थप्पड, चपराक, थापट. A slap or smack.

[सं. **चर्पटः** ; देप्रा. **चाप्टो** ; बं. **चाप्टी** ; ओ. **चेपा, चेप्टी** (सपाट) ; हिं. पं. **चप्टा** ; गु. **चांपट, चपट्ट** ; ने. **चेप्टो.**]

चापट वि. थापट, सपाट, खालपट. Low and flattish.

[सं. **चर्पटः**> **चाप्पट** ; पं. **चापर** ; ल्हां. **चापरी** ; सिं. **चापोरो, चपितरु** ; गु. **चापट, चपट** ; हिं. **चपटा, चपरी** (शेणाची गोवरी) ; फा. **चपत्, चपात्.**]

चांपड(णें) अक्रि. आंजारणें, गोंजारणें, तेल लावून मऊ करणें. To coax, to make smooth by oiling.

[सं. **चप्** १ सांत्वने + **ट्** (स्वार्थे).]

तैसे श्रद्धचे दलवाडें । आंगें किर चोखडें । परि प्राणियां चांपडे । विभागे जैं ॥ रा. ज्ञा. १७–५५.

चापस(णें) क्रि. चाचपणें, अंधारांत हुडकणें. To feel about.

[सं. **स्पश्**, (अभ्यास) **स्पस्पश्**–राजधा.]

चांफा पुं. पुष्पविशेष, वृक्षविशेष. A flower tree.

[सं. **चंपक** ; प्रा. **चंपअ, चंपय** ; पेल्हवी. **चन्प** ; गु. **चांपुं** ; सि. **चंबो** ; पं. **चंबा, चंपा** ; का. **चंब** ; हिं. **चंपा.** शब्द फार जुना आहे. मूळ आर्य भाषेंतून पेल्हवी भाषेंत, तेथून अरबींत; तसेंच मूळ आर्यभाषेंतून संस्कृतमध्यें व तेथून मराठींत असा ह्या शब्दाचा प्रवास आहे.]

चावूक पुं. बारीक आसूड, कोरडा (घोड्यासाठीं). A horse-whip.

[फा. **चाबुक्**=चुणचुणीत, तलख ; हिं. **चाबूक**= घोड्याचा चाबूक ; जावा, मलाया. **चाबोक, चांबोक, संबोक** ; अकामसा. **चाबूकस्वार**=घोड्यास शिकविणारा (फा. **चाबुक्–सुवार्**).]

चामडें, चाम (चांबडी–डें) न. कमाविलेलें कातडें. Hide, leather.

[सं. **चर्मन्+ड** प्रा. **चम्मड** ; ‘ड’ हा प्रत्यय आहे असें ‘टर्नर’ वगैरे म्हणतात. परंतु “**अन्त्र**> **आंतडें**” ह्या व्युत्पत्तीच्या साम्यानें (analogy) तो ‘डें’ लागला आहे. ‘आतडें’ मधील ‘डें’ हा प्रत्यय नाहीं. गु. हिं. बं. **चाम** ; सिं. **चमु** ; पं. **चम्म** ; सिंह. **सम** ; याकाम. **चामडी** (ली. च. १–५५).]

चामखीळ पुं. शरीरावरील मोड. A wart.

[सं. **चर्मन्+कील.**]

चामर न. चवरी. A chauri.

[सं. **चामर**<**चमरी** ; याकाम. **चवरी** (=वनगाईच्या केसांचा झुबका, नरुस्व. ७४४), **चवरधर** (नरुस्व. ६९५) ; अकाम. **चवरी, चौरी.**]

चामुण्डा स्त्री. देवीचें नांव, (त्यावरून लक्षणेनें) द्राष्ट स्त्री. The name of goddess, (hence) a shrew.

[द्रा. **सावु** (=मृत्यु, प्रेत) + **उण्डा, उण्डी, उणि, उण्णि, ओउत्ती, उरुण्डी** (=लोळणारी), **चण्डी** पहा.]

चांभार पुं. जोडे शिवणारा, कातडें कमाविणारा. A cobbler or shoe-maker.

[सं. **चर्मकार** ; पा. **चम्मकारो** ; प्रा. **चम्मारअ** ; बं. **चामार** ; ओ. **चमार** ; बि. हिं. **चमार** ; सिं. **चमारु** ; ने. **चमार्** ; सिंह. **सोम्मारु** ; पं. **चमार, चमिआर** ; याकाम. **चाम्हारु** (ली. च. १–१२), **चामाडी** (ली. च. १–५५)]

चार(णें) सक्रि. (गवत) खावयास घालणें. To graze, to pasture.

[सं. **चर्व्** १ चर्वणे, अदने (णिच्) ; अकामसा. **चारा**= पशुपक्षी यांचें खाणें ; **चाराचुरा**=बारीक तुकडे ; **चारणी**= खाण्याची क्रिया. (सं. **चर्व्**> **चारि** ; प्रा. **चारि.**)]

^{१}**चार** त्रि. संख्याविशेषण, एकाच्या चौपट. Four.
[सं. **चत्वारि ; प्रा. चत्तार, चत्तारी, चत्तारो ;** अप. **चारि ;** बं. ओ. बि. **चारि ;** हिं. पं. **चार ;** सिं. **चारि ;** गु. **चार ;** बकाम. **चिआर** (नागांव शिलालेख); **चतुर्** पहा.]

^{२}**चार** पुं. एका झाडाचें नांव. A kind of tree.
[देप्रा. **चारो पियाल वृक्षः** (११९-९). **चारोळी** = (चारवल्ली) चार नांवाच्या वनस्पतीचें बीं.]

^{३}**चार** पुं. गति, गमन, खेळ, चेष्टा, चाळे. Light habits or ways, pranks, frolics.
[सं. **चार**, √**चर्** १ गतौ, १० संशये ; प्रा. **चार** (पुं) ; म. (**वेडे**) **चार**.]

^{४}**चार** पुं. हेर, गुप्त दूत, निरोप्या. A spy, a scout.
[सं. **चर**.]

चारकट, चारगट वि. वात्रट, चावट, कुटाळ, बाष्कळ. Addicted to ill habits, prankish.
[सं. **चारभट-चारहट-चारगट** (भाअ. १८३४), **चारकृत्**. ही व्युत्पत्ति काल्पनिक दिसते. **चर्कट, चर्पट** असा शब्द **तर्क+ट** ह्यासारखा झाला असावा. किंवा **चार** (**वेडे**-चार, खेळ, चाळे) + **कट** अशा मार्गानें आला असावा.]

चारु वि. चांगलें, सुंदर, रम्य. Beautiful, elegant.
[सं. **चारु**, √ **चर्** १ गतौ ; याकाम. **चारु** (नरुस्व. ८१४) अकाम. **चारुगात्री, चारुवर्णा, चारुस्थळ** इत्यादि.]

चार्वाक पुं. व्यक्तिनाम, पूर्वींच्या एका ऋषीचें नाम. ह्यानें ‘ सुखवाद ’ प्रचलित केला. हा नास्तिकवादी होता. त्यावरून आधिभौतिक सुखवादी, नास्तिकवादी असा अर्थ. The name of an individual, an atheist.
[सं. **चार्वाक**.]

चाल(णें) अक्रि. हलणें, जाणें, मार्ग क्रमणें. To move, to go, to get on.
[*IE*. Qer, Qel (गतौ) ; सं. **चल्, चर्, कल्** गतौ; हिं. **चलना**, गु. **चलवूँ ;** सं. **चल्** १ गतौ (णिच्) **चालय ;** पा. **चाल ;** प्रा. **चाल, चल्लइ ;** झेंद. **चर ;** फा. **चरिदन्** हे संबद्ध शब्द आहेत. गु. बं. ओ. **चाल;** पं. **चल्ल ;** सिं. हिं. **चल ;** का. **चल्** (पळून जाणें) ; सिंह. **सल** (हलविणें) ; म. **चालव, चाळव, चाळणी, चालता, चाल, चालू, चालढकल, चालक,** इत्यादि शब्द ह्यापासूनच सिद्ध होतात.]

चाल स्त्री. वागणूक, पद्धत, वर्तन, गति. Custom, fashion, manner, behaviour.
[सं. **चर्या** > चल्या, चल्ली ; प्रा. **चल्ली ;** बं. **चाल् ;** ओ. **चाल ;** हिं. **चाल् ;** गु. **चाल्**.]

चालाणा पालाणा पुं. सैन्याची कूच करण्याची तयारी. The march of an army.
[म. **चालाणा** (√ **चल्, चर्**) + **पालाणा** = खोगीर ; याकाम. **चालाणापालाणा**.]

चालाणापालाणा भणओनि आफाविलिया भेरी—
धवळे पूर्वार्ध २६.

चाव(णें) सक्रि. दांतानें बारीक तुकडे करणें, दंश करणें. To chew, to bite.
[सं. १ **चर्व्** (१० चर्वणे), **चर्पट;** पा. **चप्पेति ;** प्रा. **चाव ;** का. **चापून ;** गु. **चाव् ;** सिं. पं. **चब्ब;** हिं. बं. **चाब**. २ सं. **छो** ४ कापणें, तुकडे करणें ; कान. **कच्चु**=चावणें. (कचकन्-चावला); पहिली अधिक ग्राह्य, दुसऱ्यांत ‘ व ’ची उपपत्ति लागत नाहीं; **चावरा** = चावणारा.]

चावट वि. वात्रट, बडबड करणारा, चहाटळ. Prankish, talkative.
[म. **चौहाट**. प्रसिद्ध ठिकाणीं वक्तव्य करणारा. **वाचाट** शब्दाचा वर्णविपर्यय होऊन सिद्ध झाला आहे. शब्दाच्या अर्थांत बदल-अर्थभ्रंश झाला आहे. **चावटा** = वटवट.]

चावडी स्त्री. गांवांतील सरकारी कचेरी, पाटलाची बसण्याची जागा, कोतवालाची कचेरी. The place of business in a village, the kotwal's hall.
[सं. **चौहाट** > **चौवाडी ;** हिं. **चावडी ;** याकाम. **चाहवडी** (वेळापूर शिलालेख.)]

चावल पुं. तांदूळ The rice.
[सं. **चर्व्** १ अदने (?), **शाली** = तांदूळ; देप्रा. **चाउला** (तंडुला) ; बं. **चाउल ;** ओ. **चाउळ ;** बि. **चाउर ;** हिं. **चांवल ;** पं. **चाउल ;** सिं. **चाउरु ;** गु. **चावल**. मराठीमध्यें हा शब्द हिंदीमधून चौदाव्या शतकांत आला.]

चावदस स्त्री. (कृष्णपक्षांतील) चौदावी तिथि, वद्य चतुर्दशी. The fourteenth day of dark half.
[सं. **चतुर्दशी ;** प्रा. **चउद्दसी**. अकामग्रामणि. **चावदस**.]

चावळ(णें) अक्रि. बोलणें, झोंपेंत बडबडणें. To talk incoherently, to rave.
[सं. **जल्प्** १ व्यक्तायां वाचि, > **जळप** > **चळव ; चाळवणें** = बोलणें (अमृतानुभव). ह्याच्या अर्थांत विशेषी

करण झालें. मूळ अर्थ बोलणें, त्यावरून झोंपेंत बोलणें हा विशिष्ट अर्थ झाला. सं. स्वप्+चल्, श्वल्>श्वलनं-चवळ-चवळ-चावळ (भा. अ. १८३२.) ही व्युत्पत्ति पाण्डित्याची दर्शक व काल्पनिक आहे.]

चावी स्त्री. किल्ली. A key.

[Portu; Chave; तुर्की. **चावे**, बं. **सावी** ; तामीळ. **सावी** ; हिं. चाबी, चाभी.]

चास स्त्री. नांगरट, नांगरावयासारखी जमीन, नांगराची फरफट. The ploughed farm, the furrow of a plough.

[हिं. **चास**.]

१चाह(णें) सक्रि. मानणें, मान देणें, स्तुति करणें. To respect, to like, to praise.

[सं. **चाय्** = to note, to revere (Whitney), शंस्, जुष् १ स्तुतौ, अपेक्षायाम्.]

२चाह(णें) क्रि. हवें असणें, इच्छिणें. To love, to like, to desire.

[सं. **चक्ष्** ; प्रा. **चक्ख्**, **चहइ** ; बं. **चाहा**; आ. **चाहिबा**; अशा तऱ्हेनें 'टर्नर'नें व्युत्पत्ति देऊन समर्थनार्थ '**पाह**'<**प्रचाह**<सं. प्रचक्ष् हें उदाहरण दिलें आहे. हें सर्व व्यर्थ पाण्डित्य आहे. '**जोष्**' **जुष्** ह्या धातूपासून '**चाह**' ची व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक आहे. गुजराती '**जोस**' असा शब्द आहे. त्यापासून 'चाह' हा शब्द उत्पन्न झाला आहे. सं. **चष्**, **चाय्** १ पूजायाम्; प्रा. चाह.]

चाहूर, चावर पुं. जमिनीचें मापन, एकशेंवीस बिघ्यां इतकें. A land measure (120 bighas).

[फा. **चाहर**, **चाऽहरी** = बैलाची जोडी जुंपण्याची दोरी ?]

चाहूल स्त्री. हालचाल, आवाज, कानोसा, पडसाद. Movement, a sound indicating a movement, a signal.

[सं. **चलनवलन** √ **चल्** + **व्हल्** (?); अकाम. **चाल** + **हूल** (?).]

चाळ स्त्री. सारख्या खोल्या असलेली लांबट आणि अरुंद इमारत. A long and narrow building having rooms.

[सं. **शाला-साळ-चाळ** (भा. अ. १८३२).]

चाळ(णें) क्रि. चलावयास लावणें, हलवणें (पीठ), पेलणें, झेंपणें. To make, to move, to sift, to turn, to strain.

[सं. १ **चालय** ; प्रा. **चालेइ** ; बं. **चाला** ; गु. **चाळवूं**. २ सं. चालय; पा. **चाले(ति)**; प्रा. **चालेई**. बं. **चाला**, **चाळनी** ; याकाम. **चाळक** = आज्ञा पाळणारा-नरुस्व. ३०२; **चालना देणारा** (नरुस्व. ७७०); **चाळणें** (= हातांनीं तोलून धरणें-नरुस्व. ४५८); **चाळवणें** (झकवणें, चलितचित्त करणें. नरुस्व. ४०५); **चाळ** = पैंजण, शीळ, चाळणींत राहिलेला पिठाचा भाग ; **चाळक** = खोडकर ; **चाळणी**, **चाळण** = चाळावयाचें साधन; **चाळवणें** = फसविणें (< चल् १० संशये); **चाळा**=छंद, नाद ; **चाळौणी** = टाळाटाळ ; अकाम. **चाळवणें**.]

चाळीस वि. संख्याविशेष, चार वेळा दहा. Forty.

[सं. **चत्वारिंशत्** ; पा. **चत्तालीसम्**, **चत्तारिसम्** ; प्रा. **चत्तालिसम**, **चायालीसम्** ; अप. **चालीसम्** ; बं. **चाह्लीस** ; ओ. **चाळीस** ; हिं. **चालिस्** ; सिं. **चालिह** ; गु. **चालीस** ; सिंह. **सतळिह**, **साळिस**.]

चाक्षुष वि. प्रत्यक्ष, डोळ्यांसंबंधीं. Belonging to the eye, in presence.

[सं. **चक्षुस्** + **अ**.]

चि, च, अ. एक निश्चयार्थक अव्यय. An emphatic expletive.

[सं. **एव** ; प्रा. **एज्ज** ; **च**, **चि** (काव्य).]

चिक पुं. बांबूच्या काड्यांचा केलेला पडदा. A curtain of bamboo sticks.

[तुर्की. **चिध्**, **चिग्** = पातळ पडदा, कामट्याचा पडदा.]

चिकचिक वि. ओलें, भिजलेलें, चिकटपणा असलेलें. Clammy.

[सं. **शीक्**, **सीक्** १ आर्द्रीभवने.]

चिकट(णें) सक्रि. संलग्न होणें, लागून असणें. To stick or to adhere to.

[सं **शीक्** १ आर्द्रीभवने, **चीक्** १ स्पर्शने ; सं. **चिक्कण**; प्रा. **चिखल्ल** ; कान. **जिगटु** = चिकटपणा ; परंतु कानडीमध्यें हा शब्द तद्भव दिसतो. **चिकटा** = चिकटून राहिलेला भाग, नेसण्याचें वस्त्र (कान. **चिक्क्** = लहान); **चिकसा** = अंगास लावावयाचें उटणें, एक खाण्याचा पदार्थ ; **चिकाटी** = पकड, धडाडी, सोशीकपणा, लवचिकपणा ; **चिकी** = पातळ चिकट पदार्थ, लुकण.]

चिकण, चिक्कण वि. चिकटलेलें, गोळा-चिकटा झालेलें. Gummy, unctuous.

[सं. **क्लिद्** ४ आर्द्रीभावे, **चिक्लिद्**, (अभ्यास) (निष्ठा) **चिक्लिन्न**. सं. **चिक्कण**; प्रा. **चिक्कण्ण**; हिं. **चिकना**

गुं. **चिकोणुं** ; पं. **चिक्कान** ; मराठी शब्द 'चीक' असा आहे. सिं. **चीको** = चिकटणारें, **चिकाम** = चिखलानें भरलेला, हिं. **चीक** (काजळीचा सांठा) हे शब्द चिन्त्य आहेत.]

चिकशा स्त्री. संशय, कंटाळा, वीट. Suspicion, nausea, loathing.

[सं. **चिकित्सा,** √ **कित्** १० ज्ञाने, (इच्छार्थकनाम) **चिकित्सा ; प्रा. चिकिसा** (अशोक शि. ले.) ; गु. **चिक्सा.**]

चिक्कट वि. चिकटणारें, ओलसर. Sticky.

[सं. **क्लिद्** ; देप्रा. **चिक्का** (= अल्पं वस्तु, तनुधारा ११९.९.).]

चिक्कार वि. गोंधळाची, आरडाओरडी, अतिशय. Clamorous, extreme.

[सं. **चीत्कारः** ; प्रा. **चिक्कार** ; पं. **चिकारा** ; देप्रा. **चिक्का** = अल्पं वस्तु तनधारा चेति द्व्यर्थः (११९.९) किंवा कान. **चिक** = लहान. ह्या दोन्ही शब्दांचा वरील शब्दाशीं संबंध आहे म्हणावें तर त्याच्या अर्थांत इतका बदल कसा झाला हा प्रश्न पडतो. अर्थ तर अगदीं उलट झाला आहे. प्राकृत '**चिक्कार**' हाच मूळ असावा. मुंबईंत '**चिक्कार**' हा शब्द फार रूढ आहे. उदा० चिक्कार गर्दी.]

चिकित्सा स्त्री. जाणण्याची इच्छा-परीक्षा, वैद्यानें केलेली परीक्षा, (अर्थाचें विशेषीकरण) कुकल्पना. Desire to know or to find out, minute examination, diagnosis.

[सं. **चिकित्सा,** √ **कित्** १० ज्ञाने, (अभ्यास) **चिकित् + सा** (इच्छार्थक प्रत्यय); **चिकित्सक** = दर्दी, तज्ज्ञ ; **चिकित्साखोर** = फाजील सूक्ष्मपणा करणारा (< चिकित्सा + खुर्दन्.]

¹**चिकू, चिक्कू** पुं. एक फळ. A kind of fruit.

[म. **चीक** < सं. **शीक्** १ आर्द्रीभवने.]

²**चिकू, चिक्कू** वि. कंजूष, कृपण. Miserly.

[सं. **स्तोक, क्षुत**; देप्रा. **चिक्क** ; कान. **चिक्क** = लहान; देप्रा. **चिक्का अल्पं वस्तु** (११९-९).]

चिखल पुं. ओल्या मातीचा गोळा, रेंदा, गारा. Mud, mire, muck.

[सं. **क्लिद्** ४ आर्द्रीभवने, (अभ्यास), **चिक्लिद्** (निष्ठा) **चिक्लिन्न** ; प्रा. **चिखिल्ल** ; **चिखिल्ल** देप्रा. **चिक्खल्लो कर्दमः** (११५-५) ; गु. **चिक्कल** ; पं. **चिक्कर** ; सिंह. **सिकल** ; **चिकिल-चिखल्ल-चिलुकक्षल** (राज.); **चिखल्या** = चिखलांत भिजल्यामुळें पायाच्या बोटांत होणाऱ्या भेगा.]

चिघळ(णें) अक्रि. पसरणें, गळणें, स्रवणें, पाझरणें, पाणी सुटणें. To melt, to run, to ooze.

[सं. **घृ** ३ क्षरणे ; **जिघृ** (अभ्यास) **जिघर** > **चिघळ, चिगळ,** किंवा **चिक्लिद्.**]

चिचुंदरी, चिचूंद्री स्त्री. उंदराची एक जात. The muskrat.

[१ सं. **चुचुंदर** ; देप्रा. **छच्छुंदर , छुछुनरो, छुछुन्दरो;** बं. **छुछुन्द्री, छूँछो** ; ओ. **छुंचा** ; हिं. पं. **छुछूंदर** २ सं. **छुछुदरी-छुछुदर-छुछुउदर-चिचुंदर** (भा.अ.१८३२) ही व्युत्पत्ति वृथा पाण्डित्यप्रकर्षाची आहे. हा ध्वनिशब्दच दिसतो.]

चिंच स्त्री. एक वृक्षविशेष व त्याचें फल (हें आंबट असतें.) The tamarind tree and its fruit.

[द्रा. **तिप्पली, पिप्पली, तिंतिण्णी** ; कान. **चिंचा.** ह्याच्या आद्य वर्णाच्या उपपत्तिबद्दल शंका आहे. सं **तिंत्तिण्णी** ; प्रा. **तिंतिण्णी, चिंचिण्णी** ; देप्रा. **चिञ्चा**; प्रा. **चिंचा.** मूळ शब्द द्राविडी असून त्याचें नंतर संस्कृतीकरण झालें आहे. नंतर त्याचीं प्राकृतरूपें बनलीं.]

चिंचपेटी स्त्री. चिंचेच्या पानाच्या आकाराच्या पेट्या असलेला दागिना. An ornament.

चिट(णें) अक्रि. कोरडें थान चोखणें. To suck a dry udder.

[सं. **चृत्** ६ पीडायाम्.]

चिटचिट पुं. पालीसारखा आवाज. A sound (like that of lizard).

[ध्वनिशब्द.]

चिटी, चिठी, चिट्ठी स्त्री. कागदाचा तुकडा. लहानसें पत्र. A note or small epistle.

[सं. **चिट् (?), चिट्टीका-चिट्टी,**-भा. अ. १८३२ (?); फा. **चिट** ; हिं. **चिठ्ठी** ; बं **चिठी** ; ओ. **चिठी** ; पं. **चिट्ठी**; सिं. **चिठी** ; गु. **चिठ्ठी** ; पेकाम. **चिटणीस, चिटनिवीस** = पत्रें लिहिणारा, पत्रव्यवहार करणारा ; < (चिट + निविस्तन् = लिहिणें) ; **चिटोरा** = कागदाचा तुकडा (निन्दाव्यंजक प्रत्यय-रा) ; **चिठ्ठा** = गोळा, कागद.]

चिटूक वि. लहान, क्षुद्र. Petty, mean.

[द्रा. **चिटी, चिट्ट, चिणि** = लहान.]

चिड(णें) क्रि. त्रासून जाणें, अपमान झालासा वाटणें, वैतागणें. To take offence.

[१ सं. चर्द्, चृद्, अस्यर्द् १ अपराद्धे, हिंसायाम्; देप्रा. चिड + क्क; हिं. चिथारना; पं. चिथणा (तुकडे करणें); हि. चीथना; पं. चित्थणा; सिं. चिथणु; ने. चिथर्नु. २ सं. क्ष्वेद्-थट्टा करणें; देप्रा. चिडा; हिं. चिराना; बं. चिरान; ओ. चिराइबा; पं. चिराउणा; सिं. चिराइनु; गु. चिडववूँ; कान. सिडि = रागावणें सिट्ट = राग, क्रोध; अकामसा. चिडणें = खरूज चिडणें; चिडव(णें) = खिजवणें, चेतविणें,; चिडाणी = संकटाची जागा, कांटेरी जागा, कुजकेपणा; **चिडखोर, चिढखोर** = चिडणारा, <चिड + खुर्दन्-फार्शी.]

चिडी स्त्री. चिमणी. A sparrow.

[सं. चटिका; प्रा. चडिआ, चिडिआ; चिडिया. हिं. पं. सिं. चिरी; गु. चिडियुँ; ने. चरि.]

चिडीमिडी, गोपचिडी स्त्री. हा शब्दप्रयोग मुलें खेळतांना म्हणतात. The word is used by children while at play.

[कान. चिडी = गर्दी, दाटी; चिडपु = चेंगरणें; चिडुगोडु = अव्यवस्था; गिचमीड (लिहिणें) हा शब्द ह्याशीं संबद्ध आहे. गोपचिडी=गर्दी, लपून शांत राहणें.]

चिण(णें) सक्रि. एकत्र-गोळा-करणें, वीट दगड चुना घालून रचणें, जिवंत गाडणें. To collect, to build up by ramming (stones, bricks, etc).

[सं. चि ५ समवाये; प्रा. चिण (सविकरण धातु प्राकृत, मराठी व इतर आर्योद्भव भाषांत उतरला आहे.); गु. चिणवूँ (घडी करणें); सिं. चुणणु; पं. चिणना (एकावर एक रचणें); हिं. चिनना, चुनना (जमा करणें); रुमा. चिनव् (हलविणें).]

चिणचिण स्त्री. चुणचुण, आग, लाही; रागाची कुरकुर. Pricking and itching.

[ध्वनिशब्द.]

चिणकुला वि. चिमुकला, लहान. Little and pretty.

[कान. चिण्णा = मूल; चिणोरा = चिमुकला. ('रा.' प्रा. व. म. प्रत्यय).]

चित् स्त्री. चेतना, चैतन्य, ज्ञान. Activity, the active principle, intellect, knowledge.

[सं. चित् (कित्) १० ज्ञाने; संसा. चित्कला = चैतन्याचा अंश, परमात्म्याचा अंश, जीवनकला; चित्सागर = ज्ञानरूपी समुद्र; चित्स्वरूप = ब्रह्माचें स्वरूप; चित्सुख = ज्ञानमय आनंद; चित्त = मन, बुद्धि; चित्तवृत्ति = लक्ष, मन; चित्तवेधक = चित्त वेधणारें-आकर्षित करणारें; चित्तशुद्धि = मनाचा शुद्धपणा, पावित्र्य; चिदंबर, चिदाकाश = चैतन्यरूप आकाश; चिदानंद = ज्ञानमय आनंद, परब्रह्मस्वरूपाचा आनंद; चिदाभास = परब्रह्माचा आभास; चिद्घन = परब्रह्मानें पूर्ण; चिद्रत्न = परब्रह्म; चिच्छक्ति = परब्रह्मस्वरूपी शक्ति; चिन्मय = ज्ञानमय, चैतन्यमय; चिन्मात्र = ब्रह्म, चैतन्य.]

चित वि. जिंकलेला, खालीं पाडलेला, उताणा, पाठीवर पाडलेला (विशेष अर्थ). Conquered, vanquished, thrown on the back (in wrestling).

[सं. जितः (?); हिं. चित = उताणा; चीत पद्दा. चीतपाट = पाठीवर खालीं पाडलेला (कुस्तींत); निपचीत = शांत व सपशेल (रीतीनें.)]

चितपावन, चित्पावन पुं. ब्राह्मणांची एक पोटजात, कोंकणस्थ ब्राह्मण. A sub-caste among brahmins.

[सं. १ क्षेत्र + पावन-चेत्तपावन-चित्तपावन. परशुराम क्षेत्राला पवित्र करणारे. २ क्षितिपावन, चिति + पावन = पृथ्वीला पावन करणारे (भा. अ. १८३२) ३ चित्तपोलन (चैत्य = यज्ञभूमि); चैत्यपुलीन (चिपळूण,) चित्पावन (राज) ह्या सर्व व्युत्पत्तींना आधार फारसा नाहीं.]

चितर(णें), चितार(णें) अक्रि. चित्तरणें, चितारणें, रंग भरणें. To trace figures, to draw, to fill with flourishes and scribbling.

[सं. चित्र (नाधा.)]

मग राजसा क्रिया । तिया इंद्रावणी सांसिनलिया ।
जें सुखें चितारूनियां । फलति दुःखें ।

चितळ न. पुं. ठिपक्याचा काळवीट. The spotted antelope.

[सं. चित्र; चित्रल; प्रा. चित्तल; देप्रा. चित्तलमण्डितम् (११२-८); बं. चितल; हिं. चीतल; पं. चित्ला = ठिपके असलेला; गु. चीतळ = ठिपक्याचा साप; ने. चितल्.]

चित्ता पुं. पट्ट्या वाघ, प्राणिविशेष. A leopard.
[सं. **चित्रकः** (**चित्र**, √**चित्**, √**कित्** १० ज्ञाने); पा. **चित्रो, चित्तो** ; प्रा. **चित्तअ** ; बं. चिता ; ओ. चिताबाग ; हिं. **चीता** ; पं. **चित्ता** ; सिं. **चित्रो** ; गु. **चित्रो, चित्तो** ; रुमा. **चित्रय** (मांजर).]

चिताक पुं. स्त्री. एक सोन्याचा स्त्रियांचा दागिना (हा पट्ट्यासारखा असून गळ्यांत घालतात). An ornament.
[सं. **चीतिका** = कटिशृंखला, हारावलि, आठव्या शतकांत कमरेस घालण्याची रूढी असे.]

चितार(णें) सक्रि. चित्र काढणें, चित्र रंगविणें. To draw figures and images, to fill with flourishes ond scribbling.
[सं. **चित्र**, (नाधा.), (√ **चि** ५ उपचये, **चित्** १० ज्ञाने); संस्कृतमध्यें 'चित्र'चा अर्थ आणि मराठीमधील अर्थ ह्यांत भेद आहे. मराठींतील 'चित्र' शब्दाचा हा नामधातु आहे.]

चितारी पुं. चित्रें काढणारा. A painter, a limner.
[सं. **चित्रकार** ; गु. **चितारो** ; पं. **चितेरा** ; सिंह. **सितिएर** ; हिं. **चितेरा**.]

चिति स्त्री. यज्ञवेदी. The ground prepared for sacrifice.
[सं. **चि** ५ उपचये.]

चितोड न. राजपुतान्यांतील एक शहर. A town in Rajputana.
[सं. **चित्रकूट**.]

चित्र न. आकृति, तसबीर. A drawing, a sketch.
[सं. **चित्रम्**, √ **चित्** १० ज्ञाने ; √ **चि** ५ उपचये ; संस्कृतमध्यें चित्र ह्याचा अर्थ 'आश्चर्य' असा आहे. मराठी मध्यें तो बदलून 'आकृति' असा झाला आहे. मूळचा अर्थ मराठी '**विचित्र**' ह्या शब्दांत कायम राहिला आहे. अकामसा. **चित्रकला** = चित्रें-आकृति काढण्याचें शास्त्र, रेखाकला ; **चित्रकार** = चित्रें काढणारा ; **चित्रकाव्य** = शब्दालंकाराचे व यमकाचे प्रकार असलेलें काव्य, शब्दालंकार ; **चित्रपट** = चित्रें काढलेला पट ; चालतीं बोलतीं छायाचित्रें ; **चित्रलेख** = आकृति काढणें ; **चित्रविचित्र** = निरनिराळ्या तऱ्हांचें ; **चित्रशाळा, चित्रसंग्रहालय** = चित्रांच्या संग्रहाचें स्थान ; **चित्रान्न** = खिचडी-फोडणीचा भात ; **चित्रासारखा** = चित्रासारखा तटस्थ, निश्चल ; **चित्रगुप्त** = मनुष्यांच्या जीवितांतील प्रसंगांची नोंद करणारा यमसेवक.]

चित्राहुति, चित्रावती स्त्री. ब्राह्मण जेवणापूर्वी पात्राच्या उजव्या बाजूस ज्या आहुति देतात त्या. (देतांना चित्राय स्वाहा, चित्रगुप्ताय स्वाहा इ. मंत्र म्हणतात त्यावरून.)
A portion of food set aside before the commencement of the meal as an offering to some deity.

चिथ(था)विणें सक्रि. भर देणें, (विरुद्ध) उठवणें, उत्तेजन देणें. To exicte, to provoke, to encourage.
[सं. **चित्** १ संज्ञाने (णिच्); **चित् + तापनम्**, **चित्तापनम् > चितावणें** ; **चिथावणी** = भर, प्रोत्साहन. (वाईट गोष्ट करावयास, एखाद्याच्या विरुद्ध).]

चिथडा पुं. डाग, तीळ, (अंगावरील) मस, ठिगळ. A spot, a speckle.
[सं. **चित्र** ? (**चित्थ** + ड, **चित्थड**); हिं. **चिथर, चिथ्रा** ; पं. **चीथ्रा** ; सिं. **चीथरो** ; गु. **चिथडू**.]

चिंधी स्त्री. चिरगूट, कपड्याचा फाटका तुकडा. A shred, a rag.
[सं. **चिन्ह** ; प्रा. **चिंध** (न) = ध्वजा, पताका, वस्त्रखंड ; परंतु हा शब्द √ **छिद्** ७ अवयवे ह्या धातूपासून निष्पादणें अधिक शास्त्रीय आहे. सातव्या गणाच्या विकरणाचा अंशहि शब्दांत उतरल्यासारखा आहे. कान. **चिंदी** हा शब्द अधिक जवळचा दिसतो.]

चिन(णें) क्रि. बांधणें, उभारणें, कोंबणें, भिंतींत चिनणें. To build by ramming (stones, bricks, earth.).
[सं. **चिनोति** ; पा. **चिनाति** ; प्रा. **चिणेइ** ; पं. **चिण्ना** ; हिं. **चिनना** ; गु. **चिणवूँ** ; ने. **चिन्नु** ; हा धातु संस्कृत मधून सविकरण पाली, प्राकृत व इतर हिंदी आर्योद्भव भाषांत उतरलेळा आहे.]

चिनका वि. लहानसा, सुंदर, चिमुकला. Small, pretty, tiny.
[कान. **चिण्ण** = मूल ; **चिन्न** = लघुता ; सं. **क्षुद्र** ; अकामसा. **चितुला, चिनुकला** = लहान ; **चिनाटा** = लहानसा ; **चिना, चेनापट्टण** = 'मद्रास'चें जुनें नांव.]

[1]**चिनी** वि. चीन देशांतील साखर, मऊ साखर. A sort of soft sugar.

[Chinese (Hobson-Jobson); हिं. **चीनी** ; हा शब्द बंगालमधून महाराष्ट्रांत आला असावा, कारण तेथें साखरेस ‘ चिनी ’ म्हणतात. **चिनीमाती** = शाडूसारखी पांढरी माती.]

[2]**चिनी** स्त्री. पत्रा वगैरे तोडण्याचा जाड कोंचदार खिळा. The chisel.

[सं. **छिनी** (?), √ **छिद्**, (निष्ठा) **छिन्न**.]

चिन्त(णें) सक्रि. विचार करणें, ध्यानांत आणणें, इच्छिणें, मागणें, बेत करणें. To think, to conceive, to plan, to wish, to desire.

[*IE.* Qe-i, Qi ; सं. **चिन्त्** १० ध्याने, **चित्**, **कित्** = ज्ञाने (ह्यापासून **चेतस्**, **चित्र**, **चित्रक**, **चिति** (विचार), **केतु**, **केतयति** इतके शब्द होतात.) ; गु. **चितवूँ**, **चिंतवूँ** ; सिं. **चीतणू** ; हिं. **चिंतना** ; अकाम. **चितणें**, **चिन्तणें**. कांहीं भाषांत ‘ **चिन्त्** ’ व कांहीं प्राकृत भाषांत ‘ **चित्** ’ अशीं रूपें उतरलीं ; अकामसा. **चिंतन** = मनन ; **चिंता**=काळजी (विशेष अर्थ झाला) ; **चिंताकुळ** = काळजीनें त्रासलेला,-युक्त ; **चिंतामणि** = मनांत आणलेली वस्तु प्राप्त करून देणारा मणि.]

चिन्ह न. खूण. A mark, a sign.

[सं. **चिह्नम्** ; प्रा. **चिण्ह** ; बं. **चीना** ; हिं. **चिन्ह** ; सिं. **चिन्हु** ; गु. **चिन्** (ज्ञान).]

चिप(णें) सक्रि. दाबणें, पिळून काढणें, चुरडणें, जुळविणें, एकमेकाजवळ आणणें (उ. डोळे चिपणें). To press, to squeeze.

[सं. **चि** १० चयने; **चपयति** ; **चिप्** = चिरडणें (शिक्षासमुच्चयांतील धातु) ; गु. **चिपवूँ** ; पं. **चिप्पणा** ; हिं. **चेपना** ; सिं. **चिपणुं** ; बं. **चिपिते** ; का. **चिपुन** (झांकणें) ; सिं. **चिपु**, **चुपु** ; हिं. **चुप** ; म. **चुप्प** (गप्प) ; म. **चापट** शब्द ह्याशीं संबद्ध आहे ; अकामसा. **चिप**, **चिप**, **चूप** = गप्प, शांत ; **चिपनळी** = पिचकारी ; **चिपट**, **चिपड** = टरफल असलेली डाळ,-डाळिंत्री ; **चिपटी**, **चिपाड** = चोथा, रस काढून घेतलेल्या धाटाचा अवशेष ; **चिपडा** = डोळ्यांवरील मळ, घाण ; कान. **चिप्पु** = खडबडीत कवच.]

चिपडें न. डोळ्यांतील घाण. Gummy excretion of the eye.

[सं. **चि** १० उपचये ; देप्रा. **चिप्प** (चिकट), **चिप्प** (दाबणें) ; कान. **चिप्पु** ; हिं. **चेप** (गोंद), **चीपर** ; सिं. **चिप्यरु** ; गु. **चिपडो**. **चेपणें** पहा.]

[1]**चिपळी** स्त्री. चिपनळी, पिचकारी. A syringe.

[सं. चि १० चयने, चिपयति ; + ळी—दाबणारी.]

[2]**चिपळी** स्त्री. घुंगर, चकती वगैरे अडकवून हाताच्या अंगठ्यांत घालून वाजविण्याचें एक वाद्य. The two sticks used to clap together.

[कान. **चप्पळि** = टाळी ; (√ **चप्**, **चि** (?)) ; याकाम. महानुभाववाङ्मयांत ‘ **चिपुळी** ’ असें रूप आढळतें.]

चिपाट,-ड न. रस काढलेलें उंसाचें धाट. A sugar-cane squeezed and pressed.

[सं. **चि**. १० उपचये, **चिपयति** (?) ; कान. **चिप्पु** = खडबडीत कवच, **चिप्पे**=उंसाचा चोथा. कानडींतून आला हें अधिक सयुक्तिक.]

चिपुळी स्त्री. चिपळी, पिचकारी चिळकांडी चिरकांडी. A syringe, the two sticks used to clap together, a rill.

[सं. **चप्** = दाबणें, **चि** १० उपचये ; याकाम. **चिपुळी** ; अकाम. **चिपळी** पहा. २ **चिळकांडी**, **चिरकांडी**.]

चिबुक न. हनुवटी. The chin.

[सं. **चिबुकम्** – हा शब्द कृत्रिम संस्कृत दिसतो. कोणत्या तरी देशी शब्दाचें संस्कृत रूप असावें.]

चिबूड न. फलविशेष, शेंदाड, वाळूक. A kind of melon.

[सं. **चिर्भिट–चिब्भिड–चिब्बीड–चिबूड** (?). (राज. ग्रंथमाला), ही व्युत्पत्ति काल्पनिक व वृथा पाण्डित्यप्रकर्षाची आहे. *IE.* Qerp. Qelb; सं. **चर्भ**, **चर्भट** ; *Gr.* Korp; *Lat.* Corb ; *NPer.* Karbuza = Melon. **चरबट** पहा.]

चिमखडा पुं. बारीक खडा, (लहान मुलें कामटीच्या टोंकास हा धरून जोरानें कामटी वांकवून फेकतात.) तरतरीत हुशार मुलगा (ल.). A pebble, a smart boy (fig.).

[म. **चिमणा** = लहान, + **खडा**, (सं. √ **स्यम्**, खडा (**स्खद्**).]

चिमखुरा पुं. ओरखडा, नखानें काढलेला ओरखडा. A scratching, a scratch.

[म. **चिमटा** + **खुरा**.]

चिमट, चिमूट स्त्री. कैची, चिमटा, चिमूट (हाताचा अंगठा व त्याच्या जवळचें बोट ह्यामध्यें धरलेला पदार्थ.) A pinch, a pincer.

[सं. **मुचुटी,** (वर्णविपर्यय) **चुमुटी–चिमुटी ;** कान. **चिमटु** = चिमटा घेणें, **चिम्मु** = बोटानें उडविणें ; अकामसा. **चिमट(णें)** = कैचींत सापडणें, चेंगरणें ; **चिमटा** = चिमखरा, कैची, पकड.]

चिमटा पुं. मोठ्या कात्रीसारखें हत्यार (ल.), पकड, दोन बोटांनीं कातडी दाबणें. A pincer, tongs, a pinch.

[सं. **मुचुर** (?) ; बं. **चिमटा ;** ओ. **चिमुटा ;** हिं. पं. **चिम्‌टा ;** सिं. गु. **चिम्‌टो, चिम्टा ;** द्रा. कान. **चिम्मु** = बोटानें उडविणें, दोन बोटांनीं धरून टाकणें.]

चिमण वि. लहान. A little and pretty.

[सं. **स्यम्** (?) ; अकाम. **चिमण्या दात,–चिमण्या बाळ,–चिमण बाग, चिमणसाळ** (**चिमणशालि**) = लहानदात,-बाळ,-बाग,-तांदूळ ; **चिमुरडा** = लहानसा, खुज्जा ; **चिमोला** = लहान.]

¹चिमणी स्त्री. पक्षिविशेष. A hen-sparrow.

[सं. **स्यम्** (ध्वनिशब्द) ; **चिव्**–चिवणी,–चिमणी, (राज. ग्रंथमाला).]

²चिमणी स्त्री. गिरणीचें धुराडें.

[*Mid. Lat.* Caminata = an apartment with fire-place, from Caminus = hearth, flue:; *Fr.* cheminee ; *It.* camminata.]

चिमुट(णें) सक्रि. चिमटा घेणें, पिळणें. To pinch, to squeeze.

[**चिमट** पहा.]

¹चिंब(णें) अक्रि. चिमटणें, पिळवटणें, दाबणें, सुरकुतणें, चिरफाळणें. To press, to compress, to squeeze.

[सं. **सिंभ्** १ हिंसायाम् ; कान. **चिंपु** = भेग, चीर ; अकामसा. **चिंबट** = बांबूची कांबट ; **चिंबट(णें), चिंबळ(णें)** = चिमट्यांत सांपडणें ; **चिंबा** = सुरकुत्या पडलेला, आकसलेला.]

²चिंब(णें) क्रि. फुटणें. To split.

[सं. **स्तिम् ;** प्रा. **तिम्, चिम ;** कान. **चिंपु** = भेग, चीर ; बं. **चिमटा ;** ओ. **चिमुटिबा ;** हिं. **चमटना ; चिंबटणें** (**चिंब** किंवा **चिमटा** पासून नामधातु), **चिंब** = भिजलेला (√ स्तिम्) ; **चिंबचळे** = न भरलेला दाणा.]

चिर अ. पुष्कळ वेळ. A long time.

[सं. **चिरम् ;** अकामसा. **चिरकाल** = फार दिवस, कायमचे (चिरम् + काल) ; **चिरस्थायी** = फार काळ राहणारा (< चिरम् + स्थायी √ स्था.]

¹चिर(णें) क्रि. फाडणें, कापणें, कापा करणें To split or slit.

[सं. **शॄ** ९, **चिरि** ५ हिंसायाम्. वैसं. **चिरि** = कापणें ; गु. सिं. हिं. बं. **चीर** = फाडणें ; का. **चिरून** = भोंक ; म. **चीर**=**भेग.**]

²चिर(णें) अक्रि. जाळयाचे ताणे लावणें,–पसरणें. To spread the net.

[सं. **चीर**=वस्त्र ; याकाम. शिकाम. **चिरणें** = रचणें, तयार करणें असा अर्थ आहे.

कस्तुरिया मृगा चिरवीति वागुर ॥ नरुस्व. ५९७.

एकीकडे त्याने चिरिल्या वागुरा : ठेविले श्वानपुत्रा एकीकडे । तुका. अ.

चिरणी चिरण्याचें हत्यार, कांतण. A crimpling instrument.

[**चिर** = भेग + **णी.**]

चिरक(णें) अक्रि. चरचर असा आवाज होऊन फाटणें, पिरपिर ध्वनि होऊन शौचास होणें, आवाजांत एकदम बारीकपणा येणें. To rend or tear with a sound, to have a sudden and scanty stool.

[सं. **चिरि** ५ हिंसायाम् ; देप्रा. **चिरिक्का–तनुधारा प्रत्यूषश्चेति** (११९·१०) ; पं. **चिरकणा ;** हिं. **चिरकना ;** का. **चिर** = दाबून पाणी निथळणें ; अकाम. **चिरकंडी, चिरकांडी** = जोरांत उसळून बाहेर पडणारी धार ; **चिरकन्,-कर,-दिनी** = चिडकन् ; **चिरका** (देप्रा. **चिरिक्का**) = फाटलेला तुकडा, (मोठी) भेग.]

चिरंगट(णें) क्रि. चिरडलें जाणें, दाबलें जाणें, चेंदामेंदा होणें. To jam or squeeze.

[सं. **शॄ** ९ हिंसायाम् + **गंध्** १० अर्दने (रा. धा.).]

चिरगूट न. चिंधी, वस्त्र, तुकडा, फडका. A rag.

[सं. **चीर** + कान. **गुट्ट ;** याकाम. **चीरकुट** (लीच. ३). आर्यद्राविड शब्दांचा संकर.]

चिरचिर(णें) अक्रि. ओरडणें, रागावणें, बदसूर होणें. To scream, to be angry.

[सं. **चिरि**–(ध्वनिशब्द) शुकशब्द.]

चिरचिर, चिरचिरां, चिरिचिरी स्त्री. तक्रार दाखविणारा शब्द, झिमझिम. (Imit.) of sound, drizzling.

[सं. ? ; देप्रा. **चिरचिरा तथा चिरिंचिरा**=जलधारा, पावसाची झिमझिम (११६·५).]

चिरंजीव पुं. दीर्घायुषी, पुत्र, मुलगा. Long-lived, a term used for younger-folk.

[सं. **चिरम्+जीव** (आज्ञार्थी रूप); परंतु 'कायमचा जिवंत रहा' अशा अर्थाचा हा आशीर्वाद असून त्याचें 'नाम' झालें आहे. हें अर्थाचें विशेषीकरण आहे. व्याकरणांतील प्रकारभेदहि झाला आहे. सध्यां मराठींत हा 'मायना' म्हणून वापरतात ; **चिरंजीव**=मुलगी, कन्या.]

चिरड, चिरडी, चीड स्त्री. रुसणें, रुसवा, त्रास, अपमान, रडी. Angry excitement, displeasure.

[सं. **शृध्** १० हिंसायाम्.]

चिरड(णें) क्रि. दाबणें, चेंगरणें, दाबून बारीक करणें. To press, to squeeze.

[सं. **चृत्** ६ हिंसायाम ; वैसं. **स्त्रिध्**-हिंसायाम् (भा. अ. १८३५).]

चिर(डी) स्त्री. साडी, लहान मुलीचें लुगडें. A garment for a little girl.

[सं. **चीरम्** ; पा. **चीरम्** ; **चीरकम्** ; प्रा. **चीर** ; बं. **चीरा** (फाडलेलें) ; हिं **चीर** ; सिं. **चिरु**. टर्नर **चीर** (भेग) आणि **चीर** (वस्त्र) हे दोन्ही शब्द एकाच शब्दापासून व्युत्पादितो तें बरोबर नाहीं. **चिरकूट, चिरगूट**= कपडा, चिंधुक. (सं. **चिर** ; कान. **गुट्ट**). **चिरगूट पांघरूण**=वस्त्र, कापड वगैरे (एकाच अर्थाचे दोन शब्द).]

चिरफाड स्त्री. द्विधा तुकडे. A shred.

[सं. **चीर + फाट** < सं. **छृद् + स्फट्** (द्विधातुसंयोग).]

^{1}**चिरा** पुं. कौमार्य, ज्वानी. Virginal purity. maidenhood.

[हिं. **चीर** ; **चिरा उखळणें, उतरणें**=कौमार्य नष्ट करणें, वेश्येच्या अनुपभुक्त मुलीशीं प्रथम संभोग करणें. (श. को.).]

^{2}**चिरा** पुं. मंदील, जरीच्या उभ्या काड्या असलेलें अरुंद व लहान पागोटें. A strip of cloth with line of gold forming a turban.

[सं. **चीर**=वस्त्र ; पेकामसा. **चिराबादली**.]

^{3}**चिरा** पुं. वाफा, घडलेला दगड.

[अकामसा. **चिरेबंदी**=घडींव दगडांनीं बांधलेलें ; **चिरीव**=चिरून कोरून काढलेला ; याकाम. **चिरीव**.]

हीमावतीयेचे आटीलें हींव : ते दळवाडें काढुनि चिरीव ॥
नरुस्व. ४१६.

चिराख-ग पुं. दिवा. A lamp, lighting.

[फा. **चिराघ्**=दिवा ; पेकाम. **चिराखो** (खरे. ९-४७-४५), **चिराखबत्ती**=दिवावत्ती (पेदसमा. २४२); **बे-चिराख**= ओसाड (दिवा लावलेलें घर नसलेली स्थिति).]

चिरी स्त्री. चिरटी, चिरोटी, भेग, चीर, रेघ. A slip, a slit.

[सं. **शृ** ९ हिंसायाम् ; **चिरणें** पहा. **चिरीमिरी**=लांच, बक्षिशी (व्युत्पत्ति नक्की काय असावी ?).]

चिरूट पुं. तंबाखु गुंडाळलेली मोठी जाड अशी विडी. A cigar.

[तामील. **शुरुट्टु** ; मलाया. **चुरुट्टु** (इ. स. १७२५)= तंबाखूची वडी, घडी. मराठी. **चुट्टा, चूड, चुडी**. इं. **चिरूट्** ; पोर्तु. **शारूट्**. मराठींत हा शब्द इंग्रजीमधून आला. परंतु इंग्रजींत हा शब्द तामीलमधून आला. तामील भाषेंत Shuruttu '**शुरुट्टु**' असा शब्द आहे व त्याचा अर्थ तंबाखूची गुंडाळून केलेली विडी.]

चिरोटा पुं. नऊ घड्या घालून तुपांत तळलेली पुरी. A cake composed of nine layers.

[**चिरा, चिऱ्हवटा** (?).]

चिल, चिला स्त्री. पक्षिविशेष, घार. A particular bird.

[सं. **चिल्ला**.]

चिलखत न. लोखंडी जाळ्याचा अंगरखा, अंगत्राण. Body-armour.

[फा. **चिहिल्कद्**.]

चिलट न. मशक, मच्छर, डांस, घुंगुरटें, कीटकविशेष. A mosquito, a midge.

[सं. **क्षुद्रकीट** (?); देप्रा. **चिल्लिरि** (पुं)=मशक ; कान. **चिल्हे**=लहान, **चेला**, < **चिल्ल, चुल्ल** < **क्षुद्र** इत्यादि शब्दांशीं संबद्ध आहे ; म. **चिल्लर**=खुर्दा.]

चिलस(णें) अक्रि. कष्टी होणें. To grieve.

[सं. **क्लिश्** ९ विबाधने, (**यङ्लुडन्त**) **चिक्लिश**.]

आतां तेया तामसा । आवडि आहारिं परियसां
तेहि सांघों चिलसा । झनें तुम्ही ॥ रा. ज्ञा. १७-१५२.

चिलींपिलीं, चिल्लीपिल्लीं न. मुलेंबाळें, पोरें, कच्चींबच्चीं. Children.

[देप्रा. **चिल्ल** (बालः); दोन्ही एकाच अर्थाचे शब्द. **चिल्लींपिल्लीं** पहा.]

चिलीम स्त्री. तुंबाखू ओढण्याची मातीची नळी. The bowl of a hukka.

[कान. **चिलिमे** ; हिं. **चिलीम.**]

चिल्लर स्त्री. लहानसान खर्चाच्या बाबी, खुर्दा, लहान नाणें, मोड, नाश (लक्षणा). Petty trifling articles, change (of money).

[द्रा. कान. **चिलवान्** = रकमेवरील खुर्दा ; **चिल्लर** = लहानपणा, लघुत्व ; कान. **चिल्हे, चिल्रे** = लहान.]

चिल्लींपिल्लीं न. अव. लहान पोरें, अर्भकें.

[सं. **शाबाल > शावाल > चावाल > चील ;** देप्रा. **चिल्ल** (बाल); + तामीळ. **पिल्लइ** ; कान. **चिल्लरे, चिल्रे** = लहान. **चिल्लर** = खुर्दा. दोन भिन्न भाषांतील समानार्थी शब्दांची द्विरुक्ति.]

चिवचिव(णें) अक्रि. बारीक आवाज करणें, चिमणीसारखा आवाज काढणें. To twitter and chatter.

[सं. **स्यम्–चिव्** (भाषार्थः किंवा ध्वनिशब्द द्विरुक्तिः), **चिवचिव** = पक्ष्यांचा,–तगादे करणाऱ्यांचा कलकलाट.]

चिवट वि. न तुटणारें, वातड, चिकट. Tough.

[सं. **सीव्** ४ बन्धने.]

चिवड(णें) सक्रि. कुसकरणें, चुरा करणें, पसरणें, हलवणें, हाताच्या बोटानें खालीं वर करणें. To mash, to spoil by rude mashing.

[सं. **चर्पट** = चिपिट ; प्रा. **चिविढ, चिमिढ ; चिपिट** = पोहा ; कान. **चिवुट्टु** = नखानें तोडणें, फाडणें (ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे.) ; हिं. **चिनडा** = पोहे.]

चिवडा पुं. भाजलेले तांदूळ, दाणे वगैरेंचा तळून केलेला खमंग पदार्थ. A medley of various parched grains.

[सं. **चिपिटः, चिपिटक** ; पा. **चिपिटो** ; प्रा. **चिविडो, चिमिडो** ; कुमा. **चूरा** ; बं. **चिरा** ; बि. **चिउरी** ; हिं. **च्यूरा, चिनडा** = पोहे.]

चिंवर, चिवर न. फणसाच्या गऱ्याभोंवतालच्‍यें तंतूंचें वेष्टण. The shreds round the pulp of a jack-fruit.

[सं. **चिकुर** = केंस.]

चिहळ,–चिहाळ(णें) अक्रि. गळणें, पाझरणें, झिरपणें. To ooze.

[सं. **घृ**–(अभ्यास) **जिघृ-जिहर–ळ** ; **चिहाळ** = घाम, निचरा.]

चिह्न न. खूण, निशाणी. A sign, a signal.

[**चिन्ह** पहा.]

चिळस स्त्री. किळस, तिटकारा, वीट. Disgust, nausea.

[सं. **क्लिश्** ९ विबाधने, **चिक्लिश.**]

ची स्त्री. पराभवदर्शक शब्द. The cry of defeat.

[ध्वनिशब्द. **चिरी, चिरी ; चीची** = फजिती.]

चीक पुं. चिकट रस, दूध, गोंद, चलक. The gum, the milk.

[सं. **चिक्कण,** √**क्लिद्**, (निष्ठा) **क्लिन्न ; चिक्लिण्णा.**]

चीज स्त्री. वस्तु, पदार्थ, गोष्ट, गाणें, गीत. A thing, a song.

[फा. **चीझ्.**]

चीजवस्त स्त्री. सामान. things, chattels.

[दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द आहेत. आर्यफारशी संकराचें उदाहरण आहे.]

चीट न. चित्रविचित्र रंगित पातळ कापड. Chintz.

[सं. **चित्र**; पोर्तु. **चीट** ; हिं. **चिंट** ; *Fr.* Chite; *Eng.* Sheet, Chintz ; बं. **छीट्** ; हिं. पं. **छींट, छीट** ; सिं. **छीट** ; गु. **छीट, शीट.**]

चीड स्त्री. घुस्सा, राग. Offence, displeasure.

[(**चिडणें** पहा.) **सीद–मा सीद** = चिडूं नको.]

चीण स्त्री. निरी, सुरकुती. A plait of a garment.

[**चिणणें** पहा.]

^{1}चीत वि. पाठीवर पाडलेला. Thrown on the back.

[सं **जितः, चित्त, ;** प्रा. **चित्त, चीत** ; बं. ओं. हिं. **चीत्** ; पं. **चित्त** ; याकाम. **चीत** (उगी. ४८६.)]

^{2}चीत स्त्री. गोष्ट. Guff.

[सं. **चित्तम्** ; पा. **चित्तम्** ; प्रा. **चित्त** ; बं. **चीत्** ; हिं. **चितना** ; अकामसा. **बातचीत**=समानार्थक परंतु भिन्न भाषांतील शब्दांची द्विरुक्ति.]

^{1}चीर न. वस्त्र, कपडा. A garment.

[**चिरडी** पहा.]

^{2}चीर स्त्री. भेग, फट. A slit, split.

[**चिरणें** पहा.]

चुइटी (चोयटी, चोय.) स्त्री. उसाच्या तुकड्याचा चोथा, बोरूची बारीक सुईसारखी काडी. A cane squeezed and pressed.
[चिपाड पहा. १ सं. चिपिट; २ सं. सूचि = सुई.]

^{1}**चुक(णें)** क्रि. चूक होणें, प्रमाद घडणें, भुलणें. To mistake, to err.
[सं. **युच्छ्** १ प्रमादे, **स्कु** १ गतौ; देप्रा. **चुक्क** = संपणें, विसरणें, (भ्रश्यति–पिशेल ५६६); सं. **च्यव्**, **चुक्क्**; प्रा. **चुक्कइ**; हिं. **चुकना, चुकाना**; ओ. **चुकाइबा**; पं. **चुक्कणा**; सिं. **चुकणुं**; गु. **चुकवूँ**; याकाम. **चुक** (**चुकौनि.** नरुस्व. ६४३.); चूक = प्रमाद, विस्मरण.]

^{2}**चुक(णें)** उक्रि. टाकणें, देणें, संपविणें. To finish, to dispose.
[वैसं. **चोष्कूय**; प्रा. **चोक्कू**; देप्रा. **चुक्क**; म. **चुक**; वेदामध्यें हा धातु ‘ देणें ’ ह्या अर्थी आहे. उदा. **इंद्र चोष्कूयसे वसु**–९-६-४१. मराठी प्रयोग पहा–करून **चुकलों.** बोलून **चुकलात.**]

चुकटी स्त्री. चिमूट. A pinch.
[सं. ?; देप्रा. **चुक्को मुष्टिः** (११५-१३); ‘ **चुटकी** ’ ह्या शब्दाचा वर्णविपर्यय होऊन तर हा शब्द झाला नसेलना ? सिं. **चुको** = लहान थेंब; हिं. **चुकटा** = मूठ.]

चुका पुं. वनस्पतिविशेष, एक आंबट भाजी. A kind of vegetable.
[सं. **चुक्रम्, चुक्रिका**; बं. **चूक्**; हिं. **चूका**; पं. **चुक्का, चूका**; गु. **चुको**; सिं. **चूको**; बं. **चूक.**]

चुकामूक स्त्री. एकमेकाची गांठ–भेट न होणें, चुकणें. Mutual missing or passing by.
[सं. **युच्छ्** १ प्रमादे; देप्रा. **चुक**; + **मुकणें** (√**मुञ्च्**); **चुकणें** आणि **मुकणें** ही दोन्हीं क्रियापदें जवळ जवळ येतात. म. **चुकामूक,** मधील ‘ आ ’ आधिक्यदर्शक आहे. **चुकणेंमाकणें, चुकलामाकला** (ओझरतें, नजरचुकीनें विस्मृत).]

चुकुर पुं. चूक, भ्रम, भ्रांति. Mistake, confusion.
[सं. **स्कु**–(अभ्यास)–**चुस्कू** > **चुक्कू** + **र** किंवा **युच्छ्** १ प्रमादे.]

चुगल, चुगली स्त्री. चहाडी, लावालावी. Slander, calumny, malicious babbling of one's misdeed.
[फा. **चुघुली**; तुर्की. **चुग़ुली**; पेकाम. **चुकली** (श्रेंद्र च. ३०); अकाम. **चुगली, चुगलखोर** = लावालावी करणारा (चुगल + खोर, √खुर्दन्).]

चुचकार(णें) सक्रि. मनधरणी करणें, आंजारणें गोंजारणें. To coax or sooth.
[ध्वनिशब्द, **चूं चूं** + **कार** (= **शब्द** < **कृ–शब्दे**, **चुं चुं** (चुच्य) करणम्, **चुच्य्** (**अभिषवे** = सैल करणें).]

चुटका पुं. लहान विनोदी गोष्ट. विनोदी थोडासा मजकूर, उखाणा. A witty smart piece of composition, enigma.
[सं. **सम्** + **उत्** + **कृत्** ६ छेदने; **चुट** + **का** (?).]

चुटकी स्त्री. दोन बोटें एकावर एक दाबून होणारा आवाज, गडबड, घाई (लाक्षणिक.) A snap with the thumb and a finger, haste (fig.)
[सं. **चूट्**(= फाडणें), **छोटिका**; देप्रा. **चुक्को** (मुष्टीः, ११५-१३) + ट (अल्पार्थें); **चुक्कोट**–वर्णव्यत्यासानें **चुटक्को.** बं. **चुटकी** (विगर महत्त्वाचें); ओ. **चुटकी**; हिं. पं. सिं. गु. **चुटकी**; कान. **चिटिके.**]

चुटपुट स्त्री. काळजी, तळमळ, खुरखुर. Earnest longing, fretting.
[सं. **चुट्** = भावकरणे + **पु्** १० शब्दे (द्विधातुसंयोग); अकाम. **चुटपुट(णें)** (नाधा.)= काळजी लागणें.]

चुट्टा पुं. तंबाखू ओढण्यासाठीं केलेली पानाची चिलीम. A leaf rolled up containing tobacco.
[देप्रा. **चुड्डुली** (= उल्का. ११७-४); कान. **चुट्टि, चुट्टु, चुट्टे** = तंबाखूची वळी; म. **चिरुट्ट**; **चिरूट** पहा.]

चुट्टाचुर्मा पुं. कणीक भाजून गूळ घालून केलेला जिन्नस. A dish of burnt wheaten flour.
[सं. **सम्** + **उत्** + **कृत्** ६ छेदने + **चूर्**–अवयवे.]

^{1}**चुडा** पुं. कंकण, बाहुभूषण, बांगडी, भुजाभरण. A bracelet.
[सं. **चूडा** = करभूषणम्; देप्रा. **चूड, चूडक** (= भुजाभरणम्, २५५–७), **चूडो** वलयावली (११८-६); गु. **चूडो**; सिं. **चूरो**; पं.हिं. **चूरा**; कान. **चुडेय** = सोन्याची बांगडी; याकाम. **चुडा**; अकाम. **चुडा, चुडेदान** = सौभाग्य देणें, नवऱ्याचा जीव वाचविणें.]

रतीचे चुडे राखावया श्रीमंतुः येईल येथ ॥ नरुस्व. ६१८.

चुडा (चुडी) पुं. दिवटी. A torch.
[सं. ?; देप्रा. चुडुली (=उल्का, ११७-४), चुडी, चुडणी = दिवटी ; चुडी पूर्णिमा = माघ शुद्ध पूर्णिमा (ह्या दिवशीं चुड्या पेटवितात.), चुड्या = दिवटी धरणारा.]

चुण(णें) सक्रि. निऱ्या करणें, बारीक घड्या घालणें. To plait.
[सं. चुण् १० संकोचने; फा. चीण = घडी ; अकाम. चुणी = निरी, बारीक घडी]

चुणी स्त्री. कण्या मिसळलेली भरड, कोंडा, भरडलेलें धान्य. Coarse bran having some grit mixed.
[सं. चूर्णिका ; देप्रा. चुणईओ (रेणुविच्छुरित इति तु चूर्णित शब्दभवः ११७·१८); पं. हिं. चूनी.]

चुणी स्त्री. लहान माणीक. A small ruby.
[सं. चूर्णिका, चूणिका; हिं. चुनी.]

चुणचुण(णें) अक्रि. चुणचुण करणें. To tingle, to prickle.
[सं. चुण् १० संकोचने ; अकामसा. चुणचुण = पस्तावा, रुखरुख; चुणका, चुणचुणीत = तरतरीत, हुशार, चुणचुणीत ; चुणूक = नमुना, लज्जत, मासला.]

चुतड, चुताड स्त्री. स्त्रीयोनि. The female organ of generation.
[सं. चुत < च्यू (?), गुद (?); द्रा. कुण्डे; तुळु. कूदी (स्त्रियोनि) (?); बं. चुतर ; हिं. चूतर ; पं. चुत्तर ; सिं. चुतरु ; बं. चूत; हिं. चूत ; पं. चुत्त ; सिं. चुति ; गु. चूत् ; अकामसा. चुतबावळा, चुतिया, चुत्या-चुत्यानंदन-मूर्ख ह्या शिव्या आहेत.]

चुथडा पुं. नाश, बिघाड, खराबी. Derangement, disorder, spoiled state,
[म. चोथा + डा ; चोथा पहा. सं. श्वर्त् १० वैंक्लव्ये= संकटांत घालणें.]

चुनडी स्त्री. ठिपक्याठिपक्याचें वस्त्र. बुटीदार लुगडें. A cloth dyed with stars.
[हिं. चुनरी; म. चुंदडी.]

चुनडी स्त्री. रत्नविशेष. A gem, ruby.
[सं. चूर्णिका + ट ; देप्रा. चुणइओ (रेणुविच्छुरित इति तु चूर्णितशब्दभवः; ११७·१८).]

चुना, (चुणी) पुं. पांढरा पदार्थ, शिंप, चुनखडी भाजून तयार केलेला गोळा. Lime.
[सं. चूर्ण ; पाप्रा. चुण्ण ; देप्रा. चुणओ (व्यतिकरः १२१·१४); देप्रा. चुणइओ (चूर्णाहतः ११७·१८); बं. चून्, चुना ; पं. हिं. ओ. चून्, चुना ; सिं. चुनु ; गु. चुनो ; मल्याळी. चुण्णांब ; तामीळ. शुण्णाम्बु असे शब्द आहेत. परंतु ते तद्भव दिसतात ; अकामसा. चुनकंळी= चुन्याचे बारीक दगड ; चुनखडा=न भाजलेला चुन्याचा खडा ; चुनखडी = चुना मिसळलेली माती ; चुनाळ = चुना ठेवण्याची डबी ; चुनेगच्ची = चुन्यानें बांधलेली गच्ची.]

चूप, चुप्प अ. गप्प, स्तब्ध. Still, silently.
[सं. चप् (?), चुप् १ मंदायां गतौ. यूप् प्रतिघाते (वैदिक); बं. चुप ; ओ. चुप ; हिं. चुप् ; पं. चुप्प ; सिं. चुपु ; गु. चूंप. ह्या शब्दाशीं ‘ चपणें ’ हा धातु ताडून पहा. ह्या शब्दांतील आद्य ‘ उं ’ स्वर व ‘ चेप ’ मधील आद्य ‘ ए ’ हा स्वर जुन्या ‘ ऋ ’ स्वरापासून आले असावेत. मूळ वैदिक किंवा पूर्ववैदिक धातु ‘ चृप् ’ असावा (पहा शिक्षा-समुच्चय; बेंडाल पान १८२ टीप).]

-चूपचाप अ. गप्प, स्तब्ध. Still silently.

चुबक(णें) सक्रि. सुबकणें, कुसकरणें थांबणें, स्तब्ध होणें. To knead and squeeze.
[सं. क्षुभ् १ संचलने, चुक्षुभ् (अभ्यास), शुभ् १ हिंसायाम्. चुबकळ(णें) = बुचकळणें (वर्णविपर्यय); चुबुकळी = बुचकळी, बुडी (वर्णविपर्यय.)]

चुंफ(णें) क्रि. चोखणें-पिणें. To suck.
[सं. चुंब् ; हिं. चूमना ; का. चिपु-चोखणें ; चुंफा = फळांतील रस, स्तनांतील दूध (पिण्याची क्रिया, घुटका.).]

चुंब(णें) सक्रि. मुके घेणें. To kiss.
[सं. चुब् ; पा. चुंब् ; प्रा. चुम्ब ; बं. चुचा ; ओ. चुंबिबा ; हि. चुनूना ; गु. चुमवूँ ; सिं. चुमूनु ; का. चुमुनू = विनवणी करणें, स्तुति करणें.]

चुंब(णें) अक्रि. त्रास देणें. To trouble, to be forced.
[सं. चुब्, चुंब् १० हिंसायाम् ; प्रा. चुंब ; चुंबक = आकर्षणारा (लोहचुंबक), चुंबन घेणारा, विषयी, कंजूष. चुंबत = मुकाट्यानें कांहीं तक्रार न करतां.]

चुंबळ स्त्री. चिरगुटाची वेटोळी, भांडें किंवा ओझें डोक्यावर नीट बसावें म्हणून केलेली कापडाची बैठक. A ring of cloth or grass to be placed on the head under a load.
[सं. ?; पा. चुम्बट ; प्रा. चुब्भल ; कान. सिंबी, सिंबळ = कापडाचा बोळा; हिं. चुम्मल, चुमली ; सिंह. सुंबुळ = मुगुट.]

चुर(णें) सक्रि. बारीक चुरा करणें, कुसकरा करणें, भुगा करणें, दाबणें, रगडणें. To reduce to powder, to press.

[सं. **शॄ** ९ हिंसायाम्, **छुर्** १ घर्षणे, **चूरय**, **चूर्णय** (नाधा.); प्रा. **चूर**; अकामसा. **चुर**, **चूर**, **चुरा**= बारीक तुकडे (**चूर**=डाळीचा); **चुराचारा**=तुकडे वगैरे ; **चुराडा**=नाश, चूर, खुर्दा, खराबी (चूर+डा).]

चुरमुर(णें), **चुरमुट(णें)** अक्रि. सुरकुत्या पडणें, आकसणें, चिमटणें. To shrivel.

[सं. **शॄ** ९ हिंसायाम्+**मृध्** १ हिंसायाम्; अकामसा. **चुरमुर**=शोक, तळमळ, कुरकुर ; **चुरमुरे खाणें**=असंतुष्टपणानें कुरकुरणें; **चुरमुरा**=झणझणित तीक्ष्ण (वि.). –पोहा ह्याच्याशीं संबंध नाहीं; सं. **चुर्** ४ दाहे, +**मूर्छ्** १ मोहे.]

चुरचुर(णें) अक्रि. चुणचुणणें, थोडेसें दुखणें, भाजणें. To smart, to burn.

[सं. **चुर्** ४ दाहे किंवा **ऋज्** १ भजने (द्विरुक्ति), (किंवा ध्वनिशब्द); **चुरचुर**=किंचित्शी आग. **चुरचुरीत**= खुसखुशीत.]

चुरड(णें) सक्रि. भुगा करणें, दाबून चुरा करणें, चुरगळणें. To squeeze and crush.

[सं. **चॄ** (√शॄ ९ हिंसायाम्) किंवा **अति**+**उत्**+**रद्** १ विलेखने.]

चुरंगट(णें) सक्रि. चुरगळणें, चुरडें. To crumble, to crush

[सं. **चूर्ण्**+**गन्ध्** १० अर्दने.]

चुरगळ(णें), **चुरगाळ(णें)** सक्रि. चुरडणें (कापड, कागद वगैरे). To crumble.

[सं. **चूर्णकला**, **चूर्ण**+**गन्ध्**; **चुरगाळा**=चोळामोळा.]

चुरमुरा पुं. भाजलेला ओला तांदूळ, भात, कुरमुरा. Cleaned, burnt rice.

[सं. **चुर्** ४ दाहे, **मूर्च्छ्**–मोहे (?) ; **मृ**–हिंसायाम्.]

चुरस स्त्री. स्पर्धा, चढाओढ, वैर, दावा, डाव. Competition, spite, rancour.

[सं. **चिकीर्षा** (?)–इच्छार्थक नाम.]

चुरा, चुराडा पुं. भुकटी, बारीक तुकडे, चूर्ण. Bits, fragments, shattered or crumbled state.

[**चुरणें** पहा.]

चुलता पुं. बापाचा भाऊ. काका, चाचा. A paternal uncle.

[सं. **क्षुद्रतातः** ; प्रा. **चुल्लाताय**=सासरा ; प्रा. **खुद्दताअ**, **क्षुल्लताअ**>**चुलता** ; देप्रा. **चुल्ल** (पुं) ; सिंह्. **खुदाप्पा** ; म. **चुलत**=एका नात्यानें दूरचा.]

चूं चूं पुं. कुत्र्याला बोलवतांना काढण्याचा आवाज. A sound made to call a dog.

[सं. **च्यु** १ गतौ किंवा ध्वनिशब्द ; ने. **च्यैच्यै**.]

चुलवाण, चुलाण न. उसाचा रस आटविण्याची भट्टी, मोठी चूल. The fire-place.

[म. **चुलवा**=तात्पुरती चूल ; **चुला**=वैल नसलेली मोठी चूल ; **चुलाणें**=लहान चूल, चूल पहा.]

चुवा पुं. उंदीर, हुशार, चलाख मनुष्य (लक्षणा). A mouse, a term for a sharp, intellgent man.

[फा. **चुवा** ; बं. **चुया** ; ओ. **चुआ** ; हिं. पं. **चुहा** ; सिं. **चूहो** ; गु. **चुवो** ; ने. **चुहा**.]

चुळ(णें) अक्रि. पाणी तोंडांत घेऊन टाकणें; चूळ भरणें. To gargle, to rinse.

[सं. **चुलुक**, **शुल्व** (नाधा.), (ध्वनिशब्द) तोंडाचा असा आवाज होतो ; **चूळ** पहा ; **चुळका**=**चूळ**, तळहाताचा खोलगट भाग, पसा.]

चुळचुळ स्त्री. निकड, तांतडी, उतावीळ. Urging, hurrying.

[सं. **चुड्ड**, **चुल्ल** (हावभाव).]

चुळबुळ(णें) अक्रि. चळवळ करणें, अस्थिर होणें. To be restless.

[सं. **चुल्ल**+**बुड्**–निःसारणे.]

चुळचुळा पुं. खरूज, खाजविणें. Itches, scratching sensation.

[हिं. **चलचुलाना** ; सिं. **चुरणु**. ध्वनिशब्द.]

चूक स्त्री. दोष, अपराध, गफलत. A mistake, a fault.

[**चुकणें** पहा ; सं. **च्युति**, **च्युतिका**; हिं. **चूक**.]

चूक स्त्री. लहान खिळा. A small nail.

[**स्क्रू**?]

चूड, चुडा स्त्री. तुरा, पेटलेला डोंब, उजेडाकरतां पेटविलेली सणकाड्यांची वगैरे जुडी. A lock of hair, a torch.

[सं. **चूडः** ; प्रा. **चूला**, **चूडा** ; देप्रा. **चुड्डली** (उल्का ११७·४) ; हिं. **चुरा** ; पं. **चुला** ; का. **सूड**= गवताची पेंढी.]

–चुडा पुं. कांकण. A bracelet.

[देप्रा. **चूड** ; बं. ओ. **चुरी** ; हिं. **चूरी** ; पं. **चूर** ; सिं. **चूरी** ; गु. **चूड** ; ने. **चुरि**.]

चूण न. चूर्ण, बारीक तुकडे, डाळीचा चुरा. हिरकणी, कण्या मिसळलेली भरड, कोंडा.
A ruby, husk and fragments of pulse mixed.

[सं. **चूर्णम्** ; प्रा. **चुण्ण**.]

–चुणी स्त्री. वळी, घडी, निरी A fold.

[फा. **चीन** = घडी ; परंतु हा शब्द आर्योद्भव वाटतो. **चुणणें** पहा.]

चूत, चूती स्त्री. स्त्रीयोनि. Female organ of generation.

[सं. **गुद** (?) ; द्रा. **कुण्डे**; तुलु. **कूदी** ; अकाम. **चुतड**, **चुताड** पहा.]

चूत पुं. आंब्रा वृक्ष. The mango tree.

[सं. **चूतः** ; याकाम. **चूत** (नरुस्व. ७४४).]

चूर पुंस्त्री. तुकडे, पीठ, भुगा. चुरा. Bits, fragments, pieces.

[सं. **चूर्ण** ; प्रा. **चूर** ; बं. **चूर्** ; हिं. पं. **चूर्** ; सिं. **चुरु**; गु. **चूर्**; ने. **चुर्**.]

चूर वि. गर्क, मग्न, स्तब्ध. Absorbed or engrossed in.

[सं. **श्रूर्, श्रूर्, श्रूर्यते**–वेड्यासारखे स्तब्ध होणें.]

चूल स्त्री. स्वैंपाक करण्याची जागा. A fire-place.

[सं. प्रा. **चुल्लि, चुल्ली** ; संस्कृतीकरण नंतरचें दिसतें. मूळशब्द प्राकृत किंवा देशी. कदाचित् **चूड, चुडा** ह्या शब्दाशीं संबद्ध आहे. बं. ओ. **चुल्ली, चुला** ; बि. **चूल्ह** ; हिं. **चुल्ही**; पं. **चुल्ह** ; गु. **चूलो** ; ने. **चुलि**; सिं. **चल्ही** ; अकाम. **चुला, चुलाण** = शेतांतील मोठी चूल ; **चुलखंड** = चूल (चुल्लो + खंड) ; **चुलीस अक्षत** = चूल पुजणें,–न पेटवणें.]

चूळ स्त्री. गुळणी, चुळका. A gargle, mouthful of water.

[द्रा. कान. **चुलुक, चुलका, चलक** = लहान भांडें, हाताचा पसा, ओंजळ, परंतु हा अर्थ जाऊन तोंडांतील पोकळीभर पाण्यास 'चूळ' असा अर्थ आधारआधेय ह्या तत्त्वानें आलेला दिसतो. सं. **चूलिका** ; प्रा. **चुचुली** हे शब्द आहेत परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

चूष स्त्री. मजा, गंमत. Fun.

[सं. **जुष्** ६ प्रीतिसेवनयोः (?). हा शब्द परकी दिसतो.]

चे(णें), चेइ(णें) अक्रि. चेतणें. To catch fire, to be awakened.

[सं. **चित्** १ चेतने ; प्रा. **चेय(णं), चेअ** ; याकाम. **चेओ** (ज्ञा. ९-९३) ; **चेइरा, चेइला** = जागृत, जागा (सं. **चेतित + ल > चेइल्ल**), **चेइरेपण, चेइलेपण, चेइरी, चेइरें** = जागृति.]

कापुराचें बगवें केलें पुढारें : तंव आगळे अवस्थे
जाहाले चेइरें ॥ नरुस्व. ३९७.

चेआ प्र. षष्ठीच्या 'च्या' प्रत्ययाचें जुनें रूप. An old genitive termination.

[सं. **ईय** ; प्रा. **इज्ज, इच्च** ; याकाम. **चेआ–चेहा–चेया** ; अकाम. **–च्या**–अशा मार्गानें सिद्ध होतो ; (**तत्रत्य–तत्थच्च–तेथिचेआ–तेथिचेहा–तेथिचेया-तेथिच्या–तेथिचा** इ०).]

चेकळ(णें) अक्रि. ज्यास्त अवसान येणें, भडकणें, पसरणें. To start away, to run off wildly, to engage eagerly.

[सं. **केल्, खेल्** १ चलने, (अभ्यास) **चेकेल–चेकळ**.]

चेंगट वि. दिरंगाईनें काम करणारा, कामांत मंद, रेंगाळणारा. Slow, dawdling, dilatory.

[सं. **उच्चिंगट** (ना.) ?.]

चेंगर(णें) अक्रि. दाटींत–गर्दीत सांपडणें, चेंदा होणें. To jam or squeeze.

[सं. **गूर्** ४ हिंसागत्योः–**जोगूर्य–जिघर** (?) ; अकाम. **चेंगराचेंगर** = चेंदामेंदा (रा.धा.).]

चेच(णें), चेंच(णें) सक्रि. ठेचणें, फुटणें, दाबणें. To bruise, to crush.

[सं. **छष्** १ हिंसायाम् (?) ; **चि** (वैदिक) द्वेषे= सूड घेणें (?) ; कान. **चेच्छु** = दाबणें, **चच्चु** = मारणें, तुडविणें; हीच व्युत्पत्ति अधिक ग्राह्य दिसते.]

चेट पुं. दास, सेवक, नोकर. A servant.

[सं. **चेटः**; अकामसा. **चेटका** = चेटूक करणारा, जादुटोणा करणारा ; **चेटकी** = जादुटोणा करणारी स्त्रीं ; **चेटूक** = जादूटोणा, मंत्रतंत्र; हे शब्द परकी दिसतात. संस्कृतशब्द '**चेट**' आहे परंतु तो उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतो. देप्रा. प्रा. '**चेडो**' आणि **चिल्लो** हे दोन शब्द '**बाल**' ह्या अर्थी आहेत (दे. ना. ११४·१५). कान. '**चिल्लर, चिल्ल, चिरु**, ता. **शील** ह्या द्राविडी शब्दांशीं '**चेला**' संबद्ध आहे.]

चेटा पुं. मुलगा. A son or a boy.

[सं. चेटकः ; देप्रा. चिल्लो तथा चेडो बालः (११४-१५). चेला पहा.]

चेड, चेडवा, चेडूं स्त्री. तरुण स्त्री. A young girl.

[सं. चेटी ; पा. प्रा. चेडी ; बं. चेर ; हिं.वि. चेरा.]

चेडी स्त्री. मुलगी. A girl.

[सं. चेटिका ; प्रा. चेडिआ-चेडी.]

चेंडू पुं. कापडाचा वांटोळा गोळा, मुलांच्या खेळण्याचा वांटोळा गोळा. A play-ball.

[सं. कन्दुकः, प्रा. कण्डुअ,; चण्डुअ, गेण्डुक = चेंडू; देप्रा. झेंडुओ (कन्दुकः); हिं. गेंद; कान. चंडु, सण्डु (चेंडू); गु. चेंडु. दोन्ही निर्वचनें तूल्यबल आहेत. संस्कृतीकरण नंतरचें दिसतें.]

चेत(णें) अक्रि. पेटणें, भडकणें. To catch fire.

[सं. चिति ; म. चिता (नाधा.), हा शब्द सं. चृत्-६ दाहे पासून आला. चेत=पेटणें, भडका.]

चेत(णें) अक्रि. उद्दीपित होणें, जागृत होणें, चलनवलन करणें. (किंवा वरील शब्दाचा लाक्षणिक अर्थ.) To be excited.

[सं. चित् १ संज्ञाने.]

चेतव(णें) सक्रि. पेटविणें, जाळणें, क्षोभविणें. To kindle.

[म. चेतणें, (णिच्) चेतव.]

चेंद(णें) सक्रि. दाबणें, कोंदणें, चुरडणें. To crush, to squeeze.

[सं. छिद् ७ द्वैधीकरणे ; अकामसा. चेंदा = गर्दी, दाटी, चेंदामेंदा = चेंगराचेंगर. दाटीमुळें झालेली खराबी, नासाडी; चेंदाडा = भुगा, चुराड. चेंदामेंदा ही द्विरुक्ति दिसते व ती समानार्थक शब्दांचीच दिसते. तेव्हां त्यांतील दुसरा शब्द परकी-द्राविडी असावा. किंवा दोन्हीहि शब्द द्राविडी आहेत काय ?]

चेप(णें) सक्रि. दाबणें, पिळणें, अवसान गळणें, राग येणें. To press, to compress.

[सं. चिप् १ परिकल्कने, सिभ् १ हिंसार्थे; (पहा शिक्षासमुच्चय. बेंडाल. पृ. १८२), चप्, चपय (चर्पय, चर्पटः, चिपिटः); प्रा. चप्पइ; बं. चापा; ओ. चापिबा; पं. चिप्पणा; सिं. चिपणु ; गु. चीपवूं ; हिं. चेपना = डिंकानें चिकटविणें. (चिपणें, चेपणें, चिपट, चिपाड, चूप, चिप वगैरे शब्द परस्परसंबंद्ध आहेत.); अकामसा. चेपट = चापट, दाबलेलें, चेपलेलें ; चेपण = दडपण, वजन ; चेपणी = दाब, दडपण, अट, आढी ; चेपाचेपी, चेपारा = दाटी; चेपें = टोपी, (>शिरपेच).]

चेंबटणें उक्रि. दाबणें, चिरडणें. To compress and crush.

[सं. सिभ् (१ हिंसार्थे) + पट् १ गतौ.]

चेला पुं. शिष्य, उमेदवार. A disciple, a pupil.

[सं. क्षुद्रः (?), चेट; १ देप्रा. चेल्ल, चिल्ल ; बं. ओ. चेला ; हिं. पं. चेला, चेरा ; सिं. चेलो ; गु. चेलो. २ कान. चिल्लर, चिल्लु, चिरु=लहानपणा ; तामी. शील लहान, थोडें ; ३ सं. चेटः ; पा. चेटको ; प्रा. चेड; बं. चेर; संस्कृत आणि द्राविडी अशा दोन्ही शब्दप्रतीकांचा संकर होऊन शब्द रूढ झालेला दिसतो.]

चेव पुं. क्रोध. Excitement.

[सं. चेतः ; पा. चेतो ; प्रा. चेओ ; पं. चेवो.]

चेव(णें) अक्रि. उत्तेजित होणें, क्षुब्ध होणें, क्षोभणें, त्रासणें, बेताल होणें. To become wild.

[सं. १ चि ५ द्वेषे, (वैदिक) चयते, कित् १ ज्ञाने, २ चेत्, √चित् ; पा. चेत ; प्रा. चेअ ; बं. चिया ; ओ. चीबा ; पं. चव ; गु. चेवूँ. चेवविणें (प्रयोजक रूप 'चेव' चें)=जागृत-प्रदिप्त करणें. गु. चेववूँ=गरम करणें.)]

चेष्ट(णें) अक्रि. वागणें, हालचाल करणें, हलणें. To act, to behave, to move.

[सं. चेष्ट् १ चेष्टायाम्; अकामसा. चेष्टा = चलनवलन, हालचाल, चळवळ, थट्टा. ह्याच्या अर्थांत फरक झाला आहे. मूळ अर्थ चलनवलन असा असून "टवाळी, थट्टा, खोडी" असा अर्थ उत्पन्न झाला आहे. -चेष्टेखोर = थट्टेखोर.]

चेहरा पुं. चर्या, रूप, तोंडवळा, मुद्रा. Face, features.

[फा. चिह्रा.]

चेळ(णें) अक्रि. वितळणें, ठासणें, दाबणें, चिणणें, वेडेचार करणें. To melt and run, to run riot.

[सं. घृ-(अभ्यास) जिघृ, चल् १ गतौ. चेळ = समृद्धि; चेळें = भ्रम, वेडेचार.]

चैतन्य न. जागृति, जीव, प्राण, जिवंतपणा, जीवनशक्ति. Life, spirit, activity.

[सं. चित् १ संज्ञाने.]

चैत्र पुं. महिन्याचें नाव, हिंदूंच्या वर्षाचा पहिला महिना. The name of the first month in the Hindu calendar.

[सं. **चित्रा** (नक्षत्र), √**चित्** १ संज्ञाने.]

चैन स्त्री. ऐट, आनंद, मजा, विलास, आराम, विसावा, सुख. Rest, ease.

[हिं. **चैन** ; **चैनबाज** = मजा करणारा.]

चोख(णें) सक्रि. शोषणें, तोंडानें ओढून घेणें. To suck.

[सं. **चूष्** (**जुष्**) १ पाने; अकाम. **चोखणी**, **चोखणें** = लहान मुलाच्या तोंडांत घालावयाचें रिंगणें.]

चोख वि. शुद्ध, स्वच्छ, खरा, सुंदर. Clean, clear, genuine.

[सं. **चौक्ष**, **चोक्ष** ; पा. प्रा. **चोक्ख** ; देप्रा. **चोक्ख** ; बं. **चोख्** ; ओ. **चोखा** ; हिं. **चोखा** ; पं. **चोखा** ; गु. **चोख्** ; सिं. **चोखो** ; कान. **चोक्क**, **चोक्कट** = सुंदर; याकाम. **चोखट** (ऋ. पू. ४४१), **चौखड** = निर्मल (ज्ञा. २-११), **चोखी** (नरुस्व. ७७८); अकामसा. **चोखट**, **-टा** = चांगला, शुद्ध ; **चोखटाई** = चांगुलपणा; **चोखंदळ** = नाजूक, चिकित्सेखोर (चोखनळ,-नेळ ?); **चोखी** = चांगुलपणा.]

चोखालुव(णें) अक्रि. एकत्र रचणें. To pile together.

[सं. **खल्** १ **संञ्चये**, (णिच्-अभ्यास) **चोखालय**, **चोखांलुः** (ना.).]

जेणे चोखालुती सन्याऊ । तो व्यवसाया आंतु व्यवसाऊ ।
माझें रूप हें म्हणे राऊ । सुरवरांचा ॥ रा. ज्ञा. १०-२६३

चोखाळ(णें) क्रि. तण काढणें, बारकाईनें शोधणें, अतिशय खल करणें, बारकाईनें पठणें, मार्गानें जाणें (ल.). To clear off grass, to search narrowly, to discuss mumbly.

[सं. **चूष्** १ पाने, **चूषल** (ना.), **खल्** १ सञ्चये ; कान. (तद्भव) **चोक्कळ** = पावित्र्य ; याकाम. **चोखाळ** (ज्ञा. १७-३१८)=चिकित्सक, स्वच्छ, शुद्ध, निष्कलंक.]

चोंगा पुं. दोन हात लांबीचें मापन. Two hand-breadths.

[सं. **चतुर्** **अंगुलि** (?); बं. **चुंगी** ; ओ. **चुंगा** ; हिं. **चोंगा**.]

चोगा पुं. लोंबकळत असलेला पदर, पायघोळ अंगरखा. An apron, the loose end of the dhotee.

[कान. **चोगे**. **सोगा** पहा.]

चोंच स्त्री. पक्ष्याच्या मुखाचें निमूळतें टोंक, चंचू, टोंकदार शेंडी. A beak or bill.

[सं. **चंचू** ; प्रा. **चंचू** ; देप्रा. **चुंचुली**; सिं. **चूंजी** ; गु. **चोंच** ; बं. हिं. **चोंच**. **टोंच** हा शब्द टर्नर ह्याच शब्दापासून काढतो तें बरोबर नाहीं (पहा. **टोंच** < **त्वच्** **त्वच्**). सं. **चञ्चु** (**चोंच**) व सं. **चूचुक**=स्तनाग्र ह्या शब्दाशीं संबद्ध आहे. टोंच हा शब्द त्या शब्दाशीं जोडणें जरा दूरान्वयाचें दिसतें.]

चोचला पुं. थान, स्तन, जोबन, पति, प्रियकर (ल.), हावभाव, नखरा. A female breast, darling, dear, amorous dalliance.

[सं. **चंचू** (>**चोंच**), **सूच्** १० पैशुन्ये (?), सं. **चूचुक** = स्तनाग्र व **चंचू** ह्या शब्दाशीं संबद्ध दिसतो. देप्रा. **चंचुलिअं अवधारित सतृष्णताच** (१२०-१); गु. **चोचलां** (न. अ. व.); पं. हिं. **चोचला** ; गु. **चुंची** ; पं. **चूका** ; का. **चिच** ; लमा. **चुचि**; हिं. **चोचला** = खेळकरपणा. कांहीं विद्वान् हा ध्वनिशब्द मानतात.]

^{1}**चोज(णें)** अक्रि. आवडणें, कळणें, समजून येणें, भासणें. To like, to be knowable.

[सं. **जुष्** ६ प्रीतिसेवनयोः (**जोषयेत् सर्वकर्माणि**).]

^{2}**चोज(णें)** सक्रि. प्रोत्साहन देणें, प्रवर्तणें.

[सं. **चोद्य** ; प्रा. **चोज्ज**.]

जें ज्ञानासि न चोजवे । ध्यानासिंहि जें नांगवे
तें अगोचर फावे । गोठीमाजीं ॥ ज्ञा. १५-१६

चोज न. आवड, इच्छा, नवल, आश्चर्य, कौतुक, प्रेम. Liking, desire, wonder.

[सं. **चोद्य** (?) (<सं. **चुद्** १० संचोदने) ; प्रा. **चोज्ज** ; देप्रा. =**चुज्जं आश्चर्यं ; ओत्संयोगे इति चोज्जम् इत्यपि** (११६-१४); हिं. पं. **चोज** ; याकाम. **चोज** ; अकाम. **चोज** (दन्त्यतालव्य) ; बकाम. **चोजविणें** = कौतुकानें पाहणें, तुलना करून पाहणें, विचार करणें.]

जयाचिया यशाची थोरी : चोजवीतां चंद्र न पवे सरी ॥
नरुस्व. ६३.

१चोट स्त्री. घाला, तडाखा, हल्ला, सप्पाटा, नुकसान. A stroke, a blow with a fist.

[सं. चुट् ६ अवयवे. हिंदी शब्द असून तो तेथून मराठींत आला.]

२चोट पु. पुरुषाचें जननेंद्रिय, शिश्न. Male organ of generation.

[सं. **चुट्** ६ अवयवे (?); हा शब्द शरीर अवयवाच्या इतर शब्दांप्रमाणें देशी किंवा द्राविडी असावा. द्रा. कान. **चोट्ट**= वक्रत्व, वांकडें. **चूत** (=स्त्रीयोनि) ह्या शब्दाशीं कांहीं संबंध असेल का ? **चोटाळ(णें)** (ना.धा.) = फसविणें, नाडणें, संभोग करणें ; **चोटी, चोटुली, चोटुकली** = लहान मुलाचें इंद्रिय.]

चोटी, चोटली स्त्री. शेंडी. The top-knot of hair.

[सं. **चूडा** ?; प्रा. **चोट्टी**=शेंडी ; देप्रा. **चडो, चोट्टी**+**ल** (अल्पार्थे प्र.); हिं. **चोटी** ; गु. **चोटी, चोटली** शब्द गुजराथीमधून मराठींत आला. अकाम. (प्रांतिक अहिराणी) **चोटली**.]

चोंढ, चोंढा, पुं. स्त्री. बांध घातलेलें खांचर, खांच. A banked-up portion of rice-field.

[सं. **श्रोण्, श्लोण्** १ संघाते ; अकामसा. **चोंढोळी**= स्पर्शाचा दोष ; **चोंढ(णें)**=स्पर्शणें, चिकटविणें.]

चोथा पुं. निस्सत्त्व अवशेष,-भाग. The residue of a squeezed substance.

[सं. **चुस्त, तुस्त** ; परंतु हें संस्कृतीकरण नंतरचें दिसतें. म. **चोथळ(णें)**= चोथ्यानें पुसणें, **चोथड**=चोथा.]

चोद(णें) सक्रि. स्त्रीसंभोग करणें (ग्रामीण). To co-habit.

[सं. **चुद्** १० संचोदने ; हिं. **चोदणा** ; बं. **चुदा** ; पं. **चोदणा** ; सिं. **चोदणु** ; गु. **चोदवूँ**.]

चोंद(णें) उक्रि. ठासणें, कोंदणें, बुजविणें. To stuff in, to cram.

[सं. **चुद्, चुन्द्** १ संघाते, **श्रोण्** १ संघाते ; अकाम. **चोंदा**=बोळा, ठासलेला दाब. **चोंदी**=फसवणूक.]

चोप(णें) उक्रि. मारणें, थापटणें, ठोकणें. To beat, to cudgel, to bang.

[वैसं. **चोप्य, चोब्य, चोभ्य, चुभ्य** ; प्रा. **चोप्प, चोब्ब, चोभ्भ, चुभ्भ** ; (फा. **चोब्**=दंड, मार, **चोप्दन्**=मारणें ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे.); बं. **चोप्** ; हिं. **चूभना** ; सिं. **चुभणु** ; गु. **चोपवूँ** ; अकामसा. **चोपणें**-**चोपणी**=चोपण्याचें दांडकें, चोपण्याची क्रिया.]

चोपड(णें) सक्रि. माखणें, तेल लावणें, साफसूफ करणें, लेपणें. To besmear or grease.

[सं. **चर्पटः** ; प्रा. **चोप्पड, चुप्प,**=तेलकट ; देप्रा. **चौप्पडइ** (म्रक्षति); सं. **स्पर्श्** १ आर्द्रीभावे ; अकाम. **चोपडा**=गुळगुळीत, चिकण, मऊ, सपाट, तेल चोपडलेलें.]

चोपडी स्त्री. वही, (हिशेबाचें) पुस्तक. A stitched or bound book.

[सं. **चौपत्री** ; हिं. **चोपडी** ; गु. **चोपडी**.]

चोपदार पुं. चांदी सोन्याची काठी घेऊन राजापुढें चालणारा रक्षक, ललकारणारा वेत्रधारी हुजऱ्या. A mace-bearer.

[फा. **चोब्गार** ; हिं. **चोबगार**.]

चोंव(णें) अक्रि. खच्चून भरणें, दाबणें. To stuff in.

[सं. **चुब्** १० हिंसायाम्, **सुंभ्**-to smother (Whitney); अकामसा. **चोंबाड(णें), चोबाळ**= खुशामत करणें (<**च्यु**, हासे+**बाध्** १ लोडने), **चोभ(णें), चोंभ(णें)**=चोंवणें.]

चोंवडा वि. चुगली सांगणारा, लावालावी करणारा, लुडबुड्या. Loose-tongued.

[सं. **चुब्** १ मुखस्पर्शने, **चुंबल** (नाधा.)]

चोय स्त्री. बांबूची बारीक काडी. A fibrous stick of bamboo.

[सं. **सूचि** <**सूच्** १० पैशुन्ये ; सिं. **चोई** ; २ सं. **सिव्** ४ तंतुसंताने; अकाम. **चोय(णें)**=चोईनें टोंचणें.]

चोर पुं. दुसऱ्याची वस्तु नकळत नेणारा, लुबाडणारा. A thief or robber.

[सं. **चोर,√चुर्** १० स्तेये ; पा. प्रा. **चोर** ; सिं. **चोरु** ; गु. पं. हिं. बं. रुमा. **चोर** ; का. **चुर्** ; सिंह. **होरा**. संस्कृतमधील 'चोर' शब्दाचा आद्य वर्ण तालव्य आहे. मराठी 'चोर' शब्दाचा आद्य वर्ण दन्त्यतालव्य आहे तेव्हां त्याचें मूळ निराळें असावें अशी शंका येते. **त्सर**<**त्सर्** हें त्याचें मूळ असेल कां ? चोरकप्पा, चोरखण, चोरखिसा इत्यादि शब्दांतील **चोर** शब्द **√त्सर्** १ छद्मगतौ पासून आला आहे. अकामसा. **चोरकाम**=दुसऱ्यास न दिसणारें काम; **चोरखण**= गुप्त कप्पा ; **चोरखिसा**=गुप्त खिसा ; **चोरचिलट**=चोर वगैरे ; **चोरनजर**=चुकवून पाहणें, बारीक नजर ; **चोरी**=चोरण्याची क्रिया, स्तेय.]

चोरमोळे वि. खोटें, बनावट, न चालणारें. False, counter-feit.
[याकाम. **चोरमोळा** (उगी. ६३६)]
पुनतियेंही चोरमोळीं म्हणौनि रसिकीं : वारिली वरदळाची । नरुस्व. ५२०.

चोरा पु. मोठा ओटा. A raised seat or ground.
[सं. **चतुर्**, **चबूतरा**, **चउतरा** ; हिं. **चौरा** ; हिंदीमधून मराठींत आला. याकाम. **चोरथरा** (उगी. ६३५) ; अकाम. **चह्रूतरा**, **चभ्रूतरा**. याकाम. व अकाम. मधील रूपांवरून संस्कृत मूळ 'चतुस्तर' असावें असें वाटतें. त्याशिवाय मधील 'थ, त 'ची उपपत्ति लागत नाहीं.]

चोव पुं. ओला खोवलेला नारळ. Scrappings of a cocoanut.

चोवडा एक पदार्थ. A kind of sweets.
[सं. **चो** ; **चोव** (=कीस)+**वडा**.]

चोवडी स्त्री. चोय. A fibrous stick.
[सं. **सीव्** १ तन्तुसंताने ; **सूचि** (√**सूच्**).]

चोवीस वि. वीस आणि चार, संख्या. Twenty-four.
[सं. **चतुर्विंशति** ; प्रा. **चउवीस**, **चव्वीस**, **चौव्वीस**, **चोव्विह** ; सिं. **चोवीह** ; पं. **चौबी** ; का. **चोवुह** ; हिं. **चौबीस** ; गु. **चोवीस** ; बं. **चब्बीस**. **चौवीस** पहा.]

चोष(णें) सक्रि. चोखणें, शोषणें. To suck.
[सं. **चुष्**, **जुष्** १ पाने.]

चोहट,-टा पुं. चव्हाटा, चौक. A meeting place of four roads.
[सं. **चतुर्**+**हाट** (किंवा **वाट** < **वर्त्मन्**); अकाम. **चोहाट**, **चोहाटा**, **चोहोटा**, **चव्हाटा**.]

चोळ(णें) उक्रि. हातावर दाबणें, रगडणें, मर्दणें. To rub, to knead.
[सं. **चुल्** ; प्रा. **चुल्ल** ; (सं. **चूड्**, **जुल्**, **सुल्**, **चूर्ण** (?), (वैसं. **सुल्**); गु. **चोळवूँ** ; अकामसा. **चोळट(णें)**=घांसणें; **चोळ**=घांसाघीस , फुटतूट, वर्दळ ; **चोळणी**=मळणी ; **चोळामोळा**=चेंदामेंदा (समानार्थक दोन शब्दांची द्विरुक्ति).]

चोळणा पुं. सैल विजार, तुमान. Short breeches, a loose payjama.
[कान. **चल्लण**=चड्डी.]

चोळा पुं. चोळेचा रंग, पुट. A kind of colour.
[म. **चोळ** ; याकाम. **चोळा** (उगी.).]

चोळी स्त्री. स्त्रियांचें वस्त्र (उरोभागावरील). A bodice.
[सं. **चूचुक** ह्या शब्दाशीं संबद्ध आहे काय ? सं. **चोड**, **चोडक**, **चोल**; पा. **चोलो** ; प्रा. **चालअ** ; देप्रा. **चोलअ** (न.)=कवचचर्म; बं. **चोर** ; हिं. पं. **चोला** ; सिं. **चोलो**.]

चौ वि. चार, संख्याविशेष. Four.
[सं. **चतुर्** ; प्रा. **चउ** ; हा शब्द प्रथम अवयव म्हणून येऊन कांहीं सामासिक संख्यावाचक शब्द सिद्ध होतात. उदा. **चौचाळीस**, **चव्वेचाळीस** (सं. **चत्वारिंशत्** ; प्रा. **चउआलीस**, **चउत्तालीस**); **चौवीस** (सं. **चतुर्विंशति** प्रा. **चउवीसी**); **चौतीस** (प्रा **चउत्तीसइम्**); **चौदा** (प्रा. **चउद्दह**); **चौकट** (सं. **चतुर्काष्ठ**, प्रा. **चउकट्ठ**); **चौसष्ठ**, **चौसट** (सं. **चतुःषष्टि**, प्रा. **चउसट्ठी**); **चौऱ्याहत्तर** (प्रा. **चउरहत्तर**); **चौऱ्यांशी** (सं. **चतुरशीति**, प्रा. **चउरासी**); **चौथा** (सं. **चतुर्थः**, प्रा. **चउत्थ**); **चौऱ्याण्णव** (प्रा. **चउरणउय**); **चौकी** (सं. **चतुष्किका**; प्रा. **चउक्किआ**); **चौरंग** (सं. **चतुरंग**, प्रा. **चउरंग**), **चौरस** (प्रा. **चउरंस**) इ.]

¹चौक पुं. चार रस्ते एकत्र मिळालेलें ठिकाण; मोकळी जागा आणि भोंवतालीं इमारती असें ठिकाण. A square court or area.
[सं. **चतुष्क** ; पा. **चतुक्क** ; प्रा. **चउक्क** ; देप्रा. **चउक्कं** (**चत्वरम्** १११-११); गु. **चोक** ; पं. हिं. बं. **चौक** ; का. **चोख** ; ओ. **चौका** ; सिं. **चउकु** ; **चौको** ; गु. **चोको** (स्नानाचा चौक); याकाम. **चौक** (ओटा, चौथरा नरुस्व. ७७५).]

²चौक पुं. चांगला घोडा. A good horse or its showy face.
[सं. **चोस्क**=सुंदर घोडा; किंवा **चौखुर** ह्याचा संक्षेप; अकामसा. **चौकणें**=घोड्याप्रमाणें चालणें.]

-चौकड(णें) अक्रि. उड्या मारणें. To bound.
[याकाम. **चौकडणें**=उड्या मारणें.]
पुढां चौकडते कस्तुरी-मृग : चवरियांचे पाडे उभसिंग. नरुस्व. ७४५.

चौकट स्त्री. चार कोपऱ्याची आकृति. A quandragular frame.
[सं. **चतुष्क**; प्रा. **चउक्क**+**ट**. > **चौकट** > **चौकडी**; गु. **चोकडी**; हिं. पं. **चौकरी**. '**चतुर्**+**काष्ठ**' ही व्युत्पत्ति टर्नर सुचवितो ती चिन्त्य आहे.]

चौकडा (चौकडी) पुं. चार वस्तूंचा समुदाय, मोत्यांचा चौकडा. An ornament of pearls.
[**चौकट** पहा. याकाम. **चौकडी** (ज्ञा. ९.१०६).]

चौकशी स्त्री. शोध, तपास. A careful inquiry.
[सं. **चतुःकृप्** (?); हिं. **चौकसी.**]

चौकी स्त्री. चार पायाची घडवंची, पोलिसाचें ठाणें, शिपायांचें ठाणें. A guard, a watch, a party of police, a stool.
[सं. **चतुष्कम्, चतुष्किका**; प्रा. **चौक्क, चौक्किआ**; बं. ओ. **चौकी**–(स्टूल); हिं. पं. **चौकी**; सिं. **चौकी**; गु. **चोकी**; ने. **चौकि.**]

चौकोन,-ण पुं. चार कोनांची सरळरेषा–आकृति. A quadrangular figure.
[सं. **चतुष्कोण**; प्रा. **चउक्कोण.**]

चौखूर अ. चार खुरांनीं, (त्यावरून) चहूं बाजूंला. With the four legs at once, on all sides.
[सं. **चतुर् + क्षुर**; प्रा. **चउ + खुर**; टर्नरनें **चतुस्, खुंट** अशी व्युत्पत्ति दिली आहे ती दूरान्वित वाटते.]

चौखुरी स्त्री. खाट, बाज. A cot.

चौगुण वि. चौपट. Four-fold.
[सं. **चतुर् + गुण**; प्रा. **चउ + गुण.**]

चौखांबी स्त्री. चारखांबाची (इमारत), विशेषतः देवळांतील गाभारा. A building having four main pillars.
[सं. **चतुर् + स्कंभ्.**]

चौगर्द अ. चोहींकडून, सर्व बाजूंस. All around.
[फा. **गिर्द** = परिघ; **चौ,** < **चतुर्**; हिं. **चहूं.**]

चौगुला पुं. गांवांतील कामगार पाटलाचा शिपाई. The peon of the vllage patel.
[**चौघुला** ?]

चौघडा पुं. नगारा (ठराविक वेळेस वाजवावयाचें वाद्य; चार चार घटिकांच्या अंतरांनीं वाजवीत असत.) A kettle-drum.
[सं. **चतुर् + घटि.**]

चौघे वि. चार (जण.) Four.
[सं. **चतुर्**; प्रा. **चउ.** (**चतुष्कः चउग्गः चौगे चौघे** (?); (**दोघे, तिघे, चौघे** < सं. **द्विगः, त्रिगः चतुर्गः** प्रा. **दोग्ग, तिग्ग, चउग्ग, द्विगः** = दोन दोन जाणारे–जोडीनें जाणारे).]

चौचाल वि. लहरी, भटक्या, थेर करणारे, भणंग. Speculative, having various whims, of many moods.
[म. **चौ + चाल** = भिन्न रीतीचा.]

चौडे वि. रुंद, (लंबे) चौडे. Wide, (long and) wide.
[सं. **चृद्** (?), **चतुर्** (**चउर** > **चउड**); देप्रा. **चाऊड**; बं. ओ. हिं. पं. **चौरा**; गु. **चोडूँ.** लंबेचौडे ह्यांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत.]

चौढाळ(णें) सक्रि. (बंधनें) तोडणें, अतिरेक करणें. To break through distinctions of caste &c.
[सं. **च्यु** १ गतौ, + **ध्वृ** १ हूर्छने (?); **चौ + ढाळ** = चार बाजूंनीं उतरती बाजू लागणें.]

चौंडका पुं. चवंडके. One-stringed instrument.
[कान. **चौडिके.**]

चौतर्फ क्रि. चारी बाजूंनीं–सर्व बाजूंनीं. On all sides, all round.
[हिं. **चहूं**; अर. **तरफ** = बाजू.]

चौताल पुं. एक प्रकारचा ताल. A time or measure of music.
[सं. **चतुस्ताल**; प्रा. **चउत्ताल**; हि. पं. **चौताल**; गु. **चोताल**; **चोताळूं**; ने. **चौताल्.**]

चौताळ(णें) अक्रि. क्षुब्ध होणें, पिसाळणें, चवताळणें. To be excited.
[सं. **चौ + ताल.**]

चौतीस वि. संख्याविशेष. तीन दहा आणि चार. Thirty-four.
[सं. **चतुस्त्रिंशत्**; प्रा. **चोत्तीसम्**; बं. **चौत्रीस**; ओ. **चौत्रीस**; हिं. **चौतीस**; पं. **चौत्ती**; सिं. **चोत्रीह**; गु. **चोत्रीस्**; ने. **चौतीस.**]

चौथ स्त्री. One fourth part (of the total revenue, a tax levied by the Marathas on the occupied enemy country.).

[सं. **चतुर्थ–चऊत्थ.** सर्व उत्पन्नाचा चौथा हिस्सा, सरकार साऱ्याचा चौथा हिस्सा. हा कर मराठ्यांनीं मुसलमानांच्या ताब्यांतील प्रांतांतून घेतला. त्याचे चार भाग असत. **राजबाबती** = राजाच्या हक्काचा हिस्सा. राहिलेल्या तीन भागांस **मोकासा** म्हणत. त्यांतील ६ टक्के पंत सचिवास **साहोत्रा** म्हणून देत. तीन टक्के नाडगौडाला. बाकी राहिलेल्या ६६ टक्के भागास **ऐनमोकासा** म्हणत.]

चौथरा पुं. दगडाविटांचा कट्टा. A quadrangular terrace, a raised square.

[सं. **चतुस्+स्तर (प्र–स्तर)**; प्रा. **चउत्थर**; बं. **चौतारा**; हिं. **चौतरा**; पं. **चौतरा**; गु. **चोतरो**; ने. **चौतारो**.]

चौथा वि. तिसऱ्या नंतरचा. Fourth.

[सं. **चतुर्थ**; प्रा. **चउत्थ, चोत्थ**; बं. **चौथा, चोठा**; गु. **चोथुं**; ओ. **चौथ**; हिं. पं. **चौथा**; सिं. **चोथा. चौथ**, = चौथा हिस्सा; **चौथाई** = चौथ्या हिशाची पट्टी, कर.]

चौदा वि. संख्याविशेष, दहा आणि चार. Fourteen.

[सं. **चतुर्दश**; पा. **चतुद्दस, चुद्दस**; प्रा. **चौद्दस**; **चोद्दह** (ग्रांथिक व्याकरणांत); अप. **चौद्दह, चउद्दह**; बं. **चौद्द**; हिं. **चौदह**; पं. **चौधा, चौदाम**; सिं. **चोदाहा**; गु. **चौदा**. प. पं. **चोडा**; का. **चोदाह**; अकाम. **चौदावा** (चतुर्दशक, चतुर्दशअ), **चौदस** (चतुर्दशी); **चौदा चौकड्यांचें राज्य** (चार युगांची एक चौकडी, अशा चौदा चौकड्यांपर्यंत टिकणारें राज्य); **चौदावें रत्न** = चाबूक, प्रतोद.]

चौधरी पुं. पर्यवेक्षक, पाटील, एक मुलकी अधिकारी. A public officer of the village.

[सं. **चतुर्धारी, चक्रधारी**; बं. ओ. **चौधुरी**; हिं. पं. **चौधरी**; गु. **चौध्री**.]

चौपट वि. पुं. चारदां पट, सोंगट्याचा पट. Fourfold, the cloth or the board for the game of draughts.

[सं. **चतुर्+पट**; अकामसा. **चौपदरी–चौपालवी–चौपुटी** = चार पदर असलेली, चार पदर एकत्र केलेली झोळी (चतुर्+पल्लव.)]

चौपाई स्त्री. खाट, चार पायांचा पलंग. A cot, a bed-stead.

[सं. **चतुष्पाद, चतुष्पादिका, चतुष्पदी**; पा. **चतुष्पादको**; प्रा. **चौप्पअ, चउपाइआ**; बं. ओ. **चौपाया**; हिं. **चौपा, चौपाया**; फा. **चिहारपाई**; पं. **चौपाहआ**; सिं. **चौपाई**; गु. **चोपाई**; अकामसा. **चौपाट** = चौरंग; **चौपाशी** = चहूंकडे,-बाजूंस (चतुर्+पार्श्व.).]

चौफल(णें) अक्रि. चौरंगाचा आकार बनविणें. To give the shape of a squared piece.

[सं. **चतुष्फलक** (नाधा.)]

आतां हृदय हें आपुलें । चौफलौनि भलें ।
वरी वैसवूं पाउलें । श्रीगुरुचीं ॥ राज्ञा. १५–१

चौफळ वि. चौकोनी, चौपट. Having four corners, four-fold.

[सं. **चतुर्+फल,–फलकः**; अकामसा. **चौफाळा** = चौरंग, झोपाळा; **चौफुला** = चार फुल्या असलेला, चार कप्प्यांचा डबा; **चौफुली** = फुली (चांदणीसारखी), **चौफेर** = चहू बाजूंनीं (चौ + फेर (मराठी)); **चौबंदी** = चारांचा समूह.]

चौबार पुं. चौक, अंगण. A square yard.

[म. **चौ+बार** = दरबार, मंदिर; **बारी** = गवाक्ष, खिडकी, द्वार.]

चौबुर्जी स्त्री. चार बुरुज असलेला किल्ला. A fortress having four bastions.

[फा. म. **चौ+बुर्ज्**]

चौबे, चौभे पु. नामविशेष, एक ब्राह्मण जात (उत्तरेकडील), एक आडनांव, A surname among the Brahmins.

[सं. **चतुर्वेदः**; प्रा. **चउव्वेदी**; हिं. **चोबे**; म. **चौभे. द्विवेदी > दुबे, डुवे, त्रिवेदी** पहा.]

चौरंग पुं. लाकडाचा चार खुरांचा पाट, आसन. A square wooden seat.

चौरंगी पुं. व्यक्तिनाम, चौरंगी नाथ. The name of an individual.

चौरस पुं. वि. (भूमिति) सर्व बाजू सारख्या व सर्व कोन काटकोन अशी आकृति, हुशार (ल.). A square, (fig.) clever.

[सं. **चतुर्+अस्र**; प्रा. **चउरस**; हिं. **चौरस**; गु. **चोरस**.]

चौरी स्त्री. वारा घालण्यासाठीं,-मच्छर वारण्यासाठीं केलेलें केसांचें साधन, पंखा, वनगाईच्या केंसाचा केलेला झुबका, चवरी पहा. A chauri, bunch of hair put together to whisk off flies.

[सं. **चामर** ; पा. प्रा. **चामर** ; बं. **चमर** ; ओ. **चाम्रर** ; हिं. **चावर** ; पं. **चावर** ; याकाम. **चवरी** (नरुस्व. ७००); अकाम. **चवरी. चौरी.**]

चौरेचाळ,-ताळ-चाळीस चवेचाळीस पहा.

[सं. **चतुश्चत्वारिंशत्** ; प्रा. **चउत्तालीस** ; हिं. **चौआलीस, चवालीस** ; गु. **चुम्मालिस, चवेतालीस** ;]

चौऱ्याण्णव वि. संख्याविशेष, नव्वद आणि चार Ninty-four.

[सं. **चतुर्नवति** ; प्रा. **चौणौइम्** ; बं. **चरानव्वई** ; ओ. **चौरानवे** ; हिं. **चौरानवे** ; पं. **चौरान्मे** ; सिं. **चोरानवे**; गु. **चोराणूँ** ; ने. **चौरानब्बे.**]

चौऱ्यांशी वि. संख्याविशेष, ऐंशी + चार. Eighty-four.

[सं. **चतुरशीति** ; पा. **चुल्लासीति** ; प्रा. **चौरासीइम्** ; बं. **चुरासी** ; ओ. **चौरासी** ; हिं. पं. **चौरासी** ; सिं. गु. **चोरासी** ; ने. **चौरासि.**]

चौऱ्याहत्तर वि. सत्तर आणि चार, संख्याविशेष. Seventy four.

[सं. **चतुःसप्तति** ; प्रा. **चौहत्तरीम्** ; बं. **चुयात्तर** ; ओ. **चौत्तरी** ; हिं. पं. **चौहत्तर** ; सिं. **चौहतरि** ; गु. **चुमोत्तर** ; ने. **चौहतर.**)

चौवाट पुं. चौक. The place where four roads meet.

[सं. **चतुर्वर्त्मन्** ; प्रा. **चउवट्ट** ; सिं. **चौवाटो** ; गु. **चोवाटे.** चहाटा पहा.]

चौवा, चव्वा, चव्व्या पुं. चार ठिपक्याचें पत्त्यांतील पान. The card showiug four.
[सं. चतुर्थक.]

चौवीस वि. संख्याविशेष, दोन दहा आणि चार. Twenty-four.

[सं. **चतुर्विंशति** ; पा. **चतुवीसा** ; प्रा. **चौव्वीसम्** ; अप. **चोवीस** ; बं. **चब्बीस** ; ओ. **चबीस** ; हिं. **चौबीस**; पं. ल्हां. **चव्वी** ; सिं. **चोवीह** ; गु. **चोवीस** ; ने. **चौबिस्.**]

चौसष्ट वि. संख्याविशेष, सहादां दहा आणि चार. Sixty-four.

[सं. **चतुःषष्टि** ; प्रा. **चाउसट्ठिम्** ; बं. **चौसट्टी** ; ओ. **चाऊसठी** ; हिं. **चौसठ** ; पं. **चौहट** ; सिं. **चोहठी** ; गु. **चोसठ** ; ने. **चौसट्ठि** ; अकामसा. **चौसष्ट कला** = निरनिराळीं ६४ कौशल्याचीं कामें ; **चौसष्टि** = चौसष्ट वस्तूंचा समुदाय.]

चौसार पुं. सोंगट्यांचा खेळ, बुद्धिबळ. The game of draughts.

[सं. **चतुर् + चार** ; प्रा. **चउसार**; अकामसा. **चौसोपी** = चार सोपे असलेली इमारत; **चौहटा** (चतुर + हाट).]

च्यव(णें) अक्रि. पडणें, घसरणें, ढळणें. To slip, to fall, to drop.

[सं. **च्यु** १ गतौ ; संसा. **च्यवन** = घसर ; **च्युत** = घसरलेलें, पडलेलें.]

च्याउम्याऊ पुं. लहान मुलांचा खेळ (ह्यांत मुलें एकमेकापुढें बसून एकमेकाचे कान धरून डोलतात.). A game of children.

[ध्वनिशब्द, किंवा तेलु. **चेवी, चाउ** = कान. मांजराच्या आवाजाचा कांहीं संबंध नसावा.]

च्याच्याँ पुं. मुलांचें ओरडणें, रडणें. Crying of (infants).
[ध्वनिशब्द. **चिवचिव** <स्यम्, चिवू.]

छ पुं. मराठी वर्णमालेंतील सातवें व्यंजन. ह्याचें मूळ उच्चारण तालव्य महाप्राण कठोर असून उच्चारस्थान तालु आहे. ह्याच्या उच्चारांत तालव्य व दन्त्यतालव्य असे दोन प्रकार मराठींत रूढ आहेत. ('च' पहा.) The seventh consonant of the Marathi alphabet.
[सं. **छ** ; प्रा. **छ** ;

(मध्य 'छ') सं. **त्स** ; प्रा. **छ, मद्मत्सर-मद्मछलु** ; **चिकिध्व** (अशोक शिले.); **चिकित्सा-चिकिसा.**

सं. **श. च** ; प्रा. **छ** ; **श्राण-छानणें, चह्-छालु.** याकाममध्यें मध्य **छ** फारसा येत नाहीं. त्याऐवजीं '**स**' येतो.]

छ पुं. नापंसती, तिरस्कार, नकार वगैरे विरोधी भावना दाखविणारा उद्गार. An interjection showing negation, contempt etc.

[ध्वनिशब्द. फार्शी. व जुने ऐतिहासिक कागदपत्रांत चंद्र दाखविण्यासाठीं **छ** असा आकारदर्शक मोडी '**द**' किंवा '**छ**' सारखें चिन्ह काढतात.]

छकड, छक्कड स्त्री. लावणी, एक ग्रामगीत. A folk-song. लुच्चेगिरी, फसवणूक, थप्पड, झगडा. A piece of knavery.
[सं. **चक्,स्थग्** ४ गोपने, प्रतिघाते, **शक्** १ शंकायाम्.]

छकित न. ठकविणें, फसवणूक A stroke of deceit.
[सं. **छप्** १० हिंसायाम्; शिकाम. **छकित** (रामदास.)

छकडा पुं. एक्का, एका बैलाचें वाहन. A sort of carriage drawn by one bullock.
[सं. **शकट** ; प्रा. **छकड, छकअ.**]

छकडी स्त्री. छकडा (लहान). Small. सहाचें माप. A lot comprising six.
[सं. **शकृत्** व **षट्क.**]

छक्का पुं. सहिली, पत्यांतील सहा ठिबक्याचें पान. The six of a suit of cards.
[सं. **षट्क** ; प्रा. **छक्क** ; अकामसा. **छक्केपंजे** = लबाडी, डावपेंच. छक्का व पंजा ह्या पानांची अदलाबदल हातचलाखीनें करून जुगारांतील डाव जिंकणें.]

छचोर वि. बाहेरख्याली, उनाड, चैनी, अस्थिर. Frivolous, volatile, airy.
[सं. **छित्वर–छित्तर–छिच्चर–छिचोर**; **छित्वरो धूर्तः** (उणादि २८८) किंवा **छप्** १० हिंसायाम्.]

छट वि.(पुं.) लुच्चा (मनुष्य). Rougish, niggard.
[सं. **शठ.**]

छटा स्त्री. किंचित् परिणमन, रंग, चव ह्यांची किंचित् झांक. An air, a cast, a colour, a peculiar manner, a tinge.
[सं. **क्षिप्त** ; प्रा. **छित्त** ; देप्रा. **छंट.**]

छटाक पुं. एक वजन, शेराचा सोळावा हिस्सा. The sixteenth part of a seer.
[सं. **षट्+टंक** ; > **छटंक** ; > **छटाँक** ; हिं. बं. **छटाक** ; ओ. **छटांकी** ; पं. **छटांक** ; ने. **छटाँक.**]

छड(णें) सक्रि. त्रास देणें, छळणें, छेडणें. To tease, to torment.
[सं. १ **शट्** १ अवसादने, २ **शठ्** = ठकविणें, ३ **छृद्** १० सन्दीपने.]

छडा पुं. तपास, बारीक चौकशी. A close and rigid search.
[मरा. **छड** ; सं. √**शट्** १ अवसादने (?).]

छडी स्त्री. वेताची काठी, बारीक काठी. A cane.
[सं. **छट्ट** (<**छद्म**), **छटा**; प्रा. **छडा, छडिआ** ; हिं. **छर** ; ने. **छड्** ; पेकामसा. **छडीबारदार** = चोपदार, छडी धरणारा, वेत्ररक्षक.]

छड्डु पुं. दंड, दंड ठोकतांना तोंडांतून निघणारा आवाज, आव्हान–ध्वनि. The sound created by patting the shoulders by way of challenge.
[ध्वनिशब्द. **छड्डु मारणें–ठोकणें** = दंड ठोकणें, कुस्तीसाठीं तयार होणें.]

छणछण पुं. छसछण असा आवाज. A particular sound (as of rupees).
[ध्वनिशब्द. सं. **चण्** १ शब्दे:]

छत् अ. नकार किंवा नापसंतीदर्शक उद्गार. An interjection of contempt, disavowal.
[ध्वनिशब्द. किंवा सं. **छद्** १० अपवारणे.]

छत न. झांकण, आतपत्र, आवरण. A canopy, a ceiling.
[सं. **छत्र** ; √ **छद्** १ आच्छादने ; प्रा. **छत्त.**]

छत्र न. आवरण, उन्हपाऊस निवारण्याचें साधन. A cover, a canopy.
[सं. **छत्रकम्** ; पा. **छत्तकम्** ; हिं. **छाता** ; सिं. **छटु** ; ओ. **छता.**]

छत्री स्त्री. उन्हपाऊस निवारण्याचें एक साधन. A large and lofty parasole, an umbrella.
[सं. **छत्र** ; प्रा. **छत्त.** मूळ शब्द संस्कृतमधूनच थेट आला आहे. प्राकृतचा संबंध नाहीं. त्याच्या अर्थांत व उपयोगांत बरीच क्रांति झाली आहे. राजाच्या सिंहासनावर किंवा त्याच्या शरीरावर आतपत्र म्हणून धरण्यांत येई. हें एक राजचिन्ह समजण्यांत येई. नंतर उपयोग खालीं येत येत आतां तो सर्वसाधारण झाला आहे. ही प्रथम रेशमाची करीत असत. एकोणिसाव्या शतकांत तिचा उपयोग सर्रास होऊं लागला.]

छत्तीस वि. संख्याविशेष, तीस आणि सहा. Thirty-six.
[सं. **षट्त्रिंशत्** ; प्रा. **छत्तींसती,–छत्तीसम्** ; बं. **सॉत्रीस** ; ओ. **छत्रीस** ; हिं. **छतीस** ; पं. **छत्ती** ; सिं. **छत्रीह** ; गु. **छत्रीस** ; ने. **छत्तिस्.**]

छंद पुं. इच्छा, मर्जी, नाद. A liking or fondness.

[सं. च्छन्द, छन्द् √छद् १० संवरणे ; प्रा. छंद.(पुंन.) ; अकामसा. **छांदिष्ट** (सं. **छन्द** = अभिप्राय ; प्रा. **छंद**) ; **छंदी** (फंदी) = स्वच्छंदी, चैनी, वाईट चालीचा.]

छंद पुं. वृत्त, पद्य. A metre.

[सं. **च्छन्दस्.**]

छदाम पुं. एका पैशाचा चौथा हिस्सा, सहा दाम, (लक्षणेनें) थोडा पैसा. A small coin valuing about the fourth of a pice.

[सं. **षट्+द्राम** (ग्रीक नाणें–Drakme) ; हिं. **छ + दाम.** लक्षणेनें अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. मूळ अर्थ दामांचीं सहा नाणीं. पुढें त्याचा अर्थ सामान्य रीतीनें पैसा असा झाला आहे.]

छद्म न. कपट, लपंडाव, ढोंग, इंगित. Deceit, fraud.

[सं. **छद्मन्,** √छद् १ आच्छादने, गोपने ; अकामसा. **छद्मी** = कपटी, ढोंगी.]

छप(णें) अक्रि. दडणें, लपणें. To lie hidden.

[सं. छप् = स्थलान्तर करणें, **चप्** १ विलोभने ; हिं. **छिपना.**]

छपवि(णें) सक्रि. लपविणें, गुप्त राखणें. To hide or conceal.

[सं. **चृपी** विलोभने ; देप्रा. **छप्प, छिप्प छुप्प ;** हिं. **छिपना ;** पं. **छिप्णा ;** हिं. **छुपना ;** गु. **छपवूं ;** अकामसा. **छपवणी, छपवणूक, छपवाछपवी.**]

छप्पन वि. संख्याविशेष, पन्नास आणि सहा. Fifty-six.

[सं. **षट्पंचाषत् ;** प्रा. **छप्पण्णम् ; छन्नण्णम् ;** बं. **छापान्न ;** ओ. **छपन ;** हिं. **छप्पन ;** पं. **छपञ्ज ;** सिं. **छावञ्जाह ;** गु. **छप्पन् ;** ने. **छप्पन्.**]

छपन्न पुं. (तुझ्यासारखे छपन्न पाहिले त्यावरून) पुष्कळ (हा अर्थ लक्षणेनें सिद्ध झाला.) (Fig.) Several, various (meaning having very little significance).

[सं. **षट्प्रज्ञक ;** देप्रा. **छपण्ण** = चतुर, चलाख.]

छप्पर न. झोंपडी, खोपट, घरावरील कौलारू झांकण. A thatched roof, a hovel.

[सं. **छत्वर,** √छद् १ आवरणे ; प्रा. **छप्पर ;** बं. **छापर ;** ओ. **छपर ;** पं. ल्हां. **छप्पर ;** हिं. **छप्पर ;** सिं. **छपरु ;** गु. **छापरूं ;** ने. **छाप्रो ; फा. सिपहर** (=आकाश) ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे.]

छप्पा पुं. छाप, शिक्का, हल्ला. A stamp or impression. A sudden attack.

[सं. **शृप्** १ विलोभने, **चप्** १ परिकल्कने ; बं. **छाप् ;** ओ. **छाप ;** हिं. पं. **छाप् ;** अकामसा. **छप्पापाणी छुपापाणी** = छाप मारून खेळावयाचा मुलींचा एक खेळ.]

छबिना पुं. पहारा (देवाच्या पालखीवरील), समूह, मिरवणूक, (सैनिकांचा) रातपहारा. A guard of horsemen or soldiers preceding a king or an idol.

[फा. **शबीना ;** पेकाम. **छबिना** (खरे ४-१५१०) ; अकाम. **देवाचा छबिना.**]

छबिला वि. सुंदर, गोजिरवाणा. Handsome or graceful.

[सं. **छवि ;** प्रा. **छवि ;** देप्रा. **छाइल्लो प्रदीपः सुरूपश्चेति** (१२४–१८) ; गु. **छबिलो ;** पं. हिं. **छबीला ;** मराठींत **छबिला, छानछबिला** असे प्रयोग रूढ आहेत. **छान** आणि **छबिला** हे दोन्ही एकाच अर्थाचे देशी शब्द आहेत.]

छबी स्त्री. आकृति, कान्ति, तेज. Air, lustre.

[सं. **छबि ;** प्रा. **छबि.**]

छरा, छर्रा पुं. बंदुकीची बारीक गोळी. A small shot.

[सं. **क्षर्** (?) ; हिंदीमधून आला असावा.]

छळ(णें) क्रि. फसविणें, त्रास देणें. To deceive, to tease, to annoy.

[सं. **छलयति ;** प्रा. **छलेइ ;** बं. **छला ;** हिं. पं. **छलना, छलणु ;** गु. **छळवूं ;** ने. **छल्नु ;** (टर्नर), परंतु हा अर्थभेद आहे.]

छाटणें सक्रि. कापणें, काटणें, खुडणें, (गप्पा) मारणें. To clip, to cut, to part off, to chop.

[१ सं. **छर्द् ;** प्रा. **छद्द ;** २ सं. **शत्** (छेदने) > **शातः** > **छाट ;** ३ सं. **श्वठ्** १० सम्यगवभाषणे (= गप्पा छाटणें) ; देप्रा. **छाण्ट ;** बं. **छाटा ;** ओ. **छाटिबा ;** हिं. **छाटना ;** पं. **छाटणा ;** गु. **छाटवूं ;** म. **छाट, छाटणी, छाटा (थेंब).**]

छाटी स्त्री. संन्याशीवैरागी यांचें नेसावयाचें वस्त्र. The red-coloured apron of a recluse.

[सं. **शाटी,** √ शट् १ अवसादने.]

छाती स्त्री. उरोभाग. The breast or chest.
[सं. **वक्षस् स्थल** (?) ; बं. ओ. **छाति** ; हिं. पं. सिं. गु. **छाती** ; अकामसा. **छातीठोक** = स्पष्ट, निर्भय.]

छाम(णें) सक्रि. चाळणें, शुद्ध करणें, चौकशी करणें. To sift, to purify, to look into minutely (fig.).
[सं. **शान्** १ निशाने, √श्यै-शा-१ गतौ ; हिं. **छान** = चाळणी ; अकामसा. **छानणी** = तपासणी.]

छान वि. न. उत्तम, चांगलें, ऐट, डामडौल. Fine, nice, fineness.
[**अर. शान** ; अकामसा. **छानछुक** = दिमाख, चट्टीपट्टी, ऐटबाज ; **छानछबिला** = सुंदर, गोजिरवाणा.]

छांदस पुं. पुरोहित. A priest.
[सं. **च्छन्दस्.**]

छांदिष्ट वि. नादी. Wilful, wayward.
[सं. **च्छन्द** , **छंद** पहा.]

छाप पुं. ठस्सा, खूण, चिह्न. A stamp, a print, a sign.
[सं. **चप्** १ परिकल्कने ; बं. **छाप्** ; ओ. **छाप** ; हि. पं. **छाप्.**]

छाप(णें) सक्रि. ठसे मारणें. To stamp, to print.
[सं. **१ स्थापय, २ छो** ४ छेदने, > छापय, **चप्** १० परिकल्कने > **चापय** > **छापय**.]

छापा पुं. अचानक हल्ला. A sudden attack.
[फा. **चापीदन्** ; तुर्की–**चापौल.**]

¹छापी स्त्री. कौशल्य, हातोटी. Skill.
[सं. **चप्** १० परिकल्कने.]

²छापी स्त्री. चिलमीच्या खालच्या टोकाला गुंडाळवयाची चिंधी. A piece of cloth applied to a pipe while smoking.

छाया स्त्री. सावली, प्रतिबिंब, आच्छादन. Shade, shadow.
[*IE.* Qe, Qel, Qed (= आछादने); सं. **छा, छत्र, च्छद्** १० आछादने, संवरणे; *Lat.* Cad, castrum.]

छावड न.पुं. मुलाला लडिवाळपणें वापरलेला शब्द. A cajoling term applied to a child.
[सं. **शाव**; पा. **छाप** ; प्रा. **छाव** ; गु. **छोरुं** (अर्भक); पं. हिं. **छौना** (जनावराचें पिलूं) ; बं. **छा, छां, छावल, छाला** ; रुमा. **चावो** (अर्भक). **छोकरा** हा शब्दहि ह्या संबंधांत पाहण्यासारखा आहे.]

छावणी, छावनी स्त्री. आश्रय, सैन्याचा तळ, डेरा, खिडकीवरील फळी, सैन्याची वस्ती. A temporary camp of troops.
[सं. **छादनी**; पा. **छादना, छादनी, छायणी, छापणी** ; प्रा. **छायणिआ, छापणी** ; देप्रा. **छायणिया, छायणी,** हिं. **छउनी** ; ओ. **छाअणी** ; पं. **छाउणी** ; गु. **छावणी** ; सिं. **छांविणी** ; ने. **छाउनी, छाइणु** (कौलार, छपर); गु. हिं. **छा** ; पं. **छाउ** = झांकणें.]

छावा पुं. (सिंहाचें) पिलूं, तरुण उत्साही मुलगा (लक्षणा). A young one (of an elephant or lion), (fig.) a young lively boy.
[सं. **शावक** ; पा. **छापो** ; प्रा. **छाव** ; ओ. **छुआ** ; बं. **छा, छाँ** ; हिं **छावा**. पाली शब्दावरून संस्कृत मूळ निराळें असावें असें वाटतें.]

छास न. ताक. Butter-milk.
[देप्रा. **छासी** (स्त्रीं) ; अकाम. प्रांतिक अहिराणी. **छास**.]

छिछि अ. खेद–तिरस्कारदर्शक अव्यय. An interjection showing dejection sorrow, contempt etc.
[सं. **धिक् धिक्** (?) ; देप्रा. **छिछि.**]

छिण(णें) सक्रि. तोडणें, कापणें, मोडणें, तुकडे करणें. To break, to chisel.
[सं. **छिद्** ; (निष्ठा रूप) **छिन्न** ; प्रा. **छिण्ण** ; बं. **छिना** ; हिं. **छिनना** ; सिं. **छिनो, छिनणु** ; गु. **छिनवूँ.**]

छिद्र न. भोंक, बीळ, उणीव, न्यूनता, कपट. A hole, bore.
[सं. **छिद्रम्.** √**छिद्.**]

¹छिन(णें) अक्रि. कापणें, तासणें. To cut, to chisel.
[सं. **छिद्** ७ द्वैधीकरणे; (**निष्ठा**) **छिन्न** (नाधा.), **क्षिण्** < हिंसायाम्.]

²छिन(णें) अक्रि. एकेक कण वेंचणें. To glean.
[सं. **शिल्** ६ उंच्छे, **चि** ५ संचये.]

छिनाव(णें) सक्रि. फसवून घेणें, हिसकावून घेणें. To deceive, to rob.
[सं. **छिन्न,** √ **छिद्** (**निष्ठा**) (नाधा.); हिं. **छिनाना.**]

छिनाळ वि. वाईट वर्तनी (स्त्री अथवा पुरुष). That commits whore-dom (man or woman).

[सं. छिन्ना + नारी; प्रा. छिण्णा, छिण्णाल; छिण्णालिआ; देप्रा. छिण्णो छिण्णालो=जार ; बं. छिनाल ; ओ. छिण्डाल; हिं. पं. छिनाल, छिनार ; गु. छिनाळ.]

छिन्न वि. तोडलेलें, तासलेलें. Cut, split, severed.

[सं. छिन्न (निष्ठा), √छिद् ७ द्वैधी करणे.]

छुः अ. (कुत्र्याला दुसऱ्याच्या अंगावर घालण्याचा) ध्वनि. The sound used in setting on a dog.

[(ध्वनिशब्द), सं. च्यु १ गतौ ; अकामसा. छु करणें–भांडण लावणें, कलागती लावणें.]

छुण्छुण्, छिम्छिम् पुं. घागऱ्यांचा आवाज. The jingling sound.

[ध्वनिशब्द. झुणझुण, √ स्वन् १ शब्दे.]

छेक(णें) सक्रि. कमी करणें. To lessen, to reduce.

[सं. छेक, √छो ४ छेदने, शिष् १ हिंसायाम्.]

छेका पुं. काट, रेघ. A dash showing cancelling.

छेकापन्हुति स्त्री. एक शब्दार्थालंकार, श्लेष. A figure of speech, artful turning of sense.

छेकोक्ति स्त्री. वक्रोक्ति. A mode of speech (as equivocation.).

छेकानुप्रास पुं. दोन किंवा अधिक वर्णांची आवृत्ति. Alliteration of two or more sounds.

छेड(णें) सक्रि. त्रास देणें, अनादर करणें, प्रश्न विचारणें. To tease, to torment, to disrespect, to question (tiringly).

[सं. शिट् १ अनादरे.]

छेद(णें) सक्रि. कापणें, तोडणें, चिरणें, भोक पाडणें, वेध पाडणें. To cut.

[*IE*. Qhelt ; झे. च्छिन्ध्य ; सं. छेद, √ छिद् ७ द्वैधीकरणे; अकामसा. छेद = भोंक, चीर, फट, वेध; छेदक = भाजक (गणित).]

छेंद(णें) सक्रि. शेंदणें, पाणी काढणें, अडकणें, आपटणें. To draw out (water), to intersect, to destroy, to dash down.

[सं. स्यद्.]

छेलछबीला वि. सुंदर गोजिरवाणा (छबीला पहा.). Handsome.

छेल(णें) सक्रि. कापणें. To cut.

[सं. क्षिवल् ६ कर्तने.]

छोकरा पुं. मुलगा. A boy.

[सं. शावक + रा; प्रा. छावक + रा ; देप्रा. छाकर ; का. चूकुर ; बं. छोकरा ; ओ. छोकरा ; प. छोक्रा ; सिं. छोकरु ; गु. छोकरो ; मराठी शब्द सोकरा असा टर्नर देतो.]

छोटा वि. लहान, आंखूड. Small, short.

[सं. क्षुद्र + ट ; देप्रा. छोट्ट, छुट्ट = लघु, छोर ; का. छोट् ; कु. छोटो ; बं. छोट ; ओ. छाट ; हिं. छोटा ; पं. छोट्टा ; गु. छोटूँ ; ने. छोटो.]

ज पुं. मराठी वर्णमालेंतील आठवें व्यंजन. ह्याचें उच्चारण तालव्य अल्पप्राण मृदु असून उच्चारस्थान तालु आहे. ह्याच्या उच्चारांत तालव्य व दन्त्यतालव्य असे दोन प्रकार मराठींत रूढ झाले आहेत ('च' पहा). The eighth consonant in Marathi alphabet.

[सं. ज ; प्रा. ज. ज्वाला–जाळ, ऋजु–रुजु, उजु. सं. ज्य, ज्व, द्य ; प्रा. ज्ज. द्योत–जोत; कज्जल–काजळ, उज्ज्वल.

सं. य ; प्रा. ज. पेय–पेज, उपयम–उजव, शय्या–शेज.

(मध्य ज) सं. ज्य, ब्ज, द्य, ज्व, र्ज, र्य, य्य य ; प्रा. ज्ज.

सं. ज्ञ; प्रा. ण्ण. प्रतिज्ञा–पैज, ज्ञा–जाण ; सं. ध, ध्य. प्रा. ज्ज. गंध्–गांज, चुध्य–झुज.]

जईं, जहीं अ. जेव्हां. When.

[सं. यदा, यदि ; प्रा. अप. जहीं, जधी ; म. जधीं. जहीं ; (प्रतियोगी शब्द कईं, कहीं–काव्यांत व जुन्या मराठींत रूढ.)]

जई स्त्री. भिंत, भिंतीचा छपराजवळील भाग, तेथील विटादगडांचा थर. The small layer of bricks or the space between the top of a wall and the roof.

[सं. जाति, √ जन् (?).]

जक स्त्री. पराभव, थप्पड, तंबी. Defeat, a blow, a threat.

[अर. **दक्क**=पीठ करणें; पेकाम. **जक** (देणें–राज. १०-१६७.)]

जकड स्त्री. ताण, ओढ, आखडणें. Strain, stretch, drawing in.

[म. **जोकड < योकट, √ युज्** ७ योजने.]

जकात स्त्री. कर (व्यापारी मालावरील). Customs or octroi duties.

[अर. **झकात्**=धर्मासाठीं प्राप्तीवरील कर. पेकाम. **जकायत** (राज. ३-२९); **जकातदार** = जकातीचा कर वसूल करणारा अधिकारी; **जकात नाकें** = जकात बसूल करण्याचें ठिकाण.]

जकीरा पुं. रास, गळाठा, कोठार, साठा, सञ्चय. Any mingled mass or surplus things heaped.

[अर. **झखीरा, झकीरा**; पेकाम. **जकीरा, जकीर,** (खरे. ९.५५२५).]

जखड(णें) सक्रि. आवळून बांधणें, आवळणें, एकत्र बांधणें. To tighten or draw tight.

[सं. **योक्तृ**; देप्रा. **यक्क**; हिं. **जकडना**; पं. **जकडणा**; गु. **जखडवूं**. हा धातु राजवाडे **ग्रथ्, घट्, खद्** इत्यादि धातूंच्या अभ्यासापासून काढतात. परंतु ते इतिहासास धरून नाहीं. देशी शब्द ‘ **यक्क** ’ असा आहे. त्याच्याशीं संबद्ध धातु **√युज्** ७ संयोजने हा दिसतो.]

जख्ख वि. म्हातारा, विद्रूप, खप्पड. Old, ugly.

[द्रा. कान. **जक्किसु** = शरीर वर खालीं वाकणें; सं. **यक्ष**; प्रा. **जक्ख** ह्या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं असें दिसतें. त्याच्याशीं संबंध जोडण्याचा मोह होतो. परंतु मूळ अर्थ आणि सध्यांचा रूढ अर्थ ह्यांतील वैपरित्याचा नीट उलगडा होत नाहीं. मूळ अर्थ सुंदर देवयोनि असा असून सध्यां मराठींत म्हातारा, विद्रूप, जर्जर, खप्पड असा झाला आहे; अर्थवैपरित्याचा परिहार द्राविडी मूळ मान्य करून करतां येतो.]

जख्खीण स्त्री. यक्षस्त्री, पिशाचिका. A female goblin.

[कान. **जक्किसु**; सं. **यक्षिणी**; पा. **यक्खीणी**; प्रा. **जक्खिणी**; हिं. **जखनी, जख्ख** पहा.]

जग न. लोक, पृथ्वी, अखिल सृष्टि. The universe, the world.

[सं. **जगत्, √गम्** (अभ्यास)**जगम्** चें कृदन्त; प्रा. **जग, जअं**; अप. **जगु**; गु. हिं. **जग**; सिं. **जगु**; पं. **जग्ग**; अकामसा. **जगजाहीर** = सर्वांना माहीत; **जगजेठ, जगज्जनक** = ईश्वर (**जगत्+ज्येष्ठ**); याकाम. **जगजेठी**, उ. गी. १५७; **जगड्व्याळ** = मोठा अवाढव्य (**जगत्+व्याल**); **जगझांप** = जगावर झापड घालणारा, बलिष्ठ पुरुष (नरुस्व. ७००). **जगत्पति** = ईश्वर, जगाचा पति; **जगप्रसिद्ध** = जगामध्यें प्रसिद्ध (जगत्+प्रसिद्ध, √ सिध्.); **जगदीश्वर** = जगाचा ईश्वर **जगद्गुरु** = शंकराचार्य, मठपति; **जगविलक्षण** = मुलुखानिराळा; **जगन्नाथ, जगन्नायक** = जगाचा मालक; **जगमित्र** = जगाचा मित्र; **जगदळ** = जगाचें पीठ करणारा, बलवान् पुरुष (नरुस्व. ८०८.).]

जग(णें) अक्रि. जिवंत राहणें. To live, to exist, to continue in being.

[देप्रा. **जग** = जन्तु, जीव; मराठी धातु संस्कृत **गम्**–अभ्यास–**जगम्** पासून आहे कां वरील देशी शब्दापासून आहे? देशी शब्दाच्या मुळाशींहि कांहीं संस्कृत–वैदिक धातु सांपडतो. अकामसा. **जगविणें** = वाचविणें.]

जघन न. ढुंगण, कमर, जांघ. The hip and loins.

[सं. **जघन** (हन्–हन्तेः शरीरावयवे । उणादि ५–३२. हन्‌चा अभ्यास होऊन शब्द बनला.)]

जघन्य वि. हलकें, शेवटचें. Last, final.

[सं. **कुटिलं हन्यते निन्द्यते—जघन्य.**]

[1]**जंग** पुं. मळ, कीट (भांड्यावरील). Rust of iron.

[फा. **झङ्ग** = मळ; हा शब्द व्युत्क्रम होऊन ‘ **गंज** ’ असाहि होतो. अकामसा. **जंग(णें)** = जंग येणें–चढणें.]

[2]**जंग** पुं. लढाई, युद्ध, हातघाई. War or warfare.

[फा. **जंग (स्त्री)**; पेकाम. **जङ्ग, जङ्गी** (रा. १५-११३); **जंगजंग** = फार श्रम (घेऊन); **जंगजोड** = लढण्यासाठीं साथीदार, भरपूर सुबत्ता; **जंगी** = फार मोठा, भयंकर; पेकाम. **जंगी** (खरे ७-३६१४), (**सफे**) **जंगी** = निकराची लढाई, (हा जुन्या कागदपत्रात येतो. पे. द. १-३); **जंगी सामान** = युद्धाचें साहित्य.]

जंगम वि. चलन वलन करणारें, हलवितां येण्यासारखें सामान. Moving, moveable.

[सं. **गम्**, (अभ्यास) **जगम्**; परंतु ‘ **ज** ’ वर अनुस्वार कसा आला?]

जंगम पुं. लिंगायत धर्माचा उपाध्या, शिवाचा पुजारी. An individual of a particular sect, a worshipper of Shiva.
[**जंगम** (?) = श्रेष्ठ.]

जंगल न. अरण्य, रान, दाट झाडी. A forest or wood.
[सं. **जंगल** ; पा.प्रा. **जङ्गल** ; का. **झोगुल** ; फा. **जङ्गल** = रान. मराठीमध्यें फारशीमधून आला ; **जंगली** = रानवट, जंगलांत राहणारा, अनार्य.]

जंघा स्त्री. मांडी. The thigh.
[सं. **जंघा**, √ **हन्** (**जङ्घन्यते कुटिलं गच्छति**), **जंघाल** = चपळ.]

जंघी वि. चपळ, सामर्थ्यवान्. Fleet (as a horse), powerful.
[फा. **जंग** = युद्ध ; **जंगी** > **जंघी** किंवा ज्याच्या मांड्या सशक्त आहेत म्हणून ज्याला पळण्याचें सामर्थ्य आहे असा. जंघा पहा.]

जच(णें) सक्रि. मेहनत घेणें, श्रम घेणें. To exert.
[सं. **यच्छ्** (< **यम्**) १ उपरमे.]
कीं नैरा वापाचेया पुत्र **जचे** ॥ ज्ञा. १३-५४२.

जझिया पुं. एक कर, मुसलमानेतरावरील कर, डोईपट्टी. (मुसलमानी राशियातींत बसविलेला). A tax levied on each non-Muslim individual by the muslim rulers.
[अर. **जिझ्या, जिझया** ; पेकाम. **जजिया** (वाड सनदा १५०); अकाम. **झेझिया**; **झेजिया** पहा.]

जंजाल न. गोंधळ, गुंतागुंत, त्रास, कष्ट, दगदग, लोढणें. The entanglements, the troubles.
[सं. **जंज, जज्** १ युद्धे ; हिं. **जञ्जाल** ; ओ. **जंजाळ** ; बं. **जंजाल** ; सिं. **जञ्जालु** ; **जंझाळ**.]

जंजिरा पुं. स्थानविशेष, मुंबईजवळील कोकणचें एक ठिकाण. The name of a town and fort there in Konkan.
[अर. **झजिरा** = बेट ; पेकाम. **जजिरा** (रा. १०·२८०), अनुनासिक केव्हांपासून सुरू झालें ? पेशवेकालांत शब्द निरनुनासिक आढळतो.]

जट स्त्री. (यतीच्या) केंसाची बट. The matted hair.
[सं. **जटा**, √ **जट्** ; प्रा. **जाट, झाट** ; शिकाम. **झट, जंट** (कोंकणी ख्रिस्ती. Paxao.); गु. हिं. **जटा** ; पं. **जट** = केसाची बट, वडाची पारंबी ; गु. पं. हिं. बं. **जर** ; सिं. **जोन्ह** = मुळी; रुमा. **जर** = केस. मराठी **झाट** हा शब्द ह्याशीं संबद्ध आहे. प्राकृत शब्दाचा अर्थ **लव** असा आहे.]

जट(णें) अक्रि. गुंतणें, एकत्र होणें. To combine, to league.
[सं. **जट्** १ संघाते ; **जैटा** = बैरागी, गोसावी यांच्या डोक्यावरील वळलेले केस, गुंतागुंत झालेले केस ; **जैटा** = वेदाचे मंत्र पाठ म्हणण्याचां एक विशेष प्रकार ; **जटिल** = जटा धारण करणारा [प्रा. **जटिल्ल, जटा + इल्ल**).]

जठर न. पोट, क्षुधा (लक्षणा). The stomach, hunger (fig.)
[सं. **जठर** (**जायते गर्भम् मलम् वा यस्मिन्**).]

जड वि. वजनदार, निर्जीव, मंद, मूर्ख, आळशी, भारी किंमतीचा (ल.). Heavy, (fig.) dull, stupid, costly, profound.
[सं. **जड** ; प्रा. **जड** ; बं. ओ. **जर** ; हिं. **जर** ; सिं. **जडु**, **जरु** ; गु. **जड्** ; अकामसा. **जडान्न, जडांश** = पक्वान्न, पचावयाला कठीण असें अन्न.]

जड(णें) क्रि. खचणें (रत्नें वगैरे). To set, to inlay.
[सं. **जड्** १ संघाते, **युट्** १ संयोगे ; महा. प्रा. **जड** ; प्रा. **जडिअ, जुड्ड** ; देप्रा. **जडिअ खचितं** (११६-११२); बं. **जड** ; ओ. **जडिबा** (**जोडणें**); पं. **जडउणा** ; **जडणु, जडवूँ** ; ब्लोक द्राविडी रूपाशीं जोडतो, परंतु वरील व्युत्पादन पटतें. कान. **जडि** = चिरडणें ; ता. **शडेइ, चडेइ** = खिळा ठोकणें, **जड्डु** ; ते. **जड्डे** = संयोग.]

जडजोवाहीर न. सोनें व रत्नें. Trinkets, jewels.
[फा. **झर्** = सोनें ; अर. **जवाहिर्** (अव.) = रत्न; पेकाम. **जर–जवाहेर** (रा. ७, खलप १–३); अकाम. **जडजवाहीर**.]

जडित वि. खचित. Set, inlaid.
[जडणें पहा ; देप्रा. **जडिअं** (खचितम् ११६–११२) **जडण, जडणी, जडप, जडाई, जडाजड** = सांधकाम, जोडकाम; **जडाव** = जडणी, खचण्याचें काम.]

जडी स्त्री. मूळ (झाडाचें), औषधि. A root, a medicinal root.

[सं. **जट** ; प्रा. **जड** ; सिं. **जोन्ह**=मुळी ; हिं. **जड** ; पं. **जड**=वडाची पारंबी ; अकाम. **जडीबुट्टी**=औषधिमूळ. जादुटोणा, मंत्रतंत्र. (दोन्ही समानार्थक शब्द परंतु भिन्न भाषांतील.)]

जण पुं. मनुष्य, पुरुष, व्यक्ति. A person, a body, an individual.

[सं. **जनः** ; पा. **जनो** ; प्रा. **जण** ; बं. **जन** ; ओ. **जण** ; हिं. **जना** ; पं. **जणा** ; सिं. **जणो**, **जणु** ; गु. **जण्** ; सिंह. **दन**. मराठींत समासामध्यें जोडला जातो.]

जणूं(जणों) अ. उत्प्रेक्षासूचक अव्यय. As if, as it were.

[सं. **जाने** (प्रथम पुरुष एक व. वर्तमानकाळ रूप); प्रा. **जाणे**. प्राकृतच्या काळांतच ह्या क्रियापदाच्या रूपाला अव्ययत्व प्राप्त झालें होतें व तेंच मराठींत अपभ्रंशद्वारां उतरलें. ‘ जाणणें ’ पासून ‘ जणूं ’ हें झालें नसून ‘ जाणे ’ ह्या प्राकृत अव्ययापासून झालें.]

जत(णें) सक्रि. राखणें, रक्षण करणें. To protect, to preserve.

[सं. **यत्** १ प्रयत्ने ; प्रा. **जत** ; याकाम. **जतन** (ऋपू. ५७३); मला वाटतें हा धातु **यत्** , किंवा **यत्न** ह्या संस्कृत शब्दापासून सिद्ध झाला नसावा. कारण इतका अर्थभेद झाला आहे कीं तें मूळ पटत नाहीं. हा धातु **जप्** किंवा **ज्ञप्** ह्या धातूच्या निष्ठेपासून सिद्ध झाला आहे. सं. **जप्त**, **ज्ञप्त** ; प्रा. **जत्त** ; म. **जतणें**; अकाम. **जतन**=संरक्षण, वाढ, राखण काळजी.]

जतावि(णें) सक्रि. सूचविणें, सूचना देणें, हरकत घेणें, निरोधणें. To warn, to caution.

[सं. **यत्** १० निकारोपस्कारयोः ; हिं. **जताना** ; कदाचित् ‘ चेतविणें ’शीं संबद्ध असावा ; अकामसा. **जतावणी**=सूचना, इषारा, ताकीद, चेतवणी.]

जती पुं. साधु, संन्यासी (विशेषतः जैनधर्मी). A religious mendicant (Jain).

[सं. **यति**. √**यम्**.]

जत्रा स्त्री. देवाचा नैमित्तिक उत्सव. A periodical festival in hononr of an idol.

[सं. **यात्रा** (√ **या**); प्रा. **जत्ता**. मराठी शब्दांत सं. ‘ **यात्रा** ’ आणि प्रा. ‘ **जत्ता** ’ ह्या दोन शब्दांचा संभ्रम झाला असावा किंवा दोन्हींचा परिणाम झाला आहे. एकांतील आद्य आणि दुसऱ्यांतील अन्त्य असे वर्ण घेऊन मराठी शब्द बनला असावा.]

जथ(णें) अक्रि. जुंपणें, भांडणें, लढणें. To put together, to collect together and fight.

[सं. **यूथ**, √**यू** ; उदा० होतां तयांस कथलें जथले अहो ते.]

जथ, जथा स्त्री. समूह, टोळी. A band or company.

[सं. **यूथिका**, √**यू** ; प्रा. **जूथिआ** ; हिं. **जथा**.]

जदीद वि. नवीन, अलीकडचा. Lately entertained, new or recent.

[अर. **जदीद**=जुना, पलीकडचा ; पेकाम. **जदीद** (खरे ७-३५७०).]

जधी अ. जेव्हां. When, on the day that.

[सं. **यदा**, **यदि**; प्रा. अप. **जधी**, **जहीं** ; याकाम. शिकाम. पेकाम. (काव्य) **जधीं–जहीं-जईं–जैं**.]

जन पुं. मनुष्य, व्यक्ति. A man or mankind.

[सं. **जनः** √ **जन्** ४ संभवे ; **जण** पहा. अकामसा. **जनचर्चा**=बोलवा, लोकांमधील चर्चा ; **जनता**=लोक, सामान्य जनसमूह ; **जनप्रवाद**=लोकांची चर्चा, कंडी, गप्पा ; **जनरूढी–रीति**=लोकांची चाल.]

जनाना पुं. स्त्रिया, अन्तःपूर, स्त्रीपरिवार. A seraglio, harem.

[फा. **झनान्**=स्त्रिया ; अकामसा. **जनानखाना**=स्त्रियांची जागा, समुदाय ; **जनानी**=बायकांसाठीं (< फा. **झनानी** बायकी, गैरमर्दानी).]

जनाब पुं. महाराज, उम्बरा, राजवाड्याचें अंगण. Sir (vocative). A palace, a yard.

[अर. **जनाब्** ; पेकाम. **जनाब** (रा. ३·७३.). ह्याच्या अर्थांत फरक झाला आहे. मूळ अर्थ “ प्रासादाङ्गण, उम्बरा ” असा असून नंतर बहुमानदर्शक असा अर्थ प्राप्त झाला. ‘ स्वारी ’ ह्याच्या अर्थांत जसा बदल झाला आहे तसाच ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे.]

जनावर न. पशु, चार पायाचें जनावर. A beast or an animal.

[फा. **जानूवर**=प्राणी ; ह्या शब्दाच्या अर्थांत विशेषीकरण फार झालें आहे. मूळ अर्थ सामान्य प्राणी–जीव असा, तो मराठींत मर्यादित होऊन **चार** पायाचा पशु असा अर्थ झाला. ‘ साप ’ असाहि दुसरा एक मर्यादित अर्थ ह्या शब्दाचा आहे.]

जंत पुं. कृमि (पोटांतील). An intestinal round worm.
[सं. जंतु, √जन्.]

¹जंतर न. तार काढण्याचें सोनाराचें यंत्र. An instrument for drawing wire.
[सं. **यंत्रम्**, √**यम्**]

²जंतर, जंत्र न. वाद्य, वादन, यंत्र. An instrument.
[सं. **यंत्रम्**, √**यम्**, प्रा. **जत्त**; याकाम. **जंतर** (जंत्र–नरुस्व. ५३०); **जंत्र = छांछूचा** मंत्र असाहि एक अर्थ याकाम. मध्यें रूढ होता. हा शब्द शाक्त पंथतील '**यंत्र**' ह्या शब्दापासून आला. जंतर मंतर असा एक प्रयोग अकाम मध्यें रूढ आहे.]

जंतु पुं. सजीव प्राणी. An animated creature.
[सं. **जंतुः**, √ **जन्** ४ संभवे.]

जंत्र न. यंत्र, जारणमारणाचा मंत्र, अभिचारणाची आकृति, जादुटोणा. Charm, spell, hocus-pocus.
[सं. **यंत्र**; याकाम **जंत्र** (= वाद्य, वादन, जादुटोणा नरुस्व. ५२९, ५३०). जंतर पहा.]
तव जंत्रें वाजिनलीं अनुहातें: वेळुवां-वरी ॥ नरुस्व. ५२८.

जंत्री स्त्री. यादी, सूचि, एकत्रित याद. An index, a table (of contents).
[सं. **यंत्र** (?).]

जन्म पुं. न. संभव, उत्पत्ति. Birth, production.
[सं. **जन्मन्**, √**जन्**; प्रा. **जन्म, जम्म**, मराठींत लिङ्गभेद झाला; अकामसा. **जन्म(णें)** = उत्पन्न होणें; **जन्मकुटाळ** = जन्मापासून वाईट; **जन्मगांठ** = कायमचा संबंध; **जन्मगुण** = जन्मापासूनचा उपजत गुण; **जन्मजन्मांतरीं** = कोणत्याहि जन्मांत; **जन्मदिन** = जन्माचा दिवस; **जन्मतिथि** = जन्माचा दिवस, वाढदिवस; **जन्मदरिद्री** = जन्मापासूनचा–कायमचा गरीब; **जन्मसावित्री** = ह्या व प्रत्येक जन्मांत सावित्रीसारखें सौभाग्य असलेली (आशीर्वचन देतांना वापरतात.); **जन्मांतर** = दुसरा जन्म.]

¹जप(णें) सक्रि. वारंवार म्हणणें, मंत्र म्हणणें. To harp on, to repeat.
[सं. **ज्ञप्** १० आराधने, **जल्प्**; प्रा. **जप्प** (?).]

²जप(णें) सक्रि. रक्षणें, काळजी घेणें. To take care.
[सं. **सप्** = To serve (Whitney); अकामसा. **जपणूक**–जपणें.]

जपान पुं. न. देशविशेष. Japan.
[चिनी. **जेह्पुन्** = सूर्याचें उत्पत्तिस्थान (लक्षणेनें पूर्वेकडील प्रदेश).]

जप्त, जप्ती स्त्री. वि. दबाव, जबरदस्तीनें स्वीकार, सरकारांत सामील केलेला, सरकारजमा. Seizure, attachment.
[अर. **ज़बत** = रक्षणें, पाळणें; पेकाम. **जप्त** (रा. ५-५२) ऐनी अकबरी मध्यें जो अर्थ दिला आहे तोच अद्याप वायव्य सरहद्दप्रांतांत रूढ आहे. ऐनीमधील अर्थ **उच्च पिकावरील कर** (ऊस, तंबाखु.); पुढें हा अर्थ बदलून कर देण्यांत चूक झाली तर पडणारा दंड किंवा त्या मालाचा जबरदस्तीनें स्वीकार असा अर्थ आला.]

जबडा पुं. तोंड, जाभाड. The jaws.
[सं. **जभ्, जम्भ्**. शब्द परकी–द्राविडी आहेसा वाटतो; हिं. **जबरा**.]

जबर वि. मोठा, फार, कठीण. Great, weighty, difficult.
[अर. **जब्र**; फा. **ज़बर्**; अकामसा. **जबरा** = (मोठा फार); **जबरदस्त** (ज़बर्दस्त) = दांडगा, अन्यायी, दांडगा; पेकाम. **जबर्दस्ती** (खरे. ११·६०३०); **जबरी** = शक्ति, जुल्म; शिकाम. **जबरी** = (चित्र. ३४); **जबरीसंभोग** = सम्मतिवांचून अनधिकारानें स्त्रीचा संभोग, बलात्कार.]

जबाब पुं. उत्तर, जाब. An answer.
[अर. **जवाब** = उत्तर; हिं. **जवाब**; अकामसा. **जबाबदार** = जिम्मेदार; **जवाबसाल** = प्रश्नोत्तर (**जवाब् + उ + सवाल्**, पेकाम. **जबाबसवाल**–तरा ८१); अकाम. **जाबसाल**.]

जबून वि. वाईट, दरिद्री, गरीब, भ्याड, गैर-मातबर. Bad, poor.
[अर. **जुबून** = भ्याडपणा; फा. **ज़बून्**; पेकाम. **जबून्** (रा. १–११७.)]

जम(णें) क्रि. गाठणें, एकत्रित होणें, सांचणें, मेळ बसणें. To congeal, to coagulate, to collect, to agree.
[सं. **यम्** १ परिवेषणे, **यामियति, याम्यते**; प्रा. **जामेइ**; बं. **जमा**; ओ. **जमिबा**; हिं. **जमना**; सिं. **जमणू**; गु. **जामवूँ**; अकाम. **जम** = जुळवाजुळव, उठाव, मेळ (अर. **जम्अ** = संच); **जमाजम** = एकत्र जुळणें, जमाव.]

जमा स्त्री. एकत्र घेणें, मिळकत, प्राप्ति, संग्रह, जमाव, अंतर्भाव. Collections, receipts.

[अर. **जमअ** = जमीन महसूल, एकत्र बेरीज; अकामसा. **जमाबंदी** = जमीन–महसूल-निश्चिति–कायम ठरविणें; **जमाखर्च** = आयव्यय, हिशेब (अर. **जम्अ–खर्ज**).]

जमात स्त्री. जमाव, जात, सभा, पंचायत, समुदाय. An assembly, company.

[अर. **जमाअत** = संघ; अर, फा. **जमा–दार, जमाअत्–जम्मत्** = संघ, जमादार; पेकामसा. **जमातखाना**= मशिदीचे तिन्ही बाजूस जमातीस बसण्यासाठीं बांधलेला दुमजली अगर एक मजली सोपा (ऐस्फुले. २-३४.).]

जमादिलाखर पुं. मुसलमानी पंचागांतील सहावा महिना. The sixth month in the Muslim calendar.

[अर. **जुमादियुल्–आखिर.**]

जमादिलावल पुं. मुसलमानी पंचांगांतील पांचवा महिना. The fifth month in the Muslim calendar.

[अर. **जुमादीयुल्–अव्वल.**]

जमान पुं. जामीन, जिम्मेदार. Surety, security.

[अर. **झमान्**; पेकाम. **जमान.** (रा. १५–२४), पेकाम. **जमान कतबा** (रा. १५-४९.); अकाम. **जमानकतवा** = जामीननामा, मुचल्का, जामीनपत्र.]

जमाना पुं. काळ, वेळ, पद्धत, रीति (ल.). A period, time, age, usage.

[अर. **झमाना** = हंगाम, ऋतु असा विशेष अर्थ मुळांत आहे. त्याचें सामान्यीकरण होऊन काळ, वेळ असा अर्थ झाला आहे. पेकाम. **जमाना** (खरे १-१८३.).]

जमालगोटा पुं. एक जालीम औषधि, रेचक, जयपाळाचें बी. A purgative nut.

[फा. **जमाल गोटा**; **जमाल** हे व्यक्तिनाम आहे.]

जमाव पुं. संघ, फौज सैन्य. An assembly, a concourse.

[अर, **जमूअ** = संच, समुदाय.]

जमियत, जमेत स्त्री. सैन्य, जमाव. A company or troop.

[अर. **जमूअ** = संच; **जम्इ, जमीइ** = सर्व; **जम्ईयत्** = जमाव; पेकाम. **जमेत, जम्यत्** (राज. ५-६८).]

जमीन स्त्री. शेत, भुई, भूमि, पृथ्वी. Land or ground, the earth.

[फा. **झमीन** = भूमि; पेकाम. **जमीन**; झे. **झेम**; अकाम. **जमीन**; ग्रामीण **जिमीन**; अकामसा. **जमीन–अस्मान** (पृथ्वी आणि आकाश, ह्यांमधील मोठें अंतर); **जमीनजुमला** = वतनवाडी < अर. **झमीन् + जुम्ला** = सर्व; पेकाम. **जमीनजुम्ला**; **जमिनदार** जमीनीचे मालक, वतनदार, फार जमीन असलेला जमिनीचा कर प्रत्यक्ष सरकारास देणारा; **जमिनदोस्त** = सर्वस्वी नाश, चीत, पायमाल, जमिनीबरोबर; **जमीननिवीस, जमेनीस** = जमिनीच्या वसुलाचा अधिकारी <अर. **झमीन् निवीस, √ निविस्तन्** = लिहिणें.]

जंबाळ न. शेवाळ, जळमट, चिखल, रेंदा. Moss-like substance, mud.

[देप्रा. **जंबाल** = कर्दम, शैवाल; हा क्वचित् संस्कृतमध्येंहि आढळतो. ह्या शब्दाच्या ध्वनीवरून दुसरा एक अर्थ–अगडबंब अस्ताव्यस्त, भेसूर, मंद, आळशी असा रूढ होऊं पहात आहे.]

जंबिया पुं. लहान तरवार, जरा पुढें वांकडी असलेली कट्यार. A kind of dagger.

[अर. **जन्बिय** < जन्ब् = बाजू; फा. **जम्बिया.**]

जंबीर न. लिंबू. Common lime.

[सं. **जंबीर.**]

जंबूरा पुं. लहान तोफ, बंदुख (उंटावरील).

[फा. सुतरनाल = (उंटावरील तोफ) लहान तोफ. पेकाम. **जाम्पुर्क.** (काशीराज व. १७).]

१जय पु. विजय, फत्ते, यश. Conquest, victory triumph.

[सं. **जय, √जी** १ जये; अकामसा. **जयजयकार** = जय जय असा शब्द; **जयगोपाल** =(गुजरातींत) नमस्कार, राम राम); **जयपत्र** = अजिंक्य पत्र, **जयस्तंभ** = जयसूचक खांब, चिन्ह.).

२जय पुं. नांव, महाभारताचें मूळ नांव.

जयंती स्त्री. देव किंवा साधुसंत ह्यांच्या जन्मतिथीचा उत्सव. The anniversary festival of the birth-day of an incarnation or a saint.

[सं. **जी**; (+ **अत्**) **जयत्** (स्त्री) **जयन्ती.**]

१जर पुं. ताप, तापांत उठणारी पुरळ. A fever.

[सं. **ज्वरः**; प्रा. **जर** (पुं); ओ. **जर**; हिं. **जर्**; सिं. **जर** = चुलीची आंच.]

जर^{१} पुं. स्त्री. सोन्याचांदीची बारीक तार, कलाबतु. Brocade.
[फा. झर् = सोनें.]

जर, जरी, जरीं अ. संकेतबोधक अव्यय. If.
[वैसं. **यन्हि** (?) ; प्रा. **जन्ही** ; याकाम. **जन्ही**.]

जरठ वि. म्हातारा, जख्ख, वृद्ध, दुर्बल. Old, decrepit.
[सं. **जरा + स्थित** (स्थ), **जरन्त**, √**जॄ**.]

जरडी, जरंडी स्त्री. म्हातारी, थकलेली बाई. An infirm and aged woman.
[सं. **जरा**, √**जॄ**, **जरन्त** ; देप्रा. **जरंडो वृद्धः**, **जरडो** इत्यन्ये (१२६·७)]

जरद् वि. फार पिवळा. Yellow.
[फा. **झर्द्** ; **जरद्** = पिवळा ; पिवळा जरद व हे दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द.]

जरदा, जर्दा पुं. खाण्याचा तंबाखु. Tobacco cut, washed and prepared for chewing.
[फा. **झरद्**.]

जरदाळू पुं. एक फळझाड. A kind of fruit-tree.
[फा. **जरद्** = पिवळा, **आलु** = कंद फळ.]

जरब स्त्री. भीति, धाक, वजन, दरारा, तडाका, प्रहार. Intimidating, overawing.
[अर. **झर्ब्** ; पेकाम. **जरब** (रा. ६–१२५), **जर्ब** (रा. १-१६१).]

जरबंद पुं. (घोड्याचा) चामडी पट्टा. A martingale.
[फा. **झेर्बंद**.]

जरा^{१} स्त्री. म्हातारपण, वार्धक्य. Old age.
[सं. **जरा**, √**जॄ** ९ वयोहानौ .]

जरा^{२} अ. किंचित्, थोडें, तिळमात्र. Somewhat, rather.
[अर. **झर्रा** = अणुमात्र, **जराबजरा** = सर्व वस्तु, लहानसान सर्व वस्तु (अर. **झर्रा + ब + झर्रा** = कण न् कण.); पेकाम. **जरबजरा** (रा. १५-१६४), **जराबजरा** (खरे ११-५७०).]

जरिदा, जरारा वि. एकटा, सडा. Alone.
[अर. **जरीदा**, **जरादा** = सडा ; पेकाम. **जरिदा** (रा. १-२७).]

जरी अ. यद्यपि. Even if.
[सं. **यन्हि** ; प्रा. **जन्ही** ; याकाम. **जन्ही**.]

जरूर अ. अवश्य, अगत्य. Necessarily, positively.
[अर. **झरूर** ; फा. **जरूर** ; पेकाम. **जरूर** (रा. ८-२०५), **जरूरत** = जरूरी आवश्यकता (अर. **झरूरत**) ; पेकाम. **जरूरात** (चिरा. ४).]

जर्जर, जर्जरित वि. पीडिलेला, क्षीणलेला, म्हातारा झालेला. Wasted and worn by age.
[सं. **जर्जर**, **जर्ज्**, √**जॄ** ९ वार्धक्ये (अभ्यास).]

जर्द वि. सोनेरी पिवळा. Yellow.
[फा. **झर्द्** = पिवळा ; जरद पहा.]

जर्दा पुं. जरदा पहा. खाण्याचा तंबाखु.

जल न. पाणी, उदक. Water.
[सं. **जलम्** ; पा. **जळ** ; याकाम. **जळ** ; अकाम. **जल**, **जळ** ; **जलक्रीडा** = पाण्यामधील खेळ ; **जलज** = पाण्यामध्यें जन्मणारा प्राणी ; **जलद**, **जलधर** = पाणी देणारा मेघ ; **जलनिधि** = समुद्र ; **जलप्रलय** = कल्पकाळ ; **जलमय** = पाण्यानें भरलेलें (जल–मयट् विकारे) ; **जलविहार** = पाण्यांतील क्रीडा ; **जलोदर** = उदर रोग, पोटांत पाणी सांठतें.]

जलद् अ. लवकर, ताबडतोब, शीघ्र. Quick.
(अर. **जलद** ; अकामसा. **जलदी** = गडबड, त्वरा ; फा. **जल्दी** ; पेकाम. **जलदी** (रा. १९-५२).]

जलसा पुं. गाण्याची–बजावण्याची बैठक, गाण्याची मैफल, संमेलन. A singing party, a majalas.
[अर. **जलूस्** = बसणें, **जल्सा** ; पेकाम. **जल्सा**, (रा. ५·१४४).]

जलाल वि. भयंकर, तीक्ष्ण, तिखट. Fierce, stern, hot, impetuous.
[अर. **जलाल्** ; पेकाम. **जलाल** (मराआ. २५).]

जलूस, जुलुस पुं. कारकीर्दीचा आरंभ, गादीवर बसणें. राज्याभिषेकदिन. The beginning of regime, the day of coronation.
[अर. **जुलूस** = आरोहण, समारंभ ; पेकाम. **जलूस** (ऐ. टि. १-६५), **जुलूस(सन)** = राज्याभिषेकाचें वर्ष, तख्तनशीन झाल्याचें साल.]

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

जल्प, जल्पना पुंस्त्री. वटवट, बडबड, बढाईचें भाषण. Chattering, prating.

[सं. **जल्प्** १ व्यक्तायां वाचि.]

जल्म(णें) आक्रि. जन्मास येणें. To be born.

[सं. **जन्मन्** (न), √ **जन्**; लिंगभेद होऊन मराठींत शब्द आला. स्त्रियांच्या बोलण्यांत ‘जन्म’चें ‘ जल्म ’ होतें.]

जंव अ. जोंपर्यंत, जों. As long as, whilst.

[सं. **यावत्**, **एवम्**; प्रा. **जइं**; अप. **जहिं**, **जअँ**, **जाउ**, **जाउं**; गु. **जव**; पं. **जौ** = सारखें, प्रमाणें; हिं. **जब** = जेव्हां; सिंह. **यव** = जों; ह्याचा प्रतियोगी शब्द **तंव** हा आहे.]

जॅव पुं. यव, सातु, एक धान्याचा प्रकार. Barley.

[सं. **यव**; टालेमी (१ लें शतक) यानें यवद्वीपाचा उल्लेख केला आहे–Iabadiou. अकाम. **जव्याची माळ.**]

जॆव पुं. गति, वेग. Velocity, speed.

[सं. जु १ गतौ.]

जवनिका, जवनी स्त्री. पडदा (नाटकांतील). A curtain.

[सं. **यवनिका.** ह्या शब्दांत थोडासा इतिहास आहे. हा शब्द Ionia या देशाच्या नांवाशीं संबद्ध आहे. हे लोक खिस्तपूर्व चौथ्या शतकापासून खिस्तोत्तर आठव्या शतकापर्यंत हिंदुस्थानांत होते. ह्यांना यवन म्हणत. यवनी स्त्रिया नाटकांत दासी म्हणून असत. यवनांचा संस्कृत नाट्यावर बराच परिणाम झाला आहे.]

जवस पुं. एक धान्याचा प्रकार, सातु.

[सं. **यवस**; प्रा. **जवस.**]

जवळ अ. पाशीं, नजीक, निकट, संनिध. Near, nigh, close to.

[सं. **यु** १ संयोजने (निष्ठा), **युगुल**, √ **युज्**; प्रा. **जुध**, **जुअ + ल.** ब्लोक ह्याची व्युत्पत्ति अर. फा. **जिवार** = सान्निध्य ह्या शब्दापासून देतो ती चिन्त्य आहे. हा शब्द यादवकालीन वाङ्मयांत आढळतो. याकाम. **जवलिक** (ज्ञा. ९-३७२), **जवळीक** = सोयरीक (नरुस्व. ३७५), = निकटपणा, सान्निध्य (शिशु. ४४) असे ह्याचे दोन अर्थ आहेत व दोन्ही परस्परसंबद्ध आहेत. तेव्हा हा शब्द आर्योद्भव असावासा वाटतो.]

मग दोघी संप्रधारू केला जवळिकेसीं ॥ नरुस्व. ३७५.

जवळील स्त्री. जवळ असलेली, सेविका, दासी. An attendant (female).

[म. **जवळ**; याकाम. जवळील.]

तेथ बोले भावकळिका। जवळिलीते म्हणे वाहिरे उभिया ठाका ॥ नरुस्व. ६५८.

जवा पुं. सांधा, जोड, मिलाफ. Junction, agreement.

[सं. **यु**, **युज्** = योजने.]

जवान वि. पुं. तरुण, तरणाबांड, सशक्त, शूर, धाडशी. Young, a youth or stripling.

[फा. **जवान्**; सं. **युवन्**; दोन्ही शब्द एकाच आर्य शब्दापासून निघाले आहेत. मराठींत हा शब्द फारसीमधून आला. **जवानी, ज्वानी** = तारुण्य, शक्ति, हिमत.]

जवाब पुं. उत्तर, हमी. Answer, responsibility.

[फा. **जवाब**; अकामसा. **जबाबदार** = जिम्मेदार, हमी घेतलेला.]

जवार, जवारी पुं.वि. खेडेगांवचा, मोठ्या पेठेंतील नव्हे असा, गांवढळ, सामन्त, आजूबाजूचा प्रदेश. Of country produce, relating to country, country round about.

[अर. **जुवार्**; फा. **जुवार्** = शेजार.]

जवारी, ज्वारी स्त्री. जोन्धळा, धान्यविशेष. A plant and its grain.

[सं. **यववार, यवकणिका**; देप्रा. **जोण्णलिआ जोवारी** (धान्यम्–३,५०). आस्ट्रिक सेकोई भाषेंत jawa असा शब्द आहे.]

जवाहीर न. रत्न, मूल्यवान मणि. A jewel, a gem.

[अर. **जवाहीर्**; फा. **झेवर.**]

जस न. यश, जय. Success, triumph.

[सं. **यशस्**; प्रा. **जस**; सिं. **जसु**; गु. पं. हिं. **जस**; सिंह. **जस** = नांव, कीर्ति.]

जसा वि. ज्यासारखा, ज्या प्रकारचा. Like as, such as.

[सं. **यादृश**; प्रा. **जइस**, **जारिस**; याकाम. **जइसा**, **जैसा**; अकाम. **जैसा**; अकामसा. **जसातसा** = कसला तरी (सं. **यादृशतादृश**); **जसाचे तसा** = अगदीं तसाच, तोच (सं. **यादृशः एव तादृशः**); **जसला** = ज्या प्रकारचा.]

जस्त न. एक प्रकारची धातु (कथिल व शिसें मिसळलेलें). A coarse kind of pewter.

[सं. **यशद**; प्रा. **जसद.**]

जहर न. विष, वीख. Poison.

[फा. **झहर्**; अकामसा. **जहरी** = विखारी (फा. झह्री.).]

जहल्लक्षणा स्त्री. लाक्षणिक अर्थाचा एक प्रकार. A kind of Metaphor in which the verbal sense is rejected.

[सं. **हा ३ त्यागे**, (अभ्यास) **जहा**, **जहत्** + लक्षणा, अजहल्लक्षणा, जहदहजल्लक्षणा हे लक्षणेचे प्रकार आहेत.]

जहान न. पृथ्वी, मनुष्यलोक The world, mankind.

[फा. **जहान**; अकामसा. **(शहा)जहान्** = पृथ्वीचा राजा; **(नूर)जहान** = पृथ्वीवरील प्रकाश; **जहान् गीर** = पृथ्वीजेता; **जहांबाज**–ह्या शब्दाचें मूळ निराळें आहे (झान् + बाज).]

जहाल वि. तीक्ष्ण, तिखट, कडक. Pungent, hot, fierce.

[सं. **ज्वल्** (?); हिं. **झाल**; मराठींत हा शब्द हिंदीमधून आला. फा. **जहाल** (**जहालीम > जालीम**) हा तर शब्द मूळ नसेल ना? **जहाल**(पक्ष) हा शब्द मराठींत १९०७ पासून रूढ झाला व तो केसरीनें बंगालफाळणीसंबंधीं उत्पन्न झालेल्या राजकारणी चळवळींत रूढ केला. ह्याचा प्रतियोगी शब्द मवाळ.]

जळ(णें) अक्रि. दग्ध होणें, पेटणें. To burn, to be kindled.

[सं. **ज्वल्** १ ज्वलने; पा. **जळ**; प्रा. **जल**; ओ. **जळिवा**; हिं. **जलना**; पं. **जलणा**; सिं. **जरणु**; गु. **जळवूँ**; अकामसा. **जळ** = जळलेला, जळून वार्यां गेलेला भाग; **जळजळीत** (**जज्वल् > जळजळ**) = रखरखीत; **जाळ** (सं. **ज्वलक > जलग > जळअ**;) = आग; **जळका** = जळलेला; **जळजळ** = आग (घशांतील, पोटांतील); **जळवात** = उष्णतेमुळें येणारा वात.]

जळ न. पाणी. Water.

[सं. **जल**; प्रा. **जल** (न); गु. **जळ**; सिं. **जरु**; पं. हिं. **जल**; अकामसा. **जळचर** = पाण्यांतील प्राणी; **जळमाणूस** = लहान, ठेंगू मनुष्य; **जळबंब** = पाण्याचा नळ, तुडुंब; **जळमंडप** = कळसूत्री बाहुल्याचा खेळ; **जळमंदिर** = तळें, सरोवर, कारंजीं भोंवतालीं असलेलें मंदिर.]

जळण न. कस्तन. Firewood or fuel.

[सं. **ज्वलन**; पा. **जळनो**; प्रा. **जलण**; हिं. **जलनं**; पं. **जलन**; गु. **जळण**; अकामसा. **जळत** = जळलेलें, पेटलेलें; **जळें** = जळू दे, मरूं दे ह्या अर्थी उद्गार (स्त्रियांचा); **जळप**, **जळप(णें)**, **जळाप(णें)** = चिडणें, त्रासणें (ज्वल् + अप्प); **जळवण** = गांजणूक, त्रास.]

जळफळ(णें) अक्रि. मनांत त्रासणें, धुसफुसणें. To be inflamed with anger.

[सं. **जल्प + प्रजल्पनं** = व्यक्तायां वाचि किंवा **ज्वल्** १ ज्वलने.]

जळमट न. घरोसा, कृमीचें घर, भुरा. Pendulous filaments hanging from dirty roofs.

[सं. **जाल + वन्त,–मन्त.**]

जळवट न. लाळ, कफ, श्लेष्मा. A viscid string as of phlegm.

[सं. **जाळ + वृन्त.**]

जळीत न. सोनें चांदी वगैरे धातु आटविण्यांत जळलेला अंश. Waste of metals on being melted.

[सं. **ज्वल्**, **ज्वलित.**]

जळू स्त्री. कीटकविशेष, अशुद्ध रक्त शोषून घेणारा किडा. A leech.

[सं. **जलौका**; पा. **जळोगी**; प्रा. **जलूगा**; हिं. **जलू**; सिं. **जरु**; गु. **जळो**; ने. **जुळो**; द्रा. **जलिक**, **जलूक**, **जलूका**, **जलोक**, **जलौक**, **जिगी**; संस्कृत शब्द **जलौका** हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. मूळ शब्द द्राविडीच असावा.]

^{1}**जा(णें)** अक्रि. निघणें, गमन करणें, गति असणें, सरणें, क्रमणें. To go, to proceed.

[सं. **या** २ प्रापणे; प्रा. **जा**; हिं. **जाना**; गु. **जवानुं**, **जवूँ**; सिं. **जनूं**, का. **यि** (?); सिंह. **य**–Grierson, पिशाच भाषा पृ. ११९, रशि. लमा. **या.**

या आणि **जन्** ह्या दोन्ही धातूंचें प्राकृतमध्यें '**जा**' असें एकच रूप होई. मराठीनें एक घेतलें, दुसरें नाहीं. त्याऐवजीं जन्मन् पासून नामधातु तयार केला. कांहीं मराठी प्रयोगांत '**जन्**'चा अर्थ राहिला आहे. उदा.—**जाहाला–झाला जातः** निष्ठा, √**जन्.**]

^{2}**जा(णें)** क्रि. घडून येणें, होणें. To happen.

[सं. **जन्** ४ प्रादुर्भावे; **केलें जातें** (< कृतं जायते); **केलें जाईल** (< कृतं जायेत, जायिष्येत); **केलें गेलें** (< कृतं जातम्) (या > जा > गा.).]

^{3}**जा(णें)** क्रि. अंगावर चाल करणें. To attack.

[सं. **द्यु** १ अभिगमने, **द्यै** १ न्यक्करणे; अकामसा. नाहीं येत **जा**, जेवीत **जा**, खात **जा** इत्यादि.]

जाइफळ, जायपळ न. एक फळ. A nutmeg.

[सं. **जातिफल** ; प्रा. **जाइफळ** ; गु. **जायफळ** ; सिं. **जाफुर** ; पं. **जाफल** ; हिं. **जएफल** ; सिंह. **दँफल.**]

जाइजणा वि. जाणारा, नश्वर, अशाश्वत. Transient, transitary.

[सं. **या,** (**कर्मणि भावे**) **जायते;** प्रा. **जाइज्ज, जाइज्जणा** (कृदन्त) ; याकाम. **जाइयांचे** (ज्ञा. ९·४०८), **जाइलेपण** = जन्मास आलेल्याचें सार्थक, कृतकृत्यता (नरुस्व. १९२)]

जाई स्त्री. एक वनस्पति, फुलवेल, वेलिविशेष. A kind of creeper.

[सं. **जाति** ; पा. **जाति** ; प्रा. **जाइ** ; ओ. **जाइ** ; हिं. **जाई** ; सिं. **जाइ** ; सिं. **दँ** ; गु. **जाई** ; याकाम. **जाईल** = जाईचें फूल (नरुस्व. ७४६)]

जाऊ स्त्री. दिराची बायको. Husband's brother's wife.

[सं. **यातृका** ; प्रा. **जाउया-जाऊ** कांहीं वेळेस ह्या शब्दाचा अर्थ "नवऱ्याच्या धाकट्या भावाची पत्नी" असा करतात.]

जाकळ(णें) सक्रि. खाणें, ग्रासणें. To swallow, to eat, to envelop.

[सं. **जक्ष्** २ भक्षणहसनयोः, **जक्षल** (ना.)]

जाकळ(णें) अक्रि. व्यापणें. To envelop.

[तेलगु. **जागिलि** ; याकाम. **जाकल** ; अकाम. **जाकळ.**]

दिठी जाकलौनि निभों पाए ॥ ज्ञा. ६-२६७.

मग जाकलिला ढेंकरें । तुपु जैसा ॥ ज्ञा. १८-१७.

जाकीट न. सद्र्यावर व कोटाच्या आंत घालावयाची बिनबाह्याची बंडी. A jacket.

[*Lat.* Jacobus; *OF.* Jacques, Jacquet = a child's coat,-dimunitive of Jaque = a coat of mail.]

जाखीण, जखाइ, जोखाई, जाखाई स्त्री. ग्रामदेवता. Village diety.

[सं. **यक्ष** ; प्रा. **जक्ख** ; कान. **जक्किसु** ; द्राविडी. **जक्ख** = म्हातारा, जेष्ठ, वाकडा झालेला ; द्राविडी व्युत्पत्तिच ग्राह्य वाटते. 'यक्ष' चा संबंध वर्णप्रक्रियेनें योग्य दिसला तरी इतिहासांतील माहितीला धरून दुसरी व्युत्पत्ति योग्य आहे. **जख्ख** पहा.]

जाग(णें) क्रि. जागे असणें. To wake, to watch.

[सं. **जागृ** ; पा. **जाग्ग** ; प्रा. **जग्ग** ; बं. **जागा** ; ओ. **जागिबा** ; हिं. **जागना** ; पं. **जागणा** ; सिं. **जागणु** ; गु. **जागवूँ** ; का. **झाग** = सावधान असणें ; अकामसा. **जाग** = जागी अवस्था, चाहूल ; **जागा-जागणा** = जागृत (सं. **जागृतः** प्रा. **जाग्गअ**) ; **जागता** = जागरूक, दक्ष, तत्काळ फलदायी, तेजस्वी ; **जागरण** = जागृती, जागें रहाणें ; **जागरा** = जागणारा (प्रा. **जग्गिर**) ; **जागला** = पहारेकरी, जाग घालणारा.)]

जागतिक वि. जगासंबंधी, सार्वत्रिक. Belonging to the whole world.

[सं. **जगत् + इक.**]

जागवि(णें) सक्रि. जागत ठेविणें. To awaken, to hold vigils.

[सं. **जाग्रय** ; प्रा. **जग्गावेइ** ;>बं. **जागान** ; ओ. **जगैबा** ; हिं. **जगाना** ; पं **जगाउणा** ; गु. **जगाववूँ.**]

जागसुत वि. सावध करण्यास सोपा. Easy to be awakened.

[सं. **जागृत शुद्ध** ; याकाम. **जागसुता.** (दृ. पा. १०३)]

जागा पुं. स्त्री. ठिकाण, स्थळ, आधार, अवस्था, हुद्दा, नोकरी (लक्षणा). An office, a place.

[फा. **जगाह्, जाय् + गाह्** ; शिकाम. **जागा** (पुं.) (चित्र. ८१) ; अकाममध्यें लिंगभेद झाला. (त्याच्या) **जागीं, जागा** = बदला ; (दोन) **जागा** (करणें) = भाग ; **जागाजुगा** = जागा वगैरे.]

जागृत वि. सावध, जागा. Awake.

[सं. **जागृत** (निष्ठा), **जागृ** ; अकामसा. **जाग्रण, जागृदवस्था** = जागेपणाची स्थिति.]

जांगड वि न. जोड, सांगड, ठेव, परत करण्याच्या बोलीनें पसंतीसाठीं आणलेला माल. Goods taken from a shop without settlement of purchase.

[सं. **युज्** ७ (?) ; हिं. **जाकड** ; गु. **जांगड** ; बं. **जाँकड.**]

जांगड(णें) सक्रि. एकत्र बांधणें. To tie up together.

[सं. **गड्, ग्रथ्** १ संघाते, बन्धने. अभ्यास होऊन **जागड, जग्रन्थ्** असें झालें.]

जांघ स्त्री. लहान ओटी, मांडीच्यावरील भाग. The thigh.

[सं. **जंघा**; प्रा. **जंघा**; गु. सिं. पं. **जंघ**; हिं. बं. ने. **जाङ**; सिंह. **दंग** = घोटा; रुमा. **चंग**; अकामसा. **जांघाड, जांगाड** = मांडी (ग्राम्य) (जंघा + ट,-जांग + ड).]

जांच(णें) क्रि. गांजणें, त्रास देणें. To tease, to torment.

[सं. **जच्, जर्ज्, जर्छ्, जर्त्स्, जर्झ्, जस्** **१०** ताडने असे धातु आहेत. परंतु द्राविडी किंवा देशी धातूंचींच हीं रूपें असावीं. किंवा पूर्ववैदिक धातूंचे अवशेष असावेत. टर्नर '**याच्**' पासून व्युत्पादितो तें बरोबर दिसत नाहीं. पं. **जचणा**; सिं. **जाचणु**; बं. **जाचा**; हिं. **जाचना**; अकामसा. **जाच** = त्रास, छळणूक, यातना, काट, पीडा; **जाचक** = त्रासदायक, जाचणारा; **जाचणूक** = जाच, त्रास, गांजणूक.]

जाजती वि. जास्ती, अधिक. More.

[अर. **झियादत्+इ**; शिकाम. **जाजती** (सभा. ६० चित्र. ३९); पेकाम. **ज्यादती** (रा. ७-२१), **ज्याजती**; अकाम. **ज्यास्ती, जास्ती.**]

जाजम, जाझम न. बैठक, बिछाइत, रंगित व चित्रित खादीचें जाड बैठकीचें वस्त्र. A floor-cloth.

[फा. **जाजिम्**; हिं. **जाजम.**]

जाजर(णें) अक्रि. गांगरून बोलणें, To talk in fright or confusion.

[सं. **जर्ज्** **१** परिभाषणे]

जाजरू न. शौचकूप, शेतखाना. A latrine.

[अर. **जायजरूर** = शौचकूप.]

जाजाव(णें) सक्रि. निर्भर्त्सना करणें. To storm at.

[सं. **जर्ज्, झर्झ्** **१** निर्भर्त्सने, **द्यै** **१** न्यक्करणे.]

जाज्वल्य वि. प्रखर, जहाल, तेजस्वी, रागीट. Fiery, fierce, refulgent.

[सं. **ज्वल्** **१** दीप्तौ, (अभ्यास) **जज्वल्**-(वृद्धि) **जाज्वल्य**]

जाड वि. लठ्ठ, स्थूल, धट्टाकट्टा, दांडगा, घन. Thick or coarse, strong and stout.

[सं. **जड**; गु. हिं. **जड**; सिं. **जरु**; अकामसा. **जाडगा, जाडगेला** = जाड (गा आणि ला हे विशेषणाचे प्रत्यय. कारवारी कोंकणींतील 'गेला' ह्या षष्ठीच्या प्रत्ययाशीं संबंध नाहीं. **जाडी, जाड्य** = घनता, लठ्ठपणा, वजन, अज्ञान(ल.) पचनास कठीण.]

जाण(णें) सक्रि. माहीत असणें, **ओळखणें, समजणें,** ज्ञान प्राप्त करून घेणें. To know, to apprehend, to understand.

[सं. **जाना,** √**ज्ञा** ९ (सविकरण) ज्ञाने; पा. **जाना**; प्रा. **जण, जाण**; अप. **जणु, जणि**; बं. **जाना**; ओ. **जानिबा**; हिं. **जानना**; पं. **जाणना**; सिं. **जाणणु**; गु. **जाणवूँ**; ने. **जान्नु**; का. **ज्ञान्**; सिंह. **दन्** = जाणणें, विचार करणें. काश्मिरी ज्ञान् व सिंहली दन् हीं दोन मुळें सं. **ध्यान**; पा. **ज्ञान** पासून आलीं आहेत असें ब्लोक म्हणतो. हा धातु प्राकृतच्या पहिल्या थरांतच सविकरण उतरला. ह्या धातूचें रूप थोडासा संभ्रम उत्पन्न करतें. '**ज्ञा**'पासून ('ज्, ञ्' पासून) '**जाण**' असा प्राकृत अपभ्रंश तयार होणें शक्य आहे. किंवा जा + ना (विकरण) ह्यापासूनहि तयार होणें शक्य आहे. ह्यांपैकीं कोणता स्वीकारावा हें कठीण आहे. याकाम. **जाण, जाणता, जणों** इत्यादि.]

जाणव(णें) सक्रि. सांगणें, सुचविणें. To make to know, to tell, to suggest.

[सं. **ज्ञापय, जानाप,** प्रा. **जाणावेइ,** बं. **जानान**; ओ. **जाणाइबा**; हिं. **जनाना**; पं. **जणाउणा**; सिं. **जणाइणुं,** गु. **जणाववूँ,** याकाम. **जाणव** (नरुस्व. ३५); अकामसा. **जाण** = ज्ञान, ओळख; **जाणता** = जाणणारा, समजूतदार, शहाणा; **जाणकार** = ज्ञानी, पंडित (ज्ञाने.), (याकाम. **जाण** = शहाणा–नरुस्व. २५, **जाणता**–नरुस्व. २८); **जाणावें** = जाणण्याची गोष्ट, जाणण्यायोग्य; **जाणिजे** = जाणावें, समजावें (कर्मणि **जानीयात्, ज्ञायते** ह्या दोन्हीपासून निघणें शक्य आहे.); **जाणीतणें** = जाणवणें; **जाणीव** = समजूत, ज्ञान (याकाम. **जाणीव**–नरुस्व. ४१); **जाणों** = जणों, जणूं, जसें काय; **जाणूनबुजून**–मुद्दाम (**ज्ञात्वा** > **जण्णून** > जाणून, प्रा. **बुज्झूण** + बुजून (√**बुध्** ४).]

जात[1] वि. उत्पन्न झालेला, निर्माण–सिद्ध झालेला. Born, produced, engendered.

[सं. **जन्**, (निष्ठा) **जातः**; अकामसा. **जातकर्म** = एक संस्कार. नूतन अपत्याच्या कानांत सुवर्ण ठेवून पित्यानें मंत्र म्हणावयाचा असतो.]

जात[2] स्त्री. जाति, प्रकार, वर्ग. Kind, sort, species, caste.

[सं. '**जाति, ज्ञाति**' **चा** संक्षेप (तद्भव); याकाम. **जातीतु** (गोमांतक ताम्रपट); अकामसा. **जात** = प्रत्येक (लक्षणा); **जातकुळी** = जाती वंश वगैरे; **जातजमात** = जातींतील संघ, पंचायत (दोन्ही शब्द समानार्थी परंतु भिन्नभाषीय); **जातगंगा** = जात हीच कोणी गंगा, जातबांधव, जातींतील बंधु.]

जात वि. स्वतः, खुद्द, One's own person.

[अर. **ज़ात्**; पेकाम. **जात** (रा. ५-१५९); अकामसा. **जात-इनाम,-सरंजाम** = स्वतांच्या कर्तबगारीबद्दल मिळालेलें इनाम, सरंजाम; **जातीनीशीं** = जातीनें खुद्द; **जातमुचलका** = स्वतःच्या नांवावर केलेला करार (< अर. **ज़ात**; तुर्की. **मुचल्का, मुच्लका.**)]

जातक न. ज्योतिष, भविष्य, कुंडली. Fortune or destiny predetermined from a horoscope.

[सं. **जातक** = जन्मवेळच्या ग्रहांच्या स्थितीवरून मनुष्याच्या आयुष्याचें भविष्य.]

जातखेंवो अ. जाताक्षणीं. Immediately after going.

[म. **जात**, (निष्ठा) 'जाणें' ची, **खेंवो** (सं < **क्षेप** = आलिंगन) तात्क्षणिकत्व दाखविणारा शब्द म्हणून यादवकालीन मराठीमध्यें रूढ असलेला दिसतो.]

जाति स्त्री. जात, वर्ग, प्रकार, वंश, छंदाचा एक प्रकार. Kind, sort, species, lineage, a kind of metre.

[सं. **जन्** ४ संभवे, (निष्ठा) **जात**, २ **ज्ञाति**; अकामसा. **जातिभेद** = ब्राह्मण, क्षत्रिय, वैश्य, शूद्र ह्या जातींचा भेद; **जातिभ्रष्ट** = जातींतून बाहेर पडलेला; **जातिवंत** चांगल्या कुळांतील, अस्सल कुळांतील; **जातिस्वभाव** = जन्मस्वभाव, जातिस्वभाव; **जात्यभिमान** = जातीचा अभिमान-मोठेपणा; **जात्या** = स्वतः जातीनें.]

जातें न. दळण्याचें यंत्र, दगडी चक्की. A handmill.

[सं. **यंत्रम्**; पा. **यन्तम्**; प्रा. **जन्तम्**, बं. **जात**; ओ. **जाति**; हिं. **जाँता**; सिं. **जण्डु**. अनुनासिक प्रांतिकस्वरूपांत अवशिष्ट राहिला. उदा. कोंकणांत हा शब्द **जाँताँ, जाँतु-लें** वगैरे रूपांत रूढ आहे. याकाम. **जंत्र** (नरुस्व. १७९.)]

जादा, ज्यादा वि.पुं. अधिक, जास्त, पुरवणीपत्रक. More, a supplement.

[अर. **ज़ियादा.**]

जादुटोणा पुं. मंत्रतंत्र. Conjuration, sorcery.

[फा. **जादू** + कान. **टोणे** = **फसविणें**. फारसी अथवा संस्कृत आणि द्राविडी यांचा संकर.]

जादू स्त्री. मंत्रटोणा, गुप्तविद्या, इंद्रजाल. Magic, sorcery.

[१ फा. **जादू**; २ सं. **यातु**; अकामसा. **जादूगार, जादुंगर, जादुगीर** = जादू करणारा मांत्रिक.]

जान न. प्राण, जीव, प्रियकर (लक्षणा). Life, lover.

[फा. **जान्**; वै. सं. **जान** = जन्म. परंतु मराठींत हा शब्द फार्शीमधून आला. फार्शी शब्दाचा संबंध जुन्या वैदिक संस्कृत शब्दाशीं असणें शक्य आहे. पेकाम. **जान, ज्यान** (रा. ७·८).]

जानपछान स्त्री. ओळखदेख, स्नेह, माहितीचा. An acquaintance.

[हिं. **जान, पहचान**. मराठींत हा शब्द हिंदीमधून आला. हिंदी शब्दाचा संस्कृत शब्दाशीं संबंध आहे (सं. **ज्ञान प्रत्यभिज्ञान**). तरी पण ही व्युत्पत्ति वृथा पाण्डित्यदर्शक आहे. स्वाभाविक वाटत नाहीं. हिंदीमध्यें परकी-फार्शी वगैरे-भाषेंतून आला असण्याचा अधिक संभव आहे.]

जानवें न. उपनयनानंतर ब्रह्मचाऱ्यानें घालण्याचें सूत्र. The sacred thread worn by a Brahmachari after his thread ceremony.

[सं. **यज्ञोपवीतम्**; पा. **यण्णोपवीतम्**; प्रा. **जण्णोपवीअम्, जण्णोवईय, जण्णावविअम्**; हिं. पं. **जनेउं**; ल्हां. **जन्जुं**; सिं. **जण्यो**; गु. **जनोई**; ने. **जनई**; मराठी इतर संबद्ध रूपें-**जानू, जान्हवी, जान्हवें**. २ **जन्** ४ संभवे ह्याच्याशीं कांहीं संबंध आहे कां ? अकामसा. **जानवें तोडणें** = वैतागणें; संन्यास घेतांना जानवें तोडावें लागतें त्यावरून; **जानव्याची गांठ** = ब्रह्मगांठ, भूतास दाखविली म्हणजे ते नाहींसें होतें असा समज.]

जानिवसा, जानवसा, जानोसा पुं. वराचें स्वागत करण्याची जागा, लग्नामध्यें वऱ्हाडी मंडळीस उतरण्यासाठीं दिलेलें घर. The place set up for the stay of the bride-groom and his party.

[सं. **जनवास** < **जन्यवास** (**जन्य** = वराचे मित्रगण) लां. **जन्जवास**; सिं. **जनवास**; गु. **जानवास**; हिं. **जन्वास**; याकाम. **जानवसा** (धपू. ३०). परंतु ह्यांपैकीं **जनवास जन्मवास** = जन्माचें घर, जेथें जन्म झाला तें घर अशी उपपत्ति अधिक प्रशस्य वाटते. सामाजिक रूढीशीं ही उपपत्ति जमते. ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. त्याला कारण रूढींत जे बदल झाले ते होत. मूलीच्या जन्माचें ठिकाण हा त्याचा मूळ अर्थ. मूलीच्या जन्मस्थानास लग्नासाठीं वरानें जावयाचें ही पहिली रूढी. परंतु पुढें रूढींत बदल झाला तसा शब्दाच्या अर्थांतहि फरक झाला. अर्थाचें सामान्यीकरण झालें. वरास किंवा वधूस उतरण्यासाठीं किंवा तात्पुरत्या राहण्या-

साठीं दिलेलें घर असा अर्थ प्राप्त झाला. पुढें वऱ्हाडास उतरण्यास दिलेली जागा असा अर्थ झाला. हा अर्थ पहिल्यापासून आहे. मराठी **जानवें**, गु. **जनोई** ह्या शब्दाशीं संवद्ध आहे कां ?]

जानु पुं. गुडघा. The knee.
[सं. **जानु** हा शब्द फार जुना आहे. *Eng.* Knee ह्या शब्दाशीं संवद्ध आहे. ह्यावरून असा तर्क निघतो कीं मूळ पूर्ववैदिक शब्दाच्या वर्णांत 'ज्ञ' हा वर्ण असावा व त्याचें रूपांतर संस्कृत 'जानु' असें झालें. IE. genu.]

जाफरा पुं. केशर. Saffron.
[अर. **ज्ञअफरान्**; हिं. **जाफरान**; अकामसा. **जाफरामानी** = केशरी रंगाचा (हा शब्द पेकाममध्यें येतो.)]

जाफा वि. अधिक, ज्यास्त, वाजवीपेक्षां जास्त. Exceeding, more than.
[अर. **इजाफाह** = वाढ, जोड ; अकाम. मध्यें उच्चार दोन्ही प्रकारचा म्हणजे तालव्य व दन्त्यतालव्य असा आहे.]

जाब, जबाब पुं. उत्तर. An answer.
[फा. **जवाब्**. वहुधा "**जाप, जांप** (√**जल्प्**) ह्या धातूशीं संकर झाला आहे. अकामसा. **जाबसाल** = प्रश्नोत्तर. तहाचीं प्रश्नोत्तरें (अर. **जबाब + सुआल्**; पेकाम. **ज्वाबसाल** (रा. १३-१०).]

जाबता जाबिता पुं. नियम, कानु, परवाना, कराचें वसुलीप्रमाण. A law, a regulation, a statute, authorising document.
[अर. **जाबिता** = कानु ; मराठींत शब्द हिंदीमधून आला. शिकाम. **जाबता** (सभा. २२)]

जामा पुं. एक प्रकारचा अंगरखा, झगा. A long robe or vest.
[फा. **जाम** = वस्त्र ; अकामसा. **पायजमा, जामानिमा**. (**निमा** = आंतली वंडी.) (**जामा** = विजार, **निमा** = कुडतें, सर्व पोषाख).]

जामात पुं. जांवई. A son-in-law.
[सं. **जामातृ**, (√ **यम्** (?)); अकाम. (तद्भव) **जांवई**.]

जामीन पुं. जिम्मा घेतलेला, हमीदार, विश्वासार्थ राहिलेला माणूस. A security, a surety.
[अर. **ज्ञामीन्** < **जिम्मा**; पेकाम. **जामीन** (अनन्त फन्दी ६०); अकामसा. **जामीनकदबा** = जामीनकीचा करारनामा ; **जामीनकी** = हमी, जवाबदारी ; **जामीनदार** = जामीन राहिलेला मनुष्य.]

जांब पुं. पांणी पिण्याचें भांडें. A sort of goblet.
[सं. ?; देप्रा. **जंबुलम्** (मद्यभाजनमिति सातवाहनः); **चंबू** पहा. फा. **जाम** = पेला ; पेकाम. **जाम्ब** (माप्र. ११६)]

जांब पुं. फलविशेष, कच्चा काजू. A kind of fruit, tree (guava).
[सं. **जंवू**; प्रा. **जम्वू**; वं. **जाम्**; ओ. **जामु**; हिं. **जाम्**; पं. **जाम्मू**; सिं. **जमूँ**; गु. **जाँबू**. हें फळ मूळचें अमेरिकेंतील. कच्चा काजू अमेरिकेंतून इंग्लंडमध्यें गेला असें हाब्सन जाब्सन म्हणतो तें चूक आहे. परंतु इकडे हें फळ फार प्राचीन कालापासून आहे. तेराव्या शतकांतील लेखांत ह्याचा निर्देश आहे. फा. **अम्रुद-ड जाम्ब**; वं. **जमून**; गु. **जामरूढ** हा **जामरुद** > **अम्रुद** पासून आहे काय ?]

जांवाड न. तोंडाचा पसरट भाग, जवडा, गाल. A jaw or the jaws.
[सं. **जंभास्थि** (जंभा + हाड) (?); तमा. **चम्**; सं. **जंभ** आणि मराठी. **हाड** ह्या दोन शब्दांचा समास झाला.]

जांबुवंत पुं. रामायणांतील रामाचा एक सैनिक अस्वल. हा म्हातारा व अनुभवी होता, (त्यावरून लक्षणेनें) म्हातारा शहाणा मनुष्य. The name of an aged bear in राम's army, hence any elderly person.
[सं. **जांबुवंत**.]

जांबूनद न. सोनें. Gold.
[सं. **जांबूनद**.]

जांबूळ न. फलविशेष. A fruit-tree or its fruit.
[सं. **जंबुल, (जम्बु)**; प्रा. **जंबुल**; हिं. गु. बं. **जामून**; पं. **जम्मूण**; ने. **जामुनु**; सिंह. **दम्ब, डिंबुल्**; अकाम. **जांभूळ, जांभळ**.]

जांभई स्त्री. आळसाचा एक आविष्कार. A gape or yawn.
[सं. **जृंभिता, जृंभा** (√ **जंभ्**), **जिंभिया** (स्त्री); प्रा. **जंभाइआ**; हिं. **जंभाई**.]

जायजण–णा, जायजाणा. वि. परत करण्याच्या बोलीनें आणिलेलें (कापड वगैरे), क्षणभंगुर, अस्थिर. Borrowed for an occasion.
[सं. **जात + जन**; प्रा. **जायजण**; याकामसा. **जायलेणें** = परत बोलीनें आणिलेला दागिना.]

जायपत्री स्त्री. औषधिविशेष. Mace.
[सं. **जातिपत्री** ; प्रा. **जाइपत्त** ; हिं. **जाएपत्री** ; ओ. **जाइत्री** ; गु. **जायपत्री.**]

जायफळ न. एक प्रकारचें फळ. Nut-meg.
[सं. **जातिफलम्.**]

जायबंदी वि. जखमी, इजा झालेला. Injured, impaired.
[अर. **झाईअ, झाई** = नष्ट + फा. **बंदी.**]

जाया स्त्री. बायको, स्त्री, भार्या, पत्नी. Wife.
[सं. **जाया, ✓ जन्.**]

जाया वि. नादुरुस्त, खराब, निरूपयोगी, दुखावलेला, घायाळ. Destroyed or spoiled, useless.
[अर. **झाई** = नष्ट.]

जार पुं. उपपति, प्रेमक, प्रियकर. A paramour.
[सं. **जारः** (जॄ); पा. प्रा. **जार** ; बं. **जार** ; ओ. **जार** ; हिं. पं. गु. **जार** ; अकामसा. **जारकर्म** = बदकर्म, व्यभिचार ; **जारज** = अनौरस ; **जारिणी** = व्यभिचारिणी स्त्री.]

जार पुं. पांढरा फेस, गर्भवेष्टन. The spume in the mouth of infants.
[सं. **जरायु.** उच्चार दन्त्यतालव्य रूढ आहे. **जारज** = गर्भाशयापासून उत्पन्न झालेलें.]

जार, ज्यार वि. त्रस्त, गांजलेला, जेर. Oppressed, harassed.
[फा. **झार्.**]

जारट(णें) अक्रि. टणक होणें, दडसणें, कठीण होणें. To harden and pucker up.
[सं. **जरठ** (< जरास्थित), **जॄ** ९ वयोहानौ ; प्रा. **जरठ** = म्हातारे होणें-जून होणें-निबर-कठीण होणें. **जारट** = कठीण. (ह्या विशेषणापासून वरील नाधा. मराठींत तयार झाला.)]

जारण न. मंत्रप्रयोग, जादू. Incantation (to produce infirmities).
[सं. **जॄ** ९ वयोहानौ.]

जारी वि. जोरात चाललेलें, चालू, हयात. Current or extant.
[अर. **जारी** = सुरू, चालू ; . नंतर 'जोर' असा अर्थ प्राप्त झाला.]

जाल न. जाळें, गुंता. A net.
[सं. **जालम्**]

जालीम वि. कडक, तीक्ष्ण, जुलुमी. Patent, sharp, violent.
[अर. **झालिम्** = क्रूर ; पेकाम. **जालीम, जालम** (भाइसम. १८३४ शके अहवाल, ९२); अकाम. **जालीम.**]

जालें न. जन्म. Birth.
[सं. **जातः** (निष्ठा ✓ जन् ४ संभवे) ; प्रा. **जाअ** + **ल.** निष्ठेचा उपयोग नामाप्रमाणें.]
" जयाचें जालें वंधां । उरो नेदी " ज्ञा. १७-४१२.

जांवई पुं. मुलीचा पती. A son-in-law.
[सं. **जामात** ; प्रा. **जामाउ, जामाउय** ; हिं. **जमाई** ; पं. **जमाई** ; गु. **जांवत्र** ; याकाम. **जावाई** (लीच १--५५). **जामातृ, दम्पति, जम्पति, जायापति, दम,** Dome, ग्रीक **जामीतर** वगैरे शब्द परस्परसंबद्ध आहेत. **जम्, दम** = **घर** ह्या अर्थाचा संबंध आहे. **जांवईआग्रह** = वरवर आग्रह, जांवायास करावयाचा आग्रह ; **जांवइशोध** = चुकीची दुरुस्ती (एका मूर्ख जांवयानें केलेल्या दुरुस्तीवरून.)]

जावक वि. बाहेर जाणारें, पाठवावयाचें. That is to go or be despatched.
[हिं. **जाव + क, ✓ जाना** < सं. **या** ; अकामसा. **जावर्दा** = बाहेर जावयाचा माल.]

जावत्काल अ. जोपर्यंत. As long as.
[सं. **यावत् + काल** ; प्रा. **जावइअकाल.**]

जावळ न. लहान मुलाच्या पहिल्या हजामतीच्या पूर्वीचे डोक्यावरील केंस. The hair of a child before its head is shaved.
[सं. **जात + बाल** (= वलय) = केंस ; प्रा. **जाअवाल** (**जात** = मूल) ; याकाम. **जावळी.**]

जावळा वि. जोडलेला, जुळा, जुळ्यापैकीं एक, (आवळा) जावळा. Twin, one of twins.
[सं. **युगुल** ; प्रा. **जुअल** ; याकाम. **जावळिचे** (ज्ञा. १-३८) ; अकामसा. **जावळिया** = शेजारी, जुळा, जोडीचा ; **जावळी** = जुळा, भावंड, शेजारचा.]

जासवंद, जास्विनी(चें) फूल न. एक प्रकारचें तांबड्या रंगाचें फूल. The shoe-flower or its shrub.
[सं. **जपासुमनम्** ; प्रा. **जासुमण, जासुमिण, जासुयण** (पुं.) ; अप. **जासवण** > **जासवन्द** (वर्णागम) ; मराठींत येताना लिंगविपरिणमन झालें आहे. मूळ प्राकृत शब्द पुं. असून मराठींत स्त्री. अथवा नपुं. झाला आहे.]

जासूद पुं. बातमीपत्रें नेणारा, निरोप नेणारा दूत, काशीद, हरकारा. A messenger, a courier.
[अर. **जासूस** = हेर ; पेकाम. **जासूद** ; पेकामसा. **जासूदजोडी**-जासूद नेहमी जोडीनें जात-प्रवास करीत ; **जासूद, काशीद, हरकारा** इत्यादि पेशवेकाळांत निरोप नेणारे लोक असत.]

जास्त वि. अधिक, पुष्कळ. More than, exceeding.
[अर. **झाइद्, झियाद्, झियादत** ; शिकाम. **जाजत,** (सभा. ६०); पेकाम. **जाजत, जादत** (राज. २·१३५); अकाम. **जास्त.** वर्णप्रक्रिया ज् > द् > स् अशी झाली आहे.]

जाहागीर स्त्री. वतनाची–भोगोट्याची जमीन, इनाम, नेमणूक. An assignment of land or inam by government.
[फा. **जागीर** = ताब्यांतील वतन, जागेवरील अधिकारी ; **जागीरदार** = वतनदार.]

जाहंबाज वि. हुशार, घाडशी, कृत्या, कडक (स्त्री.) Adroit, dexterous, shrew.
[फा. **जानूबाझ्** = **धाडसी** ; अकाम. **जहांबाज** (स्त्री).]

जाहीर वि. प्रसिद्ध, प्रगट, माहीत, सर्वश्रुत. Published, proclaimed, public, famous.
[अर. **झाहिर्** ; पेकाम. **जाहिरा, जाहीर** (रा. १५-१७४); अकामसा. **जाहीर खबर** = प्रकट वृत्त, बातमी ; **जाहीरनामा** = प्रकट लेख. **जाहीरसभा** = प्रकट–प्रसिद्ध–उघड सभा ; **जाहीराणा** = प्रसिद्धि (पेकाम. **जाहिराणा**- (रा. १२-१२४); **जाहीरात** = प्रसिद्धिपत्रक (< **झाहिरात्, झाहिर्**चें अनेकवचन); पेकाम. **जाहिरात** (रा. १२-१२३).]

जाळ(णें) सक्रि. पेटविणें, अग्नि लावणें, गांजणें (लक्षणा). To burn, to set fire to, to annoy.
[सं. **ज्वालयति** ; पा. **जालेति** ; प्रा. **जालेइ** ; अ. **त्सालिब** ; ओ. **जाळिबा** ; हिं. **जारना, जलाना** ; **जालना** ; पं. **जालना, जालणा, जलाउणा.**]

जाळ, झाळ पुं. झळ, ज्वाला, ताप, राग, संताप. Fire or flame, passion or anger.
[सं. **ज्वाला, √ ज्वल्** ; प्रा. **जाल** (पुं.), **जाला** (स्त्री.); अकामसा. **जाळपोळ** = आगीनें नुकसान, (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द.)]

जाळ पुं. मळ, घाण (धातूंतील). Dirt.
[सं. **ज्वाला** ?; देप्रा. **जल्ल** ; प्रा. **जल्ल** = शरीरांतील मळ.]

जाळ स्त्री. जाळी, दाट झुडुप. A thicket, a thick bush.
[सं. **जाल** ; हिं. **जाल** ; का. **झाल्** ; सिं. **दॅल** ; सिं. **जारु.**]

जाळी स्त्री. जाळें, भोकें असलेलें कापड, दोरी. Network, anything drilled or perforated, the string of a spinning top.
[सं. **जालिका** ; पा. **जालिका** ; प्रा. **जालिका** ; बं. **जाली** ; सिं. **जारी** ; हिं. पं. **जाली** ; गु. **जाळी.**]

जाळी स्त्री. कांटेरी झाडाचा समूह. A thick bush, a thicket.
[सं. **जाल** ; हिं. **जाल** ; का. **झाल्** ; सिंह. **दॅल** ; गु. **जाळुं** ; सिं. **जारु** ; याकाम. **जाळी** (= वन. नरुस्व. ८०१)]

जाळी स्त्री. खिडकी, गवाक्ष. Any lattice, trellis.
[सं. **जालम्** ; प्रा. **जाळ.**]

जाळें न. मासे पकडण्यासाठीं केलेली दोऱ्यांची गूत. A net.
[सं. **जालकम्, जालम्** ; पा. प्रा. **जालम्** ; बं. हिं. पं. **जाल्** ; सिं. **जारु** ; गु. **जाळुं.** (**जालकम्** पासून येणें अधिक ग्राह्य.)]

जि(णें), जिण(णें) सक्रि. जिंकणें. To conquer, to win.
[सं. **जि, जी** (**जिनाति**); पा. **जिनाति** ; प्रा. **जिणेइ** ; ओ. **जिणि** ; सिं. **जीत** ; का. **झेन्** ; याकाम. **जिणें** = **जिंकतो.**]

सौरठी ब्रह्मवंशीं सौर-वीरु: जो कामनेविण जिणे कल्पतरू ॥ नरुस्व. २८३.

जिकडे अ. ज्या ठिकाणच्या बाजूस, ज्या दिशेकडे. Whither, where.
[सं. **यत् + कटम्** ; अकामसा. **जिकडें तिकडें** = सर्व बाजूस–ठिकाणीं.]

जिकीर स्त्री. त्रास, अडचण, कटकट. Worry, helplessness, distress.
[सं. **जिघृक्षा > जिघीर > जिगीर** = पदार्थ घेण्याची इच्छा (भा. अ, १८३४); अर. **झिक्र्** = स्मरण ; पेकाम. **जिकीर** (राज. ५-१२); **झिकर** (रा. ७-१५३);

अकाम. **जिकीरीस येणें** = अडचणणें, मेटाकुटीस येणें. अरबी मूळ मानणें हें अधिक सयुक्तिक. संस्कृत व्युत्पत्ति वृथा पाण्डित्यप्रकर्ष दाखविते.]

जिक्क वि. त्रासलेला, कंटाळलेला. Tired out, wearied,

[अर. **दिक्क** = त्रस्त ; फा. **जिक**, **जिक्क** = ओरड ; पेकाम. **जिक्क** (रा. ६-४९७) ; अकाम. **जिक जिक**, **जिग जिग** = त्रास, ओरड.]

जिगर वि. जिवलग, जीवश्चकंठश्च (स्नेही). (A) bosom or dear (friend).

[फा. **जिगर्** = हृदय, जीव, मन, 'प्रतिहृदय असा मित्र' हा लक्षणेनें अर्थ झाला. पेकाम. **जिगर** (रा. ६-३८२) ; अकाम. **जिगरदोस्त** असा प्रयोग फार आहे. दोन्ही एकाच भाषेंतील व एकाच अर्थाचे शब्द आहेत. अर्थात आधिक्य यावें म्हणून द्विरुक्ति केली आहे.]

जिगीषा स्त्री. जिंकण्याची इच्छा, वरचढीची हाव, स्पर्धा. Desire to overcome, emulation.

[सं. **जी** (सन्नन्त अभ्यास), **जिगीषा-जेतुम्** इच्छा ; अकामसा. (वि) **जिगीषु** = विजयाची इच्छा करणारा.]

जिंक(णें) सक्रि. जय मिळविणें, पराभव करणें, दडपणें. To overcome, to defeat, to conquer, to subdue.

[सं. **जिनाति** ; पा. **जिनाति** ; प्रा. **जिणेइ** ; ओ. **जिणिबा** ; सिं. **जीत्** ; का. **झेन्** ; देप्रा. **जिअक्क** > म. **जिंक**.]

जिजी स्त्री. आजी, मोठी बहीण. A respectful term for an elderly female.

[सं. **आर्या** ; प्रा. **आज्जा** ; हिं. **जिज्जी** ; पं. **जीजी** ; गु. **जीजो** (आजा) ; **आर्य** > **आज्ज** (**अज्ज**), > **आजा**, ह्याच्याशीं संबद्ध आहे. शको. कार जी ! जी ! अशी व्युत्पत्ति देतात ! ही मान्य होण्यासारखी नाहीं.]

जिंजी पुं. दक्षिणेंतील एका किल्ल्याचें नांव. A fort in the Carnatak.

[सं. **शृंगी** (टेकडी) ; तामी. **शिंगि** > **शेंगी** > **झेंगो** > **जिंगी** > **जिंजी**.]

जिण(णें) सक्रि. जिंकणें. To conquer.

[सं. **जी** (जिनाति) ; पा. **जिनाति** ; प्रा. **जिणेई** ; ओ. **जिण** ; का. **झेन्** ; याकाम. **जिणे** (नरुस्व. २८३) ; जिणें पहा.]

जिणें न. जीवन, आयुष्य, प्राण, जीवित. Living, life.

[१ सं. **जीवनम्** ; प्रा. **जीवणँ** ; गु. **जिव** ; हिं. **जिना** ; २ सं. **जीवति** ; प्रा. **जिअइ**, **जीअन्त** ; गु. पं. **जीव** ; सिं. **जि** ; हिं. **जी** ; बं. **जी** ; का. **झव** ; याकाम. **जिणी** (जिवंतपणा, टवटवी. उगी. ४४), **जिता** (जिवंत, नरुस्व. ७८०) ; अकामग्रा. **जिता**.]

जित(णें), **जिंत(णें)** सक्रि. जिंकणें, जय मिळविणें. To conquer, to win.

[सं. **जीत** (नाधा.) ; हिं. **जित्ना** ; पं. **जित्तणा** ; गु. **जीतवूँ** ; याकाम **जिंतिलें** (जिंकिलें) ; अकामग्रा. **जितणें**, **जित**, **जिंत**.]

धुळ झाडींवन देशु दिधला सेजा:
जिंतलेया राजाचा ॥ नरुस्व. १४८

जितका वि. जेवढा, ज्या प्रमाणाचा. Which extent.

[सं. **यावत्कः** ; प्रा **जित्तिअ**, **जित्तिल** ; याकाम. **जितुला**, **जेतुला**, (हीं रूपें प्राकृत रूपांवरून सिद्ध झालीं.) ; याकाम. **जेतुला** = जितका ; अकाम. **जितपत** = जिथपावेतों, जितकें, जेवढें.]

जेतुले विडे देवों लागे: तेतुलेया पानां धूं निगे ॥ नरुस्व. ६८७

जितराप,-ब न. पीक, शेत, बागाईत. Crop.

[सं. **जित्रप**, √**जीव्**, **जीवत्**, **जिवंत** (शेत, पीक किंवा जनावर.]

जितवण, जिताणें (करणें) न. सजीवत्व, जिवंतपणा, (त्यावरून लक्षणेनें) जिवंतपणाची खूण, ओंवाळणें, अक्षौण करणें. Life, an indication of being alive, to wave light.

[सं. **जीवत्रत्वम्** ; प्रा. **जीवत्तण** (वर्णविपर्यय) ; अकाम. **जितवण**, **जिताणें**, **जितवणी** = जिवंत पाणी.]

जिता वि. जिवंत, वाहणारा, हलणारा, अस्थिर, चंचळ. Alive, (water) flowing from a spring.

[सं. **जीवन्त** ; प्रा **जीवन्त** ; बं. **जियन्त** ; ओ. **जिअन्ता** ; हिं. **जीता** ; गु. **जिवतु** ; याकाम. **जिता** (चैतन्ययुक्त, जिवंत) ; अकाम. **जिता**, **जिती** = सजीवत्व, चैतन्य. सं. **जीवतृ** (स्त्री. **जीवत्री**) ; प्रा. **जीअत्ती** > जिती.]

वनाभोवतें जित कुंप कैसे : कंदर्प केतकीचे ॥ नरुस्व. ७८०.
धैर्याचिया चांगचांगी । चिंतवणी जिती आंगी । वाहे जो कां ।
ज्ञा. १८-६३८.

जिथें अ. जेथें, ज्या ठिकाणीं. Where, at which place.

[सं. **यत्र**; प्रा. **जित्त**; अप. **जित्तअँ**; अकामसा. **जिथून** = ज्या जागेपासून; **जिथचा** = ज्या ठिकाणचा; **जिथपर्यंत** = जेथपर्यंत.]

जिद स्त्री. हट्ट, आग्रह, निकड, उगाच विरोध. Perverse opposition.

[अर. **जिद्द** = प्रयत्न; पेकाम. **जिद्द, जीद** (खरे ६-३१२८); अकामसा. **जिद्दखोर** = आडमुठा, हट्टी (**जिद्द + खोर** < **खुर्दन्**).]

जिन्न पुं. तीर्थंकर, जैन साधु. A *jain* sadhu.

[सं. **जिनः**]

जिनगर पुं. जीन शिवणारा, खोगीर तयार करणारा. (हे कल्हई करतात व प्रकाशाची दारू तयार करतात). An artisan preparing horse-saddle, one who tins utensils.

[फा. **झीन् + गर.**]

जिंदगी, जिनगी, जिनगानी स्त्री. जीवित, जन्म, आयुष्य, निर्वाह, मालमत्ता. Living, livelihood, estate.

[फा. **झिंदगी, झिदगानी**; पेकाम. **जिनगानी, जिन्दगानी, जिनगानी** (खरे १-१७८-७-३५७९) ह्या शब्दाच्या अर्थांत फरक कसा पडला आहे हें वर दिलेल्या अर्थांवरून स्पष्ट होईल.]

जिन्नस पुं. पदार्थ, वस्तु, चीज. An article, a thing (generally).

[अर. **जिन्स्**; अकामसा. **जिन्नसखाना** = कोठार; **जिन्नस पानस** = जिन्नस पदार्थ वगैरे (**पान्नस** = पदार्थ); (**एक**) **जिनसी** = एक सारखा. एकच पदार्थाचा बनलेला; **जिन्नस-अज्नास** = माल (**अज्नास्** हें अनेकवचन **जिन्स्** ह्या शब्दाचें).]

जिन्‌रिक्शा स्त्री. एक वाहनाचा प्रकार. A jinriksha.

[जपा. **जिन्–रिकि – शा** = मनुष्य – शक्ति – वाहन मनुष्याच्या शक्तीनें ओढलें जाणारें वाहन.]

जिमखाना पुं. क्लब, खेळण्याचें ठिकाण. Gymkhana.

[*Eng.* Gymkhana. हा शब्द फार अलीकडील आहे. इ. स. १८६१ सालीं रुरकी येथें प्रथम पहिला संघ काढला. हा शब्द काल्पनिक आहे. कोणी असें म्हणतात कीं **गेन्द–खाना** = चेण्डू खेळण्याची जागा हा शब्द मूळ असून त्यापासून जिमखाना हा शब्द बनला. नंतर त्याला ‘ क्रीडालय ’ असा अर्थ आला. दुसरी एक व्युत्पत्ति **जमात–खाना** असा शब्द देतात पण ती सयुक्तिक वाटत नाहीं.]

जिंमा स्त्री. पुं. पत्कर, हमी, जबाबदारी, पत्करलेलें काम. Charge, trust, responsibility,

[अर. **झिम्मा**; अकामसा. **जिम्मेदार** = हमीदार, जबाबदार (< फा. **झिम्मादार**).]

जियाफत स्त्री. आदरातिथ्य, मेजवानी, नजर, भेट. Hospitality, a present.

[अर. **झियाफत्**.]

जिर(णें) अक्रि. मुरणें, नाहींसें होणें, पचणें, दबणें, खालीं ठेवणें. To soak or sink into, to be absorbed, to go off.

[सं. १ **जॄ** ९ वयोहानौ; प्रा. **जीरइ**; २ **स्त्रिव्** ४ गतिशोषणयोः ३ **सं + हि** = लज्जेनें जिरणें, (**त्री** १ अभिभवे; उदा. त्याची जिरली.); पं. **जीर्णा, जीउर्णा**; सिंह. **दिरणवा, दिरिणी**; का. **झिरिन्**; हिं. **जीनी**; अकामसा. **जिरव(णें)** (णिच्) = पचवणें, मुरवणें; **जिरवण** = पाचक औषध; **जिरवणूक** = मुरविणें, अभिभव.]

जिरा पुं. एक मसाल्याचा पदार्थ. Cumin-seed.

[सं. **जीरकः**; प्रा. **जीरअ**; बं. ओ. **जिरा**; हिं. पं. **जीरा**; पं. सिं. **जीरी, जीरो**; गु. **जीरूं**. फा. **झीरा** = मसाल्यांत घालण्याचा एक पदार्थ. संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे.]

जिराईत वि. नुसत्या पावसावर पिकणारें (शेत). (A land) fit for dry agriculture.

[अर. **झिराअत** = पावसाच्या पाण्यावर होणारी लागवड; **जिरायत** म्हणजे उपरा, परकी व **बागाइत** म्हणजे अस्सल, मूळचा असाहि अर्थ आहे, परंतु तो लाक्षणिक दिसतो. प्रतियोगी शब्द **बागाईत.**]

जिरातखाना पुं. शस्त्रास्त्रें ठेवण्याचें कोठार, शस्त्रागार. A depot or establishment for weapons.

[फा. **झिरिह्** = चिल्खत्, **झिराव्** = लढणें; शिकाम. **जिरे, जिरेटोप** (चित्र. ११२).]

जिराफ पुं. प्राणिविशेष, उष्ट्रव्याघ्र. Cameleopard.

[फ्रें. **जिराफ**; इता. **जिरफ्फ**; स्पॅ. पोर्तु. **गिरफ**; जुनी स्पॅनिश. **अझोराफा**; फा. **झुर्नाफ**; अर. **अलझुराफ.**]

जिरे, जिरी न. स्त्री. चिलखत. An armour.
[फा. **झिरिह्** = चिल्खत ; शिकाम. **जिरे** (चित्र. ११२); अकामसा. **जिरेटोप** = लोखंडी तारांची टोपी, शिरस्त्राण.]

जिलीब स्त्री. स्वारी, मिरवणूक, लवाजमा, समुदाय. Retinue, suite, train.
[फा. **जिलब्** = शृंगारलेला घोडा, **जिलबीचा घोडा** = कोतवाली घोडा. **जिलीबदार** = घोड्याचा लगाम धरणारा सेवक (फा. **जिलाउदार, जिलाउ** = लगामाची दोरी.)]

जिलेबी, जिलबी स्त्री. एक प्रकारचें पक्वान्न. A sweetmeat.
[अर. **झलाबिया** ; फा. **झलीबिय** ; हिं. **जलेबि, जिलेबि.**]

जिल्काद पुं. मुसलमानी पंचांगांतील अकरावा महिना. The eleventh month of the Muslim calendar.
[अर. **झील्क़अदा.**]

जिल्हइ, जिल्हे स्त्री. चकाकी, उजळा, तेज. Glitter, gloss, polish.
[अर. **जिला = जला + इ** ; फा. **जिल्वा** = तेज + इ.; शिकाम. **जिल्हे** (राज. १९-५३); अकाम. **जिल्हई.**]

जिल्हा पुं. प्रांताचा भाग. A division, a district.
[अर. **झील** = वरकडी, **झीला** = भाग, अवयव व नंतर देशाचा भाग. ब्रिटिश हिंदुस्थानांत असे प्रांत भाग करून त्यावर कलेक्टरासारखे अमलदार नेमले आहेत.]

जिल्हेज पुं. मुसलमानी पंचांगांतील बारावा महिना. The twelfth month of the Muslim calendar.
[अर. **झील् हिज्जा.**]

जिवणी स्त्री. तोंड, जेवणी, (तुच्छतात्यंजक) जीभ (लक्षणा). The mouth, the tongue.
[सं. **जेमनी** = जेवण करण्याचें साधन.]

जिवती स्त्री. देवताविशेष, मुलाची माता. A goddess.
[सं. **जीवंतिका.**]

जिवलग वि. निकटचा, प्रेमाचा (मित्र), जीवश्च कंठश्च. Darling.
[सं. **जीव + लग, जिवाला** = प्राणाला जवळ असा.]

जिवाणूं न. (प्रांतिक) सापाच्या जातीचा प्राणी, क्षुद्र जंतु. A general term for the creature of the serpent kind.
[सं. **जीवनकम्** ; प्रा. **जीवणअँ.**]

जिवाळा पुं. देह, जीवंतपणा. सजीव. The life.
[सं. **जीवला, जीव + आलय** ; याकाम. **जिवाळें, जिवाळी** = लहान कमळ (लक्षणा), जीव असलेली वनस्पति.]

चौकावरि जिवाळी । नवरत्नाचीं । ऋ. ७४.

लवणाची मासोळी । जरी होय जिवाळी । अमृ. ७-३६

जिव्हा स्त्री. जीभ, ज्वाळा (अग्नीची जीभ). The tongue, a flame (fig.).
[सं. **जिव्हा** ; अकामसा. **जिव्हाग्र** = जिभेचें टोंक,– शेंडा ; **जिव्हादंश** = तोंडीं–लावणें (ल.); **जिव्हादोष** = भाषणांतील दोष, रुचीमधील वैगुण्य.]

जिव्हार–री न. स्त्री. कोमळ अवयव, हृदयाचा आंतील कोपरा, काळीज. A delicate or highly sensitive part the heart.
[सं. **जीव + आर** (?), **जीव + आलय. जीवाल**– नखाच्या लगतचा कोमल नाजुक भाग, ह्याची उपपत्ति निश्चित कोणती असावी ? याकाम. **जिव्हार** (अंतःकरण, ज्ञा. १२-३०).]

ते आडिविया कातरी भेदितः जिव्हार कामुकांचें ॥
नरुस्व. ११४

जिव्हाळा पुं. उगम, झरा, (लक्षणा). जीवित, प्राण, माया, प्रेम. Spring, source, fountain-head.
[सं. **जीवला** ; प्रा. **जीवाल** (?); जिवाळा पहा.]

जिहाद स्त्री. धर्मयुद्ध (मुसलमानी धर्मासंबंधीं). A religious war.
[अर. **जिहाद्** = प्रयत्न.]

जिज्ञासा स्त्री. जाणण्याची इच्छा, कुतुहल, ज्ञानाची इच्छा. Desire of knowledge, curiosity.
[सं. **ज्ञा**, (सन्नन्त नाम–जिज्ञासा), अकामसा. **जिज्ञासु** = ज्ञानाची इच्छा करणारा.]

जी प्र. एक आदरार्थी प्रत्यय. A honorific termination.
[सं. **१ जीवक, जयिन्** ; प्रा. **जइ** (?); **२ आदित्य** उदा. शिवादित्य>शिवाजी–राजवाडे); गु. पं. हिं. **जी; सिं. जीउ, जीक.**]

जी अं. लावणी, पोवाडा ह्यांतील पादपूरणार्थक किंवा संमतिदर्शक अव्यय. An expletive.

जीत स्त्री. जय. Victory.
[सं. **जयत्** ; हिं. **जीत्** ; पं. **जीत्त** ; गु. **जीत्** ; याकाम. **जीत** (नरुस्व. ७८०)]

जीद स्त्री. निकड, आग्रह. Pressure, urgency.
[अर. **जिद्द.**]

जीन न. खोगिराचा एक प्रकार, पलाण, लोकरीचें जाड कापड. A saddle.

[फा. **ज़ीन** ; अकामसा. **जिनगर** = जिनें तयार करणारा ; **जीनबंदी** = खोगिरें चढवून तयारी (पेकाम. **जीनबन्दी**– खरे. ७-३४९८).]

जडित जीन तया पृष्ठीं मुक्ते सभा १४-७८

जीना पुं. दान, जिंकिलेला जिन्नस. An object, a present, a grant.
[**सं. जी, जि १** जये ; याकाम. **जिनि** (उगी. ४४)]
कवणातें मागावा जीना ॥ भाए. १३१.

जीभ स्त्री. जिव्हा, रसनेंद्रिय. The tongue.
[सं. **जिह्वा, जिह्विका** ; प्रा. **जिब्भा, जिब्भया** ; जैनप्रा. **जिब्भा, जीहा** ; बं. **जीभ** ; ओ. **जिभ** ; हिं. **जीभ** ; सिं. **जिभर** ; गु. **जीभ्.** ह्यावरून काय कल्पना करावयाची ? संस्कृत शब्द अगोदरचा आणि प्राकृत नंतरचा ? वर्णप्रक्रियेच्या नियमाप्रमाणें पाहिलें तर ‘ जिब्भा ’ हा शब्द अगोदरचा दिसतो. ‘ ब्भा ’ नंतर ‘ व्हा ’ होणें शक्य आहे. ‘ व्हा ’ चा ‘ ब्भा ’ होणें हें अशक्य दिसतें. द्राविड शब्द एखादा मूळ आहे कां इराणी मूळ आहे ? ग्रीयरसन. पिशा. भा. पृ. ७८ ; लाक्षणिक प्रयोग पुढीलप्रमाणें रूढ आहेत ; अकामसा. **जीभ काढणें** = खाण्याची इच्छा दाखविणें ; **जीभ काढून बोलणें** = अवास्तव बोलणें ; **जीभ चुरचुर बोलणें** = अयोग्य बोलणें ; **जीभ जड होणें** = अस्पष्ट उच्चार होणें. **जिभट** = जीभ सैल सोडणारा, वाचाळ, बोलका. (सं. **जिव्हा + ट** ; प्रा. **जिब्भा + ट** ; याकाम. **जिभट.**).]
मग राया मेटविला किन्नरू जिभट्ठ : दिव्य रत्नांचा ॥
नरुस्व. १३७.

जीर्ण वि. जुनें, फाटलेलें. Old and decayed, tattered.
[सं. **जॄ** ९ वयोहानौ ; अकामसा. **जीर्णज्वर** = जुना ताप ; **जीर्णोद्धार** = जुन्या इमारतीची डागडुजी करणें.]

जीव(णें) अक्रि. जगणें. To live, to exist.
[सं. **जीव् १** प्राणने ; अकामसा. **जीवत्, जीवंत** = जिवंत असलेला, सजीव ; **जीवन** = आयुष्य, पाणी ; **जीवन्मुक्त** = जिवंतपणीं परब्रह्माचें ज्ञानाचा लाभ ; **जीवविणें** = जिवंत करणें ; **जीविका** = उपजीविका ; **जीवित** = आयुष्य.]

जीव(णें) सक्रि. संतुष्ट करणें. To please, to satisfy.
[सं. **जीव् १** प्रीणने (**जिन्वति, जीव्यते**) ; याकाम. **जा, जिआवें > ज्यावे > जावे.**]
आणि आंगा बळ यावें । ना तरि क्षुधा जावें (जिआवें) कां जिभेचे पुरावे । मनोरथ ॥ ज्ञा. १८-१०२४.

जीव पुं. प्राण, जीवित, किडा प्राणी, सचेतनत्व–शक्ति–तेज. Life, an animate creature, vigour, mettle.
[सं. **जीव** ; प्रा. **जीवो, जीअ** ; पं. सिं. **जीउ** ; गु. हिं. **जी** ; का. **झिव झुव** ; अकाम. **जीव अर्धा होणें** = घालमेल होणें, दमणें ; **जीव आटणें** = त्रास होणें, थकणें ; **जीव रांगणें** = काळजी वाटणें ; **जीव कीं प्राण करणें** = फार ममता करणें ; **जीव खाणें** = त्रास देणें ; **जीव खालीं पडणें** = काळजींतून मुक्त होणें ; **जीव घेऊन पळणें** = जीव बचावण्यासाठीं पळणें ; **जीव टाकणें** = निराश होणें ; **जीव ठिकाणीं नसणें** = अस्वस्थ होणें ; **जीव देणें** = मरणें, आत्महत्या करणें ; **जीव पोळणें** = दुःख होणें ; **जीव भांड्यांत पडणें** = काळजी नाहींशी होणें ; **जीव सोडणें** = मरणें, उत्कंठा लागणें ; **जीवाचा धडा करणें** = साहस करणें ; **जीवाचें रान करणें** = फार त्रास घेणें ; **जीवापाड** = पराकाष्ठेची मेहनत ; **जिवाभावास** = स्वतांला ; **जीवें मारणें** = हत्या करणें, ठार मारणें. **जीवकोश** = शरीर ; **जीवघेणा** = त्रास देणारा, गांजणारा ; **जीवजंतु** = कीटक ; **जीवदशा** = आयुष्य ; **जीवयोनि** = क्षुद्र प्राणी ; **जीवशक्ति** = प्राणशक्ति ; **जीवसृष्टि** = सचेतन सृष्टि ; **जीवश्चकंठश्च** = जिवलग मित्र ; **(एक) जीव** = एकत्र मिश्रण, समरूपी.]

जीह(णें) अक्रि. जिवंत राहणें-असणें. To live.
[सं. **जीव् १** प्राणधारणे.]
पाणी मुदला झाडा जाये । तृण तें प्रसंगें जीहे । तैसे येकां बोलिलों होये । सर्वां हीं हित ॥ रा. ज्ञा. १७-२१७

जुअ पुं. युग्म, जोडी. A pair, a couple.
[सं. **युग** ; प्रा. **जुअ, जुग** ; अकाम. **जुग** = जुळें ; **जुगणें** = जुगणें, एकत्र होणें.]

जुई स्त्री. एक पुष्पलता. A flower-creeper.
[सं. **यूभिका, यूथिका** ; प्रा. **जूहिआ** ; बं. ओ. **जुइ** ; हिं. **जूही** ; गु. **जुई** ; ने. **जुइ**.]

जुगत, जुगूत स्त्री. युक्ति, कल्पना, कौशल्य. Art, nicety, skilfulness.
[सं. **युक्ति,**√**युज्** ७ योजने.]

जुगार पुं. द्यूत, जुग्याचा खेळ. Gambling, dice-throwing.
[सं. **द्यूतकार** ; प्रा. **जूआर**. मराठीमधील '**ग**' ची उपपत्ति लागत नाहीं. आमच्या मतें प्राकृतमधील रूपाबद्दल संभ्रम झाला असला पाहिजे. प्राकृतरूप '**जूअकार**' किंवा '**जूअआर**' **जूअगार** असें नियमानें झालें पाहिजे. परंतु दोन '**अ, आ,**' सान्निध्यानें कसे येतील असा संभ्रम होऊन एक गळला. परंतु मराठींतील '**ग**' नें त्याचा अवशेष ठेविला. अशी पारंपरिक व्युत्पत्ति आहे. परंतु हा शब्द पोर्तुगीज आहे असें कांहीं विद्वान म्हणतात.].

जुजबी वि. कामचलाऊ, किरकोळ, तात्पुरता. Slight, flimsy,
[अर. **जुझ्वी** ; फा. **जुझ्बी**<अर. **जुझ्ई** ; पेकाम. **जुज्बी** (रा. १८-३१); अकाम. **जुजबी**.]

जुझ(णें), जुज(णें) अक्रि. लढणें, भांडण करणें. To fight, to contend with.
[सं. **युध्** (**युध्य**); प्रा. **जुज्झ, झुज्झ** ; हा धातु प्राकृत व मराठी भाषांत **विकरणासह** आला आहे. गु. **झुज, झुझ** ; पं. **जूज, जूझ** ; हिं. **जूझ**; का. **योद** ; आर्मे. **जुज** : याकाम. **जुझ** (उगी. ६९४), **जुझणें** (नरुस्व. ११८); अकाम. **झुज, झुंज** (अनुस्वाराची उपपत्ति काय ?).]

जुंझार वि. लढाऊ, लढाऊ वृत्तीचा. Skilled or fond of war, warlike.
[सं. **युध्** (**युध्य, युद्ध**); प्रा. **जुज्झ** + **आर** (<**कार**); याकाम. **जुझार** (उगी. २४१); शिकाम. **झुंजार, झुंझार** (न. दम.); अकाम. **झुंझार**.]

दळी वसंता ऐसे जुझारः म्हणौनि जिणें देवातें ॥
नरुस्व. ७६७.

जुड(णें) अक्रि. एकत्र होण, जुळणें, मिळणें, चिलगणें. To unite or combine together.
[सं. **जुड्, युट्**. १,१० प्रेरणे, ६ बंधने ; अकामसा. **जुडगा, जुडा** = जुडो, भारा, समुदाय ; **जुडी** (**योटिका**) = लहान जुडा.]

जुदा वि. वेगळा, निराळा. Separate, apart.
[फा. **जुदा** ; पेकाम. **जुदागी** (रा. १०-१६५); अकामसा. **जुदाई, जुदागी** = वेगळीक, निराळेपण, अंतर.]

जुना वि. पूर्वीच्या काळचा, प्राचीन, जीर्ण. Old or ancient, not recent, tattered.
[वैसं. **जूर्ण** ; सं. **जीर्ण** ; प्रा. **जुण्ण, जिण्ण** ; गु. **जूनूं** ; सिं. **जुनो** ; हिं. **जून, जौन** ; सिं. **दुणु** ; अकामसा. **जुनाट** = जुना ; **जुनापुराणा** = जुना (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द) ; **जुनेर, जुन्हेर**–जुनें लुगडें. [सं. **जुण्ण** + **चीर,–चीवरम्**].]

जुप(णें), जुंप(णें) सक्रि. गाडीच्या जुवाला जोडणें, जोडणें, आरंभ करणें. To yoke, to join, to apply.
[सं. **गुफ्, गुफ्** ६ ग्रथने, (अभ्यास) **जुगुंफ्, युप्** १ एकीकरणे, समीकरणे; प्रा. **जुप्प, जुउप, जुउंप**] गु. **जुंपवूं** ; अकामसा. **जुंपण,-णी** = जुंपणें, आरंभ (लक्षणा).

जुमस स्त्री. भय, धास्ती, कच. Fear, terror.
[फा. **गुमान** = कल्पना ; **जुंबीश्** = गति.]

जुमान पुं.स्त्री. हार (खाणें), धाक, दरारा, पर्वा. Awe, reverence.
[फा. **गुमान** = कल्पना.]

जुमान(णें) सक्रि. पर्वा करणें, मान देणें. To mind, to regard.
[फा. **गुमान** > **जुमान** (नाधा.)]

जुंप(णें) सक्रि. जोडणें, बांधणें. To yoke, to join.
[सं. **युप्** ; प्रा. **जुप्पइ** (ब्लोक.); सं. **युनक्ति, युञ्जति** ; पा. **युञ्जति**; प्रा. **जुञ्जइ** ; सिं. **जुम्बणु** ; गु. **जुपवुँ** ; जुपणें पहा.]

जुंबाड न. बुचडा (केंसाचा), गुंतागुत, झुबगा, जुडगा. A tuft of hair, a cluster, a bundle.
[सं. **स्वंब्**. १ आश्लेषणे ; प्रा. **झुंब** ; याकाम. **जुंबाडा** (समुदाय, झुबका.)]

माथा फडैचीं जूंबाडें: दिखाचिया ज्याळा वमीति तोंडें ॥
नरुस्व. २०५

जुम्मा(मशीद) स्त्री. एका मशिदीचें नांव. The name a mosque.
[अर. **जमा, जमूअ** = गोळा करणें ; एकत्र प्रार्थना म्हणण्याचें ठिकाण.]

जुलाव पुं. रेंचक, ढाळक, ढाळ. A purgative.
[अर. जुल्लाब.]

जुलूम पुं. पीडा, त्रास, अन्याय, जबरदस्ती, छळ, बळजबरी. Tyrrany; oppression.
[अर. झुल्म ; अक़ामसा. **जुलुमजबरी** = बलात्कार (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

जुलूस पुं. सिंहासनावर बसण्याचा समारंभ, राज्यारोहण, किंवा त्याचें साल. Cornation or the year of it.
[अर. जुलूस ; पेकाम. जुलुस (रा. १-२७).]

[1]जुंवा, जुवें, जुवार पुं. फासा, फाशाचा खेळ. Dice or playing with dice.
[सं. द्यूत ; प्रा. जूअ ; सं. **द्यूतकार** ; प्रा. **जुआर** ; गु. जुवुं ; सिं. जुवा ; पं. हिं. बं. जुआ ; सिं. दुव, दू ; अकामसा. **जुवेबाज** = जुगारी. जुगार पहा.]

[2]जुंवा पुं. सांधा, जोड. A joint.
[सं. युज् ७ संयोजने.]

जुवारी, ज्वारी स्त्री. जोंधळा, धान्यविशेष. Jwari corn.
[सं. **यव** (?) ; देप्रा. **जुआरि, जोण्णलिआ, जोवारी**–धान्यं, जोवारी शब्दोपि देश्य एव (१३०–१०) ; गु. **जुवार** ; सिं. **जुवारि** ; हिं. **जुवारी**. एका देशी शब्दापासून ‘ जुवार, ज्वारी ’ हे मराठी शब्द आले व दुसऱ्या देशी शब्दापासून ‘ जोंधळा ’ हा मराठी शब्द आला. ऑस्ट्रिक भाषांपैकीं Sekoi ह्या भाषेंत Jawa असा शब्द आहे. त्याचा तर ‘ **यव** ’ शीं व **ज्वारी**शीं संबंध नसेल ना ?]

जुळ(णें) उक्रि. संयोगणें, जमणें. To put together.
[सं. **युगुल**, √**युज्** ७ योजने ; प्रा. **जुऊल** (नाधा.) ; पं. **जूला** ; सिंह. **युवक** = जोडी ; अकामसा. **जुळणी** = संयोग ; **जुळी** = गड्डी जुडी ; **जुळवि(णें)** = एकत्र करणें ; **जुळवाजुळव** = एकत्रित करणें, व्यवस्थित मांडणी.]

जुळें न. जोडी, एकदम जन्मलेलीं दोन मुलें. Twins.
[सं. **जुगल** (न) ; प्रा. **जुअल** (न) ; पं. **जूला** = जूं ; सिं. **युवल** = जोडी ; याकाम. **जुंवळ**.]

[1]जूं न. जोकड. Yoke or burden.
[सं. **युग्मम्, युग** (√**युज्**) ; प्रा. **जुग, जुग्ग, जुव** ; हिं. **जू** ; सिंह. **यु** = दोन महिन्याचा काल ; याकाम. **जूं** (नरुस्व. ७३८).]

[2]जूं, जुवा न. पुं. द्यूत, जुवा. Dice.
[सं. **द्यूतम्** ; प्रा. **जूअँ** ; गु. **जुवुँ** ; सिं. **जुवा** ; पं. हिं. बं. **जुआ** ; सिंह. **दुव** ; अकाम. **जुवा**.]

जूग न. युग्म, जोड, जोडपें. A pair, a combination.
[सं. **युग्म, युग** ; प्रा. **जुम्म जुग्ग** ; सिं. **जुगु** ; हिं. **जुग** ; याकाम. **जुग** (= होडी–नरुस्व. ७२०) ; अकाम. **युग, जूग**.]

जूट स्त्री. एकी, मैत्री, मंडळी. Combination, a party, a club.
[१ सं. **यूट्, जूट्** (?), **यूथ** ; प्रा. **जूह** ; २ सं. **युक्त** ; प्रा. **जुत्त**.]

[1]जें सर्व. संबंधी सर्वनाम. Which.
[सं. **यत्** ; झें. **य, या, यत्** ; *Lat.* jam ; *Teu.* ja ; *HG.* jener ; गु. **जे** ; पपं. **जे** ; सिं. पं. **जो** ; अकाम. **जो** (पुं.), **जी** (स्त्री.), **जेआ>जा>ज्या** (सा. रूप), **जेउता** = जेवढा, (सं. **यावत्** ; प्रा. **जेत्तिअ**) ; **जेथें** इत्यादि.]

[2]जे अ. कीं, ज्यामुळें. That.
[सं. **यत्** ; प्रा. **ज**.]

[3]जे अ. आदरार्थी संबोधनी अव्यय. A particle of address.
[सं. **जय** ; गु. **जे** ; अकाम. **जे**.]

जेजाल स्त्री. नळीची बंदुक. A long musket.
[फा. **जेजाल** ; हिं. **जंजाल** ; अकामसा. **जेजालबारदार** = जेजाला जवळ असणारा सैनिक.]

जेठ वि. वडील, वयानें मोठा (भाऊ). The elder (brother), senior.
[सं. **ज्येष्ठ** ; प्रा. **जिट्ठ, जेट्ठ** ; गु. पं. हिं. **जेठ** ; सिं. **जेठु** ; का. **झेठु** ; पं. **जेठ** = वडील दीर ; बं. **जेठ** = वडील चुलता ; हिं. **जेठा** = वडील ; सिंह. **देटु** = उत्तम ; अकामसा. **जेठणें** = आवळणें ; **जेठा** (जेठा मारून बसणें.) **जेठी** = पहीलवान ; **जगजेठी** = ईश्वर ; **जेठवड** = ज्येष्ठ ; **जेठा** = एक प्रकारचा रंग.]

जेडलां अ. जेव्हां. When.
[सं. **यावत्** ; प्रा. **जेत्तिल**, अप. **जेत्तुल** ; याकाम. **जेत्तुलं** (नरुस्व. ६८७) ; अकामसा. **जेढोळ** ; **जेणें, जेतुका, जेतुलाले**.]

जेती, जेतुला वि. जितका. As much, as many.

[सं. इयत्, इयत्कः; जेत्तिअ, 'एत्तिअ' ह्याच्या धर्तीवर सिद्ध झाला. 'ल' हा विशेषणाचा प्राकृत प्रत्यय; गुं. जेटलो; सिं. जेतिरो, जेतरो; पं. जिती, जितला, जितला; का. युत्; हिं. जितना; बं. जत; ओ. जेते; याकाम. जेतुला; (नरुस्व. ६८७); पेकाम. (काव्य) जेतुल.]

जेथें, (तेथें, कोठें, येथें) अ. ज्या ठिकाणीं (त्या–कोणत्या–ह्या ठिकाणीं.) Where or at which place.

[सं. यत्र, तत्र, कुत्र, अत्र; पा. यत्त, तत्त, कत्त, अत्त; प्रा. जत्थ, तत्थ; भामहानें कत्थ, जत्थ, तत्थ अशीं कालवाचक रूपें दिलीं आहेत तीं बरोबर नाहींत, कारण प्राकृतांत 'त्थ' असा सप्तमीचा प्रत्यय नाहीं. परंतु ते अपभ्रष्ट उच्चार असावेत काय? अन्त्य 'एं' ची उपपत्ति प्राकृतमध्यें "म्मि" असा एक प्रत्यय लागतो त्यापासून आहे कां?]

जेमतेम अ. कसें तरी, पराकाष्ठेनें, मोठ्या श्रमानें. Somehow or other.

[सं. यावत्, इयत्; प्रा. जेम्तेम्; हिं. जेमतेम; गु. जेमतेम.]

जेर वि. हैराण, त्रस्त, दमलेला, जाया, पराभूत. Overcome by, exhausted.

[फा. झेर्; शिकाम. जेर (सभा. ५३); जेरदस्त = दीन, हैराण (बकाम. जेरदस्त); जेरबंद = घोड्याचा पट्टा; जेरी = दुर्बलता.]

जेवढा वि. जितका, जितका मोठा. As much, as large.

[सं. यत्वत्; प्रा. जेवड.]

जेवण न. भोजन, पंगत. A meal served.

[सं. जेमन (√जिम्), प्रा. जेमण; बं. जेमन् = जेवण; हिं. जेवना, जेओना, जेमना; पं. जेऊणा; गु. जमवूँ; अकामसा. जेवणावळ=पंगत, मेजवानी; जेवणा (हात) = उजवा हात; सं. जेमनीय; देप्रा. जमणयम् (दक्षिणमङ्गम्); जेवणी = १ श्रमभोजन, २ तोंड. जेवतागण = भोजनभाऊ, फुकटखाऊ; जेवा = जेवणाचा खर्च, शिधा.]

जेवीं अ. ज्याप्रमाणें, जसें. As, like, in which kind.

[सं. यत्+इव, यथा; प्रा. जेइं, जेवीं, जिइं, जाहे, जिम्हि.]

जेव्हां अ. ज्यावेळीं, ज्या अर्थीं. When, at the time that, since.

[सं. यत्+हि,-इव, यदा+हि; प्रा. जाहे, जिम्हि, जिइं+हि.]

जै, जैं, जइं, जेवीं अ. जर, ज्याअर्थीं, जेव्हां. If, when, at the time that.

[स. यदि; प्रा. जइ; गु. सिं. पं. जे = जर; जेव्हां पहा.]

जैत, जैत्य, जैत्र पुं. जय. Success, triumph.

[सं. जयत्रम्; याकाम. जैत्र = विजय (उगी.२४०); अकाम. (कोंकणी) जैत.]

अखंड जैत देप्रमदाः संग्रांमीं सुरतांचा ॥ नरुस्व. ७३७.

जो सर्व. संबंधीं सर्वनाम. (अनुबंधी तो). Who, which.

[सं. यत्. (पुं.) यः; प्रा. जो; गु. ओ. जे; सिं पं. हिं. बं. जे, जिनि; का. यिह्; सिंह. यम.]

जों, जों अ. जंव, ज्यावेळेस. As long as, whilst.

[सं. यत्, यदा, यावत.]

जोकड न. जूं. A yoke.

[सं. योक्त्र+ट; प्रा. जोक्क+ड.]

जोख(णें) अक्रि. मापणें, वजन करणें. To weigh.

[सं. जुष् १ परीक्षणे; प्रा. जुख; हिं. जोखना; गु. जोखवूं; अकाम. जोख = भार, वजन, तुला.]

जोखीम, जोखम स्त्री. जबाबदारी, हमी, भय, धास्ती. Risk, hazard, responsibility.

[हिं. जोखिम.]

जोग(णें) सक्रि. जोडणें, मिळणें, जुगणें. To join, to put together.

[सं. युज् १० संयोजने; अकामसा. योग = संन्यास हटयोग (< योग); जोगी = संन्यासी; जोगडा = संन्यासी. योगी (निंदार्थे); जोगती, जोगतीण = यल्लमाची सेविका (< योक्त्रिका.)]

जैसें गंगेचेनि ॐ घें । ढलमलीत जें निगे सिंधुपद तेया जोगें । आन नाहीं ॥ (रा. ज्ञा. १४-३९६)]

१जोगव(णें) अक्रि. कामांत आळसावणें. To be idle at work.
[सं. जोगुह्यते (?); प्रा. जोग्ग.]

२जोगव(णें) अक्रि. पुष्ट होणें, पाळणें, सांभाळणें, पोटभर खाणें. To thrive, to take care of.
[सं. योगायते, योग्य (ना.धा.); प्रा. जोग्ग; हिं. जोग, जोगा ; पं. जोग्गा ; लां. जोगा ; सिं. जोग, जोगा; गुं. जोगुँ ; अकाम. जोगावणें, जोगवा = अंबाबाईच्या नांवाची भिक्षा.]

पूजिते दैवतें जोगावीं । गुरूतें बोलें झाकवीं ।
माये बापा दावी । निदारपण ॥ ज्ञा. १३-७९५.

जोगा वि. योग्य. Fit, proper, appropriate.
[सं. योग्य ; प्रा. जोग्ग ; गु. जोग ; सिं. जोगु ; पं. जोग, जोग्गा ; हिं. जोग, जोगा ; का. योग्य.]

जोजार(णें) अक्रि. संकटानें त्रस्त होणें, मोठें कुंटुंब पोसण्यानें त्रासणें. To be annoyed, to have a large family, to feel the burden of the maintenance of a large family.
[सं. जॄ ९ वयोहानौ ; अकामसा. जोजार = बोजा, त्रास, कटकट, जंजाळ.]

जो जो अ. झोके देतांना उच्चारावयाचा शब्द. A word used in lulling infants.
[सं. ज्योग्जीव (आशार्थे), स्वपीहि>झोइ-झोइ> जो जो (राज.)]

जोड(णें) सक्रि. एकत्र आणणें, सांधणें, जुडणें, जुंपणें, जमविणें. To join, to unite, to put together.
[सं. यौट् १ बंधने ; जुड् (णिच्) १-१० प्रेरणे ; जुट्-जुड्-बंधने ; प्रा. जोड ; गु. पं. हिं. जोड ; सिं. जोरु; गु. सिं. पं. हिं. जोड ; जोड = बरोबरीचा, जुडलेला तुकडा, लाभ, पुस्ती ; जोडका = कमावणारा, जोडणारा ; जोडकाम = दुसरें काम, जुळवावयाचें काम ; जोडता = मिळविणारा ; जोडपें = नवराबायको, युग्म ; जोडा = एकाच प्रकारचे पदार्थ (दोन), पादत्राण, जोडीदार (अर. जौराब ; फा. जोरान = पादत्राण); जोडा फाडणें = हेलपाटे घालणें (लक्षणा) ; कोणाचा जोडा कोणाच्या पायांत नसणें = घोटाळा,-अव्यवस्था होणें ; जोडाक्षर = संयुक्ताक्षर ; जोडवें (योटकम्) = पायाच्या बोटांत घालावयाचें वळें ; जोडी = संच, जोड, बरोबरी.]

जोत स्त्री. दिव्याची वात, ज्वाळा, तेज. The wick of a lamp, lustre, brightness.
[सं. ज्योतिस्, √ द्युत् - प्रकाशने.]

जोतिबा पुं. देवताविशेष, महादेवाचा अवतार किंवा स्कंदाचा अवतार (?). The name of diety.
[सं. द्यौष्पिता, ज्योतिस् < द्युति < दिव् ; ज्योतिष्मान्-द्युतिष्मान्>जोतिबा. जोतिबा देवतेपुढें अक्षय्य नंदादीप असतो.]

१जोतें न. घडीव दगडांचा बांधलेला कट्टा. A terrace of raised ground, a work of masonry.
[वैसं. योक्त्रम् ; प्रा. जोत्त ; हिं. जोत.]

२जोतें न. जूं, पट्टा. The cord or strap of a yoke.
[कान. जत्तगी.]

जोंधळा पुं. ज्वारी, धान्यविशेष. A cereal plant or its grain.
[सं. १ यावनाल, यवकणिका ; देप्रा. जोण्णलिआ (स्त्री. धान्यम्-१३०-१०), जोन्हरी ; हिं. जोन्हरी ; का. जुनळ ; तेलु. जोन्न. २ सं. 'यव'; प्रा. जव ह्या शब्दांशीं वरील शब्दाचा संबंध असावा. 'लि' हा अल्पार्थे प्रत्यय आणि 'आ' हा संस्कृत 'का' चा अवशेष असावा. आस्ट्रिक Jawa हा शब्द चिन्त्य आहे. जुवारी पहा.]

जोपाव(णें), जोपास(णें) सक्रि. काळजी वाहणें, संरक्षण करणें, देखरेख करणें. To look after, to tend.
[सं. द्योतनम्, जोगुप्यते (√गुप्), जुगुप्स (गुप्); देप्रा. जोअणं (लोचनम्-१३०-९) ; अप. जोएदि = पाहतो ; प्रा. जुप्पइ असा एक धातु आहे. परंतु ह्या धातूच्या बाबत जरा संभ्रम झाला आहे. प्रथमांश 'जो = पाहणें' ह्या धातूशीं संबंद्ध आहे व द्वितीयांश 'पा' हा ('पा'=राखणें) ह्या धातूशीं संबद्ध आहे ; गु. जोवुं ; पं. जोहणा ; हिं. जोवना, जोहना = न्याहाळणें.]

जोबन न. स्तन, कुच, तारुण्य. A breast or bubby of a woman, youth.
[सं. यौवन (< युवन्, √ यु) ; प्रा. जोव्वन ; हिं. जोबन. मराठींत शब्द हिंदीमधून आला.]

जोर पुं. शक्ति, जोर, ताकद, दाब, नेट, दण्ड, विशिष्ट व्यायाम. Strength, force, power. an exercise of the gymnasium.

[फा. **झोर्**; अ. **जौर्**; अकामसा. **जोरकस** = सशक्त; **जोरबजोर** = जबरदस्तीनें, जोरावारीनें; **जोरा** = अधिकार, सत्ता, जुलुम; **जोराव(णें)** (नाधा.) = बळावणें; **जोराबरी** = बळजबरी; **जोरी** = जुलूम.]

जोरूं स्त्री. बायको, पत्नी. Wife.

[फा. **जोरूं**; हिं. **जोरू.**]

जोव(णें) अक्रि. एकदम सांठणें, गोळा होणें. To swarm thickly.

[सं. **योजयति**; पा. **योजेति, योजापेति**; प्रा. **जोराई**; पं. **जोणा**; ळां. **जोवण.**]

जोव स्त्री. वीज. Lightning.

[सं. **द्युति, ज्योतिस्** (√**द्युत्, दिव्**); देप्रा. **जोई** (विद्युत् १३०-३); याकाम. **जौळ** = वादळ, समूह (भा. ए. ६६१).]

जोशी पुं. जोशकी करणारा भटजी. An astronomer by professioin.

[सं. **ज्योतिषिक**; प्रा. **जोइसिअ>जोशी**; गु. **जोशी, दोसी**; सिं. **जोसी**; पं. **जोसी, जोषी**; हिं. **जोषी**; का. **सिछी**; याकाम. **जोइशी** (शिलालेख); '**द्य**' हा वर्ण महत्त्वाचा आहे. ह्याची परिणति '**ज**' अशी होते. उदा. **द्यौ**-ज्यौ, **द्यौस्पितर**-Jupiter; **द्युत्**=ज्यूत, **द्युति**-जोत, **द्युतिष्मान्**-जोतिबा. मराठी दन्त्यतालव्य वर्णांची परिणति ह्याच मार्गानें झाली आहे. त्य = च, द्य = ज, थ्य = छ, ध्य = झ.]

जोहर, जोहार पुं. अग्निकाष्ठभक्षण, संकट. Undergoing the fire-ordeal.

[फा. **जोहर** = अग्निदिव्य.]

जोहार पुं. नमस्कार (करणें), अस्पृश्य लोक वरिष्ठांना वंदन करतांना हा शब्द म्हणतात, रामराम. The word of salutation (of mahars).

[सं. **जयहर** (?); प्रा. **जोहार**; याकाम. **जूहारणें** = नमस्कार करणें (नरुस्व. १२७), (ज्ञा. ११-४८५); ह्याच्या अर्थांत सामान्यीकरण व विशेषीकरण झालें आहे.]

जौळ न. समूह, वादळ. Collection, a sudden storm.

[सं. **जालम्**; याकाम. **जौळ.**

आनंदरसाचें जौळ ॥ भा. ए. ६६१.]

ज्येष्ठ पुं. महिना (हिंदूंचा तिसरा महिना). The third month in the Hindu calendar.

[सं. **ज्येष्ठ, ज्येष्ठा** = एक नक्षत्र.]

ज्योत स्त्री. जोत, तेज, वात. Wick of a lamp, lustre.

ज्योतिष न. ज्योतिर्गोलासंबंधीं शास्त्र. Astronomy or astrology.

[सं. **ज्योतिस्**, √**द्युत्**, √**दिव्**-प्रकाशने.]

जोत्स्ना स्त्री. चंद्राचा प्रकाश, चांदणें. The moon-light.

[सं. **ज्योत्स्ना**, √**द्युत्**, √**दिव्.**]

ज्वर पुं. ताप. Fever.

[सं. **ज्वर**; अकाम. **जर, ज्वर**; **ज्वरांश** = तापाचा अंश, कसर.]

ज्वारी स्त्री. धान्यविशेष. A kind of corn.

[सं. **यवप्रकार,-आकार**; देप्रा. **जोवारी** (१३०-१०); हिं. **जुआर, जवार**; **जवार, जोंधळा** पहा. ऑस्ट्रिक jawa हा शब्द चिन्त्य आहे.]

झ पुं. मराठी वर्णमालेंतील नववें व्यंजन. ह्याचें उच्चारण तालव्य व दन्त्यतालव्य अशा दोन प्रकारचें असून त्याचीं उच्चारस्थानें अनुक्रमें तालु व दन्ततालु अशीं आहेत. The ninth consonant of the Marathi alphabet.

[सं. **झ्, ध्य्, ध्व्, क्ष्, ज्**; प्रा. **झ्**;

(मध्य झ) सं. **ह्य्, य्, ध्य्, क्ष्**; प्रा. **ज्झ्**; **क्षर-झर, विक्षि (?)-विझ, संध्या-सांझ, मध्य-माझ, वंध्या-वांझ, युध्य-जुझ, वह्य-ओझें.**]

झक स्त्री. वाईट गोष्ट, गुन्हा, चुकी, भीक. Erring, blunder, begging.

[सं. **झष्, सघ्** १ हिंसायाम्; **हिक्क्** १ हिंसायाम्> **जिहिक्क**; हिं. **झक्, झष** = मासा; फा. **दक्, झदन्**; पेकाम. **झकमारणें** (खरे १-१७७); अकाम. **झक(णें)** = चुकणें, इज्जत घेणें, दिपून जाणें, थक्क होणें; **झक मारणें** = भीक मागणें, अनाठायीं काम करणें. अकामसा. **झकव(णें)**, **झाकव(णें)** = भुलविणें, थापा मारणें; (सं. **झष्**; याकाम. **झकव**-ज्ञा. २-३१६).]

झक स्त्री. तेज, चमक, लकाकी. A sudden gleam, a quick blaze,

[सं. **सम्+चक्**; हिं. **झक** = साफ; अकाम. **झकक(णें)** = झकाकणें, चमकणें; **झकझक** = चकाकी; **झकझकाट** = प्रकाश, चकचकाट.]

झकत, झक्‌त अ. आपसूख, अवश्य. Of one's own will, necessarily, whether or no.
[सं. धकित (धिगर्थे) > झकित-झकत–राज. भाअ. १८३४.]

झकपक, झकमक वि. चकाकी, स्वच्छता. Brilliance.
[सं. झगझगाय ; प्रा. झंक्कखई ; बं. झकझक ; ओ. झकझक ; हिं. झक ; गु. झगझग ; म. झगमग.]

झक्कड वि. न. हट्टी (मनुष्य). झगडा, भांडण. Stubborn, perverse. A quarrel.
[सं. यक्षट (?); प्रा. जक्खड ; हिं. झक्कड. टर्नर संस्कृत मूळ देऊं शकत नाहीं ; परंतु हा द्राविडमूळ असावा. कान. जक्ख = वांकडें.]

झंकार, झणत्कार पुं. नूपुरांचा आवाज, 'झणझण' असा आवाज. Jingling, clinking sound.
[सं. स्वनत्कार, झंकार ; प्रा. झंकार (ध्वनिशब्द); कार = शब्द.]

झक्कू पुं. विटीदांडूचा किंवा पत्याचा डाव, एक खेळ, स्त्रीशीं संभोग (लक्षणा). A term in the game of इटीदांडू, coitus (fig.).

झगट(णें) क्रि. घांसणें, आवळून धरणें, पकडणें, झोंबणें, जडणें. To collide or clash with, to seize roughly.
[सं. सं + घट्, घट्ट् १ चलने, चेष्टायाम्.]

झगड(णें) अक्रि. लढणें, भांडणें, झटपटणें. To quarrel, to contend, to contest.
[सं. संगत (?), संग्राम ; देप्रा. जगड (झगड = भांडण); हिं. झगडना ; सिं. झगिडो. ह्याच्या मुळाशीं संगम्, संगम हे असावेत. मराठी 'झ' हा वर्ण ब-याच वेळां संस्कृत 'सम्' पासून उद्भवतो. उदा. झपाट<संपात, झड<संक्षी, झोड<संक्षुद् इत्यादि. झगडा पहा.]

झगडा पुं. भांडण, वाद, खटला, लढाई, संवाद. A quarrel, a contest, a dispute, a dialogue.
[सं. संगर्त, संग्राम ; देप्रा. झगट्ट, झग्गट ; प्रा. झगड ; बं. झगरा ; ओ. झगर ; हिं. पं. झगडा ; सिं. झगरो ; गु. झगडो ; याकाम. झगडा (= भांडण. नरुस्व. २३२); अकाम. झगडाऊ = भांडखोर ; झगडी = भांडकुदळ.]

झगा पुं. स्त्रियांचा लांब परकर, पायघोळ परकर, अंगरखा, कंचुकी. A robe or gown extending to the feet.
[अर. जुब्बा ; फा. जुबा (?) (शको.); हा शब्द "सोगा" ह्या शब्दाशीं संबद्ध आहे काय ? सोगा पहा.]

झंझावात पुं. वादळी वारा, तुफान, वावटळ. A violent gust with rain, a storm.
[सं. झंझा + वात.]

झट् अ. लवकर, तेव्हांच, एकदम. Smartly, promptly.
[सं. संटक् (?), झटिति<झट् + इति ; प्रा. झडत्ति ; देप्रा. झट्ट, झव्य छडा (विद्युत्); बं. झट् (ना.); ओ. झट् (अ.); हिं. झट (ना.); पं. झट्ट ; गु. झट ; झटपट–लवकर (देप्रा. झडप्फड = लवकर).]

झट(णें) सक्रि. श्रम करणें, खस्ता खाणें, To strive strenuously, to apply earnestly.
[सं. सं + यत् १ यत्ने.]

झटक(णें) उक्रि. एकदम निघून जाणें, झाडणें, (धोतर वगैरे) सटकणें, हिसका देऊन झाडणें. To start off suddenly, to part from.
[सं. सं + तंच्, सं. + टंक् १ बंधने, संतक्ष्, उज्झटित = वाट चुकलेला ; देप्रा. झटक ; हिं. झडकना ; गु. झडको ; पं. झटक ; अकामसा. झटका, झटकारा = हिसका, झपाटा, तडाखा ; झटकार(णें) = झटकणें, झाडणें ; झटकाव(णें) = झटकणें.]

झटपट स्त्री. त्वरा. Quickness, haste.
[सं. सं + यत्, –तंक्, –टंक् ; देप्रा. झडप्पड ; गु. झटापट = घाई ; सिं. झटपटी ; हिं. झटपट = जलदीनें ; याकाम. झडकी = लवकर (नरुस्व. ३८८)]

झड(णें) अक्रि. आवाज करणें. To be in action (as a drum or gun).
[सं. सम् + ह्रद् १ शब्दे.]

झड(णें) अक्रि. पगार वाटणें. To be under brisk course of payment.
[सं. झट् १ संघाते.]

झड(णें) अक्रि. सतत चालू असणें. To continue being in smart action.

[सं. **सं + टक्** १ बंधने; देप्रा. **जअडइ** (=त्वरते–१२८-३); अप. **झडप्पडहिं** (वेगैः); सिं. **झरप**= उन्हाची तिरीप, वाऱ्याचा जोर, नशिबाचा फेरा; हिं. **झडप**= ज्योत, उष्णता; गु. **झडप**=उडी; थाकाम. **झडकी**; अकाम. **झडप**=उडी; याकाम **झडप** (नरुस्व. ४४६); **झडपड**=धडपड.]

झॅड(णें) अक्रि. कमी होणें, पडणें, क्षय होणें, गळणें, तुटून पडणें. To decline, to break, to give way.

[सं. **संसट्, संक्षी, संसद्**; देप्रा. **झट**; प्रा. **झडइ** (शीर्यते); बं. **झड़ुया**; ओ. **झरिबा**, हिं. **झडना**; अकाम. झडझड(णें)=हिडीस फिडीस करणें, वसकन् अंगावर जाणें.]

झड, झडी स्त्री. पावसाची झड, धार. Long continued rain.

[१ कान. **जिडी, जडि**=मोठी सर; तेलं. **झडि**= पाऊस, भानगड, (वि.) सतत राहणारा. २ सं. **झट्** १ संघाते; देप्रा. **झडी निरंतरावृष्टिः** (१३१–११), **झाडझडीपुवडप्पम्** (७·८४) **लतागहनम् निरन्तरवृष्टिश्च** (२६८·१); ओ. **झरी**; गु. सिं. पं. हिं. **झडी**; बं. **झड**=वादळ; याकाम. **झडं**=थंडी, शीत (नरुस्व.) ३ **झट, झट्ट** (**झत्य**) > **झड**; म. **झडझड(णें)**=धो धो पाऊस पडणें.]

तेथ तेणें अचाटें । तिहीं ठाईं हा फांटे । गुणाचेन झडझडाटें । ऊर्ध्वमूळु ॥ ज्ञा. १५–१५३.

झडक(णें) क्रि. एकदम जाणें. To start or shoot off suddenly.

[सं. संटक्,–त्वंच्,–तंच्, – श्रथ् १० प्रस्थाने; देप्रा. **झट्ट, झट्टक्क**; बं. **झटकान**; ओ. **झटकिवा**; हिं. **झटकना**; सिं. **झटको**; गु. **झॉटकवूँ**.]

झडकर,-करी,-दिनी अ. लौकर, झटकन. Smartly, quickly.

[सं. **झटिति** (**झट् + इति**); अकाम. **झडझड**= जलदीनें, त्वरेनें; **कने** हा कानडी प्रत्यय; **झडझडाट**=वेग, सोसाटा, घोष, गर्जना.]

झडती, झाडा स्त्री. पुं. तपासणी, शोध, तपास, फडशा, गांवाचा हिशेब (झाडा). A close narrow search, taking an account, the inventory taken.

[सं. **सद्** १ विशरणगत्यवसानेषु; **सादः**>झाडा.]

झडप(णें) सक्रि. फुंकून अग्नि उत्तेजित करणें, हल्ला. To fan, to blast, to affect.

[सं. **सम् + क्षिप्, संटप्** ६ उत्क्लेशे, **सम् + पत्** > **झंपत** > **झंपड** > **झडप** (व्यत्यास); प्रा. **झडप्प**=घाई; अकाम. **झडप**=झेंप, उडी; **झडपणी**=बाधा; (याकाम. **झडप**–नरुस्व. ४४६), **झडपणी.**]

कीं दिठीची झाली झडंपणी : अस्थानिये आंतु ॥ नरुस्व. ४०१.

झडपट, झटपट अ. लवकर, जलदी, शीघ्र. Smartly, quickly.

[देप्रा. **झडप्पड, जअडइ त्वरते** (१२८-३); अप. **झडप्पडइ** (वेगैः); ह्या शब्दांतहि ‘ **संपत्** ’ ह्या संस्कृत धातूची छाया पडली असावी. ह्याचें मूळ संस्कृत दिलें नाहीं. ह्याला हेमचंद्र देप्रा. म्हणतो परंतु त्याच्यामागें तो जाऊं शकत नाहीं.]

झणका पुं. रागाचा फणकारा, वेदना, दुःख. A gust of passion, a smart sting.

[सं. **स्वनत्कार**; देप्रा. **झणक्क, झणत्क**; हिं. **झनक**; गु. **झण्को**. हा ध्वनिशब्द असावा; अकाम. **झणझणाट**= वाद्यांचा एकदम आवाज; **झणझणीत**=तिखट आग; **झणाट**= आघात, तडाखा, मोठा आवाज; **झणाण**=मोठा आवाज.]

झणकार, झणत्कार, झंकार पुं. घुंगुराचा आवाज. Twang, jingling, clinking.

[सं. १ **झणत्कार, झंकार**; पं. हिं. गु. **झंकार**; २ **स्वनत्कार**, √ **स्वन्** १ शब्दे, **स्वन इति कारः** (शब्दः); अकाम. **झणझण**=आवाज होणें, तिखटानें आग होणें (√ **क्षण्** ८ हिंसायाम्).]

झणि, झणी, झणें अ. कदाचित्, न जाणों, शीघ्र, लवकर, निषेधार्थी अव्यय. Lest, if, per chance.

[१ सं. **क्षणे, शनैः** > **सणै** > **झणे** > **झणीं**= शीघ्र–भा. अ. १८३४. आम्हास वाटतें **जाणणें, जणूं** (√**ज्ञा**) ह्यापासून वरील रूप अपभ्रष्ट होऊन आलें असावें. याकाम. **झणी, झणें**=निषेधार्थी अव्यय (ज्ञा. ६-३९, नरुस्व. ५१९).]

येन्हवीं झणे भेटि हो बाळकेंसीं : सांधती पंचमस्वरीं ॥
नरुस्व. ६१०.

झनाना पुं. स्त्रियांची जागा, लग्नाच्या स्त्रिया, जनानखाना. The harem.

[फा. **झनान** (अ. व.), **झन्**=स्त्री.]

झपझप अ. लवकर, झटझट, जलद, वेगानें. Smartly, quickly.

[सं. **सम्+क्षिप्**; प्रा. **झपिअ** (फेकलेलें); हिं. **झप** (उडी); बं. ओ. **झप**; पं. **झप्प**; गु. पं. हिं. बं. **झपझप.** ब्लोक् **झंप** पासून निष्पादितो; परंतु तोच शब्द संस्कृतीकरण होऊन बनलेला आहे. सं. **सं+पत्** किंवा **सम्+क्षिप्** पासून निष्पन्न झाला आहे.]

झपट(णें) सक्रि. धरणें, हल्ला करणें. To seize, to attack.

[सं. सं+पत्>पट्, झंप्=उडी, √क्षिप्; देप्रा. झप्पट्ट >झप्प; पं. **झपट्ट**; हिं. **झपटना, झपाट(ना.)**; हिं. **झपझपट**=उडी, आवेश; गु. **झंपलाववूं**=एकदम तुटून पडणें; पं. **झप्प**=जलदीनें.]

झंपा पुं. वृत्तविशेष. A metre.

[झंप (१), द्राविडी आहे कां ?]

झपूझा पुं. मुलींचा एक खेळ. A kind of game of girls.

[म. **जा, पोरी, जा,** ह्या शब्दसमुच्चयाचा हा वरील शब्द अपभ्रंश आहे काय ? केशवसुताच्या एका कवितेचें शीर्षक आहे. त्यामध्यें कांहीं ‘ गूढगुंजन ’ आहे असें कांहीं टीकाकार समजतात. त्यांत कांहीं काव्यानंदाचा अर्थ आहे.]

झबलें न. लहान मुलाचें अंगडें. A child’s frock.

[अर. **जुब्बा**; फा. **जुबा, झुबा**; हिं. **झगुला.**]

झब्बू पुं. शिष्ट, प्रतिष्ठेखोर मनुष्य. पत्यांतील एक पान, खेळ. One possessing prestige, respect. The joker card.

[सिं. झबू=ठोंब्या, पत्त्यांतील गुलाम.]

झमक(णें) अक्रि. चकाकणें, झळकणें, प्रकाशणें. To glitter, to shine.

[सं. चमक्>झमक्; टर्नर दुसऱ्या ‘ **झादि** ’ धातूपासून काढतो.]

झमझम पुं. छुमछुम, आवाज. Jingling, clanking sound.

[ध्वनिशब्द, सं. **स्यम्** १ शब्दे.]

झरं(णें) अक्रि. पाझरणें, वाहणें, गळणें. To ooze, to trickle, to leak.

[सं. **क्षर्** १ संचलने; प्रा. **झर**; देप्रा. **झर**; अकामसा. **झरा, झरवणी, झरी, झरकणें (सम्+क्षर्), झरझरणें, झरकन्,-कर,-दिशीं, झरझर.**]

झर(णें) अक्रि. कमी होणें, फाटणें. To waste away, to decline.

[सं. जॄ ९ वयोहानौ.]

झरोका, झरूका पुं. खिडकी, जाळी, गवाक्ष. A little window.

[हिं. **झरूका.**]

झव(णें), झंव(णें) उक्रि. स्त्रीशीं मैथुन करणें. To hold in sexual embrace.

[सं. **यभ्, यंभ्** १ मैथुने (किंवा **धव**=पति; ‘**धव**’ ह्याचें कर्म करणें; **धवनम्, विधवनम्=रतम्**-राज. भा. अ. १८३३). पहिली व्युत्पत्ति विशेष ग्राह्य. कारण त्यांत अनुनासिकाचीहि उपपत्ति बरोबर लागतें. अकाम. **झवकीर**= विशेष भोगेच्छा असणारा, विषयांध; **झवतरोड**=रोडका, हडकुळा परंतु विषयलंपट.]

झल्लक(णें) अक्रि. मोठी ज्योत होऊन जळणें, चकाकणें. To gleam, to glare.

[सं. **संलक्ष्-झल्लका, झळक, झल्लका.**]

तेथ सुदर्शनाची दीप्ति । तेचि विद्युत् जैसी झल्लकती ।
गंभीरवाचा ते आइती । गर्जनेची ॥ रा. ज्ञा. २-७८

झळ स्त्री. उन्हाची तिरीप, धग, धाप. A hot blast of air.

[सं. **ज्वल्,-झला**; अप. **झलक्किअ** (दग्ध); देप्रा. **झला, झळा** (=मृगजल-१३१-११); बं. **झलझल**; हिं. **झलना**; गु. **झळवूं**; **ज्वल्** किंवा **ज्वाला** हा शब्द टर्नर व ब्लोक ह्या दोघांनींहि दिला नाहीं !]

झळक(णें) अक्रि. चकाकणें, प्रकाशणें. To shine, to sparkle.

[सं. **झाल** (?), **सं+लक्ष्** १० दर्शने; अप. **झलक्किअ**; देप्रा. **झलुंकिअ**; बं. **झलक** (झळ); हिं. **झलकना**; पं. **झलकणा**; गु. **झळकवूँ**; सिं. **झल्कणु**; कान. **जणकने**, हा ‘ ज्वल् ’ चा तद्भव दिसतो. याकाम. **झळक**=चकाकी (नरुस्व. ७१०); अकामसा. **झळझळ, झळझळणें, झळझळीत.**]

झळम(णें) अक्रि. हलणें, डोलणें. To hang dangling.

[सं. **सम्+लंब्** १ अवस्रंसने; अकाम. **झळमळ(णें)**= हलणें व प्रकाशणें.]

झळंब(णें) अक्रि. पाण्यांत बुडणें, गुंडाळणें; स्पर्शणें, पोळणें, चकाकणें, वर्मी लागणें. To sink, to roll, to touch, to rub, to sting, to glitter.

[सं. झला=प्रकाश किंवा **सम्+रंभ्, लंभ्**=रागानें फुगणें; याकाम. **झळंब** (नरुस्व. ३९५); झळंब=झुबका (धपू. ७०.)]

झळाळ(णें) अक्रि. फार प्रकाशमान होणें. To shine brilliantly.

[सं. **झला, √ज्वल्, (अभ्यस्त) ज्वलज्ज्वल**; याकाम. पेकाम. झळाळ.]

जिचे प्रभेच्चिये झळाळा । उजाळुं चंद्रादित्य मंडळा ॥ (ज्ञा. ११-२१२)

निरुपम उमटे हे कुंडळांची झळाळी। सूाम. रु. ४-४८.

^{1}**झाँक** अ. संतोषदर्शक अव्यय, पसंत, उत्तम, चांगलें. An expletive meaning satisfaction, splendid, showy.

[सं. **जोष्, जुष्** (?); देप्रा. **झंखो** (तुष्टः).]

^{2}**झाँक** स्त्री. चमक, चकाकी, झळ, तिरीप. Brilliance. brightness.

[सं. **झष्** १ आच्छादने, संवरणे.]

^{3}**झांक** स्त्री. समूह, झांपड, मोहनी. A bevy or flock.

[याकाम. **झाक**=समूह (नरुस्व. ७४७),=मोहनी (नरुस्व. ८१९)]

झांक(णें), झांक(णें) उक्रि. आच्छादन घालणें, दडविणें, लपविणें, आवरण घालणें. To cover, to close with a lid.

[सं. **झप्** १ आच्छादने; **शाख्** १ व्याप्तौ; प्रा. **झंप**; देप्रा. **ढंकणी पिधानिका** (१४१-१२); अकामसा. **झांकण**=झाकण्याचें साधन, ढापण, तोंडावरील आच्छादन, आवरण; **झांकणी**=भांड्यावर झांकण्याची तबकडी, ताटली, वेळणी; **झांकलीमूठ**=झांकलेली मूठ, गुप्त गोष्ट; **झाकपाक**=आवराआवर.]

झाकळ(णें) सक्रि. झांकणें, लपविणें, झांकून ठेवणें. To hide, to conceal.

[सं. **झष्** १ आच्छादने, **झषल** (नाधा.); याकाम. **झाक**=समूह (नरुस्व. ७४७)]

झांकुळ(णें) अक्रि. सांठणें, एकत्र होणें, अंधारमय होणें, फिकें पडणें. To collect together, to be dazzled.

[सं. **सम्+कुल्** १ संस्त्याने; **झाकोळ(णें)**=व्यापणें (सं. **श्लाख्** १ व्याप्तौ.)]

झांगड(णें) अक्रि. सर्व वाद्यें वाजवून एकच गजर करणें. To create sound of many drums.

[सं. **सम्+गीत** (**गै** १ शब्दे) > **झांगिड.**]

झांगडू न. प्रेमपात्र, रखेली, उपभोगासाठीं ठेविलेली स्त्री. A keep,.

[(?); म. **झंगड**. लाक्षणिक ध्वनिशब्द.]

झांकर न. दाट दाडी. A dense bush or shrub.

[सं. **शाख्** १ व्याप्तौ, **झष्** १ आच्छादने; देप्रा. **झंखरो शुष्कतरुः** (१३१-१७); गु. **झांखरुं**; हिं. **झांकर**; पं. **झांगर**; याकाम. **झांक**=समूह (नरुस्व. ४४७).]

झाजाव(णें) सक्रि. आघात करणें, घाव मारणें. To strike.

[सं. **झझा** (नाधा.), **जर्जर**, √जॄ वयोहानौ].

झांज,-री स्त्री. टाळ, वाद्यविशेष. Cymbals.

[सं. **झर्जरी**=चर्मवाद्य; ध्वनिशब्द; प्रा. **झंझ**; बं. **झांज**; ओ. **झांझ**; **झंझा**=वाऱ्याचा आवाज. हिं. **झांज**; सिं. **झांझु**; गु. **झाँज**; फा. **सञ्ज**=वाटोळा चपटा व खोलगट काशाचा पत्रा.]

झांज(झ)र(णें) उक्रि. खरचटणें, कांपत कांपत बोलणें, पीडणें, पीडा देणें. To scratch, to raze, to rub off.

[सं. **सम्+चर्** १ गतौ, **जर्जर**; प्रा. **जञ्जर.**]

झांजीबार न. प्रांतविशेष, आफ्रिकेंतील एका प्रांताचें नांव. Zanjibar.

[फा. **जांगी-वार**=काळ्या लोकांचा प्रदेश, **झिंगी, झिंगीउस** असा टालेमी उल्लेख करतो (१-१७-९). '**ग**' चा '**ज**' उच्चार झाला; त्याचें कारण 'अरबी' उच्चाराचा परिणाम हें होय. मूळ शब्द आफ्रिकेच्या सर्व पूर्व किनाऱ्यास लावीत असत.]

झाट्, झाँट न. गुह्येंद्रियावरील केंस, योनीवरील लंव, शिस्नावरील केंस, तिरस्कारव्यंजक शब्द. The hair or a hair of the pubes.

[सं. **जटा** (?); देप्रा. **झंटी लघूर्ध्व केशाः** (देशी नाममाला ३-५३); देप्रा. **झण्ठ, झॉट्ट, जाठो, झाठ्ठ** (केंसांचा झुंबडा); सिं. **झाट**; पं. **झाठ**; बं. हिं. **झाट्**, रक्तें दाटली खाड मिसिया जंटा ॥ Paixao de Christe. म. **झाटर(णें), झाटळ(णें), झाटार(णें), झाटाव(णें),**

झाटाळ(णें) इत्यादि धातु "**तुच्छतेनें लेखणें**" अशा अर्थाचे आहेत. हे सर्व नामधातु आहेत. ह्याचें मूळ सं. **सम्+द्वल्, सम्+सद्** किंवा **झाँट** (नाधा.) असें एखादें असावें. परंतु हे ध्वनिशब्द म्हणूनच अधिक पटतात.]

झाड(णें) सक्रि. भोसडणें, शिव्या देणें, नाहींसें करणें. To rate, to scold, to deny.

[कान. **जडि** = जरबेनें बोलणें, भिवविणें, भोसडणें.]

राजगृहीचा जरासंदुः जेणें वैरियांचा झाडिला मदु ॥

नरुस्व. २४२

झाड(णें) उक्रि. सडकणें, झटकणें, स्वच्छ करणें, To sweep, to shake, to fan.

[वैसं. **ध्रज्** = *to sweep* (Macdonald), **ध्राज्** (?), **हड्** – जाहड्यते ; अकामसा. **झाडणी** = झाडण्याचें साधन, केरसुणी ; **झाडझूड** = झाडणें ; **झाडलोट, झाडसारवण** = केर काढणें, झाडणें व सारवणें ; **झाडू** = केरसुणी, केर काढणारा निकृष्ट मनुष्य ; **झाडून** = निपट, सर्व.]

झाड न. वृक्ष, रोपटें, वनस्पति. A tree, a bush, a plant.

[द्रा. **गिड** ; कान. **झटि** = लहान झाड ; देप्रा. **झाट** = लतागहन, वृक्ष ; २ सं. **झाट** ; प्रा. **झाड**.; बं. **झार** ; ओ. **झाड**; पं. **झार** ; सिं. **झाडु** ; गु. **झाड** ; ने. **झार** ; याकाम. **झाडळी** = झाडांचा समूह (नरुस्व. ७२३); अकामसा. **झाडोरा** = झाडाचा समुदाय; **झाडाळ** = झाडी (याकाम. **झाडळी** = झाडांचा समूह (नरुस्व. ७२३); **झाडपाला** = वनस्पती वगैरे ; **झाडंझवा** = उनाड.]

झाडा पुं. झडती, तपासणी, जुलाब, रेंच, निकाल, कबूली. A general clearance of accounts.

[सं. **झट्**, **झाटनम्** ; प्रा. **झाड** ; हिं. **झाडा** ; याकाम. **झाडा** (नरुस्व. २३३); गु. सिं. **झाडो** ; **झाडा देणें** = सर्व कबूल करणें. **झाडापत्रक, गांवझाडा** = गांवाच्या जमिनीच्या वसुलीचें पत्रक.]

झाडी स्त्री. झाडांचा दाट समूह, जंगल. A thicket.

[देप्रा. **जाडी** (गुल्मम्), **झाट** (लतागहनम्).]

झांप(णें) सक्रि. झाकणें, आच्छादणें. To cover, to close with a lid.

[सं. **संच्छादय, झष्** १ आदानसंवरणयोः ; प्रा. **झंप** = झांकणें ; गु. **झांपो** ; अकाम. **झांप** = गुंगी, ग्लानि ; **झांपड, झाप** = झाडाची फांदी ; **झांपा** = तट्या, फाटक ; **झापाळ** = दाट झाडी.]

झांप स्त्री. उडी, हल्ला; An attack, a stoop.

[सं. **झंपः**; प्रा. **झम्पा** ; बं. **झाँप** ; ओ. **झाम्प** ; हिं. **झंपना.**]

झांपडी स्त्री. अंधारी. Gloominess of clouds.

[याकाम. **झांपडी** = अंधारी.]

हा लेपु सिरव्यथे लावतां देवी : डोळां झांपडी पडत ॥

नरुस्व. ५४२.

झापण न. ढापण, आवरण. A cover, a lid.

[सं. **झपाप** (?) ; देप्रा. **झप्प** = ढापण, झांकण, झापणें पहा.]

झांपुर्क पुं. उंटावरील स्वार, बंदूकदार. A camel-swar.

[अर, तुर्की. **झाम्बूरक** (**झन्बूरक**) = सांडणी स्वाराच्या हातांतील बंदूख. दारूचा शोध होण्यापूर्वीं हा शब्द तिरकमठ्यास वापरीत. मूळ शब्द अर. **झंम्बूर** = Hornet ; त्यापासून तुर्की अल्पार्थे प्रत्यय लागून **झांपुर्क** असा शब्द झाला. तिसऱ्या पानिपताचे वेळीं अवदालीजवळ ९ हजार झांपुर्कस्वार होते.]

झांवई, जांभई स्त्री. आळसानें शरीरास येणारे आळेपिळे. Yawning.

[सं. **जृंभा** ; पा. **जंभा**. प्रा. **जंभा** ; का. **झामुन** ; हिं. **जम्हाना** ; पं. **जाम्हाई**.]

झांबड(णें) उक्रि. हिसकावून घेणें, ओढणें. To snatch or seize rudely.

[सं. **सम्+बाध्** १ लोडने; अकामसा. **झांबड** = झांपड, ओढाताण, अंधार, काळोख ; **झांबडाझांबड** = हिसकाहिसकी.]

झांबड(णें) उक. लढणें, युद्ध करणें, लुटणें. To fight, to rob.

[सं. **स+मृद्** (संमर्दः); प्रा. **संमड्ड**.]

झामोरीन पुं. कालिकत येथील राजाची पदवी. The title of the king of Calicut.

[मल्याळी. सामूतिरी, सामूरी, तामाटिरी ; तामुरी इत्यादि सर्व सं. **समुद्रिन्** चे अपभ्रंश आहेत. ह्यांपैकी कोणत्या तरी एकापासून शब्द झाला.]

झार पुं. एक पदवी, पूर्वी रशियाच्या बादशहाला 'झार' म्हणत.

[*Pol. Russ.* Tsare; *Ger.* Kaiser; *Ital.* Cœsar. **'झार,' 'कैसर', 'सीझर'** हे तिन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत व त्यांचा अर्थ 'सम्राट्' असा आहे.]

झार(णें) उक्रि. चाळणें, गाळणें. To sift, to separate the finer portion from the rough.

[सं. क्षर् ; प्रा. झर ; अकामसा. झारा = पळीसारखे दांडा असलेलें व भोंकाचा पंजा असलेलें उपकरण.]

झारी पुं. सोन्याचे कण शुद्ध करणारा कारागीर. One who sifts the ashes and dust of a goldsmith's shop.

[सं. स्वर् , क्षर् ; देप्रा. झरओ (सुवर्णकारः), जरय.]

झारी स्त्री. तोटी असलेलें पाणी पिण्याचें भांडें. A long-necked vessel, a spout.

[सं. क्षर् ; प्रा. झर ; बं. हिं. सिं. गु. झारी. (झरणें ह्या क्रियापदापासून).]

झाल स्त्री. पसरट शिपतर. An edged and shallow bamboo-basket.

[कान. जल्ली = वाटोळी वेळूची टोपली (ह्यांत कणकीचे दिवे, फळें, पुरणपोळी वगैरे जिन्नस घालून वराच्या आईस देतात.).]

झालर स्त्री. कपड्याच्या टोंकाची फीत, कापडाचा चुण्या घातलेला पट्टा, झांज, टाळी. A cymbal, a fringe.

[सं. झल्लरी (हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें); प्रा. झल्लरी ; पं. झल्ल ; हिं. झालरी ; गुं. सिं. हिं. पं. झाला, झल्ल = Sudden repeated movement. हा शब्द टर्नरनें पुष्कळ शब्दांच्या मुळाशीं धरला आहे. परंतु तेथें अर्थभेदाकडे दृष्टि दिली नाहीं.]

झाला क्रि. 'होणें' ह्या धातूचें भूतकाळी रूप. The past tense form of होणें.

[सं. जात ; प्रा. जाअ + ल (अप. प्रत्यय); याकाम. वकाम. शिकाम. जाला–जाहाला–जहाला ; ज्या ९ वयोहानौ ह्या धातूपासून राजवाडे व्युत्पादितात व त्याचें उदाहरण " तो माणुस झाला म्हणजे जराग्रस्त झाला, " असें देतात.]

[1]**झांवळ(णें)** उक्रि. झांवळ्यांनीं झांकणें. To cover with branches of the cocoanut tree.

[सं. सम् + आ + वृ १० आवरणे.]

[2]**झांवळ(णें)** अक्रि. डोकें फिरणें, भ्रमयुक्त होणें To blunder, to be forgetful.

[सं. सम् + भ्रमर (नाधा.), सम् + वलय (नाधा.); भ्रम् ; अकाम. झावळ, झांवळ = विसराळू, भ्रमिष्ट, अस्पष्ट.]

झावळी स्त्री. (ताडामाडाची) फांदी. A branch of cocoanut tree.

[सं. छायावलि ; याकाम. झावळे (ज्ञा. ९-७१).]

झांस पुं. दाट झाडी (?). A thicket.

[सं. झष ; प्रा. झस = मासा ; याकाम. झांस.]

झांसुर(णें) अक्रि. आळसावणें, पडून राहाणें, वेड्यासारखें वागणें. To be slothful.

[सं. सम् + शूर् ४ स्तंभने ; सम् + सूर् , स्वरी–आक्षेपे, सम् + स्वृ = निश्चेष्ट पडणें.]

उचितानुचित आघवें । झांसुरतां हि जीवें । तेथिचा तेथ लोलावें । ऐसी मेधा । रा. ज्ञा. १४-१८३.

झाळ(णें) सक्रि. तापवून लाल करून जोडणें. To solder, to unite with metallic cement.

[सं. १ ज्वल् , २ संक्षल् ; देप्रा. झलुसिअम् , झलुंकिअम् , झामिअं ; हिं. झालना ; गु. झाळवूं.]

झिक(णें), झिंक(णें) सक्रि. (चेंडू वगैरे) झेलणें. To catch.

[सं. ह्रा, ह्री ३ गतौ ; प्रा. ह्क्कि–जिह्क्कि,–झिक्क ; बं. झिक्क ; सिं. झिकणू ; गु. झिकवूं.]

[1]**झिगझिग** स्त्री. कटकट, त्रास, पायधरणी. Worrying, irritation.

[जिगजिग पहा.]

[2]**झिगझिग** स्त्री. चमक, तेज, झगझगी. Sparkling, glittering.

[झगझग पहा.]

झिंग(णें) अक्रि. कैफ येणें, गुंगुणें. To be intoxicated.

[सं. शिख् १ गत्यर्थे, क्षीग्. १ मदे ; अकाम. झिंगी = धुंदी, मादक द्रव्य, मद्य.]

झिंगरूं न. लहान क्षुद्र कीटक. A small shrimp.

[सं. झिंगरूप, चिंगट ; प्रा. झिंगिर ; झिंगया म्हणून 'मासे' यांची एक जात आहे.]

झिज(णें) अक्रि. रोडावणें, कमी होणें, कृश होणें, अशक्त होणें. To waste from attrition, to wear.
[सं. **क्षीय** ; प्रा. **झिज्ज** ; अप. **झिज्ज** ; हिं. **झीझना** ; सिं. **झिजणुं** ; अकाम. **झिजणी** = झिजण्याची क्रिया.]

झिंजाड(णें) सक्रि. झिंज्या ओढून पाडणें, केंस धरून ओढणें. To flout, to hoot off.
[सं. **जट. जीजट** (अभ्यास) > **जिजडी–झिंजडी** (राज.).]

झिंजोटी पुं. स्त्री. गायनशास्त्रांतील एक राग. A particular *rag*.
[हिं. **झिंजोटी.**]

झिंझी, झिंझ्या स्त्री. अस्ताव्यस्त विखुरलेले केंस. Disorderly tress of hair.
[सं. **झिंटी** = झुडुप (शको.); देप्रा. **झंटी लघूर्ध्वकेशाः** (१३१-११); याकाम. **झिंजी** (उगी. ४४९).]

झिटकार(णें) सक्रि. तुच्छणें, धिक्कारणें, धुडकावणें. To flout, to hoot, to tut.
[सं. **हिट्** १ आक्रोशे, **षिट्, हेड्, हेळ्** १ अनादरे ; **छट् + कार** (शब्द.)]

झिणा वि. झिजलेला, घासलेला, बारीक, किरकोळ. Rubbed and worn, slender.
[सं. **क्षीण** ; प्रा. **झीण** ; सिं. **झिणो** ; गु. **झीणो** ; पं. **झीणी** ; हिं. **झीणा** = अशक्त. **झीणा** पहा.]

झिपरी, झिंपरी स्त्री. केंस, फेंदारलेले केंस. Disorderly tress of hair.
[**झिंजी, झिंज्या, झिपरी** वगैरे शब्दांवरून पाहिलें तर '**झ**' हा वर्ण सर्वांत असून इतर वर्ण बदलतात. '**झ**' चा अर्थ कांहीं तरी केशवाचक असला पाहिजे. '**झाँट, झंटी**' ह्यांमध्येंहि '**झ**' वर्ण आहे. '**जटा**' (संस्कृत) मध्यें '**ज**' आहे. तेव्हां **ज–झ** ह्या वर्णांचा अर्थ केंसवाचक असावा. तसा एखादा पूर्ववैदिक भाषेंत शब्द असावा.]

झिम झिम् पुं. पावसाचा आवाज, रिपरिप. Light and soft rain.
[१ ध्वनिशब्द. सं. (?); **हम्म्** १ गतौ १ (अभ्यास) **जिहम्म.** टर्नर '**झमझम**' असा शब्द देतो तो चिन्त्य आहे.]

झिरपणें अक्रि. गळणें, टिपकणें, झरणें, कमी होणें, झिजणें. To trickle, to run, to exude.
[सं. **क्षर्, झृ** (**झरण** किंवा **क्षरण**); प्रा. **झरण** (शको.); ह्यामध्यें '**प**' ची उपपत्ति लागत नाहीं. सं. **सरीसृप्** ; प्रा. **झरिअप्प.**]

झिरूमीरूं, झुरुंमुरु न. अत्यंत अशक्ततेमुळें आलेली धुगधुगी. Fluttering due to extreme weakness.
[सं. **जॄ** ९ वयोहानौ + **मृ** ६ प्राणत्यागे ; देप्रा. **चिरी, जीरी, झीळी, झिल्ली** = कीटक.]

झि(झा)लाण न. ओलसर जागा, पाणवट. A swamp, morass.
[सं. **क्षीर** = पाणी ; हिं. **झील** = सरोवर.]

झिल्ली स्त्री. रातकिडा, मुरकुट, मेंदुवरील पापुद्रा. A cricket, a membrane.
[सं. **जॄ** ९ वयोहानौ (?) ; देप्रा. **झिल्ली** = कीटक.]

झिळमिळ अ. नाचत नाचत, हेलखावे खात. Danglingly, wavingly.
[ध्वनिशब्द. प्रा. **झल, झल्ल, झिल्, झिल्मिल्** ; बं. **झिलीमिलि** ; अकाम. **झिळमिळी** = लोलक.]

झिळमिळ(णें) अक्रि. मंदमंद प्रकाशणें, लुकलुकणें. To shine dimly.
[सं. **ज्वल्, झला** = ज्योत ; हिं. **झिलमिला** = हलणारी ज्योत ; प्रा. **झिल्ली** = लहरी ; याकाम. **झिळमिळणें.**]

झीज स्त्री. घस, कमी होणें. Waste, rubbage.
[सं. **क्षीय** ; प्रा. **झिज्ज.**]

झीजिया पुं. एक कर, हिंदूवरील मोंगल अंमलांतील. A tax on non-muslims levied in the Muslime regime.
[अर. **जिझ्य** = कर ; **जिझ्या** = गैरमुसलमानांनीं द्यावयाची डोईपट्टी ; पेकाम. **जेजया**–(ऐटी. १–१८).]

झीट स्त्री. मूर्च्छा, झुकांडी, घेरी, भोंवळ. Staggering, giddiness.
[सं. **क्षीण,** (निष्ठा) √ **क्षी** ; प्रा. **झीण, झीट, झीड, झीण** हे शब्द परस्परसंबद्धच आहेत. ह्यांची व्युत्पत्तिहि एकच असली पाहिजे.]

झीणा, जुना वि. फार दिवसाचा. Of long standing, old.
[सं. **क्षीणः, जीर्णः,** पा. **जुण्ण** ; प्रा. **झीण** ; हिं. **झीना** ; पं. **झीनी** ; सिं. **झाणो** ; गु. **झीणूं** ; अकाम. (अहिराणी) **झीणा** = पातळ, कृश. **झिणा** पहा.]

झील स्त्री. लहान ओढा, अनुवाद, घुंगुरमाळ, तेज, जिल्हई. A rill, a rillet, brightness, the sounding of संबळ.

[सं. **झिल्ली** ; प्रा. **झिल्ली**(लाट); बं. हिं. पं. गु. झील्; ओ. **झील** ; संस्कृतीकरण नंतरचें.]

झील पुं. मुलगा, वंशांतील अंकुर. A surviving member of family.

[सं. **झला** = मुलगी.]

झुक(णें) अक्रि. एकाबाजूस वाकणें, कलणें, रमतगमत जाणें,-चालणें. To stoop, to bend, to incline, to walk along lazily.

[सं. **युच्छ्**, **ष्वक्** १ गतौ, ; **युष्** (सौत्रधातु) भजने. **झुकव(णें)** = वांकावयास लावणें.]

झुकाट(णें) सक्रि. चुकवून जाणें. To give the slip, to decamp.

[सं. **ष्वष्क्** १ गतौ, + **अट्** १ गतौ.]

झुकांड(णें) सक्रि. चुकवून जाणें. To give the slip.

[सं. **ष्वष्क्** १ गतौ, + **कण्** १ गतौ; अकामसा. **झुकांडी, झुकांडा** = फसवणूक, थाप, धक्का, झोंक, तोल.]

झुगार(णें) सक्रि. भिरकविणें, दूर फेकणें. To throw, to toss.

[सं. **अधि + उद्गारणम्, अध्युद्गारणम् > झुगारणें.**]

झुंझुरकें न. पहाट, मंदप्रकाश, अरुणोदयाची वेळ. The dawn, the first glimmering of day.

[सं. **झला** = ज्योत (?); कान. **मंजु** = धुकें ; **झुगझुग** = मिणमिण ; **धुंधुरकें** (धूसरत्व); **झुंझु** = अंधुक प्रकाश. **झुंझुमंझु** पहा.]

झुंज स्त्री. न. लढाई, संग्राम; मारामारी, कुस्ती. Fight, battle, strife.

[सं. **युद्ध** ; प्रा. **जुज्झ** (न); हिं. **जूझ** ; पं. **झुझणा** ; याकाम. **जुझ, जुझार** (नरुस्व. २६४ उगी. ६९४); शिकाम. पेकाम. **झुंज, झुंझार.**]

झुंझाट स्त्री. वादळी वारा, सोसाट्याचा वारा. Violent, strong wind.

[सं. **झंझा** = वादळ, वाऱ्याचा आवाज.]

झुंझार वि. लढाऊ, लढवय्या. Skilled in or fond of fighting.

[सं. **युद्ध** ; प्रा. **जुज्झ**.]

झुंझु(मंझु) न. संध्याप्रकाश, पहांटेचा अंधुक प्रकाश.

[कान. **मंजु**=धुकें, धुक्यामुळें झालेला अंधार, झुंजुरकें पहा.]

झुंड, झुंडी स्त्री. जमाव, टोळी, समुदाय. A company, troop, a swarm.

[सं. **यूथ** ; प्रा. **जूट** ; हिं. गु. **झुंड** ; म. **जूट, जूड, झुंड.**]

झुडुप न. रोपटें. A bush.

[**झाड** पहा.]

झुणका पुं. पिठलें, बेसन. A piquant sauce.

[**स्वनः** = शब्द (?); द्राविडमूळ आहे कां ? कान. **जुनु** = संकोचणें.]

झुप(ब)का, झुमका पुं. फुलांचा गुच्छ, समूह. A bunch or cluster of flowers.

[सं. ?; प्रा. **झुम्म + अक्क** ; अर. **झुमरा** = गर्दी ; बं. **झुम्का** ; ओ. **झुमुका** ; हिं. **झुम्का** ; पं. **झुम्का, झुब्का** (कर्णभूषण); याकाम. मध्यें '**झळंब, झळंबुका**' असा शब्द **झुपका** ह्या अर्थी येतो.]

कानिचे झळंबुके करीति विरारः कृत्तिकांसीं ॥ नरुस्व. ९५

झुंबड, झुंबर स्त्री. गर्दी, तोबा, जमाव, खेंचाखेंच. Eager pressing, thronging.

[अर. **झुमरा** = गर्दी (?).]

झुंबर न. दिव्याचें झाड. A chandelier.

[अर. **झुमरा** = गर्दी (?).]

झुर(णें) अक्रि. कमी होणें, झिरपणें, स्रवणें. To ooze away, to crumble down.

[सं. **क्षर्** ; प्रा. **झूरइ** ; ओ. **झुरिबा** ; हिं. **झूरना** ; गु. **झूरवूँ** ; अकाम. **झूर** = तांदळाची पाखड ; **झुरणी** = क्षीणता ; **झुरझुरणें** = झरणें, टिपकणें.]

झुरका पुं. घुटका, घोर, दम. A deep-drawn sniff.

[**ध्वनि-झुर्** ; सं. **सृकः, सृक्क** = वाऱ्याची झुळुक.]

झुरळ न. एक कीटक, चागुरडा. A cockroach.

[देप्रा. **चिरि, झीजी, झिल्ली, झीरिक, झिरुक** ; सं. **स्वर्** १ गतौ ; देप्रा. **झरुअ** (पुं); **झारुआ** (स्त्री) = क्षुद्र जंतुविशेष, कीटक ; द्रा. **झुरळ** ; कान. **जिरिल, जिर्ले.**]

झुर(रु)मुरू(णें) अक्रि. झुरून मरणें. To pine away and die.
[सं. जॄ ९ वयोहानौ + मृ ६ प्राणत्यागे.]

झुरा, झुरावरा वि. धाडसी, निधड्या छातीचा. Daring and reckless.
[फा. झहरा = धीटपणा.]

झुल(णें) क्रि. डोलणें, मिरविणें, अंग हलणें, झोका येणें. To nod, to go lazily.
[सं. **झोलयति, दोलयति, स्वल्** १ गतौ, **ह्वल्** १ गतौ ; प्रा. **झुलइ, झुल्ल** ; ओ. **झुलिबा** ; हिं. **झूलना** ; पं. **झुल्लणा** ; बं. **झुला**; सिं. **झुलणु** ; गु. **झुलवूँ** ; पहाडी. **झुलणुं** ; अकाम. **झुला** = झोला, पाळणा, झोंपाळा.]

झुलुप न. लहान मुलाच्या कानाच्या वरच्या भागावरील डोक्याचे केंसांचा झुबका. A curling lock of hair.
[फा. **झुल्फ.**]

झुळझुळ(णें) अक्रि. संथ वाहणें. To flow gently.
[सं. **स्वल्** १ गतौ,–मंदगतौ.]

झुळूक स्त्री. वाऱ्याचा मंद झोत. A gentle puff, a fair wind.
[सं. **सृकः, सृक्क** > झुरुका, झुळुक (?), **दोल** ; प्रा. **झुल्ल.**]

झूट् वि. न. खोटें, लबाड, लटकें. A lie.
[सं. **शठ** (?); देप्रा. **झुट्ठम्** (अलीकम् १३३–१३) ; गु. **जुठुं** ; पं. **झूठ** ; हिं. **झूट.**]

झूल स्त्री. (जनावराचें) आवरण, पांघरण्याचें एक वस्त्र, पडदा, पाठीवरील वस्त्र. A body-cloth (of horses or elephants).
[सं. **स्वल्** (?) ; अर. **जुल्ल** ; हिं. **झुल्ली** ; पं. **झुल्ल** ; हिं. गु. **झूल.**]

झे अ. जोर देण्याकरितां उपयोजिलेलें अव्यय. ह्याचा उपयोग ‘जो’ प्रमाणें होतो. A particle expressive of excess.
[**जें; जो** पहा.]

झेंगट न. झांझ, संकट, गुंतागुंत, लचांड, पेंच (ल.) A cymbal, (fig.) a perplexing affair.
[सं. **जेंगट** = डोहाळे ; **झिंजट,** √ **शिज्** २ अव्यक्ते शब्दे ; **जेंगटो** दोहदःस्मृतः–हारावलि २१९.]

झेंजट(णें) अक्रि. आवाज करणें. To sing, to ring.
[सं. **शिज्** २ अव्यक्ते शब्दे, **शिंजट** (नाधा.) ; झेंगट पहा.]

झेंझड(णें) अक्रि. झिजणें, झडणें. To waste away.
[सं. **हठ्** १ बलात्कारे.]

झेंडा पुं. निशाण, पताका, ध्वज. A flag, an ensign, a banner.
[सं. **ध्वज + दण्ड** ; पा. **धजोदण्ड** ; प्रा. **धय, झयअण्ड** ; हिं. बं. **झंडा** ; पं. ल्हां. **झण्डा** ; ने. **झण्डा** ; सिं. **झण्डो** ; गु. **झँडो, झुण्डो** ; का. **झेंडे.**]

^{1}**झेंडू** पुं. एक प्रकारचें फुलाचें रोपटें. A kind of flower tree.
[सं. ? ; कान. **चेण्डी चेण**; देप्रा. **झंडुअ** (पुं.), **झेंडओ कन्दुकः** (१३४-४).]

^{2}**झेंडू** पुं. सर्पदंशामुळें आलेली रक्ताची गुळणी. The blood vomited on account of a serpent-bite.
[हे दोन्ही शब्द ब्लोक एकाच मुळाशीं जोडतो. परंतु हा दुसरा शब्द निराळा आहे व त्याची व्युत्पत्तिहि निराळी असली पाहिजे. द्राविडमूळ असावा. कान. **चेन्, चेण्** = तांबडें.]

झेंद,–अवेस्ता स्त्री. पारश्यांची जुनी भाषा.
[**अवेस्ता** हा पारशांचा धार्मिक ग्रंथ आहे, व तो **झेंद** भाषेंत लिहिला आहे. झेंदचा खरा अर्थ **अवेस्तावरील** टीका असा आहे. भाषा **पेहलवी** आहे. **झेंज, झन्** ; सं. **ज्ञा** = जाणणें ; *Lat.* gno. मूळ शब्द **अविस्तक** वा **झन्द** असा असून आतां त्याच्या उलट **झेंन्द अवेस्ता** असा शब्द रूढ झाला. **अवस्त** (=कायदा–)असा शिलालेखांत एक शब्द आहे.]

झेंप(णें) उक्रि. उडी मारणें, पल्ला गाठणें, तोलणें, सावरणें. To stoop, to spring or to dart.
[सं. **क्षिप्** ४ क्षेपणे ; अकामसा. **झेपाव(णें)** = उडी टाकणें, झडपडणें ; याकाम. **झेंपावणें.**]

कीं कुंकुमवनीं सरागुः झेंपावत ृघार–विहिंगु ॥
नरुस्व. ४६८

झेल(णें) सक्रि. वरचेवर अलग पकडणें, उचलणें, अनुसरणें (ल.). To catch a thing tossed, to take up, to apprehend and follow readily (a song).
[सं. **सम् + वेल्ल्** १ चलने, **शील्** १० उपधारणे.]

झेला पुं. झुबका, पुष्पगुच्छ. A bunch, a nosegay.

[सिलः (?)]

झोंक(णें) अक्रि. कलणें, वांकणें, नमणें, फेकणें, झुकणें, झेपणें. To bend, to incline, to reel.

[सं. जुष् ६ सेवने, ष्वक्क् १ गतौ; प्रा. जुस; बं. झोंक; पं. हिं. गु. झोंक (नाम); अकाम. झोंक = तोल; झोंका = हेलकावा, ढकल, आंदोलन.]

झोंट,-टी स्त्री. केंस, झिपरी, झुलुप, बट, कपाळावर येणाऱ्या केंसाच्या बटा. A loose tress or lock of hair.

[सं. जटा; देप्रा. झंटी लघूर्ध्वकेशः (१३१-११), झुटणं प्रवाहः (१३३-१४); सिं. झुट्ठ = शेंडी; गु. झुडो = खोटे केंस.]

झोटिंग पुं. पिशाच्च, भूत, त्रासदायक मनुष्य (ल.) The spirit of a deceased person, (fig.) a slovenly, disgusting person.

[सं. ज्योतिर्लिंग = शंकर (?); हिं. झोटिंग = केंसाळ.]

झोड(णें) उक्रि. मारणें, कुटणें, बडविणें ठोकणें. To thrash, to beat, to bang.

[सं. क्षुद्, युट्, जुड् १० प्रेरणे, युथ् (हिंसायाम्), शाट्, शोट्, सशोट्; प्रा. झोडण; देप्रा. झोडिओ व्याधः (१३३-१४); पं. झौर = हल्ला; हिं. झौर्ना; अकामसा. झोड = ठोक, मार, चोप, अतिरेक; झोडाझोड = यथास्थित चोप.]

झोंड वि. चिकट, अंगाला चिकटणारा, निर्लज्ज, कोडगा. A hector or a bully, brazen-faced.

[सं. सं + पत् (?); देप्रा. झुण्टणम्, झुण्ट, झंटि = केंसांचा झुबका; हिं. झोट. टर्नर झोट (केंसांचा झुबका) असा शब्द देतो.]

झोपा, झोपडी पुं. स्त्री. गवताचें घर, खोपट. A cottage, a hut.

[सं. स्वप् (?); देप्रा. झुंपडा (स्त्री); प्रा. झोप्प, झोम्प; अप. झुम्पडा (कुटीरक); हिं. झोंपडा; गु. झोंपडूँ; बं. झोपडा, झुपडी; सिं. झुपिरो; ओ. झुपुडी.]

झोंप(णें) अक्रि. निजणें. To sleep.

[हा शब्द व्युत्पत्तिदृष्ट्या सं. स्वप् शीं संबद्ध नाहीं. इतर भाषांत सं. स्वप् २ शयने ह्या धातूचीं रूपें येतात. गु. सुवुँ; सिं. सुमहणु, पं. सौणा; हिं. सोना; बं. सौ; का. शोंग; सिंह. होव्; अकामसा. झोंप = निद्रा (< स्वापः). तेव्हां हा शब्द संस्कृत 'स्वप्' शीं न जोडतां कान. "जोंपु, जोमु = कैफ, झांपड, जोंप = निजलेला ह्या शब्दांशीं जोडणें अधिक सयुक्तिक व सशास्त्र होईल. झोंपाळु = झोंप घेणारा (< स्वप्नालु, जोंपलु.)]

झोंब(णें) सक्रि. चिकटणें, कुस्ती खेळणें. To embrace, to gather upon, to wrestle.

[सं. जंभ् १ विनाशे, गात्रविनाशे, स्वंब् १० संघाते; अकामसा. झोंबी = कुस्ती, लढाई; झोंबाड(णें) = हिसकावून झोंबून घेणें.]

झोल,-ळ पुं. घोळ, घेर, बोळा. The loose and swinging end.

[सं. दोल; प्रा. झुल्ल.]

झोला पुं. डोला, झोंका, झोंपाळा, टाळटाळ. A swing, an evasion.

[सं. दोलः; प्रा. झुल्ल; शिकाम. झोला.]

झोले तोलें प्रतापें धरित विसभुजीं आणिलें जानुदेशी ॥

विठ्ठल, सीता स्वं. ४-४८

झोळी स्त्री. थैली, कोथळी. A wallet of beggar.

[सं. झौलिकः; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. प्रा. झोलिआ, झोल्लिआ; देप्रा. झौलिआई, झलझलिआ (३-५६); झोलिका शब्दः यदि संस्कृते न रूढस्तदायमिपि देश्यः (१३३-१), झौलम् कार्पासफलम्; हिं. पं. झोली; गु. झोळी. झोळणा = पिशवी, बटवा; कान. जोल = लोंबणें.]

झ्या झ्या अ. घोड्याला हांकण्याचा शब्द. The ejaculation used in urging on a horse.

[सं. ध्यै (न्यक्करणे); प्रा. ज्झा.]

झ्या न. एक आडनांव उत्तरेकडील ब्राह्मणांत आहे.

[सं. उपाध्याय; प्रा. उवज्झाअ; ओझा, झ्या, उपाध्ये, पाध्ये, वझे इत्यादि शब्द सिद्ध होतात.]

ञ पुं. मराठी वर्णमालेंतील दहावें व्यंजन. The tenth consonant of the Marathi alphabet.

[हा तालव्य अनुनासिक वर्ण आहे. ह्या व्यंजनानें सुरू होणारे शब्द मराठींत नाहींत.]

ट^{1} पुं. मराठी वर्णमालेंतील अकरावें व्यंजन. ह्याचें उच्चारण मूर्धन्य अल्पप्राण कठोर असून त्याचें उच्चारस्थान मूर्धा आहे. हें मूर्धन्य उच्चारण जुन्या पूर्ववैदिक आर्यभाषांत नव्हतें. आर्यभाषांपैकीं सुद्धां भारतीय भाषांतच फक्त आहे. युरोपीय आर्यभाषांत नाहीं. तेव्हां ही नति किंवा हें मूर्धन्यीकरण द्राविडी भाषांच्या संसर्गानें झालें असें भाषाशास्त्रज्ञ समजतात. ‘ रषाभ्याम् ’ यांच्या संयागानें होतें (पहा वाकरनागेल १४४-१४७, ऋक्प्रातिशाख्य पटल १.). Eleventh consonant in Marathi alphabet.

[सं. ट ; प्रा. ट ; सं. ट ; प्रा. त ;

(मध्य ट) सं. ट, ट्व, र्त, ट्ट ; प्रा. ट्ट ; उदा. **कण्टक–कांटा, घण्टा–घांट, कुटिल–कुटिळ ; खट्वा–खाट ; आर्त–आट ; ष्ट–ट्ट–ट ; विट्टाल–विटाळ.** (ह्या वर्णाचे बरेचसे शब्द ध्वनिशब्दच आहेत. टक, टणक टचक, टणत्कार, टपकन, टप्पा, टपोर. बाकी कांहीं शब्द द्राविडमूळ आहेत.]

ट^{2} प्र. ईषदर्थे प्रत्यय. An affix showing less, a dimmunitive affix.

[सं. त, ट ; प्रा. ट ; मरा. ट, ड.]

टक स्त्री. एकसारखी दृष्टि,–नजर, ताटस्थ्य, संकट. Fixed gaze, indifference calamity.

[सं. **टक्** १ बंधने (णिच्) ; याकाम. **ठक**=स्थिरदृष्टि (नरुस्व. ८५४); अकामसा. **टकटक**=सारखेपणा, सततपणा, चिरचिर, पिरपिर, घड्याळाचा आवाज (**तक्** १ उपहासे); **टकमक**=डोळे उघडून-विस्फारून. हे ध्वनिशब्दहि असणें शक्य आहेत. **टक** ह्याचा अनुबंधि म्हणून ‘ **टक मक** ’ (किंवा सं. **टंक्**+**मंघ्**) असा शब्द रूढ झाला असावा.]

टक(णें)^{1} सक्रि. चिकटणें, जवळ जाणें, मिळणें, प्राप्त होणें. To stick, to approach, to secure.

[सं. **तग्** १ गतौ ; याकाम. **टकणें** (प्राप्त होणें).]

पुनयथिच्चि ने टकेति घरवातें : अमराच्चिदे । नरुस्व. २०२ ॥

टक(णें)^{2} अक्रि. विरोध होणें. To be opposed, to abandon.

[सं. **स्तक्** १ प्रतिघाते ; याकाम. **टकणें**=टाकतां येणें (ज्ञा. ११–२०२)]

एका फलाभिलाष न टके । ते कर्मातें म्हणती बंधके जैसे । आपण नग्न भांडकें । जगातें म्हणे । ज्ञा. १८-१३५

टकळी स्त्री. जीभ, वटवट, बडबड (ल.), सूत काढण्याची चाती, डोकें, डोक्याची कवची, तीव्र इच्छा. The *takli*, the skull, babbling, extreme desire, greed.

[द्रा. टक (१) ; सं. **तञ्च्**, **स्तक्** १ प्रतिघाते ; देप्रा. **टक्क, टक्कर** ; अकामसा. **टक्कल**=डोक्याचा केंस उडालेला भाग ; **टकूचें**=टोपडें, कानटोपी, कुंची.]

टका, टक्का पुं. पैसा, एक नाणें. A coin, money (in general).

[सं. **टंकक**=छाप मारलेलें चांदीचें नाणें, **टंक**= नाणें ; हिं. **टका ; संस्कृतीकरण उत्तरकालीन दिसतें.** बंगालमध्यें हा शब्द रुपयास वापरीत, परंतु इतरत्र चार किंवा दोन पैशाच्या नाण्याला किंवा सामान्य अर्थानें पैसा ह्या अर्थी वापरीत. कोणी म्हणतात हें नाणें प्रत्यक्ष वापरांत नसून केवळ हिशेबाचें नाणें होतें. अकामसा. **टक्के करणें**=पैसा करणें ; **टकबंदी**=टक्याच्या हिशोबांत ठरलेला आकार.]

टका^{2} पुं. निशाण, ध्वज, छत्र. A flag, a canopy.

[सं. **तञ्च** (?) ; याकाम. **टका** (ध्वज).]

सदाफळा आंबेयाचे टके : तेथ अम्र पंचमाचेनि अंशुकें ॥ नरुस्व. ७८९.

टका^{3} पुं.स्त्री. अग्रभाग, कोंभ, अंकुर, पारंबी. The fore end, a sprout.

[सं. **तञ्च्**, **तग्** १ गतौ ; याकाम. **टका** (पुं.) (ज्ञा. १५–१५१), (स्त्री.) (ज्ञा. १५–१८८).]

टक्कर स्त्री. अंगाचा अंगावर आघात, ठोकर, (विशेषतः डोकें डोक्याची) धडक. Head dashing against head.

[सं. **तञ्च्** (?) ; देप्रा. **टक्कर.** (पुं.) ; (मराठींत येतांना लिंगभेद झाला.)]

टक्के टोणपे पुं. (अ. व.) धक्के, आघात, संकट (ल.). Knocks, thumps, rubs, crosses.

[सं. **तक्** १ कृच्छ्रजीवने ; अकामसा. **टोणपा**=काठी, **टकोरा**=ठोसा ; **टकोरणें**=टिकोरें, लहान दांडकें.]

टग्या पुं. लठ्ठया, लुच्चा, लबाड, भामटा. A huge burly fellow, a deceit.

[सं. **ठक** ; अकाम. **ठग**, **टगेगिरी**=भामटेगिरी, डाव, कपट.]

^{1}**टंक** पुं. टाकी लावण्याची छन्नी,-छिन्नी. A stone-cutter's chisel.

[सं. तञ्च् १ गतौ (?); देप्रा. **टंको खड्गश्छिन्नं खातं जङ्घा खनित्र भित्तिस्तटंचेति ससार्थाः** (१३७-१२); गु. **टको, टंक** (रुपया, पैसा), **टांकणु** (छन्नी), **टांकवूँ** (शिवणें); सिं. **टांकू**; पं. **टाकगा**; हिं. **टांका** (सुई, जलाशय), **टांकी** (छन्न); बं. **टंको** (फावडें, टाकी, सुरी, तंगडी, नाणें), **टांकिते** (शिवणें.).]

टंक पुं. छाप, टाईप, नाणें, वजन. The type, a weight.

[सं. **तञ्च्** १ गतौ, **तंक्** १ कृच्छ्रजीवने; अकामसा. **टंकसाळा**=नाणें पाडण्याचा कारखाना (सं. **टंकशाला**; याकाम. **टांकशाळा, टांकसाळ** (ज्ञा. ७-२५).]

टंकार, टणत्कार पुं. धनुष्याचा शब्द. Twang (as of a bowstring.)

[ध्वनिशब्द, सं. **टणत्, टणत्, टं इति कार**=शब्द.]

टंगळमंगळ स्त्री. टाळाटाळ, दिरंगाई, हयगय. Hesitation or dawdling, fits & starts.

[सं. **तग्** १ स्खलने+**मंग्** १ गतौ; कान. **तंगु**=थांबणें, **मग्गु**. शब्द द्राविडोद्भव असावा हें अधिक सयुक्तिक दिसतें.]

टच(णें) अक्रि. ओढाताण करणें. To strain.

[सं. **तञ्च्** ७ संकोचने; अकामसा. **टचटचणें**=फुगणें, सुजणें व दुखणें; **टचटचीत**=घट्ट व टणक.]

टचक(णें) अक्रि. बोचणें, रुतणें. To prick.

[सं. **तस्** ४ उपक्षये; अकामसा. **टचकन्,-कर,-दिशी, टचका**=टोंचा.]

टंचाई,-टणचाई स्त्री. अडचण, महर्गता,. दुर्मीळता. Deficiency, scarcity, scantiness.

[म. **तङ्ग+चाई**, घोड्याच्या खोगिरांतील **तंग**=बंध, त्यावरून पेकाम. **तङ्गचाई**-इम १३४.]

टणक वि. कणखर, घट्ट, मजबूत, दाट, कडक. Hard, firm, solid.

[सं. **तर्णक** (**ना**).]

टणक(णें), टणकाव(णें) सक्रि. मारणें, काठीनें मारणें, सपाटा देणें. To beat, to strike.

[कान. **टणूके**=काठी, सोट्या, **टण**=मारण्याचा आवाज.]

टणटण पु. (चेंडूचा) आवाज. The sound of rebounding.

[**टण्टण्**, ध्वनिशब्द; कान. **टण**=उडी मारतांना होणारा आवाज.]

टणकन् अ. (उडी) मारून. Used with verbs of leaping, skipping.

[कान. **टन**=उडी मारतांना होणारा आवाज; कान. **कने**=रीतिवाचक प्रत्यय.]

टणूं न. डोक्यावरील टेंगूळ. A bump on the forehead (from a blow).

[सं. **स्तन्** १ निर्घोषे (?) (काठीच्या आघातानें येणारें टेंगूळ).]

^{1}**टप** पुं. चेंडूच्या उशीचा अथवा घोड्याच्या पावलाचा अथवा पाण्याच्या थेंबाचा आवाज. Sound of something falling.

[ध्वनिशब्द; म. **टपकन्,-दिनी-दिशी**=**टप** अशा आवाजानें.]

^{2}**टप** पुं. तंबूचें आच्छादन. The cover or the canopy, either half of a tent.

[सं. **स्तुभ्** ९ आच्छादने; **टोप, स्तूप** हे संबद्ध शब्द आहेत.]

^{1}**टपका** पुं. पाण्याचा थेंब (टबकणारा.) A falling drop.

[**ध्वनिशब्द**; सं. **तिप्** १ क्षरणार्थः+**अकच्** (ठिबक), **स्तबकः**=संघात.]

^{2}**टपका** पुं. दोष, चूक, गुन्हा, अपराध. A stigma, a stain, a blot.

[कान. **तप्पु**=चूक, **तप्पिसु**=चुकविणें.]

टप(णें) अक्रि. दबा धरून बसणें (ध्यानस्थ-शांत बसणें ह्यावरून.) To lie in wait.

[सं. **तप्** ४ तप्यति (?).]

टप(पा)ल(णें), टंबल(णें) सक्रि. कामभोगासाठीं आवळणें, आवळून धरणें. To embrace out of or for carnal lust.

[सं. **तल्पः**=पर्यङ्क (नाधा.).]

टपाल न. पोस्ट, पत्रें नेणें-आणणें, डांक. The *Dak*, the post.

[ह्याचें मूळासंबंधीं एकमत नाहीं. C. P. Brown ह्यानें *Fr.* Etapi; *Eng.* staple, असें मूळ दिलें आहे. अठराव्या शतकापर्यंत **टप्प, टप्पी** असें लिहिलें जात होतें. तेलगू कारकून **टप्पा, तप्पालु** असें लिहीत असत. विल्सनच्या मतें व्युत्पत्ति द्राविडी असावी. बीम्सनें पुढील व्युत्पत्ति दिली आहे: **टप्पा** = कचेरी; **टप्पाल**=पत्रांची पेटी, **टप्पा+आलय**=ठस्से मारण्याची कचेरी.]

टप्पा पुं. मजल, ठेपा, अंतर, विराम, विरामाचें स्थान. A distance, a stage, a halting place.
[कान. टप्पा, टप्पे ; फा. तप्पा = उंचवटा ; अकामप्र. **टप्पे खाणें** = थांबणें ; **टप्प्यांत येणें** = अवसानांत येणें.]

टर स्त्री. फजीती, चेष्टा, निन्दा. Ridiculing, jeering, deriding.
[सं. तृह् ६ हिंसायाम्.]

टरक(णें) उक्रि. भिणें. गोंधळणें, फाडणें, फाडणें. To be terrified or confused, to tear, to rend.
[सं. तर्ज् १० तर्जने (णिच्), तर्क् १० भाषायाम्, तृह् ६ हिंसायाम् ; अकामसा. **टरकावि(णें)** = कान उघाडणी करणें (ल.).]

टरटर(णें) अक्रि. वर येणें, फुगणें. To thrive, to throb, to swell.
[सं. त्रग् १ गतौ, (ध्वनिशब्द.)]

टरफल न. साल, कवच, बाहेरील आवरण. A husk, sheath.
[ध्वनिशब्द ?]

टरबूज न. फलविशेष, कलिंगड. A watermelon.
[फा. तर्बुझ्.]

टरार(णें) अक्रि. तुकडे होणें. To rend, to tear.
[सं. तृह् ६ हिंसायाम् (ध्वनिशब्द.).]

टर्रेबाज वि. मूजोर. Insolent, impudent.

टवक(णें) सक्रि. बारीक करणें. To thin down.
[सं. त्वक्ष् १ तनूकरणे , त्वच् , ट्वच् ; अकाम. **टवका**.]

टवच(णें) अक्रि. कातडी धरणें. To have skin (as on a wound).
[सं. त्वच् ६ संवरणे ; अकाम. **टवंच** = टोंचण, त्रास, दुःख ; सं. त्वच् , ट्वंच् ६ संवरणे ; याकाम. **टवंच**, **टंवच** (ज्ञा. १२।१८२).]

टवटव(णें) अक्रि. ताजें तवानें होणें, प्रफुल्लित होणें. To bloom, to look fresh,-green, -lively.
[सं. तु २ गतिवृद्धिहिंसासु (द्विरुक्त) ; याकाम. **टवटवा** (वि.) (ज्ञा. ८–२१०) ; अकाम. **टवटवी** = प्रफुल्लितपणा, ताजेपणा.]

टवळी स्त्री. पंती अगर लामण दिव्याचा खोलगट तेल घालावयाचा भाग. A saucer-like lamp.
[कान. **टवळी** ; सं. ट्वल् १ हिंसायाम, भेदे.]

टवाळ वि. खोडकर, व्रात्य. Wanton, scampish.
[सं. ट्वल् १ हिंसायाम् , भेदे ; अकामसा. **टवाळखोर**, **टवाळी** = खोडी.]

टळ(णें) अक्रि. नाहींसें होणें, जाणें, चुकणें, निघून जाणें, कलणें. To pass by, to disappear to heel (as a boat.)
[सं. तल् १० पूरणे, ट्वल् १ भेदे ; गु. **टळ** ; सिं. **टिर** ; पं. हिं. वं. ओ. **टल्**.]

टळटळीत अ. निखालस, स्पष्ट, चकचकीत. clearly, conspicuously.
[सं. **तल्** १० पूरणे (द्विरुक्ति).]

टाऊकें न. टावकें, फायदा, मोठा लाभ. Gain, profit.
[सं. **टौक्** १ गतौ (?).]

टांक पुं. शिक्का, वजन (तोळ्या इतकें), तलाव, लेखणी, ठस्सा, धातूच्या पत्र्यावरील देवतेचा ठस्सा. A weight, the nib of a pen. a metal plate with an image on.
[सं. **टङ्क** ; प्रा. **टंक** ; देप्रा. **टको खङ्गच्छिन्नं खातं जङ्घा खनित्र भित्तिस्तटंच** (१३७-१२) ; याकाम. **टाक** = नाणें (शिक्याचें) (ज्ञा. ७–२५) ; अकाम. **टाकी** = छन्नी ; **छटाक** = सहा टांकांइतकें वजन. टंक पहा.]

टाक(णें) अक्रि. फेकणें, सोडणें, पेरणें, भरधांव सोडणें. To throw, to let off, to gallop.
[सं. **तक्** १ गतौ , उपहासे, **त्यज्** १ हानौ ; अकामसा. **टाकून** बोलणें = अपमान करणें.]

सांघै गा मृगजल । टाकूनि गेले याचें कवण फल ॥ कोइ सुरतरु म्हणौनि बाबुल । सेविलें करी ॥ ज्ञा. ९-१४६

टाक(णें) उक्रि. बांधणें, प्राप्त होणें, प्राप्त करणें, जाणें. To tie, to secure, to run.
[सं. **टक्** १ बंधने ; याकाम. **टाक** = प्राप्ति, **टाक** = इच्छावधि (ज्ञा. ११-९१, नरुस्व. ४७६).]

ऐसे अभिचारा वेगळें । विपायें जें अवगलें । ते टाकिती एटालें । पैशून्याचि ॥ ज्ञा. १६-३९९.

टांक(णें) सक्रि. दोऱ्यानें शिवणें. To stitch.
[सं. **टक्**, **टंक्** १ बंधने, आवरणे, उपतापे ; टंक पहा.]

टांकसाळ. स्त्री. टंकसाळ पहा. A mint.
[सं, **टंकशाला** (**तक्** १ बंधने, **तञ्च्** १ गतौ); याकाम. **टांकसाळ** (उगी. ५४३).]

टाका, टांका पुं. शिवण, दोरा, सांधा. A stitch, a joint.
[सं. **टक्, टंक्** १ बंधने ; अकाम. **टांके ढिले होणें** = दमणें, थकणें, सांधे ढिले पडणें ; **टंक** पहा.]

टाकी स्त्री. पाण्याचा हौद, डोणी, दगड फोडण्याची छन्नी. A cistern, a trough for water, a chisel.
[सं. **टंक्** १ बंधने ; **टाकें** पहा.]

टाकी स्त्री. इच्छावधि, धांव, आटोका. Desire, a run.
[सं. **तक्** १ गतौ; याकाम. **टाकी** = इच्छावधि (ज्ञा. ११-९१); = आटोका (ज्ञा. १६-८१).]

टाकें न. जलाशय (विशेषतः पहाडांतील). A reservoir of water.
[सं. **ताख** (?), **टंक** ; **तंकू** (गुज.); *Port*. Tauque *Lat*. Stagnum : *Ita*. Stagns ; *Fr*. estang ; estan ; *Modern F*. Etang ; *Sp*. estangue ; *Eng*. Tank. **टांकी, टंक** पहा.]

टांकोटांक अ. लगोलग, टाकतां टांकतां. Close upon, immediately after.
[म. **टाक** = लेखणी , लिहिण्यांतील त्वरा किंवा माप, प्रमाण; याकाम. **टाकोंटाकीं** (ज्ञा. ६-४८). **टंक** पहा.]

टांग(णें) सक्रि. लोंबकळत ठेवणें, लोंबकळणें. To hang or suspend.
[सं. **तंक्. तंग्** १ गतौ ; **तंगट** (ना.); देप्रा. **टंक** = जङ्घा ; सं. **टंकण** ; हिं. **टांगना** ; **टंक** पहा.]

टांग, टांगडी स्त्री. पाय, तंगडी, ढाप. A light term for a leg, a stride.
[सं. **टंगा** (?); शब्द मूळ द्राविडी असावा असें वाटतें. देप्रा. **टंक.** **टंक** पहा. याकाम. **टांगें** (उषा. १२६-३४); कवण रापैल मोडितां टांगे. बकाम. **टांगें** = मस्तक (ए. भा. रा. वा. कां. ५-१५) छेदूं कुंभकर्णाचें टांगें. शिकाम. **टांग** (Paixao de Christ. 93); अकाम. **टांग, ढांग.**]

टांच स्त्री पावलाची मागील खालची बाजू. The heel.
[सं. **तञ्च्** १ गतौ ; देप्रा. **टंक** = जंघा ; अकामसा **टांच वर करणें** = उंच होणें ; मानानें वागणें (ल.); **टांचा घासणें** = तडफडणें (ल.).]

टांच(णें) सक्रि. जोडणें, शिवणें, लिहून ठेवणें. To stitch, to sew lightly, to note down.
[सं. **तञ्च्** १ गतौ, बन्धने ; ह्याच्या मुळाशीं देप्रा. **टक** = टाक, टाका हा शब्द आहे. अकामसा. **टांचण** = नोंद, टिपण ; **टांचणी** = भोंक नसलेली सुई, जोडण्याचें साधन.]

टांचळ(णें) सक्रि. टांच मारणें. To urge with a heel.
[म. **टाच** (नाधा.)]

टांचें वि. उणें, अल्प, थोडें, कमी. Short, deficient.
[सं. **तञ्च्** ; याकाम. **टाचें** (ज्ञा. ६-१११).]

टाणाटोणा पुं. जादुमंत्र, मंत्रतंत्र अर्धवट ज्ञान. Hocus pocus, conjuring, jugglery.
[ध्वनिशब्द ; हिं. **टाणाटोणा** ; द्राविडी आहे काय ?]

टाप स्त्री. आघात (विशेषतः घोड्याच्या–जनावराच्या पायाचा). A stroke from the fore-foot of a horse.
[सं. **स्तप्** ; **स्तभ्** , **स्थापय** ; म. **थाप.**]

टापटीप स्त्री. व्यवस्था, पद्धति, नीटनीटकेपणा. Rigid or exact rightness, justness.
[**टाप** = चोप चोपून बसविणें ; ध्वनिशब्द.]

टापर स्त्री. डोक्यावर पांघरण्याचें फडकें. Muffler cloth round head.
[सं. ? ; याकाम. **टापर** (डोक्याचें फडकें). राजहंसा आणविती टापर : मदवियेचें ॥ नरुस्व. ५९६]

टापर नपुं. टपका, दोष, चूक, गुन्हा अपराध. An offence, an error.
[कान. **तप्पु** = चूक, **तप्पिसु** = चुकविणें ; अकाम. **टापरणें** = टोमणा मारणें.]

टापू पुं. प्रांत, प्रदेश, टप्पा, मजल. A territory.
[**टप्पा** पहा. हिं. **टापू.**]

टामटूम स्त्री. बजावणें, गाजावजा, तमाशा, देखावा. Pomp, parade, show, pageantry.
[ध्वनिशब्द ; हिं. **टामटूम.**]

टारगट, टारगा वि. खोडकर, दुष्ट, खट्याळ. Scampish, wanton, mischievous.
[सं. **टारक** ? कान. **तारु** = उद्धट.]

टाहो पुं. आक्रोश, ओरडणें, हंबरडा. A long continuous crying.

[ध्वनिशब्द.]

टाळ स्त्री. झांज. A sort of cymbal.

[ध्वनिशब्द, द्रा. **तल्**=मारणें; सं. **तालिका** (संस्कृतीकरण नंतरचें); गु. **टाळ**; सिं. **तार**; पं. **ताली**; हिं. **टाळ.**]

टाळ(णें) सक्रि. चुकविणें, काढून टाकणें, लोटणें, घालविणें. To avert, to remove, to prevent.

[सं. **टल्** १ वैक्लव्ये; गु. **टाळवूँ**; सिं. **टिर**; पं. हिं. बं. ओ. **टल्**; **टाल**; अकामसा. **टाळा**=ढकलाढकल, वहाणाचा खालचा तळ, **टाळाटाळ**=अळंटळं, लांबणीवर टाकणें, दिरंगाई.]

टाळकें न. डोकें, मस्तक (निन्दार्थे). (A contemptuous term for) head.

[सं. **तालम्**, **तालकम्**; कान. **तले**=डोकें. द्राविडोद्भवच अधिक शक्य आहे. **टाळू** पहा.]

टाळा पुं. कुलुप. A lock.

[तेलु. **टाळमु**; गु. **ताळुं.**]

टाळी स्त्री. दोन हातांनीं केलेला आवाज. तळहातावर दुसरा तळहात मारून केलेला आवाज, ताल. Beating the hands together.

[सं. **ताल**, **तालिका**; गु. **टाळी**; सिं. **तार**; पं. **ताली.** **ताळ** पहा.]

टाळू, ताळू स्त्री. डोक्याचा वरील भाग, व त्यावरील केंस. The fore-part of the head and the hair thereon.

[कान. **तले**=डोकें; सं. **तालु** (तोंडाच्या आंतील वरील भाग), संस्कृतीकरण फार प्राचीन ऋग्वेद प्रातिशाख्यकालीं झालें असावें.]

टाळू स्त्री. तोंडाच्या आंतील, वरील भाग. The roof in the mouth.

[सं. **तालु** (न.); कान. **तळे**=डोकें; संस्कृतीकरण ऋ. प्रातिशाख्यकालीत झालें असावें. गु. **तालु**, **ताळवुं**; सिं. **तारूं**; पं. हिं. **तालू**; का. **ताल्**; मराठींत हा शब्द स्त्रीलिंगी आहे.]

टाळें न. कुलूप. A lock.

[ते. **टाळमु**; गु. हिं. **ताळा**; याकाम. **टाळें**; **टाळा.** **ताळा** पहा.]

फेडावेआ गुणचित्ताचें टाळें । (उगी. ६८३).

टाळें न. पोटमाळा, इमारतीची दर्शनी बाजू, जोड्याचा तळ. The front part of a building, the sole of a shoe.

[सं. **तल.** (न.); गु. **तळियुं**; पं. **टाला**; हिं. **ताला**; याकाम. **टाळें** (शिशु. १९०, उगी. ६८३)]

टिक(णें) अक्रि. जगणें, राहणें, असणें, चिकटून राहणें, थांबणें. To live with or at, to continue to remain.

[सं. **टिक्** १ गतौ; पं. बं. हिं. **टिकना**; सिं. **टिकणुं**; गु. **टिकवूँ**, **टकवूँ**; अकामसा. **टिकाऊ**=टिकणारें; **टिकाव**=निभाव, मजबुती; **टिकलग**=शोभिवंत, जडित (टिका+लग, ज्ञा. १८-८५४)]

टिका, टिक्का, टिकला पुं. कपाळावर लावलेला टिळा.

[सं. **तिलक**; प्रा. **तिळअ**; देप्रा. **टिप्पी** तथा **टिक्क**-**तिलकम्** (१३६-१६); गु. **टीको**, **टिक्को**; सिं. **टिको**; पं. **टिक्का**; हिं **टीका**; बं. ओ. **टिका**; याकाम. **टिकू**=बोट लावणें (ज्ञा. १५-२४४); अकामसा. **टिक्का**, **टिकला**, **टिळा**, **टिकली** (स्त्री.); **टिकोची**, **टिक्कोजो**=टिकयाचा धनी (निंदार्थक). हे वरील सर्व शब्द ह्या शब्दापासूनच.]

टिच(णें) अक्रि. नेम मारणें, फुटणें, भरणें, देणें, बरोबर मारणें. To hit, to tip, to aim at.

[सं. **तिज्** १० निशाने किंवा **अति**+**अस्** ४ क्षेपणे.]

टिच, टीच स्त्री. लहान वीत, अंगठा आणि तर्जनी ह्यांमधील अंतर. A span measured by the thumb and the forefinger.

[सं. **त्वंच्** (?); अकाम. **टिचकी**=हाताच्या बोटांनीं केलेला आवाज.]

टिटघर न. तिठ्यावरचें घर. A house at the triad of roads.

[म. **तिट्टा** < सं. **त्रिवर्त्मन्**; **चाडी**, **चोरी** **शिंदळकी** ह्या तीन वाटांवरील घर. याकाम. **टिटघर** (ज्ञा. १८-६७३).]

टिटवी स्त्री. पक्षिविशेष. A bird, a lapwing.

[सं. **टिट्टिभी**, **टिट् टिट्** ध्वनिशब्द; उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. याकाम. **टिटिभ**, **टिटिभू** (ज्ञा. १६-२३४).]

[1]**टिप(णें)** उक्रि. थेंबथेंब पडणें, गळणें, ओलेंपणा शोषणें. To drop, to dab up.

[सं. **तिप्** १ क्षरणे; देप्रा. **टिप्पी**=तिलकः]

^{२}**टिप(णें)** सक्रि. गोळा करणें, नेम धरणें, मांडणें, शिवणें. To pick up one by one, to strike, to note down, to sew.
[सं. डिप् १० संघाते.]

टिपक(णें) अक्रि. थेंबाथेंबानें सांडणें. To fall drop by drop, to drop.
[सं. तिप् १ क्षरणे + अकच्; देप्रा. टिप्पी = तिलक; टिपका = थेंब, डाग, खूण. (√ स्तिम्.)]

टिप(प्प)ण न. लहान विवरण, टीका. A memorandum paper, an explanatory note.
[सं. टिप्पनकम्; प्रा. टिप्पणअ.]

टिपरी स्त्री. वीतभर लांब दांडी, (ताल धरण्याची) काठी, पावशेर माप. A small piece of stick, a measure.
[सं. डिप् १० संघाते.]

टिपूस(णें), ठिपूस(णें) अक्रि. थेंबाथेंबानें गळणें, थेंब पडणें. To drop (minute and slow dropping).
[सं. तिप्+स् (लुङ्–तिप्स्).]

टिमकी स्त्री. लहान ढोलगें, नगारा. A sort of drum.
[सं. डिमडिम + क (अल्पार्थे); ध्वनिशब्द.]

टिरटिर स्त्री. क्षणभंगुर तेजस्विता. A term for any transient glare.
[ध्वनिशब्द; देप्रा. टिरिटिल्लइ भ्राम्यति (१३७-१). कधीं अव्ययाप्रमाणें हा शब्द वापरतात.]

टिरी, टीर स्त्री. ढुंगण. A buttock.
[सं. कटी; द्राविडीमूल ?]

टिवल्याबाव्हल्या स्त्री (अव.). खोड्या, कुचेष्टा, हातवारे, चट्टीपट्टी. Pranks, mischiefs.
[सं. ट्वल् + व्हल् (?).]

टिळा पुं. टिकला, कपाळावरील पंथदर्शक खूण. A mark on the fore-head with sandal or saffron paste.
[सं. तिलकः; प्रा. तिलअ; पै. टिळअ; गु. टिलो; पं. तिल्.]

टीक स्त्री. एक स्त्रियांच्या गळ्यांतील दागिना, मोत्यांची चौकडी. An ornament for the neck, a cluster of gold beads.
[हिं. टिका < सं. तिलक, स्तिघ्; परंतु हा द्राविडोद्भव आहे अशी शंका येते. याकाम. ठीकलवा (उपाहरण १२४-१०), ठीक = मोत्यांचा दागिना-नरुस्व. ९४; शिकाम. ठीक = रत्न, (Paixao De Christ. 47.); पं. ठेका.]

टीका स्त्री. स्पष्टीकरण, विवरण. A commentary or comment.
[सं. टीका, √ टीक्.]

^{१}**टीप** स्त्री. शिवण, गणती, मोजदाद, आंकडेवार नोंद, नेम, नियम. Taking the number, a manner of stitching.
[सं. डिप् १० संघाते; टिपणें पहा.]

^{२}**टीप** न. थेंब, अश्रु. A drop, a tear.
[सं. टिप् (< स्तिम्) = ठिबकणें; टपका = सतत ठिबकणें; गु. टीपुं; सिं. टिपो; पं. टिप्प; हिं. टिपणा = थेंबथेंब पडणें; अकाम. टिपुस, टिपें.]

टुक स्त्री. तुकडा. A piece.
[कान. टुक्कि = सारांश (?), कानडी तद्भव (?); सं. त्रुट् त्रोटक, तोकडा, तोकडें.]

टुकटुक (माकड) अ. कांहीं पदार्थ खात खात वांकुल्या दाखविणें. Faces made while eating.
[कान. टुकटुक, मकळी = मुलें; येथें माकडाचा संबंध हा नंतरचा असावा. कांहीं तरी खाण्याचा संबंध हा प्रथमचा; त्याचा मुलांशीं संबध आहे.]

टुणक(णें) अक्रि. उडी मारणें. To jump, to leap suddenly.
[ध्वनिशब्द; कान. टणक्कणे = उडी मारणें; अकामसा. टुणटुण = उडी; टुणटुणीत = चलाख, तयार, तरतरीत.]

टुमणें न. तगादा, टोंचणी, निकड. Pressing, pursuing, pricking.
[हें कांहीं लांकडी हत्यार आहे असें म्हणतात. ‘ टोंचणी ’ सारखें दांडकें.]

टुरटुर(णें) अक्रि. सारखी पिरपिर लावणें. Peevishly pursuing, pressing.
[ध्वनिशब्द; टरॉंव, टरॉंव = बेडकाचा आवाज.]

टूक स्त्री. कळ, युक्ति, खुबी, कौशल्य. The art, the way, trick, mystery.
[सं. तक्ष् ५ तनूकरणे.]

टूम स्त्री. नवीन आणि चमत्कारिक प्रकार, तऱ्हा, ऐट, दिखाऊपणा. New and striking thought, fancy, invention.
[द्राविडमूळ ?; अकामसा. **टुमदार** = डौलदार.]

टेक(णें) उक्रि. रेलणें, आधारानें राहणें, बेतांत असणें. To rest, to place on a support.
[सं. **टिक्**, **तिक् १**, **तिग् १** गतौ; अकामसा. **टेक** = थकवा, दमणूक (**टेकीस येणें** = टेकण्याच्या स्थितीस येणें.)]

टेक न. पेंव, समूह, उंचवटा. Collection, heap, a hillock, a mound.
[सं. **स्थिग्** १ समूहे, **दिह्**–संचये; गु. **टेकरी**; हिं. **टेकर**; पं. हिं. **टेकरा**; अकाम. **टेकाड**, **टेकडी** = उंचवटा, ढीग.]

टेकू पुं. आधार. The support.
[कान. **टाकु** = आधार, आश्रय.]

टेप पुं. टेक, उंचवटा. A hillock or little eminence.
[सं. **स्तिप्**, **स्थिग्**,–**प् १** संघाते.]

टेपर(णें) सक्रि. टापरणें, ढकलणें, रेटणें, आपटणें, आदळणें. To clash or collide, to come into violent contact.
[सं. **तृफ्** १ हिंसायाम्; **टपल(णें)** पहा.]

टेंभा पुं. दिमाख (ल.) खांब, स्तंभ, पलिता, दिवटी. A showy air, a stump, a rude torch.
[सं. **स्तम्भ्**; प्रा. **ठंभ**, **थंभ**; याकाम. **टेंभा** = कांकडा (ज्ञा. १२-५१); शिकाम. **टेंभा** (दा. ३-८-७८ टेंभे लावूनि भाजती.); अकाम. **टेंभा**, **टेंबा**.]

टेह(णें) सक्रि. राखणें, अडकाविणें. To protect, to obstruct.
[सं. **स्तिह्** (?); याकाम. **टेहणी** = अटकाव (ज्ञा. १३–५०६)

टेहळ(णें) सक्रि. नजर ठेवणें, बारकाईनें पाहणें. To look as with an examining eye.
[सं. **अति + भल् १०** आभंडने; हिं. **टेहलना**; अकामसा. **टेहळणी** = बारकाईची दृष्टि; **टेहळ्या** = दूर दृष्टीनें पाहणारा.]

टोक(णें) उक्रि. आव्हान देणें, पुढें सरसावणें, जागें करणें. To challenge.
[सं. **त्रौक् १** गतौ.]

टोंक न. अणुकुचीदार शेवट, अग्र. A point, an end.
[सं. **त्रौक् १** गतौ.]

टोकर(णें) सक्रि. (कान–दातां)तील मळ काढणें, उकरणें. To remove dirt in the ear or teeth.
[सं. **त्रौक् १** गतौ (णिच्).]

टोंच(णें) उक्रि. बोचणें, टाकून बोलणें, शिरकविणें. To prick, to pierce.
[सं. **तुज् १** हिंसायाम्, १० भाषार्थे.]

टोणा, **टोण्या** पुं. जाड, गलेलठ्ठ, टोला, सोट. (A term for a) fat, burly (object or animal.)
[कान. **टोण्णी**, **टोण्णे** = दांडकें.]

टोणपा पुं. ओंडका, उनाड मनुष्य. A cudgel, a stout burly wanton man.
[कान. **टोण्णे**, **टोपण** = उनाड मनुष्य. **टोणगा** = रेडा, मठ्ठ मनुष्य (ल.)]

टोप पुं. एक प्रकारचें उभट भांडें, केंसांची टोपी. A certain copper or brass vessel, a sort of wig.
[सं. **स्तुप्**, **स्तुभ्** १,६ हिंसायाम्, **स्तूप्**; कान. **टोप्प** = झांकण; अकाम. **टोपी**, **टोपडें** = लहान मुलाच्या डोकीस घालावयाचें आवरण. टोपी पहा.]

टोप(णें) सक्रि. भोंक पाडणें, खुपसणें, मारणें. To bore, to pierce, to puncture.
[सं. **तुप्** १, ६, हिंसायाम्; **टोपस(णें)** = मारणें ('**स्**' हा लुङ्चा अवशेष आहे)]

टोपण न. झांकण, आवरण, हत्यार, भोंक पाडण्याचें गिरमीट. A top, a lid, a cover, a gimlet.
[सं. **स्तुप्**, **स्तुभ् १**, हिंसायाम्; कान. **टोप्प** = झांकण.]

टोपसा,-सी पुं. स्त्री. टापसी, कान व डोकें झांकण्यासाठीं बांधलेलें धोतर. A cloth wrapped around the head and ears.
[म. **टोप + स**; अकाम. '**टापर**' (= डोक्यावरील फडकें) ह्या शब्दाशीं संबद्ध आहे.]

टोपी स्त्री. शिरस्त्राण. A cap, a sort of hood.
[*Dut.* Top; *L. Ger.* Topp; *Port.* Topo; *Fr.* Topet; *Eng.* top; सं. **स्तुभ्**, **स्तुप्**; देप्रा. **टिप्पिआ, टोप्पर**; हिं. **टोपी**; कान. **टोप्प**=झांकण.]

टोमणा पुं. टोला, आघात, शब्दाचा मार (ल.). A blow, a sly hit.
[सं. **स्तुभ्** १ हिंसायाम् (?).]

टोम्याटो, टमाटा पुं. फलविशेष, Tomato.
[*Sp.* Tomate; *Mexi.* Tomatt; *Eng.* Tomato, formerly called 'love-apple'.]

टोल(णें) सक्रि. ढकलणें, अंगाबाहेर काढणें. To shuffle, to throw off from one's self to another.
[सं. **तूल्** १ बहिर्निःसारणे, निष्कासने; अकामसा. **टोलवि(णें)**=मारणें, हकलणें, ढकलणें; **टोला**=मार, आघात, तडाखा, रट्टा.]

टोलेजंग वि. भव्य, अजस्र, अत्यंत मोठें. Strong, firm, capable of sustaining.
[फा. **टोला+जंग**.]

टोळ पुं. धान्य नासणारा किडा, शलभ, कीटकविशेष. A locust, a grass-hopper.
[सं. **टुल्, टुलकः**; देप्रा. **टोलो** (पुं.)=शलभः (१३७-७).]

टोळभैरव वि. भटक्या, दांडगेश्वर, गांवगुंड. A strong, stout burly fellow.
[सं. **टोळ+भैरव** (शंकराचा दूत).]

टोळी स्त्री. समूह, समाज, तुकडी. A band, body, troop.
[सं. **टोळ**; कान. **टोळी**.]

टौकार(णें) स्त्री. डोळे पसरून पाहणें, दृष्टि विस्फारणें. To behold intently with eyes fixed. to eye fiercely and glaringly.
[सं. **तु** १ वृद्धौ+**कृ**, **तृह्**, **त्रौक्** १ गतौ.]

ठ पुं. मराठी वर्णमालेंतील बारावें व्यंजन. ह्याचें उच्चारण मूर्धन्य महाप्राण कठोर असून उच्चारस्थान मूर्धा आहे. (ट. पहा.) Twelfth consonant in the Marathi alphabet.
[सं. **स्थ**; प्रा. **ठ**; **स्था–ठा**, **स्थान–ठाण**; (मध्य ठ) सं. **ठ, ष्ट, ष्ठ, ठ, र्थ, स्थ, ‟थ्थ**; प्रा. **ठ्ठ**; **शुण्ठि–सुंठ, अष्ट–आठ, षष्ठि–साठ. अंगुष्ठ–अंगठा, स्थूल–ठूल**; मराठी आद्य, मध्य, अन्त्य '**ठ**' हा सं. व प्रा. आद्य, मध्य, अन्त्य **ठ ट स्ट ष्ट स्त. स्थ, ष, थ, त** इत्यादि वर्णांपासून सिद्ध होतो.]

ठक पुं.वि. लुच्चा, फसव्या, धूर्त. Deceit, cunning.
[सं. **स्थगः**, √ **स्थग्** १ गोपने; प्रा. **थग**; गु. हिं. **ठग**; पं. **ठग, ठग्ग**; का. **ठग्**=उचलेगिरी करणें; अकामसा. **ठकडा**=लुच्चा; **ठकणूक**=फसवणूक; **ठकबाजी**=फसवेगिरी.]

१ठक(णें) अक्रि. उभे ठाकणें, घडणें, होणें, थांबणें. To stand, to stay, to happen.
[सं. **स्थग्**, **स्तक्** १ प्रतिघाते; याकाम. **ठकणें**=उभे राहणें, **ठक**=ताटस्थ्य (ज्ञा. १८–१६००).]

कव्हणींचि आवुली न ठके पासीः विसडाउनि गौळनीं देति विवसी ॥ नरुस्व. ३७२

२ठक(णें) अक्रि. थक्क होणें. To be astonished.
[याकाम. **ठकणें** (नरुस्व. १४५).]

३ठक(णें) अ. फसणें. To be deceived.
[सं. **स्थग्**; याकाम. **टकणें** (नरुस्व. ६१३)]

ठकवि(णें) सक्रि. फसविणें. To deceive.
[कान. **ठक्कु**.]

ठकार पुं. सौंदर्य, ऐट. Form, beauty.
[सं. **स्थग्**, **स्तक्** १ प्रतिघाते;–उभे राहणें, ऐटींत उभे राहणें; याकाम. **ठकार**=सौंदर्य.]

मदना–पसि रूपें सविकारू: आंगीं चंदनाचा ठकारू ॥
नरुस्व. ७४१.

ठग पुं. लुच्च्या, फसव्या, ठग नांवाचे लुटारू लोक, एक जात. A deceit.
[सं. **स्थग**; कान. **ठक्कु**; हिं. **ठग**; अकामसा. **ठगी**=ठग लोकांचा धंदा. ठक पहा.]

ठण पुं. आवाज. A sound emitted by a metal object when struck.
[*IE.* Tan; सं. **तन्**, **स्तन्** १ शब्दे; *Lat.* Ton.]

ठणक(णें) अक्रि. दुःखणें, ठुसठुसणें. To ache, to throb,
[सं. **स्तन्** १ शब्दे+अकच् किंवा **स्तनक** (नाधा.); अकामसा. **ठणका**=दुःख, वेदना, ठसठस; **ठणकाव(णें)**=चुणचुणणें, भोसडणें, खरडपट्टी काढणें.]

ठणठण(णें) अक्रि. वाजणें, ठसठसणें. To throb, to beat,;to shoot.

[सं. **स्तनू-तस्तन्यते** (यङ्लुङन्त), किंवा ध्वनिशब्द ; अकामसा. **ठणठणाट** = घणघण असा आवाज ; खडखडाट, गरज, **ठणठणीत** = खणखणीत, स्पष्ट ; **ठणाठण, ठणाणा** = बोंबाबोंब.]

ठपकार(णें) उक्रि. दोष येणें, टोमणा मारणें. To charge peremptorily, to remind blamingly.

[सं. **स्तभ्** १ प्रतिबंधे + **कृ** ८ करणे ; अकामसा. **ठपका** = दोष, कलंक, दूषण. टपका पहा.]

ठमक(णें) अक्रि. ऐट करणें, नखऱ्यानें वागणें, लाजून मुरकून चालणें. To walk with affected nicety and delicacy, to strut.

[सं. **स्तम्** १ अवैक्लव्ये + **मक्क्** १ गतौ ; अकामसा. **ठमक, ठमका** = ऐट, ऐटबाज चाल ; **ठमकारा** = ताठा, गर्व, नखरा.]

ठर(णें) अक्रि. नेमणें, कायम होणें, निश्चित होणें. To become fixed or settled.

[सं. **स्थिर** (?), **ध्व** (स्थैर्ये) = निश्चय करणें ; अकामसा. **ठराव** = निकाल, निर्धार, करार, प्रस्ताव ; हिं. **ठेहराव** ; **ठरारपत्र, -करार** = ठरावाचा करार,-पत्र ; **ठरीव, ठरावीक** = कायमचा, ठरलेले.]

ठस(णें) अक्रि. मनावर बिंबणें, परिणाम होणें, खोलवर जाणें. To sink deep, to impress, to be imprinted.

[सं. **तंस्** १ स्थैर्ये ; (**स्थस्, त्रस्**) ; हिं. **ठसना** ; अकामसा. **ठस, ठसठसीत** = स्पष्ट, स्वच्छ ; **ठसा** = मुद्रा, छाप, शिक्का, परिणाम (याकाम. **ठसा.**).]

वायांचि ठसा चढविला गोवळीं: माणूसपणाचा ॥

नरुस्व. ३६९

ठसक(णें) अक्रि. ठसका लागणें, ढासणें. To cough.

[सं. **श्वास + अकच्** ; अकामसा. **ठसका** = खोकला, ढास, बोलण्यांतील जोर, आघात, छाप ; **ठसक** = दुःख, जखम.]

ठळक वि. जाड, स्पष्ट, मोठें, श्रेष्ठ. Thick, clear, large.

[कान. **तळकु.**]

ठाईं, ठायीं अ. सप्तमीचें विभक्तिप्रतिरूपक अव्यय. In, in place.

[१ सं. **स्थाम** (?) (टर्नर) ; प्रा. **थाम** ; (सप्तमी-**थामे**) ; **थामाहो** (पं.) ; लां. **ठाँव** ; २ सं. **स्थाने** ; प्रा. **ठाइम्मि** ; याकाम. **ठाइं ठाइं** = जागजागीं.]

ठाइं ठाइं मधुकेशरिया सुरंगी : उमावनिच्चिया नारंगी ॥

नरुस्व. ७९७.

ठाऊक, ठावूक वि. माहीत, प्रसिद्ध. Known, famous.

[कान. **टाविके** ; याकाम. **ठाउके** = प्रसिद्ध (ज्ञा. ३-२१४), **ठाउवें** = ठाऊक, माहितीचे (ज्ञा. ४-२०२).]

निळयाचे धोटे नव्हेति ठाउके : घसणी कटाक्षिए ॥

नरुस्व. ८४५.

ठाक(णें) अक्रि. उभें रहाणें, सजणें, शोभणें, जवळ येणें, पोहोंचणें. To stand, to stop still.

[सं. **स्तक्** १ प्रतिघाते ; अप. **थक्केइ** ; याकाम. **ठाकणें** = राहणें ; अकामसा. **ठाक** = बरोबर, योग्य ; **ठाकठीक** = बेताचें, जेथच्या तेथील ; **ठाकठोक** = रोख, प्रत्यक्ष ; **ठाकी** = चालरीत, मार्ग, पद्धत.]

आन पाखिरूवें ठाकेति विहाली : गगनीं चेकेच्चि पायें ॥

नरुस्व. ७०२.

ठाकूर पुं. एक घराण्याचें आडनांव, एक मानवजात, ठक्कर, आदरार्थी पदवी. A caste or a people.

[सं. **तस्कर** (सुडागम) ; प्रा. **ठकु, ठक्कुर** ; बं. **टागोर** ; गु. **ठाकोरजी.**]

ठाडा वि. सरळ, ताठ. Straight, erect, upright, standing.

[सं. **स्तब्ध** ; पा. **थद्ध** ; प्रा. **ठड्ड** ; पं. **ठाढा** ; हिं. बं. **ठाड** ; सिंह. **तद** (कठीण) ; का. **थोद्** (**दु**) = उंच ; याकाम. **ठाडवा** (ऋ. पू. ५४७).]

ठांण न. ठिकाण, घोड्याचा तबेला, मुख्य गांव, स्थान. A place, a post, a stable, a station.

[सं. **स्थान** ; प्रा. **ठाण, थान** ; गु. **ठाण, ठाणुं** ; सिं. **ठाणु** ; पं. **थान, थाणा, ठाणा** ; हिं. **ठान** ; बं. **थाना** ; अकामसा. **ठाणवई** (**स्तंभवृत्तिका**) = लाकडाची मोठी समई (याकाम्. **ठाणवै**-धपू. ५०) ; **ठाणेबंद** = ठाण्यावर बांधलेला (घोडा) (पेकाम. **ठाणेबंदी**).]

ठांण न. कापडाचा गट्ठा. A lump (as of cloth).

[सं. **स्त्यान** (?) ; का. आ. बं. **थान्** ; ओ. **थान** ; हिं. पं. **थान्** ; सिं. **थानु** ; **थाणु** ; गु. **थान्.**]

ठांण न. गर्व, ताठा. Pride, stiffness.
[सं. स्त्यानम् ; देप्रा. ठाण (पुं.) = मान, गर्व, अभिमान ; याकाम. ठाण = बांधा, शरीराची ठेवण (ज्ञा. ११-२७४).]

पांतां ठाण मांजौळे : पुन लावण्यसृष्टी वेगळे ॥
नरुस्व. ३२५.

ठाणें न. जागा, स्थान. A post or station, a place, a spot.
[१ सं. स्थानम् ; पा. ठाणम् ; प्रा. थाण, ठाण (स्थानीयम् > ठानीयो > ठाणीअ); आ. बं. हिं. थान् ; सिं. थाणो ; गु. थाणु ; २ सं. स्थामन्, स्थान ; देप्रा. स्थाम्न > थान्न > ठाण ; ३ सं. स्थाणुः > थाणु > थण्णु.]

ठाणोरी वि. युद्धांत मेलेला, वीरश्री संचारलेला (योद्धा). (One) died in battle.
[सं. स्थ्यै, स्त्यान ; प्रा. त्थान, ट्ठाण ; याकाम. ठाणौरी (शिशु. ९६३), (ज्ञा. १८-४३९.)]

म्हणौनि काम वैरी । जाला जेथ ठाणोरी ॥

ठाम वि. निश्चित, कायम, दृढ. Fixed, firm, fast.
[सं. स्तिम् १ निश्चये ; हिं. ठाम ; याकाम. ठाओ (ज्ञा. ९–५५).]

ठाय न. ठाव, ठिकाण, स्थान, आसन. A place.
[सं. स्थान, √स्था ; देप्रा. ठइओ उत्क्षिप्तः, ठइओ अवकाश इत्यन्ये (१३७–१७) ; याकाम. ठाइं ठाइं, ठायठाय ; ठाओ (ज्ञा. ९-५५) ; ठाय = आसन (ज्ञा. १६-२५४) ; ठायीठाव, ठायेठाय, ठायेठाय = तत्काळ, वास्तविक, खरोखर (ज्ञा. १०–३४) ; अकाम. ठायीं.]

ठार वि. (एकदम-जेथल्या तेथें–जागच्या जागीं) नाश झालेला, स्थिर असलेला. An emphatic particle qualifying verbs and expressing suddenness and completeness of loss, ruin, destruction.
[सं. स्थावर किंवा स्तृह् ६ हिंसायाम् (?) ; देप्रा. ठरिअ ऊर्ध्वस्थितं (२३८-६) ; पं. ठार ; सिं. ठरठप = तत्क्षणीं ; हिं. ठार.]

ठाव पुं. आधार, तळ, बूड, हद्द, जेवणाचें पान, पात्र, ठिकाण. Bottom, support, anything spread to serve food on.
[सं. स्थान, स्थामन् ; प्रा. ठाय, ठाव ; अप. ठाउ ; देप्रा. थाह, ठाणं स्थानम्–उंदम गंभीरजलम्, पृथुविस्तीर्णं तत्र त्रयेऽपि थाह शब्द थाहो दीर्घ इत्यन्ये. हिं. ठाव (पुं.) ; सिं. थाहु ; बं. था ; याकाम. ठाओ (ज्ञा. ९-५५) ; अकाम. ठाव = (पाण्याचा ठाव घेणे).]

ठाव(णें) सक्रि. स्थापणें, राखणें. To place, to protect.
[सं. स्थापय् ; प्रा. ठाव. ठाव पहा.]

ठावा वि. ठाऊक, ज्ञात. Known.
[कान. टाऊके ; याकाम. ठाऊक (नरुस्व. ८४५) ठाउवें (ज्ञा. ४-२०२) ; अकाम. ठाव.]

ठास(णें) सक्रि. खच्चून भरणें, दाबणें, कोंबणें. To cram, to stuff, to drive together.
[सं. अधि + आस् २ उपवेशने किंवा स्तंस् १ स्थैर्यें ; अकामसा. ठास, ठांस = टणक, कठिण ; ठासणी = ठेचणी, खच्चून भरणें.]

ठिकरी स्त्री. लहान तुकडा. A chip or fragment.
[सं. तञ्च्, तिघ्, स्थग् १ आवरणे ; देप्रा. ठिक्करिआ (स्त्री) = मडक्याचा तुकडा ; याकाम. ठिकरी (ज्ञा. १८–४३४.), ठिके = लहान तुकडा ; ठिके+री (अल्पार्थे प्रत्यय).]

ठिकाण,-णा न. जागा, स्थळ, स्थान, बूड, तळ, ठाव. A place, a spot, an abode, bottom.
[सं. स्थान किंवा स्तिज् (?) ; हिं. ठिकाना.]

ठिकें न. लहान तुकडा, ठिगळ, जागा. A patch.
[सं. तिघ् १ हिंसायाम्, स्थग् १ आवरणे ; अकामसा. ठिकोळें, ठिगोळें = लहान पत्रावळ.]

ठिगळ न. फाटक्या वस्त्राला लावलेला सांध, कप्पा, पट्टी, जोड. A patch.
[सं. स्थग् १ आवरणे ; देप्रा. थिग्गल.]

ठिणगी स्त्री. अग्निकण. A spark.
[सं. दहनी, धगनी, ठणगी (?)]

ठिपक(णें), ठिबक(णें) अक्रि. थेंबथेंब गळणें. To drop, to dribble.
[सं. स्तिप् १ क्षरणे + अकच्.]

ठिया,-य्या पुं. आधार, तुरसुंडी, प्रवेश. A support underneath, an entrance.
[सं. स्था, स्थिति ; प्रा. ठिइ.]

¹ठी स्त्री. ठराविक वेळ, स्थळ, मुक्काम, स्थिति, मर्यादा, शेवट. An appointed or usual spot or moment, limit.

[सं. **स्थिति ;** प्रा. **ठिइ, ठी ;** याकाम. **ठी** = शेवट (ज्ञा. ७-३०) ; ठिकाण (ज्ञा. १०-३००).]

²ठी स्त्री. स्त्री. A woman.

[सं. **स्त्री ;** हिं. **तिरिया ;** बं. **तिरी ;** का. **तिसय** (Grierson, Pis'. *Lang.* P. 8).]

¹ठीक वि. अ. बरोबर, उचित, योग्य. Right, just, correct, proper.

[सं. **स्तिघ्** ५ आस्कंदने.]

²ठीक स्त्री. मोत्यांचा झुबका. A bunch of pearls.

[सं. **स्तिब्र् ;** पं. **थेका ;** याकाम. **ठीक,** (उगी. ५१६.) ; **ठीकलग** (= रत्नजडित–नरुस्व. १७१) ; अकाम. **टिका, टीक** (डागिना).]

आंगाचेनि उजळपणें : भांसळत ठिकांचें लेणें ॥ नरुस्व. ९४.

ठुंठण न. थोटुक, कापलेला हातापायाचा भाग, खोड. The trunk.

[सं. **स्तुप्, प्रस्तुम्प् ;** देप्रा. **ढुंटो छिन्नकर** (१३७·२); गु. **ठुंठु** = थोटा, थोटुक ; सिं. **ठठु** = पानें झडलेला ; प. **ठोठ** = मूर्ख ; हिं. **ठुंठ** = खोड, वाळलेली खांदी.]

ठुमरी स्त्री. शृंगारीक लावणी. An amorous song.

[हिं. **ठुमरी.**]

ठुली स्त्री. थुली, जाडीभरडी कणीक. Coarsely ground wheat.

[सं. **स्थूल ;** प्रा. **थुल्ल ;** सिं. **थुल्हाइ ;** पं. **ठोल्ह** – लठ्ठपणा ; सिं. **तुल्** = लठ्ठा ; म. **ठोल्या, ढोल्या.**]

ठुसी स्त्री. स्त्रियांच्या गळ्यांतील दागिना, चोळीचा लग. A neck-trinket of women, a triangular piece in bodice.

[द्राविडमूळ आहे काय ?]

ठे(णें) अक्रि. ठाकणें, उभे राहणें, ताठ रहाणें, आधार घेणें ठेवणें. To stand, to be erect.

[सं. **स्थित, तिष्ठति** (√ **स्था**); प्रा. **ठाइ, उट्ठेइ** (उत्तिष्ठति), **ठिअ ;** पं. **थे** (स्थान), **थेनी** (सांठवण), **थेका** (कोंदणातील खडा); हिं. **था ;** मै. **थिक ;** का. **थव ;** याकाम. व बकाम. **ठेला** (= राहिला–नरुस्व. १६९)]

ठेका पुं. सारखा आवाज, तोरा, ताल, मक्ता, खोती. A slow measure in beating an instrument, a contract.

[सं. **स्तिघ्** १ आस्कंदने.]

ठेंगा पुं. सोडगा, सोटा, खुंट, टेंभा, गर्व. A cudgel or stout stick.

[सं. **स्तिघ्** ५ आस्कंदने ; अकामसा. **ठेंगणा** = खुजा, हलका ; **ठेंगाळ(णें), ठेंगार(णें)** = ठेचाळणें.]

ठेंच(णें) सक्रि. दगडाखालीं कुटणें, मारणें, घाव घालणें, चेंचणें. To bruise, to cram.

[सं. **तिज्** १० निशाने ; अकामसा. **ठेचळ(णें)** = ठेंच लागणें ; **ठेंच** = ठोकर ; **ठेंचा** = चटणी.]

ठेप(णें) अक्रि. जवळ येणें, भिडणें, टेकणें. To stop at; to come near, to approach.

[सं. **अति + आप्** ५ व्याप्तौ ; अकामसा. **ठेप** = टक्कर, भेट ; **ठेपसा** = मातीचा ढेपसा, ढेंकूळ.]

ठेल(णें) उक्रि. लोटणें, ढकलणें. To push, to press.

[सं. **अति + ईर्** १० क्षेपे ; अकामसा. **ठेल** = वैपुल्य, भरपूरपणा ; **ठेला** = पोतें, लहान गोण (हिं. **थैला**).]

ठेला क्रि. उभा राहिला, स्थापला, राहिला. Stood.

[सं. **स्थापितः, स्थितः** (निष्ठा), √ **स्था ;** याकाम, बकाम. **ठेला** (नरुस्व.) (ज्ञा. ६-८९). ठेणें पहा.]

मग आघवी देखतां सभा : पाख फडकुनि ठेला उभा ।
नरुस्व. १६९.

¹ठेव(णें) उक्रि. राखणें, मांडणें, लावणें. To put, to place, to set, to lay.

[सं. **अति + स्थापय ;** याकाम. **ठेवणें** (**ठेव** नरुस्व. ५०६)]

²ठेव(णें) सक्रि. चोरणें, वेष्टन करणें. To steal.

[सं. **स्तै** (१ वेष्टने) = to steal (M. Williams).]

आगा आघवेया चोरिया आपुलें । जें सर्वस्व आम्ही असें ठेविलें । तें पावोनि सुख सांचलें । होऊनि ठांसी ॥
रा. ज्ञा. ९-५१५.

ठेव स्त्री. सांठा, सचंय, निधि. A stock or hoard, a deposit, a reserved treasure.

[सं **स्थिति, स्त्याय,** √ **स्त्यै ;** याकामं. **ठेवणें** (**ठेव**–नरुस्व. ५०६) ; अकामसा. **ठेवण, ठेवणी** = आकार, **रूप,** ऐट ; **ठेवणावळ** = ठेवण्याराखण्याचा खर्च.]

ठोक(णें) उक्रि. मारणें, घाव घालणें, आघात घालणें. To knock, to strike, to beat.

[सं. त्रौक् १ गतौ; तृह् १ हिंसायाम्; त्वक्ष्; अकामसा. **ठोकण, ठोकणी–ठोकडा** (हत्यार;); **ठोकर** = ठेंच. **ठोकळा** = ओंडका, ठोका.]

ठोठाव(णें) सक्रि. दारावर शब्द करणें, आघात करणें, ठोक ठोक करणें. To knock at the door.

[सं. **स्त्यायनम्**, ध्वनिशब्द.]

ठोंब पुं. खुंट, सोट, घटिंगण(ल.). A naked or bear trunk.

[सं. **स्तुभ्** ६ स्तंभने; प्रा. **ठंभ**; गु. **ठोंब, थामलो**; सिं. **थंभु**; पं. **थम्म**; हिं. **थंब**; सिं. **टॅब**; अकामसा. **ठोंबरा, ठोमरा** = ठोसा; **ठोंबा** = आखूड काठी, जाड काठी; **ठोंब्या** = मठ्ठ मनुष्य (ल.)]

ठोल्या पुं. जार, गलेलठ्ठ मनुष्य. A term for an adulterous man, a rude, illiterate fellow,

[सं. **स्थूलः, थूस्ल**; प्रा. **थुल्लो, ठोल्या, ढोला** (गाथा सप्तशति); **ठुली** पहा.]

ठोसर वि. जाडेंभरडें, घटमुठ, दणगट. Coarse, thick.

ठोंसा पुं. रपाटा, धपाटा. A stroke.

[म. **ठोसणें.**]

ड पुं. मराठी वर्णमालेंतील तेरावें व्यंजन. ह्याचें उच्चारण मूर्धन्य अल्पप्राण मृदु असून उच्चारस्थान मूर्धा आहे. (ट. पहा.) The thirteenth consonant in the Marathi alphabet.

[सं. द; प्रा. द; **दंश्-डस, डंक.**

(मध्य ड) सं. ड, ट, ऋ + त्; प्रा. ड; **क्षोड-खोड, ताड–ताड प्रति-पत–पड.**

सं. र्द, ड्ड; प्रा. ड्ड; **उड्डी–उड, वड–वाड.**

सं. र्ध; प्रा. ड्ढ; **अर्ध–आड.** सं. र. प्रा. ड.]

डक(णें) सक्रि. चिकटणें, डसणें. To stick, to adhere.

[सं. **दष्ट** (√ दंश्); प्रा. **डक्क**; २ सं. **टक्** १ बंधने; **डंक** = दंश, चावा हा शब्द हि **डक्क**पासूनच आहे.]

डकडक(णें) अक्रि. ढिलें होणें, खिळखिळें होणें. To shake tremulously.

[सं. **दघ्** १ त्यागे (द्विरुक्तिः).]

डकमख(णें) अक्रि. ढिलें होणें, सैल होणें. To be loose.

[**क्रियाध्वनिशब्द.**]

डग(णें) अक्रि. थक्क होणें, शंका येणें, कांपणें, थरथरणें, विकल्प येणें. To be wonder-struck, to totter, to shake.

[सं. **दघ्** १ त्यागे; **टक्** १ बंधने.]

डगमग(णें) अक्रि. घाबरणें, भिणें, गोंधळणें. To totter, to rock.

[सं. **दघ्** ५ घातने, **मग्र्**; देप्रा. **डगमग.**]

डगर[1] स्त्री. नदीच्या कांठची तुटलेली जमीन, तुटलेला कडा, चढण, कडपा. A slope or ascent (as of a river bank).

[कान. **डोगरू** = भेग, **डोग्गे** = छिन्न करणें, उकरणें.]

डगर[2] पुं. प्रसिद्धि. Eminence, publicity.

[याकाम. **डगर, डगरु** (ज्ञा. १५·११८); = आळ, आरोप (ज्ञा. १८-१३), तरी तमारी हा डगरु (अमृ. २-३४).]

डगला पुं. मोठा, लांब अंगरखा. A kind of long coat.

[सं. **दुकूल** (?); हिं. **डगला.**]

डगळ, डघळ वि. ऐसपैस, सैल, ढिलें. Slack, loose.

[सं. दघ् १ त्यागे, घातने; याकाम. **डगळ** = मोठें, स्थूल (ज्ञा. १७·१२७); अकामसा. **डगूळ(णें)** = कुजणें, आंब्यासारखें लोंबकळणें, सुरकतणें, सडणें.]

डग्गा पुं. ढोल, ढोलगें, तबल्याच्या जोडीचें वाद्य. A kind of drum.

[सं. **ढक्का**; प्रा. **ढक्का**; ध्वनिशब्द.]

डंख, डंक पुं. चावा, साप, विंचू वगैरेंचा दंश, कांटा. A bite.

[सं. **दंश्**; प्रा. डक्क (निष्ठा); देप्रा. **डंक, ढंकुण** (= ढेंकुण, ढेकूण); हिं. **डंक**; ओ. डंकिबा; गु. **डंख**; सिं. **ढंगु**; **डंगणु**; पं. **डंग, डंक, डग्गाणा**; याकाम. **डंकु** (उगी. ७६७); हेमचंद्रानें हा **डंक** शब्द देशी म्हणून दिला आहे. **दंश** हा उघड उघड संस्कृतमूळ म्हणून दिसत असतां असा हा प्रमाद कसा घडला? ‘**दंश्**’ चा अन्त्य उच्चार ‘मूर्धन्य’(ष्) होता काय? एरव्हीं ‘क’ मराठींत कसा येईल.]

डंका पुं. पुकारा, प्रसिद्धि, ख्याति. Publicity.
[सं. टङ्क, (√ त्वञ्च्, √ तंच्); प्रा. **डंक**; सं. **ढक्का**; प्रा. **डक्क**; हिं. **डंका**; (ध्वनिशब्द); याकाम. **डंकी** (उगी. ५००)]

डंगी स्त्री. एक प्रकारचें जहाज. A kind of ship.
[देप्रा. **डोंगी** = पानाचा द्रोण, डबा.]

डच(णें) उक्रि. चावणें, टोचणें, नासणें. To bite, to prick, to rot.
[सं. दय् १ हिंसायाम्, दस् ४ उपक्षये; दश् १ दशने.]

डचक(णें) अक्रि. घाबरणें, एकदम भिणें. To be terrified.
[सं. **ध्रस्** १० उंछे, **दकूचक्कनम्**; अकाम. **डचका,–की** = धडकी, धसका, धक्का.]

डचमळ(णें) अक्रि. वर उडून जाऊन खालीं येणें. To shake and flop about.
[सं. **ध्रस्** १० उंछे, + **झल्** १ चलने.]

डझन न. बाराचा संच. A dozen, collection of twelve (articles).
[IE. dudeç ; सं. **द्वादश** ; *Eng*. Dozen ; *old French*. dozaine, doze ; *Fr*. douze ; *Lat*. dozena <duodecim.]

डंडल(णें) अक्रि. हलविणें, पुढें मागें झोके घेणें, डळमळणें. To shake, to agitate.
[सं. **दल्>दंदल्** (दुल्, दोलाय) = **डंडल**; माहा. डंडल.]

डंडल(णें) सक्रि. धुंडाळणें, शोधणें. To search for.
[सं. (?); प्रा. **ढुंढल्ल**; म. **धुंडाळ.**]

डफ पुं. (चामड्याचें) एक वाद्य. मोठी टिमकी. A drum, a kind of instrument.
[फा. दफ्; अकामसा. **डफघाई, डबघाई** (फा. दफ्– **गाई, घाई**) = डफावर वाजवितांना गाणें संपण्याच्या वेळीं फार घाईनें वाजवावें लागतें; त्यावरून समाप्तीची वेळ, विनाशकाल.]

डफर वि. निर्बुद्ध, मद्द‌ड. Dull.
[*Icel*. Daufr ; *Scot*. Dowfart, duffart, Douf' Dowf ; *Eng*. Deaf, Duffer = feeble.]

डफर(णें) अक्रि. गर्वानें फुगणें. To be puffed up with pride.
[सं. **दृप्** १ हर्षमोहनयोः ; अकामसा. **डफराव(णें)**– धुडकावणें, भीति दाखविणें.]

डफेदार पुं. लहान टोळीवरील अधिकारी. An officer on a small platoon.
[फा. **दफ्–अा** = एक शाखा, लहानसा संघ, + **दार** (अधिकारी)]

डबडब(णें) अक्रि. बदबद वाजणें, पाण्यांनीं भरून येणें. To sound flat or dull.
[ध्वनिशब्द ; सं. **डब्**; हिं. **डबाना** ; **डम्** १ शब्दे (Monier Williams), **डप्** १० संघाते.]

डबल, डब्बल वि. दुप्पट, दुहेरी. Double, two-fold.
[*Eng*. Double ; *Fr*. double ; *Lat*. duplus < duo, pleo ; सं. **द्वि + पृ, + पट.**]

डबा पुं. पत्र्याची पेटी, करंडा, A little box (of tin).
[कान. **डब्बी** ; हिं. **डबा, डब्बा** ; फा. **दब्बा.**]

डबीर पुं. एक अधिकारी, लेखक, चिटणीस, दिवाणजी. A secretary or notary to the king.
[पेह. **देबीर** ; प्रा. फा. **दिपि** = लेखन ; **लिपी** शब्दाशीं संबद्ध आहे. फा. **दबीर.**]

डबोलें, डबूलें, डबूकें न. गाठोडें, सांठा, संचय. A stock, a store, a hoard.
[कान. **डब्बी** = पेटी, करंडी.]

डब्ब वि. भरलेलें, फुगलेलें. Puffed up, swollen.
[कान. **डुब्ब** = मोठ्या पोटाचा मनुष्य ; अकाम. **ढब्बू, ढब्ब्या** = लठ्ठ मनुष्य.]

डेब्बा पुं. कातड्याची वाळवून तयार केलेली पिशवी. (त्यामधून तूप नेत असत किंवा गाळीत असत.) A leather bag (dried and made useful in putting ghee).
[हिं. **दबाह** = डब्बा.]

डेब्बा पुं. पळी. A (wooden) ladle.
[सं. **दर्वी** ; पं.हिं. **डब्बा** ; बि. **डाबा, दाबा** ; अकाम. डाव (लाकडाची पळी).]

डमरु पुं. वाद्यविशेष. A small drum-instrument, a sort of tabor, a rattle.
[सं. **डमरुक** ; प्रा. **डमरुग, डमरुअ.**]

डंबर न. अवडंबर, डौल, विस्तार, मेघ. A showy state or extent, fullness, a swagging state of cloud.

[सं. **डंबर**<**दंभ** (?).]

डंबार(णें) अक्रि. फुगणें, फुगीरपणा येणें. A swollen state (of belly).

[सं. **डंबर** = पूर्ण भरणें ; कान. **डब्बु** = (क्रियाध्वनिशब्द असावा ?) मोठ्या मोठाचा मनुष्य ; अकामसा. **डंबार**, **डंभारा** = फुगवटा, फुगीरपणा, **डंबाळ** = डौल, थाटमाट.]

डंभ, पुं. थाट, डौल, दांभिकपणा. A showy appearance, hypocrisy.

[सं. **दंभ** ; प्रा. **डंभ** ; देप्रा. **डंभिओ–द्यूतकरः** (१३९-४); का. **डांब, दंबी** ; अकामसा. **डंभाळ** = डौल, **डंभाळणें** (नाधा.) = ऐट करणें.]

डर(णें) सक्रि. भिणें, भयभीत होणें. To fear, to be afraid of.

[सं. **दृ, दर्** (?) ; प्रा. **दर, डर** ; देप्रा. **डरइ** ; हिं. **डर** ; प्राकृत व्याकरणकार **डर्** चा संस्कृत अर्थ **त्रस्** असा देतात. त्यांत स्वरप्रक्रियेचा संबंध कांहींच नाहीं. '**दृ, दर्**' ह्यासारखें संस्कृतमूळ असावें.]

डर स्त्री. भीति. Fear.

[सं. **दर, दृ** १ अवयवे ; पा. **दरो** ; प्रा. **डर, दर** (पुंन); गु. पं. हिं. बं. का. **डर** ; सिं. **डरु** ; रुमा. **दर्** = भीति.]

डरक(णें) अक्रि. ओरडणें (बैलाचें). To roar, to bellow.

[सं. **दांक्ष्** १ घोरवासिते ; कान. **आडुक** = बैलाचा शब्द (किंवा ध्वनिशब्द); अकामसा. **डरंक(णें), डरकाव(णें)**; ओरडणें ; **डरकणी, डरकण्या** = ओरड, आवाज ; **डुरकणी** = बैलाचें डुरकणें.]

डरांव डरांव पुं. बेडकाचा आवाज. Croaking sound (of frogs).

[ध्वनिशब्द. (**डरावणी, डरावणें, डरवणी**–हे साधित शब्द 'ओरड, बेडकासारखा आवाज' ह्याअर्थी रूढ आहेत.)]

डव पुं. सबंध नारळाची पोखरलेली करवंटी A hollowed cocoanut used as a cup, a bowl.

[सं. **दर्वी**; देप्रा. **डोई, डब्बा** ; हिं. **डवा, डोवा** ; सिं. **दावि** ; अकाम. **डाव** (लाकडाची पळी).]

डवच(णें), डिवच(णें) सक्रि. कांतडीस टोचणें, डिवचणें. To prick.

[सं. **दुवस्यति**, √ **दुवस्** ४ उपतापे, **त्वचयति**.]

डवडव(णें) सक्रि. अश्रु, पाणी, घाम ह्यांनीं भरून जाणें. To sweat in streams.

[सं. **दुप्** उपतापे किंवा **द्रु** १ गतौ; अकामसा. **डवडवित** = पूर्ण ओलें झालेलें.]

डवर(णें) अक्रि. गच्च भरणें, भरून खालीं उतरणें, टवटवीत होणें. To be studded thickly, to be covered luxuriantly.

[सं. **द्वृ.** = संवरणे, **द्व** ; देप्रा. **डड्डाडी** (दवमार्गः); याकाम. **डवरणें** = उठणें, बहरणें, (ज्ञा. ११-१३२); शिकाम. **डवरणें, डावरणें** = लिप्त करणें.]

कीं गगन-डाउ डवरिला सेंदुरें : प्रकाशाचेनि ॥ नरुस्व. ७१३

नाना रत्नांची फाकली प्रभा । तेणें डावरली सकळ सभा ॥ रामदास वि. सं. सभा.

डस(णें) सक्रि. चावणें, दंश करणें, चिकडणें. To sting, to bite.

[*IE.* Dek, Divk : सं. **दंश्. दश्** ; *Gr.* Dak; *Lat.* dac; सं **दंश्, दश्** १ दन्दशूके ; प्रा. **डस, डक्क** (निष्ठा), देप्रा. **ढंकूण** ; गु. **डस** ; पं. **डस** = चावा ; हिं. **डस. डंक** ; ह्या धातूचीं दोन प्रतीकें अर्वाचीन भारतीय भाषांत रूढ आहेत : एक. '**डस**' असें 'स' अन्त व दुसरें **डक** असें 'क' अन्त. अशीच स्वरप्रक्रिया इतर Centum, Kentum वगैरे शब्दांत झाली आहे.]

डहुल(णें) अक्रि. दुःखानें लोळणें. To roll on account of pain.

[सं. **धुर्व्** १ हिंसायाम् ; याकाम. **डहूल.**]

तैसी अहंममतेचिया लंहिदवडी । मातें न पवतिचि बापुडीं ॥
म्हणौनि जन्ममरणाची दूधडी । डहुलते ठेलीं ॥ रा. ज्ञा. ९.६१

डहुळी स्त्री. मंथन. Stirring into muddiness.

[सं. **ट्वल्**–ढवळणें ; याकाम. **डहुळणें** = घुसळणें (ज्ञा १८-६०७) ; अकाम. **ढवळणें** ; **डहुळ** = गढूळ.]

डळमळ(णें) अक्रि. चंचल होणें, अस्थिर होणें. To be unsteady, to tremble, to totter.

[सं. **टल्** १ वैक्लव्ये + **ह्वल्** १ चलने ; अकाम. **डळमळीत** = अस्थिर, हलणारा, अनिश्चित.]

डाई स्त्री. खेळांतील डाव, जय. Victory or the game.

[फा. **दाव्** = खेळांतील दान.]

डाक, डांक पुं. जोड, धातूचा जोड. A soldering bit of a metal.
[सं. **दंश** ; प्रा. **डंक** ; हिं. **डांक.**]

^{२}**डाक** पुं. अन्त्यविधि, प्रेतसिद्धि. The obsequies.
[सं. **ढक्का** ; गो. **डांक** ; हिं. **डाक.**]

^{३}**डाक** स्त्री. टपाल, पोष्ट. The tapal, post.
[हिं. **डाक्** = टपाल, टपाल किंवा उतारू नेण्याकरितां ठिकठिकाणीं टप्प्यावर घोडे ठेवण्याचीं ठिकाणें. टपालाची मूळ कल्पना खलीपाच्या राज्यांतील मोआवियानें सुरूं केलेल्या '**बरीद्**' (टपाल) पासून घेतली. अर. **बरीद्** ; *Lat.* Veredus, Veredius.]

डाकीण, डांक, डंकीण स्त्री. स्त्रीराक्षस, स्त्रीपिशाच. A class of female fiends.
[सं. **डाकिनी** = कालीची राक्षसी सेविका.]

डाकू पुं. दरोडा घालणारा, चोर दरोडेखोर. A robber, dacoit.
[हिं. **डकइत्**, **डाकायत्** = हत्यारबंद चोर, **डक** = चोरी, **डाकना** = ओरडणें (बीम्स); सं. **दष्ट** ह्या संस्कृत शब्दाशीं संबद्ध दिसतो.]

डाखळ(णें) अक्रि. डागळणें, डांक लागणें. To become spotted from rottenness.
[सं. **द्राख्** १ दशने + ल.]

डाखीण स्त्री. दाक्षिणेचा वारा. A southerly wind.
[सं. **दक्षिण** ; प्रा. **दक्खिण, दाहिण** ; सिं. **डाखिणो** ; पं. **दाहणा** ; हिं. **दाहिना** ; बं. **डाईन** ; ओ. **डाहण** ; का. **दच्छुन्, दखिन** ; सिं. **दकुण.**]

डाग(णें) सक्रि. डाग देणें, भाजणें, झाडणें. To brand, to burn, to fire.
[सं. **दह्** १ भस्मीकरणे, (निष्ठा) **दग्ध** ; प्रा. **दाघ** ; गु. **डाघ** (प्रेतयात्रा) ; सिं. **डाघु** (चिता) ; का. **दाग्** (भाजलेला भाग) ; सिं. **डागणु** ; पं. **डागणा** ; हिं. **डाघना** (पेटविणें) ; फा. **दाघ** = भाजल्याची खूण ; हा शब्द सं. '**दह्**' धातूशीं संबद्ध आहे.]

डागडुगी स्त्री. दुरस्ती. Repairing, plastering, painting.
[फा. **दाघ** = भाजल्याची खूण, **दोझ्** = शिवणें, टाके मारणें.]

डाग, डागिणा-ना पुं. अलंकार, भूषण, नग. A thing, article, ornament.
[हिं. **डाग** + णा.]

डागोबा पुं. बुद्ध स्तूप. A Budha pagoda.
[सं. **धातुगर्भ** ; पा. **धातुगब्म** ; सिं. **दागोबा** ; अकाम. **पागोडा** ह्या शब्दाशीं संबद्ध आहे.]

डांग स्त्री. लांब काठी, दांडा, दंड्या, फांदी, केळीचें मोठें पान. A crook (of a bamboo), a whole plantain leaf.
[हळेकन्नड. **डंके** = काठी ; देप्रा. **डंगा** = काठी ; हिं. **डांग** ; देप्रा. **डुंगर** ; हिं. **दांग** ; ह्यावरूनच अरण्य, दाट जंगल अशा अर्थाचा शब्द सिद्ध झाला आहे. याकाम. **डांग** = वांकदार काठी (नरुस्व. ३७१), = अरण्य (ज्ञा. ११-२१७)]

जयाचेनि प्रपंचाचे डांग उन्मळे ॥ नरुस्व. ३०६
कन्हणाचिया खांडेया न मेळवी डांग ॥ नरुस्व. ३७१

डांग पुं. नाशिक जवळचा डोंगराळ प्रदेश, (त्यावरून) डोंगर, रानटी प्रदेश. The name of wild, hilly tract.
[सं. **द्रङ्ग** = खिंडींतील लष्करी आणि जकातीचें नाकें ; देप्रा. **डग्गलो भवनोपरि भूमितलम्** (१६९-३) ; हिं. **डांग** (शिखर) ; बं. **डांग** (कोरडी जमीन) ; गु. **डागळी** (डोंकें, मेंदु) ; का. **डोंग-गु** (शेतांतील माळा) ; **द्रग** (उंचवटा), **द्रंग** (जकातीचें नाकें) ह्यावरून मूळ शब्द आर्योद्भव आहे व नंतर विशेषीकरणानें नाशिकजवळील डोंगराळ प्रदेशाला लावण्यांत आला असें दिसतें.]

^{१}**डांगर** न. वनस्पतिविशेष. A plant.

^{२}**डांगर** न. तिखट, मीठ वगैरे घातलेलें उडदाचें पीठ. Flour of उडीद with salt, chilly.
[द्राविडमूळ असावा. डांग पहा.]

डांगोरा पुं. आरोळी, ओरड, दवंडी, पुकारा. A cry, a proclamation.
[ध्वनिशब्द, कान. **डागर** = नगारा वाजवून पुकारा ; याकाम. **डागुरटी, डांगरुटी** = दवंडी (ज्ञा. १८-२८१).]

डांग्या (खोंकला) वि. एक प्रकारचा खोंकला. A violent and convulsive cough, whooping cough.
[म. **डांगळ** = सांबराचें शिंग, **डांग** = वेळूचा कोंभ. हीं दोन्हीं औषधी म्हणून वापरतात.]

डाच(णें) उक्रि. बोचणें, सलणें, टोचणें, त्रास देणें. To burn in throat, to bite, to gnaw.
[सं. **दंश्** १० दशने, **दाश्** १ हिंसायाम्; डचणें. डसणें पहा.]

डाडाइ(णें) अक्रि. गर्जना करणें. To create sound.
[ध्वनिशब्द; सं. **ध्वन्** (?)]

डांब(णें) डांभ(णें) उक्रि. अडकवणें, जखडणें, थांबवणें, बांधणें, मारणें. To tie up, to drive into ground.
[सं. **दंभ्** ५ हिंसायाम्; परंतु मराठी **डांब** (=खांब, सोट) ह्यापासून नामधातु दिसतो. **डांबर(णें)** (**डंबर** = गर्व) (नाधा.), **डांभार(णें)**, **डंभ्** = जमविणें (श. को.).]

^{1}डांबर न. एक काळ्या रंगाचें रोगण. Dammar.
[मलायी. **डामार** (Dammar); हिं. **डामर.**]

^{2}डांबर(णें) सक्रि. चेष्टा करणें, फुगणें. To redicule, to swag.
[सं. **डंब्** १० उपहासे; अकामसा. **डांबरट** = लुच्चा, खोडकर (**डंब्र, दस्मतर + ट.**).]

डांभा पुं. डौल, गर्व. Pride, pomp. hypocrisy.
[सं. **दंभ**; प्रा **डंभ**; अकामसा. **डांभारा** = फुगवटी, सूज; **डामडौल** = ऐट, इतमाम, थाटमाट. (**डांभा + डौल.**), डंभ पहा.]

डांब-डांभा पुं. खांब, खुंट, सोट. A stake or stout stick.
[१ सं. **दर्भन्**; प्रा. **डब्भ**; हिं. **डाभ**; २ सं. **दंभ**; प्रा. **डंभ**; परंतु संस्कृत ' **दर्भन्** ' हा मूळ म्हणून पटत नाहीं. **डंभ, डंब** पहा.]

डायरी स्त्री. रोजनिशी, दिनचर्या. Diary.
[*Eng*. Diary; *Lat*. diarium<diu = day; *Ital*. diaris. Latin मध्यें *diu* and *jour* अशीं दोन मुळें आहेत. ह्या दोन्ही मूळांपासून युरोपीय आर्य भाषांत शब्द सिद्ध झाले आहेत. उदा. *Diary*, *journal* इत्यादि.]

^{1}डाल(णें) सक्रि. सोडणें, त्याग करणें. To cast off.
[सं. **दा** १,३ दाने + **ला**, २ **द्व** (भये) (णिच्).]

^{2}डाल(णें) सक्रि. रचणें, रास करणें. To pile up.
[सं. **तल्**; अकाम. **डाळन** = मांदण, **कढई.**]

डाली स्त्री. एक तऱ्हेची बुटी, बुरडी, पाटी, (त्यावरून लक्षणा) फळें, भाजी, मेवामिठाई वगैरे पदार्थांचा नजराणा, शिंकाळें. A large basket, hence a gift ot sweetmeats.
[सं. **डलक** (?), **द्व** १ अवयवे, **दार**; देप्रा. **डल्लं पिटिका** (१३८-१६), **डल्लग**; गु. **डालुं**; सिं. **डाली**; पं. **डल्ल**; हिं. **डाल**; **डल्ला**; बं. **डला डाला.**]

^{1}डाव पुं. खेळ, खेळांतील पाळी, क्रम, खेळांतील जय, बाजू, पराभव, पंच, युक्ति (ल.). A game.
[फा. **दाव्** = खेळांत पडलेलें दान; अकामसा. **डावपेंच** = युक्तिप्रयुक्ति (**डाव** आणि **पेंच** हे दोन्ही शब्द समानार्थी आहेंत.]

^{2}डाव पुं. डंख. A bite.
[सं. **दातु** (भाग) अथवा **दाम** (?) किंवा फा. **डाव्** = धक्का.]

^{3}डाव पुं. वेळ, पाळी, क्रम. A turn, time.
[सं. **दातु**; का. **डाव**; बं. **डाउ**; ओ. **डाउ**; हिं. **डाऊ**, गु. **डाव** (पाळी).]

^{4}डाव पुं. लाकडाची पळी. A ladle.
[सं. **दर्विः**; प्रा. **डब्बी**; वि. **दाबी**; पं. हिं. **डब्बा**; बि. **डाबा, दाबा**; हिं. **दब्बु**; ब्लोक मराठी **डोई** = डोकें ह्या शब्दाशीं जोडतो. **डब्बा, डब्बी** वगैरे शब्द ह्या शब्दाशीं संबद्ध नाहींत. डब्बा पहा.]

डावा वि. उजव्याच्या विरुद्ध. Left.
[सं. ? ऑस्ट्रिक = **डवाल**; देप्रा. **डावो, डाव्वो**, (तथा **डावो** = वामकरः, १३८.९); हिं. **डावा**; पं. **डाउ** (मूर्ख); सिं. **डाओ**; गु. **डाबुं, डाभुं**; गु. **डावा**; हिं. **बायॉं**; देप्रा. **देव, देव्व, डावा, डाव्या**; ज्या भाषेंत हा शब्द वापरतात त्या भाषेंत ' दक्षिण ' ह्यापासून सिद्ध झालेला शब्द रूढ नाहीं; देप्रा. **देब्रो**; कु. **ढेब्रो**; हिं. **देब्रो, देवरा**; अकाम. **डावरा, डावखुरा** = डावरा, **डावीकडचें** = तिखटमीठ, कोशिंबीर वगैरे डावे बाजूकडील.]

^{1}डावर(णें) उक्रि. दटावणें, धमकावणें. To intimidate, to, menace, to overawe.
[सं. **द्व** १ भये, **दृ** १ कौटिल्ये.]

^{2}डावर(णें) सक्रि. लिप्त करणें. To besmear.
[डवरणें पहा. याकाम. **डावरणें** (ज्ञा. ११-२२२).]

डावल(णें) सक्रि. बाजूस सारणें, धिक्कारणें. To cast aside, to forsake, to desert.

[सं. **दवय** + ल (स्वार्थक); देप्रा. **डव्व** (वामकरः); याकाम. **डावलणें** (ज्ञा. ७-१२८) = डाव्या बाजूस सारणें. अलीकडे हा शब्द पुनः रूढ होत चालला आहे.]

पैं हींवरांची दाट साउली । सज्जनीं जैसी वालिली ।
तैसिं पुण्यें डावलूनि गेलीं । अभक्तांतें ॥ रा. ज्ञा. ९-४-३३

डांस पुं. मच्छर, चिलट, डाव, द्वेष. A gadfly, mosquito, hatred.

[सं. **दशक**; प्रा. **डासअ** ; हिं गु. **डांस** ; **दंस** (पुं.).]

डासळ(णें) सक्रि. डसणें, कुरतुडणें. To bite and gnaw.

[सं. **ग्रस्** १ हिंसायाम्.]

डाहार(णें) अक्रि. अंगाला लागणें, प्रसिद्ध होणें, प्रकाशणें, पीडले जाणें. To stick, to be known, to shine, to be harassed.

[सं. **द्राघ्** १ उपतापे ; **दंहर** (ना) ; **दंह्** = प्रकाशे.]

वावंदणें पाडनु पाए । सवलु **डाहरला** ठाये ॥ रा. ज्ञा. १७·१४२.

डाहाळा पुं. ओल्या हरभऱ्याचा घाटा, रोप. A leafy branch of gram-plant.

[सं. **दल्** १ अवयवे, **दल** (न) ; देप्रा. **दालि**.]

डाहाळी स्त्री. फांदी, तोडलेली फांदी. A sprig, twig.

[सं. **दल** (?) ; ऑस्ट्रिक. **डहन** = ढाळी ; प्रा. **डाली** = शाखा (१३९·१०) ; हिं. पं. बं. **डाल** ; सिं.. **डारी** ; गु. **डाळी** ; याकाम. **डहाळी** (= कोंवळी फांदी–नरुस्व. ८३४, ज्ञा. १५·९६). अकाम. **ढाळी**.]

डाळ, दाळ स्त्री. भाग, डाळिंबी. A part, portion (of a pulse.)

[*IE*. Dhdl, < Dhe, Dhdi; सं. **दल्**–अवयवे, (**दल**, **द्विदल**); *Lilh*. Dalis; *Slav*. delu; *Rus*. deliti; *Teut*. dails. *As*. dal; *Eng*. deal, ordeal. २ सं. **दालः** (**दलति**, **दरति**, **दार**) प्रा. **दालि** ; बं. डाल ; ओ. डालि ; हिं. दाल.; पं. दाल, डाळ ; सिं. डारु ; गु. डाळ. ३ सं. **द्विदल** ; प्रा. **द्विअल**> **ड्डिअल-डाळ** ; देप्रा. **दालि** (स्त्री), **दालिया** ; ह्यांत मुख्य हरभरा (हिं. **हर्हर् रहर्**), तूर, मुग, उडीद हीं धान्यें येतात. हीं धान्यें मूळ हिंदुस्थानांतील नसून ऊष्ण आफ्रिकेंतील असावींत व साधारण तीन हजार वर्षांपूर्वी हिंदुस्थानांत आणिलीं असावींत (हा. जा.).]

डाळ(णें) उक्रि. रास करणें, ढीग लावणें. To pile, to stack, to heap up.

[सं. **दल्** १ अवयवे, **दह्** १ वृद्धौ, **दढ** (निष्ठा); हिं. **ढला, ढेला, डालन** ; गु. **डलो**, पं. **डला, दला** ; हिं. **डल्ला** ; अकाम. **डाळ** = रास.]

डाळिंब न. फलविशेष. The fruit pomegranate.

[सं. **दाडिम** ; पा. **दालिमो** ; प्रा. **दाडिम, दालिम** ; आ. **डालिम** ; बं. **दाडीम** ; **डालिम** ; ओ. **दाडिम्ब** ; **डालिम्ब** ; हिं. **दारिम्ब** ; सिं. **डाढुँ** ; गु. **दाडम्** ; परंतु मूळ संस्कृत **डाडिम** हाच शब्द परकी वाटतो. तो मूळ *Austric* **दालिम**पासून आला. **दा** = पांच, **लिम** = पाकळी, **दालिम** = पांच पाकळ्यांचें फळ (क्रॉफर्ड – ३५९.). हें फळ आर्यभारती नाहीं.]

डाळिंबी स्त्री. डाळीचा अर्धा भाग. A half of any pulse split.

[सं. **दल्** १ अवयवे. ह्याचा आणि डाळिंब फळाचा कांहीं संबंध नाहीं. डाळ पहा.]

डिक(णें) उक्रि. चिकटणें. To stick.

[सं. **दिह्** २ उपचये ; डक पहा. अकामसा. **डिक, डिंक**, = गोंद, चिक ; **डिकव(णें)** = चिकटविणें ; **डिकेमाली** = एक वनस्पति.]

डिकरा, (डिकरी, डिंगरूं) पुं. मूल. A child, baby.

[सं. **डिंगर** = नोकर (?); याकाम. **डिंगरू** ; गु. **डिक्रा, डिक्री, डिंगरा** ; खानदेशी भाषेंत ‘ **डिकरा** ’ हा शब्द रूढ आहे. देप्रा. **डीर** = अंकुर–हा शब्द ह्याच्या मुळाशीं आहे काय ? असेल तर मधील **क(ग)** ची उपपत्ति काय ?]

डिखळ, डिखळी न. स्त्री. ढेकूळ, गोळा. A little clod of earth.

[म. ‘ **ढेकूळ** ’ ह्याचा अपभ्रंश ; **ढेकूळ**, √ **दिह्** २ उपचये.]

डिंडिम पुं. वाद्यविशेष, डंका, नगारा. A kind of instrument, a drum.

[सं. **डिंडिम**, (ध्वनिशब्द), **डिम, डिम** ; याकाम. **डिंडिमा** = नगारा (ज्ञा. १६-४४३).]

डिंडी स्त्री. पसारा, स्वारी, छबिना, मेळा. A procession.

[सं. **डिंडिम** (?); याकाम. **डिंडी** (ज्ञा १५-३१५); अकाम. **दिण्डी** (पंढरपूर वगैरे ठिकाणीं भजन करीत जाणारा वारकऱ्यांचा समूह.)]

डिंब पुं. मुलगा. A son.
[सं. डी १ गतौ (?) > **डिम्भ** (मूल); प्रा. **डिंभ**; हिं. **डिंब** (नुकतेंच जन्मलेलें मूल); बं. **डिंब** (अंडें, पिल्लूं). परंतु मूळ संस्कृत शब्द परकी असून 'आस्ट्रिक' भाषेंतील आहे.]

डीरी, डेर स्त्री. अंकूर, कोंभ. A young sprout.
[सं. दृ १ अवयवे; देप्रा. **डीर** (न.); याकाम. **डिरी** (ऋ. पू. ५५६), **डिरणें** (अंकुरणें).]
सवेंचि दिसे डिरैली । प्रेमलता ते ॥ भा. ए. ७९४.

डिव(णें) अक्रि. न मानणें, पचणें, बाधणें, सलणें, डिवचणें. To offend, to disagree with, to be harmful unto.
[सं. **डिव्** ४ मदे, परिपूजने.]

डिवच(णें) सक्रि. हलवणें, टोचणें. To move, to prick.
[सं. **द्विष्** २ अप्रीतौ.]

डुकर, डुक्कर पुं. न. प्राणिविशेष. A hog, sow, pig.
[सं. **शूकर** (?), ध्वनिशब्द (?); शब्द परकी असावा.]

डुडूळ पुं. घुबड. An owl.
[ध्वनिशब्द. सं. **घूक** (?); याकाम **डडूळ**; कोंकणी भाषेंत **डुडा** = पक्षिविशेष असा एक शब्द आहे. त्यापासून वरील शब्द आला असावा.]

डुब(णें) अक्रि. बुडणें, नाशणें, पाण्यांत डुंबणें, फार वेळ पाण्यांत राहणें, -खेळणें, रंगानें माखणें. To plunge in water, to gambol in water, to be ruined.
[*IE.* Dhevbh; सं. **दुब्**; *Gr.* dup; *slav. Lith.* dubus; *Teut. Goth.* diups; *Eng.* deep. depth; सं. **अधि + उभ्** ६ पूरणे; प्रा. **बुल, बुड, डुब** (वर्णविपर्यय); देप्रा. **बुड्ड** (मज्जने); कान. **डोब्बु** = वरून आंत टाकणें; अकाम. **डुब, डुबक, डुबकी** = बुडी.]

डुरक(णें) अक्रि. बैलाचें ओरडणें, डुरकी. To roar (as a bull).
[कान. **आडुकु**, **डुरकी** = बैलाचा शब्द. हा ध्वनिशब्द उघडउघड दिसतो. **डुर्** = बैलाचा ध्वनि, **डुरकरणम्**; सं. **द्राक्ष्, द्राघ्** १ घोरवासिते; अकामसा. **डुरकी, डुरकणी** = बैलाचा आवाज; **डुरडुर(णें)** = डरांव डरांव करणें; **डुर, -डुरा** = डबकें, झरा.]

डुल(णें) अक्रि. मान हलविणें, पुढें मागें मान करणें. To walk nodding and waggling, to oscillate.
[सं. **दोलय**, **डुल्** = उत्क्षेपे; प्रा. **डुल**; गु हिं. **डोल**; सिं. **डोल**; **डोर**; का. **दुल**; अकामसा. **डुलकी** = पेंगणें; **डुलकी** = ओकारी; (<**दुःउद्गीर**).]

डूब स्त्री. बुडी, बुचकळी, रंगाचा हबका. A dip (into a liquid).
[म. **डुबणें** पहा.]

डूल, डूळ पुं. कानांतील एक दागिना. An earring of children.
[**डुलणें** पहा; याकाम. **डुळें** = कानाची छिद्रें.]
दोन्ही कान नाहींत मुडें : आइकेति डुळांहुनी ॥
नरुस्व. २०६.

डेख न. देठ, ताट, मूळ. Stalk, stem, stump.
[सं. **दिह्** २ उपचये; अकामसा. **डेंखान, डेंखण** = रोप, खूड, वाढ.]

डेग स्त्री. हंडा, मोठें भांडें. A large metal culinary pot.
[फा. **देग्**.]

डेंग(णें) अक्रि. थकणें, दमणें. To be exhausted or spent.
[सं. **धिक्ष्** १ क्लेशने; अकामसा. **डेंग** = जड, ढोंगी; **डेंगणें** = लिंग, जननेंद्रिय.]

डेंगू पुं. एक प्रकारचा ज्वर, ताप. The dengue fever.
[ह्या ज्वरामध्यें सर्व अवयवांत ताठपणा येतो. ते वळत नाहींत, वांकत नाहींत; म्हणून निग्रो लोक (वे. इण्डीज) "Dandy fever" असें त्याला म्हणूं लागले. ह्या शब्दांचा स्पॅनिश लोकांनीं Denge किंवा Dengue असा अपभ्रंश केला. दुसरी एक उपपत्ति अशी आहे कीं स्वाहिली भाषेंतील '**डिंगा**' ह्या शब्दाचा अपभ्रंश असावा. झांझीबार भाषेंतून स्पॅनिश भाषेंत, नंतर इंग्लिश व नंतर मराठी भाषेंत असा ह्या शब्दाचा प्रवास आहे. हिंदुस्थानांत हा ज्वर इ. स. १७८०, इ. स. १८२४, इ. स. १८७१ ह्या सालीं सांथीच्या रूपांत होता.]

डेंडळ(णें) अक्रि. ढेंढळणें पहा. To have a flux.
[सं. **अधि + टल्** १ वैक्लव्ये.]

डेंबर(णें) अक्रि. पोट फुगणें. To swell, to be puffed (the belly).
[सं. डिंभ् १ संघाते, **डिंभर** (ना.)]

डेर(णें) अक्रि. पोट फुगणें. To swell, to be puffed.
[सं. **द्रेक्** १ उत्साहे ; अकामसा. **डेरकणें, डेंबरा, डेंभरा** = मोठें पोट असलेला (**डिंभ्** १ संघाते).]

डेरू, डिरू पुं. मुलगा, मूल, कोंभ. A sprout, son, child.
[सं. द्द (?) ; देप्रा. **डहरो** (शिशुः) ; याकाम. **डिरी, डिरू** (कोंभ) ; अकामसा. **डिंगरी** = मुळ्याची शेंग ; **डेरकें** = लहान डेरा ; **डेरा** = माठ डिकरा पहा.]

डेव(णें) अक्रि. टोमणा मारणें, अजीर्णामुळें मांद्य येणें. To taunt, to be sluggish on account of indigestion.
[सं. **दिव्** १० परिकूजने, ४ मदे.]

डों न. तेल काढण्याचें नारळाच्या करवंटीचें पात्र, डवला. A wooden ladle for taking out oil.
[म. **डाव** = वाटी, पळी. **डाव** पहा.]

तेथचि डों आणुनि देणें ॥ ऋ. १२२.

डोई स्त्री डोकें, मस्तक, टवका, गळूं, (लक्षणा) बुद्धि. The head, skull, protuberance on the head, intellect (fig.).
[म. **डोके, डोकी** ; सं. ? ; कान. **डवूगे** ; देप्रा. **डोओ** दारुइस्तः (१४०-९) ; गु. **डोक** (स्त्री) = मानगुट **डोकुं** (न.) **डोकें, डोई** (पळी, डाव) ; सिं. पं. **डोई** (पळी) ; हिं. **डोई** (पळी, वल्हें, डोकें), **डोवा, डबा, डोहरा** (पळी) ; रुमा. **डोय** (चमचा) ; का. **डेक** (**कपाळ**) ; **डव, डोकें** पहा. याकाम. **डोई** (ज्ञा. १३-७१६).]

डोकें न. टाळूं, शीर्ष, कवटी, बुद्धि, विचारशक्ति (ल.). Head, skull, intelligence.
[कान. **डवूगे** = कवची, कवटी ; अकामसा. **डोकसें, डोसकें, डोचकें** = डोकें ; **डोकावणें** = डोकें खुपसून आंत पाहणें (सं. **ढौक्** १ गतौ.). **डोई** पहा.]

डोंगर पुं. पर्वत, मोठी टेकडी. A hill, a mountain.
[सं. **दांग** = अरण्य ; देप्रा. **डुंगरो** (शैलः १४०·८) ; गु. **डुंगर** ; सिं. **डोंगरु** ; हिं. **डोंग** ; अकामसा. **डोंगरकरी** = डोंगरी (लोक) ; **डोंगरखिंड** = डोंगरांतील अरुंद मार्ग ; **डोंगरपठार** = डोंगराच्या माथ्यावरील सपाट प्रदेश ; **डोंगरकिल्ला** = डोंगरावरील किल्ला.]

डोंगा वि. वांकडा. Curved, bent.
[कान. **डोंका, डाकु** = वांकडेंपणा.]

डोण पुं. बादली, लहान हौद. A trough.
[सं. **द्रोणम्** ; पा. **द्रोणम्** ; प्रा. **दोण** ; का. **डूनु** ; कु. **दोण** (माप) ; बं. **दुनी** ; हिं. **दोना** ; डोणी पहा.]

डोणी स्त्री. लहान तारूं. A canoe, *doney*.
[सं. **द्रोणी** ; पा. प्रा. **दोणि** ; हिं. **डोनी** ; सिंह. **देण** ; याकाम. **डोणि** (उगी. ११०) ; अकाम. **डोंगा** = लहान नाव, होडी.]

परी जीवा आंतुलीकडे । जैसी संदेहाची डोणी बुडे ॥
ज्ञा. १४-३०

डोणी स्त्री धुण्याचें दगडाचें भांडें, झाडाच्या बुंध्याचें पोखरून केलेलें भांडें, द्रोण. A trough.
[कान. **डोणें** = डोंगरांतील टाकें ; तामीळ. **तोणी, तोडुग, डोणी** = मोठें पसरट भांडें ; सं. **द्रोण** ; **डोण** पहा.]

डोबरा पुं. मोठा खड्डा, खळगा. A breach or rude hole, cavity (on road).
[म. **डबरा** पहा ; कान. **डब्ब**.]

डोंब पुं. जातिविषेश. A low caste or an individual of it.
[सं. **डुंब, डोंब, डोम** (?) ; देप्रा. **डुंबो** (श्वपचः १४०-८) ; द्रा. **डुंबा** = राक्षस, डोंबारी म्हणून एक जात आहे. ते खेळ करतात. डोंब प्रेतदहनास लांकडें पुरवितात, शव वाहतात. उत्तर हिंदुस्थानांत गवई म्हणूनहि ते धंदा करतात. अयोध्येमध्यें ते भंग्याचें काम करतात. चंपारणांत ते धंदेवाईक चोर आहेत.]

डोंब, डोंबाळा पुं. आगीचा एकदम पेट, वणवा. A conflagration, fierce fire.
[कान. **डोंबी** = समूह, गर्दी ; किंवा हा ध्वनिशब्द असल्यासारखा दिसतो.]

डोंबल न. पोट, ढुंगण, शरीर, डोकें. (शिवीप्रमाणें वापरतात.). (An abusive term used for) belly, buttock, head.
[कान. **डोंबे+ल**(?).]

डोल(णें) अक्रि. हलणें, मान मागें पुढें किंवा बाजूस करणें. To nod, to waggle, to reel.

[**डुलणें** पहा. अकाम. **डोल**=देवाचा डोलारा, कंप.]

डोल पुं. पाण्याची बादली. A bucket or pail.
[फा. **दोल्**=पोहरा, बाल्डी.]

डोला पुं. ताबूत, ताजिया. The taboot.
[सं. **दोला**; हिं. **डोला**; मराठींत शब्द हिंदीमधून आला.]

डोली स्त्री. खुर्ची, लहान पालखी. A swinging chair or cot or litter.
[सं. **दोलय** > **डोलय**; देप्रा. **डोला** (शिविका आन्दोलनवाचकस्तु दोलाशब्द भवः १४०-९); सिं. पं. हिं. **डोला**; का. **डुल**; याकाम. **डोली** (नरुस्व. ४५६).]

डोल्हारा पुं. लहानसा झोंपाळा, पाळणा. A swinging cot, cradle.
[सं. **दोला**; देप्रा. **डोला**; म. **डोलणें**; याकाम. **डोल्हारा** (=झोंपाळा, हिंदोळा); अकाम. **डोलारा.**]
तेथ कापुरकेळिचा डोल्हारा केला : तो मृणाळ सुताचेनि पाटें विणिला ॥ नरुस्व. ४६०.

डोह पुं. मोठा जलाशय, खोल पाण्याची जागा, सांठा, नदीच्या पात्रांतील खोल खड्डा. A hole or deep part in a river (or a tank.)
[सं. **द्रह**; प्रा. **दह** (पुं.); **हृद**पासून वर्णव्यत्ययानें व्युत्पादणें शक्य आहे परंतु वरील व्युत्पत्ति अधिक ग्राह्य आहे. तिला प्राकृतचा आधार आहे. **संदोह** ही व्युत्पत्ति श. को. देतो. ही तर ग्राह्य नाहींच.]

डोहणा पुं. विरोध, गोंधळ, अडथळा. Interruption, hindrance.
[?; पेकाम. **डोहणा** (=दंगल–पे. द.)]

डोहळ(णें) अक्रि. इच्छा उत्पन्न होणें. To desire, to have craving or longing.
[सं. **दोहद** (√दुह्); प्रा. **डोहल** (नाधा.); याकाम. **डोहळणें**=इच्छा उत्पन्न होणें (शिशु. २७४).]
झाडें डोहळैजताति माजें : स्त्रीसुख भोगावया ॥ नरुस्व. ७६६.

डोहाळा पुं. गर्भिणी स्त्रीचा अभिलाष, मनोरथ, लालसा. The longing of a pregnant woman.
[सं. **दोहद**; प्रा. **डोहल**, **दोहल** (पुं.); अकाम. **डोहला**, **डोहोळा** (ज्ञा. १२-२२१).]

डोळ पु. अर्धवट भरडलेली डाळ. Pulse roughly ground.
[म. **डोळा**; देप्रा. **डोल**=डोळा, जंतु, फल.]

डोळा पुं. आंख, नेत्र, चक्षु, दृष्टि. An eye, sight, vision.
[सं. **दोल्** (?); देप्रा. **डाअल** (न.); देप्रा. **डोलो** (लोचनार्थः). हा शरीरावयववाचक शब्द द्राविडमूळ असावा. गु. **डोळो.** मराठींत येतांना लिंगविपरिणमन झालें. अकाम. **डोळस**=डोळे शाबूत असलेला, चतुर, हुपार (ल.) (याकाम. **डोळस**=चांगल्या डोळ्याचा, सुंदर.)]
बहुतां बाइलांतु लक्षुमी रूपसः परि तियेपासौनि हे डोळस ॥ नरुस्व. १९३.

डोळू न. भोक, छिद्र. A hole.
[म. **डोळा**; याकाम. **डोळेयाचें अंग**=कटाक्ष, दृष्टिक्षेप नरुस्वः ७४२.]

डौक(णें) अक्रि. डोळे वटारणें. To scowl, to glare at.
[सं. **ढौक्** १ गतौ.]

डौच(णें) सक्रि. टोचणें, भेदणें, डिवचणें. To prick, to pierce.

डौर पुं न. डमरु. A little rattle.

डौर(णें) अक्रि. शोभणें, सजणें. To look beautiful, to be covered profusely.
[अर. **डौल्**; शिकाम. **डौर**=घोळ; अकाम. **डौल**= ऐट, तोरा, बढाई. किंवा सं. **द्वृ** संवरणे (?).]
केली विजार वरि डौरहि मौन सेवी ॥ न. द. ४३.

डौल पुं. ऐट, दिमाख. Show, air, pomp.
[अर. **डौल**; मूळ अर्थ पद्धत, प्रचार, आकार, स्वरूप. त्यावरून दिमाखाचें स्वरूप, भूषित–अलंकृत आकृति; २ अंदाज, कोरा खोका तपशील भरण्याचा; असा ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे.]

ड्रम पुं. एक इंग्रजी वाद्यविशेष, नगारा. A drum, an instrument.
[मराठींत हा शब्द इंग्रजी किंवा इतर फ्रेंच वगैरे पाश्चात्य भाषांमधून आला. डच किंवा डॅनिश ड्रम वाजविणारे लोक त्या देशामधून येत. *Icel.* Thruma = thunder; *Dan.* Drum; *Dut.* Trom; मूळ शब्द *Trommel* असा आहे. ड्रमचा घोटाळा ड्रुन, ड्रोन (Droone, Drone) ह्या शब्दांशीं झाला. ह्या दोहोंचा परिणाम त्यावर झाला आहे.]

ढ पुं. मराठी वर्णमालेंतील चौदावें व्यंजन. ह्याचें उच्चारण मूर्धन्य महाप्राण मृदु असून उच्चारस्थान

मूर्धा आहे (ट पहा.). Fourteenth consonant in Marathi alphabet.

[सं. ढ (?); प्रा. ढ. .

(मध्य ढ) सं. र्ध, ऋ + ध, ठ, ढ, थ, ष्ट, ष्ठ;

प्रा. ड्ढ; द्व्यर्ध-दीढ, मठ-मढ, पठ-पढ, वेष्ट-वेढ, कष्ट-काढ.

आद्य, मध्य, अन्त्य मराठी ढ हा सं. प्रा. ढ ठ ड, ट, ध, थ, स्त, स्द ह्र ष, र, न्ह इत्यादि वर्णांपासून सिद्ध होतो.]

ढ[२] वि. अडाणी, अशिक्षित, मूर्ख. Block-head, dunce, stupid, illiterate.

[हा शब्द '**गाढव**' ह्या शब्दाचा संक्षेप म्हणून वापरांत आहेसा दिसतो. गाढव मधील प्रमुख वर्ण 'ढ' ह्याच्या उच्चारालाच सर्व शब्दाचा अर्थ प्राप्त झाला आहे काय ?]

ढकल(णें) सक्रि. सारणें, लोटणें, रेटणें, बाजूस काढणें, कंठणें, ढासळणें. to push, to pass.

[सं. **ढौक्** १ गतौ, (**ल?**), **अधः + कल्** १ गतौ, **धक्** १० नाशने; अकामसा. **ढकल** = चालढकल, दिरंगाई; **ढकलनंदन** = आपलें काम किंवा जबाबदारी दुसऱ्यावर फेंकणारा; **ढकलपट्टी** = रेटणें, टोलवाटोलवी; **ढकलाढकल** = रेटारेटी.]

ढका, धक्का पुं. धक्का, जोराचा हिसडा, ढकल. A sudden push, a jolt, a blow.

[सं. **धक्** १ नाशने; गु. **ढक्, धक**; सिं. **धिको**; पं. **धक्का**; का. **दक**; हिं. **ढक्का, धक्का**; बं. **ढंक**; ओ. **धका**.]

ढकार वि. एक हजार. A thousand.

[नंदभाषा. '**ढ**'**कार**; ही कांहीं तरी सांकेतिक भाषा आहे. ती व्यापारी उदमी ह्यांच्या वापरांत आहे. हीं संख्याविशेषणें विसाखेचराच्या एका अभंगांत वापरलीं आहेत. 'ढकारू वदनाचा' (विसाखेचर).]

ढक्का[२] पुं. नगारा, डमरू. A large double drum.

[ध्वनिशब्द. **ढक्का**.]

ढगढग(णें) अक्रि. हलणें, पाझर फुटणें. To reel, to rock, to nod, to ooz.

[सं. **स्थग्** १ गतौ; अकाम. **ढगढगा** = डळमळत, झुलत; **ढगळ** = बिलबिलित भाग.]

ढगळ(णें) अक्रि. कुजणें, नासणें. To rot and run.

[सं. **अधः + गल्** (**अलोप**).]

ढगोजी (**मेघोजी**) पुं. महार जातीचा गुरु. The *guru* of the *Mahars*.

[**ढग** = देवतेचें नांव ?]

ढंग पुं. थेर, चाळे, चेष्टा, दुर्व्यसन. Licentious practices, vice.

[सं. प्रा. (?); बं. **ढङ**; ओ. **ढङ्ग**; हिं. पं. **ढंग**; सिं. ढगु; गु. **ढग**; मराठींत हा शब्द हिंदीमधून आला.]

ढंगधत्तुरा पुं. सोंग, ढोंग, मंत्रतंत्र. Fuss and swell of a juggler, hocus-pocus.

[**ढंग + धत्तूर**.]

ढणढण(णें) सक्रि. आवाज करणें, एक सारखें जळणें. To ring, to clang, to clank, to flare a light.

[सं. **ध्वन्**. **ढण** (द्राविडमूल–ज्वलन ह्या अर्थी) किंवा दहन् दहन् इति ज्वलति = ढण् ढण असा जळतो.]

ढपला,–ली पुं. स्त्री. खपली, आवरण, वरील आच्छादन, धलपा. A chip, a slice.

[सं. **अधि + अर्प्** (आच्छादने) किंवा **धापय**.]

ढप(प्प)ळ न. पातळ भाजी, आमटी. A sort of thin, wishywashy vegetable soup.

[कान. **ढपळं + पाणी**. ह्या शब्दांत ढपळ, **ढेपाळ** = ढेलपणा लबलबितपणा ह्याचा अर्थ आहे. **सैल, ढिला** वगैरे शब्दांशीं ह्याचा संबंध दिसतो. व त्या दृष्टीनें सं. **शिथिल**; प्रा. **सिढिल**; वैसं. **श्रृध्** इत्यादि शब्दांशीं संबंध आहे. **ढेपाळणें**, **ढपळ** = अतिशय मोठा, **ढबळ, ढोबळ, ढपळशाई** = चंगळ, वैपुल्य वगैरे सर्व शब्द परस्परसंबद्ध आहेत.]

ढब स्त्री. आकार, स्वरूप, साम्य, ऐट, भपका, डौल, दिमाख. An imposing air, form, manner of action.

[सं. **दह्, दिह्** (?); बं. डप्; ओ. **ढप**; हिं. पं. **ढब**; सिं. **ढबु**. मराठींत हिंदीमधून हा शब्द आला. अकामसा. **ढबदार** = टप्पोरा, सुरेख, भपकेबाज; **ढबळ** = ढबू, फार मोठा; **ढबका** = मोठा तुकडा.]

ढब्बू पुं. मोठा पैसा (दोन दिडक्यांच्या किंमतीचा), लठ्ठ मनुष्य. A piece of copper money, a double pice, a gross and bulky man.

[कान. **डब्बु**; तामी. **डुद्दुपु**; हिं. **ढब्बू**; तेलु. **डब**, **डुब** = वीस कसांच्या किंमतीचें नाणें. ह्याच्या अर्थाचें सामान्यीकरण होऊन 'पैसा' असा अर्थ झाला. **डबोलें** = पैशाचा सांठा हा शब्द संबद्ध आहे.]

ढब्ब्या पुं. मोठ्या पोटाचा मनुष्य. A burly, bulky, fat man.

[कान. **डुब्ब** = मोठ्या पोटाचा मनुष्य.]

ढम, ढम्म वि. आळशी, सुस्त, मंद. Exceedingly dull, sluggish.

[**ध्वनिशब्द**, सं. **मुखस्तंभ, स्तंभ.**]

ढमका पुं. पादाचा आवाज. A loud-sounding ventris crepitus.

[**ध्वनिशब्द**, सं. **ध्मा** (धमने); अकामसा. **ढमकें** = टिमकी, एक वाद्य; **ढमढम,-ढमा** = नगाऱ्याचा आवाज; **ढमामा** = वाद्यविशेष.]

ढल(णें) अक्रि. वाजणें. To sound.

[सं. **ध्रण्** १ शब्दे; याकाम. **ढलणें.**]

म्हणौनि संवादाचा सुवाऽढले। तरि हृदयाकाश सारस्वत ओले। श्रोता दुचिता तरि वितुले। मांडरा रसु॥ रा. ज्ञा.९-२८

ढलमल(णें) अक्रि. हलणें, गदगदणें, जोरांत ढवळणें. To move, to stir.

[सं. **टल्** १ वैक्लव्ये, + **ह्मल्** १ चलने.]

जैसे गंगेचेनि आघें। ढलमलीत जें निगे। सिंधुपद तेया जोगें। आन नाहीं॥ रा. ज्ञा. १४-३९६

ढवढव(णें) अक्रि. नासणें, चक्काचूर होणें, विफल होणें, फसणें. To be smashed or blasted, to come to nothing.

[सं. **धू** ६ विधूनने (द्विरुक्ति); अकामसा. **ढवडव** = गोंधळ, घोटाळा, भानगड; **ढवढ(व)वाडा** = धिंडवडे, अप्रतिष्ठा, अपमान; **ढवंढाळ** = मसलत, हिकमत.]

ढवसाऊ न. आहुति, बळी. An oblation, offering in a sacrifice.

[सं. **ध्वंस्**, **ध्वसकः**; प्रा. **ढवसाओ**; याकाम. **ढवसाऊ.**]

"रणदेवतां ढवसाऊ केलें" ॥ शिशु ४४९

ढवळ(णें) उक्रि. हलविणें, खालीं वर करणें, घाटणें, घोळणें. To stir up, to disturb.

[सं. **ड्वल्** १ मिश्रणे किंवा **ध्वृ** १ हूर्च्छने; अकामसा. **ढवळा** = गोंधळ, नाश, बिघाड; **ढवळाढवळ** = इकडें तिकडें हलविणें, भानगड, घोंटाळा.]

ढवळा वि. पांढरा, सफेत. White.

[सं. **धवल**; प्रा. **धवल**; याकाम. **धवळ, धवळार.** अकाम. **ढवळा** = पांढरा बैल.]

ढवळें न. गीत, बायकांचें गाणें. A song.

[सं. **धवलितम्** = यश; याकाम. **धवळे** (उदा. महदंबेचे धवळे.]

ढवळार न. वाडा, डौलदार हवेली. A pretty beautiful house.

[सं. **धवलार, धवलागार**; याकाम. **धवळार** (धपू. ३०).]

ढवा पुं. हिजडा, नपुंसक, साजिंदा. An hermaphrodite.

[सं. **धवः** = नवरा. ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. अर्थभ्रंशाचें हें चांगलें उदाहरण आहे. स्त्रियांमधील पुरुष अशा अर्थानें भ्रंश झाला असावा.]

ढस(णें) अक्रि. खूप खाणें, अघाशीपणानें खाणें. To eat greedily.

[सं. **अधि + अश्** ९ अदने; अकामसा. **ढसढस(णें)** = गिळणें; **ढसास(णें)** = एकदम गिळणें, कोंबणें, भरणें; **ढसडस, ढसास** = (घटघट पिण्याचा होणारा आवाज).]

ढसाळ वि. सढळ, उदार, सैल, उधळ्या. Lavish of money, profuse of gifts or expenditure.

[सं. **ध्वस्** (हिंसायाम्), **घस्मर, अधः तल्** = (अलोप); इतररूपें **ढसळ, ढसर, ढस्मर.**]

ढळ(णें) अक्रि. हलणें, खालीं सरणें-जाणें, च्युत होणें, डळमळणें. To slip aside, to incline, to flinch, to sink, to fail.

[सं. **धृ** अवध्वंसने किंवा **ड्वल्**; देप्रा. **ढल** = झुलणें; सं. **ढल्, ढलय**; प्रा. **ढल**; बं. **ढला**; ओ. **ढलिबा**; हिं. **ढलना, ढरन**; सिं. **ढरणु**; गु. **ढळवूँ**; अकामसा. **ढळ** = घसरण, निसरडें, स्खलन; **ढळढळ(णें)** (**ध्वल्**) = प्रखरत्वानें पेटणें जळणें. **ढळढळीत** (**धवलितम्**) = स्पष्ट, स्वच्छ.])

ढांक(णें) सक्रि. झाकणें, आच्छादणें. To cover, to spread over.

[सं. **स्थग्** (?); प्रा. **ढक्क** (आच्छादने); देप्रा. **ढंकणी** **पिधानिका** (१४१-१२); गु. **ढाकवूं**; सिं. **ढकणूं**; पं. **ढकणा**; हिं. **ढकना, ढाकना**; बं. **ढाकिते.**]

ढांकण न. झांकण, ढापण. A cover, lid.

[सं. स्थग् (?), छादनम्; प्रा. ढक्क (आच्छादने), ढकण; बं. ढाकणा; हिं. ढकना; पं. ढकणा; सिं. ढकणु; गु. ढाकणूँ; अकामसा. ढांकणी = झाकणी, (प्रा. ढक्किणी; ओ. ढांकुणी).]

ढांग स्त्री. टांग, दोन मांड्यामधील अंतर, झेप, उडी. A stride, a step, the space between the two thighs.

[सं. दंघ् १ घातने ?; कान. डिंकु = उडी; देप्रा. टंको जङ्घा (१३७-१२); अकामसा. ढांगाळ = लांब ढांगा टाकणारा; ढांगाळ(णें) = लांब ढांगा टाकणें, निन्दा करणें.]

ढाण वि. आंबट, ओलें. Damp or moist, sour.

[द्राविडमूळ असावा. (ओलें) ढाण, (आंबट) ढाण = अशा दोन प्रयोगांत आतिशयत्व दाखविण्यासाठीं 'ढाण' असा शब्द वापरतात दोन्ही एकाच अर्थाचे शब्द आहेत.]

ढाणा वि. धिप्पाड, दांडगा. लांब ढांगा टाकणारा. Lusty, burly, sturdy.

[म. ढाणक = अंत्यज लोक; ढाणकस = धिप्पाड.]

ढांढूल(णें) सक्रि. शोधणें, धुंडणें. To search narrowly, to ransack.

[सं. अधि + हुड् १ वरणे (?), ढुंढन; प्रा. ढंढोल; देप्रा. ढल्लइ भ्रमति, ढंढोळइ गवेषयति (१४२-२); गु. हिं. ढढ; सिं. ढूंढ; पं. ढूंढ, ढुंड. इतर मराठी रूपें— ढांढोळणें, ढांधुलणें.]

ढापण न. झांकण. A lid, cover.

[सं. अधि + अर्प् (आच्छादने (?); देप्रा. ढंकणी पिधानिका (१४१-१२); हिं. ढापना, ढाँपना; पं. ढप्पणा; अकामसा. ढपली (फोडावरील), ढापली = बांबूचा पडदा; ढापर = नावेचा वरचा भाग; ढाप(णें) = झांकणें, टोपण लावून बंद करणें; ढाप-ढापी = ढाळी, डहाळी; ढापा = मोठी ढाळी, मोठें कौल. ढांकण पहा.]

ढाल स्त्री. तरवारीचे वार घेण्याचें एक शस्त्र. A shield.

[सं. ढालम्; ओ. ढाल; हिं. पं. ल्हां ढाल; सिं. ढाल; गु. ढाल; अकामसा. ढालगज = ज्या हत्तीवर ढाल आहे असा हत्ती. गंडस्थळावर संरक्षणासाठीं ढाली ठेवतात किंवा निशाणाचा हत्ती, त्यावरून बेफाट, दांडगी हत्तीण; ढालगज भवानी (भवानी हें पेशवाईतील एका हत्तिणीचें नांव).]

ढास(णें) अक्रि. खोकणें, कोंबणें. To cough, to thrust in.

[सं. अधि + आ + कास् १ शब्दकुत्सायाम्, अधि + अस् ४ क्षेपणे; अकामसा. ढास = कोरडा खोकला; ढासण = तोंड, कोंवणें, आश्रय; ढासरा = ढोसरा, धसका.]

ढासळ(णें) अक्रि. कोलमडणें, कोसळणें, पडणें, एकदम धडधड खालीं पडणें, To tumble in or down.

[सं. ध्वश्, ध्वंस् + सल् १ गतौ; पा. धंस; प्रा. धंस, धसइ; बं. धसा; हिं. धसना.]

ढाळ[१] पुं. पद्धत, प्रकार, आकार, डौल. Way, manner, style.

[सं. ध्वल् १ गतौ; हिं. ढाल; पं. ढाल; गु. ढाळ; याकाम. ढाळ (शिशु २९; ज्ञा. ६-२४७), ढाळढाळें = हळुहळूं (ज्ञा. ३-४२).]

ढाळ[२] पुं. जुलाब, पातळ विष्ठा. A purge.

[सं. ध्वल् १ गतौ.]

ढाळ[३] पुं. स्नान, न्हाण. A bath.

[याकाम. ढाळ (ज्ञा. १८-५७५).]

विरहज्वरीं ढाळु करिती : कवणी परी ॥ नरुस्व. ५६६.

ढाळ(णें) उक्रि. तोडणें, कापणें, पिणें, चवरी हलविणें, खालीं करणें, उतार देणें. To wave over or around, to fall or to be shed.

[सं. ध्वल् १ गतौ (?); देप्रा. ढालय, ढाल, डल्ल; बं. ढाला; ओ. ढाळिबा; हिं. ढालना; पं. ढालणा; सिं. ढारणु; गु. ढाळवूँ; याकाम. ढालणें = हलविणें, घालविणें (ज्ञा. १३-३८७).]

ढाळी स्त्री. शाखा, झाडाची फांदी. A branch or bough.

[सं. दल (?); आस्ट्रिक. डहल; देप्रा. डाली शाखा (१३९-१०); गु डाळ; सिं. डारु; पं. हिं. बं. डाल = फांदी; याकाम. डहाळी (नरुस्व. ८३४), डीरु (अंकूर); अकाम. ढाळी, ढाळा.]

ढिकळा, ढीग, ढेकळी पुं. ओल्या मातीचा गोळा. A clod of earth.

[सं. दिह् ४ उपलेपे; प्रा. ढिग्ग; देप्रा ढिग्ग, ढिब्ब, ढिम्म, ढेप्प, ढेब, ढेब्ब, ढेम्म; पं. ढीम; सिं. ढिगु, म. ढेम, ढीग, ढेकळी.]

ढिमा पुं. बेट, लहान टेकडी, मुलामा. An isle, a hillock, guilding.

[सं. **दिह्** (?); याकाम. **ढिमा** (ज्ञा. १३-४७१).]

ढिला वि. सैल, मऊ. Loose, soft.

[वैसं. श्रथ्; सं. **शिथिल** ; प्रा. **ढिला** ; देप्रा. ढेल्ल ; **ढिल्लो निर्धनः** (१४२.११); बं. **ढिलों** ; ओ. **ढिला** ; हिं. **ढीला** ; पं. **ढिल्ला** ; गु. **ढिलू**; सिं. **ढिलो** ; **ढिरो** ; सिं. **लील**, **लिहिल**, **इहिल** ; २ सं. **शिथिल**,√ष्ठल् ; पा. **सिथिल**, **सठिल** ; प्रा. **सिढिल**, **सढिल** ; सिं. **सिल्यो** हिं. **सिहिरना** ; संस्कृत '**शिथिल**' पासून मराठींत दोन तद्भव रूपें रूढ झालीं: एक **ढिला** व दुसरें **सैल.** इतर आर्योद्भव भाषांतहि अशीं दोन प्रकारचीं रूपें रूढ आहेत. दोन्ही रूपांना प्राकृत रूपांचा आधार आहे. दोन्ही रूपांच्या अर्थांत थोडासा फरक आहे व तो सैलपणाच्या प्रमाणाचा आहे. याकाम. **ढिलौनि** (=ढिली करून, सोडून–नरुस्व. ३९४).]

मौतियांची ढीलौनि अलंकरणें : मग ओळगविलीं पोतासाचीं भूषणें ॥ नरुस्व. ४५४.

ढिसळ(णें) अक्रि. ढासळणें. To tumble in or down.

[सं. **अधि + सल्** १ गतौ ; अकामसा. **ढिसळ**, **ढिसाळ** = उदार, सढळ. समर्थ, प्रचंड, विशाल, (याकाम. **ढिसाळ** = मोठें–ज्ञा. ६-९२) **ढिसूळ**, **ढिसूर** = नाजूक, भुसभुशीत.]

ढीग पुं. राशि, गोळा, पुंज. A large heap or mass.

[सं. **दिह्** ४ उपचये ; ढेकूळ, ढिकळा पहा.]

ढींव पुं. कोळी, धीवर.

[सं. **धीवर** = कोळी ; याकाम. **ढींव** (ऋ. १३).]

ढुंक(णें) सक्रि. मुद्दाम पाहणें. To poke head and see.

[सं. **ढौक्** १ गतौ ; अकाम. **ढुंकून पाहणें** = आंत तोंड घालून पाहणें. 'डोकें' ह्या मराठी शब्दाशीं संबंध आहे कां ?]

ढुंग, ढुंगण न. कुल्ला. The buttocks or posteriors.

[कान. **डुंग** = उंचवय्याचा भाग; **टोंक** = टिरी ; अकाम. ग्रामीण. **ढुंगाण**, **ढुंगड**, **ढुंगाड**.]

ढुड्ढाचार्य पुं. दुड्ढाचार्य, प्रस्थ. A term for a swaggerer or swelling professor.

[**कान. दोड्डु** = मोठा + **आचार्य** ; अकाम. **दुड्ढाचार्य.**]

ढुंडाळ(णें) सक्रि. शोधणें. To search, to seek.

[सं. **अधि + ढुड्** १ वरणे, ध्रुड्, = मार्गणे ; देप्रा. **ढांढोळ**, **ढंढोळ**, **ढुंढळ** ; प्रा. **ढुढुल्लण** = गवेषण.]

ढुल(णें) अक्रि. झोंके जात चालणें, डोलणें. To move, to nod, to swag.

[सं. **धूर्** ४ गतौ ; याकाम. **ढुलणें** (नरुस्व. ५०८); अकामसा. **ढुलवि(णें)** = डोलविणें, भुलविणें, (याकाम. **ढुलविणें** (नरुस्व. २९७)]

मदिरा नेघतां ढूले । सन्निपातें विण बोले । निःप्रेमेचि भूले । पींसे जैसे । रा. ज्ञा. १४-२५०

ढुसक(णें) अक्रि. ढोसणें, मारणें, ठासणें, डोकें खालीं करून घुसणें. To poke, to stick, to thrust, to strike with head.

[सं. **अधि + तुश्** १ हिंसायाम् + **अकच्** ; प्रा. **ढुसइ** (भ्रमति); पं. **धुसणा** ; हिं. **धसना** ; सिं. **धुसु** ; अकामसा. **ढुसकणी**, **ढुसणी**, **ढोसणी**, **ढुशी**, **ढुशी** = धडक, टक्कर ; **ढुस्सा** = गुद्दा.]

ढुस्स वि. फार (काळा), आतिशयित्व दाखविणारा शब्द. A particle of enhancement affixed to काळा.

[कान. **ढुस** = काळा ; **काळाढुस्स**=अतीशय काळा (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

ढेक(कू)र पुं. पोटांतील वायू तोंडावाटें बाहेर पडतांना होणारा आवाज. A belching sound, eructation.

[सं. **ढ्रेक्**, **ध्रेक्** १ शब्दे ; द्रा. कान. तेलु. **तेगुविके** = ढेकरणें ; अकाम. ग्रामीण. **ढेंकूर**, **ढेकार.**]

ढेकळ पुं. शेतांतील मातीचा गोळा. A clod.

[सं. **दिह्** ४ उपलेपे ; देप्रा. **ढिक्क** ; **ढीग** पहा.]

ढेंक स्त्री. गर्जना. The bellowing (of a bull).

[सं. ध्वनिशब्द (?); देप्रा. **ढिक्कइ** (**वृषभो गर्जति** १४२-७); सिं. **धिकणु** = गरजणें.]

ढेका, ढेकी पुं. स्त्री. चुना बारीक करावयाचा वत्ता, घाण्याच्या लाटेवर आडवा असलेला आखूड लाकडाचा तुकडा. An apparatus with a lever for pounding lime, the log of wood on the oil mill.

[सं. ?; देप्रा. **ढेंका** (हर्षः कूपतुला चेति द्वयर्था; १४३-३); बं. **ढेंकी** ; ओ. **ढेंकी, ढिकी** ; बि. हिं. **ढेंका, ढेंकी** ; पं. **ढिंगली**.]

ढेंकूण पुं. कीटकविशेष. A bug.
[सं. **दंश्** ; प्रा. **डक्क** ; देप्रा. **ढंकुणो, ढेंकुणो मत्कुणः** (१४१-१२).]

ढेढें न. आडंबर, मोठी आकृति, प्रस्थ. A man of much significance.
[म. **धेंड** पहा ; याकाम. **डेढें, ढेंढें, धेंडें** (ज्ञा. ९-१०२ १८-२८५.]

ढेंग स्त्री. ढांग, पाऊल, टांग. A stride, a step.
[**द्राविडमूळ** ; कान. **डिंकु**=उडी ; देप्रा. **टंको जङ्घा** (१३७-१२); अकामसा. **ढेंगळ(णें)**=ढेंग टाकून पलीकडे जाणें (सं. **अधि+अग्** १० पदेलक्षणे (?); म. **ढेंग** (नाधा.) **ढांग** पहा.]

ढेंडाळ(णें) अक्रि. अतिशय ढाळ होणें. To have a flux.
[सं. **ध्वलनम्, अधि+टल्** १ वैक्लव्ये.]

ढेप(णें) सक्रि. रास करणें, ढासणें, कायम होणें. To pile up.
[वैसं. **द्रप्स**=बिन्दु (६-४३-३); सं. **अधि+डिप्** १० संघाते ; देप्रा. **ढेप्प** ; अकाम. **ढेपसा, ढेपाळ. ढेबा** ; हिं. **ढेप**.]

ढेप स्त्री. (गुळाची) भेली. A clod or lump of गूळ.
[सं. **अधि+डिप्** १० संघाते ; देप्रा. **ढेप्प ढेबा** ; हिं. **ढेप**.]

ढेम स्त्री. डेकडी, खडक. A hill, rock.
[सं. **स्तिम्** १ संघाते ; याकाम. **ढेम** (ज्ञा. १६-३४१).]
तैसें उंचौनि लोटिले कामें। नेहटती क्रोधाचिये ढेमे।
तरी रागद्वेष प्रेमें। न माती कें हि॥ ज्ञा. १६-३४१

ढेंबूस न. टेंबूस, टेंगळ. A bump (on the body or ground or trees).
[सं. **डिप्** १० संघाते.]

ढेर न. मोठें पोट. A distended belly.
[सं. **शिथिल** (?) ; देप्रा. **डहरी अलिञ्जरम्**(१३८-१६); **डिरु**=अंकुर हा शब्द मूळ आहे काय ? पं. **ढेर** ; का. **देर**.]

ढेलच, ढेलज स्त्री. देवडी, दरवाजा, पडवी. A porch, vestibule.
[सं. **दिह्** < **देहली** (?) ; अर. **दिहलीझ्**.]

ढेस(णें) उक्रि. ढोसणें, दडपून भरणें. To press in, to put in, to throng or crowd.
[सं. **अधि+अस्** ४ क्षेपणे ; याकाम. **ढेंस**=धीट, दाट ; अकामसा. **ढेस, ढेसण**=गर्दी, **ढेसें**=**संधि** ; **ढेसा**=पेरें.]

ढैसा पुं. अंकूर. A sprout.
[**ढेसणें**–पहा. याकाम. **ढैसा**.]
तमाळांचे ढैसेणें (शिशु. ३७५)

ढोक(णें) उक्रि. गटगटा पिणें, बेदम मारणें, ढोसणें, मारणें, फाडणें. To thrash, to strike, to drink.
[सं. **दुह्** १ अर्दने, १ हिंसायाम् ; अकामसा. **ढोक**= एक हिंस्र पक्षी, हलका, कनिष्ठ, घाण्याचें लाकूड ; **ढोकण**= पाथरवटाचें हत्यार.]

ढोकळा पुं. हरभऱ्याचा वडा, भजें, बोंड, पैसा. A thick cake of coarsely ground gram, a ball made of flour.
[सं. **दुह्** १ अर्दने, **ढोक-ळा** (अल्पार्थें); गु. (**खमंग**) **ढोकळा**=एक खमंग पदार्थ.]

ढोंग न. सोंग, दांभिकपणा, पाखंड. Hypocrisy, sham, pretence, feint.

ढोण, ढोणा वि. मोठा, गलेलठ्ठ. Huge, burly.
[ध्वनिशब्द. **ढोण**=ओंडका (श. को.); पेकाम. **ढोणा, ढोणे** (अ. व.).]

ढोंपर न. पुं. कोपर, गुडघा. The elbow, knee, knuckle.
[द्राविडमूळ. (?) सं. **अधि+उत्+प्र+ईर्** १० क्षेपे ; **ढोपर(णें)** = ढोपरानें ढकलणें.]

ढोबळ वि. स्थूल, मोटा, बोजड. Large, coarse, thick.
[ध्वनिशब्द; कान. **डुब्ब**. '**ढ**' ह्या वर्णाचें वैशिष्ट्यच मोठें, अगडबंब असे अर्थाचें आहे.]

ढोर न. गुरुं, बैल गाय वगैरें जनावरें. Cattle, the general term for oxen, cows.
[द्राविडमूळ. देप्रा. **ढेर, डहरी** ; अकाम. **गुरें ढोरें**– दोन्ही एकाच अर्थाचे शब्द.]

ढोल पुं. मोठें ढोलगें. A large drum.

[सं. **ढोल** ; परंतु शब्द परकी असून त्याचें संस्कृतीकरण झालें असावें. प्रा. **ढोल्ल**, का. **डोल** ; बं. **ढोल** ; ओ. **ढोल** ; हिं. पं. गु. ल्हां. **ढोल** ; अकाम. **ढोलकें**, **ढोलगें**, **ढोल** = विवर, दरी ; **ढोल्या** = मोठ्या पोटाचा ; **ढोली** = पोकळी ; **ढोलार** = वठलेलें पोकळ झाड ; **डोल** पहा.]

ढोस(णें) सक्रि. मारणें, सारणें, लोटणें, गटगटा पिणें. To push, to thrust, to gulp large draughts.

[सं. **धृष्** ९ हिंसायाम्, **ध्वंस्** १ अवध्वंसने ; **अधि** + **अश्** ; बं. **धुसा** ; हिं. **ढोस** ; गु. **ढोसो**. **ढोसणें** = पिणें.]

ण पुं. मराठी वर्णमालेंतील पंधरावें व्यंजन. ह्याचें उच्चारण मूर्धन्य नासिक्य असून उच्चारस्थान मूर्धा आहे (ट पहा.). ह्याच्या उच्चाराची अवस्था "रषाभ्याम् नोणः" ह्या पाणिनीसूत्रांत निर्दिष्ट आहे. (ह्या उच्चाराची चर्चा "न-ण मराठी उच्चारचमत्कार", कुलकर्णी, म. सा. प. पहा.) The fifteenth consonant in Marathi alphabet.

[संस्कृत व मराठीमध्यें **आद्य णकार** येत नाहीं.

(**मध्य ण**) सं. **न**, **ण** ; **प्रा. ण.**

सं. र्ण, ज्ञ ; प्रा. **ण्ण**. मूळ द्राविडी उच्चारण. संस्कृत आणि प्राकृत **ण**, **न**, **ञ**, **ज्ञ**, **न्य**, **न्न** वगैरे वर्णांपासून निष्पन्न होतो. ह्या वर्णानें आरंभ होणारा शब्द मराठी भाषेंत नाहीं.]

णाट(णें) अक्रि. नकार दाखविणें, नाटणें. To decline, to say 'no'.

[**सं. नट्** १० भाषार्थः.]

णिच(णें) सक्रि. फेंकणें. To throw.

[**सं. नि** + **अस्** ४ क्षेपणे. (नाकावर **णिचणें**–फेंकणें.)]

त पुं. मराठी वर्णमालेंतील सोळावें व्यंजन. ह्याचें उच्चारण दन्त्य अल्पप्राण कठोर असून उच्चारस्थान दन्त्य आहे. ह्याच्या उच्चारांत प्राचीन कालापासून कांहीं विकृति झाली नाहीं. The sixteenth consonant in Marathi alphabet.

[(**आद्य त**) सं. **त**, **त्र**, **त्व** ; प्रा. **त**.

(**मध्य त**) सं. **न्त**, **त्त**, **क्त**, **प्त**, **त्न**, **त्व** ; **प्रा. त्त** ; **तट–तड**, **त्रीणि–तीन**, **त्वष्ट–तष्ट**, **अन्तः–आंत**, **उत्तर–उतर**, **अलक्त–अळता**, **तप्त–तात**, **सपत्नी–सवत**. सं. **स्त**, **स्थ**, **क्थ** ; प्रा. **त्थ** ; **हस्त–हात** ; **आस्तर–हंतर**. ह्या वरील वर्णांखेरीज **थ**, **द**, **स**, **ज**, **च**, **त्स**, **ट** इत्यादि वर्णांपासून मराठी आद्य, मध्य व अन्त्य **त** निष्पन्न होतो.]

त प्र. (मराठीमधील कृदन्त वगैरे रूपें साधणारा) एक प्रत्यय. A verbal temination.

[*IE.* Ta, to ; सं. **अत्** ; *Gr.* Tos ; *Lat.* Tus ; *Lith.* Tas ; *Got.* Ta ; *OG.* To ; *As.* ta ; १ सं. **अत्** ; प्रा. (हेमचंद्र ३-१८१) ; अप. **न्त**. २ सं. **मान** ; प्रा. **माण** ; अप. **माण** ; म. **आ**.]

ता पुं. तहत, तागाइत, तपशील, तथा, इत्यादि शब्दांचें संक्षेपचिन्ह. Upto, until, in this way.

[फा. **तहत्**, **तागाइत**, **तपशील** ; सं. **तथा** इत्यादि शब्दांचा संक्षेप.]

तइं, **तईं** अ. तेव्हां, त्यावेळीं, तेथें, तिकडे. Then. there.

[**सं. तदा**, **तस्मिन्** (काले) ; **प्रा. तम्हा**, **तम्मी** ; अप. **तहिं**, **तइं** ; याकाम. **तैं** ; २ सं. **तत्र** ; प्रा. **तहिं**, **तइं** ; अप. **तहिं**.]

तकई, **तगई** स्त्री. शेतकऱ्यांना मदत म्हणून अगोदर दिलेली रक्कम. Advances made to the agriculturist by government.

[अर. हिं. **तकावी** ; < अर. **कवी** = सामर्थ्य, शेतकऱ्यांना केलेली मदत.]

तकट न. धातूचा पातळ पत्रा, पुष्टिपत्र. Metal beaten into a plate, a plate or leaf.

[फा. **तख्त** ; अकाम. **तगट** ; अकामसा. **तकट**, **तकटी** = पातळ पत्र्याचें पान, पिंपळपान, एक डागिना ; **तकटें** = दार, खिडकीवरील जाळी, ताटी, चौकट.]

तकट(णें) सक्रि. घट्ट बांधणें, आवळणें. To tighten, to draw closely.

[सं. **टक्** १ बंधने ; **टकट** (नाधा) ; हा शब्द द्राविडमूळ असावासा वाटतो. अकाम. **तकट** = जोर, आवेश ; **तकटबंदी** = वेढा, कोंडमारा, अटकाव.]

तकत अ. पर्यंत, पावेतों. Upto, until.

[हिं. **तक्** = पावेतों.]

तकतक(णें) अक्रि. चकाकणें, चमकणें, लखलख करणें. To shine, to glitter.

[सं. **तक्ष्** ५ तनूकरणे, **तिज्** १ प्रकाशने ; अकामसा. **तकतक**, -कां = चकचक ; **तकतकी** = चकाकी ; **तकतकीत** = चकचकीत.]

तकतराव, तक्तरावा पुं. गाडीवरील तमाशा, नाचेपोरें. A planked frame with dancing girls on, a *tamasha*, procession of dancing girls.

[फा. तख्त् + रवान् ; खानदेश वगैरे प्रांतांत गाडीवर राजाचें सोंग मिरवितात. त्याच्यापुढें गाडीवरच नाच-गाणें-तमाशावजा करतात. त्यास तखतराव म्हणतात.]

तक(ग)दीर न. दैव, नशीब, भाग्य. Fate, luck.

[अर. तक्दीर.]

तकरार, तक्रार स्त्री. पुनरुक्ति, ओरड, गाऱ्हाणें, विरुद्ध बोलणें, हरकत, अडथळा करणें, भांडण, झगडा. A complaint, a grievance, a representation.

[अर. तक्रार = पुनः पुनः करणें-सांगणें ; पेकाम. तक्रार (रा. ५-२०६), तकरीर = खोटा आरोप, आळ, कैफीयत, प्रतिज्ञालेख ; अर. तक्रीर ; पेकाम. तकरीर, तक्रीर (वासमा ३-७१)]

तकलादी वि. बनावट, नकली, तकलुबी. Fabricated, forged, false.

[अर. तक्लीदी.]

तकलुबी वि. दिखाऊ, खोटा, बनावट. False, showy.

[अर. तकल्लुब् ; पेकाम. तग्लुफी, तक्लुबी, तक्लुपी (राज. ६-१०४ ६-८९).]

तकलीफ स्त्री. श्रम, तस्दी. Efforts, pains.

[अर. तक्लीफ.]

तकवा पुं. बळ, जोर, शक्ति, उत्तेजन, धीर. Power, force, strength.

[अर. तक्वियत् ; पेकाम. तककवा (ख. ११३५).]

तकशीम, तक्षीम स्त्री. हिस्सा, वतनाचा वाटा. Share, portion (in property.)

[अर. तक्सीम.]

तकिया, तक्या पुं. फकिराचें विश्रांतिस्थान, पीर पुरलेली जागा, जाड व मोठी उशी. A fakir's stand, a pillow, a cushion.

[फा. तकिया = झोंपडी किंवा महंत, साधू यांचा आश्रम ; पेकाम. तकिया, तक्या (ऐस्फुले. २३१). ह्याच्या अर्थांतहि फरक झाला आहे. साधूचा आश्रम-वसतीचें स्थान-कबरीचें स्थान-त्यावर केलेला पिंडीसारखा आकार-कापुस वगैरे भरून केलेला त्या आकाराचा जिन्नस अशी अर्थांमध्यें क्रांति झाली आहे.]

तक्त, तख्त, तखत न. सिंहासन, आसन, पीठ, गादी. A throne.

[फा. तख्त ; पेकाम. तख्त (दिमरा. २-६०) ; अकामसा. तख्तनशीन = गादीवर बसलेला ; तख्ताधिकारी = राजा, गादीचा वारस ; तख्तपोसी = कडीपाट.]

तक्ता पुं. फळी, पाट, कागदाचें लांबरुंद पान, नकाशा, कोष्टक. A plank, a sheet or half sheet of paper, a tabular statement.

[फा. तख्ता ; तक्ती = अर्धा कागद.]

तक्क्या पुं. तकिया पहा.

तक्र न. ताक. Buttermilk.

[सं. तक्रम्.]

तखड(णें) अक्रि. चालून दमणें. To be tired in walking,

[सं. त्रक्, त्रख् १ गतौ.]

तग(णें) अक्रि. जिवंत राहणें. To continue to live.

[सं. तक् १ कृच्छ्रजीवने ; तगवि(णें) = टिकविणें ; तगवणी, तगवणूक = टिकविणें ; अकामसा. तग = टिकाव, निभाव, चिकाटी.]

तगट न. भरजरी वस्त्र, अलंकार. A silk-cloth, an ornament.

[म. तकट पहा. याकाम. तगट (= अलंकार) ; अकाम. तगट = चांदीचा पत्रा, तगटी = भरजरी.]

तगट(णें) उक्रि. पिकांची आणेवारी काढणें. To survey, to estimate (crops etc.).

[कान. तगवु = मागणी करणें.]

तगट(णें) सक्रि. घट्ट बांधणें, आवळणें. To tighten.

[सं. टक् १ बंधने. तकटणें पहा.]

तगट(णें) अक्रि. झटणें, धांवणें. To run.

[सं. तक् १ गतौ. मरा. तांगडी, तंगडी ह्या शब्दापासून असावा.]

तगडा वि. सशक्त, बळकट, सामर्थ्यवान. Strong, powerful.

[सं. त्वक्षः (निघण्टु २-९), तृक्षः; देप्रा. तर्ग ; **तग्ग** ; २ सं. **तर्जय** ; पा. **तज्जे** ; प्रा. **तज्जेइ** ; हिं. **तग्रा**, प. पहाडी. **त्लग्नो** ; कु. **तंग्रो**. शब्दाच्या उच्चारावरून शब्द परकी वाटतो. **तकट** शब्दाशीं संबद्ध आहे का ?]

तगमग स्त्री. तळमळ, अस्वस्थता, तडफड. Restlessness, agitation.

[सं. **तग्** १ कृच्छ्रजीवने + **मग्** १ गत्याक्षेपे ; कान. **तग्गुमुग्गु** = खालवर ; कानडी मूळ अधिक सयुक्तिक आहे. **तगमग(णें)** = तळमळ होणें.]

तगर पुं. एडका, मेंढा. A ram.

[कान. **तगर** ; याकाम. **तगर.**]

एकु तगरांचीं झुंझणें दाविताती ॥ दाव. ८६.

तगाई स्त्री. शेतकऱ्यास मदत. Advances made to farmers.

[अर. **तकावी** ; **तकई** पहा.]

तगादा पुं. मागणी, निकड, नेट. Urging (for payment).

[अर. **तकाझा** ; पेकाम. **तकाद्दा** (रा. ३-५०२), **तगादा** (रा. ६-१५४).]

तगारी[1] स्त्री. वनस्पतिविशेष. A flowering shrub.

[सं. **तगर.**]

तगारी[2] स्त्री. पीठ भिजवून मळण्याची परात, थाळी, ताट, घमेलें. A sort of dish or platter.

[फा. **तघारी.**]

तगिरी स्त्री. बडतर्फी, कामावरून दूर करणें. Dismissal (from a post).

[अर. **तघ्यीर** ; पेकाम. **तघ्यीर** (इम. ३६) ; अकाम. **तगीर** = कामावरून काढलेला.]

तंग पुं. वि. घोड्याचें खोगीर आवळण्याचा कातडी पट्टा, आवळ, घट्ट. A girdle (of a horse-saddle), tight.

[फा. **तंग** ; पेकामसा. **तंगतोबरा** = घोड्याच्या जिनसा ; **दंगबार** ; = तयारी ; **तंगचाई** (फा. **तङ्ग + चाय** ; पेकाम. **तङ्ग + चोई** (इम. १३४) = जिन आवळणें, त्यावरून अडचण, **टणचाई**–दुर्भिक्ष (अर्थांत फरक झाला आहे).]

तंगड, तंगडी स्त्री. टांग, पाय. A leg.

[सं. **त्रक्, त्रख्, त्रग्** १ गतौ.]

तज(णें) उक्रि. टाकणें, सोडणें, त्यागणें. To abandon.

[सं. **त्यज्** ; प्रा. **तज.**]

तज स्त्री. वनस्पतिविशेष, दालचिनीचें झाड. A kind of plant.

[सं. त्वच् ; पा. **तचम्** ; प्रा. **तया** (साल), **तजा** ; हिं. तज.]

तजकरा पुं. सनद, दण्ड, चोरी. A *sanad*, a punishment, a fraudulent appropriation.

[अर. **तझ्कीर, तझ्किरा** ; पेकाम. **तज्करा** (रा. १५-४७२).]

तज(स)वीज(स) स्त्री. उपाय, युक्ति, चौकशी, सामुग्री. Planning, prudence, investigation.

[अर. **तज्वीझ** ; शिकाम–**तज्विज** (सभा. ४२) पेकाम. **तज्वीज** (इए. ५-५७).]

तजवीज दिवारजनीं जया ॥ नद. २९

तजावज स्त्री. न. कमीपणा, फरक, उल्लंघन, अतिक्रम. Difference or deviation, falling short, departure from.

[अर. **तजायुझ** ; **तजावुझ** ; पेकाम. **तजावज** (रा. १-२) ; **तजावजा** = अफरातफरीनें, अव्यवस्थित ; **तजावजा** (= बेदील, खरे १०–५३३७).]

तजेला-ली पुं.स्त्री. कान्ति, तेज, चकाकी, चमक. Lustre, brightness, bloom, gloss.

[अर. **तजल्ली** ; फा. **ताझा** (= टवटवी) ; सं. **तेजस्**, < **तिज्** १ प्रकाशने (?) ; पहिली अरबी व्युत्पत्ति ग्राह्य.]

तज्ज्ञ वि. जाणता, माहीतगार. Proficient, all-knowing.

[सं. **तत्** + **ज्ञ**, √**ज्ञा** ९ ज्ञाने.]

तट(णें)[1] अक्रि. अडणें, अडखळणें, थांबणें. To stop, to wait for, to tarry.

[सं. **त्रट्, तट्** १ उच्छ्राये ; हिं. **तरना, तरकना** ; पं. **तरना** ; शिकाम. **तटणें.**]

उदंड राजकारण तटलें (राम. पत्र).

तटनीं सकल कायें हा पडे या प्रवाहीं ॥

सा. रु. ह. ३–३४

तट(णें) सक्रि. खेटणें, भिडणें, चिकटून राहणें. To stick to, to meet.

[कान. तट्टु = शिवणें ; अकाम. **तटतट(णें)** = तुटण्याच्या बेतांत येणें ; **तटतट** = आवाज करीत, फुटत ; (गु. **तडतड** ; पं. **तरत्राट** ; हिं. **तरना**).]

तट पुं काठ, किनारा, तीर, कोट, भिंत, पक्ष, बाजु (ल.). A bank, a margin, a border, a party, a side of river.

[सं. **तट** ; अकाम. **तटस्थ** = नदीच्या कांठावर असलेला, (त्यावरून) तिऱ्हाईत, उदासीन ; **तटिनी** = नदी–तट जिला आहेत अशी ; **तटकन, –कर, –दिनीं, –दिशी** = 'तट' असा आवाज होऊन.]

तटका पुं. संबंध, भीड, मुरवत, तंटा. Connection, a dispute.

[सं. **तट्** to scatter (Whitney); अकामसा. **तटकारणें** (सं. **तट्** १ उच्छ्राये) = हडसून खडसून सांगणें ; **तटाटणें, तटतटणें, तटतटां, तटतटीत** वगैरे ध्वनिशब्द असावेसे वाटतात. **तटणें** पहा.]

तटी, –ट्टी स्त्री. बांबूची चौकट, चटई, पडदा, बांबूची रंगीत ताटी. A frame of bamboos, a mat.

[सं. **तंत्र, तट** (?) ; देप्रा. **तट्ठी** ; कान. **तट्टि** = बांबू, चटई ; हिं. **टट्टी, टटी**=पडदा ; अकाम. **तट्टया**=बांबूची चटई.]

तट्टू न. घोड्याचें पिलूं. A small breed of horses, a young horse.

[हिं. **टट्टू** ; सं. **तर, √तृ–तरणे** (?), अकामसा. **तट्टाणी** (स्त्रीं) = तट्टाची मादी.]

तंट्टू न. रंगीत जाड कापडाचा एक प्रकार. Tattoo cloth.

[*Eng.* Tattoo. हा शब्द मूळ ताहितन भाषेंतील व त्याचा अर्थ गोंदणें, √Ta = गोंदणें ; त्यावरून रेघा असलेलें कापड.]

तंड अ. तडतड (मारणें). Dunning, urging.

[ध्वनिशब्द ; कान. तड ; सं. **तड्** १० ताडने, **तडकन, –कर, –दिनीं, –दिशी** = **तड + कन्** (कानडीप्रत्यय). तटकन पहा.]

तंड स्त्री. शेवट, अखेर, अडचण, तंगी, किनारा. Shore, end, urging.

[सं. **तट** ; प्रा. **तड** ; ओ. **तडा** ; सिं. **तडो** ; हिं. **तड** (पुं.); बं. **तर.**]

तडक(णें) क्रि. तडा जाणें, फुटणें, भेग पडणें, रागावणें (ल.). To crack or split, (fig.) to get angry.

[सं. **तर्द्** १ हिंसायाम् , **त्रट्, तडत्कारी** ; देप्रा. **त्रटक** ; प्रा. **तडक्कार** ; बं. **तडका** ; हिं. **तडकना** ; पं. **तडका** ; सिं. **त्रणकठणु** ; गु. **तडकवूं.**]

तडक स्त्री.अ. नेट, जोर, आवेग, सरळ, एकदम, झपाट्यानें. A strain or stretch, smartly, sharply.

[सं. **तर्द्** १ हिंसायाम्, **अञ्च्** १ गतौ ; याकाम. **तडकु.**]. अंधकारु धाडी तडकु : रविराजुचि ॥ उगी. ६४८.

तडका पुं. तडाखा, कडाका, चपळता. A blast, activity, energy.

[सं. **तट्** १ आघाते ; अकामसा. **तडकाफडकीं, –तडकीं**= एकदम, तावडतोब ; **तडकाव(णें)** = मारणें, सपाटा मारणें, हे ध्वनिशब्दच आहेतसे दिसतात.]

तडजोड स्त्री. समेट, सलोखा. Compromise, conciliation.

[सं. **त्रुट्, योट्** (द्विधातुसंयोग) ; म. **तोडजोड,** किंवा सं. **तड्** = भाषायाम् ; जोडण्याची–समेट करण्याची भाषा.]

तडतड(णें) अक्रि. भंगणें, एकदम तडा जाणें, एकदम आवाज होणें. To split, to crack, to sputter.

[सं. **त्रट्त्रट्** (द्विरुक्ति); पा. **तटतट** ; प्रा. **तडतडा** ; बं. **तडतड** ; ओ. **तडतड** ; हिं. **तडतडना** ; सिं. **तडको,** गु. **तरडवूं. तडतड** पहा.]

तडतड स्त्री. लागून बोलणें (ल.). फुटण्याचा,–तडकण्याचा आवाज. Scolding, cracking, snapping.

[सं. **तड्** १० भाषार्थ;, **तर्द्** १ हिंसायाम् (द्विरुक्तिः), **तडतडाय**–ध्वनिशब्द. **तडतड्या** = चिडखोर ; **तडतडाट** = तडतड असा आवाज. **तडतडणें** पहा.]

तडफ स्त्री. उत्साह, चपळता, Energy, activity.

[सं. **तड** (?); हिं. **तडफ.**]

तडफड(णें) अक्रि. व्याकूळ होणें, त्रास होणें, काहील होणें, जोरानें हालचाल करणें. To flounder, to fume and chafe.

[सं. **तड्स्फट्**; **तड्** १० भाषायाम् + **पट्**–भाषायाम् (द्विधातुसंयोग); अप. **तडप्फडइ**; देप्रा. **तडफड**, **तडप्फड**, **तडफडिअ** (निष्ठा); सिं. **तरफणु**; बं. **तरपाइ**; गु.पं.हिं. **तरफर**. संस्कृत मूळ **त्वक्ष्स्फट्** असें असावें. शब्द देप्रा. असणेंहि शक्य आहे. हा एक प्रकारचा ध्वनिशब्दच. ‘ Sound Symbolism’, Psychological—Onomatopoeia चें उदाहरण आहे.]

तंड(डा)वा पुं. लाथ, प्रहार. A stroke, a kick.
[सं. तड् १० हिंसायाम्.]

तंडवा पुं. चांदवा, छत, सुताड्या, झोऱ्या. A canopy, a carpet.
[कान. **तडपु**.]

तंडस स्त्री. पोटशूळ, पोट फार फुगून आंत ताण बसल्याप्रमाणें वेदना (होणें). The pain due to belly blown or distended.
[सं. **त्रस्** ६ हिंसायाम्; याकाम. **तडस** (= पोटशूळ–नरुस्व. ५७४)]

तंडस पुं. कलश, पखाल. A water-bag.
[याकाम. **तडस** (=पखाल–नरुस्व. ५६८)]

तडा पुं. भेग, चीर, ढलपी. A crack, a slit, a chip.
[ध्वनिशब्द. (**तट**); सं. **तर्द्** १ हिंसायाम्; याकाम. **तढणें** (= उलणें, तडा जाणें–नरुस्व. ७९८; शि. ५२५); अकामसा. **तडाडणें** = फुटणें ; **तडाडां**, **तडातुडी**, **तडावणें**.]

तडाखा पुं. मार, रट्टा, आघात, प्रहार, रपाटा, झपाटा. A sounding blow.
[सं. तड् १० हिंसायाम्.]

तडाव(णें) अक्रि. पार पडणें, भेग पडणें, संपणें. To get through, to crack.
[सं. **तट** (नाधा.); सं. **तड्** १० आघाते.]

तडित् स्त्री. वीज. Lightning.
[सं. **तडित्**, √ **तड्**.]

तंडुल पुं. तांदूळ. Rice.
[परंतु हें संस्कृतीकरण नंतरचें आहे. मूळ शब्द देप्रा. किंवा ऑस्टिक आहे.]

तणतण(णें) अक्रि. रागावणें. To storm upon, to rail.
[वैसं. **तन्** १ शब्दे, ८ विस्तारे; अकामसा. **तणतणा** भांडणें = शिरा ताणून भांडणें.]

तण,–स न. रानांतील किंवा पिकांतील गवत. Grass or straw.
[*IE.* Tered; सं. **तृद्**, **तृंह्**; *Lat.* Trendu; *Ltt.* Trudi; सं. **तृण**; प्रा. **तण**, **तिण** (न); अप. **तण**; पं. **तिण**; गु. **तणखळुं** = वाळलेलें गवत; याकाम. **तण** (नरुस्व. १९६); अकाम. **तण**. ‘**तणस**’ मधील ‘**स**’ ची उपपत्ति काय ? **तनसडी** = गवताची काडी ; **तनावणें** = तणानें शेंत व्यापून काढणें.]

तणार न. गवताची झोंपडी, भाताचा पेंढा, गवताची गंज. A hut made of grass, a stack of straw.
[सं. **तृण + गृह**, **– आकर** ; प्रा. **तण + आर**. प्राकृतमध्यें ‘ आर ’ हा बहुत्ववाचक प्रत्यय आहे. परंतु तो संस्कृत ‘ आकर ’ पासून आला आहे; याकाम. **तण्हार** = गवताची झोंपडी (शिशु. ९४); अकाम. **तणार**, **तणारा** (पुं.).]

तणाव–वा पुं. ताण, बंध, दोरी, धागा. Tension, tightness, a cord, rope.
[अर. **तनाब्** ; पेकाम. **तणावा** (खरे १-१४६); सं. **तन्तु**, √ **तन्** ८ विस्तारे ? अकाम. **तणाव(णें)** = पाय पसरणें, लांब होणें.]

तंटा पुं. वाद, भांडण, कलह. A quarrel, a dispute.
[सं. **तण्ड्**; हिं. **तण्टा**, **टण्टा**; गु. **टंटो**, **तंटो**; सिं. **टंट**; पं. **टंटा**.]

तत् सर्व. तें (तृतीय पु. न. ए. व. रूप). It, that.
[कांहीं सामासिक शब्दांत प्रथम अवयव म्हणून ‘ तत् ’ हा शब्द येतो ; म्हणून तो येथें दिला आहे. *IE.* To, ta; सं. **तत्**; *Av.* Tat; *Gr.* To; *Lat.* Istum; *Indg.* Toti, tor; *Lit.* Tos. पुढील शब्द अकाम. तद्भव आहेत. **तत्पदार्थ** = परमात्मा ; **तत्पुरुष** (समासविशेष); **तत्सत्** = तें खरें, कायमचें आहे. **तत्सद्ब्रह्मार्पणमस्तु** = तें सर्व ब्रह्माला अर्पण असो. **तत्सम** = त्यासारखें ; **तदनंतर** = त्यानंतर ; **तदुपरांत** = तेथून पुढें ; **तदारभ्य** = त्यापासून, तेथपासून ; **तन्निष्ठ** = त्यासंबंधीं निष्ठा असलेला ; **तन्मय** = त्यापासून बनविलेलें, एकरूप ; **तन्मात्रा** = सूक्ष्म पंचतत्त्वें–पृथ्वी, आप, तेज, वायु, आकाश.]

तत्ता वि. अधम, पाजी. Light, low, mean.
[सं. **तत्त्व** ; अप. **तत्तु**, **तत्तामाल** (पुं.) = मगज, सार, उत्तम भाग ; पं. **तत्त** ; हिं. **तत्** ; म. प्रांतिक. **तत्ता**.]

तत्त्व न. मूळ, सत्य. Truth, reality.

[सं. तत्+त्व (भाववाचक प्रत्यय); अकामसा. **तत्त्वतः**, **तत्त्वतां** = खरोखर ; **तत्त्वनिष्ठ** = तत्त्वावर निष्ठा असलेला ; **तत्त्ववादी** = तत्त्व–ब्रह्म बद्दल वाद करणारा ; **तत्त्वार्थ** = सार, तत्त्व ; **तत्त्वमसि** (तत् त्वम् असि) = तूं (श्वेतकेतु) तें (ब्रह्म) आहेस. लक्षणेनें द्रव्य, पैसा, मुख्य गोष्ट असा अर्थ झाला आहे.]

तत्र अ. तेथें. There.

[सं. **तत्र**, **तत्**+**त्र** = त्या ठिकाणीं ; अकामसा. **तत्रत्य**= तेथचा; तेथील ; **तत्रापि** = तथापि ; **तत्रैव** = तेथेंच.]

तथा अ. तसें. In that way.

[सं. **तथा** = त्याप्रमाणें ; अकामसा. **तथापि** = तरीहि; **तथास्थु** = ठीक, होय.]

तधीं अ. त्या वेळीं. Then, at that time.

[सं. **तदा** ; प्रा. **तहिं** ; वकाम. शिकाम. पेकाम. **तधीं**, **तेधवां** हीं रूपें काव्यांत येतात.]

तन स्त्री. न. शरीर, देह. The body.

[*IE*. Tenus; सं. **तनु** ; *Av*. Tathra ; पा. **तणु** ; फा. **तन्** ; पेकाम. **तन** (होकै. २४) ; गु. **तन** ; पं. **तण** ; सिं. हिं. बं. **तनु** ; सिंह. **तुनु** ; अकामसा. **तनमनधन**. **तनु** पहा.]

तनखा पुं. पगार, वेतन, ठरलेला मुशाहिरा. Remuneration, wages, rent, assessment.

[फा. **तन्ख्वाह्** ; पेकाम. **तन्खा**, **तनखा** (रा.१५·२७१). ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झालेला दिसतो. ह्याचा पहिला अर्थ **जमाबंदी**, **पट्टी**. ह्यामध्यें बदल होऊन **मक्केला यात्रेकरू नेणाऱ्या गलबतासाठीं दिलेला खर्च** असा अर्थ झाला. नंतर **वसूल**, **पगार**, **वेतन**, **मुशाहिरा** असा अर्थ झाला.]

तन(ण)सडी स्त्री. गवताची काडी. A stalk of grass.

[सं. **तृण+सट** ; प्रा. **तणसडी** ; याकाम. **तनकुटे** (शिशु. ४८७).]

तनसळ स्त्री. सूत उकलून त्याचा ताणा करण्यासाठीं केलेली चौकट. A frame for weaving thread.

[सं. **तन्तु+शलाका**.]

तनु, तनू स्त्री. शरीर, देह. Body.

[*IE*. Tenus. सं. **तनु**, √ **तन्** ; *Gr*. Tanv ; *Lat*. Tenuis ; *Corn*. Tanow ; *Bret*. Tano ; याकाम. **तनु** (नरुस्व. ६२९).]

तनु वि. थोडें, अल्प. Small, a little.

तंत पुं.स्त्री. दोरा, धागा, त्राण, जीव, दम(ल.). A thread or string, (fig.) surviving life.

[सं. **तुंतु**, √**तन्** ; गु. **तंतु**, **वंतु** ; सिं. **तंडु** ; पं. **तंद** ; हिं. **तंत**, **तांत** ; अकामसा. **तांत**, **तांतू** (नारूचा धागा), **तांता**, **तंतु**, **तंत** = बरोबर ; **तंतोतंत** = (मापा)बरोबर, सुरांत लावलेलें (वाद्य) ; पेकाम. **तारोतार** (फा. **तार**) = बरोबर–राज. ३–६५.]

तंतर(णें) सक्रि. संभोगणें. To hold in sexual embrace.

[सं. **मंत्र** आणि **तंत्र**; ‘ **मंत्र** ’ = धार्मिक अनुज्ञा, **तंत्र**= रूढीची अनुज्ञा. परंतु **तंत्र** = धर्मबाह्य संभोग (?) ; गूढ क्रिया. **तंत्र** (नाधा.).]

तंति, तंति, तंती स्त्री. रांग, ओळ. A row, a line.

[सं. **तति**, √ **तन्** ८ विस्तरे.]

तंतु पुं. धागा दोरा, तार. वंश अंकुर. A thread or string.

[सं. **तंतु**, √ **तन्** ८ विस्तरे ; अकामसा. **तंतुकार** = तंतुवाद्य वाजविणारा ; **तंतुवाद्य** = तारा लावलेलें वाद्य, वीणा, तंबोरा, बीन ; **तंती** = विणकर. **तंत** पहा.]

तंत्र न. ‘मंत्र’ ह्याचा अनुबंधी शब्द, सूत, धागा, एक विशिष्ट संप्रदाय. Custom, tradition, thread.

[सं. **तंत्र**, √ **तन्** ८ विस्तरे. **तंत्री** = कारस्थानी, चिटणीस, कार्यवाह.]

तंदुरस्त वि. निरोगी, निकोप, सुदृढ. Healthy, sound (in health).

[फा. **तन्** = शरीर + फा. **दुरुस्त** = बरोबर ; पेकाम. **तन** (खरे १०२४) ; **तंदुरुस्ती** = आरोग्य.]

तप न. पुण्य, सदाचरण, ध्यान, मनन, कष्टाचें धार्मिक व्रत. Austerity.

[*IE*. Tep; वैसं. **तपति**, **तपस्** ; *Av*. Tapaiti; *Lat*. Tepes; *Umbr*. Tefra; अकाम. **तप(णें)** = तपें आचरणें, प्रकाशणें, रागावणें, तळपणें; **तपश्चर्या** = तपस्या.]

तपकीर स्त्री. तंबाखूची पूड. Snuff.

[सं. **तप** (?) + **कीर** = मळ ? सं. **क्षारपत्रा** = तंबाखु (?)]

तपशील पुं. बारीक सारीक गोष्टी, सविस्तर माहिती. Details, minutes.

[अर. **तप्सील** ; पेकाम. **तप्शील** (रा. १·३३५)]

तपा,-प्पा पुं. तालुक्याचा भाग, परगणा. A division of a province.

[हिं. तप्पा = प्रांत ; पेकाम. **तपे** = तालुका ; शिं. **तपो.** एका मुख्य गांवाच्या आसपास असलेल्या दहावीस गांवांची वसुलाची वहिवाट करतां येईल असा परगण्यापेक्षां लहान प्रादेशिक विभाग (श. को.).]

तपास पुं. चौकशी, शोध, तलास. Inquiry, investigation.

[अर. **तफहहुस्** ; अकामसा. **तपासणी, तपासणें.**]

तपेलें न. एक प्रकारचें भांडें. A culinary utensil.

[कान. **तपलें** = वांटोळें मोठें भांडें ; सं. **तप + आलय** = तापविण्याचें स्थान, **तप + आले** (?)–श. को. ' **तप्, तुभ्, स्तुभ्, टोप, स्तूप, टोपलें, टोपी** ' वगैरे सर्व शब्द एका विशिष्ट कल्पनेच्या आधारावर बनले आहेत. **आच्छादन, समावेश, झाकणें, आंत ठेवणें–राहणें** ही कल्पना सर्वांच्या मुळाशीं आहे.]

तप्त वि. तापलेला, रागावलेला. Heated, (fig.) excited.

[सं. **तप्** (निष्ठा) ; अकामसा. **तप्तमुद्रा** = तापलेल्या मुद्रा. वैष्णवांमध्यें दीक्षा म्हणून देतात. **तप्तशूल** = तापलेला सूळ.]

तफरका पु. दाणादाण, चेंदीलपण. Routing,

[अर. **तफ्रिका** ; पेकाम. तफ्रिका (दिमरा १-१६), (राज. ३-९०).]

तफरीक स्त्री. वांटणी, विभागणी वर्गवारी. Division, partition, classification.

[अर. **तफ्रीक** ; पेकाम. **तफ्रीक** (रा. ३-४९).]

तफावत स्त्री. फरक, अंतर, उणेपणा, चूक, स्वामिद्रोह. Difference, disparity, omission.

[अर. **तफावुत्** ; पेकाम. **तफावत (तजावत)** (ब्रच. २४०), (राज. १५-६).]

तबक न. ताट, धातूच्या पत्र्याचा वांटोळा तुकडा, नक्षीदार ताट. A platter or plate.

[अर. **तबक्** ; पेकाम. **तबक** (खरे ४-१८२७); अकामसा. **तबकडी** = लहान ताट, झांकण, ताटली.]

तबलक न. कागदाचें पुडकें, आवेष्टण. A bundle or packet of papers, a paper-cover.

[अर. **तब्लक.**]

तबला पुं. एक चर्मवाद्य. A musical instrument.

[अर. **तब्ला** ; **तबलजी--ची** = तबला वाजवणारा.]

तबिय(ब्य,ब्ये)त स्त्री. प्रकृति, शरीरस्वास्थ्य. Constitution, health.

[अर. **तबिअत्** ; पेकाम. **तबियत** (रा. ७-१२७).]

तबीब पु. वैद्य, शस्त्रवैद्य, हकीम. A physician.

[अर. **तबीब्** ; पेकाम. **तबीब** (खरे ६-२८३२).]

तबेला पुं. घोडा बांधण्याची जागा. A stable.

[अर. **तबीला.**]

तब्बल स्त्री. वि. दम, जोर, ताण, भरपूर, पूर्ण. Effort, strain, complete, perfect.

[अर. **तब्बील्** = उंच, लांब.]

तम न. काळोख, अंधार, अज्ञान (ल.). Darkness, ignorance (fig.).

[*IE.* Tem ; सं. **तमः, तमिस्त्र** ; *Av.* Temah ; *Gr.* Tam ; *Lat.* Tem, tim ; *Slav.* Tima ; *Lith.* Tem-ti ; अकाम. **तमोगुण, तमिष्ट, तामसी, तमिस्त्रा** = रात्र.]

तम(णें) अक्रि. गर्वानें फुगणें, रुसणें, धुसफुसणें. To rant, to vaunt, to swell and fume with pride and anger.

[*IE.* Tem ; वैसं. **ताम्यति** ; *Lat.* Tametum ; *Russ* Tomiti ; सं. **तम्, ताम्रः** (?) ; पा. **ताम तम्मइ** ; देप्रा. **तम्म** ; प्रा. **तामई** (दमतो) ; हिं. **तमतमाना** ; बं. **तम** (गर्व).]

तमा स्त्री. फिकीर, काळजी, पर्वा, आशा, भीति. Care or fear, awe, regard.

[अर. **तमूअ** ; शिकाम. **तमा, तमा धरणें** (चित्रगुप्त ८).]

तमाम वि. पूर्ण, सर्व. Completed, all, whole, perfected.

[अर. **तमाम्** ; पेकाम. **तमाम–तमामी** (पदमव. १३५)]

तमाल, तमालपत्र पुं. वनस्पतिविशेष (मसाल्यांत पानें घालतात.). A kind of tree.

[सं. **तमाल** ; याकाम. **तमाळ** (= ताडवृक्ष. नरुस्व. ४७३)]

तमाशा पुं. दृश्य, प्रदर्शन, करमणुकीचा देखावा, समारंभ, गंमत, मजेदार दृश्य, कुस्ती, लढाई, नाटक. A show, play, farce, exhibition.

[अर. **तमाशी, तमाशा** = हालचाल, गति ; पेकाम. **तमाशा, तमासा** (खरे ९-४७१६); तुर्कस्थानांत हा शब्द रूढ होता. मराठीमध्यें ह्याला एक विशिष्ट अर्थ प्राप्त झाला आहे. मूळ अर्थ देखावा; परंतु मराठीत एक विशिष्ट प्रकारचा देखावा कीं ज्यात नाच्यापोऱ्या स्त्रीचें सोंग घेऊन लावण्या म्हणत खेडें गांवांतील लोकांची करमणूक करतो असा देखावा, असा अर्थ आला आहे. ‘ तमाशा ’ शब्दाचा मूळ अर्थ **तमासगीर** ह्या शब्दांत उतरला आहे. **तमासगीर** = दुरून मौज पाहणारा.]

तंबाखु, तमाखु-खू स्त्री. एक प्रकारची तिखट वनस्पति. (ही ओढतात व खातात). Tobacco.

[हा शब्द मूळ हयाटी भाषेंतील आहे. त्यांचा अर्थ प्रथम **नळी** किंवा **चिलीम**, नंतर **वनस्पति** आणि नंतर त्यापासून येणारी **झोंप** किंवा **कैफ**. ही वनस्पती परकी देशांतून हिंदुस्थानांत-दक्खनमध्यें प्रथम आली आणि तेथून उत्तर हिंदुस्थानांत तिचा प्रवेश अकबर बादशहाच्या कारकीर्दींत झाला. त्या वेळीं एक मुसलमान हकीम–नबाबखान इअझम नांवाचा अकबर बादशहास भेटावयास गेला. जातांना त्यानें रत्नजडित चिलीम आणि तंबाखु बरोबर नेली. बादशहानें मोठ्या कौतुकानें ती पाहिली व प्रश्न विचारले. हकीमानें सांगितलें कीं मक्कामदीनेकडील ही वनस्पति औषधी आहे. बादशहा ओढावयास लागला. त्याला ती आवडली परंतु त्याच्या राजवैद्यानें ओढूं नका म्हणून सांगितल्यावर त्यानें बंद केली. हिचा प्रसार शहाजहानाच्या कारकीर्दींत फार झाला. तंबाखुचा प्रवेश १६०४ इ. स. सुमाराचा आहे. व शब्दहि त्याच वेळचा आहे. कोलंबसानें आपल्याबरोबर ही वनस्पति व तिचें नांव अमेरिकेहून युरोपांत आणिलें. युरोपहून पोर्तुगीज खलाशांच्या मार्फत ही वनस्पति हिंदुस्थानांत आली. ऑस्ट्रिक भाषेंतील शब्द **टो + बाको** ह्या वरील शब्दाशीं वर्णोच्चाराच्या दृष्टीनें बराच जवळचा वाटतो. दोन्ही शब्दांतील उच्चारसाम्य चिन्त्य आहे.]

तंबी स्त्री. धाक दपटशा, दटावणी, दहशत. Chastisement, correction, threat.

[अर. **तम्बीह्.**]

तंबू पुं. कापडाचें एकखांबी घर, झोंपडी, डेरा. A tent.

[फा. **तम्बू.**]

तंबूरा, तंबोरा पुं. तंतुवाद्य, वीणा. A Turkish guitar with four wires.

[अर. **तंबूरा** ; फा. **तंबूर** = चर्मवाद्य, ढोल ; बं. **तानपुरा**; **तंबूरी** = लहान तंबोरा. (हें वाद्य मूळ तुर्की आहे.).]

तयार, तय्यार वि. सिद्ध, सज्ज, उत्सुक. Prepared, willing.

[फा. **तयार्.**]

तर(णें) उक्रि. पार जाणें, ओलांडून जाणें, पोहणें. To swim or pass over, to float.

[*IE*. Ter, tr ; सं. तृ.; *Zend*. Tar ; *Gr*. Ter ; *Lat*. Ter ; *Slav*. Treti ; *Lith*. Trniti ; सं. **तृ** ; पा. **तर** ; प्रा. **तर** ; बं. **तरा** ; ओ. **तरिबा** ; हिं. प. **तरना** ; सिं. **तरणू** ; गु. **तुरवूँ.**]

तर अ. नंतर, परंतु, तथापि. Then, in that case, but, still.

[सं. **तर्हि** ; पा. **तरहि** ; प्रा. **तरिहि.** यादवकालीन मराठींत ‘ **तर** ’ याचे निरनिराळे अर्थ होतात; **तर** = मां (हें नव्हे **तर** रोकडें । ज्ञा.), **तर** = आणि (गोसावियांचे जाल तर होईल), **तर, तरी** = सुद्धां.]

तर स्त्री. होडी, मचवा. A ferry-boat.

[सं. **तरी,** √ **तृ**; याकाम. **तरि** (-नरुस्व. ७२०).]

तरक(णें) सक्रि. ताडणें, अनुमानणें. To make out, to apprehend.

[सं. **तर्क्** १० भाषार्थः, **त्रंक्** १ गतौ ; अकामसा. **तरकटणें** (तर्कट – नाधा.) = गैरलागू बोलणें, बहकणें.]

तरकस-श स्त्री. बाणांचा भाता. A quiver.

[फा. **तर्कश, तीर्कश** = बाणांचा भाता ; शिकाम. **तिर्कश्** (चित्र. १३८); पेकाम. **तरकसकमान** = भाता आणि धनुष्य (**तरकश+कमान**).]

तरंग पुं. लाट, लहर, ऊर्मि, नवी कल्पना–विचार (ल.). A wave,an idea.

[सं. **तरंग,** √ **तृ** ; याकाम. **तरंग** (नरुस्व. ११३) अकामसा. **तरंगणें** (नाधा.) = तरणें, पृष्ठभागावर राहणें, संशयांत राहणें. (याकाम. **तरंगाय.**)]

तैसे लावण्यें आंगी तरंगायः सिवलेयेचा ॥ नरुस्व. ६५२,

^{१}तरट न. मोठा चाबूक, आसूड. A whip.
[फा. **तरटं** तु महाकशा । राव्य. ५–२५]

^{२}तरट न. गोणपाट, पोतें. A sack-cloth.
[ध्वनिशब्द. सं. **तरपट्ट**; देप्रा. **तरवट्ट** (?).]

तरणा वि. तरूण, उमदा. Young, adolescent.
[सं. **तरुणः**; पा. प्रा. **तरुण**; प्रा. **तलुण, तरुणअ**; गु. **तरुण**; पं. **तर्न**; सिं. **तुरुणु**.]

तरतमभाव पुं. कमी-अधिकपणा. Discriminaation of better and best.
[सं. **तर, तम** हे दोन संस्कृत प्रत्यय आहेत. तर (=पेक्षां अधिक), तम (=सर्वांत अधिक) असे त्यांचे अर्थ आहेत]

तरतर(णें) अक्रि. चलाखीनें चालणें, फुलणें, फुगणें, सुजणें, आतुर होणें. To walk fast, to thrive, to bloom, to swell.
[सं. **त्वर्**; पा. **तर**; प्रा. **तर**; हिं. **तरार**; बं. **तर्तर** (उत्सुकता); अकामसा. **तरतर, तरतरां**=भरभर. दुडदुड, चपळाईनें; **तरतरी**=त्वरा, चपळाई, हुषारी, चलाखी, जोम, उत्साह; **तरतरीत**=चलाख, चपळ, हुषार.]

तरतूद स्त्री. व्यवस्था, सिद्धता, काळजी, कसोशी, युक्ति. Preparation, arrangement.
[अर. **तरद्दुद्**=काबील; पेकाम. **तर्दुद** (राज.१-३१५).]

तरफ, तर्फ स्त्री. बाजू, पक्ष, दिशा, कड, ताबा, जिम्मा, तालुका, पेटा. A small division of country, a side.
[अर. **तर्फ, तरफ**=पक्ष, पेटा; पेकामसा. **तरफदारी**= कैवार, पक्षपात; **तर्फे**=मार्फत; **तर्फेन**=उभयपक्ष (रांज, ५.२०२).]

तरफका, तफरका वि. गहाळ, बेपत्ता. Lost, having no trace.
[फा. **तफरका** (वर्णविपर्यय).]

तरबेज वि. निष्णात, कुशल, वाकब्गार. Accomplished, skilled.
[अर. **तर्बियत्**=शिक्षण, सुशिक्षित.]

तरम पुं. प्रत, दर्जा, (जमिनीचा) जमिनीचा सारा. Survey (of land), the classification and assessment.
[अर. **तरह्**; म. **तन्हा**; ते. **तरमु**; तामी. **तेरिम्**; **तरमबंदी**=जमिनीची वर्गवारी, प्रतवारी.]

त(तु)रमुंडी स्त्री. डोकें पुढें खुपसून मार्ग (काढणें), ढुस्सी, मुसंडी. A vehement push with the body, head foremost.
[हिं. **तर** (= खालीं) + **मुंडी** = डोकें (?)]

तरवड पुं. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **तरवट्ट**; देप्रा. **तरवट्टो प्रपुनाटः तडवडा आउलिवृक्षः**; हिं. **तरवर**; कान. **तुरुवे**=एक उंच वनस्पति.]

तर(ल)वार स्त्री. लोखंडी हत्यार, मोठें लांब कृपाण. A sword.
[सं. **तलवारि, तरवारि**; **तरभालिका** (William's Dictionary); हिं. **तलवार, तरवार**; बं. **तलोयार**; ओ. **तलबार**; पं. **तरवार**; सिं. **तरारी**; गु. **तरवार**; अकामसा. **तरवारबहादर**=युद्धात शौर्य गाजविलेला; **तलवार** पहा. संस्कृतीकरण उत्तरकालीन दिसतें. हत्यार लांब असलें तर **तरवार** व आंखूड असलें म्हणजे **निमचा** म्हणतात.]

तरस पुं. एक वन्य हिंस्र प्राणी (घोडें मारणारा). The striped hyena.
[सं. **तरक्षु, तरक्ष**; प्रा. **तरच्छ**; अप. **तरच्छ**; गु. **तरस**; प. पं. **तर्ख**; सिंह. **तरस**.]

तरस(णें) अक्रि. तहानणें, थकणें. To be thirsty, to be exhausted.
[सं. **तृष् ४ तृष्णायाम्**; **त्रस् ४ उद्वेगे**.]

^{२}तरस स्त्री. भीति. Fear.
[सं. **त्रस्**; प्रा. **तस**; अप. **तरास**; फा. **तर्स्**; पेकाम. **तरस** (=भीति रा. ३.९०); सिं **तरसु**. हिं. **तरस**; पं. **तराह, तरास**.]

तरसाळें न. एकप्रकारचें भांडें. A saucer-form vessel.
[**तपेलें, पातेलें, तरसाळें, तसराळें** वगैरे शब्दांत ‘ल’ हा प्रत्यय सर्वसाधारण दिसतो व तो ‘सांठा’ या अर्थीं असावा. हीं सर्व द्राविडी भांडीं आहेत काय ?]

तरळ (मोडशी) स्त्री. रोगविशेष, हगवण (अजीर्णामुळें). Cholera morbus.
[सं. **तरल**.]

तरळ(णें), तराळ(णें) अक्रि. चंचल-अस्थिर होणें, भांबावणें, भ्रमणें, भटक्या मारणें. To be unsteady, to be confounded, to wander idly.

[*IE.* Ter : सं. **तरल** (नाधा.) ; प्रा. **तरळ** ; *Alb.* Tartalis.]

तराजू पुं. मापनसाधन, मोजण्याचा कांटा. Scales or a balance.
[फा **तराज़ू.**]

तरांडें न. जहाज, गलबत, ताफा, पेटा. A ship, a long straight trunk.
[सं. **तरंड.**]

तरार(णें) अक्रि. फार–बेसुमार फुगणें, ताठणें. To swell exceedingly.
[सं. **तर्व्**, **तर्वर** (नाधा.) ; **तरल** (नाधा.) ; अकामसा. **तरारां** = अतीशय जलद.]

तराळ पुं. खेडेंगांवांतील वतनी पहारेकरी महार, नगररक्षक. A man of low caste whose duty is to protect a village.
[देप्रा. **तलारो** (नगररक्षक) (वर्णव्यत्यास) ; द्रा. **तेरळु** = बोलावून एकत्र गोळा करणें ; तेल. कान. **तलीर** ; याकाम. **तरालु** (ली. च. ३८) ; अकामसा. **तराळकी** = तराळाचें वतन,–काम.]

तरि, तरी, तर स्त्री. नाव, नौका, होडी. A boat.
[सं. **तरी, तरि,** √तृ ; याकाम. **तरि** (नरुस्व. ७२०) ; **तरी** = खाडी. संस्कृतमधील **तरी** शब्दावरून हा अर्थ निष्पन्न झाला काय ? साधनावरून साध्य ही लक्षणा.]

तरी अ. तथापि, निदान. Nevertheless, still.
[सं. **तर्हि** ; प्रा. **तही.** ह्या दोहोंमधील **तऱ्ही, तऱ्हें, तऱ्हें, 'तरीह'** ह्या अवस्था मराठींत रूढ आहेत. याकाम. **तऱ्ही, तरी** (नरुस्व. ७७). **तऱ्ही** ताठ न संडी दा. २-३-३३ ; **तऱ्है** तयाचें वचन न करीच. पंच ३-१९.]

होऊनी निरमत्सरु तूं परतशी : येथें तरीह ॥
गीत. चंद्रिका २-३४.

तरु पुं. झाड, वृक्ष. A tree.
[सं. **तरु,** √ **तृ.**]

तरुण वि. जवान, युवा. Young, adult.
[सं. **तरुण** ; **तरणा** पहा.]

तर्क पुं. अनुमानशास्त्र, तर्कशास्त्र, अनुमान, ज्ञान, कल्पना, अक्कल, बुद्धि. The science of reasoning, logic, reasoning, inference, conjecture, fancy, notion.
[*IE.* Terek ; सं. **तर्क्** ; *Lat.* Torqueo ; *Apr.* Tarkue ; *Gr.* Trak; *Slav.* Trakes; *Lith.* Tenkti. ह्या शब्दाच्या अर्थांत बदल फार झाला आहे. विचार करणें–त्यावरून बुद्धि–त्यावरून बुद्धीचें शास्त्र–पुनः परत त्यावरून कल्पना–ज्ञान, अक्कल अशी प्रगति, परागति अर्थांत बरीच झाली आहे ; अकामसा. **तर्कवाद** = बुद्धिवाद ; **तर्ककौशल्य** = अनुमान काढण्यांत तरबेजपणा ; **तर्कविद्या** = तर्कशास्त्र ; **तर्कज्ञान** = अनुमानाचें सामर्थ्य ; **तर्कट** = भलताच तर्क ; **तरकणें, तरकटणें.**]

तर्ज(णें) सक्रि. दहशत घालणें, धिक्कारणें सोडणें, टाकणें. To threaten, to treat scornfully.
[*IE.* Tergu ; सं. **तर्ज्** = निन्दायाम् ; *Gr.* Tarhbos ; *Lat.* Tarvus ; अकामसा. **तर्जन** = निन्दा, निर्भर्त्सना ; **तर्जनी** = अंगठ्याजवळचें हाताचें बोट (ह्या बोटानें दुसऱ्यास दहशत देतात.)]

तर्जुमा पुं. भाषांतर, The translation.
[अर. **तर्जमा, तर्जुमा** = लेख, एकंदर राज्याचा हिशेब पेशवे करीत तो (ऐस्फुले. २-७३).]

तर्पण न. संतोष, समाधान, आनंद, (विशेष अर्थानें) श्राद्धकर्मांत पितरांस द्यावयाचें पाणी. Pleasing, satisfaction, presenting water to the manes.
[*IE.* Terp ; सं. तृप् ; *Av.* Thropa ; *Gr.* Terhpo. *Lett.* Tarpa ; अकामसा. **तर्पणें, तर्पिणें, तर्पित.**]

तऱ्हा स्त्री. प्रकार, भेद, जात, रीत. A kind or sort, a way, a manner, a method.
[अर. **तर्ह्** ; पेकाम. **तऱ्हा** (राज. १०-१९२). अकामसा. **तरतऱ्हा, हरतऱ्हा** = निरनिराळे प्रकार. **तऱ्हेबाज, तऱ्हेवाईक** = लहरी ; **तऱ्हेवार, तऱ्हेदार** = निरनिराळ्या प्रकारचा.]

तल,–ळ न. बूड, खालचा भाग. Bottom, the lowest part of.
[*IE.* Tel ; सं. **तलम्** ; *Arm.* Tal ; *Apr.* Talus ; *Lit.* (pa) talas ; याकाम. **तळ** (नरुस्व.६३०)]

तलख, तल्लख वि. तापट, रागीट, चलाख, हुशार, त्रासदायक, चपळ. . Biting, impetuous, impatient, vehement. fiery.
[फा. **तल्ख्** = तिखट ; अकामसा. **तलखी, तळखली** = आग, दाह.]

तलग न. पिल्लूं, अर्भक. A young one.
[द्राविड मूळ (?), **तलगी** = अंडीं घालण्याच्या वयांत न आलेली कोंबडी.]
तेथ नवरत्नांचीं तलगें : तैसी वनीं पाखिरुवें अन्नेगे ॥ (नरुस्व८०२)
तलगासीं कमळें । चारा वांटित मराळे ॥ ऋ. ६९.

तलफ(णें) सक्रि. पत्नीसारखें वागणें, पतीबरोबर कामक्रीडा करणें. To live with (as a wife), to cohabit.
[सं. **तल्प** = शय्या.]
घडौनि सिंधुनेया आंगा । सिंधु वरि तलपे गंगा ॥
तैसा पाडुतेया भोगा । अवधीर जो । रा. ज्ञा. १८-११३२.

१**तलफ** स्त्री. गंजिफाच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द. A term at cards.
[अर. **तलफ्.**]

२**तलफ, तल्लफ** स्त्री. वाईट खोड, कैफ, व्यसनाचा आवेग, इच्छा, हुक्की. An ill-habit, a bad way, desire.
[अर. **तलब्** = इच्छा.]

३**तलफ** वि. उध्वस्त, ओसाड, नाश, विध्वंस. Desolation, distruction.
[अर. **तलफ्** ; = नाश; शिकाम. **तलफ** (सभासद५३).]

तलब स्त्री. वेतन, मुशाहिरा, वाईट व्यसन, खोड, आशा, Pay, wages, an ill-habit, summoning, a demand from government.
[अर. **तलब्** = पगार ; शिकाम. **तलब** (चित्र ७-८)]

तलम वि. पातळ (कापड), बारीक व मृदु. (Cloth) of delicate texture, weak, tender, delicate.
[तेलु. **तरमु** ; तामी. **तेरिम.**]

तलवार स्त्री. तरवार पहा.

तलाटी-ठी पुं. गांवकामगार, कुलकर्णी. The village accountant,-writer.
[ते. **तेरिम** ; तामी. **तारिम** = जमीनीची प्रतवारी ; गु. **तलाटी.**]

तलाव पुं. सरोवर, मोठा जलसंचय. A tank.
[सं. **तडाग** ; प्रा. **तलाअ, तळाअ** ; फा. **तलाव्, तालाब्** ; गु. **तलाव** ; सिं. पं. **तलाउ** ; हिं. **तलाओ, तलाव, तराव** ; सिंह. **तळा.** मराठी शब्द फार्सीमधून घेतला असल्याचा संभव अधिक. सं. **तडाग** ; प्रा. **तलाअ** ह्या पासून तद्भव **तळें** हा सिद्ध झाला. तळें पहा.]

तलावा. पुं. पहारा, देखरेख, टेहळणी, गस्त. Walking (as of a patrol), reconnoitring.
[तुर्की. **तुलावा** ; फा. **तलाया** ; अर. **तलाइअ** = टेहळणी करणारी लष्करी टोळी ; **तिलावा** = पहारा ; पेकाम. **तलावा** (खरे ८-३९१९).]

तलास,-श पुं. शोध, तपास. Search, quest, inquiry.
[फा. **तलाश** ; पेकाम. **तलास** (रा. १-२७९).]

तल्प न. शय्या, अंथरुण, बिछाना. A bed or cot.
[सं. **तल्पम्.**]

तल्लीन वि. मग्न, दंग, रममाण, गुंग. Absorbed in, deeply engaged in.
[सं. **तत्** + **लीन.** (निष्ठा-√ ली.)]

१**तव** पुं. आवेश, बल, जोर. Strength, force.
[*IE.* teu, tu ; सं. **तवस्** (तौति, तवीति); *Av.* Tav ; *Arm.* tup ; *Gr.* tavs ; *Lat.* toveo ; *Lett.* tuska.]

२**तंव, तव, तवई** स्त्री. अंधेरी, घेरी, मूर्च्छा. Giddiness, fainting.
[सं. **तमस्** = अंधार ; प्रा. **तमो, तम** ; हिं. **तंवाला** ; रुमा. **तम** = आंधळा.]

३**तंव** अ. तों, पर्यंत. Till (that time), until, then.
[सं. **तावत्, तदा** ; प्रा. **ताव, तो, तंव** ; अप. **तांव, ताउ** ; गु. **तांव** ; हिं. **तौं, तों** ; याकाम. **तंव** (पर्यंत.); अकाम. **तों.**]
धाय तंव खाईजे : पाहे तंव निजिजे ॥ लीच. ३-४९.

तवक(णें) अक्रि. रागावणें, कोपणें, जोरावणें. To be angry, to encourage.
[सं. **तवस्** = बल. (तव) (नाधा.)]

तवक, तंवका पुं. आवेश, त्वेष, संताप. Anger, rage, passion.
[याकाम. **तंवंक, तंवक** (= आवेश. नरुस्व. ४८४).]
कीं अंधारें अंतुरनायकें: सूर्यांचिया धुरा धरिलिया तवंकें ॥ नरुस्व. ४८४.

तवकल, तवकूल स्त्री. निष्ठा, श्रद्धा, आधार, भरंवसा Trust (in God), confidence.

[अर. तवक्कुल्; पेकाम. तवकूल (रा. ५८६).]

तवकीर, तवकील न. पांढरें सत्त्व (गहूं, तांदुळ, आरारूट याचें). The white essence (of wheat or rice).

[सं. त्वक् (साल) + क्षीर, क्षार ?; हिं. तवाखीर; बं. तवक्षीर; गु. तवखार; अर. तवाशीर; फा. तवाशीर.]

तवंग पुं. पाण्याच्या वर येणारा थर, तरंगणारा पदार्थ, तत्र. A thin layer (on water), floating thin substance.

[सं. तवस् (?); अप. तवंग = उपरितनः भागः.]

तवचा स्त्री. त्वचा, कातडी. The skin.

[सं. त्वचा, त्वक्; याकाम. तवचा; अकाम. टवचा,-का.]

उपचारें आंगिची तवचा उचलली: उवादर ये जवळिली ॥ नरुस्व. ५६१.

तवनो स्त्री. तापविण्याचें भांडें, पीडा (ल.). A vessel to be heated, (fig.) affliction.

[सं. तपन; देप्रा. तवणी; याकाम. तवनो.]

तवर पुं. आवेश, वीरश्री, जोम, पाणी, तोरा. Fieriness, passionateness, force, spirited-ness, haughtiness.

[अर. तहव्वुर्.]

तंवर अ. तोंपर्यंत, तोंवर, उपरि. Until that time, until then.

[सं. तावत् वर; अप. तंववर; याकाम. तंववेन्ही (ज्ञा.).]

तवली स्त्री. थाळीसारखें भांडें, मडकें, तपेली. A metal or earthen vessel.

[सं. तापक, √ तप् ?; कान. तपेलें (?); मराठी 'तवा' ह्या शब्दाशीं संबद्ध आहे का? तवली, तपेली, तवा हीं भांडीं तापविण्यासाठीं होतीं काय? तपेली, पातेली, कथली, ह्यांतील 'ली' हा अल्पार्थें प्रत्यय आहे. पातेलें, पातेली ह्यामध्यें 'पित्तल' पितळ हा शब्द आहे. कथली ह्यांमध्यें कथील हा शब्द आहे. तसा तपेली, तपेलें ह्यांमध्यें ताम्र-तांबें हा शब्द आहे काय? कां सं. तप्तल; प्रा. तप्पल; हा शब्द मूळ आहे?]

तवा पुं. लोखंडाची ताटली (भाकरी भाजण्याची). An iron plate.

[सं. तापिका, (तापक); प्रा. तविआ, तवय (पुं.); का. तवूँ (स्त्री); वि. ताई; हिं. ताई; गु. तावी, तवो; ने. ताई, तवा; का. ताओ; फा. तावा (=तवा); सिंह. तव = तपश्चर्या. लक्षणेनें कांहीं अर्थ रूढ झाले आहेत. वृक्ष, खाचखळगे, धातूचा पत्रा, तकट, शालजोडीचा मधला भाग इ.]

तवाई स्त्री. दंड, नुकसान, तूट. A fine, loss.

[फा. तवा-ई.]

तवाना वि. ताजा, सशक्त, तेजस्वी. Hale, healthy, fresh.

[फा. तवाना; पेकाम. तवाना (खरे. १२-६३९९); ताजा आणि तवाना हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द; तवान(णें) = निरोगी-सुदृढ होणें.]

तवारीख स्त्री. इतिहास, रोजनामा. History, a chronicle.

[अर. तारीख्-(अ. वचन) तवारीख; पेकाम. तवारीख नामे (ऐटि. १·१८).]

तशरीफ स्त्री. आगमनानें सन्मानण्याचा प्रकार, मान देणें. Investing (with an honorary dress), conferring an honour (with dress and other gifts).

[अर. तश्रीफ् = मान, सन्मान देणें, पायधूळ झाडणें इत्यादि; शिकाम. तशिरफा (सभा. ३०). औपचारिक सभ्यता दाखविण्याकरतां हा शब्द वापरतात.]

तष्ट न. तगादा, घाई, उपद्रव. A trouble, a hobble, a scrape.

[सं. त्वष्ट, (निष्ठा-√त्वष्, त्विष्); पेकाम. तष्ट (पे. द.).]

तसदी स्त्री. त्रास, श्रम, मेहनत, तकलीफ. Troubles, pains, efforts, worry, annoyance.

[अर. तस्दीअ; पेकाम. तज्दी, तस्दी (रा. ३-१७२, ६-३९२).]

तसबीर स्त्री. छबी, प्रतिमा, चित्र. A picture, a photograph.

[अर. तस्बीर; तजबीर पहा.]

तसर स्त्री. न. जाड्या रेशमाचा एक प्रकार, त्याचें कापड. A kind of coarse silk.

[सं. त्रसर.]

तंसर न. गल्ल्याच्या ऐवजीं घ्यावयाचा सरकारी सारा. Survey assessment, a sum to be taken by government in lieu of dues in kind.
[फा. **तसर्** (?)]

तसराळें न. एक प्रकारचें भांडें. A metal vessel.
[कान. ?; म. **तरसाळें**, **तसराळें**.]

तसरीफ स्त्री. तशरीफ पहा.

तसलमात स्त्री. वंदन, देणगी, मोघम खर्चीं वापर, उपयोग. Respects, salutation, money given on hand, use, enjoyment.
[अर. **तस्लीम्**=वन्दन ('अस्सलामु अलैकुम') ह्या शब्दाचें अने. व. **तस्लीमात**; पेकाम. **तस्लीमात** (ऐटि. १६५), **तस्लमात** (वाड सभा. १-४०).]

तसा, तइसा सर्व. वि. अ. त्यासारखा, त्याक्षणीं, त्यासरसा, लागलेंच. Immediately upon, of that kind, so, thus.
[सं. **तादृश**; प्रा. **तइस**. दृश् शब्द लावून **तादृश, यादृश, कीदृश** असे शब्द करून त्यापासूनच्या प्राकृत शब्दांपासून **तसा**, **जसा**, **कसा** व इतर सारीं सार्वनामिक तद्भव विशेषणें व अव्ययें तयार झालीं आहेत.]

तसू पुं. लांबी मोजण्याचें माप, गजाचा २४ वा भाग. A measure of length, 24th part of a गज.
[फा. **तसू**.]

तस्कर पुं. चोर. A thief.
[सं. **तत्+कर**, √कृ; पाणिनीनें सुडागम होऊन शब्द सिद्ध होतो असें म्हटलें आहे. परंतु तें पटत नाहीं. 'तस्कर' नांवाचे एतद्देशीय मूळचे लोकांपैकीं एक होते. ठकर, ठाकर, ठाकरले वगैरे शब्दांचा ह्या तस्कर शब्दाशीं संबंध असावा.]

तस्त न. पिकदाणी, हात तोंड धुतांना पाणी सांडण्याचें भांडें. A spitoon.

तस्मात् अ. म्हणून, तेथून, त्यामुळें, त्या कारणानें. Therefore, thence, from those reasons.
[सं. **तस्मात्**; **तत्** ह्या शब्दाच्या पंचमीचें एक व. रूप. परंतु त्याचा अव्यय म्हणून उपयोग रूढ आहे.]

तह पुं. शांतता, संधि, करार, समेट. Peace, compromise, aggreement.
[फा. **तह**.]

तहकीक स्त्री. सत्य, निश्चिति, निर्णय. Truth, certainty.
[अर. **तह्कीक्**; पेकाम. **तहकीक** (रा. १५-४); ह्याचें अ. वचन-**तह्कीकात्**=चौकशी.]

तहकूब, तकूब पुं. वि. थांबवणूक, अडवणूक थांबलेलें, तात्पुरतें रहित, स्थगित. Delay, delayed, stopped for a time.
[अर. **तवक्कुफ्**.]

तहत अ. पर्यंत. Upto, till.
[फा. **तहद्**; पेकाम. **तहद**=पुढें. उदा. श्री अहद रामेश्वर तहद दिल्ली देईल. ब्र. च. २८१.]

तहशील स्त्री.न. जमीन वसूल, वसूली, मामलत. Revenue, a revenue district.
[अर. **तह्शील्**; **तहसीलदार**=मामलेदार.]

तहान स्त्री. पाणी पिण्याची इच्छा. Thirst.
[*IE.* Trs; सं. तृष्णा, √तृष्; *Zend.* Tars; *Gr.* Terhs; *Lat.* Terr; *Lith.* Troksztu. सं. **तृष्णा**; प्रा. **तण्हा**; प्राकृत शब्दांत वर्णविपर्यय होऊन **तहान** असा सिद्ध झाला. सिंह. **तण**; पं. **तांघ**; का. **त्रेश्ना**; सिं. **टिह्**; हिं. **तिस्**; गु. **तरस**; सिं. **तिरस्**; हिं. **तिरखा**.]

तहाहयात अ. हयातीपर्यंत. As long as life lasts, until death.
[फा. **तहा, तहद**=पर्यंत; **हयात्**=जीवमान आयुष्य.]

तळ पुं. बूड, अधिष्ठान, खालचा भाग. Bottom, the lowest part.
[*IE.* Telos; सं. तल, (**पदतल**, **ताल**, **ताड**, **टाळी**); *Lat.* Tellus; *Slav.* Tilo (ground); *Lith.* Tile; सं. **तल**; पा. प्रा. **तल**; बं. **तल**, **तला**; ओ. **तळा**; हिं. पं. **तल**, **तला**; ल्हां. **तळे** (खालीं); सिं. **तरु**, **तरो**, **तळ** (पृष्ठभाग); गु. **तळ**, **तळूँ**; ने. **तलो**; याकाम. **तळ**=ठाव-नरुस्व. ६३०.]

तंळ पुं. छावणी, मुक्काम. A place for encampment.

तळ(णें) सक्रि. तूपतेलांत भाजणें, परतणें. To fry, to roast,

[कान. तळ=कढण्याचा बुडबुडा; सं. तलति ; प्रा. तलइ ; हिं. तलना ; पं. तलणा ; ल्हां. तलण ; सिं. तरणु ; गु. तळवूँ ; ने. तानुं.]

तळप(णें) अक्रि. प्रकाशणें, परजलेलें असणें. To shine, to sparkle.
[कान. तळपु = चकाकी ; सं. तप् (?); पं. तप्पणा, तरप्पणा ; हिं. तरपना (उडी मारणें.)]

तळतळ स्त्री. दुःखाचा आवेग, वैतागाची अवस्था. Exasperated state, ebullition of passion.
[कान. तळ = दुःखाचा आवेग; तळणें पहा. म. तळतळणें, तळतळाट, तळपट (नाश).]

तळमळ स्त्री. दुःखामुळें झालेली अस्वस्थता, काळजी. Restlessness through pain, anxiety.

तळवा पुं. पायाच्या खालचा भाग, हाताचा बोटाखालचा मनगटापर्यंतचा भाग. The sole of a foot, the palm of the hand.
[सं. तलपाद ; ओ. तळिपा ; गु. तळियूँ ; हिं. तलवा.]

तळें पुं. लहान सरोवर, पाण्याचा सांठा. A tank.
[सं. तडाग ; पा. तळाकम् ; प्रा. तडाग, तलाग, तलाय, तळाअ, तलाअ ; देप्रा. तल्लम् ; बं. हिं. पं. तलाउ ; गु. तलाव ; ने. तलाउ. फा. तलाव ; तळें <सं. तल्ल, तल, तलक ; अप. तल्ल ; देप्रा. तड, तल्ल पल्वलम् (१६४-७) ; तलाव पहा.]

ता प्र. भाववाचक प्रत्यय. A termination to form abstract nouns.
[सं. ता ; प्रा. ता, त्था.]

तां अ. तर. Then,
[सं. तत्,-तर्हि.]

ताई स्त्री. स्त्रियांना-विशेषतः वडील बहिणीस-सन्मानानें संबोधण्याचा शब्द. A term of respect used for a sister or a female in general.
[कान. ताय,-यी = आई ; हिं. ताई, = आत्या, चुलती.]

ताई, तायु पुं. चोर. A thief.
[*IE.* Te; ✓Ste. सं. स्तेन; *Zend.* tai; *Gr.* Ta; *Slav.* Tati.]

ताईत पुं. वाईट दृष्ट लागूं नये म्हणून घालावयाचा अभिमंत्रित दागिना. An amulet.
[अर. तअवीज़्, तावीज़् ; हिं. ताईत.]

ता(तां)ऊस पुं. एक वाद्य, मोर बसविलेलें वाद्य. An instrument.
[फा. ताऊस.]

ताक न. दहीं घुसळून काढलेलें द्रव पाणी, तक्र. Butter-milk.
[सं. तक्र ; प्रा. तक्क (न) ; सिंह. तक् ; गु. ताक्, चाष ; अकामसा. ताकतई,-तय,-तव, तेय,-त्येव, तोय = ताकपाणी ; ताकपिठ्या = ताक आणि लाह्याचें पीठ खाणारा. त्यावरच पुराण सांगण्याचें,-कथा करण्याचें काम करणारा, अल्पसंतोषी, क्षुद्र.]

ताकडा वि. हुशार, चलाख. Expert or smart.
[तगडा पहा. अर. ताक़् ; फा. ताख्त = हल्ला, उठाव.]

ताकडी स्त्री. तागडी पहा.

ताकत,-द स्त्री. शक्ति, बळ, जोर. Power strength.
[अर. ताकत् ; हिं. ताकत् ; पेकाम. ताकती (इम. ३३).]

ताका, तागा पुं. नव्या कापडाचा गठ्ठा, मागावरील सबंध न फाडलेलें ठाण. A web or whole piece of cloth.
[फा. अर. ताका = कापसाचा तुकडा ; गु. ताको, सिं. ताकु. सं. तंक = वस्त्र (?).]

ताकीद स्त्री. समज, आज्ञा, हुकुम, इशारत, जरब. Injunction or direction.
[अर. हिं. ताकीद् = जोर, आज्ञा ; पेकाम. ताकीद (राज. १५-१५६).]

ताग पुं. वनस्पतिविशेष, तागाचें सूत तयार ज्यापासून होतें तें झाड. A kind of plant.
[सं. तंक = वस्त्र (?) ; प्रा. तग्ग ; देप्रा. त्रग्ग, तर्ग, ताग्र ; बं. तागा ; ओ. ताग ; हिं. ताग ; पं. तरागी ; गु. त्रागडो, तागडो.]

तागडी, ताकडी स्त्री. तराजू, तोलण्याचें साधन. A balance, scales.
[कान. तुगु = वजन करणें, तूक = वजन.]

तागाई(य)त अ. पर्यंत, पावेतों. Until, till.
[फा. ताघायत्; पेकाम. तागायत (खरे ८-३८५३).]

तांगड(णें) सक्रि. जनावरांना बांधून टाकणें, जखडणें, डांबणें. To tie up by the legs.
[सं. **तंगट** (नाधा.), √ तंग् १ गत्यर्थः; अकामसा. **तांगडणी** = जखडणी. आस्ट्रिक. **टांग** = पाय.]

तांगा, टांगा पुं. एक प्रकारचें वाहन (घोड्यांनीं ओढण्याचें). A kind of conveyance drawn by horses.
[सं. **तमङ्ग** = उंचवटा, तांगा.]

ताज पुं. मुगुट, टोप, पुढारी. The crown, the leader.
[फा. **ताज** = मुकुट; शिकामसा. ताजमहाल' (ताज + अर. **महल्ल** = मंदिर) = शहाजहाननें आपल्या मुमताजमहाल राणीसाठीं बांधिलेली शोभिवंत आग्रा येथील इमारत. ही वीस वर्षें बांधली जात होती व वीस हजार मजूर कामावर होते.]

ताजा, ताझिया पुं. मोहरमांतील शोकगीत, मुसलमानांचें हसन-हुसेनसंबंधीं शोकगीत. The Tajiya.
[अर. फा. हिं. **ताझिया** = मृतांबद्दल शोक; हिंदुस्थानांत हा शब्द ताबूत ह्या अर्थीं वापरतात. ते मोहरममध्यें काढतात. इराणांत त्याच महिन्यांत जे उत्सव व खेळ वगैरे करतात त्यासंबधीं हा शब्द वापरतात.]

ताजा वि. नवा, प्रफुल्ल, सतेज. Fresh and brisk, lively.
[फा. **ताझा**; अकामसा. **ताजाकलम** = नवीन-अधिक घातलेला मजकूर, पत्र संपल्यानंतर जोडलेली पुरती; **ताजातवाना** = चपळ, प्रफुल्ल.]

ताजीम स्त्री. सन्मानार्थ (उठणें), उत्थापन, बहुमान, अभ्युत्थान. Treating with respect, receiving politely.
[अर. **तअझीम्**; पेकाम. ताजीमतवाजू = बहुमान (आदरसत्कार वस्त्रें वगैरे अर्पण करणें) (राज. १०-११३).]

ताट न. पातें, दळ, पत्र, पात्र, तबक, भोजन (ल.). A dining plate, a petal.
[**कान. तट्ट**; सं. **तत**, √ तन् ८ विस्तारे; याकाम. **ताट-काडा, ताटकाढी** (= सेविका-नरुस्व. ३३२).]

ताट न. धाट, जोंधळा बाजरी याचें कांडें. A stalk.
[ताठ, धाट < सं. **घृष्ट** (?), **ताटूक** = लहान धाट.]

ताटकळ(णें) अक्रि. जड होणें, भारून जाणें, ताठरणें. To become stiff, to stiffen.
[सं. **तक्** १ कृच्छ्रजीवने; **तस्थु** + **कला** (?); अकामसा. **ताटकळ,-ळी** = जाड्य, ताठरपणा.]

ताटवा पुं. फुलझाडांचा पुंज, रांग. A row, बांबूची चटई. A mattress.
[सं. **तट**; कान. **तट्टी**.]

ताटस्थ्य न. उदासीन वृत्ति, तटस्थपणा. Indifference, neutrality.
[सं. **तटस्थ** + **य** = **ताटस्थ्य**; ह्या शब्दाच्या अर्थांत मराठीमध्यें फरक झाला आहे.]

ताटी स्त्री. आवरण, झडप (कांबटी, गवत वगैरेंची). A bier, a light frame of bamboos.
[देप्रा. **तट्टीवृत्तिः** (१५७-५); कान. **तट्टी** = बांबूची चौकट, मखर; गु. **ताटी**; सिं. **टटी**; पं. **टट्टी**; हिं. **टट्टा, तट्टा, टाटी**.]

ताटी स्त्री. बिछाना, गादी. A bedding.
[याकाम. **ताटी** = बिछाना.]
जैसी वरुणांचिये सेजेची ताटी: कीं श्रीकृष्णा अरुणोदक आलें भेटीं ॥ **नरुस्व.** ७१७.

ताठ वि. सरळ, उभा, न वांकलेला. Stiff, straight, not pliant.
[सं. १ **घृष्ट**; अप. **तट्टअ**; सिं. **टाड्ठु**; हिं. बं. **टाट**; २ **स्थित**; प्रा. **ठिअ** (त); ब्लोकनें तृष्ट असें मूळ दिलें आहे तें चिन्त्य आहे. अकामसा. **ताठणें** (सं. **तास्था**, √ **स्था** (यङ्लुङन्त), किंवा **दृढ** (नाधा.), **ताठरणें** (सं. **दृढतर, तारतर्यते** (?) किंवा **स्थल**); **ताठा** = ताण, तणावा, ताठरपणा, गर्व; **ताठी** = मूर्च्छा.]

ताड पुं. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **ताल**; पा.प्रा. **ताल**; बं. **ताड**; ओ. **ताळ**; बि. **ताड**; हिं. पं. **ताड**; सिं. **तारी** (रस); गु. **ताड**; ने. **ताड**. मेगॅस्थनीसनें ह्या वृक्षाचा उल्लेख केला आहे. अकामसा. **ताडी** (ताडाचा रस), **ताडपत्र** (ताडाचें पान), **ताडमाड** (ताडासारखा उंच वृक्ष), याकाम. **ताडवन** = ताडपत्राचें स्त्रियांचें एक कर्णभूषण. "झळकत ताडवनाचें लेणें:" नरुस्व. ८४]

ताड(णें) सक्रि. अनुमानणें, तर्क करणें. To infer, to prove, to investigate.

[सं. ताडय, √तड् १० प्रकाशे ; प्रा. ताड ; पं. ताडना; ल्हां. ताड ; सिं. तळ् ; हिं. ताडना ; ने. ताडनु.]

ताड(णें) सक्रि. मारणें, आघात करणें. To strike.
[सं. ताडय (√तड् १० प्रहरणे) ; प्रा. ताड ; अकामसा. ताडकन,-कर = ताड असा शब्द उत्पन्न होईल असा (कन्-त्वरार्थे कानडी प्रत्यय) ; ताडताड = जोरानें व वेगानें (द्विरुक्ति).]

ताडपत्री स्त्री. वस्त्रविशेष, रोगण लावलेलें कापड. A kind of cloth, a carpet.
[सं. ताडपत्रम् (?)]

ताडा पुं. मेळ, जम, ताळा. Trying or determining by comparing.
[फा. ताडा ; म. ताळा (ताडणें पहा.)]

ताडातोड स्त्री. ताटातूट, वियोग (एकदम मुद्दामच केलेला). Separation (violently effcted).
[(द्विधातुसंयोग) ताडणें, तोडणें ; पैकीं 'ताडणें' ह्या धातूचा अनुबंधी ध्वनिवाचक शब्द तोड (<त्रुट्) हा आहे. ताडामोडा = मोडतोड.]

ताण(णें) सक्रि. लांब करणें, ओढणें, वाढविणें. To stretch, to make tense, to pull tight.
[*IE*. Ten, tn ; सं. तन् ; झें. तन् ; *Gr*. Ten ; *Lat*. Ten-ta ; *Slav*. Tynaku ; *Russ*. Tonity ; *Lith*. Tenvas. सं. तन् (णिच्) ; प्रा.. तणिआ ; ओ. टणिबा ; सिं. ताणणु ; पं. ताण, तणना ; हिं. ताणना ; गु. ताणवूँ ; अकामसा ताणा = उभें सूत (बाणा = आडवें सूत) (सं. तान ; प्रा. ताण ; बं. हिं. ताना ; पं. ताणी ; सिं. गु. ताणो).]

तांडव न. नाच, नाचणें (जोरांत हावभावांसह). Dancing with violent gesticulation.
[सं. ताण्डवम् = शिवनृत्य.]

तांडा पुं. समूह, रांग, समुदाय. A train or line, a group, a collection.
[सं. तंन्त्र (?); अप. तंडअ.]

तांडेल पुं. जहाजावरील अधिकारी. The master of a boat.
[मल्या. तण्डल ; तेलु. तण्डेलु ; म. ताण्डा. सं. तन्त्र-तंत्री (?); मल्याळी धातु √तण्डु वल्ली = वल्हें ओढणें.]

तांत स्त्री. दोरा, दोरी, सूत, धागा. A fibre or thread, a cord.
[सं. तन्तु, तन्ति ; पा. तंती ; बं. हिं. गु. ताँत, ओ. तंत ; दुसरी एक व्युत्पत्ति टर्नरनें खालीलप्रमाणें दिली आहे. सं. तन्त्रम् ; पा. तन्तम् ; प्रा. तन्त ; बं. तांत ; ओ. तांत ; हिं. तांत. ह्या सर्वांचा अर्थ "माग" असा आहे. अकामसा. तांत = धागा, काळजी ; तांतू = दोरी, नारवाचा किडा.]

तात पुं. वडील, बाबा, प्रेमादरद्योतक संबोधन. Father, child, a vocative showing love and respect.
[*IE*. Tata, teta ; सं. तात (√तन् (?)) ; *Gr*. Tetta ; *Alb*. Tate ; *Lat*. Tata ; *Cymr*. Tad ; *Corn*. Tat ; *Lett*. Teta ; *Lit*. Tetis ; *Russ*. Tata ; *Cech*. teta.]

तात(णें) अक्रि. तापणें, त्रासणें. To be worried, to be irritated.
[सं. तप्त ; प्रा. तत्त ; मराठी धातु हा निष्ठेपासून सिद्ध झाला. याकाम. तातणें, तातला, तातलेला = तापलेला. तांतावणें पहा.]

कीं त्रिनेत्रें तातला अनंगू : रिगत पश्चम समुद्रीं ॥
नरुस्व. ४६८.

तातड,-डी स्त्री. जरूरी, घाई, जलदी. Urgency, pressing necessity,
[सं. तन् ८ विस्तरे, त्वर् (?) (अभ्यस्त) तत्वर.]

तातवेळ अ. त्यावेळीं, लागलींच. Then, at that time, immediately.
[सं. तावत् + वेला, तत्काल.]

तातांव(णें) अक्रि. त्रासणें, गांजून जाणें. To be worried, to be excited and irritated.
[सं. तप्त ; पाप्रा. तत्त ; बं. ताता ; ओ. तातिबा ; हिं. ताता (गरम) ; पं. ल्हां. तत्ता ; सिं. ततो, तती (ऊष्मा) ; गु. तादूं. तातणें पहा.]

तात्काल,-ळ अ. लागलेंच, तत्काळ. At that instant.
[सं. तत्काल.]

तात्त्विक न. वि. सार, सारांश, तत्त्वासंबंधीं. Essence, academic, pertaining to principle.
[सं. तत्त्वम्.]

तात्पर्य न. सार, सारांश, भावार्थ, हेतु. Intent, design, aim, essence, bearing.
[**सं. तत्पर, तात्पर्य.**]

तात्पुरता,-चा अ. मुद्दाम, त्यावेळेपुरता. Expressly, positively, for the time being.
[**सं. तात् < तद्, √ पृ > पुरता.**]

तात्या पुं. दादा, वडिलासंबंधीं संबोधनी शब्द, आदरार्थी संबोधन. A term of respectful mention for a male person.
[*IE.* Tete–a term of endearment ; **सं. तात, √ तन्** ; *Gr.* Teta ; *Lat.* Tata ; *Lith.* Teta, tetis ; *Russ.* Teta ; *Slav.* Teta ; *Teut.* Atta ; *Eng.* Dad.]

^{1}तान, ताण स्त्री. सूर, स्वराचा आरोह अवरोह. A tune, a strain.
[**सं. तान** ; अकामसा. **तानबाजी** = सारख्या ताना ओढणें ; **तानमान** = अनुकूल परिस्थिति.]

^{2}तान स्त्री. तहान. Thirst.
[**सं. तृष्णा ; प्रा. तण्हा** ; याकाम. **तान्ह** (ज्ञा. ९-२३४). **तहान** शब्दाचा ग्रामीण उच्चार.]

तानवडें न. एक कानांतील दागिना, कर्णभूषण. An earring for females.
[**तान** = एक फूल + सं. **वृत्त** ; प्रा. **वट्ट** = वडी. नरेन्द्राच्या रुक्मिणी स्वयंवरांत '**ताडवत्र**' असा एक शब्द आला आहे (८४,२७१, ३०५) व त्याचा अर्थ ताडपत्राचें स्त्रियांचें कर्णभूषण असा आहे. ह्या दोन्ही शब्दांत वर्णविपर्यय तर झाला नसेल ना ?)

ताना, तान्हा वि. लहान, नेणता, आईच्या अंगावर पिणारें (मूल). Suckling, an infant.
[सं. **तनु** = लहान (?); ही व्युत्पत्ति तितकीशी पटत नाहीं. '**स्तन्य**' ह्या संस्कृत शब्दापासून व्युत्पादणें अधिक सयुक्तिक होय. **तानगाभ** (< स्तन्यगर्भ).]

तांत्रिक वि. तंत्राला अनुसणारें, त्रोटक. Following the doctrines in the *tantra*, short, abridged.
[**सं. मंत्र** आणि **तत्र** असे विधींत दोन प्रकार आहेत. एक वेदमंत्र व दुसरी रूढी किंवा कृति.]

तांदूळ पुं. एक प्रकारचें धान्य. Rice.
[**सं. तण्डुल** ; अप. **तंदुल.** प्रा. **तंडुल** (पुं.). हें संस्कृतीकरण नंतरचें आहे. हा शब्द मूळ ऑस्टिक किंवा द्राविडी असावा. **नीवार** हा दुसरा शब्दहि मूळ संस्कृत नसून द्राविडी-तेलगु. '**नीवारी**' असा आहे. हें धान्य उत्तर सरकार ह्या प्रांतांत नदीसरोवराच्या काठीं पिकत असें. मध्यमहाराष्ट्रांत हें धान्य नव्हतें. अलेक्झाण्डरच्या स्वारीनंतर हें धान्य युरोपमध्यें गेलें. तिकडच्या भाषांतील शब्द **व्रीहि** याशीं संबद्ध आहेत.]

तान्ह,-न्न स्त्री. पाणी पिण्याची इच्छा. Thirst.
[सं. **तृष्णा** ; प्रा. **तण्हा** ; अप. **तण्हा** ; याकाम. **तान्ह** (ज्ञा. ९-२३४); **तान्हभूक**–ज्ञा. ९-२३६. अकामसा. **तान्हेज(णें)** = तहान लागणें; **तान्हाव(णें)** (< तृष्णायते) = तहानेनें त्रास होणें ; **तान्हेला** = (तष्णार्तः + ल).]

ताप(णें) अक्रि. ऊष्ण होणें, ऊन्न येणें, संतप्त होणें (ल.). To become hot, to be enraged (fig.).
[*IE.* Tep ; सं. **तप्** ; *Zend.* Taf ; *Lat.* Tep ; *Slav.* Teplu ; *Russ.* Topi-ti ; *Gr.* Tep ; सं. **तप्, तप्य** ; पा. **तप्प** ; प्रा. **तप्प** ; देप्रा. **तोप्पिका** (ताप); ओ. **तापिबा** (जाळणें); पं. **तपाउणा** ; लां. **तप्पण** ; सिं. **तपणु** ; गु. **तापवूँ** ; ने. **ताप्नु** ; याकाम. **ताओ** ; अकाम. **ताप, ताव** = त्रास, जाळ, क्रोध ; **तापत्रय** = आधिभौतिक,–दैविक,–आत्मिक दुखें ; **तापविणें** ; **तापसी, तापित, तापिष्ठ.**]

ताप(फ)ता पुं. चमकणारें रेशमी वस्त्र, वस्त्राचा तुकडा. A kind of silk cloth.
[फा. **ताफ्ता, √ताफ्तन्** = पिळणें; *Fr.* Taffetas ; *Eng.* Taffeta.]

तापी स्त्री. एक नदी (गुजराथेंतील.) The river Tapti in Gujarat (at Surat).
[सं. **तप्ती** ; प्रा. **तप्पी.**]

^{1}ताफा पुं. तरंगणारें लांकूड. A float.
[सं. **तल्प** = नाव, शय्या ; अर. **ताइफा** ; अकाम. **तापा, तराफा** ; गु. **तापो, ताफा,** हिं. **टापा** ; *Gr.* Trappaga.]

^{2}ताफा पुं. साज, समुदाय, जथा, संच. A set or band (of musicians).
[अर. **ताइफा** ; पेकाम. **ताफा** (राज ७-२२५).]

तावडतोब अ. लवकर, त्याच क्षणीं, लागलींच, जलदीनें, त्वरेनें. On the instant, forthwith, quickly.

[हिं. तावडतोब = लागोपाठ (शकों.).]

तावूत पुं. ताझिया, डोले. A bier, the *tagia* carried by the Muhammadans in the Moharam.
[अर. ताबूत = लाकडाची पेटी, पेटारा.]

ताम्रसाळ स्त्री. एक प्रकारचें भात, साळ. A kind of rice.
[सं. ताम्रशाली.]

तामीळ पुं. एक देश, तेथील लोक व भाषा. The name of a province in South India, the people and the language there.
[सं. द्रविड, द्रमिड ; प्रा. दमिल ; द्रा. तमिळ ; द्राविड > दरामिळ > दआमिळ > दामिळ > तामिळ (जू. ब्लो. I. A. 1919. p. 191).]

तांब स्त्री. लोखंडावरील गंज, मालिन्य, तांबडा लहान किडा. Rust of iron, dirt, a reddish louse.
[सं. ताम्र ; प्रा. तंब ; देप्रा. तंबिरा, तंबरत्ती ; का. त्राम ; हिं. ताम. बं. तामा ; पं. तांबा,-भा ; सिं. टामो ; गु. तंबु ; अकामसा. तांबर, तांबीर, तांबडा.]

तांबट पुं. ज्ञातिविशेष, तांब्याचीं भांडीं तयार करणारी जात. A caste (coppersmiths).
[सं. ताम्र ; प्रा. तांब. 'ट' प्रत्यय.]

तांबडा,-ट,-ड पुं. वि. रंगविशेष. The red colour, red.
[सं. ताम्रः ; प्रा. तंब, तांब, + ड (प्राकृत प्रत्यय); अकामसा. **तांबडसर** = किंचित् तांबडा ; **तांबडालाल** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द); **तांबडें फुटणें** = पहाट होणें–अरुणोदयाचा रंग तांबडा असतो त्यावरून.]

तांबलें न. तांब्रें धातूचें केलेलें लहान भांडें. A small metal vessel.
[सं. ताम्र + आलय (?) > लें (म. प्रत्यय ; उदा. तपेलें, पातेलें इ.]

तांबूल,-ळ पुं. विडा. A roll of the betel leaf with betel.
[सं. तांबूलम् ; पा. तम्बूलम् ; प्रा. तंबोल ; बं. तांबूल ; ओ. तांबूल ; हिं. ताँबेल ; गु. न. तमोल ; हा शब्द ऑस्ट्रिक–जावा येथील भाषेंत आढळतो. संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे. अकामसा. **तांबोळी** (**तांबोलिक**) = विड्याचीं पानें व इतर जिन्नस विकणारा.]

तांबें न धातुविशेष, तांबड्या रंगांची धातु. Copper.
[सं. ताम्रम् , ताम्रक ; पाप्रा. तम्ब ; बं. तामा ; ओ. तम्बा ; हिं. ताँबा ; पं. तांम्बा ; सिं. ट्रामो ; गु. त्राम्बूं ; तांबूं. मलाय–ताम्बग, तम्बग, तम्बग ; शब्द मूळ ऑस्ट्रिक असून संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे.]

तांब्या पुं. भांडें, चंबु. A drinking vessel.
[सं. ताम्रकः ; प्रा. तंबअ.]

ताम्र न. तांबें, एक धातु. Copper.
[सं. ताम्रम् ; अकामसा. **ताम्रपट** = तांब्याचा पत्रा (ह्यावर पूर्वीं दानपत्रें, राजशासनें लिहीत असत.) ; **ताम्रमुख** = वानर, लालतोंड्या, युरोपीयन. तांबें पहा.]

ताम्हण न. पात्रविशेष, तांब्याचें एक विशिष्ट आकाराचें भांडें, संध्या करतांना पाणी सांडण्यासाठीं ह्याचा उपयोग करतात. A circular metal dish.
[सं. ताम्रभाण्डम् (?).]

तार(णें) सक्रि. रक्षण करणें, सांभाळणें. To save, to preserve.
[*IE.* Ter, Tr ; तृ १ तरणे, २ त्रै १ पालने; *Av.* Tar ; *Gr.* Terh ; *Lat.* Ter ; *Oslav.* Tre ; *Lith.* Trin. पहिल्या धातूपासून व्युत्पादिला तर 'णिच्'–प्रयोजक रूप समजलें पाहिजे. नाहीं तर 'त्रै' पासून व्युत्पादणें हेंहि तितकेंच श्रेयस्कर आहे.]

तार स्त्री. धागा, दोरा, तांत, अमल, कैफ. A wire, a string of silk, a filament, intoxication.
[सं. तारा, तारका (?); फा. तार-(कशीदन–ओढणें) = तार काढणें ; २ अमल, कैफ, ओघ, क्रम, ३ स्वरविशेष, आलाप. अकामसा. **तारकशी** = तारकसाचा धंदा करणारा ; **तारफेणी** = एक पक्वान्न–तारासारखे धागे असलेलें, सुतरफेणी ; **तारायंत्र** = तारेचें यंत्र, विजेचें यंत्र.]

तारक,-ख(पारख) स्त्री. हुषारी, सावधपणा. Cleverness, smartness.
[सं. तर्क. + पारख < परीक्षा.]

तारका स्त्री. तारा, चांदणी, नक्षत्र. A star.
[सं. तारका ; म. तारका(ल.) = गुह्य भागावरील लंव.]

तारण न. तारण्याचें साधन, रक्षण, संरक्षण, गहाण, तावा, हमी. Preserving, protecting, article pawned.

[सं. तारण, √ तॄ; याकाम. ताराण (=बळ, नरुस्व. ४४७)]

तारतखाना पुं. शेतखाना, पायखाना, शौचकूप. A privy.
[अर. तहारत् (=शुद्धि)+खाना; **शेतखाना** ह्यामध्येंहि **शेत** (< **शेहत्**) म्हणजे शुद्धि असाच शब्द आहे.]

तारतम्य न. विवेक, सारासारविचार, भेद, कमी-अधिकपणा, बरेंवाईटपणा. State of more or less discrimination, judgment.
[सं. **तर, तम** हे दोन संस्कृत प्रत्यय आहेत व हे **आधिक्य-न्यूनत्वदर्शक** प्रत्यय होत. त्यापासून हें भाववाचक नाम सिद्ध झालें आहे.]

तारनळा पुं. दारुकामांतील एक विशिष्ट प्रकार. A kind of fireworks.
[म. **तारा+नळा**; (पुष्कळ तारे ह्यांत दिसतात त्यावरून.)]

तारवट(णें) अक्रि. मादानें थकवा येणें, डोळे विस्फारणें, झिंगणें. To be stupidly intoxicated, to be heavy or dull.
[सं. **तन्द्रा+वट, तार+वर्धनम्, तारा, तारका** = डोळ्यांतील बुबूळ.]

तारा पुं. वि. तारका, नक्षत्र, चांदणी, फरडा, हुशार, तरबेज (ल.). A star, (fig.) smart, expert.
[सं. **तारका,** पा. **तारका**; प्रा. **तारगा**; का. **तारुक**; अ. बं. ओ. हि. पं. **तारा**; सिं. गु. **तारो**; सिं. **तरु, तुरु**; ने. **तारो**. अकामसा. **तारे तुटणें** = उल्का पडणें, असंबद्ध बोलणें; **तारांगण** = नक्षत्रमंडळ; **तारा(रं)बळ** = ग्रहाचें बल, गडबड.]

ताराण न. बळ, सामर्थ्य. Strength, power.
[सं. **तारण,** √ तॄ; याकाम. **ताराण**; अकाम. ग्रा. **ताराण.**]

अवलंबिलें आंगिचें ताराणः भीमकी उठिली आपण ॥
नरुस्व. ४४७

ताराबल, तारां,-रंबळ स्त्री. घाई, गडबड, त्वरा, धांदल. Haste, agitation, perplexed state.
[सं. **तारा+बल**; मराठी तद्भवांत अनुनासिक कसा आला ? ह्या शब्दाच्या अर्थांत फार चमत्कारिक रीतीनें फरक झाला आहे. विवाहाचें वेळीं शुभ मुहूर्त म्हणून तारकांचें बल पाहतात. मंगलाष्टकें म्हणणें झाल्यानंतर “ तदेव लग्नं सुदिनं तदेव । ताराबलं चद्रबलं तदेव ” हा संस्कृत श्लोक म्हणतात. हा म्हणतांना भटजींची फार त्वरा होते व ताराबल साधण्याकरितां ते अत्यंत घाई करतात; त्यावरून तर ‘ घाई, धांदल ’ हा अर्थ त्या शब्दाला आला नसेल ना ?]

तारी स्त्री. तारेचें वाद्य. A stringed instrument.
[फा. **तार**; याकाम. **तारी** (= तारांचें वाद्य). हा शब्द ‘ **एकतारी** ’ (= एक तार असलेलें वाद्य) ह्या शब्दांत आढळतो.]

निसादाचिए श्रुति वरी तारी : जयाचिया सदाची दिसे थोरी । नरुस्व. १८०.

तारीख स्त्री. मिति, तिथि. The day of the month (according to Christian or Muhammadan calendar.)
[फा. **तारीख, तेरीख**; मूळ अर्थ ख्रिस्ती अथवा महमदी पंचांगाप्रमाणें मोजलेला दिवस; परंतु आतां त्यांत सामान्यीकरण झालें आहे.]

तारीफ स्त्री. वाहवा, स्तुति, प्रशंसा, वाखाणणी. Praise, applause, commendation.
[अर. **तअरीफ्**; फा. **तारीफ्**; पेकाम. **तारीफ** (रा. १२-१२७).]

तारुण्य न. तरुणपणा, यौवन. Youth, maturity.
[सं. **तरुण+य,** √ तॄ.]

तारूं न. नौका, नाव, जहाज. A ship or boat; a ferry.
[सं. तॄ, **तरी** = नाव, याकाम. **तारूं** = जहाज.]

आवडिचां आवर्तीं पडतः सिहाणिवेचें तारूं तळु घेत ॥
नरुस्व. ६३०

तार्किक वि.पुं. ‘तर्क’ संबंधीं, तर्क करणारा. Relating to the science of reasoning, a logician.
[सं. **तर्क**; **तर्क** ह्या धातूपासून **तर्कणें** = तर्क करणें, **तरक(णें)** = भरमसाट तर्कणें; **तर्कट**–कांहीं तरी असंबद्ध बरळणारा; **तार्किक** = तर्कशास्त्रविशारद, हे तत्सम व तद्भव शब्द आले आहेत.]

ताल पुं. वृक्षविशेष. The *tal* tree.
[*IE*. Tal; सं. **ताल**; Lat. Talis, Talea; *Lit*. a(t)tolas; ताड पहा.]

ताल पुं. ठेका, सूर. Musical time or measure.

[सं. ताल, तल ; प्रा. ताल ; याकाम. ताल (= टाळी, ठेका.) ; अकाम. **तालबद्ध.**]

ताळप्रबंध-वोढव षडांग ॥ नरुस्व. १८२

ताल पुं. जमिनीचा बांध. A mound.

[देप्रा. तल्ल ; पं. हिं. ताल, तळ.]

तालीक स्त्री. नक्कल, प्रत. A copy, a transcript.

[अर. **तअलिका** = परिशिष्ट ; **तालीक** = यादी ; शिकाम. पेकाम. **तालीक** (राज. ८-१६).]

तालीम स्त्री. शिक्षण, शिस्त, व्यायाम, अध्यापन. Instruction, training, discipline.

[अर. **तअलीम्** ; ह्या शब्दाच्या अर्थांमध्यें फरक झाला आहे. मूळ अरबी शब्दाचा अर्थ शिकवणूक असून अर्वाचीन मराठींत त्याला शारिरीक व्यायाम असा अर्थ आला आहे. अर्थांमध्यें सामान्यीकरण व विशेषीकरण असे दोन्ही प्रकार झाले आहेत. अकामसा. **तालीमखाना** = आखाडा, व्यायामक्षेत्र ; **तालीमबाज** = व्यायामशोकी.]

तालीवार वि. मोठ्या प्रतिष्ठेचा, मानी (अधिकारी), श्रीमंत, आढ्य. Affluent, prosperous, wealthy and respected.

[१ सं. ? ; देप्रा **तलवर** ; प्रा. **तलवर** ; अप. **तलवर** = ग्रामरक्षक, राजपुरुष ; २ अर. **तालिअ** = भाग्य, फा. **वर** = वान (प्रत्यय). हा शब्द आर्य दिसत नाहीं. दुसरी व्युत्पत्तिच ग्राह्य. पेकाम. **तालेवार, तालीवार** (= दैववान), **ताले** (= भाग्य)–प्रभाकर २३१.]

तालु स्त्री. तोंडांतील जिभेच्या वरचें छपर, तालव्य वर्णोच्चाराचें स्थान, टाळू, डोक्याच्या वरील पुढील भाग. The palate or the roof of the mouth, the fore-part of the head.

[सं. **तालु** = जिभेच्या वरील छपर, त्यावरून लक्षणेनें वरील भाग ; **तालव्य** = तालु व जीभ यांच्या संयोगानें उत्पन्न होणारा उच्चार. **तालु, टाळु** पहा.]

तालुका पुं. जिल्ह्याचा भाग, कारभाराच्या सोयीसाठीं केलेला प्रांतविभाग. A division of a country.

[अर. **त-अल्-लुक्**, √ **अलक्** = अवलंबणें, लोंबकळणें, भाग–राज्याचा. ह्याच्या अर्थांत पुष्कळ निरनिराळ्या छटा आहेत. दक्षिण आणि पश्चिम हिंदुस्थानांत " प्रांताचा भाग, जिल्ह्याचा भाग " असा त्याचा अर्थ आहे. बंगालमध्यें त्याचा अर्थ " मालकी हक्काची जमीन, जमीनदारी "–असा आहे. अयोध्येमध्यें खंडकरी व कुळकरी ह्या दोघांत वाटावयाच्या उत्पन्नाची जमीन असा अर्थ आहे.]

ताले पुं. नशीब, दैव, प्रारब्ध. Luck, fate.

[अर. **तालिअ** ; पेकाम. **ताले, ताळे** (राज. १-५२) ; **ताळेबुलन्द, ताळेसिकन्दर, दैवाचे ताले** (एकाच अर्थाचे दोन्ही शब्द), **तालेवार.**]

ताव पुं. उष्णता, ताप, धातूस तापविण्याची क्रिया, माज, आंच. Heating.

[सं. ताप ; प्रा. **ताव** ; बं. **ताऊ** ; ओ. **ता** ; हिं. **ताउ** ; पं. **ता, ताउ** ; गु. **ताव** ; सिं. **ताउ** ; ने. **ताउ** ; याकाम. **ताओ** (ऋपू. ६२५), **ताव** (नरुस्व. ५५६).]

ताव पुं. राग, पीळ, दुःख. Anger, twisting, affliction.

[फा. **ताब्** ; पुढील प्रयोगांत फा. **ताब्** > **ताव** हाच शब्द वापरला आहे. उदा. **ताव मारणें, ताव येणें, तावातावानें काम करणें, मिशीवर ताव** (पीळ) **देणें.**]

ताव(णें) क्रि. तप्त होणें, लाल होणें, रागावणें (ल.). To heat, to scold and rate, to be hot with passion.

[सं. **तापयति**, √**तप्** ४ ; पा. **तापेति** ; प्रा. **तावेइ** ; अ. **ताइब** ; बं. **ताओयान** ; ओ. **ताइबा** ; हिं. **तारना, ताउना** ; पं. **ताउणा** ; लां. **तावण** ; गु. **ताववूँ** ; फा. **ताब्** ; अकामसा. **ताबून सुलाखून** = चांगलें पारखून ; सोन्याची पारख तापवून व सुलाख (सुलक्ष) घालून करतात.]

तावड(णें) अक्रि. कामांत गुंतणें, कामाला लावणें, राबणें, व्यापृत असणें, खपणें. To put to or to set at (a work) forcibly.

[सं. ताप + (डा) ; सिं. **ताउडी** ; **तावडींत (सांपडणें)** हाहि शब्द सं. **तप्** पासूनच निष्पन्न झाला असें टर्नर म्हणतो. **तावड** = पकड, तावा, कचाटा.]

तावत् अ. तितकें, तेवढें. So much, so many.

[सं. **तावत्** ; प्रा. **तइं** ; अप. **तई** ; याकाम. **तंव, तैं** ; अकाम. **तों, तावत्कालपर्यंत** = त्या वेळेपर्यंत.]

तावदान न. कांचेचें दार, भिंग. A pane of glass.

[फा. ताब्दान् (ताब् + दान); पेकाम. तावदान (राज. १२-१३२).]

तावदार(णें) अक्रि. रागावणें, कावणें. To scold and rate.

[तावदार (नोंधा.) < फा. ताब् = राग, पीळ.]

तावीज पुं. मंतरलेला पदार्थ. An article charmed, an amulet.

[अर. तवीज़् = ईश्वराची प्रार्थना करणें, संरक्षणासाठीं मंत्रानें भारणें.]

ताशा पुं. वाद्यविशेष (पितळेचें भांडें व त्याला चामडें चिकटविलेलें). A sort of drum.

[अर. तास् = (वाजविण्याचा पेला अगर काशाचा वाटोळा पत्रा, अडीच घटिकांचा अवधिदर्शक.).]

तास(णें) सक्रि. तोडणें, साफ करणें, वरील साल काढणें, रंधणें, कापणें, जखमी करणें, निंदा करणें (ल.). To chip, to pare, to cut, to scrape, to chide (fig.).

[*IE*. Teqs; सं. तक्ष् ; *Av*. Tash.; *Lat*. Tecs; *Slav*. Tesla; *Lith*. Taszyti; *Russ*. Tes; *Çech*. Tes; *Eng*. Textile, texture, context. वगैरे शब्दांत तोच धातु आहे. सं. तक्ष् ५ तक्षणे; प्रा. तच्छ, तक्ख; पं. तच्छणा; ल्हां. तचण; गु. ताछवूँ, तासवूँ; हिं. तासना; अकामसा. ताशीव, तास = वाजविण्याचा पत्रा-काशाचा वाटोळा.]

तासड(णें) सक्री. भोसडणें, रागें भरणें. To scold, to rate.

[*IE*. Terg; सं. तर्ज्; *Gr*. Tarhg; *Lat*. Torv.]

ताळ,-ळा, टाळा पुंन. कुलुप. A lock.

[सं. तालकः, ताडः (सपाटा); पा. ताळो; प्रा. ताळ; बं. ताडा, ताला; ओ. ताला; हिं. पं. ताला; सिं. ताडी (कडी); गु. ताळूँ; ने. तालो. सं. ताल = कुलूप; कान. ताळ = अडसर.]

ताळ पुं. ताल, प्रमाण (संगीत-वादनशास्त्रांतील). Rhythm, measure.

[ताल पहा; अकामसा. ताळ सोडणें = मर्यादा-धरबंद सोडणें; ताळतंत्र = मर्यादा, सुसंगतपणा.]

ताळ, टाळी स्त्री. तळ हाताची हातावर थापटी, काशाच्या दोन वाट्यांचें एक वाद्य. Clapping, cymbal.

[सं. ताल; पा. ताळो; प्रा. ताल; बं. ताल; ओ. टाळ; हिं. पं. ताल; सिं. ताडी; गु. ताळी; सं. ताडः; पा. ताळे; प्रा. ताडेदी, ताळेइ; म. ताड(णें) = मारणें.]

ताळा पुं. हिशेब, मेळ, जम, अविरोध, जुळतेपणा. Agreement, correspondence.

[सं. ताल-पहा; अकामसा. ताळ घालणें = मेळ वसविणें; ताळमेळ पाहणें = मेळ पाहणें, तुलना करणें, ताडून पहाणें; ताळ्यावर येणें = शुद्धीवर येणें; ताळेबंद = जमाखर्चाचा मेळ.]

ताळु, टाळु स्त्री. तोंडांतील जिभेवरील छफर, डोक्याच्या माथ्यावरील भाग. The palate or the roof of the mouth, the fore-part of the head.

[सं. तालु; पा. प्रा. तालु; प्रा. तालुअ; बं. तालु; ओ. ताळु; हिं. पं. ल्हां. तालू; सिं. तारूँ; गु. ताळुं; ने. तालु. तालु पहा.]

ति वि. 'तीन' संख्यादर्शक शब्द, 'तीन'चा संक्षेप. Three.

[सं. त्रि; पाप्रा. ति; गु. पं. हिं. सिं. ति-; सिं. टि; का. त्रे,ते; अकामसा. तिकोन (त्रिकोण); तिकाट,-णें (सं. त्रिकाष्ट; प्रा. तिकट्ट); तिकई (सं. त्रिक; प्रा. तिक) = सागरगोट्यांतील एक खेळ; तिक्कल = तीन पानें; तिगस्ता = गेल्याच्या मागील सालीं; तिघई = तीन दालनें-एकापुढें एक असलेलें घर; तिपाई = तिवई; तिपेडी = तीन पेडाची; तिय्यम = तिसऱ्या दर्जाचें; तिवटणा, तिवाट, तिवाठा (सं. १ त्रि + वर्त्मन्; प्रा. तिवट्ट; २ सं. त्रिवर्ती; प्रा. तिवट्ट; याकाम. तिवटना - दृ. पा. १०९); तिवणा = तीन दलांचें पान (सं. त्रिपर्ण; प्रा. तिवण्ण.); तिशेंड्या = तीन शेंड्या डोक्यावर ठेवणारा, तीन झुलुपें असणारा-मारवाडी.]

तिकडे अ. त्या कडेला, त्या बाजूस, तेथें. There, towards that place.

[सं. तत् + कटम्. स्त्रिया आपल्या नवऱ्यासंबंधीं लक्षणेनें "तिकडे" हा शब्द वापरतात.]

तिखट वि. तीक्ष्ण. Ardent, fierce, hot.

[१ सं. तीक्ष्णः, √तिज् १ प्रकाशने; (१) पा.प्रा. तिक्ख; पं. तीखा; हिं. तिखा; (२) पा. तिखिणो; देप्रा. तिखूण; (३) पाप्रा. तिण्ह. प्राकृत तीन रूपें होतात त्यांपैकीं निरनिराळ्या भाषांत एक एक उतरलें आहे.

२ सं. तिक्त; पा. **तित्तको**; प्रा. **तित्त**. बं. **तिता**; हिं. **तीता**; पं. **तीत**. मराठींत 'ख' कोठून आला ? तेव्हा वरील व्युत्पत्तिच ग्राह्य.]

तिखें न. पोलाद, Steel. धाडस, ताठा (लक्षणा). Firmness, impudence.
[सं. **तीक्ष्ण**; प्रा. **तिक्ख**.]

तिघे वि. तीन, तीन जण. Three (esp. animate objects, human beings).
[सं. **त्रिकः**, **त्रिवर्गः**; प्रा. **तिवग्ग**.]

तिज्जा वि. तिसरा. Third.
[सं. **तृतीयः**; प्रा. **तिइज्ज**, **तिइय**.]

तिजोरी स्त्री. खजीना, भक्कम लोखंडाची पेटी. Treasury.
[*Lat.* Thesaurus; *Gr.* Thesauros; *OFr.* Tresor; *Eng.* Treasure.]

तिटकारा पुं. तिरस्कार, कंटाळा, द्वेषभाव. Dislike, disgust.
[**ध्वनिशब्द**; कान. **तिट्टु** = निर्भर्त्सना, **तिट्** = धिक् + कार = शब्द. **तिटकारणें**, -**तिटकारी**, **तिटकारणी**-वगैरे ध्वनिशब्द होत.]

¹**तिड(णें)** सक्रि. अडचणींत घालणें, घट्ट दाबणें. To confine, to squeeze hard.
[कान. **तड** = विरोध, प्रतिबंध.]

²**तिड(णें)** अक्रि. वांक येणें, वांकडें तिकडें होणें. To become crooked, to be drawn and deflected.
[सं. **तिर्यक्**, **तिरः** √अञ्च् १ गतौ.]

³**तिड(णें)** अक्रि. तडकणें, उलणें, चिडणें. To crack, to crackle, to split.
[**ध्वनिशब्द**. **तिडतिड** (द्विरुक्ति).]

तिडक, **तिडीक** स्त्री. दुःख, अडचण. A sharp and shooting pain.
[सं. **तंच्**; अप. **तिडक्की** (= स्फुलिंग); परंतु हा शब्द द्राविडमूळ असावा. कान. **तड** = अडचण; अकाम. **तिडक(णें)** = दुखणें; **पोटतिडीक** = प्रसूतिवेदना, काळजी, आस्था.]

तिडा पुं. गुंतागुंत, अढी, मुरड. Complication, a hitch.
[सं. **त्रेधा** > **तेढा** > **तिढा**, > **तिडा**. किंवा कान. **तीड** = बांक.]

तिडीक स्त्री. तिडक पहा.

तिडें न. ढुंगण. A buttock.
[सं. **त्रिक**; देप्रा. **तिय** (पाइयलच्छी पहा.).]

तितउ स्त्री. चाळणी. A sieve.
[वैसं. सक्तुमिव **तितउना** पुनन्तो ॥ ऋ. १०-६-७१. *IE.* Tena; *Gr.* Thao. हा शब्द जरी वेदांत सांपडत असला तरी परकी आहे. जुन्या ऑस्ट्रिक शब्दाचें संस्कृतीकरण झालें आहे. **पिक**, **तामरस**, **नेम** इत्यादि शब्द असे परकीच आहेत.]

तित्तर स्त्री. पक्षिविशेष, कबरा रंग. A kind of bird.
[*IE.* Teter; सं. **तित्तिरि**; *Lat.* Turtur; *Lith.* Tetervas; *Lett.* Teteris; पा. **तित्तिरो**; बं. **तितिर**; ओ. **तित्तिरा**; हिं. **तितर**; पं. ल्हां. **तित्तर**; सिं. **तितिरु**; गु. **तीतर**; सिं. **तित** (ठिपका); ने. **तित्रो**; याकाम. **तिंतर** = काळसर रंगाचा तित्तीर पक्षी (नरुस्व. २१२).]

तिथि स्त्री. दिवस, तीथ. A lunar day.
[सं. **तिथि**; संसा. **तिथिपर्व** = चांगला शुभ दिवस; **तिथिमास** = शुभ दिवस व महिना.]

तिबेट न. देशाचें नांव. Name of a country.
[मंगो. **तुपाट** = एका राजाचें नांव; त्यावरून देशास नांव पडलें; **तुपाव** = तुफान.]

तिमया पुं. विष्णु, व्यंकोबा. The god Vishnu.
[सं. **त्रिमल**; कान. **तिकमल**; कान. **तिम्मय्या** = विष्णूचें नांव; **तिमय्या**, **तिमण्णा** हीं नावें कानडींत रूढ आहेत; **तिमाजी नाईक** = अत्यंत चिक्कू मनुष्य; **तिमाणें** = शेतांतील बुजगावणें.]

तिमिर न. अंधार, काळोख. Darkness.
[सं. **तिमिर** = डोळ्याच्या दोषामुळें येणारें अंधत्व; अकामसा. **तिमिरेज(णें)** = अंधकारानें व्याप्त होणें, तेज मंद होणें.]

तिंब(णें) सक्रि. मारणें, दाबणें, पूर्णपणें भिजणें. To punch and knead, to thump and wet soundly.
[सं. **तेम**, √**स्तिम्**, √ **तिम्** = भिजणें; अप. **तिम्म**.]

ति(त)रकस कमान पुं. बाणांचा भाता, एक आयुध. A quiver.

[फा. **तर्कश्**, **तीर्कश** ; शिकाम. **तिर्कश**, (चित्र. १३८); पेकाम. **तरकस कमान** (पेद.). **तिरकस** = वांकडा हा शब्द निराळा.]

तिरका वि. सरळ नव्हे असा, वांकडा, तिरसा. Oblique, slanting.
[सं. **तिरश्च**, **तिरश्ची**, **तीर्यञ्च्** ; पा. **तिरच्छो** ; प्रा. **तिरच्छ**, **तिरश्ची**, **तिरिच्छ**, **तिरिक्ख** ; हिं. पं. **तिर्चा** ; गु. **तिर्छु** ; कान. **तिरळु**. मराठींत इतर पुष्कळ रूपें आहेत. **तिरसा**, **तिरपा**, **तिरला**, **तिरकाठी**, **तिरका**, **तिरवा**, **तिरळा**, **तिरडी** (प्रेताचें आसन) हे सर्व **तिरः + अञ्च्** ह्या शब्दापासून किंवा कान. **तिरगु**पासून निष्पन्न होतात. **तिरळा** पहा.]

तिरगूळ पुं. ज्ञातिविशेष, ब्राह्मणांची एक विशिष्ट जात (विड्याच्या पानाची बाग मशागत करतात.). A tribe of Brahmins.
[सं. **त्रैकूटक** > **त्रिगुडक्ष** > **त्रिगुढ** > **तिरगूळ** –राज. भाअ. १८३६. **त्रिकूलकः** (?).]

तिरडी,–ढी स्त्री. प्रेताचें आसन, वाहून नेण्याची ताटी. A bier.
[सं. **तिर्यञ्च्** (?) ; देप्रा. **तिरिड्डी** (उष्णवातः).; कान. **तिरी** (= वांकडी, वांटोळी) + **डी** ('**काडी**' याचा अवशेष).]

तिरंदाज पुं. तीर मारण्यांत कुशल, धनुर्धारी. An archer.
[फा. **तीर् + अं + दाज**.]

तिरप(णें) अक्रि. वांकडें होणें, लचकणें. To be turned aside and sprained.
[सं. **तिरश्च** (?) ; कान. **तिरळु** = वांटोळें होणें.]

तिरपंगडा पुं.(वि.) अस्ताव्यस्त स्थिति. अव्यवस्थिति. Coufused condition, helter-skelter state.
[सं. **तिर** ; कान. **पगंडा** = वियुक्त. फांशाच्या खेळांतील एक विशिष्ट दान व त्याप्रमाणें झालेली सोंगट्यांची अनपेक्षित हालचाल.]

तिरपीट स्त्री. त्रेधा, धांदल, तारंबळ. Consternation, amazement, haste.
[सं. **त्रिपथ** (?). तीन रस्त्यांच्या तिकाटण्यावर मनुष्य बावरून जातो. त्या वेळीं होणारी चलविचल.]

तिरशिंगराव पुं. तिरसट मनुष्य. A term for a crabbed fellow, one who gets quickly excited.
[सं. **त्रिशृंग** = तीन शिंगें असलेला, विक्षिप्त. (?).]

तिरसट वि. त्रासीक, चिडखोर, तुसडा. Crabbed, cross-grained, excitable.
[सं. **तिरश्च**, **तिर्यञ्च्** (?).]

तिरस्कार पुं. तिटकारा, धिक्कार. Disdain, disgust, spurning.
[सं. **तिरस् + कार** (= शब्द); अकामसा. **तिरस्कार(णें)** = हेटाळणें, **तिरस्कृत** = झिटकारलेला.]

तिरस्थळी स्त्री. तीन ठिकाणांची यात्रा, तीन तीर्थक्षेत्रांची यात्रा (काशी, प्रयाग, गया). रिकामा हेलपाटा. Pilgrimage to three holy places, vain journeying.
[सं. **त्रिस्थली–१ काशी, २ प्रयाग, ३ गया** हीं तीन तीर्थक्षेत्रें होत. (लक्षणेनें) इकडून तिकडे घालावे लागणारे हेलपाटे, त्रास, कामाची दाणादाण, चंचलपणा, अस्थिरता.]

तिरळा वि. वांकडा (विशेषतः डोळा). Squint.
[कान. **तिरळु**, **तिरी**, **तिरगु** = वांटोळें होणें ; तामी. **तिरळ** = वांटोळा चेंडू ; तेलगु = **तिरि**. सं. **तिरः + अञ्च्**. तिरका व तिरळा ह्या दोहोंचें मूळ एकच असलें पाहिजे, तें द्राविडी असेल किंवा आर्य असेल. तीं दोन्हीं मुळें दिलीं आहेत. **तिरका** पहा.]

तिरीप स्त्री. झळ, उन्हाचा त्रास. Gleam of sunshine, a hot blaze.
[देप्रा. **तिरिड्डी** (ऊष्णवातः); परंतु मराठींत '**प**' आहे. देप्रा. मध्यें अन्त्य '**ड्ड**' आहे. ह्याचा मेळ कसा घालावयाचा ? "**तिरीमिरी**" मधील '**तिरी**' ह्या कानडी शब्दाशीं संबद्ध आहे.]

तिरीमिरी स्त्री. घेरी, भोंड, चक्कर, मूर्च्छा. Faint, giddiness due to heat.
[कान. **तिरमी** = घेरी, भोंड ; देप्रा. **तिरिड्डी** = ऊष्णवातः किंवा **तिरी** = वांटोळें ; चक्कर येणें, भोंड येणें.]

तिरुका पुं. एक क्षुद्र नाणें, पैसा, पाव आणा. A small coin, the fourth of an anna.

[अर. रुक्क्षा ; ती + रुक्का = तीन रुके इतका ; **पैका, रुका, टका, तिरुका** हीं कांहीं नाण्यांचीं नांवें होत.]

तिरो अ. बाजूस (कांहीं शब्दांच्या आरंभीं हा शब्द लावतात.). Aside.

[*IE.* Ter; सं. **तिरस्** ; *Av.* Taro : *Lat.* Tarmes ; *Umbr.* Traf. **तिरोधान, तिरोभाव, तिरस्कार, तिर्यक्**–आडवा, तिरपा ; **तिर्यक्योनी** = पक्षी, राक्षसयोनि ; **तिर्यक्कोण** = काटकोनाखेरीज इतर सर्व सरळ रेषांचा कोण.]

तिऱ्हाईत वि. त्रयस्थ, मध्यस्थ, पंच, परका, अपरिचित. An arbitrator, a stranger. a neutral.

[मल्या. **तिरायुत** ; सं. **त्रयस्थ** (?).]

तिल पुं. तिळाचें झाड, तीळ. Sesamum-plant.

[सं. **तिल** ; संसा. **तिलतुल्य** = तिळाइतकें थोडें ; **तिलतर्पण, तिलांजलि, तिलोदक** = मृत्यूनंतर दहाव्या दिवशीं तिलमिश्रित जलानें तर्पण करावयाचा विधि. यावरून लक्षणेनें एखाद्याच्या नाशाची-मरणाची वाट पहाणें.]

तिवट न. शिरस्त्राण, शिरोभूषण, पागोटें. A turban.

[सं. **त्रिपट** ; प्रा. **ति + वड** (वस्त्रविशेष). हा शब्द पेशवेकालीन कागदपत्रांत विशेष येतो. साडेतीन वस्त्रांपैकीं हें एक वस्त्र आहे.]

तिवण स्त्री. तीन पांकळ्यांचें पान, त्रिदळाचें झाड. A tripartite leaf.

[सं. **त्रिपर्ण** ; प्रा. **तिवण्ण** ; सिं. **टिपाणु**.]

तिवारी पुं. पंच गौड ब्राह्मणांपैकीं एक पोट जात. A tribe of the पंचगौड Brahmins.

[सं. **त्रिवेदी, त्रिपाठी**.]

तिवाशा पुं. तकिया, लोड, उशी. A pillow, a pad.

[फा. **तिवासी** = कशीदा काढलेली लहान बैठक.]

तिष्ठ(णें) सक्रि. खोळंबणें, वाट पाहात राहणें. To wait for, to be detained.

[सं. **स्था–तिष्ठ्** ; संस्कृतमध्यें ‘ उभें राहणें ’ हा मूळ अर्थ आहे ; परंतु मराठींत लक्षणेनें वाट पहाणें, मार्गप्रतीक्षा करणें ह्या अर्थीं रूढ आहे. हें एक अर्थत्भ्रवाचें उदाहरण आहे.]

तिस्मरखां–खान पुं. शूरत्वाचा आव आणणारा मनुष्य, रागीट मनुष्य. One affecting bravery, an angry man.

[**तिस्मारखान**. पूर्वी ह्या नांवाचा एक योद्धा होऊन गेला, त्यावरून विपरीत लक्षणेनें (ज्ञको.).]

तिसरा वि. तीन क्रमावरील, तृतीय. Third.

[सं. **तिस्र** ; हिं. **तिस्रा** ; **त्रि + सर** (तीन सर) > **तिहीरी** = तीन पदरी ; हिं. **तिहरा, तिसरा** ; पं. **तिसरात** ; सिं. **टिहर** (तृतीयांश).]

तिसळ पुं. एक कांटेरी झाड. A large prickly tree.

[सं. **त्रिशूल** (?) ; तमा. **त्रुशुल्**.]

तिहिरी, तीहीरी वि. तीन पदरी, तीन घड्यांचा. Three-fold.

[सं. १ **त्रिधा, त्रेधा** ; पा. **तिधा** ; प्रा. **तिहा** ; बं. **तेहारा** ; हिं. **तेहरा** ; पं. **तेहरा** ; कां. **त्रेहर** ; २ **ति + सर–तिसर > तिहेरी** ; **दुसर > दुहेरी**.]

ती सर्व. स्त्री. स्त्रीलिंगी तृतीय पुरुषी सर्वनाम. She.

[*IE.* To, Ta ; सं. **तत्** ; *Av.* Tat ; *Gr.* To : *Lat.* Istum ; *Indg.* Toti, tor ; *Lit.* Tas ; तो, ती, तें ह्या मराठी शब्दांतील सार्वनामिक मूळ बीज येथें अभिप्रेत घेऊन त्याचीं अन्वर्थक इतर भाषांतील प्रतीकें दिलीं आहेत.]

तीकटें न. प्रेताच्या पुढें धरावयाची शिंकाळी. A bier.

[सं. **त्रिकटम्** ; प्रा. **तिकट** ; याकाम. **तीकटें**. तीकटें श्रीकरें धरणें ॥ ऋ. १०७.]

तीख वि. तिखट. Sharp, pungent.

[सं. **तीक्ष्ण**, पा. **तिखिण** ; प्रा. **तिक्ख** ; गु. **तीखूं** ; पं. **तिक्खा** ; हिं. **तिखा** ; सिंह. **तियण, तिखट**.]

तीज स्त्री. तिसरा दिवस (पक्षांतील). The third (lunar) day.

[सं. **तृतीया** ; पा. **ततिया** ; प्रा. **तइया** ; **तइज्जा, तिज्जा** ; अप. **तइज्जी** ; बं. **तियात** ; हिं. पं. **तीज** ; पं. **तीआ, तीजा** ; सिं. **टीजो** ; पं. **त्रीजा** ; ने. **तिज** ; गु. **तीज** ; म. (**अख**) **तीज** (अखितीज) = अक्षय्य तृतीया. वैशाख शुद्ध तृतीया, एक पितृतिथि.]

तीट स्त्री. लहान मुलाच्या गालावर किंवा कपाळावर लावावयाचें काजळ. A mark made with soot or lamp-black.

[सं. **तिलकः** (?) ; परंतु द्राविडमूळ असावासें वाटतें. वाईट दृष्ट लागूं नये म्हणून हें काजळ लावतात.]

तीथ स्त्री. दिवस, तिथि. A lunar day.
[सं. **तिथि** ; प्रा. **तीथ**.]

तीन वि. संख्याविशेष, दोन अधिक एक. Three.
[*IE*. Tri; सं. **त्रि, त्रय, तिस्र**, (√ तृ); *Av*. Thryo; *Gr*. Trheus; *Lat*. Tres; *Lith*. Trys; *Slav*. Triji; *Got*. Threis; *OHG*. Dri; *As*. Three; O*Ir*. Tri; मूळ संस्कृत शब्दांत √ तृ हा धातु आहे, व तो गत्यर्थ आहे. ओलांडणें, पलीकडे जाणें असा त्याचा अर्थ आहे. अति प्राचीन रानटी स्थितींतील आर्य समाजांत संख्येची कल्पना अत्यंत मर्यादित होती. दोहोंच्या पलीकडील अंकांची कल्पना नव्हती. 'त्या पलीकडील', अशा अर्थानें इतर अंकांना संबोधीत असें ह्या शब्दावरून दिसतें. अंकाचे शब्दाचे धात्वर्थचमत्कार आहेत. सं. **त्रीणि** ; पा. **तीणि** ; प्रा. **तिण्णि** ; बं. **तीन** ; ओ. **तिनि** ; हिं. **तीन** ; पं. **तिन्न** ; गु. **त्रण** ; ने. **तिन** ; कांहीं भाषांत (हिंदुस्थानांतील) **त्रयः** हें रूप उतरलें आहे. उदा. पं. पहा. **त्रे** ; सिं. **त्रे** ; दार्दिक. **तीर** ; पुश्तु. **त्रे**. **तीन तेरा**-आठ अठरा=फाशांमधील दान, सोंगट्यांची दाणादाण होते त्यावरून दाणादाण, पांगापांग.]

तीर न. नदीचा कांठ. Bank, shore, margin.
[सं. **तीरम्** (√ तृ); पा. प्रा. **तीर** ; कु. **तीर** ; बं. **तिर** ; ओ. **तिर** ; हिं. **तीर्** ; सिं. **तीरु** ; गु. **तीर** ; सिंह. **तेरा**.]

तीर पुं. बाण. An arrow.
[फा. **तीर्**=बाण ; परंतु यादवकालीन मराठींत हा शब्द आहे. त्या अर्थीं आर्योद्भव समजला जाण्यासारखा आहे.]

कैसे कुसुम कामाचे तिरः जया तळासारिखे सर ॥
नरुस्व. ७६८.

तीर्थ न. पवित्र स्थळ, क्षेत्र, पुण्यभूमि, नदी. A holy or sacred place.
[सं. **तीर्थ**, √ तृ = तरणे ; **तीर्थप्रसाद** = पोथीकथा श्रवण केल्यानंतरचा देवाचा तीर्थ व प्रसाद ; **तीर्थयात्रा** = पुण्यक्षेत्रास जाणें, तीर्थाटन ; **तीर्थराज** = मुख्य क्षेत्र-तीर्थाचा राजा, प्रयाग ; **तीर्थरूप** = वडिलांस संबोधण्याचा मानाचा शब्द ; **तीर्थविधि** = तीर्थश्राद्ध, तीर्थाच्या ठिकाणीं करण्याचा धार्मिक विधि.]

तीस वि. संख्याविशेष, दहा आणि वीस. Thirty.
[सं. **त्रिंशत्** ; पा. **तिंश** ; प्रा. **तीसाँ, तीसई तीस** ; आ. बं. **त्रिस्** ; ओ. **त्रिस्** ; बि, हिं. **तीस** ; पं. **तिह्** ; सिं. **त्रिह** ; गु. **त्रीस्** ; ने. **तिस्**.]

तीळ पुं. धान्यविशेष. Sesamum-seed. कातडीवरील काळा डाग. A mole.
[सं. **तिल** ; पाप्रा. **तिल** (पुं.) ; का. **तेल** ; कु.आ.बं. **तील्** ; ओ. **तिळ** ; हिं. पं. ल्हां. **तिल्** ; सिं. **तिरु** ; गु. **तल्** ; ने. **तिल्** ; अकामसा. **तिळतिळ** = तिळा इतके बारीक ; **तिळपापड(होणें)** = तिळाचा पापडते व्हांच फुगतो (तिलपप्पडिया) ; **तिळकूट** (तिळ + कुट्टी) ; **तिळवण** (**तिल + वायन**) = तिळाचा लाडू ; **तिळेल** (सं. **तिलतैल** ; प्रा. **तिल्लेल**.)]

तीक्ष्ण वि. तिखट, जहाल, प्रखर. Pungent, hot, fierce.
[सं. **तीक्ष्ण**, √ **तिज्**.]

तुआ सर्व. त्वां. You or by you.
[सं. **त्वया** ; प्रा. **तुआ**.]

तुक न. वजन, वाईट मळ. Weight, dirt.
[कान. **तुगु** = वजन करणें, **तूक** = वजन ; अकामसा. **तुकणें, तुकतुकी** = तजेला.]

तुकडा पुं. भाग, शकल, खाप. A piece, a bit.
[सं. **त्रोटक, स्तोक** ; प्रा. **थोक** (म. **थोडें**) ; हिं. **टुकडा**. कान. (तद्भव) **तुकडी**.]

तुक्का पुं. तोंडाला पात्या ऐवजीं गोळा असलेला बाण, बोथट बाण. A blunt arrow.
[फा. **तुक्का**.]

तुच्छ वि. निंद्य. Low, mean, contemptible.
[*IE*. Teus; सं. **तुच्छ** ; *Av*. Tusen ; *Russ*. Toscij; *Lett*. Tuks.]

तुझें वि. 'तूं' ह्या सर्वनामाचें षष्ठीचें एकवचन. Your, yours, thine.
[सं. **तव, त्वदीयम्, तुभ्यम्, त्वह्यम्** (?) **मह्यम्**प्रमाणें ; पा. **तव, ते, तुह्म, तुह्यम्** ; प्रा. **तुह, तुज्झं, तुम्हे, दे, ते** ; गु **तमे** ; सिं. **ताउइ** ; हिंपं. **तुसीन** ; बं. **तुमरा** ; **तुमचे** < सं. **यूष्पाकम्**, पा. **तुह्माकम्** ; प्रा. **वो, भे, तुज्झाणं, तुम्हाणम्**.]

तुट(णें) अक्रि. मोडणें, भाग पडणें, कमी होणें, न्यून होणें. To break, to part in two, to diminish, to decrease,
[सं. **त्रुट्, तुड्** ; प्रा. **तुट्ट** ; गु. **तुट्** ; सिं. **टुठ** ; पं. **टुट्ट** ; हिं. **टूट** ; अकामसा. **तुटक** = निराळा, मोडलेला,

विसंगत ; **तुटका** = तुटलेला, मोडलेला ; **तुटरा, तुटीर** = सहज तुटणारा ; **तुटी** = अडथळा, खंड, अंत, कमीपणा, कमतरता ; **तुटावणें** = तुटून पडणें ; **तुटतुट(णें)** = तुडतुड(णें).]

तुडताळी स्त्री. कुंटीण, दूतिका. A go-between,
[सं. ?; याकाम. **तुडताळी.**]
मळ्यानिळाचें आकर्शण: मानिनियांते मेळविती तुडताळेवीण ॥ नरुस्व. ७६५

१तुडुम, तुडुंब वि. परिपूर्ण. Full, quite full.
[सं. **तट्ट + डंब** ; कान. **तुंबु.**]

२तुडुम न. घोड्यावरचा नगारा, डंका. A sort of kettle-drum upon a horse.
[**ध्वनिशब्द,** तेलु. **तुडुं** ; कान. **तुडुडु.**]

तुडुंब(णें) अक्रि. भरपूर भरणें. To be filled to the full.
[**तुडुंब** (नाधा.).]
सरोवर वांधिलें रत्नीं । अमृतोदकीं तुडबलें ॥ मुक्त. वन. ४५

तुण(णें) क्रि. शिवणें, रफू करणें, दुरस्त करणें, ठिगळ लावणें. To darn.
[सं. **तुन्नन, तुन्न** ; पा. **तुन्नम्** (सुई, अंकुश) ; प्रा. **तुण्णण** (ठिगळ) ; सिं. **तुनणु** ; गु. **तुजवूँ** ; २ देप्रा. **तुन्दति** ; गु. **तुण्वूँ** ; √तु५ ह्या धातूंत गणविकरण उतरलें आहे काय ? उदा–**जाण, विण, चुण, चिण,** तसेंच **तुण.**]

तुणतुणें न. वाद्यविशेष. A musical instrument.
[*IE.* Tno, Tneu ; *Indg.* Tūno ; *Ahd.* Dola ; सं. **तूण, तूणी, तूणा** (?) ; देप्रा. **तुणय्** (पुं.), **तुणओ** ; अर. **तन्तना** = एक प्रकारचें गीत, ह्यावरून सिद्ध होतो काय ? **ध्वनिशब्द** दिसतो, **तुइं तुइं** असा आवाज करणारें एकतारी तन्तुवाद्य.]

तुंद, (दोंद) न. वि. मोठें पोट, संतुष्ट, तृप्त, दुलदुलीत, परिपूर्ण, लठ्ठ. Plump, fat, a protuberent belly.
[सं. **तुन्दम्** ; प्रा. **तुंद** (न), **तुन्दिल्ल** (भांड्यासारखें पोट) ; देप्रा. **तुन्दम्** ; हिं. **तुद, तोंद** ; पं. **तोंद, तुन्नी** (बेंबी) ; २ सं. **तुंडिका** (बेंबी), **तुन्दिल, तुंद.** ३ फा. **तुंद.**]

तुपट वि. तुपानें भरलेलें–माखलेलें, तुपाच्या वासानें भरलेलें. Smeared with or smelling of ghee, oily.
[सं. ? ; अप. **तुप्प** ; देप्रा. **तुप्पो म्रक्षि स्निग्धः कुतुपश्चेति** (१६५–१). तूप पहा.]

तुफान न. वि. बेकाम, वादळ, वावटळ, कुभाण्ड, पुष्कळ, मनस्वी. A storm or tempest, slander, violent, excessive.
[अर. **तूफान** = १ झंझावात, २ विपुलता, आरोप ; **तुफानी** = भांडखोर, क्षुब्ध (**तुफान+इ** ; **तुफानखोर** √**खुर्दन्**).]

तुमचें वि. 'तुम्ही'चें षष्ठीचें रूप. Your.
[सं. **त्वदीयम्** ; प्रा. **तुम्हेच्चय** (विशे.). हें प्राकृत रूप महत्त्वाचें आहे. हें विशेषण आहे. विभक्तिप्रत्ययान्त म्हटलेलें नाहीं. ह्यावरून षष्ठीच्या प्रत्ययाच्या उपपत्तीवर कांहीं निराळाच प्रकाश पडण्याचा संभव आहे.]

तुमान स्त्री. विजार, चोळणा. Very large and loose trousers.
[फा. **तुंबान्.**]

तुंब न. दात्यांचें चाक, मांदळा, चाकाचा मध्य. The nave of a wheel.
[कान. **तुंबु** = चाकाचा मध्य.]

तुंब(णें) अक्रि. अडकणें, भरून जाणें, सांचणें. To be obstructed, to accumulate.
[कान. **तुंबु** = भरून जाणें, सांचणें ; याकाम. **तुंब** = बांध, बंधारा (नरुस्व. ८२७) ; अकाम. **तुंबा.**]

तुंबडी स्त्री. भोपळ्याचें भिक्षापात्र, तार लावलेलें एक यंत्र, भोपळ्याचें तंतुवाद्य, नासलेलें रक्त शरीरांतून काढण्याचें एक यंत्र. The bowl of gourd, a stringed instrument, a cupping instrument.
[सं. **तुंबा** = भोपळा ; देप्रा. **तुंबी** (१६२,८) ; गु. **तुंबी** ; सिं. **तुईं** ; पं. **तूबर, तामरी, तोरी** ; हिं. **तोमरा, तुंबरा = भोपळा** ; कान. **तुंबु** = सांचणें. सं. **तुंबा** हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे.]

तुंबळ वि. निकराचें, घनघोर. मोठें, भयंकर (भांडण, युद्ध वगैरेसंबंधीं वापरतात.) Fierce, furious (battle).
[सं. **तुमुल.** (वर्णागम)-**तुम्बळ.**]

तुंबा न. मोठें भांडें, भोपळा (**तांब्याचा आकाराचा**). A vessel made of a gourd.

[सं. तुम्ब, तुम्बक ; पा. तुम्ब ; प्रा. तुम्ब ; देप्रा. तुम्बी ; बं. ओ. तुम्बा ; बि. तुमा ; हिं. तुबा, तोंबा ; गु. तुंबडू ; ने. तुम्बो ; याकाम. तुंबा.]

तुंबेया तळीं नाभि सुधटी : वोतिवे चंद्रकळेची ॥ नरुस्व. १७३

तुम्बा पुं. विजार, चोळणा. Trousers.

[फा. तुंबान.]

तुम्ही सर्व. ' तूं ' चें अनेकवचन. You.

[वैसं. त्वस्मै ; सं. त्वम् ; पा. प्रा. तुम्हे, तुम्हो ; प्रा. तुज्झे, तुम्हे ; बं. तुमि ; ओ. तुंभि ; हिं. तुम् ; पं. तुसीं ; ल्हां. तुसी ; सिं. तव्ही ; गु. तमे ; ने. तिमि ; सिंह. तोपी.]

तुरक(णें) अक्रि. एका विशिष्ट चालीनें चालणें. To trot, to strut.

[सं. तौक्, त्रौक् १ गतौ.]

तुरकाठी-डी स्त्री. तुरीच्या रोंपऱ्याची काटकी. Dry stick of *Tura* plant.

[कानडी. तोगरी, तूर +काठी (< काष्ठ).]

तुरग, तुरंग, तुरंगम पुं. घोडा. A horse.

[सं. त्वर्, तुर् १ शीघ्रगतौ.]

तुरट वि. तुरटीसारखी चव असलेला. Astringent.

[सं. तुवर, तुरटी =क्षारविशेष.]

तुरतुर अ. त्वरेनें-गडबडींत पावलें टाकीत. (Running) with short and quick steps.

[सं. तुर् १ शीघ्र गतौ ; प्रा. तुर.]

तुरप(णें) सक्रि. शेवटचीं टोकें आत दुमडून शिवणें. To hem.

[सं. त्रुप् १ हिंसायाम् ; हिं. तुरपना ; कान. तिरिपु = फिरणें, वळणें. तुरप, तुरपणी = मुरड, दुमड.]

तुरमुंडी स्त्री. मुसंडी, डोकें पुढें करून घुसणें. A vehement push with the body, head foremost.

[तुर + मुंडी = घाईंत डोकें आंत घुसविणें.]

तुरंब(णें) सक्रि. सुवासानें संतुष्ट होणें, वास घेणें. To smell, to be pleased with fragrance.

[सं. तृप् ५, तृंप्, तृंफ् ६ प्रीणने ; याकाम. तुरंब ; तुरंबणी = वास घेण्याची क्रिया ; डोक्यास मुंडासें बांधण्याची क्रिया. ह्याचा मूळ अर्थ फक्त संतुष्ट होणें-करणें असा आहे. मस्तकावर ठेवणें, बांधणें हेहि मूळ अर्थ नव्हत. ते साधित अर्थ आहेत.]

तुरंबी स्त्री. शेंडा, कोमल अंकूर, तुळसमंजिरी, ओंबी, कणीस. A tip or tender extremity.

[तुरा, (अल्पार्थे) तुरमी ; याकाम. तुरंबी (नरुस्व. २२); अकाम. तुरमा = अंकुर, कोंभ, मोड.]

तुरळ वि. अ. विरळ, पातळ. Discontinuous, thinly, sparsely.

[सं. तरल (?) विस्तृत ; म. तुरळ, तुरळक, तुरळत.]

तुरा पुं. वाद्यविशेष. A kind of instrument.

[सं. तूर्यम्, तूरः ; पा. तुरियम् ; प्रा. तूर ; अप. तूर ; बं. तुरडी ; हिं. तुरी, तुरई ; पं. तुर्‍हीं ; सिं. तुरी ; गु. तूर् ; ने. तुरै ; याकाम. तुरें (नरुस्व. ४७९), अकाम. (कलगी) तुरा.]

तुरा पुं. शिरावरील भूषण, अलंकार, झुबका, गोंडा. An ornament for the turban.

[अर. तुर्रा = झिळमिळणारे पुढचे केंस.]

तुरी स्त्री. तगरीचें फूल, धान्यविशेष, एक प्रकारचें द्विदली कडधान्य. A kind of plant and its flower, a kind of pulse.

[कान. तोगरी.]

तुरीय वि. चौथा. The fourth.

[सं. तुर्य ; प्रा. तुरिअ, तुरीय ; तुरीया = चौथी अवस्था.]

तुरुंग पुं. कारागृह, कैदखाना. A jail or prison.

[*Portu. or Dutch*. Trank.]

तुरुत अ. लवकर, झटकन त्वरित. Smartly, promptly, quickly.

[सं. त्वरित ; प्रा. तुरिअ ; गु. हिं. तुरत ; सि. तुर्तु ; पं हिं. तुर्त. ' तूर्त ' पासून तुरुत.]

तुरें न. एकप्रकारचें वाद्य. A kind of instrument.

[सं. तूर्य ; प्रा. अप. तूर = वाद्य ; याकाम. तुरे (नरुस्व. ४७९). तुरा पहा.]

तुर्क पुं. तुर्कस्तानांतील रहीवासी. A man from Turkey, a Muhammadan.

[सं. तुरुष्क ; प्रा. तुरुक्क ; देप्रा. तुरुक्क ; संस्कृतीकरण नंतरचें ; फा. तुरुख ; याकाम. तुर्काण (=तुर्कांचें राज्य,

अमल); रामराजा **तुर्काण** जालें । (महिका. ब), **तुरुक** (स्मृ. स्थ. ८५). अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. मूळ **तुर्कस्तानचा रहिवासी** असा अर्थ असून नंतर **यवन, म्लेच्छ, मुसलमान** असा अर्थ प्राप्त झाला.]

तुलग,-गा पुं. वाद्याचा ध्वनि. Sound of an instrument.
तयाचि तुलगासवें । वीरवृत्तिचेनि थावें । ज्ञा. १-१२७

तुला स्त्री. तुलना, बरोबरी, साम्य, सारखेंपणा, वजन. Comparison, resemblance, weight, a balance.
[*IE.* Tel; सं. **तूला, √ तूल्**; *Gr.* Tule; *Lat.* Tullius; *Got.* Thul; *OG.* Dal; *Slav.* Tul.]

तुशी स्त्री. पिवळट तांबूस रंगाचें वस्त्र. A cloth yellowish red.
[देप्रा. **तुच्छमवशुक्कम्** (१६२-७).]

तुष-तुषात पुं. भूस, धान्याचा कोंडा. Husk or chaff of grain.
[सं. **तुष** ; त्वच्‌शीं संबंध आहे कां ?]

तुषार पुं. पाण्याचे बारीक थेंब, कण, बुरबुर. Thin rain, drizzle, spray.
[*IE.* Teuk; सं. **तुष्**; *Got.* Thvahn; *Eng.* (Towel.); सं. **तुषार**; प्रा. **तुसार**; बं. **तुसार**; हिं. **तुसार**; याकाम. **तुषार** (=बारीक थेंबांचा शिडकाव-नरुस्व. ५५१).]

तुष्टि स्त्री. समाधान, संतोष, आनंद. Satisfaction.
[*IE.* Teus: सं. **तुष्**; झें. **तुष्णि**; *Slav.* Tusiti, Potusiti; *Lith.* Tesziju; *Lat.* Taceoi; *Goth.* Thahan; अकामसा. **तुष्ट, तुष्टणें** = तृप्त होणें.]

तुसडा वि. तुच्छतेनें वागणारा, हेकड, तिरसट. Crabbed, churlish, surly, rude.
[सं. **त्रस्** १ हिंसायाम्, **तुच्छ** (?).]

¹तुसार पुं. पावसाची बुरबुर. Drizzle.
[सं. **तुषार**; प्रा. **तुसार**; पं. **तुक्कार**; हिं. **तुसार** (थंडी); सिंह. **तुसर** (दंव, धुकें).]

²तुसार न. खरीपाचें पीक-भात, वरी, बाजरी वगैरे. Autumnal harvest, crop of various beans.
[सं. **तुष** = धान्य; अकामसा. **तुसारपट्टी** = तुसार पिकावरील कर; **तुसारमाल** = जवारी, तूर वगैरे धान्य. **तूस** पहा.]

तुळ(णें) सक्रि. वजन करणें, मोजणें, बरोबर मानणें. To weigh with, to be equal with.
[सं. **तुल्** १० उन्माने; सिं. **तुलु**; पं. **तोरो** (वजन), **तुलाई**; पं. हिं. **तुलना**; अकामसा. **तुळणा-तुळणी** = बरोबरी, सारखेंपणा; **तुळव(णें)** = वजन करणें.]

तुळई स्त्री. दोन खांबावर आडवें बसविण्याचें लांकूड. A beam.
[कान. **तळि**; अकामसा. **तुळवट** = **तुळई**.]

तुळवा पुं. ब्राह्मणाची एक जात. A tribe of Brahmins.
[कान. **तुळुवा**.]

तुळस,-शी स्त्री. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **तुलसी, तुलसिका**; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. **तुलसी** देवतेच्या केंसापासून ही वनस्पति निर्माण केल्याची कथा पुराणांत आहे. हिची पुजा पुराणकालांत सुरू झाली. देप्रा. **तुलसी सुरसलता** (१६२-८); प्रा. **तुलसी**; अकामसा. **तुळशींत भांग; तुळशीपत्र** = ईश्वरार्पण.]

तुळिका, तुळी स्त्री. कापसाची गादी, पलंग. A bed, a bedding, a cot.
[सं. **तूल** = कापूस.]

तूं सर्व. द्वितीय पुरुषी एकवचनी रूप. Second personal pronoun, " you ".
[*IE.* Teu, Tue, Tu; सं. **त्वम्**; *Gatha.* Thwa; *Av.* Tu, Tvem, Tum; *Gr.* Tv; *Lat.* Tu; *Lith.* Tu; *Got.* Thu; *OHg.* Du; *As.* Thu; *Eng.* Thou; सं. **त्वम्**; पा. **त्वं, तुवं**; प्रा. **तुमं, तं, तु, तुम्हं**; हिं. **तुम्**; याकामसा. **तूं करणें** = तूं मी करून अवमानणें.]
पैं बोलाविजे रिणायितु । तैसा झांकवी तेयाचा हातु । तूं करणें यांचा बहुतु । प्रयोगु तेथ ॥ ज्ञा. १७-३०३.

तूक न. वजन (माष, निष्काचा सोळावा हिस्सा). Weighing.
[कान. **तूक** = तोलणें, वजा करणें; तेलु. **तुक्सु**.]

तूट स्त्री. कमतरता, तुटवडा, भेद. Deficiency or loss, shortness of due quantity, parted state.
[सं. **त्रुट्** ६ भेदने; याकाम. **तूटि** (ज्ञा. ९-४४५); अकाम. **तुटपुंजी** = कमी भांडवल (**तूट**=कमी, **पुंजी**=सांठा).]

तूण, तूणीर पुं. बाणाचा भाता. A quiver.
[*IE.* Tuou; *Idg.* Tuno; सं. **तूणीर,** √तूण् १० पूरणे.]

तूप न. कढविलेलें लोणीं, घृत. Clarified butter, ghee.
[कान. **तुप्प**; तेलु. **तुप्प**; प्रा. **तुप्पइअ तुप्पविअ**; अप. **तुप्प**; देप्रा. **तुप्पो** (म्रक्षित: स्निग्ध: कुतुपश्चेति-१६५-१) सं. " तुप्=हिंसायाम् " ह्या धातूशीं ह्या शब्दाचा संबंध दूरान्वयानें लागण्यासारखा आहे. मारलेल्या पशूची चरबी हा '**तूप**' शब्दाचा मूळ अर्थ होय. नंतर हिंसा बंद झाल्यावर दुधांतून घुसळून काढलेल्या पदार्थाला तूप म्हणूं लागले. गाथा सप्तशतीमध्यें '**तुप्प**' असा शब्द आढळतो.]

तूर स्त्री. कोष्ट्यांची दांडी. A weaver's beam.
[सं. **तुरी**; पं.बं. **तुर**; सिं. **तुरी.**]

तूर स्त्री. धान्यविशेष, द्विदल धान्य. A pulse.
[सं. **तुवरी, तुवरक**; प्रा. **तुवरी** (स्त्री); म. **तुरकाठी** (तुवरकाष्ठ); **हातावर तुरी देणें**=फसविणें; तांदुळांच्या ऐवजीं तुरी देणें किंवा सं. **तुरी**=सुताचा धोटा.]

तूष्णीं अ. मुकाट्यानें, निमूटपणानें, उगांच, केवळ, (अतीशय थोडें). Silently or still, without speaking, merely, (a very little quantity).
[सं. **तूष्णीम्,**√**तुष्+नीम्.**]

तूस पुं. भुस्सा, कोंडा, भात, गहूं वगैरेंचा कोंडा. The husk or chaff.
[सं. **तुष**; प्रा. **तुस** (पुं); पं. **तोह, तुहा**; सिं. **तहु**; का. **तोह**; हिं. **तुस**; सिंह. **तोहो. तुसार** पहा.]

तूळ स्त्री. एका राशीचें नांव (तारकांच्या योगानें ताजव्या सारखी आकृति निर्माण होते.), तागडी. A sign of the Zodiac, a balance.
[सं. **तुला.**]

तृण न. गवत. Grass.
[*IE.* Tered; सं. **तृद्, तृंह्**; *Lat.* Trendu; *Lett* Trudi; *Goth.* Thornus; *Ger.* Dorn; *Rus.* Tern; *Eng.* Thorn; प्रा. **तण्ण, तण, तिण**; याकाम. **तण** (नरुस्व १९६); अकाम. **तण**=शेतांतील गवत.]

तृप्ति स्त्री. समाधान, संतोष. Satisfaction.
[*IE.* Trp; सं. **तृप्, तृप्त** (निष्ठा); *Lith.* Tarpstu; *Got.* Tharp; *Gr.* Terp.]

तृषा, तृष्णा स्त्री. तहान, इच्छा. Thirst, (fig.) desire, ambition.
[सं. **तृष् > तृष्णा**; प्रा. **तण्हा**; *Zend.* Tarshna *Got.* Thars; *Ger.* Durst; याकाम. **तान्ह**; अकाम. **तहान, तृषार्त**=तहानेनें पीडिलेला (तृषा + आर्त).]

ते सर्व. 'तो' ह्या सर्वनामाचें अनेकवचन. They.
[सं. **तत्** (पु. प्र. अ.–ते); प्रा. **तअ.**]

तें सर्व. तृतीयपुरुषवाचक सर्वनामाचें नपुंसकलिंगी एकवचन. It.
[सं. **तत्**; प्रा. **तअँ.**]

तेख पुं. राग, त्वेष, रागाचा झटका. A fit of passion.
[सं. **त्वेषः**, √त्विष्; (तु + इष्=फेकणें).]

तेगा,–घा पुं. वांकडी लहान तरवार. A crooked and short sword.
[अर. **तेग**; फा. **तेघा**=तरवारीचें पातें; पेकाम. **तेगा.**]

तेज न. कांति, प्रकाश, वैभव, गुण, जोम. Light, lustre, splendour, majesty, virtue, vigour, force.
[*IE.* Tsg, *Stig*; सं. **तिज्** १ प्रकाशे; *Av.* Tigh; *Lith.* Tekmn; *Lat.* Stig; फा. **तेझ**=तिखट; याकाम. **तेजिठ** (तेज:पुंज–नरुस्व. २११); अकामसा. **तेजस्वी, तेज:पुंज, तेजोभंग**=अपमान.]

तेजाब न. अम्ल, द्रव पदार्थ. The nitric or hydrochloric acid.
[फा. **तेझाब्.**]

तेजी स्त्री. भरभराट, चढ, उत्कर्ष. Prosperity, briskness (of trade).
[सं. **तेजस्,**√**तिज्**-प्रकाशने.]

तेजी पुं. घोडा, अरबी (घोडा). An Arab horse.
[फा. **ताझी, तेझ्**; याकाम. **तेजी** (=घोडा).]
तेथ तित्तरवर्ण तेजी बरवे । ते संपती कैसे सांघावे ॥
नरुस्व. ११२.

तेडा वि. वांकडा, आडवा. Crooked, cross.
[सं. **तिर्यक्,** (**तिरस् + अंच्**), **त्रेधा**; पं. हिं. **तेढा**; सिं. **टेडो.** '**तेढ**' हा शब्द मूळ समजला तर व्युत्पत्ति निराळी होईल; **तेढ** (√ **त्विष्** १ दीप्तौ).]

तेतुला वि. तितका, तेवढा. That much, to that extent.

[सं. तत्, तावत्; प्रा. तेत्तुल; याकाम. तेतुला, तेसणा (ज्ञा. ९-९).]

तेत्तीस, तेहत्तीस वि. संख्याविशेष, तीस आणि तीन. Thirty-three.

[सं. त्रयस्त्रिंशत्; पा. तेत्तिंस; प्रा. तेत्तीस, तायत्तीसा; आ. बं. तेत्रिस्; ओ. तेत्रिस; हिं. तेतीस, तैंतीस; पं. तेती, तेतारे; ल्हां. तेत्री; सिं. टेटीह; गु. तेत्रीस्; ने. तेत्तिस.]

तेयां सर्व. त्या, 'तो'चें सामान्यरूप. Oblique form of तो.

[हें सामान्यरूपाचें जुनें रूप आहे. तस्य, तेषाम् < तस्स, तेहां > तेहा,-हां > तेआ,-आं > तेयां > त्या अशा मार्गानें सर्व्यांचें सामान्यरूप उतरलें आहे. ही रूपें जुन्या मराठी शिलालेखांत आढळतात; याकाम. तेह, तेहवेळीं (=त्या वेळीं–शिशु. ५६०).]

तेर न. गांवाचें नांव. Name of a town.

[सं. तगरम्.]

तेरडा पुं. एक प्रकारची वनस्पति. A kind of plant.

[सं. तेरणा; म. तेरड्याचे तीन रंग=सारखे होणारे बदल. ह्या फुलाचे रंग बदलतात.]

तेरवां अ. आजपासून मागील अथवा पुढील तिसऱ्या दिवशीं. On the third day past or future (with respect to present day).

[सं. तिरःश्वः; (त्रयः श्वः) किंवा तृतीय वासरे (श. को.).]

तेरा वि. संख्याविशेष, दहा आणि तीन. Thirteen.

[सं. त्रयोदश; पा. तेळस, तेरस; प्रा. तेरस, तेरह; अप. तेरह; का. त्रुवाह; आ. बं. ओ. तेर; हिं. तेरह; पं. तेरां; ल्हां. तेहरॉं; सिं. तेरॉंह; गु. तेर; ने. तेर; सिंह. तेळेस; अकामसा. तेरस = तेरावी तिथि, (बारस = बारावी तिथि).]

तेरीज स्त्री. बेरीज, मिळवणी, एकत्रीकरण. The summing up and forming of grand total.

[सं. त्रीज (?); हिं. तेरीज; बं. तारीज; ओ. तारिखा (= राखणें, संरक्षण); पं. तारीज (कागद किंवा कापडाचा तुकडा); गु. तारीज (रकमा), तारवूं (संरक्षण करणें).]

तेरीमेरी स्त्री. तुझें माझें करून होणारें भांडण, हमरीतुमरी. An altercation, angry thee-ing and thou-ing.

[हिं. तेरी = तुझी, मेरी = माझी.]

तेल न. स्निग्ध व द्रवरुप पदार्थ. Oil.

[सं. तैलम् < तिल; प्रा. तेल्ल, तिल्ल; पा. तेलम्; देप्रा. तैल्य; आ. बं. तेल्; ओ. तेल; बि. हिं. पं. ल्हां. तेल्; सिं. तेलु; गु. तेल्; ने. तेल्; अकामसा. तेली (प्रा. तेल्लिअ; पा. तेलियो; सं. तैलकः (?); अकामसा. तेलची, तेलफळ, तेलकट, तेलसर, इ.]

तेलगु-गू स्त्री. एका द्राविडी भाषेचें नांव. The name of a language in South India.

[सं. तेलंग, तेलिंग, तैलिङ्ग, तेनुगु, तेनुङ्गु इतके निरनिराळे उच्चार सांपडतात. देशावरून भाषेस नांव. ही भाषा प्रसारांत पहिली, व संस्कृतींत दुसरी असा हिचा क्रम द्राविडी भाषांत लागतो.]

तेलंग पुं. एका देशाचें नांव. The name of a province in South India.

[सं. त्रिकलिंग–तिअलिंग-त्रिलिंग–त्रिलिंग; तैलङ्ग + वन, तिलिंगण, तैलंगाण; हिं. तिलङ्गा.]

तेव पुं. वर सांठणारा थर, तवंग, द्रव, पाझर–गुळसाखरेचा. The layer, the exudation (from sugar, wax).

[सं. तेम, तेमनम् = आर्द्रता, √तिम् ४ आर्द्रीभवने.]

¹तेव(णें) क्रि. आर्द्र होणें, विरघळून जाणें. To liquify, to dissolve.

[सं. तिम् ४ आर्द्रीभवने; तेमनम् (आर्द्रता); पा. तेमनम्; प्रा. तीमण; देप्रा. तिमिणम् आर्द्रदारु (१६१·४); बं. तेमन; ओ. तिउण; हिं. तीवन; पं. टेमणा; सिं. तीवणूं.]

²तेव(णें) अक्रि. जळणें, प्रकाशणें, पुष्ट होणें. To be lit or alight, to grow fat.

[सं. तिज् १ निशाने, किंवा तिव्, तीव् १ स्थौल्ये, प्रा. तेअ, तेअवई; सिंह. तेद (प्रकाश).]

तेवीस वि. संख्याविशेष, वीस अधिक तीन. Twenty-three.

[सं. त्रयोविंशत्; पा. तेवीस; प्रा. तेवीस; का. त्रेवुह; आ. बं. तेइस्; ओ. तेइस; हिं. तेईस्; पं. तरेई; ल्हां. त्रेइ; सिं. ट्रेवीह; गु. त्रेवीस; ने. तेइस्.]

तेव्हढा,-डा वि. तितका. So much.

[सं. तावत्; प्रा. तेवड ; याकाम. तेव्हडा.]

आमोलें याचेआं दळभीडा : पुरतां ह्यातियेरूं कैंचा तेंव्हडा ॥ शिशु ८८०.

तेव्हां अ. त्या वेळेस. Then.

[सं. तदा ; प्रा. ताहे ; अप. तिम्हि.]

तेह सर्व. त्या (सामान्यरूप). Oblique form of तो.

[सं. तत्. तेथां पहा.]

तेहवेळीं कुचपर्वताचा घाटीं : ओळघतां डोळें जालें आयेतुटीं ॥ शिशु ५६०.

तैं-तईं अ. तेव्हां, त्या वेळेस. Then.

[सं. तस्मिन्, तदा ; प्रा. तइं ; तइंअ ; अप. तहिं ; गु. तव ; सिं. त ; लमा. ते ; याकाम. तैं. (=तेव्हां).]

तैनात स्त्री. पगार, रोजमुरा, नेमणुक, अधिकार, सेवा. Stipend, salary. charge, custody.

[अर. तइनात्, पेकाम तैनात (मदवा. १७७).]

तैल न. तेल पहा. Oil.

[सं. तैलम्; प्रा तैल; अकाम. तेल. संस्कृतीकरण नंतरचें दिसतें. तैलबुद्धि =तरतरीत बुद्धि (पाण्यावर पडलेला तेलाचा थेंब पाण्यावर पसरतो त्यावरून).]

तैवज स्त्री. न. पानसुपारी, खर्चांपैकीं एक बाब किंवा सदर. Expenses of furnishing पानसुपारी to guests.

[अर. तवाझु=सन्मान, आतिथ्य.]

तैसा वि. तसा, त्या प्रकारचा. Such, of that kind.

[सं. तादृश ; प्रा. तइस्स, तादिस ; अप. तइस ; गु तंसु ; प. हिं तैसा ; याकाम. तइसा, तैसा ; अकाम. तसा.]

तो सर्व तृतीय पु. वा. पुं. सर्वनाम. He, that.

[*IE* Ta, To; सं. त, तद्, इत्, तत्. *Gr.* To; *Lat.* Iste; *Lith,* Ta; *Slav.* Tu; *Goth.* Tha, de. सं. त्यत्, तत्, स, सो ; पा. सो, तस्, त, तस्स, ते ; प्रा. सो, से, तम्, तस्स, ताह. ग्रामीण (उच्चार) ' त्यो ' वैदिक संस्कृत ' त्यत् ' शीं संबद्ध दिसतो.]

तों अ. तंव, तोंपर्यंत Upto, as long as.

[सं. तावत्, तदा ; प्रा. ताव, तो ; याकाम. तंव (जंव =जों).]

जंवजंव जाणताः तंव तंव नेणता । स्मृस्थ. ६७.

धायतंव खाइजेः पाहेतंव निजिजे । ली. च. ३·४९

तोक न. मूल, बालक. A child.

[*IE.* Teuq, Tuq ; सं. तोक, √तुक् ; *Gr.* Tuk, Tux; *Slav.* Tukali ; *Ap.* Tauma; *Nper.* Tuxm ; *Og.* Degan, पेकाम. तोक.]

स्वतोक पितरां रुचे कितिहि कर्दमीं रांगलें ॥

तोकडा वि. लहान, आखूड, अपुरा. Short, scant.

[सं. स्तोक ; प्रा. थोअ ; याकाम. तोकडी (नरुस्व. ३३२); अकाम. थोडें.]

तोख पुं. आनंद, संतोष. Pleasure, satisfaction.

[सं. तोष, √तुष् ; याकाम. तोखव, तोख (आनंद, संतोष-नरुस्व. ६७०); पेकाम. तोषले, तोखले.]

तोंगल,-लें न. धान्याचा घोंस, झुपका, (त्यावरून) मोत्यांचा घोंस. A head of ear of corn, a pendent portion of ear-ornament.

[कान. तोंगु =लोंबणें.]

तोटा पुं. नुकसान, हानि, उणीव. Loss, shortcoming.

[सं. त्रुट् ६ अवयवे (?), त्रुटित ; अप. टुट्टउ ; गु. सिं. टोटो ; गु. तोटो ; पं. टोट्टा ; हिं. टोटा ; बं. टोटा.]

तोडा पुं. फटाका, बाण. A fire-work.

[फा. तोदा =मार, निशाण मारणें.]

तोटी स्त्री. बारीक नळी, झारी. A spout.

[कान. तोट्टु =बोंड (?).]

तोठरा पुं. गिळतांना घशांत होणारा प्रतिबंध. Obstruction of the throat (as from eating harsh and dry substances).

[ध्वनिशब्द ?]

तोड(णें) सक्रि. खुडणें, अलग करणें, फोडणें, भाग करणें, अवमानणें, दुखणें. To pluck, to dissever, to separate. to humiliate.

[*IE.* Tud, stud ; सं. तुड्, तोड्, तुड्ड् १ अनादरे, तुद् १ व्यथने ; त्रुट्(णिच्), प्रा. तोडइ ; बं. तोडा, हिं. तोडंना ; पं. तोडणा ; ल्हां. त्रोडण ; सिं. ट्रोडणुं ; गु. त्रोडवूँ ; तोडवूँ ; ने. तोडनूं ; अकामसा. तोडजोड, तोडमोड, तोडा, तोडून घेणें,-देणें.]

तोड स्त्री. युक्ति, तडजोड, उपाय, कल्पना. An expedient, a device,

[सं तुड् १ तोडने (त्रुट् ६ अवयवे); प्रा. तोड.]

तोडगा पुं. वाईट नाहींसें करण्याचा उपाय, जादुटोणा, मंत्रतंत्र. A charm, an amulet, any wild-magical device.
[हिं. **तोडगा.**]

तोडर पुं. न. पायांतील अलंकार (ह्यावर जित लोकांचीं चित्रें कोरलेलीं असतात.). An ornament for the ankle.
[कान. **तोडर** = सांखळी; याकाम. **तोडर** (धपू. ७०).]
जेणें तोडरीं घातला काळुः आमोलेपणें ॥ नरुस्व. ३७३.

तोडा पुं. (सोनेंचांदीचीं) नाणें भरलेली पिशवी. A purse of money.

तोडा पुं. सुतळीचा तुकडा. A piece of rope or cord.
[सं. त्रुट् ६ अवयवे.]

तोडा पुं. हातांत किंवा पायांत घालावयाचा दागिना. An ornament for either the wrist or anklet.
[द्रा. **तोड** ; कान. **तोडर** = सांखळी.]

तोडी पुं. एका रागाचें नांव. A musical mode a *raga*.
[**सं. त्रोटकी** ; **गु. सिं. हिं. तोडी.**]

तोंड न. खाण्याचें इंदिय, मुख, चेहरा. The mouth, the face.
[सं. **तुण्ड** ; प्रा. **तुंड** (स्त्री.न) ; अप. **तुंड**, **तोंड** ; गु. बं. **टुंड** ; सिंह. **तुंड** ; **तोल** (ओंठ) ; देप्रा. **तुंडम्** (आस्यम्–१६२-७). संस्कृतीकरण उत्तरकालीन दिसतें. अकामप्र. **तोंड-आवरणें,-सांभाळणें,-सोडणें,–गोड करणें** ; **तोंड आंबट करणें** = निराशा झाल्यानें तोंड वाईट करणें ; **तोंड उतरणें** = सुकणें, निस्तेज होणें, दुःख होणें ; **तोंड करून बोलणें** = दर्जा सोडून बोलणें ; **तोंड काळें करणें** = निघून जाणें, अपयश अंगावर येणें ; **तोंड गोरेंमोरें करणें** = नेहमींचें स्वरूप नाहींसें होणें ; **तोंड येणें** = तोंडांत जिभेवर व आंत लहान पुरळ येणें ; **तोंड थुवून येणें** = तिरस्कारानें घालवून देणें, नाहीं म्हणणें ; **तोंड फुटणें** = थंडीनें भेगा पडणें, नुकसानी येणें, नाचक्की होणें ; **तोंड लागणें** = आरंभ होणें ; **तोंड वासणें** = मागणें ; **तोंड विचकणें** = दीन मुद्रेनें पाहणें ; **तोंडाचा फडकळ** = खट्याळ, शिवराळ ; **तोंडाचा तोफखाना** = अपशब्दाची सरबत्ती ; **तोंडपट्टा सुटणें** = अद्वांतद्वां बोलणें ; **तोंडाची वाफ दवडणें** = निष्फळ भाषण करणें ; **तोंडांत भडकविणें** = थोबाडींत मारणें ; **तोंडावर थुंकणें** = निर्भर्त्सना करणें ; **तोंडास काळें, काळोखी** = नाचक्की ; **तोंडास खीळ** = गप्प बसणें ; **तोंडास पाणी सुटणें** = इच्छा होणें, लोभ,–मोह उत्पन्न होणें ; **तोंडीं देणें** = संकटांत लोटणें ; **तोंडीं लावणें** = तोंडास रुचि आणण्याचे चटणी लोणचें वगैरे पदार्थ ; **तोंडपाटीलकी** = उर्मट व निष्फळ वाचाळपणा ; **तोंडपाठ** = मुखोद्गत ; **तोंडमिळविणी** = जमा आणि खर्च ह्या दोन तोंडांचा मेळ ; **तोंडाळ** = बडबड्या.]

तोंडली स्त्री. एक प्रकारचा वेल व तिचें फळ. A kind of plant.
[**सं. तुंडिकावल्ली, तुंदिलफल.**]

तोंतरा वि. त् त् त् असें बोलतांना करणारा, अडखळत बोलणारा. Stammering.
[**ध्वनिशब्द** ; हिं. **तोतला. ' त '** बद्दल **' च '** हाहि वर्ण येतो. उदा. **तोतरा, चोचरा.**]

तोतया वि. पुं. खोटा, तोंडावळा सारखा असल्यामुळें फसविणारा, खोटा वारसहक्क सांगणारा. An impostor, a pretender.
[कान. **तोताय.**]

तोता पुं. पोपट, राघू. A parrot.
[हिं. **तोता.**]

तोंदेल वि. लठ्ठ. दोंदिल पहा. Fat.
[सं. **तुन्दिल** ; प्रा. **तुन्दिल्ल** ; हिं. **तोंदाइल, तोंदील** म. **दोंदील (तुन्द > तोन्द > दोंद).**]

तोफ स्त्री. आंत दारू भरून बार काढण्याचें यंत्र, अवजड बन्दूक. A cannon or great gun.
[तुर्की. **तोब्, तोप्** = वाटोळा गाळा ; अकामसा. **तोफखाना** = तोफा करण्याचें ठिकाण, तोफांचा समुदाय ; **तोफची, तोफजी** = तोफेवरील अधिकारी.]

तोफा वि. उत्तम, बेफाम, तऱ्हेवाईक, फर्मास. Fine, rare, excellent.
[अर. **तुहफा** ; पेकाम. **तोफा** (राज १९.९३) ; अकाम. **तोफ्या.**]

तोबा अ. पुं. दुःखाचा,–पश्चात्तापाचा उद्गार, ओरड, गर्दी, अरेरे, हायहाय. Alas ! crowd.
[अर. **तौबा** ; फा. **तोबा** ; पेकाम. **तोबा** (खरे ९-४७२१). **ह्यावरून** मराठींत ' गर्दी, गोंधळ ' **ह्या** अर्थी हा शब्द रूढ झाला. त्यावरून गर्दी मोडण्यासाठीं वल्लास पीळ घालून मारण्यासाठीं केलेला जाड कोरडा असा ह्याच्या अर्थांत बदल झाला आहे.]

तोब्रा पुं. घोड्याला दाणा चारण्याची कातड्याची पिशवी. A horse's mouthbag.

[देश्य. **तोड, तो, तोवा** ; फा. **तोब्रा** ; हिं. **तोब्रा, तोडा** ; बं. ओ. पं. **तोडा,-रा** ; गु. **तोरो, तोडो** ; ट्रंप्‌च्या मतें व्युत्पत्ति पुढील प्रमाणें आहे. सं. **प्रोथ**=घोड्याचें नाक. ह्याचें वर्णविपर्यय होऊन ' **थोप्र** ' असें झालें व त्याचा अपभ्रंश तोब्रा असा झाला.]

तोय न. पाणी, उदक. Water.

[सं. **तोय.**]

तोरड पु. तोडा, पायांतील दागिना. An ornament for the ankle.

[**तोडर** पहा, **तोरडी**=स्त्रियांच्या पायांतील भूषण.]

तोरण न. मंगलचिन्ह. A lintet, leafy bough's garland hung at the entrance.

[सं. **तोरण,√तुर्** १ गतौ.]

तोरा पुं. दिमाख, डौल, ऐट, गर्व. Airs, affectation, swaggering.

[हिं. **तोरा** ; कान. **तोर**=प्रामुख्यानें वापरणें ; तुर्की. शब्द **तोरा** असा आहे. पण त्याचा अर्थ **हुकूम** असा आहे. तेव्हां मराठी शब्द कानडी शब्दाशींच संबद्ध आहे.]

तोल(णें) सक्रि. वजन करणें, किंमत ठरविणें, महत्त्व ठरविणें. To weigh, to balance (in the mind).

[*IE* Tll, tel ; सं. तुल् ; *Gr.* Tla ; *Lat.* Tlatus ; *Slav.* Tel, Tul ; *Lith.* Tulu (quiver) ; *Russ.* Tulka (prop). सं. **तुलय, तोलय** (णिच्) ; पा. **तुलेति**; प्रा. **तुलई** ; प्रा. **तोलई** (णिच्) ; हिं. **तोलना** ; पं. **तोलणा** ; सिं. **तोराणु** ; गु. **तोळवूं** ; **तूळ**=कांटा, राशीचें नांव (सं. **तुला** ; पा. **तुला** ; प्रा. **तुल** ; बं. **तुळ.**) ; **तोल**=वजन, कल, झोंक ; सिं. **तुरो.**]

तोश स्त्री. जोर, हिंमत, बळ. Force, vigour, strength.

[फा. **तोश्** ; पेकाम. **तोश** (खरे ७-३५८९).]

तोशखाना पुं. वस्त्रागार, कोठार. A store of clothes.

[फा. **तोशा + खाना** ; पेकाम. **तोशेखाना** (राज ५-१४०).]

तोशीस स्त्री. त्रास, झीज, नुकसान, घस. Annoyance, molestation.

[अर. **तश्वीश्.**]

तोष पुं. आनंद, समाधान. Satisfaction, joy.

[सं. **तोष, √तुष्** ४ तृप्तौ ; याकाम. **तोखव, तोख** (नरुस्व. ६७०) ; पेकाम. **तोखले, तोषले.**]

तोसदान,-स्तान न. बंदुकीची दारु ठेवण्याची चामड्याची पिशवी. A cartridge-box, a pouch.

[फा. **तोशा + दान**=सामानाची पिशवी, त्यावरून **अगडबंब लठ्ठ** असा अर्थ आला. त्यावरून " **तोसदान वाढणें** = बडेजाव वाढणें.]

तोहमत स्त्री. आळ, खोटा आरोप, ठोकर, तोटा, संशय. Aspersion, a calumnious accusation, a blow or loss (in trade.)

[अर. **तुह्मत्.**]

तोळा पुं. एक माप (सोनें तोलण्याचें-सोळा माष किंवा ऐंशी रती, १०५ ट्रायग्रेन, बारा मासे). A weight (of gold or silver).

[सं. **तोलक** ,√**तुल्** ; हिं. **तोला** ; आ. बं. **तोला** ; ओ. **तोळा** ; हि.पं. ल्हां. **तोला** ; सिं. **तोरो** ; गु. **तोलो** ; ने. **तोला.**]

त्याग पुं. सोडणें, टाकणें, दान, औदार्य. Leaving, abandoning.

[*IE.* Tieg ; सं. **त्यज्** ; याकाम. **त्याग** (=दान, औदार्य-नरुस्व. ३९३) ; अकामसा. **त्यागी** = देणारा, विरक्त, उदार ; **त्याजी** = सोडणारा, टाकणारा, देणारा ; **त्यक्त** = टाकलेला ; **त्यजिणें** = सोडणें.]

त्या सर्व. तो, ते ह्या सर्वनामाचें सामान्यरूप. Oblique form of तो.

[सं. **तत्** ; **तस्य>तह>तेअ>तेया>त्या** अशा मार्गानें हें सामान्यरूप आलें आहे.]

त्यो सर्व. (ग्रा) तृ. पुं. सर्वनाम. ' He '.

[वैसं. **त्यत्** (**तत्**) ; पा. **सो, तम्,** त, **तस्स, ते** ; प्रा. **सो, से, तम्, तस्स्, ताह.** तो पहा.]

त्रपा स्त्री. लाज. Modesty, bashfulness.

[*IE.* Trep ; सं. **त्रप्** ६ संभ्रमे, लज्जायाम् ; **वैसं. तृप्र** ; *Lat.* Trep, Turp ; *Slav.* Trep ; *Lith.* Tropiyu ; *Eng.* Trembles, Trepidation, Throb ह्या शब्दांत तोच धातु आहे.]

त्रयस्थ वि. तिऱ्हाईत. Neutral, indifferent.

[सं. **त्रय + स्थ.** वादी, प्रतिवादी अशा कोणत्याहि पक्षांत नसलेला, तिसऱ्याच पक्षांत असणारा.]

त्रय न. तीन वस्तूंचा समुदाय, त्रिकूट, त्रिवर्ग. Triad or trio, collection of three.

[*IE.* Trei; सं. **त्रि, त्रय**; *Av.* Thrayo, Thri; *Arm.* Erek; *Alb.* Tre; *Toch.* Tri; *Lat.* Tres; अकामसा. **त्रयी** = तिघांचा समुदाय (अर्थाचें विशेषीकरण--**बाप, आजा, पणजा** असे तीन पूर्वज.).]

त्रांगडें न. संकट, लचांड, कुलंगडें. A difficulty, a hitch, a complication.

[सं. त्रि + अंग ? (श. को.).]

त्रागा स्त्री. राग, आवेश, संतापाच्या भरांत केलेली स्वतांची नुकसानी. Anger, inflicting upon one's own person, some injury (in order to bring evil to others).

[सं. त्रागा, √त्रख् १ हिंसायाम्; गु. **त्रागु.**]

त्राण न. रक्षण, रक्षणाचें साधन, बल, आधार, मुक्ति, मोक्ष. Protection, a means of protection, strength, salvation.

[सं. त्रै १ रक्षणे; संसा. **त्राता** = रक्षण कर्ता; **त्राण** = रक्षण, बळ, आधार; **त्राहि त्राहि** = भयानें गांजलेली स्थिति, त्रस्त अवस्था; **त्राहि** हें 'त्रै' चें आज्ञार्थी एक वचनाचें रूप आहे व त्याचा अर्थ–रक्षण कर.]

त्रास पुं. कष्ट, भीति, दुःख, पीडा. Vexation, weariness.

[*IE.* Tres; सं. **त्रस्** १ भीतौ; *Zend.* Tares; *Gr.* Tres; *Lat.* Terr; *Slav.* Tres; *Eng.* Terror. मराठींत ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे. मूळ शब्दाच्या अर्थांत 'भीति' हा अर्थ आहे. तो जाऊन 'संकट, पीडा,' असा अर्थ झाला आहे.]

त्राहाट(णें) उक्रि. मारणें, नायनाट करणें, मोठ्यानें वाजविणें, थोपटणें, थापटणें. To strike, to ruin, to strike violently.

[*IE.* Tregh; सं. **त्रख्, ध्रघ्,-ज्**; *Zend.* **थ्रक्व**; *Gr.* Trex = to run; *Lat.* Truek, Trochus; *Slav.* Triki; २ सं. **तृह्** ७ हिंसायाम्, **तृणेति, तृण्हेति**; *Slav.* Trezati; *Eng.* Tract, Attract; याकाम. **त्रहाटी, त्रहाटिल्या.**]

त्रि वि. तीन. Three.

[सं. **त्रि, त्रय. तीन** पहा. संसा. अकाम. **त्रिक** = तिहींचा समुदाय; **त्रिकरण** = कर्मेंद्रियें, ज्ञानेंद्रियें व अंतःकरण यांचा समुदाय; **त्रिकर्म** = ब्राह्मणाचीं तीन कर्में-अध्ययन, दान, याजन; **त्रिकांड** = तीन पेरें असलेला; **त्रिकाल-ळ** = भूत भविष्य, वर्तमान ह्या तिन्ही काळीं असलेला, सदासर्वकाल; **त्रिकूट** = तिघांचा समुदाय; **त्रिकोण** = तीन कोन असलेली आकृति; **त्रिखंड** = स्वर्ग, मृत्यु, पाताळ ह्या तीन लोकांचा समुदाय; **त्रिगुण** = सत्त्व, रजस्, तमस् या गुणांचा समुदाय; **त्रिजगत्, त्रिलोक्य** = स्वर्ग, मृत्यु, पाताळ; **त्रिताप** = तीन प्रकारचा त्रास–भौतिक, दैविक, आत्मिक; **त्रिदळ** = तीन पाकळ्या; **त्रिदोष** = कफ, वात, पित्त ह्यांनीं पूर्ण; **त्रिधा** = तीन प्रकारचा; **त्रिपद** = तीन पदांचा समूह (ह्यांचा समुच्चय); **त्रिपदा** = तीन पाद असलेला (गायत्रीचा मंत्र); **त्रिपुटी** = तिघांचा समुदाय (आत्मा, परमात्मा, जड; दृश्य, द्रष्टा, दर्शन इत्यादि); **त्रिपुंड्री** = तीन पट्टयांचा; **त्रिपुर** = एक पौराणिक नगर; **त्रिभुवन** = स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीन लोक; **त्रिमात्रका** = अ, उ, म् ह्या ॐकाराच्या तीन मात्रा; **त्रिरात्र** = तीन रात्री आणि तीन दिवस इतका अवधि; **त्रिवर्ग** = धर्म, अर्थ, काम हे तीन पुरुषार्थ; **त्रिवली–ळी** = पोटावर पडणाऱ्या तीन वळया (याकाम. **त्रिवळी--नरुस्व.** ३२२). **त्रिवार** = तीन वेळां, ठाम, सक्त (कोणत्याहि वचनाचा, शापाचा तीन वेळ उच्चार झाला म्हणजे त्याला पूर्णत्व येतें); **त्रिविध** = तीन प्रकारचा; **त्रिशंकु** = हें एका पौराणिक राजाचें नांव आहे. तो राजा पृथ्वी व स्वर्ग ह्यांमध्यें लोंबकळत राहिला. धड इकडेंहि नाहीं व तिकडेंहि नाहीं अशी अवस्था. त्रिशंकुरिव अंतराले तिष्ठ.); **तिवेणी** = तीन नद्यांचा एकत्रित प्रवाह–गंगा, यमुना, सरस्वती. **त्रिशूल-ळ** = तीन फाळ असलेलें हत्यार.]

त्रुटि स्त्री. अठरा निमेषांचा काळ. A period of 18 nimeshas.

[सं. त्रुट् ६ अवयवे.]

त्रेचा(ता)ळीस वि. संख्याविशेष, चाळीस आणि तीन. Forty-three.

[सं. **त्रयश्चत्वारिंशत्**; प्रा. **तेयालिस**; बं. **तेताल्लीस्**; ओ. **तेयाळिस**; हिं. **तेतालीस्**; पं. **तरताली**; ल्हा. **तिर्ताली**; सिं. **ट्रेतालीह**; गु. **तेताळीस्.** कांहीं भाषांत 'च' मध्यें येतो तर कांहीं भाषांत 'त' मध्यें येतो. '**चाळीस** व **ताळीस**' अशीं दोन रूपें होतात.]

त्रेधा स्त्री. तारांबळ, गोंधळ, धांदल. Haste, fear, confusion.

[सं. **त्रेधा** = तीन मार्गांनीं, तीन प्रकारांनीं. "**विष्णुस्त्रेधा विचक्रमे**" हा वेदिक मंत्र ह्याच्या मुळाशीं आहे. वामनानें तीन पावलांनीं तीन लोक व्यापून टाकले. बलि व वामन ह्यांच्या कथेचा संदर्भ आहे.]

त्रैराशिक न. तीन राशींच्या संबंधीं गणित. The rule of three.
[सं. त्रि + राशि + क. आद्यांक, मध्यांक, अन्त्यांक किंवा प्रमाण, फल व इच्छा अशा तीन प्रमाणांचा किंवा पदांचा संबंध असलेलें गणित.]

त्र्यंबक पुं. शंकर, तीन डोळे असलेला देव. The god Shiva.
[सं. त्रि + अंबक=डोळा; याकाम. त्रियंबक (नरुस्व. ६)

त्र्याहत्तर वि. संख्याविशेष, सत्तर आणि तीन. Seventy-three.
[सं. त्रिसप्तति ; प्रा. तेवत्तरीम् ; बं. तेयात्तर ; हिं. पं. तिहत्तर ; ल्हां. त्रिहत्तिर ; सिं. टेहत्तरी ; गु. तोतेर ; ने. तिहत्तर. मराठींत व इतर कांहीं आर्योद्भव भाषांत ‘ सत्तर ’ मध्यें ‘ स ’ राहतो व इतर समासांत ‘ ह ’ होतो. त्र्याऐंशी (सं. त्र्यशीति) = ऐंशी व तीन ; त्र्याण्णव (त्रिनवति) = नव्वद व तीन.]

त्व प्र. भाववाचक नामें साधण्याचा प्रत्यय. A termination to form abstract nouns.
[सं. त्व ; प्रा. त्तूण, त्तण ; म. पण, पणा.]

त्वचा-त्वक् स्त्री. शरीरावरील चामडी. The skin.
[*IE.* Tuaqos; सं. त्वक्, √त्वच् ६ आच्छादने ; *Gr.* dachos ; *Lat.* Tego ; *OG.* Dekiu ; *Lith.* Dengiu; याकाम. तवचा ; अकाम. त्वचा.]
उपचारें आंगिंची तवचा उचलली : उबा दर ये जवळिली ॥ नरुस्व. ५६१

त्वरा स्त्री. घाई, चापल्य, जलदपणा. Haste.
[*IE.* Tur, Tru, Tuer ; सं. त्वर्, तुर् (औप.) ; *Gr.* Trhv ; *Lat.* Trua ; *Lith.* Tru-k-stu ; *Rus.* Trusiti ; *Old Ger.* dro.]

त्वष्ट पुं.न. तगादा, घाई, उपद्रव. Inciting, importuning.
[सं. त्वष्ट, (निष्ठा) √त्वष् ; पेकाम. तष्ट, त्वेष्ट.]

त्वष्टा पुं. विश्वकर्मा, सुतार. The Creator, carpenter.

त्वेष पुं. राग, क्रोध, चीड. A fit of passion.
[*IE.* Tuei; सं. त्विष् ; *Av.* Thwy-ont ; (सं. तु + इष् ह्या दोन्ही धातूंत बल, आवेश ह्याचा अर्थ आहे).]

थ पुं. मराठी वर्णमालेंतील सतरावें व्यंजन. ह्याचें उच्चारण दन्त्य महाप्राण कठोर असून उच्चारस्थान दन्त आहे. संस्कृतमध्यें हा वर्ण आद्यस्थानीं येत नाहीं. मराठी व प्राकृतमध्यें येतो. संस्कृतवरून आला तर शब्दान्तर अनुनासिकानन्तर येतो. येरव्हीं सर्वत्र मराठी ‘ थ ’ हा संस्कृतमधील ऊष्मयुक्त जोडाक्षराच्या जागीं येतो. The seventeenth consonant in Marathi alphabet.
[(आद्य थ) सं. त्स, स्त, स्थ ; प्रा. थ.
त्सरु-थरु ; स्तन-थान, स्थाघ-थांग.
(मध्य थ) सं. त्र, र्थ, स्त, स्थ, न्थ, च ; प्रा. त्थ.
तत्र-तेथें, स्थित-थित, पन्थ-पंथ, चतुर्थ-चौथ.
आद्य, मध्य व अन्त्य थ हा सं. प्रा. थ, स्त, त, छ, स्छ, ट, ठ, स, ह इत्यादि वर्णांपासून निष्पन्न होतो.]

थक(णें) अक्रि. दमणें, भागणें, श्रमणें, थांबणें. To be tired, to get fatigued, to stop.
[सं. स्था + अक, स्थाति ; पा. ठाति ; प्रा. थाइ, ठाइ, थक्क, थक्कइ ; का. थकुन् ; आ. थाकिबा ; बं. थाका ; ओ. थाकिबा ; हिं. थाकवा ; सिं. थकणु ; गु. थकवूं ; ने. थाक्नु. पाइसद्दमहाण्णवांत २ सं. स्था ; अप. थक्क अशी व्युत्पत्ति दिली आहे. पहिली व्युत्पत्ति टर्नरनें दिली आहे. पुढील व्युत्पत्ति ह्यापेक्षां अधिक सयुक्तिक दिसते. ३ सं. थग् ; प्रा. थक्क ; अप. थक्क. ४ सं. तम् १ कृच्छ्रजीवने.]

थक्क वि. स्तब्ध, स्थित, गप्प, आश्चर्यचकित. Still, astonished, amazed, puzzled.
[सं. स्थगित ; अप. थक्क ; प्रा. थक्क ; अकाम. थकीत, थक्कित, थक्कीत. संस्कृतमध्यें ज्याप्रमाणें निष्ठारूप आहे त्याप्रमाणें ‘ थक्क ’ हेंहि प्राकृत-अपभ्रंशमधील निष्ठारूपच असावें. द्वित्त ‘ क्क ’ हा ‘ त ’ लोपाचा अवशेष असावा.]

थट(णें) अक्रि. सजणें, नटणें. To adorn, to beautify.
[सं. तट्ट १ उच्छ्राये ; अकामसा. थाट = साज, शोभा, देखावा.]

थट पुं.स्त्री. समुदाय, जमाव, गर्दी, दाट रचना. Throng, crowd, compact or close order, dense array.
[सं. तट् (?) ; देप्रा. थट्ठ ; कान. थट्टु = समूह, मूळ शब्द कानडी असून तोच देशी म्हणून स्वीकारिला गेला. देशीनाममाला संस्कृत शब्द देत नाहीं.]

थट्टा स्त्री. चेष्टा, मस्करी, विनोद, कुचेष्टा. Jesting and joking, jeering, ridiculing.

[सं. (?); हिं. **ठठ्ठा** ; म. **थट्टा**, **थट्टेखोर,-बाज, -बाईक.**]

थट्टी स्त्री. जनावरें, जनावरांचें खातें. The cattle of the state, the cattle department.

[सं. ? ; प्रा. **थट्टी** (= जनावर); पेकाम. **थटी** (अठरा कारखान्यांपैकीं एक).]

थड, थडी स्त्री. समूह, रास. A pile.

[सं. तट, √स्थग (?) ; देप्रा. **थड** (पुं.न.) ; कान. थट्टु = समूह ; **थट्ट.**]

थड, थडी स्त्री. किनारा, कांठ, कड. Bank, brink, margin.

[सं. **तट** ; देप्रा. **थड** ; शिकाम. **थडी** (तुगा. १६८); याकाम. **थडी** (ज्ञा. २-३४९); अकाम. (**दु**)**थडी** नदी भरली.]

तेणें कीर्तीची सारिली थडी : दिग्गजांसीं ॥ नरुस्व. २८०

थडक(णें) अक्रि. भिडणें, ठोठावणें, थाप मारणें, आदळणें. To run or dash against, to stop.

[सं. **थर्व्** १ गतौ + **अकच्** , **स्तंभित** ; प्रा. **थड्डिअ** ; याकाम. **थडियावणें** = थापटणें (नरुस्व. ३०८); अकामसा. **थडक** = रट्टा, धक्का, थाप.]

थडगें न. प्रेत पुरल्यानंतर अथवा जाळल्यानंतर त्या जागेवर बांधलेली समाधि. An erection over a spot where a corpse has been buried or burned, a tomb.

[सं. **स्तब्ध** (?); प्रा. **थड** ; शिकाम. ‘ **थडें** ’ (= प्रेत).]

आत्म्याविण थडें रोकडें शरीराचें । दा. १६-८-११

थडथड स्त्री. थडथड असा आवाज, कांपरें, थरथर. Trembling, quivering, quaking.

[**ध्वनिशब्द**, प्रा. **थड** ; अकामसा. **थडथड-थडथडां, थडथडाट, थडथडीत, थडाड.**]

थडिवा, थडी पुं. कांठ, तीर, भोंवतालचा प्रदेश. Brink, margin.

[**सं. तट ; प्रा. थड** ; याकाम. शिकाम. **थडिवा, थडी.**]

तयाचें पडलें रण थडिवा प्रभासाचिये । भा. ए. ६८

तुका म्हणे धांवरी थडी : न घेती उडी आतां कोणी । तुगा. १६८

थंड वि. गार, शीत, शांत, स्वस्थ. Cold or cool.

[सं. **स्तब्ध, स्थगित** ; प्रा. **थड्ड** ; सं. **तद्** १ संतोषे ; गु. **टंढु, थंडु** ; पं. **ठंडा, ठेंढा** ; हिं. **ठंडा** ; अकामसा. **थंडगार** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द) = फार गार ; **थंडाव(णें)** = गारठणें, मंदावणें ; **थंडी** = गारठा.]

थंतर मंतर न. मंत्र तंत्र, जादुटोणा, तोडगा. Hocus-pocus, jugglery, patching.

[सं. **तंत्रमंत्र** ह्याचा अपभ्रंश. ह्याच्या अर्थांत व रूपांत बराच फरक झाला आहे. **तंत्रमंत्र > थंतरमंतर > थत्तुरमत्तुर > थातुरमातुर** = मंत्रतंत्र वगैरे जादुटोणा, दुरुती, कष्टाचा किंवा निर्वाहाचा बनाव.]

थप(णें) अक्रि. ताठरणें. To grow stiff.

[सं. **स्तभ्** ५ रोधने ; याकाम. **थपी** (**लपीथपी**).]

थपथप अ. थपथप अशा आवाजानें टिबकत. Drizzling.

[**ध्वनिशब्द.**]

थप्प अ. एकदम गप्प. Still.

[सं. **स्तब्ध** ; प्रा. **थप्पिअ** ; अकामसा. **थप्पी, थापी** = रास, ढीग.]

थप्पड स्त्री. चापट, थापटी. A slap, pat, tap.

[सं. **?** ; **ध्वनिशब्द** ; देप्रा. **थप्प** ; हिं. **थप्पड** ; का. **थापुर** ; बं. **थापड** ; पं. **थप्पर** ; सिं. **थपड** ; गु. **थापड, थापट** ; अकाम. **थपडाक** = चपराक ; **थप्पडखाऊ, थप्पडबाईक** = थपडा खाणारा.]

थबक(णें) अक्रि. एकदम उभें राहाणें, थांबणें. To stop short.

[सं. **स्तंभ्** ; प्रा. **थंब** ; **स्तब्ध > थब्ब > थब + अकच्.**]

थर पुं. पडदा, एकावरील एक भूमि, रास, ढीग, समूह. A layer, a stratum, a heap.

[सं. **स्तर**, √**स्तॄ** ; प्रा. **थर** ; देप्रा. **थर** = दह्यावरील मलई (पुं.).]

थरकांप पुं.स्त्री. भीतीनें अथवा थंडीनें शरीर थरथरून कांपण्याची क्रिया. Great trembling or shivering.

[सं. **तरलकंप, त्वर् + कंप्** १ चलने.]

थरथर(णें) अक्रि. कांपणें, भीतीनें हलणें. To quake, to quiver, to tremble.

[१ सं. **थर्व्** १ गतौ ; देप्रा. **थरत्थर, थरथर, थरहर, थरहरिअ** (=कम्पितम्) ; २ सं. **थरथरायते** ; प्रा. **थरथरेदी,**

थरथरइ; अप. **थरहर** (कंपने); हिं. **थरथराना**: पं. **थरथराउणा**; ३ ध्वनिशब्द; गु. **थरथरवूँ**; अकामसा. **थरारणें**.]

थल, थळ न. जागा, जमिनीच्या उत्पन्नांतील भाग. A place, a share in the produce of a field.

[सं. **स्थल**; पा. **थलम्**; प्रा. **थल**; बं. **थल**; ओ. **थळ**; हिं. **थल**; पं. ल्हां. **थल**; सिं. **थरु**; गु. **थळ**; ने. **थल्**; अकामसा. **थलकरी** = जमिनीचा मालक; **थळझाडा** = गांवांतील जमिनीच्या वसूलपिकाचा तक्ता,--पत्रक.]

थलथल(णें) अक्रि. लिबलिबणें, लबलबणें, पातळ होणें. To be slimmy.

[ध्वनिशब्द, **थलोथल! थलथल** = फोपशेपणा, लबलब.]

थवा पुं. जमाव, समूह, मेळावा. A multitude or body (of men), a company.

[सं. **स्तूपः**; देप्रा. **स्तूप्य, थुप्प**; पा. **थूपो**; प्रा. **थूवा**; अप. **थवा**; आ. **थूप**; हिं. **थूआ**; याकाम. **थोवा** (= समूह–नरुस्व. ७८,५९१). ही टर्नरची व्युत्पत्ति आहे. त्यापेक्षां पुढील व्युत्पत्ति पहा. सं. **स्तबक**; प्रा. **थवक्क**; देप्रा. **थवक्क** (पुं); २ सं. **स्तोमक**; प्रा. **थोवक, थबक्क**; म. **थोक, थवा**.]

थळ न. स्थळ, जागा, बन, लागवड. A place or spot, a plantation.

[सं. **स्थलम्**; प्रा. **थल**; गु. ओ. **थळ**; बं. हिं. **थल**; पं. **थल**; सिं. **थरु**; (वाळवंट); अकामसा. **थळकर, थळझाडा, थळपत्रक. थल** पहा.]

थळीव न. वि. अलंकार, वडी, पात्र, कोरींव काम, कोरलेलें, टोंचलेलें. An ornament, a plate, pricked or beaten.

[सं. **स्थलिम** (?), **तल्** १ प्रतिष्ठायाम् = ठस्सा मारणें; याकाम. **थळिव**.]

कापुराचे थळिव । नुरेचि आगिची ॥ बरव अमृ. २-४२.

था स्त्री. तळ, पाया, तळची जमीन. Bottom, base, ground underneath.

[सं. **स्था–स्थ**; देप्रा. **थाह, थहा** (=निलय: १६५-१०) <**स्थाघ**; सिं. **थाहु**; पं. हिं. **थाह**; बं. **था**.]

थाउ न. ठिकाण. Place.

[सं. **स्थाकः**; प्रा. **थाओ**; याकाम. **थाउ** (उगी. २०३).]

थाउक वि. ठावकें. Known, acquainted.

[सं. **स्थापक**; प्रा. **थावअ, ठावअ**; अकाम. **ठाव, ठाऊक**.]

थाक(णें) उक्रि. दमणें, भागणें, देणें, विकणें. To be tired, to give, to sell.

[सं. **तक्** १ कृच्छ्रजीवने, **स्तक्** १ प्रतिबंधे; याकाम. **थाक, थोक** (नरुस्व. ५१५); अकाम. **थाक** = गोंधळ, घोंटाळा, गाण्यांतील विसावा; **थाकी** = रीत, पद्धत, डौल.]

थांग पुं. पत्ता, तळ, माग, खोली, नक्की जागा, ठाव. The exact spot or place, the bottom or depth.

[१ सं. **स्ताघम्**; प्रा. **थाह**; देप्रा. **थग्गो गाधः** (१६५-१०); का. **थाह**; आ. **थाह्बा**; बं. **था**; हिं. पं. **थाह**; सिं. **थाहु**. २ सं. **थांग, स्थाघ्य**; प्रा. **थग्घ**, गु. **थाग**. संस्कृतमध्यें " **थांग–अथांग** " असे शब्द येतात.]

थाट(णें) सक्रि. व्यवस्थेनें लावणें, सजविणें. To dispose, to draw up, to arrange, to display.

[सं. **तट्** १ उच्छ्राये, (**सट्** १ दर्शने, **साट्** १ आदर्शने); अकामसा. **थाट**=डौल, टोळी, जमाव; **थाटमाट** = डामडौलाची रचना, व्यवथा.]

थाटी स्त्री. एक प्रकारचें भांडें, वाटी, तबकडी (गंधाची). A saucerform metal vessel.

[सं. ?; प्रा. **थट्ट**; याकाम. **थाटी**; शिकाम. **थाटी**; अकाम. **थाटी, ताट**.]

थाटी स्त्री. सैन्य, समूह, टोळी. A body, a band.

[सं. **स्थग** (?); प्रा. **थट्ट**; कान. **थट्टु** = समूह, सैन्य.]

नागविल्या थाटी । उरो नेदीच लंगोटी ॥ तुगा. १४८९.

तिअें थाटी ओळघेल । नायकशिरोमणी–शिशु १०३५.

थाणें न. एक प्रकारचा कपडा, ठाण. A kind of cloth.

[सं. **स्था**; अकाम. प्रांतिक. **था., थान, ठाण** = कापडाचा तागा.]

थान न. जागा, ठिकाण, स्थळ. A place.

[सं. **स्थान**; प्रा. **थाण**; याकाम. **थान** (ज्ञा. ९·३८).]

थान न. स्तन, कुच. A woman's breast, a dug or teat (of a beast).

[सं. **स्तन**; पा. **थनो**; प्रा. **थण** (पुं); अप. **थण**; हिं. **थन्**; पं. ल्हां. **थण**; सिं. **थणु**. २ सं. **स्तन्यम्**; पा. **थञ्ञम्**; प्रा. **थन्न**.]

थाप(णें) क्रि. लावणें, चिकटविणें, वर ठेवणें, चापट करणें, स्थापणें, उभारणें. To dab, to flatten by patting, to pat.

[सं. **स्थापय** ; प्रा. **थप्पिअ** ; अप. **थप्पी** ; (<स्थाप्य) ; ओ. **थापिबा** ; हिं. **थपना** ; पं. **थापणा** ; सिं. **थापणु** ; गु. **थापवूँ** ; अकामसा. **थाप** (=रास, गप्प), थापट, थापटणें, थापड, **थापा** (एक हत्यार), **थापी** (गवंड्याचें हत्यार, समूह) वगैरे शब्द वरील शब्दाशीं संबद्ध असावेत.]

थांब(णें) अक्रि. उभे रहाणें, दम धरणें, खोळंबणें, वाट पहाणें. To stop, to stand.

[सं. **स्तंभ्** ; पा. **थम्भ** ; प्रा. **थम्भ** ; अप. **थंभ** ; ओ. **थामाइबा** ; हिं. **थाम्हना** ; पं. **थम्म्हणा** ; सिं. **थम्म्हणु** ; गु. **थांबवूँ** ; ने. **थाम्नु** ; (सं. **स्तम्** १ वैकल्ये अवैकल्ये च.) ; अकाम. **थामणें, थांबविणें, थामविणें.**]

थार(णें) अक्रि. स्थिर होणें, विश्रांति घेणें, स्थिरावणें. To settle, to fix, to stay, to rest.

[सं. **स्था** > **स्थिर** (नाधा.), **त्रै** १ पालने ; प्रा. थावर ; देप्रा. **थारो** (=घनः-१६६-१३) ; गु. हिं. **थावर,** ठारा ; सिंह. **तवर** (कायम) ; सिं. **थार** (शांत) ; पं **ठौर** (घट्ट) ; हिं. **ठार** ; अकामसा. **थार**=विसाव्याचें ठिकाण, आधार, आश्रय ; **थारा**=आश्रय, आधार ; **थाराव(णें)**= स्थिरावणें, आश्रयास जाणें ; **थारावणी**=वसती, राहणी.]

थाल(णें) अक्रि. प्रकाशणें (गोडबोले-हंसकोश). To illumine.

[वै.सं. **स्तॄ** प्रकाशने.]

थाली स्त्री. तांट, परात, पसरट भांडें. A plate.

[सं. **स्थाली,** √स्था ; म. **थाली, थाळी, थाळा,** थाळोरा, **थालीपीठ** (स्थालीपिष्ट).]

थाव(णें) अक्रि. स्थिरावणें, बळावणें, जोरावणें, वाढणें, वृद्धि पावणें. To settle, to fix, to increase.

[सं. **स्थामन्** (नाधा.), √**स्था** ; तु २ वृद्धौ, **स्तै** १ धारणे ; अकामसा. **थावरणें.**]

मग थावली ते वाहुटली । सैग घेउनी घर डहुली । बालपणींची कोठली । बाहिरी घाली ॥ ज्ञा. ६-२१६.

थाळ स्त्री. गोवऱ्यांची,-नारळांच्या सालीची रास, चटका, होरपळा. A pile of cakes or bits of cowdung, a sudden scorching sensation.

[सं. **तल्** १ प्रतिष्ठायाम्.]

थाळा स्त्री. धातूचें मोठें ताट. A flat vessel of metal or wood.

[सं. **स्थाल, स्थाली** ; प्रा. **थाल** ; गु. **थाळो** ; सिं. **थालु, थाल्हु** ; पं. हिं. **थाल** ; सिं. **तलि.**]

थाळिऊ पुं. थळाचा किंवा जमिनीचा सारा ज्याचा कायम केला आहे असा. One whose rent of the land has been fixed.

[सं. **स्थल, स्थलिकः** ; प्रा. **थलिअ** ; याकाम. **थाळिउ.**]

निवृत्तीचा थाल्डि ॥ भाए. २५१

थाळी स्त्री. ताट, पात्र, अन्न शिजविण्याचें भांडें, परात. A flat vessel of metal or wood.

[सं. **स्थाली, स्थालम्** ; पा. प्रा. **थाली, थल्लिआ** ; अप. थाल ; आ. बं. का. **थाल्** ; ओ **थाळ** ; बि. **थारी** ; हिं. पं. **थाल्** ; सिं. **थारु** ; गु. **थाळ** ; म. **थाळणें, थाळेंरें** (मोटेचें पाणी पडतें तें) ; **थाळा, थाळेर, थाली-पीठ**=भाजणीची भाकरीसारखी दामटी (<**स्थालिपिष्टम्**). ह्या सर्वांचें मूळ '**स्था**' हा धातु आहे. शेवटच्या '**थाळेर**' ह्या शब्दावरून **थारोळा,** (वर्णविपर्यय) **थाळोरा** हे शब्द स्पष्ट होतील.]

थिक(णें), थिंक(णें) अक्रि. चरफडणें, शोक करणें. To fret and fume.

[सं. **स्तिघ्** ५ आस्कंदने ; ह्याचीच **तिंक्,-ग्,-घ्** अशीं रूपें आढळतात.]

थिकुलें वि. थोडें, लहान. Small..

[सं. **स्तोक+ल** (वि. प्रत्यय).]

थिगळ वि. मंद, शांत, सुस्त. Slow, dull, dilatory.

[सं. **स्था** ; प्रा. **थिग्गल. ठिगळ** पहा.]

थिज(णें) अक्रि. गोठणें, घट्ट होणें, गारठ्यानें घट्ट होणें. To congeal, to thicken, to freeze.

[सं. **स्त्यै** १ संघाते जलस्य.]

थिटा वि. आखुड, अपुरा. Short, scant, of deficient length.

[सं. **त्रुटित,** √**त्रुट्** ६ अवयवे.]

¹**थित** वि. मूळ असलेलें, जवळ असलेलें. Existing, being (in possession).

[सं. **स्थित**-(निष्ठा) √**स्था.**]

²**थित** वि. नीच, हलका, व्यर्थ, अल्प, थोडें. Mean, insignificant, small, deficient.

[सं. त्रुटित (?)]
जें थितें हें डहुळलें । मानस माझें ॥ ज्ञा. ३.१४.

थिन(णें) आक्रि. असणें. To be, to exist.
[सं. स्त्यै ९, (स्त्यान>थिन्न>थिन); याकाम. थिन.]
हें असो अव्यक्तपण थिनलें । मग तेंचि विश्वाकारें ॐथिजलें । तैसे अमूर्त मूर्त मियां विस्तारलें । त्रैलोक्य जाणें ॥ ज्ञा. ९-६५.

थिबक(णें) क्रि. गळणें, थेंबथेंब पडणें. To drop, to drizzle.
[सं. स्तिब्, स्तिप् १ क्षरणे ; अप. थिप्प + क (स्वार्थे) ; अकाम. थिबक, ठी-थिपक, थिबथिब, थिपथिप.]

थिराव(णें) अक्रि. स्थिर होणें,-राहाणें. To stop, to stay.
[थिर पहा.]

थिल्लट वि. मंद, थंड, पातळ. Slow, slack, liquid.
[सं. स्तिमित , शिथिल (?) ; प्रा. थिल्ल + ट.]

थिल्लर न. वि. तळें, डबकें, उथळ, अल्पज्ञ. Shallow (understanding), a pond.
[सं. शिथिलतर, √स्त्यै, (निष्ठा) स्त्यान ; प्रा. थिन्न ; याकाम. थिल्लर (ज्ञा. ९.२८).]

थीर वि. भक्कम, कायमचें, निश्चित, शांत. Firm, settled, composed, steady.
[सं. स्थिर ; पाप्रा. थिर ; आ. थीर ; ओ. थिर ; हिं. पं. थिर ; सिं. थिरि ; गु. थिर ; याकाम. थिरावलेनि (ज्ञा. १-६१) ; अकामसा. थीरथावर = स्थिरस्थावर ; थिरावणें.]

थुः थुः अ. निन्दा-तिरस्कारव्यंजक अव्यय. Hoot, tut, flouting or jeering with a fie.
[सं. थूथू (ध्वनिशब्द) ; प्रा. थू ; आ. बं. ओ. थू ; हिं. थू ; पं. थू ; सिं. थू ; गु. थुथु.]

थुक(णें), थुंक(णें) क्रि. तोंडांतून तुषार टाकणें, (ल.) तिरस्कार करणें. To spit out, to show contempt.
[ध्वनिशब्द, सं. थुत्कार ; प्रा. थुक्क ; का. थोख ; बं. थुक ; ओ. थुक ; ओ. थुक ; हिं. थूक ; पं. ल्हां. थुक्क ; सिं. थुक ; गु. थूंक. सानुनासिक व निरनुनासिक असे दोन्ही रूढ आहेत. थुंका, थुंकी = तोंडांतील द्रव, पीक.]

थेकुटें,-डें,-लें वि. लहान, दिमटें, आंखूड, अपुरें. Short. deficient in length.
[सं. स्तोक ; प्रा. थोक + ट. काव्यांत व ग्रामीण भाषेंत रूढ आहे.]

थेट वि.अ. सरळ, नीट, हुबेहुब. Genuine, pure, straightway, directly.
[सं. तत्रस्थ (?) ; हिं. ठेठ.]

थेंब पुं. बिन्दु, टिपका. A drop.
[सं. स्तिम् ४ क्लेदने ; प्रा. थिप्पइ, थेम, थेंब (पुं.) ; देप्रा. थेवो (=बिन्दु :-१६७-९) ; अप. थेंभ ; गु. उथेवो ; सिंह. तेम = आर्द्रता.]

¹थेर पुं. बदल, लहरी. Changes.
[सं. (?) ; कान. तेर = एकावर एक थर रचणें, खप्पड. जिवाचे थेर थेर करणें.]

²थेर वि. खप्पड. Old.
[सं. स्थविर ; प्रा. थेर ; देप्रा. थेरो ब्रह्मा (१६७-१०) ; सिं. थेरु, थैरु = उंच बोकड ; सिंह. तेर = भिक्षुक. कान. तेर = खप्पड.]

थेरडा वि. म्हातारा, वयानें मोठा. An aged (person), haggard, worn out.
[सं. स्थविर ; अप. थेरि + डा (प्रत्यय - निंदार्थे).]

थैमान न. गोंधळ. Tumultuous mirth, loud and lively dancing and merriment.
[ध्वनिशब्द. थै, थै-नाचण्याचा आवाज.]

थैला पुं. पोतें, खोळ. A sack or large bag.
[हिं. ठेलना ; म. थैली.]

थोक पुं. रेशीम गुंडी, रेशिम मोजण्याचें परिमाण (चार कळयांइतकें). A quantity of silk.
[१ सं. स्तोक्य ; प्रा. थोक्क ; आ. थोक् ; बं. थोक् ; ओ. थोके ; हिं. थोक् (समूह) ; पं. थोक (समूह), थोकु (जिन्नस) ; गु. थोक (डा) ; २ सं. स्तोमक ; प्रा. थोवक.]

थोक(णें) सक्रि. उभे रहावयास सांगणें, थांबणें, बंद होणें. To make, to stop or stand still.
[सं. स्तुभ् ९ रोधने, स्तोभक (ना.) ; प्रा. थोक्क ; याकाम. थोकव (= थांबवणें-दडवणें.-नरुस्व. ५१५) ; शिकाम. थाक.]

थोटा, थोटक वि. हात नसलेला किंवा आंखूड हाताचा. Deprived of arms or legs or finger.
[सं. स्तोकहस्त (?), स्थगु ; देप्रा. थोट्ट, टुंट (छिन्नहस्त) ; हिं. टूंट ; सिं. टूंटौ.]

थोटुक न. कापलेला हातापायाचा भाग, खोंड, तुकडा (विडीचा जळून विजलेला). A stump or stock (of anything).
[सं. प्रस्तुम्पति, √स्तुप्, स्तुभ्; देप्रा. टुंटो-छिन्नकरः (१३७-२); गु. ठुठ्ठ; सिं. ठुठ्ठ; पं. ठोठ. ठुंठण पहा.]

थोडा वि. लहान, बारीक, अल्प, किंचित्. Little, few, scanty.
[सं. स्तोकम्, स्तोकट; पा. थोकम्; प्रा. थोअ; अप. थोअड, थोटा; बं. ओ. हिं. पं. थोडा; गु. थोडू; ने. थोर; सिं. थोरो.]

थोत्री, थोतरी स्त्री. तोंड, थोबाड. A side of the face, a cheek.
[देप्रा. थुथ्थ; बं. थुतनी (हनुवट); हिं. थूथन, थोतन; थूथना (नाक).]

थोप(णें) उक्रि. मारणें, हाणणें, थांबणें, आधार देणें. To strike, to stop, to bring to a stand, to pat.
[सं. स्तुन्द्, तुद्, स्तुभ् ९ स्तंभने, स्तुन्न, तुन्न; प्रा. थुण्ण, सिं. थूना; अकामसा. थोपट(णें), थोपुट(णें), थोकुट(णें).]

थोब(णें) अक्रि. लाजणें. To feel bashful.
[सं. स्तुभ् ९ रोधने, स्तोभ्; याकाम. थोब, थोबडें.]
आंगचेनि दळभिडें । पांतां चंद्रबिंब थोबडें ॥ शिशु. ४०७

थोबाड न. तोंड, गालफाड. A side of the face, a cheek.
[सं. तुंड, स्थपुट (?), थुर्व् १ हिंसायाम्; जावानी. थबाल; याकाम. थोबडें. जावानी मूळ चिन्त्य आहे.]

थोमाळ(णें) क्रि. झोंपविणें, अंगाई करणें, शांत करणें, शमविणें, थोपटणें. To soothe, to appease, to lull.
[सं. थुम्, स्तोम्+अल् १ भूषणे, स्तुभति, स्तुभ्नाति, स्तोभति; गु. थोभवूँ; (तुम्पति, स्तोप्यते.)]

थोर वि. मोठा, लठ्ठ, स्थूल, श्रेष्ठ. Great, large, big, venerable.
[सं. स्थविर, स्थूर, स्थूल; देप्रा. थोरो (पृथु). हेमचंद्र स्थूलशब्दभवः असें म्हणतो. त्यापेक्षां 'स्थविर' हें मूळ अधिक सयुक्तिक दिसतें. गु. थोर; लमा. थुलो; सिं. थोल्ही; पं. थोल्ह (स्थूलपणा); याकाम. थोरी, थोरीव (नरुस्व. १८०); अकामसा. थोरवी, थोराई (=मोठेपणा); थोराड (थोर+हाड) = दांडगा; थोराव(णें) = थोर होणें.]

थोवेकार पुं. सवंगडी, पथकाचा नाईक. A companion, the leader of an army or division.
[सं. स्तोमकरी (?); याकाम. थोवेकार (नरुस्व. ८७६)]
तंव थोवेकारी भणितलें गोपाळी ॥ दाव. ७५.
मेळविलें थोवेकारीं । कटवां पाशीं ॥ शिशु. ५०२.

थोरी स्त्री. कड, काठ. Brim, bank.
[सं. ?; यांकाम. थोरिआं.]
तंव कुचतटाचिआं थोरिआं । देओ न पुरती ॥ शिशु. ६५५

द पुं. मराठी वर्णमालेंतील अठरावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण दन्त्य अल्पप्राण मृदु असुन उच्चारस्थान दन्त आहे (त पहा.). The eighteenth consonant in Marathi alphabet.
[(आद्य द) सं. द, द्र, द्व, ध्व; प्रा. द.
दन्त-दांत, द्रोणि-दोण, ध्वन्-दणदण,
(मध्य द) सं. द, द्य, द्व, द्र, र्द, द्ध; प्रा. द.
कुद्दाल-कुदल, शब्द-साद; निद्रा-नीद, कूर्द-कुद.
सं. ध; प्रा. ध. ध्वन-दण.]

दउड(णें) अक्रि. भरधांव धावणें. To run, to gallop.
[सं. द्रु १ गतौ.]

दउत, दौत स्त्री. शाई ठेवण्याचें पात्र. An inkstand.
[अर. दवात्; ह्याचे शिष्ट उच्चार 'दउत, दौत,' हे असून अशिष्ट उच्चार 'दवात, दवत' हे आहेत.]

दखल वि. स्त्री. माहीत, परिचित, देखरेख, ताबा, पोंच, रुजू. Known or famliar to, receipt, control.
[अर. दख्ल्; शिकामपेकाम. दखल (चित्र ३७, रा. १०-३४२); अकाम. दाखल, दखलगिरी = माहिती.]

दख्खन स्त्री. दक्षिण, नर्मदानदीच्या दक्षिणेकडील प्रदेश, दक्षिण हिंदुस्थान. The South, Southern India.
[सं. दक्षिण; प्रा. दक्खिण; हिं. दख्खन. शिवकाल व पेशवेकाल येथपर्यंत 'दख्खन' शब्द वापरांत होता. दक्षिण ह्याचा फा. उच्चार दक्खन हा आहे व तो हिं. किंवा फा. ह्यामधून मराठींत आला.]

दगड पुं. धोंडा, फत्तर, शिला, खडकाचा तुकडा, (ल.) अडाणी, मट्ट, मूर्ख. A stone, a large stone, a mass of rock, a blockhead.
[कान. **दक्कड** = मजबूत, भरभक्कम ; (सं. दृषत् ?) ; याकाम. **दगडगुंडा** (कान. दक्कड + गुंडा) ; अकामसा. **दगडी** = दगडाचें भांडें.]

दगदग स्त्री. कष्ट, त्रास, दमणूक, कंटाळा उत्पन्न होण्याइतके परिश्रम, काळजी. Bother, fuss, vexations, labour.
[सं. **दघ्** ५ घातने किंवा **थक्क्** १० नाशने (द्विरुक्ति) ; अकाम. **दगदग(णें)** = श्रमणें ; **दगदगा, दगदगी** = दरारा, भीति उत्पन्न करणारा ; **दगदग(णें)** = त्रासणें, श्रमणें.]

दगल स्त्री. फसवाफसवी, लुच्चेगिरी. Trick, fraud, treachery.
[अर. **दघल्** ; अकामसा. **दगाबाज** = विश्वासघातकी, फसव्या (फा. **दघाबाझ्**).]

दगा पु. कपट, लबाडी, भय, अपघात, खोटा व्यवहार. Deceit, fraud, foul play, hazard, danger.
[फा. **दघा** ; अकामसा. **दगेखोर** = दगा करणारा ; **दगेबाज** = दगलबाज ; **दगाव(णें)** = नाश पावणें, इजा होणें.]

दग्ध वि. जळलेलें, पोळलेलें. Burned, blasted.
[सं. **दह्** ४ दहने (निष्ठा). (लक्षणेनें) अशुभ, अपवित्र असा अर्थ झाला. **दग्धतीथ, दग्धयोग** (= अमंगल योग.)]

दंग वि. निमग्न, गर्क, आश्चर्यभरित, चकित. Surprised, engrossed, deeply engaged, wonder-struck.
[फा. **दंग**.]

दंगल स्त्री. गर्दी, गोंधळ, गर्दी. A mob or rabble.
[फा. **दंगल**.]

दंगा पुं. गोंधळ, भांडण. Tumult, confusion, clamour, storming.
[फा. **दंगा** ; कु. **दंगो** ; ओ. हिं. पं. **दंगा** ; गु. **दंगो** ; ने. **दङ्गा**. हा शब्द हिंदीमधून आला असावा.]

दचक(णें) अक्रि. भिऊन गोंधळणें, बुजणें, बिचकणें, चमकणें. To start or be startled, to be taken aback.
[सं. **दृ** १ भये + **चक्**, **दृक्** + **चकन्** ; अकामसा. **दचक** = आकस्मिक भास, धक्का ; **दचका** = धक्का.]

दट(णें) उक्रि. दडपणें, जोरानें दाबणें. To press.
[कान. **दट्टिसु** ; (सं. दृ. १ भये ?) ; हिं. **दाटना**.]

दटावि(णें) सक्रि. दहशत घालणें, रागावणें, धमकी देणें, समज देणें, कानउघडणी करणें. To menace, to threaten, to reprove.
[सं. **त्रस** किंवा **यत्त** ; सिं. **जताइणु** ; पं. **जताउणा** ; हिं. **जताना** ; मराठीमध्यें ‘ ज्र ’ मधील ‘ द ’ अवशिष्ट राहिला. इतर भाषांत ‘ ज ’ राहिला ; कान. **दट्टिसु** ; अकामसा. **दट्टा, दट्ट्या, दटावणी**.]

दंड(णें) अक्रि. छाप उठविणें. To press.
[कान. **दट्टिसु** ; (सं. दृ १ भये, **दल्** १ विशरणे, **द्रा** २ कुत्सितायाम् गतौ) ; अकामसा. **दडदड, दडदडाट, दडपणें, दडसणें** (सं. **दृढीयस्**, √**ध्रस्** ९ उंच्छे) ; **दटा** (कान. **दट्टा**) = अडथळा ; **दडी** = दडण.]

दंड(णें) अक्रि. लपणें, छपून राहणें. To lie hid, to lurk.
[कान. **दडी** = ताटी, तट्टी ; याकाम. **दडा** ; पेकाम. **दड** (मोकर्ण ४५-१८) ; अकामसा. **दड, दडादडी, दडविणें**.]

दडा पुं. समूह. A crowd, a heap.
[कान. **दट्ट** = दाट ; याकाम. **दडा** (उगी. १०६).]
नर-तुरंग-गज सिंहाचे दडे : तोडी रणदेवतांचे झगडे ॥
नरुस्व. २३२

दडी स्त्री. लपाछपी, गुप्तता. Running away, lurking.
[कान. **दडि** = काठी, सोट्या ; **दडी** = ताटी, तट्टी, **दडिग** = सोट्या हातांत असणारा मनुष्य.]

दड्ड वि. मट्ट, लठ्ठ. Dull, block-head.
[कान. **दड्ड** = मठ्ठ.]

दडप(णें) सक्रि. त्रास देणें, दाबणें, चेपणें, छपविणें, खाणें (ल.). To press down, to compress.
[सं. **दभ्** १० पीडायाम्, **दृप्** ४ मोहने (?) ; कान. **दट्टणिसु**. द्रावीडमूळच दिसतो. अकामसा. **दडप, दडपण** = भार, ओझें, चेपण ; **दडपून** = अमर्याद, बेसुमार ; **दडपशाही** = जुलुमी अमल, अरेरावी ; **दडपश्रमे** = दडपून देतो ऐसा जे, आयत्या वेळीं सुचलें तें कांहीं तरी सांगून वेळ मारून नेणें

(ह्यांत अशुद्ध संस्कृत शब्दयोजना आहे व ती रुद्र ह्या वेदसूक्तांतील ऋचेच्या धर्तीवर आहे); **दडपा** = दडपण ; **दडप्या** = दडपणारा.]

जो बहु इथें विषयविलासी गुंपे । तो म्हणे उवाइ पडिला सांपें ॥
जो अभिलाषाभारें दडपे । तेयातें सज्ञानु म्हणती ॥

ज्ञा. ९-५०४

दडवादड स्त्री. लपाछप, लपंडाव, तातडा तांतडीं. Concealing and hiding.

[**दडवणें** ह्या मराठी धातूपासून. द्रु १ गतौ ; याकाम. **दडवादडी** (उगी. ७५); अकाम. **दडादडी.**]

भणऊनि चालिजे दडवादडीं । हा मंत्रची नोहे ॥

शिशु. ४८०

दणक(णें) सक्रि. आवाज करणें, आवाज करून मारणें. To sound, to beat (so as to create sound).

[सं. **ध्रण्** १ शब्दे ; अकामसा. **दणका** = प्रहार, ठोसा, आघात, गद्दा ; **दणकन** = दणदण असा आवाज होऊन ; **दणकट** = बळकट, जाडेंभरडें, मजबूत ; **दणदणां**, **दणादण** = ' **दण** ' आवाज उत्पन्न करून.]

दंड पुं. नमस्कार, जोर, व्यायामाचा एक प्रकार. A certain exercise of athlete.

[सं. **दण्ड** ; याकाम. **दंडवत** (= साष्टांग नमस्कार नरुस्व. ६७६). येथें **दण्ड** म्हणजे **काठी** ह्याच्या आकाराची कल्पना मुळाशीं आहे ; काठीसारखे पडण्याची क्रिया नमस्कारांत करावी लागते म्हणून त्यावरून ' **नमस्कार** ' हा अर्थ. हा शब्द ग्रामीण मराठ्यांच्या मध्यें रूढ आहे.]

दंड, दांड पुं. सोट्या, काठी; छडी. A stick, a staff, a mace.

[सं. **दण्ड** ; प्रा. **दण्ड** ; गु. **दंड**, **दांडो** ; सिं. **डंड** ; पं. **दन्ना**, **डन्न** (शिक्षा) ; हिं. **दण्ड**, **दांड**, **दन्ना** ; का. **दन** (मूठ), **दोन** (मुसळ) ; सिंह. **दंड** (शिक्षा, दंड) लमा. **रन** ; अकामसा. **दांड**, **दंडुका**, **दांडी**, **दांडुक**, **दण्डारणा**, **दंडुक्या.**]

दंड पुं. युद्ध, पाठीचा कणा, खांद्यापासून कोपरापर्यंतचा भाग. Battle, back-bone, an arm.

[सं. **दण्ड्** १० दण्डनिपातने ; याकाम. **दंड** (सं. **द्वंद्व**) = युद्ध (नरुस्व. २५८) ; अकामप्र. **दंड थोपटणें** = युद्धास उभें राहणें ; **दंड भरणें** = लठ्ठ होणें.]

मेखळा रत्नरथांचा चंडु : जेणें दानवांतें घेतला दंडु ॥

नरुस्व. २५८

दंड पुं. दोन तुकडे जोडण्याकरितां घातलेली शिवण. The line of stitches.

[सं. ? ; प्रा. **दंडी** = जुन्या वस्त्राचा सांधा.]

दंड पुं. शिक्षा, शिक्षा म्हणून द्यावयाचा पैसा. Fine, punishment.

[सं. **दंड्** १० दण्डनिपातने ; अकामसा. **दण्डन**, **दण्डनीय.**]

दंडक पुं. नियम, पद्धत, संप्रदाय. Custom, practice, usage.

[सं. **दण्ड.**]

दण्ड्या पुं. लांब काठी. A long staff, a mace.

[सं. **दण्डायत**, **दाण्डायतिक** ; प्रा. **दंडाइय.**]

दत्त वि. दिलेला, (त्यावरून ईश्वरदत्त, ईश्वरानें दिलेला, त्यावरून) नशीब, प्रारब्ध. Given, presented, (hence) God-given, (hence) fortune, fate, luck.

[सं. **दत्त**, (निष्ठा) √**दा**, अकामसा. **दत्तक** = ओटींत घातलेला.]

दत्त पुं. दत्तात्रेय. The name of a deity, *Dattatreya.*

[सं. **दत्त + आत्रेय** ; अकामप्र. **दत्त म्हणून उभें राहणें** = एकदम अकल्पित रीतीनें येणें, उपटणें, दत्तात्रेयाची स्वारी अचानक येई त्यावरून.]

ददात स्त्री. उणीव, तोटा, वाण, कष्ट, दगदग. Distressing lack, great straits of circumstances.

[सं. **दद्** १ दाने (?), **ददाति** = द्या, द्या असें म्हणण्यासारखी स्थिति असलेला,–उणीव असलेला.]

दधि न. दहीं. Curds.

[सं. **दधिन्.** √**दुह्** २ दोहने (?).]

दंत पुं. दांत. A tooth.

[सं. **दंत** < **दत्** ; प्रा. **दन्त** ; *Gr.* Odons ; *Lat.* dense ; *Lith.* Dins ; *Goth.* Tuneus ; गु. हिं. **दंत**, **दांत** ; सिं. **डंदु** ; पं. **डंद**, **दंद** ; का. **दंद** ; सिं. **दत्त** ; अकामसा. **दन्तकथा** = तोंडातोंडीं चालत आलेली गोष्ट ; **दन्तभग्न** = दात पडलेला ; **दन्तमंजन** = दांत घासण्याची पूड ; **दंतुर** = दांते असलेला, फार तुटलेला (किनारा).]

दंताल, दांताळ वि. दांत पुढें असलेला. Having teeth projecting over the lip.

[सं. **दन्त** ; **दन्तावलः** ; प्रा. **दन्ताल** ; देप्रा. **दन्तालु** ; बं. **दांताल** ; सिं. **डान्तारी.**]

दंद न. भांडण. Discord, dissension.
[सं. **द्वंद्व** ; प्रा. **दंदा** ; याकाम. **दण्ड** (युद्ध–नरुस्व. २५८), **दंदिया** (=योद्धा. दृ.पा. ७४) ; अकाम. **दंदी** (= भाण्डखोर).]
कां दंदिया हतियेरा । न विसंबे भांडारा ॥ ज्ञा. १३–५०१

दपकाव(णें) क्रि. दांबणें, भीति दाखविणें, दापणें. To intimidate, to menace, to snub.
[सं. **दर्पः**, **दृप्य**,√**दर्प्**,√**दर्भ्**–भीतौ ; पा. **दप्पो** ; प्रा. **दप्पा** ; पं. **दपटन** ; हिं. **दपटना** ; बं. **दापा** ; सिं. **दृप्**; याकामसा. **दापातें** (=गर्दीत दाटून जाणारे. नरुस्व. ७१८); **दापें**=दटावणीनें (नरुस्व. २६८).]
चक्रवार चकार : दापाति जवादिये लेकार ॥ नरुस्व. ७४८

दपट(णें) सक्रि. रेटणें, खुपसणें, दाबून भरणें, कोंदणें. To cram or stuff, to impell.
[सं. **दभ्** १० आज्ञापने, **दफ्** ६ हिंसायाम् ; अकामसा. **दपटशा**=धमकारणी.]

दफन न. पुरण्याची क्रिया, प्रेत पुरणें, मूठमाती. Burial.
[अर. **दफ्न्** ; पेकाम. **दफनणें**, **दफण** (ए. स्फुले. ७२).]

दफा स्त्री. कलम, वेळ, पाळी. Time, turn, column.
[अर. **दफ्‌आ**=वेळ ; पेकाम. **दफा** (राज. ७-३).]

दफाते पुं. स्त्री. कागदाला पाडलेल्या तीन सळांपैकीं पहिल्या सळाच्या मध्यापासून तिसऱ्या सळाच्या मध्यापर्यंत ओढलेली रेघ. The line drawn from the middle of the first fold of the paper to the middle of the third fold.
[अर. **दफ्‌आत** ; पेकाम. **दफाता** (पाब ४९)= स्मरणवही.]

दफे न. प्रतिकार, शिक्षा. Discipline, resistence.
[अर, **दफ्‌अ** ; पेकाम. **दफे** (राज. १५-१९).]

दफेदार पुं. घोडदळांतील कनिष्ठ अधिकारी. An officer of cavalry.
[फा. **दफ्‌अदार.**]

दफेरफे स्त्री. फडशा, कर्जाची फेड, व्यवस्था. Clearance, liquidation (of a debt).
[अर. **दफ्‌अ–रफ्‌अ.**]

दफ्तर न. कागदपत्र, कचेरी, कागदपत्राचा रुमाल. Record, register, a record-office.
[अर. **दफ्तर.** (हा शब्द ग्रीक शब्दाशीं संबद्ध आहे. त्याचा अर्थ सुटे कागद असा आहे. पुढें ते कागद एका दोऱ्यांत ओवून ठेवूं लागले. म्हणूनच ती यादी झाली. त्यावरून कागदपत्रांचा रुमाल,– रुमलाचा समूह,–कचेरी).]

दब(णें) अक्रि. खचणें, भिणें, ताब्यांत जाणें. To yield, to give in.
[सं. **दभ्** १ भये; अर. **दब्दब** ; हिं. **दबना** ; अकामसा. **दबदबणें**=दबदब आजाज होणें ; **दबदबा**= भीति, दरारा, आदर ; **दबाव**=भीति, धमकावणी.]

दबक(णें) अक्रि. नरमणें, हार जाणें, टेंकीस येणें, कचरणें. To yield, to give in.
[सं. **दभ्** १ भये.]

दंबक(णें) अक्रि. आवाज होणें. To sound.
[कान. **दबकु**=भांड्याचा आवाज.]

दबदब स्त्री. हालचाल. Movement.
[कान. **दब**=हालचाल. **दबणें** पहा.]

दम(णें) अक्रि. थकणें, भागणें, कंटाळणें, श्वास सोडणें, दम टाकणें. To be tired, to grow weary.
[सं. **दम्** ४ उपशमे, किंवा **तम्** (कांक्षायाम्); फा. **दम्**=श्वास ; अकामसा. **दम**=श्वास, प्राण, धाप, क्षण, अवसान ; **दमछाट-क**=श्वास कोंडून ठेवण्याची शक्ति ; **दमदाटी** ; फा. **दम**=जोर, धाक, दहशत ; **दमविणें**=वश करणें, शमविणें.]

दमट वि. ओलसर. Damp, moist.
[सं. **द्रवस्य**, **द्रविष्ट** > **दमिट्ठ** > **दमट** (रा.); अकामसा. **दमसर**=ओलसर (< **दमिस्त्र**).]

दमडी स्त्री. एक नाणें, पैशाचा चौथा हिस्सा. A coin, a piece of money.
[सं. **द्रम्म** ; प्रा. **दम्म** ; *Gr.* Drakme ; संस्कृतीकरण नंतरचें. मूळ शब्द ग्रीक. याकाम. **म्हातारदाम**–(स्मृ. १०७)
दामनियांचे दाम करा ॥ लीच. १·५८

दमन न. वश, ताबा, नियंत्रण. Taming, subduing.

[*IE*. Dem ; सं. दम् ४ उपशमे ; *Gr*. Dam ; *Lat*. dom ; *L. Ger*. Zam ; *As*. tam.]

दमा पुं. श्वासाचा रोग. Asthma.
[फा. दमा<दम्=श्वास, प्राण.]

दम्पती पुं. नवराबायको. A married pair.
[*IE*. Dem–बांधणें ; सं. दम=घर ; *Av*. Dengpaits; *Gr*. Dem.; *Lat*. dom.; *Slav*. domador; *Russ*. domaz. **दम्पति, जम्पति, जायापति**–असे संस्कृत शब्द दिले जातात. ह्यांतील 'जायापति' हा निराळा आहे.]

दम्दमा, धमधमा पुं. तोफांसाठीं केलेला उंचवटा, कट्टा. A raised platform.
[फा. दम्दमा.]

दंब, दंभा वि. ढोंग. Hypocricy.
[डंब, डंभी पहा.]

दया स्त्री. करुणा, कृपा, मेहेरबानी. Compassion, pity, mercy.
[सं. **दया**, √**दय्**, **दे** (रक्षणे); अकामसा. **दयदयणें**= कळवळणें; **दयाळू** (सं. **दयालु** ; प्रा. **दयालु**).]

^{1}दर अ. हरएक. Per.
[फा. दर्=आंत, प्रत्येक.]

^{2}दर पुं. किंमत, भाव, निरख. Rate, price.
[फा. दर.]

^{3}दर, डर स्त्री. भीति, भय. Fear.
[*IE*. Der; *Av*. Dardar; *Arm*. Terem ; *Brit*. Darm ; सं. दृ १ भये.]

^{1}दरक पुं. विचार, बेत, पद्धत, सरणी, भाव. Custom, practice.
[अर. दर्क.]

^{2}दरक पुं. वतन, नोकरी, पिढिजाद नोकरी. Hereditary public office.
[अर. **दर्क**, **दरक्** ; पेकामसा. **दरकदार**=पिढीजाद नोकर. मराठाशाहीमध्यें हा शब्द आठ अधिकाऱ्यांना लावीत–कारभारी मुख्त्यार-दिवाण, मुजुमदार, फडणवीस, सबनीस, कारखानीस, चिटणीस, जमादार, पोतनीस.]

दरकार स्त्री. अडचण, जरूरी, गरज, संबंध. Need, necessity.
[फा. **दर्कार**=उपयुक्त, जरूर; पेकाम. **दर्कार** (राज. १–६८); अकाम. **दरकार** (=संबंध, भीति, पर्वा.)]

दरखास्त स्त्री. अर्ज, विनंती, एखादा साक्षीदार किंवा पुरावा स्वीकारण्याबद्दल अर्ज. A petition, an application for the admission of a witness or a document.
[फा. **दरखास्त**.]

दरगा पुं. दर्गा पहा.

दरजा पुं. दर्जा पहा.

दरड स्त्री. नदीकांठचा तुटलेला उंच किनारा, उंचवटा. A huge broken bank, precipitous bank.
[सं. **दरद्वत्**, √**दृ** ९ विदारणे (?).]

दरद, दर्द स्त्री. दुःख, रोग, आजार, काळजी, कळकळ, कींव. Ailment, disease, care, concern.
[फा. **दर्द** ; पेकाम. **दर्द** (राज. ७–७७); अकामसा. **दरदी**, **दर्दी** (दुसऱ्याचा रोग) जाणणारा, गुप्तगोष्टी–बिंगें जाणणारा, रसज्ञ, मर्मज्ञ.]

दरबार पुं. कचेरी, सभा. A royal court, a hall of audience.
[फा. **दर्बार**=राजसभा ; अकाम.=**दर्बार**-ह्यांतील '**र**' मधील '**अ**' चा उच्चार निभृत आहे.]

दरवळ(णें) अक्रि. अत्यंत गतीनें पसरणें. To be diffused widely and strongly.
[सं. **द्रम्** १ गतौ + **वल्** (संचरणे).]

दरवाजा पुं. दार, द्वार, प्रवेशाचा मार्ग. A gate or door.
[फा. **दर्वाझा**, **दरवान**=देवडीवाला, < फा. **दर्वान**]

दरवेस, दरवेशी पुं. पोरका,–परदेशी,–अनाश्रित फकीर, वाघ,–अस्वल घेऊन फिरणारा भिकारी. A strolling mendicant among Muhammedans, an orphan.
[फा. **दर्वेश**=मुसलमानी धर्मांतील धार्मिक गुरू.]

दरदर(णें) अक्रि. फेंसाळणें, वर येणें, भीतीनें घाम फुटणें. To froth up, to swell and puff.
[सं. दृ ९ विदारणे; अकामसा. **दरदर–दरदरां**=सपाट्टन, भरपूर, जोरानें (उदा. **दरादरां** ओढणें, **दरदरां** घाम येणें.)]

दरा, दरी स्त्री. खोल जागा, डोंगरामधील गुहा. A gorge, recess, a deep ravine.

[सं. दर <दृ ९ विदारणे ; पा. प्रा.–दरी; बं. दर; हिं. दरी ; पं. दरा (मार्ग) ; सिं. डरी (गुहा) ; अकामसा. दरेंखोरें = खांचर, खळगा (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

दराख, द्राख, द्राक न. द्राक्ष, फलविशेष. A kind of fruit, a grape.
[सं. द्राक्षा, द्राखा; प्रा. दक्खा (स्त्री.) ; सं. प्रा. मध्यें 'लता' व मराठीमध्यें **'फल'** आहे, म्हणुन मराठीमध्यें लिङ्गविपर्यय झाला.]

दराज वि. दीर्घ, अधिक. Prolonged, more.
[फा. दराझ् ; पेकाम. दराज़ (राज. ११-२९).]

दरारा पुं. धमकी, धाक, दबदबा. A threat, an awe, a dread.
[सं. दर, √दॄ १ भीतौ ; हिं. दरादा.]

दरिद्री वि. गरीब, पैसे जवळ नसलेला. Poor.
[दारिद्र्य पहा.]

दरुणी महाल पुं. जनानखाना, अंतःपुर. Harem, the female apartment.
[फा. **दरूनी** (= आंतील) + महाल.]

दरोगा पुं. एक अधिकार, हुद्दा, व्यवस्थापक, कोतवालाचा–रखवालदाराचा हुद्दा, प्रांतावरील अधिकारी. A post, an office, an officer.
[फा. **दारोघा, दारुघा,** (मूळचा **मोंगली** शब्द); पेकाम. **दरोगा** (राज. ७-१००) ; अकामसा. **दरोगेकरी.**]

दरोडा पु. मोठी चोरी, डाका. An attack by a band of robbers.
[सं. दॄ ९ विदारणे ?; देप्रा. **दरवडोधारी** (१६९-१७) ; गु. **दरोडो** ; अकामसा. **दरोडेखोर** = चोरांच्या टोळींतील मुख्य.]

दर्गा पुं. मशीद व तिच्या भोंवतालची पवित्र जागा. साधूचें वस्तीचें ठिकाण. A place of worship among the Muhammedans.
[फा. दर्गाह् = (मूळचा अर्थ) राजदरबार ; पेकाम. **दर्गाह्** (इम. ६५).]

दर्ज, दरज स्त्री. भेग, चीर, फट, शिवण, बांधा. An interstice.
[फा. **दर्झ्** ; पेकाम. दरज़ (खरे ७-३२९७), दरद (मराआ. ३४). ज़ आणि द़ असे दोन्ही वर्ण पेकाम मध्यें येतांना दिसतात. अकाम मध्यें **'ज'** अधिक येतो.]

दर्जा पुं. योग्यता, अधिकार, पदवी. A rank, order, station, a step.
[अर. **दरजा** ; पेकाम. **दर्जा** = मुद्दा (राज. ५-७७) ; अकाम. **दरजा.**]

दर्जी पुं. शिंपी. A tailor.
[फा. **दर्झी, (दर्झ** = फाटलेलें शिवण) ; हिं. **दर्झी.**]

दर्दुर पुं. बेडुक. A frog.
[सं. **दर्दुर,** √दॄ ९ विदारणे, √दम् ४ भये.]

दर्प पुं. गर्व, धीटपणा. Pride.
[सं. **दर्प,** √दृप्.]

दर्पण न. आरसा, आयना. A mirror.
[सं. **दर्पण.**]

दर्भ न. गवत, श्राद्धांत,–यज्ञांत वगैरे धार्मिक कृत्यांत वापरावयाचें गवत.
[*IE*. Derbh ; सं. दर्भ = गवत; *Teut*. Turf; *Germ*. Turba, Turbe; सं. **दर्भ** √दंभ् ; प्रा. दब्भ; म. दाभ, **दाभण** ; अकामसा. **दभ्र्या** = उत्तरक्रिया करणारा ब्राह्मण, दुर्दैवी ब्राह्मण. ह्या शब्दाच्या अर्थाचें विशेषीकरण झालें आहे. त्याचा सामान्य अर्थ ' गवत, तृण ' असा जाऊन एक विशिष्ट **धार्मिक कृत्यांत वापरावयाचें 'तृण'** असा मर्यादित झाला आहे.]

दम्र्यान, दरमियान पुं. अ. मध्यें, मध्यंतरीं, मध्यस्थ, दलाल. In the middle, (hence) a security.
[फा. **दर्मियान्** ; पेकाम. **दम्र्यान** (पेद. २-१) (= मध्यस्थ मनुष्य).]

दर्या, दरिया पुं. समुद्र, सरोवर, पाण्याचा सांठा. The sea.
[फा. **दर्या** ; अकामसा. **दर्यावर्दी** = खलाशी, नाविक (फा. **दर्या – नवर्द + ई**)]

दर्याफ्त स्त्री. चवकशी, निर्णय, समजूत, आकलन. Inquiry, decision, understanding.
[फा. **दर्याफ्त्** ; पेकाम. **दरफ्ती (आमदरफ्ती** केली).]

दर्वान पुं. फिरता व्यापारी. An itinerent merchant.
[फा. **दर्बान्** ; अकाम. **दारवान** (= घोड्याचा व्यापारी).]

दर्वान पुं. द्वाररक्षक, द्वारपाल. A door-keeper.
[फा. **दर्बान्** ; पेकाम. **दर्बान्** , **दर्वाण** (राज. ५-१४१).

दर्शन न. पाहणें, भेट, अवलोकन, शास्त्र, मत. Sight or seeing, a doctrine, an opinion.

[*IE.* Derk; सं. दृश्, दर्श ; *Zend.* dare; *Gr.* Derk; *Lat.* Draco; याकाम. दरुषण, दरुसन (ऋ. पू. ३८३); पेकाम. दर्शन, दरुषण ; अकाम. दर्शन ; ग्रामीण. दरुषण.]

दलदल स्त्री. (चिखलाची) ओली जमीन, पाणथळ. A bog.

[सं. आर्द्र, √ द्रु. ; हिं. दलदल (?).]

दलाल पुं. अडत्या, मध्यस्थ. A broker.

[अर. दल्लाल्.]

दलित वि. भरडलेलें, तुडविलेलें. Ground, broken to pieces, pounded, depressed.

[सं. दल्, (निष्ठा) दलित.]

दंव न. हिमतुषार, दहिंवर. Dew.

[सं. द्रव, √ द्रु १ गतौ, √ द्रि. परंतु मराठी शब्दांतील अनुनासिकाची उपपत्ति ह्या शब्दानें लागत नाहीं. **हिम** पासून ज्याप्रमाणें **हींव** असा शब्द सिद्ध होतो तसा कांहीं तरी शब्द ह्याच्या मुळाशीं असावासा वाटतो. देशी '**देयं**' (देना. १६९-१) असा शब्द असून त्याचा अर्थ 'जलम्' असा आहे. तो शब्द ह्याचें मूळ होय.]

दवड(णें) क्रि. धांवणें, गमावणें, जावयास लावणें.

[सं. द्रु १ गतौ, णिच्–**द्रावय, द्रापय** > दडप, दडव, दवड (?).]

दवड(णें) क्रि. पळणें, धांवणें, गमविणें, सोडणें. To gallop, to make to gallop, to let go.

[१ सं. द्रु १ गतौ, धावने, (णिच्) **द्रावय, द्रापय** (> **दडप, दडव**), २ सं. **द्रु, द्रव** ; पा. **दवो** ; देप्रा. **द्रुक्क, द्रुग्ग, द्राक्क** (सं. **द्राक्** पासून), (**दविष्ठ** (ना.), द्रु १ गतौ > **दव, दवीयस्, दविष्ठ**). ३ सं. **द्रु, द्रव** ; बं. **दउडा** ; ओ. **दउरिबा** ; हिं. **दउडना** ; पं. **दउडणा** ; लां. **द्रोडण** ; सिं. **द्रोडणु** ; गु. **दोडवूँ** ; ४ सं. **द्राड्, ध्राड्** १ नाशे.]

दवंडी स्त्री. वाद्याचा आवाज, जाहीर पुकारा, बातमी, प्रसिद्धि. A drum beaten by a public crier, (hence) a proclamation.

[सं. **डिंडिम**=एक वाद्य, **ध्वनिशब्द**. त्यावरून त्याच्या साह्यानें जाहीरात देणें.]

दवना,-णा पुं. सुवासिक वनस्पतिविशेष. A kind of fragrant plant.

[सं. **दमण, दमनक** ; देप्रा. **दँवना** ; प्रा. **दमणअ** ; बं. **दोना** ; ओ. **दयणा** ; हिं. **दउना** ; पं. **दौना** ; गु. **दमण**.]

दश वि. दहा. Ten.

[*IE.* Dekm; सं. दशन्; *Av.* Dasa; *Gr.* Deca; *Lat.* Decem; *Got.* Taihum; *Arm.* Dek; *Lith.* Dezinthis; *Slav.* Desyati; **दहा** पहा. अकामसा. **दशक, दशग्रंथ, दशहरा, दशमी** (दहावी तिथी); **दशावतार, दशावधानी** (निरनिराळ्या गोष्टींत लक्ष ठेवणारा.)]

दशन पुं. दांत. A tooth.

[सं. **दशन**, √ **दश्** ; याकाम. **दशन** (= दांत).]
मुरारीचे दशन देखोनि साजिरे : हिंपुटी जालीं पद्मरागाचीं भांडारें ॥ नरुस्व. ७९८

दंश पुं. डंक, चावणें, नांगी मारणें, आकस, वर्म, मर्म (ल.). Sting, biting.

[*IE.* Denk; *Av.* (Tizi) dastra; सं. **दश्, दंश**; याकाम. **दंश** (ज्ञा. ९·१३६); पेकाम. **दंश** (मो. भीष्म ११-५३); अकाम. **दंश, डस, डंक, डास, डुक**.]

दंशमी स्त्री. (भाजून केलेली) भाकरी, दूध घालून केलेली भाकरी. A sort of bread made with milk.

[सं. दश् १ दहने.]

दशमी स्त्री. दहावी तिथि. The tenth lunar day.

[सं. **दशन्, दशम, दशमी**. *Av.* Dasoma; *Lat.* Decimus; **दश** पहा.]

दशा स्त्री. अवस्था, स्थिति. State or condition.

[*IE.* Dek; *Got.* Tagl; *Anord.* Tagl; सं. **दशा** ; प्रा. **दसा** ; पेकाम. **दशा** (मोकर्ण ६-२४); अकाम. **अवदशा, अवदसा** (उदा. अवदसा आठविली).]

दशी स्त्री. लहान धागा, सूत, न विणलेला दोरा. An end or unwoven thread.

[सं. **दशा** ; प्रा. **दला** (स्त्री.); अकामसा. **दसाडे** = सुताचा बोळा, दशा एकत्र करून केलेला पुंजका ; **दसोडी** = वस्त्राची दशी (निंदाव्यंजक, तुच्छतादर्शक.)]

दसरा पुं. अश्विन शु. १०, विजयादशमीचा सण. The tenth of Ashwin shudh.

[सं. **दशहरा** = दहा पापें नाहींशीं करणारा, **दशाह, दशार्हः** ; प्रा. **दसारो, दसरह** ; गु. **दसेरा, दसरा** ; हिं. **दसहरा** ; का. **दशेहार** ; सं. '**दशन्**' हा मराठींत **दश, दस, दह** अशा तीन रूपांत आढळतो.]

दस वि. दहा. Ten.

[सं. **दशन्** ; प्रा. **दस** ; **दश** पहा. अकामसा. **दसक** = दहाचा समुदाय ; **दसकी** = गांवांतील एक हक्क – पंचायती-प्रमाणें.]

दस्त पुं. कर, पट्टी, ताबा, हक्क, शेला, हात (खेळांतील), हक्कपत्र, करारनामा. An assessment or a tax, a hand or trick at cards, power, authority.

[फा. **दस्त** = हात ; अकामसा. **दस्तऐवज** = हातचा लेख; हातानें केलेली सही, प्रमाणपत्र ; **दस्तखत** = हातचा लेख ; **दस्तरुमाल** = हातरुमाल, तोंड पुसावयाचें फडकें ; **दस्तबाकी** = हातांतील बाकी.]

दस्तक पुं. परवाना, परवानगी. A pass or passport.

[फा. **दस्तक** = लहान·हात, **दस्त** = हात, √ **दफ्तन्** = पकडणें ; पेकाम. **दस्तक** (खरे ८-४२४९).]

दस्ता पुं. चोवीस कागदांची गड्डी, मूठ, पक्कड, तुंबा. A quire of paper, a handle.

[फा. **दस्ता**, √ **दफ्तन्** = पकडणें.]

दस्तुर पुं. चाल, रीत, पद्धत, नियम. Custom, fashion, popular usage.

[फा. **दस्त, दस्तुर** (अ. व.– **दस्तुरात्**). दस्तुर ह्या शब्दाचे पुढील अर्थ मराठींत रूढ आहेत. १ जमीनदारास सरकारनें दिलेली सवलत, सूट ; २ पुष्कळ परगण्यांचा झालेला एक प्रांत ; ३ सही, हस्तलेख ; अकामसा. **दस्तुरी** = कर ; **दस्तुरखुद्द** = स्वतःच्या हस्ताक्षरानें लिहिलेलें.]

दस्तूर पुं. पारशी धर्मगुरु, एक पारशी आडनांव. A priest (among the Parsis).

[फा. **दस्तूर** ; पेहलवी. **दस्तोबर** = सचिव, मुख्य प्रधान]

दस्तूर, दस्तुरी स्त्री. (विकाऊ वस्तूंवरील) कर, जकात, रस्तापट्टी. A perquisite upon things purchased.

[फा. **दस्तुर् + ई** ; हिं. **दस्तूर** = आचार, रूढी, पैसे मोजतांना मिळणारें कमिशन.]

दह(णें) सक्रि. जळणें, पेटणें, धगधगणें. To burn.

[सं. **दह्** १ भस्मीकरणे ; याकाभ. **दह, दग्ध.**] परि तियें बीजें जैसीं दग्धलीं कां नुगवती चि पेरिलीं। तैसिं कर्में चि तेयां जालीं । मोक्ष हेतू ॥ ज्ञा. ४-८२.

दहा वि. संख्याविशेष, पांच अधिक पांच. Ten.

[सं. **दशन्** ; पा. **दस, दह** ; का. **दह** ; कु. **दस्** ; आ. **दह** ; बं. **दस्** ; ओ. **दस** ; बि. हिं. **दस्** ; पं. **दहा** ; ल्हां. **दाह** ; सिं. **डह** ; गु. **दस** ; अकामसा. **दहक** = दहावा हिस्सा, शेकडा दहा ; **दहकपट्टी** = वतनदारावरील कर. ह्याच्या वतनाच्या बिनसारा जमिनीच्या उत्पन्नाशिवाय जें उत्पन्न·येतें तें दहा वर्षांतून एकदां बंद करून सार्वजनिक हिशोबांत घ्यावयाची पट्टी.]

दहीं न. दुध नासून किंवा आंबट होऊन होणारा परिणाम. Curds.

[सं. **दधिन्** ; पा. **दधि** ; प्रा. **दहि** ; कु. आ. **दई** ; बं. **दई** ; ओ. **दहि** ; बि. हिं. **दही** ; पं. **दहीं** ; ल्हां. **दही** ; सिं. **डहीं** ; गु. **दहीं** ; ने. **दहि**. मराठी शब्द हा संस्कृत प्राकृत मूळ शब्दापासून येतो कां प्रातिपदिकापासून येतो ह्याचा निश्चयानें निर्णय सांगतां येत नाहीं. कांहीं वेळीं मुळापासून तर कांहीं वेळीं प्रातिपदिकापासून आल्याचीं उदाहरणें आहेत. प्रातिपदिकापासून आल्याचीं उदाहरणें अधिक आहेत. दहींमधील अनुस्वार सं. प्रा. प्रातिपदिकांत नाहीं. अकामसा. **दहीं खाणें महीं खाणें** = टंगळमंगळ करणें, अस्थिर अवस्था होणें ; (**महीं** = दुधावरची साय) ; **दह्यांडी, दहीहंडी** = दह्याचें मडकें.]

दळ न. सैन्य, संघ, समूह, कळप, मंडळ, पान, फळांतील मगज, गर, गाभा, कीट, घाण. An army, a crowd, a group, a leaf, pulp, kernel.

[सं. **दलम्** (तुकडा) ; पा. **दलम्** ; प्रा. **दल** ; आ. बं. **दल्** ; ओ. **दळ** ; हिं. **दल्** ; पं. **दल** (सैन्य) ; **डल** (पान) ; ल्हां. **डल** (सैन्य).]

दळ(णें) क्रि. जात्यानें बारीक करणें, पीठ करणें. To grind.

[सं. **दल्** १ अवयवे ; पा. **दल** ; प्रा. **दल** ; का. **दलन्** ; आ. **दलिबा** ; बं. **दला** ; ओ. **दलिबा** ; हिं. **दलना** ; पं. **दलणा** ; सिं. **डरणु** ; गु. **दलवूँ** ; ने. **दल्नु**.]

दळणवळण न. परिचय, जाणेंयेणें, ओळख, समागम. Intercourse, communication.

[सं. (?) ; येथें '**दळण**' चा अर्थ काय ? दळण = प्रकर्षात्मक वळण (शको.). परंतु 'वळण' ह्याचा अनुबंधी ध्वनिशब्द दळण होईल काय ?]

दळवई पुं. सेनाधिपति, मुख्य. Leader of the army.

[सं. **दलपति**; याकाम. **दळवई**, **दलयै** (क. पू. ४१६); अकाम. **दळवी** (एक उपनाम). दळवैनी दीधली सूचना : ते नरेंद्र सांधेल रचना । नरुस्व. ४१४]

दळवट(णें) उक्रि. नुकसान होईलसें तुडवणें, पायाखालीं तुडवणें. To trample or tread injuriously.

[सं. **दल्** १ विशरणे + **वट्** १ विभाजने, (**दलावर्त** = सैन्य गोळा करणें); याकाम. **दळवट.** हे आपुलिया नयनांचा सेवटी : डोळसा मृगीतें दळवटीं । नरुस्व. ५९०]

दळवाडा पुं. समूह, संघ, सैन्य. A multitude, a host, a gathering.

[सं. **दलावर्त**; याकाम. **दळवाडा** (ज्ञा. ४-७८, उ. गी. ११). हीमावतीचें आटिलें हींव : तें दळवाडे काढून चिरीव नरुस्व. ४१६.]

दळें न. म्यान, तरवार. The sheath or sword.

[सं. **दलम्**; याकाम. **दळें.** तें यक्षकर्दमें बांधलें दळें : विरहिणीसी ॥ नरुस्व. ५८९]

दक्ष वि. समर्थ, काळजी वाहणारा, लक्ष देणारा, शहाणा, हुशार. Clever, competent, capable, expert.

[*IE.* Deks.; वै. सं. **दक्ष्**–सामर्थ्ये; सं. **दक्ष्** (> **दक्षिणा**, **दक्षिण**; हिं. **दक्खन**); *Av.* Dash. = उजवा हात; *Gr.* Dez.; *Lat.* dex; *Lith.* deszine; *Slav.* desinu = उजवा हात; *Eng.* Due.]

दक्षिण स्त्री. वि. एक दिशा, उजवा. The South, right.

[सं. **दक्षिण**; हिं. **दखिन**; सिं. **डखिणु**; कान. **टेंकण.**]

दक्षिणायन न. कर्क संक्रांतीपासून मकर संक्रांतिपर्यंतचा काळ. The path of the Sun from the tropic of Cancer.

दक्षिणा स्त्री. ब्राह्मणास द्यावयाचें दान. Money or alms given to a Brahmin.

[सं. **दक्ष्** = समर्थ असणें. ह्यावरून **दक्षिण** = उजवा हात व उजव्या हातानें द्यावयाचें जें दान तें "**दक्षिणा**"]

दा, दां प्र. 'वेळां' ह्या अर्थी अव्ययाचा प्रत्यय. A particle signifying 'time or turn'.

[*IE.* De, do; सं. **दा** (उदा. तदा, यदा, कदा.); प्रा. **दा**; *Av.* **द**, **दा**; *Gr.* De; *Lat.* De; *Slav.* Da, do; *Lith.* Da; *Ger.* Zuo; *Tent.* To. मराठी प्रत्ययावर जो अनुस्वार आला तो क्रि. वि. अ. च्या सामान्य नियमानें आला.]

दाई स्त्री. उपमाता, सुईण, मूल पाजण्यासाठीं ठेवलेली बाई. A wet nurse,

[*IE.* Dhe; सं. √ **धे**, **धात्री**; *Arm.* dai; *Lat.* fe; *Slav.* dete; *Lith.* dele; प्रा. **धाई**; फा. **दाया**, **दायह**; अकाम. प्रांतिक (गो.) **दाई.**]

दाईज पुं. भागीदार, हिस्सेदार. One entitled to share in a heritage, a kinsman.

[सं. **दायाद** (?); पेकाम. **दाईज** (वाडबावा. २·३६-२).]

दाखल वि. आलेला, प्राप्त, आगत, परिचित. Arrived at, reached, known.

[अर. **दाखिल**; शिकाम. **दाखल** (सभा २३); पेकाम. **दाखल.**]

दाखला पुं. दृष्टांत, उदाहरण, नमुना, शिफारसपत्र. A simile or illustration, a certificate.

[अर. **दाखिला**; पेकाम. **दाखिला** (खरे ५-२४७७).]

दाखवि(णें) सक्रि. दर्शविणें, डोळ्यासमोर आणणें. To show, to exhibit.

[सं. **दृश्** १ प्रेक्षणे (णिच्); पा. **दक्खति**; प्रा. **दक्खइ**; गु. **दाखवूँ**; सिंह. **दकिनवा.** प्राकृत रूपावरून दृश् हाच मूळ संस्कृत धातु ठरतो.]

दाग, डाग पुं. भाजल्याची खूण. Spot, sign.

[सं. **दह्** (**दग्ध**); फा. **दाग्**, **दाघ्**; हिं. **दाग**.]

दांग न. समूह, अरण्य, जंगल, रान. A crowd, a thicket, a jungle.

[हिं. **डांग**; याकाम. **दांग** (= समूह, अरण्य – ज्ञा. ११-२१७).]

दाघ(णें) अक्रि. समर्थ असणें. To be able.

[सं. **द्रांघ्** १ सामर्थ्ये. जेणें प्रकाशा कांति चढे । ब्रह्मानंदाचा दाघु मोडे । जें ब्रह्माचेनि जीवन सौरभ्यें जोडे । वेधवतिये । ज्ञा. ११-२२०]

दाट वि. घट्ट, जाड, मनस्वी. Thick, inspissate, tight, close.

[सं. द्राघ्, दृढ, दार्ढ्य (?); प्रा. दट्ट; देप्रा. **संदट्टथ**=संलग्न, कप्रत्ययाभावे **संदट्टमित्यपि संदट्टं संघट्ट** इत्यन्ये (२८०-२); गु. **दाट**; सिं. **डाटो**; पं. **डट्टा** (लठ्ठ); का. **द्रोट्** (**ड्ड**=दांडगा); **दौठु** (कठीण); याकाम. **दाटि** (ऋ. पू. ४७७); अकामसा. **दाटण,-णी, दाटी**=गर्दि, रेटारेट, चेपाचेप, समुदाय, २ कान. **दट्टी, दट्टणिसु, दट्ट, दट्टगे, दट्टयिसु.** भवती वनाची दाटी : छेत्राकारी ॥नरुस्व.७३०]

दाट(णें) सक्रि. कापणें, भोंसकणें. To cut, to pierce.

[सं. **द्राड् १** विशरणे. तव धारणावास दाटिले । महाभूतांतें एकी आटिले । मग चतुरंग निवटिले । संकल्पाचे ॥ ज्ञा. ९-२१५.]

दाट्टग(णें) अक्रि. सामर्थ्यवान् होणें, मोठा होणें. To be capable.

[सं. **द्रढक**; कान. **दट्टी**; याकाम. **दाट्टग**; याकामसा. **दाट्टगा**=श्रेष्ठ, मोठा; **दाट्टगेपण**=बलिष्ठपणा (नरुस्व. २४०.) तेयाचेनि आंगलगे । अज्ञान जगीं दाट्टगें । जें सज्ञानासि हि संगे । झोंबो शके ॥ ज्ञा. १३-७७८.]

दाठर(णें) अक्रि. टणक होणें, कठीण होणें, निबर होणें. To become hard.

[सं. **दृढतर-दढअर-दढार-दाठर** (भा. अ. १८३२)]

दाढ स्त्री. मोठा दांत (कोपऱ्यांतील कवळीचा). A molar tooth.

[सं. **दंष्ट्रा, दाढा, दाढिका**; पा. **दाठा**; प्रा. **दाढा** (स्त्री.); अप. **दाढा**; आ. **दार्**; बं. **दाड**; हिं. **डाढ**; पं. **दाहरा**; लां. **दाहड**; सिं. **डाढा, डाठ**; गु. **दाढ.** ब्लोकनें तामीळ म्हणून हा शब्द दिला आहे. तामी. मल्या. **ताडेइ, तावडेइ** (गाल); कान. **दावडे.**]

दाढी स्त्री. मुखावरील हनवटीचे केंस, गाल किंवा त्यावरील केंस. The beard.

[सं. **दंष्ट्रा, दाढिका**; पा. **दाथिका**; प्रा. **दाढिआ**; देप्रा. **दाढिआ**; कु. **दाडी**; बं. ओ. **दाडी**; हिं. पं. **दाढी**; ल्हां. **डाढी**; सिं. **डाढी**; गु. **दाढी**; ने. **दारि.**]

दाढै(णें) अक्रि. दाढेंत सांपडणें, संकटांत सांपडणें. To be caught within teeth or in difficulty.

[सं. **दंष्ट्रा**; प्रा. **दाढा**; याकाम. **दाढैले**; **दाढा** (नाधा.); प्रभुचेया दादुलेपणाची सिग : दखौनि दाढैले दैत्य पतंग । नरुस्व. ३१०.]

^{1}दाणा पुं. धान्याचा कण. Grain.

[सं. **धान्यक > दाणअ > दाणा**; फा. **दाना**; अकामसा. **दाणी**=धान्यावरील कर वसूल करणारा अधिकारी, एक आडनांव. **दाणा**=चामड्यावर बारीक कणासारखी फुगोटी (ह्यावरून स्त्रीयोनीमधील दाणा.)]

^{2}दाणा वि. धूर्त, शहाणा, चतुर. Clever, shrewd.

[फा. **दाना.**]

दाणादाण स्त्री. पांगापांग, वाताहत, विस्कळित अवस्था. Disorder, commotion.

[फा. **दाना दाना.**]

दांड पुं. कणा, वेळूची लांब काठी. Axle, a long bamboo pole.

[सं. **दण्ड.** हा शब्द मराठींत येतांना त्याच्या पहिल्या स्वराची वृद्धि झाली; तशी त्याच्या अर्थांतहि वृद्धि झाली. अकामसा. **दाण्ड**=मोठा, लठ्ठ; **दाण्डपट्टा**=एक शक्तीचा, -काठी पेलण्याचा खेळ; **दाण्डका, दाण्डु.**]

दांडगा वि. मोठा, सशक्त, राकट, मस्त, अडदांड. Strong, robust.

[सं. **दण्ड > दाण्ड, दाण्ड+गा**; कान. **दट्टी**; पेकाम. **दाडगा** (मो. केका. ३५), **दांडगाई**=मस्ती, स्वैरवर्तन.]

दांडा पुं. आखूड दांडी, तुकडा, धरण्याची मूठ, सुळका, शेंडा. A handle.

[सं. **दण्ड**; कान. (**तद्भव**) **तण्डु**; हिं. **डांड, डांडा**; गु. **डांडो**; अकामसा. **दांडी**=वांसा; **दांडा**=सोट, काठी; **दांडू**=खेळण्याची लहान काठी; **दांडुका - की.-कें**=लहान काठी; **दांडिया**=बाजारांतील एक अधिकारी (विशेषतः अफू मक्तेदारापैकीं). बडोद्यास " दांड्या बाजार " म्हणून एक पेठ आहे.]

दांडोळी स्त्री. डांगोरा, दवंडी. Proclamation, announcement by the beat of drum.

[सं. **डिंडिम+ली.**]

दांडोळ स्त्री. ओळ, रांग. A line, a rank.

[सं. **दण्ड+आवलि.**]

दांत पु. तोंडांतील पांढरा दंत, दाढ. A tooth.

[सं. **दन्त**; पा. आ. **दन्त**; का. **दंद**; कु. आ. बं. **दाँत**; ओ. **दन्त**; हिं. **दाँत**; पं. ल्हा. **दन्द**; सिं. **डन्दी**; याकाम. **दांतौर** (= थंडीमुळें दांत खडखड वाजणें, नरुस्व.

४३८); **दांतीर** (उ. गी. १५९); अकामसा. **दांतखिळी** (याकाम. **दातिखिळी**-शिशु. ८४४); **दातखिळणें, दातण** (सं. **दंतधावन** ; प्रा. **दंतधावण**) = दांत घासावयाची काडी ; **दाता** = दांतांच्या आकाराचें टोंक. **दाताड** (सं. **दन्त्र** ; याकाम. **दांतौर, दांतिरी**) = दांतांची कवळी ; **दंतुर** (सं. **दन्त + उरच्**) = तुटलेला (किनारा), दांतासारखे फाटे बाहेर आलेला.]

दांतवण न. दांत घासण्याचें मंजन. Tooth-powder.
[सं. **दन्तपवनम्, दन्तधवनम्, दन्तवर्ण** ; प्रा. **दन्तधवण** ; पा. **दन्तपोणम्** ; प्रा. **दन्तवण** ; बं. **दांतन** ; हिं. **दांतवन, दांतन, दतिन, दातऊन** ; बं. गु. **दातवण, दांतण** (दांत घासावयाची काडी).]

दाता पुं. देणारा, उदार. A donor,
[सं. **दा** - **दातृ** ; याकाम. **दाता, दानी**-अमृ. १०-५]

दाद स्त्री. रोगविशेष, खरूज, इसब वगैरे त्वग्रोग. Ringworm.
[सं. **दद्रु** (स्त्री.) ; पा. प्रा. **दद्दु** ; बं. **दाद** ; ओ. **दादु** ; हिं. **दाद** ; पं. **दद्द** ; सिं. **डद्रु, डडरु** ; गु. **दादर.**]

दाद स्त्री. न्याय, तक्रार, फिर्याद, वर्दी, मुलाखत, मागणी, विनंती. Equity, justice, a complaint, a representation.
[फा. **दाद्** ; सिं. **दादु** ; पेकाम. **दाद** (राज. ५-१३७); अकामसा. **दाद लागणें, - घेणें** = तक्रार ऐकिली जाणें ; **दाद ना फिर्याद** = न्याय ना तक्रार.]

दादर न. जिना, पायऱ्यांचा मार्ग, सोपान. A bridge, a staircase.
[सं. **दर्दर** (?) ; देप्रा. **दद्दर** = शिडी ; गु. **दादर.**]

दादरा पुं. गायनांतील एक राग. A particular tone in music.
[सं. **दर्दुर** (बेडुक) ? ; पा.प्रा. **दद्दुरा** ; प्रा. **डेड्डुर** ; आ. **दादुरी** ; हिं. **दादुरी,** पं. **दादर** ; ल्हां. **डाड्डू,** सिं. **दादूर** ; (सं. **दर्दरिका** ; प्रा. **दद्दरिया** = वाद्यविशेष ; सिं. **दादुरु**).]

दादा पुं. थोरल्या भावाला बोलाविण्याचा शब्द. A term of address used for one's elder brother.
[आ. **दादा** ; बं. **दादा** (आजा) ; ओ. **दादा** (मोठा भाऊ, चुलता) ; हिं. **दादा** ; पं. **दाद्दा डाड्डा** (आजा) ; सिं. **डाडो** ; गु. **डादो** ; याकाम. **दादा** (स्मृस्थ. १६६) ; **दादला** = नवरा, पति (**दादा + ला, दादुला** = नवरा, घरांतील यजमान), **दादुलेपण** = नवरेपण ; याकाम. **दादुला** (ज्ञा. ६-१०८).]

दान न. देणें, देणगी. Giving, bestowing a gift.
[*IE.* Dā de; सं. **दा** ; *Av.* Dā-nu; *Arm.* Tamuk; *Gr.* Dnuos. सं. **दानम्** ; √**दा ३** दाने ; पा. **दानम्** ; प्रा. **दाण** ; पं. **दाण,** (पुं) ; सिं. **डाणु** (पुं) ; गु. **दाण** (न) ; कु. **दान्** ; ओ. **दान** ; गु. **दान** ; याकाम. **दानमान, दानोदक** (संकल्प सोडण्याचें पाणी) ; **दानी** (= **दादा**-नरुस्व. १३०) ; अकामसा. **दानपात्र** = दान देण्याला योग्य ; **दानशूर** = दान देण्यांत शूर ; **दानमान** (याकाम. **दानमान** = आदर, बक्षिस दिलेलें द्रव्य, सन्मान,) बहुत देखोनि दान-मान ॥ (नरुस्व. १३५).]

दानत स्त्री. शील, सद्वर्तन, सचोटी. Munificence, liberality, character.
[अर. **दियानत** = धर्म ; अकामसा. **दानतदारी, द्यानतदारी** = प्रामाणिकपणा ; फा. **दियानदारी** ; पेकाम. **द्यानतदारी** (राज. १४-५१) ; विजापूरच्या दरबारांत **दियानतराव** हा दिवाण होता.]

दाप(णें) सक्रि. दाबणें, दटावणें, जरब देणें, भीति घालणें, चिडणें. To press, to threaten.
[सं. **दभ् १०** भये, **दप् १** संदीपने, ६ उत्क्लेशे ; याकाम. **दापाती** (= दटावणारे-नरुस्व. ७१८) ; अकामसा. **दापिता** = दटावणारा, धमकी देणारा, हट्टी ; **दापित** = शिक्षा दिलेला ; **दाप्य** = शिक्षा देण्याला योग्य.]

दाब(णें) सक्रि. रेटणें, मारणें, धमकावणें, दटावणें. To press, to compress, to browbeat.
[*IE.* Dhebh ; सं. **दभ् १०** भये ; **दभ् १** हिंसायाम् ; प्रा. **दप्प** ; *Gr.* thap ; गु. हिं. बं. ओ. **दाब** ; सिं. का. **दब** ; पं. **दब्ब** (दाब) ; रुमा. **दब्** (ठोसा) ; अकामसा. **दाब** = दडपण, वजन, चाप ; **दाबादाब** = दडपण्याची क्रिया ; **दाबाड(णें)** = दाबून, - दडपून ठेवणें.]

दाबुक पुं. तबला. An instrument (in music).
[ध्वनिशब्द, **धबक** (?) ; याकाम. **दाबुक.**]

दाभ पुं. दर्भ. Sacred grass.
[सं. **दर्भ** ; प्रा. **दब्भ** ; गु. **डाभ, दाभ** ; पं. **दब्भ** ; हिं. **दाभ** ; का. **दर्बे. दर्भ** पहा.]

दाभण पुं. जाड सुई. A pack-needle.

[म. **दाभ** = दबणें ; कान. **दब्बण.**]

दाम पुं. पैसा, अडका, किंमत, मोल. Pice, money, price.

[**सं. द्रम्म**, प्रा. **दम्म** (पु) ; ग्री. **ड्राक्म्न, द्राक्मे** ; *Eng.* Dram.; याकाम. (म्हातार) **दाम.** (ली. च. १-५८). **दमडी** पहा. शब्द फार प्राचीन आहे. मूळ अर्थ **सोनें, सोन्याचें नाणें, सोन्याचा शिक्का** असा आहे. अर्थभ्रंश होऊन किंवा अर्थसमाहार होऊन त्याचा अर्थ **पैसा, सोनें नाणें, पैसाअडका** असा झाला आहे. दामाचें वजन १ तो. ८ मा. ७ सूर्ख इतकें असे. ह्याला प्रथम पैसा किंवा बहलोली म्हणत. एका बाजूस (टांकसाळीचें) गांव दुसऱ्या बाजूस शक असे. त्याचे हिशोबासाठीं २५ भाग असत. त्यांला **जेतल** म्हणत. कांहीं काळांत हें फक्त हिशोबी नाणें असे. अधेला म्हणजे अर्धा दाम, पावला म्हणजे चौथा हिस्सा दामाचा, दमडी म्हणजे दामाचा आठवा हिस्सा. अकबराच्या राज्याचा वसूल दामांत सांगत असत. दुसरें एक कोष्टक आहे. २६ कवड्या = १ दमडी, = तीन दाम. वीस दमड्या = १ आणा. २५ दाम = पैसा.]

दाम अ. चिरायु, दीर्घायु. A word expressing long life.

[अर. **दाम** = चिरायु होवो ; शिकामसा. **दामदौलतहूं** = त्याचें राज्य चिरायू असो.]

दामट(णें) सक्रि. धांवावयास,-पळावयास लावणें, खडकावणें, दणकावणें. To despatch, to urge on,

[सं. **द्रम् १** गतौ ; **द्रमट** (नाधा.)]

दामटी स्त्री. लहान भाकर, लहान चांदकी. A small cake or bread.

[सं. दम् (दाम + टी).]

दामाशाही-ई (वाटणी) स्त्री. सारखी वाटणी, सारखे भाग असलेली. Equal sharing.

[**दामाशाह** नांवाचा एक मनुष्य होता. त्याचें दिवाळें निघालें तेव्हां प्रामाणिकपणानें त्यानें आपल्या सर्व चीजवस्ताची आपल्या धनकोंमध्यें सारखी वाटणी केली. त्यावरून-सारखी वाटणी.]

दामोधर न. मंदिर, घर, माडी. A house.

[सं. **दामन्** (दम्पति पहा) ; याकाम. **दामोधर** (नरुस्व. ४५५).]

तूं सरिसें करी पां साजणी : धारा-दामोधर ॥ नरुस्व. ४१३

दायेपसाये पुं. किमतीपेक्षां अधिक द्रव्य, खुशीचें दान देणें. Giving more than the actual price out of favour.

[सं. **दानप्रसाद** ; याकाम. **दायपसाय** (धपू ४ ; ॾ. ४०) ; अकामसा. **दाय** = हक्कानें यावयाची मिळकत, पितृधन ; **दायाद** (सं. **दाय** ; पेकाम. **दाईज**) वारस, हक्कदार ; **दायविभाग** = दायभाग.]

दार न. प्रवेशाकरितां उघडझांपाच्या दोन फळया, दरवाजा, रस्ता, वाट. A door or gate.

[*IE.* Dhuer,-am ; सं. **द्वारम्**, √ दृ-अवयवे ; *Av.* Dvara ; *Gr.* Dera ; *Lat.* Forum ; *Slav.* Dviri ; *Lith.* Dvaras ; *Russ.* Dveri ; *Got.* Daur ; *HG.* Dor ; *Eng.* Door ; १ सं. **द्वारम्** ; देप्रा. **दुवार** ; पा. **दारम्** ; प्रा. **दुवार, दुआर** ; पपं.- **दुआर** ; कु. **द्वार** ; आ. **दुवार** ; बं. **दुयार** ; ओ. **दुआर** ; हिं. **दुवार्** ; पं. **दुआर.** = बारी. २ सं. **द्वार** ; प्रा. **दार** ; का. **दार** ; हिं. पं. **बार** ; लां. **बारी** ; सिं. **बारी** ; गु. **बार** ; फा. **दरवाझा.**]

दार न. बायको. Wife.

[सं. **दारा** ; (पुं. अ. व.) ; प्रा. **दार** (पुं. न.) ; शिकाम. **दार** (न. द.) ; (लिङ्गविपर्यय प्राकृत काळांतच झाला.)]

दार प्र. स्वामित्वदर्शक फारशी प्रत्यय. A termination showing possession.

[फा. **दार्दन्** = जवळ असणें, धरणें.]

दारभ्य अ. पासून. From.

[ह्या शब्दांत "**त् + आरभ्य**" असे दोन संस्कृत शब्द आहेत. पैकीं 'त्' हा पंचमीचा एकवचनी प्रत्यय आहे. त्याचा अर्थ "**पासून**" असा होतो. "**आरभ्य**" हे धातूचें ल्यबन्त रूप आहे. त्याचा अर्थ **आरंभून** असा आहे. दोन्ही शब्दाचा अर्थ **पासून** असा आहे. ह्या शब्दाला चुकीचा अर्थ रूढ झाला आहे. जुन्याकागद पत्रांत " **दारभ्य,** (= त्यापासून), आपण **आल्यादारभ्य** ' = आपण आल्यापासून ") असे प्रयोग आढळतात. '**जन्मादारभ्य**' हाहि प्रयोग रूढ होता. परंतु हा चुकीचा प्रयोग आहे.]

दारमदार पुं. करार, ठराव, तह. Agreement, negotiating terms.

[फा. **दार् मदार्** ; पेकाम. **दारमदार** (रा. १-१९).]

दारवठा पु. उंबरठा. The threshold.

[सं. **द्वार + वंठ** ; याकाम. **दारवठा** (धपू १६) **दारवंद** (शिशु ७६५) अकामसा. **दारवठेकरु** = द्वाररक्षण. वस्तीचा

सेवटीं स्वर्गांचे दारवठे : आरौते गंधर्वांचे वसैठे ॥ नरुस्व. २११
दारवठां ठिकाचीं कवाडें : घालितां गाजेति मेघाचेनि पाडे ।
दारवठेकार लोकपाळा सांगडे : सुदर्शनातळीं ॥ नरुस्व. ८७०
दारवंड (द्वार + वंड) = दरवाजा.]

दाराटी स्त्री. दरोडा. Dacoit.
[**दारवंठ.** याकाम. **दाराटी** (= दरोडा)–इंद्रियें घेतीं विषयाची दाराटी. भाए. ५०८]

दारिद्र्य न. गरीबी, कंगालपणा, निर्धनत्व. Poverty, want.
[*IE*. Dra, Dreu; सं. **दरिद्रा**, √**द्रा** (वैदिक) (**द्रवति, द्रव, द्रविण**); *Av*. Dravaya, Draonah; याकाम. **दळिद्र, दळीद्र** (द्द. पा. ५४); अकाम. **दरिद्र, दरिद्री** ; ग्रामीण. **दळिद्री.**]

दारु न. लाकूड, काष्ठ. Wood.
[सं. **दारु (देवदारु < तरु,** √ **द्रु**); झेंद. **दौरु, दारु** ; ग्री. **दोरु** ; गॉ. **त्रिउ** ; *Eng*. Tree ; लिथू. **देर्वा** ; अकामसा. **दारुहळद** = एक औषधि (सं. **दारुहरिद्रा** ; हिं. **दारुहाळदी**).]

दारू स्त्री. स्फोटक द्रव्य. Gun-powder.
[फा. **दारू.** गंधक, सोरा, कोळसा ह्यांचें प्रमाणशीर मिश्रण. ह्या द्रव्याचा शोध इ. स. १३१३ मध्यें लागला.]

दारू स्त्री. मद्य, मादक पेय, औषध. Spirituous liquor.
[फा. **दारू.**]

दाल पुं. एकदोन बोटें रुंदीचा नक्षीदार रेशमी कांठ, झालर, किनार. Riband, lace.
[फा. **दोआल्.**]

दालचिनी स्त्री. मसाल्यांतील जिन्नस, विशिष्ट झाडाची वाळविलेली साल. An article of spices, a kind of bark of a tree.
[फा. **दारूचीनी** ; बं. **दालचीनी** ; गु. **दालचीनी** ; का. **दाचीनी, दारचीनी, दारुचीनी** ; हिं. **दालचिनी** ; अकाम. **दाल्चिनी.** हा शब्द ऑस्ट्रिक असावा.]

दाली स्त्री. एक चिन्ह, तलवार अडकविण्याचा पट्टा. A sword, a sword-belt, a sign.
[सं. **दाल < दल** ; याकाम. **दळें** (= म्यान, तरवार– नरुस्व. ५८९); अकामसा. **दाली बांधणें** = जिकण्याला सज्ज होणें, जहागीर देणें.]

दाव पुं. जंगल, अरण्य. A forest.
[सं. **दाव** ; पा. **दाव** ; गु. हिं. **दाव** ; बं. **दाव** ; सिंह. **दव** ; अकामसा. **दावानल, दावाग्नि** = अरण्य जाळणारा अग्नि.]

दाव (णें) सक्रि. दाखविणें, दर्शविणें. To show.
[सं. **दर्शय** ; प्रा. **दाअ, दाव.** हा शब्द ग्रामीण आहे. परंतु उपपत्ति शास्त्रीय आहे. ग्रामीण उच्चार हे उच्चारभ्रंशामुळें आहेत, कां हे उच्चारभ्रंश प्राकृत भाषांच्या काळांतच रूढ झाले ? हा शब्द काव्यांतहि वापरतात.]

दाव (णें) अक्रि. मनांत बाळगणें, रक्षण करणें. To entertain in mind.
[सं. **दे** १ रक्षणे. आपणचि पासि दावी । इष्टांमित्रा दुरावी ॥ मग कवडाचि वाढवी । लोभी जैसा ॥ ज्ञा. १३-७९२]

दावण स्त्री. दावें, ओळ, रांग, (गुरें बांधण्याची) दोरी. A rope for tying the cattle with.
[सं. **दामनी** ; प्रा. **दामण,– णी,– वण** ; देप्रा. **दावण** ; बं. **दाम्नी** ; बि. **दाउनी** ; सिं. **डाणी, दामणु** ; हिं. **दावन्** ; पं. **दाउनी.**]

दावण स्त्री. वर्तुळाचा,–झग्याचा घेर, घोळ. The loose end of an apron.
[फा. **दामन्.**]

दावा पुं. द्वेष, वैर, मत्सर, भांडण, खटला, फिर्याद, डंख, हल्ला. Enmity, opposition, a suit.
[अर. **दआवा** ; गु. **दावो** ; अकाम. (**हेवा**) **दावा** = मत्सर, द्वेष (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

दावें न. गुरांना बांधण्याचा दोर, दावण. The tie-rope for cattle.
[*IE*. De, dei; *Alb*. Duai, del; *Lat*. (Re) dimio: सं. **द्यति, दामन्** ; पा. **दाम** ; प्रा. **दाम** ; का. गु. **दोमु** ; बं. **दाम, दामा** ; हिं. **दाएँ** ; पं. **दाउँ, डाउँ** ; सिं. **दालणू** ; गु. **दाम.** संस्कृत प्रातिपदिकापासून हा शब्द मराठींत आला नाहीं असें दिसतें.]

दास पुं. चाकर, नोकर, गुलाम. A servant, a slave.
[सं. **दास** = कनिष्ठ वर्णाचा मनुष्य. वेदांमध्यें **'दासवर्ण'** असा शब्द रूढ होता. शूद्राच्या नांवापुढें हा शब्द उपपद म्हणून वापरीत असत. ब्राह्मणास **शर्मन्**, क्षत्रियास **वर्मन्**, शूद्रास **दास** अशीं उपपदें वापरीत. गु. पं. का. हिं. **दास** ; सिं. **दासु** ; सिंह. **दस** ; ग्रीकलमा. **दस्** = बल्गेरियन.]

दासी स्त्री. सेविका, नोकरी करणारी स्त्री, गुलाम स्त्री, मोलकरीण, रखेली. A female servant or slave.

[सं. दास (स्त्री); याकाम. **दासी** (सेविका)-नरुस्व. ६४१. ह्या शब्दाच्या अर्थांत सामान्यीकरण झालें आहे. **दासरूं** (निन्दार्थक) = दासी.]

दास्त स्त्री. रक्षण, निगा, शुश्रूषा. Care of, heed unto.

[फा. **दाश्तन्** = रक्षण करणें.]

दास्तान न. धान्य साठविण्याची क्रिया. कोठार, कोठी. मालाची वखार, गुदाम. A granary, the store.

[फा. **दाश्तन्**, **तोशदान**; शिकाम. **दास्तान** (चित्र. ३५); पेकाम. **दास्तान** (खरे १२-६२४४).]

दाह पुं. आग, पोळ. Burning, great heat, scorching.

[*IE.* Dhegh; सं. **दह्**, **दघ्** (**निदाघः**, **दग्ध**); प्रा. **डह**, **दह**; **दहणें**; *Av.* dazh; *Gr.* Te; *Lat.* fav; *Lith.* degu; *Got.* dags; गु. सिं. पं. **दह**; हिं. **दाह**, **डाह**; ओ. **दाह**; का. **दझ्**; अकामसा. **दाहणें**, **दाहक** = अग्नि; **दग्ध**.]

दाहा वि. दहा. Ten.

[**दहा** पहा. पेकामसा. **दाहीजा** = दहा जणांचा समूह, टोळी; **दाहोत्रा** = दरसाल दरशेंकडा दहा व्याजाचा दर.]

दाहीण, **दाहा** वि. उजवा. Right.

[सं. **दक्षिण**; प्रा. **दक्खिण**; हिं. **दाहीण**.]

दाळ स्त्री. डाळिंबी, चुरी, डाळ. Split or broken pulse.

[सं. **दल**; √**दल्**.]

दिऊ पुं. दिवस. A day.

[सं. **दिवस**; देप्रा. **दिअ**; याकाम. **दिहा** (ज्ञा. १-१५८); **दिवस** पहा.]

दिक्-ग् स्त्री. दिशा, बाजू. Quarter, region.

[सं. **दिश्**; अकामसा. **दिगंत** = दिशेचा शेवट, क्षितिजाचा शेवट; **दिगंतर** = अन्य दिशा, लांबचा; **दिगंबर** = दिशा हेंच ज्याचें वस्त्र असा, नग्न; **दिङ्मोह**, **दिग्भ्रम**, **दिशाभ्रम**; **दिग्विजय** = चहूंकडून अजिंक्यपत्र आणणें.]

दिक्क् वि. दुःखी, कष्टी. Pained, tired out.

[अर. फा. हिं. **दिक्**, **दिक्क** = गांजलेला, त्रासलेला; **दिक्क** (स्त्री.) = काळजी, परवा.]

दिक्कत स्त्री. हरकत, अडचण, आक्षेप, तंगी, टंचाई. Objection, difficulty, suspicion, shortage.

[अर. **दिक्कत्**.]

दिख(णें) उक्रि. पाहणें, दिसणें. To see, to look.

[सं. **दृश्**; प्रा. **दक्ख**. दृश् ह्या संस्कृत धातूपासून प्राकृत दोन रूपें तयार होतात. एकांत ‘स्’ अवशेष राहतो व दुसऱ्यांत ‘ख्’ अवशेष राहतो. मराठी **दिस**, **दिख** हीं अनुक्रमें रूपें तयार होतात. अकामसा. **देखणा** (< **दक्खणीय** < **दर्शनीय**) = सुंदर.]

दिगर अ. आणखी, जास्त, पुढें, भलतें. Also, additionally, further, otherwise.

[फा. **दिगर्** = इतर.]

दिठा पुं. द्रष्टा, पाहणारा. A looker.

[सं. **द्रष्टा**, **दृश्**; प्रा. **दिट्ठा**; अकामसा. **दिठें** = पाहिलेलें.]

दिठी, **दिठिवा** स्त्री. दृष्टि, नजर. Sight.

[सं. **दृष्टि**; प्रा. **दिट्ठी**; याकाम. **दिठी** (ज्ञा. ६-३८९).] तें सांगितलें हें दिठी । पाहों ये तैसें ॥ ज्ञा. १६-२०४.

दिडका वि. दीड मापाचा. (Consisting of) one piece and another half.

[मरा. **दीड** + **का**; **दीड** < **अर्धद्वितीय** = एक सबंध आणि दुसरा अर्धा. अकामसा. **दिडकी** = दीड दुगाणी इतकें नाणें. (ह्यावरून सामान्यीकरण होऊन **पैसा** अर्थ झाला.)]

दिंड न. कापडाचें गाठोडें, पुरणाचा मोदक, खांब, खुंट. A bale of cloth, a lump of sweetmeat, a staff.

[कान. **दिण्डु**, **डिण्डु** = रास; अकामसा. **दिंडें**, **दिं(धिं)डका**.]

¹**दिंडी** दार, खिडकी, मोठ्या दरवाज्यांत केलेलें लहान दार. A wicket.

[कान. **दिड्डि**.]

²**दिंडी** स्त्री. एक वाद्य, विणा, त्यावरून मिरवणूक, मेळा. A particular stringed instrument, (hence) a procession.

^{3}**दिंडी** स्त्री. एक वृत्त. A metre.
[कान. दिडी.]

^{4}**दिंडी** स्त्री. डोणी, दगडाचें बादलीच्या आकाराचें भांडें. A stone-vessel (bucket-size).
[सं. **द्रोण** ; हिं. **दिंगी, दॆंगी, दोंगी** ; बं. **दिंगी** = लहान नाव ; अकाम. **डोणी, गिण्डी.**]

दिण्डें न. पक्वान्नविशेष, उकडलेला पुरणाचा मुटका. A kind of sweet-meat.
[कान. **डीण्डु** = रास. **दिंड** पहा.]

दिण्ण (लें) वि. दिलेलें. Given.
[सं. **दत्त** ; प्रा. **दिण्ण, दिण्णेलयं, दिन्नं** ; याकाम. **दिन्हली** (पाटण शिलालेख), **दिण्हले** (अ. का. त्र.). **दिन्ह (णें)** असें क्रियापदहि मराठींत रूढ आहे. हें विशेषतः जुन्या काव्यांत विशेष आढळतें. मराठींतील हें क्रियापद संस्कृत व प्राकृत **निष्ठारूपावरून** आलें आहे.]
कीं मागा राउळें दिन्हला कापुरू : तो तेला नुतरेंचि. नरुस्व. ४००

दिध (णें) सक्रि. देणें. To give.
[सं. **दा, धी** ; **ददा, दिधी** (अभ्यास).]

दिन पुं. दिवस. A day.
[सं. **दिन,** √ **दिव्** किंवा **दह्** ; याकाम. **दी** (= दिवस- शिशु. ७०); **दिवस** पहा. तो संपूर्ण रसू जाला पन्हरें दी : मृगांकु नांव ठेविलें वैदी ॥ नरुस्व. ५६४. अकामसा. **दिनचर्या** (सं. **दिन + चर्या,** √ **चर्**) = रोजची राहणी, दिनक्रम.]

दिनार पुं. न. एक जुनें नाणें. An old coin.
[सं. **दिनार** ; ग्री. **दिनारियस.** हें चांदीचें किंवा सोन्याचें असें. वजन सात द्राम व किंमत अजमासें पांच रुपये.]

दिप (णें) उक्रि. प्रकाशणें, अतिशय प्रकाशामुळें डोळ्यांना अंधेरी येणें. To dazzle, to be dazzled.
[सं. **दीप्** ४ दीप्तौ ; सं. **दृप्** ६ उत्क्लेशे, **दृभ्** १, १० भये. (सूर्यापुढें डोळे दिपतात.); अकामसा. **दिपव (णें)** (णिच्) = वर्चस्व चालविणें.]

दिपवाळी स्त्री. दिव्यांची रांग, हिंदूंचा एक सण. A row of lights, (hence) a Hindu festival in which lights are exhibited.
[सं. **दीपावलि.** कार्तिक महिन्यांतील ह्या सणांत दिवे लावतात.]

दिमाख पुं. तोरा, डौल, भपका. Airs, haughtiness, inflation.
[अर. **दिमाघ्.**]

दिम्मत स्त्री. सेवा, तैनात, व्यवस्था, जिम्मा, हवाला. Service, control, authority, trust, custody.
[अर. **ज़िम्मत्** ; शिकाम. **दिमत** (चित्र. १३०); पेकाम. **दिमत** (रा. १५-१७९); अकाम. **दिमती.**]

दिरंग पुं. विलंब, उशीर. Delay.
[फा. **दिरंग्** ; पेकाम. **दिरंग** (रा. १५-२२); अकामसा. **दिरंगाई** = उशीर, लांबड,-ण.]

दिल्-ल पुं. जीव, हृदय, अंतःकरण. The heart.
[फा. **दिल्** = जीव ; अकामसा. **दिलखुष** = समाधानी वृत्ति ; **दिलखुलास** = स्पष्ट मन, शुद्ध किंवा मोकळें मन ; **दिलजमाई** = मनाची मिळणी ; **दिलदार** = उदार, मोठ्या मनाचा ; **दिलदिलासा** = उत्तेजन, कौल ; **दिलभरी** = समाधान, खात्री ; **दिलरुबा** (फा. **दिल्-रुबा**) = एक प्रकारचें वाद्य ; **दिलावर** (फा. **दिलावर्** ; पेकाम. **दिलावर** (पदसेव. ८५) = धीर, शूर, धाडसी ; **दिलासा** (फा. **दिल्-आसा** ; शिकाम. **दिलासा** (सभा. १४) = आश्वासन, सांत्वन ; **दिलेर** (फा. **दिलीर्**) = धाडसी.]

दिल्ली स्त्री. हिंदुस्थानच्या राजधानीचें नांव, एक शहर. The name of a town in India, Delhi.
[फा. **दिल्** = वैभव, **दिल्ली** (कनिंगहॅम), **दिहली** (मुसलमानी शब्द), **दिलपत्** (पूर्वीचें नांव. पृथ्वीराजानें ठेविलें.)]

दिवटी स्त्री. लहान दिवा, मशाल. A torch.
[सं. **दीपवर्ति** ; पपं. **दिउटा** ; बं. **दिउटी** ; ओ. **दिहुटी** ; हिं. पं. **दिवट** ; सिं. **डिआटी** ; गु. **दिवेट** ; ने. **दिवट** ; याकाम. **दिवटा** (= मशाल धरणारा. ज्ञा. ७-४८), **दिवी** (नरुस्व. १०८)]
जैसी वैराग्याची वेत सोधणी : दिवी अनंगाची ॥ नरुस्व. १०८

दिवस पुं. दिन. A day.
[सं. **दिव्, द्यु, द्युत्** १ दीप्तौ. परंतु सं. **दह्** १ दाहे ; *Lith.* dég-ti ; *IE.* Dhegh ह्या धातूशीं संबंध आहे. **नि + दाव** = उन्हाळा. हा शब्द '**दह्**' पासूनच आला आहे. *Teu.* dagoz ; *Goth.* Dags ; *Lith.* Dégas (*hot-season*), Daga-(harvest) ; *Eng.* Day. हे परस्परांशीं संबद्ध आहेत. सं. **दिवस** ; पा. **दिवस** ; प्रा. **दिवस,**

दिवह, दिअस, दिअह ; का. **दिह** ; कु. **दिस्** ; पं. **दिह** ; ल्हां. **डेहे, दिहवार, दिहार** ; सिं. **डिह्** ; गु. **दिवस, दिस, दहाडो** ; याकाम. **दी** (= दिवस–शिशु. ७०), **दिहा** (अमृ. ६-६६), **दिहां दिहा** (दिवसोदिवस--नरुस्व. ३२७).]

दिवळी स्त्री. कोनाडा. A nitch.
[सं. **देहली** ?; देप्रा. **दिअली** = खांब, खुंटी किंवा फा. **दिवार्** ,–**ल्** = भिंत. **दिवार** पहा.]

दिवा पुं. प्रकाश देणारी वात, दीप. A wick, a lamp.
[*IE*. Di ; सं. **दि, दिव्** ४ प्रकाशने ; *Av*. Di ; *Gr*. Di ; *Lat*. Di ; सं. **दीप, दीपक** ; पा. **दीपो** ; प्रा. **दीव, दिवओ** ; अप. **दिवड** ; कु. **दिवो** ; ब. हिं. **दिवा, दिया** ; पं. **दिआ, दिवा** ; सिं. **डीओ, डीअथु** ; गु. **दीवो** ; ने. **दियो** ; सिंह. **दिवु** ; याकाम. **दिवटा** (= दिवा--ज्ञा.७-४८), **दिवी** (नरुस्व. १०८); अकामसा. **दिवई, दिवटा,–टी, दिवली.**]

दिवाण पुं. कारभारी, प्रधान. A prime minister.
[अर. **दैवान** ; फा. **दीवान** ; मूळ अर्थ–**अर्थ–सचीव** (प्रांताचा अथवा राज्याचा ; मुलकी कर गोळा करून सरकारांत भरणारा). हा शब्द मूळचा फारसी असून नंतर त्याला अरबी स्वरूप प्राप्त झालें. **दिवाण** = दप्तर, करारपत्रें, तहनामें वगैरेंचा संचय. प्रथम उमरनें **दिवाण** म्हणून अधिकारी वालीद बिनहिशामच्या सल्ल्यावरून नेमला. युरोप देशांत दिवाणी म्हणजे–समुद्रांतील जकात असा अर्थ समजतात. पेकामसा. **दिवाण–इ–आम** = सार्वजनिक दरबारची जागा ; **दिवाण–इ–खास** = बादशहाची खाजगी बैठकीची जागा ; अकाम. **दिवाणी** = मुलकी ; **दिवाणा** = मूर्ख ; हा शब्द निराळा.]

दिवाना वि. वेडा, पिसाटलेला, मूर्ख. Mad, foolish, silly, wild.
[फा. **दिवाणा.**]

दिवार-ळ स्त्री. भिंत. A wall.
[फा. **दिवार्–ल्** ; अकामसा. **दिवळी** = कोनाडा.]

दिवाळी स्त्री. दिव्यांची रांग, एक सण (दिव्यासंबंधीं). A row of lights, (hence) a Hindu festival with nocturnal illuminations.
[सं. **दीपावलि, दीपालि** ; प्रा. **दिवाली, दीवावली.** ब. **दिउयाली** ; ओ. **दिआली** ; हिं. पं. **दिवाली** ; सिं. **डिआरी** ; गु. **दिवाळी.**]

दिवाळें न. नादारपणा. Bankruptcy, insolvency.
[ह्या शब्दाचा संस्कृत '**दीप**' ; प्रा. **दीअ** ; म. **दिवा** ह्या शब्दाशीं संबद्ध आहे असें म्हणतात. जो नादार झाला आहे तो आपल्या घरांत, दुकानांत, खिडकींत शेणाचा दिवा लावून ठेवून तेथून निघून जातो. दिव्याच्या शेजारीं तो आपल्या हिशोबाच्या वह्या ठेवितो. तो गेल्यानंतर त्याचे धनको येतात व त्याच्या वह्या पाहून त्याला ऋण परत करण्याचें सामर्थ्य नाहीं असें समजतात. ह्या पद्धतीवरून हा शब्द रूढ झाला असावा. ही व्युत्पत्ति संशयास्पद वाटते. हिं. **दियालिया** (त्या माणसाच्या घराबाहेर दिवे टांगतात त्यावरून); **दिवाळखोर** = उधळ्या, दिवाळें काढणारा.]

[१]**दिव्य** न. कांहीं तरी चमत्कारिक प्रकार, शपथ, प्रायश्चित्त, कसोटींतून पार पडून जाण्याची क्रिया, कठीण परीक्षा. An ordeal, a fiery trial.

[२]**दिव्य** वि. दैवी, स्वर्गीय. सुंदर, सुरेख. Divine.
[सं. **दिव्य,** √ **दिव्** = प्रकाशने.]

दिशा स्त्री. दिक्, बाजू, रीत, प्रकार. Region, a direction.
[सं. **दिशा,** √ **दिश्** ६ आदेशे.]

दिस(णें) अक्रि. दृष्टीस पडणें, नजरेस पडणें. To appear, to look.
[सं. **दृश्** प्रा. **दंस, दीस** ; सिं. गु. हिं. ओ. **दिस** ; सिं. **डिस** ; पं. **डिस्स, दिस्स** ; का. **डेश** (पाहणें).]

दिह पुं. दिवस. A day.
[सं. **दिवस** ; प्रा. **दिअह, दीह** ; याकाम. **दी, दिह, दिवी** ; याकामसा. **दिहें दिहूं** (दिहादिहां) = दिवसेंदिवस.]
कृष्णपक्षीं चंद्र दिहादिहां तुटे । नरुस्व. ३२७

दिह न. गांव. A village.
[फा. **दिह्** = खेडेगांव ; पेकाम. **देहे.**]

दी पुं. दिवस. A day.
[सं. **दिवस** ; देप्रा. **दिओ** (दिवसः १७१.७); प्रा. **दिअह** ; गु. सिं. **दीओ.**]

दीठ, दिठी स्त्री. दृष्टि, नजर. Sight.
[सं. दृष्टि; प्रा. दिट्ठि; सिं. डीठि; हिं. दीठ; का. ढ़ेंठ; सिंह. दिटु; गु. दीठुं; याकाम. दिठी (=दृष्टि-ज्ञा. ६.३३); अकाम. दिठी, दीठ (दीठ लागणें).]

दीढ वि. एक आणि अर्धा. One and a half.
[सं. अर्धद्वितीय (?); द्व्यपार्ध; प्रा. दिवड्ढ; गु. दोढ; सिं. देढु; पं. डेढ, डिढ, डेउढ, डूढ; हिं. डेढ; बं. डेड; ओ. देढ; का. दोड्.]

दीन पुं. महमदी शब्द (इस्लाम,-मुसलमानी धर्मदर्शक). A war-cry among the Muhammadans.
[अर. दीन्=धर्म, श्रद्धा.]

दीन वि. गरीब, लीन, दुबळा. Humble, submissive, meek.
[सं. दीन.]

दीप पुं. दिवा, प्रकाश देणारी वस्तु. A lamp.
[सं. दीप, √दीप् ४ दीप्तौ.]

दीर पुं. नवऱ्याचा भाऊ. Husband's brother.
[*IE.* Daiver; सं. देवर; *Arm.* Taigr; *Gr.* Dare; *Lat.* Tevir; सं. देवा, देवर; पा. देवरो; प्रा. देवर=दिअर; आ. देवर्; बं. देउर; ओ. दिअर; हिं. पं. देवर्; लां. देओर्, देर्; सिं. डेरु; गु. देवर, दियरन.]

दीर्घ वि. लांब, मोठें. Long, deep.
[*IE.* Delgh; *Av.* dvrgh, daregle; पा. दिघ्घ; प्रा. दिग्घ, दिग्ग.]

दीस पुं. दिवस. A day.
[सं. दिवस; प्रा. दिअस; गु. दीस, दहाडो; सिं. डीहुं; पं. देह, दिह; का. दोह; रुमा. दिवेस्.]

दीक्षा स्त्री. पाठ, व्रत, नियमाचरण, एखाद्या व्रताच्या मंत्राचा स्वीकार. Initiation, a course of penance or of rites.
[सं. दीक्ष्; याकाम. दीक्षागुरु (दीक्षा देणारा-नरुस्व. ६३६.) (गुरु दोन प्रकारचे: एक दीक्षागुरु, दुसरा शिक्षागुरु); दीक्षित=याज्ञिक; याकामसा. दीक्षिणी=पतिव्रता स्त्री.]

कुमारी तापसा दीक्षिणी: वेधे भुललिया चक्रपाणी ।
नरुस्व. ३३५

दु वि. 'दोन' ह्या अर्थानें समासांतील पूर्वपद. The form assumed by दोन in compounds.
[सं. द्वि; प्रा. दु, दो (हेम. १-९४). फार्सीमध्यें हा शब्द 'दो' असा आहे. दोन पहा. अकामसा. दुआब=दोन नद्यांमधील प्रदेश; दुकल (याकाम. दुकळा=जोडी-नरुस्व. ७४७)=जोडी, गंजीफांच्या खेळांतील एक डाव, दुगाणी=तांब्याचें एक नाणें, जनावराची मागील तंगडी; दुघई (=दु+घई=रुंदी=) दोन खणांचीं व सोप्याची इमारत; दुघडी=दोन घड्यांची; दुजोरा=अनुमोदन, पाठबळ; दुटप्पी=दोहोंकडे ज्याचा कल आहे असा; दुतर्फ=दोन्ही बाजूंस; दुधारी=दोन धारा-पातीं असलेला; दुपट=दोन पटी असलेलें; दुपटें=दोन कपड्यांचें झालेलें; दुपदरी=दोन पदर असलेले; दुपार (सं. द्विप्रहर; याकाम. दुपाहर; दोपारी-दोन प्रहराच्या काळांत.) दोनप्रहर; =निपजलें अन्न तैसें दुपाहरीं कां येरें दिवसें-ज्ञा. १७-१५५; दुबक(णें)=कळवा घालणें; दुवार=दोन वेळां; डुबे, दुबे (=सं. द्विवेदी; एक उपनांव; त्रिवेदी, > तिवारी, त्रिपाठी; चतुर्वेदी > चोभे, चोबे); दुबेरजी=जमाखर्च लिहिण्याचा एक विशिष्ट प्रकार; दुबेळकें=दोन फांटे असलेली कांठी; दुभाग(णें)=दोन भाग करणें; दुभाष=दोन भाषा जाणणारा; दुरंगी=दोन निरनिराळे रंग असलेली; दुलग=दुरोख, दुटप्पी; दुसरा=दोन सरांचा-पदरांचा हार; दुसार(णें)=एकच क्रिया दुसऱ्यांदा करणें; दुसाला=दोन वर्षांचा; दुहिरी, दुहेरी (द्वि+सर=हर); दुहोतरा=दरमहा दरशेंकडा दोन टके व्याजाचा दर.]

दु अ. वाईटपणा,-निकृष्टपणा,-अभावदर्शक उपसर्ग. A particle showing '*bad*'.
[सं. दुर्, दुः, दुस्; प्रा. दु.]

दुआळ(णें) सक्रि. दुखविणें, पिडणें, पीडा देणें. To trouble, to annoy.
[सं. दु+आळी (=वाईट हेतु, इच्छा); याकाम. दुआळिली (शिशु. ५५८); दुआड; अकाम. द्वाड.]

दुकळ, दुकाळ पुं. दुष्काळ. Famine, times of scarcity.
[सं. दुष्काल:; गु. दुकाळ; हिं. दुकाल; अकामग्रा. दुकळ, दुकाळ.]

दुकान न. विक्रीचा जागा, पसारा, कारखाना. A shop.
[अर. दुक्कान्; फा. दुकान.]

दुःख न. कष्ट, अश्रु, पीडा, संकट, वाईट वाटणें. Affliction, sorrow, trouble, misery.

[*IE*. Deu, Du; सं. दुःखम्; पा. प्रा. दुक्ख; आ. हिं. दुख्; पं. दुक्ख्; ल्हां. दुख्; सिं. डुखु; गु. दुख; अकामसा. **दुख(णें)** = वेदना होणें; **दुखणाईत** = आजारी; **दुखरा** = अधु; **दुखरूं** = नाजूक; **दुखवटा** = दुःखपरिमार्जनाचा विधि; **दुखावणें** (सं. **दुःखापयति**; पा. **दुक्खापेति**; प्रा. **दुक्खावेइ**) = इजा होणें.]

दुखापत स्त्री. इजा, वेदना, रोग. An injury, a cut, a pain.

[सं. **दुःख + आपत्** (?); परंतु '**पत**' हा कसला प्रत्यय आहे ?]

दुग्ध न. दूध, पांढरें पाणी, चीक (ल.). Milk, milky sap.

[सं. **दुग्धम्**, (निष्ठा) दुह् २ दोहने.]

दुघड वि. हट्टी, मूर्ख. Stupid, dunce.

[सं. **दुर्घट**; प्रा. **दुग्घड**; किंवा म. **दु + वड** = दोनदां केलेलें.]

दुचमळ(णें) उक्रि. हलवून त्रास देणें, हिसळणें, ढवळणें. To shake or agitate.

[सं. **दुह्** १ अर्दने + **ह्मल्** १ चलने. द्विधातुसंयोग.]

दुजा वि. दुसरा, भिन्न, वेगळा. Another, second, separate.

[*IE*. Dvo; सं. **द्वितीय**; *Av*. Bitya; *Lat*. Secundus; प्रा. **दुतीज**, **दुतीअ**, **दुइअ**, **दुच्च**, **बिइअ**, **बिइज्ज**; गु. **बीजो**; सिं. **बीजो**, **बीओ**; का. **बीय**; पं. **दूज्जा**; हिं. **दुजला**, **दुजा**; प्राकृतमधील '**द**'-आदि बीजापासून कांहीं भारतीय भाषांत शब्द सिद्ध झाले व दुसऱ्या '**ब**'-आदि बीजापासून इतर कांहीं भाषांतील शब्द सिद्ध झाले. मराठींत '**द**' पासूनचे शब्द आहेत. **बीज**, **बेकें**, **बेकी** वगैरे शब्दांत '**ब**'-आदि बीज दिसतें; याकाम. **दुजा** = दुसरा (नरुस्व. ५८४); अकाम. **दुजें** = द्वैत; **दुजागी**, **जुदागी** = वेगळीक. (**जुदा** = वेगळा.)]

दुडदुड(णें) अक्रि. त्वरित पावलें टाकीत चालणें,-धांवणें. To patter, to trot.

[सं. **द्रु** १ गतौ, **द्रुतंद्रुतं** (भा. अ. १८३४); कान. **दुडी** = खपणें; अकाम. **दुडकी** (चाल), (कान. **दुडकी**).]

दुडी स्त्री. घागर, कळशी. A pitcher.

[कान. दुड = घागर, कळशी.]

दुडीवरी दुडी । चाले मोकळी गुजरी ॥ तु. गा. ११४७

दुड्डु पुं. पैसा, पैशाचें नाणें. A pice, a coin.

[कान. दुड्डु = तांब्याचें नाणें, १/३ आणा. कानडी प्रांतांत याची मूळ किंमत एक तृतीयांश आणा होती. कारण एका पैशाच्या ४ पै असा हिशेब करीत.]

दुड्डाचार्य पुं. प्रौढी मिरवणारा मनुष्य, लब्धप्रतिष्ठित मनुष्य. A term for a swaggerer.

[कान. **दोड्ड** = वडील, वृद्ध; सं. **दोग्घ्र** = भाडोत्री कवि (राजवाडे–इ. ऐ. १·३५६).]

दुणें वि. दुप्पट. Multiplied by two.

[सं. **द्विगुणेन**; पा. **दिगुण**; प्रा. **दुउण**, **दिउण**; आ. बं.**दुना**; हिं. **दूना**; म. **दूण**; गु. **दूणू**; सिं. **दुणो**; टर्नरनें दिलेली व्युत्पत्ति चमत्कारिक आहे. पं. **दूण** = खिंड; हिं. **दून** (खिंड); सिं. **दुणु**; पं. दुणा; हिं. **दुना**, **दूना**; बं. **दुणा**; सिं. **दियुण**; याकाम. **दुणावणें** (नरुस्व. १४७); अकाम. **दुणणें** = दुमडणें, दुणवटणें, दुणावणें.]

दुण्डा (पैसा) पुं. मोठा वाटोळा पैसा. A doubled pice.

[कान. दुण्डु, दुड्डु = वाटोळा; तांब्याचें नाणें (२० कास किंमतीचें).]

दुनिया स्त्री. जग, लोक, पृथ्वी. The world, mankind.

[अर. **दुन्या**.]

दुंदुभि पुं. नगारा, नौबद, चर्मवाद्य. A sort of kettle-drum.

[सं. **दुंदुभि**; **ध्वनिशब्द**, **दुम्**, **दुम्** असा ध्वनि उत्पन्न करणारें वाद्य.]

दुबळा वि. बलहीन, निर्बल, अशक्त. Poor, powerless, thin, meagre.

[सं. **दुर्बलिकः**; **दुर्बल**; प्रा. **दुब्बलिय**, **दुब्बल**; कुमा. **दुब्ला**; ब. हिं. पं. **दुल्ब्**; सिं. **दुंबळ** (**म्हातारा**); गु. **दुबळ**. सिं. **डुबिरो**, **डोबलो**. **दुर्बल** शब्दाचा एक अर्थ, तर **दुबळा** शब्दाचा दुसरा अर्थ; दोन्हींचें मूळ मात्र एकच.]

दुबाष पुं. दुभाष्या. An interpreter.

[हिं. **दुभाषीय्**; ता. **तूपाशी**; सं. **द्विभाषीय**.]

दुभ(णें) अक्रि. दूध देणें, पान्हवणें. To yield milk.
[सं. दुह्यते (√ दुह् २ दोहने); प्रा. दुब्भइ; सिं. पं. डुभ; याकाम. दभुणें (नरुस्व. ५६९), दोहणें (धार काढणें), दुभतें (नरुस्व. ५४८); अकामसा. **दुभती, दुपती** (सं. **दुग्धवती**; प्रा. **दूद्धवई, दुभणी, दुभाळु**). ह्या धातूपासून एक रूप '**दुभ**' व दुसरें रूप **दोह** अशीं सिद्ध होतात.]

दुभीन(णें) अक्रि. दूध देणें. To yield milk.
[सं. **दुह्,–दुभ्** १ अर्दने ह्याचें कर्मणि रूप.]

दुम, दूम स्त्री. शेंपूट, पुच्छ. A tail, an end.
[फा. दुम्; अकामसा. **दुमदारी** (फा. **दुम्दार**; पेकाम. **दुम्मदारी** (खरे ४–१८३७)), **दुमची** = तंगडी, लाथ, शेंपटाखालून जाणारा खोगिराचा वंद; **दुमाला, दुम्बला** = दुजोरा, पाठबळ.]

दुम, दूम वि. दुय्यम. Secondary.
[फा. **दूयुम, दूवुम**; पेकाम. **दूम** (राज. ८-९५).]

दुमड(णें) उक्रि. दुमटणें, घडी पडणें,–पाडणें. To fold, to double over.
[सं. **द्वि + मुड्** १ खंडने, **मृद्** ९ क्षोदे.]

दुमान,–णूं न. करट, गळूं. A boil.
[सं. **द्वि + मुड्–१** खंडने (?)]
तंव मनुष्या आणि मोन जातींतें। दुमानें करटें जाहालीं सकलातें ॥ खि. पु. १·१६·८७

दुमदुम(णें) अक्रि. घोष होणें, गाजणें, घमघमणें. To echo, to resound.
[ध्वनिशब्द, दुमदुमायते.]

दुमाला, दुम्बाला पुं. मागची बाजू, दुजोरा, पाठबळ (ल.). The rear side, the support.
[फा. **दुम्बाला**.]

दुमाला वि. दोन मालकाचा (गांव), वसुलाचा पूर्ण अगर अंशतः हक्क दिलेलें (वतन). (A village) having proprietorship divided in two.
[फा. **दुबाल**.]

दुय्यम वि. गौण, गौण प्रतीचा. Secondary.
[फा. **दुयुम्**.]

दुर्, दुस्, दुश् उप. 'वाईट' ह्या अर्थाचा उपसर्ग. A prefix indicating 'bad'
[*IE*. Dus. = हिंसायाम्; सं. **दुश्, दुस्, दुर** (**दुष्यति दुष्टः, दुष्कृति**); *Gr*. Dus; *Av*. Dus, Dur; *Teut*. Tuz; संसा. **दुरतिक्रम** = ओलांडण्यास कठीण; **दुरभिमान** = वाईट अभिमान; **दुराग्रह** (वाईट आग्रह); **दुराचरण** (वाईट आचरण); **दुराचार** (वाईट आचार), **दुरापास्त** (घडून येण्यास कठीण), **दुरित** (पाप), **दुरुक्ति** (वाईट शब्द, शिवी), **दुरुत्तर** (वाईट उत्तर), **दुर्गति** = वाईट गति; **दुर्गम** = जाण्यास कठीण; **दुर्गुण** = वाईट गुण, दोष; **दुर्जन** = वाईट मनुष्य; **दुर्दशा** = वाईट दशा–अवस्था; **दुर्दिन** = वाईट दिवस, अभ्रें आलेला दिवस; **दुर्दैव** = कमनशीब, अभागी; **दुर्निवार** = निवारण्यास कठीण, अपरिहार्य; **दुर्बुद्ध** = वाईट बुद्धीचा, मूर्ख, मूढ; **दुर्बोध** = समजण्यास कठीण; **दुर्भिक्ष** = दुष्काळ, महागाई; **दुर्भेद्य** = फोडण्यास–भेदण्यास कठीण; **दुर्मुख** = वाईट तोंडाचा, तुसडा, आंबट चेहऱ्याचा; **दुर्लक्ष** = लक्ष नसणें; **दुर्लौकिक** = अपकीर्ति; **दुर्वास** = कष्ट, त्रास, जाच; **दुर्विपाक** = वाईट परिणाम; **दुर्वृत्त** = वाईट आचाराचा; **दुर्व्यसन** = वाईट व्यसन; **दुश्चित्त** = खिन्न; **दुष्कर** = करण्यास कठीण; **दुष्कर्म** = वाईट कर्म; **दुष्प्राप्य** = मिळण्यास कठीण; **दुस्तर** = तरून जाण्यास कठीण; **दुस्साध्य** = सिद्धीस नेण्यास कठीण; **दुस्स्वप्न** = वाईट स्वप्न.]

दुरडी स्त्री. दुहेरी विणीची दुरडी, टोपली. A basket.
[कान. ?]

दुर(णें) सक्रि. दूर करणें, घालविणें. To keep away, to drive.
[सं. **दूर् + इ** १ गतौ; **दूर** (नाधा.).]

दुरंदेश,–शा,–शी वि. दूर दृष्टीचा; दूरवर विचार करणारा. Prudent.
[फा. **दूर् + अन्देशा**; पेकाम. **दुरंदेशा, दुरंदेशी**(पेद.)]

दुरवा, दुर्वा स्त्री. दूर्वा पहा.

दुराणी पुं. अफगाणांचा एक वंश. An Afgan race.
[फा. **दुर्रानी**.]

दुराही,–ई स्त्री. राजाच्या नांवानें घेतलेल्या हरकतीचा पुकारा. An expresssion used in prohibiting in the name of the king.
[पेकाम. **द्वाहीदुराही**; हिं. **दुराही**.]

दुरीदराज न. अ. परागंदा, पांगापांग, बेचिराखी, फार दूर. Far, afar, off.
[फा. दूर्+दराझ्=दूर, दूर कोठें तरी.]

दुरुस्त वि. यथायोग्य, निर्दोष. Right, correct.
[फा. दुरुस्त.]

दुर्ग पुं. किल्ला. A fort, a stronghold.
[सं. दुर्+गम् १ गतौ ; याकामसा. **दुर्गजीने**=किल्ला जिकणें ; **दुर्गपौळी**=तटाची भिंत.]

दुर्बिण-स्त्री. भिंगाचें एक यंत्र. A telescope.
[फा. दूर्बीन् ; पेकाम. दुर्बीण (=नळी. पे द. ९). एका नळीच्या तोंडास भिंग लावून लांबचे पदार्थ जवळ व मोठे दिसतात.]

दुऱ्हा अ. दूर. Far, afar.
[सं. **दूरम्** ; अकामसा. **दुऱ्हाव(णें)**=नाहींसें होणें.]
एऱ्हवीं स्वामिं दुऱ्हा असिका मी कैंवि उरे । ऋ.५३.

दुलई स्त्री. रूभरूं पांघरूण, कापसाचें पांघरण्याचें वस्त्र. A quilted garment.
[सं. दुल् १ चलने ; देप्रा. **दुल्लम्**=(वस्त्रम्), **दुकुल** (न.); प्रा. **दुअल्ल** (न.), **दुउल** ; याकाम. **दुउल** (<**दुकुल**-ऋ. पू. ४३१)]

दुला,-ल्ला,-ल्हा, धुल्ला पुं. ताबुताच्या दिवसांत कत्तलच्या रात्री हातांत नालपीर घेऊन उच्चारावयाचा शब्द. A war-cry among the Muhammadans.
[ह्याचा मूळ अर्थ "**दुल्हा**=नवरा". असा आहे. **हुसेन** हा त्याच्या विवाहाच्या अगोदरच्या रात्रीं **यझीद**कडून मारला गेला, ही कथा ह्या शब्दाच्या मुळाशीं आहे.]

दुवा पुं. सांखळींतील कडी. A link in a chain.
[फा. **दुओ** ; सिं. **दुआ**,]

दुंवा पुं. पत्त्यांतील दोनदर्शक पत्ता. The deuce in cards.
[सं. **द्विकः** ? ; देप्रा. **दुवअ** ; प्रा. **दुअ, दुवय**, < सं. **द्वयः**; पा. **द्वयो** ; हिं. पं. **दुआ**.]

दुवां, दुआ पुं. आशीर्वाद, ईश्वराजवळ केलेली प्रार्थना. A benediction, a blessing.
[अर. **दुआ** ; शिकामसा. **दुवागीर**=हितेच्छु, निष्ठावन्त ; **दुवागो,-गु** (का. **दुआगो**)=अर्जदार, विनंति करणारा.]

दुवाड वि. द्वाड, खोडकर, कठीण, अवघड. Mischievous.
[अप. द्वाड ; याकाम. **दुआळिली, दुआड** (उ. गी. २२८)]

दुश्मन, दुस्मान पुं. शत्रु, वैरी. An enemy.
[फा. **दुष्मन्**.]

दुष्ट वि. वाईट, पापी, नीच. Wicked, mean, bad,
[सं. **दुष्ट** ; अकामसा. **दुष्टाई, दुष्टावा**=दुष्टपणा.]

दुस न. वस्त्र, आच्छादन, आवरण. A garment, a cover.
[सं. **दूश्य**=तंबू (श.को.) ?]

दुसरा वि. पहिल्याच्या नंतरचा, निराळा, अन्य. Another, the second.
[सं. **द्वि+सर, दु+सर**.]

दुह(णें) उक्रि. धार काढणें. To milk.
[सं. **दुह्** २ दोहने ; याकाम. **दुहणें, दुभणें** ; अकामसा. **दुहणावळ**=धार काढण्याबद्दल मजुरी ; **दुहिता**=मुलगी.]

दुहवा वि. भाग्यहीन दुर्दैवी Unfortunate, miserable.
[सं. **दुर्भग > दुहअ > दुहवा** ; याकाम. **दुहवा** (दृ. पा. ८४).]

दुही, दुई स्त्री. भांडण. A quarrel, opposition.
[सं. **दुःख** ; देप्रा. **दूहलो** (=दुर्भग १७२·१६), **दुहं** (असुखम् १७२·९); प्रा. **दुह** ; (सुखपासून **सुह** सारखें) सिं. **डुहिल** ; पं. **डुहेली** (कठीण); फा. **दूई** ; शिकाम. **दूई** (न. द. १४४); पं. हिं. **दुहाई** (=तक्रार.]

दुहिता स्त्री. मुलगी, कन्या. A daughter.
[*IE*. Dhug(h); सं. **दुहितृ**, √**दुह्** ; *Av*. Dugedar ; *Nper*. Duxtar ; *Lith*. Dukte ; *Got*. Dauhtar ; *Arm*. Dustr ; *Eng*. Daughter.]

दूण स्त्री. दुप्पट, दुमड. Folding.
[सं. **द्विगुण** ; याकाम. **दुणी** (लीच. १-१२), **दुणावटे** (ज्ञा. ९-१८); अकामसा. **दुण(णें)**=दोन्ही कांठ एकत्र आणून शिवणें ; **दुणाव(णें)** अ. दुप्पट होणें.]
भाटासी बहु चमत्कारु जालाः तो वोळग देखोनि दुणावला ॥ नरुस्व. १४७

दूत पुं. निरोप्या, जासूद, नोकर, बातमीदार. A messenger.

[सं. दूत, √ द्रु, √ दु १ गतौ (?); *Lat.* Dautia; झें. दूत ; दूतिका = स्त्रीजासूद, मैत्रीण, दासी ; शिकाम. पेकाम. दूत = वकील.]

दूध न. दुग्ध, गोरस, क्षीर, पय. Milk.

[सं. दुग्धम् (निष्ठा), √ दुह् ; पा. दुद्ध ; पपं. दुद्ध ; आ. बं. दुध ; ओ. दुध ; बि. हिं. दूध ; पं. ल्हां. दुद्ध ; सिं. डुधु (दहीं); गु. दूद् ; ने. दुद् ; दुधाळ (< दुग्धालु, दुद्धाळ) = पुष्कळ दूध देणारी ; अकामसा. दुधाणी = दुधासारखा पांढरा चीक येणारी वनस्पति ; दूधभाऊ = एकाच दाईचें दूध पिणारे भाऊ, पाजणाऱ्या दाईचा मुलगा ; दुधवणी = पाणी मिसळलेलें दूध.]

दुधी पुं. दुध्या भोपळा. A kind of gourd.

[देप्रा. दुद्धिअ ; गु. दुधा.]

दूम पुं. दुम पहा.

दूर अ. अंतरावर, लांब. Far, afar.

[पूवै. Deu = दूर असणें ; सं. दूर ; *Gr.* Der; *Av.* Durae–ca, durat ; सं. दूर ; पा. प्रा. दूर ; आ. बं. दुर् ; ओ. दुर ; हिं. पं. दूर् ; सिं. डूरी ; गु. दूर ; फा. दूर.]

दूर्वा स्त्री. बारीक लहान टोंकदार गवत (गवताचा शेंडा, हें देवाला–विशेषतः गणपतीला वाहतात.). Thin grass blade.

[*IE.* Der(e)uā ; सं. दूर्वा ; *Lit.* Dirova; *Lett.* Dirwa ; *Eng.* Tare.]

दूष(णें) सक्रि. दूषण देणें, निन्दणें, न्यून काढणें. To find fault, to censure, to affix slur.

[सं. दूष् १ दूषणे ; अकामसा. दूषित = निंदित ; दूषण = दोष, निन्दा.]

दूह् स्त्री. मुलगी. A daughter.

[सं. दुहिता, √ दुह् ; ग्रामीण अकाम. धू = मुलगी.]

दृक्–गू स्त्री. दृष्टि, नजर. Sight, vision.

[सं. दृक्, दृश् १ दर्शने.]

दृढ वि. घट्ट, कठिण, निश्चित, कायम. Firm, solid, sure.

[सं. दृह् ; अकामसा. दृढाव(णें) = घट्ट होणें.]

दृष्ट वि. पाहिलेलें. Seen, observed.

[*IE.* Derk ; *Av.* Daresa ; सं. दृष्ट (निष्ठा, √ दृश्) ; अकामसा. दृष्टि = नजर, पाहण्याचें इंद्रिय (तद्भव-दिठी) ; दृश्य = दिसणारें, बाहेरील ; दृष्ट = दृष्टि, नजर ; दृष्टादृष्ट = नजरानजर (ह्या असल्या शब्दांतील मधील 'आ' हा द्वंद्व समासाचा असावा, "दृष्ट आणि दृष्ट, नजर आणि नजर" (इत्यादि) असा ह्याचा अर्थ आहे. हा 'आ' पूर्वी वापरीत असत. उदा. इन्द्रामरुतौ, इद्रावरुणौ, एकादश) ; दृष्टार्थ = दिसणारी वस्तु ; दृष्टोत्पत्ति = नजरेस (ह्या शब्दांत 'उत्पत्ति' शब्द विनाकारण वापरला आहे. शब्दाला विनाकारण प्रौढत्व द्यावयाची ही प्रवृत्ति आहे.) ; दृष्टांत = दाखला (ह्या शब्दाच्या अर्थांत '**विशेषीकरण**' झालें आहे.)]

दे(णें) सक्रि. अर्पण करणें, स्वाधीन करणें, हवालीं करणें. To give, to bestow, to grant, to deliver, to concede.

[*IE.* De, Do, Dou; सं. दा ; झें. दद्, दव ; *Lat.* da, do, Datum ; *Slav.* Daini ; *Lith.* Duti ; *Gr.* Didomi; सं. दा ; पा. दे ; प्रा. दे ; का. द्युनु ; कु. दिणो ; आ. दिव ; बं. देउया ; ओ. देवा ; हिं. देना ; पं. देणा ; ल्हां. देवण ; सिं. दिअणू ; गु. देवूँ ; अकामसा. देणें = कर्ज, ऋण ; देता = देणारा.]

देऊळ न. देवळ. A temple.

[१ सं. देवकुलम् ; प्रा. देवउल, देउल(न), देउलिआ; बं. देउल् ; ओ. देउळ ; हिं. देवल् ; सिं. देविली ; गु. देवळ ; २ सं. देवालय ; प्रा. देवालअ > देवळ ; असलाच एक **राजकुल** पासून उत्पन्न होणारा **राऊळ** हा शब्द आहे. पहिली व्युत्पत्तिच ग्राह्य.]

देख(णें) सक्रि. पाहणें. To see, to view.

[सं. दक्ष्यति ; पा. दक्खति (दोन्ही भविष्य काळ) (**प्रेक्षते** ह्याच्याशीं साम्य असल्यामुळें वर्तमानकाळीं अर्थ ह्या भविष्यकाळीं रूपाला मराठींत आला.) ; प्रा. देक्खइ ; कु. देखणो ; आ. देखिआ ; बं. देखा ; हि. देखना ; पं. देखणा ; लां. देखण् ; गु. देखवूँ ; आर्मे. लेख ; पोर्तु. दिक ; लिथू. झेरकोलास = आरसा ; ग्रीक. देरको ; हिब्रू. दिअर कैम = मी पाहतों ; याकाम. देंखणे (= पाहणारे, बुद्धिवंत–नरुस्व. ६६८) ; अकामसा. देख = दर्शन ; देखणा (दर्शनीयः) = चांगला दिसणारा, सुंदर, मोहक ; देखणें = जमिनींत पुरलेलें गुप्त धन, ठेवा, प्रकाश, दृश्य ; देखत = समक्ष, प्रत्यक्ष, डोळ्यासमोर ; देखतखेवों = पाहण्याबरोबर ; पहातांक्षणीं ; देखरेख = नजर, पाहाणी ; देखावा = चांगली पाहण्याजोगी जागा ; देखी = पाहणी ; वळण ; देखोदेखी = चढाओढ.]

देज न. वराकडून वधूपित्यास देणगी. Gift from the bridegroom to the father of the bride.

[सं. **देयम्**; प्रा. **देज, देज्ज**; गु. **देज**; सिं. **देजु** (हुंडा); हिं. **दाएजा, देजा**; का. **दाज** (हुंडा); हे शब्द फारशी '**जहेझ**' ह्याच्याशीं संपर्क होऊन झालेले आहेत असें ब्लोक म्हणतो तें चिन्त्य आहे. याकाम. **देज** (शिशु. ४४१).]

सता यागाचें देज दीजें: मग तें रूप सहस्रां डोळां भोगिजे ॥ नरुस्व. १९४

देठ, दैंठ पुं. दांडा (फळ व फूल वगैरेंचा), आधार, पाया (ल.). A pedicle or stem, (fig.) support.

[सं. **दृढ** (?)]

देणगी स्त्री. बक्षीस, दान, इनाम. A reward, a gift.

[फा. **देहंदगी, देहनगी**; पेकाम. **देहनगी** (राज ६-३१९), **देहन्दगी** (भाइसम. १८३६, अ ५७).]

देर, देरी पुं.स्त्री. उशीर, विलंब. Delay.

[प्रा. **दीहर**; फा. **देर्** = लांब; गु. हिं. बं. **देर**; सिं. **देरी**; पं. **डेर, देर**; पेकाम. **देरी** (राज. ७-८१).]

देव पुं. ईश्वर, देवता. God, goddess.

[सं. **देव**, √**दिव्** ४ प्रकाशने; झें. **दीव, दएव**; ग्री. **झ्यूस, थिआस्**; लॅ. **जोव्हिस**; स्ला. **दीना**; सं. **देव**; अप. **देव** (असुर); का. **देव्, दिव्**; पपहा. **देउ**; बं. **दे** (यक्षकिन्नर); आ. **दिश्र**; हिं. पं. **देउ**; सं. **देवता**; पा. **देवता**; प्रा. **देवअ**; अकामसा. **देवऋण**; **देवऋषि** (**देवरुषी**), **देवघर, देवताळा** (=फाजील कर्मठ), **देवदार, देवदासी** (=मुरळी), **देवनागरी** (लिपी), **देवमाणूस, देवयोनी, देऊळ, देवळ.**]

देवक न. वंशाधिष्ठातृ दैवत. A term for the deity or deities worshippd at a ceremony.

[सं. **देव+क** (स्वार्थें, 'समूह' अर्थदर्शक)-मंगल कार्यांच्या आरंभीं वंशदेवतेचें पूजन करतात.]

देवड स्त्री. क्रम, अनुक्रम, परंपरा. A close succession.

[सं. ?; अप. **दिअडी.**]

देवडी स्त्री. पडवी, ओटी (दाराजवळची). A vestibule or porch, a raised terrace.

[सं. **देहली**; याकाम. **देहुडी** (शिशु. ४२५.); अकाम. **दिवळी**(कोनाडा.)]

देवदार पुं. वृक्षविशेष. A kind of tree, a species of pine.

[सं. **देवदारु**; पा. **देवदारुखम्**; प्रा. **देवदारु**; कुमा. **द्यार.**]

देवन न. जुगार. Gambling.

[सं. **देवन**, √**दिव्** = द्यूत खेळणें.]

देवर पुं. नवऱ्याचा भाऊ, दीर. Husband's brother.

[*IE.* Daiuer; सं. **देवर, देवृ**; *Arm*, Taigr; *Lat.* Dever; *Slav.* Deveri; *Lith.* Dewris; अकाम. **दीर** पहा.]

देवळ न. देऊळ, देवगृह. A temple.

[**देऊळ** पहा. सं. **देवकुल**; प्रा. **देवउल, देऊल**; सिं. **देवली**; पं. **देवाला**; हिं. **देवल**; बं. **देउल.**]

देवाणघेवाण न. देवघेव, व्यवहार, व्यापार. Lending and borrowing.

[म. **दे + वाण, घे + वाण, वाण>वायनम्**=देव-ब्राह्मणांस अर्पण करावयाचा जिन्नस, द्यावयाचें वाण व घ्यावयाचें वाण, त्यांवरून सामान्यीकरण होऊन देवघेव असा अर्थ. '**देवलेन**' हा एक '**देवघेव**' ह्या अर्थीं शब्द खानदेशी भाषेंत रूढ आहे. तो हिंदी किंवा गुजरातीमधून आला असावा. जू. ब्लोक ह्याचा संबंध 'प्रा. **दिण्ण**; याकाम. **दिन्नला**' ह्याच्याशीं जोडतो.]

देवांग न. पीतांबर. A silk-garment.

[**देवांग**; याकाम. **देवांग**; काढिलीं देवांगें चांग रत्नें कनक भरिएले परिएळा ॥ (धपू. ३९).]

देवाज्ञा पुं. मृत्यु. Death.

[सं. **देव+आज्ञा.**]

देवी स्त्री. देवाची स्त्री, स्त्रीदेवता, फोड्या. A goddess, the small-pox.

[सं. **देवी**, √**दिव्**; **देव** पहा.]

देव्हडें वि. अधिक. More.

देव्हारा-रें पुं. न. देवघर, देवाचें आसन, देव ठेवण्याचें लाकडी नक्षीदार आसन. An apartment for family deities.

[सं. **देवगृह** (?); याकाम. **देव्हारें** (उगी. ५७); कीं ते परिमळाचें देव्हारें: वरि मन्मथाचें चवरें–नरुस्व. ४३७; **देव्हारसर** = देवघर. परतिलिए कस्तुरियेचिये वोवरी: तेथ कुंकुमाचा देव्हारसरी । नरुस्व; ५०८; **देव्हारबडुवा** = देवघरांत पूजा करणारा भटजी; (सं. **देवगृहभट**; **देवगृहबटुः**; याकाम. **देव्हारबडुवा**; शिकाम. **भडुआ** (पुं.)–ख्रिस्तपुराण व इतर शिवकालीन मराठी ख्रिस्ती वाङ्मयांत भडुअ, भडआ-वा असा शब्द येतो. देव आणि मनुष्य ह्यांमधील मध्यस्थ असा त्याचा अर्थ आहे. मराठी 'भडवा'= कुंटणकर्मी हा शब्द असा सिद्ध होतो काय? सवें हडपु सागळिया सुआरू: देव्हारुबडुवा शिवटा वेचकरू ॥ नरुस्व. ६९५); **देशाटन** = देशोदेशीं प्रवास; **देशांतर** = परदेश; **देशाभिमान** = स्वदेशाबद्दल अभिमान; **देशिक** = प्रवासी; **देशी** = घाटावरील, देशाचें; **देशीकार** = मराठी भाषेच्या स्वरूपाचें.]

देश पुं. प्रांत, प्रदेश. A country, a tract, a region.

[*IE*. Deik; *Av*. Daes; *Lat*. Dictio (दिष्ट); सं. **देश** √**दिश्**; झें. **दिश्**; ग्री. **देइक्**; लॅ. **दिकेरे**; गॉ. **तैहन**; जुनें जर्मन. **झीगआन**; लिथू. **झेंन्क्लास**; **देस** पहा. अकामसा. **देशधडी** = दुसऱ्या देशांत; **देशपांडे** = देशकुळकर्णी; **देशमुख** = देशांतील मुख्य वतनदार.]

देशक पुं. समूह. A crowd.

[सं. **देशक** (लोक); याकाम. **देशक**. (ज्ञा. प्र. ४१५ उगी. १६).]

जयांतळीं वोळगे देशकुः देवाच्चिया विदावंताचा । नरुस्व. २१४

देशाउर न. देशपर्यटण. Journey, travel in far off countries.

[याकाम. **देशाउर** (नरुस्व. १५१ दृ. पा. ८७).]

देस पुं. देश, प्रांत. A country, a tract.

[सं. **देश**; पा. प्रा. **देस**; का. **दीश्**; प. पं. **देस्**; कु. **देस**; बं. **देस्**; ओ. **देस**; हिं. **देस्**; सिं. **डेसु देह**, **देसु**; गु. **देस्**; **देशी** < सं. **देशिन्**, **देश्य**, **देशीय**; प्रा. **देसाय**; बं. ओ. **देसी**; हिं. **देसी**; अकामसा. **देसाई** (**देश** + **स्वामिन्**) = देशाचा स्वामी, देशमुख.]

देह पुं. शरीर, प्रकृति, अंग, आत्म्याच्यावरील आवरण; लेपन, म्हणून शरीर. The body.

[*IE*. Dheigh, Dhigh; सं. **देह**, √**दिह्** २, **देग्** २ अनुलेपने (**देह**, **दिग्धः**); *Av*. dig; *Gr*. Tei; *Lat*. Fig; सं. **देह**; प्रा. **देह**; गु. बं. **देह**; सिं. **डेहि**, **देहि**; पं. हिं. **देह** (स्त्री). अकामसा. **देहखंड** = साडेतीन हातांचें शरीर; **देहत्रय** = स्थूल, लिंग, कारण असे तीन प्रकारचे देह. **देहभान** = शुद्धि, जाणीव; **देहत्याग**, **-विसर्जन**, **-पात**, **प्रयाण** = पतन, मरण; **देहधर्म**, **देहस्वभाव** = नैसर्गिक स्वभाव.]

'**देह** पुं. गांव. A village.

[फा. **दिह्** = गांव; पेकाम. **देहाय** = गांवें (अ. व.); **देहझाडा** = खेडेगांवचें पत्रक; **देहाड** = शेत.]

दैत्य पुं. राक्षस, एक वन्य जात, देवांचे शत्रु. A demon, a *rakshasa*.

[सं. **दैत्य** = **दितीचीं** मुलें.]

दैन न. दैना. A distressful condition.

[सं. **दैन्य**; प्रा. **दैन्न**; हिं. **दैन**; का. **दीन्**.]

दैनिक वि. दिवसासंबंधीं, रोजचा. Pertaining to day.

[सं. **दिन** + **इक**; अकामसा. **दैनिक** = रोजचें वर्तमानपत्र (ल.).]

दैन्य न. गरीबी, हीन परिस्थिति. A distressful condition.

[सं. **दीन** (+ **य**), **दैन्य**. **दैन** पहा.]

दैव न. प्रारब्ध, नशीब. Luck, fate, fortune.

[सं. **दैव**, √**दिव्**; अकामसा. **दैवगति** = नशीबाचें वर्तन; **दैवदशा** = नशीबानें आलेली अवस्था; **दैवयोग** = दैवघटित; **दैववशात्** = दैवयोगानें; **दैववाद** = नशीबानें सर्व गोष्टी घडून येतात असें मत.]

दैवत न. देव, देवता. God, a deity.

[सं. **दिव्**; लक्षणेनें लाडका–आवडता मनुष्य. **दैवी** = देवासंबंधीं.]

दो,-दों वि. दोन Two.

[सं. **द्वि**; प्रा. **दो**; हिं. **दो**; अकामसा. **दोआब** (फा. **दु** + **आब्**) = दोन नद्यांच्या मधील प्रदेश.]

दोघे वि. दोन. Two.

[सं. **द्वियुग्मम्** > **दिउग्गम्** > देप्रा. **दोग्गम्**.]

दोडका पुं. दोडकीचें फळ, शिराळी. A kind of vegetable.

[कान. **दोड्डु** + **काई**.]

दोण स्त्री. डोण, डोणी, पाणी सांठविण्याचें लाकडी किंवा दगडी पात्र. A stone-vessel.

[सं. **द्रोणी**; पा. **दोणी**; गु. **दोणी, दोह्णी**; बं. **दुनी**; सिंह. **देण** (होडी); पं. **दूण** (दरी); का. **द्रन** (दलदल); याकाम. **दोडी, डोणी**; अकाम. **डोण, डोणी. द्रोण** (वाटी). **डोणी** पहा.]

दोन वि. संख्याविशेष, एक आणि एक. Two.
[*IE.* Dvo, Dvuo, Dvi = दोन ; सं. **द्वि, द्वौ, द्वे** ; *Av.* dva, duye; *Gr.* Duo ; *Lat.* duo ; *Lith.* du, dvi (f); *Slav.* dvs ; *Got.* Tvai ; *Alb.* Du ; *Let.* Du ; सं. **द्वे**>**दुवे** ; पा. **द्वे, दुवि** ; प्रा. **दुवे** ; अप. **दुइ** ; का. **दोयी** ; पप. **दूई** ; आ. बं. ओ. बि. **दुई** ; सं. **द्वे द्वौ** ; प्रा. **बे** ; अप. **बी** ; गु. **बे**; सिं. **दे** ; सं. **द्वौ** ; प्रा. **दो** ; पप. **दो** ; हिं. पं. **दो** ; सं. **द्वा** ; पा. **द्वा** ; प्रा. **दोण्णी**. मराठीचें मूळ प्राकृत **दोण्णी**.]

दोनी स्त्री. द्रोणी, जलवाहन. A vessel.
[सं. **द्रोण**, (?); प्रा. **दोण** ; याकाम. **दोनी** ; अकाम. **डोणी. दोण पहा.**]

तेथ तरिया तारूवें दोनी प्रव्हाणे नावा होडी वेडिया जंगे विस्तीर्णें ॥ नरुस्व. ७२०

दोंद न. मोठें पोट, (ल.) एकदम मिळालेलें सुख, संपत्ति, लौकिक, दर्जा. Big belly, (Fig.) riches, fortune.
[सं. **तुंद** ; प्रा. **तोंद** ; कान. **तुंदी** ; हिं. पं. **तोंद** ; गु. **दुंद** ; याकाम. **दोंद** (ऋपू. ५७१); अकाम. **दोंदील** (सं. **तुंदिल**) = मोठें पोट ; याकाम. **दोंदिल** (ऋ. १२९). **तोंद** पहा.]

ते आइकतां निगे दोंदः क्षीर-सागरासी ॥ नरुस्व. २१
वाढविती आनंद दोंदिलः ब्रह्मसुखाते ॥ नरुस्व. २७

दोर पुं. रस्सी, गुण, मोठी दोरी. A rope.
[सं. **दोरकः** (?) ; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें. मूळ शब्द देशी असावा. देप्रा. **डोर** (पुं.), **देवर** (= तन्तुः–१६९–१५), **दार, दोर** (= कटिसूत्रम्–१७०–१७); गु. **दोर** ; सिं. **डोरि** ; पं. हिं. **डोर** ; अकामसा. **दोरा, दोरी**; देप्रा. **दवरिया** = दोरी ; **दोरखंड, दोरवा** (कापडाचा प्रकार.)]

दोष पुं. वैगुण्य, उणीव, पाप, अपराध. Defect, demerit.
[सं. **दोष**, √ **दूष्**.]

दोष स्त्री. रात्र. The night.
[*IE.* Deus ; सं. **दोषा** ; *Av.* Davs ; *Nper.* Dos ; *Lett.* Paduse, Tor. **प्रदोष** ह्या शब्दांत मूळ शब्द मराठींत उतरला आहे.]

दोषें अ. साठीं. For.
[सं. **उद्देषेण** (?); याकाम. **दोषे** (=साठीं--ज्ञाप्र. ८९१).]

दोस्त पुं. मित्र, स्नेही. A friend.
[फा. **दोस्त**, √ **दोह फ्तन्**.]

दोह(णें) सक्रि. दुहणें, धार काढणें. To milk.
[सं. √**दुह्** ; पं. **डोह** ; सिं. **दुह** ; हिं. बं. **दोह** ; का. **दोय** ; सिंह. **दोव्. दुहणें**, **दुभणें** पहा.]

दोहरा पुं. वृत्ताविशेष. A kind of metre.
[सं. **द्विधा, द्विधारा** ; प्रा. **देहा** ; अप. **दोहा** ; आ. **दोहार** ; हिं. **दोहरा** ; गु. **दोहरो**.]

दोहद पुं. डोहाळा, गरोदर स्त्रीचें वांच्छित. The longing, desire (esp. due to pregnancy).
[सं. **दोहद** ; √ **दुह्** ; अकाम. **डोहाळा**.]

दोही, द्वाही स्त्री. दवंडी, घोषणा, जाहीर खबर. A proclamation.
[अर. **दुआ–ई** ; पेकाम. **दोही** (राज. १-२५५), **द्वाही दुराही**.]

दौत स्त्री. शाई ठेवण्याची कुपी, मसीपात्र. An ink-stand.
[अर. **दवात, दउत** पहा.]

दौलत स्त्री. पैसा, वैभव, संपत्ति, जिन्दगी. Riches, property, wealth.
[अर. **दौलत्** ; अकामसा. **दौलतज्यादा** = दौलत अधिक होवो–भरभराटीस येवो अशा अर्थाची ललकारी ; तमाशांत हाच शब्द नाचणारा पोर किंवा पोरगी उच्चारते व श्रोत्यांचा जयजयकार करते. त्यावरून त्याला द्यावयाचें उत्तेजन.]

द्यावा पुं. आकाश. The sky, the heavens.
[*IE.* Div, Diev ; सं. **दिव्, द्युस, द्यौ** ; *Av.* Daeva ; *Gr.* Zeus ; *Lat.* diu, div, Devs ; *Lith.* devas ; Ju (piter) ; सं. **द्यौस्पितर** ; ह्या पासून Diarnal, journal असे दोन्ही शब्द निघाले आहेत.]

द्योतवि(णें) सक्रि. प्रकाशित करणें. To light, to illuminate.

[सं. द्युत् १ प्रकाशने ; अकामसा. **द्योतक** (गमक), **द्योतन.**]

द्रव(णें) अक्रि. पाणी सुटणें, पातळ होणें, विरघळणें, वितळणें. To dissolve, to melt, to become liquid.

[सं. द्रु १ गतौ ; अकामसा. **द्रव** = रस, पाझर ; **द्राव** = पाझर ; **द्रावक** = द्रवविणारें.]

द्रव्य न. धन, संपत्ति, जिन्दगी, मूलभूत घटक, तत्त्व. A primary substance, wealth, riches, property.

[सं. **द्रव्य.** ह्या शब्दाच्या अर्थांत विशेषीकरण झालें आहे. मूळ अर्थ वस्तूंतील मूलभूत घटक, मूलतत्त्व, त्यावरून संपत्ति, धन, असा विशेष अर्थ बनला.]

द्रविड पुं. एक विशिष्ट लोक–समाज, प्रांतविशेष. The *Dravids* or their country.

[सं. **द्रमिड, द्रविड**<Dromiza ; सिंह. **दमिळ** ; *Gr.* Damir–ike = Tamil country. वर जें Dromiza असें मूळ दिलें आहे तें तामिल ह्याचेंहि मूळ असावें (सु. चतर्जी. NIA. Vol. 426.); अकामसा. **द्राविड** (सं. **द्रामिडे**) ; **तेलङ्ग, कर्णाट, महाराष्ट्र, केरल, तौलव** हे पंच द्राविड होत. कांजीवरम् येथील राजाला 'द्राविड' असें म्हणत. हें राज्य ४००–११०० पर्यंत होतें. कुमारील भट्ट दक्षिणेंकडील भाषांना आंध्रद्राविड भाषा असें म्हणतो. **द्रमिड, तिरमिड, तिरमिड, द्रमिल** अशीं इतर रूपें उपलब्ध आहेत. द्राविड ह्याचा अर्थ लोकविलक्षण, चमत्कारिक असा झाला आहे. आर्यांच्या विरुद्ध जें तें द्राविड असा मूळचा संकेत, त्यावरून द्राविडी कासोटा, द्राविडी प्राणायाम असे शब्द रूढ झाले. असाच एक तत्संबद्ध शब्द 'कानडी' असा आहे. कानडी म्हणजे समजण्यास कठीण, विचित्र, चमत्कारिक, असा अर्थ रूढ झाला आहे. 'मराठी' = सरळ, सोपें व त्याच्या विरुद्ध '**कानडी**' = विचित्र, समजण्यास कठीण, बुद्धीच्या पलीकडील, अगम्य असा अर्थ रूढ झाला. 'कानडा विठ्ठल, कानडें परब्रह्म' असा प्रयोग अभंगवाङ्मयांत रूढ आहे.]

द्राक्ष, द्राख न. अंगूर. Dried grape.

[*IE.* Derak–es ; सं. **द्राक्षा** (वेली) ; **द्राक्षासव** = द्राक्षापासून केलेलें आसव (द्राक्षा + आसव.)]

द्रुत वि. लवकर अल्पकाल. Soon, immediately.

[सं. द्रु १ गतौ, निष्ठा **द्रुत, द्रुति** = पळून जाणें, सुगंध, मकरंद ; **द्रुम** = झाड, वनस्पति.]

द्रोण पुं. पानाला चोय टोचून वाटीसारखें केलेलें पात्र. A hollow saucer (made of a leaf stitched.)

[सं. **द्रोण.**]

द्रोह पुं. द्वेष, वाईट इच्छा, वैर, शत्रुत्व. Enmity.

[*IE.* Dhreugh ; सं. द्रुह् ४ दोहने ; *Av.* druz, draoga ; *Gr.* thru ; *Lat.* frud.]

द्वंद्व न. जुळें, जोडी भांडण, युद्ध. A pair, a quarrel.

[सं. **द्वंद्व,** ह्या शब्दाच्या अर्थाची निष्पत्ति मोठी चमत्कारिक आहे. '**द्वे**' = दोन (द्विरुक्ति). अनुस्वाराची उपपत्ति कशी लावांवयाची ? याकाम. **दंड** (= भांडण, युद्ध–नरुस्व. २५८).]

द्वाड वि. वाईट, खट्याळ. Bad, mischievous.

[**द्वाड, दु + आट** (?) ; याकाम. **दुआड** (उगी २२८).]

द्वादश वि. बारा (संख्याविशेष). Twelve.

[सं. **द्वौ + दश, द्वा + दश,** '**द्वा**' मधील '**आ**' जो आहे त्याचा अर्थ 'अधिक' असा आहे. द्वंद समासांत हा प्रत्यय येतो. उदा. **मित्रावरुणौ, एकादश, द्वादश.**]

द्वामुषाण,–ष्यायण पुं. उपनयन संस्कारानंतर दत्तक गेलेला मुलगा. A boy invested with the sacred thread in his father's house and afterwards adopted into another family.

[सं. **द्वि + आमुष्य + अयन** ; दत्तक व मूळजन्माच्या अशा दोन्ही घरांतील उत्पन्नावर हक्क सांगणारा–हा मूळ अर्थ, त्यावरून दोन पिते असणारा, त्यावरून व्यभिचारसंतति–त्यावरून दोन तोंड्या–मनांत एक व बाहेर दुसरें अशा वृत्तीचा–अस्थिर, गैरविश्वासू असा ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे.]

द्वार न. दार, मार्ग, वाट साधन, वाट. A door, a means of approach.

[सं. **द्वारम्** ; याकाम. **दार, दारवठ, दारवंड, दारसंका** (नरुस्व. २११, ८७०, ४२०). **दार** पहा.]

द्वाही स्त्री. दाही पहा.

द्वि वि. संख्याविशेष, दोन. Two.

[सं. **द्वि** ; संसा. **द्वित्त** = दुप्पट, दुहेरी ; **द्वित्व** = द्विरुक्ति ; **द्विज** = दोनदां जन्मणारा–ब्राह्मण, पक्षी, दांत ; **द्वितीय** = दुसरा ; **द्वीप** = बेट.]

द्वेष पुं. मत्सर, हेवा, आकस. Spite, malice, rancour.
[सं. द्वेष, √द्विष्.]

द्वैत न. दुसरेपणा, भिन्नता, निराळेपणा, भेदभाव. Duality, diversity.
[सं. द्वैत.]

ध पुं. मराठी वर्णमालेंतील एकोणिसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण दन्त्य महाप्राण मृदु असून उच्चारस्थान दन्त आहे (त पहा.). The nineteenth consonant in Marathi alphabet. It is soft dental aspirate.
[सं. (आद्य ध) सं. ध ; प्रा. ध. धन–धण, धृ–धर, (मध्य ध) सं. ध, न्थ, ग्ध, ब्ध, र्ध, ध्र, द्ध ; प्रा. ध्ध. **अन्धःकार-अंधार, उद्धृ–उधर, दुग्ध–दूध, लब्ध-लाध, गृध्र–गीध, युद्ध–यूध,** अकाम. **ध** चा **मा** करणें = उत्पात–परिणामी बदल.]

धक,–ग स्त्री. जोम, उत्साह झळ, ऊष्णता, ताप, शेक. Ardor, the glow of fire, fire, heat.
[सं. दह् **२** दाहे, **दग्ध** = जाळ (ऋग्वेद); प्रा. **धगधग** ; बं. **धक्** (आचानक जाळ), **धकधक** (हृदयाची ऊड); ओ. **धक्धक्, धक्** (भीति); गु. **दक** ; कान. **दग.** टर्नरनें ह्या शब्दांसंबंधीं घोटाळा केलेला दिसतो. **धग्** (जाळ) आणि **धाक** (भीति) अशा दोन शब्दांचा घोटाळा केला आहे. हे दोन्ही शब्द निराळे आहेत. त्यांचीं मूळेंहि भिन्न आहेत. **धाक < धृष्** ५ धर्षणे, **धग < दह्** २ दाहे ह्या दोन भिन्न संस्कृत धातूंपासून मराठी दोन्ही धातु उतरले आहेत. याकाम. **धग** (= ऊष्णता), **धगी** (नरुस्व. ४११) ; अकाम. **धक, धग.**]

विकळता बहु सर्वांगीं: दामोधर वोतिजताय धगीं ॥
नरुस्व. ५३५

धक(णें) अक्रि. निभाव लागणें. To pull on some-how.
[सं. दक्ष् **१** वृद्धौ, शीघ्रार्थे; सिं. **धिकणु** = लोटणें.]

धकधक न. धडकी, भीति. Palpitation, fear.
[सं. धृष् **५** धर्षणे, **धक्** १० नाशने, **ध्वनिशब्द** ; हिं. **धकधकी** ; अकामसा. **धकधका** = धागधुग ; **धकधक(णें)** = छाती खालींवर होणें.]

धक्का पुं. ढकल, आदळ, जोरांत मार, हिसका, खराबी, हानि (ल.). A sudden push, a joint, shock, loss.
[सं. **धक्कय, धक्** **१०** नाशने ; प्रा. **धक्क** ; का. **दक** ; बं. ओ. हिं. ओ. पं. **धक्का** ; सिं. **धकु** ; गु. **धक्को, धिकों** ; सं. **धाक** = आधार, धीर, खांब ; अकामसा. **धकाव(णें)** = धक्का बसणें, नासणें, बिघडणें, पुढें रेटणें, लोटणें (नाधा.).]

धगधग(णें) अक्रि. जळणें, आतिशय पेटणें. To burn, to blaze.
[सं. दह् (द्विरुक्त); प्रा. **धगधग** ; अकामसा. **धग, धगणें** = जळफळणें, **धगटी** = आगटी ; **धगधग** (सं. **दह्दह्** (वीप्सा) किंवा अग्निज्वलनशब्दानुकरणम् ; अप. **धगधग** = रखरखित). **धक** पहा.]

धगड पुं. जार, भडवा, यार, उपपति. A gallant, a sweetheart, lover.
[सं. **धव** (?); हिं. **धगडा** ; याकाम. **धवड्ड** (शिशु. ४८९) ; अकामसा. **धगडी** = राख, रांड.]

जड प्रपच धगडा लागीं ॥ दावि. ७५

^{1}**धज** स्त्री ऐश्वर्य, डौल, दिमाख, ढब, हातोटी. Airs, grace, propriety, show.
[सं. **धृष्** **५** प्रागल्भ्ये ; **धृज्** १ गतौ. हिं. पं. **धज** (रीति); सिं. **धजु** ; गु. **धज** ; अकाम. '**ढव**'.]

^{2}**धज,–जा** न. स्त्री. पताका. A flag, a banner.
[सं. **ध्वज** ; गु. सिं. पं. **धज** (स्त्री); पं. **धजा** (स्त्री); हिं. **धजा** (पुं.); सिंह. **दद** ; का. **दोझ.**]

धज(णें) अक्रि. धैर्य होणें, सरसावणें. To come forward, to have courage.
[सं. **धृष्** ५ प्रागल्भ्ये ; हिं. **धज** ; गु. **धज** ; अकामसा. **धजरा** = दिमाख, नखरा.]

धट, धट्ठ वि. धाडसी, धीट, धैर्यवान. Bold, daring.
[सं. **धृष्टः** ; **दृढ** (?); प्रा. **धट्ठ, धिट्ठ** ; पं. **ढट्ट** ; **ढंट्टा** ; अकामसा. **धटिंगण** = आडदांड.]

धट पुं. तराजूची दांडी, कांटा, टेकू, निश्चय. The pole of a balance, the beam to which the scales are attached, prop, determination (fig.).
[सं. **धट** ; बं. **धट.**]

धटी, धट्टी स्त्री. नेसण्याचें वस्त्र (विशेषतः स्त्रियांचें, **धडीचें प्रावरण**). A particular silken garment (of females).

[सं. घटी ; बं. घडि = धोतर. कासे पीतांबराची घटी ॥ (भूपाळी गणपतीची). सुशोभितें नेसुनि पाह घट्टी (राजवाडे ग्रंथमाला, लक्ष्मी नारायण नाटक)]

घट्टाकट्टा वि. सशक्त, सामर्थ्यवान, धष्टपुष्ट. Hale and hearty, whole, sound, lusty.

[सं. **धष्ट, धृष्ट,** √ धृष् ५ धर्पणे (?); तुर्की. **कट्टा** = मोठा, लठ्ठ. दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु दोन भिन्न भाषांतील आहेत.]

१घड न. शरीर, शिराखेरीज शरीराचा भाग. A headless trunk.

[सं. **देह** (?); प्रा. **धड** ; देप्रा. **धड** ; कु. बं. **धड** ; ओ. **धड** ; हिं. **धड** ; पं. **धर्** ; सिं. **धरु** ; गु. **धड्** ; याकाम. **धड.**]

घाअे हाणौनि धड तुटे । यां परिमळाचे ॥ शिशु. ८४२

२घड न. संरक्षण, हित, सुख. Weal, welfare, soundness, happiness.

[सं. **धृति** ; पा. **धिति** ; प्रा. **धिइ** ; गु. **धडो.** हा शब्द व त्याची व्युत्पत्ति टर्नरनें दिली आहे. मराठींत ह्याचा अर्थ निराळा आहे. **धड** = सुरक्षित (सं. **धृतम्** किंवा सं. **दृढ** ; प्रा. **दढ** ; (वर्णविपर्ययानें) **धड**).]

धडक(णें) क्रि. हृदय हदरणें. To palpitate, to flutter.

[सं. **धृष्-दधृष्-दधृक्** (धडक) ; प्रा. **धडहडिअ** ; देप्रा. **धड** ; हिं. **धडकना** ; पं. **धडकणा** ; अकामसा. **धडक** = टक्कर ; **धडका, धडकी** (भीति), **धडकन्** ; **धडकावणें** = निर्भीडपणें बोलणें.]

धडधड(णें) अक्रि. भीतीनें छाती उडणें, **धडधड** असा आवाज होणें. To beat high, to palpitate.

[सं. **धाड्** १ विशरणे.]

धडधडीत अ. स्पष्ट, निक्षून, साफ उघड उघड. Downright, outright, plainly, manifestly.

[सं. **धड. धड** पहा.]

धडपड(णें) अक्रि. तडफडणें, तळमळणें. To roll about in pain.

[सं. **धृष् + स्फट्** , **धर्षस्फटा** = धडपड किंवा **अध** + **उत्पतनम्>धडपडणँ>धाडपडणें > धडपडणें** (भा. अ. १८३५)]

•धडपा पुं. वस्त्राचें फाटलेलें मोठें फडकें, फडका. A big piece (torn off from a cloth).

[फा. **दर्पा.**]

धडफुडा वि. पेटलेला, प्रदीप्त, पक्का, खरा. Blazing, buring, firm.

[सं. **धृष् + स्फुट्** (द्विधातुसंयोग). **धड** पहा.]

१धडा पुं. नेमून दिलेला पाठ, नियम, उदाहरण. A lesson, an assigned portion.

२धडा पुं. एक वजन (दहा शेरांइतकें), अभंड, पासंग. A weight of ten seers.

[सं. **धट** = ताजवा ; हिं. **धडा** = वजन, जोख ; याकाम. **धडा** ; गु. **धडो** = वजन ; सिं. **धडो.** तराजुआ निवृत्तीचा । धडा बांधौनि तीर्थांचा । जरी कांटा कलतात दैवाचा जेउता । राजमठ, क्र. ३२ महानुभाव वाङ्मयांत **धडा** = घडा, घागर असा एक शब्द आढळतो. तो लेखनदोष असावा.]

धडाड(णें) अक्रि. ‘धडधड’ असा आवाज होणें, कडाडणें. To crack and crumble, to roar.

[**ध्वनिशब्द.** किंवा **धाड्** १ विशरणें ; अकामसा. **धडाका** = आवाज, स्फोट, धडधडाट ; **धडाड, धडाडा, धडाधड, धडाधडा, धडाधडी** हे सर्व ध्वनिशब्दच आहेत.]

१धडी स्त्री. माप, वजन, एक विवक्षित वजनाचें माप. A large weight.

[सं. **धट** = ताजवा. हिं. सिं. **धडी** = पांचशेरी.]

२धडी स्त्री. धोतर, लुगडें, चिंधी. The border of cloth, hence a dhotee.

[सं. **धटी, धट्टी** ; बं. **धडी** ; अकामसा. **धडोत धडुत** = वस्त्र, नेसावयाचें वस्त्र.]

धडु वि. मठ्ठ, निर्बुद्ध. Dull, block-head.

[कान. **दड्डु** ; सं. **धष्ट, धृष्ट.** कानडीमध्यें तद्भव झालेला दिसतो.]

धण स्त्री. भर, आकस्मिक प्राप्ति, संमृद्धि, संपन्नता. A swell of good fortune, a windfall.

[सं. **धाणि, धन** ; प्रा. **धण, धणी** = तृप्ति, संतोष ; गु. पं. धण ; सिं. **धनु** ; हि. **डन** ; का. **दन** ; बं. **धन** ;

अकाम. दुसऱ्याची **धन,** (धण) करणें ; काय **धन** लावावयाची ती लावा.]

धणा पुं. धान्यविशेष, एक मसाल्याचा पदार्थ, कोथिंबिरीचें बीं. Coriander.
[सं. १ **धान्याक, धान** (?); प्रा. **धन्न**(न), **धणा** = धना ; २ सं. **धाना** ; प्रा. **धाणा** (स्त्री.) लिङ्गव्यत्यय. ३ सं. **धन्याक** ; हिं. **धनिया** ; बं. **धने** ; गु. **धाणा** ; तेलगु. **धाणीपापु**.]

^{१}**धणी** स्त्री. इच्छा, आशा, हौस, ठेवा, अकल्पित लाभ. Desire, craving.
[सं. **ध्राणि**. प्रा. **धणी** (= भार्या धणिया प्रियापर्याप्ति (१७८·३) (१७९·१५).]

^{२}**धणी** पु. मालक, यजमान. Master, owner.
[सं. **धनिन्** < **धनन्**. √**धा ३** निधाने.]

^{१}**धत्तुरा, धत्तूरा** पुं. एक वनस्पति, धोत्रा. A kind of thorny plant, *Datura*.
[सं. **धत्तूर** ; हिं. **धतूरा** ; गु. **धतरो**.]

^{२}**धत्तुरा** पुं. अभाव, फसवणूक. Knavery, roguery.
[सं. **धूर्तता** (?). वरील धत्तुरा शब्दाशीं ह्याचा कांहीं संबध नसावा. हे दोन्ही शब्द निराळे आहेत. श.को.कार वरील धतुरा शब्दाशीं जोडतात.]

^{१}**धन** न. संपत्ति, पैका, पैसा, संपत्ति, द्रव्य. Riches, wealth, substance.
[सं. **धनम्**, √ **धा** ; पा. **धनम्** ; प्रा. **धण** ; का. **दन** ; पपं. **धण** (कळप), लां. **धणाइ** (गुराखी); सिं. **धणु** ; गु. **धण** ; ने. **धन्** ; **धणी** (सं. **धनी, धनिकः** ; पा. **धनिको** ; प्रा. **धणिअ** ; आ. **धनी** ; बं. **धनी** ; हिं. **धनी** ; पं. सिं. गु. **धणी** ; अकामसा. **धनको** (धनिकः) = कर्ज देणारा सावकार.]

^{२}**धन** स्त्री. धनु पहा.

धनगर पुं. एक जाती, रानटी जात, मेंढपाळाची जात. A particular caste.
[सं. **दाङ्ग, धाङ्ग** = टेकडी (?), **धन + कर** अशी व्युत्पत्ति श.को.कार देतात. 'धन'-द्रव्य ह्या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. हा शब्द देशी असावा.]

धनवड पुं प्रांतविशेष. A cloth or texture named after a particular part of country.
[एका प्रांताचें किंवा गांवाचें नांव. त्यावरून त्या गांवांत तयार होणारें वस्त्र-विशेषतः लुगडें. हा देश नाशिकपासून पूर्वेकडे तीस मैलावर सुरू होई.]

धनी पुं. धणी पहा.

धनु स्त्री. धनुष्य, धनु नांवाची रास. A bow, the sign Sagittarius.
[सं. **धनुस्** ; अकाम. **धनुर्मास** (**धुंधुर्मास, झुंझुर्मास**) धनु राशींत सूर्य असतो तो काल. ह्या काळांत नैवेद्य देवास अगदीं सूर्योदयाच्या सुमारास दाखवून भोजनें करतात. भोजतांत खिचडी वगैरे पदार्थ असतात.]

धंदा पुं. व्यापार, उद्योग, व्यवसाय, वृत्ति. Trade or business, employment.
[सं. **धन + दा** (भा. अ. १८३३ अशी व्युत्पत्ति देतात, ती कृत्रिम आहे.) ; प्रा. **धन्धा** = लज्जा (?) ; आ. **धन्द** = काम ; ब. **धाँदा** ; ओ **धन्दा** ; हिं. पं. **धन्धा** ; सिं. **धन्धो** ; गु. **धन्धो**.]

धन्य वि. समर्थ, संतुष्ट, सुखी, नशीबवान, श्रेष्ठ. Able, capable, blessed, happy.
[सं. **धने भवः धन्यः 'धन'** पासून **धन्य** हा शब्द निघतो त्याप्रमाणें **धन्या** (= दाई व आवळा फळ) हा शब्द हि निघतो. **'धन'** म्हणजे **संपन्नता** ह्या अर्थाचा संबंध आहे. **धनगणं लब्धा**-पा. ४-४-८४]

धन्वंतरी पुं. सुरांचा देवांचा वैद्य, (त्यावरून लक्षणेनें) कुशल वैद्य. The physician of the gods, (hence) a skilful physician.
[सं. **धन्वंतरी**.]

धपक(णें) सक्रि. मारणें, 'धप' असा आवाज करून मारणें अथवा पडणें. To fall with a whop or soft and heavy sound.
[सं. **स्तंबघात** = धबका (पाणिनि); हा ध्वनिशब्दच आहे. अकामसा. **धपका** = धक्का, चपाटा, रट्टा ; **धपकन्** = (पडणें) धप असा आवाज होऊन ; **धपटणी** = थोपटणें ; **धपकाव(णें)** = रट्टा मारणें.]

धपट(णें), धपाट(णें) सक्रि. मारणें, चोपणें, ठोकणें. To beat, to thrash.
[सं. **अधः + पत्**, **-पट्** १ गतौ, व्यक्तायाम् वाचि; कान. **डुप** ; अकामसा. **धपाटा** = मार, प्रहार ; **धपटणी** = धोपटणें ; **धपधप** = धप असा आवाज होऊन ; **धप्पा** = रट्टा.]

धपाटें न. भाजणीची दशमी. A kind of bread or cake.

धबक(णें) सक्रि. मारणें, धपधप मारणें, बदडणें. To fall with a sound.
[सं. **स्तंबघातः** परंतु हा ध्वनिशब्दच अधिक वाटतो. अकामसा. **धबका**=वार, प्रहार, रप्पाटा; **धबकन-धबधबा-धबी** हे ध्वनिशब्दच.]

धबला पुं. जाडें भरडें कापड. A coarse and strong garment or cloth.
[कान. **दप्प**, **धप्प**=जाडें भरडें; अकामप्र. गांड फाटे पण धबला न फाटे.]

धमक(णें) क्रि. धपाटा मारणें, फुंकून वाजविणें, शिरा उडणें. To thump, to pommel, to slap.
[सं. **ध्मा १** शब्दे, किंवा **ध्वनिशब्द**, **ध्मायक** (नाधा)+ अकच्; **दमक**, < **दम**; हिं. **धम**; अकामसा. **धमक**= धैर्य, जोर, हिंमत; हिं. **धमका**; **धमका**=भीति, दहशत; **धमकाविणें**=दहशत घालणें.]

धमधमा पुं. दमदमा पहा.

धमनी स्त्री. शरीरांतील एक रक्तवाहिनी, शीर, नाडी. Any tubular vessel of the body, a vein.
[सं. **ध्मा**.]

धमनी स्त्री. बैलगाडी, सारवट जातीची आवरण असलेली गाडी. A bullock-cart with cover.
[गु. **धमण**=छप्पर. गुजराथेंत **दमणी बैल** फार जलद चालतात. त्यावरून दमक गाडी. मराठींत गाडीवाचकच शब्द आला.]

धमामा पुं. एक वाद्य, मोठा नगारा. A large kettle-drum.
[फा. **दमामा**.]

धमाव(णें) उक्रि. फुंकणें. To blow.
[सं. **ध्मा**.]

धमासा पुं. एक कांटेरी वनस्पति. A kind of thorny plant.
[सं. **धन्वयवास**, **धन्वयास**; गु. **धमासो**.]

धर पुं. धारण करण्याची शक्ति, तग, टिकाव, जम, धडी. Power of holding or retaining hold, endurance.
[सं. **धृ**.]

धर(णें) अक्रि. जमिनींत मूळ धरून कायम होणें. To get firmly planted.
[सं. **दृह् १** वृद्धौ.]

धर(णें) अक्रि. दुखणें, आखडून येणें. To ache.
[सं. **धृ १** अवध्वंसने.]

धर (णें) सक्रि. हातांत,-नें पकडणें, सांपडणें, धारण करणें. To have in hand, to hold, to grasp.
[सं. **धृ १** धरणे,**-धर**; पा. **धर**; प्रा. **धर**; का. **दरुन्**; कु. **धरणो**; आ. **धरिबा**; बं. **धरा**; हिं. पं. **धर्ना**; सिं. **धरणु**; गु. **धरवूँ**.]

धरण न. बंधारा. A band.
[सं. **धरणम्**; प्रा. **धरण**; आ. **धरनी**; हिं. **धरन्**; गु. **धरण**.]

धरणी स्त्री. पृथ्वी, जमीन, भूमि. The earth, the ground.
[सं. **धरणी**, **√धृ**.]

धरणें न. ऋणकोच्या घराच्या उंबऱ्यावर बसून कर्जाच्या फेडीची मागणी. Demand for the repayment of debt by sitting on the threshold of the debtor.
[सं. **धृ**=कर्ज देणें,-असणें; याकाम. **धरणें**.]
देवि मांडिलें अवस्थेसीं धरणें ॥ नरुस्व. ६६५

धरती स्त्री. पृथ्वी, जमीन. The earth or the ground.
[सं. **धरित्री**; कु. हिं. **धर्ती**; पं. **धरत**, **धर्ती**; सिं. **धरती**; बं. **धरती**; गु. **धर्ती**; याकाम. **धरत्री** (नरुस्व. २३६); अकाम. **धरती**.]

धरबंध पुं. नियय, बंधन, मर्यादा. A law, a rule, a limitation.
[मरा. **धरणें**, **बांधणें** ह्या दोन धातूंचा संयोग. पुढील शब्द पहा; अकामसा. **धरसांड**=हातांत घेणें व सांडणें; **धरसोड** (**उत्**+**धर्**+**उत्**+**सृज्**) **उद्धरोत्सृजा** (धरसोड)= कांहीं धरणें कांहीं सोडणें, चंचलता, द्विधावृत्ति. अष्टाध्यायी २-१-७२ सि. कौ.]

धरा स्त्री. पृथ्वी, जमीन, धरणी. The earth, the ground.

[सं. धृ = धरणें. **धरातल** = पृथ्वीतल.]

धर्म पुं. मनुष्य आणि ईश्वर ह्यांमधील संबंध, कर्मकाण्ड, वेदान्त व नीति ह्या त्रयींचा समुच्चय, आचार, नियम, कर्तव्य.

[*IE*. Dher; सं. धृ १ धरणे (धरः, धरिमन्, धर्तृ); *Av*. Der; *Gr*. Ther; *Lat*. For, fir; *Teut*. Feorm. ह्याच्या अर्थांत सामान्यीकरण व विशेषीकरण अशा दोन्ही क्रिया झाल्या आहेत. **दयाधर्म, भिक्षाधर्म, धर्मकर्म, धर्मास येणें** वगैरे प्रयोगांत निरनिराळे अर्थ रूढ आहेत. याकामसा. **धर्मकुढावा** = धर्मरक्षक (सं. **धर्म**, + **कुढावा** = रक्षक ; याकाम. **धर्मकुढाव**) कीं धर्मकुढावेनि शार्ङ्गपाणी । महापातकांवरी सांधीतली सांधनी । शिशु. ३५. अकामसा. **धर्मआई** = धर्माप्रमाणें आईची जबाबदारी स्त्रीकारणारी माता (ख्रिस्तिधर्माप्रमाणें) ; **धर्मपत्नी** = विवाहाची स्त्री ; **धर्मपिंड** = विगर हक्कानें मिळणारा पिंड, निपुत्रिकांना मिळणारा पिंड ; **धर्मपुत्र** = मानलेला मुलगा ; **धर्मभोळा** = अंधश्रद्धा असणारा ; **धर्मशाळा** = वाटसरूंच्या वस्तीचें स्थान ; **धर्मादाय** = दान, देणगी.]

धर्मशाला स्त्री. पंडित-विद्वानांच्या सभेचें ठिकाण, न्यायनिवाड्याचें ठिकाण, प्रवासी, यात्रेकरू उतरण्याचें ठिकाण, आजारी, पशू ह्यांच्या आश्रयाचें ठिकाण. An assembly of learned persons, a court of justice, a place for travellers to put up in.

[सं. **धर्म + शाला** ; ह्या शब्दाच्या अर्थामध्यें कसा फरक पडत गेला हें पाहणें मोठें मनोरंजक आहे.]

धर्ष(णें) अक्रि. धाडस करणें, धिटाई करणें. To venture.

[*IE*. Dher, Dhrs; सं. धृष् ; *Av*. dars; *Lat*. fas; *Slav*. dergu; *Russ*. derzki; *Lith*. drisli; *Goth*. gadaurs; *Eng*. dare.]

धव(णें) अक्रि. पळणें. To run.

[सं. धव् १ गतौ ; याकाम. **धव(णें)**.]

धावतेया अभ्रासवें । आकाश जैसे न धवे । भ्रमणचक्रीं न भवे । जैसा ध्रुवु ॥ ज्ञा. ३३-४८७.

धव, धवाड न. छिद्र, बिळ, भगदाड. A hole.

[सं. **ध्मा** ; याकाम. **धव.**]

मुष्यक करिती धवें ॥ भा. ए. ४९१

धवड पुं. घिसाडी, लोहार, ज्ञातिविशेष, अडदांड मनुष्य. A black-smith or iron-smith.

[सं. **ध्मा** ; याकाम. **धवड.**]

तो धवडू असे आवेशला । तेयांवरी तुम्ही राॆ चाला ॥ शिशु. ४८९

धवल,-ळ वि. पांढरा, स्वच्छ, शुभ्र. White.

[सं. **धवल**, √ **धू**, **धौत** ; गु. **ढोळूं** ; सिं. **धौरो** ; पं. हिं. **धौला** ; बं. ओ. **धोला** ; अकामसा. **धवलणें** = पांढरें करणें.]

धवलार,-ळार न. चुनेगची घर. A house with chunamed terrace.

[सं. **धवल + अगार** ; पं. **धौलर** (राजवाडा); याकाम. **धवळार** (ऋपू. ८९).]

हें चंद्रकांताचें धवळारः जैसे हिमवंताचें हिंवार ॥ नरुस्व. ४४२

धवळा, ढवळा पुं. गाण्याचा प्रकार. लग्नामध्यें म्हणण्याची ओंवी. A kind of metre.

[सं. **धवल** (यशस्); याकाम. **धवळ, ढवळ** (ध.पू. १)– महदंबेचे **धवळे.**]

धस पुं. अणकुचीदार पदार्थ, खुंटी, टोंक, धक्का, दगड, कपारी. A spike, a peg, a nail.

[**ध्वनिशब्द**. सं. **धस** ; प्रा. **धस.**]

धस(णें) अक्रि. पडणें, जोरानें, शिरणें, घुसणें, भोंक पाडणें. To fall, to burst or push through.

[सं. **धस्** ; प्रा. **धस** ; हिं. **धसना** ; गु. **धसनू.**]

धस्स न. भीतीचा आवाज. A sound of terror.

[सं. **धस्** ; प्रा. **धस** ; **ध्वनिशब्द.** अकामसा. **धसक** (देप्रा. **धसक**), **धसका** = आकस्मिक भीति ; **धसाडा** = जाड, खरबरीत, **धसाळ** = विसराळू.]

धा(णें), धाइणें अक्रि. तृप्त होणें, संतुष्ट होणें. To be satiated.

[सं. **ध्यै** १ तृप्तौ, **ध्रात** ; प्रा. **धाय** = तृप्त.]

धा(णें) अक्रि. राहणें, धरणें, ठरणें. To hold on.

[सं. धा ३ स्थितौ.]

धाए स्त्री. उपमाता, दाई. A wet-nurse.

[सं. **धात्री** ; प्रा. **धाई** ; याकाम. **धाए.**]

प्रकृती धाएं सूदली ॥ शिशु. ९१

धाक पुं. दहशत, दरारा, वचक, भय. Awe, dread.
[सं. **ध्राघ्, द्राघ्** १ सामर्थ्यें; अकामसा. **धाकधुकी धागधुगी** = भीति, काळजी ; **धाक(णें)** = भीति पावणें, गांगरणें, वचकणें.]
तैसा कौरवां आशेखां । धाकु तुझा । ज्ञा. २-२१५

धाकटा,-कुटा,-ला वि. लहान, कमी. Shorter, younger, smaller.
[सं. **ध्राक, थाक, थाकुटा** ; **थोटा** पहा. याकाम. **धाकुटी** (=सखी, दासी-नरुस्व. ८५, शिशु. १७६). सर्वे धाकुटियांचा थोवा : जैसिया पुतळिया साजिवां ॥ नरुस्व. ७८. अकामसा. **धाकुली** = धाकटी, लहान ; याकाम. **धाकुली** (नरुस्व. ६६).]

धागा पुं. दोरा, सूत, दोरी. Thread.
[सं. (?); हिं. **धागा** ; गु. **धागो**.]

धांगड(णें) अक्रि. धिंगडणें, नाचणें, उड्या मारणें. To leap, to caper.
[सं. (?) **ध्वण्** १ शब्दे, **घट्** १ चलने ; अकामसा. **धांगड** = जाडेंभरडें, खरबरीत ; **धांगडी** = दांडगी, बेमुरवतखोर, फटकळ, स्वैराचारी स्त्री.]

धाटणी, धाटी स्त्री. प्रकार, वळण, चाल, पद्धत. Way, style, fashion.
[सं. **धाटी**.]

धाटा वि. धट्ट, धट्टाकट्टा. Bold, blunt.
[सं. **धृष्ट** ; प्रा. **धट्ट**.]

धाटी स्त्री. वेसण, पाश, मार्ग, प्रकार. Snare, style, mode.
[सं. **धाटी** ; याकाम. **धाटी** (=वेसण, पाश-ज्ञा. १२-४७).]
तोंड फाडूनि काळ्या सूदली धाटी ॥ नरुस्व. ३०८.

धाड स्त्री. संकट, हल्ला, घाला, चाल. An assault, an attack, an impetuous overspreading.
[सं. **ध्वंस्**, (निष्ठा) **ध्वस्त, धाटी** ; प्रा. **ध्वत्त, धाडी** ; गु. सिं. हिं. **धार** ; याकाम. **धाडी** (=स्वारी, हल्ला-शिशु. ३४).]
कीं वीजूचे गर्भ गळिनले धरणी : धाडि गडदेचिया ॥ नरुस्व. ४८५.

धाड स्त्री. नाश. Destruction, assault.
[सं. **ध्राड्** ; प्रा. **धाड** ; म. (काय त्याला) **धाड** (झाली.)]

धाड(णें) सक्रि. पाठविणें, बाहेर घालविणें. To send, to despatch.
[सं. **ध्राड्** १ प्रेरणे ; प्रा. **धाड** ; देप्रा. **धाडी** (निरस्तम् धाडइ).]

धाडस न. धैर्य, विश्वास, जोर. Boldness, daring, confidence.
[सं. **धृष्**, **धृष्ट**, **दार्ढ्यम्** (?); पं. **डाडस** ; हिं. **ढारड, ढान्हस**.]

धाडी स्त्री. धाड पहा.

धांड(ढु,ढो)ळ(णें) उक्रि. हुडकणें, शोधणें. To search, to ransack.
[सं. **अधि+ढुड्, ढुंढ्** (रा. धा.) (यङ्लुङन्त-डाढंढ); प्रा. ढंढोल्ल.]

धातु स्त्री. वीर्य, रेत, (खनिज) पदार्थ (सोनें, रुपें वगैरे). Semen virile, a metal, a meneral.
[सं. **धातु**, √**धा** ; याकाम. **धातक्षय** (धातुक्षयाचा विकार-नरुस्व. ५६२); पेकामसा. **धातुपोषण** = बलवर्धक, (लक्षणेनें) तोंडपुजेपणा, खुशामत. पेशवेकालीन मराठी पत्रव्यवहारांत हा शब्द येतो.]

धातु पुं. क्रियापदाचें मूळ रूप. The root of a verb.
[सं. **धातु**, √**धा**.]

धात्री स्त्री. दाई, पृथ्वी. A wet-nurse, the earth.
[सं. **धात्री**√**धा** ; **धाए** पहा.]

धादांत अ. धडधडीत, उघड उघड. Plainly, manifestly.
['वेदांत' ह्या शब्दाच्या उलट अर्थाचा परंतु त्या शब्दाशीं उच्चारांत जुळणारा. मूळ अर्थ **वैयक्तिक सिद्धांत. दो** ४ अवखंडने-**दात्र** (ना.) (यङ्लुङन्त-**दादात्र** (?)]

धाधाव(णें) अक्रि. धांवपळ करणें, धांवत सुटणें. To run continuously.
[सं. **धाव्**, (यङ्लुङ) **धाधाव** ; याकाम. **धाधाव** (धावपळ करणें,-होणें.)]

धान न. तांदळाचें पीक. The rice-crop.
[सं. **धान्यम्** ; पा. **धन्नम्** ; प्रा. **धण्ण** ; का. **दाने** ; आ. बं. **धान्** ; ओ. **धान** ; हिं. **धान्** ; पं. **धाण्** ; सं. **धाना** (लाही).]

धांदल स्त्री. गोंधळ, गडबड, तारंबळ. Disorder, confusion.
[ध्वनिशब्द ; सं. **धाव्**, (यङ्लुङ्) **धावाधाव** (?) ; हिं. **धांधल्** ; सिं. **धांधील.**]

धांदा पुं. धंदा पहा.

धान्य न. ज्वारी, भात, गहू, बाजरी वगैरे. Corn, grain.
[सं. **धान्य,** √ **धा.**]

धाप स्त्री. दम, छाती उडणें. Quickened respiration.
[सं. **ध्मा, ध्मापय्** (?) ; बं. **धाप** (= उडी ; म. **झांप**) ; ओ. **धाप** (पायरी) ; हिं. पं. **धप्पा** (म. **धपका**) ; अकामसा. **धबका** (छातींत ‘ धपका ’ बसला) ; टर्नरनें दिलेले शब्द परस्परभिन्न आहेत. त्यानें संस्कृत धातु दिला नाहीं.]

धापस(णें) अक्रि. धापा टाकणें, धापलणें. To breathe hard.
[सं. **ध्मा, ध्मापय** ; याकाम. **धापस** (धापा टाकणें).]

धाबळी स्त्री. नेसावयाचें अथवा पांघरावयाचें लोंकरीचें वस्त्र. A sort of woollen cloth.
[कान. **दप्प, धप्प** ; **दहाबली** अशी लौकिक व्युत्पत्ति आहे. सं. **दूर्शम्, दूर्शवलयम्, दूश्यम्** ; पा. **दुस्सम्** ; अप. **दुसानि,** ह्या शब्दांचीं इतर भारतीय भाषांत ‘ **ध** ’– आदि रूपें सिद्ध होतात, तसेंच मराठी रूप सिद्ध झालें आहे काय ? लिङ्गभेद कसा झाला ? कां कानडी मूळ आहे ?]

धाबें न. मातीचा पेंडा घालून केलेलें छपर. A flat roof of earth.
[सं. **स्था** ; हिं. **धाबा** ; गु. **धाबुं.**]

धाम न. घर. A house.
[*IE.* Dhe ; सं. **धा ३** निधाने, **धामन्** ; *Av.* dhai ; *Lat.* de ; *Lith.* Izdas ; As. don ; *Eng.* Dome. वैसं. **दम** (दम्पती, जम्पती).]

धामण स्त्री. एक सापाची जात. A kind of reptile.
[सं. (?) ; हिं. **धामिन.**]

धामधूम स्त्री. गोंधळ गोंगाट. An uproar, a tumult.
[सं. **धाव्** (?) ; हिं. **धामधूम** किंवा फा. **दम** (श्वास)?]

धाम्या पुं. अव्यवस्थित, गबाळ्या, माध्यंदिन यजुर्वेदी ब्राह्मणासंबंधीं निन्देचा शब्द. A term of opprobrium used for a Yajurvedi brahmin.
[सं. **धर्म्य** ; प्रा. **धम्म** ; **धामगंड** (एक शिवी) ; सिं. **धाम** (स्त्री) ; पं. **धाम्मा,–धामांह्** (उत्सव) ; हिं. **धामीयां** (एक पंथ) ; सिंह. **दम** (धर्म) ; **दामितु** (चांगला).]

धाय^{१} स्त्री. टाहो, आकांत, हंबरडा (ह्याच्यापुढें येणारें क्रियापद–मोकलणें). A loud lamentation.
[सं. **हृदय = (द् + ह् = ध्) = धाय** (भा. अ. १८३३) ; ध्वनिशब्द. याकाम. **धाय** (शिशु. ५७५).]

धाय^{२}**,–या** स्त्री. उपमाता, धात्री, दाई. A wet-nurse.
[सं. **धात्री. धाय, धाए** पहा.]

धार(णें) सक्रि. अनुमानणें, कर्ज देऊं असणें. To infer, to owe.
[सं. **१ द्राह् १** स्थाने किंवा **२ अधि + आ + हृ १** हरणे, **३ धृ १** धारणे (मी पेढींत हजार रुपये धारतों.)]

धार^{१} स्त्री. पात्याचें पाणी. The edge of the blade of a weapon.
[सं. **धारा** ; पा. प्रा. **धारा** ; का. **दार** ; प. पं. **धार** (टेंकडी) ; बं. **धार्** ; ओ. **धार** ; हिं. पं. लां. **धार** ; सिं. **धारा** ; गु. **धार्** ; सिंह. **दार** ; अकामसा. **धारकरी, धारातीर्थ, धारराव** = तरवारबहाद्दर.]

धार^{२} स्त्री. लहान प्रवाह, ओतणें, झरा. A stream, a line oozing.
[सं. **धारा** (स्त्री) ; पा. प्रा. **धारा** (स्त्री), **धार**(न) ; कु. **धारो** ; आ. बं. **धार** (प्रवाह) ; ओ. **धार** ; हिं. प. लां. **धार** ; सिं. **धार** ; गु. **धार.**]

धारजिणा वि. वश, फल देणारा, उपयोगी. Favouring, propitious, kindly disposed.
[सं. **धृंजानः,** √ **धृ १** धारणे ; **धार्यंजीवन** = जगण्याला समर्थ.]

^{१}धारण स्त्री. दर, भाव, किंमत, पाड. Rate, market price.
[सं. **धृ** ; कान. **धारणि** ; गु. **धारण** = वजन.]

^{२}धारण न. धरणें, अंगीं बाळगणें. Holding, having.
[सं. **धृ**.]

^{३}धारण,-णा स्त्री. स्मृति, समजूत, कल्पना. Memory, mental retention.
[सं. **धारणी**, √ **धृ**.]

धारसा स्त्री. प्रवाहाची रीत, मार्ग, गति. The flow, the way.
[सं. **धारा** ; प्रा. **धार**. (न) ; देप्रा. **धार, धारा** (स्त्री) ; याकाम. **धारसा** (खळाळ-ज्ञा. ६·४७४) ; **धारसा**–वाहण्याची गति.]

क्षेत्री वेंझ घेति खांडेयाचा धारसा ॥ नरुस्व. २२३.

धारा पुं. वहिवाट, पद्धत, पाड, नियम, शिरस्ता, सारा. General course, practice, the usual rate, the settled assessment.
[सं. **धार** (**धृ**) ; प्रा. **धार** ; हिं. **धारा** ; गु. **धारो** ; अकामसा. **धारासभा** = नियम करण्याची सभा.]

धारातीर्थ न. रणांगण, युद्धभूमि, युद्ध, तरवारीचा वार.
[सं. **धारा**-तरवारीचें पातें, तीक्ष्ण कड. **धारा** हें एक तीर्थ मानिलें आहे ; कारण संमरांगणीं मृत्यु आला तर स्वर्ग मिळतो असा समज आहे. याकाम. **धारातीर्थ** (= रणांगण– नरुस्व. २४६)]

धारिष्ट न. धैर्य, बेडरपणा, साहस, धीटपणा. Fortitude, firmness, resoluteness.
[सं. **धार्ष्ट्य** (ह्या शब्दाचा अपभ्रष्ट उच्चार).]

धारी स्त्री. (धोतर–लुगड्याची) किनार, कांठ. A narrow border or a coloured strip along a cloth.
[सं. **धारा** ; प्रा, **धारी** ; हिं. **धारी**.]

धारें वि. लहान, आंखूड. short.
[सं. **धार** ; देप्रा. **धार** (लघु) ; याकाम. **धारा**, **धारसा** (प्रवाह).]

बळभद्रा धारा श्रीकृष्णरावो : जयाचा कडिवळु मदनदेवो ॥ नरुस्व. २९७.

धाव(णें) सक्रि. स्वच्छ करणें. To cleanse.
[*IE.* Dheu ; *Teut.* Tau ; *Sax.* Deav ; *Eng.* Dew ; सं. **धाव् १** गतिशुद्ध्योः याकाम. **धाव** ; अकामसा. **धावनी** = धुणी, पुसणी, चोळणी.]

पैं द्विजसेवे परौतें । धावणें नाहिं शूद्रांतें एवं चतुर्वर्णांचि उचितें दाविलीं कर्में ।

धांव(णें) अक्रि. पळणें, जलद जाणें. To run.
[*IE.* Dheu ; सं. **धाव्** ; *Teut.* Tau ; पा. **धाव** ; देप्रा. **धव्व** ; प्रा. **धाव, धा** ; का. **दाऊन्** ; पप. **धाऊनु** ; आ. **धाइबा** ; बं. **धाउया** ; ओ. **धाइबा** ; हिं. **धावना** ; पं. **धाउणा** ; गु. **धावूँ** ; ने. **धाउनु** ; याकाम. **धावडणें** (उगी. ५४०), **धावना** (नोकर,–शिशु ५०) ; **धावनी** (उपचार) ; अकाम. **धावणी,–णें** = साहाय्य, **धावा** = प्रार्थना ; **धावरा, धावरें**. हेमचंद्र हा शब्द **देशी** म्हणतो परंतु सं. ' **धाव्** ' शीं ह्याचा संबंध जोडतां येणार नाहीं कां ? कां हा ' **धांव** ' धातु हेमचंद्राच्या वेळेपर्यंत ' संस्कृत ' म्हणून समजला जात नव्हता. हेमचंद्राच्या कालानंतर त्याचा संस्कृतमध्यें शिरकाव झाला असावा. **धा**(< **धाव्**) असा प्राकृत धातु आहेच. **धावणें** (= पळणें) आणि **धावणें** (= स्वच्छ करणें) हे दोन्ही धातु एकाच मूळ धातूपासून आले आहेत. धावण्यामध्यें गतीचा संबंध आहे. त्यावरून **धार-धो धो** ह्यामध्यें प्रवाहाचा म्हणजे गतीचाच संबंध आहे. त्याचा परिणाम म्हणजे धुणें, धावक (परीट), दंतधावन ह्यांतील ' धुणें ' ही क्रिया. मराठींत अनुनासिक कसा आला ?]

धावना पवनु ॥ शिशु ५०. ऐसे जगळ दरणे यांचिया धावनिकां हाती देती ॥ ऋ. १३६.

धावडा पुं. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **धव, धातकी** ; पा. प्रा. **धव** ; हिं. **तव** ; पं. **धावा, धावी** ; गु. **धावडी** ; ने. **धडेरो**.]

धांवा पुं. प्रार्थना, विनवणी. Calling upon (a god) for aid, an invocation.
[मूळ शब्द ' **धांवणें** ' = मदतीस **धांवून** यावें म्हणून केलेली ईश्वराची प्रार्थना. **धांवा ! धांवा !** असे ओरडूनच मनुष्य दुसऱ्यास साहाय्याला बोलावतो त्यावरून.]

धाविन्न(णें) अक्रि. धांवणें. To run.
[हें रूप जुन्या कवितेंत वापरतात. मराठींतील भूतकाळ हा संस्कृत धातूच्या निष्ठारूपावरून तयार होतो. ' **न्न** ' हा एक निष्ठेचा संस्कृत प्रत्यय आहे. ' **धाव** ' ह्या धातूचें तसें निष्ठा रूप करून पुनः मराठींत त्याला धातुत्व दिलें आहे.]

धा(धां,-ढा)सळ(णें) अक्रि. गडगडून खालीं पडणें. To tumble down suddenly.

[सं. धस् ; पं. हिं. धस ; गु. धस, धस्स (ढकलणें).]

धास्त स्त्री. नाशाची कल्पना,–भीति. Dread, awe, impression of fear.

[सं. ध्वस्ति = नाशः किंवा **दहशत्** (अरबी) ह्याचें अपभ्रष्ट रूप.]

धिक्कार पुं. शाप, तिरस्कार, तुच्छता. Contemptuous treatment.

[सं. धिक् + कृ = शब्दे (किंवा करणे), **धिक्कार** ; पा. **धिक्कितो** ; प्रा. **धिक्कारिज्जइ** ; आ. **धिकार** ; बं. **धिक्कार** ; ओ. **धिक्कार** ; हिं. पं. **धिकार** ; सिं. **धिक्कारु** ; याकामसा. **धिकरणें**.]

आपुलें केलें फोकरीती । जगातें धिकरिती दाहें दिशीं पसरिति । स्पृहाजाल ॥ ज्ञा. १६·३२६

¹धिंग स्त्री. दंगल, दंगा, गजर. Commotion, tumult.

[**ध्वनिशब्द.** फा. किंवा परकी शब्द.]

²धिंग वि. उदार, खर्चिक, उधळ्या, बेबंद, तृप्त, संतुष्ट. Lavish of money.

[अकाम. **धिंगड**, **धिंगडणें** (उनाडक्या करणें), **धिंगा**, **धिंगाडा**, **धिंगाणा** (गोंधळ, दांडगाई), **धिंबडी** = चंगळ, विपुलता, दंगामस्ती.]

धिंड स्त्री. सार्वजनीक रीत्या केलेली शिक्षा, जाहीर अप्रतिष्ठा. Public exposure or ridiculed state.

[सं. **दण्ड** (?); अकामसा. **धिंडवडा** = जाहीर अप्रतिष्ठा. **धिंडका** = जाहीर अप्रतिष्ठा करण्याची मिरवणूक, (त्यावरून) ती व्यक्ति.]

धिप्पाड वि. उंच, मजबूत. Tall, high, lofty.

[**ध्वनिशब्द. मोठें हाड** ह्याशीं संबद्ध आहे काय ?]

धिमा,–म्मा वि. मंद, असंभ्रमित, गंभीर, शांत, सहनशील. Slow, grave, cool, patient.

[सं. **धीमत्** (?) ; कु. **धिमो** ; आ. बं. ओ. **धिमा** ; हिं. पं. **धीमा** ; गु. **धीमूँ**.]

धिया पुं. धैर्य, शौर्य, खंबीरपणा. Spirit, courage, firmness.

[सं. **धृति** ; प्रा. **धिइ**.]

धिरडें न. तिखट मीठ घातलेली आंबोळी. A kind of pancake.

[(?) कान. **इडरी** > **धिडरी** > **धिरडी** (श.को.)(?)]

धिंवसा, धिंसा पुं. भीति, भय, धैर्य, धीर. Fear, courage.

[सं. **अध्यवसाय** (भाअ. १८३४ राजवाडे). परस्पर. विरुद्ध असे दोन अर्थ कसे रूढ झाले ?]

धी स्त्री. बुद्धि. Intellect.

[*IE*. Dhei : सं. **धी** ; *Av*. di, dhai ; *Slav*. div ; *Lith*. dyv ; *Russ*. feodar.]

धीट वि. धैर्यवान, धष्ट, छातीचा. Bold, courageous.

[सं. **धृष्टः** ; प्रा. **धिट्ठ** ; अप. **धिट्ठ** ; ओ. **धीट** ; हिं. **ढीठा** ; गु. **धीठ्** ; सिं. **दिरहि**.]

¹धीर वि. गंभीर. Patient.

[सं. **धीर**, √**धृ** ; पा. प्रा. **धीर** ; आ. **धीर्** ; बं. **धीर** ; ओ. **धिरा** ; हिं. पं. **धीरा** ; सिं. **धीरु** ; गु. **धीरूँ** ; ने. **धीरो**.]

²धीर पुं. दम, सहनशीलता, शांतपणा, धर, आवरशक्ति. Patience, endurance, calmness, power of retention.

[सं. **धैर्य** ; प्रा. **धीर** ; गु. सिं. पं. **धीर** (स्त्री.) ; हिं. **धीर** ; का. **दीरी**, **दोरी** ; सिंह. **दिरि**.]

¹धु(णें) सक्रि. स्वच्छ करणें. To wash.

[सं. **धावति** ; पा. **धोपति**, **धोवति** ; प्रा. **धोवइ** ; **धुवई** ; कु. **धोणो** ; आ. **धोइबा** ; बं. **धोया** ; हिं. **धोना** ; पं. **धोणा** ; लां. **धावण** ; सिं. **धुअणु**. प्रा. '**धुव**' असल्यामुळें मरा. '**धू**' असें दीर्घान्त झालें आहे. अकामसा. **धुवण** = गहूं,–तांदूळ धुतलेलें पाणी.]

²धु(णें) सक्रि. धार काढणें. To milk.

[*IE*. Dheugh, Dhugh ; सं. **दुघ्**–**दुह्** (दुग्धम्, दुहिता) ; *Av*. dug ; *Arm*. Dostv ; *Lith*. Dvkte ; *Lett*. daug. *Russ*. doche ; *Eng*. daughter ; गु. पं. हिं. **धो** ; सिं. **धुअ** ; बं. **धों** ; **धु** ; सिंह. **दोव** ; रुमा. **थोव्** ; का. **डुव** (केर काढणें). २ सं. **दुह्** ; पा. **दुहति** ; प्रा. **दुहई** ; कु. **दूणो** ; बं. **दुहा** ; ओ. **दुहिबा** ; हिं. **दुहना** ; पं. **दुहणा** ; सिं. **डुहणु**.]

³धु(णें) सक्रि. कांपणें, हलणें. To shake.

[सं. **धू** ९ कंपने. उदा. हात **धुवून** पाठीस लागणें येथें धुणें–धावन स्वच्छ करणें याचा कांहीं संबंध नाहीं.]

धुई, धुकट स्त्री. न. धुकें. Mist, smoke.

[सं. धूमिका < धूम ; पा. प्रा. धूम ; कु. धुवाँ ; आं. धूँवा ; गु. धुई, धुमो, धुवो ; सिं. दूहा ; सिं. पं. धूं ; पं. हिं. ओ. धुआं ; बं. धुयां ; अकामसा. धुकटें (धुकट), धुकटावणें (धुरानें भरणें, व्याकूळ होणें.)]

धुक(ग)धुक(ग) स्त्री. नाडीची मंद गति, धडधड, साशंक जीवित. Palpitation (of pulse).
[सं. धुक्ष् १ जीवने, संदीपने ; धुगधुगाय ; प्रा. धुक्काधुक्क ; सिं. धकिधकि (धडधड) ; पं. धुकधुका ; बं. धुकधुकनि (धुकधुक, काळजी).]

धुडगूस पुं. गोंधळ, दंगामस्ती, दांडगाई, धिंगाणा. A violent tumult, a boisterous play.
[सं. धुर् १ हिंसायम्, + घृष् १ हिंसायाम्.]

धुणक(णें) क्रि. त्रासणें, हालणें. To get vexed.
[सं. धुनोति ; पा. धुनाति ; प्रा. धुणाइ ; आ. धुनिबा ; बं. धुना ; हिं. धुन्ना ; पं. धुणकणा ; सिं. धूणणू ; गु. धूणवुँ.]

धुंणी,-धूनी स्त्री. अग्नि, वैराग्याची,-योग्याची शेकोटी किंवा मंत्राग्नि. The smoke-fire of the Gosavis.
[सं. धूपनम् ; पा. धूपनम् ; प्रा. धूवण ; वं. धुनो ; हिं. धूनी ; ओ. धुनी ; पं. धूणी ; गु. धुणी.]

धुंणी,-नी स्त्री. धुण्याची जागा, धुणें, घासणें, निवारण, क्षालन, नाश. Washing, scouring.
[सं. धावनम्. धावनिका, √ धाव्.]

धुंड(णें), धुंडाळ(णें) सक्रि. तपासणें, शोधणें. To search for.
[सं. ढुंढ्=मार्गणे ; प्रा. ढंढाल, ढढोल्ल, ढंढुल्ल ; देप्रा. ढंढोल्लई (गवेषयति), हिं. ढूंढना ; सिं. ढुंडणु ; संस्कृतमधील धातु हा नंतरचा असावा. तें प्राकृतमधील धातूचें संस्कृतीकरण असावें असें वाटतें.]

धुताडा,-रा पुं. वञ्चक, फसव्या, तोतया. A general cheat or impostor.
[१ सं. धूर्तकारः ; पा. प्रा. धुत्त, धुत्तार ; हिं. धूतना ; लां. ढुट्ट ; २ सं. दुष्टः ; पा. प्रा. दुट्ठ ; गु. धुतारो, सिं. धुत्, धुटो ; पं. ढुटा ; हिं. धुता ; सिं. धुतणु ; गु. धूतवूँ ; अकामसा. धुतार(णें)=फसविणें.]

धुधुव(णें) अक्रि. धुत्कार-फूत्कार टाकणें. To make a hissing sound.
[सं. धुत् + कृ (द्वित्व) ; याकाम. धुधुवाए (नरुस्व. २५१) याकाम. धुवाटी (उगी. ६७१) धुधुवाटा = फूत्कार, धुधुकार.]

धुधुळिया वि. अंगार धूळ उडलेला. Having dust on.
[सं. धूलि या शब्दाचें अभ्यस्त रूप ; याकाम. धुधुळीये (उगी. ४३७)]

धुन(नू)क स्त्री. चव, छटा, चुणूक. A smack, taste, flavour, foretaste.
[सं. ध्वनि किंवा धनुस्पासून (इंद्रधनुस्'मध्यें ज्याप्रमाणें निरनिराळ्या रंगाच्या छटा असतात त्याप्रमाणें 'छटा' असणारे), त्यावरून 'छटा' हा अर्थ.] ·

धुंद वि. गुंग, गर्क, मग्न. Absorbed in, lost in.
[सं. धूमधि ? (धूमस्य धिः = धुराचा लोट) ; अकामसा. धुंदाई = धुंदाट ; धुंदावा = तर्क, अंदाज ; धुंदी = कैफ, निशा.)]

धुंदर, धुंधुरु पुं. काजवा. A fire-fly.
[सं. धुंधुमार = एक किडा, इंद्रगोप.]

धुंदुमुंदु-धुंदुक अ. झुंजूमुंजू. Dimly, in a light of twilight.
[धुंद (द्विरुक्त), धुनुकधुनुक = पहाट समय, प्रभात.]

धुंप(णें) अक्रि. धुवून जाणें, वाहून जाणें, खंगणें. To be washed or cleansed.
[सं. धु-धू (णिच्).]

धुंप(णें) अक्र. हळूहळूं पेटणें, धमसणें. To smoulder.

धुपाव(णें) अक्रि. वाफा बाहेर टाकणें. To fume (Macdonald 399).
[वैसं. धूपाय.]

धुपाट(णें) न. धूपपात्र, धूप जाळण्याचें भांडें. An incense-pan, a censer.
[सं. धूप, <धूम<धू १ कंपने.]
तिया धुपाडिया न परते वेगी ॥ नरुस्व. ५५०.

धुपाडी स्त्री. धुराचें भांडें. खूपसा धूर. Smoke.
[सं. धूप ; याकाम. धुपाडी (नरुस्व ४७३) ; अकामसा. धुपारती = धूप लावून केलेली आरती ; धुपेल = सुवासिक तेल (उदापासून काढलेलें).]

धुमकुस स्त्री. गर्दी, नृत्य. A tumultuous merriment.

[याकाम. **धुमकुस.**]

आतां सुमन देतु अवधानः धुमकुसे साहित्याचेन। नरुस्व. ४३

धुमशान, धुमश्चक्री स्त्री. पदार्थांची विपुलता, दांडगाई. Overflowing abundance.

[सं. **धूम+चक्र**; हिं. **धूमशा**; '**धुमशान**' शब्द उच्चारावरून परकी वाटतो.]

धुमस पुं. चोपणें, ठोकणी. A rammer of terrace.

[ध्वनिशब्द, हिं. **धमस.**]

धुमाकूळ पुं. गोंधळ, दंगामस्ती. Disorder, wild action.

[सं. **धूम्राकुल**; म. धूम(√ धाव्)=पळ; द्रा. **धूम**= आधिक्य, पुढील शब्द पहा. **धुमाड** = उत्कर्ष, उठाव, वाद्यांचा गजर; याकाम. **धुमाडी**=धुळवड; **धुमाधार**=मुसळधार पाऊस; **धुमाळी**=धांदल, गडबड, हल्ला, दंगा. हे सर्व ध्वनिशब्दच असावेत. संबंध असलाच तर **धूम**=आधिक्य ह्या द्राविडी शब्दाशीं असावा.]

धुरकट वि. धुरानें भरलेलें,-व्यापलेलें,-मळलेलें. Covered with smoke, smoky.

[सं. **धूम्रकट.**]

धुरळा पुं. धूळ, उडणारा केर. Dust.

[सं. **धूलियुक्त**; अप. **धूलिर** (वर्णविपर्यय-धुरळा) **धूळ** शब्द अगोदरचा कीं **धूलि** शब्द अगोदरचा ? '**धूलि**' हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे काय ?]

धुंरा,धुर पुं. मर्यादा, पायाचा शिरदळ. The boundary of a village.

[सं. **धुरः** (बांबू)=मर्यादा, टोंक; हिं. पं. **धुर्**, **धुरा** (मर्यादा); याकाम. **धुर**=सेनापती.]

कीं भीमकिये सारिखेये धुरे। नरुस्व. ५२४

धुंरा स्त्री. जोकड, जूं. A yoke.

[सं. **धुर**; प्रा. **धुर**; कु. **धुरो**; बं. ओ. **धुरा** (काठी); बि. **धूरा**; हिं. पं. **धुरा**; सिं. **धुरो**; गु. **धुर्.**]

धुराडें न. धूर जाण्याचें दार-भोंक. An aperture for smoke, a chimney.

[सं. **धूम्र+**द्रा. **अट्ट**; देप्रा. **धूरिअवट्टो, धूलीवट्टो.**]

धुरी स्त्री. विस्तवांत कांहीं औषधीवनस्पति टाकून जो धूर काढतात तो. Fumigation.

[सं. **धूम्र.**]

धुंवा, धुवा पुं. मोड, पराजय, सैन्याची वाताहत, पळापळ. Discomfiture or rout.

[सं. धुव् १ हिंसायाम्; परंतु शब्द परकी वाटतो. हिं. धुव्वा.]

धुसा,-शा पुं. एक लोकरीचें वस्त्र, घोंगडी. A coarse woollen stuff.

[सं. **दूर्शम्,-दूश्यम्** पा. **दुस्सम**; अप. **दुसानि**; पं. **धुरसा**, **धुस्सार्**; हिं. **धुस्सा**, **धोसा**; गु. **धूँसो**, **धोसो**; मराठी शब्द '**धाबळी**' शब्द ह्यांशीं संबद्ध आहे काय ?]

धुसफुस स्त्री. कुरकुर, चडफड. Grumbling, muttering, chafing.

[सं. **धुक्ष्** १ क्लेशने, **धुष्** १ दाहे (द्विधातुसंयोग).]

धुळ स्त्री. धूळ पहा. Dust.

[सं. **धूलि.** मूळ देशी **धूळ** याचें हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे काय ? अकामसा. **धुळकट** (धूलिकट)= धुळीनें भरलेलें; **धुळपाटी**; **धुळोरा** = **धुरळा** (उगी. ४३७).]

धुळवड, धुळिवाडी स्त्री धुळवड, धुरळा, धुळमाती. Throwing of mud, dust etc.

[सं. **धूलिवर्तिका**; प्रा. **धूलीवदिआ, धूलडिआ**; याकाम. **धुळिवाडी, धुळौडी**; अकाम. **धुळवड.**]

नाना विद्धें सिंपणीं होत सैंग : परागाची **धुळिवाडी** सुरंग ॥ नरुस्व. ७६०.

चांदिणेयांची धुळौडी वेगळी ॥ नरुस्व. ५२७.

धूड वि.न. अवाढव्य मनुष्य, प्रचंड जनावर, विशेषतः साप. A bulky and unwieldy fellow, a monstrous animal (esp. a serpent).

[कान. **दोड्ड.**]

धूं, धुं पुं. धूर. Smoke.

[सं. **धूम्र**, याकाम. **धूं, धु.**]

तें देविये देतां गरळ होओनि परतलें : नाकें धुं निगताये ॥ नरुस्व. ५४९.]

धूण न. तांदूळ धुवून काढलेलें पाणी. Water in which rice has been washed.

[सं. **धू.** (धुवण ह्या शब्दाचा अपभ्रंश).]

धूत वि. धुतलेलें, स्वच्छ. Washed, cleansed pure.

[सं. **धू**,-निष्ठा रूप.]

धून् स्त्री. पुष्कळ वेळ घुमणारा आवाज. A prolonged sound.
[सं. ध्वनि, धुनिः ; प्रा. धुणी ; हिं. धुनी ; पं. धुण् ; धुन् ; सिं. धुनि ; गु. धून् ; सिंह. दनि. धून= 'अनुकरणात्मक स्वर'.]

धूप पुं. सुगंधि द्रव्याचा धूर (देवापुढील). Common frankincense.
[सं. धूप ; देप्रा. धुप्पा ; पपा. धुप्प ; कु. धूप ; आ. धुपिब ; बं. धुप् ; हिं. धूप ; पं. लां. धुप्प ; सिं. धुप ; का. दूप्. गु. धूप. सं. धुपांगरा=धूप जाळण्याचा निखारा.]

धूम स्त्री. गोंधळ, दंगा, जोर, धांव, दौड, शर्यत, धाडस, हल्ला. Confusion, disorder, ardour, a run, race.
[सं. धाव् ? ; देप्रा. धूम्मा ; आ. धूम्, धुम् ; ओ. धुमा, धुमी ; हिं. धूम् ; पं. धूम्, धुम्म ; सिं. धूम ; गु. धुम ; अकामसा. धुमाकुळ, धूम, धुमाड, धुमाडी, धुमाधार.]

धूम पुं. धूर, वाफ. Smoke.
[*IE*. Dhu, Dheu ; सं. धूम्र, धूमः ; प्रा. धुम्म ; ग्री. थूमॉस् ; लॅ. फ्यूमुस ; प्रा. जर्म. दौम ; लिथू. दूमै ; स्लाव्ह. दम् ; याकाम. धूँ (नरुस्व. ५४९).]

धूव स्त्री. मुलगी. A daughter.
[सं. दुहितृ ; प्रा. धूआ, धीआ ; बं. झी ; ओ. झिय ; सिं. धिउ, धिय ; पं. हिं. गु. धी ; गार्वी. दूह ; सिंह. दू, दुव्. दुहिता पहा.]

धू, धूंसर वि. न. धुरकट, धुरासारखा करड्या रंगाचा, पूड, चूर्ण. Smoke-coloured, dusky white, powder.
[सं. धूसर, धूम्रसर.]

धूर पुं. अग्नीवर निघणारा काळा झोत. Smoke.
[सं. धूम्रः ; प्रा. धूर ; सं. प्रा. धूम शब्द आहे. मराठी शब्दांत 'र' कोठून आला? तो धूम्रः ह्या शब्दापासून आला आहे हें निश्चित.]

धूळ स्त्री. मातीचे बारीक कण. Dust.
[सं. धूलिः ; प्रा. धूलि,-ली ; पपा. धूड् ; कु. धुलो ; आ. धुला ; बं. धुला, धुली ; ओ. धुळी ; हिं. धूल्, धूर् ; सिं. धूरी ; गु. धूळ. उद्धूडी < सं. उधूलयति ; प्रा. धूलडिआ ; याकाम. धुळिवाडी, धुळौडी ; अकाम. धुळवड.]

धृति स्त्री. स्थैर्य, निश्चय, धरणें, धारणा. Steadiness, firmness, fortitude.
[सं. धृति, √धृ = धरणे.]

धेड पुं. महार, नीच जात. A particular low caste.
[सं. (?) ; हिं. गु. धेड ; अकामसा. धेडगुजरी= गुजराथेंतील महार जातीची भाषा. त्या भाषेंत अनेक भाषांची सरमेसळ असते त्यावरून लक्षणेनें कोणत्याहि मिश्रणास (भाषेच्या) किंवा विसंगत गोष्टींस हा शब्द लावतात.]

धेंड न. मोठें प्रस्थ, (त्यावरून लक्षणेनें) श्रेष्ठ,-मोठा,-प्रसिद्ध मनुष्य. A huge burly fellow, (fig.) a man of high renown.
[सं. (?); प्रा. ढेंढ ; हिं. ढेंढा=ढेरपोट्या ; कान. डोड्ड (?).]

धेंडवाळी स्त्री. कोलीत, मशाल. A torch.
[सं. (?); याकाम. धेंढवाळी ; बकाम. धेंडवाळी (ए. भा. १०·५६८).]
विरहिणी धेंढेवाळिया होति काजळी ॥ नरुस्व. ७३८

धेंडा पुं. नवरानवरीस खांद्यावर घेऊन देवांचीं नांवें घेऊन नाचणारा मनुष्य. The person who takes the bride and bridegroom on his shoulder.

धेनु स्त्री. गाय. A cow.
[सं. धेनु, √धा किंवा √दुह् ; धुणें पहा.]

धेंसापिटें अ. दशदिशांना, हातापिटीनें. In all directions, with hands.
[? ; याकाम. धेंसापिटें.]
आलें रे आले भणत । धेंसापिटें जालें राउत ॥ शिशु. १६६

धैर्य न. धीर, निश्चय, धाडस. Fortitude, patience, adventure.
[सं. धैर्य, √धृ ; धीर पहा.]

धोक(णें) अक्रि. एकत्र होणें, जमणें, गोळा होणें. To gather, to come together.
[सं. स्तोक ; प्रा. थोक.]

धोकटी स्त्री. न्हाव्याच्या हत्याराची कातड्याची पिशवी. A barber's razor-case.
[द्रा. (?); हिं. धोकटी.]

धोका पुं. भय, संकट, वञ्चन. Ground for fear, danger, peril.

[सं. द्रोघः (?), द्रोहः ; पा. प्रा. दोह ; पं. धरोह ; पं. धोक्खा ; हिं. धोखा ; पं. ओ. धोका ; गु. धोका.]

धोंगड वि. ओबडधोबड, खरबरीत. Rough, coarse.
[सं. (?) ; हि. धोकड.]

धोटा पुं. औषघ पाजण्याचें नळकांडें, पोकळ नळा, उभ्या सुतांत आडवे धागे टाकण्याचें साधन. A sheath or case, a case for weaver's shuttle.
[सं. धू ; याकाम. **धोंदवडा** (भा. ए. ४३६), **धोटा** (=रंग उडविण्याची पिचकारी–शिशु. ६६९.]
निळ्याचे धोटे नव्हेति ठाउके : घसणी कटाक्षाचिए ॥ नरुस्व. ८४५

धोंड स्त्री. मोठी शिळा, दगड, A large stone or slab, hence an obstruction.
[कान. दोड्ड (?).]

धोंडा पुं. दगड. A stone.

धोंडा (महिना) वि. अधिक महिना. An intercalary month.
[सं. ? ; सिं. **लुण्डु** (=अधिक महिना) ह्याचा आणि मराठी धोंडा याचा संबंध आहे. इतर **लुण्डा, लुण्टा** वगैरे शब्दांशीं ह्याचा संबंध असला पाहिजे. अधिक महिन्यांत **धोंडा** नांवाचें पक्कान्न करतात.]

धोतर न. नेसण्याचें वस्त्र. A long piece of cloth worn by males.
[सं. **धौत, धौतरी** (स्त्री.), (निष्ठा,–√धु = धुणें), **धौत्र–धोत्र** = धुतलेलें जें तें ; सिं. **धोती, धोत्यो** ; गु. **धोती, धोतर.**]

धोतरा पुं. वनस्पतिविशेष, विषारी वनस्पति. A kind of thorny plant.
[सं. **धत्तूरः, धूर्तः, धूतकृत्** ; प्रा. **धत्तूर** (पुं.); आ. **धूतुरा** ; बं. ओ. **धुतुरा** ; हिं. पं. **धतूरा** ; गु. **धतूरो** ; ने. **धतुरा.**]

धोंदवडा पुं. नळकांडें, नळ, धोटा. A sheath or case for weaver's shuttle.
[हा कदाचित ध्वनिशब्द असावा. **धोटा** पहा.]
मकरंदाचीं धोंदवडे । नागवीति समयाते । भा. ए. ४३६

धोंधों पुं. पाण्याच्या पडण्याचा ध्वनि. The sound of dashing water.
[ध्वनिशब्द ; सं. **अधोऽधो** ; अकामसा. **धोदा, धोदाट, धोंदाणा, धोधाणी** = धवधवा, पाण्याचा लोट ; **धोंधावणें, धोंधाटणें** = पाणी ढोसणें.]

धोप(णें) अक्रि. तहान लागणें. To be thirsty.
[सं. **धूप्** १ संदीपने.]

धोप वि. सरळ, लांबलचक, (त्यावरून) लांब हत्यार, (त्यावरून) हत्याराचा तडाखा. Straight and long, hence a sword, a stroke.
[सं. **स्तुप्, स्तुभ्** ; अकामसा. **धोपट** (सं. **अधः + पद्, पट्**), **धोपटणें** = धोपड,–टणें.]

धोपटी स्त्री. धोकटी पहा.

धोबड वि. जाडाभरडा (प्रतियोगी–ओबड). Coarse, rough.
[कान. **दोप्प,–धोप्प** = जाडी.]

धोबी पुं. परीट, धुणारा. A washer–man.
[१ सं. **धुवति** ; देप्रा. **धोव्व**, पा. **धोवस्** ; प्रा. **धुव्वइ** ; **धोप्प** (सं. **धोपति** ; प्रा. **धोवइ**); बं. **धोप** ; सिं. **धोपणु.** २ सं. **धौतिक > धौबीअ > धोबीअ > धोबी** (भा. अ. १८३५).]

धोरण न. संधान, लक्ष्य, काळजी, नेम, तोंड, दिशा, व्यवहार, मार्ग, रस्ता. Aim, goal, care, tenor, manner.
[सं. **धुर्** = अग्रभाग, **धारणा, धुर्**–ज्ञाने ; गु. **धोरण** (इयत्ता, क्रम, वर्ग).]

धोवळार न. चुनेगच्चीचें सफेत घर. A house with chunamed terrace.
[सं. **धवलगृह** ; याकाम. **धवळार** (धपू. ३०). **धवळार** पहा.]

धोशा, धौशा,–सा पुं. नगारा, नौबत, डंका, गाजावजा. A large kettle–drum.
[ध्वनिशब्द ; हिं. **धौंसा** = नगारा.]

धोशा,–सा पुं. निकराचा प्रयत्न, उत्सुकता, आतुरता, मनाला लागलेली टोंचणी. A vehement and determined effort, eagerness, mental urge.
[हिं. **धौंस, धमकी** ≃ चढाई.]

ध्यान न. मनन, चिंतन, (त्यावरून) समाधि, एकचित्त, (त्यावरून) तशी दिसणारी मुद्रा, (त्यावरून)

शांत, मंद अशी चर्या, बावळट चर्या. Contemplation, meditation.
[सं. ध्यै १ चिंतायाम्.]

ध्यास पुं. घोकणी, पुनः पुन उच्चार. Repetition.
[सं. ध्यै १ चिंतायाम्, दिध्यासः = ध्यास.]

ध्रुपद, ध्रूपद न. संगीतांतील एक प्रकार. A kind of song.
[सं. ध्रुव + पद ; याकाम. ध्रुवपद (एक प्रकारचें गीत.).]
मग छंद गाउनि ताळ टेविला: ध्रुवपदावरी ॥ नरुस्व. १८६

ध्रुव पुं. तारकाविशेष, एक तारा. The polar star.

ध्रुव वि. शाश्वत, कायमचें. Fixed, firm.
[सं. ध्रुव.]

ध्वज,-जा पुं.स्त्री. निशाण, यशाचें चिन्ह, पताका, झेंडा. A flag, an ensign.
[सं. ध्वज. धज पहा.]

ध्वनि पुं. आवाज. Sound.
[*IE.* Dhuen ; सं. ध्वन् १ शब्दे ; *Teut.* dynja ; *Eng.* Dunning, din.]

ध्वंस पुं. नाश, नासाडी. Destroying, demolishing.
[*IE.* Dhues ; Dhuens ; सं. ध्वंस् १ हिंसायाम्.]

ध्वाडी स्त्री. पुतणी. Brother's daughter.
[सं. दुह् दोहने, ध्रुव + डी. 'धू' पहा.]

ध्वांत न. दाट अंधार, काळोख. Thick darkness.
[सं. ध्वांत.]

ध्वांक्ष पुं. कावळा. A crow.
[सं. ध्वांक्ष.]

न पुं. मराठी वर्णमालेंतील विसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण दन्त्य नासिक्य असून उच्चारस्थान दन्त आहे. The twentieth consonant in the Marathi alphabet, the dental nasal.
[(आद्य न) सं. न, न्य, ज्ञ ; प्रा. न. ण.
नदी–नई, नास्ति–नाथी, ज्ञातीयम्–नातें.
(मध्य न) सं. ण्य. र्ण, ण्व ; प्रा. ण्ण.
अरण्ण–रान, कर्ण–कान,
सं. क्ष्ण, ष्ण, श्न, स्न ; प्रा. ण्ह.
श्लक्ष्ण–लहान, सान, कृष्ण–कान्हा, स्नापित–न्हावअ.
सं. न्न, न्य, ज्ञ, ज्ञ ; प्रा. न्न, ण्ण.
ऊष्ण उन्न–ऊन, मन्या–मान, विज्ञापय–विनव.
सामान्य रीतीनें सं. व प्रा. न, ण, ङ, ञ, म, द इत्यादि वर्णांपासून हा वर्ण निष्पन्न होतो.]

नें अ. पादपूरणार्थक अव्यय. An expletive particle meaning 'and, verily'.
[१ सं. नूनम्, ननु, नु ; प्रा. णूण, णूण, ण. २ म. आणि > नी > नि > न्.]

नें पुं. अ. नकारार्थी–अभावार्थी अव्यय (स्वराच्या पूर्वी अन्.). No, not, nor.
[*IE,* Ne, N, En, An = not ; सं. न ; *Av.* na ; *Lat.* ne, nei, ni ; *Slav. Lith.* Ne ; *Teut.* Ni ; *As.* Ne ; *Eng.* No. सं. न. पा. प्रा. न ; गु. सिं. हिं. बं. ओ. का. न, न्. हा शब्द सामासिक शब्दांत येतो व तेथें '**न**' कार दर्शवितो. उदा. **नगे, नलगे, नव्हे, नाहीं, नसणें, नवगे, नेणणें, नोळखणें, नेदणें** इत्यादि शब्दांत नकार, निषेध, अभाव वगैरे दाखवितो. अकामसा. **नकार** = (न + कार = ' नाहीं ' असा उच्चार. **नकारघंटा** = नाहीं वारंवार म्हणणें. **नन्ना** = नाहीं नाहीं म्हणणें (नन्नाचा पाढा.)]

नई, नही स्त्री. नदी, नदी ह्या शब्दाचें अपभ्रष्ट रूप. A river.
[सं. **नदी** ; प्रा. **णई** ; सिं. हिं. **नाइ** ; सिं. **नाई** ; पं. **नह** ; चंबी. **नई** ; सिंह. **नी.**]

नऊ वि. संख्याविशेष. Nine.
[*IE.* Neun ; सं. **नवन्** ; प्रा. **नवन** ; झें. **नवन्** ; ग्री. **न्नेअ** ; लॅं. **नोव्हेम** ; गॉ. **निउन** ; प्रा. जर्मन. **निउन** ; स्लॉ. **देवन्ति**, लि. **देव्याना**. पा. **णव**, प्रा. **णव** ; गु. हि. मै. **नउ** ; पं. **नउं** ; सिं. **नउं** ; बं. **नय** ; का. **नव्** **नउ** ; सिंह. **नव, नम.**]

नकटा वि. बसक्या किंवा थापट्या नाकाचा, नाक कापलेला, (ल.) अपुरा, दोषयुक्त. Nose-cut, (one) having a snub or sqab nose, (fig.) defective, lacking.
[सं. **नासिका** ; प्रा. **णक** ; गु. **नकटुं, नाकटु** ; हिं. **नकटा** ; म. **नाक + कटा**. प्राकृत शब्द हा द्राविडोद्भव

दिसतो किंवा हा देशी असावा. जू. ब्लोक **नाक+काट** यापासून अक्षरलोपानें सिद्ध झाला असें म्हणतो.]

नकल,-नक्कल स्त्री. मूळावरून तयार केलेली प्रत, प्रतिकृति, अनुकरण, (त्यावरून लक्षणेनें) विडंबन. A copy, a transcript from original, imitation, mimicry.

[अर. **नक्क** ; अकामसा. **नक्कलनीस** = प्रत तयार करणारा (**नक्क + निवीस** = (**नकल(णें)** = प्रत तयार करणें (नामधातु) = लेखक); **नकल्या** = नकल करणारा, गमत्या, विदूषक.]

नकाशा पुं. आराखडा, नकाशा, नमुना, आकृति, (त्यावरून लक्षणेनें) भपका, थाट, प्रतिष्ठा, तोरा. An outline, a map, a sketch, (fig.) pompousness.

[अर. **नक्श** ; हिं. **नक्शा** ; गु. **नकशे** ; पेकाम. **नक्ष** (इम. २७४) ; अकाम. **नकाशा**.]

नकशी, नक्षी स्त्री. कौशल्याचें काम, शिल्पकाम, वेलबुट्टी. Ornamental work, engraving, embroidery.

[अर. **नक्शी** ; पेकाम. **नक्षी** ; अकामसा. **नकसकाम, नकसगिरी, नकसणें**.]

नकाशा पुं. नकशा पहा.

नको क्रि. निषेधार्थी आज्ञार्थी क्रियापद. A verbal form denoting prohibition, negative.

[वैसं. **नार्की**, १ सं. **न्यक्कृ--नक,--नकृ--नकम्--नकिः** (राज. भाअ. १८३४) ; २ सं. **न काम्य, न कर्तव्यम्--नका--अव्वँ--नकावँ--नकाउ--नका**. ३ सं. **न खलु** ; प्रा. **नख्खु** ; देप्रा. **नख्खो** ; **नको** हें रूप द्वि,-तृ. पु. ए. व. आहे. अ. व. **नका**.]

नक्की वि. निश्चित, अगदीं बरोबर, तंतोतंत, यथातथ्य. Exact, just, quite, right, fixed.

[अर. **नकी** = शुद्ध, स्वच्छ.]

नक्त न. एक प्रकारचें व्रत. A religious observance (in which eating only at night during the period is allowed.)

[*IE.* Naqt ; सं. **नक्त** ; *Lat.* Nax ; *Lith.* Nakti ; *Slav.* Nosti ; *Got.* Nahts ; *Eng.* night. दिवसा अनुपभुक्त राहून रात्रीं खाणें--एक एक घास दररोज अधिक खाऊन उपवास सोडणें. '**नक्त**'चा मूळ अर्थ रात्र]

नक्त, नक्द न. नगद पहा.

नक्र पुं. मगर, सुसर. A crocodile.

[सं. **नक्र** ; अकामसा. **नक्राश्रु** = भक्ष्य खातांना नक्राच्या नेत्रांतून अश्रु येतात, त्यावरून लक्षणेनें-खोटे अश्रु, वरपांगी दुःख हा अर्थ.]

नक्श पुं. डौल, प्रतिष्ठा, लौकिक मान. Pompousness, reputation.

[अर. **नक्श्** ; अकामसा. **नक्शा, नक्काशा** = आराखडा. **नकाशा** पहा.]

नख न. बोटाच्या टोंकावरील कवची,-आवरण. A nail of a finger or toe.

[*IE.* Nogh = खाजविणें ; सं. **नख्, नघ्** ; फा. **नखुन्** ; *Lat.* Ung ; *Lith.* Nagas ; *Slav.* Noguli ; *Got.* Nagle ; *Ger.* Nagel ; *Sax.* Naegel ; *Eng.* Nail. सं. **नख** ; पा. **नख** ; प्रा. **नह, णह, णक्ख** (पुं.) ; देप्रा. **णक्ख** (१४३-१०) ; ला. **नउह** ; **नहि** ; पोर्तु. **नई** ; हिं. **नह** ; प. **नहु** ; सिं. **नहूं** ; गु. **नहियुं** ; ने. **नङ** ; कान. **नख** ; अकामसा. **नखरडें, नखरूं** = नखाच्या जवळ होणारें दुःख ; **नक्षज(णें)** = नख लावून दाबणें ; **नखेल** = नखाचें तेल ; **नखरणें** = नखानें खाजविणें ; **नखल(णें)** = नखानें विंचरणें ; **नखला** = नखानें तोडलेलें व वारीक केलेलें वळवट ; **नखसुं** = नखें काढण्याचें हत्यार ; **नखाळ(णें)** = नखानें काढणें ; **नखी** = सतार वगैरे तंतुवाद्य वाजवितांना बोटांत घालावयाचें तारेचें वेटोळें, प्राण्याचीं नखें.]

नखरा पुं. (विशेषतः स्त्रियांचा) डामडौल, ऐट, नटापट्टा, नटणें मुरडणें. Coquetry, flirting, feminine airs.

[फा. **नखा** ; हिं. **नखरा** ; सिं. **नखिरो**.]

नखुदा,-डा पुं. कप्तान, संघावरील मुख्य. A captain, leader of a team.

[फा. **ना-खुदा** = जहाजावरील मुख्य. स्कीट म्हणतो-'**हासनहुसेन**' ह्या शब्दसमूहापासून ज्याप्रमाणें '**हॉब्सन् जाब्सन्**' हा शब्द झाला त्याप्रमाणें मलायी. **अनक्-कुद** (=घोड्याचा मुलगा) ह्यापासून **नाखुडा** शब्द झाला असावा.]

नख्वाही स्त्री. इच्छा नसणें. To have no desire.

[म. **न** + फा. **ख्वाहिश** = इच्छा.]

नग पु. पर्वत. A mountain.

[सं. **न + ग(√गम्)** = न जाणारा, न हलणारा, डोंगर, पर्वत.]

नँग पुं. डागिना, जिन्नस, डोक्यांतील भूषण, वस्तु. An ornament, a trinket, an item.
[फा. **नग.**]

नगद् न. रोकड, निवडक, अस्सल. Ready money, select, original.
[अर. **नक्द्**; पेकाम. **नक्त** (खरे ११-५६६६), **नगदी** = रोकडी नाण्यासंबंधीं, रोख.]

नगर न. शहर. A town.
[सं. **नगर**; याकाम. **नगर, नगराडा** (गोमांतकी ताम्रपट.)]

नगारा पुं. नौबत, डंका, मोठें ढोलकें, (ल.) मोठें, लठ्ठ पोट. A kettle-drum, (fig.) a big belly.
[अर. **नक्कारा**; याकाम. **नागारी** (भाट, स्तुतिपाठक) हा शब्द ह्याशीं संबद्ध आहे कां ? **नागारी** पहा. पेकामसा. **नगारखाना** = नगारे ठेवण्याचें ठिकाण ; **नगारची** = नगारी वाजविणारा मनुष्य.]

नग्न वि. वस्त्रहीन, नागवा. Naked.
[सं. **नग्न**, (निष्ठा) √**नज** (?); अकाम. **नंगा, नागा.**]

नंग पुं. प्रतिष्ठा, नांवलौकिक, मान. Honour, repute.
[फा. **नङ्ग**; पेकाम. **नंग** (इम. १८८), **नंग नामोश** (फा. **नङ्ग** + अर. **नामूस**)= कीर्ति, पराक्रम (राज. ८·१३६)]

नंगा वि. नागवा, वस्त्रहीन. Naked.
[सं. **नग्न**; प्रा. **णग्ग**; हिं. **नंगा, नागा.**]

नजदीक अ. नजीक पहा.

नँजर स्त्री. दृष्टि, पाहण्याचें इंद्रिय, (ल.) धोरण, उद्देश, इच्छा. Sight, seeing, vision, (fig.) regard.
[अर. **नझर्** = दृष्टि; हिं. गु. **नजर**; अकामसा. **नजरकैद** = साधी कैद ; **नजरगुजार** = पारख ; **नजरचूक** = दृष्टिदोष ; **नजरबंद** = एकदम आपल्या चातुर्यानें दृष्टि बंद करणारा गारुडी.]

नँजर स्त्री. वरिष्ठास भेट. A present to a superior.
[अर. **नझर्, नधर्** = कनिष्ठाकडून वरिष्ठाला देणगी, व्रत, व्रतांतील देणगी ; पेकामसा. **नजरनजराणा–नझराना** = भेटीच्या वेळीं दिलेल्या वस्तु ; **नजरपट्टी** = राजाला भेट म्हणून द्यावयाचा कर ; **नजरभेट** = वरिष्ठास पहिल्या भेटीच्या वेळीं द्यावयाचा नजराणा.]

नजीक अ. जवळ, सनिध. Near, close.
[फा. **नझ्दीक्**; पेकाम. **नजीक** (राज. १५-२५२).]

नजीब न. सैन्यांतील एक प्रकारची फौज. A division in the army.
[अर. **नजीब** = सरदार, उमदा ; हिं. **नजीब.**]

नट(णें) अक्रि. डौल करणें, सजणें, रूप धारण करणें. To dress finely, to affect airs.
[सं. **नट्** १० नाट्ये, १ अवस्कंदने, **नृत्** ४ नर्तने ; प्रा. **णट्टे**; हिं. पं. **नाटा** (खुजा); **नट्ट**; का. **नट**; याकाम. **नटणा** = लीला (दाव. २६०). मग सर्वेश नाथें **नटणा** केली ॥ ; अकामसा. **नट** = नाटकांत भूमिका करणारा ; **नट** = एक डोंगरी जात, डोंबारी ; **नटखट** (हिं. **नटखट**) = लुच्चा ; **नटिया-वा** = सोंग घेणारा. **नटी, नटविणें, नट्टापट्टा** = नखरा, चट्टीपट्टी.]

नठारा वि. निरुपयोगी, वाईट. Useless, bad.
[सं. **नष्ट**; प्रा. **णट्ठ**; गु. **नठारूं**; म. **नाठाळ** (?). **नाट** पहा.]

नड(णें) अक्रि. अडणें, गुंतणें, अडकणें, प्रतिबंद होणें, अडथळा होणें. To be obstructed or impeded.
[सं. **नड्** १ संचये, **नट्**; प्रा. **नडई, नडिज्जइ**; देप्रा. **णडियो वञ्चितः खेडित इत्यन्ये** (१४३·१२); गु. **नडवूं** (विघ्न आणणें); परंतु हा धातु कानडीउद्भव असावासा वाटतो. कान. **नड्डु** = अडचण येणें ; अकाम. **नड** = अडथळा, प्रतिबंध, हरकत, उपाधि, गरज.].

नडगी-गें स्त्री. न. गुडघा, पायाची नळी. The knee.
[कान. **नडगि**; याकाम. **नडनाच** (ज्ञा. ९-१९६).]

नणन्द स्त्री. नवऱ्याची बहीण. Husband's sister, a sister-in-law.
[सं. **ननांद**, √**नन्द्** (?); पा. **ननन्दा**; प्रा. **णणन्दा**; कु. **नन्द**; आ. **नन्दी**; बं. **नन्दा**; ओ. **नणद**; हिं. **ननद, ननदी**; पं. **नणानु**; गु. **नणँद**; सिं. **निणुन**; पं. **नणान.**]

नत वि. वांकलेला, नम्र. Bent, bowed.
[सं. **नत**, (निष्ठा) √ **नम्.**]

नतदृष्ट वि. क्षुद्रमनाचा, क्षुद्रवृत्तीचा, कवडीचुंबक, खाष्ट, दुष्ट. Stingy, miserly, mean.

[सं. नत + दृष्ट (?); नतदुष्ट, न + तद्रक्ष (खजीना) = कंजूष.]

नतिजा पुं. शेवट, फळ, परिणाम, शिक्षा. End, fruit, punishment.

[अर. **नतीजा**; हिं. **नतीजा**; पेकाम. **नतिजा** (राज ८-१३०).]

नथ स्त्री. स्त्रियाच्या नाकांतील मोत्यांचा दागिना. A ring worn in the nose by women.

[सं. **नाथ** = वेसण; प्रा. **णत्था**; देप्रा. **णत्थणन** = नाकाचें छिद्र; सिं. **नथ**; तामी. तेरु. मल्या. कान. **नत्त** (= नाकांत घालावयाचें रत्न); **नथिणी** = लहान नथ; वेसण.]

नद पुं. मोठी नदी. A great river.

[सं. **नद**, √**नद्** = आवाज करणें, **नदी** = वाहतांना पाण्याचा आवाज करणारी.]

नंतर अ. मागाहून, पश्चात्. Afterwards, then.

[सं. **अनन्तरम्**; प्रा. **णन्त** (**अनन्त**); सिंह **नोत्**]

नंदादीप पुं. देवापुढील सतत जाळणारा दिवा. A light kept burning before a deity night day.

[कान. **नन्दा** = नेहेमीं सतत जळणारा दिवा + सं. दीप (दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्नभाषांतील शब्द).]

नंदी पुं. बैल, शंकराचें वाहन. The bull on which Shankar rides.

[सं. **नन्द**, **नन्दिनी**; देप्रा. **णंदा**, **णंदी**, **णंदिणी** (गोवाचकाः); याकाम. **नांदिये** (नरुस्व. २३३).]

येक अखंड रत्नांचे नांदिये विनोदे ॥

नन्नुबाळ न. लहान लेकरूं. An infant.

[सं. **श्लक्ष्ण** = लहान; गु. **नाना**, **नान्हा**, **नन्हु**; **नन्नु** व **बाळ** हे दोन्ही एकाच अर्थाचे शब्द.]

नपुंसक पुं. पुरुषहि नव्हे व स्त्रीहि नव्हे असा, हिजडा, षंढ, विषयोपभोग घेण्यास असमर्थ. One neither male nor female, an impotent person.

[सं. **न + पुंसक**. पुरुष नसलेला असा अर्थ मूळचा; याकाम. **नपुंसक**.]

मना होत दादुलेपणाची हांव : जन्ही नपुंसक जालें ॥ नरुस्व. ८४३.

नफर पुं. व्यक्ति, जण, इसम, डाग, नग. An individual, a person.

[अर. **नफर**; पेकाम. **नफर** (राज ३·३८७) उदा. उंट, **नफर**, कुणबिणी **नफर** (व्यक्ति).]

नफा पुं. फायदा, (व्यवहारांतील व्यापारांतील) किफायत. Profit, emolument.

[अर. **नफअ**.]

नबाब पुं. मुसलमानी सरदार, श्रीमंत मनुष्य. The Nabob.

[पोर्तु. **नबाबो**; फ्रें. **नबाब**; ह्या भाषांत हिंदीमधून गेला. अरबी अनेक वचन **नायब्** याचें; < **नायब्** = राज· प्रतिनिधि < अर. **नूवाब**, **नव्वब**.]

नंबुद्री पुं. दक्षिणेंतील मलबारमधील ब्राम्हणाची ज्ञात. The Brahmin caste (in Malabar).

[मल्या. **नंबूदिरि**; तामी. **नंबूरी**; **नंबूतिरी** < द्रावि. **नंबूक** = विश्वास ठेवणें; **तिरी** (सं. **श्री**) = पवित्र; मल्या. **नंबु** = वेद; **ओथु** = शिकविणें.]

नभ न. आभाळ, आकाश. The sky.

[*IE*. Nebh; सं. नभ्, √ आभा; **आभा** = प्रकाश; *Gr*. Neph; *Lat*. Neb; *Lith*. Debesis; *Slav*. Nebs; *Got*. Nibls; *Sax*. Nifol. **अभ्र** आणि **नभ** हे दोन्ही शब्द एकाच पूर्ववैदिक शब्दापासून निघाले आहेत. '**अ**' आणि '**न**' ह्यांचा जो सामान्य संबंध तो येथेंहि असल्याचें दिसून येतें.]

न भूतो (न भविष्यति) प्र. पूर्वीं कधीं न झालेला व पुढें कधीं न होणारा. Not occuring in the past or in future.

[संस्कृत प्रयोग आहे. '**भू**' **निष्ठारूप** आणि **भविष्यकाळी** रूप.]

नम(णें) अक्रि. वांकणें, खालीं डोकें करणें, सैल सोडणें, पड खाणें, वंदन करणें. To bend, to bow down, to submit.

[*IE*. Nem; सं. **नम्** १ प्रव्हत्वे; *Av*. Nem,; nam; *Gr*. Nem; *Lat*. nem; *Lith*. inmu; *Slav*. ima; *Ger*. nehmey, *Sax*. nemn; याकाम. **नमिणें**; अकामसा. **नमणें**, **नमः**, **नमस्कार**, **लवणें** वगैरे शब्द परस्परसंबद्ध आहेत. अकामसा. **नमन** = नमस्कार, अभिवादन, वंदन; **नमविणें** = वांकविणें; **नमस्कार** = वंदन, डोकें लवून हात जोडून वंदन; **नमस्कार(णें)** = वंदन करणें; **नमस्ते** = नमस्कार असो.]

तो ईश्वरादिचरणकमळीं । नमितु नागार्जुनु ॥ शिशु. ६.

नमाज, निमाज पुं. (मुसलमानी धर्मांतील) प्रार्थना. Worship or divine service.
[फा. **नमाझ्.**]

नमूद, नमोद पुं. वि. प्रसिद्धि, जाहिरात, निर्दिष्ट, नोंदलेली. Shown, presented, registered, (hence) advertisement.
[फा. **नमूद ;** पेकाम. **नमूद, नमुदास** (पुं.) **नमुदीस** (स्त्री) (दिमरा. १-६७)]

नमो अ. (आरंभाचा) नमस्कार. Salutation.
[सं. **नमस्,** √ **नम्** १ प्रव्हत्वे, **नमोस्तु** (सं. **नमःअस्तु**) = नमस्कार असो.]

नम्र वि. विनीत, वांकलेला, लवलेला. Humble, obedient.
[सं. **नम्र** √ **नम्** १ प्रव्हत्वे.]

नय पुं. नीति, न्याय. Ethics, equity.
[सं. **नय,** √ **नी.**]

नयन पुं. डोळा, पाहण्याचें इंद्रिय. An eye.
[सं. **नयन,** √ **नी.**]

नये क्रि. येत नाहीं. योग्य नाहीं, नको. A negative verbal form.
[हें क्रियापद आहे. हें लिहिण्याचे दोन प्रकार आहेत व त्याप्रमाणें त्याचे दोन अर्थ आहेत. एक प्रकार जोडून **नये** = (नको) असें लिहिण्याचा व दुसरा " **न ये** " असा तोडून लिहिण्याचा ; त्याचा अर्थ ' येत नाहीं ' असा. सं. **न एव, न एवम् ;** प्रा. **नेयम्, नेव.**]

नर पुं. पुरुष, मनुष्य, पुंस जातीचा. Man.
[*IE.* Ner, Nr ; सं. **नरः, नृ;** *Av.* Nar ; *Gr.* Ner ; *Lat.* Ner ; *Teut.* Njoder (=father.); सं. **नर(नृ);** याकाम. **नर-नाथ** (नरुस्व. २४६); अकाम. **नरसिंह** = नृसिंह अवतार, शूर मनुष्य ; **नरेंद्र, नरेश** = राजा, इत्यादि.]

नरक पुं. शिक्षा करण्याचें यमपुरींतील स्थान, विष्टा. Hell, a heap of ordure.
[सं. **नरक.**]

नरटी स्त्री. कवची, नारळाची कवटी, नरोटी पहा. A skull, the hollow shell or the half of a cocoa-nut.

नरडें न. घसा, गळा, कंठमणी. Throat.
[सं. **नर्दी,** √ **नर्द्** १ शब्दे ; हिं. गु. **नरडो ;** अकाम. **नरडी, नरडा ;** परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण असावें. मूळ शब्द द्राविडी भासतो.]

नरद स्त्री. सोंगटी. A wooden draught in game.
[फा. **नर्द्.**]

नरम वि. मऊ, गुलगुलीत, मवाळ, मंद. Soft, gentle, easy, simple, dull.
[फा. **नर्म् ;** गु. **नरम.** सं. ' **नम्र** ' ह्यांत वर्णविपर्यय होऊन तर हा शब्द झाला नसेलना ? अकामसा. **नरमगरम** = थंड ऊष्ण. मंदोष्ण ; **नरम(णें)** = सौम्य होणें ; **नरमाई** = मृदुपणा.]

नरसाळें न. गळणी, तेल ओतण्याचें साधन. A funnel.
[सं. **नासिकाशीं** संबद्ध असेल कां ?]

नरा(=ह्रा)णी स्त्री. नखें काढण्याचें हत्यार. An instrument for paring the nails.
[सं. **नखहरणी ;** प्रा. **णहरणी ;** गुज. **नराणी.**]

नरोटी स्त्री. नारळाचें अर्धें कवच, कवटी, (ल) कपाळाची कवटी. The half of a cocoa-nut.
[सं. **नर + वाटी ;** देप्रा. **नारोट्टो बिलम्** (१४५.१०); अकाम. **नरोटी** हातांत घेणें = भिक्षा मागणें.]

नर्तन न. नाच, नाचणें. Dancing, acting.
[सं. **नृत्** ४ नर्तने.]

नर्मद्या पुं. नर्मदा नदींत सांपडणारा दगड, गणपति, गणोबा. A stone found in the river Narmada, hence a dull fellow.
[सं. **नर्मदीयः** (नर्मदायाम् भवः).]

नव वि. नऊ पहा. Nine.
[अकाम. ' **नव** ' हा शब्द सामासिक शब्दांत आद्य अवयव म्हणून येऊन पुष्कळ सामासिक शब्द **रूढ** झाले आहेत. उदा. **नवखंड, नवगण, नवग्रह, नवज्वर, नवटांक, नवरस, नवरात्र, नवविधा भक्ति** इत्यादि.]

नव वि. नवीन, नवें कोमल, ताजें. New, tender, fresh.
[*IE.* Nevos; सं. **नव ;** झें. **नव ;** ग्री. **नेऑस् ;** लॅ. **नोवुस् ;** गॉ. **निउयिस् ;** लिथु. **नौयेस् ;** स्लॉ. **नावु ;** सं. **नव ;** प्रा. **नव, णव ;** गु. **नवुं ;** सिं. **नइउं ;** पं. **नवां ;**

हिं. नवा ; बं. नई ; सिंह. नव ; का. नोव (वु); रुमा. नोवो ; अकामसा. नवा, नवाई, नवखा.]

नवखा वि. अपरिचित a new-comer, stranger.
[सं. नव + क्क (?); प्रा. णोक्खा = विलक्षण, नवें अकाम. नोक. 'नव' हा शब्द आद्य अवयव म्हणून येऊन पुस्कळ सामासिक शब्द अकाममध्यें रूढ झाले आहेत. उदा. नवतर, नवथर, नवथळ, नवनवती, नवरान, नवाई, नववधू, नवेजुनें, नवेनर, नवोढा, नव्याने, नव्याची पुनव, नव्हांड इ.]

नवनीत न. लोणी. Butter.
[सं. नवनीत ; प्रा. णअणीअ ; अकाम. लोणी ; ग्रामीण अकाम. नोनी. लोणी पहा.]

नव(नौ)दिगर न. फेरबदल, विरोध, हरकत. Change, alteration, perverse objecting.
[फा. नव् + दिगर, नव् = नवीन, दिगर = दुसरें ; पेकाम. नौदिगर (राज. १-५२); नवदिगर (राज. ३-२०६)]

नवरा पुं. विवाह झालेला पुरुष, पति, लग्नाच्या वयाचा मुलगा. A bridegroom, the husband.
[सं. नववरकः, नवराशी>नवरास>नवरस ; सं. नववरिका>नोवारिका>नोआरिआ > नवरिआ> नवरी (मसाप. १-२-१०).]

नवरोज-झ पुं. पारशी वर्षाचा पहिला दिवस. The first day in the Parsi calendar.
[फा. नव् रोझ् ; अकाम. नौरोज.]

नवरंगे वि. एक आडनांव, केशरी वस्त्र वापरणारे. A surname (among the Brahmins).
[सं. नवरंग = केशरी वस्त्र (राजवाडे-ग्रंथमाला).]

नवल न. आश्चर्य, आश्चर्यकारक गोष्ट, अचंबा, कौतुक. A wonder, a marvel, astonishment.
[सं. नव + ल ; प्रा. णवल्ल ; देप्रा. नवल, नवल्ल ; हिं. नवल = सुंदर ; अकामसा. नवलविशेष = नवल वगैरे, विशेष नवलाची गोष्ट ; याकाम. नवलाव,-लु, नवलार = नवल.]

तें देखोनि तोखला रावो: तव तेथ जाला नवलावो ॥ नरुस्व. १७५. फुन तें अवस्था नवलु आइका । शिशु. १७२

नवलकोल पुं. वनस्पतिविशेष. A kind of plant or vegetable.
[इं. नोएल, कोल = कोबी.]

नवस पुं. इष्टहेतुसिद्ध्यर्थ दिलेलें देवतासमाधानाचें अभिवचन, देवास एखादा पदार्थ अर्पण करण्याची प्रतिज्ञा. A vow.
[१ सं. नमस्यः ; प्रा. णवस—नवस ; २ सं. नमसित ; प्रा. णमसिअ, णवसिअ ; ३ सं. नमस = अनुकूल ; देप्रा. नंअसियं उपयाचितकम्, नवसिअं इत्यन्ये (१४५-३) ; सं. नमस्यति = नमस्कार करतो. ह्या शब्दाच्या अर्थावर इराणी भाषांचा परिणाम झालेला आहे. फा. नमाझ् , बलुचि. नमाश् , नवाश् = प्रार्थना ; यादवकालीन रूप ' नवसी, नवसिआ (= नवस करणारा, नवसाचा पदार्थ) असें आहे. (नरुस्व. ६०२).]

हरिचंद्रनाचे फोक । सोलौनि कीजेति दाखंड त्रिशाक । वरि सेंदुरें विनायक । नवसि आंचें नवसियें होती इतरें । माझियानिधनीं ॥ ज्ञा. १३-५७१.

नवसागर पुं. कल्हई लावतांना वापरावयाचा क्षार. Sal ammoniac.
[सं. नवसारः (?) ; फा. नउशादर ; गु. नवसार ; हिं. नवसादर.]

नवाज वि. कृपाळु, कनवाळु, पोशिंदा. Kind, affectionate.
[फा. नवाझ् ; हिं. नवाझना शिकामसा. नवाज(णें) निन्दी तयातें निवेदनवाजे (मुक्त. मू. ल. ९८) = स्तुती-प्रशंसा करणें ; नवाजी, नवाझीश = स्तुति, प्रशंसा.]

नवार स्त्री. पलंग किंवा खाट विणावयाची दोनतीन बोट रुंदीची सुती पट्टी. A coarse and broad tape for a bed-stead.
[फा. नवार्, नुवार्.]

नवाळी-नव्हाळी स्त्री. प्राप्ति, कृपादृष्टि, गोडी, इच्छा, अपूर्वता, नवल. A gain, kindness, interest, wish, a marvel.
[म. नवल, नवा पहा.]

नविन, नवीन वि. नव पहा.

नवीस, निवीस पुं. 'लिहिणारा' हा अर्थ दाखविणारा प्रत्यय. A writer.
[फा. निविस्तन् = लिहिणें ; नविसंदा-नविशिंदा (फा. नवीसन्दा) = कारकून, लेखक.]

नव्वद वि. संख्याविशेष, नऊदां दहा. Ninety.
[सं. **नवतिः**; पा. **नवुति** ; प्रा. **नऊइँ** ; का. **नमथ** ; पपं. **नव्वे** ; आ. **नवइ** ; वं. **नव्वई** ; आ. **नवे** ; हिं. **नव्वे** ; पं. लां. **नव्वे** ; सिं. **नवे** ; गु. **नेवूँ**; ने. **नव्वे.** मराठीमध्यें 'व' चें द्वित्व हें त्याला 'नऊ'पासून अलग करण्याकरतां झालें आहे हें टर्नरचें म्हणणें ग्राह्य नाहीं. हें आघातामुळें आणि अन्त्य वर्ण नरमाविल्यामुळें झालें आहे.]

नव्ह(णें) अक्रि. न होणें नसणें To exist not.

नव्हे क्रि. 'होत नाहीं', 'नाहीं' ह्या अर्थी न होये ह्याचा संक्षेप. Is not.
[सं. **नभ्**-अभावे, **नह्** १ वन्धने, (कर्मणि).]
माझे या विस्तारपणें नावें । हें जगचि नव्हे आवघे । जैसें दूध मुरालें स्वभावें । तरि तेंचि दधि । ज्ञा. ९,६२

नशा स्त्री. धुंदी, गुंगी, कैफ. Intoxicated state.
[फा. **नशात्** = कैफ ; अकामसा. **नशाःखोर**, √ **खुरदन्.**]

नशीब न. दैव, प्रारब्ध, Fate, luck.
[अर. **नसीव्.**]

नश्वर वि. नाश पावणारें, अशाश्वत. Perishablé, transitory.
[सं. **नश्वरम्** , √ **नश्** ४ नाशने.]

नष्ट वि. नाश झालेलें, हरवलेलें. Lost, ruined, destroyed.
[सं. **नस्** ४ नशने, (निष्ठा), **नष्टचर्य** = दुर्दैव.]

नस(णें) अक्रि. न असणें, अभाव असणें. Not to be.
[म. **न + असणें** < सं. **अस्** २ सत्तायाम्; अकामसा. **नसता** = अस्तित्वांत नसलेला, विनाकारण, अनवश्यक.]

नेस स्त्री. नाडी, नसा, शीर. A vein, a sinew.
[सं. **नसा** ; देप्रा. **णसा** (स्त्री); अर. **नस्.**]

नँस स्त्री. तपकीर, नाकांतून ओढण्याचें द्रव्य. Snuff.
[सं. **नस्यम्** ; प्रा. **णस्स** (नाक); का. वं. **नास्** ; ओ **नास** ; हिं. पं. **नस्**; सिं. **नास** ; गु. **नास** (श्वास). २ सं. **नसा** ; प्रा. **णसा** ; कु. **नसो** ; हिं. पं. **नस्** ; सिं. **नस** ; गु. **नस्** ; ने. **नसो.** पुष्कळ शब्दांतील 'अ'चा तोकडा, निभृत उच्चाराची उपपत्ति टर्नरला कळली नाहीं. तो नेहमीं म्हणतो कीं 'अ' च्या उच्चाराचें लघुत्व व्युत्पादितां येत नाहीं. याकाम. **नस** (नाकानें हुंगण्याचें औषध, तपकीर).]
तेणें नसु देतां आमोदे : पुनभ्रमु न फिटे ॥ नरुस्व. ५५७.

नसद्धी वि. नुसती, एकटी. Only, alone.
[सं. **न + सत् + हि** ; याकाम. **नसद्धी.**]
निगालेआं यदुपती । न शोभेची द्वारावती । जेंवी नसद्धी शांती । विवेकें विणु । शिशु. ५३८.

नसनस(णें) अक्रि. श्लेष्मा नाकांतून बाहेर टाकण्याची इच्छा होणें, नाकांत खाजणें. To have irritating sensation in the nose, to have a feeling of blowing off the nose.
[सं. **स्नस्** १ निरासे (द्वित्व), **स्नासिका-नासिका** ; **स्नस्-नस्** , **स्नासा-नासा.**]

नसराणा वि. सोदा, लुच्चा, वस्ताद. A scamp, a rogue, pagan.
[अर. **नस्रानी** = खिश्चन ; अकामसा. **नसरूड** = कोडगा. (निंदार्थी व कुत्सितार्थी शब्द.)]

नसल न. प्रजा, बीज, (ल.) अनौरस मुलगा, दत्तक मुलाचें बीज,-संतान. A child of an adopted son.
[अर. **नस्ल्** ; पेकाम. **नसल** (राज. ६·३४९).]

नसि(शि)यत स्त्री. शिक्षा, उपदेश, समजावणी, शासन. Chastisement, correction, admonition.
[अर. **नसीहत्** ; पेकाम. **नसीहत, नशेत** (राज. ३·३३३).]

नहर पुं. नळ, कालवा, पाट (पाण्याचा). A stream, an aqueduct.
[अर. **नह्र्** ; पेकाम. **नहर** (राज. ५·१११). **नहर** = हवापाण्याचें उत्तम ठिकाण हा शब्द निराळा.]

नहाण, न्हाण न. (सचैल अम्यंग) स्नान, आंघोळ. An ablution.
[सं. **स्नान** ; प्रा. **ण्हाण, न्हाण** ; हिं. **नहान, न्हाना**; गु. **नाहणूं** (वधूचें स्नान) ; पं. **न्हाउणा** ; सिंह. **नानवा** ; का. **नान** (< **स्नान**). २ कान. **नने** = ओलें. (लक्षणेनें ह्याचा अर्थ " ऋतुप्राप्ति, रजोदर्शन " असा आहे.) नहाणें = रजस्वला होणें, विटाळशी होणें (नामधातु).]

नळ पुं. देंठ, मोठ्या आंतड्याच्या वरचा भाग. The stalk (of a lotus), the ascending portion of the colon.
[सं. **नड, -नळ, -नल** ; पा. **नळो, -नका** ; प्रा. **णडा, णल** ; आ. **नरा, नल** ; वं. **नड, नल** (बांबू);

लां. **नड, नळ**; सिं. **णड्ड** (वेत); गु. **नळ** (लोखंडी); याकामसा. **नळा, नळकांडें**; अकामसा. **नड(णें), नाड(णें)** हीं क्रियापदें. ह्याच शब्दाशीं टर्नरनें जोडलीं आहेत. नडणें पहा. **नळकांडें, नळपट, नळगूत, नळपट्टी.**]

चंद्र आपुलां सोळा कळीं: केळीचेया गाभेवनांचां नळीं ॥ नरुस्व ५०७

कीं अनंगाचीं सुटेती नळकांडें: विरहिणीवरी नरुस्व. ५२३

नळी स्त्री. नळ (स्त्री), हाड, वेळूचा तुकडा, मोरी, गटार. A tube, the bone of the leg.

[सं. **नलकम्** (**अस्थि**), **नलिका नालिका**; प्रा. **णालिआ**; आ. **नली**; बं. **नली** (हाताचें हाड); ओ. **नळी**; हिं. पं. **नली**; गु. **नळी**; याकाम. **नळा, नळकांडें, नलकम्** हा शब्द मूळ '**नळा**' हा जो शब्द त्यापासून झाला. कमलाचा **नाळ–नाल** हा शब्द चिन्त्य आहे.]

नक्ष-नक्षा पुं. नक्श पहा. वजन, महत्त्व. Prestige, influence.

नक्षत्र न. तारा, तारकापुंज, चांगल्या किंवा वाईट काळाचें दर्शक चिन्ह. A star, a constellation.

[सं. **नक्षत्रम्, न+क्षत्, √क्षी.**]

ना अ. नकारदर्शक, पक्षांतरबोधक अव्यय. A negative particle.

[सं. **न, ना**; अकामसा. **नापत** = पत किंवा सचोटी ह्याचा अभाव; **नापसंद–त** = अमान्य; **नापादणें** (न + आपादणें)= न मिळणें; **नापीक** = पीक न उगविणारी जमीन; **नापूस** = अनादर; **नापेर** = न पेरलेलें शेत; **नाफेर** = फेरबदल न करणें; **नाबर** = नालायक; **नाबूद**=नष्ट (फा. न + बूद); **नाभी** = भिऊ नकोस; **नामर्द** (फा. **ना + मर्द**)= भ्याड, भित्रा, अशक्त; **नामाकूल** (**ना**+अर. **मअकूल्**)= मूर्ख बिनअकली; **नामोहरम्** (**ना + महरूम्**)= नष्ट, पराभूत; **नालायक** (फा. **ना + लायख**)= कर्तृत्वहीन; **नावड** = नापसंती; **नासमज** = असमंजसपणा; **नाहक** (फा. **ना + हक्क**)= अन्यायानें, विनाकारण.]

नाईक पुं. मुख्य, शिपायांवरील मुख्य. A chief, a leader.

[सं. **नायक** =मुख्य; शिकाम. **नाक**–महाराच्या नांवापुढचें उपपद, हें कदाचित् 'नाग'पासून. '**नायक**' > **नाईक, नायक, नायर** (?) हे तद्भव आहेत.]

नाइता पुं. कोंकणांतील मुसलमानांचा एक ज्ञातिगट. A class among the Muslims in the Konkan.

[सं. **नव > नाइता** = नवीन धर्मांतर केलेला; फा. **नाईति, नाईत्** = एक अरबी ज्ञात.]

नाऊ,–हु,न्हावी पुं. हजाम, न्हावी. A barber.

[सं. **नापितः, स्नापकः**; पा **नहापितो**; माग. **णाविद**; शौर. **णाविद**; महा. प्रा. **ण्हाविअ, णविद**; का. **नोयिद**; **नाविद्**; कु. **नाई**; बं. **नाइ, नाउ**; हिं. **न्हावी, नाई, नाऊ**; पं. लां. सिं. **नाई**; गु. **नाइ**; याकाम. **नावी.** प्राकृतरूपावरून हा शब्द **नापितः** पासूनच आल्याचें दिसतें. यादवकालीन रूप '**नावी**' असें आहे.]

नाक न. घ्राणेंद्रिय, वास घेण्याचें इंद्रिय, शरीर–अवयव. The nose.

[*IE.* Nesos; सं. **नस्**, **नासिका**; *Av.* Naonha; *Lat.* Nasus; *Lith.* Nosis; *Slav.* Nosu; *Got.* Nasg; *Ger.* Nase; *Sax.* Nosu; *Eng.* Nostril; सं. **नासिका**; प्रा. **णक्क**; देप्रा. **नक्को घ्राणं मूकश्च** (१५·५); पप.–**नक्क**; कु. **नाख**; आ. ब. **नाक्**; ओ. **नाक**; हिं. **नाक्** (स्त्री); पंलां. **नक्क**; गु. **नाक**; सिं. **नणु**; गु. **नाक्**; सिंह. **नकुट**; **नक्क** (जू. ब्लोक) < **नास्** ('**नस्**'ची वृद्धि); **नक्रम्** > हिं. **नाका**; प्रा. **णक्क**; पा. **नक्को**. (**नाकोटें > नाकपुट**), **नकट–नस्+ट** (अल्पार्थें मराठी प्रत्यय).]

नाक पुं. महार व परवारी यांच्या नांवांच्या पुढचें आदरार्थी उपपद. An appellation used after the names of mahars.

[सं. **नायक, √नी** किंवा '**नाग**' नांवाचे लोक होते त्यांचे वंशज ह्या अर्थीं.]

नाकें न. चव्हाटा, कोंपरा, टोंक, (ल.) दस्तुरी घ्यावयाचें ठिकाण, मुख्य ठिकाण, शेंवट. A place where two roads meet, a place to receive custom. duties.

[देप्रा. **नक्क** = सुईचें भोंक; बं. **नाका**; हिं. **नाका** (रस्त्याचें टोंक); पं. **नक्का** (नदीमुख); लां. **नक्का** (कड); गु. **नाकू**; सिं. **नाको** (प्रवेश, खिंड.).]

नाकेशर न. एक वनस्पति. A kind of plant.

[सं. **नाग + केशर**; बं. **नागेश्वर**; ते. **नागकेशरालु**.]

नाखिवा स्त्री. खाण्याचें पक्वान्न, नखानें केलेले गव्हले, नख पहा. A small bit cut off with nails out of wet lump of wheat flour.

नाखिवा माळतिया सळिवें । इत्यादि वळिवट्ट बखें । ऋ. ८२

नाग पुं. फडा असलेला साप, हत्ती. A cobra, an elephant.

[सं. **नाग** ; अकामसा. **नागपूजा, नागपाश, नागवील, नागबिंब, नागमोड, नागमणी.**]

नागर पुं. ब्राह्मणांची एक जात. नागरीक. A tribe of the Gujarati brahmins.

[सं. **नगर** > नागर.]

नागरमोथा पुं. एक सुवासिक वनस्पति. A kind of fragrant plant.

[सं. **नागरमुस्ता** ; हिं. पं. **नागरमोथा** ; बं. **नागरमुता** ; सिं. **नागरमोथ** ; ओ. **नागरमुथा.**]

नागवा, नागा, नंगा वि. वस्त्ररहित, उघडा, विवस्त्र. Naked.

[सं. **नग्नः, नग्नकः** ; पा **नग्ग** ; प्रा. **णग्ग, नग्गो, णक्क** ; बं. **नागा** ; ओ. **नागा, नंगला** ; हिं. **नागा** (भिकारी); गु. **नागू** ; सिं. **नंगा** (धाकटी बहीण). **नग्न** पहा. याकामसा. **नागोवा** (= नागवणूक–ज्ञा. १३–८५.); अकामसा. **नागविणें** = लुबाडणें.]

चंद्रातें घेतला कळांचा नागोवा । नरुस्व. ५८८.

नागवेली स्त्री. वनस्पतिविशेष, विड्याची पानांची लता. The betel-plant and its leaves.

[सं. **नागवल्ली** = नागाच्यासारखी वांटोळी वनस्पति ; हिं. बं. गु. **नागरवेल** ; कान. **नागरवल्ली** ; याकाम. **नागिवेली** (= विड्याचें पान).]

तेथ सुमनें आलीं दसेः विस्वाचां मूखीं **नागिवेली** वसे ॥ नरुस्व. ७५४

नागारी पुं. भाट, स्तुतिपाठक. A bard.

[सं. **नगर** (?) ; म. **नगारा** (?) ; याकाम. **नागारी** (ज्ञा. १३-८५).]

ऐसे बोलिजताए नगराभीतरीं : जें नागरी येकु येताये ॥ नरुस्व. १२८.

नागोवा पुं. नागवणूक. नागवा पहा.

नांगर पुं. जमीन नांगरावयाचें साधन, आउत. A plough.

[सं. **लाङ्गल** ; **लङ्गल** ; देप्रा. **णंगल, णंगर, णंगर** ; प्रा. **नंगल, लंगल** ; हिं. गु. **लंगर** ; सिं. **लंगरु** ; पं. **नंगल, लंगल** ; बं. **नांगल.** हा शब्द आस्ट्रोएशियाटिक असल्याचें प्रिझलुस्की सांगतो.]

नांगळी स्त्री. वेल. A creeper.

[सं. **लङ्गलिका.**]

नांगडा, नांगोडा पुं. विंचवाची नांगी. The tail of a scorpion.

[सं. **लांगूलम्** ; पा. **लंगूलम्, नङ्लम्** ; प्रा. **लंगूल, लंगोल, णंगूल, णंगोल** ; बं. **लागूल** ; ओ. **लांगुळ** ; **लांगुर** ; गु. **लंगुर, लंगूल** ; सिं. **नगळ, नगुट** (शेंपटी).]

नाच(णें) अक्रि. तालावर तेथल्या तेथें पाय हालविणें, नृत्य करणें, पावलें टाकणें. To dance.

[सं. **नृत्य**, √**नृत्** ४ गात्रविक्षेपे ; पा. **नच्च** ; प्रा. **णच्च(इ)** का. **नटून्** ; पपा. **नचनूं** ; कु. **नाचणो** ; आ. **नासिबा** ; बं. **नाचा** ; ओ. **नाचिबा** ; हिं. **नाचना** ; पं. **नच्चणा** ; लां. **नच्चण** ; सिं. **नचणु** ; गु. **नाचवूँ** ; ने. **नाच्नु.** धातु प्राकृतमध्येंच सविकरण उतरला व तेथून तसाच सविकरण मराठींत उतरला. चतुर्थ गणाचे बरेच धातु गणविकरणासह मराठींत आलें आहेत.]

नाचकण, नाचकंड न. नखें काढण्याचें न्हाव्याचें हत्यार. An instrument for paring nails.

[फा **नाचख्** = कुन्हाड ; सिं. **नच्किणो.**]

नाचार वि. गरीब, कंगाल, दरिद्री, **असमर्थ.** Poor, helpless, destitute.

[फा. **ना–चार्** ; अकाम. **लाचार.**]

नाजूक वि. कोमल, नरम, सुकुमार, अशक्त, सुंदर. Tender, soft, delicate, dainty.

[फा. **नाझुक्** ; हिं. **नाजूक** ; सिं. **नाज़ुक.**]

नाझर पुं. कोर्टांतील मूल्यवान् मालावर देखरेख करणारा अधिकारी. The sheriff of a law-court.

[अर. **नाझीर्**, < **नझ्र्** = दृष्टि.]

^{1}नाट पुं. नाच, नृत्य. A dance.

[सं. **नट** ; याकाम. **नाट.**]

मग रूप करिताय खेचरू : नाटें चतुर्विधें ॥ नरुस्व. ३१९.

^{2}नाट पुं. तोटा, नुकसान, खोट, नड, अडथळा. Loss, difficulty.

[सं. **नष्ट** ; पा. **नट्ठो** ; प्रा. **णट्ठो** ; का. **नोठ** ; पपं. **नठा** ; कु. **नाटो** (ब्रह्मचारी); आ. **नाठ** ; बं. **नाटुया** (उधळ्या); पं. **नट्ठणा** ; लां. **नट्ठा** ; हिं. **नठ** ; गु. **नाटूं** ; कान. **नाट** = अडचण ; अकामसा. **नाठा** = वाईट, खराब ; **नाठाळ** = अडेल, आग्रही ; **नाट** असा ' दिवाळखोर ' ह्या अर्थीं एक शब्द मराठींत आहे. त्याचेंहि मूळ हेंच आहे. (सं. **नष्ट** ; प्रा. **णट्ठ** ; पं. **नाटा** ; हिं. **नठ, नाठा, नाट** (दुष्ट); सिं. **नट** ; म. साठी बुद्धि **नाठी.**)]

^{३}नाट पुं. ठावठिकाण, स्थान. A place.

[द्रा. नाडु, नाड; याकाम. नाट. तयाचिये भजनाचे नाटीं (ज्ञा. १०९).]

नाटक न. खेळ, सोंग, बतावणी. A play or a drama.

[सं. नाटक, √ नट्; संसा. नाटिका, नाट्य; अकामसा. नाटकशाळा = रंगमहाल, दारुणीमहाल, अंतःपुर (ल.) महालांतील स्त्रिया, रखेल्या.]

नाठाळ वि. अडेल, आग्रही. Obstinate.

[सं. नाथ् १ उपतापे, नाथालु (?); देप्रा. नाथारा, नडिअ = वंचित. नाट पहा.]

नाड(णें) अक्रि. संकटांत सांपडणें, फसणें. To straiten, to be cheated.

[सं. नाथ् १ उपतापे; देप्रा. णडिअ = वंचित; कान. नाट,–नाड = अडचण; अकाम. नाड = संकट, अडचण, प्रतिबंध.]

नाडा, नाडी पुं. स्त्री. दोर, पट्टा, मोठा दोर. A rope or cord.

[सं. नाडी; प्रा. णाडी; हिं. नाडा; पं. नाडा; लां. नाडी; सिं. नारो; गु. नाड; ने. नारो; म. नाडी (स्त्री.).]

नाडी,–नाड स्त्री. हाताची नस, रज्जु, दोरी, शिरा. The pulse, any tubular vessel, a rope, a sinew.

[सं. नाडी, नाळी, नाली; पा. नाळिका; प्रा. णाडी, णाली; पपा. नाळ (ओघ); कु. नाडी; आ. नाडी; बं. नाडी, नाला (ओघ); पं. नाडी; लां. नाळ; सिं. नाडी; गु. नाडी. स्नायुरुक् > नाहरुक् > नारू = तंतुरोग. सं. स्नायु; पा. न्हारु; प्रा. ण्हारु, का. नोरु; म. नारू.]

नाणक, नाणें न. पैसा, चलन. A coin.

[सं. नाणक; गु. नाणुं; सिं. नाणु; याकाम. नाणी (द्रव्य), नाणें (=ठसा–नरुस्व. १९०); अकामसा. नानावटी, नाणवटी, नाणवट्टी = सराफ नाणें तयार करणारा.]

वसंताचीं नाणीं नगरें: कीं कामांचीं बिजाक्षरें ॥ नरुस्व. ८१६

ना तरी अ. अथवा, नाहीं तर. Or, otherwise.

[सं. नहि तर्हि; याकाम. ना तरी (ज्ञा.); अकाम. नाहीं तर.]

नातवान वि. दरिद्री, अशक्त, दुबळा. Poor, helpless, powerless.

[फा. ना + तवान्; शिकाम. नातवान (चित्र ३९.); पेकाम. ना-तवान (राज. ८-८९); नातवानी = दुबळेपणा, दारिद्र्य; पेकाम. नातवानी (खरे ७-३५१५).]

नातु,–तू पुं. मुलाचा अथवा मुलीचा मुलगा. A grandson.

[*IE.* Nepot; वैसं. नपात्, नप्तृ; *Av.* Napat; *Lat.* Nepos; *Lith.* Nepotis; *Slav.* Nestera; *Ger.* Neffe; *Sax.* Nefa; *Eng.* Nephew; सं. नप्तृ, नप्तृक; पा. नत्ता; प्रा. णत्तिअ, णत्तुअ; कु. नाती; आ. बं ओ. नाति; हिं. नाती; पं. नत्ता; (सं. नप्त्री; प्रा. णत्तिआ = नात, नातीण.)]

नातें न. (नात्याचा) संबंध, रक्ताचा संबंध, सोयरीक, आप्तपणा. Relationship (by blood or marriage.)

[१ सं. ज्ञातीयम्; पा. ञाति; गु. नातुं; गु. सिं. नातो; पं. नात्ता; हिं. नाता; सिंह. नाँ; कान. तद्भव. नण्टु = नातें; २ सं. ज्ञातित्वम्; प्रा. णत्तिअ. म. नात < सं. ज्ञाति.]

^{२}नाथ पुं. मालक, धनी, प्रभु, स्वामी. Lord, master.

[सं. नाथ, √ नाथ्.]

^{१}नाथ पुं. नाकांतील दोर-दोरी; वेसण. The nose-rope.

[सं. नस्तक; पा. नत्थु; प्रा. णत्था; पपा. नाहत; कु. नाथ्यूणो; ओ. नथ; हिं. नाँथ; पं. लां. नत्थ; सिं. नथ; म. 'नथ' = बायकांच्या नाकांतील दागिना. हा फार्शीउत्पन्न आहे कां ?]

नाथि,–थी अ. नाहीं. Is not.

[सं. नास्ति, √अस्; प्रा. णत्थि; गु. नथी; सिंह. नॅति; याकामसा. आथिनाथी (अस्ति नास्ति); नाथिला = नसलेला, लटका, वाईट; सं. नास्ति + ल (वि. प्र.); याकाम. नाथिले (नरुस्व. ४०५).]

^{१}नाद पुं. आवाज, ध्वनि, शब्द. Sound.

[सं. नद् १ शब्दे.]

^{२}नाद पुं छंद, शोक, वेड. Hobby, interest.

[अकामसा. नादावणें = नाद लागणें; नादी, नाद्या = छांदिष्ट.]

नादार वि. दरिद्री, अकिंचन, दिवाळखोर. Insolvent, poor.

[फा. ना + दार ; पेकाम. ना-दार (साने पयाव. ५७).]

नान्‌कटाई न. एक बिस्किटांचा प्रकार. A kind of bread.

[फा. **नान्‌ खटाई** (कॅथे येथील भाकर किंवा फा. **नान्** = भाकर, **खट्** < सं. **षट्**); = सहा पदार्थांची केलेली भाकर–गव्हाचें पीठ, अंडीं, साखर, लोणी (तूप), ताडीचा अंश, बदाम.]

नान स्त्री. भाकरी. A bread.

[फा. **नान्** ; पेकामसा. **नानपरवेशी**–(**नान्** + **पर्वरिश्** = पालन करणें). लढाईंत मृत झालेल्या शिपायांच्या बायकापोरांस पोटगी, रांडरोटी.]

ना ना अ. नाहीं, नाहीं, ना तरी, नाहीं तरी. No, not, nor.

नाना पुं. संबोधण्याचा एक शब्द. An honorific term of address for males.

[सं. **नना** = आई ; देप्रा. **णण्णो** (= ज्येष्ठो भ्राता–१५५·५) वं. हिं. **नाना** = आईचे वडील, आजोबा ; पं. **नान्ना** ; सिं. **नानो** ; ‘ नारायण ’ ह्या नांवाचा संक्षेप.]

नाना वि. पुष्कळ. Various, several.

[सं. **नाना.**]

नानी स्त्री. वात्सल्याचें–प्रेमाचें संबोधन. A term of address denoting endearment.

[*IE.* Nana ; सं. **नना** (आई); *Gr.* Nenos = Uncle ; *Lat.* Nonnus ; *Teut.* Nunna ; *Eng.* Nun.]

नांद स्त्री. रुंद तोंडाचें मोठें भांडें. A vessel with a broad opening.

[देप्रा. **णन्दं**–इक्षुनिपीनडकाण्डं कुण्डाख्यो भाण्डविशेषश्चेति द्व्यर्थम् (१५४·१७); सिं. **नादी** ; पं. **नांद** (पुं.); हिं. **नंद** (स्त्री).]

नांद(णें) अक्रि. राहणें, वास करणें, जुळणें, पटणें, (सासरीं) राहणें. To dwell, to reside, to abide.

[सं. **नंद** १ समृद्धौ ; सिं. **नंदन** = आनंद ; गु. **नंदवूँ** (मोडणें) ; याकाम. **नांदणें** (राहणें) ; अकामसा. **नांदणूक** = रहवास ; **नांदी** = प्रार्थनाविषयक पद ; ह्या धातूच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. **नंद** म्हणजे सुखी असणें, सुखानें राहणें, लक्षणेनें त्याच्या अर्थांत दोन्ही प्रकार–सामान्यीकरण, व विशेषीकरण झालें आहे.]

जें परब्रह्म देखाल नांदतें : येहीं डोळा ॥ नरुस्व. ६९७.

नापास वि. अ. यशस्वी, अनुत्तीर्ण, नापसंत, रद्दी. Failed.

[मरा. **ना** + (इंग्रजी) **पास.** दोन भाषांतील शब्दांचा समास.]

नाभी स्त्री. बेंबी, शरीरावयव. The navel.

[*IE.* nobh ; सं. **नभ्**–अवयवे ; *Av.* nab ; *Lat.* umb ; *Slav.* nobozn ; *Goth* naba ; *Sax.* nafela ; *Eng.* navel; याकाम. **नाभी** (= तळाशी, तारांची खुंटी–नरुस्व. १७३).]

नाम न. नांव, अभिधान. Name.

[सं. **नामन्** ; *Lat.* Nomen ; *Eng.* Name. फा. **नाम्.** कांहीं शब्दांत संस्कृत नामन् तर कांहींत फार्सी नाम हा घेऊन समास सिद्ध झाले आहेत. अकामसा. **नामजात** = नेमलेला, नेमणूक ; **नामदार** = सुप्रसिद्ध ; **नामधारी** = नुसत्या नांवाचा.]

नामाथि(णें) अक्रि. प्रसिद्धीस येणें, नांव होणें, नांवाजला जाणें. To be famous, to gain publicity.

[सं. **नामन्** + **अत्** १ बंधने ; **नाम्ना** + **अतित** = नामानें बद्ध (गुणाथिल, नामाथिल); **नामन्** + **अस्ति** > नामाथि (?).]

नामुष्की स्त्री अपकीर्ति, नाचक्की, कीर्ति. Ignominy, disrespect.

[अर. **नामूस्** = पराक्रम ; परस्पर विरोधी असे दोन्ही अर्थ आहेत.]

नायक पुं. नेता, म्होरका, पुढारी, सेनापती. A chief, leader.

[सं. **नी** + **अक** = नायक ; याकाम. **नायक** ; अकाम. **नाईक**, **नाक** (?), **नायकवडी** = नायक, शिपायांचा मुख्य ; **नायकीण** = नायकाची बायको, वेश्या. ‘नायक’ ह्या शब्दाचीं स्त्रीलिंगी दोन रूपें होतात: एक नायिका, दुसरें नायकीण. दुसऱ्या रूपाच्या अर्थात् विशेषीकरण झालें आहे.]

नायटा पुं. एक त्वचेचा रोग. Ringworm.

[इतर भाषांत ‘**नाइटा**’ असा शब्द आढळतो परंतु तो ‘**नाभिआवर्त**’ पासून निष्पादितां येतो. ह्या शब्दाचा त्याच्याशीं कांहीं संबंध आहे कां ?]

नायब वि. हाताखालचा, दुय्यम, मदतनीस, बदली काम करणारा. Deputy, subordinate.
[अर. नाइब्.]

नार पुं. गाभा (शिंगाचा, लांकडाचा), हृदय, अंतःकरण, केळीच्या सोपटाचा गाभा,–धागा. The heart or core.
[अर. **नार्** = मन ; कान. **नार** = तंतु.]

नार स्त्री. बायको. A woman or female.
[सं. **नारी**; प्रा. **नारिओ** ; गु. पं. हिं. **नार**, **नारी** ; सिं. **नारि** ; बं. **नारी**.]

नारळ पुं. फलविशेष, 'खोबरें'चें फळ, Cocoa-nut.
[सं. **नारिकेल**, **नारिकेर** ; पा. **नाळीकेरो** ; प्रा. **णालिअर**, **णारिएल** ; का. **नोरिल** ; कु. **नाँरूल** ; हिं. **नारियल** ; पं. **नाँरेल** ; सिं. **नारेलु**, **नाइरु** ; गु. **नारियल** ; ने. **नरिवल** ; याकाम. **नारियल** ; ग्रामीण. **नाऱ्योळ** (ज्ञा. ९-८०) ; फा. **नारगील** ; अकामसा. **नारळ हातीं देणें** = जावयास सांगणें, निरोप देणें ; **नारळाची आई** = नरोटी, दारिद्र्याचें लक्षण ; **नारळी पौर्णिमा** = श्रावण शुद्ध पौर्णिमा,–समुद्राचें पूजन करून नारळ टाकतात.]

नारायण पुं. एक नांव, विष्णूचें नांव. Name of deity,–Vishnu.
[सं. **नार** = (आपः) पाण्याचा समूह + **अयन**=आधार. आपो नारा इति प्रोक्ताः तेषाम् अयनम् (मनुस्मृ.)]

नारिकेल पुं. नारळ पहा. A cocoa-nut.

नारिं(रीं)ग न. फलविशेष (लिंबाच्या जातीचें, मधुर). A kind of fruit, an orange.
[द्रा. **नरु**, **नारु** = वास, गंध, > **नागर**, **नागरंग** (**र** = **ड** = **ग**) **नागर** आणि **नारल** किंवा **नारलु** (सुवास) हे संबद्ध आहेत. २ स्पॅनिश. **नारंज** ; अर. **नरंज** ; फा. **नारंग**.]

नारू पुं. रोगविशेष (धाग्यासारखा–तंतूसारखा एक कीटक त्यांतून निघतो.). Guinea-worm.
[१ कान. **नार** = तंतु ; ता. **नार** = तंतु ; २ सं. **स्नायुरुक्** (?); प्रा. **ण्हाऊ** = धमनी.]

(कारू)नारू पुं. बलुतेदार, गांवांतील कारागीर. A term used for certain artisans in village.
[कान. **नाडु**. **काडु** + **बाडु** = चांगली व वाईट जमीन.]

नाल पुं. जनावराच्या पायांत मारावयाची अर्धवर्तुळाकार लोखंडी पट्टी. A horse-shoe.
[अर. **नअल्** ; पेकामसा. **नालबंदी** = स्वारांना द्यावयाचा तयारीचा खर्च ; नालबंदाचें कार्य ; **नालसाहेब** = मोहरमांत पंजा काठीस लावून मिरवीत नेतात. पैगंबर महमद ज्या घोड्यावर बसून मक्केहून मदीनेस गेले त्या घोड्याचा दर्शक (अर. **न आल्**).]

नालकी,–खी स्त्री. पालखी, मानाचें आसन, बारा भोयांनीं वाहण्याची पालखी. A sort of *palki*
[अर. **न** + **आल्** ; पेकाम. **नालकी**, **पालकी**, महादजी शिंद्यामार्फत पेशव्याला बादशहाकडून '**नालखी**' चा मान मिळाला.]

नालस्ती स्त्री. निन्दा, फिर्याद, गाऱ्हाणें, तक्रार. Censure, condemnation, grievance.
[फा. **नाशास्त** + **ई** ; फा. **नालिश्** = रड, आक्रोश.]

नाला पुं. ओढा, पाण्याचा ओघ, प्रवाह. A rivulet, a streamlet, a current.
[सं. **नाल** ; हिं. **नाला**.]

नाव स्त्री. होडी, लहान गलबत, नौका, तर, जहाज. A boat.
[*IE*. Ne, Neu (Sne, Sneu = सरणें) ; सं. **नौ** ; *Av*. Nav ; *Gr*. Naf ; *Lat*. Na ; *Ger*. Nahho ; *Sax*. Naea ; सं. **नौ**, **नावा** ; पा. **नावा** ; प्रा. **णावा** ; का. **नाव्** ; कु. **नाऊ** ; आ. **नाउ** ; ओ. **ना** ; बि. हिं. **नाव्** ; पं. **नाउ** ; सिं. **नाउक** ; गु. **नाव** ; ने. **नाऊ** ; अकामसा. **नावाडी** = नावकरी.]

नांव न. कीर्ति, अभिधान, बिरुद, उपाधि. A name or appellation, title, fame.
[सं. **नामन्** ; पा. **नाम** ; प्रा. **णाम** ; का. **नाम्** ; पपा. **नाऊँ** ; कु. **नाँव** ; आ. **नाउ** ; बं. **नाम्** ; ओ. **ना** ; हिं. **नाँव**, **नाओं**, **नाऊं** ; पं. **नाँ**, **नाऊ** ; लां. **ना** ; सिं. **नाँउँ** ; गु. **नाम** ; याकामसा. **नांवानांवा**, **नांवेंनांवें** = वारंवार, क्षणोंक्षणीं, ह्याचा संबंध '**नांव**' शीं आहे.]
तरी सेवावी ना कां कोडें । नावानावा ॥ ज्ञा. ४·२१९.

नावेक अ. क्षणभर, थोडा वेळ. For a moment,.for a short time.
[सं. **ना**, **वा**, **नामन्** (?) ; याकाम. **नावेकु** (ज्ञा. १-३८), **नावानावा** = क्षणोक्षण (ज्ञा. ४-२१९).]

नाश(णें) सक्रि. नाश करणें, नाहींसें करणें. To destroy.

[*IE.* Nek; सं. **नश्** ४ नाशने; *Av.* Nac; *Gr.* Nek; *Lat.* Nec; *Slav.* Navi; *Got.* Naus. नास पहा.]

नास पुं. नाश, तोटा, नुकसान. Loss, ruin.

[सं. १ **नाशः**; पा. **नासो**; प्रा. **णास, णस्स**; कु. **नास**; पं. **नसाउणा** = हाकलणें; बं. **नास**; ओ. **नास**; हिं. **नास**; **नाशणें** पहा. गु. **नासवूँ** = पळून जाणें; अकाम. **नास(णें), नाश(णें)** = नाश करणें, बिघडणें. सं. २ **नश्य**; पा. **नस्स**; प्रा. **णास्स**; का. **नहा**, बं. **नासा**; हिं. **नासना**; अकामसा. **नासका, नासरा, नाशक, नासाड.**]

नासपात न. एकप्रकारचें फळ. A kind of fruit.

[फा. **नाश् पाती.**]

नासा, नासिका स्त्री. नाक, नासिका. Nose.

नास्ति क्रि. नाहीं, नव्हे. Is not.

[सं. **न + अस्ति**; मसा. **नास्तिक** = नास्ति असें म्हणणारा, ईश्वराचें अस्तित्व न मानणारा.]

नाह,-हो पुं. नवरा, नाथ, पति. Lord, husband, master.

[सं. **नाथ**; प्रा. **णाह.** सर्वत्र '**नाथ**' हें रूपच रूढ आहे. '**नाह**' हें **खानदेशांत** रूढ आहे.]

ऐसे सकळ सिद्धांताचा रावो । देवी लक्ष्मी येचा नाहो । ज्ञा. ३-२७३

नाह(णें), न्हा(णें) अक्रि. स्नान करणें, आंघोळ करणें. To bathe.

[सं. **स्ना.** ह्याच्या रूपांत फार फरक पडला आहे. **ह्रा, न्हा, ण्हा, नहा, नाह**-इत्यादि.]

तरी अनुतापतीर्थीं **न्हाला** । न्हाऊनि मज आंत आला ज्ञा. ९-४२०. त्यासी निजस्वरूपीं **नाहतां** । जाहली परम पवित्रता ॥ ए.भा. ११-२७६. न-नाहे माना हे न धरि ललना हेतु दुसरा ॥ न. द. १४६.

नाहक अ. उगांच, अन्यायानें, विनाकारण. Unjustly, in vain.

[फा. **ना + हक़.**]

नाहीं क्रि. नकारार्थी क्रियापदाचें रूप. Is not.

[सं. **नास्ति**; प्रा. **णत्थि,-णहि**; गु. **नथि,-थी, नहि**; बं. **नाय**; ओ. **नाही**; हि. पं. **नहीं**; लां. **नाही**; गु. **नही**; २ **नाहीं < न + अहई.** म. '**आहे**' आणि हिं. **अह्** हे सारखे दिसतात. **अह् <** सं. **आभवति**; प्रां. **आहूअ** (जु. श्लोक.); (चतर्जी); **अस्ति-असति.** सं. **नहि** ह्याच्याशीं संबद्ध असावा.]

१नाळ स्त्री. नुकत्याच जन्मलेल्या मुलाच्या बेंबीतून निघणारी वार. The umbilical cord.

[सं. **नाभिवलयम्**; पा. **नाभी**; प्रा. **णाहि**; आ. बं. **नाइ**; ओ. **नाइ**; बि **नाह**; सिं. **नहीं**; गु. **नाइडी**; **नाळकूट, नाळगूद** = एक रोग. नाभीपासून सूज सुरू होऊन सर्व शरीर व्यापतें. **नाइटा < नाभिआवर्त** असा एक शब्द इतर भाषांत आढळतो. त्याचा अर्थ बेंबी. (मराठी '**नायटा**' = व्रण हा शब्द निराळा.)]

२नाळ न. कमळाचा देंठ. The stalk of a lotus.

[सं. **नाल.**]

३नाळ पुं. तोफ (सुतरनाळ, गरनाळ). A cannon.

[फा. **नाल्** = तोफ **शुतर्नाल्** = सुतरनाळ.]

नाळकें न. नरसाळें, भांड्याला पडलेलें भोंक. A funnel, a leakage.

[सं. **नाला, नालिक,** (अल्पार्थे- **नाळकें**).]

नाळी स्त्री. घटका. Short time measure, a moment.

[सं. **नाली**; याकाम. **नाळी.**]

कीर्तिखांबी नाळीची अवलीळा. शिशु ५५.

नि उप. नकार,- आतिशयित्व,—निश्चय दर्शक उपसर्ग. A prefix denoting negation, addition, certainty,

[सं. **नि, निस्**; अकामसा. **निकामी, निरोगी**; **निमग्न**; **निकोप.**]

नि,-नी उप. खालीं. Down.

[*IE.* Ne, N, Nei; सं. **नी, नि**; *Av.* ni; *Lat.* nidus; (सं. **नीद**); *Slav.* nizu; *Teut.* ni, un; *Eng.* (Be) neath.]

३नि अ. पादपूरणार्थी अव्यय. An expletive.

[तेलु. **तो, तोनी**; **नी** = शीं (तृ. ए. व.) उदा. असत्याचे नि=असत्याच्याशीं.]

निकट वि. जवळचा, शेजारचा. Near, nigh, close.

[सं. **निकटम्** (**नि + कटम्**, √**कट्** १ आवरणे).]

निकड स्त्री. लकडा, तगादा. Urging.

[सं. **नि + कट्** १ आवरणे. अतिसान्निध्यावरून '**लकडा**' हा अर्थ सिद्ध होईल कां ? कां हा द्राविडोद्भव आहे ?]

निकर पुं. आवेश, कहर, गहजब, जोर, वाईट परिणाम. Vehemence, extremity.

[सं. नि + कृ > निकर्ष, निकर, निकरू = समूदाय, समूह. निकर्श-र्ष (नि + कृष्) = अतिरेक, पराकाष्ठा, हद्द ; निखरणें पहा.]

¹निका वि. चांगलें, बरोबर, योग्य, निश्चित. Pure, clean, right, proper, certain.

[सं. **निष्कृतः ; निष्कः** ; प्रा. **णिक्क** (स्वच्छ); ओ. **निक** (चांगले तांदुळ); हिं. **नीका, नेका** (< फा. **नेक**); पंजां. **निक्का** (तरुण); गु. **नीकूं** (चांगलें); याकाम. **निकें** (ज्ञा. ६·४२०); पुढील व्युत्पत्ति काल्पनिक दिसते. २ **निष्क** (= मापणें)–**निख्क–निक्क–निक–नीक** (भाअ. १८३३) ३ अर. **नकी–का** = शुद्ध, स्वच्छ.]

²निका पुं. मुसलमानी धर्मप्रमाणें लग्न, पाट, मोहतूर. A particular form of marriage (followed among the Muslims).

[अर. **निकाह** ; पेकाम. **निकाह, निका** (दिमरा. २-९५).]

निकामी वि. निरुपयोगी, कुचकामाचें. Useless.

[सं. **निष्कर्म** ; पा. **निक्कम्मो** ; प्रा. **णिक्कम्म** ; ओ. **निकमा** ; हिं. **निकामा** ; सिं. **निकामो** ; म. **निकम्मा** ; **नक्कामा.**]

निकाल पुं. बाहेर काढणें, वासलात, बाहेर पडण्याचा मार्ग. Vent, issue, passage.

[सं. **निस् + काशय** ; प्रा. **णिक्काल** ; सं. **निष्कालन, निष्काल्य** (√ **कल्**) = गुरें राखणीला नेणें, हांकलणें ; अप. **निक्कलिउ** (धातुसाधित); गु. **निकळवूँ** ; सिं. **निकिरणु** ; पं. **निक्कलणा** ; हिं. **निकलना** ; रुमा. **निकल.**]

निकुर पुं. निश्चय, राग, संताप. Surety, certainty, rage.

[सं. **निकर, निष्कृ** = बाहेर पडणें, **नि + कॄ** ६ निक्षेपे ; याकाम. **निकुर** = राग ; अकाम. **निकर.**]

निकृंत(णें) उक्रि. कापणें, छेदणें. To cut.

[सं. **नि. + कृत्** ६ छेदने.]

निकृष्ट वि. हलक्या प्रतीचा, अधम. Low, mean.

[सं. **नि + कृष्**–(निष्ठा)]

निकोप, नीकोप वि. निर्दोष. Free from disease, free from blemish or flaw.

[सं. **नि + कोप, निकफ** (?) ; याकाम. **निकोप.**] कीं चंद्राचें पूडिव नीकोप : कांडारिलें ॥ नरुस्व. ८६.

निखंद(णें) उक्रि. हुसकणें, निषेधणें To scout, to flout.

[सं. **नि + स्कंद्** १ गैक्ष्ये ; शिकाम. **निखंदणें**– निखंदोनि बोलिलों नको निंदू । न. द.]

निखर(णें) अक्रि. शेवटास जाणें, अगदीं नष्ट होणें, नाहींसा होणें. To be clean gone, to disappear.

[सं. **नि + क्षर्** १ संचलने, **निखरण**–निरभ्र (दिवस); निकर पहा.]

निखळ(णें) क्रि. सैल होणें, सुटून पडणें, उपटून काढणें, मोकळा करणें. To become loose, to unfix.

[सं. **निष्कालय, निष्काल्य,–निष्करोति, निष् + स्खल्, नि + स्खल्, निष्कास्** ; देप्रा. **निक्यो** = निष्कृत. टर्नरनें उगाच ह्या शब्दासंबंधीं अवडंबर केलें आहे. त्यानें उपसर्गांचें अर्थ विचारांत घेतले नाहींत.]

निखाडा वि. दाढीचे केस नसलेला. Beardless.

[**नि.** + देप्रा. **खड्डु** = दाढी, **खड्डुश्मश्रु**–दे. ना. माला (२-६६); शिकाम. **खाड** (= **दाढी**), रक्तें दाटली खाड मिसिया जंटा । Passion of Christ 25.]

निखार(णें) उक्रि. घालवून देणें, साफ नाहींसें करणें. To clear away.

[सं. **निस् + क्षारय,-क्षालय** ; हिं. **निखारना** ; पं. **निखारणा** ; अकामसा. **निखार** = ओहटी, निरभ्र आकाश ; **निखरणें** = शेवटास जाणें ; **निखारा** = जळता विस्तव, अंगार (सं. नि + क्षर् १ संचलने); **निखरडा** (सं. **निखर्यंप** (= अनाथांचा नाथ--तैत्त. सं. ५९५); देप्रा. **णिक्खुरिअं अदृढम्** (१५२·३); हिं. **निखोरा.**]

निखालस वि. स्पष्ट, साफ, निर्भिड, निष्ठावंत, भाडभीड न धरणारा. Plain, positive, blunt, open, straight-forward.

[अर. **नि + खालिस** ; शिकाम. **निखालस** (चित्र. १२३).]

निगड(णें) अक्रि. बांधलें जाणें. To get tied.

[सं. **नि + √गड्, निगडित** = जोडलेलें, जखडलेलें (निष्ठा), निकट.]

निगद(णें) सक्रि. बोलणें, सांगणें. To speak, to tell.
[सं. नि + गद् १ व्यक्तायां वाचि; अकाम. निगद,–दु = भाषण, बोल.]

निगद वि. निरोगी. Healthy, free from disease.
[सं. नि + गद.]

निगम पुं. वेद, वेदवाक्य. A common term for the Vedas.
[सं. नितराम् + गम्, निस् + गम्; निगमन = अनुमान, तर्क.]

निगर वि. ताठर, निबर. Rigid, stiff.
[कान. निगरिसु = सरळपणा, ताठपणा; अकामसा. निगरगट्ट = निलाजरा (सं. निगीर्ण, निग्रह + गट्ट (?).]

निगा,–घा स्त्री. जपणूक, देखरेख, काळजी. Care.
[फा. निगाह्; पेकाम. नेक–निगा (मदरु. २·७५).]

निगूढ वि. झाकलेलें, गुप्त. Covered, concealed.
[सं. नि + गूह्, (निष्ठा).]

'निगुत अ. इतक्यांत, नुकतेंच, स्पष्ट, यथार्थ, लक्षपूर्वक. Lately, clearly.
" जिये भाषेच्यिये रसवृत्तिः सा भाषाचे कुपे कीजेति निगुती ॥ नरुस्व. ४६

'निगूत स्त्री. शहाणपणा, कुशलता. Wisdom, skill.
[सं. नि + युज्, युक्ति, युगत > जुगूत (?)–शको.]
तें संकीर्ण गाइलें निगुतें: पन्नकें वर्धमान ॥ नरुस्व १८३

निग्रह पुं. संयमन, प्रतिरोध, दमन, निश्चय, आग्रह, पक्केपणा, बंदी, अटक. Restraint, control, pressing, imprisonment.
[सं. नि + ग्रह् ९ ग्रहणे.]

निघ(णें) अक्रि. बाहेर पडणें,–जाणें, उद्भवणें, घडणें. To get or go out, to issue.
[सं. निर्गम्; प्रा. णिग्ग, णिग्गम; याकाम. निगावा (= निघणें–नरुस्व. ३२८); ह्या धातूला मराठींत पुष्कळ अर्थ लक्षणेनें आले आहेत. उदा. कोनी निघाली = बाळंत झाली. तुमचें निघेल (ह्यांतील निघ हा धातु सं. स्निह्–वधकर्मा (निघंटु) पासून आला असावा.]

निघंटु पुं. यास्काचार्यांचा वैदिक शब्दकोश. A Vedic etymological dictionary.
[सं. निर् + ग्रंथ्, नि + घंट् (?).]

निच्च अ. नेहेमीं, नित्य, सदोदित. Always, often, constantly.
[सं. नित्य; प्रा. णिच्च; याकाम. निचनवें (उगी. ७४०, ऋपू. २५७)]

निचर(णें) अक्रि. गळणें, झरणें, टिपटिप गळणें. To ooze out, to flow off from.
[सं. निश्चर्; पा. निच्चर; कु. निचोडणो; हिं. निचोरणा; अकामसा. निचरा = सर्व पाणी बाहेर येणें, पाझर, स्वेद.]

निचळ वि. स्वच्छ, गप्प, स्तब्ध. Motionless, quiet, clear.
[सं. निश्चल; पा. निच्चलो; देप्रा. निश्चल्ल; प्रा. णिच्चल; हिं. निचूला; पं. निचल्ल; सिंह. निसंलू.]

निचिन्त वि. निश्चिन्त, स्थिर, शांत, काळजीरहित. Free from anxiety.
[सं. निश्चिन्त, निश्चिन्ता, √चिन्त्; अप. णिचिन्तइ, गु. पं. हिं. निचिन्त.]

निचेष्ट वि. बेशुद्ध, निचेतन. Devoid of motion.
[सं. निस् + चेष्टा, √ चेष्ट् १ चलने; याकाम. निचेष्ट (उगी. ७३).]

निज वि. आपलें, स्वतांचें, स्वकीय. One's own.
[सं. निज; अकामसा. निजजन = आपले लोक; निजधाम = स्वतांचें घर. हा शब्द प्रथम अवयव असलेले पुष्कळ सामासिक शब्द आहेत.]

¹निज(णें) अक्रि. झोंपणें. To sleep.
[सं. निद्रा (नि + द्रै १ स्वापे); पा. निद्दा; प्रा. णिद्दा; देप्रा. निज्जा; णिज्ज, गु. निजवूँ; अकामसा. निजविणें, निजसुरा (याकाम. निदसुरा–उ. गी. ५५५.)]

²निज(णें) अक्रि. मैथुन करणें, संभोगणें. To cohabit.
[देप्रा. णिअय (न) = रत, मैथुन; सं. निद्रा (पारंपरिक व्युत्पत्ति). हेमचंद्र हा शब्द देशी म्हणून देतो. ऑस्ट्रिक निद = संभोगणें. हा धातु सं. निधूवन पासून निघणें शक्य आहे. ह्यात ' ज ' ची उपपत्ति लागते.]

निजध्यास पुं. एकसारखें चिंतन. मनन. Constant meditation or thinking.
[सं. निदिध्यास. (अभ्यास, √ ध्यै, ध्यास.)]

निजाम पुं. हैद्राबादचा सुलतान. The Nizam.
[अर. **नझ्म्** = राज्य करणें ; **निधाम** = राज्यकारभार फारसी उच्चार **निझाम**; **निजाम** = कारभारी, दिवाण; **निजाम-उल्-मुल्क्** ही चिन्‌किलीजखानास व त्याच्या वंशजांस पदवी रूढ आहे. हैद्राबाद (दक्षण) येथें त्यांचें राज्य आहे.]

निझर(णें) अक्रि. पाझरणें, गळणें. To ooze out or from, to exude.
[सं. **निक्षर्** ; प्रा. **णिज्झर** ; हिं. **निइझर,-झरा**; = धबधबा.]

निझूर अक्रि. अशक्त, निकस (जमीन). Lean, poor, meagre.
[सं. **निजर्जरित** ; देप्रा. **णिज्झर जीर्णम् णिज्झूर** इत्यन्ये (१४६·११).]

निटाई स्त्री. सरळपणा, नीटनेटकेपणा. Straightness, suitableness.
[कान. **नेट** ; याकाम. **नीट**. **नीट** पहा.]

निटारि(णें) सक्रि. निवडणें, व्यवस्थेशीर लावणें. To arrange, to select.
[सं. **निट्** १ संनिकर्षे ; याकाम. **निटारिणें**.]

निठूर वि. क्रूर, निष्ठुर, कर्कश. Cruel, merciless, harsh.
[सं. **निष्ठुर** ; पा. **निट्ठुर** ; प्रा. **णिठ्ठुर** ; कु. **निरुठो** ; बं. **निठुर** ; ओ. **निठुर** ; हिं. **निठुर** ; सिं. **निठरु** ; न. **निठुर**.]

निडार(णें) अक्रि. उघडणें, फाडणें, पक्क होणें, परिपक्क होणें. To open up, to break open, to ripen.
[सं. **निस्** + **धृ**, **निर्** + **दृ** ९ विदारणे, **नि** + **दृह्** १ वृद्धौ; याकाम. **निडार** (= दाटी, परिपक्तता—ज्ञा. ६-२६६); बकाम. शिकाम. **निडार** = रोखलेली दृष्टि. ह्या शब्दाच्या अर्थांत फार बदल झाला आहे. अकाम. **निडार** = पक्क.]

तैसा चांदिणेयाचा निडारू : जेथ रत्नें वर्तेंची ॥ नरुस्व. ५१२

तंव निन्हां विस्मयो पातैला । मग मनीं निर्धारो लागैला ॥ बच्छह. ३६२.

तेणें तसें नगर तें धरितां निडारीं ॥ न. द. ९३.

निडाराचेनि कोंदाटें । मोतियें नावरति संपुटें ॥ ज्ञा. ६-२६६

तें नारदक्षेत्रीं संपूर्ण । पीक पूर्ण निडारलें ॥ ए. भा. १६-२४

निडाळ, निढळ न. कपाळ, डोकें. The forehead.
[सं. **निटिल** ; देप्रा. **निलार**, < **ललाट**, **रराटम्**, **निटलम्** ; प्रा. **ललाटम्**, **नलाटम्** ; प्रा. **निडाल**, **णडाल**, **णल्लाड**, **णिलाड** ; **नेडाली पट्टवासिता शिरोभूषणभेदः** (१५३·१८); हिं. **लिलाड** ; सिं. **निराडु** ; सिंव्ह. **नळल** ; याकाम. **निडळ** (= कपाळ-उगी. ३२५), **निढाळ** ऋपू. ६२९ ज्ञा. १३-१०८.]

निडळीं चंदनाचा टिळा उभा ॥ निरुस्व. १७२

निडी अ. समीप, जवळ. Near, close.
[सं. **निकट** ; प्रा. **निअड** ; याकाम. **नीडि**.]

निणी(णें) सक्रि. नेणें. To carry, to lead.
[सं. **नि** + **नी** १ नयने ; याकाम. **निणी**, **निनी** (शिशु. ८३१)]

प्रेमाचिं पेटीं । बांधिलिं येकाचां पोटिं ॥ मग नीणिले तटीं । सायुज्याचां । ज्ञा. १२-९२

नितकोर पुं. चतकोरचा अर्धा भाग, सबंदचा आठवा भाग. One eighth portion (of a bread).
[मरा. **निम** + **चतकोर**; कान. **कोर** = भाग अंश.]

नितंब पुं. कुल्ले, ढुंगण. Buttocks.
[सं. **नितंब**.]

नितर(णें) क्रि. शेवटचा थेंब पडेतोंपर्यंत दाबणें, पिळणें, झिरपणें, टिबकणें. To press to the last drop, to trickle.
[सं. **निस्तर्** ; पा. **नित्थर** ; कु. **निटारणो** ; पं. **नितार्णा** ; गु. **नितारवूँ**. २ सं. **निस्तरति** ; पा. **नित्थरति** ; प्रा. **णित्थरइ** ; पं. **नित्तरना** ; **नितरवूँ** ; ने. **नितार्नु** ; अकामसा. **नितळ(णें)**, **निथळ(णें)**. ३ सं. **नि** (**नितराम्**) + **तल** = तळापर्यंत दाबणें; **नितळ** = शुद्ध, स्वच्छ.]

नितांत वि. अत्यंत, पुष्कळ. Excessive, much.
[सं. **नितांत** ; 'उत्कंठा, अधीरता' ह्या अर्थीं नितांत हा पुं. नाम म्हणून रूढ आहे.]

नित्य अ. सतत, नेहेमीं, सदा. Constant, everlasting, always.
[सं. नित्य; प्रा. णिच्च; याकाम. निच नवें (उगी. ७४०).]

निद(णें) अक्रि. झोंप घेणें, निजणें. To sleep.
[सं. निद्रा, नि + द्रै स्वापे; याकाम. निदसुरा (उगी. ५५५) = अर्धवट झोंप, अज्ञान; अकामसा. निदसुरें, निदेलें = निजलेलें.]

निथर(णें), निथळ(णें) अक्रि. नितरणें पहा.

निदर्शन न. पाहणें, अनुभव. Seeing, experience.
[सं. निदर्शन, नि + √ दृश्.]

निदान न. मूळ, परिणाम, अखेर, रोगपरीक्षा, शेवट. First primary cause, ascertaining the cause of disease, end.
[सं. निदान.]

निदिध्यास पुं. सतत मनन,–चिंतन. निजध्यास पहा. Constant meditation.

निदेश पुं. आज्ञा, शासन. Order, command.
[सं. नि + दिश् ६ आदेशे.]

निदैव न. दुर्दैव. दुर्भाग्य. Ill luck, misfortune.
[सं. नि + दैव. तुझें निदैव आम्हीं कवणातें उपमावें ।]

निद्रा स्त्री. झोंप. Sleep.
[*IE.* Der = झोंपणें; सं. द्रै, द्रा–स्वापे, नि (= खालीं) + द्रा = झोंप; *Gr.* Dor; *Lat.* dor (dormitory); *Slav.* drem; *Russ.* dremali.]

निधडा वि. निःशंक, समर्थ, लायक, बेधडक. Doubtless, able, daring.
[सं. निधृष्ट; मरा. नि + धट्ट; निधडा = मनाची खात्री, निश्चय.]

निधन न. मृत्यु, मरण. Death.
[सं. निधनम्, नि + √ धा.]

¹निधा पुं. धग, आहळी, आंच, त्रास, वाफ. Glow, heat, trouble (fig.).

²निधा पुं. भोंवऱ्याचें आपल्याभोंवतीं फिरणें. Eddying.
[सं. नि + धाव् १ गतौ.]

निधाई,–य स्त्री. ओरड, गोंगाट, वडेजाव, भपका. Uproar, show, cry.
[सं. नि + धा.]

निधान,–निधि न. सांठा, संचय, खजिना, संग्रह. A treasure, a mine.
[सं. नि + धा.]

निधि पुं. भ्रमण, अंगाभोंवतीं फिरणें.
[सं. नि + धाव् १ गतौ.]
पैं भिंगोरी निधिये पडली । ते गमे भूमीसीं जैसी जडली ॥ ज्ञा. १५·१३६.

निधोट वि. फार शुद्ध, स्वच्छ, पवित्र. Exceedingly clean or pure.
[सं. निर् + धूत,–धौत; म. नि + धोट. (मूळ अर्थ ‘ फार चांगल्या रीतीनें धुतलेला ’, त्यावरून दोन अर्थ निष्पन्न झाले: एक फार शुद्ध–पवित्र व दुसरा फार दरिद्री, अनाथ.)]

¹निन्द(णें) अक्रि. तण काढणें. To remove weeds or poisonous grass.
[सं. नि–तृण (?); देप्रा. णिन्दिणी कुतृणोद्धारणम (१५०,४); गु. नींदवूँ; का. निंदा.]

²निन्द(णें) सक्रि. निंदा करणें. To censure.
[सं. निंदा (√ निन्द्).]

निन्हव(णें) सक्रि. लपविणें, गुप्त राखणें. To hide, to conceal.
[सं. निह्नु.]

निपचीत वि. कांहीं हालचाल न करणारा, चेतनारहित, निचेष्ट. Lying senseless or motionless from stupor or exhaustion.
[सं. निश्चेतन (?); नि + अप + चित् (= ज्ञाने) = बेशुद्ध पडणें; अकाम. निपचेत, निपचीप.]

निपज(णें) अक्रि. जन्मणें, उपजणें, सिद्ध होणें, निघणें, होणें. To spring or proceed from, to be born, to turn out.
[सं निर् + पद् ४ गतौ; प्रा. णिप्फज्ज, णिपज्ज. प्राकृतमध्यें संस्कृत धातु सविकरण आला आहे. गु. सिं. निपज; सिंह. निपन्, निपुत् (जन्म).]

निपट वि. अ. सर्व, पूर्ण, पूर्णपणानें, पूर्णांशानें. Whole, wholly, absolutely, exactly.

[सं. **निपत्**, **निस्पष्ट** (?); प्रा. **णिप्पट्ठ**; देप्रा. **णिपट्टो अधिकः** (१४८-१०); बं. **निपट**; ओ. **निपटी**; हिं. **निपट**; पं. **निप्ट**; सिं. **निपटु**; गु. **निपट**; ने. **निस्पट्ट** (नेपाळी शब्दावरून असें अनुमान होतें कीं मूळ सं. ‘**निस्पष्ट**’ असावें. परंतु म. **निपट** आणि **सपाट** हे शब्द सममूल असावे. व त्यांचा संबंध **पट्** धातूशीं असावा.)]

निपट(णें) सक्रि. खरडून काढणें, जाणें, सोडणें, नासणें. To scrape or wipe up.
[सं. **निर्** + **पट्** १ विचलने, **निस्** + **पत्**, **पद्** १ गतौ; देप्रा. **णिप्पट्टो अधिकः** (१४८·१०); गु. पं. हिं. बं. **निपट**; याकाम. **निपट**; बकाम. **निपटणें** = शेवटचें अपत्य; अकाम. **निपट** = अतिशय. सर्वस्वीं; **निपटार** = हीन **निपटून** = झाडून, सर्व.]
आतां एयावरी जें बोलनें । तें एनिचि बोलें सीहाणें । जें मौनांचें ही निपटणें । पीउनी गेलें । अमृतानुभव २७२. मातेंसी आवडे निपटणें । तेवीं उद्धव वृद्धपणीचें तान्हें ॥ एभा. २८·६९९

निपटें न. एक माप (धान्य मोजण्याचें), अर्धें चिपटें.
[सं. **नि** + **पट्** (?)]

निपणजा पुं. पणजाचा वडील. Great-great-grand-father.
[**पणजा** शब्द पहा. सं. ‘**आर्य**’; प्रा. **अज्ज**; मरा. **आजा**; सं. ‘**नप्तृ, प्रनप्तृ**’ पासून प्रा. **नत्तु**, **पणत्तु**. मराठी. **नातु**, **पणतु**. ह्या दोन्ही शब्दांवरून संभ्रमानें व उपमीतीमुळें **पणजा**, **पणतवंड**, व त्यापासून हे **निपणजा**, **निपणतु**, **निपणतंड** शब्द झाले.]

निपनवसा पुं. Cleverness. शहाणपणा.
[मरा. **निपुण** + **वसा**; याकाम. **निपनवसा**.]
मग बोलती निपनवसां । आणआगूं ॥ शिशु ८१

निपराध वि. दुष्ट, नीच, निरूपयोगी, व्यर्थ. Cruel, mean, useless.
[सं. **नि** + **अपराध** (?).]

निपळ स्त्री. रुक्ष जमीन, कोरडी जमीन. Arid or dry ground.
[सं. **निष्फल** किंवा **निप्लव**; प्रा. **णिफ्फल**; याकाम. **णिफळ**, **निफळ**.]

निःपात पुं. संपूर्ण नाश, नायनाट. Complete demolition, utter distruction.
[सं. **निस्** + **पात**, √ **पत्** १ पतने.]

निपुण वि. निष्णात, कुशल, वाकचगार. Skilful, clever.
[सं. **निपुण**; अकाम. **निपुण**, **निपूण**.]

निफज वि. स्पष्ट. Clear, distinct.
[सं. **निस्** + **पद्**; याकाम. **निफज** (ज्ञा. ७-१६), **निफन्नले** (निष्ठा).]
म्हणोनि प्रपंच समूळ सहज । नाशिवंत सकारण सजीव । याचें मूळ स्वरूप निफज । सांगों आतां ॥ ज्ञा. प्र. ५७५

निबंध पुं. गद्यलेख, प्रबंध, एक वतन,–शेटयेपणा. A treatise, a composition.
[सं. **नि** + **बध्** ९ बन्धने; **निबद्ध** = घट्ट बांधलेलें.]

निबर वि. जून व जाड, राठ, कठीण, मजबूत. Dry or old and stiff.
[सं. **निर्भर**; प्रा. **निब्भर**; अकाम. **निब्बर**.]

निबिड वि. दाट, गडद, घनदाट, (त्यावरून) अरण्य, जंगल. Dense, thick, (hence) a forest.
[सं. **निबिडम्** (अरण्यम्).]

निभ(णें) क्रि. पुरें पडणें, पूर्ण होणें. To come well out of, to finish, to succeed.
[सं. **निर्वह्** (भावे कर्मणि), **निर्भवति**; पा. **निब्बह**; प्रा. **णिव्वाह**; हिं. **निबहना**, **निबाहना**; पं. **निबाहुणा**; सिं. **निबाहणु**; (येथें दिलेली व्युत्पत्ति इतर भाषांतील रूपांना चांगलीशी लागूं पडत नाहीं. त्यावरून असें वाटतें कीं मराठींत हा शब्द आगंतुक असावा.) **निभाव(णें)** = पार पडणें, मुक्त होणें; **निभाव** (= पार, अन्त, जय); **निभावणी** = टिकाव.]

निभग(णें) अक्रि. तडकणें, फुटणें. To be cracked.
[सं. **निभञ्ज्**, **निभग्न** (?); प्रा. **निब्भग्ग**; देप्रा. **णिब्भुग्गो भग्नः** (१४९·१).]

निम वि. अर्धा, निम्मा. Half.
[फा. **निम्**, **निमा**; अकामसा. **निमगोरा** = अर्धवट गोरा; **निमपट** = अर्धा भाग; **निमसारा** = अर्धा सारा; **निमकी** = निम्या पटीचा पाढा.]

निम(णें) अक्रि. संपणें, शेवटास जाणें, कमी होणें. To be finished, to end, to diminish.
[सं. **नि+मी** ३ हिंसायाम्; ह्याच्या भूतकाळचें रूप काव्यांत विशेष वापरलेलें आढळतें. **निमालें**, **निमालेंपण** = मरण.]

निमक पुं. मीठ, लवण. Salt.

[फा. निमक्, नमक्; पेकामसा. निमकहराम् (फा. निमक् हराम्)=कृतघ्न. निमकहलाल (निमक हलाल), = कृतज्ञ, नमकहलाल (वाड. सनदा. ३२).]

निमट(णें) अक्रि. नाहींसें होणें, संपणें. To disappear.

[सं. निर् + मृज् १० शौचे, निर् + मघ् ९ विदारणे.]

निमचा पुं. लहानशी तरवार, एक हत्यार. A small scabbard, a sword.

[फा. निमूचा; पेकाम. निसूचा (रा. ६·२२८).]

निमताना पुं. पिकाचा अंदाज व आकार, ताळा, अनुमान. Estimate of the crops.

निमा पुं. अंगरखा. A coat, an apron.

[फा. निमा = आंतून घालावयाचा अर्धा अंगरखा; जामा + निमा.]

निमाज पुं. नमाज पहा.

निमासुर वि. सुंदर, सुरेख, तरुण. Beautiful, young.

[सं. नि + मृज् १० शौचकर्मणि (?)]

सुंदर निमासुर वदन । रघुनंदन उभा तेथें ॥

निमित्त न. हेतु, कारण, उद्देश, प्रयोजन. Purpose, intention.

[सं. नि + मित्त (√मा ?)]

निमिष, निमेष पुं. पापणीच्या उघडझांपेस लागणारा वेळ. The twinkling of an eye.

[सं. निमिष, √मिष्; एक कालपरिमाण; १८ निमेष = काष्ठा; २० काष्ठा = कला; २० कला = क्षण.]

निमुट(णें) क्रि. लय पावणें, झांकणें, मिटणें, निमणें, पुसून टाकणें. To cover, to close, to wipe off, to merge in.

[सं. निर् + मृज् १० शौचकर्मणि, निर्मृष्ट.]

नातरी वारेआचेनि आंगें झगटली । दीपाची दिठी निमुटली । कां लखुलखूनि हारतली । विजु गगनीं । ज्ञा. ६-२८५

निमूळता वि. पुढें पुढें बारीक होणारा, क्रमानें उतरता. Tapering. conical.

[सं. निम्न + उत् + नम्–निम्नोन्नम्-निमुण–निमुळ.]

निमोला वि. बिन मोलाचा, मोल पहा. Useless.

निंब पुं. लिंबाचें झाड. The *nim* tree.

[सं. निंब; हिं. नीम; अकाम. लिंब, लिंबारा; निंबोणो, णिंबोणी निंबोळी, लिंबोणी (सं. निम्बगुलिका; प्रा. णिंबोलिया; याकाम. निंबोली (ज्ञा. ९-४३४); न, ण, ल ह्या वर्णांत अभेद झाला आहे.]

निंबू पुं. न. फलविशेष, लिंबू. A lime, a lemon.

[सं. निम्बूक; प्रा. निम्ब; कु. निमुवा; आ. नेमु; बं. नेबु; ओ. नेबु; हिं. निंबू; पं. निम्बू; गु. लिंबु; ने. निबु; हाब्सन जाब्सन ‘ निम ’ असें रूप देतो. अकाम. निंबू, लिंबू, निंबलोण (सं. निंबूक + लवणम्) = दृष्ट काढण्याचा उपचार; निंबझाडा = लिंबाचीं पानें अंगाभोंवतीं गुंडाळून कलशाची पूजा करावयाचा एक धर्माचार.]

निंबूर पुं. बाजरीचीं तयार झालेलीं कणसें. Ears of *Bajra*.

नियम(णें) सक्रि. ताब्यांत ठेवणें, निग्रह करणें. To restrain, to control.

[सं. नियम, नि + √ यम्; अकामसा. **नियमन** **नियम** = निग्रह, कायदा, बंधन; **नियमित** = नेमलेला, नक्की झालेला; **नियत** = नियमन केलेला, ठराविक; **नियत** (**नियति** = शील, दानत, दैव.]

नियोग(णें) सक्रि. काम सांगणें, आज्ञा करणें. To appoint, to assign, to command.

[सं. नि + युज् (णिच्) ७ योगे; अकामसा. **नियोजणें**, **नियोग** = आज्ञा, हुकुम, भावाच्या विधवेशीं विवाह.]

तें तेथौनि मग पांतां । म्हणे साक्षी मी अकर्ता । हे गुणचि क्रियाजाता । नियोगीना । ज्ञा. १४-२९१

निर् अ. उप. नकार–खात्री–आश्वासन,–आतिशयित्व–दर्शक उपसर्ग. A particle or prefix implying negation, certainty.

[सं निर् १ (= निर्गत). २ (= नितराम्). पुढील सामासिक शब्दरूढ आहेत; अकामसा. **निरहंकार**, **निरंकार** (अशिष्ट) = शुद्ध, निराकार; **निरंकुश** = अमर्याद, बंधनरहित; **निरंजन**=निर्विकल्प, निष्कलंक; **निरांजन** = आरतीचें धातूचें पात्र, **निरपराध** = निर्दोषी; **निरपेक्ष** (**निर् + अपेक्षा**), **निष्काम** = अपेक्षा नसलेला; **निरभिमान** (**निर् + अभिमान**), **निरभिलाष** (**नि् + अभिलाष**) = निष्काम; **निरभ्र** (**निर् + अभ्र**) = ढगाचा अभाव; **निरयास**, **निरायास** (**निर् + आयास**) = प्रयत्नाशिवाय; **निरर्थक** = अर्थशून्य, फुकट; **निरलस** = उद्योगी, आळस नसलेला; **निरवकाश** = फुरसत नसलेला; **निरवधि** = अनंत, बहुत,

अमर्याद; **निरशन** = कडकडीत उपास ; **निरस** = रस-चव नसलेला ; **निरक्षर** = अशिक्षित ; **निराकरण** = खंडन, निवारण ; **निराकार** = आकाराशिवाय ; **निराधार** = निराश्रित, आधाराचा अभाव ; **निराभास** = असत्य, आभासाचा अभाव ; **निरामय** = निरोगी, आनंदी ; **निरालंब** = निराश्रय ; **निराश** = आशा भंग पावलेला ; **निराशणें** = आशा सोडणें ; **निराहार** = कांहीं न खाणें ; **निरिच्छ** = इच्छारहित ; **निरिंद्रिय** = व्यंग असलेला, पंढ ; **निरीश्वर** = ईश्वराच्या अस्तित्वाचा अभाव ; **निरीक्षण** = सूक्ष्म अवलोकन ; **निरुत्तर** = उत्तराचा अभाव ; **निरुत्साह** = उत्साह नसलेला ; **निरुद्योगी** = उद्योग न करणारा ; **निरुपयोग** = उपयोग नसलेला ; **निरुपाधिक** = त्रासापासून मुक्त ; **निरुपाय** = उपाय नसलेला ; **निरोगी** = रोग नसलेला ; **निर्गम** = सद्गति, शेवट, निकाल ; **निर्गुण** = गुणांच्या पलीकडचा ; **निर्घृण** = निर्दय, निष्ठूर ; **निर्जन** = ओसाड ; **निर्जर** = देव ; **निर्जल** = पाणी नसलेला देश ; **निर्जीव** = अचेतन, प्राण नसलेला ; **निर्णय** = निश्चय, निकाल ; **निर्दलन** = उध्वंस, नाश ; **निर्दोष** = दोष नसलेला ; **निर्द्वंद्व** = भांडण-कलह नसलेला ; **निर्धार** = निश्चय, खात्री ; **निर्धूत** = धुतलेला ; नागविलेला ; **निर्बंध** = निश्चय, मर्यादा ; **निर्बल** = अशक्त, कमजोर ; **निर्बुद्ध** = मंद, बुद्धि नसलेला ; **निर्भर** = भरपूर, गाढ, अतिशय ; **निर्भर्त्सना** = निंदा, उपहास ; **निर्भीड** = भीडमुर्वत न ठेवणारा, स्पष्ट वक्ता ; **निर्भेळ** = भेळ–मिश्रण नसलेला ; **निर्मम** = ममत्व नसलेला, आपलेपणा,–स्वत्व सोडलेला ; **निर्मल-ळ** = स्वच्छ, मळ नसलेला ; **निर्माण** = उत्पन्न ; **निर्माल्य** = देवास वाहून काढलेलीं शिळीं फुलें ; **निर्मूल-ळ** = मूळ नसलेला, मुळासुद्धा काढलेला ; **निर्लज्ज** = बेशरम ; **निर्लेप** = शुद्ध, पवित्र, कसलाहि पदार्थ न चिकटलेला ; **निर्वच** = निर्णय ; **निर्वंश** = वंश नाहींसा झालेला ; **निर्वाळा** = खातरी, विश्वास ; **निर्विकल्प** = विकल्प–संशय-कल्पना नसणारा ; **निर्विकार** = फरक, बदल–विकार नसलेला; **निर्विघ्न** = संकट नसलेलें ; **निर्विवाद** = बिनतक्रार ; **निर्विष्** = विषरहित ; **निर्वीर** = वीर पुरुषाशिवाय ; **निर्वीर्य** = शक्तिहीन; पौरुषहीन ; **निर्वेद** = किळस, वीट ; **निर्वेध** = निष्काळजी ; **निर्व्यसन** = व्यसनाचा अभाव.]

निरख पुं. दर, भाव, चालू किंमत. Market rate, price.

[फा. **निर्ख्**, > **निरख्**, **निरिख्** = बाजारभाव ; हिं. **निरख** ; पेकाम. **निरख** (खरे ८-३९७६).]

निरख(णें) सक्रि. सूक्ष्मपणानें पाहणें, परीक्षा करणें. To behold intently.

[सं. **निर्** + **ईक्ष्**; प्रा. **निरिक्ख** ; गु. प. हिं. **निरख** ; हिं. **निरेखना** ; याकाम. **निरख**.]

निरड(णें), **निरढल(णें)** उक्रि. पक्के करणें, पकविणें, मुरवणें. To season, to harden.

[सं. **नि** + **रध्**, **रंध्** ४ हिंसायाम्.]

निरढाव(णें) अक्रि. संवय होणें. To habituate, to harden.

[सं. **निर्** + **धापनम्**, **निर्धावनम्**.]

निरण न. ओटीपोट, गाई–म्हशीचा गुह्यभाग. The belly below the navel, the pudendum of a female animal.

निरंतर वि. अ. सलग, जोडलेला, मध्यें अंतर नसलेला, कायमचा, नेहमीं. Having no intervening space, constantly.

[सं. **निर्** + **अंतर**; याकाम. **निरंतर** (निरुक्त ४३८).]

निरप(णें) उक्रि. पुसून,- निपटून काढणें, खडसावणें. To scrape or wipe up or off.

[सं. १ **निर्** + **पृ** (निपरणम्) (वर्णविपर्ययाने)–निरप २ **निर्वपनम्** (?) ; **निरपण** = खरवड, धूण , निपटा.]

निरव(णें) उक्रि. ताब्यांत देणें, स्वाधीन करणें, सोंपविणें, कामावर नेमणें, तडीस नेणें. To consign to, to commit to, to carry to end.

[सं. **निर्** + **वह्** १ प्रापणे ; **निरवानिरव** = सारवासारव.]

निरवडी स्त्री. निग्रह, चातुर्य, कौशल्य. Control, skill.

[सं. **निर्** + **वर्ती**, √**वृत्** (?). **नि**+**ऋत** ? (सत्य, खरें).]

निरस(णें) सक्रि. फेंकून देणें, दूर सारणें, घालविणें, नाश करणें, मरणें. To pass off or away, to push away, to destroy, to die.

[सं. **निर्** + **अस्** ४ क्षेपे.]

निराळा वि. वेगळा, स्वतंत्र, दुसरा, अन्य, भिन्न. Separate, distinct. another, different.

[सं. **अन्यतर**>**अन्यअर**–**न्यार** (+ ल प्रत्यय)– **न्यारल**–**निराळ** (भा. अ: १८३३) ; **निरालय** (=रिकामा).]

निरी स्त्री. चुणी, घडी (धोतराची, लुगड्याची), हाताच्या बोटानें केलेली लहान घडी. The small fold of a dhotee, a plait.

[कान. **निरिसु** = व्यवस्थित करणें, **निरी** = घडी, पट्टी, हाताच्या बोटांनीं केलेली घडी ; सं. '**नीवि**' शीं संबद्ध आहे कां ?]

निरुक्त न. कठीण शब्दाची व्युत्पत्ति सांगून त्याचा अर्थ सांगणारें शास्त्र, वेदांग, 'निघंटु' नांवाच्या वेदाच्या शब्दसंग्रहावरील टीका. Science of etymology.

[सं. **निर् + उक्त** ; √ **वच्** १ शब्दे.]

निरूतें वि. अ. निश्चित, कायम, पक्के, खरें, शुद्ध, खास. Certain, firm, true, distinct.

[सं. **निरुक्त** (**नितरां उक्तम्**); देप्रा. **णिरुत्तं निश्चितम्** (१४८-३); '**निरुक्त**' पेक्षां '**नि + ऋत**' (= खरें) ही व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक आहे. याकाम. **निरुतें** (= पूर्णपणें–ज्ञा. १०-६३); अकाम. (काव्य) **निरुत.**]

जो श्रीकृष्णु वेदा नव्हे ठाऊका निरुता नेणवे तिही लोका ॥ नरुस्व. २९

निरूपि(णें) सक्रि. सांगणें, वर्णन करणें. To express, to expound, to explain.

[सं. **नि + रूप्** १० रूपक्रियायाम् ; **निरूपण, निरोपण** = कथन, वर्णन, प्रतिपादन.]

निरुंध(णें) उक्रि. बुजविणें, भरून काढणें, रोखून धरणें, अटकाव करणें. To fill in, to prevent, to describe.

[सं. **नि + रुध्** ७ आवरणे–हा धातु मराठींत **सविकरण** आला आहे. '**नि + रुन्ध्**' हें रूप मराठींत उतरलें आहे.]

कां आपुलां गरलज्वालीं । जालीं तेयां आंगाचि पेंदलीं । ते सर्पंचि करीं विलीं । निरुंधलां ॥ ज्ञा. १६·४०८.

निरोध(णें) सक्रि. अटकाव करणें, प्रतिकार करणें. To prevent, to restrain, to control, to check.

[सं. **नि+ रुद्ध** १ आवरणे; याकाम. **निरोध** (=अडथळा-नरुस्व. ४०२); अकामसा. **निरोध,–न–क** = प्रतिबंधकरणारा.]

निरोप पुं. आज्ञा, संदेश, मजकूर, परवानगी, कबुली. A message, permission to depart.

[सं. **नि + रुप्** १० + **रु** २ गतौ (विच्.).]

निरोल(णें) सक्रि. मळ काढून स्वच्छ करणें, मशागत करणें. To make clean by removing dirt.

[सं. **निर्मल** (ना.धा.), **ओल** = ओलें (M. William).]

मूडांहूनि विं काढिलें । मग निरोलिलिये भुइं पाखिरिलें । तरि तें सांडी विखुरी गेलें । म्हणो ये काइ ॥ ज्ञा. ९-३९.

निर्गांठ स्त्री. न सुटणारी गांठ. A fast or firm knot.

[सं. **निर्** (नितराम्) + **ग्रंथिः**, √**ग्रथ्**.]

निर्गुंडी स्त्री. एक प्रकारची वनस्पति. A kind of plant or herb.

[सं. **निर्गुंडी.**]

निर्बुज(णें) उक्रि. दिङ्मूढ होणें, घाबरणें, अडखळणें चुकणें. To be confused or confounded, to be at sea.

[सं **निर्+ बुध्–निर्बुध्य**; प्रा. **णिब्बुज्झ**; २ **निर्+मुह्** ४ मोहने–**निर्मुह्य > निमुज्ज** ; ह्यांपैकीं कोणतीहि व्युत्पत्ति स्वीकारिली तरी मूळ धातु **सविकरणच** मराठींत आला आहे.]

निर्वाण न. स्वर्ग, मोक्ष, मुक्ति (बुद्ध धर्मांच्या मताप्रमाणें). Emancipation, Summum Bonum.

[सं. **निर् + वा,** (निष्ठा) **निर्वाण** = उच्छ्वसित सोडलेलें ; (लौकिक अर्थ) निदान, अतिशय निकृष्टावस्था ; **निर्वाणीचा** = संकटाच्या शेवटच्या अवस्थेसाठीं राखून ठेवलेला.]

निर्वाह पुं. निकाल, तड, निवाडा, निश्चय, कारभार, संपादणी. Conducting to end, carrying on, accomplishing.

[सं. **निर् + वाह,** √**वह्** १ प्रापणे.]

निऱ्हां अ. अगदीं. Quite.

[सं. **नितराम्** ; प्रा. **निअराँ > निऱ्हां** ; हिं. **निरा** ; याकाम. **निऱ्हा** = कायमचें.]

नातरी अधोकढीं ठेलें । कां निऱ्हां करपौनि गेलें ॥ तैसेंहि खाये चुकलें । रसा जें येवों ॥ ज्ञा. १७-१५५-२४८

निलख अ. पूर्णपणें, निःशेष. Completely.

[सं. **निरुतें (?) निऋत (?)**; याकाम. **निलख** (पूर्णपणें).]

करी घट्टकामुखु । तरि मनोदंड्डु तोडी निलखु ॥ भाए. ४५६

निलाग वि. लाग-संबंध-संपर्क नसलेला, निराश्रयी. Without any contact or support (of anything), not worm-eaten.
[**सं. नि+लाग √ लज्, लग.** कीड न लागलेलें (धान्य वगैरे).]

निलाजरा वि. निर्लज्ज, बेशरम. Shameless, impudent.
[सं. **निर्+लज्जा ‘ रा ’** मराठी प्रत्यय.]

निव(णें) क्रि. गार होणें, ऊष्णता कमी होणें, थंड होणें, शमणें, खपणें. To cool, to abate, to be mitigated.
[सं. **निस् + वा ; निर्वा ;** पा. **निब्बा ;** प्रा. **णिव्वाव ;** बं. **निवा ;** पं. **निब्णा** (मालवणें); सिंह. **निमनवा, निवेनवा** = निवणें, विझणें.]

निवट(णें) अक्रि. स्पष्ट बाहेर पडणें. To stand out, to come out, to turn out.
[सं. **नि + वट् १०** विभाजने, **निर्वृत् ;** पा. **निब्बत्त ;** प्रा. **णिब्बत्त ; णिव्वट्ट ;** कु. **निब्टाउनो ;** हिं. **निबटना. निवटणें** म्हणजे ठार मारणें, नष्ट करणें ह्या अर्थीं मराठींत एक धातु आहे; तोहि ‘ **निवृत्** ’ पासून; **निवडणें** हा **नि + वट् १०** विभाजने पासून; **निवळणें** = निमणें हा सं. **निर्मा ;** पा. **निम्मिता;** प्रा. **णिमाव** ह्यापासून आहे. याकाम. **निवट** (उगी. ४४४).]

निवड(ट)(णें) सक्रि. वेचणें, निर्णय लावणें, पसंतीस येणें. To call out, to select, to choose, to decide.
[सं. **निवर्तन, नि+वट् १०** विभाजने ; प्रा. **णिव्वड,** = पृथक् होणें; **णिवट्ट ;** गु. **निवडवूँ ;** पं. **निब्बडना ;** हिं. **निब्बडना;** अकामसा. **निवड** = पसंती, शेलकें, वेंचक ; **निवडपाखड** = पाखडून स्वच्छ ; **निवडणूक** = वेचणी, पसंती ; **निवाडा** = निर्णय, तडजोड, **निवाडें** = निश्चयानें.]

निवडंग पुं. वनस्पतिविशेष, कांटेरी झुडूप. A kind of prickly-thorny plant.
[सं. **स्नुहिदंड ;** हिं. **सेहुंड ;** ते. **चेमुंड** (?)]

निवतणें सक्रि. (जेवण्यास) बोलावणें. To invite (for dinner).
[सं. **निमन्त्र् ;** प्रा. **निमंतण ;** अकाम. **निवतण, निवताण** (ग्रामीण), **आवतण, आवताण.**]

निवर्त(णें) अक्रि. परत फिरणें, माघार घेणें. मरणें, पुनः स्वर्गांत परत जाणें. To turn back or from, (fig.) to die.
[सं. **नि + वृत् १** वर्तने ; **निवर्तन** = जमीन मोजण्याचें एक परिमाण.]

¹निवस(णें) अक्रि. जवळ राहणें, वसती करणें. To live close by.
[सं. **नि + वस्.**]

²निवस(णें) सक्रि. पानें तोडणें, वेगळें करणें, निवडणें. To separate, to pluck leaves.
[सं. **निर + √वस्, √वच्** , न्यवच (ग्रामीण).]

निवळ(णें) अक्रि. स्वच्छ होणें, मळ नाहींसा होणें, शांत होणें. To become clear, or limpid.
[सं. **निर्+मल** (नाधा); प्रा. **निव्वल;** अकामसा. **निवळ** = स्वच्छ, शुद्ध. **निव्वळ** = फक्त ; **निवळी** = स्वच्छ करण्याचा पदार्थ, बीं वगैरे.]

निवाडा पुं. निकाल, तडजोड, भिन्नता. निवडणें पहा. Decision, settlement, difference.

निवांत वि. उपद्रवरहित, शांत, स्तब्ध. Still, quiet, without any disturbance.
[सं. **निर्वात, निवांत.**]

निवार(णें) सक्रि. दूर सारणें, हटविणें, टाळणें. To push aside or back, to prevent.
[सं. **नि + वृ ९** वरणे ; **निवारण** = परावृत्त करणें, मागें फिरविणें.]

निवार,-रा पुं. आसरा, शांत स्थान. Shelter.
[म. **नि + वारा ;** वारा नसलेलें ठिकाण.]

निवारसा पुं. वारसाचा हक्क नसलेला. Non-possession of right.
[अर. **निवारीश** = वारसा नसलेला.]

निवास पुं. राहण्याचें ठिकाण. An abode.
[सं. **नि+वस्.**]

निविष्ट वि. अंतर्भूत केलेलें, समाविष्ट, स्थिर. Included, entered in, seated.
[सं. **नि+विश्** (निष्ठा.)]

निवृत्त वि. मागें फिरलेला. Turned back.
[**नि+वृत् १** वर्तनेः **निवृत्ति** = उपरति, मन वळविणें.]

निवेद(णें) सक्रि. सांगणें, बोलणें, अर्पण करणें, भाषण करणें. To address, to represent, to deliver.
[सं. **नि + विद्** १० आख्याने ; **निवेद्य, नैवद्य** = अर्पण केलेला जिन्नस; याकाम. **निवेदु** (ली. च. ३-४७); ग्रामीण. **निवद, निवाद.**]

निवेश पुं. आत जाणें, प्रवेश. Entrance, entering.
[सं. **नि + विश्** ६ प्रवेशे.]

^{1}**निशा** स्त्री. रात्र. Night.
[सं. **निशा, √ शी** २ शयने (?).]

^{2}**निशा** स्त्री. कैफ आणणारा मद. Intoxication.
[अर. **नशा.**]

^{3}**निशा** स्त्री. खात्री, विश्वास, आश्वासन. Assurance, confidence.
[फा. **निसआ, नसिआ.**]

निशाण न. ध्वज, पताका, झेंडा, निसाण पहा. An ensign, a flag, a banner, the mark.

निशाणी स्त्री. खूण, चिन्ह, लक्षण. Sign, mark.
[फा. **निशानी ; निशानदार** = नेम अचूक मारणार.]

निशा(सा)ण पुं. नगारा, डंका. Kettle-drum.
[प्रा. **निःसाण** ; याकाम. **निशाण** (= रणवाद्य, नगारा.- नरुस्व. ७४९).]

देवा, माझे होते बहीरी : तेहीं निशाण आइकिलें दुरी ॥ नरुस्व. १२८.

निष्क न. सोन्याचें नाणें. A gold coin.
[सं. **निष्क.**]

^{1}**निष्टंक(णें)** अक्रि. निर्वेधपणानें उरकणें, संपविणें. To finish without interruption.
[सं. **निस् + तक्** (इ) गतौ.]

^{2}**निष्टंक(णें)** अक्रि. निश्चय करणें. To resolve.
[सं. **निस् + तर्क्** १० भाषायाम्.]

तर्न्हि न जुझें ऐसें । निष्टंकीसि जें मानसें ते प्रकृति अनारिसें । करिल चि ॥ ज्ञा. १८·१२७८

निस् उप. निषेध,-निश्चय-दर्शक उपसर्ग. A prefix denoting negation, certainty.
[सं. **निस्, निर्** पहा. संसा. अकामसा. **निश्चय** (**निस् + चि**) = निर्धार, ठराव, करार ; **निश्चित** = ठराविक; **निश्चित** = चिंतारहित ; **निश्वास** = उच्छ्वास ; **निश्शेष** = पूर्ण, सगळा ; **निषेध** (**√ सिध्**) = प्रतिषेध, मनाई ; **निष्कटंक**=भय-संकट नसलेला ; **निष्कर्म** ; **निष्कर्ष** = सार, तात्पर्य ; **निष्कलंक**; **निष्कांचन** = दरिद्री ; **निष्काम**; **निष्कारण** = उगांच ; **निष्कृति** = मुक्तता, नाश, फेड, परिहार ; **निष्क्रय** = वस्तूच्या बदला किंमत ; **निष्टंक** = निश्चय, सिद्धान्त (**निस + टंक, √ तञ्च्** गतौ); **निष्ठा** = श्रद्धा, विश्वास ; **निष्पत्ति** = सिद्धि; पूर्णता ; **निष्पादणें** (**निस् + पद्** ४ गतौ) = उत्पन्न करणें ; **निष्पन्न** = उत्पन्न झालेलें. **निष्पाप** = पापरहित ; **निष्प्रभ** = प्रभाहीन ; **निष्फळ** ; **निष्प्रयोजन** ; **निःसंग** (**नि+सञ्ज्**)= मर्यादा न पाळणारा ; **निस्तेज** = तेजहीन ; **निस्पृह** (**स्पृह्**) = निरिच्छ.)]

निस(णें) उक्रि. निवडणें, वेंचणें, सोलणें. To pick, to clean by picking.
[सं. **नि + अस्** ४ क्षेपने, **निष्** १ सेचने (?); अकाम. ग्रामीण. **निस, न्यस.**]

निसट(णें) अक्रि. एकदम निघणें, जागा सोडणें. To slip (aside, from, out of), to slide.
[सं. **निस् + सृष्ट, √ सृज्** ४ विसर्गे ; प्रा. **निसट्ट.**]

निसण-णी स्त्री. शिडी. A ladder.
[सं. **निःश्रेणि** ; प्रा. **णीसणिआ, निस्सेणी** ; हिं. **निसेनी, नसेनी, निसैनी, नसैनी** ; सिंह. **निसिणी.**]

निसणा पुं. सहाण, धार लावावयाचा दगड. A whet-stone.
[सं. **निशाण, √ शो, शी** ; प्रा. **णिसाण** ; सिं. **निहुनुगा** = निसणा.]

निसंतान न. निर्वंश, वंशक्षय. Extinction of a race or family, childlessness.
[सं. **नि + संतान, सम् √ तन्** ८ विस्तरे.]

निसबत स्त्री. हवाला, दिम्मत, हुकमत, संबंध, नातें. Custody or charge of, connection with.
[अर. **निसबत्.**]

निसर(णें) अक्रि. घसरणें, निसटणें, पडणें, कमी होणें. To slip or slide.
[सं. **निस् + सृ** १ गतौ, **निस् + क्षर्** १ संचलने ; अकामसा. **निसरड-ट्** = घसरण्यासारखी गुळगुळीत जागा ; **निसरगांठ** = सुटगांठ, निसरणारी गांठ.]

निसर्ग पुं. सृष्टि, स्वभाव. Nature; the natural state.

[सं. **निसर्ग, नि + सर्ग** √सृज् १ सर्जने.]

निसव(णें) अक्रि. कणीस येणें, लोंबर बाहेर येणें, पुढें येणें, (त्यावरून) तरबेज होणें, निर्लज्ज होणें. To shoot into ears, to have no sense of shame

[सं. **नि + सू** २ उत्पतौ, **नि + श्रम्** ४ खेदे = निलाजरे बनणें ; याकाम. **निसवणें** (बाहेर येणें).]

अवसे पुढलिये वीजे : चांदणें निसवलें सहजे ॥ नरुस्व. ४८९

निसळ वि. अ. फक्त, निर्दोष, पूर्ण, निर्भेळ. Without any mixture, purely, only, simply.

[सं. **निस् + शल्य** √ **शल्** ; प्रा. **निस्सळ** ; **निसळ(णें)** = धान्यांतलीं शल्यें टाकून देणें.]

निसाण न. ध्वज, पताका. An ensign, a flag, a banner.

[फा. **निशान** ; सं. **निःसाण** (राज.) (?); याकाम. **निसाण** (उगी. ४४४ ज्ञा. ९·२१६) ; अकाम. **निशाण.**]

निसास पुं. उच्छ्वास, उसासा. Expiration.

[सं. **निश्वास,** √**श्वस्** २ श्वसने ; **निहास(णें)** = धापा टाकणें, दमणें, त्रासणें.]

निसाळ(णें) उक्रि. उजवणें, जिल्हई देणें, विसळणें. To furbish, to polish.

[सं. **नि + क्षालनम्** = निसाळणें, **वि + क्षालनम्** = विसळणें.]

निसिंदा पुं. लेखक. A writer.

[फा. **नवीसंदा,** √ **निविस्तन्** = लिहिणें.]

निसुट(णें) अक्रि. गळणें, गळून पडणें, घसरणें. To drop down, to slip, to slide.

[सं. **नि + सृष्ट,** √ **सृज्** ; प्रा. **निस्सुट्ट.**]

तें न धरत निसुटलें । परि नेणेंचि हातौनि पडिलें ॥ ऐसें हृदय असें व्यापलें । मोहें तेणें ज्ञा. १·१९८

निसुर(णें) अक्रि. स्वैर वागणें, स्वछंद-बेकैद होणें, पेंगणें, निष्काळजीपणानें असणें. To run wild, to get lawless or loose, to doze.

[सं. **नि + शूर्** ४ स्तंभने ; **निस्संग** (?); अकामसा. **निसूरता, निसुटता** = ओझरता, घसरता ; **निसूर** = निष्काळजी, निर्वेध, निश्चित, कोडगा.]

निस्त(स्ता)र(णें) उक्रि. चूक सुधारणें, दुरुस्त करणें, पार पाडणें. सावरणें. To rectify, to complete, to carry through.

[सं. **नि + स्तृ** ९ प्रापणे ; **निस्तरणम् निस्तर, निस्तारण, निस्तार** = तरणें, मोक्ष, सुटका.]

निस्तू(स्तो)क(ष) अ. पूर्णपणें, सर्वस्वीं, निव्वळ. Wholly, totally.

[सं. **निस् +तुष्.**]

निस्संग वि. बंधनापासून मोकळा, स्वतंत्र, (त्यावरून अर्थ-भ्रंश होऊन) निर्लज्ज, बदफैली, स्वैर. Free from shackles, free, (hence) hardened.

[सं. **निस् + संग,** √ **सञ्ज्.**]

निस्सत्व, निस्सार वि. तेज-सामर्थ्य नसलेला, सार नसलेला. Sapless.

निस्सीम वि. अमर्याद, श्रेष्ठ दर्जाचा, एकनिष्ठ. That is without bound, superlative.

निहट(णें) सक्रि. बळकट धरणें, जोरानें आंत शिरणें. To hold fast, to thrust in.

[सं. **नि + हठ्** १ बलात्कारे ; **निहट** = जवळ, निकट.]

पै पाइं कांटा निहटे । तवं व्यथा जीविं उमटे । तैसा पोले संकटें । पुढिला घेनि ॥ ज्ञा. १६-१५८

निहा पुं. आवाज. Sound.

[सं. (?); याकाम. **निहा, नेहा** (आवाज).]

जेय भद्रजाति सारसी : निहे विसंवति आकासीं ॥ नरुस्व. २२२.

निहाय अ. पासून-पर्यंत, सर्व, दरेक, प्रत्येकीं. From —to, through-out.

[अर. **निहायत्. निहायत** = सीमा, मर्यादा ; शिकाम. **निहायत** (चित्र. ३३).]

निहाळ(णें), न्याहाळ(णें) क्रि. पहाणें, निरखणें. To observe minutely.

[सं. **निभालय** (**नि + भल्** १ परिभाषणे); प्रा. **णिहाल** ; आ. **निहालिबा** ; बं. **निहारा** ; हिं. पं. **निहारना** ; सिं. **निहारणु** ; गु. **निहाळवूं.**]

निळग(णें) ; निळघ(णें) अक्रि. गळून जाणें, ग्लानि येणें, उपासानें दमून जाणें. To droop down, to faint.

[सं. **नि + लघ्** ६ गतौ.]

निहेट(णें) ; नेट(णें) सक्रि. त्रास देणें. To annoy.

[सं. नि + हेट् १ विबाधायाम्.]

निहेटले पर्वत । कवलनि ज्वालाचे उभड्ड ऊठित ।
तैसे चाटित दाढदांत । जीभ लले । ज्ञा. ११-३०८.

निळवें न. एक माप. कोळग्याचें अर्धे. A measure.

[द्रा. निलुवु = to fall into, entering the standing (corn), entering or hiding in standing corn. –Kittel.]

निळा वि. रंगविशेष. Blue (colour), indigo blue.

[सं. नील, नीलकः ; पा. नीलो ; प्रा. णील ; आ. निल् ; बं. निल ; ओ. निळ ; हिं. पं. लां. नीला ; सिं. नीरो ; गु. लीलूं ; नीळ (निळ्या रंगाचा पदार्थविशेष.).]

निःक्षत्र पुं. क्षत्रियांचा नाश. Extinction of Kshatriya class.

निक्षित वि. ठेविलेला, गहाण ठेविलेला. Deposited.

निक्षूण,–न अ. स्पष्टपणें, उघडपणें. Positively, plainly.

[सं. नि + क्षुण्ण, (निष्ठा) √ नि + क्षुद्.]

निक्षेप(णें) उक्रि. टाकणें, फेंकणें. To cast, to throw.

[सं. नि + क्षिप् ६ क्षेपणे, **निक्षेप** = ठेवणें, जवळ राखणें, निधि, ठेव, हवाला. अर्थांत थोडासा फरक झाला आहे.]

[1]नीच वि. खालचा, हलकट, दुष्ट, घाणेरडा, कमी प्रतीचा. Low, mean, base.

[सं. नीच ; पा. नीचो ; प्रा. णीअ, णिच्च ; देप्रा. निच्च ; फा. न्युचु ; कु. नीरच् ; आ. नीस् ; बं. ओ. निच ; हिं. पं. नीच ; सिं. ऩीचु ; गु. नीच.]

[2]नीच अ. नित्य, सतत. Always.

[सं. नित्य ; प्रा. णिच्च ; याकाम. नीच.]

[1]नीज वि. स्वतःचें, आपलें. One's own.

[सं. निज.]

[2]नीज स्त्री. झोंप, निद्रा. Sleep.

[सं. निद्रा ; देप्रा. णिज्ज, निज्जा ; गु. निजवूं ; नीद पहा.]

[1]नीट वि. सरळ, थेट, वाकडें नसलेले, बरोबर, योग्य. Straight, direct, not crooked, right, proper.

[कान. नेट्टगें = सरळ, नेट्ट निट्टु = सरळपणा ; सं. निकट (?); अकामसा. नीटनेटका.]

[2]नीट वि. दयाळु. Kind.

[सं. स्निह् ४ स्नेहे (निष्ठा); किंवा ' सरळपणा ' दाखविण्यावरून हा अर्थ लक्षणेनें प्राप्त झाला असावा.]

नीटस, नेटस वि. चांगलें, ठसठसीत. Bold, straight, impressive.

[सं. निस् + तक्ष् १ त्वचने (?); कान. नेट्टगे = सरळ ; अकाम. नेटकें.]

नीड न. पक्ष्याचें घरटें. A bird's nest.

[सं. नीडम्.]

नीडें,–डें अ. जवळ. Near, close.

[सं. निकटम् ; प्रा. निअडँ ; गु. हिं. पं. सिं. नेडें ; याकाम. निडें, नीडें (उगी. ३९८).]

होआवेंआ श्रीकृष्णा नीडें । एरुं रिगे एरां पुढें ॥ दा. व. २०३.

[1]नीत स्त्री. चांगली रीत, नीति. Morality, good practice.

[2]नीत वि. नेलेला. Taken away, carried.

[सं. नीत (निष्ठा < नी १ नयने.)]

[3]नीत वि. सततचा, नेहमींचा. Constant, permanent.

[सं. नित्य.]

नीति स्त्री. नय, नियम, शिष्टाचार, धर्म, नियम. Ethics, morality, etiquette, law dealing with conduct.

[सं. नी १ नयने.]

नीद स्त्री. झोंप, निज. Sleep.

[सं. निद्रा ; पा. निद्दा ; प्रा. णिद्दा ; बं. निद् ; ओ. निद ; हिं. निंद ; पं. निंद्, निंदर् ; लां. निन्दर ; सिं. निण्द्र ; गु. नीद्. २ देप्रा. निज्जा ; णिज्ज ; गु. निजवूँ. नीज पहा. मराठी निज(णें) हें क्रियापद देप्रा. निज्जा पासून आहे.]

नीम वि. निम्मा, अर्धा. Half.

[फा. नीम्.]

नीर न. पाणी, जल. Water.

[सं. नीरम् ; कान. नीरु. कानडी शब्द मूळ असून संस्कृतमध्यें नंतर समाविष्ट केला गेला काय ?]

नील,–ळ स्त्री. नील, वनस्पतिविशेष, निळीचा रंग. Indigo, the blue colour.

[सं. नील ; अकामसा. नीलिमा = निळेपणा, निळा रंग ; नीलकंठ = शंकर.]

नीशार पुं. अंथरण्याचा कपडा. Cloth for spreading out.
[अर. नशूर = पसरणें.]

^{1}नीस पुं.अ. सारांश, तात्पर्य, निष्कर्ष, बारीक चौकशी, पूर्णपणें, निखालस. Substance, essence, scrutiny. altogether, utterly.
[सं. निःशेष,√शिष्.]

^{2}नीस स्त्री. उसण, ताठर. Sense of soreness in the back.
[सं. निश्वस्.]

^{3}नीस पुं. दगड. Stone.
[सं. शाण ; गु. नीसा.]

नुकसान न. तोटा, नाश, बूड, अपकार, खराबी. Loss, detriment, damage, harm.
[अर. नुक्सान् ; ग्रामीण अकाम. नुकसान, लुकसान.]

^{1}नुक्ता पुं. चुटका, गाणें, सुभाषित. A pretty thought, an adage.
[अर. नुक्ता ; पेकाम. नुक्ते व चुटके (राज. ७).]

^{2}नुक्ता पुं. दोषारोप, आळ, ठपका. An impeachment or a charge.
[अर. नुक्त.]

^{3}नुक्ता, नुकतां अ. इतक्यांत, आतांच. Lately, recently.
[म. निगुता ?]

नुगव(णें) सक्रि. न कळणें, न समजणें. Not to understand.
[सं. न + अव+गम् १ गतौ, न + उगव (उत् + गम्). असे ‘ नु ’ नें आरंभ होणारे कांहीं धातु मराठींत रूढ आहेत. आरंभींचा नु हा न व पुढील धातूंतील उ मिळून झाला आहे. उदाः नुधवणें (न + ऊर्ध्व) = वर न करणें, न उचलणें ; नुपकरणें (न + उप कृ) = समर्थ न होणें ; नुपेक्षणें (न + उपेक्ष्) = उपेक्षा न करणें ; नुमगणें (न + उत् + मस्ज् > उम्मज्ज, उम्मग), नुमजणें = न समजणें ; नुमच,-नुमुचणें (न + उत् + मंच् १ पूजायाम्) = प्रत्युपकार न करणें ; नुमुचणें (न + उत् + मुच् ६ मोचने), तैसें दीधलें दान तेयाचें । जें कोणीं आंगें नुमुचें ॥ ज्ञा. १७-२८१. नुमसणें (न + उत् + मस्ज्) = न सांगणें, प्रकट न करणें ; नुपरतें (न + उपरत, √ रम्) = विषयासक्त ; नुबगणें (न + ऊष्म - उम्ह-ऊब) = कंटाळा न करणें.]

नूतन वि. नवा, ताजा. Fresh, new.
[सं. नूतनम् = नव + तन (प्रत्यय).]

नूपुर पुंन. पायांतील स्त्रियांचा अथवा मुलांचा दागिना. An ornament for the feet.
[सं. नूपुरम्.]

नूर पुं. चेहरा, चर्या, (त्यावरून) रंग, वर्ण, कांति तेज. Face, air, expression, (hence) colour, lustre.
[अर. नूर = प्रभा ; शिकामसा. नूरजहान (= विश्वाची प्रभा) ; कोहिनूर (कोह = पर्वत, नूर = तेज) ; अकाम. एक नूर अदमी, दस अथवा हजार नूर कपडा. लाख नूर गहिना करोड नूर नखरा.]

नृत्य न. नाचणें, नाच. Dance.
[सं. नृत्य, √नृत् ४ नर्तने.]

नृप, नृपाळ पुं. राजा. A king.
[सं. नृ + प, √पा २ पालने.]

नृसिंह पुं. नरसिंह, एक (ईश्वराचा) अवतार. Lion amongst men, an incarnation of Vishnu.
[सं. नृ + सिंह, √हिंस्.]

^{1}ने प्र. ‘ पासून ’ अर्थाचा प्रत्यय. A termination expressing ‘ from ’.
[सं. पंचमीच्या ‘ न: ’ प्रत्ययापासून.]

^{2}नें प्र. तृतीयेचा प्रत्यय. A termination of instrumental case.
[सं. एन ; प्रा. एण, एँ ; अप. एँ ; म. ने, एँ.]

ने(णें) सक्रि. वाहणें, हलवणें, घेऊन जाणें. To lead, to carry, to remove.
[सं. नयति ; पा. नेति ; प्रा. णेइ ; दा. ना ; का. न्यूनु ; पप. नैणु ; आ. निब ; बं. नेओया ; ओ. नेबा ; पं. नेणा ; सिं. निअणु ; अकामसा. नेता = नेणारा, मुख्य, नायक ; नेतृत्व = पुढारीपणा.]

नेक, नेकी स्त्री. खरेपणा, सत्यपणा, सरळपणा, सद्वर्तन. Probity, integrity, truthfulness, upright behaviour.
[फा. नेक्. नेकजात, नेकदार, नेक नामदार नेकनजर नेकबाजी, नेकसल्ला इत्यादि शब्दांत हाच अर्थ आहे.)]

नेचा पुं. गुडगुडीची नळी, हुक्क्याची नळी. A hukka-snake.
[फा. नैचा.]

नेट पुं. जोर, सामर्थ्य, प्रयत्न, बल. Exertion, endeavour, strength.
[सं. **निकट** ; प्रा, **णिअड** ; अप. **णिअल** ; का. **न्यूरु** ; पं. **निआरु** ; कु. **नेडो** ; पू. हिं. **नियर** ; हिं. **नेड्** ; पं. लां. **नेडे** ; गु. **नेडे**. (कान. **नेट्टगे**=सरळ). मराठी नाम **नैकट्यपासून** आहे कीं काय ? अकामसा. **नेटका, नेटणें, नेटदार, नेटबाज, नेटी, नेटें.**]

नेट(णें) सक्रि. सारणें, पार पाडणें. यत्न करणें, जोर करणें. To strain, to finish, to press hard.
[सं. **नि+वृत्त्** ; प्रा. **णिअट्ट** ; सं. **नि+अर्द्** ; प्रा. **णिअट्ट.**]

नेटका, नेट्टुगी, नेट्टुगा वि. सुरेख, बांधेसूद, सरळ, ताठ, धड. Neat, comely, handsome.
[कान. **नेट्टी** = सौंदर्य ; याकाम. **नेटकें** (नरुस्व १३८); **नेट्टगे** = सरळ.]

नेडें,-ढें न. दाभण, सुई–याचें भोंक, नाक, कुदळ-कुऱ्हाडीचें दांडा बसविण्याचें भोंक. The eye of a needle, the hole in the handle of an axe.
[सं. **नीडम्** (?)]

नेण(णें) अक्रि. न जाणणें. Not to know.
[सं. **निर+ज्ञा** (**ज्+न्+आ**). धातूच्या एका रूपांत '**ज्**' हा वर्ण राहिला (उदा. जाणणें) व धातूच्या दुसऱ्या रूपांत '**न्**' हा वर्ण राहिला (उदा. नेणणें). दोन्हीं धातु '**ज्ञा**' ह्या धातूचेच तद्भव आहेत. याकाम. **नेणणें** (नरुस्व. २८); अकाम. **नेणणें.**]

नूक(णें) अक्रि. वांकडें होणें, अपमान होणें. To be crooked, to be disrespected.
[सं. **न्यक्+भू.**]
आंगभारें सूटला ढोंडा । आपा नूकौनियां खांडा । वरि पडिलेयां रगडा । करी जैसा । ज्ञा. १७·२५९

नेघ(णें) अक्रि. जवळ न जाणें. Not to approach.
[सं. **न (इग्), इख्** १ गतौ.]
विचार जेथ न रिघे । हेतु जेथ नेघे जें द्वैत दोषसंगें । सिंपेच्चिना ॥ ज्ञा. ४-१४९

नेतवट वि. मऊ. Soft.
[सं. **निस्+पत्** ; पा. **निप्फत** (?); याकाम. **नेतवट.**]

नेति(नेति) अ. असें नाहीं, असें नाहीं. It is not so.
[सं. **न+इति, (तत्) न इति, (तत्) न इति.**]

नेत्र पुं. डोळा, दृष्टीचें इंद्रिय. An eye.
[सं. **नी+त्र.**]

नेपथ्य न. पडदा, वेष, भूषण. A curtain, the attiring room.
[सं. **नेपथ्य.**]

नेपाळ(णें) उक्रि. मऊ करणें, सपाट–एकसारखें करणें, चोळणें, मळणें, घांसणें, संथ वाहूं देणें. To smooth, to rub down.
[सं. **निस्+पालिः** (नाधा.), **निष्पत्** ; पा. **निप्फत.**]

नेपाळा पुं. चूळ, थुंका (वहावयास लावणें). Spittle.
[म. **नेपाळणें, निस्+पालि** (नाधा.)]

नेपाळें वि. सुंदर, लाल, सतेज. Handsome.
[म. **नेपाळणें** (ना.)]

नेभळट,-ळा, निभळा वि. ढिला, अव्यवस्थित, भोंगळ, बेबंद. Loose, slovenly.
[सं. **निर्बल.**]

नेम पुं. नियम, हेतु, साधन, लक्ष्य. Rule, intention, means, aim.
[सं. **नियम, नि √ यम्** १ उपरमे ; अकामसा. **नेमका** = पाहिजे असलेला, अमूकच, अपेक्षित ; **नेम(णें)**= योजणें, लावणें, ठरविणें ; **नेमणूक.**]

नेर न. गांवाच्या नांवाच्या शेवटीं लागणारा प्रत्यय. A word or particle affixed to names of some towns.
[सं. '**नीवरम्**', **नीरम्** (?) = पाण्याचें ठिकाण, रहाण्याचें ठिकाण ; **नगर** ; प्रा. **णअर.** महाराष्ट्रांतील कांहीं ग्रामनांवाच्या पुढें हा शब्द येतो. उदा. **अमळनेर, जामनेर, पारनेर, पिंपळनेर, शिवनेर.** राजस्थानांतील अशीं नावें **बहानेर, बिकानेर, रानेर, संगनेर** हीं होत. बंगालमध्यें **मोहनेर, दिनगर, दिनरा** अशीं नांवें आढळतात. **जुन्नर, सिन्नर** हीं आणखी ह्याशीं संबद्ध आहेत. जुन्नरचीं रूपें **जुण्णनगर, जुनेर** अशीं असल्याचें मनूची म्हणतो. गुजरातमध्यें **चांपानेर, वडनेर,** अशीं गांवें आढळतात. हा शब्द **नीवरम्** किंवा **नगरम्** ह्या पासून निष्पन्न होण्यासारखा आहे.]

नेवासें न. ग्रामनाम, एका गांवाचें नांव (नगर जिल्ह्यांत). The name of a town.
[सं. **निधिवास > निहिवास > नेवास.**]

नेस्तनाबूत स्त्री. वि. नायनाट, नाश, नष्ट, नामशेष. Destruction, desolation, ruined.
[फा. **नीस्त–नबूद** ; पेकाम. **नेस्तनाबूद** (राज६·५७०).]

नेस(णें) सक्रि. वस्त्र अंगावर घालणें, आवरणें. To put on, to wear.
[सं. **नि + वस्** ; प्रा. **णि अस, निवस्–निअस्–न्येस–नेस** (भा. ए. १८३३), अकामसा. **नेसवणी** = साडी, चिरडी ; **नेसूं** = नेसण्याचें वस्त्र.]

नेहट(णें) अक्रि. जवळ असणें, पाठीशीं असणें, निश्चय करणें, भिडणें, आंत जोरानें शिरणें. To be close at hand, to close fast upon.
[सं. **नि + हठ्** १ बलात्कारे ; **नेहटा** = बरोबर, योग्य.]

नेहमीं अ. सतत, नित्य, सर्वथा, सदोदित, अगदीं. Always, constantly.
[सं. **नियम** (?). शब्द परकी दिसतो.]

नैवेद्य पुं. देवास अर्पण करावयाचा पदार्थ. An offering of some eatable to an idol.
[सं. **नि + विद्** ; याकाम. **निवेदु** (ली. च. ३·४७); अकाम. ग्रामीण. **निवेद, निवाद.**]

नैष्कर्म्य न. कर्म न करण्याची अवस्था, कर्मापासून अलिप्तता. Freedom from observance of religious rites.
[सं. **निस् + कर्मन्.**]

नैष्ठिक वि. निष्ठापूर्वक, आमरणान्त (ब्रह्मचर्य). Devoted, permanent (celibacy).
[सं. **निष्ठा + इक.**]

नोक पुं. झोंक, मुद्दा, खुबी, ऐट, नखरा, टोंक, अणी. Point, sting, beauty, particular excellence.
[फा. **नौक्** ; अकाम. **नोकझोंक, नोकदार** = ऐट.]
सखे तूं पातळ पुतळी फोक । नको मारूं नयनाची नोक (होनाजी बाळ. १७८)

^{1}**नोक(णें)** सक्रि. टोंचणें, पराभव करणें, कृपादृष्टीनें पाहणें. To prick, to defeat, to look at kindly.
[फा. **नौक्** (नाध्रा.)]

^{2}**नोक(णें)** सक्रि. हुडकणें. To find out or search.
[सं. **अनु + ईक्ष्** १ दर्शने.]

^{3}**नोकणें** लपविणें, निंदिणें. To hide, to censure.
[सं. **ह्नु** २ गोपने (रा. धा.).]
हे चतुर्भुज कोंभेली । जेयाची शोभाचि रूपा आली । देखोनि नास्तिकीं । नोकिलीं । भक्तवृंदें (ज्ञा. ६-३२४).

नो,–नौकर पुं. चाकर, सेवक. Servant.
[फा. **नौकर्** पेकाम. **नौकर.** (राज. ६-६३०). **नोकर चाकर** (दोन्ही एकाच अर्थाचे व एकाच भाषेंतील शब्द. कधींकधीं दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द येऊन असे प्रतिध्वनि शब्द किंवा द्विरुक्त शब्द (double–barrelled or echo words.) सिद्ध होतात).]

नोडगा पुं. (वि.) मुसलमान, अडदांड मनुष्य. A term of contempt for a ruffian or muslim.

नोंद(णें) सक्रि. लिहून ठेवणें, नक्कल करणें. To register, to copy, to note down.
[सं. **न + उन्द्** ५ क्लेदने ; हिं. **नोंदना** ; सिं. **नुंधणूं** ; गु. **नोंदवूं.**]

नोलकोल पुं. एक प्रकारची वनस्पति. A kind of plant.
[Dutch, knollkool>knol–khol. = Turnip, cabbage ; अकाम. **नवलकोल, नवलकंद, नोलकांदा.**]

नौका स्त्री. होडी, नाव. A boat.
[सं. **नौ, नौका.**]

नौदिगर वि. नवादिगर पहा.
[फा. **नव् + दिगर्.**]

नौबत,–द स्त्री. नगारा, डंका, अडचण, संकट. A large kettle-drum, (fig.) difficulty.
[अर. **नौबत.**]

नौरोज पुं. नवरोज पहा.
[फा. नव्-रोझ्.]

न्यस(णें) सक्रि. टाकणें, फेकणें, स्थापणें. To throw, to fling, to place.
[सं. **नि + अस्** ४ क्षेपणे; **न्यास**. स्थापणें ह्या अर्थी धातु ' **न्यास** ' पासून आला आहे.]

न्यहारी स्त्री. सकाळचा फराळ, फराळ. A breakfast.
[फा. नहारी.]

न्यहाल वि. मोठेपणास चढलेला, मानास चढलेला, कृपेंतील. Exalted or raised to honour.
[फा. निहाल्; **न्यहाली** = कृपा, मेहेरबानी.]

न्याय पुं. युक्तता, खरेपणा, निकाल, निर्णय, वचन, शासन, नियम. Fitness, rightness, justice, a maxim, principle, equity.
[सं. **नी** १ नयने; **न्याय इन्साफ** (दोन्ही एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील शब्द). ग्रामीण. **न्याव** = न्याय. (सं. **न्याय**; पा. **ञियाय**; प्रा. **णाअ**; सिं. हिं. **निआउ**; गु. बं. का. **न्याय**; सिंह. **नियाव, नियाव**; याकाम. **न्यावों**).]

न्यारा वि. निराळा, वेगळा, भलता. Separate, distinct.
[सं. **अन्यतरः**.]

न्यास पुं. स्थापणें, ठेव. Placing, deposit.

न्यून वि. कमी, अपुरा, उणा. Less, short, deficient.
[सं. **न्यूनम्** (**नी + ऊन**).]

न्हा(णें) क्रि. आंघोळ करणें, स्नान करणें. To bathe.
[सं. **स्ना, स्नापय**; पा. **न्हाय, नाहय, नाहप**; प्रा. **ण्हा, ण्हावे**; का. **नावुन्**; कु. **नाणो**; हिं. **नहाना**; पं. **न्हाउणा**; लां. **नहावण्**; गु. **नाहवूँ**; ने. **नुवाउनु**. **न्हाणी** = म्होरी, स्नानाची-धुण्याची खोली, ठिकाण. सं. **स्ना**; प्रा. **ण्हा, ण्हाण**; हिं. **न्हाना**; याकाम. **नाहाण** (धपू. ७४), **नाहावे** (ज्ञा. ९·११). ह्या शब्दाच्या अर्थांत व रूपांत पुष्कळ फरक झाल्यानें कांहीं ठिकाणीं संभ्रम उत्पन्न होतो. अर्थ मर्यादित झाला. उदा. **न्हाणवली**–रजोदर्शन झालेली स्त्री. **न्हावी** शब्द **स्ना**शीं संबद्ध नाहीं; ' नापित 'शीं संबद्ध आहे.]

न्हावी पं. हजाम. A barber.
[सं. **नापित**; प्रा. **णाविअ** (पुं.), **ण्हाविअ** (पुं.); बं. **नाइ**; हिं. सिं. **नाई**; **न्हाणें, स्ना** वगैरेंपासून व्युत्पादणें अग्राह्य. **स्नापित**; प्रा. **ना(न्हा) विअ**; **न्हाविओ-उ, नहापित**.]

प पुं. मराठी वर्ण मालेंतील एकविसावें **व्यंजन**. ह्या वर्णाचें उच्चारण ओष्ठ्य अल्पप्राण कठोर असून ह्याचें उच्चार स्थान ओष्ठ आहे. प्राचीन कालापासून ह्याचें उच्चारण अविकृत आहे. The twenty-first consonant of the Marathi alphabet.
[(आद्य **प**) सं. **प, प्र, प्ल**; प्रा. **प**.
पत-पड, प्रसर-पसर, प्लीहा-पी.
(मध्य **प**) सं. **त्प, ल्प, प्र, र्प, त्म, त्व, प्य, च, फ**; प्रा. **प्प, प्फ**.
आतुफ-आटोप, कर्पट-कापड, उत्पद्य-उपज, शिल्पिन्-शिंपी, पिप्पल-पिंपळ, आत्मन्-आपण.

प^{2} प्र. जुना कर्मणि प्रत्यय. An old passive termination.
[सं. **प्य**; प्रा. **प्प**; अप. **प्प**; मरा. **प**. हा प्रत्यय 'याकाम.' मध्यें येतो. उदा. घेपे, घालपे, म्हणिपे, हारपे. मुळांत '**प्य**' हा प्रयोजक प्रत्यय असून पुढें प्राकृतमध्यें त्याचें सामान्यीकरण होऊन त्याचें मूळचें प्रयोजकत्व (णिच्त्व) नाहींसें झाले, व कर्मणि अर्थ कायम राहिला (हेमचंद्र ८·४·२५४·२५५). मराठीमध्यें **प, य, आव, अव** हे **णिच्** चे प्रत्यय आहेत. संस्कृतमध्यें णिच् रूपाचे प्रत्यय **य, अय, प, पय** असे लागतात. त्यांचीं रूपें पूर्ववैदिक भाषेंत **इक् इअक्** अशा स्वरूपाचीं असत. त्यापासून अय, अव अशीं रूपें झालीं असण्याचा संभव आहे.]

पक न. आश्रय, पद. A support, a foot.
[सं. **पक्ष**; देप्रा. **पग** = पाय, स्थान, सोंगट्याचें घर. याकाम. **पक** (ज्ञाने.). **पगणें** पहा.]

पक(णें), पच(णें) उक्रि. शिजणें, पिकणें, तयार होणें, पचणें. To cook, to ripen.
[*IE*. Peq; सं. **पच्** १ दहने; प्रा. **पच**; *Av*. pach; *Gr*. pep; *Lat*. Coq-pop. (Culina = kitchen); *Slav*. peku; *Lith*. kepena, kepu; *Ger*. choh, koch; *Eng*. cook, cake.]

पकड(णें) क्रि. धरणें, ताब्यांत आणणें, एकदम ताबा मिळविणें, (बोलण्यांत, वादांत) अडविणें, (ल.) पेचांत धरणें. To hold fast, to seize, to take possession, to catch suddenly.

[सं. १ **प्रकृष्टि**=पकड (डावपेंच), **प्रघृष्टि, प्र √ कृष्** किंवा **√ घृष्** ; २ **अप + कृ**=बलात् हरणे ; ३ **प्र + स्कद्** १ गतौ ; सं. ४ **पक्क** ; प्रा. **पक्क** (सं. **पर्क–मधुपर्क, √ पृच्**). सं. ५ **पृक्ण, पृक्त** ; प्रा. **पग्गइ** (धरतो), **पगाह**. सं. ६ **प्रक्रमयति** ; देप्रा. **पक्कड** ; **पक्क** ; का. **पकुन्** (पुढें जाणें); आ. बं. **पाक्** (वळविणें, पिळणें); कु. **पकड्णो** ; बं. **पाकड्भा** ; हिं. **पकड्ना** ; पं. **पकडणा** ; गु. **पकडवूँ** ; ने. **पक्रनु**.]

पक्का वि. पिकलेला, पूर्ण स्थितीस पोहोंचलेला, पुरा झालेला. Ripe, ripened.

[सं. **पक्क** (निष्ठा, **√पच्**–पचणें, शिजविणें) ; पा. **पक्को** ; प्रा. **पक्क, पिक्क** ; का. **पापु, पोकु** ; कु. **पाको** ; बं. **पाका** ; ओ. **बाकला** ; हिं. **पाकल** ; पं. ल्हां. **पक्का** ; सिं. **पको** ; गु. **पाकूँ** ; म. **पक्का, पाका, पिकलेला. इ.**]

पख, पंख पुं. न. पिस, बाजू, पक्ष, वर्ग, समुदाय. Wing, feather, side, party.

[सं. **पक्ष** ; प्रा. **पक्ष** ; हिं. **पख**. सं. **पक्ष्मन्** ; प्रा. **पँक्ख>पंख** ; पं. हिं. **पंछ** ; सिं. **पख** ; याकाम. **पाख** ; अकाम. (घराचें) **पाकें** (बाजू), **पखरण, पाखरण** (आश्रय). संस्कृतमधील '**क्ष**' हा कांहीं आर्योद्भव भाषांत '**ख**' होतो, तर इतर कांहीं भाषांत छ होतो. '**क्ष**' चे जे दोन अवयव '**क**' आणि '**ष**', त्यांपैकीं एकाची परिणति '**ख**' ही कांहीं भाषांत व '**ष**' ची परिणति '**छ**' ही कांहीं भाषांत प्रतीत होते.]

पखर(णें), पखळ(णें) क्रि. पसरणें, विस्कळित होणें, उधळणें. To scatter, to throw.

[सं. १ **अप (प्र)+कॄ** ६ विक्षेपे, २ **प्र+क्षर्** १ संचलने ; हिं. **पखरना** ; सिं. **पखिरणु** ; गु. **पखरवूँ** ; अकामसा. **पख(खा)रडा–पखळ, पखरण** ; **पखाडा** (पसारा) ; **पखरणी** (विस्कळित पडण्याची क्रिया किंवा स्थिति).]

पखवाज पुं, वाद्यविशेष, एक प्रकारचें दोहोंबाजूंनीं हातानें वाजविण्याचें कातड्यानें मढविलेलें वाद्य. A kind of instrument, a drum.

[सं. **पक्षवाद्य, पक्षातोद्य**. (सं. **आतोद्य** ; प्रा. **आआज्ज** = वाद्य) ; प्रा. **पक्खाउज्ज** ; ओ. **पखाउज** ; हिं. **पखावज** ; पं. **पखाउज्** ; सिं. **पखवाज** ; गु. **पख(वा)ज** ; अकामसा. **पखवाजी, पकवाजी** (**पखवाज + ची**) = पखवाज वाजविणारा.]

पखाल स्त्री. पाणी वहाण्याची कातडी पिशवी. A leather bag for water, a double water-skin.

[सं. **प्र + खल्ल** (= चामड्याची पिशवी) ; देप्रा. **पग** = पाय, **पक्ष + खल्ल** (टर्नर), **पयस् + खल्ल** (ब्लोक्) ; हिं. **पखाल** ; पं. **पखाल्** ; सिं. **पखाल** ; गु. **पखाल** ; म. **खाल** = खाल, कातडें ; गु. हिं. **खाल** ; का. **खल्** ; पं. **खल्ल** ; आर्मी. रुमा. **खर्** = पिशवी.]

पग न. पाय, स्थान, घर (सोंगट्याच्या पटांतील). Foot, place, place of resort.

[सं. **पक्ष, प्र+गम्** १ गतौ (रा.) ; प्रा. **पग** ; याकाम. **पक** (ज्ञाने.) '**पद, पद्**' ह्या संस्कृत शब्दांपासून व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं. कारण संस्कृत '**द, द्**' पासून मराठी '**ग**' अशी निष्पत्ति फारशी आढळत नाहीं. **पक्ष>पक्ष्>पक्ह >पग** ह्या मार्गानें वर्णनिष्पत्ति होणें शक्य आहे. **पक्ष** म्हणजे **बाजू, स्थान, घर** ह्या अर्थांशीं विरोध येत नाहीं. त्याहिपेक्षां ग्राह्य व्युत्पत्ति **प्र + गम्** पासून ही होय. अकाम. **पग(णें)** = पुढें पाऊल टाकणें ; उ. सोंगटी पगली.]

पगडा पुं. वर्चस्व, सत्ता, अधिकार, सोंगटी. Influence, dominance, power, the piece of wooden block, a draught (in the play.).

[सं. **पक्ष + कट, पग = घर**, स्थान, **आश्रय** ; लक्षणेनें **वर्चस्व, सत्ता** असा अर्थ झाला असावा. '**पग**' वर बसणारी **सोंगटी** हा अर्थ त्यानंतर आला असावा. हाहि अर्थ लाक्षणिकच आहे. याकाम. **पगड**= पक्ष, प्रकार (नरुस्व ८७५)]

तेथ पगड यातिचा व्यापारू बहुतुः दिसतु असे ।
नरुस्व. ८७५

पगडी स्त्री. शीर्षवेष्टण, पागोटें. *The puggree* head-gear, a turban.

[सं. **पक्ष + पट** (?) ; देप्रा. **पग्ग + ड** (प्रा. **प्रत्यय**) ; का. **पागुरु** ; बं. **पागडी** ; ओ. **पगडी** ; हिं. पं. लां. **पग्डी** ; सिं. **पगिडी** ; गु. **पाघडी, पागडी** = अंतस्थ द्यावयाचा पैसा, लांच.]

पगार पुं. वेतन, तनखा, ठराविक मुदतीच्या श्रमाबद्दल मिळणारा मेहनताना. Pay, salary.

[पोर्तु. पागा = वेतन ; पगार = पैसे देणें.]

पघ(णें), पग(णें) सक्रि. (ग्रामीण) पाहाणें. To see, to observe.

[सं. पश् १ दर्शने, किंवा पश्य्. ह्यावरून हें सिद्ध होतें कीं 'दृश्' ह्या संस्कृत धातूला पश्य् हा आदेश होत नसून 'पश्य्' हा निराळा स्वतंत्र धातु संस्कृत किंवा वैदिक संस्कृत भाषेंत रूढ होता. पाणिनिकालांत ह्याचा स्वतंत्रपणा नष्ट झाला; म्हणूनच त्याला 'दृश्'चा आदेश म्हणून समजण्यांत येऊं लागलें. मराठीमध्यें त्याचा अवशेष राहिला. असे वैदिक संस्कृत व प्राकृत भाषांचे अवशेष सद्य:कालीन बोलींत राहिले आहेत.]

पघळ(णें) अक्रि. विरघळणें, पातळ होणें, पसरणें, विस्तार पावणें. To dissolve, to liquify.

[सं. प्र + घृ १ क्षरणे, -गल् १० स्रवणे, प्र + गल्भ् विस्तारे, धाष्टर्ये ; याकाम. पघळणें (ज्ञा. १५-१४५); अकाम. पघळ = पुष्कळ, ऐसपैस, अवाढव्य ; अघळपघळ (सं. आगल्भ प्रगल्भ).]

पङ्क पुं. चिखल. Mud.

[*IE*. Penqes (mud, slime); सं. पङ्क ; *Slav*. Pannian ; *Got*. fani ; *Ger*. fanne ; *Sax*. fânn ; *Eng*. fen. हा शब्द तत्सम म्हणूनच सर्व भाषांत रूढ आहे. याकाम. पङ्क (ज्ञा. १६-३१७).]

पंक्ति स्त्री. ओळ, रांग, गट, पंगत. A line, row.

[सं. पंक्ति ; अकाम. पंगत (स्वरभक्ति).]

पंख न. पिस, पक्ष. A feather, a wing.

[सं. पक्ष्मन् ; पक, पक्ष पहा.]

पंखा पुं. विंझण, वारा घेण्याचें मोठ्या पानाच्या आकाराचें साधन. A fan.

[सं. पक्ष (?), पक्ष्मन्, पक, (पंख पहा.)]

पंखी, पंखिल, पंखेरूं न. पक्षी. A bird, a small bird.

[सं. पक्ष, पक्ष्मन्, पक्षिन् ; (इल < प्रा. इल्ल-इन्नन्त प्रत्यय); सं. पक्ष्मरूपम्, पक्षिरूपम् ; म. पाखरूं, पंखेरूं (अल्पार्थे प्रत्यय). पक, पंख पहा.]

पंगु वि. पांगळा, व्यंग असलेला. Lame, crippled.

[सं. अपांग, > अपंग, = अंगविकलित, व्यंगी. अकामसा. पंगिस्त = लंगडा.]

पंच(णें) क्रि. शिजणें, पाक होणें. To cook, to digest.

[*IE*. Pequ ; सं. पच् ; *Av*. Pacai, *Lat*. Coquo ; *Alb*. Pick ; *Gr*. Peptos ; सं. पच् ; पा. पच्च् ; प्रा. पच्च् ; आ. पसीव ; बं. पचा ; ओ. पाचिबा ; हिं. पाचना ; सिं. पचणु ; गु. पचवूँ ; ने. पच्नु ; अकामसा. पक्का, पाका (सं. पक्का ; प्रा. पक्क), (स्वयं)पाक ; पचणी (मानवणें) ; पचन (पोटांत जिरणें).]

पंच(णें) अक्रि. मुरणें, जिरणें. To dissolve, to merge in.

[सं. १ पच् १ पाके, २ अप + चि ५ क्षये.]

पचक(णें) क्रि. फसणें, तुटणें, समाधान नसणें, मरणें. To break, to crack, to be dissatisfied.

[सं. अप + चक् १ तृप्तौ, २ प्रकचनम् ; ३ प्रचक् (भिवविणें) ; अकामसा. पचका (फसवणूक, नाश) ; पचकळ (नि:सत्त्व, अभद्र), पचकवणी, पचपचित हे शब्द निराळे आहेत.]

पचपच पुं. (अ.) चिखलासारख्या ओल्या पदार्थांत हातपाय बुचकळल्यानें किंवा थुंकण्याचा होणारा आवाज. The sound of spitting or of walking in mud.

[ध्वनिशब्द. पच असा आवाज. सं. पृष् १ सेचने (?) ; अकामसा. पचडी (< कान. पच्चदी, पच्चणें = ओलेंपणा) = पातळ ओला पदार्थ, कोशिंबीर ; पचकन्, -दिशी, -दिनी, कर (कान. कने (प्रत्यय) ; पचपचीत ; पचका = वाईट अवस्था ; पचकवणी = पाण्याशीं मिश्रण.]

पचम(णें) क्रि. थांबणें, अडथळा होणें. To be stopped.

(सं. प्रति + अम् १ गतौ. (प्रत्यम् > पच्चम > पचम).]

पचर(णें) क्रि. पसरणें (खरूज, नायटा वगैरे). To spread (an ulcerous sore).

[सं. प्र + सृ (अथवा) + चर् (अथवा) + शृ (रा.).]

पचाळ(णें) क्रि. पूर्ण फजिती होणें, बारगळणें, भरकटणें. To be light, to be silly.

[सं. अप + चल् १ गतौ.]

पंची स्त्री. फजीती, दुर्दशा, टर, पाणउतारा. Disgracing, deriding, jeering.

[सं. अपचय ; प्रा. अपचय (= अपकर्ष, हीनता) ; २ अपश्री ; हिं. पची.]

पंच्ची वि. घट्ट, जडाव (काम). Secure or permanent binding, insetting.

[**पच्चीकर, (?), पच्चीगर, पंच्चीगर** (जडाव काम करणारा सोनार.)]

पछ(छा)ड(णें) सक्रि. पाठीमागें लागणें, जिंकणें, पिच्छा पुरविणें. To pursue, to defeat, to catch.

[सं. १ **प्र + छर्द् – प्रच्छर्दनम्; २ प्र + शद्** ६ शातने, **शड्** १ रुजायां. ह्या व्युत्पत्तींपैकीं कोणतीनेंहि समाधान होत नाहीं. ह्या सर्व शब्दांत '**पिच्छा**' हा शब्द मूळ असावा. तो **पुच्छ, पश्चात्** किंवा **पृष्ठ** ह्या शब्दापासून निष्पन्न झाला आहे. त्यापासूनच मराठी '**पछाडणें**' हा धातु आला असावा. **पछाडणी** (पराभव, पिच्छा).]

पछाण(णें) सक्रि. जाणणें, ओळखणें. To know, to recognise.

[सं. **प्रत्यभिजानाति**; पा. **पच्चभिञ्ञानम्**; प्रा. **पच्चभिणादि, पच्चहिआणाइ**; का. **पाचानूँ**; हिं. **पहचमना**; पं. **पचाणना**; २ सं. **प्रत्यभिज्ञान**; प्रा. **प्रच्चभिजाण**; **पच्चहिजाण, पच्चहियाण. प्रति + आ + ज्ञा,** किंवा **प्रत्यभिज्ञा** ह्यापासून मरा. **पछाण** येणें शक्य आहे. दुसराच अधिक ग्राह्य आहे. मराठींत मात्र हा शब्द हिंदीमधून आला.]

पछि अ. नंतर, मागें, पाठीमागें. Then, afterwards.

[सं. **पश्चा, पश्चात्**; पा. **पच्छा, पच्छातो**; प्रा. **पच्छा, पच्छादो**; कु. **पछा, पार्छी**; आ. **पासे**; बं. **पाछे, पाछु**; ओ. **पछे**; हिं. व्रज, **पाछइ, पाछई**; सिं. **पछोडु.** टर्नर हा शब्द मराठी '**पासोडी**' ह्या शब्दाशींच जोडतो तें मान्य नाहीं. **पश्च + पुट** असा शब्द तयार करतो. आमच्या मतें '**पार्श्व + वर्ति** किंवा **पार्श्वपट** ह्या शब्दाशीं जोडणें अधिक युक्त.]

पंञ्च वि. संख्याविशेष, पांच. Five.

[*IE*. penque; सं. **पञ्चन्, पञ्च**; *Av*. Panca; *Arm*. Hing; *Gr*. Pente; *Lat*. Quinque; *Got*. Fimf; *Aisl*. Fimm; *Ags*. Fif. ह्या तत्सम शब्दापासून होणारे निरनिराळे तद्भव पुढें **पांच** ह्या शब्दाखालीं दिले आहेत. हाताचा **पंजा** हा शब्द ह्या शब्दाशीं संबद्ध आहे. किंवा हाताच्या (पांच) बोटांवरून येणारी कल्पना पंचन् ह्या शब्दाच्या मुळाशीं आहे. खुणांची भाषा हीं नेहमींच ध्वनिभाषा किंवा शब्दभाषा हिच्या मुळाशीं असते (See Paget–Human speech. P. 132.). हा शब्द पुष्कळ संस्कृत व मराठी शब्दांच्या आरंभीं येऊन सामासिक शब्द झाले आहेत. प्रत्येक शब्दांत त्याचा अर्थ पांच, पांचांचा समूह असा होतो. अक्रमसा. **पंचकन्या** = (अहल्या, द्रौपदी, सीता, तारा, मंदोदरी); **पंचकल्याणी** = (पांच ठिकाणीं पांढरे पट्टे असलेला घोडा) **पंचकेणें** = (पांच व्यापारी जिन्नस : मिरी, मोहरी, जिरे, हिंग, खोबरें); **पंचखाजे** = खाण्याचे पांच जिन्नस (खाद्य > खाजें); **पंचपंच उषःकाळ** = पांच घटिकांचा सूर्योदयापूर्वींचा काळ; **पंचनखी** = (स्त्री) माकडी, वानरी, पांचनख्या असलेला प्राणी; **पंचपात्र** = पांच धातूंच्या मिश्रणानें बनविलेलें किंवा पांच बोटांनीं उचलण्याचें पात्र; **पंचमेळ** = पांच डाळींचें तोंडि–लावणें; **पंचहत्यारी** = ढाल, तरवार, तिरकसकमान, बंदूक भाला हीं धारण करणारा; **पंचारती** = ओंवाळण्याच्या पांच आरत्या; **पंचाक्षरी** = पांच ठिकाणीं मंत्राक्षरें मांडणारा जोतिषी; **पंचोत्तरी** = पांच आहेत उत्तर (अधिक) ज्यामध्यें अशी संख्या; ह्यांशिवाय संस्कृत शब्द **पञ्चकर्मेंद्रियें, पंचज्ञानेंद्रियें, पंचप्राण, पंचमुख, पंचयज्ञ, पंचमहादेव** इत्यादि शब्द आहेत. तसेंच **पंचवीस, पसतीस, पंचेचाळीस, पंचावन्न, पासष्ट, पंचाहत्तर, पंचाऐंशी पंचाण्णव** हेहि मराठी सामासिक शब्द आहेत. त्यांची व्युत्पत्ति त्या त्या ठिकाणीं दिली आहे.]

२**पंच** पुं. निवाडा करणारा, लवाद. An arbitrator.

[सं. **पंच = पांच**. निवाडा करण्यास एक मनुष्य पुरा नसून चार पांच माणसें लागत. जुन्या सामाजिक रूढीचा निदर्शक शब्द.]

पंचपात्री स्त्री. पाणी पिण्याचें एक भांडें. A small cylindrical vessel.

[सं. **पंच + पात्र, – पात्री = पुरोडाष** ठेवण्याची एक रुंदट वाटी. पुरोडाष पांच असत म्हणून पंचपात्री किंवा पांच धातूंच्या मिश्रणानें बनलेल्या धातूपासून तयार केलेलें भांडें. कधीं कधीं **पानपात्र** असेंहि रूप वापरांत आढळतें.]

१**पंचम** पुं. गायनांतील सप्तसुरांपैकीं एक सूर. The fifth note of the gamut.

[सं. **पंचम.** पञ्चसु स्थानेषु माति इति पञ्चमः (विग्रहकोशः) "पंञ्चानाम् पूरणः पञ्चमः" – भट्टोजी दीक्षित, सि. कौ. ५·२·४९. नाभि, कण्ठ, हृदय कपाळ, रक्ताशय ह्या पांच स्थानांच्या वायूपासून हा स्वर निघतो म्हणून ह्याला 'पंचम' असें नांव आहे (डुकले–शब्द रत्नाकर). केवळ पांचवा स्वर म्हणून हा 'पंचम' नव्हे.]

पंचम पुं. तंबाखु A covert term for tobacco.
[सं. **पंचम. 'तंबाखु'** हा पांचवा पदार्थ इतर चार पदार्थ–१ पान २ चुना, ३ सुपारी ४ कात. तंबाखूचा दर्शक एक पाण्डित्यप्रकर्ष दाखविणारा विनोदानें वापरलेला शब्द आहे.]

पंचवीस वि. संख्याविशेष, वीस आणि पांच. Twenty five.
[सं. **पञ्चविंश-ति**; पा. **पञ्चवीस, पण्णावीसति, पण्णुवीस**; प्रा. **पणुवीसम्**; अप. **पचीसम्**; का. **पुचुहं**; बं. **पॅचीस्**; ओ. **पचीस**; हिं. **पचीस**; पं. **पँजी**; लां. **पञ्जीह**; सिं. **पञ्जवीह**; गु. **पचीस्**; ने. **पचिस्.**]

पंचा पुं. आंखूड व अरुंद असें नेसावयाचें धोतर. A piece of cloth, a small or short dhotee.
[फा. **पंज, पंचह्**;=लहान वस्त्र.]

पंचाऐंशी वि. संख्याविशेष, ऐशीं आणि पांच. Eighty-five.
[सं. **पञ्चाशीति**; प्रा. **पञ्चासीइँ**; का. **पोंचाशीथ**; बं. **पॅचासी**; ओ. **पञ्चासी**; हिं. **पचासी**; लां. **पञ्जासी**; सिं. **पञ्जासी**; गु. **पँच्यन्सी**; ने. पचासि.]

पंचांग न. रोजचें दिनमानपत्रक, दिनमानाची पांच अंगांची माहिती देणारें पत्रक. Hindu calendar or almanac.
[सं. **पंच + अंग**; राशि, वार, नक्षत्र, योग, करण. हीं त्यांतील पांच अंगें होत]

पंचाण्णव वि. संख्याविशेष, नव्वद आणि पांच. Ninety-five.
[सं. **पञ्चनवति**; प्रा. **पञ्चाणउइँ**; का. **पोचनमथ**; बं. **पँचानब्बइ**; ओ. **पञ्चानबे**; हिं. **पचान्वे**; लां. सिं. **पञ्जानवे**; गु. **पँचाणूँ**; ने. **पचान्नब्बे.**]

पंचार(णें) क्रि. पांच वर्षांची उमर होणें. To become of five years' age.
[सं. **पंचवर्षीयः** (नाधा.). हा धातु घोड्याची उमर सांगतांना वापरतात.]

पंचावन्न वि. संख्याविशेष, पन्नास आणि पांच. Fifty-five.
[सं. **पञ्चपञ्चाशत्**; पा. **पञ्चपन्नास**; प्रा. **पणवण्णम्**; देप्रा. **पंचावण्णा** तथा **पणवण्णा पञ्चाधिक पञ्चाशत्** (११९-७); का. **पोचवन्ञ्झह**; बं. **पंञ्चान्न**; ओ. **पञ्चावन**; हिं. **पचपन**; लां. **पच्वञ्ज**; सिं. **पञ्ज्वञ्जाह**; गु. **पॅचावन्**; ने. **पञ्चन्न.**]

पंचाहत्तर वि. संख्याविशेष, सातदां दहा आणि पांच. Seventy-five.
[सं. **पंचसप्तति**; प्रा. **पञ्चहत्तरी, पन्नत्तरि**; का. **पोचसतथ**; बं. **पंचात्तर**; ओ. **पञ्चत्तरी**; हिं. **पचत्तर्**; लां. **पञ्झात्तर**; सिं. **पञ्जहररि**; गु. **पॉचोतेर**; ने. **पचहत्तर.**]

पंची,-छी पुं. पक्षी, पोपट. A bird, a parrot.
[सं. **पक्षिन्**; प्रा. **पंछि**; पं. हिं. **पंछी**; पण गु. **पंखी**; सिं. **पखी**; बं. **पाखी**; सिंह. **पक**; मरा. **पंची प्यारा**; (प्यारा पोपट, प्रियकर; प्रेमिक व्यवहारांत पोपट मैना हे शब्द फार रूढ आहेत); **पंचू** (पोपट, हुशार, कुशल <पक्षिन् > पंछि); परंतु हा शब्द मराठींतील मूळचा नाहीं. दुसऱ्या औत्तरीय भाषेंतून आला आहे. संस्कृतमधील **'क्ष'** चा कांहीं भाषांत **'ख'** होतो व कांहीं इतर भाषांत 'छ' होतो.]

पंचेचाळिस,-ताळीस वि. संख्याविशेष, चाळीस अधिक पांच. Forty-five.
[सं. **पञ्चचत्वारिंशत्**; प्रा. **पणयालीसम्**; अप. **पचतालीसह**; का. **पोंचतालिहं**; बं. **पायँताल्लीस**; ओ. **पचाळीस**; हिं. **पैतालीस्**; पं. **पैताली**; लां. **पेताली**; सिं. **पञ्जतालीह**; गु. **पिस्ताळीस्**; ने. **पैंतालिस्.**]

पंजा पुं. बोटें व तळहात, शरीरावयव, पत्याचें पांच ठिपक्याचें पान. A claw, the five of a suit of cards.
[सं. **पंचक**; प्रा. **पंचअ**; नुसत्या **पंचपासून पंजा** शब्द निष्पन्न होणार नाहीं. त्याच्या शेवटीं **'क'** हा प्रत्यय हवा किंवा फा. **पन्जा** हाच शब्द मराठी **'पंजा'** ह्या शब्दाचा मूळ असावा हें अधिक सयुक्तिक आहे. पंजार(णें) पंचारणें पहा.]

पंट पुं. पट्टा. A stripe, a long piece of cloth.
[सं. **पट, पट्ट.** मूळ शब्द प्राकृत; नंतर त्याचें संस्कृतीकरण झालें. सं. **पत्र**; प्रा. **पट्ट** असाहि एक व्युत्पादिण्याचा मार्ग आहे. उदा. **ताम्रपत्र, ताम्रपट्ट; पत्रवर्धन > पट्टवर्धन. 'पत्र'** ह्या संस्कृत रूपाचीं प्राकृतमध्यें दोन रूपें होतात. एक **पात** व दुसरें **पट्ट.** हें दुसरें रूप संस्कृतांत घेतलें गेलें (राजवाडे भा. इ. मं. इतिवृत्त) ज्ञानेश्वरींत (१२–८४) **पटा** हा शब्द **अधिकार** ह्या अर्थी वापरलां आहे. ह्या शब्दाच्या साहाय्यानें कांहीं

सामासिक शब्द मराठींत बनले आहेत. **पटवर्धन** = जकात वसूल करणारा एक अधिकारी (ह्यांतील **पट** शब्दाचा अर्थ 'कर, ज्यांच्यापासून वसूल करावयाचा त्या कुळांच्या नांवांची याद' असा आहे. ह्या शब्दाच्या अन्वयानें सिद्ध झालेले पुढील शब्द पहा; बकामसा. **पटवारी** = गांवकुलकर्णी, तलाटी, पटावरून वसूल करणारा; **पाटील** (**पट्ट + कील**) गांवकामगार; **पटह** = **पट्टयानें** आघात करून वाजविण्याचें वाद्य, पडघम; अकामसा. **पटाईत** < सं. **पटु** (नाधा.) किंवा **पट्टायत्त** = निष्णात; **पट्टराणी** = मुख्य राणी; **पट्टा** = लांब पट, लांब निमुळता कापडाचा तुकडा; **पटकूर** (**पट + कूर, कूल** (अल्पार्थे प्रत्यय); **पट्टकूलम्**; **पटका** = (**पट + क**) डोक्याचा अरुंद रूमाल; **पटखळ** = (< **पट्टकूलम्, पटकूर,**) वस्त्र, प्रावरण, आच्छादन; **पटखळ(णें)** = आच्छादणें (पटखळ पहा.).]

पेंट स्त्री. आवृत्ति, पौनःपुन्य. Repetition, fold.
[सं. **प्रति** ह्या अव्ययापासून हें मराठी नाम सिद्ध झालें आहे.]

पट(णें) क्रि. कबूल करणें, स्वीकारिलें जाणें, मान्य होणें, जुळणें, मनास येणें, खरें ठरणें. To be accepted, to be admitted, to agree.
[सं. १ **पट्** १ गतौ, २ **प्रत्ययनम् – प्रति √ इ** किंवा √ **अय्.**]

पटई, पटाई स्त्री. पाटणी, लाकडाची तख्तपोसी. The floor.
[सं. **पाट**; हिं. **पाटई.**]

पटक(णें) क्रि. जोरानें आपटणें, आदळणें, मारणें, फेंकणें, ताब्यांत घेणें, स्वीकारणें. To dash down or against forcibly, to accept.
[सं. १ **प्र + टक्** १ बंधने; २ **प्रति + ग्रह्** (पकडणें) (रा.). **पटकन्, पटकर, पटदिशी, पटदिनीं** (ध्वनिशब्द किंवा वरील 'पटक' ह्या धातूशीं संबद्ध. **कन्** हा कानडी **कनेचा** अवशेष.]

पटका पुं. डोक्यास किंवा कमरेस बांधण्याचें लांब फडकें, रुमाल. A piece of cloth about a span in breadth worn round head or waist.
[सं. **पट्ट–क**; हिं. **पटका**; पं. **पटुका**; सिं. **पट्को**; ने. **पटुका**; अकामसा. **पोतेरें** (< सं. **पट्ट + कीर** (?))= जमीन सारवण्याचें क्षुद्र फडकें; हा शब्द ताडून पहाण्यासारखा आहे.]

पटकाव(णें) सक्रि. घेणें, लाटणें, फसवून घेणें, ताब्यांत आणणें. To seize smartly, to pounce upon.
[कान. **पट्टु** = धरणें, पकडणें; सं. **प्रति + क्रम्**; प्रा. **पट्टिकवँणम**; मरा. **पटकावणी** = झडपणी, एकदम तावा.]

पटकी स्त्री. रोगविशेष, महामारी. The epidemic cholera.
[मरा. **पटकन्**; रोगाचा परिणाम **पटकन्** होतो म्हणून **पट, पटक(णें)** ह्या शब्दाशीं संबध मोल्सवर्थ व टर्नर जोडतात. परंतु ही व्युत्पत्ति संशयास्पद वाटते.]

पटवारी पुं. मुलकी ग्रामाधिकारी. A village revenue officer.
[सं. **पट्ट + वाल, पट्टकील**; प्रा. **पट्टइल्ल**; हिं. **पटेल**; मरा. **पाटील**; बं. **पाटारी**; हिं. पं. **पट्वारी**; गु. **पटावालो**; सिं. **पटेवारु, पटेवाल**; '**र**' यावयाचें कारण तीं रूपें पूर्व हिंदीपासून घेतलीं. त्याभाषेंत '**ल**' चा '**र**' होतो. ह्यांतहि टर्नरचा घोंटाळा झाला आहे. तो पाटील आणि पट्टावाला हे एकच समजतो.]

पेंटवि(णें) सक्रि. रेशमांत विणणें. To string on a thread of silk.
[सं. **पट्** १० वेष्टने; अकामसा. **पटवा, पटवणी, पटवेकरी.**]

पेंटवि(णें) सक्रि. स्वीकारणें, खात्री करणें. To accept or honour.
[सं. १ **प्रत्ययम्**; २ **पटु** (नाधा.), **पटयति–** पटुं आचष्टे.]

पटांगण न. विस्तृत मोकळें मैदान,–अंगण. A big open space, a quadrangle.
[सं. **पाटांगण.** त्यावरून आद्य वर्ण ऱ्हस्व होऊन पटांगण हें रूप झालें.]

पटिसाळा स्त्री. पाठशाळा, राजमठ. A school, an assembly room.
[सं. **पाठशाला.** याकाम. मध्यें हा शब्द रूढ होता. व त्याचा अर्थ **पाठशाळा, मठ** असा होता. (रू. ३५१).]

पटल न. आच्छादन, आवरण, (डोळयावरील) पडदा. A covering, a membrane.
[सं. **पटल.**]

पटा,–ट्टा पुं. लांब अरुंद तुकडा, नवार, रेघ, तरवार, पत्र, कागद (लक्षणा). A stripe, a kind of sword.

[सं. पट; हिं. पट; याकाम. पटा = अधिकार (ज्ञा. १२·८४); अकामसा. पट्टी (लहान आकाराचा पट, चिंधी); **पट्टीचा** (पट्टा ओढून त्यावर विद्वान वेद म्हणणारे उभे करीत.); **पट्टू** (उंच लोंकरीचें कापड); **पट्टें** (शालजोडी; कांबळ्याचा एक तुकडा.). **पट्ट्याचा हात** (तरवारीचा खेळ); **पट्टावाला** (पट्टा गळ्यांत घालणारा, शिपाई);]

पटु वि. हुशार, तरबेज, चलाख. clever, able, smart.
[सं. पटु, **पट्टायत्त** = पटाइत (हुशार, तरबेज).]

पठ(णें) उक्रि. पढणें, अभ्यास करणें, वाचणें. To learn, to study, to read.
[सं. पठ् १ पठने.]

पठाडा,-डी वि. आंखुड, ठेंगणा, मजबूत, सपाट. Short, shortsized and thickset, flat.
[सं. पृष्ठ; प्रा. पट्ठ,>**पाठ + डा,-डी-रा** (मराठी विशेषणाचे प्रत्यय) : आद्य ऱ्हस्वत्व हा हिंदी उच्चाराचा अवशेष असावा. हिंदी किंवा गोप भाषेंतून हे शब्द मराठींत आले असावे. **पठार** (डोंगरावरील सपाट भाग) हा शब्द **सं. प्रस्तार** ह्या शब्दाशीं संबद्ध असला तरी वरील शब्दाशीं ताडून पहाण्यासारखा आहे.]

[१]पठाण पुं. उत्तरेकडील मुसलमानांची एक जात. A Pathan.
[**पृश्तान** = डोंगरी लोक; बं. **पाठान्**; ओ. **पठाण**; हिं. **पठान्**; पं. **पठाण्**; सिं. **पठाणु**; गु. **पठाण्**; ने. **पठान्**; सं. **पक्थन्** (?); हिं. **पठान.**]

[२]पठाण न. रूंद पाठ, रुंद जाड कौल. Broad back, a broad and flat tile.
[सं. पृष्ठ.]

पठार न. डोंगराचा माथा, माथ्यावरील सपाट मैदान. The plateau or level ground on hill.
[सं. **पृष्ठ, प्रस्तार, प्रस्तर**; हिं. **पटरा**=तक्ता. ह्या शब्दाशीं **प्रस्तर** पासून निघालेले **पाथर, फत्तर** वगैरे शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत.]

पठ्ठा,-ठ्ठ्या वि. कुशल, निपुण, बळकट, धष्टपुष्ट. Skilful, dexterous, sturdy, sinewy.
[सं. **पृष्ठ, पुष्ट, पटु**; प्रा. **पट्ठ पुट्ठ**; अर. **पट्ठा**; हिं. **पट्ठा**]

[१]पड(णें) अक्रि. पतन पावणें, जमीनीवर येणें, खालीं घसरणें. To fall, to drop, to tumble.
[सं. **पत्**; पा. **पत्**; प्रा. **पड**; कु. **पडणो**; आ. **पडिब**; बं. **पडा**; ओ. **पडिबा**; हिं. **पडना**; गु. **पडवूँ**; ने. **पडनु**; ह्या शब्दाचे इतर लाक्षणिक अर्थ आहेत. **पडणें** = होणें, असणें. उदा. तो पडला श्रीमंत (सं. **प्रति + पद्**); **पडणें** = किंमत असणें, मूल्य होणें, उदा. टोपीस आठ आणे पडले. (सं. **परि + क्री**; प्रा. **पडिइ**). पुढील धातु पहा.]

[२]पड(णें) सक्रि. मिळणें, घेणें, अनुभवणें. To get, to secure, to receive, to enjoy.
[सं. **प्र + दा**; **परि + क्री**; कान. **पडु** = मिळणें, प्राप्त होणें. कानडी, तेलगु, मल्याळी भाषांत कर्मणि प्रयोगच वापरतात.]

पड वि. दुय्यम, हाताखालील. Subordinate, secondary.
[सं. **प्रति, प्र,परि**; प्रा. **पडि**; गु. हिं. **पड**; सिंह. **पिळी.** हा शब्द प्रथम येऊन पुष्कळ मराठी सामासिक शब्द तयार झाले आहेत. **पडच्छाया** (< प्रति + च्छाया); **पडसाद** (प्रतिशब्द); **पडजीभ** (प्रति जिव्हा); **पडचाकर** (प्रति चाकर); **पडदासी** (प्रतिदासी).]

पडक(णें) क्रि. सवकणें, संवय लागणें. To be habituated.
[सं. **प्रत्यग्र** (नाधा.); याकाम. **पकडणें** (नरुस्व. ५८४).]

पडकय स्त्री. शेतकऱ्यांच्या मधील देवघेव. The exchanging among farmers.
[सं. **प्रतिकृति**; पा. **कतिका** = ठराव; देप्रा. **पडिक्कओ प्रतिक्रिया** (१८८-९); प्रांतिक कोंकणी. **पडकय.**]

पडखर वि. रोखठोक. Blunt, prompt.
[सं. **प्रतिक्षर**; **प्रतिक्षार** (?); देप्रा. **पडिक्खरो क्रूरः** (१९०-१२).]

पड(डि)खर(णें) क्रि. ओळखणें. To recognise.
[सं. **परि + ईक्ष** (शको.); ह्या व्युत्पत्तीनें 'र'ची उपपत्ति लागत नाहीं. सं. २ **प्रति + अक्षर**; प्रा. **पडि अक्खर > पडखर** ही व्युत्पत्ति अधिक ग्राह्य. पडखर पहा; किंवा हा शब्द '**पडखळ**' ह्याचें दुसरें रूप असावें. त्याचा अर्थ एकमेकावर पडणें, आलिंगणें म्हणून 'ओळखणें' असा अर्थ आला असावा.]

[१]पडखळ(णें) क्रि. आदळणें, एकमेकावर पडणें. To dash against or one upon another.
[सं. **प्रतिस्खल् > पडिखळ > पडखळ.**]

पडखळ(णें) क्रि. उठावणी करणें. To raise up, to make to rise.
[सं. **परिस्खद्** (चलने) = संमतात् हलविणें.]

पडघम,-घाम, घांव न. एक चर्मवाद्य. A kind of instrument.
[सं. **पटह** ; पट्यानें वाजविण्याचें वाद्य. **पट+√ हन्** धातूपासून **घम्, घाव** हे शब्द सिद्ध होणें शक्य आहेत.]

पडत(ता)ळ,-ळा पुं. उपचार, आदरसत्कार. Hospitality.
[सं. **प्रति + तल** किंवा **प्रति + स्तृ** ५ विस्तारे ; याकाम. **पडताळा** (ज्ञा. ५-१६७).]

पडतळ,-ताळा पुं. अनुभव, प्रतीति, तुलना, अनुवाद. Experience, comparing, operation of measuring.
[सं. **प्रति + ताळी, प्रति + दान, प्रति + तर्क्** १ प्रतिभाषणे ; याकाम. **पडताळा** (ज्ञा. ७-२०२); **पडताळ(णें)** = परीक्षा पाहणें, अजमावणें.]

पडतोरा पुं. नदीचा,-तळ्याचा घांट. The stairs or steps on a bank.
[तामी. **पडित्तोरै, पडि** = पायरी ; **तुरै, तोरै** (घांट तंजावरकडे रूढ).]

पडदणी स्त्री. स्नान करतांना आडवें लावून घ्यावयाचें लहान वस्त्र (स्त्रियांचें), सोंवळें वस्त्र नेसतांना मध्यें नेसावयाचें वस्त्र. A small cloth worn during ablution (esp. by women).
[सं. १ **परिधानी > पडिदाणी > पडदाणी > पडदणी** ; २ **पट+दुणी** ; याकाम. **पडदनी** (दृ. १५).]

पडद(दा)ळें न. गळ्यांतील तरवारीचा पट्टा. A sort of sword-belt.
[सं. **पट+तल** ; हिं. **परदल.**]

पटदर(णें) अक्रि. विस्तारणें. To spread out, to extend.
[सं. **प्रस्तृ** ५ विस्तारे १ **प्रति+स्तृ** ५ विस्तारे.]

पडदा पुं. जवनिका, मध्यें आडोसा म्हणून लावावयाचें वस्त्र, गोशा, मर्यादा, शरम. A curtain, a veil, a screen.
[१ फा. **पर्दा** = आडवस्त्र ; २ सं. **परिधा > पडिधा > पडदा** (रा.), **पटल.** पहिलीच व्युत्पत्ति अधिक ग्राह्य ; पेकाम. **पड्दा** (साने. पयाव. ३०९).]

पडदी स्त्री. एका विटेच्या थराची लहान भिंत, कूड. A wall of one brick in breadth, a partition wall.
[सं. **प्रति + दिह्** २ उपचये (?) ; **पडदा** ह्या शब्दाचें स्त्रीलिंग आहे कां ?]

पडप(णें) क्रि. उद्धट होणें, खोटें महत्त्व अंगीं आणणें, शृंगारणें, चकाकणें. To be arrogant, to decorate, to assume importance or airs.
[सं. **प्र दृप्** ४ मोहने, १ संदीपने ; याकाम. **पडपणें** (ज्ञा. १७-२४६); **पडप** = प्रतिष्ठा, महत्त्व, शोभा, कान्ति; (सं. **प्र + दृप्** १ संदीपने ; याकाम. **पडप** (उगी. २५, ४२. ज्ञा. १०-४६); पेकाम. **पडप** (मोरो. वपअ ७-२०३)]

पडल, पडळ न. डोळ्यावरील आच्छादन, डोळ्यावरील सारा. A film over the eye.
[सं. **पटल** ; प्रा. **पडल** (न); गु. **पडल** ; याकाम. **पडळ** (ज्ञा. १३·५६१); शिकाम. **पडळ** ; अकाम. **पडळ** ; माशांचा थवा ह्या अर्थीं काव्यांत हा शब्द वापरला आहे. (ब्लोक). मग हे दृष्टि गेली । वरीं आलें पडळ ॥ तुका.]

पडवळ, पडोळ न. वनस्पतिविशेष, एक प्रकारचा लांबट भोंपळा. A kind of vegetable, a snake-gourd.
[सं. १ **पटवल्ली** ; २ **पटोल, पटोलिका** ; प्रा. **पडोल** ; कान. **पडवल** ; गु. **परवर.**]

पडवा-वें पुं. न. अनायासें झालेला लाभ. An unexpected gain.
[सं. **पत्** १ पतने.]

पडवी स्त्री. ओसरी ; घराच्या पुढील किंवा मागील ओटी. The verandah of a house.
[सं. १ **पटकुटि** (?) ; देप्रा. **पडवा** (स्त्री) ; मरा. **पडोशी** ह्या शब्दाशीं कांहीं संबंध आहे कां ? २ **प्रति + विश्.**]

पडशी स्त्री. मध्यें भोंक असलेलें व दोन्ही टोंकांस सामानासाठीं पिशव्या असलेलें पोतें. A double pack-sack having its opening in the middle.
[कान. **पसुबे** = पडशी.]

पडसाद पुं. प्रतिशब्द, शब्दाचा पुनरुच्चार, प्रतिध्वनि. A reflected sound, an echo.

[सं. **प्रतिशब्द**; देप्रा. **पडसुआ** (**प्रतिश्रुति**); हेमचंद्र हा शब्द '**प्रतिश्रुति**' पासून व्युत्पादितो परंतु तें सयुक्तिक नाहीं. '**प्रतिशब्द**' हा शब्द त्याचा मूळ शब्द आहे. **शब्द** पासूनच **साद** निघणें शक्य आहे. मधली **पडिसाद** ही अवस्था याकाम. मध्यें आढळते. याकाम. **पडिसाद** (ज्ञा. ९-७७); अकाम. **पडसादणें** = प्रतिध्वनि उमटविणें.]

पडसें-शें न. थंडी, सर्दीमुळें नाकांतून श्लेष्मा गळण्याचा विकार. A common cold.
[सं. **प्रति + श्यै** १ गतौ, संघाते च; अकाम. **पडशेणें** = नाक गळणें, सर्दी होणें.]

पंडळ स्त्री. डोळयावरील सारा, (गांधील माशांचा) थवा, जमाव, मेघ. A film over the eye, a congregation, a crowd.
[सं. **पटल, पडळ, पडल** पहा.]

पंडळ न. मोकळें आवार. Open large space.
[सं. **पटल** (?); देप्रा. **पडलम्**]

पडाव पुं. एकप्रकारची मच्छिमारी नाव, लहान नाव-जहाज, तळ, मुक्काम. A kind of fishing boat, encampment.
[सं. **पटकुटी ; प्लवः** ; देप्रा. **पडवा** ; कान. **पडगु** = जहाज, नाव.]

पडिकर पुं. वि. दंड, काठी, सुंदर, डोळस. A staff, a stick, beautiful.
[सं. **प्रति + कृ, प्रतिकर** ; याकाम. **पडिकर** = दंड, काठी, डोळस (ज्ञा. १७·४२).]

पडिकार पुं. उपाय. A remedy.
[सं. **प्रतिकार** ; याकम. **पडिकार** (ज्ञा. १७-१०२).]

पडिखर(णें) क्रि. ओळखणें, पारख करणें, पडखर पहा. To recognise, to examine.

पडिघ,-घा,-घाइ(णें) सक्रि. धरणें, दाबून अडकवून धरणें. To hold, to grapple forcibly.
[सं. **१ प्रति किंवा परि + हन्** २ हिंसायाम्; **२ प्रति** किंवा **परि + ग्रह्** ९ उपादाने ; याकाम. **पडिघाणें** (ज्ञा. १३-५१, १४-१८५), **पडघा, पडिघा** (सं. **प्रति, परिग्रह, पतद्ग्रहः**) = तस्त, पिकदाणी (ज्ञा. १३-४१९); **पडघाणी** (**प्रतिग्रहणी**) = कळसाची बैठक.]

पडिघात(णें) क्रि. आदळणें, ताडन करणें. To strike, to dash against.
[सं. **प्रतिघात** (नाधा.); याकाम. **पडिघातणें** (ज्ञा.); अकाम. **पडिघातिणें, पडिघायणें, पडिघात्रणें.**]

पडिपाड पुं. सारखेपणा, पराक्रम, बरोबरी. Similarity, resemblance, valour.
[सं. **प्रति, प्रति** ; एक **प्रति** उपसर्ग व दुसरा **प्रति** = किंमत, मोल, प्रकार ; **प्रति > प्रत > पाड** ; याकाम. **पडिपाड** (ज्ञा. १०-१५९); वकाम. **पडिपाड** (प. मा. २·२४९).]

पडिभार पुं. भर, आसक्ति, अधिकता, बडेजाव. Excess, attachment, greatness.
[सं. **प्रतिभार, √ भृ** ; **परि + बर्ह्, परिबर्हः > पडिभर** ; याकाम. **पडिभार, पडिभर** (ज्ञा. २-१९३); शिकाम. **पडिभर.** अभेदाचे पाठांतर । अतिविषयीं पडिभर ॥ तुका.]

पडिभास(णें) अक्रि. दिसणें, भासणें. To appear, to look.
[सं. **प्रति + भास्** १ दीप्तौ ; याकाम. **पडिभास** (ज्ञा.)]

पडिमठ पुं. प्रत्येक स्थान. Every place.
[सं. **प्रति + मठ** ; याकाम. **पडिमट** (शि. १६९); **पडिमठ** = गायनाचा प्रकार.]
तेथ पडिमठें गाइलें पंचम स्वरें : तेणें आंग धरेचिना ॥ नरुस्व ३९७.

पडियंत स्त्री. प्रतिष्ठा. Greatness, prestige.
[सं. **प्रति + इ**, किंवा **अय्** १ गतौ ; **प्री** ४ प्रीतौ ; **प्रतिहृदय** ; याकाम. **पढियंत** = आवडता, प्रिय (अमृ. १०-१३) **पडियावो, पढियावो** (ली.च.१-५,उगी.८१).]

पडिसाई स्त्री. पडसावली. Shadow.
[सं. **प्रति + च्छाया** ; याकाम. **पडिसाई** (ज्ञा. ११-६२७).]

पडोशी पुं. शेजारी, जवळचा. A neighbour.
[सं. **१ प्रतिवेशी** ; प्रा. **पडिवसिअ** ; बं. **पड्सी** ; ओ. **पडिसा, पडोसी** ; गु. सिं. पं. हिं. **पडोसी** ; **२** सं. **प्रातिवेश्मिकः, प्रतिवासी** ; पा. **पटिवसति** ; प्रा. **पडिवसइ**. **३** सं. **प्रातिवेशिकः** प्रा. **पडिवेसिअ** ; अकाम. **पडोस** = जवळ ; **पडोसा** = शेजार, जुळतेपणा, पडताळा.]

पढ(णें) उक्रि. वाचणें, शिकणें, घोकणें, म्हणणें, बोलणें. To read, to learn, to repeat, to affirm.

[सं. पठ् १ व्यक्तायां वाचि (पृथ्); पा. पठ; प्रा. पढ; का. परुन्; पपं. पढनु; कु. पढणो; आ. परिब; बं. पडा; ओ. पठिबा; हिं. पढना; पं. पढणा; लां. पढण; सिं. पढणु; गु. पढवूँ; ने. पर्नु; याकाम. **पढणें** (नरुस्व. १३६, ज्ञा. १८-५२६); **पढिन्नला** (ज्ञा. ९-४१८), **पढियावो** = शिक्षण; अकामसा. **पढत** (मूर्ख) = शहाणा गाढव; **पढयंता** = बोलका, शिकलेला.]

पढवळ काठी स्त्री. उंच भाला. A spear.
[सं. **प्रतिभल्ल** (?); याकाम. **पढवळ काठी.**]

पढिए वि. आवडता. Dear.
[सं. **पठत्**, √**पठ्**, **प्रति + इ**, - + **अय्**, **प्री**, किंवा **प्रतिहृदय**; शिष्य हा आवडता असतो. त्यावरून **भक्त** हा अर्थ आला. **पढिए**, **पढियंता** = आवडता, प्रिय (अमृ. १०-१३); **पढियार** = विशेष आवडतें (नरुस्व. ३९२); **पढियावो** = आवड (ज्ञा. ९-७), **पढियास** (प्रतिभास) (ज्ञा. २·१६७) इत्यादि शब्द याकाम. मध्यें रूढ असलेले आढळतात. ह्याची व्युत्पत्ति सं. **प्रतिहृदय** ह्यापासून झालेली अधिक ग्राह्य. **पडियंत**, **पढणें** पहा.]

पण अ. परंतु. But.
[१ सं. **पुनर्**; पा. **पुन**, **पन**; प्रा. **पुणो**, **उण**, **पण**; पपं. **पण्**; हिं. **पुनि** (**पुनः**); सिं. **पुणि**; **पिणि**, **पण**; गु. **पण्**; सिंह. **पुन**, **पन**; ने. **पनि**; याकाम. **पणि**; २ सं. **न + अपि**; प्रा. **णवि**; ३ सं. **अपि + न**; प्रा. **विण**, **पण**; ग्राम्य. अकाम. **पन**, **पणबीण** ह्या शब्दावरून असें वाटतें कीं **विण** ह्या प्राकृत शब्दाशीं संबंध असावा.]

पेण पुं. शर्त, होड, प्रतिज्ञा. A condition, the stake, a promise.
[*IE.* Pel; सं. **पणते**; *Lith.* Pelnas; *Lett.* Pelns; *Gr.* Polen; सं. **पण**, (**प्रण**, **प्रतिज्ञा**, प्रा. **पइण्णा**); प्रा. (महा.) **पण**; प्रा. **पण.**]

पँण प्र. भाववाचक नाम सिद्ध करण्याचा प्रत्यय. A termination to form abstract nouns.
[वैसं. **त्वा**, **त्वीन**, **त्व**; सं. **त्व**; प्रा. **त्तण.**]

पणजा पुं. आजाचा बाप, आईचा किंवा वडिलांचा आजा. A great grand-father.
[सं. **प्रार्यकः**, **प्र + आर्य**; प्रा. **प्र+अज्ज**; देप्रा. **पज्जय**; परंतु मधील **ण** ह्या अनुनासिकाची उपपत्ति काय? प्राकृत मधील किंवा अपभ्रंश भार्षेतील नेहेमींचें सामान्य स्वरूपाचें नासिक्य ह्या शब्दांत उतरलें आहे काय? किंवा द्वित्त ‘ **ज्ज** ’ मधील एका ‘ **ज** ’ बद्दल ‘ **ण** ’ हा आला काय? किंवा ‘ **पणतु** ’ शब्दाच्या साम्यानें त्यांतील **ण** व **आजा** मधील ‘ **जा** ’ अशा मिश्रणानें सिद्ध झाला आहे कां? अकामसा. **पणजी**, **पणजोळ.**]

पेणती, **पणतु** पुं. स्त्री. नातीची मुलगी, -मुलगा. A great grandson: or grand daughter.
[सं. **प्र + नप्तृ**, **प्र + नप्त्री**; सं. **प्रणपात्** (**नपात्**), **प्रणप्तृक**; प्रा. **पणत्ति**; शिला. प्रा. **प्रनतिक**, **पणतिक** (अशोक); हिं. **पनाती** (स्त्री.). असलाच शब्द **पणतोंड** (पणतवंड, प्रणप्तृ + वंड) असा आहे.]

पंणती स्त्री. वाटी अथवा बशी सारखें एक मातीचें पात्र. An earthen saucer.
[सं. **पंक्ति** (?).]

पंडित वि. विद्वान, अधीत. A learned man.
[सं. **पण्डा** (बुद्धि) + इन्नंत प्रत्यय, √**पण्ड्** = जाणणें; अकामसा. **पण्ड्या** = क्षेत्रस्थ ब्राह्मण, उपाध्याय.]

पंढरपूर, **पंढरी** न. स्त्री. एक शहर. The name of a town.
[सं. **पांडुर.** जमीन दोन प्रकारची : **काळी** आणि **पांडरी.** **काळी** = धान्य पिकविण्याची जमीन. **पांढरी** = वस्तीकरून राहण्याची जमीन. ह्या ‘ **पांढरी** ’ पासून ‘ **पंढरपूर** ’ शब्द आला असावा. **पांडरपेशा** (पांढरपेशा) ह्या शब्दाच्या मुळाशीं हाच शब्द आहे.]

पण्हरें न. उत्तम प्रकारचें सोनें. Pure gold.
[सं. **पञ्चदश**; प्रा. **पन्दह्**; >**पन्धर.** पूर्वी ज्ञानेश्वर काळीं किंवा यादवांच्या राजवटींत सोन्याचा भाव दर तोळ्यास रुपये पंधरा असा होता; म्हणून सामान्य रीतीनें **सोनें** ह्याचा वाचक **पन्हधरें** किंवा **पन्हरें** किंवा **पण्हरें** हा शब्द रूढ झाला. याकाम. **पन्हरें**, **पन्नरे**, **पन्धरें** (ज्ञा. ६-३४).]

पत स्त्री. नांव लौकिक, इमानीपणा, अब्रू, वजन. Fame, credit, reputation.
[सं. **प्रति + इ**, **प्रतिष्ठा.** शब्द परकी आहे कां ?]

पत(थ)क. न. घोडेस्वारांचा समुदाय. A body of horse, cavalry.
[सं. **पत्ति**, **पत्तिक**; पेकाम. **पतकी** = एक आडनांव, जकात गोळा करणारा अधिकारी.]

पतकर(णें) सक्रि. स्वीकारणें, मान्य करणें, अंगीकारणें. To agree to, to undertake, to acquiesce.

[सं. **प्रतिग्रह् > पतकर** (**पतिगर, – पतगर**); याकाम. **पतिकर** = अनुभव (ज्ञा. २-१९३); अकाम. **पतकार(णें), पतकरा, पतकार** (कबूली, मान्यता).]

पताका स्त्री. निशाण, ध्वज. A flag or banner.

[सं. **पताका.**]

पति पुं. नवरा, मालक. Husband, a lord.

[*IE.* Potis; सं. **पति, √पत्**; *Av.* Paiti; *Lat.* Potis (Fem.); *Av.* Paithni; *Gr.* Potnia.]

पतित वि. पडलेला. Fallen.

[सं. (निष्ठा) **√पत्.**]

पैत्ता पुं. थांग, खूण, शोध, माग, राहण्याचें ठिकाण. Trace, intelligence, address.

[सं. **पथिन्** (?); हिं. **पता, पताह.** हा शब्द अन्यभाषीय असावा.]

पैत्ता पुं. तंबाखूचें हिरवें पान, पत्त्याचा डाव, खेळ. A green tobacco leaf, a pack of cards.

[सं. **पत्र**; प्रा. **पत्त**; हिं. **पत्ता.**]

पत्ती स्त्री. भांगेचीं पानें, पत्री. Green tobacco, hemp-leaves.

[सं. **पत्र**; हिं. **पत्ती.**]

पत्नी स्त्री. लग्नाची स्त्री, बायको. Wife.

[सं. **पत्नी. पति** पहा.]

पत्र न. चिठ्ठी, कागद, पान. A letter, an epistle, a leaf.

[सं. **पत्र, √पत्** १ पतने; *Av.* Patareta; अकामसा. **पत्रक** = यादी, तक्ता; **पत्रा** (**पत्रक**) = धातूचा तक्ता; **पत्रावळ** (**पत्रावलि**) = पानांचें ताट, **पत्रिका** = (**जन्मपत्रिका–ह्या** शब्दाचा संक्षेप.) = जन्मवेळेच्या ग्रहांचें टिपण.]

पथ पुं. पंथ पहा.

पथक न. लष्कराची तुकडी. पतक पहा.

पथारी स्त्री. अंथरूण, बिछाना, पसारा. Bedding, anything spread.

[सं. **प्रस्तार, √ प्रस्तृ** ५ विस्तारे; पा. **पत्थार**; प्रा. **पत्थार**; देप्रा. **पथारी निकरः प्रस्तरश्च** (२०६·१५); गु. **पथारी**; सिं. **पथरु**; हिं. **पत्थर**; सिंह. **पतर** = पसरलेली वस्तु; बं. **पाथार** (**समुद्र**), **पथारो** (**विस्तार**); आ. **पथार**; का. **पथर.** २ सं. **प्रस्तरी**; प्रा. **पत्थारी**; देप्रा. **पत्थारी.**]

पथ्य न. वि. हितकारक खाद्य, चांगलें हितकारक (बोलणें). Profitable, beneficial diet or regimen.

[सं. **पथ्–चलने** (विध्यर्थी कृदन्त विशेषण). पथ पहा.]

पैद न. पाय, पाऊल, भाग, अंश, अवयव. A foot, a portion, a part.

[*IE.* Ped, Pod; सं. **पद्**–पतने, गतौ (**पाद, पद, पदाति**); *Av.* Pad; *Gr.* Ped; *Lat.* Ped, Pedis = Foot, Pade = Footstep; *Lith.* Padas, Peda = Footmark; *Got.* Fotus; *Ger.* Fuoz; *Sax.* Fot; *Eng.* Foot. सर्व भाषांत तत्सम **पद** असेंच रूप रूढ आहे. तद्भव **पाय, पाव, पग, पञ,** इत्यादि आहेत. अकामसा. **पदोपदीं** = क्षणोक्षणीं, नेहेमीं, प्रत्येक पावलागणिक (पद + उ + पदीं, 'उ' हा एक प्रत्यय द्वंद्व समास सिद्ध करतांना मध्यें येतो. वैदिक संस्कृतमध्यें 'अ' किंवा 'आ' येत असे. उदा. " मित्रावरणौ ").]

पैद न. श्लोक, काव्य, गेय. A verse, a song.

[सं. **पद्य**; प्रा. **पद्द.**]

पदर पुं. वस्त्राचा शेंवट, टोंक, थर, आवरण, पापुद्रा. End of a cloth, border, fold, a layer.

[सं. **प्र + दृ** १ विदारणे.]

पैदर पुं. ऋतुप्राप्ति, न्हाण. Puberity.

[सं. **प्रदर.**]

पदवी स्त्री. हुद्दा, अधिकार, बिरुद, किताब. A rank, a station, a title.

[सं. **पद् + अव्** १ गतौ (?).]

पदाति पुं. पायदळांतील सैनिक. A foot-soldier.

[सं. **पद + अत्** १ गतौ.]

पदार्थ पुं. जिन्नस, वस्तु, शब्दाचा अर्थ. A thing, an article, the meaning of word.

[सं. **पदार्थ, , पद + अर्थ (√पद्, √ऋ).**]

पद्धत स्त्री. चाल, रीत आचार. A manner, an usage, a trodden way.

[सं. **पद्धति, पद् + √हन्,** (निष्ठा) **हत; पायानें मळलेली वाट म्हणून चाल, रीत** (ल.).]

पंत पुं. एक बहुमानदर्शक शब्द. A honorific term.

[सं. **पंत**, '**पंडित**' शब्दाचा संक्षेप. **पंतोजी**= गुरु, **पंत+जी** (मराठी बहुमान,–आदर–अर्थी प्रत्यय). हा '**जी**' प्रत्यय निरनिराळ्या रीतीनें व्युत्पादिला आहे. १ '**जीव**' ह्याचा संक्षेप; २ '**आदित्य**' ह्याची परिणति किंवा अपभ्रंश होऊन '**जी**' हा प्रत्यय झाला (राज.).]

पंथ,–था पुं. मार्ग, वाट, रस्ता. A road, a way.

[*IE.* Peth, Penth; सं. **पथ्, पंथ्** (**पथिन्, पथः** इ. वेदामध्यें **पथः**=पाणी, **पथिः**=समुद्र, **पथ्य**= नेहमीचें, योग्य, त्यावरून **पथ्य**=हिताचें; प्रा. **पत्थ**); *Av.* Path, Pant; *Gr.* Pat; *Lat.* Pont; *Slav.* Pati; *Ger.* Pfad; *Eng.* Path.]

पंधरा वि. संख्याविशेष, दहा आणि पांच. Fifteen.

[सं. **पञ्चदश**; झें. **पचदर**; पा. **पञ्चदस, पन्नरस, पण्गरस, पण्णइह, पण्णरस**; अप. **पण्णरह**; का. **पन्हाह**; बं. **पनेरा**; ओ. **पन्दर**; हिं. **पन्द्रह**; सिंह. **पसळोस**; पं. लां. **पन्द्राँ**; सिं. **पन्द्राहा**; गु. **पन्दर्**; ने. **पन्द्र**; याकाम. **पन्धरें, पन्नरें, पन्हरें**=सोनें (ज्ञा. ६·३४; नरुस्व. ५६४). सोनें हें यादवकाळांत पंधरा रुपये तोळा ह्या दरानें विकलें जात असावें.]

पन्नास वि. संख्याविशेष, दहादां पांच. Fifty.

[*Av.* Pancasat; *Lat.* Quinquaginta; सं. **पञ्चाशत्**; पा. **पन्नास**; **पण्णास**; प्रा. **पण्णासम्, पण्णसा**; देप्रा. **पण्णास**; **पन्नास** (स्त्री. न.); का. **पञ्चाह**; बं. **पञ्चास्**; ओ. **पञ्चास**; हिं. **पचास**; पं. लां. **पँजाह**; सिं. **पञ्जाह**; गु. **पचास**; सिंह. **पणस**.]

पन्नास(णें) सक्रि. मांडणी करणें, शृंगारणें. To decorate, to adorn, to arrange.

[कान. **पण्णु, पण्णसु**=मांडणी करणें; याकाम. **पन्नासणें** (ज्ञा. १·११६); बकाम. **पंन्नासणें** (एभा.२·२९३).]

पन्हाळ स्त्री. वळचणीचें पाणी सांडण्याकरतां लावलेला नळ. A pipe or tube.

[सं. **पानीय, प्रणालि**; प्रा. **पणाल-ळ**; कु. **पन्याळो** (**नळ**), **पणियाळा** (**पाण्याचें**); सिं. **पाण्यारु**; अकाम. **पन्हळ, पनळ.**]

पन्हा स्त्री. आधार, आश्रय, सावली, छाया, Support, shelter, shadow.

[फा. **पनाह्**; पेकाम. **पन्हा** (ब्र. च. ३०८); पुस्तपन्हा, गिर्दपन्हा वगैरे शब्दांत हा शब्द वापरला आहे.]

पन्हाव(णें) क्रि. अधिक विस्तृत करणें, फैलावणें. To extend, to spread.

[फा. **पन्हा, पन्हा**=रुंदी (नाधा.); अकाम. **पन्हा**=रुंदी.]

पन्हें न. आंब्याचें सरबत. (Mango) sherbet.

[सं. **पानक** (?); **पर्ण** > **पन्ह** (झाडाचें कलम).]

पपई,–यी पुं. स्त्री. फलविशेष. A kind of fruit.

[स्पॅनि–पोर्तु. **पापाया**; गो. **पयाय**; हिं. **पपैया**; ओ. **पपया**; पं. **पपीता**; गु. **पपउ**; (हाब्सन् जॉब्सन्–कोश); अकाम. **पपैय्या, पोपई**.]

पपनस स्त्री. पुं. फलविशेष, वनस्पतिविशेष. A kind of fruit, a pompelmoose.

[*S. American.* Pompelmoose.]

पपेटी, पटेटी पुं. पारशी लोकांचा पाडवा. The first day of the first month in Parsi calendar.

[*Av.* Pateti.]

पंप पुं. पोकळींत हवा भरण्याचें साधन. A pump.

[*Du.* Pomp; MEng, pampe; *Eng.* Pump.]

पयदरपय अ. पदोंपदीं, एकामागून एक, पावलोंपावलीं. Every now and then.

[सं. **पदं** > **पय + दर + पय**=प्रत्येक पावलागणिक. पहिला व शेवटचा शब्द आर्योद्भव व मधील 'दर' शब्द फारशी. सर्वच शब्द फारशी असावा.]

पर[1] स. वि. सर्व, परकी, दुसरा, अन्य. Strange, foreign, other, different.

[*IE.* Per; सं. **परः**; *Av.* Para; *Arm.* Heri; *Gr.* Peran; याकाम. **पर** (ज्ञा. १४-४१). इतर सर्व भाषांत **पर** हा तत्सम रूढ आहे. हा शब्द प्रथम अवयव म्हणून जोडून सामासिक शब्द सिद्ध झाले आहेत. अकामसा. **परोपकार**=दुसऱ्यावर उपकार; **परोपदेश**= दुसऱ्यास उपदेश; **परार्थ**=दुसऱ्याचा अर्थ; **परार्ध**=संख्याविशेष; **परदार**=व्यभिचार.]

पर[2] पुं. पंख, पीस. A feather.

[फा. **पर्**.]

पर[3] स्त्री. परी, चाल, रीत. A manner, a kind.

[सं. **प्रति**,> **प्रत**,>**पर**.]

पर[4] अ. परंतु. But.

[सं. **परम्**.]

पर, परम्, परम अ. श्रेष्ठ. A prefix meaning 'great.'

[सं. **परम्**; हा शब्द पुष्कळ मराठी सामासिक शब्दांत आरंभीं वापरलेला आढळतो; अकामसा. **परमाणु** = अति सूक्ष्म कण; **परमात्मा** = विश्वात्मा; **परमार्थ** = पुरुषार्थ, मोक्ष; **परमेश्वर** = परब्रह्म.]

परकर पुं. लहान मुलींचा झगा. A sort of gown or apron (for girls).

[सं. **परिकर**; फा. **पर्कार्**.]

परकळा,-काळें पुं. कापडविशेष. A kind of cloth.

[फा. **परकाला**.]

परका वि. दुसरा, अन्य, अपरिचित. Foreign, another, alien.

[सं. **पारक्य, परकीय**; प्रा. **पारक्क, परकीअ, परकेर, परक्क**. मराठींत आणखी एक **पारखा (परका)** शब्द रूढ आहे. तो वरील शब्दाशीं संबद्ध आहे. '**क**' चा 'ख' कसा झाला? 'ख' कोठून आला हें ह्या व्युत्पत्तींत उघड होत नाहीं.]

परगणा पुं. देशविभाग, प्रांत. A province, a division of country.

[फा. **परगणा**; सं. **प्रगण** (?).]

परगुणें न. जेवण, मेजवानी, पक्वान्न. A meal, a feast, a dinner.

[सं. ?; याकाम. **परगुणें** = पक्वान्न (ज्ञा. १४·२१६), मेजवानी (ज्ञा. १५-५६५). स्वानुभूति परगुणे वोगरिलें ॥ अमृ. १०–२४.]

परचुरण स्त्री. नाण्याचा खुर्दा, किरकोळ सटरफटर वस्तु. Change, coins.

[सं. **परिचूर्ण**; गु. **परचुरण**; मराठीमध्यें गुजरातीमधून आला.]

परज पुं. तरवारीची मूठ, तरवार (लक्षणा). The hilt of a sword.

[सं. **परि+अस्** ४ क्षेपे; हिं. **पर्ज**; याकाम. **परजणें** (ज्ञा. १०·२५५); अकाम. **परजणें**.]

परजळ(णें) क्रि. पाजळणें, प्रज्वलित करणें. To sharpen, to ignite, to enflame.

[सं. **प्रज्वल्**; प्रा. **पज्जल**.]

परडी स्त्री. टोपली, शिपतर. A round basket.

[सं. **परिधिः**; कान. **परटे**.]

परडें न. अंगण, घराच्या मागील अंगण. An enclosure around.

[सं. **परिहितम्** (?); देप्रा. **पुरोहड** (न), **परोहड**.]

परण(णें) सक्रि. लग्न करणें. To marry.

[सं. **परि+नी, परिणयति**; गु. **परणवूँ**; सिं. **परणणु**; पं. **पर्नाहु** (लग्न); हिं. **परना**.]

परत(णें) क्रि. उलट येणें, मागें येणें. To return, to go back.

[सं. १ **प्रति** ह्या उपसर्गापासून मराठी '**परत**' हें अव्यय तयार झालें व ह्या अव्ययाचा याकाम. **परत(णें)** (ज्ञा. १५·२२) **परतणें** हा धातु बनला असावा. सं. **परि+वृत्, परि+अय्, प्रति+इ, परि+तप्** इत्यादि संस्कृत धातूंपासुन '**परत**' हा धातु व्युत्पादणें शक्य असला तरी वरील व्युत्पत्ति अधिक ग्राह्य आहे.]

परता वि. पलीकडील, श्रेष्ठ, शिवाय. Beyond, yonder, great.

[सं. **परतः**.]

परतें वि. दुसरें, पुढचें. Other, yonder.

[सं. **पुरतः, परतः**; याकाम. **परौतें** = पलीकडचें (अमृ. ६·५८).]

परंतु अ. पण, किंतु, तरी सुद्धां. But, nevertheless.

[सं. **परं+तु**.]

परपर(णें) क्रि. परपर असा आवाज करणें-होणें, पादणें. To create a particular sound.

[सं. **परिपर्द्** १ कुत्सितशब्दे; ध्वनिशब्द.]

परभारां अ. परस्पर, बाहेरच्याबाहेर, अन्यद्वारां. Elsewise, in or through or by another.

[सं. **पर+भार, √ भृ**.]

परभू पुं. एक ज्ञाति, चांदसेनीय कायस्थ. A caste.

[सं. १ **प्रभु** = परबु; ह्या जातींतील लोक पूर्वीं एके काळीं राजे असावेत. २ **परभू** = दुसऱ्यापासून उत्पन्न झालेले. ही व्युत्पत्ति ग्राह्य वाटत नाहीं.]

परमळ(णें) अक्रि. वास मारणें, घाण सुटणें, वास येणें. To give out a dirty smell.

[सं. **परिमल** – ह्याचा अर्थ चांगला सुवास असा आहे, परंतु त्यापासून क्रियापद जें निष्पन्न झालें आहे,

त्याच्या अर्थांत अर्थभ्रंश झाला आहे. याकाम. **परिमळ** म्हणजे सुगंध असा अर्थ होता. दुसऱ्या आर्योद्भव भाषेंतून हा शब्द मराठींत आला.]

परमा पुं. लिंङ्गरोग, योनिद्वारां पू वाहाणारा असा रोग. Gonorrhœa.
[सं. **प्रमेह > परमेह > परमा.**]

परमाटा पुं. एक प्रकारचें कापड, परमाटा गांवांत तयार झालेलें कापड. A kind of cloth.
[*Eng.* Parramatta; हें शहर New South Wales मध्यें आहे. Parra-Eels, Matta = Place.]

परमानगी स्त्री. भेट करून देण्याबद्दल बक्षीस. A reward or *bakshis* for arranging an interview.
[फा. **पर्वानगी ;** पेकाम. **पर्मानगी** (खरे ११-६०५९).]

परमार्थ पुं. शेवटचा अर्थ, ब्रह्म, मोक्ष, सत्य. The ultimate object, the Brahman, salvation, truth.
[सं. **परम + अर्थ** (√ऋ १ गतौ); **पारमार्थिक** = परमार्थासंबंधीं.)]

परंपरा स्त्री. माळका, रांग. Regular succession, rank, tradition.
[सं. **परम् + पर, परम्पर** – अशा रीतीनें लागलेली माळका.]

परवचा,–वजा पुं. उजळणीचा पाठ, कर्माची रडकथा (ल.). Repetition of tables of sums, (fig.) drawling narration.
[१ **प्रवचन, प्र √ वच्.** २ **परावृत्ति, परा + आ √ वृत्** = उजळणी.]

परवड(णें) क्रि. पुरवणें, पटणें, पसंतीस येणें. To please or suit.
[सं. **परि + वत् , वृध्, वट्** १ विभाजने, **परि + वावृत्** (रा.); याकाम. **परवडी** = रीति, प्रकार (शा. ६-२९०); **परिवडणें ;** अकाम. **परवड** (**प्ररिवृत्ति**) = रीत, त्रास, दगदग.]

परवर पुं. पोशिंदा, पालनकर्ता. Protector, saviour.
[फा. **परवर ; पर्वर्दा** = पाळलेला, पालन ; **परवरदिगार** = आश्रयदाता (फा. **पर्वर्दिगार्**).]

परवंठ, परवंटा पुं. वरवंटा, परतणी. A particular way of wearing a *saree* by young unmarried girls.
[सं. **परिवर्तन ;** प्रा. **परवत्तण, परवट्टण ;** कारवारी. **पडतण ;** गोवेंमराठी. **परतणी , वल्लपडतण.** लहान मुलींचा साडी नेसण्याचा एक प्रकार, साडीचा पदर डोक्यावरून न घेतां कमरेभोंवतीं गुंडाळलेळा असतो आणि साडीच्या निऱ्यांची पोटावर केळ्याच्या आकाराची रचना केलेली असते.]

परवत पुं. व्यापार, धंद्याचा संबंध. Commercial connection.
[सं. **परिवृत्, परिवर्त ;** प्रा. **परियत्त ;** अकाम. **परतणें, परवटणें.**]

परवा, पर्वा स्त्री. आदर, फिकीर, किंमत, काळजी. Care or concern about, regard.
[फा. **पर्वा.**]

परवां,–व्हां अ. कालच्या मागचा किंवा उद्यांच्या पुढच्या दिवशीं. On the day before yesterday or on the day after tomorrow.
[सं. **परश्वः;** गु. **परां** (दूर, अंतरावर); सिं. **परिंहं ;** पं. **परसों ;** हिं. **परसों, परहौं, परों. परवां, तेरवां, नेरवां, एरवां** = आजचा दिवस वर्ज्य करून मध्यें एक सोडून तिसरा, चौथा, पांचवा, सहावा दिवस. (सं. **अद्य**–प्रा. **अज्ज ;** म. **आज ;** गु. **आजे.** सं. **कल्य ;** प्रा. **कल्ल ;** म. **काल ;** गु. **काले**); सं. **परश्वः;** प्रा. **परस्स ;** म. **परवां ;** गु. **पादाडे ;** किंवा सं. **वा,** प्रा. '**इआ**' म. **व्हा.**]

परवान(ण)गी स्त्री. हुकुम, अनुज्ञा, सुटी, मोकळीक. Permission, leave.
[फा. **पर्वानगी ;** पेकाम. **पर्माणगी, पर्वानगी.**]

परवाना पुं. हुकुम, आज्ञा, अधिकारपत्र. Permit, order, authority.
[फा. **पर्वाना.**]

परवेशी स्त्री. पर्वरिशी, पोषण. Rearing up, feeding.
[फा. **पर्वरिशी ;** शिकाम, पेकाम. (**बाल**) **परवेशी.**]

पर(रि)स(णें) सक्रि. ऐकणें, समजून घेणें. To hear, to listen to, to understand.
[सं. **परि + श्रु** = ऐकणें ; २ **पर्येष्** = शोध करणें ; याकाम. **परियस, परियेस** (धपू.); अकाम. **परस, पर्यंस, परिस.**]

^{१}परस(णें) सक्रि. वाढणें, पानांत घालणें. To serve.
[सं. **परि + वेष्.**]

^{२}परस(णें) सक्रि. अंगावरून हात फिरविणें. To pat.
[सं. **परि + सृ.**]

परस,-सूं न. घराची मागची बाजू, अंगण, परडें. An enclosure behind house.
[सं. **पार्श्व < पर्शु** = बरकडी. २ **परिश्रय** = भोंवतालची जागा ; अकाम. **परसांतील भाजी** = सहज प्राप्त होणारी वस्तु (ल.). **परसाकडेस** = शौचास (अर्थगौरव) ह्यांतील परस हा शब्द परसूं शब्दाशीं संबद्ध असावा असें दिसतें; परंतु महानुभावी वाङ्मयांत '**परिश्रय**' असा एक शब्द असून त्याचा अर्थ–शौचाची जागा असा आहे ; त्यापासून हा शब्द आला असावा.]

परस्पर सर्व. एकेक, अन्योन्य. Reciprocal, mutual.
[सं. **परस्पर, पर + स् + पर** (सुडागम).]

परळ, परेळ पुं. मातीचें भांडें, मातीचें पात्र, पक्वान्न, मांडा. An earthen vessel.
[सं. ?; देप्रा. **परिअली स्थालम्, भोजनभाण्डम् इतियावत्** (८५-६) ; याकाम. **परियाळ, परिएळ.**]

परा उप. अंतर,–आधिक्यदर्शक उपसर्ग. A preposition showing distance–excess.
[सं. **परा, पर + आ.** हा उपसर्ग जोडून कांहीं सामासिक तद्भव शब्द मराठींत रूढ आहेत. **पराकाष्ठा** (**परा** = शेवटची, **काष्ठा** = मर्यादा) = परमावधि ; **पराक्रम** (**पर आ क्रम**) = सामर्थ्य, बहादुरी, शौर्य ; **पराजय** (**परा + जी**) = पराभव, मोड ; **परामर्श** (**परा + मृश्**) = विचारपूस, समाचार ; **परायण** (**परा + अयन**) = आसक्त, तल्लीन.]

परागंदा वि. देशांतरीं गेलेला, घरदार सोडून गेलेला, वाट फुटेल तिकडे गेलेला, विकीर्ण. Errant, vagrant, wandering from home, scattered.
[फा. **परागन्दा.**]

पराणी स्त्री. हत्यार, आर, टोंचणी (बैलास टोंचण्याची). A pricking or goading instrument.
[सं. **प्रवयण, प्रतोदन, प्रवहण,–हरण** (उर्वशी प्रहरणं महेन्द्रस्य. विक्र. १) ; गु. **पराणी.** शेवटची व्युत्पत्ति अधिक ग्राह्य ; **प्रतोदनकम् > पडोअणअं > परोअणअँ > परोअणउ > परोणउ. प्रहरणकम् > पहरणउ > प्हरणउ > परोणो** (गु.).]

परात स्त्री. मोठें ताट, मोठी पितळी. A circular edged metal vessel.
[सं. **पर + पात्र > पर आत्त > परात.**]

पराया,-वा वि. परस्थ, परका. Strange, foreign.
[सं. **परागत** ; प्रा. **परागअ** ; हिं. **पराया** ; सिं. **परायो, पराओ, पराई**; गु. **परायुं** ; याकाम. **परावें** = परकी (ज्ञा. १६-३२७, १७-१०५).]

पराळ न. भाताचा भुसा. Rice–straw.
[सं. **पलालः, पलालि** ; पा. प्रा. **पलाल** ; कु. हिं. **पराल** (स्त्री.); पं. **पराल** (पुं.); लां. **पराली** ; सिं. **परास** ; गु. **पराल.**]

परि अ. उप. भोंवतालीं, संभोवतीं. A prefix meaning round about.
[*IE.* Peri; सं. **परि** (सं. **पर्यङ्क** ; प्रा. **पल्लंक** ; हिं. **पालकी** ; म. **पालखी**); *Av.* Pairi; *Lat.* Per; *Gr.* Peri, Perhi; *Goth.* Fair; *Lith.* Per; *Germ.* Fra; *Alb.* Per. ह्या उपसर्गानें अन्वित असे सामासिक शब्द मराठींत रूढ आहेत. उदा. **परिचय** (**परि + ची** ५ चयने) = ओळख, सहवास, घसट ; **परिचित** = ओळखींचा, माहितीचा ; **परिचार** (**परि + चार, √चर्, प्र + चार**) = प्रचार, प्रदक्षिणा, देशाटण ; **परिच्छन्न** (**परि + च्छिन्न, √छिद्**) = अलग, निराळा (हा शब्द पेकाममध्यें अव्यय म्हणून **निश्चितपणें** ह्या अर्थीं रूढ आहे.); **परिच्छेद** = विभागणी, लेखनखंड, पॅरिग्राफ ; **परिणाम** (**परि + नम्**) = शेवट, निकाल, पूर्णावस्था ; **परिणामणें** = पालटणें, रूपांतर होणें (याकाममध्यें **परिणमणें** असें रूप आढळतें.); **परिपाक** (**परि + पच्**) = पूर्णावस्था, फळ, विकास (याकाम. **परिपाक** = पूर्णता–ज्ञा. १८-७९०); **परिपाठ** (**परि, √पठ्**) = रीत, चाल ; **परिभाषा** = संज्ञा, शास्त्रासंबंधीं शब्द ; **पारिभाषिक** = परिभाषेसंबंधीं ; **परिशीलन** = व्यासंग, मनन, सतत अभ्यास ; **परिहार** (**परि + हृ**) = त्याग, **परिहारणें** + टाकणें ; **परिस्थिति** (**परि + स्था–स्थिति**) = भोंवतालची अवस्था–स्थिति ; **परिस्फोट** (**परि + स्फुट्–स्फोट**) = सूक्ष्म स्पष्टीकरण.]

परिए पुं.(अ.व.) झोंके. Swings.
[सं. **परि + इ, अय्** १ गतौ ; याकाम. **परिए** (नरुस्व. ९)]

परिएळ न. तबक. A plate.
[सं. ?; याकाम. **परिएळ** (नरुस्व. ११).]

^{1}**परिकर** पुं. रीत, पद्धत, चाल, जात, प्रकार. A way, a mode, a manner.
[सं. **प्रकार, परकार, परिकर,** अकामसा. **परिकरणें** = नेमणें, नियोजणें.]

^{2}**परिकर** वि. सुंदर. Beautiful.
[सं. **परि + कर,**√**कृ**; याकाम. **परिकर** (ज्ञा. १-९१); बकाम. **परिकर** (एरा. १·७२), **परिकर** (< **प्रखर**) = कठिण. ऐसे संताचे बोल परिकर ॥]

परिगुण पुं. सुसंधि, प्रसंग, पाहुणचार. An opportunity, hospitality.
[**परगुण** पहा.]

परिघाट(णें) क्रि. सभोंवतीं ढवळणें, घाटणें. To stir all round.
[सं. **परि + घट्.**]

परितोख पुं. संतोष. Satisfaction, delight.
[सं. **परि + तोष्,**√**तुष्**; याकाम. **परितोख** (ज्ञा.).]

परिपाटी-ठी स्त्री. अनुक्रम, व्यवस्था, प्रघात. An order, an arrangement, an usage.
[सं. **परिपाटी, परि** √ **पट्**; याकाम. **परिपाठी** (ज्ञा. १४-२२३).]

परिणाम न. माप, मान, मोजणी. Measure, magnitude.
[सं. **परि + मा + न, परिमाण.**]

परियवस(णें) क्रि. अनुभवास येणें, शेवट होणें, शेवटीं होणें अथवा घडणें. To experience, to result in, to end.
[सं. **परि + अव + सो** ४ अवखंडने ; याकाम. **परियवसणें** (ज्ञा. १७·३७७).]

परिया पुं. झोंका, हलणें. A swing.
[सं **परि + इ** २ गतौ ; याकाम. **परिया** (ज्ञा. १२·५). **परिए** पहा.]
माझेनि स्मरणें जाण । परिये देणें बालका ॥ एभा. १२·१७९.

^{1}**परिवड(णें)** क्रि. प्रकार करणें, प्रत लावणें. To classify.
[सं. **परि + वट्** १ विभाजने ; याकाम. **परिवडणें** (ज्ञा. १७-१४६).]

^{2}**परिवड(णें)** क्रि. भोंवताळून गुंडाळणें, कालवणें, माखणें. To roll in, to mix, to besmear.
[सं. **परि + वट्** १ वेष्टने.]

परिवंड(णें) क्रि. खालीं वर सर्व बाजूंनीं आच्छादिणें. To cover.
[सं. **परि वड्** १ वेष्टने (इ)].

परिवस(णें) सक्रि. स्पर्श करणें. To touch.
[सं. **परि + स्पृश्** ६ संस्पर्शने ; याकाम. **परिवस** (ज्ञा. १३-७१२).

परिवस(णें) सक्रि. वस्त्रानें गुंडाळणें. To cover, to clothe in.
[सं. **परि + वस्** २ परिधारणे.].

परिवार(णें) सक्रि. वेष्टणें, वेढणें, पसारा करणें. To surround.
[सं. १ **परि + वृ** १० आवरणे ; याकाम. **परिवारणें** (ज्ञा. १८-८७६) ; अकाम. **परिवार** = लवाजमा.]

परिस(णें) सक्रि. ऐकणें, लक्षणें. To listen to, to hear.
[सं. **परि + श्रु** १ श्रवणे ; याकाम. **परियस ; परिहस, परिस** ; अकाम. **परसणें, परसावि-परसविणें.**]

परिसोय स्त्री. संबंध, नातगोत. Relationship.
[सं. **परि + सू, सोयरा.**]

परिहस(णें) क्रि. ऐकणें. To hear.
[सं. **परि + श्रु** ; याकाम. **परियेस, परिस.**]

^{1}**परी** स्त्री. प्रकार, जात, रीत, सारखेंपणा. Kind, type, manner, likeness.
[सं. **प्रति** > **प्रत** > **पर, परी** ; याकाम. **परी** (ज्ञा. १५-४१७).]

^{2}**परी** स्त्री. सुंदर स्त्री, अप्सरा. A nymph.
[फा. **परी.**]

परीट पुं. धुणारा, धोबी. A washerman.
[सं. **परि + अञ्चल,**√**अञ्च्** ; देप्रा. **परिअट्टो** रजक. (१८६-१८).]

परी(रि,र)श्रय पुं. शौचाची जागा. A lavatory.
[सं. **परिश्रय** ; याकाम. **परिश्रय** (महानुभाव वाङ्मय); मराठीमध्यें **परसाकडे** असा शब्द रूढ आहे ; त्याचें मूळ ' **परसूं** ' हें असावेंसें वाटतें ; **परसूं** हा सं. **पार्श्वशीं** संबद्ध आहे, कां तो **परिश्रय**पासून आहे ?]

^{1}**परीस** पुं. लोखंडाचें सोनें करणारा दगड. The stone the touch of which turns iron into gold.
[सं. **स्पर्श** (?) ; प्रा. **परिस.**]

परीस अ. पेक्षां अधिक. Mor ethan.
[सं. **परि** (?), **पक्षे** ; मरा. **पेक्षां**.]

परीक्ष(णें) क्रि. परीक्षा करणें, पारखणें. To examine.
[सं. **परि+ईक्ष्** १ दर्शने ; अकामसा. **परीक्षा** (पारख) ;-**परीक्षण** ; **परीक्षक**.]

परु(र)स पुं. उंचीचें एक माप, एका माणसाच्या उंचीइतकें. A measure (man's height).
[सं. **पुरुषः**; पा. **पुरिसो** ; प्रा. **पुरिस** ; सिं. **पुरिहु**.]

परेश पुं. परमेश्वर, मायानियंता. The Almighty.
[सं. **पर+ईश** ; याकाम. **परेश** (ज्ञा. १८-५२२). महानुभावी वाङ्मयांत **परेस** असा शब्द रूढ आहे. '**परेसायनमः**' असा त्यांचा आरंभाचा नमस्कार आहे.]

परेशान वि. चिन्तातुर, हैराण. Anxious, annoyed.
[सं. **परि+श्रान्त** (निष्ठा); √ **परिश्रम्**; फा. **फरेशान**.]

परोक्ष अ. एखाद्याच्या पाठीमागें, एखाद्याच्या समक्ष. Behind the back, in the presence of.
[सं. **पर+अक्ष** < **अक्षिन्**, डोळ्याआड, अर्थविरोधानें डोळ्यासमक्ष.]

परौतां,-तें,-ता अ. पलीकडे, (त्या)शिवाय. Beyond.
[सं. **परतः**, **परस्मात्** ; याकाम. **परौती** (अमृ. ६-५८), **परौतें** (ज्ञा. २-५२), **परौते**=दुसरा (ज्ञा. १६-४६२).]

पर्ण(णें) क्रि. लग्न करणें, विवाह होणें. To marry.
[सं. **परि+नी**, **परिणय** > **पर्ण** (नाधा.) गु. **पर्णवूँ**. **परणणें** पहा.]

पर्यंत पुं. अ. शेंवट, मर्यादा, पावेतों, अव्वल अखेर. End, limit, upto, until.
[सं. **परि+अन्त**, **पर्यन्त**.]

पर्यवसान न. शेवट, अखेर, अंत, निकाल. End, result.
[सं. **परि+अव+सो** ४ अवखंडने.]

पर्याय पुं. प्रकार, रीत, मार्ग, शैली, टप्पा, पायरी. Kind, type, manner, step.
[सं. **परि+आ+अय्**, (**इ**) १ गतौ.]

पर्व न. पुण्यकर्मांविषयींचा काल (ज्योतिष्), पुस्तकाचें प्रकरण, भाग. An auspicious time, a portion, a part.
[सं. **पर्वन्**. मराठी 'पेरें' शब्द ह्या शब्दापासूनच उत्पन्न झाला.]

पर्वत पुं. मोठा डोंगर, गिरि. A mountain.
[सं. **पर्वत**, < **पर्वन्** (?).]

पऱ्हा, पऱ्हिवा पुं. पर्जन्यकाळीं पाणी जाण्यासाठीं जी चरी खणतात ती, ओढा, पाट. An outlet, a streamlet.
[सं. ?; याकाम. **पऱ्हा** (ज्ञा. १३-५६३).]

पऱ्हां, पैऱ्हां अ. पलीकडे. Beyond.
[सं. **परतः**; याकाम. **पऱ्हा**, **पैऱ्हा** (ज्ञा. ९-३७८).]

पल, पाल, फाळ स्त्री. मोठा दांत. A big tooth, a tusk.
[द्रा. **पल** ; सं. **स्फल्**.]

पलंग पुं. खाटवा, माचवा. चांगली खाट. A bedstead.
[सं. **पर्यङ्क**, **पल्यङ्क** ; पा. प्रा. **पल्लङ्क**, **पलिअंक** ; का. **पलंग**, **प्रंग** ; आ. **पालोंग** ; बं. **पालण** ; ओ. **पलठक** ; पं. **पलंघ** ; लां. **पलग्घ** ; सिं. **पलंगु** ; गु. **पलँग** ; फा. **पलंग** ; अकामसा. **पलंग**, **पलंगपोस** (चादर, फा. **पलंग्+पोष्**), **पलंगडो** (लहान पलंग).]

पलट(णें) क्रि. उघडें होणें, एका बाजूवर पडणें, परतणें, बदलणें. To lie topsy turvy or upside down, to change.
[१ सं. **परि+अट्** ; प्रा. **पल्लट्टइ**, **पळट्टइ** ; देप्रा. **अल्लट-पल्लट्टम्** ; आ. **पाल्टिब** ; बं. **पाल्टान** ; ओ. **पालटिबा** ; हिं. **पलटना**. २ सं. **परिवृत्त**, ३ सं. **परिवृध्** किंवा ४ सं. **परि+अस्** ४ क्षेपणे (**पर्यस्त** ; प्रा. **पल्लट**); मरा. **पलट** (उलथ), **पलटन** (फेरी); **पलटा** (जंबियाचा डाव.)]

पलटण,-न नस्त्री. फौजेचा एक भाग, तुकडी. A platoon, a battalion.
[*OFr.* Peloton–Small ball; *Portu.* Platoon ; हिं. **पलटण**.]

पलाट(णें) क्रि. फिरविणें, धार लावणें. To move the razor on a strap.
[सं. **पलट** (नाधा.); **पलट** पहा ; म. **पलाटणें**= धार लावणें—ज्या कातड्याच्या तुकड्यावर न्हावी वस्तऱ्यास

पुस्तकालय
गुरुकुल कांगड़ी

धार लावतो त्याला पलाटणें म्हणतात. क्रियेच्या आधारास क्रियेचें नांव दिलें आहे.]

पलाटण-न न. भ्रमण, भटकणें, देशाटन. Wandering about, roving.
[सं. **पर्यटन**; प्रा. **पर्यट्टन**; देप्रा. **अलट्टपलट्टं**; **पार्श्वपरिवर्तनम्** (२३·६).]

पला(ल्हा)टी स्त्री. कापसाच्या झुडपाची काटकी. A small thin stick (esp. of cotton plant).
[देप्रा. **पलहि** (= **कपासी**).]

पलाण(णें) क्रि. खोगीर चढविणें. To girt with the pack-saddle.
[१ सं. **पल्ययन, पर्याण** ; प्रा. **पल्लण** ; फा. **पालान्**. संस्कृतीकरण उत्तरकालीन असल्याची शंका येते. फारशी मूळ असावें.]

पलाण, पालाण न. खोगीर (उंट, हत्ती, घोडी वगैरेंचें), घोड्याचा साज. A pack-saddle.
[सं. **पर्याण** ; प्रा. **पल्लाण** ; गु. ओ. **पलाण** ; फा. **पालान्** ; सिं. **पलाणु** ; पं. **पलाण** ; हिं. बं. **पालाण**. पलाणणें पहा.]

पलिता पुं. दिवटी, मशाल, हिलाल, कांकडा. A torch with a thick cloth wick.
[सं. **प्रदीप्त** ; प्रा. **पलित्त** ; किंवा **पल्** (दीप्तौ-निष्ठा **पलित**).]

पलिस्तर न. कातड्यावर फोड आणणारें औषध. Blister.
[*Eng.* Blister.]

पलिस्तर न. गिलावा. Plaster.
[*Lat.* Plastrum, plasso = mould ; *Gr.* Emplastron = thing doubled ; *Eng.* Plaster.]

पलीकडे अ. दुसऱ्याबाजूस, दुसरीकडे. To or on the farther side, yonder.
[सं. **प्रति, परि + कट** ; **अलीकडे** या शब्दाचा प्रतियोगी.]

पल्ला पुं. तीस पायल्याचें एक माप. A measure of capacity of thirty *paylis*.
[सं. **पल्यम्** = धान्याची गोणी ; प्रा. **पल्ल**.]

पल्ला पुं. लांबी, विस्तार, अंतर. Length, extent, distance.
[हिं. **फ्ला**.]

पल्ला पुं. वस्त्राचा जरीचा बुट्टीदार कांठ. An ornamental border.
[सं. **पल्लव** ; गु. **पल्लो**.]

पल्हाटी स्त्री. कापसाच्या झुडपाची काडी, पलाटी पहा.

पव पुं. फांशावरील एक संख्येची खूण. The sign of one on the draught of dice.
[सं. **पाद** ; प्रा. **पाअ** ; **पव बारा** किंवा **पोबारा** – एक दान–तीन फाशांपैकीं एकावर एक व दोहोंवर सहा सहा ठिपके मिळून तेरा पडणें. असें दान पडलें म्हणजे त्या दानानें सोंगटी दूर जाते; त्यावरून लक्षणेनें **पोबारा करणें** म्हणजे दूर पळून जाणें.]

पव(णें) क्रि. पावणें, प्राप्त होणें, पोंचणें. To obtain, to attain, to get unto.
[सं. **प्र + आप्** ५ प्रापणे ; याकाम. **पवणें**. (ज्ञा. १६·३३८).]

प(पों)वळें न. समुद्रांतील खडकाचा एक तांबडा प्रकार. Coral.
[सं. **प्रवाळ, प्रवाड, अपाम्मल, अपाम् वलयम्** (?); प्रा. **पवाल** ; गु. **परवाळुं** ; सिं. **पवळ** ; परंतु अनुनासिकाची उपपत्ति काय ? याकाम. **पवळा** (नरुस्व. १६४,४६७).]

पवाड(णें) क्रि. आंत शिरणें, टिकाव धरणें (ल.) To enter into, to last.
[सं. **प्र + पत्**.]

पवाड(णें) सक्रि. स्तुति करणें. To praise, to applaud.
[सं. **प्रवाद, प्र + √ वद्** ; सं. **प्रवृद्ध** ; प्रा. **पवड्ढ** (शको.); गु. **पवाडो** ; हिं. **पोआडो** ; सिं. **पोआडो** (= गडबड); अकाम. **प्रवोड** = मोठेपणा, महत्त्व ; **पवाडा** = कीर्तिकाव्य.]

पवि पुं. इंद्राचें हत्यार. The Indra's weapon.
[*IE.* Peu, Pu ; सं. **पव्** ; *Lat.* Pav.]

पवित्र वि. शुद्ध, धर्म्य, स्वच्छ, चांगलें. Pure, clean, sinless.
[*IE.* Pev, pu(= pure); सं. **पू, पु** (**पुण्य, पवन, पवित्र; पवमान**); *Lat.* pu, pi; *Ger.* fuir; *Sax.* fyr; *Gr.* Pu.]

पवित्र न. दर्भ, दर्भाची अंगठी. A ring (of sacred grass).
[सं. **पवित्र** ; देप्रा. **पवित्तो** (=दर्भ).]

पवित्रा पुं. कुस्तीच्या तयारीचा एक प्रकार. The attitude of readiness (in wrestling).

पव्हह(णें) अक्रि. पोहणें. To swim.
[सं. **प्र + वह्**; याकाम. **पव्हे** = पाणपोई (ज्ञा.); पेकामसा. **पव्हंहणाऊ** (पोहण्या जोगें पाणी), **पव्हणी** = नौका); अकाम. **पोहणें.**]

पशमी, पश्मी वि. लोंकरी (वस्त्र). Woolen (cloth).
[फा. **पश्मी** ; **पश्मी** = लोंकर, गुह्य भागावरील केंस; हिं. **पशम्** (उखडना); पेकाम. **पश्मी.**]

पशी(सी)ना पुं. घाम, पसीना पहा. Sweat.

पशु पुं. जनावर, निर्बुद्ध अविचारी मनुष्य (ल.) A beast, brute.
[सं. **पशु** ; *Lat.* Pecus; *Av.* Pasnuš; *Arm.* Posi.]

पश्चात् अ. मागें, पूर्वी. Behind, after.
[*IE.* Pes. Pos; सं. **पस्** (**पश्चात्, पश्चिमः, पार्श्व**); *Lat.* Pos; *Lith.* Pa, Pas; *Sax.* Post; सं. **पश्चात्ताप** (पाठीमागून,–मागाहून वाईट वाटणें).]

पष्ट वि. उघड, साफ. Plain, clear.
[सं. **स्पष्ट** ह्या शब्दाचा अपभ्रष्ट उच्चार.]

पसतीस वि. संख्याविशेष, तीस आणि पांच. Thirty–five.
[सं. **पञ्चत्रिंशत्** ; प्रा. **पणतीसम्** ; का. **पञ्जतृह** ; बं. **पॉयत्रीस** ; ओ. **पाँइत्रिस** ; हिं. **पैंतीस** ; पं. **पाइती** ; लां. **पेत्री** ; सिं. **पञ्चत्रींह** ; गु. **पाँत्रीस्.**]

पसंत वि. मान्य, कबूल, संमत. Approved, admitted, agreeable.
[ा. **पसंद्.**]

पसर(णें) उक्रि. लांब करणें, ताणणें. To open out, to spread abroad.
[सं. **प्रसर,** √ **सृ** ; पा. **पसार** ; प्रा. **पसारेइ** ; कुं. **पसरणो** ; बं. **पसारा** ; ओ. **पसारुणी** ; हिं. **पसारना** ; पं. **पसारणी** ; सिं. **पसारणु** ; गु. **प्रसारवूँ**; **पसारवूँ**; याकाम. **पसरणें, पसारा** = दुकान (ज्ञा. १६–२२३).]

पसव(णें) क्रि. विणें, जन्म देणें. To bring forth (young), to foal.
[सं. **प्रसू** ; पा. **पसू** ; प्रा. **पसव, पसय्** ; का. **प्रसॅू** ; गु. **प्रसववूँ**; ने. **पसारनु** ; जनावरांच्या बाबतींत वापरतात.]

पसा पुं. तळहाताचा खोलगट भाग, ओंजळ. The cavity formed by the hollowing and joining of both palms.
[सं. **प्रसृति** ; पा. **पसतम्** ; प्रा. **पसअ** ; **पसिअ** ; हिं. **पसा** (दोन पसे); सिं. **पहो** ; गु. **पस्ली.**]

पसाय, पुं. कृपा, प्रसाद, मेहरबानी. Favour, kindness.
[सं. **प्रसाद** ; प्रा. **पसाय** ; याकाम. **पसाय** (ज्ञा. १८-१७९४); **पसाव,–वो** (ज्ञा. १५-३२१).]

पसार पुं. पुढें मागें जाणें, निघून जाणें, पोबारा.
[*Portu.* Passar = to Pass (?); **आठ पसार** = आठ वाजल्यानंतर. सं. **प्र + सृ** (?); अकाम. **पसार होणें.**]

¹पसारा पुं. पसरलेली अवस्था. Spread–out condition.

²पसारा पुं. व्यापारी, दुकानदार. A shop–keeper.
[सं. **प्रसारकः**; प्रा. **प्रसार** ; प्रा. **पसार** ; आ. **पोहार** (दुकान); बं. ओ. **पसारी** ; हिं, **पसारी,–पॉसारी** ; पं. **पसारी** ; ने. **पन्सारी** (‘ **न्** ’ कोठून आला ?). नेपाळी, हिंदी हे शब्द अन्योद्भम आहेत काय ? अकाम. **पसारा** = पसरलेली स्थिति, दुकान.]

पसीना पुं. घाम. Perspiration, sweat.
[सं. **प्रस्विन्न, प्र +** √ **स्विद्** ; हिं. **पसीना** ; कु. **पसिणो** ; पं. **पसीणा.** पशीना पहा.]

पस्त–फस्त अ. पूर्णपणें, सर्वस्वी, साफ, निःशेष. Utterly, totally.
[फा. **पस्त्** = खालीं, जमीनदोस्त.]

पस्तावा पुं. पश्चात्ताप, मागून वाईट वाटणें. Repentance, remorse, compunction.
[सं. **पश्चात्ताप** ; पा. **पच्छानुतापो** ; प्रा. **पच्छादाव** ; शौ. **पच्छादाव** ; हिं. **पछ्ताव्** ; पं. **पच्छोतावा** ; सिं. **पछताउ, पस्तावो** ; ने. **पछिताउ** : गु. **पस्तावुं** ; बं. **पस्तान** ; सिंह. **पसुतॅव** ; अकामसा. **पस्तावणें** (नाधा.).]

पस्तीस वि. पसतीस पहा.

पहा(णें) सक्रि. बघणें. To see, to observe.
[*IE.* Pek, Spek; वैसं. **स्पश्** ; सं. **पश्**; अकाम. **पाहा, पहा, पाह** ; याकाम. **पाह,** (**प्र + भा, पश्य, प्रार्थ**). **दृश्** धातूला **पश्** हा आदेश होतो असें पाणिनि म्हणतो. परंतु हे दोन्ही धातु निराळे; समानार्थक असल्यामुळें दोन्ही एकत्र जोडले गेले.]

पहाट स्त्री. सूर्योदयाच्या पूर्वींचा सहा घटिकांचा काळ. The dawn.

[सं. **प्रभात** ; प्रा. **पहा**, **पहाअ**, **पहाद** ; हिं. **पह**, **पोह** ; गु. **पोह** ; सिं. **पिरिह**.]

पहाड पुं. कडा, डोंगर. A hill.

[सं. **पाशी** (स्त्री)=दगड, **पाष्यम्**, **पाषाण** ; पा. **पासाणो** ; प्रा. **पासाण**, **पाहाण** ; बं. **पाहाड** ; ओ. **पाहाड** ; हिं. पं. लां. **पहाड** ; संस्कृत '**पाषाण**'शीं कांहीं संबंध नाहीं असें कांहीं भाषाशास्त्रज्ञ म्हणतात.]

पेहार स्त्री. फोडण्याचें कुटण्याचें लोखंडी हत्यार. A pointed iron-bar.

[सं. **प्रहार**, **प्र** √ **हृ** १ हरणे.]

पेहार पुं. तीन तासांचा काळ. A period of three hours.

[सं. **प्रहर** ; गु. **पोर** ; प. **पहिर** ; हिं. **पहर**, **पहिरा** ; बं. **पहर**. प्रत्येक तीन तासानंतर पूर्वीं वेळ दाखविण्यासाठीं ठोके वाजवीत असत काय ? अकाम. ग्रामी. **पहार**, **पार**]

पहारा पुं. चौकी, संत्री. A watch or a guard.

[सं. **प्रहर** ; प्रा. **पहर** ; हिं. पं. **पहर** ; लां. **पाहर** ; सिं. **पहरु** ; गु. **पहोर** ; फा. **पह्रा**. मूळ फार्सी **पह्रा** ह्या शब्दाचें संस्कृतीकरण झालें आहे (टर्नर).]

पहिलवान, **पैलवान** पुं. पहेलवान पहा.

पहिला वि. सर्वांत अगोदरचा, प्रथम. The first.

[सं. **प्रथम** ; प्रा. **पढमिल्लं**, **पढमिल्लअ**,-**ग**, **पढमुल्लअ**-**ग**, **पढमेल्लुय**, **पहिल्ल** ; अप. **पढमिल्ल**, **पहिल** ; कु. **पैलो** ; हिं. पं. **पहिला** ; गु. **पहेलुं** ; सिं. **पहर्यों** ; याकाम. **पहिले** (१८-१८६) ; अकाम. **पहिला**, **पहिलट**, **पहिलटकरीण** (प्रथम प्रसूतीची).]

पहीं पुं. पाहुणा, वाटसरू, प्रवासी. A guest, a traveller.

[सं. **पथिक** ; अप. **पहिअ**, **पहीं** ; गु. **पहीं** ; अकाम. **पहिपाहुणा** (सं. **पथिक-प्राघूर्णक** ; प्रा. **पहिअ प्राहुण्णव**).]

पहुरण न. ओटी भरणें. To fill in the lap-cloth with sacred articles such as wheat, cocoa-nut, etc.

[सं. **प्राभरणम्**, **प्रौधःकरणम्** ; याकाम. **पहुरण** (ज्ञा. १७·२४८).]

पहूड स्त्री. भेट, उपहार, संकल्पित भिक्षा. A present.

[सं. **प्राभृत** ; प्रा. **पाहुड** ; याकाम. **पहूड**. लिङ्गविपर्यय मराठींत झाला.]

पहूड(णें) क्रि. निजणें, अंग टाकणें. To sleep, to recline, to lie down.

[सं. **प्रसुप्त** ; प्रा. **पहुत्त**, **पहुड**, **पवड्ढ** ; कान. **पवडिसु** ; याकाम. **पउढिअ**, **पहुडिय**, (ज्ञा. ६-६२).]

पहेलवान पुं. मल्ल, तालीमबाज. A professional wrestler.

[पेल्हवी. **पहेलवान**, **पहलवान** (इ. स. ५००)= सरदार. प्राचीन इराणांतील सरदारांना **पहलवान** म्हणत. त्यावरून हा शब्द मराठींत आला. त्याच्या अर्थांत फरक पडला आहे तो उघड आहे. फा. **पहलवान** ; हिं. **पहिलवान** ; **पहल** = सामर्थ्य.]

पळ पुं. क्षण. The sixtieth part of a *ghatika*.

[सं. **पल** ; पाप्रा. **पल** ; का. **पल** (वजन) ; कु. **पल** ; आबं. **पल** ; ओं. **पळ** ; हिं. पं. **पळ** ; गु. **पळ** ; ने. **पल**.]

पळ(णें) क्रि. धांवणें. To run.

[सं. १ **पल्** १ गतौ, २ **परा**+**इ** २ गतौ ; प्रा. **पलाइ** ; गु. **पळवूँ** ; बं. **पलाइते** ; सिंह. **पल** (धांव).]

पळका पुं. भाजलेल्याचा वण. The skin that peels off from a burn.

[सं. **प्लुषक**, √ **प्लुष्** ४ दाहे.]

पळप(णें), **पळिप(णें)** क्रि. पेटणें, जळणें, जाळणें, पेटविणें. To burn.

[सं. **प्लुष्** १ दाहे ; याकाम. **पळप**, **पळिप** (ज्ञा. १-१२९).]

पळवा पुं. वाळवून ठेविलेली भाजी. Vegetable dried up.

[सं. **पल्लव**.]

पळशे पुं. ब्राह्मणजाति, माध्यंदिनशाखीय ब्राह्मण. A caste of Hindu brahmins.

[**पळशी** ह्या ग्रामनामावरून हें नांव आलें आहे काय ?]

पळस पुं. वृक्षविशेष. A kind of tree.

[सं. **पलाश** ; पा. प्रा. **पलास** ; आ. **पलाह** ; बं. **पलाश्** ; ओ. **पळास** ; हिं. **परास** ; पं. **पलाह** ; सिं. **पलासु** ; ने. **पलाँस** ; सिं. **पलस्** ; अकामसा. **पळसुला** =

उपनयनांत चौथ्या दिवशीं पळसाची डाहाळी ओली करून करण्याचा एक धार्मिक विधि. **पलश + उन्द् > पळस + ओला** (?)]

पळी स्त्री. लांब दांडा असलेली पितळी अगर लोखंडी वाटी. A ladle.

[हिं. **पली.**]

पळे(णें) सक्रि. पाहणें. To see, to observe.

[सं. **प्रलक्ष्**; प्रा. **प्रलक्ख, प्रलच्छ.** ह्याचीं जुनीं रूपें ' **पलाह, पल्हा, पाळा** अशीं सांपडतात.]

धन्य तेथिचीं जलचरें । जिॲं अवलोकिलीं ईश्वरें ।
वरौतीं एऔनी आनंदभरे । पाळांती श्रीमूर्तीतें ॥ वच्छहरण १८८
पाळांता नेत्रु आनंदती ॥ २०४.
ऐसे निरधारिलें ज्ञानपथें । मग पाळाइलें वत्सगोपाळातें ॥ ६३९.

पक्ष पुं. (न). पंख, बाजू, पंधरवडा, मुद्दा. A wing, a side, a fortnight, a point.

[*IE.* Pag; सं. **पक्ष**; *Lat,* pectus, √ pek; *Lett.* Paksis; *Russ.* pach; *'Cech.* paze. **बाजू, मुद्दा, भाग,** वगैरे अर्थ नंतर प्राप्त झाले. मूळ अर्थ **पंख** हा प्रथमचा. हा शब्द कांहीं मराठी तत्सम शब्दांच्या आरंभीं येतो. **पक्षघात** (< **पक्ष + घात्,** √ **हन्**) = अर्धांगवायु; **पक्षपात** = कैवार, तरफदारी; **पक्षकार** = खटल्यांतील वादी किंवा प्रतिवादी; **पक्षी–पक्षिणी.**]

पाइ(ई)क पुं. सेवक, चाकर, दूत, पायदळांतील एक सैनिक. A foot soldier, a servant, messenger.

[सं. **पदातिक, पदिक, पत्तिक**; प्रा. **पाइक**; अप. **पइक**; पं. हिं. **पैक**; बं. **पाईक**; शिकाम. **पाइक** (तु. अ.) पाईकीचें सुख पाईकासि ठावें ॥ फा. **पैक्, पैग्**; पेहेल. **पैक**; याकाम. **पाइकु** (ऋ. २७६). वरील संस्कृत शब्दांपैकीं **पदिक** शब्द हा ब्लोकनें निराळा काढला आहे. प्राकृत अपभ्रंश शब्दरूपांवरून **पदातिक** हा शब्द मूळ असला पाहिजे. (**पाईकी** = सेवा).]

पां, पां अ. जरी, यद्यपि, निश्चयदर्शक अव्यय. An expletive particle showing certainty.

[सं. **प्रायः**; अप. **पाउ.** किंवा सं. **अपि** किंवा **पश्य > पहा > पां** (?); याकाम. **पां** (ज्ञा. ८-४; नरुस्व. ४१३)]

पाउख(णें) क्रि. वाट पहाणें. To await, to wait for.

[सं. **प्रति + ईक्ष्**; याकाम. **पाउखणें** (ज्ञा. १८-१७४४)]

पाउटी,ठी,पाउठणी स्त्री. पायरी, दर्जा, योग्यता. A step, a rank.

[सं. **पाद + स्थ, > पाउट्ठ,** (स्त्री) **पाउटी**: याकाम. **पाउटी** (ज्ञा. ६-२७१, ३०३), **पाउठणी** (सं. **पादस्थान**).]

पाउड पुं. देवादिकांपुढें ठेविलेलें द्रव्य, दक्षिणा, नजराणा. A present.

[सं. **प्रति + दान**; याकाम **पाउड** = पैसा सुपारी (ज्ञा. १८-४६), **पाउडी.**]

पाउड पुं. रिकीबी, पावडी. A step, a stirrup.

[सं. **पाद + स्थ > पाउट्ट, > पाउटी > पाउडी**; याकाम. **पाउड, पाउटी** (ज्ञा. ९-५०); अकाम. **पाउंड, पौंड.**]

पाउन न. पाळेगण, सैन्य. A horde, an army.

[सं. **पादकुळ, पदिककुल**; याकाम. **पाउळ** (नरुस्व. ७२५).]

पाउवा स्त्री. पादत्राण, जोडा, पादुका. A shoe, sandals.

[सं. **पादुका**; प्रा. **पाउआ**; याकाम. **पाउवा.** (ज्ञा. १३-४१६).]

पाऊण वि. तीनचतुर्थांश, चारपैकीं तीन हिस्से. Three-fourths.

[सं. **पाद** (चौथा हिस्सा) + **ऊन** (कमी); प्रा. **पाओन, पाऊन**; हिं. **पौने**; बं. ओ. **पौने**; गु. **पोणो**; पं. **पौणा**; सिं. **पोणो**; अकाम. **पाऊण, पाऊणकी** (पाउणाचे पाढे), **पावणेआठ = नपूंसक**–ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीची निश्चिति नाहीं. ज्याच्या जननेंद्रियाची लांबी आठ बोटांपेक्षां कमी आहे असा मनुष्य-म्हणजे नपूंसक, अशी काल्पनिक व्युत्पत्ति आहे ती पटत नाहीं.]

पाऊल न. पाय, लहान पाय. A step, the foot.

[सं. **पाद**; प्रा **पाउ + ल** (अल्पार्थे.)]

पाऊस पुं. वर्षा, पर्जन्य. Rain.

[सं. **प्रावृष्** (स्त्री); प्रा. **पाउस**; पा. **पावुस**; **पाउसो**; गु. हिं. **पावस्**; मराठी भाषेंत लिंगभेद झाला. हिंदी. **बारिष** (हा शब्द **वर्षाव** ह्या शब्दापासून आहे.)]

पाक पुं. शिजविण्याची क्रिया, अर्क, काढा, साखरेचा रस, सिद्धि, सफलता, गुण (ल.) Dressing, cooking, preparing by fire,

[सं. **पच्** १ पाके.]

पांक वि. पुरें, संपूर्ण, सर्व, स्वच्छ, शुद्ध, निर्मळ. Full, complete, pure, clean.
[वैसं. पाक ; फा. पाक ; सिं. पाकु.]

पाक, पांख, पाकें पुंन. पक्ष, बाजू, छपराची एक उतरती बाजू, पंख, पीस. A side.
[सं. पक्ष ; प्रा. पक्ख ; गु. पांख, पंख ; यांकाम. पाख (नरुस्व. १३९), पाखाड (नरुस्व. ७२१); अकाम. पाखाड–पाखाडें = छपराचा एक भाग.]

पाकळी स्त्री. फुलाचा भाग, एक पापुद्रा. The petal of a flower.
[सं. पक्ष, पक्ष्मन् (?); प्रा. पम्ह, पम्हल ; ह्या प्राकृत शब्दांवरून असें वाटतें कीं मूळ शब्द '**पक्ष्मन्**' हा असावा आणि '**कुड्मल**' ह्या संस्कृत शब्दांत ज्याप्रमाणें दुसरा अवयव **मल** आहे त्याप्रमाणें **पक्ष्मल** असा संस्कृत शब्द असून त्यापासून प्राकृत शब्द तयार झाला. '**ल**' हा अल्पार्थे प्रत्यय. गु. **पाखडी** ; हिं. **पख (खु)डी** ; मराठीमध्यें **पाकोळी** असा एक पक्षिवाचक शब्द आहे ; त्याचा वरील संस्कृत मूळाशींच संबंध आहे.]

पाका, पिक वि. पिकलेला. Ripe.
[सं. पक्व, √ पच् ; प्रा. पक्क ; म. पक्का.]

पाकीट न. लखोटा, लिफाफा. A packet.
[*MEng.* Packe; cf. *Du.* Pak; *Eng.* Packet.]

पाकु(को)ळ(णें) क्रि. शिथिल,–व्याकुळ होणें, ढिलें होणें, पेंगळणें, विस्कळित होणें. To become slack, to relax, to fall together.
[सं. प्राकुल, पंकाकुल (नाधा.), अपाकुल.]

पाकोळी स्त्री. वाघुळाची एक लहान जात. A bat.
[सं. पक्ष पक्षिन्. ली (अल्पार्थे प्र.), पक्ष्मन्, प्रा. पम्ह, पम्हल (?) ; पाकळी पहा.]

पाखड(णें) क्रि. सुपानें हालवून धान्य स्वच्छ करणें. To sift grain by shaking in a pan.
[सं. १ अप + आ + कृष् (अलोप); २ प्रस्कन्द् १ गतिशोषणयोः,]

पाखंड न. नास्तिक मत, धर्मविरोधी मत. Denial of the authority of the Vedas or religion.
[सं. पाखंड (?); याकाम. पाखंड (ज्ञा. १६-३१५).]

पाखर स्त्री आसरा, आवरण, दयां (ल.), हत्ती वगैरे जनावरांवर घालावयाची झूल किंवा चिलखत. A shielding cover, armour, (fig.) kindness.
[सं. उपस्कर ; पक्ष (?); देप्रा. पक्खर, पक्खरा तुरगसन्नाहः (१४४-१०) ; सिं. पाखर = कृपा, दया ; गु. पं. हिं. पाखर ; याकाम. शिकाम. पाखर = आश्रय, पंखातील उबाऱ्याची जागा.]

तुका म्हणे तुझ्या चरणाची पाखर । असतां कळीकाळ पायातळीं ॥ (तु. अ.)

पाखर(णें) क्रि. पसरणें, To spread out.
[सं. प्र + कॄ, प्रा + क्षर् १ संचलने; सिं. पखेरणु ; याकाम. पाखरणें (ज्ञा. १–९५).]

पाखाण पुं. दगड, पाषाण पहा. A stone.

पाखरूं न. लहान पक्षि, A small bird.
[सं. पक्षिरूपम्, पक्षिन् ; पा.प्रा. पक्खि ; का. पचिन्, बं. पाखी ; पं. पखी, पंखी ; लां. पक्खी ; सिं. पखी ; याकाम. पाखिरूं, पाखिरुवें (ज्ञ. १८–१७१३).]

पाखल(णें) पखाळ(णें) क्रि. मूर्ति उजळणें, धुणें, पंचामृतस्नान घालणें. To scour (an idol with *panchamrit*).
[सं. प्रक्षाल्, प्रक्षर् ; पा. पक्खल, पक्खाल ; प्रा. पक्खाल ; आ. पखालिबा ; बं. पाखलान ; ओ. पखाळिबा ; हिं. पखालना ; पं. पखारणा ; पखालणा ; गु. पखाळवूँ ; ने. पखाल्नु ; याकाम. पाखाळणें (ज्ञा. १३-१७२), पाखळी = शुद्धता (ज्ञा. १३-४६४).]

पाखवा पुं. पंखांचा उबारा. The warmth under feathers or wings.
[सं. पक्ष > $\underset{\text{ख}}{\text{पक्}}$ > पंख ; याकाम. पाखवा.]

पागडी स्त्री. खुषी, बक्षीस, कर. A present, a *bakshis*, a tax.
[कान. पगडी = कर, उपायन.]

पागल वि. खुळा, वेशरम, आचरट, उलु. Silly, mad.
[हिं. पागल. ह्याचें मूळ कोणत्या भाषेंतील आहे ?]

पागा स्त्री. घोडदळ, घोडशाळा. A body of horse.
[फा. पाय् + गाह् ; पेकामसा. पागेदार = (पाग्या = पागेवरील अधिकारी) ; पाकनीस, पागनीस = पागेचा कारकून.]

पागुडें न. पायांतील दागिना. An ornament for foot.
[सं. **पद्** ; याकाम. **पागुडें.**]

पागोटें न. डोक्याचा बांधलेला रंगीत रुमाल, मोठी पगडी. A turban, a head-dress.
[म. **पाग**=दोर, बांधावयाचा पट्टा, अंगावरचा शेला, (**पाग+ट > पागोटें**), **पगडी** शब्द ह्याच मराठी शब्दापासून निष्पन्न झाला आहे कां ? व्युत्पत्ति स्पष्ट नाहीं. कान. पागु ; गु. **पाघडी.**]

पागोडा पुं. देवालय, नाणें. A pagoda.
[१ चिनी. **पावत्** ‘ **अह्** ’=शुभअस्थिसंचय ; २ पोर्तु. पागाव=pagan; **३ पागोडा,** Dagoba (वर्णव्यत्यासानें) **पागोडा ;** ह्याचा चिनी भाषेंत **देवालय** असा अर्थ व दक्षिणेंत **होन** असा अर्थ आहे.]

पाघ(ग)ळ(णें) अक्रि. गळणें, द्रवणें, पाणी होऊन गळणें, टिवकणें, झरणें. To drip, to trickle, to dissolve, to melt.
[सं. **प्रगलित: < प्र+गल्** ; पा. **पग्गलितो** ; प्रा. **पगलइ** ; कु. **पगळ्णो** ; सं. **प्रघरति** ; पा. **पग्घरति** ; हिं. **पिगळलना** ; प. **पघारणा** ; लां. **पघारा** ; सिं. **पघिरणु** ; **पघारणु** ; (**प्रघलति > हिं. पिघलना**) ; ने. **पग्रनु.** २ **अप+आ+गल्** १९ स्रवणे ; ३ **प्र+आ+गल्म्.**]

पांग(णें) क्रि. पघळणें, पसरणें, अस्ताव्यस्त रीतीनें धांवणें, सैरांवैरां धांवणें, टाकणें. To disperse, to scatter.
[सं. १ **संग्** १ गतौ, २ **प्र+अञ्च्** १ गतौ ; याकाम. **पांगणें** (ज्ञा. ९-१३८), **पांगापांग** (दाणादाण, फांकाफांक.)]

पांग पुं. तीव्र इच्छा, उणीव, कमीपणा, पराधीनता. Intense desire or craving want, deficiency.
[सं. **अप+अंग**=वाईट अंग, व्यंग, हीनता, कमीपणा हा मूळ अर्थ; नंतर लक्षणेनें इतर अर्थ ह्या शब्दाला प्राप्त झाले आहेत. याकाम. **पांग**=गरज, अपेक्षा (ज्ञा. ४-१६४), वकाम. **पांग**=कमीपणा (ए. रु. १०-८८) ; शिकाम. **पांग**=काळजी.]

पांगडा पुं. पारतंत्र्य, पंगुपणा. Dependence, crippledness.
[सं. **पङ्गु** ; प्रा. **पङ्गु+ड** ; **पांगळा** पहा.]

पांगवि(णें) सक्रि. पसरणें, जावयास लावणें. To spread out.
[सं. **प्र+अञ्च्** १ गतौ (णिच्).]

पांगा-पांगळा वि. पाय नसलेला, लंगडा, लुळा, चालतां न येणारा. Lame, crippled.
[सं. **पङ्गु+ल** (स्वार्थे); **अपांग** ; अप. **पंगुल** ; गु. **पांगळुं** ; पं. **पांगुला** ; हिं. **पंगु, पंगा, पंगला** ; सिं. **पंगो**=अशक्त ; बं. **पंगडी** ; लमा. **पंगो** ; म. **पांगुळ, पांगुळणें**=गति खुंटणें.]

पांघर(णें) सक्रि. अंगावर घेणें, आच्छादिणें, अंग झांकणें. To cast loosely around the body.
[सं. १ **परि+ग्रह**, २ **प्र+अंगाचरणम्** (नाधा.) **प्रावरणम्** ; प्रा. **पंगुरण** ; अप. **पंगुरुण** ; ३ **प्र+घृण्.** दुसऱ्या व्युत्पत्तीनेंच नासिक्याची उपपत्ति लागते. पहिल्या व तिसऱ्या व्युत्पतीनें लागत नाहीं ; **पांघरुण** (पांघरण्याचें वस्त्र) < **प्रांगावरण, प्रावरण.**]

पांच वि. संख्याविशेष चार आणि एक. Five.
[*IE.* Penqe (पांच), Penqttos (पांचवा), Penqdekn (पंधरा) ; सं. **पंचन्, पंचम, (पंचदश्)** ; *Av.* Panchan (five), P.uxdha (fifth), Pandeadacan (fifteen); *Gr.* Pente ; *Lat.* Quinque: *Lith.* Penkl; *Goth.* Fimf; *Ger.* Funf; *Sax.* fif ; सं. **पञ्च,** पा. प्रा. **पञ्च** ; का. **पांच** ; पं. **पञ्ज** ; कु. **पंच** ; आ. **पाँस** ; बं. **पॉच्** ; ओ. **पाम्त्र** ; हिं. **पाँच्** ; पलां. **पञ्ज्** ; सिं. **पञ्ज** ; गु. **पॉच्.** पांचवा (**पंचम-पञ्चम** ; बं. **पॉचुइ,** हिं. **पाँचूवा** ; पं. **पञ्जमा** ; **पञ्जवू** ; सिं. **पञ्जो**), पांच हा शब्द पुष्कळ मराठी सामासिक शब्दांत पहिला अवयव म्हणून येतो. अकाम. **पांचामुखी** (पांच शिष्ट मुखें बोलतील तसें किंवा चार चौघे सांगतील तें खरें बहुमत म्हणजे ईश्वरी मत असावयाचें) ; **पांचावर धारण** (रुपयास पांच शेर अशी धारण दुष्काळांत किंवा युद्धकाळांत होई, त्यावरून संकटकाळ.) ; **पांचपरतावण** (पाहुण्यास परत जेवण, मांडवपरतणें) ; **पांचपाट** (धिंड, डोक्यावर पांच पट्टे ओढणें) ; **पांचवटा** (पांच वाटा फुटतात तें ठिकाण) ; **पांचवेडली** (इंगळी < **पंच+व्याल**) ; **पांचशेरी-(पासरी)** ; **पंचुत्री** (पांचाचा समुदाय).]

पाच पुं. रत्नविशेष. An emerald.
[सं. **पाच** ; याकाम. **पाचिखंड.**]

पाचकळ वि. फाजील, चावट, अर्थहीन बोलणारा. Light, silly.
[सं. १ **भस्त्राकल** (नाधा.) (?) ; २ **प्र+स्खल्** १ संचलने > **प्राचकळ** (रा.).]

पाचट, पाचोटी स्त्री. ऊंस पिळून बाकी राहिलेला धाटाचा अवशेष. Dry blades of sugarcane.
[सं. **अपशिष्ट** किंवा **प्रशिष्ट, शिष्टः**; पा. प्रा. **सिट्ठ**; अ. **सिटा**; बं. **सिटा**; ओ. **सिठा**; हिं. **सीठ**; पं. **सेठ** (पिळलेला ऊंस).]

पांचकळशे पुं. ब्राह्मणांतील एक जात. A caste.
[सं. **पंच + कलश.** ह्यांना पळशे असेंहि म्हणतात. हें नांव पलाश ह्या वृक्षनामावरून किंवा पळशी ह्या ग्रामनामावरून पडलें असावें. लग्नांत बोहल्यावर पांच कलश मांडून ठेवण्याची चाल ह्यांच्यांत आहे.]

पाचपेंच पुं. डाव, युक्ति, गुप्त मसलत. Trick, a secret plot.
[फा. **पेच्** (द्विरुक्ति.); **पाच** आणि **पेंच** ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ एकच परंतु ते दोन भिन्न भाषांतील आहेत.]

पाचर स्त्री. लहान खुंटी, जोड, जोडण्यासाठीं मध्यें लहानशी खुंटी ठोकतात ती. A wedge.
[हिं. **पाचर.**]

पाचार(णें) सक्रि. बोलावणें, निमंत्रण देणें. To call, to invite.
[सं. **प्रा + चर्** (णिच्-**चार**) १ गतौ; अकामसा. **पाचार** (पाचारण); **पाचारिका** (दासी, बोलाविणारी).]

पांचवनी पुं. पांच अग्नि. Five fires.
[सं. **पञ्च + वह्नि, पञ्चाग्निः १ प्रळयानळ, २ विद्युदळन, ३ वडवानळ, ४ शिवनेत्रानळ, ५ द्वादशादित्यानळ**; याकाम. **पांचवनी** (ज्ञा ११·३०५).]

पांचवा वि. संख्याविशेषण (क्रमवाचक). Fifth.
[सं. **पंचम > पंचवँ > पांचवा; पांचवी** (स्त्री.) = बाळंतिणीचा प्रसूतीचा पांचवा दिवस, त्या दिवशीं पूजा करतात ती; **पांचावा** (दर पांचव्या दिवशीं येणारा ताप, <**पंचमिकः**); **पांची** (ऐतरेय ब्राह्मणाचा एक भाग<**पंचिका**); **पांचुदा** (पाच पेंढ्यांचा गट-**पंच + वृंद = पंचु + त्र.**]

पांचाखरी पुं. मांत्रिक, पंचाक्षरी. An enchanter, one knowing the charms.
[सं. **पंच + अक्षर + इन्** = मंत्राचीं पांच अक्षरें यंत्रांत लिहिणारा; याकाम. **पांचाखरी.**]

पाचिखंड पुं. पाचेचा खडा, रत्न. An emerald.
[सं. **पाच + खंड**; याकाम. **पाचिखंड** (उगी.).]

पाचोळा पुं. वाळलेलीं पानें. वैरणीचा कचरा. Fallen leaves, dry peeling.
[म. **पान + चोळा,** (**पर्ण + चूर्ण.**].]

पाज स्त्री. डोंगरांतील पाउलवाट. A passage between mountains.
[सं. **पद्या**; देप्रा. **पज्जा अधिरोहिणी – मार्ग वाचकस्तु पद्याशब्दभवः**; गु. **पज** (**स्त्री**) = धक्का, पूल.]

पाज(णें) सक्रि. प्यावयास लावणें,–देणें,–घेणें, माखणें. To make or give to drink.
[सं. १ **पा** = पाने, (णिच्) **पायय > पाज,** (**प्र + अश्** = पासून मोलस्वर्थ देतो. परंतु तितकीशी शक्य दिसत नाहीं); **प्र + अंज्** ७ म्रक्षणे; अकामसा. **पाजविणें** पू – पवने, शुद्ध करणें) = धार लावणें.].

पाज(णें) क्रि. लावणें, चोपडणें, माखणें, खळ पाजणें. To anoint.
[सं. (**अपपपाज**), √ **पज्**, **प्र + सस्ज्**; देप्रा. **पज्जति**; पा. **पञ्जो**; गु. **पॉचवूँ**; २ सं. **प्र + अंज्** ७ म्रक्षणे; ३ सं. **पृञ्जति, पृन्ज्, पृंक्ते,** कु. **पॉञ्णो**; हिं. **पाँजना**; पं. **पाँजाउणा**; गु. **पॉचजण.**]

पाजळ(णें) सक्रि. तेवणें, जळणें, पेटणें, सारखें जळत ठेवणें, पेटविणें. To kindle or light.
[सं. **प्रज्वल्**; प्रा. **पज्जल, पजल**; अप. **पज्जल.**]

पाजी वि. हलकट, फाजील, नीच. Low, mean, dirty.
[फा. **पाजी**; सं. **पाय्य** (नीच) ?]

पाझर(णें) क्रि. हळूहळू गळणें, टिबकणें, गळणें. To ooze, to exude, to trickle.
[सं. **प्र + क्षर्** १ क्षरणे, **प्रस्रव**; प्रा. **पज्झर**; सिं. **पघीर्जणु.**]

पांचजन्य पुं. विष्णूच्या हातांतील शंखाचें नांव, ओरडाओरड, बोंबाबोंब (लक्षणा). A particular conch, (fig.) loud bellowing of plaints.
[सं. **पंच + जन**–पांच लोकांचा जो तो. वेदांमध्यें पांच लोकांचें–आर्यांच्या विभागांचें वर्णन आहे.]

पांजर(णें) क्रि. विस्तारणें. To extend.
[सं. **पंचतितराम्** (रा.). संस्कृतमध्यें क्रियापदाच्या रूपाला '**तराम्**' हा प्रत्यय लागतो, परंतु मराठींत धातूलाच

तो लागल्याचें हें उदाहरण आहे काय ? याकाम. **पांजरणें** (ज्ञा. १३-२६३); अकाम. **पांजरण** पहा. **पांजरण** (छपरावरील कौलांच्या खालीं काड्या घालतात त्या.)].

पांजरण स्त्री. न. घरावर घालावयाच्या तुरकाड्या. Loppings of leafy bushes.
[सं. **पञ्जर, पुञ्ज** (समूह); इतर भारतीय भाषांत पा. **पञ्जो** ; बं. **पाँजा** ; आसा. **पाँझी** ; ने. **पाँजो** = कडबा, वैरण, तुरकाडी ह्या अर्थीं शब्द आहेत व ते सं. **पुञ्ज**– उद्भव आहेत. याकाम. **पांजरणें** = विस्तारणें (ज्ञा. १३-२६३); अकाम. **पांजरणें** पहा.]

पांजरपोळ पुं. धर्मार्थ गोशाला. An asylum for cattle.
[गु. **पिंजरापोळ,–पोर** = शंकराला सोडलेला पोळ बांधण्याचा पिंजरा.]

पांजरा, पुं. पिंजरा. A cage.
[सं. **पञ्जर,** (**पिंजर**–ताडून पहा); गु. **पांजरूँ** ; हिं. बं. का. **पंजर** ; याकाम. **पांजर** (ज्ञा. ७·१५४)]

पांजरी पुं. आरमारावरील एक कामगार, जहाजाच्या डोंलकाठीवरील पिंजऱ्यांत उभा राहून जो दूरची टेहळणी करतो तो. A naval officer.
[सं. **पंजर** > **पिंजर** > **पंजरी, पांजरी.**]

पाँजी स्त्री. भुतांचा बळी. An offering to spirits.
[सं. **पुञ्ज**; पा. **पञ्जो**; बं. **पाँजा** (पेढी) ; आ **पाझी**; ह्यांत टर्नरचा घोटाळा झाला आहे. **पेंढीं** आणि **पुंज** हे एकोद्गमच आहेत असें म्हणतो तें बरोबर नाहीं.]

पांट पुं. कापडाचा पट्टा. A stripe of cloth.
[सं. **पट्ट** ; पाप्रा. **पट्ट** ; का. **पोट्टु** ; कु. आ. **पाट** (रेशीम); बं. **पाट्** ; ओ. **पाट** ; पं. **पट्ट** ; लां. **पट्ट** ; सिं. **पट्टू** ; गु. **पाटो** ; गु. **पटो** (कंबरबंद).]

पांट पुं. लाकडाच्या फळीचें आसन, पाण्याचा ओघ, शरीराचा भाग. A stool, a canal, a part of the body.
[सं. **पीठ, पट्ट** (शिला, आसन); पा. (**सिला**) **पट्टो** ; प्रा. **पट्ट** (सिंहासन); आ. बं. हिं. **पाट.** (पुं.); गु. **पाट** (स्त्री.); सिं. **पाटी** ; बं. **पाटा, पाटी** ; सिंह. **पट, पटी** ; का. **पुट** (टु), **पोट** (टु); याकाम **पाट पिढे** = बहुमानाची जागा, (नरुस्व. २०६); **पाटाचा** (पट्टाधिकारी) ज्ञा. १८-९०८ ; **पाटाची** (पट्टाभिषिक्त, नरुस्व. ६४); **पाटी** = वस्त्र (नरुस्व. ४६०); प्रवाह (नरुस्व. १३७); अकाम. **पाट लावणें** (पुनर्विवाह करणें); **पाटणी, पाटली, पाटाऊ** (वस्त्र); ‘ **पाट** ’ ह्या शब्दाला यादवकालांत निरनिराळे अर्थ आहेत. ह्या निरनिराळ्या अर्थांच्या मूळाशीं संस्कृत शब्द **पट्ट** ’ = अधिकार हाच आहे. **पाट बांधणें** (ज्ञा. १५-९,) १६·५०, १८-१३०) म्हणजे पट्टाभिषेक करणें, त्यावरून **पाट लावणें**–हा ग्रामीण भाषेंतील प्रयोग पुनर्विवाह ह्या अर्थीं रूढ झाला. ‘ **पाट** ’ = **पाण्याचा ओघ** हा अर्थहि ज्ञा. १३-६९८, १५-४०४, १७-१८३ वगैरे ठिकाणीं आढळतो. **पाटा फुटणें** = आडपडदा नाहींसा होणें, ज्ञान होणें, दिसणें (ज्ञा. १-२३, वृद्धा. ११ नरुस्व. २९), इत्यादि अर्थ आढळतात.]

पांटगें न. पासोडी, पैठणी, रेशमी साडी. A thick,-rough cloth, a silk *saree*.
[सं. **पट + क** (अल्पार्थें).]

पांटगें न. मोहतूर. Marriage (with a widow).
[सं. **पट्ट,–पाट + क** (निन्दार्थें).]

पाटलूण, पँट स्त्री. आवळ घट्ट विजार, इंग्रजी तऱ्हेची विजार. A pantaloone.
[*Eng*. **Pantaloone.** सेंट पँटालिओन ह्या नांवाचा एक प्रसिद्ध पाद्री व्हेनिसमध्यें फार लोकप्रिय होता. त्याच्या ताब्यांत एक मंदिर होतें. एका रोम नाटकांत व्हेनिसचा विदूषक म्हणून पॅन्टालिओनचें पात्र घातलें, तो घट्ट व आवळ विजार घाली. त्यावरून हा शब्द आला. ह्याचा संक्षेप ‘ पॅन्ट ’ हा आहे.]

पाटा पुं. जिन्नस वाटण्याचा घडलेला दगड. A slab for grounding or bruising things.
[सं. **पट्ट** ; याकाम. **पाटा** (दृ, २९); **पाट** पहा.]

पाटी स्त्री. फळी. A board.
[सं. **पट्टिका** ; प्रां. **पट्टिया** ; **पाट** पहा.]

पाटील पुं. ग्रामाधिकारी, गांवातील वतनदार, मुखी. The head-man of a village.
[सं. **पट्ट + कील, पट्टलिक** ; प्रा. **पट्ट + इल्ल** ; देप्रा. **पट्टइल** ; **पट्ट** = गांवाच्या शिवेंतील कुळांची यादी. त्यावरून तो वसूल करतो ; गु. हिं. **पटेल** ; सिं. **पटेलु**. जुन्या ताम्रपटांत हा शब्द वापरला आहे. निरनिराळ्या प्रदेशांत निरंनिराळे शब्द रूढ आहेत. **पटवारी, तिवारी** ; बकाम. **पाटेलु, पाटैलु–ल्लु** (पाटील शब्दाचीं जुनीं रूपें. नागांव शिलालेख).]

पाटोला, पाटोळा पुं. रंगीत रेशमीवस्त्र, अंथरूण. A coloured silk cloth.

[सं. **पटोल**=वस्त्रविशेष (मेदिनी कोष); **पट**; याकाम. **पाटौळा, पाटौळें पाटाऊं**=उंची वस्त्र ; अकाम. **पाटला**= कापडाचा किंवा सोन्याचा तुकडा.]

पाठ^{1} स्त्री. मागील बाजू, पोटाच्या उलट बाजू. The back.

[सं. **पृष्टिः, पृष्ठ**; पा. **पिट्ठी, पिट्ठिका**; प्रा **पट्ठ, पिस्टीं, पिट्ठी, पुट्ठी, पट्ठी**; कु. **पीठ**; आ. **पिठी**; बं. **पिठ**; ओ. **पिठी**; हिं. **पीठ**; पं. **पिट्ठ**; लां. **पुट्ठ**; सिं. **पूथि**; गु. **पूठ**; ने. **पिठ**; म. **पुठ्ठा** [सं. **पुष्ट** (?)], **पाठिंबा, पाठकुली** (**पृष्ठ+कुल्ला** (द्राविडी). मराठींतील शब्द स्त्रीलिंगी आहे. तो **पृष्ठ** पासून आला असें म्हणावें तर लिङ्ग–विपरिणमन कसें झालें हा प्रश्न राहतो. तेव्हा **पृष्टि** पासून निष्पादणें जरूर पडतें; अकामसा. **पाठार, पठार** (याकाम. **पाठार**=आश्रय)=डोंगराच्या माथ्यावरील सपाट मैदान; **पाठारणें** (सं. **पृष्ठाय**; याकाम. **पाठारणें**)= उलटणें, पालटणें; **पाठिंबा** (सं. **पृष्ठ**)=आश्रय, आधार; **पाठमोरा, पाह्मिोरा** (सं. **पृष्ठ+मुख**)=पाठीमागें तोंड वळविणारा; **पाठीं** (सं. **पृष्ठे**; याकाम. **पाठी**=नंतर– ज्ञा. १६-२०)=**पाठोवाटी** (ज्ञा. १८-१५७)=वरचेवर.]

पाठ^{2} पुं. धडा, अभ्यास, अभ्यासावयाचा भाग, ग्रंथांतील एकाच अर्थाचें किंचित् स्वरूपभेदाचें वाक्य. A lesson, a reading.

[सं. **पठ्** १ पठने.]

पाठवि(णें) क्रि. जावयास लावणें, धाडणें, सोडणें, रवाना करणें, प्रवृत्त करणें. To send, to dispatch.

[सं. **प्रस्थापय**; पा. **पट्ठपेति**; प्रा. **पट्ठावे, पट्ठेवइ**; कु. **पठूणो**; आ. **पठाइब**; बं. **पाठान**; ओ. **पठाइबा**; सिं. **पठणु**; पं. **पठाणा**, (सिंह. **पटन्**=आरंभ, < सं. **प्रस्थान**); अकाम. **पाठवण**=निरोप).]

पाड^{1} वि. पूर्ण, पिकलेले, मुरलेला. Ripe.

[कान. **पड्डु**=पूर्णत्व].

पाड^{2} पुं. किंमत, भाव, दर, प्रमाण, महत्त्व. Market rate, price, proportion.

[कान. **पड्डी, पाड्डु**=समता, बरोबरी ; याकाम. **पाड**= १ योग्यता (ज्ञा. ९-२२),=२ सादृश्य (धपू. ६६), =३ मान, परिणाम, किंमत (ज्ञा. १·११२, १७·१२, १८·७२१),=डोंगर **पहाड** (?) (ज्ञा. ७-१२७).]

पाड(णें) सक्रि. खालीं फेंकणें. To make to fall.

[सं. **पत्**, (णिच्) **पातय**; प्रा. **पाड**; हिं. **पाडना**; बं. **पाडिते**=पसरणें. ह्या क्रियापदाचे पुष्कळ अर्थ आहेत. त्यांत बऱ्याच ठिकाणीं लक्षणा आहे, **पाडून मागणें** (क्षपा+दा); **संवय पाडणें** (पद्-पादय), **समजूत पाडणें** (पारय); **रास पाडणें** (पड्-संचये).]

पाडवा पुं. महिन्याची पहिली तिथि,-दिवस, चैत्र व कार्तिक महिन्याची प्रतिपदा. The first day of a month in Hindu calendar.

[सं. **प्रतिपद्**; प्रा. **पडिवअ, पाडिव**; गु. **पाडवो**; बं. **परब**; याकाम. **पाडिवा** (ज्ञा. १६-७५); हिं. **पडिवा, परिवा**, अर्थाचें विशेषीकरण होऊन चैत्र किंवा कार्तिक प्रतिपदा ह्याच अर्थीं शब्द रूढ झाला.]

पाडशी स्त्री. वांझोटी गाय. A barren cow.

[सं. (?); देप्रा. **पडिच्छिआ चिरप्रसूता महिषी** (१८५-४).]

पाडा^{1} पुं. खोंड, गाईचें वासरूं (पुं). A male calf.

[सं. (?); देप्रा. **पाडस, पडोआेबालः** (१८४·३); **पड्डी प्रथमप्रसूता** (१८१·३); गु. **पाडुं**; सिं. **पाडो**; हिं. **पाडा**; याकाम. **पाडे**=**पाडस** (नरुस्व. ७४५); **पाडस**=हरिणीचें पिलूं, गाईचें वासरूं).]

पाडा^{2} पुं. खोपट, झोपडी, झोपड्यांची वाडी. A hut, a hamlet of huts.

[सं. **पद्रक**; प्रा. **पड्डअ > पाडा**; गु. **पाडा–खेडें**; बं. **पाडा**=पेठ; सिं. **पाडो**=मोहल्लो.]

पाडा^{3},**-पाढा** पुं. उजळणीचा धडा. पाढा पहा.

पाडाव पुं. मोड, पराभव, लढाईंतील कैदी. Defeat, overthrow, a war-prisoner.

[सं. **पत्**; प्रा. **पड**; (णिच्) **पाड, पाडाऊ** (विशे).]

पाडि स्त्री. किल्ला. A fort.

[हिं. **पहाड**; याकाम. **पाड**=डोंगर (ज्ञा. ७·१२७) **पाडि**=किल्ला.].

पाडी स्त्री. लहान वासरूं (गाय). A female calf.

[सं. (?); देप्रा. **पड्डय**; **पड्डिया**; गु. **पाडो**; प्राकृत काळीं हा शब्द म्हशीसंबंधींहि वापरत. पाडा पहा.]

पाढा पु. उजळणींतील धडा, पाडा पट्टा. A column in multiplication table.
[सं. पाठ ; प्रा. पाढ ; याकाम. **पाढाऊ** (मार्गदर्शक, < सं. पाठ्य).]
द्रष्ट्याचिया दर्शना पाढाऊ जो ॥ अमृ. २–५.

पाणउतारा पुं. कमीपणा, नक्षा (उतरणें), बेहिम्मत. Dishonouring, slighting.
[सं. प्राण + उतारा (< अव + तृ). २ पू १ शोधने.]

पाणचट वि. निःसत्त्व, पाण्याचा अंश अधिक असलेलें. Watery, insipid.
[सं. पानीयम् + चट.]

पाण(णं)द,-दी स्त्री. शेताच्या बांधाजवळील वाट, दोन कुंपणांतील अरुंद वाट. A narrow foot-path between two fields.
[सं. (?); देप्रा. **पाणद्धी** (रथ्या); याकाम. **पाणधी** (ज्ञा. १६-१८७).]

पाणि पुं. हात. The hand.
[सं. पाणि.]

पाणिएडा पुं. पाणवठा. A place for watering.
[सं. पानीयवंठ ; याकाम. **पाणिएडा** (उगी. १०६), **पाणिवथा** (शि. ४४४), याकाममध्यें ह्याचीं पुढील रूपें आढळतात. **पाणियडें** (= तळें); **पाणियाडें**, **पाणियाढें** (ज्ञा. ९·२१४, १६·२२८) = जळपात्र. सत्राविये‍चें पाणियाढें ॥ भा. अ. ९-१२७]

पाणिक पुंन. साप. A serpent.
[सं. पन्नग ; याकाम. पाणिक.]
तें संकीर्ण गाइलें निगुतें पाणिकें वर्धमान ॥ नरुस्व. १८३

पाणिवाळा पु. स्त्रियाच्या कानांतील दागिना. An earring.
[सं. कर्ण + वलयम् ; प्रा. **कण्णवल** > **पण्णवळ** ; याकाम. पाणिबाळा.]

पाणी न. (तरवारीची–शस्त्राची) धार. Whetted state.
[सं. पू १ शोधने, **पवनीयम्** > **पानीय** > **पाणी** ; टर्नरनें ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल घोटाळा केला आहे. त्यानें नेपाळी शब्द **पाईन** हा **प्रतीक्ष्ण** ह्या संस्कृत शब्दापासून काढिला आहे ; याकाम. **पाणीपद** = तेजस्विता, तीक्ष्णता (नरुस्व. २४३).]

पाणी न. उदक, जीवन, आप. Water.
[सं. **पानीय** (√ पा १ पाने); प्रा. **पाणिअ** ; गु. **पाणी** ; हिं. **पानी** ; बं. **पानी** ; का. **पोञ** (ञु); सिंह. **पॅन्** ; ल्मा. **पनि** ; हा शब्द पहिला अवयव असलेले असे पुष्कळ सामासिक शब्द मराठींत रूढ झाले आहेत. उदा.–**पाणकसर** (पाण्याच्या करांतील तूट); **पाणकाठी** (पाण्यांत मोजमापाची काठी); **पाणकांदा** (नदींत होणारा कंद); याकाममध्यें पुढील सामासिक शब्दाचे प्रयोग आढळतात. **पाणकेली** (= जलप्राशनाची क्रीडा, जलक्रीडा–नरुस्व. ७५९); **पाणीतुळी** (पाणी भरून ठेविण्याचें भांडें–नरुस्व. ४२६); **पाणीपात्र** (पाणी न्यावयाचें भांडें–एभा. २३-५२०); **पाणीकाढे** (मोट धरणारे, पाणी काढणारे चाकर–नरुस्व. ७७९); **पाणीढाळ** (पायउतार–ज्ञा. ७·९९); **पाणीयडें** (तळें–ज्ञा. ९-२१४); **पाणिवळ** (पाण्यांतील केरकचरा–ज्ञा. ६-४७१); **पाणचट** = निस्सत्त्व, पाण्याचा अंश अधिक असलेलें ; **पाणथळ** (**पानीयस्थल**) पाण्यानें भरलेला ; **पाणपोई** (**पानीय + पा**) वाटसरूंना पाणी देण्याची जागा ; **पाणबुडी** = (**पानीय + बुड्‌–मस्ज्**) पाण्यांत बुडी मारण्याची कृति,–नाव; **पाणलोट** (पाण्याचा लोट येण्याची जागा.); **पाणवठा** (**पानीय + वंठ**); **पाणसळ** (**पा. शल्य, शलाका**).]

पाणें न. पात्र, भांडें, A vessel.
[सं. **पानीयम्** ; **पाणें** (चोंभा–उखाहरण).]

पांड पुं. जमीन मोजण्याचें एक परिमाण, चारशें चौरसकाठ्या, एकविसांश विघा. A measure of land.

पांडव पुं. पुंडुराजाचे वंशज. The *Pandavas.*
[सं. पंडु + अ, पांडव.]

पाण्डाऊ पुं. पान्हा. The oozing of milk from breasts.
[सं. **प्र + स्नु** , **प्रस्नव** ; प्रा. **पण्हअ** ; याकाम. **पाण्डाऊ** ; अकाम. **पान्हा**.]

पांड्या पुं. विशेषनाम, व्यक्तिनाम, कुलनाम, आडनांव.
[सं. **पण्डित** (पण्डा); हिं. **पांडे**, **पंडा**, **पांडा** = देवळांतील उपाध्याय.]

पांडु, पंडु पुं. स्त्री. रोगविशेष, रक्तक्षय. A particular disease, anæmia.
[सं. **पंडु** ; **पांडु + र** = पांढरा ; **पांडर**, **पांढर**, **पांडरी**, **पांढरी** (गांवठाणची जमीन. ‘ काळी ’ = शेतीची जमीन ह्याचा प्रतियोगी शब्द); **पांडुर + का**, **पांडुरका** (क-अल्पार्थे प्रत्यय).]

पांड(ढ)र,-री स्त्री. वसाहतीची जागा, गांवठाणाची जागा. The space for settlement or buildings.

[सं. **पाण्डुर** ; गु. हिं. बं. **पांडुर** = फिक्का ; हिं. **पांडरी**= पांडुरकी जमीन ; सिंह. **पंडर** = पांढरा, पिवळा ; कान. **पंडरिके-गे** ; अकाम. **पंढरपूर, पांडुरंग** ह्या शब्दांत वरील शब्दाचा अवशेष आहे.]

पात न. स्त्री. पान, पाला. A blade or leaf.

[सं. **पत्र** ; प्रा. **पत्त, पात**. अकाममध्यें **पात** (स्त्री), **पातें** (न) असे दोन शब्द रूढ आहेत. पैकीं पहिला सं. **पत्री**पासून व दुसरा सं. **पत्रम्**पासून आला आहे.]

पात पुं. पडणें, नाश. Fall, destruction.

[*IE*. Pet ; *Gr*. Potao ; *Lat*. Peto ; सं. **पत्** १ पतने, **पात्** (णिच्.).]

पात, पांत स्त्री. ओळ, रांग. A line, rank, a row.

[सं. **पंक्ति** ; प्रा. **पंति** ; याकाम. **पांतिकर** = पंक्तीस बसणारा (ज्ञा. ६-१२).]

पात(णें) सक्रि. विश्वास टाकणें. To trust, to confide.

[सं. **प्रति+इ, प्रत्यय, पात** (नाधा.) ; (कर्मणि) याकाम. **पातिजणें, पातेजणें** = विश्वास ठेविणें (ज्ञा. १७५१).]

पात(णें) अक्रि. प्राप्त होणें. To reach unto.

[सं. **प्र+आप्** (निष्ठा) ; **प्राप्त** (नाधा.) ; पा. प्रा. **पत्त** ; सिं. **पातो** ; सिंह. **पत** ; हा शब्द काव्यांत विशेष रूढ आहे. याकाम. **पातणें** (ज्ञा. १-१८८, २-७२, ५-१०३).]

पातक न. वाईट कृत्यें. A sin.

[सं. **पात-√पत्+क** = पातक.]

पातशहा,-शाह पुं. बादशहा, पादशहा पहा. An emperor.

पातळ वि. झिरझिरीत, बारीक, विसविशीत, द्रवरूप, प्रवाही, कृश, हडकुळा. Liquid, thin, dilute, feeble.

[सं. १ **पत्रल < पत्र+ल** (वि. प्रत्यय) ; अप. **पत्तल** ; देप्रा. **पत्तल** (**कृशइत्यर्थे** १८६-३). २ **प्र+अति+ली** ९ द्रवीभवने (रा.) ; अकामसा. **पातळाई** (गर्दी नसलेली स्थिति) ; गु. **पातळुं** ; सिं. **पतिरु** ; पं. हिं. **पतला** ; बं. **पातल, पातला** ; **पातळी** (सं. **पद+तली, पद+स्थली**) = सपाटी.]

पाताळ न. तीन लोकांपैकीं एक लोक-पृथ्वीच्या खालील. the regions under the earth.

[सं. **पातालम्** (**पद+तलम्, पात+आलयम्**) ; याकाम. **पाताळ** = पायाखालील जमीन (नरुस्व. ४५२) ; अकामसा. **पाताळयंत्री** (गुप्त मसलती करणारा).]

पातें न. (धार असलेलें) पान, पत्र, दल. A blade of a tool or weapon, a petal.

[*IE*. Pet ; सं. **पत्** १ पतने ; **पत्रम्**, प्रा. **पत्त** (**पत्र, पताका, प्रपातः इ.**) ; *Av*. pat.-(patara=**पत्र**) ; *Gr*. Pet ; *Lat*. Pet ; *Goth*. Fithre ; *Ger*. Fedar ; *Eng*. Feather. सं. **पत्र, पत्रकम्** ; प्रा. **पत्तँ, पत्तअँ** ; **पात** पहा.]

पातेज(णें) सक्रि. विश्वासणें, विश्वास ठेवणें. To trust, to confide in.

[सं. **प्रति+इ, प्रत्यय** (नाधा.) ; याकाम. **पातिज** (ज्ञा.) ; बकाम. **पातेज** ; शिकाम. **पातेश**. श्रद्धा म्हणितयासाठीं। पातिजां नये किरीटी ॥ ज्ञा. १७·५१. पातेंजुनि तुझिया बोलासी ए. भा. १२-२५६. जो हरामी आहे +++ याकरितां त्यास पातेशां नये–सभासद शि. च. ६०.]

पातेज(णें) क्रि. धार लावणें. To whet, to sharpen.

[सं. १ **प्रा+तिज्** १ निशाने (रा.) ; याकाम. **पातेज, पातिज** (ज्ञा. १७–५१) ; परंतु धातूच्या रूपावरून असें दिसतें कीं हें रूप संकृत नामधातूचें कर्मणि रूप आहे आणि तें खालील मार्गांनीं येणें शक्य आहे. १ **पात < पत्र** ; (कर्मणि) **पातेज**, २ **प्राप्त** ; प्रा. **पात्त**. कर्मणि **पातेज** ; ३ **प्रतीत (प्रति+इ)**. **पातणें** पहा. (राजवाडे यांची व्युत्पत्ति पटत नाहीं).]

पातेरा पुं. पाला, पाचोळा, कचरा. The rubbish, dry leaves etc.

[सं. **पत्र** ; प्रा. **पत्त** ; **रा** (मराठी प्रत्यय.)]

पातेलें न. विस्तृत बुडाचें भांडें, भगुणें. A utensil (broad–bottomed.)

[सं. **पात्र** ; प्रा. **पत्त+ल** (अल्पार्थे प्रत्यय). हिंदी भाषेंत **पतेला, पटेला** = मोठ्या बुडाचें गलबत असा एक शब्द आहे, पण त्याचा ह्या शब्दाशीं संबंध नसावा. **बतेला** ह्याचा तो हिंदी अपभ्रंश असावा.]

पात्यवि(णें) क्रि. विश्वास ठेविणें, खात्री करणें. To trust in.

[सं. **प्रत्यय** (**√प्रति+इ**) ; प्रा. **पच्चअ, पत्तीअ** ; फा. **पचूनू** ; ओ. **पतिआर** ; हिं. **पत्याना** ; पं. **पतिआउणा** ; गु. **पतियार्** ; याकाम. **पातेजणें, पातिजणें**. **पातणें** पहा.]

^{1}**पात्र** न. पिण्याचें भांडें, भांडें. A vessel.
[सं. पा १ पाने + त्र.]

^{2}**पात्र** न. रक्षा, ठेविलेली स्त्री, राख, भोगस्त्री. A keep.
[सं. पा (पालने) + त्र = रक्षण करण्यास योग्य ; **रक्षा >** राख ह्या शब्दांत तो अर्थ आहे. वरील दोन्ही शब्द प्राचीन वाङ्मयांत आढळतात.]

पाथर स्त्री. मोठी शिळा, पसरट दगड. A big slab.
[सं. **प्रस्तरः**; पा. **पत्थरो** ; प्रा. **पत्थर** ; देप्रा. **पाथरी निकरःप्रस्तरश्च** (२०६–१५); का. **प्रथुर्**; आ. बं. **पाथर्** ; ओ. **पाथर** ; हिं. **पाथर्** ; पं. **पत्थर्** ; सिं. **पथरु** ; गु. **पाश्रो**; का. **पाथुर** = जमीन, **पथर** = तळमजला; अकाम. **पाथर, फथ्थर, फत्तर, पाथरवट.**]

पाद पुं. चौथा हिस्सा, श्लोकाचा चौथा हिस्सा, ¼ भाग. The fourth part, a line of a *shloka*.
[सं. **पाद**.]

पाद(णें) अक्रि. वायु सरकणें, वारा सरकणें. To break wind.
[*IE.* Perd (Pesd–to break wind); वैसं. **पर्द्** १ कुत्सितशब्दे ; *Av.* Perder. *Gr.* Perdo; *Lat.* Pes. (in Pedere, Podex = the anus); *Lith.* Perdsiu ; *Ger.* Ferzan, feslin ; *Alb.* Perd ; *Russ.* Perdet. गु. हिं. बं. **पाद**; सिं. सिंह. **पड्**; अकाम. **पाद, पाद्रा, पादरधीट, पादरफुसका, पादेलोण.**]

पादड(णें) क्रि. तावडणें, जोरानें हाकणें, दमणें. To make to toil, to drive, to work hard.
[सं. **प्रा + द्राड्, ध्राड्** १ विशरणे ; अकाम. **पादाड, पादड, पदडा** (अतिश्रम, थकवा).]

पा(बा)दशहा पुं. सम्राट, अधिराजा. An emperor.
[सं. **पत्ति** ; झेंद. **पैतिस्** ; पुराणफा. **पति** = मालक ; फा. **पेचाह्** = राज्यशास्ता, **पाद्,–त्** = सिंहासन ; **शाह** = राजपुत्र ; **पाशा > बाशा > पादिशाह.** पातशहा पहा.]

पादुका स्त्री. जोडा, वहाण, खडावा, पायाचा दगडाचा ठस्सा. A shoe or slipper, wooden shoes, an impression of foot.
[सं. **पाद, पद–का** (प्र.); याकाम. **पाउवा** (ज्ञा. १५-१८ ; १३-४१७).]

पादेलोण न. क्षारविशेष. Blacksalt.
[सं. **पर्दक + लवणम्, पादणें** पहा.]

पाधाणी वि. अजागळ (स्त्री). Slovenly.
[सं. **अपाधानी** (?); शिकाम. **पाधाणी** = अजागळ स्त्री (तु. अभंग).]

पाद्री पुं. ख्रिस्ती धर्मोपदेशक. Christian missionary.
[*Portu.*–Padre = उपदेशक ; *Lat.* Pater ; *Eng.* Father. सं. **पितृ, √ पा.**]

पान न. पर्ण, झाडाचा अवयव, पुस्तकाचें पृष्ठ, हत्याराचें पातें. A leaf.
[*IE.* Per < Spr; सं. (**पर, √ पृ.**) **पर्णकम्** ; *Lith.* Sparnas, Papartis; *Russ.* Paporoti ; *Ger.* Varn ; *Sax.* Fearn. सं. **पर्णम्, पर्णकम्** ; प्रा. **पण्णँ, पण्णअँ** ; पं. **पण्ण, पन्ना** ; सिं. **पनु** ; गु. **पान.**]

पाना पुं. खिळे घट्ट बसविण्याचें व काढण्याचें हत्यार, चावी. A spanner.
[*Eng.* Spanner.]

पानास(णें) क्रि. रचणें, व्यवस्थित लावणें, शृंगारणें. To arrange, to decorate.
[सं. **प्र + नि + अस्** ४ क्षेपे ; **प्र + न्यस्** ; याकाम. **पन्नासणें** (ज्ञा. ११६).]

पांत अ. पाहत. Seeing.
[सं. **पश्य** (**√ दृश्**) + **अत्** ; याकाम. **पांत** (उगी. ३८०), **पांता** = पाहतां, विचार करतां (ज्ञा. १-२०९ रा).]

पांती स्त्री. पंक्ति, पंगत, ओळ. A row, a line.
[सं. **पंक्ति** ; प्रा. **पन्ति** ; गु हिं. **पान्त** ; सिं. **पंगति** ; सिंह. **पेत** ; याकाम. **पांती** (ज्ञा. ८-१५५), **पांतीकर** (ज्ञा. ११-२); **पांती** (सं. **पांक्तिक**) = हिस्सेदार, सोबती.]

पांतु स्त्री. ब्राह्मणाची दक्षिणा. The *daxina* or present given to brahmins.
[सं. **पा** = पालने, (आज्ञार्थे) **पान्तु**, त्यापासून नाम.]

पांथ पुं. मार्ग, रस्ता. A way or road.
[*IE.* Pent ; *Av.* Panta ; *Lan.* Ponti, Pons ; *Gr.* Pontos ; (सं. **पथिन्, पन्था**; याकाम. **पांथिक** (ज्ञा. १६-७); अकाम. **पंथ, अपथ्य** पहा. **पांथस्थ, पाथिक, पथिक** = वाटसरू); **पांथी** = माळ (ज्ञा. ८·२४४).]

पान्हा पुं. दुधाची धार (स्तनांत उतरलेली). Descent of milk into the udder.

[सं. **प्रस्नु, प्रस्नव** ; प्रा. **पण्हओ** ; देप्रा. **पण्हओ स्तनधारा** (१८२-१); गु. **पानो**; बं. **पानाइते** = गाय पान्हविण्यासाठीं वासरूं सोडणें; याकाम. **पान्हावणी** = पाझरलेलें पाणी (नरुस्व. ५६९) **पान्हां धरणें** = पान्हा चोरणें (ज्ञा. ११·४०); अकाम. **पान्ह(न्हे)णें** = सडांतून दूध निघावयास लावणें.]

पान्हेरें न. पाणी काढण्याचें भांडें. A vessel to draw out water,

[सं. **पानीयधारकं** ; प्रा. **पाणीअहारी–अँ** ; हिं. **पनिहारा** ; गु. **पणिहार** ; पावसाचें पाणी गळण्याचें छपरावरील पन्ह्याचें भांडें, **पन्हाळ** < **पानीय** + **धारा** (?) ; देप्रा. **परिअली स्थालम्** भोजनभाण्डम् (८५-६); याकाम. **पान्हावणी** = प्राप्त झालेलें ; अकाम. **परळ, परेळ** पाणी (नरुस्व. ५६९)]

पाप न. वाईट कृत्य, दोष, पातक. Sin, crime, wickedness, vice.

[सं. **पाप** ; (**पापकर्म, पापदृष्टि, पापनिरास, पापभीरु** ; इत्यादि), **पाप्याचा पितर** (अशक्त, रोडका माणुस–पापी मनुष्यानें अर्पण केलेले पिंड त्याचे पितर खात नाहींत म्हणून ते रोडावतात त्यावरून).]

पापड, पापडी पुं. स्त्री. उडीद, हिंग ह्यांची चकती–पोळी. A thin crisp cake made of flour.

[सं. **पर्पट** ; प्रा. **परपड, पप्पल, पप्पडग** ; का. **पपर** ; कु. **पापडी** ; बं. **पापडी** ; हिं. **पापड** ; पं. **पापड** ; लां. **पापडी** ; सिं. **पापडु** ; गु. **पापड** ; याकाम. **पापडी** = बांधून काढलेला रस्ता (नरुस्व. ७८१). २ **प्र** + **स्फुट्** १ विकसने (**पर्पट** हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.); **पापडी** = तांदळाची हिंग वगैरे मसालामिश्रित चकती (सं. **पर्पटिका** ; प्रा. **पप्पडिया** ; **पापुद्रा**–वरचें पातळ आवरण.]

पापणी स्त्री. डोळ्यावरील झांकण. An eye-lid.

[*IE*. Pek (तोडणें); सं. **पक्ष्** (**पक्ष्मन्, पक्ष्मल**); प्रा. **पक्ख, पप्प** (?) (किंवा सं. **पक्ष्मन्** ; प्रा. **पप्पन** पासून); इं. **पश** ; *Gr*. Pek; *Lat*. Pec. pect; *Lith*. Pesrti = Plucks ; *Ger*. Fahs; **पक्ष्मन्** पासूनची व्युत्पत्ति संशयित आहे असें ब्लोक म्हणतो. महाप्राण जातो ह्याबद्दल **रुक्म–रुप्प, पाकळी** हीं उदाहरणें त्यानें दिलीं आहेत.]

प(पां)पर,–रा स्त्री. लाथ A kick.

[सं. **पाद्** + **रजः, पादप्रहार** ; याकाम. **पापरा, पापरी** = लाथ (ज्ञा. ११·१०५); शिकाम. **पापरा, पापरी**; ब्राह्मणें **पापरा** जरी हाणितला । तो हृदयीं धरिला पदांकु ॥ यमातीं **पापरी** हाणें आतां ॥ तु. अभंग.]

पापुद्रा पुं. आवरण, पदर, खपली, कवची. A detached crust, a scale or peeling off.

[सं. **पर्पट, प्र** + **स्फुट्, स्फुड्** १ विकसने, अवयवे ; प्रा. **पप्फोडइ** ; अकाम. **पापुडणें, पाफुडणें** = पापुद्रा किंवा पदर सुटणें, खवले पडणें.]

पांवळ स्त्री. ओढा, नाला. A stream-let.

[सं. **प्र** + **वह्**.]

पांबळ वि. पामर. दुर्बळ. Weak, imbecile.

[सं. **अप+बल** ; याकाम. **पाबळें** = तुच्छ (ज्ञा. २·३६३).]

पामर त्रि. क्षुद्र, गरीब, क्षुल्लक. Poor, harmless,

[सं. **पामर**. < **पामंन्**, √**पै**.]

पामरी स्त्री. रेशमी पांघरण्याचें वस्त्र. A silken cover.

[सं. (?); देप्रा. **पोमरं** (**कुसुमरक्तं वस्त्रम्**).]

पाय पुं. पाद, पद, पाऊल. Foot, step.

[सं. **पाद** ; प्रा. **पाअ, पाय** ; सिं. **पाओ, पाय** ; गु. हिं. **पाव** ; याकाम. **पावो** (नरुस्व. ४५१), **पायखोळा** = लाथ (ज्ञा. १७-१०१). सं. **पाद्**पासून मराठींत दोन तद्भव रूढ झाले आहेत. एक **पाय** व दुसरा **पाव** (चौथा हिस्सा). प्राकृतरूपें अनुक्रमें **पाव** व **पाअ** अशीं आहेत. अकामसा. **पायउतार** ; **पायगुण** ; **पायगोवा** (अडथळा); **पायघडी** (विहिणीच्या पायांखालीं वस्त्र पसरण्याचा मान); **पादस्तर** = पायरी (ज्ञा. ८·२२३); **पायघोळ** (पायांपर्यंत पोंचण्याइतकें खालीं नेसलेलें धोतर–पदर); **पायताण**, (सं. **पादत्राण** ; प्रा. **पायत्ताण**); **पायदळ** (पायानें चालणार सैन्य); **पायपाखोळणी** (पाय धुणें-**पाद** + **प्रक्षालन**–ज्ञा. १३-१०७६); **पायपीट** (पुष्कळ चालणें < **पाद** + **पिट्** १ प्रतिघाते); **पायरहाट, पायरस्ता पायवाट** ; **पायरव** (**पाद** + **रजस्कः, पाद** + **रव्** १ गतौ) = वर्दळ–ज्ञा. ६-१७२); **पायवणी** (= चरणतीर्थ (सं. **पाद** + **पानीयम्**) ज्ञा. १२-२१५); **पायाळू** (=पायांकडून जन्मलेला < सं. **पाद** + **लु** ; याकाम. **पायाळ** (ज्ञा. ६-४५८).]

पायंडा पुं. पद्धत, परंपरा, सुरवात, आरंभ. The beginning, the tradition, usage.
[सं. पाद् + डा (?) ; अनुस्वार कसा आला ?]

^{1}**पाय** पुं. पाद. Foot
[फा. **पाए** ह्या फार्सी शब्दापासून कांहीं सामासिक शब्द झाले आहेत. **पायकस्ता** (दुसऱ्या गावांतील शेती करणारें कुळ, < **पाएकाश्त**) ; **पायखाना** (= संडास, < **पायखाना**); **पायगा**=(फौजेचा सरंजाम, < **पाए+गाह्**); **पायपोस** (जोडा । < फा. **पाय्पोश**) ; **पायमर्दी** (= धांवपळ < फा. **पाएमर्दी**-धैर्य, निश्चय) ; **पायमल्ली** (= नासधूस, तुडवातुडव < फा. **पाएमाली**).]

पायजामा पुं. सुरवार, विजार, तुमान. A loose underwear, pantaloon.
[फा. **पाय्जामा**.]

पाय(ये)दामी पुं. जाळयानें पक्षी पकडणारा. One catching birds in a net.
[फा. **पाय्दामा** ; पेकाम. **पायदामा** = जाळें (मराचिथोशा. ३३).].

पायपोस पुं. पादत्राण. Shoes.
[फा. **पाय्पोश्** ; पेकाम. **पायपोस** (रा. २०-१२) ; याकाम. **पायेंपुसणें** (ऋ. ३६६), परंतु हा शब्द संस्कृतोद्भव असून त्याचा अर्थ निराळा आहे. वस्त्रवाची आहे.]

पायमाल वि. तुडविलेला, उध्वस्त, नष्ट. Trodden, trampled.
[फा. **पाय्माल्**; अकाम. **पायमाली** (फा. **पाय्माली**); पेकाम. **पायमल्ली** (ब्र. च. २१२).]

पायरव स्त्री प्रवेश, पद्धति (लक्षणा). Entrance, custom.
[फा. **पाए+रव्** = चाल ; पेकाम. **पायरव** (ऐटी. १-२९) **पायरवा** = शिरस्ता.]

^{1}**पायरी** स्त्री. शिडीचा-जिन्याचा एक टप्पा, पायठणी, दर्जा, अधिकार, मान्यता (ल.). A step, rank.
[१ **पाय + री** (मरा. प्र.) **पायरव** < **पदरज** ; याकाम. **पायतरी** (ज्ञा. ८-२२३)]

पायरी पुं. कलमी आंब्याची एक जात (मूळ गोव्याकडील.) A kind of mango.
[पोर्तु. **परेरा**—ज्यानें प्रथम हें कलम तयार केलें त्याचें नांवावरून. **फर्नादीन** शब्द असाच **फर्नांडीस** वरून आला.]

पायली स्त्री. धान्य मोजण्याचें एक परिणाम, चार शेरांचें एक माप. A measure of corn.
[म. **पाय** = पाव (?), चौथा हिस्सा परंतु कशाचा ?.]

पायवट(णें) क्रि. पायाखालीं तुडवणें, (वाट) चांगली पायानें मळविणें. To tread on, to trample under.
[सं. **पादवर्तनम्**, **पादसृप्**.]

पाया पुं. तळ, खालचा भाग, (घराचा) आधार. The bottom.
[फा. **पाया**. **पाय** पहा ; अकामसा. **पायाळू** (पायाकडून जन्मलेला, **पाय + ळू** (म. प्रत्यय); याकाम. **पायाळ** (ज्ञा. ६ ४५८).]

पायाब पुं. उतार. Descent.
[फा. **पायाब्** ; पेकाम. **पायाब** (दिमरा. १-२५७).]

पायु न. गुदस्थान. The anus.
[सं. **पायु** ; याकाम. **पायु**.]

पार(णें) अक्रि. शकणें, सामर्थ्य असणें. To be able.
[सं. **पॄ** ९ पूरणे ; प्रा. **पार**.]

^{1}**पार** स्त्री. शेवट, तट, किनारा, दुसरी बाजू. The end, the bank, the other side.
[*IE*. Per : सं. **परम् परम**, √ **पॄ** ; झें. **पर** ; *Gr*. Perha ; *Lat*. Par. = equal ; *Lith*. Pri ; *Slav*. Pre ; *Goth*. Faurra ; *Ger*. Fer, ferro ; *Eng*. Fro, for (lorn), far, farther. सं. **पार** ; √ **पॄ** ; प्रा. **पार** ; गु. पं. हिं. बं. **पार** ; **पारु** = मर्यादा ; **पारि** = परतीरास ; याकाम. **पार** = परतीर (ज्ञा. १८-६८६) ; अकाम. **पार**–(नाम), **पार** (अ. परतीराला), **पारावार** = पलीकडचे, अलीकडचे, मर्यादा. (ज्ञा. १५-५३७).]

^{2}**पार** पुं. पिंपळासारख्या झाडाच्या भोंवतालचा कट्टा. The mound round the bottom of a tree.
[सं. **प्राकार** ; प्रा. **पाआर**.]

पारका पुं. शत्रु. An enemy, a foe.
[सं. **पारकाः**, **परकीयः** ; प्रा. **पारक** ; याकाम. **पारका** (ज्ञा. १६-८९), **पारका** (स्त्री) = निवळी ; हिं. **पारक**.]

पारका,–खा वि. (पुं.) दुसरा, शत्रु, अनोळखी. Another, a foreigner, a foe.

[सं. **परकीयः, पारक**; प्रा. **पारङ्क** ; गु. **पारकुं** = उलट; पं. **पराई** ; याकाम. **पारखा** = परकी ; **पारका** = शत्रु ज्ञा. १६-८९).]

पारख स्त्री. परीक्षा. A test.
[सं. **परीक्षा** ; पा. प्रा. **परिक्खा** ; बं. **परख** ; ओ. **परख** ; हिं. पं. लां. **परख** ; सिं. **पर्खं** ; गु. **परख** ; ज्यूल्स ब्लोक '**परीख**' शब्द ह्यापासूनच निष्पादितो तें चिन्त्य आहे. अकाम. **पारख(णें)** = परीक्षा करणें, तपासणें सं. **परी + ईक्ष्-परीक्ष्** ; प्रा **परिक्खा** ; गु. सिं. **पारखवूँ** ; हिं. **पारखना** ; याकाम. **पारखणें**, **पारखी** = परीक्षक ज्ञा. (१६-२४९)]

पारंगत वि. पैलतीराला पोहोंचलेला, तरबेज, निष्णात. (One) having gone to the other end, thorough, fully conversant.
[सं. **पारम् + गतः**, √ पॄ ९ पूरणे, √ पार् १० कर्मसमासौ.]

पारचा पुं. (मानाचा) पोषाख, वस्त्र. A dress of honour.
[फा. **पार्चा.**]

पारठा वि. पोक्त, मोठा, व्याल्याला पुष्कळ दिवस होऊनसुद्धां दूध देणारें, गर्भार असल्यानें दूध देण्याचें थांबणारें (जनावर). Well-advanced towards maturity.
[सं. **प्रष्ठौही** (गर्भिणीगौः); याकाम. शिकाम. **पारठें** = पोक्त. विसरल्या घरें । तान्हीं पारठीं लेकुरें (तु. अ.)]

पारडें न. तराजूच्या बाजूचें सामान मापावयाचें एक पात्र. The side pan in a balance.

पारणें न. उपवास सोडणें, व्रताच्या नंतरचा दुसरा दिवस, व्रताचा शेवट. Breaking of a fast.
[सं. **पारणम्**, **पार** (अन्त, शेवट), √ पॄ ; याकाम **पारणें** = शेवट (नरुस्व ८५०) ; पॄ ५ तर्पणे (**पारणम्** = समाधानम् ; (उदा. डोळ्याचें **पारणें** फेडणें.) ही व्युत्पत्ति राजवाडे देतात परंतु ती ग्राह्य वाटत नाहीं. हा प्रयोग लाक्षणिक दिसतो).]

पारद पुं. धातुविशेष, पारा. The mercury.
[सं. **पारद** ; याकाम. **पारज** (नरुस्व. ५६३). परंतु ह्या शब्दांत **द=ज** ह्या दोन वर्णांचा संभ्रम झाला आहे. अकाम. **पारा**]

पारद,-ध स्त्री. शिकार, मृगया. A hunt.
[सं. **पापर्द्धि** (√ ऋध्) ; (जुना अर्धतत्सम) ; प्रा. **पारद्धि** ; अप. **पारद्धि** ; देप्रा. **परद्ध....आखेटकः** (२०९-७); अकामसा. **पारधी** (**पापर्द्धिक** ; प्रा. **पारद्धिअ**; अप. **पारद्धिय**-व्याध इत्यर्थं देशी) = शिकारी.]

पार(रि)पत्य पुं. शिक्षा, दंड, मोड, अपजय. Punishment.
[सं. **परिपत्**, १ अभिघाते. पारिपत्थ]

पारपत्य पुं. व्यवस्था पाहणारा, शिपाई, सेवक. An attendant, a servant.
[सं. **परि + वृत्**-सेवायाम्, **पारिपत्यदार** असें एक आडनांव रूढ आहे.]

पारंबी स्त्री. वडाची लोंबणारी मुळी. A descending shoot of the *vada* tree.
[सं. **प्रा + लंब् > प्रालंबी > पारंबी.**]

पारवडा पुं. खेडेंगांवांतील एक भाग. A particular locality in a village.
[सं. **प्राकार** ; प्रा. **पाआर, पाराअ** ; सिं. **पारो** ; हिं. बं. **पाडा** ; म. **पाडा.**]

पारवा पुं. पक्षिविशेष, कबूतराची जात, रंगविशेष. A blue pigeon.
[सं. **पारापतः, पारावतः** ; पा. **पारापतो, पावरतो** ; प्रा. **पारवअ, परेवअ** ; ओ. **पारा** ; हिं. **परेवा** ; गु. **परेवो** ; ने. **परेवा** ; सिं. **परेलो** ; सिंह. **परिवय.** २ सं. **परभृत्** ; प्रा. **परहुअ.**]

पारस, परीस पुं. एक प्रकारचा दगड. The philosopher's stone.
[सं. **स्पृश्** ; गु. पं. हिं. **परस्** ; (**स्पर्शमणि** = परीस-कोश). २ सं. **परीक्षा** ; सिं. **पारसु** ; गु. पं. हिं. **पारस** ; बं. **परस, परेस, पाथर, परीस**; सं. **परीक्ष** । ह्या शब्दापासून जर हा शब्द आला असेल तर मराठींत व सिंधींत लिंगभेद कां झाला हें कळत नाहीं. **परीस** ह्या दगडाच्या स्पर्शानें लोखंडाचें सोनें होतें अशी समजूत आहे.]

पारसड(णें) अक्रि. झाडावरील पानें नाहींशीं होणें, वठणें. To shed or lose leaves.
[सं. **पृज्** २ हिंसायाम् + **शद्** १ अवसाने ; द्विधातुसंयोग.]

पारशी,-सी पुं. पर्शिया देशांतील मनुष्य, झर्थुष्ट्राचे अनुयायी. An inhabitant of Persia, A Parsee.
[फा. **पार्सी** ; '**पार्स**' प्रांतांतील रहिवासी ; सं. **पारसिक**; पा. **पारसिअ**; संस्कृतीकरण हें अर्थात् उत्तरकालीन आहे.]

पारा पुं. धातुविशेष, पांढरी द्रवरूप धातु. Mercury.
[सं. पारद ; प्रा. पारअ, पारय ; याकाम. पारद, पारज ; (नरुस्व. ५६३); हिं. बं. पं. ओ. पारा ; गु. सिं. पारो.]

पारायण न. ग्रंथाचें वाचन, पठन, शेवटपर्यंत वाचणें. Perusal, reading through.
[सं. पार + अयन, √ अय् १ गतौ.]

पारावार पुं. ऐल पैल तीर, दोन्हीं टोकें, आटोप, मर्यादा, शेवट. The near and farther banks of a river, limits, ends.
[सं. पार + अपार, (√ पॄ.); याकाम. पारावार = पलीकडचें, अलीकडचें (ज्ञा. १५-५३७)]

पारितोषिक न. बक्षीस, इनाम, देणगी. Gift, present.
[सं. परि + तुष् १० तुष्टौ.]

पारिपत्य न. पारपत्य पहा.

पारी स्त्री. पायरी. A step.
. [सं. पार = अन्त, टोंक ; याकाम. पारी = पायरी, = धान्यावरील कीड ; पार पहा.]

पारुख(णें) सक्रि. वाट पहाणें, थांबणें. To wait for, to await.
[सं. परि, प्रति + ईक्ष् ; याकाम. पारुखणें (ज्ञा. १२-२१०).]

पारुख(णें) अक्रि. खिन्न होणें, शिळें होणें, रागावणें, रुसणें, बंद होणें. To be dejected, to grow stale.
[सं. प्र + रुक्ष् ; प्रा + रुष् ४ हिंसायाम् ; पर्युषित > परुखिअ, पारुख = शिळे होणें ; याकाम. पारुखणें (ज्ञा. १-२४६).]

पारू(रु)ष(णें) क्रि. शिळें होणें. To grow stale.
[सं. पर्युषित (नाधा.), परि + उषस् (परि + उष्) = दुसरा दिवस उजाडलेलें ; पं. परोस्सा = उशीरां येणाऱ्या पाहुण्याकरिता ठेविलेला भाग ; गु. पारोठ = कुजलेला ; सिं. पारथु = शिळा ; म. पारोसा (स्नान न केलेला) पारास पहा.]

पारेरा पुं. आठवण, स्मरण. Recollection, memory.
[सं. प्र + स्मृ ; याकाम. पारेरा = स्मृति. उदा. घडींघडीं पारेरा देती योगें.]

पारोसा वि. शिळा, ज्यावर एक रात्र गेली असा, अशुद्ध. Stale, not fresh, impure.
[सं. पर्युषित (< परि + उषस्), परुसिअ, पारुस ; पारोसा पिंपळ = एक प्रकारचा पिंपळ, फटिंग मनुष्य (लक्षणा); (सं. पार्श्वपिप्पल ; गु. पारसपीपळो; सिं. पारसुपिपिरु).]

पार्चा पुं. पोषाख, मानाचें वस्त्र, मांसाचा तुकडा. A dress of honour, a piece of meat.
[फा. पार्चा. पारचा पहा.]

पाल स्त्री. प्राणिविशेष, सरपटणारा सरड जातीचा घरांत वावरणारा प्राणी. A common house-lizard.
[कान. पल्ली ; द्रा. पल्ली, हल्ली (ध्वनिशब्द); द्रा. पद्रु, परिसु, परेपल, पलम्बु ; सं. पल्ली हें संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे.]

पाल न. दुकान, राहुटी. A cloth stretched across a pole forming a tent.
[सं. पटलम् = छपर ; प्रा. पअल ; हिं. पाल.]

पालउ पुं. पालवी, पदर. Sprouts, a fold.
[सं. पल्लव ; याकाम. पालउ (ली. च. ३-६०) ; पालव = कोंवळें पान, पदर ; अकाम. पालवी. (ज्ञा. ११-३०१).]

पालक,-ख पुं. पाळणा, पालकी, पालखी. A cradle.
[सं. पर्यङ्क ; प्रा. पल्लक; सिं. पालिकी; पं. हिं. पालकी; सिंह. पळक् ; याकाम. पालक-ख (ज्ञा. १२-५ नरुस्व. ११२).]

पालकट, पालखट,-त स्त्री. मांडी घालून बसण्याचें आसन. A particular posture of squating. (with legs crossed.)
[सं. पर्यंक, पल्यंक किंवा परिकटि; याकाम. पालखत = मांडी; अकाम. अलकट पालकट, (नरुस्व. ११२ उगी. ६६९)]

पालखी स्त्री. लाकडाचा एक वाहनाचा प्रकार. A palanquin.
[सं. पर्यंकिका ; प्रा. पल्लंकिआ ; > पालकी - खी ; फा. पाल्की ; कान. पल्लकि √; सं. पर्यङ्क ; पा. पल्लङ्को ; हिं. म. पलंग ; हिं. पालकी ; तेलगु. पल्लकी ; मलायाजावा. पल्लकी ; याकाम. पालख ; पेकाम, पालखी-की (नालकी पालकी).]

पालट स्त्री. वि. बदल, फिरवाफिरव, उपडें, पालथें. A turn, a change, an alteration.
[सं. पर्यस्त ; प्रा. पल्लट, पल्हत्थ, पल्लोट्ट ; देप्रा. पल्लत्थो, पल्लट्टो, इति पर्यस्तशब्दभवम् (१८६-८).]

पालट(णें) सक्रि. दुसऱ्या बाजूस वळणें, वळविणें, बदलणें. To turn over, to change.
[सं. परि + अस्, (निष्ठा) पर्यस्त (नाधा.); प्रा. पल्लठ, पल्लत्थ ; देप्रा. पल्लटइ, पल्हत्थइ पर्यस्यति (१९२–११); पं. हिं. पलटा = उलटलेला; गु. पलटवूं, पालटवूँ ; सिं. पलटणु ; हिं. पलटणु ; हिं. पलटना ; बं. पालटिते = उलटविणें.]

पालथ(णें) क्रि. उलथें करणें, उपडें करणें. To turn over or on the other side.
[सं. परि + असू ४ क्षेपणे, (निष्ठा) पर्यस्त (नाधा.) प्रा. पल्लत्थ ; देप्रा. पल्लत्थइ पर्यस्यति (१९२–११); पं. हिं. पलटा ; म. पालथा, पलटी (उलटी उडी).]

पालथा वि. तोंड खालीं पाय वर अशा स्थितींतील, उपडा, उलटा. Upside down.
[सं. पर्यस्त ; प्रा. पल्लत्थ > पालथा, पालथ. पालट पहा.]

पालव पुं. उपरणें, पदर, ओढणी. The skirt of a cloth.
[सं. पल्लव ; याकाम. पालव, पालौ.]
तेंही पालौ खोंविला ॥ ली. च. खंड ३ पृ. ३९.
किं लागला पालय पापिणींचा. साम ॥ ऋ. ह. २-९३.

पालव(विणें) क्रि. अंकुर फुटणें, पालवी येणें, मोहोरणें, विस्तार करणें. To sprout, to shoot up, to spread.
[सं. पल्लव (नाधा.); याकाम. पालवणें = विस्तार करणें (ज्ञा. ६-४८९), = मालवणें (ज्ञा. १२-१००), पालव-वी (कोवळीं पानें) पाल्हाणें .]

पाला, पालव पुं. पानें वगैरे. The foliage.
[सं. पल्लव ; गु. पालो ; पलाव ; सिंह. पळु = हाड; याकाम. पालौ = पल्लव, पदर, (नरुस्व. ३९४), पाल्हाणें = पल्लवित होणें (ज्ञा. ६-२५८) तूलना करून पहा. सं. पल्लव ; *Lat.* Peluis ; *Gr.* Pelec.]

पालाण न. खोगीर. A pack-saddle.
[सं. पल्ययन, पर्याण ; प्रा. पल्लाण ; फा. पालान ; याकाम. पालाणणें = खोगीर चढविणें ; पालाणवालाणो = तयारी (ज्ञा. १८-१०६३) पेकाम. अकाम. पालाण.]

पालिं(गे)ग,-न पुंन. समुदाय, समूह. Crowd, group.
[पाळा (= समुदाय) + गण.]

पालिवण, पालेवन न. पाल्याची झोंपडी. A hut (covered with hay and dry leaves.)
[सं. पल्लव + अयनम्.]

पाली स्त्री. आद्य प्राकृतभाषा, बुद्धाची भाषा. The Pali language.
[सं. १ प्रालि (ओळ, धर्मग्रंथाच्या जोळी) ; २ प्रकट ; प्रा. पअड, पअल , पाल–पाली (?).]

पाले(भाजी) स्त्री. हिरवीं पानें असलेली भाजी. A general name for vegetables.
[कान. पल्य = पानांची हिरवी भाजी.]

पालेज(णें) क्रि. पालवी फुटणें. To sprout forth.
[सं. पल्लव (नाधा.); प्रा. पल्लवीय ; याकाम. पाल्हेजणें (ज्ञा. १५-१२७), पाल्हेजवि(णें) (णिच्रूप).]

पालौ पुं. पदर. A petal, a fibre.
[सं. पल्लव ; याकाम. पालौ = पदर (नरुस्व. ३९४).]

पाल्लक पुं. पाळणा. A cradle.
[सं. पर्यङ्क ; याकाम. पाल्लक.]

पाल्लव पुं. पल्लव. A sprout.
[सं. पल्लव ; याकाम. पाल्लव.]

पाल्हाळ पुं. विस्तार, लांबड (निरर्थक), पसारा Amplification, elegance.
[सं. प्र + आ + लल् १० ईप्सायाम् ; ही एक व्युत्पत्ति (राज.) आहे. परंतु ती इतर शब्दांशीं ताडून पाहता सयुक्तिक वाटत नाहीं. पाल्हाणें (ज्ञा. ६-२५८); पाल्हेजणें (ज्ञा. १५-१२७); पाल्हेलें = पसरलें (ज्ञा. १५ १०२) इत्यादि शब्द आहेत. त्यांचा पालौ = पल्लव (नरुस्व. ३९४) ह्याशीं संबंध आहे. त्याअर्थीं पाल्हाळ शब्द हि पल्लव शब्दाशीं संबद्ध आहे हें उघड आहे. म्हणून त्याची व्युत्पत्ति पुढीलप्रमाणें आहे. सं. पल्लव > पालौ > पाल्हौ + ल – पाल्हाळ = विस्तार ; अकाम. पाल्हाळणें, पाल्हाळीक. इ.]

पाव पुं. चौथा हिस्सा. A fourth part, a quarter.
[सं. पादः ; पा. पादो ; प्रा. पाअ ; का. पाव ; कु. पाउ ; बं. ओ. पोआ ; हिं. पाँव ; पं. पाउ ;

सिंह. लां. **पा** ; सिं. **पाउ** ; गु. **पाव** ; अकामसा. **पावला**, **पावली**, **पावकी** (पाव चे पाढे) ; तुपाचें **पावकें** = चौथ्या हिश्शाचा डबा.]

पाव(णें) सक्रि. मिळणें, प्राप्त होणें, पोहोंचणें. To reach, to attain, to come to hand.
[सं. **प्र + आप्**; प्रा. **पाव** ; गु. **पावूँ**; सिं. **पायिणु** ; पं. **पाउणा** ; हिं. **पाना**, **पाउना** ; बं. **पाइते** ; ओ. **पाइबा** ; सिंह. **पॅमिनेनवा** ; का. **पाडुनू** ; याकाम. **पातणें**, **पातला** (सं. **प्राप्त**) ; अकाम. **पावणें**, **पावती** (पोहोंच) ; **पावेतों** ; **जों पावेतों**, **पावोन** (पासून) ; अकाम. ग्रामीण. **पून** (पासून '**पावोन**' चा संक्षेप).]

पावका पुं. शिडीची पायरी. A step, a ladder.
[सं. **पादुका**.]

पावटा पुं. धान्यविशेष, द्विदल धान्य. A pulse.
[सं. **प्रावट** ; प्रा. **पाउट**.]

पावणा पुं. पाहुणा पहा.

पावसाळा पुं. पाऊस पडण्याचा काळ, मृग आणि हस्त ह्या दोन नक्षत्रांमधील काळ. The rainy season.
[म. **पाउस + काळ** ; सं. **प्रावृष् + काल**.]

पांवा पुं. वाद्यविशेष, अलगुज, वेणु. An instrument, a flute.
[सं. **प्रा + वे** (**प्रावय**) ; देप्रा. **पावय** (पुं.) ; हिं. गु. **पावो**. परंतु अनुस्वार कसा आला ? अन्योद्गम आहे कां ?)]

पाश पुं. बंधन, जाळें. A noose, a net,
[*IE*. pek, peg ; सं. **पाशः**; *Av*. pac ; *Gr*. pag ; *Lat*. pac. (pecus.) ; *Lith*. pekus ; *Goth*. fahan (fae, fan, falnh) ; *Sax*. fœng ; *Eng*. fee, feudal. (**पशु** = प्राणी, जनावर. हा शब्द ह्या वरील मुळाशींच संबद्ध आहे.) ; याकाम. **पास**, **पासिक** (ज्ञा. १६-३४५) ; **पाशक** (ज्ञा. १४-६४) ; **पांस** (नरुस्व. ५९५) ; **पासिक** (नरुस्व. ११२) ; **पासवडा**=आच्छादन (नरुस्व. ४६१) ; अकाम. **फास**.]

पास, पार्शी अ. समीप, जवळ, शेजारी. Near, nigh, close to.
[सं. **पार्श्व** (**पर्शु** = बरगडी) ; प्रा. **पास** ; गु. **पांसु** = बरगडी, बाजू ; सिं. **पासु** = बाजू ; पं. **पास**, **पाह** ; हिं. बं. **पास** = जवळ ; सिंह. **पस्** = बाजू, सान्निध्य ; रुमा. **पश्** = अर्धा भाग, **पशो** = जवळ ; का. **पास** = पुस्तकाचें पान (?). सं. **परशु** ; म. **फरशी** (कुऱ्हाड) हे शब्द **पर्शु** शीं संबद्ध आहेत ; याकाम. **पासी** (नरुस्व. ३७२) ; **पास** (ज्ञा.) ; **पासवणा** (बाजूस होणें, मागें हटणें, ज्ञा. ७·१७२), **पासाव** ; अकाम. **पार्शी** = आसपास, जवळपास.]

पासंग पुं. वजन सारखें करण्यासाठीं घालावयाचा जिन्नस. Something put in the light pan of a balance to effect equilibrium.
[फा. पा–संग्.]

पासल(णें) अक्रि. जवळ निजणें, अस्ताव्यस्त निजणें. To lie down, to recline.
[सं. **पार्श्वित**, **पार्श्व+ली** ; प्रा. **पासल्लिअ** (नाधा.) ; सं. **प्रसुप्तः** ; पाप्रा. **पसुत्त** ; याकाम. **पुसुत्त + ल्ल** ; अकाम. **पासलें पडणें**.]

पासव(णें) क्रि. मागें पहाणें. To look back.
[सं. **पार्श्व** ; प्रा. **पास** (नाधा.) ; अकामसा. **पासावणा** (माघार) ; **पासवा** (नेसत्या वस्त्राचा आंतील पदर) ; **पासाव(णें)** = जवळ होणें < **पार्श्व** (नाधा.), = २ पसरणें (**प्रसर्**).]

पासष्ट वि. संख्याविशेष, साठ आणि पांच ; Sixty-five.
[सं. **पञ्चषष्टि** ; प्रा. **पणसट्ठी** ; का. **पोञ्चद्दोठ** ; बं. **पॉयसट्टी** ; ओ. **पञ्चसट्ठी** ; हिं. पं. **पाइसठ** ; लां. **पेंठ**. सिं. **पञ्जहठी** ; गु. **पाँसठ** ; ने. **पैंसट्ठी**.]

पासा पुं. पाश, फास. A snare, a net, a noose.
[सं. **पाश** ; प्रा. **पास** ; याकाम. **पाश**, **पास** ; अकाम. **फास**.]

पेंसाव पुं. प्रसाद, आश्रय. Favour, shelter, support.
[सं. **प्रसाद** ; प्रा. **पसाअ** ; जुनी म. **पसाय**<**पासाव**.]

पेंसाव अ. पेक्षां, पासून. From, since, (more) than.
[सं. **१ पक्षे**, **२ पार्श्वतः** ; याकाम. शिकाम. **पासाव** (ऋपू. ६१) ; **पासौनि** ; अकाम. **पेक्षां**, **पासून**.]

पासून अ. कडून, हून (पंचम्यर्थक विभक्ति-प्रतिरूपक अव्यय). From, since.
[सं. **पार्श्वे + होऊन**; याकाम. बकाम. शिकाम. **पासोन**,–**पासोनि-नी**,–**पासौनि-नी** (काव्य).]

तेजापासाव जन्म आपासीं ॥ विवे. सिं. ४
द्विजीं निषधापासाव म्हणीजेलें ॥ न. द. १३.

पासोडा पुं. वस्त्रविशेष, आच्छादन, पांघरूण. A thick coarse cover (doubled over).

[सं. **पश्चपट**, (सं. **पश्चात्**), **प्रच्छद्**, **प्रच्छाद्**; पा. **पट**; सिं. **पाडो**; सिंह. **पळ**; बं. **पाछूडी**; हिं. **पछोडी**, **पिछउरा**; गु. **पिछोडी**; ने. **पछेउरो**; याकाम. **पासवडा** (नरुस्व. ४६१).]

पासोडी स्त्री. खादीचें जाड पांघरूण. A thick coarse cover (of khadi).

[सं. **प्रच्छद्**, **प्रच्छाद्**–पासोडा पहा. '**डी**' किंवा '**डा**' हा प्रत्यय '**पट**' ह्या शब्दाचा अवशेष असावा; नंतर '**पास**' हा शब्द राहतो. हा '**पार्श्व**' पासून असावा किंवा '**प्रांशु**' पासून असावा; कान. **पच्चड** हा शब्द ह्या संबंधांत उल्लेखनीय आहे. –**पासोडा** (मोठी पासोडी).]

पाँसोळी, फासळी स्त्री. बरगडी. A rib.

[सं. **पर्शुः**, **पार्श्व**; पा. **फासुलिका**; सिं. **पासिरी**, **पासू**; लां. **पसली**; गु. **पॉसळी**; हिं. **पसुली**; पं. **पस्सली**, **पासला**.]

पेंाह(णें) सक्रि. हवें असणें, इच्छिणें. To desire, to expect, to seek.

[सं. **अपेक्ष्**; प्रा. **अपेच्छ**, > **अपेह** > **पेह**; देप्रा. **अप्पाहइ संदिशति** (दे. १-३७).]

पेंाह(णें) अक्रि. भासमान होणें, प्रकाशणें, उजाडणें, उगवणें. To shine, to appear.

[सं. **प्रभा**; प्रा. **पहा**; याकाम. **पाहणें** (ज्ञा. ३-१९७), **पाहलें** = प्रातः; **पाहें** = उद्यां (नरुस्व. २७६).]

पेंाहणें सक्रि. प्रार्थना करणें. To pray.

[सं. **प्र + अर्थय** १० ; (अप) प्रा. **पाह**; **पाहिजे** < **पाहेज्ज**, **पाहिज्ज**.]

पाह(णें) सक्रि. नजरेंत आणणें, दृष्टींत आणणें. To look, to behold, to see.

[*IE*. Pek, (s) pek ; सं. **स्पश्**, **पश्** (**पश्यामि**); प्रा. **पेह**, **पास**; *Slav*. Pazite-se (Beware of) किंवा **स्पश्**–६ संस्पृशने. ह्यासारखेच **स्फुटति** (> **फोड** = **फुट**) आणि **स्फन्द** (> **फुंज**) हे धातु आहेत. ह्यांतील पहिल्या अवयवांतील '**स्**' ह्याचा लोप होतो.]

पाहाल(णें) क्रि. उजाडणें. To have day-break.

[सं. **प्रभा + काल**, **पहा + आल** – **पहाल** (नाधा.); याकाम. **पाहाल**, **पाहालीं** = प्रातःकाळ (२–३५५), **पाहालया रजनी** = रात्र संपली असतां, पहाटेच्या वेळीं (ज्ञा. १३-९३); **पाहात(न)पट** = प्रभातकाल, सकाळ (उगी. ५०८, शिशु. ७९०).]

पाहिजे क्रि. प्रकाश देतें. Illumines.

[सं. **प्रभाति**, **प्रभातम्**; पा. **पभाति**, **पभात**; प्रा. **पहाय** (पहाट); २ प्रलिक ; सं. **प्रभानम्** (= तेज); याकाम. **पाहिजे** (ज्ञा. ५-७६) ; सिंह. **पहन पहाणें**; **पाहिजे**–(हवें) ह्याअर्थीं क्रियापदांतील धातु निराळा. तो सं. **प्र + अर्ह्**, **प्र + अर्थ्**, **प्र + कांक्ष्** ह्यांपैकीं एका धातूपासून आला असावा. **पाहणें** पहा.]

पाहुणा पुं. अतिथि, कधीं तरी येणारा,–परका मनुष्य. A stranger, a guest.

[सं. **प्राघुणः**, **प्राघूर्णक**; पा. **पाहुणेय्य** = आतिथ्यवस्तु; प्रा. **पाहुण**, **पाहुणग**, **पाहुणअ**, **पहुण**; अप. **पाहुणअ**; गु. **पोणो**; पं. **पाहुणा**; हिं. **पाहुना** = अतिथि, जांवई; याकाम. **पाहुण(न)रु** (अमृ. २-१८), **पाहुणेर** (ज्ञा. ११-२); अकाम. **पाहुणा**, **पाहुणेर** = मेजवानी (·**पाहुणचार**); अकाम. ग्रामीण = **पाहुणा**, **पाव्हणा**, **पावणा** (जांवई वगैरे नातेवाईक).]

पाळ(णें) क्रि. रक्षण करणें, पालन करणें. To nourish, to support, to feed.

[सं. **पाल्** १० रक्षणे (√ **पा**. २ **रक्षणे**); प्रा. **पाळ**, **पाल**; गु. **पाळवूँ**; सिं. हिं. बं. **पाल**; **पाळत** (**पालति**–राखण); **पाळण** (रक्षण), **पाळक**.]

पाळ स्त्री. कानाचें टोंक, तटावरील गच्ची, एका वस्तूभोंवतीं वर्तुळाकार पसरलेल्या दुसऱ्या वस्तु. The outer curving edge of the auricle, the ring of things round a thing.

[सं. **प्राल्** १ समाप्तौ, **प्रालि**; पा. प्रा. **पालि**; गु. **पाळ** = टोंक, कंगोरा; सिं. **पालु** = फळाच्या अढींतील गवताचे थर, पं. **पाल** = ओळ, माला; हिं. **पाल** = धक्का; सिंह. **पेल** = ओळ, ग्रंथांतील अवतरण; का. **पल्या (लिया)** = लांकडी कुंपण; याकाम. **पाळ** = किल्याची भिंत, तट; **पाळी** = कांठ (नरुस्व. २२८).]

पाळणा पुं. मुलें निजविण्याचा झोंपाळा. A cradle.

[सं. **पालन**; सिं. **पालणो**; म. **पाळ + णा** (मराठी प्रत्यय). परंतु ह्या शब्दाचा जवळचा संबंध सं. **पर्यङ्क**, किंवा मरा. **पालकी**, **पालखी** ह्या शब्दांशीं आहे. **पालकी** शब्द पहा.]

पाळी स्त्री. खेप, रांग, कांठ, ओळ. A turn, a recurring season, a brim.

[सं. प्रालि, पालि ; प्रा. पा. पाली (पाली भाषा); याकाम. पाळी (कांठ,-नरुस्व. २२८, ८६४); अकाम. पाळी.]

पांळें न. धान्य ठेवण्याचें गोल पात्र. A wooden bowl.

[सं. पल्यम् ; प्रा. पल्ल (पुंन) ; याकाम. पाळी =कांठ (नरुस्व. २२८).]

पांळें मुळें न. अ. मूळ, आरंभ, समूळ, संपूर्ण (नाश).

[सं. (?) मूलम् ; परंतु पहिल्या '**पाळें**' ह्याचा संस्कृत शब्दाशीं संबंध प्रतीत होत नाहीं. दोन्ही शब्द मिळून हा ध्वनिशब्द (echo-word) झाला असावा. अशा ध्वनिशब्दांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे परंतु भिन्न भाषांतील असतात. तसे ह्या शब्दांतील **पाळें** हा शब्द कानडी असून **मुळें** शब्द आर्य आहे. पाळे शब्दाचे दोन अर्थ पुढें मांडले आहेत. कान. **पाळे**=वृक्ष, झाड ; २ नाश. सं. **मूलम्** ; हा शब्द पाळेंमुळें खणून काढणें,–रुजून बसणें ह्या प्रयोगांत येतो.]

पाळेगार पुं. लोकांचा मुख्य, जहागीरदार, मवासी (बंडखोर). A chieftain, a revolted ryot.

[सं. **पल्ली पाली**=गांव तळ; कान. **पालेथ**=वस्ती, गांव,**–गार** (प्रत्यय); **पाळेकर, पाळेगण** (समूह, समुदाय, सैन्य) < सं. **पाल्यगणः**=संरक्षिलेले लोक; याकाम. **पाळेगण**=सैन्य–शिशु. २४०).]

पि(णें), पी(णें) सक्रि. द्रव पदार्थ तोंडांतून घशांत घोट घेणें. To drink.

[*IE.* pe, pi, po, pib; सं. **पा, पिब्** ; *Gr.* pepo; *Lat.* po, bib, bu; *Lith.* pola; *Slav.* poja, pili (drink); *Teut.* poltr; सं. **पा, पिब्** १ पाने ; प्रा. **पिअ** ; सिं. **पिअणुं** ; गु. **पिवूं** ; पं. हिं. **पी** ; सिं. बं. ऌमा. **पि–**; सिंह. **बो** ; प्राकृतमध्यें धातु आला तो '**पिव्**' आला, '**पा**' नाहीं; किंवा संस्कृतमध्येंच मूळ धातु **पिब्** असावा व सूत्राच्यां सोयीसाठीं पाणिनीनें '**पा**' धातूशीं त्याची सांगड घालून दिली. '**पा**' आणि **पिब्** हे दोन्ही धातु स्वतंत्र निरनिराळे आहेत असें प्राकृत व मराठी धातूंवरून दिसतें.]

पिक, पिंक स्त्री. विडा खाऊन तयार झालेली थुंकी. Spittle.

[सं. **पिज्** ७ वर्णे, **पिकदाणी** (थुंकण्याचें भांडें).]

पिक(णें) क्रि. पक्व होणें, पूर्ण होणें, To ripen, to be matured.

[सं. **पक्व**, √ **पच्** १ पाके ; प्रा. **पक्क, पिक्क** ; हिं. **पक्का, पाका** ; (हा शब्द सर्व भाषांत आहे.); का. **पक्**=पिकणें ; ऌमा. **पेक्**=पचणें ; मराठी शब्द इतर भाषांतील शब्दापेक्षां विलग आहे असें ब्लोक म्हणतो, परंतु तो कसा विलग आहे हें सांगत नाहीं. मराठीमध्यें **पाका, पक्का** हे शब्द आहेतच ; शिवाय **पीक** (जमीनीवरील उत्पन्न), **पिकाऊ** (सुपीक) इत्यादि शब्द आहेत. **फिक्का** असा एक शब्द आहे तो **पीत** पासून.]

पिंगळा पुं. पक्षिविशेष, प्राणिविशेष. A little spotted owl

[सं. **पिङ्गल** ; प्रा. **पिंगुल** ; द्रा. **पिङ्ग**=लहान प्राणी ; द्रा. **पिंजु**=पिलें ; किंवा हा त्या प्राण्याच्या शब्दावरून **ध्वनिशब्द** हि असावासा वाटतो.]

पिंगा पु. लहान मुलींचा एक खेळ. A game of girls.

[म. **पिंग**=असा तोंडांतून आवाज काढून खेळावयाचा खेळ. **ध्वनिवाचक** शब्द.]

¹पिच(णें) क्रि. फुटणें, तडा जाणें, उलणें. To crack, to split.

[सं. **पिश्, पिष्** ६ अवयवे, तुकडे होणें.]

²पिच(स)णें, सक्रि. खालींवर करणें. To shuffle.

[सं. **पिश्** ६ अवयवे किंवा **पिष्** ७ अवयवे, **पिचका** (तडा गेलेला); **पिचविणें** (णिच् रूप).]

पिचपिच(णें) क्रि. (डोळे रोगामुळें) **उघडझांक** करणें. To open and shut, to blink.

[सं. **पिच्चट** (अक्षिरोग); परंतु हा ध्वनिशब्द असून संस्कृतीकरण नंतरचें असावें.]

पिच्छा पुं. मागील भाग, (ल.) तगादा, **सारखें मागें** लागणें. The hinder part, ceaseless dodging.

[सं. **पश्चात्** ; गु. **पिच्छो** ; **पुच्छ** ह्या शब्दाशीं कांहीं संबंध असेल कां ?]

पिछाडी स्त्री. मागील बाजू. The hinder parts.

[सं. **पश्चार्धः**, (< **पश्चात्**); प्रा. **पच्छद्ध** ; कु. **पिछाडी** ; हिं. **पछाडी** ; पं. **पछवाडा** ; गु. **पछवाडूं, पछाडूं**.]

पिंज(णें) सक्रि. कापूस स्वच्छ करणें,–मोकळा करणें, कापूस निवडणें. To card or comb.
[सं. **पिञ्ज्** ; प्रा. **पिंज** ; किंवा **पिंष्** ७ संचूर्णने, कान. **पिजु** = विभागणें, कापूस स्वच्छ करणें ; अकाम. **पिंजण** (पिंजण्याची क्रिया); **पिंजरणें, पिंजारी.**]

पिंजरा पुं. सांपळा, तुरंगाची खोली, आच्छादन. A cage, a cell with bars.
[सं. **पञ्जर, पिञ्जर** ; सिं. **पिङ्रिो** ; पं. **पिंजरी** ; हिं. बं. **पिंजर** ; याकाम. **पिंजरी** (= आच्छादन, छत) ; ओ. **पिंजिरा.**].

पिंजर(णें), पिंजार(णें) क्रि. विसकटणें, विखुरणें, विस्तारणें, पसरणें. To get dishevelled.
[सं. **पिंज्** १० प्रदाने, हिंसायाम्, **पिंजर** (नाधा.) ; याकाम. **पिंजरी** = उटी (ज्ञा. ११-२२३) ; = विस्तार (ज्ञा. ९·१२५); = पालकीचें छत.]

पिंजारी पुं. कापूस पिंजणारा. A carder of cotton.
[सं. **पिंजिक** = कापसाचा पेळू; हिं. **पिंजारा** ; तामीळ. **पंजारी, पुंजुकोट्टी.**]

पिट(णें) क्रि. मारणें, बडविणें, (टाळी) वाजविणें. To beat, to knock, to thrash.
[सं. **पिट्** १ संघाते किंवा शब्दे, किंवा **पिष्ट** ; प्रा. **पिट्ठ** ; हिं. **पिटना** ; सिं. **पिटणु** ; गु. **पिटवूँ** ; याकाम. **पिटणें** (ज्ञा. १८-८३५); अकाम. **पिटपिटणें** (**पिट्** १ शब्दे-दिरुक्ति); **पिटकी, पिटकन्**–कर,–दिनी,–दिशी (ध्वनिशब्द = झटकन्), **पिटवि(णें)** = दवडणें (णिच्रूप).]

पिटकुला वि. लहान, चिमुकला. Small, tiny.
[सं. **प्रथुक** + **ल.**]

पिट(टा)ळ(णें) क्रि. जोरानें हाकलणें. To drive ferociously.
[सं. **पिट्** + **टल्** (**टुल्**) १ वैक्लव्ये, द्विधातुसंयोग.]

पिठलें न. झुणका, हरभऱ्याच्या पिठाचें घट्ट तोंडीलावणें. A sauce-flour of gram boiled and spiced.
[सं. **पिष्टल** (?).]

^{1}**पिठा** वि. ठिसूळ. Crumbling.
[सं. **पिष्ट,** निष्ठा √ **पिंष्** ७ अवयवे ; प्रा. **पिट्ठ.**]

^{2}**पिठा** पुं. दारूचा गुत्ता. A liquor-shop.
[सं. **पैष्टी** = दारू. परंतु हा शब्द अन्यभाषीय असावा असें वाटतें.]

पिठाळ(णें), पिठुळ(णें) क्रि. पिटासारखी चव लागणें. To be doughy.
[सं. **पिष्टल** (नाधा.) ; √ **पिंष्** ७ अवयवे.]

पिठी स्त्री. तांदुळाचें पीठ. Fine flour of rice.
[सं. **पिष्ट,** (निष्ठा), √ **पिंष्** ७ अवयवे. **पीठी, कणीक, पीठ** ह्या शब्दांच्या अर्थाचें विशेषीकरण झालें आहे. त्यांचा अर्थ मर्यादित झाला. **पिठी** = तांदुळाचें पीठ ; **कणीक** = गव्हाचें **पीठ** ; **पीठ** = साधें जोंधळ्याबाजरीचें पीठ ; हे त्यांचे मर्यादित अर्थ आहेत.]

पिठोरा पुं. श्रावणी अमावास्येच्या दिवशीं चौसष्ट योगिनींच्या प्रतिमा करून जो पूजेचा विधि करतात तो. (‘ पिठोरा ’ नांवाचा एक राजा होता त्याच्या गोष्टीचा संबंध आहे). An observance on the New-Moon day of Shravan.
[मरा. **पिठोरा.** सं. **पिष्ट** (?)]

पिड(णें) सक्रि. त्रास. To harass, to trouble.
[सं. **पीड्** १० पीडने ; प्रा. **पीड** ; मराठी तद्भव–. **पिळणें.**]

पिढी स्त्री. वंश, कुळी. A generation, a succesion.
[सं. **पीठिका** ; प्रा. **पीढी** (स्त्री) = घराचा आधार.]

पिढें न. स्टूल, बांक, मेज, तक्तपोशीखालील तुळई, आसन, पाट. A sort of stool.
[सं. **पीठम्, पीठक**; पा. **पीठम्, पीठको** ; प्रा. **पीढ, पीढअ, पिढिआ** ; का. **पीरू** ; कु. **पीडो** ; आ. **पिरा** ; ओ. **पढा** ; हिं. **पीढा** ; पं. **पीढा** ; सिंह. **पिळ** = सिंहासन ; अकाम **पिढा, पिढलें** (आसन).]

पिंड पुं. गोळा, लाडू, देह (ल.). A lump, a ball.
[सं. **पिंड्** १ संघाते ; गु. **पिंडलो** ; प. पं. **पिन्न** = भीक मागणें ; सिं. **पिन** = भिक्षा, **पिनु** = गाठोडें ; हिं. **पेड, पिंडी** : ब. **पिंड** ; सिंह. **पिड** ; अकाम. **पिंड, पिंडा, पेंढा, पिंडी.**]

पिंडरी, पिंढरी स्त्री. पोटरी. The calf of the leg.
[सं, **पिण्ड, पिण्डिका** ; प्रा. **पिंडिआ** ; कु. **पिनी** (मांडी) ; हिं. **पिंडली** ; पं. ला. **पिन्नी** ; गु. **पिंडी** ; अकाम. **पेंढी, पिंढा, पेंढा, बिण्डा.**]

पितर पुं. पूर्वज, मातापिता–प्रपिता वगैरे. The deceased progenitors of mankind.
[सं. **पितृ,** √ **पा** = पाळने. **पिता** पहा.]

पितळ न. एक धातूचा प्रकार. Brass.

[सं. **पित्तलम्**; प्रा. **पित्तल**; अप. **पित्तल**; आ. बं. **पितल्**; हिं. **पीतल्**; पं. **पित्तल्**; गु. **पीतळ**; ने. **पितल्**; कान. **पित्तल**; पितळ धातु ही मिश्र धातु आहे. ही तयार करण्याची कला संस्कृत कालांत लोकांना अवगत होती. ह्या शब्दाचा काळ नक्की होणें जरूर आहे. आमच्या मतें हा शब्द उत्तरकालीन असावा व त्याचें संस्कृतीकरण नंतर झालें असावें.]

पिता पुं. जनक, बाप, जनक. Father.

[ओष्ठ्य व्यंजनें हे मुलाचे अगदीं पहिले उच्चार होत व त्यामुळें आई, बाप वगैरे अगदीं जवळचे व मायेचे नातलग ह्यांच्यासंबंधींच्या शब्दांत ओष्ठ्यवर्ण आले आहेत. तसेंच अन्न, खाद्य, रक्षण, पोषण ह्यासंबंधींच्या शब्दांत हि ओष्ठ्यवर्णच प्रधान उच्चार म्हणून असतात. ह्या दृष्टीनें पुढें दिलेले निरनिराळ्या भाषांतील शब्द पहा:—*IE*. peter, pe; po, सं. **पा, पी, पितृ**; *Av*. pita, patar; फा. **पादशहा**; *Gr*. pa, po; *Lat*. pa. papas (Breast); *Slav*. Pitali (protects): **पति** (husband); *Teut*. fa, fo.]

पित्त न. यकृतांतून पडणारा पिवळा रस. Bile.

[सं. **पित्तम्**, **पीत** पहा.]

पिंपळ पुं. एक प्रकारचा वृक्ष. A kind of tree, the pippal.

[सं. **पिप्पल**; हिं. **पिपल**; जुनेफार्शी. **पुल्पुठ्**; *Gr*. peperhi = pepper tree; *Lat*. pepe, piper; *Ger*. pfeffar; *Sax*. pipor; (*Eng*. poplar); *As*. pipor; *IE*. Bale, Bhabh, pap; *Lat*. papula; *Lith*. papas, pupulo; *Lett*. papa: सं. **पिप्पल**; पा. **पिप्फलो**; प्रा. **पिप्पल**; कु. **पीपल्**; बं. **पिप्पल्**; ओ. **पिप्पळ**; हिं. **पीपल्**; पलां. **पिप्पल्**; सिं. **पिपिरु**; गु. **पीपळ्**; अकाम. **पिंपळ, पिंपर, पिंपरण** (**पिप्पलिनी**).]

पिंपळी स्त्री. औषधिविशेष. The long pepper-plant.

[सं. **पिप्पली**; पा. **पिप्पलो, पिप्फली**; प्रा. **पिप्पली, पिप्परी**; कु. **पिप्ला**; आ. **पिपली**; बं. **पिंपुल्**; ओ. **पिप्पली**; हिं. **पिपल**; पं. **पिप्पला**; सिं. **पिपिरी**; गु. **पीपर**; द्रा. **पिरि** = मोठें; **पिप्पली** = पिंपळी.]

पिरक(णें) अक्रि. थोडें थोडें शौचास होणें. To have a scanty stool.

[सं. **अपि + रिच्** ७ विरेचने; अकाम. **पिळक(णें), पिळिक(णें)**–इतर रूपें होत.]

पिरग(गा)ळ(णें) सक्रि. पिळवटणें, मुरगाळणें. To twist, to wrench.

[सं. **परि + घूर्** (हिंसायाम्), किंवा **घूर्ण्** १ भ्रमणे; “ **पिर–गळ,-गाळ** ” आणि ‘ **मुर–गळ, मुर–गाळ** ’ हे दोन्ही धातु एकाच शब्दापासून आले असावेत. गळ, (गाळ) हा अवयव दोहोंत आहे. ‘ **पिर,** ’ आणि ‘ **मुर** ’ एवढाच फरक. हे शब्द अन्यभाषीय–कानडी तर नाहींत ना ?]

पिलूं,-ल्लूं न. प्राण्याचें लहान पोर, बच्चा. A young a cub.

[सं. **पिलुक**; पा. **पिल्लक**; अप. **पिल्ल**; देप्रा. **पीलुक, पिल्ह** (**डिंभ इत्यर्थेंदेशी**); प्रा. **पीलुअ** = बच्चा. प्राकृत भाषेंत हा द्राविडी भाषेंतून आला असावा, म्हणूनच देशी म्हणून तो निर्देशिला आहे. द्रा. ता. **पिल्लै**; तेल. **पिल्ल**; कान. **पिल्ले**; मलाया. **पिल्ले**; गु. **पीलो** = कळी; हिं. **पिल, पिल्ला**; बं. **पिळ**; सिंह. **पिलवा**. याकाम. **पिलूं, पिलें**; पेकाम. **पील** (पेद. १२); अकाम. **पिल्लूं, चिल्लींपिल्लीं.**]

व्याधापासौनि सुटलें । आंतु पक्षिणीचें पिलें. ऋपु. ३८५

पिवळा वि. रंगविशेष. Yellow.

[सं. **पीतल** < **पीत + ल**; पा. **पीतो, पीतको**; देप्रा. **पीवलं** पीतमिति पीतशब्दभवम् (२००,१३); प्रा. **पीअ, पीअल**; बं. **पिला**; हिं. **पीला**; पलां. **पीला**; सिं. **पिअरो, पीलो**; गु. **पीळूं.**]

पिशवी स्त्री. थैली, कोथळी. A purse or little bag.

पिशाच्च न. भूत. A devil, a fiend.

[*IE*. peig, peik; *Lat*. piget; *Lith*. paikas; *Got*. faih. सं. **पिशाच** (**पिशितम् अंचति**); द्रा. **पिण, पेणें, पेय, पियु**–त्रासदायक; **फी** = राग, क्रूर मनुष्य.]

पिशुन वि. दुष्ट, चुगलखोर. Slanderous.

[सं. **पिशुन**.]

पिष्ट न. पीठ, चूर्ण, बारीक पूड. Flour, powder.

[सं. **पिष्ट** (निष्ठा) √ **पिंष्** ७ अवयवे; **पिष्टपशु** (पिठाचा पशु, यज्ञीय पशूचें प्रतीक.)]

पिस(णें) सक्रि. दळणें, बारीक करणें, खालींवर करणें. To grind, to shuffle.

[*IE*. Peis, Pins; सं. **पिंष्** ७ अवयवे; *Gr*. Pis; *Lat*. Pis; *Lith*. Paisyti, Pesta (pestle); *Slav*. Pisa; *Ger*. Pesa (chaff); सं. **पिनष्टि**,

पिंशति ; पा. पिंशति ; प्रा. पिसइ ; का. पिहुन् ; आ. पिंहिब ; बं. पिसा ; हिं. पीसना ; पं. पिहना ; लां. पीहण ; सिं. पीहणु ; गु. पिसवूँ.]

पिसकार(णें) क्रि. अस्ताव्यस्त पसरणें, विखुरणें. To scatter.
[सं. अपिस्करणम्.]

पिसट(णें) क्रि. बिथरणें, वेड्यासारखें करणें. To lose one's wits.
[सं. पिशाचाविष्ट (नाधा.) ह्यांतील 'पिसा' हा शब्द संबद्ध आहे.]

पिस, पिस अ. मांजरास बोलावतांना उच्चारावयाचा शब्द. A sound uttered to call a cat.
[संताळी, ब्राहुई. पिशी = मांजर. मांजरासंबंधीं आपण बरेच शब्द " मनी, माऊ, मावशी वापरतों. ह्यांतील कांहीं ध्वनिशब्द आहेत. त्यांतील कांहीं आर्योद्भव भाषांत रूढ आहेत. नेपाळी भाषेंत मुनी, मनी, मंझी हे मांजर ह्या अर्थी शब्द आहेत. चिनी भाषेंत माऊ हा शब्द आहे. ब्राहुई ह्या द्राविडी भाषेंत पिशी हा शब्द आहे.]

पिसाळ(णें) अक्रि. वेड्यासारखें करणें, भ्रमणें, बिथरणें, वेड लागणें. To become rabid or mad, to lose one's wits.
[सं. पिशाच, पिशाचाविष्ट ; प्रा. पिसल्ल (पुं.) (नाधा.). पिसटणें पहा.]

पिसें न. वेडें, पिशाच्च, भूत, वेड, भ्रम, वेडेचार. Maddened,-mad condition.
[सं. पिशाच ; प्रा. पिसाय (पुं.), पिसल्ल ; अकाम. पिसा, पिसाळें = वेड ; वेडेपिसें.]

पिस्ता पुं. वनस्पतिविशेष व तिचें फळ. The pistachio nut.
[फा. पिस्ता.]

पिळ(णें) क्रि. वळणें, दाबणें, त्रास देणें, फिरवून घट्ट बसविणें. To twist, to wrench, to squeeze.
[सं. पीडय ; पा. पीळे , प्रा. पीडे, पीले ; अप. पीले ; आ. पिडिब ; बं. पिडा ; पं. पिडणा ; सिं. पीडणु ; गु. पीडवूँ, पीळवूँ ; अकामसा. पिंळा, पीळ, पीळू, पेळू, पिळवटणें, पिळंगुटणें, पिरगडणें.]

पिळ(ळं)गुट(णें) क्रि. पिळणें व फिरविणें. To twist, to contort.
[सं. पीड् १० हिंसायाम् + गुड १ वेष्टने ; द्विधातुसंयोग.]

पिळवट(णें) क्रि. पिळून काढणें. To squeeze, to twist.
[सं. पीड् १ वेष्टने ; द्विधातुसंयोग.]

पी, पिहा स्त्री. प्लीहा. The spleen.
[सं. प्लीहन्, प्लीहा ; प्रा. पिल्हिा ; बं. पिला ; ओ. पिल्हाइ ; बि. पिल्ही ; हिं. पिल्हा ; पं. पिहला (अंड) ; ने. फियो.]

पीक न. शेतांत तयार झालेलें धान्य. Crop.
[सं. पच्, पक्क.]

पीठ न. चूर्ण, भुगी. Flour, powder.
[*IE.* pis; सं. पिष्ट, √ पिष् ; *Av* pišant ; *Gr.* plisso; *Lat* pinso; *Umbr.* pistu; *Lith.* paisyti; सं. पिष्ट ; पाप्रा. पिट्ठ ; कु. पीठो ; आ. बं. ओ. पिठा ; बि. पीठा ; हिं. पीठा ; पं. पिठी (डाळीचें जेवण) ; लां. पीठा ; सिं. पीठो ; गु. पीठ ; ने. पिठो.]

पीठ न. आसन. A seat.
[सं. पीठ.]

पीडा स्त्री. त्रास, संकट, वेदना. Pain, anguish, trouble.
[सं. पीडा, √ पीड्.]

पीन वि. लठ्ठ, स्थूल. Fat, plump.
[सं. पीन.]

पीत,-त्त न. शरीरांतील एक द्रव्य (वात, पित्त कफ.) The bile.

[सं. पित्तम् ; पाप्रा. पित्तम् ; का. पंथ ; आ. पित् ; ओ पित (कडू) ; हिं. पित्त ; पं. पित्त ; सिं. पितु, पितो.]

पीनस न. फोड, फुटकुळी, सूज, वर आलेला भाग, ऊष्णतेच्या रोगांत तोंडावर उठणाऱ्या बारीक फुटकुळ्या. Purulent defluxion.
[*IE.* pei, pe = सुजणें ; सं. पी (पीवन, पीवर, पीवस्, इ.) ; *Gr.* pi; *Lat.* pi; *Lith.* puszis; *Gr.* tilyan; *Eng.* fat.]

पीप न. लाकडाचा हौद, मोठें भांडें. A cask or barrel.
[*Portu.* Pipa.]

पीयु(यू)ख न. अमृत. Nectar.
[सं. पीयूष.]

पीर पुं. मुसलमानाचें थडगें. A shrine (of Muhammadan saint).
[फा. **पीर**=मुसलमान साधु; **पीरजादा** = साधूचा वंशज.]

पील पुं. हत्ती. An elephant.
[पेल्हवी. **पील्**. हा मूळ असून त्याचें अरबीकरण झालें आहे. अरमाईक, खाल्डीयन–**पील** ; अर. **फील** ; फा. **पील** = हत्ती ; शिकाम. पेकाम. **पीलखाना** = हत्तीखाना.]

पीस न. लहान पंख. A feather.
[*IE*. Peisqo; *Cech*. Pisk; सं. **पक्ष** ; प्रा. **पिच्छ** ; ‘ पक्ष आणि पिच्छ ’ असे दोन्ही शब्द आढळतात ह्यावरून अनुमानें दोन : एक प्राकृत शब्दाचें संस्कृतीकरण झालें असावें किंवा संस्कृत शब्दाचें प्राकृतीकरण संस्कृतकाळींच सुरू झालें असावें.]

पीळ पुं. वळ, गुंडाळा, पिळणें पहा. A twist.

पुआल(णें) अक्रि. पळणें, धांवणें. To run.
[सं. **प्लु**, **प्लव** ; याकाम. **पुआळणें** = उड्या मारणें, पळणें.]

पुकार(णें) क्रि. ओरडणें, नांवानें हांक मारणें. To bawl unto.
[सं. **पूत्** + **कृ** ; प्रा. **पुक्कारइ**, **पुक्कारेइ** ; कु. **पुकार** ; हिं. पं. **पुकारना** ; सिं. **पुकारणु** ; गु. **पुकारवूँ** ; प्राकृतरूपावरून असें वाटतें कीं **पूत्–पुक** + **कृ** शब्दे असा मूळ संस्कृत धातु आहे. परंतु त्यामध्यें अर्थभेद उत्पन्न होतो. हांका मारतांना, ओरडतांना, ‘ **पुक्** ’ असा शब्द आपण करीत नाहीं. तो स्वाभाविक शब्दहि पण नाहीं. सं. १ **प्र** + **उत्** + **कॄत्** १० संशब्दने (रा). २ **पूत्करणम्** **फूत्करोति** वगैरे रूपें अनुक्रमें विक्रमांकदेवचरित् आणि सिंहासनद्वात्रिंशतिका ह्या ग्रंथांत आढळतात परंतु तें नंतरचें संस्कृतीकरण आहे. मूळ शब्द हिंदी असावा. हिंदीमध्यें फारसीमधून आला असावा.]

पुखा,-ख्खा पुं. जेवण, खाणें. Eating, a meal.
[सं. **पुष्**, **पूर्त** + **खाद्** (?); हिं. **पुख्खा**.]

पुंगी स्त्री. वाद्यविशेष. A sort of pipe.
[सं. (?); देप्रा. **पुग्ग** = एक वाद्य (?).]

पुचक(णें) क्रि. एदकम बंद पडणें, मरणें (ल.). To stop all of a sudden, to die (fig.).
[सं. **प्युस्** + क–स्वार्थें प्रत्यय; **उपस्कृ** (पूतिगंध येणें) उदा. दहीं **पुचकलें** (रा.).]

पुची,-च्ची,-च्चा स्त्री.पुं. स्त्रीयोनि, मायांग, उत्पत्तिस्थान. The female organ.
[सं. **स्फिचौ**, **स्फिजौ**, **स्फिज्ञी** (ढुंगण), **स्फ्यः** = Broad wooden instrument, ‘ **स्फिज्य** ’ पासून उत्पन्न झालेले हे शब्द आहेत. २ सं. **पोस** ; प्रा. **पोस** (**अपानदेश, गुद, योनि**); देप्रा. **पुत्तरे योनौ** (सं. क्षि. ४७.); शीना. **स्पिझ्** ; सिं. **फीजु** = 1 Horse’s pastern, 2 Mare’s urinal parts. ह्यांतील सिंधी शब्द महत्त्वाचा आहे. त्यापासून मराठी स्त्रीयोनिदर्शक शब्द आलेला दिसतो. हा शब्द शरीरावयववाचक आहे व इतर अवयववाचक शब्दांप्रमाणें हा द्राविडोद्भव असणें शक्य आहे. पुढील द्राविड शब्द एतत्संबद्ध म्हणून उल्लेखनीय आहेत. कान. **पुकळी–पुकु** = स्त्रियांचें जननेंद्रिय, √ पुगु = शिरणें, आंत जाणें. तेलगु. **पुच्ची** = Anus.]

पुच्छ न. शेंपूट. A tail.
[*IE*. Puq, Peuq; सं. **पुच्छ** (**पिच्छ**, **पश्चात्** (?)); *Av*. Pusa (Fem.); = diadem ; *Aisl*. Foa.]

पुज(णें) सक्रि. पूजा करणें, आदरणें. To worship, to adore.
[सं. **पूज्** १० पूजायाम् ; अकामसा. **पुजा** (अर्चा), **पुजारी** (पूजा करणारा).]

पुञ्ज पुं. समूह, ढीग, राशि, तुरा, झुबका. A stock, a heap, a fund, a bunch.
[सं. **पुञ्ज** ; पा. **पुञ्जो** ; प्रा. **पुञ्ज** ; कु. **पुंजी** ; ओ. **पुंजी** ; हिं. गु. **पुंजो** ; याकाम. **पुञ्ज** (राशि, ज्ञा. १६-९), = समुदाय (ज्ञा. १८-३५४); **पुञ्जाळणें** (ज्ञा. ६-२०३); अकाम. **पुंजी**, **पुंजका**, **पुंजा** (शेणाचा ढीग), **पुंजाळ** (ढीग सांचलेला).]

पुट न. लेप, वर्तुळ(अर्ध), भोंक. An application, concavity, a hole.
[सं. **पुट** ; याकाम. **पुट** = मूस (ज्ञा. १३-२२८), = पाठ, = पुडा (ज्ञा. ६–२२५).]

पुट(णें) क्रि. प्रकाशणें, घांसणें, उसळणें. To illumine, to whet, to rise up.
[सं. **स्फुट्** ६ स्फोटने ; याकाम. **पुटणें** = प्रकाशणें (महानु.).]

पु(फु)टकुळी स्त्री. पुळी, लहान फोड. A pustule, a pimple.
[सं. **पीटिका**, हा शब्द नंतरचें संस्कृतीकरण आहे. **स्फोटिका** + **ळी** (अल्पार्थें प्रत्यय), **स्फोटकलिका**. तूलना

करा–कान. **पोडकुळी, पोदकुली** = दु:ख, वेदना ; ह्यापासून **बेडकुळी** (= मांडी, पिंडरी, दंड वगैरे दाबून गोळा निघतो व जी वेदना होते ती) हा शब्द निघाला.]

पुटपुट(णें) क्रि. अस्पष्ट बोलणें, वडवडणें, कुरकुरणें (ल.). To utter or speak indistinctly.
[सं. पुट् १० भाषार्थः ; पुटपुट (बडबड).]

पुठा,–ठ्ठा पुं. मागील ढुंगणाचा भाग, कुल्ला, वही किंवा पुस्तक याचें वेष्टण. A buttock, a cover.
[सं. पृष्ठ ; प्रा. पुट्ठ.]

पुंडा पुं. विड्याचीं पानें वगैरे ठेवण्याची करंडी, करंडक. A bundle or packet.
[सं. पुट, पुटक ; देप्रा. पुडइअं, पुण्डइअं, पिण्डीकृतम् (२०१-१५) ; प्रा. पुड, पुडअ ; आ. पुडिआ ; ओ. हिं. पं. पुडा ; सिं. पुडो ; गु. पुडो, पडो ; ने. पुरा ; अकाम. पुडा, पुडी (स्त्री).]

पुंडा पुं. कागदाची गांठोडी. A bundle or packet.
[सं. पुट, पूल ; प्रा. पुड, पूल (आवरण); का. पुल (गवत); कु. पुलो ; बं. पुला ; ओ. पुळा (पसा); हिं. पं. पूळा ; गु. पुळो. टर्नर ह्यानें पुढील शब्द ह्याच शब्दापासून व्युत्पादिले आहेत. पुरा, पुडा, पुडी (संन्याशाचें जेवण) हे शब्द भिन्न व्युत्पत्तीचे आहेत. पहा–पुडी (पूर्ति); पुडा (पूलकः).]

पुंडी स्त्री. संन्याशाचें भोजन. A term for the meal of a sanyasi.
[सं. पूर्ति.]

पुंडी, पूड चूर्ण भुकी. Powder.
[कान. पुडी ; तामी. पोटी ; तेलगु. व तुलु. पोडी ; परंतु हा द्राविड तद्भव आहे.]

पुंडी स्त्री. कागदाची गांठ, गठडी. A small bundle.
[सं. पुटिका (< पुट) ; प्रा. पुडिया.]

पुंड वि. बलिष्ठ, तरुण, बंडखोर, उद्दाम, दांडगा. Strong, refractory, turbulent.
[सं. पुंगंड ; देप्रा. पुअंडो (तरुणः) ; पोअण्डः (मुक्तभयः) ; संस्कृत शब्दांतील '**गंड**' शब्द द्राविडी आहे. परंतु त्याचें संस्कृतीकरण बऱ्याच प्राचीन काळीं झालें ; कारण प्राकृतमधील **पुअंड** हा शब्द '**पुंगंड**' पासून आला आहे.]

पुण्य न. सत्याचरणाचें फळ, दैवीसंपत्. Religious merit.
[*IE.* Peu, pu ; सं. पूनाति, पुवति, पुण्यम्.]

पुतण्या पुं. (पुरुषाच्या) भावाचा किंवा (स्त्रीच्या) दिराचा मुलगा. Brother's son, or (in the case of a woman) husband's brother's son.
[सं. पुत्रान्यक.]

पुतळी स्त्री. बाहुली. A doll, a puppet.
[सं. पुत्रक, पुत्री, पुत्रिका, पुत्तलिका ; प्रा. पुत्तलिआ ; कु. पतली (भावली, पांखरूं); आ. पुतली ; बं. पुत्‌ला ; ओ पुतळी ; बि. हिं. पं. पुत्‌ली ; गु. पुतळी ; अकाम. पुतळा (सं. पुत्रलकः ; प्रा. पुत्तलअ ; कु. पुतलो ; आ. पुत्‌ला ; बं. पुतुल् ; बि. हिं. पं. पुत्‌ला ; गु. पुतळू.)]

पुत्र पुं. मुलगा, आत्मज. A son.
[*IE.* Peu, Pu = to generate ; सं. पुत्र, √पू ९ पवने ; *Gr.* Pav ; *Lat.* Pov, pu, puer = boy ; *Av.* Pu, (puthras); *Slav.* Puta = a young bird ; *Teu.* Fula ; *Ger.* Fohlen ; **पुंनाम नरकात् त्रायते इति पुत्रः** अशी एक व्युत्पत्ति परंपरेनें दिली जाते ; परंतु इतर भाषांतील शब्दांशीं ताडून पाहिली असतां ही पारंपरिक व्युत्पत्ति पटत नाहीं. (सं. पोत, पुमान्); अकाम. पूत पहा.]

पुद(दा)ड(णें) सक्रि. मारणें, ओबडधोबड वापरणें. To beat, to treat violently.
[सं. पुथ् १ क्लेशने + दल् १ विशरणे ; अकाम. पुदल, पुदळ, पुदाड, पुदाल, पुदाळ–पुदाडा (अव्यवस्थित वापर).]

पुदि(दी)ना(णा) पुं. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[फा. पूदिना ; हिं. पोदिना ; बं. पुदिना ; सिं. फुदिनो ; गु. फोदिना.]

पुन अ. पुन्हा, पण. Again, but.
[सं. पुनः ; याकाम. पुन = परंतु, पण (नरुस्व. ६१), पुनति, पुनः पुनर् (पुष्कळ सामासिक शब्दाच्या आरंभीं हा शब्द येतो); अकाम. पुनः, पुन्हा.]

पुंन(नी)व–पुन्यो स्त्री. पूर्णिमा. The full-Moon day.
[सं. पूर्णिमा ; पा. पुण्णमा ; प्रा. पुण्णिवाँ ; अप. पुण्णिवँ ; कु. पुन्यूँ ; सिं. पुनाइँ ; पुनाऊँ ; हिं. पुन्यों ;

पं. **पुन्निओं** ; गु. **पुनम्** ; याकाम. **पुनव** (शा. १८-४९६); अकाम. ग्रा. **पुनव**.]

पुंनव पुं. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **पुंनाग** ; प्रा. **पुण्णाअ, पुण्णाम** ; पुं. **पुन्ना** ; याकाम. **पुंनाग** (नरुस्व. ८१४).]

पुंर(णें) सक्रि. भरणें, पुरें पडणें, पूर्ण करणें. To fill in, to satisfy or gratify in full.
[*IE.* Pre, Pr ; सं. पृ, पॄ (**पूरयति, प्राण, पुरु, पूर्णः**); *Av.* Per, fre ; *Gr.* Plr; *Lith.* Pil, plu; *Slav.* Pluku, (= crowd); *Goth.* Ful, fil, tol; *Ger.* Fullyan, fullan; *Eng.* Fulfil. सर्व आर्योद्भव हिंदी भाषांत **पुर** हेंच रूप आढळतें. **पुरणें** = पूर्ण होणें (शा. १८-४७०) = संपणें, बंद होणें (ज्ञा. १८-९६५), **पुरता** (ज्ञा. १५-४९२).]

पुंर(णें) सक्रि. गाडणें, जमिनींत ठेवणें. To bury, to inter.
[सं. **पूरयति** ; पा. **पूरेति** ; प्रा. **पूरइ** ; का. **पूरुन्** ; आ. **पुरिब्** ; हिं. पं. **पूरना** ; लां. **पूरण** ; सिं. **पूरणू** ; गु. **पूरवूँ** ; ने. **पुर्नु**. २ सं. **पॄ** ९ पूरणे ; **पूर्व्** १ हिंसायाम् (राज.).]

पुर-पूर न. शहर, नगर. A city.
[सं. **पुरम्** ; **पूर्व्** १० निकेतने ; अकाम. **पुरी** (नगरी); **पुरी** (शहरांतील वस्तीचा भाग).]

पुरचुंडी स्त्री. लहान गांठोडी, पुडी. A small bundle, a small quantity.
[सं. **पुर** = चुडा.]

पुरण न. शिजलेली डाळ व गुळ ह्यांचा पदार्थ. Pulse boiled and mixed with jogree.
[सं. **पूर्णान्न** (?); **पूरण** (?); कान. **हूरण होळगी** (?).]

पुरभय्या पुं. परदेशी, हिंदुस्थानी मनुष्य. A caste (Hindu) and an individual of it.
[सं. **पूर्व** ; **पूर्वीयः, पूर्वदेशीयः** ; हिं. **पुरबीया** ; **भय्या** < **भ्रातृ** ह्याच्याशीं संबंध नाहीं का ?]

पुरव(वि)(णें) सक्रि. देणें, व्यापणें, पत्करणें. Supply or provide to the full, to accept.
[सं. **पॄ** ३ पूरणे, **पुर्** ६ तृप्तौ, **पृ** ५ प्रीतौ (रा.); अकाम. **पुरवठा** ; **पुरवणी** (जोड, समृद्धि); **पुरवणूक**.]

पुरशीस स्त्री. चौकशी, मुख्य तपासणी, विचारपूस. Questioning, examination, inquiry.
[फा. **पुर्सिदन्** = विचारणें, **पुर्सिश्** ; पेकाम. **पुर्सिसा** (खरे १०-५०२९).]

पुरः,-स् अ. पुढें. Before, in front of.
[सं. **पुरः** ; संसा. **पुरश्चरण** (जप, पाठ.); **पुरस्कार** (पुष्टि, साहाय्य, पक्षपात); **पुरस्सर** (मुख्य पुढारी); **पुरोहित** (उपाध्या,–**पुरः हितः** √ **धा**.)]

पुरळ स्त्री. बारीक फोड, फुटकुळी, लहान लहान फोड. A pustule or pimple.
[कान. **पुरे** = फोड, खांडुक ; सं. **पूलक** (?).]

पुरा वि. पूर्ण, संपूर्ण, आख्खा. Complete, entire, perfect.
[सं. **पूरकः** ; पा. **पूरो, पूरको** ; प्रा. **पुर, पुरअ** ; कु. **पुरो** ; आ. **पुर्** ; बं. ओ. **पुरा** ; हिं. पं. लां. **पूरा** ; सिं. **पूरो** ; गु. **पूरो**.]

पुराण न. जुन्या कथा, जुनें वाङ्मय,–ग्रंथ,–इतिहास. An old sacred poetical work.
[सं. **पुराणम्**.]

पुराणा वि. जुना, पूर्वींचा. Old, ancient.
[सं. **पुराणः, पुरातन** ; पा. **पुराणो** ; प्रा. **पुराण** ; का. **प्रोणु** ; आ. **पुरणा** ; बं. **पुरान** ; ओ. **पुरुणा** ; हिं. **पुराना** ; लां. **पुराण** (नदीची बाजू); सिं. **पुराणो** ; गु. **पुराणूँ** ; ने. **पुरानु** ; याकाम. **पुराणें** (ज्ञा. १५-२५).]

पुरावा पुं. प्रमाण, साह्य, पुरवठा, आधार. Evidence, proof, help.
[सं. **पृ** ; परंतु हा शब्द अन्यभाषीय असावा.]

पुरी स्त्री. कणिकेची लहान तळलेली पोळी. A small wheat cake (fried).
[सं. **पूरकः, पूरिका** ; प्रा. **पूर** ; का. **पूरु** ; ओ. **पुरी** ; बि. हिं. सिं. **पूरी** ; गु. **पुरी** ; हिं. **पुरा** ; गु. **पुडो** ; कान. **पुरी** ; ' **अपूपः** ' शब्दाशीं कांहीं संबंध आहे कां ? याकाम. **पुरी** = पूर्ण (ज्ञा. १८–१०४०).]

पुरुष पुं. मानवजातींतील पूंस्त्वदर्शक प्राणी, सृष्टीचा निर्माता. Man, adult, the Creator.
[सं. **पुरि–देहे शेते-देहांत ज्याचें अधिष्ठान आहे तो पुरुष-आत्मा** अशी एक व्युत्पत्ति आहे. हा शब्द वेदामध्यें वापरला आहे ; तेथें पुरुष अथवा स्त्री अशा दोन्ही अर्थांनीं हा **रूढ** आहे. त्याचा अर्थ नुसता-

मानवप्राणी असा आहे (**यं जीवमश्नवामहे न स रिष्यति पूरुषः** १०-९७-१७); पा. **पोस, पुरीस, पोरिस** ; याकाम. **पुरुख** (ज्ञा. १४-७६), **पुरुष** (ज्ञा. १६-४५९); वरील व्युत्पत्ति वेदान्तांतील आहे. पुढील व्युत्पत्ति चिन्त्य आहे. सं. **पु+वृष्**. हा शब्द वैदिक भाषेंत आढळतो.]

पुर्जा पुं. कागदाचा तुकडा, पत्र, लिखित. A piece of paper, a decument, a letter.
[फा. **पुरजा**.]

पुला पुं. गवताचा पेंढा, गड्डा. A bundle (of grass).
[सं. **पूल् १** संयोगे ; प्रा. **पोल्लअ** ; गु. हिं. **पुला** ; पं. **पूला** ; याकाम. **पुवाळणें** = घोड्याला चारा घालून शांत करणें.]

पुलाव पुं. भाताचा एक प्रकार (मांस आणि भात याचें मिश्रण). A kind of rice (spiced and mixed with meat).
[फा. **पुलाओ, पिलाव** ; सं. **पुलाक** ?; परंतु संस्कृतीकरण नंतरचें.]

पुलेज(णें) क्रि. पूं वाहणें, पुंवानें भरणें. To run with purulent matter, to fill with pus.
[सं. **पूय्** (दुर्गंधे) + **रिच् ७** रेचने (रा.), द्विधातुसंयोग ; अकाम. **पुलेणें, पुवळणें, पुवारणें** हे सर्व **पूय्**–दुर्गंधे पासून व्युत्पाद्य आहेत.).]

पुंल्लिंग न. पुरुषत्वाचा बोध करणारें चिन्ह. The masculine gender.
[सं. **पुँ + लिंग**.]

पुवा पुं. एक मऊ सुग्रास अन्न-(माल) पुवा. A sort of sweetmeat.
[सं. **अपूपः, पूपः** (महाभा.); पा. **पूवो, पूपो** ; प्रा. **पूअ** ; **पूअल** ; कु. **पुवा** ; हिं. **पू, पूआ** ; गु. **पुवो** ; ने. **पुवा** ; सिंह. **पुव**, पू. (शेणाचा) **पूं** हा शब्द निराळा आहे.]

पुवाळ(णें) क्रि. चुचकारणें, शांत करणें (घोडा). To pat.
[म. **पुल्हो** (नाथा.), **पुला** = गवताचा गड्डा ; याकाम. **पुवाळणें** = गवत घालून घोड्यास शांत करणें ; **पुला** पहा.]

पुष्कळ वि. विपुल, रगड, मोठें, फार. Much, many, abundant.
[सं. **पुष्कल**.]

पुष्टि, पुष्टाई स्त्री. पोषण, खाणेंपिणें. Nourishment.
[सं. **पुष् ९** पोषणे ; **पुष्ट** (निष्ठा) + **ई** (मराठी प्रत्यय), **पुष्टिक–पौष्टिक** = शक्तिवर्धक].

पुष्प न. फूल. A flower.
[सं. **पुष्प** ; अकामसा. **पुष्पवर्षाव** (फुलांची वृष्टि), **पुष्पाळी** (फुलांची ओळ).]

पुंस न. शेंपूट, पुच्छ. A tail, a feather.
[सं. **पुच्छ** ; प्रा. **पुस्स, पुछ्छ** ; याकाम. **पुंस** (ज्ञा. १३–२३४); शिकाम. **पुंस** (तु. अ.)]
पुंस नाहीं पादचारी । मनुष्य परि कुतरीं तीं ॥ तु. अ.

पुंस(णें) सक्रि. विचारणें, प्रश्न करणें. To ask, to interrogate.
[*IE*. Prek ; सं. **प्रच्छ्, पृच्छ्** ; प्रा. **पस्स** ; **पुच्छइ** ; *Av*. Perc ; *Lat*. Prec, proc ; *Lith*. Praszau ; *Ger*. Fragen. सं. **प्रच्छ्, पृच्छ्** ; पा. **पुच्छ** ; प्रा. **पुच्छ** ; अप. **पुच्छ** ; देप्रा. **पूस–प्रच्छधात्वर्थे** ; का. **पिच्छुन्** ; कु. **पूछाणो** ; आ. **पोसिब** ; व. **पुच्छा** ; ओ. **पुच्छिबा** ; हिं. **पूछना, पुच्छणा** ; सिं. **पुचणू** ; गु. **पूछवुँ** ; याकाम. **पुसणें** (नरुस्व. ६१९) **पुसी** = **पृच्छा** (ज्ञा.).]

पुंस(णें) सक्रि. धुवून काढणें, स्वच्छ करणें. To wipe, to cleanse.
[सं. **प्रोञ्छ्, प्रोच्छ्** (बौ. सं.) ; पा. **पुञ्छ** ; प्रा. **पुच्छ** ; दे. **पुछइ, पुंछई, पुंसइ, पुसइ** ; बं **पूँछा** ; ओ. **पोंछिबा** ; हिं. **पोछना** ; पं. **पूझणा** ; लां. **पूझण** ; गु. **पूछवूं** ; ने. **पुछनु**.]

पुसवणें न. उपचार, उपाय. A remedy.
[**पुसणें** ह्या धातुचें णिच् रूप ; याकाम. **पुसवणें**(महानु.).]

पुंसा पुं. पक्षी, पोपट. A bird, a parrot.
[सं. **पक्षिन्** ; प्रा. **पच्छी, पक्खी** ; याकाम. **पुंसा** (ज्ञा. ११-१७); शिकाम. **पुंसा** (तु. अ.); अकाम. **पीस** (**पंख**).]
शिकविता तैसा पढों जाणे पुंसा ॥ (तु. अ.)

पुंस्त स्त्री. पाठ, पिछाडी. The back, the hinder part.
[फा. **पुश्त** ; पेकाम. **पुस्तपुन्हा** (**पाठपुरावा** खरे ८–४११९) **पुश्त् + पनाह्**, **पुस्तवानी** (मदत),

पुस्तगर्मी. शब्दकोशकारांचा ह्या शब्दाबाबत घोटाळा झाला आहे. त्यांनीं **पुस्तपन्हा, पुस्तवानी** हे शब्द **पुस्त**= पिढी, वंश, ह्या शब्दाशीं संबंद्ध केले आहेत. त्यांचा संबध पुश्त=पाठ ह्याशीं आहे.]

पुस्त, पुश्त न. पिढी. A generation.
[फा. पुश्त्; पेकाम. **पुस्तापासोन** (राज. २२·७५); **पुस्तदरपुस्त** (रा. १५-४८३).]

पुस्तक न. ग्रंथ, चोपडी. A book.
[द्रा. पुसु, पुस्त=घांसणें>, चोंपडणें>, माखणें>, लिहिणें>, हस्तलेख>, पोथी असा अर्थ निष्पन्न झाला; सं. पुस्तक हें संस्कृतीकरण नंतरचें.]

पुस्ती स्त्री. (मुलांच्या) अक्षराचा नमुना, जोड, पुरवणी, ठिगळ. A specimen of boy's writing, a suppliment, a patch.
[फा. **पुश्त, पुश्ती**; सं. **पृष्ठ** (?).]

पुहपकी स्त्री. माळीण, फुलें देणारीं स्त्री. (A woman) selling flowers.
[सं. **पुष्प+की**; याकाम. **पुहपकी** (महानु).]

पुळक(णें) क्रि. थोडें व पातळ शौचास होणें. To have a running stool.
[सं. **पुरीष** (नाधा.) > **पुलीस** > **पुळक.**]

पुळका पुं. आवेश, इसाळा. Force, energy.
[सं. १ **पुलकः**=रोमांच (भय–आनंद–शीत वगैरेंनें) आलेला कांटा; २ **पुलिका** (पुळी); परंतु पहिलीच व्युत्पत्ति ग्राह्य. लिंग पुंल्लिंगच राहिलें आहे. याकाम. **पुळा, पुळी, पुळका, पुळुक** (महानु); हे सर्व सं. **पुलक**=रोमांच, भीतिदर्शक शरीरविकार, ह्या शब्दापासून आले आहेत.]

पुळचट वि. नेभळा, भित्रा, खुळचट. Timid, imbecile, silly.
[सं. **पुलकः**; ह्यांत '**चट**' हा प्रत्यय आहे. '**भेणचट**'=भेणानें पूर्ण, तसें 'पुळा'नें पूर्ण, असा ह्याचा अर्थ आहे '**पुळ**' म्हणजे काय ? संस्कृत '**पुलक**'=रोमांच ह्यापासून वरील शब्द आला आहे कां ? **पुळपुळीत, पुळपुळा** ह्याहि विशेषणांचा तोच अर्थ आहे.]

पुळी स्त्री. लहान फोड. A pustule.
[सं. **पुलः, पुलकः, पुलिका**; *Lett.* Pulis, pule; *Lith.* Pukne; सं. **पुलिका**; देप्रा. **फुल्ल**; प्रा. **पुल(पुं.)**; याकाम. **पुलिका**=काळजी, ठिणगी, राशि (शा. ६-२४६, अमृ २-५१).]

पूं पुं. शेणाचा ढीग, विष्टेचा ढीग. A heap (of stools).
[*IE.* Peu, pv (foul); सं. **पू (पूतः, पूर्ति, पूय)**; *Av.* pu; *Gr.* pu; *Lat.* pu (putere); *Lith.* puvu, putas (foul); *Got.* fuls; *Ger.* ful, faul; देप्रा. **पोद्द(पुं)**; गु. कच्छी, **पोह्.**]

पूं पुं. जखमेंत सांठणारा किंवा जखमेंतून वाहणारा पांढरा द्रव पदार्थ. Pus.
[सं. **पूय**; देप्रा. **पोद्द**; बं. **पूया, पूंज**; सिं. **पूनी** (स्त्री.); १ **पूं** पहा.]

पूज(णें) क्रि. पुजा करणें, स्तवन करणें. To worship, to pray, to adore.
[सं. **पूज्** १० पूजायाम्; संसा. **पूजक**; **पूजा**; **पूज्य**; **पूजन.**]

पूड स्त्री. चूर्ण, पीठ. Powder.
[१ सं. **पुड्** १ दळणें, चूर्ण करणें; २ कान. **पुडि, पुडी** (=गठडी) हा शब्द निराळा; **पुडा** पहा.].

पूत पुं. मुलगा, पुत्र. A son, a boy.
[सं. **पुत्र**, √पू ९ पवने; कान. **पुदु**=जन्मणें; तेलगु. **पुय्**=होणें, असणें; **पोदळ**=जन्मलेला; अशी व्युत्पत्ति डॉ. गुण्डर्ट ह्यानें दिली आहे. परंतु द्राविडी भाषांतील वरील शब्द हे तद्भव दिसतात. ' '**पुं नाम नरकात् त्रायते इति पुत्रः**' अशी व्युत्पत्ति देतात ती पारंपरिक आहे. व ती इतर भाषांतील मूळ धातूकडे पाहिलें असतां शास्त्रीय वाटत नाहीं. सं. **पुत्र**; पाप्रा. **पुत्त**; का. **पोथर्**; पपं. **पुटळ**; पं. **पुत्त, पुत्तर**; लां. **पुत्तुर**; आ. बं. **पुत्**; कु. **पूत्**; ओ. **पुत**; हिं. **पूत्**; सिं **पुट्टरु**; गु. **पुत्र, पुत**; का. **पूत्(तु)**= कोंबडीचें पिलूं. **पुत्र** पहा.]

पूत वि. पवित्र, शुद्ध केलेला. Pure, purified.
[सं. **पू** ९ शोधने.]

पूतिः पुं. दुर्गंध. Bad odour.
[सं. **पू (पूयति, पूतः, पूति)**; इं. **पु. जु. फा. पूदिन, पूदिना.**]

पू(पो)पी स्त्री. रव्याची लहान पोळी. A small wheaten cake.
[सं. **अपूप, पूपिका, अपूपिका.**]

पूर न. नगर. A town.
[*IE.* Puro; सं. **पूर्व, पूर** √**पृ**; *Gr.* Puros; *Lith.* Purai; *Cech.* Pyr; *Russ.* Pyrej; *Lat.* Polis=City.]

पूर पुं. पाण्याचा लोंढा, पाण्याचा ओघ. Floods.
[कान. **पूरी, पुण्ड्=**नदी ; द्रा. **पुर, पॉनल, पोले** ; सं. पॄ पूरणे (?); याकाम. **पूर**=अथांग पाण्याचा तुंब (नरुस्व. ४७२).]

पूर्तकाल पुं. पूर्तुगाल देश. Portugal.
[*Portu.* Portugal; पेकाम. **पूर्तकाल**, Portugese > **पूर्तकेश.**)]

पूर्व वि. पहिला, आद्य, पूर्वदिशेकडील, प्राचीन. The first, former, eastern, ancient.
[**सं. पूर्व** हा शब्द मराठींत दिशावाचक सूर्योदयाची दिशा ह्या अर्थानें रूढ आहे. पहिली दिशा हा संकेत त्याच्या मुळाशीं असावा. संसा. **पूर्वजन्म, पूर्वज**, पूर्वपुण्य, **पूर्वपीठिका, पूर्ववृत्त, पूर्वस्थिति, पूर्वील, पूर्वस्थल; पूर्वपक्ष** इत्यादि ; अकामसा. **पूर्वीं** (सं. **पूर्वे, पूर्वस्मिन्**).]

पूर्वीं अ. मागें, प्राचीन काळीं. Before, in ancient times.
[**सं. पूर्व** (सप्तमी ए. व. **पूर्वस्मिन्.**) ; प्रा. **पुव्वम्मी** ; अप. **पूव्वइं.**]

पूल पुं. नदीवरून जाण्याचा रस्ता, दादर, सेतु. A bridge, a ford.
[फा. **पूल्, पुल्**; गु. **पूल** ; पं. हिं. **पल** ; हिं. **पुलि**(स्त्री).]

पूस पुं. मासविशेष. The month Paush, the tenth month in Hindu calendar.
[सं. **पुष्यः** प्रा. **पुस्स** ; का. **पोह्, पुह्**; कु. **पूस्** ; आ. **पुह्** ; ओ. **पुस** ; हिं. **पुस्** ; ओ. **पूष्ट** ; गु. **पोस, पोष**; सिं. **पोहु** ; प. **पोह.**]

पृथक् वि. निराळें. Separate, different.
[*IE.* Pleth, Preth; सं. **प्रथ्, प्रथः**=विस्तीर्ण (पृथ्वी); *Av.* Frath; *Gr.* Plat; *Lat.* Plat; *Lith.* Platus; *Ger.* Flaz: *Sax.* Flint.]

पृथ्वी स्त्री. जग, जमीन, इहलोक. The Earth.
[*IE.* Pret, Plet; सं. **प्रथ्** (**प्रथस्; पृथु**); *Av.* Perethu; Perethwi (पृथ्वी); *Gr,* Plataia.]

पृष्ठ न. पाठ, वरील भाग,–अवयव. The back, the upper or outer part.
[सं. **पृष्ठ√पृष्**; संसा. **पृष्ठदेश, पृष्ठभाग, पृष्ठमात्रा, पृष्ठवंश** (पाठीचा कणा).] :

'पेक(ख)(णें) सक्रि. पहाणें. To look for, to attend the coming of, to await.
[सं. **प्रेक्ष्** ; **पेक्खति** ; प्रा. **पेक्खई** ; ओ. **पेखिन्दि** ; हिं. **पेखना** ; पं. **पेखणा** ; गु. **पेखवूं** ; **पेकणें** दोन्ही पहा.]

'पेक(णें) अक्रि. नाचणें. To dance.
[सं. **प्रेंख्** ; प्रा. **प्रेंखा**=हलणें, झोंके घेणें ; याकाम. **पेखगेंकार**=नर्तक, गणिका (नरूस्व. ४७९).]

पे(पें)क(का)ट न. पाठीखालील मागचा भाग. The loins.
[सं. **अप+कटि** (?); द्राविडमूळ (?); असाच एक दुसरा शब्द साधला आहे. उदा. **उदर > अपोदर** (फोदर) =उदराचा भाग (विशेषतः स्त्रियांचा), खालची ओटी ; हा शब्द वैदिक वाङ्मयांत वापरला आहे. त्यावरील रोमराजीचा उल्लेख आहे.]

पेख(णें) क्रि. पेकणें पहा.

पेंग(णें) क्रि. डुलकी घेणें, झोपेंत डुलणें. To nod.
[सं. **प्र+इंग्** १ गतौ ; **पेंग्** असा वैदिक धातु मॅक्डोनेल देतो. अकामसा. **पेंगळणें, पेंगुळणें** (सं. **प्र+इंग्+ग्लै**).]

पे(पें)च पुं. डाव, लपेट, वेढा, त्रास, पंचाईत. An artful turn or twist, a trouble.
[सं. **पिज्** १० तोदने ; **पिच्छ्** १ द्रुत्याघाते ; फा. **पेच** ; अकामसा. **पेचपाच** (=डावपेच–दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

पे(पें)च(णें) क्रि. पिळणें, गोंधळणें, संकटांत पकडणें. To twist, to turn round, to perplex.
[सं. **पिज्** १० तोदने ; **प्र+यम्** (यच्छ्) १ नियमने ; **पेच** (डाव, संकट); **पेचाटी** (अडचण, संकट).]

पेज स्त्री. भातावरील पाणी, कांजी. Rice-gruel.
[सं. **पेय, पेय्य** (वौ. सं.); **√पा**; प्रा. **पेज्ज** ; सिं. हिं. **पेज** ; याकाम. **पेजें** (नपुं.)=दूध.]

पेट न. शरीरावयव, उदर, पेटी. The belly, the stomoch, a box or chest.
[सं. **पीटकम्** ; प्रा. **पेट्ट, पिट्ट, पोट्ट, पुट्ट** ; देप्रा. **पेट्ट**; पंपं. **पेट** ; कु. आ. बं. **पेट्** ; ओ. **पेट** ; हिं. पं. **पेट्** ; सिं. **पेटु** ; गु. **पेट्. पोट** ह्या अर्थी **पेट** हा शब्द द्राविडी असावा ; '**पीटकम्**' पासून नाहीं. प्राकृत **पोट्ट, पुट्ट** अशीं रूपें आहेत. परंतु तीहि मूळ द्राविडीवरून घेतलीं असावींत.]

पेट(णें) क्रि. जळणें, चेतणें. To kindle, to ignite.
[सं. **प्र+इंध्** ७ दीप्तौ ; अकामसा. **पेटणी** (चेतणें); **पेटवा** (आग); **पेटवण** (पेटविण्याचें कस्तन).]

पेट स्त्री. दुकानाची रांग, पेठ पहा. A row of shops.

पेटका पुं. गात्रसंकोच, बेडकी, वळ. Cramp, spasm.
[सं. **पिट्** (?); हिं. **पेटका.**]

पेटारा पुं. मोठी पेटी, बांबूची मोठी पेटी. A big box, a covered basket of bamboo.
[सं. **पेटक** ; **पेटिका** (पेटी) ; **पेटी** पहा.]

पेटी स्त्री. लाकडाची पेटी, लहान पेटारा. A box, a chest.
[ते. **पेट्टु** ; तामी. **पोड्डु** = ठेवणें, धरणें, सोडणें ; सं. **पेटिका** (उत्तरकालीन संस्कृतीकरण) ; प्रा. **पेडा** ; गु. सिं. पं. हिं. **पेटी** ; पं. **पेटिया** ; **पेडा** = प्रवासाची पेटी ; सिंह. **पेली.**]

पेठ स्त्री. बाजार, बाजारांतील दुकानाची रांग, बाजारमार्ग. A place of sale, long street of shops.
[सं. **पीठ** = स्थान, प्रतिष्ठा, **प्रविष्ट** ; पा. **पविट्ठ** ; प्रा. **पविट्ठ, पैट्ठ** ; देप्रा. **पइट्ठो मार्गः** (२१६-३) : याकाम. **पैठ** = व्यापाराची जागा, वसतिस्थान (ऋपू. ६८, नरुस्व. ४७७) ; द्रा. **पॅटे** = बाजार ; **पेट** पहा.]

१पेड पुं. वळ, पदर, एकेरी दोर. A strand, a single string.
[कान. **पिडी.**]

२पेड न. मैदान, पठार. *A maidan.*
[सं. **पदम्** ; पा. **पदं** ; प्रा. **पय, पअ** ; **पद्ड, पेड** (पाय).]

पेढा पुं. दुधाच्या खव्याचा साखर मिसळून केलेला पदार्थ. A sweet-meat composed of inspissated milk.
[सं. **पिष्ट** ; प्रा. **पिट्ठ, पिड्ढ** ; किंवा सं. **पिण्ड** ; हिं. **पेंढा.**]

पेढी स्त्री. दुकानांतील बसावयाची जागा. The seat of a shroff.
[सं **पीठम्** = आसन ; प्रा. **पेढ** ; गु. **पेढी.**]

१पेणें न. सामान, माल, व्यापारी जिन्नस. Article of merchandise.
[*IE*. Per, = संकोचने (ऋग) ; सं. **पॄ, पण्**, (**पणस्त्र,–पण्यस्त्री**) ; *Gr*. Pon; *Lat*, Pret; *Lith*. Praekis(price); *Slav*. Plasta (price) ; सं. **पण्यम्** ; प्रा. **पणिअ** ; याकाम. **पेणें.**]

२पेण,–णें न. मुक्कामाचें ठिकाण, वस्ती, टप्पा. A stage of a journey, a stoppage, halt.
[सं. **आप्यायनम्** ; याकाम. **पेणें** (ज्ञा. १६–४१३ ; ऋपू. २७).]

पेंड पुं. चिखलाचा लादा (गाडीच्या चाकाला लागतो तो), गळिताच्या धान्यांतून तेल काढून राहिलेला भाग. A mass of slightly wet earth, the refuse of seeds from which oil has been extracted.
[सं. **पिण्ड** ; प्रा. **पेण्ड** ; देप्रा. **पेंडवालं पेंडलियं पिण्डीकृतम्** (२०१–१५); गु. **पेंडो** = मातीचा गोळा ; हिं. **पेड** ; **पेंड** = गोळा.]

पेंढा पुं. गवताचा भारा. A bundle of grass.
[सं. **पिण्ड** ; अकामसा. **पिण्ड, पेण्डी, पेण्ढा, पेण्डका, पेडका, पेंडें** = मोत्याचा सर ; **पेंडोळा** (दोरीची गुंडाळी).]

पेंद्र न. गवत. Grass.
[सं. **पिंड्र, पेंडी, पेण्ढा** पहा.]

पेंद्या,–ध्या पुं. व्यक्तिनाम, लंगडा,–पांगळा मनुष्य. Name of a person.
[याकाम. **पेंधा** = मोडका (ज्ञा. १६-०८१), **पेदळी** = वेटोळें (ज्ञा. १६-४१०).]

पेर पुं. खळयांत मळण्याकरितां भाताची केलेली पसरण. Casting rice-stalks upon the thrashing floor.
[सं. प्रदर, √दृ ; देप्रा. **पयरो शरः प्रदरशब्दभवः** (१८६–८) ; अकाम. **पेरणें** पहा.]

१पेर(णें) सक्रि. (जमिनींत) बीं पसरणें. To sow.
[सं. **प्र + ईर्** १ गतौ, **प्रेरय** किंवा **प्रदर, √दृ** ; देप्रा. **पयर** ; प्रा. **पेर पइर** ; हिं. **पेरना** ;बं. **पेरा** ; ओ. **पेरिबा** ; पं. **पेरणा** ; सिं. **पेरणु** ; गु. **पेरवूँ** ; अकाम. **पेरणी, पेरा** ; **पेर** पहा.]

२पेर(णें) सक्रि. अंगावर घालणें, पेहरणें . पहा. To put on.

पेरें न. भाग, तुकडा, अवशेष. A portion, a division.
[सं. **पर्वन्** ; उंसाचें,-बोटाचें **पेरें**.]

पेल(णें) सक्रि. फिरविणें, धरणें, दाबणें, उचलणें, तोल संभाळून धरणें, झेपणें. To balance, to poise, to support.
[सं. **प्रेरय** ; पा. **पेरइ** ; प्रा. **पेल्लइ** ; अप. **पेल्ल** ; देप्रा. **पेल्लइ** ; कु. **पेलणो** ; आ. **पेलाइब** (फेंकणें); ओ. **पेलिबा** ; हिं. **पेलना** ; पं. **पेलणा**. प्राकृत कोशकार मूळ धातु √ **क्षिप्** हा देतात ; परंतु तो समानार्थक संस्कृत धातु आहे. '**क्षिप्**' पासून **पेल्ल** निघणें अशक्य आहे. याकाम. **पेलणें** = पुढें करणें, लोटणें (ज्ञा. १-१६९), पुढें होणें (ज्ञा. ७-१०१), संभाळून धरणें (ज्ञा. ६-१९६).]

पेला पुं. पाणी पिण्याचें भांडें. A drinking vessel.
[फा. प्याला.]

पेली स्त्री. झाडाची ओली साल, लांकूड. Wet bark of a tree.
[सं. **प्रालि** ; याकाम. **पेळी** (ज्ञा. १५-१२९).]

पेलोवेली स्त्री. वाढ, वृद्धि. Increase.
[सं. **प्र + ईर्** (?); याकाम. **पेल्लोवेली** (ज्ञा. १४-९०).]

पेंव न. भुयार, जमिनीखालील धान्याचें कोठार. A grain-cellar.
[तामी. **पयंवु** = खळगा ; याकाम. **पेंव** (ज्ञा. १७-२८५).]
किंबहुना जें पेंव । विंचुवांचें ॥ ज्ञा. ८·१४३.

पेश वि. दरबारांत मान्यता मिळालेला, उन्नत, यशस्वी. Bearing esteem at court.
[फा. **पेश्** ; पेकाम. **पेश** (रा. १-१११); **पेशजी** (**पेश् + अर्जी**) = मागें ; **पेशवा** (फा. **पेश्वा**.) = मुख्य प्रधान, पंतप्रधान, सामोरे.]

पेशकब्ज-बज पुं. एक प्रकारचा सुरा. A dagger.
[फा. **पेश् कब्ज्** = हत्याराची मूठ ; पेकाम. **पेशकबज** (ऐटि. १-१६).]

पेशकश स्त्री. देणगी, नजर, उपायन. A grant, a present, hereditary right.
[फा. **पेश् + केश्** = पहिलें फल ; पेकाम. **पेश्कस** (दिमरा. १-२४०).]

पेशखाना पुं. अगोदरची तयारी, सेवा. Preparation or arrangement for pitching tents, attendance.
[फा. **पेश्खाना** = तंबू राहुट्या वगैरे उतरण्याची अगोदर केलेली तयारी.]

पेशा पुं. धंदा, उद्योग, वृत्ति. An occupation, an employment.
[फा. **पेशा** ; अकाममध्यें **पांढरपेशा** असा एक शब्द आहे. येथें **पेशा** शब्दाचा अर्थ **पोषाख** असा चुकीनें करतात. **पांढरपेशा** ह्या शब्दांत **पांढर** आणि **पेशा** असे दोन शब्द आहेत. '**पांढर**' हा शब्द **पांडर** ह्या शब्दापासून आला आहे, व त्याचा अर्थ गांवठाण जमीन असा असून तो '**काळी**' = पेरण्याची जमीन ह्या शब्दाचा प्रतियोगी शब्द आहे. पांढरपेशा म्हणजे पांढरीवर धंदा करणारा, नागरवृत्तीचा, नांगरटीचा धंदा करणारा नव्हे असा.]

पेशा(सा)ब पुं. मूत्र, लघवी. Urine.
[फा. **पेशाब्** ; अकाम. **पिशाब**, **पिशाबखाना** = मुतारी, शौचकूप.]

पेस्तर वि. पुढील, आगामी. The next to come.
[फा. **पेस्तर्**, **पेश्तर्** ; पेकाम. **पेस्तर** (पाव. ४४).]

पेहर(णें) सक्रि. अंगांत,-वर घालणें. To put on, to wear.
[सं. **परिधान** ; प्रा. **परिहान-ण** ; देप्रा. **परिहणं परिधानम्** (१८९·३); गु. **पहेरवूँ** ; हिं. **पहेरना** ; सिं. **पहरणूं** ; पं. **परिणना** ; का. **पैर** = परिधान करणें; याकाम. **पैरावणें** = नेसणें, आच्छादणें (नरुस्व. २६९.); अकाम. **पैरण** ; मराठींत हा शब्द हिंदीमधून आला. ह्याची व्युत्पत्ति मूळ फा. **पेराहन्**, **पीराहन्** अशी आहे. हे फारशी शब्द संस्कृत शब्दांशीं संबद्ध आहेत. प्राचीन फारशी भाषेंतील हे शब्द आहेत. पुढील व्युत्पत्ति पहा. सं. **पिनद्ध** ; प्रा. **पिणद्ध** (**अपि + √ नह्**).]

पेक्षां अ. हून, ज्या अर्थी. From, more than, as.
[सं. **अपेक्षया** (तृतीयान्त शब्द अव्ययाच्या रूपानें राहिला आहे). मराठींत जरी दोन भिन्न अर्थ दिसतात तरी दोघांचें संस्कृत मूळ एकच आहे.]

[1]**पै** स्त्री. एक नाणें. A pie, a coin.
[सं. **पाद** ; प्रा. **पाअ**, **पाई** (**पादिका > पाईआ**.).]

पै, पां अ. पादपूरणार्थक निश्चय-संभव-दर्शक अव्यय. An expletive particle.

[सं. **वै, इव, प्रति**; पैशा. '**पिव**' (वररुचि), **सिव, पिव, विव** (हेम.); अप. **प्राइव** (सं. **प्रायेण**) गु. हिं. सिं. **पै** = (परंतु); याकाम. **पै** (ज्ञा. १८·३८६); मराठी '**पै**' व '**पां**' हे शब्द '**पिव**' याचे अपभ्रंश आहेत हें उघड आहे.]

असत्य तेंचि पै पातक। असत्य तो चि महानरक ॥ मान्यता श्रेष्ठ सर्वांहूनी शुक्राची असे जाण पां ॥

पैक,-कु पुं. समुदाय. A throng, a crowd.

[सं. **पक्ष**; याकाम. **पैक** (ज्ञा. १७-६१); अकाम. **पैक** (हंसकोश पहा.)]

पैक(ख)(णें) क्रि. वाट पहाणें. To expect, to wait for.

[सं. **प्रतीक्ष्**; प्रा. **पईक्ख, पैक, पैख**; याकाम. **पेखणें, पेखणेंकार** = नर्तक, वेश्या (नरुस्व. ४७९); अकाम काव्य. **पैखणें, पेकणें** पहा.]

पैकीं अ. मधील, मधला. From amongst, out of.

[कान. **पैक, पैकी**.]

पैका पुं. द्रव्य, धन, पैसा, संपत्ति, ऐश्वर्य. Money, wealth.

[सं. **पशु** (?); *Lat.* Pecus. हा फार जुना आर्य शब्द आहे. ह्यांत जुना अर्थ राहिला आहे. पूर्वीचें धन गोधन होतें.]

पैखाना पुं. शौचकूप, संडास. A latrine.

[फा. **पाखाना**.]

पैगंबर पुं. ईश्वराचा प्रेषित-अवतार (महमदी धर्माप्रमाणें). The Prophet.

[फा. **पैगंबर, पैघाम्बर**.]

पैगाम पुं. संदर्भ, निरोप, पल्ला, टप्पा. Content, a stage, distance.

[फा. **पैगाम्, पैघाम्**; पेकाम. **पैगामा** = जाबसाल (रा. २०-३८); ढवळाढवळ, धुमाकूळ (रा. ८-७७).]

पैज स्त्री. होड, प्रतिज्ञा, पण. A bet or wager.

[*IE.* Ptati, Preti, Proti; सं. **प्रति**; *Gr.* Pro'ti; *Lett.* Ptett; *Lat.* Pretium; *OIcc*; Protivy. सं. **ज्ञा**; *Gr.* Gnohai; *Lat.* Gnosco; *Lith.* Senas; *Irish.* Gnatti; O*hg*. Knaen; *Eng.* Know. सं. **प्रतिज्ञा**; पा. **पटिञ्ञा, प्रटिञा**; प्रा **पडिण्णा, पइण्णा, पइज्जा**; जै. मा. **पइज्ञा**; हिं. पं. **पइज्**; सिं. **पैज** (कीर्ति); याकाम. **पैजा** (ज्ञा. ६-१४); **पैंज, पैण, पेण, पण**. याकाममध्यें शब्दामध्यें अनुनासिक कधींकधीं आढळतो. तो प्राकृतमधील **पडिण्णा, पइण्णा** ह्या रूपांचा अवशेष असावा असें वाटतें किंवा तें रूप **पैइज्ञा** असें रूप मानावें लागतें (वर. १२·८; की. ३-७६७७).]

पैजार स्त्री. पादत्राण, जोडा. A shoe or slipper.

[फा. **पैझार्**; शिकाम. **पैजार** (तु अ.).]

तुका म्हणे ऐशा नरा। मोजून माराव्या पैजारा ॥

पैंजण पुं. पायांतील घुंगुराचा दागिना. A silver ornament for the ankles.

[हिं. **पैंझण** (?).]

पैठण न. ग्रामनाम. The name of a town.

[सं. **प्रतिष्ठानम्**; पा. **पतिट्ठानं**; प्रा. **पइट्ठाणँ**; देप्रा. **पइट्ठाणम् नगरम्** (१९३-३); अकामसा. **पैठणी** = रेशमी उंची वस्त्र, स्त्रियांचें नेसणें.]

पैठा पुं. प्रवेश, प्रवेशद्वार. Entrance, access door.

[सं. **प्रविष्टः**; पा. **पविट्ठो**; प्रा. **पविट्ठ, पैट्ठ**; देप्रा. **पइट्ठो**; **ज्ञातरसा विरलं मार्गश्च** (२१६-३); बं. **पैठा** (जिना), ओ. **पैठ** (देणें), **पैठ्ना**; सिं. **पेठो, पेठी** (ऋण, खर्च); गु. **पेठू**; हिं. **पेठुं**; याकाम. **पैठें** (प्रविष्ट-ज्ञा. ६-३११). ह्या शब्दाशीं पुढील अन्यभाषांतील रूपें ताडून पाहण्यासारखीं आहेत. गु. **पेसवूँ**; सिं. **पेहणुं**; हिं. **पैठना, पैसना. प्रविश्, उपविश्** (बैसणें) ह्या धातूंतील '**व**' चा लोप होतो. **पेठ** = बाजारपेठ.]

पैण स्त्री. पैज, होड, शर्यत. A bet or wager.

[सं. **प्रतिज्ञा**; प्रा. **पइण्णा**; बकाम. **पैण**. **पैज** पहा.]

पैदपैं अ. एकामागून एक, लागोपाठ. One after another.

[फा. **पै-दर्-पै**; पेकाम. **पैदपैं** (दिमरा. १८).]

पैदा वि. संपादित, प्राप्त, मिळविलेलें, व्यक्त, उत्पन्न. Acquired.

[फा. **पैदा**; पेकाम. **पैदा** (इऐ ५-१००).]

पैदास-स्त स्त्री. नफा, उत्पन्न, निपज, उपज. Profit, income.

[फा. **पैदाइश्**; पेकाम. **पैदास्त** (मराआ ३६).]

पैरण स्त्री. आंखूड लहान असा सद्रा. A short shirt.

[सं. **परिधान**; प्रा. **परिहाण**; हिं. **पहिरना**; सिं. **पहिराणु**; गु. **पहेरण**; श. को. कार **प्रावरण** अशी व्युत्पत्ति देतात ती ग्राह्य नाहीं. हा शब्द फारसी असावा असें ब्लोक म्हणतो. **पेहरणॅ** पहा. **परिधान** (=आंतील वस्त्र) हा शब्द अथर्ववेदांत आढळतो. फार्शी भाषेंत जुन्या फार्शीमधून व जुन्या फार्शीत संस्कृतमधून आला असावा.]

पैरव-वी स्त्री. दळणवळण, जाणेंयेणें, अनुनय, पाठलाग, व्यवस्था, विचार, ढवळाढवळ. Frequenting, intercourse with.

[फा. **पैरवी**; शिकाम. **पैरवी**, (चित्र. ७५) पेकाम. **पैरवी** (दिमरा. १-६३).]

पैरा पुं. जमिनीची मशागत करण्यांत भागीदार. A partner in cultivation.

[सं. **प्रदर**; पा. **पदरो**; प्रा. **पयर** (< **प्रगिर** < **प्रगालयति**); कु. **पैरो** (जमिनीचा तुकडा.); याकाम. **पैरावणें** = नेसणें, आच्छादणें (नरुस्व. २६९).]

पैल वि. पलीकडील, दुसरा, समोरचा. The other, the opposite.

[सं. **अति**, (**आ**)+**ईर्**; प्रा. **आइल**, **आइल्ल**; अकाम. **ऐल**; सं. **प्रति**+**ईर्**; प्रा. **पइल**, **पइल्ल**; याकाम. **ऐल**, **पैल** (नरुस्व. ७२१, ज्ञा. ५-९३), **पैला** = पलीकडचा; अकाम. **पैल**, **पली**(**कडे**), **पैलथडी**, **पैलाड**, **पल्याड**.]

पैवस्ती स्त्री. पत्र पोहोंचल्याची तारीख, पोहोंचणूक, येणें. The date of the receipt of a letter, arrival.

[फा. **पैवस्त्**; पेकाम. **पैवस्ती**, **पैवस्ता** (दिमरा. १-४४, पेद.)]

पैस वि. पुष्कळ, विस्तरित, मोकळी (जागा). Spacious, roomy.

[सं. १ **पार्श्वम्**; देप्रा. **पइस्सो** (विपुलार्थः); ब्लोकची व्युत्पत्ति-सं. **प्रदेश**; प्रा. **पएस**; सिंह. **पिएस**; याकाम. **पैस** = प्रसार, विस्तार (ज्ञा. १५-१८०); अकाम. **ऐसपैस**; २ सं. **अतिपार्श्व** > **अइआस्स** > **ऐस**; **परिपार्श्व** > **पइआस्स** > **पैस**.]

पैसा पु. तांब्याचें नाणें, संपत्ति (ल.). A pice, money (fig.).

[सं. (?) हिं. **पैसा**.]

पैसाव वि. पसरलेला. Extended, spread out.

[सं. **प्रतिसार**, **प्रतिस्राव**.]

पैसार पु. मार्ग, प्रसार, विस्तार. A way, extension.

[सं. **प्रवेशः** = मार्ग, प्रसार (√ सृ); याकाम. **पैसार** = मार्ग (ज्ञा. ६-५८); विस्तार (ज्ञा. १०-२५०).]

पो, पाव (बारा) वि. फाशामधील एक डाव. A throw in dice game.

[सं. **पदम्**, **पाद**; पा. **पदम**; प्रा. **पाय**; हिं. **पउ**; सिं. **पाँऊँ**; गु. **पो**; ने. **पौ**; अकाम. **पोबारा**, **पोबारा** = धूम, पळ हा शब्द संबद्ध आहे; **पवबारा** (चांगला डाव म्हणजे ‘ चार ’ टिंबाचा फांसा पडला म्हणजे होतो.]

(पाण)पोई स्त्री. पाणी फुकट पिण्यास देण्याची जागा. A place where drinking water is given gratis.

[सं. **प्रपा**; पा. **पपा**; प्रा. **पवा**; कु. **पऊ**; हिं. **पउ**; पं. **पउ**; ने. **पौवा**.]

पोंक(णें) अक्रि. वर अंकुर येणें,—फुटणें. To shoot up, to have a sprout.

[सं. **प्र**+**उत्**+**अंच्** १ गतौ; **प्रोंच्**; प्रा. **पोंक**; सं. **प्रोद्गम्** > **पोग्गम** > **पोक** (रा.)]

पोंक न. कुबड, वांकडेंपणा. A hump-back.

[सं. **पुंग**, **वंक**, **वक्र**; देप्रा. **पोक्क**.]

पोकळ वि. भोकळा, रिता आंत कांहीं नसलेला, हलका, सैल. Hollow, empty, light.

[सं. **पुष्कर**, **पुष्कल**; प्रा. **पुक्कल**; कोंकणी. **पोको**; ‘ सं. **पुष्कर** ’ ही व्युत्पत्ति श. को. कारांनीं दिली आहे. ‘ सं. **प्रोत्**+**खन्** ’ ही व्युत्पत्ति राजवाडे ह्यांनीं दिली आहे. परंतु ह्या दोन्ही व्युत्पत्ति ग्राह्य होण्यासारख्या नाहींत. सं. **वक्र**; देप्रा. **पोक्क**; ‘ **ळ** ’ प्रत्यय–हीच व्युत्पत्ति ग्राह्य होण्यासारखीं आहे.]

पोकु वि. चार, संख्याविशेष. Four.

[नंदभाषा. **पुकू** = चार; याकाम. **पोकु वेडावलें** = चार वेदांनांहि अगम्य असें ब्रह्म – विसोबा खेचर अभंग.]

पोक्त,-ख्त वि. संभावित, प्रौढ, शिष्ट, विपुल, पुष्कळ, पक्व, थोर, सज्ज, मजबूत. Arrived at maturity, perfect, profuse.

[फा. **पुख्त**; शिकाम. **पोक्ता** (जमाव) (चित्र ७९); पेकाम. **पोक्त**, **पोख्त**, (मराचिथोशा. ५४.); अकाम. **पोक्त**, **पोक्त**, **पोख्त**, **पोक्तगी** = पक्वता.]

पोख(णें) क्रि. पोषणें, वाढणें, पुष्ट होणें. To nourish, to grow fat.
[सं. पुष् ४ पोषणे–**पोषणम्**; याकाम. **पोखणें** (ज्ञा. १-३५-९०).]

पोखर न. तळें, सरोवर, डबकें. A lake, a pond.
[सं. **पोष्कर**, **पुष्कर**; पा. **पोक्खरम्** (कमल); प्रा. **पोक्खर**, **पोखरिणी**; का. **पोखुर्**; बं. **पुकुर्**; ओ. **पोखरी**; बि. हिं. पं. **पोखर्**; सिंह. **पोकर**=कमळ. **पोखरणें** ह्या धातूपासून **पोखरण** हें नाम व त्या नामाचा संक्षेप **पोखर** असा शब्द सिद्ध झाला.]

पोखर(णें) क्रि. उकरणें, खणणें. To dig, to excavate.
[सं. प्र+उत्+कृ ६; प्रा. पोक्कर, पोखर; अकाम, **पोखर**, **पोखारा**, (प्रोंक).]

पोखरण,–णी स्त्री. विहीर, झरा, तळें, सरोवर. A small well or pond, a lake.
[सं. **पुष्करिणी**, **पोखर**, **पोखरणें** पहा.]

पो(पों)गडा पुं. तरुण, वयांत आलेला मुलगा. A youth, a stripling.
[सं. **पौगंड**, **पुं(मान्)+गण्ड**. '**गंड**' (=तरुण) हा द्राविडी आहे. **संस्कृत**–द्राविडी समास किंवा एकाच अर्थाच्या दोन शब्दांची द्विरुक्ति आहे.]

पोचट,–ड वि. पोकळ, निस्सत्त्व, असार, सत्त्वरहित. Hollow, unsound, pithless.
[सं. **प्र+कुचिष्ट**=पोचट; देप्रा. **पोचड**; गु. **पोचा.**]

पो(पों)चा पुं. ठोका, ठोक्यानें आंत गेलेला भाग (विशेषतः भांड्याचा). A dint.
[सं. **प्र+कुञ्च्** १ कौटिल्ये.]

१पोट न.शरीरावयव, अन्नाशय. The stomach.
[सं. **पुष्ट**, **प्रकोष्ठ (?)**; देप्रा. **पोट्टम् उदरम्** (२०४-५); प्रा. **पोट्ट**; बं. पं. हिं. गु. **पेट.** हा शब्द द्राविडमूळ आहे. कान. **पोट्ट**, **होट्ट**. कानडींत **प** बद्दल **ह** हा वर्ण येतो. संस्कृत शब्दाचा कानडी मुळाशीं कांहीं संबंध आहे का? मूळ शब्द द्राविडीच मानणें सयुक्तिक. अकाममध्यें ह्या शब्दाला लाक्षणिक अर्थ कांहीं प्राप्त झाले आहेत.]

२पोट पुं. फुगीर भाग. गांठ, The bulging or protuberant portion.
[सं. **पुष्ट**; देप्रा. **पौट्य** (< **पुटः**); प्रा. **पोट्ट**, **पुट्ट**; हिं. **पोट** (स्त्री); पं. **पोट्**, **पोट्ट**; सिं. **पोटरी**; गु. **पोट**; पुढील संबद्ध मराठी शब्द पहा. **पोटिस्त**, **पोटरी**, **पिण्डरी**, **पोट**, **पेट**, **पेटा**, **पुडा**, **पुडी.** ह्या सर्वांत 'समूह, फुगीरपणा' असा अर्थ आहे. संस्कृत **प्रकोष्ठ**, **पुष्ट** यांच्याशीं तर दूरचा संबंध नसेल ना?]

पोटकुळी स्त्री. पोटांतील दुखणें. Pain in the stomach.
[कान. **पोटकुळी**, **पोदकुळी**=दुःख वेदना; अकाम. **बेडकुळी**=मांडी, दंड, पिंडरी दाबल्यानें जो गोळा निघतो व जी वेदना होते ती.]

पोटळी स्त्री. गांठ, फडक्याच्या टोंकांत बांधलेल्या वस्तु. A knot, a bundle.
[सं. **पुष्ट**; अप. **पोट्टल**; देप्रा. **कुण्टी पोट्टलम् वस्त्रनिबद्धंद्रव्यम्** (८२-१६); गु. **पोट**, **पोटलो**; सिं. **पोटी**; पं. हिं. **पोटली**; बं. **पुंटली.**]

पोटाळ(णें) सक्रि. आलिंगन देणें. To embrace.
[सं. **पुष्ट** (?); देप्रा. **पोट्ट** (नाधा.); अकाम. **पोटाला पोट लागणें**, त्यावरून आलिंगणें असा अर्थ प्राप्त झाला.]

१पोत स्त्री. कांचेचे मणी, सोन्याचे मणी. Beads of glass or gold.
[सं. **प्रोतम् (?)**; देप्रा. **पोत्ती काच** (२०४-५); बं. हिं. पं. **पोत** (मणी); सिं. **पूति**; गु. **पोत**; ने. **पोते.**]

२पोत न. चांगलें,–बारीक,–तलम सूत. Fine thread.
[सं. **प्रोतम्** (?); प्रा. **पोत्त** (कापड); हिं. **पोत्** (गुण, स्वभाव); सिं. **पोतु** (जोडी); गु. **पोत**; ने. **पात्**; फा. **पूत्**=वीण, विणाई.]

पोतडी स्त्री. लहान पोतें, कोथळा. A small bag, sack.
[फा. **पोतेह्**; याकाम. **पोतडी** (ज्ञा. ४-१७); पेकाम. **पोता** (रा. ६-१५९).]

पोता पुं. खजिना. Treasury.
[फा. **पोता**=खजिना; शिकाम. **पोता** (सभा. २४); पेकाम. **पोता**; **पोतनीस** (**पोता+निवीस**)= खजिनदार, **पोतदार**=नाणेंपारखी, सोनार, एक आडनांव.]

पोतास पुं. भीमसेनी कापूर. A kind of camphor
[सं. **पोतासः शुद्ध कर्पूरः** इति रत्नकोशः; याकाम. **पोत्तास** (ज्ञा १०-१४२, अमृ. ४-५).]
प्रमेयांचा पोतास कवणेपरीः निफजे जाणांलागी ॥ नरुस्व. २१

पोतें न. गोणपाटाची मोठी पिशवी. A gunny bag.
[सं. **पोतक** ; प्रा. **प्रोत्त, पोत्तअ** (कपडा), **पोत्तिआ** (स्त्रियांचा पोषाख); हिं. **पोता पोतिया** (पंचा); लां. **पोत्** ; सिं. **पोती** (शाल); सं. **पोतः** ; प्रा. **पोत्थकर्म** ; प्रा. **पोत्थ** ; फा. **पोता** = कोथळा, **पोतेह्** ; अकाम. **पोतेरें** (सारवावयाचें घाण फडकें), **पोतडी** = लहान पिशवी ; मूळ संस्कृत आहे कीं फारशी आहे ?]

पोथी स्त्री. सुटें पानांचें पुस्तक. A book, a manuscript of loose sheets.
[सं. **पुस्तक** ; पा. **पोत्थक** ; प्रा. **पोत्थअ, पोत्थ, पोत्थआ** ; हिं. पं. **पोथा** ; गु. **पोथी** ; सिं. **पोथु, पोथी** ; बं. **पुथो** ; फा. **पुस्त, पुस्तो**. फारसी शब्द चिन्त्य आहे.]

पोपट पुं. पक्षिविशेष, राघू. A parrot.
[सं. **पट्** १ भाषार्थः-अभ्यास (?).]

पोपड(णें) अक्रि. पोपडे येणें. To have peelings.
[म. **पोपुडा** (नाधा.); अकाम. **पोपुडा** १ **पोपुडा** < **पापुद्रा** – आवरण ; २ **पुट्** ६ संश्लेषणे (पोपुट).]

पोफळ स्त्री. पुं. (कच्ची) सुपारी. A betelnut.
[सं. **पूगीफल** ; प्रा. **पोअफल, पोप्फल(ळ)** ; याकाम. **पोफळगांठी** = पदर न काढतां गांठ देऊन नेसण्याची पद्धत (नरुस्त्र. ८४२ शि. पा. ६५४); **पोफळ घालणें** = पैज मारणें, प्रतिज्ञा करणें (१३-२०); अर. **फौफल्** ; फा. **पूपल्**.]

पोबारा पुं. पळणें, एकदम निघून जाणें, धूम. Running away, a sudden quitting.
[नेपाळी. '**पोयबारा**'=हुकमी चांगले यशस्वी असे बारा. **पवबारा** पहा.]

पोमिनी स्त्री. वृक्षविशेष, वेलीविशेप. A kind of tree (plant).
[सं. **पद्मिनी** ; प्रा. **पोम्मिनी** ; याकाम. **पोमिनी** (महानु.).]

पोर स्त्री. मूल. A child.
[सं. **पुत्रक** ; प्रा. **पोरअ, पोरग, पुत्तअ-पोत** ; अकामसा. **पोरासोरी, पोराटोरी, पोरापोरी, पोरवडा, पोरगा**.]

पोल न. पोकळ नळी,-धान्य A hollow grain.
[सं. **पूल्य** = Shrivelled grains (Whitney *A*tharv. V. p, 765); प्रा. **पोल्ल** (पोकळ); का. **पोलु** ; आ. **पोलाकटा** (चोर); ब. **पोलो** (टोपली); ओ. **पोल** ; हिं. **पोल** ; पं. **पोल, पोला** ; गु. **पोल** ; अकाम. **पोलकट, फोलकट, फोल** = वायां.]

पोलकें न. बायकांचें चोळीसारखें वस्त्रविशेष. A blouze.
[*Eng*. Polka.]

पोलाद न. लोखंडाचा एक लवचिक चिवट असा प्रकार, बनविलेलें लोखंड. Steel.
[मूळ शब्द पेल्हवी भाषेंतील '**पोलावत्**' असा आहे. त्याचें **अरबीकरण** किंवा **फार्सीकरण** झालें ; फा. **पुलाद्, फुलाद्**.)

पोलिस पुं. बंदोबस्ताचा शिपाई. The police.
[*Lat*. Polis = city, politia; *Eng*. police.]

पोलो पुं. गाल. A cheek.
[सं. **कपोल**. आरंभींच्या '**क**' चा लोप झाला आहे. (प्रा. प्र. २-२, वा. सूत्र. १-३८); (**प्रांतिक**)]

पोलो पुं. एक प्रकारचा खेळ, घोड्यावर बसून लांब काठीनें चेंडू टोलवून खेळावयाचा खेळ. A kind of game.
[*Eng*. polo. परंतु हा शब्द मूळ बाल्ती भाषेंतील आहे. त्या शब्दाचा अर्थ–**चेंडू** असा आहे.]

पोवतें न. देवास अर्पण केलेला पवित्र दोरा, पवित्र पिवळें सूत. A sacred yellow thread.
[सं. **पोत, पवित्रम्, प्रोतम्** ; प्रा. **पोत्तअ**.]

पोवळें न. तांबडें रत्नविशेष. Coral.
[सं. **प्रवालः** ; पा. **पवाल** ; प्रा. **पवाल, पोवाल** ; सिं. **पवारी** (तांबड्या रंगाचें फूल.); द्रा. **पुलक**.]

पोवा पुं. सापाचें किरडूं. A young snake.
[सं. **पोतः** ; पा. **पोतो** ; प्रा. **पोअ** ; आ. **पो** (मुलगा); बं. **पो** ; आं. **पुअ, पुआ** ; हिं. **पोआ, पोअ** ; याकाम. **पोरा** = काळा जीव पडून धान्यास रोग होतो तो (ज्ञा. ९-५०३); अकाम. **पोर** (मुलगा) व **पोरी, पोरगी** (हे शब्द '**पुत्र**' ह्याशीं संबद्ध आहेत.).]

पोशाक,-ख,-षाक पुं. घालावयाचे कपडे, पेहराव. Dress.
[फा. **पोशाक्**.]

पोशिन्दा पुं. पोसणारा, पालनकर्ता. A supporter, a patron.
[फा. **पोशिन्दा.**]

पोष(णें) सक्रि. वाढविणें, अन्न घालणें. To nourish, to feed, rear up.
[सं. **पुष्** ४ पुष्टौ.]

पोस(णें) सक्रि. वाढविणें, पाळणें. To nourish, to support, to maintain.
[सं. **पोषय**; पा. **पोस**; प्रा. **पोस**; कु. **पोस्णो**; आ. **पोहब**; बं. **पोसा**; ओ. **पोसिबा**; हिं. **पोस्ना**; पं. **पोह्णा**; गु. **पोसवूँ**; ने. **पोस्नु.**]

पोस्ट न. टपालासंबंधीं खातें. The post.
[*OE.F.* Postis; *Eng.* Post.]

पोस्त न. बक्षिसी, नोकराचाकरास द्यावयाचें बक्षिस. Money given to servants.
[१ सं. **पुष्टि** (?); हिं. **पोस्त**=अफूचें झाड. शब्द परकी असावा.]

पोह(णें) अक्रि. पाण्यावर तरंगणें. To swim.
[सं. १ अप+वह् ; अपोहन (अ लोप); २ प्र+उह् १ गतौ; ३ प्रप्लृत, (प्रपर्षि Aorist), प्रतुरति, ४ प्रु १ गतौ; प्रा. **पुवन्ति>पुहन्ति, पोह**; हिं. **पैरना**; ने. **पौरनु**; (प्र+तरति, √तॄ);]

पोहा पुं. भाजलेलें भात. Parched rice.
[*IE.* perth; *Gr.* ptorthos; *Arm.* Ort; *Slav.* pera; सं. **पृथुक**; प्रा. **पिहुय** (पुंन.).]

२**पोहा** पुं. थवा. A crowd.
[सं. **अप्यूह**? (पिशेल); प्रा. **पूह.**]

पोहोच(णें) क्रि. प्राप्त होणें, घेणें. To reach, to come to.
[सं. **प्रभू, प्रभूत्य** (**प्रभवति**; पा. **पहोति**); प्रा. **पहुच्चइ**; बं. **पहूँचा**; ओ. **पहूंचिबा**; हिं. **पहूँचना**; पं. **पहूचणा**; सिं. **पहुचणु**; गु. **पहोचवूँ**; मराठी शब्द **पाहुणा** (सं. **प्राघूर्ण**) ताडून पहा.]

पोळ(णें) सक्रि. भाजणें, जळणें. To burn, to be scorched.
[*IE.* Preus (ज्वलने); सं. **प्रुष्, प्लुष्** १ दहने; *Lat.* Prus; *Goth.* Frius; *Ger.* Frost; *Sax.* Forst; *Eng.* Frost; सं. १ **प्रज्वल्**; २ **प्लुष्** १ दाहे; देप्रा. **पौड, पाड, पउलइ पचति** (१९१-११); प्रा. **पाउक्कइ, पाऊलइ**; आ. **पोरिब**; ब. **पोरा**; ओ. **पोरिबा**; ने. **पोल्नु**; अकाम. **पोळी, पोळ,** (जाळ) **पोळ.**]

पोळ पुंस्त्री. बोळ, शहरांतील रस्ता. A lane, a blind alley.
[सं. **प्रतोली**; प्रा. **पओली** (स्त्री); गु. **पोळ**; हा शब्द निरनिराळ्या भाषांत निरनिराळ्या रूपांनीं उतरला आहे. गु. **पोळ**; बं. **तोळा**; म. **बोळ** हे तिन्ही शब्द सं. **प्रतोली**पासूनच आहेत.]

२**पोळ, पौळ** स्त्री. तट, भिंत, नुसत्या दगडांची कच्ची भिंत. A wall, a fortification.
[सं. **प्रतोली**; प्रा. **पओल**; गु. **पोळ**=रस्ता; हिं. **पौल, पौर**=अंगण, दार, दार असलेला चौक; हिमालयी भाषा. **प्रोळ्**; याकाम. **पौळी**=आवार, भिंत (नरुख. ८६४; ज्ञा. ९-२१३); अकाम. १ **पोळ** पहा; कान. **पौली**=आवाराची भिंत.]

'**पोळ** पुं. देवास सोडलेला बैल, वळू. A bull dedicated to gods.
[सं. **पोतक, पोतलिक**; प्रा. **पोआल, पोअल**; देप्रा. **पोआलो वृषभः** (२०४-१७); सिंह. **पो**; हिं. **पूआ**; (वासरूं); अकाम. **पोळ, पोळा**=बैलांचा सण, बेंदूर.]

पोळी स्त्री. खाद्यविशेष, चपाती. A plain wheaten cake.
[सं. **पोलिका, पूल्किका, पूप, पूपिका**; देप्रा. **पोअलओ** (अपूपः); प्रा. **पूअल** (पुं.), **पूअलिया** (स्त्री.); देप्रा. **पौलिका**; प्रा. **पोलिआ** (स्त्री.). संस्कृत शब्द निराळा असावा. त्यामध्यें 'ळ' असला पाहिजे. **पोळणें**=भाजणें ह्यावरून **पोळी** शब्द आला आहे, कारण भाकरी (< **भ्रस्ज्**), दशमी (< **दह्**) हे शब्द भाजणें ह्या अर्थाच्या धातूपासून उद्भूत आहेत. पोळणें पहा.]

१**पोळें,-ळा,-ळ** न. मधमाशांचें घर. A honeycomb.
[सं. **पूलिका**; देप्रा. **पोल्ल**; ओ. हिं. **पोला**; पं. **पोल्ला**; गु. **पोलूँ.**]

पोळें न. तांबडा,-पिवळा मणी. पोवळें पहा. Coral.

पौंड पुं. एक सोन्याचें इंग्रजी नाणें. A pound, a sterling.
[*Lat.* pondus = weight, ponds; *Du.* pond; *OE.* pund; *Eng.*Pound.]

पौळ,-ळी स्त्री. आवाराची भिंत ; पोळ पहा.

प्यादा पुं. पायदळ शिपाई. A foot-soldier.
[फा. **पियादा** ; सं. **पदाति** ह्या शब्दांशीं दूरान्वित दिसतो. ह्याचा लाक्षणिक अर्थ–बुद्धिबळांतील शेवटच्या दर्जाची सोंगटी,]

प्यार,-रा वि. आवडता, प्रेमी. Dear, fondled.
[सं. **प्रियकर, प्रियतर** ; प्रा. **पिअरिअ** ; अप. **पिआर** ; कु. **प्यार** ; हिं. **पियार** ; पं. **पिआर** ; सिं. **पिआरा** ; गु. **प्यार्.** मराठींत हा शब्द हिंदीमधून आला.]

प्याला पुं. पेला, पाणी पिण्याचें भांडें. A Cup, a bowl.
[वैसं. **पेरु** (?); फा. **प्याला.**]

प्यास स्त्री. तहान, पिण्याची इच्छा. Thirst.
[सं. **पिपासा** ; पा. **पिपासा** ; प्रा. **पिवासा, पिआसा** ; अप. **पियास** ; का. **प्यास्** (पुं.); आ. **पियाह** ; बं. हिं. **पियास्** (स्त्री); सिं. **पिआस** ; गु. **प्यास.**]

प्र उप. पुढें, समोर, अधिक. A prefix signifying before, more.
[*IE*. Pro ; सं. **प्र** ; *Av*. fra; *Gr*. Prho; *Lat*. Pro ; *Lith*. pra; *Slav*. pre ; *Teut*. faur ; *Sax*. for; *Eng*. for. '**प्र**' (प्रकर्षेण) ह्या उपसर्गाच्या पुढें संस्कृत धातु येऊन पुष्कळ तत्सम शब्द मराठींत रूढ झाले आहेत. अकामसा. **प्रणत** (प्र + नम्) = वांकलेला, नम्र ; **प्रणति-प्रणाम** = नमस्कार; **प्रणय** (प्र + नी + अ), = प्रेम; **प्रणेता** = लेखक, पुरस्कारक ; **प्रताप** (प्र + तप् + अ) = शौर्य ; **प्रतारणा** (प्र + तारणा, √ तृ) = फसवणूक ; **प्रतिष्ठित प्रतिष्ठ(णें)** (प्र + स्था), **प्रतिष्ठा** (मान) ; **प्रति**(विरुद्ध); **प्रतिकार** (प्रति + कृ) = विरोध ; **प्रतिक्रिया** ; **प्रतिकृति** (प्रतिमा) ; **प्रतिगामी** (प्रति + गम्) = विरोधी ; **प्रतिध्वनि** (प्रति + ध्वन्) = पडसाद ; **प्रथम** (प्र + तम) = प्रकर्षानें श्रेष्ठ, पहिला ; **प्रथा** [प्र + था (?)] = रूढि ; **प्रदर** = एक रोग, धुपणी ; **प्रदक्षिणा**; **प्रधान** = मुख्य, दिवाण ; **प्रपंच** (प्र + पंच; √ पच् – विस्तारे) संसार ; **प्रपिता** (प्र + पिता , √ पा) = आजा ; **प्रबंध** (प्र + बंध्) = ग्रंथ ; **प्रबल-ळ** (प्र + बल्) ; **प्रबोध** (प्र + बोध, √बुध्), प्रबुद्ध; **प्रभा** (प्र + भा) = कान्ति ; **प्रभाव** (प + भाव, √ भू) ; **प्रभृति** (इत्यादि) ; **प्रमाण** (प्र + मा + न) = पुरावा ; **प्रमाद** (प्र + माद, √ मद्) = चुकी ; **प्रमुख** (प्र + मुख) = मुख्य ; **प्रयत्न** (प्र + यत्न, √ यत्) = खटपट ; **प्रयाण** (प्र + या + न) = गमन, प्रवास ; **प्रयास** (प्र + यास, √ यस्) = प्रयत्न, कष्ट ; **प्रयोग** प्र + योग, √ युज्) रचना, मांडणी ; **प्रयोजन** , **प्रस्थान** (प्र + स्थान, √ स्था) = प्रयाणाची तयारी ; **प्रहर** (प्र + हर, √ हृ) = तीन तासांइतका वेळ ; **प्रहार** (मार) ; **प्रहसन** (प्र + हस् + न) = लहान नाटक ; **प्रक्षाळ(णें)** (प्र + क्षाल्) = धुणें ; **प्रक्षिप्त** (प्र + क्षिप् + त) = घुसडलेलें, फेंकलेलें ; **प्रज्ञा** (प्र + ज्ञा) = बुद्धि ; **प्राक्** (प्र + अञ्ज्) = पूर्वीं ; **प्राक्तन** (नशीब) ; **प्राकृत** (प्रकृति–प्र + कृ + त) सामान्य, एक भाषा ; **प्रागतिक** (प्रगति + इक, प्र + गम् + इ) ; **प्राचीन** + (प्र + अञ्च्, प्राक्–ईन) ; **प्रलय** (प्र + लय, √ ली) = मृत्यु, कल्पना, नाश ; **प्रळय** ; **प्रलाप** (प्र + लाप, √ लप्) = बडबड ; **प्रवचन** (प्र + वच + न, √ वच्) = व्याख्यान, प्रतिपादन ; **प्रवण**; **प्रवर** ; **प्रवर्तक** (प्र + वर्तक < वृत्) = प्रेरक ; **प्रवाद** (प्र + वाद < वद्) = बोल; **प्रवाल** = पोवळें; **प्रवाह** (प्र + वाह, √वह्) = ओघ ; **प्रविष्ट** (प्र + विष्ट, √ विश्), **प्रवेश, प्रवेशणें** ;: **प्रवृत्ति** (प्र + वृत्ति, √ वृत्) **प्रघात** = चाल, कल ; **प्रशंसा** (प्र + शंसा < शस्–स्तुतौ), **प्रशस्ति** ; **प्रशांत** (प्र + शांत, √ शम्) = शांत; **प्रश्न** (√ प्रच्छ्) = सवाल ; **प्रसक्त** (प्र + सक्त √ सञ्ज्) = जवळ आलेला ; **प्रसंग** (प्र + संग √सञ्ज्) = वेळ ; **प्रसरण** (प्र + सरण √ सृ) = विस्तार, प्रसार ; **प्रसव** (प्र + सव √ सू) = प्रसूति, जन्म ; **प्रसाद** (प्र + साद, √ सद्) = कृपा ; **प्रसिद्ध** (प्र + सिद्ध, √ सिध्) = नाणावलेला ; **प्रस्थ** (प्र + √ स्था) = महत्त्व ; **प्रस्ताव** (प्र + स्ताव, √ स्तु) = कथन, ठराव, प्रस्तावना, प्रस्तावणें, प्रस्तुत ; **प्रांजल, प्रांजळ** (प्र + अंजलि) स्पष्ट, उघड ; **प्रांत** (प्र + अन्त) = देश, देशविभाग ; **प्रातः** (प्र + आ + तस् ः) = पहाट, प्रातःकाल ; **प्रादुर्भाव** (प्र + आ + दुः + भू) = उत्पत्ति ; **प्रापंचिक** (प्र + पंच्) ; **प्राप्त** (प्र + आप्) = मिळालेला ; **प्रामाणिक** (प्रमाण < मा) = खरा, **प्रायः, प्रायशः** = सामान्य रीतीनें; **प्रायश्चित्त** ; (प्रायःचित्त < चित्) = पापनिरसनासाठीं कर्म ; **प्रारब्ध** (प्र + आ + रंभ्) = नशीब, आरंभिलेलें ; **प्रारंभ** = सुरवात ; **प्रार्थिणें** (प्र + अर्थ् = विनविणें) ; **प्राशन** (प्र + अश् + न) = खाणें ; **प्रास** = शब्दानुवृत्ति ; **प्रासाद** (प्र + आ + सद्) = राजवाडा ; **प्रास्ताविक** (प्रस्ताव इक.) ; **प्राज्ञ** (प्र + ज्ञा) = शहाणा, विद्वान ; **प्रेत** (प्र + इत, √ इ) = मृत शरीर ; **प्रेरणा** (प्र + ईरणा < ईर्) = चेतना ; **प्रेष(णें)** (प्र + इष्) = पाठविणें ; **प्रेष** (पत्र) = निरोप ; **प्रेक्षक**(प्र + ईक्ष् + क) =

पहाणारा (प्रेक्षण, प्रेक्षा); **प्रोत्साहन** (प्र + उत्साह + न, √उत् + सह्) = उत्तेजन ; **प्रौढ** (प्र + ऊढ < वह्) = पोक्त.

प्रक(ग)ट(णें) क्रि. जाहीर होणें-करणें, दाखविणें. To declare, to advertise.
[सं. प्र + कट्.]

प्रकरण न. भाग, विभाग, बाबत (लक्षणा). A chapter, an item.
[सं. प्र + कृ + न.]

प्रकार पु. रीत, तऱ्हा. Kind, sort.
[सं. प्र + कृ + अ.]

प्रकाश पु. तेज, उजेड. Light, lustre.
[सं. प्र + काश् २ दीप्तौ.]

प्रकृत वि. प्रस्तुत, सांप्रत. Present, (a thing) on hand.
[सं. प्रकृत ; याकाम. प्रकृत (ज्ञा.)]

प्रकृति स्त्री. एक सांख्यतत्त्व (प्रकृति, पुरुष), माया, स्वभाव, प्रजा.. An element in Sankhya philosophy, illusion, subject.
[सं. **प्रकृति**, √ **कृ**. ह्या शब्दांचे निरनिराळे अर्थ आहेत. **माया, मायेचा पसारा, प्रजा, स्वभाव** असे अर्थ आहेत. **स्वभाव** ह्या अर्थावरून **तव्येत** असा अर्थ रूढ झाला. याकाम. **प्रकृति** (९-८०); **प्रकृतिगत** = मायोपाधिक (ज्ञा. १४-३४); अकाम. **प्रकृत** = प्रस्तुत ; **प्राकृत** = सामान्य.]

प्रखर वि- अतिशय ऊष्ण, तीक्ष्ण. Hot, intense.
[सं. **प्रखर.**]

प्रगट वि. स्पष्ट, उघड. Open.
[सं. प्रकट ; गु.हिं. प्रगट ; सिं. **पर्वट्ट** ; पं.हिं. **पर्गट** ; सिंह. **पहळ.**]

प्रगति स्त्री. उत्कर्ष, वाढ, सुधारणा. Progress, increase.
[सं. प्र + **गति**, √ **गम्.**]

प्रगल्भ वि. पोक्त, प्रौढ, धीट. Matured, perfected, bold.
[सं. **प्रगल्भ** ; प्र + √ **गल्भ्.**]

प्रघात पुं. परिपाठ, शिरस्ता. Prevalency, custom, practice.
[सं. **प्र + घात** (√ **हन्**) = पायानें मळलेली वाट ; ह्या अर्थी वरचेवर हाणलेली–केलेली **गोष्ट.** हाच अर्थ **पद्धति,** परिपाठ (मार्ग) ह्या शब्दांत निविष्ट आहे.]

प्रचण्ड वि. अतिशय, विशाल. Extreme, excessive.
[सं. **प्र + चण्ड्** (तापने). **अतिशय ऊष्णतेचा** असा मूळ अर्थ, त्यावरून अतिशय तापदायक, त्रास देणारा–त्यावरून भयंकर, विशाल.]

प्रचार पु. चाल, रीत, मार्ग, शिरस्ता. General use or adoption, usage.
[सं. **प्र + चार** ; √ **चर्** १ गतौ ; ह्या शब्दांत हि चालण्याचा–पायानें हाणण्याचा–मार्गाचा अर्थ निविष्ट आहे. **पद्धति** = पायानें हाणलेली वाट).]

प्रचीति,–त स्त्री. पडताळा, अनुभव. Experience, tallying.
[सं. **प्रतीति, प्र** + √ **इ**–गतौ. ह्यांतहि **‘ मार्ग ’** हा अर्थ अभिप्रेत आहे.]

प्रजा स्त्री. लोक, मुलें. Subject, progeny.
[सं. **प्रजा, प्र** + √ **जन्.**]

प्रण(णें), पर्ण(णें) क्रि. (काव्य) विवाह करणें. To take hand in marriage.
[सं. **परिणय,** < **परि** + √ **नी** ; गु. **परिणवूं.**]

प्रति उप. दिशा–गतिदर्शक उपसर्ग. A Prefix signifying direction.
[*IE.* Ptati, proti ; Preti, proti ; सं. **प्रति** *Lat.* Pretium : *Lett.* Ptett ; *OIce.* Protivz ; सं. **प्रति** ; प्रा. **पइ** ; ह्या शब्दाच्या अन्वयानें सिद्ध झालेले पुढें दिलेले कांहीं शब्द पहा. **प्रतिनिधि** (**प्रति + निधि**) = मुखत्यार ; **प्रतिपक्षी** (**प्रति + पक्ष**) = विरोधी ; **प्रतिपाद(णें)** (**प्रति + पद्**) = सिद्ध करणें ; **प्रतिपाळ** (**प्रति + पाळ्**) = सांभाळ ; **प्रतिबंध** (**प्रति + बंध्**) = अडथळा ; **प्रतिबिंब** (**प्रति + बिंब**) = पडछाया ; **प्रतिमा** (**प्रति + मा**) = प्रतिबिंब ; **प्रतियोगी** (**प्रति + योगी** < **युज्**) = शत्रु ; **प्रतिरोध** (**प्रति + रुध्**) = अडथळा ; **प्रतिवादी** (**प्रति + वादी** < **वद्**) = प्रतिपक्षी ; **प्रतिशब्द** (**प्रति + शब्द**) = पडसाद ; **प्रतिसहकारपक्ष** (**प्रति + सहकार**) ; **प्रतिस्पर्धा** (**प्रति + स्पर्धा** > **स्पर्ध्**) = चढाओढ ;

प्रतिज्ञा (प्रति + ज्ञा.) = निश्चय; प्रतीत (प्रति + ईत > इ–प्रतीति = प्रचीति ; प्रत्यहीं (प्रति + अहीं > अहन् = दिवस)=दरदिवशीं ; प्रत्यंतर (प्रति + अंतर,) = पुरावा, खात्री ; प्रत्यय (प्रति + अय > इ) = अनुभव, जोडून येणारा शब्द ; प्रत्यक्ष (प्रति + अक्ष)=डोळ्यासमोर ; प्रत्युत्तर (प्रति + उत्तर) = उलट जबाब ; प्रत्येक (प्रति + एक)=हरएक.]

प्रमाणें वि. अ. सारखें, सम. Similar, like.
[सं. **प्रमाणेन.**]

प्रयोग पुं. उपयोग, वापर. Use, usage.
[सं. **प्रयोग, प्र + √ युज्**; याकाम. **प्रयोग** (१७–३०५); याकाम. मध्यें **प्रयुंजणें** असा धातु वापरला आहे (ज्ञा. १७-३५४); त्याचा अर्थ **योजणें** असा आहे. अकाम. **प्रयोजणें**; परंतु **उपयोगिणें** असा धातु **उपयोग** पासून सिद्ध झाला आहे. **प्रयोग**–शाळेंत उपकरणाच्या साह्यानें **प्रयोग** करतात. नाटकाचा **प्रयोग** असा एक किंचित् भिन्न अर्थाचा प्रयोग आहे.]

प्रवीण वि. हुशार, चतुर. Well-versed.
[सं. **प्र + वीणा. वीणा** वाजविण्यांत कुशल ; ह्या शब्दाच्या अर्थातील बदल चिन्त्य आहे. तसाच दुसरा शब्द कुशल हा आहे. **कुश + ल √ (ला), =** कुश नांवाचें गवत तोडण्यांत चतुर. ह्या दोन्ही शब्दांच्या अर्थांत लक्षणा आहे. याकाम. **प्रवीण** = चतुर, हुशार (नरुस्व १६२).]

प्रवर्त(णें) अक्रि. चालू होणें, उद्युक्त होणें. To be in action, to be inclined.
[सं. **प्र + वृत्**; याकाम. **प्रवर्तणें** (ज्ञा. १७-३६७); **प्रवृत्ति** = बहिर्मुखवृत्ति (ज्ञा. १६-९१); = कर्म (ज्ञा. १८-५६६); = प्रेरणाहेतु (ज्ञा. १८-४८४). प्रवृत्ति शब्दाच्या अर्थामध्यें बराच फरक पडला आहे. मूळ अर्थ **वृत्ति,** नंतर **उद्युक्तता, कल,** नंतर **कर्म,** नंतर **प्रेरणाहेतु** अशा अवस्था आहेत.]

प्रशंसा स्त्री. स्तुति. Praise, eulogy.
[*IE.* Kĕs, Kĕns, Kns; सं. **शस्, शंस्; शस्तम्** (स्तोत्रम्); *Lat.* Cas, Cens (Census = शिरगणति).]

प्रश्न पुं. सवाल. A question.
[*IE.* Plek; सं. प्रश्न, √प्रच्छ्, √पृच्छ्; *Gr.* Plecho; *Lat.* Plico (Explicare, applicare); *Ags.* Fleo; *Aisl.* Fletta.]

प्रसंग पुं. वेळ, गोष्ट, प्राप्ति. The fit time, season, occasion.
[सं. **प्रसंग, प्र + √ सञ्ज्**; याकाम. **प्रसंग** = प्राप्ति (ज्ञा. १७-२६७); = गोष्ट (१६-२९३); अकाम. **प्रसंग** = वेळ.]

प्रस्ताव पुं. उपक्रम, प्रसंग, ठराव. Introduction, occasion, resolution.
[सं. **प्रस्ताव, √ स्तु**; याकाम. **प्रस्ताव** = उपक्रम (ज्ञा. १८-७७१), = प्रसंग (ज्ञा. १६-६२); **प्रस्तावणें** = सांगण्यास आरंभ करणें (ज्ञा. १८-२९७); हिं. **प्रस्ताव** = ठराव; ह्या अर्थी मराठींत रूढ होऊं लागला आहे.]

प्राचीन वि. न. पूर्वींचें, मागील काळांतील, दैव, प्रारब्ध. Ancient, luck.
[सं. **प्राचीन; प्राचीन** = दैव, प्रारब्ध (ज्ञा. १६-१९१-१७-३८), **प्रारब्ध, संचित, प्राचीन** ह्या शब्दांना दैव, नशीब असा जो अर्थ प्राप्त झाला तो एकाच भाषिक प्रक्रियेनें प्राप्त झाला.]

प्रांजळ वि. सुगम, स्पष्ट. Clear.
[सं. **प्र + अञ्जलि**; याकाम. **प्रांजळ** = सुगम (ज्ञा. ५-१६६); शिकाम. **प्रांजळ** (प्रांजळ करूनि निरूपण ॥ दा. ३-६).]

प्राण पुं. श्वास, हवा, वायु, जीव. Breath, life.
[*IE.* An.=श्वास घेणें ; सं. **प्र √ अन् २** श्वसने (**अनिल, आननम्**); *Av.* Ainika (तोंड); *Lat.* an (animus. animal); *Goth.* Anan; याकाम. **प्राण** (ज्ञा. १७–२१९).]

प्राप्ति स्त्री. मिळकत, फायदा. Acquisition, profit, income.
[*IE.* Ap, op = मिळणें, मिळविणें ; सं. **अप्, आप्**; *Lat.* Ap, op; *Got.* abra; याकाम. **प्राप्ति** = प्रतिष्ठा शक्ति (ज्ञा. १८-१३७८).]

प्रिथिवी स्त्री. पृथ्वी. The earth.
[सं **पृथ्वी, < पुथु + इ √ प्रथ्**; याकाम. पेकाम. **प्रिथिवि.**]

प्रिन्सिपाल पुं. कॉलेजमधील मुख्य आचार्य. The principal.
[*Lat.* Princeps, principalis; *Eng.* Principal.]

प्रिय वि. लाडका, आवडता. Dear, liked.
[*IE.* Pri; सं. प्रि, प्री ९ आनन्दे; *Av.* friya; *Gr.* Prha; *Slav.* Pri; *Lith.* Prelel, Pre; *Got.* Frijon; *Sax.* Freon, freond; *Ger.* Friunt; *Ent.* Friend.]

प्रेम न. प्रीति. Love, liking.
[सं. प्रेमन्.]

प्रोफेसर पुं. अध्यापक, ज्ञाता. A professor.
[*Lat.* Profesous, pro, fateor ; *Eng.* professor.]

प्लव पुं. नाव, तरंगणारें जहाज, उडी. A boat, a leap, a jump.
[*IE.* Plev, Plu, (< Leu, Lu = float); सं. प्रव्, प्लव्; *Av.* Frav; *Gr.* Plot; *Lat.* Plov; *Lith.* Pleugu; *Slav.* Plov; *Teu.* Pleeu; *Sax.* leahdhov. संसा. प्लवंग, प्लवंगम, प्लवग, प्लुति.]

फ पु. मराठी वर्णमालेंतील बाविसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण ओष्ठ्य महाप्राण कठोर असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. प्राचीन काळापासून उच्चारण अविकृत आहे. The twenty second consonant in Marathi alphabet.
[(आद्य फ); सं. फ्, स्फ्, प्; प्रा. फ. (मध्य फ) सं. स्फ्, ष्फ्; प्रा. फ्फ, **फल–फळ, स्पन्द्–फांद, स्फट्–फाट, स्फ्य–फावडें, बाष्फ–वाफ, आस्फल–आफळ, निष्फल–निफळ.** सामान्यतः हा मराठी वर्ण सं. प्रा. प्, पह्, फ्, म्ह् पासून निष्पन्न होतो.]

फंक(णें) अक्रि. पसरणें. To spread.
[वैसं. **स्फयै**–वृद्धौ (रा.)]

फंक(णें) अक्रि. वाईट मार्गास लागणें. To go astray.
[सं. **फक्क्** १ नीचैर्गतौ; अकामसा. **फक्कड, फकावणें** = पकडणें (अमृ.).]

फकरूड न. ज्याच्या फांका निघतात असें क्षुद्र व कोंवळें फळ, फाक पहा. A tiny loose fruit.

फककन् अ. एकदम फकी मारून (खाणें). (Eating) with chucking sound.
[**ध्वनिशब्द** (बारीक पिठासारखा पदार्थ एकदम तोंडांत घालतांना होणारा आवाज). **कन्** हा प्रत्यय कान. कनेपासून. ह्यासारखे **कर, दिनी–दिशी** हे शब्द त्याच अर्थाचे आहे.]

फका,–क्का पुं. घांस (एकदम घेतलेला). A quantity taken to be chucked.
[ध्वनिशब्द; अर. फक्क = जबडा.]

फकी,–क्की स्त्री. चूर्ण, पूड. Powder.
[ध्वनिशब्द; अर. फक्क = तोंड, जबडा.]

फक्कि(क्कि)का स्त्री. गद्याचें स्पष्टीकरण, सिद्धांत. An explanation, a thesis.
[सं. **स्पष्ट (?), √ स्पश्**; प्रा. **फक्किका.**]

फकीर पुं. मुसलमानी भिक्षु,–साधु, गरीब मनुष्य, भिकारी. A Muhammadan mendicant.
[अवे. **फक्रा**; अर. **फक्र्; फकीर** = गरीब (मूळचा अर्थ–तद्देशीय पुरुष, नंतर कृपेला पात्र); हिं. **फकीर**; पेकाम. **फकिरी** (साने. पयाव १२६) = भिकारी, (फकीराची वृत्ति), **फकिराणा** < फा. **फकीफराना** = फकिराचें वतन, फकिरांना द्यावयाचा दानधर्म; पेकाम. **फकिराणा** रा. १५–१).]

फक्कड वि. उत्तम, चांगला, रंगेलवृत्तीचा. Good, free, gay.
[सं. **फक्किका** (युक्त), **√ फक्** १ नीचैर्गतौ; प्रा. **फक्किआ** (संकटमार्ग); हिं. पं. **फॉकडा**; हिं. **फक्कड**; कु. **फकर** (गरीव); आ. **फकरा**; बं. **फक्कर**; पं. **फक्कर**; सिं. **फक्किरी** (भांडण).]

फक्त,–कस्त अ. केवळ, नुसता. Only.
[अर. **फकत्**; मध्यें '**स**' चा आगम केवळ प्रौढत्व-दर्शक आहे.]

फजीत वि. विरमलेला, ओशाळलेला, लज्जित. Abashed, confounded.
[अर. **फजीहत्, फझीहत्**; अकामसा. **फजीतखोर** (हंसें करून घेणारा); **फजीता** (एक खाण्याचा पदार्थ); **फजीती, फजीत** (बोजवारा, अप्रतिष्ठा).]

फंट स्त्री भेग, चीर, खांच, दोहोंमधील अंतर, अवकाश. An interstice or opening.
[सं. **स्फट्**; प्रा. **फट्ट**; गु. हिं. पं. **फट**; सिं. **फड**; का. **फ्यार.**]

फंट स्त्री. वाईट शब्द, अपवाद (ल.) A word of reproof.
[सं. **फट्ट्** = हिंसनम्; फटकळ पहा; अकामप्र. **फट** म्हणून घेणें.]

फेटक(णें) सक्रि. पाखडणें. To sift (grain).
[सं. स्फट् ६ अवयवे, विशरणे ; प्रा. फट्ट ; देप्रा. **फट्टक** ; कु. **पटकणो** ; आ. **फट्का** (फटाका); बं. **फट्का**; ओ. **फटका** (पटाका); हिं. **फटकना** ; पं. **फटकणा** ; सिं. **पटाको** ; गु. **पटकू** (उडणें, स्फुरणें) ; ‘ **फाट(णें)** ’ ह्याच्याशीं जोडणें सयुक्तिक नाहीं.]

फेंटक(णें) क्रि. एकदम जाणें, नाहींसें होणें, बाहेर निघणें. To start off, to part.
[१ सं. स्फट् ६ अवयवे, १ विशरणे ; प्रा. **फट्ट** ; हिं. **फटकना** ; **फट + क** (त्वरावाचक प्र.) किंवा सं. **स्फट् + अंच्** (गतौ) > **फटक**; **फट् + कृ**–ध्वनिशब्द, फटकडा, **फडकडी** = एकदम आवाज करणारे दारूचे पदार्थ ; **फडकन्** = एकदम.]

फटकळ वि. अभद्र, अश्लील, वाईट. Foul, vile, bad.
[म. **फट** = वाईट (फट म्हणून घेणें.) ; **फट + कळा** (वाईट स्वरूप) ; **फटकळ** (वाईट स्वरूपाचें, अश्लील, अभद्र.) सं. **फट्** = हिंसनम् (अथर्ववेदकांड ४अनु. ४ सू. १८, ऋ. ३); अकामसा. **फटका** = तडाखा, सपाटा ; सं. **स्फट्** ; **फटकाफटकी** = भांडाभांड; **फटकारणें** = मारणें; **फटकारा** = काठीचा तडाखा ; फटाका.]

फटकी स्त्री. तुरटी. Alum.
[सं. **स्फटिक**, **स्फटिकारि** ; बं. **फटिकारि** ; हिं. **फट्करी**, **फिट्किरी** ; पं. **फट्करी** ; गु. **फट्कडी**.]

फटकूर न. कांबळ्याचा तुकडा. A piece of coarse blanket.
[सं. **पट + कूर** (अल्पनिन्दार्थे प्र.). **पटकूर**.]

फटकाव(णें) क्रि. विस्तारणें. To extend, to spread.
[सं. **स्फटक** (नाधा.)]

फटफजीती स्त्री. अत्यंत अपमान, लाजीरवाणी स्थिति. A miserable plight, disrespect.
[सं. **फट** (= हिंसनम्) + **फजीत** (अर. **फजीहत्**).]

फेंटफट(णें) अक्रि. हलणें, धडपडणें, पंखे हलविणें. To make flapping or fluttering sound, to move, to struggle.
[**ध्वनिशब्द.** सं. **स्फट्ट**, **स्फुट्ट**, **फट्** (द्विरुक्ति) ; हिं. **फट्ट**, **पटाना** ; अकाम. **फडफडणें**, **फरफरणें** (सं. **स्फरणम्**--द्विरुक्त) ; बं. **फडफड** ; हिं. **फडफडना** ; गु. **फडफडवूँ**.]

फेंटफट(णें) क्रि. उजेडणें, चांगला प्रकाश होणें. To become broad day-light, to break or dawn glowingly.
[सं. **स्फट्** १ विस्तारे ; प्रा. **फट्ट** ; **फटफटीत** (= चांगलें स्वच्छ) ह्या शब्दांत **स्फट्** ची द्विरुक्ति किंवा पूर्ण अभ्यास झाला आहे. कांहीं शब्दांत हा अभ्यास अर्धाच किंवा अपुराच झाला आहे. उदा० **फटाट(णें)** = उजेडणें.]

फटलंडी पुं. वि. हलकट मनुष्य, क्षुद्र. A mean fellow, low.
[मरा. **फट** = वाईट ; सं. **लंड** = वाईट जन्माचा, वाईट उत्पत्तीचा.) ; **फटरांड** (वाईट स्त्री, वेश्या).]

फटवि(णें) सक्रि. फसविणें, परिहासास पात्र करणें. To trick, to deceive.
[सं. **स्फट्** १० परिहासने ; प्रा. **फट्टिक**, **फटाइ** ; ने. **फट्टि** (गंमतदार) ; बं. **फटा** = (फसव्या) ; अकाम. **फटवण** (फसवणूक).]

फटाकडा,-(डी) पुं. फटाका. A cracker.
[सं. **स्फट्** १ विस्तारे किंवा ध्वनिशब्द (ह्या शब्दांत अल्पार्थे दोन प्रत्यय लागले आहेत, **स्फट् > फट + क + डा** ;) **फटाका + डा** = फटकडा, फटाकडा.]

फटिंग पुं. कांहीं परिवार नसलेला मनुष्य, भणंग. One without family or retinue.
[वैसं. **फट्** = हिंसा.]

फड पुं. आखाडा, व्यवहाराचें ठिकाण, कचेरी, ऊंस पेरलेलें वावर. A place of public business, arena, a plantation field.
[फा. **फड** ; हिं. **पहड** ; मुसलमानी अमदानींत जे राज्यव्यवहारादि बाबींतील शब्द मराठींत आले त्यांपैकीं हा एक शब्द आहे. **फडणीस** (< **फड + निवीस**) = फडाचें लिहिणें करणारा, **फडफर्मास** (फा. **फड + फरमाइश** = हुकुम.) = अधिकाऱ्याच्या हुकुमानें मागविलेला.]

फडक(णें) अक्रि. विस्तारणें, पसरणें, हलणें, फडफड करणें. To rustle, to flutter, to flap.
[सं. **स्फट्** १ विस्तारे + **अकच्** ; **फडकवि(णें)**, **फडकावि(णें)** (णिच् रूप.)]

फडका,-(कें) पुं. कापडाचा तुकडा. A piece of cloth.
[सं. स्फट्ट् १ विशरणे ; प्रा. **फलही, फडही**(कापूस); हिं. **फरिया.**]

फडतर स्त्री. लहान फोड, तुकडा. A pimple, a pustule, a piece.
[**स्फुट्ट्** १ विशरणे, अवयवे ; याकाम. **फटतर** = फाडलेल्या चिंध्या (नरुस्व. १९८); अकाम. **फोड** हा शब्द अल्पार्थ बनला आहे. त्यापासून पुन्हा **फडतर(णें)** = विभागणें हें क्रियापद बनविलें आहे.]

फडताळ न. दार, कपाट. A door, a recess in a wall with shelves and shutters.

फडतूस वि. टाकाऊ, गचाळ, क्षुद्र. Rubbish, mean, low.
['**फालतु**' (?), **फड + तूस** (?)]

फडफड स्त्री. (पंखे, कापड, कागद, सूप वगैरेंचा) आवाज, (त्यावरून) धडपड. Fluttering or flapping sound, struggle.
[**ध्वनिशब्द** ; सं. **स्फट्ट्** (द्विरुक्ति), **प्रतिस्फट्ट्**, **परिस्पंद्** (रा.) ; अकामसा. **फडफडणें** = (पक्ष्यांचा) सुटण्याचा प्रयत्न करणें ; **फडाड, फडाडां, फडफडां, फडफडवणी, फडफडाट, फडफडीत, फटफट, फरफर** पहा.]

फड, फर्मास वि. फडाच्या-अधिकाऱ्याच्या हुकुमाप्रमाणें मागविलेला. फड पहा. Ordered as per orders of officers.

फडशा पुं. निकाल, परिणाम. Clearance, settlement.
[हिं. **फरचा.** परंतु हिंदीमध्यें हा फारसी,-अरबीमधून उतरला असावा.]

फडा स्त्री. फणी, नागसाप वगैरेंचें डोकें. The hood of a *nag*.
[सं. **फटा, √ स्फट्ट्.**]

फणका पुं. रागाचा झटका,-आवेश. A sudden ardour or anger, a fit of passion.
[सं. **प्र + हन्, फण्** ; पं. **फणकणा** (उठणें); गु. **फणकवूँ** ; अकाम. **फण, फणफणाट.**]

फणकार,-रा पुं. सपाटा, आघात, चावा. A sudden stroke or bite, a fit of passion.
[सं. **प्र + हन्, फण्** = प्रकाशणें (राज.); ह्यांतील '**कार**' हा शब्द **कृ** (हिंसायाम् किंवा शब्दे) = दुःख देणें किंवा **शब्द करणें** ह्या अर्थी धातूपासून आला आहे. '**फणा**'च्या योगानें आघात असा अर्थ.]

फणस पुं. वृक्ष-फलविशेष. A jack-fruit.
[सं. **पनस** ; प्रा. **फणस** ; हिं. **पनस, फनस** ; गु. **फणस** ; बं. **पणस** ; म. **फणस.**]

फणी स्त्री. नागाचा फणा, विंचरणी. A hood, a a comb.
[सं. **फणः** ; पा.प्रा. **फण** ; का. **फन्** ; आ. **फना** ; बं. **फन्** ; ओ. **फणा** ; हिं. **फन्** ; पं. **फण्** ; सिं. **फणि** ; लां. **फणिश्चर** ; गु. **फेण्** ; याकाम. **फणि** (नरुस्व. २१८). सं. **फणा, फणिन्** ; प्रा. **फणा** ; देप्रा. **फणग, फणिह.**]

फंड पुं. द्रव्याचा संचय. A fund.
[*Lat.* Fundus; *Eng.* Fund.]

फतकण,-ल स्त्री. विस्तृत,-ऐसपैस बैठक. Sitting broadly and roomily.
[सं. **प्रस्थ** ; प्रा. **पत्थ + कल** ; **फतकल** ; **फतका.**]

फतवा पुं. धर्म, आज्ञा, आज्ञापत्र. A religious injunction, an order.
[अर. **फत्वा**-मुसलमानी विद्वत्परिषदेनें कायदा,-धर्म, नीतिसंबंधीं दिलेला निर्णय.]

फताडा वि. पसरट, ओबडधोबड. Spreading out widely.
[सं. **प्रस्तर-प्रस्तार** ; प्रा. **पत्थड.**]

फते,-त्ते स्त्री. यश, जय, सरशी. Victory, success.
[अर. **फतेह, फन्ह, फाह्** ; पेकाम. **फत्ते** (रा. ८-५), **फत्तेजंग** = जगावर किंवा युद्धांत जय मिळविणारा ; **फत्तेनशीब** = विजयशाली ; **फत्तेबाज** = जयी.]

फतेमारी स्त्री. गलबताचा एक प्रकार. A small sailing vessel.
[पोर्तु. **पातीमार** = A *patimar* ; गो. **पातमार** ; म. **पातमारी** ; हिं. **फतेमार** = A letter-carrier.]

फत्त(त्थ)र पुं. दगड, काळा,-मोठा व कठीण दगड. A stone.
[वै.सं. प्र + स्तर ; सं. प्र + स्तर, ✓ स्तृ ; प्रा. पत्थरो ; *Lat.* Petra = Rock; *Gr.* Petrha; *Sax.* Lampreda. हिं. **पत्थर.**]

फत्री स्त्री. कुचकामाची वस्तु, हलकें पान. A useless thing, a dry leaf.
[सं. **प्रस्तर (?), पत्र, पत्री** ; देप्रा. **प्रत्थरिश्च** (पुं.)]

फद्फद,-दां अ. फदफद असा आवाज करून. With the particular sound.
[ध्वनिशब्द, सं. पर्द् १ कुत्सितशब्दे (रा.).]

फद्फद(णें) अक्रि. खदखदणें. To fizz, to spit.
[मरा. **फद्फद्**-(नामधातु.).]

फद्या पुं. मुंबई प्रांतांत चालू असलेलें एक नाणें. A copper coin.
[म. **फद्या** (अर. < **फिद्य**-खंडणी (?)). सोळाव्या शतकांत हिशोबी नाणें म्हणून हें चालू होतें. पन्नास फद्यांचा एक रुपया होत असे. इजिप्तमध्यें **पद्**-चांदीचें एक नाणक सुरू होतें. तुर्की. **फड्डु**; दुसरें एक प्रमाण २००० फदे= १ शि. २ पें.]

फनेल न. नसराळें. A funnel.
[*Eng.* Funnel; *Fr.* Founil ; हा शब्द मूळ फ्रेंच आहे. फ्रान्सच्या दक्षिणेंतील बोर्डो हें शहर इंग्रजांच्या ताब्यांत फार दिवस होतें. त्यामुळें तेथील बरेच फ्रेंच शब्द इंग्रजींत उतरले. जे कांहीं दारुसंबंधीं शब्द आले त्यांपैकीं हा एक आहे.]

फंद पुं. नाद, व्यसन, कारस्थान, फसवणूक, कौटिल्य. A vice, an evil habit, a wily scheme.
[फा. फन्द् ; पेकाम. **फन्द** = बंड (राज. ५-१७७); **फन्दफितूर** (कट); **फन्दी** (नादी, रंगेल), **फन्दफितोडा** (बंड, राजद्रोह वगैरे).]

फन्ना पुं. वि. निकाल, नाश, नष्ट, उध्वस्त. Complete destruction, destroyed.
[अर. **फना** = नाश.]

फरक पु. अंतर, भेद, तफावत. Difference, variation.
[अर. **फर्क्.**]

फरक(णें) क्रि. बाजूस होणें, वाट देणें. To move aside, to allow way.
[सं. **परा + कृ** ८ अवमाने, अपसारणे ; प्रा. **फरक्किद** (< **पराकृत**) = हललेला ; अर. **फर्क्.**]

फरकट स्त्री. रेघोटी, ओळ, रेघ. Scratching, track, trail.
[सं. १ **परि + कृष्** (१ विलेखने) > **परिकढ** > **फरकट** ; २ **फर + कट** (म. प्र.) < **स्फर्** १ कंपने, गतौ; अकामसा. **फरकट(णें)** = रेघोट्या ओढणें.]

फरगत न. जहाजाचा एक प्रकार. A sailing vessel.
[*Fr.* Fregate; *Ital.* Fregata ; *Span.* Fragata; *Eng.* Frigate = वल्हवण्याची लहान नाव.]

फरजंद पुं. मुलगा, मूल. Son, a child.
[फा. **फर्झन्द** = मूल ; पेकाम. **लेकर फर्जन्द** (रा. १५-२७९).]

फरफट स्त्री. जमिनीवरून ओढत नेल्याची खूण. A track, a trail.
[सं. १ **पर्पट** ; २ **परिस्फटनम्, फरफट(णें)** = जमिनीवरून ओढत नेणें.]

फरमान न. हुकुम, फर्मान पहा. A royal mandate, a firman.

फरमाव(णें) क्रि. आज्ञा करणें. फर्मान पहा. To order.

फरशी स्त्री. धारेची लहान पात्याची कुऱ्हाड. A battle-axe.
[*IE.* Per, Pre ; (मारणें); सं. **पर्, पर्शु,** ✓ **अश्** ; *Av.* Per (लढणें); *Gr.* Pel; *Lat.* Pel; *Slav.* Prati; *Lit.* Perti: सं. **पर्शु, परशु** ; पा. प्रा. **परसु** ; गु. **फरसी, फरशी** ; हिं. **फरसा** ; बं. **फरसा, फलसा** ; फार प्राचीनकाळीं बरगड्यांच्या हाडांचें हें हत्यार तयार करीत असावेत.]

फरस पुं. मोठी फरशी, दगड, लाद्याची जमीन. A slab, a pavement.
[अर. **पर्श** ; पेकाम. **फर्श** (राज. ५-७).]

फरसाळें वि. भिन्न रुचीचें, भिन्न स्वादाचें. Having different tastes.
[सं. **स्फरशाली** (?); याकाम. **फरसाळें** (ज्ञा. १८-२४५)]

फरा पुं. ओळ, रांग, खांद्याचें हाड. A row, rank, line.

[सं. **फलक**; प्रा. **फरअ**; देप्रा. **फरओ फलकः** (२१-१५); पं. **फर.**]

फराकत,-गत स्त्री. सोडवणूक, मोकळीक, मुक्तता, आराम. Release, liberty, leisure.

[अर. **फराघत्**; पेकाम. **फरागत** (रा. ६-१३०).]

फरारी पुं.वि. पळून गेलेला, बेपत्ता, बेपत्ता झालेला कैदी. Absconded, a prisoner, a runaway.

[अर. **फिरार**=पळ, मूळ अर्थ–जमीनघर सोडून देशांतरीं भटकणारा.]

फरारी स्त्री. ओढ, फडफडणें, आधिक्य, आभास, भास. Attraction, fluttering, increase, illusion.

[सं. **स्फर्** १ संचलने, **फरफर,** (अर्ध अभ्यस्त) **फरार**; याकाम. **फरारी**=आभास, भास (ज्ञा. १३-१०५).]

फरास पुं. घरांतील बैठक घालणारा नोकर. A servant (whose business is to spread the carpets).

[अर. **फर्राश्** (√ **फर्श्** = सतरंजी पसरणें); **फरासखाना**=राहुट्या, शामियाने, जाजमें, खुर्च्या वगैरे सामान अगर तें सामान ठेविण्याची जागा. अठरा कारखान्यांपैकीं एक.]

फरांसीस,-शीस पुं. फ्रेंच मनुष्य,-शिपाई. A Frenchman.

[*Fr.* Francez; *MLat.* Francus = Free; *Fr.* Frank = Free man. ह्यापासून मराठी **फिरंगी** हा शब्द आला.]

फराळ, फळार पुं. थोडेसें खाणें, उपाहार. A slight repast.

[सं. **फलाहार**; **फल+आ √ हृ > फळार, फराळ** (वर्णव्यत्यास); गु. **फराळ, फळार**; हिं. **फलार, फल्यार**; बं. **फलार.**]

फरोक्त वि. न. विकलेलें, विक्री. Sold, sale.

[फा. **फरोख्त्**; पेकाम. **फ्रोख्त** (चंद्रद. १-१९), **फ़रोख़्ती** (रा. १३-९२).]

फर्गोल पुं. रूभरी(कापसाचा) अंगरखा, पायघोळ वर-झगा. A gown (of cotton-stuffed cloth).

[फा. **फर्वल्**, **फर्गूल्**; पेकाम. **फर्गोल** (रा. ८-१२०).]

फर्जी पुं. वजीर. A vizier or minister.

[फा. **फर्झी.**]

फर्द,-रद पुं. रेशमी पांघरण्याचें वस्त्र, शालजोडीचें पान, एकेरी वस्त्र. A silk-cloth, a piece of a shawl.

[अर. **फर्द्**-एकटा; मूळ अर्थ = **सुटा, एकटा, एक भाग, तुकडा, जोडींतील एक.** शालेची जोडी असे. फर्द दोन मिळून एक शाल होई; त्यावरून लक्षणेनें शाल–रेशमी वस्त्र; पेकाम. **फर्द** (रा. ८-२१७); अकाम. **फर्द, फरद.**]

फर्नादीन वि. ना. आंब्याची एक जात. A kind of mango.

[*Portu.* Fernandez.]

फर्मा पुं. नमुना, प्रत, छापलेल्या मजकुराचीं कांहीं पानें. A specimen, a form.

[*Lat.* Forma = Shape; *Fr.* Forme; *Eng.* Form.]

फर्मान न. हुकुम, आज्ञापत्र, राजपत्र, बादशहाची आज्ञा. Order, a royal writ.

[पेल्हवी. **फ्रमान्**; फा. **फर्मान्**=आज्ञा, परवाना, √ **फर्मुदन्**=आज्ञा करणें; हिं. **फरमाना**; पेकामसा. **फर्मानवाडी. फरमान** पहा.]

फर्मास,-श,-ष पुं. नजराणा, अति उत्तम नमुना. The best specimen, a present to a superior.

[फा. **फर्माइश्**, **फर्मास्**; पेकाम. **फर्मास** (रा. १-२४८); अकाम. **फर्मास, फरमास**=निवडक, उत्तम, नमुनेदार.]

फर्लांग पुं. अंतर मोजण्याचें एक माप, मैलाचा आठवा हिस्सा. A meaure of distance, a furlong.

[*A.S.* Furlang (furrow-long); furrow च्या बाजूचें अंतर, २०० यार्ड किंवा चाळीस पोल इतकें अंतर.]

फर्लो(रजा) वि. सेवानिवृत्तीच्या पूर्वीची हक्काची रजा. The furlough (leave).

[*Eng.* Furlough; *Dut.* Verlof = सैनिकाची गैरहजिरीची रजा; हा शब्द डच भाषेंतून इंग्रजींत आणि इंग्रजींतून मराठींत आला.]

फल न. फळ. A fruit.

[सं. **फलम्**; संसा. **फलज्योतिष** (ग्रहाच्या गतींचा मनुष्याच्या जीवनावर होणारा परिणाम व त्याप्रमाणें मिळणारें फल); **फलाशा** (फलाची आशा); **फलितार्थ** (सारांश अर्थ, गर्भितार्थ).]

फलाणा सर्व. अमूक एक. Such a one, certain.

[अर. **फुलान्**; **फलान्**; फा. **फलान्**; हिं. **फुलान**, **फलान**; स्पॅ. पोर्तु. **फुलनो**; पेकाम. **फलाणें** (पार. ब्रच. ३२).]

फलाणी स्त्री. लोंकरीचें तलम कापड. Flannel.

[*Eng.* Flannel. परंतु हें अशुद्ध रूप आहे. त्याचें शुद्ध रूप Flannen, *Fr.* Flanell; हा शब्द Flanders ह्या देशनामावरून आला.]

फव(णें) क्रि. प्राप्त होणें, मिळणें. To get, to secure.

[सं. **स्फयै** (वृद्धौ) ?]

फवारा पुं. उडणाऱ्या पाण्याचे तुषार, हबका, शिंपणें, जलोत्क्षेप, कारंजें. A spray, a playing fountain.

[अर. **फव्वारा**; पेकाम. **फवारा** (सानेपयाव. २८६).]

फस(णें) अक्रि. चुकणें, भुलणें, वंचना होणें. To err, to miss, to be deceived.

[सं. **पश्** १० नाशने; **स्पश्** १ बाधे (?) (रा.); अकामसा. **फसकणें**, **फसगत** (फस + गति), **फसगफलत** (दोन्ही एका अर्थाचे पण भिन्न भाषांतील शब्द), **फसगायब**.]

फसक(णें) क्रि. सैल होणें, तुटणें. To be loose, to break.

[**ध्वनिशब्द** किंवा **फस्स + अक**; म. **फस + क** बं. ओ. **फसका**; हिं. **फसकना**; गु. **फसकवूँ**.]

फसली(सन) वि. मुसलमानी एक शक. A Muslim era.

[अर. फा. **फस्ली**; अर. **फसल्** = हंगाम, मोसम, ✓ **फसूल्** = विभागणें; अकामसा. **फसल** = मोसम, पीक.]

फस्त वि. उध्वस्त, नष्ट. Destroyed, lost.

[फा. **फस्त्** = शीर तोडून रक्त काढणें.]

फळ(णें) क्रि. गर्भ धारण करणें. To receive impregnation.

[सं. **फल**; पा. **फल**; प्रा. **फलदि**; का. **फलुन्** कु. **फळणो**; आ. **फलिब**; बं. **फला**; हिं. पं. **फलना**; सिं. **फरणु**; गु. **फळवूँ**; याकाम. **फळणें** = फलद्रूप होणें, सफल होणें (नरुस्व. ६१४); सं. **फल** = स्त्रियांचा पहिला विटाळ; **फलशोभन**; **फळफळणें** (उत्कर्ष होणें).]

^{1}**फळ** न. फल, परिणाम, वाढ, फायदा (ल.). A fruit, a result, a gain.

[सं. **फलम्**; पा.प्रा. **फल**; का. **फल्**; प.पं. **फळ्**; कु. आ. बं. **फल्**; ओ. **फळ**; वि. **फर्**; हिं.पं.लां. **फल्**; सिं. **फरु**; गु. **फळ**; ने. **फल्**; सिंह. **पल**; याकाम. **फळ**, **फळेकार** (पक्षी नरुस्व. ७४८); **फळेवरी** (गोफणींत फळें घालून-नरुस्व. ५९८); **फळोवळी** (फळांच्या ओळी -नरुस्व. ७८७).]

^{2}**फळ** न. नांगराचा फाळ. The blade of a plough.

[सं. **फलम्**; पा. **फल** (बाण, तरवारीचें टोंक); प्रा. **फल** (नांगर); का. बं. **फल** (धार, पातें); ओ. **पळी**; हिं. पं. **फल**; सिं. **फरु**; गु. **फळ**; अकाम. **फरा**, **फाळ**.]

फळकन् अ. एकदम व फळफळ अशा आवाजानें. Suddenly and with the sound of.

[**ध्वनिशब्द**, मूत्राचा किंवा द्रवपदार्थाचा आवाज. कान: **कने-कन्**, **-कर**, **-दिनी**, **-दिशी**.]

फळा, (फळी) पुं. लाकडाची पट्टी. A board, a plank.

[सं. **फलक**; पा. **फलक**; प्रा. **फलग**, **फलइ**; का. **फल**; आ. **फली**; बं. **फला** (पातें); ओ. **फळी**; हिं. **फली**; पं. **फल्हा**; सिं. **फरहो**; गु. **फाळ** (पातें); अकाम. **फाळ** (धार, पातें) आणि **फळा** (लाकडाचा), ह्या दोहोंत टर्नरचा घोंटाळा झाला आहे. ‘ **फल** ’ = नांगराचें लोखंडी तीक्ष्ण टोंक, त्यावरून **फळ**, **फळा**, **फळी**, **फळकुट** इत्यादि शब्द आले आहेत. याकाम. **फळकट**, **फळी** = (पक्ष, रांग-ज्ञा. १७-२६). ह्यांत सं. ✓ **स्फार्** १ विस्तारे असा धातु निघतो. तो वैदिक **स्फूर्यै**-वृद्धौ ह्यांशीं संबद्ध आहे.]

फॅक्टरी स्त्री. कारखाना, वखार, गुदाम. Factory.

[*Eng.* Factory; *Lat.* Factum; अकामग्रा. **फतोरी**. इ. स. १६१३ मध्यें पश्चिम किनाऱ्यावर पुढील

ठिकाणीं वखारी होत्या–कच्छ, खंबायत, बडोदा, भडोच, अहमदाबाद, सुरतस्थाली, मुंबई, रायबाग (?), राजापूर, कारवार, बातिकाल, होनावर, बार्सीलोना, मंगलोर, कनोर, धर्मपट्टम, तेलिचेरी, कालिकत, करगनोर, पोर्ची, कानोंपली, किलान, अंजनगांव.]

फॅड न. संवय, लहर. A fad, a hobby.
[*Fr.* Fadaise = Unknown, Fade = witless; *Eng.* fad.]

फाईल स्त्री. वही, चोपडी, ओळ. A file.
[*Eng.* File; *As*, Feol; *Dut.* Vijl; *Dan.* Ful; *OH.G.* Figila, √ fiden = to rule.]

फाक(णें) क्रि. खाणें, एकदम तोंडांत घालणें. To eat suddenly.
[सं. फक्किका, फक्क; हिं. फाक, फांक; पं. फक्का; लां. फक्क; सिं. फकु; गु. फाको; अर. फाका (अभाव) (?); अकाम. फाका (घांस), फाका (उपास) पहा.]

फाक(णें), फांक(णें) क्रि. पसरणें, विस्तृत करणें, विकसणें, फुलणें. To open out wildly.
[सं. फक्क्-नीचैर्गतौ किंवा प्र + अक् १ कुटिलायां गतौ; देप्रा. फक्क, फक्कड; बं. फांक (उघडणें); हिं. फाकना; पं. फकणा; याकाम. फांकणें (ज्ञा. १८-२५७). ह्या शब्दाचीं दोन रूपें फाक व फांक अशीं आहेत. **गुरें फाकणें** (दूर हाकणें), **गप्फा फाकणें, दिशा फांकणें** असे प्रयोग रूढ आहेत.]

फांक स्त्री. फोड, अंतर, प्रतिबंध. A slice, an obstruction.
[सं. प्र + कृत् ६ छेदने (?); **फांक** ह्या शब्दावरील अनुनासिकाची उपपत्ति नीट लागत नाहीं. याकाम. **फांक** (अंतर, प्रतिबंध—ज्ञा. ५-१७३); अकामसा **फकरूड** = क्षुद्र फळ.]

फाकट(णें) क्रि. अलग करणें, पसरणें, विभाग करणें. To separate, to spread.
[सं. प्र + कृत् ६ छेदने; अकामसा. फाक + र = दार; **फाटक** (वर्णव्यत्यास).]

फा(फां)कडा वि. पाणीदार, निष्णात, ऐटबाज, सुंदर Smart, dashing, fine, spirited, adept.
[सं. **फक्किका** (युक्ति), **फक्क्** १ नीचैर्गतौ; प्रा. **पक्किआ**; हिं. पं. **फॉंकडा**; पेकाम. **फाकडा.** पेशवेकालांत विशेषतः उत्तर पेशवाईंत फाकडा ही पदवी जिवाची तमा न बाळगणाऱ्याला देत असत. (कॅप्टन स्टुअर्ट)–इष्टुर फाकडा; मानाजी फाकडा, कोन्हेर त्रिंबक एकबोटे ह्या तिघांना फाकडा असें म्हणत.]

फा(फां)का पुं. अभाव, खाडा, उपास. Emptiness, fast.
[अर. **फाका** = दारिद्र्य, अभाव; पेकाम. **फाका** (पाव. ३०); अकाम. **फाकणें** = खाणें. फाकणें पहा.]

फाग पुं. फाल्गुन महिना, (ह्या महिन्यांत म्हणावयाचें) गाणें, लावणी. The month *Falgun*, *lavani*.
[सं. फल्गुः; पा. फग्गु; प्रा. फल्गु; देप्रा. फग्गु वसंतोत्सव (२१०-१५); आ. **फॉंक**; बं. **फाग**; ओ. **फगु**; हिं. **फाग**; गु. **फाग, फगवो** (होळीनिमित्त देणगी); सिं. **फागु** (महिन्याचें नांव, होळींतील मजा); पं. **फाग** (होळी).]

फांज(णें) सक्रि. फाडणें, चिरणें. To tear asunder, to rend apart.
[सं. **प्र + छो** ४ छेदने; **प्र + अस्** (**प्रास्य**); हिं. **फांज**; म. **फास, फांज** = तट, तटाची भिंत, बांध (< सं. **स्पर्श** (?)).]

फाजल वि. शहाणा, विद्वान. Clever, learned.
[अर. **फाझिल्**; पेकाम. **फाजल** (रा. ३-१८६), ह्यापासून **अर्थभ्रंश** होऊन '**फाजील**' = अतिशाहाणा, अतिरेकी ह्या अर्थाचा शब्द रूढ आहे.]

फाट(णें) अक्रि. मोडणें, विदारण होणें, भेग,-चीर पडणें. To burst, to split.
[सं. **स्फट्** ६ विशरणे, (कर्मणि); प्रा. **फट्टइ**; अप. **फट्ट**; देप्रा. **फट्ट**; का. **फाट्टन्**; कु. **फाट्टणो**; आ. **फाटिब**; बं **फाटा**; ओ. **फाटिबा**; हिं. **फाटणा**; पं. **फाटणा**; लां. **फाटण**; सिं. **फाटणु**; गु. **फाटवूँ**; याकाम. **फांटणें** (स्वच्छंद फिरणें, पोहोंचणें,-ज्ञा. १८-२४९); **फाटां फुटणें** (प्रसार होणें–ज्ञा. १-२३); शिकाम. **फाटा फुटणें** (तुका म्हणे वाटे । नको फुटो देऊं फांटे ॥ तु. अ.).]

फाट पुं. एकदम होणारा आवाज. A sudden sound.
[सं. **स्फट्**; प्रा. **फट्ट**, कु. **फॉट्ट**; आ. **फॉट्ट**; ओ. **फांटी**; पं. **फॉट्ट**; सिं. **फांड**, गु. **फॉंट.**]

फाटक न. दार. A door or gate.
[सं. स्फट् (?); आ. फाटक (तुरुंग); बं. फाँटक; ओ. फाटक; बं. हिं. पं. फाटक. मराठीत फाटक आणि फाकट असे दोन्ही शब्द आहेत.]

फाड(णें) सक्रि. तुकडे करणें, विभागणें, चिरणें. To tear to pieces, to rend, to cut.
[सं. स्फट् ६ विशरणे, (णिच्) स्फाटय; प्रा. फाड; हिं. फाडना; पं. फाडणा; याकाम. फाडोवाड (=स्पष्टता-ज्ञा. ९-४३); ओ. फाडिबा; बं. फाडा; सिं. फाडणुं; गु. फाडवूँ; अकाम. फाड (चीर, भेग, भाग, स्पष्टीकरण, चिरफाड); फाडकन्-कर-दिन-दिशी; फाडकी,-फाडीव, फाडे (ढीग); फाडा,-फाडी (ढीग).]

फाण(नू)स पुं. कंदील, आच्छादित दिवा. A lantern.
[अर. फानूस्; फा. फानूस्; गु. फानस; सिं. फानोसु, फानूस्; पं. हिं. फानूस्.]

फात्या पुं. स्त्री. कुराणांतील मंत्राचा आरंभ, पहिला घांव (ल.) The first part of the first chapter of the *Koran*, a stroke.
[अर. फातिहा, अल् फातिहा = कुराणांतील पहिला सुरा; पेकाम. फात्या (मराचिथोशा. ९); अकाम. फतवा, फांते.]

फांत पुं. कुणगा, जमिनीचा तुकडा. A piece of land.
[पोर्तु. फातिआ; अकाम. फात, फांती, फाती.]

फांद(णें) अक्रि. उडी मारणें, उधळणें. To leap, to spring.
[सं. स्पन्द्; पा. फन्द; प्रा. फंद; कु. फॉंदणो; बं. फांदा; हिं. फांदना.]

फांदा पुं. झाडाचा ढापा, अडचण, संकट (लक्षणा). A branch, a bough, a difficulty (fig.)
[सं. १ प्र + स्कन्दः किंवा अप + स्कंदः; प्रा. फक्खन्दो; हिं. फांदा = संकट, २ प्र + अत्, प्र + दो, प्र + स्पन्द् (ह्या व्युत्पत्ति राजवाडे ह्यांनीं सुचविल्या आहेत.). ह्याच्या जोडीला खांदा, खांदी व्युत्पादिण्यास घेतले म्हणजे 'स्कद्' धातु निश्चित ठरतो. फांदी (खांदी, डहाळी), फांद(णें), फांदडा (प्रस्कंद).]

फांपर(णें) क्रि. जखम होणें, खरचटणें, दुर्गंधयुक्त पू येणें. To be wounded, to be scratched or bruised.
[सं. पर्द् १ कुत्सित शब्दे.]

फांपस(णें) क्रि. घसटणें, खरडणें, चेंदामेंदा होणें, खाजवून काढणें. To squeeze, to crumble, to scratch.
[सं. स्पश् १ बाधने, (अभ्यास) पस्पश् > फापस फापुस(णें); सं. प्र + स्फुट् १ अवयवे = फोडणें, झाडणें.]

फायश स्त्री. प्रसिद्धि, प्रकाशन, जाहिरात. Publication, advertisement.
[अर. फाश् = जाहीर; पेकाम. फायश (मदबा. १-१९९).]

फाया पुं. सुवासिक अत्तराचा कापसाचा बोळा. A small scented piece of cotton.
[सं. स्पर्शः (?); हिं. फाया.]

फार वि. अधिक, स्पष्ट, उघड, पुष्कळ. Many, much, distinct, open.
[सं. स्फार; प्रा. फार; अप. फार; गु. फार, (सं. स्फारम्-अव्यय; याकाम. फार-(प्रसृत, विकसित; ज्ञा. १५-३११); (=स्पष्ट-ज्ञा. १५-३१०); अकामसा. फारा होणें = स्पष्ट होणें.]

फारकत स्त्री. इस्टेटीवरील सोडलेल्या हक्काचा दस्तऐवज, तारातूट, विभागणी. A deed of relinquishment of claim, separation, division.
[फा. फारिग् + खत्ती; अर. फारिग् = मुक्त; पेकाम. फारीक (मराआ. २३).]

फारसी-शी पुं. इराणचा रहिवासी (तेथील भाषा). A Persian, the Persian language.
[१ सं. पारस, पारसिक; हे नंतरचें संस्कृतीकरण आहे. २ फा. फारसी.]

फारिक,-ख वि. परतफेड केलेलें, फेडलेलें (कर्ज). Liquidated (debt).
[अर. पारिग् = मुक्त; पेकाम. फारीक (मराआ. १३).]

फार्स पुं. लहान परिणामकारक असें नाटक, सोंग, बतावणी. A farce, an acting.
[*Eng.* Farce; *Fr.* Farce = the stuffing in meat; *Lat.* Farcire = to stuff; *Gr.* Phrassein = to shut in.]

फालतु,-क वि. अधिक, ज्यास्त, वरकड. Additional, surplus.
[हिं. फालतु.]

फाल्गुन पुं. हिंदुपंचागांतील शेवटचा महिना. फाग पहा. The month of *Falgun*.

फाव(णें) अक्रि. सवड होणें, प्राप्त होणें. To stand unto as convenient, to be at leisure, to find as convenient or practicable.

[सं. फर्व् १ गतौ; प्रा. फव्वाहइ; का. फबुन्; आ. फापिब; हिं. फब्ना; पं. फब्बणा; सिं. फबणु; गु. फाववूं; २ सं. प्राप् ५ प्रमाणे; प्रा. फव्व, फव्वीह; ३ प्याय् १ वृद्धौ; प्राव् १ तृप्तौ (राज.); याकाम. फावणें (=प्राप्त होणें-ज्ञा. ५·१०८); फाव (=प्राप्ति-अमृ. ७-११२).]

फावडें न. माती सावरण्याचें हत्यार. A hoe or scraper.

[सं. स्फ्यः (लाकडाचें लांब हत्यार); पा. फिय; कु. फउरो; बं. ओ. फाउरा; बि. फरुहा; हिं. फरुआ, फाओरा, फौरा (टिकाव, खोरें); सं. फल = नांगराचा फाळ-ह्या शब्दाशीं संबंध आहे कां? अकाम. फलट, फालट, फावडा हे शब्द रूढ आहेत.]

फांस(णें) क्रि. घासणें, माखणें. To rub over, to besmear.

[सं. स्पर्श् ६ संस्पर्शने, १ बंधने.]

फांस(णें) सक्रि. चिरणें, कापणें, पसरटून भाग करणें, फांकणें. To slit, to cut.

[सं. प्र + छो ४ छेदने (रा.), प्र + अस् (प्रास्य > फास) ही व्युत्पत्ति अधिक ग्राह्य. ह्या धातूचीं दोन रूपें आहेत. एक सानुस्वार, दुसरें निरनुस्वार; त्यांमध्यें संभ्रम होऊन दोन्ही एकाच अर्थीं वापरतात. दोन्ही भिन्न अर्थाचीं रूपें आहेत.]

फांस पुं. गळ, फासा, जाळें. A noose, a snare.

[सं. स्पर्श, पाश; का. फोहु; बं. फॉसा; ओ. फास; हिं. फासा; पं.लां. फाहा; सिं. फाहो; गु. फासो; अकामसा. फासणें, फांशी (बं. आ. ओ. हिं. फॉसी).]

फासा पुं. पाश, पकड, हस्तिदंताचा चौकडी तुकडा. A clasp, a hook, a snare, a draught (of dice).

[सं. पाशः, पाशकः; प्रा. पासअ; अकामसा. फांसा, फासाड, फासोटी, फासाडणें, फासावणें = गुंतविणें.]

फाळ(णें) उक्रि. तुकडे करणें, विभागणें, फाडणें. To tear, to rend, to divide.

[सं. स्फल्, स्फट्, किंवा प्र + हल्, फल् (विशरणे); पा. प्रा. फाल; का. फालबु; आ. फालिब; बं. फाला; ओ. फालिबा; हिं. फाल; सिं. फार; गु. फाळो; याकामसा. फाळुकें = लहान वस्त्र; अकामसा. फाळका = केळीच्या पानाचा तुकडा; फाळा (कापडाचा तुकडा, जमिनीचा कर); फाळणी (जमिनीची वाटणी).]

फाळ पुं. नांगराचा फाळ, नांगर. A ploughshare or blade of it.

[सं. फल, फालः; पा.प्रा. फाल; का. फाल; कु. फालो; आ. बं. फाली; ओ. फाळा; बि. फार; पं. फाल; सिं. फारु; पं. लां. फाला.]

फाळ स्त्री. लाकडाचा तुकडा, चपटा. A large slip.

[सं. (फालयति), फालि; का. फाल; आ.बं. फालि; ओ. फाळिआ; बि. फारी; पं. फाल; सिं. फार; गु. फाळी.]

फिक(की)र स्त्री. काळजी, आस्था, चिंता, विचार. Care, concern, anxiety.

[अर. फिक्र्; पेकाम. फिकीर, फिकीरमन्द = चिन्ताक्रान्त (पदमव. ६९).]

फिका,-का वि. पिवळट, पांढरट, निस्तेज, पुसट रंगाचा. Faint or dim of colour, pale, light.

[सं. पीत, पक्व; प्रा. पीअ, पिक्क; कु. फिको; बं. ओ. फिका; पं. फिक्का; सिं. फिको; हिं. फिक्का, फीका; गु. फीकूं; ने. फिको.]

फिट(णें) क्रि. सुटणें, सैल होणें. To get loose, to be removed or cleared away.

[सं. स्फिट्ट (?); प्रा. फिट्टइ; ओ. फिटिबा; पं. फिट्टणा; लां. फिट्टण; सिं. फिटणु; गु. पिटवूं; याकाम. फिटणें = सोपणें (ज्ञा. ११-१५९); = नाहींसें होणें (ज्ञा. ४-१६४). दुसरी व्युत्पत्ति सं. भ्रंश् (निष्ठा) भ्रष्ट; प्रा. फिट्ट अशी आहे; परंतु हा धातु स्फट्, स्फुट्, स्फिट्, ह्या शब्दसंस्थेंतील आहे. फिटंफाट, फिटफिटें, फिटी, फिटाल.]

फिड्ल न. तंतुवाद्यविशेष. A fiddle, a stringed instrument.

[*Eng*. Fiddle; *ME*, Filhele; *OHG*. Fidula; *Dut*. Vedele; *MLat*. Vitula = a violin.]

फित(णें) अक्रि. बदलणें, स्वामिद्रोहास प्रवर्तणें. To revolt, to change.

[फा. **फितन्**, **फित्ना**; अर. **फुतुर्** = शैथिल्य; अकामसा. **फितवा**, **फितूर** (< अर. **फुतुर**), **फितुरी**; शिकाम. **फन्दफितुर**, **फितवाफांदा,-फांदडा** (सभा. २२) (चित्र. ३६).]

फिदफिद(णें) अक्रि. फिदफिद हसणें, तडतडणें. To thrill and tingle, to laugh.

[**ध्वनिशब्द**, सं. १ **पर्द्** १ कुत्सितशब्दे, २ **पद्** (अभ्यास).]

फिदा वि. खूष, प्रसन्न, आसक्त, (मूर्खपणानें) अनुरक्त. Pleased, attached.

[अर. **फिदा**; पेकाम. **फिदा** (प्रभाकर लावणी १९७).]

फिंदार(णें) क्रि. पसरणें, मोठें करणें. To dilate, to open and spread.

[सं. **स्फाय्**, **प्याय्**, **प्यै** १ वृद्धौ + **द्राघ्** १ आयामे (रा.) (?). इतर रूपें **फेंदार**, **फिंदाड**, **फेंदर**, **फिंदड**.]

फिर(णें) अक्रि. हिंडणें, चालणें, वळणें, परत जाणें, भोंवतीं गिरकणें. To go over, to walk, to turn round, to return.

[सं. **स्फिर्** (?); प्रा. **फिर**, **फिरक्क**; देप्रा. **फिर**; अप. **फिर**; कु. **फिरणो**; बं. **फिरा**; हिं. पं. **फिरना**; सिं. **फिरणु**; गु. **फरवूँ**. (राजवाडे पुढील व्युत्पत्ति सुचवितात; सं. **परि + इ**; **भ्रम्**; **परि + ईर्**; **भ्रम्**, **विहर्**); अकामसा. **फिरता**, **फिरविणें** (णिच्), **फिरवाफिरव**, **फिरवणी**; **फिरकणें** (प्रा. **फिरक्क**; कु. **फिर्कौं**, **फरकणो**; गु. **फरकवूँ**).]

फिरंगी,-घी पुं. परदेशी,-युरोपियन मनुष्य. A Frank or an European.

[*OHG*. Frank = A free-man. ह्या शब्दाचें अरबी **अल्-फरंगी**, **इफ्रंजी**, **फिरंजी** असें होई; फा. **फरंगी** असें होई. दक्षिण हिंदुस्थानांत व सिंव्हलद्वीपांत हा शब्द **परंगी** असा आहे आणि तो पोर्तुगीजास लावतात. **फन्हगी**,-**फिरंगी** हे शब्द 'तीक्ष्ण तरवार' ह्या अर्थी वापरतात. बाबर हा पानिपतावर वापरलेल्या तोफखान्यास **फरंगीह** असा शब्द वापरतो (हा. जा. ३५३). **फिरंगाण** (**फिरंगी + वन**) = फिरंग्यांचा राहण्याचा प्रदेश, त्यांच्या ताब्यांतील प्रदेश.]

फिर(र्या)द स्त्री. गाऱ्हाणें, तक्रार. A complaint, a suit.

[अर. **फर्याद्**; पेकाम. **फिर्याद** = न्याययाचक (राज. ६-१८); **फिराद** (राज-१५-१३.).]

फिसक(णें) क्रि. गळून पडणें, हातांतून जाणें, फसणें. To drop down, to be taken in.

[सं. **प्र + हिंष्क्** १० हिंसायाम्; प्रा. **पहिक्क**. ह्यालाच 'ट' हा त्वरादर्शक प्रत्यय लागला म्हणजे **फिसकट(णें)** हा धातु "मोडणें, बिघडणें" ह्या अर्थी तयार होतो.]

फिसाद स्त्री. बंड, दंगा, तफावत, अंतर. Mutiny or insurrection, discrepancy.

[अर. **फसाद्** = फितूर; पेकाम. **फसाद** (पाव. ७); बंडाळी (रा. ५-७७); **फिसादी** = बण्डखोर (ऐटी. १-५९).]

फी स्त्री. मेहनताना, मोबदला. Fee.

[*As*. Feoh; *Icel*. Fe = cattle, money. *Dut*. Vee. = cattle; *Goth*. Faihu = cattle, property-connected with *Fief* and Feudal. सं. **पशु**.]

फुई स्त्री. आत्या, सासू. Husband's mother or paternal aunt.

[सं. **पितृश्वसा**; प्रा. **पिअस्सहा**; देप्रा **पुप्फा**; शा. **फपी**; का. **फोफ**; कु. हिं. **फूफू**; पं. लां. **फुप्फी**; सिं. **पुफी**; हिं. **फुआ**; गु. **फोई**, **फुकी**.]

फुक(णें) क्रि. फुंकणें पहा.

फुकट, फुका अ. निरर्थक, व्यर्थ, विनामोबदला. For nothing, gratis, free of cost.

[सं. **फूत्कृतम्**; प्रा. **फुक्कडअँ**; देप्रा. **फोक्का** मिथ्या (२११-१०); गु. **फोक** = रिकामा, फुकट; सिं. **फोकुट** = कारणावांचून; पं. **फोक**, **फोक** = नकार; **फोका** = आढ्यताखोर, पाणचट; हिं. **फोकट** = कुचकामाचा; बं. **फुकार** = मोकळी जागा; भगदाड; मरा. **फुक्का + ट**, **फुकट** = वृथा.]

फुग(णें) अक्रि. आकार वाढणें, सुजणें, शीग येणें. To swell, to rise, to be puffed up.

[सं. **फूत्कृ**, **पूग** (?); प्रा. **फुक्क** (?) (आंत वारा घालून फुगविणें); अकामसा. **फुकट,-णें**, **फुगवटा**, **फुगविणें**, **फुगीर**, **फुगा** (सं. **पूग**; प्रा. **पूग**.).]

फुंक(णें) उक्रि. वारा घालणें, तोंडांतून वारा काढणें. To blow, to puff up with the mouth.

[सं. **फूत्करोति** ; प्रा. **फुक्कइ** ; अप. **फुक्क**, **फुंक** ; का. **फुंकु** ; आ. **फूंकिब** ; **फुंका** ; ओ. **फुंकिबा** ; हिं. **फुंकना** ; पं. **फूकणा** ; सिं. **फँकणु** ; गु. **फुंकवूँ** ; याकाम. **फुंक** (नरुस्व. ५३४); मराठीत दोन रूपें आहेत. १ **फुकणें**, २ **फुंकणें** ; **फुंकणी** = अग्नीस वारा फुंकण्याची वांबूची नळी. अकामसा. **फुंक,–फुंकणें**, **फुंकर**, **फुंकारा**, **फूक**, **फूत्कार**. ध्वनिशब्द.]

फुंज(णें) अक्रि. गर्वानें फुगणें. To be puffed up with pride.

[सं. **स्फुन्द्** १ स्फुन्दने ; प्रा. **फुन्द** ; याकाम. **फुंज** = गर्व, **फुंजणें** (ज्ञा. १३-७१६).]

फुट(णें) क्रि. तुटणें, मोडणें. To break, to burst, to split.

[सं. **स्फुट्** ६ हिंसायाम् ;पा. **फुट्ट** ; प्रा. **फुट्ट** ; का. **फुट्टुँ** ; कु. **फुट्टणो** ; आ. **फुटिब** ; बं. **फुटा** ; ओ. **फुटिबा** ; हिं. **फुटना** ; पं. **फुट्टणा** ; सिं. **फुटणुं** ; गु. **फुटवूँ** ; अकामसा. **फूट्** (मोड तोड), **फुटकळ**, **फुटकर**, **फुटका**, **फुटाणा**, **फुटाणी**, **फुटाफूट**.]

फुट(णें) अक्रि. विकसणें, कोंभ फुटणें, प्रगट होणें. To sprout, to shoot up.

[*IE.* Pet; *Lat.* Palent ; सं. **स्फुट्** ; प्रा. **फुट**, **फुट्ट** ; अप. **फुट्ट** ; देशी. **फुट्ट** ; गु. सिं. हिं. **फुट्** ; बं. **फुटिते**, **फोलन** = सूज.]

फुट(णें) अक्रि. तहानेनें घाबरें होणें, कंठ सुकणें. To be choked up with thirst.

[सं. **स्फुट्** ; प्रा. **फुट**, **फुट्ट** ; अप. **फुट्ट** ; याकाम. **फुटणें**. (ऋ. पू. २२२).]

जैसी मेघेंविन चातकी फुटे: तेवीचि आंगीं विजु उपटे ॥ नरुस्व. ४६३.

फुटा पुं. शेला. A shawl, a silk covering.

[सं. (?) ; याकाम. **फुटा** = शेला. (नरुत्व. ४०७) ; दरिवंटु दाटिला राजवल्लभा: फुटेयाचा ॥ नरुस्व. १७२.]

फुडें वि. स्पष्ट, उघड, निश्चित. Open, clear, certain.

[सं. **स्फुट्**, **स्फुटम्** , (निष्ठा) **स्फुटितम्** ; प्रा. **फुडिअँ** ; **फुडँ** ; याकाम. **फुडा** ; **फुडें** (ज्ञा. ६–२९०) = खरें (ज्ञा. ३–६५), = **फुडी** (नरुस्व. ६६६).]

फुणगी स्त्री. स्फुलिंग, ठिणगी, अग्निकण. A spark.

[सं. **स्फुलिंग** ; प्रा. **फुनिग** (?) ; अप. **फुल्लिग** ; याकाम. **फुणगा** (ज्ञा. १६-८).]

फुणफुण(णें) क्रि. ठसठसणें, भणभणणें. To fume and chafe.

[ध्वनिशब्द, सं. **स्फुण्** (?) १ दाहे.]

फुंद पुं. आवेग, हुंदका. Inflation, sobbing.

[स. **स्फुंद्** ; प्रा. **फुंद** ; याकाम. **फुंज** = गर्व (ज्ञा.).]

फुफ (णें) अक्रि. फुसकारणें. To hiss.

[**फुपाट**, **फुफाटा**, **फोपाटा**, **फुफाव(णें)**, **फुरण(णें)** = फुरकणें. हे सर्व ध्वनिशब्द आहेत.]

फुप्फुस न. उदरवर्ती अंत्रविशेष. A lung.

[सं. पुष्प् १ विकसने ; देप्रा. **फुप्फुस**.]

फुर(णें) क्रि. स्फुरणें, फुगणें, हलणें. To throb, to move, to rise.

[सं. **स्फुर्** ६ चलने ; प्रा. **फुर** ; का. **फोरुन्** ; सिं. **फुरणु** ; पं. **फुरणा** ; हिं. पं. **फुर्ती** ; अकामसा. **फुरण**, **फुरफुरणें**.]

फुर(णें) अक्रि. आचके येणें. To be affected with twitching, to have cramps.

[सं. **स्फुरति** ; प्रा. **फुरइ**, **फुरन्त** ; **फुरफुरन्त** = कांपणारा ; गुं. पं. सिं. **फुर–** ; सिंह. **पुपुर** = ठिणगी.]

फुरसत स्त्री. सवड, मोकळेपणा, रिफामपण. Leisure, freedom from hurry, interval.

[अर. **फुर्सत** ; पेकाम. **फुर्संत**, **फुर्संती** (रा. ३–५७).]

फुरसें न. एक प्रकारचा साप. A species of snake or coluber.

[ध्वनिशब्द. **फुरं** + **फुस्**.]

फुल(णें) क्रि. फुलें येणें, उमलणें, फुगणें. To blow, to expand, to flower.

[सं. पुष्प्,–**फुल्ल्** १ विकसने ; पा. **फुल्लति** ; प्रा. **फुल्लइ** ; का. **फोलुं** ; कु. **फुलणे** ; आ. **फुलिब** ; बं. **फुला** ; ओ. **फुलिबा** ; हिं. **फुलना** ; पं. **फुल्लणा** ; सिं. **फुलणु** ; गु. **फुलवूँ** ; २ सं. **स्फुर्** ६ विकसने (राधा.) ; अकामसा. **फुलफुल**, **फुलविणें**, **फुलार**, **फुलारी**, **फुलौरा** (फूलपासून), **फुलका,-की** (सं. **फुल्ल** ; देप्रा. **फुल्ल**) ; पं. **फलौरी** ; हिं. **फुलौरी**.]

फुंली स्त्री. एक झाड किंवा झुडुप. A kind of plant.

[सं. फुल्ल ; प्रा. फुल्ल ; याकाम. फुली (नरुस्व. २९) ' फुल्ल ' शब्द हा मूळ प्राकृत. संस्कृतीकरण हें उत्तरकालीन झालें असावें. पुष्प पासून फुल्ल निघणें म्हणजे स्वरप्रक्रियेच्या नियमांची ओढाताण आहे. याकामसा. फुलसर = फुलांचा हार (ज्ञा. १८-५०); फुलिका (६-२४६); फुलौरा = पुष्पगुच्छ (ज्ञा. ९-२७)]

फुंली स्त्री. निशाणी, बंधन, शिक्का. An asterisk, a mark.

[सं. फुल्ल ; प्रा. फुल्ल, फुल्लिका ; फुली शब्दाला हा अर्थ लक्षणेनें आला असावा. खूण करतांना फुली–फुलासारखी किंवा ताऱ्यासारखी आकृति काढतात. याकाम. फुली (ज्ञा. १५-१२०).]

फुलेल न. फुलांचें अत्तर, फूल पहा The scent of some flower, scented oil.

फुलौरा पुं. फुलांचा बहर, मोहर, देवावर बांधावयाची खाद्यपदार्थफळें वगैरेंची माळ. A plumage, abundance of flowers, a string of eatables dedicated to gods.

[फुलणें पहा. याकाम. फुलोरा (ज्ञा. ९–२७) (नरुस्व. ७८९); अकाम. फुलौरा.]

फुशारी,–रकी स्त्री. बढाई, शेखी, डामडौल. Bragging, too much lauding, vain obstentation.

[अर, फा. फुशार (?); सं. प्रोत्साह; प्रा. पोस्साह (?)]

फुसक(णें) अक्रि. एकदम तुटणें,-बाहेर येणें. To break suddenly.

[ध्वनिशब्द ; सं. भ्रंश्, पुस्, प्र + उष् १ रुजायाम् (?); कान. पुस् = पादाचा आवाज ; अकामसा. फुसकणें = पोटांत वात साठणें,-सरकणें; फुसकट; फुसकारा फुसकी, फुसुकली वगैरे ध्वनिशब्दच आहेत.]

फूल, फुल न. पुष्प. A flower.

[सं. फुल्ल (विकसित); पा. प्रा. फुल्ल ; अप. फुल्ल ; देप्रा. फुल्ल ; आ. बं. फुल् ; कु. फूल ; ओ. फुल ; बि. हिं. फूल ; पं. लां. फुल्ल ; सिं. फुलु ; गु. फूल ; ने. फूल् ; याकाम. फुलसर, फुलिका, फुली, फुलौरा ; अकामसा. फुलेल (सं. फुल्ल+तैल किंवा फुल्ल+इल्ल).]

फूंल न. स्त्रीयोनि, गर्भाशय. A female organ, ovary.

[सं. पुष्प, पुष्पितम् (?) ; बं. फुल् , ओ. फुल, हिं. फूल , पं. फूल्ल, गु. फूल.]

फूस स्त्री. गुप्त प्रोत्साहन. Secret instigation.

[(?) ; ध्वनिशब्द. अकामसा. फुसलावणें.]

फेक(णें) सक्रि. दूर टाकणें, उडविणें. To throw, to fling.

[सं. प्र + इंख् १ गतौ, प्रा. प्रेख ; बं. फेका ; हिं. फेकना, फेंकना ; गु. फेकवूँ ; ह्यापेक्षां सं. प्र + क्षिप् ; प्रा. पक्खिअ (पेक्ख) ह्या मार्गानें ही निष्पत्ति विशेष पटण्यासारखी आहे.]

फेंगड(णें) क्रि. वांकडें चालणें, फेंगड्यासारखें चालणें. To walk with legs distended or crooked, to walk bow-legged.

[सं. प्र + इंग् १ गतौ, प्रेंगट ; प्रा. पेगंट–फेंगडा (वांकड्या पायाचा).]

फेटा पुं. डोक्याचा रुमाल, पटका, लांबट व रंगी पट. A kind of turban, a head cloth.

[सं. पटः ; देप्रा. फेट्ट, फेन्ट ; कु. फेटो ; आ. फेट (नागाची फडा); बं. फेटी ; वि. फेट्टवाल ; हिं. फेटा ; सिं. फेटो ; गु. फेटो ; याकाम. फुटा = शेला (नरुस्व. ७४१), फेट = सद्रा (?) ; सं. स्फिट्ट ६ आच्छादने ह्या धातूपासून राजवाडे वरील शब्द निष्पादितात. परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण केल्यासारखें दिसतें. हिंदीमधून हा शब्द मराठींत आला.]

फे(फें)टाळ(णें) क्रि. दूर लोटणें, धुडकावणें, टाकणें. To drive, to reject and throw.

[सं. स्फिट्ट ; हिं. फेटना ; ('ळ' कोठून आला. ?) ; प्र + टल् किंवा ट्वल् १ वैक्लव्ये (रा.).]

फेड (णें) सक्रि. मुक्त करणें, सोडणें, मोकळे करणें, नाहींसा करणें; घालविणें, पुसून टाकणें. To loosen, to slacken, to undo, to wipe off.

[सं. स्फिट् ; अप. फेड ; गु. फेडवूँ ; बं. फेलिते, फेलाइते ; याकाम. फेडणें = नाहींसा करणें (ज्ञा. १६-१४); = घालविणें (ज्ञा. १६–४७१); = पुसून टाकणें (ज्ञा. १८–२२३); = सोडणें (ज्ञा. १८–८५२); (सं. अप + स्फिट्ट १० हिंसायाम् ; प्रा. फिडिअ).]

फेण पुं. फेंस. Foam, froth.
[सं. **फेन**; पा. प्रा. **फेण**; कु. **फेण**; का. **फीन**; आ. बं. **फेन्**; ओ. **फेण**; बि. हिं. **फेनुस्**; हिं. **फेना** (पुं.); सिं. **फीणु**; गु. **फेण**; बं. **फेणि**=उसाचा रस; म. **फेणी** (स्त्री).]

फेणी स्त्री. पापडी, पक्वान्नविशेष. A kind of sweetmeat.
[सं. **फेन** (?); देप्रा. **फीणिया**-एक पक्वान्न; हिं. **फेनी**; गु. **फेणी** (सुतर फेणी).]

फेंदाड(णें) क्रि. रागानें नाक मोठें होणें,-करणें. To flatten, to dilate.
[सं. स्फाय्, प्याय्, प्यै १ वृद्धौ+द्राघ् १ आयामे (द्विधातुसंयोग) (रा.); अकामसा. **फेंदड,-फेंदर,-फेंदार(णें)**.]

फेंपरें न. रोगविशेष, अपस्मार. A foaming fit, a fit, epilepsy.
[१ ध्वनिशब्द, **फें-फें**-ध्वनि, **'रें'** हा प्रत्यय) २ सं. **अपस्मार > अपम्हार > अफआर > फे (फेर) >फेपरें.**]

फेर(णें) क्रि. बदलणें. To turn over and over.
[सं. **स्फेरय, स्फिरय, प्र+ईर्**; प्रा. **फेरण**; का. **फेरुं**; बं. **फेरा**; ओ. **फेरिबा**; हिं. **फेरना**; पं. **फेरणा**; सिं. **फेरणुं**; गु. **फेरवूँ**; अकामसा. **फेर** (वर्तुळ, रंगण); **फेरा** (आवृत्ति), **फेरी** (प्रदक्षणा), **फिरणें** पहा.]

फेरिस्त न. टांचण, यादी, सूचि, अनुक्रमणिका. A list, a catalogue.
[फा. **फिह्‌रस्त**.]

फेरिस्ता पुं. प्रभुप्रेषित, पैगम्बर, देवदूत. Prophet.
[फा. **फिरिस्ता**.]

फेंस पुं. पाण्याच्या बुडबुड्यांपासून होणारा तरंग. Foam, froth.
[*IE*. Plu (*s*); Piu; *Gr*. Pu; *Lat*. Pu; *Ger*. Fam; *OS*. Pena; *AS*. Foam; सं. **फेन**; **फेनस्**, **स्फयै** (वृद्धौ); देप्रा. **फेंस** = त्रास, डर; ने. **फिंज**; अकामसा. **फेंसणें, फेसाळ, फेसाट**.]

'फैल पुं. स्त्री. कार्य, अमल. Dominance.
[अर. **फिअल**; पेकाम. **फैला, फैल** (**ऐच ११५**); अकामप्र. **फैलावर घेणें**=शिक्षा करणें, कानउघाडणी करणें, भोसडणें.]

'फैल पुं. टोळी, संघ. A file.
[*Eng*. File; *AS*. feol; *Dut*. Vijl; *Dan*. Ful; O*HG*. figila, Figan = to rule]

फैलाव(णें) क्रि. प्रसार करणें. To spread abroad.
[सं. **प्र+आ+ईल्** (?); हिं. **फैलाव**. हिंदींतून हा शब्द मराठींत आला.]

फैसला,-ल्ला पुं. निकाल, निर्णय, निवाडा. Decision, settlement.
[अर. **फैसला**; पेकाम. **फैसल** (रा. १५-२१); **फैसल करणें**=निवाडा करणें.]

फोक स्त्री. (झाडाची) बारीक छडी. A twig, a small shoot.
[सं. (?); याकाम. **फोक**=लहान डहाळी (**ज्ञा. १५-९८**).]

फोकल(णें) क्रि. पातळ शौचास होणें. To void mucus or watery matter.
[सं. **प्लुष्** ९ स्नेहने (**'ल'**-म. प्र.).]

फोकलिचा पुं. (वि.) एक शिवी (षष्ठीचा प्रत्यय लावून विशेषण झालें आहे.). A term of abuse.
[कान. **पोक**=उनाड, दुष्ट, शठ; **पोकरी**=उनाड; **पोकरीचा-फोकलीका**=उनाडापासून झालेला.]

फोकार(णें) क्रि. पुकारणें. To declare.
[सं. **फूत्कृ** (?) किंवा म. **पुकार**; याकाम. **फोकरणें** (ज्ञा. १६-२२२).]

फोड(णें) सक्रि. तुकडे करणें, मोडणें. To break, to part by violence.
[सं. **स्फुट्-स्फोट्**; पा. **फोटेति**; प्रा. **फोडेइ**; अप. **फोटिय**; गु. हिं. **फोड**; सिं. **फोर, फोरि**=भेग; बं. **फोलन्** = सूज; **फोलाइते**=उत्तेजित करणें; मरा. **फोडणें**=(फुटणें ह्याचें णिच् रूप.); राजवाडे ह्या धातूच्या एकवीस व्युत्पत्ति सुचवितात. उदा० **अपपद्**, **प्र+कुट्**, **प्र+कृंत्** इत्यादि.]

फोड पुं. फुगीरभाग, सूज, गाठ. A boil, a pustule.

[सं. स्फोटः ; प्रा. फोड ; कु. फोर ; सिं. फोर ; २ सं. स्फोट, स्फोटक ; पा. फोटो, फोटको ; प्रा. फोडअ ; बं. फोडा ; ओ. फोडी ; हिं. पं. फोडरा ; गु. फोड्लो.]

फोडणी स्त्री. म्होरी घालून तेलांचा चटका. Oil or ghee heated (with mustard seeds.)

[सं. स्फोटनी ; देप्रा. फोडिय (म्होरी); बि. फोरन ; गु. फोडणी.]

फोदरी स्त्री. स्त्रीचें जननेंद्रिय. Female organ.

[वैसं. अपोदर (अप+उदर); अकाम. फोदल,-फोदळ(णें), फोदाळपट्टी (शिविगाळ), फोद्रा, फोदा.]

फोपसा,-शा वि. पोकळ. Bloated, flabby.

[सं. पुष्पसदृश (> पुप्फसा); पुष्प् ४ विकसने ; प्रा. फोप्प.]

फोंफारा पुं. ऊन्ह राख, धुरळा. Hot dust.

[सं. (?); प्रा. पुप्फुआ.]

फोफाव (णें) क्रि. वाढणें. To get bloated.

[ध्वनिशब्द ; सं. पुष्प् १ विकसने. (पुष्पाव > पुप्फाव > फोफाव.]

फोल न. टरफल, कोंडा, भुसा, (वरील) आच्छादन, आवरण. A hollow cover or chaff, husk.

[सं. पलाल, √ स्फोटं ; अकाम. फोलणें, फोलीण (पत्र्याची पेटी).]

फोल वि. निरर्थक, रिकामें, पोकळ. Hollow, empty.

[सं. पलाल ; प्रा. फोको ; बं. फोरा ; पं. फोलुर (भुस्सा) ; गु. फोचूं ; सिं. फोफो ; म. (टर)फोल, टरफल ; ऑस्ट्रिक शब्द फोलकट असा एक आहे.]

फौज स्त्री. सैन्य. Army.

[अर. फौज़्.]

फौजदार पुं. पोलिसांवरील अधिकारी. Sub-inspector (of police).

[अर. फौज् ; फा. फौज़् (लढाऊ सैन्य)+दार. ह्या शब्दाच्या अर्थांत पुष्कळ फरक झाला आहे. अर्थांत चढउतार झालेला दिसतो. लढाऊ सैन्यावरील अधिकारी हा पहिला अर्थ. नंतर जिल्ह्यावरील ससैन्य अधिकारी, गुन्हे निवाडा करणारा अधिकारी असा पुढील अर्थ अठराव्या शतकांत होता. पुष्कळ परगण्यावरील अधिकारी असा अर्थ ऐनी-अकबरीमध्यें दिला आहे. अर्थभ्रंश पुष्कळ झाला आहे.]

ब पुं. मराठी वर्णमालेंतील तेविसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण ओष्ठ्य अल्पप्राण मृदु असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. Twenty-third consonant in Marathi alphabet.

[(आद्य ब्) सं. ब्, द्ब, ब्र, व्; प्रा. ब.

(मध्य ब्) सं. र्ब्, ब्र, र्व्; प्रा. ब्ब. बक–बग, बीज–बीं, ब्राह्मण–बाम्हण, उपविश–बैस.

सं. भ्; प्रा. म्भ; सं. म्ल ; प्रा. म्म. कर्बुर–कबरा, श्लेष्य–शेंब, कुभ्र–कुबड.]

बं उप. ला,–शीं–सह. कांहीं फारशी शब्दांत हा शब्द प्रथम घालतात. उदा. ब–अमल, ब–अद, बइज्जत. A Persian prefix denoting 'to, with'.

बइस(णें) अक्रि. खालीं बसणें. To sit.

[सं. उप+विश् ६ प्रवेशने ; प्रा. उअइस ; अप. बइसइ ; याकाम. बकाम. बैस ; अकाम. बसणें पहा.]

बक(णें) अक्रि. बडबडणें. To prate, to chatter.

[सं. भष् १ भर्त्सने, बष्क् १ वचने ; प्रा. बक्कर (विकटहास्य); का. बकुं ; आ. बकिब ; बं. बका ; ओ. बकिबा ; हिं. बकना ; पं. बकणा ; सिं. बकणु ; गु. बकवूँ ; अकाम. बकबक, वकवक ; (फा. बक़्बक़्, ज़क़्ज़क़्), बकवा (हा फारशी आहे).]

बक पुं. बगळा. A kind of heron, a crane.

[सं. बक; प्रा. बग ; हिं. पं. बगला ; सिं. बगु, बगुलो ; गु. बक, बगलो ; याकाम. बक (ज्ञा. १८·४८०); अकाम. बगळा ; बक(ध्यान).]

बकरी स्त्री. मेंढी. A he-goat.

[सं. बर्कर, वर्कर ; प्रा. वक्करो ; का. बकर ; पपं. बक्रु, बक्रा; कु. बाक्रो, बाख्रो; बं. बक्रा; ओ. बकरा; बि. हिं. बकरा, बेकरी; पं. लां. बकरा; सिं. बाकिरो; गु. बकरो ; रु. मा. बक्रो. संस्कृतीकरण नंतरचें आहे. बकर कुदी (पत्त्यांतील एक खेळ, हात (बकर+कुर्दन्).]

बकाणा पुं. तोंडाचा जबडा, तोंडभरून घास. A big gobbet or mouthful.

[कान. बोक्कण = कोटाचा खिसा, तोबरा, सुपारीची पिशवी.]

बकाबक अ. भडाभड, बुक्क्यानें मारतांना होणारा आवाज. Thumping, pommeling (sound of).

[ध्वनिशब्द किंवा भष् १ भर्त्सने; बुकलणें पहा.]

बका, बका (खाणें) अ. सैरांवैरां (खाणें). Hurried or eager (eating)

[सं. भक्षय भक्षय (इति खादति.); प्रा. भक्ख भक्ख.]

बकाल वि. गचाळ, असंस्कृत, व्यापारपेशा. Uncultured, :mean, shopkeeping profession.

[अर. बक्काल = भाजी विकणारा.].

बकुल–ळी पुंस्त्रीन. एक फुलझाड. A kind of flower-tree.

[सं. बकुल; याकाम बकुळ (नरुस्व. ८१४); अकाम. बकुळ.]

बखत् पुं. स्त्री. वेळ. Time.

[अर. वख्त्. (वख्त पहा.)]

बख्तियार वि. दैवशाली. Fortunate.

[फा. बख्त्यारी; पेकाम. बख्तवारी (रा. १५-२४); बख्तवार (एस्फुले. १-२२).]

बखर स्त्री. बातमी, हकीकत, इतिहास. Narration, memoir, history.

[अर. खबर; शिकाम. बखेर (रा. १५-१३), बखर; पेकाम. बखर (ऐटि २-३७); अकाम बखर मूळ अरबी शब्दाचा वर्णव्यत्यास होऊन बखर हें रूप बनलें काय ?]

बखल (णें) उक्रि. कुटून नाहींसें करणें, चेंदामेंदा करणें, To pommel, to thump.

[बुक्का पहा. याकाम बखलणें; अकाम. बुक्कलणें.]

तयाचा बखली, (बखोली) मुखचंद्र : आंधार सां— तीयाचा ॥ नरुस्व. २९४.

बखळ स्त्री. मोकळी जागा. Open or clear space..

[कान बक्कल = मोरी, गटार (?).]

बखेडा पुं. अव्यवस्था, गोंधळ, भांडण, त्रास. Contention, dispute, troublesome business.

[सं. व्याक्षेप; प्रा. वक्खेव; बं. हिं. बखेडा; पं. बखेडा; गु. बखाडा; पेकाम. अकाम. बखेडा. हा शब्द अन्यभाषीय आहे काय ?]

बख्तर नं. लोखंडी जाळीचें चिलखत. Armour of steel.

[फा. बक्तर, बख्तर; बग्तर = चिल्खत; पेकाम. बक्तर (पोस) (दासेह. १४).]

बग पुं. पक्षिविशेष. A kind of heron.

[सं. बक; पा. बक; प्रा. बग, बय; आ. बग; बं. बक; ओ. बग; हिं. बग, बगला, बगुला, बकुला; गु. बक, बग, बगलो; पं. बगला; सिं. बगु, बगुलो; याकाम. बक (ज्ञा. १८-४८०); अकाम. बगळा. ला किंवा ळा हा प्रत्यय गु. हिं. पं. सिं. म. ह्या भाषांत आढळतो.]

बगल स्त्री. बाजू, काख. The armpit, side.

[फा. बग़ल्; कान. बगल; बगरु, बगिसु = खाजविणें.]

बगा पु. प्रकार, मार्ग, संबंध. A kind, a way.

[सं. पक्ष (?); प्रा. बगा, बग; याकाम. बगा = देखावा. (ज्ञा. ११-४०४), = आकार, मार्ग (ज्ञा. १७-३८८), = संबंध (ज्ञा. १३-२४४).]

बगाड न. जाडें गवत, लाकडाचा साचा (मोटेसाठीं), नवसाचा एक विधि. A religious observance, an apparatus of wood erected to draw out water, coarse grass.

[म. बगड (भाताची जात), बगड; बगडा; पं. बगड (जाडें गवत).]

बघ(णें) क्रि. पाहाणें. To see.

[सं. बष्क् १ दर्शने; प्रा. बक्क (?) > बघ; याकाम. बगा = देखावा (ज्ञा. ११-४६८); राजवाडे अव + ख्या, + गम्, बष्क्, बक्ष्, बृह् इत्यादि धातु ह्या धातूचें मूळ म्हणून देतात (राधा.).]

बंक पुं. चौकी, पहारा. A watch, a chowki.

[फा. बंकी. अन्तर्द्वारपालस्तु दरुबंकी प्रकीर्तितः (रा. व्य. को.).]

बंगला पुं. राहण्याचें हवेशीर घर, माडी. A bungalow, a summer-house.

[सं. वंग; प्रा. बंग + ला (षष्ठीचा प्रत्यय). इंग्रज लोक प्रथम ज्यावेळीं आले त्यावेळीं त्यांनीं बिहार,

बंगालमध्यें अगोदर वस्ती केली. युरोपियन किंवा इतर श्रीमंत सुखवस्तु लोकांचें राहण्याचें ठिकाण. बहुतेक एक – मजली, वर निमुळतें होत गेलेलें कवलारू छपराचें असें घर असतें.]

बंगाल पुं. देशविशेष. The country Bengal.
[सं. वंग.]

बंगी स्त्री. पोस्टानें पाठविण्याचें बंडल. A bundle or packet.
[सं. **विहंगम, विहंगिका** (?); हिं. **बहङ्गी.**]

बचक स्त्री. हाताच्या पांच बोटांची मोठी चिमूट. The hand inverted with the fingers extended, a pinch.
[**ध्वनिशब्द**; क्रियाध्वनि आहे कीं काय ? अकाम. **बचकण, बचका.**]

बचडें न. लहान मूल. A young one.
[सं. **अपत्यम्, अपत्यतर, वत्सतर** (बचेरो); प्रा. **अपच्चम्**; प्रा. **अवच्च**; पं. **बच्च, वच्च**; हिं. **बचहिडा, बचहरा;** सिं. **वस**; २ सं. **वंश;** हा शब्द **'अपत्यम्'** शब्दापेक्षां **'वत्स'** ह्यापासून येणें अधिक शक्य आहे. **बच्चा** पहा.]

बचाव (णें) सक्रि. राखणें, संरक्षणें. To protect or preserve.
[सं. **विच्छ्** ६ गतौ-(**णिच्**) **विच्छाय > बचाव**; हिं. **बचाना**; बं. **बाँचाना**; पं. **पचाउणा**; का. **बचाउन्**; सिं. **बचाइणु**; गु. **बचाववूँ**; ने. **बचाउनु**; अकाम. **बचाव** (संरक्षण).]

बच्चा पुं. मुलगा, मूल. A young one.
[सं. **अपत्य**; प्रा. **अवच्च > वच्च**; किंवा सं. **वत्स**; प्रा. **बच्च**; फा. **बच्चा.** जुन्या फारशींत संस्कृतमधून गेला असावा, बचडें पहा.]

बजरंग पुं. हनुमानाचें एक नांव. The deity *Hanuman.*
[सं. **वज्रांग.**]

बजरबट्टु पु. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **वज्रवट्ट**; सिं. **भचरबट्टू.**].

बजाज पुं. कापडाचा व्यापारी. A cloth-merchant.
[अर. **बज़्ज़ाज़्**].

बजाव(णें) सक्रि. वाजवणें. To play (a musical instrument.)
[सं. **वाद्य** (नाधा.), **वाद्ययति**; प्रा. **वाज्जावेइ**; कु. **बजोणो**; आ. **बझाइब**; बं. **बाजान**; ओ. **बाजाइबा**; हिं. **बजाना**; पं. **बजाउणा**; सिं. **बजाइणु**; गु. **बजाववूँ**; ने. **बजाउनु.**]

बजावणें सक्रि. संपादणें, शेवटास नेणें. To achieve, to execute.
[फा. **बजा** = जागी; √ **आवर्दन्** = आणणें; हिं. **बजाना.**]

बजांह अ. रास्त, योग्य, मुक्रर. Proper, right.
[फा. **ब–जा**; पेकाम. **बजा** (दिमरा. १-७).]

बजिन्नस वि.अ. चोख, अस्सल, मुद्दाम, वस्तुतः हुबेहुब. Direct, open, genuine, real.
[फा. **ब + जिन्स्** = वस्तु, पेकाम. **ब–जिन्नस** (रा. ८-२११).]

बजीद बि. दीन, नम्र, कष्टी, श्रमी, निकड लावणारा. Overcome, humble.
[फा. **ब–जिद्द**; पेकाम. **बजीद** (रा. १-३७); परंतु संस्कृत **विजित**पासून निष्पादितात; हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे. अकाम. **बजीदी** (आर्जव).]

बट स्त्री. धागा, वेणीच्या पेडांतील केशसमुदाय. Fibres or hair clotted together.
[सं. **वट, वर्तिका** (?).]

बटवडा पुं. वाटणें, ज्याचें त्याला देणें. Distribution.
[हिं. **बटाना** = वाटणें बट्टा पहा.]

बटवा पुं. अनेकपदरी झोळणा, सरकदोरीची पिशवी. A bag with folds or divisions in it.
[याकाम. **वाटवा, वटवा.**]

बटाई स्त्री. मालक आणि कूळ ह्यांच्यामधील जमिनीच्या उत्पन्नाची वाटणी. Division of produce between the land-lord and the farmer.
[हिं. **बटाई, बतैई**; सं. **वृत्** (णिच्–**वर्तय**); प्रा. **वट्ट**; हिं. **बट्टा**, **बाट्टा**; म. **बट्टा** पहा.]

बटाटा पुं. एक प्रकारचा कांदा. Potato.
[*Span.* Patata; Haytian. Batata. मराठी शब्द अमेरिकन इंडियन शब्दापासून आला.]

बटाव(णें) सक्रि. नाण्यांचीं अदलाबदल करणें. To change coins of one value into another.
[सं. **वृत्-वर्त्** (णिच्); अकाम. **बट्टा** (नाण्याची बटाई); (सं. **वर्तन**; सिं. **भटा**; हिं. **बट्टा**).]

बटीक. स्त्री. दासी, कुणबीण, मोलकरीण. A female slave.
[सं. **वृत्तिकरी** (?). हा हिंदी शब्द आहे का ? हिं. **बाटना**=वाटणें (?); याकाम. **बटिकरी**=दासी (शा. १८-५५०), **बटकी**=कन्या (नरुस्व. २१३), **बटिकी**=दासी (नरुस्व. ३८६); अकाम. **बटकूर** (अल्पार्थे, निन्दार्थे-**कूर**,-**कूल**, =क्षुद्र बटीक) **बटीकपुरा**, **बटकीचा**, **बटक्या**.]

बट्टा पुं. काट, कमती, कमिशन, रूपांतर करतांना पडणारें नाण्यांच्या किंमतींतील अंतर. Cut, commission, cost of exchanging.
[सं. **वृत्** (णिच्-**वर्तय**); पा. **वट्ट**; हिं. **बट्टा**, **बाट्टा**; अकाम. (व्याज) **बट्टा**, **बट्ट्या** (बोळ).]

बठाण न. खोली. A room, an apartment.
[सं. **उपस्थानम्**, **अवस्थानम्**; प्रा. **उपट्ठानम्**; प्रा. **उवट्ठाण**, **अवट्ठाण**; बं. **बाथान्**, बि. **बथान**; हिं. **बथान्**, **बठान्**; सिं. **वठाणु**. ने. **बथान्**.]

बडगा पुं. सोट्या, मोठी जाड काठी, सोडगा. A cudgel, a staff.
[कान. **बडिगे**=सोटा, हातोडा; **बडि**=लहान जाड काठी; अकाम. **बडविणें**.]

बडण न. ब्राह्मणांचा एक कुळाचार. A religious observance (among the Brahmins).
[सं. **वर्धन**; प्रा. **बोडणँ**; बोडण पहा.]

बडतर्फ वि. काम, अधिकार वगैरे वरून दूर केलेला, पदच्युत. Dismissed, discharged.
[फा. **बर्तरफ्**.]

बडबड(णें) क्रि. वाचाळणें, अद्वातद्वां बोलणें, वटवटणें. To gabble, to clack, to prate.
[सं. **वद्वद्** (**द्विरुक्ति**); प्रा. **वडवाडइ**; देप्रा. **बडबडइ** (विलपति) (हे. २१४-१२); **ध्वनिशब्द**. राजवाडे **भद्**, **बद्**, **वृध्** हे आणखी धातु देतात. याकाम. **वडंबा** = गडबड (शा. १५-५७६); अकाम. **बडबड**, **बडबड्या** (फार बोलणारा.)]

बडवा पुं. पंढरपूर येथील विठोबाचा पुजारी. A worshipper priest of Vithoba.
[कान. **बडि**, **बडिगे** ह्या शब्दाशीं संबंद्ध आहे कां ? गर्दी शांत करणारा असा एक त्याचा अर्थ करतात; याकाम. **वडुवा** (ली. च. १·१६); किंवा सं. **भट**, **बटु** ह्यांचा संबंध आहे ?]

बडवि(णें) सक्रि. मारणें, चोपणें. To bruise, to beat.
[कान. **बडि** = मारणें. उदा. बैलाचें अंड **बडविणें**. वैसं. **वध्रि**, **वेध्रि** ह्या शब्दाशीं संबंद्ध आहे कां ? अकाम. **बडगा**, **बडवा** संबद्ध आहेत.]

बडा वि. मोठा, थोर. Great, big.
[सं. **वृद्ध**; प्रा. **वड्डो**; देप्रा. **बड** (**बोड्डओ**); अप. **बड**; हिं. **बडा**. मराठींत हा शब्द हिंदीमधून आला. अकाम. **बडिवार** (थोरवी, वैभव, तेज <फा-**बडि**+**वार**); **बडिजाव**=मोठेपणा, आढ्यता; हिं. **बडेजाव**.]

बडोदा न. ग्रामविशेष, गायकवाडाची राजधानी. The name of a town.
[सं. **वटोदर**, **बरोदर** (१५५२); **बलौदरा** (१५५५) **बरोदर**, **वरोदा** (१६०६), **वडोदरा** (वर्णवत्यास).]

बढती स्त्री. वाढ, प्रगति. Increase, growth, progress.
[सं. **वृध्**, **वृद्धि**; प्रा. **बड्ढ**, **वड्ढी**; हिं. **बढती**, **बढाई**.]

बंड न. गोंधळ, अराजक, दंगा. Insurrection, revolt.
[फा. **बंद**.]

बण्ड्या पुं. टेकडीच्या माथ्यावरील खडक, पठार. The top rock on a hill.
[कान. **बण्डे** = खडक, मोठी सपाट शिळा.]

बताव(णें) सक्रि. सोंग बरोबर आणणें. To represent.
[सं. **वृत्** (?); हिं. **बताना**; अकाम. **बतावणी**.]

बतासा पुं. साखरेच्या पाकाचा एक जिन्नस. A kind of sweet-meat.
[सं. (?) ; हिं. **बतासा.**]

बतेला पुं. जहाजाचा एक प्रकार. A sailing vessel.
[पोर्तु. **बातेलॉ.**]

बत्ता पुं. खलामध्यें कुटण्याचा दांडा. A pestle.
[सं. (?) ; प्रा. **बत्ता** ; २ फा. **बत्ता.**]

बत्ती स्त्री. दिवा, वात. A wick, a lamp.
[सं. **वर्तिका** ; प्रा. **वत्तिआ** ; हिं. **बत्ती** ; शब्द हिंदीमधून आला.]

बत्तीस वि. संख्याविशेष, तीस आणि दोन. Thirty-two.
[सं. **द्वात्रिंशत्** ; प्रा. **बत्तिस** ; प्रा. **बत्तीसम्** ; का. **दोयेतृ** ; आ. **बत्तिस** ; बं. **बत्रिस** ; ओ. **बत्रिस** ; हिं. **बत्तीस** ; पं. **बत्तरी** ; लां. **बक्त्री** ; सिं. **बटि्ह** ; गु. **बत्रीस.**]

बद वि. वाईट. Bad.
[फा. **बद** = वाईट. ह्या शब्दाच्या साह्यानें पुष्कळ फारसी–साधित समास मराठींत रूढ आहेत. उदा० **बदअमल** (वाईट अमल, अधिकार), **बदकर्म** (वाईट निंद्य कर्म, व्यभिचार), **बदनाम** (वेअब्रू), **बदफैल** (दुर्वर्तन), **बदमाश** (दुराचरणी), **बदराहा** (वाईट बर्तणूक), **बदसूर** (बेसूर), **बदू** (वाइट, कुप्रसिद्ध).]

बद(णें) क्रि. मारणें, बदके मारणें. To beat.
[**ध्वनिशब्द** ; राजवाडे सं. **व्यति+हन्**, **बद् १** स्थैर्ये अशी व्युत्पत्ति देतात. **बदका** (मुठीचा प्रहार), **बदबदां** (एकदम मारण्याचा प्रकार), **बदकन.**]

बदक न. पक्षिविशेष. A kind of heron, a duck.
[फा. **बतक्.**]

बदका पुं. बुक्कीचा प्रहार, ठोसा, गोळा, लादा. A blow, a small lump.
[सं. बद् १ स्थैर्ये (रा.) ; ध्वनिशब्द.]

बदबद(णें) क्रि. बदबद असा आवाज करणें. To create the particular sound.
[१ ध्वनिशब्द. २ सं. **बद् १** स्थैर्य ; अमकासा. **बदबदां**, **बदबदित** (बदबद आवाज करून-करीत) ; **बदाडनें** (**मारणें**) ; **बदाबद** = एकदम सारखे गुद्दे (मारणें).]

बदमाश वि. वाईट वर्तनाचा, खट्याळ, नीच, दुष्ट. Wicked, of vicious ways.
[फा. **बद्** = वाईट ; अर. **मआश्** = जीवन.]

बदल(णें) क्रि. अलटापालट करणें, पालटणें. To change, to alter.
[अर. **बदल्** = देवघेव करणें ; पेकाम. **बदल** (खरे ११-५६७०) ; अकाम. **बदल**, **बदली** (एका जागेवरून दुसऱ्या जागीं जाणें). राजवाडे सं. **व्यति+रा १** दाने अशी व्युत्पत्ति देतात. ती दूरान्वित दिसते. शब्द परकी आहे. अर. **बदल**, फा. **बदल्** ; पेकाम. **बद्दल**, **बदल** (रा. १५-१५८) ; अकाम. **बदल** = पालट, **बदला**, **बदली.**]

बदाम पुं. फळविशेष. Almond.
[फा. **बादाम.** ह्या शब्दाचें "**वाताम्बु**" असें संस्कृतीकरण केलें आहे परंतु तें उत्तरकालीन आहे. धार्मिक विधिकार्यांत हा शब्द वापरतात.]

बध(णें) क्रि. ऐकणें, ताब्यांत येणें. To yield, to be brought about.
[सं. **बध्** १० संयमने.]

बन(णें) उक्रि. तयार करणें, –होणें, घडणें, जमणें, फावणें. To be made or done.
[सं. **वर्णय** ; पा. **वण्णोति** ; प्रा. **वण्णोइ** ; मरा. **वाणणें**, **वानिणें** (काव्य). –सं. **वनति** ; प्रा **वनति**, **वनायति** ; प्रा. **वणेइ.** हा दोन्ही धातूंचा घोटाळा झाला आहे. सं. **वन् १** क्रियासामान्यार्थे, **पण् १ व्यवहारे** (रा.) ; प्रा. **भन** ; हिं. **बनाना** ; अकाम. **बनावट** (खोटें), **बनाव** (घटना) ; **बनावणी** (फसवणूक) हे शब्द हिं. **बनाना-बनावना** पासून आले आहेत.]

बन न. झाडांचा समूह. A wood, a grove.
[सं. **वनम्**, **वनिका** ; पा. **वनम्** ; प्रा. **वण** ; कु. **बण** ; आ. बं. **बन्** ; ओ. **वण** ; बिं. हिं. **बन्** ; पं. लां. **वण्** (झाडाचें नांव) ; ने. **वन्** ; याकाम. **बन** (उद्यान, बगीचा–नरुस्व, ३८८), **बनकरी** (= माळी–शिशु. २५५) ; अकाम. **बन.**]

बनात स्त्री. लोंकरीचें कापड. Broad-cloth.
[सं. **ऊर्णा** ? अरबी आहे का ?]

बनिया पुं. व्यापारी, हिशेबीवृत्तीचा मनुष्य. A bania, a calculating (man).
[सं. **वणिक्** ; प्रा. **वनिअ** ; हिं. **बनिया.**]

[३]**बंद** वि. अटक केलेला, झांकलेला. Stopped, blocked up.
[सं. **बन्ध.**]

[४]**बंद** पुं. दोरा, फोत, नाडी, बांधण्याचें साधन. A piece of string or tape.
[फा. **बन्द** ; पेकाम.. **बन्द** (मराआ. ६).]

बंदर न. समुद्र किनाऱ्यावरील गलबतें सुरक्षित लागण्याचें स्थान. A port or harbour.
[सं. (?) ; देप्रा. **बंदिर** ; फा. **बन्दर्** = नौकाशय ; शिकाम. **बन्दर** (सु. सभा. १४).]

बंदर न. वानर. Monkey.
[सं. **वानर** (**बान्दर**–वर्णागम) ; हिं. **बांदर.**]

बंदा पुं. वि. सेवक, बांधलेला, उपकृत, संबंध, अखंड. Unbroken, whole, a servant, a person bound by favours.
[फा. **बन्द** ; अकामसा. **बंदिस्त** ; (फा. **बंदिश्**).]

बंदी स्त्री. अडथळा, विरोध, मज्जाव. Obstacle, impediment.
[सं. **बन्ध्** ९ बंधने ; फा. **बन्दी.** पुढील मराठी शब्द पहा. **बंदीखाना** (तुरुंग), **बंदेज** (आळा, धरबंद).]

बंदी पुं. स्तुतिपाठक, भाट. A bard, a minstrel.
[सं. **बंदीजन.**]

बन्दूख स्त्री. गोळी मारण्याचें नळीचें हत्यार. A musket or firelock.
[तुर्की. **बंदूक** ; अर. **बन्दुक्** ; फा. **बन्दुक्** ; हिं. **बन्दुक्.** ह्या शब्दाच्या अर्थांत फार फरक पडलेला आहे. अर्थाची चमत्कारानें वाढ झाली आहे. प्रथम अरब लोक 'बनादिक, (बंदुकीचें अनेकवचन) हा शब्द filberts ह्याला वापरीत ; कारण तें व्हेनीसहून आलें होतें. वेनिस, वेनिदिवग (जर्मन)-बनादिक–नंतर nut-like pellet shots ला लावूं लागले. नंतर firearms ला लावूं लागले. हरुन अल रशीदच्या कारकीर्दींत हा शब्द आला (१४ शतक).]

बन्देज पु. हुकूम, बंदोबस्त. Order.
[सं. **बंध्य** ; पं. **बंधेज** ; हिं. **बन्धेज** ; सिं. **बन्धेगु** ; बंगु. **बंधी** ; < **बन्धीय** ; फा' **बन्दिश्** ; पेकाम. **बन्देज** (गोबुकै. २३).]

बंदोबस्त पुं. व्यवस्था, शिस्त, तजवीज, शिकस्त, कैद. Settlement, adjustment, orderliness, order.
[फा. **बंदुबस्त्** ; पेकाम. **बंदोबस्त** (खरे. ४–१५१०).]

बन्ध पुं. बंधन. A bond, a rule.
[सं. बंध् ९ बंधने.]

बप्पय पुं. चातक पक्षी. बापयो पहा. A kind of bird, *chataka.*

बंब पुं. पाणी भरण्याचा पीप–मोठें भांडें, नळ, स्थूल, लठ्ठ (लक्षणा). A pump, a large vessel, a thick man.
[हिं. **बंबा** ; पोर्तु. **पाँपा.** हा शब्द ध्वनिशब्द दिसतो. अकाम. **बंब्या** (शिवी, धान्य काढण्याचा लोखंडी दांडा) ; **बंबाड** (पुष्कळ), **बंबाळ** (समुदाय) ह्या शब्दांत आधिक्य, प्राचुर्य दर्शक–'अभ्यास' झाला. **बंबूरा** (ग्राम्य–पुरुषेंद्रिय), **बंब–महादेव** ह्यांतील **बंब (म)** हा ओम्–ॐ–चा अपभ्रंश आहे.]

बंबाळें न. लोट, लोळ, झोत, लखलखाट. Hugeness, vastness, dazzling light.
[प्रा. **बंब** ; याकाम. **बंबाळ** = शब्द (ज्ञा-१–१३६) = दिव्याचा लखलखाट (ज्ञा. १५–३०८); अकाम. **बंभाळें, भंबाळें.**]

बम्मण, बामण, पुं. ब्राह्मण. A Brahmin.
[सं. **ब्राह्मण** ; प्रा. **बंभण** ; अकाम. ग्रा. **बामण.**]

बया स्त्री. बाई पहा.

बयाणा पुं. अगाऊ दिलेला पैसा, इसार, सचकार. Earnest money.
[अर. **बैआना** ; फा. **बयान्.**]

बयाद पुं. विस्तार, हकीगत, तपशील, जबानी, वर्णन. Detail, minute.
[अर. **बयाज,–न** ; फा. **ब–याद** = आठवण ठेवून ; पकाम. **बयान** (रा. १०, १३९).]

बरकत स्त्री. भाग्य, सुदैव, कृपा, यश. Success, happy termination.
[अर. **बरकत्.**]

बरकंदाज पुं. हत्यारवाला शिपाई, गोळीबार करणारा लढाऊ शिपाई,–सैनिक. A musketeer.
[फा. **बर्क् अंदाज.**]

बरका वि, मऊ, बिलबिलीत (फणस). Soft, flacid (jack fruit).
[कान. बक्के (?).]

बरखास्त वि. संपलेली, समाप्त, विसर्जित. Broken, ended, terminated, dissolved.
[फा. **बरखास्त** ; पेकाम. **बर्खास्त** (रा. ६–५१०); अकाम. **बरखास्त**.]

बरग न. धान्यविशेष, दुष्काळ. Millet, famine.
[सं. **आवर्ष (ण)–अवर्ख** > **बरख** > **बरग** हा शब्द मूळ असेल कां ? सं. **भरंड** = कीड (?)]

बरगडी स्त्री. काखेच्या खालीं असलेलें पोटाच्या दोहों बाजूंचें लहान हाड. A rib.
[कान. **बरकी** = बरगडी.]

बरंगळ(णें) अक्रि. बडबडणें. To talk wildly.
[सं. **भ्रम्+गल्ह्** १ निंदायाम्; म. '**बारंगळ**'चें हें एक रूप असावें. **बरगळ**; **बरंगळ** (विरळ, दूरदूर धाग्याच्या).]

बेरड स्त्री. धान्यविशेष. A kind of corn.
[सं. **भरंड** = कीड ; देप्रा. **बरठ** ; अकामसा. **बरडणें** = कीड लागणें.]

बंरड स्त्री. ओसाड नापीक जमीन, भाकड. Rice-ground left uncultivated for one crop.
[ता. **बरडु** = रुक्षता ; याकाम. **बरड** = भातजमीन (ज्ञा. ७८८), (ज्ञा. ५-१११) ; = ओसाड (ज्ञा. १३-१२).]

बरणी स्त्री. एक उभट चिनी मातीचें भांडें. A china jar.
[सं.. **भरणी** (?).]

बरदास्त स्त्री. व्यवस्था, आदरसत्कार, पाहुणचार. Hospitable entertainment.
[फा. **बर्दाश्त्**; पेकाम. **बर्दास्त** (होकै २७); अकाम. **बरदास्त**, **बडदास्त**.]

बरबट(णें) क्रि. चोपडणें, लेपणें. To besmear.
[सं. **पर्पटी** (नाधा.); याकाम. **बरबट** = चिखल (ज्ञा.).]

बरबर(णें) क्रि. स्रवणें, पचपचित होणें To run (with mucus).
[सं. **बर्ब्** १ गतौ.]

बरल(णें), बरळ(णें) क्रि. बाजूस सरणें. To move aside.
[सं. **अव** + **रफ्**, **लर्ब्** + १ गतौ.]

बरव स्त्री.वि. शोभा, चांगलेंपणा, चांगलें. Beauty.
(सं. **परम्** ; याकाम. **बरव** (ऋपू. ७२); अकाम. **बरवें** (चांगलें), **बरव(णें)**–शोभणें.]

बरळ(णें) क्रि. निरर्थक बडबडणें. To talk wildly.
[सं. **प्र+लप्** १ भाषणे, **परि+गॄ** ९ शब्दे (रा.) ; याकाम. **बरळणें** = स्वच्छंद फिरणें (ज्ञा. ३–११६); अकाम. **बरळ** (विसंगत भाषण), **बरळणी**.]

बरा वि. चांगला. Good.
[सं. **वरम्**; याकाम. **बरवें**, **बरवंट** (नरुस्वं. ७६, २७८.); अकाम. **बरें** (चांगलें), **बरेंका** ; **बारीक** (मात्र) हा शब्द दुसऱ्या शब्दापासून आला असावा. सं. **वारिक्य**(?); 'इक' हा प्राकृत प्रत्यय–इक्क असावा.]

बरू, बोरू पुं. तृणविशेष. A reed, a kind of grass.
[सं. (?) ; देप्रा. **बरुअ इक्षुसदृशतृणम्** (२१४–३–५); गु. सिं. पं. हिं. **बरू**.]

बरोबर वि. अ. सम, तुल्य, सुरेख रीतीनें. Equal or alike.
[फा. **बर्–उ (आ)–बर्** ; अकाम. **बराबर**.]

बर्चा पुं. भाला. A spear.
[आ. **बर्शा** ; बं. **बर्‌ची** ; ओ. **बर्छा** ; हिं. पं. **बर्चा** ; सिं. गु. **बरचीं** ; फा. **बरची** पहा.]

बर्फ न. थिजलेलें घट्ट (पाणी.) Ice, snow.
[फा. **बर्फ**.]

बर्फी स्त्री, एक प्रकारची वडीची मिठाई. A kind of sweetmeat.
[फा. **बर्फी**.]

बर्सात स्त्री. पावसाळा, पाऊस. Rainy season.
.[फा. **बरसात्** ; हिं. **बरसाती**. त्याचा मूळ अर्थ 'घोड्याचा रोग' असा आहे. ह्या रोगांत त्याच्या डोक्यावर आणि पुढच्या भागावर फोड उठतात. सं. **वर्षा+ऋतु**.]

बल,–ळ न. शक्ति, सामर्थ्य. Power, strength.
[सं. **बलम्** ; अकाम. **बल्**, **बळ**, **बळवान्** (सामर्थ्यवान), **बलिष्ठ**, **बळी** (बलिन्), **बळकाव**

(बलकाम्य), **बळी** (अर्पण केलेली वस्तु-हा शब्द सं. **बलि** पासून आहे.).]

बलकी अ. शिवाय, देखील. Yet, even, besides.
[फा. **बल्की**.]

बलुतें न. गांवांतील वतनाचा हक्क किंवा हक्कदार. The right of a village servant.
[कान. **बल** = उजवा + **कुड** = देणें, **बलुता** = उजव्या हाताचा हक्क (श. को.) ही व्युत्पत्ति संशयास्पद दिसते. ह्याचा एक दुसरा प्रतियोगी अलुते म्हणून शब्द आहे. शब्द तेलगु असावा. याकाम. **बलौता** (ज्ञा. १३-३४). २ सं. **बलवत्तर**, **बली** + **अपत्य** > बलुतें. पाटील, कुलकर्णी, चौधरी, पोतदार, देशपांडे, न्हावी, परीट, गुरव, सुतार, कुंभार, वेसकेर, इत्यादि.]

बलहारी स्त्री. सामर्थ्य, थोरपणा, चांगलेंपणा. Strength, greatness, goodness.
[सं. **बलिहारिन्**, हिं. **बलिहारी** (श.-को.). ही व्युत्पत्ति संशयास्पद दिसते. हा शब्द '**भलें**' ह्या विशेषणापासून निष्पन्न झाला असावा.-'**भलेंरी**', **भलारी**. पहिल्या 'भ' मधील 'ह' कार मराठीच्या स्वभावाप्रमाणें पुढें सरकला आहे. '**भलें**' हा शब्द; सं. **भद्**; प्रा. **भद्द**, **भल्ल**; सिं. **भलों** ह्या मार्गानें आला आहे.]

बशर्त,-र्थ स्त्री. अ. निश्चयाचा प्रयत्न, निश्चयानें, अटीप्रमाणें. With determination.
[फा. **ब.** + **शर्त** = अट; पेकाम. **बशर्त**, **बशर्थ**. (रा. १०-२६५.)]

बशी स्त्री. ताटली, लहान थाळा, चहा पिण्याचें चिनी मातीचें, तबकासारखें भांडें. A saucer.
[पोर्तु. **बसिया**; हिंदी भाषेंतील '**बासन**' शब्द ह्या संबंधात चिन्त्य आहे. *Eng.* Basin.]

बस् अ. पुरें, ठीक. Enough.
[फा. **बस्**; हिं. **बस**; ह्या सारखाच एक शब्द इतालियन भाषेंत आहे.]

बस पुं. सत्ता, अधिकार. Power, authority.
[सं. **वस**; पाप्रा. **वस**; हिं. **वस**; पं. **वाह**; सिं. **वहीणो** (अवलंबी) "वस(णें) वसीं, विसीं" हे शब्द टर्नर व ब्लोक ह्या वरील शब्दांशींच जोडतांत तें चिन्त्य दिसतें. उदा. माझा बस चांगला बसला.]

बस(णें) अक्रि. बैठक घालणें. To sit.
[सं. **उपविश्** ६ आसने; प्रा. **उवइस**, > **उबइस**, **बइस** > **बैस** > **बस**, **वि+अश्**, **व्यव+सो**, **वस्** १ निवासे; ४ स्तंभे, **अभि+अस्**; इ. राजवाडे यांनीं दिले आहेत. अकाम. **बस** (बैठक), **बसक**, (भसक, हा शब्द निराळा); **बसकट**, **बसका**, **बसणी**—इतर सर्व लाक्षणिक अर्थ झाले आहेत. **बैठक** (√ **उपविष्ट**).]

बसव पुं. लिंगायत धर्मांतील दैवत, त्या धर्माचा संस्थापक. The deity of Lingayat sect. The name of the saint who started that sect.
[सं. **वसु** = बैल, नंदी.]

बसवी स्त्री. वेश्या. A prostitute.
[तेल, कान. **बसिवी**. देवाशीं लग्न झालेली सेवेकरीण, लिङ्गबसवी, गरुडबसवी इत्यादि प्रकार आहेत.]

बस्तान न. जम, बस, बंदोबस्त. Arrangement or order.
[फा. **बस्तन्** = बांधणें, **बस्ता**, **बास्ता** = गांठोडें.]

बंस्ती स्त्री. ओटीपोट. The lower belly.
[सं. **बस्ती**; द्रा. **बसिर**.]

बंस्ती स्त्री. जैन लोकांचें धर्ममंदिर. A temple of the Jains.
[सं. **वस्** १ वासे.]

बहक(णें) अक्रि. बेताल होणें, भ्रमणें, भटकणें, बरळणें. To err from the way, to stray.
[सं. **वहति**; **वस्क** १ गतौ; हिं. **बहकना**; पं. **बहिकणा**; कु. **बहणो**; गुं. **वहावूँ** (फसविणें).]

बहर पुंस्त्री. वाढ, हंगाम, आनंद, वैपुल्य. Abundance, season, happy time.
[फा. **बहार** = वसंत.]

बहल,-ल वि. पुष्कळ, विपुल. Much, abundant.
[सं. **बहुल**; कान. **बाहला**; याकाम. **बहके-ळे**.]

बहाणा पुं. सोंग, ढोंग, मिष, निमित्त. A sham, a pretence.
[फा. **बहाना**.]

बहादूर, पुं. एक पदवी, बडा मनुष्य. A title, a big man.
[फा. **बहादर** ; हिं. **बहादूर** = वीर, नायक, पुरस्कर्ता. चेंगीजखानाबरोबर हा शब्द आला.]

बहाल वि. खुष, प्रसन्न. Kindly disposed, propitious.
[फा. **ब-हाल** ; पेकाम. ब-हाल (स. ७-९२).]

बहिरा वि. कमी ऐकूं येणारा. Deaf, short of hearing.
[सं. **बधिर** ; प्रा. **बहिर** ; अप. **बहिरअ** ; हिं. **बहिरा, बहरा** ; बं. **बहेरा** ; ओ. **बहिरा** ; गु. **बेहेरो, बेरो** ; सिंह. **बिहिरी, बिहिरा** ; याकाम. **बहिरणें** (नरुस्व. ५१८.)]

बही अ. बाहेर. Outside, away.
[सं. **बहिस्** = बाहेर. हा शब्द किंवा मूळ संस्कृत शब्द आरंभीं जोडून पुष्कळ साधित शब्द मराठींत रूढ झाले आहेत. उदा. **बहिरंग, बहिर्वास, बहिर्दिशा** (शौचास जाणें), **बहिर्मुख. बहिष्कार** (जातीबाहेर टाकणें. त्याज्य ठरविणें. सध्यां ह्याचा अर्थ परदेशी मालाचा त्याग—असा रूढ आहे).]

बहीण स्त्री. भगिनी, सहोदरी. Sister.
[सं. **भगिनी** ; पा. **भगिनी** ; प्रा. **भइणी, भइणिआ, बहिणी** ; अप. **बहिणी** ; का. **बने** ; अ. **भनि** ; बं. **बइन्** ; ओ. **भउणी** ; हिं. **बहिन्, वहनी** ; पं. **भैण** ; लां. **भेण** ; सिं. **भेणु** ; गु. **बहेन** ; व. **वैनि** ; अकाम. प्रांतिक. **बोईण.**]

बहीरबुणगें न. फौजेंतील न लढणारे लोक, सैन्याबरोबर त्यांच्या सोयीसाठीं जाणारे लोक. Non-fighting people accompanying an army.
[हिं. **बहीड-बुन्गाह्.**]

बहु,-हू वि. अ. पुष्कळ. Much, many.
[सं. **बहु** ; याकाम. **बहु, बहळ** (पुष्कळ), **बहुवस** (फार), **बहुवा** (फार); हा शब्द आरंभीं जोडून पुष्कळ साधित शब्द रूढ झाले आहेत. **बहुगुणी, बहुचकं** (वाचाळ- < बहुवाचक), **बहुजिनसी, बहुत्व, बहुधा, बहुपत्नी, बहुमत, बहुरंगी, बहुराशिक, बहुरूप,** (भोरपी), **बहुवचन, बहुश्रुत इ.**]

बहुड(णें) अक्रि. मागें फिरणें. To turn round.
[सं. **अव+हूड्** १ गतौ ; याकाम. **बहुडा** = परावर्तन, मागें फिरणें (ज्ञा. ११-६७०).]

बहुमोल वि. फार किंमतीचें. Valuable, of great value.
[सं. **बहुमूल्य** ; प्रा. **बहुमोल्ल.**]

बहूत अ. पुष्कळ. Much, many, plenty.
[सं. **बहुत्वम्, प्रभूत** ; प्रा. **बहुत्त** ; कु. **भउत** ; आ. बं. **बहुत्** ; ओ. **बहुत** ; हिं. **बहुत्, बहोत्** ; पं. **बहुत्, बहुता** ; गु. **बहुत्** ; अकाम. **बहूत** (**करून**) **बहुतेक, बहुतावें** (बारभाईपणा).]

बहुलें-बोहलें न. लग्नमुंज वगैरे कार्यांत होमासाठीं केलेली वेदी. An altar or raised seat with steps (prepared in marriage ceremoney.)
[सं. **भवालय, बाहुवलय** (?) अशी व्युत्पत्ति श. को. कार देतात. परंतु ती संशयास्पद आहे. याकाम. **बहुलें** ; अकाम. **बोहलें** (ज्ञा. १८-१५७८).]

बळ न. सामर्थ्य. Strength.
[सं. **बलम्** ; पा. प्रा. **बल** ; का. कु. आ. बं. **बल्** ; ओ. **बळ** ; हिं. पं. **बल्** ; सिं. **बल्** ; गु. **बळ** ; याकाम. **बळकट-बल+कट्टु** (कानडी); परंतु '**कट**' हा संस्कृतोद्भव प्रत्यय दिसतो). **बळजोरी-जबर, बळदंड, बलवान बलिष्ठ, बळकाव(णें), बळी** (इन्नन्त-सामर्थ्यवान्) **बळें** (मुद्दाम.)]

बळद पुं. बैल. A bull
[सं. **बलिवर्द** ; पा. प्रा. **बलिवद्द** ; प्रा. **बलिद्द, बलद्द** ; देप्रा. **बलद्द** ; आ.बं. **बलर्द** ; ओ. **बळद** ; हिं. **बरद, बलद** ; पं. **बल्द** ; लां. **बलेद** ; सिं. **बलेदो.**]

२**बळद** नस्त्री. भूयार. A cellar.
[फा. **बिल** (?)]

बळी पुं. यज्ञांतील आहुति. An offering in sacrifice.
[सं. **बलि** ; पा. **बलि** ; का. **बल.** आ. बं. **बलि** ; ओ **बळि** ; हिं. **बल** ; पं. **बली** ; गु. **बळी** ; टर्नर मराठी शब्द '**बळ**' असा देतो तो चिन्त्य आहे.]

बळ्हे पुं. बगळा. A duck.
[सं. **बक.**]

बक्षी पुं. एक लष्करी अधिकारी. पगार देणारा. An officer in the army, paymaster.
[सं. **भिक्षु** ; प्रा. **भिक्खु** (**भिकारी, भटजी**); ह्या शब्दाचा मंगोली किंवा तुर्की अपभ्रंश हा वरील शब्द

असावा. चेंगीजखान आणि त्याचे मागील सुलतान ह्यांच्या बरोबर आलेल्या तातरांनीं बुद्ध भिक्षूंना 'बक्षी' हा शब्द लावला. मध्यकालीन युरोपियन लेखांमध्यें ह्याचीं निरनिराळीं रूपें आढळतात. पुढें त्याचा अर्थ Scribe, असा झाला. लॅटिन फार्सी-तुर्की कोशांत हाच अर्थ दिला आहे. ऐनि अकबरींत 'बक्षी' हा किताब बुद्ध लामांना लावीत असें म्हटलें आहे. परंतु बाबरच्या कारकीर्दींत ह्याचा अर्थ बक्षी शस्त्रवैद्य असा झाला. अर्वाचीन पर्शियन लोक 'शिक्षक, विद्वान' ह्या अर्थी तो शब्द वापरतात. किरघीस कझाक लोकांमध्यें त्याचा अर्थ मंत्रविद्या जाणणारा, जादूगार, मांत्रिक, जादुटोण्याचा वैद्य असा आहे. पश्चिम तुर्कस्तानांत त्याचा अर्थ शाहीर, वैतालीक असा आहे. मोंगल दरबारांत त्याचा अर्थ लष्करी अधिकारी असा झाला. फा. **बक्श**-पगार वेतन, **बक्षी** = Pay—master.]

बक्षीस न. इनाम, देणगी Present, reward
[फा. **बख्शिश** ✓ **बख्शिदन्** = देणें.]

बॅट स्त्री. इंग्रजी क्रिकेट खेळण्याचें एक फळकुट. A bar.
[*Eng.* Bat. परंतु मूळ शब्द *Lat.* 'Batt' ठोकळा, ओंडका, ह्या पासून Bat हा शब्द आला.

बा पुं. बाप पहा.

बा, बे वि. दोन. Two.
[सं. द्वा, द्वि; प्रा. बा, दे; कांहीं आर्योद्भव भाषांत ह्याची परिणति 'ब' युक्त व कांहींत 'द' युक्त अशी द्विविध झाली आहे. उदा. **बारा, बावीस, बत्तीस; दुबोत्री, दुबोदरशें** इ.]

बाई स्त्री. स्त्री, आदरार्थी शद्ब. A woman, a a term of respect (for female).
[सं. **बप्पिका**; प्रा. **बप्पिआ**; 'बा'चें स्त्रीलिंगीरूप याकाम. **बाईल** = पत्नी, स्त्री (नरुस्व. ११).]

बाइणी स्त्री. वायदा. अभिवचन. An assurance.
[सं. **विभाजु, वचन** (?); याकाम. **बाइणी** (ज्ञा. १३·७०५).]

बाऊ पुं. भीतिदर्शक वस्तु,-शब्द. बागूल पहा.

बाक, बांक पुं. वांकडेंपणा, भांडण (ल.) बिन पाठीची लांब लाकडाची बैठक. A bench, a curvature, (fig.) strife.
[सं. वक्र; प्रा. अप. **वंकु**; अकाम. **बाकणें** (नाभा.)]

बाका,-का वि. अवघड, धाडसी, शूर. Difficult, daring, intrepid.
[सं. **पाक**=आपत्ति (?); हिं. **बाका**; हा शब्द अन्यभाषीय असावा.]

बाकी स्त्री. शेष, शिल्लक. Remainder, residue, balance.
[अर. **बाकी, बक्**=उर्वरित; (अ. व.) फा. **बाकी.**]

बागड(णें) अक्रि. उड्या मारणें, सुखानें विहरणें. To skip, to frisk, to frolic.
[वैसं. **वल्गूय**; सं. **व्याघुय्य** (रा.); याकाम. **बागडी** = चेष्टा, **बागडें** = सोंग. (ज्ञा. १३-५७१).]

बाग पुंस्त्री. बगीचा, उद्यान, उपवन. A garden, an orchard.
[फा. **बाघ, बाघात** (अ. व.); अकामसा. **बागाईत,-दार, बागशाई.**]

बागा पुं. आकार, मार्ग, रीत, संबंध. Form, way, manner, relation.
[कान. **बगे** = रीत मार्ग; याकाम. **बागा** (ज्ञा. १३-२४४).]

बागी वि. बंडखोर, उपद्रव देणारा. Rebellious, troublesome.
[अर. **बाघी**; पेकाम. **बागी, यागी** (रा. १-१५०).]

बागूल (बाबा) पुं. मुलांना भय दाखविण्याकरतां केलेला एक पुतळा. (The name of a) goblin, phantom.
[स्लाव्ह. **बोगु**=देव; **बग्**=भूत.]

बांगडी स्त्री. स्त्रियांच्या हातांतील कांचेचें कंकण. A bracelet (of glass or metal).

बाच(णें) अक्रि. भांडणें. To squabble, to wrangle.
[सं **वच्** १० परिभाषणे; २ **भर्त्स** १० तर्जने; अकाम. **बागणूक, बाचणी, बाचाबाच** = भांडण.]

बाचकुट(णें) अक्रि. नासणें, कुजणें, बिघडणें. To ferment, to corrupt, to spoil.
[सं. **वि+अति+कुथ्** ४ पूतिभावे; याकाम. **बाचट**; बासटें = विष; पांतां बाणाचे आकार : बाचट्ट आमोदाचां। नरुस्व. ७६८. अकाम. **बाचो (चू) ट.**]

बाज स्त्री. खाट. A bed-stead, a cot.
[सं. **वाह्य**, ✓ **वह** (?).]

बांज स्त्री. भीति, दरारा. Fright, terror.
[सं. बुध्, बुध्य ; प्रा. बज्ज ; देप्रा. वज्जइ त्रस्यति (५५१·६).]

बांज पुं. पक्षिविशेष, ससाणा. A hawk.
[फा. बाझ़.]

बांज प्र. फारशी प्रत्यय. A Pesian termination.
[फा. बाक्ष = खेळाडू.]

बाजत अ. नंतर, शिवाय. After, besides.
[फा. बाजत् = नंतर, बाजत बरसात = पावसाळ्यानंतर.]

बाजरी स्त्री. धान्यविशेष. A cereal grain, the *bajra.*
[सं. प्रा. (?) ; बं. बाजरा ; ओ. बाजरा ; बि. बाजरा, बाजरी ; हिं. पं. बाजरा ; गु. बाजरो ; ने. बाज़ुरो.]

बाजा(झा)र पुं. मंडई, व्यापाराचें ठिकाण. A market, a *bazaar.*
[फा. बाझ़ार ; म. बाजार-हाट–दोन्ही एकाच अर्थाचे शब्द, हाट = कोणत्या तरी दिवशीं भरणारा बाजार ; 'गंज = धान्य वगैरे रोजच्या जिनसा मिळण्याचें ठिकाण ; 'गंज' मध्यें बाजार व हाट ह्या दोहोंचे अर्थ समाविष्ट होतात.]

बाजी स्त्री सरशी, डाव, पत्त्याचा खेळ. Success, a game at cards, a hand.
[फा. बाक्षी ; पेकाम. बाजी = सरशी (खरे ११-६१००) ; अकाम. अंगावर बाजी येणें.]

बाज़ीगर पुं. जादूगार, कोल्हाटी, गारुडी. A conjurer or juggler.
[फा. बाझ़ीगर् ; पेकाम. बाज़ीगार (खरे. ७-३५६७).]

बाजू स्त्री. कड. A side.
[फा. बाझ़ू = बाहु, हात ; शिकाम. बाजू (सभा. ६२) ; पेकाम. बाजू (रा. ५-६) ; अकाम. बाझुबंद–दण्डांतील दागिना ; 'बाक्ष्' = पृष्ठ, कड, हात.]

बाजे वि. अवांतर, दुय्यम, वरकड. Extra additional, secondary.
[फा. बअक्षि ; बं. ओ. बाजे ; ते. कान. बाजा, बाज़ी.]

बाट(णें) अक्रि. अपवित्र होणें, धर्मांतर होणें. To become polluted, to be converted to another religion.
[सं. १ भ्रष्ट (नाधा.) ; २ अव + अत १ गतौ (रा.).]

बाटी स्त्री. (शेणींत भाजलेला) कणकीचा रोट. A coarse and thick cake.
[सं. वाटिका (?).]

बाठ (णें) अक्रि. कोय बांधणें. (To form) a mango-stone.
[सं. बद्ध + अष्टि ; बद्धाष्टि (ना.) ; अकाम. बांठ, बाठर, बाठळ, बांठळ, बाठाव, बाठाळ, बाठी, बाठुळ, बांठुळ.]

बाड न. गांठोडें, वही, पुस्तक. A bundle, a book, a compendium.
[हिं. बाड़ ; अकाम. बाडबिछायत ; दोन्ही एकाच अर्थाचे शब्द आहेत का ?]

बाण पुं. तीर (धनुष्याचा). An arrow.
[सं. बाण (बाण = कळक) ; पा.प्रा. बाण ; अ.बं. बान ; ओ. बाण ; हिं. बान् ; पं. बाण, वाण् ; ल. बाण् ; सिं. बाणु ; गु. बाण. हा शब्द मूळ ऑस्ट्रिक आहे असें विद्वानांचें मत आहे.]

बाण(णें) अक्रि. व्यापणें, प्रतीतीस येणें. To occupy, to be impressed.
[सं. वर्ण १० प्रेरणे ; याकाम. बाणणें (ज्ञा. १२-१८६).)

बांड वि. तरूण, कोणाचें न ऐकणारा (पोर). A stout, lusty (youth).
[सं. पौगंड, पुंगण्ड, तरणा बांड–ह्यांतील दोन्ही शब्द एकाच अर्थाचे आहेत.]

बात स्त्री. गप्पा, गोष्ट. Idle talk.
[सं. वार्ता ; प्रा. वत्ता, वट्टा ; हिं. बात.]

बादशाहा पुं. राजा, मांडलिकांचा अधिपति, पातशाहा. An emperor.
[फा. बाद्शाह्.]

बाध(णें) सक्रि. न जमणें, न सोसणें. To disagree.
[सं. बाध् १ लोडने ; याकाम. बाधणें = दुःख देणें (ज्ञा. १८-९२०).]

बांदकरी पुं. वि. बंदी, विकलेला मनुष्य, गुलाम. A prisoner, a slave.

[सं. बन्दिन्; याकाम. बन्दी = गुलाम.]

बांध(णें) सक्रि. जखडणें, दोरीनें आवळणें, नियमणें. To lie, to bind, to fasten.

[सं. बध्नाति, बन्धति; पा. बन्धति; प्रा. बन्धइ; का. बोणु; कु. बांधणो; आ. बांधिब; बं. बांधा; ओ. बांधिबा; बि. बाँधबं; हिं. बाँधना; पं. बन्नणा; गु. बांधवूँ. बांध =(सं. बन्ध; पाप्रा. बन्ध; कु. बान् (बंधारा); आ. बान्ध (गांठ); बिं. हिं. बाँध; पं. बन्ह; लां. बन्ह; सिं. बन्धु; म. बद्ध, बंध, बंधन, बंधारणें, बंधु, बंधाटा; बांधणें, बांधा = शरीराची रचना; अकामसा. बद्ध, बंध,-न, बंधारण, बंधाटी, (भाताची दमीन), गुं. बांधो; याकाम. बांधा (ज्ञा. ८-२१); बांधी = बंधन (ज्ञा. १४-५८).]

बाप पुं. पिता, वडील. Father.

[सं. वप्तृ (?); प्रा. बप्पो; देप्रा. बप्पो सुभटः पितेत्यन्ये (२१३-३); अप. बप्पीकी; अवं. बाप्; ओ. बाप, हिंपं. बाप; लां. बापू (आजा); गु. बापा; ने. बाप; याकाम. बाप (मोठा—ज्ञा. १५-४४५); म. बाप, बापू, बापूजी, बाबा, बा = आदरदर्शक शब्द, उ. खंडोबा, शिवबा. कानडी शब्द चिन्त्य आहे.]

बापजादा पुं. वाडवडील, पूर्वज. Ancestor.

[फा. बाप = पिता; अर. जद्द = आजा; पेकाम. बापजादा (गोखचेशाव. १२).]

बापयो पुं. चातकपक्षी. The *chataka* bird.

[सं. (?); देप्रा. बप्पही, बापीह (पुं.); याकाम. बापिया (ज्ञा. १०-१८३).]

बापुडा वि. गरीब, निराधार. Poor, helpless.

[देप्रा. बप्पुड; अप. बप्पुडा (वराकः); गु. बापडुं; हिं. बापडा, बापरा; म. बापुडा (अल्पार्थें).]

बाब,-त स्त्री. रकम, कलम, गोष्ट. An item, a particular.

[अर. बाब्; शिकाम. पेकाम. बाबत = हिशेब, जमाखर्च; बाबती = सरकारसाऱ्यांतील किंवा वसुलांतील हिस्सा.]

बाबर(णें) अक्रि. वांकडें तिकडें चालणें. To walk with cross-legs.

[सं. बर्ब् १ गतौ; भ्रम् ४ अनवस्थाने.]

बाबरी स्त्री. लांब व न विंचरलेले केस. Long dishevelled hair.

[सं. बर्बर; देप्रा. बब्बरी केशरचना (२१३-१५); प्रा. बब्बरी; हिं. बबी = दोराचें गवत; गु. बबा, बाबी = जटा मोडणें; पं. हिं. बाब्रियां = लांब विचरलेले केस.]

बाबलेज(णें) क्रि. बेसुमार वाढणें, शक्ति येणें, विस्तारणें. To grow enormously, to expand.

[सं. बल—बलीयस् (नाधा.); याकाम. बाबळैज (ज्ञा. १५-१८५), बांबलैंज; बल ह्या शब्दाचा आधिक्यार्थी अभ्यास करून नामधातु तयार करून त्याचें कर्मणि रूप बनविलेलें दिसतें. एरव्हीं मराठीतील 'ज' ची उपपत्ति लागत नाहीं.]

बाबा, बापा पुं. चांगल्या भल्या माणसा (संबोधन). A term of respect meaning 'oh good man'.

[बाप, बा, बाबा, बाप, बाबू वगैरे शब्दांतील 'ब' हा वर्ण स्नेहवात्सल्यादि भावदर्शक असा सर्व आर्य व अनार्य भाषांत आढळतो. ओष्ठ्य वर्ण असल्यामुळें अर्भकांचा आदिम असा तो उच्चार असल्यास व त्याच्यांत वात्सल्याची भावना निविष्ट झाली असल्यास नवल नाहीं. कानडी शब्द चिन्त्य आहे. 'बाबा' हा शब्द तुर्की भाषेंत असून त्याचा अर्थ वडील, बाप असा आहे. बाबालोक-ग = मुलें. बाबा पुता = मनधरणी, बाबा वाक्य = वाडवडिलांचें मत.]

बाबू पुं. एक संबोधनाचा शब्द, आदरदर्शक संबोधन. A term of respect and honour.

[सं. वप्तृ = वडील; का. बब; कु. बाबू; बं. आ. बाबु (सभ्य गृहस्थ), हिं. बाबू (बाप), गु. बाबू; 'बाबा' शब्दाचें अल्पत्वदर्शक रूप 'बाबू' हें असावें. बंगालमध्यें कंपनी सरकारांत मुनशी किंवा कारकुनाचें काम करणाऱ्यास बाबू, बाबूजी म्हणत. कानडीमध्यें बाबू म्हणजे वडील असा शब्द आहे.]

बाभूळ स्त्री. एक कांटेरी वृक्ष. Gum-Arabic tree.

[सं. बाबूल, बर्बूर (कोश सं.), बब्बूलः, बर्बुरः; प्रा. बब्बूल; देअप. बंबुल; का. बापुरु; बं. बाब्ला; हिं. बबूल, बाबूल, बाबूळ, बाबूर्, बबूर; पं. बबूल; सिं. बबुरु; गु. बावल. मूळ शब्द देशी असून संस्कृतीकरण नंतरचें आहे. बाभूळ बुडणें = जमिनीच्या बांधावरील बाभळ नाहींशी होणें किंवा पाण्यांत बुडणें-नुकसान होणें.]

बामण,-न पु. ब्राह्मण. A brahmin, a caste.
[सं. **ब्राह्मण**; पा. **ब्राह्मणो**; प्रा. **ब्राह्मण, बम्भण**; अ. **बामुन**; बं. **बामन**; बि. **बामन, बाभन**; हिं. **बाह्मन**; **ब्राह्मण**; सिं. **बाँभणु**; म. **बांमुर्डा** (निंदाव्यंजक); वरील उच्चार हा ग्रामीण आहे.]

बांबल-ळ न. दाटवन, वनसमूह, आधिक्य, बाढ. A grove of *Babul* trees.
[सं. **बल**; **बलीयस्**: याकाम. **बाबल** = वनसमूह (नेरुस्व ४७३.), **बाबुळी** = शेवाळ (ज्ञा. ७ ६०).]

बांबू पुं. कळक. A bamboo.
[कान. **बम्बु**; मलाया + **बुलुह्**; जावा. **बांबु**.]

बायको स्त्री. स्त्री, पत्नी. A woman, wife.
[**बाई** पहा. याकाम. **बायकें**; गु. हिं. **बाई, बाईडी**; तुर्की **बायको** हा शब्द चिन्त्य आहे.]

बार स्त्री. वेळ, पाळी. A time, a turn.
[सं. **वार**; पा. प्रा. **वार**; का. **बार**; फा. **वार**; पेल्हवी. **बार**; अ. बं. **बार**; ओ. **बार**; हिं. **बार**; पं. **बार, वार**; सिं. **वार**; गु. **वार**.]

बार पुं. स्फोट किंवा स्फोटाचा आवाज. A charge, an explosion.
[**ध्वनिवाचक**; फा. **बार्**; सं. **भृ**-भरणे (?).]

बार पुं. भर, मोसम, हंगाम. A season, a crop.
[फा. **बहर**.]

बार नोंद. Registering, noting.
[फा. **बार** = नोंद. म. **बार-निशी**.]

बारगळ(णें) अक्रि. मर्यादेच्या बाहेर जाणें, उल्लंघन करणें. To go beyond limits, to become loose.
[सं. **अपार्गल** (**अप + अर्गल**) = आडण्याच्या पलीकडे; **परि + (अर्गल), व्यर्गल**.]

बारगीर पुं. घोडेस्वार. A trooper.
[फा. **बारा** = घोडा; फा. **बारगीर** = वजन, वाहणारा घोडा; हिं. **बारगीर**.]

बारदान न. गोणपाट, पोतें. A wrapper of a bale.
[फा. **बार्दान**.]

बारस स्त्री. बारावा दिवस, (द्वादशीचें पारणें). The twelfth day.
[सं. **द्वादशाह**; प्रा. **बारह, बारस**; म. **बारसें** = मुलाच्या जन्मानंतर बाराव्या दिवशीं होणारा उत्सव.]

बारा वि. संख्याविशेष, दहा आणि दोन. Twelve.
[सं. **द्वादश**; पा. **द्वादस**; अशोक प्रा. **दुवादस**; प्रा. **द्वालस, बारस, बारह**; अप. **बारह**; का. **बाह**; अ. बं. ओ. **बार**; हिं. **बारह**; पं. **बारा**; ल्हां. **बाहरा**; सिं. **बाराँहाॅ**; गु. **बार**; ने. **बार्**. प्राकृत **बारह** हा संस्कृत **द्वादश**पासून निघणें जरा असंभवनीय आहे. **एकारह, बारह, तेरह**, हीं संख्याविशेषणें प्राकृतमध्यें स्वतंत्रच असावींत. नंतर त्यांचा संस्कृताशीं संबंध जोडलेला दिसतो. स्वतंत्र प्राकृत विशेषणांपासून मराठी विशेषणें निघालीं. अकामप्र. **बारा वाजणें** (अवनतीस आरंभ होणें), **बारा वाटा पळणें, बारा गांवचें पाणी, बारलिंग्या, बारभाई** (अनेक कारभारी. मराठ्यांच्या इतिहासांत सवाई माधवरावाच्या अज्ञान दशेंतील मंत्रीमंडळाचें नांव.), **बारावंदी, बारमाशी** (एक टरबुजासारखें फळ), **बारावा बृहस्पति** (कुंडलींत बाराव्या राशींतील त्रासदायक गुरु. **बाराखडी** = (द्वादशाक्षरी) अक्षराची साधनिका.]

बारी स्त्री. खिडकी खिंड. A narrow pass.
[सं. **द्वारम्**; प्रा. **दारँ**; का. **बर**; गु. **बारी, बरुं**, (दार), सिं. **बारी**; आर्मे ल्मा. **बर**. संस्कृत 'द्वारम्' ह्या शब्दापासून प्रा. **दारँ** आणि **बारं** असे दोन शब्द निघतात. एकापासून मराठी दार, दुसऱ्यापासून बार, >बारी, बारणुं (गुज) हे शब्द निघतात. एका भाषेंत (दक्षिणेकडील) मराठी भाषेंत 'द' कां व्हावें ? व पश्चिम उत्तरेकडील भाषांत 'व' कां व्हावें ह्याच्या मुळाचीं कारणें शोधनीय आहेत. मराठींत बारी खिंड, **बारें** (द्वारम्) हे शब्द भोंक, द्वार ह्या अर्थी आहे. परंतु ते परप्रांतीय असावींत.]

बारीक वि. लहान, इडकुळा slight, little, thin.
[देप्रा. **बारिक्क**; फा. **बारीक्** = सूक्ष्म.]

बाल पुं. केंस Hair.
[सं. **वाल**; हिं. **बाल**; अकामसा. **बालंबाल** (खात्री); **बालाग्र** (केंसाच्या टोंकाइतकें).]

बालजबूल पुं. सैतान, भुतांचा स्वामी. The Satan.
[हिब्रू. **बाल + झबूब** = माशांचा स्वामी, नरकाचा धनी.]

बाला वि. निराळा, स्वतंत्र, कडक. Separate, independent.

[फा. **बाला** = उंच, वर, अलग ; अकामसा. **सूंबाला, सूंबाल्या** (फसवून पळून जाणें); **बाल्या सूटी** (मुलांच्या खेळांतील शब्द); **बाल, बाला** (प्रौढी, गौरव); **बाले किल्ला**—उंच किल्ला. (**बाल+इ+किल्ला** = किल्याचा उंच भाग).]

बाल्या पुं. कोंकणी गडी, कोंकण्या. A menial servant (esp. from Konkan).

[सं. **बल्लव** (?).]

बांव पुं. डावा हात. The left hand.

[सं. **वाम**; पा. प्रा. **वाम**; कु. **बऊ**; आ. **बाऊँ**; बं. ओ. **बाँ**; हिं. **बवाँ, बायाँ**; गु. **वाम्.**]

बांव,-डी स्त्री. मोठ्या तोंडाची व पायऱ्या असलेली विहीर. A well.

[सं. **वापि, वापिका**; हिं. **बावडी, बावली, बावरी, बाई**; का. **बावी**; गु. **बाव**; सिं. **वाइ**; सिंह. **वव, वविय**; पं. **बाउ**; मालदिवी. **वेन्.** 'डी हा प्रत्यय प्रत्येक भाषेंत अल्पार्थे म्हणून लागतो.]

बावचळ(णें) अक्रि. घाबरणें, गोंधळणें, वेडगळपणा करणें. To be confounded or bewildered.

[सं. १ **भावचलित**; प्रा. **बावचलिअ**; २ **वाव** = **वारा+चळ** = वेड (श. को.).]

बावची स्त्री. वनस्पतीविशेष, भाजीचा एक प्रकार, गवार. A kind of vegitable.

[सं. **बाकुची**; प्रा. **बाउची**; हिं. गु. **बावची**; कान. **बाऊचि.**]

बावन्न वि. संख्याविशेष. पन्नास आणि दोन. Fifty-two.

[सं. **द्वा-द्विपञ्चाशत्**; प्रा. **बा (दा) पण्णाअ, बावण्णम्**; का. **दोवन्झ**; आ. **बावन्**; बं. **बायान्न**; ओ. **बाअन**; हिं. **बावन्**; पं. **बवञ्जा**; लां. **बवञ्ज**; सिं. **बावझाह**; गु. **बादन्**; ने. **बाउन्न**; म. **बावन्न-कशी** (सोनें).]

बावर(णें) अक्रि. गोंधळणें. To be bewildered.

[सं. **भ्रम्**-(यङ्लुङन्त); परंतु ह्या व्युत्पत्तीनें मराठी रूपांत अनुस्वार येणें अवश्य आहे. तसा तो आलेला दिसत नाहीं. म्हणून ही राजवाडेप्रणीत व्युत्पत्ति ग्राह्य मानवत नाहीं. आमच्या मतें '**अपावृ**' ही व्युत्पत्ति ग्राह्य आहे. आद्य '**अ**' चा लोप आणि त्या लोपामुळें पुढील '**प**' हा नरमाविला जाऊन त्याचा '**ब**' होणें शक्य आहे.]

बांवळा पुं. खांदा, दंड. A shoulder.

[सं. **बाहुल** (बाहुः); प्रा. **बाहुलग**; कु. **बाऊलो**; पं. **बाहुली**; ने. **बाउलो**; म. **बाही, बाव्हटा.**]

बांवळा वि. अव्यवस्थित खुळचट. Slovenly, silly.

[सं. **व्याकुलः**, **वातुल**; पा. **व्याकुलो**, **वाउळ**; प्रा. **वाउल**; का. **वूलु**; गु. **बावरूँ**; सिं. **बाँविरो**; हिं. **बावला, बाउराहा**; ने. **बोलाहा.**]

बावीस वि. संख्याविशेष, वीस अधिक दोन. Twenty-two.

[सं. **द्वाविंशति**; पा. **द्वावीसति, द्वावीस**; प्रा. **बावीसँ**; अप. **बाइस**; आ. **बाइस्**; बं. **बाइस्**; ओ. **बाइस**; हिं. **बाईस**; पं. **बाई**; लां. **बावी**; सिं. **बावीह**; गु. **बावीस.**]

बाव्हटा पुं. निशाण, हाताचा-दंडाचा वरील भाग. बावळा पहा. A flag, arm.

बाशिंग न. कागदाचें शिरोभूषण. A head-gear (of paper.)

[सं. **वर, भाल+शृंग** (?).]

बाष्कळ वि. अद्वांतद्वां, अवास्तव, भरमसाट. (To talk) wildly.

[सं. १ **वस्क्** १ गतौ, **वस्कल** (नाधा.)>**बास्कळ**> वाष्कळ ; २ वाष्कल हें एका ऋषीचें नांव ; ह्यानें एक वैदिक शाखा सुरू केली. शाकल शाखा व बाष्कल शाखा अशा दोन वैदिक संहितेच्या शाखा होत्या. त्या ऋषीच्या नांवावरून हा शब्द मराठींत रूढ झाला काय ? व हें एक अर्थभ्रंशाचें उदाहरण आहे काय ?]

बासट(णें) अक्रि. भिणें, चिकटणें, चढविणें. To fear, to stick.

[सं. **वि + आ + सञ्ज्**, (निष्ठा) **व्यासक्त**; पा. प्रा. **व्यासट्ट**; याकाम. **बासटौनि** (नरुस्व. ७८०).]

बासट,-ष्ट वि. संख्याविशेष, साठ अधिक दोन. Sixty-two.

[सं. **द्विषष्टि**; पा. **द्वासट्ठी**; प्रा. **बासट्ठी, बावट्ठी**; का. **दोहइठ**; आ. **बाझटी**; बं. **बासटी**; ओ. **बासठी**; हिं. **बासठ**; लां. **बैठ**; सिं. **बाहाठी**; गु. **बासठ.**]

बासटें न. काळकूट विष, अमोघ औषध, बाचकुट पहा. Venom, poison.

बासण न. भांडें. A vessel.
[फा. बाझन = धुण्याचें मोठें भांडें; सं. भाजनम् (पात्रम्).]

बासी स्त्री. पारडी (महानु.). A female calf.
[सं. वत्सतरी.]

बासुंदी स्त्री. दुध आटवून केलेला एक पदार्थ, पक्वान्न. A dish (made of milk).

बाह(णें) सक्रि. बोलावणें, हाक मारणें. To call, to invite.
[सं. १ आ+ह्वे (आह्वय), २ आ+वह् (णिच्) ३ बृह् वृद्धौ शब्देच (धा. पा.). ४ सं. बाहु (नाधा.). हा मराठी धातु सं. 'ह्वे' पासून आला आहेसा वाटतो; परंतु 'ह्वे' पासून आला असें समजलें तर सं. बाहु शब्द हा 'बाहणें' पासून व्युत्पादावा लागेल. व संस्कृत शब्दाचा उद्गम प्राकृतिक शब्द ठरेल. दोन्ही शब्द स्वतंत्र समजले तर कांहीं हरकत नाहीं. परंतु त्यांत हि 'बाही–अस्तनी ह्या शब्दाची अडचण भासेल.]

बाहत्तर वि. संख्याविशेषण. Seventy-two.
[सं. द्विसप्तति; प्रा. बिसत्तरि, बावत्तरी; का. दुसतथ; बायात्तर; आ. बाआत्तरि; हिं. पं. लां. बहत्तर; सिं. बाहतरि; गु. बोतेर.]

बाहाळ पुं. विस्तार. Extent, expansion.
[सं. वह्, बहुल; याकाम. बहुळीव = पुष्कळ (नरुस्व. ४२२).]

बाही स्त्री. अस्तनी. The sleeve, arm.
[सं बाहु; पा. बाहु, बाहा; बौप्रा. बाहा; प्रा. बाहु, बाहा (स्त्री), बोई; कु. बाह; बं. बाह; ओ. बाहा; बि. बांहु (बांगडी); सिं. बांहान, बांहु; गु. बाहु; सिंह. बा; का. बाऊ (बाहि = कडे); म. बाहणें = हातानें खूण करून बोलाविणें; हा शब्द वरील शब्दाशीं संबद्ध आहे कां ?]

बाहीर(बुणगे) पुं. सैन्याबरोबर जाणारा (मजूर), सैन्याचें सामान, बाडबिछायत. The sutlers and followers of an army.
[हिं. बहाइ; पेकाम. बहीरबुनगे, बाजार बुनगे, बहीर.]

बाहु पु. दंड, हात. Arm, shoulder.
[सं. बाहु; पा. प्रा. बाहु; याकाम. बाह, बाहा, बाही, बाहे, बाहुटा, बाहुटी, बावळा इत्यादि स्वरूपांत आढळतो.]

बाहुली स्त्री. मुलीचें खेळणें, पुतळी. A doll, a puppet.
[सं. ?; देप्रा. बहुल्ली, बाउल्लया, बाउल्ली, बाउल्लिय; बहुल्ली व बहुल्लिआ म्हणजे मोठ्या भावाची वायको असा अर्थ देप्रा. मध्यें होता. देप्रा. बाउल्ली पञ्चालिका; अत्र बप्फाउल–बाउल्ली शब्दौ केषांच्चिद् दन्त्यौष्ठ्यादि (२१४-१३).]

बाहेर अ. बाहेरच्या बाजूस. Outside.
[सं. बहिर्; प्रा. बाहि; पा. बाहिरो; प्रा. बाहिरअ; का. बहार, कु. भैर; आवं. बाहिर; पं. हिं. बाहर; ओ. बाहार; हिं, बाहिर; सिं. बाहरी; गु. बाहेर; बहार; ने. बाहर; याकाम. बाहिरील–रिला (इ. पा. शि. ले. १२०६.]

बाळ(णें) अक्रि. आफळणें, व्यवहार पुरा करणें. To give (a thing sold).
[सं. वल् १०, वि+आ+अल् १ पर्याप्तौ; याकाम. बाळणें (अमृतानु. ४४९).]

बाळ न. लहान मूल. A child.
[सं. बालक, बालः; पा. प्रा. बाल; बं. बाल्; ओ. बाळ; हिंपं. बाला; लां. बाल्; सिं. बारु; गु. बाळ; अकामसा. बाळब्रह्मचारी,–लेणें,–विधवा, बाळपरवेशी (लढाईंत मेलेल्या शिपायांच्या मुलांच्या जोपासनेची व्यवस्था.]

बाळग(णें) सक्रि. संभाळणें, काळजी घेणें. To keep, to rear up, to maintain.
[सं. १ वल्गूय (नाधा.); २ बल् १० जीवने; बालक. (नाधा.); ३ पाल् १०, वल् (णिच्) + अकच्.]

बाळंत वि. (स्त्री.) प्रसूत. (A woman) delivered or brought to bed.
[सं. बालवती (?).]

बाळसें न. लहानपणची पुष्टता. The chubbiness of infancy.
[सं. बालसू, बालिश, बालिश्यम्.]

बाळी स्त्री. कानांतील एक दागिना. An ornament of ear.
[सं. वलय, वालका; कु. बाली; बं. बालि; बि. बारी; हिं. बाली; पं. वाली; लां. वाळी; गु. वाळी.]

बॉयकॉट पुं. बहिष्कार. Boycott.
[*Eng.* Boycott. आयर्लंड मधील होमरूल चळवळीच्या-वेळीं कॅ. **बॉयकॉट** नांवाच्या गृहस्थावर १८८० मध्यें घातलेल्या बहिष्कारावरून हा शब्द उपयोगांत आला.]

बॉय पुं. नोकर, चाकऱ्या. Boy.
[दक्षिण हिंदुस्थान आणि चीन देशांत हा शब्द कनिष्ठ नोकरांना वापरतात. तेल. मल्या. **बोयी**; ता. **बोणि**, म. **भोई**.]

'**बि**-पुं. एक प्रत्यय, कांहीं शब्दांच्या द्विरुक्तांत येणारा वर्ण. An expletive prefixed in reduplicated word.
[मराठीमध्यें '**बि**' नें आरंभ होणारे शब्द पुष्कळ आहेत. **करणें बिरणें, निजणें बिजणें** वगैरे धातूंतील **बी** हा संस्कृत **वि** किंवा **अपि** ह्या आद्य उपसर्गाचा अवशेष आहे. कांहीं नामविशेषणांच्या पूर्वी तो येतो, तेव्हां त्याचा अर्थ-रहित, अभाव असा होतो.]

'**बि.** पुं. एक फारशी प्रत्यय. A Persian prefix.

बिक्र न. बळ, सामर्थ्य, शक्ति. Strength, power.
[सं. **अभिख्या**, > **भिख्या**, > **बिक** (रा.); याकाम. **बिक्र** = बळ (ज्ञा. ३-२४८), = तेज (अमृ. २-६)]

बिकट वि. कठीण, अवघड. Difficult, hard.
[सं **विकट**; कान. **बिक** (= घट्ट) + **कट्टु** (= बांधणें).]

बिगर अ. शिवाय, वांचून, खेरीज. Without.
[अर. फा. **ब-घैर**; हिं. **बिगर**.]

बिगार स्त्री. वेट, सक्तीचें व विनावेतन काम. Labour exacted without remuneration, a work done carelessly.
[फा. **बेगार-री** = वेठ; हिं. **बेगार**; **बे** + **गार** (= **कार** = काम करणारा.)]

बिगीबिगी अ. लवकर, झटपट. Soon, speedily.
[सं. **वेगेन** > **वेगें, बिगींबिगीं.**]

बिघड(णें) उक्रि. नासणें, खराब होणें. To spoil, to become bad.
[१ सं. **वि** + **घट्**; पाप्रा. **विघड**; का. **बिघारू**; ओ. **बिगारिबा**; हिं. **बिगारना**; पं. **बिगाडणा**; सिं. **बिगारणु**; गु. **बगाडवूँ**. २ सं. **अभिघातय** = बिघाडणें (णिच्). ह्या धातूच्या व्युत्पत्तीबद्दल मतभेद आहे. दिवेटिया, ब्लोक, टर्नर हे सर्व '**वि** + **घट्**' पासून निष्पादितात. परंतु टर्नरनें एक योग्य शंका प्रदर्शित केली आहे. ह्या संस्कृत धातूचें प्राकृतमध्यें (MIA.) **विहडइ** असें रूप होतें. आणि अर्वाचीन भारतीय भाषांत हिं. **बिगडना**; बं. **विगडा**; म. **बिघडणें** अशीं रूपें होतात. पुढील व्युत्पत्ति पहा. सं. **विकृत**; पा. **बिकट**; प्रा. **बिगड**.]

बिघा पुं. जमिनीचें माप-परिमाण. A measure of land.
[हिं. **बिघा**; सं. **विग्रह** (शको.). प्रत्येक प्रांतांत हें जमिनींचें परिमाण निराळें असल्याचें दिसतें. ३०३५ चौरसयार्ड किंवा $\frac{५}{८}$ एकर (वायव्यप्रांत), १६०० चौ. यार्ड किंवा $\frac{१}{३}$ एकर (बंगाल); २० पाण्डाचा बिघा किंवा ४०० चौ. काठ्या असे आपल्याकडे समजतात. आदीलशाहीमध्यें ४३८३ चौ. यार्ड म्हणजे बिघा समजत असत.]

बिघाड पुं. नाश, भांडण, युद्ध, मतभेद. Spoiled state, quarrel, difference, discord.
[सं. **विग्रह**; पा. **विग्गहो**; प्रा. **विग्गह**; सिं. **विगोड़ु**; गु. **विघरो**; सं. **अभिघातः** हा शब्द मूळ असेल काय ?]

बिंग न. गुप्त हिकमत, दोष, उणीव, गुह्य. A secret, a defect.
[१ सं. **वक्र**; प्रा. **वंक**; पं. **बिंग, विंग** (वक्रता); सिं. **विङ्ग**. २ सं. **व्यंग**; प्रा. **विंग**.]

बिचक(णें) अक्रि. गोंधळणें, भिणें, घाबरणें. To start or startle.
[सं. **वि** + **चक्** १ भये, प्रतिघाते, **भ्यस्** (**भ्यसक**), हिं. **बिचकना**; गु. **बिचकवूँ**; म. **बिचकव, बिचकाव**-णिच् रूपें.]

'**बिचवा** पुं. एक प्रकारचें विंचवाच्या आकाराचें हत्यार. An instrument (of scorpion shape), a sort of dagger.
[सं. **वृश्चिक**; प्रा. **विच्चुअ**; हिं. **बिछूआ**.]

'**बिचवा** वि. चिमखडा, हुशार. Sharp, smart.
[सं. **विद्या** (?); पा. प्रा. **विज्जा, सिविजा**; **वैद्य** = जादुगार.]

बिछाना पुं. अंथरूण, गादी. A mattress, a bed.

[सं. **विच्छादन, (वि + शी)**; पा. **विच्छादन ; बिच्छाअण** ; बं. **बिचान** ; ओ. **बिचाइन** ; हिं. **बिचाना.** फा. **बिछाव.**]

बिछायत स्त्री. जाजम, बैठक, मालमत्ता. Anything spread for sitting on, a carpet, mat, property.

[अर. **बिसात.**]

बिजली स्त्री. वीज. Lightening.

[सं. **विद्युत्**; प्रा. **विज्जुलिआ** ; पं. हिं. बं. **बिजली**; ओ. **बिजुली** ; सिंह. **विदुलीय.** मराठींत हा शब्द हिंदीवरून आला.]

वि(बी)जाखर, न. रहस्यमय मंत्र. A secret charm.

[सं. **बीजाक्षरम्** ; प्रा. **बीजा + क्खर** ; याकाम. **बिजाखर** (उ. ७७३).]

विजावळी स्त्री. भेद, अंतर, वेगळेंपणा. Difference, separateness.

[सं. **द्वितीय** (?); याकाम. **बिजावळी** (ज्ञा. १८-२७०).]

बिजें न. जाणें, गमन, आगमन. Going, departure.

[सं. **व्रज्** १ गतौ ; प्रा. **वच्च** ; गु. **वचवूँ**; याकाम. **बीज** ; अकामग्रा. **वच** (कारवारी). लीलाचरित्रांत '**बिजें केलें**' हा प्रयोग पुष्कळ वेळां वापरला आहे.]

बिझिक पु. पत्त्याचा एक खेळ, डाव. Bizzique.

[फा. **बाझीचि** = जादुगार, खेळ, क्रीडा. **बाझीदन्** = खेळणें. **बाझी, बाजी** = खेळ, क्रीडा, **बाझीगार** = जादुगार.]

बिटी स्त्री. मल. Dirt.

[सं. **विष्ठा** ; हिं. **बीठ** ; का. **बोठ, बोठु** = गोवरी ; सिंह. **बेट्ठ** ; म. **विटाळ.**]

विट्टी, बिट्टा वि. लहान. Short.

[सं. **वीटि, विड** = तुकडा ; देप्रा. **बिट्ट** (पुं.), **बिट्टी** (स्त्री) ; हिं. म: **बेटा, बेटी.**]

विठ्ठा पुं. गट्ठा. A bundle, a package.

[सं. **वृन्त**; प्रा. **विट्टी** ; कु. **बिटो** ; पं. **बीटी, वीटी** ; सिं. **वाटणु** ; गु. **विंटो.**]

विडवई पुं. छावणीचा रक्षक, अधिकारी. An officer in a camp (of army).

[कान. **बीडु** = तळ, छावणी.]

बिडा(ढा)र न. घर, बिऱ्हाड. House, household lodgings.

[सं. **वऱ्हाडक** ; हिं. **बिडार, बिढार** ; याकाम. **बिढार** (ज्ञा. १२-२११, नरुस्व. ७२७.) ; अकाम. **बिढार, बिऱ्हाड** (वर्णव्यत्यास); कान. **बीडार.** (**बिड्डु + आर**).]

बिडी स्त्री. कैद्याच्या हातापायांत घालावयाची कडी. A fetter for the foot.

[सं. **वृंत** ?]

बिडी स्त्री. तंबाखूची चुरटी. Tobacco rolled in a leaf for a smoke.

[सं. **बीटि,—टी. विटिका** ; प्रा. **बिडि, बीडी.**]

बिंडा पुं. गवताचा गठडा, पेंढी, गट्ठा, भारा. A load or a bundle, a mass rolled up together (as of cotton, grass).

[सं. **वृन्त, पिण्ड** ; प्रा. **बिण्ड** (?), (**बेण्ट, विट्ट, बिट्ट, वीट, बीट**); बं. **बिंडा** ; ओ. **बिंडा** ; बिं. **बीरा** ; हिं. **बींरा** ; सिं. **बिंडी, बिनी.**]

बित(णें) उक्रि. जवळ येऊन ठेपणें, घडणें, ठसणें. To be close at hand, to happen, to impress.

[सं. **वृत्**, हिं. **बीतना** ; गु. **बीतवूँ.**]

बित्तं (बातमी) वि. खरी, नक्की, बारीकसारीक. True, real, certain, details.

[सं. **वृत्तम्** ; प्रा. **बित्तम्** ; अर. **बातम्** = बोलणें. दोन्ही शब्द एका अर्थाचे आहेत. एक आर्य व दुसरा फारशी.]

बिथर(णें) अक्रि. बिघडणें, उलटणें, फिसकटणें To fail, to miscarry, to take a bad turn.

[सं. १ **वितर्क** (द्व्याश्रयकाव्य) ; २ **वि + स्थल्.**]

बिदा स्त्री. रवानगी, पाठवणी. Despatch.

[अर. **बिदाअ** ; पेकाम. **बिदा** (ऐटि ७८); अकाम. **बिदाई, बिदागिरी, बिदागी.**]

बिदी स्त्री. मार्ग, रस्ता. A way, a road.
[सं. वृत्ति, वीथि; प्रा. बित्ती; याकाम. बिदी (ज्ञा. १८-४५०); शिकाम. बिदी = गांवांतील रस्त्यावरून वाहणारें घाणेरडें पाणी. वस्त्रासि हे थोर चिन्ध्या बिदी ॥ (तु. अभंग).]

बिन पुं. मुलगा, पुत्र. Son (of), issue (of).
[अर. इब्न; फा. बिन्, इबिन् = मूल, अब्ना = मुलगे. इब्नत् = मुलगी; अबन् = संशयी.]

बिन अ. शिवाय, खेरीज, वांचून. Without.
[सं. विना; फा. बिन्.]

बिनस(णें) सक्रि. बिघडणें, वांकडें येणें. To spoil, to fall out, to take a bad turn.
[सं. वि + नश्; हिं. बिनसना.]

बिनी स्त्री. सैन्याची पुढची बाजू, आघाडी. The front or van (of an army).
[फा. बिनी = नाक; म. बिन्दी बिजोरा, बिन्दीपट्टी = डोक्यावरील दागिने.]

बिन्दी स्त्रीपुं. डोक्याचा डागिना, भूषणविशेष. An ornament for the head.
[सं. बिन्दु; पाप्रा. बिन्दु; का. बेन्द; प. बिंदी; सिं. बिन्दु (शुक्र); गु. बिंदु; बं. बुंदीय (लाडू); हिं. बुन्द; पं. बुद्ध; लां. बुन्दा. ही टर्नरने दिलेलीं प्रतीकें आहेत, परंतु ह्यांत व्युत्पत्तिसंभ्रम झालेला दिसतो. ह्या शब्दाचा संबंध बिंदु शब्दाशीं क्वचितच लागेल; फा. बिनी = नाक ह्या शब्दाशीं संबंध असेल.]

बिन्दू पुं. थेंब. A drop.
[सं. बिन्दु, √बिद्, बिन्द्–अवयवे; बिन्दु = तुटलेला, अलग झालेला. प्रा. बिंदु; गु. सिं. हिं. बं. बिंदु; हिं. का. बिंद; सिंह. बिंद = थेंब; याकाम. बिंदुलें = शून्य (ज्ञा.); अकाम बिंदली, बिंडली, बिंदडी. मूळ शब्द द्राविडी असेल का ?]

बिया पुं. औषधिविशेष. The marking nut.
[सं. भल्लातक; हिं. भिलावा; बं. भेला; गु. भिलामा; ओ. भल्लिप; द्रा. बिडी; पोर्तु. कों. बिंबो; अकामप्र. बिब्बा घालणें–चिडणें.]

बिवि स्त्री. थोर मुसलमानाची स्त्री, कुलीन स्त्री. A mussalman lady.
[फा. बिबी.]

बिभूत स्त्री. भस्म. Ashes.
[सं. विभूति; प्रा. बीभूत; म. विभूत, इभूत.]

[illegible] न. वर्तुळ ग्रह. A disc (of the Sun or a planet), a reflection.
[सं. बिंबम्; याकाम. बिंब = प्रतिबिंब (ज्ञा. १८-४१४), = मंडल (ज्ञा. १८·४६३); अकाम. बिंब(णें) = ठसणें, समजणें.]

बियाणें न. लावणीपेरणीसाठीं ठेविलेलें धान्य. Sowing seed.
[सं. बीजधान्यम्; बीजधानम्; प्रा. बिअहाणँ. कु. बिना; हिं. बीहन; बेहन्; सिं. बीइणु.]

¹बिरडें न. गुंडीचें भोंक किंवा गुंडी, बटन. A button and (or) loop.
[कान. बिरडे = बूच, लांकूड अगर धातूंचा खिळा; सिं. बीरणु; पं. बीरा; गु. बिडवूँ; ने. बिकों.]

बिरा(ला)मत स्त्री. भानगड, खोटा आरोप. A false accusation.
[फा. बर्–आमद्.]

बिरार न. स्पर्धा. Rivalry.
[सं. वैरम् (?); याकाम. बिरार = स्पर्धा (शि.४०३).]

बिऱ्हाड न. घर, खोली, मुक्काम, वास्तव्य, कुटुंब. बिढार पहा. House, lodgings, family.

बिळ न. भोंक. A hole.
[सं. बिलम्, बिल्लम् (उत्तरकालीन संस्कृत), √भिद्; पा. प्रा. बिल; सिं. बिरु; हिं. बं. बिल; सिंह. बल; अकाम. बिळूक, बीळ; द्रा. बिळु, बिरि. संस्कृतमध्यें लहान भोंक व थोर गुहा अशा दोन्ही अर्थी हा शब्द रूढ होता. प्राकृतमधून मराठींत येतांना मात्र दुसरा अर्थ नाहींसा होऊन पहिलाच अर्थ कायम होऊन बसला.]

बिलकुल अ. पूर्णपणें, सर्वस्वीं, मुळींच (नकारार्थी). Altogether, wholly.
[अर. बिल्कुल्; पेकाम. बिल्कूल (पदमव ८५); ह्याचा मूळ अर्थ '**पूर्णपणें**' असा आहे. परंतु मराठींत हाच अर्थ नकाराच्या साहचर्यानें आला आहे.]

बिलग(णें) अक्रि. चिकटणें, कवटाळणें. To stick, to adhere.
[सं. विलग्न (निष्ठा), वि + लग् १ संगे; प्रा. विळग्ग; हिं. बिलगना; गु. बिलगवूँ.]

बिलंदर वि. पक्का, अट्टल, ठकबाज, अथांग, धूर्त, लफंगा. Prime, of the first rate, a thief, a rogue.

[फा. **बुलंद** = दुर्गम. मूळ फारसी शब्दाचा अर्थ ‘ **दुर्गम** ’ जिंकण्यास अशक्य असा आहे. ‘ **किल्ला बुलंद.** ’ त्यापासून मराठींत ‘ **बिलंद** ’ हा शब्द प्रथम आला. जुन्या कागदपत्रांत ‘ **किल्ला बिलंद** ’ असा उपयोग येतो. पुढें **बिलंदर** शब्द रुढ झाला. अठराव्या शतकाच्या शेवटापासून (चंद्रचूड दप्तर) हा शब्द वापरांत असल्याचें आढळतें.]

बिलबिलित वि. कोमल, मऊ, भुसभुशीत. Soft, flaccid.

[देप्रा. **विलिविली** (स्त्री); हा एक ध्वनिशब्दाचा प्रकार असावा. उच्चारध्वनि, क्रियाध्वनि, भावध्वनि, स्पर्शध्वनि असे निरनिराळे ध्वनि व त्याचे दर्शक शब्द भाषांत रूढ असतात. त्यांपैकीं स्पर्शध्वनि किंवा भावध्वनि ह्याचें हें उदाहरण असावें.]

बिलवर, बिलोर पुं. वि. उंची कांच, बांगडी. (Made of) glass or crystal.

[अर. **बिल्लौर.** प्रथम हा शब्द विशेषण–“ **उंची, पैलू पाडलेला** ” अशा अर्थानें रूढ होता; परंतु पुढें नाम म्हणून त्याचा ‘ **बांगडी** ’ ह्या अर्थानें उपयोग होऊं लागला.]

बिल्ला पुं. पदक, खूण दाखविणारी तबकडी. A medal.

[हिं. **बिल्ला.**]

बिवड, बेवड न. खत किंवा अगोदर काढलेलें आड पीक. A manure, the seed or crop antecedent.

[**सं. बीजवृध्; प्रा. बीअवड्ढ** (श. को.). ही व्युत्पत्ति कृत्रिम आहे. पिकाचा, पालट होणें ही कल्पना मुख्य आहे. त्या अर्थी **वि + वृत्**–(णिच्) ही व्युत्पत्ति ग्राह्य आहे. याकाम. **बिंवड** = खत (ज्ञा. ९–५३३.).]

बिसार(णें) अक्रि. पसरणें, फांकणें. To spread out.

[सं. **वि + सत्र्** १ विस्तारे; प्रा. **विसट्ट**; याकाम. **बिसाटणें** (ज्ञा. १८-३७५). पसरणें–फांकणें ह्या क्रियेंत अव्यवस्थितपणा असतो व त्याच अर्थी ‘ **बिसाट** ’ हा शब्द ज्ञानेश्वरींत ‘ **बिसाटकर्म** ’ (= अनियमितकर्म) वापरला आहे.]

बिस्मिला पुं. समंत्रक हत्या. Killing with uttering a mantra.

[अर. ‘ **बिस्मिल्ला हिर्ऱ्हमानिर्ऱ्हीम्** ’ हा मंत्र मुसलमानी धर्मांत म्हणतात. ह्याचा अर्थ–दयाळू परमेश्वराच्या नांवानें–असा आहे. ह्या मंत्रांतील पहिलाच शब्द उपयोगांत राहिला. कांद्यास विस्मिला कशाला ? = “ क्षुद्र कार्यास फार विधि कशाला.]

बिह(णें) अक्रि. भिणें. To fear.

[सं भी ३ भये; याकाम. **बिहे, बिहाळी** (ज्ञा. ६-७).]

बिही स्त्री. वल्लीविशेष. A kind of creeper.

[सं. **विभीडक, विभीटक**; प्रा. **विभीटको**; का. **बींहू**; हिं. **बिही**; पं. बी. ह. सिं. **बेटी.**]

बिळूक न. भोंक, बिल पहा. A hole.

बीं न. मूळ बीज. A seed.

[सं. **बीजम्**; पा. **बीजम्**; प्रा. **बीअ**; बि. **बिया**; हिं. **बिआ**; पं. लां. बी (पुं.): गु. बीं (न); म. **बीं– बियाणें, बेणें** (सं. **बीजधान्य**; कु. **बिना**; हिं. **बीहन बेहन्**; सिं. **बीहणु**).]

बी अ. हि, सुद्धां, देखील. Also, likewise, even.

[सं. **अपि, वि**; प्रा. **पि, वि**; गु. सिं. **बी**; पं. हिं. **बी, भी**; म. **बी, हि.**]

बीच स्त्री. मध्य, मध्यभाग. Middle (part).

[सं. **उरु–व्यंच्, व्यच**; प्रा. **विच्च** (मध्य); कु. **बीच्**; हिं. **बीच**; पं. **बिच**; सिं. **विचु**; गु. **वच, वच्च.** परंतु हा शब्द फारसी आहे कां ?]

बीज स्त्री. द्वितीया, क्रमानें दुसरी तिथी. The second day in a month (of Hindu calendar).

[सं. **द्वितीया**; प्रा. **बिइज्ज, बिअ, बिइज्जिया** (सुर), पं. **बिआ.** गु. सिं. **बिया,** गु. **बीजूं**; हिं. **बीजा**; म. (भाऊ) **बीज, बिजवर.**]

बीड न. अशुद्ध लोखंड. Iron-ore.

बीत स्त्री. मुलगी. A daughter.

[अर. **बीत.**]

बीद,-दी स्त्री. रस्ता, गल्ली. A way, a lane.

[सं. **वीथि**; का. **बीदि**; याकाम. **बिदी** (नरुस्व८५).]

बीन न. तंतुवाद्यविशेष. A stringed instrument.

[सं. **वीणा**; पा.प्रा. **वीणा**; कु. **बिणइ**; अ.बं. **बीन**; हिं. **बीन्**; पं. **बीण.**]

बीभत्स पुं. वि. नवरसांपैकीं एक रस, किळसवाणें. One of the nine sentiments, disgusting, loathsome.
[सं. भद् (इच्छार्थक - अभ्यस्तरूप).]

बीर पुं. मंत्र, मंत्रोच्चारानें जाग्रत होणारी भूतयोनि. A charm, (spirit awakened by) a charm.
[सं. वीर ; हिं. बीर ; अकामसा. वीर नाचणें,-काढणें.]

बीळ न. भोंक, छिद्र, बिल पहा. A hole.

बुक्का, पुं. मुठीनें दिलेला ठोसा आघात. A blow with a fist.
[सं. बुक्क् (?), बुक्क् १ हिंसायाम्; प्रा. बुक्का (मूठभर); देप्रा. बुक्का (स्त्री.) = मुष्टि ; का. बोंकु ; कु. बुकडणो (खाणें); हिं. बूकना ; पं. लां बुक्क; सिं. बुकु ; गु. बूक (घास), बुकवूँ (भात खाणें); अकामसा. बुकणा, बुकलणें, पुकाडा, बुकांदा-डा, बुकी, बोकाणी (तोंडभर घांस).]

बुका, बुकटी पुंस्त्री. पीठ, चूर्ण. Powder.
[सं. बुक्क (?), बुक्क (चूर्ण) ; प्रा. सुक्क ; क. बुको (चूर्ण); बं. बुकनी ; ओ. बुकनी ; बि. बुकुआ ; हिं. बुका ; पं. फ. बुका ; सिं. बुकी ; अकाम. बुकण, बुकणा-णी, बुकाणा. बुक्का = सुगंधी चूर्ण. हे शब्द आर्योद्भव दिसत नाहींत.]

बुगडी स्त्री. कानांतील दागिना An ear-ornament.
[कान. ता. ते. बुगडी = कानांतील दागिना ; बुगरी-भोंवरा.]

बुचकळ(णें) सक. पाण्यांत बुडवून बाहेर काढणें, गोंधळणें, भ्रमांत पडणें (ल.). To dip, to immerse, to fluctuate.
[सं. १. व्युत् + कल् १० क्षेपे ; २ व्युत् + क्लीद् ४ आर्द्रीभवने (रा.); म. बुचकळा, बुचकळी.]

बुचका पुं. पुंजका. A mass.
[कान. बागसी = हाताच्या बोटांत मावण्याइतकें. लां. बुचार - husk of millet. अकाम. बुचाड = कडब्याच्या पेंड्याचें ; बुचका हा शब्द पुंजका (सं. पुंज्- घनीभवने) ह्याचा अपभ्रंश आहे का ? म. बुच(चु)क,-की, बुचडा, बुचडी, बुचाड,-णें.]

बुचडा पुं. स्त्रियाचा एक केशरचनेचा प्रकार. The knob or bunch of hair on the head.
[सं. वि+चूडा (?), 'पुंज' धातूशीं संबंध आहे का ?]

बुचाट(णें) सक्रि. नागविणें, लुटणें, लुबाडणें. To strip violently, to rob.
[सं. व्युत् + सद् (+ छिद्, + चट्).]

बुचुक,-ली स्त्री. हाताचीं पाचीं बोटांची चिमट, बुचका पहा. The hand inverted with the fingers extended, a grasp.

बुच्चा वि. आंखूड, अपूर्ण, व्यङ्गी. Short, narrow, wanting.
[सं. (?) ; प्रा. बुच्चा ; कु. बुचो (पोंकळ ; बं. बोंचा (नाकाशिवाय); हिं. बूचा ; पं. बुच्चा ; सिं. बुचो (केस बसलेला), बुचु (सपाट नाकाचा).]

बुज्ज(णें) उक्र. बंद करणें, भरून टाकणें. To fill in.
[सं. वि + उब्ज् १ स्थापने ; याकाम. बुज (ज्ञा. ११-४८८)]

बुजणें सक्रि. जाणणें, भिणें. To know, to take fright.
[सं. बुध्-बुध्य ; प्रा. बुज्झ ; देप्रा. बोज्झारं अतीतं भातं च बोज्जइत्रस्यति (२७१-८). ह्या धातूच्या अर्थांत बराच फरक झालेला दिसतो. संस्कृतमधून प्राकृत व मराठी ह्या भाषांत हा धातु सविकरण आला आहे व त्याच अर्थानें जुन्या मराठी वाङ्मयांत तो वापरलेला आढळतो. भिणें, गोंधळणें बुजणें हा अर्थ नंतर त्या धातूला प्राप्त झाला. राजवाडे ह्या अर्थाच्या धातूच्या व्युत्पत्ति मुह् पासून देतात ; परंतु त्याला एक तर आधार नाहीं व दुसरी गोष्ट म्हणजे त्याची वर्णप्रक्रियेच्या नियमानें सिद्धि होणार नाहीं. शब्दकोशकार सं. बद्ध ; प्रा. बज्झ ; प्रा. बुज्जण-स्थगन् अशी व्युत्पत्ति देतात पण ती प्रथमतःच प्रामादिक दिसते. द्ध > झ ही परिणति शास्त्रसंमत नाहीं. त्यांत तालव्यीकरणास योग्य परिस्थिति नाहीं. अकाम. बुजट, बुजरा, बुजीर, बुजग-बुजगावणें.]

बुजुर्ग वि. मोठा, वृद्ध, म्हातारा. Old, big.
[फा. बुझुर्ग ; पेकाम. बजुर्ग ; अकाम. बुजुर्ग, बुद्रुक.]

बुझ(णें) क्रि. समजणें, सांपडणें. To understand, to perceive.
[सं. बुध्यते ; पा. बुज्झति ; प्रा. बुज्झदि ; अप. बुज्झ ; कु. बोझुन ; अ. बुझिब ; ब. बुज्झा ; हिं. बुज्झना ; रू. बुज्झावण ; सिं. बुज्झणु ; गु. बुझवूं. याकाम. बुजणें, बुझणें (ज्ञा. १३-५०७, १७-३४२). मराठीमध्यें मूळ संस्कृत धातु सविकरण उतरला. अकामसा. बुझविणें.]

बुटका वि. लहान, आंखूड, गिड्डा. Short, stubby.

[कान. **पट्टु**. सं. **बटु** ह्या शब्दाशीं कांहीं संबन्ध असेल काय ? **बुटकली, बोटुक, बुटकी** इ.]

बुटी स्त्री. वनस्पतीचें मूळ. The root of a herb.

[सं. **वृन्त** ; प्रा. **वट्** ; कु. **बुटी** ; हिं. पं. लां. **बूटी** ; सिं. **बुटी** ; गु. **बुट्टी** ; ने. **बुटि** ; म. (जडी) **बुटी**.]

बुट्टी स्त्री. टोपली, बांबूची पेटी. A basket.

[कान. **बुट्टी**.]

बुट्टी, बुटी पुं. कापडावरील ठिबक्याची नकशी. Embroidery on cloth.

[फा. **बोता** ; हिं. **बूटा** ; म. **बुट्टीदार, बुटेदार**.]

बुड(णें) अक्रि. पाण्यांत जाणें,-शिरणें. To drown, to sink.

[सं. **बोडयति, बोलयति** ; **ब्रुड्** १ मज्जने, गतौ ; प्रा. **बुट्टइ, बुड्ड** ; का. **बोड्ड** ; कु. **बुरणो** ; आ. **बुरिव, बबुरा** ; ओ. **बुरिबा** ; हिं. **बुरणा** ; पं. **बुड्डणा** ; लां. **बुड्डण** ; सिं. **बुडणु** ; गु. **बुडवूँ** ; याकाम. **बुडणें** (ज्ञा. १५-४२६) ; म. **बोल(णें)** ; हिं. **बोरना** ; लां. **बोरण** ; सिं. **बोरणु** ; गुं. **बोलवूँ** ; कान. **बुड** (पाण्यांत भांडें बुडतांना होणारा आवाज). ह्या शब्दाच्या मुळाबाबत निश्चिति नाहीं. मूळ शब्द संस्कृत नसावा. प्राकृत भाषांच्या काळांत '**बुड**' शब्द प्रचारांत आला. नंतर त्याचा संस्कृत '**मस्ज्**' धातूशीं संबंध जोडला गेला. कानडी मुळावरून हा ध्वनिशब्द असावासा वाटतो. वेदामध्यें '**बुध्न**' असा एक शब्द येतो. त्याचा आणि मराठी **बूड, बूंधा, बोचा**' इत्यादि शब्दांचा संबंध जोडतात. ह्या **बुध्न** शब्दाचा बुडणें शब्दाशीं संबध असेल काय ? पुढील मराठी शब्द पहा. **बुडी, बुडी, बुडणूक, बुडता, बुडीत, बुडीत, बुडविणें, (लु)बाडणें, बुडबुडा** (?).]

बुडखा पु. (झाडाचा) बुंधा, तळ. The bottom (of a tree), base.

[सं. **बुध्न** ; प्रा. **बुंध, बुद्ध** ; म. **बूड, बोचा, बुंधा, बुंथा, बुंथारा, बुधारणें**.]

बुडबुडा पुं. पाणी साबण वगैरेचा हवेनें भरलेला फुगा. Bubble, gurgle, rippling.

[सं. **बुद्बुदः, ध्वनिशब्द**. संस्कृतीकरण उत्तरकालीन.]

बुड्ढा वि. म्हातारा. Old.

[सं. **वृद्ध** ; प्रा. **बुड्ढ** ; हिं. **बुड्ढा, बडा**.]

बुणगे पु. सैन्याबरोबरचे अवांतर लोक. The sutlers and followers of the army.

[फा. **बुन्गाह्** ; पेकाम. **बुणगा, बुनगा, बुलगा** ; (साने पयाव ९०) ; अकाम. **बाहीरबुणगे, बाजारबुणगे** = उदीमधंदा बाजार वगैरे करणारे बिनलढवय्ये लोक. ह्या अर्थावरून '**बुणगा**' म्हणजे 'कमकुवत, नपूंसक' असा त्याचा अर्थ रूढ झाला असावा. **बुणगी भागुबाई**' हा शब्दप्रयोग खेळतांना मुलें प्रतिपक्षाला अधिक्षेपक असा करतात.]

बुंड्का वि. खुजा. Short, stumpy.

[सं. **बुद्ध** (?) ; हिं. **बुदघु** ; गु. **बुधूँ**.]

बुत् पुं. मूर्ति. An image, an idol.

[फा. **बुत** ; **बुत्परस्त** = मूर्तिपूजक, **बुत्फरोष** = मूर्तिविक्रेता ; **बुत्शिकन्** = मूर्तिभंजक.]

बुदला पुं. तेल, तूप वगैरे ठेवण्याची कातड्याची कुपी, -बाटली. A bottle or vessel made of skin.

[कान. **बुद्दणिगे** = कातड्याची तेलासांठीं कुपी, **बुड्डी** = काचेची बाटली, दौत ; हिं. **बुदला** ; *Eng*. Bottle.]

बुद्धि स्त्री. ज्ञानाचें किंवा जाणण्याचें इंद्रिय. Understanding, intellect.

[सं. **बुद्धि**, √ **बुध्**, (निष्ठा) **बुद्ध** = ज्ञानी, गौतमबुद्ध, बौद्धधर्माचा संस्थापक ; अकाम. **बूध, बुध** ; सिं. **बुधि** ; पं. **बुद्ध** ; हिं. **बुध्** ; का **बोद** ; सिंह. **बुदु** = भगवान बुद्ध).]

बुद्रुक,-ख वि. मोठा, पूज्य, थोर. Elder, larger.

[फा. **बुझुर्ग** ; पेकाम. **बुजुर्ग** ; अकाम. **बुद्रुक** आणि **खुर्द** हे दोन शब्द **मोठा, थोर**, आणि **लहान** ह्या अर्थानें ग्रामनामांत वापरण्यांत आहेत.]

बुनियाद स्त्री. शक्ति, वजन, किंमत, आरंभ, स्वभाव. Force, might, vigour.

[फा. **बुन्याद्** ; शिकाम. **बुनाद** = प्राचीन ; पेकाम. **बुनियाद, बुनाद** (रा. ७-९२) ; अकाम. **बुनाद, बुन्याद** = परमावधि, हद्द, शर्थ, आरंभ व शेवट असे दोन परस्परविरोधी अर्थ आहेत. तुका म्हणे बुनादीचें । झालें साचें उजवणें ।]

बुंथ,-थी स्त्री. घुंगट, बुरखा, ओढणी, पांघरण्यांचें वस्त्र. A cloak, a cover.

[सं. **अवगुंठन** (?) ; याकाम. **बुंथी** (ज्ञा ६-२५१) ; बकाम. **बुंथी** (ए. रू. १५-३६) ; नाना परीच्या घेतल्या बुंथी ॥]

बुंदी स्त्री. हरभऱ्याच्या पिठाची कळी. A granule of gram flour.
[सं. बिंदु ; हिं. बुंदिया, बुन्द ; पं. बुन्द ; लां. बुन्दा ; सिं. बुंदो, बुंद ; गु. पं. हिं. बुन्द. बिन्दी पहा.]

बुंधा पुं. वृक्षाच्या मुळाजवळचा जाड भाग. बुडखा पहा. The portion near the root of a tree.

बुबुळ न. डोळयांतील काळा वाटोळा भाग. The eye-ball.
[सं. बुद्बुर–बुब्बुल–बुबुल ; सं. बुद्–पाहाणें.]

बुभुक्षा स्त्री. खाण्याची इच्छा, भूक. Desire to eat, hunger.
[सं. भुज्–(इच्छार्थक अभ्यास).]

बुरका,–खा पुं. तोंडावरील आवरण, आच्छादन. A veil, a hooded cloak.
[अर. बुर्कुअ.]

बुरखुंडा पुं. कणरहित कणीस. The head of maize.
[म. बुडखा + दण्ड (?).]

बुरगुंडा पुं. मुलगा. A boy.
[तेलुगु. बुरगं.]

बुरजी स्त्री. बुद्धिबळाच्या खेळांतील एक डाव. A game in the chess.
[फा. बुर्ज = नेलेलें, हरलेलें.]

बुरटें वि. खुरटें, थोडें दुध देणारें (जनावर). Stunted (animal).
[सं. वृथा ; हिं. ब्रथा (?).]

बुरणूस पुं. लोकरीचें (न विणलेलें) बसकर. A kind of woolen carpet.
[सं. ऊर्णायु.]

बुरबुर(णें) क्रि. थोडाथोडा पाऊस पडणें. To drizzle.
[सं. (?); हिं. बुरबुरना ; सिं. बुरबुरी (फेंस), बूर, (अभ्यस्त) बुरबुर, बूर; = भूस ; गुं. बुरू (वाईट साखर); अकामसा. बुरा (एक प्रकारची साखर).]

बुंरा पुं. ओल्या पदार्थांवर सांचणारा मळ. Dirt accumulated, mud.
[सं. बुरा (?); हिं. बूर = कोंडा टरफल, अकामसा. बुरशी, बुरशी, बुरसणी, बुरसटणें, बुरसा.]

बुंरा वि. वाईट. Foul, filthy.
[याकाम. बुरु = कृतघ्न (ज्ञा. १७-२८१), ‘ चागला वाईट ’ ह्याप्रमाणें हे शब्द भला बुरा असे युग्मानें वापरतात.]

बुरुज पुं. कोटाच्या भिंतींच्या कोणावरील वाटोळी बांधलेली माऱ्याची जागा. A bastion.
[अर. बुर्ज् (अव.–बुरुज).]

बुलडॉग पुं. अक्राळविक्राळ तोंडाचा कुत्रा, पसरट तोंड व नकटें नाक असलेला कुत्रा. A bull-dog.
[*Eng.* Bull-dog (पंधरावें शतक). कुत्रा बैलाच्या अंगावर धावून जातो, तुटून पडतो किंवा बैलासारखा दिसतो म्हणून बुलडॉग म्हणतात.]

बुलबुल पुं. पक्षिविशेष. A kind of bird, Indian nightingale, rapid chattering.
[फा. बुल्बुल् ; ध्वनिशब्द.]

बुलाक्,–ख् पुं. मुसलमान स्त्रियांच्या नाकांतील दागिना. An ornament suspended from the middle of the nose.
[फा. बुलाक्.]

बुली,–ल्ली स्त्री. लहान मुलाचें जननेंद्रिय. A child's organ.
[कान. बुल्ल, बुल्ली = पुरुषाचें इंद्रिय ; तेलु. बुल्ल ; म. बुल्ला = पुरुषाचें जननेंद्रिय.]

बुवा पु. बावा, मोठा सन्मान्य मनुष्य. A term of respectful address for elderly person.
[सं. वप्ता, √ वप्–पेरणें ; प्रा. बप्पा ; (स्त्री) बाई (सं. वप्त्रिका, प्रा. बप्पिआ), बाप, बावा, बा पहा.]

बुळा वि. नपूंसक. Infirm, impotent.
[सं. प्लुष् ९ स्नेहने > म. बुळबुळणें (राधा.). ह्या शब्दाशीं पुष्कळ शब्द संबद्ध आहेत. बुळकट, बुळकन्, (= सैल), बुळकणें, बुळका, बुळगा, बुळकुंटी, बुळबुळीत, बुळबुळां, बुळबुळी.]

बूच न. बाटलीचें झांकण. A cork.
[*Portu.* Buch ; सं. देप्रा. बुज्ज, बुच्च ; प्रा बुज्जण (झांकण) ; कु. बुजणो ; बं. बुजा, बुंजा ; ओ. बुजिबा ; हिं. बुज्ना ; पंलां. बुज्जा ; सिं. बुञा ; गु. बूच.]

बूज स्त्री. योग्य जाणीव, बुद्धि. Recognising or rendering tribute.

[सं बुध्य (बुद्धि); प्रा. बुज्जा ; कु. बूझ ; अ. बुझ ; बं. बुझ ; हिं. बूझ ; गु. बूज.]

बूट पुं. नवीन पद्धत, टूम. An innovation, a fashion.

[हिं. बूटा.]

बूट पुं. इंग्रजी पद्धतीचें पादत्राण, Boots.

[*Of*. Botte; *Dut*. Bote; *Ir*. Broque; *Sp*. Bota; *Ital*. Bota; *Eng*. Boot.]

बूट पुं. वनस्पतिविशेष, नक्षी (शेल्यावरील). A flower or leaf of a plant, embroidery.

[सं. वृन्त ; प्रा. वण्ट, बुट्ट ; का. बूट (कापडावरील फूल); कु. बुटी (वनस्पति); अबं. = बुट्ट ; ओ. बुट ; हिं. पं. लां. बूटा (फूल); सिं. बूटो ; गु. बुट्ट ; अकाम. बुटा, बुटी पहा.]

बूट पुं. प्राणिविशेष, नक्र. A kind of animal.

[प्रा. बुट्ट (?) ; पं. बुट्ट, सिं. बुटो ; बोट्ट ; हिं. बोटा (ठोकळा); म. बुटका (गिड्डा). शब्द द्राविडी असावा.]

बूड न. खालचा भाग. The bottom, the base.

[वैसं. बुध्नः, बुन्ध ; पा. बुंदो ; प्रा. बुन्ध ; का. बॉन् (खालीं); गु. बुंधूँ; हिं. बूँड (अपानद्वार); पं. बुण्ड, बुन्ध, बुंण्डी ; सिं. बूण्डरु ; ने. बून्दी ; म. बूड, बोचा, बुडखा पहा.]

'बे वि. दोन. Two.

[सं. द्वा, द्वि, द्वे ; प्रा. बा, बि, बे ; गु. बे, बेन् ; सिं. बा ; सिंह. दे ; हिं. बे, बा ; संस्कृत. 'द्वि' पासून प्राकृत बीजें दोन तयार झालीं: एक द् दुसरें ब्, व ह्या दोन्हीपासून कांहीं भाषांत द्-अन्वित शब्द तयार झाले व इतर कांहीं भाषांत 'ब्-अन्वित शब्द तयार झाले. उदा. बावीस, बत्तीस बेचाळीस, बावन्न इ. दुणें, दुप्पट, दो, इ.]

'बे अ. विना, शिवाय. Without.

[फा. बी. ह्याचेहि सामासिक शब्द पुष्कळ आहेत. अकामसा. **बेअकली, बेअदबी, बेअब्रु, बेइज्जत, बेइमान, बेकैद, बेकायदा, बे-गुमान, बेचव, बेचैन, बेछूट, बेजबाबदार, बेजरब, बेज्या** (बीजा), **बेजार** (बीझार्), **बेडर, बेढब. बेदाणा** (आत बीं नाहीं असें द्राक्ष), **बेदिक्कत, बेपरवा** (निष्काळजी, फा. **बी-पर्वाह**), **बेफाम** (निश्चिन्त, गाफील, <फा. **बी+फहूम्.**), **बेफिकीर, बेबाक, बेभरंसा, बिमार, बेमुरवत** (फा. < **मुरुव्वत्** – माणुसकी, **बेशरम्, बेसुमार, बेशिस्त, बेशुद्धि** (संस्कृत आणि फारशी मिश्र).]

बेक न. विरोध. Opposition.

[सं. द्विक ; प्रा. बिक ; हा शब्द 'एक' ह्या शब्दाचा प्रतियोगी म्हणून ध्वनिसादृश्यानें तयार झाला. '**बेकी**' हें त्यापासून नाम ; **ऐकी बेकी.**]

बेगड न. रंगीत चकचकीत जस्ताचा पत्रा. Shining tin-plate.

[कान. **बेगडे.**]

बेगम स्त्री. राणी, उच्च घराण्यांतील स्त्री, अविवाहित स्त्री (लक्ष.). A lady, wife of a Muslim grandee.

[फा. **बेगम्.** हा शब्द तुर्की आणि अरबी ह्या दोन मिश्रणापासून झाला आहे. तुर्की **बेग्, बे,** = राजा प्रधान कारभारी ; + अर. **अम्, अम्म** = आई. सध्यांच्या मराठींत 'अविवाहित स्त्री' असा अर्थ प्राप्त झाला आहे.]

बेगमी, बेजमी स्त्री. पुरवठा, सांठा, निश्चिति. Sufficiency, supply.

[फा. **बेगमी, बेजमी** ; हिं. **बेगमी** ; पेकाम. **बेगमी-शेगमी** (रा. ३-२३९); **बेजमी.** (रा. १५-११६).]

बेगवटा पुं. पोट. Belly.

[सं. (?); याकाम. **बेगवटा.**]

बेच(णें) सक्रि. विकणें. To sell.

[सं. **व्यय, विक्रयः,** ह्या दोन्ही शब्दांशीं ह्याचा संबंध जोडल्यामुळें ह्याच्या अर्थांत बदल झाला. हि. **बेचन.**]

बेचकें न. दुबेळकें, झाडाच्या दोन फांद्यांमधील अडचणीची जागा. A fork of a tree.

[कान. **बेळे** ; हिं. **बीच** ; गु. **वचमां** (मध्यें); याकाम. बेच = पानांत पान असतें तें (ज्ञा. १५-१०३); अकाम. **बेचकें, बेंळकें** = दोन फाट्यांचें दांडकें (देप्रा. **बेली स्थूणा** (२१६-६); हिं.का. बेल = फावडें.]

बेचा(ता)ळीस वि. संख्याविशेष, चाळीस अधिक दोन. Forty-two.

[सं. **द्विचत्वारिंशत्** ; पा. **द्वाचत्तालिस** ; प्रा. **बायालीसम्, बायाला** ; अप. **बेआल** ; का. **दोयेतोजिह** ; बं. **बियाल्लिस** ; ओ. **बयालिस** ; हिं. **बयालीस** ; पं. **बिताळी** ; लां. **बेताली** ; सिं. **बाएताळीह** ; गु. **बेताळीस.**]

बेंचळ न. जुंबाड. A sprout, a mass of leaves.

[याकाम. **बेच** = पानांत अंतर्विद्ध असलेला कोंवळ्या पानाचा कोंभ. **बेचकें** पहा.]

बेट न. सर्व बाजूंनीं पाण्यानें वेढलेलें जमिनीचें क्षेत्र. An island.

[सं. **वृन्त** ; प्रा. **बिंट** (बंधनम्); बं. **बेंठ, बेंट** ; सिं. **बेट्टु** ; कान. **ब्यट्ट** ; अकाम. (कळकाचें) **बेट** ह्यांत समूहाचा अर्थ आहे. वरील ‘ **बेट** ’ शब्दाची व्युत्पत्ति निराळी असली पाहिजे. ‘ **वेण्ठ** – वेढणें असा एक प्राकृत धातु आहे त्यापासून हा शब्द असेल काय ? द्राविड भाषांत **बेट्ट, बेत्त** = वेत ह्या अर्थी शब्द आहेत. परंतु ते सं. **वेत्र** शब्दाचे तद्भव असावेत. प्रा. **बिंट** शब्दाचा संस्कृत **वृंत** शब्दाशींच संबंध असावा हें अधिक शक्य आहे. मराठी **बेट, बिंट, बिंडा** वगैरे शब्द ‘ **वृन्त** ’ शीं सबद्ध आहेत.]

बेटा पुं. मुलगा, पुत्र. A son.

[सं. (?) ; **बिट्ट** ; देप्रा. **बिट्ट** ; कु. **बेटो** ; अ.बं.हिं.पं. **बेटा** ; सिं. **बेटो** ; गु. **बेटो** ; ने. **बेटो** ; मराठींत हा शब्द हिंदींतून आला. अकामसा. **बिट्टा, बिट्टया, बिट्टी, बिडकुली, पिट्टुकली, पिटकें.**]

बेडा पुं. नाव, तराफा. A boat.

[सं. (?) ; देप्रा. **बेडोनो:** (२१६-६) ; प्रा. **बेडा, बेडअ** ; पं. लां. **बेरा** ; सिं. **बेरो** ; गु. **बेडो** ; रुमा. **बेरो** ; याकाम. **बेडी** = जलवाहन (नरुत्व. ७२०) ; अकाम. **भेली** (प्रा. **वेडा** ; **भेडक, भेलअ**).]

बेडुक पुं. पाण्यांतील एक प्राणिविशेष. A frog.

[सं. **मंडूक** ; सिं. **डेडरु.**]

बेडी स्त्री. लोखंडी सांखळी, कैद्याच्या हातापायांत घालावयाची लोखंडाची कडी. A fetter, shackle.

बेणा वि. उघडा, स्पष्ट. Disclosed, revealed.

[फा. **बिना** = पाहणें. ह्या शब्दाची घटना ‘ **स्पष्ट** ’ शब्दासारखी आहे. ‘ **स्पष्** ’ हा धातु मूळ असून त्याचा अर्थ **पाहणें** असा आहे.]

बेंड न. देठ, सुजलेला भाग, फुगलेला भाग, फोड, गुप्त गोष्ट (लक्षणा). A stalk, a boil, a tumour, a secret.

[सं. **वृन्त** ; **वि + अंठ्** १ गतौ ; प्रा. **वेण्ट** ; प्रा. **बेंठ.**]

बेंड, भेंड न. जोंधळ्याच्या धाटाचा आंतील पांढरा भाग. The pulpous portion.

[कान. **बेंडु** = आंतील पांढरा आणि **हलका** भाग, पोकळ भाग.]

¹**बेत** न. उन्माद, प्रेमाचा अतिरेक. The excess or exuberance of passion, the heat of passion.

[कान. **बेट** = कामेच्छा, शृंगार, वैषयिक सुख ; अकामप्र. **बेतांत,–वर येणें** = प्रेमाचा अतिरेक करणें.]

²**बेत** पुं. उद्देश, हेतु, योजना. A plan, a scheme.

[सं. **हेतु** ; हिं. **बेत.**]

बेत(णें) सक्रि. माप घेणें व कापणें. To measure and cut.

[सं. **वीत** (निष्ठा), √ वे–तन्तुसन्ताने.]

बेथु वि. जवान, बळकट. Young, strong.

[सं. **वयस्थ** ; याकाम. **बेथु** (शा. १-१२०).]

बेंबट(णें) अक्रि. **ओरडणें, बेंबें ओरडणें. मेंढीसारखें** ओरडणें. To cry, to bleat.

[सं. **बिट्** १ आक्रोशे (यङ्लुङन्त), वैसं. **मेम्यत्** ; सं. **मा.** ३ शब्दे, **बेंबाब(णें)** = ओरडणें.]

बेंबळ, बेबळे न. वि. ढिला, निःशक्त. Loose, imbecile.

[सं. **विव्हल** ; अकाम. **बेंबळ, बेंबाव, बेंबाट** वगैरे शब्द कोणत्या तरी संस्कृत मूळाशीं जोडून दाखवितां येतात. तरी पण हे शब्द ध्वनिशब्द (echo-words) मानणें हें अधिक सशास्त्र होय. ध्वनि हा उच्चाराचाच असावा लागतो असें नाहीं. कोठें गुणाचा, तर कोठें द्रव्याचा, तर कोठें क्रियेचा, तर कोठें भावनाकल्पनेचा असे निरनिराळे ध्वनि आहेत व त्याप्रमाणें ध्वनिशब्द उत्पन्न होतात.]

बेंबी स्त्री. नाभि, गर्भनालाचें स्थल. The naval.

[सं. (?) ; देप्रा. **बेंबी** ; शरीराच्या मध्यभागावर हा अवयव आहे. त्याला गर्भनाल चिकटलेला असतो. सर्व शरीराचें अधिष्ठान ह्याजवळ आहे ; त्यावरूनच **बेंबीच्या** देठापासून, देठ पिळणें, **बेंबीचें** उखळ येणें (स्वास्थ्याची परिस्थिति) हे वाक्प्रचार रूढ झाले आहेत.]

बेरकी वि. अट्टल, वस्ताद. A scamp, cunning.

[कान. **बेरिके** = संकरजन्मा.]

बेडर पुं. एक निकृष्ट ज्ञातिविशेष, अट्टल लुटारू, दरोडेखोर (ल.). A professional robber.
[काना. **बड्डुर.**]

बेरीज स्त्री. एकुणात, रकमाची मिळणी–एकत्रीकरण. The sum, the addition, the total.
[फा. **बरीज** ; कान. **बेरिजु.**]

बेल पुं. वृक्षविशेष, बिल्व. A kind of tree.
[सं. **बिल्व, बैल्वम्** ; पा. प्रा. **बिल्ल, बेल्ल** ; सिंह. **बेल** ; का. **बेल्, बिल्**; हिं. **बेल्**; गु. **बीली.** पं. **बिल्ल** ; अकामसा. **बेलकाचरी, बेलपानी** (टिका), **बेल** (फळ), **बेलवांगें, बेलभंडार** (शपथ देण्याघेण्याच्या वेळीं पिंडीवरील किंवा खंडोबाच्या मूर्तीवरील बेल आणि भंडारा (हळद) उचलण्याचा प्रघात आहे ; त्यावरून बेलभंडार उचलणें म्हणजे आणभाक घेणें असा अर्थ).]

बेलें न. पैशाची पिशवी. A money–bag, a purse.
[फा. **बील** = प्रवासांत गरीबांना वाटण्यासाठीं पैशाची पिशवी ; अकामसा. **बेलबारदार** = थोरामोठ्यांच्या नांवानें पैसे वाटणारा.]

बेला अ. शिवाय. Without.
[फा. **बेला** ; **बे** हा त्याच अर्थी दुसरा शब्द आहे. अकामसा. **बेलाकसूर, बेलाशक.**]

बेश वि. अ. चांगलें, छान, ठीक, योग्यपणें. Good, proper, suitable.
[फा. **बेश.**]

बेसन न. हरभऱ्याच्या डाळीचें पीठ, त्याचा पदार्थ. Flour of gram, a sweet.
[सं. **वेसनम्** ; प्रा. **वेसण** ; बं. **बेसन** ; ओ. **बेसन** ; हिं. **बेसन्**; पं. **बेसण** ; गु. **वेसण.** संस्कृतीकरण नंतरचें असावें.]

¹बेहडा पुं. अंदाजपत्रक, सर्व वर्षांतील जें देणें घेणें, वतनइनामाचें उत्पन्न आलें असेल त्यासंबंधीं कागद. A public paper showing receipts and disbursement.
[हिं. **बेहडा.**]

²बेहडा पुं. औषधिविशेष. A kind of medicinal fruit.
[सं. **बिभीतक** ; प्रा. **बहेडओ, बहेडय** ; हिं. **बहेडा.**]

बेहबुदी स्त्री. सुस्थिति, सुव्यवस्था, निगा. Flourishing or happy state.
[फा. **बिह्बूद्.**]

बेळें न. दुबेळकें. A fork of wood-pieces.
[कान. **बेळे** ; देप्रा. **बेली** स्थूणा (२१६-६); हिं.का. **बेल्** = फावडें ; म. **बेळकें, बेचकें.**]

बैकार पुं. बहिष्कार. Boycott.
[सं. **बहिष्कार**(< **बहिस्** + **कृ**) ; प्रा. **बहिक्कार** ; याकाम. **बैकार** ; अकाम. **बैकार.**]

बैठ(णें) अक्रि. बसणें. To sit.
[सं. **उपविष्ट** (निष्ठा √ **उपविश्**) ; प्रा. **उवइट्ठ** ; अप. **बइट्ठ** ; हिं. **बिठना, बैठना** ; याकाम. **बैठला, बैठा** = बसलेला (ज्ञा. १८-५९३); अकामसा. **बैठक** (बसणूक), **बैठा** (बसलेला), **बैठी**–कीर्द,–वही,–खातें (रोजच्या व्यवहाराची).]

बैतें न. बलुतें. A village servant.
[अ. **बैत** ; पेकाम. **बैत** (ऐस्फुले २-४५); अलुतें बलुतें असे दोन हक्क खेडेगांवांत असतात.]

बैल पुं. वृषभ. A bull.
[सं. **बलीवर्द** ; देप्रा. **बइल्ल** ; **बईल** पहा.]

बैस(णें) अक्रि. बैठक मारणें. To sit.
[सं. **उपविश्** ; अप. प्रा. **बइस** ; का. **बेहुन्** ; पं. **बेसना** ; सिं. **बिहणु** ; हिं. **बैसना** ; गु. **बेसवूँ** ; याकाम. **बैसणें, बैसका, बैसणी** (ज्ञा. ८-२६५, १५-११३, १६-२६२); अकाम. **बसक, बैठक, बैठा** (सं. **उपविष्ट**; प्रा. **बइट्ठ**), **बैसणें** (आसन), **बैसक, बैसणाईत, बैसतखेवो.**]

बोकड पुं. प्राणिविशेष, शेळीजातींतील नर, मेष, अज. A he-goat.
[सं. **वृकः** (?), **बुक्कः** ; प्रा. **बोक्कड** ; देप्रा. **बोक्कडो** छागः (२१६-१३); कु. **बोको** ; बं. **बोका** ; ओ. **बोका** (मूर्ख, मद्दड); बि. हिं. **बोका** ; पं. **बोक** ; लां. **बोक** (बोकडाचे आवाज); गु. **बोकड्रं** ; म. **बोका** = मांजरातील नर.]

बोक(का)णा पुं. बकाणा, मोठा घांस. A huge gobbet.
[कान. **बॉक्कण, बांकांणा** पहा.]

बोका पुं. मांजरांतील नर, खाऊन माजलेला-लठ्ठ मनुष्य (लक्षणा.) A he-cat.
[सं. **वृकः**, **वुक्क**; प्रा. **बोक्कड**; देप्रा. **बोक्कडो**; **बोकेसंन्यास** (ढोंग, उदीर पकडतांना बोका अगदीं संथ बसतो त्यावरून, वकध्यान).]

बोका पुं. मूत्राशय, अंडाशय, स्तन. A kidney.
[सं. **वृक्कौ**, **वृक्यौ**, **√ वृष्** (?); प्रा. **बुक्कम्**, **बुक्का**, **बुक्कन्**; पा. **वक्कम्**; का. **बोख**, (ढुंगण); अ. बं. **बुक** (छाती, स्तन); ओ. **बुक**; लां. **बुक्की**; सिं. **बुकी**; अकामसा. **बोकांडा** = मान, पाठ, ऊर, ढुंगण.]

बोखार(णें) सक्रि. झांकणें. To cover.
[सं. **अव+कृ** (?); **बुंथी** = आवरण; याकाम. **बोखारणें** = झांकणें; **बोखारा** (आवरण, बुरखा).]

बोगदा पुं. भगदाड, तळघर, भिंत, डोंगरांत मोठें भोंक पाडून आरपार नेलेला रस्ता. A breach, a tunnel.
[तुर्की. **बोघोझ्** = चिंचोळी समुद्रपट्टी; फा. **बुघाझ्**; पोर्तु.-**आगोगदा**.]

बोंगा पुं. फुगीर भाग, अव्यवस्थित फुगीर भाग. A clumsy protuberent part.
[**ध्वनिशब्द**. अकाम. **बोंगाडा**, **बोंगाड्या** = अव्यवस्थित.]

बोच(णें) सक्रि. टोंचणें. To prick.
[सं. **ब्रुस्** १० हिंसायाम्, **व्रश्च्** ६ भेदने (रा.); अकामसा. **बोचणी**, **बोंच** (भोंक), **बोचक(णें)**, **बोचकरणें**, **बोचकुरणें**, **बोचलणें**, **बोचकडणें**, **बोचकारा** (< सं. **व्युत्+कृ** १ विदारणे).]

बोचकें न. गाठोडें. A bundle.
[तुर्की. **बुक्का**; अकामसा. **बुचुक**, **बोचका**.]

बोचरा, बोतरा वि. दांत नसलेला. Having no teeth.
[कान. **बोच्चु** = दंतहीन; तेलगु **बोक्की**; याकाम. **बोचर** (ज्ञा. १२-७०); अकाम. **बोतरा**, **बुच्चा**, **बोचखिंड**.]

बोचा पुं. खालचा,-तळचा भाग, ढुंगण, अपानद्वार. The posteriors, the anus.
[सं. **बुध्न**; अकाम. **बोचाळ,-ळू**, **बोचु**.]

बोज पुं. वजन, महत्त्व, मान. Weight, dignity, importance. honour.
[सं. **बुध्** (?); हिं. कान. **ओजे**; अकाम. **बोजा**, **बोझा**, **बोजड**.]

बोजा,झा पुं. ओझें, वजन. A load or burden.
[सं. **वह्यः वाह्यः**; प्रा. **वोज्झ**; कु. **बोजो**; अ. **बोझा**; बं. **बोज्झा**; ओ. **बोझ**; हिं. **बोझ**; गु. **बोझो**; सिं. **बोझो**; अकाम. **बोजा**, **बोझा**; **बोजें**, **वोजें**.]

बोझा पुं. अर्क, रस. An essence, an intoxicating stuff.
[सं. **वाह्य**; याकाम. **बोझा** (ऋ. ५५१), **बोझावणें** = रंगणें (नरुस्व. ७२३).]

बोट न. शरीरावयव, हाताची अंगुली. A finger or toe.
[कान. **बोट्टु**. **बोट** हें दाखविण्याचें साधन म्हणून वापरतात त्याअर्थीं त्यावरून कांहीं वाक्प्रचार लक्षणेनें रूढ झाले आहेत. **बोट दाखविणें**, **बोटावर नाचविणें**, **बोटें मोडणें** (शापणें), **दोन बोटें स्वर्ग उरणें**, **बोटें डोळ्यांत घालणें**, **बोटावरील थुंकी** इत्यादि. इतर शब्द—**बोटखत**, **बोटवा**, **बोटी**, **बोटाळ(णें)**, **बोटूक**.]

बोड(णें) सक्रि. हजामत करणें, भादरणें. To shave the head.
[कान. **बोडुअ** = केश, दंत, शृंग—रहित, **बोट्ट**, **बोक्क**, **बोळुभ** = हजामत केलेला; तेल. **बोडी** = हजामत, **बोळी** = बोडकी, विधवा. सं. (?); प्रा. **बोड** (एमेव अड्ड बोडो); गु. **बोडो**; अकामसा. **बोड**, **बोडसें**, **बोडकें बोडंती**, **बोडकी**.]

बोडण व. एक धार्मिक विधि. A religious ceremony.
[सं. **मुट्** १, ६ अवयवे, **मोटनम्**; प्रा. **बोटणम्**; पांच सुवासिनी व एक कुमारिका ह्यांच्या कडून परातींत दहीं, दूध, वडे, भात, पोळ्या, मध इत्यादि पदार्थ कालवितात.]

बोडी स्त्री, वीस कवंड्यांइतकें एक नाणें. A coin, a small pond.
[सं. **वाटिका**; प्रा. **बुड्ड**; याकाम. **बोडी** = **नाणें**; **डबकें**.]

बोडा पुं. (अशिष्ट) पुरुषाचें जननेंद्रिय. The penis, male organ of generation.
[देप्रा. **बोड्डो** = तरुण; प्राकृतमध्यें **बोड्ड** = मूळ, मुलगा, **बोड** = पिंड असे शब्द आहेत. त्यांचा ह्याशीं कांहीं संबंध

असेल काय ? पुढील द्राविडी शब्दांशीं कांहीं संबंध असेल काय ? कान. **बुड्डे** = फुगवट ; तेलगु. **बोड्डु** = पुढें आलेली बेंबी.]

बोंड न. कापूस, अफू इ. वनस्पतीचें फळ. The head or ear of corn, anything of that shape.

[कान. **बोंडु** ; देप्रा. **बोंडं** चूचुकम् (२१६-१२); कान. **बुड्डे** = फुगवटा ; तेलगु. **बोड्डु** = पुढें आलेली बेंबी. म. **बोंडी, बोंडशी, बोंडुस-बोंडूस** (नाकथानवगैरेचें अग्र). अल्पार्थे प्रत्यय लावून हे शब्द तयार झाले आहेत.]

बोंथट वि. मोंड, धार नसलेला. Blunt.

[सं. **बुंथी** = आवरण, **व्यर्थट** (रा.) ; म. **बोथाटी, बोथरा, बोथराखिंड, बोथरखेडें. बोद्** पहा.]

बोद् वि. बोथट, Blunt,

[सं. **बुंथी, व्यर्थट** ; प्रा. **बोद्द, बोद्ध, भोद्द** ; कु. **बोदो** ; बं. **बोदा** (दुर्गंधी) ; हिं. **बोदा** (निर्बल), **भोंदु** (मूर्ख) ; पं. **बोद्दा, बोड्डा** (घाणेरडें) ; गु. **बोदूँ** ; म. **बोथाटी.**]

बोध(णें) सक्रि. जाणणें. To know.

[सं. बुध् १ ज्ञाने ; प्रा. बुध् (?) ; अकाम. **बोध, बुद्धि, बोद्धा, बोधन, बोधपर, बोधावणें, बोधा, बोधिनी, बोध्य.**]

बोनें न. जेवण, नैवेद्य, पक्वान्न. A meal, a thing offered to idol, a dish.

[कान. **बोन** = भात, अन्न ; याकाम. **बोणें, बोनें** (अमृ. १-३६, नरुस्व. ४८ ज्ञा. ९-३९३) ; अकामसा. **बोन्, बोनेवटी.** वेघाचें बोनें बहु । वाढितेनसि जेऊनियां धाला जो ॥ अमृ. १-३६.]

बोबडा विं. बोलतांना अडखळणारा, अस्पष्ट किंवा अर्धवट उच्चार करणारा. Incapable of distinct articulation.

[ध्वनिशब्द. वैसं. **बल्बला,** √ **बल्ह्** १ भाषणे किंवा **ब्रू** ह्या धातूंची छाया.]

बोभा(इ)(णें) उक्रि. मोठ्यानें हांक मारणें, ओरडणें. To call.

[सं. **ह्वे** १ आव्हाने, **बह** १ भाषार्थे ; **बोबह** ; याकाम. **बोभाणें बाबाणें.** (ज्ञा. १३-३०५) ; अकामसा. **बाभा** (< **आह्वयः**) = हांक, **बोभाट,-टा** (प्रसिद्धि), **बोभावणें, बोभाविणें.**]

बोंब स्त्री. ओरड, शंखध्वनि, तोंडावर हात मारीत मारीत काढलेला आवाज. A cry, a loud bellowing, beating the mouth with hand.

[देप्रा. **बुंबा,** (ध्वनिशब्द), **बोंबल** ('**ब्रू**'चा अभ्यास-राधा.) ; याकाम. **बोंबती** = वाद्य. ॐ हा उच्चार सारखा केला म्हणजे '**बोंब**' असा शेवटीं पर्यवसित ध्वनि निघतो, त्यावरून चेष्टेनें '**बोंब**' ला बकारमिश्रित '**ओम्**' असें म्हणतात. अकामप्र. नांवानें **बोंब** मारणें, **बोंब** वाजणें, **बोंबाबोंब, बोंब्या, बोंबल्या.**]

बोंबील न. वाळविलेला मासा. A dry fish.

[*Portu.* Bommelow.]

बोर न. फलविशेष. The *ber* fruit.

[सं. **बदरम्** ; पा. **बदर** ; प्रा. **बअर, बोर** ; का. **ब्रय्** ; कु. **बेर** ; बं. बि. **बइर, बेर** ; हिं. **बेर.** पं. **बेर** ; सिं. **बेरु** ; गु. **बोर** ; अकाम. **बोरांतील कीड,-आळी** = आत्मसंतुष्ट मनुष्य (ल.), **बोराटी, बोरकंडा, बोरखडा, बोरण्हाण.**]

बोरा पुं. लाल खडा. A flint-pebble.

[याकाम. **बोरा** = लाल खडा, गोहर (नरुस्व. ४७१).]

बोरा,-रिया,-र्‍या पुं. वि. पोतें, तरट, गोणपाट फजीती, अनाथ, दुर्बळ. A mat, a sort of thick carpet, a sack, disgrace, helpless.

[फा. **बूरिया.**]

बोरू पुं. तृणविशेष. A kind of reed (used for writing).

[सं. (?) ; देप्रा. **बरुअं** (**इक्षुसदृशतृणम्**), **अत्र बरुअ-बलवट्टी शब्दौ दन्तौष्ठ्यादी कैश्चिन्निबद्धौ** (२१४-३,५) ; म. गु. सिं. पं. हिं. **बरू.**]

बोल(णें) क्रि. भाषण करणें, शब्द उच्चारणें. To speak, to utter sounds, to talk.

[सं. **वल्ह्** १ भाषणे ; प्रा. **बोल्ल** ; देप्रा. **बोल्ल, बोल्लो** (कलकल) ; अप. **बोल्लिअ** ; कु. **बोलणा** ; आ. **बोलिब** ; बं. **बोला** ; ओ. **बोलिबा** ; हिं. **बोलना** ; पं. **बोलणा** ; सिं. **बोलणु** ; गु. **बोलिवूँ.** ब्लोक ह्या शब्दाला द्राविडी **मूळ** सुचवितो ; ता. **वगुळि** (गोंगाट) ; कान. **बगळु, बोगळु** = ओरडणें, **बोब्ब** = ओरड, रड ; अकाम. **बोल** (-करणें, ठेवणें, लागणें), **बोलांत बोल नसणें, बोलभांड, बोलका,**

बोलबाला (हिंदी), **बोलाचाली, बोलाचाल, बोली** = भाषा. ज्ञानेश्वर, रामदास, तुकाराम ह्यांच्या कवितेंत **करिजे करीजति** यांच्यासारखीं वर्तमान कर्मणि रूपें किंवा **करिजेल** अशीं भविष्यत् कर्मणि रूपें सांपडतात. परंतु **'बोलिजेलें'** ॥ सारखीं भूत कर्मणि रूपें रघुनाथ पंडितच तेवढा विशेषं वापरतांना आढळतो. उदा. भीमरूपें मग तया **बोलिजेलें**, काय **बोलिजेलें** तपस्वीराजें, अत्यादरें **बोलिजेलें**.]

बोलें न. बहुलें पहा. लग्नाची वेदी. An altar for mariage-ceremony.

बोहणी-नी स्त्री. आरंभ, सुरुवात, सकाळची वेळ, पहिली विक्री. Morning, beginning, first sale of goods.

[सं. विभानु ; प्रा.अप. **विहाण, बिहाणु** ; हिं. **बेहान्**, **बिहान्**; बं. **बिहान्**, **ब्यान्**; अकाम. **भवानीच्या** पारीं; कान. **बोणी** ; याकाम. **बोहणी** = आरंभ (ज्ञा. १८-७८४).]

बोहरी पुं. मुसलमानांची एक जमात. A class among the Muslims.

[सं. **व्यवहारिन्**, **वि + अव + √ हृ**.]

बोहरी स्त्री. नाश, चुराडा, अग्नि, हद्दपारी. Distruction, fire, exile.

[सं. बुन्ध् १० हिंसायाम्; वैसं. **भुर्** (अभ्यास – **जुभुर्**) = ज्वलने ; याकाम. **बोहरी, बोहिरी** (ज्ञा.१८-५५५); बकाम. **बोहिरी** (भा. ५-४८१).]

बोळ पुं. अरुंद वाट, दोन्हीबाजूंस घरें असलेला व पुढें बंद किंवा उघडा असलेला अरुंद रस्ता. An alley, a lane.

[सं. **प्रतोली** ; प्रा. **पओली**, **बोळ** (?) हा शब्द चिन्त्य आहे. ह्याच अर्थाचे **पोळ** (गुजरातींत), **तोळा** (बंगालींत, उ. माणिकतोळा), **टोळी** (इंदुर)–असे शब्द रूढ आहेत. एकाच संस्कृत शब्दाचे तद्भव असे चमत्कारिक त्या त्या भाषेच्या वर्णप्रक्रियेप्रमाणें झाले.]

बोळ(णें) अक्रि. घट्ट होणें. Thicken.

[सं. **पुल्** १ महत्त्वे ; अकामसा. **बोळा** = चिंध्यांचा गुंडाळा; अकामप्र. **बोळा फिरविणें,–फासणें**, **बोळयानें दूध पिणें** = स्वतःची अक्कल नसणें (लक्षणा).]

बोळवि(णें) सक्रि. पाठविणें, रवानगी करणें. To send.

[कान. **बोळु** ; याकाम. **बोळाविणें** = घालविणें (ज्ञा. १७-३०५), **बोळावा, बोळावी** = पावती (ज्ञा. १६-६५); शिकाम. **बोळावा** ; अकामर्सा. **बोळवण,–णी, बोळावा,–वी.**]

बौहडा पुं. वृष्टि. A sharp shower of rains.

[सं. **भृ** = भरणे. **वहण** = प्राचुर्य.]

ब्याण्णव वि. संख्याविशेष, नव्वद अधिक दोन. Ninety-two.

[सं. **द्विनवति** ; प्रा. **बाणउई** ; का. **दुनमय** ; आ. **बेरान्नवइ** ; बं. **बिरानव्बइ** ; ओ. **बयानवे** ; हिं. **बान्वे, बिरानव्वे** ; ला. **बानवे** ; सिं. **बिआनवे** ; गु. **बाणूं**.]

ब्यॉंशीं वि. संख्याविशेष, ऐंशी अधिक दोन. Eighty-two.

[सं. **द्व्यशीति** ; प्रा. **द्वासीति** ; प्रा. **बासीइँ** ; अप. **बेआसी** ; का. **डोयेसीथ**; आ. **बेराझ्ञा** ; बं. **बिरासी** ; ओ. **बयासी**; हिं. **बियासी, बिरासी** ; पं. **बिआसी** ; ल. **बेआसी** ; सिं. **बिआसी** ; गु. **ब्यसी**.]

ब्रह्म न. सत्तत्त्व, जगत्कारण, परब्रह्म. The divine substance, the *Brahman*.

[सं. **बृंह्** १ सामर्थ्येवृद्धौ. ह्या शब्दाचा लाक्षणिक उपयोग पुष्कळ झाला आहे. **ब्रह्म सांपडणें, ब्रह्मघोंटाळा** (फार गोंधळ), **ब्रह्मद्वेष** (ब्राह्मणाचा द्वेष), **ब्रह्माण्ड**.]

ब्रह्मदेश पुं. देशविशेष. The name of a country.

[ब्रह्मी. **म्रन्** = शीघ्र ; **मा** = समर्थ ; राष्ट्रनाम **"म्रन्-मा"** असें आहे. ब्रह्मी लोकांकडून ह्याचा उद्धार **"बम्–मा"** असा होतो. हाच शब्द सर्व मंगोली लोकांनीं उचलला. पाली भाषेंत **'ब्राम्–मा'** असा त्याचा निर्देश आहे. बुद्धवाङ्मयांत हाच निर्देश आहे. पुढें नंतर त्याचें संस्कृतीकरण झालें.]

ब्राह्मण पुं. एक विशिष्ट जात. A particular caste of Hindus.

[सं. **ब्रह्म, ब्राह्मण** = ब्रह्म जाणणारा ; विशिष्ट जात म्हणून त्याचा अर्थ फार पुढें झाला. वेदामध्यें वेद जाणणारा असा त्याचा अर्थ आहे. पुरुषसूक्तांत (१०-९०) मात्र त्याला नवीन अर्थ प्राप्त झाला आहे.].

ब्रीद न. व्रत, शील, बाणा. An observance, character, prestige.

[सं. **बिरुद** (?); याकाम. **ब्रीद** (नरुस्व २१.).]

भ पुं. मराठी वर्णमालेंतील चोविसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण ओष्ठ्य महाप्राण मृदु असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. Twenty-fourth consonant of the Marathi alphabet. It is soft aspirate labial.

[(आद्य **भ**) सं. **भ्**, **भ्र्**; प्रा. **भ**; **भक्त–भात**, **भय–भें**. सं. **म्ह्**; प्रा. **म्ह**; **महानस–भानवस**.

(मध्य **भ**) सं. **र्भ**, **भ्य्**, **र्भ्**, **भ्र्**, **ब्ह्** **व्ह्**; प्रा. **ब्भ**; **गर्भ–गाभ**; **अभ्र–आभ**, **जिव्हा–जीभ**, **लभ्य–लाभ**.]

भकाट न. न खाण्यानें आंत गेलेला पोटाचा भाग, पोटाची खळगी. The hollow of a side of the body, sinking of the parts from fasting.

[कान. **बक्क** = मोकळें; किंवा सं.; **भग** (?).]

भकास वि. उदास, मोकळें, भयाण, ओसाड, निर्जन, उजाड. Desolate, sad, depopulated.

[कान. **बक्क** = मोकळें, रिकामें.]

भक्कम वि. दनकट, बळकट, दृढ. Strong, lusty, firm.

[अर. **मुह्कम**.]

भक्त पुं. भजन करणारा, सेवेकरी, सेवक. A votary, a follower.

[*IE*. **Bhag**; सं. **भज्** १ सेवायाम्; *Av*. **Baga**, **Baxta** (भक्त); *Slav*. **Bogz**; *Nper*. **Baya**; *Gr*. **Phrugios**; अकामप्रा. **भगत** (स्वरभक्तीनें); अकामसा. **भक्ति**, **भक्तिमार्ग** = सेवा, पूजा निष्ठा; **भक्त** = शिजलेले तांदूळ हा शब्द निराळा.]

भग न. भोंक, व्रण. An ulcer or a sore.

[सं. **भग**; अकाम. **भगदड**, **भगदाड**, **भगाड**.]

भगभग(णें) अक्रि. आग होणें, तिखटानें तोंड भाजणें. To feel burning.

[सं. **भ्रस्ज्** ४ भर्जने, (द्विरुक्त); प्रा. **भज्ज**; कान. **बग** = मिरची खाऊन झालेली आग; अकामसा. **भगवती** = मिरचीची पूड, **भगभग** = त्रास.]

भगवा वि. रंगविशेष, कावेच्या रंगाचा. (Of) red colour.

[सं. **भृगु**.]

भगीरथ पुं. एका सूर्यवंशी राजाचें नांव. Name of a king.

[ह्यानें आपल्या पूर्वजांना पुनीत करण्यासाठीं म्हणून खडतर तपश्चर्याकरून स्वर्गावरील गंगा आणिली; ह्यावरून खडतर प्रयत्नास **भगीरथ** प्रयत्न म्हणतात. गंगेला त्याच्यावरून **भागीरथी** असें म्हणतात.]

भंग(णें) अक्रि. मोडणें, नाश पावणें. To break, to destroy.

[सं. **भङ्ग**, **भञ्ज्** ७ छेदने; गु. पं. **भंग**; सिं. **भांगो** = वाळलेली डहाळी; **भंगो** = विघ्न; पं. **भांगा** = नास धूस; बं. **भांगिते** = मोडणें; रुमा. **फग्** (बंग) = मोडणें; याकाम. **भंगणें** = नाहींसें होणें (नरुस्व ६६४); **भंग** = थरकांप; **भंगलेया वाटे** = फुटलेल्या वाटेला (ज्ञा. १३-६१९); अकाम. **भंग**, **भंगुर**, **भंगणी**, **भग्न**, **भंजक**.]

भंग स्त्री. भांग पहा. Hemp.

[सं. **भंगा**; अकामसा. **भंगट** = गांजेकस **भंगी**चंगी. (व्यसनी), **भंगट**.]

भंगी स्त्री. वळण, झोंक, पद्धति, एकाच अर्थी केलेले वाक्याचे प्रकार. A turn, a set of sentences having the same sense.

[सं. **भंगी**; याकाम. **भंगी** = रीति, प्रकार. (ज्ञा. १७-६५).]

भंगी पुं. मेहतर. A sweeper.

भज(णें) सक्रि. स्तुति करणें, सेवा करणें. To adore, to worship.

[सं. **भज्** १ सेवायाम्; याकाम. **भजणें** = अनुष्ठणें, आदरणें (ज्ञा. १८-६२८).]

भजें न. हरभऱ्याच्या पिठाचा तिखटमीठ घालून तळलेला मुटका, बोंड. A preparation of gram flour.

[सं. **भ्रस्ज्**; निरुक्तामध्यें (१–१) '**भरुज्ञा**' म्हणून एक खाद्यविशेष निर्देशिला आहे. तोच हा असेल काय ? सं. **भर्जित**; प्रा. **भज्जिअ**; आ. **भाझी**; बं. ओ. **भाजि**; हिं. **भाजी**; सिं. **भाजी**; गु. **भाजी**; ने. **भाजी**.]

भट पुं. ब्राह्मण, धर्मविधि करणारा. A Brahmin, a priest.

[सं. **भट्ट**; '**भट**'च्या धर्मविधींमुळें कामांत दिरंगाई होते किंवा नाश होतो किंवा त्याच्या ज्योतिषाच्या ज्ञानामुळें कार्याची निश्चिति राहात नाहीं ह्यावरून कामांत **भट** पडो हा वाक्प्रचार रूढ झाला. किंवा '**भट**' ह्या नांवाचा एक लाकडांतील पोखरणारा किडा आहे त्यावरून. '**भट**' हा लाघवी वृत्तीचा असतो

म्हणून '**भटाला** दिली ओसरी, **भट** पाय पसरी' ही म्हण रूढ झाली. 'भटा'संबंधीं कांहीं लोककथाहि रूढ आहेत. बाजारांत तुरी, **भट भटणीस** मारी, **शामभटाचें** तटाणें वगैरे म्हणी रूढ आहेत. भट, ब्राह्मण हे नेहेमीं चेष्टेचे विषय होतात. नाटकांतील विदूषक भट भिक्षुक असत. मैत्रेय हा ब्राह्मणच असावयाचा. रामभट, शामभट हीं त्याचीं ठराविक नांवें असावयाचीं. खाण्यापिण्याचे पदार्थ हे त्याच्या आवडीचे विषय असावयाचे. ह्यापासून अल्पार्थें, निंदार्थें-**भटुरका, भटुरगा, भटू** असे शब्द रूढ आहेत. **भटजी, भटकी** (वृत्ति) इ.]

भटक(णें) अक्रि. अद्वांतद्वां हिंडणें, फिरणें. To roam, to rove.

[सं. १ अभि + अट् + अकच् = अभ्यटक (राज.). २ **भ्रंष्ट, √भ्रंश्**; प्रा. **भट्ट + क**; गु. सिं. पं. हिं. **भटक**; गु. **भटकवूँ**; सिंह. **बट्** = बुडालेला, अस्तास गेलेला सूर्य म. **भटक्या, भटकणी**.]

भट्टी स्त्री. चुलाण, घाणा, तयार करण्याची युक्ति (ल.). A kiln, furnace, (hence) cast art.

[सं. **भृष्टि**; **भ्रष्ट्री**; हिं. **भट्ठी**; गु. **भट्टी**; बं. **भाटी**; म. **भटारखाना** = खानावळ, सबगोलंकार. **भट्ठा** = विस्तव असलेलें भांडें. सं. **भ्राष्ट**; गु. **भट्टा**; पं. **भट्ट**; हिं. **भट्टा**; बं. **भाटा** (दारूगोळा गाळण्याचा); **भडभुंजा, भटारी** = पोहे भाजणारा; (< सं. **भृष्टकारः**; बं. **भाटियारा**; हिं. **भथियारा** (खानावळवाला); पं. **बथिआर**; सिं. **बथारो**; गु. **भठियारो**).]

भडक(णें) अक्रि. एकदम पेट घेणें. To blaze up.

[सं. **अभि + दह् + अकच्, भ्रस्ज्** (?), **भ्रष्ट + अकच्**; देप्रा. **भडक्क** = थाटमाट. टर्नर व ब्लोक ह्या दोघांचा ह्या धातुबाबत संभ्रम झालेला दिसतो. एक '**भ्रस्ज्**. शीं संबंध लावतो तर दुसरा '**भ्रष्ट**' शीं संबंध लावतो. '**भटकणें, अडकणें, कडकणें, तिडकणें**' ह्यांमध्यें जसा '**क**' आला आहे तसा वरील धातूंतहि आला आहे. तो काढला म्हणजे '**भड**' असें मूळ राहतें. **भट** = कडकड वाजणारें जळण, असा एक शब्द आहे. व तो **अभिदह्** शीं जोडणें अधिक सयुक्तिक आहे. **भडाड** असा एक मराठी शब्द आहे (पहा. ज्ञा. ११-३०४.). (अ. **भरक**; बं. **भडक**; ओ. **भरक**; हिं. **भरक**; पं. **भरक्**; सिं. **भरक्**; गु. **भडकू**; अकामसा. **भडका, भडकणी**. (लाल) **भडक, भडाडणें, भडाड, भडाडा, भडाभड**.).]

भडक(णें) क्रि. भीतीनें एकदम गोंधळणें, उधळणें, To be routed and scattered, to take fright.

[सं. **भटभटायते**; प्रा. **भडक्क** (आवाज); आ. **भरक** (गर्व); बं. **भडकान**; ओ. **भराकिबा**; हिं. **भरकना**; सं. **वरति**; पा. **वारेति**; प्रा. **वारेइ**.]

भडकवि(णें) सक्रि. मारणें, चपराक मारणें. To slap.

[सं. बर्ह् १० हिंसायाम्, बृह् ६ उद्यमने + अकच्.]

भडखंभा पुं. रणभूमीवर शेंदूर लावून उभा केलेला खांब. A pillar with red pigment posted on a battle-field.

[सं. **भट + स्कंभ** (**भट** = योद्धा); याकाम. **भडखन, भडखंभा, भडखळ** = रणभूमि.]

भडवा पुं. (ग्राम्य) एक शिवी, अपशब्द, कुंटणपणा करणारा मध्यस्थी, कलावंतीणीचा साजिंदा. A term of abuse.

[सं. **भर्याट**, (**भट्ट** > **भाटुक** = भाड्यानें देणें.); देप्रा. **भडिल**; हिं. **भडुआ**; बं. **भेडुया** (श. को.); शिकाम. **बडुआ** = भक्त.]

भडसें न. भडका, उदय, उत्कर्ष, महत्त्व. Blazing, rise, success, importance.

[सं. **भ्रष्ट, भ्राष्ट**; याकाम. **भडसा** = पूर, लोट (ज्ञा. ६-३५४), = महत्त्व (विवे. १-६६).]

भण(णें) सक्रि. म्हणणें, बोलणें. To speak, to say.

[सं. **भण्** १ भाषायाम्; याकामसा. **भणौनि** (म्हणून), **भणितु** (बोललेली गोष्ट), **भणिजे** (बोलावें), **भणिपै** (म्हणावें); अकामसा. **म्हणणें**; ग्रामीण. **भन**; **भणभण** = आवाज करणें, गुणगुण करणें.]

भणंग(भिकारी) वि. दरिद्री, भिकारी, क्षुद्र, हलका. Poor, beggar, low.

[कान. **बणगु** = क्षुद्र, हलकट मनुष्य; याकाम. **भणंग** (**भणग**) = दीन (ज्ञा. ११-४२८).]

भत्ता पु. पगाराशिवाय अधिक वेतन. An allowance beyond the settled salary paid for extra duty.

[हिं. **बात्** (= खोगिरासाठीं पैसा.); *Lat.* Bastum; हिं. **बत्ता, भात्, भत्ता**.]

भर्दें न. नाश, अर्धे मडकें, खापर.

[सं. **भद्रम्**; प्रा. **भद्द**; अप. **भद्द**. ह्या शब्दाच्या अर्थांत चढउतार फार झाला आहे. **भादरणें** (< **भद्राकरणम्**), **चांगभला** हीं दोन चांगलीं उदाहरणें होत ; अकामसा. **भद्दा**, **भदया**, (कामाचें) **भर्दें**, तत्सम **भद्र** हाहि रूढ आहे.]

भबक(णें) अक्रि. पेट घेणें, आगीचा डोंब उठणें. To blow in puffs, to rise and spread.

[सं. **बर्ह्** १ प्राधान्ये. **बबर्ह** + **अकच्** (?); हिं. **भबकना**; पं. **भबक**; सिं. **भभक**; गु. **भभको**; **भभरु**, **भभट्ठ**; म. **भपका** (चमक), **भबकणा**, **भपकारा**.]

भय न. भीति. Fear.

[सं. **भी** ३ भीतौ; अकामसा. **भयचकित**, **भयभीत**, **भयंकर**, **भयाण**, **भयानक**, **भयावह**. भिणें पहा.]

भय्या पुं. भाई, भाऊ. Brother.

[सं. **भ्रातृ**; हिं. **भय्या**.]

भर(णें) उक्रि. आंत घालणें, पूर्ण करणें, बुजविणें, जेवावयास घालणें. To fill up or in, to feed.

[*IE*. Bher; सं. **भृ** १ पूरणे (वैदिक); *Av*. Bara; *Gr*. Phers; *Lat*. Fers; *Alb*. Bie; *Got*. Baira; पा. **भरति**; प्रा. **भरइ**; का. **बरुँ**; कु. **भरणो**; आ. **भरिबा**; बं. **भरा**; ओ. **भरिबा**; हिं. **भरना**; पं. **भरना**; त्सां. **भरण**; सिं. **भरणु**; गु. **भरवूँ**; याकाम. **भरित** = पूर्ण (ज्ञा. १८-७१५), **भरितें**, **भर** = पाण्याचा चढ, **भरती** (ज्ञा. १८-२८९, नरुस्व. ४१), **भरोवरी** = सामग्री (ज्ञा. १८-८५५). हा धातु उभयविध आहे. **अंगानें भरणें**, **कणीस भरणें**, **आयुष्य भरणें** ह्यांत अकर्मक उपयोग आहे. **भांडें भरणें**, **पैसे भरणें**, हे सकर्मक उपयोग आहेत. ह्यापासून साधित शब्द पुष्कळ झाले आहेत. **भरणा**, **भरणावळ**, **भरणी**, **भर**, **भरती** (समुद्राची), **भरतूक** (भरण्याचें भाडें), **भरळें**, **भरताड**, **भराभरा** (घाई), **भरित** (वांग्याचें तोंडीलावणें), **भरभराट**, **भरती**, **भरतें** (आनंदाचे). लाक्षणिक अर्थहि पुष्कळ उत्पन्न झाले आहेत. शारिरिक, मानसिक वगैरें वृत्तींतील पूर्णत्व कित्येक गोष्टींत दिसल्यामुळें '**भर**' शब्द त्याबाबत वापरला जातो. **आनंदाचा भर**, **खेळाकडे भर**, **घरभर धान्य**, **मणभर धान्य**, **महिनाभर**, **भरगच्च** ह्या प्रयोगांत पूर्णत्वाचीच, कल्पना आहे. सिंधी भाषेंत **भर** = वर असें एक शब्दयोगी अव्यय वापरांत आहे. तें ह्याबाबत चिन्त्य आहे.]

भर पुं. वजन, पूर्णता. Weight, measure, fullness.

[सं. **भरः**; प्रा. **भर**; अ. **भर्** (अवलंब); हिं. **भर** (वजन); पं. **भर** (प्राचुर्य); त्सां. **भरी** (वजन); सिं. **भरु** (आधार); गुं. **भर**; याकाम. **भर** (ज्ञा. ६-१६९).]

भरकड(णें) सक्रि. घाईनें लिहिणें, रेघोट्या ओढणें. To scribble, to scratch.

[सं. **भृ** + **कृष्** (द्विधातुसंयोग.); **अभि** + **अव** + **कृष्** १ विलेखने; **भरकाडा**, **भरकडत**, **भरकांडणें**.]

भरड(णें) सक्रि. जाडजाड दळणें. To grind coarsly.

[सं. **अभि** + **अर्द्** १ मर्दने; म. **भरडा** (कळणा), **भरडी**.]

भरभराट स्त्री. उत्कर्ष, वृद्धि. Rise, prosperity.

[सं. **बर्ह्** १ प्राधान्ये (द्विरुक्त).]

भराड न. डौर वाजवून नाचून देवापुढें केलेलें भजन. A religious service-singing etc.

[सं. **भरटक**; प्रा. **भरडअ**; याकाम. **भराडा** = गोसावी (१३-३९०), '**भराड**' वाजविणारा गोसाव्याचा पंथ, **भराडी** = श्रावण महिन्यांतील एक गौर].

भरंवसा पुं. विश्वास, खात्री. Confidence, trust.

[सं. **विश्रंभ**; हिं. **भरोसा**; म. **भरोसा**.]

भरित न. एक प्रकारचा शिजलेला व मऊ झालेला जिन्नस. A sauce.

[सं. **भृ** (?); अप. देप्रा. **भडिय** = पक्व; '**जडभरित**' ह्यांतील '**भरित**' शब्द निराळा; त्याचा अर्थ **पूर्ण** असून तो √ **भृ** पासून आहे.]

भर्तार पुं. नवरा, भ्रतार. Husband.

[सं. **भर्तृ**, √ **भृ**, **भ्रतार**.]

तो प्रकृतिचा भर्तारु पाही । ज्ञा. १३-९८४.

भलतें वि. कोणतेंहि, मनपसंत, योग्य, पुष्कळ. Anyone, any whosoever, enormous.

[सं. **भद्र** (?); प्रा. **भल्ल**; याकाम. **भलतें** (ज्ञा. १६-१७२), **भलतेंडतें** (नरुस्व ३६७).]

भला वि. चांगला, प्रामाणिक, मायाळू. Good, virtuous, kind,

[सं. **भद्र**, **भल्ल** (= ग्राम्य - वामन); प्रा. **भल्ल**, **भल्लअ**, **-य**; कु. **भलो**; अ. **भाल**; बं. **भाल**;

ओ. हिं. पं. लां. **भला**; सिं. (**चंगा**) **भलो**; गु. **भलूं**; अकामसा. **भलघोडा**, **भलगाजी**, **भलसोदा**, **भलजेवण**, **भलगोणी**, **भलओझें**, **भले** (सं. **भल्**=वाटणें), **भलेतेंकरी**, **भलेतयाचे** (ज्ञा.); **भलतासलता**, **भलंतेंउतें**, **भलतेणें**, **भलतेंतुकें**, **भलतेवढी**, **भलंतेसण**, **भलाई**, **भलामण**, **भलेरी**, चांग **भला**.]

भल्या (पहाटें) वि. फार (पहाटें). Early dawn.

[१ सं. **प्रभात** > **पहाट** > **पहात** > **फात** > **फाल** > **फाल्या** > **भल्या** ; २ **भद्र**, **भद्रक** > **भला**. दुसरी व्युत्पत्ति सयुक्तिक नाहीं. भल्या पहाटें-फाल्या पहाटें-पहाटें पहाटें (द्विरुक्ति) ह्या मार्गानें शब्द सिद्ध झाला असावा.]

भव पुं. संसार, जन्म, उत्पत्ति, सत्ता. The world, the state of existence, birth.

[*IE.* Bheu; सं. भू (भवति, *Av.* Bavaiti) १ सत्तायाम्. संबद्ध शब्दः-**भूत**, **भूति**, **भूरि**, **प्रभूत**; *Av.* Buti; *Lith.* Buti; *Gr.* Phuo; *Lat.* Fui; *Got.* Bauan; *Russ.* Byti; अकामसा. **भव-सागर,-चक्र,-बाधा,-रोग,-गोवा-डोह.**]

भंवई, भुवई स्त्री. भुवई पहा. An eyebrow.

[सं. **भ्रूमयी**; पा. **भमुक**; प्रा. **भरँई**, **भुमआ**, **भमुहा**; सिंह. **बॅम**; का. **बुम्**; बं. **भोमा**; पं. **भउंह**; गु. **भवुं**, हिं. **भउं**; रुमा. **फोव**. मराठीमध्यें (**भूवई**) वई हा अधिक अवयव यावयाचें काय कारण आहे ? संस्कृतमध्यें नुसता **भ्रू** असाच शब्द वापरतात. '**भ्रूमयी**'-असें **मय टूकरण** कां करावें लागलें ? '**भ्रू**' म्हणजे केश आणि **भ्रूमयी** म्हणजे केशयुक्त पापणी असा काहींसा भेद करावा लागेल.]

भंव(णें) आक्रि. फिरणें, अंगावर येणें. To move, to suffer.

[सं. **भ्रम्** १ चलने; याकाम. **भवणें**=भोंवणें, हिंडणें (ज्ञा १८-५५१). अकामसा. **भवता**, **भोवतीं**, **सभोवतीं**, **भोवताल**, **भंवरा**, **भोंवरा**=पाण्यांतील चक्र, मुलांचें खेळणें, सं. **भ्रमर**; प्रा. **भँअर**; याकाम. **भंवरु** (ज्ञा. १८-४८१).]

भव(णें) अक्रि. होणें. To be, to become.

[सं. भू १ सत्तायाम्; अकामप्र. **भवति न भवति**= वादविवाद; वादांत ' (**इदम्**) **भवति** असें एका पक्षानें म्हटलें तर (**इदम्**) **न भवति**=' असें होत नाहीं ' असा दुसरा पक्ष म्हणतो. **भवन**, **भवितव्य** (भावी गोष्ट) **भविष्य.**]

भवंड(णें), भंव(णें) अक्रि. चक्कर येणें. To roll, to reel.

[सं. **भ्रमण**; याकाम. **भवंडी** (ज्ञा. ९-८१); शेवटच्या अनुनासिकांत एक वर्णागम होऊन **भंवण्ड**, **भोंवण्ड** असा शब्द तयार झाला, **भ्रमणें** ह्याचा एक अर्थ तर **भोंवडणें** ह्याचा दुसरा होतो. चक्र ह्याचा एक अर्थ तर **चक्कर** (येणें) ह्याचा दुसरा अर्थ. शब्दाचें रूपांतर झालें कीं त्यांत अर्थभेद उत्पन्न होतो.]

भसक(णें) सक्रि. भोंसकणें. To thrust into forcibly.

[सं. **मस्क्** किंवा **वस्क्** १ गतौ, **भस्मन्**; प्रा. **भस्म**; कान. **पसा**=खणतांना होणारा आवाज. ध्वनिशब्द. **भसाडा**, **भसका**, **भसक्या**, **भसकट(णें)**, **भसकन्**, **भरदिशीं भसक** असे शब्द तयार होतात.]

भस्म न. राख, रक्षा. Ashes.

[सं. **भस्मन्**; अकामसा. **भसम**, **भस्म्या** रोग (सं. **भस्मक**=एकरोग)=कफ कमी व पित्तवाढीचा जठराग्नि प्रज्वलित करणारा रोग.]

भक्ष(णें) सक्रि. खाणें. To eat.

[सं. **भक्ष्**=खाणें; अकामसा. **भक्ष्य**, **भक्ष्यभोज्य**, **अभक्ष्यभक्ष.**]

भाई, भाऊ पुं. बंधु. Brother.

[*IE.* Bhrator; सं. **भ्रातृ**, **भ्रातृक**; *Av.* Bratar; *Gr.* Phreter; *Lat.* Frater; *Arm.* elbair; *Oper.* Bratar; पा. **भाता**, **भातिको**, **भातुको**; प्रा. **भादा**, **भादुअ**, **भाइ**, **भादअ**, **भाया**; का. **बाय**; कु. **भई**; अ. **भाइ**; बं. ओ. **भाइ**; हिं. **भय्या**, **भाई**; पं. **भाई**, **भरा**; लां. **भ्रा**; सिं. **भाई**, **भाऊ**; गु. **भाई**; ने. **भाई**. अकामसा. **भाउपणा**, **भाऊबंध**, **भाऊबहीण**; **भाऊबीज**; **भाऊजी**, **भावोजी** हे आदरार्थी शब्द दिराला भावजय वापरते. '**भाऊ**' विशेष नामासारखा-'सदाशिवराव' चिमाजी आप्पाचा मुलगा ह्यासंबंधीं वापरतात (तसेंच **परशरामभाऊ** पटवर्धन). पानिपतच्या रणक्षेत्रावर '**भाऊ**' घोड्यावरून उतरून लढाईत घुसल्यानंतर सर्व रणक्षेत्रावर धुमाळी माजली हिला **भाऊगर्दी** असें म्हणतात. त्यावरून कोणताहि गोंधळ झाला तर त्याला **भाऊ गर्दी** असें म्हणतात. **भाई चारा** (सलोख्याचा संबंध).]

भाक(णें) सक्रि. मागणें. To ask for, to pray.

[सं. **भाष्** १ व्यक्तायाम् वाचि; अकाम. **भाक**=शब्द, वचन; आण**भाक** (सं. **भाषा**; प्रा. **भासा**, **भाक**), **भाकित**=भविष्य.]

भाकर स्त्री. जोंधळयाची दामटी. Bread.
[सं. **भ्रस्ज् १** (दहने), **भृज्ज्**; प्रा. **भक्ख** (गोळा,), **भकुण्डो, भकुल्लो, भकासे, भक्कु**; बं. **भाकुस** (मूर्ख); ओ. हिं. **भाकुआ** (मूर्ख); हे मधील बंगाली, ओढिया, हिंदी शब्द टर्नर विनाकारण देतो. त्यांचा कांहीं संबंध नाहीं. आमची '**भ्रस्ज्**' हीच व्युत्पत्ति सयुक्तिक आहे. ह्याची व्युत्पत्ति निरनिराळी दिली आहे. '**भास्करी**=सूर्यासारखी वाटोळी दिसते म्हणून. **भक्ष्याहारी** (श. को.) खाण्याचा पदार्थ म्हणून. परंतु ह्या ग्राह्य नाहींत. **पोळी** (< प्लुष् १ दाहे); **दशमी** (=भाकरी; **दश्**–दाहे); हे शब्द व त्यांच्या व्युत्पत्ति पाहिल्या म्हणजे आमची व्युत्पत्तिच ग्राह्य वाटेल.]

भँाग(णें) उक्रि. फायदा होणें, जवळ येणें. To profit, to approach.
[सं. **अभ्यागम् १** फलागमे ; अकामप्र. आमचें **भागेल. चांदोबा भागला.**]

भँाग(णें) सक्रि. भाग करणें, वाटणें. To divide.
[सं. **भाज् १०** पृथक्कर्मणि ; अकामसा. **भाग** (हिस्सा), **भागाकार, भागीदारी.**]

भँाग(णें) अक्रि. पळणें, धांवणें, दमणें, थकणें. To run, to tire, to be exhausted.
[सं. **भग्नः**; पा. **भग्ग**; प्रा. **भग्ग**; पप. **भगा**; कु. **भागणो**; अ. **भागिब**; बं. **भागा**; हिं. **भागना**; पं. **भगेल** (मित्रा); सिं. **भगो**; गु. **भागवूं**; ने. **भाग्नु**; म. चांदोबा **भागला,** मित्रा **भागुबाई** ह्या प्रयोगांत हा **भागणें** धातु आहे.]

भाग्य न. नशीब, दैव, Fortune, luck.
[*IE.*: Bhag; सं. **भग,** √ **भज्**; *Av.* Baga; *Nper.* Baya. **भग**= ऐश्वर्य, वीर्य, श्री, यशस्, धर्म, ज्ञान, वैराग्य इत्यादि गुणांनीं युक्त तें भग (मनुस्मृति).]

भांग(णें) सक्रि. भाग करणें. To divide.
[सं. **भंगः**; पा.प्रा. **भङ्ग**; अ. **भंगिब**; बं. **भागा**; ओ. **भंगिबा**; हिं. **भंगना**; पं. **भग**; सिं. **भंगु**; गु. **भंगवूं.**).]

भँाङ्ग स्त्री. गांजाचीं हिरवीं पानें. Hemp.
[सं. **भङ्गा, भृङ्गी**; पा. **भङ्गम्**; प्रा. **भंगा, भंगी**; का. **बग**; कु. बं. अ. **भाङ्**; ओ. **भांग**; वि. **भाँग**; अर. **बंज**; *Old optic.* Nibanj; अकामप्र. **भांगेंत तुळस.**]

भँांग पुं. केसांतील विभागणीची रेषा. The line along the cinciput made by parting the hair on both sides.
[सं. **भंग**; म. **भांगवळ** (सं. **भांगवलय**), **भांगसळ** (भांगशलाका).]

भँांग स्त्री. ओहोटी. Neaptide.
[सं. **भंगा.**]

भांगल(णें) उक्रि. निंदणें, शेतांतील वाईट गवत काढणें. To censure, to weed and clear.
[सं. **भज् ७** आमर्दने. **भंजिल** (ना) ; म. **भांगलणी, भांगलण.**]

भांगार,-रें न. सोनें, द्रव्य, पैसा. Gold, money, wealth.
[सं. **भांगार** (भू+अंगार ?); याकाम. **भांगाळें**= सोनेरी.]

भाचा पुं. बहिणीचा मुलगा. A nephew.
[सं. **भागिनेय**; पा. **भागिनेय्यो**; प्रा. **भाइणेज्ज**; **भाइणेज्ज, भाइणिज्ज, भत्तिज्ज** (भ्रात्रिय); कु. **भाणिज्**; ओ. **भाणिजी**; हिं. **भाँजा, भानचा**; पं. **भाण्जा**; लां. **भानेआ**; सिं. **भाणिजु, भाणेजो**; गु. **भाणेज्, भाणीयो, भाणो.**]

भाज स्त्री. पत्नी, बायको. Wife.
[सं. **भार्या** √ **भृ**; प्रा. **भज्जा**; का. **बोर्(रि)या**; सिंह. **बॅरि**; म. **भाज, भाजा** (काव्य).]

भाज(णें) सक्रि. पोळणें, शिजविणें. To dress by parching, to burn.
[सं. **भृज्जति**; **भ्रस्ज्, भुज्ज्, भज् १०** विश्राणने ; पा. **भज्जति**; प्रा. **भज्जइ**; सिं. हिं. **भाज्**; बं. **भज्**; का. **बझ्**; सिंह. **बद्**=पचविणें ; गु. **भाज्यु**=तुपांत परतलेली पोळी ; अकामसा. **भाजकें, भाजकट, भाजणें, भाजणी, भाजणूक, भाजाणा** (भाजका+चणा, +दाणा).]

भांज(णें) वाटणें, विभागणें. To portion, to share out.
[सं. **भनक्ति, भंजति**; पा. **भञ्जति**; प्रा. **भञ्जइ**; बं. **भॅाजा**; हिं. **भाँजना**; पं. **भनणा**; लां. **भन्नण**; सिं. **भणणु**; गु. **भांजवूं**; याकाम. **भांज** (ज्ञा. २·७१); म. (चढती उतरती) **भांजणी, भांजणी** (खांज़णी).]

भाजी स्त्री. शाक, तरकारी (पानाची). A vegitable.

[सं. **भर्जिका**; पा. **भज्जिआ** (सं. **भंजन** (?).); कान. **भाजी**; म: **भाजीपाला** (कान. **पल्य** = हिरवी भाजी)–दोन्ही एकाच अर्थाचे शब्द. समाहारासाठीं द्विरुक्ति.]

भाट पुं. (राज) कवि. A minstrel, a bard.

[सं. **भट्ट**; √ भट्ट = भाषायाम्; प्रा. **भट्ट**; का. **बाठ**; **भाट्ट**; ओ. **भाट**; हिं. **भाट्ट**; पं. **भट्ट**; सिं. **भट्टु**; याकाम. **भाट** (ज्ञा. १७-२९६).]

भाट स्त्री. शेतजमिनीजवळील उंचवट्याची जमीन, सपाट उंचवट जागा, कमी प्रतीची पडीक जमीन. An elevated and level spot, occuring in arable land.

[याकाम. **भाट** (ज्ञा. १३-४५). महाभूतांचे एकवाट । सैरा वेटाळुनि भाट ॥]

भाडळीमत न. ज्योतिषांतील एक विशिष्ट मत,–पद्धत. A method of calculation in astrology.

[**सहदेव** आणि **भाडळी** हे दोघे बहिणभाऊ मराठीभाषेच्या आरंभाच्या काळांत प्रसिद्ध लोकज्योतिषी होते. ह्यांच्या ज्योतिषांत ठोकताळे फार असत.]

भाडें, भाड न. स्त्री. किंमत, दर, वस्तूच्या उपयोगाबद्दल द्यावयाचें द्रव्य. Rent, hire, fare.

[सं. **भाटम्**, **भाटि** (व्यभिचाराचे पैसे); प्रा. **भाडअ**; बं. **भारा**, **भाऊ** (वेश्येचा दर); हिं. पं. **भाड**, **भाडा**; सिं. **भाडो**, **भाडि**; गु. **भाडूँ**; गु. सिं. हिं. **भाड**; बं. पं. **भाडा**; सिंह. **बॅल** = पगार. अर्थगौरवाचें हें एक उत्तम उदाहरण आहे. मूल अर्थ **वेश्येचा दर** असा असून त्याचें सामान्यीकरण होऊन **उपयोगाबद्दल** द्यावयाचें द्रव्य असा अर्थ झाला. म. **भाडे–चिठ्ठी–पट्टा**, **भाडोत्री भाडखाऊ**, **भाड्या** (शिवी).]

भाणवशी स्त्री. चुलीजवळचा ओटा. A raised seat near the hearth.

[सं. **महानस**; अकाम. **भाणशिरें** (सोदणें–स्वयंपाक घरांतील फडकें) **भाणवसा**, **भाणोसा** **भाणस** (गौरीहार, वही), **भाणसाघर** (स्वयंपाकघर).]

भाणें न. पात्र, भाजन, भांडें, ताट. A vessel, a plate.

[सं. **भाजनम्** > **भाअणँ** > **भाणँ** > **भाणें** (राज.); गु. **भाणुं**; याकाम. बकाम. **भाण**, (ज्ञा. ८-१४३), भा. अ. ३–२८१). जेंवीं उसागुळाचा घाणा । तोंडीचा रस भरे आणा.]

भाण्ड(णें) अक्रि. वितंडणें, विरोधणें, रागानें शिवीगाळ करणें. To dispute, to contend with.

[सं. **भण्डनम्**, **भण्ड्** १ युद्धौ, **भड्** १ परिभाषणे; पा. **भण्डति**; प्रा. **भण्डई**; हिं. **भांडना**; सिं. **भनणु**, **भंडणु**; गु. **भाडवूँ**; कु. **भणकनु** (गोंगाटणें); हिं, **भणक**, **भिनक**; गु. **भणको**, **भांडवूँ** = शिव्या देणें; अकाम. **भाण्डण**, **भांडगा–खोर,–कुदळ.**]

भाँड वि. मूर्ख, गाढव, बदमाष, विदूषक, जातीचें नांव. A caste of jesters, buffoons.

[सं. **भण्डः**; देप्रा. **भडो मागधो** (२२१–१६); प्रा. **भण्ड**; कु. **भान्**; बं. **भॉड**; ओ. **भॉड**; हिं. **भॉर**; पं. **भण्ड**; सिं. **भानु**; याकाम. **भांड** = वीभत्स भाषणानें मनरंजन करणारा, हावभाव करून नाचणारा (ज्ञा. १८-८९७).]

भांडवल न. व्यापारांत घातलेलें मुद्दल–पैसा. Capital.

[सं. **भांड** + **वल** (हिंदी प्रत्यय).]

भांण्डार न. साठा, खजिना. A treasury, a store.

[सं. **भाण्डार**; प्रा. **भाण्डाआर**, **भाण्डार**; कु. **भनार**; अ. **बाँराल**; बं. **बॉरार**; ओ. **भण्डार**; हिं. पं. **भॉडार**; याकाम. **भांडार** (नरुस्व. ५७.).]

भंण्डारी पु. एक विशिष्ट जात. A particular caste.

भांडें न. पात्र, ताट. A vessel, a plate.

[सं. **भाण्डम्**; पा. प्रा. **भण्ड**; कु. **भानो**; बं. **भाँड**; ओ. **भाण्ड**; हिं. **भांडा**; प. **भांडा**; सिं. **भानी**, **भांडो**; गु. **भाडूं**, **भंडुं**; म. **भांडेंकुंडें** (दोन्ही एकाच अर्थाचे परंतु एक आर्य व दुसरा-**कुण्डा** द्राविडी (कानडी) असे हे शब्द आहेत). पेकाम. **भांडें** = तोफ.]

भांत स्त्री. प्रकार, रीत, पद्धत. A manner, a mode.

[सं. **भक्तिः** (भाग); पा. **भत्ति**; प्रा. **भत्ति**; कु. **भाँति**; हिं. **भांत**, **भांति**; पं. **भांत्**; सिं. **भाँति**; गु. **भात**; म. (**रीत**)**भात.**]

भात पुं. शिजविलेले तांदूळ, धान्यविशेष, टरफलासह तांदूळ. Rice in the husk, rice boiled.

[सं. **भक्तः**, **भक्तम्**; पा. प्रा. **भक्त**; कु. अ. बं. **भात्**; ओ. **भात**; बिं. हिं. **भात्**; सिं. **भतु**; पं. **भत्त**; गु. **भात्**; ने. **भात्**; कान. **बत्त**, **भत्त** (तद्भव); मलायी. **पॉदी**; जावा. **पारी**=भात ह्यावरून इंग्रजींत Paddy हा शब्द तयार झाला. याकाम. **भातुकें**=भक्ष, खाद्य (ज्ञा. ३-२४८); शिकाम. **भातुकें**-देहा केविंरिझें हें काळाकें भातुकें ॥ (तु. अ.); अकाम. **भात+क-भातुकें** (अल्पार्थें), **भात+कुल** (अल्पार्थें), **भातुकली** (मुलींचा खेळ) **भातवडी** (तांदुळाचे पापड) **भातलवंडा**-चांगदेवाच्या कृपेनें एका विधवेस मुलगा झाला. त्या वेळीं अन्न संतर्पणासाठीं केलेला भात नदींत लवंडून दिला त्यावरून.]

भाता पु. वारा घालण्यासाठीं कातड्याची पिशवी, तरकस. bellows.

[सं. **भस्त्रा**, **भस्त्री**; प्रा. **भत्था**, **भत्थी**; देप्रा. **भत्थ**, (पु. स्त्री.); का. **बस्ता**; अओ. **भाति**; हिं. **भाथी**; सिं. **बथी**; गु. **भाथो**.]

भादर(णें) सक्रि. कैंस कापणें, हजामत करणें. To shave or to shear.

[सं. **भद्राकरण** (ह्या नांवाचा एक विधि जैन धर्मांत श्रावकदीक्षा देतांना सांगितला आहे. त्यांत केशकर्तन हें प्रधान कार्य आहे). हलीं ह्या शब्दाला अर्धभ्रंशानें वाईट अर्थ आला आहे. पं. **भद्दन**=हजामत, **भद्दन करवाउणा**= सुतकानिमित्त क्षौर करणें.]

भादवा पुं. भाद्रपद महिना. The month of Bhadrapada.

[सं. **भाद्रपद**; प्रा. **भद्दवम**, **भद्दव-अ**; का. **बादर-पेथ**; कु. **भादो**; बं. **भादइ**; बि.हिं. **भादो**; प.पं. **बध्द्रो**, **भद्दु**, **भदु**; पं. **भादों**, **भाद्रो**; गु. **भादरवो**.]

भादा-भाद्या वि. खच्ची केलेला, नरम. Of beaten testicles, soft.

[सं. **भद्र**; प्रा. **भद्द**; याकाम. **भादी**=चांगली, नीटनेटकी, दोनतीन वेळां व्यालेली (ज्ञा. १३-६३८).]

भान न. शुद्धि, सावधपण, आठवण. Consciousness, waking.

[सं. **भानम्**.]

भानगड स्त्री. कटकट, संकट, गुंतागुंत. Intricacy and confusedness.

[सं. **भंगड** (ना.); हिं. **भांजना**.]

भानचोद वि. पुं. एक शिवी. A term of abuse.

[सुलतान महंमद बेगडा ह्याचा वजीर हाजी मलिक बहुद्दीन ह्यानें आपल्या स्त्रीच्या स्मरणार्थ एक मशीद बांधली. त्याच्या बायकोचें नांव बीबी अछूत, अचूत. ह्या बाईसंबंधीं एक वाईट गोष्ट सतराव्या शतकांत प्रचलित होती. (हा. जा.) परंतु हा दूरान्वय दिसतो. **बेहेन + चोद**, **मेहेन + चोद**. हीच व्युत्पत्ति ग्राह्य.]

भानु पुं. सूर्य. The Sun.

[सं. **भा** + २ दीप्तौ ; **नु** हा प्रत्यय ' शील ' ह्या अर्थीं-प्रकाशण्याचें ज्याचें शील आहे असा.]

भांबाव(णें) अक्रि. गोंधळणें, चुकणें, भ्रमणें. To be perplexed or confused.

[सं. **भ्रम्** १ चलने, **भ्रमः**; प्रा. **भम्म**; याकाम. **भांब** (ज्ञा. १०=७७). परि माणुसपणाची भांब। लोकाचि भाग.]

भांभळ वि. विसराळू. Forgetful.

[सं. **भर्भ्**=हिंसायाम्; देप्रा. **भंभलो**; सिं. **भंभुलिजणु**=व्यग्र, गर्विष्ठ होणें. ही व्युत्पत्ति ब्लोकनें दिली आहे. देशी शब्द वरील मराठी शब्दाच्या मुळाशीं आहे हें स्पष्ट आहे. त्याच्या मागील अवस्था सं. **भर्भ्** अशी तो देतो. ह्यापेक्षां '**भ्रम**' हा शब्द किंवा √ **भ्रम्** हा धातु ह्याच्याशीं किंवा ह्याच्या यङ्लुङ् रूपाशीं अधिक संबद्ध दिसते.]

भार पुं. वजन, ओझें, मोठेपणा, जडपणा. Weight, influence, heaviness.

[सं. **भार**, √ **भृ** ३ भरणे; पा. प्रा. **भार**; का. **बार**; कु. **भारो**; अ. बं. **भार**; ओ. **भार**; हिं. प. लां. **भार्**; गु. **भार्**. ह्या धातूपासून '**भर**' आणि **भार**; **भरणें** आणि**भारणें** अशीं एक साधें आणि दुसरें णिच-रूपें तयार झालीं आहेत. **भरणें**-पूर्ण करण्याच्या कल्पनेनंतर **भारणें**-ओझें घालणें ही कल्पना येणें साहजिक आहे. '**भार**' चे समूह सेना, मेळा असा अर्थ ह्यामुळेंच झाला. कोणीकडून तरी गुरुत्व आणावयाचें व वाढवावयाचें ही कल्पना. ह्या शब्दापासून दुसरा एक त्याच अर्थाचा '**भार**' शब्द आहे तो निराळा समजला पाहिजे. कारण त्याच्या मुळाशीं फा. **बार** हा शब्द आहे. हाहि मराठींत **भार** असेंच रूप घेतो. ह्यापासून मराठी **भारदस्त**, **भारदार**, **भारबारदार** इत्यादि शब्द तयार झाले आहेत. पहिल्या शब्दापासून **भारग्रस्त**, **भारभूत**,

भारंभार, भारवाहक, भारोभार इत्यादि सामासिक शब्द तयार झाले. (लक्षणेने) **भारी** = किंमतवान (विशेषण), **भार–भारी** = पुष्कळ, **भारणें**—मंतरणें, मोहून टाकणें; याकाम. **भारणी**=वशीकरण (ज्ञा. १२-१५), **भारणारा मंत्र** ह्यामध्येंहि मंत्राचा भार त्याच्यावर घालणें हीच कल्पना आहे. (नरुस्व ५३३).]

भारत न. हिंदुस्थान. The country India.

[सं. **भरत,** √ भृ ३ भरणे. भरत ह्या नांवावरून **भरतखंड, भरतभूमि, भारतदेश** अशीं नांवें हिंदुस्थानास जुन्या आर्यवाङ्मयांत व हल्लीं आर्यपरंपरेनें देतात. ‘ **भरत** ’ हें राजाचें नांव. हा राजा सूर्यवंशांतील भरत असें कांहीं म्हणतात. कोणीं दुष्यन्ताचा मुलगा म्हणतात. कोणी म्हणतात हा एक वेदकालीन भरत कुळांतील राजा असावा. भरतांचीं युद्धें झाल्याचा उल्लेख ऋग्वेद मं. ३-७ ह्यांत आहे. त्यावरून हें नांव पडलें असावें.]

भरवि(णें) संक्रि. खावयास घालणें. To feed.

[सं. **भृ** (णिच् भारय); का. **भाराइव**; बं. **भरान**; हिं. **भराना**; पं. **भराउणा**; गु. **भराववूँ**.]

भारती स्त्री. वाणी. Speech.

[सं. **भारती.**]

भारूड न. लांब, गुंतागुंतीचें गाणें, कथा, अवघड कूट काव्य, पंचाईत, संकट, विघ्न (लक्षणा). A long, intricate poem, history, (fig.) a perplexity.

[सं. **बहुरूढम्** > **भारूढ.** भारत + रूढ (श. को.). पहिली व्युत्पत्ति अधिक सयुक्तिक.]

भाल न. स्त्री. कपाळ, ललाट, नशीब (लक्षणा); शपथ. The forehead.

[*IE.* Bhel; सं. **भाल**; *Gr.* Phalos; *Alb.* Bale; *Lat.* Fulica; प्रा. **भाल**; अकाम. **भाळ, भाल भालपत्र** = दिव्य करणाऱ्याच्या कपाळावर बांधण्याचें शर्थीचें पत्र.]

भाल, भाला स्त्री. पुं. भाला, भाल्याचें फाळ. A Spear or pike.

[सं. **भल्ल, भल्ली**; का. **भाल, बाल**; हिं. **भाल**; पं. **भाला**; गु. सिं. **भालो**; गु. **भालुं**; अकाम. **भालाइत,–दार, राव**; याकाम. **भाळ** = टोंक, अग्र. (ज्ञा.).]

भालु,–वा,–क स्त्री. अस्वल, म्हातारी कोल्ही, हिडीस म्हातारी (लक्षणा). A bear, (fig.) a crone or old woman.

[सं. **भल्लूक**; प्रा. **भल्लुअ**; देप्रा. **भल्लू ऋक्षः** (२१८-२); हिं. ओ. **भालू** (पुं); भोजपुरी. **भाऊल**; बं. **भाल्लूक**; सिंह. **बल्ला, बळु** = कुत्रा. मराठींतील ‘ **अस्वल** ’ शब्द एकाच अर्थाच्या दोन शब्दांच्या जुळणीनें सिद्ध झाला. ऋक्ष > **अच्छ** > **अस्** + (**भल्ल**)वल.]

भाव पुं. भक्ति, श्रद्धा, निष्ठा, मनोविकार, अर्थ, अभिप्राय, पदार्थ. Devotion, faith, confidence, affection, mind, meaning.

[सं. **भू १** सत्तायाम्; अकाम. **भावे प्रयोग, भावीक, भाअकू, भावूक.**]

भाव पुं. किंमत, दर. Rate, price.

[सं. **भावः** (अस्तित्व); पा. प्रा. **भाव** (बाजारदर); कु. **भउ**; बं. ओ. **भाउ**; हिं. **भाव**; पं. सिं. **भाउ**; गु. **भाव.**]

भाव(णें) उक्रि. मावणें, समजणें, कल्पणें, विचार करणें, इच्छा करणें, मानवणें. To understand, to imagine, to think.

[सं. **भाव** (नाधा.), √ **भा २** दीप्तौ.. का. **बावुन्** = खुलासा करणें, सांगणें; बं. **भावीते**; हिं. **भावना, भओना** = विचार; पं. **भाउणा** = पसंत करणें; सिं. **भाइणु**; गु. **भाववूँ** = इच्छिणें; **भाव** = वृत्ति–शारिरीक अथवा मानसिक. त्यापासून नामधातु तयार झाला व तोच मराठींत रूढ आहे.]

भावका स्त्री. शूद्रांची एक देवता. A goddess of the lower people.

[सं. **भावका, भाविका** (?) म. **भावकादेवी, भावकाई** ही एक शिवी म्हणून वापरूं लागले.]

भावजय स्त्री. भावाची बायको. Brother's wife.

[सं. **भातृजाया, भ्रातुर्जाया**; प्रा. **भाउज्ज्या**; देप्रा. **भाउज्जा** (२१६-११); कु. **भउज**; बं. **भाउज्**; ओ. **भाउजू**; हिं. **भाउज्, भौजी**; पं. लां. **भर्जाई**; सिं. **भाजाई**; गु. **भोजाई**; पपं. **भिजाई.** प्राकृत रूपां वरून असें वाटतें कीं मूळ “ **भातृजाया** ” असें नसून “ **भात्रार्या** ” असें असावें, कारण अन्त्य ‘ **ज्जा** ’ हें पद पद ‘ **आर्या** ’पासूनच प्राप्त होणें शक्य आहे.]

भावोजी पुं. दिराचें संबोधन, दिराला हाक मारण्याचा शब्द. A term of address for husband's brother.

[सं. **भाव** किंवा **भ्रातृ**; देप्रा. **भाओ** (ज्येष्ट भगिनी-पतिः) वडील बहिणीच्या नवऱ्यास भावोजी असें देशस्थांत व मराठ्यांच्यांत म्हणतात.]

भाष स्त्री. वचन, आश्वासन, भाक. An assurance, promise.

[सं. **भाष्** १ शब्दे; प्रा. **भास**; अकाम. **भाषा, भाषण, भाष्य, भाक** (आणभाक), (*IE.* Bhg असा धातु असून तोच; सं. **भाष्, भास्**; *Gr.* Phos, Phemi; *Lat.* Fari वगैरे शब्दांत आहे.)]

भास(णें) अक्रि भास होणें, वाटणें. दिसणें. To appear, to feel, to look.

[सं. **भा, बिभास्य**-(इच्छार्थक) किंवा **भास्** १ दीप्तौ, **भासमान** (कृदन्त.),**भास** (ठसा, कल्पना).]

भासळ(णें) उक्रि. मिसळून जाणें, लुप्तप्रभ होणें.

[सं. याकाम. **भासळणें.** (नरुस्व ९४, ३३०).]

अंगाचेनि उजकळणें : भासळत ठिकांचें लेणें । नरुस्व ९४.

भाळ न. कपाळ, ललाट. The forehead.

[सं. **भाल**; पाप्रा. **भाळ**; हिं. बं. **भाल**; का. **बाळु**; गु. **भांळ.** प्रत्येकाच्या कपाळावर त्याचें जीवितफल चित्रगुप्त लिहितो अशा समजुतीवरून **भाळीं लिहिणें** अशी म्हण रूढ आहे. **भाळ** = दैव (लक्षणा).]

भाल(णें) उक्रि. प्रेम वाटणें, खुष होणें, आकर्षिलें जाणें. To feel attracted or drawn.

[सं. **बल्**, (णिच्) **बालय**, (**कर्मणि**) **बल्यते**; किंवा **वल्लभ** (नाधा.); याकाम. **भाळणें** = **भुलणें.** (ज्ञा. १८-३८९).]

भि(णें) सक्रि. भययुक्त होणें, To fear.

[१ *E.* Bhai; सं. **भी** ३ भये; प्रा. **बीहइ**; याकाम. **बिहिणें, बिहणें**; अकाम. **भी.** प्राकृत रूप ज्ञानेश्वरापर्यंत रूढ होतें. '**बिहाला**' हें त्याचें भूतकाळीं रूप ज्ञानेश्वरींत आहे.]

भिक, भीक स्त्री. याचना, भिक्षा. Begging.

[सं. **भिक्ष्** १ याचने, **भिक्षा**; प्रा. **भिक्खा भिकारी** (सं. **भिक्षाकारीन्**; प्रा. अप. **भिखारी, भिक्खारि.**)= भीक मागणारा.]

भिंग न. काच, आरसा, तावदान. A piece of glass, a pane.

[(?); याकाम. **भिंग**; शिकाम. **भिंग**; अकाम. **भिंग** = अभ्रकाचें पुट.]

जरी प्रज्ञेचेनि आथिलेपणें । श्री गुरुसामर्थ्या रूप करू म्हणें ॥
तरि मोतियां भिंग देणें । तैसे होइल ॥ ज्ञा. १०-१४.
देऊनियां भिंग कमाविलें मोतीं ॥ पारखियां हातीं घेतां नये ॥
तु. अभंग.

भिंगरूट, भिंगुरटी न. स्त्री. लहान पांखरूं, चिलट, मशक, रातकिडा. A cricket.

[सं. **भ्रंम,-र. भृंग :**; पा. **भिंग, भिंकारो**; देप्रा. **भिंगारी** चीरी मशक (२२०,६); प्रा. **भिंगारग, भिंगारी**; हिं. **बसुंगा, भंगा**; ने. **भंडेरो, भिंगारी** म्हणजे भ्रमरासारखे ठिपके असलेली मेंढी, वांसरूं, '**भिंगारी**' शब्द '**भृंग, भ्रम्**' ह्या शब्दांशीं संबद्ध आहे. पायाला **भिंगरी,** पाण्यांत **भिंगरी** फिरविणें ह्यामध्यें फिरण्याची–चलनाची क्रिया आहे. '**भृंग**' हा शब्दच **भ्रम्** आणि **गम्** ह्या दोन धातूंचा मिलाफ होऊन झाला आहे कीं काय असें वाटतें.]

भिंगुळ वि. भयंकर, भयानक, विपरीत, विचित्र. Terrible, dreadful.

[? याकाम. **भिंगुकुत्राणें** = विचित्र, भयंकर. (ज्ञा. ११–३४६).]

भिज(णें) अक्रि. ओलें होणें. To get wet, to wet.

[सं. **अभि + अंज्** ७ भ्रक्षणे; पं. **भिज्जणा,** सिंह. **भिजणु**; प्रा. **भिज्ज** (**अलोप**); बं, **भिजिते**; हिं. **भीजना**; गु. **भिजवूँ, भिंजवूँ. भिज-कट,-ट,–का** (भिजलेला, ओला–ट. क. म. प्रत्यय) **भिजणूक, भिजवण, भिजवणी, भिजवाण. भिजत कांबळें–घोंगडें.** (लक्षणा) = अनिश्चित कार्य.]

भिड(णें) उक्रि. एकमेकाच्या समोर येणें, जवळ येऊन चिकटणें. To bring or come into contact.

[सं. **आभ्रिद्**; अप. देप्रा. **आब्भिड.** (**संमुखगमने**) अकाम. (इतर शब्द) **भिडता, भिडतु, भिडु.** (खेळांतील गडी).]

भिन(णें) अक्रि. शिरणें, सर्वत्र मुरणें. To penetrate and pervade.

[सं. **अभि + ली** ४ श्लेषणे किंवा **अभि + नि + इ** २ गतौ (अलोप). **भिद्** (श. को.) ही व्युत्पत्ति सयुक्तिक नाहीं कारण अर्थभेद होतो.]

भिंत स्त्री. मातीविटांची उभी रचण. A wall.

[सं. **भित्ति** ; प्रा. **भित्ति** ; अप. **भिंत** ; बं. **भित** ; सिंह. **बीत, बितु** ; हिं. **भीत** ; सिं. **भिति** ; गु. **भींत** ; अनुनासिक अपभ्रंश भाषेंतील आहे. **भित** हा अशिष्ट उच्चार हा संस्कृत मुळाशीं अधिक जवळ आहे.]

भिंद(णें) सक्रि. फोडणें. To break.

[सं. **भिद्** ६ छेदने ; सिंह. **बिदिनवा** = फोडणें ; का. **बेनुन्** = फुटणें, **बेजेरून्** = फोडणें. हा मराठी धातु संस्कृत धातूच्या **'भिन्न'** ह्या निष्ठारूपापासून सिद्ध होऊन नंतर वर्णागमानें भिन्द(णें) असा बनला.]

भिन्न वि. मोडलेला, विभागलेला, निराळा. Broken, separated, separate.

[सं. **भिद्, भिन्न** = मोडून, विभागून निरनिराळे अवयव झालेला म्हणून त्यावरून **निराळा, वेगळा** हा अर्थ.]

भिरक(णें) सक्रि. फेकणें. To throw off,

[सं. **अभि + ईर्** २ गतौ + **अकच्** (अलोप). **'क'** हा मराठी प्रत्यय, भिरकाव(णें) हें णिच् रूप आहे. **भिर–कांडा, भिर–का, भिर–कुटी, भिरकें** (एक प्रकारची गाडी–एकाच्या मागें दुसरा बसावयाचा अशी, < **बिरक ?**) ; **भिरभिर(णें), भिरभिंर, भिराडी, भिरीरी** ह्यामध्यें निरनिराळ्या रीतीनें अभ्यास होऊन अर्थाचें आधिक्य उत्पन्न केलें आहे.]

भिलावा पुं. बिब्याचें झाड व फळ. A marking nut tree.

[सं. **भल्लातकः** ; पा. **भल्लाटको** ; प्रा. **भल्लाय, भल्लाअय** ; अ. **भला** ; हिं. **भिलावाँ** ; पं. **भिलावा** ; सिं. **भेलावो** ; गु. **भिलामूँ.**]

भिसमिल्ला पुं. प्रत्येक कृत्याच्या आरभीं मुसलमानी लोकांनीं म्हणावयाचा धार्मिक शब्द, गोंधळ. The first word of the sentence of pious invocation, (fig.) confusion.

[अर. **बि–'स्मि–ल्लाहि'–र्–रहमानी–र्–रहीम्.**]

भिसें न. कमळाचा देंठ, दांडा. A stalk of lotus.

[सं. **बिस** ; पा. प्रा. **भिस** ; हिं. **भिस** ; सिं. **बिहु** ; सिंह. **बिसि** = चटई ; फा. **भेह.**]

भिस्त स्त्री. विश्वास, आधार. Confidence, trust.

[फा. **बेहेश्त** = स्वर्ग.]

भिस्ती पुं. पाणी वाहणारा, पखाली. A carrier of water.

[फा. **बेहश्ती** = स्वर्गीय ; **बिहिश्टी, बिहिश्ट** = नंदनवन. अर्थभ्रंशाचें उदाहरण. 'स्वर्गीय' असा ह्याचा अर्थ आहे. नीच व्यवसायाला चांगलें नांव दिलें आहे.]

भीक स्त्री. भिक पहा.

भींड स्त्री. आदर, विनय. Respect, regard, humility.

[सं. **अभ्यर्थ्** १० प्रार्थने ; प्रा. **अब्भट्ठ** ; कान. **भिडे** = विनय ; याकाम. **भीड** (ज्ञा.११·७८) ; अकाम. **भिडस्त, भीडमर्यादा.** **'भीड'** ह्या शब्दाचे लक्षणेनें कांहीं प्रयोग रूढ आहेत.]

भीतर अ. आंत. In, inside.

[सं. **अभ्यंतर** ; देप्रा. **भीतर** ; प्रा. **अब्भिन्तर** ; गु. **भितर** ; बं. हिं. **भित्तर, भीतर** ; याकाम. **भीत्तर, भीतरीं** (ज्ञा. ८–२३, नरुस्व. ५१६), **भितूर.**]

भींस स्त्री. राठ केंस. Thick coarse hair.

[सं. **बृसी** ; प्रा. **भिसी** ; सिंह. **बिसी** = पाय पुसण्याची चटई, तपस्व्याचें आसन.]

भुई स्त्री. जमीन, भूमि. Earth, ground.

[सं. **भूमि** ; पा. प्रा. **भूमि** ; देप्रा. **भूमिपिसाओ** तालः (२२१–३) ; सिं. **भुंईं** ; **भूं** ; पं. **भुं** ; हिं. **भुंईं, भूं** ; बं. **भू, भूंई** ; सिंह. **बिम** ; का. **बुम** ; रुमा. **फुव** ; अकामसा. **भुईकोट** (जमीनीवरील किल्ला), **भुईचणे** (भुइमुग), **भुईभूग** (भुमिमग्ग), **भुयार** (भूमिगृह-भुईघर), **भुयाळ** (स्थानिक).]

भुक(णें), भोक(णें) अक्रि. (कुत्र्याचें) ओरडणें. To bark.

[सं. **भष्, बुक्** १ शब्दे ; प्रा. **बुक्क, भुक्क** ; देप्रा. **भुक्कणो श्वा** (२२३–३) ; का. **बकुन्** ; हिं. **भुकना, भोकना, भोंकना** ; सिं. **भौंकणु** ; गु. **भुकवूँ, भोकवूँ** ; रुमा. **फुकवू** = बोलणें, नांव ठेवणें. हा ध्वनिशब्द आहे. संस्कृत धातु हा उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे.]

भुक्कड वि. दरिद्री, निलाजरा. Poor, shameless.
[देप्रा. **भुक्कणो** श्वा (२२३-३) ; परंतु ह्या शब्दाचा संबंध सं. '**बुभुक्षित**' ह्या शब्दाशीं असावा ; कुत्र्याशीं नाहीं.]

भुगा पुं. पूड, चुरलेली भुकटी. Powder, poundings.
[सं. **भुग्न** (**निष्ठा√भुज्**) ; प्रा. **भुग्ग** ; अकाम. **भुगराळा, भुगाळ, भुगाभागा.**]

भुंगा पुं. भ्रमर. A bee.
[सं. **भृंग** ; प्रा. **भुंगअ** ; *Czek.* Bronk; *Russ.* Brjakt, *Lith.* Brgmic.]

भुज पुं. हात, दण्ड. An arm.
[सं. **भुज** ; **भुजंग, भुजग, भुजंगम** (=सर्प, भुजानें चालणारा), **भुजा** (हात).]

भुंडा वि. आंखूड, आवरणरहित. Short, coverless.
[कान. **बोडुअ**=बोत्रा, बोडका, आवरणरहित, शृंगरहित, शेंडारहित ; देप्रा. **भंडो** (छिन्नमूर्धा); अकाम. **भुंडा, भुटा, भुट्टा, भुडकी, भुडकी** (विहीर).]

भुमकृ(णें) अक्रि. गाजणें, वाजणें. To sound, to roar.
[**ध्वनिशब्द** ; ध्वनि कदाचित् ॐ हा असावा ; सं. **बृह्** १ भाषार्थे ; **बृहंतिका** > **भुमका** (राज.), परंतु ही व्युत्पत्ति दूरान्वित दिसते.]

भुमा पुं. वि. स्थानिक. Local (inhabitant), a land-lord.
[सं. **भूमिवान्** ; पेकाम. **भूमे-म्ये**=उत्तरेंतील सरदार, संस्थानिक.]

भुरक(णें) उक्रि. भुर् आवाज करून पिणें, ओरडणें, डरकणें. To drink or sip with a particular sound, to cry.
[सं. **बृंह्** १ भाषार्थः ; **भ्रक्ष्** १ अदने. भुरकन्, भुरका, भुरकी, भुरकाळ, भुरदिशी इत्यादि शब्दांत **भुर्** असा आवाज आहे. तेव्हां हा ध्वनिशब्द आहेसा दिसतो. " **भुर्** " कंपने असा एक वैदिक धातु आहे. '**वि+स्फुर्**' ह्यामध्यें किंचिच्चलनक्रियेची कल्पना आहे. हे धातुहि मूळ म्हणून राजवाडे सुचवितात. ध्वनिशब्द म्हणून मानण्याकडे अधिक प्रवृत्ति होते. ' भुरका ' (रंग) हा शब्द ' **भ्रमक** ' ह्याचा अपभ्रंश असावा.]

भुर्भूर्-रां अ. हा शब्द उडतांना, जळतांना जो हलका आवाज होतो त्याला व त्यावरून क्रियेच्या प्रकाराला लावतात. With the particular sound of wings.
[वैसं. **भुर्**-कम्पने. **भुर+कन्,-दिन्,-दिशी-का** (नाम),-**की** (नाम),-**कणें** (क्रियापद), **भुररें** (**भूल, भ्रांति**), **भुरली** (फजीति) **भुराडा,-टा** (कामाचा भरकाटा).]

भुररें न. पिसें, चेटूक, जादूटोणा. A charm, enchanting.
[वैसं. **भुर्**-कम्पने ; याकाम. **भुररें** (ज्ञा.१३-७५६, उगी. ३४२) ; ह्याचा √ **भ्रम्** शीं संबंध आहे कां ? भुर पहा.]

भुरळ(णें) अक्रि. विरळ ढगांप्रमाणें जाणें. To pass like scattered clouds.
[वैसं. **भुर्+रय्** १ गतौ, (द्विधातुसंयोग) ; अकाम. **भुरळ** (ढग), **भुरा** (रंग < अभ्रक), **भुरी.**]

भुल(णें) अक्रि. विसरणें, पडणें, लुब्ध होणें. To forget, to feel attracted.
[वैसं. **भुर्**-कम्पने ; सं. **भ्रंश्** (?); प्रा. **भुल्ल** ; देप्रा. **भोल** ; पं. **भुल्ल** ; बं. **भुल्** ; गु. सिं. हिं. **भुल्** ; याकाम. **भुलला**=भ्रमिष्ट झालेला (ज्ञा. १६-३७५) ; अकाम. **भुल, भूल, भुलवणी, भुतणें**=भुलणें (ज्ञा. १७-२९६), = होणें, भुलविणें.]

भुवई, भुंवई स्त्री. डोळयाच्या (पापणी)वरील केंस. An eyebrow.
[*IE.* Bhru; सं. **भ्रू** ; *Av.* Brvat: *Gr.* ophrus; *Lith.* Bruvis; *Per.* Abru, Baru; सं. **भ्रूमयी, भ्रू, भ्रूवर्तिका** ; देप्रा. **भुमया** ; प्रा. **भुवया, भुवँया, भुँवई.** प्राकृत रूपांवरून संस्कृत शब्द **भ्रूमयी** असावासा वाटतो.]

भू स्त्री. पृथ्वी, जमीन. The earth.
[सं. **भू** (स्त्री) ; अकामसा. **भूगोल, भूपृष्ठ, भूकंप** (धरणीकंप) इ.]

भूक स्त्री. खाण्याची इच्छा, क्षुधा. Desire to eat, appetite.
[सं. **बुभुक्षा** ; प्रा. **बुभुक्खा** ; देप्रा. **भुक्खाक्षुत** (२२०,१३), **बुहुक्खा** ; गु. बं हिं. **भूख** ; पं. **भुक्ख** ; सिं. **बुख** ; अकामसा. **भुकाळ-ळू, भुकिस्त, भुकेकंगाल, भुकेज(णें).**]

भूत वि. झालेला, होऊन गेलेला, पूर्वीचा. Elapsed, past.

[सं. **भूत**, ✓ **भू** १ सत्तायाम्; याकाम. **भूतणें** (होणें, भुलणें– ज्ञा. १७-२९६); **भूत+ल** (दोन भूतकाळचे प्रत्यय किंवा एक 'ल' विशेषणाचा).]

भूत न. पिशाचयोनि. A spirit, goblin.

[**भूताटकी**, **भूत** + (कान.) **आटकी** = खेळ. **भुतावल** (भूतावलि), **भुतेखेतें**, **भुतारें** (भूतार्त).]

भूमि स्त्री. पृथ्वी. The earth, ground.

[सं. **भूमि**, ✓ **भू** १ सत्तायाम्, **भूम्या**, **भूमिये** (सं. **भूमिकः**) = भूमीचा मालक, संस्थानिक.]

भूयसी स्त्री. ब्राह्मणास द्यावयाची दक्षिणा. The money presented to Brahmins.

[मूळ इंडो युरोपियन धातु ✓ **भू** असा असून त्याचा निरनिराळ्या वर्णांशीं संयोग होऊन निरनिराळीं रूपें झालीं आहेत. १ **'र' संयुक्तः–सं. भूरि**; *Av.* Biuri; *Lith.* Burys; *Lett.* Bura; **'य' संयुक्तः–भूयस्**; *Av.* Baiyo; **भूयिष्ठ**; *Av.* Boistem. सं. **भूयसी भूयस्**, **भूयिष्ठ** हीं तरतमाचीं संस्कृतरूपें होत. धार्मिक मंत्रांत **भूयसी** (स्त्री) शब्द म्हणून देणगीसंबंधीं वापरला आहे. तोच शब्द ब्राह्मणाच्या दक्षिणेस रूढ झाला.]

भूर्ज पुं. वृक्षविशेष. A kind of tree.

[सं. **भूर्ज**; *Lat.* Farnus; *Lett.* Ferfs; *Lith.* Berzas; म. **भूर्ज**, **भूर्जपत्र**.]

भूस न. भात वगैरे धान्याचें वरील आवरण. Chaff or husk.

[सं. **बुसिका**; प्रा. **बुसिआ** (स्त्रीं.); बं. **बुशी**; गु. **भुसो**, **भुस**; पं. **भुस**; हिं. **भूंस**, **भुंसा**; रुमा. **फुस** = वाळलेलें गवत; सिं. **बूह**, **बुहा**; अकाम. **भुस–कट**, **–कुट**, **–कुरा** (अल्पार्थें प्रत्यय), **भुसकाट(णें)**; **भुस–कन्**, **–कर–दिनी**, **–दी**; **भुस–का**, **भूसडा**; **भोसडा**, **भूसकुंडा**, **भुसा**, **भुसार–माल**, **भुसारी** (मालाचें दुकान).]

भें न. भय. Fear, dread.

[सं. **भय**; याकाम. **भें**, **भेडरें** (ज्ञा. १३-१०४१); **भेणें** (ज्ञा. १८-१९२); गु. ओ. **भे**; सिं. **भै**, **भौ**; पं. **भै**, **भए**; बं. **भय**, **भी**; सिंह. **बय**, **–बा**; का. **बय**; अकाम. अशिष्ट. **भें**, **भ्यां**, **भेकट** (सं. **भ्रेषट**).]

भेक(णें) सक्रि. चिरणें, रडणें. To cut, to cry.

[सं. **भ्रेष्** १ भये; **अभि+कृत्** ६ छेदने; **भेक**, **भेग** = फट, चीर, फाक, फोड.]

भेक पु. बेडूक. A frog.

[सं. **भेकः**; प्रा. **भेओ**; बं. **बेड्**; ओ. **बेङ्गा**; हिं. **बेंग**; अकाम. **भेकड** (**भ्रेषट**).]

भेंजूड, **भेंझूड** वि. भित्रा. Affected with fear.

[सं. **भयाविष्ट** (?); देप्रा. **भेडो**, **भेज्ञो**, **भेजलओ** त्रयोऽप्येते **भीरुवाचकाः** (२२१–४); अकाम. **भेड** = भित्रा.]

भेट(णें) सक्रि. आलिंगन देणें, जवळ येणें. To meet, to approach, to embrace.

[देप्रा. **भिट्ट**; हिं. **भेट**.]

भेड न. भय, भीति. Fear, dread.

[सं. **भ्रेष्** १ भये; याकाम. **भेड**, **भेण**; अकाम. **भेडस(णें)**, **भेडसाव(णें)**, **भेडसार**.]

भेंडी स्त्री. वनस्पतिविशेष, एक प्रकारची भाजी. A kind of herb or plant, "lady's finger".

[कान. **बेंडे** = एक उंच वनस्पति; देप्रा. **भिंडिया**; हिं. **भंटा**, **भिंडी**; गु. **भेंडा**, **भिंडा**; याकाम. **भेंड** = पोकळ निरुपयोगी झाड (ज्ञा. १८-५७५); म. **भेंड**.]

भेंडोळें न. गुंडाळी. A bundle.

[कान. **बिंडा**, **बिंडोळें** > **भिंडोळें**.]

भेत(णें) सक्रि. चिरणें, फाका करणें, उभ्या वाटण्या करणें. To cut, to split, to divide.

[सं. **भिद्**, (**भेत्तुम्**); **अभि+कृत्** ६ छेदने; पं. **भेत** = रहस्य; सिं. **भेतु** = भेद, रहस्य; अकाम. **भेत** = छेद, **भेतूक**, **भेतकुल** = लाकडाची फळी; **भेताळा** = चीर.]

भेद(णें) सक्रि. विभागणें, निराळें करणें. To divide, to separate.

[*IE.* Bheid; सं. **भिद्** ७ विदारणे; *Gr.* Pheidomai; *Lat.* Findo; *Goth.* Beitan; याकाम. **भेद** = प्रकार (ज्ञा. १८-४९), = वेगळेपणा (ज्ञा. १८-९०); अकाम. **भेदाभेद**, **भेद्या** (गुह्य फोडणारा).]

भेदर(णें) अक्रि. बावरणें, भिणें, गोंधळणें. To be afraid, to be confused.

[कान. **बेदर** = भीति; **बेदरीसु** = भिणें, **भेदरट** = (भित्रा).]

भेर स्त्री. बोर, फलविशेष. The *ber* fruit.

[सं. **बदर**; हिं. बं. **बेर**.]

भेर स्त्री. वाद्यविशेष. A kind of instrument.
[सं. **भेरी**; गु. हिं. **भेर, भेरी**; सिं. **भेरि**; सिंह. **बेरय.**]

भेरुड(णें) अक्रि. भेरड नांवाचा रोग झाडाला होणें. To be affected with a particular disease.
[सं. **विरुज्,–वीरुध्+चुद्** ६ छेदने, (= रोगविशेष) **भेरड, भेरुड** = डोळ्यांतील घाण.]

भेली स्त्री. ढेप, गुळाची ढेप, गुळाचा खडा. A small made-up lump of *gur*.
[काम. **बेल्ल** = गुळ, अशुद्ध साखरेचा खडा.]
गूळ आवडे ज्याला । त्यास नावडे कोण भेला ॥
यथार्थ दी. ९–१४०८.

भेलगा पुं. वृषणाची सूज, वृषण सुजून झालेला गोळा. Swelling of the testicles.
[म. **भेला** (गोळा) + **गा.**]

भे(स)ळ(णें) अक्रि. मिसळणें. To mix up.
[सं. **अभि, वि+मिश्र्** १० संपर्के.]

भोई पुं. पालखी वाहणारा कोळी. A palanquin-bearer.
[हिं. **भोई**; याकाम. **भोई** = छत्र धारण करणारा (नरुस्व. ३९२).]

भोंक न. छिद्र, लहान पोकळी. A hole, a cavity.
[कान. **बोक्के**–उंदरानें पाडलेलें लहान भोंक; याकाम. **भोकसा** = पेंढा भरलेलें मृत जनावर (ज्ञा. ३–२५०); अकाम. **भोकसा** = मोठें भोक, **भोकाड** = पसरलेलें तोंड .]

भोक(णें) क्रि. कुत्र्याचें ओरडणें. To bark.
[१ ध्वनिशब्द; २ सं. **बुक्क्**–शब्दे; प्रा. **भुक्कर** देप्रा. **भुक्कणोश्वा** (२२३–३); कान. **बागळुं** = भुंकणें भुकणें पहा.]

भोकस(णें) सक्रि. टोचणें, मारणें. To pierce, to prick, to thrust.
[सं. **अभ्युत्+कृष्**–विलखने ; वर्णविपर्ययानें '**भोसकणें**' असाहि प्रयोग रूढ आहे.]

भोकाड न. तोंडाचा जबडा. The jaw opened.
[कान. **बोक्क** = दन्तविरहित तोंड.]

भोग(णें) सक्रि. उपभोग (मैथुनसुख) अनुभवणें.
[सं. **भुज्** ७ भोगे; अकामसा. **भोक्ता, भुक्त, भोग चढविणें** (देवास उपभोगासाठीं पदार्थ अर्पणें), **भोगोरा, भोगवटा** (वहिवाट, कबजा).]

भोंगळ(णें) सक्रि. अव्यवस्थित होणें,–वागणें. To behave slovenly.
[१ **ओंगळ < अमंगल**; ह्याचे प्रतियोगी शब्द **सोंगळ** व **भोंगळ**; सं. **भंगिल** (नाधा.).]

भोज न. उल्हास, आनंद, जेवण, भूषण, अलंकार, राज्य. Joy, satisfaction, delight.
[सं. **भुज्** ७ भोगे; अकामसा. **भोजन, भोजें** = जेवण; **भोजणें, भोजिणें** = जेवणें.]

भोंडला पुं. आश्विन महिन्यांतील मुलींचा खेळ. A game of girls.
[**भोंड** = जोंधळा, धान्यवृद्धि (?).]

भोपळा पुं. एक फलविशेष. A gourd.
[सं. **बहुफलकः**. साल्डानानें ह्या शब्दाचा संबंध पोर्तुगीज शब्द Abobla ह्याशीं लाविला आहे तो पटत नाहीं. अकामप्र. **भोपळा** फुटणें, हातीं **भोपळा** येणें, **भोपळ्यारोग, भोपळा** = शून्य.]

भोंव(णें) उक्रि. त्रास देणें–होणें, भ्रम होणें. To trouble or be troubled.
[सं. **भ्रामयति**; पा. **भामेति**; प्रा. **भमावइ**; हिं. **भाउना**; लां. **भावावण**; गु. **भमाववूँ**; सं. **भ्रमति**; पा. **भमति**; प्रा. **भमई**; गु. **भ्रमवूँ, भमवूँ**; सिं. **भवणुं**; पं. **भरमना, भौंना**; हिं. **भमना, भओना**; का. **ब्रमुन्**; सिंह. **बमण** = गिरकी, वर्तुळ; याकाम. **भोविन्नणें** = फिरणें (ज्ञा. ६-७६); अकाम. **भोवळ, भोवंड** = मूर्छा, चक्कर.]

भोंवड(णें) अक्रि. भोवरा करणें, फिरणें, मूर्च्छा येणें. To feel a reeling sensation.
[सं. **भ्रम्**; देप्रा. **भंमडइ, भामाडइ, भमडइ** (२१९-४); हिं. **भौरियाना**; अकाम. **भोवड, भोविन्नणें** (ज्ञा.); **भोंवता, भोंवळ, भोंवरा** इत्यादि मराठी शब्दांच्या मुळाशीं **भ्रम्** हा संस्कृत धातु आहे.]

भोंवर पुं. काळा भुंगा. A bee.
[सं. **भ्रमर**; पा.प्रा. **भमर**; सिं. **भौंरू**; पं.हिं. **भंवर**; **भौरा**; बं. **भोमार**; सिंह. **बंबर,–रा.**]

भोंवरा पु. केंसाचा वाटोळया आकाराचा पुंजका, मुलांचें खेळाचें एक साधन (दोरीनें फिरवावयाचें). A round bunch of hair, a toy.
[सं. भ्रमरक ; सिं.पं.हिं. भौंरी ; सिंह. वंबरु = केस.]

भोंस, भोंशाऊस पुं. ऊंस, एक प्रकारचा बोरू. A kind fo reed, sugar-cane.
[देप्रा. भमासो इक्षुसदृशतृणम् भमसइति धनपालः.]

भोसड(णें) सक्रि. शिव्या देणें. To abuse, to coax.
[सं. भस् १ भर्त्सने, भसट, अवभर्त्स, भोसडा, भोसडी (अशिष्ट) = स्त्रियांचें जननेंद्रिय.]

भोळा वि. सहज फसला जाणारा, क्षिप्रविश्वासी. Simpleton, gullible.
[सं. भ्रम् ; देप्रा. भोल ; गु. भोळू.]

भ्याड वि. भित्रा, घाबरणारा. Coward.
[सं. भी ; देप्रा. भेडो (भीरुवाचकः).]

भ्रम(णें) अक्रि. फिरणें, डोकें फिरणें. To move, to roam, to reel.
[*IE*. Bhrem. ; सं. भ्रम् १ चलने (भ्रमिष्ट, भ्रामक, भ्रमण, भ्रमर, भ्रांत); *Gr*. Phormigx, Brems; *Cymr*. Brefu. भ्रमी = दहा हजार हत्ती, एक लाख रथ, एक कोटी घोडे, एक अब्ज पदाति इतकें सैन्य.]

भ्रंश(णें) अक्रि. पडणें, गळणें, कमी होणें. To drop down.
[सं. भ्रंश् १ पतने ; अकाम. भ्रष्ट निष्ठा, भ्रष्टाचार (गोलंकार).]

म पुं. मराठी वर्णमालेंतील पंचविसावें व्यंजन, ह्या वर्णाचें उच्चारण ओष्ठ्य नासिक्य असून उच्चारस्थान ओष्ठ आहे. मानवांचा हा एक आद्य उच्चार आहे. Twenty-fifth consonant of the Marathi alphabet. It is the labial nasal.
[(आद्य म) सं. म, म्र, म्ल, स्म ; प्रा. म. मनस् = मन, म्रेड-मेड, आम्ल-आम.
(मध्य म) सं. न्म, म्य, र्म, ल्म ; प्रा. म्म. श्मास-आह्म.
सं. ष्म, श्म, स्म, क्ष्म ; प्रा. म्ह. पक्ष्मन्-पाकळी, ग्रीष्म-गीम, श्मशान-मसाण, धार्मिक-धामा, कर्मन्-काम, म्रक्ष्-माख, ब्राह्मण-बामण.]

मकई स्त्री. मका. Maize.

मकडी स्त्री. माकडीण, माकड (स्त्री) पहा. A female monkey.

मका पुं. धान्यविशेष. Maize, Indian corn.
[सं. मर्कक:, मर्कटकः ; का. मकायुं ; कु. मकई ; बं. मकइ ; ओ. मका ; बि. मकइ ; हिं. मक्का (पुं) मकाई (स्त्री); पं. मक ; सिं. मकी, मकाई ; गु. मकाई ; ने. मकै ; अकामसा. मकई, मक्याण (मका + धान्य -तृण) = मक्याचा कडबा, मक्याची उसळ.]

मकाण न. राहण्याची जागा, घर. A place of residence.
[अर मकान्.]

मक्ता पुं. ठेका, कंत्राट. A contract, an agreement of work.
[अर. मक्तअ.]

मखमल स्त्री. न. एक प्रकारचें मृदु वस्त्रविशेष. Velvet cloth.
[फा. मख्मल् ; पेकाम. मख्मली (वा. समा. १-२४६). म. मखमुल, मख्मल.]

मखर न. सुशोभित जाळी,-घर. A decorated frame.
[फारशी (?) ; याकाम. मखर = घर.]

मखलाशी स्त्री. मान्यतेचा शेरा, पसंतीची सही. An endorsement of sanction, signature showing acceptance.
[अर. मुखल्लस = शुद्ध, बिनचूक.]

मख्खी स्त्री. खोंच, मर्म, खुबी, युक्ति, रीत. The point, art, knack.
[सं. म्रक्ष् (?); मक्षिका (?); प्रा. मक्खिआ.]

मग अ. नंतर, पुढें. Then, afterwards.
[सं. मार्ग (?); देप्रा. मगा, मग्ग = पश्चात् (३-८); गु. मग = रस्ता ; याकाम. मग = पादपूरक अव्यय.]

मगज पुं. गीर, गाभा, आंतील जाडा मऊ भाग, डोक्यांतील मेंदु. Pulp, kernel, pith, marrow, brains.
[फा. मघ्ज ; शिकाम. मगज (दा. ११-१०-२३); पेकाम. मगज (खरे ८-४३५२).]

मगदूर पुं. शक्ति, सामर्थ्य. Strength, capacity, power.
[अर. मक्दूर ; पेकाम. मक्दूर (दिमरा. १-१६).]

मंगर स्त्री. जलचर प्राणी, नक्र, सुसर. An alligator.
[सं. मकर.]

मंगर अ. परन्तु. But.
[फा. मगर् ; पेकाम. मगर (रा. ५-६).]

मगरूर वि. गर्विष्ठ, उन्मत्त, चढेल. Proud, haughty.
[अर. मघ्रूरी ; अकामसा. मगरमस्त (फा. मघ्रूर् + मस्त (?)).]

मगे अ. म्हणजे. That is, meaning.
[सं. भण् (विध्यर्थ); भणीये > म्हणजे > म्हंजे > म्हंगे > मगे.]

मघमघ(णें) अक्रि. वास दरवळणें, घमघमीत वास येणें. To have the scent spread out.
[कान. मग = वास ; प्रा. मघमघ = फैलावणें, मघमघ, (वर्णव्यत्यास व द्विरुक्ति) घमघम.]

मघां अ. नंतर, मागें. Then, sometime back.
[सं. मार्ग (?); देप्रा. मगा, मग्ग (३-८); अकाम. मगां, मवार्शी.]

मंगळ वि. शुभ, कल्याणकर. Auspicious, pious.
[सं. मंगल ; प्रा. मंगल, मगल्ल ; गु. मंगळ ; सिं. मंगलु ; पं. मंग्गल ; हिं. बं. मंगल ; सिंह. मगुल ; याकाम. मंगळ ; अकाम. मंगळ, मंगळणें = फसविणें, चकविणें; मंगळमाठ्या (मंगळ + मठ्ठ) = मूर्ख, मठ्ठ.]

मच(णें) अक्रि. फुगणें, सुजणें, माजणें, भांडणें. To swell, to grow big, to quarrel.
[सं. मच् , मञ्च् ; प्रा. मच्च ; का. मचर ; हिं. मचना; अ. मसिब; पं. मच्चणा ; लां. मच्चण ; सिं. .मचणु ; गु. मचवूँ ; सं. मद् (माद्य); प्रा. माज्ज, माच्च, मच्च.]

मचमच स्त्री. खातांना तोंडांतून होणारा आवाज, बडबड (लक्षणा). The sound of the jaws while eating or talking.
[सं. मञ्च् (?); बं. मचकान ; हिं. मचकना ; पं. मचक ; बं. मचक.]

मचवा पुं. मालाची मोठी नाव, शीड. A kind of boat.
[मल्याळ. मंजी < मंची (< सं. मंच, मंचक = खाट. ह्या मल्याळी शब्दाचा पोर्तुगीज अपभ्रंश मांचुआ असा आहे. संस्कृत–मल्याळी–पोर्तुगीज–मराठी असा ह्या शब्दाचा प्रवास आहे.]

मचूळ वि. बेचव, नीरस, मद्दचूळ पहा. Brackish.

मच्छ पुं. मासा, नदीवरील पुलास आधार देणारी व पाण्याचा आघातास विरोध करणारी भिंत. A fish, the sharp-edged member of a pier which sustains the force of the stream.
[सं. मत्स्य.]

मच्छर न. चावणारा बारीक कीटक. A mosquito or gnat.
[सं. मशकः, मत्सर ; पा. मच्छरो ; प्रा. मच्छर, मच्छल; लां मच्छुर ; सिं. मच्छरु ; फा. मच्छरदानी = बिछान्यावरील डासांचें प्रतिबंधक आवरण ; याकाम. मछरू (सं. मत्सर ; प्रा. मच्छर) हा शब्द निराळा.]

मजकूर पुं. हकीकत, वृत्तान्त, आशय, युक्ति, पाड, हिशेब. Contents, account, communication.
[अर. मझ्कूर ; शिकाम, मज्कूर (सभा २६).]

मजगतीं अ. मध्यंतरीं, दम्यान. In the meanwhile.
[सं. मध्य ; प्रा. मज्झ ; अकाम. मच्चा ; गु. वच्चे, वच्मां.]

मजबूत–द वि. बळकट, भरींव, कायम, खंबीर, निश्चित. Strong, stout, firm, compact.
[अर. मझ्बूत ; शिकाम. पेकाम. मज्बूत,–द.]

मजमू स्त्री. जमिनीवरील करवसुलीचा अधिकार. The right of levying taxes on land.
[अर. मज्मूअ = वसूल ; अकामसा. मजमूदार, मुजुमदार.]

मजमून पुं. वृत्तांत, विषय, आशय. Account, contents.
[अर. मझ्मून ; पेकाम. मज्मून (रा. ७-३).]

मजरा पुं. शेताजवळील शेतकऱ्यांची वसाहत. A settlement of huts near a farm.
[अर. माज़्री.]

मजल स्त्री. टप्पा, पल्ला, प्रवासाचा भाग. A stage, a halt.
[अर. मन्झील; शिकाम. मजली (सभा. ३७).]

मजलस स्त्री. दरबार, सभा, गाण्याची बैठक. A royal court or assembly, a concert.
[अर. मज्लिस,-जलस = बैठक ; शिकाम. मजालसा ; अकाम. मजालीस,-लस. गोमेदाचिया मजालसा ॥ मुक्ते. सभा २-३१.]

मजला पु. माळा, माडी. An upper storey.
[अर. मन्झिझा.]

मजा स्त्री. गंमत, मौज, आनंद, करमणूक. Favour, fun, sport, diversion.
[फा. मझा, अकाम. मजेदार (मझा + दार).]

मजीत वि. मळकट, जुना, खराब. Soiled, tarnished.
[अर. मजीद ; अकाम. मजीद्, मंजीट,-ठ.]

मजूर पुं. गडी, वेतनानें ठरविलेला गिरणींतील कामकरी, मोलारी. A day labourer.
[फा. मझ्दूर.]

मज्जा स्त्री. हाडांतील मऊ पदार्थ, धातुविशेष. The marrow of the bones.
[सं. मज्जा.]

मज्जाव पुं. मनाई, जाण्यास बंदी. Prohibition (of departure).
[हिं. मत् (निषेधार्थक अव्यय) + जाव.]

मंजन न. (दांत) स्वच्छ करण्याची पूड. Tooth-powder, a medicine for teeth or gums.
[सं. मार्जनी ; प्रा. मज्जण ; बं. माजन् ; पं. मञ्जण ; म. दंतमंजन.]

¹मंजिरी स्त्री. तुळशीचा तुरा, मोहोर, फुलांचा झुपका (दाण्ड्यासह). A branching foot-stalk.
[सं, प्रा. मंजरी ; गु.हिं. मंजरी.]

²मंजिरी स्त्री. लहान टाळ. Small cymbals.
[सं. प्रा. मंजीर ; हिं. गु. मंजरी (पुं.) ; बं. मंजीर (पुं.) = पायाचें भूषण. (ताल धरतांना उपयोग करतात.)]

मंजुळ वि. मधुर, कानास गोड लागणारा. Sweet, soft, melodious.
[*IE.* Mang, Meng; सं. मञ्जु, मञ्जुल, √मञ्ज् ; *Gr.* Magganu ; *Lat.* Mangs; मङ्गल ह्या शब्दाशीं संबद्ध आहे.]

मंजूर वि. संमत, कबूल. Agreeable, acceptable.
[अर. मंजूर.]

मंझील न. घर, मुक़ामाची जागा. A mansion, a house.
[अर. मंझील् = उतरण्याची जागा, स्थळ.]

मटक(णें) सक्रि. खाणें, क्षुधा शांत करणें, एकदम झांकणें. To eat suddenly, to shut at once.
[सं. मुट् ; बं. मटकाना (फुटणें); ओ. मटका (ढिसूळ); हिं. मटकना ; पं. मटकणा (फुटणें); गु. मटकाववूँ ; अकाम. मटमट = घाईत खातांना होणारा आवाज. हा ध्वनिशब्द आहे.]

मटकी स्त्री. एक द्विदल धान्य. A kind of beans.
[कान. मडकी = डाळीचा प्रकार ; सं. मट्टक हें उत्तरकालीन रूप आहे.]

मटगा वि. फार आखूड. Shorter than what is required.
[कान. मट्ट = लहान, कमी ; सं. मुट ; देप्रा. मट्टो (२२२-१४); गु. माठु = अपूर्ण, वाईट ; सिं. मठो ; बं. माट = वाईट ; अकाम. मटकन,-दिशी. कांहीं मराठी शब्द ह्याशीं ताडून पाहण्यासारखे आहेत. उदा. मटकुला, मुटका, मुटकळें = कणकेचा गोळा ; मुटकणें = बुक्क्यानें मारणें ; मोट (बांधणें).]

मटार पुं. धान्यविशेष. A kind of beans.
[हिं. मटर.]

मठाडी,-टी स्त्री. बैलाच्या डोक्यावरील दोरीचा साज. The string or rope equipment of a bullock.
[सं. मस्तक + ताटी > मत्थअ + ताटी > मठाडी.]

मठार(णें) अक्रि. सुस्त होणें, मंद होणें; माजणें, गर्विष्ठपणा करणें, सफाई करणें, गोंजारणें. To grow dull, to boast, to coax.

[सं. **मृष्ट**; देप्रा. **मडदर** = गर्व; याकाम. **मठारणें** (ज्ञा.). सफाई करणें हा अर्थ धरला तर √ **मृज्** धातु मूळ असावा.]

मठ्ठ, माठा वि. निर्बुद्ध. Dull, sluggish.

[सं. **मंदः, मृष्टः** (?); अप; **मंठ**; देप्रा. **मट्टो अलसः** (२२२–२-१४); प्रा. **मट्ठ**; का. **मोट्टु**; अ. **मठ**; बं. **माठ**; ओ. **माठुआ**; हिं. **माठा, मट्ठा**; लां. **मट्ठा**; सिं. **मठो**; गु. **माठूं**. संस्कृत मूळ कोणतें असावें ह्याची शंका आहे. प्राकृत काळांत शब्द रूढ झाला. कान. **मड्डु** = मूर्ख ह्या शब्दाशीं संबद्ध असेल काय ?]

मठ्ठा, पुं. लोणी न काढतां केलेलें ताक, आलें, मिरची, मीठ साखर लावून तयार केलेलें चवदार ताक. Spiced butter-milk.

[सं. **मस्तु** (न.): का. **मंथ** = ताक; गु. **मठो, मट्टो**; सिं **मठो**; पं. हिं. **मठा**; बं. **माठा.** काश्मिरी शब्दावरून असें वाटतें कीं सं. **मंथ्** हा धातु मूळ असावा.]

मडकें न. मातीचें भांडें, घडा. A water-jar or pitcher.

[सं. **मृत्घट > मग्घट > मकुट >** (वर्णव्यत्यास); देप्रा. **मडक्क** (पुं.). मराठींत लिंगविपर्यय झाला. कान. **मडके** = भांडें (सं. **मृत्तिका > मट्टी,>मड.**).]

मडम स्त्री. इंग्लीश स्त्री. Madam.

[*Fr.* Ma = My, dame = lady, Madame; *Lat.* Mea domina = My lady; *Eng.* Madam.]

मडौरा पुं. वाद्यविशेष, डमरू. A kind of instrument.

[सं. **मृत् + डौ** (डमरू), √ **दम्**; **मडौरा**.(उगी.)]

मढ(णें) उक्रि. थर देणें, आच्छादन देणें, आस्तर घालणें. To have a lining, to cover.

[सं. **मर्दति, मठति** (उत्तरकालीन), **मृष्ट**; प्रा. **मड्डइ**; सिंह. **मड्** = चेपणें; गु. सिं. हिं. **मढ्**; बं. **माड्** = चिरडणें; पं. **मढ** = कातडी. सं. **मृष्ट** आणि **मर्द** ह्यांमध्यें घोटाळा झाल्यामुळें व्युत्पत्ति अनिश्चित होते.]

मढी स्त्री. झोंपडी. A hut, a hermitage.

[सं. **मठ**; √ **मह्** = वाढणें; प्रा. **मढ**; का. **मर**; कु. **मरी**; अ. **मरा**; ओ. **मरिआ**; बि. **मरई**; हिं. **मऱ्हा**; पं. **मऱ्ह**; याकाम. **मढ, मढगा.** मढिचेनी मापें मवावें (पाटण शिलालेख).]

मढें,-डें न. मृतशरीर, प्रेत. A corpse, a dead body.

[सं. **मृत, मृतकम्**; पा. **मटकम्**; देप्रा. **मडो मृत** (२३३–९); प्रा. अर्धमा. **मडअ**(न); का. **मोरु**; कु. **मरो**; अ. **मरा**; ब. ओ. **मरा**; सिं. **मड्डु**; गु. **मडूं.** (औत्तरीय भाषेंतील **र** = मराठी **ड**). सं. **मृतक**; प्रा. **मडय, मडअ** (न). आमच्या मतें हा शब्द सं '**मृतदेह** पासून सिद्ध झाला आहे. त्याशिवाय '**ढ**' ची उपपत्ति लागत नाहीं. अडचण येते ती लिङ्गव्यत्ययाची. तिचा परिहार प्राकृत व्युत्पत्तीवरून होतो.]

मण पुं. एक माप, ४० शेर वजनाचें माप. A measure (forty seers).

[फा. अर. **मण, मन्** = वजन; द्राविडी. **मण**; सं. √**मा, मण** (?); **मना** (सोनें वजन करावयाचें वजन); हिब्रू. **मानेह**; का. बं. हिं. **मन्**; पं. **मण**; सिं. **मणु**; गु. **मण**. ह्याचा आणखी फारशी **मन** शीं संबंध आला. दोन्ही एकाच मूळ आर्य शब्दापासून निष्पन्न झाले आहेत. ग्रीक भाषेंत ह्याच्या सारखाच शब्द आहे. ह्या शब्दाचा इतिहास फार चमत्कारिक आहे. साईसच्या मतें (तूलनात्मक भाषाशास्त्र पृ. २०८,–२११) हा शब्द मूळ अक्केडियन भाषेंतील असून तेथून तो हिंदुस्थानांत आला. बाबिलोन देशांत टॅलेन्टच्या $\frac{१}{८०}$ भागाला मण ही संज्ञा असे. तेथून हा शब्द त्या वेळच्या ज्ञात देशांत गेला. **मेन, म्न** अशा रूपानें मिसरी चित्रलेखांत हा शब्द आढळतो. हेब्रू. **मानेह एम्न, अम्न** (कॉप्टभाषेंत), **मीन** (रोमनभाषेंत) अशीं रूपें होतात. आठव्या किंवा नवव्या शतकांत अरबी व्यापाऱ्यांनीं हा शब्द हिंदुस्थानांत आणिला. ह्याच्या परिमाणांतहि वेळोवेळीं फरक झाला आहे (हाबसन जाबसन).]

मणका पुं. मोठा मणी, माकड हाड, पृष्ठवंशांतील जोडणारीं निरनिराळीं हाडें, मणी पहा. A single vertebre of the back.

मणखुरा पुं. सोनाराचें एक हत्यार. An instrument of a goldsmith.

[सं. **मणिक्षुरा.**]

मण मण (माती) स्त्री. माती. Earth.
[कान. **मण्** = माती. मुलींच्या गाण्यांत हा शब्द येतो.]

मणि,-णी, पुं. जवाहिर, हिरा, रत्न. A jewel, a bead.
[सं. **मणि**; गु. **मणि** (न.); सिं. **मणि** (स्त्री.); पं. **मणि**; हिं. **मन, मण**; सिंह. **मिण, मॅण**; म. **मण्यार, मणेर** (सं. **मणिकार**), **मणका.**]

मंड पुं. पेज, उकळणाऱ्या किंवा आंबलेल्या पदार्थांची साय किंवा फेंस. Water in which parched rice is boiled, froth on boiled or fermented substance.
[सं. **मण्ड, मण्डक**; प्रा **मण्ड**; पं. **माण्ड**; हिं. **माण्ड** (पेज).]

मंडई स्त्री. भाजीपाल्याच्या बाजाराचें ठिकाण. A market (of vegetables).
[हिं. **मंडी.**]

मंडण न. शोभा, आधार. Decoration, adorning.
[सं. **मंडन, √ मण्ड्** १० मण्डने; अकाम. **मंडाण** = मेघांचें पटल.]

मंडवळी स्त्री. विवाहामध्यें वधूवरांच्या कपाळावर बांधण्याचें भूषण. A sort of ornament or decoration for the head of bride and bridegroom.
[सं. **मुण्डवलय, √ मण्ड्**–शोभिवंत करणें.]

मंडळ पुं. समूह. An assembly.
[सं. **मण्डल**; प्रा. **मंडल**; सं. **मण्डली**; प्रा. **मंडली** (स्त्री) = श्रेणि; अकाम. **मंडळी** = समूह.]

मंडळ न. वर्तुळ. A circle.
[सं. **मण्डल**; पं. बं. ओ. **मंडल**; सिं. **मंडलु**; का. **मण्दूज** (**जु**); सिं. **मडुल्ल, मॅंडिला** = साप.]

मंडाण न. मंडण पहा. आकाशांतील मेघांचें पटल. An assemblage of clouds in sky.

मत(णें) क्रि. गुप्त मसलत करणें, एकी करणें. To agree together secretly.
[सं. **मंत्र्** १० मंत्रणे; प्रा. **मंत**; अकामसा. **मत-(थ)विणें** = मन वळविणें.]

मतलब पुं. हेतु, आशय. Intent, purpose gist.
[अर. **मतलब्** < **तलब्** = त्यानें विचारलें; पेकाम. **मत्लब** (साने पयाव. ३५३).]

मतवाली वि. रंगेल, विलासी. Gay, gallant.

मतोळा पु. घोंटाळा, गोंधळ. Confusion, chaos.
[सं. **मन्थ्** ९ मंथने.]

मतुलई स्त्री. पूर्व किंवा ईशान्य दिशेकडून येणारा वारा. The wind blowing from the East or North-East.
[अर **मत्लअ** = पूर्व, उगवत.]

मत्ता स्त्री. द्रव्य, मिळकत, जिन्दगी. Property, wealth.
[अर. **मताअ.**]

मथ(णें) क्रि. घुसळणें, एकत्र होणें. To churn, to mix.
[सं. **मंथन, √ मंथ्** (घुसळणें), **√ मंत्र्** १० गुप्तविचारे; का. **मथुन्**; बं. **मथिते**; पं. **मधणा, मद्धणा**; हिं. **मथना, माहना**; गु. **मथवूँ**; सिं. **मथणु**; अकामसा. **मथविणें** = मन वळविणें.]

मथक न. मुख्य ठाणें, ठिकाणा. The chief place.
[सं. **मस्तिष्क.**]

मथळा पुं. लेखनाचें नांव, शीर्षक. The heading, the title.
[सं. **मस्तिष्क.**]

मद पुं. मळलेलें पण न कांडलेलें भात. मदन पहा. Rice trodden but unhusked.

मद पुं. माज, गुर्मी, ताठा, जोर, सामर्थ्य. Pride, arrogance, haughtiness.
[*IE.* Mad; सं. **मद्**; *Av.* Mada; *Lat.* Madulsa, mederi.]

मदत स्त्री. साहाय्य. Help, assistance.
[अर. **मदद्**–साहाय्य; अकाम. **मदतगार, मदत-नीस** (**मदद् + निविस**–लेखनाचें साह्य करणार).]

¹**मदन** न. कणसें तुडवून काढलेलें गोंडांसहित धान्य. The corn arising from the first treading of the ears.
[सं. मृद्+ अन्न > मृदन्न > मदन; २ सं- मर्दन; प्रा. मद्दन; अकाम. मद.]

²**मदन** पुं. प्रेमशृंगार वगैरेंची देवता. The name of hindu Cupid.
[सं. मदन, √ मद्.]

मदलस स्त्री. मजलस पहा. सभा, मांडवाचा किंवा छताचा मधला भाग. The centre of a canopy, (hence) an assembly, court.

मद्वी स्त्री. वस्त्र, उंची रेशमी वस्त्र. A kind of costly silk cloth.
[कान. **मद्वी**=लग्न (किंवा सं. मृदु+वी ?); ह्याच्या अर्थांत बदल झाला आहे. मूळ अर्थ **लग्न** असा असून नंतर लक्षणेनें '**अहेर वस्त्रें**' असा अर्थ झाला; याकाम. मदवी.]
आतां अविद्येचां गांवीं। मोहाची वेढूनि मदवी ॥ ज्ञा. १८·६८७
अमृतानुभव ७·१२६; क्षणक्षणी नीचनवी। दृश्याची चोख मद्वी ॥

मदार स्त्री. वशिंड, पाठीवरील उंच भाग, आधार, भिस्त, थडगें. The hump, regard, confidence, support, a tomb.
[अर. **मदार्**=आंस, भार, इतबार; शिकाम. पेकाम मदार (रा. ५–२९).]

मदारी पुं. सापाचा जादुगार, गारुडी, हात चलाखीचा व नजरबंदीचा खेळ करणारा. A juggler, a snake-charmer.
[सं. **मंत्रकारः**; पा. **मंता**; पं. **मदारी**; हिं. गु. **मदारी**; अ. **मुदारी**=ढोंगी.]

मद्ड वि. मठ्ठ, जड. Dull.
[सं. **मंद**; **मृत्+बुद्धि** किंवा कान. **मड्डु**=मूर्ख; अकाम. **मदड,–दाड.**]

¹**मध** पुंस्त्री. पोळें अगर फूल ह्यांतील गोड रस. Honey.
[सं. **मधु**, मराठींत लिङ्ग विपर्यय कसा झाला ?.]

²**मध** पुं. मधील भाग. The middle part.
[सं. **मध्य**; प्रा. **मज्ज**; हिं. **मध, मद्ध, मधि**; गु. **मध.**]

मधुकरी पुंस्त्री. अन्नाची भिक्षा, अन्नाची भिक्षा मागणारा गरीब. Begging of cooked food (by a Brahmin beggar).
[**मधुकर**–च्या वृत्तीनें भिक्षा गोळा करणारा गरीब, ही व्युत्पत्ति पटत नाहीं. दुसरी व्युत्पत्ति असावी.]

मधुवा स्त्री. मधमाशी. A bee.
[सं. **मधुवह्**; याकाम. **मधुवा.**]

मन न. विचार करणारें–इंद्रिय. The mind.
[सं. **मनः**; पा. **मनो**; प्रा. **मणो, मणे**; का. **मन्**; अ. बं. हिं. **मन्**; सिंह. **मन**; पं. गु. **मन्**; सिं. **मनु**; अकामसा. **मनणें**=पटणें, पसंत होणें, **मन** उठणें (नापसंत होणें), **मन** घालणें (विचारांत घेणें), **मन** पाहणें (विचार अजमावणें), **मन** बसणें (आवडणें), **मन** मोडणें (विरुद्ध करणें) **मनाचा** थोर,–हलका (उदार,–क्षुद्र): **मनमुराद** (वाटेलतितकें), **मनसोक्त, मनकवडा,** (मन जाणणारा), **मनोदय** (उद्देश), **मनोज्ञ** (सुंदर), **मनःपूत**=मनाला वाटेल असें, स्वतंत्र, बेताल; **मनवणें**=मान्य होणें; **मनीषा,** **शा,–सा,–स्यां**=इच्छा; **मनोरथ, मनोरे** (प्रा. **मनोरह**; सं. **मनोरथ**), **मनसाराम,–मनुबाई**=मन, **मनस्वी**= स्वच्छंदी, फार; **मनाविणें.**]

मनग(क)ट न. हाताच्या पंजाच्या बुडाचा भाग. The wrist.
[सं. **मणिकट.**]

मनसब स्त्री. घोडदळांतील एक अधिकार. A rank or command in the cavalry.
[अर. **मन्सब्+दार**=अधिकाराची जागा, जहागीर, अधिकारी.]

मनसुबा पुं. हेतु, उद्देश, मसलत, विचार, युक्ति. A design, purpose.
[अर. **मन्सुबा.**]

मनसुबी,–फी स्त्री. निकाल, चौकशी, निवाडा. An investigation and adjustment of dispute.
[अर. **मनूसब्**; फा. **मुन्सिफी**; अकाम. **मुनसब,–फ.**]

मनसोटी–मसणवटी पहा. A grave-yard.
[सं. **स्मशानवाटिका, मसणवटीचा** अशिष्ट उच्चार.]

मनस्वी वि. अ. स्वच्छंदी, लहरी, फार, अधिक. Of subdued mind, (fig.) lax, lawless.

[वैसं. **मनस्वान्** ; सं. **मनस्** + **विन्** ; ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे. **मनःपूत** सारखा हा शब्द आहे. ' मन स्वाधीन असलेला '.]

मना,-ई स्त्री. प्रतिबंध, ठरकत. Forbidding, prohibition.
[अर. **मन्अ** ; शिकाम. **मना** (सभा. ४२).]

मनावि(णें) सक्रि. मन वळविणें. To persuade.
[सं. **मन्**, (णिच्-**मान्**-) ; प्रा. **मनावइ** ; पं. **मनावणा** ; हिं. **मनाना** ; बं. **मानाइते** ; सिं. **मनाईणु**; गु. **मनाववूँ**; अकाम. **मनावणी** = मनधरणी, आर्जव.]

मनुका स्त्री. काळें वाळलेलें द्राक्ष. A dried grape.
[अर. **मुनक्का**, (एकवचन-मनूक).]

मनुष्य पुं. मानव जातीची एक व्यक्ति, इसम. A man, an individual.
[सं. **मन्** ४ मनने; वैसं. **मनुस्** ; तद्धित **मनुष्य** (**मनु** + **ष्** + **यत्**, **मनु** + **अञ्** + **यत्**-१-५९-४) = मनुष्याचा, मानवाचा. प्रथम हा शब्द विशेषण म्हणून रूढ होता. नंतर नाम म्हणून रूढ झाला. मराठीमध्यें '**मनुष्य**' हा अधिक रूढ आहे. **मानव** त्यापेक्षां कमी रूढ आहे. **मानुष** हा काव्यांत वापरतात. ह्या सर्वांच्या मुळाशीं √**मन**-मनने हा धातु आहे. त्यापासून **मनु** = मननशील सिद्ध झाला. '**मनुस्**' असाहि एक शब्द वेदामध्यें रूढ आहे. त्याचे **मनुष्य** व **उत्पन्नकर्ता** असे अर्थ आहेत. हा शब्द नाहींसा होऊन त्याची जागा '**मन**' ह्या शब्दानें घेतली. पाणिनीनें '**मनु**' पासूनच **मनुष्य** आणि **मानुष** हे दोन्ही शब्द व्युत्पादिले आहेत. अकामसा. **मनुष्यगण** (ज्योतिष्यांतील नक्षत्रवर्ग), **मनुष्यपण**, **मनुष्यबल**, (तद्भव) **माणुस**, **माणुसकी**.]

मॅनेजर पुं. व्यवस्था करणारा, कारभारी. A manager.
[*Lat.* Manus = hand ; *Of.* Manege = managing a horse ; *Ital.* Maneggio = Business ; *Eng.* Manager.]

मनोती स्त्री. रक्कम घेतांना कांपून घेतलेलें व्याज, ठरलेल्या व्याजापेक्षां अधिक व्याज. A premium to a money-lender above the stipulated interest.
[हिं. **मनौति**.]

मंनोरा पुं. उंच स्तंभ, दगडी खांब, दीपमाळ. A minaret.
[अर. **मनोरा**.]

मंनोरे पुं. (अ.व.) इच्छा, आकांक्षा. Desires.
[सं. **मनोरथ** ; प्रा. **मनोरह** ; अकामप्र. **मनोरे** बांधणें,-रचणें.]

मंत्र पुं. वेदांतील सूक्त, ऋचा, गुप्त शब्द, रहस्य. A hymn, sacred (and secret) word, a charm.
[सं. **मंत्र** ; √ **मन्** ; अकामसा. **आमंत्रण**, **निमंत्रण**, (**आवतण**, **निवतण**), **मंतरणें** = भारणें, **मंतव्य** = विचार (करण्यायोग्य) ; **मंतु** = अपराध, गुन्हा]

मंथ(णें) क्रि. घुसळणें. To churn.
[सं. **मथ्** (मथ्नाति) ; पा. (**अभि**) **मत्थइ** ; प्रा. **मथइ** ; का. **मथुन्** ; अ, **मथिब** ; ब. **मथा** ; हिं. **मथना** ; व. **मथणा** (विचार करणें) ; सिं. **मथणु** ; गु. **मथवूँ**. **मथणें** पहा.]

मंद वि. आळशी, सुस्त. Dull, idle.
[सं. **मंद** ; शिकाम. **मंदणें** (नाथा.), **मंदावणें** = विषण्ण,-खिन्न होणें.–काय म्हणोनि पुसता लज्जा । मनोत्साह मंदला ॥ मु. आदि ३०,८१]

मन्दिर न. देऊळ, शोभिवंत घर. A temple, a decorated residence.
[*IE.* Mand ; सं. **मंदिर** ; *Gr.* Mandra. संबद्ध शब्द **मन्दुला**.]

मपितला वि. मर्यादित, मोजका. मवणें पहा. Limited.

मफौरा पुं. तीन पेड असलेला एक गळ्यांतील दागिना. A necklace with three strings.
[कान. **मुप्परी** (तीन पीळ).]

मफ्त अ. वि. फुकट. Free, gratis.
[फा. **मुफ्त**; अ. **मुफ्लिस** ; हिं. **मुफ्त** ; सिं. **मुफ्तु** ; गु. **मुफ्त**, **मुफ्लस** ; अकाम. **मुफ्त**, **मोफत**.]

मयंक पुं. चंद्र. The Moon.
[सं. **मृगांक** ; प्रा. **मयंक**.]

मंमं न. मुलांचें खाणें, जेवण. A term in children's language applied to an eatable or meal.
[सं. **अम्** १ अदने ; प्रा. **अम्** (= खाणें), **अम्मा** = स्तन. सर्व ओष्ठ्यवर्ण व त्यांतहि पुनः '**म्**' हा ओष्ठ्य वर्ण हे मानवाचे आद्य उच्चार असल्यामुळें सर्व भाषांत लहान मुलांच्या भाषेंत ह्या वर्णांचें प्राचुर्य असतें. वात्सल्य, ममता, अर्भकांच्या गरजा वगैरे दर्शक शब्दांत ओष्ठ्यवर्ण आढळून येतात. माय, बाप, भाऊ, पान, वगैरे शब्दांत त्यांचें प्राचुर्य आढळतें.]

मर(णें) अक्रि. जीव,-प्राण-जाणें. To die.
[सं. **म्रियते,** ; पा. **मरति** ; प्रा. **मरइ** ; का. मरुँ ; कु. **मरणो** ; अ. **मरिब** ; बं. **मरा** ; ओ. **मरिबा** ; बि. **मरब** ; हिं. पं. **मरना** ; लां. **मरण** ; सिं. **मरणु** ; गु. **मरवूँ** ; अकामसा. **मर** = कीड, सडलेला भाग. **मरकळ, मरगत, मरगळ** (सं. **मृतकला** ; देप्रा. **मरालो** अलसः (२२२-१३) ; बं. हिं. **मराल** = थकवा, दमणूक ; **मरकी,-गी** = रोगविशेष, महामारी), **मरण** = मृत्यु, नुकसान, तोटा, अन्त्य स्थिति ; **मरतमढें** = अत्यंत अशक्त मनुष्य ; **मरतवड** (सं. **मृतवृत्ति**) = मरणाची सांथ. **मरताक** (**मृतक्रिया**) = शेवटची और्ध्वदेहिक क्रिया. **मरतुकडा** (मृतक + गंड) = अत्यंत अशक्त.]

मरगज पुं. रत्नविशेष, मरकत. A kind of jewel.
[सं. **मरकत** ; याकाम. **मरगज** (ज्ञा. ११ ६०१).]

मरड स्त्री. माळ जमीन. Waste land.
[कान. **मलर** = खडे, वाळू (वर्णविपर्यय).]

मरमर स्त्री. पिरपिर. Complaining, murmer.
[सं. **मर्मरः**; पा. **मुरुमुरु** ; प्रा **मुरुमुरिअ** (ध्वनिशब्द).]

मरवा पुं. एक सुवासिक वनस्पति. A kind of fragrant plant.
[सं. **मरुवक** ; पं. **मरूआ** ; हिं. **मारुआ** ; **मर्वा** ; उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

मरातब पुं. पदवी, बिरुद. An appellation of honour, a title.
[अर. **मरातिब्** (अनेक व. '**मर्तबा**'चें) ; शिकाम. पेकाम. **मरातीब, मरातब** (रा. ४-२३, ५-२०२) ; अकाम. **(मान) मरातब.**]

मरामत स्त्री. चांगली अवस्था, डागडुजी, दुरुस्ती. A good condition, repairs.
[अर. **मरम्मत्** ; पेकाम. **मरमत, मऱ्हामत** (रा. ७-९८).]

मराळ पुं. हंसपक्षी, तांबड्या चोंचीचें आणि पायांचें बदक. A sort of goose.
[सं. **मराळ** ; देप्रा. **मरालो हंस इति सातवाहनः** (२२२-१४) ; बं. हिं. **मराल** ; गु. **मराळ.**]

मरी स्त्री. सांथ, पटकी, मरणें पहा. Epidemic (cholera).

मरु पु. निर्जल प्रदेश, रेताड प्रदेश, मारवाड. A desert, a waste province, Marwar.
[सं **मरुप्रांत.**]

मर्जी स्त्री. इच्छा, आवड, पसंती, कबुली. Will, pleasure, choice.
[अर. **मर्ज़ी** ; पेकाम. **मर्जी** (रा. १-२२८) ; म. **मरजी.**]

मर्द पुं. पुरुष व्यक्ति, नवरा, शूर मनुष्य. A man, a bold and brave person, husband.
[फा. **मर्द** ; पेकाम. **मर्द** (ब्र. च. ८८) ; अकाम. **मर्दानी** (प्रतियोगी शब्द-**जनानी**), **मर्दाइ, मर्दुमकी, मरद.**]

मर्दबाण न. उटीचें भांडें. A receptacle of ointment.
[फा. **मर्दबाण.**]

मर्म न. इंगित, रहस्य, अत्यंत नाज़ुक भाग. Secret quality, the latent powers.
[सं. **मर्मन्** ; अकामसा. **मर्मण** (सं. **मर्मज्ञ**) = मर्म जाणणारा.]

मराठा पुं. (वि.) ज्ञातिविशेष, महाराष्ट्रांतील व्यक्ति. A Maratha.
[सं. **महाराष्ट्र** ; पा. **महारट्ठ, महाराट्ठ** ; प्रा. **मरहट्ठ** ; अप. **मरट्ठ** ; शिला. प्रा. **महारट्ठ** ; सं. **महाराष्ट्रिकः,-य** ; प्रा. **महारट्ठीअ** ; शिलाप्रा. **महारठी** ; ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल एकमत नाहीं. हेमचंद्र व शिलालेख ह्यांमधील रूपें दिलीं आहेत. **महार + राष्ट्र, मरेंगे पर हटेंगे नही,** अशा पारंपरिक व्युत्पत्ति देतात. हिं. **मऱ्हाठा** ; गु. **मराठो** ; सिंह. **महरठ** ; ने. **मराठा** ; याकाम. **मऱ्हाठे** ; अकाम. **मराठा, मराठमोळ** (समूह) = मराठा समाज व त्याच्या चालीरीति.]

मलई स्त्री. दुधाची साय, स्निग्ध पदार्थ. Cream.
[सं. **मल** ; बं. **माळाइ** ; हिं. **मलाई** ; पं. गु. **मलाई.**]

मलई स्त्री. दांडगाई. Noise and bluster.
[सं. **मल्ल** ; पं.हिं.बं. **मल्ल** ; सिंह. **मल** = रानवट. परंतु मूळ शब्द द्राविड असून संस्कृतमध्यें समाविष्ट नंतर केला गेला. द्रा. **मल, मल्ल** = डोंगर, पर्वत. त्यावरून रानवट. **मल्लारी** शब्द ह्याबाबत चिन्त्य आहे. **मल्ल** पहा.]

मलगंडा पुं. अव्वल माल. The original or the best article or goods.
[कान. **गंडा** = श्रेष्ठ.]

मलप(णें) अक्रि. डुलणें, हलणें. To reel or waddle, to nod.
[सं. **मुप्** १ गतौ किंवा **मुद्र्** = आक्षेपे ; याकाम.
लु
मलपणें (नरुस्व. २६).]

मलव न. आकाश, ढग. A cloud.
[सं. **मल + अभ्र** (?).]

मलबार पुं. पश्चिम किनाऱ्यावरील दक्षिण प्रदेश. The southern strip of land on the West coast.
[द्राविडी. **मलइ** = पर्वत ; त्याचें संस्कृतीकरण '**मलय**' असें झालें. तंजोरच्या शिलालेखांत (११ शतक) ह्या देशाला '**मलइनाडु**' = डोंगराळ प्रदेश असें म्हटलें आहे. '**बार**' हा शब्द ११५० मध्यें **मलइ** ह्या शब्दापुढें जोडला. **मार** < अर. **बार्** = खंड ; सं. **वार** = प्रदेश; झांजीबार हा शब्द अरबीच असावा. अरबी व्यापाऱ्यांनीं हें नांव दिलें असावें.]

मलम न. चोळण्याचें स्निग्ध व मऊ औषध. An ointment.
[अर. **मर्हम्** ; फा. **मल्हम्**.]

मलमल स्त्री. एक प्रकारचें तलम कापड. The muslin.
[हिं. **मल्मल्**.]

मलिदा पु. बारीक मऊ केलेला लादा. Anything much crushed with milk, sugar, butter and wheat-flour.
[फा. **मालिदा**. विशेषतः कणिकेमध्यें लोणी किंवा तुप, साखर, दूध वगैरे घालून केलेलें पक्वान्न. हें पिरास अर्पण करण्याची महमदी धर्मांत चाल आहे.]

मलिक मैदान पु. विजापूरच्या एका तोफेचें नांव. The name of a gun.
[अर. **मलिक मैदान** = मैदानाचा मालक.]

मलूल वि. निस्तेज, दमलेला, थकलेला, उदास, क्लान्त. Dull-looking, feeble, infirm, lack-lustre.
[अर. **मलूल्**; पेकाम. **मलूल** (भाइसंम. १८३४).]

मलेरिया पुं. हिंवताप, थंडीवाजून येणारा ताप. A kind of cold fever.
[*Ital.* Mala = Bad, Aria = air, Malaria; *Eng.* Malaria.]

मल्ल पुं. पेहेलवान, योद्धा. An athlete or wrestler.
[सं. **मल्ल**. परंतु ह्याबावत द्रा. **मलइ** = पर्वत, डोंगर हा शब्द चिन्त्य आहे. **मल, मलबार, मल्ल** शब्द परस्परसंबद्ध आहेत ; अकाम. **मल्हारी** (सं. **मल्ल + अरि**).]

मल्हार पुं. एक राग. A mode in music.
[सं. **मल्हार** ; हिं. **मलार, मल्लार**; गु. पं. **मल्हार** ; सिं. **मलारु**.]

मव(णें) सक्रि. मोजणें, मापणें, लिहून ठेविणें. To measure, to write.
[सं. **मा** ९ माने (णिच्-**मापय**) ; प्रा. **मव** ; याकाम. **मवणें** (अमृ. ५-२६), **मवणी** = गणना, माप (ज्ञा. १७-४२५) (पाटणशिला.), **मपितला** (ज्ञा. ६-३५०); अकाम. **मावणें**.]

मवाई स्त्री. मऊपणा. Softness.
[सं. **मृदु** ; प्रा. **मऊ + ई** ; अकामसा. **मवारी** = साय, लोण्यासारखा मऊ पदार्थ, **मवाळ** = नरम वृत्तीचा (प्रतियोगी शब्द-जहाल) ; १९०८ च्या चळवळींत **नेमस्त** पक्षासंबंधीं हिंदी राजकारणांत रूढ झाला.]

मवाली वि. दंगेखोर, पुंड, गुंड. A bandit, a brigand.
[अर. **मआली** ; परंतु ह्या अरबी शब्दाचा अर्थ चांगला आहे. सिं. **मवाली**-व्यसनी.]

मवास पुं. दंगेखोर, नायक, जमीदार. A bandit, a leader, a land-lord.
[अर. **मुआसी**.]

मशक न. क्षुद्र कीटक, घुंघुरडें. A gnat, a mosquito.
[*IE.* maqo, maqu ; सं. **मशक**, √ **मश्** (?) ; *Lith*, maszalai ; *Latt.* masalas ; *Russ.* masoliti; सं. **मक्षिका** ; AV. *Maxsi*; म. **माशी** वगैरे शब्द वरील धातूशीं संबद्ध आहेत. :कांहीं आर्योद्भव भाषांत 'ख' अन्वित व इतर भाषांत 'श' अन्वित शब्द रूढ झाले आहेत. **माशी** पहा.]

मशगूल वि. दंग, चूर, निमग्न. Engrossed in.
[अर. **मश्घूल्** ; पेकाम. **मश्गूल** (रा. २२-३९).]

मशागत स्त्री. मेहनत, श्रम, जमीनींसंबंधी कष्ट. Labour, toil, work, tilling work.
[अर. **मशक्कत** ; शिकाम. पेकाम. **मशागत.** (चित्र. ५ सभा. २३).]

मशारनिल्हे वि. वर सांगितलेला. Above-mentioned.
[अर. **मशारुन्–इलैह.**]

मशाल स्त्री, दिवटी. A torch.
[अर. **मश्अल्**, **मश्अल्ची** ; **मश्अल्** + **ची** (तुर्की प्रत्यय) = दिवटीवाला ; हिं. **मशाल**).]

मशी स्त्री. शाई, काजळी, मस पहा. Ink, a black pigment.

मशीद स्त्री. मुसलमानांचें प्रार्थनामंदिर. A mosque.
[अर. **मस्जिद्** – प्रार्थनामंदीर ; **सुजूद्** = साष्टांग प्रणिपात.]

मशीन न. शिवण्याचें यंत्र, यंत्र. A machine.
[*Lat.* Machina; *Gr.* Mechane; *Fr*, *Eng.* Machine.]

मश्रु स्त्री. गर्भरेशमी कापड. A kind of silken cloth.
[अर. **मश्रुअ.**]

मसक स्त्री. पाण्याची कातड्याची पिशवी, पखाल. A leather water-bag.
[फा. **मश्क्.**]

मस, मसी स्त्री. शाई, काळा रंग. Ink, black colour.
[सं. **मषी, मसी** ; पा. प्रा. **मसि** ; कु. **मसी** ; अ. **मही** ; बं. ओ. **मसि** ; ओ. **मसिक्षा** ; आ.हिं. **मसी**; पं.लां. **मस्स** ; पं. **मस, मस्सु** ; गु. **मसी, मेस** ; याकाम. **मसैरें** (सं. **मसीरूपम्** – ज्ञा. ५-८३) = अंधार, काळोख; अकामसा. **मसकूट**, (काळा) **मिचकूट** (सं. **मसीकूट** = फार काळा).]

मसका पुं. लोणी. Butter.
[फा. **मस्क.**]

मसण न. प्रेतदहनाची जागा. A burning or burying ground.
[सं. **श्मशान** ; पा. **सुसानम्** ; प्रा. **मसाण, सुसाण**; बं. **मसान्** ; ओ. **मसाणि** ; हिं. **मसान्** ; गु. **मसाण** ; सिंह. **सोन, साहोन, होन** ; अकाम. **मसणवट** (सं. **श्मशानवाटिका**), **मसणा** = फलाणा, कोणीतरी.]

मसंड(णें) क्रि. समाधानानें किंवा विजयश्रीनें मिशी पिळणें. To twist or curl the hair of moustaches (out of triumph).
[सं. **मृष्टि** ; पा. **मसति** ; हिं. **मसक्ना, मसलना** ; **मसळवूँ**; हा शब्द द्रविडमूल आहे किंवा ' **श्मश्रु** 'शीं संबध आहे ? अकाम. **मसंदळणें, मसंदणें** = चुरडणें, विणणें.]

मसंद(णें) साक्रि. विणणें, गुतणें, चुरडणें. To knead and squeeze.
[सं. **मृशति + अक** ; प्रा. **मसरक्कइ** ; हिं. **मसलना** ; सिं. **महटनु.**]

मसनद स्त्री. गादी, तख्त, सिंहासन. A seat, a royal seat, a throne.
[अर. **मस्नद्** ; पेकाम. **मस्नद, मस्लद** (श्म. २४०).]

मसलत स्त्री. विचार, बेत, योजना युक्ति. A plan, a plot, a scheme, a design.
[अर. **मस्लहत्** ; पेकाम **मस्लत** (ऐच. १७).]

^{1}मसाला पुं. माल, मिसळण्याचे पदार्थ–हिंग, दालचिनी वगैरेंचे मिळून. Ingredients of composition spices.
[अर. **मसालिह्** – (अ. व.) **मस्लह्** = घटक, द्रव्यें. शब्दशः अर्थ–चांगलीं उपकारक, हितकारक द्रव्यें.]

^{2}मसाला पुं. दण्ड, शिक्षा. Fine or fee that a revenue collector is authorised to demand.

मसुदा पुं. कच्चा खर्डा. A sketch, a rough draft.
[अर. **मुस्वद्, मुसव्वदा** ; पेकाम. **मस्विदा** (रा. १०–११६).]

मसूर स्त्री. धान्यविशेष, तांबडी तूर. A sort of pulse.
[सं. **मसूर** ; प्रा. **मसूर, मसूरक्ष** (पुं. न.) ; का. **मासूर** ; बं. **मसुरा** ; ओ. **मसुर** ; बि. हिं. **मसूर** (पुं.); पं. **मसूर, महुर** (पु); सिं. **महुरी** (स्त्री.).]

मसैरें न. अंधार, काळोख, मस पहा. Darkness.

मस्करी स्त्री. चेष्टा, थट्टा, टवाळी. Joking and jesting.
[अर. **मस्करा** = गमत्या.]

^{1}मस्त वि. मातलेला, गर्विष्ठ, फुगलेला. Intoxicated, arrogant.
[फा. **मस्त्** = निश्चिंत असलेला.]

मस्त वि. पुष्कळ. Much.
[कान. मस्त.]

मस्तुती स्त्री. अरुंद व लांब जमिनीचा पट्टा. A strip of land narrow and long.
[कान. **मस्तुदीर** = परीव, वांटोळें.]

महकूब वि. थांबविलेलें, तहकूब, रहित. Suspended, stopped.
[अर. **मौकूफ**; पेकाम. **महकूब** (इम. २०५).]

महजर पुं. सनद, पुराव्याचे कागद, निकाल, करारनामा. A title, deed, a written statement in a suit.
[अर. **मह्झर्**.]

महत् वि. मोठें. Great, big.
[सं. **महत्**, √ **मंह्**; अकामसा. **महा**, **महंती**, **महत्त्व**, **महंत** (साधु), **महर्ग**,-**र्घ** (महाग), **महदंतर**, **महर्षि**, ह्याशिवाय '**महा**' शब्दान्वित कित्येक शब्द रूढ आहेत: **महाकल्प**, **महाकाल**, **महाकाव्य**, **महाजन**, **महात्मा**, **महादेव**, **महानवरात्र**, **महानुभाव**, **महापातक**, **महापीठ**, **महापुरुष**, **महापूर**, **महाप्रलय**, **महाप्रसाद**, **महाप्राण**, **महाबळी**, **महाभारत**, **महामंत्र**, **महामारी**, **महामाया**, **महायात्रा**, **महारोग**, **महाराज**, **महाराष्ट्र**, **महालय**, **महाशिवरात्र**.]

महताप स्त्री. चंद्रज्योत (दारुकामापैकीं), चांदणें, चंद्रमुखी. A kind of fire-work, (fig.) a beautiful woman.
[फा. **महताब्**; पेकाम. **महताब** (खरे ८-४१३०).]

महंत पुं. मठाचा मुख्य, महत् पहा. The chief of a monastery.

महशूर वि. सुप्रसिद्ध, प्रख्यात. Celebrated, publicly known.
[अर. **मशहूर** = प्रसिद्ध, (वर्णविपर्यय).]

महसरा पुं. वेढा, त्रास. Besiege, trouble.
[अर. **मह्सर्**.]

महसूल पुं. वसूल, सारा, खंड. Public revenue.
[अर. **मह्सूल्**.]

महाग वि. फार किंमतीचें. Dear, not cheap.
[सं. **महार्घ**; पा. प्रा. **महग्ग**; अप. **महग्घ**; अ: **महंगा**; बं. **माहांगा**; हिं. **महङ्गा**; सिं. **महाँगो**; पं. **महिंगा**; गु. **मोहोंगु**, **मोघुं**; ने. **महँगो**.]

महात पुं. हत्तीला हाकणारा. An elephant-driver.
[सं. **महामात्र** (?); प्रा. **महामत्त**; हिं. **महावत**; पं. हिं. **महौत**; गु. **महावत**, **महात**; अकाम. **माहूत**.]

महादंदी वि. महामत्सरी, भांडखोर. Quarrelsome.
[सं. **महाद्वंदिन्**; याकाम. **महादंदी** (ज्ञा. प्र.)]

महानुभाव; पुं. एक धर्मपंथ (चक्रधरप्रस्थापित). The name of a sect.
[सं. **महानुभाव**; याकाम. **महानुभाव**; अकाम. **मानभाव**.]

महामुदी (वि.)स्त्री. एकप्रकारचें कापड. A kind of cloth.
[फा. **महमुदी**.]

महामूर स्त्री. विपूलता, समृद्धि. Abundance, exuberance.
[अर. **मअमूर**; पेकाम. **महामुटी** (पाव. ११).]

महार पुं. एक अस्पृश्य जाति. A depressed caste.
[सं. १ **महा + अरि**, २ **महा + आर्य**, ३ **महा + अर**, ४ **मृत + हर**. ह्या चार प्रकारांनीं व्युत्पादितात परंतु कोणतींहि व्युत्पत्ति सयुक्तिक वाटत नाहीं. हा शब्द देशी असावा.]

महाल पुं. प्रांत, प्रदेश, जिल्हा, अधिकाऱ्याच्या ताब्यांतील प्रदेश. A subdivision of a territory, the hall or court, drawing room.
[अर. **महल्ल**, **महाल्ल** (अ. व.); पेकाम. **महाल्ल**; ह्याचे अर्थ पुष्कळ झाले आहेत—खोली, शृंगारलेला दिवाणखाना, शेजगृह.]

महावटी स्त्री. मुख्य रस्ता. The main road.
[सं. **महावर्ति**.]

महाळ,-ल पुं. भाद्रपद महिन्यांतील पितृपक्षांतील श्राद्ध. A term for the shraddha performed in the latter half of Bhadrapada.
[सं. **महालय**.]

महिना पुं. तीस दिवसांचा कालखंड, वर्षाचा बारावा भाग. A month.
[फा. माह्, माहीना; (सं. मास ?); माह = चंद्र; मराठी मारूं हा शब्द ताडून पहाण्यासारखा आहे. मारूं < फा. माह + रू–चंद्रासारखें सुंदर मुख आहे जिचें, त्यावरून सुंदर.]

मही स्त्री. पृथ्वी. Earth.
[सं. मही, √ मंह्.]

महीं न. ताक, दूध, ताक वगैरेंचा थर. Butter-milk, layer on milk.
[सं. मथितः, मथितम्; पा. मथितम्; प्रा. महिअ; हिं. मही; सिं. मही; गु. महिथ; अकामप्र. " दहीं खाऊ, महीं खाऊ. ")]

महुडा पु. ढग, मेघ. A cloud.
[सं. मिघ्, मेघ + कूट, > मेहऊट > मेहऊड > महुड.]

महुर वि. गोड. sweet.
[सं. मधुर.]

महुरें न. नागाचें विष. The venom, poison.
[सं. मुख + गर (ल.); याकाम. महुरें.]

महूंचळ वि. मचूळ, मोहाच्या फुलाच्या वासासारखें. Saltish.
[सं. मधु + जल > महु + चल. > मचूळ.]

महैळी स्त्री. बायको. Wife, a woman.
[सं. महिला; याकाम. महैळी, म्हैळी, म्हैळारु.]

मेळ(णें) अक्रि. घाण होणें, अस्वच्छ होणें. To become dirty.
[सं. मल (नाधा.); प्रा. मलइ, मळइ, मलेइ; बं. मलिबा, मला; अकामसा मळ; सं. मल; पाप्रा. मल; देप्रा. मलोस्वेदः (२२२-९); का. कु. अ. बं. मल; ओ. मल; हिं. मल्; लां. मळ; सिं. मरु; गु. मळ.]

मंळ(णें) क्रि. धान्याचीं कणसें तुडविणें, झोडपणें. To tread or to beat out (corn).
[सं. मर्दन, √ मर्द्; प्रा. मलन; गु. मळवूं; हिं. मलना; सिं. मलवुं; पं. मळना.]

मळमळ स्त्री. अस्वस्थता (शरीराची किंवा मनाची). Uneasiness (mental or physical).
[सं. मल, म्लै (ग्लानौ).]

मळयपांचौर न. पांच सुगंधांचें लाकूड. A kind of fragrant wood.
[सं. मलय (चंदनानें सुवासित); याकाम. मळयपांचौर (उगी. १२५).]

मळवट पुं. कपाळावरील कुंकवाचा अथवा गंध उटण्याचा लेप. The daub on the forehead.
[कान. (?); सं. मलपट्ट (?).]

मळसूत्र न. कांचा पाडलेला खिळा. A screw.

मळा पुं. बागाईत उत्पन्नाची जमीन. A rich, alluvial soil.

मा अ. मग, नको, नाहीं, कां. A prohibitive particle, then, after.
[सं. मा; याकाम. मा = मग (ज्ञा. ६-३३१), = कां (ज्ञा. १८-७०३).]

मां स्त्री. आई. A mother.
[सं. माता; पा. माता; प्रा. मादा, माया; अ. बं. ओ. मा; हिं. पं. माँ; लां. गु. मा; अकाम. माई, माय, माउली, मावली, माऊशी (सं. मातृष्वसृ; अप. माउच्छिआ).]

माकड पुं. वानर. A monkey.
[सं. मर्कट; पा. मक्कटो; प्रा. मक्कड; अप. मक्कल; अ. माकर; ओ. माकर; बि. मक्रा; पं. हिं. मकडा (कोळी); गु. माकडूं; परंतु संस्कृतमध्येंच हा शब्द परभाषेंतून घेतला गेला. हा शब्द मूळ आस्ट्रोएशियाटिक आहे. द्राविडी. मर = वृक्ष, कड = उडी मारणें, ओलांडणें. ह्या दोन शब्दांचा मर्कट असा शब्द होऊन तो संस्कृतमध्यें अंतर्भूत झाला असावा. कान. मंग, मंगेश (< मर्क) टर्नरनें मत्कुण (> गु. मॉंकडी) आणि मर्कट ह्यांमध्यें घोटाळा केला आहे.]

माकत्यान–मात्कयान अ. पुनः फिरून. Again.

माकूल वि. प्रौढ, सभ्य, पसंत, उदार, योग्य, शहाणा. Respectable, worthy, agreeable, liberal.
[अर. मअकूल्.]

माकोडा पुं. मुंगळा, कीटकविशेष. A kind of insect.
[सं. मत्कुणः, मृत्कीटकः; प्रा. मक्कड; देप्रा. मक्कडो जालकर क्रमिः, मक्कोडा उर्णा पिपीलिका

(६-१४२); पं. मक्कर = कोळी, टोळ ; पपं. माकोरा = मुंगळा ; बं. माकड = कोळी ; सिं. मकुल्, माकड = कोळी ; सिं. मकोर = मुंगी ; हाहि शब्द परकी दिसतो.]

माख पुं. उडीद. A kind of pulse.
[सं. माष ; याकाम. माख.]

माख(णें) सक्रि. चोपडणें, मालीश करणें. To besmear, to anoint.
[सं. म्रक्ष् ; पा. मक्ख ; प्रा. मक्ख ; बं. माखिते ; सिंह. मकनूवा, = उपटणें ; म. माखटणें.]

माखजण न. कोंकणांतील एक स्थान. A place in Konkan.
[अर. मखजन (अनेकवचन–मखझिन); *Ital.* Magazino; *OF.* Magazie; *Eng.* Magazine.]

माखण न. लोणी. Butter.
[सं. म्रक्षणम् (लेपनम्); पाप्रा. मक्खण ; अ. बं. माखन् ; हिं. माखन्, मक्खन् ; पं. मक्खण ; गु. माखण ; सिं. माखणूं.]

मांग पुं. विणण्याचें यंत्र. A loom.
[कान. मग्ग.]

मांग पुं. रस्ता, शोध, तपास, पावलांचीं चिन्हें. A track, a search, a trace.
[सं. मार्ग ; प्रा. माग्ग, मग्ग ; पं. मग्ग ; हिं. मांग, मग ; सिंह. मग ; गु. माग ; सिं. मागु = ठिकाण ; याकाम. मागुतें (ज्ञा. १६-२८३), मागोवा (ज्ञा. १८-१७२३), मांगावा (ज्ञा. १७-४१); अकामसा. मागुता, मागाहून, आगेमागें, मागें, मागील, माघार, मागमूस (दोन भिन्न भाषांतील शब्द).]

माग(णें) सक्रि. हवे असणें, द्यावयास सांगणें. To ask for, to beg.
[सं. मार्ग् ; पा. मग्ग ; प्रा. मग्ग ; का. मगुँ ; कु. मग्णो ; अ. मागिब ; बं. मागा, मांगा ; ओ. मागिबा ; हिं. माँगना ; पं. मंगना ; सिं. मागु ; गु. मागवूँ ; अकाम. मागी = याचना.]

मागें अ. पाठीमागें, पाठीवर, नंतर. Behind, after.
[सं. मार्ग ; देप्रा. मग्गा पश्चात् (३८), मग्गो पश्चात् (२२२-९); कान. मग्गल = बाजू ; √ मगुल = फिरणें, गिरकी घेणें ; याकाम. मागुतें, माघौतें (१५-७५), मागील (देप्रा. मग्गिल्ल) ; अकाम. मागुता, मागील, माघलट, माघार.

मांग पुं. अस्पृश्य जात. A low or depressed caste.
[सं. मातंग ; प्रा. मायङ्ग ; गु. मांग = पितळीवर काजळीनें भंग्याच्या कुटुंबाचें चित्र काढून त्याची पूजा करतात तें (ब्लोक).]

माच पुं. खाटलें, बाज, A bed-stead, a cot.
[सं. मञ्च, मञ्चकः, √ मञ्च् ; पा. प्रा. मंच ; अप. मंचऊ ; कु. माँचो ; अ. मासिया (खुर्ची) ; बं. माचा (कट्टा) ; ओ. मोचा ; त्लां. माझी ; बि. मॉच ; हिं. माँचा, माचा ; पं. माजा ; अकाम. माची = उंचावरील भाग, माचा, माचवा ; मञ्चकमधील शेवटचा ‘ क ’ अवश्य आहे.]

माज(णें), मांज(णें) क्रि. धुणें, स्वच्छ करणें, तेल वगैरे लावणें. To wash or to besmear.
[सं. मार्ष्टि, मार्जति ; पा. मज्जति ; प्रा. मज्जइ ; का. माझुन् ; अ. मझिब ; बं. माजा ; ओ. माजिबा ; हिं. माँजना ; पं. माँजणा ; सिं. माजणु ; गु. माजवूँ ; अकामसा. माजण (सं. मार्जन) = मूर्तीवरील शेंदराचा लेप.]

माज(णें) अक्रि. उन्मत्त होणें, झिंगणें, फुगणें, शेंफारणें. To be intoxicated, to swell, to be arrogant.
[सं. मद् (माद्य-माज) ; प्रा. मज्ज ; प्राकृतमध्यें व तेथून मराठीमध्यें संस्कृत धातु विकरणचिन्हासह आला. त्याशिवाय ‘ ज ’ची उपपत्ति लागत नाहीं. याकाम. माज = कैफ (ज्ञा. १८-६५८), = वृद्धि (ज्ञा. १४४६), माजवण, माजिरा, माजिवटा ; अकाम. माज (सं. माद्य ; प्रा. मज्ज ; हिं. माजा, मांज, मंझा = गदळ ; सिंह. मद = = मस्ती, मैथुनेच्छा, दारू).]

माज(माझारीं) अ. आंत, मध्यें. In the middle.
[सं. मध्यः, मध्ये ; पा.प्रा. मज्झे ; का. मंझ ; कु. मु ; अ. माझे ; बं. माझे ; हिं. माझा, माहा, में ; सिं. मंझि,-माँ ; गु. माँ ; अकाम. मार्जी, माजघर, माझारीं (सं. मध्यकार, मध्याकार ; प्रा. मज्झआर ; बं. माझार ; हिं. मझार ; सिं. मंझारो ; सं. मध्यतर.]

माझें सर्व. ‘ मी ’ ह्या सर्वनामाचें षष्ठीचें रूप. My, mine.
[सं. मह्यम्, मदीयम् ; प्रा. मज्झं ; पं.हिं. मुझ ; सिं. मूंझों ; बि. बं. ओ. मो. मराठी वगैरे भाषांत षष्ठीरूप

लिङ्गनिघ्न विशेषणासारखें असल्यामुळें मूळ **मदीयम्** मानणें हेंच सयुक्तिक आहे.]

मांजर न. प्राणिविशेष, बिलाडी. A cat.

[सं. **मार्जार, √ मार्ज्, मृज्** = धुणें ; प्रा. **मंजार** (पुं), **मज्जर, माज्जार मज्जार** (पुं.स्त्री.), **वंजार** ; गु. **मांजर** ; हिं. **मंजर, मंजाड** ; सिंह. **मॅदिर** ; अकामप्रांतिक. **माँजर.** ह्या शब्दाच्या व्युत्पत्तिसंबंधीं बराच घोटाळा आहे. पारंपरिक व्युत्पत्ति वर दिली आहे. मांजर हें तोंडावरून पंजा फिरवून तोंडधुण्यासारखी कांहीं क्रिया करतें म्हणून **मार्ज्, मृज्** हा धातु मूळ असावा असें म्हणतात. प्राकृत **वंजार** हें रूप सूचक आहे. त्यावरून संस्कृत **वनचर** हा शब्द मूळ म्हणून मानावासा वाटतो. त्यानें सर्व भाषांतील शब्दांच्या नासिक्य वर्णाची नीट उपपत्ति लागते. वैसं. **मार्जार** शब्दाचा अर्थ **मोर** असा आहे. **मांजर** ह्या अर्थी वेदांत तो शब्द नाहीं. त्यावरून हा प्राणी प्राचीन आर्यांच्या परिचयाचा नसावा. हिंदुस्थानांत आल्यानंतर हा प्राणी दिसला असावा ; व शब्दहि त्या वेळींच संस्कृतमध्यें निविष्ट केला असावा. **मज्जर** असा एक आस्ट्रोएशियाटिक भाषांत शब्द आहे. **उन्दर, इन्दुर** वगैरे. आस्ट्रोएशियाटिक शब्द जसे वेदोत्तर संस्कृतमध्यें घेतले गेले, तसा हाहि घेतला गेला असला पाहिजे.]

मांजरपाट पुं. एक प्रकारचें कापसाचें जाड कापड. A kind of cloth.

[सं. मद्रिपट, (**मद्रीपोलम** येथें तयार झालेंलें), **मॅन्चेस्टर** (?) ह्या आंग्लग्रामनामावरून हा शब्द आला काय ?]

मांजा पुं. पतंगाच्या दोरीला लावण्याचा एक चिकट पदार्थ, (त्यावरून) दोरी. A paste composed of wax, oil and pounded glass.

[सं. **मज्जा** ; प्रा. **मिंज, मिंजा** ; हिं. **माँझा** ; सिं. **माँझो** ; गु. **माजो.**]

माट पुं. गोडानें तोंडास बसलेली मिठी. Distaste (due to too much sweetness).

[सं. **मिष्ट, √ मिष्.**]

माठ पुं. मातीचा घडा, रांजण. A broad earthen jar.

[सं. **मृद् + घट.** > **माअ + हट** > **माहट** > **माठ.**]

माठ(णें) उक्रि. रंधा मारणें; टाकीनें साफ करणें, दागिने वगैरे गुळगुळीत करणें. To make soft.

[सं. **मृष्ट** ; पा. **मट्ठो, मट्टो** ; प्रा. **मट्ठो** ; का. **मॉठु** ; अ. **माठिब** ; ओ. **माठिबा** ; पं. **माठण** ; हिं. **मट्ठा** = घासून गुळगुळीत केलेला ; सिंह. **मट** = चकचकीत ; **मदिनवा** = चकचकीत करणें ; अकाम. **माठ** = सपाट, चापट, खोलगट, मंदगति.]

माडी स्त्री. घरांतील वरील मजल्याचा भाग. An upper storey.

[सं. **मठिका** (?); देप्रा. **मडओ तथा मयडो** (आरामः), **माडिअंगृहं** (२२८·१२); प्रा. **मडिआ** ; हिं. **मन्ही.** माळी पहा.]

माडी स्त्री. दारूचा एक प्रकार, माडाचा चीक. The exudation of the cocoa-nut tree.

माँडी स्त्री. आई. Mother.

[सं. **अम्बा** ; अप. **अम्मडी** ; अकाम खानदेशी. **माडी.**]

माणिक पुं. (एक तांबडें) रत्नविशेष. A kind of jewel.

[सं. **माणिक्य** < **मणिः.**]

माणुस पुं. मनुष्य पहा. A man, a person.

मांड(णें) उक्रि. ठेवणें, व्यवस्थेशीर ठेवणें. To lay out or spread in order.

[सं. **मण्डयति** ; पा. **मण्डेति** ; प्रा. **मण्डेइ** ; का. **माण्डॅू** ; हिं. **मण्डना** ; पं. **मण्डणा** ; बं. **मंडण** = आच्छादन ; सिं. **मनणु** (चेपणें, रगडणें); गु. **माण्डवूँ** ; याकाम. **मांडणें** = विस्तारणें (ज्ञा. १५-१३८); अकाम. **मांड, मांडणी, मांडणूक, मण्डप, माण्डव.**]

मांड,–डी स्त्री. गुडघ्यापासून जांगाडापर्यंतचा शरीरावयव. The thigh.

[कान. **माण्ड.**]

मांडलि(ळी)क पुं. राजमंडळांतील एक राजा, दुय्यम राजा. A prince, a raja or ordinary potentate.

[सं. **मंडल + इक, √ मण्ड्.**]

मांडव पुं. मंडप, कार्यासाठीं केलेलें शोभेचें आच्छादन. An open shed erected for festive occasions.

[सं. **मण्डप** ; प्रा. **मंण्डअ, मंडव** ; हिं. **मडुवा, मंडवा** ; सिं. **मंडपु** ; गु. **मांडवी** ; सिंह. **मडवॅ** = झोंपडी ; अकाम. **मांडवी** = मूर्तीवरील सुशोभित चौकट.]

मांडा पुं. कणिकेचें एक पक्वान्न, खाद्यविशेष. A preparation of wheat-flour.

[सं. **मण्डः** (भाताचा थर), **मंडकः**; पा.प्रा. **मंडग-अ, मण्डो**; देप्रा. **मंडिल्लो**(अपूपः); का. **मनवोलु, मोण्ड**; कु. **मान्**; अ. **मार**; बं. **माड**, ओ. **मण्ड**; बि. हिं. **माँड**; पं. **मांड**; लां. **मन्न**; सिं. **मानी**; गु. **माडो** (बारिक थर).]

मात(णें) क्रि. फुगणें, बेफाम होणें. To be puffed up, to be inflated.

[सं. **मत्तः, मत्तकः**, √ **मद्**; पा.प्रा. **मत्त**; का. **मोतु**; कु. **मातो**; आ. **मातिब**; बं. **मात, माता**; ओ. **मातिबा**; हिं. **मातना**; पं. **मत्त**.]

मात स्त्री. बुद्धिबळांतील एक डाव. A term at chess, check-mate.

[अर. **मात्**; ह्या डावांत राजाला हत्तीनें शह देऊन कोंडतात.]

मात स्त्री. वार्ता, हकीकत, गोष्ट, बात. An event or occurrence.

[सं. **वार्ता**; गु. **वात, बात**; याकाम. **मात** (ज्ञा. १६-४३३); परंतु ही व्युत्पत्ति मान्य होणार नाहीं. सं. **मात्रा**; हा शब्द द्रावीडोद्भव आहे; कान. **मातु**= शब्द; तेलु. **माटा** = गोष्ट, भाषा.]

धर्मादिका चौही आंत । पुरुषार्थांची तैंची मात ॥ ज्ञा.१६-३३३.
गुपतिऐं जुवाळिकारूं । मातु सांगिते ॥ शिशुपा. व. ३५४.

मातट वि. मचूळ, माती मिसळल्यामुळें वाईट झालेला. माती पहा. Mixed with earth.

मातब्बर वि. प्रतिष्ठित, थोर, श्रीमान, अब्रूदार. Respectable, reputable.

[अर. **मुअतबर्**.]

मातम्पुर्सी स्त्री. दुखवट्याचीं भेटवस्त्रें. A gift of condolence.

[फा. **मातम्पुर्सी, मातम्**=दुःख, शोक; अर. **मअतम्**; पेकाम. **मातम** (रा. १-१८६), **मातङ्गपुर्शी** (होके.).]

माता स्त्री. आई, जननी. The mother.

[*IE*. Mater; सं. **मातृ**; *Av*. Matar; *Arm*. Mair; *Gr*. Meter; *Alb*. Motre; *Lat*. Mater; *Lith*. Mote; *Lett*. Mate; *Alb*. Mati; अकामसा. **मातोश्री** (**मातृ+श्री**).

मातावळा वि. वेडा. Foolish, silly.

[सं. **मत्त + वल**, √ **मद्**; याकाम. **मातावळा, माताई** = मस्ती, **माताइता**=माजरा, उन्मत्त (नरुस्व. ४८३).]

माती स्त्री. जमीनीचें पीठ, पृथ्वी. Earth.

[सं. **मृत्तिका**; पा. **मत्तिका**; प्रा. **मट्टिआ, मत्तिआ, मित्तिआ**; कु. **माटो**, अबंओ. **माटि**; हिं. **माटी, मट्टी, मिट्टी**; पं. **मिट्टी**; लां. **मट्ट**; सिं. **मिटी**; गु. **माटी**; अकामसा. **मातट** (सं. **मृत्तिका + कट**) = मचूळ, **मातेरें** (**मृत्तिका + कीर**) = माती मिसळलेलें धान्य. मराठी शब्द हा प्रा. **मट्टिआ** पासून नरमावून झाला नसून सं. '**मृत्तिका**'पासून सिद्ध झाला. कांहीं मराठी शब्द प्राकृत शब्द सिद्ध होण्याच्या पूर्वीच्या अवस्थेंतील आहेत. संस्कृत शब्दाचें एक निराळें स्वतंत्र असें प्राकृतीकरण झालें; त्यांपैकीं हे शब्द होत. किंवा एका प्रांतात **मट्टिआ** व दुसऱ्या प्रांतांत **मत्तिआ, मित्तिआ** अशी रूपें रूढ होतीं.]

मातु(तो)श्री स्त्री. आई, माता पहा. A term of reverence for mother.

मातेरें न. माती मिसळलेलें धान्य, माती पहा. Corn mingled with earth.

मात्रा स्त्री. उच्चाराचें परिमाण. Measure or time-limit in pronunciation.

[सं. **मात्रा**, √ **मा**, मोजणें; याकाम. **मात्रा** = आहार, कपडालत्ता, सामान; अकाम. **मात्रा** = अक्षरावरील ' ए ओ ' दर्शक तिरकस रेघ, रसायन, औषध.]

माथण-णी स्त्री. रुंद तोंडाचा मातीचा डेरा (ताक घुसळण्याचा), रांजण. A broad and spreading earthen jar.

[सं. **मृद् + स्थाली**, किंवा **मंथ्**; गु. **मथनी**; हिं. **मंथनी**; अकाम. **माथुलें**.]

माथुली स्त्री. मातीचें भांडें, मडकें, माथण पहा. An earthen jar or vessel.

माथा पुं. डोकें. The head.

[सं. **मस्त, मस्तिष्क, मस्तक**; पा. **मत्थो, मत्थको**; प्रा. **मत्थ, मत्थअ**; अ. **माथ, माथा**; बं. **माथा**; ओ. **मथा**; हिं. **माथ, माथा**; लां. **मत्था**; सिं. **मथु, मथो**; गु. **माँथू**. अकाम. **माथाकूट, माथेफोड माथोट, माथवणें** = स्नान घालणें (चांभाराच्या लग्नांत हा एक विधि आहे.).]

मादनें न. आंघोळ, सतैल स्नान. A bath.
[सं. मर्दनम्, पा. मद्द; प्रा. मड्ड; याकाम. मादन (सतैल स्नान); अकाम. मांदणें = चोपडणें (माजणें, मांजणें पहा.).]

मादी स्त्री. स्त्रीजात. The female (kind).
[फा. माद = स्त्री; पेकाम. मादवान (मादियान) = घोडी (रा. ७-१३८.).]

मा(म)ध्यान स्त्री. दुपार, मध्यरात्र: The mid-day, the mid-night,
[सं. मध्य + अह्न (अहन्) = दिवसाचा मध्य.]

मान स्त्री. ग्रीवा. The neck.
[सं. मन्या; अकाम. मानगूट.]

मान पु. आदर, पूज्यभाव दर्जा. Respect, regard, reverence, title.
[सं. मानः, √मन्; पा. मानो; प्रा. माण; का. अ. बं. हिं. मान्; पं. लां. माण; सिं. माणु; ने. मान्; अकामसा. मानकरी, मानधन, मानपान, मानमान्यता, मानाचें पान (मानाचें वस्त्र).]

मान(णें) सक्रि. विचारांत घेणें, स्वीकारणें, आवडणें, ऐकणें. To admit, to hold, to mind, to like, to care for.
[सं. मन्यते, पा. मञ्ञति; प्रा. मण्णइ; का. मानुँन्; कु. मानणो; अ. मानिब; बं. माना; ओ. मानिबा; हिं. मानना; पं. मनणा; लां. मन्नण; सिं. मानणु; गु. मानवूँ; ने. मान्नु.]

मानभाव पुं. चक्रधरप्रस्थापित पंथ किंवा त्याचा अनुयायी. A religious sect (started by Chakradhar.
[सं. महानुभाव.]

मानवळण स्त्री. न. वेढा, किल्यावरील पहारेकरी. पहारेंकरी. A siege, a guard on a fort.
[सं. मानवेली.]

मानस न. मन, हेतु, इच्छा. The mind, the heart, desire or inclination.
[सं. मनस्, मनसि भवम् – मानसम्; अकामसा. मानसपूजा, मानसिक.]

मानूसून् पुं. एक प्रकारचे वारे, (त्यावरून) पावसाळा.
[अर. मउसिम् > मोसम = काळ; मला. मूसिम; इट. मन्सोन; पोर्तु. मोंचाव; इंग्र. मॉन्सून.]

मांदगी स्त्री. आजार, सुस्ती, थकवा. मांदा पहा. Fatigue, weariness.

मांदण न. रुंद तोंडाचें मातीचें भांडें (गुऱ्हाळांत वापरतात.). A broad-mouthed vessel.
[सं. मृद् (?) किंवा म. मांदूस (सं. मञ्जूषा ?).]

मांदस स्त्री. सांपळा, मोठी पेटी. A chest, a large box.
[सं. मंजूषा; पा. प्रा. मंजूसा; सिंह. मदोस्; याकाम. शिकाम मांदुस (ज्ञा. १५-८३).]
लोहाची मांदुस केली ॥ दास. ७-१-३३.

मां(मा)दळ,–ळा पुं. मोठा मृदंग. An instrument.
[सं. मृदङ्ग; याकाम. मांदळ (ज्ञा. १-१३२).]

मांदा वि. मंद, आजारी. Sick, ill, languid.
[सं. मन्दः; पा. प्रा. मन्द; का. मोन्द; हिं. मान्द, माँदा; पं. मन्दा; लां मान्दा; सिं. मन्दो; गु. मांदो.]

मांदा(दो)डा,–ळा पुं. समूह, समुदाय, मांडव. A crowd, a group, a shed.
[सं. मंडल (?); याकाम. मांदाडा (नरुस्व. ८०९) = झुंबाड (ज्ञा. १५-६०); मांदियाळी (ज्ञा. १८-१७९७); बकाम. मांदाडा (भा. अ. १०-६०६); अकाम. मांदी; ग्रामीण. मायदंळ.]

मांदियाळी स्त्री. गर्दी, समुदाय, मांदी पहा. A crowd.

मांदी स्त्री. समूह, जमाव, रचना. A crowd.
[सं. मंड् १० शोभायाम्, मंडल; याकाम. मांदी (ज्ञा. ८-५६); अकाम. मांदें = समूह.]

मांदें न. प्राण्याची चरबी. Animal fat.
[सं. मेद.]

माप न. वजन, मान. Measure.
[सं. माप्य; √मा; पा. मापेति; प्रा. माविअ; प्रा. माप्प; अ. बं. माप्; ओ. माप; हिं. माप (पुं. स्त्री.); पं. माप् (पुं); सिं. मापु (पुं); अकाम. मापणें, मावणें, मापटें (एक माप).]

माफ वि. क्षमा केलेला, क्षान्त, सूट. Pardoned, forgiven.
[अर. मुआफ्.]

माफक वि. बेताचा, नेमस्त, अनुकूल. Suitable, agreeable.
[अर. मुआफिक्; पेकाम. मवाफीक, (रा. १५-१६७), माफक (दिमरा. १-७५).]

माफकत स्त्री. पसंती, सोय. Liking, convenience.
[अर. मुयाफकत; पेकाम. माफिकत (रा. ७ १२०).]

माफ(व)जत, मावजत स्त्री. दक्षता, बंदोबस्त, जपणूक, संरक्षण. Taking care of, heeding.
[,अर. मुवाफजत्; पेकाम. माफजत (दिमरा. २-९५).]

माभळभट पुं. गबाळ्या भटजी, गबाळया माणूस. A slovenly and untidy person.
[सं. महावलभट्ट. कृष्णास मारण्यास गेलेला भटाच्या वेशांतील राक्षस).]

मामला,-त पुं. स्त्री. वसुलाचा प्रांत, वसुलाचा अधिकार, कार्य, गोष्ट. A business, an undertaking, a territory over which revenue is to be collected.
[अर. मुआमलत्, मुआमला = कारभार; पेकाम. मामला (रा. १६-४३.) मामलतदार (मु-अमलतदार).]

मामा पुं. संबधवाचक शब्द, आईचा भाऊ, सासरा (ल.). A maternal uncle.
[सं. माम (मित्र, सुहृद्), मामकः (चुलता), मामक; पा. मामको, मामिका (आई); प्रा. माम, मामअ; कु. बं. ओ. हिं. मामा; पं. माम्मा; लां. मामा; गु. मामो; सिं. मामो, मामु; अकाम. मामी, मावळा, मामंजी = सासरा; देप्रा. माम, मामिग, माअवल = मावळा; देप्रा. मम्मि मल्लाणी, मामी त्रयोप्यमी मातुलानीवाचकाः (२२२-१५).]

मामुल पुं. साधारण वहिवाट, चाल, रीत. Custom, usage.
[अर. मअमूल्; पेकाम. मामूल (दिमरा २-९६).]

माय स्त्री. आई. Mother.
[सं. मातृ; प्रा. माउआ (< मातृका); सिं. पं. हिं. माऊ; याकाम. माय (ज्ञा. १६-२४).]

मायंदळ वि. पुष्कळ मांदी पहा. Many, much, abundant.

मायफळ न. फलविशेष, औषधिविशेष. A gall-nut.
[सं. मायुफल; पा. मायु; व. माजु; हिं. पं. माजू; हिं. माफक; माजूफल; सिं. माओ; फा. माझु.]

मायवणी स्त्री. कुलीन स्त्री, गर्भार स्त्री. A lady, a gentle-woman, a pregnant woman.
[सं. मातृ + विन् (?); महावर्णिनी; याकाम. मायवणी (ज्ञा. १६-१४४).]

मायना पुं. संप्रदाय, अभिप्राय, हेतु, आशय, धोरण. Meaning, significance.
[अर. माना, मअना; पेकाम. मायना.]

१माया स्त्री. अवसर, जागा, पुंजी. Space, stock.
[सं. मा ३ माने; फा. मायाह् = पुंजी.]

२माया स्त्री. दया. कृपा, वात्सल्य. Kindness, affection.
[सं. माया; अकामसा. मायाळू.]

३माया स्त्री. जादू, चमत्कार, आश्चर्य, सामर्थ्य. Illusion, wonder, power.
[वेसं. माया = सामर्थ्य. पुढें अर्थभेद निर्माण झाला.]

१मार पुं. आघात, त्रास, वार. A stroke, affliction.
[सं. मारी, मारः; प्रा. मारि, मार; का. मार्; बं. मार्; हिं. मार्; पं. मार् (स्त्री); सिं. मार; गु. मार; अकाम. मारा; सं. मारकः; पा. मारको; प्रा. मारग; हिं. मारा; सिं. गु. मारो.]

२मार अ. पुष्कळ, अतीशय. Much.
[कान. मार् = वावभर अंतर, फार अंतर. " त्यानें मार जमीन नांगरली "]

मार(णें) सक्रि. आघात करणें. To strike, to kill.
[सं. मारयति; पा. मारेति; प्रा. मारेइ; का. मारुन्; कु. मारणो; अ. मारिब; बं. मारा; ओ. मारिबा; हिं. पं. मारना; लां. मारणा; सिं. मारणु; गु. माँरवूँ; ने. मार्नु; अकामसा. मारामारी, माराहाण, मारा, माराकुटी (मार + कुट).]

मारवाड पुं. देशनाम. The name of a country.
[सं. मरु(आ)वर्त > मारवाड.]

माराकुटी स्त्री. बेदम मार, शिकस्त. मारणें पहा. Beating and buffetting, extreme effort.

माराणु पुं. विष्णु, लक्ष्मीचा पति. The god Vishnu.
[सं. मा (लक्ष्मी) + राणा.]

मारांक पुं. शस्त्र, बाण. An arrow, a weapon.
[सं. मार + अञ्च् (=जाणें) > माराच > माराक ; याकाम. मारांक (नरुस्व. ३०७).]

मारुती पुं. हनुमान्, वायूचा पुत्र. *Hanuman.*
[सं. मारुत् = वारा. मारुत्चें अपत्य.]

मारूं वि. उत्तम, सुंदर, Beautiful, goodly looking.
[फा. माह् = चंद्र, रूं = चर्या, मुख; मारूं = चंद्राच्या मुखासारखें सुंदर.]

मार्गशीर पुं. एका महिन्याचें नांव. The name of a month.
[सं. मृगशिरस् (नक्षत्र).]

मार्फत स्त्री. मध्यस्थ, गुजारत, ओळख. Instrumentality.
[सं. मुआरफत् ; पेकाम. भारफत, मार्फत (रा. १-३०)]

माल पुं. सामान, वित्त, द्रव्य, संपत्ति. Property, possession, wealth.
[अर. माल्, माल = जमीन ; अकामसा. मालकटनी, मालकाटी, मालचाटी=उपगुरु; मालमसाला, मालमिळकत मालमुद्दल.]

मालक पुं. धनी. An owner.
[फा. मालिक् ; याकाम. मालैक (शिशु. ७२६.).]

मालकइ,-कै स्त्री. गोष्ट. An article or a thing.
[अर. माल (?) ; याकाम. मालकई.]

मालखंड पुं. कुस्तीचा आखाडा, युद्धाची भूमि, साखरेचा एक पदार्थ. An arena for wrestling, a sweetmeat.
[सं. मल्लखंड ; (किंवा अर. माल् + खंड) ; भिन्नभाषीय शब्दांचा समास.]

मालगंठी स्त्री. धोतर नेसण्याचा प्रकार, घट्ट कास घालणें. A manner of wearing a dhotee, girding up the loins.
[सं. मल्लग्रंथी ; याकाम. मालगंठी.]

मालपुवा पुं. पक्वान्नविशेष, घृतशर्करामिश्र तळलेलें पीठ. A kind of sweet-meat, a sort of rich and light pancake.
[अर. माल् ; हिं. मालपुआ.]

माल(ल्ह)व(णें) सक्रि. विजवणें, संपणें, नाहींसें होणें. To extinguish, to expire.
[सं. म्लै > म्लाय > मालव.]

मालाति(थ)(णें) अक्रि. मल्लविद्येनें लढणें. To wrestle.
[सं. मल्ल्, मल्लायित + ल > मालाइत + ल् > मालाति (थ,थि) ल; याकाम. मालाथिणें.]

मालीमर्दन न. मालीश. Shampooing.
[सं. मल्लमर्दनम्, याकाम. मालीमर्दन ; मल्लाली, माली = न्हावी.]

मालु(लू)म वि. माहीत असलेला, ज्ञात. Known.
[अर. मअलूम्.]

माल्हात(णें) क्रि. स्वीकार करणें, जवळ करणें, पेंच घालून कवेंत पकडणें. To accept, to catch on the hip.
[सं. मल्ल् = जवळ करणें ; याकाम. माल्हातणें (ज्ञा. १४-१७९).]

माव(णें) क्रि. सामावणें. To include, to cover.
[सं. मा > णिच्-मापय ; प्रा. माअइ, हिं. माना ; गु. मावूँ ; सिं. माइणू.]

माव स्त्री. कपट, लबाडी, माया पहा. Deceit, illusion.

मावंदें,-धें न. यात्रेहून आल्यानंतरचा गंगापूजनाचा विधि. A religious observance after a pilgrimage.
[सं. मावद (?) ; कानडी शब्द आहे काय ?]

मावशी स्त्री. नातेंवाचक शब्द, आईची बहीण. A maternal aunt.
[सं. **मातृश्वसा, मातृष्वसृका**; पा. **मातुच्छा**; प्रा. **माउस्सी, माउस्सीआ, माउच्छा, माउच्चा**; देप्रा. **माउच्चा**; हिं. **माउसी, मासी**; पं. **मास्सी**; लां. सिं. गु. **मासी**; ने. **मुसेद**.]

मावळा पुं. आईचा भाऊ, मामा पहा. A maternal uncle.

माशी स्त्री. घरांतील उडणारा कीटकविशेष. A housefly.
[सं. **मक्ष, मक्षा, मक्षिका**; पा. **मक्खिका**; प्रा. **मक्खिआ, मच्छिआ**; का. **माछी**; पं.प. **मछी**; कु. **माखी**; अ. **माखी**; पं. **मक्खी**; बं. ओ. **माछी**; सिं. **मखी, मखो**; गु. **माख, माखी,–माखो** (पुं.); सिंह. **माखा, मस्सा**; हिं. **माखी, माछी**; ह्या शब्दाचीं निरनिराळ्या भाषांत झालेलीं रूपांतरें चिन्त्य आहेत. कांहीं भाषांत सं. **क्ष** वर्णाचें रूपांतर '**ख**' मध्यें तर इतर कांहीं भाषांत छ, '**श**' मध्यें झालेलें दिसतें. प्राकृतमधील जीं दोन स्वरूपें दिलीं आहेत तीं दोन भिन्न प्रांतांतील असावींत व त्यांचाच अवशेष इतर प्रांतांतील शब्दांच्या रूपांत उतरला असला पाहिजे. कुमाऊन, पंजाब, आसाम, सिंध, गुजराथ, सिंहलदेश ह्या प्रांतांत '**ख**' अन्वित रूप आहे. हिंदीच्या मध्य प्रांतांत मात्र दोन्हीं रूपें आढळून येतात. नकाशांत हे दोन्हीं भाग पाहिले म्हणजे प्राकृत भाषांचे '**छ**' विशिष्ट गट व '**श**' विशिष्ट गट असे दोन भाग दिसतील. बाह्यप्राकृत व आंतर् प्राकृत असे जे दोन गट डॉ. ग्रियरसननें पाडले आहेत त्यांवर ह्या असल्या शब्दांच्या रूपांतरानें चांगला प्रकाश पडण्यासारखा आहे.]

माषूक वि. प्रिय, प्यारें, सुंदर, आवडतें, कोमळ Dear, beloved.
[अर. **मअशूक**; फा. **माशूक** = प्रेमिका.]

मांस,–मास न. शरीरांतील घट्ट पदार्थ. Flesh.
[सं. **मांस, मासम्**; पा. प्रा. **मास, मंस**; का. **मास्, माझ्**; कु. **मासु**; हिं. लां. **मास्** (पुं); सिं. **मासु, माहु** (पुं.); गु. **मांस** (न).]

मास पुं. महिना. A month.
[सं. **मासः**; पा. प्रा. **मास**; पुं. फा. **माह** = चंद्र; का. **मास्** (पु.); अ. **माह**; बं. **मास**; ओ. **मास**; बि. हिं. **मास्** (पु.); लां. **माँह्**; सिं. **माँहु**; गु. **मास**; **माहे, माह, महिना** हे शब्द निराळे आणि ते फा. **माह्** = चंद्र ह्या शब्दापासून आले आहेत.]

मासला पुं. नमुना, डौल, रुचि, उदाहरण. A specimen, a sample.
[अर. **मसल**.]

मासा पुं. पाण्यांतील कीटक. A fish.
[सं. **मत्स्यः**; पा.प्रा. **मच्छ**; का. **माछ्**; कु. **माछो**; अ. **मास**; बं. **माछ**; ओ. **माछ**; बि. **माछली**; हिं. **माछ, मछली**; पं. **मच्छ्**; सिं. **मछु**; गु. **माछली**; म. **मासळी**.]

माह पुं. महिना, मास. A month.
[फा. **माह्** = चंद्र.]

माहसरा पु. वेढा. A siege.
[अर. **महसूर** = वेढलेला.]

माहाग वि., फार किंमत पडणारा. Dear.
[सं. **महा + अर्घ** = मोठ्या किंमतीचें.]

माही(मरातब) स्त्री. छत्र, उंच छत्री. Certain honours given to princes, a canopy, an umbrella.
[फा. **माह्, माही मरातिब्** = मत्स्य व दोन गोल सोन्याचे मिळून होणारें बिरुद. तें हत्तीवरून मिरवीत नेत. हा मान फक्त राजे व मातब्बर सरदार ह्यांचाच असे. ह्या शब्दाच्या अर्थांत सामान्यीकरण झालें आहे.]

माहीत वि. परिचित, दखलगिरी असलेला. Known, acquainted, familar.
[अर. **माहीयत्**; पेकाम. **माहीयेत, माहीत** (रा. १२-१११).]

माहुटी स्त्री. घराच्या छपरास शेवटीं बांधलेली आडवी पट्टी. The cross piece that passes along the extremity of a roof.
[सं. **मुखवटी > मुहवटी > मोहटी > मोटी**.]

माहूत पुं. हत्ती हांकणारा. An elephant driver or keeper.
[सं. **महामात्रः**; प्रा. **महाआत्त**; हिं. **मंहावत, माहूत, महात**; संस्कृत मूळ जरा चिन्त्य आहे. कारण त्याचा संस्कृतमध्यें अर्थ भिन्न आहे व त्या अर्थास भेद होऊन प्रचलित अर्थ कसा उत्पन्न झाला हा प्रश्न आहे.]

माहेर न. (लग्न झालेल्या बाईच्या) आईबापाचें घर. The parent's house, maternal residence of a married girl.
[सं. **मातृगृह**; प्रा. **माइघ(ह)र**; गु. **माहीरं**.]

माहेवणी स्त्री. गरोदर स्त्री, जिला कांहीं दिवस लोटले आहेत अशी स्त्री, रजःस्वला स्त्री. A pregnant woman.
[सं. **मास** ; फा. **माह.** किंवा सं. **महावर्णिनी.**]

माळ स्त्री. माला, माळा. A garland, a wreath.
[सं. **माला**; पा. प्रा. **माला**; का. **माल्**; ओ. **माळी**; (सं. **मालिका**; प्रा. **मालिआ**); हिं. **माल**; अकाम. **माळका** (सं. **मालिका**); **माल्यम्** असें एक मूळ टर्नर सुचवितो परंतु तें ग्राह्य नाहीं. त्यांत लिंगभेद होतो व अर्थभेदहि होतो. **माल्यम्**=फूल; **माळ**=हार.

माळी, माडी स्त्री. दुसरा मजला, जिना असलेली घराची बाजू. A storey.
[कान. **माळिगे**=घर, वरची बाजू, मजला; सं. **माल**=पठार; देप्रा. **मालो, मञ्चः** (२३४-१४६); प्रा. **माल**(पुं.); गु. **माळ, माळो**=मजला; अकाम. **माळवद, माळा माळेकार**=शेतांतील माळ्यावर बसणारा.]

माळी स्त्री. झाडाची आडवी फांदी, डोंगराच्या पठारावरील पेरतां येण्याजोगी जमीन. A branch, cultivable land on a hill.
उपनिषदर्थाची माळी। माजी खांडिली ॥ ज्ञा. १८-३५.

माळ पुं. डोंगराळ जागा, नापीक जागा. A plain.
[कान. **मल**=डोंगरी मुलुख; अकाम. **माळरान**=माळाचें रान.]

मिचक(णें) क्रि. डोळ्याची मिष्किल रीतीने उघडझांक करणें. To close and open (an eye).
[सं. **मिष्**; प्रा. **मिंचण**; देप्रा. **मिंचण चक्षुःस्थगन** (१२१-१२); हिं. **मीचना** (बंद करणें); पं. **मीचना**; गु. **मीचवूँ**; अकाम. **डोळे मिचिमिची**; बलूची–**मिचक** (डोळ्याच्या पांपणीची उघडझांप). द्राविडी मूळ असावें. कान. **मिंचू**=लकाकणें, **मिटकिसु**=डोळे अर्धे उघडे ठेवून पहाणें; ते. **मीचु, मिकि**; सं. **मिषति** हें रूप नंतरचें असावें.]

मिचकूट वि. अस्पष्ट, एकांत एक गुरफटलेलें, गिचमीड. मसी पहा. Indistinct.

मिचमिच स्त्री. गडबडीनें खातांना तोंडाचा (ओंठाचा) होणारा आवाज. The sound emitted in eager eating.
[सं. **चम्**–वर्णव्यत्ययानें **मच्** किंवा ध्वनिशब्द.]

मिजास स्त्री. गर्व, तांठा, ऐट, डौल. Airs and affectation.
[अर. **मिझाज्.**]

मिट(णें) क्रि. झाकणें. To close (the eyelid).
[सं. **मिथ्**; प्रा. देप्रा. **मिट**; बं. **मिटिया**; ओ. **मिटिमिटि**; पं. **मीटणा**; सिं. **मिटाइणु**; गु. **मिट्** (स्त्री.). ह्याचेंहि मूळ द्राविडी असावें. कान. **मिटकिसु**=डोळे मिचकणें; ते. **मिकि, मीचु**; ह्याच्याशीं मराठी धातु संबद्ध दिसतो.]

मिट(णें) क्रि. नाहींसें होणें, एकमत होणें, बंद होणें. To disappear, to agree.
[सं. **मृष्ट,√मृज्**; प्रा. **मेटावइ, मिटावइ, मिटिज्जई**; अ. **मिटिबा, मेण्टिबा**; हिं. **मिटणा**; सिं. **मेटणु, मिटणु**; गु. **मिटवूँ.**]

मिठा वि. गोड, चविष्ट. Sweet.
[सं. **मिष्टः, मृष्टः** (गोड, स्वच्छ); पा. **मिट्ठो**; प्रा. **मिट्ठ, मट्ठ**; का. **म्युथु**; पं. प. **मिट्ठु**; अ. बं. ओ. **मिठा**; हिं. **मीठा**; पं. लां. **मिट्ठा**; सिं. **मिठो**; गु. **मिठूँ**; ने. **मिठो**; अकाम. **मिठी बसणें.**]

मिठी स्त्री. पकड, आलिंगन, भेट. Clasp, embrace.
[सं. **मिथ्.**]

मिणमिण अ. अंधुक अंधुक. Dimly.
[ध्वनिशब्द.]

मिति स्त्री. परिमाण, संख्या. Measure.
[सं. **मा** (मापणें) + **ति, मित**=मोजकें.]

मित्र पुं. स्नेहि, सुहृद्. A friend.
[सं. **मित्र**(न.); पा.प्रा. **मित्त** (पुं. न.); कु. **मीताइ**; का. **मेठर**; अ.बं. **मिता**; ओ. **मित**; हिं. **मीत्**; पं. **मित्राई**; सिं. **मिटु.**]

मिथ्या वि. अ. खोटें. False.
[सं. **मिथ्या.**]

मिथुन न. जोडी. A couple, a pair.
[सं. **मिथुन,√मिथ्**, **मैथुन**=भोग.]

मिन(णें) क्रि. एकत्र होणें. To mix up, to gather together.
[सं. मिल् ६ संगमे, मिव् १ सेवायाम्, मिन्वति.]

मिनतवारी स्त्री. मनधरणी, विनंती. Earnest entreaty, request,
[अर. मिन्नत = कृपा, उपकार.]

मिना पुं. कांच, कांचेचा मुलामा. Glass.
[फा. मीना.]

मिनिट न. एक तासाचा साठावा भाग, थोडा वेळ. A minute.
[*Lat.* Minuo, minutus, minutum; *Of.* Minute; *Eng.* minute.]

मिरची,मिरी स्त्री. एक वनस्पति (तिखट व लांबट). Chili-pepper.
[सं. मिरिका (उत्तरकालीन); हिं. सिं. मिरी; गु. मरी; म. मिरिशेंग–मिरीसारखी तिखट शेंग; कान. मरिच; ते. मिरिय, मिळगु; सं. मरिच; पा. मरिचो; प्रा. मिरिय, मरिअ, मिरिअ; सिंह. मिरिस्; बं. मिरी; हिं. मरीच, मिरी, मिर्च; पं. मिरिच, मिर्च; सिं. मिरी, मिरई; गु. मरी (नपुं.).]

मिरास स्त्री. वतन, वडिलोपार्जित इस्टेट. An hereditary office.
[अर. मीरास, मीरासी, मीरासदार; √ मरिस् = वडिलोपार्जित येणें; पेकाम. मिरास (रा. ८-४९).]

मिर्धा पुं. गांवांतील एक अधिकारी. A village-officer.
[फा. मिर्दह.]

मिलाप पुं. ऐकी, मिसळ. Mixing up together.
[सं. मिल्; पाप्रा. मिळ; म. मिल + आप].

मिशन न. एक विशिष्ट कार्य करण्यासाठीं काढलेली संस्था. A mission.
[*Lat.* mitto, Missus; Missionem = a sending off; *Fr.* Mission.]

मिशी स्त्री. वरील ओंठावरील केंसाची लंव. Moustaches.
[सं. श्मश्रु; प्रा. मंसू; देप्रा. मासुरी; का. मोशी; अकाम. मिसरूड, मिसरूं.]

मिष्कील वि. बेरकी, वरून गरीब परंतु अंतर्यामी धूर्त. Cunning, deceitful.
[अर. मिस्कीन् = गरीब; म. मिसकील. शब्दाचा अर्थभेद झाला.]

मिष्ट वि. गोड, चवदार. Sweet.
[सं. मिष्ट (निष्ठा), √ मिष्.]

मिसळ(णें) उक्रि. एकमेकांत शिरणें, एक होणें. To mix or mingle.
[सं. मिश्र : मिश्रयति; पा. मिस्सेति; प्रा. मिस्सइ; कु. मिसणो; आ. मिहलिब; बं. मिसा; ओ. मिसिबा; सिं. मिसो. देप्रा. मिसालिअ असें रूप हेमचंद्र देतो. त्यावरून सं. मिश्रितम् असें निष्ठारूप असलें पाहिजे हें उघड आहे.]

मिस्त्री पुं. कौशल्याचें काम करणारा, सुतार, लोहार, गंवडी ह्यांवरील मुख्य. A mistry.
[*Portu.* Mestre; *Russ.* Master. = skilled workman.]

मिस्त्री,-श्री स्त्री. खडी साखर. Sugarcandy.
[इजिप्सियन-मिस्त्रि, < मिश्र < मिझ्रइम्. तेथून ह्या जिन्नसाचा पुरवठा होत असे. म. सालंमिश्री, सफेतमिश्री.]

मि(नि)स्सळ, स्त्री. कागदपत्र, खटल्यांतील पुराव्याचे कागद, हुकुम, व्यवस्था. Documents (in a case).
[अर. मिस्ल्. = साम्य.]

मिहुडें न. मेघ, लहान मेघ. A cloud.
[सं. मेघ; प्रा. मिहु, मिहो; याकाम. मिहुडें (ज्ञा.); 'ड' अल्पार्थे प्रत्यय.]

मिळ(णें) क्रि. भेटणें, प्राप्त होणें. To meet, to obtain, to secure.
[सं. मिलति, मेलापयति; प्रा. मिलइ, मेलावइ; का. म्युलुन् (भोगणें); कु. मिलणो; अ. मिलिब; बं. मिला; ओ. मिळिबा, हिं. मिलना; पं. मिलणा; लां. मिलण; सिं. मिरणु; गु. मळवूँ, मेळववूँ; ने. मिल्नु.]

मिळकत स्त्री. प्राप्ति, लाभ, फायदा, नियमित मिळणारें द्रव्य. Gain, profit, emolument.
[अर. मिल्कत्.]

मी सर्व. प्रथम पुरुषवाचक सर्वनाम. ‘I’.
[सं. **अहम्**; महा.प्रा. **अहम्मि, अम्मि, म्मि**; प्रा. **मइ, मे**; अप. **हं, ह, हुँ, हउं, आमी**; याकाम. **मी, मीं**; हिं. **मैं, मे**; ओ. **मुं**; गु. **हूं**; सं. **मया**; महाप्रा. **मए, मइ**; अप. **मइँ**; याकाम. **मिया, मियाँ**; अकाम. **म्यां, मीं**; हा शब्द फार महत्त्वाचा आहे, सर्वभाषांत आर्यभाषा ही आदिम व प्राचीनतम; आर्यभाषेंतील सर्व शब्दांत सर्वनामें प्राचीनतम शब्द; सर्वनामांत प्रथमपुरुषवाचक सर्वनामें प्राचीनतम; त्यांत पुनः **मीं** किंवा **अहम्** हें प्राचीनतम. सर्वभाषांत हा अत्यंत जुना शब्द आहे. त्यांतहि पुनः हें सार्वनामिक बीज आहे. ह्या त्याच्या प्राचीनतमत्वामुळेंच त्याचें महत्त्व विशेष आहे. मराठींत **मी** आणि **मीं** अशीं दोन रूपें आहेत. एक प्रथमाविभक्तीचें व दुसरें तृतीयाविभक्तीचें एकवचनी रूप आहे. ‘सं. **मयि**’ पासून ब्लोक व्युत्पादितो तें चिन्त्य आहे व तें ग्राह्य धरलें तर अर्थभेद मानावा लागेल. प्रा. **मइ, म्मि** हीं रूपें मूळ समजणें हें अधिक शास्त्रीय आहे. व हीं रूपें देप्रा. असावींत व चोलीभाषेंत उतरलीं असावींत असें मानणें हें सयुक्तिक होईल. **मह्यं, मदीयं** > माझें.]

मीन पुं. मासा. A fish.
[द्रा. **मिचु** = चकाकणें. पारंपरिक दृष्टीनें हा शब्द संस्कृत समजतात. परंतु संस्कृतमध्यें तो इतर भाषेमधून आला आहे. ऑस्ट्रोएशियाटिक शब्द असून वेदकाळीं त्याचा समावेश संस्कृतमध्यें केला गेला. **पिक, नेम, मयूर** वगैरे शब्दांचा परकी म्हणून निर्देश जैमिनी व पतंजली ह्यांनीं सब्दाधिकरणांत केला आहे त्यांपैकीच हा शब्द आहे.]

मीस न. ढोंग. Affectation.
[सं. **मिष**, प्रा. **मिस**; याकाम. **मीस** (नरुस्व. ३२७).]

मुक(णें) सक्रि. गमावणें, त्याग होणें, वियोग होणें. To lose.
[सं. **मुक्त**, √ **मुच्**; पा. **मुत्तो**; पा. प्रा. **मुक्क**; अप. **मुक्क**; का. **मोकुलु**; अ. **मुकलि**; ओ. **मुकुला** पं. **मुक्कणा** (= शेवटास जाणें); लां. **मुक्कण**; सिं. **मुको**; गु. **मुकवूँ**; म. **मुक**; हें रूप संस्कृत निष्ठारूपापासून सिद्ध झालें. **मोकळा (मुक्त + ल, मुत्त + ल, मुक्क + ल)**.]

मुकणा(हत्ती) वि. दन्तहीन Tooth-less.
[सं. **मत्कुणः** (= ढेंकूण, दन्तविहीन हत्ती); का. **मोकुन्**; बं. **माकुंदन**; बि. **मकुना**; सिं. **मकनो**; गु. **माकण** (ढेंकूण); **मत्कुणः, उत्कुणः** (ऊ किंवा ढेंकूण); देप्रा. **ढेंकूण, ढंकुण**.]

मुकदम पुं. कामकऱ्यांवरील मुख्य, शिपायांवरील मुख्य. The supervisor of the labourers, the *muccadum*.
[अर. **मुकद्दम** = मुख्य मनुष्य; हिं. **मुकद्दम**.]

मुकदमा पुं. खटला, कज्जा. A suit.
[अर. **मुकद्दम** = कार्य.]

[१]मुकटा पुं. मुगूट, तुरा. A crest.
[सं. **मुकुट**; सिं. **मोड्ड**; म. **मोड** (वर आलेला देंठ).]

[२]मुकटा पुं. सोवळयाचें एक रेशमी वस्त्र. A silk wear.
[कान. **मुकटा**; सं. **मूतकः**; √ **मू** = विणणें.]

[१]मुका वि. न बोलतां येणारा. Dumb.
[सं. **मूक**; प्रा. **मुख, मुअ**; देप्रा. **मूअल्लो, मुअलो, मूकः** (२३१–१६).]

[२]मुका पुं. चुंबन. A kiss.
[सं. ?; देप्रा. **मुका** (?).]

मुकाबला पुं. लढाई, गांठ, भेट, पडताळा, रुजुवात. Confronting, comparing.
[अर. **मुकाबला**; पेकाम. **मुकाबला, मुकाबिला** (खरे ८-४३२५).]

मुक्काम पुं. वस्ती, उतरण्याची जागा, बिऱ्हाड. A place of halt, an encamping ground.
[अर. **मुकाम**.]

मुक्रर वि. निश्चित, कायमचा. Fixed, determined.
[अर. **मुकर्रर्**; पेकाम. **मुक्रर**.]

मुख न. तोंड, चेहरा. Face, mouth.
[सं. **मुख**; अकामसा. **मुखोटा** (सं. **मुखपट्ट**), **मुखी, मुखर, मुखरीण** (मुख्य, पुढारी).]

मुखत्यार पुं. सर्वाधिकारी, प्रतिनिधि. A dictator, a representative, an attorney.
[अर. **मुख्तार**.]

मुग, मूग पुं. धान्यविशेष. A kind of grain.
[सं. **मुद्गः**; पा.प्रा. **मुग्ग**; देप्रा. **मुग**; अ. **मुगा**; बं. **मुग**; ओ. **मुग**; बि. हिं. **मूंग**; पं. **मुग्ग**; लां. **मुङ्ग**; सिं. **मुङु**; गु. **मग**; सिंह. **मुङ्**.]

मुगदाण न. वेसण, नाकांत घालण्याची दोरी. A noose.

[कान. मूग = नाक ; दाण < दामन् (सं. मुखदामन् > मुगदण).]

मुगुट पुं. डोक्यावरील भूषण, शोभेचें शिरस्त्राण. A crown.

[सं. मुकुट.]

मुग्दळ न. पहिलवानाची फिरविण्याची जोडी. A wrestler's club.

[सं. मुद्गर; हिं. मुग्दर.]

मुंगा पुं. घोड्याचा एक रोग, किडा, गर्व, उन्मादचेतना. A disease of horses, itching.

[देप्रा. मुअंगी ; म. मुंगी (उन्मादचेतना).]

मुंगी स्त्री. कीटिका, लहान कीटक. An ant.

[सं. ? ; देप्रा. मुअंगी, मुइअंगा, मुइंगलिआ; म. मुंगळी (देप्रा. मुइंगलिआ).]

मुंगूस न. प्राणिविशेष, नकूल. A mongoose, ichneumon.

[सं. मद्गुशः ; देप्रा. मंगुसो, मुग्गुसू, मुग्गसो (नकुलः); तेलगू. मंगीसु किंवा मुंगीस ; कान. मुंगुरी ; मुंगळा, मुंगी, मुंगुस, मंग (वानर) हे सर्व शब्द परस्परसंबद्ध आहेत. ह्याचें मूळ आस्ट्रोएशियाटिक असावें. उत्तर हिंदुस्थानांत ह्या प्राण्याला हिं. नेवळ, निऊला म्हणतात. संस्कृतमधील ' मक्षु ' (जलद धांवणारा–हलणारा) ह्या शब्दापासून व्युत्पादितात परंतु तें ग्राह्य नाहीं. अरबी. बिंत अरूस = नवरी मुलगी. इजिप्त. कित्त, कत्त, फराउन = फॅरोचें मांजर.]

मुचल्का पुं. जामीन, लेखी प्रतिज्ञापत्र, जामीनपत्र, वचनपत्र. A written engagement under penalty.

[तुर्की (मोंगल). मुचल्का ; हिं. मुचलका, मुचल्क.]

मुजरत वि. मुद्दाम, खास. Expressly, positively.

[अर. मुजर्रद् ; पेकाम. मुज्रद (रा. १५-११७).]

मुजरा,-त्रा पुं. वंदन, नमस्कार, रामराम. Respects, salutation.

[अ. मुज्रा = रूढ ; खालच्या दर्जाच्या लोकांकडून केलें जाणारें वंदन.]

मुजावत वि. अधिक, देणगीसंबंधीं (खर्च). (Expenditure) on account of presents.

[फा. मुजाफत.]

मुजारद स्त्री. शिष्टाचार, आर्जव, मनधरणी. Courtesies, civilities, entreaty.

[अर. मुदारत् ; पेकाम. मुजारद–त (भाकै. ४).]

मुजावर पुं. मशीदींतील सेवेकरी. A servant of a mosque.

[अर. मुजाविर्.]

मुजाहीम पुं. अडथळा, प्रतिबंध. Obstruction, hindrance.

[अर. मुझइम् ; पेकाम. मुजाहीम (रा. १५-११७).]

मुंच(णें) क्रि. सुटणें, मुक्त होणें, मुकणें, सोडणें. To be free or released.

[सं. मुंच् ६ मोचने.]

मुंज स्त्री. एक धार्मिक विधि, उपनयन संस्कार. The ceremony of investing a Brahmin boy with sacrificial thread.

[सं. मुंजा–मौंजी. मुंजा नांवाच्या गवताची मोळ बटूच्या कमरेस बांधतात.]

मुटका पुं. लहान गोळा (मुठींतील), ठोसा, बुक्का. A gentle blow (with a fist).

[सं. मुष्टि+क, मुट् १ मर्दने ; कान. मुटगी ; अकामसा. मुटकुळा, मुटकें, मुटकणें (हलुहळू बुक्क्या मारणें), मुटला (सं. मुष्टिल) = थिजलेल्या पदार्थांचा गोळा.]

मुडदा पुं. प्रेत. A dead body, a corpse.

[फा. मुर्दा ; सं. मृतदेह (?); अकामसा. मुडदार,-ड (फा. मुर्दार) = कुजलेलें मांस ; मुडदेफरास (फा. मुर्दाफरोश) = मुडदे वाहणारा माणूस.]

मुडदार वि. वाईट तेल, समयीच्या खालीं गळलेलें तेल. Stale oil.

[सं. मृतधारा ; मुरदाड शेंग (सं. मृद्दारुशृंग).]

मुडा पुं. गवताचा अथवा सुंभाचा गोल, (खोबरें, भात किंवा धान्यासाठीं केलेला) कणगा, तांदूळ मोजण्याचें एक माप. An oval bundle of grass.

[कान. मुडि ; मल्याळी. मूट, √ मूट्ट = आच्छादणें ; सं. मुष्टि (?). दुसरी एक संस्कृत व्युत्पत्ति चिन्त्य आहे. सं. मूतकम् = करंडी ; √मू–बंधने ; फा. मुतोळी (पिशवी); प्रा. मूड ; सिं. मूडु ; गु. मूडो.]

मुंडा वि. तोंडफुटका. Of which the mouth is broken.
[सं. मुण्डः ; पा. प्रा. मुण्ड ; का. मोण्डु ; कु. मूॅडो ; अ. मुरा ; बं. मुरा ; ओ. मुण्डा ; बि. मूरा ; हिं. मुंडना ; गु. मुण्डवूँ (हजामत करणें).]

मुंड(णें) क्रि. हजामत करणें. To shave (esp. the head).
[सं. मुण्डयति ; पा. मुण्डेति ; मा. मुण्डेइ, मुण्डइ ; बं. मुरान ; हिं. मुंडना ; पं. मुनणा ; सिं. मुनणु ; गु. मुंडवूँ ; हिं. मुंड = संन्यासी, मुंडो = विधवा ; सिंह. मड = टकल्या ; मिडी = दासी ; का. मोड = विधवा ; रुमा. मुर = हजामत करणें ; म. मुंडा = आखूड. परंतु हा मुण्डापासून नाधा. आहे. 'मुंड'. हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे. मूळ शब्द प्राकृत आहे. त्याचा कदाचित् सं. मूर्धन्शीं संबंध असेल. म. मुण्डन, मुंडासें (मुण्डवस्त्र, मुण्डवासस्).]

मुंड न. डोकें. The head.
[सं. मूर्धा ; पा. मुद्धा ; प्रा. मुद्ध, मुड्ढ, मुण्ड्ढ(पुं.) ; अ. मुर् ; कु. मुन् ; ओ. मुण्ड ; हिं. मूँर ; पं. मुण्ड ; लॉ. मूण्ढ ; सिं. मुण्डु ; गु. मुंडी. मुंडणें पहा. अकामसा-मुंडासें (कान. मुंडु = डोक्यास बांधावयाचें फडकें, मुंडवासस्) = रुमाल ; मुंडावलि,–ळी, मंडोळी = वधू-वरांच्या डोक्याला बांधावयाची शोभेची माळ.]

मुंड वि. तीन (संख्या). Three.
[तेलगु. मुडू. विटीदांडूच्या खेडांतील वकट, लॅंड, मुंड, नाल, आर, वैद, झकु हे शब्द तेलगु आहेत.]

मुंडा वि. आंखुड. मुडा पहा. Short.

मुत(णें) अक्रि. लघवी करणें. To pass urine.
[सं. मूत्र (नाधा.); प्रा. मुत्त ; हिं. बं. मूत ; सिंह. मू ; पं. मुताला = लघवी लागलेला ; गु. मुतरवूँ, मूत्र, मूतर ; सिं. मुटणु, मुट्ठ ; आर्मे. मुरेल्, मुरॅल.]

मुतपाकखाना पुं. सैंपाकघर. A kitchen.
[अर. मुत्बख.]

मुतवजे वि. जाणारा, तयार, उद्युक्त, गमनकर्ता. Ready to start or depart.
[अर. मुतज्जिह ; पेकाम. मुतवजे (रा. १-६१).]

मुतालीक पुं. दुय्यम कारभारी, प्रतिनिधि, संबंधी. A representative.
[अर. मुतअल्लिक.]

मुत्सद्दी पुं. धोरणी, राजकारणी मनुष्य. A diplomat, a politician.
[अर. मुतसद्दी-कार्यकारी ; पेकाम. (रा. २२-१०४).]

मुदन स्त्री. बिरडें, फांसा, भोंकांची ओळ. A button-loop.
[सं. मुद्रा ; प्रा. मुद्दा ; मुदी.]

मुदलियार पुं. एक आडनांव, गांवांतील मुख्य ग्रामाधिकारी. A surname, the village-chief.
[तामीळ. मुदलियार – मुथलियार, मुदली, मुथलीं–मुख्य ह्या शब्दाचें अनेकवचन.]

मुदाई पुं. हक्क सांगणारा, दावेदार, विरोधक. A claimant.
[अर. मुद्दई ; पेकाम. मुद्दइ.]

मुदाम ,– द्दाम अ. सहेतुक, सतत, बुद्ध्या. Perpetual, positively.
[अर. मुदाम् , अम्दन्.]

मुदी स्त्री. लहान अंगठी, वळें, नाकाकानांतील दागिना. A ring, an ear-ornament.
[सं. मुद्रा, मुद्रिका ; पा. मुद्दा, मुद्दिका ; प्रा. मुद्दा, मुद्दिआ ; बं. मुदा ; ओ. मुदा, मुदी ; हिं. मुद्री ; सिं. मुंड्रा, मुंदी ; याकाम. मुदी (ज्ञा. १४-११०); मूद = डोक्यांतील दागिना ; भाताची मूद.]

मुद्दल न. भांडवल, मूळ रक्कम. Capital, principal.
[सं. मूलद (?); मूलदेयम् ; कान. मैदलु = मुख्य ; ते. मोंदलु ; याकाम. मुदल (ज्ञा. १८-२८०).]

मुद्दा पुं. महत्त्वाचा पुरावा,–विधान, मुख्य बाब,–गोष्ट. Evidence, point, argument, item.
[अर. मुअदा.]

मुद्दुनियां अ. संक्षेपानें. In brief.
[सं. मुद्रा (नाधा.) = ठसा उठविणें ; छापणें ; याकाम. मुद्दुनिया.]

मुधा अ. व्यर्थ, फुकट. In vain.
[सं. वृथा, मृथा ; मिथ्या. 'मुग्ध' ह्या शब्दाशीं संबद्ध असेल.काय ?]

मुधादित्य पुं. सूर्याचें देऊळ, एक आदित्य. The Sun-temple.
[सं. मुधा + आदित्य ; याकाम. मुधादित्य.]

मुनसफ,–ब पुं. न्याय देणारा अधिकारी. A judge.
[अर. मुन्सिफ ; पेकाम. मुन्सफ (खरे ७–३५७०).]

मुनशी पुं. फार्सी अरबीचा शिक्षक किंवा पत्रलेखक, दुभाषा, वाचक, अर्थ सांगणारा. A teacher, an interpreter.
[अर. फा. मुन्शी, ✓ इन्श् = शिकविणें ; हिं. मुनशी.]

मुनि पुं. ऋषि. A holy sage.
[सं. मुनि, ✓मुन्, मन् (?).]

मुनीम पुं. कारकून (पेढीवरील), प्रतिनिधि. A representative, an agent.
[अर. मुनीम.]

मुफ्ति पुं. काझीच्या वरचा न्यायाधिकारी, न्यायाधीश. A judicial officer. a judge.
[अर. मुफ्ती = मुसलमानी कायदा जाणणारा, फतवा म्हणणारा. सैन्यांत '**साधे कपडे घालणारा**' ह्या अर्थींहि हा शब्द वापरतात.]

मुबलक वि. पुष्कळ. Abundant.
[अर. मुब्बक्.]

मुबारक पुं. संतोष, इनाम, बक्षीस. A present, a reward.
[अर. मुबारक्.]

मुमुक्षु वि. (पुं.) सुटण्याची इच्छा करणारा, मोक्षाची–ब्रह्मप्राप्तीची इच्छा करणारा. One desirous of salvation.
[सं. मुमुक्षु, ✓ मुच्.]

मुय(या)र वि. निःसत्त्व. Pale, dead.
[सं. मृत ; मृत्तिका.]

मुर(णें) क्रि. जिरणें, वेढणें. To sink into, to soak.
[सं. मूर्व् १ बंधने ; मूर्च्छ् ६ संत्स्याने ; अकामसा. मुरवण = ताक (विरजणासाठीं दुधांत मिसळण्याचें).]

मुरक(णें) अक्रि. लाजेनें मान वळविणें. To turn away from coyly,
[१ सं. मुस्र् १ गतौ ; २ कान. मुरु (= नाखुषी)+क ; मुरुकुसु = चेहरा बदलणें, म. मुरका,–की.]

मु(मि)रकूट न. क्षुद्र कीटक, डांस वगैरे. A small fly.
[सं. मृत + कीट.]

मुरकुंडी स्त्री. मान वळविणें, गात्रवैकल्य. Bending the neck down, bowing, exhaustion of limbs.
[कान. मुरि = वांकविणें, वळणें ; तेलगु. मुरिकोलु = मोडणें ; याकाम. मुरकुंडी (ज्ञा. १३-५६९) ; सं. मृत+कुडी, मूर्च्छा+कुडी वगैरे व्युत्पत्ति दूरान्वित आहेत.]

मुरगळ(णें) सक्रि. पिरगळणें, वांकडें करणें. To twist, to wring, to wrench.
[कान. मुरि = वळणें; सं. मृ ९ हिंसायाम् + घूर–द्विधातु संयोग (रा.) ; कानडी मूळ हेंच अधिक सयुक्तिक.]

मुरड(णें) उक्रि. वळविणें, शेंडे–टोकें आंत घेणें. To twist in turning round suddenly.
[सं. मृड् ९ क्षोदे ; याकाम. मुरडणें = मागें फिरणें ; म. मुरडा = दुमडा, पीळ, (ज्ञा. ६-२१४), मुरडाण = वांकडी जमीन.]

मुरदंग पुं. आट्यापाट्यांतील मुख्य पाटी. The central line in the game of atya-patya.
[सं. मूर्धन् + दण्ड, मूर्धन् + अंग. मूलदंड पासून व्युत्पादितात. मूयदण्ड.]

मुरदंग, मृदंग पुं. वाद्यविशेष. A kind of instrument.
[सं. मृत् + अंग.]

मुरब्बी वि. कैवारी, तरबेज, पोक्त, वस्ताद. A patron, an advocate, skilful diplomat.
[अर. मुरब्बी ; पेकाम. मुरब्बी (पा. ब. ८).]

मुरमुरा पुं. चुरमुरा, भाजलेलें भात. Husked rice soaked and parched.
[सं. मुर्मुरक, मुमुर = तुस, भूस, पाचोळा ह्यांवर भाजलेलें भात. ; अकाम. कुरमुरा, चुरमुरा, मुरमुरा.]

मुरळी स्त्री. वाद्यविशेष. A kind of instrument.
[सं. मुरलि.]

मुरळी स्त्री. देवदासी. A female divotee of god Khandoba.
[सं. मृड् १० सेवायाम् ; मैराळी = खंडोबाची स्त्री ; कान. मरळी.]

(मन)मुराद वि. विपूल, पुष्कळ, मनाच्या इच्छेला येईल तितकें. Abundant.
[अर. **मुराद**=इच्छा.]

मुरूम पुं. एक प्रकारचा ढिसूळ दगड. A fissile kind of stone.
[तेलगू. **मुरुकल्लु**=खडक; कान. **मेरी, मरीमश.** **मुरमाची** पुटकळी ह्यांतील **मुरुम** शब्द हा **मुरगंड**पासून.]

मुर्गी स्त्री. कोंबडी. A hen.
[फा. **मुर्घ्**=पक्षी.]

मुर्चा पुं. तोफांचा मारा, तोंड, रोंख. An attack with guns, a battery, face.
[अर. **मुर्चा**; पेकाम. **मुर्चा** (ब्र. च. १९२), अकाम. **मोर्चा.**]

मुर्दा पुं. मुडदा पहा.

मुर्वत स्त्री. भीति, भीड, पत्रास. Awe or fear of, care, concern.
[फा. **मुरवत्**; अर. **मुरुव्वत्**; पेकाम. **मुर्वत** (रा. १-२२८).]

मुऱ्हाळी पुं. निरोप्या, (नवऱ्या, मुलीस आणण्यानेण्यासाठीं) पाठविलेला मनुष्य. A man sent to escort, a messenger, a person (sent to accompany a newly-married girl).
[सं. **मूळहारी > मुळारी** (वर्णव्यत्यय) **मुऱ्हाळी मुरळी. मूळ** ह्या नक्षत्राचा संबंध आहे.]

मुलगा पुं. मूल, पोर, पुत्र. A boy, a son.
[सं. **मूल, मूल्य, मूलक**; प्रा. **मुल्ल.**
पुढील अपत्यवाचक शब्द व त्यांचें निर्वचन चिन्त्य आहे. **१** सं. **पोत**; पा. **पोतो**; प्रा. **पोअ**; अ. **पो**; व. **पो, पोया**; ओ. **पुओ**; हिं. **पोआ**; ने. **पोयी**=कोंबडी; कु. **पोथो**; म. **पोवो**=लहान साप. *Gr.* Panros; *Lat.* Parvus. **पुत्रक**शीं संबद्ध आहे. **२** सं. **लटति, लडति**; हिं. **लडका**; ने. **लडके**; म. **लडका, लडकी**; प्रा. **लिक्क, लेक्क, डिक्क, दिक्क**; म. **लेक, लेकरूं, डिकरा**; प्रा. **झिल्ल**=लहान; म. **झिलगा, भुर्गो, बुर्गो, पीळ** पहा.
३ :सं. **कुण्डगोलक** ह्याचा अर्थ जातिवाचक जरी असला तरी ह्यांत अनैतिक संबंधापासून झालेल्या जन्माचा अर्थ अभिप्रेत आहे. ह्यांतील **कुण्ड** व **गोलक** ह्या दोन्ही शब्दांचा अर्थ अपत्य असाच आहे. पहा:—*IE*. Kurno; सं. **कुण्डन्**=वांटोळें छिद्र, **गोलक**=वांटोळेपणा; *Gr*. Kurnoi. **४** सं. **शिशु**; *IE*. Kesi=To swell. म. **पीळ, पिलूं**; हिं **पिल्ल**; पं. **पिल्ल** इत्यादि शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत. (S.:M. Katre, B. A. J.vol.]

मुलाजमत स्त्री. भेट, हुजूर नौकरी. Visit, attendance on a master.
[फा. **मुलाझमत.**]

मुलाणा पुं. मुसलमानी धर्माचा गुरु. A muslim priest.
[अर. **मौलाना.**]

मुलामा पुं. (एका धातूचा दुसऱ्या धातूवर बसविलेला) थर. A layer (of a metal on another).
[अर. **मुलम्मअ**; शिकाम. **मुलामा.** मुलाम्याचें नाणें। तुका म्हणे नव्हे सोनें ॥ तु. अ.]

मुलाहिजा पुं. गय, पर्वा, मान. Regard or respect for.
[अर. **मुलाहजा**; पेकाम. **मुलाजा, मुलाइजा** (म. रा. आ. १६).]

मुलूख पुं. प्रांत, देश, राज्य. A country, a region.
[अर. **मुल्क्**; अकाम. **मुल्की; मुलुख मैदान**; (अर. **मलिक + इ + मैदान**=रणाचा राजा,-मालक); ह्या नांवाची विजापूरची तोफ.]

मुल्ला पुं. विद्वान् पंडित, कुराण पढणारा शिक्षक. A learned man.
[अर. **मौला < विला**; हिं. **मुल्ला**; म. **मौलवी**=विद्वान्.]

मुष्कील वि. स्त्री. कठीण, अडचण, संकट, पंचाईत. Difficult, arduous, hard difficulty.
[फा. **मुश्किली**; पेकाम. **मुष्कील, मुष्किली** (दिमरा १-३८).]

मुशाफर पुं. वाटसरू, फिरस्ता. A traveller.
[अर. **मुसाफिर**; अकामसा. **मुशाफरखाना, मुशाफिरी.**]

मुष्टि स्त्री. मूठ. The fist.
[सं. **मुष्टि.** मूठ पहा.]

मुश्रीफ पुं. तपासनीस. An examiner.
[अर. **मुश्रीफ.**]

मुसक(णें) सक्रि. तुच्छतेनें परतणें, कमी लेखणें. To turn away in scorn.

[सं. **मुस्** १ अवयवे ; हिं. **मुस्कुराना** ; पं **मुस्कराउणा** ; सिं. **मस्कणु** ; गु. **मुस्कावूँ** (आनंदणें).]

मुसकी स्त्री. तोंडाला बांधावयाची दोरी, म्होरकी, तोंडाचें बंधन. A muzzle for the mouth of animals.

[कान. **मुसकु** = तोंडावरील आवरण, **मुसुर्** = आच्छादन, बुरखा ; **मुसुकु**, **मुसुंडी** = चेहरा ; अकामसा. **मुसकाड**, **मुसकट**, **मुसंडी** = डोवयाचा धक्का ; हिं. **मूसक** ; हा शब्द सं. **मूर्धन्** किंवा **श्मश्रु** ह्या शब्दाशीं जोडतात. परंतु ही व्युत्पत्ति ग्राह्य होण्यासारखी नाहीं.]

मुसलमान पुं. महमदी धर्माचा अनुयायी. A follower of Mohomet.

[अर. **मुस्लीम्** = राज्य करणारा, देवावर हवाला ठेवणारा. हा शब्द प्रथम महमदानें आपल्या एकनिष्ठ सेवेकऱ्यांना लावला. ह्या शब्दाचें अ. वचन **मुस्लीमन** असें आहे. तेंच पुढें एकवचनांत वापरूं लागलें. दुसरें एक मत आहे कीं अरबी अनेकवचन **मुस्लिमिन्** हें आहे किंवा **मुस्लिम्-मन** = मुस्लिमसारखा, ह्यावरून वरील शब्द आला असावा.]

मुसळ न. कांडण्याचें लांकूड. A pestle.

[सं. **मुसलम्**, **मुशलम्**, **मुषलम्** , √ **मुस्** = तोडणें ; पा. **मुसल** ; प्रा. **मुसल** (न. पुं.) ; कु. **मुसल** ; आ. **मुहल** ; बं. **मुसल** ; ओ. **मुसल** ; बि. **मूसर** ; हिं. पं. **मूसल** ; सिं. **मुहुरी** ; गु. **मुसळू** ; ह्याचा द्राविडी शब्दाशीं संबंध असावा असें ब्लोक म्हणतो. कान. **मसेमसगु** = घासणें, दळणें, **मसुमसर्**–रगडणें ; अकामसा. **मुसळ्या** (देप्रा. **मुसल**) = लठ्ठ.]

मुसाव(णें) सक्रि. पूर्णपणें भरणें, वाढणें, फुगणें, व्यापणें. To fill thoroughly, to swell, to occupy, to faint.

[सं. १ **मूस** (नाधा.), २ **मूर्च्छा** (नाधा.). दुसरी व्युत्पत्ति अधिक ग्राह्य ; याकाम. **मुसणें** = मूर्छित करणें (नरुस्व. १००), **मुसावणें** = मूर्च्छित होणें (ज्ञाप्र. ७७१).]

मुस्तकीम वि कायम, निश्चित. Sure, certain.
[अर. **मुस्तकीम** ; पेकाम. **मुस्तकीम** (रा. ७-१२).]

मुस्तेद वि. तयार, सिद्ध. Ready, prepared, alert.
[अर. **मुस्तइद्द** ; शिकाम. पेकाम. **मुस्तेद**(चित्र. १३३).]

मुळमुळ स्त्री. अस्पष्ट वाणी, अस्पष्ट स्फुंदन. Indistinct speech or sobbing.
[ध्वनिशब्द, सं. **मुहुर्मुहुर्**.]

मुळा पुं. वनस्पति, कंदविशेष. मूळ पहा. A kind of root.

मूग पुं. एक द्विदळ धान्य, मुग पहा. A kind of grain.

मूग (गिळून बसणें) अ. स्तब्ध (बसणें). (To sit) silently.

[कान. **मुगी** = तोंड मिटविणें, झांकणें (सं. **मूक** ; प्रा. **मूग** ; कानडींत तो तद्भव झाला असावा). प्रयोग मराठींत वापरतांना '**मूग**' हें धान्य समजून मग त्याला '**गिळणें**' हें क्रियापद लाविलें ; **किंवा** २ कान. **मुगीळ** = बंद झांकलेली (कळी, फूल,) ह्यावरून हा प्रयोग आला असावा ; सं. **मौग्ध्यम्** ही राजवाडेव्युत्पत्ति शास्त्रीय नाहीं.]

मूजोरी स्त्री. गर्व, प्रतिष्ठा. Arrogance.
[फा. **मू** + **जोर** = तोंडाचा जोर.]

मूठ स्त्री. दांडा, बोटें झाकलेला हाताचा भाग, मुष्टी, खोगीर. The fist, hilt, handle.

[सं. **मुष्टि** ; पा.प्रा. **मुट्ठी** ; का. **मोठ** ; कु. **मुठी** ; अ. **मुठि** ; बं. **मुठ** ; ओ. **मुठी** ; बिं. हिं. **मूठ** ; पं. लां. **मुट्ठ** ; सिं. **मुठी** ; गु. **मूठ** ; रुमा. **मुशी**.]

मूढ वि. मूर्ख, अडाणी. Ignorant, dull, stupid.
[सं. **मूह्** = वेडा होणें (निष्ठा).]

मूत पुं. मूत्र, लघवी, मुतणें पहा. Urine.

मूद स्त्री. ओगराळ्याच्या आकाराचा भाताचा गोळा. A lump of boiled rice as turned out of a ladle.

[कान. **मुद्द** ; सं. **मुद्रिका** (भट्टोजी, उणादि १७८) ; प्रा. **मुद्दिआ** ; कानडीमध्यें तद्भव झाला.]

मूर पुं. एक मुसलमानांमधील देशीक ज्ञात. The Moors.

[हा शब्द फार प्राचीन आहे. पोर्तुगीजांना जे महमदी लोक भेटले त्यांना **मोउरोस** असें म्हणत. त्या शब्दाचे पुढें निरनिराळ्या लोकांनीं अपभ्रंश केले. कालिकत आणि कोचीन येथील मुसलमानी लोक हे मिश्रजन्मी होते. युरोपमधील राष्ट्रांत मुसलमानांना मूर ही संज्ञा प्राप्त झाली.]

मूर स्त्री. गळती.
[म. **मुरणें** पहा.]

मूर्ख वि. खुळा, अडाणी. Stupid, ignorant.
[सं. **मूर्ख**, √ **मूर्च्छ्**.]

मूर्च्छा स्त्री. घेरी. A faint.
[सं. **मूर्च्छा**, √ **मूर्च्छ्**.]

मूर्त स्त्री. मूर्ति. An idol.
[सं. मूर्ति.]

मूर्धा स्त्री. डोकें.
[सं. **मूर्धन्**; संसा. **मूर्धन्य**.]

मूल न. पोर, मुलगा पहा. A child.

मूस स्त्री. धातु आटविण्याचें पात्र, योजना, बांधाचें दार, भोंक. A crucible, a scheme.
[सं. **मूष**, **मूषा**; सिंह. **मुसा**; बं. **मूषी**; हिं. **मूस**.]

मूळ न. झाडाचें मूळ. The root of a tree.
[सं. **मूरम्**, **मूलम्**, **मूलकम्**; पा. **मूलम्**; **मूलकम्**; प्रा. **मूल**, **मूलअ**, **मूली**, **मूलिआ** (स्त्री.); कु. **मूली**, अ. **मुल्**, **मुला**; बं. **मुला**; ओ. **मुळ**; **मुळा**; बि. **मूर**, **मूल**; हिं. **मूल्**, **मुली** (स्त्री); सिं. **मूरु**, **मुरी**; गु. **मूळ**, **मुळा**; अकामसा **मुळा**=वनस्पतिविशेष, **मुळी**, **मुळा मुळें**, **मूळ अक्षर**, **मूळचिठ्ठी**, **मूळपीठ**, **मूळपुरुष**, **मूळव्याधि**, **मूळस्तंभ**.]

मूळ न. आमंत्रण, बोलावणें, पाठवणी. Invitation, escort.
[सं. **मूल** (नक्षत्रनाम); याकाम. **मूळ**; अकाम. **मूळवणें**=घालविणें, उच्चाटण करणें.]

मूळव्याध स्त्री. अर्श, गुदरोग. The piles.
[सं. **मूलव्याधि**; **मूल**=मूल चक्राचें स्थान.]

मुळु वि. पांच. Five..
[नंदभाषा. **मूळु**=पांच (विसोबा. खेचर अभंग).]

मृत्य पुं. मरण. Death.
[सं. **मृत्यु**, √ **मृ**; अकामसा. **मृत्युपत्र**, **मृत्युपंथ**, **मृत्युयोग**,.]

मृदु वि. मऊ. Soft:
[सं. **मृदु**.]

मृदंग पुं. एक वाद्य. A sort of tabor.

मृषा अ. खोटें, वृथा. Falsly, in vain.
[सं. **मृषा**.]

मेकल(णें) क्रि. घट्ट बांधणें. To tie closely.
[सं. **मेखला** (नाधा.); **मे** + **खल**; याकाम. **मेकलणें**, **मेखळणें**=घट्ट धांधणें (ज्ञा. १५-२४१).]

मेकूड पुं. नाकांतील घाण. The hard mucus of the nose.
[हा शब्द देप्रा. आहे काय ?]

मेख स्त्री. खुंटी. A peg.
[फा. **मेख्**; सं. **म्यक्ष्** – १ वंधने (?); **मेखसूं**; हिं. **मखचू**; पेकाम. **मेखचूं**; = ओबडधोबड मोठी मेख; अकामसा. **मेख्या**, **मेखाट**; **मेखाट्या**.]

मेखला स्त्री. कमरेचा पट्टा. A waist-band.
[सं. **मे** (= शरीर.) + **खला**, √ **कल्**=जोडणें; अकाम. **मेखळा**.]

मेघुडें न. मेघ, मेहुडा पहा. A cloud.

मेंग स्त्री. सापाची कात, कवच. A slough.
[सं. **मृतांग**; प्रा. **मयांग**; अकामसा. **मेंग-चोट**, **मेंगटा**.]

मेंग(णें) क्रि. माघार घेणें. To shirk, to withdraw.
[१ **मेंग** (ना.) किंवा वैसं. **पेंग्**.]

मेच(णें) सक्रि. स्तुति करणें, मानणें. To hold in estimation, to regard.
[कान. **मेच्चु**=स्तुति करणें, (किंवा सं. **मिच्छ्** ६ प्रतिघाते, ४ दर्शने; याकाम. **मेचु** (ज्ञा. १७-१६३).]

मेज न. लिहिण्यासाठीं लांकडाचें केलेलें साधन. A table.
[फा. **मेझ**.]

मेज(णें) सक्रि. मोजणें. To measure.
[सं. **मी** २ मापने; **मीय** (कर्मणि) **मिज्ज** > **मेज**.]

मेजवा(मा)नी स्त्री. भोजन देऊन सत्कार करणें. Feasting, entertaining.
[फा. **मेझबान्–मान्**.]

मेट न. गुडघ्याचा सांधा, चौकी, पहारा. The knee-joint, watch-house.
[सं. **मिथ्** १ संयोजने; **मेथि**; प्रा. **मेढी**; बं. **मेइ**, **मेधि**, **मेढ**=देवाच्या मूर्तीभोंवतालची चौकट; बि. **मेहं**=डांबा.]

मेटाकुटी स्त्री. दमणूक, रडकुंडी, मेट पहा. Exhaustion.

मेढ,-ढी स्त्री. लहान खांब. A short post.
[सं. मेथिः, मेथी, मेधी, मेठी, मेढी (स्त्री.); पा. मेढी ; प्रा. मेहि, मेढि ; देप्रा. मेढ (पुं.) ; पं. मेहर् ; गु. मींढ्ढ ; याकाम. मेढा = धनुष्य (नरुस्व. ७६७); अकाम. मेढ, मेढ्या (= महर्द्धिकः) = आधारभूत व्यक्ति.]

^{1}**मेण, म्यान** न. स्त्री. तरवारीचें आवरण. A sheath, a scabbard.
[फा. मियान.]

^{2}**मेण** न. पोळयांतील चिकट पदार्थ, (घट्ट) तेल. Wax.
[सं. मिद् ४ स्नेहने (निष्ठा-**मिन्न**, किंवा सं. **मदन**; प्रा. **मयण**); सिं. **मेण**; अकाम. **मेण-कट,-चट,-मेणबत्ती.**]

मेणबत्ती स्त्री. मेणानें मढविलेली वात, मेणाचा दिवा.
[फा. **मोम + बत्ती** ; सं. **मिन्न + वार्ता,- वर्तिका** ; म. **मेण** पहा.]

मेंडका पुं. पेटका, मांसल गोळा, गांठ. A cramp, the rising observable in the muscles.
[सं. **मंडूक** ; अकाम. **मेंडकी, मेंडकुळी, बेडकुळी.**]

मेंढा पुं. एक जनावर, मेष. A male sheep, a ram.
[सं. **मेष, मेढ, मेण्ढ,** √ **मिष्** ; पा. प्रा. **मेण्ड, मिण्ढ, मिण्ढ्य** ; देप्रा. **मेंढ** ; अप. **मिंढी, मिंढ्य** ; हिं. **मेंडा, मेंढा** ; पं. **मेडा** ; बं. ओ. **मेडा, मेढा, भेला** ; आ. **मेर** ; सिंह. **मेड** ; गु. **मेंढो, भेड** ; याकाम. **मेडा, मेढ्र** = शिश्न (ज्ञा. ६-१९५); अकाम. **मेंढा, मेंढी** (स्त्री) ; **मेंढरूं.**]

^{1}**मेतकूट** न. तांदूळ-डाळ-मोहऱ्या-मेथ्याचें पीठ. Spiced flour of rice, pulse etc.
[सं. **मिथ(मेथिका) कूट** ; म. **मेथी + कूट.**]

^{2}**मेतकूट** न. मेळ, एकी. Friendship, intimacy.
[सं. **मैत्र (मित्र) + कूट** ; प्रा. **मित्तकूट.**]

मेथा पुं. शिक्षक, शिष्ट. A teacher.
[सं. **महत्तर, मेधाविन्** (?); प्रा. **महत्तर.** '**महत्तर**' शब्द विचार्य आहे. ह्यापासून '**म्हातारा, मेथा**' हे शब्द तयार झाले आहेत. म्हातारा-वयानें अधिक ; मेथा ह्यामध्यें ज्ञानानें अधिक असा अर्थ आहे. **मेहतर** = भंगी (< फा. **मिहूतर**).]

मेथी स्त्री. वनस्पतिविशेष, भाजीचा प्रकार. A kind of vegetable and its seed.
[सं. **मेथिका** ; हिं. वं. गु. **मेथी** ; '**मेथी**' हा शब्द मूळ व त्यापासून '**मेथिका**' हें संस्कृतीकरण झालेलें दिसतें.]

मेद पुं. चरबी. Marrow.
[सं. **मेद,** √ **मिद्** - संघाते.]

मेधा स्त्री. बुद्धि. Intellect.
[सं. **मेधा.**]

मेंदगी स्त्री. थकवा, लठ्ठपणा. Fatigue, fatness.
[फा. **मेंदगी** ; अकामसा. **मेंदट.**]

मेंदी स्त्री. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **मेंधिका** ; हिं. **मेहन्दी** ; हाताला रंग देण्यासाठीं ह्याचा उपयोग करतात.]

मेंदू पुं. मगज, बुद्धि, अक्कल (लक्षणा). Brains.
[सं. **मेद** (?).]

मेर स्त्री. टेंकडीचा काठ, कड, मर्यादा. Edge, verge, border (of a hill).
[कान. **मेर** = टेंकडी ; देप्रा. **मज्जा** तथा **मेरा** मर्यादा (२२३.३); गु. **मेर** ; हिं. **मडी, मेंड** ; सिंह. **मॅर** ; याकाम. **मेर** (ज्ञा. ८-७४).]

मेरु पुं. एक पौराणिक पर्वत. The sacred mountain Meru.
[सं. **मेरु** ; कान. **मेर** हा शब्द चिन्त्य आहे.]

मेला वि. मेलेला, प्राण गेलेला. Dead, expired.
[सं. **मृत + ल** ; प्रा. **मअ, मुअ, मड** ; पं. **मोआ** ; हिं. **मुआ** ; गु. **मुओ, मुएलो** ; का. **मुद्** ; सिंह. **मळ** ; लमा. **मुर्दल** ; आर्मे. रुमा. **मुल.** मराठींतील हें रूप इतर भाषांतील रूपांशीं तुलना करतां निराळें आहे. '**ल**' हा भूतकाळाचा प्रत्यय आहे. तो इतर भाषांत आढळत नाहीं. मराठीचा हा विशेष आहे. विशेषणाचा, स्वार्थे, भूतकाळाचा असे तीन प्रकारचे '**ल**' प्रत्यय आहेत.]

मेल्ह(ल)वन न. मालवणें, मेळवणें. Extinguishing.
[सं. **म्लै** = म्लान होणें ; प्रा. **मिलाणी** ; याकाम. **मेल्हवन-ण** (नरुस्व. ७३).]

मेवा पुं. द्राक्ष वगैरे मिष्ट पदार्थ, फळफळावळ. Fruit, confectioneries.
[फा. मेवा ; शिकाम. मेवा (सभा. ४०).]

मेषपात्र न. भितरा, मुखदुर्बळ, नेभळट (लक्षणा.) Imbecile. slovenly.
[सं. मेषपात्र = मेंढी.]

मेस्तक न. तक्त्यांचें एक पुस्तक. A book of tables (of arithmetic).

मेहतर पुं. भंगी, झाडू, घरांतील निकृष्ट कामें करणारा नोकर. A sweeper.
[फा. **मिह्तर्** = मोठा मनुष्य ; (सं. **महत्तर** = राजपुत्र). विरोधाभास, उपहास किंवा अकारणगौरवानें हा असा भव्यार्थी शब्द भंग्यासंबंधीं वापरतात. आतां सरावानें मूळचा भव्यार्थ नजरेंत येत नाहीं. शिंप्याला असेंच **खलीफ**, कुंभाराला **राजे**, स्वयपाक्याला **बबर्जी, मिस्त्री, महाराज,** हे शब्द अशाच अकारणगौरवाचे नमुने आहेत.]

मेहनत स्त्री. कष्ट, श्रम, आयास. Toil, pains labour.
[अर. **मिहनत्**.]

मेहमान पुं. पाहुणा, अतिथि. A guest.
[फा. **मिह्मान.**]

मेहर स्त्री. दया. Favour, kindness.
[फा. **मिह्र्** ; शिकाम. **मेहेर** (चित्र. ३४); अकामसा. **मेहेरबान, मेहरनजर.**]

मेहराप,-पी स्त्री. मखराची कमान, कंस, वेलबुट्टी. A decoration of loops, embroidery.
[अर. **मिहराब्.**]

मेहुडा पुं. ढग. A cloud.
[सं. **मेघ**, √ **मिह्** ; प्रा. **मेह** ; पं. हिं. **मेंह** ; सिंह. **मे** ; सिं. **मींहु** ; गु. **मेह, मेहुलो** ; याकाम. **मेहुडा,-डें** (ज्ञा. ११-१९४).]

मेहूण न. जोडपें. A wedded couple.
[सं. **मिथुन**, √ **मिथ्**, √ **मि+थु+** √ **नी** ; सिंह. **मेवुन्** = जोडपें ; अकाम. **मेहुणा, मेहुणी** हे शब्द वरील शब्दाशीं संबद्ध आहेत काय ? **मेव्हणा** पहा.]

मेव्हणा, मेहुणा पुं. बहिणीचा नवरा, बायकोचा भाऊ. Brother-in-law.
[सं. **मैथुनिकः, मिथुन,** √ **मिथ्** ; देप्रा. **मेहुणिआ** पत्न्या भगिनी, मातुलात्मजा च, **मेहुणओ** पितृष्वसृसुत इति. द्राविडी शब्द ताडून पहा. कान. **मयूदुन** = नवरा मेहुणा ; ता. **मेत्तुणण्, मिच्चिणण्,** = मेहुणा. संस्कृत व द्राविडी ह्या दोन्ही भाषांतील शब्दांचा अर्थभेद झाला आहे. देप्रा. शब्दांवरून तत्कालीन सामाजिक रूढीची कल्पना येते.]

मेळ पुं. संयोग, संगम, मीलन. Agreement, union.

मेळा पुं. समूह. A concourse (of people).
[सं. **मेलः**, √ **मील्** ; प्रा. **मेलअ** ; का. **म्युलु** ; कु. **मेलो** ; बं. **मेला** (सभा); ओ. **मेळा** ; हिं. **मेला** ; गु. **मेलो** ; याकाम. **मेळाव** (अमृ. ७-१४२); म. **मेळी** (< देप्रा. **मेली**). '**मेला**' ह्याचे दोन अर्थ आहेत: १ समूह २ सोंपवलेलें काम (टर्नर).]

मैदान न. पटांगण. A plain.
[फा. **माइदान्** = उघडी जागा, पटांगण.]

मैना स्त्री. पक्षिविशेष, पोपटाच्या जातींतील मादी. A kind of bird-jay.
[तुर्की. **मैना** ; चिनी. **मयना**. तुर्कस्तानांतून चिनी-तुर्कस्तानांत व तेथून हिंदुस्तानांत हा शब्द आला. हा शब्द सं. **मदना > मअना > मैना** असा व्युत्पादितात, परंतु ही व्युत्पत्ति शास्त्रीय नाहीं, कृत्रिम आहे ; ओ. पं. हिं. **मैना** ; गु. **मैना.**]

मैंद वि. आळशी, निरुत्साही. Dull, sluggish.
[सं. (**मैन्द**) **मन्द** ; प्रा. **मइंद** (रामाचा एक सैनिक, वानरवीर); बं. **मैंद** = माकड.]

मैल वि. घामट. Dirty.
[सं. **मलम्** ; प्रा. **मयल, मइल** (**मलील, मलील्ल**); हिं. **मइला** ; सिं. **मेरो** ; प्रा. **माइल्ला** ; ओ. **मैला** ; सि. **मैलु, मेलूँ** ; याकाम. **मैळ** (ज्ञा. १६-२५०).]

मैळें न. वस्त्र. A cloth.
[सं. **मल्** = धारण करणें ; याकाम. **मैळें** = वस्त्र.]

मोईन स्त्री. नेमणूक, ठराव, पगार, वेतन. A stipend, a fixed allowance.
[अर. **मुअय्यन** ; पेकाम. **मोईन** (स. १७-४२).]

मोकल(णें) सक्रि. पाठविणें. To send.
[सं. **मुक्त+ल**, (√ **मुच्, म्लुच्, म्रुच्**); देप्रा. **मोकल्ल** ; सिं. **मोकलणु** = पाठविणें ; का. **मोकल्** ;

गु. **मोकलवूँ**; याकाम. **मोकलणें** = सोडविणें (नरुस्व. ८२७) ह्यामध्यें **मुच्** (णिच्–**मोचय**) किंवा **मुक्त**, **मुक्क + ल** ह्या संस्कृत शब्दाची छाया पडलेली आहे.]

मोकळा वि. सुटा, विस्कळीत, बंधनरहित. Free, loose, unbound.
[सं. **मुक्त**; प्रा. **मुक्क + ल**; देप्रा. **मोक्कल**; गु. मोकळु; सिं. **मोकल**; ओ. **मुकुळा**. **मोकळा** आणि **मोकलणें** हे दोन्ही शब्द संबद्ध आहेत.]

मोका पुं. नाक्याचें ठिकाण, संधि. The central place, a proper time.
[अर. **मौकूअ**.]

मोकाट वि. स्वैर, उद्धट, दांडगा. Free, licentious.
[सं. **मुक्त + ट** > **मुक्क + ट** > **मोक्क + ट**.]

मोकासा पुं. (लष्करी) इनाम, वतन, अम्मल, ह्यांतील हिस्सा. (A share) in the rule and revenue of a village, etc.
[अर. **मुकासा**; अकामसा. **मोकाशी**, **मुकासदार**, **मोकासबाब**.]

मोकूफ वि. अ. स्थगित, रहित. Deferred, stopped.
[अर. **मव्कूफ्**.]

मोगर पुं. धुतांना कपड्यावर आघात करण्याचें लांकूड, ठोकणी, चोपणें. A mallet, a washerman's beater.
[सं. **मुद्गरः**, **मुद्गलः**, ✓ **मुद्**; पा. **मुग्गरो**; प्रा. **मुग्गर**, **मोग्गर**; कु. **मुग्रो**; बं. **मुगुर**; ओ. **मुगुरु**; बि. **मुँगरा**; हिं. **मूग्रा**, **मोग्रा**; पं. **मुंगली**; लां. **मुगली**; गु. **मोगरी**.]

मोगरा पुं. लताविशेष, आणि तिचें पुष्प. A kind of plant and its flower.
[सं. **मुद्गरः**; प्रा. **मुग्गर** (न), **मोग्गर**.]

मोगली(एरंड) पुं. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[देप्रा. **मुग्गली** + एरंड.]

मोघम वि. अनिश्चित, संदिग्ध. Undefined, general.
[अर. **मुब्हम्**.]

मोघा पुं. एक प्रकारचें भांडें. A kind of vessel.
[कान. **मोगे** = मातीचें एक लहान भांडें.]

मोंगल पुं. ज्ञातिनाम, मुसलमानी समाजनाम. The Mughals.
[फा. **मुघोल्**; मूळ अर्थ '**मोंगल**' म्हणून इराणांतील भटकी ज्ञात. हिंदुस्थानांत तुर्कांना (बाबर वगैरेंना) हा शब्द लावला गेला. ह्यांमध्यें इराणी आणि तुराणी असे दोन भेद आहेत. त्यांच्या नांवाच्या पुढें '**बेग**' हा शब्द लावतात. पठाणांना '**खान**' लावतात.]

मोच(णें) क्रि. मोकळें करणें. To release.
[सं. **मुच्** ६ सोडणें.]

मोची पुं. चांभार. A cobbler.
[सं. (?); देप्रा. **मोच मर्धाजंघी** (२३२-११); बं. ओ. **मोची**; बि. पं. सिं. गु. **मोची**; सिं. **मोचरु** (जोडा मारण्याच्या अर्थी); पेल्हवी. **मोचक**; फा. **मोक्ष**; तेलुगु. **मुच्छे**.]

मोज(णें) सक्रि. मापणें, मेजणें. To measure, to count, to reckon.
[सं. **मा**, **मी** (**मेय** > **मेज** > **मोज**); **मुस्** ४ ३ परिमाणे; अकामसा. **मोजका**, **मोजणी**.]

मोजा पुं. हात–पायांत घालावयाचें आवरण. A stocking or sock.
[पेल्हवी. **मोचक** > फा. **मोझा**; हिं. **मोझा**.]

मोट स्त्री. कातड्याची मोठी पिशवी (विहिरींतील पाणी काढण्याची.) A big leather-bag (for a draw-well).
[कान. **मोट्ट** = संचय, सांठा, समूह. हा कानडी तद्भव आहे काय ? पुढील शब्द पहा.]

मोट स्त्री. मूठ, बैलाचें खोगीर. A handle, a saddle.
[सं. **मुट्** ६ बंधने; **मोट** (पुं. न.); देप्रा. **मोट्ट**; बं. **मोट**, **मोटा**; हिं. **मोट(ठ)**; पं. **मोट्टा** = मोठा; गु. **मोटियुं** = धान्याचें पोतें; सिं. **मोरि** = लहान गाठोडें; सूरो = चेंडू; सिंह. **मिटिय** = गाठोडें; का. **मोट्ट (ड)**; याकाम. **मोटोळें**; अकाम. **मोटळा**, **मोटळी**.]

मोटका वि. निपुण, निष्णात, चांगला. Skilful, adept.
[सं. **मुट्** ६ बंधने; याकाम. **मोटकी** = किंचित् (अमृ. ७-१३२), **मोटकेंपण**, **मोटें** = सुंदर (नरुस्व. ३७१).]

मोठा वि. लठ्ठ, स्थूल. Big, large, fat.
[सं. **मोट** किंवा **महत्तर** ; देप्रा. **मोट्ट** ; का. **मोट्टु** ; कु. **मोठी** ; अ. बं. हिं. **मोटा** ; पं. **मोट्टा** ; गु. **मोटो** ; ने. **मोटो**.]

मोड(णें) सक्रि. तोडणें. नाश करणें. To break.
[सं. **मुट्**, **मुड्**, ६, १, अवयवे, ·तिरस्करणे ; प्रा. **मोड** ; हिं. **मोड** ; अकामसा. **मोडणें**, **मोडणी** (वळण), **मोडा** (विघ्न), **मोडी** (अक्षर), **मोड** = पराजय, चिल्लर.]

मोड पुं. वर आलेला भाग, अंकुर, सूज, गांठ. A sprout.
[कान. **मोड्डु** = सूज, गांठ.]

मोत स्त्री. मरण, संकट, स्मशानयात्रा. Death, difficulty, funeral procession.
[सं. **मृत्यु** ; प्रा. **मत्तु** ; हिं. पं. **मौत** ; गु. **मोत** ; अर. **मौत**.]

मोतद्दार पुं. घोड्याची चाकरी करणारा. A horse-keeper.
[अर. **मुत अह्दिद** = काळजी घेणारा.]

मोताद स्त्री. ठराविक (अन्न), मर्यादित वेतन, अभाव, महाग, दुर्भिक्ष्य. A certain quantity, scanty, dearth.
[अर. १ **मुअताद** = ठराविक, २ **मअताज** = दरिद्र.]

मो(म्हो)तूर पुं. पुनर्विवाह, पाट, Remarriage.
[सं. **मूहूर्त** ; प्रा. **मुहूत्तर**, **मोहत्तर**, **मोतूर** ; सं. **मुहूर्त** शब्दाचा विचित्र अर्थभेद झांला. ‘ **गांधर्व** ’ ह्या शब्दाचा अर्थहि तसाच विचित्र आहे.]

मोत्यें न. रत्नविशेष. A pearl.
[सं. **मुक्ता**, **मौक्तिकम्** ; पा. **मुत्ता** ; प्रा. **मुत्ता**, **मोत्ता** (स्त्री.), **मुत्तिअ**, **मोत्तिअ** ; बं. ओ. **मोति** ; हिं. पं. **मोती** ; लां. **मोती** ; सिं. **मोती** ; गु. **मोती** ; द्राविडी तद्भव **मुत्तु** = पहिलें, उत्तम, श्रेष्ठ; अकाम. **मोतीचूर** = मोत्यासारखी कळी (लाडू).]

मोथा पुं. एक प्रकारचें गवत. A kind of grass.
[सं. **मुस्त** ; प्रा. **मुत्था**, **मोत्था** ; अ. बं. ओ. **मुथा** ; हिं. **मोथा** ; पं. **मुत्था** ; सिं. **मोथा** ; गु. **मोथ**.]

मोदक पुं. पक्वान्नविशेष. A kind of sweetmeat.
[सं. **मुद्** = एकत्र करणें, आनंदणें.]

मोदळा पुं. भारा, ओझें, गांठोडें. A bundle, a load.
[सं. **मुस्त्** १० संघाते ; प्रा. **मुत्थ**; २ सं. **मृद्** + **गोलक** ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं कारण मातीच्या ठिगाचा, –गोळ्याचा कांहीं संबंध नाहीं.]

मोदी पुं. धान्याचा दुकानदार, कारभारी, दिवाणजी. The steward, provedore.
[अर. **मुदाई** = विश्वस्त, निधिधारक ; हिं. **मोदी** ; म. **मोदीखाना** = सैन्याच्या धान्याचें खातें.]

मोघा वि. मुग्ध, स्तब्ध. Quiet, silent.
[सं. **मुग्ध** ; प्रा. **मुद्ध**.]

मोप न.वि. मातीची वीट, पुष्कळ, विपूल. A brick, much, abundant.
[सं. **मा** ३ = मोजणें, **उमाप पहा**.]

मोपला पुं. मलबारमधील मुसलमान. A muslim in Malabar.
[मल्याळ. **माप्पिल**, **मा–पिल्ल** = आईचें मूल ; अरबी. **मुआब्बर** = पाण्यामधून ; **मा** (<**महा**) **पिल्ल** (मूल) = मोठें मूल. मलाबारमधील स्त्रिया आणि परकी वसाहतवाले यांची संतति.]

मोबदला पुं. देवघेव, अदलाबदल. Exchange.
[अर. **मुबादला**.]

मोबेद पुं. पारशी धर्मगुरु. A Parsi priest.
[फा. **मूबिद्** = पारशी धर्मगुरूचें बिरुद ; पेल्हवी. **ममो-पत्** ह्या शब्दाचा वरील शब्द अपभ्रंश आहे.]

मोम न. मेण. Wax.
[फा. **मोम** ; पेकाम. **मोमबत्ती** ; अकाम. **मेणबत्ती**.]

मोमीन पुं. मुसलमान विणकरी A muslim weaver.
[अर. **मूमीन** =सनातनी ; अर्थाचा भ्रंश झाला आहे.]

मोर पुं. पक्षिविशेष. A peacock.
[सं. **मयूरः** ; प्रा. **मऊर**, **मऊल**, **मोर** ; अ. **मद्दरा** ; म. **मऊर** ; पा. अशोक शिलालेख-**मोर** ; का. **मोर्** ; हिं.पं. **मोर्** ; सिं. **मोरु** ; गु. **मोर** ; अकाम. **मोरचल** (सं. **मयूरशल**), **मोरपीस** (मयूरपिच्छ), जरी संकृत म्हणून हा शब्द दिला असला तरी **मूळ** हा आस्ट्रिक आहे.]

मोरस स्त्री. मोरस (पिठी) साखर. The sugar.
[*Eng*. Mauritius बेटाचें नांव, तेथून साखर हिंदुस्थानांत येतें.]

मोरांवा, मुरंवा पुं. आंब्याचा गोड आचार. Jam of mango.
[अर. मुरब्बा.]

मोरी, म्होरी स्त्री. नहाणी, न्हानी, नाला. An outlet, a channel to carry water.
[कान. **मोरवु** = तळ्यांतील वाहून जाणारें पाणी, २ फा. **मूरी**; हिं. **मुहरी**; पं. **मुहरी** (बंदुकीचा घोडा); सिं. **मुहुरी**; ने. **मीरि.** फारशी व्युत्पत्तिच ग्राह्य.]

मोरत(र्त)ब न. शिक्का, छाप, चिह्न. The seal.
[अर. **मुरत्तब** = तयार; पेकाम. **मोर्तबसूद** = शिक्का मारला गेला.]

मोर्चेल न. मोराच्या पिसांची चौरी. A brush of peacocks feathers.
[सं. **मयूरचल**; हिं. **मोर्चहल्.** मोर पहा.]

मोर्चा पुं. तोफांचा धमधमा, उंचवट जागा. A battery.
[फा. **मूर्चा, मूर्चाल.**]

मोल न. किंमत. Value, price.
[सं. **मूल्यम्**; अप. प्रा. **मोल्ल**; बं. गु. कु. अ. हिं. **मोल**; ला. **मोल**; सं. **मूल्यम्**; पाप्रा. **मुल्ला**; प्रा. **मूलिअ**; ओ. **मुलाइबा**; पं. **मुल्ल**; सिं. **मुल्हु**; गु. **मूळ.**]

मोसम पुं. हंगाम, पीक, ऋतु. Season.
[अर. **मूसम.**]

मोसु पुं. नांव, पत्ता. Name, address.
[सं. **म्यक्ष्** (वैदिक), √ **म्यस्**–ज्ञाने; याकाम. **मोसु** = मार्ग, शोध.]

मोह पु. एक प्रकारचें झाड. A kind of tree.
[सं. **मधूकः**, पा. **मधुकम्**; प्रा. **महुअ** (पुं. न.); हिं. **महुआ** (पुं.); पं. **महूआ, महवा** (पुं.); गु. **महुडो, मौडो** (पुं.); ने. **मौवा**; अकामसा. **मोहाचा (नारळ)** (< **मधु** > (**महु**) = गोड नारळ.]

मोह(णें) क्रि. मोह होणें, भ्रमणें, मन गढून जाणें. To be drawn to or attracted.
[सं. **मोहनम्, मोह, मोहयति**; पा. **मोहति**; प्रा. **मोह, मोहण, मोहाणी** (औषधि); का. **मुमूह**; हिं. **मोहना**; पं. **माहु**; लां. **मोहण**; सिं. **माहणु**; अकाम. **मोह** = मूर्च्छा, भूल.]

मोहकम वि. भक्कम, दृढ. Firm.
[अर. **मुहकम.**]

मोहटी स्त्री. छपराचें टोंक. The edge of the roof.
[सं. **मुखपट्टी, मुखवटि,** छपर, भिंत व कौलें ह्यांतील भाग.]

मोहतर्फा पुं. दुकानावरील कर. A tax on shops.
[फा. **मुहतरिफा.**]

मोहमदी न. वस्त्रविशेष. A kind of cloth.
[अर. **महामुदी.**]

मोहरम पुं. मुसलमानी पहिला महिना. The first month in the Muslim calendar.
[अर. **मुहर्रम्**; इ. स. ६६९, ६८० ह्या वर्षी हसन व त्याचा भाऊ हुसेन हे मरण पावले त्यांच्या स्मरणार्थ.]

मोहरा न. तोंड, चेहरा. Face.
[१ सं. **मुख**; प्रा. **मुह**; हिं. **मुह**; सिं. **मुहु**; गु. **मोहो**; २ फा. **मुहरा** = चेहरा; अकामसा. **मोहडा** = नायक, **म्होरकी, म्होरँ** = पुढें; **मोहरी** = वाद्यविशेष; याकाम. **मोहिरें** (सं. **मोहकर**; प्रा. **मोहअर**). = मोहक वस्तु.]

मोहळ न. मुस्की. A muzzle.
[सं. **मुखम्, मुखवलयम्**; पा. **मुखम्**; प्रा. **मुह**; हिं. **मूँह**; पं. **मूँह**; लां. **मूँह**; सिं. **मुँहुँ**; गु. **मोहँ.**]

मोहाथि(णें) क्रि. भुरळ पडणें. To be allured.
[सं. **मोहित** (नाधा); किंवा म. **मोह + आथिणें.**]

मोहीम स्त्री. स्वारी, युद्ध, महत्त्वाची कामगिरी. An invasion.
[अर. **मुहिम्म**; पेकाम. **मोहीम.**]

मोहो,–ळ न. मधाचें पोळें. A bee-hive.
[सं. **मधु, मधुवलय, मध्वालय**; पा. **मधु**; प्रा. **मधु**; कु. अ. बं. **मउ**; ओ. **महु**; हिं. **मउ**; गु. **महुडो.**]

मोहोर स्त्री. एक सोन्याचें नाणें. A gold coin, *Mohur.*
[फा. **मुहर्** = धातूची मुद्रा. नंतर त्याचा अर्थ सोन्याचें नाणें असा झाला. ह्याचा **मिहिर** = सूर्य ह्या शब्दाशीं प्रत्यक्ष

असा संबंध नाहीं; अप्रत्यक्ष असा असूं शकेल. गिजनीच्या राजाच्या स्वाऱ्यांपासून (१२०० नंतर) हा शब्द हिंदुस्थानांत आला असावा. १०० रतींचें वजन.]

मोहोर पुं. (आंब्याच्या) फुलांचा गुच्छ. Blossom
[सं. **मधुभार > महुहार > मोहोर**; अकाम **मोहोरव(णें)** आनंदित करणें.]

मोळ पुं. एक प्रकारचें गवत. A kind of grass.
[सं. **मकूलकः, मुकूलकः**; सं. **मुस्ता, मृदुल** (?).]

मोळा पुं. वळण, रीत, पद्धत. A turn, a manner, a mode.
[देप्रा. **मोड**; सं. **मुट्** १ बंधने; अकामसा. (मराठ) **मोळ.**]

मोळा पुं. खिळा. A nail.
[कान. **मोळे**=टांचणी, खिळा, अणकूचीदार पदार्थ; सं. **मौलि** किंवा **मोट**शीं संबंध जोडणें शास्त्रीय नाहीं. शब्द द्राविडी आहे.]

मोळी स्त्री. रास, समूह. A bundle, a collection, a heap.
[कान. **मोळे**=समूह, रास; सं. **मूलिका** हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे. लांकडांची मोळी.]

मौज स्त्री. मजा, गम्मत. Fun, entertainment.
[अर. **मौज.**]

मौजा पुं. खेडेंगांव. A village.
[अर. **मौझा.**]

मौलवी पुं. महमदी धर्मांतील धर्माधिकारी. A religious priest (Muslim).
[अर. **मव्लवी.**]

म्यान न. तरवारीचें आवरण. A sheath.

म्याना, मेणा पुं. पालखीसारखें आच्छादित वाहन. A covered palanquin.
[फा. **मीयान**=मध्य आकाराचा; हिं. **मियान, म्यान.**]

म्लान वि. खिन्न, थकलेला, सुकलेला. Dejected, pale.
[सं. **म्लै** (निष्ठा).]

म्लेंच्छ पुं. परकी धर्माचा, यवन. A foreigner.
[वैसं. **म्लेच्छ्**=अशुद्ध बोलणें.]

म्हण(णें) सक्रि. बोलणें, भाषण करणें. To say, to speak.
[सं. **भनति, भणति**; पा. **भणति**; प्रा. **भणइ**; अ. **भनिब**; ओ. **भणिबा**; हिं. **भनना**; गु. **भणवूँ**; अकामसा. **म्हणून, म्हणजे, म्हणतखेंवो**; मराठींतील रूपें '**म्ह**' आदि व इतर भाषांतील '**भ**' आदि असल्यामुळें दोन्हींत वर्णप्रक्रियेचा भेद आढळतो, म्हणून **भण्** हा धातु मराठी **म्हण** चा मूळ नाहीं असें ब्लोक म्हणतो.]

म्हातारा वि. वयानें वृद्ध झालेला. Old, aged.
[सं. **महत्तर.**]

म्हैस स्त्री. प्राणिविशेष, रेड्याची मादी. Female buffalo.
[सं. **महिष**; प्रा. **महिस**; गु. **भेंस**; सिं. **मेंहि**; पं. **मैह, मेह, मज्झ**; हिं. वि. **भैस, भैंसा**; बं. **भैस**; ओ. **भयेष**; सिंह. **मियु, मिवु, मी.**]

म्होर न. अ. बाशिंग, पुढें. The head-decoration of a bride or bridegroom, in front.
[सं. **मुखर**; हिं. **मोहरा**=बिनी; सिं. **मोरु**=मुख्य; **मुहरु, मोहरी**=पुढील बाजू, **मुहुरुहु**=तोंड; पं. **मोहर**; गु. **मोर**=पुढें, **मोहडूं**=पुढें; अकामग्रामीण. **म्होर.**]

य पुं. मराठी वर्णमालेंतील सव्विसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण तालव्य अर्धस्वरासारखें असून उच्चारस्थान तालु आहे. संस्कृत तत्सम शब्दांत हा वर्ण आढळतो. ह्याची निष्पत्ति 'इ+स्वर' ह्यांच्या मिळणीनें होते. आद्य 'ए'चा उच्चार कधीं 'ये' होतो. हा प्रकार कदाचित् द्राविडी उच्चाराचा परिणाम असावा. ह्या वर्णाच्या शब्दांसाठीं 'ए' वर्णाचे शब्द पहा. Twenty sixth consonant in the Marathi alphabet.
[(आद्य **य**); सं. **ए, अइ, य**; प्रा. **ए**; **ए–येणें, येर – एर < इतर.**
(मध्य **य**); सं. **क् ग् घ् ज् त् द्** यांचा लोप झाल्यानंतर (यश्रुतिसारखे), द्विस्वरसंधि टाळण्यासाठीं **मणिकार–मण्यार, पंडित–पंड्या, प्रियकर–प्यार, आयना, कायदा, फायदा** '**आ**' नंतरच्या '**ब**' चा **य** होतो. **कायम, करतोय.**]

यःकश्चित्,–श्चन वि. सामान्य, कोणीतरी, क्षुद्र. Somebody, some ordinary person.
[सं. **यः कः चित्** (**चन**).]

यकृत न. शरीरावयव, पित्ताशय. The liver.
[*IE*. Ieq; सं. **यकृत्**; *Av*. yakard; *Gr*. Hpatq; *Lat*. jecur; *Lith*. jeknos; *Lett*. Akne; *Eng*. Hepatic.]

यज(णें) उक्रि. होम करणें, पूजन करणें. To sacrifice, to worship.
[*IE*. Iag–to worship; सं. यज् १ पूजने; *Av*. yazaiti; हिं. **यागी**; संसा. **यजन, यजमान, यज्ञ, यज्वा, यज्ञयाग.**]

यच्चावत्, यच्चयावत् स. सर्व, सगळें, असलेलें सर्व. All whosoever or whatsoever.
[सं. यत्+च+यावत्.]

यजमान पुं. मालक, धनी, जार, नवरा, धार्मिक कृत्यांतील मुख्य. Owner, lord, husband, a person performing a religious ceremony.
[सं. **यज्** १ पूजने; ह्या शब्दाच्या अर्थात फार बदल झाला आहे. मूळ अर्थ **यज्ञ करणारा**–मालक, धनी–नवरा–जार अशा मार्गानें अर्थभेद झालेला दिसतो.]

यजुर्वेद पुं. चार वेदांपैकीं दुसरा वेद. The second of the four Vedas.
[सं. **यजुर्वेद, ✓ यज्, ✓ विद्**; संसा. **यजुर्वेदी, यजुश्शाखी**; अकामसा. **जज्जु, यज्जु.**]

यत्किंचित् अ. थोडें देखिल, थोडेसें. Somewhat.
[सं. **यत् + किम् + चित्.**]

यत्न पुं. प्रयत्न, खटपट, उद्योग. Effort, exertion.
[*IE*. Iat; सं. **यत्**; *Cymr*. Add–iad; *Gall*. ad-iata.]

यथा अ. ज्याप्रमाणें, जसा. As, like as.
[सं. **यथा**; ह्यांतील '**था**' हा अव्ययाचा प्रत्यय. पहिला अवयव '**य**' हा एतत्, इदम् वगैरे सर्वनामांतील '**इ**' ह्या सार्वनामिक बीजाशीं संबद्ध आहे. अकामसा. **यथाक्रम** (क्रमानुसार), **यथातथा** (कसें तरी), **यथाशक्ति** (शक्तीप्रमाणें), **यथायोग्य** (जसें असावें तसें), **यथार्थ** (योग्य, बरोबर), **यथावकाश** (सवडीप्रमाणें), **यथाविधि, यथाशास्त्र** (नियम–शास्त्राप्रमाणें), **यथासांग** (संपूर्ण), **यथास्थित** (भरपूर), **यथेच्छ, यथेष्ट** (भरपूर).]

यंत्र न. साधन, कळीचें साधन, कांहीं गुह्य आकृति. A means, an engine, a machine.
[सं. **यंत्र, ✓ यम्, यंत्र्** १० संकोचने; याकाम. **यंत्र** = तोफ, संहारसाधन (ज्ञा. ११-३४३).]

यंदा अ. ह्या वर्षीं, येणाऱ्या काळीं, This year.
[फा. **आइन्दा** = भावी काळ; अकाम. **अवंदा.**]

यम पुं. काळ, कृतान्त, ताबा, संकट. Yama, the deity presiding over death, control.
[*IE*. Iem; सं. **यम्** १० परिवेषणे; *Av*. yata, yema; देप्रा. **जम.**]

यमुना स्त्री. नदीनाम. The name of a river, the Jamuna.
[सं. **यमुना, ✓ यम्** १० परिवेषणे, **✓ यु.**]

यरवाळीं अ. लवकर. Early.
[सं. **वारवलय, अपरवेला.**]

यलम्मा स्त्री. रेणुका, देवीची जोगतीण. Deity Renuka, a female divotee.
[कान. **यल्लम्मा.**]

यव पुं. धान्यविशेष, सातु, जव. A kind of grain, barley.
[सं. **यव**; गु. सिं. हिं. **जव, जऊ**; रुमा. **जोव**; टालेमीनें उल्लेखलेला Iabadiou = **यवद्वीप** हा शब्द ताडून पहाण्यासारखा आहे.]

य(ये)वज(णें) सक्रि. योजणें, निश्चित करणें. To plan, to employ, to fix.
[सं. **युज्** ७ योगे; **योजणें** ह्याचा हा ग्रामीण व स्त्री भाषांतील उच्चार आहे.]

यवन पुं. अयोनियन मनुष्य, अर्थांत सामान्यीकरण होऊन ग्रीक परकी म्लेच्छ असा अर्थ झाला. An Ionian or Greek but now it means a foreigner generally.
[*Gr*. Ionions ह्याचें संस्कृतीकरण '**यवन**' असें झालें. अशोक शिलालेखी प्राकृतमध्यें **योन** असें रूप येतें. मराठीमध्यें संस्कृत तत्समरूपच रूढ आहे.]

यश न. जय, सुदैव, सुफल, कीर्ति. Fame victory, luck.
[सं. **यशस्, ✓ ईश्.**]

यक्ष पुं. देवयोनिविशेष. A semidivine species.
[सं. **यक्ष्** – पुजणें, √ **यज्.**]

यज्ञ पुं. याग, इष्टि, होम. A sacrifice.
[**सं. यज्ञ, √ यज्**, यजणें पहा.]

यज्ञोपवीत न. जानवें (तीन पदरी सूताचें). The sacred thread.
[**सं. यज्ञ + उपवीति** = यज्ञांत वापरण्याचें वस्त्र.]

याच(णें) सक्रि. मागणें, प्रार्थणें. To beg, to beseech.
[सं. **याच्**; संसा. **याचन, याचना, याचनीय.**]

यात-ती स्त्री. जात, नातें, भेद, वर्ण. Caste.
[सं. **ज्ञाति, याति.**]

यातना स्त्री. कष्ट, हाल, अपेष्टा, दुःख. Torment, agony, pain.
[सं. **यातना, √ यत्.**]

यातायात स्त्री. कष्ट, मेहनत, हेलपाटे. Toil, effort, vexatious going and coming.
[सं. **यात + आयात, √ यत्** = प्रयत्न करणें.]

यात्रा स्त्री. तीर्थक्षेत्राचा प्रवास. A pilgrimage.
[सं. **यात्रा, √ यत्.**]

याद,-दी स्त्री. स्मरण, आठवण, स्मरणार्थ टिपण जंत्री. Recollection.
[फा. **याद्**; पेकामसा. **याददास्त** (**याद + दास्त, √ दफ्तन्** = लिहिणें); **यादगिरी, यादवान.**]

याद पुं. मासा. A fish.
[सं. **यादस्** = जलचर.]

यार पुं. मित्र, प्रेमक. A friend, an associate.
[पेल्हवी. **आयार**; इराणी. **यार**; फा. **यार**; म. **जार** (< सं. **जॄ** – वयोहानौ).]

यावा पुं. उदय, प्राप्ति, आगमन. Rise, arrival.
[सं. **या, आ + इ** २. गतौ; याकाम. **यावा** (ज्ञा. ९-४६२); बकाम. **यावा** (एभा. ३-२९).]

यावाका पुं. धैर्य, पुरुषार्थ. Courage.
[म. **आंवाका**; याकाम. **यावांका** (ज्ञा. १५-१७).]

युंक्त वि. जोडलेला. मिळलेला, सहित. United, joined.
[सं. **युक्त, √ युज्** (निष्ठा).]

युक्त स्त्री. कल्पना, खुबी कौशल्य. Scheme, plan, skill.
[सं. **युक्ति, √ युज्.**]

युद्ध न. लढाई. War, battle.
[*IE.* Ieuq; सं. **युध्**; *Av.* yaozaiti; *Arm.* yuzem; *Lat.* Jutiere, Judes; *Lith.* Jude.]

युवन्, युवा पुं. तरूण. A youth.
[*IE.* jeu; सं. **युवन्, √ यू**; *Av.* yvan; *Lat.* Juvenis; *Lith.* Jaunas; *Lett.* Jauns; *Abg.* gunz.]

[1]**ये(णें)** सक्रि. जाणणें. To know.
[सं. **ज्ञा**; अप. **या.**]

[2]**ये(णें)** अक्रि. आगमन करणें. To come, to arrive.
[सं. **आ + इ**; प्रा. **ए.** प्राकृत कोशकार ‘ **आ+इ** ’ असा संस्कृत धातु देतात. ‘ **आ + या** ’ असा धातु देणें अधिक सयुक्तिक नाहीं का ?]

येऊतें वि. येवढें, इतकें. This much, so much.
[सं. **एतावत्**; प्रा. **एआउत.**]

येखादा वि. कोणीतरी एक. Certain one.
[सं. **एक + अर्ध**; प्रा. **एकाद्ध.**]

येथें अ. ह्या ठिकाणीं. Here.
[सं. **अत्र**; प्रा. **एत्थ, एत्थम्मि, इत्थ**; अप. **इत्तहे**; अकामग्रा. **येथ.**]

येर,-रु सर्व. दुसरा एक. Other.
[सं. **इतर > इअर > येर**; ‘**अपर, अवर, अन्यतर,** पासून दिलेली व्युत्पत्ति तितकीशी ग्राह्य नाहीं. ‘ **ए** ’काराची उपपत्ति नीट लागत नाहीं.]

येरझार स्त्री. खेपा, विनाकारण जाणें येणें. Going and coming.
[म. **येरे + जारे; येरे < आया + रे; झार < जारे < या + रे.**]

ये(य)ळकोट पुं. सातकिल्ले, खंडोबाचा जयाचा शब्द. Seven of forts of deity Khandoba, the cry in honour of that deity.
[कान. **येळकोटि** = सातकिल्ल. **एळकोट** पहा.]

येळील पुं. कंटाळा. Tiresomeness.
[सं. (?) ; शिकाम. **येळील**]

येळील नको करूं । केळिच तुझे उरु ॥ न. द. ८१.
तेथें निस्पृहें जाऊं नये । त्याचें अन्न खाऊं नये ॥
येळिलवाणें करूं नये । आपणासीं ॥ दा. बो. १४,१,५४.

योग पुं. जुळणी, संग, संलग्नता. Union, joining, company.
[**युज्** = जोडणें. **योजणें** पहा.]

योज(णें) सक्रि. निश्चित करणें, व्यवस्था करणें, वापरणें, नेमणें. To plan, to fix, to arrange.
[*IE.* Ieu; सं. **यु, युज्** ७ योगे; *Av.* yaoj, yuj; *Lat.* jungo; *Lith.* jungas; सं. **युक्त** (*Av.* ywxta; *Lat.* junctus; *Lith.* jungtas); सं. **योग** (*Lat.* jaukian); सं. **योजन, युक्ति,** (*Av.* yujjaoti; *Lat.* juncti).]

योध पुं. लढवय्या, वीर, योद्धा. A warrior, a hero.
[सं. **योद्धा, √ युध्** – लढणें.]

योनि स्त्री. जन्म, जन्मस्थान, जननेंद्रिय (स्त्रियांचें). Birth, the generating organ (female organ), the place of birth.
[*IE.* Ieu-ni; सं. **योनि, √ यु**; *Av.* yaone.]

यौवन न. तारुण्य. Youth.
[सं. **(प्र)** + **√ यु, युवन्** पहा.]

र पुं. मराठी वर्णमालेंतील सत्ताविसावें व्यंजन. ह्या वर्णाचें उच्चारण मूर्धन्य असून तो अर्धस्वर समजतात. ह्याचें उच्चारस्थान मूर्धा आहे. ह्याच्या उच्चारांत पुष्कळ फरक पडला आहे. मूळ संस्कृतमधील 'र' प्राकृतमध्यें कांहीं वेळा 'ल' तर कांहीं वेळा 'ड' असा होतो. ह्या उच्चाराचे अवशेष अर्वाचीन बोलींत आढळतात. The twenty seventh consonant in Marathi alphabet.
[(आद्य **र**) सं. **र, वृ, ऋ**; प्रा. **र**; **वृक्ष–रुख, ऋण–रीण.**
(मध्य **र**) सं. **र, ल**; प्रा. **र**; **रंग–रंग, रट–रड.**
सं. **र्य**; प्रा. **र. तर्हि–तर, गर्हा–गाऱ्हा, वल्भ्-वरप, वीर्य-वीर, धैर्य-धीर.**]

रईस पुं. सरदार, श्रीमंत, रहिवासी. A resident, a nobleman.
[अर. **रईस्**; पेकाम. **रईस** (भा-ऐपयाव २१).]

रकटें न. जुनें जाडें भरडें कापड. Piece of old rough cloth.
[कान. **रट्टु** = जाडें भरडें कापड; **रट्टुकु** (वर्णव्यत्यय).]

रक(क्क)म स्त्रीं. (द्रव्य) संख्या, बाब, कलम, ऐवज. An amount, an item, an article.
[अर. **रक्म**; पेकाम. **रकम**; अकाम. **रक्कम.**]

रकाना पुं. स्तंभ, (कागदाचा) घडीचा भाग.
[अर. **रुक्न्.**]

रक्त न. शरीरांतील तांबडा द्रव पदार्थ. The blood.
[सं. **रक्त, (√रंज्)**; = रंगलेलें, त्यावरून लक्षणेनें तांबडा द्रव पदार्थ. अकामसा. **रक्ताळणें, रक्तावणें** (नाधा.) < सं. **रक्ताल**; **रक्तबंबाळ** = रक्तानें भरलेला–माखलेला (सं. **रक्त** + कान. **बंबल** = रास, ढीग, मोठा प्रवाह. संस्कृत–कानडीसमास).]

रक्तखाना पुं. कचेरी, दरबार, फडणिशी फड. A place of business, an office.
[फा. **रख्त** = शाई; शिकाम. **रख्तखाना**; पेकाम. **रख्तवान** = शाई पुरविणारा नोकर.]

रखड(णें) अक्रि. खितपणें, कंठणें, रेंगाळणें. To drudge on, to move heavily.
[सं. **रख्** १ गतौ + ड. **क्षर्** पासून वर्णव्यत्ययानें व्युत्पादणें शक्य आहे परंतु अर्थभेद होतो.]

रखरख स्त्रीं. उन्हाचा कडाका, आग. Heat, scorchedness.
[सं. **रुक्ष** (द्विरुक्ति), परंतु ह्यापेक्षां **राख्–१** शुष्क करणें, ह्या धातूपासून काढणें अधिक ग्राह्य.]

रखवाल पुं. रक्षक, पालक. A guard, a watch.
[सं. **रक्षपालः** (?) ; प्रा. **रक्खवाल**; देप्रा. **रक्खवाल**; कु. **रखवाल**; बं. **राखाल**; ओ. **रकुभल**; बि. **रखवार**; हिं. **रखवार, रखवाल, रखवाला**; पं. **रखवाल**; पं. **रखवाल**; गु. **रखवाळ.** ह्या व्युत्पत्तीनें समाधान होत नाहीं. **रक्ष्** व **पाल्** हे दोन्ही शब्द एका अर्थाचे धातु आहेत. त्यांची द्विरुक्ति कां झाली? शिवाय **वाल** हा प्रत्यय फारसी असल्याची शंका राहतेच. प्राकृत शब्द हे तरी संस्कृत शब्दाची छाया आहेत कां ?]

रखेली स्त्री. ठेवलेली स्त्री, रक्षा. A keep.
[सं. **रक्षा,√रक्ष्** ; '**पा**=पालने' पासून जसा **पात्र** तसाच हा शब्द **रक्ष्** पासून.]

रग स्त्री. जोर, सामर्थ्य, गुर्मी, इंगा. Stiffness, conceit, strength, haughtiness.
[फा. **रग**=धमनी ; पेकाम. **रग** (प्रभाकर १३१); अकाम.–**रग**, **रगेल**=गुर्मीचा, गर्विष्ठ, मस्त.]

रगड वि. पुष्कळ, विपूल, भरपूर, चंगळ. Much, abundant.
[अर. **रघद्**=विपुलता ; अकाम. **रगाडी**=रेलचेल.]

रगड(णें) उक्रि. दाबणें, रेटणें, जोरानें हाणणें. To press and rub roughly.
[सं. **रग्**, **लग्** ; देप्रा. **रग**+**ड** ; कु. **रगडणो** ; ओ. **रगडिबा** ; हिं. **रगडना** ; पं. **रगडणा**; गु. **रगडवूँ**; अकामसा. **रगडा**=दाटी, ढीग.]

रंक वि. गरीब, दरिद्री, सर्व नाश झालेला. Poor, ruined.
[सं. **रच्** १ त्यागे.]

१रंग पुं. वर्ण. A colour.
[१ फा. **रङ्ग्** ; २ सं. **रंग** ; पाप्रा. **रङ्ग** ; का. **रङ्ग** ; ब. ओ. **राग** ; हिं. **रांग** ; पं. लां. **रङ्ग** ; सिं. **रणु** ; याकाम. **रंगाचळ**= आनंद ; **रंगाथिणें**=रंगविणें ; अकामसा. **रंगणें** (नाधा.), **रंगविणें** (णिच्).]

२रंग पुं. सुख, मजा, युक्ति, तजेला. Pleasure, delight, freshness.
[फा. **रङ्ग्** ; अकामसा. **रङ्गढंग**=युक्ति, फन्द, **रङ्गमहाल**, **रंगणें** (सं. **रंज्**)=गढून जाणें ; **रंगेल** (सं. **रंगिर** ; अप. **रंगिर**)=चैनी, आनंदी.]

रं(रिं)गण न. आखाडा, वर्तुळाकार मंडळ. A circle, an arena.
[सं. **रग्** १ गतौ किंवा **रञ्ज** + **अङ्गण.**]

रंघळ(णें) अक्रि. धिमेधिमे चालणें, रेंगाळणें. To move on heavily.
[सं. **रघ्** १ गतौ + **ळ.**]

रच पुं. ढीग, रचलेला जिन्नस. A heap.
[सं. **रच्** १०-रचनायाम् ; अकामसा. **रचनावळ**, **रचणी**, **रचणावळ.**]

रचमेच पुं. उपद्व्याप. Unnecessary toil.
[**रच**+**मेच**, (ध्वनिशब्द), द्विरुक्ति.]

रजई स्त्री. दुलई, लेप. A quilt.
[१ सं. **रंजिक**=कापड ; २ फा. **रङ्गीदन्**=रंगविणें ; पेकाम. **रजाई** ; **३ रझा** नांवाच्या मनुष्यानें ह्याचा शोध लावला. पहिली वस्तु त्यानें निर्माण केली म्हणून त्याच्या नांवावरून वस्तूला नांव पडलें.]

रजक पुं. धोबी, परीट, रंगारी. A washerman.
[सं. **रंज्**–रंग देणें.]

रजपूत पुं. राजपुतान्यांतील हिंदु जमातींतील एक मनुष्य. A man of Rajputana, a Rajput.
[सं. **राजपुत्र** ; प्रा. **राजपुत्त** ; हिं. **राजपूत.** ह्या लोकांमध्यें राजवंश पुष्कळ आहेत. चन्दाच्या माहितीप्रमाणें ३६ वंश आहेत. त्यापैकीं मुख्य चार आहेत-प्रतिहार, परमार सोळंकी, चौहाण. हे सर्व अग्निकुंडांतून (अबू पर्वतावर) बाहेर पडले अशी कथा आहे. कांहीं ठिकाणीं हा वंशाचा आंकडा ९९ आहे. हे क्षत्रिय आहेत कीं नाहींत ? अग्निशुद्धीचा खरा अर्थ काय आहे ? हे प्रश्न अनिर्णित आहेत.]

रज़ा स्त्री. परवानगी, अनुमति, विश्रांति, निरोप. Permission, consent, rest.
[अर. **रिझा** ; पेकाम. **रजा**, **रज़ावन्द** (<**रिझामंद**)= खूष (रा. ६-३०२, ५-२३१८).]

१रंज(णें) अक्रि. रंगणें, गढून जाणें. To be absorbed in.
[सं. **रञ्ज्**=रंजने.]

२रंज(णें) अक्रि. दुःखी होणें, कष्टी होणें To be miserable.
[फा. **रञ्ज्**=दुख ; अकाम. **रञ्जीस** (फा. **रञ्ज़िश्**) ; अकाम. **रंजणें** (गजणें).]

रंजक स्त्री. बार भरण्याची दारू. Ammunition.
[फा. **रन्जक्.**]

रटमट स्त्री. हुरहुर, काळजी. Care, concern.
[**ध्वनिशब्द.**]

रट्टा पुं. खांद्याच्या खालील भाग, कोपर व खांदा ह्यांमधील भाग. The part below the shoulder.
[कान. **रट्टे**=खांद्याच्या खालील भाग.]

रंट्टा,-ट्ट्या पुं. टोला, सपाटा, तडाखा. A heavy stroke.
[कान. **रट्टु** = जाडें भरडें.]

रड(णें) अक्रि. आक्रोश करणें. To cry, to lament.
[सं. **रटति**, (**रटितम्**); पा. **रटति**; प्रा. **रडइ**; अप. **रडन्तउ**; ओ. **रडिबा**, (**रडी**); कां. **रडण**; सिं. **रडणु**; गु. **रडवूँ**; अकामसा. **रडी** = चिरड, प्रेममय द्वंद्व, भांडण. हा शब्द '**रति**' पासून आला असावा. **रडकूळ**, **रडकुंडी** (सं. रट्ट + कुद्), रड = कुरकुर, तक्रार, **रडका**.]

रड्डी पुं. एक आडनांव, उपनाम. A surname.
[सं. **राजन्** (?); द्रा. **रड्डी** = राजा, लहान सरदार. तेलगु शेतकऱ्याची एक पदवी–एक सरदारी जमात. ह्यांनीं इ. स. ११२५–१४३९ पर्यंत तेलगूप्रांतावर राज्य केलें. सध्यांहि त्या प्रांतांतील खेडेगांवांतील मुख्य ग्रामणी हे **रड्डी-रेड्डीच** आहेत.]

रण न. युद्ध, लढाई. A battle.
[सं. **रण**; अकामसा. **रणकंदन**, **रणगाडा**, **रणखांब**, **रणझेंडा**, **रणढोल**, **रणकुदळ**, **रणखंदळ**, **रणखुदळ** = निकराची लढाई.]

रणरण स्त्री. प्रचण्ड ऊष्णता. Heavy or extreme heat.
[सं. **रणति** (आनन्दे), **रणः**–आनंद, युद्ध; प्रा. **रण**, **रणक्कार** (गोंधळ); पं. **रणकणा** = मोठ्या कर्कश आवाजानें बोलणें.]

रत(त्त)ल पुं. एक पौंड, १६ औंस इतकें वजनाचें परिमाण. A pound (measure).
[*Portu.* arratel; अर. **रत्ल्**; म. हिं. **रतल**.]

रताळ न. एक प्रकारचा कंद. A kind of root, sweet potato.
[हा हिंदुस्थानांत बहुतेक प्रांतांत तयार होतो. अमेरिका आणि वेस्ट इंडीजमध्यें तर विशेषच; तरी पण मूळचा मलाया बेटांतील असें म्हणातात. वंगालमध्यें **शकर-खण्ड** असें म्हणतात. सं. **रक्तालु** (**आलु** < **आरूँ** > **रत्तालू**).]

रंति-ती स्त्री. नशीब, प्रेम शृंगार. Fortune, love, romance.
[सं. **रति** √ **रम्**.]

रंत्ती स्त्री. एक लहान वजन. A measure.
[सं. **रक्तिका**; प्रा. **रत्तिआ**; अ. **राति**; सिं. **रती**; हिं. पं. **रत्ती**; कु. **रती**; बं. ओ. **रति**; गु. **रती**. ह्याचें प्रमाण सुमारें दीड गुंज आहे. ह्यानें मोत्यें वजन करतात.]

रतीब पुं. खुराक, नियमित घ्यावयाचा पदार्थ. Daily supply of an article.
[अर. **रातिब**, **रातिबा**, √ **रतुब** = ठराव.]

रत्न न. मणि, मूल्यवान वस्तु. A jewel.
[सं. **रत्न**, √**रम्**, **रत्**.]

रथ पुं. देवदेवतांचा शकट,-गाडी. A chariot.
[सं. **रह्** १ गतौ.]

रदबदल स्त्री. मध्यस्थी, वाटाघाट, शिष्टाई. Mediation, negotiation.
[का. **रद्द-उ-बदल**; पेकामअकाम. **रदबदल**.]

रद्द वि. निकामी झालेलें, खोडलेलें. Cancelled, liquidated.
[अर. **रद्**; पेकामसा. **रदकर्ज** = कर्जफेड; **रद्दी** = निरूपयोगी कागदांचा समूह.]

रधव(णें) सक्रि. संपविणें, सतावणें, अडथळा करणें. To exhaust, to vex, to prevent.
[सं. **रुध्** ७ रोधने.]

रंध(णें) सक्रि. शिजविणें. To cook.
[सं. **रध्**; याकाम. **रंधन**, **रंधण** (ज्ञा. १८-४०७).]

रन्धा पुं. लांकूड साफ करावयाचें सुताराचें हत्यार. A carpenter's plane.
[फा. **रन्दा**; अकामसा. **रन्ध(णें)** = रन्धा मारणें, साफ करणें.]

रप, **रपका** पुं. धपाटा, गुद्दा. A severe stroke.
[सं. **रंफ्** १ तांडने; परंतु हा ध्वनिशब्द असावा. कान. **रप्** = मारण्याचा आवाज; **रेप्पे** = मारणें; अकामसा. **रपकन्**, **रपदिशी**, **रपाटा**, **रपाटणें**.]

रफिक पुं. स्नेही, मित्र. A friend.

रफू पुं. तूण, कापडाचें छिद्र शिवणें. Darning.
[अर. **रफ्व**; फा. **रफू**.]

रबड(णें) क्रि. फार काम करणें, दमणें. To labour or work hard.
[सं. १ **रभस्वन्**, २ **रभट** (नाधा).]

रबडा पुं. चिखल, रद्दा, लादा. A mass of mud.

[१ सं. **री**-स्रवणे ; २ हिं. **राब** ; अकामसा. **रबडी** = दुधावरची साय, मलई.]

रबर पुं. एक प्रकारच्या झाडाचा चीक. Rubber.

रबी,-ब्बी स्त्री. वैशाखी पीक. The vernal crop.

[अर. **रबीई** = वसंत ऋतूंतील. **रबी** आणि **खरीफ** हीं दोन ऋतूंतील पिकें आहेत.]

रम(णें) क्रि. खेळणें, क्रीडा करणें, गढणें. To play, to delight, to sport, to be engrossed in.

[सं. **रम्णाति, रम्यति, रमते** ; पा. **रम्मो** ; प्रा. **रम्मइ** ; का. **रमुं** ; अ. **रमिब** ; हिं. **रमना** ; पं. **रम्णा** ; सिं. **रमणु** ; गु. **रमवूँ** ; अकामसा. **रमणीक, रमणूक, रमत** = खेळ, **रमणा** = बाग, क्रीडास्थान.]

रमजान पुं. अरबी वर्षाचा नववा महिना. The ninth month in the Muslim calendar.

[अर. **रमझान्.**]

रमल न ज्योतिषशास्त्र. Astrology.

[अर. **रमल्.**]

रयत स्त्री. शेतकरी, प्रजा. A tenant, a subject.

[अर. **र‘इयत्**, √**र’आ** = शेती करणें,–गवत खाणें–गवत उगवणें,–शेती करणें–प्रजा अशा मार्गानें अर्थांत बदल झाला.]

रया स्त्री. किंमत, गुण, वजन. Merit, value.

[सं. **रा** = देणें (?); परंतु हा शब्द परकी दिसतो.]

रवंथ पुं.स्त्री. चर्वण, पुनः पुनः चावणें. Rumination.

[सं. **रोमंथ.**]

रवंदळ स्त्री. नाश, चुराडा, कुसकरणें, तुडविणें. Trampling under, distruction.

[सं. **रय्** १ गतौ, **दल्** १ अवयवे.]

रवरव(णें) क्रि. शहारे येणें, मुंग्या येणें, कणकणणें. To have horripulation, to be affected with stinging sensation.

[सं. **रि** ५ हिंसायाम् ; अकामसा. **रवरवीत** = ओळी असलेलें.]

रवळी स्त्री. टोपली, तांदूळ धुण्याची भोकें असलेली टोपली, भोंकाचें भांडें. A basket, basket-like vessel.

[कान. **रवळीगे** = बांबूची टोपली ; म. **रोळी, रौळी.**]

रवा पुं. कण असलेलें पीठ, कण. Flour with granules, grain grit.

[कान. (तद्भव) **रवे** ; सं. **रज** ; प्रा. **रअ.** हाच शब्द ता, ते, हिं. म. भाषांत आहे ; अकाम. **रव, रवळणें.**]

रवाना वि. पाठविलेला, प्रेषित. Despatched, departing.

[फा. **रवानह**, √**रवा** = जाणें ; पेकाम. **रवानगी** (फा. **रसानगी**) (रा. ५-१९९) = निरोप, पाठवणी.]

रवासुदगी स्त्री. दस्तऐवज, सनद, पावती. An official document.

[फा. **रवनाशुदा** = पावता झालेला ; पेकाम. **रवासुदगी** (रा. १५-१०१)]

रवि पुं. सूर्य. The sun.

[सं. **रवि**, √ **रू, रा.**]

रवी स्त्री. ताक करण्याची काठी. A churning staff.

[सं. **अर्कवृक्ष** ; देप्रा. **रवओ** = मन्थनः (२३७·४), **रूवी** (अर्कद्रुम); कान. **रावि** = वृक्षविशेष ; हें लांकूड ‘**अर्क**’ नांवाच्या वृक्षाचें असतें, म्हणून त्याला रवि म्हणण्याचा प्रघात आहे.]

रशी,-श्शी स्त्री. दोरी, दोर. A cord.

[सं. **रश्मि** ; प्रा. **रस्सि** ; पं. **रस्सा, रस्सी** ; हिं. **रास** = लगाम, **रस्सी** = दोर ; बं. **रसा, रसी** ; अ. **रशि** ; का. **रझ** ; गु. **रसी, रसो, रास**(स्त्री) ; सिंह. **रॅस्** = प्रकाश, किरण.]

रशीद स्त्री. पावती. A receipt.

[फा. **रसीद** = आलेली ; *Eng.* Receipt चा अपभ्रंश हा वरील शब्द होणें शक्य आहे.]

रस पुं. पदार्थांतील द्रव भाग. The juice or sap in a substance.

[सं. **रस** ; पा. प्रा. **रस** ; का. कु. **रस** ; अ. **रह** ; बं. **रस** ; पं. **रहा** ; ओ. **रस** ; हिं. **रस्** ; सिं. **रहो** ; गु. **रस्** ; अकामसा. **रसा, रस्सा** (पं. **रस, रसा** = मांसरस, **रहा** = तोंडीं लावणें, सिंह. **राह** (**रा** = चव मादक पेय.); **रसाळ** = रसयुक्त.]

रसक(णें) क्रि. आनंदानें गढून जाणें. To be engaged pleasantly,
[सं. रस् १ आस्वादने, **रसीक** (नाधा.).]

^{1}रसद स्त्री. सैन्याचा दाणागोटा, दाणावैरण. Supply of corn to an army, forage.
[फा. **रसद्**.]

रसरस(णें) अक्रि. रसानें पूर्ण भरणें, धगधगणें. To be full of juice, to blaze.
[सं. **रह्** + **स्** = दीप्तिमान् असणें, **रक्ष** > **रस**.]

रसोई स्त्री. स्वयंपाक. Cooking,
[सं. **रसवती** ; प्रा. **रसवई**(स्त्री) ; अप(प्रा). **रसोइ** ; हिं. **रसोई** ; गु. **रसोई**.]

रस्ता पुं. वाट, मार्ग, वहिवाट, नियम. A road, a path, a way.
[फा. **रास्ता** ; सं. **रथ्या** ; प्रा. **रच्छा**.]

रहा स्त्री. मार्ग, वागणूक. A way, practice.
[अर **राह** ; फा. हिं. **राह्** , **राहा** ; अकाम. **रहदार** = मार्गरक्षक, **रहदारी** = वर्दळ, **रहवास** = वस्ती.]

रहा(णें) क्रि. असणें, थांबणें, वस्ती करणें. To stay, to live, to stop.
[सं. **रहति**, **रहयति**, **ली** ९ लयने ; पा. **रहति**, **रहायति** ; जैनप्रा. **रहए** = तो राहिला ; प्रा. **रहइ**, **रहेइ**, (**रहइ** = सोडणें); देप्रा. **राहो** निरंतर (१४२-२); कु. **रउणो** ; अ. **रहिब** ; बं. **रहा** ; ओ. **रहिबा** ; हिं. **रहना** ; पं. **रहिणा** ; लां. **रहण** ; सिं. **रहणु** ; गु. **रहेवूँ** ; याकाम. **राहटी**, **राहाट** (व्यापार), **राहाण** (नरुस्व ७३५); अकाम. **राहा**, **राह**.]

रहाट पुं. आडांतून पाणी ओढण्याचें साधन, कापूस कातण्याचें यंत्र. The wood-wheel to draw water.
[सं. **अरघट्ट** ; प्रा. **अरहट्ट** (पुं.) **रहट्ट** ; गु. हिं. **रेंट** ; सिं. **अरटु** ; पं. **रट्ट**, **रट** ; हिं. **रहट**, **अर्हट** ; अकाम **रहाटगाडगें**–पाणी काढण्याचें गाडग्याचें यंत्र.]

रहित वि. शिवाय, खेरीज, Destitute of.
[सं. **रह्** १ त्यागे.]

रा प्र. अतिशय ह्या अर्थी प्रत्यय. An affix meaning excess.
[सं. **र**, **इर** ; प्रा. **इर** ; म. **इरा**, **रा** (कुत्सितार्थे) ; उदा० **मधुर**, **हसिर**, **भ्रमिर**, **हसरा**,]

^{1}राइ स्त्री. ओळ, पंक्ति. A line, a row.
[सं. **राजि** ; प्रा. **राइ** (स्त्री).]

^{2}राई स्त्री. मोरी, एक धान्यविशेष. Mustard seed.
[सं. **राजिका** ; पा. **राजिका** ; प्रा. **राइका** ; कु. **राई** ; अ. **लाइ**, **लार**, **राल्** ; बं. ओ. वि. **राई** ; हिं. **राई** ; **राया** (पुं.) ; पं. सिं. **राई** ; गु. **राइ** ; याकाम. **राई**.]

^{3}राई,–ही स्त्री. स्त्रीनाम. A female name.
[सं. **राधिका**.]

राईस,–रहीस पुं. मुख्य, नेता, सरदार. Leader, chief, nobleman.
[अर. **र** + **अइस्** < **रअस्** = मुख्य नेता. **रइस** पहा.]

राऊत पुं. घोडेस्वार. A horse soldier, a trooper.
[सं. **राजपुत्रः** ; पा. **राजपुत्तो** ; प्रा. **रायउत्त**, **राउत** ; ओ. **राउत**, **राउतराय** (राजपुत्राचा धाकटा भाऊ); हिं. **राऊत** ; गु. **राउत** ; ने. **राउत्** ; याकाम. बकाम. **राऊत** (रा. २५). संस्कृत शब्द उत्तरकालीन संस्कृतीकरणासारखा दिसतो.]

राऊ(व)ळ पुं. राजाचा वंश, एक आडनांव, राजमंदिर, देऊळ. A prince, a temple.
[सं. **राजकुल** ; प्रा. **राउल** (पुं.); याकाम. **राऊळ** (ज्ञा. ५-८६). लिङ्गभेद प्राकृत काळींच झाला.]

राकस(मुख) पुं. भयंकर, व्यक्ति, राक्षस. A terrific (figure), Rakshasa.
[सं. **राक्षस** ; **रक्षस्**, (**राक्षसी**) ; पाप्रा. **रक्खस** ; बि. **राकस्** ; हिं. **राखस्** ; पं. **राखस्** ; **राकस्** ; गु. **राखस्**.]

राख(णें) क्रि. ठेवणें, सांभाळणें, नेमणें, पालन करणें. To keep, to protect, to fix, to guard.
[सं. **रक्षति** ; पा. **रक्खति** ; प्रा. **रक्खइ** ; अप. **रक्ख** ; का. **रछुं** ; कु. **राखणी** ; अ. **राखिब** ; ब. **राखा** ; ओ. **रखिबा** ; हिं. **राखना** ; पं. **रक्खणा** ; लां. **रखण** ; सिं. **रखणु** ; गु. **राखवूँ**.]

^{2}राख स्त्री. अग्नि विजल्यानंतर राहणारी पांढरी भुकटी. Ashes.
[सं. **रह्**–दीप्तौ ; **रक्षा** ; **रक्षा** = धाना ; प्रा. **रक्खा** ; हिं. **राख** ; पं. **राख** ; सिं. **रखा** ; गु. **राख** ; **रासणें** (निखारे), **रसरशीत** (अग्नि), **राखुंडी** (राख+उंडा).]

^{१}**राख,-खी** स्त्री. रक्षण, हातांत बांधण्याचा दोरा. A charmed cord tied on wrist.

[सं. **रक्षा** ; पाप्रा. **रक्खा** ; का. **रोखु** ; बं. **राखि** ; बि. हिं. **राखी** ; पं. **रक्खिआ** ; सिं. **रख** ; गु. **राखी**. टर्नरचा **रक्षा** शब्दाच्या दोन अर्थासंबधी घोंटाळा झाला आहे.]

^{२}**राख** स्त्री. रक्षा, ठेविलेली बाई. A keep.

[सं. **रक्ष्**–रक्षणे. **पात्र** हा शब्द जसा **पा**-पालने पासून तसा हा शब्द '**रक्ष्**' पासून.]

रांग(णें) अक्रि. सरपटणें, हात गुडघे टेंकून जाणें. To crawl.

[सं. **रंघ्**, **रंग्** १ गतौ ; याकाम. अकाम. **रांग**=ओळ, योग्यता.]

रांगोळी स्त्री. (भोजनांत पात्रापुढें घालण्याकरतां) रंगाची भुकटी. Coloured powder.

[सं. **रंग+आवलि** ; किंवा **रंगवल्ली**.]

राज(णें) अक्रि. समाधान होणें. To be satisfied.

[सं. **राज्** ; पा. **रज्जति** ; प्रा. **रज्जइ** ; हिं. **राजना** ; पं. **रज्जणा** ; ला. **रज्जण** ; सिं. **रजणु** ; गु. **राजवूँ**.]

राज न. राज्य. Kingdom.

[सं. **राज्यम्** ; पाप्रा. **रज्ज** ; कु. **राज्** ; अ. **राझ** ; हिं. **राज्** ; सिं. **राजु**.]

राजगिरा पुं. धान्यविशेष. A kind of corn.

[सं. **राय+कीर** (?), **राजिका > राई** (मोरी).]

राजा पुं. मालक, नृप, भूपाल. A king, lord.

[सं. **राजन्**, √ **राज्**=प्रकाशणें, √ **रंज्** ; याकाम. **राजवळ**=राजाचीं अक्षरें,–सही (ज्ञा. १६-१६३).]

^{१}**राजी** स्त्री. ओळ, राई. A line, a row.

[सं. **राजी**.]

^{२}**राजी** वि. खूष, तयार. Pleased, satisfied.

[अर. फा. **राझी** ; शिकाम. **राजी** (न. द. १२) ; अकामसा. **राजीनामा**, **राजीबिराजी**=सुख दुःख, **रजावती**, **राजीखुषी** (अर. **राजी**, फा. **खुष**=सुखी).]

रांज(झ)ण पुं. मातीचें मोठें भांडें. A big earthen jar.

[सं. **राध्** ; देप्रा. **रांधन** ; **रंजण** (पुं.).]

रांजणवाडी स्त्री. डोळ्याच्या पापणीवरील पुळी. A pimple on the eye-lid.

[सं. **रध्** ४ हिंसायाम् + **पीटिका**, **रंध्यनपीटिका** ; देप्रा. **गंदीणी चक्षुःस्थगनक्रीडा** (हे. २-८३).]

राट,-ठ वि. जाडेभरडें, ओबडधोबड, कर्कश, आडदांड. Coarse, thick, rough.

[कान. **रट्टु**=दुप्पट, दुहेरी दोऱ्यानें विणलेला पट, जाडेंभरडें कापड.]

^{१}**राड** स्त्री. भांडण, गोंधळ, घोंटाळा, संकट. Confusion, chaos, calamity, quarrel.

[सं. **रातिः** (युद्ध) ; प्रा. **राडि** ; देप्रा. **राडी** (संग्राम) ; कु. हिं. पं. **राड्** (भांडण) ; सिं. **राडि**, **राडो** (ओरड) ; गु. **राड**, **राढ** ; सं. **राति** शब्दांतील धातु कोणता ? √ **रा**, **अराति**=शत्रु असा एक शब्द आहे.]

^{२}**राड** स्त्री. रेंदाड, रस्त्यावरील चिखल. Sticky mud.

[कान. **राडी** ; याकाम. **राडी** (ज्ञा. १७-१६०).]

राणा पुं. आदरार्थी शब्द, राजा. A king.

[सं. **राजन्**, (**राजन्य**) ; पा. **राजञो** ; प्रा. **रायण्ण**, **राइण्ण** ; प्रा. **राणा** ; ओ. **राण** ; हिं. **राना** ; पं. **राणा** ; गु. **राणो** ; ने. **राना** ; याकामसा. **राणीव**=राज्य (ज्ञा. ६-३५६) ; **राणी**=राजपत्नी (सं. **राज्ञी** ; पा. **रञ्ञी** ; प्रा. **रण्णी**, **राणी**, **राणिआ** ; कु. **राणी** ; ओ. **राणि** ; हिं. **राणी** ; पं. सिं. गु. **राणी**.).]

रांड स्त्री. विधवा, बदचालीची स्त्री. A widow, an adulterous woman.

[सं. **रण्डः** (विगलित गात्र), **रण्डा**= विधवा ; प्रा. **रण्डा** ; का. **रोणु** (अधू हाताचा) ; कु. **रान्** ; बं. **रांड्** ; ओ. **राण्ड** ; बि. **राँड** ; हिं. **राँड** ; पं. लां. **रण्ड** (स्त्री.) ; सि. **रण** (=विधवा) ; गु. **राँड** ; ने. **रांड** ; कान. **रण्डे**= विधवा, वेश्या ; (म. **रांडलेक**, **राण्डेचा**).]

रात स्त्री. रात्र, काळोख. The night, darkness.

[सं. **रात्री** ; पा. **रत्ती** ; प्रा. **रत्ती**, **राडी**, **राई** ; का. **राथ** ; कु. **रात्** ; अ. **राति** ; बं. **रात्** ; ओ. **राति** ; हिं. पं. लां. **रात्** ; सिं. **राति** ; गु. **रात्** ; ने. **रात्** ; याकाम. **राती** (ज्ञा. १६-२), **राताव(णें)**, **रातीदेवो**= रात्रंदिवस ; अकामसा. **रातबिरात** (संकट), **रातोरातीं**.]

रातन्दळ न. रात्रींचा आंधळेपणा. The night-blindness.
[सं. रात्र्यान्ध्यम् (?); प्रा. रत्तिअन्धअ, रत्तिन्ध ; हिं. रतउंध ; पं. रतउंधी (स्त्री) ; रताहना (पुं.).]

राता पुं. वि. तांबडा, डोळयांतील तांबडेंपणा. Red, the redness in eye.
[सं. रक्त–रक्तकः, √ रंजू, पाप्रा. रत्त ; कु. रातो ; अ. रातुल् ; ओ. रता, हिं. राता ; पं. लां. रत्ता ; सें. रतो ; गु. रातूँ.]

रान, रण न. अरण्य, वन, जंगल, रुक्षप्रदेश. A forest, a desert, a desolate tract.
[सं. आरण्यक, अरण्यम् ; पा. अरण्णम् ; प्रा. अरण्ण, रण्ण ; हिं. रान् (पुं) ; सिं. रिन (स्त्री), रण, अरण, अरणो ; सिं. रिणु (ओसाड मैदान) ; अकामसा. रानटी (अरण्यवर्ती > रण्णवट्टी.).]

रांध(णें) क्रि. तयार करणें, शिजविणें. To dress (food), to cook.
[सं. रन्धयति (ऋणद्धि); पा. रन्धति ; प्रा. रन्धेइ, रन्धइ; का. रणुन् ; आ. रांधिब ; ब. रांधा ; ओ. रान्धिबा ; हिं. रांधना ; सिं. रन्धणु ; गु. राँधवूँ ; याकाम. रांधवणी = स्वयंपाकीण (ज्ञा.२-२५४); अकाम. रांधणें = शिजविणें, रंधणें (तासणें) रंधा = रंधण्याचें हत्यार, रांधण = स्वयंपाक.]

रांधा पुं. चिखल वगैरेचा गोळा. A lump of sticky substance like mud.
[कान: रोडें, रोंदें = चिखल.]

रांपँ(णें), रांप(णें) अक्रि. काळे पडणें, रंगपालट होणें. To blacken, to change colour.
[सं. रक्ताभः √ रंज् (णिच्); देप्रा. राविअं रञ्जितम् (२३८-१); प्रा. रावेइ (हे ४-४९).]

रांप(णें) सक्रि. चांचपणें, दाबणें, रापीनें दाबणें, हिसकावून घेणें. To feel, to press, to squeeze.
[सं. रफ् १ हिंसायाम्, गतौ ; रभ् १ राभस्ये.]

राप, रांप पुं. तुरटपणा. Astringent taste.
[कु. राफ (उष्णता); अ. राप (प्रेम, माया.); पं. रप्परप्प (एकदम).]

राँपा पुं. तासण्याचें हत्यार, चामडें कापण्याचें हत्यार. An implement for stripping.
[सं. रफ् १ हिंसायाम् ; प्रा. रंप, रंपइ, रफइ, रप्पइ, रम्हइ (तासणें); ओ. राम्प, राम्पिबा ; बि. रांपी, रापी ; हिं. रांपी ; पं. रम्बी, रम्बा ; लां. रम्बा (पुं.); सिं. रंबु (पुं.) ; गु. राँप्.]

राब स्त्री. पुं. दाट काकवी, उसाच्या रसाचा दाट रांधा. Boiled juice of the sugarcane.
[देप्रा. रब्बा ; हिं. राब.]

राव(णें) क्रि. सरावणें, कष्ट करणें. To toil, to have practice.
[सं. १ रफ् १ गतौ ; २ रध् १ संराधने ; याकाम. राब = मेहनत (ज्ञा. १८-९५).]

राबता पुं. नेहमींची वहिवाट. Frequency of passage.
[फा. रफ्त् रध्-संराधने.]

रावडी स्त्री. एक दूधखव्याचा मिष्ट पदार्थ. A kind of custard.
[सं. री – स्रवणे; देप्रा. रब्बा ; प्रा. रब्ब, रब्ब(डि); हिं. पं. राबडी ; गु. राबडी ; बि. राब ; हिं. पं. राब ; सिं. रबा ; गु. राव ; अर. रब्ब–रस ; अकाम. राब = गुळाचा राब. रबडा पहा.]

रामफळ न. फळविशेष. A kind of fruit.

रामरगाडा पुं. पराकाष्ठेची गर्दी, गोंधळ. Extreme chaos, confusion.

रामरट्टा पुं. मोठा आघात. A severe stroke.
[ह्यामधील ‘ राम ’ ह्या शब्दाचा आणि ‘ राम ’ विशेषनाम ह्याचा कांहीं संबंध नाहीं. एकतर ‘ राम ’ हा परकी–द्राविडी शब्द असावा किंवा ‘ राम ‘ हा आराम ह्याच्याशीं किंवा ‘ रान ’ ह्याच्याशीं संबद्ध असावा. ‘ रामफळ ’ ह्यांत तर संशय उरत नाहीं. सीताफळ = थंड फळ.]

रामू(मो)शी पुं. एक विशिष्ट जात, रखवालदार. A caste.
[सं. अरण्यवासी > रणवासी, रामवंशी (?). ह्यांची एक भाषा आहे. तिच्यांत तेलगु शब्द फार आहेत.]

राय, राव पुं. बहुमानार्थी, आदरार्थी शब्द. A term of honour.
[सं. राजा ; पा. राजा ; प्रा. राया ; अप. राअु ; का. राय ; बं. राय ; ओ. राय ; हिं. राय, राव ;

पं. **राइ, राउ** (पु.); सिं. **राउ** ; गु. **राय, राव** ; ने. **राई** ; याकाम. बकाम. **रावो**.]

राय,-वा पुं. पोपट. A parrot.
[देप्रा. **राय** = चटक.]

रायतें न. आंबा, कांकडी, मोहरी वगैरे घालून केलेला जिन्नस. A kind of sauce,
[सं. **राई + युक्त** (?)]

रायवळ वि. जंगली, रानटी (लांकूड). Wild, rustic.
[सं. **अरण्य > रण्ण > रान + आवलि** किंवा **वल्ली**.]

राव(णें), रांवणें क्रि. रंगविणें. To dye, to colour.
[सं. **रञ्ज्** ; याकाम. **रावणें, रावण** = रंग (उगी. २७).]

राव पुं. राय पहा.

राष्ट्र न. देश, राज्य, प्रांत, लोक किंवा देश–समुदाय. A nation, a country.
[सं. **राज्**.]

राष्ट्रण न. अस्ताव्यस्त मेळा, झुंड. A crowd.
[सं. **राष्ट्र**.]

रास स्त्री. ढीग, संचय, तारकापुंज. A heap, a collection.
[सं. **राशिः**, पा. **रासि** ; प्रा. **रासि** ; अ. **राहि** ; सिं. **राहि** ; गु. **रास**.]

रास न. संख्यावाचक शब्द. A numeral.
[अर. **रास्** = डोकें. हा घोड्याविषयींच वापरतात.]

रास वि. सरळ, तिरकसच्याविरुद्ध. Straight.
[फा. **रास्त**.]

रासन्हाण न. विहिणींचें नहाण. A ceremonial bath.
[सं. **रासस्नान** = समारंभानें एकत्रित स्नान करणें, रासक्रीडा पहा. २ फा. **रास** = डोकें.]

रास्त,-स्ती वि. बरोबर, खरें, सत्य, न्याय्य, नेकीचा. Right, correct, true, just.
[फा. **रास्त्**.]

राह(णें) कि. वस्ती करणें, रहाणें पहा. To stay, to live.

राळ,-ळा पुं. धान्यविशेष. A kind of grain.
[सं. **राल, रालकः**; प्रा. **राल, रालग, रालय** ; गु. सिं. **राळ** ; पं. हिं. बं. **राल**.]

राळ स्त्री. एक ज्वालाग्राही पदार्थ. A kind of inflamable substance.
[सं. **राल, रालि** ; गु. सिं. **राळ** ; पं. हि. बं. **राल**.]

रिकामा वि. पोकळ, आंत कांहीं नसलेला. Empty, hollow.
[सं. **रिक्त + कर्मन्, √ रिच्** ; प्रा. **रिक्क + कम्म** ; देप्रा. **रिक्कं** स्तोकम् (२३८-८); सिं. **रीकमु** = निरुपयोगी. संस्कृत शब्दांतील **कर्मन्** शब्दाचें विशेष औचित्य नाहीं, असें जर म्हटलें तर शेवटच्या '**म**' ची उपपत्ति काय ? आहे म्हटलें तर तें पटत नाहीं. '**म**' हा अन्यभाषीय प्रत्यय आहे काय ?]

रिक्शा स्त्री. मनुष्यानें ओढावयाची गाडी. A rikshaw.
[जपानी. **रिकशा** ; **किशा** = आगगाडी.]

रिग(घ)(णें) अक्रि. शिरणें, प्रवेश करणें. To enter, to penetrate.
[सं. **रिघ्** १ गतौ, **रिख्** (?); प्रा. **रिग्गइ** ; देप्रा. **रिग्गो** ; **रइंग्रा प्रवेशः** (२३८-२); पं. **रिघन्** ; हिं. **रिंगना, रेंगना**, गु. **रिघवूँ** ; बं. **रिंघन** ; याकाम. **रिघणें** ; **रिगणें** (ज्ञा. १७-१९३); **रिगावा, रिगीनिगी** (ज्ञा. १३-१०२); अकाम. **रिगवणी, रिगाव, रीग**.]

रिंगणी स्त्री. एक प्रकारची वेली व तिचें फल. A kind of plant.
[सं. (?); देप्रा. **रिंगणी** ; प्रा. **रिंगणी** ; हिं. **रेंगनी** ; गु. **रिंगणी**.]

रिचव(णें) उक्रि. पडणें, ढासळणें, मोकळे करणें, ओतणें. To crumble, to clash, to pour down.
[सं. **रिच्** ७ विरेचने, **रिष्** ४ हिंसायाम् ; अकाम. **रिचाव,-विणें**.]

रिझ(ज)(णें) सक्रि. खुषी होणें, आनंदणें, To please, to satisfy.
[सं. **ऋध्** (**ऋध्यति**); प्रा. **रिज्झइ**. धातु सविकरण प्राकृतमध्यें उतरला ; सिं. **रीझणु** ; गु. **रिझवूँ** ; हिं. **रिझना** ; पं. **रिझणा, रिज्झणा** ; याकाम. **रिझणें** ; अकाम. **रिझव** (णिच्).]

रिठा पुं. एक प्रकारचें फळ. A kind of fruit used for cleaning clothes.

[सं. अरिष्टकः; प्रा. अरिट्ठअ, अरिट्ठा, रिट्ठ; कु. रिठो; बं. ओ. रिठा; हिं. रीठा; पं. रिठा, रेठा; गु. रीठ; सं. अरिष्टक हा शब्द उत्तरकालीन संस्कृतीकरणासारखा दिसतो. मूळ शब्द रिट्ठ असा देशीच असावा.]

रिता वि मोकळा. Empty.

[सं. रिक्तः, रिक्तकः, √ रिच्; पा. रित्तो, रित्तको; प्रा. रित्त; कु. रितो; हिं. रीता; याकाम. रिता (ज्ञा. ११·४७६).]

रिद्धि स्त्री. संपत्ति भरभराट, एक सिद्धि. Wealth, prosperity.

[सं. ऋद्धि, √ ऋध्; प्रा. रिद्धि.]

रिपरिप स्त्री. पावसाची सर. Drizzling (of rain).

[सं. रिंफ् १ हिंसायाम्. (द्विरुक्त) ध्वनिशब्द.]

रिपोर्ट पुं. अहवाल, वृत्तान्त. Report.

[*Lat.* Re-porto, Reportare; *Eng.* Report.]

रिबीट न. दोन लोखंडी पट्टयांची जुळणी. A rivet.

[*Fr.* River = rivet; *Icel.* Rifa.]

रिबीन स्त्री. रंगीत फितीचा वेणींत अगूळासारखा बांधण्याचा तुकडा. Ribbon.

[*Eng.* Ribbon; (*Scand.* origin); *Dan.* Vrideband = A twisted band or string; *Ir.* Ribin; *Gael.* Ribean.]

रिमझिम वि. सारखा हळूहळू पाऊस पडण्याचा प्रकार. Drizzling.

[ध्वनिशब्द; कु. रिम्झिम् (अशक्त); हिं. रिमझिम्; (पावसाचा आवाज).]

रिवाज पुं. चाल, पद्धत, शिरस्ता. Practice, custom, tradition.

[अर. रिवाज्.]

रिसाला पुं. घोडदळ. Cavalry.

[अर. रिशाल < रसूल-रसूल ह्या मुलकी अधिकाऱ्यांचें काम. त्याचें काम अटक करण्याचें असें. ही अर्थामध्यें क्रांति कशी झाली हें सांगतां येत नाहीं. ऐनीअकबरीमध्यें रिसालह असा शब्द आहे.]

रीण न. कर्ज, ऋण. Debt.

[सं. ऋणम्; पा. इणम्; प्रा. रिण; का. रेन्; कु. रिण्; हिं. पं. रिन् (पुं); लां. रिण्ण (पुं.); ने. रीन्; ऋण पहा.]

रीत स्त्री. पद्धत, वहिवाट. Custom, practice.

[सं. रीति.]

रीम न. कागदाचे वीस दस्ते. A ream of papers.

[*Ar.* Rizma = A packer of paper; *Fr.* Rame; *Sp.* Resma; *Port.* Rema; *Eng.* Ream. चोवीस कागदांचा एक दस्ता होतो.]

रीस् स्त्री. राग, क्रोध, अपराध, तिटकारा. Anger, contempt.

[सं. रिष् = व्यथा, √ रुष् (?), √ रिष्; का. रेह्; पं. कु. हिं. रिस् = क्रोध; सिं. रीस = स्पर्धा; गु. रीस्.]

रीस, रींस न. अस्वल. A bear.

[सं. ऋक्ष; पा. रिच्छ, रिक्ख; प्रा. रीस, अच्छ; पं. रिच्छ; हिं. रीछ; गु. रीछ; सिं. रिछु; का. इछ; लमा. रिच. एका 'ऋक्षः'चीं दोन प्राकृत रूपें होत: १ रीस २ अच्छ. एकापासून मराठी रीस, दुसऱ्यापासून मराठी अस्वल हे शब्द निर्माण झाले.]

रुई स्त्री. वृक्षविशेष. A kind of tree.

[सं. अर्क (?); देप्रा. रूवी अर्कद्रुमः (२३९-१०); ह्यापासून म. रवी (ताक घुसळण्याची) हा शब्द आला.]

रुका पुं. एक प्रकारचें नाणें, पैसा, एक हिशेबी नाणें. A coin.

[सं. रुक्मन्; = सोनें, देवघेवीचें साधन, √ रुच् १ दीप्तौ. तेलु. रोक्कम, रुक्कम; अर. रुक्आ; याकाम. रुका (स्मृ. ११०).]

रुकार पुं. होकार, संमति. Assent.

[फा. रु + सं. कार = रु-शब्द = होय म्हणणें. लेखाची नक्कल घेतल्यावर रुजवात घेतल्याबद्दल रु असें चिह्न करीत त्यावरून.]

रुखवत न. लग्नविधींत नवऱ्यामुलास द्यावयाचें भोजन वगैरे पदार्थ, मानसन्मान. A present or gift (esp. of sweemeats) to a bridegroom.

[फा. रुषवत् = देणगी; याकाम. रुखवत (धपू.)]

रुखरुख स्त्री. अस्वास्थ्य, चिंता, टोंचणी, चटका. Disquietude, vexation, regret.

[सं. रुष्; १ शब्दे; द्विरुक्त किंवा ध्वनिशब्द.]

रुखसत स्त्री. निरोप, सोडवणूक, परवानगी. Permission to leave or to depart.

[अर. रुख्सत्; पेकाम. रुख्कत (दिमरा. १-१०१), रुख्सत (रा. १ २३)]

रुखा वि. नापीक, ओसाड. Dry, desolate, barren.

[सं. रुक्षः, लुक्षः; पा. लूखो; प्रा. रुक्ख, लुक्ख, लूखा; का. लोखु; कु. रूखो; बं. ओ. रुखा; हिं. रूखा; पं. लां. रुक्खा; सिं. रुखो; गु. लूखूँ. टर्नरनें "रुक् ग् = दुःख" ह्या शब्दाशीं जोडल्यामुळें त्याचा घोटाळा झालेला दिसतो.]

रुच(णें) अक्रि. आवडणें, गोड वाटणें. To like, to be tasty or agreeable.

[सं. रुच्यते, रोचते; पा. रुच्चति; प्रा. रुच्चइ; का. रोचुँ; कु. रुचणो; आ. रुसिब; बं. रुचा; ओ. रुचिबा; हिं. रुचना, रूचना; पं. रुचणा; सिं. रुचणु; गु. रुचवूँ; ने. रुच्नु; अकामसा. रुचि, रुचिर, रुचिकर, रुचकर, अभिरुचि.]

रुज(णें) अक्रि. मूळ धरणें,–लागणें, कोंभ येणें. To sow, to shoot, to sprout.

[सं. रुह्–वृद्धौ,–रुह्य, रुध्; प्रा. रुज्झ; प्राकृतरूपावरून रुह्य आणि रुध्य अशीं संस्कृतरूपें अनुमानितां येतात. त्याखेरीज 'ज्झ' ची उपपत्ति लागत नाहीं. सविकरण किंवा कर्मणि (रुह्य) रूपें प्राकृतमध्यें उतरलीं.]

रुजुवात स्त्री. कबुली, सत्यता. Assent, confrontedness.

[अर. रुजूअत्, रुजूअ; शिकाम. रुजवात (चित्र ४५).]

रुणा वि. (पुं.) रडणारा. Grieving and sorrowing for.

[सं. रोदिति; पा. रोदति; प्रा. रोद्दइ, रोयइ; का. रिवु; कु. रूणो; बं. रोया; हिं. रोना; पं. रोणा; ला. रोवण; सिं. रूअणु; गु. रोवूँ.]

रुंड न. मुंडकें. The skull, the head.

[सं. रुण्ड; प्रा. रुण्ड; सिं. रुण्डो; गु. रुंढ, मुंढ.]

रुत(णें) अक्रि. खोल जाऊन बसणें, अडकणें. To pierce, to enter or run into.

[सं. रुध ७ प्रतिघाते.]

रुध(णें) उक्रि. अडविणें, रोधणें, अडथळा येणें. To block up or to close, to hinder.

[सं. रुद्ध, √रुध् ७ प्रतिघाते; पा. रुन्धति; प्रा. रुन्धइ; पाप्रा. रुद्ध; गु. रुधवूँ; सिं. रुधणु; हिं. रोधना, रुधना; पं. रुधणा; बं. रोधिते; अकाम. रुंधणें, रुध,–इविणें.]

रुंद वि. पसरट, विपूल. Broad or wide.

[सं. रुन्द्र (कोष संस्कृत), वृंद; देप्रा. रुंदो विपुलश्च (२४१-६).]

रुंप(णें) सक्रि. रुतणें, बोचणें, खुपणें. To sink into, to pierce, to run into.

[सं. ऋफ् १ हिंसायाम्.]

रुंप(णें) अक्रि. मूळ धरणें, वाढणें To sprout.

[सं. रुह्, (णिच्) रोपय.]

रुप(पा)या पुं. एक चांदीचें नाणें. A rupee, a silver coin.

[सं. रूप्यक, रुपें पहा.]

रुपें न. धातुविशेष. Silver.

[सं. रूप्यम्; रौप्यम्; पा. रूपियम्; प्रा. रुप्प; का. रोफ; आ. रुप्; बं. ओ. रुपा; हिं. रूप, रूपा; पं. रुप्पा; सिं. रुपो; गु. रुपूँ.]

रुबरु अ. प्रत्यक्ष, समक्ष, समोरासमोर. Face to face, in person.

[फा. रू-ब-रू (मुखासमोर); पेकाम. रुबरु (दिमरा १-२०१), उरूबरू (दिमरा. १-११९).]

रुमझुम स्त्री. घुंगराचा आवाज. Jingling sound.

[ध्वनिशब्द. रुणझुणपासून, √रण् + स्वन् किंवा ध्वन्.]

रुमाल पुं. (तोंड पुसण्याचें किंवा डोक्यास बांधावयाचें) चौकोनी फडकें. A handkerchief, a turban.

[फा. रू (= चेहरा) + माल (= फ़डकें); हिंदीमधून मराठींत आला. मराठींत हा शब्द दोन अर्थांनीं वापरतातः एक तोंड पुसावयाचें फडकें व दुसरें डोक्यास बांधावयाचें फडकें. निरनिराळ्या काळांत ह्या फडक्याची लांबीरुंदी वाढत गेली आहे. प्रथम पडदानशीन स्त्रियांचें हात तोंड पुसण्याचें फडकें, बटव्यावरील फडकें,–नक्षी काढलेलें फडकें,–डाव्या खांद्यावर टाकण्यासारखें,–गळ्याभोवतीं गुंडाळण्यासारखें,–मफ्लरसारखें, नंतर तोंडास–डोक्यास गुंडाळण्यासारखें,–फडकें अशा मार्गानें अर्थांत उत्क्रांति झाली आहे.]

रुस(णें) अक्रि. रागावणें, घुस्सा करणें. To be offended or displeased.
[सं. रुष्; प्रा. रूस; गु. पं. सिं. बं. रुस्; (पं. रोह्=राग); हिं. रुस-रोस्; लमा. रुश्; कान. **रोसु**=निराश, नावड हा शब्द ताडून पहा.]

रुसकत स्त्री. रुखसत पहा.

रुस्तुमी स्त्री. शौर्य, शक्ति, पराक्रम. Valour, bravery, heroism.
[फा. **रुस्तुम**=शहानामाचा नायक=इराणचा भीमसेन.]

रुळ(णें) अक्रि. चालू असणें, संवय असणें, वहिवाटणें, सरावणें. To roll, to continue, to become habituated.
[सं. लुठ्, रूढ (नाधा.); प्रा. रुल.]

रुंक्ष वि. शुष्क, कोरडें. Dry, not bland.
[सं. रुक्ष् १ परुषभाषणे. रुखा पहा.]

रुंक्ष पुं. रीस, अस्वल. A bear.
[सं. **ऋक्ष**; प्रा. **ऋच्छ**; अप. **रीस**; अकाम. ग्रामीण. **रीस**.]

रूं पुं. मऊ कापूस. Carded cotton.
[सं. **अर्क** (?); देप्रा. **रूवी अर्कद्रुमः** (२३९-१०), रुअंतूलम्; प्रा. रुअ (न.); कु. **रुवा**; ओ. **रुइ**; बि. रू; हिं. **रूई** (स्त्री.); पं. **रूई**, **रूई** (स्त्री.); लां. **रूँ** (स्त्री.); सिं. **रुई** (स्त्री.); गु. **रुवो** (पुं); ने. **रुवो**; अकामसा. **रूभरी, रूदार.**]

२**रूं** प्र. अल्पार्थक किंवा कुत्सार्थक प्रत्यय. A dimunitive termination.
[**सं. रूपम्; प्रा. रूअ, रूय, रूप; सिंह. रुअ, रू;** हा प्रत्यय फार जुना आहे. ह्याचा अर्थ 'अर्भक'–अल्पत्वदर्शक आहे. ह्याचा उल्लेख मिलिन्दपन्ह वगैरे ग्रंथांत आढळतो. पुढील शब्द पहा. **गोरूप, दासरुव, डिकरूव, वासरूं, मेंढरूं, पांखरूं, रांडरूं**-इ.]

रूख पुं. झाड, वृक्ष. A tree.
[सं. (रुक्षः) वृक्षः, √ व्रश्च्; पा. प्रा. रुक्ख; हिं. रूख; पं. लां. रुक्ख; गु. रूख; सिं. रुक्. रिक्; अकाम. **रूख** (अमृ ७-६१).]

रूढ वि. उगवलेला; वाढलेला, प्रचलित, परिचित (ल.). Grown up, commonly known (fig.).
[सं. रुह्–निष्ठा.]

रूढी स्त्री. प्रघात. Custom, practice.
[रूढ+ई (म. प्र.); √ रुह्.]

रूप न. बाह्यस्वरूप, देखावा, चेहेरा. External appearance, a form.
[सं. **रूप**; √**रूप्**; याकाम. **रूपण, निरूपण** (स्पष्टीकरण); अकामसा. **रूप-डें** (अल्पत्वदर्शक), **रूपरंग, रूपरेषा, रूपवान, रूपवती, रूपी, बहुरूपी–भोरूपी.**]

रूळ पुं. आंखणी, लोहमार्ग, वाटोळा लांब जड दगड. A ruler, a rail, a roller.
[*Eng.* Ruler. Roller.]

रे अ. संबोधनार्थक अव्यय. A vocative particle.
[सं. रे; पा. रे; का. रे; कु. रे, री (स्त्री); अ. बं. ओ. रे; हिं. सिं. रें. (पुं), री (स्त्री); गु. रे.]

रेंक(णें), रेक(णें) अक्रि. रेड्यासारखें ओरडणें, असंबद्ध ओरडणें, कर्कश आवाज काढणें. To grunt.
[कान. **रंके**=डुरकणें, रेड्याचा आवाज करणें; सं. **रेष्, ह्रेष्, अवरिङ्क**; प्रा. **ओरिंक**; हिं. **रेकना**; पं. **रिंगणा**; लां. **रिङ्ग**; सिं. **रिंगतु**; गु. **रेंकडो**. संस्कृत मूळ दिलें आहे. तरी पण हा धातु ध्वनिशब्दच असावासा वाटतो.]

रेकला पुं. एक्का, एक बैलाची गाडी, एक प्रकारची तोफ. A sort of uncovered carriage drawn by one bullock, a blasting instrument or weapon.
[हिं. **रहकला**.]

रेख(खा)ट(णें) उक्रि. रेघोट्या ओढणें, चितारणें. To draw lines or figures.
[सं. **रिख्** १ विलेखने, २ **रेखा** (नाधा.); अकामसा. **रेखा** (रेघ), **रेखणी** (आकृति), **रेखींव** (नमुनेदार, सुंदर).]

रेघ स्त्री. रेषा, ओळ. A line.
[सं. **रेषा, रेखा,** √ **रिष, रिख्**=विलेखने; गु. हिं. **रेख**; सिं. **रेघी**=अशुभ लक्षणें; सिंह. **ले**; अकामसा. **रेघटी, रेघोटी** (अल्पत्वदर्शक).]

रेंग(घ)ळ(णें) अक्रि. सुस्तावणें, मंद गतीनें चालणें, दमणें. To drawl, to saunter, to move sluggishly.
[सं. **रिग्, रिख्** १ गतौ + ळ.]

रेंच पुं. मळमळ, ताठपणा. A disorder (consisting in nausea etc.), erectness.
[सं. **रिच्** १ वियोजने.]

रेचक न. ढाळक, जुलाबाचें औषध. A purgative.
[सं. **रिच्** १ वियोजने.]

रेंज(णें) सक्रि. मान देणें, भिणें. To revere, to regard.
[सं. **रिच्** (?); देप्रा. **रेचयं प्रमाण**–(२३९·११) हा शब्द **णिच्** दिसतो; परंतु कोणत्या धातूचें हें णिच् रूप हें निश्चित नाहीं.]

रेट(णें) सक्रि. ढकलणें, रंधणें, लाकूड तासणें. To shove or push.
[सं. **लेंट्** ४ धौत्ये, **रिष्** १ हिंसायाम्; बि. **रेत**; हिं. **रेना**; पं. **रेतणा**; सिं. **रेती**; गु. **रेतरडी**; अकामसा. **रेंट, रेट, रेटक** (जोरदार), **रेटणी** (ढकल), **रेटा** (धक्का), **रेटारेट**, **रेंटें** (जाड भाकर), **रेट** (पुष्कळ).]

रेडा पुं. प्राणिविशेष, हल्या, टोणगा. A male buffalo.
[सं. **रिष्** ४ हिंसायाम्; अकामसा. **रेडका, रेडी, रेडूक**.]

रेणें न. काळ्या गुराचें किंवा गवत न खाणाऱ्या वासराचें शेण. The excrement of the suckling cattle.
[सं. **रिज्नु, रियते**; प्रा. **रीअइ, रयः रयते** (जातो); देप्रा. **रेणि** (चिखल); सिं. **रेणी** (कालवा, पाट); गु. **रेण** (सिमीट). सं. **रीणः रीण्ण**; प्रा. **रीण**; लां. **रीण**. सं. **राति, रेपयति**; गु. **रेवँू**. व्युत्पत्ति अनिश्चित; रेट–पुष्कळ.]

रेत न. वीर्य, धातु, शुक्र. The seminal fluid.
[सं. **रेतस्**.]

रेती,-त स्त्री. वाळू. Sand, gravel.
[सं. **रेत्रम्, रेतजा**.]

रेंद,-दा, पुं. चिखल, घाण, शेणाची रास, दारूचा गुत्ता. Sloppy mud, mire, slush.
[सं. **ली** ४ श्लेषणे, (निष्ठा) **लीन, लीनणे, लीन्हणे**; अकामसा. **रेंदाड, रेंदडाणें, रेंदवणी** (गढूळ पाणी), **रेंद्या** (खरबीत.)]

रेंप(णें) अक्रि. सुस्तपणानें बसणें. To sit sluggishly.
[सं. **ली**, किंवा **रिफ्**, **रेंफ** (दगड, शीला).]

रेबड(णें) सक्रि. माखणें. To besmear.
[वैसं. **रिप्**–लेपने; अकामसा. **रेबडी**, **रेबड** (घाण).]

रेम्या वि. मंद, आळशी, मूर्ख. Dull, stupid, silly.
[**ध्वनिशब्द. रे, मे** = मेंढ्यांचा आवाज; रेम्याडोक्या. शब्द द्राविडमूल आहे का ?]

रेल(णें) क्रि. ढकलणें, गर्दी करणें, अंगावर पडणें, झुकणें, लोळणें. To push by reeling, to reel, to yield, to incline.
[सं. **लेट्**, **रिण्व्**; प्रा. **रेल्लइ**; देप्रा. **रेल्ल**; बं. **रेला**; हिं. **रेलना**; पं **रेळणा**; सिं. **रेलणु**; गु. **रेलवूँ**.]

रेल चेल वि. पुष्कळ, उदंड, पूर. Overflowing, plenty, abundance.
[सं. **लेट्**, **रिण्व्** (?); प्रा. **रेल्लइ**; देप्रा. **रेल्लि** (प्रवाह, स्रोत); बं. **रेला** (थवा, ढकल); हिं. **रेल** (थवा), **रेला** = ढकलणें; पं. **रेला** (राशि); सिं. **रेलो** (प्रवाह); गु. **रेलो, हल्ला** (ओघ); म. **रेल** (पूर).]

रेल्वे स्त्री. लोहमार्ग, आगगाडी रस्ता. Railway.
[*Germ.* Regel; *Swed.* Regel = a bar, rail.]

रेव स्त्री. मऊ बारीक वाळू. Fine gravel or sand.
[सं. **रेत्रम्**; कु. **रेतो**; हिं. पं. **रेत्, रेती**; सिं. **रेट्ट, रेटु**, **रेति**, **रेवा** (नदीनाम), **रेवतः** (वारा), हिं. **रेव**; सं. **रिणाति**; देप्रा. **रेवलिआ**; अकाम. **रे**, **रेवडा,-डी** (रेववटिका).]

रेव(णें) क्रि. खालीं दबणें, आरणें, रुपणें, होरणें, भरणें. To sink down, to enter in, to occupy.
[सं. **रेव्** १ गतौ, प्लवगतौ – छिद्र भरून काढणें, छिद्रांत शिरणें; देप्रा. **अहिरेमइ पूरयति** (२३·२); गु. **रेववूँ** = (चुन्यानें) भक्कम भरणें; अकाम. **रेवण** = तटाबाहेरील मातीचा उतरता ढीग, उतरण, खांच भरण्याचा मसाला.]

'**रेवडी** स्त्री. गोड पदार्थ. A sweetmeat.
[सं. **रेव + वटि**; बं. **रेऊडी**; हिं. **रेवडी**; पं. **रेऊडी**; गु. **रेवडी**; बि. **रेवडा** (ऊंस).]

रेवडी स्त्री. फजीती. A disgraced state.
[म. रेव = चिखल ; रेव पहा.]

रेवळ स्त्री. वाळू. Sand, gravel.
[सं. रेव + आलि ; देप्रा. रेवलिआ ; अकाम. रेवाळ, रेवाळें.]

रेशीम न. एका किड्यापासून निघणारा मऊ तंतु. Silk.
[फा. रेशम्, अब्रीशम ; चिनी भार्षेत रेशम् ह्या उच्चाराचाच शब्द आहे तो मूळ असावा.]

रे(रें)स पुं. आण्याचा पंचविसावा भाग, एक नाणें. Twenty-fifth part of an anna.
[पोर्तु. रीस.]

रोकड स्त्री. प्रत्यक्ष पैसा, रक्कम. Cash, ready money.
[सं. रोक क्रय ; देप्रा. रोक्क + उ ; बं. रोकड् ; बं. हिं. पं. रोकड ; लां. रोकीर (पुस्तक); सिं. रोकडी ; गु. रोकड ; देप्रा. रोक्क + ड > रोक, रोख (प्रत्यक्ष पैसे); अकामसा. रोक(ठोक) किंवा रोख ठोख. तेलु. रो,–रुकम.]

रोख(णें) उक्रि. थांबविणें, मज्जाव करणें. To point, to obstruct, to plant or set against.
[सं. रोधति, रोधः ; पा. रोधम् ; प्रा. रोह (बंधारा); का. रोक–ख (अडथळा); कु. रोकणो ; बं. रोका ; ओ. रोकिबा ; बि. रोकब ; हिं. रोकना ; पं. रोकणा ; सिं. रोकणु ; गु. रोकवूँ.]

रोख(णें) क्रि. नेम करणें. To plant against.
[सं. लक्षीकरणम् (?).]

रोखा पुं. पत्र, खत, दस्तऐवज. A written acknowledgement.
[अर. रुकूआ.]

रोग पुं. आजार, दुखणें. A disease or disorder, an illness.
[सं. रुज् = दुःख होणें ; अकामसा. रोगवणी (रोगाचें पाणी, धान्याच्या नाशाचा पाऊस) रोगट (सं. रोगाढ्य = आजारी), रोगडणें, रोंगाळ(णें), रोगी (रोग जडलेला).]

रोगण न. चिकट पदार्थांचें माखण, चरबी, तेल, रंग वगैरेसारखा पदार्थ. Varnish.
[फा. रौघन्.]

रोज पुं. दिवस, वार, दिवसाची मजूरी, वेतन. A day, hire, wages for a day.
[फा. रोझ् ; अकामसा. रोजकीर्द (दिनचर्या), रोजगार (धंदा), रोजगारी (धंदा करणांरा); रोज–गुदस्त (कालचा दिवस); रोजमुरा (रोझ् मुऱ्हा = रोजची मजूरी), रोजा = मुसलमानांचा उपवासाचा दिवस.]

रोझा पुं. कबरस्तान. A grave-yard.
[अर. रउझा ; हिं. रउझ. ह्याचा मूळ अर्थ बाग असा आहे ; पुढें कबरस्तान असा झाला.]

रोट पुं. जाड भाकर, पोळी. A thick bread, a puffed mass of dough baked in embers.
[सं. रोटिका ; प्रा. रोट्ट, रोट्टग, रुट्टिअ ; देप्रा. रोट्ट तण्डुलपिष्टम् (२४०-५); कान. रोट्टु ; का. रोठ ; कु. रोटो ; आ. रुटि ; बं, रोटि, रुटि ; ओ. रोटि ; बि. रोटी ; हिं. पं रोट ; लां. रोटी ; सिं. रोट्ठ, रोटलु ; गु. रोटी, रोटली, रोटलो (पुं.); अकाम. रोट, रोंठ, रोटगा, रोडगा.]

रोड(णें) क्रि. कृश होणें. To grow thin and lean.
[सं. रुध्–रोधय, २ ह्रद् १ संकोचे ; पं. रोडा = हजामत केलेला ; लां. रोडा = शिंगें नसलेला ; सिं. रोडो ; अकाम. रोडा, रोडमा, रोडाव(णें) = कृश होणें.]

रोडा पुं. वीट. Dislike, disgust.
[सं. रोटति ; हिं. पं. लां. रोडा ; गु. रोड्ड ; प्रा. रोटा (जाडा); गु. रोड (जाडा); रोट्ट ; ओ. रोट.]

रोध(णें) सक्रि. वाट बंद करणें, अडविणें. To obstruct.
[सं. रुध् ७ प्रतिघाते.]

रोप(णें) क्रि. लावणें, पेरणें. To fix, to sow.
[सं. रोप्यते, रोपयति ; पा. रोपेति ; प्रा. रोवेइ, अ. रोइब ; बं. रोया ; ओ. रोइबा ; कु. रोपणो ; हिं. रोपना ; लां. रोप ; गु. रोपवूँ ; अकामसा. रोप, रोपा]

रोमावळी स्त्री. केसांची ओळ. A line of hair.
[सं. रोमन् + आवलि ; अकामसा. रोमाळ (केंसाळ).]

रोव,–ह पुं. रुजून वर आलेलें बीं. A sprout, a shooting.
[सं. रोह, √ रुह् ; बं. रोआ = हिवाळ्यांत लावलेलें भात.]

रोव(णें) सक्रि. झाड लावणें. To plant, to sow.
[सं. **रोपयति**, √ रुह्; गु. **रोपवूँ**; बं. **रुइते**.]

रोवळी स्त्री. तांदूळ धुण्याची लहान दुरडी. A basket of open texture.
[कान. **आरोळगी** = बांबूची बुट्टी.]

रोहिण स्त्री. पुं. मुंग्यांचें वारूळ. An ant-hill.
[सं. **रोहण**.]

रोहिला पुं. एक मुसलमानी जमात, A Rohilla.
[पुश्तु. **रोहु** = पर्वत, त्यापासून विशेषण **रोहिला** = पर्वतावर राहणारा. रोहिलखंडात हे राहतात. ह्यांचा उत्कर्ष इ. १७४४ पासून आहे. अलीमहमद हा मुख्य प्रस्थापक होय. सं. **रोभिल्लशीं** जोडण्याचा प्रयत्न करतात परंतु तें सशास्त्र नाहीं.]

रोही स्त्री. एक प्रकारचा मासा. A kind of fish.
[सं. **रोहित**; पा. **रोहितो**; प्रा. **रोहिअ**; आ. **राउ**; बं. **रुइ**; ओ. **रोहि**; हिं. **राहू**, **रेहूँ**, **रहूँ** (स्त्री); पं. **रेहूँ**; (सं. **लोहितः** पहा).]

रोझी स्त्री. एका जातीचें हरिण. A kind of deer.
[सं. **रोहि** (पुं.); देप्रा. **ईसओ रोज्झाख्यमृगः** (३५-१७); गु, सिं. पं. हिं. **रोझ**.]

रौनक स्त्री. सौंदर्य, शोभा. Beauty.
[फा. **रौनक**.]

लं पुं. मराठी वर्णमालेंतील अठ्ठाविसावें व्यंजन, ह्या वर्णाचें उच्चारण दन्त्य असून हा अर्धस्वर समजतात. ह्याचें उच्चारस्थान दन्त्य आहे. The twenty eighth consonant in the Marathi alphabet, a dental semi-vowel.
[(आद्य ल) सं. **ल**, **र**, **न**; प्रा. **ल**. **लशुन-लसण**, **लघु-लहु**, **नवनीत-लोणी**;
(मध्य ल) सं. **र्ल**, **ल्य**, **ल्व**, **ल्ल**, **द्र**, **ल्प ड**, प्रा. **ल्ल**. **डेक्क-लेकरूं**. **संलग्न-सलग**, **अच्छभल्ल-अस्वल**, **कल्य-काल्**, **प्रक्षाल्-पखल्ल-पखाळ**, **क्रोष्ट्र-कोल्हा**, **बिल्व-बेल**.]

लं प्र. भूतकाळचा प्रत्यय, A termination of the past tense.
[सं. **त**, **इत**, **ण्ण**, **त्त**, **न्न**; प्रा. अप. **अ-ल्ल**, **इ-ल्ल**; हा '**ल**' विशेषणस्वरूप आहे. कांहीं विशेषणास लागतो. **चांग-ल**-प्रेम-वात्सल्य-अल्पत्वदर्शक; दुसरा एक 'ल' प्रत्यय आहे. उदा. तान्हा-तान्हुला इ.]

लई वि. पुष्कळ, अतिशय. Many or much.
[सं. **लय** (?); अप. लइ = अतिशय इत्यर्थे लोकोक्तै (हेमचंद्र); अकामग्रा. **लई**.]

लंक(ग)ट(णें) सक्रि. लोटणें, चिकटणें. To push, to stick to.
[सं. **लग्** + **ट**. कधीं वर्णविपर्यानें **लटकणें** असें रूप होतें.]

लकत(क्त)र न. फाटकें वस्त्र, चिंधी. A rag or shred.
[सं. **लक्तक**; फा. **लत्र**.]

लकब स्त्री. संवय, खोड, लक्षण. An ill habit or way, a trick.
[सं. **लक्ष्मन्** (?); फा. **लकब्** = टोंपण नांव.]

लकी(के)री स्त्री. चुणुक, छटा, गाण्यांतील तान. Lustre, gloss, polish, coptivating quality (in singing).
[सं. **लष्** १ प्रकाशने (?).]

लखलख(णें) अक्रि. चकचकणें. To sparkle or glitter.
[सं. **लष्** १ कान्तौ किंवा **लघ्** १ प्रकाशने; आ. **लकलखिब**; ओ. **लक्लक्**; हिं. **लखलखाना**; सिं. **लखलखणुं**; गु. **लखलखवूँ**; अकामसा. **लकलक**, **लखलख**, **लखलखाट** (प्रकाश, दीप्ति), **लकाकी** (प्रकाश), **लक्ख** (स्पष्ट, प्रकाशित).]

लख(खा)पति पुं. लक्षाधीश. A millionaire.
[सं लक्ष + **पति**; मध्यें **उ** किंवा **ओ** हा आधिक्य-समुच्चयदर्शक प्रयय येतो. उदा. **घरोघर**, **पावलोपावलीं**, **क्रोडोपति**, **लाखोपति**.]

लखलाभ पुं. अतीशय मोठा फायदा. लाख पहा. A term for any extraordinary gain.

लखापडी,-ढी स्त्री. लिहिणें वाचणें, पत्रव्यवहार. Reading and writing.
[सं. **लिख्** + **पठ्**, > **लिखा** + **पढी** > **लखापढी**.]

लखोटा पुं. पाकीट. A closed letter, a packet.
[सं. **लाक्षा** ; म. **लाखोटा**.]

लगट(णें) उक्रि. जवळ जाणें, चिकटून बसणें. To approach, to adhere.
[सं. **लख्** १ गतौ, **लग्**-संगे+**ट** ; अकामसा. **लगट** (दाट मैत्री, घसटण), **लगत** = जोड, संधि, जवळचा, समीप, **लगताळा,-लगताळ, लगती** (सोयरा), **लगवग, लगधग** (सं. **लग्**+**वख्, वघ्** १ गतौ), **लग** = तुळई, **लगा, लग्गा** = लाभ, संबंध, **लागाबांधा** = संबंध, आश्रय, **लग्न** = विवाह.]

लगाम पुं. घोड्याच्या तोंडांत घालावयाची एक लोखंडी सांखळी. The bit of bridle, the reins.
[फा. **लिगाम्**.]

लग्न न. विवाह, शरीरसंबंध. लग-ट पहा. Marriage.

लघाळ(णें) क्रि. वडवडणें, फार बोलणें, लाळघोटेपणा करणें. To prattle, to flatter.
[सं. **श्लाघ्–श्लाघालु** (नाधा८); अकाम. **लघाळ, लघाळमावशी, लघळपणा**.]

लघु वि. ऱ्हस्व. लहान पहा. Short.

लंका स्त्री. रावणाची राजधानि, भांडखोर, किंवा अव्यवस्थित स्त्री (लक्षणा). Ravana's capital, a quarrelsome woman (fig.).
[सं. **लंका** = लंकेची रखवालदारीण.]

लंग(णें), लंघ(णें) अक्रि. जाणें, लंगडणें. To limp.
[सं. **लंघ्** ; पा. **लंघति** ; प्रा. **लंघइ** ; आ. **लंघोन** ; बं. **लंघन** ; हिं. **लंघना** ; सिं. **लघणु** ; पं. **लंघना** = वरून उडी मारणें ; अकाम. **लंघणें** (ज्ञा. १५-३५९); **लंघन** (ओलांडणें), **लंघन** (उपास) हे दोन शब्द टर्नरनें एकच समजले आहेत. अर्थसंभ्रमाचें हें उदाहरण आहे.]

लंग वि. अशक्त, कमजोर. Imbecile, weak.
[सं. **लंग्**-गतौ. ह्या शब्दाच्या व ‘**ल**’ वर्णान्वित इतर शब्दांच्या उपपत्ति किंचित् संशयग्रस्त आहेत. पुढील भिन्न भाषांतील भिन्न अर्थांचे शब्दांवरून हें स्पष्ट होईल ; म. **लंग** = अशक्त ; का. **लिंग** = कुरूप ; बं. **लेंगा** = डावखुरा ; ओ. **लेंगरा** ; म. **लिंग** = पुरुषयोनि ; **लीर, लुला, लुंगणें** = कमजोर होणें. **लेंव** ; गु. **लेंघवूँ** ; ‘**ल**’ आणि नासिक्य उच्चार असा कांहींतरी मिश्रवर्ण आस्ट्रोएशियाटिक भाषांत असून त्याचे निरनिराळ्या वर्णांशीं अन्वय करून तयार झालेल्या शब्दांचें नंतर संस्कृतीकरण झालें असावें असा एक तर्क संभवतो.]

लंगडा वि. पाय नसलेला. Lame.
[सं. **लंग्**+**ड** ; हिं. पं. **लंगडा** ; गु. **लंगडूं** ; सिं. **लङु** ; का. **लोंग** (**गु**) ; लमा. **लंग** ; अकामसा. **लंगड(णें), मलंग** = अशक्त. काश्मिरीभाषेंत ‘कुरुप’ असा अर्थ आहे. **लिंग** (**पुरुषयोनि**), **लीर, लुलो लेंग** ; बं. **लेंगा** = डावखुरा ; ओ. **लेकरा**, म. **लुंगणें** = कमजोर होणें ; + **लँज** ; गु. **लेंगवूँ** = लंगडणें.]

लंगर पुं. गलबताचा नांगर, लोखंडाची सांखळी. An anchor.
[सं. **लाङ्गल** ; फा. **लङ्गर** ; अकाम, **लङ्गरखाना** = अवाढव्य कारखाना.]

लंगोट, (लंगोटी) पुं. गुह्य इंद्रियावरील आवरण. A piece of cloth covering privities.
[सं. **लगपट्ट** (उत्तरकालीन संस्कृतीकरण); का. **लगुटी** ; कु. **लगउटी** ; हिं. पं. **लंगोट** ; सिं. **लगोटु** ; गु. **लंगोट** ; हिं. **लांग** = मांडीवरील कापडाची घडी, **लंगर** = ढुंगणावरील आच्छादन.]

लंघन न. उपास. Fasting.
[सं. प्रा. **लङ्घ** ; सिं. **लंघणु** ; हिं. **लंघन**. मूळ जर सं. **लघ्** १ गतौ असें समजलें तर **उपास करणें** असा अर्थ त्याला कसा प्राप्त झाला ? अकाम. **लंघन** = उपास (ज्ञा. १७-३५०).]

लचक(णें) क्रि. मध्येंच वांकणें, मुरडणें, उसण भरणें, मुरगाळणें. To spring or to start suddenly.
[सं. **लस्ज्, लज्** ६ व्रीडने, हिंसायाम् (अकच् कर्मणि); हिं. **लचकना** ; पं. **लचकणा** ; गु. **लचकवूँ** ; हिं. **लचना**+**अक** ; याकाम. **लचकणें** (ज्ञा. १४-८४); अकाम. **लच**+**क**+**णें, लचकणी, लचका** (चावा ह्या अर्थी **लचका** हा शब्द निराळा.)]

लचांड न. भानगड, घोटाळा, तोहमत. A difficulty, a hitch.
[सं. **लस्ज्** ६ व्रीडने (?).]

लज(णें) क्रि. लाजणें. To feel bashful.
[सं. **लस्ज्** ६ व्रीडने ; म. **लज्जा** (लाज), **लज्जालु लाजाळू** (लाजरा).]

लज्जत स्त्री. रुचि, स्वाद, गोडी, छटा. Flavour taste.
[अर. लइझत्.]

लट-लट् स्त्री. गुंतागुंत, योनीवरील केंस. Entangledness of hair, the hair on genitals.
[सं. लोमन्; प्रा. लँअ; बं. लाट्; बि. हिं. लट्; पं. लट; सिं. लिट; गु. लट. प्रा. लट्ट कदाचित् सं. लता पासून यावा. लत्ता (पाय), लट्ट, लट्ट; म. लद्द, लती, लठ्या.]

लटक(णें) क्रि. लोंबणें. To hang on, to depend.
[सं. लट्+अकच्; आ. लटकन् (कानांतील दागिना); बं. लटकान (लोंबणें); ओ. लटकाइबा; हिं. लटकना; पं. लटकणा, ने. लटक्क=पुष्कळ; सिं. लटकणु; अकामसा. लटक (रीत), लटकन्.]

लटका वि. खोटा, असत्य लबाड. False, not true.
[सं. लट्ट=वाईट संवयीचा, लट्ट+क.]

लटपट स्त्री. घाई, चलाखी, भीति, धांदल, धाबरगुंडी. Lively motion, brisk agitation.
[सं. लट्ट् १ बाल्ये, +पट् किंवा पत्; आ. लटपट; बं. ओ. लट्पट्; हिं. लटपट (गुंडाळलेलें); गु. लटपट; सिंह. लटपट (गोंधळ); ने. लट्टिपट्टी (सामानसुमान); अकामसा. लटपटणें=घाबरणें, पुढें मागें होणें, सैल होणें; कान. लटकने, लटकटिसु=गोंधळणें, घाबरणें.]

लटलट(णें) अक्रि. भीतीनें कांपणें, मुलासारखें चालणें. To be quivering.
[सं. लुठ् १ विलोडने, किंवा लट्ट् १ बाल्ये.]

लटांबर न. समूह, समुदाय, सामानसुमान, मुलें बाळें यांचा घोळका. Baggage and train, any multitude.
[समुद्राच्या लाटाशीं ह्या शब्दांचा काहीं संबंध असेल काय? हा भरमसाट बनविलेला शब्द आहे असें शब्दकोशकार म्हणतात, तें ग्राह्य नाहीं.]

लटिगा पुं. लहान जाड काठी. A small thick stick.
[सं. यष्टि; प्रा. लट्टी; गु. लट्ठिगो, लटो; ने. लटयाङ्गो=मुका, खुळा, वेड. 'गा' हा प्रत्यय दिसतो, उदा. जाडगा, लहानगा, दांडगा.]

लटीपुटी स्त्री. खोटेंपणा. Artificiality.
[सं. लट्ट् १ बाल्ये+पुट, लाला+पुता.]

लठ्ठ वि. स्थूल, जाड, अंगानें धष्टपुष्ट. Fat, thick.
[सं. धष्ट; देप्रा. लट्ठ; सं. यष्टि; प्रा. लट्ठी; अकामसा. लाट=लाकडाचा ओंडका, सोटा, लाठी, लठ्ठालठ्ठी; लठ्या=(देप्रा. लठ्ठो–अन्यासक्तोप्रियंवदःश्च=दुसऱ्या बाईवर नजर ठेवणारा), लडदू=धटिंगण, निरुद्योगी; लड्डु=मूर्ख.]

लड, लडी स्त्री. कापसाची लांबट व चापट पट्टी. A long and flat strap of cotton.
[सं. लट (?); पं. लां. लडी.]

लडथड(णें) उक्रि. तंटा उत्पन्न करणें, वाद उत्पन्न होणें. To create differences or quarrel.
[सं. लत् (सौत्र धातु)+ऋद्=सतावणें (द्विधातुसंयोग).]

लडबड(णें) अक्रि. डगमगणें, लटपटणें, अडथळा करणें. To rock, to shake, to meddle.
[सं. १ लर्ब्+बर्ब्, किंवा २ लड्–विलासे+बल्–हिंसायाम् किंवा लड् ह्या धातूशीं ध्वनिसादृश्यानें बड हा मराठी शब्द जोडला. अकामसा. लडवड्या, लडबड ध्वनिशब्द.]

लडिवाळ वि. लाडीगोडी-लाड–कौतुक करणारा. Coaxing, caressing.
[सं. लाड+वाळ (मराठी इन्नन्त प्रत्यय), लल् (रक्षणे) ह्या धातूशीं संबद्ध आहे (लालायितम्, लाडायितम्).]

लढ(णें) सक्रि. युद्धणें, कुस्ती करणें, झुंजणें. To fight, to wrestle with.
[सं. रध् ४ हिंसायाम (?); का. लडुत्; कु. लडणो; बं. लढा; ओ. लडिबा; नडिबा; हिं. लडना; पं. लडणा; लां. लडण; गु. लडवूँ; सं. रध् हें मूळ समाधानकारक नाहीं; लढत (युद्ध, भांडण), लढवय्या, लढविणें, लढा, लढाई (युद्ध), लढाऊ.]

लंड पुं. पुरुषलिंग. The male organ of generation.
[सं. लण्डम् (न)=Excrement, प्रा. लण्ड; देप्रा. लंड; दार्दिक. लण्, लण्डी (स्त्रीयोनि); हिं. लांड; पं. लन्न; सिं. लनु.]

लंड वि, धीट, बेगुमान, ठक. Rude, refractory, bold.
[फा. लन्द, लवन्द.]

लत स्त्री. वाईट कल,-प्रवृत्ति. An evil habit, a vice.

[सं. लटः (दोष, गुन्हा); देप्रा. लट्ठ, लंठ, लण्ड ; ओ. लट ; हिं. लट ; पं. लॉट (वाईट संवय); गु. लट ; अकाम. लतावणें.]

लता स्त्री. वेल. A creeper.

[सं. लता, √ लत्.]

लत्ता स्त्री. लाथ. A kick,

[सं. लत्ता.]

लत्ती स्त्री. फाटकी पट्टी (कापडाची). A torn strip.

[सं. लत्ती ; देप्रा. लत्त, लट्ट (कमी); आ. लाट (वापरलेले); बं. लाट = वापरलेले कपडे ; पं. लता (= चिंधी, पुं.); सिं. लटो (वस्त्र); गु. लत्तू (चिंधी); म. लक्तर ; फा. लत्र हा शब्द ताडून पहा.]

ल(ला)थाड(णें) सक्रि. लाथ मारणें, लाथेनें ढकलणें. To kick soundly.

[सं. लत्ता ; प्रा. लथ्था + ट ; हिं. लथाडना ; अकामसा. लथडणी, लथाडणी, लथडपथड, लथडसथड लथडासथड.]

लद्दा पुं. लादा पाहा.

लप(णें) क्रि. दडणें, छपणें, गुप्त राहणें. To hide, to lie concealed.

[सं. लप् १ गूहने ; लुप् पासून व्युत्पादणें ग्राह्य नाहीं. अकामसा. लपीथपी, लपीछपी (ज्ञा. १४·९) = एक खेळ, लपणीचपणी, लपूनछपून (दोन्ही एकाचे अर्थाचे शब्द).]

लपेट(णें) उक्रि. गुंडाळणें, आच्छादणें, लेपणें, वेष्टणें. To roll up, to enwrap, to envelop.

[सं. लिप् ६ उपदेहे ; कु. लपेटणो ; बं. लप्टाना, लपेट ; बि. लपेटन् ; हिं. लपैटना ; पं. लपेटणा ; गु. लपेटवूं ; अकामसा. लपेट, लपेटणी, लपेटा (चिखल वगैरेचा थर), लपेटी.]

लपडाक वि. चापट, थापट, Flat, plain.

[हिं. लपट ; पं. लक्का, लप्प ; लां. लप्प (मूठभर); सिं. लपाटा.]

लपेटा पुं. वेष्टण, आवरण, A covering,

[लपेटणें पहा. बं. लपट्ट ; हिं, लपेट्ट, लपेटा ; पं. लपेट, लपेटा (कपट), लपेटा (आवरण)]

लफंगा वि. लुच्चा, लबाड, ठक. Vainglorious, fraudulent.

[तुर्की. लपंग, लफंग = चिमणीसारखा एक पक्षी, कधीं घारीसारखा किंवा ससाण्यासारखा मोठाहि असतो. शिकारीच्या-दृष्टीनें महत्त्वाचा आहे. ह्या शब्दावरून मराठींतील शब्द आला ; अर. लफाझ् = वडवड्या ; गु. लफंगु (निर्लज्ज); ने. लफङ्गे.]

लवक(णें) क्रि. खालीं वांकणें, वाईट संवय लागणें. To bend forwards, to acquire a bad taste.

[सं. लव् १ अवस्रंसने + क.]

लवलव(णें) अक्रि. थवथवणें, लाडीगोडीनें बोलणें. To be watery or swashy, to speak in a fondled way.

[सं. लब् १ शब्दे ; म. लबलब = वडवड ; फा. लब् = ओठ, ध्वनिशब्द.]

लबाड वि. खोटा, असत्य बोलणारा लुच्चा. False, untrue.

[सं. (?); हिं. लबाड ; अकामसा. लबाडी (खोटेंपणा), लबाडीलचाडी.]

लबे स्त्री. निरोपाचें काम. Errand-business, message-carrying.

[फा. लब् = ओठ.]

लब्ध वि. मिळालेलें.

[सं. लभ्, (निष्ठा) लब्ध ; संसा. लब्धप्रतिष्ठ; लभ्य, लभ्यांश (फायदा).]

ललकार(णें) अक्रि. ओरडून राजाचें आगमन सुचविणें, आव्हान देणें, पुकारणें. To call after loudly, to proclaim.

[सं. ललकृ (?); प्रा. लल्लक्कः (भिवविणारे); हिं. ललकारना ; पं. ललकारणा ; गु. ललकारवूं.]

लय स्त्री. पुं. नाश, अंतर्भाव, (गायनांतील) यतिविराम. Extinction, destruction, absorption, a pause (in music).

[सं. लय, √ ली.]

ललाट न. कपाळ, दैव(ल.) Forehead.

[सं. लल्लाट ; परंतु हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

ललुपतु, ललोपतो स्त्री. न. खुशामत, लाडीगोडी. Flattery.
[देप्रा. **लल्लि** ; अकामसा. **ललोपतो**, **लालापुता**.]

लँव, लोंं, लाँव स्त्री. न. अंगावरील बारीक मऊ केंस. The soft hair on the body.
[सं. **रोम**, **लोमन्** ; पा. प्रा. **रोम**, **लोम** ; का. **रुम्**, कु. **रोम्** ; आ. **नोम्** ; बं. **राँ** ; ओ. **रोम** ; हिं. **रोअँ**, **रुअँ**, **रुआँ** (पुं.); पं. **रोम**, **रोऊ**, **लुई** (स्त्री); लां. **लू** ; सिं. **रूम**, **लुअँ**, **लूँ** ; गु. **रुऊँ**.]

लव(णें) क्रि. वांकणें, ओणवें होणें, नमणें. To bend, to bow down.
[सं. **नम्** ; पा. **नम** ; प्रा. **णम** ; का. **नमुन्** ; बं. **नमा** ; ओ. **नाइंवा** ; हिं. **नउना** ; पं. **नेउणा** ; लां. **नेऊँ** ; सिं. **निवणु** ; सं. **निपत्** ; ह्याच्या जोडीला '**नवणें**' असें एक शिष्ट रूप रूढ आहे ; अकामसा. **लवण**=वांकण, वांकडा रस्ता.]

लव(लौ)कर अ. झटकर, पटकन्. Quickly, speedily.
[सं. **लँव** (< **लोमन्**)+**कर** (?); **लव**+**कर**, असा तोडतां येईल काय ? किंवा **लघु**+**कर**.]

लवंग स्त्री. वनस्पतिविशेष The clove tree.
[सं. **लवङ्ग** ; पा. **लवङ्गम्** ; प्रा. **लवङ्ग** (पुं. न.); का. **रोङ्ग**, **रंग** ; कु. **लडन्** ; आ. **लण** ; बं. **लङ्ग** ; ओ. **लंग** ; हिं. पं. **लऊंग** ; सिं. **लऊंगु** ; गु. **लवंग**. शब्द ऑस्ट्रिक आहे काय ?]

लवचीक वि. वांकणारें, लवणारें. Flexible.
[सं. **नम्** १ प्रव्हत्वे (?)+(देप्रा. **चीक**). '**लवणें**'शीं संबद्ध.]

लवडसवड स्त्री. तांतडी, त्वरा. Speed, haste.
[ध्वनिशब्द. (द्विरुक्ति). सं. **लघु** शब्दाशीं संबद्ध.]

लवडा पुं. (ग्राम्य) पुरुषलिंग, पुरुषाचें जननेंद्रिय, शिस्न. The penis.
[सं. **लकुटः**, **लगुड** ; हे शब्द आस्ट्रिक आहेत. संस्कृतीकरण नंतर झालें ; पा. **लगुळो** ; प्रा. **लउड** ; **लउल** ; **रुवलो**, **रुवली**, **लउरी**, **रऊरी** ; का. **लुरू** ; कु. **लउरो** (लिंग); बं. **लेऊडा** ; ओ. **लाउडी** (काठी); बि. **लाउर्** ; हिं. **लउडा** ; सिं. **लउडो** ; गु. **लोडो**. **लगुडा** शब्दाचा अर्थ लिंग करणें ही प्रवृत्ति कांहीं ऑस्ट्रिक शब्दांत आहे. सं. **अलाबु** ; प्रा. **लाऊ** ; अप. **अलाउ** ; पं. **लौवी** ; हिं. **लावू** ; बं. **लाउ** ; सिं. **लब्ब** (अने. व. **लबु**) = भोपळा अशीं व्युत्पत्ति ब्लोकनें दिली आहे. व्युत्पत्ति अनिश्चित आहे. **लोमन्**, **लू** वगैरे शब्दांशीं संबद्ध आहे काय ? का ऑस्ट्रोएशियाटिक आहे ? **लाङ्गूल**, **लङ्ग**, **लङ्गल**, **लिङ्ग**, **लक्कुड**, **लगुड** वगैरे ऑस्ट्रिक आहेत.]

लवंड(णें) अक्रि. सांडणें, उपडें-उलथें होणें, पसरणें-एका अंगावर पडणें. To spilt, to be topsy-turvy.
[सं. १ **रुठ्**, **लुठ्-लुड्** १ उन्मादे, २ **लंड्** १ उत्क्षेपणे, ३ **ली** = खालीं लवंडणें.]

लवंडी स्त्री. दासी, वेश्या रखेली. A maid, a prostitute, a keep.
[फा. **लवन्द** ; हिं. **लौंडी**.]

लवलाह पुं. त्वरा, वेग. Haste, speed.
[सं. **लवलाभ** (थोडक्या क्षणानें, लवकर) > **लवलाह** ; **लव** हा शब्दहि **लोमन्** > **लंव** ह्यापासून निष्पादिता येईल. एक अडचण मात्र राहते. 'ल' वर अनुस्वार नाहीं **लवकर** मधील 'ल' वर हि अनुस्वार नसल्यामुळें **लोमन्** > **लव** ह्या शब्दाशीं त्याचा संबंध संशयग्रस्त वाटतो. याकाम. **लवलाहो**, **लवडसवड**, **लगबग** (ज्ञा. ९-६); शिकाम. **लवलाहीं** = लगेंच (न. द. ५६).]

लवाजमा पुं. परिवार, नोकरचाकर. Servants, retinue.
[अर. **लवाझिमा**.]

लवाद पुं. पंच, न्याय देणारे मध्यस्थी. An umpire.
[अर. **लवाझ** = कैवारी, आश्रय घेणें.]

लवा, लाव पुं. पक्षिविशेष. A species of bird.
[सं. **लाव**, **लावक**, √**लू** ; पं. **लवा** ; हिं. **लावा** ; बं. **लब**.]

लवोटवो, **लवटव** पुं. आर्जव, लाडिकपणा. Urging, pressing, fondledness.
[सं. **नम्**, **लम्** १ प्रव्हत्वे ; **टव** हा '**लव**'शीं ध्वनिसाम्य साधण्यासाठी प्रतियोगी शब्द वापरला.]

लश्कर न. सैन्य. An army.
[अर. **अल् अस्कर** ; फा. **लश्कर्**.]

लस(णें) अक्रि. खुपणें, दुखणें. To prick.
[सं. **लस्**, **लष्** (हिंसायाम्).]

लस(णें) क्रि. विलसणें, शोभणें, दिपविणें. To shine, to illumine.

[सं. लष्, लस् १ कान्तौ; शिकाम. लसणें; अकाम. लसलस, लसफशीत, लसलशीत, कमकतोरणा कलित-धोरणी लसती खाणी बहुत्या उपन्या ॥ सुदाम च. १३. सुंदर सकलवधूंते कसी न लसतीच होय दमयंती ॥ न. द. २

लस स्त्री. शेंब, पू. Serous excrement.

[सं. लश=राळ; देप्रा. लसुअं तैलम् (२४२-११); सिं. लस; पं. लस; हिं. लस, लस्सा (पुं.), लस्सी=मठ्ठा, ताक हा शब्द निराळा.]

लसूण पुं. वनस्पतिविशेष, कन्दविशेष. Garlic.

[सं. लशूनम्, लशुनम्, रसुनम्, रसोनम्; पा. लसुनम्, लसुणम्; प्रा. लसुण, लसण; का. रुहुन्; कु. लासण; बं. रसुन्; ओ. रसुण; बि. लहसुन्, रसुन्, रस्सन्; हिं. लसुन्, लसुम् (पुं.) संस्कृतीकरण उत्तरकालीन उघड दिसतें. पं. लसण; गु. लसण; सिंह. लून (कांदा).]

लहंगा पुं. परकर, कटिवस्त्र, घागरा. A loin garment.

[फा. लुंग, लुंगी.]

लहणें न. हुंडी, जम, मेळ. A cheque, tallying.

[सं. लभनम्; पा. लभनम्; प्रा. लहण; बं. लहना (ऋण); हिं. लहना (पुं. = फायदा); पं. लहिणा; लां. लाहणा; सिं. लहणी; गु. लहाणूं (बक्षिसें वाटणें); अकाम. लहणी (एक प्रकारची हुंडी).]

लहर स्त्री. लाट, मनाचा कल, अवस्था, वेग, आवेग. A wave, a fit, a heave.

[सं. लहरिः; प्रा. लहरी; अ. बं. लहरि; ओ. लहरा; हिं. लहर् (स्त्री.); पं. लहीर; सिं. लहरि, लहरो (पुं.); गु. लार् (ओळ), लेर् (लाट).]

लहान वि. छोटें, सान, आखुड. Small, pretty.

[सं. लघु; प्रा. लहु; सं. श्लक्ष्ण पासून व्युत्पादिला तर 'न' ची अडचण रहात नाहीं.]

लळ(णें) अक्रि. निश्चेष्ट पडणें, जीभ मध्यें येणें, लोंबणें. To hang, to lie senseless.

[सं. लल् १ विलासे; अकाम. लळलळणें, लळा (प्रीति, ममता).]

लळीत न. उत्सवाच्या शेवटीं करावयाच्या करमणुकीचा प्रसंग, कार्यक्रम, गोंधळ, नाटक, भांडण, शेवटचें भांडण (लक्षणा). A dramatic entertainment at the end of a religious festival like नवरात्र.

[सं. ललित, निष्ठा, < लल् १ विलासे.]

लक्ष पुं. संख्याविशेष, लाख, नेम ज्याच्यावर मारावयाचा तें. A lakh, a hundred thousand, attention, aim.

[सं. लक्ष् १० अंकने; लभ्, लांच्, लष्, लग्, लज्ज् हे धातु यास्क मूळ म्हणून देतो. अकामसा. लक्षण, (लक्ष्मन्), लक्षिणें, लक्षणा (शब्दाची एक विशिष्ट शक्ति), लक्ष्मी (श्रीमंती, संपत्ति), लक्ष्य (अवधान, चित्त).]

ला प्र. द्वितीयेचा प्रत्यय. An accusative termtion.

[सं. लागयति; प्रा. लाइउ; अप. लाइवि; लाउनु (ब्लोक); लाभे (होर्नुल); कु. लाइ, लइ; सिं. लाइ; बि. ला (साठीं); हिं. लां (पर्यंत); लां. ला (पासून).]

ला(णें) क्रि. घेणें. To take, to receive.

[सं. लाति; पा. लाति; प्रा. लाय; कु. लाणो; आ. लइव; बं. लाओया; हिं. लाना; सं. लाति. हा शब्द लभते (प्रा. लहइ) पासून आला असावा.]

लाइलाज पुं. निरुपाय, नाइलाज. Absence of alternative.

[अर. ला+इलाज.]

लाक(णें), लाखणें क्रि. दोन पशु एकत्र बांधणें, लाख चढविणें, लादवठणें. To tie together two animals, to besmear with lac.

[सं. १ लाक्षा (नाधा.), २ लग् १ अंकने; पहिलीच ग्राह्य; अकाम. लांक=लांख (जनावरांची सांगड, जूट), लाकण (बंधन), लकारी=बांधण्याची दोरी (लाखेचें काम करणारा).]

लांकूड न. जाड काष्ठ. A piece of wood.

[सं. लक्कुट; प्रा. लक्कुड; बि. हिं. लकडी; पं. लक्कड; लां. लक्कड; सिं. लकिडा; गु. लाकडूं. हा शब्द मूळ ऑस्ट्रिक असून संस्कृतमध्यें नंतर समाविष्ट केला गेला.]

लाख वि. संख्याविशेष, शंभर हजार. A hundred thousand.

[सं. लक्ष; पा. लक्खम्; प्रा लक्ख, लच्छ; का. लच्छ (पुं.); कु. अ. बं. लाख्; ओ. लाख; हिं. लाख (पुं.); पं. लक्ख (पुं); सिं. लखु (पुं); गु. लाख्; लास् (खूण).]

लाख स्त्री. एक प्रकारचा चिवट पदार्थ. Lac, a red dye.

[सं. लाक्षा, राक्षा; पा. लाखा; प्रा. लक्खा; का. लाछ (स्त्री); आ. लाहा; बं. लाहा; ओ. लाहा; लाख; वि. हिं. लाह (पुं.); लाख (स्त्री); पं. लां. लाख; सिं. लाख (स्त्री); गु. लाख; सिंह. ला; फा. लाक्; तेलगु. लाका; शिकाम. लाखी = तांबड्या रंगाचें. लाखी हे शाल घे ॥ न. द. ८१]

लाख वि. उत्तम. The best.

[सं. लक्ष्य; प्रा. लक्ख; अकामप्र. लाख माणुस, लाख गोष्ट.]

लाग(णें) क्रि. चिकटणें, मारणें, आघात होणें, बोंचणें, हवे असणें, स्पर्शणें. To stick or adhere to, to sustain a blow, to pierce, to be in want of, to touch.

[सं. लग्; पा. लग्ग; प्रा. लग्ग; दार्दि. लागु; फा. लगू; पं. लग्गु; कु. लागणो; आ. लागिब; बं. लागा; ओ. लागिबा; हिं. लागना, लग्ना; पं. लग्गणा; लां. लग्गण; सिं. लगणु; गु. लागवूँ; अकामसा. लाग (संधि, वेळ, फायदा), लागट (लोंचट, सडलेला), लागण (लागवड), लागवड, लागी, लागू (संबंध असलेला), लागीर = भुतानें पछाडलेला, भूत. 'लाग' धातूचे एकंदर अर्थ पन्नासाच्यावर आहेत. कांहीं अर्थांबाबत लक्षणा मानून अर्थभेदाचें निराकरण होतें; परंतु 'लाग' हा धातु इतर भिन्नभिन्न धातूंपासून निघाला असें मानावें लागतें. लग्, रग्, श्लाघ् रक्ष् इत्यादि धातु मुळाशीं असले पाहिजेत.]

लाग(णें) सक्रि. जरूर असणें, संग करणें, संबंध करणें. To require, to want, to stick to.

[सं. लग्, लज्, (निष्ठा) लग्न; प्रा. लग्ग; सिं. लग = प्रेम; लागू = वैषेयिक संबंध; अकामसा. लाग, लग्गा, लागण, लागा (बांधा), लागू, लगाव.]

लाग पुं. संधि, समय. An opportunity, a fit time.

[सं. लग्न; पा. प्रा. लग्ग; देप्रा. लग्ग (चिन्ह); का. लग (स्त्री) संवय; हिं. लाग (स्त्री) = आवड; सिं. लागू (वैषेयिक संबंध), लग = प्रेम; गु. लाग; अकामसा. लागू = अनीतिकारक संबंध असलेला.]

लांच स्त्री. स्वार्थ साधण्यासाठीं दुसऱ्याला गुप्त रीतीनें दिलेले पैसे. A bribe.

[सं. लञ्चा, √ राध्, + √ रास्; प्रा. लंचा; कान. लंच; हिं. सिं. गु, लंचा; सिंह. लस; अकाम. लाच (पुं.) (१८९५).]

लांगूल न. शेंपूट. A tail.

[सं. लांगूल, √ लग्, लंग्, लंब् (निरुक्ति).]

लाचार वि. गरीब, अगतिक, दीन. Helpless, forlorn, destitute of resource.

[फा. लाचार्.]

लाज(णें) उक्रि. लज्जित होणें. To feel abashed.

[सं. लज्ज्; पा. लज्ज; प्रा. लज्ज; हिं. लजना; हिं. लजणा; सिं. लजणुं; गु. लाजवूँ; अकाम. लाज, लाजाळू, लाजीर, लाजलज्जा, लाजिंदा, लाजिरवाणा.]

लाज स्त्री. विनय, मर्यादा. Shame, modesty.

[सं. लज्जा; पा. प्रा. लज्जा; का. लझ; कु. लाज; आ. लाझ्; बं. लाज्; ओ. लाज; हिं. लाज् (स्त्री); पं. लज्ज (स्त्री); सिं. लज; गु. लाज्; अकाम. लाज = पदर, वस्त्र.]

लाजा(लज्जा)होम पुं. विवाहविधींतील लाह्यांचा होम. A sacred fire (in marriage ceremony).

[सं. लाजा (लाह्या) + होम, √ लाज्.]

लाजिमा,-म्मा पुं. हक्क, वहिवाट. Propriety or title in.

[अर. लाझिम; पेकाम. हक्कलाजिमा.]

लाट(णें) क्रि. पातळ करणें, दाबणें, फिरविणें. To roll out, to press, to turn round.

[सं. रद्–विलेखने (णिच्); हिं. लटना; सिं. लटणु; गु. लटवूँ.]

^{1}**लाट(णें)** सक्रि. अन्यायानें मिळविणें, बळकावणें. To usurp.

[सं. ला, रा २ आदाने ; अकाम. **लाट** = फायदा, घबाड.]

^{2}**लाट** अ. भले, वाहवा. Bravo, well-done.

[सं. **लाडनम्** ; प्रा. **लट्ठ** ; देप्रा. **लट्ठो प्रियंवादः** (२४५–१६); सिं. **लाडलो** ; हिं. **लाडा** ; पं. **लाडा** = वर, **लाड** = प्रेम ; हिं. **लाढिया** = स्तुतिपाठक ; म. **लाड, लाडका.**]

^{3}**लाट** स्त्री. बगाड, पाण्याचा तरंग, लहरी, लाकडाचा सरळ, जाड ओंडका. A wave, the cross piece of a *bagad*, a roller.

[सं. १ **लट्ट्**, २ **यष्टि** ; प्रा. **लट्ठी** ; हिं. **लाठी.**]

^{4}**लाट** पुं. मोठा सरदार, अधिकारी (बडे लाटसाहेब). Lord.

[*Eng*. Lord; *As*. Hlaford, Hlaf = Loaf, Weard = guardian, *Icll*. lovarder = Loaf-Reeper, master of the house.]

^{5}**लाट** पुं. समूह, संच (पुस्तकांचा लाट). A lot.

[*Eng* Lot; *As*. Hlot ; *Goth*. Hlants ; *Dut*. Lot ; *Icel*. Hluti.]

लाठ स्त्री. पाणी उचलण्याचें तीन दांड्याचें एक साधन. A contrivance to draw water out of a deep well.

[सं. **यष्टि, लष्टि** ; पा. प्रा. **लट्ठि** ; दार्द. **लाट** (ढाळी); का. **लोठु** ; कु. **लाठो** ; आ. बं. ओ. **लाठि** ; बि. हिं. **लाठ** ; पं. लां. **लट्ठ** ; सिं. **लाठि** ; गु. **लाठी**; म. **लाटी.**]

लाठा (म्हैस) वि स्त्री. वांझट. Barren.

[सं (?); आ. **लठा** (पर्णरहित); बं. **लठुया** ; हिं. **लट्ठर** ; गु. **लठ्ठिगो** ; अकाम. **लट्ठ** = व्यंगी. पुढचे शब्द ताडून पहा. (**लट्ट, लिट्ट, लुण्ट, लण्ठ, लुठ्ठ, लठ्ठ, लोट्ठ, लोद्द, लण्ड, लिण्ड लेण्ड, लुण्ड, लड्ड, लंढ, लिड्डु, लेड्डु, लिद्द** इत्यादि शब्द प्राकृतमध्यें निन्दार्थक आहेत. **लुल्ल, लुलो, लंग, लिंग, लेंग, लुञ्ज, लनारो, लुज, लोज्झ, लोस्स, लट्ठक, लठ्ठालट्ठी, लट्टीनु, लट्ठु, लट्टुवा, लठेप्रो, लठ्यारो**).]

लाठी स्त्री. काठी. A stick.

[सं. **यष्टि** ; प्रा. **लट्ठि** ; हिं. **लाठी.** लाठ पहा.]

लाड पुं. कोड, इच्छा. Caressing, fondling.

[सं. **लाडनम्**, √ **लाड्** १० लौल्ये, **ल्हाद्** ; प्रा. **लड्डिण** (न.) कु. हिं. **लाड्** (प्रेम); प. **लाड** ; लां. **लाड्ला** (लाडावलेला); सिं. **लाडु** (मुका); गु. **लाड** ; याकाम. **लाडैज** (ज्ञा. १५-५९७); अकाम. **लाडका, लाडिक.**]

लाडका वि. ममतेंतील, प्रेमांतील, आवडीचा. Darling, fond, loving.

[सं. **लटति, लडति** ; आसा. **लरा** ; बं. **लेडका** ; हिं. पं. **लडका** ; **लड + अक.**]

लड्डु, लाडु पुं. एक गोल व गोड पक्वान्न. A sweet ball.

[सं. **लड्डुक** ; **लषित** (**लष्ट**): प्रा. **लड्डुअ** ; अप. **लड्डुय** ; हिं. पं. **लड्डू** ; का. **लोड्डु** ; आ. **लाडु** ; बं. **लाडु** ; ओ. **लड्डु** ; सिं. **लड्डू** ; गु. **लाडु.**]

लांडिस न. पत्त्याचा एक खेळ, एक वाहन. A game at cards, a conveyance.

[*Eng*. Lorry, Larry.]

लाणी स्त्री. स्थान, आश्रय, शेवट, सीमा अवधि, प्राप्ति. A place, shelter, end.

[सं. **लयन**, √ **ली, लान** ; प्रा. **लेणे, लाण** ; याकाम. **लाणी** (ज्ञा. २-२४२).]

लांडा वि. अपुरा, आखूड. Deficient, short, tail-cut.

[पुढील निरनिराळे शब्दभेद पहा. ह्या सर्वांचें मूळ ऑस्ट्रिक असावें. १ **लेण्ड** ; हिं. **लेंड्, लेंडा** (नपूंसक, भित्रा); २ **लण्ड** ; का. **लुण्ड** (कुब्जास्त्री); **लण्डुर** (विधूर); ते. **लण्डा** (खल्वाट); हिं. **लँडा** (बिनशेंपटाचा); सिं. **लण्डो** (निर्लज्ज); म. **लांडा कारभार, लांडीलबाडी**; ३ **लुण्ड** (लडितु); ४ **लण्ढ**; बि. **लँढा** (तुटक्या शेपटाचा बैल); ५ **लेण्ढ** ; बि. **लेढा, नेढा** = Empty cob; ६ **लिड्डु** ; फा. **लेंड** (अशक्य); **लेड्डु** ; बं. **लेडा** (खल्वाट), ८ **लड्ढ** ; म. **लाढा** (वांझ म्हैस); ९ **लिद्द्** ; पं. **लिद्** (स्त्री. भित्रेपणा); सं. **लेण्ड, लिण्ड, लण्ड, लिड्डु, लैड्डु, लद्द, लिद्द, लेद्द** (शेण), **लण्ड** (पुरुषलिंग); अकामसा. **लांडाकारभार, लांडाभाई** (मुसलमान), **लांडाभोंडा** (दोन्ही एकाचे अर्थाच्या शब्द), **लांडालटका, लांडीलबाडी, लांडेलटकें.**]

लांडोर स्त्री. मोराची मादी. A peahen.
[सं. (?); देप्रा. लांडोर.]

लाथ स्त्री. पायाचा शेवटचा भाग, लत्ता. A kick.
[सं. लत्ता, √ लत्त (सौत्रधातु)-आघाते ; प्रा. लत्ता ; का. लथ ; कु. लात् ; बं. नाति ; ओ. लत्त, नात ; हिं. लात् ; पं. लां. लत्त ; सिं. लत ; गु. लात् ; सं. लत्ता ; प्रा. लत्था ; (अ. बं. लाथी-काठी).]

लाद(णें) सक्रि. ओझें घालणें, चढविणें. To load, to burden.
[सं. रद्य, √ रद् १ विलेखने, लदयति (उत्तरकालीन); प्रा. लद्दइ ; का. लदुन् ; आ. लाद (ओझें); बं. ओ. लदाइबा ; हिं. लादना ; पं लद्दणा ; लां. लड्डुण ; सिं. लडणु ; गु. लादवूँ.]

लादा पुं. (चिखलाचा) गोळा, शेणाचा पुंजका. A mass of kneaded dough.
[सं. रद्य ; प्रा. लद्दी (हत्तीचें शेण, लीद); का. लोदु ; आ. लाद ; गु. लाद. लद्दा, लिद्दा, लण्ड, लिण्ड, लेण्ड लेड्ड, शब्द ताडून पाहाण्यासारखे आहेत.]

लाध(णें) क्रि. मिळणें, सांपडणें, प्राप्त होणें. To get, to secure, to procure, to accrue, to come unto.
[सं. लब्ध, √ लभ् ; पा. प्रा. लद्ध ; पं. लध्धना ; लां. लद्धा ; सिं. लधो ; गु. लाधवूँ ; सिं. लध. किंवा सं. राध् ५ संसिद्धौ ; याकाम. लाधणें (ज्ञा. १४८६).]

लांपट वि. सैल, ढिलें, लटपटित. Loose, slackened.
[सं. लंपट (?).]

लापणीक स्त्री. विवेचन, वादविवादाची पद्धत. A prolix discourse.
[सं. लापनिका; √ लप्. ; याकाम. लापणीक ; अकाम. लावणी.]

लापशी स्त्री. खीर, साबुदाण्याचा एक पदार्थ. A dilute preparation of milk.
[देप्रा. लप्पसिया, हिं. लपसी.]

लाभ(णें) क्रि. सांपडणें, मिळणें. To accrue, to arise, to get.
[सं. लभ्यते ; पा. लब्भति ; प्रा. लब्भइ ; पं. लभण ; लां. लभणु ; गु. लाभवूँ.]

लामा पुं. बुद्धधर्मांतील मुख्य गुरु (तिबेटांतील). The Lama, Budhistic priest.
[तिबेटी, ल्हामा. ब्लाम ('ब्' हा वर्ण अनुच्चारित आहे.)]

लांब(णें) अक्रि. दूर होणें, दीर्घ होणें. To become distant, to increase in length.
[१ सं. अवलंबते ; पा. ओलम्बति ; प्रा. ओलंबई ; २ सं. आलंब ; पा. प्रा. आलंब (पुं.); हिं. अलम् ; ३ सं. रंबते, लंबते ; पा. लबति ; प्रा. लंबई ; का. लमुन् ; हिं. लुमना ; सिं. लमणु ; गु. लामण (दिवो).]

लांब वि. दीर्घ, दूर, अंतरावरील. Long, distant, remote.
[सं. लंब, √ लंब् ; पा. लंबो ; प्रा. लम्ब ; कु. लामो ; आ. लम्बा ; हिं. लाँब, लम्बा ; पं. लां. लम्मा ; सिं. लाम ; गु. लांबूँ ; ने. लामु ; अकामसा. लांबट, लांबणें, लांबण, लांबविणें ; लांबी = चिकट पदार्थ, ह्याची व्युत्पत्ति काय ?]

^{1}**लाव(णें)** क्रि. चिकटणें, जोडणें, पाठविणें, रोवणें, To stick to, to adhere, to join, to plant, to send.
[सं. लागयति ; प्रा. लाएइ ; अप. लाइवि ; का. लायु ; बि. लाएब ; हिं. लाना ; पं. लाउणा ; लां. लावण ; सिं. लाइणु ; गु. लाववूँ ; अकामसा. लावणी-संचणी, लावालाव. ह्या धातूचें मूळ लग्, ली, रग्, री वगैरेंपैकीं एखादें असूं शकेल.]

^{2}**लाव(णें)** सक्रि. तोडणें. To break.
[सं. लुञ्-छेदने ; याकाम. लावणें (ज्ञा. १३-२३४).]

लावणी स्त्री. एक प्रकारचें ग्राम्य गीत. A kind of rural erotic song.
[सं. लापनिका.]

लावण्य न. सौंदर्य. Beauty.
[सं. लवण (मीठ). मीठानें शरीरकांति वाढते असें म्हणतात. परंतु ही व्युत्पत्ति पटत नाहीं. त्यापेक्षां 'रमण', रमण्य, √ रम् ह्या शब्दापासून व्युत्पादणें हें संमत होईल.]

लावलद वि. निपुत्रिक. Having no male issue.
[अर. लावलद्.]

लायक,-ख वि. योग्य, समर्थ, पात्र. Proper, suitable, able.
[अर. लाइक्.]

लारी स्त्री. एक प्रकारचें नाणें. A kind of coin

[अर. फा. **लारी**. इराण आखाताजवळील **लार** ह्या प्रदेशांत हें नाणें वापरांत असे. अद्याप नाण्याला तोच शब्द तेथें वापरतात.]

लाल(णें) क्रि. लालन करणें, लाड करणें. To rear up, to fondle.

[सं. **लल्**, (णिच्) **लालय.**]

लाल वि. पुं. तांबडा, रत्नविशेष. Red, a ruby.

[फा. **लाल्** ; अकाम. **लालभडक.**]

लालूच स्त्री. इच्छा. Wish, desire, a bribe.

[सं. **लालसा** ; पा. **लालसा** ; प्रा. **लालसा** ; बं. हिं. पं. **लालच** (पुं); सिं. **लालिच** (स्त्री); गु. **लालच** (पुं.). √ **लुष्** १० हिंसायाम् किंवा √ **लष्** ह्या धातूच्या अभ्यस्त रूपापासून वरील शब्द सिद्ध झाला असावा.]

लाल्हात वि. रमणीय, सुंदर. Beautiful.

[सं. **लालायित**, √ **लल्** (णिच्); **ललितपासून** व्युत्पादणें योग्य नाहीं.]

लाँव स्त्री. लावसट स्त्री, वेडी, राक्षसी. A female demon, a sorceress, a silly woman.

[सं. **लाविका** (लाम); पा. **लामको** (कनिष्ठ); देप्रा. **लामा डाकिनी** (२४३·१४)=जादुगारीण; पं. **लावाँ** (व्यंगी); सिं. **लाव, लामो** (वोथट, धीट); याकाम. **लाव** (ज्ञा. ८-१४७). कदाचित् सं. **रामा** (काळी, कुरूप स्त्री) ह्या शब्दापासूनहि वरील शब्द आला असावा (ब्लोक).]

लांशें, ल्हासें न. काळा डाग, अंगावरील डाग. A black spot on the skin.

[सं. **लांछ्** १ लक्षणे.]

लास(णें) सक्रि. खुणा करणें, शिक्का मारणें. To mark, to stamp.

[सं. **लक्ष्मन्** (खूण चिह्न), √ **लक्ष्** (लक्षणे); पा. **लक्खो** ; प्रा. **लक्ख** (**लक्षते, लक्षयति > लक्खेति > लक्खइ**); हिं. **लखना** ; सिं. **लखणु** ; गु. **लाच्छो** ; अकामसा. **लासणी, लासें, लास**=लोखंडाच्या सळीचा डाग.]

लांसी स्त्री. राक्षसी लास. A female demon.

[सं. **राक्षसी** ; देप्रा. **लाक्खसी > लाहसी, लांस.**]

लाह(णें) सक्रि. मिळविणें, घेणें, प्राप्त होणें. To accrue unto, to get.

[सं. **लभ्, लाभ** ; पा. **लभ** ; प्रा. **लह** ; गु. **लहण** (न)=लाभ, **लहेवूँ**=लक्षपूर्वक ऐकणें ; सिं. **लहणु**=मिळणें, **लाहो** ; पं. **लाह** ; हिं. **लाओसाओ, लाहना**=मिळणें, वाढणें ; सिंह. **लबनवा** ; याकाम. **लाहणें** (ज्ञा. १६–५६); **लाहो, लाहणा**=लाभणारा (ज्ञा. १६–४६); अकाम. **लाह**=लाभ.]

लाहक(णें) अक्रि. धापा टाकणें, तगमग होणें. To gasp, to heave, to exasperate.

[सं. **लष्** (णिच्); याकाम. **लाहाक**=शोक ; अकामसा. **लाहंडा**=तगमग, **लाहकी** (उकळी, घालमेल), **लाहा**=अंगावरील तीळ, **लाही**=आग, भाजून फुगलेला दाणा.]

लाही स्त्री. भाजून फुगलेला दाणा. Corn blown out by parching.

[सं. **लाजा, लाजिका** ; प्रा. **लाइआ.**]

लाळ स्त्री. तोंडांतील चिकट पदार्थ, थुंकी. Saliva, spittle.

[सं. **लाला**, √ **लल्** ; पा. प्रा. **लाला** ; का. **लाल्** ; कु. **राल्** ; अ. अं. **लाल्** ; ओ. **लाळा, राळा** ; हिं. **लाल, लार्, राल्** ; सिं. **लार** ; गु. **लाळ्** ; कान. तद्भव. **लोळे**=लाळ.]

लाळ(णें) सक्रि. लाड करणें, लोळणें. To fondle, to roll.

[सं. **लल्** १ वाल्ये.]

लिक(णें) उक्रि. दडणें, दडवणें, गुप्त ठेवणें. To hide, to keep secret.

[सं. **लिश्** ४ अल्पीभावे ; प्रा. **लुक्कइ, लिक्कइ** ; देप्रा. **लिक्कइ, लिहकइ** निलीयते (२४४-७); कु. **लुकणो** ; आ. **लुकिब** ; बं. **लुका** ; हिं. **लुकना** ; पं. **लुकणा** ; रु. **लुकण** ; सिं. **लुकणू.** परंतु मराठी शब्दांत **'उ'** च्या ऐवजीं **'इ'** हा स्वर आला आहे. प्राकृतमध्यें **'लिक्कइ'** असें एक रूप आहे. त्याच्याशीं मराठी शब्द अधिक संबद्ध आहे. सिंधीमध्यें **लिकणु** असें **'इ'** चेंच रूप आहे.]

लिख(णें) सक्रि. लिहिणें. To write.

[सं. **लिख्** ; कु. **लेखणो** ; आ. **लेखिब** ; बं: **लेखा** ; हिं. **लेखना** ; सिं. **लेखणु** ; गु. **लिखवूँ** ; म. सा. **लेख, लिखाई, लिखावट, लेखणें** (णिच्).]

लिख स्त्री. केसांतील एक कृमि. A louse, a nit.

[सं. लिक्षा ; प्रा. लिक्खा ; का. लच्छ, लिच्छ ; कु. लिखो ; आ. लेखि ; बं. लिक्का ; ओ. निख ; हिं. पं. लीस ; सिं. लाख ; गु. लीख.]

लिखित न. पत्र, लेखन, लिहिलेलें. A writing, a letter, a document.

[सं. लिखितम्, √ लिख् ; मूळ विशेषण परंतु त्याचा नामाप्रमाणें उपयोग पहिल्यापासून आहे.]

शिवादि चरणरज वांछित । त्या मज पाठविलें लिखित ए. रु. स्व. ५-५४.

लिगाड न. संकट, अडचण, लचांड (ल.), बैलाच्या मानेवरील जूं, ओझें. A perplexing affair, a difficulty (fig.), the yoke.

[सं. नि + गड्-बंधने, लिगट(ड)णें = चिकटणें, बांधणें ; म. लिगाड (नाधा.); सं. श्लिष्, लिग् १० आलिंगने ; किंवा 'लगटणें'चें दुसरें रूप.]

लिंगायत पुं. एक पंथविशेष, शिवभक्तीचा पंथ. A religious sect of Shiva worshippers.

[सं. लिंगायत्त ; कान लिंगायत. तेराव्या शतकांत बसव्वानें स्थापिला.]

लिटक(णें) क्रि. चिकटणें, बिलगणें. To stick to, to adhere.

[सं. श्लिष्टक ; √ श्लिष्–आलिंगने.]

लिडबिड(णें) अक्रि. लडबडणें, माखणें, लपेटलेलें असणें. To rock, to besmear.

[सं. लिप्तविलिप्त, √ लिप् ; लीढ विलीढ, √ लिह्.]

लित(णें) सक्रि. माखणें, लिंपणें. To smear.

[सं. लिप्त (निष्ठा, √ लिप्); प्रा. लित्त ; याकाम. लितणें.]

लिफाफा,-पा पुं. पाकीट, लखोटा. An envelop.

[अर, लिफाफा.]

लिमलेट न. लिंब–साखरमिश्रित पेय. A lemonade drink.

[*Fr.* Lemon ; *Per.* Limun ; *Fr.* Limonade.]

लिंप(णें), लिप(णें) उक्रि. माखणें, चोपडणें, सारवणें, लेपणें. To anoint, to smear with.

[१. सं. लिप् ६ उपदेहे, लिप्यते ; पा. लिप्पति ; प्रा. लिप्पइ ; आ. लिपिब ; बं. लेपा ; ओ. लिपिबा ; हिं. लीपना ; लिपना ; पं. लप्पणा ; गु. लिपवूँ ; २ सं. लिंपति ; पा. लिंपति ; प्रा. लिंपइ ; पं. लिमणा, लां. लिम्मण ; (सं. लिप्त ; पा. प्रा. लित्त); गु. लिंपवूँ ; अकामसा. लिंपण, लिपी, लेप, लेपाट.]

लिपी स्त्री. लेख, अक्षरमाला. Writing, alphabet.

[सं. लिप् ६ उपदेहे. लिंपणें पहा. पूर्वीं अक्षरें धुळीचे लेप देऊन काढीत.]

लिंब पुं. वृक्षविशेष. A kind of tree.

[सं. निम्ब ; प्रा. लिंब ; अप. लिंबड ; अकाम. लिंब, लिंबारा, लिंबोणी, लिंबूर.]

लिंबू पुं. एक प्रकारचें आंबट रसयुक्त फल. A lemon.

[सं. निम्बूक ; फा. लेइमून् ; हिं. लीमू, नीम्बू ; *Eng.* Lemon ; *Fr.* Lemon ; *Ita.* Limone ; *Sp.* Limon. मलाया, लिमऊ ; पोर्तु. लिमाव.]

लि(नि)लाव पुं. सरकारतर्फें जाहीरविक्री. An auction.

[पोर्तु. लेइलॉव, निलामु ; हिं. लिलाम ; म. लिलांव लिलाम, निलाम.]

लिहि(णें) क्रि. कागदावर अक्षरें काढणें. To write.

[सं. लिख् १ अक्षरविन्यासे ; पा. लिखति ; प्रा. लिहइ ; सिंह. लियनु ; सं. लेखा ; पा. लेखा ; प्रा. लेहा ; प. लीह् ; सिं. लीह ; गु. लीह.]

लीद स्त्री. घोड्याची विष्ठा, जनावराची विष्ठा. The dung of a horse.

[देप्रा. लद्दी, लिंड (न), लिंडिय, लिद्दा (लद्द, लेइ, लेड्डु, लण्ड, लिण्ड, लेण्ड); कु. लिदो ; वि. हिं. लिद ; सिं. लिद्दी ; गु. लीद ; कान. लद्दी ; सं. लिप्त हा शब्द कदाचित् मूळ असावा किंवा मूळ शब्द ऑस्ट्रिक असावा.]

लीळा स्त्री. लीला, खेळ. A sport, a game.

[सं. लीला.]

लुकलुक(णें) अक्रि. चकचकणें. To sparkle, to shine, to glitter.

[सं. रुश् १ प्रकाशने (द्विरुक्ति).]

लुकड,-ण, लुंकण न. एक चिकट पदार्थ. A kind of varnish.

[ते. अलुकु = शेणकाल्यानें सारवणें.]

लुकसान न. नुकसान, तोटा. Loss, ruin.
[अर. नुक्षान्; हिं. लुकसान; अकाम. लुकसान, नुकसान. कधीं कधीं विशेषण म्हणून वापरला जातो.]

लुंका वि. सडपातळ, रोडका. Lean, emaciated.
[सं. रुग्ण, √ रुज्; प. लुग्गो; प्रा. रुग्ग, लुग्ग.]

लुगडें न. स्त्रियांचें नेसण्याचें वस्त्र. A cloth usually coloured, a sari.
[सं. रुग्णः (दुबळें, अशक्त); पा. लुग्गो; प्रा. रुग्ग, लुग्ग; ओ. लुगा; हिं. लूगडा (चिंध्या); सिं. लुगिड़ु (घामट); गु. लुगडूँ (कपडा); याकाम. लुगडें = वस्त्र (अमृ. ९-४६); लां. लुग्ग (निर्जन); सिं. लुगिरो (घामट). ह्या शब्दाच्या अर्थाबाबत निरनिराळ्या भाषांत फरक पडला आहे. पहिला अर्थ “ भग्न, वापरलेलें, फाटलेलें, ” त्यापासून दुसरा अर्थ ‘चिंध्या’ असा येणें किंवा होणें साहजीक आहे आणि त्यापासून “ वापरण्याचा कपडा ” असा अर्थ निघणें हेंहि अस्वाभाविक नाहीं. मराठीमध्यें सामान्य अर्थ जाऊन स्त्रियाचें नेसणें असा मर्यादित अर्थ कसा प्राप्त झाला ? आमच्या मतें हा शब्द महाराष्ट्रांतील परप्रांतीय व्यापाऱ्यांनीं मराठींत रूढ केला. त्यांच्या व्यवहारांत लुगडा असा शब्द स्त्रियांचा वस्त्राबाबत रूढ झाला व पुरुषवस्त्राला ‘धोतर’ असा शब्द रूढ होऊन बसला. (पुढील निर्वचन पहा. सं. दुकूलम् > डुगूलम् > लुगुड). ह्यासारखाच आणखी एक शब्द आहे—लत्ती (चिंधी).]

लुगार(णें) लुंगाड(णें) सक्रि. लुटणें, लुबाडणें. To plunder, to rob.
[सं. लुञ्चाहर.]

लुंगी स्त्री. ढुंगणाभोंवतीं गुंडाळलेलें वस्त्र. A cloth round the waist.
[फा. लुङ्ग, लुंगी = रंगीत कापड, धोतर, रंगीत कांठ. (लिंग ह्याच्याशीं संबंध आहे काय ?)]

लुच्चा वि. लबाड, फसव्या, खोटा, उधळा. Rougish, dissolute, unprincipled, profligate.
[सं. लुञ्चक > लुच्चअ > लुच्चा (राज.); फा. लुच्चा = व्यसनी; प. पहा. लुच्चॉण्; कु. लुच्चो (भिकारी); लो. लोच्चा; बं. हिं. पं. लुच्चा; सिं. लुचो; गु. लुच्चूं. फारशी शब्द हाच मूळ आहे.]

लुंच(णें) क्रि. केंस उपटून काढणें. To pluck up or out the hair.
[सं. लुञ्चति; पा. लुञ्चति; प्रा. लुच्छइ, लुंचइ; कु. लुचणो; अकामसा. लुचका, लचका, लुचपत, लुचाडणें.]

लुट(णें) सक्रि. लुबाडणें. To plunder, to pillage.
[सं. लुण्ठति, लोठ्यति (लुठ्, लुट्, रुट्); पा. लुठति; प्रा. लूडइ, लुट्टइ; का. लूटुं; कु. लुटणो; आ. लुटिब; बं. लुटा; ओ. लुटिबा; हिं, लूटना; पं. लुट्टणा; लां. लुट्टण; सिं. लुटणु; गु. लुटवूँ; अकामसा. लुटारू, लूट, लुटालूट. २ पुढील व्युत्पत्ति चिन्त्य आहे. सं. लुप् (चोरणें), लोप्तृ; प्रा. लोत्त, > लोट्ट > लूट.]

लुटपुट(णें) अक्रि. सैल होणें, लटपटणें. To be loose, to slacken.
[सं. लुठ् ६ विलोडने.]

लुटपटीचा वि. खोटा, नकली. लटपुटीचा पहा. Paltry, counterfeit, not real.

लुठ(णें) उक्रि. गुंडाळणें, लोळणें. To roll up.
[सं. लुठति; प्रा. लुढइ; हिं. लुढना; गु. लुठवूँ.]

लुडक(णें) सक्रि. थापटणें, मारणें, टोकावर नाचणें, To tip over, to pat, to recline.
[सं. लुडति; पा. लुळति; प्रा. लुलइ; बं. लुडलुड (नाचणें); सिं. लुडणु; लां. लुडण.]

लुडवूड स्त्री. मधील विघ्न, संबंध नसतां कामामध्यें येणें. Vexatious intermeddling.
[सं. लुठ्+बृह्, (किंवा बुड्ड्—मज्जने (नाधा.), लुडबुड(णें), लुडबुड्या. हा ध्वनिशब्द आहे.]

लुडमा वि. अशक्त उंच (मनुष्य). Lean and tall.
[प्रा. लुट, लुड, लठ; आ. लुरुमा = गिड्डा.]

लुंडा वि. विकलांग. Infirm, mutilated, deformed.
[देप्रा. लुण्ड, लुण्ट; का. लुण्ड; हिं. लुंडा (शेंपूट नसलेला); पं. लुण्ड (निर्लज्ज मनुष्य); लुण्डा (विधूर, शेंपूट नसलेला); लां. लुण्डा; सिं. लुण्डु (अधिक महिना). लांडा पहा.]

लुत्रा वि. बडबड्या. That prattles.

[सं. (?); प्रा. लुत्त, लत्थ ; का. लथ ; आ. लुतुरा (विषयासक्त); हिं. लुत्रा (खुषमस्करा); पं. लुत्रा, म. लुब्रा (?).]

लुबक(णें) अक्रि. तीव्र इच्छा होणें, टपून बसणें (मिळविण्यासाठीं). To be closely and earnestly desiriing.

[सं. लुभ् ४ गार्ध्ये + अकच्.]

लुबरा, लुब्रा वि. मध्येंच तोंड घालणारा, विनाकारण लुडबूड करणारा. Troublesome by uncalled for interference.

[सं. लुभ् ४ गार्ध्ये + रा (वि. प्रत्यय).]

लुंबडें न. बैलाच्या मानेवरील वशिंड, पोळें. The hump on the neck of a bull.

[देप्रा. लुंम्बी (स्त्री.) झुबका ; कु. लुम्रो (गरीब); हिं. लूमना ; गु. लुमवूँ ; लूम (स्त्री.) = झुबका.]

लुला वि. विकलांग, पंगु, ढिला, अशक्त. Mutilated, infirm, withered, distorted.

[सं. लूत, लून (निष्ठा); प्रा. लुअ + अल्ल (प्रत्यय); कु. लूडो ; हिं. लूला ; गु. लूलूँ; सिं. लूलो ; पं. लूला.]

लुलुप(णें) अक्रि. लोभ धरणें, भुलणें. To desire, to be attracted.

[सं. लुभ् किंवा लुप् > लोलुप ; याकाम, लुलुप ; अकाम. लुळणें.]

लुस(णें) सक्रि. लुटणें, ओढणें. To draw, to plunder.

[सं. लुष् १० हिंसायाम् ; याकाम. लुसणें.]

लुसलुस(णें) अक्रि. टवटवीत असणें. To have a blooming appearance.

[सं. लुस् किंवा लस् दीप्तौ (द्विरुक्त); अकामसा. लुसलुशीत (मऊ, टवटवीत).]

लुळी, लोळी स्त्री. लोळण्याची इच्छा, गुंडाळी, गांठ. A desire to roll, a knot, a bunch.

[सं. लुड्, लुल्–विलोडने.]

लूट स्त्री. चोरी, लबाडी. Plunder, theft.

[सं. लोतृ,–प्तृ,–त्र, √ लुप्–चोरणें ; हिं. लूट ; का. लूठ ; कु. लूठ ; अबं. लूट् ; ओ. लुट ; हिं. लूट (स्त्री); पं. लां. लुट्ट ; सिं. लुटि. लुटणें पहा.]

लूद,–त स्त्री. एक प्रकारचा त्वचेचा रोग. A cutaneous disorder.

[सं. लूता (कोळी, गलत्कुष्ट); पा. लूता ; प्रा. लूआ ; हिं. लूता ; पं. लूत ; याकाम. लुती (ज्ञा. १३-७३२); अकाम. लुतिजणें ; हा रोग 'कोळी' कीटकाच्या चिरडण्यानें किंवा त्याच्या घाणीनें जडतो.]

ले(णें) क्रि. अंगावर घालणें. To wear, to put on.

[सं. लभते, √ लभ्, किंवा ली ४ श्लेषणे ; प्रा. लेइ ; अप. लेवि (ल्यबन्त); का. लेवादेवा ; कु. लिणो ; हिं. लेना ; पं. लेवा (देवी); लां. लेवण ; सिं. लेती ; गु. लेवूँ ; याकाम. लेइणें, लेणें.]

लेक पुं. स्त्री. मुलगा, मुलगी. Son or daughter.

[देप्रा. लिको तथा लीचोबालः (२४४–३); जैन. प्रा. डिकरुव, डेक्करुव ; प्रा. लेक्क, डेक्क, लिक्क, डिक्क, दिक्क ; अकाम. लेकरूं (लेकरूपम्) = मूल, लेकुरवाळा (लेकरें असलेला); झिलगा, मुलगा, पोरगा, डिकरा, छावा, भुर्गा वगैरे अपत्यवाचक शब्द चिन्त्य आहेत. पुढील व्युत्पत्ति पहा. मूल < प्रा. मूल्ल ; < सं. मूल्य ; पोत < पुत्रक, < पुत्तअ ; पोर. छावा < शिशु. कुण्डगोलक ह्यांतील दोन्ही शब्दांचा अर्थ अपत्य असाच आहे. –पहा, कत्रे–जुबिली अंक, भाण्डारकर अनॉल्स.]

लेकवळा, लेकावळा वि. (पुं.) संकरजन्माचा, दासीपुत्र. Of mixed breed, bastard.

{ तेलु. लेंक ; कान. लेक (गुलाम, दास) वाळी (= वाडी, पाडी); कान. पाळी ; तेलु. पाडी ; (धर्म, नीति, कायदा). ह्या शब्दाचा निर्देश कानडी शिलालेखांत १०४५ इसवीसनांत आढळतो व तेथें त्याचा अर्थ दासीपुत्र असा आहे. ह्यासारखे **जोळवाळी, वेळवाळी** असे आणखी दोन शब्द आहेत.]

लेकिन अ. पण, परंतु, शिवाय. But, besides.

[फा. लेकिन् ; अर. लाकिन्.]

लेख पुं. लिहिलेला मजकूर, कागद. A writing, a document.

[सं. लेख्य ; प्रा. लेक्ख ; का. ल्युखु ; कु. लेखो ; अ. बं. ओ. हिं. लेख (पुं.); पं. लेक्खा, लेखा ; लां. लेखा ; सिं. लेखो ; गु. लेखू ; अकामसा. लेखणी (लेखनी), लेखणें (मानणें, लिहिणें); √ लिख्, √ लेक्ष् १ दर्शने.]

लेखणें सक्रि. मानणें, समजणें, गणणें, लिहिणें. To regard, to count.
[सं. १ लिख्; २ लेक्ष् १ दर्शने.]

लेच(णें) अक्रि. कबूल करणें. To yield, to give way.
[सं. लीयते.]

लेचापेचा वि. अशक्त, कमजोर, कच्चा. Weak, imbecile.
[सं. लिश् ४ अल्पीभावे + पिश्.]

लेज(णें) क्रि. धारण केलें जाणें, घातलें जाणें. To be put on.
[सं. लि (कर्मणि); प्रा. लेज्ज.]

लेटणें अक्रि. कबूल करणें, पडणें, पसरणें. To agree, to fall, to spread.
[सं. लीयते; आ. लेटिब; बं. लेटा (विरोध); हिं. लेटना (पडणें); पं. लेटणा; लां. लेटण; सिं. लेटणु; गु. लेटवूँ.]

लेणें न. उडणें, घालणें, डागिना. Putting on, wearing an ornament.
[सं. लेपन; प्रा. लेवण > लेअणँ > लेणें.]

2**लेणें** न. डोंगरांत पोखरून बांधलेलें ठिकाण, बुद्धजैन वगैरेंचें डोंगरांतील प्रार्थनामंदिर. A cave.
[सं. लयनम् > लअणँ > लेणें.]

1**लेंड** वि. दोन, विटीदांडूमधील संख्या. Two.
[ते. रेंडू.]

2**लेंड** न. स्त्री. पूरिषाचा जाड भाग. A lump of excrement.
[सं. लेण्डम्; देप्रा. लेहुडो, लेदुक्को, लेडुओ लोष्टवाचकाः (२४५-३), लेडुक्को लंपटोलोष्टश्च (२४६-११); कु. लीन्; वं. लेण्ड; हिं. लेंड, लेंड (स्त्री); पं. लेनी, लिड; सिं. लेण्डो; सं. लिण्ड; प्रा. लिण्ड, लिड्डिआ; सिं. लिण्डु; गु. लींडु; अकामसा. लेंडी, लेंडुक, लेंडूर.]

लेथड(णें) सक्रि. लेपणें, थापडणें. To smear, to apply, to anoint.
[सं. लिप + थुड् १ आवरणे; आ. लेतकेत; हिं. लेत (प्लास्टर); पं. लेट; लां. सिं. लेटी (paste); मूळ संस्कृत लिप्त; प्रा. लित्त पासूनच हा शब्द उतरला आहे.]

लेप(णें) क्रि. माखणें, सारवणें, लेप देणें, लिंपणें. To smear, to apply, to anoint.
[सं. लिप् ६ उपदेहे; अकामसा. लेप (सारवण), लेपटणें (माखणें), लेपाटा (मोठा लेप).]

लेप पुं. चोपडणें, थर, माखलेला थर. A layer.
[सं. लेप्यम्, √ लिप् ६ उपदेहे; प्रा. लेप्प; = भिंत, लेप = गिलावा; सं. लिम्पति; आ. लेप्; बं. लेप; ओ. लेप; लां. लेम्बो; सिं, लेपु; गु. लेप, लेपडी (स्त्री).]

लेवा पुं. आवरण, थर. A layer, a cover.
[सं. लेपः; पा. लेपो; प्रा. लेव; का. लिवा; बं. ओ. लेइ; हिं. लेव; पं. लेउ; ले (पुं.); लां. ले (पुं.); सिं. लेउ (पुं.).]

लेस स्त्री. किनार, फीत. Lace.
[*Lat.* Lacio = I entice; Laqueus = a snare; *Ofr.* Las = a snare, a noose; *Eng.* Lace.]

लेसट न. तेल, तूप किंवा चरबी ह्यासारखा भांड्यांना चिकटून राहणारा पदार्थ. Any matter like oil ghee or grease sticking to the vessel.
[सं. श्लेष्म (चिकट पदार्थ, कफ); कु. लिसो, लेसो; का. लीश; आ. लेहुका; हिं. ल्हेस, लेस (पुं.) = चिकटपणा, डिंक; पं. लेस (स्त्री); सिं. लेसु; मराठींतहि 'लेस' हा शब्द मूळ असून 'ट' हा प्रत्यय आहे. 'वशट' असा एक दुसरा तसलाच शब्द आहे.]

ले(लै)सन न. परवाना, मंजुरी. Licence.
[*Lat.* Licet = It is permitted; Licentia = Freedom; *Ofr.* Licence; *Eng.* Licence.]

लोक पुं. जन, मनुष्य, समाज. People, mankind.
[सं. लोक, √ लुक्, लोक्; अकामसा. लोककथा, लोकसंग्रह, लोकापवाद, लौकीक, लोकोत्तर, इत्यादि.]

लोंकर स्त्री. मेंढ्या वगैरे प्राण्याच्या अंगावरील मऊ केंस. Wool.
[सं. लोमन् + कर (?) > लँव + कर, लोंकर.]

लोखंड, लोह न. एक धातु. Iron.
[सं. लोहखंड; पा. प्रा. लोह (न); कु. लुवा (लोखंड); आ. लो; बं. लोहा; ओ. लुहा; हिं. पं. लां. लोहा; सिं. लोहु (पुं); गु. लोह; कु. लोखंड; हीं. लोखंड; ने. लोखर.]

लोट(णें) क्रि. ढकलणें, पडावयास लावणें. To push, to urge. to roll.

[सं. **लोठ्यते, लोटति, लुठ्यति, लोठति,** √ **लोट्-** धौर्त्यें, **लुठ्, लोष्ट**; प्रा. **लोट्टइ**; कु. **लोटणो**; आ. **लोटिब**; बं. **लोटा**; ओ. **लोटिबा**; हिं. **लोटना**; पं. **लोटणा**; सिं. **लोटिको**; गु. **लोटवूँ**; अकामसा. **लोट** (लोंढा, प्रवाह), **लोटालोट, लोटण, लोटपोट,** (कडे)**लोट.**]

लोटा पुं. एक भांडें. A metal or an earthen pot.

[सं. **लोष्टः** (?); का. **लोटो**; कु. **लोटिया**; आ. बं. **लोटा**; ओ. **लोटाः मोटा**; हिं. **लोटा**; पं. **लोट्टा**; लां. **लोटा**; सिं. गु. **लोटो**; ने. **लोहोटा.**]

लोटांगण न. नम्रपणानें नमस्कार घालणें, साष्टांग नमस्कार घालणें. Rolling one's self over and over.

[सं. **लोट+अंकन** (लोटत लोटत जाणें), √ **अञ्च्-** गतौ. **लोड + अंगण** पासून काढणें सयुक्तिक नाहीं.]

लोड पुं. टेकावयाचा लांब व वाटोळा तक्क्या. A long bolster or stuffed case.

[सं. **लोट** किंवा **लोष्ट.**]

लोढणें न. गुराच्या गळ्यांत अडकावयाचें लांकूड. An encumbrance or clog for cattle.

[सं. **लोठ्यति**; प्रा. **लोढेइ, लोढ, लोल्लोडा**; हिं. **लोढा**; पं. **लोठा**; सिं. **लोढा** (कुबडी काठी); लां. **लोढण**; गु. **लोढवूँ**; सं. **रुध्**–पासून निघणें शक्य आहे. '**ड**' च्या ऐवजीं '**ढ**' ही रूढ आहे.]

लोण न मीठ, क्षार, खार. Salt.

[सं. **लवण**; पा. प्रा. **लोण**; कु. **नून**; प. पं. **लूण**; बं. **नुन्**; **लोना, नोना**; ओ. **लुण,** सिं. **लूणु**; गु. **लुण्**; सिंह. **लुणु**; अकामसा. **लोणा** (जमिनींतील ओलसरपणा), **लोणारी** (क्षारयुक्त मातीपासून चुना काढणारा).]

लोण न. आट्यापाट्याच्या खेळांत पहिल्या पाटीच्या पलीकडील जमिनींतील 'माती'. A term in the play of *atyapatya*.

[सं. **लवण.**]

लोणी न. दुधाचा एक जिन्नस, मंथनानंतर निघणारा मऊ स्निग्ध पदार्थ. Butter.

[सं. **नवनीतम्**; पा. **नवनीतम्, नोनीतम्**; प्रा. **णवणीअ**; कु. **नउणी**; बं. **ननि, लनि**; ओ. **नहुणी, लहुणी**; हिं. **नानी, लोनी**; पं. **नउणी**; ने. **नौनि.**]

लोंढा पुं. पाण्याचा लोट, पूर, प्रवाह. A vast overruling mass of water.

[सं. **लोष्ट्** १ संघाते, **लुड्** १ उपघाते; याकाम. **लोंढा** (ज्ञा. ७ ७६).]

लोथ स्त्री. पुं. शव. A dead body.

[सं. **लंथ्** १ हिंसायाम्; हिं. पं. **लोथ्** (स्त्री); सिं. **लोथ**; **लोथ्र**; गु. **लोथ** (स्त्री); देप्रा. **लोत्थ, लोथ्रो, लोत्त, लठ्ठ**; सं. **लोष्टः**; प्रा. **लोट्ठक**; हिं. **लोथ्रा.**]

लोद, लोध पुं. समूह पुंजका. A collection, a bunch.

[सं. **रोध्रः**; **लोध्रः**; पा. **लोद्दो**; प्रा. **लोद्ध**; का. **लोदु** (झाड); बं. **लोध**; ओ. **लोध**; हिं. **लोध**; पं. **लोध**; सिं. **लोडु**; गु. **लोधर**; अकामसा. **लोद्या, लोठा.**]

लोद्या वि. लठ्ठ, वातूळ व लुच्चा. Fat, plump.

[सं. **लुब्धक**; प्रा. **लोद्धओ.**]

लोध(णें) अक्रि. लुब्ध होणें, झोंबणें, चिकटणें, To stick or adhere to, to be attracted.

[सं. **लुब्ध,** √ **लुभ्** (निष्ठा, नाधा.).]

लोधा पुं. लादा, Mass of swashy stuff.

[सं. **लोष्ट**; अ. **लोडोरा**; हिं. **लोदा**; गु. **लोदवूँ**; देप्रा. **लोद्द, लोद्ध.**]

लोभ पुं. उत्कट इच्छा, मेहेरबानी. Intense desire, kindness.

[सं. **लुभ्**; अकामसा. **लोभणें** (नाधा.), **लोभाळू**= हावरा.]

लोम पुं. अंगावरील बारीक केंस. Hair on the body.

[सं. **लोमन्**=केंस, √ **लू**–अवच्छेदने, √ **ली**-श्लेषणे.]

लोंब(णें) क्रि. टांगलेलें राहणें. To be suspended, to hang down.

[सं. **लंब्, लुंब्** १ अर्दने, १० अदर्शने, किंवा **लंब्** (?) सिं. **लमणु**=टांगणें; हिं. **लुमना**=टांगणें, **अवलंब > ओलंब > ओळंब.**]

लोंबकळ(णें) क्रि. धरून लोंबणें, लटकणें. To hang from.
[सं. लुंब, (लंब) कळ (?), < कुर्द्-क्रीडायाम् (?)]

लोंबड स्त्री. घड, पुंजका. A bunch, a cluster.
[सं. लूमः (शेंपूट); प्रा. लुम्बी ; देप्रा. लुम्बस्तबकोलताच (२४६ ७); बं. लुम (शेंपुट); हिं. लूम (पुं); गु. लूम (स्त्री) = पुंजका, (लोपाश, लोपाकः).]

लोल वि. हलणारा, कांपणारा. Active, motionful, shaking.
[सं. लुल्, लुड् १ आलोडने ; अकामसा. लोलक = मणी, रत्नविशेष ; लोळा, लोळी ; (सं. लुंटिका = लोळी).]

लोलाव(णें) उक्रि. आसक्त होणें. To feel attached.
[सं. लुप् किंवा लुभ्, (अभ्यास) लोलुप, लोलुभ.]

लोहार पुं. लोखंडांचें काम करणारा कारागीर A black-smith.
[सं. लोहकार ; पा. लोहकारो ; प्रा. लोहार ; कु. लवार ; बं. हिं. लोहार ; पं. लुहार ; लां. लोहार ; सिं. लुहास ; गु. लुहार. लोखंड पहा.]

लोहाळ वि. पुष्कळ लोंकर असलेला. Posessing much wool.
[सं. लोमन् + ल्ल (प्राकृत प्रत्यय).]

लोहो, लोह न. लोखंड. Iron.
[सं. लोह. लोखंड पहा.]

लोळ(णें) क्रि. अस्ताव्यस्त निजणें,-पडणें. To roll.
[सं. लुड्, लुल् १ आलोडने.]

लोळ पुं. समूह, पुंजका, गुंडाळा. A disordered cluster.
[सं. लोलः; पा. लोळो, लोलो ; प्रा. लोल ; का. लोल (स्त्री) = जीभ ; आ. लोला (सैल); बं. लेल ; ओ. लोळी (कर्णभूषण); हिं. लोलना (हलणें); पं. लोल ; सिं. रोलो ; गु. लोळो (जीभ); लोळीयूं ; सं. लोडति, लोड.]

लोळी^{१} स्त्री. (मुलांचें) लिंग. Male organ (dimunition.)
[का. लूली (स्त्री) = पुरुषलिंग ; पं. लुल्ल (लिंग).]

लोळी^{२} स्त्री. शेंबडाची धार. Mucus in the nose.
[कान. लोळ = लाळ.]

व^{१} पुं. मराठी वर्णमालेंतील एकोणतिसावें व्यंजन. ह्याचें उच्चारण दन्तौष्ठ्य असून उच्चारस्थान दन्त व ओष्ठ हीं आहेत. ह्या वर्णाची निष्पति पुढीलप्रमाणें आहे. हा अन्तस्थवर्ण आहे. अर्धस्वर आहे. 'उ+अ' ह्या दोन स्वरांच्या मिश्रणानें सिद्ध होतो. The twenty-ninth consonant in Marathi alphabet.
[(आद्य व) सं. व, व्य, व्र ; प्रा. व ;
सं. उप ; प्रा. उव ; उपानह्-वहाणा ;
सं. ओ, औ ; प्रा. ओ ; औषध-वोखद, वखद.
(मध्य व) सं. प, म ; प्रा. व, वं.]

व^{२} प्र. जुना णिच् व कर्मणि प्रत्यय. A termination indicating passive or causal sense in old Marathi.
[सं. अय, य ; प्रा. व्व, व ; याकाम. व,-जाणवे, रमवे, नेणवे ; अकाम. करव(णें), जाणव(णें)]

व^{३} अ. आणि. And.
[सं. वै, एव ; प्रा. इव.]

वइ^{१}, **वाई** प्र. प्रमुख-प्रवीण ह्या अर्थाचा प्रत्यय. A termination indicating chief, skilful.
[सं. पति ; प्रा. वइ ; (सं. गृहपति ; प्रा. गहवइ).]

वइ^{२}, **वई** स्त्री. वही पहा. कुंपण अटकाव. Obstruction.
[सं. वृत्ति ; प्रा. वइ, √ वृन्त्.]

वकट वि. एक, विटीदांडूच्या खेळांतील एक संख्या. One (used in the game of *iti-dandu*).
[ते. वकटु = एक.]

वकर पुं. मान, प्रतिष्ठा, अब्रू. Prestige, honour, dignity.
[अर. वकार.]

वकल न. वेश्या, रक्षा, स्त्री, कुटुंब. A keep, a prostitute, a wife.
[अर. वक्ल्.]

वकील पुं. प्रतिनिधि, मुखत्यार. A representative, an advocate, an ambassador.
[अर. **वकील्** ; पेकाम. अकाम. **वकलात**, **वकिलात** < अर. **वकालत्** ; पेकाम. **वकील मुतालकी** (वकील–इ–मुत्लक)=राजप्रतिनिधीचा अधिकार.]

वकूप(ब) पुं. हुशारी, अक्कल, प्रभाव, सामर्थ्य. Strength, cleverness.
[अर. वकूफ्.]

वक्त पुं. वेळ, प्रसंग, खडतर प्रसंग. Time, an occasion, a troublous time.
[अर. **वक्त** ; अकामसा. **वक्तशीर** (वेळेवर), **वकत**, **वखत**, **वकुत**.]

वक्र वि. वांकडें, सरळ नसलेलें, वांकलेलें. Crooked, bent, not straight.
[सं. वक्र, √ व्रज्, व्रश्च्छ् (?); संसा. **वक्रगति**,**-दृष्टि**, **वक्री**, **वक्रोक्ति**.]

वजा स्त्री. उणीव, वर्जन. Deficiency.
[अर. **वझ्आ** ; सं. **वर्ज** > **वज्ज** ; अरबी मूळच ग्राह्य ; अकामसा. **वजाबाकी** (मोठ्या रकमेंतून लहान रक्कम काढण्याची क्रिया), **वजावाट** (हिशेब पुरा करणें).]

वज़ीर पुं. मुख्य दिवाण. A prime minister.
[अर. हिं. **वझीर**=दिवाण (ऐनी अकबरी–**वझीर**= अर्थसचिव, वकील पंतप्रधान); पेकामसा. **वजिरात**= वजिराचा हुद्दा.]

वज्र न. इंद्राचें आयुध. The thunder-bolt.
[*IE.* Ueg ; वैसं. वज्र ; पेल्हवी. वझ्र ; अर. वझ्र ; *Av* Vazra ; *Lith.* Vaage ; *Got.* Wakan. संसा. **वज्राघात**,**–देह**,**–प्रहार**,**–प्राय**,**–मुष्टि**, **वज्री** (पाय घांसण्याचा खडबडीत दगड).]

वझे न. एक आडनांव. A surname.
[सं. **उपाध्याय** ; प्रा. **उवज्झाअ** > **ओझा** > **ज्झा**, > **वझे**, **ओझे** ; सं. **आध्यापकः**; पा. **अज्झायको** ; प्रा. **अज्झावअ** ; असें (टर्नर) निष्पादितो. त्यापेक्षां **उपाध्यायपासून** अधिक ग्राह्य. ह्या शब्दापासून **ओझा**, **ज्झा**, **वझे**, **उपाध्ये**, **पाध्ये** इत्यादि शब्द निष्पन्न झाले आहेत.]

वखवख(णें) क्रि. खा खा सुटणें,–होणें. To be affected with extreme hunger.
[सं. १ **अव+खाद्** ; २ **अव+क्षी** (द्विरुक्ति); अकाम. **वखवख** (क्षुधातिशय).]

वखार स्त्री. कोठार, गोदाम. A warehouse, a store-room.
[सं. **उपस्कर**=गृहोपकरणम् ; देप्रा. **वक्खारयं रतिगृहं अन्तःपुरमित्यन्ने** (२५२-१३); गु. सिं. **वखार** ; हिं. बं. **बाखार** ; व्युत्पत्ति म्हणून वरील संस्कृत व देप्रा. शब्द हे मूळ समजतां येणार नाहींत असें वाटतें. तसे जर समजले तर अर्थभेदाची अडचण येते. शब्द परकी असावा.]

वग स्त्री. आश्रय, ओळख, परिचय, प्रतिष्ठा. Favour, support, patronage.
[अर. **वक्‌अ** ; अकामसा. **वगवशिला**.]

वगर अ. खेरीज, शिवाय. Without, except.
[अर. **बिघैर्**, **बघैर्** ; गु. **वगर** ; पं. **वगार** ; बं. **बेगर** ; अकाम. **बगर**.]

वगळ(णें) सक्रि. सोडणें, टाकणें, डावलणें. To omit, to drop, to set aside.
[सं. **अवग** , **अवस्खल्** स्रवणे ; **वगळणी** (त्याग).]

व(ओ)घळ(णें) अक्रि. गळणें, सांडणें, वहाणें, तुटणें. To ooze, to flow, to trickle, to slip down.
[सं. **अव+वह्** , **अव+वोढ**, किंवा **अवस्खल्**.]

वंक,–ट वि. वांकडा. Crooked.
[सं. वक्र ; प्रा. वंक.]

वंग पुं. कलंक, घाण, मळ. A spot, dirt.
[देप्रा. वंक=कलंक ; अकामग्रा. **बंगाळ** (<अमंगल).]

वंगण न. गाडीच्या चाकांत घालण्याचा स्निग्ध पदार्थ, तेल वगैरे. Grease or oil (applied to the axle).
[सं. **व्यंजन** (?), **म्रक्षण**, √ **म्रक्ष्** १ संघाते (?); अकामसा. **वंगारी** (वंगण घालण्याची सळी), **वंग(णें)**= नम्र होणें, **वंगवि(णें)**=मऊ करणें ; सं. **म्रक्ष्** १ संघाते, वंग् १ गतौ.]

वच(णें) क्रि. जाणें, चोरून जाणें, टाळणें, हरविणें, वगळणें. To go, to move stealthily, to avoid, to lose.
[सं. **व्रज्** १ गतौ ; प्रा. **वच्च** ; गु. **वचवूँ** ; अकामप्रां. **वचणें** (जाणें).]

वचक(णें) क्रि. धास्ती,–दरारा वाटणें. To be filled with apprehension or dread of.
[सं. **अवचकन्**, म. **वचक**=दरारा, धाक.]

वचन न. भाषण, बोलणें, करार. Speech, word, promise.

[*IE*. Uek; **संवच्** १ भाषणे; *Av.* Vaxs; *Lat.* Vox, Vocis; अकाम. **वचवच**=वडबड.]

वच(ज)पा,-बा पुं. भरपाई, कमीअधीकपणा, बरोबरी. Deficiency made up, tallying.

[अर. **वझा**.]

वज स्त्री. काळजी, ओज, सामर्थ्य. Care, regard, strength.

[वैसं. **वाज**=बल, **अन्न** (?); सं. **ओजस्** (?); अर. **वज्ह्**=तऱ्हा, प्रकार; अकाम. **वजेवजें** (काळजीनें), **वजा** (स्वरूप, आकार).]

वजन न. (तोलण्याचें) माप, महत्त्व, भार. Weight, importance.

[अर. **वझ्न्**.]

वाज(स)रूक पुं. गोव्यांकडील एक नाणें, दोन रेस. A coin in Portuguese India.

[*Portu.* Bazarucco; *Eng.* Budgrook; **बाझार+रुका** (कान. **बडग+रुका**=वाईट, पैसा तांब्याचें नाणें),**बुझुर्ग+रुका** (फा. **बुझुर्ग**=मोठें, बुद्रुक).]

वंच्य,-च्यु वि. कृपण. Miserly.

[सं. **वंचक** √ **वंच्** १ प्रलंबने; याकाम. **वंच्यु**.]

वंचक वि. फसव्या, लबाड. That cheats or imposes upon.

[*IE.* Ua-n-q; सं. **वंचक** √ **वंच्**, *Alb.* Vank, Vangu; *Lat.* Vagor; अकाम. **वंचणुक** (फसवणूक), **वंचित**, **वंचना**, **वंचन**.]

वंजारी पुं. एका जातीचे लोक, लमाण. A class of nomadic traders.

[सं. **वणिक्+कार**, **वाणिज्यकार**; फा. **बिरिंज्** (भात), **बिरंजार**; गु. **वणज** (पुं.); सिं. **वणिज**; पं. **बंज**; का. **बंज**=व्यापार; गु. **वणजर** (तांडा); सिं. **वणिजरो**; पं. **वणजारा**=व्यापारी; हिं. **बंजारा**=धान्याचे व्यापारी.]

वट प्र. युक्त. A termination showing full of.

[सं. **वत्**; प्रा. **वत**, **वट**. किंवा '**वत्**' चा '**व**' होऊन ईषदर्थी '**ट**' हा प्रत्यय लागला असावा. उदा. **रानवट**, **कडवट**]

वट,-ट्ट वि. एकूण, एकत्र. Collected together, in one sum or lump.

[कान. **ओट्टु**; अकामसा. **वटहुकुम** (जाहीरनामा).]

वट स्त्री. कच्चें रेशीम धुऊन निघणारा गाळ. Waste in washing silk.

[सं. **वर्तिन्**, **वृत्**; देप्रा. **वट्टिमं अतिरिक्तम्**.]

वट(णें) सक्रि. लोखंडी दांड्यानें कापूस लाटणें. To roll cotton with an iron stick, to remove seed.

[सं. **वट्यन्ते**; बं. **बाटिते**; हिं. **बटना**; सिं. **वटणु**; गु. **वाटवूँ**, **वाटणो**=मुसळ.]

वट(णें) सक्रि. रचणें. To stack or pile.

[वैसं. **वत्**; अवे. **वत्**=वाटणें.]

वट(टा)व(णें) सक्रि. पैशाचा मोबदला घेणें. To exchange money.

[सं. **वट्** १ पृथक्करणे; अकाम. **वटाव** (नाण्याचा मोबदला, मोड).]

वटवट(णें) अक्रि. बडबडणें. To gabble.

[सं. **वद्** (?); प्रा. **वडवडइ**; देप्रा. **बडबडइ**; कु. **बडबडाणो**; बं. **बरबरिया**; ओ. **बरबर**; हिं. **बरबराना**.]

वटवाघूळ न. पक्षिविशेष. A kind of bird.

[सं. **वट+वल्गुली** (**वाग्गुद** > **वागूळ**).]

वटार(णें) क्रि. डोळे फाकून पाहणें, विस्फारणें, डोळे मोठे करून वासून टक लावणें.

[सं. **अव+स्तृ**–अवस्तारय (अलोप).]

वटिका स्त्री. सांजोरी, वडा. A kind of stuffed cake.

[सं. **वटिका**; याकाम. **वटिका**=सांजोरी,.]

वठ(णें) अक्रि. नरम होणें, उमटणें, उठावदार दिसणें, (झाडाचीं) पानें गळणें. To soften, to stamp, to flourish, to dry out.

[सं. उठ् ६ उपघाते (झाड वठणें); **वठ्** १ स्थौल्ये (ठसा वठणें); **व्यथ्** १ भयसंकोचनयोः (नरमणें); देप्रा. **वंठ**; अप. **वंठ**.]

वठाण न. खोली, गाळा. A room of a house or suite of rooms.

[सं. **उपस्थान**, **अवस्थान**; का. **वतन्** (=देश,

स्थानः फारशी शब्द); पं. **वटन**; हिं. **बथान** = जंगलांतील झोपडी; **बठान्** = कुरण; सिं. **वाठानु** = गुरांना रात्रीं कोंडावयाचें कुंपण.]

वड पुं. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **वट**; प्रा. **वड** (पुं.); आ. **वर**; बं. **बड**; ओ. **बर**; हिं. **बड**; पं. **बड**, **वड**; सिं. **बड़ु**, गु. **वड**; अकामसा. **वडपिंपळ**; **वडपुनव**; **वडसावित्री**; **वडवागूळ–वाघूळ**.]

वडवाळी स्त्री. घांस, आहुति. A mouthful, an oblation.
[याकाम. **वडवाळी** = घांस, आहुति (ज्ञा.)]

वडस न. डोळयाचा एक रोग. A disease of the eye.
[सं. **बलास** (नेत्ररोगः); प्रा. **वड्डवास** = अभ्र.]

वडा पुं. खाद्यविशेष, पिठाचा तळलेला थापटा. A cake made of pulse flour soaked,-spiced and fried.
[सं. **वटक**; प्रा. **वडग**, **वडअ** (न); हिं. **वडा**; अकाम. **वडी** < देप्रा. **वडी**.]

वडार पुं. एक जात (दगड फोडणें, खणणें इ. कामें करणारी). An individual of *Vadar* caste (stone-splitters).
[कान. **ओड्ड**; प्रा **वड्डर**.]

वडी स्त्री. चापटी. A cake or pat, a smali flat lump.
[सं. **वटकः**, **वटिका**; प्रा. **वडी**; आ. **बरी**; बं. ओ. **बडी**; बि. **वरी**; पं. **बडी**, **वडी**; सिं. **वडी**; गु. **वडी**.]

वडील वि. पुं. वयानें अधिक, श्रेष्ठ, बाप (नाम). Senior, elder, an elderly person, father.
[सं. **वृद्ध**;. प्रा. **वड्डिअ**; देप्रा. **वड्डिल**, **वड्ड**; अकामसा. **वडिलकी**, **वडलकी**, **वडलाई**, **वडीलधारे** (लहान मोठें, **धारें** = आखूड, लहान), **वडील परंपरा**,–**मान**, **वडा**.]

वडूवा स्त्री. घोडी. A mare.
[सं. **बडवा** = समुद्रांतील घोडमुखी अग्नि).]

वढ(णें) स्त्री. ओढणें. To draw.
[सं. **वह्**, (निष्ठा–**ऊढ**); प्रा. **वड्ढइ** (**कड्ढइ** हेम. ४-१८७); गु. **ओडवूँ**; **ओढणें** पहा.]

वढरी पुं. प्रेतयात्रेंत भाग घेणारा, प्रेत बांधणारा. An undertaker, one who arranges the funeral pyre.
[सं. **वठ्** १० ग्रंथे,+ **री**; याकाम. **वढरी**.]

वण पुं. डाग, ठस्सा, घट्टा, क्षताचें चिह्न. A scar, a mark left by a wound.
[सं. **व्रग**; प्रा. **वण**; सिंह. **वण** = जखम, गळूं; याकाम. **वणी**; अकाम. **वणाळ**, **वनाळ** = अंगावर वण असलेला, घाव घालणारा, (सं. **व्रणिन्**; प्रा. **वणि**).]

वणज स्त्री. व्यापार, उदीम. Trade, business.
[सं. **वाणिज्य**; अकामसा. **वणीक**, **वणीज**, **वणजार–री**.]

वणवण स्त्री. दमणूक, व्यर्थ श्रम, त्रास. Toiling, moilng.
[सं. **वन्** ८ याचने (द्विरुक्त), किंवा **वठ्** १ एक चर्यायाम्.]

वणवा पुं. वनांतील पेट, आग, डोंगरावरील आग. Conflagration in a forest.
[सं. **वनवह्नि**, **वडवाग्नि**; देप्रा. **वणवो**, **दवाग्नि** (२४९–१०). ब्लोक **वनवात** असें सं. मूळ सुचवितो; त्यापेक्षां आमचें **वनवह्नि** हें अधिक सयुक्तिक आहे.]

वणी न. प्र. पाणी मिसळलेलें ह्या अर्थाचा शब्द. A form of the word *pani*.
[सं. **पानीयम्**; प्रा. **पाणी**; (समासांत उत्तरपद म्हणून येतें–गुळ**वणी**, आंब**वणी**, तेल**वणी**).]

वत् अ. सारखें, सम. Like.
[सं. **वत्**; अकामसा. **तद्वत्**, **पाषाणवत्**, **दंडवत्**.]

वतन न धंदा, अधिकार व त्याचें उत्पन्न. An office, right, due.
[अर. **वतन** = जन्मभूमि, घर. **वर्तन** ह्या संस्कृत शब्दाशीं संबंध कित्येक जोडतात. पेकाम. अकामसा. **वतनदार**, **वतनपत्र**, **वतनवाडी**, **वतनी**.]

वतीनें प्र. –च्या बाजूस, मुळें,–च्या नांवानें. To, by the side of, in the name of.
[सं. **वक्त्र**; पा. **वत्त**; गु. **वती** = च्या बाजूस,–च्या स्थानीं, **वते** = तर्फें; सिं. **वटि** = जवळ; **वटून** = कडून, पासून; सिंह. **वत्**; का. **बुथ** (चेहरा).]

वत्स न. मूल, अर्भक, पोर. A child.
[*IE.* Uet; सं. **वत्स**; *Gr.* Fetos; *Lat.* Vetus, √Ueteso. अकामसा. **वछ, बच्चा, वत्सल, वासरूं.**]

वद(णें) क्रि. बोलणें, जाहीर करणें. To speak, to declare, to disclose.
[*IE* Ued; *Lith.* Vadantn; सं. **वद्** १ भाषणे; अकामसा. **वदणूक** (स्पष्ट करणें, कबुली), **वदंता, वदंती** (बातमी), **वदन.**]

वदान्य वि. उदार, दाता. Liberal.
[सं. वदान्य.]

वध पुं. हत्या, मारणें, Killing.
[*IE.* Uedhas; सं. **वध्**; *Av.* Vada.]

वधारा स्त्री. वाढ. Increase.
[सं. **वृध्**; प्रा. **वद्धार**; गु. **वधारो, बद्धो** (सर्व) ह्यापासूनच, **वधार(णें)**=मोठा होणें; हिं. **बढाई.**]

वधू स्त्री. मुलगी, नवरी मुलगी, सून. A bride.
[*IE.* Uedh; सं. **वधू**, √ **वह्**; *Av.* Vadu; *Lett.* Vedu; *Lith.* Vedu; *Lat.* Vesta. वधू ह्या शब्दाच्या अर्थाचें विशेषीकरण झालें आहे.]

वन न. अरण्य, रान, जंगल. A forest.
[सं. **वनम्**; अकामसा. **वनगाय, वनचर** (>**वञ्जर,** > **मांजर**), **वनदेवता, वनप्रस्थ, वानप्रस्थ, वनवास, वनस्पति, वन्य, वनेचर, बन** (बाभळीचें **बन**).]

वनबंदी स्त्री. एक वाद्य. An instrument.
[सं. **वन्** ८ स्तुतौ.]

वनव(णें) क्रि. जाळणें, करपणें. To burn.
[सं. **वह्नि** (नाधा.), **वनवा** (**वणवा**) < **वनवह्नि.**]

वनसें, वन्सें न. स्त्री. नवऱ्याची बहीण (आदरार्थी). A term of address for a sister-in-law.
[सं. **भगिनीसदृशा > बहिणीसा, > वइनिसा > वइन्स. पतिस्वसा**पासून काढला तर 'न'ची उपपत्ति लागत नाहीं.]

वनिता स्त्री. स्त्री. A woman.
[*IE.* Uen; सं. **वनिता**, √ **वन्**; जिला मागणी घातली जाते ती **वनिता.**]

वंथ पुं. वडिलार्जित मिळकतीचा वांटा. A share (as of a patrimony).
[सं. **वस्तु** (?); प्रा. **वत्थ**; सिं. **वथु**; सिंह. **वत्**= वस्तु, पैसा.]

वंद(णें) सक्रि. नमस्कार करणें, आदर दाखविणें. To salute. to respect, to adore.
[सं. **वंद्**; **वंदारुता**=वंदन करण्याची इच्छा.]

वप(णें) उक्रि. पेरणें, देणें, विकणें, केस काढणें. To sow, to give, to sell.
[सं. वप् (पेरणें); अर्प् (देणें), अकामसा. **वपणी, वपन, वपविणें** (रंग देणें); **वपा**=चर्बी, **वपु**=शरीर ह्यामधील धातु निराळा आहे काय ?]

वम(णें) अक्रि. ओकणें. To vomit.
[सं. **वम्**; हिं. **बमना**; बं. **वांइत**=ओकारी; म. **वमन, वान्ती.**]

वय न. वर्षें, उमर, आयुष्य, तारुण्य (ल.) Age, time of life.
[सं. **वयस्**; **वयस्क,-र** (वयांत आलेला, प्रौढ.)]

वर अ. वरच्या बाजूस, 'खालीं' याच्याविरुद्ध. Up, above, upon.
[*IE.* Upa; सं. **उप, उपरि**; *Av.* Upara; *Lat.* Super, Supra; *OHG.* Ubir. प्रा. **उवरि**; याकाम. **वऱ्हे**=पर्यंत; कु. **वर**; हिं. **वरा**; अकामसा. **वर, वरील** (< प्रा. **उवरिल्ल**), **वरकड** (< सं **उपरिकटि**; प्रा. **वराकड, वराकड**), **वरून** (**वरौनि** < **उपरिहोओनि**), **वरती,-ता,-रौता,-रुता, वरघाट, वरचढ, वरचष्मा.**]

वर(णें) सक्रि. संबंध करणें. To accept in marriage.
[*IE.* Uel; सं. **वृ** ९ वरणे; *Av.* var; *Lat.* volo, velo; *Lit.* pavelmi; *Got.* Wilajan; प्रा. **वर**; अकाम. **वर**=नवरा मुलगा (सं. **वर**; हिं. बं. गुं. प. **वर**; सिं. **वर, वर**; **वरइती**=सुवासिनी), **वरघोडा, वरात** (**वरयात्रा**).]

वंरई स्त्री. वरी पहा. धान्यविशेष. A kind of grass bearing grain.

वंरई, वराई स्त्री. एक सोन्याचें नाणें. A gold coin.
[सं. **वराह**; सिंह. **वरा** (रानडुक्कर).]

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

वरकल,-कोल पुं. कसोटीचा दगड. A touch-stone, a test-stone of gold.
[कान. **ओरेकल्लु**; तेलु. **ओरेगल्लु**; सं. **परिकल्** १ निरीक्षणे.]

वरख पुं. धातूचें आवरण, पान, पत्रा. A leaf or cover of metal (gold).
[अर. **वरक**; सं. **वराख्य**; प्रा. **वरक्ख** (न.).]

वरखु पुं. पाऊस, वर्षाव, वृष्टि. Rain.
[सं. **वर्षाव.**]

वरंग(घ)ळ(णें) क्रि. घसरणें, खालीं वहात जाणें. To roll or slide down.
[सं. **परिरग्,-रघ्** १ गतौ (**वरून+गळणें**-ही व्युत्पत्ति अशास्त्रीय आहे.]

वरण न. शिजविलेल्या डाळीचा पदार्थ. A dish of pulse.
[सं. **वर+अन्न.** मूळ **'वरण'** शब्दाचें संस्कृतीकरण नंतर झालें असावें.]

वरणभात पुं. विसंगत जोडपें. A disproportionate married-couple.
[सं. प्रा. **वरण**=विवाहसंबंध; सं. **भर्तृ**; प्रा. **भत्त** = पति. ही व्युत्पत्ति अवास्तव पाण्डित्यप्रकर्षक आहे. पटत नाहीं. मराठींतील अर्थाची उपपत्ति लागत नाहीं.]

वरचेल वि. इतर, अवांतर. Others, the rest.
[सं. **उपरि**; प्रा. **उवरिल्ल.**]
जन्मासवें श्रम । वरचिलही गेले ॥ ज्ञा. ९-४०४.

वरताळा,-तवळा,-वाळा पुं. वरचट्टा, वाढावा. Balance over, surplus.
[सं. **वृध्. वर्धिततुल्यम्** (तोल) > **वरताळा**; ' **वरता+ल** ही व्युत्पत्ति अशास्त्रीय अतएव अग्राह्य आहे.]

वरदळें वि. वरचें, बाहेरचें. Outside.
[सं. **वृत्**; मरा. **वर्तले** = आहे तसें.]

वरदळ(णें) उक्रि. तुडवणें, फार वापरांत आणणें. To tread, to beat.
[सं. **परि+दल्** १ विशरणे, विदारणे.]

वरदळी (-वर येणें) अक्रि. रागावणें, भांडणें. To quarrel.
[सं. **परि+दृप्** (वैदिक) = रागावणें; अकामसा. **वर्दळ, वरदळ** (धुडगूस, राबता).]

वरपं(पां)गी वि. वरवर, वरकांती, बाह्यात्कारी. Outer or upper.
[सं. **उपरि अपांग.**]

वरवड(णें) सक्रि. ओरबडणें, ओढणें, तोडणें. To draw, to pluck disorderly.
[सं. १ **परिवर्धू** १ अवयवे; २ **परिवध्**-हिंसायाम् (राधा.).]

वरम(णें) अक्रि. ओशाळणें, नरमणें, शरमणें, दबले जणें. To abate, to go down.
[सं. १ **वि+परि+नम्** १ प्रव्हत्वे; **अवरम्, विरम्**; परंतु ह्या शब्दाचा **वर्म** ह्या शब्दाशीं संबंध असावा हें अधिक ग्राह्य आहे. **'वर्म'** हा शब्द अर. **वर्म्**पासून आला आहे. त्याच्या मूळ अर्थांत पुष्कळ फरक झाला आहे. वर्म पहा.]

वरव स्त्री. (धान्याची) शिल्लक, सारखा वापर, खर्च, रेलचेल, समृद्धि. Surplus, balance,
[सं. **उर्वरितम्.**]

वेरवंटा पुं. लहान मुलींचा साडी नेसण्याचा एक प्रकार, परवंट, पहा. A mode of tucking in the folds of a girl's sari.
[सं. **परिवर्तन**; प्रा. **परिवत्तण, परिवट्टण**; २ सं. **परिवेष्ट**; प्रा. **परवेण्ट**; अकामप्रा. कारवारी-**पडतण**; गोवें-**परतणी**; **पडदणी.**]

वेरवंटा पुं. वाटोळा लांबट दगड, पेटका, वळ(ल.). A stone, roller, a cramp.
[सं. **परिपंथः, परिवंटनम्**; म. (पाटा) **वरवंटा.**]

वरस(णें) अक्रि. पाऊस पडणें. To rain.
[सं **वर्षू**; प्रा. **वरिसइ**; कु. **वर्सणो**; आ. **बरहिब**; बं. **बरिसा**; ओ. **बरसिबा**; हिं. **बरसना**; पं. **वऱ्हणा**, गु. **वरसवूँ**; अकामसा. **वरसाडा**=तुषार.]

वरॉंड, वरवंटा नपुं. भिंत. A wall.
[फा. **बरांद**, सं. **वरण्डकः**; प्रा. **वरण्ड** (भिंत).]

वराण्डा, व्हराण्डा पुं. आच्छादिलेली गच्चीची जागा. A verandah.
[सं. **वरण्डकः**, **वरन्द** (?), **वृन्द**, **वृन्दावन**; परंतु संस्कृतीकरण नंतरचें असावें. फा. **बरामद** = पुढें येणें. मूळ शब्द पोर्तुगीज आहे – Varanda = Balcony. जुना पोर्तुगीज-Varanda = a stair railing; *Spanish.* Vara = a rod, *Portu.* Vara–a rod. Anda हा प्रत्यय विशेषणाचा आहे. *Lat.* Uxarus = crooked. स्पॅनिश आणि पोतुगीज शब्दाच्या मुळाशीं *Lat.* uara = forked pole हा आहे.]

^{1}वरात स्त्री. नवरानवरीची मिरवणूक. A procession of the bride and bride-groom after the marriage.

[सं. **वरयात्रा** ; कु. **बरात्** ; बि. **बरियात्** ; **बरात्** ; हिं. **बरात्** ; पं. **बरात**, **वरात्** ; गु. **वरात्** ; ने. **बरियाँत्**. २ **वर + आर्तिक** (?); ३ **व्रात**पासून काढणें आग्राह्य.]

^{2}वरात स्त्री. पैशाच्या देवघेवीसंबंधी चिठ्ठी, हुंडी, चेक, हवाला. An order upon the revenue, a cheque.

[अर. **वरात्**.]

^{1}वरि अ. वर. Up, upon.

[सं. **उपर** ; प्रा. **उअर** ; वर पहा.]

^{2}वरि,वर अ. पर्यंत. To, upto.

[कान. **वरम** = पर्यंत ; कावेरियिंदम गोदावरि वरम (नृपतुंग–कविराजमार्ग); याकाम. **वेन्हीं** (हा ठावोवन्हीं, दृ. पा. ८७); अकाम. **वर** (**येथवर** = येथपर्यंत , **आजवर**) **तोंवर**.]

वरी स्त्री. एक प्रकारचें धान्य. A kind of grass bearing grain.

[सं. **व्रीहि** ; देप्रा. **वरइअ वरय** = शालीविशेष ; कान. **वरुक** = निकृष्ट धान्य ; तेलगु **वरी** ; द्रा. **बरगु** ; सं. '**व्रीहि**'पासून कानडी व तेलगु शब्द तद्भव म्हणून सिद्ध झाले असावेत.]

वरो(र)ळी स्त्री. तांदुळ वगैरे धुण्याचें भांडें. A kind of metal vessel.

[कान. **आरोळी**, **रोवळी** (वर्णविपर्ययानें).]

वर्ग पुं. तुकडी, संघ. A class.

वर्गणी, वर्गत स्त्री. हिशाचे पैसे, वांटणी, वांटा, पट्टी. Division, share.

[सं. **वर्ग**.]

वर्ज(णें) सक्रि. वगळणें. To omit, to drop.

[सं. **वृज्** १० त्यागे ; अकामसा. **वर्ज** (वगळलेला), **आवर्जून** (मुद्दाम); **वर्जिणें**.]

वर्ण पुं. रंग, ज्ञाति, जात, अक्षर. A colour, caste, a letter.

[सं. **वृ** (**व्रीयते एनम्**). ह्या शब्दाचा **ज्ञाति** हा अर्थ उत्तरकालीन असावा. ह्याच्या पूर्वी त्याचा अर्थ **रंग** हा होता. " यो दासं वर्णमधरं गुहाकः " ऋ. २-१२-४, ह्या ऋचेंत काळ्या कातडीचे दास असा अर्थ आहे. यास्कानें हा शब्द ' उपमा ' अर्थी वापरला आहे. **तत्र उपमार्थेन युद्धवर्णा भवन्ति** "–नि. २-१६. दुर्ग त्याचा अर्थ **वर्णन** असा करतो. औपमन्यवानें मात्र **पञ्चजन ज्ञाति** ह्या अर्थी (नि. ३-८) वापरल्याचें यास्क सांगतो (चत्वारिवर्णा निषाद पञ्चम इति औपमन्यवः). पाणिनीनें '**रंग**' ह्या अर्थीच वर्ण शब्द वापरला आहे '**वर्णो वर्णेन** (पा. २-१-६९). **वर्ण** = रंग–ह्याचा संबंध जाती ह्या कल्पनेशीं येणें अगदीं स्वाभाविक आहे. पतंजली तर म्हणतो कीं ' गोरें पिवळटपण ' हा उच्च ब्राह्मणवर्गाचा शारिरीक विशेष आहे. " तथा गौरः शुच्याचारः पिङ्गलः कपिलेशः इत्येतानभ्यन्तरान् ब्राह्मणे गुणान् कुर्वन्ति "– महाभाष्य ५-१-११५. संसा. **वर्णक्रम**, **वर्णचतुष्टय**, **वर्णधर्म**, **वर्णव्यत्यय**, **वर्णविपर्यय**, **वर्णसंकर**, **वर्णाश्रम**, **वर्णावर्ण**, **वर्णानुप्रास** इ.]

वर्तक पुं. पंचायतीच्या निर्णयाची बजावणी करणारा अधिकारी, एक आडनांव. An officer who executes the decisions of the *punch*, a surname, a bailiff.

वर्त(णें) अक्रि. वागणें, वर्तन करणें. To behave, to conduct one's self.

[सं. **वृत्** १ वर्तने ; संसा. **वर्तन** ; याकाम. **वर्तणु** ; अकाम. **वर्तणूक**.]

वर्तमान न. बातमी, वस्तुस्थिति. News, tidings.

[सं. **वृत्** १ वर्तने. '**वर्तमान**' हें **वृत्** धातूचें कृदन्त विशेषण आहे व तसें तें संस्कृत मराठींत वापरांतहि आहे. ह्या विशेषणाचा उपयोग पुढें नामाप्रमाणें होऊं लागला व त्याला अर्थ **राहणूक**, **वस्ती**, **अस्तित्व** असा प्राप्त झाला. पुढें त्या अर्थांत बदल होऊन परिस्थिति, अवस्था, बातमी, हकीकत असे अर्थ त्या शब्दाला प्राप्त झाले. शब्द मोठा चिन्त्य आहे.]

वर्तुळ न. वांटोळी आकृति (भूमिति). A circular figure.

[सं. **वर्तुलम्**, √ **वृत्**.]

वर्दी स्त्री. निरोप, बातमी. A message.

वर्ध(णें) अक्रि. वाढणें. To increase.

[सं. **वृध्** १ वर्धने ; संसा. **वर्धन**, **वर्धक**, **वर्धमान**, **वर्धित**.]

^{1}वर्म न. चिलखत, An armour.

[सं. **वर्मन्**. '**वर्मन्**' शब्द क्षत्रियाच्या नांवापुढें उपपद म्हणून लावितात. उदा. कृष्ण**वर्मा**, रविवर्मा.]

वंर्म न. शरीरांतील नाजूक भाग. A touchy or dilicate part of the body.
[अर. **वरम्**. किंवा सं. **मर्मन्** ह्या शब्दाच्या संभ्रमानें सिद्ध झाला काय ?]

वर्ष न. साल. A year.
[सं. **वर्ष** ; √ **वृष्** १ सेचने ; *Av.* Varesa ; अकाम. **वर्ष-ल**=उत्पन्नाचें वर्ष ; **वर्षासन**=वर्षाची नक्त नेमणूक ; **वर्षघात, वर्षप्रतिपदा, वर्षर्तु, वर्षफल** इ.]

वऱ्हाड न. लग्नाची मंडळी, समुदाय. A marriage party.
[सं. **वर+हाटक** ; दुसरी एक व्युत्पत्ति मोल्स्वर्थनें सुचविली आहे: **वर+आड**=नवऱ्या मुलाच्या मागें चालणारी मंडळी. दोन्हीहि व्युत्पत्ति पटत नाहींत. अकामसा. **वऱ्हाडघर, वऱ्हाडणी, वऱ्हाडी** इ.]

वलग(णें) अक्रि. बडबड करणें. To prattle.
[सं. **वल्ग्** १ शब्दे.]

वलद, वल्लद पुं. (ची) संतति,–मुलगा. Son or child of.
[अर. **वलद्**.]

वलंदेज पुं. डच मनुष्य, हालंडमधील मनुष्य. A man of Holland, A Dutch.
[*Eng.* Holland (हालंड) > **वलंदेज** ; गु. **वलंदा**.]

वलवणी स्त्री. देवाचा कौल, देवास प्रार्थना. A prayer to god.
[सं. **आलपनम्**, √ **लप्** ; म. **आळवणी**.]

वल्कल न. जाडें भरडें अंगरखें,-वस्त्र, झाडाच्या सालीचें आवरण. Inner bark of a tree, a garment made of it.
[सं.. **वल्कल** ; *Russ.* Volokno ; *Poln.* Wlokno ; अकाम. **वाकळ**.]

वंली पुं. प्रांतांचा अधिकारी. A revenue officer.
[अर. **वली**=मुलकी अधिकारी. **अमीर**=लष्करी अधिकारी.]

वंली पुं. साधु. Saint, a sage.
[अर. **वली**=साधु ; पेकाम. **वलीअहद** ; अकाम. **वल्ली**=विक्षिप्त मनुष्य–आंत अर्थभ्रंश झाला आहे.]

वल्हें न. नाव ढकलण्याची काठी. An oar.
[सं. **वलयम्** (?), **उप** किंवा **उत्+प्लवनम्** ; देप्रा. **अवल्लक** ; प्रा. **अवल्लय**. मराठींत दोन रूपें रूढ आहेत : **वल्हें**, **आवलें**.]

वंल्हा, वल्हें अ. जलदी, चटदिशीं. Smartly, sharply.
[सं. **लघु** ; प्रा. **लहु** ; (वर्णविपर्यय) **हलु हलुं** (लघु लघु)–हुलें हुलें, **वल्हेंवल्हें**.]

वश वि. स्वाधीन. Controlled, subjected.
[सं. **वश**.]

वशं(शिं)ड न. बैलाच्या मानेवरील आंवाळू, मांसलगांठ. A bullock's hump.
[सं. **वृषस्कंध, वृषस्कन्द, वृषभस्कंध**.]

वशिला पुं. स्नेह, संबंध, वग, शिफारस. Acquaintance, influence, recommendation.
[अर. **वसीला**.]

वषट न. भांड्याचा स्नेहयुक्त लेप, **ओषट** पहा. Greasiness, oiliness.
[सं. **वृष्**, **वर्ष्** १ स्नेहने (**वषट्**) (ना.) **वषेटणें**=तुपट होणें.]

वंस(णें) अक्रि. राहाणें, ठेवणें. To settle, to stay, to abide.
[सं. **वसति** ; पा. **वसति** ; प्रा. **वसइ** ; कु. **बसणो** ; अ. **बहिब** ; बं. **बसा** ; ओ. **बसिबा** ; हिं. **बसना** ; पं. **वहिणा, वहिणा** ; सिं. **वहणु** ; गु. **वसवूँ** ; अकाम. **वसवटा** (वास्तव्य), **वसाहत**.]

बंस(णें) सक्रि. पूजणें. To worship.
[सं. **उप+आस** > **उवास** > **वस**.]

वसक(णें) क्रि. वसकन् अंगावर जाणें, रागावणें. To turn upon angrily.
[**ध्वनिशब्द**. किंवा **वष्** १ हिंसायाम् + **अकच्**, **वक्ष्** १ रोषे ; अकामसा. **वस-कन्-कण्**=एकदम अगावर येणें, **वसवसा**=रागाचा आवाज.]

वसण(णें) क्रि. झोंपेंत किंवा वातांत बरळणें. To talk in sleep.
[सं. **अव**, **उत्+स्वप्** ; २ **अव+स्वन्** १ शब्दे.]

वसवसा पुं. दरारा, भीति, धास्ती. Threat, terror, fear.
[अर. **वस्वास**, **वस्वसा** ; **वसकणें** पहा.]

वसाहत स्त्री. वस्तीचें ठिकाण. A colony, a settlement.
[१ अर. **वस् अत्**; २ सं. **वस्** १ निवासे.]

वसुवार न. निवासस्थान. A place of abode.
[*IE.* Uesu ; *Av.* Vohu ; *Got* Iusiza ; *Gr.* Eus. सं. **वस्** – १ निवासे ; याकाम. **वसुआर**.]

वसूल पुं. कर, खंड, उत्पन्न, शेतसारा. Revenue, rent.
[अर. **वुसुल**.]

वसें स्त्री. वशिंड. Bullock's hump.
[सं. **वृषभः** ; पा. **वसभो** ; प्रा. **वसह**, **वुसह** ; बि. **बसहा** ; हिं. **बसह** ; ने. **बसाहा**.]

वस्त स्त्री. वस्तु, जिन्नस, पदार्थ. An article or thing in general.
[सं. **वस्तु** ; पेकाम. **वस्त**. 'ज्याची वस्त त्याला द्यावी' –शाहु पत्र (मस्तानी संबंध). ह्या शब्दाचा उपयोग अव्ययाप्रमाणें केलेला पेशवेकालीन पत्रव्यवहारांत सांपडतो. **वस्त** = कडून, मार्फत, हस्तें.]

वस्तरा पुं. हजामत करण्याचें हत्यार. A razor.
[अर. **अस्तुरा** ; फा. **उस्तरा**.]

वस्ताद पुं. शिक्षक, वाकब्गार, कावेबाज (ल.). A master, an adept, a teacher.
[अर. **उस्ताद्** ; ह्या शब्दाच्या अर्थांत भ्रंश होऊन **कावेबाज**, **धूर्त** असाहि अर्थ त्याला प्राप्त झाला आहे.]

वस्ती स्त्री. गांव, राहणूक. An abode, a settlement.
[सं. **वसति** ; कु. **वस्ती** ; आ. **बहतिया** ; बं. **बसत्** ; **बस्ति** ;–ओ. **बसति** ; हिं. **बस्ती** ; गु. **वस्ती** ; जैन "**बस्ती**" प्रार्थनामंदिर ह्या शब्दाचा वरील शब्दाशीं संबंध आहे.]

वस्त्र न. प्रावरण. cloth.
[*IE.* Ues ; सं. **वस्त्र**, √ **वस्** ; *Av.* Vastra ; *Lat.* vestia; *Alb.* ves.]

वस्म(स्मा)र(णें) क्रि. तक्रार करणें. To complain or talk about.
[सं. **अवस्मृ**, **उत् + स्मृ** १ आध्याने ; अकामसा. **वसर**, **वस्मारा**.]

वहा(णें) सक्रि. नेणें, वाहणें, To carry, to take.
[सं. **वह्** १ वाहने ; अकाम. **वाहणें**, **वाहाणें**.]

वहाणा स्त्री. चपल, पायताण. A pair of sandals or chappals.
[सं. **उपानह्** (स्त्री); प्रा. **उपाणहिय** (पुंस्त्री.), **उवाणया** (स्त्री), **उवाणहा**.]

वहिनी स्त्री. थोरल्या भावाची पत्नी. A term of address applied to (elder) brother's wife.
[सं. **वधू**, √ **वह्** ; देप्रा. **वहुण्णी** = ज्येष्ठ भार्या, थोरल्या भावाची बायको ; प्रा. **वहूण्णी**.]

वहिला अ. वि. निराळा, स्वतंत्र, प्रथम, सत्त्वर, तांतडीनें, अगोदर. Separate, quickly, first, certainly.
[सं. **प्रथम** ; देप्रा. **वहिल्ल** = शीघ्र ; गु. **वहेलो** ; याकाम. बकाम. शिकाम. **वहिला**.]

वहिवाट स्त्री. पद्धत, व्यवस्था, वापर, चाल. custom, practice, administration.
[सं. **वहू + वृत्** (द्विधातुसंयोग); प्रा. **वहिवट्ट**.]

वॅही स्त्री. चोपडी, हिशोबाचें पुस्तक. A stitched book.
[सं. **वाहिका** ; प्रा. **वहिआ** ; आ. बं. ओ. **बहि** ; हिं. पं. **बही** ; पं. लां. सिं. हिं. **वही** ; ने. **वहि** ; सं. **राजवाहिका** = राजाची रोजनिशी.]

वॅही स्त्री. लग्नाच्या बहुल्याच्या कोंपऱ्यावरील मडक्याची उतरंड, कुंपण. The earthen pitchers constituting the pile around the *bohale*.
[सं. **वत्ति** ; प्रा. **वइ**.]

वहीम पुं. संशय, धाक, किंतु. Suspicion, surmise.
[अर. **वहम्**.]

वहू स्त्री. नवरी मुलगी. Daughter-in-law.
[सं. **वधुः**, √ **वह्** ; पा. **वधू** ; प्रा. **वहू** ; आ. **बउ** ; बं. **बऊ** (सून) ; ओ. **बोहु** ; बि. हिं. **बहू** ; सिं. **वहू** ; गु. **वहु** ; ने. **बहु** ; याकामसा. **वहुराणी**, **वहुळ्या** = रांजण भरणाऱ्या स्त्रिया.]

वळ(णें) अक्रि. परत फिरणें. To turn.
[सं. **वल्** ; प्रा. **वल** ; **वळण** = वांकडेंपणा ; **वळें** = कंकण, वेष्टण, नदीचा बांक (सं. **वलयम्** ; प्रा. **वलय**, **वलअँ**). **वळी** (प्रा. **वलि**) = पोटावरील केंस.]

वळ पुं. खूण, वण, सुजलेला लांबट भाग. A mark, a tumor.

[सं. वल्, **वलयम् > वळअँ**; अकामसा. **वळें** = वांटोळी अंगठी, **वळवळ** = हालचाल; **वळण** = तऱ्हा; **वळी वळकटी** = गुंडाळलेलें अंथरुण (**वळ + कट**–अल्पार्थे).]

वळघ(णें) क्रि. चढणें, आरूढ होणें, आश्रय करणें. To climb, to grasp, to hug.

[सं. **अव + लग् > ओळग > वळघ. वळघ** (पकड, मिठ्ठी)].

वळचण स्त्री. छपराच्या कोपऱ्याकडील खालील भाग. The lower edge of roof.

[सं. **वलभिस्थान > वलहिचाण > वळीचाण > वळचण.**]

वळवट न. रव्याच्या वळलेल्या गोळया. Dough of fine flour and milk rolled out into little twists.

[सं. **वल्+वटिका.**]

वळवटा पुं. वहिवाट. Custom, practice.

[सं. **वल्.**]

वळस(णें) क्रि. वळसा घेणें. To take a turn.

[सं. **वल्+स** (स्वार्थे).]

वा प्र. ईषत्, अल्प, स्वार्थ, निंदा वगैरे अर्थदर्शक. A termination indicative of smallness, contempt etc.

[सं. **वत्**; पा. **वा**; म. प्रा. **अँ**; म. **वा**. (पुं.) सं. **क**; प्रा. **अ**; म. **वा** (पुं.).]

वा(णें) सक्रि. पेरणें, वाहणें, अर्पण करणें. To sow, to yield.

[सं. **वप्** १ बीजसंताने–**वापित + ल** (णिच् निष्ठा), **अर्प्** १० दाने; प्रा. **ओप्प > ओव > वा**; अकाम. **वाणें, वाइणें** (ज्ञा. १७·९४, १८·३३).]

वा(णें) अक्रि. वाजणें. To blow.

[सं. **वानं** (निष्ठा) = फुंकलेला.]

वाइच वि. अ. थोडा, जरा, अल्प, उगाच. A little, small, in vain.

[सं. **वृथा, अल्पीयस्**; याकाम. **वाऊ, वीए**; (ज्ञा. १५-२३८); अकामग्रा. **वाइच, वाइसा, वाओ, वाउगा, उलिसें.**]

वाइला वि. निराळा, वेगळा. Separate, different.

[सं. उपाहित, उप + आ + √ धा; > **उवाइअ + ल**, उप + आ + √ धा; याकाम. **वहिला** = निराळा (ज्ञा. ६-१५४); अकामग्रा. **वाइळा, वायला.**]

वाइल पुं. चुलीचा एक भाग. The off-portion of a cooking stove, the hob.

[सं. **चुल्ली** (?); देप्रा. **उल्ली.**]

वाईट वि. अनिष्ट, गुणरहित. Bad.

[सं. **वि + अय् + ट** (?), अकामसा. **वाईटविट्ठल, वाईटसाईट, वाईटवाणा.**]

वाउगा, वावगा वि. व्यर्थ, निरर्थक, मिथ्या. Bad, false.

[सं. **विगत > विअअ > वाया > वाउ**; २ सं. **अनुपयोगी**; प्रा. **अउओगी**; ३ **वृथा**; याकाम. वाउगा (ज्ञा. (१५-२३८); **वाया, वाऊ, वाए, वाओ.**]

वाउधाण न. वादळ, वावटळ. A storm, a tempest.

[सं. **वातउत्थान, ऊर्ध्वाण > उद्धाण > वाउधाण, उधाण**; याकाम. **वाउधाण-न, वावधण, धाण** = वादळ (ज्ञा. १३-६८९).]

वाक् स्त्री. वाणी, भाषण. Speech, articulate utterance.

[सं. **वच्** २ परिभाषणे; संसा. **वाक्य, वाक्चातुर्य, वाक्चापल्य, वाक्पटु, वाक्पारुष्य, वाग्जाल, वाग्दत्त, वाग्दान, वाग्दोष, वाग्बाण, वाग्युद्ध, वाग्वीर.**]

वाक, (वाकळ) पुं. स्त्री. झाडाची साल, सालीचे धागे, गोधंदी. The filamentous integuments of certain plants.

[सं. **वल्क**; प्रा.. **वुक्क, वुक्क** (साल); हिं. **बोक्ला**; सं. **वल्क, वल्कल**; पाप्रा. **वक्कल**; कु. **बकल**; आ. बं. **बाकल**; हिं. **बक्ला**; पं. **बक्क**; गु. **वाख.**]

वांक(णें), बांक(णें) अक्रि. लवणें, वळणें, वांकडें होणें. To bend, to incline.

[*IE.* Qq, Anq. सं. **अक्, अंक, वंक्**– कौटिल्ये; झें. **अक्** (**अक** = आंकडा); *Lat.* Ak, Anc, unc, unq : *Slav.* Ag; *Teut.* Anc, Ang, Ong; अकामसा **वांकण** (वळण), **वांकुली** (विडंबन), **वांकडणें, वांकी** (दंडावरील दागिना.).]

वांकडा, वाँका वि. वांकडा, तिरका. Crooked, curved, bent.

[सं. वक्रः ; पा. प्रा. वक्क, वंका ; बं. बाँका ; ओ. बंका ; वि. बाँक ; हिं. बाँका ; पं. बिंगा ; सिं. वंग ; गु. वांवु ; अकामसा. वांका, वांकुडा, वांकुल्या, वांकुडणें, वांकडें तिकडें (सं. वक्रट, त्रिकटम् ; प्रा. तिक्कटँ).]

वाकनीस पुं. बातमीदार, लेखक, रोजची बातमी लिहिणारा. A recorder, a news-writer.

[अर. वकिआ = बातमी, √ निविस्तन् = लिहिणें.]

वाकफ वि. जाणता, हुशार, तज्ञ. Acquainted with.

[अर. वाकिफ ; पेकाम. वाकीफ (रा. ८-२१४) ; अकाम. वाकब, वाकीफ, वाकबगार.]

वाकळ स्त्री. गोधडी, जाडें,-भरडें,-ठिगळाचें पांघरूण. A quilt composed of pieces.

[सं. वल्कल ; पा. वक्कलो, वक्कलक ; प्रा. वक्कल ; आ. बं. बाकल ; ओ. बाकळ ; हिं. बक्कला ; प. वाकळ. वाक पहा. *Russ.* Volokno ; *Poln.* Wlokno.]

वाका पुं. हकीकत, वर्तमान. An affair, or occurrence.

[अर. वाकिआ ; शिकाम. पेकाम. वाका (चित्र. १३७) ; अकाम. वाकनीस.]

वाकी स्त्री. स्त्रियांचा दण्डावरील दागिना. An ornament for the arm of the females.

[सं. वक्र (> वंक) ; वक्रिका (?) ; किंवा द्राविडी आहे कां ?]

वाक्य न. संपूर्ण अर्थाचा शब्दसमूह. A sentence.

[सं. वच् २ परिभाषणे ; संसा. वाक्यखंड, वाक्यदोष, वाक्यरचना, वाक्यप्रयोग, वाक्यार्थ, वाक्यालंकार, इ.]

वाख पुं. वाक पहा.

वाखती स्त्री. (छातीचा) खळगा, खड्डा. A ditch, the hollow part.

[सं. वक्षस् + गर्ता ; याकाम. वाखती ; शिकाम. वाखती.]

भरोनियां घरीं । राहिलों वाखती ॥ तु. अभंग.

वाखा पुं. उपद्रव, ओकारी, गर्भपात, अनर्थ. An excessive disorder of the frame.

[अर. वाकीआ ; शिकाम. वाखा (सभा. ४९).]

वाखाण(णें) सक्रि. स्तुति करणें, चर्चा करणें. To praise, to speak well of.

[सं. व्याख्यान (नाधा.) ; पा. व्याख्खान ; प्रा. वक्खाण ; पं. वखाणना ; बं. बखान (शिवी) ; हिं. बखानना ; सिं. वखाणणूँ ; गु. वखाणवूँ ; याकाम. वाखाण = विवरण (ज्ञा. १८-१७४५).]

वाग(णें) क्रि. हलणें, वर्तन करणें, राहणें. To behave, to move, to be working.

[१ सं. वल्ग् ; प. वग्ग ; प्रा. वग्ग ; २ सं. व्रज् ; पा. वज ; प्रा. वयइ ; अ. वंजइ ; अकामसा. वागणूक (वर्तन).]

वागुर स्त्री. पक्ष्यास पकडावयाचें जाळें. A snare, a net.

[*IE.* Ueg ; *Lat.* Velum ; सं. वागुरा. ' वाक् दोर ' पासून श. को. कारांनीं काढलेली व्युत्पत्ति अशास्त्रीय. याकाम. वागुर (ज्ञा. ४-२०३).]

वागुळ स्त्री. चर्वण. Chewing the end.

[सं. (?) ; देप्रा. वग्गोलइ रोमन्थयति (२५४-४) ; गु. वागोळवूँ.]

वाघ पुं. वन्य पशु. A tiger.

[सं. व्याघ्र ; पा. व्याग्घो, व्याग्घो ; प्रा. वग्घ ; पप. बागेआर ; कु. बाग ; आबं. बाघ ; ओ. बाघ ; पं. बराघ ; हिं. पं. बाघ ; सिं. वाघु ; गु. वाघ. पहाडी व पंजाबी भाषांत ' र ' अवशिष्ट राहिला आहे. मराठी ' वाघरूं ' ह्यांत हि तो असावा असें वाटतें.]

वाघंटी स्त्री. वनस्पतिविशेष. A kind of plant.

[सं. व्याघ्राटकी ; अकाम. वाघाट, वाघांट (वाघंटीचें फळ).]

वाघवडाई स्त्री. वागजाई, ग्रामदेवता. A village deity.

[सं. १ व्याघ्रवधिका = वाघ वगैरे हिंस्र पशु मारणारी ; २ वाक् वर्धिका = वाणी वाढविणारी देवता. ह्या दोन शब्दांपासून येणें संभवनीय आहे. ह्या देवतेचा निर्देश महानुभाव वाङ्मयांत आहे.]

वाघूळ न. पक्षिविशेष. A kind of bird, a flying fox.

[सं. वल्गुली, वाग्गुद.]

वाघ्या, वाघा पुं. खंडोबाचा भक्त-सेवक. A divotee of god *Khandoba*.

[कान. **वग्गे** = भक्त. मोल्स्वर्थनें ह्या शब्दाचा संबंध **वाघी** (वाघाच्या कातड्याची पिशवी) ह्या शब्दाशीं जोडला आहे. तीमध्यें भंडारा ठेवतात. परंतु ती पटत नाहीं. हा कानडीमूळ असावा.]

वांगें न. वनस्पतिविशेष व त्याचें फळ. A kind of fruit, a brinjal.

[सं. **वृन्ताकम्, वंगनः, वङ्गः**; देप्रा. **वङ्गं, वृन्ताकम्** (२४६-१३); पा. **वातिङ्गनो**; प्रा. **वाइगण, वाइगणी, वाइंगिणी**; बं. **बेंगन**; बि. **बइँगन्**; हिं. **बैंगुन्, बैगन्**; पं. **बाइँगण**; गु. **वेंगण**; पं. **वंगा**; संस्कृत मूळ स्पष्ट व निश्चित नाहीं. ह्या शब्दाशीं फा. **बदिनजान**; कान. **बसदनि**; ता. **वळुदलेइ**; मल्या. **वळुइनी**. हे शब्द ताडून पहा.]

वाच(णें) सक्रि. लिहिलेलीं अक्षरें उच्चारणें. To read.

[*IE*. Uaka; सं. **वच्** २ परिभाषणे; **वाचा**, √ **वच्**; *Lat*. Vacca; *Av*. Uxsan, Usa*n*; अकामसा. **वाक्, वाचा, वाचिक, वाचाट, वाचाळ, वाच्य, वाचन, वाचणी, वाचप, वाच्य, वाच्यता, वाच्यांश, वाच्यार्थ.**]

वांच(णें) अक्रि. जिवंत राहणें, राखणें. To live, to exist, to live out or through.

[सं. **वञ्च्** १ गतौ; पा. **वञ्च**; प्रा. **वंच**; बं. **बॉंचा**; ओ. **बंचिब**; हिं. **बॉम्चना**; सिं. **वाजणु**; ने. **बॉच्नु**; सं. **वच्यते**; प्रा. **वच्चइ**; याकाम. अकामसा. **वाचून, वाचौनि-या**, '**व्रज्**' गतौ पासूनहि हा शब्द येणें शक्य आहे. **वञ्च्** पेक्षां '**व्रज्**' अधिक प्रशस्य.]

वाज(णें) उक्रि. आवाज करणें. To emit a sound.

[सं. **वाद्यते** (√ **वद्**); पा. **वज्जति**; प्रा. **वज्जइ**; का. **वझून्**; आ. **वाजिब**; बं. **बाजा**; ओ. **बाजिबा**; हिं. **बॉजना**; पं. **बज्जणा, वज्जणा**; सिं. **वजणु**; गु. **वाजवूँ**; ने. **बज्नु**; याकाम. **वाज** = बोलणें (ज्ञा, १४-७९); अकामसा. **वाजंत्री**; **बजावणें.**]

वाजवी वि. योग्य, रास्त, न्याय्य. Proper, right, appropriate.

[अर. **वाजिब्**; पेकाम. **वाजीब** (रा. १०-२८०).]

वांझ वि. निष्फल. Barren.

[सं. **वंध्य**; पा. प्रा. **वंज्झ**; कु. **बाँजो**; बं. **बाँझा**; बिहिं. **बोझ**; पं. **बंझ**; सिं. **वॉझ**; गु. **वांझ**; याकाम. **वाजठ, वांजट** (ज्ञा. १४-२६); अकाम. **वांझ, वांझट, वाझोट** ताडून पहा. **वण्टः** (पुच्छहीन), **बण्डह, वण्डरः** (नपूंसक).]

वाट स्त्री. रस्ता, मार्ग, प्रतीक्षा, प्रवास. A road, a path, a way.

[वैसं. **वर्तिः** = मार्ग (तेन नरा वर्तिरस्मभ्यंयातम् १-११७-२ ऋ.); सं. **वर्त्मन्** (पुं); पा. **वटुमा**; प्रा. **वट्टा** (स्त्री); का. **वाथ**; प. प. **वाट**; कु. **बाटो**; आ. बं. **बाट्**; ओ. **बाट**; हिं. **बाट** (स्त्री); पं. **बाट, वाट** (स्त्री-अंतर); लां. **वाट्**; सिं. **बाट** (स्त्री); गु. **वट्, वोट्ट.**]

¹**वाट(णें)** उक्रि. भासणें. To seem, to appear unto.

[वैसं. **वत्** = समजणें; सं. **वृत्**; प्रा. **वट्ट**. अकामसा. **वाटावाट, वाटाघाट** = चर्चा.]

²**वांट(णें)** सक्रि. विभागणें. To distribute, to divide amongst.

[सं. **वण्ट्** १० विभाजने; गु. **वाँटवूँ**; पं. **वंडन**; सिं. **वाटणु**; हिं. **वंटना**; बं. **बंटिते**; बि. **बांट** = वाफ्यानें जमीन करणें. याकाम. **वांटली** (विभागलेली), **वांटाव** (मोबदला), अकामसा. **वांटा** (भाग), **वांटप, वांटीव** (अंश, प्रशंसा).]

³**वाट(णें)** सक्रि. वरवंट्यानें चिरडणें, बारीक करणें. To grind, to lavigate.

[सं. **अवघट्ट** १ संघर्षे, प्रा. **अवहट्ट.**]

वाटला अ. भोवतीं. Around, about.

[सं. **वृत्त, वर्तुल**; प्रा. **वट्ट, वट्टि.**]

वाटवा पुं. भोंवतालचें पाण्यासाठीं केलेलें थाळें. A circular basin around for water.

[सं. **वृत्त**; प्रा. **वट्ट, वट्टि**; गु. **वाट, वाटो** = चाकाची धाव; हिं. **बटवा**; सिंह. **वट** = वर्तुळ, **वॅट** = कुंपण; म. **बटवा.**]

वांटा पुं. भाग. A share, a portion.

[सं. **वंटः**; कु. **बान्**; बं. **बाँट्**; ओ. **बाण्ट**; हिं. **बाँट**; पं. लां. **वण्ड**; गु. **वाँट**; २ सं. **वंटकः**; प्रा. **वण्डग**; बं. हिं. **बाँटा**; पं. **वण्डा**; गु. **वाँटो.** वांटणें पहा.]

वाटी, (वाटगा) स्त्री. लहान भांडें. A saucer-form vessel.

[सं. वर्तिक (वर्तुळ), वर्तलोहम्, वृत्त; पा. वट्ट, वट्टी; देप्रा. वट्टम्; प्रा. वट्ट, वट्टिय, वट्टग; कु. वाटुली; ओ. बटि; हिं. बाटी (भाकरी), बत्री (भांडें); पं. वट्टी (गोळी); सिं. वटो; गु. वाटको, बट्टो. ह्यांतहि टर्नरनें घोटाळा केला आहे. गोळी, वडी, वांटोळें भांडें ह्या अर्थी सर्व शब्द एका यादींत त्यानें बांधले आहेत.]

वाटोळा वि. गोल, चेंडूसारखा गोलाकार. Round circular.

[सं. वर्तुल; प्रा. वट्टुल; याकाम. वाटला = भोंवतीं.]

वाटोळें न. नाश. Ruin, distruction.

[सं. अव + ट्वाळन् (– नाशः), अवट्वाळनम् > अवट्टाळँ < (अलोप) वाटाळें. ह्या शब्दाचा ' वर्तुळ ' ह्या शब्दाशीं संबंध नाहीं. हें संस्कृतीकरण उत्तरकालीन दिसतें.]

वांठ वि. चकित, तटस्थ, आश्चर्ययुक्त. Wonder-struck.

[याकाम. वांठ (ज्ञा. २-२१३).]

वाड न. वसतिस्थान, राहण्याचें ठिकाण, वाडी पहा. A place of abode, a settlement.

वाड,-गा पुंन. आवार, परडें. A small yard or enclosure.

[१ सं. वाटः, वाटी, वृत्तिः; पा. वति, वाटो; २ सं. वाटक; प्रा. वाड, वाडग, वाडी; का. वार; कु. बार; आ. बार; बं. बाड; ओ. बाड, बि. बारी; हिं. बाड; पं. बाड; सं. वर्तिः ह्या शब्दाशीं हा शब्द ब्लोकनें जोडला आहे.]

वाड वि. थोर, मोठें, पुष्कळ, भव्य. Large, great, huge.

[सं. वृध्-(निष्ठा) वृद्ध, वड्; देप्रा. वड्डोमहान् (२४६-१३); गु. वडु; सिं. वडो; पं. वड्डा; हिं. बं. बडा; सिंह. बॅडी; याकाम. बाड (ज्ञा. ९-२२२); का. बोड्डु; रूमा. बारु.]

वाडकोड न. कौतुक, आवड. Fondling, liking.

वाडी स्त्री. बाग, शेतवाडी. An enclosed piece of meadow or garden.

[सं. वाटिका; देप्रा. वाडी वृति (२५१-१६); अप. वाड; प्रा. वाडिआ; कु. बारी; अ. बारि; बं. ओ. बाडी; बि. बारी; हिं. पं. बारी; पं. लां. सिं. वसि; म. वाडा (< वाटकः).]

वाडें,-ढें न उंसाचा शेंडा. The leafy head of sugar-cane.

[सं. वर्धनम् किंवा वर्धकम् > वड्ढअँ.]

वाढ(णें) उक्रि. मोठे होणें. To increase or augment.

[सं. वर्धते; पा. वड्ढति; प्रा. वड्ढइ, वद्धइ; का. वड्डू (वृद्ध); कु. बडगो; आ. बारिब; ब. बारा; ओ. बन्हिबा; हिं. बन्हना; गु. वाढवूं; वाढवि(णें) (णिच्) वाढ-वड्, बर; बि. वर; हिं. बरा; प. बडा.]

वाढ(णें) सक्रि. अन्न पानावर ठेवणें. To serve (food).

[सं. १ उप + पादय (पद्-णिच्) > उवाड > वाढ; २ कान. बडिसुं.]

वाढ स्त्री. आधिक्य. Excess, increase.

[सं. वृद्धि; पा. वद्धि, वुद्धि, वुड्ढि; प्रा. वड्ढि, वुड्ढि; का. वड; ब. बाड; हिं. बाढ; पं. वद्ध; सिं. वधी; गु. वढ.]

वाढणी स्त्री. केरसुणी. A broom.

[सं. वर्धनि; प्रा. बड्ढन; आ. बारनी; बं. बारन; ओ. बन्हिणा; हिं. बन्हनी.]

वाढाया पुं. सुतार. A carpenter.

[सं. वर्धकि; पा. वड्ढकी; प्रा. वड्ढइअ; आ. बारइ; बं. बारइ; ओ. बन्हाइ; हिं. बन्हई.]

वाढी स्त्री. अधिकपणा. Excess, abundance, increase.

[सं. वृद्धिः, वृद्धिका; पा. वड्ढि (व्याज); प्रा. वड्ढि; का. वाड (नफा); अ. बारि (व्याज); बं. बारी; ओ. बाढी; बि. बाढी; पंलां. वड्ढी (लांच); सिं. उढीखुटी (नफातोटा).]

वाढोळ अ. पुष्कळ वेळ, उशीर. For a long time.

[सं. वृद्ध + वेला; म. वाढवेळ, वाढुवेळ.]

वाण पुं. रंग, वर्ण, नमुना. Colour, specimen.

[सं. वर्ण; प्रा. वण्ण. वर्ण पहा.]

^{1}**वाण** न. ब्राह्मणास द्यावयाचें वायन. Fruits and sweetmeats given to Brahmins as present.
[सं. **उपायनम्**; प्रा. **उवाणअँ.**]

^{2}**वाण** स्त्री. कमीपणा, कमतरता, उणीव. Deficiency, want.
[सं. **ऊनम्** (निष्ठा, √वे).]

वाणसी स्त्री. वेश्या, पण्यांगना. A prostitute, a public woman.
[सं. **वणिक्** + **स्त्री** (?), **वारं** + **स्त्री.**–ह्या व्युत्पत्तींत 'ण' ची उपपत्ति लागत नाहीं. याकाम. **वाणसी** (ज्ञा. १३-७०१).]

वाणी पुं. व्यापारी दुकानदार. A trader, a merchant.
[सं. **वाणिज्यः**; पा. **वाणिजो**; प्रा. **वाणिअ**; का. **वान्** (दुकान); **वॉन** (व्यापारी); बं. **बानिया**; ओ. **बणिअ**; बि. हिं. **बनिया**; पं. **बानिया.**]

^{1}**वाणी** स्त्री. वाचा, भाषण. Speech.
[स. **वाणी.**]

^{2}**वाणी** पुं. कीटकविशेष. An earth–worm.

वांड वि. खोडकर, व्रात्य, उनाड. Mischievous.
[सं. **वंड**, **वड्** ६ विभाजने; प्रा. **वंठ.**]

^{1}**वात** स्त्री. दिव्याची जोत (कापडाचा तुकडा). A wick.
[सं. **वर्तिः**, **वर्तिका**; पा. **वट्टिका**; प्रा. **वत्ति**, **वट्टि**, **वट्टिआ वट्टिआ**; कु. **बातो**; आ. बं. **बाति**; ओ. **बति**; बि. हिं. **वाती**; पं. **वत्ती**; सिं. **वटी**; गु. **वात**; ने. **वाति**; याकाम. **वात**, **वाती** = दिवा (ज्ञा. २ २६१); अकाम. **वातेरें** = समयींतील वात लावण्याची खोलगट जागा.]

^{2}**वा(बा)त** स्त्री. कथा, गोष्ट. A narration, a news.
[सं. **वार्ता**; प्रा. **वत्ता.**]

^{3}**वात** पु. वारा. Wind or air.
[*IE.* Ue; सं. **वा**; *Av.* Vaiti, Vato; *Lith.* Vetyati; अकामसा. **वातूळ**, **वातूल** (वातकारक, **वात** + **ल**), **वाताहत**, (**वात** + **आहत**, √**वा**, √**हन्**) = दाणादाण, पांगापांग.]

वातट, ड वि. न तुटणारा, चिवट. Tough, persisting.
[सं. **वात** + **ट** (नाधा - **वातटणें**).]

वात्रट वि. चिवट, लोचट, पाचकळ बोलणारा, निरर्थक वाद खेळणारा. Tough, persisting.
[सं. **वादित्र** + **ट** > **वाइॆत्र** + **ट** > **वात्रट.**]

वाद पुं. चर्चा, भांडण, वादविवाद, कज्जा. Disputation, discussion, debate.
[सं. **वद्** १ शब्दे; शिकाम. **वादवेवाद** = वादविवाद, **वादी**, **वाद्या** = भांडखोर, **वादाळ(णें)** = १ वादांत बोलणें, = २ वाऱ्यानें गार होणें; अकामसा. **वादी** = खटल्यांतील प्रमुख पक्ष; **वादेली** = कज्जेदलाल; **वाद्या** = वादी; **वादंग**, **वाधंग**, **वाधांग्या.**]

वादळ न. सोंसाट्याचा वारा. A hurricane' a violent gale.
[सं. **वर्दलिका**, **वार्दलम्**; पा. **वद्दलिका**; प्रा. **वद्दल**; कु. आ. बं. **बादल** (मेघ); ओ. **बादल**; बि. **बादर**; हिं. **बादल** (पुं); पं. **बद्दल** (पुं); सिं. **बदलु**; गु. **वादळ**; ने. **बादल**; अकामसा. **वादळणें.**]

वादी स्त्री. कातड्याची पट्टी. A strap of leather.
[सं. **वर्ध्र**, **वार्धी**; प्रा. **वद्ध**; गु. **वाधर** (स्त्री); सिं. **वदि**; **वदिध्र**; सिंह. **वंद**; अकामसा. **वादाडा** (**वर्ध्र** + **आघातः**) = सपाटा, थप्पड; **वादड(णें)** (**वर्ध्र** (नाधा.) = १ वादीनें मारणें, **वादड(णें)** = खाणें, संपादन करणें, अपहार करणें (सं. **अपा** + **दंह्** (१ वृद्धौ) > **अवादंह** > **वादड**).]

वाधंग पुंन. कुत्सितपणाची टीका, वादविवाद, धुसफूस. Ill-tempered chiding.
[सं. **वादंग**, **वादांग** = वादांतील मुद्दा.]

वान,-ण पुं. रंग, वर्ण, प्रकार Colour, hue, tint.
[सं. **वर्णः**, **वर्णिका**; पा. **वण्णो**, **वण्णिअम्**; प्रा. **वण्ण**, **घण्णिआ** (प्रकार); कु. **बाण** (संवय); ओ. **बाणा**; हिं. **बान्**, **बाना** (स्वरूप); गु. **वान्**, **वानी** (जाती); अकाम. **वानगी** = नमुना.]

वान(णें) सक्रि. स्तुति करणें. To extol, to laud.
[सं. **वर्ण्**; प्रा. **वण्ण**; याकाम. **वानणें** = वर्णन करणें (ज्ञा. १४-१०).]

वानगी स्त्री. नमूना. A specimen, a sample.
[सं. **वर्णिका**; प्रा. **वन्निगा**, **वन्निआ.**]

वानर पुन. प्राणिविशेष, काळें माकड. A black-faced and long-tailed monkey.

[सं. **वानर**; गु. **वांदर**; सिं. **वानरु**; पं. हिं. बं. **बंदर**; सिं. **वंदूर**; का. **वाँदुर**; सिलोनी. **वाण्डरू**, **वाण्डूर**; अकाम. **वान्दर वान्नर**, (वर्णागम). परंतु हा शब्द परकी भाषेंतून संस्कृतमध्यें आला असावा. पेकाम. **वानर तेल** ह्या संबंधीं पंचतंत्रांत एक गोष्ट आहे. ह्याचा अर्थ हांजीखोरानें केलेल्या जुलुमी वर्तनाबद्दल त्याच्यावर होणारा योग्य ईश्वरी कोप. अकामसा. **वानरथेर**, **वानरभोजन**, **वानरविचका**, **वानरशेक**, **वानरखत**]

वानवसा–सें पुं. न. स्वयंपाकगृह, माजघर. A kitchen.

[सं. **महानस** > **भाणवस** > **वानवस**=अग्निगृह; याकाम. **वानिवसें** (ज्ञा. १७-१०२), **वानवट** (**वानवस**= (अग्नि)+**ट**= भाजलेलें बीं.]

¹वानवा पुं. स्त्री. शंका, अनिश्चितपणा. Uncertainty.

[सं. **वा+न+वा.**]

²वानवा स्त्री. वर्णन, वाखाणणी, वानणें पहा. Praise. lauding.

वांधा,–धें पुं. न. भानगड, देण्याघेण्यासंबंधीं तक्रार, वादविवाद, वांझा, वांझे. A hitch, an obstruction, a dispute.

[सं. १ **वादंग**, किंवा २ **व्यवधान.**]

वाप(णें) क्रि. पेरणें, धान्य रुजत घालणें, उगवणें. To sow.

[सं. **वप्** १ बीजसंताने, (णिच्) अकाम. **वाप** (पेरणी, पेरा); **वापा**, **वाफा** (जमिनीचा पेरलेला एक पट्टा).]

वापर(णें) सक्रि. उपयोगांत आणणें, अंगावर घालणें. To bring into use.

[सं. **वि+आ+पृ** ९ पूरणे – **वापर** (वहिवाट, राबता).]

वापस अ. परत, माघारा, उलट. Back, in return.

[फा. **वापस्.**]

वाफ स्त्री. धुकें, वायुरूप पाणी. Vapour, stream.

[सं. **बाष्पः**; पा. **बप्पो**; प्रा. **बप्फ**; देप्रा. **बप्फा**; का. **बाह**; कु. **बाफ**; ओ. **बाम्फ**; हिं. **बाफ**; सिं. **बाफ**; गु. **बाफ.** लिंगभेद मराठींत झाला. २ सं. **वाष्पः**; पा. **वप्पो**; देप्रा. **वप्फाउल**=फार ऊष्ण; अकामसा. **वाफस**, **वापस**, **वाफल(णें)**, **वाफारा.**]

वाफा पुं. पेरण्यासाठीं केलेलें आळें. A bed or plat of a plantation.

[सं. **वपति**, **वप्र**; पा. **वपति**; प्रा. **ववइ**; देप्रा. **वप्पिणो** (२६८-७), **वप्पीडिअ** (२५३-१५); का. **वाॅंबू**; अ. **बड्ब**; बं. हिं. **बोना**; सं. **वप्र**; प्रा. **वप्प**; गु. **वाफो**; सिंह. **वफ**; अकाम. **वाफा**, **वावर** (< **वापकार** < **वप्रकार**), **वोपणें.**]

वाभाड(णें) क्रि. निर्भर्त्सना करणें. निंदणें, वाभाडे काढणें. To scold.

[सं. १ **अवा+व्रश्च**–तोडणें, २ **अवा+भर्त्स्**–निन्दा करणें (रा), ३ **व्या+बाध्**; अकामसा. **वाभाडा** (= चीर, भेग, खरडपट्टी).]

वामा स्त्री. सुंदर स्त्री, बायको. A woman.

[सं. **वाम**–डावी बाजू; धर्मविधींत स्त्रिया नवऱ्याच्या डाव्याबाजूस बसतात म्हणून **वामांग**=स्त्री, हें स्पष्टीकरण पटत नाहीं. धातुमूळ निराळें असावें.]

वाम्ब, बाम स्त्री. एक प्रकारचा मासा. An eel.

[सं. **ब्रह्मी** (एक प्रकारचा मासा); आ. **बामी**; हिं. पं. **बाप** (स्त्री); गु. **बाम** (पुं.).]

वांबळ, वांबाळ स्त्री. वाईट हवा, थंड,–दमट हवा. Raw or dull weather.

[सं. १ **बाष्पाकुल**, **वाफाउल**, २ **वार्भृत्** (**वारा**-जल भृत् (ना.)= ढग येणें, थंड हवेचा परिणाम होणें (रा.)).]

वाय वि. अ. व्यर्थ, निष्फळ, निरर्थक. In vain, useless, barren.

[सं. **वृथा**; प्रा. **विहा** > **वाय**; याकाम. **वाय**= वृथा (वायकाण्ड) (ज्ञा.); अकाम. **वाय**, **वाया** = वृथा (वायबार).]

वायच(णें) सक्रि. वेंचणें, पाखडणें, निवडणें. To shake and sift, to separate.

[सं. **व्या+विच्** ७ पृथग्भावे. ह्या शब्दाच्या कांहीं रूपांत (उदा. **वेंच**) अनुनासिक आहे. त्याची उपपत्ति ह्या व्युत्पादनावरून लागत नाहीं. मूळ दुसरें असावें अशी शंका येते. गणविकरण त्यांत मिसळलें असावें किंवा **वि+आ+अंच** अशी व्युत्पत्ति असावी.]

वाय(ई)दा पुं. ठराव, करार, नेमलेली–ठरविलेली वेळ. A promise, an agreement.
[अर. **वअदा.**]

वायला वि. वेगळा, अलग, भिन्न. वाईला पहा. Separate, different.

वार(णें) सक्रि. टाळणें, विरोध करणें. To avoid, to prohibit.
[सं. **वारयति,** √**वृ**; पा. **वारेति**; प्रा. **वारेइ**; का. **वारूँ**; हिं. **बारना**; पं. **बारना, वारना**; सिं. **वारणु**; गु. **वारवूँ.**]

वार(णें) अक्रि. चौरी फिरविणें, वारा घालणें. To fan, to move round the chouri.
[सं. **वार, वाल,** √**वा.**]

वार(णें) सक्रि. पुकारणें. To announce.
[सं. **व्याहर**; प्रा. **वाहरिअ** (निष्ठारूप).]

वार प्र. राखणारा ह्या अर्थी प्रत्यय. A termination indicating protection.
[सं. **वाल**; > **याल**; > **वार** किंवा दुसरा एक **वार** फारशी प्रत्यय आहे. उदा. तपशीलवार, तऱ्हेवार इ.]

वार पुं. दिवस, **अहोरात्र** (उदा. आदितवार, सोमवार). A day of the week.
[सं. वार, √ **वृ** १० आवरणे; गु. पं. **वार**; सिं. **वारु**; हिं. बं. का. **बार**; सिंह. रूमा. **वर**; म. **वार**= दिवस, वेळां (अ.).]

वार पुं. समूह, लोकांचा थवा, त्यांचें रहाण्याचें ठिकाण. A multitude, a great number, a settlement.
[सं. **वार**=समूह; ह्यावरून **वार**वनिता, **वार**योषिता, **वारस्त्री** (म्हणजे लोकांची–स्त्री,–वेश्या) हे शब्द उत्पन्न झाले. "वेश्येकडे जाण्याचा दिवस-वार" म्हणून वारयोषिता (श. को.) ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं.]

वार पुं. कापड मोजण्याचें साधन, माप. A yard.
[*As.* Gierd ; *Ger.* Gerte ; *Eng.* Yard.]

वार स्त्री. अवधि, विलंब, फुरसत. Time considered as long, delay.
[प्रा. **वारा**–विलंब.]

वार स्त्री. नुकत्याच जन्मलेल्या मुलाभोंवतालचें आवरण. The secundines.
[सं. **वृ.** १० आवरणे.]

वारती स्त्री. झोंपाळ्याची कडी, पाळण्याची दोरी. A cord, an iron bar.
[सं. **वारत्र, वरत्रा**; प्रा. **वारत्त, वरत्ता** (?); याकाम. **वारती.**]

वारस वि. हक्कदार, वडिलार्जित मालकी असलेला. A rightful claimant.
[अर. **वर्स**; अकामसा. **वारसा, वार्सा** (हक्क, मालकी), **वारसदार** (हक्कदार).]

वारळी पुं. एक जंगली रानटी जात. A wild tribe.

वारा पुं. वात. Wind or air.
[सं. **वात, वातृ** (?) ; देप्रा. **वायार, वाआर** (पुं) शिशिरवातः (२५६·१४); गु. **वायरो**; हिं. बं. **बयार**; सिं. **बाराइणु**=वारा देणें. मूळ सं. **वात** हें संशयास्पद दिसतें. मूळ सं. **वातृ**=वाहणारा असें असावें काय? अकामसा. **वारापाणी, वारें** (न.), **वारावणें**]

वारावार स्त्री. निरवानिरव, व्यवस्था. Discharging or paying off.
[सं. **वृ,** (णिच्) **वारय, वाव्रीय** > **वारावार,** (द्विरुक्ति) **वार** + **वार** > **वारावार, वारासार** (**वृ** + **सृ**)= वारावार, निरवानिरव.]

वारी स्त्री. यात्रा, फेरी, नियमित दिवसांची यात्रा. The regular visits to sacred places.
[सं. **वार** (स्त्रीं.), **वारी.**]

वारी अ. साहाय्यानें, साधनानें, सारखा, रीतीनें. With, by, through.
[ह्यामध्यें **बारी, वर** असे दोन्ही प्रत्यय रूढ आहेत. ह्याचा याकाम. **वेऱ्ही**=पर्यंत ह्या अव्ययाशीं संबंध आहे. म. थट्टेवारी, केरावारी.]

वारि(री)क पुं. न्हावी, म्हाली, नापीक. A barber.
[सं. **व्रश्च** ६ अवयवे; प्रा. **वारिअ**; देप्रा. **वच्छीउत्तो· तथा वरिओ** नापितः (२५३·१०); हिं. **बारी**=एक जात. संस्कृतीकरण प्राकृतनंतर झालें आहे. 'वार'–दिवस–ठराविक दिवशीं येणारा अशी व्युत्पत्ति दिली आहे (श. को.), ती मान्य होण्यासारखी नाहीं. सं. **वापकारिन्** अशी व्युत्पत्ति ब्लोक सुचवितो. ती चिन्त्य आहे.]

वारूळ न. मुंग्याचें घर. An anthill.
[सं. **वामतुर**; **वामलूर** (वम्र); प्रा. **वामलूर,** वर्णविपर्यय–**वामरूल** > **वाँरूल** > **वारूळ.**]

वार्ता स्त्री. बातमी, गोष्ट, संवाद, संभाषण. Tidings, news, conversation.
[सं. **वार्ता, √ वृत्** = होणें; अकामसा. **वार्तिक** (**वार्ता + इक**) = बातमीदार.]

वाऱ्हाव पुं. डुकर, वराह, A hog.
[सं. **वराह > वऱ्हाअ >** शिकाम. **वाऱ्हाव** (रामदासी).]

वाल पुं. धान्यविशेष, पावटा. A pulse.
[सं. **वल्लः**; प्रा. **वल्ल**; कु. **बाल** (कणीस), **बाल्‌रो** (पीक); हिं. **बाली**; सिं. **वालि**; गु. **वाल.** संस्कृतीकरण उत्तरकालीन आहे.]

वालभ न. प्रेम, आवड, प्रिति. वाल्हा पहा. Love, liking, taste.

वाला प्र. जवळ असलेला, बाळगणारा ह्या अर्थी प्रत्यय. An affix showing possession.
[सं. १ **वलच्** (उदा. दन्तावलः), २ **पालक**; प्रा. **इल्ल, उल्ल** (हेम. २-१५९, १६३-४); ह्या प्रत्ययाचे निरनिराळे अर्थ आहेत. १ कर्तृवाचक. **जानेवाला** = जाणारा. २ मतुप् अर्थ.-**गाडीवाला, घरवाला.** ३ 'चा' षष्ठीचा प्रत्यय.-**गांववाला** ४ स्वार्थे. उदा. छोटावाला, बडावाला. हेमचंद्रानें हे अर्थ दिले आहेत. मत्वर्थीय, कर्त्रर्थ, स्वार्थ अशीं नांवें त्यानें दिलीं आहेत. सं. **वल** पासून निघालेला **वाला** फा. **वाला** पासून निराळा आहे.]

वाली वि. वतीनें बोलणारा, रक्षक. A protector, a patron.
[सं. **पालकः**; प्रा. **वालय.**]

वाल्हा पुं. प्रेमिक, प्रेम करणारा. A lover.
[सं. **वल्लभ**; प्रा. **वल्लह**; गु. **व्हालो**; याकाम. **वाल्हा, वाल्हेंदुलें. वालभ** पहा.]

वाव पुं. वारा. Wind or air.
[सं. **वातः, वायुः,** पा. **वातो, वायु, वायो**; प्रा. **वाअ, वाउ**; का. **वाव**; कु. **बाई**; आ. **बा**; बं. **बाइ**; ओ. **बा**; हिं. **बाव, बाई**; पं. लां. **वा**; सिं. **वाउ**; गु. **वा**; ने. **बा.** पश्चिमेकडील आर्योद्भव भाषांत '**व**' युक्त रूप रूढ आहे. पूर्वेकडील भाषांत '**ब**' युक्त रूप रूढ आहे.]

वांव स्त्री. दोन हात पसरून होईल तें परिमाण. A fathom, the space along the arms extended.
[सं. **व्याम**; गु. **वाम** (स्त्री. पुं.); हिं. **बाम** (पुं); **व्यानू**; बं. **बांऊ**; सिंह. **बंबय, वॅम.**]

वाव अ. व्यर्थ, निष्फळ. Useless, in vain.
[सं. **वृथा**; अकाम. **वावगा, वाउगा.**]

वाव, बाव, बावडी स्त्री. लहान चौकोनी विहीर. A small well.
[सं. **वापी**; प्रा. **वावी** (स्त्री).]

वावट(ट्ट)ळ स्त्रीन. वादळ, सोसाट्याचा वारा. A whirl-wind.
[सं. **वातट्टल, वातदल**; प्रा. **वावदळ**; याकाभ. **वावदळ**; अकामसा. **वावदळ**-(वादळ), **वावधण,-न-धूळ** (तुफान, वातधूली).]

वावट-ड(णें) अ. विश्रामणें, लीन होणें, वाटेल तिकडें भटकणें, निवड करणें. To shelter, to be humble, to run about wildly, to select.
[१ **व्या + वृत्**, २ **व्या + वंठ्**, ३ **व्या + वध्**, **व्य + धू.** (रा).]

वावडा वि. निषिद्ध, अपथ्य. Unwholesome, unenjoined. fatulent.
[सं. **वात + ट** किंवा **व्यावृत अपावृत्त.**]

वावडी स्त्री. पतंग. A paper-kite.
[सं. **वातवर्ती > बाअवट्टी.**]

वावर(णें) अक्रि. हलणें, फिरणें. To move, to carry on, to live and act in.
[सं. **व्यापृ**; अप. **वावर**; प्रा. **वावार**; सिं. **वपारु** (व्यापार), **वपिरी** (व्यापारी); हिं. **बेपर, ब्योपार, बेपारी**; अकाम. **वावर** = कामधार, वहिवाट.]

वावर न. शेत, जमीन, पेरण्यास योग्य शेत. A field, a meadow.
[सं. **वप्र, √वप्, वापकार** = पेरण्याचें स्थान; प्रा. **वप्पं**; देप्रा. **वप्पिणो, वप्पीडिअ** (२६७-१४, २६८-७, २५३-१५), **वाफा** पहा.]

वावसळ(णें) अक्रि. बावचळणें, भ्रमणें, वेडेचार करणें. To become crazy.
[सं. **वात + सल्**; २ **व्यव + सल्**-गतौ, वातामध्यें बडबडणें. **बावचळ** (भावचलित).]

वावसाव पुं. धंदा. Occupation.

[सं. **व्यवसाय ;** प्रा. **ववसाअ ;** अकाम. **वावसाव, विवसा, वेवसा.**]

वास(णें) क्रि. पसरणें, फांकणें. To open, to expand, to open out widely.

[सं. १ **व्यास्** (वि+आ+अस्); प्रा. **वास,** २ **व्रश्च्** ६ अवयवे, ३ **वष्** १ हिंसायाम्.]

^{1}**वास** पुं. वस्ती. Abiding, dwelling, abode, habitation.

[सं. **वास ;** पा. प्रा. **वास ;** आ. **बाह** (घरटें); बं. **बासा ;** ओ. **बास ;** बि. **बासा ;** हिं. **बास ;** गु. **वास ;** अकामसा. **वास्तु, वास्तव्य, वास्तुपुरुष.**]

^{2}**वास** पुं. गंध, परिमळ, सुगावा, खूण, अवशिष्ट अंश (लक्षणा). Smell or odour, smack, trace.

[सं. **वास ;** हिं. बं. **बास ;** गु. **बास** (स्त्री); सिं. **बासु ;** मराठींत नुसत्या **'वास'** शब्दाचा अर्थ **घाण** असाहि आहे.]

वासना स्त्री. मनाचा कल, प्रवृत्ति, इच्छा. Disposition, inclination of mind, a desire.

[सं. **वस्** (?), **वाच्छ्** १ इच्छायाम्.]

वासरूं न. गाईचें वत्स, पाडें. A calf.

[सं. **वत्सरूपम्** (रूप प्रशंसार्थे,–पाणिनि ५-३-६६); प्रा. **वच्छरूअँ ;** पं. **बच्छ ;** सिं. **वछ ;** हिं. **बाछा, बछा, वछ ;** गु. जुनें रूप–**वाछरूव, वाछरूं, बाछरडूं ;** बं. **छाछुर ;** ओ. **बाछुरी. कामरूप > कामरूं ; गोरूप > गोरुं, गोरूआ, गोरा** हे शब्द ताडून पहा.]

वासलात स्त्री. निकाल, शेवट, वसूल, जमा. Revenue, received issue, result.

[अर. **वासिलात्.**]

वासा, वांसा पुं. बांबू, वेळू, घराच्या छपरांत घालावयाचा सोट, आडवें लाकूड. A rafter, a pole.

[सं. **वंश ;** पं. **वंझ ;** सिं. **वसु ;** हिं. बं. **बांस ;** सिंह. **वस् ;** गु. **वांस, वंसडो.**]

वास्तपुस्त स्त्री. चौकशी, विचारणा. Anxious inquiry, inquiry about.

[फा. **बाझ + पुर्स.** दोन्ही शब्द एकत्रित वापरतात.]

वास्तव वि. प्रत्यक्ष, खरोखरीचें, भरींव. Real, actual, true.

[सं. **वस्तु > वास्तव;** अकामसा. **वास्तविक** (खरोखर, यथार्थ).]

वास्तु पुं. राहण्याचें ठिकाण, घर. वास पहा. A house or habitation.

^{1}**वाह(णें)** अक्रि. झरणें, जाणें, सरणें, हलणें. To flow, to ooze, to let flow.

[सं. **वह्;** पा. **वह;** प्रा. **वह;** कु. **बहणो;** बं. **बहा;** ओ. **बोहिबा;** हिं. **बहना;** पं. **बहिणा, वहिणा;** लां. **वाहण;** सिं. **वहाणु;** गु. **वहेवूँ.** पूर्वेकडील भाषांत 'ब' व पश्चिमेकडील भाषांत 'व' होतो. अकामसा. **वाहणें** (णिच्), **वाही** = ओध.]

^{2}**वाह(णें)** सक्रि. जमीन पेरणें,–कसणें, मशागत करणें. To sow, to till.

[सं. **वह्** १ प्रापणे, २ **वप्** १ बीजसंताने ; अकामसा. **वाहीवा** (शेताची लागवड),–**वाहील** (मशागत), **बाहुदार** (जमीन कसणारा), **वाहो, वाहोळ.**]

^{3}**वाह(णें)** अक्रि. नेणें, भार सहन करणें. To lead, to carry, to convey.

[*IE.* Uegh; सं. १ वह् १ प्रापणे ; *Av.* vazaiti ; *Lat.* veho ; *Got.* gawigan : *Slav.* veza ; *Lith.* vezu.]

^{4}**वाह(णें)** सक्रि. हलणें. To blow, to move.

[*IE.* Uai, ui ; सं. **वा** १ गतौ ; *Lith.* Vajes : *Lat.* Vajs ; *Lett.* Vals]

^{5}**वाह(णें)** सक्रि. देणें, देवाला फुलें वाहणें. To offer.

[सं. **हू** ३ प्रीणने > **हावय > वाह.** सं. **वाह्** १ प्रयत्ने.]

वाहणा स्त्री. पायताण. A pair of sandals.

[सं. **उपानहौ** (स्त्री); प्रा. **वाणहा, पाणहा, वाहणा** (स्त्री.), **उवाणहो.** संस्कृत शब्दाचें मूळ लिंगहि मराठी शब्दांत कायम राहिलें. **वहाणा** पहा.]

वाहर स्त्री. पीडा, बाधा, दुःख. Trouble, misery.

[सं. **अपा + हृ > अपाहर् > अवाहर;** याकाम. **वाहर** (शा.).]

वाहवट स्त्री. प्रवाह, ओघ, पात्र, मार्ग. Stream, current.

[सं. वह्+वृत्, > वाहवर्ती > वाहवट.]

वाह्वा अ. स्त्री. शाबास, भले, शाबासकी, स्तुति, प्रशंसा. An interjection of admiration, bravo, excellent !

[फा. वाह्वाह्.]

वाहळी स्त्री. ओढा. Streamlet, current.

[सं. वह्, वाह: + ल (?); देप्रा. वहोलो, वाहली, विरओ वर्षोऽपिलघुजलप्रवाहवाचका: (२५०-५); गु. वेहडो, वहडो; सिं. वाहरू = कालवा; सिंह. वहल. अकाम. वाही = ओघ, प्रवाह, ओढा.]

वाह्यात वि. व्रात्य, खोडकर, अतिमर्याद. Mischievous, libertine.

[अर. वाहियात्.]

^{1}वाळ न. पुच्छ, शेंपूट, शेंपटीचे केंस. वाळा पहा. A tail, a bunch of hair.

^{2}वाळ स्त्री. बहिष्कार, जातिभ्रष्टता. Ejection from caste.

[सं. वृ-वारय > वाळ; २ वै (णिच्) वालय > वाळव, ३ व्याव + कल् (रा.)]

वाळ(णें) अक्रि. सुकणें, रोडणें, ओलेंपणा नाहींसा होणें. To dry, to lose wetness.

[सं. १ वा २ गतौ (वालय), २ वै १ शोषणे (वालय), ३ वृ (णिच्) (वारय-वाल्).]

वाळवंट न. वाळूचें रण,-मैदान. वाळू पहा. A sandy beach or plain.

वाळवी स्त्री. लांकूड खाणारा कीटक, कीटकविशेष. White ant.

[सं. वाल्मिक.]

^{1}वाळा पुं. हातापायांतील डागिना. A sort of bracelet or anklet.

[सं. वल्, बालक: ; प्रा. वालेइ ; कु. बालो ; बं. बाला ; बि. बारी ; हिं. बाला ; पं. बाला, वाली ; लां. वाळा ; सिं. बालो ; गु. वाळो, वाळी.]

^{2}वाळा पुं. केंस. Hair.

[सं. वाल: (शेंपटाचे केस); पा. वालो ; देप्रा. वालप्प (शेंपूट); का. वाल ; कु बाल्; अ. बाल (योनीवरील केंस); बं. बाल ; सिं. वारु ; ओ. बाल ; हिं. बाल् ; पं. बाल्.]

^{3}वाळा पुं. वनस्पतिविशेष (सुगंधी), खस. A grass of which roots are fragrant.

[सं. वाल, वह्लूर ; बं. बाला ; गु. वाळो ; सिं. वारो; हिं. वाला; गु. वालो. वाळा पहा.

वाळू स्त्री. रेती, रज. Sand, gravel.

[सं. वालुका ; पा. वालुका, वालिका ; प्रा. वालुआ ; कु. बाल्ह, बालुवा ; आ. बं. बालि ; ओ. बालि ; हिं. बाल्ह ; पं. बाळू ; सिं. वारी ; गु. वालु ; अकामसा. वाळवंट.]

वाळूक न. थोरली कांकडी. A sort of melon or cucumber.

[सं. वालुङ्क (उत्तरकालीन); प्रा. वालुंक, वालुंकी, वालुक्की.]

वि उप. भिन्नत्व, प्रकार, विरोध इत्यादि अर्थद्योतक उपसर्ग.

[*IE.* Ui; सं. वि ; *Av.* Vi ; *Gr.* vi ; *Lat.* Vi ; *Oslav.* vi ; *Got.* withira, widher ; *As.* widh. सं. वि = विशेष, विगत, विविध, विरोध, विकृत ; प्रा. वि. ; अकाम. वि, वि (तद्भवरूप).]

वि(णें) सक्रि. जन्म देणें, प्रसूत होणें. To bear, to give birth.

[सं. विजायते, √ विजन्, √ वी २ प्रजने ; पा. विजायति ; प्रा. विआअई ; कु. ब्याणो; आ. बियान् ; सं. बिया, ; ओ. ब्याणो ; अ. हिं. ब्याना ; लां. विआवण ; सिं. विआमु.]

विक(णें) सक्रि. पैसे घेऊन देणें. To sell.

[सं. विक्रीयते ; पा. विक्के(तुम्); प्रा. विक्केइ, विक्कणय (सविकरण), विक्कइ ; सं. बिका ; ओ. बिकिबा ; हिं. बिकना ; पं. बिकणा ; लां. विकण् ; सिं. विकणु ; अकाम. विक्री (सं. विक्रीतम्, विक्रय:, प्रा. विक्कअ ; ओ. बिका ; पलां. विका), विकाऊ, विकरा, विकताऊ ; म. केणें पहा.]

विकट वि. मोठें भयंकर, छिन्न, कुरूप. Formidable, terrible, frightful, hideous.

[सं. विकट. ' अकटोश्च विकटोशान ' असा एक प्रयोग ' अर्धवट, अपुरें ज्ञान ' ह्या अर्थी रूढ आहे. ह्यांतील 'विकट' हा शब्द 'लंबोदरश्च विकटो' ह्या मंत्रार्धांशीं जोडतात

व एका भटजीसंबंधीं कल्पितकथेंशीं त्याचा संबंध लावतात. त्याऐवजीं वरील **विकट** शब्दाशीं जोडणें हें अधिक समंजस होईलसें वाटतें.]

विकर(णें) उक्रि. विखरणें पहा, अस्ताव्यस्त पसरून टाकणें. To scatter.

विकल्प पुं. भेद, विरोध, संशय, कुतर्क, भ्रम. Opposition, an alternative doubt.
[सं. **विकल्प, √ वि + √ क्लृप्.**]

विकस(णें) अक्रि. उमलणें, उकलणें, फुलणें. To open, to expand.
[सं. **वि + कस्** १ वृद्धौ.]

विकळ वि. असमर्थ, दुःखित, गलितगात्र, अस्ताव्यस्त, निस्तेज. Infirm.
[सं. **विकल, वि + √ कल्** १० गतौ, किंवा **√ क्लृ** १ गतौ.]

विकृति स्त्री. आजार, बिघाड, राग, शंका तिटकारा. A change from the healthy state, modification.
[सं. **वि + कृ**; संसा. **विकार, विकारी, विकृत.**]

विकोप पुं. संताप, राग, अनर्थ, वाईट शेवट. Anger, extreme condition, fit of passion.
[सं. **वि + कुप्** ४ क्रोधने.]

विक्राळ वि. भयंकर, भयावह Frightful.
[सं. **विकराल.**]

विख, वीख न. विष, जहर. Poison.
[सं. **विष**; प्रा. **विस**; पं. **विह, विस**; सिं. **विहु, विखु**; गु. **विख**; हि. **बिस**; हिं. सं. **बिख**; का. **वेह**; अकामसा. **विखार, विखारी, विखारूं, विरूख.** ह्या शब्दाच्या बाबतींत निरनिराळ्या भाषांतील वर्णप्रक्रिया चिन्त्य आहे. **'ष्'** बद्दल मरा. गु. पं. सिं. हिं. वं. ह्या भाषांत **'ख्'** होतो, तर सि. पं. का. सिंह. भाषांत ह् होतो, तर पं. हिं. सिंह. ह्या भाषांत **'स्'** होतो. आद्य **व** बद्दल कांहीं भाषांत **'व'** तर इतर कांहीं भाषांत **'ब'** असा फरक होतो.]

विखर(णें) क्रि. अस्ताव्यस्त पसरणें. To scatter.
[*IE.* Qer, Ker; सं. कॄ ('शॄ' चें एक रूप); *Lat.* Cer, Cire; *Lith*; Kloju. सं. **विकिरति** (विष्किरति); प्रा. **विक्खरइ, विक्किरइ**; पं. **विखउणा**; हिं. **विखरना; बिखेरना**; सिं. **बिखिराइणु**; = निराळें करणें, विभागणें; **बिखिरु** = भाग; गु. **विखेरवूँ**; याकाम. **विखरणें, विखुरणें** (ज्ञा. १४-१४३), = क्षोभणें.]

बिघड(णें) अक्रि. नासणें, फोडून तुकडे करणें. To demolish, to destroy.
[सं. **वि + घट्** १ चलने, चेष्टायाम्; २ **विकृत**; पा. **विकट**; प्रा. **विगड**: याकाम. **बिघडणें** बिघाड. (ज्ञा. १८-७८५), **बिघड** (भाग, अवयव, तुकडा).]

विघ(घु)र(णें) अक्रि. द्रवणें, विरघळणें, वितळणें. To melt, to dissolve.
[सं. **वि + घृ** १० क्षरणे; याकाम. **विघरणें** (ज्ञा. १८-२८६).]

चांदणेयाचा पडिभरुं । जातयां सोमकांताचा डोंगरू ॥
विघरोनि सरोवरु । हों पाहे जैसा ॥ ज्ञा. १८-२८६.

विघ्न न. अडचण, संकट, आपत्ति. An obstacle, an impediment.
[सं. **वि + हन्.**]

विचक(णें) क्रि. निरखणें, पसरून पाहणें, फांकणें. To open or part widely, to expand.
[सं. **विष्क्** १ हिंसायाम्; **वि + कित्** (**+ चक्ष्, अंच्, कच्** (रा.); अकामसा. **विचका** (**विचिकित्सा**- परंतु लिंगविपरिणमन झालें आहे.) = बिघाड, नासाडी, घोटाळा, अव्यवस्था.]

विचकट(णें) क्रि. ओढणें, फाडणें, इकडें तिकडें फेंकणें. To tear and pull asunder, to toss or stir about.
[सं. **विष्क-विष्कट-विसकट.**]

विसकट वि. बीभत्स. अश्लील, वेडें वांकडें. Obscene.
[सं. **विष्क्** १ हिंसायाम्, **वि + कत्थ्** (अभ्यास) **विचकत्थ > विचकट.** अचकट शब्दाचा सहचारी.]

विचकु(खु)र(णें) सक्रि. ओरखडणें, नखानें फाडणें. To claw or pinch.
[सं. **वि + स् + कॄ** ९ हिंसायाम्; अकाम. **विचकोरा** = ओरखडा.]

विचंब(णें) अक्रि. श्रमणें, त्रासणें, कष्ट पडणें, खोळंबणें. To be tired or exhausted, to wait.
[सं. १ **विश्रम**, २ **विस्मय्**; याकाम. **विचंब** (ज्ञा. ६-४९); अकाम. **विचंबु** (**विस्मयः, विश्रामः**).]

विचर(णें) क्रि. भटकणें, फिरणें, हिंडणें. To play or move about.
[सं. वि + चर् ; याकाम. विचरे (ज्ञा.)]

विचळ(णें) क्रि. भ्रमणें, बावचळणें, मोडणें. To behave foolishly, to break.
[सं. वि + चल् १ गतौ ; याकाम. विचळणें = मोडणें (ज्ञा. १३–१६).]

विचक्षण वि. शहाणा, चिकित्सक, ज्ञाता. Proficient, knowing.
[सं. वि + चक्ष् ; याकाम. **विचक्षण** (ज्ञा. १७·३०९).]

विचार(णें) सक्रि. प्रश्न करणें, परामर्श घेणें. To ask, to inquire after.
[सं. वि + चर्, वि + श्रु–(णिच्) विश्रावय (रा.); अकामसा. **विचार** (चिंतन, चर्चा, मनन),-**विचारणा** (चौकशी), **विचारपूस** (वास्तपूस्त, < **विचर्** + पृच्छ्).]

विचित्र वि. आश्चर्ययुक्त, चमत्कारिक, वेगळें. Wonderful, surprising, various.
[सं. वि + चित्र ; याकाम. **विचित्रता** (ज्ञा. १८·५३९).]

विचुक वि. अ. असंबद्ध, बोबडें. Wild, incoherent.
[सं. वि + चुक्क्, वि + कूह् = विस्मापने (रा.), वि + शूर = स्तंभने.]

विच्छाय वि. पांढरें फटफटित, फिक्कट. White, pale.
[सं. वि (विगता, विशेमा) + च्छाया.]

विच्छिन्न वि. तुटलेलें, चुराडा झालेलें. Broken, chopped, crushed.
[सं. वि + छिन्न, √छिद्.]

विज(णें) अक्रि. लोप होणें, शांत होणें. To be extinguished.
[सं. **विध्यै** ; प्रा. **विज्झ** ; अकामसा. '**विजविणें**' (सं. **विध्यापय** ; प्रा. **विज्झव** ; किंवा सं. **विक्षामम्** (कोळसा) –**क्षायति**-ज्वलने. बं. **बुजा** ; ओ. **बुजिबा** ; हिं. **बुझना** ; सिं. **उझाणु** ; गु. **बुझावूँ**. (सं. **बृह्यते**, **बृहति**); **उज्झ** (?) ; पा. **विज्झायति** ; प्रा. **विज्झाइ** , **विज्झावइ**.]

¹विजना वि. कृश, बारीक. Thin, slender.
[सं. **विज्** ६ चलने.]

²विजना पुं. पंखा. A fan.
[सं. **वीजन**, **व्यंजन** ; हिं. **बिजना**, **बेना** ; सिंह. **विदिनि** ; गु. **विंजणो** ; सिं. **विजणु** ; म. **विंजणें** = वारा घालणें ; याकाम. **विजणा** (ज्ञा. ९–१०). अर्वाचीन बोलींतील रूपांवरून संस्कृत मूळ रूपें दोन असावींत असें वाटतें. एक **वीजन** व दुसरें **व्यंजन**. पहिलें म. हिं. सिंह. मध्यें व दुसरें गु. म. सिं. मध्यें उतरलें.]

विजली स्त्री. वीज, विजेची चमक. The lightening.
[सं. **विद्युल्लता** ; प्रा. **विज्जलिया**, **विज्जुल्लआ**,–**ल्लया**, **विज्जुला**, **विज्जुलिआ**, **विज्जुली** ; अकाम. **विजु**, **वीज**, **विजली**.]

विजवटा वि. व्रात्य, खोडकर, दुर्वर्तनी, दिवटा. Mischievious, wayward.
[सं. **विद्योतिन्**, **वि + द्युत् + वर्ति**. 'दिवटा' ह्या शब्दाशीं अर्थसाम्य असल्यावरून त्यांच्या व्युत्पत्तिसाम्याची कल्पना येते. ह्याची युत्पत्ति '**विद्यावत्**', '**विजयवर्तिक**' अशी दिली आहे. परंतु वरील पहिली अधिक ग्राह्य वाटते.]

विजोड वि. विसंगत, विशोभित. Dissimilar.
[सं. **वि + युट्**, **जुट्** १ बंधने.]

¹विझ(णें) अक्रि. मालवणें, शांत होणें. To be extinguished.
[सं. **विक्षिणाति**, **वि + शम्** ; सिं. **उझणु** ; गु. **विसामवूँ** ; गुजराती क्रियापदाच्या रूपावरून ही '**विशम्**' व्युत्पत्ति उपोब्दलित होते. णिच्रूप–**विझविणें** (<**विशामय**). **विजणें** पहा.]

²विझणें अक्रि. भोंक पडणें. To bore. to pierce.
[सं. **विध्** ४ व्यधने (सविकरण), **विध्य** > **विझ**.]

विंचर(णें) सक्रि. फणीनें केस मोकळे करणें. To comb.
[सं. **वि + चृत्** १ ग्रंथने ; अकामसा. **विंचरणी** (**विचर्तनी** = फणी).]

विंचू पुं. प्राणिविशेष (विषारी). A scorpion.
[सं. **वृश्चिक** , पा. **विच्छिको** ; प्रा. **विच्छिअ**, **विच्छुअ** , **विंचिअ** , **विंचुअ** ; देप्रा. **विंचुअ** ; का. **बिची**, आ. **बिसा** ; बं. ओ. **बिछा** ; हिं. **बिचू**, **विच्छी** , **बिच्छु** ; सिं. **विछु** ; गु. **बिंछी**, **वीछु**, **वीछी**.]

विंज(णें) क्रि. पंख्यानें वारा घालणं. To fan.
[सं. **व्यंजन** (नाधा.); प्रा. **विंजग**; गु. **विजगो**. **विजणा,-ना** पहा.]

विट(णें) अक्रि. वाईट होणें, सडणें, नासणें. To tarnish, to soil, to lose freshness.
[सं. **विट्** (**विण्ट्**) १ क्षये, (कर्मणि–विट्य) २ व्यथ् ४ हिंसायाम्, ' **विष्ठा** ' ह्या शब्दाशीं संबंध आहे कां ? **विट्** = घाण (नाधा.); अकामसा. **विटकें** (नासलेलें), **विटविणें** (वेडावणें), **विटविट**, **विटाविट** (< **द्विट्**. द्वेष–बिघाड, नाश).]

विटकर,-कूर न. विटेचा तुकडा. **वीट** पहा. Brickdust.

विटंब(णें) क्रि. उपहास,–थट्टा करणें. विडंबन पहा. To expose, to ridicule.

विटाळ(णें) क्रि. अशुद्ध करणें, अपवित्र करणें. To defile, to pollute.
[सं. १ **विष्ठा**; प्रा. **विट्ठा**; प्रा. **विट्ठाल**; देप्रा. **विट्टाल**, २ **वि+ट्वल्**, > **विट्टल** (तया विट्वालिताः तिलाः). संस्कृतीकरण नंतरचें असावें असा संशय येतो; अकामसा. **विटाळ** (अपवित्रता, स्त्रियांचा विटाळ), **विटाळशी** (रजस्वला स्त्री).]

विटाळ पुं. अशुद्धता, अस्पृश्यता, अमांगल्य. Impurity, pollution, menstrual discharge.
[सं **विष्ठा**, **विट्क**, ✓ **विश्**, (विट्टल, विट्टल्ल, विट्टल्य.) गु. **वट्लो**; प्रा. **विट्टालिय**; अप. **विट्टाल्ल**; बं. **बिटाल**; सिं. **विटारणु**; हिं. **बिटालना**; अकामसा. **विटाळशी**.]

विटाळें न. विटा पाडण्याचा लांकडी सांचा. **वीट** पहा. A mould of bricks.

विठ्ठल पुं. पंढरपूरक्षेत्रांतील एक देवता, वारकरी भक्तिसंप्रदायाचें मुख्य दैवत. The god Vitthal.
[सं. **विष्णु** (?), **वित्** (=ज्ञान) + **ठ** (=शून्य) + **ल**; कान. **विट्टु**, **बिट्ट+र** (**र** कान. प्रत्यय). प्रिझुलस्की ह्याच्या मतें ही देवता मूळ द्राविडी असून **विठु** हें नांव आस्ट्रोएशियाटिक आहे. ' **विष्णु** ' ह्या शब्दाचा आस्ट्रोएशियाटिक अपभ्रंश ' **विठु** ' असा झाला व पुढें 'ल' हा आदरार्थे प्रत्यय लागला. राजवाडे ह्यांची व्युत्पत्ति **विष्ठा** पासून देतात ती मान्य होण्यासारखी नाहीं. ह्या शब्दाच्या संभाव्य व्युत्पत्ति वर दिल्या. परंतु कोणतीहि समाधानकारक वाटत नाहीं ! ' **विष्णु** ' आणि ' **विठु** ' हे दोन मूळ भिन्न, परंतु पुढें परस्परसंबद्ध किंवा एकापासून दुसरा निघाला असें समजूं लागले. **विष्णुपासून** **विट्टू** निघणें स्वरप्रक्रियेच्या दृष्टीनें अशक्य वाटतें. **विष्णुद्वीप** शब्द '**बेठदीप**' शब्दाशीं संबद्ध असल्याचें एका शिलालेखावरून सिद्ध होतें. तसेंच '**बिट्ट**' हें व्यक्तिनाम '**विष्णु**'शीं संबद्ध असल्याचें दिसतें. परंतु हे दाखले व्युत्पत्तीच्या बाबत निर्णायक नाहींत. उलटें संस्कृतीकरण दर्शवितात. आस्ट्रोएशियाटिक म्हणावा तर विष्णु देवतेशीं त्याचें ऐक्य कसें झालें ? शिवाय हा **कर्नाटक**-महाराष्ट्रांत रूढ असलेल्या भक्तिसंप्रदायांत कसा निविष्ट झाला ? **कानडावो विठ्ठल** ह्या प्रयोगाचा व्युत्पत्तीस कांहीं उपयोग होईल काय ?]

विडंबन न. उपहास, फजीती, टवाळी. Mocking, ridiculing.
[सं. **विडंब्**; प्रा. **विडंब**; अकाम. **विडंब** (डौल, थाट, ठेवण.]

विडा पुं. तांबूल, पानपट्टी. A roll of betel-leaf.
[सं. **वीटकः**; प्रा. **बीडग**, **वीडिआ**; का. **बीर**; बं. **बिडा**; ओ. **बिरा**; हिं. **बीरा**; सिं. **बिडो**; अकामसा. **विडी** (सं. **विटिका**; हिं. **बीरी**.]

विडूळ(णें) क्रि. नासणें, थलथलीत होणें, मिश्रणानें नासणें. To get or become vapid.
[सं. १ **विड्वल्** १ मिश्रणे; २ **विट्** = घाण; अकामसा. **विडोळ**, **विढूळ**, **बिढोळ**, **विढोळणें**.]

विण(णें) सक्रि. सुतें एकमेकांत गुंतविणें. To weave.
[सं. **उनाति**, **ऊत**, **ऊयते**; प्रा. **वुणण**; का. **वोनूँ**; कु. **बुण्णो**; वं. **बुना**; ओ. **बुणिबा**; हिं. **बुन्ना**; पं. **बुण्ना**. सं. **वायति**; पा. **वीनाति**; प्रा. **विणण**; हिं **बिनूना**; पं. **बिण्णा**; गुं. **वणवूँ**.]

विणुढ(णें) क्रि. रुजणें, अंकुरणें. To sprout.
[सं. **वि+रुह्** (निष्ठा–**विमूढ**) (नाधा).]

विणें, विण अ. खेरीज बिना. Without, except.
[सं. **विना**; हिं. **बिन**, **बिना**; वं. **बिणा**; सिंह. **विना**; सिं. **बिनु**, **बिना**; गु. **विण**, **विना**; रुमा. **बीअन**.]

वित(णें) क्रि. होणें, घडणें, वर्तणें, तापून पातळ होणें. To happen, to melt.
[सं. **१ वृत्, २ वि + तप्.**]

वितंड वि. मोठें, विशाळ, प्रचंड. Large, big.

^{1}**वितंड(णें)** क्रि. निष्फळ भांडणें, काथ्याकूट करणें. To quarrel or dispute aimlessly.
[सं. **वितण्डा** = जल्प.]

^{2}**वितंड(णें)** वेगवेगळें करणें. To separate.
[सं. **वि + तड्, तण्ड्.**]

वितर(णें) सक्रि. देणें, प्रसन्न होऊन बहाल करणें. To present, to award.
[सं. **वि + तृ.**]

वितर्क(णें) क्रि. सांगोपांग विचार करणें. To discuss largely or freely.
[सं. **वितर्क**–भाषार्थः (नाधा.).]

वितवित(णें) अक्रि. चरफडणें, रागावणें. To storm and stamp.
[सं. **व्यथ्**–४ हिंसायाम्–(द्विरुक्ति).]

वितळ(णें), वितुळ(णें) क्रि. विरघळणें, द्रवणें. To melt, to dissolve.
[सं. **वि + अति + ली** १ द्रवीकरणे. धातूच्या रूपाकडे व अर्थाकडे पाहिलें तर '**ली**' धातु हा मूळ असलाच पाहिजे असें वाटतें. "**वि + ताल्**" ही श.को.ची व्युत्पत्ति अशास्त्रीय आहे.]

वितुटणी स्त्री. ताटातूट, वियोग, फाटाफूट. Separation.
[सं. **वि + त्रुट्.**]

वित्त न. संपत्ति, द्रव्य. Wealth, money.
[सं. **विद्** २ प्रापणे.]

विथर(णें) अक्रि. अस्ताव्यस्त होणें, अनिर्बंध वागणें, मार्ग सोडून जाणें. To turn aside and walk deviously.

विथर पुं. पांगापांग, पडीक घर. Irregular separation, demolished house.
[सं. **वि + स्सर्** १ छद्मगतौ, **विस्तर, विस्तार** ; प्रा. **वित्थरइ** (?); सिं. **विथीरो** = दूरचा ; हिं. **बिथारना** ; का. **वथरावुन्** = पसरणें, **वतुर** = पाणी वाढणें, **वितर** = रुंदी.]

विदगुड(णें) क्रि. लचकणें, मारांत निखळणें. To sprain or strain.
[सं. **व्यथ् + घुड्** १ प्रतिघाते (द्विधातुसंयोग); अक्रामप्रां. **विदगुड.**]

विदविद(णें) अक्रि. रागानें बडबडणें, चरफडणें, मऊ, विलविलित होणें. To storm and stamp, to chafe, to become soft.
[सं. **१ व्यथ्** ४ हिंसायाम् (द्विरुक्त), **२ विद्** १० अवयवे. दोन्ही अर्थ परस्परविरुद्ध असे आहेत. **वितवितणें** असेंहि एकरूप आहे.]

विदळ(णें) सक्रि. नाश करणें, मारणें. To soil, strike.
[सं. **विदलनम्, विदारणम्** ; याकाम. **विदळ** (ज्ञा. १३·१००९); अकाम. **विदळ** (हिणकस).]

विदार(णें) सक्रि. फाडणें, तोडणें, मोडणें, विध्वंसणें. To tear, to rend.
[*IE.* Der, Dr; सं. **दृ** ९ अवयवे ; *Av.* dar ; *Lat.* dor ; *Gr.* der ; *Lith.* derli ; *Slav.* deivo ; *Russ.* drova.]

विदूषक पुं. नाटकांतील एक विनोदी पात्र. The humourous character in a play, the buffoon.
[सं. **विदूषक, √ दूष्.**]

विदूस(णें) क्रि. तोडणें, फ़ोडणें, खराब करणें. To break, to soil.
[सं. **वि + ध्वंस्** १ नाशने.]

विद्यमान वि. हयात असलेला. Living, present.
[सं. **विद्** – विद्यमान.]

विद्या स्त्री ज्ञान. Knowledge, learning.
[*IE.* Ueid ; सं. **विद्या , √ विद्** ; *Av.* Vid ; *Lat.* Vedis ; *Lith.* Veizdmi]

विघड(णें) अक्रि. बिघडणें, नासणें. To spoil, to soil.
[सं. **विध्वस्त,** किंवा **विघट**]

विधर(णें) क्रि. छिन्नभिन्न होणें, घायाळ होणें. To be crushed, to be injured.
[सं. **वि + ध्वर्**–हिंसायाम्.]

विधवा स्त्री. गतधवा स्त्री. A widow.

[सं. **विधवा**; प्रा. **विहवा**, **विधवा**; याकामसा. (अ)हेव, (अ)हेवपण, (अ)हेवदोरु. संस्कृत व्याकरणकार **वि+धव** असे दोन शब्द निराळे तोडतात व त्याच्या जोडीला **अधव** व **सधव** हे दोन शब्द देतात. हीच व्युत्पत्ति Pott ह्यानें व सेंट पीटर्सबर्ग कोशानें मान्य केली आहे. स्कीट व इतर कांहीं विद्वान ह्याचा संबंध **विध** < **विध्** < **वि+धा** ह्या धातूशीं जोडतात, व त्याला **सोडलेली**, **त्यक्त** असा विशेषणात्मक अर्थ देतात. संस्कृत व्याकरणकारांची व्युत्पत्ति मान्य केली तर **विधवा** हा शब्द इतर युरोपीय आर्य भाषांतील शब्दांपासून अलग होतो असें त्यांचें म्हणणें आहे. खरें मत म्हणजे **विधवा** हा शब्द **वि+धव** ह्याशीं संबद्ध आहे. **धव** हा शब्द **धा** ह्या धातूशीं संबद्ध आहे. मूळ शब्द **धा**, त्यापासून **धव**, त्यापासून **विधवा**, अशी ही सांखळी लागते. ताडून पहाण्यासाठीं इतर आर्य भाषांतील शब्द पुढें दिले आहेत. *Av.* Vidhava; *Lat.* Viduus, vidua; *Ofr.* Vedve, veuve; *Oslav.* Vidova; *Russ.* Vdova; *Goth.* widuwe. *OGH.* Witawa; *As.* widuwe; *Wel.* Gweddw.]

विधवार स्त्री. नाश, फडशा, उधळपट्टी. Loss, destruction, squandering.

[सं. **वि+ध्वर्** १ हिंसायाम् ‘**विविध+वाट**’ अशी व्युत्पत्ति मोल्स्वर्थनें दिली आहे.]

विधान न. स्थापना, आज्ञा, नियम, विधि. Placing, fixing a rule, a canon.

[सं. **वि+धा+न**; याकाम. **विधान** = शास्त्राची आज्ञा (ज्ञा. १५-१७८).]

विधुर पुं. ज्याची पत्नी मृत आहे असा पुरुष. A widower.

[सं. **वि+धुर**, √ ध्वर् (?). हा स्वतंत्र शब्द आहे. ‘**विधवा**’ शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. विधवा पहा.]

विधुळ(णें) अक्रि. धुळीस मिळणें, नाश पावणें. To be reduced to dust, to be destroyed.

[सं. १ **वि+धूलन**, २ **वि+ध्वृ** १ हिंसायाम्; याकाम. **विधुळणें** (ज्ञा. १७-७); अकामसा. **विधुळणी** (धूळधाण, नाश).]

विधेय न. सांगितलेली गोष्ट, कर्तव्य. That is to be observed, a thing laid down, a duty.

[सं. **वि+धा**.]

विध्वंस पुं. नाश, मोडतोड, स्फोट. Loss, destruction.

[सं. **वि+ध्वंस्** १ नाशने.]

विनट(णें) अक्रि. तल्लीन होणें, रमणें. To revel to dance, to play.

[सं. १ **वि+नत** (निष्ठारूप, √नम्), २ **वि+नट्**; याकाम. **विनटणें** (ज्ञा. १२–१८१); **विनटु** = खेळगडी (ज्ञा. १४-११४); अकाम. **विनट** (प्रीति, आवड).]

विनंती स्त्री. विज्ञप्ति, निवेदन, प्रार्थना. Supplication, entreaty.

[सं. **विज्ञप्तिः**; पा. **विण्णत्ति**; प्रा. **विण्णत्ति**; पं. **बिन्ती**, **बेण्ती**; सिं. **विनती**; गु. **विनति**, **विनाति**; ने. **बिन्ति**; याकाम. **विनति** (ज्ञा. १८-८६). ह्या शब्दामध्यें टर्नरनें सं. **विनति** आणि **विज्ञप्ति** ह्या दोन शब्दांचा घोंटाळा केला आहे- ‘**विनति**’पासून मराठी विनति व ‘**विज्ञप्ति**’पासून मराठी ‘**विनंती**’ हा आला आहे.]

विनव(णें) क्रि. प्रार्थना करणें, आर्जव करणें. To supplicate, to implore.

[सं. **वि+ज्ञप्**; प्रा. **विण्णव**; गुं. **विनवूँ**; अकाम. **विनय** (नम्रता), **विनवणी** (सं. **विज्ञापना**; प्रा. **विण्णवणा**, **विन्नवणा**).]

विना अ. वांचून, शिवाय, खेरीज. Without.

[सं. **विना**.]

विनाश पुं. नाश, विध्वंस, नायनाट. Extinction, destruction.

[सं. **वि+नश्**.]

विनियुक्त वि. नेमलेला, योजिलेला. Appointed.

[सं. **वि+नि+युज्**, (निष्ठा) **युक्त**.]

विनीत वि. नम्र, लीन, चांगला शिकलेला. Humble, lowly, meek, trained.

[सं. **वि+नी**.]

विनोद पुं. आनंद, थट्टा, गंमत. Sport, joy, jesting.

[*IE.* Neud; सं. **वि+नुद्**; *OE.* Niutan; *Nhg.* Nutzen; *As.* Neotan; *Lith.* Nauda; *Slav.* Nuta; *Eng.* Neat.]

विंदाण न. कौशल्य, कारागिरी, कारस्थान, निग्रह, वेध, लक्ष. Skill, cleverness, craftiness.

[**सं. व्यधू**. ह्यांतील ‘ वि ’ वरील अनुनासिकाची उपपत्ति नीट लागत नाहीं. म्हणून **विज्ञान** पासून व्युत्पादणें अधिक शास्त्रीय होय. याकाम. **विंदाण** (ज्ञा. ७-२१).]

हें अवघें मायेचें विंदाण । ए. भा. ३-१०५.

विंध(णें) क्रि. आंत घालणें, भेद करणें. To pierce, to bore.

[सं. **विध्य**; पा. **विज्झ**; प्रा. **विज्झ, वेहइ, विंधइ**; बं. **बिंधा**; हिं. **विंधना, बेधना** (वेधयति); पं. **विन्न्हणा**; सिं. **विन्धणु**; गु. **विंधवूँ**. अनुनासिक एका प्राकृत रूपांत-**विंधइ**’मध्यें आढळतो. मूळ संस्कृत धातु विध् नसून दुसरा असावा. मराठी व इतर भाषांत **विंधें** व **वेजें** अशीं दोन्हीं रूपें आढळतात. निरनुनासिक रूप ‘**विध्**’शीं संबद्ध आहे.]

विंधें न. छिद्र, भोंक, (मोत्याचें) वेजें. A bore, perforation.

[सं. **व्यध्, विध्, विंध, विध्य > वीज, वीधे > विधारी** (मोत्यास वेजें पाडणारा). विंधणें पहा ; गु. **विंधुं** = भोंक ; सिं. **विंध** ; हिं. **वेध, बींध** हीं रूपें ताडून पहाण्यासारखीं आहेत. ‘**व्यध्**’ धातुपासून निरनुनासिक रूपेंच फक्त व्युत्पादितां येतील. सानुनासिक रूपांचें संस्कृत मूळ दुसरें असलें पाहिजे.]

विन्मुख वि. पाठमोरा, निराश, रिक्त, फजित. Averted, adverse, having the face turned from.

[सं. ‘ **विमुख** ’ हा मूळ ; परंतु ह्यात ‘**न्**’ मध्यें आला आहे, तो “ **सन्मुख** ” ह्या शब्दघटनेच्या अनुरोधानें आला आहे. ‘**सन्मुख**’ हा शब्द ‘**सम्मुख**’ शब्दापासून आला आहे ; परंतु द्वित्त ‘**म्म**’ चा मराठी उच्चार ‘**न्म**’ असा जोरांत केल्यामुळें ‘ **सन्मुख** ’ अशी निष्पत्ति झाली.]

विपट न. वितुष्ट, तेढ, वैर. Disagreement, variance.

[सं. वि+पट्.]

विपन(णें) क्रि. शास्त्रदृष्टया पाहणें. To test according to scriptures.

[सं. **व्युत्पन्न** (निष्ठा), √ **व्युत्पद्**.]

विपरीत वि. उलट, विचित्र, उफराटें. Opposite, contrary.

[सं. **वि+परि+इ** =जाणें.]

विपर्यय पुं. विरोध, उलटसुलटपणा, फरक. Opposition, metathesis.

[सं. **विपर्यय**.]

विपर्यास पुं. विरोध, भलतेंपणा, फरक. Contrarity, change.

[सं. **विपर्यास**.]

विपक्ष पुं. उलट पक्ष, शत्रु, प्रतिस्पर्धी. An adversary.

[सं. **वि+पक्ष**.]

विपाओ पुं. (महानु.) उपाय पहा.

विपाइला वि. विरळा, क्वचित्. Scarce.

[सं. उग्राहित; प्रा. **उवाहिअ > उवाइ+ल**, विपाइल ; ग्रामीण मराठी ‘**वाइला**’, ‘**वायला**’ हा शब्द ह्याच शब्दापासून निघाला.]

विपार(णें) अक्रि. खोडकर होणें. To be playful or wayward.

[सं. वि+आ+पृ ३ पूरणे ; बं. गु. **विपरीत** ; अकाम. **विपारा** = हूड, हट्टी, आडमुठा, पायाळू.]

विप्लाव(णें) क्रि. प्रकट करणें. To lay bare or open.

[सं. **वि+प्लव**.]

विफळ वि. निष्फळ, व्यर्थ. Fruitless, vain.

[सं. **वि+फल** ; याकाम. **विफल** (ज्ञा. १७-३४९).]

विभक्ति स्त्री. अलगपणा, तुटकपणा, प्रत्यय. Portioned or divided state, an inflection.

[सं. **वि+भज्**.]

विभाग(णें) क्रि. वांटणें, हिस्से करणें. To divide, to part.

[सं. वि+भज् (णिच्) **भाजय–ज्=ग्** ; प्रा. **विभज, विभाग** ; अकाम. **विभाग, विभागीण, विभाजक इत्यादि**.]

विभां(भा)ड(णें) सक्रि. सांत्वन करणें, जिंकणें, पराभव करणें, फोडणें, छेदणें. To console, to defeat, to separate.

[सं. **वि+भंड्** १ परिभाषणे, (**भड्** १० कल्याणे); याकाम. **विभांडणें** (ज्ञा. १७-२९९).]

विभ्रम पुं. प्रमाद, चूक, गोंधळ. Error, confusion.

[सं. **वि+भ्रम्** ४ चलने.]

विमनस्क वि. खिन्न, निराश. Depressed, dejected.
[सं. **वि+मनस्+क.**]

विमळ वि. शुद्ध, स्वच्छ, निर्दोष. Pure, faultless.
[**सं. वि** (विगतः) **+मल.**]

विमा पुं. हमी, हप्ते भरून मिळणारा कायमचा सुरक्षितपणा. Security, insurance (of goods).
[फा. **बीमा** ; हिं. **बीमा.**]

वियोग पुं. ताटातूट, वेगळेंपणा. Separation.
[सं. **वि+युज्, वियोग.**]

¹विर(णें) अक्रि. विरघळणें. To melt, to dissolve.
[वैसं. **विरिणीते** ; सं. **विलियते** (?) ; **वि+री** ४ स्रवणे ; प्रा. **विरइ** ; गु. **वरवूँ** = दमून जाणें ; इतर भाषांत **बिलिनु** = वितळणें ह्या स्वरूपाचे शब्द झाले आहेत.]

²विर(णें) अक्रि. सुतें बाजूस सरून फाटणें. To become threadbare.
[सं **वि+ऋ** १ गतौ.]

विरघळ(णें) उक्रि. पातळ होणें, पाघळणें, द्रवणें, मिसळून एकरूप होणें, गळणें. To melt, to dissolve.
[सं. **वि+परि+घृ** १० प्रस्रवणे, (**वि+प्र+घृ**) किंवा **वि+प्र+ग्लै** (हर्षक्षये) (रा.).]

विरंगुळ(णें) क्रि. काम थांबविणें, रमणें, गमणें. To idle or dally at work.
[सं. १ **वि+परि+अख्** १ गतौ, **अंखिल, अंखुल** (ना), २ **वि+रम्+घुण्** १ भ्रमणे, (द्विधातुसंयोग) ; याकाम. **विरंगुळा** = आळस (ज्ञा. १५-४६६) ; अकाम. **विरंगुळा** (विसांवा, करमणूक, हरकत).]

विरच(णें) सक्रि. रचणें, जुळणें. To arrange, to set in order.
[सं. **वि+रच्** १० प्रतियत्ने.]

¹विरज(णें) अक्रि. दुधाचें दहिं होणें, विपरिणमन होणें. To coagulate.
[सं. **वि+रज्** १ रागे ; प्रा. **विरज्ज** ; अकामसा. **विरजण** (दहीं झालेलें दूध).]

²विरज(णें) अक्रि. शोभणें. To shine.
[सं. **वि+राज्** १ प्रकाशे ; याकाम. **विरजा** = मित्र, साह्यकर्ता (ज्ञा. १-११७).]

विरजीक, विरजे, विरज्या इ. इरजीक, इरजे, इरज्या इ. पहा.

विरढ(णें) अक्रि. उगवणें, अंकुरणें. To sprout.
[सं. **वि+रुह्**, (निष्ठा) **रूढ** (नाधा.)]

विरप(णें) उक्रि. तण काढणें, भांगलणें. To weed (a field).
[सं. **वि+रिफ्** ६ हिंसायाम् ; अकाम. **विरपणी** (भांगलणी).]

¹विरम(णें) अक्रि. थांबणें, थबकणें. To stop, to cease.
[सं. **वि+रम्.**]

²विरम(णें) अक्रि. वरमणें, ओशाळणें. To feel shy.
[सं. **वर्मन्** (नाधा.).]

विरंब(णें) क्रि. ओशाळणें, लाजणें, पचपचित होणें. To be downcast, to feel ashamed, to be savourless.
[सं. १ **वर्मन्** (नाधा.). २ **वि+लंब्** १ अवस्रसने (मान खालीं घालणें). विरम(णें) पहा.]

विरस(णें) अक्रि. निरुत्साह होणें, थिजणें. To be flat and depressed.
[**वि+रस** (नाधा.); अकाम. **विरस** (बेरंग, निरस).]

विरह पुं. वियोग, ताटातूट. Separation.
[सं. **वि+रह्.**]

विरळ वि. दुर्मीळ, दूरदूर अंतरावर असलेला. Rare, scarce, wide apart.
[सं. **विरल** ; प्रा. **विरल. विरल** हा संस्कृत शब्दहि '**विरद**' ह्या शब्दाचा अपभ्रंश आहे. तेव्हां **विरद** हें अतिप्राचीन रूप आहे. आणि तो **वि+रद्** १ दन्दशूके ह्या धातूपासून आला आहे. **विरळा** (क्वचित्).]

विराज(णें) अक्रि. शोभणें, प्रकाशणें. To look well, to shine.
[सं. **वि+राज्** १ प्रकाशन ; **विराज्-ट्** (विश्वव्यापी ईश्वर).]

विराट् पुं. ब्रह्मदेवाचें अपत्य. The first projeny of Brahman.

[**सं. वि+राज्.** मराठीमध्यें नाम व विशेषण असे दोन्ही उपयोग आहेत. नामापासून विशेषणाचा अर्थ निष्पन्न झाला आहे. टर्नरनें **विराट** हा शब्द महाभारतांतील विराटपर्वांतील **'विराट्'** राजाशीं जोडला आहे.]

विराम पुं. विसांवा. Stop, cessation.

[सं. **वि+रम्.**]

^{1}**विराव(णें)** अक्रि. विरमणें, थिजणें. To feel shy or bashful.

[सं. **वर्मन्.**]

^{2}**विराव(णें)** क्रि. रममाण होणें. To sport.

[सं. **वि+रम्**; अकाम. **विरावा** (मध्यस्थ, अडचण), **विरावें** (शौर्य, वीर्य, तेज).]

विरुद्ध वि. प्रतिपक्षी, उलट बाजूचा. Opposite or opposed to.

[सं. **वि+रुध्** ७ प्रतिघाते; अकामसा. **विरोध** (प्रतिबंध, वैर).]

विरूं न. वैर, शत्रुत्व. Enmity.

[सं. **वैर, वि+ √ ऋ** १ गतौ; याकाम. **विरुं, विरु** (ज्ञा. २-३५).]

विरूढ(णें) क्रि. वाढणें, मूळ धरणें, रुजणें. To grow, to take root.

[सं. **वि+रुह्** (निष्ठा-**रूढ** (नाधा.); याकाम. **विरूढणें** (ज्ञा. १६-३२०), **विरुढी**=वाढ, अंकुर (ज्ञा. ८-२२); अकामसा. **विरूढण** (मूळ अंकूर).]

विरोळा पुं. पाणसर्प, साप. A harmless water-snake.

[सं. **उरस्+वलय. 'व्याल'** शब्दापांसून हा शब्द निष्पादिला आहे तें ग्राह्य नाहीं. **'र'** ची उपपत्ति काय?]

विऱ्हड(णें) अक्रि. दुःखी होणें. To be miserable.

[सं. **विरह+ट** (नाधा.).]

^{1}**विलग(णें)** सक्रि. चिकटणें. To adhere to.

[सं. **वि+लग्**; प्रा. **विलग्ग. बिलगणें** पहा.]

विलग(णें) क्रि. दूर होणें, नाहींसा होणें. To separate.

[सं. **वि+लग्**; याकामसा. **विलग** (अलग, भिन्न), **विलगट** (वेगळा).]

विलप(णें) क्रि. शोक करणें, रडणें. To lament loudly, to wail.

[सं. **वि+लप्** १ व्यक्तायां वाचि.]

विलंब(णें) क्रि. उशीर लागणें, खोळंबणें. To be delayed.

[सं. **वि+लंब्**; पा. प्रा. **विळंब**; अकामसा. **विलंब** (उशीर, अवकाश), **विलंबित.**]

विलस(णें) अक्रि. शोभणें, विरजणें. To glitter, to shine.

[सं. **वि+लस्** १ क्रीडने; **लष्** १ प्रकाशने; याकाम. **विलसणें** (ज्ञा. १८-८७७).]

विलक्षण वि. चमत्कारिक, असामान्य. Strange, extraordinary.

[सं. **वि+लक्षण, √ लक्ष्.**]

विलायत स्त्री. मूळ देश, स्वदेश, युरोपांतील देश (लक्षणा). A foreign country, Europe.

[अर. **विलायत्.** अफगाणी मुसलमान लोक आपल्या देशाला **विलायत** असें म्हणत. नंतर त्याचा अर्थ स्वतांचा **मायदेश** म्हणून युरोपियन लोक **करू** लागले. म्हणून **विलायत**=युरोप.]

विल्हा,-ल्हे पुं. स्त्री. वर्ग, भाग, प्रकार. A class or head, a kind.

[अर. **बिल्हा**; अकामसा. **विल्हेवार** (वर्गवारीनें), **विल्हेवाट** (उधळपट्टी, निकाल).]

विल्हा(ल्ह)ळणें अक्रि. दीनवाणें कारुण्य दाखविणें, लडिवाळपणा करणें. To moan, to whine, to make lamentations.

[सं. **वि+लल्** १ विलासे, २ **वि+ल्हक्.**]

विवंच(णें) क्रि. विचार करणें, चिंता करणें. To think, to contemplate, to revolve in mind anxiously.

[सं. **विवंच्**; याकाम. **विवंचणें**=विवेचन करणें (ज्ञा. १५-४७७); अकाम. **विवंचना** (विचार, चिंता).]

विवद(णें) सक्रि. चर्चा करणें, खल करणें, स्तुति करणें. To discuss.

[सं. १ **वि+वद्**=पुष्कळ बोलणें, २ **विविद्**= पुष्कळ जाणणें (अभ्यास); याकाम. **विवदणें**=वाखाणणें.]

विवर(णें) सक्रि. स्पष्टीकरण करणें. To explain, to interpret.
[सं. वृ (अभ्यास) विवृ ; 'वि' हा उपसर्ग नव्हे. अकाम. विवर = छिद्र, स्पष्टीकरण.]

विवशी स्त्री. राक्षसी, अवदसा. A female fiend.
[सं. विवशा ; याकाम. विवशी (ज्ञा. २-३१२).]

१विवसा पुं. उद्योग, धंदा. Business, traffic.
[सं. व्यवसाय, वि + अव + √सो ४ समापने.]

२विवसा स्त्री. इच्छा, कल. Desire, inclination.
[सं. वि + इष् = इच्छा.]

१विवळ(णें) सक्रि. प्रकाशणें, स्पष्ट होणें, प्रसवणें, उत्पन्न करणें. To shine, to be explicit.
[सं. वि + वल्ह् १ प्रकाशने (विल्यम्स); याकाम. विवळ = स्पष्ट, सुगम (ज्ञा; ५–१६४).]

२विवळ(णें) अक्रि. तळमळणें, कण्हणें. To moan, to groan.
[सं. विव्हल (नाधा.); सं. विलपनम् ; देप्रा. विमलिअं मत्सरभणितं लशब्दंचेतिद्वयर्थम् (२७०-३); याकाम. बेंबळ (ज्ञानेश्वरी).]

विवाद(णें) क्रि. वाद करणें, भांडणें. To dispute, to discuss.
[सं. वद्, (अभ्यास) विवद् > विवाद.]

विवाहणें सक्रि. लग्न करणें. To marry.
[सं. वि + वह् (णिच्) प्रापणे, विवाह (लग्न, शरीरसंबंध); गु. विवाह; सिं. विहांइउ; पं. विआह; हिं. बिवाह, ब्याह; सिंह. विवा; रुमा. बिअब.]

विविध वि. नाना प्रकारचें, अनेक प्रकारचें. Varied, of various kinds.
[सं. वि + विधा (प्रकार) < वि + √धा ३ स्थापने ; याकाम. विविध (ज्ञा १७-२४५).

विवेक पुं. विचार, तारतम्यबुद्धि. Discrimination, discretion.
[सं. विच्, (अभ्यास) विविच् < विवेक ; याकाम. विवेक (ज्ञा. १६-४६६).]

विव्हळ वि. व्याकूळ, दुःखित. Moaning.
[सं. विव्हल.]

विशाळ-ल वि. लांब, रुंद, भव्य. Large, huge.
[सं. विशाल.]

विशाळू वि. विषयीं. Addicted to pleasures of senses.
[सं. विषयालुः ; याकाम. विशाळू ; अकाम. ईशाळू.]

विशेष पुं. असामान्य गुण,–धर्म,–लक्षण. Distinguishing property.
[सं. विशेष, वि √शिष्. विशेषण (गुणदर्शक शब्द); याकाम. विशेषणें = विशेष वर्णन करणें (ज्ञा. ५-८८).]

विश्व न. अखिल चराचर जगत्. The universe.
[सं. विश्व, √विश् ; *Av.* Vispa ; *Ap.* Vispa.]

विश्वास पुं. भरंवसा, खात्री, इमान. Trust, confidence.
[सं. विश्वास, वि + श्वस् ; अकाम. विश्वासणें, विश्वासूक (विश्वास + उकच्).]

विष न. जहर, वीख. Poison.
[सं. विष ; अकामसा. वीख, विखार, विषार.]

विषण्ण वि. खिन्न, दुःखी. Dejected.
[सं. विषण्ण, वि + सन्न, √सद् (निष्ठा).]

१विषय न. स्त्री. संकट, अडचण, असमान, अशुभ. Difficulty, odd, unpropitious.
[सं. वि (विगतम्) समम्.]

२विषय पुं. प्रदेश, टप्पा, उद्देश, कार्य, द्रव्य, कामेच्छा. A country, an object, money, desire for pleasure.
[सं. विषय, वि + शी.]

विसक(णें) अक्रि. वाळणें, आटणें. To dry.
[सं. वि + सच् १ सेचने.]

विसकट(णें) क्रि. अस्ताव्यस्त करणें. To be in disorder.
[सं. १ विशकलनम्, २ हिष्क + ट (?) = हिष्कट (नाधा.).]

विसकर(णें) क्रि. विसकटणें, अस्ताव्यस्त पसरणें. To throw helter-skelter.
[सं. वि + (स्) + कॄ ६ विकीरणे.]

विसकळ(णें) क्रि. अस्ताव्यस्त होऊन पडणें. To be in disorder.
[सं. **विशकलनम्** किंवा **वि+सम्+कल्** १ गतौ; अकामसा. **विसकळित** (अस्ताव्यस्त), **विसकळ** (अस्ताव्यस्त स्थिति).]

विस(सु)कुस(णें) क्रि. विसकटणें, गोंधळणें, बिघडणें. To lie in confusion.
[सं. १ **विष्क्** १० हिंसायाम् + **कुस्म्** १० कुत्सितस्मयने (द्विधातुसंयोग) > **विष्क् कुस्म्** > **विसकुस**; २ **वि + सम् + उत् + कुष्** ९ निष्कर्षे; अकामसा. **विसकुस** (बिघाड, गोंधळ).]

विसंच(णें) क्रि. बिघडणें, नासणें, विकार पावणें. To spoil, to soil.
[सं. **वि + संच्** १ गतौ; याकाम. **विसंचणें** (ज्ञा. ८-१८०); अकाम. **विसंच** (घोंटाळा, नाश).]

[1]**विसण(णें)** क्रि. आवेशयुक्त होणें, चिडणें. To storm, to chafe.
[सं. **वि+क्षन्, क्षण्** ८ हिंसायाम्; याकाम. **विसणणें** (ज्ञा. १-१३३).]

[2]**विसण(णें)** क्रि. कोमट करणें, उन्ह पाण्यांत थंड पाणी घालणें. To pour cold water in hot water.
[सं. १ **अनुष्ण**; प्रा. **अणुसिण**, **विसण.** २ **विशमनम्–विसण.**]

विसंब(णें) क्रि. विसांवा घेणें, भार टाकणें, विश्वास धरणें. To rest or pause.
[सं. **वि श्रम्** ४ खेदे; **वि श्रंभ्** १ प्रमादे; प्रा. **विस्सम, विस्संभ**; याकाम. **विसंब, विसंभ** (ज्ञा. २-२५९) = विसरणें (ज्ञा. १८-९१०).]

विसर(णें) क्रि. स्मरणांतून जाणें. To forget.
[सं. **विस्मरति**; पा. **विस्सरति**; प्रा. **वीस्सरइ**; कु. **बिसरणो**; हिं. **बिसरना**; पं. **बिस्सरना-णा**; लां. **बिसरण**; सिं. **विसिरणु**; गु. **विसरवूँ**; अकामसा. **विसर, विसरभोळा, सई** (स्मृति). प्रा. **वीसरणालु** पासून मराठी **विसराळू** आला असें म्हणावें तर मधील 'णा'ची वाट काय झाली ?]

विसर्ज(णें) क्रि. सोडणें, टाकणें. To leave, to abandon.
[सं. **वि+सृज्** ६ विसर्गे; अकाम. **विसर्जन** (पाठवणी, बोळवण).]

विसळ(णें) सक्रि. धुणें, स्वच्छ करणें. To wash, to cleanse.
[सं. **विक्षल्, विक्षाल्**, किंवा **उत् + क्षाल्**; प्रा. **उच्छोल**; गु. **विछळवूँ. 'विक्षालित'** निष्ठारूपापासून]

विसार पुं. सचकार, इसारा, बयाणा. Advance, earnest money.
[सं. **विस्मर (?)**; अकाम. **विसरा.**]

विसार(णें) क्रि. दूर लोटणें, विसरविणें. To push aside.
[सं. **वि+सृ** किंवा, **वि + स्मृ (णिच्)**, विसार .]

विसाव(णें) अक्रि. विश्रांति घेणें, थांबणें. To rest, to pause.
[सं. **वि + श्रम्** ४ खेदे; पा. **विस्समेति**; प्रा. **विसम्म, विस्सम्**; कु. **बिसुणो**; सिं. **विसाइणु**; गु. **विसामो**; अकाम. **विसवणें.**]

विसावा पुं. विश्रांति, विराम. Rest, pause.
[सं. **विश्राम**; प्रा. **विस्साम, वीसाम** : गु. **विसामो**; ने. **बिसा**; याकाम. **विसांवा** = विश्रान्तिस्थान (ज्ञा. १४-२).]

विसाळ,–ळा पुं. ईर्षा, स्पर्धा, द्वेष. Envy.
[सं. **ईर्षालु (?).**]

[1]**विसुरा** पुं. विचार, अभिप्राय. Thought, opinion.
[सं. **वि + चर्.**]

[2]**विसुरा** पुं. चमत्कार, विस्मय, आश्चर्य. Wonder, surprise.
[सं. **वि + स्मयः, विस्मरः, विसुर**; याकाम. **विसुरा** (ज्ञा. ५-१७४).]

[3]**विसुरा** पुं. समुदाय. A collection.
[याकाम. **विसुरा** (ज्ञा. ६-९८).]

विस्तर(णें), विस्तार(णें) क्रि. पसरणें, उघडणें, पाल्हाळ लावणें. To spread, to open.
[सं. **वि + स्तृ** ५ आच्छादने; अकामसा. **विस्तर, विस्तार** (पसारा), **विस्तारी** (पत्रावळ).]

विस्तव पुं. अग्नि, आग, जाळ. Fire.
[सं. **वि + स्तु** २ स्तुतौ; स्तुति करण्याची वेदांतील देवता, व्युत्पत्ति अगदीं उत्तान आहे. २ **वैश्वदेव > विसदेओ > वीसतओ > विस्तव**, (ही आम).]

विस्ताव(णें) क्रि. मावळणें, अस्तास जाणें, नाहींसें होणें. To set.

[सं. वि + अस्तायते (अस्त पासून नामधातु).]

विस्मय पु. आश्चर्य, चमत्कार, अचंबा. Wonder, surprise.

[सं. वि + स्मि, विस्मयः ; याकाम. विस्मो (ज्ञा. १–१७७).]

विस्वा पुं. विसावा अंश. Twentieth part.

[सं. विंशतितमः > वींसइ + वँ; अठरा विस्वे दारिद्र्य).]

विहग पुं. पक्षी, पाखरूं. A bird.

[सं. विहायसा गच्छति सः ,–विहंग,–म.]

विहर(णें) अक्रि. क्रीडा करणें, खेळणें, रमणें. To sport.

[सं. वि + हृ; प्रा. विहर ; अकामसा. विहरण, विहार = खेळ, क्रीडा, बौद्धांचा मठ.]

विहा(ह्या)ळी स्त्री. विहार. क्रीडा, शिकार A sport, a game, a hunt.

[सं. विहार किंवा व्यध् .]

विहि(णें) क्रि. सांगणें, उपदेशिणें, विधान करणें. To tell, to advise.

[सं. वि + धा किंवा अभि + धा ३ धारणे ; याकाम. विहिणें (ज्ञा. ३-८८).]

विहीण स्त्री. नवऱ्या मुलाची किंवा मुलीची आई, व्याह्याची पत्नी. The mother of the bride or bridegroom.

[सं. १ विवाही > व्याही, (स्त्रीलिंगरूप) विहीण. २ किंवा > भगिनी > विइणी > विहीणी.]

विहीर पुं. मोठी विहीर, कुवा. A big well.

[सं. विवर ; याकाम. विहिरा = पाण्यासाठीं खड्डा (ज्ञा. १५–२६९); अकाम. विहीर , विहर , विहरा , (आड, कुप, वाव).]

विळ पुं. ब्रह्मदेवाचा दिवस. A day of Brahman.

[सं. वेला; याकाम. विळ (ज्ञा. ८-११५).]

विळव(णें) क्रि. रडणें, दोषारोप करणें. To lament, to accuse, to complain against.

[सं. विलप्; पा. विलप; प्रा. विलव; आ. बिलाइ; हिं. बिह्लाना; ने. बिलना; विवळणें पहा.]

विळा ु. कोयता, कापण्याचें हत्यार. A cutting weapon, a knife.

[कान. ईळिग ; अकाम. इळी , विळी.]

विक्षिप्त वि. विचित्र, तऱ्हेवाईक, लहरी. Strange, odd, freakish.

[सं. वि + क्षिप् , (निष्ठा) क्षिप्त.]

विक्षेप पुं. चित्ताचा संभ्रम, चंचलता, गोंधळ, विषाद. Dissipation of mind, amazement.

[सं. विक्षेप , वि + √ क्षिप् ; याकाम. विक्षेप (ज्ञा.)]

विज्ञान न. सामान्य ज्ञान, शास्त्रीय ज्ञान. Knowedge, science, learning.

[सं. विज्ञान , वि + √ ज्ञा.]

वीख न. जहर, विष. Poison.

[सं. विष ; प्रा. वीख ; अकामसा. विखार.]

वीज(णें) क्रि. पंख्यानें वारा घालणें. To fan.

[सं. व्यजन ; याकाम. वीजणें (ज्ञा.), वीजन,–ण,–णा, (पंखा).]

वीज स्त्री. विद्युत्, विद्युल्लता. Lightening.

[सं. विद्युत् ; प्रा. विज्जु (पुं), विज्जुआ ; पं. बिज्ज ; सिं. विजु ; गु. बीज ; अकाम. विजू, विजुका , विज्जु, विजु , बिजली (> वि ुल्लता).]

वीजन न. बैठक, आसन. Seat.

[सं. अपस्तरण ; अपच्छदन ; हिं. बिस्तारा, बिछाना ; याकाम. वीजन = बैठक.]

वीट पुं. कंटाळा, ओकारी, तिरस्कार, शिसारी. Disgust, loathing, nausea.

[सं. विट्ट , विण्ट्ट १० क्षये. विटणें.]

वीट स्त्री. ईट. A brick.

[सं. इष्टिका > ईट. वीट उच्चाराच्या बाबत हें शिष्ट उच्चारण आहे.]

वींण,–णें अ. शिवाय, विणें पहा. Without, except.

[सं. विना ; पा. विना ; प्रा. विणा ; अप. विणु ; का. वेंण ; आ. बिने ; ओ. बिनु ; हिं. बिन ; पं. बिण ; गु. विन् ; ने. बिनु.]

वींण स्त्री विणणें, विणण्याचा प्रकार, विणलेलें कापड. Texture, weftage.

वीणा स्त्री. एक तंतुवाद्य. Indian lute.
[सं. वीणा, √ वा.]

वीत(णें) अक्रि. वर्तणें, घडणें. To happen.
[सं. वृत्; प्रा. वीत.]

¹वीत न. द्रव्य. Wealth.
[सं. वित्त.]

²वीत स्त्री. एक मापन, अंगठ्यापासून करंगळीपर्यंत पसरलेल्या तळव्याचें अंतर. A measure, a large span.
[सं. वितस्ति, विहस्ति; प्रा. विहत्थि (पुं. स्त्री.) < हस्त, हत्थ, विअत्ति, बियत्त (अल्बीरूनी); कु. ब्यॉत; हिं. बीता, बित्ता; प. बित्थ, वित्थ; लां. वित्थ; गु. वेत; ने. बिता.]

वीप स्त्री. लाज. Shame, shyness.
[सं. १ व्यप्-क्षये (कर्मणि-व्रीप). २ वि + अप + इ २ गतौ; याकाम. वीप.]

विभाड(णें) सक्रि. पराभव करणें. To defeat, to overcome.
[सं. वि + भंड्; अकाम. वाभाडा.]

वीर पुं. योद्धा, शूर पुरुष. A hero, a warrior.
[*IE.* Uiro-s; सं. वीर; *Av.* Vira; *Lith.* Vyra; *Lett.* Wirs; *Lat.* Vir; *Got.* Wair; संसा. वीर्य, वीर्यवान्.]

वीरगळ पुं. वीराचा दगड, पुतळा (शिल्पविशेष). A stone-image.
[सं. वीर; कान. कल्लु = दगड.]

वीष न. जहर. Poison.
[सं. विषम्; पा. प्रा. विस; का. वेह; आ. बिह; ब. बिस्; ओ. बिस; हिं. बिस्; पं. बिह्; लां. विहूँ; सिं. विहु; अकाम. विष (तत्सम), वीख, इख. ह्या शब्दाची रूपप्रक्रिया कांहीं भाषांत 'ख' अन्वित, तर कांहीं भाषांत 'ह' अन्वित झाली आहे.]

वीस वि. संख्याविशेष, दहा आणि दहा. Twenty.
[*IE.* Uikmti; *Av.* Visaiti; *Arm.* Ksan; *Lat.* Viginti. सं. विंशति; पा. विसति, वीसम्; प्रा. बीसइ, वीसम्; कु. बीस्; आ. बिहा; बं. बिस; ओ. बिंस; हिं. बीस्; पं. लां. वीह; गु. वीश.]

वीसदेओ पुं. विस्तव. Fire.
[सं. वैश्वदेव > विश्वदेव > वीसदेओ > याकाम. वीसदेओ; अकाम. विस्तव.]

¹वीळ पुं. तिसरा प्रहर, संध्याकाळ. Evening, afternoon.
[सं. विकालः, विकालम्; पा. विकाला; प्रा. विआल; कु. ब्याल, बेली (काल), बियालो (बाजूस); ओ. बियलि (संध्या), ब्यालु.]

²वीळ स्त्री. भरती. Flow or rise of the tide.
[सं. वेला? प्रा. वीली तरङ्गः (२६३९); गु. वील, बीळ; सिं. वीरि.]

वुंड,-डा पुं. लाडू, पिंड. A lump.
[प्रा. उंडी; कान. उंडे.]

वृक पुं. लांडगा. A wolf.
[*IE.* Ulqos; सं. वृक √ वृन्, *Av.* Vehrka; *Alb.* Ulk; *Got.* Wulbo; *Lat.* Ulk, Vulka; *Lith.* Vilka.]

वृत्ति स्त्री. वृत्त, वार्ता. News, information, tidings.
[सं. वृत्तिः, √ वृत्.]

वृद्ध वि. म्हातारा, वयानें ज्येष्ठ. Old, aged.
[सं. वृद्ध, √ वृध् (निष्ठा).]

वृषण न. अण्ड. The testicle.
[सं. वृषण, √ वृष्; *Lat.* Verres; *Lith.* Verses; *Av,* Varsni; *Lett.* Versis.]

वृष्टि स्त्री. पाऊस, सर. Shower of rain.
[सं. वृष्टिः, √ वृष्,-वर्षणे.]

वृक्ष पुं. झाड, रोपटें. A tree.
[सं. वृक्ष, √ वृश्च्.]

वेउळ पुं. प्राणिविशेष, चित्ता, हिंस्र प्राणी, पशु. A kind of beast of prey.
[सं. व्यालः; याकाम. वेउळी = इंगळी; हा शब्द निराळा आहे काय?]

वेखंड न. औषधिविशेष. A kind of herb.
[सं. वच + खंड.]

वेखसें वि. विरुद्ध, वांकडें. Opposite.
[सं. विसदृश; प्रा. वेस (> द्वेष्य?). याकाम. वेखासें (ज्ञा. ७-४७)

वेग पुं. गति, जलदपणा, त्वरा, आवेश, वेदना. Velocity, a sharp pang, a sudden impulse.

[**सं. वेगः, √ विज्** ७ भयचलनयोः, याकामसा. **वेगाढा, वेगाळ** (सं. **वेगाढ्य, वेगवान्**).]

वेगळा वि. निराळा, पृथक्. Separate, disjoined.

[सं. **वि + गल्** १ स्रवणे (?); **वि + अग्रिम, व्यग्र**; प्रा. **वग्ग, विअग्ग, वेग्गळ**; देप्रा. **वेग्गलो** दूरवर्ती; सिं. **वेग्यो**; गु. **वेगळू, वेगू** (वेडा); अकामसा. **वेगाळणें, वेगळीग, वेगळावा.**]

वेंग(णें) अक्रि. थकणें, ओलांडणें. To be overcome with fatigue.

[सं. **व्यंग** (नाधा.), **विज्** ७ भयचलनयोः, **वि + अंघ्** १ गत्याक्षेपे; याकाम. **वेंगट** = पायास पेटके येणें (ज्ञा. १३-५७१); अकामसा. **वेंगट**(णें) = वेंगेंत धरणें, **वेंगळ**(णें) = मिठी मारणें.]

वेंगाट(ड)(णें) अक्रि. तोंड वेडें वांकडें करणें, दैन्य दाखविणें, वांकुल्या दाखविणें. To make wide and distorted faces.

[सं. **व्यंकट** (नाधा.), अकामसा. **वेंगडी** (वांकडा, आंखडलेला.]

वेंघ (णें) अक्रि. चढणें, आरोहणें, ओलांडणें, थकणें, गळणें. To climb, to mount, to ascend.

[सं. **वि + अंघ्** १ गतौ. याकाम. शिकाम. **वेघणें.**]

परिसा संनिध वेंघलें । लोह सुवर्ण होवोनि राहिलें ॥
वि. सिं.

ऐसिया वेंघेनिस्वप्ना । धांवत भवस्वर्गांचेया राना ॥
ज्ञा. १५-४९३.

श्रृंगारिला हय तयावरि भूप वेंघे ॥ न. द. ३१

1**वेंच(णें)** सक्रि. खर्चणें. To expend, to spend.

[सं. **व्यय** (नाधा.), **विच्** ७ अवयवे, **वि + चि**; प्रा. **वेच्चइ, विच्चइ**; कु. **बेचणो**; आ. **बेस** (किंमत); बं. **बेचा**; हिं. **बेचना**; पं. **वेचणा**; लां. **वेचण**; गु. **वेचवूँ**; याकाम. **वेच, वेंच.** (ज्ञा. १५-१५५; १५-३०६); कान. **वेच्च.**]

2**वेंच(णें)** सक्रि. उचलणें, निवडून घेणें, गोळा करणें. To pick or gather generally.

[सं. **वि + चि** ५ संचये, **विच्** ७ अवयवे; अकामसा. **वेंचा** (निवडून घेतलेला जिन्नस).]

वेजें-झें न. छिद्र, भोंक (विशेषतः मोत्याचें), वर्म, लक्ष्य (लक्षणा). A bore, eye (of a needle).

[सं. **वेध**; प्रा. **वेज्झ**; कान. वेज्ज, प्राकृत व मराठी रूपांवरून असें वाटतें कीं संस्कृत शब्द '**वेध्य**' असला पाहिजे.]

1**वेट(णें)** सक्रि. फुलें तोडणें, शेंगा तोडणें, सरक्या बाहेर काढणें. To pick, to pluck.

[सं. **व्यव + कृत्** ६ छेदने.]

2**वेट(णें), वेटाळ(णें)** सक्रि. जोरानें वेढा देणें, वळणें, वेठण पहा. To surround, to twist.

वेटवण न. वेडवण, वांकुली. Mocking, wry faces.

[सं. **विटंबनम्**; अकामसा. **वेटवणें, वेडवणें** = वांकुल्या दाखविणें.]

वेठ स्त्री. जुलुमाचा रोजगार. Press-service, forced labour.

[सं. **विष्टिः**; **विष्टि, वैष्टिकः** (रोजगार, कामकरी); प्रा. **बिट्ठि, वेट्ठि**; ओ. **बेठी**; गु. **वेठ**; सिंह. **विटी.** कान. **बिट्टी**; तेलु. **वेट्टी.** हा शब्द कानडी–तेलगूमध्यें तद्भव झाला आहे कां द्राविडी शब्दाचें संस्कृतीकरण झालें ? याकाम. **वेठ(णें)**; अकाम. **वेठकरी, वेठ्या.**]

तरि मज पांता तें उणें । फेडावया गीतापणें ॥
वेदु वेठला भलतेणें । सेव्यु होआवया ॥ ज्ञा. १८-१४४९.

वेठ(णें) अक्रि. उठणें, निघणें, मूर्त होणें, आकाराला येणें. To rise, to get up.

[सं. **उत् + स्था**; **व्यव + स्था**; याकाम. **वेठणें.**]

वेठण न. गुंडाळा, आवरण. A cover, rolling.

[सं. **वेष्टनम्**; प्रा. **वेट्ठण**; का. **वुट्टू**; बि. **बेठण**; हिं. **बेठंन**; सिं. **वेठणु**; याकाम. **वेठणें** = वेष्टणें (ज्ञा. १८-४१०); अकामसा. **वेठी** = वळीव दोरी, **वेटणें, वेटाळणें.**]

वेड न. खूळ, लहर, उत्कट इच्छा, मेंदूची विकृति. Madness, folly, foolishness.

[सं. **वैधेय** > **वेढेअ** > **वेढ** > **वेड** (भा. अ. १८३५). कान. **एड्डु, इड्डु** = मूर्खपणा.]

वेडें वि. असामान्य, भलतेंच. Uncommon, extraordinary.

[कान. **एड्डु** = पुष्कळ. अकामप्र. वेडें पीक, वेडा पाऊस.]

वेडझवें वि. अडाणी, मूर्ख, एक शिवी. Crazy or cracked.

[सं. **अर्धयंभी (?)**; देप्रा. **अड्डज्झियँ**; हा शब्द **वेड + झवें** असा समजतात हें चूक आहे. **अडडज्झिय** म्हणजे **विपरीत मैथुन** असा अर्थ आहे. **वेडा = मूर्ख** ह्या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. कान. **एड** = पुष्कळ ह्या शब्दाशीं संबद्ध असावा.]

वेडें वांकडें वि. वांकडें तिकडें, सरळ नसलेला, भरमसाट. Curved and crooked.

[**वेडें वांकडें**-दोन्ही शब्द एकाच अर्थाचे पण दोन भिन्न भाषांतील असावेत. किंवा दोन्ही प्राकृतोद्भव असावेत. वेडें = असामान्य, भलतें, **वेडी** हळद, **वेडें** पीक. '**वेडें**' हा 'वेढें' असा शब्द मूळ होता काय ? (< **वेष्ट**, वांकडें < वक्रम्. वांकडें तिकडें पहा.]

वेढ(णें) सक्रि. भोंवतालीं पसरणें. To surround, to encircle.

[**सं. वेष्टते**, **वेष्टयति**; पा. **वेठते**, प्रा. **वेढइ**, **वेढ्ढइ**. का. **वुरु**; आ. **बेरिब**; बं. **बेडा**; ओ. **बेढिबा**; हि. **बेढना**; पं. **वेढा**; लां. **वेढ**; अकामसा. **वेढा** = गराडा, वेढें = अंगठी.]

वेढ,-ढें न. अंगठी, वर्तुळ. A ring.

[सं. **वेष्टकम्**; पा. **वेठो**; प्रा. **वेढ**; देप्रा. **वेंढिअ** (२६४-११,१३); आ. **बेर** (भिंत); बं. **बेर**; ओ. **बेरा**; हिं. **बेढ**; पं. **बेढ**, **वेढा** (अंगण); लां. **वेढ** (आवार); सिं. **वेढु**.]

वेण,-वेणा स्त्री. (अ. व.) कळ, दुखणें, तिडका, वेदना. A sharp pain, a pang.

[सं. **वेदना**; प्रा. **वेअणा**, **वीअणा**, **वेयणा**.]

¹वेणी स्त्री. (पदराची केंसाची) वांधणी, गुंतागुंत. A braid (of hair), a cluster.

[मरा. **विणणें**; सं. **वी**-तन्तुसंताने; अकामसा. **वेणीदान** (सुवासिनीनें प्रयाग क्षेत्रांत दान केलेल्या आपल्या वेणीच्या दोन बटा), **वेणीफणी** = वेणी घालणें, केंस विंचरणें वगैरे (< सं. **वेणीप्रवेणी**).]

²वेणी स्त्री. नद्यांचा संगम. Confluence of the rivers.

[सं. **वेणि**; पाप्रा. **वेणि**; बं. **बेनि**; ओ. **बेणि**; हिं. **बेनो**; गु. **वेणी**; याकाम. **वेणी** = प्रवाह (ज्ञा.); अकाम. **त्रिवेणी संगम**.]

वेणु पुं. वेळू, कळक. A bamboo, a cane.

[सं. **वेणी**.]

वेत पुं. तृणविशेष, वोरुची जात. A kind of grass, a cane.

[सं. **वेत्र**, **वेतसः**; पा. **वेत्तम्**; प्रा. **वेत्त**; कु. **बेत**; आ. **बेंत**; बं. **बेत्**, ओ. **बेत**; हिं. **बेत** (स्त्री); पं. **बेत** (पु); अकामसा. **वेतसी वृत्ति** = नम्रता, **वेताटी** (वेताची छडी < वेत्रयष्टि).]

वेतन न. पगार, मजुरी, मेहनत. Wages, pay.

[सं. **वेतनम्**.]

वेताळ पुं. भूतांचा-पिशाचांचा मुख्य. The king of the *Pishachas.*

[सं. **वेताल**; याकाम. **वेताळ** (ज्ञा), परंतु हें संस्कृतीकरण नंतरचें आहे हें उघड आहे. वेदामध्यें ह्या देवतेचें नांव नाहीं तेव्हां ही देवता आर्य नाहीं. द्राविडी किंवा मूळ एतद्देशीय असली पाहिजे. म्हणून हा शब्द देशी असला पाहिजे.]

वेद पुं. भारतीय आर्यांचा पवित्र धर्मग्रंथ, श्रुति. The *Veda.*

[सं. **वेद**, √ **विद्**; संसा. **वेदमूर्ति** = मूर्तिमान वेद; **वेदवाक्य** = प्रमाण; **वेदांग** = वेदाच्या अभ्यासास उपयोगी शास्त्र; **वेदान्त** = ब्रह्मज्ञान, तत्त्वज्ञान, वेदाचा शेवटचा भाग-आरण्यक, उपनिषदें इ. **वेदोक्त** = वेदांत सांगितलेलें (प्रतियोगी शब्द **पुराणोक्त**).]

वेदना स्त्री. दुःख, कळ, तिडीक. Pain, pang.

[सं. **वेदना**; म. **वेण**, **वेणा**, √ **विद**.]

वेदी स्त्री. यज्ञाचें स्थंडिल, उंच आसन. An altar.

[सं. **वेदी**; **वेदिका**.]

वेध(णें) सक्रि. आंत शिरणें, व्यापणें. To perforate, to pierce.

[सं. **वेधयति**, √ **विध्**, **व्यध्**; प्रा. **विज्झ** (सविकरण); हिं. **वेधना**; गु. **वेधवूं**; याकाम. **वेध** = छंद (ज्ञा. १३-९६९); अकाम. **वेध**, = छंद, नाद, काळजी, भोक, छिद्र, नेम, लक्ष्य. ग्रहणाच्या पूर्वींचा काळ. **वेध** (सं. **विध्य**; प्रा. **विज्झ**). ह्या शब्दाशीं संबद्ध असे इतर भाषांतील शब्द पहा. *IE.* Ueiah, Uidh; *Lat.* Divido; *Lith.* Divido.]

वेधा स्त्री. विद्या, ज्ञान. The lore, knowledge.

[सं. **वेधस्** ; याकाम. **वेधा** = ज्ञान. मूळ अर्थ ब्रह्मदेवाचें एक नांव.]

वेपथ(णें) अक्रि. कांपरें भरणें. To tremble.

[सं. **वेपथु** (नाधा.), √ **वेप्** १ कंपने ; याकाम. **वेपथणें** = कांपरें भरणें, सं. **वेप्** ह्याशीं संबद्ध असे दुसऱ्या भाषांतील शब्द पहा. *IE.* Ueip; *Av.* Vip ; *Lett.* Viepe ; *Lat.* Vibro ; *Got.* Weipan.]

वेंब(भ)ळ स्त्री. बोबडी, चांचरी. Stammering.

[सं. **विव्हल** ; प्रा. **विंभल** ; याकाम. **वेंबळ** ; **वेंघळा** ; **वेंभळा** ; अकामसा. **वेंधळा**.]

वेरीं–ऱ्हीं अ. पर्यंत, पावेतों, वर. Until or unto (used of time or place).

[सं. **उपरि** ; प्रा. **उअरि** > **वेरि** – **वेऱ्हीं** ; याकाम. **वेऱ्हीं** (ज्ञा. ९-५०६). **अद्यउपरि** > **अज्जउअरि** > **आजवेऱ्हीं** > **आजवर**.]

वेरुल पुं. लांडगा. A wolf.

[सं. **व्याल** , याकाम. **वेरुल** , **वेऊल** पहा.]

वेल स्त्री. पसरणारी वनस्पति, A creeping or climbing plant.

[सं. **वेली** , **वल्ली** , **वेल्लीः** ; पा. **वेल्ली** ; पा. **वल्ली** ; प्रा. **वल्ली** , **वेल्ली** : देप्रा. **वल्ली** , **वेल्ली** ; बं. **बेल** ; हिं. **वेल** ; पं. **बेल** , **वेल** ; लां. **वल्ल** , **वल्ह** ; सिं. **वलि** ; गु. **वेल** ; याकाम. **वेलरी** (< **वल्लरी**), **वेलांटी** ; अकामसा. **वेलबुट्टी** (सं. **वल्लिव्यूति**),]

वेलदोडा पु. वेलची, एक सुगंधी वनस्पतीचें बीं. Cardamom.

[द्रा. **एला** , **एलक्की** , **यलक्की** ; **अक्की** = तांदूळ ; ता. **अंजी** ; ता. **एला** + **अंजी** > **एलायची** , **एलदाणा**. सं. **एला** ; प्रा. **एला** (स्त्री.). परंतु संस्कृतीकरण नंतरचें दिसतें.]

वेला–ळा स्त्री. समुद्रकिनारा, वेळ, सीमा, मर्यादा. Shore, limit.

[सं. **वेला** , याकाम. **वेला** (ज्ञा. १६-३९३).]

वेलाटी–,लांटी,–डी स्त्री. विस्तार, इकारदर्शक चिन्ह. The mark for इ or ई.

[याकाम. **वेली जाणें** = विस्तारणें (ज्ञा. १५-१५२), **वेलांडी** = विस्तार (ज्ञा. १५-२८१). वेल्हवणें, वेल पहा.]

वेल्हव(णें) सक्रि. विस्तारणें, वाढणें, सुखावणें, डोलणें. To spread, to expand.

[सं. **वल्ली** (नाधा.). एला ११ विलासे, **विल्** ६ विभजने.]

वेल्हाळ वि. वाढलेला, लाडावलेला, लाडका, प्रिय, सुंदर. Amplified, fondled, dear, darling.

[सं. **व्हल्** , **वेल्लहल** ; प्रा. **वेल्ला** , **वेल्लहल** ; देप्रा. **वेल्लहलो** कोमलो विलासीच (२७१-७) ; गु. **व्हाली** = प्रियकर स्त्री, पत्नी, रक्षा, प्रीतिपात्र ; याकाम. **वेल्हाळ** = विलासी (ज्ञा. १०-२३१), = विस्तारलेला (१३-३१२).]

वेल्हाळ ते न दिसतां विरहांधकारीं ॥ न. द. ७६.

वेंव न. मागाचें सूत गुंडाळावयास लागणारें सरळ लांकूड. A stick used in rolling the thread.

[सं. **वेम** ; याकाम. **वेंव** "कव्हणी एव साळी हाटासि । वेंव वेयावेयाजाए ॥ दृष्टांतपाठ ११.]

वेवट न. त्रास, पीडा, संकट, भीतीचा उद्गार. Calamity, difficulty, an expresion of fear.

[सं. **विवेष्ट** ; देप्रा. **वेव्वे** (भयवारणविषादमन्त्रणार्थेषु– २७०-१४) ; सिं. पं. **वे**.]

वेवत(णें) सक्रि. वेढा घालणें, नेट करणें. To surround, to press.

[सं. **विवेष्टन**, √ **विश्** , **विवृत्त**.]

वेवसाय पुं. व्यापार. Business.

[सं. **व्यवसाय**, **वि** + **अव** + √ **सो**. आरंभीच्या '**व्य**' चा अशिष्ट उच्चार '**वे**' असा पुष्कळ शब्दांत झालेला आढळतो. उदा. **यवस्था** > **वेवस्ता** , **व्यवहार–वेव्हार** , **विवाद** > **वेवाद** इत्यादि.]

वेवेढ(णें) सक्रि. गुंडाळणें. To roll up.

[सं. **वेष्ट्** (**वेवेष्ट**) ; याकाम. **वेवेढ**.]

चंदनु सौरभ्य वेवेढी । किं सुधा आपनपेयां गोडी ॥
गुळुवारी ॐ वांडी । ऐसे आथी ॥ अमृतानुभव
जुनी पोथी ५५५.

वेश्या स्त्री. शरीरविक्रय करणारी स्त्री, कसबीण. A harlot.

[सं. **वेश्या** (**वेशे भवा**) किंवा **विशाम् इयम्** सा वेश्या.]

वेष पुं. पोषाख, पेहराव. Dress, garb, habit, fashion.

[*IE.* Ueis; सं. वेष; *Arm.* Gi; *Cech.* Vich; *Nord.* Visis.]

वेस स्त्री. तटाच्या भिंतींतील दरवाजा, नगरद्वार. The gate in a fortification.

[सं. विश् ६ गतौ, अंतर्गमने; अकामसा. वेसकट, वेसकर.]

वेसजी स्त्री शुद्धि, प्रकाश. Purification, light.

[सं. विशुद्धि; प्रा. विसुज्झि; याकाम. वेषजे, वेसजें (शा. ६-११०). वि + शुध्–विशुध्यते > विसुज्झइ > विसुजे.]

वेसण स्त्री. बैल, रेडा वगैरे जनावरांच्या नाकांत अडकविलेली दोरी, नियंत्रणाचें साधन. The nose-bridle of a bullock.

[सं. अव + यस् (?); देप्रा. अवयासिणी – नासारज्जू.]

वेसना स्त्री. व्यभिचारीणी स्त्री. An adulterous woman.

[सं. वेश्या; प्रा. वेसा; पं. वेसवा; हिं. बेसवा; सिंह. वेसू. वेश्या पहा.]

वेसवार पुं. मेतकूट, मसाला. A condiment of spices.

[सं. वेशवार.]

वेळ(णें) सक्रि. पेज–पाणी निथळून काढणें, तांदूळ हलविणें. To shake and take out the water from.

[सं. वेल् १ चलने, किंवा विल्‌ ६ संवरणे.]

वेळ स्त्री. काळ, मर्यादा, किनारा. Time, duration, limit, shore.

[सं. वेला; पा. वेळा; प्रा. वेला; पै. वेळा; का. वेल; कु. बेर; आ. बेली (पाळी); ओ. बेळ (दिवस); हिं. बेर, बेल (मयादा); पं. बेर, वेल (प्राण्याची लांबी); ला. वेल, वेला; सिं. वेर, वेरो; सिंह. वेल = तीर.]

वेळा, वेळ पुं. स्त्री. दंडांत घालावयाचा दागिना. An armlet.

[सं. वलय.]

वेळणी स्त्री. एक भांडें. A metal plate.

[सं. वेल्लनम्; कु. बेलण; बं. बेलन, बेल्ना; ओ. बेलणा; हिं. बेलना; पं. बेलणा, वेलणा; सिं. वेलणु; गु. वेलण. परंतु हा शब्द कानडींतून आला असावा.]

वेळू पुं. बांबु, कळक. A bamboo.

[सं. वेणू; पा. प्रा. वेळु.]

वैकल्पिक वि. विकल्प सांगितलेला असा, ऐच्छिक. Optional, allowing difference of opinion.

[सं. विकल्प, √ क्लृप्.]

वैकल्य न. वैगुण्य, व्याकुळता. Imperfection.

[सं. विकल + य.]

वैकुंठ न. स्थलविशेष, विष्णु देवतेचें रहाण्याचें ठिकाण. The residence of Vishnu.

[सं. वैकुंठ.]

वैखरी स्त्री. एक वाणी–भाषा, बोलण्याची शक्ति. Speech in the fourth of its four stages.

[सं. वैखरी=चार वाणी. परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी.]

वैंच(णें) सक्रि. (सुपानें पाखडून) वेगळें करणें. To separate (the finer from the coarser parts).

[सं. अव + विच् ७ पृथग्भावे.]

वैज पुं. स्त्री. वैद्य, दाई, सुईण. A physician, a nurse.

[सं. वैद्य; प्रा. वेज्ज; अकाम. प्रां. वैज्ज.]

वैडूर्य न. रत्नविशेष. A kind of jewel.

[सं. वैदूर्य.]

वैताग पुं. संताप, विरक्ति, त्यागबुद्धि, वीट, तिरस्कार. Hasty and sudden fit of anger and consequent renunciation.

[सं. वै + त्याग (?), वि + तक् (?).]

वैद वि. संख्या–सहा, (विटीदांडूमधील) सहावा डाव. Six.

[तेलगु. अयिदु = सहा.]

वैद्य पुं. औषधें देऊन रोगपरिहार करणारा, औषधितज्ज्ञ. A physician.
[सं. **वैद्य**, √ **विद्**.]

वैधव्य न. विधवापण, विधवेची अवस्था. Widow-hood.
[सं. **वैधव्य** < **विधवा**.]

वैनतेय पुं. गरुड. The deity Garud.
[सं. **विनता–पुत्र**.]

वैपरीत्य न. विपरीतपणा. Contrariness.
[सं. **वि + परि + ईत**.]

वैफल्य न. निष्फलता. Fruitlessness.

वैभव न. संपत्ति, श्रीमंती, ऐश्वर्य. Grandeur, glory.
[सं. **विभव**, √ **भू**.]

वैमनस्य न. वैर, गोंधळ, चलबिचल (विमनस् + य). Sadness, hostility.

वैयाकरण पुं. व्याकरण पढलेला. A grammarian.

वैर न. शत्रूत्व. Enmity.
[सं. प्रा. **वैरम्**.]

वैरस्य न. गोडीचा अभाव, शत्रुत्व. Hostility.

वैर(णें) सक्रि. शिजणें, भाजणें, जोरांत दाबून बारीक करणें, भरडणें, उकळत्या पाण्यांत हळूहळू (तांदूळ वगैरे) सोडणें. To pour gradually (rice, etc.) in boiling water.
[सं. **अव + ईर्** २ क्षेपे; याकाम. **वैरण** = जात्याच्या पाळींत, उखळींत (ज्ञा. १८-३६०) वगैरे शेवटच्या घांसाबरोबर घालतात तें धान्य.]

¹**वैरण** स्त्री. पांघरण्याचें वस्त्र, नवऱ्यामुलीची अंगावर घेण्याची चिरडी. A garment used as a cover by a bride.
[सं. **आवरणम्**.]

²**वैरण** स्त्री. गुरांना घालावयाचा चारा, कडबा. Fodder.
[सं. **अव + इरणम्** (?). वैरणें पहा.]

वैरागर न. हिरे वगैरे रत्नांची खाण. A mine of diamonds
[सं. **वैडूर्याकर**. किंवा **वज्राकर**.]

वैरागी पु. बैरागी, वैराग्य उत्पन्न झालेला मनुष्य, संन्यासी. An ascetic or divotee.
[सं. **वि + राग**, √ **रज्**. अकामसा. **वैराग्य** = विरागी वृत्ति. विषयांचा त्याग. कंटाळा.]

वैराण वि. नापीक, ओसाड (जमीन). Desolate, barren (land).
[सं **विराधनम्**; पा. **विराधन**; प्रा. **विराहणा**, पं. **बिराण**, **विराणा**; अकामसा. **वैराणी**; (फा. **वैरानी** = नासाडी). हा शब्द फा. **वैरान्** पासून निष्पादणें अधिक प्रशस्य.]

वैरूप्य न. विरूपता, कुरूपपणा. Ugliness.
[सं. **विरूप + य**.]

वैलक्षण्य न. विलक्षणपणा, भिन्नता. Strangeness.
[सं. **वि + लक्षण**.]

वैवाहिक वि. लग्नासंबंधीं, विवाहासंबंधीं. Pertaining to marriage.
[सं. **विवाह + इक**, **वि +** √ **वह्**.]

वैशद्य न. स्पष्टपणा (विशद + य). Clearness.

वैशाख पुं. एक महिना, दुसरा महिना (**विशाखा** नक्षत्र सूर्याचें). Tne month Vaishakh.

वैशिष्ट्य न. विशेषपणा, फरक, निराळेपणा. Distinguishing feature.
[सं. **विशिष्ट + य** < **वि + शिष्**.]

वैशीक, **वैसीक** वि. वश करणारा. Subjugator.
[सं. **वशी कृ** ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीची व अर्थाबद्दलची हि शंका आहे. याकाम. **वैसीक**.]

ओळखिला वैशीक । भाए. ७४६
वैशीकापासीं हे बांधौनि उसासीं ॥ भाए. ७५१.

वैश्य पुं. व्यापारी उदीमांची जात, हिंदूच्या चार वर्णांपैकीं एक–तिसरा वर्ण. The mercantile class.
[सं. **विश्** = (सामान्य लोक) + **य**.]

वैषम्य न. दुःख, मत्सर, असमता, विषमता. Oddness, misery.
[सं. **वि + सम + य**.]

वैष्णव पुं. विष्णूचा भक्त, एक विशिष्ट संप्रदाय-विष्णु भक्तिसंबंधीं. A devotee of Vishnu, a particular sect of devotees.
[सं. विष्णो: अयम्, √ विश् – व्यापणें.]

वो आरंभीं असलेलें शब्द **ओ** ह्या वर्णाच्या खालीं पहावे. (उदा. वोखटें, वोखद, वोढणें, वोणवा, वोतणें, वोपणें, वोरपणें, वोल, वोली, वोवणें, वोवरी, वोवाळणें, वोस, वोसंग, वोसर, वोसरी, वोहटणें.)

वोखारी, वाखारी स्त्री. भांडारांतील नक्त शिल्लक. The cash money in treasury.
[सं. अव + क्षर्; याकाम. वोखारी.]

वोगर(णें) सक्रि. ओगरणें पहा.
[कान. ओगर = भात; याकाम. वोगरणें (ज्ञा. ६-२२); अकामसा. वोगरा,-ळें.]

वोघरणी स्त्री. फोडणी. An oil-fry.
[कान. ओग्गरण = फोडणी.]

वोज(णें) अक्रि. आचरणें, वागणें. To behave.
[सं. अव + वह्, ओजस्, ऊर्जस्; प्रा. उज्ज; याकाम. वोजणें, वोज (ज्ञा. ६-७३); अकाम. वोज = रीति, मार्ग, व्यवस्था.]

वोटंग(णें) सक्रि. आश्रय करणें, अवलंबून राहणें, बांधणें. To take shelter or support.
[सं. अव + टंक् २ बंधने; याकाम. वोठंगणें (ज्ञा. ३-१२); अकामसा. वोटंगण = आश्रय, बंधन, वोठंगण = लोड, टेकण्याचें साधन.]

वोडव स्त्री. योग्यता, मोटेचें चाक. Fitness, the water-wheel.
[सं. ऊढ, √ वह्; याकाम. वोडव (ज्ञा. ६-३३९.)]

वोडौ पुं. उद्गार, अवतरण. Expression, exclamation.
[सं. उप + धा, (णिच्) उपधापय, > वोढव; याकाम. वोडौ.]

वोणा पुं. ओहोळ, ओहोण. A brook, a streamlet.
[सं. अववहन, √ वह्; याकाम. वोणा, वोत (ज्ञा. १८-१५५५).]
बुंदेस्वरापासौनि तळेयाचा वोणा ॥ ऋ. ११६.
वाजेश्वरा पूर्वे वोतु ॥ ऋ. ११४.

वोत(णें) अक्रि. अवतरणें. To descend.
[सं. अव + तृ; अव + तत, √ तन्; प्रा. ओतर, वोतर; याकाम वोत; अकाम. ओतणें.]
माया घटाकारें वोते ॥ च. सि. सूत्रें २३-६

वोथंबा पुं. ओळंबा, आश्रय. Support.
[सं. अव स्तंभ्, अवष्टंभ: = ओथंबा; याकाम. वोथंब(णें); ओथंबणें पहा.]

वोथर(णें) अक्रि. घाबरणें, नाहींसा होणें, ढिला पडणें, मंदावणें. To be terrified, to disappear, to be loosened.
[सं. अव + स्थिर(नाधा.).]

वोथिज(णें) उक्रि. पातळ करणें, बारीक करणें. To liquify, to pound.
[सं. अव + उत् + स्त्यै १ संघाते; याकाम. बोथिजणें, ओथिजणें पहा.]
आइका पाणी वोथिजावें नलगे ॥ ज्ञा. ९-२१.

वोदर(णें) अक्रि. कोसळणें, उमळून पडणें, ढासळणें. To crumble down.
[सं. अव + दृ; याकाम. वोदरणें.]
वोदरे तेथ मध्यें टेंका सुति । दृ. पा. १०.

वोप पुं. न. मुलामा, तेज, शोभा. A guilding, lustre.
[सं. अर्प् (?).]

वोपसलें न. उजाळा. Furbishing, scrubbing.
[सं. वोपशलाका; याकाम. वोपसरा, वोपसिरा = रत्नावरील मुलामा (ज्ञा. १५-७६).]

वोभाण न. पूर, वेग. Floods, force.
[सं. अवभंण (?); याकाम. वोभाण.]
जेथ प्रपंचाचीं वळणें । कर्माकर्माचीं वोभाणें ।
वरी तरताती वोसाणें । सुखदु:खाचीं ॥ ज्ञा. ७-७३.

वोरपेकार पु. दरोडेखोर. A robber.
[म. ओरपणें < सं. अव + रफ्; याकाम. वोरपेकार, वोरपेकारू गांवें घेताती.]

वोरस पुं. पान्हा, प्रेम, (त्यावरून) पुत्र, वत्स. Love, liking, (hence) a child.
[सं. उरस् > औरस्य; प्रा. औरस्स; याकाम. वोरस (ज्ञा. १४-६२), वोरस(णें) = पान्हा सोडणें.]

वोल पुं. स्त्री. स्त्रियांची ओढणी, (पुरुषाचें) उपरणें. An upper garment.
[सं. पल्लव; याकाम. **पालव > पालौ > वोल**; कान. **ओल्ली** = शेला. **वोलिसावलें** पहा.]
तेही पालौ खोविला ॥ ली. च. खं. ३. पृ. ३९.
चणा वोलीं घालोनी घेऊनी आणिला ॥ ली. च. ३-५७.
कानीं कुंडलें झळाळा । धोंत्र ७० ली ॥ योगवासिष्ठ
१०·१०३.
किं लागला पालव पापिणीचा ॥ सा. ऋ. हरण २-९३.

वोलिसावलें न. स्त्रियांचीं महावस्त्रें. Female garments.
[कान. **ओल्ली** = शेला; याकाम. **ओलीसेलें, वोलिसावलें. वोल** पहा.]
कन्हणा एका रायाचा डिंगरा असे तो वोलिसाउलें ने।
ते उपसाहे ॥ दृ. पा. ८२.

वोल्हाट(णें) सक्रि. बुजवणें, हाकलणें, परतविणें. To drive out.
[सं. **उत्+ रंधं् (णिच्)**.]

वोल्हाव(णें) अक्रि. ओलें होणें. To become wet.
[सं. **उद् ७** क्लेदने; याकाम. **ओल्हावण** = ओला लेप, (महानु) शक्तिवर्धक औषधि, **ओल्हावा–ओलावा.**]
मग तो रावो म्हणे यासि वोल्हावण करी ॥ दृ. पा. ७७.

वोव(णें) सक्रि. ओवणें पहा.
ऐसेनि हा सकलु । जगडंबरु निखलु श्रद्धेचा चि केवलु
वोविला असे ॥

वोवरी स्त्री. ओवरी पहा.
युगसम होय विभावरी । घर **वोवरी** स्मरबाण विलासें ॥
न. द. १२३.

वोवसा पुं. वसा, व्रत, नेम. A vow, an observance.
[सं. **उप + वस्, उप + आस्**; प्रा. **उवास > वोवस**; याकाम. **वोवसा** (ज्ञा. १३-८१७); अकाम. **वसा.** ओवसणें पहा.]

वोस वि. शून्य, ओस पहा. Desolate.
[सं. **ऊष् १** रुजायाम्, **अव+सो ४** अवसाने; याकाम. **वोसि** = शून्यता, खिन्नता; अकामसा. **ओसणें, वोसणें** = नाश होणें, रोग होणें. **वोसळ, वोसल, वोसाड** (अवसन्न).]

वोसण(णें) अक्रि. बरळणें, बडबडणें, ओसणणें पहा. To rave.
[सं. **उत्+स्वप्न**; प्रा. **ओसण्ण.**]

वोसंड(णें) अक्रि. ओसंड(णें) पहा.
[सं. **अव, उत्+स्यन्द् १** प्रस्रवणे.]
मग वोसंडलेनि दर्पे । कामां हि पीत्त कुरुपें ॥
तेया धगी सैंघ पलिपे । क्रोधाग्नीची ॥ ज्ञा. १६-३९२.

वोसंत(णें) उक्रि. आचरणें, त्रास होणें. To practise, to be troubled.
[सं. **अव + सम् + तम् १** पीडायाम्; याकाम. वोसंतणें.]
होतो अज्ञानाचा आंधारा । वोसंतीत जन्मवारा ॥
तें आत्मप्रकाशमंदिरा । आंतु आणिलों ॥ ज्ञा. १७-४२६.

वोसांव(णें) अक्रि. त्रास होणें. To be troubled.
[सं. **अव + सम् ४** परिणाम; याकाम. **वोसांवणें.**]
चंद्रमा कळीं धाला । न दिसे कोण्ही आंगीं वोसांवला ॥
तेवी अपेक्षेचा अवखळा । न पडे जेयां ॥ ज्ञा. १५-३०३.

वोह,–हा पुं. कांस, ओटी, पान्हा. Udder.
[सं. **ऊधस्**; प्रा. **ऊह**; याकाम. **वोह, वोहा.**]
का वोहाचे दुधीं । सायची असावी आधीं ॥ अमृ. ७-६३.
वोहा दाटल्या चहुं स्तनीं । दुग्धधारा वर्षति भुवन ॥ १२-६७

वोहर(णें) अक्रि. ओहरणें, कमी होणें, संपणें To decrease, to be finished.
[सं. **अव + हृ**; याकाम. **वोहरणें, वोहरी** = शून्य-पोकळ जागा.]

वोहरें न. वऱ्हाड, वरात. Bride-bridegroom, a marriage-procession.
[सं. **वधूवर > वहूवर √ वोहर.**]

वोहमाय, वोहमा स्त्री. ओहमाय पहा.

वोहळ, वोहोळ पुं. ओहोळ पहा. ओढा. A brook.
[सं. **अव + वह्, अव + गल्, अव + द्रु १** प्रस्रवणे; अकाम. **वोहळ(णें)** = ओघळणें, वाहून जाणें.]

वोहिनी स्त्री. वहिनी पहा. Brother's wife.

वोळ(णें) अक्रि. ओळणें, वळणें, अनुकूल होणें, प्रसन्न होणें. To be turned towards favourably.
[सं. **अव +वल्, अव + ली ४** श्लेषणे.]

वोळख(णें) सक्रि. जाणणें, माहीत असणें. To know.

[सं. **अव + लक्ष्** १ दर्शने; याकाम. **वोळख** (ज्ञा. १७-३५६), **ओळखण** (ज्ञा. १८-६४९); अकाम. **वोळख**, **ओळख** = परिचय, ज्ञान. ओळखणें पहा.]

वोळग(णें) सक्रि. सेवा करणें, आश्रय करून राहणें, जवळ येणें. To serve.

[सं. **अव + लग्** १ संगे; याकाम. **वोळख** = सेवा, उळीग, **वोळगण**, **वोळगी** = सेवा, **वोळगणा.** = सेवक **वोळगवि(णें)** = सेवेप्रीत्यर्थ अर्पण करणें (ज्ञा. ९-३२२, ४-१६६, १३-४३१).]

वोळंबा पुं. वाळवीचा किडा, वारुळ करणारी मुंगी. Insect in an anthill.

[सं. **वम्रीकः**. वाळवी ही सर्वभक्षक आहे परंतु अग्नीवर तिचा इलाज चालत नाहीं. याकाम. **वोळंबा** (ज्ञा. ८-८९). **इंगळास वोळंबे लावणें** (पीडितानें पीडकावर हल्ला करणें).]

"कोप आलिया ओळंबयासी । केवीं स्पर्षे अग्नीसीं ।"
"श्री गुरुकृपा असे जयासी । काय करील यवन दुष्ट ॥"
गु.च. ४-२४

"वोळिंबा इंगल न चरे । तेजीं तिमिर न सिरे ॥ ज्ञा. ८-८९

वौज(णें) सक्रि. चांगल्या मार्गावर येणें. To turn to good ways.

[सं. **ऋजु** (नाधा.). याकाम. **वौजे.**]

हा गा जरि ऐसें न कीजे । तरि अज्ञाना कइ वौजे ।
तहीं कवणीपरीं जाणिजे । मार्गातें । ज्ञा. ३-१५६.

व्यंकट वि. वांकडा, वक्र, कुटिल. Crooked.

[सं. **वक्र**; प्रा. **वंक**; याकाम. **व्यंकटी** = वांकडेंपणा, कुटिलपणा.]

जे खळाची व्यंकटी सांडो। ज्ञा. १८-१७९४.
भोंवई सांडिली व्यंकटी ॥ **ए. रू.** ७-१७.

व्यक्त वि. स्पष्ट, उघड उघड केलेलें, ज्ञात. Clear, explicit, known, expressed.

[सं. **व्यक्त**, (निष्ठा) + **वि** √ **अंज्**, **व्यक्ति** = स्पष्टपणा. उघडपणा, स्पष्ट उच्चार,–आकार,–स्थिति, (त्यावरून) मनुष्य, पुरुष, आकार, (त्यावरून) बदमाष माणूस.]

व्यंग्य न. न्यून, उणेंपणा. Blemish, a drawback.

[सं. **वि + अंग.**]

व्यंग न. सूचित करावयाचें तें, अप्रत्यक्ष रीतीनें सांगावयाचें तें. That which is suggestible.

[सं. **वि + अंज्**; संसा. **व्यंग्यार्थ**, **व्यंजना.** शब्दाच्या अभिधा, लक्षणा, व्यंजना ह्या तीन शक्ति व वाच्यार्थ, लक्ष्यार्थ, व्यंग्यार्थ हे तीन अर्थ होत. **व्यंजक** = सूचक, **व्यंगित** = सूचित.]

व्यंजन न. वर्णविशेष (स्वरवगळून). A consonant.

व्यंजन, व्यजन . पंखा, विंजण A fan.

व्यतिरिक्त वि. निराळा, भिन्न. Separate.

[सं. **वि + अति + रिक्त**, (निष्ठा) √ **रिच्**; अकामसा. **व्यतिरेक** = वेगळी भिन्न स्थिति, अभाव, अव्याप्ति.]

व्यतिपात पुं. ज्योतिष शास्त्रांतील एक योग. The seventeenth of the astrological *Yogas.*

[सं. **वि + अति + पत्** १ पतने. सतरावा योग हा अशुभ व आपत्ति यांचा सूचक आहे. त्यावरून लक्षणेनें–अपशकुन, संकट.]

व्यत्यय पुं. अडथळा, आडकाठी, मूळचा अर्थ–उलटापालट, विपरीतभाव, विपर्यास. Obstruction, impediment, interchange.

[सं. **वि + अति + इ** २ गतौ.]

व्यथा दुःख, क्लेश, वेदना. Pain.

[सं. **व्यथा, विध्, व्यथ्.**]

व्यधिकरण न. निरनिराळीं अधिष्ठानें असलेले. One having different substrata.

व्यभिचार पुं. नियम–निषेध, अतिक्रम–भंग, अपवाद, मार्गच्युति–दुराचार (त्यावरून लक्षणेनें)–परस्त्रीगमन, परपुरुषगमन. Deviation from common rule, adultery.

[सं. **वि + अभि + चर्** १ गतौ.–**व्यभिचारी. अभिचार** ह्या शब्दाला अथर्ववेदाच्या काळांत विशेष अर्थ प्राप्त झाला. जारण, मारण, अभिचारण वगैरे अनिष्ट मार्ग तेथें निर्दिष्ट आहेत. **व्यभिचारी** ह्या शब्दांत तोच अर्थ आला आहे.]

व्यय पुं. खर्च, वेंच. Expenditure.

[सं. **वि + अय्** किंवा **इ** १ गतौ.]

व्यर्थ वि. निष्कारण, निरर्थक. Useless.
[सं. **वि + अर्थ्.**]

व्यवच्छिन्न वि. निराळा, वेगळा. Separate, different.
[सं. **वि + अव + च्छिन्न** (निष्ठा), √ छिद् ७ छेदने.]

व्यवधान न. मध्यंतरीं येणारा पदार्थ, अडथळा, खंड, गतिरोध. Intervening object, intervention.
[सं. **वि + अव + धा** ३ निधाने.]

व्यवसाय पुं. धंदा, व्यापार, व्यवहार, खात्री, खटाटोप. Buying and selling, certainty, effort.
[सं. **वि + अव + सो** ४ अवयवे.]

व्यवस्था स्त्री. तयारी, योजना, तजवीज, निर्णय, मत. Arrangement, plan, decision.
[सं. **वि + अव + स्था**, **व्यवस्थ(णें)** = ठरविणें.]

व्यवहार पुं. कार्य, व्यापार, धंदा, वहिवाट, पद्धत, देवघेव. Business, transaction.
[सं. **वि + अव + हृ.**]

व्यष्टि स्त्री एकैक, व्यक्ति, देह, पिण्ड. Individual.
[सं. **वि + अश्** ५ व्याप्तौ.]

व्यसन न. नाद, संवय, लहर, संकट, **अडचण**, पाप, गुन्हा. Difficulty, fad, vice, freak.
[सं. **वि + अस्** ४ क्षेपणे, **व्यस्त** = उलटा, विपरीत, वेगळा, निराळा, गोंधळलेला, विपरीत प्रमाण (गणित).]

व्याकरण न. भाषेच्या नियमांचें शास्त्र, विस्तार. A grammar, expansion.
[सं. **वि + आ + कृ**]

व्याकुल,-कूळ वि. पीडित, आकूल, बेचैन, मग्न. Afflicted, engrossed.
[सं. **वि + आ + कुल्.**]

व्याख्या स्त्री. भाष्य, गुणधर्म सांगणें, टीका, स्पष्टीकरण. Definition, commentary.
[सं. **वि + आ + ख्या** २ शब्दे ; अकामसा. **व्याख्याता** = व्याख्या करणारा,-त्यावरून सामान्य अर्थानें वक्ता, बोलणारा, भाषण करणारा ; **व्याख्यान** = विवरण, भाषण, प्रवचन.]

व्याघ्र. पुं. वाघ, हिंस्र पशुविशेष A tiger.
[सं. **वि + आ + घ्रा.**]

[1]**व्याज** न. पैशाच्या वापरासाठीं दिलेलें भाडें. Interest.
[**वि + अज्** (?).]

[2]**व्याज** न. मिष, कपट, ढोंग A disguise, a cover.

व्याजोक्ति न. वाङ्मयांतील एक अलंकार. A figure of speech.

व्याध पुं. शिकारी, पारधी. A hunter.
[सं. **व्यध्** ४ हिंसायाम्.]

व्याधि स्त्री. रोग, आजार, पीडा. A disease.
[सं. **वि + आ + धा.**]

व्याप पुं. व्यापण्याची क्रिया,-त्यावरून सतत वास, लक्ष, निमग्नता. Constant occupiedness.
[सं. **वि + आप्** ५ प्रापणे ; अकामसा. **व्यापक**, **व्यापी** = व्यापणारा, **व्याप्ति** = सर्व ठिकाणीं असणें-विस्तार, व्यापकता.]

व्यापार पुं. क्रिया, चलनवलन, काम, व्यवहार, उद्योग, खटपट. Activity, movement trade.
[सं. **वि + आ + पृ.** ह्या शब्दाच्या अर्थांत बराच फरक झाला आहे. धात्वर्थ **क्रिया, चलनवलन** ह्या स्वरूपाचा असून त्यांत विशेषीकरण बरेंच झालें आहे. 'सामान्य अर्थाची क्रिया' असा अर्थ जाऊन, देववेव, खरेदीविक्रीची क्रिया, 'वाणिज्य' असा अर्थ झाला आहे. अकामसा. **व्यापारी** = दुकानदार, खरेदीविक्री करणारा मनुष्य, वणिक् ; **व्यापारणें** (नाधा.) कामाला लावणें. **व्यापारोपयोगी वारे**-इंग्रजी मधील Trade-winds ह्या शब्दसमुच्चयाचें भाषांतर, व्यापारी गलबतांना उपकारक असे वारे. ह्यांत अर्थाचें विशेषीकरण झालें आहे.]

व्याम(णें) अक्रि. **उद्योग करणें** To exert.
[सं. **वि + आ + यम्** १ उपरमे, प्रयत्ने.]
देहभूतमात्रीं नमिजे । परोपकारीं व्यामिजे ॥
स्त्रीविषीं नेमिजे । नावां नावां ॥ ज्ञा. १७-२०९.

व्यामोह पुं. भ्रम, मोह, संशय. Infatuation.
[सं. **वि + आ + मुह्** ४ मोहे.]

व्यायाम पुं. मेहनत, श्रम, शरीरांतील अवयवांचें बुद्धिपुरःसर चलनचलन, दण्ड-जोर. Exercise, exertion.
[सं **वि + आ + यम्** १ यतने. ह्या शब्दाच्या अर्थांत

विशेषीकरण झालें आहे. मुळ धात्वर्थ सामान्य अर्थाचा आहे. परंतु त्याचें विशेषीकरण झालें आहे. ह्याच सारखा **तालीम** हा शब्द पहा. **'तालीम'** = शिक्षण, व्यायाम, दण्ड.]

व्याल पुं. हत्ती, साप. A serpent, an elephant.

व्यावृत्त वि. वगळलेला, सोडलेला, अलग, निराळा, परत फिरलेला. Dropped out, omitted, separate.
[सं. **वि + आ + वृत्त** (निष्ठा), √ **वृत्.**]

व्यावृत्ति स्त्री. संशय, किंतु, मनाचा गोंधळ, अस्वस्थता. Suspicion, confusion.

व्यास पुं. वर्तुळाच्या एका बिंदूपासून दुसऱ्या बिंदूपर्यंत त्याच्या मध्यबिंदूमधून जाणारी रेषा (भूमिति), विस्तार, रुंदी. Diameter, width.
[सं. **वि + आ + अस्** ४ क्षेपणे.]

व्यास पुं. एका ऋषीचें नांव किंवा ऋषि–अधिकाराचें नांव (बादरायण व्यास, द्वैपायन व्यास). The name of an ancient *rishi*.

व्यासपीठ न. उच्चासन, आसन, पोथी ठेवून वाचण्यास बसावयाचें आसन. A platform, a pedestal.
[सं. **व्यासपीठ.** व्यास हें एक अधिकारदर्शक नांव आहे. मूळ व्यासानें भारत ग्रंथ लिहिला व पुराणें लिहिलीं. दुसऱ्या एकानें शारीरसूत्रें रचिलीं. व्यास म्हणजे पुराणीक. त्यावरून ' व्यासपीठ ' म्हणजे पुराणिकाचें बसण्याचें ठिकाण–आसन, त्यावरून सामान्यीकरण झालें आहे.]

व्यासंग पु. सतत पारिश्रम, अभ्यास, नाद. Constant labour or study.
[सं. **वि + आ + संग,** √ **सञ्ज्**; अकामसा. **व्यासंगी** = उद्योगी, अभ्यासी, परिश्रम करणारा.]

व्याहत वि. परावृत्त, अडविलेला. Impeded, obstructed.
[सं. **वि + आ + हत,** √ **हन्.**]

व्याहाळ न. अरण्य, रान. A desert.
[**वाहयाली–प्रवहणम्** = (महानु) शिकार ; याकाम. **व्याहाळी–व्याहाळ** (णें).]
रावो व्याहाळीए बाहिरी नीगे ॥ इ. पा. ७७.

व्याही पु. नवऱ्या मुलाचा किंवा मुलीचा बाप. The father of the bride or bridegroom.
[सं. **वैवाहिक** ; प्रा. **वेवाहिअ** ; गु. **वेवइ** ; बं. **वेहाई.**]

व्याक्षेप पुं. प्रत्याघात, विघ्न, अडथळा, खोळंबा. Obstruction.
[सं. **वि + आ + क्षेप,** √ **क्षिप्** ४ क्षेपणे.]

व्युत्क्रम पुं. उलट क्रम, विरुद्ध प्रकार, अव्यवस्था, गोंधळ. The reverse order.
[सं. **वि + उत् + क्रम.**]

व्युत्पत्ति स्त्री. परिचय, ज्ञान, नैपुण्य, अर्थांचें ज्ञान, मुळाचें ज्ञान, धातु,–प्रत्यय वगैरेंसंबंधीं शास्त्र. Proficiency, skill, etymology.
[सं. **वि + उत् + पद्, व्युत्पन्न** (निष्ठा) = पारंगत, पंडित.]

व्यूह पुं. सैन्याची विशिष्ट रचना, युक्ति, मसलत. Array or arrangement of army.
[सं. **वि + ऊह्.** मूळ अर्थ न्यायशास्त्रांतील (**ऊहा** पहा) ऊहापोह ; युद्ध शास्त्रांत त्याचा उपयोग होऊं लागला. पुढें सामान्यीकरण होऊन **'युक्ति, मसलत'** असा अर्थ झाला.]

व्योम न. आकाश. The sky.
[सं. **व्योमन्.**]

व्रज पुं. समुह, जमाव, समुदाय, गवळीवाडा. Collection, crowd.
[सं. व्रज, √ व्रज् १ गतौ (?).]

व्रण पुं. क्षत, भोंक, इजा, जखम. A wound.
[सं. व्रण.]

व्रत न. धार्मिक नियम, व्रीद, प्रतिज्ञा. A vow, an observance.
[सं. व्रतम्.]

व्रात्य पुं. उपनयन योग्य वेळीं न झालेला द्विज, (त्यावरून) भ्रष्ट,–बहिष्कृत मनुष्य, (त्यावरून) अनार्य, (त्यावरून लक्षणा) उनाड, खोडकर, नियमबाह्य वर्तनाचा मनुष्य. A brahamin whose investiture is not performed in time, hence a vile child.
[सं. व्रात्य > व्रत. **व्रात्यस्तोम.** बहिष्कृत मनुष्याचा शुद्धिसंस्कार करण्याचा विधि.]

श पुं. मराठी वर्णमालेंतील व्यंजनांपैकीं हें तिसावें व्यंजन होय. हा ऊष्मवर्ण असून ह्याचा उच्चार तालव्य व उच्चारस्थान तालु आहे. प्राचीन वैदिक वाङ्मयांत तालव्य, मूर्धन्य व दन्त्य असे तिन्ही प्रकार होते. पुढें प्राकृत भाषांच्या काळांत ह्यांची सर्वत्र गल्लत होऊन त्यांच्यापैकीं एकच राहिला. त्यांचें एकांत एकत्रीकरण झालें. ढक्की प्राकृतमध्यें सं. '**श**' चा '**श**', व '**स व ष**' च्या जागीं '**स**' झाला (पिशेल २२८). मागधींत '**श**' आहे. इतर प्राकृत भाषांत '**स**' आहे. प्राकृताचें हें स्वरूप आधुनिक भारतीय भाषांत दिसून येईल (म. भा. वि. ब्लोक, पृ. ३२). मराठींत ऊष्मवर्ण एकच आहे. त्याच्यापुढें येणाऱ्या स्वराच्या प्रयत्नाप्रमाणें त्याचे दोन भिन्न उच्चार होतात. '**अ, उ, ओ**' च्या पूर्वी '**स**' '**इ, ए**' च्या पूर्वीं **श** होतो (म. भा. वि. पृ. ब्लोक १९५). The thirtieth consonant in the Marathi alphabet.

[मराठीमध्यें तत्सम शब्दांत जुनी संस्कृत उच्चारपद्धतिच अवलंबिली जाणार हें उघड आहे. व त्याचा परिणाम क्वचित् कांहीं तद्भव शब्दांवरहि झाला आहे. संस्कृत शब्दांचें पुनरुज्जीवन मराठीच्या अमदानींत दोन तीन वेळां झालें. पेशवे काळांत एकदां व आङ्ग्लकाळांत दोनदां असें पुनरुज्जीवन झालें. त्यावेळेस पुनः ऊष्मे तीन्हीचे तीन मराठींत उच्चारूं जाऊं लागले. '**श**' हा तालव्य ऊष्मा आहे.

(आद्य **श**) सं. **श**, **श** ; प्रा. **स**.
(मध्य **श**) सं. **स्य**, **र्श** ; प्रा. **स**.
सं. **क्ष**, **त्स** ; प्रा. **च्छ**.

सामान्यतः सं. व प्रा. **श्**, **ष्**, **स्**, **क्**, **छ्**, **च्छ**, **त्स्**, **स्य्**, **त्स्** इत्यादि वर्णांपासून मराठी **श्** निष्पन्न होतो.]

शउ(ऊ)र पुं. प्रज्ञा, चातुर्य, विवेक. Prudence, skill, discrimination.
[अर. **शुऊर.**]

शंक पुं. संशय, शंका, बोल. Doubt, suspicion, evil surmise.
[अर. **शक** ; पेकाम. **शक** (इम. १९८).]

शंक पुं. कालगणना, कारकीर्दीचा काल, राज्यारोहण वर्ष. An era.
[**शक** = सिथियन मानववंश. सातवाहन, शालिवाहन हा यांतील मूळ पुरुष. त्यानें जय मिळविल्याच्या दिवसापासून शक मोजतात. अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे. **शक** = कोणत्याहि राजवटीचा काळ, राजवाडे सं. **शक्**–ऐश्वर्ये हा धातु मूळ देतात.]

शक(णें) अक्रि. समर्थ होणें, असणें. To be able.
[*IE.* Kag, Keg ; *Av.* Sacati ; सं. **शक्** ५ सामर्थ्यें ; पा. **सक्क** ; प्रा. **सक्क** ; का. हेकुन् ; कु. **सक्णो** ; हिं. **सकना** ; पं. **सक्कणा** ; सिं. **सघणु** ; गु. **शकवूँ** ; अकामसा. **शक्य** = संभाव्य, संभवनीय ; **शक्यक्रियापद.**]

शकट पुं. गाडी, गाडा. A cart.
[सं. **शकटः**]

शकटभेद पुं. फुटाफूट, कट फोडणें, फूट. Breach, treachery.
[सं. **शकटभेद** ; पेकाम. **शकटभेद** = युक्तिभेद. रोहिणी नक्षत्राचा आकार गाडीसारखा आहे. त्यामधून चंद्र अथवा दुसरा एखादा ग्रह गेला म्हणजे **शकटभेद** झाला असें म्हणतात. त्यावरून **जूट फोडणें**, **बेत फोडणें** असा अर्थ प्राप्त झाला.]

शकल न. तुकडा, भाग, खड. A piece, a division.
[सं. **शकलम्.**]

शंक(क्क)ल स्त्री. युक्ति, योजना, रीत, स्थिति, योजना. A plan, scheme, a device.
[अर. **शक्ल्** ; पेकाम. **शकल** (रा. ५-८०), **शकल** (साने पयाव. ४७७.)]

शकुन पुं. चिन्ह, शुभदर्शक खुण, भविष्यकथन करण्यास लागणारा आधार. An omen, a portent.
[*IE.* Kog–ono ; सं. **शकुन** ; *Gr.* Chuchnos ; अकामसा. (**अप**) **शकुन** = वाईट शकुन, दुश्चिन्ह ; **शकुनवंती** = ज्योतिषशास्त्राची पोथी ; **शकुनगांठ** = खात्रीचा निर्णय.]

शक्ति स्त्री. सामर्थ्य, बळ, फेंकण्याचें अस्त्र. Prowess, strength, ability, a missile.
[*IE.* Kek ; सं. **शक्** ५ सामर्थ्यें ; झें. **शच्** ; अकामसा. **शक्ति** = देवी ; **शाक्त.**]

शंकरपाळें न. पक्वान्नविशेष, कणिकेच्या गोड व तळलेल्या वड्या. A sort of sweetmeat.
[फा. **सकरपारा**–ह्याचें नंतर संस्कृतीकरण झालें आहे.]

शंका स्त्री. संदेह, भय, आक्षेप, कल्पना, आडकाठी. Fear, apprehension, misgiving.
[*IE.* Kong, Kenk; सं. **शंस्**, **शक्**, **शंक्**, १ शंकायाम्; *Lat.* Cunctor; अकाम. **शंकणें**.]

शंकु पुं. टोंकाचा खिळा, सळी, शूळ. A spike, a nail.
[सं. **शंकु**.]

शंख पुं. जलचर प्राण्याचें कवच, निर्बुद्ध, मूर्ख. A conch, a dullard.
[*IE.* Konqho; सं. **शंखं**; *Gr.* Cho; *Lat.* Conquis, Concha; झें. **शांख**. शंख हें रणवाद्य म्हणून वाजवीत. **पांचजन्य** = एक शंख, बोंब, ओरड (ल.); **त्वंपुरा** = बोंब, ओरड (पांचजन्य हा शंख समुद्रमंथनांत सांपडला. त्याच्या मंत्राच्या आरंभींचा शब्द). शंख हा पूर्वी निकृष्ट नाणें म्हणून वापरत. त्याचा अर्थ **मठ्ठ**, **मूर्ख** झाला.]

शंखजिरा पुं. संगजिरा पहा.
[फा. **संग जिराहत्**.]

शठ वि. लब्बाड, कपटी, लुच्चा, ठक. Roguish, crafty.
[सं. **शठ**; अकामसा. **शाठ्य** = कपट.]

शत वि. संख्याविशेष, शंभर. Hundred.
[सं. **शतम्**; अकामसा. **शतकृत्य** = अचाट कृत्य, महत्कृत्य (सं. **शतक्रतु** = शंभर यज्ञ–अश्वमेध. इंद्रानें इतके यज्ञ केले); **शतपावली** = भोजनानंतर अन्नपचनासाठीं थोडेसें चालणें; **शतमान** = शंभराचें मापन, शंभर वर्षें आयुष्य; **शतमूर्ख** = अत्यंत मूर्ख, महामूर्ख (शंभर मूर्खांइतका); **शतशः** = शेकडों.]

शत्रु पुं. दुष्मन, रिपु, अपकारी मनुष्य. An enemy, a foe.
[*IE.* Ket, Ked; सं. **शत्**; झें. **शद्–शद्र**. *Eng.* Hate, Hatred. हे शब्द ताडून पहा.]

शनि पुं. एक आकाशस्थ ग्रह, तापदायक मनुष्य (ल.) The planet Saturn.
[सं. **शनि**–एक पापग्रह. हा एका राशींत साडेसात वर्षें राहतो. त्या राशीच्या व्यक्तींना तो संकटांचा काळ असतो. त्यावरून अकामसा. **शनीचा फेरा**, **साडेसाती** = शनीपासून होणाऱ्या त्रासाचा काळ; **शनि** उदरीं येणें.- जन्मराशीस **शनि** असणें; **शनिवार**, **शनैश्चर** (सं. **शनैः + चर**), **शनिशनि** = हळुहळूं.]

शप(प्प)थ स्त्री. आण, भाव, वचन. An oath, solemn declaration.
[सं. **शप्** १ आक्रोशे, **शपथ** (पुं.), लिंगविपरीणमन मराठींत झालें. **शपथ वाहाणें**. **शपणें** = शाप देणें.]

शफ पुं. खूर, गाय म्हैस वगैरेचा खूर. A hoof.
[*IE.* Kapho; सं. **शफ**; *Russ.* Kopyto; *Slav.* Kopati.]

शफरी पुं. माशाची एक जात. A kind of fish.
[सं. **शफरी**.]

शबर पुं. एतद्देशीय एक जात, भिल्ल. A wild tribe.
[सं. **शबर**.]

शबल वि. मिसळलेले, गढूळ, मिश्र, कलंकित. Variegated, intermingled.
[सं. **शबल**.]

शब्खून पुं. रातछापा, रात्रीचा हल्ला. A night-attack.
[फा. **शब्खून्**; पेकाम. **शब्खून** (रा. १९-८०).]

शब्द पुं. ध्वनि, वस्तुदर्शक अक्षरसमूह, आवाज, बोल. A sound, a word.
[सं. **शब्द्** १ शब्दे. लाक्षणिक अर्थ–"**आज्ञा**, **निरोप**, **प्रतिज्ञा**, **वेद**"; अकामप्र. **शब्द खाणें** = शब्द गाळणें; **–टाकणें** = मागणी करणें; **–लावणें** = दोष देणें; **–कोश**, **–गुण**, **–जाल**, **–दोष**, **–पाण्डित्य**, **–प्रमाण**, **–प्रहार**, **–विचार**, **–शक्ति**, **–अर्थ**; याकाम. **शब्दवेधिया** = केवळ शब्दांनीं इतरांना आकर्षून घेणारा (नरुस्व. ४२).]

शमस उल्–उलेमा पुं. (महमदी धर्मांतील) पंडित, महामहोपाध्याय. A learned man among the Muslims.
[अर. **शमूस्** = सूर्य.]

शम पुं. शांतता, स्वास्थ्य, शांति. Stilling, peace, quietude.
[सं. **शम्** ४ उपरमे; अकामसा. **शम(णें)** (नाधा.) = शांत होणें, स्थिर होणें, **शमनीय** = शांत. याकाम. **शमशमणें** = पूर्णपणें शांत होणें.]
कैसी शमशमिते पहा नवाई। मुखैलेपणांची ॥ **ज्ञा.** ११-४२४.

श(स)मला पुं. फेट्याचा सोडलेला पदर, सोगा. The end of a head-gear or turban.
[अर. **शमूला**.]

शमी स्त्री. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[*IE.* Kem; सं. **शमी**; *Lat.* Comisia; *Brit.* Kamps. एक कांटेरी झाड. ह्या झाडाच्या मुळाखालीं खोल पाणी असतें व ह्याच्याशीं अग्नीचा संबंध आहे असें म्हणतात. दसऱ्याच्या दिवशीं ह्याची पूजा करतात.]

शंभर वि. शत, शेंकडा. Hundred.
[सं. **शतम्+भर** (?), वैसं. **शंबर असुर** (?).]

शयन न. निजणें, झोंप, निजण्याचें ठिकाण, बिछाना, खाट, पलंग, आंथरूण. Sleeping, bedstead, a bed.
[*IE.* Kei; सं. **शयनम्**, √ **शी** २ शयने; *Av.* Saeti; *Gr.* Cheitai; *Lat.* Civis; *Lett.* Saimi; *Lith.* Seimyna.]

शर पुं. बाण, तीर. An arrow.
[सं. **शरः**, √ शॄ ९ हिंसायाम्; अकामसा. **शरपंजर** = शरांचा केलेला बिछाना. असा शरपंजर तयार करवून भीष्म त्यावर मृत्यूचीं वाट पाहत निजला. ह्यावरून **शरपंजरी पडणें** म्हणजे दुखण्यानें आजारी पडणें.]

शरट पुं. प्राणिविशेष, पालीच्या जातीचा रानांतील सरपटणारा प्राणी. A chameleon.
[सं. **शरट**, √ शॄ; अकामसा. **सरड,-डा.**]

शरण न. रक्षण, गति, आश्रय. Protection, shelter, support.
[सं. **शॄ** १ गतौ; अकामसा. **शरणागत**–" शरणंगत " असा मूळ शब्द, त्यावरून ' शरणागत ' असा रूढ झाला.]

शरत्,-द् पुं. एक ऋतु–भाद्रपद व आश्विन महिन्यांत येणारा. A season.
[*IE.* Kel; सं. **शरद्**, √ शॄ ९ हिंसायाम्; *Av.* Sared; *Nper.* Sal; *Lith.* Silus.]

शरबत न. सरबत, पेय. A drink,–juice of lemons mixed with water and sugar.
[फा. **शरबत्**, **शराब**=दारू. विशेषत: लिंबू, मोसंबें, डाळिंब ह्याचें तयार केलेलें.]

शरभ पुं. कृमिविशेष. A locust.
[*IE.* Qr, Ql, Kr, Kl; सं. कॄ, शॄ (भेदने, हिंसायाम्).]

शरम स्त्री. लाज, लज्जा. Shame.
[फा. **शर्म्**; अकामसा. **शरम(णें)**=लाज वाटणें, खजील होणें, ओशाळणें. **शरमिंदा**=शरमलेला, खजील.]

शराकत पुं. सरकत, वांटा, इनाम. A share, portion in land, yield.
[अर. **शिराकत्**; पेकाम. **शराकत** (रा. ५-१९); अकामसा. **शराकती**, **सरकती**, शराकतदार, **शरीक**= वांटेकरी, खंडकरी (< अर. **शरीक**).]

शरांटी स्त्री. बाणाची कामटी. A bamboo-stick.
[सं. **शर**, √ शॄ; याकाम. **शरांठी** (अव्यय)= बाणाच्या कैचींत.]
शरांटी पिढौनु । तों हीं खांडें सूनु ॥ शिशु. ४४२.

शराब पुं. स्त्री. पिण्याची दारू, मद्य. (Vinous) liquor.
[अर. **शराब्**; अकामसा. **शराबपाणी**=दारूपाणी, निशाबाजी.]

शरारू वि. घातुक, वाईट, हिंसात्मक. Dangerous.
[सं. **शरारु**, √ शॄ–हिंसायाम्.]

शरीयत् पन्हा पुं. महंमदी धर्म जाणणारा, काझी. A qazi.
[फा. **शरीअत+पन्हा.**]

शरीर न. अंग, देह, काया, वपु, गुह्येंद्रिय (लक्षणा). The body.
[सं. **शरीर** < **शॄ. शरीरप्रकृति**=शरीराचें स्वास्थ्य, प्रकृतिमान (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द); **शरीरयष्टि**= शरीरकाठी, ठेवण. **शरीरसंबंध**=विवाहानें होणारा संबंध, सोयरीक.]

शर्करा स्त्री. साखर, वाळू, रेती, कणयुक्त पदार्थ. Sugar, gravel.
[सं. **शर्करा.** परंतु हा शब्द मागाहून संस्कृतमध्यें घेतला गेला. संस्कृतीकरण हें उत्तरकालीन आहे. वैदिक वाङ्मयांत हा शब्द नाहीं. उत्तरकालीन संस्कृत वाङ्मयांत आढळतो. हा द्राविडी किंवा तुराणी शब्दावरून आला काय ?]

शर्त,-र्थ स्त्री. अट, नियम, कळस, परम सीमा, पराकाष्ठा. A wager or bet, a condition, vast quantity.
[अर. **शर्त्**; शिकाम. **शर्ती** (सभा. ३४), **शर्तमर्दी**= मोठा प्रयत्न, ' सेवा शर्तमर्दीनें केली ' (खरे ४-१८०८).]

शर्मा पुं. ब्राह्मणांच्या नांवापुढें वापरावयाचें उपपद. An adjunct proper to the names of brahmins.

[सं. **शर्मन्** (सुख). " शर्मान्तम् ब्राह्मणस्य, वर्मान्तम् क्षत्रियस्य, दासान्तम् शूद्रस्य " असा नियम होता. उदा. ब्राह्मण–बालकृष्णशर्मा, क्षत्रिय–रविवर्मा, शूद्र-चंदनदास.]

शर्यत स्त्री. चुरस, स्पर्धा, पैज, होड. A wager bet, rivalry.

[अर. **शर्त** , **शरायत.**]

शलाका स्त्री काडी, सळई, तारेचा तुकडा, कामटी. A spike, a little rod or pin.

[*IE*. Kel ; सं. **शलाका**, √ **शल्** ; *Gr*. Chelon; **शलाकापरीक्षा** = परीक्षा घेण्याची एक विशिष्ट पद्धत. एक शलाका घेऊन तिनें ग्रंथ कोठेंहि उघडणें व त्या पानावरील मजकुराचें स्पष्टीकरण करावयास सांगणें.]

शल्य न. टोंचणारा पदार्थ, कांटा. A pin, a spike.

[सं. **शल्यम्.**]

शव न. प्रेत, मढें. A corpse.

[सं. **शव**, √ **शी.**]

शश पुं. ससा. A hare.

[सं. **शश** ; संसा. **शशांक**, **शशधर** = चंद्र. चंद्रावरील डाग सशाच्या आकृतिसारखे दिसतात त्यावरून नांव.]

शशोपंज पुं. संकट, अडचण. Difficulty, an impediment.

[फा. **शशोपञ्ज** ; पेकाम. **शशोपञ्ज** (रा. ५-१००).]

शष्कुली स्त्री. करंजी. A kind of sweetmeat.

[सं. **शष्कुली.**]

शष्प न. कोवळें गवत. Tender grass, the hair on the genitals.

[सं. **शष्प** ; अकाम. **शष्प** = गुह्येंद्रियावरील केंस (ल.)]

शस्त्र न. हत्यार, आयुध. A weapon.

[*IE* Kes ; सं. **शस्त्र**, √ **शस्** १ हिंसायाम्; *Gr*. Cestus ; *Lat*. Castrate.]

शह पुं. नेट, वेध, रोख. A check, a notice.

[फा. **शाह्** = राजा. बुद्धिबळाच्या खेळांत एखाद्या सोंगटीनें राजाची केलेली अडवणूक, कोंडी, सूचना, इशारा. **शहानिशा** = निश्चित निर्णय, निकाल, चौकशी, तपास (फा. **शहन शह**).]

शहर न. मोठें गांव, मोठी वसती, नगर. A city or large town.

[फा. **शहर**, **शार.**]

शहा पुं. राजा, सुलतान, बादशहा ह्यांच्या नांवाच्या पुढें उपपद म्हणून हा शब्द लावतात. A king.

[शहा, (शाह) हे शब्द मूळ फारसी **क्षायथीय** = राजा ह्या शब्दाचा अपभ्रंश आहेत. मूळ इण्डोजर्मनिक Ksi ; सं. **क्षि** = राज्य करणें–हे धातु आहेत. **शहाजाद** = राजाचा मुलगा, राजपुत्र (< फा. **शाहझाद**); **शहाजोग** = उघड-उघड, पतीचा, नांवलौकिकाचा ; **शहानशहा** = राजाधिराज (< **शहन्शह**); **शहानामा** = राजाचा इतिहास (< **शाहनामा**). ह्यांत ६०००० श्लोक होते. फिर्दोसी कवीनें लिहिलेला महमदगिजनीचा इतिहास.]

शहाजण न. नगारा, मंगल वाद्य. A drum.

[फा. **शाद्याना** ; पेकाम. **श्यादान** (रा. ६-५९), **शहाजण.**]

शहाजिरा पुं. एक मसाल्याचा जिन्नस, एक प्रकारचा जिरा. An article in spices.

[फा. **शाहजीरह्** ;गु. **शाजिरु.**]

शहाणा वि. हुशार, चलाख, बुद्धिमान्, अक्कलवंत. Clever, shrewd, smart, sagacious.

[सं. **स + ज्ञान** (?); प्रा. **सेयाण** ; बं. **सेयान** (बुद्धिमान) ; हिं. **सियाना** , **सयाना** ; पं. **सियाणा** ; सिं. **सिआणो.** हा शब्द **विचक्षण** ह्या संस्कृत शब्दापासून राजवाडे व्युत्पादितात. (सं. **विचक्षण** ; प्रा. **विचक्खण** ; पुढें स्वरलोप व व्यंजनलोप झाला असें म्हणतात. परंतु हा दूरान्वय दिसतो. प्रा. '**सेयाण**' ह्याचा **सज्ञान** ह्याच्याशीं संबंध अधिक आहे.]

शहानिशा पुं. स्त्री. निर्णय, चौकशी. Positive determination.

[फा. **शहनशह.** शह पहा.]

शहाबादी (फरशी) वि. पातळ (पांढरा) दगड. White (marble).

[हैद्राबाद संस्थानांतील ' **शहाबाद** ' ह्या गांवावरून हें विशेषण तयार झालें असावें.]

शहामत स्त्री. धैर्य, धाडस, चातुर्य. Boldness, valour.

[फा. **शहामत्.**]

शहामृग पुं पक्षिविशेष. A kind of bird, a griffin.
[फा. शाहेमृग.]

शहारा पुं. कांटा, रोमांच. Quaking, horripilation
[अर. **शअर**=केंस, रोम. " अंगावर शहारा आला ".]

शहाळें न. कोंवळा नारळ. An unripe cocoanut.
[कान. **सियाळ**=कोंवळा नारळ किंवा त्यांतील पाणी.]

शाई स्त्री. कागदावर लिहिण्यासाठीं केलेला काळया रंगाचा कषाय, मसी. Ink.
[फा **सियाही.**]

शाऐन्शी शैन्शी वि. संख्या ऐंशी आणि सहा. Eighty-six.
[सं. **षडशीतिः** ; पा. **छळसीति** ; प्रा. **छळसीईअँ** ; बं. **छेयासि** ; ओ. **छयासि** ; हिं. **छियासी** ; सिं. **छहासी** ; गु. **छयासी** ; ने. **छयासि.**]

शाक स्त्री. भाजी, भाजीपाला. Vegetable.
[सं. **शाखा** (?)]

शाक बेशक पुं. अनिश्चितपणा. शंकाकुशंका, शंकानिरसन. Inexactness, misgiving, removal of doubts.
[अर. **शाक** ; पेकाम. **शाक-बे-शाक** (रा. ७-८२).]

शाकर(णें) सक्रि. घरावर कौलें घालणें, नीट व्यवस्थित करणें, छप्पर करणें. To thatch.
[सं. **छादनकृ** ; पा. **छाद** ; बं **छाओया** ; ओ. **छाइबा** ; हि. **छाना** ; पं. **छाउण** ; सिं. **छाइणु** ; गु. **छावूँ** ; ने. **छाउनु** ; किंवा २ सं. **छायाकृ, शाकृ-शाकर, शकलनम्** (**शकल**=खापर).]

शाखा स्त्री. डहाळी, खांदी, त्यावरून लक्षणेनें-पंथ. भाग, पक्ष, गण. A branch or bough.
[*IE.* Kak, *Kok*; सं. **शाखा** ; *Arm.* cax; *Slav.* Socha ; *cymr.* Caine. **शाखामृग**=डहाळ्यांवर उड्या मारणारा प्राणी म्हणून वानर.]

शागीर्द पु. विद्यार्थी, शिष्य, उमेदवार, नोकरचाकर घरगुती हलकीं कामें करणारा (ल.). A scholar, a disciple, an attendant.
[फा. **शागिर्द, शागिर्दी**=शागीर्दानें करण्याचीं (कामें). अकाम. मध्यें अर्थभ्रंश झाला आहे.]

शाटी, छाटी स्त्री. संन्याशानें नेसावयाचें वस्त्र. A garment (worn by *Sanyasi*).
[सं. **शाटी, शाटिका**=पैठणी ; अकाम. (तद्भव) **साडी.**]

शाडवल वि. खेडवळ, गांवढळ, साधा. Rustic, boorish, simple.
[सं. **शाद्वल**=गवत, धान्य-दर्भ-अंकुर, त्यावरून खेडेगांवीं-गांवढळ असा अर्थ.]

शाडू पुं. पांढरी चिक्कण माती. Yellow-white loam.

शाण्णव, शाहाण्णव वि. संख्या, नव्वद आणि सहा. Ninety-six.
[सं. **षण्णवति** ; प्रा. **छण्णवइम्** ; बं. **छेयानब्बइ** ; ओ. **छयानबे** ; हिं. **छियानवे** ; सिं. **छहानवे** ; गु. **छण्णूं.**]

शाद वि. आनंदी, सुखी. Joyful, happy.
[फा. **शाद्** ; पेकाम. **शाद** (रा. १९-९५) **शाद्मानी**=कुशलवृत्त.]

शादी स्त्री. (महमदी धर्माप्रमाणें) लग्न, विवाह, निका. Marriage.
[फा. **शादी,** < **शाद्**=आनंद.]

शान, छान वि. स्त्री. उत्तम, चांगला, डौल, मान, प्रतिष्ठा. Fine, superb, fineness, pompousness.
[अर. **शअन्** ; पेकाम. **शान** (रा. ३-३७२); अकामसा. **छानदार**=छानदार-चांगला, **शानशोक**-छानछोक.]

शान प्र. धातुसाधिताचा प्रत्यय. A termination of verbal derivatives.
[सं. **सत्, सन्** ; अकामग्रा. **शान** ; **श्यान, शानी. करूनशान, जाऊनशान** इ.]

शांत पुं. वि. गप्प, थंड, शमलेला, सौम्य, संतुष्ट, रसांपैकीं एक रस. Quiet, calm, mild, gentle, *a rasa.*
[सं. **शांत** (निष्ठा), √ **शम्** ४ शांतौ ; *Lat.* Cedo अकामसा. **शांतता, शांति**=संतोष, समाधान, स्थिरता ; **शांतिपाठ**=बाळबाळंतिणीस अनिष्ट बाधा होऊं नये म्हणून म्हणण्याचा मंत्रपाठ.]

शाप पुं. वाईट इच्छा, अपशब्द, अनिष्टचिंतन, तळतळाट.

[*IE.* Kapo; *Lith.* Sapai; सं. **शाप**, √ शप् ४ अभिशापे. **शापा**दपिशरादपि = शापाच्या सामर्थ्यानें किंवा बाणाच्या सामर्थ्यानें अशा दोहोंनीं (पूर्वीच्या ऋषींच्या उदा. द्रोणाचार्यांच्या अंगांत असें दुहेरी सामर्थ्य होतें.]

शाबास अ. भले! वाहावा! Bravo, well done.

[फा. **शाबाश्, शादबाश्, शाहअब्बास; शाबासकी** = स्तुति, वाहवा.]

शाबुत वि. टाकठीक; व्यवस्थित, मजबूत, न मोडलेलें. Firm, sound, unimpaired.

[अर. **सुबूत.**]

शाम वि. काळा, श्याम. Black, sable.

[सं. **श्याम.**]

शामदान न. मेणवत्तीचा उभा दिवा, ठाणवाई. A candle-stand.

[फा. **शमादान्.**]

शामल पुं. काळा, हबशी. Abyssinian.

[सं. **श्यामल** किंवा **सोमाली** प्रदेशांतील मनुष्य. दुसरी व्युत्पत्ति ग्राह्य. अठराव्या शतकांतील कागदपत्रांत जंजिऱ्याच्या हबशी राजाबद्दल हा शब्द वापरला आहे.]

शामियाना पुं. मोठा तंबू, डेरा. A big tent.

[फा. **शामियाना, शाम्याना.**]

शा(सा)मील वि अंतर्विष्ट, समाविष्ट. Included.

[अर. **शामिल्**; पेकाम. **शामील** (रा. ७-११).]

शारदा स्त्री. वाणीची अधिष्ठात्री देवता, सरस्वती. The goddess of learning.

[सं. **शारदा**, < **शरद्**, √ शॄ ९ हिंसायाम्. '**शरद्**' ह्या शब्दाच्या अर्थाचें सामान्यीकरण झालें व त्याचा मूळचा अर्थ नाहींसा होऊन नव्या अर्थाच्या शब्दापासून '**शारद, शारदीय**' वगैरे विशेषणें झालीं. त्यांपैकीं पहिल्या '**शारद**' ह्या विशेषणापासून **शारदा** हें नाम सिद्ध झालें. ह्यांत '**शॄ**' च्या मूळ अर्थाचा विसर पडून तो शब्द नव्या अर्थानें विशेषण व नाम म्हणून रूढ झाला.]

शार्ङ्ग न. शार्ङ्ग नावाचें विष्णूचें धनुष्य. The bow of Vishnu.

[सं. **शृंग**; अप. **शारङ्ग**; वर्णविश्लेष किंवा स्वरभक्तीनें **शारङ्ग** हा शब्द सिद्ध झाला.]

शार्दूल पुं. वाघ, (समासांत) श्रेष्ठ. A tiger.

[सं. **शार्दूल.**]

शाल स्त्री. लोंकरीचें वस्त्र (पांघरण्याचें). A shawl.

[फा. **शाल्.**]

शाला, शाळा स्त्री. शिक्षणाचें गृह,-घर,-स्थान,-ठिकाण, A house, an apartment, a school or reading place.

[*IE.* Kelkl; सं. **शाला**, √ **शल्**; *Lat.* celo, cella, calleus √ celo; *Gr.* chalta; सं. **शाला** ह्याच्या अर्थांत विशेषीकरण झालें आहे. सामान्य अर्थ–' जागा ' परंतु पुढें शिक्षणाची जागा, शिक्षणाची रीत, संप्रदाय, मंडळ, पद्धत असा अर्थ झाला.]

शालिवाहन पुं. एक राजकुलाचें नांव, शककर्ता. The name of a king.

[सं **शालिवाहन, शातवाहन. सातवाहन.** एक कालगणना. हा शक नर्मदेच्या दक्षिणेकडील प्रांतांत चालतो. आरंभ चैत्र शु॥ १. ख्रिस्ती शकाच्या ७८ व्या वर्षी सुरू. ह्या शब्दांचें निवर्चन राजवाडे ह्यांनीं केलें आहे त्यांत काल्पनिक भाग बराच आहे. शालिवाहन = तांदूळ वाहणारा; शातवाहन = ज्यांच्या गाडीच्या बैलाचे कान कापले आहेत असे.]

शाली वि. शोभणारा, चमकणारा. Shining or lustrous with.

[सं. **शाली**, √ **शल्**–प्रकाशने.]

शालीन वि. लाजाळू नम्र. Modest.

[सं. **शालीन.**]

शालू पुं. उत्तम उंची रेशमी वस्त्र. A cloth of fine texture.

शाव, शावक पुं. छावा, बचा, मुलगा. A young one of a tiger or lion, a child.

[सं. **शाव, शावक**; *Av.* Syava; *Nper* Siyah]

शाश्वत वि अ नेहेमीं, चिर, कायमचें. Constantly.

[सं. **शाश्वत्, शाश्वती** = टिकाऊपणा.]

शास(णें) सक्रि. राज्य करणें, शासन करणें, दण्डणें. To rule.

[*IE.* Kas; सं. **शास्** २ शासने; *Av* Sasti; *Arm.* Sast: *Lat.* Castus; *Goth* Hazjan; याकामसा. **शासन** = राज्यकारभार, सत्ता, दण्ड; **शास्त** = शासन, दण्ड; **शास्ति** = शासन, शिक्षा, दण्ड.]

शास्त्र न. कोणत्याहि विषयाचा उच्च अभ्यास–नियम, दर्शन. Institutes of (religion, law etc.), scripture.

[सं. **शास्** २ शासने, **शास्+त्र; शास्त्री** = पंडित, विद्वान्, शास्त्र पढलेला.]

शाहदी स्त्री. साक्ष, गोही. Evidence.

[फा. **शाहिदी.**]

शाहत्तर वि. संख्या, सत्तर आणि सहा. Seventy-six.

[सं. **षट्सप्तति** ; प्रा. **छावत्तरीम्** ; बं. **छेयात्तर** ; ओ. **छअत्तर** ; हिं. **चहत्तर** ; सिं. **छाइतरी** ; गु. **छोतेर** ; ने. **छयहत्तर.**]

शाही वि. न. राजाचा, राजासंबंधीं, ताबा, अम्मल, सत्ता, कारकीर्द, राज्य. Belonging to king, kingship.

[फा. **शाही < शाह्** = राजा.]

शाहीर पुं. कवि–विशेषतः पोवाडे लावण्या रचणारा व गाणारा. A poet (of ballads and folk-songs).

[अर. **शाइर.**]

शाहीरू पुं. वेतनव्यय, राज्यकारभारांतील खातें. A department of public accounts.

शाळा स्त्री. शाला पहा.

शाळू पुं. जोंधळयाची एक जात. A kind of *jwari.*

शाळू वि. थोडा वेळ टिकणारा, क्षणिक, नश्वर. Fleeting, fugitive, ephemeral.

[सं. **शीतकालः** ; प्रा. **सियाल** ; थंडीच्या दिवसांत दिवस लहान असतो. **शाळू** दिवस, –सोबती.]

शिक(णें) क्रि. पढणें, अभ्यास करणें. To learn, to study.

[सं. **शिक्षते** ; पा. **सिक्खति** ; प्रा. **सिक्खइ** ; का. **हेच्छुं** ; कु. **सिखणो** ; आ. **सिकिब** ; बं. **सिका, शिखिबा** ; ओ. **सिखिबा** ; हिं. **सिखना** ; पं. **सिक्कणा** ; लां. **सिक्खण** ; सिं. **सिखणु** ; गु. **सिखवूँ** ; अकामसा. **शिकवि(णें)** = पढविणें ; **शिकाऊ** = शिकणारा ; **शिकवणी** = शिकविण्याची पद्धत,–वेतन.]

शिकंदर पुं. एका ग्रीक राजाचें नाव, त्यावरून मोठा पराक्रमी जगज्जेता. Name of a king, Alexander.

[ग्री. **अलेक्झांडर** ; अर. **इस्कंदर** ; फा. **सिकन्दर.**]

शिकर(क)ण स्त्री. न. केळें दुधांत कुसकरून गूळ-साखर घालून केलेला पदार्थ. Plantains-milk-sugar mixed together.

[सं. **शिखरिणी, श्रीखण्ड.**]

शिकल स्त्री. जिल्हई, साफसुफी, उजाळा. Polishing, furbishing.

[अर. **सैकल्. शिकलकर–गार** = हत्यारें उजळणारा.]

^{1}**शिकस्त** वि. स्त्री. पराजीत, पराभूत, मोड, दुर्दशा, हार. Defeated, defeat.

[फा. **शिकस्त** ; पेकाम. **शिकस्त** (रा. १०-१३९).]

^{2}**शिकस्त** स्त्री. कमाल, पराकाष्ठा, अतिसीमा. High pitch or degree.

[फा. **शिकस्त.**]

शिकार स्त्री. मृगांचा पाठलाग व हत्या, पारध, मृगया. A hunt.

[फा. **शिकार. शिकारखाना** = वन्य पशुपक्षी ठेवण्याची जागा, त्यांची निगा राखणारें खातें.]

शिकेकाई स्त्री. वनस्पतिविशेष, केंस वगैरे स्वच्छ करण्यास वापरावयाचा पदार्थ. A kind of plant and the pod of it.

[कान. **शिगी** = नांवाची वनस्पति (ते. **शिगा** = बुचडा ; कान. **काई** = शेंग). पहिली व्युत्पत्तिच ग्राह्य.]

शिक्का पुं. छाप, ठस्सा, मुद्रा. A stamp, a seal.

[फा. **शिक्का. शिक्काकट्यार** = अधिकाराचीं चिन्हें. पूर्वीं अधिकारप्राप्ति झाली म्हणजे दोन जिन्नस दिले जात. एक मुद्रा करण्याचा अधिकारदर्शक शिक्का व दुसरा कट्यार.]

शिखंड पुं. मोराचें शेपूट किंवा तुरा, मुलाच्या डोक्यावरील जावळ. The tail of a peacock, the locks left at the time of tonsure.

[सं. **शिखंड, शिखंडी** = मोर, द्रुपदराजाचा पुत्र. त्याला जावळाचीं झुलपें होतीं म्हणून **शिखंडी** म्हणत असावे. हा मूळ स्त्री असून पुढें वरप्रसादानें त्याला पुरुषत्व प्राप्त झालें. (लक्षणा) नपुंसक.]

शिखर न. टोंक, शेंडा, देवालयाचा वरचा भाग, माथा, (ल.) पराकाष्ठा, कळस, शेवटची सीमा. The peak or summit, apex.

[सं. शिखर. शिखा, शृंग ह्यांशीं संबद्ध.]

शिखा स्त्री. शेंडी, तुरा. The tuft, crest.

[सं. शिखा-शृंग ह्याशीं संबद्ध. शिखी = शिखा, शेंडी किंवा तुरा, शेंडा ज्याला आहे असा-म्हणजे मोर किंवा डोंगर.]

शिंक(णें) अक्रि. नाकांतून श्लेष्मा बाहेर पडणें, नाकांत खाजून खोंकणें, शिंक येणें. To sneez.

[सं. शिघ्, शिंह्, शृंख् १ आघ्राणे, छिक्क; देप्रा. छिक्कम्; बं. छिक्का; ओ. छिक्क; हिं. छिंक; पं. छिक्क; सिं, छिक; गु. छिंक; ने. छिंक; कान. सिन् = शिंकणें ह्यापासून व्युत्पादितात तें ग्राह्य नाहीं. असल्या शब्दावरून उघड अनुमान होतें कीं कांहीं देप्रा. शब्दांचीं मुळें संस्कृत असणें शक्य आहे ही कल्पनाच प्राकृत व्युत्पादिकांना नव्हती. मुळें संस्कृत असून सुद्धां ते शब्द देप्रा. म्हणून हेमचंद्रानें दिले आहेत.]

शिंकर पुं. स्त्री. नाकांतील घाण. The dirt in the nose.

[सं. शीकरः = वातः, √ शिघ् १ आघ्राणे; सिंहण, सिंघण, सिंहाण, सिघण, सिंघाण; अकामसा शिकरणें द्रा. सिंबळ, सुंबळ ह्यांपासून ' शेंबूड ' शब्द आला.]

शिंकें न. दोऱ्याचें केलेलें टांगतें जाळें, म्होरकी. A sling (for suspending things).

[वैसं. शिकी; सं. शिक्य; पा. सिक्का (दोरी); प्रा. सिक्कय, सिक्कग, सिक्किआ; का. शिखुरु; कु. सीको; बं. सिक्, सिका; ओ सिका; बि. सिक्, सीका, सिकाँ; गु. सिकूं. मराठींतील अनुस्वाराची उपपत्ति काय ? अनुस्वार कोठेंच नाहीं. अपभ्रंश भाषेंत तो असावा. बिहारी भाषेंत आहे. कान. सिक्किसु = गुंतणें, गुतणें हा धातु चिन्त्य आहे.]

शिंग न. जनावराच्या कपाळावरील शृंग. A horn.

[सं. शृंगम्; पा. प्रा. सिंग; का. सेंग; कु. सीङ; आ. सिङ; बं. सिङ; ओ. सिंग; हिं. सींग; पं. लां. सिंग; सिं. सिङु; गु. सिंग; ने. सिंढ; अकाम. शिंगोटी (शिंग, गुरांवरील कर).]

शिंगरूं न. घोडें, खेंचर, गाढव इत्यादि प्राण्याचें लहान पोर. A young one of a horse, a colt.

शिं(सिं)गाडा पुं. पाण्यांत होणारी एक वनस्पति. A water-plant.

[सं. शृंखाणिका, (शिंङ्घानः); पा. सिङ्घानिका; प्रा. सिङ्घाण; कु सिङाणो; अ. ह्सेङ्गुन्; बं. सिङ्घान्, सिंघन्; ओ. सिंङ्घाणि, सिंगाणि.]

शिग्राम पुं. गाडी, धमणी. A vehicle.

¹**शिज(णें)** क्रि. उकळून मऊ होणें, रांधणें जाणें, पकणें. To soften by boiling, to be cooked.

[सं. सिध् ४, सिध्य-(सविकरण); प्रा. सिज्ज, सिज्झ; पं. सिज्जणा; सिं. सिझणु; हिं. सिझाना, सिजाना; गु. सिजवूँ; ओ. सिजिबा.]

²**शिज(णें)** अक्रि. घाम फार येणें, उकडणें. To be sultry, to be perspiring.

[सं. स्विद्य; प्रा. सिज्ज > शिज (उदा. अंग शिजणें). टर्नर पुढीलप्रमाणें व्युत्पत्ति देतो ती मान्य करतां येत नाहीं; सं. क्षीय; पा. खिय; प्रा. खिज्ज; हिं. खियाना; सिं. खिजनू.]

शिंच(णें) क्रि. शिंपडणें, पाणी मारणें. To sprinkle.

[सं. सिञ्चति; पा. सिञ्चति; प्रा. सिञ्चइ; अ. ह्सिंसिब, ह्सिसिब; हिं. सिंचना; पं. सिञ्जणा; लां. सिञ्जण; गु. सिचवूँ; मराठी व गुजराती धातु हे संस्कृत कर्मणि रूपापासून आले आहेत.]

¹**शिट(णें), शिंट(णें)** अक्रि. विष्टा टाकणें, घाण शिंकरून टाकणें. To void excrement.

[सं. शिंघ् १ आघ्राणे, शिक्थ (ना.) > शिट्ठ = पांखराची विष्टा.]

²**शिट(णें)** अक्रि. (चांगल्या घोड्याऐवजीं वाईट घोडा एखद्या घोडीस) लागणें. To get covered (used of a mare).

[सं. शिट्, षिट् १ अनादरे].

शिडक(णें) अक्रि. शिडका टाकणें, शिंपडणें, कापडाला रंगाचा शिंप देणें. To sprinkle.

[सं. क्ष्वेडः (नाश), श्वित् १ वर्णे; अकाम. शिडका (देप्रा. छित्र, छिटक्क; बं. ओ. छिटा; हिं. छींट).]

शिडी स्त्री. पायऱ्या लावलेली बाबूंची एक लांबट चौकट. A ladder.

[सं. श्रेधी, श्रेडी, श्रेढी ; प्रा. सेढी, सेढि ; देप्रा. सिङ्घि ; का. हेर ; बं. शिडी ; ओ. सिढि ; बि. हिं. पं. सीढी ; गु. सीढी ; २ सं. श्रेणीः ; पा. सेणी ; प्रा. सेणि.]

शिण(णें) अक्रि. दमणें, थकणें, श्रमणें. To be tired or exhausted.

[सं. १ क्षीण् ८ हिंसायाम् किंवा शॄ ९ हिंसायाम् ; २ श्विद्, (निष्ठा) श्विन्न. शिणोटा = थकवा, दमणूक.]

शिणगार पुं. शृंगार. Decoration.

¹शितर(णें) अक्रि. चितरणें, रंग भरणें. To paint, to draw.

[सं. चित्र (नाधा.) किंवा श्वित् १ धवलीकरणे.]

²शितर(णें) सक्रि. फसविणें, नागवणें, संकटांत पाडणें. To deceive.

[सं. श्वर्त् १० दुर्गतौ.]

शि(शी)तळ वि. थंड गार. Cold, cool.

[सं. शीतलम्.]

शिता पुं. केसाचा भांग. Parting of the hair.

[सं. सीमन्त (मर्यादा) ; पा. सीमन्तो ; प्रा. सीमन्त ; कु. स्यूनी ; आ. ह्स्युन्ता ; बं. सिँता, सीथा, सिति ; लां. सीन्ध ; सिं. सिंधि ; गु. सेंती, सेंथी.]

शिताप,-पी,-फ न. कौशल्य, चपलाई. Skill, smartness.

[फा. शिताप् ; पेकाम. शिताफ, सिताफ (सभा. १७) (रा. ६-२१९); अकाम. शिताफ, सित्ताफ, सिताब.]

शिताफळ न. वनस्पतिविशेष व फळ. A kind of plant and its friut.

[सं. शीत फल. मधील 'आ'ची उपपत्ति काय ?]

शिथिल वि. सैल, ढिलें, मंद. Loose, dull.

[वैसं. शृध् ; सं. शिथिल. ह्यापासून दोन तद्भव होतात एक सढळ व दुसरा सैल.]

शिदोरी स्त्री. शिजवलेलें अन्न. Dressed provisions (for a journey).

[सं. सिद्धः ; पाप्रा. सिद्ध ; आ. शिधा (मरा. शिधा = कच्चें अन्न दिलेलें); बं. सिधा ; बिहिं. सीधा (पुं.) ; सिं. सीधो ; गु. सीधूँ. मराठी शिजणें पहा. शिज(णें) = तयार करणें, पकविणें, रांधणें. सं. सिध्यति ; पा. सिज्झति ; हि. सिझना ; गु सिजवूँ ; अ. ह्सिस्साइब ; बं. सिझा, सिजा ; ओ. सिझिबा. सं. सिद्ध = पक्कें, तयार झालेलें ह्या शब्दापासून 'शिधा = कच्चें अन्न' असा अर्थ असलेला शब्द कसा निष्पन्न होणार ? तेव्हां व्युत्पत्ति दुसरीच असली पाहिजे.]

शिना वि. निराळा. Separate.

[सं. शीर्ण (निष्ठा), √ शॄ ; याकाम. आत्मा देहाहून शिना.]

शिनसाल स्त्री. जुनी साल. Old skin.

[सं. शीर्ण + छाल.]

भंवईचीं पडळें । वोमथती शिनसाळें ॥ ज्ञा. १३-५६०.

शिंतड(णें) सक्रि. शिंपडणें पहा.

शिंतोडा पुं. पाण्याचा थेंब, तुषार, पाण्याचे तुषार. Sprinklings.

[सं. सिच्, सिंच् १ सेचने + उद्धू ६ उद्धवने (राधा.). एका ' सिंच् ' धातूपासूनच शिंचणें, शिंपड(णें), शिंतड(णें) हे तिन्ही धातु निघाले असावेत असें वाटतें.]

शिंद(न)ळ वि. वाईट चालीचा, बदफैली, दुराचारणी. Adulterous.

[सं. छिद्, छिन्न, क्षुण्ण (?) ; देप्रा. छिण्णो, छिण्णाल, छिण्णालिआ ; हि. छिनाल. राजवाडे ह्या धातूचें निर्वचन शिश्नदेवनीपासून असें करतात तें चिन्त्य आहे.]

शिंदा पुं. जारकर्मज, लेकवळा, रक्षापुत्र, ठेवलेल्या बाईपासून झालेला मुलगा. An illegitimate child.

['शिदळ' ह्या शब्दाशीं संबद्ध आहे काय ? पेशवेकालीन कागदपत्रांत हा शब्द वरील अर्थी वापरला आहे. 'शिंदे' हे सरदाराचें आडनांव सेंद्रकपासून तें निराळें आहे.]

शिंदी स्त्री. वनस्पतिविशेष, खजूरीच्या जातीचें एक जंगली झाड, ह्या झाडाचा रस, एक प्रकारची दारू. A kind of plant, its juice.

[सं. ?; हिं. सेंध.]

शिंदे मराठ्यांचें एक आडनांव, उपनांव. A Maratha surname.

[सं. सेन्द्रकाः. ह्यांच्या देवकाशीं ह्याचा संबंध असावा.]

शिपाई पुं. सैन्यांतील नोकर, योद्धा, चाकर. A servant, a soldier.

[फा शिपाही. (-खोर,-गिरी,-बाणा,-डा इत्यादि प्रत्यय लागून आणखी-भाववाचक, अल्पत्ववाचक असे शब्द होतात. हे प्रत्यय फारसी आहेत).]

शिफारस स्त्री. वाखाणणी, वाहवा, तारीफ, प्रशंसा. Recommendation, praise.

[फा. सिफारिश्; पेकाम. सिफारस (रा. १२-१०).]

शिबंदी स्त्री. फौज (कांहीं विशेष कामासाठीं-वसुलासाठीं ठेवलेली), हंगामी सैन्याची तुकडी. An army (maintained for a special purpose).

[फा. सिहबंदी.]

शिबिर न. सैन्याचा तळ, मुक्काम, छावणी. A camp of an army.

[सं. शिबिरम्.]

शिमगा पुं. होळीचा सण, फाल्गून पौर्णिमेचा सण, (लक्षणा) बोंब, शंख, अश्लील भाषण. The *holi* festival, (fig.) bawling.

[सं. शृङ्गार (?)]

शिंप(णें) अक्रि. सडा टाकणें, पाणी शिंपडणें, सिंचणें. To sprinkle.

[सं. सिन्व्, सिच् १ सेचने; प्रा. सिंप्प, सिंप; देप्रा. सिंपइ (सिंचति).]

शिंप,-ली,-लें स्त्री. समुद्रांतील एका प्रकारच्या कीटकाचें कवच-आवरण. An oyster-shell.

[सं. शुक्ति; प्रा. सिप्पि; हिं. सीप; कान. सिप्पु, सिंपु=आच्छादन; परंतु हा संस्कृत शब्दापासून कानडींत तद्भव झाला आहे.]

शिंपड(णें) क्रि. पाणी टकणें, तुषार टाकणें, उडविणें. To sprinkle water.

[देप्रा. छण्ट; प्रा. छण्टई; हिं. छाँटना; पं. छण्डणा; सिं. छण्डणु; गु. छाँटवूँ, छाँट्नु (निवडणें). पुढील व्युत्पादन बरोबर नाहीं. कारण सर्व भाषांतील शब्द दुजोरा देत नाहींत. सं. क्षिप्, सिन्व् १ सेचने; प्रा. सिप्प+ड.]

शिंपी पुं. शिवणारा, शिवण्याचें काम करणारी ज्ञाति, दर्जी. A caste, a tailor.

[सं. सीव्, षिव् (?); प्रा. शिप्पिअ; देप्रा सिप्पी=सुई. प्राकृत शब्दाचें संस्कृत मूळ 'शिल्पिन्' असें आहे. सं. शिल्पम्; पा. प्रा. सिप्प; कु. सिप (हुशारपणा); अ. हिसपिनी (हुशार विणकरीण). मराठींतील अनुस्वार अपभ्रंश भाषेंतून आला.]

शियारी स्त्री. कांपरें, रोमांच. Horripilation, shivering.

[सं. शिशिर; √ शॄ; याकाम. शियारी, शारी, सियारी (ज्ञा. १६-६९).]

परी येतुलियाही वेगळा । जो केवळ आनंदैक कळा । तया अंतरात्मयाही निश्चळा । शियारी आली । ज्ञा. ११ ३६९

शियाळ पुं. कोल्हा. A jackal.

[सं शृगाल; प्रा. सिआल; तुर्की. Chakal; फा. शघाल्; *Eng.* jackal. हे दुसऱ्या भाषेंतील शब्द आहेत; त्यावरून हा प्राणी फार प्राचीन काळापासून सर्व भाषिकांना-आर्य व शिमी लोकांना माहीत होता असें दिसतें.]

शिर(णें) अक्री. आंत जाणें-घुसणें, प्रवेश करणें. To enter or go in.

[सं. श्रि १ सेवायाम्=आश्रय करणें, आधार घेणें.]

शिर न. डोकें, मस्तक, माथा. The head, the top.

[*IE.* Ker; सं. शिरस्; *Av.* Sarah; *Gr.* Cherhas, Charh; *Lat* Cerebrum; अकामसा. **शिरावर घेणें**=जबाबदारी पत्करणें; **शिर्ताज**=डोक्यावरील दागिना (< फा. **शिर्ताज**); **शिर्पाव**=डोक्याचें पागोटें, मानसन्मानाचा पोषाख (ल.) (फा. **सरोफा**); **शिरयाळें**=धड, डोक्याचें आसन-आधार (**शिरस् + आलय**); **शिरोबिंदु**=उच्च टोंक; **शिरोमणि**=डोक्यावरील दागिना; **शिरोलेख**=मथळा; **शिरोवेदना**=डोकेंदुखी.]

'शिर, शिरा स्त्री. नाडी, नस. A vein, any vessel of the body, artery.

[सं. शिरा; प्रा. छिरा.]

'शिर, शिरा वि. चांगलें. उत्तम, सुरेख. Good, fine.

[अर. शिरा; पेकाम. शिरा (दारू).]

शिरा पुं. एक पक्वान्न-रवा,-तूप-साखर युक्त, सांजा. A kind of sweetmeat..

शिरक(णें) अक्रि. आंत जाणें, घुसणें. To enter or go into, to penetrate.

[सं. श्रिक् १ गतौ. कान. 'सेरकु'=आंत शिरणें-धातु चिन्त्य आहे; **शिरकविणें**=घुसविणें.]

शिरजोर वि. डोईजड, वरचढ, हेकड, तिरसट. Headstrong, refractory, turbulent.

[फा. सझोर.]

शिरशिरी स्त्री. कांपरें, हुडहुडी. Shivering.
[सं. **शृ** ९ हिंसायाम्, **चिरि**-हिंसायाम् (राधा.); याकाम. **शारी, शियारी** (ज्ञा. १६·६९) = भय कंप.]

शिरस्ता पुं. चाल, रीत, पद्धत. Practice, usage.
[फा. **सरिश्ता. शिरस्तेदार** = न्यायकचेरींतील शिरस्ता सांगणारा कारकून–ह्यावरून अर्थाचें सामान्यीकरण होऊन–मुख्य कारकून.]

शिराज(णें) अक्री. शोभणें, सुंदर दिसणें. To look fine.
[सं. **श्री** (नाधा.), **श्रीयते–शिराजे.**]
नावंद झळकें कटितटी । मणि शिराजे ॥ कथा.१-१-११.

शिराणी स्त्री. मोठा लाभ, आनंद, गोडी, समाधान सुख, आवड, महत्त्व, मातब्बरी. Delight, pleasure, gratification, preciousness.
[फा. **शिराणी** = गोडी, पक्वान्न ; सं. **शिरस्** (?); याकाम. शिकाम. **शिराणी** (ज्ञा. १६·३९).]
आणि पुत्रें मी सर्व गुणी । जिणावी हे बापा शिराणी ॥ ज्ञा. १८.–१६५२. दृढतर मनिंभावे पूर्ण ज्याची शिराणी ॥ आनंदतनय (शबयोख्यान)

शिराळशेट पुं. एक विशेषनाम. Name of a fabulous king.
[हें एक दंतकथेंतील राजाचें नांव असून त्याला साडेतीन घटकाच फक्त राज्य करण्याची संधि मिळाली. परंतु तेवढ्याच वेळांत त्यानें दानधर्म, नेमणुका, वेतनाच्या देणग्या पुष्कळ दिल्या. त्यानें दुर्गादेवीच्या दुष्काळांत पुष्कळ लोकांचे प्राण वाचविले. तो विजापुरास साडेतीन घटका राजा झाला. हा मूळचा वाणी होता. (लक्षणेनें) क्षणभंगुर वैभव.]

शिरें न. धान्य जाळून–तें कढवून तयार केलेली शाई. A decoction of corn like *nachna-bajra.*

शिलग(णें) क्रि. पेटणें, अग्नि लागणें. To take fire, to light.
[सं. **संलग्नः** ; √ **श्लज्** (?); **शलाका** (?); कु. **सिल्कणो** ; हिं. **सुलग्ना, सिलग्ना** ; पं. **सुलगणा** ; गु. **सळगवूँ**, अशी व्युत्पत्ति दिसते व बुद्धीला पटतेहि. परंतु **शिलक** असा एक शब्द आहे. त्याचा अर्थ **बत्ती, सरबत्ती, फैर** असा आहे. व तो अर. **शल्क** पासून आहे. **यावरून ह्या** शब्दाचे दोन अर्थ आहेत. त्याप्रमाणें ते दाखविणारे दोन्ही शब्द दोन भिन्न मुळांपासून आले आहेत. एकाचें मूळ संस्कृत **संलग्न** आहे व दुसऱ्याचें मूळ अरबी **शल्क** आहे. मराठींत हा शब्द जो आला तो हिंदीमधून किंवा उर्दू. मधून आला हें उघड आहे.]

^{1}**शिलक-शिल्लक** स्त्री. उरलेली रकम, बाकी. Balance in hand.
[अर. **सल्ख्** ; अकामसा. **शिल्लकबाकी** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द) = उरलेले, बाकी राहिलेले ; **शिलकी** = निवडक, राखीव.]

^{2}**शिलक** स्त्री. कळा, चमक, लचक. Pain, cramp.
[सं. **श्लक** (ना.)]

शिलंगण न. दसऱ्याच्या दिवशीं गावांच्या शिवेपर्यंत जाऊन करावयाचा शमीपूजन वगैरे विधि. The passing of the borders on the *Dasera* day.
[सं. **सीमोल्लंघन.**]

शिल्शिला पुं. संबंध, वहिवाट, सांखळी, ओळ, रांग. Connection, series, train, line.
[अर. **सिल्सिला** ; पेकाम. **शिल्शिला** (खरे ८·४३५०).]

शिला,–ळा स्त्री. मोठा सपाट दगड, पाषाण, पाटा. A large and flat stone.
[सं. **शिला, शिलाजित** = एक औषधि-दगडांतून पाझरणारी.]

शिलाई स्त्री. शिवण्याबद्दल मजुरी, शिवणावळ. The cost of sewing.
[सं. **शिल्प** ; (शब्द हिंदीमधून आला.) ‘ शिवणें ’ पासून आला असें समजलें तर ‘ व ’ कोठें गेला ?]

शिला. पुं. चिलखत. An armour.
[अर. **सिलाह, सिलाआ, शिलेखाना** (अर. **सिलाह्खाना** = शस्त्रास्त्रें ठेवण्याची जागा, दारूचें कोठार); **शिलेदार** (अर. **सिलाह्दार** = स्वतांचें घोडें बाळगून मराठशाहींत शिपायाची नोकरी करणारा)]

शिल्प न. कौशल्याचें काम, हुन्नर, कुसरीचें काम. Any handicraft.
[सं. **शिल्पम्, शिल्पी** = कारागीर.]

¹शिव(णें) सक्रि. दोरा घालून जोडणें, सांधणें, जोडणें. To sew, to stitch.

[सं. **सीव्** ४ बंधने, तन्तुसंताने ; पा. **सिब्ब** ; प्रा. **सीव, सिव्व** ; का. **सुवुं** ; कु. **सिणो** ; आ. **ह्सिव** ; बं. **सियान** ; ओ. **सिइबा** ; हिं. **सीना** ; पं. **सीउणा, सीम्णा** (+ **सींब्णा**); लां. **सीवण** ; गु. **सिववूँ**.]

²शिव(णें) सक्रि. स्पर्श करणें. To come into contact with, to touch.

[१ सं. **षिव्, सिव्, स्पृश्** १ बन्धने ; प्रा. **छिव** ; २ सं. **छुप्** ; पा. **छुप** ; प्रा **छाव** ; आ. **सोईंवा** ; ३ सं. **क्षिप्** ; प्रा. **छिव, छिह** ; बं. **छुया.** अकामसा **शिवाशिव** (> स्पृश्यास्पृश्य) = विटाळाचा गोंधळ.]

शिवट(णें) सक्रि. धार लावणें, हत्याराचें टोंक बारीक व तीक्ष्ण करणें. To whet, to sharpen.

[सं. **शा, शी** (तनूकरणे), + **वर्ध्** १ छेदने.]

शिवरी स्त्री. वनस्पतिविशेष, एक प्रकारचें कापसाचें झुडुप. A kind of plant.

[सं. **शिंबलः, शाल्मली** ; पा. प्रा. **सिंबलि** ; प्रा. **सामरी, सिंबाली** ; कु. **सिमल** ; आ. **ह्सिमलु** ; बं. **सिमुल** ; ओ. **सिमिळी** ; हिं. **सेंबल, सेमल** ; पं. **सिंबल, सिम्मल** ; गु. **सिमळो** ; २ सं. **शाल्मली** ; प्रा. **संबली** (३ सं. **चिकुर** (केंस) ; प्रा. **चिउर** ; Austro-Asian origin–*Bala* = केंस)]

शिवशिव(णें) अक्रि. दुखणें, फुरफुरणें, थंडीनें कुडकुडणें, सहन करणें. To tickle, to thrill, to vibrate.

[सं. **सिमसिमाय** ; **शीक्** १० आमर्षणे (द्वित्व).]

शिवाय अ. सोडून, वांचून, खेरीज. Besides, without.

[अर. **सिवाअ** ; पेकाम. **शिवाय** (रा. ५-१३७).]

शिवी स्त्री. अपशब्द, अभद्र शब्द. An abusive word or speech.

[सं. **शप्, शपः, शापः** ; प्रा. **सव**, लिङ्गाची उपपत्ति कशी ? किंवा हा शब्द द्राविडमूल असावा. कान. **सीवरिसु.**]

शिशु पुं. मुल, लहान पोर. A child.

[सं. **शिशुः**]

शिश्न न. पुरुषाचें जननेंद्रिय. The male organ of generation.

[सं. **शिश्न.**]

शिष्ट वि. उरलेला, बाकी, शेष, शासना–नियमाप्रमाणें वागणारा, (ल.) विद्वान्, सभ्य, उत्कृष्ट. That remains or is left, disciplined, trained, educated.

[सं. **शिष्ट** (निष्ठा), √ **शास्**, √ **शिस्**, **शिष्टमंडळ** = शिष्टाईसाठीं सभ्य लोकांचें मंडळ, **शिष्टाई** = मध्यस्थी, **शिष्टाचार** = संभावित लोकांनीं पाळावयाचे आचार.]

शिष्य पुं. विद्यार्थी. A pupil, a disciple.

[सं. **शिष्यः**, √ **शास्**.]

शिस न. डोकें, शिर. The head.

[सं. **शीर्ष** ; प्रा. **सिस्स**, **शिसार** = डोक्याचें दुखणें, अर्धशिशी.]

शिसाराचें रागें लावणें । शिसचि जैसें ॥ ज्ञा. १८-१७९.

शिसवा पुं. वृक्षविशेष. काळ्या कठीण लांकडाचें झाड. A kind of tree.

[सं. **शिंशपा** ; प्रा. **सीसवा** (स्त्री) ; बं. ओ. **सिसु** ; हिं. **सीसो** (पुं) ; **सिस्सु** (पुं.) ; ने. **सिसो** ; गु. **सिसम्** ; प. **सीसम्** (पुं).; अकाम. **शिसव,-वी.**]

शिसारी स्त्री. तिटकारा, कंटाळा, दुर्गंधी. Nausea, an unpleasant thrill.

[ध्वनिशब्द. **शी शी शी !!** किंवा '**शीर्ष**' शब्दाशीं संबद्ध.]

शिसें न. धातुविशेष, एक काळी धातु. Lead.

[सं. **शीसम्** ; पा. **सीसम्** ; प्रा. **सीस, सीसय** (न.) ; कु. **सीसो** ; आ. **ह्सिह** ; बं. ओ. **सिसा** ; हिं. पं. **सीसा** (पुं) ; सिं. **सीहो** (पुं) ; गु. **सीसूँ** (न).]

शिस्त स्त्री. पद्धत, रीत, संप्रदाय, नेम, निशाण, वेध. Discipline, manner, aim.

[सं. **शास्** २ शासने किंवा फा. **शिस्त** ; पेकाम. **शिस्त** (प्रभाकर २३६).]

शिहाना वि. शहाणा पहा.

विचारौनि पांता शिहाना । नाहीं दादापरौता ॥ शिशु. २१२.

शिळपट वि. नेभळट, निःसत्त्व, नपूंसक, ढिला, बोथट. Slack, tame, spiritless.

[सं. **शिलापट** (?). '**शिळा**' या शब्दाशीं संबंध असावा असें वाटतें.]

शिळा स्त्री. शिला पहा.

शिळा वि. ताज्याच्या विरुद्ध, कांही तरी दिवस होऊन गेलेला, जुनां. Stale, cold, dull.
[सं. **शैतल**, (**शीतल**); पा. **सीतलो** ; प्रा. **सीअल**; हिं. **सीला** ; पं. **सीला** ; सिं. ल्हां. गु. **शीळू** ; सं. **शीत** ; पा. **सीतो** ; अकामसा. **शिळापाका** = शिळें उरलेलें अन्न, आदल्या दिवशींचें (सं. **शीतलः पक्वः**), **शिळी**(**ओटी**) = गर्भाधानविधीच्या दुसऱ्या दिवशीं मुलीची जी ओटी भरतात ती, **शिळोपा** = थंड हवेची–सकाळची वेळ (सं. **शीतल+प**। (?)]

शिक्षक पुं. शिकविणारा पंतोजी, गुरु. A teacher.
[सं. **शिक्ष्** १ शिक्षायाम्; **शिक्षा** = अध्ययन, अध्यापन, शिकवण, पारिपत्य, दण्ड (मराठींत पहिल्या अर्थापासून दुसऱ्या अर्थाची निष्पत्ति झाली आहे).]

शीं प्र. तृतीया विभक्तीचा प्रत्यय, बरोबर, सह. A termination of the instrumental case, with.
[सं. **समम्** ; प्रा. **सअँ** ; २ सं. **समेन** ; प्रा. **सवें** ; अकामसा. **सवें**, **शीं**. ३ सं. **सह** > **शीं** (तो तिच्याशीं लागू आहे–तिच्याशीं निजतो).]

शी प्र. युक्त, (उदा. विटाळशी). An affix meaning like, as.
[सं. **शः** (उदा. **लोमशः**); प्रा. **शो**, **शी**; म. **शी**. (हा प्रत्यय ‘स्वार्थें’हि वापरांत आहे. उदा. केव्हांशी, मघाशी इ.)]

शीक-ख पुं. नानकाचा अनुयायी. A follower of *Nanak.*
[सं. **शिष्य**.]

शीग स्त्री. रास, समूह, डोकें, वरील भाग, (त्यावरून) राशीवर येणारा निमूळता भाग, अखेर, शेवट. The head, the apex of a measure of corn, the end.
[सं. **शीर्षकम्**.]

शीघ्र वि. लवकर, सत्वर, जलद. Soon, quick, speedy.
[*IE.* Keigh ; सं. **शीघ्र**; *Russ*. Sigati; **शीघ्रकवि** = तात्काळ कविता करणारा कवि. **शीघ्रकोपी** = तेव्हांच रागावणारा.]

शीड न. गलबतावरील एक अवजार. A sail.
[सं. **श्रेढि**. हें कापडाचें असून उंच काठीला टांगलेलें असतें व त्याचा उपयोग वारा अडविण्याकडे होतो. शिडी पहा.]

शीण पुं. थकवा, दपणूक. Languor, exhaustion.
[सं. १ **क्षीण** (निष्ठा, √ क्षी); पा. प्रा. **खीण** = शीण (टर्नर). २ सं. **शीर्ण** (ब्लोक्). **शिणोटा**.]

शीण न. स्त्री. ताकत, सामर्थ्य, वय, उमर. Strength, power, age.
[अर. **सिन्न** = वय, काळ ; फा. **सीना** = जोर.]

शीत न. शिजेलल्या तांदळाचा एक दाणा. A grain of boiled rice.
[सं. **सिक्थ** ; पा. **सित्थम्** ; प्रा. **सित्थ** ; **सित्थअ**, हिं. **सीथ** (पुं) = पेज .]

शीत न. थंडी, गारवा. Cold.
[सं **शीतम्**; अकामसा. **शीतळा** = देवताविशेष, देवी (रोग), **शीतळशाई** = एक मुलांचा खेळ.]
हमाम्या शीतळशाई । पोरा मेली तुझी माई ॥ भ. ज. ३३.

शीप, शिंप स्त्री. आवरण, (कीटकाचें) आच्छादन. Cover, a shell.
[सं. **शिप्र,-प्रे** (?); पा. प्रा. **सिप्पी** ; कु. **सीपि** ; ओ. **सिप** ; बि. **सीपी** ; हिं. **सीप**, **सीपी** ; पं. **सिप्प**, **सिप्पी** ; लां. **सिप्पी** ; सिं. **सिप** ; गु. **सीप**.]

शीर न. डोकें, मस्तक. The head.
[सं. **शिरः** ; पा. प्रा. **सिर** ; का. **हेरइ** (वर); **हेरउ** (डोकें); कु. **सिर** ; आ. **ख़िर्** ; बं. **सिर्** ; ओ. **सिर** ; हिं. पं. लां. **सिर्** (पुं); सिं. **सिरु** (पुं.), **शिरळ** (केंस).]

शीर स्त्री. नस, नाडी, रग. A vessel in the body, an artery.
[सं. **शिरा** ; प्रा. **छिरा**.]

शील,-ळ न. स्वभाव, वर्तन, चारित्र्य. Nature, disposition, character.
[सं. **शीलम्**.]

शींव स्त्री. मर्यादा, हद्द, सीमा. Boundary, limit.
[सं. **सीमा**, **सीमान्त** (?); पा. प्रा. **सीमा**; हिं **सीवँ**; पं. **सीं**; **सीवाँ** (पुं.); लां. **सीं** ; सिं **सीमँ**; गु.

सीम्; सिंह. **सिम्**, **हिम**, **इम**; ने. **सिमाना**; अकामसा. **शिवधडा** = शिवेजवळ राहणारा, शेजारी, शिवेला शींव लागून असलेल्या दोन गांवांतील लोक; **शिवार** = गांवशिवेच्या आंतील सर्व क्षेत्र, सर्व जमीन (< **सीमा** + **वारम्**).]

शीस न. मस्तक, शीर, डोकें. The head.
[सं. **शीर्षम्**; पा. **सीसम्**; प्रा. **सिस्स**, **सीस**; हिं. **सीस्** (पुं); सिं. **सिसी** (स्त्री); गु. **शीस्**; अकामसा. **शीसफूल** = डोक्यांत घालावयाचें स्त्रियांचें फूल-भूषण. (अर्ध) **शिशी** = अर्धें डोकें दुखणें (**शिशी** हा सिं. **सिसी** शब्दाशीं संबद्ध आहे.)]

शीळ,-ळा स्त्री. मोठा दगड. A large flat stone.
[सं. **शिला**; पा. प्रा. **सिला**; कु. **सिली** (निसणें); अ. **सिल**; बं. **सिल**; ओ. **सिळा**; बि. हिं. पं. **सील**; लां. **सिल** (वीट); सिं. **सिर**.]

शीळ स्त्री. तोंडाचा चंबूचा आकार करून त्यांतून हवा सोडून काढलेला आवाज. A whistle.
[कान. **सिल्लु**–**शीळ**, **सीळ** = आवाज, ओरडणें, **चीळ** = हांक, किंवा ध्वनिशब्द.]

शुक पुं. पक्षिविशेष, पोपट, राघु. A parrot.
[सं. **शुकः**, **शुकाचार्य** = ब्रह्मचारी. शुक ह्या नांवाचा एक ऋषि होऊन गेला. तो आजन्म ब्रह्मचारी होता.]

शुक्-शुक् अ. विरोधार्थक नकारार्थक अव्यय. An expletive showing negation.
[सं. **षुक्क्** १ गतौ. मांजरास हाकलण्यासाठीं वापरतात.]

शुक्ति स्त्री. शिंपली, A shell.

शुकर,-रीया पुं. आभार, कृपा. Thankfulness, kindness.

शुक्र पुं. विशेषनाम, दैत्यगुरूचें नांव, एक ग्रह. A proper noun.

शुक्र न. वीर्य, रेत. Semen.

शुक्रमेह पुं. मूत्रांतून होणारा शुक्रस्राव. A kind of disease relating to semen.
[अर. **शुक्र**; पेकाम. **शुक्र** (रा. ६-६२१).]

शुक्ल वि. पांढरा, शुभ्रवर्णाचा. White.
[सं. **शुच्**; अकामसा. **शुक्लपक्ष** = चंद्रोदयाचा पंधरावडा, ब्राह्मणांचें आडनांव–ब्राह्मणाचेंच पौरोहित्य करणारा ब्राह्मण.]

शुचा स्त्री. चिंता, काळजी. Anxiety.
[सं. **शुच्**.]
अगा जगाही परौति । शुचा वाहे पै चित्तीं ॥
ज्ञा. १८ ६८७.

शुजा वि. शूर, पराक्रमी. Brave, valorous.
[अर. **शुजा**.]

शु(सु)णें न. कुत्रें. A dog.
[सं. **शुनः**; अकाम. प्रांतिक (गोवें). **सुणें**.]

शुतर पुं. उंट. A camel.
[फा. **शुतुर**; **शुतरखाना** = उंटांचा कारखाना–खातें, **शुतरनाल** = उंटावरील बंदूक–तोफ.]

शुद क्रि. झालें, घडलें. Happened.
[फा. **शुद्** = घडलें, होतें; पेकाम. **सुद** (**बारसुद**).]

शुद्ध वि. निर्मळ, स्वच्छ. Free from filth, clear.
[सं. **शुद्ध**, √ **शुध्**, केवळ, पांढरें, शुक्ल, साक्षात्, एकाकी–त्यावरून ब्रह्म, चैतन्य, परब्रह्म. **शुद्धाद्वैत** = एक संप्रदाय, शुद्ध जीव व परब्रह्म हीं एकच आहेत असें मानणारा.]

शुद्धि स्त्री. शुद्धपणा, स्वच्छता, स्वच्छ करण्याचें कार्य, देहभान. Purity, consciousness.
[सं. **शुद्धि**, √ **शुध्**; अकाम. **शुद्ध**.]

शुभ वि. न. स्वछ, मंगल, चांगलें, कल्याण, ऐश्वर्य अभ्युदय. Clean, auspicious, good, good fortune.
[सं. **शुभम्**; **शुभवर्तमान** = चांगलें वर्तमान, विशेषतः बायबलमधील नवा करार; मॅथ्यू, मार्क, जान ह्यांनीं लिहिलेला भाग.]

शुंभ वि. मठ्ठ, जड, मंदबुद्धि. Dull, sluggish.
[सं. **शुंभः**, हें एका राक्षसाचें नांव होतें. त्याला दुर्गेनें मारिलें. त्यावरून लक्षणेनें–मठ्ठ.]

शुभ्र वि. पांढरें, स्वच्छ. White.
[सं. **शुभ्र**, √ **शुभ्**.]

शुमार, शुरवात, शुरू—सुमार, सुरवात. सुरू पहा.
[फा. **शुमार**, **शुरा**. '**श**' आदि रूपच शुद्ध आहे. परंतु मराठींत '**स**' आदि रूप रूढ आहे.]

शुल्क न. द्रव्य (विशेषतः मुलीबद्दल घेतलेलें), कर. Toll, duty, tax, money received for giving away daughter in marriage.
[सं. **शुल्कम्**, ✓ **शुल्क्** (दाने).]

शुष्क वि. वाळलेलें, कोरडें, सुकलेलें. Dry, dried.
[सं. **शुष्क**, ✓ **शुष्**.]

शू(सू)कर न. डुकर. A hog.
[सं. **सूकर**.]

शूद्र पु. चार वर्णांपैकीं एक-शेवटचा वर्ण. The *shudras* or the fourth division in the caste system.
[सं. **शूद्र**. शंकराचार्यांनीं ह्या शब्दाची व्युत्पत्ति जरा चमत्करिक रीतीनें दिली आहे.]

शून्य न. पूज्य, अभावदर्शक वांटोळें चिह्न, रिकामें, पोकळी. Voidness, vacancy.
[सं. **शून्यम्**, **शून्यवाद** = जग हें शून्य आहे-अभावात्मक आहे असें वेदान्तांतील एक मत. ह्याबाबत पुढील पाश्चात्य शब्द ताडून पाहण्यासारखे आहेत. *IE*. Keon; *Gr*. cheneos; *Av*. Sura; *Arm*. Sin; *Gr*. chooi; *Cymr*. cawr; *Lat*. Cavus; *Corn*. Caur.]

शूर्प न. सूप. A winnowing basket.
[सं. **शूर्प**. संस्कृतीकरण नंतरचें असावेंसें वाटतें. **शूर्प्** १ मापने. **शूर्पणखा** = एक राक्षसीण (लक्षणा), कुरूप स्त्री (सुपाप्रमाणें नखें आहेत जिच्चीं).]

शूळ पुं. टोंकाचें हत्यार, भाला, टोंकाचा लोहस्तंभ, दुःख, पीडा. A weapon, a sort of pike, affliction, misery.
[*IE*. Ku; *Arm*. Slak; *Lat*. Chulex; सं. **शूल**; पा. प्रा. **सूल**; प्रा. **सूल**; का. **हालुँ**; कु. **सूल्**; अ. **ह्सुल्**; बं. **सुल्**; ओ. **सुळ**; हिं. पं. **सूल**; लां. **सूल्**; सिं. **सूरु**; गु. **सूळ**; अकामसा. **सूळ**, (पोट–, कटि–, मस्तक–) **शूळ**.]

शृंखला स्त्री. सांखळी. A chain.
[*IE*. Ker – **क्र**; सं. **शृंखला**; *Gr*. Chairhos; *Lat*. Cancer; *Arm*. Sari-K.]

शृंग न. शिंग, टोंक, शिखर एक वाद्य. A horn, an end.
[सं. **शृंग**; **शृंगापत्ति** = वादांच्या दोन बाजूंपैकीं कोणत्याहि बाजूचा स्वीकार केला तरी आपत्ति येते ती अवस्था (**शृंग** + **आपत्ति**).]

शृंगार पुं. प्रेमविषयक,–कामविषयक रस, स्त्रियांचे कामविकारदर्शक हावभाव, थाटमाट, अलंकार, भूषण. Decoration, romance.
[सं. **शृंगार**; याकाम. **शृंघार** (= शोभा, वेषभूषा नरुस्व. ५३), **शृंघार** (= मदन- नरुस्व. २७०), **शृंगार(णें)** = भूषविणें, **शृंघारिणी** = शृंगाररचना करून देणारी सेविका (नरुस्व. १०४).]

१**शेक(णें)** क्रि. उबारा देणें, मंद उष्णता देणें. To warm, to foment.
[सं. **श्रिष्** १ दाहे, (**श्रापयति**, **श्राप्यते**) (?); प्रा. **स्सिक**, **स्सिस** (?); कु. **सेकणो**; आ. **ह्सेकिब**; बं. **सेका**, **सेंका**; ओ. **सेकिबा**; हिं. **सेकना**, **सेंकना**; पं. **सेकणा**; सिं. **सेकणु**; गु. **सेकवूँ**; ने. **सेक्नु**. श्रापयपासून व्युत्पत्ति जमत नाहीं. तिच्यामध्यें प् आहे. इतर भाषांत क् आहे. सं. ष् चा 'क्' झाला.]

२**शेक(णें)** अक्रि. इजा करणें, स्पर्श करणें. To touch, to injure, to affect with a loss.
[सं. **शिष्** १ हिंसायाम्, **शीक्** १ स्पर्शे (?) – आमर्षणे.]

शें वि. संख्याविशेष, शंभर. Hundred.
[सं. **शतम्**; पा. **सतम्**; प्रा. **सयँ**, **सअअ**, **सइ**; का. **हथ**; प. पहाडी. **शउ**; कु. **सइ**; आ. **ह्स**; बं. **सये**; ओ. **स**, **सए**; बि. **सइ**; हिं. पं. **सउ**, **सइ**; लां. **सो**; सिं. **सउ**; गु. **सो**, **शें**; ने. **सै**. ह्यांतील बं. ओ. बि. हिं. पं. गु. ही रूपें संस्कृत 'शतानि' पासून आलीं आहेत असें वाटतें.]

शेकाटा पुं. मोठी, लांब, उंच बांबूची काठी. A bamboo-crook or a hooked stick.
[सं. **शाखा** (?)]

शेकार–शेकारणी, शेकारणें शाकारणें पहा.

शेकोटी, शेगडी स्त्री. अग्नि ठेवण्याचें साधन, चूल. A little warming fire, hearth.
[सं. **शकटिका**; प्रा. **सगडिया**.]

शेख पुं. मुसलमानी पीर, विद्वान् वृद्ध. Learned *Mussalman.*
[अर. **शेख.**]

शेखर पुं. तुरा, शेंडा. A plume or crest.
[सं. **शेखर** (< शिखा).]

शेखी स्त्री. प्रौढी, बढाई, फुशारकी. Boasting, vaunting.
[फा. **शैखी.**]

शेंग स्त्री. फलविशेष, लांबट व आंत दाणे असलेलें फळ. A pod.
[सं. शिंबा (?); **शेंगोळें** = शेंगेसारखा केलेला डाळीच्या वगैरे पिठाचा मुटका.]

¹शेज स्त्री. बिछाना, आंथरूण, शय्या. A bed, bedding.
[*IE.* Qei, Qi, Kei; सं. **शी** > **शयनम्**; झें. **शी**-**शिति** = वस्ती; *Lat.* civ, qui. civis; *Lith.* Kemas, Kaemes; *Slav.* Pociti, Kokeji (rest); Szeima (House); सं. **शय्या** (√ **शी** २ शयने); पा. **सेय्या**; प्रा. **सेज्जा**; कु. **सेज्**; आ. **त्सेजा** (नदीचें पात्र); बं. **सेज**; ओ. **सेस**; हिं. पं. **सेज**; सिं. **सेज**; गु. **सेज**; ने. **सेज.**]

²शेज स्त्री. रांग. ओळ, क्रम. A row, series.
[सं. **सज्ज** (?).]

शेजारी स्त्री. जवळ राहाणारा, पडोसी, शय्या घर. A neighbour, a place for sleeping.
[सं. **शी**; **शय्यागार**; देप्रा. **सइज्झ**, **सइज्झअ**, **सएज्झिअ.**]

शेठ, शेट, शेठी पुं. महाजन; व्यापारी, पेढीवाला, उदमी (ह्यांच्या नांवाच्या पुढें हा शब्द लावतात). A merchant, a tradesman.
[सं. **श्रेष्ठिन्**; पाप्रा. **सेट्ठी**; देप्रा. **सेट्ठी**; ओ. **सेठी** (परीट); हिं. पं. **सेठ**; सिं. **सेठि**; गु. **शेठ**, **शेठियो**; ने. **सेठ्.** (जुन्या प्राचीन वैदिक संस्कृतमध्यें हा शब्द आढळत नाहीं.) अकामसा. **शेट सावकार**–व्यापारी उदमी वगैरे; **शेटाणी**–शेट सावकाराची पत्नी; **शेटे वतन**–महाजनाचें वतन; **शेट, शेठी.**]

शेंट,–कूल न. पुरुषाच्या जननेंद्रियावरील केंस. Hair of the pubes.
[सं. **सिट्**, **षिट्**, **शिट्** १ अनादरे. **सेध** (जननेंद्रियावरील लोम), **सेधालु** (ना.); **शेंटाळणें** = शेंटाची किंमत एखाद्यास देणें, अवहेलना करणें.]

शेडा वि. पुं. अस्पष्ट, अंधुक, दोरीचा तुकडा, घड्याळाची सांखळी. Indistinct, shadowy, a piece of rope or chain.
[**सं. छाया**; कु. **सेडो**; पं. **सेढा** (उलट्या बाहुल्याचा तिरवा).]

शेण न. गुरांचा उत्सर्ग,–मल. Dung.
[*IE.* Ke-q; सं. **शकृत्**, √ **शक्**–उत्सर्ग (मल वगैरे); पा. **छकणम्**, **छगणम्**; देप्रा. छाण(**न**)–गोमयम्; हिं. **छेरना**; सिं. **छेणु**; अकामसा. शाण, **शेण खाणें** = (लक्षणा) मूर्खपणा करणें, **शेणाचा दिवा** = दिवाळें वाजणें, **शेणखळा** = सड्यासाठीं केलेलें पाणी, **शेणगोटा** – शेणानें सारवणें; **शेणामेणाचा** = अशक्त, हलका, निःसत्त्व; **शेणी** = शेणाची थापटी, गोरी.]

शेणवई,–वी पुं. सारस्वत समाजापैकीं एक पोटविभाग. A caste, a sub-division among Saraswat brahmin class.
[**सं. सेना**; पा. **सेना**; प्रा. **सेणा**; का. **सीना**; हिं. **सेन्**. सं. **सेनापति**; पा. **सेनापति**; प्रा. **सेणावइ**, कांहीं नांवाच्या शेवटीं ‘सेन’ हें उपपद असतें. शेणै पहा.]

शेंडी स्त्री. डोक्यावरील केंसाचा झुबका, डोक्यावरील मागचे केंसाची बट, तुरा. The tuft or the lock of hair on the head.
[सं. **शिखा** (स्त्री), **शिखण्डः**; पा. **सिखा**, **सिखंडि**; प्रा. **सिहा**, **सिहर** (न.), **सिहण्ड** (पुं), **छिहंड**, **छेंड**, **छेंडा**; देप्रा. **छिंड**. सं. **शिखंडिका**; प्रा. **शिहणिआ**; हिं. **सिहरा**; सिं. **सिहरो**; अकामसा. **शेंडा** = डोक्यावरील केंसाचा झुबका, तुरा, टोंक. सं. **शिखंडक**; प्रा. **सिहण्डअ**; हिं. **छॅंडा**, **झेंडा**, **शेंडा**; कान. **चण्डिके** = तुरा, शेंडा शेंपूट (देप्रा. **छिप्प**) हे शब्द ह्याच्याशीं संबद्ध आहेत.]

शेत न. जमीन, धान्य पेरण्याचें क्षेत्र, जागा, पीक f(लक्षणा). A field, a cultivated piece o ground.
[सं. **क्षेत्रम्**; प्रा. **छेत्र**; अकामसा. **शेतकरी**=शेती करून उपजीविका करणारा; **शेतखेत** = जमीनजुमला (शेत आणि खेत हे दोन्ही शब्द सं. क्षेत्रम् ह्या शब्दाचे तद्भव होत. दोन्ही शब्द एकाच अर्थाचे. तसेच शेतजमीन, शेतभात हे त्याच अर्थाचे शब्द.]

शेतखाना पुं. शौचकूप, पायखाना. A privy.
[फा. **सीहूह्तूखाना** = आरोग्यगृह.]

शेंद(णें) सक्रि. पाणी विहिरींतून काढणें, वर ओढणें. To draw up water from a well.
[कान. **सेदु** = पाणी काढणें. अनुस्वाराची उपपत्ति वरील कानडी धातूपासून लागत नाहीं. सं. **स्यन्द्** १ प्रस्रवणे ह्या धातूपासून आला असावा.]

शेंद(दा)ड न. फलविशेष, शेंदड ह्या वेलाचें फल. A melon.

शेंदाड शिपाई पुं. बढाई मारणारा शिपाई, पराक्रमाच्या पोकळ बाता मारणारा. Braggart.

शेंदूर पुं. तांबड्या रंगाचा एक पदार्थ, औषधि, रक्तवर्ण चूर्णविशेष. Red-lead.
[सं. **सिंदूरम्**; प्रा. **सिंदूरा**, **सेंदूरो**; का. **सेन्दुरु**; आ. **स्सेन्दुर**; बं. **सिंदुर**; ओ. **सिंदूर**; बि. **सिंदुर**; हिं. **सिन्दूर**, **सेंदूर**; गु. **सिंदूर**; ने. **सिंदुर**; संस्कृत प्राकृतमध्यें नपुंसकलिंग असून मराठींत लिङ्गविपर्यय झाला.]

शेंदेलोण, सैंधव पुं. एक प्रकारचा क्षार. Rock-salt.
[सं. **सैन्धव** + **लवणम्** (समुद्रापासून किंवा सिंधुनदीपासून मिळालेलें); प्रा. **सेन्धव**; हिं पं. **सेंधा**; सिं. **सेंधोलूणु**.]

शेंप,-पूट न. लांगूल. A tail.
[*IE.* Skeip; *Lat.* Scipio; वैसं. **शेप** = शिस्न ("अपयामि शेपम्"–ऋ १०); सं. **शेपः**; देप्रा. **छिप्प**; प्रा. **छेप्प**; देप्रा. **शेप**, **छिप्पालुअ**; मराठींत 'शें' वर अनुस्वार आहे त्याची उपपत्ति काय? **शेपट(णें)** = चाबुकानें किंवा फोकेनें मारणें. **शिफा** = चाबुकाचा तडाखा, **शेपटा** = शेंडा]

शेप न. शिस्न. The male organ of generation.
[*IE.* Keipo; वैसं. **शेप**; प्रा. **शेप**, **चेप**; *Lat.* Cippus, Scipio; *Gr.* Schipo. "**अपयामि शेपम्**" ऋ १०. **शेमनें** असा एक ग्रामिण भाषेंत पुरुष जननेंद्रियवाचक शब्द आहे. त्याचें मूळ हाच वैदिक शब्द असावा.]

शेप स्त्री. वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **शतपुष्पा**; पा. **सतपुप्फा**; प्रा. **सयपुप्फा**; हिं. प. सिं. **सौंफ**; अकामसा. **शोप**, **बडीशेप**, **बाळंत शोप**, **शेपू** (भाजी).]

शेपं न. एक फळ. A kind of fruit.
[फा. **सेब** = सफरचंद.]
शेपें शिताफळेंदि खरबुज खिरणी । सुंदरें तूत बोरें ॥
साम. र. ह. ३·४९.

शेफार(णें) अक्रि. गर्वानें फुगणें, - चढणें, मिजास करणें. To be puffed up.
[सं. **शिभ्** १ कत्थने, **शीभ्र** (ना.) (?). परंतु हा शब्द परकी दिसतो. वरील व्युत्पत्ति वर्णप्रक्रियेच्या नियमानें जुळत असली तरी पटत नाहीं.]

शेम,-म्ब स्त्री. चिकट पदार्थ, नाकांतील,–गुदांतील मळ. The mucus.
[सं. **श्लेष्मा**; पा. **सेम्हम्**; प्रा. **सेप्फ**, **सेफ**, (पुं), **सेंभा** (स्त्री), **सिंभ**, **सिलिम्ह** (पुं); आ. **स्सेप** बं. **चेप**; ओ. **चेप**; हिं. **सेंभा** (पुं); सिं. **लेसुमम्**; **लेसु**.]

शेमेज(णें) अक्रि. घाम येणें, घामानें भिजणें. To perspire.
[सं. **स्विद्** + ४ **मिद्** + ४ स्नेहने. परंतु व्युत्पत्ति दूरान्वित दिसते. 'शेम' ह्या नामापासून हा नामधातु असावा.]

शेम्न, शेमनें न. (ग्राम्य) पुरुषाचें जननेंद्रिय. शेप पहा. The male organ of generation (vulgar).

शेंबूड पुं. नाकांतील घाण, श्लेष्मा. Moist mucus of the nose.
[कान. **सिंबळ** = शेंबूड. परंतु हा कानडी शब्द संस्कृत शब्दाचा तद्भव दिसतो. '**श्लेष्मोदक**' पासून राजवाडे व्युत्पादितात. परंतु ही व्युत्पत्ति दूरान्वित दिसते.]

शेंबा पुं. शेताच्या बांधावरी दगड. The boundary stone in a field.
[सं. **सीमा**. **शेंबी** = काठीच्या शेवटीं टोंकाला घालावयाचें लोखंडी–पितळी टोंपण.]

शेर पुं. एक माप, दोन रत्तलांइतकें, ऐंशी तोळे. A measure equivalent to two pounds.
[सं. **सेट** (एक वजन); देप्रा. **सेर**; प्रा. **सेर**; का. **सेर**; कु. **सेर**; आ. **स्सेर**; बं. **सेर**; ओ. **सेर**; बि. हिं. पं. लां. **सेर**; सिं **सेरु**; गु. **शेर**. (लक्षणेनें) नोकर वगैरे लोकांस पोटास धान्य देतात तें, त्यावरून सामान्यीकरण होऊन चरितार्थ–रोजचें अन्न.]

शेर पुं. वि. वाघ, वरचढ, सत्ता गाजविणारा. Tiger, tiger-like.
[फा. **शेर** ; हिं. **शेर**; अकामप्र. **शेराला सव्वाशेर.**]

[2]**शेर** स्त्री. पक्ष्याचा उत्सर्ग–मळ. पक्ष्याची विष्ठा. Dung of bird.
[सं. **शकृत् > छकर** ; पा. **छकणम्. गु. छेर. शृध्** १ उंदने, **शृधु** = गुदद्वार, **शेरणें** = मळ बाहेर टाकणें.]

शेरणी स्त्री. नवसाचा प्रसाद, खिरापत, मिठाई, त्यावरून राजे लोकांना द्यावयाचा नजराणा. Sweetmeats (distributed in a temple).
[फा. **शीरीनी, शिर्नि** = गोडी, मिठाई; सं. **श्रेणी–शेरणी** (भा. अ. १८३३).]

शेरवाणी स्त्री. एक प्रकारचा लांब अंगरखा. A kind of long coat.
[फा. **शेरवान.**]

शेरी स्त्री. गल्ली, अरुंद आळी. A lane, an alley.
[सं. **शिरस्** = टोंक.]

शेरा पुं. सरासरी, सामान्य प्रमाण. Average, proportion.
[अर. **शराह्** = दर, पगार, भत्ता; अकामसा. **शेरी** = कमाविसदाराचा हक्क.]

शेरा पुं. घालून दिलेली रूढी, परंपरा, धारा, नियम, टीका, मत. A law, rule, usage.
[अर. **शरआ** = नियम.]

शेल न. टोंक, शेवट. End, lip, extremity.
[सं. **शैल, √ शॄ** ९ हिंसायाम् (?); गु. **छेड़े.**]
तैसा नोहोटे दुर्वाक्य शेलीं । सेलिला प्रांता ॥ ज्ञा. १३-४९६

शेल(णें) सक्रि. वेंचणें. To pick up.
[सं. **शिल्** ६ उंछने ; याकाम. **शेलणें** = विंधणें, जखम करणें. (नवनिशित तिहीं शेलित् यादवातें गस्तो ॥ ५७.) **शेलका** = निवडक, वेंचक. उत्तम, मुख्य.]

शेला पुं. पांघरण्याचें रेशमी वस्त्र. A silken garment.
[सं. **चेल, चैलः, √ चिल्**–धारणे. **चेल** हें रूप **चीर** पासून नंतर बनलें असावें. **चीर** हा उणादि **√ ची** पासून असावा. **चीर** आणि **चीवर** हे दोन्ही संबद्ध आहेत; परंतु **चीवर** हा **√ चीव्**–आच्छादने पासून सिद्ध होतो. हिं. **शेला**–सु. चतर्जी–NIA. Vol. II 425.]

शेली स्त्री. डोकें, मस्तक, उत्तमांग, अग्रभाग. Head, the top.
[**शीर–शेर–शेल** (?): **शैल–शेला–शेल** (?) (प्रो. कोलते व. शा. प. ५६-१०). सं. **शेल** ; गु. **छेल.**]
लघुत्वाचेनि मुदलें । वैसला गुरुत्वाचे शेले ॥
अमृतानुभव-प्र. २-२०
सेल दिधलीसे उपदेशा । कीरिटीसीं देवें ॥ ज्ञा. ११-६४३

शेलें न. जोकड, जूं, ओझें, जबाबदारी (लक्षणा). A yoke, responsibility.
[सं. **शेलम्** (?)]

शेव स्त्री. तळलेलं एक तंतूमय खाद्य. A sweetmeat made of thread-like rolls of boiled flour.
[अकामसा. **शेवई, शेवाई.** = गव्हाच्या पिठाचा लांब तंतु. **शेवगा** = शेव करण्याचा सांचा.]

शेवट पुं. टोंक, कांठ. End, termination, extremity.
[सं. **छेदः**; पा. **छेदो** ; प्रा. **छेअ** ; देप्रा. **छेओ** ; बं. **छे** ; हिं. **छेउ** ; **छेवा** ; सिं. **छेहु** ; म. **शेव + ट,** (**शेड** म्हणजे तुकडा) असा शब्द टर्नर देतो. शेरा (टोंक) **छेद् छेड्डु < छिद्र. शेंव** (सं. **सीमान्त**) = टोंक, शेवट, सीमा.]

[1]**शेवती** स्त्री वनस्पतिविशेष. A kind of plant.
[सं. **सेमंती.**]

[2]**शेवती** स्त्री. शेवंती. नवरदेवाचें सीमेवर करावयाचें पूजन. Honours paid to a bridegroom on the border of the village when he goes to take his bride.
[सं. **सीमान्ती, सीमान्तपूजन.**]

शेव(वा)ळ न. वनस्पतिविशेष (हिरवी, पाण्यांतील). A kind of acquatic plant, moss.
[सं. **शीपाल,** (पुं.न.); **शैवाल** (पुं.न.); पा. **सेवालो** (पुं.); प्रा. **सेवाडा, सेवाल** (पुं.); का. **हिल्** ; कु. **सिवालो** ; बं. **सेयाला** ; ओ. **सिउळि** ; हिं. **सिवार, सिवाल** ; सि. **सिंआरु, सेंवरु** ; **शेवाळ(णें)** = शेवाळ येणें–उगवणें.]

[1]**शेष** पुं. नागांची देवता– राजा. The deity *Nag*.
[सं. **शेष.**]

शेष पुं. उरलेला बाकीचा अंश. Remainder.
[सं. **शिष**; अकामसा. **शेख, शेखी.**]

शेंस,-पाट स्त्री. (प्रांतिक) कपाळावरील मळवट. The stripes of *Kunku* on the forehead.
[सं. **शीर्षपट्ट.**]

शेस, शेसपाट पुं. न. मुरळीचें देवाबरोबर करावयाचें लग्न. The marriage of a *Devdasi* with the deity.
[सं. **शय्यापट्ट. शेजपाट–शेसपाट.**]

शेसाळा पुं. राग, क्रोध. Anger.
[सं. **श्वल्, श्वल्ल्**;–(अभ्यास) **शिश्वल**; अकामसा. **शेसाळणें** = रागावणें.]

शेळी स्त्री. बकरी. A she-goat.
[सं. **शाग, छाग**; प्रा. **छगली, छअली**; देप्रा. **छेल, छेलिआ, छेली, शअली, शेली**; सं. **छागिका**; प्रा. **छालिया.**]

शैत्य न. थंडी, गारठा हींव. Cold.
[सं. **शीत.**]

शैथिल्य न. शिथिलपणा. Slackness.
[सं. **शिथिल–√ शिथ्, श्रथ्.**]

शैल पुं. डोंगर, पर्वत. A mountain.
[सं. **शीला** (शीलाभिः पूर्णः).]

शैली स्त्री. रीत, पद्धति. Usage, style.
[सं. **शैली.**]

शोक(णें) अक्रि. वाळणें, सुकणें. To dry, to get dried.
[सं. **शुष्क, √ शुष्** ४ शोषणे.]
निंदा मोटकी आइके । आणि कपाळ धरूनि ठाके ।
थेंबें विरे वारेनि शोके । चिखलु जैसा ॥ ज्ञा. १३-६६५.

शोक पुं. दुःख, आक्रोश, रडारड. Grief, cry.
[सं. **शुच्.**]

शोख पुं. आवड, नाद, छंद. Liking, fondness.
[अर. **षौक**; अकाम. **शोख(णें)** = सवकणें; **शोखी** = ऐट, वंड, दांडगाई (फा. **शोखी**).]

शोच(णें) उक्रि. दुःख करणें, शोक करणें. To grieve.
[सं. **शुच्** १ आक्रोशे; अकामसा. **शोचनीय, शोच्य** = दुःखकारक; **शोक** = दुःख.]

शोणित न. रुधिर, रक्त. Blood.
[सं. **शोणित.**]

शोध(णें) सक्रि. स्वच्छ करणें, धुंडाळणें, शोध करणें, हुडकणें, दुरुस्त करणें. To search, to explore, to cleanse, to purify.
[सं. **शुध्** ४ शौचे; **शोध** = चौकशी, परीक्षा.]

शोधार(णें) सक्रि. शुद्ध करणें. The purify, to cleanse.
[सं. **शुद्धीकृ, शुद्धाकार** (नाधा.)]
पाठिं सात्विकें धीरें तेणें । शोधारिलीं तियें करणें ।
मनेंसि योगधारणे । नेलविलीं ॥ ज्ञा. १८, १०१२.

शोभ(णें) अक्रि. चांगलें दिसणें, सुरेख दिसणें. To become, to be suitable to.
[सं. **शुभ्**; १ शोभने; **शोभन** = समारंभ, भूषण; (फल–) **शोभन** = गर्भाधान; **शोभा** = तेज, सौंदर्य, प्रभा, (लक्षणेनें) फजीती; **शोभिवंत** = सुशोभित, सुरेख.]

शोस(णें) क्रि. आंत ओढून घेणें, जिरणें. To suck up, to absorb.
[सं. **शोषयति**; पा. **सोसेति**; प्रा. **सोसेइ**; कु. **सोसणो**; आ. **सोहिब**; बं. **सुसा**; पं. **सो** = उन्हाळा; ओ. **सोसिबा**; गुं. **सोसवूँ**; **सोस**; (तहान, इच्छा सोस). सं. **शोष**; पा. **सोस**; प्रा. **सोस**; अकामसा. **शोष, शोषणें.**]

शौच पुं. न. शुद्धि, त्यावरून लक्षणेनें मलशुद्धि. Purification, evacuation of bowels.
[सं. **शुच्**–शोधने; मलशुद्धि–मलोत्सर्ग, शुचिर्भूत होणें. ह्या शब्दाच्या अर्थांत असत्परिहार झाला आहे. **शौचकूप** = शेतखाना, **शौचविधि** = परसाकडेस जाणें.]

शौहरा पुं. पराक्रम, प्रसिद्धि लौकिक. Valour, fame.
[अर. **शुहरत**; **शौहरत, शौरत** ह्या शब्दांशीं संबद्ध असलेला '**शौरा**' शब्द जुन्या महानुभावी वाङ्मयात आढळतो. कदाचित् ह्याचा संबंध संस्कृत **शूर, √ शॄ** ह्या शब्दाशीं असावा.]

लोहांचा विसुरा । बलिभद्रु नव्हे शौरा ॥ शि. शु. ८९३.

श्म(स्म)शान न. प्रेतें पुरण्याचें अथवा जाळण्याचें ठिकाण, मसणवाट. A cemetery.
[सं. **शवशयनम्, √ शी** २ शयने; **श्मशानरोदन** = श्मशानांतील रडणें; **श्मशानवैराग्य** = तात्कालिक वैराग्य. श्मशानांत गेल्यावर तेथील सर्व देखावा पाहून मनावर होणारा विरक्तीचा परिणाम.]

श्मश्रू स्त्री. न. मिशा—वगैरे तोंडावरील केंस, त्यावरून लक्षणेनें हजामत. The beard, moustaches.
[सं. श्मश्रू ; तद्भव—मिशी (?)]

श्याम वि. सांवळा. Dark blue.
[सं. श्याम, + ल ; श्यामकर्ण = कान व शेंपूट पांढरें व इतर अंग काळें असा घोडा. श्यामिका = श्यामलत्व, काळेंपणा.]

श्यालक पुं. मेहुणा, बायकोचा भाऊ. Brother-in-law.
[सं. श्यालः, श्यालक ; शालक; अकाम. साला.]

श्रद्धा स्त्री. निष्ठा, भाव, विश्वास, आदर. Reverence, veneration, faith.
[सं. श्रत् + धा ; श्रद्धालु, = भाविक, विश्वासूक. पुढील शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत. *IE*. Kerdho; *Av*. Saredo; *Oper*. Thaid; *Got*. Hairda; *Lith*. Kerdzius.]

श्रम(णें) अक्रि. दमणें, थकणें, कंटाळणें. To be tired or exhausted.
[सं. श्रम् ४ खेदे ; श्रमविभाग = श्रमांची वांटणी. श्रमी = कष्टी ; श्रमणक = संन्यासी (बुद्धधर्मानुयायी)·]

श्रवण न. ऐकणें, ऐकण्याचें इंद्रिय, कान. Hearing, an ear.
[*IE*. Kreu, Kro (ऐकणें); सं. श्रु ; झें. श्रु ; अकामसा. श्रवणें, श्रवणीय, श्रोता, श्रुत, श्राव्य.]

श्रांत वि. दमलेला, थकलेला, कंटाळलेला. Exhausted, spent up.
[सं. श्रान्त (निष्ठा), √ श्रम्.]

श्राद्ध न. पितरांच्या स्मृतीचा दिवस व त्या दिवशीं करण्याचें कर्म. The *Shraddha* day.
[सं. श्रत् + धा.]

श्रावण पुं. हिंदी पंचागांतील पांचवा महिना. The fifth month in Hindu calendar.
[सं श्रवण नक्षत्र.]

श्री स्त्री. लक्ष्मी Wealth, richess.
[*IE*. Krei; सं. श्री, √ श्रा ; वैसं. श्री (श्रीर, अश्रीर, अश्लील); *Av*. Sri, srira; याकाम. श्री (= लक्ष्मी—नरुस्व. ६६४); अकामसा. श्रीकंठ = शंकर देवता ; श्रीकांत = विष्णु देवता ; श्रीकार = श्री हें अक्षर प्रत्येक लेखाच्या आरंभीं काढावयाचें तें ; श्रीखण्ड = पक्वान्नविशेष, (दहीं + साखर + केशर मिश्रित); (सं. श्रीखंड ; प्रा. छिहंडअ); श्रीपती, श्रीपाद, श्रीफळ (नारळ), श्रीमंत (धनवान्), श्रीमंती, श्रीमुख, श्रीयुत,. इत्यादि.]

श्रीकरण पुं. कुळकर्णी, लेखक, प्रधान. The village-writer, minister.
[सं. श्रीकरण, याकाम. श्रीकरण (= कुळकर्णी).]
कीं कामाची कीर्ति लिहिता श्रीकरणीं: वहिये सुमनाचिये ॥
नरुस्व. ७३४

श्रीखंड न. चंदन. Sandal-paste.

श्रीगिरि पुं. छत्र. A cover.
[याकाम. सिरगिरि.]
सिरगिरी धरी बारिणी: मयूरिका । नरुस्व. १०२

श्रीमाठ पुं. मद, मस्ती. Arrogance.
[श्रीमाठ = संपत्तीचा गर्व ; याकाम. श्रीमाटु = मद.]
तंव तुज सवया थोर माला श्रीमाटु ॥ गस्तौ. ३३
तैं मीचि का कर्मठ । ऐसा न ये श्रीमाठ ॥ ज्ञा. १४·३५८

श्रुत न. ऐकलेलें, श्रुतींत सांगितलेलें. Heard, laid down in the *Vedas*.
[*IE*. Kreu ; सं. श्रु १ श्रवणे (निष्ठा) ; *Av*. Surunaoiti, Sroota, Sraothra ; *Lat*. Clueo ; *Cymr*. Clywed ; *Lett*. Sludinat.

श्रुति ऐकणें, कान, ऐकण्याचें साधन, वेद (ऐकलेलें वाङ्मय), वीणा. The *Vedas*.
[सं. श्रु ; याकाम. श्रुति (= स्वर, आवाज—नरुस्व. ३४५), श्रुतिधर (= सूर धरणारे).]

श्रेढी स्त्री. पायरी, रांग, ओळ. A step, a line, a row.
[सं. श्रेढी < श्रेधी.]

श्रेणी स्त्री. ओळ रांग. A row, a line.
[सं. श्रेणि.]

श्रेय वि. न. कल्याण, हित, लाभ, चांगुलपणा. Good, well-being, weal.
[सं. श्रेयस् √ श्री.]

श्रेष्ठ वि. उत्तम, उत्कृष्ट. The best.

श्रोणि स्त्री. कमरेच्या खालचा भाग, पुठ्ठा, ढुंगण. The hip and the loins.
[*IE*. Klou-nis ; सं. श्रोणि , √ श्रोण्-संचये ; *Lat*. Ctunis ; *Gr*. Chlonis ; *Cymr*. Clun.]

श्रोता पुं. श्रवण करणारा, ऐकणारा. Hearer.

श्रोत्र न. कान. The ear.

श्रोत्रिय पुं. वेदवेत्ता. One well-versed in the *Vedas*.

श्रौत वि. वेदांतील मर्म जाणणारा, वेदासंबंधीं. Pertaining to the *Vedas*, one well-versed in the *Vedas*.
[सं. श्रु १ श्रवणे.]

श्लाघ(णें) सक्रि. प्रशंसा करणें, स्तुति करणें, वाखाणणें. To praise, to applaud.
[सं. श्लाघ् १ कत्थने, श्लाघा = स्तुति.]

श्लेष पुं. चिकटणें, आलिंगन, मिठी, (त्यावरून) दोन अर्थांचा शब्द (लक्षणा). Embrace, a word of double meaning.
[सं. श्लिष् ६ आलिंगने.]

श्लेष्मा पुं. नाकांतील मळ, कफ, बडका, शेंबूड पहा. The mucus in the nose.

श्लोक कविता, पद्य. A verse.

श्वः अ. उद्यां, दुसऱ्या दिवशीं. Tomorrow.

श्वा पुं. कुत्रा. A dog.

श्वपच, श्वपाक पुं. अंत्यज. A man of an out-caste tribe.
[सं. श्व + पच् १ पाके. पूर्वीं प्राचीन कालीं आर्यांच्या वसाहतकालांत कुत्रें हा मुख्य प्राणी असल्यामुळें त्याची काळजी घेणें हें कुटुंबांतील मंडळीचें एक कर्तव्य होतें. ताडून पहा. **श्वश्रू, श्वशुर.**]

श्वान न. कुत्रें. A dog.
[*IE.* Kuon; सं. **श्वन्**; *Av.* Span; *Arm.* Sun, skund; *Got.* Hunds; *Lett.* Suntuna; *Lith.* Sun-muse.]

श्वापद न. हिंस्र जनावर. A beast of prey.
[सं. **श्व + पद** = कुत्र्याच्या पायासारखे पाय असणारे.]

श्वास पुं. नाकानें किंवा तोंडानें वायु आंत घेणें व बाहेर सोडणें. A breath.
[*IE.* Kues; सं. **श्वास**, ✓ **श्वस्**; *Av.* Susi; *Lith.* Susiniti; *Lat.* Queror.]

श्वेत पुं. सेतु. A bridge.
[सं. **सेतु**, ✓ **सीव्**; पेकाम .पत्राचा श्वेत बांधला.]

श्वेत वि. पांढरा, स्वच्छ. White, fair.
[*IE.* Kueit; सं. **श्वेत**; *Av.* Spaeta; *Got.* Heits.]

ष पुं. मराठी वर्णमालेंतील व्यंजनांपैकीं एकतिसावें व्यंजन होय. हा ऊष्मवर्ण असून ह्याचा उच्चार मूर्धन्य व उच्चार स्थान मूर्धा आहे. श पहा. मराठीमध्यें 'ष' आदि शब्द फारसे नाहींत. The thirty-first consonant in the Marathi alphabet. a lingual sibilant.
[सं. **ष**; अकाम. **ष, ख, श.** यादवकालीन व इतर कालीन मराठींत 'ष' कार हा तत्सम शब्दांतच येतो. ग्रामीण मराठींत स, श, बद्दल येतो, परंतु तो अपभ्रष्ट उच्चार होय.]

षट् वि. संख्याविशेष. सहा. Six.
[सं. **षष्, षट्, षड्, षण्** इत्यादि त्याचीं रूपें समासांत होतात. **षट्‌-कर्णी** (होणें)–गुप्तगोष्ट उघडकीस येणें, सहा कानी होणें–दोन माणसांच्या कानांपेक्षां अधिक कानांवर जाणें, **षट्-कर्में**- ब्राह्मणांना विहित अशीं सहा कर्तव्यें–यजन, याजन, दान, प्रतिग्रह, अध्ययन, अध्यापन, **षट्कोण** = सहा कोपरे असलेली आकृति, **षट्चक्र** = हटयोगशास्त्रांत मानवी देहामध्यें मानलेलीं सहा चक्रें–मूल, अनाहत, अधिष्ठान, मणिपुर, नाभी, **षट्दर्शनें** = सहा दर्शनें–शास्त्रें,–सांख्य, योग, वैशेषिक, न्याय, मीमांसा, वेदान्त, **षट्शास्त्रें** = सहा शास्त्रें–वेदाभ्यासास उपयोगी–छंद, निरुक्त, व्याकरण, ज्योतिष्, शिक्षा, कल्प, **षड्गुण** = समग्र ऐश्वर्य, वीर्य, यशस्, श्री, ज्ञान, वैराग्य हे सहा गुण, **षड्भाव** = काम, क्रोध, लोभ, मोह, मद, मत्सर, **षड्रस** = सहा रस - कडू, अंबट, मधुर, खारट, तिखट, कडवट.]

षंढ पुं. नपुंसक, हिजडा, (लक्षणा) निःसत्त्व. A eunuch, imbecile.
[सं. **षण्**–दाने (?).]

षोडश वि. संख्याविशेष, सोळा. Sixteen.
[सं. **षोडष्. षट् + दश; षोडषोपचार** = सोळा उपचार, पूजेचे प्रकार, आवाहन, आसन, अर्घ्य, आचमन, स्नान इ.]

स पुं. मराठी वर्णमालेंतील व्यंजनांपैकीं बत्तिसावें व्यंजन. हा ऊष्म वर्ण आहे. ह्याचें उच्चारण दन्त्य असून उच्चारस्थान दन्त आहे. मराठींत श्, ष्, स् हे तीन ऊष्मवर्ण आहेत. त्यांत 'स्' चें प्राधान्य अधिक आहे. 'श्' वरील विवेचन पहा. Thirty-second consonant in the Marathi alphabet.
[(आद्य स) सं. **श, ष, स**; प्रा. **स**; **श्यामल—**
सांवळा, शल्-सल, शीर्ष–सीस;
सं. **श्य, श्र, श्ल, श्व, स्य, स्र**; प्रा. **स**;
प्रसर–पसर, कार्पास–कापूस;

सं. क्ष, छ, त्स, त्स ; प्रा. छ, **कच्छ–**
कासोटा.

(मध्य स) सं. श, ष, स; प्रा. स; **पुच्छ–पूंस,**
आशा–आस.

सं. र्श, श्र, श्य, ष्य, स्य, स्र, स्ल,
श्व, श्ल, स्व, र्ष ; प्रा. स्स ;

सं. क्ष, प्स, च्छव, त्स, छ, त्स्य ;
प्रा. च्छ.]

स^{१} प्र. चतुर्थी,–द्वितीयेचा प्रत्यय. A termination of the Accusative and Dative cases.
[सं. **स्य** ; प्रा. **स्स , सम्** ; प्रा. **सँ.**]

स^{२} प्र. नात्याचा वाचक प्रत्यय An affix showing relation-ship.
[सं. **श्री.** हा प्रत्यय मराठीच्या कांहीं प्रांतिक बोलींत रूढ आहे. कोकणांत आईशी, बापूस असे प्रयोग रूढ आहेत. त्याचप्रमाणें आजास, आजीस, आतेस, भाऊस, सासूस असेहि प्रयोग क्वचित् आढळतात. ह्या प्रत्ययाचें मूळ सं. **श्री** असें असावें. नंतर त्याचें सामान्यीकरण झालें असावें.]

स^{३} उप. बरोबर, सहित. A prefix signifying ' with together '.
[सं. **सह , सम्** ; संसा , अकामसा. **सकल** = सर्व , संपूर्ण ; **सकळीक, सकर्मक, सकरुण , सकंटक , सकस** (मजबूत) , **सकाम** (लंपट), **सगुण.**]

सई^{१} स्त्री. मैत्रीण, स्त्रीमित्र. A female friend.
[सं. **सखी , सम्** + √ **ख्या** ; पा. **सखी** ; प्रा. **सही** ; बं. **सइ** ; ओ. **सहि** ; हिं. पं. सिं. **सहेली** ; ने. **सहेली** ; गु. **सइ , सही** (भा. अ. १८३४); अकाम. **सए ,–ये** (संबोधन).]

सई^{२} स्त्री. स्मृति, आठवण. Memory, remembrance.
[सं. **स्मृति** ; प्रा. **सई.**]

सई^{३} स्त्री. कबूली, संमति. Assent.
[अर. **सहीअ** = निर्दोष.]

सई^{४} स्त्री. व्यक्तिनाम. A proper noun.
[सं. **सती** ; प्रा. **सई.** २ सं. **शची** ; प्रा. **सई.**]

सक स्त्री. सहापट. Six-fold or times.
[सं. **षट्क** ; प्रा. **छक्क** ; पं. **छक्का** ; का. **शक.** हा शब्द पाढ्यांत वापरतात. उदा. चार **सक** चोवीस.]

सक(णें) अक्रि. शक्ति असणें, सामर्थ्य असणें. To be able to.
[सं. **शक्** ५ सामर्थ्ये ; पा. **सक** ; प्रा. **सक्क**; पं. **सक्कणा** ; हिं. **सकना** ; गु. **शकवूँ** ; सिं. **सघणु** ; का. **हेकुन** ; सिंह. **सॅकी , हॅकी**; अकाम. **शक(णें) , सक(णें).**]

सकट वि. सर्व, सगळें, एकंदर. All, whole.
[सं. **सकृत्.**]

सकट(णें) सक्रि. तुकडे करणें, छेदणें. To cut, to make pieces.
[सं. **सम्** + **कृत्** ६ छेदने.–**संकृन्त**; प्रा. **संकट.**]
जो देवकिये वसुदेवातव जाला । कुमारीसाठि गोकुला नेला । प्राणु सकटुनि आटिला । पूतनेचा ॥ ज्ञा. १०-२६५.

सकणव, सकिणव वि. कृपा,–दया उत्पन्न झालेला, सदय. Compassionate, kind.
[सं. **कृपा** √ **कृप्** ; प्रा. **किणव**; याकाम. **सकणव** (ज्ञा. २-२०६).]

सकरतार पुं. सेक्रेटरी, व्यवस्थापक. Secretary.
[*Eng.* Secretary ; *Fr.* Secretaire ; *MLat.* Secretarius = a confidential officer, from *Lat.* Secretus = secret, secerno = I sever, se = aside, cerno=I distinguish. अव्वल इंग्रजींत हा शब्द वापरीत. जुन्या कागदपत्रांत आढळतो.]

सकलात,–द स्त्री. भारी वस्त्र–लोकरीचें जाड उंची वस्त्र. Broad-cloth.
[अर. **सकलात्** ; तुर्की. **इस्केरिएट** ; *Eng.* Sack-cloth. **स्करिएट** ; इटा. **स्कॅरिआलटो** ; फ्रे. **स्कॅरिएट.**]

सकार(णें) सक्रि. स्वीकारणें, घेणें. To accept or endorse (*a hundi*).
[सं. **स्वीकार,** √ **कृ, सत्कार** : पा. **सक्कार** ; प्रा. **सक्कार** ; का. **सकार** (वराचा मान); हिं. पं. **सकारना** ; लां. **सका** (कणंग); सिं. **सकारणु** ; गु. **सकारवूँ.**]

सकाळ स्त्री. प्रातःकाळ. Early morning.
[सं. **उषःकालः , सत्कालः** (भा. अ. १८३३); बं. **सकाल** ; ओ. **सकाळ** ; हिं. **सकाल** ; गु. **सवार** ; ने. **सकार.**]

सकृत् अ. एकदां, एक वेळ, एकदम. Once, at one time, suddenly.
[*IE.* Sam ; सं. **सकृत्** (**स–हस्तम्**), (संस्कृतमधील बरेच उपसर्ग ह्याच्याशीं संबद्ध आहेत. **सन्, सह,**

सम्, समा); झें. **ह्म्, ह**; *Slav*. Samu, same, samo; *Russ*. Su, so = with; *Teut*. Sem (one); अकाम. **सकृद्दर्शनीं** = प्रथमच.]

सक्का पुं. कोळी, पखाली, पाणी वाहणारा–देणारा. A water-carrier.
[अर. **सक्का. सक्का** तु जलदः–रा.व्य ३.३.]

सखल वि. खोलगट, उतार असलेली (जमीन). खालीं पहा. Low, deep.

सखा पुं. मित्र, सोबती, प्रेमक. A friend, a companion.
[सं. **सखिन्, सम्, सह** + √ ख्या ; पेकाम. **सखा,** (देवा, विठ्ठला–सखाराम भगवंत बोकील, देवाजी पुरुषोत्तम चोरघोडे, विठ्ठल सुंदर परशुरामी–पेशवाईतील तीन शहाणे मुत्सद्दी); अकाम. **सख्खा, सगा.**]

सखोल अ. खोल, पूर्ण. खोल पहा. Deep, complete, not shallow.

सख्खा, सगा वि. अगदीं जवळच्या नात्याचा, सख्खा भाऊ. Of the closest relation, of direct relationship.
[सं. १ **स्वक**; पा. **सको**, प्रा. **सय.** २ सं. (?); प्रा. **साक्खइ, साखिल्लो, सक्खेत्**; प्रा. **सक्क, सग्ग**; का. **सख**; हिं. **सखा, सगा**; पं. **सग्ग**; लां. **सक्क, सकदार**; सिं. **सका** (नातेवाईक); **सगो** (एकाच आईबापाचें); गु. **सगॅू** (संबंध), **सागवॅू** (नातेवाईक); अकामसा. **सगा, सगासोयरा** (स्वकीयः सोदरः).]

सख्त वि. कडक, कठीण, निष्ठुर. Hard, firm, harsh, stern.
[अर. **सख्त्, सख्ती** = बळजबरी, जुलूम.]

सगर पुं. पायवाट. A foot-path.
[सं. ?; याकाम. **सगर.**]
आला जीवउं अनंगसगरूं वाटें चंद्रमौळीसी ॥ नरुस्व. ९७

सगळें वि. सर्व, सबंध, पूर्ण. All, whole, entire.
[सं. **सकल**; प्रा. **सगल, सअल, सयल**; अप. **सगल**; पं. **सगल, सग्रा**; हिं. **सगर, सग्रा, सगल, सग्ला**; गु. **सघळुं**; सिंह. **सियल, सियल्ल.**]

सम् उप. बरोबर, एकत्र, चांगलें ह्या अर्थाचा द्योतक उपसर्ग. A prefix signifying 'with, together, good'.
[सं. **सम्**; संसा. अकामसा. **संकट** (सांकडें), **संकर्षण, संकलन, संचय, संकल्प** (बेत, हेतु, विचार), **संकल्पिणें** (योजणें), **संकर** (मिश्रण), **संकीर्तन** (गुणगान), **संकुल, संकुलित** (एकत्रित, दाट, गर्द), **संक्रमण** (अवस्थांतर), **संक्रान्त, संक्रान्ति** (सूर्याचें राश्यन्तर).]

संकष्ट न. संकट, विघ्न, अरिष्ट. A strait, a difficulty.
[सं. **संकट** ह्या संस्कृत शब्दाचें अपभ्रष्ट किंवा संस्कृतीकरण केलेलें रूप. विशेषतः स्त्रियाच्या बोलण्यांत येतें. **संकष्टी** चतुर्थी. '**सम् + कष्ट**' अशी ही व्युत्पत्ति असणें शक्य आहे. परंतु त्याचा अर्थ–**त्रासलेला, श्रमी, खेदशीक** असा होईल.]

संकीर्ण वि. निरनिराळ्या प्रकारचें, एकत्रित केलेलें, मिसळलेलें, सर्व पसरलेलें. Mixed or mingled, miscellaneous.
[सं. **सम् + कीर्ण** (निष्ठा), √ कॄ ६ विकरणे.]
तें संकीर्ण गाइलें निगुतें: पत्रकें वर्धमान ॥ नरुस्व. १८३

संकेत पुं. बेत, योजना, करार, तरतूद, खूण, चिन्ह, समज, अट. Appointment, provision, a sign, a condition.
[सं. **सम् + कित्** १० ज्ञाने ; याकाम. **संकेत** = खूण (ज्ञा. १७-३३१).]

संकोच(णें) अक्रि. आकुंचित होणें. आखडणें. To draw in, to contract.
[सं. **सम् + कुच्** ६ संकोचने ; **संकोच** = आखडणें, मिटणें, अरुंदपणा, निमूळतेंपणा.]
संकोचलीं कमळें : पक्षिये टाकिती अविसाळें ॥ नरुस्व. ४७६.

संक्षेप पुं. सार, थोडक्यांत सांगणें. Synopsis.
[सं. **सम् + क्षिप्** ४ क्षेपे.]

संख्या स्त्री. आंकडा, अंक. A figure.
[सं. **सम् + ख्या** = एकत्र सांगणें, मोजणें, त्यावरून **अंक** मोजण्याचें साधन; अकामसा. **संख्या(वाचक)** = संख्या दाखविणारा शब्द, **संख्या(विशेषण)** = संख्या दाखविणारें विशेषण.]

संग पुं. सोबत, संगति, ऐक्य, स्त्रीशीं संबंध. Companionship, friendship.
[सं. **सम् + गम्** (लक्षणेनें) १ गतौ, √ **सञ्ज्.**]

संगमरवरी वि. पांढऱ्या रंगाचा (दगड). A white marble stone.

[फा. **संग** (= दगड) + **मरवरा** (**मर्मर**) = एक प्रकारचा–आरसपानी दगड.]

संगट(ठ)(णें) अक्रि. एकत्र होणें, एकवटणें. To be together, to be mixed together.
[सं. **सम्** + **ग्रंथ्** ९ रचने, (**गम्** १ गतौ).]

संगत-ति स्त्री. संगति, सोबत, स्नेह. Companionship.
[सं. **सं** + **गत** (निष्ठा), √ **गम्** .]

संगम पुं. एकत्र होणें–जाणें, भेट, मिलाफ, एकमेकांत मिसळणें. Confluence.
[सं. **सम्** + **गम्** १ गतौ.]

संगीत न. चांगलें गीत–गायन, गायनवादन. A good song, music.
[सं. **सं–गै**—गायने.]

संगीन वि. जड, वजनदार, दगडी, (लक्षणा) चांगलें, यथास्थित, पूर्ण तयारीचें, जय्यत. Huge and heavy, massive (firm).
[फा. **संग** = दगड.]

संगीन स्त्री. बंदूकीच्या तोंडास लावलेलें टोंकाचें हत्यार. A bayonet.
[तुर्की. **संगु** = भाला ; फा. **संगीन**.]

संगें अ. सह, बराबर. With.
[सं. **संग** ; पा. प्रा. **संग** ; सिं. **सङ्गूं**. २ **संगतः** (श्लोक) ; पा. **संगतो** ; प्रा. **संगय**, पण '**संग**' ची तृतीया कां घेऊं नये ?]

संगोप(णें) सक्रि. चांगल्या रीतीनें पाळणें, सांभाळणें. पोसणें, व्यापणें. To protect, to rear up, to nourish.
[सं. **सम्** + **गुप्** १ पालने; **संगोपन**. = पालन, पोषण.]

संग्रह(णें) सक्रि. जमविणें, एकत्र सांठवणें. To collect, to bring together.
[सं. **संग्रह** (नाधा.), **सम्** + √ **ग्रह्** ९ धारणे, **संग्रह** = सांठा, रास, ढीग, **संग्रहणी** = रोगविशेष, हगवण, अतिसार.]

संग्राम पुं. लढाई, युद्ध, जमाव. A battle, a crowd.
[सं. **सम्** + **ग्राम**.]

संघ पुं. जमाव, जूट, समूह. Crowd.
[सं. **संघ**. **संघशः** = एकत्रित, समूह करून.]

संघट(णें) अक्री. एकत्र येणें, भेटणें, दाट संबंध येणें. To come together, to meet.
[सं. **सम्** + **ग्रंथ्**, **घट्** १ चलने; **संघटण** = सलगी, निकट संबंध (इतर रूपें–**संघट्टण**, **संघष्टण**.]

संघर्षण न. घांसाघीस, घसट. Contact.
[सं. **सम्** + **घृष्** १ घर्षणे, **संघर्ष** (णें) = घांसणें, चोळवटणें.]

संघात पुं. समुदाय, समूह, मेळ. Crowd, company.
[सं. **सम्** + **घात**, √ **हन्**.]

संघार(णें) सक्रि. मारणें, हत्या करणें. To slay, to kill.
[सं. **सम्** + **घृ** (?) **हृ–संहारणे** यापासून असावा.]

सच, च्,–त्य वि. न. खरें, सत्य. True.
[सं. **सत्य**; प्रा. **सच्च** ; हिं. **सच्** ; अकाम. **साचा सच्चा**.]

सचकार पुं. पैसे अगोदर देणें. विसार. Earnest money, retaining fee.
[सं. **सत्यंकार** ; याकाम. **साचोकार** = खरेंपणा.]

सचिव पुं. प्रधान, मुख्य मंत्री. A minister of state.
[सं. **सचिव**.]

सज(णें) अक्रि. तयार होणें, वस्त्र अलंकार घालून तयार होणें, नटणें, शोभणें, नटणेंथटणें. To get or become prepared.
[सं. **सज्ज**, √ **सस्ज्** ; प्रा. **सज्ज**. २ सं. **सज्ज** > **स** + **ज्जा** ; धनुष्याची दोरी वगैरे ताणून लढण्याच्या तयारीनें असणें, त्यावरून सामान्यीकरण होऊन–'सिद्ध–तयार होणें'; याकाम. **सजणें** = शोभणें (ज्ञा. १५-१३); अकामसा. **सजविणें**–भूषविणें, **सजावट**–शोभा, तयारी, सिद्धता.]

सजगुरा पुं. धान्यविशेष, बाजरीसारखी एक धान्याची जात. A kind of corn.
[कान. **छज्जे** = बाजरी, म. **सजगुरा**.]

सजणा पुं. मित्र, सखा, प्रेमक, नायक. A friend, a companion, a lover.
[सं. **स्वजनः** ; **सजणी** (स्त्री) = नायिका.]

सजा स्त्री. शिक्षा, दण्ड, कैद. *Punishment*, fine, sentence.
[फा. **सझा** = कैद.]

सज्ज, सज्य वि. सजणें पहा.

सज्जन पुं. चांगला प्रामाणिक सात्त्विक मनुष्य. A good and virtuous person.
[सं. **सत्+जन.**]

सज्जा पुं. गच्ची, माडीवरील पुढची बंदिस्त जागा, कठडा असलेली माडीवरील जागा. A room or an erection of slight framework on a terrace.
[सं. **छाद्य** ; हिं. पं. **छज्जा** ; ने. **छज्जा.** वरील व्युत्पत्ति टर्नरनें दिली आहे. हा शब्द फार्सी आहे काय ?]

संच पुं. सांठा, जोड, आकार, ठेवण. Apparatus, materials viewed collectively, frame, mould.
[सं. **संचय, सम्+√चि** ५ संचये ; अकामसा. **संचणें, संचिणें, संचणी** (पेरणीसंचणी) = जमीनपेरणी, पीक गोळा करणें.]

संचर(णें) अक्रि. फिरणें, जाणें, पिशाच्चाचा संचार होणें, घालणें, प्रवेश करणें. To move, to walk, to haunt.
[सं. **सम्+चर्** १ गतौ; अप. **संचारि** (निष्ठा); गु. पं. हिं. **संचर** ; अकामसा. **संचार** = गति, भ्रमण, (लक्षणा) भूत अंगात येणें. **संचार(णें).**]
कीं इथे काहि यकु जाला संचारू । नरुस्व. ४००

संजाप पुं. घेरा, डोक्यावरील केंसाची कड, नक्षीदार पट्टी. Ornamental border (of the hair on the head).
[फा. **संजाफ.**]

संजीवन न. पुनर्जीवन, प्रेतास जिवंत करणें. Revival.
[सं. **सम्+जीवन, √जीव्.**]

सटवणी स्त्री. सहावी तिथी (विशेषतः मार्गशीर्ष महिन्यांतील शुद्ध षष्ठी), मुलाच्या जन्मापासून सहावा दिवस. The sixth day (of either half (esp. of month Margashiras).
[सं. **षष्ठी** ; प्रा. **छट्ठी** ; हिं. **छठी** ; पं. **छटी** ; सिं. **छठी** ; गु. **छट्ठी** ; ने. **छैटी** ; अकामसा. **सटवणी** = सटीच्या दिवशीं पडणारा पाऊस (सं. **षष्ठी+पाणी > वणी**), **सटवी, सटवाई** = षष्ठी देवता (ज्ञा. १८-८३७) (सं **षष्ठिका**). पुढें चांगला अर्थ जाऊन त्याला वाईट अर्थ उत्पन्न झाला.]

सटक(णें) अक्रि. एकदम निघून जाणें, निसटणें, पळून जाणें. To start and disappear.
[१ सं. **सट्ट** १ गतौ + क (स्वार्थे), प्रा. **सट्ट** ; देप्रा. **छट्ट+क** ; २ सं. **सं+तक्ष् > संतक्ख > सटक, झटक.** किंवा ध्वनिशब्द. कु. **सटकणो** ; बं. **सटकान, छेटकान** ; हिं. **सटकना, छटकना** ; पं. **सटकणा** ; गु. **सटकवूँ, छटकवूं** ; ने. **छडकनु** ; अकामसा. **सटकन्, सटदिशी ,–दिनी.**]

सट्टा पुं. देवघेवीसंबंधीं केलेला तात्काळ व्यवहार, सौदा. An immediate transaction.
[देप्रा. **सट्ट** = विनिमय ; गु. **सटोडा** ; हिं. **सट्टा** ; अकामसा. **सट्टेबाज** = सट्टे करणारा, सट्ट्याचें व्यसन असलेला (साटें पहा).]

सड(णें) सक्रि. कांडणें, कुटणें, आपटणें, विखरणें. To pound, to thrash.
[सं. **क्षुद्, क्षद्** १ संपेषणे किंवा **शद्** १ विशरणे ; देप्रा. **छट** ; प्रा. **छडा** (थेंब); बं. **छडान** ; हिं. **छडना** (पाखडणें); पं. **छडना** (पाखडणें); सिं. **छढणु** ; गु. **छढवूँ.** **छट्ट** ; प्रा. **छट्टा** ; अकाम. **सडा.**]

सड(णें) अक्रि. नासणें, वाईट होणें, कुजणें, झडणें. To rot, to putrify.
[सं. **शृत्** ; पा. **सरति** ; सं. **शट्** ; प्रा. **सडइ** ; बं. **सडा** ; ओ. **सडिबा** ; पं. **सडना** ; लां. **सडण** ; (जळणें); सिं. **सडणु** ; गु. **सडवूँ** ; अकामसा. **सडका** = नासका, कुजलेला.]

सड पुं. खुंट, बुडखा, स्तन, आंचळ, (त्यावरून) जननेंद्रिय. A stub or stump, a teat.
[सं. **छृद** (?)]

सडक स्त्री. रस्ता. A road.
[सं. **सध्र्यंच्** (?), **सध्रि+√अच्** १ गतौ; बं. **सडक्** ; ओ. **सडक** ; लां. **सडक** ; गु. **सडक** ; २ सं. **सृतिः** ; प्रा. **सिड्ड** (शिडी) (< **संशृतिः**).]

सडक(णें) उक्रि. मारणें, धोपटणें, झोडपणें, लागणें, एकदम निघून जाणें. To pelt, to batter, to belabour, to start and disappear.
[सं. **सध्रि+अच्** ६ गतौ; हिं. **छिडकना** ; पं.

छिडकणा; अकामसा. **सडकून** < **शद्** १ विशरणे; गुं. **छडववूँ**.]

ते सडकी सींसा वळिये सैंग: भारसिंग कोंतेकार ।
नरुस्व. ७४५.

सडा पुं. पाणी शिंपडणें. Sprinkling.

[सं. **छर्दय** किंवा **सम्+वृष्** १ सेचने (?); प्रा. **छंट**, म. **छडा** = पाण्याचे थेंब; **साटा** (उडविलेले पिठाचे कण) **शीटा** (तुषार); याकाम. **सडा** = १ वृष्टि, २ एकटा (ज्ञा. ६-३१३, ११-६७४).]

सडा वि. एकटा, रिकामा, स्वतंत्र. Bare, void, detached, single, sole.

[याकाम. **सडिवा**.]

तेव्हळीं **सडिवा** फेडिला तुळसियेसी: अठवरपणाचा ।
नरुस्व. ३७२

सडु(डु)सष्ट वि. संख्याविशेष, साठ आणि सात. Sixty-seven.

[सं. **सप्तषष्टिः**; प्रा. **सत्तसट्ठीं**; का. **सतह्राइठ**; बं. **सात्सट्टी**; ओ. **सतसठी**; हिं. **सडसठ**; पं. **सताहट**; लां. **सतइठ**; सिं. **सतहठि**; **सडसठ**.]

सढल वि. पुष्कळ, मुबलक. Liberal, profuse, lavish.

[वैसं. **श्रथ्**; सं. **शिथिल**; प्रा. **सिढिल**, **सिढिल**; हिं. **ढिला**; ह्यापासून **सैल**, **ढिला** व **सढळ** असे तीन भिन्नभिन्न तद्भव शब्द सिद्ध झाले आहेत. एक माहाराष्ट्री, दुसरा अपभ्रंश व तिसरा शौरसेनी अशा तीन निरनिराळ्या प्राकृत मधून आले आहेत. "**श्रद्धावत्–सड्ढाल–सढाळ** (भा. अ. १८३२) ही व्युत्पत्ति ग्राह्य नाहीं.]

सण न. तृणविशेष. A kind of grass.

[सं. **शण**; प्रा. **सण** (पुंन.).]

सण पुं. उत्सव, आनंदाचा दिवस, (लक्षणा) सणाच्या दिवशींची–देणगी, अहेर, जेवण. A holiday, a festival.

[सं. **क्षणः**; पा. **छण**; प्रा. **छण**; देप्रा. **छणो** उत्सव (१२०-८); पं. **खिण** (पुं); गु. **खण** (स्त्री); सिं. **खुणु**) हिं. **छन**, **छिन्**, **खण**, **खिण**. '**क्षण**' हा संस्कृत शब्द मजेदार आहे. ह्यापासून **क्षण** = दर्भ, **खण**; = वस्त्र, **खिण** = थोडा वेळ. **सण**, = उत्सव. **क्षण** = वेळ इतके निरनिराळे शब्द उत्पन्न झाले आहेत. '**सणासुदी**' मधील सुदी शब्दाचा अर्थ तोच असला पाहिजे. एकाच अर्थाचे दोन शब्द.]

सण, **सणंग** पुंन. वस्त्र, कापड, लुगडें (नवीन). Cloth.

[सं. **शणः**; पा. **सणम्**; प्रा. **सण**; देप्रा. **छाणं** (वस्त्रम्); कु. **सण**; बि. हिं. **सन्** (पुं.); पं. **सण्** (स्त्री); सिं. **सिणु** (दीर्घ उंच गवत); **सिणी** (ताग); गु. **सण** (न).]

सण पुं. ताग. Hemp.

[सं. **शण**; अकाम. **सणगर** = घोंगड्या विणण्याचा धंदा करणारा.]

सणसण(णें) अक्रि. (तापानें) थणथणणें, झिणझिण्या येई तों मारणें. To emit sound, to be down with high fever.

[सं. **क्षण्** ५ हिंसायाम्; प्रा. **छण**; किंवा ध्वनिशब्दहि हा असणें शक्य आहे; अकामसा. **सणक** = दुःख, वेदना, कळ; **सणकन्** = दुःखाची वेदना.]

सणाणा वि. सणसणीत, तीक्ष्ण. Intense, sharp.

[सं. **क्षण्** ५ हिंसायाम्; प्रा. **छण**; याकाम. **सणाणा** (ज्ञा. १५–२५९).]

शस्त्र केलें जीं सणाणें ॥ भा. अ. १२–५७६.

संट(णें) क्रि. सांठणें, मावणें, व्यापणें. To collect, to occupy.

[सं. **श्वंठ्** १० असंस्कारे.]

देहबुद्धीची अर्गळा । स्वरूपीं न संटे ॥ अमृ. ८-४.

संड(णें) क्रि. उडणें. To fly.

[सं. **सम्+डी** १ विहायसा गतौ.]

तरंगभंग सांडी पडे । विजू ही नुपकरे होरडे ॥
ज्ञा. १५ २४५.

संड(णें) सक्रि. टाकणें, सोडणें. To leave, to abandon.

[सं. **श्वठ्** १ त्यागे; प्रा. **संट्ठ**.]

हा वडवानळु न संडी पाठी: आमचीये क्षीराब्धीचा ॥
नरुस्व. ५२५.

सत् वि. चांगलें, खरें, सर्वकाळ असणारें. Good, true, permanent.

[सं. **सत्**, √ **अस्** २ सत्तायाम्; *Lat. Esse*; (हा शब्द लागून पुष्कळ सामासिक शब्द सिद्ध झाले आहेत.) **सत्कर्म**, **सत्कृति**, **सत्कार्य** = चांगलें काम; **सत्पात्र** = योग्य, लायख; **सत्पुरुष** = साधु, संत; **सच्छिष्य** = चांगला शिष्य; **सत्संग** = चांगल्या मनुष्याचा सहवास; **सद्बुद्धि** =

चांगली बुद्धि–विचार; **सद्भक्त** = चांगला भक्त, **सद्भाव** = चांगली भावना, निष्ठा; **सद्वृत्त** = चांगलें वर्तन; **सद्व्यय** = चांगल्या रीतीनें केलेला खर्च; **सत्कार** = मान सन्मान; **सच्चित्** (सत् आणि चित्); **सद्गति** = चांगली गति–शेवट; **सद्गद** = कंठ भरून येऊन अस्पष्ट शब्द; **सद्गुण** = चांगला गुण; **सद्गुरु** = गुरु, शिक्षक; **सद्धर्म** = चांगला धर्म.]

सतनागत स्त्री. निरूपाय, अगतिकत्व, नाइलाज. The indispensableness, the must-be.
[सं. सत न + अगति (?) सत्य + ना + गति.]

सतका, सत्का पुं. ओंवाळणी, एखाद्यावर ओंवाळलेली वस्तु, कुरवंडीची वस्तु. A thing offered or devoted for.
[अर. सद्का = दान दिलेली–अर्पण केलेली वस्तु.]

सतत–संतत अ. नेहमीं, सर्वकाळ, नित्य. Continual, perpetual, eternal.
[सं. सम् + तत (निष्ठा), √ तन् ८ विस्तारे. मूळ विशेषण, असून व त्यावरून अव्यय सिद्ध झालें.]

सतरंग पुं. बुद्धिबळाचा खेळ. The game of chess.
[सं. चतुरंग (?); फा. शतरंज.]

सतरंजी स्त्री. रंगीत बैठक, बसावयास घालण्याचें रंगीत सुताचें कापड.
[अर. फा. शतरंजी.]

सतरा–त्रा वि. संख्याविशेष, दहा अधिक सात. Seventeen.
[सं. सप्तदशन्; प्रा. सत्तरस, सत्तरह; हिं. सत्रह; पं. सतारा; सिं. सत्रहं; गु. सित्तर; मै. सत्रह; सिंह. सतळोस; ओ. सतर; बं. सेतर.]

सतार स्त्री. एक ततुंवाद्य. A guitar.
[फा. सितारा–तीन तारांचें वाद्य.]

सताव(णें) क्रि. त्रास देणें, रागेजणें. To plague, to tease, to vex.
[सं. संतापयति; पा. सतापेति; प्रा. सतावेदी; का. सतावूँ; कु. सतोणो; हिं. सतना; पं. सताउणा; सिं. संदइणु; गु. सताववूँ.]

सती स्त्री. चांगली स्त्री, पतिव्रता, साध्वी, सती–नवऱ्याच्या शवाबरोबर स्वतांस अग्निसात् करणारी स्त्री. A chaste and virtuous wife, esp. *Sati*.
[सं. सत्, √ अस्; सती (स्त्री.); अकामप्र. **सती जाणें** = सहगमन करणें. हिंदुस्थानाखेरीज रशिया, ग्रेशिया, मलाया बेटें ह्या देशांत ही चाल रूढ होती. **सतीचें वाण** = सती जाणाऱ्या स्त्रीनें दुसऱ्या स्त्रीस दिलेलें वाण. हें घेतलें म्हणजे सती जाण्याची जबाबदारी येते. ह्यावरून लक्षणेनें–कडकडीत निश्चय, स्वार्थत्यागाची तयारी, दृढ प्रतिज्ञा.]

सत्कार पुं. मानसन्मान, मानमरातब, आदरातिथ्य. Honour, hospitality, respect.

सत्कार पुं. अस्तिवाद, अस्ति शब्द. The philosophy pertaining to the existence of world.
[सं. सत्– √ अस्; + कार.]

सत्तर वि. संख्याविशेष, साठ आणि दहा. Seventy.
[सं. सप्तति; पा. सत्तति, सत्तलि, सत्तरि; प्रा. सत्तरीं; का. सतथ; बं. त्सतरी; सत्तर; ओ. सतोरि; हिं. पं. सत्तर; लां. सत्तीर; सिं. सतरि; गु. सितेर; ने. सत्तरि.]

सत्ता स्त्री. असणें ही स्थिति, अस्तित्व. Being, existence.
[सं. सत् + ता, √ अस् २ सत्तायाम्.]

सत्ता स्त्री. हक्क, अधिकार, मालकी, शक्ति. Authority, right over.

सत्तावन्न वि. संख्याविशेष, पन्नास आणि सात. Fifty-seven.
[सं. सप्तपंचाशत्; का. सतपन्झाह; बं. सातान्न; ओ. सतावन; हिं सत्तावन्; पं. सत्वाञ्ज; लां. सत्वंज; सिं. सत्वाञ्जह; गुं. सत्तावन्; ने. सतावन्.]

सत्तावीस वि. संख्याविशेष, वीस आणि सात. Twenty-seven.
[सं. सप्तविंशतिः; प्रा. सत्तावीसम्; का. सातोवुह; बं. साताइस; ओ. सताइस; हिं. सताईस; पं. लां. सतावी; सिं. सतावीह; गु. सत्तावीस.]

सत्तेचाळीस वि. संख्याविशेष, चाळीस आणि सात. Forty-seven.
[सं. सप्तचत्वारिंशत्; प्रा. सीयालीसम्; का. सततोजिह; प. पहा. सताळी; अ. त्सात्साह्लिस; बं. सातचाह्लीस; ओ. सतचाळिस; हिं. सइतालीस; पं. सइताळी: लां. सताळी; सिं. सतेतालीह; गु. सडताळीस; ने. सैंतालिस्.]

सत्य वि. न. खरें, खरेंपणा, सचोटी. True, truth, truthfulness.
[सं. **सत्य**, √ **अस्** २ सत्तायाम् ; अकामसा. **सत्यपांड** = ब्रह्मांड, **सत्ययुग** = कृत, त्रेत, द्वापार, कलि ह्या चार पैकीं पहिलें युग, **सत्यलोक** = ब्रह्मलोक, **सत्यसंकल्प** = खरा निश्चय, **सत्यानृत** = खरें खोटें.]

सत्याहत्तर वि. संख्याविशेष, सत्तर आणि सात. Seventy-seven.
[सं. **सप्तसप्तति** : प्रा. **सत्तहत्तरि**; का. **सतसतथ** ; बं. **सातात्तर** ; ओ. **सतस्तरि** ; हिं. पं. **सतहत्तर** ; लां. **सतात्तर** ; सिं. **सतहतरि**; गु. **सीतोतर**.]

सत्त्यांशीं वि. संख्याविशेष, ऐंशी आणि सात. Eighty-seven.
[सं. **सप्ताशीतिः** ; प्रा. **सत्तासीइ** ; का. **सतशीथ** ; आ. **त्सातासि** ; बं. **सातासि** ; ओ. **सतासि** ; हिं. लां. सिं. **सतासी** ; गु. **सत्यासी** ; ने. **सताति**.]

सत्र न. पुष्कळ दिवस चालणारा यज्ञ, नामसंकीर्तन, दानधर्म–अन्नदान. A sacrificial session.
[सं. **सत्र्**–विस्तारे.]

सत्रा वि. संख्याविशेष. सतरा पहा. Seventeen.

सत्रावी स्त्री. जीवनकला, चंद्राच्या सोळा कला जीवर अधिष्ठित असतात ती मूळची कला, चंद्रबिंब, हटयोगांतील पारिभाषिक शब्द. A term in *Yogashastra.*

सत्राण पुं. जोर, सामर्थ्य, बल, रग, धमक. Strength, power, vigour.
[सं. **स** + **त्राण**, √ **त्रै** १ पालने ; **सत्राणें** = आवेशानें, जोरानें.]

सत्त्व न. अस्तित्व, अवस्था, स्थिति, द्रव्य, वस्तु, वस्तूंतील सार, कस, अर्क, स्वभाव, खरेंपणा. Being, existence, substance, essence, vigour, excellence.
[सं. **सत्त्वम्**, √ **अस्** २ सत्तायाम्, **सत्** + **त्व** = **सत्त्वम्**. ह्या शब्दाच्या अर्थांत लक्षणाशक्तीनें बरेच प्रकार उत्पन्न केले आहेत. मूळ अर्थ अस्तित्व–त्यावरून असलेली वस्तु–त्यावरून त्या वस्तूंतील सार, कस वगैरे. सत् म्हणजे असणारे–त्रिकाल असणारे–म्हणून सत्य चांगलें–त्यापासून सात्त्विक इत्यादि. **सत्त्व घेणें–पाहणें** = परीक्षा घेणें, सार पाहणें ; **सत्त्वगुण** = चांगला गुण-रजस्, तमस् हे दुसरे दोन गुण आहेत. **सत्त्वनिष्ठ**, **सत्त्वशील**, **सत्त्वशुद्ध** = सत्त्वावर निष्ठा असलेला, सात्त्विक शीलाचा, सत्त्वानें शुद्ध.]

सत्वर अ. लवकर, तावडतोब, जलद. Quick, speedy.
[सं. **स** + **त्वरा**, √ **त्वर्**–आशुगमने.]

सथाउं, सथावां वि. आवेशयुक्त, जोरदार, चपल. Vigorous, active, vehement.
[सं. **स** + **थाव**, √ **स्तिम्**, **थाव** = जोर, सामर्थ्य, बल.]
नीगता सथावां गतीं । आसुडितां दोहो हातीं ॥ शिशु. ५३३.
तो सथाऊं घोटा । न साहे आंगा सानटा ॥ शिशु. ५७२.

सदतीस वि. संख्याविशेष, तीस आणि सात. Thirty-seven.
[सं. **सप्तत्रिंशत्** ; पा. **सत्तत्तिंसत** ; प्रा. **सत्ततिसइ** ; का. **सततृह** ; आ. **त्सातत्रिस्** ; बं. **सइत्रिस** ; ओ. **सइँत्रिस** ; हिं. **सइंतीस** ; पं. **सइंती** ; लां. **सतत्री** ; सिं. **सतटूह** ; गुं. **साडत्रीस** ; ने. **सैतीस्**.]

सदन न. घर, स्थान, राहण्याचें ठिकाण. A house or habitation.
[सं. **सदनम्**, √ **सद्**.]

सदय वि. दयावान्, दयाळू. Kind, compassionate.
[सं. **स** + **दया**, √ **दय्**.]

सदर वि. मुख्य, श्रेष्ठ, (त्यावरून) मुख्य कचेरी, न्यायसभा. Exalted, eminent, supreme court.
[अर. **सद्र**, **सदर अदालत** = दिवाणी न्यायसभा, **सदर अमीन** = दिवाणी न्यायाधीश, **सदरहू** = सदरप्रमाणें (फा. **सदर्हू**).]

सदर न. रकाना, बाब, प्रकरण. A heading, an item, a paragraph.

सदळ वि. दांडगें, जाड, दाट. Strong, thick, dense.
[सं. **स** + **दल**, **सम्** + **दभ्** ६ ग्रंथे.]
सपुर खोजिएचें चोखट । फेडुनि सदळ कांठ ॥ ऋ. ८०

सदरा, सद्रा पुं. कुडतें, पैरण, कोटाच्या आंत घालावयाचें प्रावरण. A shirt.
[अर. **सुद्रा**, **सद्र्** = हृदय, अंतःकरण.]

सदसत् वि. चांगलेंवाईट, भलेंबुरें, खरेंखोटें, अस्तित्वांत असलेलें-नसलेलें. Good and bad, true or false.

[सं. **सत् + असत्, √ अस्** २ सत्तायाम्; **सदसद्विचार** = खरें खोटें यांचा विवेक, **सदाचरण** = चांगली वर्तणूक,–वर्तन (**सत् + आ + चर् + न**).]

सदां अ. नेहेमीं, निरंतर, कायम. Always, at all times, constantly.

[सं. **सदा, √ अस्, सत्** (?); अकामसा. **सदानकदा, सदासर्वकाळ, सदाफुली, सदावर्त** (पांथस्थांस अन्नशिधा देणारी संस्था), **सदैव**.]

सदी,-द्दी स्त्री. शतक. Century.

[फा. **सदी** ; शिकाम. **सदी** (चित्र. १०९); अकाम. **दर सद्दे**.]

संदी,-द्दी स्त्री. नशीब, भरभराट, सुदैव. Luck, prosperousness, good fortune.

[अर. **सदी, सअद** = चलती.]

सद्म न. घर, राहण्याचें ठिकाण. A house or habitation.

[सं. **सद्मन्**.]

सद्यः,-द्यां अ. आतां, एकदम, ताबडतोब, त्या क्षणीं. Now, suddenly, instantly, at the present time.

[सं. **सद्यः**, '**स**' चा अर्थ '**एक**' असा आहे. उदा. **सपदि, सद्यस्क** = हल्लीचें, सांप्रतचें.]

सध(णें) अक्रि. जखमी करण्याची इच्छा करणें. To desire to cause wound, to injure.

[**सं. सध् ५ हिंसायाम्.**]

तो आपुलिया स्वैंच्छा। मग कोणी कोणीं ठाईं हिंसा।
यां प्राणियांतें वीरेषा। न सधीति गा॥

ज्ञा. १६-३९५.

सध्यां अ. आतां, हल्लीं, वर्तमान काळांत. Now, at the present time.

[सं. **सद्यः** (?). मूळ अर्थांत फरक झाला. **सद्यः** म्हणजे एकदम, तात्काळ.]

सन पुं. वर्ष, साल. Year.

[फा. अर. **सना, सनह्** = वर्ष.]

सनई स्त्री. वाद्यविशेष, तुतारी, पिपाणी. A kind of instrument, a pipe.

[सं. **स्वनादि, स्वनति, √ स्वन्** १ शब्दे ; फा. **सुनाई, सुर्नाय्**; शिकाम. पेकाम. **सनयी**. फारशी व्युत्पत्तिच ग्राह्य.]

सनया नफेरिया बुरंगें ॥ मुक्तेश्वर-वनपर्व १२-५९.

सनद स्त्री. शासन, अधिकारपत्र. A royal order, letter of authority, a law, a commission or warrant.

[अर. **सनद्** = वतनपत्र (इ. १५९०); अकामसा. **सनदशीर**-सनदेस धरून, कायद्याप्रमाणें ; **सनदी** (नोकर)–सनद देऊन मान्यता दिलेला हक्कदार.]

सनाटा पुं. रट्टा, सपाटा, झणाटा, जोराचा रपाटा, जोर. A rap, a severe stroke, violence.

[सं. **सम्-नाट, नद्ध, √ नह्** (!).]

सनातन वि. नेहमींचें, पुष्कळ दिवस चालत आलेलें, शाश्वत, अनादि. Eternal, perpetual.

[सं. **सना + तन**.]

सनाथ वि. नाथ–मालक–धनी असलेला. That has a lord or master.

[सं. **स + नाथ, √ नाथ्, नाध्, नाह्**.]

सनाह पुं. नाथ, स्वामी. Lord, master.

तो रायाचा वोलिजे सनाहोः दक्षिणे महिमेचेयां ॥

नरुस्व. २७५

संत पुं. वि. साधु, पुण्यपुरुष, ईश्वराला जाणणारा. शांत, स्थिर, नित्य, शांत. A saint, a holy person, calm, quiet.

[सं. **सन्त, √ अस्**–धातूचें वर्तमान कृदन्त; प्रा. **सन्त**; गु. पं. हिं. **संत**; सिं. **संतु**. ह्या शब्दाच्या संबंधांत इं. **स्पंतो** ; इटॅ. पोर्तू-Santo हे शब्द चिन्त्य आहेत. **संताळा** = संत असणारा, संताचा संघ.]

सम् उप. ह्या उपसर्गान्वित कांहीं शब्द पुढें दिले आहेत.

[अकामसा. **संतति, संतान** (**सम् + तन्**) = मुलें, अपत्यें; **संतप्त** (**तप्**) = रागावलेला; **संताप** (राग, ताप, दाह); **संतुष्ट, संतोष, संतोषणें**; **संदेश** (**सम् + दिश्**) = निरोप, बातमी, **संदेह** (**सम् + दिह्**) = संशय, शंका.]

संत्री पुं. पहारा करणारा शिपाई. A patrol.

[इ. **सेंट्री, सेंटिनल**.]

संथ, संत वि. थंड, मंद. Gentle, calm.
[सं. (**संथ**) < **शांत** (निष्ठा, √ **शम्**), पा. **प्रा. सन्त, सन्ति** ; पं. संत (स्त्री.); सिंह. **सेत्** = शांतता.]

संथा स्त्री. पाठ, घडा, पुनरावृत्ति. Reading and cramming in order to commit to memory.
[सं. **संस्ताव, संस्तवः**; पा. **संथवो** ; प्रा. **संथव** अशी व्युत्पत्ति टर्नर देतो व संशयित म्हणतो. **संस्था** किंवा **संहिता** (वेद) ह्या शब्दापासून वरील शब्द आला असावा. वेदपठन, वेदपाठ ह्या अर्थी '**संहिता**' असा शब्द आहे; ने. **संथा.**]

संदर्भ पुं. संबंधाचा उल्लेख, संगति, अनुसंधान. Context.
[सं. **सम्** + **दृभ्** ४ रचनायाम्.]

संदाळ(णें) सक्रि. आवळणें, आवळून बांधणें, दाट बांधणें. To fasten or fix fast and tight.
[सं. **सम्** + **दृभ्** ६ ग्रंथे.]

संदिग्ध वि. संशयित, अनिश्चित. Doubtful, ambiguous, uncertain.
[सं. **सम्** + **दिग्ध** (निष्ठा), √ **दिह्**.]

संदु पुं. आवड, नाद, छंद. Liking.
[सं. **छद्**.]
नाहीं आर्ति निर्वेदु । न संडी विषयसंदु ॥ ऋ. ५७

संदु(जु)क स्त्री. पेटी, पेटारा. A box, a chest.
[अर. **संदूक.**]

संध स्त्री. सांधलेला, जोड, सांधा, गांठ, वेळ, प्रसंग. A joint, a knot, a time, an opportunity.
[सं. **संधि**, √ **सम्**+**धा.**]

संधान न. योजना, तरतूद, लक्ष, अवधान. Aim, arrangement, plan, attention, heed.
[सं. **सम्**+**धा.**]

संधि पुं. योग्य वेळ, अवसर, अवकाश. An opportunity.
[सं. **सम्**+**धा.**]

संधि पुं. जोड, ऐक्य, सांधा, चीर, भेग. Junction, union, joint, an internal (space), a gap.

संधि पुं. तह, समेट, तडजोड. A compromise, a peace.

संधिप्रकाश पुं. 'संध्या' च्या वेळचा-सूर्योदय व सूर्यास्त वेळचा प्रकाश. The twilight.
[सं. **संधि प्रकाश** = मधील काळांतील प्रकाश किंवा **संध्याप्रकाश** = संध्येचा प्रकाश.]

संध्या स्त्री. संधिकाळ, दिवस व रात्र ह्यांमधील काळ, उपासना. Religious meditation, twilight.
[सं. **संध्या**, √ **सम्** + **ध्यै** = चांगलें ध्यान करण्याची वेळ (तद्भव-**सांज.**)]

संनिकर्ष पुं. जवळपणा, निकटवर्तित्व, शेजार. Nearness, proximity.
[सं. **सम्** + **नि** + **कृष्** = जवळ ओढणें.]

संनिध अ. जवळ, शेजारी. Near.
[सं. **सं** + **नि** + **धा.**]

संनिधान न. जवळपणा. Nearness.
[सं. **सम्** + **नि** + **धा.**]

सन्नद्ध वि. तयार, सिद्ध. Armed, accoutred.
[सं. **सम्** + **नद्ध**, √ **नह्**.]

सन्निपात पुं. एकत्र पडणें,-येणें,-मिसळणें, संबंध जोडणें, रोगविशेष, वात, पित्त, कफ ह्यांचें सारखें प्रमाण होऊन झालेला आवेग. Coming together, falling together, violent fever.
[सं. **सं** + **निपात**, √ **पत्**.]

सन्मान पुं. मान, सत्कार. Respect, honour.
[सं. **सत्** + **मान**, √ **मन्** ४ मनने; अकामसा. **सन्मानणें** (नाधा.) = सन्मान करणें, **सन्मान्य** = सन्मान करण्यास योग्य.]

सन्मुख अ. समोर, पुढें. In front, fronting.
[सं. **सम्** (**सन्**) **मुख.**]

संन्यास पुं. विरक्ति, त्याग, सर्वस्व सोडणें. Renunciation.
[सं. **सन्न्यास**, **सम्** + **न्यास**, √**नि** + **अस्** ४ क्षेपणे. ह्या शब्दाच्या अर्थाचें विशेषीकरण झालें आहे, **संन्यास** म्हणजे चतुर्थाश्रम.]

सपक वि. बेचव, पाणचट. Insipid, unsavory.
[कान. **सप्पे** = बेचवपणा.]

सपशेल अ. पूर्णपणें, निखालस, एकदम, अव्यवस्थित रीतीनें, अस्ताव्यस्त. Completely, at once, in helter-skelter way.
[अर. **सफा.**]

सपसप-सपासप-सपासपां अ. लवकर, जोरानें, झपाझप. Continuously, incessantly.
[ध्वनिशब्द.]

सपाट वि. चापटलेला, चढउतार नसलेला, सारख्या पृष्ठभागाचा. Flat, level, smooth.
[सं. **चर्पट**; प्रा. **चप्पट** (?); पं. **चापर**; सिं. **चापोरो**; ल्हां. **चाप्री**; कान. **सप्पे** = सपाटी, बेचवपणा (**म. सपक**).]

सपाट(णें) सक्रि. सारख्या पातळींत आणणें. To bring in one level.
[सं. **समपट** (नाधा.).]
तें चि वायुचें स्फुरण ठेलें। आणि उदक साह्यजें सपाटलें। तरि काइ आतां निमालें। विचारि पां ॥ ज्ञा. २-१०७

सपाट(णें) सक्रि. कोणतीहि गोष्ट बेसुमार करणें, फाडणें. To do a thing excessively.
[सं. **सम्+पाट्य.**]

सपाट कर(णें) क्रि. पूर्ण नाश करणें. To demolish.
[सं. **सपत्रंकरणम्** (सपुंखशरप्रवेशेन सपत्रं करोति मृगम्).]

सपिण्ड वि. पिण्डासहित. Accompanied with a *pinda* (a ball of rice).
[सं. **स+पिण्ड** = मृतासाठीं श्राद्धान्न, भाताचा बळी (हें मूळचें विशेषण परंतु पुढें नामाप्रमाणें रूढ झालें.). पिण्ड देण्याचा अधिकार असलेला नातेवाईक.]

सपिण्ड पुं. खडा, ढेंप. A lump.
तेआंचे सपिंड काढावे चिरे। पुरखप्रमाणें ॥ ए. भा. १६

सपीट,-टी स्त्री. बारीक पीठ (गव्हाचें किंवा तांदळाचें). Fine wheaten flour.
[सं. **संपिष्ट** (निष्ठा), √ पिंष् ७ चूर्णने.]

सपुर वि. पातळ, मृदु, बारीक. Soft, liquid.
[याकाम. सपुर-नरुस्व. ४३१, ज्ञा. १-६; ऋपू. ४८२]

संपुट न. करंडी, ओंजळ, शिंपला, दोन खोलगट भाग जोडून तयार झालेला. A casket, a basket, cavity of the palms brought together.
[सं. **संपुट, सम् +** √ **पुट्.**]

संपुष्ट न. संब्रळी, देव ठेवण्याचें पात्र. A casket.
[सं. **संपुट.** उत्तरकालीन संस्कृतीकरण.]

संपूर्ण वि. सर्व, एकूणएक, सगळें. Complete, full.
[सं. **सम्+पूर्ण** (निष्ठा), √ पृ-पूरणे.]

सपोश,-ष,-स वि. पुष्ट, लठ्ठ, पोसलेलें. Fat, nourished.
[सं. **सपुष्टि, स +** √ पुष् ४ पोषणे.]
जो गुरुप्रेमें सपोषु ॥ ज्ञा. १३-४४२.

सप्त वि. सात-संख्या. Seven.
[सं. **सप्त**; अकामसा. **सप्तर्षि** = सात ऋषि, सात तार्‍यांचा समूह; **सप्तजिव्ह** = सात जिव्हा असलेला,-अग्नि; **सप्तपदी** = वधूवरांनीं मिळून सात पावलें जाण्याचा विधि; **सप्तशती** = सातशें श्लोकांची स्तुति, **सप्ताश्व** = सात घोडे रथाला असलेला,—सूर्य.]

सप्ताळू न. फलविशेष. A kind of fruit.
[फा. **शफ्तालू**-एक फळ.]

सप्रयोजन वि. प्रयोजनासह, कारणासह. Along with object or aim.
[सं. **स+प्र+युज्.**]

सप्रवर वि. प्रवर सारखे असलेला. Of the same *Pravara*.
[सं. **प्र+वर,** √ **वृ. प्रवर** = मूळ पुरुष-ऋषि.]

सफर स्त्री. प्रवास, यात्रा. A journey, a pilgrimage, a voyage.
[देप्रा. **सफर.** (पुं. न.); अर. **सफर्.** हा शब्द देप्रा. म्हणून दिला आहे. परंतु परदेशी वाटतो. कदाचित् प्राचीन कालीं-प्राकृत काळांतच हा शब्द शिरला असावा. किंवा हा शब्द लोप पावून तदर्थक दुसरा फारसी शब्दच रुढ झाला असावा. देप्रा. शब्द पुं. न. लिंगी आहे व मराठी रुढ शब्द स्त्रीलिंगी आहे.]

सफा वि. स्वच्छ, साफ, पांढरें स्वच्छ. Clear, neat.
[अर. **सफा** = स्वच्छता; अकामसा. **सफाई** = स्वच्छता, शुद्धता, तजेला, (**पांढरा सफेत**).]

सफ्फा अ. पूर्णपणें, समूळ, अगदीं, साफ. Completely, altogether.
[अर. **सफ्फ**=ओळ, रांग.]

सफा पुं. पूर्ण नाश, सपाट, तडाखा. Complete destruction.
[अर. **सफ**=कत्तल, मारामारी. < **सफ्फ**= ओळ, शिपायांची रांग; पेकामसा **सफजंग, सफेजंग**=मोठी निकराची लढाई (रा. १-५०, खरे १-५८).]

सफेत वि. पांढरा, स्वच्छ, श्वेत. White.
[फा. **सफेद्**. हा शब्द राजवाडे '**श्वित्** १ वर्णे किंवा **श्विद्** १ श्वैत्ये' ह्या धातूपासून काढतात. परंतु तें पटत नाहीं. शब्द फार्शी आहे.]

सफेल,–ली स्त्री. मोठी भिंत. तट. A great wall, fortification.
[अर. **फसील्**=भिंत. वर्णव्यत्यासानें **सफेल** असें रूप झालें. पेकाम. **सफेली** (चिरा. ४५).]

सब्,–ब वि. समस्त, सर्व. The whole.
[फा. **सब्**; सं. **सर्व** (?). मराठींत हा शब्द फार्शी मधून आला.]

सबज वि. हिरव्या रंगाचा. Of green colour.
[फा. **सब्झ्**; **सबजा**=एक सुवासिक वनस्पति.]

सबनीस पुं. सैन्यांतील पगाराचा हिशोब वगैरे लिहिणारा अधिकारी. The accountant in army.
[फा. **सफ्नवीस, √ निविस्तन्**–लिहिणें.]

सबब स्त्री. अ. कारण, हेतु. Cause, aim, reason, because, therefore.
[अर. **सबब्**; पेकाम. **सबब**=म्हणून; **असबाब** (अव.).]

सबंद,–ध वि. बंदासहित, बांधलेला, सर्व, सगळा, पूर्ण, आखा. The whole, complete, that is tied.
[सं. **स+बंध, √ बन्ध्**.]

सबर वि. गाभण (घोडी संबंधीं वापरतात). Big with young.
[सं. **सभर**(?)]

सब–ल वि. सशक्त, बळाचा, बलवान्, सैन्यासह. Strong, able, one with strength or army.
[सं. **स+बलम्**–सामर्थ्य, सैन्य.]

सबळ स्त्री. अन्न, शिधा, शिदोरी. Food.

आणि प्रिय आलिया स्वभावें। सबळ उरे वेचें ठाउवें नव्हे ॥
ज्ञा. १८-५९१.

सबूरी,–र स्त्री. उशीर, दम, धीर. Patience, forbearance, waiting.
[फा. **सबूरी**.]

सभा स्त्री. लोक जमाव, जमून बसण्याची जागा, दरबार, जमाव, बैठक. A meeting, an assemblage.
[सं. **सभा, √ स+भा**; अकामसा. **सभाजन**=सभेंतील लोक; **सभाधीट**=न भिता बोलणारा, **सभापति**=अध्यक्ष, **सभासद, सभ्य**=सभेमध्यें बसणारे सदस्य, भारदस्त प्रौढ मनुष्य.]

सभाज(णें) सक्रि. मान करणें,–राखणें. To be honoured.
[सं. **स+भाज्** १० प्रीतौ; **सभाजन**=देणगी, बक्षीस.]

सम(णें) अक्रि. वाटणी करणें. To divide.
[सं. **सम्+मा** ३ माने.]

तें सत्त्वें आपुलां आंगीं। समुनिनिमुनी भागी।
दोघे केले नियोगी। ब्राह्मणक्षत्री। ज्ञा. १८-८२५.

सम(णें) अक्रि. संथ होणें, शांत रहाणें. To be calm and quiet.
[सं. **सम्** ४ परिणामे, **शम्** ४ शमे.]

सम स्त्री. वि. सारखें, तुल्य, समान. Like, likeness, similarity.
[सं. **सम**; अकामसा. **सम–चौरस,–च्छेद;–दर्शी, समदुःखी, समरस, समवयस्क** (सारख्या वयाचे) इत्यादि सामासिक शब्द रूढ आहेत.]

सम स्त्री. तालदर्शक टाळी (गायन शास्त्रांतील), दोन सम गोष्टींची तुलना. Marking of time.

समई स्त्री. धातूची (पितळेची) ठाणवाई. A lamp-stand.
[अर. **शमूअ**=दिवा; सं. **संदीपिका, संवर्तिका** (?).]

समक(णें) अक्रि. आवड असणें, सवकणें, गोडी लागणें. To like.
[सं. **सम्+मक्, मख्** १ गतौ.]

समज(णें) क्रि. आठवणें, जाणणें, आकलन होणें. To understand, to apprehend.

[सं. **संबुध्यते** ; पा. **संज्झति** ; प्रा. **संबुज्झइ** ; कु. **समजणो** ; बं. **समजा** ; ओ. **समझिबा** ; हिं. **समुझना**, **समझना** ; पं. **समझणा** ; सिं. **समुज्झणु** ; गु. **समजवूँ**. हा धातु सविकरण प्राकृत भाषांत आला. '**संपद्यते**' पासून हा शब्द निघूं शकेल. परंतु वरील टर्नरची व्युत्पत्ति अधिक ग्राह्य दिसते. अकामसा. **समजवि(णें)** = स्पष्ट करून सांगणें, **समजाविशी**, **समजूत** = समाधान.]

समज स्त्री. पुं. ज्ञान, जाणणें, बुद्धि. समजणें पहा. Knowledge, intellect.

[सं. **संपद्यते** ; प्रा. **सम्मज्झइ** ; बं. **समज** ; ओ. **समझ** ; हिं. **समझ** (स्त्री), (पु.) **संझ** ; सिं. **समुझ** ; गु. **समज** ; याकाम. **समज** = समुदाय (ज्ञा. ११–१८६).]

समदँ, समदा वि. (ग्राम्य) सर्व, सगळें. Whole, complete.

[सं. **समस्त** (?), **सबंध**, **सबंद** ; याकाम. **समट** = सर्वं (नरुस्व. १६५).]

समय पुं. वेळ, काळ, प्रसंग, संधि, निकराची वेळ. Time, opportunity.

[सं. **सम्+इ**, **अय्** १ गतौ ; अकामसा. **समयसूचक** = समयास योग्य गोष्ट सुचणारे.]

समरस(णें) अक्रि. तद्रूप होणें. To become one with.

[सं. **समरस** (नाथा.), याकाम. **समरसणें**. (नरुस्व. ८२४)]

समर पुं. लढाई, युद्ध. A battle.

[सं. **सम्+मृ** ६ मरणे ; –**समरांगण** = युद्धभूमि (सं. **समर+अंगण**, √ **अंज्** १ गतौ).]

समर्थ वि. योग्य, लायख, सशक्त. Strong, able, proper.

[सं. **सम्+अर्थ्** १० याचने–किंवा **ऋच्छति एनम् अर्थः** ; अकामसा. **समर्थ(णें)** = सिद्ध करणें, **समर्थन** = पुष्टि, प्रतिपादन.]

समर्पण न. अर्पण करणें, देणें. Bestowal.

[**सम्+अर्प्** १० दाने ; अकामसा. **समर्पण** = देणें ; **समर्पक** = देण्याजोगें, बरोबर, उचित.]

समला पुं. फेट्याचा पदर, टोंक, शेंवट. The end of a turban.

[फा. **शम्ला** ; पेकाम. **सम्ळा** (प्रभा. ४७) ; अकाम्र. **शेमळा**, **समला**.]

समवाय पुं. नित्य संबंध, संयोग, समुदाय. Assemblage, collection, intimate and constant relation.

[सं. **सम्+अव+अय्**, –इ ; **समवेत** = बरोबर, सह.]

समव(णें) अक्रि. जखडणें. To join, to fasten.

[सं. **सम्+मव्** १ बन्धे.]

समशेर स्त्री. तलवार. A sword.

[फा. **समूशेर**.]

समष्टि स्त्री. समुदाय, सामग्र्य. Collection, wholeness.

[सं. **सम्+अष्टि**, √ **अश्**–व्यापने]

समस्त वि. सगळा, सर्व. All, whole.

[सं. **सम्+अस्त** (निष्ठा), √ **अस्** ४ क्षेपणे.]

समस्या स्त्री. अपेक्षा, श्लोकाच्या अपुऱ्या भागाचा अवशेष. Expectation, remainder.

समक्ष अ. देखत, समोर, डोळ्यादेखत. Before, in front or presence of.

[सं. **सम्+अक्ष** > **अक्षिन्**–अक्ष्णोः समम्.]

समाई(णें) अक्रि. समावणें पहा. मावणें, एकत्र होणें. To include.

[सं. **सम्+मा**, (**णिच्**) **संमापय**.]

समाईक वि. एकत्र, सर्वांचें स्वामित्व असलेला. Common to several proprietors.

समाकुल,–ळ वि. सर्व, समस्त, सगळा. All, the whole.

[सं. **सम्+आ+कुल्**.]

समागम पुं. एकत्र येणें, सहवास, (लक्षणा) संभोग, मैथुन, स्त्रीसमागम. Company, coalition.

[सं. **सम्+आ+गम्**.]

समाचार पुं. (लक्षणा) बातमी, चौकशी, विचारपूस. The inquiry into, news.

[सं. **सम्+आ+चार**, √ **चर्** १ गतौ.]

समाज पुं. समुदाय, जमाव, सभा. An assembly, a multitude.

[सं. **समाज**.]

समांतर वि. सारख्या अंतरावरील. Parallel.
[सं. सम्+अंतर < अन्तः + √ इ.]

समाधान न. संतोष, मनाची शांति, तृप्ति (लक्षणा). Satisfaction.
[सं. सम्+आ+ √ धा.]

समाधि स्त्री. एकतान होणें, चित्ताची एकतानता, (लक्षणेनें) संन्याशाचें मरण, किंवा त्याचें थडगें. Deep meditation.
[सं. सम्+आ+ध्यै.]

‘**सम्**’ उपसर्गान्वित आणखी कांहीं तत्सम शब्द पुढें दिले आहेत; संसा. अक्रामसा. **समग्र** = सगळें, सर्व, संपूर्ण; **समाहार** (सम्+आ+हृ) = समूह, संक्षेप; **समाहित** (सम्+आ+धा) = एकत्र आणलेला,–ठेवलेला, एकाग्र, ध्यानस्थ; **समिति** (सम्+इति) = एकत्र जमाव, एकजूट, मंडळी, सभा; **संमिश्र** (सम्+मिश्र) = मिसळलेलें; **समीकरण** (सम+कृ) = सारखें करणें, **समीचीन** = योग्य, न्याय, युक्त; **समीप** = जवळ, जवळचा; **समीर, समीरण** (सम्+इर् १ गतौ, ऋ) = वारा, वात; **समीक्षण-क्षा** (सम्+ईक्षण, √ ईक्ष्) = परीक्षा, चांगल्या रीतीनें अवलोकन; **संमुख** = समोर, तोंडासमोर, सन्मुख; **समुचित** (सम्+उचित) = योग्य, चांगलें; **समुच्चय** (सम्+उच्चय–उत्+चि) = समूह, सांठा; **समुदाय** (सम्+उत्+ √ इ १ गतौ) = समूह, संघ; **समूह** (सम्+ऊह्) = जमाव, गट, कळप; **समृद्ध** (सम्+ऋद्ध, √ ऋध्) = संपन्न; **समृद्धि** = भरभराट, संपन्नता; **समेत** = बरोबर आलेला,–जुळलेला; **समवेत** = सह; **संमेलन** (सम्+मीलन) = जमाव, मेळा; **संभार** = साहित्य, साधन; **संभावना** = आदरसत्कार, मानमरातब, संभव.]

समान पुं. पांच प्राणांपैकीं एक प्राण. One of the five vital breaths.
[सं. सम्+आन, √ अन् २ श्वसने.]

समान वि. सारखें, बरोबरीचें. Even, smooth, level.
[सं. सम्+मान > मा ३ मापने.]

समाप्त वि. संपलेलें, पूर्ण झालेलें. शेंवटास गेलेलें. Ended, finished.
[सं. सम्+आप् ५ प्रापणे (निष्ठा). समाप्ति = शेंवट, पूर्णता.]

समारंभ पुं. योजना, मांडणी, उत्सव. Arrangement, disposition, celebration.
[सं. सम्+आ+रभ् १ समारम्भे.]

समाराधन,-ना. स्त्री. मोठें ब्राह्मणभोजन. मूळ अर्थ–मनाचें समाधान, मनधरणी, संतोष वगैरे. Entertainment made to Brahmins.
[सं. सम्+आ+राध् १ संतोषे.]

समारोप पुं. शेंवट, समाप्ति, उपसंहार. Closing, concluding.
[सं. सम्+आ+रोप, √ रुह्–(णिच्) रोपय.]

संमार्जन न. सडा घालणें, साफ करणें, मूळ अर्थ ‘झाडणें, साफ करणें’ व त्यावरून सडा घालून स्वच्छ करणें, पाणी शिंपडणें. Sprinkling.
[सं. सम्+मृज् २ परिशोधने.]

समालोचन न. चहूंबाजूंनीं पाहाणें, निरीक्षण. Survey.
[सं. सम्+आ + लोचन < लोच्, लोक् १ दर्शने.]

समावि(णें) सक्रि. धरणें, आंत घेणें, व्यापणें. To enter and be contained, to enter in.
[सं. समापयति, सम्+आप् (णिच्), सम्मति; पा. सम्मित्तो; प्रा. सम्माइ; कु. समूणो (घेणें); बं. सामाइ; हिं. समाना, पं. समाउण; सिं. समाइजणु; गु. समाववूँ. सं. समाप्त; पा. समापेति; प्रा. समावेइ (?)]

समाविष्ट वि. सामावलेला, आंत घेतलेला, अन्तर्भूत, अंगभूत. Included, incorporated.
[सं. सम्+आ विष्ट (निष्ठा), √ विश् ६ प्रवेशे.]

समावेश पुं. अंतर्भाव, प्रवेश, रिघाव. Inclusion.

समाश्रय पुं. आधार, थारा. Support.
[सम्+आ+श्रय, √ श्री.]

समास पुं. एकत्रीकरण. contraction, abridgement, a compound of words.
[सं. सम्+आस्. एकत्र येणें, जोडणें, हा मूळ अर्थ असून त्याचें विशेषीकरण झालें आहे. ‘शब्दांचा संयोग, –जोडणी, जोड शब्द’ हा त्याचा अर्थ झाला. अध्याय, प्रकरण, संक्षेप हे दुसरे अर्थ आहेत.]

समिठी स्त्री. बुक्काबुक्की, मारामारी. Striking with blows.

[सं. **समिति**; म. **स + मिठी**; याकाम. **समिठी.**]

वज्रांगी वज्रमुठी निहनत समिठी होतसे । गस्तो ५९.

समिध,-धा स्त्री. होमासाठीं अग्नींत टाकावयाच्या उंबर पिंपळ आंबा ह्या झाडाच्या काटक्या. Sacred sticks for sacrificial fire.

[सं. **सम् + इन्ध्** १ ज्वलने.]

समुद्र पुं. पाण्याचा सांठा, उदधि, सागर. A sea, an ocean.

[सं. **सम् + उद्रस्**, < **उदन्**; अकामसा. **समुद्र फल** = एक औषधि, **समुद्र फेंस** = एक औषधि.]

समेट(णें) क्रि. एकत्र करणें, व्यवस्थित करणें, तडजोड करणें. To bring together or to terms or to agreement.

[सं. **संवर्तयति**; २ **संवेष्टयति**; पा. **संवट्टति**; **संवत्तेइ**; कु. **समटणो**, **समेडनो**; हिं. **समेटना**; पं. **समेटणा**; गु. **समेटवूं**; ने. **समेटनुँ**; अकामसा. **समेट** = सलोखा, तडजोड, मेळ, समजूत.]

समो पुं. मेळ, सारखेंपणा, समूह, समुदाय (श्रोतृसमो). Likeness, similarity.

[सं. **समय.**]

शिष्या देतां वाटे । अद्वैताचा समो फुटे । अमृ. ९·७०

संप(णें) अक्रि. पुरें होणें, पूर्ण होणें, खर्च होणें, सरणें. To end, to finish.

[सं. **सम् + आप्** ५ प्रापणे, अकामसा. **संपवि(णें)** = पुरें करणें.]

संप पुं. एकजूट होऊन काम सोडणें,–बंद पाडणें, एकोपा, एकमत. A strike.

[सं. **सप्** १ समवाये.]

संपज(णें) अक्रि. पूर्ण होणें. To be completed.

[सं. **सम् + पद्**–संपद्यते.]

एक एकु एकातें पोखी । ऐसे बहुत पदार्थ एकिं ।
संपजति ते लोकीं । सपत्ति म्हणिजे ॥ ज्ञा. १६·६५

संपत्ति स्त्री. धन, मालमत्ता, पैसा, लाभ, प्राप्ति. Property, richess, wealth, gain.

[सं. **सम् + पद्**; संसा. **संपदा** = पैसा, धन; **संपन्न** = श्रीमंत, युक्त.]

समोर अ. पुढें, तोंडापुढें. In front or presence of.

[सं. **सम्मुखः**; पा. **सम्मुखो**; प्रा. **सम्मुह**; हिं. **सामुह**; पं. **सौहे**, **सुहेरहे**; सिं. **सम्हो**; गु. **सामूँ**, **सम्हो**; मराठी व पंजाबी मध्यें फक्त एक '**र**' अधिक आला आहे. तो '**मुखर**' मधील आहे काय ? महानुभावी वाङ्मयांत **साउमा**, **साउमील** अशीं रूपें आढळतात (नरुस्व. १३१,२३५). **समोरील**, **समोरचा**, **समोरून**, **सामोरा** हे इतर तद्भव होत.]

संपात पुं. झपाटा, हल्ला, तडाखा, प्रहार. An attack.

[सं. **सम् + पत्** १ पतने.]

संपात पुं. संयोग, संमीलन. Union.

[सं. **संपात**–एक विशेष अर्थ ह्या शब्दाला प्राप्त झाला आहे.–विषुववृत्त व क्रांतिवृत्त ह्यांचा परस्पर च्छेदबिंदु).]

संपाद(णें) सक्रि. मिळविणें, प्राप्त करणें, तडीस नेणें. To acquire, to gain, to edit.

[सं. **सम् + पद्**; अकामसा. **संपाद(णें)** = परिष्कार करणें (मासिक, पत्र संपादणें), **संपादक** = वर्तमानपत्र-मासिकांतील मजकुराची जुळणी करणारा, **संपादणी** = प्राप्ति, बतावणी, निभावणूक.]

संबंध पुं. संग, संयोग, नातें, विवाह. Relation, connection, tie.

[सं. **सम् + बन्ध्** ९ बन्धने; अकामसा. **संबंधी** = आप्त, नातेवाईक.]

संबंधीं अ. जोडून, नात्याचें. Pertaining to, bearing on.

[सं. **संबन्धः** > **संबंधी**; पा. **संबधो**; प्रा. **संबंध**, **संबंधि**; का. **सोणूँ** (सासरा); कु. **सोंदी**; ओ. **समूधी**; हिं. **संधी**; गु. **समंधी.** '**संबध**' ह्या शब्दाचें सप्तमी विभक्तिरूप.]

संबळ न. एक वाद्य, तोमर, भाल्यासारखें एक शस्त्र. A kind of instrument.

संबळ, सबळ स्त्री. पहार, दुधार पहार. A pommel.

कौतुकें जें जें जल्पे । तें संबळाहूनि तीख रुपे ॥
ज्ञा. १३-६६२.

संबळी स्त्री. वेताची बुट्टी, करंडी, पेटी. A basket.

संवाह(णें) उक्रि. चोळणें, मर्दन करणें. To press and besmear.
[सं. **संवाहनम्**, **सम्** + √ व्हे किंवा **वह्**.]

संवोख(णें) सक्रि. बोलाविणें, हांक मारणें, पुकारणें. To call.
[सं. **सम्**+**वोच्** (वैदिक '**वच्**' चें रूप); **वच्** १ भाषणे.]

संबोध(णें) सक्रि. हांक मारणें, बोलविणें. To call.
[सं. **सम्**+**बुध्** १ बोधने ; अकामसा. **संबोधन**= हांक, आमंत्रण, आठवी विभक्ति.]

संभर(णें) अक्रि. जबाबदारी घेणें. To take responsibility.
[सं. **सम्**+ **भृ** १ वाहने.]

संभव(णें) अक्रि. उत्पन्न होणें, पात्रता असणें, शक्य असणें. To be produced or born, to be possible.
[सं. **सम्** + **भू**; प्रा. **संभव** ; याकाम. **संभवणें** (ज्ञा. १८-२७), **संभवी** (ज्ञा. १६-६७), **संभहु** = सांठा, भर, संभव. **संभव** = उत्पत्ति, **संभावना** = शक्यता, योग्यता, पात्रता, अंदाज, संशय, शंका.]

हा तंवचि आदर बहु । जंव सुकृतांचा संभहु ॥ ऋ. २९.

संभावि(णें) उक्रि. आदर करणें, संभावना करणें. To honour, to entertain.
[सं. **सम्**+**भू** (णिच्). **संभावित** = शक्य, सभ्य, सन्मान्य, प्रतिष्ठित.]

संभाष(णें) अक्रि. बोलणें, परस्पर बोलणें. To converse with.
[सं. **सम्**+**भाष्**, **संभाषण** = संवाद, वचन.]

संभाळ(णें) क्रि. रक्षण करणें, पाळणें, काळजी घेणें. To protect, to take care, to rear.
[सं. **संभारयति**, **संभारः** (योगक्षेम); पा. **संभारो** (एकत्रीकरण, पुंज); का. **संभाळू**; बं. **सामाला** ; हिं. **संभालना** ; प्रा. **संभरई** ; ओ. **संभालिबा** ; पं. **संभाळणा** ; सिं. **संभारणुं** (लक्ष ठेवणें); गु. **सांभाळवूं**; अशी टर्नर व्युत्पत्ति देतो. **संपालयति** पासून **संभाळणें** ही व्युत्पत्ति अधिक ग्राह्य आहे.]

संभूत वि. योग्य, सुसंगत, सुसंबद्ध. Proper, appropriate.
[सं. **सम्** + **भूत** (निष्ठा), √ **भू** ; **संभूति** , **संभूत** = संभव, शक्यता, योग्यता.]

संभोग(णें) सक्रि. उपभोग घेणें, भोगणें. To enjoy.
[सं. **सम्** + **भुज्** ७ भोगे; **संभोग**, **उपभोग** = (विशेषीकरणानें) रतिसुख, मैथुन.]

संभ्रम पुं. गोंधळ, गडबड, मोह, गैरसमज, भ्रमण, भोंवरा. Confusion, chaos, misunderstanding.
[सं. **सम्**+**भ्रम्** ४ गतौ, भ्रमणे.]

संभ्रम पुं. आदर, पूज्यबुद्धि. Reverence.

सुदेवा आदरू करी सुंदरी: संभ्रमें उठिली राजकुमरी ॥
नरुस्व. ६५५

संमत स्त्री. बाजू, दिशा. Side, direction.
[अर. **सम्त्**; पेकाम. **सम्मत** (रा. १५-१७२).]

संमत वि. मान्य, कबूल, अभिमत. Acceptable.
[सं. **सम्**+**मत** (निष्ठा), √ **मन्** ४ मनने; संसा. **संमति** = मान्यता.]

संमर्द पुं. चेंगराचेंगर, गर्दी, दाटी. Crowdedness.
[सं. **सम्** + **मृद्** ९ संघर्षणे.]

सम्यक् वि. चांगलें, रास्त, योग्य. Good, proper, appropriate.
[सं. **सम्यक्**, √ **अंच्** १ गतौ (?)]

सम्राट् पुं. पादशहा, राजांचा राजा, सार्वभौम राजा. Emperor, overlord.
[सं. **सम्** + **राट्**, **राज्**, √ **राज्** १ प्रकाशने.]
['**सम्**' हा उपसर्ग लागून झालेले कांहीं शब्द :— **संप्रदान** (**सम्**+**प्र**, **दान**, √ **दा**) = दान, अर्पण; **संप्रदाय** = प्रचार, प्रघात, रीत, विशिष्ट पंथ; **संप्रसारण** = व्याकरणांतील एक विशिष्ट वर्णप्रक्रिया-**य्**, **व्**, **र्**, **ऌ** च्या ऐवजीं **इ**, **उ**, **ऋ**, **ऌ** हे स्वर येणें; **संप्राप्त** = चांगल्या रीतीनें मिळविलेलें; **संयम** (**सम्** + **यम्**) = निग्रह, आळा; **संयमन**, **संयत** ; **संयुक्त** (**सम्** + **युक्त**, √ **युज्**), **संयोग** = जोड, मिळणी; **संयोजक** = योजना करणारा.]

सय्यद पुं. मुसलमानी धार्मिक पदवी, महंमदाच्या मुलीच्या वंशांतील मनुष्य. A term of religious reverence among the Muslims.
[अर. **सइयिद, सय्यिद** = सरदार, महाजन.]

सर पुं. डोकें, नग. Head, (fig.) chief.
[फा. **सर्**. लक्षणेनें श्रेष्ठ, मुख्य, नेता हा अर्थ. उदाः– **सर**कारकून, **सर**देशपांडे, म्हैस **सर** तीन. अकामप्र. **सर** करणें; **सरसहा, सररहा, सरसाल.**]

सर पुं. आवाज, ध्वनि. Sound.
[सं. **स्वर.**]

सर पुं. माळ, कंठा, पदर, मण्यांचा हार. A neck-lace.
[सं. **सर,** √ **सृ**; देप्रा. **सरामाला** (२७२-१२); सिं. **सर** (स्त्री.); याकाम. **सर** "हातीं उसाचा मेढा फुलांचे सर ॥ नरुस्व. ७६७. अकाम. **सर** = दोरी ; **सर** = धार, लोंढा (पावसाची सर).]

सर,–रा पुं. बांबूची काठी, बाण, शर.
[सं. **शर,** √ **शॄ**; पा. प्रा. **सर** (बोरू); बि. **सर**; हिं. **सर**; सिं. **सरू**; गु. **सर** (बाण); याकाम. **सर** = बाण (नरुस्व. ७६८)]

सर अ. सारखेंपणा,–साम्य दाखविणारा प्रत्यय (इषद्-अर्थे प्रत्यय–काळसर). Similarity, likeness.
[सं. **सदृश**; प्रा. **सरिसो** > **सर**; अकामसा. **सरधोपट** = सरळ, उघडउघड ; **सरमिसळ** = सर्व सारखें मिसळलेलें, एकत्रित केलेलें; **सरसपाट** = अगदीं सरळ.]

सर(णें) क्रि. हलणें, जाणें, चळवळणें. To move.
[सं. **सरति**; पा. **सरति**; प्रा. **सरइ**; कु. **सर्णो**; आं. **स्सलाइब**; बं. **सरा**; हिं. **सर्ना**; पं. **सर्ना**; सिं. **सरणु**; गु. **सरवूँ.**]

सर(णें) अक्रि. संपणें. To be finished.
[सं. **सम्+हृ** (?), **क्षर्** १ संचलने. अधिक तें सरतें (ज्ञानेश्वर).]

सर(णें) सक्रि. सत्कार करणें. To honour, to entertain.
[सं. **सपर्** ११ पूजायां; याकामसा. **सरतें** = मान्य, सर्वमान्य. नरुस्व. १५७.]

तें येक अगाधचि आहे । तेयाचा सावाओ जैं लाहे । तै मोक्षाचां हि होये । गावीं सरता ॥ ज्ञा. १७-३१९.

सर(णें) सक्रि. आठवणें. To remember.
[सं. **स्मृ** १ आध्याने.]

जो ध्यानें सुये मानसी । तेया लागी तूं नाहिं देशीं ।
ध्यानेंचि सरे तेणेसीं । वालभ तुज । ज्ञा. १७-१३.

सरक(णें) अक्रि. किंचित् दूर जाणें. To slip or slide.
[सं. **श्रंक्**, **स्रक्** १ गतौ, **सृ+श्रक**; आ. **स्सर्किब**; हिं. **सरकना**; गु. **सरकवूँ**; हा शब्द **सरणें** ह्या धातूशीं संबद्ध आहे हें उघड दिसतें. अकामसा. **सरकट(णें)** = घसरणें, = भरभर खाणें, **सरकवणें, सरकाव(णें)** = दूर सारणें, **सरपटणें** = सरकत जाणें, पोटानें पुढें सरकणें ; **सरफास** = सरणारा फास; **सरसरणें, सरारणें, सरारा** = भरभर; **सरसावणें** = धिटाईनें पुढें जाणें.]

तेयांचे सांधावेया जावो न ल्हाये ।
ऐसा सरकटितु आहासि ॥ ज्ञा. ११-३८८.

सरकत स्त्री. वांटणी, वांटा, पाती, हिस्सा. Share, portion, division.
[अर. **शिरकत्**; पेकाम. **सर्कत** (रा. ७-१८); अकामसा. **सरकतदार** = भागीदार, वाटेकरी.]

सरका पुं. आंबट रस. A sour juice.
[फा. **सिरका.**]

सरकार न. राज्य करणारी संस्था, राजा, राजाची सभा, कचेरी, अधिकारी लोक, राजाचा प्रांतदेशविभाग. The government of a state, the reigning institution.
[फा. **सर्कार्**; पेकाम. **सर्कार** (खेर ११२१).]

सरकाळा पुं. सरकांडें, कणसाचा देंठ, दांडा, कडब्याचें धाट. The stem of an ear.

सरकी स्त्री. कापसाची बी. A cotton seed.

सरजा पुं. नथीच्या टीकेभोंवतीं कलिकाकार जो मोत्यांचा घेर बसविलेला असतो तो, (लक्षणा) बैलाच्या दावणींतील मुख्य बैल. The circle of bud-form pearls in the nose-ring, the chief bullock (fig.).
[फा. **सराजह्.**]

सरंजाम पुं. सामानसुमान, बरोबरचें सामान, हत्यारपात्यार, सैन्य, (त्यावरून सैन्याच्या खर्चासाठीं दिलेलें) इनामवतन, जमिनीची देणगी. Materials, furniture, equipment, an inam.
[फा. **सरंजाम** = आरंभ, शेंवट.]

सरड,-डा पुं. प्राणिविशेष, सरपटणारा–पालीसारखा प्राणी A chamelion, lizard.

[सं. **सरट**, √ सृ ; प्रा. **सरड** ; अप. **सरढ** ; देप्रा. **सरड** (२७६–१); पं. **सड्डुर** ; हिं. **सरट**.]

सरण न. जाळण्याचीं लांकडें, चिता. A pyre, fuel.

[म. '**सरपण**' शब्दाचा संक्षेप. < सं. **सर्पिष्** (?). **सरपण** पहा.]

सरणि,-णी स्त्री. वाट, रस्ता, पद्धति, रीति, चाल. धाटणी. Way, manner, usage.

[सं. **सरणि**, √ सृ १ गतौ, **सर** पहा. अकामसा. **सरतें** = शेंवटचें (ल.). श्रेष्ठ, मान्य, ग्राह्य; **सरतेंशेंवटीं** = शेंवटीं (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

तेणें गुरुप्रसादें सरता जाला: स्थानीं रायाचिये ।
नरुस्व. १५७

[१]**सरद** वि. थंड, गार, ओलसर. Cold, cool, wet.

[फा. **सर्द**. दूरान्वित कां होईना सं. **शरद्** शब्दाशीं संबंध असावा. √ शृ , √ श्रृध् १ उन्दने; अकामसा. **सरदणें** = थंड होणें, गारठणें, थक्क होणें.]

[२]**सरद** स्त्री. सीमा, मर्यादा, (लक्षणा) सरदेपर्यंचा ताब्यांतील प्रदेश. सरहद्द पहा. Boundary.

सरदार पुं. सैन्यांतील मोठा अधिकारी, मुख्य नेता, मानकरी. A chieftain.

[फा. **सरदार** ; पेकाम. **सर्दार** (पारस. ब्रच ७७).]

सरपण न. जाळावयाचें गवत वगैरेसारखें इन्धन. Wood, fuel.

[सं. **शरपर्ण** (तृणविशेष); प्रा. **सरपण्ण**. '**सर्पिष्**' शब्दाशीं संबंध आहे कां ? सरण पहा.]

सरपोस पुं. डोक्याचें आवरण, आच्छादन, चादर, गुप्त गोष्ट. A cover or covering.

[फा. **सर–पोश** = शिरस्त्राण; पेकाम. **सर्पोस** (खरे ९-५०४२).]

सरफ पुं. खर्च. Expenditure.

[फा. **सर्फ** = खर्च.]

सरफा पुं. नफा, फायदा. Gain, profit.

[अर. **सर्फा**.]

सरफराजी स्त्री. शिफारस, कृपा, स्तुति. Advancement, promotion, commendation.

[फा. **सरफराज**.]

सरबत न. लिंबू, आंबा वगैरेंचा रस–साखर–पाणी यांचें केलेलें एक प्रकारचें पेय. Syrup, a drink made from lemon etc.

[अर. **शरबत्**.]

सरबत्ती स्त्री. मोठी बत्ती, एकदम भडका, (तोफ, बंदूक वगैरेंच्या बाराचा) धडाका, स्फोट. A volley or a rapid discharge.

[फा. **सर + बत्ती**.]

सरबर-रा स्त्री. बरोबरी, स्पर्धा. Rivaling, emulating.

[फा. **सरबर** = पुढारी.]

सरबर(णें) सक्रि. पातळ करणें. To dilute.

[सं. सृ , भृ , **सम् + परि + भृ** , **सम् + मिश्र्**, **सर्वमिश्र**; अकामसा. **सरबरीत** = किंचित् पातळ, **सरबसर**, **सरबसळ**, **सरमिसळ** = मिश्रित, एकंदर, सरासरी.]

सरबराई स्त्री. (अधिकाऱ्याची) व्यवस्था, पाहुणचार, तरतूद. Entertainment to guests or officers.

[फा. **सरबराह** = सामुग्री, प्रवासखर्च; शिकाम. **सरबरा** (सभा. २४); पेकाम. **सर्बरा** (रा. १०-३२५), **सरबरा**, **सरभरा** = व्यवस्था, मदत, बंदोबस्त, तरतूद.]

[१]**सरम(णें)**, **शरम(णें)** अक्रि. लाज वाटणें. To feel shy.

[सं. **श्रम्** ४ खेदे; फा. **शर्म** ; हिं. **सर्म**, **शर्म** ; गु. **सरम**, **शरम** ; सिं. **शरमु** ; पं. **शर्म**.]

[२]**सरम(णें)** अक्रि. विवेचन करणें. To expound.

[*Eng*. Sermon. (नाधा.).]

जें ऐकतां सुख तुमां । तें सरमतां संतोषु आमा ॥
ख्रि. पु. १.१.

सरमाड न. बाजरीचें धाट, कडबा. The stem of ear of corn.

[सं. **शरमृष्ट** (?).]

सररास,-राहा अ. सर्व एकंदर. All-told.

[फा. **सर–राहा** (मार्ग), **सरिराशि**, **सरिरास** (?).]

सरल,-ळ वि. नीट, थेट, समोर, स्पष्ट, सोपा. Straight, simple, direct, clear.

[सं. **सरल**, √ सृ १ गतौ ; प्रा. **सरल** ; पं. हिं. सिं. **सरल, सरलो** ; गु. **सरळ.**]

सरव(णें) सक्रि. संपविणें, सरणें पहा. To finish.

सरवा पुं. नुकतीच पिकाची कापणी केली आहे अशी जमीन. The land from which harvest is just taken.

[सं. ?; देप्रा. **सरिवाओ** तथा **सिहरओ आसार:** (२७६-९); गु. **सरवा** (अ. वचन). शेतांतील झाडें झुडपें साफ करून पेरणीस योग्य केलेली जमीन (श. को.), पावसाची सर (ब्लोक).]

सरस वि. श्रेष्ठ, उत्कृष्ट, उत्तम. Superior, excelling.

[सं. **श्रेयस्** ; **सदृश** (?) ; अकामसा. **सरशी**,-**सी** = श्रेष्ठता.]

सरसा वि. सारखा, बरोबरीचा. Similar, resembing, like.

[सं. **सदृश** ; प्रा. **सरिस** ; गु. **सरसुं** = सह ; हिं. **सरस** = सारखा ; पं. **सरिह** = समोर ; सिंह. **सरि** ; याकाम. **सरिसा** (नरुस्व. १९६). ह्या शब्दाचा अंतर्भाव ब्लोकनें '**सृ**' धातूच्या शब्दपरिवारांत केला आहे. आमच्या मतें ह्याचा अंतर्भाव '**सदृश**' शब्दाच्या परिवारांत केला पाहिजे. आमच्या म्हणण्यास प्राकृत रूपांचा आधार आहे. सं. **सदृश** ; प्रा. **सरिस, सरिच्छ, सदक्ष**, (अशोक शिला.) **सदिस.**]

सरसाव(णें) अक्रि. धिटाईनें पुढें जाणें, चालून जाणें, वाढणें, तयार होणें. To move on, to advance, to offer.

[सं. **सृ**–गतौ. **सर्व्**–गतौ (अभ्यास)–**ससर्व**–सरसावणें (रा. धा.).]

सरस्वती स्त्री. विद्येची अधिष्ठात्री देवता, गणपतीची बायको, वाग्देवता, वाणी. The goddess of learning and speech.

[सं. **सरस्** + **वती**. **सरस्**, (√ सृ १ गतौ) = पाणी. ही प्रथम जलदेवता असून नंतर पाणी आणि वाणी ह्यांमधील वाहनाच्या गतीच्या साम्यामुळें 'विद्येची देवता' असा अर्थ झाला.]

सरहद्द स्त्री. सीमा, मर्यादा. Boundary.

[फा. **सर** + **हद्द.**]

¹सरळ वि. थेट, वांकडें नसलेलें. Straight, direct.

[सं. **सरल**(वि.), (**सरल**–वृक्षविशेष); पा.प्रा. **सरल**; का. **सरल** ; कु. **सह्लो** ; अ. **ऽसरल** ; बं.. **सरल** ; ओ. **सरळ** ; हिं. **सरल** ; **सरला** (वि); पं. **सरल** ; गुं. **सरल.**]

²सरळ पुं. एक भूषण, स्त्रियांच्या केंसाच्या भांगांत घालावयाचा मोत्यांचा सर. An ornament.

. [सं. **सर**, √ **सृ.**]

मोतियांचे दुसरें । सरळाचेनि घसरें । शिशु. ४०४

संरक्षिणें सक्रि. सांभाळणें. To protect, to guard.

[सं. **सम्** + **रक्ष्** ; **संरक्षण** = सांभाळ.]

¹सरा स्त्री. दारू, मद्य. Wine, liquor.

[सं. **सुरा**, सिं. हिं. **सरो. सुरा** आणि **सार** ह्या शब्दाचा संकर असेल काय अशी ब्लोक शंका घेतो.]

²सरा स्त्री. नदी. A river.

[सं. **सरिता**, √ सृ.]

समुद्र होऊनि ओघु । सरे दाऊनि भानु राहे जैसा ।
अमृ. ५-२१.

¹सराई स्त्री. प्रवाशांचें उतरण्याचें ठिकाण, धर्मशाळा. A home for resting for travellers.

[फा. **सराय्.**]

²सराई स्त्री. हंगाम, सुगी. Harvest-time.

[सं. **शरद्** (?).]

सराऊ–सराव पुं. अभ्यास, संवय. Practice.

[सं. **श्राय:** = सेवा किंवा √ सृ ; अकामसा. **सराईत** = तरबेज, पटाईत. **सराव**, **सरावणें** = संवय असणें.]

ते दोघै देती सरावो: गरुडीं कस्तुरीचिए ।। नरुस्व. २२५.

सराटा पुं. एका वनस्पतीचें कांटेरी बीं, गोखरूं, (लक्षणा) कुसपट, टोंकें असलेला तुकडा. A thorny shrub.

[सं. **शर**, √ शॄ (?).]

सराफ पुं. सोन्याचांदीचा व्यापार करणारा पेढीवाला, पैशाची देवघेव करणारा सावकार. A shroff, a banker, a money-exchanger.

[अ. **सर्राफ्** ; अकामसा. **सराफकांटा,–कट्टा** = सराफांची पेठ, बाजार, **सराफी** = सराफीचा धंदा, सराफाचें कसब,]

सरासरी स्त्री. साधारण प्रमाण, अजमास, अंदाज. Average, rough estimate.
[सं. **सर, सदृश** ; प्रा. **सरीस, सर-सरी** = बरोबर.]

सरिता स्त्री. नदी. A river.
[सं. सृ १ गतौ.]

ˈसरी वि. सारखा, समान. Similar, equal.
[सं. **सदृश-क** ; प्रा. **सारिस , सरिस , सरीवण्णो** ; हिं. **सरिस्** ; ओ. **सरिसा** ; याकाम. **सरि , सरिसी** (**सदृशी**).]

तयाचेनि एकैकें गुणें सरिसीः कव्हणी नव्हे ॥ नरुस्व. ५४.

ˈसरी स्त्री. एक स्त्रियांचा दागिना, सोन्याची लड, –लांब कांब–काडी. A kind of ornament of females.
[सं. **सर, √ सृ.**]

सरेगाऊ वि. सरळ. Straight.
[सं. **सृ, गम्.**]

आलें सराठी सिंथितु । सरेगाऊ ॥ शिशु. ९६४.

सरोभर(णें) सक्रि. बरोबरी करणें, तुलणें, साम्य साधणें. To equal, to emulate.
[सं. **सदृश , सम् + परि + बृंह्** १ वृद्धौ (राधा.); अकाम. **सर , सरी + बर** , बरी, **सरोभरी** = बरोबरी. **सर** = सारखेंपणा.]

अर्जुना हा ठाववरी । जो सोहंभाव सरीभरी ।
तो द्वैताचा पैलतीरीं । निगों सरला ॥
माडगांवकर, ज्ञा. १२-१८५.

सरोवर न. मोठें तळें, तडाग. A lake.
[सं. **सरस् + वर , √ सृ.**]

सर्ग पुं. जन्मणें, उत्पत्ति, सृष्टि, अध्याय, समूह, त्याग, स्वभाव. Creation, birth, a canto, nature.
[सं. **सर्ग, √ सृज्.**]

सर्ज पुं. एक प्रकारचें लोंकरी कापड. A kind of woolen cloth.
[*Chinese.* Seres ; *Eng.* Serge; *Lat.* Serika = silk.]

सर्प पुं. साप, नाग, सरपटत जाणारा प्राणी. A serpent.
[सं. **सर्पः , √ सृप्.**]

सर्व सर्व. वि. सगळें, समूह, अखिल, पूर्ण, **सबंध.** Whole, complete, all.
[सं. **सर्व** ; प्रा. **सव्व** ; सिं. **सभु** ; पं. **सभ** ; हिं. **सब** ; अकामसा. **सर्वत्र** = सर्व ठिकाणीं, (इकडील **सर्वत्र** सुखी आहों–ह्यांत 'सर्वत्र' ह्याचा अर्थ 'सर्व' असा करतात. तो लक्षणेनें झाला. मूळ अर्थ–सर्वांकडील. सर्व बाजूचे.), **सर्वथा** = सर्व बाजूंनीं, पूर्णपणें, **सर्वदा** = नेहेमीं (सरवदा, = ज्योतिषी–नरुस्व. ६१६), **सर्वनाम** = सर्वांसाठीं वापरला जाणारा शब्द (व्याकरण), **सर्वमान्य** = सर्वांस मान्य, **सर्वसाधारण** = सर्वांस सारखा लागूं होणारा असा, **सर्वस्व** = सर्व संपत्ति, चीजवस्त, **सर्वस्वीं** = पूर्णपणें, अगदीं, सर्व प्रकारें. **सर्वाधिकार** = पूर्ण सत्ता.]

सर्वनमसेन न. वतन, अग्रहार, बक्षीस. The *Vatan*, a gift.
[कान. **सर्वनमस्य** = बक्षीस.]

पुराणवृत्ति भूमि सर्वनमसेन (नेवासें, शि. ले.इ.स.१२३९)

सल(णें) अक्रि. त्रास देणें–होणें, बोंचणें, टोंचणें, खुपणें, छळणें. To prick, to trouble.
[सं. **शल्य** (नाधा.), **छल्** १ हिंसायाम् ; प्रा. **साल, सल्ल** .]

जियें लोकिंचा चंद्रु क्षयरोगी । जेथ उदो होये अस्तवावे-याचि लागि । दुःख लेऊनि सुखाची आंगी । सलित जगातें । ज्ञा. ९-४९७.

ˈसल न. टोंक, शल्य, कांटा, अंकुर, पोटांतील न वाढलेला गर्भाचा अंश, सलणें पहा. An end, sprout, dead foetus.
[शिकाम. **सल**–सल आडवें गर्भपात ॥ दा. ३·६-४७.]

ˈसल पुं. दोरा, वादी, कमरपट्टा, तरवारीच्या म्यानाची दोरी. A cord.
[फा. **सह्ल.**]

ˈसल न. ठाणें, पहारा, संरक्षण. A patrol.
[सं. **शल्य** (!)]

तीयें सलें ठेविलीं मज पांतां: सतें सांकिकाचीं। नरुस्व. ४८३

सलकडें न. पुरुषाच्या हातांतील सोन्याचें कडें. A gold wristlet.

सलग वि. सरळ, अखंड, एकसंधि, **बिनजोड.** Straight.
[सं. **सम् + लग्न, √ लग्.**]

सलगी स्त्री. दाट परिचय, मैत्री. Thick acquaintance.
[कान. **सलिगे** = परिचय. हा शब्द कानडींत तद्भव झालेला दिसतो. सं. **संलग्न.**]

तिया सलगि देवाचिये भाटिवेची: दीधली सामग्री ॥
नरुस्व. १०. ज्ञा. ११-३२.

सलतनत स्त्री. राज्य, अधिकार, राजाची गादी, पातशाही, सुलतानाचा अधिकार, सैन्य, पसारा, सामानसुमान. Sovereignty or a kingdom.
[अर. **सलतनत** = सुलतान ; पेकाम. **सल्तनत** = फौज (खरे ९-४७९५), **सलातीन** = राजपुत्र ; अर. **सुलतान**'चें अ. वचन.]

सलाबत स्त्री. कृपा, मेहरबानी, सुदैव, वर्चस्व, हुकमत, प्राबल्य, दरारा, वचक. Majesty, compassion, dominance.
[अर. **सलाबत्**; पेकाम; **सलाबत** = मजबूत (भा. व. ३).]

सलाम पुं. महमदी धर्मांतील वंदनाचा शब्द, नमस्कार, रामराम. The word of salutation among the Muslims.
[अर. **सलाम्** = शान्ति ; अकामसा. **सलामत** = सुरक्षितपणा, **सलामी** = नमस्कार, वंदन वगैरे, (त्यावरून लक्षणेनें) प्रथम भेट–प्रथम सामना.]

सलिता पुं. उंटावरील खोगीर, ओझें. The bag or packing in which a camel's burden is put.
[हिं. **शलिता.**]

सलीस वि. सहज, सोपा, हलका. Light, slight, moderate.
[अर. **सलीस्.**]

सलूक-ख, सलोखा पुं. तह, समेट, मैत्री, दिलजमाई. Peace, compromise, friendship.
[अर. **सुलुक्**; पेकाम. **सलुका** (रा. ६-३३०).]

सल्ल, सला, सलाह, सलह पुंस्त्री. समेट, तह, एकदिल, दिलजमाई, (त्यावरून) उपदेश, मसलत. Peace, compromise, truce, counsel, advice.
[अर. **सलाह** (स्त्री.); पेकाम. **सलाह, सला** (रा. १०-७९.); अकामसा. **सल्लागार** = मसलत देणारा, उपदेश सांगणारा, **सल्लामामला** = सल्ला मसलत.]

^{1}**सव** स्त्री. उत्तर दिशा. The North.
[सं. **सव्य** = डावा.]

^{2}**सव** स्त्री. रुचि, चव, आनंद. Taste, delight.
[वैसं. **सप्** = शोधणें, प्रेम करणें; सं. **शेप, शिश्न** (?); सिं. **सह** = प्रणय; पं. **सह** = मद, उन्माद, कुलुली. सं. **स्वाद** शब्दांशीं संबद्ध आहे कां ?]

सवक(णें) अक्रि. संवय लागणें, चट–गोडी लागणें. रोजच्या रोज–नेहमीं तेंच करणें. To take liking to, to be habituated.
[सं. **श्रक्** १ गतौ, **समया करोति.**]

सवंग वि. थोड्या किंमतीचें, अल्प पैशांत मिळणारें, स्वस्त. Cheap.
[सं. **सुमर्ह, सुमर्घ, समर्घ**; अप. **सुमग्घ**; सिं. **सहांगो**; गु. **सोंघु**; याकाम. **सवंग, सवंघ** (ज्ञा. १६-४२९) ;अकाम. **संवगणें** (नाधा.).]

संवग(णें) सक्रि. धान्य गोळा करणें. To gather a crop by reaping.
[सं. **सम् + ग्रह्** ; याकाम. **संवगण,–णी** = कापणी (ज्ञा. १३-३८).]

पेरितां शेतीं । संवगणिया जाती ॥ अमृ. ६-५८.

संवचोर पुं. सावासारखा दिसणारा चोर. A thief looking as a gentleman.
[म. **साव + चोर** ; < सं. **साधु + चोर**; याकाम. **संवचोर.**]

परी तो संवचोराचा सांगातु । जैसा नावेक स्वस्थु ।
ज्ञा. ३-२११.

संव(सवं)गडी पुं. खेळांतील जोडीदार, सोबती. A playmate, a familiar companion.
[म. **सवें + गडी** < सं. **समम्** + द्रा. **गडी,** (आर्यद्राविडसंकर); याकाम. **संवघडा** = सोबती (ज्ञा. १८-३०५).]

^{1}**सवड(णें)** उक्रि. यत्न करणें, फुरसतीनें काम करणें, उरकणें, आटपणें. To dispatch or do a job.
[सं. **सम्+अड्** १ उद्यमे.]

संवड(णें) अक्रि. समृद्धि होणें. To prosper.
[सं. **सम्** + ऋध् १ समृद्धौ.]

सवड, संवड स्त्री. फुरसत. मोकळा वेळ, अवकाश, संधि, जागा. Leisure, room, place, time, space.
[सं. **स** + **वृत्ति** (?); म. **सवळ** (< **शुभवेला**).]

सवड,-डे,-ड्यां अ. समक्ष. In presence of.
[सं. ?; देप्रा. **सवडंमुहो अभिमुखः** (२८१-७).]

संवत् पुं. वर्ष, साल. A year.
[सं. **संवत्** '**संवत्सर**'चा संक्षेप; अकाम. **संवत्सर** = वर्ष, साल. हे संवत्सर साठ आहेत.]

सवत स्त्री. सपत्नी, एका नवऱ्याच्या दोन बायकांपैकीं एक, (ल.) प्रतिस्पर्धी. A rival wife, a co-wife.
[सं. **सपत्नी**; पा. **सपत्ती**; प्रा. **सवत्ती**; पं. **सौत** (सपुत्रा); का. **सोन्**; कु. **सउत्**; हिं. **सउती**; ने. **सौता**; अकामसा. **सवताळा** = एकाच स्त्रीशीं लग्न करणाऱ्या दोन किंवा अधिक नवऱ्यांपैकीं एक, (त्यावरून) जार.]

सवता वि. निराळा, स्वतंत्र. Separate, different.
[**सवत** पहा. किंवा सं. **स्वतः** ह्याचा अपभ्रष्ट उच्चार आहे काय ? याकाम. **सवतें** = स्वतःचें (ज्ञा. १३-५८३); **सवता** = स्वतः (ज्ञा. १७-१०१); पेकाम. **सवतें** (यश जोडितों सवतें—मोरोपंत).]

संवथळ न. सपाट जागा. Table-land.
[सं. **सम** + **स्थल**.]

सं(सौं)दण स्त्री. कपडे धुण्याचें परटाचें भांडें. The washing vessel of washermen.
[सं. **शोधनी, संशोधनी**; याकाम. **संवदण** (ज्ञा. १३ ४६६); शिकाम. **संवदणी**.]

भागीरथीचें जळ आप। मोरी संवदणी तेंहि आप॥ दा. १३-१०-१५.

संवफळ न. स्पर्धा, टक्कर, धडक. Clash, crash, rivalry.
[सं. **सम** + **फल**.]

दंतवक्रू संवफळेयासीं आला। तो हिरवाची धरिला।
शिशु. ९८३.

सवय, संवय स्त्री. सराव, चाल. Habit.
[सं. **समय**, **सम्** + √ **अय्**, **ई** १ गतौ.]

सवया अ. स्त्री. सहज, समता, तुलना. Easily, equality, comparison.
[सं. **समयेन, स्वयम्, सुखेन**; याकाम. **सवया, सविया**; अकाम. **सवें**.]

सवयां दिसे कारीसवाणे॥ उषा. ६८

स(सं)वर(णें) उक्रि. सांवरणें, आटोपणें, शृंगारणें. क्रियेची पूर्णता दर्शक धातु. To adorn, to beseem, (a verb used along with other verbs to show completeness).
[सं. **सम्** + **वृ**, (**स्वरयति**—सवरतो—भा. अ. १८३५), **सम्** + **व्यव** + **हृ** १ व्यवहारे; अकामप्र. करणें **संवरणें** बोलणें **सवरणें**, गाणें **संवरणें**. **सवारणें** पहा-]

सव(सौ)लत स्त्री. सवड, सूट. Convenience, leisure, relief.
[अर.. **सुहलत्**; फा. **सोहलत**; पेकाम. **सोहलत** (इम. २९५).]

सवसा पुं. मेहुणीचा नवरा, बायकोच्या बहिणीचा नवरा, साडू, मेहुणा. A brother-in-law, husband of wife's sister.
[सं. **स्वस्रीयः**, < **स्वसृ**.]

संवसाटी स्त्री. तुलना, बरोबरी साम्य. Resemblance, equality, similarity.
[सं. **सम** + **स्था** (**संस्था, संस्थिति**).]

संवसारें अ. बरोबर. With.
[सं. **समूसर**, √ **सृ** १ गतौ.]

सवळ स्त्री. चांगली वेळ, शुभ वेळ, प्रातःकाल, पहाट. An auspicious time, dawn, morning.
[सं. **सु** + **वेला**, **शुभ** + **वेला**. **सवेर, सवेळ** पहा.]

संवा,-व्वा वि. पाव हिशानें अधिक एक, एक पूर्ण आणि चतुर्थांश. One and a quarter.
[सं. **सपादः**; प्रा. **सवाय**; का. **सवा**; पपहा. **सुआ**; कु. **सवा**; बं. **सओया**; ओ. **सउआ**; हिं. **सवा**; पं. ला. सिं. गु. **सवा**. महानुभावी वाङ्मयांत रूपें '**सवाय, सवावो**' आढळतात. अकामसा. **सवाई** = एक वृत्त-विशेष (**समस्या ?**), **सवाकीं, सवायकी** = सव्वाचा पाढा; **सवाशें** = एकशें पंचवीस, **सवाशे** = ब्राह्मणाची एक पोटजात.]

संवा स्त्री. बाजू, कड. Side, edge.
[सं. **सम , समा.**]

सैंवा पुं. प्रकार, पद्धति, तऱ्हा. Manner, way.
[सं. **समय.**]

सँवां, सवें अ. बरोबर, सह. With, along with.
[सं. **समम्.**]

संवाद पुं. बोलणें, भाषण, संभाषण, मेळ, जुळणी. A talk, conversation, dialogue, union.
[सं. **संवादः,** ✓ **सम् + वद्** १ भाषणे ; अकामसा. **संवाद(णें)** (नाधा.) = सांगणें, बोलणें, भाषण करणें, **संवादी** = जुळणारा (स्वर), संवाद करणारा.]

सवाद स्त्री. सीमा, पेरण्याची जमीन, काळी (पांढरीच्या विरुद्ध). Boundary, cultivated land.
[अर. **सवाद्** ; शिकाम. **सवाद** (रा. १५-१३१).]

सवार(णें) सक्रि. सुशोभित करणें, शृंगारणें, शोभिवंत करणें, झाडणें. To decorate, to beautify.
[सं. १ **सम्+मार्ज्,** ✓ **मृज्** १० शोधने, २ **सम्+वृ–संवरण. सम् + आरच्–समारचयति > समारयति > समारई** (भा. अ. १८३४), **सवरणें** पहा.]

सवाल पुं. प्रश्न, विचारणा, पृच्छा, चौकशी. A question, an enquiry.
[अर. **सुआल्.**]

सवाशा पुं. ब्राह्मणांची एक पोटजात व तींतील व्यक्ति. A division among Brahmins and and an individual of it.
[सं. **सपादशतक, सहवासी** (?); देप्रा. **सवासो ब्राह्मणः** (२७३,१७); गु. **सवासो** ; हिं. **सवासन.** ह्या शब्दाच्या व्युत्पत्तीबद्दल निश्चित मत नाहीं. देप्रा. शब्दावरून हा शब्द फार जुना ठरतो. ह्या सवाशें ब्राह्मणांसंबंधीं व त्यांच्या अपांक्तपणासंबंधीं जी आख्यायिका रूढ आहे तिच्यांत ऐतिहासिक तथ्य दिसत नाहीं. ती उत्तरकालीन व काल्पनिक असावीशी वाटते. देप्रा. सं. व इतर भाषांतील शब्दांवरून तिला पाठिंबा मिळत नाहीं.]

सवाशीण,-ष्ण,-ष्णी स्त्री. भोजनास बोलाविलेली सौभाग्यवती स्त्री. A woman whose husband is living.
[सं. **सुवासिनी** शब्दाचीं अपभ्रष्ट रूपें.]

सवासा वि. उजवा, सरळ, सोयीचा. Right, simple, convenient.
[सं. **सव्य+सा** (प्र.) किंवा **सवचा** (सोयीचा).]

संवाहन न. नेणें, उचलून–वाहून नेणें, त्यावरून–साह्य, रगडणें, अंगमर्दन. Carrying, taking, (fig.) help.
[सं. **संवाहनम् , सम्+** ✓ **वह्.**]

संवित्, संवित्ति स्त्री. ज्ञान, योग्य ज्ञान, खरें ज्ञान, ब्रह्माची जाणीव. Knowledge, good understanding.
[सं. **सम्+विद्.**]

संविधान न. जुळणी, रचना, व्यवस्था, अनुसंधान. Congruity or connection.
[सं. **सम्+विधान,** ✓ **धा ; संविधानक** = नाटकांतील कथानक, कथासूत्र.]

सविनय वि. विनयशील, नम्र. Modest, humble.
[सं. **स + विनय, वि +** ✓ **नी** १ नयने.]

सविया अ. सहज, आपोआप, तत्काल. सवया पहा. Easily, of one's own accord.

सविवळ अ. स्पष्ट, विस्तृत, खुलासा करून. Clearly, distinctly.
[सं. **स + वि + वृ.**]

सवें पु. समय, काल, वेळ, सवय. Opportunity, time, habit.
[सं. **समय.**]

सवें अ. बरोबर. With.
[सं. **समम्**; याकाम. **सवेल** = सांगाती, सोबती नरुस्व. ३४७. नरुस्व. ३४०,७४४.]

सवे अ. आपण होऊन, आपोआप. सवया पहा. Of one's own accord.

सवेर, सवेळ स्त्री. योग्य वेळ. A proper time.
[सं. **समम्** ; याकाम. **सवेल** = सांगाती, सोबती (नरुस्व. ६९३). याकाम. मधील शब्दांत '**ल**' कोठून आला ? कां ह्या शब्दाचा सं. **सहवेला** ह्या शब्दाशीं संबंध आहे ? इतर भारतीय भाषांतील शब्द ताडून पहाण्यासारखे आहेत ; गु. **सवेरा, सवेळा** ; सिं. **सवेरे, सवेले, सवेरो** (लवकर); हिं. **सुबेर, सवेर, सवेल, सवेरा**

(सकाळ). ह्या शब्दांत **र** आणि **ल(ळ)** असे दोन्ही वर्ण आहेत. मराठींतील **सवेर** शब्द आगंतुक आहे असें ब्लोक म्हणतो.]

सव्य वि. पुं. डावा, डावा हात. Left, left hand.
[सं. **सव्य**. ह्या शब्दाच्या अर्थांत पुष्कळ फरक झाला आहे. **सव्यापसव्य** = श्राद्धाच्या वेळीं जानवें डाव्या व उजव्या खांद्यावर आणणें; त्यावरून उलटसुलट, बरोबर चुकीचें, विनाकारण यातायात, खटपट (ल.) असा अर्थ झाला.]

सव्यय वि. (विभक्ति) प्रत्यय लागणारा (शब्द), विकृति घेणारा (शब्द). Declinable.
[सं. **स + व्यय**–(**वि + अय्** १ गतौ).]

सव्वीस वि. संख्याविशेष, वीस अधिक सहा. Twenty-six.
[सं. **षट्विंशति**; पा. **छव्वीसति**; प्रा. **छव्वीसइ**; अप. **छव्वीस**; बं. **छाब्बीस**; ओ. **छबिस**; हिं. **छब्बीस**; पं. **छव्वी**; सिं. **छबीह**; गु. **छवीस**; ने. **छब्बिस**.]

सष्ठम वि. अ. उत्तम, सुंदर, बळकट, खूप, यथेच्छ. Strong, best, excellent.
[सं. **सत् (?) + तम**.]

सशंक, साशंक वि. शंका असलेला. Doubting, suspecting.
[सं. **स + शंका**.]

संशय पुं. शंका, वहीम, संभ्रम, संदेह, भय. A doubt, a suspicion, a misgiving.
[सं. **सम् + शी**.]

संशोधक वि. पुं. शोध लावणारा, नवीन वस्तु हुडकून काढणारा, दुरस्त्या सुचविणारा. A researcher, a proof-reader.
[सं. **सम् + शोधक, √ शुध्**.]

सस(णें) अक्रि. झोंपणें, निजणें. To sleep, to lie down.
[सं. **षस्** १ निद्रायाम्, **स्वप्** २ स्वप्ने (?).]

कां नीद ससौनी गेली । जाग्रती नाहीं चेइली ।
तेव्हां होए आपुली । जैसी स्थीती ॥

अमृ. जुनी पोथी. ५७५

ससकर(णें) क्रि. धान्य व माती एकत्र मिसळणें, मिसळणें, धान्यांत गदळ असणें. To mix (grain and earth).
[सं. **सश्** १ आश्लेषे + **कृ** ८ करणे (?); २ **सशर्करा** (?) किंवा **ससंकर**; अकाम. **ससकर** = मिसळलेलें धान्य, रेंव, वाळू, कण.]

ससकार पुं. बयाणा, सचकार. Advance, earnest money.
[सं. **सत्यंकार > साचोकार > सचकार > ससकार.** पाणिनीच्या "**कारे सत्यागदस्य**" ह्या सूत्राप्रमाणें 'सत्यंकार', 'अगदंकार' असे शब्द होतात.]

संसक्त वि. चिकटलेला, लागलेला, जोडलेला, आसक्त. Joined, stuck to, attached.
[सं. **संसक्त** (निष्ठा), **सम् + √ सञ्ज्**.]

ससगणी स्त्री. दुंडा पैसा, सहा रुके इतकी किंमत. A double *paisa*, a couple of pice.

ससा पुं. प्राणिविशेष, एक भित्रा प्राणी. A hare.
[*IE*. Keses (ससा), Kekes, Kek (उडी मारणें); सं. **शश्** १ प्लुतौ, (**शशः**); *Eng*. Hare; रुमा. **शोशोय्**; पं. हिं. **ससा**; सिंह. **सावाहावा, साहा**; अकामसा. **ससेहोलपट** = सशाच्या शिकारींत कुत्रा सशाला ताणतो. त्यावेळीं पळतांना तो उलटा सुलटा होऊन पडतो तशी स्थिति. मारामार, पाठलाग व मारा, गोंधळ.]

ससाणा पुं. एक हिंस्र पक्षिविशेष. Falcon.
[सं. **श्येनः**]

संसर(णें) अक्रि. संसार करणें, जन्म जगणें–मरणें, जन्ममरणाच्या फेऱ्यांतून जाणें, सरसावणें. To live and die, to pass through birth, life and death.
[सं. **सम् + सृ** १ गतौ; अकामसा. **संसर** = संचार, गमन, पसारा, **संसरण** = गमन, सरणें, जाणें, **संसार** = प्रपंच, जग.]

संसर्ग पुं. संबंध, संयोग स्पर्श, निकटत्व. Contact, union, touch.
[सं. **सम् + सर्ग, √ सृज्**.]

संसार पुं. मानवी जीवन, जगांतील व्यवहार, प्रपंच, पसारा, भव. The world, mundane existence.
[सं. **संसार, सम् + सृ**; गु. हिं. **संसार**; सिं. **संसारु**; सिं. **संसर**. मूळ अर्थ **हलणें, जाणें, जगणें,** (त्यावरून) **जग, पृथ्वी, विश्व,** (त्यावरून) **मानवी जीवन, भव, प्रपंच**; अकामसा. **संसारी, संसारीक** = प्रापंचिक.]

संसिद्धि स्त्री. चांगली सिद्धि, पूर्णता, फलप्राप्ति, ज्ञानयोग्यता, मूळची,–स्वाभाविक स्थिति. Perfection, completion, natural state.
[सं. **सम्+सिद्धि, √ सिध्** .]

संसृति स्त्री. संसार पहा.

ससेमिरा पुं. एक प्रकारचें वेड, पिच्छा, पाठ पुरवणें. A fad, pursuit.
[ह्यासंबंधीं एक गोष्ट सिंव्हासनबत्तिशीमध्यें आहे. एकानें आपल्या एका मित्राचा विश्वासघात केल्याचें वर्णन एका श्लोकांत केलें असून त्याचीं आद्याक्षरें स, से, मि, रा हीं आहेत त्यावरून हा शब्द रूढ आहे. (श. को.).]

संस्कार पुं. शुद्धि, क्रिया, परिपाक, प्रक्रिया, बदल. A purificatory rite.
[सं. **सम्+स्+कृ** ८ करणे ; प्रक्रिया ह्या अर्थावरून त्याला एक विशिष्ट अर्थ रूढ झाला आहे. एक धार्मिक विधि. हिंदु धर्मात हे संस्कार सोळा आहेत.]

सस्ताव(णें) अक्रि. अल्प किंमतींत मिळणें, सवंग होणें, सुलभ मिळणें. To cheapen.
[सं. **स्वल्पवस्न** (नाधा. **वस्न**=किंमत) (रा.धा.) **स्वस्थ** (?); अकामसा. **सस्त , सस्ता**=सवंग ; **सस्ताई**= सवंगपणा.]

संस्था स्त्री. चांगल्या तऱ्हेनें राहणें, चांगली स्थिति, स्वास्थ्य, घटना, योजना, सभा, मंडळ. Happy life or state, comfortableness of condition.
[सं. **सम् + स्था १** स्थितौ.]

संस्थान न. लहानसें राज्य, देव, मठ वगैरेचें वतन. A state.
[सं. **सम् + स्था + न, संस्थानिक**=संस्थानाचा मालक.]

संस्पर्श पुं. स्पर्श, संबध, संसर्ग. Contact.
[सं. **सम् + स्पृश्** .]

सस्य न. धान्य, धान्याचें रोपटें, पीक. Corn, grain, fruit.
[सं. **सस्य, √ षस्** १ निद्रायाम् (?) ; याकाम. **सस्य**=धान्य, विशेषतः भात, भाताचें रोप. (ज्ञा. १८-३५५,-१२९).]

सह(णें) अक्रि. सहन करणें, सोसणें. To endure, to bear.
[सं. **सह्** १ सहने ; अकामसा. **सहन**=सहन करणें, **सहनशील**=सोशीक, सहन करणारा.]

सह उप. बरोबर, संगति,–संबंध–जोड ह्या अर्थी उपसर्ग. With.
[सं. **सह** ; अकामसा. **सहकार**=साह्य, मदत, **सहकारी**=मदत करणारा, **सहगमन**=सती जाणें, **सहभोजन**=बरोबर एका पंक्तींत जेवणें, **सहवासी**=बरोबर राहणारा, **सवाशे** = एक ब्राह्मण पोटजात (परंतु ह्या अर्थी हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.), **सहानुभूति**=एकाच्यासारखी होणारी अनुभूति, दया, माया. ह्याच अर्थानें हा **सह** शब्द इतर आर्य भारती भाषांत उतरला आहे. पं. **सह** (स्त्री)= गाईची वाफ ; सिं. **सह**=प्रेम. संस्कृत ' **स्वधा** ' (स्वातंत्र्य, इच्छा, सुख) ह्या शब्दापासून वरील **सह > शीं** हा शब्द उतरला असावा (टर्नर).]

सहज वि. पुं. बरोबर जन्मलेला, भाऊ. Born of the some mother.
[सं. **सह+ ज, √ जन्** ४ जनने. (मुळ अर्थ बरोबर जन्मलेला–भाऊ ; त्यावरून जन्मापासून जवळ असलेला–स्वाभाविक, नैसर्गिक, त्यावरून सुलभ, सोपें, प्रयत्न फारसा न लागतां असा अर्थ झाला.). पुढील शब्द पहा.]

सहज वि. सोपें. सरळ. Easy, simple.
[सं. **सहज**. अ. **त्सहझ** ; बं. **सहज** ; ओ. **सहज** ; हिं. **सहज** ; पं. **सहिज** ; सिं. **सहजु** ; गु. **सहज** ; अर. **सहल्** सोपें, साधें ताडून पहा.]

सहदेवमत न. फलज्योतिषांतील एक विशिष्ट–सहदेव नांवाच्या ज्योतिष्यानें काढलेलें मत. A school of astrologers after *Sahadev*.
[**सहदेव**–एका ज्योतिषाचें नांव. तो व त्याची बहीण **भाडळी** हे दोघे ज्योतिष सांगत असत. ज्योतिष सांगण्याचे त्यांचे कांहीं विशेष आडाखे असंत.]

संहर(णें) क्रि. नाश पावणें–करणें, अपहरण करणें. To be destroyed, to usurp.
[सं. **सम् + हृ** १ हरणे ; प्रा. **संहर** ; अकामसा. **संहर, संहार**=नाश, लय, क्षय, विनाश, विध्वंस, लोप.]

सहल स्त्री. फेरी, फिरणें, चक्कर, रपेट. Exercise, a walk.
[अर. **सैर्** .]

सहवास पुं. बरोबर,–एकत्र वास. Dwelling with.
[सं. **सह + वास, √ वस्** .]

सहसा अ. एकदम, विचार न करितां, एकाएकीं, बहुशः, कधीं, कदापि. Hastily, precipitately.
[सं. **सहसा**.]

सहस्र वि. हजार. A thousand.
[सं. **सहस्र**; याकाम. **सहास** ; महानुभावी वाङ्मयांत 'सहास' असा एक शब्द 'सहस्र' ह्या अर्थी आढळतो, कदाचित लेखनदोष असावा किंवा पाठभेद चुकीचा असावा.]
राया सवाये लक्ष जंबुद्वीप परियसः दक्षणे वसती सोळा **सहास** ॥ नरुस्व. २१०

सहा वि. संख्या, पांच आणि एक. Six.
[सं. **षट्** (सं. **षष्** < **क्शक्श्**) ; पा. प्रा. **छ** ; अप. **चह** ; अवेस्ता. **क्षवस्** ; बं. **छय** ; ओ. **छअ** ; हिं. **छ**, **छे** ; पं. **छे** ; ल्हां. **छे**, **छी** ; ने. सिं. गु. **छ** ; सिंह. **स**, **सय**, **ह**, **हय**. महानुभाव- वाङ्मयांत यादवकाळीं '**सा**' असें रूप आढळतें. अकामसा. **शहाण्णव** (प्रा. **षण्णउइ**, **षण्णवइ** ; सं. **षट्नवति**); **छत्तीस** (प्रा. **छत्तीस** ; सं. **षट्त्रिंशत्**); **सोळा** (प्रा. **छद्दस** ; सं. **षोडशन्**); **छपन्न** (प्रा. **छपण्ण**, **छपन्न** ; सं. **षट्पञ्चाशत्**); **सासष्ट** (प्रा. **छसट्ठि** ; सं. **षट्षष्टि**).]
जिये भाषेन्चिये रसवृत्तीः साभाषांचे कुपे कीजेति निगुती ॥ नरुस्व. ४६.

सहाजणें न. एक वाद्य, नगारा, जयवाद्य. A drum.
[फा. **शादयान**.]

सहाण, साण स्त्री. दगड, उघाळण्याचा दगड. A grind-stone.
[सं. **शाणः शाण** ; प्रा. **साण सण्णा** ; कु. **साणो** ; अ. **ह्सणा** ; बं. **सान** ; ओ. **साण** ; बि. **सान्** ; हिं **सान्** ; पं. **साण** ; सिं. **सिराणी** (**र** कोठून आला ?).]

सहासष्ट, सासष्ठ वि. संख्या, साठ आणि सहा. Sixty-six.
[सं. **षट्षष्टिः** ; प्रा. **छसट्ठि**, **छवट्ठिम्** ; बं. **छेसट्टि** ; ओ. **छअसट्ठि**; हिं. **छियासठ** ; सिं. **छासठि** ; गु. **छासठ** ; ने. **छयसट्ठि**.]

संहित वि. चांगल्या रितीनें ठेविलेलें, जोडलेलें, युक्त. Joined, united.
[सं. **सम्+हित (निष्ठा, √धा)**.]

संहिता स्त्री. वेदाची रचना. विशिष्ट शाखा, मांडणी, ग्रंथाचें मूळ, मूळ रचना. The composition or the text of the *Vedas*.

सहिष्णु वि. सहन करणारा, सोशीक. Patient, enduring, meek.
[सं. **सह् + स्नु**, **ष्णु** (विशेषणाचा प्रत्यय).]

सही स्त्री. स्वतांचें नांव, नांवाची खूण, निशाणी. Signature.
[अर. **सहीह्** ; अकामसा. **सही** = मान्य , कबुल, पुरेसें. **सहीसही** = बरोबर , ततोतंत.]

सही स्त्री. मैत्रीण, सखी. A female friend.
[सं. **सखी** ; अकाम. **सहेली** = मैत्रीण, सहचरी.]

सळ पुं. त्वेष, अभिमान, आवेश, त्रास, गांजणूक, घडामोड, सुखदुःख, कटकट, हट्ट. Teasing, tormenting, irritating, urge, strength, vehemence.
[सं. **छलम्** ; पा. प्रा. **छल** ; बं. **छल** ; आ. **छळ** ; सिंह. **सळ**=हूल ; हिं. पं. **छल** ; गु. **छळ** ; ने. **छल** (फसविणें).]

सळ पुं. बाणाचें टोंक, ताटाचा बुडखा. The tip of an arrow, the stem.
[सं. **शल्य**.]

सळ(णें) अक्रि. भिणें, छळणें. To torment, to be afraid.
[सं. **छल्**.]
श्रीकृष्णाचेनि नांवें अविद्या सळेः तेथकें पुतनेचा पाडु अबळे ॥ नरुस्व. ३०६.

सळ(णें) अक्रि. वर येऊन वाहणें, उतूं जाणें, उकळी फुटणें, कढणें. To boil, to bubble.
[सं. **क्षल्** १ धवने, १० शौचकर्मणि, **श्वल्** १ आशुगमने ; देप्रा. **छल्ल**, **छल** ; सिं. **छर** (पूर); बं. **छलकणा**, **छल्को** ; गु. **छलकावूँ** ; अकामसा. **सळसळ**= उकळी, **सळसलणें**=खदखदणें, **सळाळणें**.]

सळक(णें) अक्रि. निसटणें, निसटून जाणें, सळसळणें, सर्कन् निघून जाणें. To glide along rushingly.
[ध्वनिशब्द किंवा सं. **क्षल्** ; **सल्** १ गतौ + **अकच्**, **सलति**, **सरति** ; पा. प्रा. **सलिल** (पाणी); अकामसा. **सळकन-कर-दिशी** = सळसळ आवाजानें; **सळक**=पावसाची सर, **सळका** = सणका.]

सळी, सळई स्त्री. काडी, (लोखंडाची) सुई, बारीक काडी, टोंचणी. A pike, a pin, a needle.

[सं. **शलाका, शक, शल्य**; पा. **सलाका**; प्रा. **सलाया,-गा,-आ**; बं. **सला**; बि. हिं. **सलाई** (काठी); का. **सलाय**; गु. **सळी**; पं. लां. **सलाइ**; सिं. **सराई**; याकाम. **सळु.**]

सिंधुची सींव न मोडे । पाणीपणा सळु न पडे ॥
अमृ. ७-२६१.

सळी स्त्री. कुचाळी, चेष्टा, कुचेष्टा. Jest, joke.
[सं. **छल.**]

सळी स्त्री. हांव, ईर्षा. Rivalry.

सळें अ. एकदम, सत्वर, लवकर. At once, instantaneously.
[सं. **शलाका (?)**]

पाऐंधुळि रगडे । तरि सळें माथेआं चढें ॥ शिशु ४७२.

संक्षेप पुं. थोडक्यांत सांगणें, सारांश, निष्कर्ष. Abridging, epitome, digest.
[सं. **सम् + क्षिप्** ४ क्षेपे ; अकामसा. **संक्षेप(णें)** (नाधा.) = संकोचणें ; **संक्षेपतः** = थोडक्यांत.]

संज्ञा स्त्री. नांव, खूण, चिह्न. Name, denomination.
[सं. **संज्ञा, सम् + √ ज्ञा.**]

सा प्र. ईषदर्थाचा प्रत्यय, असा. Such, similar.
[सं. **'इषत्**; प्रा. **इसि**; मरा. **सा, शी, सें**; किंवा **' असा '** ह्याचें संक्षिप्त रूप, उदा. **जरासा, मोठासा. सा < असा < ईक्षस्स < ईदृश** ही त्याची व्युत्पत्ति होय.]

सा प्र. कांहीं विशेष नामाच्या पुढें लागणारा प्रत्यय. A termination or affix.
[सं. **साधु, साहु-शा-सा** किंवा **षाद्-षा-सा.** महानुभाव वाङ्मयांत हा प्रत्यय कांहीं स्त्रीनामांच्या पुढें लाविलेला आढळतो. उ. **महदाइसा, कामाइसा, बाईसा.** ब्रह्मक्षत्रिय किंवा पटवेकरी यांच्यामध्येंहि हा प्रत्यय पुंल्लिंगी नामांना लावितात. उदा. **पांडुसा, हरिसा.** जव्हारच्या राजांच्या नांवापुढें लावितात. कोकणांतील कांहीं बोलभाषांत **' स '** हा प्रत्यय कांहीं नात्याचा संबंधवाचक नामांना लावितात. उदा. **आइस-शी, बापूस.** ह्या **' स '** चा संबंध वरील शब्दाशीं किंवा **श्री** ह्या शब्दाशीं असावा.]

साइखडें न. कळसूत्री बाहुली. A puppet (moved by a string running underneath).
[सं. **सूचि आकृति (?); सूत्रकृष्ट**; प्रा. **सूअकड्ढ**; याकाम. **साइखडें**–साइखडियानें काइं पार्थावें । सूत्रधारातें ॥]

साई स्त्री. फायदा, इसार. Gain, profit, advance.
[सं. **सातिः** (दानम्); प्रा. **साइ** (पुं. स्त्री.); हिं. पं. लां. **साई** (इसार); मिळालें तेवढीच सई.]

साई स्त्री. छाया, सावली, आश्रय. A shadow.
[सं. **च्छाया.**]

साईं पु. साधुसंताच्या नांवांच्या पुढें लागणारा आदरार्थी शब्द. A term of respect used in conjunction with the names of *Sadhus*.
[सं. **स्वामिन्**; पा. **सामिको**; प्रा. **सामिण**; अप. **सामिआ**; का. **सावेनुँ**; पं. **साईं**; लां. **साईं**; हिं. **साईं**; सिं. **साँईं**; गु. **साँइ** (फकीर).]

साईर स्त्री. ओळ, रांग समूह, झुंड, घोळका, A row, a line, a crowd.
[अर. **साइर** .]

साईर पुं. वसुलीचा किंवा कराचा एक प्रकार. A kind of cess or tax.

साईल स्त्री. सखी, मैत्रीण. A female friend.
[सं. **सखी + ल**; प्रा. **सइल**; सं. **सती + ल**; प्रा. **सईल**; याकाम. **साईल.**]

मग सेजीया साईलीया असति ! तिया म्हणेति ॥ दृ. पा. ४४.

साउ, साव पुं. खरा, प्रामाणिक, श्रीमंत (सावकार). True, honest, a *sawkar*.
[सं. **साधुः** पा. **साधु**; प्रा. **साहु**; का. **सावु**; कु. **साऊ** (पेढीवाला); बं. **साहुकार**; ओ **साहु, साउ**; हिं. **साह्, साहू** (प्रामाणिक मनुष्य); पं. **साऊ** (प्रतिष्ठित); सिं. **साऊ**; गु. **साउ, साहु** (पेढीवाला); सिंव्ह. **ओवु** (होय); < सं. **साधु**; अकाम. **साउजी** = सालस, गरीब. **साधु** पहा.]

साउमा अ. समोर, पुढें, सन्मुख, प्रत्यक्ष, साक्षात्. In front of, in the presence of.
[सं. **सन्मुख**; याकाम. **साउमा.**]

तेथें बहुत डंबाळें । पांडवूं साउमेयां आलें ॥ शिशु. ५७९

नांगांवा साउमीं येती ॥ पूजावसर.

तेथ साउमा घेयावा उवावो । तंव ओडवला आन प्रस्तावो ॥
ज्ञा. १६-६२

साउली स्त्री. सावली पहा. Shadow.

साउलें न. लुगडें. A cloth for the females to wear, a *sari*.
[सं. **वस्त्रांचल** (?); देप्रा. **साउली**; याकाम. शिकाम. **साउलें**.]

साउलें वेढुनि पोफळ-गांटी: वाखोरेया देउनि वाय-गांठी ॥
नरुस्व. ८४२. मु. सभा. १५-२२५

सांक स्त्री. पुरावा, आधार, पहारा, शोध, तपास, अब्रू, पत. Evidence, support, a person set to watch, credit, search.
[सं. **साक्षिन्**, **साक्ष्य**; प्रा. **सक्ख**; सिं. पं. **साखी**; का. **सोक्षी**; हिं. **साख**=पत, अब्रू; अकाम. **साकसुरत**, **साखसुरत**=हुमदार, प्रमाणशीर.]

सांक(णें) अक्रि. गोठणें, सांकळणें. To congeal, to clot.
[सं. **सम्** + **श्यै** १ गतौ.]

सांकड,-डें वि. न. अरुंद, संकट, अडचण, खड्डा, गर्ता. Narrow, strait, difficulty, a ditch.
[सं. १ **संकट** (अरुंद वाट); < **संकृत**; प्रा. **संकड**; का. **संगुर्** (पुं. उंच कडा); कु. **सानुरो** (अरुंद); हिं. **सांकर**; पं. **सगोडणा**; सिं. **संकटु** = त्रास, **संगटु**. २ सं. **संकोचयति**; पा. **संकोचेति**; प्रा. **सकोअइ**; गु. **सांकडूं**; याकाम. **सांकडणें**=संकटांत सांपडणें.]

पांता आत्मेयाकडे । परबुद्धिचा पैसु सांकडें ।
सनिद्रा स्वप्न बुडे । जागणां जैसे । ज्ञा. १६-११०
चिंतामणी फेडुं सिकला सांकडे: तुझेया हातातळीं ॥
नरुस्व. ३५५

सांकळ स्त्री. सांखळी, बेडी. A chain, fetters.
[सं. **शृंखला**; प्रा. **संकला**, **सिंखला**; गु. **सांकळ**; सिं. **सांघर**; पं. **संग्गल**; हिं. **सांकल**, **सांकर**, **सीकड**; बं. **सिखल**; का. **होन्कल्**; सिंह. **सॅकिल्ल**, **हकिल्ल**; अकामसा. **सांकळणें**=जोडणें.]

सांकळ(णें), **सांकुळ(णें)** अक्रि. गोठणें, घट्ट होणें, बोळणें, गोळा होणें. To congeal, to clot.
[सं. **सम्** + **कल्** १० गतौ, **कुल्** १ संस्त्याने; अकामसा. **सांकळा**=घट्टपणा, गोळा, गांठ, खडा; **सांका**=डाक लावण्याचें मिश्रण,-चिकटा. **सांखरशेला** = आखूडशेला हा शब्द मूळ सांकळशेला असा असला पाहिजे.]

साकार वि. आकारासह, आकार-देह असणारा. That has a form.
[सं. **स** + **आकार**, **आ** + √ **कृ**.]

साकांक्ष वि. उत्सुक, संशययुक्त. Eager, doubting, that has a desire.
[सं. **स** + **आकांक्षा**, √ **कांक्ष्**.]

साकी स्त्री. एक मराठी वृत्त. A kind of Marathi metre.
[सं. ?; प्रा. **साकी** (?). चार मात्राचा एक गण असे सात गण असलेल्या दोन चरणांचें वृत्त. पं. **साकी** (जनम्साकी).]

साकीन वि. रहिवासी, राहणारा. Resident, a post
[अर. **साकिन्**; पेकाम. **साकीन**, **सेकीन** (रा. १५-१३८-१७२).]

सांकु पुं. पूल, तात्पुरता खांब. A bridge.
[सं. **संक्रम**; पा. **संकमो**; प्रा. **संकमा** (पुं); कु. **साणो**; आ. **त्साकु**; बं. **साँकु**; हिं. **साँको**, **साँखो**, **साखु**; २ सं. **शंकु**.; प्रा. पा. **संकु** (श्लोक).]

सांकुवें न. अंडें. An egg.
सांकुवें गाळिलें आकासीं: रूपें चंद्राचेनि । नरुस्व-४९६.

साखर स्त्री. गोड पदार्थविशेष, गोड व रवा असलेली भुकटी,-पीठ. Sugar.
[सं. **शर्करा**; पा. **सक्करा**; प्रा. **सक्करा**; का. **शेकर**; हिं. पं. **सक्कर**; गु. **साकर**; सिं. **हकुरु**; *Eng.* jaggery, xagara, jagars;; हा शब्द **मॉनूरूमेर** भाषेंतील असून त्याचा अर्थ ' **भुकटी** ' असा आहे. ही दोन प्रकारची असे-चिनी आणि मिसर. हीं दोन्हीं नांवें देशाचीं आहेत. चीन आणि मिसर (इजिप्त) ह्या देशांत साखर तयार होई. पुढें नंतर ह्या दोन्ही शब्दांच्या अर्थांत फरक केला गेला. चिनी म्हणजे खडीसाखर आणि मिसरी म्हणजे पिठीसाखर. त्यानंतर चिनी आणि मिस्री हे दोन्ही शब्द विशेषणाप्रमाणें वापरांत आले-सफेत मिस्री, **साळम्** मिस्री. '**शर्करा**' हें उत्तरकालीन संस्कृतीकरण आहे. प्राकृत व पाली शब्दहि नंतरचे आहेत. साखर हा पदार्थ गोड असल्यानें ह्या शब्दाच्या संयोगांत कांहीं लाक्षणिक अर्थांचे सामासिक शब्द व प्रयोग रूढ झाले आहेत. **साखर पेरणें**= गोड बोलून काम करून घेणें; **साखरगोळा**=लाडू, सुग्रास अन्न, **साखरझोंप**=गोड झोंप, पहाटेच्या वेळेची झोंप (परंतु येथें साकर हा शब्द दुसऱ्या कोणत्या तरी शब्दाचा अपभ्रंश असावा असें वाटतें.).]

सांखरशेला पुं. सांकळशेला. A kind of garment.

[ह्यांतील 'सांखर' शब्दाचा साखर (< शर्करा = गोडपदार्थ) ह्या शब्दाशीं कांहीं संबंध नाहीं. सांखळशीं संबद्ध आहे.]

सांखळी स्त्री. (कड्यांची) जोडणी A chain.

[सं. शृंखला; पा. संखला; प्रा. संकलिआ, संखला, सिंखला, सँकला; अ. त्सिकालि; हिं. सांकडी, सिकडी; लां. संगली; गु. साँकडी; ओ. सांकोळी, सिकुळी; बि. सिंकार; बं. सिकल; कु. साँगलो; का. होकल; हिं. साँकर, सिकर; प. संगल, लां. सगली, सिं. संघरा; गुं. सांकळ.]

साखाळा स्त्री. शाळा. A place of learning.

[सं. √ शास् किंवा √ शिक्ष्; शिक्षालय, शिक्षाशाला; याकाम. शाळा.]

साखाळाचिया उंचिया। पांतां दृष्टी टांचिया। ऋ. पू. १६.

साग, सागवान पुं. वृक्षविशेष, इमारतीच्या कामीं उपयोगी पडणारें लांकूड. A kind of tree, the teak tree.

[सं. शाकः; पा. साको; प्रा. साग; हिं. साखू; सांखू, सागून्, सागों, सागऊन्; पं. सागून्; सिं. सागु; गु. साग; मराठींत 'साय' असें हि रूप आहे. पुढचा 'वान्' शब्द वनम् पासून असावा. ईसवी सनाच्या पहिल्या शतकांतील पेरिप्लुस मध्यें ह्याचा उल्लेख आहे.]

सागर पुं. समुद्र. The ocean or sea.

[सं. 'सगर' राजाच्या नांवावरून हा शब्द रूढ झाला. याकाम. सायर, सागर (नरूस्व. ७२१); अकामसा. सागरगोटा = सागरगोटी नांवाच्या वेलीचें बीं.]

सागळ स्त्री. बकऱ्याचें कातडें. Goat-skin.

[सं. छाग + वलय (?); सागुती, सागोती < सं. छाग + कृत्ति (?); हिं. सगोती; = खावयाचें बकऱ्याचें मांस.]

सागळ न. पाण्याचें भांडें. A drinking vessel.

सवें हडपु सागळिया सुआरूः देव्हारु-वडुवा दिवटा
वेचकरू। नरुस्व. ६९५

सागू पुं. 'साबू' पहा. साबुदाण्याचे झाड. The sago.

[मलाया. सागू.]

सांकेतिक वि. संकेताचें-संकेतानें ठरलेलें, चिन्हानें जाणावयाचें. That cansists of signs.

[सं. संकेत + इक, सम् √ कित् १ ज्ञाने.]

सांख्य न. एक तत्त्वज्ञान, (कपिलऋषिप्रणीत) दर्शनं. The *Sankhya* philosohy.

[सं. सांख्य, √ सम् + ख्या.]

सांग वि. संपूर्ण, सर्व, यथास्थित, अव्यंग, सर्व अंगांसहित. Whole, complete.

[सं. स + अंग, √ अज्. सांगता = सिद्धि, पूर्णता.]

सांग(णें) सक्रि. कथन करणें, निवेदणें. To tell, to narrate.

[सं. सम् + ख्याति; प्रा. संघई; महा. संघ, (संख्या > सांघ > सांग); अकामसा. सांगकाम्या = सांगितलेलेंच फक्त काम करणारा, सांगावा = निरोप, सांगीवांगी (सं. संख्यानंप्रख्यानम्; प्रा. सांघपांघ) = सांगण्यामुळें समजलेली गोष्ट.]

सांगड स्त्री. एकी, दोन भोपळे किंवा होड्या जोडून केलेला तराफा, जलयान. A float composed of two boats or pompions.

[सं. संघाटः; पा. संघाटो; प्रा. संघाद, संघाडी (Pair); देप्रा. संघाडी, युगलम् (१७४,१२); कु. सिगाड; वि. सिघाड; हिं. सिघाड; गु. सांघाडो; किंवा सम् + ग्रथ् ९ बन्धे; याकाम. सांगड (ज्ञा. १८-२५५) तामीळ. शंगडम्; तुळु. जंगल = तराफा.]

सांगडा वि. सारखा. Like, similar.

[म. सांगत; सं. सम् + गम्; याकाम. सांगडा (अमृ. ७-२८८.); सांगडें = सादृश्य (ज्ञा. १५-५०७).]

सांगाडा पुं. सांपळा, मूळ रचना, मोठी अवजड वस्तु, चौकट. The skeleton or frame.

[सं. सम् + घट्ट्; देप्रा. संगलइ संघटते (२८०-१३); म. सांगुळणें = सांखळणें.]

सांगात पुं. सोबत. Company.

[सं. संगत, सम् + √ गम् १ गमने; याकाम. सांगाती (ज्ञा. १६-१९); अकामसा. सांगातीं = बरोबर, सह, सांगाती = मित्र, बरोबर जाणारा.]

सांघ(णें) सक्रि. सांगणें, निवेदणें. To tell, to narrate.

[सं. सम् + ख्या; याकाम. सांघ. चतुराननीची सोभा कईं सांघो ! (अप. का. त्रयी).]

सांघणी-नी स्त्री. धाड, हल्ला, चाल. A sudden attack.

[सं. **संघात**, **संहनि** (?), **सम् + हन्** .]

दंडकी-दंभोळिची सांघनीं: नवसियें पुरवी रण-जखिणी ।
नरुस्व. २७१

सांच(णें) अक्रि. एकत्र सांठणें, एकत्र होणें, जमणें. To accumulate, to collect.

[सं. **संचय** (नाधा.) किंवा **संस्त्यै**, **संस्त्याने**, **सम् + श्यै** १ संस्त्याने; सिं. **साचणु**; हिं. **संचना**; पं. हिं. **साचा**; गु. **साचवूँ**, **संचो**, **सांचो** = यंत्र; अकाम. **सांच** = जागा, स्थल, अवकाश, **सांचा** (ओतकामाचा वगैरे).]

साच, सांचा वि. खरा, प्रामाणिक. True, honest.

[सं. **सत्य**, **सत्यक**; पा. प्रा. **सच्च**; प्रा. **सच्चा**; कु. **साँचो**; आ. **स्सासा**; बं. **सॉचा**; ओ. **सचा**; हिं. **साँच**, **साचा**, **सच्चा**; पं. **सच्च**; लां. **सच्च्**; सिं. **सच्चु**, **सचो**; गु. **साचू**, **साचूँ**; परंतु अनुनासिक कोठून आला? आणि तोहि पहिल्या '**स**' वर आहे. तेव्हां सन्, सन्त, सन्त्य, असा मूळ शब्द असला पाहिजे. याकाम. **साचोकार** < सं. **सत्यंकार** (-"**कारे सत्यागदस्य**" -**पा. सू.**) (**अगदंकार**); प्रा. **सच्चंकार** > **साचोकार** = खरेंपणा, **साचार** = खरा.]

तो म्हणे हे काइ साचोकारें रूप: कीं गाळिवां सौंदर्याचे लेप । नरुस्व. १४०.

सांचणें सक्रि. हलविणें. To move.

[**सं. सम् + चल्** १ गतौ, (णिच्); शिकामसा. **साचल,-ळ** = पावलांची चाहूल, **साचोला** = आवाज.]

तव साचाल झाला मार्गावरील ॥ मु. वन. १६-१२८
इतुकियांत साचळ ऐके द्वारिं देवा ॥ कथा. १-६-१८७.

सांचा पुं. यंत्र, चौकट, ठसा, मूस, आकृति. A model, a mould, a pattern.

[कान. **सञ्चु** = साधन, युक्तीचें यंत्र. सांचणें ह्या मराठी शब्दाशीं संबद्ध असावा. तसें असेल तर कानडींत हा तद्भव मानिला पाहिजे. सांचणें पहा.]

साचार वि. अ. खरा, खरोखर, खराखुरा. साच पहा. True, truly.

साचोकार पुं. अ. खरेंपणा, खरेंपणानें. Truth, truthfully.

साज(णें) क्रि. ठेवणें, भूषविणें, सजविणें. To keep, to become, to befit.

[सं. **सज्ज सज्जयति**; पा. **सज्जेति**, **सज्जायेति**; प्रा. **सज्ज**, **सज्जेइ**; का. **संझ**; कु. **सजूणो**; आ. **साझिबा**; बं. **साजा**, **साजान**; ओ. **सजाइबा**; हिं. **सजाना**; पं. **सजाउणा**, **सज्जा** (ताजा); लां. **सज्जा** (नवा, ताजा). गु. **साजवूँ**.]

साज पुं. शोभा आणण्याचें साहित्य, सरंजाम, दागिना, भूषणविशेष. Habiliments, trappings, accoutrement. ornaments.

[फा. **साझ्**; याकामसा. **साजिरा** = सुशोभित, सुंदर (ज्ञा. १८-८३९), **साजिरागोजिरा** = देखणा, सुंदर. **साजरा** पहा.]

साजण, सजणा पुं. प्रियकर. A lover, a paramour.

[सं. **स्वजन**; याकाम. **साजणी** (**नरूस्व.**); अकामसा. **साजणी** = प्रियकर, **साजणें** = मैत्री, सख्य.]

साजरा वि. अलंकृत, मंडित. Decorated, embellished.

[सं. **सज्ज** (**सज्य** ह्याच्याशीं संबद्ध); पा. प्रा. **सज्ज**, **सजो**, **साजी**; सं. **सद्यस्कः** प्रा. **सज्जअ**; देप्रा. **सज्जोक**; बं. **सॉजो** (ताजें); पं. **सज्ज**, **सज्जरा**; लां. **सज्जा**; सिं. **सजो**; गु. **साजूं**; **साज** पहा.]

मुरारिचे दशन देखौनि साजिरे: हिंपुटी जाली पद्मरागाचीं भांडारें । नरुस्व. ७९८.

सजा वि. ताजा, नवा, तयार. Fresh, new.

[सं. **सद्यस्कः**; प्रा. **सज्जअ**; देप्रा. **सज्जोक**; याकाम. **साजा** (ज्ञा. १४-१०२).]

कायि जलार्णव पाउसें । साजा होय ॥ ज्ञा. १४-३३३.

साजिंदा पुं. बजवय्या, सांथ देणारा. A musical performer who accompanies with his instrument the movements of a dancer.

[फा. **साझंदा**.]

साजूक वि. चवदार, ताजा, मऊ, **टवटवीत**. Fresh, new, tasteful, soft.

[सं **सद्यस्क**; प्रा. **सज्जअ**; देप्रा. **सज्जोक**.]

सांज स्त्री. संध्याकाळ, सायंकाळ, संधिप्रकाश. The evening.

[सं. **संध्या** ; प्रा. **संज्झा** ; सिं. **संझी, संझो** ; पं. हिं. बं. ओ. **संझ** ; सिंह. **संदी, संद** ; ह्या शब्दाच्या मूळ अर्थांत पुष्कळच फरक झालेला आहे. 'ध्यै' ह्या धातूपासून जर व्युत्पादिला तर 'ध्यान करणें'-चांगल्या तऱ्हेनें ध्यान करणें (**सम्+ध्यै**), ध्यान करण्याची वेळ-अशा मार्गानें तद्भव '**सांज**' ह्या शब्दाच्या अर्थाचा पत्ता लागतो. परंतु ह्यापेक्षां संधिकाल ह्या शब्दाशीं त्याला जोडणें हें अधिक सयुक्तिक होय. '**संधि**' हा शब्द मूळ √ **सम् + धा** ह्या धातूपासून निघतो ; याकाम. **सांजवेळ** (नरुस्व. ४८५) ; अकामसा. **सांजवेळ सांजोळ, सांजाव(णें)** = संध्याकाळ होणें.]

सांज स्त्री. नवें धान्य निघाल्यानंतर तें खाण्यापूर्वीं बऱ्या वाईट देवतांना अर्पण करण्याची रीत, अंदाजलेलें पीक. Offering of new corn to god.

सांजा पुं. पक्वान्नविशेष, शिरा, रवा-साखर-तुप ह्यांचें खाद्य. A kind of sweetmeat (made of wheaten flour).
[सं. **संयावः** (?); **सांजोरी** = सांजाची पुरी.]

सांजें न. व्रत, शपथ. A vow, a promise.
[सं. **संज्ञा** ; प्रा. **सण्णा** ; हिं. **सान, सैन** ; गु. **सान** ; सिंह. **सन्**. इतर भाषांत ह्याचा अर्थ **खूण, इषारा** असा आहे.]

साटी स्त्री. सट्टा. साटें पहा. Speculation.

साटी स्त्री. आश्रय, संगत, बरोबरी, सारखेंपणा. Company, support, equality.
[सं. **सार्थे** किंवा **सम् +** √ **स्त्यै** १ संघाते.]

साटें न. लांकडाचा गाडीचा सांगाडा, गाडीची चौकट. The bottom of a load-cart.
[सं. **छटा, छडी** < **छट्ट** ; किंवा सं. **शकट** ; प्रा. **सअट, सयड** (पुंन.); बं. **छाद्द** (वेत); ओ. **छाट** ; पं. **छटी** ; गु. **साट** (पाठीचा कणा), **साटो** = गाडीचा सांगाडा ; अकाम. **साटा,-टी,-टें,-ठ.**]

साटें, साट(णें) न. देवघेव, देणेघेणें, सूड, एकदम माल विकत घेणें. Exchange (of commodities), buying of the whole lot.
[सं. **साति** (?), **सर्जू**-प्रापणे, **सर्जू** = व्यापारी ; प्रा. **सट्ट** (पुं) ; आ. **स्सुटाइब** ; हिं. **साटा, सट्टा** (पुं) = देवघेव ; पं. **सट्टी** (सट्टा, बाजार) ; सिं. **सट्ट** (स्त्री) = ठोरा, **सटो** ; गु. **साटूँ** ; लां. **सट्टण** (फेंकणें) ; याकाम. **साटोवाटी** = अदलाबदल (ज्ञा. ६-४९४) ; अकामसा. **साटें खत** = खरेदीचा करार. **साटेंलोटें** = लग्नव्यवहारांत एकमेकाची बहीण एकमेकानें वरणें.]

साटोप पुं. खटपट, प्रयत्न, आटोप, (त्यावरून) उरक असणारा, व्यवस्था नीट करणारा,-त्यावरून. अहंमन्य, गर्वोद्धत. Effort, dispatch, (hence) one having dispatch, arrogant, vehement.
[म. **स + आटोप.** < **आ + स्तुभ्, स्तुप्.**]
ऐसा सुदेवें देखिला साटोपुः तो रितुरावो मदनप्रतापु ।
नरुस्व. ७७०.

साठ वि. संख्याविशेष, दहादां सहा. Sixty.
[सं. **षष्टिः** ; पा. प्रा. **सट्ठि** ; का. **शैठ, शेठ** ; आ. **त्साठी** ; बं. **साइठ** ; ओ. **साठी** ; हिं. **साठ** ; पं. लां. **सट्ठ** ; सिं. **सठी** ; गु. **साठ** ; सिं. **सट** ; अकामसा. **साठी बुद्धि नाठी** = म्हातारपणामुळें होणारा बुद्धिभ्रंश.]

सांठ(णें) अक्रि. एकत्र होणें, जुळणें, सांचणें. To collect, to accumulate.
[सं. **संस्था, सम् + स्त्यै** १ संघाते ; प्रा. **संठ** ; सिंह **सटहन्** ; अकामसा. **साठविणें** (सं. **संस्थापय** ; प्रा. **संठव**).]

साठ(णें) अक्रि. संकट सोसणें. To suffer a hardship.
[सं. **शठ्** १ संक्लेशने, **शाठ्य.**]
तेथ सत्काराची कें गोठी । कें आदरा होईल भेटि ।
मरणेंसि साठि । नमस्कारितां । ज्ञा. १३·१८९.

साठीं अ. करितां, स्तव. For, for the sake of, on account of.
[सं. **सार्थे, सार्थम्** ; गु. **साटे** = बदली ; सिं. **साटो** = विनियम, **सठाइतो** = अनुकूल लक्षण; सिंह. **टा** = करितां.]

साडा वि. अधिक अर्धा. Increased by one half.
[सं. **सार्धः** (**स + अर्धः**); प्रा. **सड्ढ** ; का. **सोड्ड, स्प्रोड्ड** ; बं. **साडे** ; ओ. हिं. **साढे** ; पं. **साढे** ; सिं. **साढु** ; गु. **साडा** ; ने. **साडे** ; अकामसा. (पाढ्यांत अनेक वचनी) **साडेतीन=चार, साडेतीन** (पोषाख) =

१ जामा, २ निमा, ३ शेला, तिवट (अर्धा) मिळून साडेतीन; **साडेतीन** (मुहूर्त) = दसरा, दोन पाडवे, अक्षय्यतृतीया अर्धा; **साडेतीन शहाणे** = सखारामबापू बोकील, विठ्ठल सुंदर परशरामी, देवाजीपंत चोरघोडे व नाना फडणीस अर्धा, **साडेपन्हरें** = (लक्षणा) सोनें. (ज्ञानेश्वराच्या काळीं सोन्याचा भाव १५॥ होता.—**साड पन्हरें जालें सफळ** ॥ नरुस्व. ७९१), **साडेसाती** = (लक्षणा) संकटपरंपरा, शनीचा क्रमणकाल–तीन राशींतून–साडेसात वर्षें लागतात.]

साडा,-डे पुं. (अव.) लग्नानंतर चौथ्या दिवशीं ऐरणी-पूजनाच्या प्रसंगीं वधूवरांस वस्त्रें अर्पण करावयाचा सोहळा, (किंवा) तीं वस्त्रें (श. को.). (लक्षणा) समाप्ति, शेंवट. (साडी पहा). A certain ceremony performed on the fourth day of marriage.

तो हा अमृत इच्छितो। संसाराचे साडे। अमृत. ११६.

साडी स्त्री. बायकांचें नेसण्याचें वस्त्र. A female garment (worn by girls).

[सं. **शाटः** (कापडाचा पट्टा), **शाटिः**, **शाटिका**; प्रा. **साडी**, **साडिआ** (वस्त्र); कु. **सारी** (बायकांचें वस्त्र); बं. **साडी**; ओ. **साडी**; बि. **सारी**, **साडी**; हिं. **साडी**; पं. **साढी**; सिं. **साढी**, **साडु**; गु. **साडी**; अकाम. **साडा**.]

साडू,-ढू पुं. बायकोच्या बहिणीचा नवरा. Husband of one's wife's sister.

[सं. **श्यालिवोढृ**; **स्याली** > **सालडुओ** < **स्याली** + **वोढृ**; का. **सोजिवा**, **सोजुव**; कुं. **साडू**; ओ. **साढू**; हि. **साढू**; पं. **साढू**, **सांढू**; लां. **सांढु**; सिं. **संढू**; गु. **साडु**.]

साण स्त्री. सहाण, उगाळण्याचा दगड, निसणा. A whet-stone.

[सं. **शाण**; प्रा. **साण**; देप्रा. **छाण** (१२४-१४); पं. **साण**; सिं. **सण हण**; रुमा. **असन**.]

साण स्त्री. होळीच्या पालखीची जागा, होळीचा कोनाडा. The appropriate place for the *palkhi* of the *holi*.

[सं. **छादयति**, **छादन**; प्रा. **छाअण**; हिं. **छाना** = झांकणें, **छान** = पाचटीचें छपर; पं. **छन्न**; सिं. **छाविणी**; गु. **छावं**; सिंह. **हिवनवा** = झांकणें.]

सांड पुं. स्त्री. पोळ म्हणून सोडलेला बैल, उंटाची मादी. A bull set at liberty, a female camel.

[१ सं. **साण्डः** (न वडविलेला); प्रा. **सण्ड** (बैल); का. **श्रण्ड**; कु. **सान्**; आ. **ह्सिड**; ब. **साँड**; ओ. **सण्ड**; हिं. **सांड**; गु. **सांड**, **सांढ**; पं. **सान्ह**, **सांढा**; २ सं. **षण्ढ**; प्रा. **संण्ड**, **सण्ढ**; देप्रा. **सण्ढी** (उंटीण); बं. **सांडणी**; ओ. **सण्ड**; **सण्ढ**, (बळकट); हिं. **सांडिआ**; पं. **सण्ढ** (वांझ); लां. **सड्ढ** (वांझ); सिं. **सण्ढी**.]

सांड(णें) सक्रि. गमावणें, सोडणें, जमीनीवर पडणें. To lose by dropping, to cast away.

[सं. १ **स्यन्द्** १ प्रस्रवणे, २ **छर्दय**, **छृणत्ति**, **छृन्दति**. प्रा. **छड्डेइ**, **छड्डुई**; बं. **छारा**, **छाडिते**; ओ. **छारिबा**; हिं. **छाडना**; पं. **छड्डणां**; सिं. **छंडणु**; अकामसा. **सांड** = उपेक्षा, विस्मरण, **सांडपाणी** = सांडलेलें पाणी; **सांडरांड**, **सांडरूं** = सोडचिठ्ठी दिलेली बायको, **सांडलवंड** = सांडणें, लवंडणें.]

पुनु आंगा आलें अपेस : जे प्रियें सांडिली। नरुस्व. १९६.

सांड(णें) सक्रि. कापणें, तुकडे करणें. To cut.

[सं. **सम्** + **दो** ४ अवखंडने.]

मग देह अहंतेचे दळें। सांडूनि एके वेळे। ज्ञा. १५-२३५.

सांडगा पुं. फळांत (विशेषतः भेंडी, काकडी, भोपळा) तिखटमीठ घालून केलेलें तोंडीलावणें. A ball of particular seasoning and savoury composition.

[कान. **संडिगे**; सं. **शांडाक** (भा. अ. १८३४).]

सांडस पुं. मोठा चिमटा, पकड. A kind of pincers.

[सं. **संदंशः**, **संदंशकः**; पा. **सण्डासो**; प्रा. **सण्डास**; का. **सनस्**; आ. **ह्सार**; बं. **संडास**; ओ. **सण्डुअसि**; बि. **साड्सी**; हिं. **सांडस**, **सांडसी** (स्त्री.); पं. **सन्डासी**, **सन्ही**; सिं. **संजु**; गु. **संडसो**; ने. **सनासो**; याकाम. **सांडस** (ज्ञा. ११-४१५).]

सात वि. संख्याविशेषण. पांच अधिक दोन, संख्येनें मोठा, अतीशय (ल.). Seven, several.

[सं. **सप्तन्**; पा. प्रा. **सत्त**; का. **सथ**; कु. **सात**; आ. **ह्सात्**; बं. **सात्**; ओ. **सात**; बि. हिं. **सात्**; पं. लां. **सत्त**; सिं. **सत**; गु. **सात**; शिकामसा. **सात पांच** = (लक्षणा) सात (धातु), पांच (महाभूतें). सातपांचाचें गोठलें। प्रारब्धें आकारलें। तु. गा. २००४. अकामसा. **सातपुती** = सात पुत्रांची आई. **सातभाई** = पक्षिविशेष, शेतांतील किडे खाणारा पक्षी. **सातोळें** = सात महिने गर्भांत राहिलेलें मूल.

सातवांकडी, सातरें = सात दिवस सारखी लागणारी पावसाची झड. अमृताची सातवांकुडी । लागो कां अनुघडी । ज्ञा. १३-६४०. **सातवेउळी** = सात नांग्याची इंगळी. कां आयुष्य जातिये वेळे । शेळिये सातवेउळी मिळे ॥ ज्ञा. १६-२५९. **सातासायास** = फार खटपट. **सात्रक** = सात दिवस (पुरणारें औषध).]

सातर(णें) क्रि. पसरणें, विस्तरणें, विस्तार होणें,–पावणें. To spread, to extend.
[सं. **सत्र** १० संतानक्रियायाम् किंवा **सम् + स्तृ** ९ विस्तारे.]

सातवा वि. संख्याविशेषण–सात संख्येचा. The seventh.
[सं. **सप्तमः** ; पा. प्रा. **सत्तम** ; का. **सत्युमु** ; हिं. **सातवाँ** ; पं. **सातवाँ** ; लां. **सत्तवाँ** ; सिं. **सतों** ; गु. **सातमूँ** ; ने. **सातौं**.]

सातळ(णें) सक्रि. थोडेसें तळणें, फोडणीस टाकणें. To fry up a little.
[सं. **सम् + तल्** १० प्रतिष्ठायाम् ; किंवा **तप्**.]

साता, सांता वि. होत्साता, असणारा. Being.
[सं. **सत्**, √ **अस्** १ प्रतिष्ठायाम् ; प्रा. **सन्त** ; पं. **संदा** ; सिं. **हंदो** ; का. **सोंद** (इ), **होंद्** (इ).]
जे योगु यागु न करितीचि । जन्मले साते । ज्ञा. ४-१५४.

साती स्त्री. छत्री, विस्तार, झुबका. An umbrella, a bunch, extent.
[सं. **सम् + स्तृ**.]
झळकती पालव सातीया ॥ भाए. ४४१.
बारिणीं साति मेळवी आइकाः धाकुटिया चढेति वारूवा बारिका ॥ नरुस्व. ३८५.

सातु, सत्तू पुं. धान्यविशेष, गव्हासारखें धान्य, गहूं आणि हरभरा यांचें पीठ. Barley.
[सं. **सक्तुः** ; पा. प्रा. **सत्तु** ; प्रां. **सत्तुअ** ; का. **सोतु** ; कु. **सातु** ; बि. **सत्तू** ; हिं. **सातू, सत्तू** ; पं. **सत्तू** ; सिं. **सांतूँ** ; गु. **सातु**.]

सात्व(त्वी)ण स्त्री. वृक्षविशेष, एक प्रकारच्या झाडाची साल, सात पानांच्या फांदीचें एक झाड. A kind of tree or its bark.
[सं. **सप्त,–छत्रपर्णः** ; प्रा. **छत्तवण्ण, छत्तिवण्ण** ; सं. **सप्तवर्ण** ; प्रा. **सत्तवण्ण** ; सिंह. **सत्पात्, सत्दळ**.]

सात्वत पुं. भक्त, भागवतधर्मानुयायी. A divotee, a follower of *Bhagvata* cult.
[सं. **सात्वत**.]

सात्त्विक वि. सौम्य, सत्य, पवित्र, सत्त्व असलेला, सत्त्वगुणयुक्त. Pure, honest, free, holy, gentle.
[सं. **सत्त्व + इक** < **सत् + त्व**, √ **अस्** ; **सात्त्विकभाव** – स्वेद, स्तंभ, रोमांच, स्वरंभग, वेपथु, वैवर्ण्य, अश्रु, प्रलय हे आठ सात्त्विक भाव होत.]

साथ अ. स्त्री. बरोबर, बरोबर असणें, संगत, मदत. Company, association, society, fellowship, along with.
[सं. **सार्थः** ; पा. प्रा. **सत्थ** ; का. **साथ** ; कु. **साँथ** (बरोबर) ; बं. **साट** (कट) ; हिं. पं. **साथ** (संगत) ; सिं. **साथु** ; गु. **साथ**. **स्वस्ति > सथ्थि > साथ** अशी व्युत्पत्ति राजवाडे देतात ती पटत नाहीं. (**साथ < संस्था** > प. लां. **सत्थ** ; सिं. **सथ, सथु**). सं. **सार्थवाहः** ; पा. प्रा. **सत्थवाह** ; सिं. **सत्वा** = व्यापारी हा शब्द निराळा.]

साद पुं. शब्द, आवाज, हांक, मागाहून उच्चारिला जाणारा शब्द, प्रतिध्वनि. An echo, a hollooing or calling to.
[सं. **शब्दः** ; प्रा. **सद्दो** ; सिं. **सडो** ; का, सिंह. **सद** ; पं. **सद** ; हिं. गु. **साद** ; अकाम. **सादवि(णें)** = साद घालणें, **पडसाद** (**प्रतिशब्द**).]

सादळ(णें) अक्रि. ओलसर होणें. To become damp.
[सं. **शाद्वल** ; प्रा. **सद्दल**.]

सादर वि. आदरयुक्त, तत्पर, सज्ज. Possessing reverence or respect.
[सं. **स + आदर, आ + √ दृ**.]

सादर वि. उद्भूत, प्रविष्ट, रुजू. Produced, issued, sent forth.
[अर. **सादिर्** ; शिकाम. **सादर** (चित्र. ८) ; पेकाम. **सादर** (रा. १५·५५).]

सादिल वि. आगंतुक, नैमित्तिक. Contingent.
[अर. **सादिरवारिद** ; अकामसा. **सादिलवार** = वरचा किरकोळ खर्च.]

सा(सां)दुक(णें) क्रि. पेटणें, पेटविणें, प्रज्वलित करणें,–होणें. To light, ignite.
[सं. **सम् + आ + धुक्ष्** १ संदीपने.]

नातरी वढवानलु सांदुकला । प्रलयवातें पोखलां ॥ ज्ञा. १-९०
वीजिता वारेयाचे नि फुकें : आंगिचें श्रीखंड सादुकें ।
नरुस्व. ५७६.

साद्यंत वि. सर्व, संपूर्ण, आरंभ-शेवटासह. Whole, entire, complete, having beginning and end.
[सं. **स + आदि + अंत.**]

सांद्र वि. दाट, घट्ट, जवळजवळ. Thick, dense.
[सं. **सांद्र.**]

साध(णें) सक्रि. मारणें, नाशणें. To destroy, to ruin.
[सं. **सध्** ५ हिंसायाम्.]

हे मारिले ते पर थोडे । आणीकहि साधीन गाढे ।
मग नादैन पवाडे । येकला मी चि । ज्ञा. १६-३५२.
हे शस्त्रेंविण साधिति । दोरेंविण बांधिती ।
ज्ञातिया तरि वधीति । पैज घेउनि । ज्ञा. ३-२५३.

साध(णें) अक्रि. पोहोंचणें, सिद्धीस नेणें, मिळविणें, जिंकुणें, संपादणें. To accomplish, to achieve, to effect.
[**सं. साध्** १० संसिद्धौ ; अकामसा. **साधक** = साधणारा, सिद्धीस नेणारा, उपकारक, मुमुक्षु. **साधणी** = संपादणी, **साधित** = साधलेंलें, सिद्ध झालेलें, **साधन** = साहित्य, सामग्री, **साधनिका** = तयार करण्याची रीति.]

आयुष्यपंथें प्राणिगणीं । करूनि अहोरात्रांची सुअणीं ।
वेगें वक्त्रमिलणीं । साधिजत आहाति ॥ ज्ञा. ११-४१९

साधा वि. सरळ, निष्कपटी, कांहीं विकृति–वक्रता नसलेला. Plain, simple, bare.
[फा. **सादा** ; सं. **साधु** (?); अकामसा. **साधासुदा, साधासिधा** = सरळ, निष्कपट. (< फा. **साद** ; सं. **सिद्ध** किंवा ध्वनिशब्द **सुदा**).]

साधारण वि. सामान्य, सर्वांना लागू पडणारें. Common, general.
[**सं. साधारण.**]

पांतां दिलीचें अनियाळपण : कमळदळें होति साधारण ।
नरुस्व. ९२.

साधु पुं. वि. पवित्र, सात्त्विक, सरळ, चांगलें, सज्जन मनुष्य, संत. Holy, sincere, pure, simple, a saint.
[सं. साधु. **साध्वी** = साधुपत्नी, पतिव्रता (लक्षणा)].

साधु(वाणी) वि. (पुं.) भला, चांगला, जव्हेरी व्यापारी, सराफ.
[सं. **साधु** ; प्रा. **साहु** ; हिं. **साहु** ; पं. **साऊ** ; सिं. **साहू** , **साऊ** ; गु. **साहु, साऊ, साहुकार, साउकार, सावकार**; बं. **साहुकार**; ने. **साऊ**; म. **साव, साऊ, साहुकार, साऊकार, सावकार.** हा शब्द सत्यनारायण कथेच्या पोथींतील एका गोष्टींत आढळतो. तेथें एका साधुवाण्याची कथा सांगितली आहे. तेथें "**साधुवाणी** = चांगला वाणी " असा अर्थ करण्याचा परिपाठ आहे. परंतु वरील अर्थावरून असें दिसतें कीं **साधु** = व्यापारी, जव्हेरी, सावकार, श्रीमंत असा त्याचा अर्थ आहे.]

साध्वस न. भय, भीति. Fear, terror.
[सं. **साध्वस.**]

सान, साना वि. अल्प, लहान थोडें, बारीक. Small, dainty, pretty.
[सं. श्लक्ष्णः; पा. **सण्हो** ; प्रा. **सण्ह, सण्ह** ; का. **श्रोणु** ; कु. **स्यानो** (पोरकट); ओ. **सान** ; सिं. **सन्हो** ; **लहान** हें विशेषणहि ह्यापासून निष्पाद्य होणें शक्य आहे. श्लक्ष्ण > **लण्ह** > **लह्ण** > **लहाण** (वर्णव्यत्यास). **सान** व **लहान** हीं दोन्हीं विशेषणें अनुक्रमें **सान, लघु** ह्यापासून निष्पाद्य होण्यासारखीं आहेत. अकामसा. **सानट सानुला** = चिमुकला लहान, **सानेज(णें)** = लहान होणें.]

जियें अधमोत्तम तुझे । जियें सानेथोर बुझे ।. ज्ञा. १३-८७

सानक स्त्री. ताट, ताटली, (लक्षणेनें) रोटी, अन्न, इनामवतन. A plate or small dining dish, maintenance, inam.
[अर. **सह्न्**, **सह्नक** ; हिं. गु. **सहनक** ; पेकाम. **सानकरोटी** (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

सानुकंप वि. अनुकंपेसह, दयार्द्र. Having kindness, kind.
[सं. **स + अनु + कंपा.**]

सानुकूल वि. अनुकूल. Favourable.
[**सं. स + अनु + कूल.**]

सानुनय वि. अनुनयासहित, नम्र, सभ्य. Modest, soft, gentle.
[सं. **स + अनु + नय.**]

सानेज(णें) क्रि. अत्यंत स्वच्छ होणें, स्वच्छ करणें. To purify or to be pure and clean.
[सं. **सम् + निज्** ३ शौचे.]

दांत ही आन होंती । परि अपोड सानेजांती ।
जैसी दों बाहीं बैसे पांती । हीरेयांची । ज्ञा. ६-२६३

सान्निध्य न. जवळपणा, समीपता, शेजार. Nearness, proximity.
[सं. **संन्निध, < सम् + नि + धा.**]

सांतव(णें) सक्रि. समाधान करणें. To pacify, to appease, to comfort.
[सं. **सांत्व्** १० सामप्रयोगे, किंवा **शान्त**; पा. प्रा. **सन्त**; गु. **सांतवूँ**.]

म्हणोन मायाकुंजर मोडून । मुक्ति मुक्तांफळातें काढऊन ।
तोचि वोगरु भक्षऊन । सांतविलें जेणें ॥
शिवकल्याण, अमृत. ३५-२३.

सांत्वन न. समाधान शांतपणा. Appeasing, consoling.
[सं. **सांत्वन, √ सान्त्व्.**]

सांद,-ध स्त्री. खोंपट, संधि, कोंपरा. A hut, a juncture, a corner.
[सं. **संधिः**; पा. **संधि**; प्रा. **संधि**; का. **सन्** (दरोडा); आ. **त्सॉधी**, **त्सिधि**; बं. **सिंध** (भिंतींतील भोंक); ओ. **सिधि**; पं. **संध**, **सण्ह**; लां. **सनह**; याकाम. **सांड** (ज्ञा. १४-२३५).]

सांद,-ध पुं. जोड, मिळणी. Joint, juncture.
[सं. **संधा**, **संधिः**; पा. **सन्धि**; प्रा. **संधा**, **संधि**; का. **सन्द**, **सोन्द**, **सोनु** (नद्यांचा संगम); अ. **त्साँधि**; पं. **सन्न्ह**; सिं. **संधु**, **संधो**; गु. **साँध**. ज्ञानेश्वरींत '**सांदणें**' असा शब्द वापरला आहे. त्याचा अर्थ '**जोडणें, मिळणें, दोऱ्याला दोरा जोडणें**' असा आहे.]

तरि डांक देऊनि सांदिलें । शिळेतें काई ॥ ज्ञा. ८-४३.
चौऱ्यांयशी लक्ष योनी । तिये कांडां पेरा सांदणी ।
ज्ञा १४-१०७.

सांध(णें) सक्रि. जोडणें, एकमेकास मिळणें. To join, to put together.
[सं. **संदधाति**; **संधायति**; पा. **संदहति**; प्रा. **संधाइ**, **संधेइ**, **संधइ**; का. **सनूं** (आंत शिरणें); कु. **सानणो**; आ. **त्सानिब**; हिं. **सानना**; सिं. **सांधणु**; गु. **सांधवूं**; अकामसा **सांध**, **सांधा** = जोड, पेरें, जोडलेला तुकडा.]

सांधणें न. तांदळाचा एक पदार्थ. An article made up of rice.
[सं. **संधानम्** (मिसळणें); प्रा. **संधाणम्** (जोड); हिं. **सन्धाना** (लोणचें); सिं. **सधाणी**; गु. **सधाणूँ** (लोणचें).]

साप पुं. सर्प, नाग, सरपटणारा प्राणी. A serpent.
[सं. **सर्पः**; पा. प्रा. **सप्प**; आ. **त्साप**; बं. **साप्**; ओ. **साप**; हिं. **साँप**; पं. लां. **सप्प**; सिं. **सपु**; सिंह. **सपुहपु**; रुमा. **सप्**.]

सापटें न. जीर्ण वस्त्र. An old garment.
[सं. **संपुट**; प्रा. **संपुड**; याकाम. **सापटें**.]

कव्हणी एकु एसणें सापटें : पांगुरावेया दे । दृ. पा. ५३.

सांपड(णें) क्रि. घडणें, मिळणें, प्राप्त होणें, धांवणें, गवसणें. To get, to secure, to find out, to fall into the hands of.
[१ सं. **संपतति**; पा. **संपतति**; प्रा. **सम्पदइ** (यशस्वी होणें); देप्रा. **संपडिअं लब्धम्** (२७७-१५); कु. **सपणों** (यशस्वी होणें); हिं. **सपडना** (पडणें); गु. **सांपडवूँ** (हुडकणें, मिळणें). २ सं. '**संभरति**' अशी व्युत्पत्ति ब्लोक देतो. ही व वरील **संपत्** ह्या व्युत्पत्ति ग्राह्य वाटत नाहींत. ३ सं. **सं + पद्** ४ प्राप्तौ; प्रा. **संपड** ही व्युत्पत्ति अर्थ-दृष्टया योग्य होय.]

सांपडा,-ळा पुं. चौकट, पिंजरा, छप्पर, माळा, मांडव. A gin or a trap, a roof.
[सं. **संपुटः**; पा. **संपुटो**; प्रा. **संपुडा**; गु. **साँपध**. (संशयित आहे.); **सांपळा** पहा.]

सापत्न वि. सावत्र, (लक्षणा) वैरभाव, वितुष्ट. The feeling or sentiment of rival wives.
[सं. **स + पत्नी**-समान ज्यांचा पति आहे अशा बायका.]

सांपळा पुं. पकडण्याचें यंत्र, पिंजरा. A trap.
[सं. **संपत्**; प्रा. **संपल. सांपडा** पहा.]

सांपें अ. सध्यां, हल्लीं, अलीकडे. Now, at present, now-a-days.
[सं. **सांप्रतम्**; प्रा. **सांप्पअं**; याकाम. **सांपें**.]

मामा येकु मारिला सांपें: घरिचा घरीं ॥ नरुस्व. ३७०

सापेक्ष वि. अपेक्षा असलेला, तुलनादृष्टीनें एकमेकावर अवलंबून असलेला. That has desire, respective, referential.
[सं. **स + अप + ईक्ष्** १ दर्शने.]

साप्ताहिक वि. न. सात दिवसाचें, आठवड्याचें, (त्यावरून) आठवड्यानें प्रसिद्ध होणारें वर्तमानपत्र. Pertaining to a week, a weekly.
[सं. **सप्त + अहन्**.]

साफ वि. अ. उघड, स्पष्ट, सरळ, निर्दोष, स्वतः, निखालस, बिलकूल, निक्षून. Definitely, clean, clear, explicit, simple.
[अर. **साफ्**; पेकाम. **साफ करणें** = छाटून टाकणें (रा. ५-६६); अकामसा. **सफा** = स्वच्छ, **सफाई** = स्वच्छता.]

साफल्य न. फलप्राप्ति, सफलता, फायदा, लाभ. Fruitfulness.

साफा पुं. डोक्याचा रुमाल, फेटा. A head-gear, a turban.

साव(बी)क वि. अ. पूर्वी, मागचा. Former, formerly.
[अर. **साबिक्**.]

साबड वि. साधा, सरळ, निष्कपटी. Plain, simple.
[खालच्या ओवींवरून व्युत्पत्ति समजते काय ?]
हा सदां पाणि बुडाः युधिष्ठिरूं साबडा । शिशु. ८९४.
कैवाडु रचिती साबडें: विज्ञानबळें उंगविती कुआडें ।
नरुस्व. ११७.

साबण पुं. न. कपडे, अंग स्वच्छ धुण्याचें साधन. Soap.
[अर. **षाबून**; फा. **साबून**; पोर्तु. **साबून**; पं. **साबूण**, **साबण**; हिं. **साबून**; गु. **साबु**; का. **साबन**; शिकाम. **साबण** (तु. अभंग).]

साबर स्त्री. वनस्पतिविशेष, निवडुंगाची एक जात. A kind of plant.
[सं. **शाल्मली**; प्रा. **संबलि**, **शबर** (?); याकाम. **साबर**.]
साबरी वाढिन्नल्या सरळा । परी फळ ना आंतु पोकळा ।
ज्ञा. ९-१७४.

साबर न. मंत्रतंत्र, जादुटोणा. The *mantra*.
[सं. **शाबर**.]

साबरें न. पुञ्ज, कुञ्ज. A bunch, a cluster.
केतुकी दळाचीं सेजारें । पाचाचीं साबरी परिकरें ।
शिशु. ७७७.

साबळा वि. साधा, सौम्य, शांत, भोळा, सावडा पहा. Simple, calm, gentle.

साबळें न. भाला, हत्यार. A spear, instrument.
[सं. **स + भल्ल**; देप्रा. **सब्बल**; हिं. **सब्बल**; याकाम. **साबळ**, **संबळ** (ज्ञा. १७-१४३).]
साउलियेतें साबळें । हालया भोय आढळे ॥ अमृ. ६–४४.

साबूदाणा पुं वनस्पतिविशेष व त्याचें बीं, सागूचें बीं. The sago and its seeds.
[मलायी. **सागू**.]

साम पुं. न. 'साम' नांवाचा वेद, (त्यावरून) गान, मंत्र. The *Samaveda*–the third of the four *Vedas*, a chanted song.
[सं. **सामन्**.]

साम पुं. समेट, सामोपचार, मैत्री, सख्य. Conciliation, appeasing.
[सं. **साम**; अकामसा. **सामोपचार** = समेटाचा प्रयत्न.]

सामग्री स्त्री. तयारी, वस्तूंची जुळवाजुळव, सामान, साधनभूत गोष्टी. Readiness, materials kept ready for production.
[सं. **समग्र (सम् + अग्र)**, **√ अज्**, **अग्** १ गतौ.]

सामंत पुं. वि. मांडलीक राजा, हाताखालचा राजा, सीमेवरील. A feudatory prince, limitative.
[सं. **सामन्त**.]

सामता पुं. छिद्र पाडण्याचें तीक्ष्ण हत्यार. A carpenter's tool, a sort of drill.
[याकाम. **सामथा**.]
आधींची विरहज्वरें तेथें: ग्रुसळत चंद्रकराचे **सामथे** ॥
नरुस्व. ५२८

सामना पुं. विरोध, लढाई, चुरशीचा खेळ. Oppositeness, confrontedness.
[हिं. **सामना**.]

सामव(णें) सक्रि. समावेश करणें, मावणें, सामावणें. To include in, to incorporate.
[सं. **सम् + मा ३** माने (णिच्) सम्मापय.]

तैसें शब्दें जें न लभे । तें घडूनु अनुष्टभें ।
स्त्रीशूद्रादिप्रतिभे । सामविलें । ज्ञा. १८-१६७८.

सामर्थ्य न. शक्ति, बल, क्षमता, पात्रता. Power, strength, force, might.
[सं. **सामर्थ्य < समर्थ, सम् + √ अर्थ** .]

सामलात वि. स्त्री. सामील, अंतर्निवेश, समावेश, साहाय्य, हिस्सा. Associate, included, partenership.
[अर. **शामिल्** चे अ. व.–**शामिलात.**]

सामसूम वि. स्त्री. स्थब्धता, शांतता, गप्प. Stillness, silence, quiet.
[हिं. **सुनसान–सानसून.**]

सामाजिक वि. समाजासंबंधीं, समाजसुधारणासंबंधीं, समाजांत–सभेंत बसणारा. Social, relating to assemblage or society, a person sitting in an assembly.
[सं. **सामाजिक, < समाज < सम् + आ + √ अज्.**]

सामान न. माल, चीजवस्त, साधनें, सामग्री. Instruments, implements, tools.
[फा. **सामान्**; शिकाम. **सामान** (पुं.) (सभा. ६८). पेकाम. **सामायन** (होपो २२), पेकामसा. **सामानपूर** = साधनांनीं पूर्ण, चांगल्या तयारीनिशीं.]

सामान्य न. सर्वसाधारण, सर्वांना लागूं पडणारें, साधारण प्रकारचा. Generalness, commonness.
[सं. **सामान्य, < समान, < सम.**]

सामाव(णें) अक्रि. मावणें, समावणें पहा. To be included in.
[सं. **सम् + आ + मा** ३ माने.]

सामील वि. समाविष्ट, अन्तर्भूत, साहाय्यक, मदत करणारा. Confederated or associated with, included in.
[अर. **शामिल्**; पेकाम. **सामील, सामळ** (होकै. २८).]

सामुद्र वि. समुद्रासंबंधीं, दर्यावर्दी. Pertaining to sea.
[सं. **सामुद्र < समुद्र > सम्–उद्रांसि सन्ति अस्मिन्.**]

सामुद्र न. शरीरावरील खूण, हातपायांवरील रेषा. A spot or mark on the body.
[सं. **सामुद्र < समुद्र > स + मुद्रा.**]

सामोपचार पुं. समेटाचा प्रयत्न–उपाय. A mild and moderate application.

सांप्रत अ. संप्रति, सध्यां, हल्लीं. Now, at present.

सांप्रदाय न. चाल, रूढी, मत, सिद्धांत. Usage, manner.
[सं. **संप्रदाय, सम् + प्र + दा.**]

सांबर पुं. न. काळवीट जातीचें हरीण. A sort of elk or antelope.
[सं. **शंबर**; प्रा. **सम्बर**; बं. **साबर**; हिं. **साबर, सांबर, साबळ**; कु. **साब्लो**; ओ. **साबळ**; बि. **साबर, सब्रा**; पं. **सावर**; गु. **साबर**; हिं. **साबल.**]

सांबारें न. आमटी. Sour curry, a liquid preparation in meal.
[सं. ? **संभार** = मसाल्याचें साहित्य. दक्षिणेंत कर्नाटकांत कोल्हापुर प्रांतीं हा शब्द रूढ आहे.]

सांभळ(णें) सक्रि. ऐकणें. To hear.
[सं. **सम् + स्मृ, सम् + भल्**; प्रा. **संभर, संभल**; गु. **सांबळ, शांभळा, शांभळोभाई** – गुजराती मनुष्यासंबंधीं चेष्टेनें वापरतात.]

सांभाळ(णें), संभाळ(णें) सक्रि. काळजी घेणें, रक्षण करणें, राखणें. To protect, to take care.
[सं. **सम् + भालय, स + पालय**; प्रा. **संभाल.**]

साम्य न. सारखेंपणा, सादृश्य. **सम** पहा. Equality, likeness, resemblance.

साम्राज्य न. अधिराज्य, सम्राटाचें राज्य. Empire, the sway of an emperor.
[सं. **साम्राज्य < सम् + राज्, राट्, √ राज्.**]

साय स्त्री. तापल्या दुधावरचा पातळ पापुद्रा,–थर, (नदींतील) गाळ, मळ. Cream.
[सं. **छाया**; फा. **साय.**]

साय स्त्री. सावली, छाया, रक्षण. A shadow, protection, shelter.
[सं. **छाया.**]

साय पुं. सागवान. Teak-wood.
[सं. **शाक**; हिं. **साग**; सिं. **सागु**; गु. **साग**; अकाम. **सावा, साग, सागवान.**]

सायखडें न. कळसूत्री (बाहुलें). A puppet moved by a hidden cord underneath.
[सं. **सूत्र + काष्ठ** (?), **छाया + काष्ठ** (?).]

सायन पुं. (मेष) संपातबिंदूपासून गणलेला ग्रहाचा रेखांश. The longitude of heavenly body from a solstice.
[सं. **स + अयन, √ अय्** १ गतौ.]

सायर न. जकात, मालावरील कर,–पट्टी. Duty on commodities.
[अर. **साइर्.**]

सायर पुं. सागर. The ocean or sea.
[सं. **सागर**; सिह. **सयुरु**; याकाम. **सायर.**]

सायारू पुं. जाळी. A thicket, a raised place of shelter.
[सं. **छाया, साईर** (?); याकाम. **सायारू** = माच, माण्डव.]

मोतियांचा सायारू बांधिला । कीं देवीं पुष्पवर्खाओ केला ।
शिशु. ७१५.

धाराचे दाटे ति सायारः परिझगडौनि फुटेति तुशार ।
नरुस्व. ४३२.

सायुज्य न. चार मुक्तींपैकीं एक मुक्ति. The fourth of the four *Muktis*.
[सं. **सायुज्य, √ युज्.**]

सार न. एक प्रकारचें कालवण, चिंच, अमसूल वगैरे घालून करावयाचें पेय. A dilute mixture of tamarind etc., decoction of tamarind etc.
[द्रा. **साऊ**; कान. **सारू** = पातळ पेय.]

सार न. तात्पर्य, अर्क, रस, तथ्यांश, बल. Essence, substance, pith, spirit.
[सं. **सार**; पा. प्रा. **सार**; का. **सार**; आ. **ह्सार्**; बं. **सार्**; ओ. **सार** (चरबी); हिं. **सार** (सत्त्व); पं. **सार** (तत्त्व); सिं. **सारु**; गु. **सार**; याकामसा. **साराधार, सारोद्धार** = सारांश, तात्पर्य; अकामसा. **सारवत्ता** = श्रेष्ठता, योग्यता, **सारासार** = खरेंखोटें, चांगलें-वाईट (**सार + असार**).]

तयांचा सारोधारु ॥ आतां आईक तुं ॥ भा. प. ६९५

सार(णें) क्रि. ढकलणें, लोटणें, पुढें करणें, संपवणें, उरकणें. To move in or aside, to remove, to despatch.
[सं. **सारयति**; सृ १ गतौ (णिच्), पा. **सारेति**; प्रा. **सारेइ**; का. **सारॅं** (गोळा करणें); हिं. **सार्ना**; सिं. **सारणु** (तुलना करणें); बं. **सारा** (पार पाडणें); ओ. **सारिबा**; अकाम. **सारण** = १ करंजी वगैरे पक्वान्नांत घालावयाचा मसाला, पुरण, २ पाट, कालवा; **सारक** = चक्र, जुलाब.]

द्विजीं सारलीं संध्यावंदनें शोडषोपचारीं देवतापूजनें ॥
नरुस्व. ४७८.

सारखा वि. सदृश, समसमान, तुल्य, सपाट. Similar, like, equal, even.
[सं. **सदृक्ष, सदृश**; प्रा. **सरिक्ख, सारिक्ख, सरिच्छ**; हिं. **सरीखा**; याकाम. **सारिख**; अकाम. **सरसा.**]

तेंही प्रश्नेसारिखें चरणीं । निवेदीन परिसिजे ॥
मु. आदिपर्व. ४-४९

तया मुखाचें पांता सारिखेः लाजा चंद हिंवाचा
होउनि उपेखे ॥ नरुस्व. ९१

सारंग पुं. संगीतांतील एक राग, भ्रमर, चित्रविचित्र रंगाचा हरण, मोर. A *raga* or mode of a music, an antelope.
[सं. **सारंग, √ रञ्ज्, सारंगी** = वाद्यविशेष.]

सारंग पु. खलाशी, नावाडी, (सैन्य) अधिकार. A sailor.
[फा. **सारंग** = सैन्यांतील अधिकारी.]

सारजा स्त्री. स्त्रीनामविशेष, शारदा, विद्यादेवी. The name of a female.
[सं. **शारदा**; प्रा. **सारया.**]

सारथी पुं. रथ चालविणारा–हांकणारा, गाडीवान. The driver of a chariot or a car.
[सं. **सारथिन् < स + रथ < रंह** = वेग.]

सारमेय पुं. न. कुत्रा. A dog.
[सं. **सरमा** नांवाची एक कुत्री वैदिक काळांत होती. तिची प्रजा म्हणून सारमेय.]

सारव(णें) सक्रि. शेणपाणी मिसळून जमीन चोपडणें. Smearing with cowdung.

[१ कान. **सारणें**, **सारवणें** = शेण लावणें. **सारिसु** = चोपडणें, मऊ करणें ; २ सं. **समास्वन** (?); प्रा. **सारवण**, ३ **सार + वन** (**सार** = चांगलें, **वन** = पाणी). परंतु वरील द्राविडी मूळच अधिक सयुक्तिक आहे.]

सारस पुं. पक्षिविशेष, चक्रवाक, कमल. A kind of bird, a lotus.

[सं. **सरस्.**]

सारस्वत न. वि. वाङ्मय, साहित्य (सरस्वतीसंबंधीं). Literature.

[सं. **सरस्वती** < **सरस् + वत्.**]

सारा वि. सगळा, पूर्ण, पुरा. Whole, complete.

[सं. **सर्व** ह्या शब्दापासून उत्पन्न झाला असें ब्लोक म्हणतो. का. **सोरु** ; कु. **सारो** (कठीण); बं. हिं. पं. लां. **सारा** ; सिं. **सारो** ; गु. **सारूँ.**]

जे सारा अखरांची गोसावीणी: रूपें पुरवी कंदर्पाची आइणि ॥ नरुस्व. १९५.

सारा पुं. जमिनीवरील कर, खंड, भाडें. The land-cess, rent.

[अर. **साईर्** ; पेकाम. **सायरु.**]

सारा पुं. डोळयांतील एक रोग, पापुद्रा. An eye-disease.

सारीपाट पुं. सोंगट्याच्या खेळांतील पट. The cloth or board in the game of draughts.

[म. **सारी**–सोंगट्या खेळणारा.]

सारी खेळतां अस्करूं । निकरेंहि भांडो ॥ ज्ञा. ११-५४८

सारोख पुं. पत, अब्रू, लौकिक, शहाणपणा. Credit, name, repute.

[सं. ? ; याकाम. **सारोख.**]

महाभूतांचे सारोख सरले होती ॥ ज्ञा. १५-९८.

सार्थ पुं. व्यापाऱ्यांचा संघ, समूह. A company of traders.

[सं. **सार्थ.**]

[**स** हा अवयव ‘ सह ’ ह्या अर्थी प्रथम येऊन सिद्ध झालेले कांहीं शब्द. **सार्थ** (**स + अर्थ**, √ऋच्छति एनम्) = अर्थासह, सफल, **सार्थक** = कृतकृत्य ; **सार्थक्य** सफलता ; **सार्द्र** = ओलें ; **सार्ध** = अर्ध्यासह.]

सार्वत्रिक वि. जिकडे तिकडे–सर्वत्र असलेलें. Everywhere.

साल न. वर्ष, सन, (लक्षणा) वर्षाचें वेतन. Year, (fig.) yearly income.

[फा. **साल्** ; अकामसा. **सालदरसाल**, **साल ब साल**, **सालोसाल** = दरवर्षी, **सालमजकूर** = चालू साल. **सालहाल**, **सालीना** (फा. **सालियाना**) = वर्षाकाठीं. **सालाबाद** (फा. साल् बअद्).]

साल स्त्री. (झाडाचें) आवरण. त्वचा (झाडाची), कातडें, बारीक त्वचा, फोल, टरफल. The skin of a tree, the cover.

[सं. **क्षद्**, **स्खद्**, **छल्ली** ; पा. **छल्ली** ; प्रा. **छल्ली** ; देप्रा. **छल्ली** (त्वक्) ; बं. **छाल** ; ओ. **छाल** ; हिं. **छाल**, **छाला** (१२०-८) ; सिं. **छिल** ; गु. **छाल** ; (कान. **छल्ली**) ; अकामसा. **सालपट.**]

सालज्बाब पुं. प्रश्न–उत्तर, वाटाघाट. Question and answer correspondence.

[फा. **सवाल् + जबाब.**]

सालंमिश्री स्त्री. औषधिविशेष. A kind of medicine.

[अर. **सालबि + मिस्री.**]

सालस वि. नम्र, सज्जन, गरीब. Modest, humble.

[अर. **सलिस.**]

साला पुं. मेव्हणा, बायकोचा भाऊ. Wife’s brother.

[सं **स्याल** ; पा. **सलको** ; प्रा. **साला**, **शियाल** (पुं.) ; कु. **सालो** ; बं. **साला** ; ओ. **साळा** ; हिं. पं. **साला** ; लां. **साळा** ; सिं. **सालो** ; गु. **साळो.** ‘**साला**, **साली**’ हे अपशब्द परभाषेंतून आलेत काय ? .]

साली स्त्री. बायकोची धाकटी बहीण. Wife’s sister.

[सं. **स्याली**, **श्याली**, **स्यालिका** ; प्रा. **साली**, **सालीआ** ; का. **साल** ; कु. **साली** ; बं. **सालि** ; ओ. **साळी** ; हिं. **साली** ; लां. **साळी** ; सिं. **सालि** ; गु. **साळी.**]

साव वि. चांगला, प्रामाणिक. Honest, good.

[सं. **साधु** ; प्रा. **साहु** ; पं. **साऊ** ; हिं. **साहू** ; गु. **साहु**, **साऊ** ; सिं. **साहू** ; का. **सोवं** (क).]

सांव पुं. व्यापारी, सावकार, पेढीवाला. A trader, a banker.
[सं. सार्थः (?); साहु, < सं. साधु. 'साहुकार' असें प्राचीन रूप आढळतें.]

सांव स्त्री. नाडी, शीर (अनेकवचनी प्रयोग). A vessel.
[सं. स्नायु ; प्रा. ण्हारु, ण्हाउ ; पा. नहार, आणि सिंह. नहरय, ह्या दोन रूपांत विकृति निराळ्या प्रकारानें झाली आहे.]

सावकार पुं. श्रीमंत मनुष्य, पैसे कर्जाऊ देणारा. A rich monied man, a creditor.
[सं. सार्थकार ; प्रा. साहुकार (साधुकार ?).]

सावकाश पुं. अ. स्वस्थता, आराम, शांतपणें, स्वस्थपणें, घाई न करतां. Ease, rest, slowly, softly.
[सं. स + अवकाश , अव + √ काश्.]

सावचित्त वि. अ. लक्ष ठेवून, दक्ष, हुशार. Attentive, careful, with attention.
[सं. स + अव + चित्त , √ चित्.]

सावज न. शिकारीचें जनावर, श्वापद. A wild animal (to be hunted).
[सं. श्वापद, (श्वा + पद = कुत्र्याप्रमाणें पाय असलेलें). ही पारंपरिक व्युत्पत्ति आहे ही पटत नाहीं].

सावट न. सावली, सावलींतील जागा. A shady spot, shadiness.
[सं. छायावट. सावली पहा]

सावड(णें) सक्रि. गोळा करणें, सारखें करणें, सांचविणें, सारवणें. To collect or gather together.
[सं. सम् + आ + वृत् १ वर्तने (णिच्), समावर्तय ; अकाम. सांवडणें.]

सावत्र वि. सापत्न. Having the sentiment or relation like that of a co-wife.
[सं. सापत्न्य ; प्रा. सावत्त. सापत्न्य हें मूळ पटत नाहीं. कांहीं तरी दुसरें मूळ असलें पाहिजे. ' सापत्न्य ' हें मूळ व ही व्युत्पत्ति पारंपरिक दिसते ; ऐतिहासिक नाहीं.]

सावध वि. दक्ष, जागृत, हुशार, शुद्धीवर असलेला. Advertent, attentive, vigilant.
[सं. सावधान, सावधि (ह्यांचें संक्षिप्त रूप.)]

सावधान वि. दक्ष, जागृत. Attentive, advertent.
[सं. स. + अवधान. लग्न मुंज वगैरे कार्यांत मंगलाष्टकाच्या शेवटीं हा शब्द वापरतात. लौकिक अर्थ 'सावध रहा.' असा केला जातो. शुभेच्छादर्शक अर्थ आहे.]

सावधा वि. मर्यादित, परिमित. Limitative.
[सं. स + अवधा, – अवधि ; याकाम. सावधा.]
येकें गुळ उस रसा सावधा : येकें मृगमदासि । नरुस्व. ७८२.

सावधि,–क वि. मर्यादा असलेला , ठराविक, अवकाश असलेलें. That has bound or limit.
[सं. स + अवधि < अव + धा, धी (?).]

सावर(णें) ; सांवर(णें) सक्रि. व्यवस्थित करणें, गोळा करणें, पूर्वस्थितीवर आणणें, तोल सांभाळणें. To gather up or together closely, to recover, to uphold.
[सं. सम् + आ + वृ १० आवरणे.]
सर्वांगीं विकळ विद्याधंरी : आंग सावरे ना ॥ नरुस्व. ६५५

सावली स्त्री. छाया, आश्रय, प्रतिमा. Shadow or shade.
[सं. छाया ; पा. छाया ; प्रा. छाआ, छाहा ; देप्रा. साउली , साहुली, साहुलिआ = वस्त्रांचल, वृक्ष, शाखा (२९२–१) ; छाअडी, छांयडी < छायाधार ; का. छाय ; आ. सॉ ; ओ. छाइ ; हिं. छाह ; पं. ल्हां. छाँ ; सिं. छाव ; गु. छॉइ.]

सावलें, सावळें न. वस्त्र, स्त्रियाचें नेसणें, लुगडें. A female clothing (generally).
[सं. वस्त्रांचल. (?) ; देप्रा. साउली = वस्त्रांचल ; याकाम. साउलें = लुगडें (नरुस्व. ८४२).]

सावळ, झावळ स्त्री. नारळाच्या किंवा ताडाच्या झाडाची मोठी ढापी, झावळी. A large branch of palm.
[सं. शाखा ; पा. साखा ; प्रा. साहा ; देप्रा. साहुली, शाखा (२९२–१) ; सिंह. सा.]

सांवळ(णें) अक्रि. नाहींसें होणें, मावळणें, कमी होणें. To set, to disappear.
[सं. सर्व् १ गतौ किंवा शम् ४ उपशमे – (णिच् कर्मणि) + ल (स्वार्थे).]

सांवळ(णें) अक्रि. काळें पडणें,–होणें, काळवंडणें. To become darkish.
[म. सांवळा (नाधा.) < श्यामल.]

सावळा, सांवळा. वि. काळसर रंगाचा, निमगोरा. Of light complexion, fair.

[सं. **श्यामलः** ; प्रा. **सामल** ; ओ. **साउँला** ; हिं. **साँवला**, **साँवरा** ; पं. **साँवला** ; **साउला** ; सिं. **साँविरो** ; गु. **सामळूँ** ; याकाम. **सांवळा** (नरुस्व. ३२६).]

सावळा गोंधळ पुं. गडबडगुंडा, गुप्त अनाचार. Undecided state, secret evil practices.

[सं. **शांभलिकः गौन्दळ** (राज.) ; म. **सावळें** = स्त्रियांचें लुगडें. त्यासंबंधीं गोंधळ. (?)]

सावा पुं. धान्यविशेष, तांदुळाचा एक प्रकार. A kind of grain.

[सं. **श्यामाकः** ; पा. **सामाको** ; प्रा. **सामाअ** ; बं. **सामा** ; बि. **सामा**, **साँई** ; हिं. **सामा**, **साँवाँ** ; पं. **साँवाक्** ; सिं. **साँआँ** ; ने. **सामा**.]

सावाइ(णें) अक्रि. बोलणें, चांगला संबंध येणें. To talk, to have good connection.

[सं. **सम्** + **वर्ह्** १ परिभाषणे ; याकाम. **सावाइ.**]

सावाय न. मदत. Help.

[सं. **साहाय्य** ; याकाम. **सावाय** (ज्ञा.) ; (नरुस्व.) **सावाव** (ज्ञा) ; अकाम. **सावाय** = मदत करणें, संयुक्त होणें.]

सांवाय स्त्री. सायाळ, साळ. A porcupine.

सावायाचे दिवटे खोलवी । कविता–पुढां ॥ नरुस्व. १२

भारी बहु सावायांचे असिवार : ते चालती मोचे–घसणी ॥
नरुस्व. ७४८

सावास पुं. संगति, सहवास. Company, residence.

[सं. **सहवास** ; याकाम. **सावास**, **सावासिनी**, **सोवासिनी** (नरुस्व. १०३)]

वाजीए खंड सावासिए पढियार : ते राहिले दारवंठां ।
नरुस्व. ३९२

सावित्री स्त्री. गायत्री मंत्र, एक स्त्रीनाम. The holy *Gayatri*, a female name.

[सं. **सावित्री** ; < **सवितृ**, √ **सू** २ सवने.]

साविया वि. सरळ, योग्य, सहज, निसर्गतः योग्य. Straight, proper, easy, natural.

[सं. **सव्य** ; प्रा. **सव्व** ; याकाम. **साविया** ; अकाम. **सवें.**]

सीतेपासौनी साविया सुंदरी : सूर्याची कन्या काळंदी कुमरी ॥
नरुस्व. ३३७

जें अमृतही परि नावडे । ऐसें सावियाचि आरोचकु जैं पडे ॥
ज्ञा. ४–१९७.

सावेव वि. साकार, सावयव, सांग, पूर्ण. That has a form.

तिया मदनांचा गोसांवी लाचाविला : सावेव अनंगु जिववला ॥ नरुस्व. १०१

मज पाहतां सावेव । शांतिचि ते ॥ ६–६५५

साशंक वि. शंका घेणारा, विश्वास नसलेला. Timid, fearful, apprehensive.

[सं. **स** + **आशंका** < **आ** + **शंका.**]

साष्टांग वि. आठ अंगांसह, सपशेल. With the eight parts of the body.

[सं. **स** + **अष्ट** + **अंग.**]

सास वि. सत्य, खरें. True, real.

[सं. **सत्य** ; प्रा. **सच** ; याकाम. **सास.**]

सप्नीचे सुष सास करील ॥ उषा. १२.

सांस(णें) अक्रि. सांठणें, गोठण, गोठण्यामुळें आकसणें. To gather together, to congeal.

[सं. **स** + **चि** ५ संचये ; शिकाम. **सासी** (तुकाराम).]

सांसन(णें) क्रि. विभक्त होणें ; वांटलें जाणें To divide, to separate.

[सं. **सन्** १ विभजने (अभ्यास).]

तरि बद्धमूलें अज्ञानें । महदादिकीं सासनें ।
वेदचि थोरवणें । घेउनियां ॥ ज्ञा. १५-१४६. ११-११.

सांस(सी)न(णें) क्रि. पिकणें, बहरणें. To blossom, to reap.

तेणें तोखें सदाफळें झाडें : वनश्री सांसिनली चहूकडें ॥
नरुस्व. ७७४

सासप(णें) सक्रि. चांचपणें, स्पर्शणें, हळूहळूं स्पर्श करून पहाणें. To feel, to touch.

[सं. **सम्** + **स्पृश्** ६ संस्पर्शने.]

सासर न. सासऱ्याचें घर. The house of the father-in-law.

[सं. **श्वाशुर** ; प्रा. **सासुर** ; याकाम. **सासुरें** (नरूस्व. २०३).]

सासरा पुं. पतीचा अगर पत्नीचा पिता. The father of the wife or husband, father-in-law.

[सं. श्वशुरः; पा. प्रा. ससुर; रो. सस्त्रो, शस्त्रो, सश्त्रो (पुं.); श. शाइऊर; का. हिहुर, हिहिरु; कु. ससुर; बं. ससर; ओ. ससुर; हिं. ससुर्, सुसर्, सुस्रा; पं. सहुरा; सिं. सहुरो; गु. सस्रो; सिंह. हूरा (मेव्हणा); अकामसा. सासर, सासुरवाडी. सासू पहा.]

सासू स्त्री. पतीची अथवा पत्नीची माता. The mother of the wife or husband, mother-in-law.

[सं. श्वश्रूः; पा. प्रा. सस्सू; का. हाश्; कु. सासू; अ. स्साहु; बं. सासुरी; ओ. सासु; हिं. सास्; सासू, पं. ल्हां. सस्स; सिं. ससु; गु. सासु; ने. सासु; सिंह. सुहुल्. (आर्यांच्या प्रथम वसाहतकर्मांच्या वेळीं 'कुऱ्यां'वर देखरेख करणारी स्त्री अशी व्युत्पत्ति राजवाडे देतात, ती चिन्त्य आहे. 'श्वन्' शब्दाशीं संबंध आहे.]

सांसारिक वि. संसारासंबंधीं. Pertaining to life or existence.

सांस्थानिक पुं. वि. संस्थानासंबंधीं, राजा. Pertaining to state, king of a state.

साहंकार वि. गर्विष्ठ. Proud, boastful.

साहचर्य न. बरोबर असणें, संगत. Company, association.

साहजिक वि. सहज, सुलभ, तात्काल. Easily.

सासिन(णें) अक्रि. उत्तम भिजणें, बहरणें. To become, to reap, to be wet.

[सं. सम् + आ + सिन्व् १ सेचने; प्रा. सासन्न; याकाम. सासीन (नरूस्व. ७७४.)]

तुमचेया दिठीवेयाचिये खोले। सांसिन्नले प्रसन्नतेचे मळे।
ते साउली देखौनि लोले। श्रांत जो मी ॥ ज्ञा. ९-४.

साह(णें) सक्रि. सोसणें, चालू देणें. To endure, to allow, to continue.

[सं. सहते; पा. सहति; प्रा. सहइ; का. सहूँ; कु. सहणो; आ. स्सहिब; बं. सहा; ओ. सहिबा; हिं. सहना; पं. सहिणा; सिं. सहणु; गु. सह्वूँ; याकाम. साहणें.]

साहस न. विचाराविना केलेलें काम, धैर्याचें कृत्य, धाडस. An adventure.

[सं. साहस (√ सह् १ सहने); प्रा. साहस.]

साहाण न. सैन्य. Army.

[सं. सेना, सैन्य; साहाणी = सैन्याचा नेता; याकाम. साहाण.]

कीं तें अनंगाचें पाळाणलें साहाणः त्रिनेत्रावरी ॥ नरूस्व. ७३६

साहाय्य न. मदत. Help, assistance.

[सं. साहाय्य, √ सह + अय् १ गतौ; शिकाम. साहे.]

साहित्य न. सामानसुमान, सामग्री, मदत, उत्तम वाङ्मय. Materials, instruments kept ready for products, apparatus, literature.

[सं. सहित, सह + √ इ २ गतौ.]

साहेब पुं. अधिकारी, मालक, धनी. A lord or master (used especially of an Englishman).

[अर. साहिब्; शिकामसा. साहेबजादा < अर. साहिब् + ज्ञादा = साहेबाचा मुलगा, सरदाराचा पुत्र; साहेबीण = अधिकारी स्त्री, अधिकाऱ्याची स्त्री, साहेबाची पत्नी, बडी सुलताना.]

साहोत्रा पुं. एक शेंकड्यावरील व्याजाचा दर-सहा प्रमाणें होणारें व्याज, उत्पन्नांतील दरशेंकडा सहा प्रमाणें घ्यावयाचा हक्क, कर. Interest at the rate of six per cent, the right of receiving six in hundred.

[सं. षट्र, सहा + त्र = सहावा हिस्सा-'कर' किंवा तो कर घेण्याचा हक्क. उत्पन्नाचा सहावा भाग राजाला देत असत. अठराव्या शतकांत हा हक्क पंत सचिवाचा असे.]

साह्य न. मदत, साहाय्य पहा. Help, assistance.

साळ, शाळा स्त्री. कारखाना, घर, विद्या शिकण्याचें ठिकाण. A school, a workshop.

[सं. शाला; पा. प्रा. साला; याकाम. साळा (नरूस्व. २५७); का. हाळ; बं. साल्; ओ. साळ; बि. हिं. सार् (गोठा); हिं. साल (घर, दिवाणखाना); सिंह. साल्, हाल् (बाजार); अकामसा. धर्मशाळा, टांकसाळ.]

साळकाई स्त्री. स्त्रियासंबंधीं निन्दार्थी शब्द. A word of contempt used for a female.

[म. **साळू** = पक्षिविशेष. (सं. **सारीका**; देप्रा. **साळंकी**); कान. **साळुव** = पक्षिविशेष ; अकाम. **साळकाई–म्हाळकाई** = कोणीहि सामान्य बाई (कुत्सितार्थें).]

साळ स्त्री. भात,तांदुळ. Uncleaned rice.
[सं. **शाली** ; प्रा. **सालि** ; गु. **साळियु**, **साळ** ; हिं. **साली** ; सिंह. **इली**, **ॲल** ; याकाम. **साळी** ; (नरुस्व. ७४९).]

साळी स्त्री. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. **शालः** ; पा. प्रा. **साल** ; अ. **रसाल** ; बं. **साल** ; ओ. **साळ** ; हिं. पं. **साल** ; ने. **साल**.]

साळ, साळी स्त्री. पक्षिविशेष. A porcupine.
[सं. **शल्य** (?); **सल्लकी** ; देप्रा. **सालहिआ** , **सालही** ; याकाम. **साळें** (नरुस्व. ५९५), **साळैया** (नरुस्व. ८२६).]

साळुंकी,-खी स्त्री. पक्षिविशेष. A kind of bird.
[सं. **सारिका** ? ; देप्रा. **साळंकी** (= सारिका, मैना) ; कान. **साळुव** = पक्षिविशेष ; याकाम. **साळैया** (नरुस्व. ८२६). अकाम. **साळू** .]

साळ(णें) क्रि. तासणें, छाटणें, सोलणें, साफ करणें. तोडणें. To pare, to shave, to chip off.
[सं. **शो** ४ अवयवे (णिच्) ; हिं. **छाला** ; अकाम. **साळणी** = कापणी , छाटणी.]

साळुता पुं. केरसुणी. A broom.
[सं. **शल्** १ चलने (णिच्).]

साक्ष, साक्षी वि. स्त्री. डोळयांसमोर घडलेलें. पुरावा, डोळयानें पाहाणाऱ्याचें सांगणें, अनुभव. That happened in our presence, evidence before our eyes.
[सं. **स+अक्षिन्**.]

साक्षर वि. लिहिणें वाचणें समजणारा, शिकणारा. Literate.
[सं. **स + अक्षर, < अ + क्षर**.]

साक्षात् अ. पुढें, समोर, उघडपणें. In front of, distinctly.
[सं. **साक्षात्**.]

साक्षात्कार पुं. प्रत्यक्ष अनुभव, ईश्वरदर्शन. Experiencing peculiar about God.
[सं. + **साक्षात् + कार, √ कृ**.]

साक्षेप पुं. आस्था, काळजी, नेट. Strong bent, care.
[सं. **स + आ + क्षेप**, **साक्षेपी** – आस्थेवाईक, **साक्षेप** – मुद्दाम. **क्षेप < क्षिप्** ४ क्षेपणे.]

सिकार पुं. सुरतोपभोग, विषयसुख. Sex-enjoyment,
[सं. **सीत्कार** ;प्रा. **सिक्कार** ; याकाम. **सिकार** (नरुस्व. ७९४).]

सिकेकाई स्त्री. वनस्पतिविशेष, केंस स्वच्छ करण्यासाठीं साबणासारखीं ह्याचीं बोंडें वापरतात. A kind of plant and its seeds.
[कान. **सिके + काई** (**सिगे** – हें वनस्पतीचें नांव).]

सिंच(णें) सक्रि. शिंपडणें, सेचणें. To sprinkle.
[सं. **सिच्** ६ क्षरणे , सेचने ; प्रा. **सिंच** ; पं. **सिंजणा** ; गु. **सिंचवूँ** ; हिं. **सिंचना** , **सींचना**.]

सिण(णें) अक्रि. श्रांत होणें, दुःखी होणें, थकणें. To be tired or exhausted.
[सं. **क्षीण** ; प्रा. **खीण** ; अकाम. **सिण** (नरूस्व. ४०२) ; अकाम. **शिण(णें)**.]

1**सित, सीत** न. धनुष्याची दोरी. Bow-string.
[सं. **सिक्थ** (?) ; प्रा. **सित्थ** ; देप्रा. **सित्था** लाला जीवन (२९२-६) ;]

2**सित, सीत** न. शीत, भाताचा लहान कण. A grain of boiled rice.
[सं. **सिक्थ** (?) ; प्रा. **सित्थ** ; याकाम. **सित** (नरूस्व. १९९).]

3**सित, सीत** वि. पांढरें, शुभ्र. White.
[सं. **सित**, **सितोपल**. = खडी साखर (< **सित + उपल**).]

सिताफळ न. फळविशेष. A kind of fruit.
[सं. **शीतफलम्** (?) हें फळ मूळ अमेरिकेंतील आहे असें म्हणतात.]

सितारा पुं. तारका, नशीब, प्रारब्ध. A star, fate, luck.
[फा. **सितारा**.]

सिद(णें) क्रि. छेदणें, कापणें. To cut, to chop.
[सं. **छिद्** ६ अवयवे.]
देहहि सिदतां तया। काय खेदु होईल॥ ज्ञा. १८-६४३.

सिद्ध(णें) अक्रि. संपविणें, सिद्ध करणें. To make ready, to finish.
[सं. सिध् ४ संराद्धौ.]

इहीं कामक्रोधलोभेसीं । कार्यें सिद्धति तैसीं ।
म्हणौनि ठावोच्चि पूसीं । येयांचा गा । ज्ञा. १६-४३४.
तुल्दाइयां वैलां सिद्धवै– (पाटण शिलालेख, सन १२०४).

'सिद्ध वि.पु. तयार, पूर्ण, पक्व, प्रत्यक्ष, देवयोनिविशेष, साधु. Accomplished, complete, cooked, proved, a saint, a semi-divine being.
[सं. सिद्ध (निष्ठा, √ सिध् ४); अकामसा. सिद्धि = दैवी शक्ति, अतिमानुष शक्ति. सिद्धांत = मत, तत्त्व, निर्णय.]

सिन्नसाळ वि. क्षणिक, जीर्ण. Temporary, ephemeral, old.
[सं. शीर्णशाल, √ शृ ; प्रा. सिन्नसाल.]

भवईचीं पडळें । वोमथतीं शिनसाळें ॥ ज्ञा. १६-५६०.

सिनळ वि. जारिणी, वाईट चालीची (स्त्री). An adulterous woman.
[सं. छिन्न (?); देप्रा. छिण्णो तथा छिन्नालो जारः, छिण्णा छिण्णाली स्त्रीत्यपि (१२१-१२); हिं. पं. गु. छिनाल ; अकाम. शिंदळ, शिन्नल, छिनाल.]

सिनान वि. निराळा, भिन्न, वेगळा. Different, separate.
[सं. छिन्न (?), √ छिद् ६ छेदने ; पं. छिन्न ; हिं. छीन ; का. छेन् ; गु. सिं. छिन ; रुमा. चिन् = ओढून काढणें, फाडणें ; सिंह. सून् ; अकाम. सिना, सीन.]

सिनीवाली स्त्री. अमावास्या. The *amavasya* day.
[वे. सं. सिनीवाली, वेदामध्यें राका आणि सिनीवाली असे दोन शब्द अनुक्रमें पूर्णिमा व अमावास्या ह्या अर्थीं आहेत. त्या त्या दिवसाचीं दैवतें होत.]

सिंतर(णें) अक्रि. फसविणें, ठकविणें. To deceive, to cheat.
[सं. सिध् १ हिंसायाम्; याकाम. सिंतर (नरुस्व. १५९).]

सिंथ(णें) सक्रि. मारणें, ताडणें. To beat, to strike.
[सं. सिध् १ हिंसायाम्; याकाम. सिंथ, सिंत (नरुस्व. ४८३.]

तेया द्वेषाचेनि कालकूटें । बासठति तिखटें ।
कुबोलाचिं सदटें । सिंथिति कांटें । ज्ञा. १६-४०२

सिंदी स्त्री. वृक्षविशेष. A kind of tree.
[सं. (?); देप्रा. सिंदी = खजूरी, सिन्द तथा सिन्दोली खर्जूरी (२८४-३).]

सिंधु पुं. सिंधुनद, समुद्र. The river Indus, a sea (generally).
[सं. सिंधु ; सामान्यीकरण होऊन 'समुद्र' असा अर्थ झाला.]

सिंप(णें) अक्रि. शिंपडणें, सिंचन करणें. To sprinkle.
[सं. सिच् ६ सेचने ; याकाम. सिंप (नरुस्व. ८४७), सिंपणारें – पिचकारी (नरुस्व. ७६१); अकाम. शिंप, शिंचणें पहा.]

सिय न. शीत, हींव, थंडी. Cold.
[सं. शीत ; प्रा. सीअ ; याकाम. सिय (नरुस्व. ४३८), सीयाली (शीतकाल) = थंडीचे दिवस ; अकाम. शीत.]

सियारी स्त्री. डांकीण, चेटुक. A sorceress.
[अर. साइर = चेटकी (?) किंवा सं. शृंगाली (?)]

म्हणे काम सांगुन ऐकेल । हे आशा सियारी देखैल ॥
ज्ञा. १३-५०४.

सियालुं न. कोल्हा. A jackal.
[सं. शृगाल ; पा. सिगालो, सिंगालो ; प्रा. सिअल ; का. शाल ; कु. स्याल ; आ. त्सियाल ; बं. सियाल ; ओ. सिअळ ; हिं. सियाल ; गु. सियाळ.]

सियाळ स्त्री. साल, आवरण. Skin, a cover.
[सं. छाल, छियाल, √ च्छद् – आवरणे ; याकाम. सियाळ.]

तेचि स्वयेंभु सियाळी । वेढीजताती । शिशु. २७६.

सिराणी स्त्री. आवड. शिराणी पहा. Liking.

आनंदाची दिवाळी सनी । जेयांचेयां दर्शनाची सिराणी । शिशु. १०.

सिरियाळ(णें) अक्रि. गुढघ्यांत मान लपविणें. To hide the face behind the knee.
[सं. शिरोलापनम् (√ ली – णिच्).]

सिलसिला पुं. संबंध, योजना, व्यवस्था, तजवीज. Connection, relation, arrangement.
[फा. सिलसिलाह्.]

सिलिक स्त्री. वात, पेट. Wick, ignition.
[अर. **शल्क**; सं. **शलाका** (?).]

सिले न. हत्यार, शस्त्र. A weapon.
[अर. **सिल्ह**; पेकामसा. **सिलेटोप** = शिरस्त्राण, **सिलेदार** = हत्यारबंद.]

सिंव(णें) सक्रि. तयार करणें. To prepare, to keep ready.
[सं. **श्री** ९ पाके.]

पैं पृथ्वीचा घट्ट कीजे । सवें चि पृथ्वीसि मिले जरि मेलविजे ।
तोचि अग्निसंगें सिंविजे तरि मांगल होये ॥ ज्ञा. ७-६४.

सिवणी स्त्री. गुद आणि गुह्येंद्रिय ह्यांमधील शिवण. The seam-like line between the two privities.
[म. **सिवणें**. **सीव** पहा.]

सिवना न. स्वप्न. A dream.
[सं. **स्वप्न** (पुं) ; प्रा. **सिवण** ; याकाम. **सिवन** ;–**ना**, **सीवण**,–**णा** ; अकाम. **स्वप्न** (न). मराठींत मुक्तेश्वरापर्यंत हा शब्द पुंल्लिंगी वापरलेला आढळतो. अर्वाचीन मराठींत मात्र तो नपुंसकलिंगी झाला आहे.]

दिठीं देखिला **सीवणा** सांगवेना ।
सुतैलें तया माखिती सीसहीना मुरा. ७९.
धायवटें होती सिवनाः तया उपहुडुचि जाला विजना ॥
नरूस्व. ६६६

सिस, सीस न. शीर, डोकें. The head.
[सं. **शीर्ष** ; प्रा. **सिस्स** ; याकाम. **सिस**, **सेस** = मळवट (नरूस्व. ५), **सिसाळी** = डोक्यांची रांग, **सिसफुल** = डोक्यांतील फूल, दागिना.]

पाठी उभे ठाकूनि सुवेळीं ।
प्रतापलंकेश्वराची सिसाळी । ज्ञा. १०-६५३.

सिंह पुं. प्राणिविशेष, हिंस्र प्राणी, राशिविशेष. A lion, a line of the zodiac.
[सं. **सिंह** (हिनस्ति इति सिंहः), √ **हिंस्**, वर्ण–विपर्यय संस्कृतमध्येंच झाला. प्रा. **सिंह** ; याकाम. **सिंहाडा** = सिंहमुखी दगडी कठडा; अकामसा. **सिंहासन** = राजाचें बसावयाचें आसन, तख्त. **सिंहावलोकन** = मागें पाहणें, सिंह जसा मागें पाहातो तसें पाहणें. **सिंहस्थ** = गुरु सिंह-राशींत असण्याचा काल. बारा वर्षांनीं हा काल येतो.]

सिहतखाना पुं. शेतखाना, आरोग्यखातें. A privy, the health department.
[अर्. **सिहत्खाना**.]

सि(श)हाणा वि. हुशार. Clever.
[सं. **विचक्षण** ; प्रा. **विचक्खण** ; याकाम. **सिहाणा**, **सेहाणा**, **सिहाणीव** = शहाणपण ; ग्रामीण. **श्येणा**, **श्येना**.]

सीक स्त्री. शिक्षा. Discipline, punishment, learning.
[सं. **शिक्षा** ; प्रा. **सिक्ख**, **सिक्खा** ; पं. **सिक्खणा** ; हिं. **सिखना**. का. **हेछुन्** ; सिंह. **ह्विक्** = अभ्यास.]

आतां न धारे लावीन सीक ॥ उषा. ५४.

सीग स्त्रीं. माप भरल्यावर वर आलेला भाग, वोसंडून वाहाणारा भाग. शीग पहा. The head, the crown, the apex of the measured corn.

तेथ वीक चढलें श्रीधाराः सिग वाढीनली विकारा ॥
नरूस्व. ७५९.

सीता स्त्री. स्त्रीनाम, रामाची पत्नी. The name of a female, the celebrated Sita, wife of Rama.

सीधा, शीधा, वि. शांत, सरळ. Silent. quiet.
[सं. **सिद्धः** पा. प्रा. **सिद्ध** ; का. **स्योदु** (सरळ); कु. **सिधो** (बावळा) ; बं. ओ. **सिधा** (सरळ) ; हिं. **सीधा** ; पं. लां. **सिद्धा** ; सिं. **सिधो** ; गु. **सिधूँ**. एकाच संस्कृत शब्दापासून अगदीं निराळ्या अर्थाचे शब्द कसे निघाले आहेत ते पहा.]

सीम वि. तिसरा. The third.
[फा. **सिवुम्**. **अव्वल**, **दूम**, **सीम** – **अवल** = पहिला, **दूम** = दुसरा.]

सीमंत पुं. स्त्रियांच्या केसांतील भांग. The sparation or the partition of the hair.
[सं. **सीमन्त**.]

सीमा स्त्री. मर्यादा, हद्द. Boundary, limit, extremity.
[सं. **सीमा** ; अकामसा. **सीमांतपूजन** = गांवाच्या हद्दीवर नवरदेवाची पूजा ; **सीमोल्लंघन** = गांवाच्या हद्दीच्या पलीकडे जाणें, दसऱ्याचा विधि.]

सीमूरें वि. उद्धट. Arrogant.

सीयाळी स्त्री. थंडीचे दिवस. Cold season.
[सं. **शीतकाळ** ; याकाम. **सिय** (नरूस्व. ४३८.).]

सीरगिरी स्त्री. एक प्रकारचें छत्र, आवरण. A kind of cover.
पालव छेत्रें सीरगिरिआ नाहीं तेथ अंतु ॥ धवळे पू. ३४.

सीरणें न. साम्य, बरोबरी. Similarity, resemblance.
कोंवळीक घाली सीरणें । शिरीष पुष्पासीं ॥ भाए. २६

सीलद्री स्त्री. एक प्रकारचें किंमतवान लुगडें. A valuable female garment.
तव सिलद्रिया आणिले अनेक वस्त्रें आळंकारू ॥ धवळे–पू. ७६.

सीलाव(णें) सक्रि. ठेवणें. To keep, to place.
[सं. शील् १० उपधारणे.–शीलापय.]
धाना सीलावितां लागे, खरें खोटें न पाहे (राम.)

सींव स्त्री. मर्यादा, शींव, हद्द. Boundary, limit.
[सं. सीमा.]

सींवकारा पुं. शिंपडणें. Spray.
देइजे कस्तुरिअेचा सींवकारू । शिशु.

सु उप. चांगलें ह्या अर्थी उपसर्ग. An *Upasasga* meaning good, auspicious.
[सं. सु ; प्रा. सु.]

सु(णें) अक्रि. घालणें, शिरणें, रिगणें. To put, in, to thrust, to enter.
[सं. सू ६ प्रेरणे.]
न रिगावें तेथ करणें । तोंडें सुती । ज्ञा. १३·१२४.

¹सुआर पुं. आचारी. A cook.
[सं. सूदकार ; प्रा. सूअआर.]
कीं सुआरासींचि अन्न घरीं, येरां नोहे । ज्ञा. १७-९०

²सुआर पुं. वस्त्रें देणारा. One who distributes clothes.
[सं. सूत्रकर (?) ; याकाम. सुआर.]
सवें हडपु सागळिया सुआरू : देव्हारु–बुडुवा दिवटा वेचकारु ॥ नरूस्व. ६९५.

सुइज(णें), सुज्ज(णें) सक्रि. तयार होणें, शोभणें, प्रवृत्त होणें. To be prepared, to become, to be inclined.
[सं. सू ६ प्रेरणे (कर्मणि); प्रा. सुइजे ; याकाम. सुजणें = शोभणें.]
ते इंद्रायणिही इयेपुढां न सुजे : जे मोलावली म्हणौनि ।
नरुस्व. १९४.

सुई स्त्री. शिवण्याची टोंकदार तार, कपडा शिवण्याची तार, सळई. A needle.
[सं. सूचि ; पा. सूचि, सूचिका ; प्रा. सूई ; देप्रा. सिव्वी, सिव्विसी (सूचि) ; का. सूव (पुं.) ; बं. सुइ ; बिं. हिं. पं. सूई ; गु. साय.]

सुईण स्त्री. स्त्रियांच्या बाळंतपणासंबंधीं कामें करणारी स्त्री. A nurse.
[सं. सु २ प्रसवे.]

¹सुक(णें) क्रि. वाळणें, बारीक होणें, नरमणें, ओलेपणानाहींसा होणें, सुरकुत्या पडणें. To dry, to lose moisture, to shrink.
[सं. शुष्क ; √ शुष् ; पा. सुक्खति ; प्रा. सुक्खइ ; का. होखु ; आ. स्सुकाइब ; बं. सुकान ; ओ. सुखिबा; हिं. सूखना ; पं. सुक्कणा ; लां. सुक्कण; सिं. सुकणु ; गु. सुकावूँ ; कान. सुक्कु = सुरकुत्या पडणें, आखडणें ; हा धातु कानडींत तद्भव असावा. अकामसा. सुकवण = वाळवण, सुकें = वाळलेलें, सुकेळें (सुकें + केळें – वर्णलोप होऊन सुकेळें).]

²सुक(णें) अक्रि. सुखी होणें. To be happy.
[सं. सुख १० तत्क्रियायाम्. परंतु हा शब्द नाम म्हणूनच अधिक वापरांत आहे. " तुझें काय सुक दुखतें ".]

¹सुकट न. सुकलेलें बोंबिल, माशांचे वाळलेले स्नायु. The fish (bombil) dried and preserved.
[सं. शुष्क + ट (?).]

²सुकट वि. बारीक, काटकुळा. Lean, emaciated.
[सं. शुष्कट, (शुष्क + काष्ठ) ; बं. सुक्टीया ; ओ. सुकटा ; हिं. सुक्टा.]

सुकड स्त्री. कस्तुरी. Musk.

सुखड न. सुगंधी लाकूड, चंदन. Sandal.
[सं. सुकाष्ठ.]
सर्वांगें वाहाकाति परिमळें । सुकडिचेनि । ऋ. ७१.

सुकर(णें) सक्रि. शांत करणें. To pacify, to console.
[सं. सम् + कृप् १ कृपायाम्.]
परी गा नीवृत्तीराया । हांतातळीं सुकरीला तुआ ।
ते नीवातांची मी यां । भोगावें की तों ॥
अमृतानुभव (जुनी पोथी) ७७२.

सुका वि. वाळलेला. Dried.
[सं. **शुष्क, शुष्कक**; प्रा. पा. **सुक्ख**; का. **ह्याखु**; आ. **स्सुकान्**; बं. **सुका**; ओ. **सुखिला**; **सुकिला**; हिं. **सूखा**; पंलां. **सुक्का**; सिं. **सुका**; गु. **सुकूँ**.]

सुकाणूं न. गलबताचा कर्ण, विशिष्ट दिशेकडे गति देण्याचें यंत्र, साधन. A rudder or helm.
[अर. **सुक्कान**.]

सुकाळ पुं. चांगला काळ. Prosperous season.

सुकाळीचा, सुकाळ्या वि. एक शिवी, अपशब्द. A term of abuse.
[व्युत्पत्ति अनिश्चित. दुसऱ्याकडून मैथुन करून घेणारा. शब्द द्राविडी असावा काय ?]

सुकृत न. चांगलें कृत्य, पुण्य, सत्कृत्य. A good action.

सूक्तासूक्त चांगलें वाईट, लागू गैरलागू. Good or bad.
[सं. **सुक्त+असूक्त**. ह्याच्या अर्थांत बराच बदल झाला आहे. मूळ वैदिक काळांत ह्याचा अर्थ चांगला मंत्र, वचन; त्यावरून लक्षणेनें भलेंबरें.]

सुख न. आनंद, समाधान, स्वास्थ्य. Joy, satisfaction.
[सं. **सुख**; **सु+खम्** (?).]

सुगंध पुं. चांगला वास, सुवास. A good scent.
[सं. **सुगंध**; संसा. **सुगंधी**=अत्तरें वगैरे विकणारा. 'गंध' शब्द बहुव्रीहि समासांत 'गंधी' होतो.]

सुगरण स्त्री. पाकशास्त्रकुशल स्त्री, सुवासिनी, कुटुंबिनी स्त्री. A housewife, one very skilful in culinary art.
[सं. **सुगृहीणी** अशी व्युत्पत्ति देतात. परंतु ती पटत नाहीं. **सुगरावा** असा ज्ञानेश्वरींत "हुशारी, दक्षता" ह्या अर्थीं एक शब्द आहे. तो मुळाशीं आहे काय?]
जयाचा सुगरावा देखे ॥ ज्ञा. १३-८१२.

सुगी स्त्री. हंगाम, हंगामाची वेळ. मार्च-मे पर्यंतचा काळ, धान्याची समृद्धि. Season, the period of maturity of the corn.
[कान. **सुग्गी**=वसंताचा समय, धान्याच्या मळणीची वेळ.]

सुघट, सुघटित वि. सोपें, चांगलें, चांगल्या आकाराचें. Easy, of good form.
[सं. **सु+घट्**; याकाम. **सुघट** (ज्ञा. ७-५५).]

सुघड वि. सोपें, स्वच्छ, सरळ. Easy, clear, straight.
[सं. **सुघट**; देप्रा. **सुग्घड**; याकाम. **सुघड**=कुशल, निपुण (नरूस्व. ३४५.); हिं. **सुघड, सुघर**; सिं. **सुघरु**=शहाणा.]

सुंकलें न. नाककानांतील क्षुद्र दागिना. A tiny ornament.
[सं. **शृंखला** (?); मराठींत लिंगभेद झाल्यामुळें व्युत्पत्ति संशयास्पद वाटते.]

सुंग(णें) क्रि. हुंगणें, वास घेणें. To smell.
[सं **शिंघति**; **शृंखति**; पा. **सिंघति**; देप्रा. **सुंघिअ**; कु. **सुङ्णो**; आ. **स्सुणिब**; बं. **सुगा**; ओ. **सुंघिबा**; हिं. **सूंघणा**; पं. **सुङ्घणा**; लां. **सिंघण**; सिं. **सिंघणु**; गु. **सूँघवूँ**; ने. **सुङ्नु**.]

सुच(णें) क्रि. मनांत येणें, विचारांत येणें, आठवणें. To think, to remember, to brood over.
[सं. **शुध्यति** (स्पष्ट होणें); पा. **सुज्झति**; प्रा. **सुज्झइ**; **सम्+ऊह्** १ वितर्के (कर्मणि),-**समुह्य**; का. **सोझरु**; आ. **स्सुशिब**; बं. **सुझा**; ओ. **सुझिबा**; पं. **सुज्झणा**; सिं. **सुझणु**; गु. **सूजवूँ**; याकाम. **सुझणें**.]
किंबहुना सुझे । स्वर्गवरी ॥ ज्ञा. १४-१५६.]

सुज(णें) क्रि. वाढणें, फुगणें, चिडणें, सूज येणें. शोभणें. To swell.
[सं. **शूयते** (**शू, श्वा, श्वि** १ वृद्धौ), **शौथ** (?); पा. **सूनो** (<सं. **शूनः**); प्रा. **सूण, सूअ**; याकाम. **सूज** (नरुस्व. १९४); का. **होनु**; हिं. **सूजना**; पं. **सूज्जणा**; लहां. **सूज्जण**; सिं. **सूजणु**; गु. **सूजवूँ**; ने. **सूज्नु**; अकाम. **सूज**,=फुगीर भाग, वाढ.]

सुज(णें) अक्रि. जाणें, खोळंबणें (रू.). To be delayed.
[सं. **श्वज्**-गतौ.]

सुझ(णें) सक्रि. सुचणें, समजणें, कळणें. To suggest, to understand.
[सं. **सूचणें** पहा. सं. **सम्+बुध्य**; याकाम. **सुजणें**, **सुझणें** (ज्ञा. १३-८७, १८-१८४)

सुट(णें) अक्रि. मुक्त होणें. To be released, to become free or loose.

[सं. छोव्य (णिच्), चुट्, छुट् ६ छेदने, श्वठ् १ शैथिल्ये; देप्रा. छुट्ट, छुव्य; प्रा. छुट्टो, छुट्ट; बं. छुटा; ओ. छुटिबा; हिं. छूँटना; पं. छुट्टणा; गु. छुटवूँ; ने. छुटनु.]

सुटका स्त्री. मुक्तता. Release, liberation.

[देप्रा. छुट्टक्का < छुट्ट; हिं. पं. छुट्कारा; सिं. गु. छट्कारो; गु. छुट्को. सुटणें पहा.]

सुटी स्त्री. रजा, मोकळीक, मुक्तता. Leave, liberty, remission.

[म. सुट(णें) पहा. आ. सुटी; बं. ओ. छुटि; हिं. पं. छुट्टि; सिं. गु. छुटी, ने. छुट्टि.]

सुडकें न. जुनें धोतर, -लुगडें, फाटकें वस्त्र, पटकूर. An old dhotee or sari, a rag.

[सं. सम् + उत् + +अञ्चलम्, √ अञ्च्.]

सुडावणी स्त्री. चेतना, क्षुब्धता, जाग, गर्जना, ध्वनि (ल.). Excitement, awaking sound.

[सं. सूद् १ चेतनायाम्, (णिच्) सूदय, सूदापय (M. Williams).]

सुणें न. कुत्रें. A dog.

[सं. शुनक, श्वन्; पा. सुनक; प्रा. शुणह, सुणअ; हिं. सूना; का. हुन् (नु); याकाम. सुणें (ज्ञा. १६-३४५).]

सुंठ स्त्री. वाळलेलें आलें, वनस्पतिविशेष. Ginger.

[सं. शुण्ठि; प्रा. सुण्ठी; कु. सुँठो; बं. सुंठ; ओ. सुंठि; हिं. सूंठ, सोठँ; पं. सुण्ढ; सिं. सुंढि; गु. सुंठ; कान. सुण्डे = वनस्पतिविशेष; अकामसा. सुंठवडा (< शुंठिवटि), सुंठगुळ. आलें मलबारांत फार चांगलें पिकतें. मल्याळ इंचि, इंचिवेर = ओलें आलें; इंची पासून सिंचि, चिंचि असें रूप होऊन कानडीमध्यें सुंडी असें झालें. ह्यापासून मराठी 'सुंठ' निघाला. सं. 'शृंगवेर' हें नंतरचें संस्कृतीकरण होय. अरबी रूप झिंझी असें झालें आणि त्यापासून 'जिंजर' हा शब्द निघाला. अरबी लोकांनीं ह्याचा संबंध झांझीबारशीं लावला.]

सुत पुं. मुलगा, पुत्र. A son, a boy.
[सं. सुतः √ सु २ प्रसवे.]

सुत, सूत न. धागा, दोरा. A thread.

[सं. सूत्रम्; प्रा. सुत्त; अकामसा. सुतपुतळी = कापसाची बाहुली; सुताडा = जाड लुगडें. सूत पहा.]

सुत(णें) अक्रि. निजणें, गाढ झोंपणें. To sleep.

[सं. शस्; सस् १ निद्रायाम्, याकाम. सुत (ज्ञा. ५-१४८)'; परंतु सं. सुप्त; प्रा. सुत्त ही व्युत्पत्ति प्रशस्य.]

ते आहार नव्हति घेतले । व्याधिव्याल सुतले ।
ते चेववावेया घातले । पोटा माझि ॥ रा. ज्ञा. १७-१४९.
चांदिणेयाचां अवसरीं : सुतली ते । नरुस्व. ५७८.

सुतक न. अशौच, अशुद्धि, कुटुंबांतील एखाद्या व्यक्तीच्या मृत्यूनंतरचें अशौच. Impurity arising through the death of a member in the family.

[सं. सूतक; प्रा. सूअय; सूअग; सू २ प्रसवे. ह्या शब्दाचा अर्थभ्रंश चिन्त्य आहे. मूळ अर्थ जन्माशौच परंतु नंतर मृताशौच असा अर्थ झाला. सुतक आणि सोयेर हे दोन्ही शब्द एकाच धातूपासून व्युत्पाद्य आहेत, परंतु रूढार्थ मात्र अगदीं विरुद्ध झाले.]

सुतरनाल स्त्री. उंटावरून मारावयाची तोफ, बंदुख. A gun carried on a camel.

[फा. शतुर्नाल; शुतर = उंट; सुतरस्वार = सांडणीस्वार.]

सुतळी स्त्री. दोरी. Twine, pack-thread.

[सं. सूत्र + ल; प्रा. सूत्त + अल्ल; कु. सुत्लो; हिं. सुतली; ओ. सुतुली; बि. सुत्ली; गु. सुत्ळी.]

सुताडा पुं. जाडें भरडें कापड, लुगडें.

[सं. सूत्र, 'ड' हा मराठी प्रत्यय.]

सुतार पुं. एक कारु-लांकडावर काम करणारा. A carpenter.

[सं. सूत्रधार, सूत्रकार; प्रा. सुत्तआर.]

सूतोवाच सूतौवाच, न. आरंभ, बोलण्यास सुरुवात. Beginning.

[सं. सूत + उवाच. सूत = पौराणिक. महाभारत व पुराणें सूतानें ऋषींना सांगितलीं अशी परंपराप्राप्त समजूत आहे. प्रत्येक पुराणकथनाच्या आरंभीं सूत शौनकाप्रत सांगतो असें विधान असतें.]

सुत्ताले पुं. भिंत, तट, देवळाभोंवतालचा प्राकार. A wall, a fortification, a rampart around a temple.

[कान. **सुत्तु** (?) + **आलय** ; याकाम. **सुत्ताले** (श्रवण बेळगोळचा शिलालेख).]

सुथार(णें) क्रि. सरळ व्यवस्थित करणें, सुधारणें, संकटांतून वाचविणें. To set right, to extricate.

[सं. **सुत्राणम्** , **सु** + **त्रै** ४ पालने.]

सुद(णें), सूद(णें) सक्रि. घालणें. To put in, to thrust.

[सं. **सूद्** १ संस्थापने ; याकाम. **सुत** (ज्ञा. १-२६४.)]

चांदिणेयाच्या अरुवारीं: सुतलीते ॥ नरुस्व. ५७८

सुदामा-सुदामदेव पुं. रोडका, दरिद्री मनुष्य. Lean and emaciated man.

[सं. **सुदामा**–कृष्णाचा सहाध्यायी मित्र. तो फार दरिद्री व रोडका होता, त्यावरून लक्षणा.]

सुदामत अ. सरळ, बिनधोक. नियमितपणें. Well, happily, securely.

[फा. **शुदामद्**.]

सुद्धां अ. देखील, सह. Along with, in spite of.

[सं. **सार्द्धम्**.]

सुधा स्त्री. अमृत. The nectar.

[सं. **सुधा**.]

सुधा स्त्री. चुना. The *chunam*.

सुधा वि. सरळ, प्रामाणिक. Straight, simple, honest.

[सं. **शुद्ध** ; पा. प्रा. **सुद्ध** ; का. **होदु** (स्वच्छ अन्न) ; आ. **त्सुध** (अमिश्रित), **त्सुदा** (साधें); बं. **सुधु**, **सुधा** (ऋण फेडणें); हिं. **सूधा** ; पं. **सुद्धा** ; सिं. **सूधो** ; गु. **सूधूँ**; अकाम. (**साधा**) **सुधा**.]

सुधार(णें) क्रि. सरळ करणें, बरोबर करणें. दुरुस्त करणें. To set right, to reform, to mend, to improve.

[सं. **शुद्ध**, किंवा **सम्** + **उत्** + **धृ** (णिच्) ; अकाम. **सुधारणा**, = दुरुस्ती, व्यवस्थित मांडणी.]

सुधी, सूध स्त्री. जाणीव, समजूत, भान. A (sharp and good) understanding.

[सं. **शुद्धि** ; पा. प्रा. **सुद्धि** ; कु. **सुद्**, **सुध्** ; हिं. **सूध्**, **सुध्** ; सिं. **सुधी** ; गु. **सूध**.]

सुन(णें) क्रि. ऐकणें, लक्ष देणें. To hear, to be attentive.

[सं. **श्रू** ५ श्रवणे; पा. **सुणाति**; अशोक.–**सुणारु**, **सुनेयु**; प्रा. **सुणेदि** ; कु. **सुण्णो** ; आ. **त्सुनिब** ; बं. **सुना** ; ओ. **सुणिबा** ; हिं. **सुन्ना** ; लां **सुणण** ; सिं. **सुणणु** ; गु. **सुणवूं** ; अकामसा. **सुनाविणें**, **सुनावणी**.]

सुना वि. मोकळा, आंत कांहीं नसलेला, रिकामा. Empty, void.

[सं. **शून्य** ; पा. **सुञ्ञो** ; प्रा. **सुण्णा** ; कु. **सुनो** ; हिं. **सून**, **सूना** ; पं. **सुन्न**, **सुन्ना** ; लां. **सुञ्ज**, **सुञ्ञा**; सिं. **सुञो** ; गु. **सूनूँ**; याकाम. **सुना**, **सुणा** (ज्ञा. १७-४१८) = ओसाड, निर्जन (ज्ञा. १८-५५२).]

सुनी पुं. महमदीयांमधील एक पंथ, शिया, सुनी. A sect among the *Muslims*.

[अर. फा. **सुन्नी** < अर. **अहलु-सुन्ना** = सन्मार्गी लोक, परंपरावादी, पहिले चार खलिफ मानणारे.]

सुंता स्त्री. महंमदीयांमधील एक धार्मिक संस्कार, (लिंगावरील त्वचा कापण्याचा विधि.) The circumcision.

[अर **सुन्नत्**.]

सुंदर वि. चांगला, देखणा, रम्य, मनोहर. Beautiful, attractive.

सुदर्शन वि. न. चांगलें दिसणारें, विष्णूचें चक्र. Of goodly looking, the wheel of *Vishnu*.

सु(सू)पवती स्त्री. बिछाना, आसन. Bedding, seat.

[सं. **स्वापवत्**, √ **स्वप्** ; याकाम. **सुप**, **सूप** (शिशु. २५७).]

बोलेया हरिचंदनांचा सेजवटीं:
ज्ञळदाचिये सुपवति वीरवंटी ॥ नरुस्व. ५६६

सुपाणी वि. पाणीदार, तेजस्वी. Lustrous, sparkling.

[सं. **पानीयम्**, √ **पू** ९ पवने.]

रूंप सुपाणी चोख असेः मागां वेणी रुळत दिसे।
नरुस्व. ९८.

सुपारी स्त्री. फलविशेष. Betel-nut.

[सं. (?); पा. प्रा. (?); का. **सुफोरी** ; कु. **सुपारी** ; बं. ओ. **सुपारि** ; बि. हिं. पं. **सुपारी** ; सिं. **सोपारी** ; गु. **सोपारी** ; याकाम. **सुरपोफळी** = सुपारीची एक जात ; **सु + पार** = चांगला आंतील गाभा अशी एक व्युत्पत्ति मोल्स्वर्थ सुचवितो. परंतु ती ग्राह्य नाहीं. हा अन्यदेशीय शब्द आहे कां ? संस्कृत प्राकृत शब्द कोणते ?]

सुपूर्द,-र्त अ. ताब्यांत, हवालीं. In the custody or posession of.

[फा. **सुपूर्द.**]

सुफराट(णें) अक्रि. सुलटें,-सरळ करणें. To set right.

[म. **सुफाराट** (नाधा.), < **सम्** + **उत्** + **परि** + **अट्**, १ गतौ. **उफराट** शब्दाचा प्रतियोगी शब्द.]

सुफळ वि. चांगलें फळ देणारें, फायदेशीर. Profitable, fruitful.

[सं. **सुफलम्.**]

सुफी पुं. प्रेमविषयक वेदान्ताचा महमदीयांमधील एक पंथ. A *Muslim* sect.

सुबक वि. चांगला आटोपशीर, छानदार, बांधेसूद. Of suitable proportion, light and tight.

[फा. **सबक.**]

सुबत्ता स्त्री. सुकाळ, समृद्धि, विपुलता, स्वस्ताई. State of peace and plenty.

[हिं. **सुबत्ता.**]

सुँबाल्या पुं. भिऊन पळून जाणें, फसवून पळून जाणें. Running away fleeing.

[**सूँबारा.** सोंगट्यांच्या खेळांतील एक पारिभाषिक शब्द.]

सुबुद्ध वि. समजूतदार, हुशार, बुद्धिवान्. Clever, intelligent.

[सं. **सुबुद्ध** , √ **बुध्.**]

सुबोध वि. सोपें, सहज समजण्याजोगें. Easily understandable.

सुभग वि. चांगला, दैववान्. Lucky.

[सं. **सु** + **भग** , √ **भज्.**]

सुभ(णें), सुब(णें) अक्रि. वैपुल्यानें भासमान् होणें. To look plenty or abundant.

[सं. **सम्** + **उत्** + **भा** १ दीप्तौ.]

आतां मूर्खांचिये जिभे । अक्षरांचा आनुखा सुभे ।
आणि तो ब्रह्मसभे । न रिझे जैसा । ज्ञा. १६-२२४

सुभा पुं. देशाचा भाग, प्रांतावरील अधिकारी. A province, a division in administration, a revenue officer.

[फा. **सूबा** ; पेकामसा. **सुभेदार** = सुभा, प्रांतावरील अधिकारी.]

सुभाष वि. (पुं.) चांगलें भाषण करणारा, गोड शब्दाचा. A sweet-talker.

[सं. **सु** + **भाष्.**]

सुभिक्ष न. समृद्धि, स्वस्ताई. Plenty, abundance.

[सं. **सु** √ **भिक्ष्.**]

सुम न. फूल. A flower.

सुमंत पुं. एक प्रधान, अष्टप्रधानांपैकीं परराष्ट्र मंत्री, वकील. A minister of the state, an ambassador.

सुमार पुं. मर्यादा, बेत, प्रमाण, अजमास, अंदाज. Limit, proportion, estimate, rough calculation.

[फा. **शुमार**; शिकाम, पेकाम. **सुमार** (चित्रगुप्त); अकामसा. **सुमारणें** = किंचित् वाढणें, सुचणें, भरभराटणें, **सुमारें** = अंदाजानें.]

सुमुहूर्त पुं. चांगली वेळ. उत्तम दिवस. An auspicious time,-day.

[सं. **सु** + **मुहूर्त**]

सुर पुं. देव. A god.

सुंब न. तृणविशेष. A kind of grass.

[सं. **शुम्ब**; प्रा. **सुंब**; अकामसा. **सुंबाडी** = सुंबाची काडी.]

सुंभ न. नारळाची शेंडी, काथ्याची वगैरे दोरी. The fibrous integuments of a cocoa-nut.

[सं. **शुल्ब**; प्रा. **सुब्ब**; पं. **सुब्ब** = तंबाखूची सुरळी; लमा. **शेलो.**]

सुंबा,-भा पुं. तोफेची टोकणी, दगडी हतोडा, घण. A hammer, a ponderous implement.

[सं. **शुंभ: शुंभति** ; पा. **सुभति**; बि. **सुंबा, सुम्भा**; हिं. **सुंबा, सुंभा** (हतोडा); पं. **सुंबा**; सि. **सुंबो.**]

सुभ,-म्भ वि. मंद, आळशी, सुस्त, वेडा, मठ्ठ. Dull, niggard.

[सं. **सौम्य**; पा. **सोम्मो**; प्रा. **सोम्म**; **किंवा शुभ**; प्रा. **सुंभ**. शुंभनिशुंभ राक्षसांचीं नांवें. (**सोमपानाशीं** याचा संबंध आहे काय?]

सुर पुं. स्वर, कौल, शकुन. A tune, a tone.

[सं. **स्वरः**.]

सुर वि. मुख्य. Chief, main.

[अकामसा. **सुरपाटी** = मुख्य पाटी. – **सुरपारंबी** = एक खेळ (झाडावर चढावयाचें उतरावयाचें).]

सुरइ स्त्री. खुजासारखें भांडें, चंबू. A goblet.

[सं. **सुरा** (?); हिं. **सुराही**. मराठी भाषेंत हा शब्द हिंदीमधून आला.]

सुंरई स्त्री. कस्यारीसारखें हत्यार. A kind of scimitar.

[हिं. **सुराही**.]

सुरक(णें) अक्रि. एकदम न समजतां जाणें, निसटणें. To slip off.

[सं. **स्रक्**, सृ १ गतौ + **अकच्** (?); अकामसा. **सर्रकन्** = झटकन्, एकदम सुर्र असा आवाज करीत; **सुरकंडी** = अंग लांबवून पाण्यांत मारावयाची उडी, मुसंडी. ध्वनिशब्द.]

सुरकत(णें) अक्रि. आंखडणें, सुरकुत्या येणें. To shrink, to contract.

[कान. **सुरकु** = आंखडणें; अकामसा. **सुरकुती** = कातड्याची वळी, घडी.]

सुरण पुं. एक प्रकारचा कान्दा, वनस्पतिविशेष. An esculent root.

[सं. **सूरण**; प्रा. **सूरण**, देप्रा. **सूरणो** (कन्दः) (२८८-९); गु. **सूरण**; **सूरणु** (न); हिं. **सुरन**, **सोरन**.]

सुंरत न. मैथुन. The congress of the sexes.

[सं. **सुरत** (**सु** + √ **रम्**.)]

सुंरत स्त्री. तोंड, चेहरा, स्वरूप. Face, appearance.

[अर. **सुरत**.]

सुरनीस पुं. एक सरकारी अधिकारी, कामगार. A public officer of the Maratha government.

[फा. **सरु** + **नविस**, √ **निविस्तन्**.]

सुरमा पु. एक प्रकारचें अंजन, मोत्यांच्या चुराचें केलेलें अंजन. Sulphuret of antimony.

[फा. **सुर्मा**.]

सुरवाड(णें) अक्रि. सुखी होणें. To be happy.

[याकाम. **सुरवाड** (ज्ञा. १–४०, ६–२५). **सुरुवाडु** (व. ह. २६४); हा शब्द सुरवाड आहे कां सुखाड आहे ह्यांसंबंधीं मतभेद आहे.]

सुर(रू) वात स्त्री. आरंभ. Beginning.

[अर. **शुरुअ**.]

सुरवार स्त्री. एक प्रकारची विजार, चोळणा, गुढघ्याखालीं पायांत तंग बसणारा व वर सैल असणारा पायजामा. Trousers.

[फा. **शुल्वार्**.]

सुरसन पुं. एक महमंदी शक. A *Muslim* era.

[अर. **शुहूर**. इ. स. ५९९ सालीं सुरू झालेला. मृगसाल.]

सुरळी स्त्री. वळी, घडी, कागदाचें वेटोळें. A roll.

[कान. **सुरळी**.]

सुरळीत वि. सरळ, बिनतक्रार. Straight and smooth.

सुरा पुं मोठा एकपाती चाकू. A large knife.

[सं. **क्षुर**; पा. **खुरो**; प्रा. **खुरा**; आ. **सुरी**; बं. ओ. **छुरि**; हिं. **छुरा**; पं. **छुरा**; ल्हां. गु. सिं. **छुरी**; अकाम. **सुरी** (स्त्री.)]

सुरुंग, सुरंग पुं. दारूनें भरलेलें विवर, भुयार, भगदाड. A mine, a subterranean ditch.

[सं. **सुरुङ्गा**; **सुरङ्गा** (भिंतींतील छिद्र); पा. **सुरुङ्गो** (विवर); प्रा. **सुरुङ्ग**, **सुरङ्ग** (स्त्री); का. **सुरॅङ्ग**; बं. **सुरङ्ग**; हिं. **सुरङ्ग**; पं. **सुरुङ्ग**; सिं. **सुरिंघ**; गु. **सुरंग**. परंतु ग्रीक शब्दाशीं ह्याचा संबंध आहे.]

सुरू न. वनस्पतिविशेष. A kind of tree.

[फा. **सर्व्**.]

सुरेख वि. सुंदर, चांगलें,' रेखींव. Neat, pretty, handsome.

[सं. **सु** + **रेखा**; याकाम.. **सुरेख** (नरूस्व. १६४).]

सुर्खरू स्त्री. बहुमान, आब्र, Respect, prestige.
[फा. **सुर्ख** (= तांबडें) + **रु** = **तोंड.** ह्या शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे. उजळ तोंडाचा व निर्लज्ज, बेगुमान, ढोंगी असा विरोधी अर्थ रूढ झाला आहे.]

सुलट वि. सरळ (उलटच्या विरुद्ध). Right or proper side.
[सं. **सम् उल्लट** (?); हिं. **सुलटना ;** ह्यांच्याशीं '**उलटा, उलथा**' हे शब्द तुलना करून पाहावेत. **परि + अस्** ४ > **पालट. उपरि + अस् > उलट. सम् + उपरि + अस् > सुलट.**]

सुलतान पुं. बादशहा, राजा, महमदी राजा, अरेराव (लक्षणा). A Muhammadan king.
[फा. **सुलतान्** ; याकाम. **सुलतान** (स्मृ. ८३). अर. **सुलटान** = राजा, सम्राट, राजपुत्र. परंतु हा अर्थ उत्तरकालीन आहे. मूळ ह्याचा अर्थ 'राज्य' असा होता. आरंभीं भाषेंत **शल्लिटन** असें रूप होतें. याकाम. **सुलतान** (स्मृ. ८३), **–सुलतानी** = सुलतानाचा अंमल, दडपशाही.]

सुलाख पु. सोनें, चांदी वगैरे धातूचा अस्सलपणा पारखण्याकरितां धातूच्या लडींत एक लहानसें भोंक पाडतात तो. A hole or bore generally.
[फा. **सुराघ्** = भोंक, छिद्र ; अकामसा. **सुलाख(णें)** = पारखणें ; **तावून सुलाखून निघणें** = चांगली परीक्षा होऊन बाहेर पडणें.]

सलुख पु. स्नेह, मैत्री, तह. Amity, friendship, peace.
[अर. **सल्रूक** ; पेकाम. **सलूक,–ख** ; अकाम. **सलोखा.**]

सुव(णें) सक्रि. घालणें. To put in.
[सं. **सू** ६ प्रेरणे ; याकाम. **सुव.**]
गगन मुठी सुवावें । मशके जेवीं ॥ ज्ञा. १. ७४.

सुवर्ण न. सोनें. Gold.
[सं. **सुवर्णम्**– प्रा. **सोण्णँ** (?) > **सोनें.**]

सुवाव पुं. चांगला वारा, अनुकूल वारा. A good or favourable wind.
[सं. **सुवात** ; याकाम. **सुवाव** ; (ज्ञा. ९-२८).]
म्हणूनि संवादाचा सुवावो ढळे ॥ ज्ञा. ९-२८.

सुवास पुं. चांगला वास,–गंध. Fragrance.

सुवासिनी स्त्री. सौभाग्यवती स्त्री. A woman with a living husband.
[सं. **सु + वासिनी, √ वस्** ; अकाम. **सवाष्ण.**]

सुविद्य वि. विद्वान्, विद्या शिकलेला. Learned, cultured, educated.

सुशिक्षित वि. चांगला शिकलेला. Educated.

सुशील वि. चांगल्या शीलाचा. Possessing good conduct.

सुशोभित वि. चांगलें, शोभायमान. Beautiful, decorated.

सुश्राव्य वि. ऐकण्यासारखें, कानाला गोड लागणारें. Sweet for hearing.

सुषुप्त वि. निजलेला, झोंपलेला. Slept.

सुसंगत वि. चांगला संगतवार. Consistent.

सुसंबद्ध वि. चांगला जोडलेला. Well-connected.

सुसकार(णें) अक्रि. श्रमानें थकणें, दीर्घ उसासा टाकणें. To be exhausted, to heave.
[ध्वनिशब्द. **उसासा < उच्छ्वास, √ श्वस्** २ श्वसने, सूत्क. (?); अकामसा. **सुसकार** = दीर्घ उच्छ्वास (दुःखदर्शक).]

सुसर पुं. स्त्री. जलचर प्राणिविशेष. An alligator.
[सं. **शिंशुमार, शुंशुमार, शिसुमार** ; पा. **सुंसुमारो** ; प्रा. **सुसुमार** (पुं.), **सुसुमार** ; का. **सूसमार** ; कु. **सुस्** ; हिं. **सूंसमार ; सूइ, ससूस** ; पं. **सिसार**; कां. **सिसार** (पुं.); सिं. **सेसरु** (पु.); ने. **सोस.** शब्द परकी आहेसा वाटतो. संस्कृतीकरण उत्तरकालीन असावें.]

सुसाइ(णें) अक्रि चांगली सावली पडणें. To cast a good shade.
[सं. **सु + च्छाया.**]
सुसाइलीं नाखिवें एके । करणा साध्ये ते नाटकें । ऋ६९.

सुवाल(णें) सक्रि. व्यवस्थित मांडणें. To arrange properly.
[सं. **सम् + उत् + वल्** १ वेष्टने ; याकाम. **सुवाळ.**]
तेथ येरिझारी लागी । जन्ममृत्युची सुरुंगीं
सुवाललीं चांगी । संकल्पे एणें ॥ ज्ञा. १३-४९.

सुसाट(णें) अक्रि. सोसाट्यानें वाहणें. To blow violently.
[सं. **सम + उत् + श्वंठ्** १ गतौ; ध्वनिशब्द; अकामसा. **सोसाटा** = धडाका, झपाटा, जोराचा वारा, श्वास.]

सुस्त वि. न हलणारा, मंद, आळशी, जड. Dull, not moving, idle.
[फा. सुस्त ; सं. सुस्थ (?); सुस्तव(णें)=आळसावणें.]

सुहाड पुं. शूर, योद्धा, राजा, मित्र, सुज्ञ, शहाणा. A brave warrior, a king, a friend.
[सं. सुभट ; प्रा. सुहड ; याकाम. सुहड.]
साम्य तेचि सुहाडा । वेढि जाणें ॥ ज्ञा. ९-२४१.

सुहाड(णें) वि. शोभिवंत करणें, शोभविणें. To decorate.
[सं. सुभ्राज् १ दीप्तौ.]

सुहाव(णें) सक्रि. शोभिवंत करणें, शोभविणें, कल्पिणें. To decorate, to ornament.
[सं. सम् + उत् + भावय ; याकाम. सुहाव, सुहावा = आवडता (सं. सुभग), सुहावना = संदर.]
तेथ येरझारेलागीं । जन्ममृत्यूची सुरंगी ।
सुहावली निहागी । संकल्पें येणें ॥ ज्ञा. १३-४८.
पुन रूप-गुणें नव्हेति सुहावे : माणुसां ऐसे ॥ नरुस्व. २१२
कान्हा मना सुहावना । रावो गाती श्री चक्रपाणी ॥ धवळेउ. ५९.

सुळक(णें) अक्रि. एकदम जाणें, सुटणें, निसटणें. To slip off suddenly.
[सं. श्वल् (+ अकच्) १ आशुगमने ; अकामसा. **सुळकन, -कर ,-दिशी** = एकदम आवाज होऊन. **सुळका** = डोंगराचें निमुळतें टोंक. **सुळकांडी** = उडी.]

सुळा पुं. टोंकदार मोठा दांत, अणकुचीदार खुंटा. A pointed tooth, tusk.
[सं. शूल , शूलक ; प्रा. सूळअ.]

सूक पुं. एक ग्रह, शुक्र. The planet Venus.
[सं. शुक्र; प्रा. सुक्किल, सुकिल ; पा. प्रा. सुक्क ; हिं. सुक, सूक; अकामग्रा. ' सुकीर ', सुकीरवार. इ.]

सूंक न. जकात पट्टी. A kind of cess.
[कान. सूंक = जकात ; याकाम. सूंक (पाटण. शि. ले. १२०६ इ. स.) अर्धमापहारी रूपाचें सूंक.]

सूक्त न. वेदांतील ऋचांचें काव्य. A hymn (from the *Vedas*).
[सं. सु + उक्त (निष्ठा, √ वच्) चांगलें म्हटलेलें, गायिलेलें ; त्यावरून वेदाचा मंत्र, वेदाचें सुभाषित.]

सूचक न. खूण, हेर. A sign, a spy.

सूचना स्त्री. इशारत. Suggestion, a warning.

सूचिका स्त्री. सुई, टोंकदार खाच. A needle.

सूट स्त्री. माफी, मुक्तता, सुटका. Release, concession, remission or abatement (of a debt).

सूड पु. पलिता, गवताची दिवटी. A torch.
[कान. सूड = जळणें ; तेलगु. सुडिचु = द्वेष करणें ; याकाम. सूड (ज्ञा. १३-५४१).]

सूड पुं. वचपा, उट्टें, बदला, परतफेड, शोध, तपास. Revenge, an enquiry.
[सं. शोध, √ शुध् (?) ; ह्या शब्दाच्या अर्थांत फार फरक झाला आहे. गुन्हा किंवा इजा करणाऱ्याचा शोध. तपास करण्याच्या क्रियेंतून ' सूडा ' ची कल्पना निघाली असावी.]

सूत न. बारीक धागा, वस्त्रतंतु, तार. A thread, string, a wire.
[सं. सूत्रम् ; प्रा. पा. सुत्त ; का. सथर् ; कु. सूत् ; आ. त्सुत् ; बं. सुत् ; ओ. सुता ; ब्रिं. हिं. सूत् (पुं) ; पं. सूत, सूतर (पुं.); लां. सूतर (पुं); सिं. सुटु (पुं.); गु. सुतर (न); सुती (प्रा. सुत्तिअ ; बं. सुति ; हिं. पं. सूती. गु.सुत्रीयो) ; म. सुतार.]

सूत पुं. सारथी, भाट, पुराणिक. A charioteer, a bard.
[सं. सूत :]

सूतशेखर पुं. एक औषधी मात्रा, पित्तावरील औषधी. A particular medicinal preparation.

सूति स्त्री. जन्म, प्रसव. Birth.
[सं. सू २ सवने; अकामसा. **सूतिका** = बाळंत झालेली स्त्री, **सूतिकागृह** = बाळंत स्त्रियांच्या शुश्रूषेची खोली.]

सूत्र न. दोरी, धागा, तंतु, युक्ति, कायदा, नियम. Thread, string.
[सं. सूत्र् १० वेष्टने, √ सीव् ; परंतु संस्कृतमध्यें हा नामधातु असावा. अकामसा. **सूत्र जमणें** = संगत होणें. एकमत होणें. **सूत्रधार** = कळसूत्री बाहुली नाचविणारा.]

सूद(णें) सक्रि. मारणें. To strike.
[सं. सूद् १० हिंसायाम्.]

सूद(णें) सक्रि. घालणें. To put in.
[सं. सूद् १ संस्थापने; याकाम. सूद (ज्ञा. ११-६१).]

सून स्त्री. मुलाची पत्नी. A daughter-in-law.
[सं. स्नुषा ; प्रा. सुण्हा, न्हुसा, सोण्हा ; हिं. सून् ; सिं. नहं ; नुहं ; पं. न्हूं ; अकामसा. **सूनमुख** = सुनेचें तोंड पाहण्याचा विधि. वरातीच्या अगोदर सुनेच्या अंगावर दागिने, तोंडांत साखर घालून सासू आपल्या मांडीवर तिला घेऊन तिचें तोंड पाहते.]

सूना स्त्री. हिंसा. Killing, sacrifice.
[सं. सूना ; याकाम. **सोनक** = खाटीक (शिशु. १६०). गृहस्थाच्या संसारांत पांच ठिकाणीं त्याच्या हातून हिंसा घडतात. झाडणें, कांडणें, दळणें, वाटणें, चूल पेटविणें इत्यादि प्रसंगीं घडणाऱ्या हिंसा त्या पंचसूना होत.]

सूप न. धान्य पाखडण्याचें साधन, मोठी सुपली. A scuttle-form basket for sifting corn.
[सं. शूर्प ; हिं. सूप ; गु. सुपडुं ; सिं. सुपु. हा शब्द उत्तरकालीन संस्कृतीकरण केल्यासारखा दिसतो. अकामसा. **सूप वाजणें** = मंगल कार्य संपल्याचें दिग्दर्शक, म्हणून देवक उठल्यानंतर समिधेनें सूप वाजवितात.]

सूपवती स्त्री. गादी. Bedding.
[सं. स्वापवत् ; याकाम. सूपवती (नरुस्व. ५६६).]

सूर पुं. आवाज, ध्वनि. Sound, tone.
[सं. स्वरः (?), सुरः (महाभारत) ; प्रा. सुर, सुरना ; हिं. पं. सुर् (स्त्री) ; सिं. सुरु ; गु. सुर्.]

सूर पुं. मुख्य. Main, chief.
[सुरपारंबी खेळांतील फेकावयाची काठी, २ आट्यापाट्याच्या खेळांतील मुख्य पाटी.]

सूर्य पुं. आकाशांतील तेजोगोल, रवि, भानु. The Sun.
[सं. सूर्यः ; अकामसा. **सूर्यपत्र** = अब्दागीर. **सूर्यमंडल** = सूर्य व त्याच्या भोंवतालीं फिरणारे तारे. **सूर्याचीं पिलें** = कानाच्या शिरा ताणल्यानंतर डोळ्यापुढें काजवे चमकण्यासारखा दिसणारा देखावा. **हा सूर्य हा जयद्रथ** = प्रमाणासकट दोष पदरीं बांधणें.]

सूळ पुं. लोखंडाचा तीक्ष्ण टोंकाचा खांब. An iron spike, a stake.
[सं. शूल ; पा. प्रा. सूल (पुं. न.) ; गु. सूळ, शूळ ; पं. हिं. सूल ; सिंह. सुल्, हूल्, उल् ; का. होल् (लु) ; अकामसा. **सुळावरील पोळी** = मोठ्या संकटाचें काम, जीव धोक्यांत घालून करावयाचें काम.]

सूक्ष्म वि. बारीक, लहान, नाजूक. Little, small, minute, fine.
[सं. सूक्ष्म.]

सूक्ष्म न. अणू, ब्रह्म. The subtle spirit.

सृज(णें) क्रि. उत्पन्न होणें, -करणें. To create, to be produced.
[सं. सृज् १ सृष्टौ ; याकाम. स्रज्.]
पाठीं नेणों किती येर । स्रजिले लोक अपार ।
जालें ब्रह्मदत्त अग्रहार । तिन्हीं भुवनें ॥
ज्ञा. १७-३४०

सृष्टि स्त्री. जग, विश्व. Creation, universe.

से स्त्री. आठवण, स्मृति. Memory, remembrance.
[सं. स्मृति ; प्रा. सइ ; याकाम. से, सें (ज्ञा. ३६३) ; अकाम. सईं, सय.]

सेअ(णें) अक्रि. जाणें. To go.
[सं. सेक् १ गतौ ; याकाम. सेअ्.]
म्हणौनि यया वाखाणा– । पाठिं सेअली चौगुणा ।
ना म्हणों न ये देंखणा । होसी ज्ञानी ॥ ज्ञा. १३-६४६.

सेक, सेकाट, सेकार, सेचाळीस–‘श’ मध्यें पहा.

सेज स्त्री. शय्या, अंथरूण. A bed, bedding.
[सं. शय्या, √ शी २ शयने ; प्रा. सेज्जा ; पं. हिं. सेज ; हिं. ओ. सज्जा ; याकाम. **सेजसाळी** (**शय्याशाला**), **सेज** (नरुस्व. ४०), **सेजवट** = शयनस्थान. (नरुस्व. ५६६.), **सेजवळा** = बिछान घालणारी सेविका, **सेजार** = शयनगृह (नरुस्व. ४४०).]

सेतु पुं. पूल, बांध, धरण. A bridge.
[सं. सेतु, √ सीव्.]

सेना स्त्री. फौज, सैन्य. An army.

सेंद पुं. करंडा A casket.

सेनी स्त्री. स्त्री. A female.
[सं. स्वामिनी ; पा. सामिनी (स्त्री, बायको) ; का. सॉवेनु ; ला. सेण ; **‘याज्ञसेनी’** या शब्दावरून ‘सेनी’ हें रूप महाभारतकालीं वापरांत असावेंसें दिसतें.]

सेयारी स्त्री. चेटकी, डाकीण. A sorceress.
[अर. साहिर = मांत्रिक, पंचाक्षरी.]

सेरडूं न. लहान शेळी किंवा बोकड. A ram, a goat.
[सं. (?); याकाम. **सेरडूं** (नरुस्व. २०१).]

सेल पुं. शेवट, टोंक. End, tip.
[सं. **शैल**; गु. **छेल्ल**; याकाम. **सेल.**]
बैसला गुरुत्वाचे सेले। अमृ. २·२०.

सेलका वि. निवडक, उत्तम. Select, choice.
[म. **सेल** पहा.]

सेल(णें) अक्रि. जोरानें पोहणें, पाणी तोडणें, आकाशांत भरारी मारणें. To swim vigorously, to take a flight in sky.
[सं. **सम्+ईर्**, **इल्** १० गतौ, किंवा **सेल्** १ गतौ; याकाम. **सेल.**]
ते उपरतीच्या वावी सेलत। ज्ञा. ७-१०१.
तिथें सेलीत सप्तस्वराचीं शस्त्रें। कानाचेनीं निरोपें॥
नरुस्व. ५२९.

से(शे)लार पुं. बाण तयार करणारा. One who prepares the arrows.
[अर. **सिलह्** = शस्त्र. हें एक आड नांव आहे.]

सेलू वि. सहा. Six.
[नंदभाषा. **सेलू** = सहा; याकाम. **सेलू.**]

सेव(णें) सक्रि. सेवा करणें, उपयोग करणें, खाणें, उपभोग घेणें. To serve, to wait upon, To enjoy.
[सं. **सेव्** १ सेवने; अकामसा. **सेवक** = नोकर; **सेविका** = स्त्रीनोकर; शुश्रूषा करणारी नोकर; **सेवेकरी** = देवाची सेवा करणारा पुजारी.]

सेवडी स्त्री. कातडें, चामडें. Skin.
[सं. **छाल+कृत्ति**, **छाल + डी**; याकाम. **सेवडी** (ज्ञा. ६·१८२).]

सेस पुं. मळवट. Lines drawn on the forehead with sandal paste.
[सं. **शिरस्**, **शीर्ष**; प्रा. **सिस्स**; याकाम. **सेस** (नरुस्व. ५).]

सेहचाळीस वि. संख्याविशेष, चाळीस आणि सहा. Forty-six.
[सं. **षट्चत्वारिंशत्**; प्रा. **छायाळीसम्**; बं. **छेचाल्लीस**; ओ. **छयाळिस**; हिं. **छियाळीस**; ल्हां. **छिताली**; गु. **छेताळीस**; ने. **छयालिस.**]

सेहत स्त्री. प्रकृतिस्वास्थ्य. Health, well being of the body.
[अर. **सिहत**; पेकाम. **सेहत** (खाना); अकाम. **शेत** (खाना).]

सैग अ. सहज, स्वयंभू, नैसर्गिक. Easily, naturally.
[याकाम. **सैग** (नरुस्व. ३७१).]

सैंग,-घ पुं. वि. समूह, पुष्कळ, सर्व. A crowd, all, many.
[सं. **संघ**; याकाम. **सैंग**; **सैंघ** (ज्ञा. ६-१००).]

सैतान पुं. वेताळ, झोटींग. Satan, the devil.
[अर. **शैतान्.**]

सैंधव न. एक क्षारविशेष, शेंदेलोण. Rock-salt.
[सं. **सैंधव**; प्रा. **सिंधव**, **सेंधव**; **सिंध** देशांतील मिठाला **सैंधव** म्हणतात (?). **सिंधु** = समुद्र, सिंधूमधील क्षार. (?).]

सैंभ न. लष्कर, फौज. Army.
[सं. (?); याकाम. **सैंभ** (नरुस्व. ८७), **सैंभी** (नरुस्व. ८६९).]

सैरा(वैरां) अ. वाटेल तसा. At random, with wild liberty.
[सं. **स्वैरम्**; प्रा. **सइर**; देप्रा. **सैरावसहो** धर्माय त्यक्ता **वृषभ** (२८२-९). **वैराची** उपपत्ति काय? **स्वैर** पासून एक रूप **सैर** व दुसरें रूप **वैर** असें झालें काय?]

सैराट(णें) अक्रि. लहरीप्रमाणें वागणें. To behave freakishly.
[सं. **स्वैर्याढ्य.**]

सैंवर न. स्वयंवर. The marriage of self-choice.
[सं. **स्वयंवर**; याकाम. **सैंवर** (नरुस्व. ११६). यादवकालांतील स्वयंवर शब्दाचा उच्चार अद्यापहि क्वचित् ठिकाणीं ऐकूं येतो.]

सैल वि. मोकळें, ढिलें, पोकळ. Loose, slack, hollow.
[*IE*. Keth; सं. **शिथ्**, √ **श्रथ्**, **शिथिर**, **शिथिल**; *Lat*. Haid, Heid. *Gr*. Cattartie.]

सोई,-य स्त्री. अनुकूलता, चांगली परिस्थिति. Opportuneness, suitableness.

[सं. **सु+ईर्** १ गतौ ; अकामसा. **सोईस्कर** ; **सोईवार** = फायद्याची , लाभदायक.]

सोएर पुं. सोयेर पहा.

सोक(णें) अक्रि. सवय लागणें, नाद लागणें, सवकणें. To contract a fondness or liking for.

[सं. **सञ्ज्** १० अभिषंगे , (निष्ठा) **सक्त** > **सक** > **सोक** (नाधा.) (?); अर. **शौक्** ; फा. **षोक्** = छंद , नाद , ह्यापासून धातु सिद्ध झाला. ही फार्सी व्युत्पत्तिच अधिक ग्राह्य.]

सोंकर(णें) सक्रि. राखणें, पाखरें राखणें, -हांकणें, हाणणें. To protect or guard (from birds).

[सं. **संरक्षणम्** (?), **सम्+अव+कॄ** ६ विकीरणे ; याकाम. **सोकर** (नरुस्व. ५९८).]

सोंकरिताति तुरुंविआंवरी । पूसेयाते ॥ शिशु. २२५.
रजोगुण पेरी । तेंतुलें सत्त्व सोंकरी ।
एकलें तम करी । सागवणी ॥ रा. ज्ञा. १३-३९.

सोकाजी पुं. नादी मनुष्य, छांदिष्ट. A fadist, a showy or freakish man.

[अर. **शौक्** = नाद , छंद.]

सोख(णें) अक्रि. कोरडें होणें. To dry.

[सं. **शोष्** < शुष्; प्रा. सोख; याकाम. **सोख** (नरुस्व. ४६६).]

सोगा पुं. शेंपटा, पदर, खालीं लोळणारा पदर. The end, the skirt of a garment.

[कान. **सोगिल्** = ओंचा, ओटा, **सोगे** = टोंक, शेंपूट , पंख . तुर्की भाषेंत **चोघा** = लांब लोंबता अंगरखा असा एक शब्द आहे. तिबेटी भाषेंत **चउबा** , **जुबा** , असा त्याच अर्थी शब्द अहे. परंतु कानडी मूळ चिंत्य आहे.]

सोंकटी स्त्री. सोंगटी. लांकडाचा एक लहानसा ठोकळा. Draught, a wooden piece.

[सं. **सारी+काष्ठ** (?).]

सोंग न. ढोंग, अनुकरण, चेष्टा. A sham, feint pretence.

[सं. **सम+अंग** ; **समाङ्ग** (समाकार) ; कु. **स्वांग** ; हिं. **स्वाँग** , **सवाँग** , **सुवाँग** ; पं. **सवाँग** ; गु. सोगँ. कुणबाऊ उच्चार इतर भारतीय शब्दांच्या उच्चारांशीं बराच मिळतो.]

सोंग(णें) स्त्री. शेताची कापणी करणें. To reap.

[सं. **सम्+उञ्छ्** किंवा **संग्रह्** ; अकामसा. **सोंगणी** कापणी , कापणी-सांचणी.]

सोंगळ वि. नाजूक, कोमल, मृदु. Delicate, soft.

[सं. **सुमंगल.** प्रतियोगी शब्द (**ओंगळ**).]

सोजी स्त्री. तांदूळ परतून केलेला भात, तांदुळाच्या भाताचा एक प्रकार. A kind of boiled rice.

[सं. **शोध्यः** ; प्रा. **सोज्झ** ; बं. **सोजा** ; हिं. **सोझा**; पं. **सोझा** (दूरदर्शी) ; लां. **सोझा** (काळजी) ; सिं. **सोझी** (बुद्धिची सूक्ष्मता). इतर भाषांतील शब्दाच्या अर्थांत फरक झाला आहे.]

सोज्वळ वि. निर्मळ, पापरहित. Spotless, sinless.

[सं. **स+उज्ज्वल** , **उत्+√ज्वल्** १ दीप्तौ. मूळ अर्थ चकचकीत, चमकणारा, भास्वर; नंतर लक्षणेनें वरील अर्थ प्राप्त झाला.]

सोजीर पुं. गोरा शिपाई (पलटणींतील). A soldier.

[Eng. Soldier ; *OF*. Soude = pay ; पोर्तु. **सोल्दाद.**]

सोटा पुं. दंड्या, मोठी काठी. A club, a cudgel.

[सं. **शौंड** (?); प्रा. **सोट्ठ** ; कु. **सोटो** ; आ. **त्सोटा** ; बं. **सोंटा** ; ओ. **सोठा** , **सोण्ठा** ; बि. **सोंठ** ; हिं. **सोंटा** ; पं. **सोठा** , **सोट्ट** ; लां. **सोटा** ; गु. **सोटो.**]

सोड(णें) सक्रि. मोकळें करणें, मुक्त करणें, तोडणें, सैल करणें. To leave, to release, to slacken.

[सं. छंद् १ अवयवे, **छद्य**, **श्वठ्** १ शैथिल्ये, **छोड** ; प्रा. **छोड** ; बं. **छोडा** ; हिं. **छोडना** ; सिं. **छोडणु** ; गु. **छोडवूँ** ; ने. **छोडनु** ; अकामसा. **सोड** = सूट, मोकळीक; **सोडचिट्ठी** = विवाहबंधनांतून मुक्तता, काडीमोड ; **सोडमुंज** = ब्रह्मचाऱ्याच्या कमरेची मुंजा सोडण्याचा विधि.]

सोडत स्त्री. शर्यत, लॉटरी, जुगार. Lottery.

[पोर्तु. **सोर्ट.**]

सोंड स्त्री. हत्तीचें लांबट नाक. The trunk of an elephant.

[सं. **शुण्डा** ; पा. **सोण्डा** ; प्रा. **सोंडा** ; पुश्तु. **सुण्ड** = ओंठ; आ. **त्सूंड** ; ओ. बं. **सूण्ड**; बि. **सूंड**; हिं. **सूड**; पं. **सुण्ड** ; सिंह. **सोण्ड**, **होण्ड्य** ; ने. **सुंड**.]

सोंडी स्त्री. देवडी, दरवाज्याजवळची पडवी. A verandah, near the gate.

[याकाम. **सोंडी**. उत्तम दक्षिण सोंडिया दोन्ही–ऋ. १०६.]

सोदा वि. पुं. लुच्चा, लबाड, बदमाष. Dissolute, rake, a sharper, a cheat.

[हिंदी. **सोदा**.]

सोध(णें) सक्रि. तपासणें, चौकशी करणें. To search, to enquire.

[सं. **शुध्** १ शौचकर्मणि ; कु. **सोधणो** ; आ. **त्सोध्वाइब** ; बं. **सोधा**, **सुधा** (पैसा देणें), **सुधान** (विचारणें); हिं. **सोधना** (स्वच्छ करणें, तपास करणें) ; पं. **सोधणा** ; सिं. **सोधणु** (परीक्षणे) ; याकाम. **सोध** (नरुस्व. ५८५). तें विरहाग्नि सोधिताय दळ ॥.]

सोध,–णी पुं. शोध, तपास. Search, enquiry.

[हिं. **सोध** (स्त्री) ; सिं. **सोध** (दुरुस्ती) ; गु. **सोध** (शुद्धता) ; याकाम. **सोधणी** = तपास. **सोधणें** पहा.]

जैशी वैराग्याची घेत सोधणी। दिवी अनंगाची ॥ नरुस्व. १०८

सोनक पुं. खाटीक. Slaughterer.

[सं. **सूना** = हत्या ; याकाम. **सोनक**. **सूना** पहा.]

सोनकानें उरगुढें घेतलें। वैकुंठीचें ॥ शिशु. १६०.

सोनवै स्त्री. सोन्याची वात. A golden wick.

[याकाम. **सोनवै** (शिशु. ३०). **सोनें** पहा.]

सोनार पुं. सोन्यावर काम करणारा, सोन्या-चांदीचे अलंकार करणारा. A goldsmith.

[सं. **सुवर्णकार** ; पा. **सुवण्णकारो**; प्रा. **सुवण्णआर** ; का. **सोनर**; कु. **सुनार** ; आ. **त्सोनारि** ; ओ. **सुनारि**, **सुण्णार**, **सोणार** ; हिं. **सुनार**, **सोनार्** ; पं. **सुनिआरा** ; ल्हां. **सुनारा** ; सिं. **सोनारो** ; गु. **सोनार्** ; ने. **सुनार्**.]

सोनें न. धातुविशेष, पिवळी मूल्यवान् धातु, कांचन. Gold.

[सं. **सुवर्णम्** ; पा. **सुवण्ण**, **सोवण्ण**, **सोण्णम्** ; प्रा. **सुवण्ण**, **सोअण्ण** (न.), **सुवन्न** (न); का. **सोन्** ; कु. **सुनो** ; आ. **त्सोन्**, **त्सोना** ; बं. **सोना** ; ओ. **सुना** ; हिं. **सुना**, **सोना** (पुं.) ; पंल्हां. **सोना** (पुं) ; गु. **सोनुँ** (न.); याकाम. **सोनें** (साडेपन्हरें) ; अकामसा. **सोनें** = (लक्षणा) सोन्यासारखें मौल्यवान् ; **सोन्याचा धूर** = श्रीमंती , संपन्नता; **सोन्याचा दिवस** = भाग्याचा , आनंदाचा काळ. **सोनखत** = विष्टावगैरेचें खत; **सोनचांफा** = पिवळा चांफा ; **सोनेरी** = सोन्याच्या रंगासारखें ; (लक्षणा) धाडशी लोकांची लुबाडणारी टोळी ; **सोनसळ** = सोन्यासारखी पिवळी काडी (**सुवर्णशलाका** ; याकाम. **सोनेसळ** = जरीच्या धाग्याचें वस्त्र–नरुस्व. ७४०).]

सोप,–ट न. केळीच्या बुंध्याची त्वचा. The skin of a plantain tree.

[कान. **सोप्पु** = साल, आवरण ; याकाम. **सोपटें** (ज्ञा ९·४३३).]

सोप(णें), **सोंप(णें)** उक्रि. देणें, अंगावर टाकणें, हवालीं करणें. To commit to the charge of.

[सं. **सम्** + **अर्प्** ; प्रा. **समोप्पिअ** ; हिं. **सौंपना** ; गु. **सोपवूँ** ; अकामसा. **सोंपवि(णें)** = दुसऱ्यावर जबाबदारीनें देणें, टाकणें; **सोंपीव** = सोपविलेलें.]

सोपस्कार पुं. साधनभूत गोष्टी–उपचार, उपाय. Things to be used as instrument.

[सं. **सोपस्कार** (**स** + **उपस्कार**).]

सोपा पुं. घरांतील पुढची पडवी, ओसरी. A branch of verandah.

[अर. **सुप्फा**,]

सोपा वि. सरळ, सुलभ. Easy, straight.

[सं. **स्वल्प** ; प्रा. **सप्प**.]

सोपान,–ण पुं पायरी, जिंना A flight of steps.

[सं. **सोपान** ; याकाम. **सोपान** (नरुस्व. ५१, ज्ञा. ६-५४).]

सोपारा पुं ग्रामनाम. The name of a village.

[सं. **सूर्पारक** ; प्रा. **सुप्पारक** (४६० इ. स.); **सुबारा** (९५१ इ. स.), **सूफाराह** (१३३० इ. स.), **सूपारा** (१८०३), **सोपारा** (१८४३ इ. स.).]

सोबत स्त्री. संगत, मैत्री, सहवास. Company, friendship.

[अर. **सोह्बत** ; पेकाम. **सोभत** (सानेपयाव. १७) ; अकामसा. **सोबती** = मित्र.]

सोम पुं वनस्पतिविशेष, चंद्र. A kind of plant, the Moon.

[सं. **सोम**, √ **सु** २ सवने ; **सोमवती** = सोमवारीं आलेली अमावास्या.]

सोमट वि. कोमट, कोंबट. Warmish.

[सं. **स + ऊष्मन् + ट.**]

सोमल पुं. क्षारविशेष, विष. White arsenic.

[अर. **सुंबुल** ; हिं. **सोमल**]

सोय स्त्री. फायदा–लाभाची बाजू, जुळणी. सोई पहा. Advantage, convenience.

सोयरा पुं. नातेवाईक, पाहुणा, आप्त. A relative, a guest.

[सं. **सोदर, सहोदर** ; प्रा. **सोअर.**]

सोयरा पुं. यजमान, जार. A lover.

[सं. **सहचर** ; याकाम. **सोयरा, सोइरा.**]

सदेवो वांचौनि नाहीं आणिकु । सोइरां साकडीचा ॥ नरुस्व. ६४६, ज्ञा. १२-८३.

सोयेर मुलाच्या जन्मामुळें येणारें अशौच. The impurity due to child-birth to the members of the family.

[सं **सू** २ प्रभवे, **सूतक** = जन्म; ने. **सुत्केरो. सूतक** आणि **सोयेर** असे दोन शब्द अशौच ह्या अर्थानें मराठींत रूढ आहेत; परंतु पहिला मृत्यूमुळें येणारें अशौच आणि दुसरा **सोयर** हा जन्मामुळें येणारें अशौच ह्या अर्थानें रूढ आहेत. दोन्ही शब्द '**सू**' ह्या संस्कृत धातूपासून उत्पन्न झाले आहेत.]

सोरटी (सोमनाथ) पुं. एका देवतेचें नांव. The name of deity.

[सं. **सौराष्ट्रीय** < **सुराष्ट्र** (**सुस्** लोकांचें राष्ट्र ; *Gr*. Syrashene.); प्रा. **सुरट्टी.**]

सोरठ स्त्री. पुं. गानविशेष, नृत्यविशेष. एका देशाचें नांव. A particular music or dance.

[सं. **सुराष्ट्र** (?); प्रा. **सोरट्ठ** (वृत्त,–छंदविशेष); पं. हिं. **सोरठ** ; सिं. **सोरठी** ; गु. **सोरठ**; याकाम. **सोरट**, **सोरठ** (नरुस्व. ७००).]

सोरा पुं. क्षारविशेष. A kind of salt.

[फा. **शोरा.** ; सं. **सूर्यक्षार** (?).]

सोल(णें) सक्रि. आवरण काढणें, उकलणें. To divest of the outer skin, to peel.

[सं. **शल्क्** ; **शकलीकृ**, **सम् + अव + लू** ९ अवयवे ; प्रा. **छोल्ल.** पहिल्या दोन पासूनच प्राकृत '**छोल्ल**' ची उपपत्ति लागते. तेव्हां तेच ग्राह्य. कानडी– '**सुलि**' हा शब्दहि ह्या संबंधांत चिन्त्य आहे.]

सोल पुं. वाळलेली साल, अमसोल, कोकमसोल. Dried rind.

[कान. **सुलि** ; अकामसा. **सोलाणा** = ओला हरभरा, पावटा ; **सोलींव** = सोललेलें.]

सोंवळें वि. शुद्ध, पवित्र, धौत. Pure, holy, auspicious, clean.

[सं. **सुकुमार, सुकोमल** (?), **सुमंगलम्** > **सुअंगलम्** > **सोअँळ** ; देप्रा. **सोमालं, सुकुमारम्, सोअमल्लं सौकुमार्यम्** एतौ शब्दभवौ (२९०·३). पहिल्या '**ओ**' ची उपपत्ति कोणत्याहि व्युत्पत्तीनें नीट लागत नाहीं असें ब्लोक म्हणतो तें पटत नाहीं. पहिल्या दोन मध्यें लागत नाहीं. **सुमंगल** पासून लागते. **सोंवळ** आणि **सोमळ** हे दोन्ही निराळे व्युत्पादिले पाहिजेत. **सोमळ** मध्यें **स + ऊष्मन्** चा संबंध आहे.]

सोंवळी स्त्री. वि. केशवपन केलेली विधवा स्त्री A tonsured widow.

सोवाळें न. खिडकी, गवाक्ष. A window.

[याकाम. **सोवाळें.**]

आववां खणीं झळकती सोवाळीं ॥ नरुस्व. ४२४.

सोवाणी स्त्री. आसन. A seat.

[सं. **सु + आसन–सोपान** ; याकाम. **सोवाणी** (ज्ञा. ११-४२४).]

सोवाणी स्त्री. गोड वाणी, चांगलें भाषण. A sweet speech, a good word.

[सं. **सुवाणी** ; याकाम. **सोवाणी** (नरुस्व. १७९).]

सोस(णें) सक्रि. सहन करणें, मानवणें. To bear, to endure, agree with.

[सं. **च्युस्** १० सहने (भट्टोजी दी.) ; अकामसा ; **सोस** सहनशीलता ; **सोशीक** = सहन करणारा.]

सोस पुं. आवड, नाद, हांव, तीव्र इच्छा. Strong longing or desire.

[कान. **सोसु** = हांव ; तेलु. **सोस** = हांव. ब्लोक ह्यानें सं. **शोष** शीं संबंध जोडला आहे परंतु तो पटत नाहीं. गु. **सोस** = तीव्र तहान ; सिं. **सोसु** = काळजी ; पं. **सोस** = कोरडा. हे शब्द निराळे आहेत. **सोस** = हव्यास ह्याशीं संबद्ध नाहींत.]

सोहं पुं. सः अहम्–मी ब्रह्म आहे (असा भाव). The feeling "I am the *Brahman*."
[सं. अहम्.]

सोहलत स्त्री. सवलत, सवड, माफी. Relaxation, remission.
[अर. सुहलत्.]

सोसो(णें) उक्रि. पुनः पुनः खुपसणें. To thrust again and again.
[सं. सु २ सवने ; > **सुवो सुवो** ; याकाम. **सो सो**.]

सोहळा पुं. उत्सव, सुखाचा प्रसंग. A festive ceremony, merriment.
[सं. सौहार्द (?).]

^{1}**सोहागा** पुं. सवागी क्षार. A kind of salt.

^{2}**सोहागा** पुं. दैववान् मनुष्य. A lucky person.
[सं. **सौभाग्यम्**, कु. **सोहागो** ; बं. ओ. बि. हिं. सोहागा (पुं.); पं. **सुहागा** ; सिं. **सुहागो** ; अकाम. **सवागी**, **स्वागी**, **सोहागी**.]

सोळा वि. संख्याविशेष, दहा आणि सहा. Sixteen.
[सं. **षोडशन्** ; पा. **सोलस** ; प्रा. **सोलस**, **सोळस**, **सोलह**, **सोळा** ; कु. **शुराह** ; प.पं. **सोडे** ; आ. **त्सोल** ; बं. **सोल** ; ओ. **सोळ** ; बि. **सोलह** ; हिं. **सोलह**, **सोरह** ; पं. **सोलॉं** ; लां. **सोलॉ** ; सिं. **सोरॅंहॅं** ; गु. **सोळ** ; ने. **सोर**, याकामसा. **सोळखनें** = सोळा खांबाचे (नरुस्व. ४१७); **सोळाकें** = वजनदार, डौलदार.]

काई पूर्ण चंद्रमंडळ। पाहूनी सोळाके मुक्ताफळ॥ नरुस्व. ९३.

सोक्षमोक्ष पुं. बरा वाईट,–भलाबुरा निकाल. A settlement–good or bad.
[सं. **मोक्ष**, √ **मुच्** ६ मोचने. '**सोक्ष**' हा प्रतियोगी ध्वनिशब्द.]

सौकट पुं. विणावयाचा माग, आउत. A loom, a plough.
[सं. **चौकट** ; याकाम. **सौकट** (अमृ. ७-२४१).]

सौकर्य न. सुलभता, सुकरपणा. Easiness of performance.
[सं. **सौकर्य** > **सु** + **कृ**.]

सौख्य न. सुख, समाधान. Happiness.

सौजन्य न. चांगुलपणा, सभ्यपणा. Gentlemanliness.
(सं. **सौजन्य** > **सुजन**, √ जन् ४ संभवे.]

सौत्र वि. सूत्रासंबंधीं, सूत्रकाळांतील. Pertaining to *Sutra* times.
[सं. **सौत्र** < **सूत्र**.]

सौंदर्य न. सुंदर रूप, सुंदरपणा. Beauty.
[सं. **सौंदर्य** < **सुंदर**.]

सौदा पुं. खरेदी विक्री, व्यवहार, (त्यावरून लक्षणेनें) खरेदी विक्रीचा माल,–जिरे हिंग मीठ मिरची वगैरे. Traffic, trade, transaction.
[फा. **सौदा** ; अकामग्रा. **सौदा**, **सवदा**; **सौदागीर** = व्यापारी, वाणी, उदमी.]

सौंदळ न. सैन्य. An army.
[सं. **सम** + **दल** ; पेकाम. **सौंदळ**, **संवदळ** (ऐपो. १२).]

सौभाग्य न. चांगलें नशीब, सुदैव, (त्यावरून लक्षणा) सवाष्णपणा, सवाष्णपणाचीं लक्षणें–कुंकुम वगैरे. Good fortune or luck.
[सं. **सौभाग्य** < **सु–भग** < **सु** + **भज्** ; याकाम. **सौभग**, **सौभाग्य** (नरुस्व. ८९), **सौभाग**, **सोहाग** ; (ज्ञा. १५-१७); अकामसा. **सौभाग्यवती** = पत्नी, सुवासिनी स्त्री.]

सौम्य वि. शांत, नरम, मृदु, साधें. Soft, delicate, simple.
[सं. **सौम्य** < **सोम** < **सु** २ सवने ; सोम म्हणजे चंद्र. तो शांत असतो त्यावरून.]

^{1}**सौर** वि. शूर. Brave.
[सं. **शूर** किंवा **सौर्य** < **सूर्य** ; बकाम. **सौर**, **सौरा** (ए. भा. १६·१२९).]

^{2}**सौर** वि. सूर्यासंबंधीं, सूर्याचें. Pertaining to the Sun.
[सं. **सौर्य** ; बकाम. **सौर** ; अकाम.–**सौर**]

सौरस्य न. गोडी, प्रेम, रहस्य. Tastiness, savouriness, friendliness.
[सं. **सौरस्य** < **सुरस** ; याकाम. **सौरस** (= सामर्थ्य, योग्यता, २ अभिप्राय–ज्ञा. ६·४५९); बकाम. **सौरस** (= आसक्ति, इच्छा,–एभा. १५६५).]

सौरी स्त्री. स्वैर स्त्री, हिजडा. A wanton woman.
[सं. **स्वैरिणी, स्व** + √ **ईर्** १ गतौ; शिकाम. **सौरी** (= मुरळी, –तुगा. २९७).]

सौहार्द न. मैत्री, स्नेह. Friendship.
[सं. **सौहार्द** < **सुहृद्.**]

स्कंद पुं. कार्तिक स्वामी. The name of deity.
[सं. **स्कंद,** √ **स्कंद्.**]

स्कंध पुं. खांदा, अवयव, भाग, समूह. Shoulder, a crowd.

स्खलन न. गळणें, गळून पडणें, दोष, चूक. Oozing, dropping, mistake.
[सं. **स्खलन,** √ **स्खल्.**]

स्तन न. थान, अचळ, सड. A teat.
[सं. **स्तन, स्तन्य** = दूध (स्तने भवम्).]

स्तब्ध वि. गप्प, थांबलेला, निश्चल. Silent, quiet.
[सं. **स्तब्ध**–(निष्ठा) √ **स्तंभ्**– रोधने).]

स्तंब पुं. घोंस, समूह. A bunch, a collection.

स्तंभ पुं. खांब, थांबणें, अडखळणें, अडथळा, अटकाव, रोखणें. A pillar, a post, obstruction.
[सं. **स्तंभ,** √ **स्तंभ्.**]

स्तव पुं. न. स्तुति, प्रार्थना, वर्णन. Praise, prayer.
[सं. **स्तु** २ स्तवने.]

स्तुत(णें) क्रि. फार स्तुति करणें. To praise.
[सं. **स्तु** २ स्तवने; याकाम. **स्तुतिणें, स्तुतणें** (रा. ज्ञा. १४-३५७).]

हा ब्रह्मा ऐसेनि स्तुतिजो। कां नीचु म्हणौनि निंदिजो ॥
राज्ञा. १४-३५७.

स्तूप पुं. (बुद्धधर्मांतील) स्मारक. A pillar
[सं. **स्तूप्** १ चयने.]

स्तोम पुं. एक विशिष्ट यज्ञ, संस्कार, (त्यावरून) संच, समूह, जमाव, रास, ढीग, (त्यावरून दुसरी लक्षणा)–बडेजाव, ढोंग, खोटा आव. A heap, a mass, an assemblage, a particular sacrifice, empty vaunting, bragging.
[सं. **स्तोम,** √ **स्तु** २ स्तवने.]

स्त्री स्त्री. बायको, बाई, (विशेषीकरणानें) स्वतःची पत्नी. A woman, wife (fig.).
[सं. **स्त्री.** √ **स्त्यै**– विस्तरे; अकामसा. **स्त्रीचरित्र** = स्त्रियांचें वर्तन, चालचलणूक; **स्त्रीधन** = लग्नांत नवऱ्यानें पत्नीला दिलेलें धन; **स्त्रीधर्म** = लज्जा वगैरे; **स्त्रीलिंग** = व्याकरणांतील स्त्रीत्वदर्शक लिंग.]

स्थळ,–ल न. ठिकाण, स्थान, जागा. Place, spot.
[सं. **स्थलम्,** √ **स्था;** याकाम. **स्थळ** (ज्ञा. १८-१२४३); अकाम. **–थळ; थळीक** = स्थानिक.]

स्थाणु पुं. खांब. A post.

स्थान न. जागा, स्थळ, ठिकाण. A place.
[सं. **स्थानम्,** √ **स्था.**]

स्थानी स्त्रीं. सभा. An assembly.
[सं. **स्थान;** याकाम. **स्थानी** (= सभा).]

जाण अवधारितु स्थानिचे। जे भावरीय शब्द–ब्रम्हीचे ॥
नरुस्व. ३८.

स्थाप(णें) अक्रि. ठेवणें, स्थापन करणें, बसविणें. To place, to keep, to install.
[सं. **स्था,** (णिच्) **स्थापय;** अकाम. **थापणें** (= लेपणें), (**स्थापना, स्थापित, स्थापनीय**).]

स्थाय पुं. (गायन) रागाचा अंश. A portion of *Raga*.
[सं. **स्था.**]

स्थायीक वि. कायमचा (राहाणारा), वस्ती करणारा. Stable, staying permanently.

स्थायीभाव पुं. कायमचा,-चिरकालचा मनोभाव, रसनिर्मिति करणारा मनोभाव (विभाव, अनुभाव, व्यभिचारीभाव यांच्या साह्यानें). A kind of sentiment (in rhetorics).

स्थाली स्त्री. थाळी, ताट (लाकडाचें). A plate (wooden).
[सं. **स्थाली,** √ **स्था;** अकाम. **थाळी, थाळा.**]

स्थावर न. घर जमीन वगैरे न हलणारी संपत्ति, जंगमच्या विरुद्ध. Landed (estate).
[सं. **स्थावर,** √ **स्था.**]

स्थिति स्त्री. अवस्था, वास, दशा, परिस्थिति. Condition, state.
[सं. **स्था.**]

स्थिर वि. शांत, न हलणारे, निश्चयी, थंड. Silent, quiet, not moving, determined.
[सं **स्थिर, √ स्था**; अकामसा. **स्थिर-बुद्धि** = निश्चित मताचा, (लक्षणा) मंद बुद्धीचा; **स्थिर-स्थावर** = शांत, सामसूम स्थिति, **स्थिराव(णें)** = थांबणें, शांत होणें.]

स्थूल,-ळ वि. लठ्ठ, जाड, मोठा, वातूळ शरिराचा. दृश्य. Fat, great, large, gross.
[सं. **स्था**; संसा. **स्थूलदेह, स्थूलदृष्टि.**]

स्नान न. आंघोळ, न्हाण. Bath.
[सं. **स्ना**; प्रा. **न्हा, ण्हा**; अकाम. **ण्हान, न्हाण.**]

स्नायु पुं. शरीरांतील तंतुयुक्त असा भाग, अवयव. A tendon, a sinew, a muscle.
[सं. **स्नायु.**]

स्नेह पुं. तेल, चरबीसारखा पदार्थ. Oil, fat, grease.
[सं. **स्निह्** ४ स्नेहने.]

स्नेह पुं. मैत्री, प्रेम. Affection, attachment.
[दोन्ही शब्द धात्वर्थानें एकच आहेत. लक्षणेनें दोन अर्थ निर्माण झाले. **स्नेहाळू** = ममताळू, तेलकट.]

स्पर्ध(णें) अक्रि. चढाओढ करणें. To compete.
[सं. **स्पर्ध्, स्पर्धा** = मत्सर, ईर्षा.]

स्पर्श(णें) सक्रि. स्पर्श करणें. To touch.
[सं. **स्पर्श** (नाधा.); अकामसा. **स्पर्श** = शिवणें, शिवाशीव; **स्पृश्यास्पृश्य** = शिवण्यास योग्य,-अयोग्य.]

स्पष्ट वि. स्वच्छ, उघड, साफ. Clear, distinct, clean.
[सं. **स्पष्ट, √ स्पश्**-दर्शने; पेकामअकाम. **सपष्ट, पष्ट, पस्ट**; **स्पष्टीकरण** = फोड करणें, विवरण.]

स्पृहा स्त्री. इच्छा, वाञ्छा. Desire.
[सं. **स्पृहा, √ स्पृह्.**]

स्फटिक पुं. न. पारदर्शक स्वच्छ दगड. Crystal.
[सं. **स्फटिक, √ स्फट्.**]

स्फटी स्त्री. तुरटी. Alum.

स्फार(णें) सक्रि. स्फुरणें. To throb.
[सं. **स्फुर्** ६ चलने; पेकाम. **स्फार** (गीता. १-१२८९).]

स्फीत, स्फीति स्त्री. मोठेपणा, विस्तार, (ल.) मान्यता, वैभव. Greatness, grandeur, celebrity.
[सं. **स्फ्यै** १ विस्तरे, वृद्धौ; शिकाम. **स्फीति** (तुगा. ११७९).]

स्फुंज पुं. गर्व, ताठा. Pride, swelling.

स्फुंज(णें) अक्रि. स्फुंदणें, गर्वानें मुसमुसणें. To be swollen with pride.
[सं. **स्फुन्द्**-स्फुन्दने, चलने.]

स्फुट वि. उघड, स्पष्ट, वेगळें, निराळें, अलग. Clean, distinct separate, different.
[सं. **स्फुट्** ६ अवयवे.]

स्फुंद(णें) अक्रि. हुंदके देऊन रडणें. To sob.
[सं. **स्फुंद्** ६ स्फुंदने (**स्फुर्ज्** ६ शब्दे), **स्फुंदन** = हुंदका.]

स्फुर(णें) अक्रि. कंप पावणें, हलणें, थरथरणें, एकदम आठवणें. To throb, to have tremour, to move.
[सं. **स्फुर्** ६ चलने; अकाम. **फुर- स्फुरण** = कंप फुरफुर, एकदम स्मृति होणें.]

स्फुलिंग पुं. ठिणगी. A spark.

स्फोट पुं. फोड, एकदम फुटणें, भडका, धडाका. A boil, a blister, bursting, rending.
[सं. **स्फुट्** ६ स्फोटने.]

स्मर पुं. मदन. The god of love.
[सं. **स्मर √ स्मृ.**]

स्मर(णें) सक्रि. आठवणें, मनांत येणें. To occur, to recollect.
[सं. **स्मृ** १ आध्याने; याकाम. **स्मर** (स्मरी, स्मरे); अकामसा. **स्मरण** = चिंतन; **स्मरणी** = जपाची माळ, जिच्या साह्यानें देवस्मरण करावयाचें ती माळ, **स्मारक** = आठवणीचें प्रतीक; **स्मृति** = आठवण, स्मरण.]

स्मित न. मंद हास्य, गालांतल्या गालांत हसणें. A smile.
[सं. **स्मित.**]

स्रज(णें) उक्रि. उत्पन्न करणें. To produce.
[सं. सृज् १ सर्जने ; स्रष्टा = ब्रह्मदेव, उत्पत्तिकर्ता.]

स्रव, स्राव पुं गळणें, पाझर, प्रवाह. Oozing out, drizzling.
[सं. स्रु १ गतौ.]

स्व सर्व. आपलें, स्वतांचें. One's own.
[सं. **स्व.** हा शब्द आत्मदर्शक अर्थानें पुष्कळ ठिकाणीं योजतात. अकामसा. **स्वकष्ट**=आपले कष्ट; **स्वच्छंद** = आपला नाद, हट्ट; **स्वच्छंदी** = लहरी, नादी, स्वैर, **स्वजन** = आपल्या नात्याचा मनुष्य; **स्वतः** = आपण होऊन, खुद्द; **स्वदेश** = आपला देश.]

स्वच्छ वि. शुद्ध, पवित्र, निर्मळ. Pure, holy, free from dirt.
[सं. **स्वच्छ.**]

स्वप्न न. मनाच्या जाणीवेची एक अवस्था, झोंपेंत होणारी जाणीवेची अवस्था (तिचा भास). Dream.
[सं. **स्वप्न**, √ **स्वप्** २ निद्रायाम्; अकाम.मध्यें ह्या शब्दाचें लिंग बदललें आहे ; **सपन, सिविण** संस्कृतमध्यें पुं. आहे. प्रा.मध्यें नपुं. आहे. **स्वप्नावस्था** = स्वप्न पडणें, (लक्षणा) स्वप्नांत वीर्यस्खलन होणें.]

स्वभाव पुं. प्रकृति, उपजत गुण. Nature, native state or quality.
[सं. **स्वभाव**, √ **भू**, **स्वभावतः**=स्वाभाविक, सहज, साहाजिक ; **स्वभावचित्र** = स्वभावाचें वर्णन, एखाद्याचें वर्णन ; **स्वाभाविक** = साहाजिक, आपोआप.]

स्वयम् अ. स्वतः, खुद्द. Of one's ownself.
[सं. **स्वयम्** ; अकामसा. **स्वयंनिर्णय** = स्वतः ठरविणें–ठरविलेलें राज्ययंत्र ; **स्वयंपाक, सैंपाक, सयपाक** = स्वतः अन्न शिजविणें; (सामान्यीकरण होऊन) अन्नाचा पाक (कोणींही केलेला) ; **स्वयंसेवक** = स्वतःच्या इच्छेनें सेवा करणारा.]

स्वर पुं. आवाज, नाद स्वतंत्रपणें उच्चारला जाणारा वर्ण. A note, tone, a tune in music.
[सं. **स्वर**, √ **स्वर्** १ शब्दे ; याकाम. **स्वर** (=सूर, आवाज ;–नरुस्व ३४६).]

स्वरूप न. स्वतःचें रूप, आकृति, (सामान्यीकरण होऊन) कोणाचेंहि रूप, मुद्रा, चेहरा. One's own proper figure or form.
[सं. **स्वरूप** ; याकाम. **स्वरूप** (=आत्मस्वरूप–ज्ञा. ८-९३), (**स्वरूपता** = तद्रुपता–नरुस्व. ८२२), **स्वरूपता** = सौंदर्य, तद्रूपता (नरुस्व. ८२२), **स्वरूपवान्** = सुंदर ; अकाम. **स्वरूप.**]

स्वर्ग पुं. देव लोक, पुण्यलोक, मोक्ष (ल.). The heaven.
[सं. **स्वर्ग.**]

स्वल्प वि. थोडें, सोपें. Little, small, easy.
[सं. **स्वल्प** (**सु + अल्प**).]

स्वस्त वि. शांत, सुखी, स्वस्थ. Quiet, happy.
[सं. **स्वस्थ** ; याकाम. **स्वस्त** (नरुस्व ३९१).]

स्वस्त वि. सवंग, थोड्या किंमतीचा, '**महाग**'च्या उलट. Cheap.

स्वस्ति अ. चांगलें, कल्याण, हित. Particle of benedicton.
[सं. **स्वस्ति**, (**सु + अस्ति**, √ **अस्** (?) ; अकामसा. **स्वस्तिवचन** = '**कल्याण होवो**' असा आशीर्वाद ; **स्वस्तिवाचन** = मंगलकार्यांच्या आरंभाचा विधि (**नरुस्व.** ६७६); **स्वस्तिक्षेम** = कुशल असणें, सुस्थिति (**दोन्ही एकाच** अर्थाचे शब्द).]

स्वस्तिक न. एक लाभदर्शक धार्मिक प्रतीक, चिह्न. A symbol of fortune.
[सं. **स्वस्ति.**]

स्वस्तिक न. शुभाशीर्वाद. Benediction, blessing.
[सं. **स्वस्ति + क** ; याकाम. **स्वस्तिक** (**शुभ** शीर्वाद).]
राजहंस बोलेति स्वस्तिकें। झणें कमळाचें भाणें ठाके ॥ (नरुस्व. ६१३.).]

स्वस्थ वि. शांत, समाधानी, सुखी. Silent, happy, contented.
[सं. **स्व + स्थ** ; चांगली शारिरीक अवस्था, त्यावरून शांत, समाधानी (ल.); याकाम. **स्वस्त** (नरुस्व. ३९१) ; अकाम. **स्वस्थ > स्वास्थ्य** = प्रकृतीचें सुख, चांगली सुखाची स्थिति.]

स्वागत न. आदरसत्कार, आदरातिथ्य. Welcome, hospitality.
[सं. **सु + आगत**, √ **गम्.**]

स्वाति स्त्री. एक नक्षत्र. A constellation.

स्वाद पुं. चव, आवड, रस, गोडी, चांगला वास. Taste, liking.
[सं. स्वाद, √ स्वद्–स्वाद्.]

स्वाधीन वि. आपल्या ताब्यांत, स्वतंत्र (अर्थाचें सामान्यीकरण झालें आहे.). In one's own control or possession, independent.
[सं. स्व + अधीन, √ इ.]

स्वाध्याय पुं. अभ्यास, वेदपठण. Study.
[सं. स्व,–सु + आध्याय, √ अधि + ई.]

स्वानंद पुं. मोक्षाचा आनंद. The bliss of absolution.

स्वानुभव पुं. स्वतांचा अनुमव. Self-experience.

स्वाभिमान पुं. स्वतांबद्दलचा अभिमान. Self-respect.

स्वामी पुं. धनी, मालक, साधु, संन्यासी. Master, lord.
[सं. स्वामिन्.]

स्वारी स्त्री. घोड्यावर बैठक. The seat or ride on a horse.
[फा. सवारी; अकाम. सवारी व स्वारी असे दोनी रूढ आहेत. घोड्यावर बसणारा मनुष्य. ह्याच्या अर्थाचे सामान्यीकरण व विशेषीकरण बरेंच झालें आहे. कुस्तींतील स्वारी, राजाची स्वारी, वेताळाची स्वारी, वगैरे प्रयोग रूढ आहेत.]

स्वार्थ पुं. स्वतांचें हित, लाभ. Self-interest.
[सं. स्व + अर्थ, √ ऋ,–ऋच्छति एनम् इति अर्थः]

स्वार्थ पुं. व्याकरणांतील अर्थ–साधा विधानदर्शक. Indicative mood (in grammar).

स्वाहा अ. यज्ञांत बलि किंवा आहुति देण्याच्या वेळीं म्हणावयाचा शब्द. The word uttered when throwing oblation in fire.
[सं. स्वाहा; स्वधा, स्वाहाकार = यज्ञयाग.]

स्वीकार पुं. घेणें, संमति, कबूल करणें. Acceptance, assent.
[सं. स्वीकार; स्वी + कृ. स्वीकार(णें) (नाधा.) = पत्करणें < स्वीकार.]

स्वेत पुं. पूल, सेतु. A bridge.
[सं. सेतु. कृत्रीम संस्कृतीकरण होऊन स्वेत; पेकाम. सेत. पत्राचा सेत लावला (पेद.).]

स्वेत वि. पांढरा स्वच्छ. White.
[सं. श्वेत; याकाम. स्वेत (नरुस्व. ४९४).]

स्वेद पुं. घाम. Sweat, perspiration.
[सं. स्वेद ४ स्वेदने–स्विद्, स्विज्ञ; याकाम. स्वेद (= घाम;–नरुस्व. ५५८); अकाम. सिज(णें), घामानें शिज(णें).]

स्वैंपाक स्वयंपाक पहा.

स्वैर वि. मनाला वाटेल तसा वागणारा. Self-willed.
[सं. स्वैर, स्व, √ ईर् गतौ; अकाम. स्वैर, सैर.]

स्वैरिणी स्त्री. स्वच्छंदानें वागणारी स्त्री, जारिणी, व्यभिचारी स्त्री. A self-willed woman.
[सं. स्वैरिणी, स्व + √ ईर; याकाम. स्वैरिणी (नरुस्व. ४८०).]

ह पुं. मराठी वर्णमालेंतील तेहत्तिसावें व्यंजन. मराठींतील हा महाप्राण असून ह्याचें उच्चारण कंठ्य आहे. ह्याचें उच्चारस्थान कंठ आहे. औरस्य उच्चार हि ह्याचा होतो. पाणिनीच्या हयवरट् ह्या सूत्रावरून आद्य वर्ण 'ह' असावा असें कांहीं विद्वान् म्हणतात. (भागवत–वि. फा., १.) The thirty–third consonant in Marathi alphabet, the gutteral aspirate.
[(आद्य ह) सं. ह, स, (स्वर); प्रा. ह. हन्–हाण; अन्य–हाण.
(मध्य) सं. श, स; प्रा. ह.
सं. ख, घ, थ, फ, भ; प्रा. ह. लिख–लिह; मेथुन–मेहुण नाथ;–नाहो (स्पर्शत्व लोप. प्राकृत नियमान्वयें) कधीं कधीं 'हकार' आगम म्हणून येतो. सोहोपें, सोहोज्वळ, माहेर (मातृगृह).]

हइराण, **हइक**, **हउद**, **हउस** इत्यादि **है** आणि **हौ** वर्णाखालीं पहा.]

हक, हक्क पु. अधिकार, मालकी. Authority, claim, mastery, ownership.
[अर. हक् = खरें, सत्य, ईश्वर,–त्यावरून न्याय्य मागणी, हक्क = मालकी; हक् ना हक्, हकनाक, हकनाहक. = विनाकारण, उगांच, अन्यायानें.]

हक(णें), हांक(णें) क्रि. पुढें जावयास लावणें, पुढें जाणें. To drive.

[म. श्वंक्, स्वंक् १ गतौ (?), हक. हांकणें पहा.]

हकाक(णें) क्रि. ओरडाओरड करणें, विनवणी करणें, गरजू होणें. To raise a cry, to supplicate, to be in want of.

[वैसं. आ + कै-आकायति. ध्वनिशब्द.]

हकाट(णें) अक्रि. जाहीर करणें, ओरड करणें. To proclaim, to cry.

[सं. **हक्कार** = '**हक्**' असा शब्द. ध्वनिशब्द.]

हकार(णें) सक्रि. पुकारणें, प्रेरणें, हांक मारून हांकणें. To proclaim, to encourage, to call to.

[सं. **हक्कयति** (?), **आ + कारय**, √ **कृ** (शब्दे); प्रा. **हक्कार**; पं. **हाक**, **हकल**; हिं. **हकारना**; बं. **हाकिते**; गु. **हाकारवूँ**. हाकारणें पहा.]

हकाल(णें), हाकल(णें) सक्रि. काढून लावणें. To drive off.

[सं. **हवकार**, **हक्कार** (नाथा.).]

हकीक(ग)त स्त्री. वृत्त, बातमी, अहवाल. An account, a statement, a report.

[अर. **हकीकत्**; पेकाम. **हकीकत** (रा. १७-३८); अकाम. **हकीगत**.]

हकीम पुं. वैद्य. A physician.

[अर. **हाकीम्** = न्यायाधीश, राजा, स्वामी; अर. **हकूम्** = नियमणें, निवडणें. ह्यापासून **हकीम**, **हुक्म**, **हुकुम**, **हिकमत** हे शब्द सिद्ध होतात.]

हंकीम पुं. अधिकार. Authority.

[अर. **हकूम्** = नियमणें, निवडणें.]

हक्क पुं. मालकी, वारसा, प्राधान्य, पगार. Right, title, the share due.

[अर. **हक्** = सत्य, खरें; अकामसा. **हकटाक** = देशमुख वगैरे अधिकारी; **हक्कताला** = सर्वश्रेष्ठ ईश्वर; **हक्कदार** = हक्काचा मालक; **हक्कहवाल** = सुस्थिति. **हक्** पहा.]

हग(णें) अक्रि. शौचास होणें, सोडणें. To disharge or void (excrement).

[सं. **हद्** १, ४ **उत्सर्जने**; प्रा. **हज्ज** (?); कु. **हगणो**; आ. **हागिब**; बं. **हागा**; ओ. **हगिब**; हिं. **हगना**; पं **हगणा**; लां. **हग्गण**; सिं. **हङ्गणु**; गु. **हगवूँ**; ने. **हग्नु**; कान. **हकु** = वाळलेला श्लेष्मा, शेणाचा वाळलेला पापुद्रा; अकामसा. **हगट(णें)**, **हगुट** (सं. **हद्** (?) = हगणें); **हगंदारी** = खेडेगांवांतील सार्वजनिक शौचाची जागा; **हगरा** = सारखा हगणारा; **हगरडा** = हगून ढुंगण न धुतलेला.]

हंगाम पुं. वेळ, सुगी, मोसम. The season.

[फा. **हंगाम्**.]

हगामा, हंगामा पुं. कुस्त्याचा फड, दंगल, धुमाकूळ, गडबड, दंगा, बखेडा. A wrestling arena, uproar, tumult.

[फा. **हंगाम्**; पेकाम. **हंगामा** (रा. १-२५).]

हजर वि. सिद्ध, वर्तमान, तयार. Ready, present.

[अर. **हाजीर**, **हाझीर** = तयार सिद्ध; अकामसा. **हजिरी**, **हजरी**, **-पट**, **-खर्डा**.]

हजाम पुं. न्हावी. A barber.

[अर. **हज्जाम्**; **हजामत** = श्मश्रू, (लक्षणा) कानउघाडणी.]

हजार वि. सहस्र, दहादां शंभर. Thousand.

[फा. **हझार्**. हा शब्द हिंदुस्थानांतील सर्व भाषांत आहे.]

हजारा पु. सोंगट्याच्या खेळांतील दान (तीन फाशांनीं पडलेले नऊ किंवा सात), अनेक धारांचें कारंजें. A term at the game of draughts, a spray.

[फा. **हजारा**.]

हजिंवा, हजिमा पुं. गर्दी, दाटी, अतीशय, पराकाष्ठा, धुवा, फजीता. Crowdedness, extremity, disgrace, discomfiture.

[अर. **हझीमा**.]

हट(णें) क्रि. मागें जाणें, मार्गांतून दूर जाणें, मागें सरणें, परतणें. To recede, to retire, to step back.

[सं. **अट्ट्** १ अनादरे (?); का. **हटुँ**; कु. **हटणो**; आ. **हटिब**; बं. **हठा**, **हटा**; ओ. **हटिबा**; हिं. **हटना**; पं. **हटणा**; लां. **हटण**; सिं. **हटणु**; गु. **हटवूँ**; ने. **हट्नु**.]

हंट, हट्ट, हाट पुं. बाजार, फिरता बाजार. A market, a movable market.

[सं. **हट्ट**, **हाट**; प्रा. **हट्ट**; पं. **हट्ट**, **हाट**; हिं. बं. **हट**, **हट्ट**; गु. **हाट**; सिं. **हट**; अकामसा. **हाट बाजार**, (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द आहेत.); **हटावू**, **-ऊ** = बाजारी.

१हट पु. युद्धभूमि, रणांगण. A battle-field.
[सं. **हट** ; याकाम. **हट** (=रण).]
कांस घालौनि गगनाचा हटीं कसुमायधू हा ॥ नरुस्व. ४९८.

हटक(णें) क्रि. आडवणें, अडथळा करणें, हांक मारणें. To call, to challenge, to defy.
[सं. **आ + टक्** १ बंधने, **स्तक्** १ रोधने (?); हिं. **हटकना** ; पं. **हटकणा** ; सिं. **हटकणु** ; पेकाम. **हटक**, **हटकी** (मोसभा. ६२०).]

२हट, हट्ट पुं. हेका, आग्रह, दुराग्रह. Obstinacy, stubbornness.
[सं. **हठ, हट** = जोर; **हठात्**. परंतु मराठी शब्दाचा अर्थ संस्कृत '**हठ, हट**' ह्या शब्दांच्या अर्थाहून निराळा दिसतो. मराठी शब्दाचें मूळ निराळें असावें व तें द्राविडी असावें असें वाटतें.]

हट्टी स्त्री. जत्रेंतील बाजार, कारू लोकांची एकत्र वस्ती, भिल्ल रामोशी लोकांची वसाहत. A bazar in a fair, a colony of artisans.
[सं. **हट्ट**.]

१हडक(णें) क्रि. सपाटा मारणें. To strike smartly.
[देप्रा. हड्ड (?); हिं. **हडक्ना** ; सिं. **हडकिजणु** ; गु. **हड्हड्**.]

२हडक(णें) सक्रि. वाळणें, सुकें होणें. To dry, to become dry.
[सं. **सम् + आ + द्राक्ष्** १ शोषणे (रा. धा.).]

हड, हड पुं. कुत्र्याला वारण्याचा शब्द. A word used in driving away a dog.
[सं. १ **हड्** १ गतौ, २ **हुड** ; देप्रा. **हुड** = श्वान, कुत्रा. किंवा **ध्वनिशब्द**.]

हड, हड्डक, हड्डी न. हाड, अस्थि. A bone.
[सं. **अस्थिन्** ; प्रा. **अट्ठी** ; देप्रा. **हट्ट. आठी, हट**, असे दोन तद्भव होतात. अकामसा. **हडक(णें)** = वाळणें, हाडासारखें कोरडें होणें. **हडकी** = महाराच्या नोकरीबद्दल इनाम, हाडेंवगैरे गोळा करण्याची नोकरी व वेतन. **हाडकुळा** = मांस नसलेला, रोड (म. **हाड** + कान. **कोळ** = काठी); **हाडवैर** = कायमचें तीव्र शत्रुत्व, हाडीं मांसीं खिळलेंलें वैर ; **हडौती** (याकाम. **हडौती** ज्ञा. ६-२०७) = गळ्यांतील हाडांचा खळगा.]

हडदा पु. गुंता, पायगोवा, त्रास, पायखोडा. A clog, a fetter.
[बौ. सं. **हडि** (पुं); बं. **हडि**.]

१हडप न. न्यास, जामीन, ओल, तारण, पत. A pledge or deposit in security.
[कान. **हडप** = लहान पिशवी ; कान. **अडसु** = गहाण ठेवणें.]

२हडप न. पान, विडा. A betel leaf rolled.
[देप्रा. **हडप्प** (=तांबूलपात्र) ह्याचा कान. '**हढप**' ह्या शब्दाशीं संबंध असावा. याकाम. **हडप** (ज्ञा. १३-४१९); **हडपी** = विडा करून देणारा नोकर; **हडपिणी** = तांबूलकरंकवाहिनी स्त्री. याकाम. हडपु (ज्ञा. १७-२७६).]
सवें कर्पुरिका हडपिणी : चंद्रिका चवर–ढाळिनी ॥ नरुस्व १०२.

हडवड स्त्री. गडबड, गोंधळ. Commotion, uproar.
[ध्वनिशब्द. शिकाम. हडबड (रामदास).]

हडस(णें) सक्रि. एकदम ओढणें, जोरानें ओढणें, खेंचणें, आंत दडपणें, निक्षून सांगणें (ल.). To pull suddenly, to push in.
[सं. **अंतर् + अस्** ४ क्षेपे किंवा **हठ्** ; अकामसा. **हडसून खडसून** = रोख ठोक, बजावून.]

हडळ, हाडळ स्त्री. स्त्रीपिशाच, (लक्षणा) हडळी सारखी दुष्ट स्त्री. A female goblin.
[देशी. **हडळ** (?).]

हण(णें), हाण(णें) उक्रि. मारणें, जावयास,–चालावयास लावणें, हांकणें. To strike, to drive by beating.
[सं. **हन्** २ हिंसायाम्, गतौ ; प्रा. **हण** ; सिं. **हणणू** ; गु. **हणवूँ** ; हिं. **हनना** ; (सं. **हत + ल**), याकाम. **हाणितल, हाणियल, हाणिळ. हन्** चा संस्कृतमधील अर्थ आणि **हाण** चा मराठींतील अर्थ ह्या दोहोंत फरक आहे.]

हणगा, हण्डगा पुं. नपूंसक (निन्दाव्यंजक). An impotent (person).
[कान. **हेण्णिग** = नपूंसक, भित्रा. **हेण्णु** = स्त्री. 'हनुमान् पासून श कोकार व्युत्पत्ति काढतात ती पटत नाहीं. अकामसा. **हणगोबा** = मूर्ख अडाणी मनुष्य.]

हणम वि. मोठ्या शिंगाचा बैल वगैरे जनावर. A bullock with long horns.

हणमंत पुं. मारुती, हनुमान. The god *Maruti*.
[सं. हनुमान्; प्रा. हणुमंत.]

हणवट, हणू स्त्री. खालच्या ओठाचा खालचा भाग. हनवट पहा. The chin.

हत वि. मारलेला, ठार केलेला, तडाखा बसलेला. Slain, beaten.
[सं. हत, निष्ठा, √ हन् २ हिंसायाम्; अकामसा. हतभाग्य = कमनशीब, दुर्दैव.]

हण्डा पुं. एक मोठें भांडें (पाणी भरण्याचें). A big vessel.
[कान. हण्डा = मोठें पसरट तोंडाचें भांडें (विशेषतः कांचेचें); सं. हंडा (?), हण्डक, हण्डिका हें उत्तरकालीन संस्कृतीकरण दिसतें.]

हंडी स्त्री. मातीचें गाडगें, भांडें, कांचेचें भांडें (दिव्यासाठीं). A (metal or earthen) vessel.
[सं. हण्डिका (संस्कृतीकरण नंतरचें); कान. हंडा = कांचेचें भांडें, शिजविण्याचें भांडें; कु. हानो, हानी; बं. हॉडल, हाँडा, हॉडी; ओ. हण्डा, हाण्डी; बि. हंडा; हिं. होड, हाँडी; पं. हाँडी; लां. हाण्डी; सिं. हण्डी; गु. हाँडी; याकाम. हांडी (ज्ञा. १६-३६८). गाजराची हण्डी, दहीं हण्डी हे शब्दप्रयोग रूढ आहेत.]

हतगा, हदगा पुं. मुलींचा हस्त नक्षत्रांत खेळण्याचा एक खेळ. A game of girls.
[सं. हस्त; प्रा. हत्थ + गा.]

हतवस(णें) सक्रि. स्वाधीन करणें, ताब्यांत घेणें. To put in the custody of, to commit to the charge.
[सं. हस्त + वश (?); बकाम. हातवस (ए. भा. २८-२९९).]

हताळ(णें) सक्रि. हात लावणें, मळवणें. To soil, to touch.
[सं. हस्त + तळ.]

हतियार, हत्यार न. साधन (मारण्याचें, कामकरण्याचें). A weapon, an instrument.
[सं. हस्तकार (?), हस्तकार्य; पा. हत्थकम्मम्; प्रा. हत्थियार; देप्रा. हत्थियार; बं. हतियार; ओ. हतिआर; हिं. हथियार (पुं.); पं. हथिआर (पुं.); लां. हाथेआर (पुं.); सिं. हाथिआरु (पुं.); गु. हाथियार (पुं. न.); याकाम. हतियार (ज्ञा. ११-२१४); पेकाम. हतियेर; अकाम. हतेर, हत्यार. आपण हात हतियार.]

हातोडा पुं. लहान घण, ठोकण्याचा घण. हातोडा पहा. A hammer.

हत्ती पुं. प्राणिविशेष, सोंड असलेलें जनावर, गज. An elephant.
[सं. हस्तिन्; पा. प्रा. हत्थी; का. होस्तु; प. पहा. हाथी; कु. हाती; आ. बं. ओ. हाति; हिं. गु. हाथी; ने. हाति; अकामसा. हत्तीचें मढें = अवाढव्य ओझें.]

हत्या स्त्री. मारणें, हिंसा, वध. Slaying, slaughter.
[सं. हत्या, √ हन्.]

हत्यार न. हतियार पहा. A weapon.

हदर(णें) अक्रि. हिसका बसणें, धक्का बसून हलणें. To tremble, to vibrate.
[सं. ध्व १ अवध्वंसने.]

हदाल,-ळ वि. मोठा, स्थूल. Big, fat.
[कान. हदुल.]

हदी पुं. वाट दाखविणारा. A guide.
[अर. हादी; पेकाम. हदी (पेद ३·१८३).]

हद्द स्त्री. सीमा, सींव, मर्यादा, कांठ. Limit, boundary.
[अर. हद्द; पेकाम. हद, हाद, हद्द.]

हन अ. आणखी, खरोखर. More, indeed.
[सं. हन्त.; याकाम. हन (ज्ञा. ४-९७).]

हनन न. मारणें, वध, हिंसा. Slaughter.

हनवट स्त्री. तोंडाच्या खालचें हाड, दाढी. Chin.
[सं. हनुवटी; प्रा. हनुवट्टी, हणुवट्टि.]

हनुमान्,-मंत पुं. मारुती. The god *Maruti*.

हंतरूण, आंथरूण न. बिछाना. A bed, a bedding.
[सं. अवस्तरण, √ स्तृ; प्रा. ओत्थरण.]

हप(ब)का पुं. पाण्याचा जोरांत दिलेला शिंपका. A gush of water, a shake.
[ध्वनिशब्द.]

हप(ब)शी पुं. हबसाणांतील मनुष्य. An Abyssinian.

[*Eng.* Abyssinia; अर. **हबश** ; पोर्तु. Abex पासून इंग्रजी Abyssinian (इ. स. १६००); **हपसाण**, **हबसाण** = हबशी लोकांचा मुलूख,–अमल.]

हपाप(णें) अक्रि. हांव धरणें, लोभ करणें,–सुटणें. To have a craving for.

[सं. **हा** (णिच्–**हापय**) + **आप्** ५ प्रापणे (रा.धा); अकामसा. **हपाप** = लोभ, अनावर इच्छा ; **हपाप** = जूलूम, त्रास, शिव्याशाप (हा ! पापम्); **हपापाचा माल गपाप** = अन्यायानें मिळविलेला लाभ तसाच लवकर नाहींसा होणें (हा सबंध ध्वनिशब्द आहे कां ?).]

ह(हा)पूस पुं. एक प्रकारचें कलमी आंब्याचें फळ. A kind of mango.

[पोर्तू. **अल्फॉन्सो** (Alfonso) ह्यानें प्रथम तें कलम तयार केलें. दुसरा 'पायरी' हा शब्द तसाच नांवावरून उत्पाद्य आहे.]

हप्ता पुं. किस्त, मुदतींत द्यावयाचा भाग,–अंश, ठराविक काळाची मुदत. An instalment of rent.

[फा. **हफ्त**, **हप्ता** = आठवडा. सं. **सप्त** ह्या शब्दाशीं संबध आहे का ? मूळ अर्थ 'ठरविलेली मुदत.' पुढें अर्थामध्यें सामान्यीकरण झालें.]

हबक(णें) अक्रि. जोरांत धक्का बसणें, हिसका बसणें, (लक्षणा) लुबाडणें, अपहरण करणें, शिंपडणें. To shock, to jolt, to rob, to sprinkle.

[सं. **सम्** + **वष्** १ हिंसायाम् (?); अकामसा. **हबक**, **हबका**, **हबकी** = धक्का, तोटा, अडचण. हा ध्वनिशब्दच असावा.]

हबेलंडी स्त्री. धांदल, गाळण, फजिती. A distressful condition, a plight.

[हिं. **हा–बे–लंडी**.]

हम वि. सगळें, सर्व. Whole, all.

[अर. **आम्**; फा. **हमह्**; अकामसा. **हमखास** = खात्रीनें, निश्चयपूर्वक, प्रसिद्धपणें; **हमरस्ता** = सार्वजनिक रस्ता; **हमरहा** = सर्वांचा वापर.]

हमराह अ. बरोबर. सांगातीं. With.

[फा. **हम्राह** ; पेकाम. **हमराह** (रा. १-१९८).]

हमरी तुमरी स्त्री. अरेतुरेचें भांडण. A sharp affray.

[हिं. **हमरा** = आमचा, **तुमरा** = तुमचा ;–माझें–तुझें, मी–तूं अशी भाषा.]

हमशाई स्त्री. जवळीक, शेजार. Nearness, proximity

[फा. **हम्साई** ; पेकाम. **हमशाई,–ही**.]

हमामखाना पुं. आंघोळीचें घर, न्हाणीघर. A bath-room.

[अर. **हम्माम्** + (फा.) **खाना**.]

हमामा पुं. एक गुराख्याचा खेळ, गोंधळ, धांगडधिंगा, Commotion, uproar.

[ध्वनिशब्द.]

हमाल पुं. मजूर, बोजा उचलणारा मनुष्य. A coolie. a labourer.

[अर. **हम्मल्**.]

हमी स्त्री. जबाबदारी, खात्री, जिम्मा. Responsibility, surety.

[अर. **हामी** = रक्षण, √ हमदन् = रक्षण करणें.]

हमेशा अ. नेहमीं, सर्वकाळ, सतत. Always, often, constantly.

[फा. **हमिशह्**.]

हंब(णें) अक्रि. ताठा दाखविणें. To be arrogant.

[सं. **अहंयु** (नाधा.).]

आह्मी ब्रह्मविद् ब्राह्मण। येर चांडाळ कीं अवघे जन।
ऐसें जयाचें ज्ञान। हुंबत असें ॥ शिवकल्याण अमृ.
पृ. ४. ओंवी ९७.

हंबर(णें) अक्रि. (गाईचें) ओरडणें. To bellow.

[ध्वनिशब्द; सं. **हम्मा**, सं. **हम्मरटण** ; पेकाम. **हंबरडा** ; अकामसा. **हंबरडा** = आक्रोश, दीनवाणें रडणें (मोकृष्ण ५३-२७).]

हंबरू पुं. गळफांस. Cloth tied round the neck.

[सं. (?); याकाम. **हंबरू** (भा. ए. ५९६).]

तैसा प्रपंचाचा हंबरू : केविं र्‍ये जिउ निराकारु ॥.

हय पुं. घोडा. A horse.

[सं. **हय**. **अश्व** पहा.]

हयगय स्त्री. हेळसांड, दुर्लक्ष, ढिलाई. Negligence, indifference.
[हिं. **हइगई.**]

हयराण, हैराण वि. व्याकूळ, त्रस्त. Afflicted, troubled.
[अर. **हैरान्.**]

हयात स्त्री. आयुष्य, जिवंतपणा. Life.
[अर. **हयात्.**]

हर वि. सर्व. दरेक, प्रत्येक. Every.
[फा. **हर**; अकामसा. **हरएक** = प्रत्येक; **हरकाम्या** = कोणतेंहि काम करणारा; **हरतऱ्हा** = सर्व प्रकार; **हरदम**, **हरवख्त** = हरघडी; **हरप्रयत्न** = सर्व प्रयत्न; **हरहुन्नरी** = सर्वधंद्याचा कसबी; **हरहमेशा** = नेहमीं.]

हर(णें) उक्रि. पराजीत होणें, पळून जाणें, (मुलें खेळामध्यें हा धातु वापरतात). To fail, to be defeated, to run away.
[कान. **हरि** = धांवणें, वाहणें.]

हर(णें) क्रि. गमविणें, लुटणें, सांडणें. To lose.
[सं. **हरति**; पा. **हरति**; प्रा. **हरइ**; का. **हरुन्**; आ. **हरिब**; बं. **हरा**; ओ. **हरिबा**; हिं. पं. **हरना**; गु. **हरवूँ**; २ सं. **हारय**; पा. प्रा. **हार**, इतर अभाआ. भाषांत '**हा**' आद्यवर्ण धातु आहे. याकाम. **हर** (ज्ञा. १५-२४२); **हरलेपण** = अभाव, नसणें (अमृ. ७-१०४).]

हर(ख)क(णें), अक्रि. आनंदणें, सुख होणें, हुरळणें. To be jubilant.
[सं. **हर्षः**; प्रा. **हरख**, **हरक**; ने. **हर्क**; याकाम. **हरुष** (नरूस्व. ५१२), **हरुक**, **हरुख**; अकाम. **हरक**, **हरख.**]

हरकत स्त्री. विरोध, अडथळा, विलंब. Opposition, hundrance.

हरकारा पुं. जासूद, निरोप्या. A messenger, an errand-boy.
[फा. **हकारा**; बं. **हरकेरु**; हिं. **हरकारा**; **हर**–प्रत्येक; **कार** = काम, **हरकरु.** परंतु मराठी इतिहासकाळांत ह्याच्या अर्थांत फरक पडला आहे. **जासूद, काशीद हरकार**– वाड्यांतील वाड्यांत जवळ निरोप पोहोंचविणारा.]

हरकी स्त्री. बक्षीस, आशीर्वाद, जय,–ह्यांबद्दल बक्षीस. A reward, a blessing.
[कान. **हरके** = आशीर्वाद, व्रत, प्रसाद. कपड्यांत हळद, पैसा, दागिना बांधून उशाशीं ठेविलें म्हणजे स्त्री प्रसूत होते. त्याला **हरके** म्हणतात. संस्कृत **हर्ष** शब्दाशीं संबंध आहे काय? अकाम. **हरकी** = हरवलेली वस्तु मिळवून दिल्याबद्दल बक्षीस.]

हरगी(घी)ज,–स अ. नेहेमीं, हमेश, मुळींच, बिलकूल. Always, often, even.
[फा. **हर्गीझ**; पेकाम. **हरगीस** (पेद. ६-१८०).]

हर(री)ण पुं. न. प्राणिविशेष, मृग. A deer.
[सं. **हरिण**; पा. प्रा. **हरिण** (पुं.); का. **हर्युं**; आ. **हरिना**; बं. **हरिनी**; ओ. **हरिणि**; हिं. **हरिन्**, **हिरन्** (पुं.); पं. **हरनी** (स्त्री.); लां. **हरण**; सिं. **हरिणी**; गु. **हरण** (न.).]

हरताळ, हर्ताळ पुं. एक पिवळा विषारी पदार्थ. A yellow substance.
[सं. **हरितालक**, **हरिताल.** पूर्वी हस्तलिखितें लिहितांना चुकीचा शब्द खोडावयाचा असेल तर हरताळ लावून खोडीत असत. त्यावरून 'हरताळ–लागणें,–फासणें हे प्रयोग रूढ झाले.]

हरताळ पुं. व्यवहारस्थगन,–बंदी, बाजार बंद करणें, संप. A strike, closing of shop or business.
[सं. **हरतालिका**, < **हरिद्रा** (म. **हळद**). वरील **हरताळ** पहा. कान. **होरे** = काम, धंदा, **हरदु** = व्यापार, उदीम; **हर**, √ **हरि** = निघून जाणें, सोडणें, संपविणें. **ताळ**, √ **तळवू** = बंद करणें, दिरंगाई करणें; **हर + ताळ**; फा. **हर** = घरांतील मधला भाग, माजघर; **ताला** = कुलुप; घराला कुलुप लावणें. मराठीमध्यें हा शब्द निःशस्त्र प्रतिकाराच्या चळवळीपासून फार रूढ झाला. तो गुजराती भाषेंतून आला. इ. स. १९२० पासून त्याचा अधिक उपयोग होऊं लागला.]

हरतालिका स्त्री. गौरीची प्रतिमा. An image of the goddess.

हरदावळ पुं. घोड्याच्या छातीवरील केंसांचा भोंवरा. The bunch of hair on front part of a horse.
[सं. **हृदयावर्त**, **हृदयावलि.**]

हरदास, हरिदास पुं. कीर्तनकार, कथेकरी बुवा. A professional devotee singing the prayers of gods.
[सं. **हरिदास.**]

हरदू वि. दोघे, दोन्ही. Both.
[फा. **हर्दो.**]

हरद्र न. मुद्दा, मजकूर, मतलब, अर्थ. Meaning or intent, design.
[सं. **हार्द** < **हृद्**; पेकाम. **हरद्र**–हरद्र मनास आणणें. (वाड. १-३११).]

हरप,–र्फ पुं. अक्षर, वर्ण. A letter of the alphabet.
[अर. **हरफ्**; पेकाम. **हर्फ.**]

हरप(णें) उक्रि. हरविणें, गमाविणें. To lose.
[सं. **हारय**, √ **हृ**; पा. **हरापेति**; शिकाम. **हरप** (तु. गा. ५८).]

हरभ(ब)रा पुं. एक धान्यविशेष, चणा. Gram.
[सं. **हर + भरक** (?); अकामसा. **हरभऱ्याच्या झाडावर चढणें** = गर्वानें फुगणें. फाजील स्तुतीला बळी पडणें. ह्यांतील हरभरा हा शब्द परकी असावा. द्राविडी आहे काय ?.]

हरमाळ स्त्री. ओळ, रांग. Rank, row, line.
[म. **हर + माळ.**]

हरंबळ(णें) अक्रि. तळमळणें. To toss or fling about in pain.
[सं. **सम् + रभ्** १ सामर्थ्यें + **ळ**; शिकाम. **हरंबळ**; अकाम. **हरमळ.**]

हरव(णें) सक्रि. गमविणें, सांडणें. To lose.
[सं. **हराय**, √ **हृ**; पा. **हरापेति**; प्रा. **हरावेइ**; आ. **हराविदु**; कु. **हराणो**; अ. **हराइब**; ओ. **हराइबा**; हिं. **हराना**; पं. **हराउणा.**]

हंरळ,–ळी स्त्री. दूर्वासारखें बारीक गवत. A kind of thin grass.
[सं. **हरिताली** (कोशसंस्कृत); प्रा. **हरिआली**; हिं. **हरियल.**]

हंरळ पुं. लहान दगड, गार, कण. A small stone, fine pebble, gravel.
[कान. **हरळु**; याकाम. **हरळु हरळु** (शा. १३-३३६).]

हरळ(णें) अक्रि. तोडणें, फट ठेवणें, पाडणें, विरळ दांत असणें. To stand apart, to have interstices.
[सं. **सम् + रद्** १ विखण्डने; शिकाम. **हरळ** (दा ३-७-२३).]

हरळी स्त्री. आरोळी, हांक. A call, a loud cry.
[सं. **आरव**; ग्रा. **हरळी**, **हारळी.**]

हरहर अ. शिवशिव, उत्साहदर्शक रणध्वनि. An invocation of *Hara* indicative of ardour.

हरा पुं. बांबूच्या कामट्याची मोठी पाटी. A large basket.

हरामजादा वि. पुं. वाईट जन्माचा. Base-born.
[फा. पेकाम. **हरामजादा,–जादगी** (रा. ८-१५९).]

हराम वि. दुष्ट, वाईट, निंद्य. Unlawful, irregular.
[अर. **हराम्**; **हरामखोर** = स्वामिद्रोही, लुच्चा (मनुष्य).]

हरि पुं. विष्णु, कृष्ण, घोडा, सिंह, सूर्य, इंद्र. The name of *Vishnu*, a horse, a lion.
[सं. **हरि**, √ **हृ**; अकामसा. **हरिजन** = महार वगैरे अन्त्यज. **हरिजागर** = एकादशी दिवशीं भजन कीर्तनांत करावयाचें जागरण; **हरिदास** = कथेकरी; **हरिदिन** = एकादशी, हरीचा दिवस, **हरिद्वार** = एक तीर्थक्षेत्र; **हरीपाठ** = अभंगाचें (विशेषतः नामदेवाच्या) पठण; **हरीचा लाल** = चैनी मनुष्य (लक्षणा).]

हरिक,–ख पुं. हरक पहा.

हरिचंदन न. पिवळें चंदन. Yellow sandal wood.
[सं. **हरिचंदन.**]

हरि(री)त(णें) सक्रि. हिसकणें, काढून घेणें. To take away from, to rob or deprive one of.
[सं. **हृत**–(निष्ठा √ **हृ**); पेकाम. **हरिते.**]

हरिद्रा स्त्री. हळद. Turmeric.
[सं. **हरिद्रा.**]

हरियळ पुं. मधमाशा खाणारा प्राणी. Indian bee-eater.
[सं. **हरिताल**; प्रा. **हरिआल**; बं. **हरियाल्**; हिं. **हरियाल** (हिरवा पारवा); पं. **हरिआला**; गु. **हरियाळू.**]

हरीप पुं. शत्रु, वैरी. An enemy, a foe.
[अर. हरीफ़् ; पेकाम. हरीफ (सभासद बखर).]

हरूख, हरूष पुं. आनंद. हरक पहा. Joy.

हरोल स्त्री सैन्याची पिछाडी. The rear of an army.
[फा. हरावुल् ; पेकाम. हरोली (पेद.१-२२).]

हंरोळी स्त्री. हांक, ओरड. हरळी पहा. A loud cry.

हंरोळी, आरळी स्त्री. गाकर, आरळी. A wheaten cake.
[सं. आहार, आ + √ हृ.]

हर्ता वि. हरण करणारा, निवारणारा. One removing.
[सं. हृ + तृ.]

हर्ष पुं. आनंद. Joy.
[सं. हर्ष ; अकामसा. हर्ष(णें) = आनंद होणें.]

हर्षामर्श पुं. रागलोभ, युद्धतह. Joy and anger, squabbling.
[याकाम. हर्षामर्ष (ज्ञा. १२-१६८) ; पेकाम. हर्षामर्श (बाडशा. २४).]

हल् न. व्यंजन. A consonant.

हल पुं. नांगर, आऊत. A plough.

हल्लक, हलाक वि. अशक्त, क्षीण. Weak, emaciated.
[अर. हलाक् ; पेकाम. हलाक (चित्रगुप्त ७९) ; अकाम. हल्लक,–ख.]

हल(णें) अक्रि. सरणें. To move.
[सं. हल् १ चलने ; देप्रा. हल्ल ; प्रा. हल्लइ ; का. हलुन् ; हिं. हालना ; पं. हल्लणा ; सिं. हलणु ; गु. हालवूँ. ब्लोक्चें म्हणणें हा शब्द द्राविडी आहे. कान. अले (क्षोभणे), अलगु ; तामिळ. अलेद्र ; का. अलकु, अलचु ; तेलु अलचु (हलणें).]

हलका वि. थोड्या वजनाचा, जड नसलेला, (ल.) कमी महत्त्वाचा, क्षुद्र, कमी. Light, of small weight, insignificant.
[सं. लघुक ; प्रा. हलुअ ; कु. हल्को ; बं. हल्का ; हिं. हलुका, हल्का ; पं. हल्का ; हलु + क ; शब्द द्राविडी असावा असें ब्लोक सुचवितो. तेलुगु. अलकन, एल्कि.]

हलवा पुं. तिळगूळ, एक प्रकारचा मिठाईचा पदार्थ. A kind of sweetmeat.
[अर. हल्वा, हलाव. कान्स्टांटिनोपल पासून कलकत्त्यापर्यंत हा शब्द रूढ आहे. अकामसा. हलवाई, हल्वाई = मिठाईवाला < अर. हल्वाई.]

हलाल वि. योग्य, न्याय्य. Right, just.

हलालखोर पुं. भंगी वगैरे कनिष्ठ कामें करणारा. A sweeper, a cleaner.
[अर. हलाल खोर = न्याय्य असेल तेंच उपभोगणारा. अर. हलाल् – धर्मप्रमाणें हत्या केलेला प्राणी. ह्यांत अर्थभ्रंश झाला आहे किंवा वाईट धंदे करणाऱ्याला गौरवून हा शब्द वापरतात. ह्याच्या उलट ‘हरामखोर’ = निषिद्ध खाणारा. निमक हराम, निमक हलाल हे शब्द चिन्त्य आहेत.]

हलाहल न. विष, समुद्रमंथनांतून निघालेलें विष. The poison churned out of the sea.

हले(णें) सक्रि. बडविणें, मारणें. To strike, to thrash.
[सं. हल्य = नांगरास जुंपण्यास योग्य केलेला. याकाम. हालया (अमृ. ७-५०).]

हल्य वि. नांगरण्यासंबंधीं. Pertaining to ploughing.
[सं. हल्य. < हल.]

हल्या पुं. रेडा, टोणगा, मंद (ल.). Dullard
[सं. हल्य ; हिं. हेला.]

हंस(णें) अक्रि. हास्य करणें, स्मित करणें (लक्षणा), उपहास करणें, नांवें ठेवणें. To laugh, to smile. to deride (fig.).
[सं. हस् ; प्रा. हस ; हिं. हंसना ; गु. हंसवूँ ; हांसणें पहा. अकामसा. हंसरा (सं. हसितृ ; प्रा. हसिर) = हंसणारा. हांसें (हास्यम् ; प्रा. हंस्स) = हांस्य, स्मित.]

हसड(णें) उक्रि. जोरांत ओढणें, हिसका देणें. To pull out forcibly.
[सं. आ + सध् १ हिंसायाम् ; अकाम आसड, हासड, हसड.]

हसळी स्त्री. गळ्याजवळचें हाड, (त्यावरून) मुलांच्या गळ्यांतील सोन्याची सरी. हांसळी पहा. The collar bone, the ornament put on there.
[हिं. हसली.]

हस्त पुं हात. Hand, arm.
[**सं. हस्त, √ हन् (?)**; अकाम्सा. **हस्तकौशल्य** = हाताचें कौशल्य, कसब ; **हस्ताक्षर** = हातानें लिहिलेलें अक्षर; **हस्तें** = मार्फत, तर्फ.]

हस्ती हत्ती. An elephant.
[**सं. हस्तिन्.**]

हळ पुं. नांगर, जूं. A plough, a yoke.
[**सं. हल ; प्रा. हल ;** का. **हल , अल ;** कु. **हल् ;** आ. **हलिया** (जोडी) ; **बं. हल ;** ओ. **हल ;** बि. **हर ;** हिं. पं. लां. **हल् ;** सिं. **हरु ;** गु. **हळ.**]

हळज(णें) अक्रि. बाळंत होणें. To deliver.
[सं. (?) ; याकाम. **हळजतीं** (अज्ञातच ५७).]

हळद स्त्री. वनस्पतिविशेष. Turmeric.
[**सं. हरिद्रा ;** पा. **हलिद्दी ;** प्रा. **हरिद्दा, हलिद्दा, हलद्दा ;** का. लाँ. दोरु ; कु. **हल्दो ;** आ **हाल्धि ;** बं. **हल्दी ;** आ. **हळदी ;** बि. **हरदी , हल्दी , हरदा ;** पं. **हलदी , हलधी , हलधर ;** लां. **हलदर , हरदल् ;** सिं. **हेड्राओं, हळद ;** गु. **हळदर , हळद.**]

हळकुंड न. हळदीचा तुकडा, मुळाचें कुडें. A piece of turmeric.
[**सं. हरिद्राखंड.**]

हळबी स्त्री. एक भाषा. The language of the *Halbas*.

हळवट वि. हळवें, लवकर पिकणारें (धान्य). Mild, soft.
[**सं. लघु + वट ; हळवा** = लवकर पिकणारा.]

हळहळ स्त्री. काळजी, दुःख, हुरहुर, खेद. Care, anxiety, pain.
[सं. **हलहल** (?).]

हळीस् हळस् पुं. स्त्री. नांगराची फाळ. काठी. The pole or shaft of a plough.
[सं. **हलीषा, हलेषा** (स्त्री) ; प्रा. **हल + इसा ;** बं. **हलिसा ;** बि. **हरीस् ;** हिं. **हलस् , हरिस् , हिरस् हरस्** (स्त्री) ; पं. **हल्स् ;** लां. **हलेह ;** सिं. **हरद्य ; (ईसा, इसाड < ईषदण्डः ईषा ;** पा. प्रा. **ईसा ,** बं. **इस् ;** ओ. **इस ;** बि. **ईस ;** पं. लां. **ही).**]

हळूं अ. सावकाश. Slowly, gradually.
[**सं. लघु , लघुक ;** पा. **लहुक ;** प्रा. **लहुअ , हलुअ ;** का. **लड्. लुकु** (लहान) ; शा. **लोकु , (लहुक) ;** पपहाडी. **लउक** (लहान) ; पं. **लहुडा** (तरुण), **हलका ;** सिं. **हरिडो ;** गु. **हळु ;** मराठी शब्द **लुक्का** (लहान) ह्याशीं संबद्ध आहे.]

हळु(लु)वार(णें) क्रि. बरेंच कमी होणें. ओझें हलकें होणें. To reduce the load.
[सं. **लघुतरें** (ना.).]

तेया मनाचें मोकलें । पेटवण घातलें ।
जें यमनियमीं हलुवारलें आइतें होतें ॥

राज्ञा. ४-१३३

हा पुं. सर्व. जवळचा दर्शक. This.
[*IE.* Eiso ; सं. **एषः;** *Lat.* Is-te ; (**एषः एतस्य;** पा. **एस, एतस्स , एते**); प्रा. **एसो, एस्स ; एआणम् ;** अ. **एहा, ऐई ;** का. **थिह ;** कु. **यो ;** अ. **एही ;** बं. ओ. **ए ;** बि. **ई ;** हिं. **य ;** पं. **एह ;** लां. **ए ;** सिं. **हे ;** गु. **ए ;** ने. **यो.**]

हा अ. (निषेधदर्शक-विरोधदर्शक,-शोकदर्शक) अव्यय. Interjective indicative prohibition.
[सं. **हा ! हाय !** ध्वनिशब्द.]

हां अ. आनन्द,-संमति,-दुःखदर्शक अव्यय. An expletive showing joy, assent.
[**ध्वनिशब्द. हां , अं** इत्यादि.]

हाउली स्त्री. समूह. A crowd.
[सं **आवलि ? ;** याकाम. **आउळी** (भाए. ६३८).]

हांक स्त्री. पुकारा, आव्हान, आरोळी. A call.
[देप्रा. **हक्का , हाका.**]

हल्या पुं. निकृष्ट मनुष्य, ह्निवी. A low, dull person.
[कान **होलये**=कमी, अस्पृश्य. रेड्याला उद्देशून वापरतात.]

हवई, हवाई स्त्री. चंद्रज्योत वगैरे उडविण्याचें दारूकाम. Sort of blue-light, a kind of firework.
[फा. **हवाई.**]

हवन न. यज्ञ करणें, आहुति. Sacrificing, oblation.
[सं. **हू** ३ हवने ; याकाम. **हवन** (ज्ञा. ४-१२३).]

हवलदार पुं. पोलिस शिपायांवरील मुख्य नाईक. Lower police officer.

[फा. **हवाल–हवाला** = जामीन, वचन ; **हवालदार** = मूळ अर्थ हवाला घेणारा, जामीन ; नंतर सामान्यीकरण होऊन अधिकारी, नंतर सैन्यांतील अधिकारी.]

हवळा पुं. भाजलेला ओला हरभरा. Wet gram parched.

[सं. **होलक** (?) ; उत्तरकालीन संस्कृतीकरण.]

हवा स्त्री. वारा, वात, वायु, हवापाणी. Air, wind, climate.

[अर. **हवा** ; **हवाई**, = हवेंतील ; अर. **हवा + ई** (पष्ठीचा प्रत्यय) = हवेचे.]

हवाई स्त्री. हल्ला. Assault, attack.

[पेकाम. **हवाई** (रा. १-२०७).]

हवाल स्त्री. अवस्था, स्थिति, परिस्थिति, हकीकत. The present condition or state.

[अर. **अहूवाल.**]

हवालदील वि. घाबरलेला. Terror-stricken.

[फा. **हवाल्+दील्.**]

हवाला पुं. जामीनकी, ताबा, काळजी, हमी, विश्वास. Charge, trust, care.

[अर. **हवाला** ; अकामसा. **हवालीं** = ताब्यांत, स्वाधीन.]

हवि पुं. आहुति, बळी, यज्ञांतील होमांत टाकावयाचा पदार्थ. An oblation.

[सं. **हविस्**, √ हु ३हवने.]

हवे अ. आतां, हल्लीं. Now, at present.

[सं. **अर्वाच्** (?) ; प्रा. **हव्व** ; गु. **हवे.**]

हवेली स्त्री. टुमदार इमारत, जिल्ह्याचें ठिकाण. A large house or edifice, the district place.

[फा. **हवीली.**]

हव्य न. यज्ञकर्म, आहूतीचे पदार्थ. An article for oblation.

हव्यकव्य. न. धार्मिक कृत्य. Religious rites.

[सं. **हव्य** = देवासाठीं होमावयाचें ; **कव्य** – पितरांसाठीं अर्पावयाचें.]

हव्यास पुं. तीव्र इच्छा, हांव, नाद. Strong desire, thirst,

[अर. **हवस्.**]

हशम पुं. इसम, नोकर, नोकराची तैनात, अनुयायी, परिवार. Individual, servant, retinue.

[अर. **हशम्** ; **हशमनिवीस** = हशमांची हजिरी ठेवणारा लेखक.]

हंस पुं. पक्षिविशेष, मानससरोवरीं राहणारा पक्षी. A kind of bird, a swan.

[सं. **हंसः** ; पा. प्रा. **हंस** ; का. **उन्झु** ; आ. **हॉह्** ; बं. हिं. **हांस** ; पं. **हँस्** ; सिं. **हञ्जु** ; गु. **हँस.**]

हंसळें न. हंसाचें चित्र काढलेलें वस्त्र. A cloth on which the swan-figures are drawn.

[सं. **हंसल** ; याकाम. **हंसळें** (प्रभा. ८).]

हांक(णें) क्रि. जावयास लावणें, हाकलणें. To drive, to cause to move.

[सं. **हक्कयति** ; **श्वंक्**, **स्वंक्** – गतौ ; प्रा. **हक्कइ** ; कु. **हाक्णो** ; अ. **हाक्** (विरोध) ; बं. **हाका** ; ओ. **हंकिइबा** ; बि. **हॉकब** ; हिं. **हॉकाना** ; पं. **हक्कणा** ; लां. **हकलण** ; सिं. **हकिलणु** ; गु. **हाँकवूँ.**]

हाकार(णें) क्रि. बोलावणें, चालू करणें. To call, to begin.

[सं. **हक्कार** (नाधा.) ; प्रा. **हक्कारइ** ; बं. **हाँकारा** ; ओ. **हाकारिबा** ; हिं. **हकारना**, **हाँकारना** ; लां. **हकारण** (पक्षी उडवणें) ; गु. **हाकारवूँ** ; अकामसा. **हाकारा** (सं. **हक्कार** ; प्रा. **हक्कारा** ; बं. **हाकार** ; हि. **हाँकार**) ; **हकारणें** पहा.]

हंकीम पुं. अधिकारी, प्रांतावरील मुख्य A ruler or head-man.

हांकीम, हकीम पुं. वैद्य, मुसलमानी शस्त्रवैद्य. A physician (Unani).

हाजत स्त्री. आवश्यकता, जरूरी. Necessity.

[अर. **हाजत्** ; पेकाम. **हाजत** (रा. १९-१०६).]

हाजी वि. एक मुसलमानी बिरुद, ज्यानें मक्केची यात्रा केली असा, मक्केचा यात्रेकरू. A *Muslim* title (used for one who had been to Mecca).

[अर. **हाज्ज्** = मक्केचा यात्रेकरू ; **हज्ज्** = यात्रा ; हजीज.]

हांजी अ. खुशामत करण्याचा शब्द, '**हं होय**'. 'Yes, sir, yes, please'; a word of flattery.

[**हां जी ! हां जी.**, ध्वनिशब्द.]

हाजीर वि. उपस्थित. Present.
[अर. हाझिर्.]

हाट पुं. बाझार, व्यापाराचें स्थान. *Bazaar*, a place where business is transacted.
[सं. हट्ट; हट्टी (स्त्री); प्रा. हट्ट, अट्ट (पुं. न.); का. अठ; हाठ; कु. हाट्; अ. बं. हाट्ट; ओ. हाट; ब्रि. हाट्; हिं. हाट. द्रा. हट्ट, हट्टी (वसाहत, बाजार), द्रा. पड्ड, हड्ड > हट्टी ही व्युत्पत्ति चिन्त्य आहे. याकाम. **हाटधारण**=बाजारांतील जिनसांचाभाव, दर (शिशु. ४७); **हाटवका**=बाजारांतील जिन्नस. **हाटवट** (ऋ. ११४); शिकाम. (दा. ५-८-१९).]

हाटक न. सोनें. Gold.
[सं. हाटक.]

हाड न. अस्थि, हाड्क. A bone.
[सं. हड्डम्; प्रा. हड्ड; का. हड, अड; कु. हाड्; अ. हार; बं. हाड्; ओ. हाड; हिं. हाड्; पं. लां. हड्ड; सिं. हड्ड; (अस्थि < सं. अष्टिः, पा. अट्ठी; प्रा. अट्ठी; का. ओट्ठ; अ. आठु (गुडघा); पं. आटी, ऑट्ठ; ओ. ऑठु; हिं. आठी (फणसाची आठळी); अकामसा. **हाडीं खिळणें** = मुरणें, बिंबणें; **हाडावर मारणें** = मर्म छेदणें; **हाडें घुसळणें** = त्रास देणें; **हाडें निघणें** = अशक्तता येणें, रोडणें; **हाडखाईर** = हाडवैर, हाडें खाणारा, त्रास देणारा; याकाम. **हाडखाईरा** (ज्ञा. १३-५५०)]

हाड्या पुं. कावळा. A crow.

हाण(णें) क्रि. मारणें, तोडणें. To strike, to beat.
[सं. हतः; पा. हतो; प्रा. हय; सं. हन्, पा. हनिति, प्रा. हणइ; बं. हाना: ओ. हाणिबा.]

हाण स्त्री. तोटा. Loss or detriment.
[सं. हानि; अकाम. हाण.]

हात पुं. अवयवविशेष, हस्त, बाहु. A hand, an arm.
[सं हस्तः; पा. प्रा. हत्थ; का. अथ; कु. अ. बं. हात्; ओ. हात; ब्रि. हिं. हाथ्; प. लां. हत्थ; सिं. हथु; गु. हाथ; अकामप्र. **हात-आंखडणें,-आवरणें,-झाटपणें,-उगारणें** (मारणें),**-ओंवाळणें** (तुच्छणें);**-चेपणें** (लांच देणें);**-चोळणें** (रागावणें);**-जोडणें** (नमस्कार करणें);**-झोडणें** (संपविणें);**-टेकणें** (थकणें, दमणें);**-दाखविणें** (सामर्थ्यानें दटावणें),**-दाबणें** (लांच देणें),**-धरून जाणें** (पुरुषाबरोबर पळून जाणें),**-पसरणें** (भीक मागणें),**-पाय पसरणें,-गाळणें;-राखणें** (काटकसर करणें) इत्यादि प्रयोग रूढ आहेत. अकामसा. **हातवस(णें)** = ताब्यांत येणें, हस्तगत होणें; **हात(णें)** = सारवणें; **हातउगावा** = सूड, पारिपत्य; **हातकडी**=बेडी, हातांतील सांखळी; **हातखंडा** = कुशल, निपुण; **हातखोडा** = हाताचा खोडा-सांपळा; **हातचलाख** = लपवाछपव.]

हात पुं. डाव, खेळ, किल्ली. A trick in a game, a game, a key.

हात बोनें न. हातांतील भक्ष्य, An eatable in a hand.
[याकाम. (ज्ञा. ६-२८२)]

हातरुमाल पुं. तोंड पुसावयाचें लहान फडकें. A handkerchief.
[म. हात + रु (तोंड) माल (फडकें).]

हातरोखा पुं. पत्र, रोखा. A document.

हातवसिया वि. एक हातावर लोंबकळत असलेला. Suspended on one hand.
[म. हात + वस; याकाम. हातवसिया (धवळे).]

हाता पुं. मूठ. A handful.
[सं. हस्तक; पा. हत्थको; बं. हाता (पळी); ओ. हता; हिं. हाथा; पं. लां. हत्था (दांडा); सिं. हथा; गु. हाथो.]

हाताफळी स्त्री. कुस्ती, हाताहाताची मारामारी. A hand-to-hand fight.
[सं. हस्त + स्फाल.]

हातासन न. हातोटी. Skill.
[याकाम. हातासन (ज्ञा. ६-११९).]

हाताळ(णें) सक्रि. हातांत घेणें,-स्पर्श करणें. To handle, to touch by hand.
[सं. हस्त + तल (नाधा.); देप्रा. हत्थल.]

हातिवा पुं. काडवात. A wick.

हातोडा पुं. ठोकण्याचें हत्यार (सोनाराचें) A hammer.
[सं. हस्तकूट, हस्तताड; देप्रा. हत्थोडा; (पा. कूटम्; प्रा. कूड; अ. कुरा; ओ. कुढा; हिं. कूड, कूढी; पं. कुड; म. लांकुड?); कु. हथौडा; बं. हातुडी; ओ. हातुडा; बि. हथौडा, हायोडा; पं. हाथऊडा, लां. हाथोडा; गु. हाथोडा.]

हातोफळी अ. हातोहात, तात्बडतोब, लवकर. Immediately, smartly, from hand to hand.

हातोवा पुं. ओंजळ. A handful.

हातोसा पुं. मदत, साह्य. Help.

हातोळी स्त्री. लग्न. A marriage.

हानि स्त्री. नाश, नुकसान, तोटा. Loss, destruction, detriment.

[सं. **हानि** ; पा. **हानि** ; प्रा. **हाणि** ; का. **हान्** ; कु. **हाणि** ; आ. **हानि** ; बं. हिं. **हान** ; पं. **हाण** ; सिं. **हाणि** ; गु. **हाण. हाण** पहा.]

हांदुळ(णें) उक्रि. हलविणें. To move, to swing.

[सं. **आंदोलनम्** (नाधा.).]

हापीज पुं. कुराण तोंडपाठ असणारा, एक महमंदी विरुद. A title amongst the *Muslims* used for one who recites the *Koran* by heart.

[फा. **हाफिझ्** ; पेकाम. **हापीज** रहमतखान पठाण (पेद.)].

हॉबसन जॉब्सन पुं. एक कोश (इंग्रजी). A particular dictionary.

[हा शब्द फार चमत्कारिक आहे. ह्याचा मूळ अर्थ **एक आनंदाचा उत्सव, तमाशा** असा आहे. मोहरममध्यें उत्सवप्रिय लोक **या हसन या होसन** असें ओरडत जात. हाच शब्द इंग्रज सैनिकांनीं ऐकून तेहि मजेनें ओरडत. ह्याचा अपभ्रंश होऊन **हॉबसन जॉब्सन** हा शब्द झाला. आणखी इतर अपभ्रष्ट मूळ शब्द *Jaksom Boksom, Hossen Jassein.*]

हाय अ. दुःसह–दुःख,–सुखदर्शक अव्यय. An interjection of pain, dismay.

[सं. **हा, हाय** ; ध्वनिशब्द.]

हायदोस, दुल्हा पुं. मुसलमानी घोषशब्द (ताबुतापुढें ओरडतात). A cry (of the *Muslims*) of sorrow.

[**हसन हुसेन** हे लग्नानंतर लगेंच मरण पावले ; त्या दुःखाचा दर्शक शब्द–**हाय ! दोस्त ! दुल्हा** = नवरा].

हायन न. वर्ष. A year.

[सं. **हायन** ; पेकाम.–**हायन** (मो. उ. ७-५१).]

हायल त्रि. भयंकर- Terrible.

[अर. **हाईल्** ; पेकाम. **हायेल** (रा. ५-१५७).]

हार स्त्री. न. पड, पराभव, पराजय, नुकसान. Loss, defeat.

[सं. **हारि**, √ **हृ** ; प्रा. **हारि** ; का. कु. बं. **हार** ; ओ. **हार** ; हिं. पं. **हार्** ; सिं. **हार** ; गु. **हार्**.]

हार पुं. माळ, ओळ. A necklace.

[सं. हार ; प्रा. **हार** ; कु. हार ; **हारि** ; गु. **हार्** (स्त्री).]

हारत(णें), हारप(णें) सक्रि. गमविणें. To lose.

[सं. **हृ १** हरणे,–णिच्–**हारित** (निष्ठा), **हारतला**–संस्कृत निष्ठेवरून मराठी निष्ठा. याकाम. **हारतला, हारविली** (राज्ञा. ९ २०७ ६-२८३).]

परि तेयांपासि पांडवा । मी हारतला गिवसावा ॥
एसी निज कांति हारविली । मग प्राणाची केवळ जाली ॥

राज्ञा. ९-२०७, ६-२८३.

हारवि(णें) सक्रि. गमावणें. हरवणें पहा. To lose.

हारा पुं. बांबूच्या कामट्यांची मोठी पाटी. A basket made of bamboo-sticks.

हाराकिरी स्त्री. एक जपानी (हत्येचा) विधि, मानासाठीं म्हणून आत्महत्येचा एक प्रकार. Suicide, sacrifice, self-immolation (among the *Japanese*).

[जपानी. **हारा** = पोट, + **किरी** = कापणें.]

हारी स्त्री. ओळ, रांग. A row, a line.

[सं. **हार** ; **आहरी** (?), अकाम. **हारी** = बाजूस, कडेस.]

हार्द,-हार्द्र न. इंगित, उद्देश. Object, meaning, intent.

[सं. **हार्द** < **हृद्**.]

हाल पुं. कष्ट, दुःख. यातना. Plight, distress, calamitous condition.

[अर. **हाल्** ; अकामसा **हाल अपेष्टा** = संकटें (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द) ; **हाल हवाल** (**हाल अहवाल**, = वाईट स्थिति. दुर्दशा ; पेकाम. **हाल हवाल.**]

हाल अ. हल्लीं, सध्यां, सतत. Now.

[अर. **हाल्** ; पेकाम. **हाल अहवाल** (रा. १८.३१०); अकामसा. **हालीं** = हल्लीं, सध्यां ; **हालीमाजी** = बदली, वर्गावर्गी (पेकाम. **हालीमाझी**).]

हाल(णें) अक्रि. हलणें पहा.

हालत स्त्री. अवस्था, जोर, दम. Condition, state.
[अर. हालत्.]

हांव स्त्री. तीव्र इच्छा, लोभ, हिंमत, धाडस. A strong desire,–adventure.

हांवभरी वि. उत्सुक, महत्त्वाकांक्षी. Eager.

हावभाव पुं. अभिनय, हातवारे, नखरा, Actions and postures indicating sentiments.

हावरा वि. लोभी. Avaricious.

हाशील, हशील न. किंमत, भाव, फायदा, नफा, कर. Price, rate, charges, revenue.
[अर. हासील.]

हांस(णें), हंस(णें) क्रि. आनंदणें, हंसणें. To laugh, to be joyful.
[सं. हसू; पा. हस्, हास; प्रा. हास; आ. हाँहिब; बं. हाँसा; हिं. हँसना; कु. हॅसणो; ओ. हसिबा; हिं. हँसना; गु. हसवूँ. हंसणें पहा. अकामसा. हास्य = हसें (सं. हास्य – विध्यर्थ कृदन्त).]

हासळी स्त्री. मुलाच्या गळयांतील डागिना. An ornament of the neck of a child.
[सं. अंश; पा. प्रा. अंस; हिं. हॅास (मानेचें हाड.); लां. हस्सी; सिं. हाशी; बं. हासुली; हिं. हॅसली; पं. लां. हस्ली.]

हा हा अ. दुःख,–निर्वेददर्शक उद्गार. An interjection of pain, dismay.

हां हां अ. निरोधनदर्शक अव्यय An interjection of prohibition.
[सं. हा !]

हाळ पुं. लांब, मोठा चर, खाई. A ditch.
[सं. आहार–ळ.]

हिक(णें) उक्रि. संभोग करणें. To hold in sexual embrace.
[सं. ई २प्रजने + अकच् (?).]

हिकमत स्त्री. युक्ति, मसलत, चातुर्य. Skill, a device, a plan, a scheme.
[अर. हिक्मत्.]

हिकाती वि. सबबी सांगणारा. That makes difficulties or starts objections.
[अर. हिकायत्.]

हिंग पुं. मसाल्याचा एक पदार्थ, उग्र वासाचा चीक. An article of the spices, assafoetida.
[सं. हिंगु; पा. हिंगु; कु. हींग; अ. ब. हिङ्; ओ. हिंगु; हिं. हींग; प. हिङ्ग (स्त्री); सिं. हिङ्गु (स्त्री); गु. हिंग (स्त्री.); ने. हिङ्; अकामसा. हिंगाष्टक = हिंग, सुंठ, मिरे, पिंपळी, ओंवा, सैंधव, जिरे, शहाजिरे, यांचें मिश्रण.]

हिंगूळ पुं. पारव गंधक यांचें मिश्रण. Vermilion.
[सं. हिंगुल; प्रा. हिंगुल; हिं. बं. हिंगुल, हिंगूल; गु. हिंगळो; सिं. हिंगूळ.]

हिंगेंतिंगे न. टाळाटाळ. Avoidance, evasion.

हिजडा पुं. षंढ, नपुंसक. A neuter.
[हिं. हिजरा.]

हिजरी पुं. अरबी वर्ष. The year in *Arabic* era.
[अर. हिज्रा = वतनत्याग. महंमद पैगंबर मक्का सोडून मदिनेस गेले तो दिवस (१६-७-६२२ इ. स.).]

हिडस(णें) उक्रि. अवमानणें, धिक्कारणें. To flout, to reject summarily.
[सं. हेट् १ अनादरे; प्रा. हेट, हेळ; अकामसा. हेळसांड; हिडीस (फिडीस) = अनादर, अवहेलना.]

हिणा वि. कमी. Deficient.
[सं. हीनः, √ हा; पा. हीनो; प्रा. हीण; का ह्युनु; कु. हीण; ओ. हिना; हिं. हीना; पं. हीणा; लां, हीणॉ; सिं. हीणो; गु. हीणूँ; ने. हिन्; अकामसा. हिणकस = कमी कसाचा, कमी किंमतीचा; हिणव(णें) = कमी लेखणें.]

हिंड(णें) अक्रि. फिरणें, जाणें, भटकणें. To wander, to roam, to have a walk.
[सं. हिण्डते; पा. हिण्डति; प्रा. हिण्डइ; हिं. हिँड्ना; गु. हिंडवूँ. ॐहण्ड–गु. हाँडवूँ. संस्कृत धातु उत्तरकालीन दिसतो.]

हित(णें), हि(णें), सक्रि. पाठविणें. To send, to despatch.
[सं. हि, (निष्ठा) हित्त + ल; याकाम. हीतलें.]
जेणें भ्रांतीपासौनि हीतले । गुरुवाक्यें मन धूतलें ।
मग आत्मस्वरूपीं घातलें । हरौनिया ॥ राज्ञा. ५-३४

हित न. लाभ, कल्याण, फायदा. Advantage, profit, interest.

[सं. हित (निष्ठा √ धा); अकामसा. हितचिंतक = हित,-कल्याण इच्छिणारा; हितशत्रु = अहित इच्छिणारा; फायद्याच्या आड येणारा; हितोपदेश = हिताचा,-कल्याणाचा उपदेश (त्यासंबंधीं एक ग्रंथ); हितगूज = मनांतील गोष्ट < सं. हित-(निष्ठा √ धा) गुह्यम्.]

हिन्दुस्थान पुं. देशविशेष. India, *Hindustan*.
[सं. सिन्धु> हिन्धु; फा. हिन्द, हिन्दि,-न्दु-स्तान अर. सिंध.]

हिंदोळा पुं. झोंपाळा, पाळणा, झोंका. A swinging cradle.
[सं. आन्दोलक ; प्रा. अंदोलग. म. हिं. हिंदोळ.]

हिफाजत स्त्री. संरक्षण. Protection.
[अर. हिफाझत ; पेकाम. हिफाजती (रा. ५-११९).]

हिम न. बर्फ, थंडी, दंव, हींव. Cold, dew, snow.
[सं. हिम > (तद्भव) हिंव.]

हिंमत स्त्री. धैर्य, धाडस, हिय्या, उत्साह. Courage, vigour, boldness, spirit.
[अर. हिम्मत् ; पेकाम. हिंमत (रा. १-४८).]

हिमाइत स्त्री. संरक्षण, साह्य, मदत. Protection, patronage.
[अर. हिमायत् ; पेकाम. हिमाइत (रा. ९-४५ ४८), हिमायेत (रा. ६-१३), हिमाइतदार = आश्रित.]

हिंपुटी वि. लज्जायुक्त, खिन्न, कष्टी. Of fallen countenance, bashful, oppressed.
[सं. हीन + पुट ; शिकाम. हिंपुटी (म. श्लो. २०).]

हिय्या पुं. हिमत, हृदय, धीर, छाती. Spirit, courage, heart, fortitude.
[सं. हृदयम् ; पा. हदयम् ; प्रा. हिअअ , हडक ; आ. हिया (छाती); बं. ओ. हिया ; हिं. ही, हिया ; पं. हिआँ ; सिं. हिओ ; गु. हइयूँ ; याकाम. हियें (ज्ञा. १-२३४).]

हिर(णें), हिरत(णें) उक्रि. हरण करणें, हिरावून घेणें. To seize and take from.
[सं. हृ १ हरणे; निष्ठा,-हृत > हिरत ; याकाम. हिर (ज्ञा. १३-४१६), हिरत (ज्ञा. ५-२४).]

हिरडा, हरडा पुं. वृक्षविशेष व त्याचें फळ, औषधिविशेष. A tree and its fruit.
[सं. हरीतक, हरितक, विभीतकः, आमलक (हावळा), (हरट, हरिट, < हरित , हीं जुनीं रूपें आहेत.), सं. हरितकः ; पा. हरीतक, हरीतकी ; प्रा. हरअई ; हरडई, हरीडई ; ओ. हरिडा. हिं. हरडा , हररा, हरला (पुं.); पं. हरेड (स्त्री); लां. हरीड (पुं); सिं. हरीड ; गु. हरडू.]

हिरडी स्त्री. दाताच्या वरील मांसल भाग. A fleshy bed of the teeth.

हिरमूस(णें) अक्रि. खिन्न,-कष्टी होणें, दुःखानें अवनत होणें. To be damped and disheartened.
[सं. ह्रीमुषित , ह्रीमूर्च्छित, ह्रीमृष्ट.]

हिरमोड पुं. तेजोभंग, निराशा, उत्साहभंग. Loss of spirit or vigour or respect.
[सं. ईर्षा किंवा < वीरश्री; ह्यापासून इरश्री, इरसिरी, ईर = वीरश्रीचा तेजोभंग, अपमान ; हृदय+मोड हिमअ > हिय्या + मोड, हीर + मोड< मोट ; ' हिरवा + मोड ' अशी व्युत्पत्ति मोल्स्वर्थ देतो ती हास्यास्पद आहे.]

'हिरवट वि. साधारण हिरवा, किंचित् हिरवा, Greenish. unripe.

'हिरवट वि. तामसी. Excitable.

हिरवळ स्त्री. हिरव्या गवताचें रान. A meadow.
[सं. हारित-आवलि (?) ; शिकाम. हिरवळ(णें) = हिरवा चारा येणें.]

हिरवा वि. रंगविशेष. Green colour.
[सं. हरिः हारितः ; पा. हरि , हरितो ; प्रा. हरि , हरिय ; हिं. हरिया ; पं. हरिआ ; सिं. हर्यो ; गु. हर्यॅू , हरूं; अकामसा. हिरवा चार = अतिशय हिरवा (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द ; हिरवा कच्चा = अपक्व (दोन्ही एकाच अर्थाचे शब्द).]

हिरसा वि. खिंकाळणारा,-नाठाळ,-उन्मत्त (घोडा). A neighing horse.
[सं. हेषवान्.]

हिरा पुं रत्नविशेष. A diamond.
[सं. हीरक ; प्रा. हीरअ.]

हिराकस पुं. एक खनिज पदार्थ. Sulphate of iron.
[हिं. हिराकस.]

हिराव(णें) सक्रि. हिसकून घेणें. To wrest from.
[सं. हृ - (णिच रूप).]

हिरासा त्रि. भयभीत. Terror-sticken.
[फा. **हिरासान्**; पेकाम. **हिरासा.**]

हिरीरी स्त्री. तीव्र इच्छा, जोस, वेग, झपाटा. A strong desire, an impetuous onset.
[सं. **वीरश्री, ईर्षा** (?) ; म. **ईर, हीर. ईर्षा** पहा.]

हिलग(णें) उक्रि. लोंबकळणें, जोडणें, गुंतणें, ओढणें. To suspend loosely, to tie in a hanging manner.
[सं. **अभिलग्**, **अभिलग्न** > **हिलग**; हिं. **हिलगना.**]

हिलगड स्त्री. भानगड, अडगळ, गुंता. A hitch, a hindrance.

हिलाल पुं. दिवा, टेंभा, दिवटा, मशाल, मशाल धरणारा. A torch, a torch-bearer.
[अर. **हिलाल्**; पेकाम. **हिलाल** (पाय २८८).]

हिला पुं. लबाडी, ढोंग, युक्ति, कोटी. A pretence, a sham trick.
[अर. **हीला**; पेकाम. **हिला** (स. १२-६६७६).]

हींव न. थंडी, गारठा, (ल.) थंडी-ताप. Cold, coldness.
[सं. **हिम**; पा. प्रा. **हिम** (न); का. **शीन्**; का. **हिमन्**; कु. **ह्यूँ**; पं. **हिऊँ** (पुं); गु. **हिम्** (पुं); अकामसा. **हिंवसा** = थंड, गार; **हिंवस(णें)** = थंडी होणें.]

हिशेब, हिशोब पुं. मोजणी, गणना, मेळ. Computation, calculation.
[सं. **हिसेब, हिसाब**; शिकाम. **हिसाब**; अकामसा. **हिशेब कितेब** = जमाखर्च.]

^{1}**हिंस(णें)** अक्रि. खिंकाळणें. To neigh.
[सं. **हेष्**; शिकाम. **हिसाण** (गी. १-४८४). द्वारीं झुलोत गजसंघ हिंसोत, तेजी न. द. १२. **हेषा** नाम तु हिंसणें (रा. व्य.).]

^{2}**हिंस(णें)** उक्रि. मारणें, हिंसा करणें. To strike, to kill.
[सं. **हिंस्.**]

हिसक(णें) क्रि. परत घेणें, हातांतून जोरानें घेणें. To pull or wrest suddenly and smartly.
[सं. **हिष्क् १** हिंसायाम्; प्रा. **हिंच्छअ**; जुनें एकरूप- **हिच + अक**; **हिचकना**, गु. **हिचकवूँ**; पं. **हिचना**; लां. **हिच्चण**; ु. **हिचवूँ**; **हिंचाडवूँ**; 'क' हा मराठी त्वरार्थ प्रत्यय; अकाम. **हिसका हिसडा** = झटका, तडाखा.]

हिस्सा पुं. भाग, वाटा, पाती. A share, a portion.
[अर. **हिस्सा**; अकामसा. **हिस्सेदार** = वाटेकरी. (हिस्सादार.]

हीण,-न वि. कमी, न्यून, हलका. Deficient, defective.

^{1}**हीर** पुं. माडाची काडी. A rib of the palm tree.

^{2}**हीर** स्त्री. ईर्ष्या. Emulation.
[सं. **वीरश्री** (?), **इर्षा, हिरीरी.**]

^{3}**हीर** पुं. प्रकाशकिरण. A ray.
[याकाम. **तया रंगाचे हीर.**]

हु, हुं अ. होकारार्थी मान्यतादर्शक अव्यय. An expletive expressive of assent.
[ध्वनिशब्द. कान. द्रा. **हु**; अकामसा. **हुं का चूं** = कुरकूर.]

हुक(णें) अक्रि. चुकणें, न साधणें. To miss.
[सं. **युच्छ् १**-प्रमादे; हिं. **हुकना.**]

हुक्का पुं. लांब नळी व मध्यें भांडें असलेली चिलीम. A *hukka*, a smoking appartus.
[अर. **हुक्काह** = वाटोळें भांडें; पेकाम. **हुक्काबारदार** = हुक्का नेणारा सेवक.]

हुकी, हुक्की स्त्री. कोल्ह्याचा शब्द, एकदम आलेली लहर. A sound of jackals, a sudden whim.

हुकुम, हुक्म पुं आज्ञा. Order, a command.
[अर. **हुक्म्**; पेकाम. **हुकुमबारदार** = हुकुम पाळणारा, आज्ञासेवक, **हुकमत** = अधिकार, **हुकमतपन्हा** = रक्षण करणारा; **हुकमी**-अचूक, खात्रीचा.]

हुंग(णें) सक्रि. वास घेणें. To smell.
[सं. **सम् + ऊह्** (?), **शिङ्घ**; देप्रा. **सुंघिअं** घ्रातं (२८७-१); हिं. **सुंघना**; पं. **संघणा**; सिं. **संघणु**; गु. **सुंघवूँ**; लमा. **शुंग**; **सुंगणें** पहा.]

हुच, हुच्च वि. हलकट, भरमसाट, नीच, मूर्ख, बेताल. Light, low, scampish.
[कान. **हुच्चा** = वेडा; हिं. **उच्च**; **हुच्चु** = मूर्खपणा.]

हुच्चावर (वसविणें) अ. चढविणें, खोटें अवसान (देणें). To incite or set on.

[सं. **उच्चीकृत**; अप. **उच्चाइय.**]

हुचमल्ली स्त्री. बुद्धिबळांतील एक डाव, उंट, राजा व प्यादें ठेवून प्याद्याचा शह. A move in the game of chess.

[सं. **उष्ट्र + मल्ली,-माली** (?)**-माल** = खेळ.]

हुजत, हुज्जत स्त्री. घांसाघीस, भांडण. Higgling, a perverse wrangling.

[फा. हुज्जत्.]

हुजूर पुं. स्वतः धनी, राजा, मालक, सरकार. The royal court, the master or lord himself.

[अर. **हुजूर** = अस्तित्व (= हजरत, हुजुरी); पेकामसा. **हुजरात** = स्वतः राजाचें सैन्य, राज्यरक्षक सैन्य.]

हुटक(णें) उक्रि. जोरांत हलविणें, झटकणें. To shake suddenly.

[ध्वनिशब्द. सं. **उत् + तक्** १ गतौ (?).]

हुटहुट(णें) अक्रि. कसें तरी हलणें, उतावीळ होणें. To be eager.

[सं. **हूड्** १ गतौ; याकाम. **हुटहुट** (राज्ञा. ९-३७५.)]

हुडक(णें) उक्रि. शोधणें, तपास करणें, धुंडणें. To search.

[कान. **हुडुकु**.]

हुडवा पुं. शेर्णींचा ढीग, रास. A heap or mound of dung-cakes.

[कान. **हुडा** = किल्ला.]

हुडहुडी स्त्री. थंडी, कांपरें. Shivering.

हुडा पुं. तट, बुर्ज, शेर्णींचा ढीग. A rampart, a bastion.

[कान. **हुडा** = किल्ला ; **हुड** = दगडाची रास.]

हुंडा पुं. वरदक्षिणा. Money given to the bride-groom (or the bride in some cases).

[सं. **हुड्** १ स्वीकरणे (?).]

हुण्डी स्त्री. व्यापारांतील देवघेवीचें साधन. A bill of exchange.

[सं. (?); हिं. **हुण्डी, हुण्डवी**; गु. **हुण्डी**; अकामसा. **हुण्डेकरी** = जकात देऊन माल सोडवून मालकाच्या स्वाधीन करणारा अडत्या.]

हुत वि. यज्ञाच्या अग्नींत होमलेलें-टाकलेलें, बोलावलेलें (आहूत). (An article) offered in sacrifice.

[सं. **हुत**, (निष्ठा √ हु ३ हवने). सं. **हुताशन** = अग्नि (होमांत टाकलेलें खाणारा), **हुताशनी** = होळी.]

हुतुतू पुं. एक प्रकारचा खेळ (हुतूतू असा शब्द दम जाईतों उच्चारून खेळतात). A kind of game.

हुद्दा पुं. अधिकार, पदवी, काम, नेमणूक. Authority, designation, appointment.

[अर. **उहूदा**; शिकाम. **हुद्दा** (सभा. २४.); अकामसा **हुद्देदार** = अधिकारी नोकर.]

हुंदका पुं. रडण्याचा आवेग. उमाळा. Eager impatience, a gust (of pain).

हुंदड(णें), हुंदाड(णें) सक्रि. शिंगानें ढकलणें, -मारणें. To push with horns.

[कान. **हुडीद**; अकामसा. **हुंदडा** = शिंगांचा मार, धडक, ढुस्सा.]

हुन्नर पुं. कौशल्य, कसब, युक्ति. Skill.

[फा. हुनर्; शिकाम. **हुनेर, हुन्नर** (सभासद ६१).]

हुप्प्या पुं. मोठा वानर. A big ape.

हुबक(णें), हबक(णें) सक्रि. मारून ओढणें, चोरणें, लांबविणें. To seize or snap sharply.

हुंब(णें) अक्रि. कण्हणें. To groan.

हुबेहुब अ. थेट सारखें, सादृश्य असलेलें. Having exact and close resemblance.

[अर. **हुबहू, ऊ-ब-ऊ.**]

हुब्बेवतन न. आपल्या देशाविषयीं प्रेम, स्वदेशप्रीति. Love of one's own country.

[फा. **हुब्बु इ वतन** = वतनाचें प्रेम.]

हुमणी पुं. ठोसा. A stroke, the bobbing up.

हुमला पुं. हल्ला, चाल. Attack assault, onset.

[गु. **हुमलो.**]

हुम्मा पुं हुम्मा नांवाचा एक पक्षी. A kind of bird.

[फा. **हुमा**; पेकाम. **हुम्मा** (पेद. ४-२).]

हुंबर(णें), हंबर(णें) अक्रि. गाईचें ओरडणें. To bellow.
[ध्वनिशब्द. सं. **क्षंभ्** १ शब्दे ; **आरु**–शब्दे, **हम्भा**; अकामसा. **हंबरडा** = गाईचा शब्द, (लक्षणा) आक्रोश.]

हुरडा पुं कोंवळा भाजलेला जोंधळा. Corn or grain of tender pods parched.
[कान. **हुरि** = भाजलेलें, भाजलेलें भात, चणे वगैरें धान्य ; देप्रा. **हुरड** ; अकामसा. **हुरड(णें)** = भाजणें, वरवर जाळणें.]

हु(ही)रप(णें), होरपळ(णें) सक्रि. भाजणें, आगींतून निघणें, (लक्षणा) तोटा येणें. To singe, to scorch, to parch.
[सं. **हुर्** (**अभि** + **परि** ?) + **प्लुष्** १ दाहे.]

हुरमत स्त्री. पत, लौकिक, नांव. Character, credit, reputation.
[अर. **हुमत्**; पेकाम. **हुर्मत्** (पाब. १६).]

हुरमुजी,–झी वि. एक प्रकारचा रंग. A kind of colour.
[अर. **हरमुज्**. हा शब्द **ओर्मुस्**, **ओर्मूझ्** ह्या बंदराच्या नांवावरून आला असावा. ह्या बंदराजवळ मोतीं सांपडतात. इराणी आखातांत हें एक प्रसिद्ध बंदर आहे. ह्या बंदरावर पुष्कळ संकटें येऊन गेलीं. कांहीं वेळेस त्याचें स्थलांतरहि झालें. इराणी लोकांनीं तें बेचिराखहि केलें. ‘**अहूर मज्द**’ ह्या अवेस्तन नांवावरून पडलेलें नांव. पेकाम **हुर्मुजी** (होनाजी १६९).]

हुरेंवडी स्त्री. फटफजीती. A general hissing and rediculing, disgrace.
[मं. **हुर्रे** + **वावडी** = वाताहत.]

हुरहुर स्त्री. रुखरुख, चिंता, काळजी. Grieving, sorrowing anxiety.
[सं. **ह्वृ**-दुःखे (द्विरुक्त).]

हुरळ(णें) अक्रि. आनंदित होणें. To be jubilant.
[सं. **हुट्** १ गतौ (?) ; कान. **हुरि** ; अकामसा. **हुरळ** = **भुरळ**, **भूल**.]

हुरूप पुं. उत्साह, हुशारी. Ardour, spirit, a sudden impulse.
[अर. **हुरिम** = **मन**.]

हुर्यो स्त्री. फजीती. Redicule, hissing.

हुल, हूल, स्त्री. आवई. A rumour.

हुलकाव(णें) उक्रि. झुकांडी देणें, फसविणें. To deceive, to cheat.

हुल्लड स्त्री. दंगा, गोंधळ, गर्दी, ओरड. An uproar, a tumult.
[सं. **हुडति**, **हुण्डति** ; देप्रा. **हुडुआ** (ओघ) ; कु. **हूल** ; आ. **हुल्** (दंगा) ; पं. **हुल्लर** (पुं) ; गु. **हुल्लड** ; बं. **हुड** (समूह) ; **हुलरी**=खेळांतील गलका (रामला १८).]

हुश्श अ. विश्रांतिदर्शक सुस्कारा, हाकालावयाचा शब्द. A heaving (showing rest), a word (used in driving off).

हुशार वि. शहाणा, चलाख. Clever, smart.
[फा. **हुश्शार**.]

हुसक(णें) सक्रि. हाकलून देणें. To drive off, to expell, to hiss or hoot out.
[ध्वनिशब्द. **हुश्श** + क. **उत्स्कु** (?).]

हुसकट(णें) सक्रि. हाकलून-घालवून देणें. To drive off.
[सं. **उत्** + **स्स्वद्** १ विद्रावणे (?).]

हुस्न न. सौंदर्य, रम्यत्व, चांगलें रूप. Beauty, attractiveness.
[अर. **हुस्न**.]

हुळहुळ स्त्री. किंचित आग–दाह, कंड, खाज. Titrillation (due to heat).
[ध्वनिशब्द. सं **ह्वल्** १चलने ; अकामसा. हुळहुळा= नाजूक, मृदु.]

हूक स्त्री. पाठींतील–कमरेंतील कळ, वेदना. A pain in the back.

हूड वि. खोडकर, तापट, उनाड. Mischievious.

हून प्र. पासून. An ablative termination.
[सं. **स्मात्**, **स्तः तः** ; प्रा. **हिंतो**, **सुन्तो** ; याकाम. शिकाम. पेकाम. **होऔनि होऊन**. अकाम. **हून**. **हो** धातूपासून. मी **पुणा होऊन** आलों.–मी पुण्याहून आलों.]

हृत्,–द् न. हृदय, अंतःकरण. Heart.
[सं. **हृत्** ; अकामसा. **हृद्गत** = गुपित गोष्ट, मनांतील हेतु. **हृद्य** (**हृदि भवम्**) = मनाला आवडणारें.]

हृत वि. हरण केलेलें. Carried away.
[सं. **हृत** (निष्ठा) √ **हृ**–हरणे.]

हृदय न. अंतःकरण, मन. Heart.
[सं. **हृदय** ; अकामसा. **हृदयंगम** = हृद्य, मोहक ; **हृदय भरून येणें** = फार वाईट वाटणें ; **हृदय फुटणें** = फार दुःख होणें.]

'**हें** सर्व. दर्शक सर्वनाम. This.
[*IE.* E, Ei, I, (सार्वनामिक बीजें); सं. **इ, अय, इत्थम्, इह, इदम्**; *Lat.* Id, I.; *Lith.* jis, jo; *Slav.* ji. jejo; *Teu.HG.* Er.]

'**हे** अ. हांक मारण्याचें अव्यय. An expletive used in calling.
[सं. हे; पा. प्रा. हे; का. हे; कु. अ. बं. ओ. बि. हिं. पं. गु. **हे.**]

हेंग(गा)ड वि. राकट, ओबडधोबड, मूर्ख, रानवट, चमत्कारिक. Rough, coarse, ugly, stupid.
[कान. **हेंगसू** = स्त्री. म. **हेंगसा** = षंढ.]

हेंगळ स्त्री. अडथळा, अडचण. Obstruction. hindrance.
[कान. **हेंगे** = कसें.]

हेजीब पुं. वकील, दूत. An attendant, an envoy.
[अर. **हाजिब्**; शिकाम. **हेजीब** (नल. द).]

हेट(णें), हेड(णें), हेळ(णें) उक्रि. अनादर करणें. To disrespect, to revile.
[सं. **हिड्, हेड्** १ अनादरे; देप्रा. **हेठ**; पा. **हीळेति**; प्रा. **हीलइ**, प्रा. **हेला** (स्त्री); गु. **हेट**. बं. **हेला** (तिटकारा करणें); अकामसा. **हेटाळणी, हेटीमेटी** = अनादर.]

हेटाळणी, हेटीमेटी स्त्री. अनादर, टवाळी, अवहेलना. Disrespect.

हेंड न. झोंबाझोंबी, मैथुन. A drove (of cattle), coitus.
[सं. **हिद्, हेद्, हेद्द, हेड्** (?); बकाम. **हेंड**; अकाम. **हेंडगूळ** = श्वानाचें मैथुन, श्वानाचें हेंड तत्काळ सुटें.]

हेत,-तु पुं. उद्देश, आशय, इच्छा, बेत. Object, aim, desire.
[सं. **हेतु**; पेकाम. **हेत** (मोकर्ण. ५-८).]

हेंदकाळ(णें) सक्रि. हलून सांडणें, डुचमळणें. To move and drop out.
[सं. **हिंदोल**; शिकाम. **हेंदोळ** (तुगा. ४१०६).]

हेपल(णें), हेपल्ल(णें), हेपाल(णें) सक्रि. संभोग करणें. To hold in sexual embrace.
[सं. **ह्री** (लज्जा), **ह्रेपय**; अकाम. **हेपल्लणें, हेपालोंलो, सेफ** (पुरुषलिङ्ग), **सेफक** (?).]

हेवाळ(णें) सक्रि. ओढाताण करणें, खालीं वर करणें. To treat roughly.
[सं. **हिल् + वल्** १ गतौ (?).]

हेम न. सोनें. Gold.
[सं. **हेमन्**. **हेमाद्रि पंडित > हेमाडपंत**–यादवाचा सचिव.]

हेमंत पुं. एक ऋतु. The season *Hemant.*
[सं. **हेमन्त < हिम.**]

हेर(णें) क्रि. जाणणें, पाहाणें, अगोदर जाणणें. To spy out, to peer into.
[सं. **हेरक** (?); प्रा. **हेरइ**; देप्रा. **हेर**; कु. **हेरणो**; बं. **हेरा**; हिं. **हेरना**; गु. **हेरवूँ**; ब्राहुई–**हिर्** = पाहणें; **–एर, इर.**]

हेल,-करी पुं. ओझें, ओझें वाहणारा. A load, a coolie.

हेलपाटा पुं. निष्कारण जाणें–येणें, जाण्याचा त्रास. An empty journey or trip.
[सं. **हेला** = फेरा, **हेलपाट(णें)** = व्यर्थ येरझार करणें.]

हेलाव(णें) अक्रि. हलणें, खालीं वर होणें. To undulate, to toss.
[सं. **हल्, सम् + वेल्ल**; याकाम. शिकाम. **हेलावला**. नळ पयोधि दया रसाचा (नल. द. ५५). **हेलकावणें** = हलणें.]

जयजय सर्व विसांवया। सोहंभाय सुहावया।
नाना लोक हेलावया। समुद्रा तूं ॥ ज्ञा. १४-२.

'**हेला, हेळा** पुं. वेळ, काळ, क्षण. Time, a moment.
[सं. **वेला**?; देप्रा. **हेला** (= वेग); याकाम. **हेळा** (ज्ञा. २-८३), **हेळामात्रें**=सहज लिलेनें (देप्रा. **हेला**=वेग).]

'**हेला** पुं. रेडा. A buffalo.
[कान. **हल्ल्या.**]

'**हेवा** पुं. मत्सर, स्पर्धा. Emulation, envy.
[कान. **हेव** = मत्सर; याकाम. **हेवा** (उगी. २८); अकाम. **हेवादावा.**]

'**हेवा** पु. हव्यास, तीव्र इच्छा. A strong desire.
[अर. हेवा = इच्छा; शिकाम. **हेवा** (तुगा ३२२).]

हेषा स्त्री. घोड्याचें खिंकाळणें. Neighing.
[सं. **हेषा.**]

हेळ(णें) सक्रि. अवहेलना करणें. हेटणें पहा. To disrespect, to disgrace.

पुस्तकालय

हेळस(णें) सक्रि. अवमानणें. To disrespect.
[सं. हेळ्; पेकाम. **हेळसोनि** (मोकर्ण २८-४२).]

हेळसांड(णें) सक्रि. तिरस्कार करणें, अवहेलणें. To despise, to slight.
[सं. **हेड्** १ अनादरे + **सध्** १ हिंसायाम्.]

हेळ पुं. ओढ्यांत काढलेली लहान विहीर. A small well in a brook.
[कान. **आहार–ळ** (?).]

हैदोस पुं. गोंधळ. हायदोस पहा. An uproar.

हैपत, हैबत स्त्री. दहशत, दरारा, धास्ती. Terror.
[अर. **हैबत**; पेकाम. **हैबत** (हौके १२).]

हैराण वि. गांजलेला, त्रस्त, व्याकूळ. Perturbed, distressed through pain.
[अर. **हैरान्**.]

हैवान पुं. पशु. A beast.
[अर. **हैवान्**.]

हो(णें) क्रि. असणें, घडणें. To be, to become.
[सं. **भवति**; पा. **भवति**, **होति**; प्रा. **भोमि**, **होइ**; का. **बोवॅू**; कु. **हुणो**; आ. **हाब**; बं. **होया**; ओ. **होबा**; बि. **होएब**; हिं. **होना**; पं. **होणा**; लां. **होवण्**; सिं. **हुअणु**; गु. **होवूँ**; याकाम. **होआवे**, **होईजे**, **होए**, **होओनि**, **होत्साता**, **होष्य**, **होष्यमाण** अशीं भिन्न भिन्न काळाचीं रूपें जुनीं रूढ होतीं.]

हो अ. थांबविण्याचा,–हांक मारण्याचा शब्द. A word used in calling or stopping.

हो अ. होवो. May it be !

होट पुं. ओठ. The lip.
[सं. **ओष्ठ**; प्रा. **होट्ठ**; हिं. **होठ**; अकामसा. **होटाळी** = घोड्याच्या तोंडाला लगामाच्या ऐवजीं अडकावावयाची दोरी (**ओष्ठ वलय**); **न होटाला** न पोटाला ह्या म्हणींतील **होट** हा शब्द द्राविडोद्भव असून त्याचा अर्थ **पोट** आहे.]

होड स्त्री. पैज. A wager, a bet.
[सं. ?; देप्रा. **हुड्डा**, **होड** = पण (२९-३); कु. हिं. **होड्** (स्त्री); सिं. **होड**; गु. **होड्**; सिंह. **आडापना**.]

होडी स्त्री. लहान जहाज. A small boat.
[सं. **वाह** = जहाज; प्रा. **वाहडिआ**; कान. **ओड** = नाव, **हडगु** = जहाज; अकाम. **होडकी**, **–कें**, **–गें**.]

होता पुं. यज्ञ करणारा. A sacrificial priest.

होन पुं. सोन्याचें एक नाणें (ह्याची किंमत साडेतीन रुपये साधारणपणें असे). A gold coin.
[कान. **होन्न्**, **होण्**, **होन्** = सोनें; हिं. **हून**; **सुवर्ण** > **हुवण्ण** > **होण्ण** > **होन** (?) अशी एक व्युत्पत्ति आहे. होन निरनिराळया ठिकाणचे असत व त्याप्रमाणें त्याच्या किमतींत फरक असे.]

होम पुं. यज्ञ. A sacrifice.
[*IE*. Gheu, Ghu; सं. हु ३हवने (**हवन**, **हविस्**, **होता**); *Av*. Zaotar; Zavaiti; *Lat*. Fov; *Slav*. Goveti; *Lith*. Zuvis; *Goth*. Giuitain; futili, fuse. याकाम. अकाम. **होमणें** (ज्ञा. १६–३८६.) **होता**, **होत्र**, **होमकुंड**.]

होय अ. प्रश्नास होकारार्थी उत्तर देण्याचा शब्द. 'Yes'.
[*IE*. Age; सं. **अह्** (आह, आत्थ, वगैरे); *Lat*. Aj, Ag, Ajo; *Lith*. Nigi, Nigu (= नको); *Russ*. Nekatu; अकामसा. **होयबा** = होय होय म्हणणारा. २ सं. **अथ किम्**, **ओम्**, **आम्**; पा. **आम्**; प्रा. **अहइं**; तामी; **आम**.]

होर(णें) अक्रि. जमीन धुपून येणें, आच्छादणें. To cover over and to fill up (pits).
[सं. **हृ** १ गतौ; कान. **होळु होळे**; **होर** = धुपून आलेली जमीन.]

होरा स्त्री. (पारिभाषिक ज्योतिष–दिवसाचा २४ वा भाग, राशिलग्नाचें अर्ध), (लक्षणा) भविष्य. Prediction.
[सं. **होरा**.]

होलगट(णें) उक्रि. फेंकणें, भिरकावणें. To throw, to pelt.
[सं. **सम्** + **उत्** + **लघ्** १ गतौ + **ट** किंवा **क्रियाध्वनिशब्द**.]

होलपट(णें) उक्रि. फेंकणें, फेंकून मारणें. To throw.
[सं. **हुड्** + **पथ्** १ प्रेरणे (?).]

होशा पुं. कळकळ, उत्सुकता, जोम. Eagerness, vigour.

होळ(णें) क्रि. पाझरणें, धुपणें. To exude, to ooz.

होळणी स्त्री. धुपणी रोग. A disease.

होळी स्त्री. एक सण, फाल्गुनी पौर्णिमा. The *Holi* festival.

[सं. होला, होलाका, होलिका; प्रा. होलिआ; बं. होलि; बि. हिं. होली; पं. होह्ली; सिं. होरी, होली; गु. होळी.]

हौज्या पुं. फजीती, बेअब्रू. Disgrace, hissing.

[अर. हझ्झ्.]

हौद पुं. पाणी साठविण्याचें भांडें. A big vessel for storing water, a tank.

[अर. हौझ्.]

हौदा पुं. हत्तीवरील बैठक,–खुर्ची. The seat on elephant.

[अर. हाउदाज् = उंटावरून न्यावयाच्या पेट्या.]

हौस स्त्री. नाद, आवड, गोडी, उत्सुकता. Inordinate desire.

[अर. हवस्; फा. होस्.]

ळ पुं. मराठी वर्णमालेंतील चौतिसावें व्यंजन, ह्याचें उच्चारण मूर्धन्य असून उच्चारस्थान मूर्धा आहे. हा वर्ण प्राकृतमध्यें नाहीं; पालींत होता; मराठींत आहे. The thirty-fourth consonant in the *Marathi* alphabet.

[आद्य ळ) संस्कृत व मराठी मध्यें आद्य ळ कार नाहीं. (मध्य ळ) सं. ल, प्रा. ळ. अभिलाष–अभिळास, राजकुल–राउळ; फलक–फळक.

सं. ट, ड, ल्य, र; प्रा. ल, ड, ल्ह, र.]

क्ष पुं. मराठी वर्णमालेंतील पस्तिसावें व्यंजन. उच्चारस्थानें कंठ व मूर्धा आहेत. The thirty-fifth consonant in the *Marathi* alphabet.

[संस्कृत प्राकृत. क्ष्–क्, ष्, यांच्या मिश्रणानें सिद्ध होतें.]

क्षण पुं. एका मुहूर्ताचा बारावा अंश, (अर्थाचें सामान्यीकरण होऊन)–वेळ, काळ. A measure of time–twelfth of a *Muhurta*, time (generally).

[सं. क्षण; अकामसा. क्षणभंगूर = थोड्या वेळाचा, अस्थिर; क्षणभर = थोडा वेळ. 'क्षण' ह्या शब्दापासून तद्भव पुढीलप्रमाणें होतातः–१ सण, २ खण, ३ खिण.]

क्षण पुं. श्राद्धकर्मांत ब्राह्मणाच्या हातांत द्यावयाचें दर्भ. A blade of sacred grass.

[सं. क्षण, √ क्षी १ क्षये. क्षण; अकामसा. क्षण(णें)= श्राद्धकर्म करणें.]

क्षत न. भोंक, छिद्र, जखम. A hole, a bore, a wound.

[सं. क्षत, √ क्षत्, क्षण् १ हिंसायाम्). क्षिति > क्षति > खिवती = तोटा, दुखापत, पर्वा.]

क्षत्र, क्षत्रिय पुं. क्षत्रिय वर्ण, वीर योद्धा. The *Kshatriya*, a warrior.

[सं. क्षत्र (क्षतात् किल त्रायते); अकाम. खत्री.]

क्षपणक पुं. साधु (विशेषतः जैन व बौद्ध धर्मी). A *Buddha* mendicant.

[सं. क्षपणक, √ क्षि, क्षी १ क्षयने. मराठींत तद्भव खवण असा एक शब्द होतो.]

क्षपा स्त्री रात्र. Night.

[सं. क्षपा, √ क्षी.]

क्षम(णें) सक्रि. समर्थ होणें. To be able or capable.

[सं. क्षम्.]

क्षम(णें) सक्रि. क्षमा करणें. To forgive.

[सं. क्षमा (नाधा.); अकामसा. क्षम = सोशीक. सोसणारा; क्षमा = सोशीकपणा, सहनशक्ति, माफी, पृथ्वी.]

क्षय पुं. नाश, ऱ्हास, नाहींसें होणें, एक रोग. Ruin, consumption.

[सं. क्षि, क्षी, १ क्षये.]

क्षर वि. गळणारे. Oozing, perishable.

[सं. क्षर्; अकाम. खर, झर.]

क्षार पुं. मीठ. Salt.

[सं. क्षार; अकाम. खार.]

क्षालन न. धुणें. Cleansing.

[सं. क्षल्; अकाम. खळ.]

क्षिण(णें) अक्रि. झिजणें. To waste.

[सं. क्षीण, (निष्ठा– √ क्षी); अकाम. खिण.]

क्षिती स्त्री. पृथ्वी. The earth.

क्षितिज न. आकाश जमिनीस टेकलेलें दिसतें ती मर्यादा. Horizon.

क्षिप्र अ. लवकर, ताबडतोब. Soon, immediately.

[सं. क्षिप्रम्.]

क्षीण वि. अशक्त, रोडका, दुर्बल. Lean, weak, emaciated.
[सं. क्षि १ क्षये.]

क्षीर न. दूध. Milk.
[सं. **क्षीर** ; प्रा. **खीर** ; अकाम. **खीर** (विशेष अर्थ–दुधाचें गोड पेय), **क्षीरार** = दुग्धपूर्ण > **खिल्लार** (अर्थभेद).]

क्षुण्ण वि. तुडविलेला, मळविलेला, (लक्षणा) रूढ. Trodden.
[सं. **क्षुण्ण**, निष्ठा, √ **क्षुद्**.]

क्षुत् स्त्री. भूक. Hunger.

क्षुद्र वि. कमी, लहान, तुच्छ. Mean, low.
[सं. **क्षुद्र**, **क्षुत्** ; प्रा. **चुल्ल** ; अकाम. **चुल(ता)**.]

क्षुधा स्त्री. भूक. Hunger.

क्षुर पु. वस्तरा, जनावराचा खूर. A razor, a hoof.
[सं. **क्षुर** ; प्रा. **सुर** ; अकाम. **सुरा**, **खूर**.]

क्षुल्लक वि. लहान, हलका. Mean, insignificant.

क्षेत्र न. जागा, शेत, अर्थाचें विशेषीकरणानें–पवित्र भूमि. Field, farm, a holy place.
[सं. **क्षेत्र** (√ **क्षि**) ; अकाम. **शेत**, **खेत** (तद्भव).]

क्षेप पुं. झेंप, टाकणें, फेंकणें. A jump, a throw.
[सं. **क्षेप**, √ **क्षिप्** ४ क्षेपे ; पेवाम. **क्षेपनिक्षेप** (मा. ब. ८८ पेद. १-५५).]

क्षेम न. कुशल, कल्याण, सुख. Welfare, happiness.
[सं. **क्षेमन्**.]

क्षेव(णें) सक्रि. लावणें. To sow, to plant.
[सं. **क्षिप्**, **क्षेप्** ; याकाम. **क्षेव** (२१५ पू. ६४).]

क्षेवीं अ. तत्क्षणीं, लागलींच. Immediately.
[सं. **क्षेप**; याकाम. **क्षेवीं** (ज्ञाप्र. ६६), **खेवो** (ज्ञा.).]
प्रथम ज्ञान होत क्षेवी । ईश्वर मायबाप गोंसावी ॥ ज्ञाप्र. ६६

क्षोभ पुं. संताप, राग, खळबळ. Agitation, commotion.
[सं. **क्षोभ**, √ **क्षुभ्** ; याकाम. **क्षोभ** (= अनुराग. शिशु. ५७४), **क्षोभणें** (क्षोमे अनंगू जिये), **क्षुब्ध**.]

क्षोणी स्त्री. पृथ्वी. The earth.
[सं. **क्षोणी**, √ **क्षुद्** (?) ; याकाम. **क्षोणी** (ज्ञा. १२-१२).]

क्षोद पुं. पूड, पीठ, चूर्ण. Powder.
[सं. **क्षुद्**.]

क्षौर न. हजामत, श्मश्रू. Shaving.
[सं. **क्षुर** = वस्तरा ; अकाम. **खौर**.]

क्ष्वेड न. वीष. Poison.

ज्ञ पुं. मराठी वर्णमालेंतील छत्तिसावें व्यंजन. Thirty-sixth consonant in the *Marathi* alphabet.
[संस्कृत प्राकृत **ज्** + **ञ्** , **द्** + **न्** + **य्** इत्यादि मिश्रणानें सिद्ध होतें.]

ज्ञप्त वि. जाणलेलें. Known, understood.
[सं. **ज्ञा**, **ज्ञप्** ; अकामसा. **ज्ञप्ति** = ज्ञान, बुद्धि.]

ज्ञात वि. माहीत, जाणलेलें. Known.
[सं. **ज्ञा**.]

ज्ञाति स्त्री. जात. A caste.
[सं. **ज्ञाति**.]

ज्ञान न. माहिती, बुद्धि, विद्या. Knowledge.
[सं. **ज्ञा**, **ज्ञान**, निष्ठा–**ज्ञात** ; **ज्ञापक** = चिह्न, **ज्ञेय** जाणण्यासारखें,–योग्य.]

ज्ञानेंद्रिय न. त्वक्, नेत्र, कर्ण, जिव्हा, नासिका इत्यादींपैकीं ज्ञान करून देणारें इंद्रिय. A sense.
[सं. **ज्ञान**, √ **ज्ञा** ; + **इंद्रिय**, √ **इन्द्**.]

ज्ञापक वि. ज्ञान करून देणारा, चिन्ह. An indicating sign.

ज्ञापवि(णें) सक्रि. माहिती करून देणें. To acquaint.
[सं. **ज्ञा**, **ज्ञप्** (णिच्), **ज्ञापय**.]

ज्ञेय वि. जाणण्यासारखें, समजण्यासयोग्य. Fit to be known or understood.
[सं. **ज्ञा**.]

ओ३म्
पुस्तक संख्या ९ब/२

पञ्जिका संख्या २८४८८

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।